ाण हें एकदम एकाच वेळीं प्रकट न होतां तें भिन्न भिन्न काळीं तेवीस वर्षांच्या अवधींत अंशत: अंशत: प्रकट झालें आहे, म्हणून

गांत एकच र पुन्हां पुन्हां ां आला?

प्रसंगविशेषीं त्यांतील महावाक्यांची पुनरुक्तिहि झालेली आहे. परंतु ही द्विरुक्ति वाचकांस कंटाळा आणीत नाहीं. कारण मूळ कुराणाच्या अरबी भाषासरणींत एका विशिष्ठ प्रकारचें वैचित्र्य ती इतकी रसभरीत आहे कीं वाचकांचें मन त्यांतच तन्मय होतें; व मनावर फारच गंभीर व बोधपर परिणाम घडतो. कुराणांत पूर्वापरविरुद्ध अशीं नाहींत. तथापि वर वर पाहणारांस असा भ्रम होण्याचा संभव आहे. कुराणाचीं कित्येक महावाक्यें दुसऱ्या कित्येक महावाक्यांचें स्पष्टीकरण याला पूर्वापर विरोध समजणें अगदींच चुकीचें आहे.

ते

व

स

ऐतिहासिक महत्वाच्या गोष्टीहि बऱ्याच आलेल्या आहेत. त्यांतील मननपूर्वक परिशीलन करणाऱ्यांच्या सहज लक्षांत येतें; व त्यापासून सुपरिणामकारक असे अनेक बोध घेतां येतात. म्हणून अशा पुस्तकास कादंबरी वा बखरी प्रमाणें घाई-घाईनें न वाचतां फारच शांत मनानें व विचारपूर्वक वाचिलें तरच त्याचा कांहीं योग्य उपयोग होईल. खऱ्या व यथार्थ इतिहासाच्या विचारी मनुष्यांचे अंगीं खरें व उपयुक्त शहाणपण प्राप्त होतें हें सर्व ाहे. म्हणून परमपवित्र व सर्वशक्तिमान परमेश्वरानें अशा प्रकारचे ल्लेख करून ह्या अपूर्व व महनीय ग्रंथाद्वारें आम्हां मानवांत एक नवीन त्पन्न केलें व मनुष्यजन्मसार्थक्याचें एक उत्कृष्ठ वळण लावून दिलें आहे.

'इस्लाम' या अरबी शब्दाचा अर्थ ईश्वराज्ञापालन असा होतो; आणि आज्ञापालकास 'मुसलमान' ही संज्ञा आहे; तर जगांत जितके ईश्वरप्रणीत

णांत जो ी प्रतिपादिला वा नव्हे; तर द्ध धर्मांचेच सत्यमूलक ा आहे.

धर्म होऊन गेले त्या सर्वांच्या बुडाशीं 'इस्लाम'–ईश्वराज्ञा-पालन हें असलेंच पाहिजे. जगाच्या उत्पत्तीपासून आज-पर्यंत कोणतेंहि धर्मपुस्तक घ्या–मग ते वेद असोत किंवा बायबल वा झंदावस्था असो–त्यांत ईश्वराज्ञापालन हें आहेच. म्हणून परमेश्वरानें कुराणांत म्हटलें आहे कीं '**परमेश्वरापाशीं (मूळचा सत्य) धर्म (म्हटला) तर केवळ इस्लामच** हा. कुराण अ. ३:१९). **आणि जो कोणी इस्लामाखेरीज (आणखी)**

**एखादा धर्म शोधूं पाहील, तर (परमेश्वरापाशीं) त्याचा तो धर्म मान्य केला जाणार नाहीं; व तो परलोकीं हानि भोगणारांपैकं** (कुराण अ. ३:८५). ह्मणूनच परमेश्वरानें सांगितलें आहे कीं **शंका नाहीं कीं बुद्धिमानासाठीं या लोकांच्या वृत्तांतांत एक धडा होय. हें कुराण एखादी (नवीन) रचिलेली गोष्ट तर नव्हे जीं (दिव्य पुस्तकें) याच्या(प्रकटीकरणा)पूर्वीं (उपलब्ध) होत तें सत्यत्व पटवितें. आणि यांत, जे लोक विश्वास त्यांच्यासाठीं प्रत्येक गोष्टींचा तपशील, व सद्बोध व दया है** (कुराण अ. १२:१११).

**कुराण व सायन्स-पदार्थविज्ञान वगैरे आधुनिक शास्त्रें.**

जगांत आजतागाईत जे शास्त्रीय शोध झाले व होत आहेत ज्यांना ज्यांना आहे त्यांनीं कुराणाचीं तत्वें ह्या शास्त्रीय तत्वांशीं व त्यांना हें सिद्ध झालें कीं त्यांच्या दर्म्यान नाहीं. मनुष्य जातीची संस्कृति व उन्नति ह मूळ हेतु तो कुराणाद्वारें उत्तम प्रकारें सिद्धी आणि आचारविचारासंबंधीं सर्व अडचणी सहज दूर होतात; म्हणूनच अध्यात्महि व्यवहार्य व सुलभ असून संसारांत वावरूनहि त्यायोगें सफल करितां येतें; व सहजगत्या मोक्ष प्राप्त होतो. कुराणांतील तत्वें इतकीं ठाम व निर्विघ्न आहेत कीं त्याच्या प्रकटीकरणाच्या जगांत जिकडे तिकडे जो धर्मविषयक गोंधळ व अव्यवस्था माजली यानें दूर झाली; आणि आजहि लोकांत ज्या समाजविघातक व नि व चालीरीति पसरल्या आहेत, उदाहरणार्थ मद्यपान, जातिभेद, पुनर्लग्नि या गोष्टींचें निर्मूलन करण्यास कुराणाचीं तत्वें समर्थ असून त्यांचें मुसलमानेतर जातीकडूनहि अनुकरण होत चाललें आहे. यूरोपियन व लोकांच्या धर्मशास्त्रांत या गोष्टींची मनाई नसतांहि त्यांना पुष्कळ वर्षांच्या नंतर मानवहितास विघातक अशा या चालींचा दिवसेंदिवस वीट येत आहे व ते त्यांचा प्रतिज्ञापूर्वक त्याग करूं लागले आहेत; व पुढें त्यांच्या ज्ञानांत व विवेचक बुद्धींत प्रगति व उन्नति होत जाईल तस निंद्य चालीरीतिचा वीमोड होत जाईल. यावरून हेंहि सिद्ध कुराण ईश्वरप्रणीत आहे म्हणून त्याचीं तत्वें त्रिकालाबाधित व अशींच आहेत.

हजरत **मोहंमद** पैगंबर साहेब–परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो-यांच्या हातून इतके बहुत चमत्कार घडले आहेत कीं ते येथें दिल्यास एक निराळेंच पुस्तक बनेल. या शिवाय हे चमत्कार जरी तत्कालीन लोकांनीं आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिले व ते इतिहाससिद्धहि आहेत तरी ज्या लोकांच्या स्वभावांत वितंडवाद आहे ते आज म्हणतील कीं आम्हीं तर हे चमत्कार पाहिले नाहींत व ते आम्हीं मानीतहि नाहीं, हें संभवित आहे. म्हणून सर्व प्रकारच्या लोकांस कुराणाचें प्रामाण्य पटविण्यासाठीं परमेश्वरानें यालाच एक जागती ज्योत व स्वतःसिद्ध चमत्कृति करून पाठविलें; कारण, ज्या काळीं कुराण प्रकट झालें तत्कालीन व तद्देशीय लोक मोठ्या अभिमानानें आपणाला 'अरब' म्हणजे वक्ते व इतरांना 'अजम' म्हणजे मुके अशी संज्ञा देत असत, आणि त्या वेळेचें अरबी वाङ्मय इतक्या पूर्णावस्थेस पोहोचलें होतें कीं त्यांचा हा अभिमानहि व्यर्थ नव्हता. अशा वेळीं हजरत **मोहंमद** पैगंबरासारखा एक अगदींच निरक्षर भविष्यवादी निर्माण होणें व त्याला याच नीतिपर भारदस्त व भव्य अशा अरबी भाषासरणीचें अप्रतिम व अद्भुत असें वक्तृत्वपूर्ण कुराण प्रकट होणें म्हणजे कांहीं लहानसहान चमत्कार नव्हे; तर परमेश्वरानें त्याच्या संबंधानें संयश करणाऱ्यांस व त्याला पाखंड म्हणणाऱ्यांस खुद्द कुराणांतच अनेक जागीं स्पष्टपणें असें अव्हान केलें आहे कीं ह्या सारखाच एक अध्याय तुह्मीं मानव-लोकहि रचून आणा (पाहा कुराण अ. २: २२–२३ आणि अध्याय १०:३७–३९ वगैरे). परंतु अरबी वाङ्मयाच्या त्या उत्कर्षाच्या वेळेपासून आज १३३४ वर्षें झालीं मोठ-मोठाल्या विरोधी विद्वानांनीं जिवापाड प्रयत्न केले असतांहि कोणीही हें ईश्वरी अव्हान खोटें पाडूं शकला नाहीं व शकणारहि नाहीं. जगांत कोणत्याहि पुस्त-कांनें असें अव्हान केलेलें नाहीं; आणि बायबलाच्या हिब्रू व वेदांच्या संस्कृत भाषे प्रमाणें कुराणाची अरबी भाषा मृत कोटींतली नव्हे; तर ती प्रचलित असून अनेक देशांत बोलली व लिहिली जाते; म्हणून हें अव्हान खोटें पाडण्यासहि जागा होती. यास्तव कुराण हें ईश्वर प्रणीत आहे असे मानण्यास किंचितहि हरकत दिसत नाहीं.

**चमत्कार व भविष्यवाद**

शिवाय कुराणांत जीं भविष्य वचनें आलीं आहेत तीं आजपर्यंत तंतोतंत खरीं झालीं, व पुढेंहि खरीं ठरतील यांत शंका नाहीं. या संबंधानें मीं टीकेंत जागजागीं इशारत दिली आहे.

कुराण हें हजरत मोहंमद पैगंबरांना प्रकट झालें आहे. परंतु त्यांतील कित्येक गोष्टी जरी हजरत पैगंबरांस अनुलक्षून सांगितल्या आहेत तरी त्यांचा उद्देश त्यांच्याद्वारें इतर

**कुराण व हजरत मोहंमद पैगंबर साहेब**

मानवांस बोध करण्याचा असतो. उदाहरणार्थ आईबापांसंबधानें ईश्वरी आज्ञा (पाहा कुराण अ. १७: २३–२५) इचा कटाक्ष हजरत पैगंबराकडे आहे असें समजणें अगदींच वेडगळपणाचें होय. कारण हें महावाक्य प्रकट झालें त्याच्या आधींच म्हणजे पैगंबर साहेबांच्या बाल्यावस्थेंतच त्यांचे आईबाप निवर्तले होते. अशींच इतरहि वाक्यें आहेत. तीं सर्वच येथें देऊन वाचकांचा वेळ दवडणें इष्ट नाहीं. तथापि पैगंबर साहेबांनीं स्वतःहि ह्या पवित्र कुराणाप्रमाणें अक्षरशः आचरण करून आम्हां मानवांस एक उत्कृष्ट कित्ता घालून दिला आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये.

कुराणापूर्वी अखिल जगांत जितके म्हणून पैगंबर वा ऋषि आले ते सर्व ईश्वरप्रेषित असून मानवउद्धारासाठीं आले होते व जीं जीं पुस्तकें त्यांना भिन्न

**कुराण हें विश्वधर्म प्रतिपादितें व तें अखिल जगासाठीं आहे.**

भिन्न काळीं प्रकट झालीं तीं खरीं असून त्यांत एकाच परमेश्वराची उपासना प्रतिपाद्य होती. (पहा कुराण अ. २:२८५). पैगंबर साहेबांच्या एका वचना प्रमाणें हे पैगंबर २ लक्ष २४ हजार व दुसऱ्या वचन–संग्रहांत १ लक्ष २४ हजार असे होऊन गेले आहेत. परंतु कुराणाखेरीज इतर पुस्तकांचें प्रकटीकरण सुरक्षित राहण्यास साधनें नव्हतीं व त्यांत बरीच ढवळाढवळहि झालेली आहे, यास प्रमाण हें कीं त्यांत एकाच परमेश्वराची उपासना हा जो प्रतिपाद्य विषय तो स्पष्टपणें सांगितलेला नसून अनेक वस्तू व विभूतींची उपासना आढळून येते. म्हणून इतर पुस्तकांचें अक्षरशः अनुकरण करणें जरी सुरक्षित नाहीं, तरी पुस्तकां बद्दल व त्यांच्या पैगंबरांबद्दल पूज्यबुद्धि बाळगणें हें कुराणास मानणाऱ्यांचें कर्तव्यकर्म आहे. (कुराण अ. २:१३६ पाहा.) ज्या अर्थी कुराणांत सर्व धर्मांचें सार आहे व त्याचें प्रकटीकरणहि सुरक्षित आहे (कुराण अ. १५:९), त्या अर्थीं कुराणाचें अनुकरण करणें हेंच बिनधोक होय. हजरत मोहंमद पैगंबर साहेबांचें आगमन सर्व जगासाठीं झालेलें आहे. म्हणूनच परमेश्वरानें त्यांस उद्देशून कुराणांत **('हे पैगंबरा!) आम्हीं तुला सकल जगांच्या लोकांसाठीं केवळ (मूर्त) दया करून पाठविलें आहे.'** असें प्रतिपादिलें आहे. कुराणांत जातीद्वेष नाहीं. त्यावर कोणाहि ए‹ विशिष्ट जनसमुहाची एकतंत्री सत्ता नाहीं. कुराणांचें अनुकरण ज्याला पाहि त्याला करतां येतें. कुराणाचें विश्वबंधुत्व इतकें मोठें व व्यापक आहे कीं त्य

दाखल होतांच कोणत्याहि प्रकारचा जातिभेद न बाळगतां कुराणाप्रमाणें आचरण राखणारांस मुसलमानी समाजांत सख्या बंधु प्रमाणें वावरतां येतें, व जगांतील इतर समाजाचे उलट त्यांस रोटी व बेटी व्यवहारासहि अंतरावें लागत नाहीं. त्यांत अंत्यजोद्धारासाठीं नवीन समाज किंवा मंडळ यांची स्थापना करण्याची अपेक्षा नसून पहिल्या पासूनच त्यांच्या उद्धाराकरितां मार्ग खुला करून ठेवलेलाच आहे.

**कुराण व प्रवृत्तिमार्ग**

कुराणांत जागजागीं प्रवृत्तिमार्गच प्रतिपादिलेला आहे; म्हणून शब्दांची व वाक्यांची ओढाताण करून बायबल व गीता वगैरे पुस्तकें ज्यांची भिस्त निवृत्तिमार्गावरच आहे त्यांजप्रमाणें याला प्रवृत्तिपर सिद्ध-करण्याचा खटाटोप करण्याचें कारण नाहीं. कुराणावरून निवृत्तिमार्गाचाहि बोध होतो; परंतु तो ज्या लोकांस वैराग्य प्राप्त होतें अशा विशिष्ट वर्गाच्या लोकांसाठींच होय. या लोकांसहि कर्मे केव्हांहि सुटत नाहीं. पण वैराग्य प्राप्त झाल्यावर त्यांची कर्मे निष्काम होतात हें मात्र खास. शिवाय कर्म प्रवृत्तिपर असो किंवा निवृत्तिपर असो त्यांत ईश्वरार्पण करण्याची निर्मल बुद्धि त्याच्या बुडाशीं असलीच पाहिजे, हाहि कुराणाचा मुख्य उद्देश आहे. कारण, मुसलमान लोक जीं जीं शास्त्रविहित कर्मे करितात त्यांत ईश्वराज्ञाधीनता-इस्लाम-याची जोड असल्या शिवाय तीं कर्मे मान्य होत नाहींत.

**क्षमायाचना.**

कुराणाची जाहिरात बाहेर पडून बराच काळ लोटला; पण पुरेशा द्रव्यनिधीच्या अभावामुळें हें काम निरुपायास्तव लांबणीवर टाकणें भाग पडलें व वाचक वर्गास फार दिवस वाट पाहत राहावें लागलें; या बद्दल ते मला क्षमा करतील अशी आशा आहे.

**हि. हा. निझाम सरकारचे आभार.**

तथापि माझें व वाचकांचें हें मोठेंच सुदैव कीं हिज हायनेस आसिफजाह मुझफ्फरुलममालिक रुस्तमेदौरान अरस्तुएजमान निझामुल्मुल्क निझामुद्दौला नव्वाब मीर उस्मान अलीखान बहादुर फत्हेजंग यांनीं उदार राजाश्रय देऊन हें सत्कार्य तडीस नेण्यास अमौल्य मदत केली व हा दिव्य ग्रंथ वाचकांपुढें अत्यादरानें ठेवण्यास मीं भाग्यशाली झालों; म्हणून याचें सर्व श्रेय त्यांनाच योग्य आहे. त्यांच्या या अभिनंदनीय व प्रशंसनीय सत्कार्याबद्दल त्यांचे जितके आभार मानावेत तितके थोडेच होतील. शेवटीं माझी हीच प्रार्थना आहे कीं उदारधि व

गुणग्राहक अशा ह्या सिंहासनाधिपतींस व त्यांच्या संततीस अशींच सुकृत्यें करण्यास ईश्वर उदंड आयुष्य देवो! व त्यांचें राज्य अखंड व चिरकाल चालवो! तथास्तु.

परमस्तुत्य परमेश्वरानें या कलियुगाचे महान प्रेषित श्रीमन्**मोहंमद**--सल्लाहो अलैहे व सल्लम—परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो—यांस उद्देशून आज्ञापिलें

**मुसलमान बंधूंस विनंति.**

आहे कीं **'हे पैगंबरा! जे (हुकूम) तुला तुझ्या पालनकर्त्यांकडून सादर झाले आहेत ते तूं (जशाचे तसेच लोकांना) पोहोंचवून दे'** वगैरे (पाहा कुराण अ. ५:६७) तर ही ज्ञानदानाची आज्ञा हजरत पैगंबर साहेबांद्वारें आम्हां विश्वासूंसहि केली गेली आहे. परंतु कुराण निव्वळ अरबी भाषेंत असल्यामुळें, इतर भाषांत त्याचें भाषांतर झाल्याशिवाय हा संदेश पोहोंचविण्यास दुसरा मार्गच नाहीं. शिवाय फार्शी, उर्दू, इंग्रजी, फ्रेंच, वगैरे भाषांत याचीं भाषांतरें झालीं आहेत; म्हणून मराठींतहि भाषांतर करून मी हा ज्ञानयज्ञ केला आहे. यास्तव मुसलमान बंधू सहानुभूतिपूर्वक माझ्या या अल्प सेवेंत समभागी होऊन या सत्कार्यास हातभार लावतील अशा पूर्ण आशेनें प्रमोदकपूर्वक मी हें पहिलें मराठी भाषांतर त्यांच्या हवालीं करितों. शेवटीं परमेश्वरापाशीं एवढीच प्रार्थना आहे कीं माझे हे नम्र प्रयत्न त्याच्या सेवेंत मान्य होवोत व तो मला व सर्व भक्तांस प्रसन्न होवो! आमीन! आमीन!! आमीन!!!

**मुंबई.**

ता. २५ जमादिल् आखर हि. स. १३३४

**मीर मोहंमद याकूब खान.**

# पवित्र कुराण.

## भाग पहिला–सूरा (अध्याय) १ ला.

## सूरतुल्–फातेहा.

सूरतुल्–फातेहा ह्मणजे मूळ अध्याय हा हजरत मोहंमद पैगंबर साहेब (सल्लल्ला हो अलैहेव सल्लम-परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो.) यांना मक्का शहरीं प्रकट झाला. ह्यांत ७ आयात (महा वाक्यें) आहेत. फातेहा ह्मणजे प्रारंभ, मूळ कुर्‌आनाची सुरुवात याच अध्यायानें होते ह्मणून याला उम्मुल्कुर्‌आन म्हणतात. शिवाय अल्-हम्‌द म्हणजे स्तुति–स्तोत्र, सब् उल्-मसानी ह्मणजे ज्या सात आयात नमाजींत दोनदां वाचिल्या जातात अगर ज्या दोनदां प्रकट झाल्या आहेत त्या–एकदां मक्केंत जेव्हां नमाज पढणें फर्ज म्हणजे अवश्य कर्तव्य ठरलें तेव्हां; व एकदां मदिनेंत जेव्हां किब्ला म्हणजे नमाजीची दिशा बदलली तेव्हां, सुरतु-श्शफा सूरतु-स्सलात वगैरे, अशीं आणखींही ह्याचीं नांवें आहेत. (पहा तफ्सीरे बैज़ावी व तफसीरे रहमानी).

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों). १.**

---

(१) ह्या पुढील पहिल्या चार वाक्यांत परमेश्वरानें आपलें शुभ नांव कसें घेतलें जावें व आपली यथायोग्य स्तुति कशी व्हावी याविषयीं आपल्या पैगंबराद्वारें मनुष्यास शिक्षण दिलें आहे; ह्मणूनच 'तुह्मी असें ह्मणा' हे शब्द सुरुवातीपूर्वी येथें अवगत आहेत. हे पहिलें वाक्य प्रत्येक सत्कर्माच्या आरंभीं शुभकारक ह्मणून बोललें जातें. ह्यांत 'रहमान' व 'रहीम' हे दोन्ही शब्द एकाच धातूचे आहेत; परंतु रहमान ह्मणजे परम दयाळू–जो ह्या जगांत सर्वांवर दया करणारा तो, व रहीम ह्मणजे परम कृपाळू–जो त्याला एक मानणाऱ्यांवरच पुढील जगांत कृपा करणारा तो,–असा जो एकच परमेश्वर आहे त्याच्या नांवानें आरंभ करणें येथें सुचविलें आहे.

**सर्व स्तुति, सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच (योग्य) होय. २. (तो) परम दयाळू (आणि) कृपाळू (आहे). ३. (तो) (शेवटच्या) निर्णयाच्या दिवसाचा धनी (आहे). ४. (हे परमेश्वरा)**

---

(१) सर्व स्तुति ह्मणजे ती कोणत्याही कारणानें, कोणाहीकडून कोणाचीही व केव्हांही झाली तर तिची योग्यता परमेश्वराखेरीज इतर कोणालाही नाहीं. कारण जें जें हित आणि देणग्या मनुष्यास प्राप्त होतात त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दाता परमेश्वरच होय.

(२) सकल जगांचा पालनकर्ता—जग अरबी भाषेंत आलम होय. ज्या ज्या वस्तुवर्गाच्या अवलोकनानें जगत्कर्त्याचें ज्ञान होतें त्या सर्व, आलमीन या शब्दांत मोडतात. पालनकर्ता याला अरबी शब्द 'रब' आहे. त्याचा मूळ अर्थ कोणत्याही वस्तूस हळुहळू तिच्या पूर्णावस्थेस आणणारा असा होतो. तर रब ह्मणजे सर्वांचा स्वतंत्रपणें निर्माणकर्ता व प्रत्येक अवस्थेंत पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच सर्व स्तुति योग्य होय. पालनकर्ता या नामाद्वारें परमेश्वरानें आपल्या सर्व सृष्टीशीं आपला प्रेममय संबंध दर्शविला आहे; त्यास प्रमाण पुढील वाक्य आहे.

(३) 'तो परम दयाळू (आणि) कृपाळू आहे.' त्याची परम दया ही कीं तो सर्वांस ह्या जगांत निर्माण करितो व त्याला कोणी मानो अगर न मानो तरी देखील तो त्यांचें पालन पोषण करितो. त्याची परम कृपा ही कीं जे लोक त्याला श्रद्धापूर्वक मानतात व त्याच्या हुकुमाप्रमाणें वागतात त्यांना तो जाति व वर्णांचा भेद न पाळतां कारण—जो कोणी परमेश्वराच्या मर्जीच्या व हुकमाच्या आधीन असतो तोच त्याच्यापाशीं उच्च जातीचा होय—परलोकीं प्रत्येकाच्या कर्मांच्या योग्यतेप्रमाणें अतोनात कल्याण व सुख देईल.

(४) कारण 'तो शेवटच्या निर्णयाच्या दिवसाचा धनी आहे.' ज्या दिवशीं सृष्टिप्रलय होऊन मेलेले लोक पुन्हां जीवंत करून उठविले जातील व प्रत्येकाच्या कर्मांचा निवाडा होऊन जशास तसें फळ मिळेल, म्हणजे सुकृत्यें करणारांस स्वर्ग हें वतन इनाम मिळेल आणि कुकर्मे करणारांस शिक्षेदाखल नरकवास प्राप्त होईल त्या दिवसाला अरबींत कियामतचा दिवस व मराठींत पुनरुत्थानाचा दिवस ह्मणतात. त्याचें सविस्तर व सप्रमाण वर्णन पुढें कुर्आनांत अनेक जागीं आलें आहे तें वाचून पहा.

**तुझीच आम्हीं भक्ति करित आहों; व तुझीच आम्हीं मदत मागत आहों. ५. तूं आह्मांस सरळ मार्ग दाखीव. ६. (ह्मणजे) ज्या (लोकां) वर त्वां कृपा केली आहेस त्यांचा मार्ग (दाखीव.) पण ज्यांच्यावर**

---

(१) आमचा निर्माणकर्ता, पालनकर्ता व शेवटच्या निर्णयाचा मालक, परमेश्वरच ठरतो म्हणून भक्तीस पात्रही केवळ तोच आहे; आणि आमची उत्पत्ति, रक्षण व तारण ज्याच्या हातीं आहे असा जो सर्वशक्तिमान परमेश्वर त्याचीच मदत मागणें योग्य आहे. सबब परमेश्वरानें ह्या वाक्यांत, भक्ति, ज्यांत धार्मिक व नैतिक कर्मांचा समावेश होतो, आणि मदत, जी व्यवहारिक व सामाजिक वगैरे कर्मांस लागू असते त्या दोहोंचें स्वामित्व आपणासच आहे असें सिद्ध केलें; म्हणूनच कायावाचामनेंकरून त्याला एकच जाणून पुढील प्रार्थना करण्यास शिकविलें:–'हे परमेश्वरा, तुझाच आम्हीं भक्ति करितों व तुझीच आम्हीं मदत मागतों.'

(२) ह्या करारावर कायम राहणें, मनुष्यांत देवगुणापेक्षां पशुगुण विशेष प्रबल असून त्याला मायामय मनोविकारांचा झोंका कसल्या आडरानांत वाहून नेईल त्याचा नेम नाहीं म्हणून, फार कठीण असतें. सबब परमेश्वरानें आपल्या अपार कृपेनें ही प्रार्थना शिकवून आम्हां मनुष्यांवर महदुपकार केले:–'तूं आम्हांस सरळ मार्ग दाखीव.' सरळ मार्ग हा शब्द, कुर्आनांत जेथें आला आहे तेथें त्याचा अर्थ इस्लामधर्म असा आहे; व इस्लाम या शब्दाचा अर्थ, परमेश्वराच्या मर्जीच्या व हुकमाच्या आधीन होणें असा होतो. या व्याख्ये प्रमाणें सर्व मनुष्य मात्राचा धर्म सृष्टीचे आरंभापासून नेहमीं इस्लामच होय. त्याप्रमाणें चालून वेडेंवांकडें जाण्याची भीति रहात नाहीं.

(३) कारण, "ज्या लोकांवर त्वां कृपा केली आहेस त्यांचा मार्ग (दाखीव)." ह्या तपशीलवार वर्णनावरून असें ठरतें कीं, ज्या लोकांवर परमेश्वरानें कृपा केली आहे तेच सरळ मार्गावर आहेत; कां तर, त्याच्या उद्दिष्ट मार्गावर चालल्याशिवाय त्याच्या कृपेस पात्र होणें शक्य नव्हे. ह्मणूनच पैगंबर लोक व त्यांचे अनुयायी–सात्विक लोक, धर्मार्थ प्राणास मुकणारे [शहीद] आणि सद्गुणी लोक–यांनीं आपापल्या वेळीं पूर्वी निरनिराळ्या पैगंबरांद्वारें व शेवटीं हजरत **मोहंमद** पैगंबराद्वारें प्रकट झालेल्या त्याच एका इस्लाम धर्माप्रमाणें वागून ईश्वरकृपा संपादिली.

**(तुझा) कोप झालेला आहे त्यांचा (मार्ग) नको आणि आडमार्गी भटकणाऱ्यांचाही नको. ७. तथास्तु.**

---

(१) पण ज्या वेळीं हजरत मोहंमद (सल्लल्लाहो अलैहेवसल्लम्–परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो.) ह्या जगांत आले त्या वेळीं अज्ञानरूपी अंधकार सर्वत्र पसरला होता व यहुदी व खिस्ती लोक ह्यांच्यापाशीं ईश्वरी पुस्तक असतांनाही गैरमार्गी झाले होते. तसेंच जगांत इतरत्रही लोक ईश्वरी राजमार्गापासून अगदीं अलिप्तच होते. ह्मणून परमेश्वरानें प्रार्थनेंत असें ह्मणण्यास शिकविलें:—"पण ज्यांच्यावर [तुझा] कोप झालेला आहे त्यांचा मार्ग [नको]." कोप हा एक मनोविकार असल्यामुळें परमेश्वरासंबंधी बोलतांना त्याचा यथाशब्द अर्थ न घेतां, कोपाचा परिणाम जी शिक्षा ती समजली जाते. जे लोक जगप्रपंचांत फार कुशल असून ईश्वर इच्छित धर्माची सत्यता जाणून बुजून सुद्धां त्याप्रमाणें आचरण्याची व आपल्या जन्माचें सार्थक करून घेण्याची त्यांना सुबुद्धि प्राप्त न होणें हा ईश्वरी कोपाचाच परिणाम होय. तर यहुदी लोक आपल्या तोरात ह्मणजे जुन्या करारांत, खिस्ति लोक अनेक ठिकाणीं त्यांच्या बाईबलांत व मुख्यत्वें करून स्पष्टपणें बार्नेबसच्या गॉस्पेलांत,—हें पुस्तक लपविण्याचे प्रयत्न झाले असतांही तें लंडन, लेडन व रोम वगैरे जागीं मिळणें शक्य आहे—व पारशी वगैरे इतर लोकांनीं आपापल्या धर्मग्रंथांत, हजरत मोहंमद पैगंबरांच्या आगमनाविषयीं ज्या पूर्व सूचना आहेत त्या लपविल्या अगर द्वेषानें त्यांचा भलताच अर्थ केला त्यास अनुलक्षून हें वाक्य प्रकट झालें.

(२) 'आणि आडमार्गी भटकणाऱ्यांचाही नको;' ह्मणजे मार्ग नको. कारण यहुदी, हजरत ओझैर पैगंबर अलै हिस्सलाम त्यांस शांति असो–यांस परमेश्वराचा पुत्र समजत होते व खिस्ति हजरत ईसा (येशू) पैगंबर अलै हिस्सलाम–त्यांस शांति असो–यांस परमेश्वराचा पुत्र अथवा प्रत्यक्ष परमेश्वर समजत होते. तसेंच इतर लोक पण ह्या जगांतील नाशिवंत, बुद्धिशून्य व बलहीन वस्तूंची पूजा अर्चा करीत होते त्यास उद्देशून प्रार्थनेचा हा शेवटचा भाग आहे. 'आमीन' या हिब्रु शब्दाचा अर्थ, मीं, तथास्तु ह्मणजे तसेंच होवो, असा केला आहे. हा शब्द प्रार्थनेच्या शेवटीं उच्चारण्याचा परिपाठ आहे.

# अध्याय २ रा.

## सूरतुल्-बकरः

हा अध्याय हजरत मोहंमद पैगंबर (परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो) यांस मदिना शहरीं प्रकट झाला. ह्यांत २८६ आयात (महा वाक्यें) आहेत. याचें हें नांव ६७ ते ७३ व्या वाक्यांतल्या बकरः या शब्दावरून प्रसिद्ध झालें. (पहा त्या वाक्यांवरील टीपा).

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**अ. ल. म. (अलिफ–लाम–मीम.) १. हें (असें) पुस्तक (होय कीं) त्या (च्या ईश्वरवाणी होण्यां)त कसलाच संशय नाहीं. (तें परमेश्वराला) भिऊनें चालणाऱ्यांस सन्मार्गदर्शक (होय). २. (ह्मणजे) जे**

(१) अरबी मूळाक्षरांपैकीं असलीं कांहीं कांहीं अक्षरें कित्येक अध्यायांच्या प्रारंभीं आलीं आहेत. त्यांना हुरूफे-मुकत्तेआत म्हणजे तुटक अक्षरें म्हणतात. त्यांचा गूढार्थ समजाविण्यासाठीं विद्वानांनीं प्रयत्न केले आहेत व आपापलीं सयुक्तिक व समर्पक मतें प्रदर्शित केलीं आहेत. उदाहरणार्थ: 'अलिफ' अल्लाह साठीं, व 'लाम,' जिब्रईल–पवित्र आत्मा–या साठीं, आणि 'मीम' मोहंमद साठीं; म्हणजे परमेश्वरानें जिब्रीलदूता–पवित्र आत्म्या–द्वारें हजरत मोहंमद पैगंबर यांस कुराण प्रकट केलें, वगैरे, वगैरे.

(२) येथें दोन अर्थ संभवित आहेत; म्हणजे जे लोक परमेश्वराला भिऊन चालतात, त्यांस अधिकाधिक सन्मार्ग दिसतो किंवा ज्या लोकांच्या अंगीं परमेश्वराला भिऊन वागण्याची पात्रता आहे, त्यांस सन्मार्गाची सुबुद्धि प्राप्त होते.

लोक (धर्मविषयक) गैबी-इंद्रियातीत-गोष्टींवर विश्वास ठेवितात, व (नित्य) नमाज पढतात आणि जें कांहीं आह्मी त्यांना देऊन ठेविलें आहे त्यांतून (परमार्थांत) खर्च वेंच करितात; ३. आणि (हे पैगंबरा!) जे लोक, तुला जें (पुस्तक) प्रकट करण्यांत आलें आहे त्यावर व तुझ्या पूर्वी जीं (पुस्तकें) प्रकट झालीं आहेत त्यांजवर विश्वास ठेवितात; आणि परलोकींचीही जे (पूर्ण) खातरी बाळगितात: ४. असलेच लोक आपल्या पालनकर्त्याच्या सरळ मार्गावर होत; आणि हेच (अखेर आपल्या मनोरथांत) सफल होतील. ५. (हे पैगंबरा!) ज्या लोकांनीं (इस्लाम स्वीकारण्याचें) नाकारिलें, त्यांना तूं (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखविलेंस काय अगर न दाखविलेंस काय सारखेंच; ते तर विश्वास धरणार नाहींत. ६. परमेश्वरानें त्यांच्या अंतःकरणांवर व त्यांच्या कानांवर मोहर लाविली आहे; व त्यांच्या डोळयांवर पडदा (पडला) आहे, आणि त्यांना (परलोकीं) मोठी शिक्षा (होणें) आहे. ७. आणि लोकांत कोणी कोणी असेही आहेत कीं जे (तोंडून तर) म्हणतात कीं आम्हीं

---

(१) ज्या गोष्टी इंद्रियांच्या आकलनशक्तिपलिकडे आहेत, त्यांस 'गैब' म्हणजे अदृष्ट म्हणतात व त्या अंतर्ज्ञान व बुद्धिनें जाणतां येतात. उदाहरणार्थ: परमेश्वर व त्याचीं गुणविशेषणें, परलोक, नरक व स्वर्ग, वगैरे.

(२) म्हणजे अहो **मोहंमदपैगंबर**! तुह्मांला जें पवित्र कुराण प्रकट झालें आहे त्यावर व तुमच्यापूर्वी ज्या ज्या प्रवक्तयांस व प्रेषितांस जीं जीं पुस्तकें सादर झालीं आहेत त्यांजवर; म्हणजे हजरत **दाऊद**ला **जबूर** (Psalms), हजरत **मोझेज-मूसा**-ला **तौरात** (जुना करार) व हजरत **येशू** (ईसा) ला **इंजील** (नवा करार) वगैरे हीं परमेश्वराकडून होत असा विश्वास ठेविला पाहिजे. कुराणा शिवाय इतर पुस्तकांत लोकांनीं आपल्या मनःकल्पनेनें पुष्कळ ढवळाढवळ व फेरफार करून टाकले आहेत; व म्हणूनच त्यांत एकाच व सर्वशक्तिमान परमेश्वराची उपासना व भक्ति सोडून भलभलत्या वस्तूंची पूजा अर्चा पाहण्यांत येते व मनुष्या सारखा बुद्धिश्रेष्टही त्यापुढें नमतो. यास्तव परमेश्वरानें अस्सल तत्वें जीं त्या दिव्य पुस्तकांत होतीं तीं कुराणांत पुन्हां पुन्हां सांगितलीं आहेत; तर कुराणाप्रमाणें आचरणें हें त्या सर्व पुस्तकां प्रमाणेंच आचरणें दाखल होय. मग तें पुस्तक वेद असो वा बायबल असो.

**परमेश्वर व शेवटला दिवस यांचा विश्वास धरिला आहे; व खरें पाहतां, ते विश्वासू नव्हेत. ८. (हे लोक आपल्या मतें) परमेश्वराला व ज्यांनीं विश्वास धरिला आहे त्यांना ठकवितात; आणि (अर्थात) ते खुद्द आपल्या शिवाय (अन्य) कोणालाच ठकवित नाहींत; व (ही गोष्ट) त्यांना समजत नाहीं. ९. त्यांच्या अंतःकरणांत (आधींच अविश्वासाचा) रोग होता, तशांत आतां (कुराण प्रकट करून) परमेश्वरानें त्यांचा (तो) रोग (आणखीही) वाढविला. आणि त्यांना त्यांच्या लबाड बोलण्याच्या शासनार्थ दुःखदायक शिक्षा (होणें) आहे. १०. आणि जेव्हां त्यांना सांगितलें जातें कीं पृथ्वीवर फिसाद फैलावूं नका, तेव्हां ते ह्मणू लागतात कीं आह्मीं तर (लोकांत) मेळ मिलाफ मात्र करविणारे आहोंत एवढेंच. ११. पहा! ते आपणच फिसादखोर होत; परंतु, (तें) त्यांना**

---

(१) जे लोक लबाडीला आपली कार्यसिद्धि समजतात, एकदांकां त्यांची लबाडी उघडकीस आली, म्हणजे या लोकीं त्यांची फजिती होते व परलोकीं त्यांना शिक्षा होईल ती वेगळीच; म्हणून ते आपल्या स्वत:शिवाय अन्य कोणालाच ठकवित नाहींत, असें होतें.

(२) नास्तिक लोकांच्या मनांत आधींच धर्मावर विश्वास नव्हता, तशांत आतां कोणाचीही भीड न बाळगितां खरी गोष्ट उजेडांत आणणारें कुराण प्रकट झालें, हें पाहून ते मत्सर व द्वेषानें पेटून अगदीं भडकून गेले; आणि आम्हींही मुसलमान आहों असें लबाड बोलून खऱ्या मुसलमानांस धोक्यांत ठेवून त्यांच्यांत फिसाद म्हणजे गैरसमज उत्पन्न करण्यास झटूं लागले. सारांश, गोष्ट तर एकच असते; पण तन्निमित्त कोणी सन्मार्गीं लागतो व कोणी कुमार्गीं लागतो.

(३) लबाड बोलणें म्हणजे मुसलमानांस फसगतींत ठेवण्या साठीं आम्हींही मुसलमान आहों असें ढोंग करून सागणें.

(४) ज्या दांभिक (म्हणजे ढोंगी) लोकांचा या वाक्यांत उल्लेख आहे, त्यांची नांदणूक अशी होती कीं ते मुसलमान व नास्तिक या उभयतांशींही मेळमिलाफ ठेवीत, व ते ज्यांच्याशीं भेटत, त्यांच्यासारखीच गोष्ट करीत असत. तुम्ही एका पक्षाचेच होऊन रहा व दुरोखी गोष्टी करून फिसाद वाढवूं नका, असें त्यांना सल्ला मसलतीनें बोललें असतां ते त्याचा जबाब देत कीं आम्हांला

**कळून येत नाहीं. १२. आणि जेव्हां त्यांना सांगितलें जातें कीं ज्याप्रमाणें (आणखीही) लोकांनीं विश्वास धरिला आहे, त्याप्रमाणें तुम्हींही विश्वास धरा; तेव्हां ते म्हणूं लागतात कीं (इतर) मूर्खांनीं जसा विश्वास धरिला तसा आम्हींही विश्वास धरावा काय? पहा, ते आपणच मूर्ख होत; परंतु त्यांना (ह्या गोष्टीची) जाणिवच होत नाहीं. १३. आणि ज्यांनीं विश्वास धरिला आहे त्यांच्याशीं जेव्हां ते भेटतात, तेव्हां ते ह्मणतातः आह्मींही विश्वास धरिला आहे. आणि जेव्हां ते आपल्या फाजील पुढाऱ्यांकडे एकांतीं जातात, तेव्हां ते ह्मणूं लागतात, आह्मीं तुमच्या सोबतच आहों, आह्मीं कायती (मुसलमानांची) चेष्टा मात्र करित आहों. १४. (ते मुसलमानांची तर काय चेष्टा करतील? पण**

---

फिसादी ठरविणें हें केवळ कुभांड होय. आमचा खास उद्देश हा कीं दोन्ही पक्ष आपापल्या जागीं दबून रहावेत व उघड उघड हातघाईवर येऊं नयेत. परमेश्वरानें त्यांच्या अशा वर्तणुकीचा निषेध करून मुसलमानांस बजाविलें कीं ही त्यांची गैर समजूत आहे, यानें उलट जास्तच वैमनस्य वाढतें. दांभिकांस धर्माशीं कांहीं संबंधच नाहीं. ते तर जगप्रपंचांतच लागलेले असतात. ते हें गूज समजत नाहींत कीं खुशामतीपणाचे वर्तनानें हरेक पक्षास पाठिंबा मिळतो; आणि अशा परिस्थितींत समेट होणेंच अशक्य असतें.

(१) प्रथमारंभीं लोकांची स्थिति सळमिसळीची होती. जसजसे लोक इस्लामांत दाखल होत चालले, तसतसा त्यांचा समाज वेगळा बनत गेला. बहुतेक उघडपणें नास्तिक होते; कित्येक पण थोडकेच उघड उघड मुसलमान होते; आणि कित्येक न धड इकडे न धड तिकडे असे होते. या तिघांतही गोत्रसंबंध व प्रिती कायम होती. जेव्हां कांहीं पक्के मुसलमान गोत्रसंबंध वगैरेनीं प्रेरित होऊन दांभिकास समजावित कीं तुम्हीं दुसऱ्या लोकांप्रमाणें पक्के मुसलमानच कां होत नाहीं? तेव्हां दांभिक त्यांना आपले समजून बिनधडक जबाब देत कीं तुम्हीं तर सारे मूर्ख आहां; तुम्हांस जगप्रपंचाचा विचार नाहीं म्हणून कां आम्हींही मूर्ख व्हावें? त्यांच्या उत्तरादाखल परमेश्वरानें फर्माविलें कीं, ते मुसलमानास मूर्ख समजतात; पण ते आपणच मूर्ख होत. कारण कीं संसाराला धर्मावर श्रेष्ठता देणें व विवेचक बुद्धीचा उपयोग न करणें यांहून आणखी मूर्खपणा तो कोणता असणार?

**खरोखरीं) परमेश्वर यांचीच चेष्टा करितो, व (ह्मणूनच) तो त्यांना ढिली दोरी देतो कीं ते आपल्या शिरजोरींतच भटकत फिरतात १५. हेच लोक होत कीं ज्यांनीं सरळ मार्गाच्या ऐवजीं चुकीचा मार्ग विकत घेतला. पण त्यांचा व्यापार[2]ही फलीभूत झाला नाहीं, व ते सरळ मार्गावरही कायम राहिले नाहींत १६. या (ढोंग्यां) चा दृष्टांतही अशा (मनुष्या) च्या दृष्टांता[3]सारखा होय कीं ज्यानें (लोकांच्या एका समुदायांत रात्रीं)**

---

(१) जशास तसें या न्यायानें परमेश्वर त्यांचें पारिपत्य करितो.

(२) येथें देवघेव व व्यापाराचा मजकुर दृष्टांतरूप आहे. त्याचा अर्थ हा कीं दांभिक लोकांस सरळ मार्ग पत्करावयास पाहिजे होता; पण त्यांनीं खोट्या आशेवर चुकीचा व वांकडातिकडा मार्ग पत्करला. अखेरीस त्यांना आपल्या खोट्या ग्रहाचा दुष्परिणाम भोगावा लागला. हाच व्यापारांतील तोटा होय.

(३) दृष्टांताचें स्पष्टीकरण असें कीं कोणा दांभिकानें लोकांच्या समुदायांत कलेमए–शहादत ह्मणजे परमेश्वरा वांचून अन्य कोणी उपास्य नाहीं व हजरत मोहंमद हे त्याचे पैगंबर वा प्रेषित आहेत,–हे शब्द उच्चारले, ह्मणजे त्यानें एक प्रकारचा अग्निच पेटविला. त्याच्या या कृतिनें आसपासच्या इतर लोकांस उत्तेजन मिळून तेही मनोभावें करून हे दैदिप्यमान शब्द उच्चारून पक्के मुसलमान झाले. तो स्वत:ही दांभिक असल्यामुळें फजित होऊन समाज भ्रष्ट व्हावयाचा, तो बचावला. पुढें त्याची मनोवृत्ति अशी कांहीं झाली कीं त्याला विश्वासाचें तेज दिसेनासें झालें व तो अविश्वासाच्या अंध:कारांतच राहिला. किंवा त्याला मृत्यु येऊन त्याच्या डोळ्यांचें तेज हरवलें व त्यानें दांभिकपणानें उच्चारलेल्या घोषणेचा कांहींच परिणाम झाला नाहीं. पश्चात्ताप करणें त्याला कांहीं उपयुक्त होईल ह्मणावें तर मरणोत्तर पश्चात्ताप करणें ही व्यर्थच; ह्मणून फिरून त्याचें सन्मार्गावर येणें ही शक्य नाहीं. अगर दांभिकानें वरच्या मनानें कां होईना विश्वास व्यक्त केला व आसपासच्या लोकांनीं त्याचा लाभ घेऊन व इस्लाम स्वीकारून आपलें सार्थक करून घेतलें. ढोंगी लोक, जवळ असूनही पाहवत नाहीं असें होऊन आंधळेचे आंधळेच राहिले. हे फक्त आंधळेच असते; तरी आंधळा दुसऱ्या कोणाच्या हाक मारल्यानें अगर

**अग्नि पेटविला. मग जेव्हां त्यानें त्याच्या सभोंवतील वस्तु चकाकूं लागल्या, तेव्हां परमेश्वरानें त्यां (च्या डोळयां) चें तेज हरण केलें व त्यांना अशा अंधःकारांत सोडून दिलें कीं (आतां तेथें) त्यांना कांहींच सुचत नाहीं. १७. (जणो काय) बहिरे, मुके, आंधळे; कीं ते फिरून (कोणत्याच युक्तिनें सन्मार्गाकडे) येऊं शकत नाहींत. १८. अगर (त्यांची स्थिति) आकाशांतून पडणाऱ्या झोडीच्या पावसा सारखी होय; कीं त्यांत (नानातऱ्हेचे) अंधःकार, व मेघगर्जना व वीज हीं असतात; (व लोक) विजेच्या कडाक्यां मुळें मरणाच्या भीतीनें आपलीं बोटें आपल्या कानांत**

---

स्वत: विचारपूस केल्यानें वाटेवर येऊं शकतो. परंतु जो मनुष्य आंधळा असून बोलतही नाहीं व दुसऱ्याचें ऐकतही नाहीं तर त्याची सरळ मार्गावर येण्याची आशाच नको.

( १ ) ह्यांत इस्लाम धर्माला पावसाची उपमा दिली गेली आहे. निःसंशय पाऊस ही परमेश्वराची कृपा होय. पावसानें जशीं शेतें हिरवीं टवटवीत होतात तशींच इस्लामाचा विश्वास धरिल्यानें व त्या प्रमाणें आचरल्यानें मनुष्यांचीं मनें प्रफुल्लित होतात. परंतु त्याच्या बरोबरच अंधःकार, मेघगर्जना व वीज हीं अरिष्टें हीं आहेत, तर इस्लामवर कायम राहणें हें अज्ञानी लोकांच्या अज्ञानपणामुळें येणाऱ्या दुःखास व संकटास तोंड दिल्यावांचून शक्य नाहीं. प्रथमच्या मुसलमानांवर पुष्कळच संकटें ओढवलीं होतीं. त्यांना मूर्तिपूजक व नास्तिकांकडून पुष्कळ छळ सोसावा लागे. पण दांभिकांस पूर्ण विश्वसाच्या अभावीं हा छळ दुःसह होत असे. मुसलमानांस जर कोठें ऐहिक नफा झाला किंवा लढाईत विजय मिळाला, तर या दांभिकांच्या मनांत इस्लाम धर्माविषयीं उत्तम ग्रह उत्पन्न होत असत, परंतु जर त्यांना नुकसान पोहोंचलें अथवा लढाईत पराभव झाला, तर त्या दांभिकांचें मन धर्माकडून डगमगून जाई व त्यांची श्रद्धा कमी होई. तात्पर्य दांभिक हे कधीं धर्मापासून खुष होत व कधीं नाखुष होत असत. अगर हा झोडीचा पाऊस ह्मणजे कुराणाचें प्रकट होणें, अंधःकार ह्मणजे त्यावेळीं जगांत जो नास्तिक भाव होता तो; मेघगर्जना ह्मणजे कुराणांत जे दरडावणीचे वायदे होत ते आणि वीज ह्मणजे कुराणाची स्पष्ट व सुबोध प्रमाणें. तत्कालीन लोक, कुराण ऐकून आपण इस्लाम धर्माकडे

**घुसवून घेतात. आणि परमेश्वर नास्तिकांस घेरून आहे, (कीं त्याच्या आटोक्यांतून ते कोठेंच निसटून जाऊं शकत नाहींत.) १९. हें संभवित आहे कीं वीजें त्यांचे डोळे झपटून नेईल. जों जों वीज त्यांच्या पुढें चमकली, तों तों, ते तिच्या (प्रकाशां) त (कांहीं) चालले. आणि जेव्हां त्यांच्यावर गडद काळोख पसरला, तेव्हां ते उभे (चे उभेच) राहिले. आणि जर परमेश्वर इच्छील तर तो (एरवीं पण) त्यांची श्रवणशक्ति व दृष्टी हरण**

---

झुकून जाऊं व आपला पूर्वींच्या धर्माचा त्याग होईल या भितीनें—कारण पूर्वींचा वेडावाकडा धर्म ही त्याग करणें ह्मणजे त्यांनां मरण आल्या सारखें होई—ह्मणून ते लोक आपलीं बोटें आपल्या कानांत घुसवून घेत; कीं कुराण ऐकूं येणार ही नाहीं व स्वधर्म त्याग ही होणार नाहीं.

(१) अरबींतल्या काफिर या शब्दाचा अर्थ मीं नास्तिक असा केला आहे. कारण जे लोक सत्याचा अपलाप करून असत्याच्या नादीं लागतात किंवा दुसऱ्या शब्दांत, परमेश्वर व त्याच्या आज्ञा हेंच जें सत्य त्यास नाकारितात त्यांना काफिर म्हणतात. मराठींत नास्तिक म्हणजे परमेश्वराचें अस्तित्व मानीत नाहींत ते; तर हजरत पैगंबर साहेब तत्कालीन लोकांस, परमेश्वर एक आहे व कुराण ही त्याची वाणी आहे व त्यांत ईश्वरी आज्ञा आहेत असें समजावून सांगत असत, तरीही ते लोक आपलें तें खरें असा अभिमान बाळगून पैगंबराच्या बोलण्यास म्हणजे ईश्वरी आज्ञांस जुमानीत नसत, म्हणजे ते परमेश्वरालाच मानीत नसत; म्हणून त्यांना नास्तिक ही संज्ञा देण्यांत कांहींच वावगें होणार नाहीं.

(२) वीज ह्मणजे कुराणोक्त प्रमाणें ऐकून त्यांचे डोळे दिपून जात हीं प्रमाणें त्यांच्या बुद्धीस पटलीं ह्मणजे ते त्यांच्या प्रकाशांत चालत व जेव्हां त्यांच्या पूर्वींच्या मतांस विरोधक अशा गोष्टी ऐकून त्यांची मति गुंग होऊन जाई तेव्हां ते जेथल्या तेथेंच उभे राहून जात असत.

(३) 'अणि जर परमेश्वर इच्छील तर तो (एरवीं पण) त्यांची श्रवणशक्ति व दृष्टी हरण करील' या वाक्यांतून असें निष्पन्न होतें कीं परमेश्वरास जशी आंतील इंद्रियांवर सत्ता गाजवितां येते तशी तो बाहेरचीं इंद्रियें, कान व डोळे हीं हि हरण करूं शकतो. अतएव दांभिक कट्टे अविश्वासी झाले,

करील. कांहीं शंका नाहीं कीं परमेश्वर सर्व शक्तिमान् होय २०. अहो लोकांनों ! ज्या तुमच्या पालनकर्त्यानें तुह्मांस व तुमच्या पूर्वी जे लोक होऊन गेले आहेत त्यांस निर्माण केलें, त्याची तुह्मीं भक्ति करा; कीं कदाचित् तुह्मीं (परमेश्वराला) भिऊन वागूं लागाल. २१. ज्या (परमेश्वरा) नें तुह्मांसाठीं पृथ्वीला बिछाईत व आकाशाला छत बनविलें; आणि आकाशांतून पाण्याचा वर्षाव करून तद्द्वारें तुमच्या भक्षणार्थ फळफळादि उत्पन्न केलीं; तर अशा परमेश्वराचे तुह्मीं कोणालाही जोडीदार बनवूं नका; आणि तुह्मीं तर जाणते (वुजतेही) आहां. २२. आणि आह्मी आपला सेवक (मोहंमद) यास जें (कुराण) प्रकट केलें आहे त्या संबंधानें जर तुह्मीं संशयांत असाल, (व समजत असाल कीं हें ईश्वरी पुस्तक नव्हे, पण मनुष्यानें रचिलेलें आहे) आणि तुह्मी (आपल्या त्या दाव्यांत) खरे असाल; तर ह्या सारखाच एक अध्याय (सूरा तुह्मीही

---

तरी इस्लाम धर्माचें ते कांहींही बिघडवूं शकत नाहींत. या अध्यायाच्या आरंभा पासून येथ पर्यंत तीन तऱ्हेच्या लोकांचा अहवाल दिला गेला आहे. प्रथम मुसलमानांचा, नंतर ज्यांच्या अंत:करणावर मोहोर लाविली गेली आहे व जे कधींच विश्वास धरणार नाहींत त्या नास्तिकांचा व तिसरा, दांभिकांचा कीं ते दिसण्यांत तर मुसलमान पण त्यांच्या मनांतून विश्वासाचा गंध ही नाहीं.

( १ ) परमेश्वराला भिऊन वागणें हें केवळ भक्ति पेक्षांही श्रेयस्कर होय. कारण, (लअल्ल) म्हणजे कदाचित् या शब्दांत आशाही आहे व शंकेचाही बोध होतो. यानें ज्याशीं बोललें जातें त्याला उमेदवार करण्याचा उद्देश असतो. उदाहरणार्थ:—कोणी अधिकारी कोणा मनुष्याची चाकरीवर नेमणूक करून सांगतो कीं तुम्हीं ही चाकरी बरोबर बजावाल तर नवल नव्हे कीं तुमची लवकर बढती केली जाईल. आतां ही बढती चांगल्या सेवेवर अवलंबून आहे. अगदीं हीच गोष्ट येथेंही लागू पडते कीं परमेश्वराची भक्ति करा म्हणजे त्याला भिऊन वागण्याचीही सुबुद्धि प्राप्त होईल.

( २ ) म्हणजे तुम्हांस ही गोष्ट समजण्याची अक्कल आहे कीं मनुष्य आपल्या आपणच पैदा झाला नाहीं, पृथ्वी व आकाश हीं आपोआप बनलीं नाहींत, पाऊस आपोआप पडत नाहीं व पावसाच्या अंगीं फळेंही आपल्या आपणच

**रचून) आणा व परमेश्वराखेरीज तुह्मीं आपले प्रत्यक्ष हिमाईतीही बोलावून घ्या. २३. मग जर तुह्मीं (एवढी गोष्टही) न करूं शकला व (ती) तुमच्यानें केव्हांही करवणारच नाहीं, तर ज्या नरकाग्नीचें इंधण मनुष्यें व दगड होतील, त्याचें भय बाळगा; तो नास्तिकांकरितां (भडकवून) तयार ठेवलेला आहे. २४. आणि (हे पैगंबरा!) ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंही केलीं, तूं त्यांना शुभवर्तमान ऐकीव कीं त्यांच्या साठीं अशा (स्वर्गीय) बागा होत कीं ज्यांच्या खालून नद्या वाहत असतील. जेव्हां त्यांना त्यांतून एखादें फळ खावयास दिलें जाईल, तेव्हां ते ह्मणतील कीं आह्मांला जें पूर्वीं दिले गेलें होतें तेंच हें; आणि (असें ते यासाठीं बोलतील कीं त्यांना**

---

उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं. हे सारे फेरफार पाहून मनुष्याला स्वभावतःच विचार उत्पन्न होतो कीं हे फेरफार करणारा कोणी वेगळाच आहे; तो व्यक्ती व गुणविशेषणांत अद्वितीय व एकटाच होय; त्याचा कोणी विभागी नाहीं, कोणी जोडीचा नाहीं; आणि कोणी त्याचा मदतनीसही नाहीं. मनुष्य आपल्या उपजत बुद्धि द्वारेंच या गोष्टी समजतो; पण संसाराच्या मोहपाशांत फसून त्याला आपला उद्दिष्ट मार्ग दिसेनासा होतो.

(१) हजरत मोहंमद पैगंबर साहेब आपली पैगंबरी–प्रेषितत्व–आणि कुराण ही परमेश्वराची वाणी आहे. यांविषयीं पुष्कळ प्रमाणें देत होते, त्यांत हें प्रमाण सर्वांत फार भक्कम होतें. कारण ज्या काळीं कुराण प्रकट झालें त्या काळीं अरब लोकांमध्यें वक्तृत्वशक्ति व साहित्यशास्त्र याची फारच ख्याति होती. पद्यरचना करण्यांत ते इतके तरबेज होते कीं दासी देखील निरनिराळ्या विषयांवर अशीं उत्कृष्ट पदें म्हणत कीं आज उत्तमांत उत्तम साहित्यशास्त्रपारंगत विद्वान त्यांची बरोबरी करूं शकत नाहीं. तर एका निरक्षर पैगंबराचे कंठरवानें बोलणें कीं यासारखाच एक अध्याय तुम्हींही रचून आणा, ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे; तर ही एक अशी चमत्कृति आहे कीं पुनरुत्थान होईपर्यंत अशीच निःसंशयें करून काईम राहील.

(२) म्हणजे खनिज द्रव्यें जसें, गंधक वगैरे.

**त्या (पूर्वींच्या फळां) शीं सादृश्य अशींच (फळें) दिलीं जातील; आणि तेथें त्यांच्यासाठीं चोखीं (व निर्मल) जोडपीं असतील व ते त्या (बागां) त सदासर्वदा राहतील. २५. निःसंशय परमेश्वर कोणताही दृष्टांत देण्यांत (कसलीच) भीड ठेवित नाहीं; (मग पाहिजे तर तो दृष्टांत) चिलटाचा असो वा ह्याहूनही जास्त (आणखी कोणा क्षुल्लक वस्तुचा)**

---

(१) जगांत जेव्हां कोणाला त्यानें पूर्वी न पाहिलेलें असें फळ खावयास दिलें जातें, तेव्हां तो तें खावयास मागें पुढें करतो कीं न जाणो तें कसलें असेल. स्वर्गवाश्यांस जीं परिचित अशा रंगारूपाचीं फळें दिलीं जातील, तीं खावयास ते बिचकणार नाहींत. कारण, ते जाणतात कीं असलीं तर आह्मीं पूर्वीही खाल्लीं आहेत. होय, कदाचित् रंगारूपाच्या मोहांत येऊन त्यांना फारशी अभिलाषा होणार नाहीं कीं एकदां खाल्लें तरी तेंच व दोनदां खाल्लें तरी तेंच, परंतु तीं फळें चाखल्यावर त्यांना अपूर्व रूचि मिळेल व ते जास्तच खुष होतील कांकीं त्यांत अपरिचित असा स्वाद प्राप्त होईल. ह्या जड व आधिभौतिक वस्तूंचा उल्लेख या साठीं केला गेला आहे कीं ज्यांस विशेष ज्ञान नाहीं त्यांनीं यांतच आनंद मानावा आणि जे ज्ञानी व विचारी आहेत त्यांनां या पासून आध्यात्मिक सुखाची कल्पना व्हावी.

(२) परमेश्वरानें कुराणांत लोकांस समजाविण्यासाठीं जागजागीं प्राणी व इतर वस्तूंचीं उदाहरणें दिलीं आहेत. त्याच कोटींतलें हें चिलटाचें व सतराव्या भागांतील सुरतुल् हज्जच्या एका वाक्यांतल्या माशीचें उदाहरण होय. त्याचा खुलासा असाकीं लोक परमेश्वराला सोडून ज्या मूर्तींची पूजाअर्चा करतात, त्या मूर्ती एक लहानशी माशी देखील बनवूं शकत नाहींत, आणि बनविणें तर एकिकडेच, पण माशी जर त्यांच्यापासून एकादी वस्तु झोंबाडून नेईल, तर त्या तिच्यापासून हिसकाऊन घेऊंही शकत नाहींत. काय बापडी निर्बल माशी व काय तिचा केवा! आणि ज्यांच्या अटोक्यांत एक माशीही नाहीं ते तर तिच्याहूनही निर्बल होत. असलीं उदाहरणें ऐकून अधर्मी लोक आक्षेप घेत होते कीं मुसलमानांचा कसा हा परमेश्वर कीं तो अशा हिडिस्स व क्षुल्लक वस्तूचीं उदाहरणें देतो. आक्षेपकांस परमेश्वरानें त्यांचा मूर्खपणा दाखवून देऊन म्हटलें कीं, हे मूर्ख लोक माशी, चिलट वगैरेच्या नांवानें

**(पैगंबरा) शीं चाळीस[२] रात्रींचा वायदा केला; नंतर तुम्हीं त्याच्या (गेल्या) पश्चात् (पूजाभक्तिसाठीं) वासराला धरून बसलां. आणि तुम्हीं (आपण होऊन आपल्यावर) जुलूम करीत होता. ५१. मग ह्या नंतरही आम्हीं तुम्हांस माफी दिली कीं कदांचित् तुम्हीं आभार मानाल. ५२. आणि (तो वेळही आठवा कीं) जेव्हां आम्हीं मूसाला (तौरात) पुस्तक व निर्णायक नियमशास्त्र दिलें कीं कदांचित् तुम्हीं सन्मार्गीं लागाल. ५३. आणि (तो वेळही आठवा कीं) जेव्हां मूसानें आपल्या लोकांस म्हटलें कीं, हे बांधव हो! तुम्हीं वासरा[२] (च्या पूजे)चा अंगिकार करून आपल्यावर (मोठाच) जुलूम**

---

होतां होतां अशा एका जागीं जाऊन गांठलें कीं ते अजून समुद्राच्या अलिकडेच होते. **बनी-इस्राएला**साठीं हा मोठा आणीबाणीचा वेळ होता. पाठीमागें शत्रु व पुढें समुद्र; जवळ गलबत वगैरे कांहींच नाहीं. परमेश्वरानें अशा वेळीं **बनी-इस्राएलां**स साहाय्य केलें. हजरत **मूसा**नें समुद्रांत आपली काठी मारली, तों समुद्र फाटून विभागला व **बनी-इस्राएल** कोरडे खुष्क निघुन गेले. **फेरो** त्यांचा पिच्छा पुरवित चालला येत होता. तो जेव्हां समुद्राच्या मधोमध आला, तेव्हां समुद्राचे विभक्त भाग एक होऊन गेले व **फेरो** व त्यांचें सर्व सैन्य बुडालें.

(१) हजरत **मूसा**ला परमेश्वरानें तौरात देण्यासाठीं तूर पर्वतावर पाचारिलें होतें कीं एक महिना पर्वतावर येऊन रहा. मग परमेश्वरानें त्याचे चाळीस दिवस केले. हे चाळीस दिवस, आमचे पैगंबर जसे दिव्य प्रकटीकरणा पूर्वीं **हीरा** नांवाच्या गुहेंत एकातीं ध्यानस्थ होते, त्याच प्रकारचे होते.

(२) हजरत **मूसा** तूर पर्वताकडे जातांना आपला भाऊ हजरत **हारून** यांस आपला प्रतिनिधी करून गेले होते. **बनी-इस्राएलां**नीं **हारून**चें एकदेखिल ऐकिलें नाहीं व **सामेरी**च्या बहकावणीनें वासराची एक मूर्ति बनवून त्याची उपासना करूं लागले. **मूसा**नीं परत आल्यावर ही स्थिति पाहिली व त्यांना फार संताप झाला. परमेश्वराचे हुकमानें या पातकाचें प्रायश्चित्त हें ठरलें कीं त्यांनीं एकमेकाला जिवें मारावें. सारांश, कांहीं लोक अशाप्रकारें ठार झालेही. परंतु हजरत **मूसा** व **हारून** हे परमेश्वराच्या हुजुरांत धाय धाय रडले व त्यांनीं बाकीच्या लोकांस माफी देवविली.

केलात, तर (आतां) तुम्ही आपल्या निर्माणकर्त्याच्या सेवेंत पश्चात्ताप करा; आणि (तो हा कीं आपल्याच लोकांच्या हातून) आपल्याला ठार करा. ज्यानें तुम्हांस निर्माण केलें आहे त्याच्या जवळ तुमच्याठायीं हेंच उत्तम होय. मग (जेव्हां तुम्हांकडून हुकूम बजाविण्याची तयारी झाली, तेव्हां) परमेश्वरानें तुमचा पश्चात्ताप मान्य केला. निःसंशय, तो मोठा पश्चात्ताप मान्यकर्ता (व) दयाळू होय. ५४. आणि (तो वेळही आठवा कीं) जेव्हां तुम्हीं (म्हणजे तुमच्या वडिलांनीं मूसाला) म्हटलें होतें कीं, हे मूसा! आम्ही परमेश्वराला साक्षात पाहींपर्यंत आम्ही तर केव्हांच तुझा विश्वास धरणार नाहीं; (कीं परमेश्वरच तुजशीं संभाषण करितो आहे.) यावर तुम्हांला विद्युल्लतेनें येऊन गांठलें; व तुम्हीं बघतच राहिला. ५५. मग तुमच्या मरणानंतर, आम्हीं तुम्हांस (जिवंत करून) उठविलें कीं कदाचित् तुम्हीं आभार मानाल. ५६. आणि आम्हीं तुम्हांवर आभाळाची सावली केली व तुम्हांवर मन्न व सल्वा हीं (मिष्टान्नें) उतारिलीं; (व तुम्हांस परवानगी दिली कीं) आम्हीं तुम्हांस जे (हे उत्तम व) चोख पदार्थ दिले आहेत त्यांतून तुम्हीं (खुशाल)खा. आणि त्या लोकांनीं आमचें तर कांहीं नाहींच बिघडलें; परंतु ते आपलेंच (कांहीं) नुकसान करीत

---

(१) हजरत मूसा बनी–इस्राएलांस घेऊन इजिप्तहून निघाले तेव्हां परमेश्वरानें त्यांस आश्वासन दिलें होतें कीं तुम्ही अमालीक लोकांशीं लढाल तर आम्ही तुम्हांस विजयी करूं व सिरीया देशांत तुमचें राज्य स्थापन करूं. म्हणून मूसानें त्यांस पुष्कळ समजाविलें पण त्यांची हिंमत होईना. हा आज्ञाभंग केल्याबद्दल परमेश्वरानें त्यांना शिक्षा दिली; तों चाळीस वर्षें ते वनवासांत राहून दररोज प्रवासांतच होते. नंतर हजरत मूसाचे प्रार्थनेचे प्रतापानें परमेश्वरानें त्यांच्यावर कांहीं बऱ्याच मेहरबान्या व कृपादानें केलीं. उन्हातान्हांतून वांचण्यासाठीं त्यांच्यावर आभाळाची सावली केली जाई आणि खावयास मन्न व सल्वा हीं मिळत. रात्रीं दव पडे तों जंगली झाडांच्या पानांवर कांहीं गोडगोडसा पदार्थ जमत असे तोच मन्न होय. तो खुरचून घेऊन गोड पदार्थांच्या जागीं ते खात. आणि सल्वा हा लाव्याच्या प्रकारचा एक पक्षी होता. हे बनी-इस्राएल जेथें जेथें तळ देत, तेथें त्यांचे थवेचेथवे आपोआप गोळा होत व ते त्यांस भाजून खात. परंतु हुकूम असा

राहिले. ५७. आणि (तो वेळ आठवा कीं) जेव्हां आह्मीं फर्माविलें कीं तुह्मीं ह्या (उरैहा) गांवांत दाखल व्हा व त्यांत जेथून तुमच्या इच्छेस वाटेल तेथून खूप खा (प्या); आणि दरवाज्यांतून साष्टांग नमस्कार घालीत शिरा व (तोंडून) हित्तुन (ह्मणजे क्षमाक्षमा) बोलत जा. ह्मणजे आह्मी तुह्मांस तुमच्या पापांची क्षमा करूं; व जे (आमचा) हुकूम चांगला बजावितील त्यांना आह्मी वरून अधिक (पुण्यही) देऊं (तें वेगळेंच). ५८. तर जे लोक (त्यांच्यांत) खोडसाळ होते, ते (क्षमेच्या याचनेची) प्रार्थना जी त्यांना सांगितली गेली होती ती बदलून दुसरेच बोल बोलूं लागले. मग आह्मी, जे लोक खोडसाळ होते त्यांच्यावर, ते आज्ञाभंग करीत

---

होता कीं उद्यासाठीं गोळा करून ठेवूं नये. लोकांच्यानें धीर धरवला नाहीं व संचय करून ठेवूं लागले. तेव्हां या आज्ञाभंगाच्या शासनार्थ हीं मिष्टान्नें येणें बंद पडलें.

(१) हजरत मूसाचे हयातींत तर बनी-इस्राएलांना सिरीया देशाच्या सरहद्दींत दाखल होणें प्राप्त झालेंच नाहीं; येथ पर्यंत कीं त्यांच्या हैराणगतींतच हजरत मूसाचा अंत झाला. त्याचे मागून हजरत यूशा बीन नून हे पैगंबर झाले. त्यांनीं बनी-इस्राएलांस सिरीया देश जिंकण्याचें वचन आठवून देऊन अमालिकांचे राष्ट्राशीं युद्ध करण्यास सिद्ध केलें. सारांश बनीइस्राएलांनीं किनआन-खनान-च्या इलाख्याचीं कांहीं शहरेंही सर केलीं. परंतु त्यांच्यावर अशी कांहीं साडेसाती होती कीं ते एकाच स्थितीवर कायम राहत नव्हते. थोडासा विजय होतांच ते पुन्हां खोडसाळपणा करूं लागले. त्यांना आज्ञा होती कीं जेव्हां पहिलें शहर जिंकाल, तेव्हां त्यांत परमेश्वराला साष्टांग नमस्कार घालीत व क्षमा भाकीत दाखल व्हा, ह्मणजे परमेश्वराचें आभार-प्रदर्शन व उपकार-स्तुति प्रगट होईल. तर पहिलें शहर जें त्यांनीं जिंकिलें तें उरैहा होतें. त्यांत शिरतांच ते साष्टांग नमस्काराचे जागीं पोरांप्रमाणें गुडघेमेटे येऊन चालूं लागले; आणि क्षमा भाकण्यास्तव त्यांना 'हित्तुन' ह्मणजे पापांचें निरसन होवो हे शब्द शिकविण्यांत आले होते त्याच्या ऐवजीं 'हिन्तुन' ह्मणजे गहूं किंवा गोधूम हा शब्द बोलूं लागले. तात्पर्य, त्यांनीं ईश्वरआज्ञेची अवहेलना केली ह्मणून त्यांच्यांत सांथ व मऱ्या पसरल्या व जिंकलेला मुलुख पुन्हां त्यांच्या हातचा निघून गेला.

होते ह्मणून आकाशांतून शिक्षा पाठविली. ५९. आणि (ती गोष्टही आठवा कीं) जेव्हां मूसानें आपल्या लोकांसाठीं पाण्याची दरखास्त केली. तेव्हां आह्मी फर्माविलें कीं (हे मूसा) तूं आपली काठी खडकावर मार, (काठी मारताक्षणीं) त्या (खडकां) तून बारा झरे फुटून वाहूं लागले. (आणि) सर्व लोकांनीं आपापला पाणवठा ओळखून घेतला. (आणि सदर परवानगी झाली कीं) परमेश्वराच्या (दिलेल्या) अन्नोदकांतून खा व प्या; आणि पृथ्वींत फिसाद फैलावीत हिंडूं नका. ६०. आणि (तो वेळही आठवा कीं कीं) जेव्हां तुह्मीं (मूसाला) ह्मणालां कीं हे मूसा! आमच्यानें तर एकाच अन्नावर मुळींच दम धरवत नाहीं. तर तूं आह्मांसाठीं आपल्या पालनकर्त्यास विनंति कर कीं धरित्री जे (जे पदार्थ) निपजविते ते ह्मणजे तिची शाकभाजी व काकडी व गहूं व मसूर व कांदे हीं (पिकें, मन्न व सल्वाचे ऐवजीं) तो आह्मांकरितां निपजवील. (मूसानें) ह्मटलें कीं जो (पदार्थ) उत्कृष्ट होय, तुह्मीं कां त्याच्या बदलीं जो (पदार्थ) निकृष्ट होय तो घेऊं पाहतां? (बरें तर) तुह्मी कोणा शहरांत उतरून पडा; ह्मणजे तुह्मी जे काय मागतां तें तुह्मांस अर्थात् (तेथें प्राप्त) होईल. आणि त्यांच्यावर हीनता व दारिद्र्य यांचा छाप मारला गेला व ते परमेश्वराचे कोपांत येऊन सांपडले. हें यासाठीं कीं ते परमेश्वराच्या निशाण्यांस नाकारीत होते व प्रवक्त्यांस विनाकारण जिवें मारीत होते. (आणि तसेंच) हें याकरितां कीं त्यांनीं आज्ञा मोडली व ते मर्यादेचें उल्लंघन करीत असत. ६१.

---

(१) यहुद्यांवर यासाठीं टीकेचा एवढा वर्षाव केला जातो कीं त्यांनीं सीरीया देशावर चढून जाण्याचें नाकारिलें व हजरत मूसाची आज्ञा मोडिली. ह्याचें शासनार्थ त्यांना चाळीस वर्षें अरण्यांत भटकावें लागलें. तथापि हजरत मूसाचे आर्जवामुळें त्यांना खावयास मन्न व सल्वा हीं मिळत होतीं. त्यांना कित्येकदां पाण्याची जरूरी भासली; तेव्हां हजरत मूसानें आपल्या चमत्कृतीनें पाण्याचे झरे दगडांतून वाहविले. परंतु बनी-इस्राएल एकच प्रकारचें अन्न खातखात कंटाळलेले होते. ते हजरत मूसाला आग्रह करीत कीं जमिनीचीं पिकें आम्हांस कां ह्मणून न मिळावींत? ते उत्तर देत कीं तुमचे मनांत जर हे पदार्थ हवेसे असतील, तर चला, तुम्ही किनआनवर चढाई करा व एखाद्या शहरावर विजय संपादून तेथें तळ द्या. येथें अरण्यांत शेताचीं पिकें कोठून येणार?

**यांत शंका नाहीं कीं मुसलमान व यहुदी व खिस्ती व साबी या लोकांपैकीं ज्यांनीं कोणी परमेश्वरावर व शेवटल्या दिवसावर विश्वास ठेविला व चांगलीं कामें करीत राहिले, तर त्यांना त्यां (च्या कर्मां)चा मोबदला त्यांच्या पालनकर्त्यापाशीं (प्राप्त) होईल; आणि त्यांनां (कसलेंच) भय राहणार नाहीं व ते(कोणा प्रकारें) दुःखी होणार नाहींत. ६२.**

---

हें जें मन्न व सल्वा याचें खाद्य अनायासें मिळतें व स्वादिष्ट ही आहे त्यालाच अलभ्य लाभ समजा. शेवटीं हजरत मूसाचें मरणानंतर त्यांनीं किनआनींयाशीं युद्ध केलें; व याप्रमाणें यशापयशाची परांपरा चालू झाली. खोडसाळपणा तर बनी-इस्रायलांच्या स्वभावांत होताच; ते पैगंबरांस जिवें मारून टाकीत होते, व नियमशास्त्राचें उल्लंघन करीत होते. परिणाम असा झाला कीं सर्वकाल पावेतों त्यांचें राज्य व इभ्रत त्यांजपासून हरण केली गेली. हल्लींहि ते तसेच कोपग्रस्त आहेत व पुनरुत्थानापर्यंत असेच राहतील. म्हणून चतुरांनीं यापासून धडा घ्यावयाजोगा आहे. येथें या गोष्टी सांगून पुढच्यास ठेंच व मागचा शहाणा या म्हणीप्रमाणें लोकांस जागृत करणें एवढाच उद्देश आहे.

(१) साबी हे लोक कोण व केव्हां व कोठें होते; आणि ते कोणत्या मताचे होते याविषयीं कुराणाच्या भाष्यकारांत म्हणजे तफसीर-स्पष्टीकरण-करणारांत इतकीं भिन्न मतें आहेत कीं तीं येथें सविस्तर नमूद करणें स्थलसंकोचामुळें अशक्य आहे. तरी जी गोष्ट या सर्वांच्या मतांतून निष्पन्न होते ती ही कीं ते तत्वज्ञानी लोकांचे अनुयायी होते; त्यांत कांहीं एकेश्वरमतवादी व कांहीं मूर्तीपूजक व नक्षत्रपूजक होते.

(२) यहुदी हे प्रवक्त्यांची अवलाद होते म्हणून ते परमेश्वराशीं आपला खास संबंध दर्शवीत होते. कधीं कधीं ते म्हणत कीं "आम्हीं परमेश्वराचीं लेकरें व त्याचे आवडते आहों;" व कधीं असें प्रतिपादन करीत कीं "गणतीच्या कांहीं दिवसांखेरीज नरकाग्नि तर आम्हांला स्पर्श देखील करणार नाहीं;" आणि कधीं अशी फुशारकी मिरवीत कीं "यहुद्याशिवाय स्वर्गांत कोणी जाणारही नाहीं." परमेश्वरानें त्यांचीं हीं विधानें खोटीं पाडलीं व बजाविलें कीं कोणाही पक्षाला कांहीं विशिष्टत्व व श्रेष्ठता नाहीं.

**आणि (हे बनीइस्राएलांनों! तो वेळ आठवा कीं) जेव्हां आह्मीं तुह्मापाशीं (तौरातचे अमल बजावणीचें) पक्कें वचन घेतलें आणि तूर (पर्वता)ला उचलून तुमच्या (शिरा) वरती (आणून लोंबकळावयास) लाविलें. (आणि आज्ञा केली कीं हें तौरातपुस्तक) जें आह्मीं तुह्मांस दिलें आहे त्याला मजबूत धरून रहा; व त्यांत जें (लिहिलेलें) आहे तें (नीट) स्मरणीं घ्या कीं कदाचित् तुह्मी (परमेश्वराला) भिऊन आचरूं लागाल. ६३. नंतर ह्या मागून तुह्मीं फिरून पडला. पण जर तुह्मांवर परमेश्वराची कृपा२ व त्याची दया (दृष्टि) झाली नसती तर तुह्मी अवश्य (मोठ्या) गोत्यांत आलां असतां. ६४. आणि तुम्हांपैकीं ज्या लोकांनीं शब्बाथ दिवशीं**

---

आणि जी श्रेष्ठता आहे ती विश्वास व चांगलीं कामें करण्यावरच अवलंबून आहे व यावर सर्व धर्मशास्त्रांनें मतैक्य आहे. जोंपर्यंत हजरत मूसाचें नियमशास्त्र प्रचलित होतें तोंपर्यंत युहुदी परमेश्वरास प्रिय होते; त्या नंतर जे ख्रिस्ती आपल्या अस्सल धर्माचें वातावरण बिघडण्यापूर्वी येशू-ख्रिस्ताला परमेश्वर किंवा परमेश्वराचा पुत्र नव्हे, तर त्याचा प्रेषित मानून धर्माचरण करीत होते, ते त्याला प्रिय होते. आतां स्वधर्माचरणीं मुसल-मान परमेश्वरास प्रिय होत. कारण इस्लाम धर्माप्रमाणें हजरत मोहंमद पैगंबरापूर्वीचे सर्व पैगंबर व वशिष्ठ ऋषि व त्यांचीं पुस्तकें—ज्यांत एकाच पर-मेश्वराशिवाय अन्य कोणाचीही उपासना सांगितलेली नाहीं आणि परलोक सत्य आहे याचाही त्यांत उल्लेख आहे—हीं सर्व खरीं मानिलीं जातात व त्यांजविषयीं पुज्यबुद्धि बाळगिली जाते. ज्याप्रमाणें एखादें राज्य बदलल्यावर त्याबरोबरच पूर्वीचे कायदेकानू बदलतात त्याप्रमाणेंच हीं पुस्तकें तत्वत: बहुत अंशीं नाहीं पण रद्द झालीं असून प्रचलित दिव्य पुस्तक जें कुराण त्यांत त्यांचा समावेश झालेला आहे; म्हणून कुराणाप्रमाणें आचरणें हेंच उचित जाणिलें जातें. तात्पर्यार्थ हा कीं आपापल्या काळीं आपापल्या प्रेषितांच्या कह्याप्रमाणें ज्यांनीं परमेश्वराचा व शेवटल्या दिवसाचा विश्वास धरिला त्यांनीं आपल्या जन्माचें सार्थक करून घेतलें.

(२) यहुद्यांस तौरात दिली गेली तेव्हां ते त्याचा जाडपणा पाहून घाबरले व म्हणूं लागले कीं आमच्यानें तर एकढ्या बहुत हुकमांची बजावणी

(त्याच्या अनादराचा) अतिरेक[२] केला त्यांच्या (परिणामा) शीं तर तुम्हीं वाकबच होऊन चुकलां अहां. तर आम्ही त्यांस म्हणालों कीं तुम्हीं माकडें बनून जा (कीं जेथें जाल तेथें) धुत्कारिले (जाल.) ६५. मग आम्हीं या वृत्तांतांत जे लोक ह्याच्या (घडून येण्याच्या) वेळीं हजर होते व जे लोक ह्याच्या मागून येणार होते त्या (सर्वां) साठीं एक धडा घालून दिला आणि (तसाच परमेश्वराला) भिऊन चालणाऱ्यांसाठीं एक बोध. ६६. आणि (तो वेळ आठवा कीं) जेव्हां मूसानें आपल्या लोकांस म्हटलें कीं परमेश्वर तुम्हांस अशी आज्ञा करितो कीं तुम्हीं एका गाईचा बळी द्या. ते म्हणूं लागले, कां तूं आमची थट्टा करितोस? (त्यावर मूसानें) म्हटलें कीं मी (इतका जहाल) अज्ञानी लोकांपैकीं होऊं (नये) म्हणून मी परमेश्वरालागीं शरण रिघतों. ६७. ते बोलले, तूं आपल्या पालनकर्त्यापाशीं आम्हांकरतां विनंति कर कीं तो आम्हांला फोड करून समजावील कीं ती (गाय) कसली असावी. (मूसानें) म्हटलें, परमेश्वर म्हणतो कीं ती (एक) गाय असावी, ना म्हातारी व ना तरणी फोक. ह्या (दोहों) मध्यें मध्य रास. तर तुम्हांला जी आज्ञा केली गेली आहे ती बजावून टाका. ६८. ते बोलले, तूं

---

होणार नाहीं. तेव्हां परमेश्वरानें तूर पर्वत त्यांच्या शिरावर आणून लोंबकळविला कीं मानता तर माना; नाहींतर आतां चुराडा करून टाकतों. अखेर त्यांनीं मानिलें. ही परमेश्वराची कृपाच होय.

(१) ज्या प्रमाणें मुसलमानांत शुक्रवार व खिस्त्यांत आदितवार, हे विश्रांति व ईश्वरोपासना यांचे दिवस आहेत, त्याचप्रमाणें यहुद्यांसाठीं शनवारचा दिवस खास मुक्रर होता. इतर हुकमाप्रमाणें त्यांना हाही एक हुकूम होता कीं शनवारचे दिवशीं त्यांनीं शिकार करूं नये. हे लोक नेहमीचे खोडसाळ होतेच. ते काय चलाखी करीत कीं समुद्रकांठीं खळगे खणून ठेवित. शुक्रवारीं समुद्राला भरती येऊन त्या खाड्यांत पाणी येई व त्यांत मासेही येत. आदल्या दिवशीं त्या खळग्यांतून मासे काढून घेत व ह्मणत कीं ही शिकार शुक्रवारची आहे. त्यांनीं हुकमाच्या अनादराचा अतिरेक केला ह्मणून परमेश्वरानें त्यांना विरूप करून माकडें बनविलीं व त्यांना चोहोंकडून धुत्कार व हड हड होऊं लागली.

आपल्या पालनकर्त्यापाशीं आम्हांकरितां विनवणी कर कीं तो आम्हांस स्पष्ट करून सांगील कीं तिचा रंग कसा असावा. (मूसानें) म्हटलें, परमेश्वर म्हणतो कीं ती गाय असावी, पिवळी (व) खूप गहिऱ्या रंगाची; कीं पाहाणाऱ्यांस ती गोजिरवाणी दिसावी. ६९. ते बोलले कीं तूं आपल्या पालनकर्त्याला आम्हांसाठीं विनीव कीं तो आम्हांला चांगल्या प्रकारें समजावील कीं ती (आणखी) काय (काय गुण धारण करीत) असावी. आम्हांला तर (ह्या रंगाच्या बहुतेक सर्वच) गाई सारख्या दिसतात. (तर कोणती घ्यावी व कोणती न घ्यावी?) व (या खेपेस) परमेश्वरानें इच्छिलें तर आम्हीं अर्थात् (तिचा) नेमका पत्ता लावून घेऊं.७०. (मूसानें) ह्मटलें, परमेश्वर ह्मणतो कीं ती गाय अशी राबलेली नसावी कीं जी जमीन नांगरते व अशीही नसावी कीं जी शेताला पाणी देते; निरोगी, व्यंगरहित, तिच्या अंगीं कोणत्याही तऱ्हेचा डाग नसावा. ते बोलले, (होय) आतां मात्र तूं खरें (व नेमकें) वर्णन आणिलेंस. सारांश, त्यांनीं तिचा बळी दिला; आणि आशा नव्हती कीं ते (तें) करतीलच. ७१. आणि (हे बनी-इस्राइलांनों!) जेव्हां तुम्हीं एका मनुष्यास जिवें मारिलें व मग तुह्मीं त्याच्या संबंधानें एकमेकांशीं झगडूं लागला; (कीं कोणी कोणालाच खुनी ह्मणे व कोणी कोणा-लाच) आणि तुह्मीं जें कांहीं लपवीत होता, परमेश्वराला तें उघडकीस आणावयाचेंच होतें. ७२. तर आह्मीं फर्माविलें कीं त्या (गाई) चें कोणतें ही (यज्ञांग) घेऊन तें त्या (प्रेता) ला लावा.

(१) कुराणाच्या भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं फार प्राचीन काळीं यहुदी लोकांमध्यें एक खून झाला होता. त्याचा नीट पत्ता लागत नव्हता; कारण खून झालेल्या इसमास त्याच्याच वारसदारांनीं ठार केलें होतें व तेच उलट हजरत मूसा ह्मणजे मोझयापाशीं फिर्यादी झाले होते. हजरत मूसानें परमेश्वराचे हुकमानें एक गाय बळी दिली व तिचें यज्ञांग त्या प्रेताला लाविलें. मयतानें तेव्हांच थोडा वेळ जिवंत होऊन आपला खूनी कोण होता हें त्यांस सांगितलें. हा सारा अहवाल ६७ ते ७३ वाक्यांत आलेला आहे. प्रथम गौयज्ञाचा व मग खूनाचा; आणि गौयागामध्यें यहुद्यांनीं जे वितंडवाद उभे

**अशाच तऱ्हेनें (पुनरुत्थानाचे दिवशीं) परमेश्वर मेलेल्यांस सजीव करील; आणि तो (जगांत) तुह्मांस आपल्या (सामर्थ्याच्या) निशाण्या दाखवितो कीं नवल नव्हे कीं तुह्मीं समजाल (कीं पुनरुत्थानाचें घडून येणें सत्य आहे). ७३. मग ह्यानंतर तुमचीं अंतःकरणें (अशीं) कठीण होऊन गेलीं कीं जणुंकाय तीं पाषण होत; किंबहुना (याहूनहि) जास्तच कठीण. आणि पाषाणांत तर कांहीं असेही असतात कीं त्यांतून अर्थात् नद्या फुटून वाहतात; आणि त्यांत कांहीं असेहीं असतात कीं जे फाटतात व त्यांतून पाणी झरतें; आणि त्यांतच कांहीं असेही असतात कीं जे परमेश्वराच्या भयानें (धडाधड) कोसळून पडतात. आणि जें काय**

---

केले त्यांत त्यांचा नेहमीचा खोडसाळपणा दिसून येत होता. खुनाच्या बाबींत ज्या रीतीनें खूनी इसमांचा सुगावा लागला तो एक महान चमत्कार होय.

( १ ) ह्मणजे जसें यज्ञपशुच्चे यज्ञांग मयताला लाविल्यानें मयत सजीव झाला; आणि हें लक्ष्यांत येत नाहीं कीं यज्ञांगानें स्पर्श करण्याचा मैताच्या सजीव होण्यांशीं काय संबंध होता. तसेंच पुनरुत्थानांत शेंकडों व हजारों वर्षांचे मेलेले यांचें पुन्हां जिवंत होणें लक्ष्यांत येत नाहीं. परंतु ज्या प्रमाणें बनी-इस्राएलांचा मेलेला इसम जिवंत होऊन उठला होता त्या प्रमाणेंच तें होईल हें खास. ह्याच अध्यायांत पुढें हजरत इब्राहीम पैगंबराचा अहवाल आलेला आहे. त्यांनींही पैगंबर असून, मानवी प्रवृत्यानुसार मेलेल्यांचे सजीवन होण्या-संबंधीं आपलें आश्चर्य प्रदर्शित केलें होतें. त्यांनाही परमेश्वरानें मेलेले प्राणी सजीव करून आपलें अद्भुत सामर्थ्य दाखविलें. परंतु परमेश्वरानें त्यांनाही हें जीवनाचें गूज प्रकट केलें नाहीं. अगदीं हीच गोष्ट बनी-इस्राएलाशींही घडून आली. यावरून सिद्ध झालें कीं जीवनाचें गूज उमजणें मानवी शक्ति पलिकडेचें आहे व ह्यांत माथेफोड करणें व्यर्थ आहे.

( २ ) पर्वतांचें कोसळणें ही कांहीं असाधारण गोष्ट नव्हे. बहुधा तर भूकंपामुळें [illegible] मोठाले डोंगर कोसळून पडतात; आणि ज्या पर्वतांतून आपो-आप ज्वाळ[illegible]तात व जे ज्वालाग्राही ह्मणवितात, त्यांच्यावर अशीं [illegible]तात. शिवाय आंतल्या आंतच असें ही कोणा एखाद्या [illegible] ठिसूळ व पोंचट होऊन जातें व पर्वत कोसळून पडतात.

तुम्ही (लोक) करितां त्या पासून परमेश्वर गाफील नाहीं. ७४. (मुसलमानांनों!) कां तुम्हांला (ही) आशा आहे कीं (यहुदी) तुमची गोष्ट मान्य करतील? आणि त्यांची परिस्थिति ही आहे कीं त्यांच्यांत एक लोकसमूह असाही होऊन गेला आहे कीं ते परमेश्वराचें वचन (ह्मणजे तौरात) ऐकत असत; मग ते तें समजवून (पटवून) घेतल्यानंतर जाणूनबुजून त्याचें कांहींचे बांहीं करून टाकीत असत. ७५. आणि जेव्हां ते मुसलमानांशीं भेटतात, तेव्हां ते ह्मणूं लागतात कीं आम्हीही विश्वास धरून चुकलों आहों. आणि जेव्हां ते एकांतीं आपल्यांपैकीं एक दुसऱ्यापाशीं जातात, तेव्हां ते ह्मणतात कीं जें कांहीं (तौरातमध्यें) परमेश्वरानें तुह्मांला उघड केलें आहे, त्याची तुह्मीं मुसलमानाशीं वार्ता कां करितां; कीं (उद्याला) तुमच्या पालनकर्त्या

---

तर हें बसून जाणें अगर कोसळून पडणें परमेश्वराचे हुकमानें होतें. कारण, त्यानें सर्व पदार्थांत हा एक विशिष्ट गुण ठेविला आहे कीं वजनी पदार्थ फार जलद खालीं येतो व हलका जरा उशिरानें. याचेंच नांव भय होय कीं ते पर्वत सुद्धां परमेश्वरानें नेमून दिलेले कायदे मोडूं शकत नाहींत.

(१) तौरात म्हणजे जुना करार, अनुवाद अध्याय १८वा वर्स १५-१८-१९ यांमध्यें हजरत मोहंमद पैगंबराविषयीं परमेश्वराचें हें वचन स्पष्टपणें दिलेलें आहे. तें समजून उमजून ते त्याचा भलताच अर्थ करीत असत. मराठी बायबलांत हें भविष्य ख्रिस्ताविषयीं आहे असें कंसांत लिहिलें आहे; तें मूळचें नसून हा ख्रिस्तीलोकांचा हटवादीपणा होय. कारण, ख्रिस्त हे कोणाही प्रकारें हजरत मूसा-मोशाचे भाऊ होऊं शकत नाहींत. तर ते त्यांच्या संतानांत होते. हजरत इब्राहीम पैगंबरांचे पुत्र इस्हाक ना आयझाक यांच्या वंशांत प्रथम मूसा मग ख्रिस्त हे उतरत आले होते; आणि इब्राहिमाचे ज्येष्ठ पुत्र हजरत इस्माईल यांच्या कुलांत हजरत मोहंमद पैगंबर होते. या नात्यानें हजरत मोहंमद पैगंबर साहेब हजरत मूसाचे भाऊ होते. पहा अनुवाद अध्याय १८:

(२) कांहींचेंबाहीं करून टाकण्यांत शब्दांचा उलटापालट या दोन्ही गोष्टी आल्या.

समक्ष त्याच गोष्टीचे अधारावर त्यांनीं तुम्हाशीं प्रमाण पटवून वाद मांडावा? तर कां तुह्मीं (इतकेंही) समजत नाहीं? ७६. (पण) का ह्या लोकांस ही गोष्ट ठाऊक नाहीं कीं ते जें कांहीं लपवितात व जें कांहीं जाहीर करतात तें (सर्व कांहीं) परमेश्वर जाणतो? ७७. आणि त्यांच्यांत जे कोणी निरक्षर आहेत ते (तोंडून कांहीं शब्द) बडबडण्याशिवाय (ईश्वरप्रणीत) पुस्तक तर (मुळींच) समजत नाहींत; आणि ते केवळ कल्पनाच[1] लढवीत असतात, झालें. ७८ तर त्यांच्यासाठीं ही दुःखाची गोष्ट होय कीं ते आपल्या हातांनीं तर पुस्तक लिहितात; नंतर ते (लोकांस) सांगतात कीं हें परमेश्वरापासून (उतरलें) आहे, अशासाठीं कीं त्या योगें त्यांना थोडेसे दाम (ह्मणजे जगिक फायदे) प्राप्त करतां यावेत; तर त्यांस दुःख होय कीं तें त्यांच्या हातांनीं लिहिलें; आणि (पुन्हां) त्यांस दुःख होय कीं तें असली कमाई करतात. ७९. आणि ते ह्मणतात कीं गणतीच्या कांहीं दिवसाखेरीज नरकाग्नि तर आह्मांला स्पर्श देखील करणार नाहीं. (हे पैगंबरा! तूं त्या लोकांस) सांग, कीं तुह्मी का परमेश्वरापाशीं कांहीं वचन घेऊन ठेविलें आहे कीं परमेश्वर आपल्या वचनाच्या उलट (केव्हांच) करणार नाहीं? अगर तुह्मांस ज्याचें ज्ञानही नाहीं अशा (खोट्यानाट्या) गोष्टी कां तुह्मी परमेश्वरासंबंधीं व्यक्त करितां? ८०. खरी गोष्ट तर ही आहे कीं ज्याच्या पदरांत[2] दुष्टपणा पडला व जो आपल्या पातकांच्या फेऱ्यांत सांपडला, तर असलेच लोक नरकवासी होत; कीं ते निरंतर नरकांतच राहतील. ८१. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंही केलीं, तर असलेच लोक स्वर्गवासी होत; कीं ते

(१) यहुदी लोक हजरत मोहंमद पैगंबरास नाकारण्यासाठीं पुष्कळ कल्पना लढवीत व म्हणत कीं जो पैगंबर जुन्या करारांत सांगितला आहे तो यूशा बिन नून होय. पण त्यांना हेंही माहीत होतें कीं हे यूशा, मूसाचे चाकर वा शिष्य होते; भाऊ नव्हते. अनुवाद अध्याय १८ यांतील भविष्यांत 'तुझ्या भावांतून' असें लिहिलें आहे.

(२) जे जो कोणी येऊन जाऊन रात्रंदिवस पापार्जन करूं लागला पापांच्या फेऱ्यांत सांपडला.

निरंतर स्वर्गांतच राहतील. ८२. आणि (तो वेळ आठवा की) जेव्हां आह्मी (प्राचीन) बनी-इस्राएल (म्हणजे तुमच्या पूर्वजां) पासून पक्कें वचन घेतलें कीं तुह्मीं परमेश्वरावांचून कोणाचीही उपासना करूं नये; आणि आईबापाशीं चांगलीं वागणूक ठेवावी आणि (तशीच) नातलग व अनाथ बालकें व गोरगरीब यांच्याशींही; आणि लोकांशीं चांगलें (गोडीगुलाबीनें) संभाषण करा; आणि नमाज पढत जा व जकात देत राहा. तदनंतर तुमच्या पैकीं थोड्याशा लोकांशिवाय (बाकी सारे) फिरून पडले. आणि तुह्मी लोक (कांहीं) आहांच (बेपर्वा) कीं (उपदेशापासून) तोंड चुकवितां. ८३. आणि (तो वेळ आठवा कीं) जेव्हां आह्मी तुह्मांपासून (ह्मणजे तुमच्या वडिलांपासून) पक्कें वचन घेतलें कीं तुह्मी आपला (परस्परांचा) रक्तपात करूं नये व आपल्या शहरांतून आपल्या लोकांस हद्दपार करूं नये. नंतर तुह्मी (ह्मणजे तुमच्या वडिलांनीं हें) कबूल केलें व तुह्मां (सांप्रत काळचे) लोकांसही (त्याची) साक्ष पटतेच; (की होय, असें घडलें होतें). ८४. तथापि तेच तुह्मी आहां कीं जे आपल्यांस मारून टाकितां आणि (तसेच) आपल्यापैकीं कांहीं मंडळीच्या विरुद्ध अन्यायानें व बलात्कारानें एकमेकांस पाठबळ देऊन, त्यांना त्यांच्या शहरांतून हद्दपार करितां. आणि तेच लोक जर (कोठें) बंदीवान होऊन तुह्मांपाशीं (मदत मागायास) येतात, तर तुह्मीं खंड देऊन त्यांना सोडवून घेतां; व वास्तविक पाहतां, (मुळांत) त्यांचें बाहेर काढणेंच तुह्मांस गैरवाजवी होतें. [१] तर कां तुह्मीं (ईश्वरी) पुस्तकाच्या कांहीं (गोष्टीं) चा विश्वास धरितां व कांहींस नाकारितां? तर तुमच्यांतून जे लोक असें करतील ह्याच्या शिवाय त्यांचा (आणखी) काय मोबदला होऊं शकतो कीं या लोकींच्या आयुष्यांत (त्यांची) फजिती होईल; व (अखेर) पुनरुत्थानाचे दिवशीं (नरकाग्नीचे) फारच कडकतर शिक्षेकडे लोटले जातील. आणि जें कांहींही तुह्मीं करितां, परमेश्वर त्यापासून गैर सावध नाहीं. ८५. ज्या लोकांनीं पुढच्या

(१) भाष्यकारांनीं याचा दुसरा अर्थ असाही आहे लोकांस नीतिशिक्षण द्या.

(आयुष्या)चे ऐवजीं ह्या जगाचें आयुष्य विकत घेतलें, ते हेच लोक होत. तर (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांच्यावरून तर शिक्षा हलकी केली जाणार नाहीं व (कोठून) त्यांना मदतहि पोहोंचणार नाहीं. ८६. आणि अलबत आम्हीं मूसाला (तौरात) पुस्तक दिलें; व त्याच्या मागून एकामागें एक (इतर) प्रेषितही पाठविले. आणि मरयमचा पुत्र ईसा (येशू) यासही आम्हीं ढळढळीत चमत्कार दिले व पवित्र आत्मा (म्हणजे जिब्रील) या द्वारें आम्हीं त्याला पाठबळ दिलें. तर कां (तुम्हीं इतके द्वांड होऊन गेलां आहांत कीं) जेव्हां जेव्हां तुम्हापाशीं कोणी प्रेषित–(पैगंबर) तुमच्या जिवांस नको नको होत असे हुकूम घेऊन आला, तेव्हां तेव्हां तुम्हीं गर्वानें अडून बसलांत ? मग कांहींना तुम्हीं पांखडी म्हटलेंत व कांहींस तुम्हीं जिवें मारूं लागलांत. ८७. आणि ते म्हणतात, आमचीं अंतःकरणें (आवरणांत) सुरक्षित[1] आहेत; (तसें नव्हे) पण त्यांच्या नास्तिकपणामुळे परमेश्वरानें त्यांजला शापित केलें आहे; तर ते विरळाच विश्वास धरतात. ८८. आणि जेव्हां परमेश्वराकडून त्यांच्यापाशीं (कुरआन) पुस्तक आलें कीं तें त्यांच्यापाशीं जें (तौरातपुस्तक) आहे त्याची सत्यताही पटवितें व लोक ह्याच्यापूर्वी (ह्याच्याच भरवंशावर) नास्तिकांविरुद्ध आपल्या जयाची प्रार्थना[2] करीत होते; तर जेव्हां जें कांहीं ते जाणून ओळखून

---

(१) शब्दशः भाषांतर तर हें आहे कीं आमचीं अंतःकरणें पडद्यांत अगर आवरणांत आहेत. त्याचा भावार्थ हा कीं इस्लामचे पैगंबर ज्या ज्या गोष्टींचें शिक्षण देतात त्या आम्हीं कबूल करीत नाहीं; कारण कीं आमचीं अंतःकरणें फार खोल व दूर आहेत. जणूं काय साता-पडद्यांत असून त्यांवर कोणत्याच शिक्षणाचा कांहीं परिणाम घडून येऊं शकत नाहीं व त्यास तेथें वावही मिळत नाहीं. तर आह्मां पासून इस्लाम स्वीकारण्याची आशाच नको. ह्या त्यांच्या समजुतीचें परमेश्वरानें खंडन केलें व बजाविलें कीं हें आवरण नव्हे; पण त्यांस हा परमेश्वराचा शाप होय.

(२) [illegible]गजे कलियुगाच्या हजरत मोहंमद पैगंबर साहेबांच्या आग-[illegible] (म्हणजे जुना करार) यांत भविष्य वचन लिहिलेलें होतें व

होते, तें त्यांच्यापाशीं येऊन चुकलें तेव्हां ते त्याची नाकारणी करूं लागलें. ह्मणून नाकारणाऱ्यांस परमेश्वराचा शाप होय. ८९. ज्या (गोष्टीं)च्या ऐवजीं त्या लोकांनीं (आपल्या मतें) आपले जीव खरीदले आहेत, तो कितीतरी वाईट (मोबदला) होय! म्हणजे (एवढ्याच गोष्टीवरून कीं) परमेश्वर आपल्या सेवकांपैकीं ज्याला इच्छील त्याला आपली कृपा प्रगट करील; ते शिरजोरी करून, परमेश्वरानें जें (पुस्तक) प्रकटिलें आहे त्यास नाकारूं लागले. तर ते कोपावर कोपांत येऊन सांपडले. आणि नाकारणाऱ्यांस फजितीची शिक्षा (होणें) आहे. ९०. आणि जेव्हां त्यांना सांगितलें जातें कीं (कुर्आन) जें परमेश्वरानें प्रकट केलें आहे त्याचा विश्वास धरा; तेव्हां ते जबाब देतात कीं आम्हीं तर जें (पुस्तक) आम्हांस प्रकट झालें आहे, त्यावरच विश्वास ठेवितों. सारांश, त्याच्याशिवाय दुसऱ्या (पुस्तका)ला मानण्याचें ते नाकारतात. आणि खरें पाहिलें असतां, हें (कुर्आन) सत्य आहे (व) जें (पुस्तक)

---

यहुदीलोक ह्या पैगंबराची वाट पाहत होते; आणि ते मूर्तिपूजकांविरुद्ध अशी प्रार्थना करीत होते कीं परमेश्वर करो आणि तो येणारा पैगंबर प्रगट होवो, ह्मणजे आह्मीं त्याच्या बळावर मूर्तिपूजकांवर आपलें वर्चस्व गाजवूं.

(१) पवित्र कुराणांत दुसरें जागीं असें लिहिले आहे कीं "प्रत्येक मनुष्य आपल्या कर्माबद्दल गहाण आहे" आणि "दरएक आत्मा आपल्या कर्माबद्दल गहाण आहे;" ह्मणजे प्रत्येक मनुष्याचा जीव परमेश्वरापाशीं कर्माबद्दल गहाण आहे; जो कोणी सुकर्म करील त्याचा आत्मा मुक्त होईल. हीच स्थिति यहुद्यांचीही होती. परंतु त्यांनीं आपल्या मुक्तीच्या ऐवजीं शेवटल्या युगाच्या अपेक्षित पैगंबरास नाकारिलें व ह्या नाकारणीलाच ते आपल्या मुक्तीचें साधन समजून बसले. ही त्यांची घोडचूक होय.

(२) ह्मणजे यहुदी आपल्या खोडसाळपणाचे शासनार्थ ईश्वराचे कोपांत होतेच. आतां त्यांच्यावर हा दुसरा कोप उतरला कीं हजरत मोहंमद पैगंबराला कुराण सादर होतांना पाहून ते मनांत जळूं ल[illegible] ह्मणजे सोडून दुहेरी दुहेरी कोप त्यांच्यावर उतरले.

त्यांच्यापाशीं आहे त्याची तें सत्यताही दर्शवितें. (हे पैगंबरा! तूं त्यांना हें तर) विचार, बरें जर तुम्हीं (म्हणजे तुमचे पूर्वज) विश्वासू असते, तर पूर्वीं (चे काळीं) ते परमेश्वराचे प्रवक्त्यांस जिवें कां मारीते? ९१. आणि तुम्हांपाशीं मूसा खुल्या (खुल्या) निशाण्या घेऊन येऊनही चुकला होता; त्यावरही तुम्हीं त्याच्या (तौरात आणण्यासाठीं तूर पर्वतावर गेल्या) पश्चात् वासराला (भक्तिप्रित्यर्थ) घेऊन बसलां. आणि (असें केल्यानें) तुम्हीं (आपलेंच) नुकसान करीत होता. ९२. आणि (तो वेळ आठवा कीं) जेव्हां आम्हीं तुम्हां-(म्हणजे तुमच्या पूर्वजां) पासून पक्कें वचन घेतलें व तूर (पर्वता)ला उचलून तुमच्या (म्हणजे तुमच्या पूर्वजांच्या शिरा) वरतीं (आणून लोंबकळू) लाविलें; (आणि आह्मी आज्ञा केली कीं हें तौरात पुस्तक) जें आम्हीं तुह्मांस दिलें आहे त्याला मजबूत धरून राहा; आणि (त्यांत जें कांहीं लिहिलेलें आहे तें) ऐका; (व पदरीं बांधा. ह्मास उत्तरादाखल) ते लोक (तात्काळ) ह्मणाले कीं आम्हीं ऐकिलें तर खरें; पण आह्मीं (त्यास) मान्य करीत नाहीं. आणि त्यांच्या नास्तिकपणामुळें वासरूं (ह्मणजे त्या विषयींची पूज्य-बुद्धि) त्यांच्या अंतःकरणांत भिनून गेली होती. (हे पैगंबरा! तूं त्या लोकांस) सांग कीं जर तुम्हीं विश्वासू आहां, तर तुमचा विश्वास तुम्हांस (फारच) वाईट शिक्षण देतो. ९३. (हे पैगंबरा! तूं त्यांना) सांग कीं जर परमेश्वरा पाशीं परलोक निखालस तुम्हां करतांच आहे व दुसऱ्या लोकां-करतां नव्हे, व तुह्मीं (ह्या दाव्यांत) रास्त आहां; तर तुह्मीं मृत्युची हांव धाला; (कीं लवकरच स्वर्गांत प्रवेश होईल). ९४. परंतु जीं (दुष्ट कर्में) त्यांच्या हातांनीं पूर्वीं घडून आलीं आहेत त्यांमुळें ते मृत्युची हांव घालूं शकणारच नाहींत. आणि परमेश्वर (या) आज्ञा-भंजकांस खूप जाणून आहे. ९५. आणि (हे पैगंबरा!) अर्थातच तुला हें आढळून येईल कीं हे लोक जीवनाचे (सर्व) लोकांहूनही अतिशय जास्त लोभी होत; येथपर्यंत कीं (दुसऱ्यांना परमेश्वराचे) जोडीदार[१]

(१) ि,\ वार्थ इतकाच कीं जे लोक दुसऱ्यांना परमेश्वराचे जोडीदार थानाला मानीत नाहींत. त्यांना ऐहिक जीवनाचा लोभ

मानणारे (कीं ज्यांना पुन्हां उठणें मुळांत मान्यच नाहीं) त्यांच्यांतून हरेक असेंच चिंतितो कीं (ईश्वर करो आणि) आपल्याला एक हजार वर्षांचें आयुष्य दिलें जावो! आणि वास्तविक (तो इतका काळ जगला, तरीही) दीर्घायुष्य दिलें जाणें हें त्याची शिक्षेपासून सुटका करणार नाहीं. आणि जें कांहींही हे लोक करितात तें परमेश्वर पहात आहे.
९६. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं जो कोणी जिब्रील (दूता)चा दुश्मान होईल (तर होवो बापडा!) हें (कुर्आन्) त्या(दूता)नेंच परमेश्वराचे आज्ञेनें तुझ्या अंतःकरणांत भरविलें आहे; (आणि कुर्आन) हें आपल्या (प्रकटीकरणाचे) आधीं (पुस्तकें म्हणून एकंदरींत) जीं होतीं त्यांचें सत्यत्व दर्शवितें; आणि तें विश्वासूं साठीं सद्बोध व (तारणाचें) शुभवर्तमान होय. ९७. जो कोणी परमेश्वराचा दुशमन होय व त्याच्या दूतांचा व त्याच्या प्रेषितांचा व (प्रामुख्यें करून) जिब्रील (दूता)चा व मीकाएल (दूता)चा; तर खरोखरींच परमेश्वरही अशा नास्तिकांचा दुशमन होय. ९८. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुजकडे सुबोध (व स्पष्ट अर्थाचीं) महा वाक्यें पाठविलीं आहेत. आणि आज्ञाभंजक लोकांशिवाय त्यांस कोणीही नाकबूल करीत नाहीं. ९९. आणि कां (या यहु-

---

होणें हें आश्चर्य नव्हे. कारण, त्यांच्या कल्पनेनें जें कांहीं आहे तें हेंच जग आहे; आणि ह्यांत जितकें आपण जगूं तितकाच अलभ्य लाभ. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं ज्या लोकांना पुनरुत्थानाचें होणें मान्य आहे, तेही या जगाच्या क्षणभंगुर जीवित्वाचे लोभिष्ट होत!

(१) यहुद्यांच्या खोडसाळपणापैकीं एक गोष्ट ही होती कीं त्यांच्या धर्मपुस्तकांत आज्ञाभंजक लोकांस जिब्रीलदूताचे हस्तें शिक्षा ठोठावण्याचा मजकूर होता यामुळें ते जिब्रीलशीं खुष नव्हते. हजरत मोहंमद पैगंबर साहेब कुराणासंबंधीं ह्मणत कीं ते परमेश्वरापासून जिब्रील मजला प्रकट करतात. परमेश्वरानें यहुद्यांच्या ह्या खोट्या व वेडगळ मताचें याप्रमाणें खंडन केलें; कीं मिकाएल ह्यांस लोकांला अन्न पुरविण्याचा अधिकार आहे तरी जिब्रीलच्या व त्यांच्यामध्यें परस्पर प्रतिनिधित्वाचा संबंध आहे. आणि अवघे दूत परमेश्वराचें [illegible]ष्कर आहे[illegible] तर जो कोणी त्यांजपैकीं एकाचा शत्रु झाला तो दुसऱ्याचाह

यांनीं खोडसाळपणावरच इतकी कंबर बांधिली आहे कीं) जेव्हां जेव्हां ते एखादा करार करितात, तेव्हां त्यांच्यांतून कोणी ना कोणी तरी लोकपक्ष त्यास धाब्यावर बसवून ठेवितो; किंबहुना त्यांच्यांतील बहुतेक तर विश्वासही ठेवीत नाहींत. १००. आणि जेव्हां त्यांजकडे परमेश्वराकडून (हजरत मोहंमद) पैगंबराचे आगमन झालें (व तो) या (यहुद्यां)पाशीं जें तौरात (पुस्तक) आहे त्याचें सत्यत्वही दर्शवितो; तेव्हां (ह्या) ग्रंथधारी लोकांपैकीं एका पक्षानें परमेश्वराचें पुस्तक (तौरात ज्या मध्यें ह्या मोहंमद पैगंबराविषयीं भविष्यवचनही आहे तें) आपल्या पाठीमागें (असें) झुगारून टाकिलें; जणों कीं त्यांना (त्याची) कांहीं जाणीवच नव्हती. १०१. आणि ते, सुलेमान पैगंबराचे राज्याचे अमदानींत सैतान (म्हणजे असुर लोक) जें (धंतर मंतर) पठन पाठन करीत होते त्याच्या नादीं लागले. वास्तविक पाहतां सुलेमानचे हातून नास्तिकपणाचें (हें) काम नाहींच घडलें; परंतु नास्तिकपणाचें काम (केलें होतें तर) असुरांनीं केलें होतें कीं ते लोकांस जादू शिकवीत होते. आणि (ह्याशिवाय ते लोक) बाबेल मध्यें हारूत व मारूत या दोघां दूतांस ज्या (गोष्टी) प्रकट केल्या गेल्या होत्या (त्यांच्याही नादीं लागले) आणि ते उभयतां (दूतही त्यांना

(१) ज्याप्रमाणें आज लोकांत ज्योतिष, फलज्योतिष, गंडादोरा वगैरे वगैरे पुष्कळ धंतर मंतर व ठकविद्या प्रचलित आहे त्याच प्रमाणें यहुदीही असल्या निरर्थक गोष्टींत आपला वेळ दवडीत असत; येथपर्यंत कीं त्यांना आपलें दिव्य पुस्तक तौरातचीही खबर नव्हती. आणि पैगंबर साहेब काय ह्मणतात व कोणतें शिक्षण देतात याचा त्यांना गंधही नव्हता. ह्या धंतर मंतरलाच ते धर्म समजून बसले होते. या धंतर मंतर व जादू वगैरेची उपपत्ति परमेश्वरानें अशी वर्णिली आहे कीं हजरत सुलेमान प्रेषितांच्या राज्याचे अमदानींत या गोष्टींचा फार बोभाट व चर्चा होती. परंतु हें अधर्मीपणाचें काम हजरत सुलेमानचे हातून झालें नव्हते; तर हें तत्कालीन असुरांचें काम होतें. नंतर बाबेल ह्मणजे बाबिलोनीयामध्यें हारूत व मारूत [illegible] कोणी ह्मणतो, दूत होते व कोणी ह्मणतो, सौंदर्यादि गुणांनीं संपन्न अशीं वरचे [illegible] होतीं; व कोणी ह्मणतो, बादशाह होते—कांहीं असो;

जें कांहीं पोहोचलें होतें तें) कोणालाही शिकवीत नसत; येथपर्यंत कीं ते (त्याला बजावून) सांगींत की (बाबारे!) आम्हींतर परिक्षेची कसोटी आहों; तर (या विद्येचा दुरुपयोग करून) कोठें तूं नास्तिक बनूं नकोस. यावरही ते त्या उभयतां पासून अशा गोष्टी शिकत कीं ज्या योगें ते पतिपत्नींमध्यें ताडातोड करीत. तथापि परमेश्वराचे हुकमावांचून ते (आपल्या) या (तितंब्या)नें कोणालाही नुकसान पोहों-चवूं शकत नाहींत. सारांश, हे लोक, ज्या (गोष्टी खुद्द) यांनाच नुक-सान पोहोंचवीत व यांना (कोणाही तऱ्हेचा) नफा पोहोंचवीत नसत अशा (गोष्टी त्यांच्यापासून) शिकत. आणि वस्तुस्थिति अशी होती कीं ते हें जाणून चुकले होते कीं जो कोणी या गोष्टींचा खरीददार झाला, त्याचा परलोकीं कांहींच वांटा नाहीं. आणि ज्याच्या बद्‌लीं यांनीं आपले जीव विकले तो अर्थात (फारच) वाईट (मोबद्‌ला) होय. यांना जर (इतकी) जाणीव असती (तर बरें होतें)! १०२. आणि जर हे विश्वास धरते व (परमेश्वराला) भिऊन वागते, तर (जी) पुण्यप्राप्ति (यांना) परमेश्वराकडून (मिळती ती त्यांच्या ठायीं या पेक्षांही) उत्तम होती. यांना जर (इतकी) समज असती (तर बरें होतें)! १०३. अहो मुसलमानांनों! तुह्मी (पैगंबराला) 'राएना'

---

ज्या काळाचें हें कथन आहे त्या काळीं तीं माणसें होतीं. त्यांनाही असले तोडगे व गौडबंगाल माहीत होतें; व ते लोकांच्या आग्रहामुळें त्यांस शिकवीतही होते. परमेश्वरानें जादू व तोडगे यांचें भांडें फोडिलें; आणि हेंही सांगून दिलें कीं हें अधर्म व नास्तिकपणाचें काम होय. परमेश्वरानें हेंही सुचविलें कीं माझ्या हुकमावाचून कांहींच होणें सवरणें नाहीं.

( १ ) ह्मणजे नास्तिक मतांचा अंगिकार करून त्यांनीं आपल्या जन्माचें मातेरें केलें.

( २ ) पैगंबर साहेब जेव्हां धर्मसंबंधीं कांहीं उपदेशपर विवेचन करीत, तेव्हां श्रोते मंडळींत, मुसलमान, यहुदी, ख्रिस्ती, मूर्तिपूजक वगैरे सर्वच प्रकारचे लोक असत. कधींकधीं असेंही होई कीं कांहीं ग्रंथ कोणाला बरोबर न ऐकूं येई, तेव्हां त्याला ह्मणावें लागे कीं

(अशा) शब्दांनी संबोधून बोलूं नका; तर 'उन्जुर्ना' बोलत जा व (ध्यान लावून) ऐकत जा. आणि जे नास्तिक होत त्यांच्या साठीं दुःखदायक शिक्षा होय. १०४. ग्रंथधारी लोक व (तसेच) मूर्तिपूजक यांजपैकीं जे लोक (इस्लामधर्मास) नाकारितात, त्यांस ही गोष्ट पसंत नाहीं कीं तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हां (मुसलमानां)स कांहीं कल्याण (ह्मणजे प्रकटीकरण) सादर व्हावें. आणि परमेश्वर ज्याची इच्छितो त्याची आपल्या दयेसाठीं खास (निवड) करितो. आणि परमेश्वर महान् कृपानिधि होय. १०५. (हे पैगंबरा!) आह्मीं एखादी आयत (ह्मणजे महा–वाक्य) खोडून[१] टाकूं वा (तुझ्या) स्मृतिपटलावरून ती पुसून टाकूं, तर आम्हीं तिच्यापेक्षांही उत्तम वा तसलीच प्रकटही करूं शकतों. (हे पैगंबरा,) कां तुला ठाऊक नाहीं कीं परमेश्वर सर्व शक्तिमान् आहे? १०६. कां तुला हें माहीत नाहीं कीं आकाश व पृथ्वी यांचें राज्य त्याच परमेश्वराचें होय? आणि परमेश्वरावाचून तुमचा (मुसलमानांचा) कोणी मित्र नाही व कोणी मदत-

---

बोला. यहुदी जे पैगंबर साहेबांचे कट्टे शत्रु होते, ते 'राएना' हा व्द्यर्थक शब्द उच्चारीत. त्याचा एक अर्थ तर हा कीं आह्मीं समजलों नाहीं; आह्माकारितां पुन्हा एकदां बोला; व दुसरा अर्थ, त्यांच्या भाषेंत, हे फुशारकी व शेखी मिरविणाऱ्या मूर्खा! असा अपशब्दव्यंजक होतो; आणि 'राएना' यांत मधल्या अक्षराचा दीर्घ उच्चार केला ह्मणजे त्याचा 'हे आमच्या मेषपाला किंवा हे आमच्या राखणदारा' असा अर्थ होतो. मुसलमान कीं ज्यांच्या मनांत कांहींच खोट नव्हती त्यांचें ह्याकडे लक्ष्य गेलें नाहीं. यहुद्यांना पाहून तेही 'राएना' च बोलूं लागले; यहुद्यांस कुटाळकीची संधि मिळाली. म्हणून परमेश्वरानें मुसलमानांस समजाविलें कीं तुम्ही ज्यांत अनादराचा बोध होतो असा शब्द कां उच्चारितां? तर राएना नाहीं पण उन्जुर्ना बोलत जा कीं त्याचाही तोच अर्थ आहे कीं आम्हांकरतां पुन्हां एकदां बोला.

(१) कुराण जोंपर्यंत प्रकट होत राहिलें तोंपर्यंत त्यांतलें एखादें ...चारांतून वा पठनपाठनांतून रद्दही होई. विरोधी पक्षी-

**गारहि नाहीं. १०७. (मुसलमानांनों!) कां तुह्मीं हें इच्छितां कीं ज्याप्रमाणें पूर्वकाळीं मूसापाशीं (वेडगळ मागण्या व) प्रश्न केले गेले होते, त्याप्रमाणेंच तुह्मींही आपल्या पैगंबरापाशीं (वेडगळ मागण्या व) प्रश्न करावेत? आणि जो कोणी विश्वासाचे बदली अविश्वास पत्करील, तर तो सरळ मार्गाहून खचितच बहकला. १०८. (मुसलमानांनों!) बहुतेक ग्रंथधारी लोक, त्यांना सत्य जाहीर होऊन चुकलें तरी देखील आपल्या मनांतल्या मात्सर्यामुळें, अशी उत्कंठा बाळगितात कीं तुमच्या विश्वासधारणानंतरही त्यांनी तुम्हांस पुन्हां नास्तिक करून टाकावेत. तर तुम्हीं**

---

यांचा यावर आक्षेप होता व आतांही आहे. त्याचा जबाब परमेश्वरानें असा दिला कीं आम्ही आपल्या सेवकांचें हित कशांत आहे हें खूप समजतों. लोकांची स्थिति सर्वदा सारखीच राहत नसते; तर त्यांचे स्थित्यंतर होतच असतें. त्याच्या स्थित्यंतरास अनुसरून योग्य ते हुकूम दिले जातात व त्यांच्या स्थितीचा पालट करण्याचाही अधिकार आम्हांला आहे. त्यांना वेळोवेळीं जें जें शिक्षण देणें योग्य समजलें जातें तें त्यांस दिलें जातें. यांवर आक्षेप तो काय?

(१) यहुद्यांस फारच वितंडवाद करण्याची संवय होती व त्याचें उदाहरण गौयागांत माहीत झालेंच आहे. परमेश्वरानें मुसलमानांस अशा रीतीनें खोरसणी करण्यापासून मनाई केली व आयातच्या रद्द होण्यासंबंधी कारणमीमांसा करीत बसणें हीही एकातऱ्हेची खोरसणीच होय. अशाच तऱ्हेनें यहुदी हजरत **मू**सापाशीं वेडगळ मागण्या करीत होते. ते कधीं म्हणत कीं आम्हांस परमेश्वर आणून दाखीव; कधीं बोलत कीं मन्न व सल्वा आम्ही नाहीं खात; कधीं ह्मणत कीं दुसरे लोक मूर्ती पूजतात, तर तूं आम्हांलाही एक मूर्ति बनवून दे. अशाच कांहीं गोष्टी तत्कालीन कांहीं मुसलमानाविषयींही बोलिल्या जातात. उदाहरणार्थः 'जाते अन्वात' हा एक वृक्ष होता; मूर्तिपूजक त्याचा कौलप्रसाद घेत असत. कांहीं मुसलमानांनी पैगंबर साहेबांसही दरखास्त केली कीं आम्हांलाही असें एक स्थान बनवून द्या. तर या वाक्यांत जेथें वेडगळ मागण्यांची मनाई आहे तेथें असल्या प्रश्नांचीही मनाई होय.

(त्यांना) माफ करा व सोडा, जाऊं द्या; येथपर्यंत कीं परमेश्वर आपला (आणखी कांहीं) हुकूम[1] सादर करील. निःसंशय परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. १०९. आणि तुम्ही नमाज पढीत जा व जकात देत असा. आणि जें कांहीं पुण्य तुम्ही आपल्या साठीं (पुढच्या सामुग्रीदाखल) पहिल्यानेंच पाठवाल, तें तुम्हीं परमेश्वरापाशीं (जाऊन) पावाल. निःसंशय जें कांहीही तुम्ही करितां, तें परमेश्वर पाहत आहे. ११०. आणि (यहुदी) म्हणतात कीं यहुद्यां (शिवाय) व (खिस्ती म्हणतात कीं) खिस्त्यां शिवाय स्वर्गांत कोणाच्यानेंच जाववणार नाहीं. ह्या त्यांच्या (आपल्या) मिथ्या कल्पना होत. (हे पैगंबरा तूं या लोकांस) सांग की जर तुम्ही खरे आहां तर तुम्ही आपलें प्रमाण पुढें करा. १११. किंबहुना (वास्तविक गोष्ट ही आहे कीं) ज्यानें खुद्द आपल्याला[2] परमेश्वराचे आधीन केलें, व तो परोपकारीही आहे, तर त्याला त्याचा मोबदला त्याच्या पालनकर्त्यापाशीं (प्राप्त) होईल. आणि (परत्रीं) असल्या लोकांस (कसलेंच) भय राहणार नाहीं व ते दुःखीही होणार नाहींत. ११२. आणि यहुदी म्हणतात कीं खिस्ती (धर्म) कशांतच नाहीं; व खिस्ती म्हणतात कीं यहुदी (धर्म) कशांतच नाहीं.

---

(१) हुकूम म्हणजे जिहाद उर्फ धर्मयुद्धाची परवानगी. जेव्हां ग्रंथधारी म्हणजे ज्यांच्यापाशीं ईश्वरी पुस्तकें आहेत असे यहुदी व खिस्ती लोक यांनीं आपल्या पुस्तकांत हजरत मोहंमद पैगंबराविषयीं भविष्यवचन असूनही इस्लामधर्म स्वीकारिला नाहीं, तेव्हां ते उलट मूर्तिपूजकांशीं मिळून मुसलमानांस पुन्हां नास्तिक बनविण्यास झटूं लागले व त्यांना छळूं लागले. सुरवातींत मुसलमान त्यांच्या वाटे न जातां क्षमाशीलता व मौन धारण करीत. आणि कांहीं तिखट स्वभावाचे लोक हातघाईवर येऊं पाहत, तेव्हां पैगंबर साहेब त्यांना रोखून ठेवीत असत. परंतु सहनशीलता व उपेक्षा यांचाही कांहीं परमावधी असतो; तर जेव्हां गोष्ट गळ्यापर्यंत आली तेव्हां आपल्या व धर्माच्या संरक्षणा साठीं धर्मयुद्ध करणें भाग पडलें.

(२) वज्ह म्हणजे तोंड, तर आपले तोंडाला आधीन केलें म्हणजे आपल्याला आधीन केलें.

**आणि खरें पाहूं जातां, ते (दोन्हीही पंथाचे लोक, ईश्वरी) पुस्तक वाचीत असतात. अशाच तऱ्हेनें (मूर्तीपूजक अरब) ज्यांना (ईश्वरी हुकमांचें कांहीं) ज्ञानही नाहीं तेही त्यांच्याच सारख्या गोष्टी बोलत असतात. तर ज्या गोष्टींत हे लोक वादविवाद करितात, त्यांचा, पुनरुत्थानाचे दिवशीं परमेश्वर यांच्या मध्यें फैसला करील. ११३. आणि जो कोणी परमेश्वराच्या मशीदींत परमेश्वराचें नामस्मरण केलें जाण्यास मनाई करील व त्यांच्या बेचिराख करण्यास झटेल, अशा (मनुष्या) पेक्षांही विशेष जुलमी (आणखी) कोण? हे लोक खुद्द ह्या लायक नाहींत कीं त्यांनीं (उजळ माथ्यानें) मशीदींत शिरावें, परंतु भीत भीतच. यांच्यासाठीं इहलोकींही नामोशी आहे आणि परलोकींही यांना मोठी**

---

(१) समग्र सृष्टीचा उत्पन्नकर्ता असा जो एकच परमेश्वर, त्याचें नामस्मरण त्यास वाहिलेल्या मशीदींत अगर भजनालयांत करणें हें प्रत्येक मानवाचें आद्य कर्तव्य होय. जो कोणी हें कर्तव्य स्वतः न बजावितां तें बजावतांना दुसऱ्याच्याही आड येईल व परमपूज्य परमेश्वराची पवित्र मशीद उजाड करील व तिला कांटी लावील, तो अतोनात जुलमी होय. आणि असा ईश्वर द्रोही व दुर्दैवी मनुष्य कितीही जबरदस्त व दीर्घायु असला तरी जुलमाचे दिवस थोडे. तो उजळ तोंडानें मशीदींत वा भजनालयांत शिरण्यास योग्यच नाहीं; कारण कीं सर्वत्र परमेश्वराचें सत्तारूपी अस्तित्व आहेच. तर त्याला भीत भीतच राहिलें पाहिजे. त्याच्यावर कोणतें अरिष्ट केव्हां ओढवेल याचा नेम नाहीं. अशा ईश्वरद्रोहाचा कसा विपरीत परिणाम होतो याचीं उदाहरणें जगाचे इतिहासांत पुष्कळ आहेत. तर अशालोकांस इहलोकींही नामोशी आहे व परमेश्वरापुढें त्याचे काय हाल होतील, नकळे. इस्लामचे प्रसाराचे आरंभीं मक्केकर मूर्तिपूजक व नास्तिक लोक, पैगंबर साहेब व त्यांचे अनुयायी यांचा फार छळ करीत होते; त्यांना बांग पुकारण्यास व नमाज पढण्यास मनाई करीत; पैगंबर साहेबांचे वाटेंत कांटे हाथरीत. ते नमाज पढीत असतांना त्यांनीं त्यांना बळेंच धरून एकदा त्यांचा गळा दाबिला; आणि एकदां ते परमेश्वरापुढें सिजदा म्हणजे साष्टांग नमस्कार घालीत असतां, त्या नास्तिकलोकांनीं त्यांचे मानेवर उंटाचें आंतडें आणून घातलें. साधारण छळ तर नित्य चालूच होते. नंतर जेव्हां जिवावर पाळी आली व फिर्याद उभे

**(भारी) शिक्षा होय. ११४. आणि पूर्व व पश्चिम (ह्या दिशा) परमेश्वराच्याच होत. तर जेथेंही कोठें तुम्हीं (किब्ल्याकडे) तोंड कराल, तेथेंच परमेश्वराचा सामना आहे. निःसंशय परमेश्वर सर्व-व्यापी व सर्वज्ञानी होय. ११५. आणि ते म्हणतात (कसें) कीं परमेश्वर पुत्र बाळगितो. (पण) तो (ह्या बखेड्यापासून) पाक होय. किंबहुना, आकाश व पृथ्वी यांत जें कांहीं आहे तें त्याचेंच**

---

ईश्वराज्ञेनें पैगंबर साहेब मक्का सोडून मदिनेंत येऊन राहिले. या हिजरत म्हणजे स्वदेशत्यागाचे सहावे वर्षीं पैगंबरानें उमरा म्हणजे मक्केचें तीर्थ—याचेंही पुण्य हज्ज म्हणजे नेमलेल्या काळची मक्केची यात्रा याच्या जवळ जवळच आहे—करण्याचा बेत केला. परंतु मक्ककरांनीं त्यांस मज्जाव केला. या जुलमाकडेही या वाक्यांत इषारा आहे. ह्याच्या पारिपत्यास्तव पैगंबरानें भाकीत केलें होतें तें पूर्ण झालें; म्हणजे मक्का जिंकला गेला व मुसलमान त्यावर काबीज झाले, आणि नास्तिक व मूर्तिपूजक भयभीत होऊन पळत सुटले. मशीदींत कोणा-लाही एकाच व सर्वशक्तिमान परमेश्वराची उपासना करण्याची मनाई नाहीं. पैगंबर साहेबांची स्थिति अशी होती कीं जेव्हां नजरानचे खिस्ति लोक त्यांच्या सेवेंत येऊन हाजर झाले, तेव्हां त्यांनीं आपल्या खास मशीदी मध्यें त्यांस उतारा दिला व तेथें त्यांना आपल्यापरी भक्ति करण्याची पर-वानगीही दिली. ह्या भूलोकावर मनुष्य मात्रास सारख्या व सौम्य नजरेनें पाहणारा असा एकच इस्लामधर्म होय. त्यांत कोणाचा कसलाच द्वेष मानिला जात नाहीं.

( २ ) मक्केच्या नास्तिकांकडून मुसलमानांस काबा या पवित्र मंदिरांत ईश्वरभक्तिसाठीं मज्जाव होत होता, त्यानें मुसलमानांस अर्थातच विषाद वाटला असेल कीं त्यांना ईश्वरी मंदिरांत कां भक्ति करितां येऊं नये या वाक्यांत परमेश्वरानें मुसलमानाचें सांत्वन केलें आहे कीं त्यांच्या ह्या वर्तनाचें तुम्हीं वाईट कां मानतां? कारण हा मज्जाव थोड्या दिवसांसाठींच होय. तर नमाज पढावयाची ती पाहिजे तेथें होऊं शकते. मुसलमानांस सर्व [illegible]भर मशीदच आहे. कोठेंही कां असानात किब्ला म्हणजे काब्याच्या [illegible]तोंड करा म्हणजे ती परमेश्वर मान्य करितो.

हेंय. सर्वच त्याच्या आज्ञांकित होत. ११६. (हीं विचित्र) आकाश व पृथ्वी यांचा तोच उत्पादक होय. आणि जेव्हां तो कोणा एखाद्या कामाचा निश्चय करितो, तेव्हां तो त्याच्या संबंधानें फक्त एवढेंच फर्मावितो कीं हो, व तें होऊन जातें. ११७. आणि (मूर्तीपूजक अरब) ज्यांना (ईश्वरी नियमांचें कांहीं) ज्ञानही नाहीं, ते म्हणतात कीं परमेश्वर (खुद्द) अम्हांशीं संभाषण कां नाहीं करीत? अगर आम्हांपाशीं (आम्हीं मागतो तशी) एखादी निशाणी कां नाहीं येत? अशाच तऱ्हेनें जे लोक यांच्या पूर्वीं होऊन गेले आहेत, तेही यांच्याच सारख्या गोष्टी करीत असत. या (सर्वां) चीं अंतःकरणें (कांहींशीं) सारखींच होत. जे लोक दृढविश्वास (ठेवण्याची पात्रता) राखतात त्यांना तर आम्हीं (आपल्या) निशाण्या स्पष्टपणें दाखवून चुकलों आहों. ११८. (हे पैगंबरा!) आम्हीं तुला सत्धर्म देऊन (विश्वासूंस

---

(१) भावार्थ असा कीं जे लोक सत्यलोलुप व न्यायी स्वभावाचे आहेत त्यांच्या ठायीं, कुराण, त्याचें शिक्षण व त्याची वक्तृत्वपूर्ण वर्णन शैली, आणि हजरत मोहंमद पैगंबर व त्यांच्या पवित्र जीवन चरित्राचा नमुना, हीं सर्व समाधानकारक व समर्पक चिन्हें होत. आणि ज्यांच्या मनांत धरसोड व कचर आहे ते तर आपण मागितलेल्या निशाण्या पाहून तरी कां मानूं लागणार? सारांश, दुसऱ्या जागीं ह्याचें वर्णन आलें आहे. ते म्हणत असत कीं हे पैगंबरा! आम्हीं तुम्हांवर विश्वास ठेवण्यास तयार आहों परंतु तुम्ही अगोदर जमिनींतून एक पाण्याचा झरा वाहून दाखवा अगर अशी एक बाग लावून दाखवा कीं ज्यांत खजूर व द्राक्षें फळलेलीं असतील व नद्या वाहत असतील. अगर जसें तुम्ही आम्हाला दरडावितां, तसें आम्हांवर आकाश फाटून पडावें; किंवा परमेश्वरानें दूतासहपरिवार आमचे समक्ष येऊन उभें राहावें अगर सोन्या व चांदीचें एक घर आयतें बनविलेलें मिळावें किंवा तुम्हीं आम्हां समोर आकाशावर चढून दाखवा व आम्हांस तुमचें आकाशावर चढणेंही मान्य नाहीं; तर हें कीं तुम्हीं आकाशांतून आम्हांस एक पुस्तक प्रकट करवा कीं तें आम्हीं खुष वाचावें. तात्पर्य हें कीं ह्या लोकांनीं परमेश्वराबरोबर हारजीत मांडली होती.

तारणाची) सुवार्ता सांगणारा व (नास्तिकांस परलोकींचे शिक्षेचें) भय सुचविणारा (करून) पाठविला आहे आणि तुला नरकवासी लोकांसंबंधीं (कांहीं) विचारणा[1] केली जाणार नाहीं. ११९. आणि (हे पैगंबरा!) यहुदी तुझ्याशीं कधीं खुष होणार नाहींत व खिस्तीहि (तुझ्याशीं खुष होणार) नाहींत; येथपर्यंत कीं तूं त्यांचाच धर्म (न) अनुसरशील. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं परमेश्वराचा सन्मार्ग तोच (अस्सल) सन्मार्ग होय. आणि (हे पैगंबरा!) जर तूं, ज्ञान (म्हणजे कुर्आन्) जें तुजपाशीं येऊन चुकलें आहे त्या उपरांत, त्यांच्या मनेच्छेप्रमाणें चाललास, तर (मग) तुला परमेश्वरा-(चे कोपा) पासून (वांचविणारा) ना कोणी मित्रच होय व ना कोणी मदतगार. १२०. ज्या लोकांस आम्हीं कुर्आन् दिलें आहे, ते जसा त्याच्या वाचण्याचा हक्क आहे तसें वाचीत राहतात. (व) हेच त्यावर विश्वासही ठेवतात. आणि जे त्यास मानण्याचें नाकारितात तेच लोक तर तोट्यांत[2] होत. १२१. अहो बनी-इस्राएलांनों! मी

---

म्हणण्याप्रमाणें एखादी गोष्ट झालीही असती, तरी त्यांनीं दुसरें दुसरें निमित्त काढून उभें केलें असतें. कारण कीं परमेश्वरानें त्यांस साशंकवृत्तीचेच निर्माण केलें होतें. आणि वहीमाचें औषध लुकमानापाशींही नाहीं.

( १ ) म्हणजे, अहो पैगंबर साहेब! तुम्हांस जी ही तळमळ वाटते कीं लोकांचे मोठमोठाले समुदाय भराभर मुसलमान कां होत नाहींत? तर तुम्हांस ती न वाटतां, सबुरी ठेविली पाहिजे. कारण कीं, नरकवासी लोकांची जबाबदारी तुम्हांवर नाहीं. लोक जसें करतील तसें भरतील.

( २ ) भावार्थ असा कीं, यहुदी व खिस्ती तर कुराणापासून धर्म विषयक फायदा घेऊं इच्छित नाहींत, तर कांहीं फिकिरीची गोष्ट नाहीं. अखेर असे लोक तर आहेतच कीं जे कुराणाला चित्त देऊन वाचीत राहतात व त्याच्या योग्य पारायणानंतर त्याचें ईश्वर–प्रणित दिव्य पुस्तक होणें मान्य करितात व मान्य करून चुकले आहेत. अशाच अर्थाचें वाक्य कुराणांत दुसरीकडे आलें आहे; "हे (नास्तिक) जर या (देणग्यां)ची किंमत जाणत नाहींत तर (कांहीं चिंता नाहीं; या साठीं कीं) आम्हीं या (देणग्या)

जे उपकार तुम्हांवर केले आहेत त्या माझ्या उपकारांचें स्मरण करा; आणि ह्याचेंहि कीं मीं तुम्हांस सकल जगांच्या लोकांवर श्रेष्ठत्व दिलें. १२२. आणि तुम्हीं अशा एका दिवसा (चे शिक्षे) चें भय बाळगा कीं ज्या दिवशीं कोणी मनुष्य कोणा मनुष्याच्या कांहींच कामीं येणार नाहीं, व त्याच्याकडून कांहीं भरपाई कबूल केली जाणार नाहीं व (कोणाची) शिफारस त्याला फायदा देणार नाहीं आणि लोकांना (कोणीकडून) मदत पोहोंचणार नाहीं. १२३. आणि (हे पैगंबरा! बनी-इस्राएलांस तूं तो वेळ आठवून दे कीं) जेव्हां इब्राहीमास त्याच्या पालनकर्त्यानें कित्येक गोष्टींनीं कसून पाहिलें व त्यानें त्या पूर्ण करून दाखविल्या; तेव्हां (परमेश्वरानें प्रसन्न होऊन) म्हटलें कीं मीं तुला लोकांचा इमाम (म्हणजे धर्माध्यक्ष) बनविणार आहें. (इब्राहीमानें) विनंति केली, आणि (मग) माझ्या वंशांतून? (परमेश्वरानें) उत्तर दिलें, (होय! पण,) माझ्या ह्या वचनांत (नाहक) जुलूम[१] करणारे सामील नाहींत. १२४. आणि (हे पैगंबरा! बनी-इस्राएलांस तूं तो वेळही

---

अशा लोकांस सोंपविल्या आहेत कीं जे त्यांचे गुणग्राहक नाहींत असे नाहीं." ते जसा त्याच्या वाचण्याचा हक्क आहे तसें वाचीत राहतात, म्हणजे बरोबर समजून वाचितात. आणि जे त्याचा अव्हेर करतात ते कुराण वाचीत नाहींत व त्यांना तारणाचा मार्ग सुचत नाहीं म्हणून तेच लोक तर तोट्यांत होत.

(१) येथून थेट ह्या भागाच्या समाप्तीपर्यंत एकच विषय चाललेला दिसून येतो. त्याचा अस्सल रोंख यहुद्यांकडे आहे व कोठें कोठें लपेटींत खिरस्तीही येऊन गेले आहे. यहुदी लोकांस तौरात पुस्तक मिळालें होतें व ते हजरत इब्राहीम पैगंबराचा मोठा आदर ठेवीत होते. असें असूनही इब्राहीमाचा पुत्र, हजरत इस्माईल यांचा वंश म्हणजे अरब लोक, यांच्याशीं त्यांस वैमनस्य असें; या द्वेषामुळेंच त्यांची अशी कल्पना व भावना झाली होती कीं या जगाचें राज्य व धर्माध्यक्षता म्हणजे पैगंबरी ज्यांचें अभिवचन परमेश्वरानें इब्राहीमाचे वंशास दिलें होतें, तें इब्राहीमाचा पुत्र, इस्हाक याच्याच वंशांत फलीभूत होईल. हजरत मोहंमद पैगंबर साहेबांशीं

आठवून दे कीं) जेव्हां आम्हीं (काबा) गृहाला लोकांचें पुण्यक्षेत्र व शांतिस्थान ठरविलें; आणि (लोकांस आज्ञा केली कीं) इब्राहीमचे (ह्याच) जागेला तुम्हीं नमाजीची जागा मुकर ठेवा. आणि आम्हीं इब्राहीम व इस्माईल यांस आज्ञापिलें कीं माझ्या (ह्या) गृहाला तुम्हीं उभयतां, प्रदक्षिणा घालणारे, व व्रतस्थ होऊन आंत वास्तव्य करणारे आणि नमन करणारे व साष्टांग नमस्कार घालणारे (म्हणजे नमाजी) अशा लोकांसाठीं पाक (साफ) राखा. १२५. आणि (हे पैगंबरा! तूं त्यांना तो वेळही आठीव कीं) जेव्हां इब्राहीमानें प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! या (शहरा) स तूं शांततेचें शहर बनीव आणि तेथील रहिवाश्यांस, (म्हणजे) त्यांच्यापैकीं परमेश्वरावर व शेवटल्या दिवसावर विश्वास ठेवितील त्यांस फळफळावळ खाव-

---

त्यांच्या विरोधाचें कारणही हेंच होय. या वाक्यांत यहुद्यांचा गैरसमज उघडकीस आणिला गेला आहे व त्यांची कानउघाडणी करण्यांत आली आहे. मुळांत गोष्ट अशी आहे कीं परमेश्वरानें इब्राहीम पैगंबराला कांहीं हुकूम दिले. भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं ते हुकूम शारिरीक व आत्मिक शुद्धि व उन्नति या संबंधाचे होते. आत्मिक शुद्धि म्हणजे सर्व भाकडकथा सोडून देऊन, परमेश्वर एकच व सर्वशक्तिमान आहे अशी कायावाचामनें करून दृढभावना ठेवणें व ह्या विश्वासास विरोधक अशीं सर्व मतें अंत:करणांतून दूर करणें व एकाच परमेश्वराचें मनन करणें; आणि शारिरीक शुद्धि म्हणजे सुंता करणें, नखें काढणें, मिशांचे, बगलेचे व नाभीखालील केंस मुंडविणें आणि लघवी व शौचानंतर पाण्यानें शुद्धि करणें वगैरे वगैरे. इब्राहीमानें या हुकमांची बजावणी अशा उत्तम प्रकारें केली कीं पमश्वरानें प्रसन्न होऊन त्यांस लोकांचा इमाम म्हणजे धर्माध्यक्ष वा नेता बनविला. मानवधर्मानुरूप इब्राहीम यानीं आपली इच्छा प्रदर्शित केली कीं त्यांचा वंशहीं ह्या ईश्वरी देणगीस अंतरू नये. परमेश्वरानें त्यांची प्रार्थना मान्य केली व फक्त नाहक जुलूम करणारे व परमेश्वराच्या आज्ञेचा भंग करणारे अशा लोकांस अपवादभूत ठरवून वगळले; मग ते इस्हाकच्या वंशाचे असोत कीं इस्माईलच्या. यांत यहुद्यांच्या मुख्य दाव्याचा जबाब झाला व पुढें हजरत इस्माईलचे सेवाभक्तीचें वर्णन केलें गेलें.

यास दे. (परात्पर परमेश्वरानें) म्हटलें, आणि जो (परमेश्वराला म्हणजे मला व शेवटल्या दिवसाला) नाकारील त्यालाही मीं थोड्या दिवसासाठीं (या पदार्थांचा) सुखोपभोग घेऊं देईन. मग (सरशेवटीं) त्याला निरुपाय करून नरकाग्नीचे शिक्षेस पोहोंचवून सोडीन. आणि (तें फारच) वाईट ठिकाण होय. १२६. आणि (हे पैगंबरा! बनी इस्राएलांस तूं तो वेळही आठीव कीं) जेव्हां इब्राहीम व (त्याचे सोबत) इस्माईल (हे उभयतां काबा) गृहाचा पाया उभारीत होते; (व प्रार्थना करीत जात होते कीं) हे आमचे पालनकर्त्या! आम्हांकडून तूं (ही सेवा) मान्य कर. निःसंशय तूंच (प्रार्थनेचा) ऐकणारा (व मनोगत) जाणणारा आहेस. १२७. आणि हे आमचे पालनकर्त्या! तूं आम्हांस

---

(१) हजरत इस्माईल पैगंबर हे काब्याची इमारत उभारण्यांत आपले पिता हजरत इब्राहीम यांचे सहकारी होते. बापलेंकरांनीं हें भक्तिगृह मान्यतेच्या आशेनें बनविलें होतें. ह्मणून ते बांधीत बांधीत परमेश्वराला प्रार्थना करीत होते कीं परमेश्वर आमची ही सेवा मान्य करो. आणि हें भजनालय अशा जागीं स्थापित झालें होतें कीं जेथें खाण्यापिण्याच्या वस्तू दुर्लभ होत्या. यास्तव हें अवश्यक होतें कीं निर्वाह साधनें प्राप्त केलीं जावींत व वस्तींत शांतता नांदावी कीं जेणेंकरून लोकांस शांति समाधानानें ईश्वरोपासना करितां यावी. सारांश ह्या प्रार्थनेच्या मान्यतेचीं चिन्हें आज तागाईत अस्तित्वांत आहेत व पुनरुत्थानाचे दिवसापावेतों काईम राहतील. मक्केचे आस्मंतात् जमीन डोंगराळ व वालुकामय आहे. पाऊसपाणी होत नाहीं आणि जमिनींत पिकांची पात्रता नाहीं. पाण्याची कमतरता व जें कांहीं थोडें बहुत आहे तेंही खारें. मक्का मोठें शहर झालें आहे व जगांतील सर्व पदार्थ तेथें मिळतात. आणि शांततेची अशी स्थिति होती कीं अरबलोक नित्य एकमेकांशीं लढत होते व अखिल मुलखांत लूटमार चाललेलीच होती. परंतु मक्केचे आदरबुद्धिमुळें तेथें त्या वेळींही कोणी यात्रेकरूना आडवीत नसे आणि हज्जचे एक महिन्यापूर्वी व हज्जचे एका महिन्यानंतर पावेतों सर्व लढाया बंद होत असत. आणि खास शहरांत पूर्वीही शांतता होती व आतांही आहे. ह्या सर्व गोष्टी शारिरीक सुखासंबंधाच्या झाल्या.

आपले आज्ञाधारक (सेवक) बनीव; आणि आमच्या वंशांतून तुझी आज्ञा पाळणारी अशी एक प्रजा (निर्माण कर). आणि तूं आम्हांला आमचे भक्तीचे मार्ग दाखीव; व आमचा पश्चात्ताप स्विकार. निःसंशय तूंच मोठा पश्चात्ताप स्विकारणारा (व) दयाळु आहेस. १२८. आणि हे आमचे पालनकर्त्या! तूं ह्या (मक्केकरां)मध्यें ह्यांच्यांतूनच एक पैगंबर पाठीव कीं तो त्यांना तुझीं महा वाक्यें वांचून ऐकवील, व त्यांना (दिव्य) पुस्तक व अक्कल शिकवील आणि त्यांची आत्मशुद्धि करील. निःसंशय तूंच समर्थ व सत्यसंकल्प आहेस. १२९. आणि असा कोण आहे कीं जो इब्राहीमचे पंथास विमुख होईल? परंतु ज्याची अक्कल मारली गेली असेल तोच. आणि आम्हीं त्याला ह्या लोकींही खरोखरच निवडून घेतलें होतें; व परलोकींही तो पवित्राचरणी लोकांपैकींच होईल. १३०. जेव्हां त्याला त्याच्या पालनकर्त्यानें फर्माविलें कीं तूं

---

( १ ) हजरत इब्राहीम यांनीं लोकांच्या आत्मिक उन्नत्ति व सुखासाठीं प्रार्थना केली होती कीं ह्या मक्केकरामध्यें ह्यांच्यांतून एक पैगंबर पाठीव म्हणजे तो त्यांची आत्मशुद्धि करील. तर आमच्या मोहंमद पैगंबरांच्या आगमनानें इब्राहीमाचे प्रार्थनेची मान्यता पूर्ण करून दाखविली. हा यहुद्यांच्या विशिष्ट वितंडवादाचा दुसरा जबाब होय. आणखी या गोष्टीचाही कीं यहुद्यांपाशीं मक्का व काबागृह याचा मुळींच आदर सन्मान नव्हता व ते ह्यांच्या आदर सन्मानाला, अज्ञानकाळांतील अरब लोकांचा सांप्रदाय समजत होते. परमेश्वरानें स्पष्टपणें सांगून दिलें कीं हजरत इब्राहीमाला मानणें व हजरत मोहंमद पैगंबरास न मानणें हा निवळ हटवाद होय. इस्लामधर्म ज्याचें हजरत मोहंमद पैगंबर शिक्षण देतात हा तोच इब्राहीमचा धर्म होय. हा धर्म इब्राहीमापासून त्यांचीं मुलें इस्माईल व इस्हाक यांस व मग त्यांचे प्रपुत्र याकूब यांस व याकूबच्या संततीस आणि शेवटीं पिढी दर पिढी होतां होतां हजरत मोहंमद पैगंबर यांस मिळाला. यहुद्यांस ह्या गोष्टीचा फार गर्व होता कीं आम्हीं इब्राहीम, इस्हाक व याकूब यांचा वंश आहों. तेव्हां परमेश्वरानें म्हटलें कीं धर्माचा वंशावळीशीं व कुळाशीं काय संबंध आहे? मनुष्य हा अधर्मी व आचारभ्रष्ट झाला म्हणजे तो कुलीन होऊनहि व्यर्थच.

(माझ्याच) हुकमाच्या आधीन हो; तेव्हां त्यानें (नम्रतेनें) जबाब दिला कीं मीं सकल जगांच्या पालनकर्त्याच्या (म्हणजे तुझ्याच) आधीन झालों आहें. १३१. आणि ह्याच (पंथा) संबंधानें इब्राहीम आपल्या मुलांस मरतेवेळीं ताकीद करून गेला व (तशीच) याकूबही; कीं अहो माझ्या मुलानों! निःसंशय परमेश्वरानें (तुमच्या) या (इस्लाम) धर्मास तुम्हांसाठीं पसंत केलें आहे. म्हणून तुम्हीं (मराल तर) मुसलमानच मरा. १३२. (हे यहुद्यानों!) बरें कां तुम्हीं (त्यावेळीं) हजर होतां कीं जेव्हां याकूबला मृत्यु येऊन ठेपला, (आणि) त्यावेळीं त्यानें आपल्या मुलांस विचारिलें कीं तुम्हीं माझ्या (मरणा) पश्चात् कोणाची भक्ति कराल? (तेव्हां) त्यांनीं जबाब दिला कीं आम्हीं तुझा उपास्य, व तुझे वडील (म्हणजे) इब्राहीम व इस्माईल व इस्हाक यांचा उपास्य असा जो एकच परमेश्वर त्याची उपासना करूं; आणि आम्हीं त्याच्याच आधीन आहों. १३३. (हे यहुद्यांनो) हे लोक (आपापले वेळीं) होऊन गेले; त्यांचें केलें सवरलें त्यांना व तुमचें केलें सवरलें तुम्हांला. आणि जें कांहीं ते करून गेले आहेत, त्याची तुम्हांस विचारपूस केली जाणार नाहीं. १३४. आणि (यहुदी व खिस्ती लोक मुसलमानांस) म्हणतात कीं तुम्हीं यहुदी वा खिस्ती बनून जा, कीं सरळ मार्गावर याल. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं (नाहीं) पण, आम्हीं इब्राहीमचे पंथांत आहों; कीं तो एका (परमेश्वरा) चाच होऊन

---

(१) मरेपर्यंत ह्याच धर्मावर कायम रहा. मुसलमान या शब्दाचा अर्थ परमेश्वराच्या हुकमाच्या व मर्जीच्या आधीन राहाणारा असा होतो.

(२) यहुदी लोक मुसलमानांस म्हणत होते कीं आम्हीं सरळ मार्गावर आहों तर तुम्हीं आमच्या धर्मांत या. आणि खिस्ती म्हणत होते कीं आम्हीं सरळ मार्गावर आहों, तुम्ही आमच्या धर्मांत येऊन जा. परमेश्वरानें मुसलमानांच्या वतीनें त्यांना जबाब दिला कीं तुम्ही दोन्ही पंथांनीं अस्सल धर्म म्हणजे परमेश्वराला एक मानणें सोडून दिलें आहे; आणि आमचा धर्म, जो पक्का एकेश्वरवादी इब्राहीम यांचा धर्म होता,

राहिला होता; व तो (कोणालाही परमेश्वराचा) जोडीदार मानणाऱ्यां-पैकीं नव्हता. १३५. (मुसलमानांनो! तुम्हीं यहुदी व खिस्ती यांस हें) उत्तर द्या कीं आम्हीं तर परमेश्वरावर विश्वास ठेविला आहे; आणि (कुर्आन्) जें आम्हांस प्रकट झालें आहे त्यावर, व (इतर ग्रंथ) जे इब्राहीम व इस्माईल व इस्हाक व याकूब व (याकूबचीं) कुलें यांजला प्रकट झाले त्यांजवर, आणि मूसा व ईसा यांस जीं (पुस्तकें) दिलीं गेलीं आहेत त्यांजवर, आणि जीं (इतर) प्रवक्त्यांस त्यांचे पालनकर्त्या-कडून दिलीं गेलीं त्यांजवरही (विश्वास ठेविला आहे.) आम्हीं ह्या (पैगंबरां) पैकीं कोणा एकामध्येंही (कसलाच) भेदभाव ठेवीत नाहीं. आणि आम्हीं त्या (एका परमेश्वरा) चेच आज्ञाधारक आहों! १३६. मग तुम्हीं ज्या गोष्टींचा विश्वास धरिला आहे त्याप्रमाणेंच जर हे लोक (त्या गोष्टींचा) विश्वास धरतील; तर (झालेंच) तेही सरळमार्गी लागले. आणि जर ते विमुख होतील तर (समजा कीं) बस ते

---

तोच आहे. आणि त्यांचा वंश मूसा, ईसा–येशू–वगैरे वगैरे या प्रेषितांचा जो धर्म होता तो हाच. आणि आम्हीं सर्व दिव्य ईश्वरी पुस्तकांस मानितों तुम्हीं तर कोणाला मानितां व कोणाला मानीत नाहींत. उदा-हरणार्थ, जसे यहुदी हजरत ईसा–येशू–ला व नव्याकरारास मानीत नाहींत; तसे यहुदी व खिस्ती हे दोन्हीं, इस्लाम जो त्यांच्याच वाडवडिलांचा खरा धर्म त्यास विमुख आहेत व कुराणाला मानीत नाहींत.

(१) म्हणजे आम्हीं मुसलमान लोक, जितके पैगंबर म्हणजे प्रेषित व प्रवक्ते म्हणून होऊन गेले आहेत त्यांजपैकीं कोणा एकामध्येंही कस-लाच भेदभाव ठेवित नाहीं; व या गोष्टीवर दृढ विश्वास ठेवितों कीं ते सर्व परमेश्वराचे प्रामाणिक पैगंबर वा प्रेषित आहेत व त्यांनीं मानवजातीस आपल्या त्या एकाच परमेश्वराचे भक्तिचा उपदेश केला व आपापला कार्य-भाग पूर्णपणें उरकून गेले. आणि ही गोष्टही विचारार्ह आहे कीं त्यांनीं परमेश्वराखेरीज अन्य कोणावस्तूंची उपासना सांगितलीच नाहीं. कारण कीं हे प्रेषित आपला पाठविणारा जो परमेश्वर त्याच्याप्रती फारच आशंकित व प्रामाणिक होते.

(तुमच्या) विरोधावर आहेत; (व डाव साधल्यास तुम्हांस छळतील) तर (हे पैगंबरा) त्यांच्या (अपकारा) पासून परमेश्वर तुझ्या (संरक्षणा) स्तव बस होईल. आणि तो (सर्वांचें) ऐकितो (व प्रत्येकाचे स्थितीशीं) वाकब होय. १३७. (मुसलमानांनो! या लोकांस सांगा कीं आम्हीं तर) परमेश्वराचे रंगात (रंगले गेलों) आणि परमेश्वराचे (रंगा) पेक्षां आणखी कोणाचा रंग अधिक उत्तम होणार? आणि आम्हीं त्याचीच भक्ति करित आहों. १३८. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं तुम्ही कां परमेश्वराचे संबंधीं आम्हांशीं झगडतां! आणि खरें पाहतां, तोच आमचाही पालनकर्ता व (तोच) तुमचाही पालनकर्ता होय. आणि आम्हांला आमचीं कर्मे व तुम्हांला तुमचीं कर्में; व आम्हीं निखालस त्यालाच मानितों. १३९. अगर तुम्हीं असें म्हणतां कीं इब्राहीम व इस्माईल व इस्हाक व याकूब आणि (याकूबचीं) कुलें (हे लोक) यहुदी वा खिस्ती होते. (हे पैगंबरा! तूं त्यांस) सांग कीं (बरें,) तुम्हीं अधिक जाणणारे आहां कीं परमेश्वर? आणि जो कोणी परमेश्वराकडून (आलेली) ग्वाही त्याच्यापाशीं (हजर असून तो ती) लपवील त्याच्यापेक्षांही अधिक जुलमी (आणखी) कोण होणार? आणि जें कांहींही तुम्हीं करीत आहां, परमेश्वर त्याकडून गाफिल नाहीं. १४०. हे लोक (आपापले वेळीं) होऊन गेले; त्यांचें केलें सवरलें त्यांना, व तुमचें केलें सवरलें तुम्हांला. आणि जें कांहीं ते करून गेले आहेत तुम्हांस त्याची विचारपूस केली जाणार नाहीं. १४१.

---

(१) ग्वाही लपविण्याचा अर्थ हा कीं यहुदी व खिस्ती यांचीं पुस्तकें म्हणजे जुना करार व नवा करार यांत हजरत मोहंमद पैगंबराविषयीं जें भविष्यवचन होतें व ह्या दोन्हीं पुस्तकांत उत्तरोत्तर प्रचंड फेरफार झालेला असून अद्यापिही जें भविष्य त्यांत आढळून येतें त्यास ते लपवित होते. ह्या विषयीं मी पुढें लिहिणार आहे; तरीही वाचक वृंदासाठीं त्यापैकीं कांहीं भविष्यवचनांचा हवाला येथें देणें इष्ट होय. (पाहा जुना करार, अनुवाद अ० १८: १५, १८, १९, २० आणि अ० ३३: २ नवा करार योहान, अ० १४: १५, १६ व २६, ३०. आणि अ० १६: ७.)

# पवित्र कुराण

## भाग दुसरा.

### सूरतुल् बकर: (पुढें चालू).

ज्या लोकांची अक्कल मारली गेली आहे ते तर म्हणतीलच कीं मुसलमान ज्या किबल्याकडे (पूर्वी) होते (म्हणजे पालेस्टाईन) त्यापासून त्यांच्या (काबागृहाकडे) वळण्यास काय कारण झालें? (हे पैगंबरा! तूं हा) जबाब दे कीं पूर्व व पश्चिम (सर्व) परमेश्वराचीच होय. तो ज्याला इच्छितो त्याला (धर्माचा) सरळ मार्ग दाखवितो. १४२. आणि (मुसलमानांनो! जसा आम्हीं तुम्हांस योग्य किब्ला दाखविला आहे) अशीच आम्हीं तुम्हांस मध्य राशीची

---

(१) हजरत पैगंबर साहेब सुरवातींत पालेस्टाईनकडे तोंड करून नमाज पढीत होते; येथपर्यंत कीं मदिनेस आल्यानंतरही कांहीं दीड वर्षांच्या जवळ जवळ पालेस्टाईनकडेच तोंड करून नमाज पढीत असत. नंतर हुकूम झाला कीं काबागृहाकडे म्हणजे मक्केच्या पवित्रालयाकडे तोंड करीत जा. यहुदी लोकांस उखाळ्या पाखाळ्या काढण्याची संवय होतीच. त्यांना आतां ही संधी सांपडली व ते म्हणूं लागले कीं पैगंबरांचेही बोलण्यांत बोलणें नाहीं; त्यांचें मतही स्थीर नाहीं. या आयत ह्मणजे महावाक्यामध्यें त्यांच्या अक्षेपाचा जबाब आहे कीं परमेश्वराचे अगाध ज्ञानामध्यें कायमचा किबला म्हणजे जिकडे तोंड करून नमाज पढतात ती दिशा हाच काबा होता. मुसलमानांकडून कोणा विशिष्ठ कारणामुळें पालेस्टाईनकडे नमाज पढविली. सारांश, त्या विशिष्ठ कारणाचा पुढें उल्लेख होईल.

(२) या वाक्याचा असा अर्थ होतो कीं आम्हां मुसलमानांचे धर्मांत कांहींच अफरातफर होत नाहीं; व आम्हीं बुद्धिलाही कुचकामाची ठरवीत नाहीं कीं अंधश्रद्धेनें प्राचीन लोकांचें अनुकरण करीत जावें. व तशीच बिलकूल बुद्धीवरच आमच्या धर्माची मदार नाहीं कीं दरेक

(नेमस्त) प्रजाही बनविली आहे; अशा साठीं कीं (इतर) लोकांवर तुम्हीं साक्षीदार बनावें व तुम्हांवर (तुमचा) पैगंबर (मोहंमद) साक्षी बनेल. आणि (हे पैगंबरा!) ज्या किबल्याकडे तूं (पूर्वी) होतास (म्हणजे पालेस्टाईन) आम्हीं तो या उद्देशानेंच मुकर केला होता कीं (जेव्हां किबला बदलला जाईल तेव्हां) जे लोक पैगंबराचें अनुकरण करतील त्यांना आम्हीं अशा लोकांपासून (वेगळे) जाणून ठेवावें, कीं जे (बेहुकमी करून) आपल्या मागल्या पायींच उलटून फिरतील. आणि किबल्याचें बदलणें सर्वांलाच जड गेलें; परंतु ज्या लोकांस परमेश्वरानें (सन्मार्गाची) सुबुद्धि दिली त्यांना मात्र (जड गेलें नाहीं. ह्मणूनच त्यांनीं किबला बदलणें खुशी खुशीनें मंजूर केलें.) आणि परमेश्वर असा नव्हे कीं तो तुह्मां मुसलमानांच्या विश्वासा(चें काम ह्मणजे नमाजी-)ला (कीं जी तुह्मीं पालेस्टाईनकडे पढून चुकलां आहां तिला किबला बदलला ह्मणून) वायां जाऊं देईल. परमेश्वर तर लोकांवर फारच ममता करणारा व दयाळू होय. १४३. (हे पैगंबरा!

---

गोष्टीची कारण-मिमांसा करीत बसावें. कारण, यांत सर्वज्ञानी अशा परमेश्वराचे आज्ञेसच अग्रस्थान दिलें जातें. किबला बदलण्याचें प्रकरणही अशाच प्रकारचें होतें कीं आम्हांस त्याचें कारण विचारण्याची गरज नव्हती. पैगंबराचें म्हणणें मान्य करून त्या प्रमाणें आचरणें पुरे होतें. किबला बदलण्याचा हुकूम असर–म्हणजे तीन प्रहरचे नमाजीचे वेळीं सादर झाला. पैगंबर साहेब तर नव्या किबल्याकडे ‘असर’ची नमाज पढून चुकले होते. कुबा येथील मशीदींत नमाज चालली होती; एक सहाबी म्हणजे पैगंबर साहेबांचा तत्कालीन अनुयायी, ह्या मशीदीजवळून गेला व त्यानें नमाजींतल्या लोकांस सांगितलें कीं मी नव्या किबल्याकडे पैगंबर साहेबांबरोबर नमाज पढून आलों आहें. हें ऐकतांच लोकांचें मंडळ जें नमाजींत झुकलें होतें तें तत्काळ तसेच काब्याकडे वळलें. मध्यराशीची नेमस्त प्रजा म्हणजे हेच अतिरेक न करणारे असे मुसलमान लोक. परंतु सगळ्यांची स्थिति सारखीच नसते. यहुद्यांचे बहकविण्यानें कांहीं तर संशयित होऊन गेले. म्हणून पुढील वाक्यांत त्याचा

किबला बदलण्याचे हुकमाची वाट पाहतांना) तुझें तोंड फिरवून फिरवून आकाशाकडे पाहणें आह्मीं निरिक्षीतच आहों. तर (तूं घाबरूं नकोस) जो किबला तूं चाहतोस त्याच्याचकडें आह्मीं तुला वळण्याचा हुकूम देऊं. (बरें,) तर (आतां नमाज पढतांना) आदर-सन्मानाचे[1] मशीदी (ह्मणजे काब्या) कडेस आपलें तोंड करीत जा; आणि (मुसलमानांनो! तुह्मींही) जेथें कोठेंही असाल, तेथें त्याच्याचकडे आपलीं तोंडें करीत असा. आणि (हे पैगंबरा!) ज्या लोकांना (तौरात वगैरे) पुस्तक दिलें गेलें आहे, त्यांना हें पक्कें माहीत आहे कीं किबल्याचें बदलणें सत्य[2] (व) त्यांच्या पालनकर्त्यांचे (हुकमा) द्वारें होय. आणि ज्या (युक्त्या हे लोक मुसलमानांचे मनांत शंका उद्भवण्यासाठीं) करीत आहेत, परमेश्वर त्यांपासून अजाण नाहीं. १४४. आणि (हे पैगंबरा!) ज्या लोकांस (तौरात वगैरे) पुस्तक दिलें गेलें आहे, त्यांचेपाशीं जरी तूं (जगभरचें) एकूणएक प्रमाणही घेऊन येशील, तरीही ते तुझ्या किबल्याचें अनुकरण करणार नाहींत; व तूंहि

खुलासा आहे कीं प्रथम पालेस्टाईनकडे किबला ठरविणें व मग काब्याकडे बदलणें या हेतुनेंच होतें कीं मुळींच कांकूं न करितां गपचीप मानणारे व वितंडवाद करणारे हे पृथक पृथक जाणिले जावेत.

(१) काबा तर एक कोठासा आहे; व त्याचे भोंवतालीं मशीद बनलेली आहे. तिला मस्जिदे हराम ह्मणजे आदर सन्मानाची मशीद ह्मणतात. मशीदीचा आदर सन्मान काबागृहामुळेंच होय. ह्मणून जरी या पवित्र मशीदीकडे तोंड करण्याचा हुकूम आहे, तरी मुख्य उद्देश काब्याकडेच तोंड करण्याचा असतो; कारण कीं, मशीदींत ज्या नमाजी होत असतात त्या चोहोंकडून काब्याकडेसच तोंड करून पढिल्या जातात.

(२) मागील दिव्य पुस्तकांत हजरत पैगंबर साहेबांविषयीं जीं भविष्यवचनें होतीं त्यांतच त्यांची एक खूण हीहि होती कीं ते दोन किबल्याचे स्वामि होतील ह्मणजे ते दोन किबल्याकडे नमाज पढतील. तर ग्रंथधारी लोकांस योग्य होतें कीं किबला बदलणें ही त्या भविष्याची पूर्णता समजून मुळींच कांकूं न करतां ते विश्वास धरिते.

त्यांचे किबल्याचें अनुकरण करणार नाहींस. आणि त्यांच्यातला कोणी (पक्ष) ही दुसऱ्या कोणा (पक्षा)चे किबल्याचें अनुकरण करणार नाहीं. आणि तुला जें ज्ञान (प्राप्त) होऊन चुकलें आहे, त्याच्या (प्राप्ती) पश्चातही जर तूं त्यांच्या मनेच्छेप्रमाणें चालशील, तर अशा स्थितींत निःसंशय तूंही आज्ञाभंजक लोकांपैकींच (लेखलेला) होशील. १४५. ज्या लोकांस आम्हीं (तौरात वगैरे) पुस्तक दिलें आहे, ते जसे आपल्या लेंकरांस ओळखतात, त्याच तऱ्हेनें ते (आमचे) या (पैगंबर मोहंमद) लाही ओळखतात. आणि त्यांच्यांत कांहीं लोक (असेही आहेत कीं जे) जाणूनबुजून सत्य (गोष्ट) लपवितात. १४६. (हे पैगंबरा! हें किबल्याचें बदलणें) सत्य (व) तुझ्या पालनकर्त्याचे (हुकमा) द्वारें होय. तर (पहा! तूं) कोठें साशंकांपैकीं होऊं नकोस. १४७ आणि हरएक (पक्षा) करितां एक दिशा (मुकर) होय कीं तो तिकडे (नमाजींत) आपलें तोंड करितो. तर (मुसलमानांनों! तुम्हीं दिशाभेदाची फारशी पर्वा न करितां) पुण्याईचे कामांकडे सर-

---

(१) ग्रंथधारी लोकांपैकीं यहुद्यांचा किबला तर यरुशलेम आहे; व खिस्त्यांचा किबला पूर्व दिशा होय; आणि प्रत्येक पक्ष आपापल्या किबल्यावर बळकट जमून आहे.

(२) प्राचीन दिव्य पुस्तकांत हजरत मोहंमद पैगंबर साहेबांसंबंधानें असे स्पष्ट व सुबोध भविष्यवाद आहेत कीं पैगंबर साहेबांविषयीं शंका घेण्यास वावच नाहीं. कारण विचारांतीं हे स्पष्ट कळून येतें कीं परमेश्वरानें पूर्वील पुस्तकांत ज्या पैगंबरांचें आश्वासन दिलें होतें ते हेच पैगंबर साहेब आहेत.

(३) किबला बदलून जाणें हो कांहीं सोपी गोष्ट नव्हती. विरुद्ध पक्षांनीं या गोष्टीला विलक्षण स्वरूप आणिलें; व ते फार कंठरवानें आक्षेप घेऊं लागले कीं तुमच्या पैगंबराचे मतास स्थीरताच नाहीं; आज कांहीं तर उद्यां कांहीं. हें ऐकून ज्या मुसलमानांची श्रद्धा खंबीर नव्हती ते डगमगूं लागले होते. त्यांना हें माहीत नव्हतें कीं ह्यांत पैगंबराचें कांहींच नाहीं; परमेश्वर करील तोच हुकूम. म्हणून परमेश्वरानें या

साचा (कीं इतराहून वरचढ व्हाल.) तुम्हीं कोठेंही असा, परमेश्वर तुम्हां सर्वांस (आपल्यापाशीं) खेंचून आणील. निःसंशय परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. १४८. आणि (हे पैगंबरा!) तूं कोठूनही निघोस (येथपावेतों कीं मक्केहूनही ; तर जेथेंही तूं असशील तेथें नमाजींत) आपलें तोंड मस्जिदे हराम (म्हणजे आदरसन्मानाचे मशीदी) कडे करीत जा. आणि हा (म्हणजे नवीन किबला) सत्य (व) तुझ्या पालनकर्त्यांचे (हुकमा) द्वारें होय. आणि (मुसलमानांनों!) परमेश्वर तुमच्या कर्मांपासून गैरसावध नाहीं. १४९. आणि (हे पैगंबरा!) तूं कोठूनही निघोस (येथपावेतों कीं मक्केहूनही; तर जेथेंही तूं असशील तेथें नमाजींत) आपलें तोंड मस्जिदेहराम (म्हणजे आदर सन्मानाचे मशीदी) कडे करीत जा. आणि (मुसलमानांनों!) तुम्हींही जेथें कोठेंही असाल तेथें (नमाजींत) तिच्याचकडे आपलीं तोंडें करा. (पुन्हां पुन्हां हुकूम देण्यांत एक) उद्देश हा होय कीं असें न

---

आक्षेपांचे तीन जबाब दिले आहेत. प्रथम किबला बदलण्याचीं कांहीं प्रयोजनें सांगितलीं आहेत. नंतर तौरात वगैरे मागील पुस्तका–चे भविष्य वचनाद्वारें त्याचें सत्यत्व पटविलें. व सरशेवटीं विश्वासापुढें त्या गोष्टीला असें हलकें करून दाखविलें; जणूं काय ही गोष्ट इतका जोर देण्यास योग्यच नाहीं. मुख्य मुद्दा हा कीं ही नमाजीची एक अट आहे. म्हणून मनुष्य कोणत्याना कोणत्यातरी दिशेकडे तोंड करीलच; परंतु ज्यांत ईश्वराज्ञा पालन होतें तेंच कृत्य उत्तम. जर अमुक वेळपावेतों अमुक दिशेकडे तोंड करीत राहिलें व मग ती सोडून दुसरी दिशा पत्करली तर ह्यानें ईश्वरोपासना कीं जी अस्सल नमाज होय तीस कांहीं बाध येत नाहीं. मुसलमान जसे पालेस्टाईनकडे नमाज पढतांना मुसलमान होते, तसेच ते काब्याकडे नमाज पढतांनाही मुसलमानच राहतात. तसेंच आगगाडींत व गलबतावर, किबल्याचें ज्ञान व त्याकडे वळण्याचें सामर्थ्य नसल्यास प्रत्येक दिशेस नमाज होऊं शकते. तरी ईश्वराज्ञापाळनार्थ प्रयत्न करून पहावें कीं किब्ला कोणिकडे असावा आणि जी खास दिशा लक्ष्यांत येईल तिकडेच नमाजींत तोंड करावें.

**न्हावें कीं लोकांस तुमच्या पदरीं घालण्यास प्रमाण मिळावें; परंतु यांच्यापैकीं जे नाहक हेंकडाई करितात (ते तर तुह्मांस दोष लावल्यावांचून राहणार नाहींत.) तर तुह्मीं त्यांच्याशीं भिऊं नका आणि माझें भय बाळगा. आणि (दुसरा) उद्देश हा होय कीं मी आपला उपकार तुह्मांवर पूर्ण करावा; व (तिसरा) उद्देश हा होय कीं (किबल्याचे संबंधांत) तुह्मीं सरळ मार्गी येऊन लागावें. १५०. (मुसलमानांनो! हे उपकारही त्याच कोटींतले होत कीं) जसा आह्मीं तुह्मांमध्यें तुमच्यांतूनच एक पैगंबर पाठविला कीं तो आमचीं महा वाक्यें तुह्मांस वाचून ऐकवितो व तुमची (चित्त) शुद्धि करितो, व तुह्मांला पुस्तक (ह्मणजे कुरआन्) व अक्कल शिकवितो आणि तुह्मांस अशा अशा गोष्टी शिकवितो कीं ज्या (या पूर्वी) तुह्मांस माहीत नव्हत्या. १५१.**

---

(१) इतक्या अवधींत काबागृहाकडे तोंड करण्याचा हुकूम तीनदां येऊन चुकला आहे. परमेश्वरानें ह्याचीं तीन कारणें दर्शविलीं आहेत. एक तर हें कीं असें न व्हावें कीं लोकांस मुसलमानांचे पदरीं घालण्यास प्रमाण मिळावें; त्याची हकिकत अशी कीं किबला बदलण्याचा हुकूम आला; तेव्हां काय मुसलमान व काय यहुदी व काय मूर्तिपूजक या सर्वांमध्येंच एकसारखा खळबळाट उडाला. यहुदी तर यासाठीं चिडले कीं मुसलमानांनीं त्यांच्या किबल्याचा परित्याग केला. मूर्तिपूजक या शेखींत आले कीं त्यांनीं आमचा किबला पत्करला आहे तर ते हळूहळू आमचा धर्मही पत्करतील. चोहोंकडून असा गोंगाट पाहून मुसलमानांपैकीं कांहींची तर मुद्राच उतरली. मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं त्याला आपल्या मनेच्छेविरुद्ध हुकूम दिला जाईल तर तो लाचार होऊन त्यांत एखादें निमित्त काढून उभें करितो, तर कांहीं मुसलमानांस असा विचार आला कीं नित्य राहण्याचे जागीं तर काब्याकडे तोंड करावें; पण मुशाफरींत व नैमित्तिक मुकामीं मात्र नाहीं. यासाठीं तीनदां आज्ञा झाली कीं कायमचे जागेंत, हंगामी वस्तींत व मुशाफरींत या सर्व स्थितींत काब्याकडे तोंड करणें भाग आहे. कारण कीं जर फक्त कायमचे जाग्याची अट ठेविली जाईल; तरीही लोक आक्षेप घेतील कीं किबला कशाचा झाला, इकडचा न तिकडचा; कीं नेहमीच्या जागीं असतांना काब्या-

**तर तुम्हीं माझ्या स्मरणांत लागून रहा; म्हणजे मींहि तुमचें स्मरण[१] ठेवीन. आणि माझे आभार मानीत राहा व मजलागीं कृतघ्न होऊं नका. १५२. अहो मुसलमानांनो! (तुम्हांवर एकादें संकट आल्यास त्याचा सामना करण्यासाठीं) सहनशीलता व नमाज यांच्याद्वारा साह्य मागा. निःसंशय परमेश्वर सहनशील लोकांचा साथी होय. १५३. आणि जे लोक परमेश्वराचे मार्गांत जिवें मारले जातील त्यांना मेलेले म्हणूं नका. (ते मेले नाहींत) तर ते जिवंत होत; परंतु (त्यांचे जीवनाची हकीकत) तुम्ही समजत**

---

कडे व इतर जागीं व प्रवासांत असतांना यरुशलेमकडे तोंड केलें जातें! सारांश वारंवार हुकूम देण्याचें कारण हेंच तर झालें. परंतु त्याच्याच सोबत हेंही सांगितलें कीं तुह्मांशीं जे नाहक हेंकडाई करितात ह्मणजे यहुदी, ते तर तुह्मांस दोष लावल्यावांचून राहणार नाहींत. तर अशांना भिणें काय! वारंवारच्या हुकमांत दुसरें कारण विचाराअंतीं असें दिसतें कीं अरब लोकांचे ठायीं किबला बदलणें हा ईश्वरी उपकारच होता. ह्यानें 'इब्राहीम पैगंबरांची व त्यांनीं स्थापिलेल्या काब्याची गेलेली इभ्रत व अब्रू पुन्हां कायम झाली. शिवाय ह्यांत अरबलोकांची मनधरणीहि होती. तिसरें कारण असें कीं परमेश्वराला काब्याची इभ्रत नेहमीं कायम राखावयाची होती. आणि जें कांहीं परमेश्वराला मंजूर असतें तेंच खरें. ह्मणून वारंवार हुकूम देऊन मुसलमानास समजाविलें कीं सरळ मार्ग हाच होय.

(१) एक लांबलचक हदीस (म्हणजे पैगंबर साहेबांचें वचन) यामध्यें असें निविदिलेलें आहे कीं देवदूत भूतलावर येऊन ईश्वरी दरबारांत जेव्हां पुन्हां हजर होतात तेव्हां त्यांना सेवकांविषयीं पृच्छा होते. त्या वेळीं ते ईश्वरस्मरण व चांगलीं चांगलीं कामें यांचा उल्लेख करितात व परात्पर परमेश्वराकडून त्यांचेवर दयादृष्टि होते. तर या वाक्यामध्यें कदाचित् त्याच गोष्टीकडे इषारा असेल. अगर व्यावहारिक भाषेंत बोलावयाचें तर तुम्हीं आमचे स्मरण करा म्हणजे आम्हींही तुमचें स्मरण करूं अथवा आम्हांस तुमचा विचार राहील.

नाहीं. १५४. आणि अलबत आम्हीं तुम्हांस थोड्याशा भयानें व भुकेनें आणि धनदौलत व प्राण व (जमिनींतील) पीक यांच्या हानीनें कसून पाहूं; आणि (हे पैगंबरा!) सहनशीलता[1] राखणाऱ्यांस (ईश्वरप्रसन्नतेची व भरभराटीची) सुवार्ता ऐकीव. १५५. हे लोक, जेव्हां यांचे वर एकादें संकट ओढवतें, तेव्हां बोलूं लागतात कीं आम्हीं तर परमेश्वराचेच आहोंत; (तो आम्हांला हव्या त्या स्थितींत राखो) आणि आम्ही त्याच्याचकडे परतून जाणार आहों (तर तो आम्हांस आमच्या सहनशीलतेचा मोबदला देईल). १५६. हेच लोक होत कीं ज्यांच्यावर त्यांच्या पालनकर्त्याची मेहरनजर व दया होय. आणि हेच सरळ मार्गावर होत. १५७. निःसंशय सफा[2]

---

(१) मतलब हा कीं मनुष्य सहनशीलतेची संवय करून घेतो, तेव्हां त्याला संकटाची इजा कमी भासते; व एकदां दुःख सोसण्याची संवय झाली म्हणजे तें दुःखच राहत नाहीं. हीच गोष्ट नमाजीविषयींही होय. म्हणजे ईश्वरस्मरणानें जीवास समाधान वाटतें. हजरत पैगंबर साहेबांचाही हाच परिपाठ असे कीं जेव्हां जेव्हां त्यांना कांहीं विवंचना पुढें येई तेव्हां तेव्हां ते नमाजींत लागून जात असत.

(२) इस्लामचे पूर्वीपासूनच हज्ज-यात्रेचाही उपासनेंतच समावेश होता परंतु त्यांत बहुतेक निरर्थक व शिष्टाचाराविरुद्ध रीतरिवाज सामील झाले होते. इस्लामनें त्यांचा समुच्छेद करून अस्सल उपासनाच कायम ठेविली. हज्जचे कांहीं प्रधान विधि आहेत:—जसें 'एहराम' ह्मणजे हज्जचीं वस्त्रें परिधान करणें, 'अरफात' नामी मैदानांत मुकाम करणें, 'मिना' येथें खडे फेंकणें, काबागृहाची प्रदक्षिणा करणें आणि सफा व मर्वा या पर्वतां दरम्यान दौड मारणें. सफा व मर्वा हे मक्का शहरांत दोन पर्वत आहेत. पैगंबराचें आगमनापूर्वीं काबागृहाला जसें मूर्तींनीं भरून ठेविलें होतें, तशाच ह्या पर्वतावरही दोन मूर्ति उभ्या केलेल्या होत्या. या दोन पर्वतांचे मध्यें दौडणें या गोष्टीचें स्मारक होतें कीं जेव्हां हजरत इब्राहीमनें आपली पत्नि हाजरा व पुत्र इस्माईल या उभयतांस या जागीं आणून बसविलें; तेव्हां बाई हाजरा पाण्याचे शोधांत या पर्वतांचे दरम्यान दौड

(पर्वत) व मर्वा (पर्वत) हीं ईश्वरस्थापित सन्माननीय स्मारकें होत. तर जो कोणी काबागृहाची हज्ज–यात्रा करील अगर उमरा–तीर्थ करील, त्यावर ह्या दोहोंचे दरम्यान प्रदक्षिणेचे (फेरे) घालण्यांत कांहीं गुन्हा नाहीं; (कीं जसा लोकांचा समज आहे, तर मात्र पुण्यच होय). आणि जो कोणी आपखुशीनें सुकृत्य करील (व प्रदक्षिणाही त्यापैकींच होय) तर परमेश्वर गुणज्ञ व (मनोगत) जाणणारा होय. १५८. आह्मीं जे खुले खुले हुकूम व (तशाच) सन्मार्गाच्या गोष्टी प्रकट केल्या आणि (तौरात) पुस्तकांत आह्मीं लोकांस त्या स्पष्ट करून वर्णिल्या, त्या उपरांतही जे लोक त्या लपवितील; तर हेच ते लोक होत कीं ज्यांना परमेश्वर शापग्रस्त करितो व (जगभर सर्व) छीथू करणारेही त्यांजला छीथू करितात. १५९. परंतु ज्यांनीं पश्चात्ताप केला व (आपलें आचरण) सुधारिलें व (जें कांहीं पुस्तकांत होतें तें) स्पष्ट करून सांगितलें, तर हेच लोक होत कीं ज्यांचा पश्चात्ताप मी मान्य करतों. आणि मी (तर पश्चात्तापाचा) मोठा मान्य कर्ता व दयाळू आहें. १६० जे लोक (जिवंत जीव आहे तोपर्यंत सद्धर्मास) नाकारित राहिले व (नाकारीत) नाकारीतच मरण पावले: हेच लोक होत कीं ज्यांच्यावर परमेश्वराचा शाप होय व (तसाच) देवदूतांचा व मनुष्यांचा–सर्वांचा. १६१. ते सदासर्वदा ह्या शापां-

---

घालीत होत्या. पूर्वीं येथें मूर्ती होत्या ह्मणून कांहीं मुसलमानांस ही शंका आली कीं ह्या पर्वतांचे मध्यें दौड घालणें हें त्या मूर्तींच्या प्रदक्षिणेसाठीं होत असेल, तर नवल नाहीं. या विचारानें लोक यांमध्यें दौडण्यास कचर करूं लागले. ह्मणून परमेश्वरानें बजाविलें कीं दौडणें हें केवळ हज्ज व उमरा यांच्याच विधिपैकीं होय. 'हज्ज' व 'उमरा' यांत फरक एवढाच कीं हज्ज खास जिल्हज्जचे महिन्यांत होतो आणि उमरा पाहिजे तेव्हां करतां येतो; एक हा व 'उमऱ्या'चे दुसरे विधि फक्त हे आहेत कीं 'एहराम' परिधान करणें, काबागृहास प्रदक्षिणा घालणें व सफा व मर्वाचे दरम्यान दौडणें. परंतु हज्जमध्यें याखेरीज प्रमुख विधि अरफातमध्यें मुक्काम करणें, मिना येथें खडे टाकणें व काबागृहाची प्रदाक्षिणा करणें हेहि होत.

तच राहतील. यांच्यावरून शिक्षा हलकी केली जाणार नाहीं व यांना (शिक्षेचे मध्यंतरी) अवसरहि दिला जाणार नाहीं १६२. आणि (लोकांनों!) तुमचा उपास्य (देव तर तो) एकच परमेश्वर होय. त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य नाहीं; (तो) परमदयाळू (व) कृपाळू होय. १६३. निःसंशय आकाश व पृथ्वी यांचे निर्माण करण्यांत व रात्रंदिवसाचे अनुक्रमांत; आणि जहाजें, जीं लोकांस उपयुक्त अशा चिजा (म्हणजे व्यापारी माल) लादून समुद्रांतून वाहतात त्यांत; व (पाऊस-)पाणी, जें परमेश्वर आभाळांतून पाडितो, मग त्या परत्वें जमिनीस तिच्या मेल्या (म्हणजे पडित झाल्या) पश्चात पुन्हां सजीव (म्हणजे टवटवीत) करितो त्यांत; आणि हरतऱ्हेचे प्राणी, ज्यांचा परमेश्वरानें जमिनीवर फैलाव करून ठेविला आहे त्यांत; व वाऱ्यांचे (इकडून तिकडे व तिकडून इकडे) पालटण्यांत, आणि ढग, जे (ईश्वराज्ञेस वश होऊन) आकाश व पृथ्वी यांचें दरम्यान घेरून राहिलेले असतात त्यांत, (एवंच या सर्व गोष्टींत) समंजस लोकांकरतां (ईश्वरी सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या (उपलब्ध) आहेत. १६४. आणि लोकांत कोणी असेही आहेत कीं जे परमेश्वराखेरीज (इतरांसही त्याचे) विभागी ठरवितात (व) जशी प्रीति परमेश्वराशीं राखिली पाहिजे तशीच प्रीति ते त्यांच्याशींही राखतात. आणि जे विश्वासू आहेत त्यांना (तर सर्वांहून) अधिक परमेश्वराची प्रीति असते. आणि जी गोष्ट (या) जालिम लोकांस (प्रत्यक्ष) शिक्षा पाहिल्यावर समजेल ती जर आतांच समजती कीं हरतऱ्हेची शक्ति परमेश्वरालाच होय व (तसेंच) हें कीं परमेश्वर शिक्षेंतही कडक आहे, (तर बरें झालें असतें)! १६५. (ही अशी आणीबाणीची वेळ होईल कीं) त्या वेळीं ज्यांचें अनुकरण केलें जात होतें (असे गुरु वा आचार्य) हे त्यांचें अनुकरण करीत होते असे जे (चेले वा शिष्य) त्यांजकडून (आपलें) अंग काढून घेतील व (डोळ्यांनीं) शिक्षा पाहून घेतील व त्यांचे (परस्पर) हितसंबंध पार तुटून जातील. १६६. आणि अनुकरण करीत होते असे जे (चेले वा शिष्य) ते ह्मणूं लागतील कीं

जर करतां आह्मांला (एकदां जगांत) पुन्हां परतून जाणें (प्राप्त) होईल, तर जसें (ह्या लोकांनीं) आह्मांकडून अंग काढून घेतलें आहे तसेंच आह्मींही त्यांचेकडून अंग काढून घेऊं. ह्याप्रमाणें परमेश्वर त्यांच्या करण्या त्यांच्यापुढें आणील; कीं त्यांना (त्या सर्वोपरी) खेद-प्रद दिसून येतील. आणि (इतकें होऊनही) त्यांच्यानें नरकाग्नींतून बाहेर निघवणार नाहीं. १६७. अहो लोकांनों! धरित्रींत ज्या (वस्तु) अनिषिद्ध व चोख आहेत त्यांतून तुह्मीं (तुह्मांस हव्या त्या बेलाशक) खा; व सैतानाचे पदोपदीं चालूं नका. कारण, तो तुमचा बोलून चालून दुशमन होय. १६८. तो तर तुह्मांस कुकर्मे व निर्लज्जपणा (चींच काय तीं कामें) करावयास सांगील व हेंच (इच्छील) कीं तुह्मी जाणत देखील नाहींत अशा (नसत्या कुभांडाच्या) गोष्टी तुह्मीं (आप-ल्याकडून) परमेश्वरासंबंधीं व्यक्त कराव्या. १६९. आणि जेव्हां या (लोकां)स सांगितलें जातें कीं जो (हुकूम) परमेश्वरानें सादर केला आहे त्याप्रमाणें चाला; तेव्हां ते जबाब देतात, नाहीं हो! आम्हीं तर ज्या (मार्गा)वर आपल्या वडिलांना (चालतांना) पावलों आहों त्या (मार्गा)वरच आम्हींही चालूं. बरें, जरी त्यांचे वडील कांहींच समजत नसतील व ते सरळ मार्गावरहि चालत नसतील तरी देखिल कां (ते त्यांचेंच अनुकरण करीत चालले जातील)? १७०. आणि जे लोक नास्तिक आहेत, (मूर्तिपूजेंत) त्यांची उपमा अशा मनुष्याचे उपमेसारखी होय कीं जो कोणाएका वस्तूचे मागून ओरडत राहतो

---

(१) मूर्तिपूजक अरब वळू सोडलेल्या जनावरांस त्यांची महिमा व पूज्यता यांमुळें निषिद्ध समजत होते. तर परमेश्वरानें सांगितलें कीं ही सैतानाची बहकवणी आहे; व हे लोक आंधळ्यासारखे आपल्या वडि-लांचे धरतीवर चालले जातात. एरवीं, परमेश्वरानें तर मेलेलीं जना-वरें, रक्त वगैरे (ज्यांचें वर्णन पुढें येईल) या शिवाय कांहींच निषिद्ध केलें नाहीं; आणि लाचारीस तर मुडदारही हलाल होय. मुसलमानी शास्त्रांत वळू सोडलेल्या जनावरांचा निषेध आहे खरा; परंतु अनेकेश्वरवादी व मुर्तिपूजकांचे मताप्रमाणें त्या वाहिलेल्या जनावरांच्या पूज्यते मुळें नव्हे, तर त्यांच्या मलीनते व घाणीमुळें होय.

(व)ती ऐकत (वैकत कांहींच) नाहीं. (तर त्याची ओरड) केवळ (निरर्थक) बोलाविणें व हाक मारणें होय; (कीं त्याचा कांहीच परिणाम नाहीं. मूर्तिवरच काय अवलंबून आहे, हे लोक स्वत:ही) बहिरे, मुके, आंधळे होत. तर हे समजत (उमजत कांहींच) नाहींत. १७१ अहो मुसलमानांनों! आम्हीं तुह्मांस ज्या चोख्या वस्तु देऊन ठेविल्या आहेत, त्या तुह्मीं (बेधडक) खा; आणि जर तुह्मीं परमेश्वराचेच भक्तीचा दम भरीत आहां, तर त्याचे आभारही माना. १७२. त्यानें तर तुह्मांसाठीं फक्त मेलेलें (जनावर) व रक्त व डुकराचें मांस हीं निषिद्ध केलीं आहेत; व (तसेंच) परमेश्वराशिवाय अन्य कोणा(चे अराधने) स्तव जें (बळी दिलें व) नामजादं केलें जाईल तें (जनावर.) पण जो कोणी (भुकेनें) व्याकूळ होऊन जाईल, आणि तो आज्ञाभंग व मर्यादोल्लंघन करणारा नसेल, तर त्याच्याकडे (ह्यांतून एखादी वस्तु सेवन करण्याचाही) गुन्हा नाहीं. निःसंशय परमेश्वर क्षमाळू व दयाळू होय. १७३. जे लोक, परमेश्वरानें (आपले तौरात) पुस्तकांत जे (हुकूम) सादर केले आहेत त्यांस लपवितात व त्याच्या ऐवजीं अत्यल्प (ऐहिक) मोबदला प्राप्त करतात; हे लोक आणखी कांहीं नाहीं पण आपल्या पोटांत अंगारे भरतात, आणि पुनरुत्थानाचे दिवशीं परमेश्वर यांच्याशीं संभाषणही तर करणार नाहीं, व तो यांना (पाप–विटाळापासून) शुचिर्भूतहि करणार नाहीं. आणि यांच्यास्तव दुःखप्रद शिक्षा होय. १७४. हेच लोक होत कीं ज्यांनीं सरळमार्गाचे

---

(१) पूर्वापर संदर्भास अनुसरून आह्मीं 'मा ओहिला' चें भाषांतर त्याचें एकच अंग वा सदर घेऊन ह्मणजे 'जनावर' या शब्दानें केलें आहे. परंतु कुराणोक्त शब्द सर्व साधारण आहेत. निषिद्ध वस्तु-वर्गांत त्याचीं इतर सदरेंही दाखल आहेत ह्मणजे सर्व जातीचे नवस व नैवेद्यहीं परमेश्वराखेरीज अन्य कोणाचे नांवानें करणें निषिद्ध होय; आणि कोणाला कांहीं करावयाचेंच असेल तर परमेश्वराचे नांवास अर्पण करून त्याचें पुण्यफल, पैगंबर, अवलिया, साधूसंत व मातापिता वगैरे यांस वाहणेंस अडचण नाहीं. यावरून सिद्ध होतें कीं जें कांहीं पुण्य कृत्य करावयाचें तें परमेश्वरार्थींच करावें, ह्मणजे तें मान्यता पावतें.

बदलीं आडमार्ग विकत घेतला; व (ईश्वरी) क्षमेचे ऐवजीं शिक्षा. तर नरकाग्नीपुढें हे, किति तरी कंठक! १७५. हें यासाठीं कीं (तौरात) पुस्तक वस्तुतः परमेश्वरानेंच प्रकट केलें. आणि ज्या लोकांनीं त्या पुस्तकांत मतभेद केला, (व त्यांत अफरातफर व लपवालपव केली) ते पराकाष्टेचे विरोधांत (पडले) आहेत. १७६. (मुसलमानांनों!) पुण्य इतकेंच नव्हें कीं (नमाजींत) तुम्हीं आपलीं तोंडें पूर्वे (कडे करा); वा पश्चिमेकडे करा. किंबहुना (अस्सल) पुण्य तर अशा लोकांचें होय कीं ज्यांनीं परमेश्वर व शेवटला दिवस व देवदूत व (दिव्य) पुस्तकें आणि पैगंबर (लोक) यांजवर विश्वास ठेविला; आणि (आपलें प्रीयतर) धन परमेश्वराचे प्रेमार्थीं, नातलग व अनाथ बालकें व (अन्नास मोताद असे) दीन गरीब व वाटसरू व याचक वृंद यांस दिलें; आणि (तसाच गुलामगिरी वगैरेचे बंदांतून लोकांच्या) माना (मुक्त करण्यां) त (खर्चेंच केला;) आणि नमाज पढीत व जकात देत राहिले; आणि (कोणाहि गोष्टीचा) त्यांनीं करार केला म्हणजे ते आपल्या वचनाचे पुरे; आणि टंचाईंत व आपत्तींत व हल्लाहरकतीचे वेळीं सहनशील राहिले. हेच लोक होत कीं (मुसलमानीचे दाव्यांत) खरे निपजले; आणि (परमेश्वराला) भिऊन वागणारें (म्हटलें म्हणजेही) हेच. १७७. अहो मुसलमानांनो! जे लोक (तुमच्यांत) जिवें मारिले जातील त्यांच्या संबंधांत तुम्हांस (जिवाचा) बदला (जीव) घेण्याचा हुकूम दिला जातो; स्वतंत्राचे बद्दल स्वतंत्र

(१) माणसाच्या माना तीन तऱ्हेनें फसतात. एक गुलामगिरींत, दुसरी कर्जांत व तिसरी बंदीवासांत. येथें सर्व प्रकारांचा समावेश केला गेला आहे. गुलामास, पैसे भरून, मुक्त करावें; अगर कोणावर कोणाचें कर्ज येत असेल तर त्यास ऋणमुक्त करावें अगर खंड देऊन जर कोणाची बंदीवासांतून सुटका होऊं शकेल तर त्याची, आपल्याहातून खंड देऊन, मुक्तता करावी.

(२) अरबलोकांत हजरत मोहंमद पैगंबरां पूर्वीं असा दस्तुर होता कीं जर कोणी बडा गृहस्थ खालचे वर्गाचे मनुष्यास जिवें मारी तर त्यापासून बदला

**व गुलामाचे बद्दल गुलाम व स्त्रिचे बद्दल स्त्रि. पण ज्या (खून्या) ला त्या (मयता)चे भावाकडून (बदल्या पैकीं) कांहीं (हिस्सा) माफ केला जाईल तर (जिवाबद्दल द्रव्यदंड व मैताचे वारसदाराकडून त्याची) मागणी (शास्त्र)-सांप्रदायानुसार करणें, आणि (खून्यानें) मैताचे वारसदारास (ठराविक द्रव्यदंड) भल्याभलाईनें आदा करणें. हा (द्रव्य-दंडाचा हुकूम) तुमच्या पालनकर्त्याकडून (तुमच्या ठायीं एका प्रकारची) सवलत व मेहरबानी होय. मग ह्या पश्चात जो कोणी मर्यादेचें उल्लंघन करील तर त्याच्याकरतां दुःखकारक शिक्षा होय. १७८. आणि अहो बुद्धिवानांनो! सूडा (चे कायद्यां)त तुमचें जीवनें होय. (व तो**

---

घेत नसत; आणि बडा मनुष्य मारला जाई तर ते एकाचे बदलीं अनेक खून करीत असत. सारांश, ते सूड उगविण्यामध्यें जगिक वैभव व मातब्बरीचा विचार ठेवीत होते. इस्लामधर्मानें हा भेदाभेद मिटविला; व हा नियम घालून दिला कीं खूनी इसम, स्वतंत्र असो वा गुलाम असो अथवा कोणीही असो, त्याचे हातून झालेल्या खूनाबद्दल त्याचाच जीव घेतला जावा.

(१) मुळांत खुनाचा बदला तर खून होय; व याला अरबींत 'किसास' म्हणजे सूड म्हणतात. हा, खून झालेल्या मनुष्याचे वारसदारांचा हक्क आहे. परंतु जर मैताचे वारसदार त्या खुनाची माफी देतील व खून्याचा जीव घ्यावयास न इच्छीतील; अथवा त्यांच्यांत मत-भेद पडेल, कीं कांहीं सूड घ्यावयास इच्छितात व कांहीं नाहीं इच्छीत; तर या दोन्हीं स्थितींत 'दिय्यत' म्हणजे रक्ताचा बदला वा द्रव्यदंड लागू होईल. मग जेव्हां द्रव्यदंड देणें ठरलें तेव्हां देणारानें तो भल्या-भलाईनें व कृतज्ञतापूर्वक देऊन टाकावा व घेणारानें त्याच्या मागणींत व वसूल करण्यांत गैरवाजवी सक्ती करूं नये.

(२) सूडांत तुमचें जीवन होण्याचा अर्थ असा कीं त्या योगें जिवांचें संरक्षण होतें, म्हणजे सूड उगविला जाण्याचे भीतीनें लोक रक्तपात करण्यापासून आपल्याला आवरून घेतात. या प्रमाणें सूडापरत्वें प्राण-दान प्राप्त होऊन हजारों लोकांचे जीव बांचतात. नाहींतर यादवी माजून कोणी कोणाची पर्वाच बाळगिली नसती.

या सद् हेतुनें करण्यांत आला आहे) कीं कदाचित् तुम्हीं (रक्तपात-करण्याविषयीं) जपून वागाल. १७९. (मुसलमानांनो!) तुम्हांस लेखी हुकूम दिला जातो कीं जेव्हां तुम्हांपैकीं कोणा एखाद्यास मृत्यु येऊन ठेपेल तेव्हां तो, कांहीं मालमत्ता मागें सोडीत असल्यास मातापिता व अगदीं जवळचे नातलग यांचेसाठीं यथाशास्त्र मृत्यु-लेखदान (करून त्यानें मरावें.) जे लोक (परमेश्वराला) भितात अशा (लोकां)वर (त्यांचे आप्तांचा हा एक) हक्क होय. १८०. मग जो कोणी तो (मृत्यु लेख) ऐकिल्यानंतर त्यांत कांहीं अदलाबदल करील तर त्याचें पाप, मृत्युलेखांत जे लोक अदलाबदल करितील त्यांचे कडेच होय. निःसंशय परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्वकांहीं) जाणतो. १८१. तथापि ज्या कोणाला मृत्युलेख करणाराकडून (कोणा विशिष्ट व्यक्तीची) तरफदारी अगर (कोणाचा) हक्क मारला जाणें यांचा अंदेशा झाला असेल, व तो वारसदारांमध्यें समेट करवील तर (अशा परिस्थितींत मृत्युलेखांत हेरफेर केल्यास) त्याच्याकडे कांहींच पाप नाहीं. निःसंशय परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. १८२. अहो मुसल-मानांनो! ज्या प्रमाणें तुमचे पूर्वींचे (ग्रंथधारी) लोकांस उपास पाळणें कर्तव्य केलें गेलें होतें, त्याचप्रमाणें तें तुम्हांसाठींही कर्तव्य केलें गेलें आहे; अशासाठीं कीं तुम्हीं (कित्येक पापाविषयीं) कदाचित् जपाल. १८३.

---

(१) चौथ्या भागांत एक कलम आहे ज्यांत वारसांचे हक्क ठरविण्यांत आले आहेत, त्या अन्वयें मृत्युलेखाचे नियम ज्यांचा संबंध वारसांशीं आहे ते रद्द केले गेले आहेत. परंतु इतर नातलगासंबंधीं मृत्युलेखाचे नियम यथास्थित रूढ आहेत. तर प्रथमतः मरणोन्मुख झालेल्या मनुष्यास मृत्युलेख करण्याची ताकीद आहे; यासाठीं कीं त्यानें लोकांचे हक्क आपल्या मानेवर घेऊन जाऊं नयेत. नंतर ज्यांस मृत्युलेख करून दिला गेला आहे त्यांस अशी सक्त मनाई आहे कीं त्यांनीं मृत्युलेखांत आपल्या कडून कांहीं कंपेश करूं नये. आणि जर ते तसें करतील व कोणास कांहीं ज्यास्त देववितील, तर ज्याला जादा पोहोंचेल त्याचें पापही मृत्युलेख बदलणाराचे शिरावर आहे. पण मरणाराकडून कांहीं भूलचूक झाली असेल व ज्यांचे साठीं मृत्युलेख केला गेला आहे त्यांचे संमतीनें एखादी गोष्ट ठरेल तर कांहीं हरकत नाहीं.

(तेहि) गणतींचे कांहीं दिवस (होत.) यावरही जो कोणी तुमच्यांतून आजारी असेल अगर मुशाफरीवर (असेल) तर इतर दिवसांतून गणती (त्यानें पुरी करावी.) आणि ज्यांना भोजन देण्याचें सामर्थ्य आहे त्यांच्यावर (एका उपासाचा) मोबद्ला, एका (मोताद्) गरीबास भोजन घालणें हें होय. आणि जो कोणी आपखुषीनें (हें) पुण्य कृत्य करूं इच्छील, तर हें त्याचेठायीं अधिक उत्तम होय. आणि जर तुम्हीं समजाल तर उपास करणें हें (कांहीं झालें तरी) तुमच्याठायीं उत्तमच होय. १८४. (उपासांचा) महिना रमजानचा (महिना) होय कीं ज्यांत (उपास करण्याच्या आज्ञे विषयीं परमेश्वराकडून) कुर्आन प्रकट झालें आहे; (व कुरआन् हें) लोकांस सन्मार्गदर्शक होय व (त्यांत) सद्बोध व (सदसतविचाराचे) तारतम्याचे खुले खुले नियम होत. तर (मुसलमानांनों!) तुमच्यांतून जो कोणी या महिन्यांत (घरीं) हजर असेल त्यानें या (महिन्या)चे उपास पाळा-

---

(१) दुखणाईंत वा मुशाफरींत जो उपास सुटेल तो आपल्या मुक्कामीं आल्यावर वा दुखणाईंतून उठल्यावर पुरा करणें हें धर्म–कर्तव्य होय. शिवाय ज्यांना भोजन देण्याचें सामर्थ्य आहे त्यांनीं एका उपासाचे मोबद्ला एका मोताद गरीबास भोजन घालावें; याला 'फिदया' किंवा 'कफ्फारा' म्हणतात. जो कोणी भोजन घालण्याचें पुण्यकृत्य आप खुषीनें करील व सुटून राहिलेले उपासहि पाळील तर त्याचे ठायीं तें उत्तमच होय. अगर याचा असाही अर्थ आहे कीं इस्लामचे प्रथमारंभीं भोजन देणें अथवा उपास करणें या गोष्टींची मुभा होती. परंतु हा नियम पुढील वाक्यानें रद्द झाला. तर आतां उपास केल्यावांचून कोणालाही गत्यंतर नाहीं. आणि जर तुह्मीं उपासाचें इंगित समजाल, तर उपास करणें हें कांहीं झालें तरी उत्तमच होय.

(२) कित्येक भाष्यकारांनीं असें लिहिलें आहे कीं रमजान महिन्यांत कुरआन् प्रकट होण्यास सुरुवात झाली व तें अंशत:अंशत: येऊं लागलें. हा अर्थ कायम ठेवून आम्हीं जो अर्थ घेतला आहे तो 'तफसीरे कबीर' या भाष्याचे आधारें घेतला आहे.

(३) ह्यांत 'शहेदा' या शब्दाचे आणखीही अर्थ आहेत. परंतु

वेत. आणि जो कोणी आजारी असेल अगर मुशाफरीवर (असेल) तर इतर दिवसांतून गणती (त्यानें पुरी करावी). परमेश्वर तुह्मां-साठीं सुसाध्यता इच्छितो व तो तुह्मांवर सक्ती करूं इच्छित नाहीं. आणि (हे नियम त्यानें या साठीं घालून दिले आहेत) कीं तुह्मीं (उपासांची) गणती पुरी करावी व हें कीं परमेश्वरानें जो तुह्मांस सन्मार्ग दाखविला आहे त्या (उपकारा) बद्दल तुह्मीं त्यास गौरवावें, व तुह्मीं (त्याची) उपकार स्तुति करावी. १८५. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां माझे सेवक तुला माझ्यासंबंधीं विचारतील तेव्हां (तूं त्यांना समजावून दे कीं) मीं (त्यांचे) जवळ आहें. जेव्हां कधीं कोणी माझी प्रार्थना करील तेव्हां मीं (हरेक) प्रार्थना करणाराची प्रार्थना (ऐकितों व योग्य वाटल्यास) मान्यही करून देतों. तर त्यांना पाहिजे आहे कीं त्यांनीं माझा हुकूमही मानावा व मज वर विश्वास ठेवावा; कीं ते कदाचित् सन्मार्गी

---

मखदूम फकीह अली साहेब या जगमान्य विद्वान महात्म्यांनीं याचा अर्थ, शावान महिना संपून रमजान महिन्याच्या चंद्राची ज्याला जाणीव होईल वा साक्ष पटेल त्यानें त्या महिन्याचे उपास पाळावेत, असा केला आहे व हाच उचित होय; कारण शहेदा, हा 'अलेमा' व 'रआ' म्हणजे 'जाणिलें' व 'पाहिलें' या अर्थीं ही रूढ आहे. म्हणून चंद्र पाहून व जाणून उपास केला पाहिजे.

(१) अरबस्तानांतील कांहीं अज्ञानी लोकांस असा वहीम आला कीं परमेश्वर उंचीवर आहे; म्हणून ते ओरडून ओरडून त्याची प्रार्थना करूं लागले. तेव्हां परमेश्वरानें या वाक्यांत त्यांचा वहीम दूर केला; आणि प्रार्थना मान्य होण्याची स्थिति अशी आहे कीं गैब म्हणजे अदृष्ट गोष्टींचा अहवाल परमेश्वरालाच ठाऊक आहे; कधीं असेंही होतें कीं मनुष्य एखादी गोष्ट प्रार्थना करून इच्छितो; परंतु परमेश्वराचे अगाध ज्ञानांत त्यास ती अहितकारक होय; ह्मणून परमेश्वर आपल्या कृपेनें ती गोष्ट होऊं देत नाहीं. अशा स्थितींत ज्या मनुष्यानें ईश्वराचाच अवलंब केला आहे तो सहनशीलता पत्करतो व त्याला त्या गोष्टीचें दुःख होत नाहीं. सारांश प्रार्थनेचे मान्य-

लागतील. १८६. (मुसलमानांनों!) उपासांचे रात्रींत तुम्हांस आपल्या पत्न्यांपाशीं जाण्याची मुभा दिली गेली आहे. त्या तुमचा पदर¹ होत व तुह्मीं त्यांचा पदर आहां. परमेश्वरानें पाहिलें कीं तुह्मीं (चोरी छपी त्यांचे पाशीं गेल्यानें) खुद्द आपलेंच (धार्मिक) नुकसान करीत होतां; ह्मणून त्यानें तुमचा पश्चात्ताप मान्य केला व तुमच्या अपराधांची क्षमा केली. तर आतां (उपासांत रात्रीचे समयीं) तुह्मीं त्यांच्याशीं अंगसंग करा; आणि (अंगसंगाचा परिणाम) जी (पुत्रप्राप्ती) परमेश्वरानें तुह्मांसाठीं लिहून ठेविली आहे² तिची आकांक्षा करा; (व निवळ कामतृप्तीचे नादास लागूं नका) आणि तुह्मीं खा व प्या, येथपर्यंत कीं (रात्रीचे) काळ्या धारेपासून प्रातःकाळची³ पांढरी धार तुह्मांस स्पष्ट दिसून येऊं लागेल. नंतर रात्र (पडे) पर्यंत उपास पुरा करा; आणि (होय,) तुह्मी मशीदींत व्रतस्थ असाल, तर (रात्रींही) त्यांच्याशीं अंगसंग करूं नका. ह्या, परमेश्वराच्या (ठराविक)

---

तेचे दोन प्रकार आहेत: एकतर उद्दिष्ट हेतु सफल होणें अगर मनाचें समाधान व सांत्वन होणें.

(१) लिबास या शब्दाचा अर्थ पोषाक वा परिधान असा आहे; मी त्याचा अर्थ पदर केला आहे. कारण कीं, नवऱ्याच्या अब्रूवर बायको पदर घालते व बायकोचे अब्रूवर नवरा पदर घालतो अगर ते परस्परांचे सुखास कारणीभूत होतात; म्हणजे एकमेकांचे सहवासावांचून त्यांचें चालतच नाहीं.

(२) इस्लामधर्माची हीच तर मोठी खुबी आहे कीं त्यांत मानवी स्वभाव व प्रवृत्तींचा विचार ठेविला गेला आहे. नाहींतर वास्तविक पाहतां, पतिपत्नीच्या समागमाचा वेळ म्हटला म्हणजे रात्रीचा; आणि उपास दोनचार दिवसांचेच नाहींत तर एक महिन्याभरचे. मग पतिपत्नीस एक सारखें वेगळें राहण्याचा हुकूम दिला गेला असता, तर त्याची अंमलबजावणी फार मुष्किल होती.

(३) प्रातःकाळ होतो तेव्हां प्रथम गडद अंधार होतो व मग उजेडाच्या दोन धारा उगवत्या दिशेस दिसून येतात. नंतर उजेड प्रबळ होतां होतां अंधार लय पावतो.

मर्यादा होत ; तर तुह्मीं त्यांच्याजवळही फिरकूं नका. अशाच तऱ्हेनें परमेश्वर आपले नियम लोकांस स्पष्ट करून सांगतो ; कीं कदाचित ते (आज्ञाभंगास) जपून वागतील. १८७. आणि तुह्मीं आपसांत एकमेकांचे माल (उगीच) नाहक खाऊन चट करूं नका ; व त्या (माला)ला (सरकारी) अधिकाऱ्यांपाशीं (वशीला घडवून आणण्याचे कामीं) साधन बनवूं नका ; कीं लोकांचे मालांतून (थोडें बहुत जें) कांहीं (हातीं लागेल तें) पापबुद्धीनें जाणून बुजून तुह्मांस गिळंकृत करितां यावें. १८८. (हे पैगंबरा ! लोक) तुला चंद्रा (चे रूपांतरां) संबंधीं प्रश्न करितात. तर (तूं त्यांना) सांग कीं चंद्राचे द्वारा लोकांचे व्यवहार व (त्यांची उपासना उदाहरणार्थ) हज्ज यांचे वेळ माहीत होतात. आणि घरांत तुह्मीं त्यांच्या पाठीमागचे बाजूनें यावें हें कांही पुण्य नाहीं ; किंबहुना पुण्य तर त्याचें होय कीं जो (परमेश्वराला) भिऊन वागेल. आणि घरांत (याल तर) त्यांचे दरवाज्यांतून या ; व परमेश्वरा (चे आज्ञाभंगा) पासून भीत रहा

( १ ) म्हणजे लांच खाण्याचे हेतुनें ; कीं जी लांच, लांचखाऊ अधिकाऱ्यांस खऱ्याचें खोटें करण्यासाठीं दिली जाते.

( २ ) पैगंबर साहेबांस लोक लहान मोठ्या सर्वच तऱ्हेच्या गोष्टी विचारीत होते. सारांश, कोणी हेंही विचारिलें कीं, कांहो, महाराज ! ही चंद्राची वधघट व उगवणें मावळणें ह्यांत काय प्रयोजन आहे ? परमेश्वरानें त्यांस उत्तर दिलें कीं चंद्राद्वारा लोकांचीं मोठमोठालीं कामें निघतात. त्यांचे व्यवहार व उपासना याचें कालमान चंद्रावर अवलंबून आहे. ह्मणूनच शास्त्रांत चंद्रमास व चांद्रवर्ष गणण्याचा प्रचार होय.

( ३ ) इस्लामापूर्वीं अबरलोक निरनिराळ्या वहीमांत पडलेले होते. त्यापैकीं एक हें कीं हज्जचीं वस्त्रें धारण केलीं असतांना घरांत यावयाचें अगत्य झाल्यास, घरांत मागचे बाजूनें भिंतींत खिंडार पाडून येत होते. परमेश्वरानें या त्यांच्या वर्तनाचा निषेध केला व सांगितलें की प्रथम तर या गोष्टीच पुण्यांत दाखल नाहींत. पण ज्या पुण्याची जरूरी आहे त्याचेकडे तुमचें लक्ष नाहीं.

कीं तुह्मीं (आपल्या मनोरथांत) सफल व्हाल. १८९. आणि (मुसलमानांनों!) जे लोक तुह्मांशीं लढतील, तुह्मीहीं परमेश्वराचे मार्गा-(ह्मणजे धर्मा)र्थ त्यांच्याशीं लढा. व अत्याचार करूं नका; कारण कीं, परमेश्वर (कोणाही तऱ्हेनें) अत्याचार करणाऱ्यांना पसंत करीत नाहीं. १९०. आणि (जे लोक तुह्मांशीं लढतात) त्यांना जेथें पावाल तेथें कत्तल करा; व जेथून त्यांनीं तुह्मांस काढून लाविलें आहे (ह्मणजे मक्केंतून) तुह्मींही त्यांना बाहेर काढा. आणि फितुर (काईम राहणें हें) कत्तले पेक्षांही अधिक भयंकर होय. आणि जोंपावेतों नास्तिक लोक आदर मान्यतेचे मशीदी (ह्मणजे काबागृहा)पाशीं तुह्मांशीं न लढतील, तों पावेतों तुह्मींही त्या जागीं त्यांच्याशीं लढूं नका. परंतु जर ते लोक तुह्मांशीं लढतील तर तुह्मींही त्यांना (बेलाशक) मारून टाका. (असल्या) नास्तिकांची अशीच सजा होय. १९१. मग जर ते माघार घेतील तर परमेश्वर क्षमाळू व दयाळू होय. १९२. आणि तुम्हीं येथपर्यंत त्यांच्याशीं लढा कीं (मुलखांत) फंदफितुर (नांवासही) राहणार नाहीं; व (एका) परमेश्वराचाच हुकूम चालेल. मग जर ते (फितुरापासून) माघार घेतील तर (त्यांच्यावर कोणात्याही प्रकारची सक्ती न केली पाहिजे. कारण) सक्ती तर जुलुमी लोकांखेरीज कोणावरही (वाजवीच) नाहीं. १९३.

(१) उर्दू भाषेंत कुराणाचे लोयप्रीय भाषांतरकार शाह अबदुल कादिर साहेब हे लिहितात कीं 'अविश्वासी व नास्तिक लोकांशीं लढाई यास्त करतां होय कीं अन्याय व जुलूम तहकूब व्हावा, व सद्धर्माकडून लोकांस बहकविलें न जावें आणि हुकूम सर्वत्र परमेश्वराचा चालावा. जर अविश्वासी लोक ताबेदार होऊन राहतील तर लढाईची गरज नाहीं; आणि विश्वास तर मनांवर अवलंबून आहे. मग बळजबरीनें मारून हाणून मुसलमान करण्यांत काय हांशील आहे?' यावरून मुसलमांनाचें जिहाद ह्मणजे धर्मयुद्ध यावर चांगला प्रकाश पडतो व त्याची कची हकिकत माहीत होते कीं कसल्या धार्मिक आवश्यकतेमुळें जिहादची परवानगी असते; एरवीं तर लढाई चालत असतांही अत्याचार व जुलूम करण्याची मनाई आहे.

**आदर सन्मानाचे महिन्यांचा बदला आदर सन्मानाचे महिने; आणि (महिन्यावरच काय? तर) आदराच्या (सर्वच) चिजा अदल्यांचा बदला. तर जो कोणी तुम्हांवर (कांहीं) कहर गुदरवील, तर जसा कहर त्यानें तुम्हांवर गुदरविला, तसाच कहर तुम्हींही त्याच्यावर गुदरवा. आणि (कहर गुजारतांना) परमेश्वराला भीत राहा व जाणून असा कीं परमेश्वर, त्याला जे लोक भिऊन वागतात त्यांचाच साथी होय. १९४. आणि तुम्हीं परमेश्वराचे मार्गांत खर्चवेंच करा व आपल्या हातांनीं आपल्याला हलाखींत घालूं नका. आणि परोपकार करा; निःसंशय परमेश्वर परोपकारकर्त्यांस प्रीय**

---

असले नियम असतांना 'जिहाद' वर कोणाच तऱ्हेचा आक्षेप येऊं शकत नाहीं.

(१) अरबलोक जिल्काद, जिल्हज्ज मोहर्रम व रजब या चार महिन्यांचा फार आदर करीत होते; कीं सर्व मुलूखभर लूटमार व लढाया बंद होत होत्या. मुसलमानही त्याच कायद्याप्रमाणें वागत होते. ह्मणून नास्तिक लोक या महिन्यांत मुसलमानांवर चढचढून येत असत. मुसलमान या सन्माननीय महिन्यांच्या विचारानें लढाईकडून अंग काढून घेत. परमेश्वरानें मुसलमानांस सदर परवानगी दिली कीं आदराबरोबर आदर आहे; जर ते कोणा वेळेचा अगर स्थलाचा आदर न पाळतील तर तुह्मांसही असा आदर पाळण्याची जरूरी नाहीं; कीं जेणें करून तुह्मीं जशाला तसा जबाब देण्यांत कमी करावी.

(२) भाष्यकारांनीं या वाक्याचे अर्थ वेगवेगळाले दिले आहेत. कोणी ह्मणतात कीं आपल्याला हलाखींत घालणें ह्मणजे जर तुह्मीं जिहाद करणें सोडून द्याल तर शत्रूचा तुह्मांवर पगडा बसेल व ते शेवटीं तुमचे नाशास कारणीभूत होतील; कोणी ह्मणतात कीं जर तुह्मी धर्मयुद्धांत आपलें धन न खर्चाल तर शत्रूंचे पुढें हार खाऊन पायमल्लींत पडून जाल. आणि कोणी हाही अर्थ सांगतात कीं परमेश्वराचे मार्गीं खर्च करा, पण इतका जास्त खर्चही करूं नका कीं तुह्मांला स्वतः टंचाई भासेल. व तुमची टंचाई तुह्मांलाच नडेल व तुमचे पायमल्लीस कारणीभूत होईल.

**ठेवितो. १९५. आणि परमेश्वरार्थ हज्ज व उमरा (यांचा तुह्मीं निश्चय केला असेल तर तो) पूर्ण करा. आणि जर तुह्मीं (वाटेंत कोठें) घेरले जाल**

---

(१) ज्या मनुष्यानें हज्ज व उमरा यांचा निर्धार केला असेल व वाटेंत शत्रु त्याला अडकवतील; व यास्तव तो काबागृहीं पोहोंचू न शकेल; तर त्याला सर्वानुमतें कुरबानी ह्मणजे बळी अर्पण करणें भाग होय. आतां तो बळी कोठें व केव्हां दिला जावा याविषयीं धर्मशास्त्रवेत्यांमध्यें मतभेद आहे. हजरत इमाम-आचार्य-अबुहनीफा यांचें असें मत आहे कीं बळी-दानार्पण काब्यांजवळ केलें जावें; ह्मणजे त्या मनुष्यानें बळीच्या जनावराला आणखी कोणा मनुष्याच्या हस्तें काबा गृहांत धाडावें आणि त्याच्या अर्पणाचा दिवस हज्जचे विधि करावयाचे असल्यास 'यौमे नहर' ह्मणजे जिल्हज्जची दहावी तारीख, व उमरा ह्मणजे तीर्थाचे विधि करावयाचे असल्यास कोणताही एक दिवस ठरवावा. त्या दिवशीं ह्या निर्धार केलेल्या मनुष्यानें जेथें अडकविला गेला असेल तेथेंच आपलें डोसकें मुंडवून एहराम ह्मणजे हजचीं वस्त्रें काढून टाकावीं व आपला नेहमीचा पोषाक करावा. हजरत इमाम—आचार्य—शाफई ह्मणतात कीं हें बळीदानार्पण काब्याजवळच होणें कांहीं जरूर नाहीं. ज्या जागीं तो मनुष्य घेरला गेला असेल त्याच जागीं बळी देऊन वस्त्रें उतरावीं. या मतभेदामुळें आह्मी सर्व साधारण असा अर्थ पत्करला आहे व तो दोन्ही पक्षांसही लावतां येतो. हें ठाऊक असू द्या कीं काबागृहाचे आदराचे दृष्टीनें मक्कापुरीच्या चारही बाजूस तटबंदी केली गेली आहे; व या हद्दींत शिकार करणें व वनस्पतींपैकीं झाड, पान, फूल, गवत वगैरे कापणें, तोडणें व ओरबाडणें यांची मनाई आहे. याचें कारण अध्यात्मिक उन्नति व नैतिक प्रगती हें होय; याशिवाय मक्केची जमीन रेताळ व खडकाळ आहे व तींत पाणी व झाडपाल्याची कमतरता आहे; ह्मणून त्या जागेला पायमल्लीपासून राखणें हा ही उद्देश दिसतो. या हद्दबंदीचे आंत जो प्रदेश आहे त्याला 'हरम' ह्मणतात. निरनिराळ्या देशाहून येणाऱ्या मक्केचे यात्रे करूं साठीं शास्त्रांत कांहीं स्थळें नियमित केलीं गेलीं आहेत. उदाहरणार्थ:—मदिनेकरांसाठीं जुल्हलीफा, सिरीयादेशाचे रहिवाशांसाठीं हजफा, नज्दचे लोकांसाठीं

तर जी सहज प्राप्त होऊं शकेल अशी कुरबानी (ह्मणजे बळी अर्पण करा). आणि बळी आपल्या वेदी जवळ जाऊन ठेपे तों पर्यंत तुह्मीं आपलीं डोसकीं मुंडवूं नका. पण जो कोणी तुमच्यांत दुखणेकरी असेल अगर त्याच्या डोसक्याकडून त्याला (कोणतीही) इजा होत असेल; तर (केंस उतरून टाकण्याचा) मोबदला उपास वा दानधर्म वा बळीदान (यांहीं होतो); मग जेव्हां तुह्मीं (शत्रु वगैरे कडून) बिनघोर होऊन जाल, तेव्हां जो कोणी उमरा (ह्मणजे तीर्था)चा, हज्ज (ह्मणजे यात्रे) बरोबरच लाभ घेऊं पाहील तर जी सहज प्राप्त होऊं शकेल अशी कुरबानी (ह्मणजे बळी त्यानें दिला पाहिजे); आणि ज्याला (बळी) प्राप्त न होईल तर हज्जचे हंगामांत तीन दिवसाचे उपास (राखणें) व जेव्हां तुह्मीं परत याल तेव्हां सात (दिवसाचे). हा पूर्ण दशक (झाला). हा (हुकूम) ज्याचें घरदार सन्माननीय मशीदी (चे सींमेंत ह्मणजे मक्के) त नसेल त्याच्या करतां होय. आणि तुह्मी परमेश्वराला भ्या व जाणून असा कीं परमेश्वर शिक्षेंत फार कडक आहे. १९६.

---

कर्नुल्मनाजिल व यमनवाल्यांकरतां (ज्यांत हिंदुस्थानही दाखल आहे) यलमलम पर्वत. जेव्हां कोणी हज्ज अथवा उमरा करण्याचे निर्धारानें या स्थळीं किंवा त्यांच्या थेट समोरासमोर येऊन पोहोंचेल त्यानें स्नान अगर वजू करून ह्मणजे तोंड व हात पाय धुवून सोवळें होऊन नवे कपडे बदलावे व सुगंधी द्रव्यें लावावीं व दोन रकअत नमाज पढून तलबिय: ह्मणजे ( लब्बैक ल्लाहुम्मा लब्बैक, लब्बैकालाशरीकालक, लब्बैक अन्नल हमदा व न्नेअमता लक, वल्मुल्का लक ला शरीका लक.) हे परमेश्वरा! मी तुझ्या सेवेंत हजर आहे, हे परमेश्वरा! मीं तुझ्या सेवेंत हजर आहें, मी तुझ्या सेवेंत हजर आहे; तुझा कोणी सरकतदार नाहीं. हे परमेश्वरा! मी तुझ्या सेवेंत हजर आहें. सर्व स्तुति तुलाच योग्य आहे, सर्व देणग्या व राज्य तुझेंच आहे, तुझा कोणी विभागी नाहीं;' अशी घोषणा करीत जावी. मुहरिम ह्मणजे हज्जचीं वस्त्रें परिधान करणाराचे फक्त दोनच कपडे असतात ह्मणजे एक चादर, व एक लुंगी कीं तीं शिवलेलीं नसावींत; परंतु स्त्रियांस शिवलेले कपडे परिधान करण्याची मुभा आहे. हीं वस्त्रें धारण केल्यानंतर कित्येक गोष्टी करण्याची

हज्जचे (तर खास) महीने (होत कीं ते सर्वांस) विदित[1] आहेत. तर जो कोणी त्या महिन्यांत हज्जचा निर्धार करील, तर (एहराम-हज्जची वस्त्रें-धारण केल्यापासून अखेर पावेतों) हज्जचे (हंगामा) मध्यें ना विषयसुखाची कांहीं गोष्ट (करणें) व ना (कसल्याच) पातकाची व ना तंट्याबखेड्याची. आणि तुम्हीं पुण्याचें कोणतेंही काम कराल, तें परमेश्वराला (तेव्हांच) माहीत होऊन जाईल. आणि (हज्जेस जाण्यापूर्वीं वाटेची) बेगमी करून घ्या. कारण, (वाटेची) सर्वोत्तम बेगमी (परमेश्वराचें) भय होय; (व त्यांपैकींच हें कीं कोणापाशीं मागूं नये व चोरूं नये). आणि अहो बुद्धिवानांनों! (अस्सल धार्मिकता ही कीं) तुम्हीं माझ्याशीं भीत[2] असा. १९७. (हज्जमध्यें सामील होऊन) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याची कृपा (म्हणजे व्यापाराद्वारें कांहीं द्रव्य) संपादन करूं पाहाल तर त्यांत तुम्हांकडे कांहीं पाप नाहीं. मग जेव्हां तुम्हीं 'अरफात'हून परत फिराल, तेव्हां मश्‍अरुल्‌हराम (म्हणजे मुजदल्फा) मध्यें मुकाम करून परमेश्वराचें स्मरण करा. आणि त्याचें स्मरणही जसें त्यानें (पैगंबराद्वारा) तुम्हांस

---

मनाई आहे:—पुरुषाला शिवलेले कपडे घालणें, डोकें झांकणें, अत्तर लावणें, ऊवा मारणें, शिकार करणें, डोकें मुंडविणें, नख वा केस कातरणें, पतिपत्निगमन व केशर वगैरे रंगीन वस्तुनें रंगलेलें वस्त्र लेणें वगैरे. स्त्रिला डोकें झांकण्याची मुभा आहे पण तोंडावर बुरखा घेण्याची मनाई आहे.

(१) म्हणजे शव्वाल, जिल्काद व जिल्हज्जचे दहा दिवस. हज्जचीं वस्त्रें परिधान करणें शव्वालचे अगोदर निषिद्ध होय.

(२) इस्लामचे पूर्वीं तर लोक भीक मागमागून हज्ज करीत होते व मगदुर असून वाट सामुग्री बरोबर नेत नसत व इतर लोकांस कंटाळा आणीत असत. आतांहि हजारों मनुष्यें ज्यांना मगदूर नाहीं ते पुरता वाटखर्च घेतल्या वांचून केवळ भिकेचे भरंशावर हज्ज करण्यासाठीं निघून उभे राहतात. तर वाटेची बेगमी करून घेण्याची फार उत्तम व उपयुक्त ताकीद होय. मुसलमानांना या गोष्टीकडे पुरतें लक्ष पुरविलें पाहिजे.

शिकविलें आहे तसेंच करा. आणि या पूर्वी तर तुम्हीं आडमार्गी भटकणाऱ्यांपैकीं होतां; (म्हणजे तुम्हांस भक्तिमार्गही माहीत नव्हता.) १९८. नंतर (एक गोष्ट ही होय कीं जेव्हां तुम्हीं आरफातहून चालूं लागाल तेव्हां) ज्या जागेवरून (इतर) लोक चालतील त्या वरूनच तुम्हींही चाला; आणि परमेश्वरापाशीं (पातकांची) क्षमा मागा. निःसंशय परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. १९९. मग जेव्हां तुम्हीं आपले (हज्जचे) विधि पूर्ण करून चुकाल, तेव्हां तुम्हीं (शेखीनें) जसें आपल्या वाडवडीलांचें स्मरण करूं लागत होतां (तें सोडून देऊन) तसेंच, किंबहुना त्याहूनही जास्तच (पूज्यबुद्धीनें) तुम्हीं परमेश्वराचे स्मरणांत लागा. मग लोकांतून

---

(१) हजरत पैगंबर साहेबांनीं परमेश्वराचे शिक्षणास अनुसरून जें कांहीं कार्य केलें व जें त्यांच्या हदीस म्हणजे वचनानें शाबीत होतें तें असें कीं:–त्यांनीं मुजदल्का मुक्कामीं पोहोंचून एकदां 'अज़ान' म्हणजे बांग व दोनदां 'इकामत' म्हणजे नमाजीला उभें राहण्याचे वेळीं पुकारली जाते ती बांग म्हणवून 'मगरिब' म्हणजे संध्याकाळ व 'ईशा' म्हणजे रात्र या वेळच्या दोन्हीं नमाजी एकत्र पढून कांहीं विश्रांति घेतली. सकाळ झाली तेव्हां अज़ान व इकामत पुकारून सकाळची नमाज पढली. मग आपल्या कस्वा नांवाचे उंटणीवर स्वार होऊन, कुज़हपर्वत जो मुजदल्फाचे मैदानांत आहे तेथें आले; व किबल्याकडे तोंड करून दुवा व तकबीर (म्हणजे अल्लाहो अकबर) व तहलील (म्हणजे लाइलाहा इल्लल्लाहो) यांचें घोषण करीत राहिले. व सूर्य उगवतांच पुढें चालते झाले.

(२) मक्केचे राहणारे अरफात मध्यें जाऊन राहत नव्हते; व म्हणत कीं आम्हीं तर, खास हरमचे रहिवाशी आहों. तर आम्हीं हरमचे हद्दीबाहेर कां म्हणून जावें? पण वास्तविक पाहतां अरफातमध्यें मुक्काम करणें, हा हज्जचा एक मुख्य विधि होय. इतर लोक तर अरफातहून चालत; व हे लोक हरमची सरहद्द, जेथें ते थांबत होते तेथूनच चालूं लागत. परमेश्वरानें त्यांच्या ह्या गैरसमजाची सुधारणा केली.

(३) जे लोक अरफातहून चालून येऊन काबागृहाला प्रदक्षिणा

**कांहीं असे होत कीं जे (प्रार्थनेंत) म्हणतात कीं हे आमचे पालनकर्त्या! आम्हांला (जें कांहीं देणें असेल तें) ह्या जगांत दे; (सारांश, त्यांना दुनिया प्राप्तही होते.) आणि पुढील जगांत त्यांचा कांहींच वांटा नाहीं. २००. आणि त्यांच्यांतून कांहीं असेही होत कीं जे (प्रार्थनेंत) म्हणतात कीं हे आमचे पालनकर्त्या! तूं आमचें ह्या लोकींही कल्याण कर व परलोकींही कल्याण (कर;) व आम्हांस नरकाग्नीचे शिक्षेंतून वांचीव. २०१. हेच लोक होत कीं ज्यांना (परलोकीं) त्यांनीं जें कांहीं केलें सवरलें आहे त्याचा वांटा (म्हणजे पुण्य फल प्राप्त) होईल. आणि परमेश्वर तर फटक्या भरांत (सर्वांचा) हिशेबकर्ता होय. २०२. आणि गणतीचे (ह्या कांहीं) दिवसांत तुम्हीं परमेश्वराचें स्मरण करीत असा. मग जो कोणी घाई करील (व) दोनचे दिवसांत (मिनाहून निघून उभा राहील); तर (त्यांत) त्याच्याकडे कांहीं पाप नाहीं. आणि जो उशीरापर्यंत थांबून राहील त्याच्याकडेही कांहीं पाप नाहीं. (ही सवलत) जो कोणी**

---

घालतात, त्यांचे हज्जचे विधि या प्रदक्षिणेनंतर पूर्ण होतात. परंतु हज्ज तर इस्लामचे पूर्वीं पासूनच चालत येत होता; व ते लोक हज्ज पूर्ण झाल्यावरही मेळा जमवून ठेवित असत. त्यांत ते देवघेव करीत व शेखीनें आपल्या वाडवडीलांची बढाई मिरवीत व पवाडे व काव्यें पाठ ह्मणून दाखवीत. परमेश्वरानें हा जमाव मोडावयास इच्छिलें नाहीं, कारण कीं ते क्रयविक्रय व व्यापारधंद्याचे दिवस असतात; परंतु वाडवडिलांची बढाई व निरर्थक गोष्टी यांची मनाई केली; व परमेश्वरानें आपलें स्मरण फार पूज्य-बुद्धीनें करावयास त्यांस आज्ञा केली.

( १ ) दोनच दिवस अथवा कांहीं जास्त दिवस पावेतों राहण्यास अडचण नाहीं. पण ईश्वरस्मरणाकडून गाफिल होतां कामा नये. सारांश जे लोक मक्केंत राहतात ते मिनामध्यें खडे फेंकतात व प्रत्येक नमाजेनंतर व एरवींही 'तकबीर' ह्मणत जातात. व ही तकबीर इतर देशांतही लोक हज्जमध्यें नसले तरीही याच नियमित दिवसांत नमाजेनंतर ह्मणतात.

(परमेश्वराला) भिऊन[1] वागेल त्याच्या साठींच होय. आणि तुम्हीं परमेश्वराला भीत राहा व जाणून असा कीं (पुनरुत्थानाचे दिवशीं) तुह्मीं (सर्व) त्याचेच हुजुरांत हजर केले जाल. २०३. आणि (हे पैगंबरा) कोणी एखादा माणूस[2] असा (दांभिकही) असतो कीं ज्याच्या गोष्टी तुला (या वेळीं) जगिक आयुष्यांत भल्या व मोहक वाटतात व तो आपल्या अंतरंगांतील (प्रीति) भावाचा परमेश्वराला साक्षीही ठरवितो; व वास्तविक पाहतां, तो (तुझ्या) शत्रू मध्यें (सर्वांत) अति कट्टा भांडखोर होय. २०४. आणि जेव्हां तो (तुजकडून) परत फिरेल, तेव्हां तो या हेतुनें (सारा) मुलुख खुंदळून टाकील कीं त्यानें त्यांत नासाडी माजवावी; व शेताभाताचा व (मनुष्य व पशु वगैरेच्या) बिजांचा विध्वंस करून टाकावा. आणि परमेश्वर नासधूळीला पसंत करीत नाहीं. २०५. आणि जेव्हां त्याला सांगितलें जाईल कीं तूं परमेश्वराला भी; तेव्हां त्याला शेखी येऊन (ती त्याला) पाप करण्यास प्रवृत्त करील. तर अशा (अजागळा) स मात्र जहन्नम (ह्मणजे नरककुंड) पुरेसें होय व तें (फारच) वाईट शयन होय. २०६. आणि लोकांत कोणी (भला माणूस) असाही होय कीं जो परमेश्वराची मर्जी संपादण्यासाठीं आपला जीव

---

( १ ) आणि जो कोणी परमेश्वराला भिऊन वागेल त्याच्यासाठीं वेळ अवेळ कशाचीच अडचण नाहीं; पण जो कोणी वाईट हेतुनें तेथें थांबून राहील त्याचें राहणेंच परमेश्वराला पसंत नाहीं. मग तो घाई करो वा उशीर करो.

( २ ) मौलवी शाह अबदुलकादिर साहेब लिहितात कीं दांभिक ह्मणजे ढोंगी माणसाची ही स्थिति असते; कीं तो जाहीरपणें तर खुशामत करतो व परमेश्वराला साक्षी ठेवून ह्मणतो कीं माझ्या मनांत तुमचें फार प्रेम आहे. पण भांडतांना तो कांहीं कसर ठेवित नाहीं. आणि त्याला वाव सांपडेल तर लूटमार चालवील. त्याला मना करावें तर तो शेखींत येऊन जास्तच पाप करितो. हजरत पैगंबर साहेबांचे वेळीं अखनस बीन शुरैक नामी मनुष्य त्यांच्याशीं असेंच वर्तन करीत होता.

(देखिलही) देऊन टाकतो. आणि परमेश्वर, सेवकांचे ठायीं फारच करूणाशील होय; (कीं त्यांच्या कमजोरीवर नजर ठेवून त्यानें धर्मात हरतऱ्हेची सुलभता ठेविली आहे.) २०७. अहो मुसलमानांनों! इस्लामांत तुम्हीं पुरेपुरे दाखल व्हा व सैतानाचे पदोपदीं चालूं नका. निःसंशय तो तुमचा धडधडीत दुशमन होय. २०८. मग जर तुह्मांपाशीं स्पष्ट हुकूम येऊन पोहोंचेल व त्या उपरांतही तुह्मीं डगमगाल, तर जाणून असा कीं परमेश्वर परम समर्थ (व) बुद्धिवान् होय. (त्याच्या तावडींतून तुह्मांस सुटतां येणार नाहीं.) २०९. हे लोक कां या गोष्टीचीच वाट पाहतात कीं परमेश्वरानें आभाळाचें छत्र लावून देवदुतांसह परिवार यांचे समोर येऊन हजर व्हावें; व (जें कांहीं होणें असेल त्याचा) हुकूम सोडला जावा. (म्हणजे पुनरुत्थानाची घटका यावी; परंतु हें सद्या मंजूर नाहीं.) आणि सर्व कामें परमेश्वराचेच हवालीं होत. २१०. (हे पैगंबरा!) तूं बनी-इस्त्राएलांस विचार कीं आम्हीं त्यांना कितीतरी खुल्या खुल्या निशाण्या दिल्या? आणि जो कोणी (इतका अजागळ असेल कीं परमेश्वर त्याला एक देणगी म्हणजे दिव्य पुस्तक देईल व तो) परमेश्वराचे (त्या) देणगीला ती आपल्यापाशीं आल्यानंतर बदलून टाकील; तर ह्यांत शंका नाहीं कीं परमेश्वर शिक्षेंत फार कडक होय. २११. जे लोक (सत्धर्माला) नाकारितात त्यांना ऐहिक आयुष्य सुशोभित

---

(१) कित्येक यहुदी मुसलमान झालेले होते; व मुसलमान होऊनही शब्बाथ ह्मणजे शनवारचे दिवसाचा आदर करीत होते; व उंटाचें मांस जें यहुद्यांचे येथें निषिद्ध आहे त्याविषयीं जपत. अजूनही हिंदूंचे झालेले कांहीं नवे मुसलमान आपल्या पहिल्या धर्मातल्या गोष्टी पाळतात. तर मुसलमान व्हावें तर पुरेपुरे. अर्धे हिंदू व अर्धे मुसलमान राहून कांहीं उपयोग नाहीं. हें वाक्य दांभिक लोकांसंबंधानें प्रगट झालें आहे.

(२) ह्मणजे सर्व कामें परमेश्वराचे मर्जी व परवानगीनें होतात. तशीच कियामत ह्मणजे पुनरुत्थानाची घटका जेव्हां येईल तेव्हां योग्य वेळीं त्याच्याच मर्जी व परवानगीनें होईल.

करून दाखविलें गेलें आहे; व ते मुसलमानांची चेष्टा¹ उडवितात. व वास्तविक पाहतां, जे लोक परमेश्वराला भिऊन चालतात (म्हणजे मुसलमान, ते आपल्या दर्ज्यामध्यें) पुनरुत्थानाचे दिवशीं त्या(नाकारणाऱ्यां) वरहि वरचढ राहतील. आणि परमेश्वर ज्याला इच्छील त्याला बेसुमार (देणग्या) देईल. २१२. (सुरुवातींत सर्व) लोक एकाच पंथाचे होते. मग (ते आपसांत मतभेद करूं लागले तेव्हां) परमेश्वरानें प्रवक्ते पाठविले कीं ते (विश्वासूंना ईश्वरप्रसन्नतेची) सुवार्ता सांगीत व (नास्तिकांना ईश्वरशिक्षेचें) भय सुचवीत; आणि त्यानें त्यांच्या मार्फत सत्य पुस्तकें पाठविलीं, कीं ज्या गोष्टींत लोक मतभेद करीत आहेत त्या गोष्टींविषयीं ईश्वरी पुस्तक त्यांच्यांत फैसला करील. आणि (यावरही लोकांचा विरोध बंद झाला नाहीं कीं) ज्या लोकांना पुस्तक दिलें गेलें होतें तेच (लोक) आपल्यापाशीं खुले खुले हुकूम आले त्याउपरांत, आपसांतील अढीमुळें त्याविषयीं मतभेद करूं लागले. तर (अखेर) ज्या खऱ्या (मार्गा)विषयीं लोक मतभेद करीत होते तो (मार्ग) परमेश्वरानें स्वसंकल्पानें मुसलमानांस दाखविला. आणि परमेश्वर ज्याला इच्छील त्याला सरळमार्ग दाखवील. २१३. (मुसलमानांनों!) कां तुह्मीं अशी कल्पना करितां कीं तुम्ही (मजेनें) स्वर्गांत जाऊन दाखल व्हाल? आणि अजून, जे लोक तुमच्या आधीं होऊन गेले आहेत त्यांच्यासारखी स्थिति तुह्मांला आली नाहीं; कीं त्यांना टंचाईही पोहोंचली व दुःखेंही (पोहोंचलीं) व झटकारिलेही गेले; येथपर्यंत कीं पैगंबर व त्याचे संगतीं जे विश्वासणारे होते ते (हळहळून) बोलूं लागले कीं अखेर परमेश्वराचे मदती(चे येण्या)चा कांहीं वेळही आहे? सावध असा! सावध असा! परमेश्वराची मदत (ह्मणजे तिचावेळ) जवळ (येऊन लागला) आहे. २१४. (हे पैगंबरा!) तुला (लोक) विचारितात कीं (परमार्थांत) त्यांनीं काय खर्च करावा? तर तूं

---

(१) हल्लींही कांहीं श्रीमंत आपल्या वैभवाच्या घमेंडींत गरीब मुसलमानांची हेटाळणी व चेष्टा करतात. त्यांना या वाक्यापासून बोध घेतला पाहिजे.

(त्यांना) समजीव कीं (परोपकारबुद्धिनें) जो मालही तुह्मीं खर्च कराल, तो तुमच्या आईबापांचा हक्क होय, व (तसाच) अगदीं जवळचे नातलगांचा व अनाथ बालकांचा आणि (मोताद) गोरगरिबांचा व वाटसरूंचा. आणि तुह्मीं कोणचाही परोपकार (लोकांशीं) कराल तर परमेश्वर तो जाणून आहे. २१५. (मुसलमानांनो! जिहाद् ह्मणजे धर्मयुद्ध) तुह्मांस कर्तव्य केलें गेलें आहे; व तें तुह्मांस आवडेनासेंहीं वाटेल. आणि नवल नाहीं कीं एक गोष्ट तुह्मांला आवडेनाशी लागेल व ती तुमचे ठायीं उत्तम असेल! आणि नवल नाहीं कीं एक गोष्ट तुह्मांस प्रीय वाटेल व ती तुमचे ठायीं वाईट निपजेल. आणि परमेश्वर जाणतो व तुह्मीं जाणत नाहीं. २१६. (हे पैगंबरा! मुसलमान लोक) तुला आदरणीय महिन्याविषयीं (ह्मणजे) त्यांत लढाई करण्याविषयीं विचारितात (कीं काय हुकूम आहे?) तर तूं त्यांना समजावून दे कीं आदरणीय महिन्यांमध्यें[2] लढणें महा पातक होय. पण परमेश्वराचे मार्गास अडथळा करणें व परमेश्वराला (जसें मानिलें पाहिजे तसें) न मानणें, आणि सन्माननीय मशीदीं (ह्मणजे काबागृहां)त मज्जाव करणें व त्या (मशीदींत राहण्याची व सेवाभक्ति करण्या)ची ज्यांचे अंगीं पात्रता आहे अशांस (ह्मणजे मुसलमानांस) तींतून काढून लावणें (कीं काबागृहांत त्यांना भक्तिकरतां येऊं नये), हें परमेश्वरा समीप (त्याहूनही) महान्तर (पातक) होय. आणि फितुर माजविणें हें (रक्तपात व) कत्तलेहूनही भयंकर होय आणि (हे नास्तिक लोक) नित्य तुह्मांशीं लढतच राहतील येथपावतों कीं जर त्यांचें चालेल तर ते तुह्मांस तुमच्या (इस्लाम) धर्माहून फिरवून टाकतील. आणि तुमच्यांतून जो कोणी आपल्या धर्माहून फिरेल व नास्तिक असतांनाच मरून जाईल, तर असल्या लोकांचें केलें सवरलें

(१) दानधर्म व परोपकार यांचे विनियोग तर स्पष्ट करून सांगितले व किती द्यावें हें प्रमाण लोकांच्या हिमतीवर सोडून दिलें. कारण जितका गूळ घालाल तितकें गोड होईल.

(२) पहा पृष्ट ७७, नोट नं० १.

(काय) इहलोक व (काय) परलोक (दोहों)मध्यें अक्रीत जाईल. आणि हेच नरकवासी होत (व) ते सदासर्वदा नरकांतच राहतील. २१७. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व ज्यांनीं परमेश्वराचे मार्गांत स्वदेशत्याग[1]ही केला व जिहाद-धर्मयुद्ध-हि केलें; हेच ते होत कीं जे परमेश्वराचे दयेची आशा बाळगून (बसले) आहेत. आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. २१८. (हे पैगंबरा! लोक) तुला दारू व जुगार यांविषयीं प्रश्न करितात. तर (तूं या लोकांस) सांग कीं ह्या दोन्हीं (चिजां)त मोठें पातक होय; आणि लोकांचे (कांहीं) फायदेही होत; परंतु यांच्या फायद्यापेक्षांही यांचें पातक (व नुकसान) अति मोठें होय. आणि ते तुला विचारितात कीं त्यांनीं (परमेश्वराचे मार्गांत) किती खर्च करावा? तर (तूं त्यांना) समजावून दे कीं (तुमच्या गरजा भागून) जितका फाजिल उरेल. अशाच तऱ्हेनें परमेश्वर (आपले) नियम तुह्मांस स्पष्ट करून सांगतो कीं तुह्मीं कदाचित् इहलोक व परलोक यां(चे प्रकरणां)त[2] मननपूर्वक विचार कराल. २१९. आणि (हे पैगंबरा! लोक) तुला अनाथ बालकांविषयीं विचारितात. तर (तूं त्यांना) समजावून दे कीं (ज्यांत) त्या(अनाथां)ची सुधारणा[3] (होईल तेंच) उत्तम होय. आणि जर तुह्मीं

---

(१) स्वदेशत्याग हा हिजरत या शब्दाचा अर्थ होय. पैगंबर साहेब व तत्कालीन मुसलमान हे, नास्तिक व अविश्वासी लोकांचे छळणूकीचे भयानें आपापले देश सोडून मदिनेंत येऊन राहिले होते. नंतर परमेश्वरानें असें केलें कीं मुसलमानांनीं पैगंबर साहेबांचे हयातींतच मक्का शहर जिंकलें व तमाम अरबी द्विपकल्पांत मुसलमानांचें राज्य झालें. लोकांस धर्माचें स्वातंत्र्य प्राप्त झालें व पुन्हां स्वदेशत्याग करण्याची जरूर उरली नाहीं.

(२) ह्मणजे जग प्रपंचाला निभावणें व परलोकींचें मनन करणें हें होय. माणसाला पाहिजे कीं त्यानें चांगल्याप्रकारें समजूनउमजून खर्चाची व्यवस्था करावी; मग तो खर्च पारमार्थिक गरजांस अनुसरून असो वा प्रापंचिक गरजामुळें असो.

(३) अनाथ बालकांच्या वित्तविषयाचे संरक्षणाबद्दल खबरदारी

त्यांच्याशीं मिळून मिसळून राहाल तर तीं तुमचीं भावंडें होत; (कोणी परकीं नव्हत). आणि परमेश्वर दुर्धारकाला सुधारकापासून (अलग) ओळखतो. आणि जर परमेश्वर इच्छिता, तर तो तुह्मांस कष्टांत घालता. निःसंशय परमेश्वर परम समर्थ (व) युक्तिवान होय. २२०. आणि (मुसलमानांनों !) मूर्तीपूजक स्त्रिया विश्वास धरीपर्यंत त्यांच्याशीं तुम्हीं लग्न करूं नका. आणि मूर्तीपूजक स्त्री, तुम्हांला कितीही भली (कां) वाटेना, तिच्यापरती मुसलमान दासी बेहत्तर. आणि मूर्तीपूजक पुरुष विश्वास धरीपर्यंत तुम्हीं त्यांचा विवाह संबंध करूं नका. आणि मूर्तीपूजक तुम्हांला कसाही भला (कां) लागेना त्याच्यापरता मुसलमान दास बेहत्तर. हीं (मूर्तीपूजक स्त्रिपुरुषें तर लोकांस) नरकाकडे पाचारण करितात; व परमेश्वर आपल्या आज्ञेनें स्वर्ग व तारण यांकडे पाचारितो. आणि तो आपले नियम लोकांस स्पष्टकरून सांगतो कीं ते कदाचित् हुशार राहतील. २२१. आणि (हे पैगंबरा! लोक) तुला ऋतुस्त्रावाविषयीं विचारतात. तर (तूं त्यांना) समजावून दे कीं तो मल होय; तर विटाळांत तुम्हीं स्त्रियांपासून अलग राहा. आणि त्या चोख्या होईपर्यंत त्यांच्यापाशीं जाऊं नका. मग जेव्हां त्या नाहून धुवून घेतील तेव्हां जेथून परमेश्वरानें तुम्हांस सांगून दिलें आहे तेथून त्यांच्यापाशीं या. निःसंशय परमेश्वर पश्चात्ताप करणाऱ्यांस पसंत करितो व सफाई राखणाऱ्यांसही पसंत करितो. २२२. तुमच्या पत्न्या (जणुं काय) तुमचीं क्षेत्रें होत. तर तुम्हीं आपल्या

---

ठेवण्याचा हुकूम होता. सारांश कुराणांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं जे लोक अनाथ बालकांचा माल निष्कारण व हकनाक गिळंकृत करतात, ते आपले पोटांत अंगारे भरतात. तर जे लोक जास्त खबदारी घेणारे होते त्यांनीं पोरक्या मुलांचें खाणेंपिणें वेगळें केलें; कीं असें न होवो कीं त्यांची एखादी कवडीही आमचे खर्चांत यावी. परमेश्वरानें बजाविलें कीं अस्सल हेतु अनाथांचे आचार व स्थिति सुधारणें हें होय. तर ज्यांत त्यांचें हित असेल तेंच करा. परंतु त्यांच्या संगतीं खाण्यापिण्यास बाध समजूं नका.

**क्षेत्रांत जसें पाहिजे आहे तसें या; आणि आपल्यासाठीं पुढची (म्हणजे परलोकींचीही) व्यवस्था ठेवा. आणि परमेश्वराला भ्या व जाणून असा कीं तुम्हांस त्याचे हुजूर हजर होणें आहे आणि (हे पैगंबरा! तूं) विश्वासणाऱ्यांना सुवार्ता ऐकीव. २२३. आणि (मुसलमानांनों!) आपल्या (निरर्थक) आणाशपथां (चे निमित्ता)नें परमेश्वराला (ह्मणजे त्याच्या नामाला, लोकांशीं) पुण्यवर्तन ठेवणें व (परमेश्वराला) भिऊन वागणें व लोकांत समेट घडवून आणणें या गोष्टींस प्रतिबंधक (व मुजाईम) ठरवूं नका. आणि परमेश्वर ऐकता व जाणता होय. २२४. तुमच्या शपथांत ज्या निरर्थक (शपथा) होत त्यांबद्दल तर परमेश्वर तुह्मांस पकडणार नाहीं. परंतु तुमच्या मन:संकल्पित (शपथा) बद्दल तो तुह्मांस (अवश्यच) पकडील.**

---

(१) स्त्री क्षेत्र, पुरुष शेतकरी, व वीर्यबिंदु बीज होय. तर ज्या प्रमाणें शेतकरी बियाण्याचें संरक्षण करितो कीं तो त्यास वायां जाऊं देत नाहीं व जेथें उगूं शकेल तेथेंच टाकतो; त्याचप्रमाणें पुरुषानेंही आपल्या बियांचें संरक्षण करावें. हें संरक्षण, आपल्या सत्तेचे शेतांत व नैसर्गिक मार्गानेंच बिजारोपण केल्यावांचून होणें शक्यच नाहीं.

(२) पुढची व्यवस्था या शब्दांतून जें निष्पन्न होतें तें हें कीं प्रपंचांतच गर्क होऊन धार्मिक व पारमार्थिक कार्याकडून गाफिल होऊं नये. दुसरें असें कीं आपल्या पत्नीशीं या उद्देशानें अंगसंग करावा कीं परमेश्वर सुसंतति देवो व ती जगांत आपल्या कामा येवो! आणि परमेश्वर त्यास सुपुत्र करो कीं त्याच्या श्राद्धादि क्रियांनीं म्हणजे कोणतेंही सुकृत्य करून त्याचे पुण्यफळांनीं आईबापांचें पाप क्षालन होऊन त्यांना उत्तम गति प्राप्त होवो.

(३) कधीं असें होतें कीं एक काम शास्त्रत: सुवंद्य व पुण्यवह आहे व मनुष्य रागाचे भरांत तें न करण्याची शपथ घेऊन बसतो; तर असल्या शपथा पाळल्या न पाहिजेत.

(४) निरर्थक शपथा म्हणजे इरादा व मन:संकल्प नसतां, अगर गतगोष्टींविषयीं ज्या शपथा ती गोष्ट प्रत्यक्ष घडली नसली तरी

**आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयार्द्र होय. २२५. जे लोक आपल्या स्त्रियांपाशीं जाण्याची शपथ घेऊन बसतील, त्यांना चार महिन्यांचा अवकाश होय. मग (ह्या अवधींत) जर ते (शपथेहून) फिरतील तर परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. २२६. आणि जर ते सोड चिठींचा निर्धार करतील, तरीही परमेश्वर ऐकता (व) जाणता होय. २२७. आणि ज्या स्त्रियांस सोडचिटी दिली गेली असेल त्यांनीं आपली तीन विटाळांपावेतों वाट पाहावी. आणि त्या जर परमेश्वरावर व शेवटल्या दिवसावर विश्वास ठेवीत असल्या तर (पुत्रसंतानापैकीं) जें कांहीं परमेश्वरानें त्यांच्या गर्भाशयांत निर्माण करून ठेविलें असेल तें लपवून ठेवण्याची त्यांस मुभा नाहीं. आणि त्यांचे पति (त्यांना) चांगल्या प्रकारें ठेवूं इच्छितील तर ते ह्या अवधींत त्यांना (आपल्या पत्नित्वांत) परतून घेण्याचे विशेष हक्कदार होत. आणि जसे ( पुरुषांचे हक्क ) स्त्रियांवर तसेच यथाशास्त्र स्त्रियांचे**

---

ती खरी आहे अशा कल्पनेनें परवलीच्या शब्दा दाखल तोंडून निघतात त्या; उदाहरणार्थ कित्येक लोक बोलतां बोलतां संकल्पावांचून ईश्वराची, देवाची वगैरे शपथा वाहतात. जरी असल्या शपथाचें प्रायश्चित करावयास नको; तरी परमेश्वरानें त्यांस निरर्थक म्हटलें आहे. म्हणून मुसलमानांनीं निरर्थक गोष्टींपासून दूरच राहावें. तेविसाव्या अध्यां-यांत विश्वासू मनुष्यांचीं कांहीं लक्षणें दिलीं आहेत; त्यांतल्या त्यांत एक लक्षण “आणि जे निरर्थक गोष्टींपासून पराङ्मुख असतात” हेंही होय. प्रायश्चित नाहीं तरी ह्या निरर्थक शपथांत परमेश्वराचे पवित्र नांवाचा अनादर मात्र आढळून येतो. म्हणून त्या पासून परमेश्वर आम्हां सर्वांस वांचवो!

( ३ ) ह्या शपथांचे वर्गांत एक खास तऱ्हेचे शपथेचें वर्णन केलें आहे. तिला शास्त्रीय परिभाषेंत ‘ईला’ म्हणतात म्हणजे पुरुषानें आपल्या स्त्रिपाशीं जाण्याची शपथ वाहिली; तर त्यांना चार महिनांचा अव-काश दिला गेला आहे. याच्या आंतच पाहिजे असेल तर त्यानें ती शपथ मोडून तिचा पुन्हां अंगिकार करावा अगर लाचारीस त्या मुदतीनंतर काडी मोडून द्यावी.

(हक्क पुरुषांवर होत). आणि पुरुषांला स्त्रियांवर (एक विशेष) दर्जा आहे. आणि परमेश्वर परम समर्थ व बुद्धिमान होय. २२८. सोडचिठी (जिच्या अन्वयें त्या टाकलेल्या स्त्रीचा पुन्हां अंगिकार करतां येतो ती) दोनदां ('मी तुला टाकलें' असें म्हणून, दिली जावी.) मग (दोनदां असें म्हटल्यावर) यथा शास्त्र (तिला घरांत) ठेवून घेणें अगर उपकारशीलतेनें रजा देणें. आणि जें कांहीं तुम्हीं त्यांना देऊन चुकलां असाल त्यांतून तुम्हांला कांहींच (परत) घेण्याची मुभा नाहीं; परंतु हें कीं पतिपत्नीस (या गोष्टीची) भीति असेल कीं परमेश्वरानें (पतिपत्नींच्या नांदणूकीच्या) ज्या मर्यादा ठरविल्या आहेत त्यांजवर ते काइम राहूं शकणार नाहींत; तर अशा स्थितींत कीं तुम्हां लोकांस ह्या गोष्टीचें भय असेल कीं पतिपत्नि परमेश्वराचे (बांधीव) मर्यादांवर काइम राहूं शकणार नाहींत, आणि स्त्री (आपला पिच्छा सोडविण्याखातर) कांहीं देऊन सुटेल; तर त्यांत उभयतांवरही कांहीं पाप नाहीं. ह्या परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादा होत; तर तुम्हीं त्यांचें उल्लंघन करूं नका. आणि जे परमेश्वराचे (बांधीव) मर्यादांचें उल्लंघन करतील, तर हेच लोक अन्यायी होत. २२९. आतां जर त्यानें तिला (तिसऱ्यांदा) सोडचिठी दिली, तर त्यानंतर जों पर्यंत ती त्याखेरीज (दुसऱ्यां कोणा) पतीशीं लग्न लावून घेणार नाहीं, तोंपर्यंत ती त्याचे साठीं कायदेशीर (होऊं शकत) नाहीं. पण जर (दुसरा पति तिचा अंगसंग केल्यावर) तिला सोडचिठी देऊन टाकील, तर दोघां (पतिपत्नि) वर कांहीं पाप नाहीं, कीं त्यांनीं (पुन्हां) एकमेकांकडे वळावें; अशा अटीवर कीं उभयतांचीही अशी पक्की भावना व्हावी कीं ते परमेश्वराचे (बांधीव) मर्यादांवर काइम राहूं शकतील. आणि ह्या परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादा होत कीं तो, जे लोक (गृहकार्य प्रयोजन) समजतात त्यांस त्या स्पष्ट करून सांगतो. २३०.

---

(१) पैगंबर साहेबाचें वचन म्हणजे हदीस या अन्वयें सिद्ध होतें कीं दुसऱ्या पतीशीं तिचा स्त्रिप्रसंग होणें हेंही आवश्यक आहे.

आणि जेव्हां तुह्मीं स्त्रियांना (दोनदां) सोडचिठी देऊन टाकली व त्यांची इद्दत (ह्मणजे सूटपत्रानंतरची शास्त्रोक्त अवधि) पूर्ण व्हाव-यास आली; तेव्हां (दोन गोष्टीं पैकीं एक गोष्ट तुह्मीं पत्करा, कांतर पुन्हां) यथाशास्त्र त्यांना (पत्नित्वांत) राखा अगर (तिस-ऱ्यांदा सोडचिठी देऊन) त्यांना शिष्टाचारानें निरोप देऊन टाका. आणि इजा देण्यासाठीं त्यांना (घरांत) ठेऊन घेऊं नका कीं (मागाहून) तुह्मीं त्यांचे प्रकार करावेत. आणि जो कोणी असें करील तर तो (कांहीं) आपलेंच नुकसान करून घेईल. आणि पर-मेश्वराचे हुकमांस हंशी (खेळ) समजूं नका; व परमेश्वरानें जे तुह्मांवर उपकार केले आहेत त्यांचें स्मरण करा; आणि (त्याचा) हा (उपकारही स्मरा) कीं त्यानें तुह्मांस पुस्तक व अक्कलेच्या गोष्टी प्रकट केल्या; (आणि उद्देश हा) कीं त्यानें तुह्मांस त्या योगें बोध करावा. आणि तुह्मीं परमेश्वराला भीत असा व जाणून ठेवा कीं परमेश्वर सर्वज्ञानी होय. २३१. आणि जेव्हां तुह्मीं स्त्रियांस (तीनदां) सोडचिठी देऊन टाकाल व त्या आपली (इद्दतीची) मुदत पुरी करतील, व यथाशास्त्र त्यांची आपसांत (कोणाशीं) मर्जी मिळून जाईल; तेव्हां तुह्मीं त्यांना आपल्या (दुसऱ्या) पतींशीं लग्न लावून घेण्यास अडथळा करूं नका. तुम-च्यांत जो कोणी परमेश्वरावर व शेवटल्या दिवसावर विश्वास ठेवीत असेल त्याला हा उपदेश केला जातो. ही तुह्मांसाठीं फार शुद्धिकारक व चोखेपणाची गोष्ट होय. आणि (गृहकार्यांचे प्रयोजनांस) परमेश्वरच (खूप) जाणतो व तुह्मीं (तसें) जाणत नाहीं. २३२.

---

(१) हजरत मोहंमद पैगंबर साहेबांपूर्वी अरब लोकांनीं सोडचिठीला हंशीखेळ बनवून ठेविला होता. सोडचिठी देण्यावर उतरल कीं एकदम शेंकडों वेळां, 'मी तुला टाकलें,' 'मी तुला टाकलें' असें बोलतच चालले जात; अगर सोडचिठी देत व पुन्हां अंगिकार करीत; नंतर पुन्हां सोडचिठी देत व पुन्हां अंगिकार करीत. तर त्यांच्या या जहाल अज्ञानपणाची कांहीं पारा-वारच राहत नसे. ते गृहकार्यांचे प्रयोजनाकडेही नजर ठेवित नसत. परमेश्वरानें ह्या वरील वाक्यांत सूटपत्राचा असा उत्तम उलगडा केला

आणि जो मनुष्य (बायकोला सोडचिठी दिल्यावर आपल्या तान्ह्या मुलास) पुऱ्या दिवसापर्यंत दूध पाजवूं इच्छील; तर त्याचे खातर आईनीं आपल्या मुलांस भरपूर दोन वर्षें दूध पाजावें. आणि ज्याचें तें मूल आहे (ह्मणजे बाप) त्यावर शिष्टाचाराप्रमाणें त्या (आई)चें अन्नवस्त्र देणें लाजिम होय. (अन्नवस्त्रांचे ठरावांत) कोणालाच तकलीफ दिली जाऊं नये; परंतु त्याच्या ऐपतीप्रमाणेंच मात्र. आईला तिच्या मुलाकारणें नुकसान पोहोंचविलें जाऊं नये व तसेंच ज्याचें तें मूल आहे त्याला (ह्मणजे बापाला) त्याच्या मुलाकारणें (कोणाही तऱ्हेचें नुकसान दिलें जाऊं नये.) आणि (दूध पाजणारीचें अन्नवस्त्र जसें अस्सल बापावर) तसेंच (त्याचे) वारसदारावर[१] (लाजिम होय.) मग जर (शास्त्रोक्त मुदतीचे आधींच आईबाप हे) दोन्हीं आपल्या मर्जी व सल्लामसलतीनें दूध सोडवूं इच्छितील तर त्यांजवर कांहीं पाप नाहीं. आणि जर तुम्हीं आपल्या मुलांना (कोणा दाईकडून) दूध पाजवूं इच्छाल, तर ज्या अर्थीं तुम्हीं दस्तुराप्रमाणें (त्यांना) जें देऊं केलें होतें तें (त्यांचे) हवालीं कराल त्या अर्थीं (त्यांतही) तुम्हांवर कांहीं पाप नाहीं. आणि परमेश्वराला भीत राहा व जाणून असा कीं जें कांहींही तुम्हीं करितां परमेश्वर तें पाहतो[२] आहे. २३३.

---

कीं याहून उत्तम उलगडा होणें शक्यच नाहीं. सूटपत्र देण्यासंबंधीं परमेश्वरानें आपली नापसंती दर्शविली; व लाचारीस सोडचिठी द्यावीच लागली तर तिचे नियम व कानू स्पष्ट करून सांगितले व गृहकार्याचीं प्रयोजनेंही समजाविलीं.

( १ ) येथें वारसदार, एक तर मूल जें आपल्या बापाचा वारस होय, त्याचे हिश्श्याची कांहीं मालमत्ता असेल तर त्यांतून दूध पाजणारीचें अन्नवस्त्र दिलें जावें; अगर त्या मुलाचा जो कोणी वारसदार असेल तो असा अर्थ होय; त्या मुलाची कांहीं मालमत्ता नसेल तर त्याचा वारस जो त्याचा नातलग त्यानें वारस या नात्यानें त्याचें पालन पोषण करावें.

( २ ) बायकोस सोडचिठी दिल्यावर दूध पित्या तान्ह्या मुलांची फार मुष्किली होते. सोडचिठीनें पतिपत्नींत तर झाली अदावत; व

**आणि तुमच्यांत जे लोक मरून जातील व (मागें) बायका सोडून जातील, तर (त्या विधवा स्त्रियांस पाहिजे आहे कीं) त्यांनीं चार महिने व दहा दिवस (दम धरून) आपली वाट पाहावी. मग जेव्हां त्या, आपली (इद्दतीची) मुदत पुरी करतील, तेव्हां शिष्टाचाराप्रमाणें जें कांहीं त्या आपल्यां संबंधीं करतील त्याचा तुम्हां (मैताचे वारसां) कडे कांहीं दोष नाहीं. आणि तुम्हीं लोक जें कांहींहि करितां परमेश्वराला त्याची खबर आहे. २३४. आणि जर तुम्हीं कोणा गोष्टीचे आडपडद्यांत (या) स्त्रियांशीं लग्नाचें बोलणें कराल अगर (तें) आपल्या मनांत लपवून ठेवाल तर त्यांतही तुम्हांवर कांहीं पाप नाहीं. परमेश्वराला माहीत आहे कीं तुम्हांला त्या (स्त्रियांशीं लग्न करण्या)चा विचार येईल; (तर त्याची कांहीं हरकत नाहीं). परंतु त्यांच्याशीं (लग्नाचा) ठराव तुम्हीं गपचीपहि करूं नये; पण शिष्टाचाराप्रमाणें जें बालणें तेवढेंच बोलावें. आणि जोंपर्यंत नियमित काळ (म्हणजे इद्दत) समाप्तीस न पोहोंचेल,**

---

एकमेकाचे हट्टानें मुलाचे ममतेंतही कमीपणा आला. अशा परिस्थितींत फारखत झाल्यावर पतिपत्नींनें एकमेकांस नुकसान पोहोंचवूं शकूं नये व मुलाचेंही मातेरें होऊं नये अशी व्यवस्था होणें ती परमेश्वरानें वरील वाक्यांत सांगितल्याप्रमाणें अम्मलबजावणी केल्यानेंच होऊं शकते. वरील वाक्यांतून हेंही निष्पन्न होतें कीं मुलाकारणें आईबापांस नुकसान पोहोंचणें योग्य नाहीं, तसेंच आईबापांचे परस्पर विरोधामुळें मुलासही नुकसान पोहोचतां कामा नये. नंतर मुलांना आईकडून किंवा कोणा दाईकडून दूधपाजणें हें ही आईबापांचे मर्जीवर व सल्लामसलतीवर ठेविलें आहे. दूध पाजण्याचे हक्काचें पूर्ण संरक्षण करून ठेविलें आहे कीं जितके दिवस आई दूध पाजील तिला तिचा हक्क जो दस्तुराप्रमाणें ठरला असेल तो विनतक्रार हवालीं केला जावा.

(१) म्हणजे दुसरें लग्न करण्याचे तयारींत बनाव शृंगार वगैरे शिष्टाचाराप्रमाणें त्या स्त्रीया जें कांहीं करतील, त्यांत तुम्हांवर कांहीं पाप नाहीं. शिवाय अरबांचे अज्ञान काळचे परिपाठाप्रमाणें जास्त दिवसांपावेतों स्त्रियांस सुतक पाळण्यास भाग पाडलें नाहीं म्हणून कांहीं दोषही नाहीं.

तोंपर्यंत तुम्हीं लग्नगांठ पक्की करून बसूं नका. आणि जाणून असा कीं जें कांहीं तुमच्या मनांत आहे तें परमेश्वर जाणतो; तर त्याला भीत रहा व (हेंही) जाणून असा कीं परमेश्वर क्षमाकर्ता व दयार्द्र होय. २३५. जर तुम्हीं स्त्रियांस स्पर्शहि केला नसेल अगर त्यांचें स्त्रिधनही ठरविलें नसेल, तोंच तुम्हीं त्यांना सोडचिठी देऊन टाकाल तर त्यांत तुम्हांवर कांहीं पाप नाहीं. पण असल्या स्त्रियांस तुम्हीं कांहीं निर्वाह–साधन द्या;–ऐपत दारानें आपल्या ऐपतीचें प्रमाणानें (देणें जरूर आहे) व बिनऐपतवाल्यानें स्वशक्त्यानुसार. (आणि) देणेंही (जें कांहींही असेल तें) शिष्टाचाराप्रमाणें. ज्यांचे अंगीं परोपकारशीलता बाणली आहे त्यांचेवर (अशा स्त्रियांचा हाही एक प्रकारचा) हक्क होय. २३६. आणि जर तुह्मीं स्त्रियांस स्पर्श करण्यापूर्वींच त्यांना काडी मोडून द्याल आणि त्यांचें स्त्रिधन ठरवून चुकलां असाल; तर जें कांहीं तुह्मीं ठराविलें होतें त्याचें निम्मेनिम (देणें येईल.) पण हें कीं स्त्रिया माफ करून टाकतील अगर (पुरुष) ज्याच्या हातांत लग्नगांठ (ह्मणजे त्याचें बंधन व मोचन) आहे तो (आपला हक्क) सोडून देईल (ह्मणजे पुरें स्त्रिधन देण्यास राजी होईल, तर गोष्ट वेगळी.) आणि तुह्मीं (आपला हक्क) माफ करून टाकावा, ही गोष्ट तर (परमेश्वराला) भिऊन चालण्याच्या अगदीं जवळ जवळ होय. आणि तुह्मीं आपसांतील श्रेष्ठता विसरूं नका. जें कांहींहि तुह्मीं करीत आहां, परमेश्वर तें पाहतो आहे. २३७. (मुसलमानांनों! तुह्मीं बहुधा

(१) श्रेष्ठता यांतच आहे कीं मनुष्यानें ओढाओढीचे वेळीं दबून जावें व आपला हक्क थोडाबहुत सोडून द्यावा.

(२) सूटपत्र व स्त्रिधन यांचे चार प्रकार आहेत. **प्रथम,** सर्व साधारण प्रकार असा कीं स्त्रिधन ठरून लग्न झालें, पतिपत्नि हीं एकमेका संगती राहिलीं; नंतर त्यानें तिला कोणा शास्त्रोक्त कारणामुळें सोडचिठी दिली तर तिला पुरें स्त्रिधन द्यावें लागेल. **दुसरा प्रकार,** स्त्रिधन ठरल्यावांचून लग्न झालें, पतिपत्नि हीं एकमेकासंगतीं राहिलीं व तदनंतर त्यानें काडी मोडून दिली तर 'महर-

**सर्वच) नमाजींची आणि (मुख्यत्वेंकरून) मधल्या नमाजीची कळकळ बाळगा; व (नमाजींत) परमेश्वरापुढें आज्ञांकित होऊन (अत्यादरानें) उभे राहा. २३८. मग जर तुह्मांला (शत्रूची) भीति असेल (व**

---

मिस्ल' म्हणजे त्या स्त्रीच्या ज्ञातींत जी रूढी असेल तीप्रमाणें स्त्रीधन देणें भाग होईल. **तिसरा प्रकार,** स्त्रीधन ठरून लग्न झालें पतिपत्नि यांचा समागम होण्यापूर्वींच विवाह मोचन झालें अशा स्थितींत निमें स्त्रीधन देणें येईल. **चवथा प्रकार,** स्त्रिधन ठरलें नाहीं व पतिपत्निचे समागमाचीही पाळी आली नाहीं तोंच सोडचिठी दिली तर स्त्रीधन कांहींच नाहीं. हा प्रकार सर्वांत कमजोर आहे. त्याची घटना जवळ जवळ अशी झाली आहे कीं जशी हल्लींचे लोक लग्नाची मागणी किंवा योजना करून सोडून देतात; कीं तें जरी लग्न नाहीं तरी लग्नाची प्रस्तावना खरी. परंतु येवढ्याशा गोष्टीनेंही कांहीं प्रमाणानें स्त्रीस कमीपणा येतो, तर त्याचा मोबदला कपडेलत्ते वगैरे देणें होय; स्त्रिधन नव्हे. आणि असा विचार होत होता कीं अशा सोडचिठीनें स्त्रीचा हक्क मारला जातो व पुरुष हा बे-मुरवत व त्यांचा हक्क हाणून पाडणारा ठरतो. म्हणून असें फर्माविण्यांत आलें कीं ह्या तऱ्हेचा करारनामा जोरदार नसून त्यानें पुरुषाकडे कांहीं दोष येत नाहीं व स्त्रीचीही कांहीं हानी होत नाहीं. शेवटले दोन प्रकार येथें दिले आहेत. पहिला प्रकार चवथ्या अध्यायांत येईल; व दुसरा प्रकार हदीस ह्मणजे पैगंबरांचे वचनसंग्रहामध्यें आहे. हे नियम सूटपत्रासंबंधीं होत. ज्या स्त्रीचा पति निवर्तेल तिला ह्या चारही प्रकारांत पुरें स्त्रिधन अगर महरेमिस्ल हदीसचे वचनाअन्वयें मिळेल. यावरून हेंहि माहित झालें कीं स्त्रीधन ठरविल्याखेरीजही लग्न होऊन जातें. लग्न झाल्यावर तें आपसाचे संमतीनें ठरवावें अगर 'शरीअत' म्हणजे धर्मशास्त्र 'महरेमिस्ल' ठरवील.

(१) हदीस प्रमाणें मधल्या नमाजीचा अर्थ 'असर'ची नमाज होय. ही वेळ संसार व्यवहारांत गुंतून राहण्याचा असल्यामुळें त्या नमाजीची फार ताकीद व महत्व आहे. असरच्या नमाजीला, मधली नमाज ह्या साठीं म्हटलें कीं सकाळची व दोनप्रहरची या दोन नमाजी दिवसांत तिच्यापूर्वीं आणि संध्याकाळ व रात्र यांच्या दोन नमाजी रात्रीं तिच्यानंतर आहेत; तर ही मधली नमाज झाली.

नमाजीचे मुख्य विधी पुरे पुरे आदा न करूं शकाल,) तर पायीं अगर घोड्यावर (ज्या स्थितींत असाल त्या स्थितींत व जशी होऊं शकेल तशी नमाज पढा.) मग जेव्हां तुह्मीं निर्भय होऊन जाल, तेव्हां जशी परमेश्वरानें तुह्मांस (पैगंबरामार्फत नमाजीची पद्धति) शिकविली आहे कीं तुह्मीं (ती) पूर्वी जाणत नव्हतां, त्याच पद्धतीनें तुम्हीं परमेश्वराचें स्मरण करा. २३९. आणि तुह्मां पैकीं जे लोक निवर्ततील व (मागें) स्त्रिया सोडून जातील तर आपल्या (विधवा) स्त्रियांस एक वर्ष पर्यंतचें (निर्वाह–) साधन पुरविणें (व घरांतून) बाहेर न घालविणें असा मृत्युलेख (त्यांनीं करून मरावें.) मग जर स्त्रिया (आपणच घरांतून) निघून उभ्या राहतील तर शिष्टाचारानें जें कांहीं त्या आपल्या ठायीं करतील त्याचा तुह्मांकडे कांहीं दोष नाहीं. आणि परमेश्वर परमसमर्थ व बुद्धिवान होय. २४०. आणि ज्या स्त्रियांस सोडचिठ्ठी दिली जाईल त्यांस (स्त्रिधनाखेरीज) शिष्टाचाराप्रमाणें (कपडेलत्ते वगैरे कांहीं) देणें योग्य होय; कीं (परमेश्वराला) भिऊन चालणारांवर (त्यांचा हाही एक प्रकारचा) हक आहे. २४१. अशाच तऱ्हेनें परमेश्वर तुह्मां लोकांकरतां आपले हुकूम स्पष्ट करून सांगतो कीं कदाचित् तुह्मीं (त्याच्या प्रयोजनांस) समजाल. २४२. (हे पैगंबरा!) मृत्युचे दहशतीनें जे लोक आपल्या घरादारांतून निघून

(१) अशाच प्रकरणाचें एक वाक्य पूर्वी येऊन गेलें आहे. त्यांत इद्दतचा काळ चार महिने व दहा दिवस ठरले आहेत. तें वाक्य जरी वाचण्यांत प्रथम आहे, तरी पण तें या वाक्यानंतर प्रकट झालें आहे; आणि चार महिने व दहा दिवस ही मुदत ठरल्यानें वर्षाची मुदत रदबातल झाली. असें असतांही या वाक्याचा भावार्थ हा कीं विधवा स्त्रीस एक वर्षपर्यंत मैयत पतीच्या वारसाकडून अन्नवस्त्र मिळावें व पतिचे घरांतून तिला कोणी काढूं नये. जर ती आपणच इद्दत पुरी करून निघून जाईल व दुसऱ्या विवाहाची तयारी करूं लागेल; आणि अशा परिस्थितींत मैयत पतीचे वारस तिचें अन्नवस्त्र बंद करतीलच; तर त्या लोकांवर अन्नवस्त्र बंद करण्यानें व त्या स्त्रीची दुसऱ्या लग्नाची तयारी करण्यानें कोणताही गुन्हा होत नाहीं.

उभे राहिले व तेहि हजारों होते, त्यां(च्या स्थिति)चें तूं अवलोकन केलें नाहींस काय? मग परमेश्वरानें त्यांना फर्माविलें कीं मरा; (व ते मरून गेले.) नंतर परमेश्वरानें त्यांना जिवंत केलें. निःसंशय परमेश्वर तर लोकांवर (फारच) कृपावंत होय. परंतु बहुतेक लोक (त्याची) उपकार स्तुति करीत नाहींत. २४३. आणि (मुसलमानांनों!) तुह्मीं परमेश्वराचे मार्गांत (त्याचे शत्रु जे नास्तिक त्यांशीं) लढा व जाणून असा कीं परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो व (सर्व कांहीं) जाणतो. २४४. कोणी आहे कीं जो परमेश्वराला दिलखुशीनें कर्ज देईल; कीं परमेश्वर त्याचें कर्ज त्याला अनेक पटींनीं वाढवून देईल? आणि परमेश्वर (लोकांस) तंगदस्तही करितो व विपुलही देतो व त्याच्याचकडे तुह्मां (सर्वां)स परतून जाणें आहे. २४५. (हे पैगंबरा!) मूसाचे मागून (आलेल्या) बनी-इस्राएलांचे सरदारां(च्या स्थिती)चें तूं अवलोकन केलें नाहींस काय? कीं ऐके काळीं त्यांनीं आपले (वेळचे) पैगंबर (सम्युएल) यास

---

(१) या वाक्यांत दैवगतीशीं कृतज्ञतापूर्वक संतुष्ट राहण्याचें शिक्षण आहे. असें निवेदन करण्यांत येतें कीं प्राचीन काळीं बनी इस्राएलांचे हजारों लोक सांथीचे दहशतीनें घरदार सोडून पळाले होते. ते जेथें पळून गेले होते तेथेंच सांथीनें त्यांना येऊन गांठलें व सारेचे सारेच मरून गेले. मग बराच काळ लोटल्यावर हजरत हिझकील-यहजेकील-पैगंबर हे तिकडून सहज गेले. त्यांनीं परमेश्वरास उःशापाची प्रार्थना केली व त्यांना परमेश्वरानें पुन्हां जिवंत करून उठविलें.

(२) ह्मणजे धर्मयुद्ध करण्यांत जे लोक निष्कारण सबबी पुढें आणतील, परमेश्वर त्यांचे बहाणे ऐकितो व त्यांच्या मनोगतास खूप जाणतो.

(३) परमेश्वराला कर्ज देणें ह्मणजे त्याच्या मार्गांत खर्च करणें. आणि परमेश्वराचे मार्गांत खर्च करण्याचें पुण्य परलोकीं मिळेल ह्मणून त्याला कर्ज ह्मटलें. 'हसन' याचा शब्दशः अर्थ चांगला असा आहे. आह्मीं त्याचा भावार्थ दिलखुशीनें असा घेतला आहे. व्यवहारांत 'कर्जे हसन' बिनव्याजी कर्जास ह्मणतात व तो शब्द बोलतांना 'कर्जे हसना' असें बोलतात.

दरखास्त केली होती कीं तूं आह्मांसाठीं एक बादशाह नेमून दे कीं आह्मीं (त्याचे आश्रयाखालीं) परमेश्वराचे मार्गांत युद्ध—जिहाद्—करूं. (यावर सम्युएलनें) ह्मटलें कीं जर धर्मयुद्ध तुमचें कर्तव्यकर्म ठरविलें जाईल, तर हें संभवित नव्हे काय कीं तुह्मीं लढणार देखील नाहींत? ते बोलले कीं आह्मीं आपल्या घरादारांतून व आपल्या पोराबाळांतून तर काढले जाऊन चुकलों, (तर आतां) आह्मांस कोणतें (निमित्त उरलें) आहे कीं आह्मीं परमेश्वराचे मार्गांत लढणार नाहीं? मग जेव्हां धर्मयुद्ध त्यांचें कर्तव्यकर्म ठरविलें गेलें, तेव्हां त्यांच्यांतून थोड्याखेरीज (बाकी सर्व) फिरून पडले. आणि परमेश्वर तर आज्ञाभंजकांस खूप जाणून आहे. २४६. आणि त्यांच्या पैगंबरानें त्यांस सांगितलें कीं परमेश्वरानें (तुमच्या मागणी बमुजब) तालूतला तुमचा बादशाह मुक्रर केला आहे. (यावर) ते ह्मणूं लागले कीं त्याला आह्मांवर कसा राज्याधिकार मिळूं शकतो? आणि वास्तविक पाहूं जातां, त्याच्यापेक्षां तर राज्याधिकाराचे आह्मींच विशेष हक्कदार आहोंत; कीं त्याला तर धनदौलतीपैकींही कांहीं भरभराट दिला गेला नाहीं. (पैगंबरानें) ह्मटलें कीं परमेश्वरानें तुह्मांवर (राज्याधिकार चालविण्यास) त्यालाच पसंत केलें आहे; आणि (धनदौलतींत नाहीं तर) ज्ञानांत व शरीरांत त्याला (फार) समृद्धि दिली आहे. आणि परमेश्वर आपलें राज्य, ज्याला इच्छील

---

(१) हजरत मूसाचे मागून कांहीं दिवस बनी—इस्राएलांची स्थिति चांगली होती. ते कनआन देशांत विजय मिळवीत चालले होते. परंतु ते बेचैन होते; एकाच स्थितीवर कायम राहत नव्हते. त्यांनीं अपला जुना खोडसाळपणा पुन्हां सुरू केला. परमेश्वरानें त्यांच्यावर शत्रूंस सरशी दिली व त्यांचा प्रतिस्पर्धि जालूत बादशाह यानें त्यांस फार दिक्क करून सोडिलें. त्याकाळीं हजरत सम्युएल हे पैगंबर होते, बनी इस्राएलांनीं त्यांचा आश्रय घेतला. पुढें काय झालें हें कुराणांत सांगितलेंच आहे.

(२) ज्ञानाची समृद्धि ह्मणजे त्याला लढाईचे कामाचें चांगलें ज्ञान होतें व शरिराची समृद्धि ही कीं तो शरिरानें खंबीर व बलाढ्य होता.

त्याला देईल. आणि परमेश्वर (अति) उदार व सर्व ज्ञानी होय. २४७. आणि त्यांच्या पैगंबरानें त्यांना सांगितलें कीं तालूतचे (ईश्वरनियुक्त) बादशाह होण्याची खूण ही होय कीं ज्या पेटींत तुमचे पालनकर्त्यांची (पाठविलेली) शांति (ह्मणजे तौरात) आहे व तशीच मूसा व हारून यांच्या वंशजांनीं जी (यादगिरी) मागें सोडिली आहे तींतून उरल्या सुरल्या चिजाही जींत आहेत ती पेटी[1] (बिनलढतां) तुह्मां-पाशीं येईल (व) तिला देवदूत उचलून आणतील. जर तुह्मीं विश्वासणारे आहां तर हीच एक गोष्ट तुह्मांसाठीं (नेमकी) खूण होय. २४८. मग जेव्हां तालूत फौजांसह (आपल्या मुकामाहून) रवाना झाला, तेव्हां त्यानें (आपल्या सार्थीदारांस) सांगितलें कीं (वाटेंत एक नदी पडेल) परमेश्वर (त्या) नदीद्वारें तुमची (ह्मणजे तुमच्या सहनशीलतेची) कसोटी पाहणार आहे. तर जो कोणी (तहानभर) तिचें पाणी पिईल, तो माझ्यांतला नाहीं; आणि जो तें पाणी चाखूनही पाहणार नाहीं तो माझा होय. पण जो आपल्या हातानें एखादी ओंजळ भरून घेईल (व पिईल तर त्याची हरकत नाहीं). मग त्या लोकांपैकीं कांहीं थोड्याखेरीज सर्वच तर त्या(नदीं)तून (तृप्त होऊन) प्याले. नंतर जेव्हां तालूत व त्याच्या संगतीं जे

---

(१) असें सांगण्यांत येतें कीं बनी इस्राएलांपाशीं एक पेटी अगर कोशागर होता त्यांत तौरात ह्मणजे जुन्या कराराची एक प्रत, मूसा पैगंबराची काठी, 'मन्ना'ची बरणी, हारून पैगंबराचा झगा वगैरे चिजा होत्या. ते लोक लढाईत ही पेटी आशिर्वाददायक ह्मणून पुढेंपुढें ठेवीत असत. जालूतनें बनी इस्राएलांचा पराभव केला तों त्यानें ती पेटीही छिनावून नेली. आतां जां तालूतचे आश्रयाखालीं लढाई ठरली; तेव्हां जालूतचे लोकांनीं ती पेटी छकड्यावर लादून तालूतचे कंपुकडे हांकलून लावली कीं हीच भांडणाचें मूळ कारण आहे. बनी–इस्राएल ह्या पेटीचें पोहोंचणें अलभ्य लाभ समजले व तें त्यांचे ठायीं शुभ चिन्ह झालें व त्यांची हिंमत वाढली. आणि हा परमेश्वराचा उपकार होय कीं दुतांनीं ती पेटी बनी इस्राएलांकडे उचलून आणिली.

विश्वासणारे होते ते ती नदी ओलांडून पार होऊन गेले, तेव्हां (ज्या लोकांनीं तालूतचा वचनभंग केला होता) ते ह्मणूं लागले कीं आमच्यांत तर जालूत व त्याच्या फौजांशीं सामना करण्याचा आज दमच नाहीं. (यावर) ज्या लोकांची अशी (पक्की) भावना होती कीं त्यांना परमेश्वराचे हुजूर हजर होणें आहे, ते बोलूं लागले कीं बहुतेक (असें घडून आलें आहे कीं) परमेश्वराचे हुकमानें एका छोट्याशा टोळीनें बड्या टोळीवर वर्चस्व गाजविलें आहे. आणि परमेश्वर सहनशील लोकांचा साथी होय. २४९. आणि जेव्हां ते, जालूत व त्याच्या फौजा यांच्या समोरासमोर निघाले तेव्हां ते (प्रार्थना करून) ह्मणूं लागले कीं हे आमच्या पालनकर्त्या! तूं आह्मांवर धैर्याचा वर्षाव कर व (समरांगणांत) आमचे पाय दृढ जमवून ठेव आणि नास्तिक लोकांवर आह्मांला यशस्वी कर. २५०. मग त्या लोकांनीं परमेश्वराचे हुकमानें (शत्रूंचा मोड करून) त्यांस पळविलें. आणि जालूतला दाऊदनें[१] ठार मारिलें व त्याला परमेश्वरानें राज्य व विवेचक बुद्धि हीं दिलीं; आणि त्याच्या इच्छेस आलें तें (कलाकौशल्य) त्यानें त्याला शिकविलें. आणि जर परमेश्वर कित्येक लोकांचे द्वारा कित्येकांस (राज्यासनावरून) न हटवित राहील तर पृथ्वी(ची व्यवस्था) बिघडून जाईल. परंतु परमेश्वर सकल जगांचे लोकांवर फार कृपावंत होय. २५१. (हे पैगंबरा!) हीं परमेश्वराचीं महावाक्यें होत कीं तीं आह्मीं तुला (जिब्रीलदुताद्वारें) सत्यपूर्ण वाचून वाचून ऐकवितों. आणि निःसंशय तूं (पाठविलेल्या) पैगंबरांपैकीं आहेस. २५२.

---

( १ ) तालूतचे लष्करांत हजरत दाऊद पैगंबरही होते. त्यांनीं जालूतला ठार केलें. तालूतनें आपली कन्या त्यांस दिली. ह्या परंपरेनें तालूतचेनंतर हजरत दाऊद हे बादशाह झाले. कुराणांत अन्य स्थलीं याचेंही वर्णन आहे कीं दाऊदला बकतर बनवितां येत होतें, व ते इतर प्राण्यांची वाणीही समजत होते; आणि आश्चर्य नाहीं कीं विवेचकबुद्धि व कलाकौशल्य या शब्दांची इषारत या गोष्टींकडेच असेल.

# पवित्र कुराण

## भाग तिसरा.

### सूरतुल्‌ बकर: (पुढें चालू).

हे (जे) पैगंबर (आह्मीं पाठविले) यांच्यांतून कित्येकांस कित्येकांवर आह्मीं श्रेष्ठता दिली. यांजपैकीं कोणी तर असा होय कीं ज्याशीं (खुद्द) परमेश्वरानें संभाषण केलें; व यांच्यांत कोणाकोणाचे दर्जे त्यानें (अन्य तऱ्हेनें) वाढविले. आणि मर्यमचा पुत्र ईसा यास आह्मीं खुले खुले चमत्कार दिले व पवित्र आत्मा (ह्मणजे जिब्रीलदूत) या द्वारें आह्मीं त्याला सबळ केलें. आणि जर परमेश्वर इच्छिता तर जे लोक त्यां(पैगंबरां)चे मागून झाले ते आपल्यापाशीं स्पष्ट निशाण्या आल्या त्या उपरांत, एकमेकांशीं न लढते. परंतु लोकांनीं आपसांत मतभेद केला. तर ह्यांच्यांत कोणी असे होते कीं ज्यांनीं विश्वास धरिला व कोणी असे होते कीं ज्यांनीं (विश्वासास) नाकारिलें. आणि जर परमेश्वर इच्छिता, तर (हे लोक) आपसांत न लढते; परंतु परमेश्वर जें योजितो तें करतो. २५३. अहो मुसलमानांनों! आह्मीं दिलेल्यांतून (कांहीं परमार्थांतही) खर्च करा; (परंतु) असा एक दिवस (ह्मणजे पुनरुत्थान) येईल त्यापूर्वींच; कीं त्या दिवशीं क्रयविक्रय होणार नाहीं

---

(१) भावार्थ हा कीं परमेश्वर इच्छिता तर सर्व माणसांचे स्वभाव एकाच प्रकारचे झाले असते; व त्यांच्यांत मतभेदही झाला नसता. परंतु त्यानें सत्य व असत्य अशा दोन गोष्टी निर्मिल्या; मनुष्याला सदसद्विवेकबुद्धि दिली व शिवाय अधिकार व सत्ताही दिली; कीं त्यानें हवें तर सत्य पत्करावें अगर असत्य पत्करावें. माणसाला साधिकार निर्माण करणें हें परमेश्वराचें कृत्य आहे; व सदसद्विवेक करणें व सत्याचा स्वीकार व असत्याचा त्याग करणें हें माणसाचें कर्तव्य आहे.

आणि मित्राचारी व शिफारसहि (कांहीं कामा येणार) नाहीं. आणि जे (परमार्थांत खर्च न करीतां ईश्वर देणगीस) कृतघ्न होतात, ते लोक (कांहीं आपलेंच) नुकसान करितात. २५४. परमेश्वर (असा परम पवित्र होय कीं) त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य (देव) नाहीं; जिवंत, (अवघ्या सृष्टीचा शाश्वत) सांभाळ कर्ता; त्याला ना गुंगी घेरते व ना निद्रा. जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें त्याचेंच होय. कोण असा आहे कीं जो त्याच्या परवानगी वांचून त्याच्या समीप (कोणाची) शिफारस करील? जें कांहीं लोकांचे पुढें येतें तें व जें कांहीं त्यांच्या मागून (होणार) आहे तें (सर्व) त्याला विदित आहे. आणि लोक त्याच्या ज्ञानाचे कसपटासही पोहोंचूं शकत नाहींत; पण जेवढें तो इच्छील तेवढेंच काय तें (ते जाणतात). त्याच्या (सत्तारूपी) सिंहासनानें आकाश व पृथ्वी (हीं सर्व) व्यापिलीं आहेत; व (आकाश व पृथ्वी) या दोहोंचें संरक्षण त्याला (मुळींच) जड जात नाहीं. आणि तो (अति) परात्पर व महिमावंत होय. २५५. धर्मांत जबरदस्ती (चें कांहीं

---

(१) शिफारस करण्याचा अर्थ असा होतो कीं शिफारस करणारा हा अधिकाऱ्याला रयतेचे हक्क ज्यांची त्याला स्मृति नाहीं अगर माहिती नाहीं त्यांची आठवण करून देतो. पण परमेश्वर तर भूल-चूक व अज्ञान या दोषांपासून अलिप्त आहे; आणि त्याचे दरबारांत शिफारस करण्याची जरूरच काय आहे? यावरही परमेश्वर आपल्या कडून दया जाहीर करण्यासाठीं व शिफारस करणाराकडून कनवाळा दर्शविण्यासाठीं व या प्रकारें पाप्यांचें समाधान व्हावें म्हणून दूत, प्रेषित व प्रवक्ते आणि पवित्राचरणी लोक यांस लोकांच्या शिफारशीची परवानगी देईल.

(२) भावार्थ हा कीं परमेश्वर जणो काय आपल्या राज्यासनावर विराजमान होऊन सर्व सृष्टीमात्रावर अधिकार गाजवीत आहे. आकाश, पृथ्वी वगैरे अखिल जग त्याच्याच सत्तेखालीं होय.

(३) परमेश्वर तर स्पष्ट शब्दांनीं सांगतो कीं धर्मांत जबरदस्ती नाहीं; आणि लोक व्यर्थ इस्लामधर्माला दोष लावतात कीं तरवारीनें

काम) नाहीं. बावग्या मार्गापासून सन्मार्ग (वेगळा) जाहीर होऊन चुकला आहे. तर जो खोट्या देवतांस नाकारील व परमेश्वरावरच विश्वास ठेवील, तर त्यानें अर्थात् भक्कम दोरगांठ धरून ठेविली आहे; कीं ती तुटावयाची नाहीं; (व त्याचा बेडा पार होय). आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. २५६. परमेश्वर विश्वासणारांचा पुरस्कर्ता (व मदतगार) होय कीं तो त्यांना (नास्तिकपणाचे) अंधःकारांतून काढून (विश्वासाचे) उजेडांत आणितो. आणि जे लोक (सद्धर्मास) नाकारितात त्यांचे पुरस्कर्ते सैतान होत कीं ते त्यांना (विश्वासाचे) प्रकाशांतून काढून (नास्तिकपणाचे) अंधःकारांत लोटून देतात. हेच लोक नरकवासी होत (व) ते सदासर्वदा नरकांतच राहतील. २५७. (हे पैगंबरा!) जो मनुष्य केवळ एवढ्यावरूनच कीं परमेश्वरानें त्याला राज्य देऊन ठेविलें होतें (गर्विष्ट होऊन) इब्राहीमाशीं त्याच्या पालनकर्त्याचे संबंधानें वादविवाद करूं लागला, त्या (च्या स्थिती) चें तूं अवलोकन केलें नाहींस काय? जेव्हां इब्राहीमानें (त्याला) सांगितलें कीं माझा पालनकर्ता, जो (लोकांस) जिवंवितो व मारतो तो होय; तेव्हां तो म्हणूं लागला कीं मीही जिववितों व मारतों. (यावर) इब्राहीमानें म्हटलें कीं (बरें) परमेश्वर सूर्य पूर्वेकडून उगवितो, तूं

---

त्याचा प्रसार केला गेला. जर कोणा बादशहानें धर्माची सबब पुढें करून राज्यविस्ताराचे महत्वाकांक्षेनें असें केलेंही असेल तर त्याचा धर्माकडे काय दोष? कुराणांत जिहाद ह्मणजे धर्मयुद्ध जें आहे त्याचा मूळहेतु राज्यविस्तार नव्हे तर धर्मपालनांत प्रतिबंध होऊं नये आणि ईश्वरोपासना निर्वेध करितां यावी, हा होय. परंतु या युद्धांत विजय मिळाल्यास पर्यायानें राज्य विस्तार होणें हें साहजिकच आहे.

(१) ही गोष्ट त्या नास्तिक राजानें त्याला सांगितली कीं मी ज्याला पाहिजे त्याला बेगुन्हा मारून टाकितों व पाहिजे त्या फांशीचा हुकूम झालेल्या खुन्याला सोडून जीवदान देतों; अगर इनाम व बक्षिसें देऊन निर्धनास सधन करितों.

तो पश्चिमेकडून उगीव (पाहूं!). यावर तो नास्तिक थक्क होऊन राहिला (तरीहि त्यानें विश्वास धारिला नाहीं) आणि परमेश्वर हटवादी लोकांस सुबुद्धि देत नसतो. २५८. अगर (हे पैगंबरा!) उदाहरणार्थ जो (सत्पुरुष) एका वस्तीच्या जवळून गेला कीं ती आपल्या छतांवर ढांसळून पडली होती त्या (च्या स्थिती) चें तूं अवलोकन केलेंस कां? तो (हें पाहून आश्चर्यानें) म्हणूं लागला कीं परमेश्वर ह्या (वस्ती)ला तिच्या मेल्या (म्हणजे इतकी उजाड झाल्या) नंतर कशी जिवंत (म्हणजे आबाद) करून टाकील? यावर परमेश्वरानें त्याला शंभर वर्षें मृत दशेंत ठेविलें; नंतर त्याला जिवंत करून उठविलें; आणि विचारिलें कीं तूं (या स्थितींत) किती काळ राहिलास? तो म्हणाला, एक दिवस राहिलों असेन अगर एका दिवसाहूनही कांहीं कमीच. परमेश्वरानें म्हटलें, (तसें नाहीं) किंबहुना, तूं शंभर वर्षें (या स्थितींत) राहिलास. तर आतां तूं आपल्या खाण्याच्या व आपल्या पिण्याच्या पदार्थांकडे पाहा कीं ते नासले सुद्धां नाहींत; आणि (ज्यावर तूं स्वार होतास त्या) आपल्या गाढवाकडेही पाहा. (इतका काळ तुला मृत दशेंत ठेवण्याचा व पुन्हां जिवंत करून उठविण्याचा) उद्देश हा कीं आम्हीं तुला लोकांसाठीं (आपल्या सामर्थ्याचा) एक नमुना बनवावा. आणि (गाढवाचे) हाडकांकडे पाहा कीं आम्हीं त्यांना (जोडून जाडून त्यांचा सांगाडा बनवून) कसा उभा करितों; (व) मग त्यांवर मास मढवितों! मग जेव्हां त्या (सत्पुरुषा)ला (ईश्वरसामर्थ्याचा हा चमत्कार) प्रगट झाला तेव्हां तो बोलूं लागला कीं आतां मी (विश्वासपूर्ण) जाणतों कीं परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. २५९. आणि (हे पैगंबरा! तो प्रसंगही आठवण कर, कीं) जेव्हां इब्राहीमानें (परमेश्वराला विनवून) ह्मटलें कीं हे माझ्या पालनकर्त्या! (एक नजर) मलाही तूं दाखीव कीं (पुनरुत्थानाचे दिवशीं) तूं मेलेल्यांस जिवंत तरी कसे करशील! (परमेश्वरानें) फर्माविलें, कां तुला (याचा) विश्वास नाहीं? त्यानें अर्ज केला, नाहीं कां ह्मणून (तुझ्या सांग-

---

(१) बहुतेक असें घडून येतें कीं जुन्या घरांचीं छतें अगोदर कोसळून पडतात. मग अखेर भिंती व दारें त्यावर येऊन ढांसळतात. तात्पर्य हें कीं ती वस्ति उजाड पडलेली होती.

(२) भाष्यकारांनीं कोणती वस्ति व कोण मनुष्य यांच्या निश्चित करण्यांत मतभेद केला आहे. त्यांत कांहींचें म्हणणें असें आहे कीं

ण्यानें विश्वास तर आहेच) परंतु (मी एक नजर पाहावयासही इच्छितों) अशा साठीं कीं माझ्या मनाचें (पुरेंपुरें) समाधान व्हावें. (परमेश्वरानें) फर्माविलें कीं (बरें) तर चार पक्षी घे व त्यांस आपल्या ध्यानांत बरोबर ठेव, (व त्यांचा चेंदा मेंदा कर;) तदनंतर एकेका डोंगरावर त्यांचा एकेक तुकडा ठेवून दे; व मग त्यांना बोलीव, म्हणजे ते (आपोआप) तुजकडे दौड घालीत येतील. (हा ईश्वर-सामर्थ्याचा नमुना तूं पाहा) व जाणून अस कीं परमेश्वर परम समर्थ (व) सत्यसंकल्प होय. २६०. जे लोक आपली धनदौलत परमेश्वराचे

बख्तनस्सर (Nebuchadnezzar) यानें यरूशलेमला आग लावून व शहर उजाड करून बनी इस्राएलांस कैदी करून नेलें होतें. हजरत ओझैर पैगंबर या सत्पुरुषानें यरूशलेमचे जवळून तें विध्वस्त झालें असतांना सहज गमन केलें व त्या बाह्य परिस्थितीवर नजर करून त्यांच्या मनांत निराशा उत्पन्न झाली कीं असली उजाड जागाही कधीं वसली आहे! परमेश्वरानें त्यांना आपल्या सामर्थ्याचा चमत्कार दाखविला कीं ते शंभर वर्षे मृत दशेंत पडून राहिले; नंतर जेव्हां त्यांना पुन: जिवंत करून उठविलें तेव्हां यरूशलेम पुववत् आबाद होऊन गेलें होतें. परमेश्वरानें त्यांच्या गाढवास त्यांच्या डोळ्यां देखतां जिवंत केलें; व त्यांच्या खाण्यापिण्याचे पदार्थांचें येथ पावेतों संरक्षण केलें कीं ते नासले देखिल नाहींत. हजरत ओझैर यांस केवळ याचेंच आश्चर्य होतें कीं परमेश्वर आपल्या नैसर्गिक नियमांचे विरुद्ध आपली सत्ता कशी चालवितो? ज्या नास्तिक राजानें हजरत इब्राहीम पैगंबराशीं वादविवाद केला होता त्याला मुळांत ईश्वरसामर्थ्य मान्यच नव्हतें. परंतु हजरत ओझैर यांस तें अमान्य नव्हतें, तर किंबहुना त्याचें आश्चर्य वाटत होतें. अमान्यता व आश्चर्य यांत जरी फरक आहे तरी दोन्हींही जवळ जवळ आहेत. म्हणून परमेश्वरानें या दोन्हीं गोष्टी एकामागून एक अशा निवेदिल्या. हें जें हजरत ओझैर यांनीं शंभर वर्षे मृतदशेंत राहिल्यावरही त्या कालास एक दिवस अगर एका दिवसाहूनही कमीच असें सांगितलें त्याचें कारण असें कीं ते खरोखरींच मरून गेले होते. त्यांना उशिराचा भासच झाला नव्हता. हीच स्थिति पुनरुत्थानांत होईल कीं नास्तिक व अविश्वासू हे इहलोक व बरझख (म्हणजे मृत्यु व पुनरुत्थान यांचे मधील स्थल) यांत राहण्याचा काळ असाच थोडा दर्शवितील. पण गफलतींत पडलेला मनुष्य ह्या लोकीं जागृत होत नाहीं.

(१) परमेश्वरानें इब्राहीम पैगंबराला आपल्या सामर्थ्याचा नमुना

मार्गांत खर्च करितात त्यां(च्या दानधर्मा)ची उपमा एखाद्या धान्याच्या दाण्याप्रमाणें होय कीं त्याला सात कणसें येतात, व प्रत्येक कणसांत शंभर (शंभर) दाणे असतात. आणि परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला दुप्पटीनें देतो. आणि परमेश्वर (अति) उदार व सर्वज्ञानी होय. २६१. जे लोक आपली धनदौलत परमेश्वराचे मार्गांत खर्च करितात, व मग खर्च केल्यावर परिणामीं (कोणा तऱ्हेचा) उपकार दर्शवित नाहींत व (दान स्वीकारणारांला कोणा तऱ्हेची) इजा देत नाहींत, त्यांना त्यां(च्या दिल्या)चा मोबदला त्यांच्या पालनकर्त्या समीप (प्राप्त) होईल; आणि (परत्रीं) त्यांना कसलेंच भय राहणार नाहीं व ते (कोणा तऱ्हेनें) दुःखीहि होणार नाहींत. २६२. नरमाईनें बोलणें व (याचकाचे जिकिरीची) उपेक्षा करणें हें अशा खैरातीपेक्षां फार उत्तम होय कीं जिच्या(दिल्या)वर परिणामीं (याचकास कोणा तऱ्हेची) इजा होईल. आणि परमेश्वर निरपेक्ष¹ (व) दयार्द्र

---

तर दाखविला; पण जीवनाचें गूढ सांगितलें नाहीं. तें हजरत मोहंमद पैगंबराला उद्देशून कुराणांत दुसरीकडे सांगितलें आहे कीं 'आत्मा हा एक माझ्या पालनकर्त्याचा हुकूम होय.' आणि हुकूमकर्ता जसा परम समर्थ व सत्यसंकल्प तसा त्याचा हुकूमही जबरदस्त होय. इच्छाशक्तिजन्य हुकमाची ज्याला प्रचिति पाहावयाची असेल त्यानें लहान प्रमाणावर मेस्मेरिझ्म मध्यें व मोठ्या प्रमाणावर सुफिज्म् अगर योगशास्त्रामध्यें स्वतः प्रयोग करून पाहावेत. दुर्बल व सृष्ट मनुष्याचें अंगी इतका चमत्कार असतो तेव्हां सर्व शक्तिमान सृष्टीकर्त्याचे अंगीं हे चमत्कार साहजिकच होत. या प्रमाणें जगांतील प्रत्येक शास्त्र व वस्तू यांद्वारें जगदुत्पादक परमेश्वराचें ज्ञान प्राप्त होतें. या प्रमाणें कुराणाचें मननपूर्वक परिशीलन केल्यानें कुराण हेंच एक ईश्वर प्रणीत विश्वग्रंथ आहे असें अनुभवास येईल.

(१) निरपेक्ष म्हणजे त्याला असल्या दानधर्माची पर्वा नाहीं कीं जो, उपकार दर्शवून दिला जाईल. आणि दयार्द्र आहे म्हणजे लोक दान अर्पणकरून उपकार दर्शवितात व याचकांस दुखवितात; तरीही परमेश्वर त्यांच्या या वर्तनाकडे फारसें लक्ष न देतां सहसा रागावत नाहीं.

होय. २६३. अहो मुसलमानांनों! तुह्मीं आपल्या दानधर्माला, उपकार दर्शवून व (याचकास) इजा देऊन, जो मनुष्य आपलें धन लोकांच्या दाखविण्यासाठीं खर्च करितो व परमेश्वर व शेवटला दिवस यांजवर विश्वास ठेवीत नाहीं अशा त्या मनुष्याप्रमाणें अक्रांत करूं नका. तर त्या(च्या दानधर्मा)ची उपमा एखाद्या दगडाचे शिले सारखी होय कीं तिच्यावरती (कांहीं थोडीशी) माती (पडली) आहे; मग तिला झोडीचा पाऊस लागला व तिला सपाट खणखणीत करून (वाहून) गेला. (अशाच रीतीनें डौल दाखविणारांस पुनरुत्थानीं त्यांच्या दानधर्मोद्वारें) त्यांनीं जें (पुण्य) संपादिलें होतें त्या पैकीं त्यांच्या कांहींच हातीं लागणार नाहीं. आणि जे लोक कृतघ्न आहेत त्यांस परमेश्वर सन्मार्गाची बुद्धि देत नसतो. २६४. आणि जे लोक परमेश्वराची मर्जी संपादण्यासाठीं व आपली दानत शाबीत ठेवून आपलें धन खर्च करितात, त्यांची उपमा एखाद्या उंचवट्यावर (असलेल्या) बागे सारखी होय; कीं तिला झोडीचा पाऊस लागला तों तिनें आपलीं फळें दुप्पट दिलीं. आणि जरी तिला झोडीचा पाऊसही न लागला, तरी (तिला) हलकें तुषारहि (पुरेसें आहे). आणि तुह्मी लोक जें कांहीं करितां तें परमेश्वर पाहतो आहे. २६५. बरें तुम्हांपैकीं कोणीही ह्या गोष्टीस पसंत करील कीं खजुरींची व द्राक्षांची त्याची एक बाग असावी (व) तिच्या खालून (पाण्याचे) पाट वहात असावेत व हरतऱ्हेची फळफळादि त्याला तेथें (प्राप्त) असावी; आणि वृद्धापकाळानें त्याला येऊन गांठलें व त्याचीं (लहान लहान) दुर्बल मुलें आहेत. आतां त्या (बागे) वर एक वावटळ आलें कीं त्यांत अग्नि होता, तर ती (बाग)पार जळून भाजून गेली. अशाच तऱ्हेनें परमेश्वर (आपले) हुकूम तुम्हां लोकांस स्पष्ट करून सांगतो कीं कदाचित तुम्हीं मनन कराल. २६६. अहो

---

(१) झाडें खोलवट्यांत असतील व मुळांशीं पाणी तुंबेल तर मुळें गळून जातील व झाडें पणपणार नाहींत व त्यांस फूलफळहि येणार नाहीं; म्हणून उंचवट्यावर असलेली बाग असें म्हटलें आहे.

मुसलमानांनों! (व्यापारधंद्यांत) तुम्ही जें स्वतः मिळविलें आहे व आम्हीं तुम्हांसाठीं जमिनींतून जें निपजविलें आहे त्या पाक (आणि चोख) पदार्थांतून (परमेश्वराचे मार्गांत) खर्च करा. आणि वाईट पदार्थां (च्या देण्या)चा संकल्पही करूं नका कीं तुम्हीं त्यांतून खर्च करूं लागावेंत. आणि वास्तविक पाहतां, (तीच वस्तु कोणी तुम्हांस देऊं करील तर) तुम्हीं ती (राजी खुषीनें कधींही) स्वीकारणार नाहीं परंतु हें कीं ति–(च्या स्वीकारां) त तुम्हीं (बुध्या) काणाडोळा कराल, (तर ती गोष्ट वेगळी.) आणि जाणून असा कीं परमेश्वर निरपेक्ष (व) सुस्तुत्य होय. २६७. सैतान तुम्हांस दारिद्र्याचें भय घालतो व तुम्हांला शरमेची गोष्ट (म्हणजे कृपणपणा) करावयास सांगतो. आणि परमेश्वर आपल्या कडून (पापांची) क्षमा व समृद्धि यांचें तुम्हांला अभिवचन देतो. आणि परमेश्वर (अति) उदार (व सर्वांचे स्थितीशीं) वाकब होय. २६८. तो ज्याला इच्छितो त्याला (गोष्टींची) समज देतो; आणि ज्याला (गोष्टींची) समज दिली गेली, तर अर्थात् त्याला मोठी दौलत दिली गेली. आणि उपदेशही (म्हटला म्हणजे) कायतो समजदारच मानतात. २६९. आणि जो खर्चही तुम्हीं (परमेश्वराचे मार्गांत) उचलाल अगर (त्याच्या नांवाचा) एखादा नवस मानाल, तो सर्व परमेश्वराला माहीत आहे. आणि जे लोक (परमेश्वराखेरीज अन्य कोणाचे नांवाचा नवस मानून परमेश्वराचा) अन्याय करितात, (पुनरुत्थानाचे दिवशीं) कोणी त्यांचा मदतगार होणार नाहीं. २७०. (लोकांनों!) जर तुम्हीं दानधर्म जाहिरपणें कराल तर तोही चांगलाच; (कीं यानें दानधर्माव्यतिरिक्त दुसऱ्यांनाही उत्तेजन मिळतें). आणि जर तुम्हीं तो गुप्तपणें कराल व गरजूंस द्याल, तर हें तुमचे ठायीं विशेष

---

(१) कित्येक लोक वाईट व निकाम्या वस्तु दानधर्मांत देतात व पुण्यफलाचीही आशा बाळगून असतात. या वाक्यांत परमेश्वरानें बजावून सांगितलें कीं रद्दी माल परमार्थांत खर्च करावा व पुण्याची आशा धरावी हें वेडगळपणाचें काम होय.

श्रेयस्कर होय; (कीं यांत नांवालौकिकाचा लवलेशहि नसतो). आणि असलें देणें, तुह्मांपासून तुमचे पापांचें प्रायश्चित करील. आणि जें कांहींही तुह्मीं करितां परमेश्वर त्याशीं माहीतगार होय. २७१. (हे पैगंबरा!) या लोकांस सरळ मार्गावर आणणें हा तुझा जिम्मा नव्हे; किंबहुना परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला सरळ मार्गावर आणितो. आणि तुह्मीं लोक (आपल्या) मालांतून जें कांहींही (दानधर्मापरी) खर्च कराल, तर तें आपल्याच साठीं; आणि तुह्मीं तर परमेश्वराचीच मर्जी संपादण्यासाठीं खर्च करीत आहां ना? आणि तुह्मीं (आपल्या) मालांतून जें कांहींही (धर्मापरी) खर्च कराल, तें (पुनरुत्थानाचे दिवशीं) तुह्मांस पुरें पुरें भरून दिलें जाईल; व तुमचें (रतिभाररही) नुकसान केलें जाणार नाहीं. २७२. (खैरात तर) अशा मोताद् गोरगरिबांचा हक्क होय कीं जे परमेश्वराचे मार्गांत कोंडून पडले आहेत, देशांत कोणीकडे ते (जाऊं पाहतील तर) जाऊंही शकत नाहींत. (जो मनुष्य त्यांच्या स्थितीशीं) अजाण (आहे तो) त्यांच्या संतोषवृत्तीमुळें त्यांना श्रीमंत समजतो. (परंतु हे वाचक–श्रोत्या!) तूं (त्यांना पाहशील तर) त्यांचे मुद्रेवरूनच त्यांना साफ ओळखून जाशील (कीं ते मोताद् होत पण) ते गळीं पडून लोकापाशीं मागीत नाहींत. आणि जें कांहींही तुह्मीं लोक (आपल्या) मालांतून (दानापरी) खर्च कराल तर (खूप खात्री ठेवा कीं) परमेश्वर तें जाणून आहे. २७३.

---

(१) परमेश्वराची मर्जीच संपादण्याची तर अन्य कोणाचे नांवाचे नवस मानून त्या दानधर्मास व्यर्थ कां घालवितां? आणि हाही अर्थ होऊं शकतो कीं जर परमेश्वरार्थी द्यावयाचें तर रद्दी वस्तु कां द्यावी.?

(२) हिजरत म्हणजे स्वदेशत्यागाचे आरंभीं जेव्हां पैगंबरसाहेबांचें मक्केहून मदिनेंत आगमन झालें तेव्हां कांहीं मुसलमान धर्मशिक्षण घेण्यासाठीं व कांहीं, नास्तिकांचे भीतिनेंही पैगंबर साहेबांचे सेवेंत गोळा झाले होते. हे लोक केवळ निराश्रित व निराधार असून पैगंबरांचे मशीदींत राहात व मदिनेच्या 'अनसार' ह्मणजे साह्यकारी लोकांचे दानधर्मावर आपली उपजीविका

जे लोक अहर्निशीं गुप्तपणें व जाहरिपणें आपली धनदौलत (परमेश्वराचे मार्गांत) खर्च करितात, त्यां (च्या दिल्या)चा मोबदला त्यांच्या पालनकर्त्यापाशीं त्यांना (प्राप्त) होईल; आणि (पुनरुत्थानांत तर) त्यांना कोणा प्रकारचें भय राहणार नाहीं व ते दुःखीहि होणार नाहींत. २७४. जे लोक व्याज खातात, ते (पुनरुत्थानाचे दिवशीं) उभे राहूं शकणार नाहींत, पण ज्या मनुष्याला सैतानानें (आपल्या) झपेटींत आणून बुद्धिभ्रष्ट करून सोडिलें असेल तो जसा उभा राहातो तसेच मात्र (तेही उभे राहतील.) ही त्यांच्या (ह्या) अशा म्हणण्याची शिक्षा होय कीं व्यापार व्यवहार (म्हटला म्हणजे) व्याज व्यवहारासारखाच होय; व वास्तविक पाहूं गेलें असतां, व्यापाराला तर परमेश्वरानें हलाल केलें आहे व व्याजाला हराम; (तर व्याजाचे व्यापारावर अनुमान करणें हें स्पष्ट चुकीचें होय.) तर ज्या कोणापाशीं त्याच्या पालनकर्त्याकडून बोधवचन आलें व त्यानें (इतउत्तर आपल्याला) आवरून घेतलें, तर जें पूर्वीं (घेऊन चुकलेलें) असेल तें त्याला (लखलाभ) होय. आणि त्याचें प्रकरण परमेश्वराचे हवालीं होय. आणि जो (मनाई झाल्यावर) पुन्हां (व्याज) घेईल, तर असलेच लोक नरकवासी होत; व ते सदासर्वदा नरकांतच राहतील. २७५. परमेश्वर व्याजांतून बरकत घटवितो व दानधर्मांची वृद्धि करितो. आणि जेवढे म्हणून कृतघ्न आहेत (व) कह्या मानीत नाहींत, परमेश्वर त्यांस प्रीय ठेवित नाहीं. २७६. ज्या लोकांनीं

---

चालवीत. परंतु ते होते बाणेदार, गरीबी त्यांच्या मुद्रेवरूनच दिसून येत होती, पण ते तोंड पसरून मागत नव्हते. हेच लोक असहाबे सुफ्फाही ह्मणवितात. सुफ्फा ह्मणजे चबुतरा; पैगंबरांचें मशीदींत एकिकडे कच्चा चबुत्रासा बनवून त्यावर खजुरीच्या झावळ्यांची छाया केली होती; त्यावरच हे लोक निजत बसत असत.

(१) म्हणजे तुम्हीं त्याचेपासून व्याज परत देवविण्याचे मागें पडूं नका व त्याचेवर ताशेराही झाडूं नका. त्याचे संबंधानें परमेश्वराला जें करणें असेल तें तो करील.

विश्वास धरिला व चांगलीं कामेंही केलीं व नमाज पढत व जकात देत राहिले, त्यां (च्या केल्या) चा मोबदला त्यांच्या पालनकर्त्यापाशीं त्यांना (प्राप्त) होईल; व (पुनरुत्थानांत) त्यांना कोणा तऱ्हेचें भय राहणार नाहीं व ते दुःखीहि होणार नाहींत. २७७. अहो मुसलमानांनों! जर तुह्मीं विश्वास ठेवितां, तर परमेश्वराला भ्या आणि जें व्याज (लोकांकडे) बाकी असेल तें सोडून द्या. २७८. मग जर तुह्मीं (असें) न कराल, तर परमेश्वर व त्याचा पैगंबर यांशीं लढण्यास तत्पर होऊन राहा. आणि जर तुह्मीं पश्चाताप कराल तर आपली मूळ रकम तुम्हांला (घेण्याचा हक्क पोंहोंचतो). तुह्मीं (कोणाचें) नुकसान करूं नये व कोणी तुमचेंहि नुकसान करूं नये. २७९. आणि जर (कोणी) तंगदस्त [1](तुमचा ऋणी) असेल तर सुबत्तेचे काळापावेतों (त्याला) अवसर (द्या). आणि जर तुम्हीं समजाल तर तुमच्याठायीं हें विशेष श्रेयस्कर होय कीं तुम्हीं (मूळ कर्जही त्यास) धर्मार्थ सोडून द्यावें. २८०. आणि अशा एका दिवसाचें भय ठेवा कीं जेव्हां तुह्मीं परमेश्वराकडे परतून नेले जाल; नंतर प्रत्येक जणास त्याच्या केल्याचा पुरापुरा मोबदला दिला जाईल; व लोकांवर (रतीमात्रही) जुलूम होणार नाहीं. २८१. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुह्मीं एका नियमित काळापर्यंत उधाराचें देणेंघेणें कराल, तेव्हां तें लिहून घेत जा. आणि (जर तुम्हांस लिहितां येत नसेल तर) तुमच्या दरम्यान (तुमचा परस्पर करारनामा) कोणी लिहिणारानें न्याय पुरस्सर लिहून द्यावा. आणि (ज्याच्यापाशीं लिहिवाल तर त्या) लिहिणारास पाहिजे कीं त्यानें लिहिण्यास नाकारूं नये. जसें परमेश्वरानें त्याला (लिहिणें वाचणें) शिकविलें आहे तसें त्यालाही पाहिजे कीं त्यानें (बिनतक्रार) लिहून द्यावें. आणि ज्याच्याकडे

---

(१) धनको जर फेड केलेली कर्जाची मूळ रकम व्याजांत वजा करील तर हा त्याचा जुलूम होय. तसेंच रिणकोनें व्याजाचे मनाई हुकमाचे पूर्वीं, कांहीं व्याज दिलें असेल व तो आतां तें मूळ रकमेंत मोजूं लागेल तर हा त्याचाहि जुलूम होय.

कर्ज निघत असेल त्यानेंच (दस्ताचा) मजकूर सांगत जावा व परमेश्वर जो त्याचा (खरा) पालनकर्ता होय त्याचें त्यानें भय बाळगावें; आणि (मजकूर सांगतांना धनकोचे) हक्कांतून कोणाहि तऱ्हेची काटछाट करूं नये. पण ज्याच्याकडे कर्ज यावयाचें असेल तो जर कमअक्कल वा नादान असेल अगर तो खुद्द मजकूर न सांगूं शकेल, तर (जो) त्याचा कारभारी (असेल त्यानें) न्यायपुरस्सर (दस्ताचा) मजकूर सांगत जावा. आणि तुह्मीं आपल्या पुरुषांपैकीं दोन साक्षीदार करून ठेवीत जा; मग जर ते दोन्हीं पुरुष नसतील, तर जे साक्षीदार तुह्मीं पसंत कराल त्यांजपैकीं एक पुरुष व दोन स्त्रिया; अशा साठीं कीं त्यांच्यांतून एखादीला विसर पडेल तर त्यांपैकीं एक दुसरीला आठवून देईल. आणि जेव्हां साक्षीदार (साक्षीस्तव) बोलाविले जातील तेव्हां त्यांनीं (हजर होण्यास) नाकारूं नये. आणि मुदतीचा व्यवहार लहान असो वा मोठा, त्या(च्या दस्तावेजा)चे लिहिण्यांत आळस करूं नका. परमेश्वरासमीप हें फारच न्याय्य होय, व साक्षीसही हीच पद्धति फार ठीक होय; व हें जवळजवळ (अनुमानगम्य) आहे कीं तुह्मीं (पुढें कोणा प्रकारची) शंका धरणार नाहींत. परंतु रोखठोक सौदा असेल कीं त्याची तुह्मीं (हातोहात) आपसांत देवघेव चालवीत राहतां तर त्या(च्या दस्तावेजा)चे न लिहिण्यांत तुह्मांकडे कांहीं पाप नाहीं. आणि जेव्हां तुह्मीं (अशा तऱ्हेचा) क्रयविक्रय कराल तेव्हां (हुशारी दाखल) साक्षी करून ठेवीत जा; आणि (दस्तावेज) लिहिणारास व साक्षीदारास (कोणा तऱ्हेचें) नुकसान पोहोंचतां कामा नये. आणि जर तुह्मीं असें कराल तर हा तुमचा खोडसाळपणा होय. आणि परमेश्वराला भ्या व परमेश्वर तुह्मांस (व्यवहार ज्ञान) शिकवितो. आणि परमेश्वर सर्वज्ञानी होय. २८२.

---

(१) यांत या गोष्टीकडे इषारा आहे कीं मनुष्याचें काम मनुष्याचे हातून निघालें तरीही त्यानें परमेश्वराचा हा उपकार मानिला पाहिजे कीं त्यानें आपल्या कोणा सेवकाचें काम करण्याची त्याला सुबुद्धि दिली.

(२) यावरून असें विदित होतें कीं पुरुषाचे मुकाबल्यांत स्त्रिया जेथें शारिरीक शक्तींत बहुत करून कमी आहेत, तेथें त्यांची स्मरणशक्तिही पुरुषांसारखी नसते. ह्मणूनच एका पुरुषाचे जागीं दोन स्त्रियांची साक्ष ठेवावयास सांगितली आहे.

आणि जर तुह्मीं प्रवासांत असाल व तुह्मांला कोणी लिहिणारा न मिळेल, (व कर्ज घ्यावयाचेंच असेल) तर तारणगहाण (ठेवून घ्या.) मग जर तुमच्यांतून एक दुसऱ्याचा विश्वास करील, तर ज्याचा विश्वास केला गेला आहे (म्हणजे रिणको), त्याला पाहिजे आहे कीं त्यानें धनकोची अमानत[1] (म्हणजे कर्ज पुरें पुरें) आदा करावें; आणि परमेश्वर जो त्याचा (खरा) पालनकर्ता त्यास भ्यावें. आणि तुह्मीं साक्ष लपवूं नका; व जो कोणी ती लपवील, तर खरोखर तो मनाचा खोटा होय. आणि जें कांहींही तुह्मीं लोक करितां तें (सर्व) परमेश्वराला माहीत[2] आहे. २८३. जें कांहीं आकाशांत व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वराचेंच होय. आणि (लोकांनों!) जें कांहीं तुमचे मनांत आहे, तें जरी तुह्मीं जाहीर कराल अगर तें लपवाल तरी परमेश्वर तुह्मांपासून त्याचा हिशेब घेईल. मग (खोट्यावासनेबद्दल) ज्याला तो इच्छील त्याला क्षमा करील व ज्याला इच्छील त्याला शिक्षा देईल. आणि परमेश्वर सर्वशक्तिमान् होय. २८४. (आमचा हा) पैगंबर (मोहंमद), जें (पुस्तक) त्याच्या पालनकर्त्याकडून त्याला प्रकट झालें आहे, त्याला मानितो व (तसेंच पैगंबराबरोबर इतर) मुसलमानही; (ह्या सारेचे) साऱ्यांनीं परमेश्वर व त्याचे दूत व त्याचीं पुस्तकें व त्याचे प्रेषित (पैगंबर) यांचा विश्वास धरिला आहे कीं (सर्व पैगंबरांचा धर्म एक होय; व ते ह्मणतात कीं) आह्मीं परमेश्वराचे पैगंबरांपैकीं कोणा-

---

(१) येथें परमेश्वरानें असल्या कर्जास धनकोची अमानत ह्मटली आहे; कारण कीं त्यानें रिणकोचे विश्वासावर कर्ज दिलें; तर जणुंकाय त्याच्यापाशीं आमानत किंवा ठेव ठेविली.

(२) या सदरावरून हें सिद्ध होतें कीं परमेश्वराला आमच्या आपसांतील भांडणांची व्यवस्था कोठपर्यंत मंजूर आहे. जर करतां सेवक परमेश्वराची मर्जी जाणतील व त्याच्या हुकमाप्रमाणें चालतील कीं परमेश्वराची सुप्रसन्नता व आमचा फायदाही यांतच आहे; तर किती उत्तम होईल !

**मध्येंही भेद ठेवीत नाहीं, (ह्मणजे सर्वांस मानितों). आणि ते बोलूं लागले कीं (हे आमचे पालनकर्त्या!) आह्मीं (तुझें वचन) ऐकिलें व मान्य केलें; हे आमचे पालनकर्त्या! (फक्त) तुझीच क्षमा (पाहिजे आहे) व तुजकडेच परतून जाणें आहे. २८५. परमेश्वर कोणाही मनुष्यावर, (जितका बोजा उचलण्याची) त्याची ताकद असेल तितकाच मात्र बोजा टाकतो. त्यानें जीं (चांगलीं कामें) केलीं तीं त्याचीं त्यालाच; व त्यानें जीं (वाईट कामें) केलीं तींही त्याचीं त्याच्याच पुढें (येतील). हे आमच्या पालनकर्त्या! जर आम्हीं भुलून जाऊं अगर चुकून जाऊं, तर (त्याबद्दल) तूं आह्मांला धरूं नकोस. आणि हे आमच्या पालनकर्त्या! आमच्या पूर्वीं जे**

---

(१) आमच्या पूर्वीं ज्या ज्या लोकांस परमेश्वरानें दिव्य पुस्तकें दिलीं व ज्यांच्यानें त्याप्रमाणें आचरण झालें नाहीं त्यांत हल्लीं अस्तित्वांत असलेल्या दोन धर्मांचा समावेश होतो. तर सदरहू दोहोंपैकीं प्रथम हजरत **मूसा** अगर **मोश्या** पैगंबर यांस तौरात म्हणजे नियम शास्त्र प्रकट झालें. नंतर हजरत **ईसा** किंवा **येशू** पैगंबर यांस इंजील म्हणजे शुभवर्तमान प्रकट झालें. पण हें शुभवर्तमान ज्याला नवा करार ह्मणतात तो नव्हे. कारण हजरत **ईसा**–पैगंबर तें शुभ वर्तमान तोंडींच सांगून गेले होते. व तें पुस्तकरूपानें कोठेंच एके जागीं लोकांनीं ग्रथित केलेलें नव्हतें. पुढें सुमारें ५० वर्षांनंतर सेंटपॉल यानें आपल्या मताप्रमाणें मार्काकडून मार्ककृत शुभवर्तमान हें पहिलें पुस्तक लिहिवविलें. अशीं शुभवर्तमानें जवळ जवळ १५० होतीं. यास प्रमाण लूक अध्याय १: १ पहा. हीं सर्व पुस्तकें हजरत **येशूचीं** चरित्रें आहेत त्यांस समुच्चयेंकरून दिव्य प्रकटीकरण किंवा ईश्वरी आदेश ह्मणणें चुकीचें आहे. सरतेशेवटीं आमचें कुराण, प्रार्थनेचे मान्यतेदाखल हजरत **मोहंमद** पैगंबर साहेब यांस प्रकट झालें व पुनरुत्थानापर्यंत प्रेषितत्वाचा म्हणजे पैगंबरी पदाचा अंत येऊन गेला. कारण हें पुस्तक लक्षावधि लोकांस तोंडपाठ असून त्यांत हजरत **मोश्याच्या** व हजरत **येशूच्या** पुस्तकांप्रमाणें ढवळाढवळ होणें शक्य नाहीं; व ह्याचीं तत्वें व्यवहार्य व त्रिकालाबाधित अशीं आहेत. ह्मणून दुसरा पैगंबर व दुसरें पुस्तक येण्याची अवश्यकता उरली नाहीं. यांजपैकीं यहुदी हे हजरत **येशूला** मानीत नाहींत व हजरत **मोहंमद** जे हजरत **येशूचे** कैवारी (पाहा योहान्न, अध्याय १६: ८–१५) त्यांना ख्रिस्ती लोक मानीत नाहींत; पण आम्हीं मुसलमान लोक **मूसा** व **ख्रिस्त येशू** या उभयतांसही मानतों कीं **मूसा** व त्यांचें पुस्तक तौरात व **येशू** व त्यांचे पुस्तक **इंजील** हीं सत्य होत. तरीही ह्या ढवळाढवळ झालेल्या

**लोक होऊन गेले आहेत त्यांच्यावर जसें त्वां (त्यांच्या पापांचे शासनार्थ सक्त नियमांचें) ओझें लादलें होतेंस, तसें ओझें आह्मांवर लादूं नकोस. आणि हे आमच्या पालनकर्त्या ! ज्या (च्या उचलण्या)ची आह्मांला ताकद नाहीं असें ओझें आह्मांपाशीं उचलवूं नकोस. आणि तूं आमचीं पापें पुसून टाक व आम(च्या अपराधा)ची क्षमा कर व आमच्यावर दयादृष्टी असूं दे. तूंच आमचा (पुरस्कर्ता व) मदतगार आहेस. तर जे लोक नास्तिक आहेत त्यांच्या विरुद्ध तूं आम्हांस साह्य कर. २८६.**

---

नव्या व जुन्या करारांत एकंदरीनें पाहतां नैतिकशिक्षण व नियमशास्त्राचीं कित्येक वचनें आहेत; पण त्याप्रमाणें चालण्याचें ओझें त्यांच्यानें उचलवलें नाहीं व येशू पैगंबरांनीं याविषयीं आपल्या अनुयायींयांस सांगूनही ठेविलें होतें (पहा योहान्न, अध्याय १६ : १२). ह्मणून त्यांच्या शास्त्राचरणासंबंधीं एवढीच म्हण बरस आहे, कीं 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' राहिलीं. "उद्यासाठीं सांठवा सांठव करून ठेवूं नको; जर तुझ्या उजव्या गालावर कोणी थपडाक मारील तर डावा गालही पुढें कर कीं घे आणखीही मार ; आणि जशी तूं आपल्या एकुलत्या पुत्रासाठीं प्रार्थना करितोस तशीच आपल्या जिवाचे शत्रूचे कल्याणासाठीं सात्विक मनानें प्रार्थना कर." वगैरे नियमांचें ओझें या लोकांच्यानें उचललें गेलें नाहीं. याच प्रकारचे आणखीही नियम पुस्तकांत लिहावयास्तवच मात्र आहेत. परंतु कोणीही मनुष्य त्या नियमाबरहुकूम मागें कधीं चालला नाहीं व पुढेंही चालणार नाहीं; व असल्या नियमांनीं जगप्रपंच चालणेंही शक्य नाहीं. मोश्यांचे शास्त्रांत शुद्धीकरण व खाण्यापिण्याचे विधिनिषेधासंबंधीं इतके सक्त नियम आहेत कीं अखेर ख्रिस्त्यांच्यानें ते पाळवले नाहींत. यहुद्यांत कुरबानी ह्मणजे यज्ञाचे संस्कार इतके कठीण आहेत कीं वर्षभर शिकूनही त्यांतील कोणी एखादी अट कोणाच्यानें फार मुष्किलीनें पुरी होऊं शकते. स्वतः ख्रिस्त येशू हे नियमशास्त्र पाळीत होते पण हल्लींचे ख्रिस्ती यांस नियम शास्त्राचें ओझें उचलवत नाहीं. या शिवाय जेथें हजारों अडचणी आहेत तेथें हजरत येशूच्यामागून तीन चारशें वर्षानंतर अस्तित्वांत आलेला सेंट अथानेशसप्रणीत ईश्वरत्रयीचा मतवाद हाहि एक होय. आयुष्यभर त्याचे मागें माथेकूट करूनहि स्वतः पाद्री लोकांनाहि तो समजला नाहीं. आह्मां मुसलमानांवर परमेश्वराची कृपा नांदत आहे कीं आमचा धर्म, आचार व विचार या संबंधींच्या सर्व अडचणी पासून पाक आहे. ज्या मनुष्याला ह्या तिन्ही धर्मांच्या पुस्तकांची सविस्तर माहिती असेल त्यालाच मात्र या गोष्टीची साक्ष पटूं शकते.

# अध्याय ३ रा.

## सूरतु-आले-इमरान.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. ह्यांत २०० आयात -महावाक्यें-आहेत. ह्यांत प्रथम कांहीं ऐशींच्यावर वाक्यांत आले-इमरान ह्मणजे इमरानचें कुटुंब ह्मणजे हजरत ईसा-येशू ख्रिस्त, त्यांच्या मातोश्री कुमारीशिरोमणी हजरत मरयम, हजरत याह्या ह्मणजे योहान्न बापुतिस्माकार जे येशू ख्रिस्ताचे गुरु व मावस भाऊ होते ते, आणि या योहान्नाच्या मातोश्री ह्मणजे हजरत मरयमच्या बहीण यांचें वर्णन आलें आहे ह्मणून हें नांव. इमरान हें त्यांच्या कुलपतिचें नांव आहे. या शिवाय हजरत मूसा-मोश्याचें बापाचें नांव-हि इमरान होतें व तोहीं या लावी घराण्याचा कुलपतिच होय.

**परम दयाळू आणि कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**अ. ल. म. (अलिफ-लाम-मीम.) १ परमेश्वर (असा परम पवित्र होय कीं) त्याचे शिवाय अन्य कोणी उपास्य नाहीं; जीवंत, (अवघ्या सृष्टीचा शाश्वत) सांभाळ कर्ता. २ (हे पैगंबरा) त्यानेंच तुला हें सत्यपूर्ण पुस्तक प्रकट केलें कीं तें त्याच्या पूर्वीं जीं (दिव्य पुस्तकें प्रकट झालीं) आहेत त्यांचें सत्यत्व पटवितें. आणि त्यानेंच (ह्याचे) पूर्वीं लोकांचे सन्मार्गदर्शनार्थ तौरात व इंजील हीं प्रकटिलीं. आणि त्यानेंच भेददर्शक (अशा आणखीही चिजा) उतारल्या**

---

(१) फ़ुरकान याचा यथाशब्द अर्थ फरक किंवा भेददर्शक हा होय. आणि मूळ अर्थ जो आम्हीं भाषांतरांत दिला आहे तोच होय. आतां गोष्ट ही राहते कीं त्या चिजा कोणत्या? कोणी म्हणतात, त्या चमत्कृत्या होत; व कोणी म्हणतात, निर्दोष अशी विवेचकबुद्धि; आणि कोणी म्हणतात, इतर

(कीं जेणें करून सत्य व असत्य यांतील फरक जाहीर होतो) ३. जे लोक परमेश्वराचे निशाण्यास नाकारितात, निःसंशय त्यांना सक्त शिक्षा होईल. आणि परमेश्वर सामर्थ्यवान् (व) सूड उगविणारा होय. ४. परमेश्वर (असा सर्वज्ञानी होय कीं) त्याच्या पासून कांहींच गुप्त नाहीं; (ना) आकाशांत व ना पृथ्वींत. ५. तोच (असा परम समर्थ) होय कीं जो (आईच्या) गर्भाशयांत कशी हवी तशी तुमची आकृति बनवितो. त्याच्या वाचून अन्य कोणी उपास्य नाहीं; (तोच) प्रबल व सत्यसंकल्प होय. ६. (हे पैगंबरा!) तोच (असा परम पवित्र) होय कीं ज्यानें तुला हें पुस्तक प्रकट केलें; कीं त्यांत कांहीं वाक्यें ठाम (अर्थाचीं व सुबोध) आहेत (व) तींच पुस्तकाचीं मूलतत्वें होत. आणि कांहीं इतर मोघम (दृष्टांतरूप कीं त्यांतून अनेक अर्थ निघतात) तर ज्या लोकांचे अंतर्यामीं वक्रपणा आहे ते तर कुरआनाच्या ह्याच मोघम वाक्यांच्या मागें लागून राहतात; अशा हेतुनें कीं फिसाद् (ह्मणजे मतभेद) पैदा करावा व हें कीं त्यांच्या मूळ अर्थाचा थांग लावावा. आणि वास्तविक पाहतां परमेश्वरावांचून त्यांचा मूळ अर्थ कोणालाच माहीत नाहीं. आणि जे लोक ज्ञानांत पारंगत आहेत ते तर इतकेंच बोलून राहतात कीं यावर आम्हीं विश्वास ठेवितों; (हें) सर्व आमच्या पालनकर्त्याकडूनच होय. आणि (समजाविल्यानेंही) जे अक्कलवान् आहेत तेच समजतात. ७.

---

प्रेषितांस मिळालेले आज्ञालेख; व कोणी म्हणतात, कीं तें कुराणच होय व त्याचीच पुनरुक्ति या ठिकाणीं मागील वाक्यांला जोर देण्यास्तव केली गेली आहे.

(१) कुराण हें आहे तर दिव्य पुस्तक; परंतु लोकांचे समजाविण्यासाठीं प्रकट झालें आहे. लोकांची परिस्थिति अशी आहे कीं बऱ्याच गोष्टी त्यांच्या समजूतीचे बाहेर आहेत. उदाहरणार्थः—मरणानंतरची स्थिति आणि परमेश्वराची व्यक्ति व त्याचीं विशेषणें यांचें सविस्तर ज्ञान अगर आत्मज्ञान वगैरे; आणि लोकांचे बुद्धिमत्तेप्रमाणें त्यांशीं बोलावें तर त्यांच्या भाषासरणीचे पद्धतीस अनुसरून बोलावयाचें असतें. ह्मणून कुराणांत अशाही बऱ्याच गोष्टी आहेत कीं त्यांचीं कारणें समजणें व त्यांचा थांग लावणें कठीण आहे.

**(आणि ज्ञानसंपन्न लोक हीच प्रार्थना करतात कीं) हे आमच्या पालनकर्त्या! आह्मांला तूं सरळ मार्गी लाविलेंस (तर आतां) ह्या उपरांत, आमचीं मनें डळमळीत होऊं देऊं नकोस; आणि तूं आपल्याकडून आह्मांला दया (बक्षीस ह्मणून) दे. निःसंशय तूंच महान् दाता आहेस. ८. हे आमच्या पालनकर्त्या! ज्या (दिव-**

---

पण धर्माचरणाचीं तत्वें इतकीं सुलभ व सोपीं आहेत कीं निर्बुध्यांतला निर्बुद्धी व अज्ञान्यांतला अज्ञानीही समजूं शकेल. त्याचा खुलासा असा कीं मनुष्य कांहीं कालासाठीं कोणा विशिष्ठ प्रयोजनामुळें जगांत पाठविला गेला आहे. त्याच्यांत एक प्रकारचा आत्मा आहे कीं तो अनंत कालापावेतों बाकी राहील. शारिरीक संबंधामुळें मनुष्यास पुष्कळ गरजा भासतात व त्या परत्वें लोकांत क्लेश व कलह उद्भवतात; व त्यांचा अपरिहार्य परिणाम फिसाद व उत्पाद हीं होत. हीं पापांचीं मूलभूत कारणें आहेत. आतां पापांचा परिणाम आत्म्यावर होतो व त्यानें मरणोत्तरचें आत्म्याचें अस्तित्व सफल होतें अगर बिघडतें. मनुष्याला जी अक्कल दिली गेली आहे ती त्याला शिकविते कीं ह्या जगांत त्यानें कशी नांदणूक करावी; व बुद्धिमत्तेस जास्त प्रकाश मिळावा व तिचा जास्त विकास व्हावा ह्मणून परमेश्वरानें वारंवार पैगंबर वा प्रेषित पाठविले व दिव्य पुस्तकें प्रकटिलीं. विश्वासू होण्यासाठीं कांहीं मोठी अक्कल व मोठी माहिती पाहिजे असें नाहीं. मनुष्यानें आपल्या स्थितीचा मननपूर्वक विचार करणें, ऐहिक आयुष्यास क्षणिक व परमेश्वरापुढें स्वतःला दुर्बल व शक्तिशून्य समजणें पुरें करतें. हें झाल्यावर परमेश्वर, एकच व सर्व शक्तिमान आहे; व परलोकीं कर्मांचा जाब देणें सत्य आहे. पूर्वी आमच्या बऱ्या साठीं होऊन गेलेले सर्व पैगंबर व प्रवक्त खरे असून शेवटचे हजरत मोहंमद पैगंबर हेही खरे आहेत असें मानणें हाच ईस्लाम धर्म. ठाम अर्थाच्या व सुबोध गोष्टी ह्मटल्या ह्मणजे ह्याच होत. मानवांत कोणीच या गोष्टी समजण्यास अशक्त नाहीं. दरेक गोष्टींवर तक्रार वा आक्षेप काढणें, आपल्या बुद्धिमत्तेस श्रेष्ट जाणणें व बुद्धीपासून तिच्या योग्यतेबाहेरचें काम घेणें हीं अधर्मीपणाचीं लक्षणें आहेत. ह्या बौद्धिक रोगास सुशिक्षित लोकच प्राय: बळी पडतात; आणि इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांत तर हा रोग अतोनात आढळून येतो. त्याचें कारण इंग्रजी शिक्षण नव्हे

साचे येण्यां)त (कोणा तऱ्हेची) शंकाच नाहीं अशा (एकाना) एका दिवशीं, तूं लोकांस (प्रत्येकास त्याच्या कर्माचें फल देण्यास्तव) एकवटून गोळा करशीलच; (तर त्या दिवशीं तूं आह्मांवर दयादृष्टि असूं दे;) निःसंशय परमेश्वर वचनाच्या उलट करीत नसतो. (त्याचें पुनरुत्थानाविषयक वचन पूर्ण होईलच होईल). ९. जे लोक (इस्लाम धर्मास) नाकारितात, परमेश्वरापुढें त्यांची धनदौलत कांहीं कामा येणार नाहीं व त्यांची संततीही (त्यांना उपयोगी होणार) नाहीं आणि हेच होत (कीं जे) नरकाग्नीचें इंधन (होतील) १०. (त्यांचीही तीच) फिरऔनवाल्यांची व त्यांच्या अगोदरचे लोकांच्या सारखीच गत (होणें आहे); कीं त्यांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें; तर परमेश्वरानें त्यांना त्यांच्या पातकांबद्दल धरिलें. आणि परमेश्वराचा मार फार सक्त होय. ११. (हे पैगंबरा!) जे लोक (इस्लाम धर्मास) नाकारितात त्यांना सांगून ठेव कीं, पुढें कांहीं अवधींत (मुसलमानांचे मुकाबल्यांत) तुम्हीं जेर केले जाल, व तुम्हीं (मरणोत्तर पुनरुत्थानाचे दिवशीं पुन्हां जिवविले जाऊन) जहन्नम (ह्मणजे नरकाग्नी)कडे पिटाळून लाविले जाल. आणि तें (किती तरी) वाईट शयन होय. १२. (अहो इस्लाम धर्मास नाकारणाऱ्यांनो! बद्रचे मुक्कामीं) जे दोन (विरोधी) पक्ष एकमेकांशीं भिडले होते त्यांच्या (प्रकरणां)त तुमच्या (समजण्या) साठीं (ईश्वर सामर्थ्याची एक मोठी भारी) निशाणी (जाहीर होऊन चुकली). आहे. (त्यांतून) एक पक्ष तर (मुसलमानांचा होता कीं तो) परमेश्वराचे मार्गात लढत होता, व दुसरा (पक्ष)

---

तर अधर्मी लोकांचा सहवास हा होय. धर्मदृष्ट्या ही स्थिति फारच घातक आहे. असला मनुष्य आपल्या विचारसरणींत चुकून प्रधान गोष्टी सोडून गौण गोष्टींचे मागें लागतो; व प्रधान धर्मकर्तव्याचा त्याग करून तत्संबंधीं गौण गोष्टींचा आपल्यावर पत्कर घेतो. तथापि तो हेंही निभावूं शकत नाहीं. या आयात ह्मणजे महावाक्यांमध्यें हें स्पष्ट करून सांगितलें गेलें आहे कीं मोघम व अनिश्चित गोष्टींच्या नादास लागून आचरणें हें धार्मिकपणास विरुद्ध व बहकणेंचें चिन्ह आहे.

नास्तिकांचा होता कीं त्यांना डोळ्यांदेखतां, मुसलमान लोक आपल्या दुप्पट दिसून येत होते. आणि परमेश्वर आपल्या सहाय्यानें ज्याला इच्छितो त्याला पाठिंबा देतो. यांत संशय नाहीं कीं जे लोक अंतर्दृष्टि ठेवतात त्यांच्यासाठीं ह्या (वृत्तांतां)त अर्थात् एक धडाच होय. १३. लोकां (चा जन्मसिद्ध स्वभावच असा आहे कीं त्यां) स (इहलोकींच्या) इष्ट वस्तु म्हणजे (उदाहरणार्थ), बायका व पोरेंबाळें व सोनें व चांदी यांचे सांठविलेले मोठमोठाले ढीग, व अत्युत्तम (निवडक) घोडे व गुरेंढोरें आणि शेतीवाडी यांची प्रीति भली वाटत असते. (व वास्तविक पाहतां,) हीं तर ऐहिक आयुष्याचीं (क्षणिक) साधनें होत. आणि (सदाचें) चांगलें ठिकाण तर त्याच परमेश्वरापाशीं होय. १४. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (तुमची इच्छा असेल तर) मी तुम्हांस ह्या (इहलौकिक क्षणिक साधनां) पेक्षांही अत्युत्तम चीज दाखवून देऊं का? (ती ही कीं) ज्या लोकांनीं (परमेश्वराला) भिऊन आचरण केलें, त्यांच्यासाठीं त्यांच्या पालनकर्त्यासमीप (स्वर्गाचे) बाग होत कीं त्यांच्या खालून नद्या वाहत आहेत (व ते) त्यांत सदासर्वदा राहतील; आणि (बागांव्यतिरिक्त त्यांच्याकरितां) शुचिर्भूत (व चोख्या) पत्न्या होत; आणि (सर्वांत अति श्रेष्ठ अशी) परमेश्वराची सुप्रसन्नता ही होय. आणि परमेश्वर सेवकां (च्या बऱ्यावाईटां)स पाहतो आहे. १५. (हेच) ते लोक (होत कीं) जे (प्रार्थनेंत)

---

(१) वस्तुतः तर नास्तिक बहुत होते व मुसलमान कमी. परंतु परमेश्वरानें नास्तिकांच्या मनांत मुसलमानांची अशी जरब बसविली होती कीं त्यांना डोळ्या देखतां मुसलमान आपल्या दुप्पट दिसत होते. अगर ह्या बद्रचे लढाईंत परमेश्वरानें मुसलमानांचे मदतीसाठीं देवदूतही पाठविले होते तर त्या दुतांमुळें मुसलमान लोक नास्तिकांस दुप्पट दिसत होते. सारांश, कांहीं झालें तरी, परमेश्वराचे मदतीनें थोड्याशा मुसलमानांनीं नास्तिकांच्या मोठ्या प्रचंड सैन्यास मारून हटविलें व युद्ध जिंकिलें. आणि हाही अर्थ होऊं शकतो कीं मुसलमान डोळ्यादेखतां नास्तिकांस दुप्पट पाहत होते तरीही परमेश्वरानें त्यांस हिंमत दिली होती कीं त्यांना नास्तिकांवर विजय मिळाला.

म्हणतात, हे आमच्या पालनकर्त्या! आम्हीं (तुजवर) विश्वास ठेविला आहे; तर तूं आम्हांला आमच्या पातकांची क्षमा कर व आम्हांस नरकाग्नीचे शिक्षेपासून वांचीव. १६. (हेच लोक) सहनशील व सत्यवचनी व (परमेश्वराचे) आज्ञाधारक व (त्याचे मार्गांत) खर्चवेंच करणारे व (प्रतिदिवशीं) प्रातः समयास क्षमा भाकणारे (असे होत. १७.) (स्वतः) परमेश्वर या गोष्टीची साक्ष देतो कीं आपल्यावांचून (अन्य) कोणी उपास्य नाहीं; व देवदूत व ज्ञानी हेही (साक्ष देतात; व तसेंच हें कीं परमेश्वर) न्यायपुरःसर (अवघ्या सृष्टीस) सांभाळून

---

(१) ही गोष्ट तत्ववेत्यांस मान्य आहे कीं परमेश्वरानें भिन्न व विरुद्ध प्रकृतीच्या पंचमहाभूतांतून सृष्टि निर्मिली आहे; आणि एका विशिष्ठ काळापर्यंत या महाभूतांत मेळमिलाफ व परस्पर संबंध कायम राहतो व त्यांत कंपेश होऊं शकत नाहीं. नाहींतर, पंचमहाभूतांचे संयोगानें बनलेली सृष्टवस्तु आपल्या प्राप्त स्थितींवर कायम राहणारच नाहीं. .आतां उदाहरणार्थ सृष्टवस्तूंपैकीं आम्हीं मनुष्यालाच घेऊं व पाहूं. तर या भौतिक तत्वांचा परस्पर संयोग कायम न राहतां, त्यांतून एखादें तत्व प्रबल होऊन त्याचा एकदांचा इतर तत्वांवर पगडा बसला, म्हणजे मनुष्याच्या जिवाशीं गांठ पडते. म्हणून ह्यांच्यामध्यें न्यायाचें धोरण हें कीं त्यांचा परस्पर संबंध एका विशिष्ठ काळापर्यंत बदलला न जावा. सारांश, ही स्थिति सृष्टीचे दरेक परिमाणूंत दृगोचर होते; आणि सृष्टीचें अस्तित्व हा संबंध बाकी राहण्यावरच अवलंबून आहे. अगर मनुष्यांच्या स्थितीची दुसरी बाजू घेऊन या विषयीं विचार करूं; तर त्याचा आपसांत द्वेषभाव आहे, झगडेबखेडे आहेत, जोरजुलूम आहे, फिसाद व उपद्व्याप आहे. आणि परमेश्वर जर लोकांस जबरदस्त व जेरदस्त न करीत राहील, तर हे सर्व आपसांत कापाकापी करून मेले असते. कुराणांत दुसरीकडे परमेश्वरानें ह्मटलें आहे, "आणि जर परमेश्वर कित्येक लोकांच्या द्वारें दुसऱ्या कित्येकांस (अधिकारासनाहून) न हटवीत राहील तर पृथ्वी(ची व्यवस्था) बिघडून जाईल. परंतु परमेश्वर सकल जगांचे लोकांवर (फार) मेहरबान होय." सृष्टीचें अस्तित्व कायम राखण्याचे युक्तींत एक युक्ति

**(आहे). त्याच्यावांचून (अन्य) कोणी उपास्य नाहीं, (तोच) परम समर्थ (व) सत्य संकल्प (होय). १८. परमेश्वरापाशीं (मूळचा सत्य) धर्म (ह्मटला) तर केवळ इस्लामच होय. आणि ग्रंथधारी (ह्मणजे यहुदी व खिस्ती) यांनीं जो (सद्धर्माशीं) विरोध केला, तर (त्यांनीं) तो त्यांना (सत्य गोष्टीचें) ज्ञान झाल्यानंतर (केला व) परस्परांचे हट्टानें (केला). आणि जो कोणी परमेश्वराचे निशाण्यास नाकारील, तर परमेश्वरास (त्याच्यापासून) हिशेब घेतां (व त्याला अवज्ञे-बद्दल शिक्षा देतां) कांहीं उशीर लागत नाहीं. १९. मग (हे पैगंबरा!) जर (ग्रंथधारी लोक) यावरही तुझ्याशीं वाटाघाट करतील**

---

धर्म आहे. जरी बाह्यांगानें जगिक अधिकारी वा सरकार सृष्टीची योग्य व्यवस्था लावतें तरी त्या व्यवस्थेशीं धर्माचा मोठाच संबंध होय. धर्माचा लोकांचे संकल्प व मनोगत यांवर परिणाम घडतो व ही गोष्ट अधिकाऱ्यांस साध्य नाहीं. जगाचे कायदेकानू रोग निर्माण झाल्यावर त्याचें निरसन करतात; पण धर्मनियम ज्यांची रचना सर्वोपरी न्यायावर आहे ते आरंभींच रोग उत्पन्न होऊं देत नाहींत.

(१) इस्लाम याचा यथाशब्द अर्थ परमेश्वराचे मर्जीच्या व हुकमाच्या आधीन होणें असा होतो. तर धर्माची मूळभूत कल्पना ह्मणजे ईश्वर व आत्मा यांचा जो नित्य संबंध तो आत्म्यानें परमेश्वराचे मर्जीच्या व हुकमाच्या आधीन होऊन व आचरून त्याशीं तादात्म्य पावल्याखेरीज कायम राहणें शक्य नाहीं. जर कोणी त्याच्या हुकमाविरुद्ध आचरून पाहिजे त्या सृष्ट वस्तूंची उपासना व भक्ति करूं पाहील व परमेश्वराचे जेवढे ह्मणून प्रेषीत वा पैगंबर आहेत त्यांच्यांत विषमभाव ठेवील तर त्यास धर्माशीं संबंध न राहतां तो अधर्मच होणार आहे. तर सृष्टीचे आरं-भापासून शेवटपर्यंत धर्म ह्मटला तर केवळ इस्लामच ह्मणजे ईश्वराज्ञापालन हा होय. आणि सामान्यें करून विचार केला तर इस्लाम धर्मास वृक्षाचे स्वरूप येतें व हिंदु, खिस्ती वगैरे धर्मांस शाखांचें ह्मणजे धर्मपंथांचें स्वरूप येतें ही गोष्ट निर्विवाद आहे; व विश्वबंधुत्वाची उदात्त कल्पना जर कोठें कृतींत आलेली पाहावयास सांपडते तर ती इस्लाम धर्मामध्येंच सांपडते.

तर तूं (त्यांना) सांगून दे कीं मी आपलें मुख परमेश्वराच्या आधीन केलें आहे (म्हणजे इस्लाम स्वीकारिला आहे); आणि जे लोक माझे अनुयायी आहेत (त्यांचीही अशीच स्थिति आहे.) आणि (हे पैगंबरा!) ज्यांना पुस्तक दिलें गेलें आहे त्यांस व (अरबांचे) निरक्षर लोकांस सांग कीं तुम्हींही इस्लाम स्वीकारतां (कीं नाहीं)? मग जर ते इस्लाम स्वीकारितील तर निःसंशय ते सरळ मार्गीं लागले. आणि जर ते तोंड मुरडतील तर (हे पैगंबरा!) तुजकडे (ईश्वरी आज्ञा) पोहोंचविणें मात्र आहे एवढेंच. आणि परमेश्वर सेवकां(चे स्थिती) स खूप निरखून आहे. २०. जे लोक परमेश्वराचे निशाण्यांस नाकारितात व प्रवक्त्यांस विनाकारण जिवें मारितात; व (तसेंच) जे लोक (त्यांना) इनसाफ[१] करावयास सांगतात त्यांचीही ते कत्तल उडवितात; तर (हे पैगंबरा!) असल्या लोकांस दुःखदायक शिक्षेचें शुभवर्तमान ऐकीव. २१. हेच लोक होत कीं ज्यांचें केलें करविलें इहलोक व परलोक यां (दोहों) त अक्रीत; व (परमेश्वरापुढें) त्यांचा कोणी मदतगार नाहीं. २२. (हे पैगंबरा!) ज्या (यहुदी विद्वानां) स (तौरात) पुस्तका (च्या ज्ञाना)चा एक हिस्सा दिला गेला होता त्यां (च्या स्थिती)चें अवलोकन तूं केलें नाहींस का? (आतां) त्यांना परमेश्वराचें पुस्तका (म्हणजे त्याच तौरात) कडे बोलाविलें जातें कीं (त्यानेंच) त्यांचा झगडा चुकवून टाकावा; यावरही त्यांचा एक पक्ष फिरून पडतो. आणि ते (तौरातचा हुकूम[२] स्वीकारण्यास) विमुख होत. २३.

---

(१) पैगंबरसाहेबांच्या एका वचना–हदीस–वरून असें कळतें कीं बनी–इस्राएलांनीं एके दिवशीं प्रथमच चाळीस प्रवक्ते म्हणजे पैगंबर यांस ठार मारिलें. त्यावर त्यांच्यांतलीं एकशें सत्तर मनुष्यें पैगंबरांचे मारेकऱ्यांस दोषारोप व वाग्दंड करूं लागलीं. तेव्हां सांज होण्याच्या पूर्वींच त्यांनाही त्यांनीं कंठस्नान घातलें. या वाक्यांत याच वृतांताकडे इशारा असेल तर नवल नाहीं.

(२) तौरात मध्यें बायकोच्या नवऱ्यास व नवऱ्याच्या बायकोस व्यभिचाराबद्दल धोंडमार करण्याची शिक्षा होती. इस्लामधर्मांतही तोच

हा (स्वेच्छाचार त्यांच्यांत) यानें (उत्पन्न झाला) कीं ते प्रतिपादितात कीं आह्मांस नरकाग्नी शिवेलहि तर केवळ गणतीचे कांहीं दिवसच. आणि जें जें थोतांड हे रचीत राहिले त्यानेंच यांना यांच्या धर्माचे संबंधीं फसगतींत ठेविलें आहे. २४. नंतर (पहा! पुनरुत्थानाचा दिवस कीं) ज्या (च्या येण्यां)त कांहींच संशय नाहीं, त्या दिवशीं, (त्यांची) कशी (गत) बनेल? कीं जेव्हां आम्हीं त्यांना (आपल्या हुजूर हिशेबास्तव) गोळा करूं, व प्रत्येक जणास जसें त्यानें (जगांत) केलें असेल तसें त्याला पुरें पुरें भरून दिलें जाईल; व लोकांवर (कोणा तऱ्हेचा) जुलूम होणार नाहीं. २५. (हे पैगंबरा!) तूं (तर ही) प्रार्थना कर कीं, हे परमेश्वरा! (साऱ्या) राज्याचे मालका! तूंच ज्याला इच्छितोस त्याला राज्य देतोस; व तूंच ज्याच्यापासून इच्छितोस त्याच्यापासून राज्य काढून

---

हुकूम बहाल आहे. यहुदी तर परमेश्वर व परमेश्वराचे हुकूम यांशीं खेळ करीतच असत. गरीबांस धोंडमाराची शिक्षा देत, व अमीर उमराव व सुखवस्तु लोकांना शिक्षा देतांना कांहींचें कांहींच समजावून टाकीत. हजरत मोहंमद पैगंबराचे वेळीं कोणाएका धनाढ्य यहुदिणीचे हातून जारकर्म घडलें. यहुदी धर्मपंडितांनीं तिला धोंडमाराचे शिक्षेंतून बचाविण्याचा बेत केला व सबब ही काढली कीं चला, नव्या पैगंबरापाशीं जाऊन विचारूं. कोणा कारणामुळें त्यांना अशी उमेद झाली असावीशी वाटते कीं हे नवे पैगंबर धोंडमार करण्याचा हुकूम कदाचित् न देतील. पण येथें कोणाची भीड ठेवण्याचें कामच नव्हतें. त्याच तौरात व कुराणाचे हुकमाअन्वयें त्यांनीं धोंडमाराचा हुकूम फर्माविला. यहुदी म्हणूं लागले कीं तौरातमध्यें हा हुकूमच नाहीं. पैगंबर ह्मणाले, तौरात आणून दाखवा पाहूं? तौरात आलें तों पैगंबर साहेबांस निरक्षर समजून धोंडमाराचा हुकम असलेल्या जागेवर त्या यहुदी लोकांनीं हात ठेवून तो लपविला. पैगंबराचे तत्कालीन अनुयायी म्हणजे ज्यांला सहाबी म्हणतात त्यांपैकीं कोणी एक पढलेला त्या वेळीं हजर होता त्यानें त्यांची चोरी पकडली. या वाक्यांत याच गोष्टीकडे इषारा आहे.

घेतोस. आणि तूंच ज्याला इच्छितोस त्याला इजतअब्रू देतोस, व तूंच ज्याला इच्छितोस त्याला नमवितोस. (हरतऱ्हेचें हित व) कल्याण तुझ्याच हातीं आहे. निःसंशय तूं सर्वशक्तिमान् आहेस. २६. तूंच (उन्हाळ्यांत) रात्रीस (घटवून) दिवसांत सामील करतोस व तूंच (हिंवाळ्यांत) दिवसास (घटवून) रात्रींत सामील करतोस; आणि तूंच निर्जिवांतून सजीव व तूच सजीवांतून निर्जिव काढतोस, व तूंच ज्याला इच्छितोस त्याला बेमुमार देतोस. (तर तूं आपल्या कृपेनें मुसलमानांना राज्यसत्ता व इजतअब्रूचा वांटा दे.) २७. मुसलमानांस पाहिजे कीं त्यांनीं मुसलमानांना सोडून नास्तिकांस मित्र पत्करूं नये. आणि जो असें करील, तर त्याशीं व परमेश्वराशीं कांहीं संबंधच नाहीं; पण (अशा युक्तीनें) कोणा तऱ्हेनेंही त्यांच्या (खोडसाळपणा) पासून जपून वर्तूं पाहाल (तर एक असो). आणि परमेश्वर तुम्हांस आपल्या (जाज्वल्यत्वा) कडून भिववितो; व (सरशेवटीं) परमेश्वराकडेच जाणें आहे. २८. (हे पैगंबरा!

---

( १ ) निर्जिवांतून सजीव काढण्याचा दृष्टांत कवटांत पाहण्यांत येतो. कवट हें खुद्द निर्जीव असून त्यांतून सजीव पिलूं निपजतें; आणि सजीवांतून निर्जीव पैदा करण्याचा दृष्टांत कोंबडी होय; कीं तींतून कवट पैदा होतें. ह्यांत या गोष्टींकडेही इषारा आहे, कीं पैगंबराचे काळीं मुसलमानांत कांहीं जीव नव्हता. तर पुढें त्यांचा वंश चालून जितीजागती व चालतीफिरती प्रजा निर्माण होईल. तसाच रात्र व दिवस यांमध्यें नास्तिकपणा व इस्लाम यांकडे इषारा आहे. नास्तिकांचे अमदानीस रात्र ह्मटली; कांकीं त्यांच्या अमलदारींत जुलुम व अन्याय यांचा अंधकार होता; व इस्लामचे अमदानींत सुव्यवस्थेचें चांदणें प्रकाशित होतें, ह्मणून त्याला दिवसाची उपमा दिली.

( २ ) भाग २८ वा, अध्याय ६० यांत याचें जास्त स्पष्टीकरण आहे. दिसण्यांत हा हुकूम आह्मा हिंदुस्थानाचे मुसलमानांसाठीं दुष्कर व दुःसाध्य आहे. कारण, आह्मीं परधर्मीय लोकांची प्रजा आहों व आह्मांस कुराणोक्तीअन्वयें त्यांजप्रत राजनिष्ठ बनून राहिलें पाहिजे. आमचें

या लोकांस ) सांगून दे कीं जें कांहीं तुमच्या मनांत आहे तें तुम्हीं लपवाल अगर तुम्हीं तें जाहीर कराल तर तें (कांहीं झालें तरी) परमेश्वरास तर (तेव्हांच) माहीत होऊन जाईल. आणि जें कांहीं आकाशांत व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (तर तो सर्व) जाणतो. आणि परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. २९. (लोकांनों! तो दिवस दृष्टीपुढें ठेवा कीं) ज्या दिवशीं दरेकजण, जें कांहीं बरेंपण (जगांत) तो करून गेला असेल तें (परमेश्वरा समीप)हाजर पावेल; व (ह्याचप्रमाणें) जें कांहीं वाईटपण करून गेला असेल तेंही (तो हजर पावेल.) तो अशी हांव घालील कीं त्या दिवसाच्या व आपल्या दरम्यान लांबलचक अवधि असता तर (बरें होतें!) आणि परमेश्वर तुह्मांस आपल्या (जाज्वल्यत्वा)कडून भिवविती. आणि परमेश्वर (आपल्या) सेवकांवर अतोनात करुणाही ठेविती. ३०. (हे पैगंबरा! या लोकांस) सांगून दे कीं जर तुह्मीं परमेश्वराशीं प्रीति ठेविता तर तुह्मीं माझें अनुकरण करा; ह्मणजे परमेश्वरही तुह्मांशीं प्रीति ठेवील व तुह्मांस तुमचे अपराध क्षमा करील. आणि परमेश्वर क्षमाशील व दयाळू होय. ३१. (हे पैगंबरा!

---

परधर्मीय लोकांशीं घेणेंदेणें आहे व त्यांचें आमचें परस्पर हितगुज असतें. आमचें एकमेकांवाचून चालणेंही शक्य नाहीं. शिवाय आह्मांस आपसांत फिसाद व नासधूळ करण्याची सक्त मनाई आहे. पण कुराणांत कित्येक जागीं असें आढळून येतें कीं परधर्मीय लोकांस मित्र बनविण्याची मनाइ तात्पुरतीच असून तिचा राज्यकारणाशीं बराच संबंध येतो, ह्मणजे इस्लामची स्थापना होत होती व परधर्मीय लोकांनीं लढाई सुरु केली होती; अशावेळीं ह्या गोष्टीची आवश्यकता होती कीं मुसलमानांनीं परधर्मीयांशीं संबंध ठेवूं नये व मुसलमानांच्या तजविजी विरोधीयांस कळूं नयेत. असल्या व्यवस्था आतांही कधींकधीं करणें भाग पडतें. अथवा मित्र ह्मणजे धर्मविषयक मित्र असा अर्थ असावा. पण असली मैत्री विरुद्ध धर्मीय लोकांशीं कधीं झाली आहे व न कधींच होऊं शकेल.

**या लोकांस) सांगून दे कीं परमेश्वर व पैगंबर यांची आज्ञा पाळा; मग जर (हे लोक) फिरून पडतील तर (समजून राहा कीं) परमेश्वर आज्ञाभंजकांस पसंत करीत नसतो. ३२. परमेश्वरानें सकल जगांचे लोकांवर (श्रेष्ठत्व देऊन) आदम व नूह व इब्राहीमचें कुटुंब व इमरानचें कुटुंब यांस निवडून घेतलें आहे. ३३. (हे लोक एकाच आदमची) अवलाद (होते), एकाची (संतति) एक. आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ३४.**

---

(१) इमरान हें हजरत **मूसा—मो**श्याचे बापाचें नांव होतें व **मर्यम**चे बापाचें नांवही हेंच होतें. शिवाय हजरत **मू**साच्या भावाचें नांव **हारून** व बहिणीचें नांव **मर्यम** होतें व तसेंच **येशू**ची आई **मर्यम** ईच्या भावाचें नांवही **हारून** होतें. ऐतिहासिक माहीतीच्या अभावीं खिस्ती पाद्र्यांनीं असा गोंधळ माजवून सोडिला आहे कीं 'हे **इमरान**चे मुली!' व 'हे **हारू**मचे बहिणी!' या शब्दावरून ते असें विधान करितात कीं कुराणानें **येशू**ची आई **मर्यम** इला हजरत **मूसा—मो**शाचा बाप **इमरान** यांची मुलगी ठरविली आहे. पण हें चुकीचें विधान होय. कारण तसें असतें तर 'हे **मू**साचे बहिणी!' असें आलें असतें; व तसें मुळींच नाहीं. 'हे **हारून**च्या बहिणी!' ह्मटलें आहे तर **हारून** तिचा भाऊ होताच. या शिवाय बाईबलांत जसें 'हे दाविदाचे पुत्रा!' ह्मटलें आहे पण **येशू** हा **दा**विदाचा प्रत्यक्ष पुत्र नसून त्यांच्या वंशांत मात्र आहे तसेंच **मर्यम** कुमारी हीहि **मूसा** व **हारून** यांच्याच वंशांतली होय; कारण तिचेंही **लावी** घराणें आहे. तर तिच्या प्रतिष्ठीत घराण्याकडे इशारा करतांना असें संबोधण्यासही हरकत नाहीं. तर यांपैकीं कोणताही एक किंवा दोन्ही अर्थ घेतल्यास कांहींच आक्षेप उरत नाहीं.

(२) 'जाणतो' या शब्दानंतर आणखी इतकें वाढविलेलें समजाल तर मतलब खूब ध्यानांत येईल, 'त्यांतल्या त्यांत सेवकांचीं कामें व वचनें होंहीं; तर त्यांजपैकीं तो ज्याला प्रेषितत्वास योग्य पाहतो त्यास निवडून घेतो. सारांश कोणा खास मनुष्यास पैगंबर वा प्रेषित बनविणें हें आक्षेपार्ह नाहीं.

एके काळीं इमरानचे पत्नीनें (परमेश्वरा हुजूर) विनवणी केली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! माझ्या पोटीं जें (मूल) आहे तें मीं (संसार-) मुक्त करून तुला समर्पण करित्यें. तर तूं मजकडून (हें समर्पण) मान्य कर; कीं तूं (सर्वांचें) ऐकितोस (व सर्वांचें मनोगत) जाणतोस. ३५. मग जेव्हां ती मुलगी प्रसवली आणि परमेश्वराला हें खूप ठाऊक होतें कीं ती कोण योग्यतेची (मुलगी) प्रसवली आहे (व ती तिच्या हकीकतीशीं वाकब नव्हती)—तेव्हां ती ह्मणूं लागली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! (आतां काय करूं?) मीं तर ही मुलगी प्रसवली आहे; आणि मुलगा हा, मुलगीप्रमाणें (दुर्बळ) नसतो. आणि मीं तिचें नांव मर्यम ठेविलें आहे; व मी तिला व तिच्या संततीस धोंडमार केलेल्या सैताना(च्या बहकविण्या)पासून तुझ्या आश्रयांत देत्यें. ३६. तर तिच्या पालनकर्त्यानें (तिचें समर्पण ह्मणजे) मर्यम इला चांगल्या मान्यतेनें[1] स्वीकारिलें व तिला चांगल्या[2] प्रकारें वाढवून मोठी केली व त्यानें तिला जकरीयाच्या हवालीं केलें. जेव्हां जेव्हां जकरिया मर्यम(-ला पाहण्यास्तव तिच्या-) जवळ (तिच्या राहत्या) खोलींत जाई तेव्हां तेव्हां मर्यमजवळ

---

(१) मर्यम कुमारीच्या मातोश्रीचा नवस करतेवेळीं असा समज झाला होता कीं पुत्र होईल तर त्याला संसार मुक्त करून परमेश्वराचे मंदिराचे सेवेस अर्पण करीन. पण झाली मुलगी ह्मणून ती मोठ्या विवंचनेंत पडली कीं जगप्रपंच असो वा धर्म सांप्रदाय असो यांत स्त्रियानें तर पुरुष्याची बरोबरी करवत नाहीं; तर माझा नवस तरी कसा पुरा होणार? परंतु परमेश्वरास हें मंजूर होतें कीं त्या कुमारीशिरोमणीच्या पोटीं चमत्कारापरी एक नामांकित व प्रख्यात पैगंबर ईसा–येशू–हे निर्माण व्हावेत. आणि असली मुलगी मुलग्यापेक्षांही फारच श्रेष्ठ होय. तात्पर्य, परमेश्वरानें आईच्या नवसा दाखल मर्यम इला चांगल्या मान्यतेनें स्वीकारीलें व तिचा नवस पुरा झाला.

(२) ह्मणजे जकरियाचे देखरेखेखालीं धर्म व संसार यांच्या दृष्टीनें मर्यमची उत्तम जोपासना झाली.

(फळफळादि पैकीं कांहीं ना कांहीं) खाण्याचा पदार्थ त्याला आढळून येई. (ह्मणून त्यानें एके दिवशीं मर्यमला) विचारिलें कीं अगे मर्यम; हा (खाण्याचा पदार्थ) तुजजवळ कोठून (येतो)? (मर्यम) ह्मणाली, हा परमेश्वराकडून (येतो). परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला बेसुमार देतो. ३७. (हें उत्तर ऐकून) तेथेंच जकरियानें आपल्या पालनकर्त्याचा धांवा केला (व) ह्मटलें कीं हे माझ्या पालनकर्त्या! तूं आपल्याकडून मलाही चांगली संतति अर्पण कर; कीं तूं (सर्वांची) प्रार्थना[१] ऐकितोस. ३८. तथापि जकरिया खोलींत उभा उभा प्रार्थनाच करीत होता, कीं दूतांनीं त्याला हाक मारून ह्मटलें कीं परमेश्वर तुला (एक पुत्र) याहया (याच्या जन्मण्या)चें शुभ वर्तमान देतो; (व त्याच्यांत हे विशिष्ट गुण असतील कीं ईसा जो केवळ) परमेश्वराचे हुकमा(-नें बापावांचून जन्मेल, याहया त्याच्या पैगंबरी)ची सत्यता दर्शवील व (लोकांचा) पुढारी होईल व (स्त्रियांचे सहवासापासून आपणाला) आवरून राहील व प्रवक्ता होईल, (सारांश, तो परमेश्वराचे)पवित्राचरणी (सेवकां)पैकीं होईल. ३९. (जकरियानें) अर्ज केला कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझ्या घरीं कसा पुत्र होऊं शकणार? व (माझी परिस्थिति अशी आहे कीं) मला वृद्धावस्था येऊन चुकली आहे व माझी पत्नि वांझ आहे. (परमेश्वरानें) फर्माविलें, अशाच तऱ्हेनें परमेश्वर जें इच्छितो तें करितो. ४०. (जकरियानें) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझ्या (समाधाना)साठीं एखादी खूण ठरीव (कीं जेणें करून मी समजेन कीं माझी प्रार्थना मान्य झाली. परमेश्वरानें) फर्माविलें कीं तुला खूण (पाहिजे आहे तर ती) ही कीं तीन दिवसपर्यंत तुझ्यानें लोकांशीं बोलवणार नाहीं पण खुणेनेंच मात्र. आणि (त्या दिवसांत) तूं आपल्या पालनकर्त्याचें अतोनात स्मरण कर व सांजसकाळ

---

(१) जकरिया बहुतेक वेळां मर्यम जवळ बिनहंगामीं फळें ठेवलेलीं पाहत होते, यावरून त्यांना वृद्धावस्थेंत संततीची उमेद प्राप्त झाली.

**(त्याचीच) पवित्रता वर्णीत अस. ४१. आणि जेव्हां दूतांनीं (मर्यमला) सांगितलें कीं अगे मर्यम! तुला परमेश्वरानें निवडलें व (पापाचे गंधापासूनही) तुला पाकसाफ राखिलें; आणि (त्यामुळेंच) तुला सकल जगांचे स्त्रियांवर (श्रेष्ठत्व देऊन) निवडून काढलें. ४२. (तेव्हां) अगे मर्यम! तूं आपल्या पालनकर्त्याचें आज्ञापालन करीत राहा व (त्याच्या पुढें) साष्टांग नमस्कार घालीत अस; आणि (ओणवे होऊन) नमन करणारांबरोबर(तूंही-ओणवी होऊन) नमन करीत अस. ४३. (हे पैगंबरा!) ह्या**

---

(१) या वरील वाक्यांचें तात्पर्य असें:–बैतुल्मक्दिस म्हणजे यरुशलेम येथील मंदिराची सेवा हजरत जकरियाचे घराण्यांत होती. पण अडचण अशी येऊन पडली होती कीं जकरीया वयातीत झाले होते व त्यांस संतान नव्हतें. ह्मणून त्यांना संतानाची हौस झाली. इकडे मर्यम कुमारी ह्या जरी पवित्र मंदिराचे सेवेस निखालस वाहिलेल्या होत्या, तरी पण त्या स्त्री जात. आईनें तर या मुलीस पवित्राश्रमाच्या सेवकांचे हवालीं केलें. पण त्यांच्या आपसांत हा वाद उपस्थित झाला कीं मर्यमची जोपासना कोणी पतकरावी. अखेर सर्व दावेदारांनीं शकुन पाहवा म्हणून आपल्या तौरात लिहिण्याच्या लेखण्या नदींत टाकिल्या, तों जकरियाचे शिवाय सर्वांच्या लेखण्या वाहून गेल्या. हें या गोष्टीचें चिन्ह होतें कीं मर्यम ह्या जकरियाचे हवालीं केल्या जाव्या. जकरियानें मर्यमला देवळांत एकिकडे एक जागा दाखवून ठेविली होती तेथें त्या राहत, व ईश्वरोपासना व मंदिराची सेवा करीत. जकरिया त्यांस पाहण्यास्तव वारंवार जात तों त्यांच्याजवळ फळफळावळासारखे पदार्थ आढळून येत. तें पाहून त्यांना आश्चर्य होई. शेवटीं एकदां त्यांनीं त्यांस विचारिलें, तेव्हां मर्यम या म्हणाल्या कीं परमेश्वर आपल्या कृपेनें माझा शेर पाठवितो व मीं तो खातें. हें ऐकून जकरियाचे मनांत संतानाची हौस उत्पन्न झाली; व त्यांनीं प्रार्थना केली व ती मान्य झाली. परंतु जकरिया हे आपल्या मानवी स्वभावामुळें वृद्धावस्था व स्त्रीचा वांझपणा पाहून मनांत आश्चर्य करीत, शेवटीं त्यांच्यानें राहववेना; तेव्हां त्यांनीं परमेश्वराला विनंति केली कीं तूं माझी प्रार्थना तर मान्य केलीस पण

ज्या (गोष्टी) आह्मीं तुला प्रकटीकरणाद्वारें पोंहोंचवितों त्या गैबी बातम्या होत. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां ते (ह्मणजे मर्यमच्या पुरस्काराचे दावेदार) आपल्या लेखण्या (नदींत) टाकीत होते, कीं कोण (आहे कीं ज्याची लेखणी नदीचे चढावाकडे वाहून जाईल व तो) मर्यमचा पुरस्कर्ता बनेल, तेव्हां तर तूं त्यांच्या-पाशीं (हजर) नव्हतास. आणि (तसेंच) जेव्हां ते आपसांत झगडत होते तेव्हांही तूं त्यांच्याजवळ (हजर) नव्हतास. ४४. जेव्हां दूतांनीं (मर्यमला) सांगितलें कीं अगे मर्यम! (परमे-श्वराचे केवळ आज्ञेनेंच तुझ्या पोटीं एक पुत्र जन्मेल, ह्मणून) परमेश्वर तुला आपल्या (त्या आज्ञाव्यंजक) शब्दाचें शुभवर्तमान कळवितो. त्याचें नांव होईल ख्रिस्त, मर्यमचा पुत्र इसा-येशू; इहलोक व परलोक या (दोहों)मध्यें प्रतिष्ठित, व (परमेश्वरानें आपल्या) जवळ केलेल्या (सेवकां)पैकीं (एक सेवक होईल) ४५. आणि तो पाळण्यांत व तसेंच वयांत येऊन लोकांशीं (एकसारखें) संभाषण करील व (परमेश्वराचे) पवित्राचरणी सेवकांपैकीं (एक तोहि) होईल. ४६. ती ह्मणूं लागली कीं हे माझ्या पालनकर्त्या! मला कसा पुत्र होऊं शकणार? व वास्तविक मला तर कोणा पुरुषानें स्पर्श देखील केला नाहीं. (दूतानें) ह्मटलें, अशाच तऱ्हेनें परमेश्वर जें इच्छितो तें निर्माण करितो. जेव्हां तो कोणा कामाचा निर्धार करितो, तेव्हां तो त्यास मात्र इतकेंच फर्मावितो कीं हो, व तें होऊन जातें. ४७. आणि परमेश्वर त्या (तुझ्या पुत्रा)ला (सर्व दिव्य) पुस्तकें व अक्कलेच्या गोष्टी व (प्रामुख्यें करून) तौरात व इंजील (हीं सर्व) शिकवील. ४८. आणि (तो आमचा) पैगंबर (होईल व त्याला आम्हीं) बनी—इस्राएलांकडे (पाठवूं. व तो त्यांस सांगील कीं) मी तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हांकडे

---

माझ्या मनाचें समाधान कसें होणार? आज्ञा झाली, आमचें स्मरण व ध्यान केल्यानें समाधान होईल. सारांश, तीन दिवस मुके राहिल्यावर जकरिया घरीं गेले व त्यांच्या स्त्रीस गर्भ राहिला; व याह्या म्हणजे योहान्न बाप्टिस्माकार यांचें जन्म झालें. भाष्यकारांनीं या गोष्टीसही चमत्कार म्हटला आहे.

निशाण्या (म्हणजे चमत्कार) घेऊन आलों आहें; (आणि मला परमेश्वरानें हें सामर्थ्य दिलें आहे) कीं मी तुमच्या (मनाचे समाधाना)साठीं मातींतून पक्ष्याचे आकाराचासा (एक प्राणी) बनवीन, मग त्यांत फुंक मारीन व तो परमेश्वराचे हुकमानें उडूं लागेल. आणि परमेश्वराचेच हुकमानें, जन्मांध व कोडी यांस धडधाकड व मेलेल्यांस जिवंत करीन. आणि जें कांहीं तुम्हीं खाऊन याल तें व जें कांहीं तुम्हीं आपल्या घरांत सांठवून ठेविलें आहे तें (सर्व) मीं तुम्हांस सांगीन. जर तुमच्यांत विश्वास (धरण्याची योग्यता) आहे; तर निःसंशय या गोष्टींत तुम्हांकरतां (ईश्वरसामर्थ्याची मोठी) निशाणी होय. ४९. आणि (होय!) तौरात (पुस्तक) जें माझ्या काळीं (उपलब्ध) आहे मी त्याचें सत्यत्व दर्शवितों; आणि (माझ्या पैगंबर करून पाठविण्यांत) एक उद्देश हाही होय कीं कित्येक पदार्थ जे तुह्मांस निषिद्ध होत (ईश्वराज्ञेनें) त्यांस मी तुह्मां करतां हलाल ठरवीन. आणि (तोंडी दाव्यानेंच नव्हे तर) मी तुमच्या पालनकर्त्याकडून निशाण्या (ह्मणजे चमत्कार) घेऊन आलों आहे; तर परमेश्वराला भ्या व माझा कह्या माना. ५०. निःसंशय परमेश्वरच माझा पालनकर्ता होय व (तोच) तुमचाही पालनकर्ता होय, तर त्याचीच भक्ति करा; (कीं) हाच (तारणाचा) सरळ मार्ग होय. ५१. मग जेव्हां ईसानें यहुद्यांकडून नकार पाहिला, तेव्हां तो (ओरडून) बोलला, कोणी आहे कीं परमेश्वराकडेस (होऊन) माझी मदत करील? (हें ऐकून) हवारी[१] बोलले, परमेश्वराचे (बाजू)चे मदतगार आह्मीं. परमेश्वरावर आम्हीं विश्वास ठेविला आहे, आणि (हे सद्गुरु! तूंही) या गोष्टीचा साक्षी अस कीं

(१) बारा मनुष्यें ज्यांनीं पहिल्या प्रथम ईसा वा येशू यांचा विश्वास धरिला होता, त्यांना 'हवारी' ह्मणतात. हौर या शब्दाचा मूळ अर्थ सफेदी किंवा पांढरेपणा असा आहे. तर हवारीयांस हवारी यासाठीं ह्मणतात कीं त्यांच्यांत कित्येक परीट होते; अगर यासाठीं कीं त्यांनीं हजरत ईसा यांजपाशीं व इतर लोकांनीं त्यांच्यापाशीं बाप्तिस्मा घेतला. हें एक प्रकारचें स्नान आहे व तें अजून खिस्ती बनवितांना दिलें जातें. परंतु खरा बाप्तिस्मा म्हटला म्हणजे स्नान नव्हे तर खरा परमेश्वर म्हणजे

आह्मीं आज्ञाधारक आहों. ५२. ( आणि त्यांनीं परमेश्वराचे हुजुरांत अर्ज केला कीं ) हे आमच्या पालनकर्त्या! इंजील ( पुस्तक ) जें त्वां प्रकटिलें आहेस आह्मीं त्याचा विश्वास धरिला व आह्मीं ( तुझ्या ) पैगंबरा ( ह्मणजे ईसा ) चें अनुकरण पत्करिलें; तर आह्मांलाही ( त्याच्या सत्यतेची ) साक्ष पटविणाऱ्यांत लेखून राख. ५३. आणि यहुद्यांनीं ( ईसाशीं ) डाव केला व परमेश्वरानें ( त्यांच्याशीं ) डाव केला; आणि डाव करणाऱ्यांत परमेश्वर ( सर्वांत ) उत्तम ( डाव करणारा ) होय. ५४. त्याच समयीं परमेश्वरानें ( ईसाला ) सांगितलें कीं हे ईसा? ( जगांत ) तुझ्या राहण्याची मुदत पुरी करून, मी तुला आपल्याकडे वर उचलून घेईन, आणि नास्तिकां(च्या सहवासाचे विटाळा)पासून तुला शुचिर्भूत करीन व ज्या लोकांनीं तुझें अनुकरण केलें आहे त्यांना पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत ( तुझ्या ) नाकारणाऱ्यां ( ह्मणजे यहुद्यां )वर चढ राखीन. नंतर तुह्मां ( सर्वां )स मजकडे परतून येणें आहे; तर ( त्या दिवशीं ) ज्या ज्या गोष्टींत (तुह्मी जगांत) मतभेद करीत होतां त्या त्या संबंधीं मीं तुमच्या दरम्यान फैसला करून टाकीन. ५५. तर ज्यांनीं ह्मणून ( तुझ्या पैगंबरीस ) नाकारिलें त्यांना तर मी इहलोक व परलोक या ( दोहों )त फार सक्त शिक्षा देईन; आणि त्यांचा कोणी मदतगार होणार नाहीं; ( कीं तो त्यांना माझ्या

---

एकच व येशूखिस्त हा त्याचा प्रेषित आहे असें मनोभावानें ओळखणें हें होय; व यांतच सर्व कालीन जीवन होय (पाहा यौहान्न अध्याय १७:३) पण हें जीवन कल्पित त्रिमूर्ती मानण्यानें प्राप्त होणें शक्य नव्हे.

( १ ) डाव ज्याचा मजकूर या वाक्यांत आहे तो हा कीं यहुद्यांनीं एकाएकीं हजरत ईसा यांस पकडलें व अदावतीनें त्यांना सुळावर चढविण्याचा बेत केला. हा यहुद्यांचा डाव होता. ईश्वरीडाव हा कीं हजरत ईसा नव्हे पण त्यांच्याच शकलेचा एक इसम जो खरोखर हजरत येशूचा घात करण्यासाठीं निघाला होता व हजरत येशूच्या तोंडावळ्या सारखाच त्याचा तोंडावळा परमेश्वरानें केला होता तो सुळीं दिला गेला, हजरत ईसा हे सुरक्षित आकाशांत वर घेतले गेले.

हातून वांचवील ) ५६. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं तर परमेश्वर त्यांना त्यांचीं ( पुण्य ) फळें पुरीं पुरीं देईल. आणि परमेश्वर आज्ञाभंजक लोकांस पसंत करित नाहीं. ५७. (हे पैगंबरा!) हीं जीं आह्मीं तुला वाचून वाचून ऐकवितों तीं महावाक्यें असून ( प्रमित व ) तंतोतंत उल्लेख होय, ५८. परमेश्वरापाशीं जसा आदम तसा ईसा; कीं ( परमेश्वरानें ) मातींतून आदम ( चे पुतळ्या ) ला बनवून, त्याला हुकूम दिला कीं ( आदम ) बन व तो (आदम) बनून गेला. ५९. (हे पैगंबरा! ही होय) सत्य ( गोष्ट कीं ती तुला) तुझ्या पालनकर्त्याकडून (निवेदिली जाते); तर कोठें तूंही शंकितांपैकीं न होऊन जावेंस!, ६०. मग जेव्हां तुला (ईसाची) हकीकत माहीत होऊन चुकली त्यानंतरही तुझ्याशीं त्याच्या संबंधी कोणी वितंडवाद करूं लागेल, तर (असल्या लोकांस) सांग कीं (बरें तर मैदानांत) या; (इकडे) आम्हीं आपल्या मुलांना बोलावूं व (तिकडे) तुम्हीं आपल्या मुलांना (बोलवा), आणि (तशाच) आम्हीं आपल्या मुलींस (बोलावूं) व तुम्हीं आपल्या मुलींस (बोलवा), आणि आम्हीं आपल्यालाही (सामील करूं) व तुम्हींही आपल्याला (सामील करा); नंतर

---

( १ ) या दृष्टांताद्वारें ख्रिस्ती व यहुदी या दोघांचीही कानउघाडणी करण्याचा उद्देश दिसतो. ख्रिस्त्यांची अशी कीं जर ईसा ह्मणजे येशू यांचें बापावांचून जन्मणें हें त्यांच्या परमेश्वर किंवा परमेश्वराचा पुत्र होण्यास प्रमाणभूत आहे; असें ते समजतात; तर आदमला आईबाप हे दोन्ही नव्हते त्यांना प्राधान्येंकरून परमेश्वर किंवा परमेश्वराचा पुत्र व्हावयास पाहिजे! पण जर हजरत आदमला परमेश्वर किंवा परमेश्वराचा पुत्र म्हणतां येत नाहीं तर येशूख्रिस्ताला परमेश्वर किंवा परमेश्वराचा पुत्र म्हणजे अगदींच गैर आहे एवढेंच नव्हे तर ही ईश्वरनिंदा आहे; आणि ही गोष्ट सर्वसंमत आहे कीं ईश्वरनिंदा करून स्वर्गप्राप्ती व त्याची कृपा संपादणें हें वेडगळपणाचें होय. आणि यहुद्यांस हें सांगणें मंजूर आहे कीं ज्या परमेश्वरानें आदमला मातींतून बापावांचून निर्मिलें, त्यानें येशूला बापावांचून निर्माण केलें यांत नवल तें काय! तर मग ईसा वा येशू यांच्या जन्मासंबंधीं तुमचा विपरीत ग्रह कां असावा? ह्याप्रमाणें हजरत मोहंमद पैगंबर हे हजरत येशूचे खरे कैवारी आहेत. (पाहा योहान्न अ. १६:८)

आम्हीं (सर्व मिळून परमेश्वरापुढें रडून) गाऱ्हाणें करूं व मिथ्यारोप करणाऱ्यांवर परमेश्वराचा शाप घालूं. ६१. (हे पैगंबरा!) हा (जो आम्हीं सांगितला) तोच निःसंशय खराखुरा वृत्तांत होय. आणि परमेश्वरावांचून अन्य कोणी उपास्य नाहीं. आणि निःसंशय परमेश्वर, तोच (सर्वांत) प्रबळ (व) युक्तिवान् होय. ६२. यावरही जर (हे लोक) बदलून पडतील, तर परमेश्वर, फंदफितुर माजविणाऱ्यांस खूप जाणून आहे, (व तो त्यांना पाहून घेईल.) ६३. (हे पैगंबरा! तूं त्यांना) सांग कीं अहो ग्रंथधारी लोकांनों! या, अशा एका गोष्टीकडे (वळा) कीं जी आमच्या व तुमच्या दरम्यान समसमान (मानिली जात) आहे; कीं परमेश्वरावांचून आपण कोणाचीच भक्ति करूं नये व त्याचा कोणालाही सरकतदार ठरवूं नये, आणि परमेश्वराखेरीज आमच्यांतून कोणी, कोणालाही (आपला) मालक समजूं नये. मग जर ते (असल्या सरळ व खऱ्या गोष्टीस मानण्यापासून) तोंड मुरडतील, तर (मुसलमानांनों! तुम्ही या लोकांस) सांगून द्या कीं तुम्हीं या गोष्टीचे साक्षी असा कीं आम्हीं

---

(१) हा एक वृत्तांत हजरत पैगंबर साहेबांचे वेळेचा होय, कीं नजरान येथील खिस्तीलोक त्यांच्या सेवेंत हजर झाले. पैगंबर साहेबांनीं त्यांचें येथपर्यंत स्वागत केलें कीं त्यांना खास आपल्या मशीदींत उतारा दिला व तेथें ते आपल्या संप्रदायाप्रमाणें भक्तिही करीत होते. पैगंबर साहेबांनीं त्यांना आदमचा दृष्टांत देऊन पुष्कळ समजाविलें कीं येशू खिस्त यांस परमेश्वर व परमेश्वराचा पुत्र म्हणण्यापासून पराङ्मुख व्हा. त्यांनीं एकही ऐकिलें नाहीं. अखेर पैगंबर साहेबांनीं त्यांच्याशीं आणाशपथा करून परमेश्वरापुढें गाऱ्हाणें करण्याचा संकेत केला. याला शास्त्रीय परिभाषेंत 'मुबाहला' म्हणतात. तेंव्हां पैगंबर साहेब, आपल्या कन्या श्रीमती फातमाबाई व दोन्हीं नातू हसन व हुसेन व आपले चुलत भाऊ व जावई हजरत अली यांस बरोबर घेऊन आणाशपथा करण्यास्तव बाहेर निघून आले. परंतु नजरानचे खिस्ती पळून गेले, आणि पैगंबरांचे विरुद्ध जर त्यांनीं आणाशपथा केल्या असत्या तर ज्या दुष्परिणामास ते भीत होते त्याची गोडी त्यांनीं प्रत्यक्ष चाखली असती.

तर (एकाच परमेश्वरास) मानितों. ६४. अहो ग्रंथधारी लोकांनों! इब्राहीमाचे संबंधांत तुह्मीं कां झगडतां (कीं तो यहुदी होता का ख्रिस्ती )? आणि तौरात व इंजील (ज्यांच्यापासून यहुदी व ख्रिस्ती यांचा मूलारंभ आहे तीं) तर त्याच्या मागून प्रकट झालीं आहेत. तर कां तुह्मीं (इतकी गोष्टही) समजत नाहीं ? ६५. पाहा! हो! तुह्मीं लोकांनीं अशा गोष्टीसंबंधीं झगडा केला कीं ज्या विषयीं तुह्मांस कांहीं ( ना कांहीं खरें खोटें ) ज्ञान होतें, ( तर असो; ही एक वेगळी गोष्ट होती.) पण ज्या संबंधीं तुह्मांस ( मुळापासूनच कांहींही) ज्ञान नाहीं त्याविषयीं तुह्मीं कां ह्मणून वाटाघाट करितां? आणि परमेश्वर जाणतो व तुह्मी नाहीं जाणत. ६६. इब्राहीम ना यहुदी होता व ना ख्रिस्ती; किंबहुना तो (आमचा) एकनिष्ठ व आज्ञाधारक (सेवक) होता; व तो मूर्तीपूजकांपैकींही नव्हता. ६७. अर्थातच ज्या लोकांनीं इब्राहीमाचें अनुकरण केलें ते व हा (कलियुगी)[१] पैगंबर व ज्यांनीं (त्याचा) विश्वास धरिला ते (मुसलमान), हे तर इब्राहीमाच्या विशिष्ट नात्याचे बडे हक्कदार होत. आणि परमेश्वर तर मुसलमानांचा पुरस्कर्ता[२] होय. ६८.

---

( १ ) हजरत मोहंमद साहेब हे या कलियुगांत झाले व त्यांच्या मागून कोठेंही कोणीच पैगंबर प्रगट झाला नाहीं व अखेरपर्यंत कोणी होणारही नाहीं. ह्मणून हेच कलियुगी पैगंबर ठरतात. आणि कांहीं थिऑसोफिस्टप्रभृती लोक अवतार विषयक ज्या कंड्या पिकवितात त्या, त्यांनीं ह्या कलीयुगाच्या पैगंबराविषयीं माहिती मिळविली असती, तर त्यांस आडरानांत जाऊं न देतां, सन्मार्गदर्शक झाल्या असत्या. कारण, तो शेवटला अवतार हाच होय असें स्पष्ट दिसून आलें असतें. या पैगंबरा पूर्वीं जे जे वशिष्ठ ऋषी, प्रवक्ते व पैगंबर होऊन गेले आहेत ते परमेश्वराचेच हुकमाच्या आधीन होते; ह्मणून ते शिरसावंद्य होत असें मानण्यास याच पैगंबरानीं शिकविलें, व बारीक नजरेनें पाहतां हेच थिऑसोफिचेही स्वामी व पिता होत, हें त्यांच्या इतिहासज्ञानास मान्य असलेच पाहिजे.

( २ ) मुसलमान लोक, परमेश्वरानें जो धर्म ह्मणजे इस्लाम हजरत इब्राहीम यांस प्रगट केला व जो आमचे स्वामी व प्रभु मोश्या, येशू व

(मुसलमानांनों!) ग्रंथधारी लोकांतली एक मंडळी तर असें आतुर्तेनें इच्छिते कीं कसेंही करून त्यांनीं तुह्मांस बहकवून सोडावें; व वास्तविक पाहूं जातां, ते (आपल्या युक्त्यांनीं तुह्मांला नव्हे तर) खुद्द आपणासच बहकवितात. आणि त्यांना (ही गोष्ट) कळून येत नाहीं. ६९. अहो ग्रंथधारी लोकांनों! तुह्मीं परमेश्वराचे महावाक्यांस कां ह्मणून नाकारितां? व खरें पाहूं जातां, तुमच्या मनास (त्यांची) साक्षही पटते. ७०. अहो ग्रंथधारी लोकांनों! तुह्मीं सत्यास असत्याचें आवरण कां घालतां व सत्य कां लपवितां? व वास्तविक पाहतां तुह्मीं (वस्तुस्थितीशीं) वाकब आहां. ७१. आणि ग्रंथधारी लोकांतली एक मंडळी (आपल्या लोकांस समजावून) सांगते कीं मुसलमानांस जें (पुस्तक) प्रकट झालें आहे त्यावर दिवसाचे आरंभी विश्वास ठेवा, व दिवसाचे अखेर (त्यास) नाकारीत जा; कीं कदाचित् (या युक्तिनें) मुसलमान (ह्या नव्या धर्मांकडून) मागें हटतील. ७२. आणि जो तुमच्या धर्माचें अनुकरण करील त्याच्या शिवाय अन्य कोणा(च्या गोष्टी)चा विश्वास करूं नका. (हे पैगंबरा! तूं त्यांना) सांग कीं (अस्सल) सन्मार्ग (ह्मटला ह्मणजे तो) परमेश्वराचाच सन्मार्ग होय. (आणि तो ग्रंथधारी लोकांशिवाय आणखी कोणाचा नसावा हें अवश्यक नाहीं; आणखी आपल्या लोकांना ते हें ही समजावितात कीं बरें, कोठें असें होऊं शकतें) कीं जसा

---

मोहमद यांनीं आपापल्यावेळीं उपदेशिला त्यास शिरसावंद्य जाणून अनुसरतात व या प्रेषितांस परमेश्वराचें स्वरूप न देतां त्यांस त्याचे सेवक व पैगंबर समजतात; आणि इस्लाम ह्मणजे परमेश्वराच्या मर्जीच्या व हुकमाच्या आधीन होणें याचें अक्षरशः अनुकरण करतात, व परमेश्वर सर्वशक्तिमान्, सर्वसाक्षी, व सर्वज्ञानी असतांना त्याच्याशिवाय अन्य कोणीही उपासनेस पात्र जाणीत नाहींत ह्मणून ते परमेश्वराचा पक्ष करतात व तो त्यांचा पुरस्कार करतो.

(१) म्हणजे आम्हांला डळमळीत पाहून ते आपणही डळमळीत होतील.

(उत्कृष्ट धर्म) तुह्मां (ग्रंथधारी लोकां)स दिला गेला आहे तसाच (धर्म) आणखी कोणाला दिला जाईल? अगर ते परमेश्वरापाशीं (जाऊन) तुह्मांशीं झगडतील (व वरचढ राहतील)? (हे पैगंबरा! त्यांना) सांग कीं श्रेष्ठता तर परमेश्वराचेच हातीं आहे, तो ज्याला इच्छील त्याला ती देईल. आणि परमेश्वर अति उदार व सर्वज्ञानी[१] होय. ७३. तो ज्याची इच्छील त्याची आपल्या दयेसाठीं खास निवड करील. आणि परमेश्वर महान् कृपानिधि होय. ७४. आणि ग्रंथधारी लोकांत कोणी असा आहे कीं जर त्याच्यापाशीं रोकड नाण्यांचा ढिगही अमानत ठेवून देशील, तर तो (पाहीजे तेव्हां) तुझ्या हवालीं करील. आणि त्यांच्यांत कोणी आहे कीं (जास्त नव्हे,) एक (फार लहानशी) अश्रफीच त्याच्यापाशीं अमानत ठेवून देशील, तर तो तुला यावाचून ती परत करणार नाहीं कीं तूं सतत (निकड लावून) त्याच्या (शिरा)वर उभा राहशील. (ह्या लोकांत) हा (कुव्यवहार) यासाठीं (आला) कीं ते असें प्रतिपादन करितात कीं (अरबांचे) निरक्षरां(चा हक्क मारण्यां)त आह्मांस पृच्छा होणार नाहीं. आणि ते जाणुनबुजून परमेश्वराविरुद्ध खोटें बोलतात. ७५. होय! यांस पृच्छा होईलच होईल; (कारण) जो मनुष्य आपलें वचन पूर्ण करील व (कुव्यवहाराविषयीं) जपेल, तर परमेश्वर (कुव्यवहाराविषयीं) जपणाऱ्यांस दोस्त राखतो; (व नव्हे कीं कुव्यवहार करणाऱ्यांस!) ७६. जे लोक, परमेश्वराशीं (केलेल्या आपल्या) वचनाचे ऐवजीं व (तसेंच) आपल्या आणाशपथांचे ऐवजीं क्षुल्लकसा (ऐहिक) मोबदला घेतात (व आपल्या वचनाचा व शपथेचा मान राखीत नाहींत) हेच लोक होत कीं ज्यांचा परलोकीं कांहीं वांटा नाहीं; आणि पुनरुत्थानाचे दिवशीं परमेश्वर त्यांच्याशीं भाषणही तर करणार नाहीं व त्यांच्याकडे (नजर भरून) पाहणार सुद्धां नाहीं; आणि तो त्यांना (पापांचे विटाळांतून) शुचिर्भूत करणार नाहीं, व त्यांच्यासाठीं दुःखदायक शिक्षा होय. ७७. आणि या (ग्रंथधारी लोकां)तच असा एक पक्ष

---

(१) म्हणजे परमेश्वर अतोनात औदार्यशील असून तो सर्व कांहीं जाणतो व पात्रापात्रांस खूप ओळखून आहे.

होय कीं ते पुस्तक (म्हणजे तौरात) वाचतांना आपल्या जिभा मुरडीत (तुरडीत व कांहींचें कांहींच वाचीत) असतात; ह्यासाठीं कीं तुम्हीं समजावें कीं (जें कांहीं ते वाचितात) तें (दिव्य) पुस्तकांतूनच होय. व वास्तविक पाहतां, तें (दिव्य) पुस्तकांतून नव्हें. आणि ते म्हणतात कीं हें (जें आम्हीं वाचीत आहों तें) परमेश्वराकडून (प्रकटिलेलें) आहे; व वास्तविक पाहतां, तें परमेश्वराकडून (प्रकटिलेलें) नव्हे. आणि ते जाणून बुजून परमेश्वराविरुद्ध खोटें बोलतात. ७८. कोणाही मनुष्याला तर (ही गोष्ट) शोभतच नाहीं कीं परमेश्वरानें त्याला (आपलें) पुस्तक व अक्कल व पैगंबरी हीं अर्पण करावींत, नंतर त्यानें लोकांस सांगूं लागावें कीं परमेश्वराला सोडून माझे सेवक बनून राहा! किंबहुना (तो तर हेंच म्हणेल कीं) तुम्हीं ईश्वरभक्त होऊन राहा; यासाठीं कीं तुम्हीं लोक (दुसऱ्यांना दिव्य) पुस्तक शिकवीत राहतां व यासाठीं कीं तुम्हीं (स्वतःही) वाचीत राहतां. ७९. तो तर तुम्हांस (केव्हांही) असें सांगणार नाहीं कीं दूतांस व प्रेषितांस ईश्वर माना. बरें (कोठें असें होऊं शकतें कीं) तुम्हीं इस्लाम स्वीकारून चुकलां आहां व तो त्यानंतर तुम्हांस नास्तिक व्हावयास सांगील? ८०. आणि (हे पैगंबरा! तूं त्यांना तो वेळ आठवून दे कीं) जेव्हां परमेश्वरानें पैगंबरांचें पक्कें वचन घेतलें कीं मी तुम्हांस (आपलें) पुस्तक व अक्कल देईन, व नंतर कोणी पैगंबर तुम्हांपाशीं येईल व तो जें (पुस्तक) तुम्हांपाशीं आहे त्याची सत्यताही दर्शवील; तर पाहा! तुम्हीं जरूर त्याच्यावर विश्वास ठेवावा व जरूर त्याची मदत करावी.

---

(१) दुर्दैवी यहुदी लोक हजरत पैगंबर साहेबांवर असा दोषारोप करीत होते कीं हा गृहस्थ जरी परमेश्वराकडे बोलावितो तरी पण त्याचा मूळ हेतु असा आहे कीं लोकांकडून आपली भक्ति करवावी; नाहींपेक्षां आम्हीं तर त्याच्या आगमनाच्या पूर्वीपासूनच ईश्वरभक्ति करीत आलों आहों. या व पुढील वाक्यांत या दोषारोपाचें चांगलें खंडन करण्यांत आलें आहे. कारण, त्यांची ईश्वरभक्ति नांवाची मात्र होती; ते दूतांस व प्रेषितांसही ईश्वर मानीत होते. अर्थात ते अनेकेश्वरमतवादी होते.

**(परमेश्वरानें) म्हटलें, कां तुम्हीं इकरार केला; आणि या गोष्टीवर मी जें तुमचें वचन घेतलें आहे तें तुम्हीं मान्य केलें? (पैगंबरांनीं) अर्ज केला कीं (होय!) आम्हीं इकरार करितों. (परमेश्वरानें) फर्माविलें, बरें तर (आजचे इकराराचे) तुम्हीं साक्षी राहा, व तुम्हां संगती साक्षींतून (एक साक्षी) मीहि आहें. ८१. तर (गोष्टी) इतक्या (पक्या झाल्या) नंतर जो कोणी (इकराराहून) फिरेल, तर तेच लोक आज्ञाभंजक होत. ८२. कां हे लोक परमेश्वराचे धर्मा-शिवाय (आणखी) कोणा धर्माचे शोधांत आहेत? व वास्तविक पाहूं जातां, जे (दूत) आकाशांत आहेत व जे (लोक) पृथ्वींत आहेत ते (सर्व) आपखुषीनें (म्हणा) वा बळजबरीनें (म्हणा) त्याच्याच आज्ञाधीन होत. आणि त्याच्याचकडे सर्वांस परत जाणें होय. ८३.**

---

(१) परमेश्वरानें जेव्हां सर्व मानवांस सृष्टि निर्माणकरण्यापूर्वीं विचारिलें कीं 'कां मी तुमचा पालनकर्ता नव्हें? तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, 'होय.' तर जसें हें उत्तर दरेक मनुष्याच्या मनांत ठसलेलें आहे तसेंच पैगंबराविषयींचें वचनही होय. कारण सद्धर्म म्हटला म्हणजे नेहमीं एकच. शास्त्रांत, लोकांच्या गरजा व प्रयोजन व देशकालवर्तमान यांस अनुसरून कांहीं कांहीं भेद होतच आला आहे.

(२) भावार्थ हा कीं सर्व सृष्टि परमेश्वरानें बनविली व निर्माण केली आहे. परमेश्वराला जसा हा संसार चालविणेंचा होता तसा तो चालत आहे व नित्य चालेल. दगडाला असें बनविलें आहे कीं तो आपल्या जागेवरून आपोआप हालत नाहीं; वर फेंकला जाईल तर पुन्हां जमिनीवरच येऊन पडतो. पाणी, खालाट असेल तिकडेच वाहतें; अमुक एका उंचीहून जास्त चढूं शकत नाहीं. एक नियम कोंबडीच्या अंडीपिलीं देण्याचा आहे; तसाच एक नियम मानवांच्या वंशवृद्धीचा आहे. ह्याच कायद्याचें नांव निसर्ग किंवा सृष्टिक्रम होय. मनुष्याच्या नैसर्गिक स्वभावांत एक हाही गुण आहे कीं परमेश्वर आहे असें तो मानितो व तो एकच आहे असेंही मानितो; आणि याचेंच नांव इस्लाम होय. ज्याप्रमाणें एखादी वस्तु आपल्या नैसर्गिक नियमांचें

**(हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (आमचा धर्म तर हा होय कीं) आह्मीं परमेश्वरावर विश्वास ठेविला आणि जें (पुस्तक) आह्मांस प्रगट झालें आहे त्यावर, व जे (शास्त्रलेख) इब्राहीम व इस्माईल व इस्हाक व याकूब व याकूबचीं कुलें यांस प्रगट झाले त्यांजवर, आणि मूसा व ईसा व (इतर) पैगंबरांना जीं पुस्तकें त्यांच्या पालनकर्त्याकडून दिलीं गेलीं त्यांजवर, (विश्वास ठेविला). आह्मीं तर या (पैगंबरां)तून कोणा एकांतही भेद ठेवीत नाहीं; व आह्मीं त्या (एका परमेश्वरा)लाच मानितों. ८४. आणि जो कोणी इस्लामाखेरीज[1] (आणखी) एखादा धर्म शोधूं पाहील, तर (परमेश्वरापाशीं) त्याचा तो धर्म केव्हांही मान्य केला जाणार नाहीं. व तो परलोकीं हानी भोगणारांपैकीं होईल. ८५. परमेश्वर अशा लोकांस सन्मार्गाची बुद्धि कशी देणार कीं जे (तौरातचे भविष्याप्रमाणें कलियुगाच्या पैगंबरावर) विश्वास ठेविल्यानंतर (त्यास) नाकारूं लागले? आणि त्यांना या गोष्टीची साक्षही पटली होती कीं (कलियुगाचा) पैगंबर (याचें आगमन) सत्य आहे व त्यांचेपाशीं (याचीं) स्पष्ट प्रमाणेंही येऊन चुकलीं होतीं. आणि परमेश्वर (असल्या) हटवादी[2] लोकांस सन्मार्गाची बुद्धि देत नसतो. ८६.**

---

उल्लंघन करीत नाहीं त्याच प्रमाणें मनुष्यही त्याच नियमाबरहुकूम आपल्या एकाच परमेश्वराचे अस्तित्वास नाकारूं शकत नाहीं. ह्मणजे मनुष्य होणें व एकाच परमेश्वराला मानणें हा त्याचा सृष्टिजन्य स्वभावच होय. आतां कांहीं गैर समज उत्पन्न होतात, ह्मणून ते दूर करण्यासाठीं पैगंबर आले व दिव्य पुस्तकें प्रकट झालीं.

(१) कारण, इस्लामम्हणजे ईश्वराज्ञापालन; ईश्वरी आज्ञा पाळल्या शिवाय कोणतेंच मानवीकल्पनासृष्टींतून निघालेलें धर्माचरण ईश्वरी होऊं शकत नाहीं. म्हणूनच तें परमेश्वरास मान्य नाहीं.

(२) यहुद्यांची परिस्थिति अशी होती कीं ते कलियुगाचे पैगंबरां विषयींचें भविष्य तौरातमध्यें पाहत होते व त्यांच्या जाहीर होण्याची वाट पाहत होते; येथपर्यंत कीं मूर्तीपूजक अरबांचे विरुद्ध आपला हा

हे (होत परमेश्वरापासून दुरावलेले लोक, व) त्यांची शिक्षा ही होय कीं त्यांना परमेश्वराचा व दुतांचा व (जगभर) लोकांचा, सर्वांचा शाप आहे. ८७. त्या (शापां)तच ते सदासर्वदा राहतील. (परलोकीं) त्यांची शिक्षा हलकी केली जाणार नाहीं व त्यांना अवकाशहि दिला जाणार नाहीं. ८८. परंतु ज्या लोकांनीं असें केल्यावर पश्चात्ताप केला व (आपली स्थिति) सुधारली, तर परमेश्वर अर्थात क्षमाशील व दयाळू होय. ८९. जे लोक विश्वास धरल्यानंतर अविश्वासी झाले व मग त्यांचा अविश्वास वाढतच गेला, तर अशांचा पश्चात्ताप केव्हांच मान्य होणार नाहीं. आणि हेच लोक (होत कीं जे पराकाष्टेचे) बहकलेले आहेत. ९०. ज्या लोकांनीं (इस्लामास) नाकारिलें व (नाकारीत) नाकारीतच मरून गेले, त्यांच्यांतून कोणी एखादा मनुष्य पृथ्वी(चा गोल) भरूनही सोनें मोबदल्यांत देऊं करील तर तें मुळींच कबूल केलें जाणार नाहीं. हेच लोक होत कीं ज्यांना (परत्रीं) दुःखदायक शिक्षा होईल; आणि (त्यावेळीं) त्यांचा कोणीही मदतगार होणार नाहीं. ९१.

---

आशिर्वाद प्रमाणापरी पुढें करीत असत, परंतु कलियुगाचे पैगंबर ज्यांची ते वाट पाहत होते, ते जेव्हां प्रगट झाले तेव्हां द्वेषानें व आळ्यतेनें ते त्यांचा विरोध करूं लागले. ह्यांत यहुद्यांच्या खोडसाळपणाकडे इषारा आहेसा वाटतो.

# पवित्र कुराण

## भाग चवथा.

### सूरतु-आले-इमरान (पुढें चालू).

(लोकांनों!) तुह्मांस ज्या (वस्तु) प्रिय आहेत त्यांतून (परमेश्वराचे मार्गांत) तुह्मी जोंपर्यंत खर्च न कराल तोंपर्यंत तुह्मीं पुण्य (पद) कधींच प्राप्त करूं शकणार नाहींत. आणि जी कोणचीही वस्तु खर्च कराल, तीस परमेश्वर जाणतो. ९२. जी वस्तु याकूबनें आपल्यास निषिद्ध केली होती ती खेरीज करून, तौरात प्रकट होण्याच्यापूर्वीं खाण्याचे सर्व पदार्थ बनी-इस्राएलांकरतां हलाल होते. (हे पैगंबरा! या यहुद्यांस) सांग कीं जर तुह्मीं (आपल्या दाव्यांत) खरे अहां तर तौरात घेऊन या व तें (माझ्यापुढें) वाचा. ९३. मग ह्या (प्रामाण्या) नंतरही जो कोणी परमेश्वरावर खोटें (खोटें) कुभांड रचील, तर (समजून असा कीं) असलेच लोक हटवादी होत. ९४. (हे पैगंबरा! या यहुद्यांस) सांग कीं परमेश्वरानें सत्य सांगितलें, तर (आतां त्याच्या आदेशानुरूप) इब्राहीमाच्या धर्मपद्धतीचें अनुकरण करा, कीं तो एका (परमेश्वरा)चाच होऊन राहिला होता; आणि तो मूर्तीपूजकांपैकीं नव्हता. ९५.

---

(१) हजरत पैगंबर साहेब व मुसलमान यांजवर तर यहुद्यांकडून आक्षेपांचा व ताशेऱ्यांचा भडिमार होतच होता. पण पैगंबर साहेब या गोष्टीचा अभिमान बाळगीत होते कीं आह्मीं मुसलमान हजरत इब्राहीमाच्या धर्मपद्धतीचें अनुकरण करितों. आणि ज्याअर्थीं यहुदी व खिस्ती हे दोन्ही पक्ष हजरत इब्राहीमाविषयीं आदरबुद्धि बाळगीत होते, व अरबचे मूर्तीपूजक त्यांच्या वंशांत होते, त्याअर्थीं इब्राहीमाचे धर्माचें अनुकरण करणें हें त्यांच्या विरुद्ध मोठें सकृत प्रमाण होतें. हे लोक इब्राहीमासंबंधीं तर कांहीं आक्षेप घेऊं शकत नव्हते. परंतु ते, पैगंबर

**लोकां(च्या भक्ति) करितां जें पहिलें घर स्थापिलें गेलें तें हें जें मक्केंत आहे तेंच होय; तें प्रासादिक असून सकल जगांचे लोकांसाठीं सन्मार्ग दर्शकही होय. ९६. यांत (श्रेष्ठत्वाच्या) बऱ्याच खुल्या खुल्या निशाण्या होत; (त्यांपैकींच) इब्राहीमाच्या उभें राहण्याची जागाहि होय. आणि जो या (घरां)त दाखल झाला, तो निर्भय**

---

साहेबांवर दोषारोप करीत होते कीं इब्राहीमाचें अनुकरण करण्याचा दावा ह्या त्यांच्या बाताच बाता होत. येथें यहुद्यांचे दोन आक्षेप नमूद करण्यांत आले आहेत. एक हा कीं यहुदी इब्राहीमाचे वंश आहेत ही तर सर्वमान्य गोष्ट होय; आणि यहुद्यांच्या धर्मांत उंटाचें मास वर्ज्य व मुसलमानांस उंटाचे मांसाची मुभा; तेव्हां ते इब्राहीमाचे अनुयायी कसले? पण हा आक्षेप केवळ अनाठायीं होता. यहुदी हे इब्राहीमाचे वंश होत ह्मणून ते त्यांचे अनुयायीही आहेत असें सिद्ध होत नाहीं. राहिलें, उंटाचें मांस, तें यहुद्यांस निषिद्ध झालें; पण त्याच्या निषेधाचें आरंभभूत कारण असें कीं इब्राहीमाचे काळांत उंट हलाल होतें. त्यांच्यानंतर **हजरत याकूब** ज्यांचें दुसरें नांव इस्राएल आहे ते कोणाएका रोगानें पीडित होते व त्यांतून बरें होण्यासाठीं त्यांनीं उंटाचें मांस वर्ज करण्याचा नवस केला होता. सारांश बरें झाल्यावर त्यांस उंटाचें मांस जें अति प्रिय होतें तें त्यांनीं आपोआप वर्जिलें. **हजरत याकूब**ला पाहून त्यांच्या वंशानेंही तें वर्ज केलें. परंतु उंटाचें मांस ईश्वरनिषिद्ध नव्हतें. नंतर पुष्कळ काळांतरानें हजरत **मूसा**ला जेव्हां **तौरात** पुस्तक प्रकट झालें तेव्हां उंटाचें मांस निषिद्ध झालें. यांत हेतु हा होता कीं यहुद्यांस त्यांच्या खोडसाळपणाबद्दल शिक्षा व्हावी व त्यांना आहाराची चणचण भासावी. हें यहुद्यांच्या आक्षेपाचें समर्पक उत्तर झालें.

(१) मागील टिपेंत दर्शविल्याप्रमाणें यहुद्यांचा दुसरा आक्षेप हा होता कीं मुसलमानांनीं **काबागृहाला, किब्ला** कां बनविला? आणि वास्तविक पाहूं जातां, सर्व प्राचीन पैगंबरांचा **किब्ला** यरूशलेम होता. याचें उत्तर हें दिलें कीं **काबागृह** इब्राहीमानें स्थापिलें व त्यांचो

होऊन गेला. आणि लोकांचें कर्तव्य होय कीं परमेश्वराप्रित्यर्थ (काबा-) गृहाची हज्ज-यात्रा (त्यांनीं करावी म्हणजे) ज्याला त्यापर्यंत पोहोंचण्याचें सामर्थ्य[१] असेल त्यानेंच; व जो (सामर्थ्य ठेवूनही त्या देणगी-प्रत,) कृतघ्नता दर्शवील (व हज्जेस न जाईल), तर परमेश्वर सकल जगांचे लोकांकडून निरपेक्ष होय. ९७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं अहो ग्रंथधारी लोकांनो! परमेश्वराचे हुकमास कां म्हणून नाकारितां? आणि जें कांहींही तुह्मीं करितां तें परमेश्वर साक्षात् निरिक्षित आहे. ९८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं अहो ग्रंथधारी लोकांनों! तुह्मीं जाणतां बुजतां, परमेश्वराच्या मार्गांत (हकनाक) वांक काढून काढून विश्वासणाऱ्यांना त्यापासून कां अडकवितां? आणि जें कांहींही तुह्मीं करितां, परमेश्वर त्याशीं अजाण नाहीं. ९९. अहो मुसलमानांनों! जर तुह्मीं ग्रंथधारी लोकांच्या कोणा पक्षाचाही कह्या मानाल, तर ते तुमच्या विश्वासा-नंतर तुह्मांस पुन्हां नास्तिक करून सोडतील. १००. आणि परमेश्वराचीं महावाक्यें तुम्हांस वाचून वाचून ऐकविलीं जातात व त्याचा पैगंबर (मोहंमद) तुमच्यांत (हजर) आहे, असें असतांना, तुम्हीं नास्तिक तरी कसें होऊं लागणार? आणि जो मनुष्य परमेश्वरा(चे धर्मा)ला दृढपणें धरून राहील, तर तो खचितच सरळ मार्गास लागून गेला. १०१. अहो मुसलमानांनों! जसा परमेश्वराला भिण्याचा हक्क आहे तसें त्याला भ्या; आणि तुम्हीं (मराल तेव्हां पक्के) मुसलमान राहूनच मरा. १०२. आणि तुम्हीं सर्व

---

स्थापना यरूशलेमहूनही पूर्वींची होय. त्याचें श्रेष्ठत्व व इब्राहीमाकडून त्याची स्थापना यांचे पुष्कळ पुरावे आहेत; त्यांपैकींच ज्या दगडावर उभें राहून इब्राहीमानें काबागृह बांधिलें तो दगड अद्यापि तसाच तेथें आहे. इब्राही-मानें प्रार्थना केली होती कीं काबागृहांत शांति असो व तेथें सर्व तऱ्हेचें अभय प्राप्त होवो तें तेथें सांप्रतही दिसून येतें.

(१) पोहोंचण्याचें सामर्थ्य ह्मणजे वाटेचा खर्च, स्वारी व वाटेंत शांतता व अभय हीं होत.

(मिळून) परमेश्वराचे (धर्माचे) दोरीस दृढपणें धरून राहा व एकमेकापासून वेगळे होऊं नका. आणि तुम्हांवर (असलेला) परमेश्वराचा (तो) उपकार स्मरा; कीं जेव्हां तुम्हीं (एकमेकाचे) शत्रु होतां, तेव्हां परमेश्वरानें तुमच्या मनांत परस्पर प्रीति उत्पन्न केली, व तुम्हीं त्याच्या उपकारामुळें भाऊभाऊ[1] होऊन गेलां. आणि तुम्हीं लोक अग्निच्या खंदका (म्हणजे नरका)च्या किनाऱ्यावर (येऊन लागलां) होतां, तर त्यानें तुम्हांस त्यांतून वांचविलें. अशाच तऱ्हेनें परमेश्वर आपले हुकूम[2] तुम्हांस स्पष्ट करून करून सांगतो कीं कदाचित् तुम्हीं सरळ मार्गावर येऊन जाल. १०३. आणि तुमच्यांत एक अशी जनताही असली पाहिजे कीं जे (लोकांना त्यांच्या) हिताकडे बोलावितील व चांगलीं कामें करावयास सांगतील व दुष्ट कामांची मनाई करतील; आणि (परलोकीं) असलेच लोक (आपल्या मनोरथांत) सफल होतील. १०४. आणि जे लोक (एकमेकांपासून) वेगळे पडले व आपल्यापाशीं स्पष्ट प्रमाणें आल्यानंतर आपसांत मतभेद करूं लागले, त्यांच्यासारखे तुम्हीं बनून जाऊं नका; आणि हेच होत कीं ज्यांना (परलोकीं) मोठी शिक्षा होईल. १०५. ज्या दिवशीं (कित्येक लोकांचीं) तोंडें पांढरीं सफेद होतील व (कित्येकांचीं) काळीं; तर (त्या दिवशीं) ज्यांचीं तोंडें काळीं होतील (त्यांना सांगितलें जाईल) कीं तुम्हींच तर विश्वास धरल्यावर नास्तिक झालां होतांना? तर (आतां) आपल्या नास्तिकपणाबद्दल शिक्षेची गोडी चाखा. १०६. आणि ज्यांचीं तोंडें पांढरीं सफेद होतील ते परमेश्वराच्या दयें

---

(१) हजरत पैगंबर साहेबांच्या आगमनापूर्वी अरबचे लोकांत मोठी यादवी माजलेली असे. सारांश मदिनेचीं दोन घराणीं ज्यांना औस व खजरज म्हणतात त्यांच्यांत कित्येक शतकें युद्ध कायमच होतें. म्हणून इस्लामानें एक नवें मंडळ स्थापिलें व त्याच्या प्रभावानें लोक आपसांतील द्वेष विसरले. याप्रमाणें मुसलमानांत व्यापक स्वरूपाचें विश्वबंधुत्व स्थापन झालें.

(२) आम्हीं येथें आयातचा अर्थ हुकूम असा केला आहे. पण त्याचा अर्थ '(ईश्वर सामर्थ्याच्या) निशाण्या' असाही होऊं शकतो.

(म्हणजे स्वर्गां)त असतील. ते त्यांतच निरंतर राहतील. १०७. (हे पैगंबरा!) हीं परमेश्वराचीं (म्हणजे आमचीं) सत्यपूर्वक महा वाक्यें होत (व) तीं आम्हीं (जिब्रीलाद्वारें) तुला वाचून वाचून ऐकवितों. आणि परमेश्वर सकल जगांच्या लोकांवर (कोणाही तऱ्हेचा) जुलूम करूं इच्छीत नाहीं. १०८. आणि जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वराचेंच होय. आणि (सर्व) कामांची पोहोंच (सरशेवटीं) परमेश्वरापर्यंतच होय. १०९. लोकांच्या (सन्मार्ग दाखविण्या)साठीं जेवढ्या म्हणून जनता निर्माण झाल्या त्यांच्यांत तुम्हीं (मुसलमान) सर्वांत उत्तम आहां, कीं तुम्हीं चांगलीं कामें करावयास सांगतां व दुष्ट कामाची मनाई करितां व परमेश्वरावर विश्वास ठेवितां. आणि जर (ह्याच प्रमाणें) ग्रंथ-धारी लोकही (सारेचे सारेच) विश्वास धरिते तर त्यांच्याठायीं उत्तम होतें; (पण) त्यांच्यांतून कित्येकांनीं विश्वास धरिला व त्यांत बहुतेक आज्ञाभंजक होत. ११०. (मुसलमानांनों! साधारण) इजा देण्याच्या खेरीज, ते कधींच तुम्हांस कोणा तऱ्हेचें (कांहीं मोठें) नुकसान पोहोंचवूं शकणार नाहींत. आणि जर ते तुम्हांशीं लढतील, तर त्यांना तुम्हांपुढें पाठ दाखविणेंच भाग पडेल; नंतर (हेंही समाधान ठेवा कीं) त्यांना (कोठून) मदतही मिळणार नाहीं. १११. जेथें कोठेंहि ते आढळून येतील तेथें क्षुल्लकपणाची छाप त्यांच्यावर बसले-लीच. परंतु परमेश्वराच्या (करारबंधनाच्या) योगानें व (तसेंच) लोकांच्या

---

(१) ह्मणजे जें कांहीं जगांत चाललें आहे त्याची कारणमिमांसा परमेश्वराकडेच जाऊन संपते; आणि प्रत्येक गोष्टीचें आदिकारण तोच होय.

(२) ह्मणजे, परमेश्वराच्या करारबंधनाच्या योगानें आश्रय मिळ-ण्याचा अर्थ हा आहे कीं अखेर हे लोक ग्रंथधारी आहेत ह्मणजे त्यांना परमेश्वराकडून दिव्य पुस्तकें मिळालीं आहेत; तर कोणा परधर्मी मनुष्यानें ते ग्रंथधारी आहेत या दृष्टीनें त्यांना आपल्या आश्रयांत घेतलें व त्यांच्या वाटेस न गेला अगर त्यानें त्यांचा पुरस्कार पत्करला, ह्मणजे अर्थात् त्यांना आश्रय मिळून गेला.

(करारबंधनाच्या) योगानें (कोठें त्यांना आश्रय मिळून गेला, तर गोष्ट दुसरी). आणि ते परमेश्वराचे कोपांत येऊन पडले; व दारिद्र्यही (वेगळेंच) त्यांच्या बोकांडीं बसलेंच आहे. ही ह्याची शिक्षा होय कीं ते परमेश्वराच्या महावाक्यांस नाकारीत होते व (नकारणी शिवाय) पैगंबरांनाही विनाकारण जिवें मारीत होते. ही ह्याची शिक्षा होय कीं त्यांनीं आज्ञाभंग केला व ते मर्यादेचे बाहेर गेले होते. ११२. (तरी देखील हे सारे) सारखेच नव्हत. ग्रंथधारी लोकांपैकीं कांहीं लोकसमुदाय असाही होय कीं ते रात्रीं (नमाजींत) उभे राहून परमेश्वराच्या महा वाक्यांचें पठन करितात व (त्याच्यापुढें) साष्टांग नमस्कार घालतात. ११३. ते परमेश्वरावर व शेवटल्या दिवसावर विश्वास ठेवितात; आणि चांगलीं कामें करावयास सांगतात व दुष्टकामांची मनाई करितात; आणि (स्वतःही) चांगल्या कामांत धांव मारून जातात. आणि हेच पवित्राचरणी लोकांपैकीं होत. ११४. आणि ते कोणाही तऱ्हेचें पुण्य करोत, असें कधींच होणार नाहीं कीं त्यांच्या त्या पुण्याची किंमत न जाणिली जाईल. आणि परमेश्वर (आपल्याला) भिऊन वागणाऱ्यां(च्या स्थिती)शीं खूप वाकब होय. ११५. जे लोक (सत्धर्मास) नाकारितात त्यांची संपत्ति व त्यांची संतति परमेश्वरापुढें कधींच त्यांच्या कांहींही कामा येणार नाहीं. व हेच लोक नरकवासी होत; व ते निरंतर नरकांतच राहतील. ११६. जगाच्या ह्या आयुष्यांत जें कांहींही हे लोक (इस्लामाचे विरोधांत) खर्चवेंच करितात त्याची उपमा, त्या वाऱ्याच्या उपमे सारखी होय कीं त्यांत कडक गारठा होता (व) तो जे लोक (ईश्वराज्ञा भंग करून) आपलीच हानी करून घेत होते त्यांच्या (उभ्या) शेतावर जाऊन लागला व अखेर त्यानें त्या(शेता)चा (मारून) विध्वंस करून टाकिला. परमेश्वरानें त्यांच्यावर कोणाही तऱ्हेचा जुलूम केला नाहीं; किंबहुना ते आपणच आपल्यावर जुलूम करीत होते. ११७. अहो मुसलमानांनों! तुह्मीं आपल्या (लोकां)स सोडून (विरोधी पक्षांतून) कोणालाही जिवींचा मित्र करून घेऊं नका कीं हे लोक तुमची खराबी करण्यास कांहींच चुकणार

नाहींत. तुह्मांस कष्ट पोहोंचावेत असें ते मनापासून इच्छितात. द्वेष तर त्यांच्या तोंडून जाहीर होऊनच चुकला आहे आणि (राग व संताप) जे त्यांच्या उरांत (भरलेले) आहेत ते (त्यापेक्षांही) फार जबर होत. आह्मीं तुह्मांस (हे) दाखले फोड करून सांगिले आहेत. जर तुह्मांस (व्यवहाराची) अक्कल आहे (तर हें तुमच्या उपयोगीं लागेल.) ११८. पाहा हो! तुह्मीं कांहीं असे (सरळ स्वभावाचे) लोक आहां कीं तुह्मी तर त्यांशीं दोस्ती ठेवितां व ते तुह्मांशीं (मुळींच) दोस्ती ठेवीत नाहींत; आणि तुह्मीं परमेश्वराच्या सर्व पुस्तकांवर विश्वास ठेवितां (व ते तुमच्या कुर्आनास नाकारितात;) आणि जेव्हां ते तुमच्याशीं भेटतात तेव्हां ते बोलून दाखवितात कीं आह्मींही विश्वास धरिला आहे. आणि जेव्हां ते एकटे असतात, तेव्हां रागाचे भरांत ते तुह्मांवर (आपलीं) बोटें चावून घेतात. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुह्मी आपल्या रागांतच (जळून) मरा. जें (कपट आमच्याकडून तुमच्या) मनांत आहे तें सर्व परमेश्वराला माहीत आहे. ११९. (मुसलमानांनों!) जर तुह्मांस कांहीं फायदा पोहोंचेल तर तो त्यांना वाईट लागतो; आणि जर तुह्मांस एखादा अपाय पोहोंचेल तर ते त्यानें खुष होतात. आणि जर तुह्मीं (त्यांच्या इजा) सहन कराल व (सूड घेण्यांत अतिरेकाविषयीं) जपाल तर (समाधान ठेवा कीं) त्यांच्या कपटानें तुमचें कांहींही तर बिघडणार नाहीं. (कारण,) जें कांहींही हे करितात, (त्याचें पारिपत्य) परमेश्वराच्या (सामर्थ्याच्या) आटोक्यांत आहे. १२०. आणि (हे पैगंबरा!) एक वेळ तोही होता कीं तूं सकाळींच लवकर आपल्या घराहून चाललास (व) मुसलमानांना लढाईकरितां तळ देऊन बसवूं लागलास. आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्वकांहीं) जाणतो. १२१. हा त्याच वेळेचा वृत्तांत होय कीं तुमच्यांतून दोन टोळ्या हिंमत खचण्याच्या बेतावर होत्या; पण

(१) हा ओहदच्या लढाईचा वृत्तांत होय. हजरत पैगंबर साहेबांचें मत असें होतें कीं बाहेर मैदानांत निघून नास्तिकांशीं लढावें; आणि मदिनेंतील दांभिक अशी सला देत होते कीं आपण शहरांतच राहून

(त्या सांवरून गेल्या, कारण,) परमेश्वर त्यांच्या कुमकेवर होता. आणि मुसलमानांस पाहिजे कीं त्यांनीं परमेश्वरावरच भरंवसा ठेवावा. १२२. आणि (तुम्हां मुसलमानांस धैर्य खचणें काय योग्य होतें?) व वास्तविक पाहतां, बदर(चे लढाई)मध्यें परमेश्वर तुमची मदत करूनच चुकला होता व (त्यावेळीं शत्रूपुढें) तुमची कांहींच हकीकत नव्हती. तर परमेश्वरा(चे खपामर्जी)स भ्या (व भ्याल तर) नवल नव्हे कीं तुम्हीं (त्याचे उपकार स्मरून) कृतज्ञताही प्रदर्शित कराल. १२३. (हे पैगंबरा! त्याच बदरचे लढाईचा तो वृत्तांत आठवून ठेव कीं) जेव्हां तूं मुसलमानांस समजावित होतास कीं तुम्हांला कां इतकें पुरे नाहीं कीं तुमचा पालनकर्ता (आकाशांतून) तीन हजार दूत पाठवून तुमची मदत करील? १२४. किंबहुना, जर तुम्हीं करारीपणानें वर्ताल व (परमेश्वर व पैगंबर यांच्या अवज्ञेविषयीं) जपाल, आणि (शत्रू) आतां ह्याचक्षणीं तुम्हांवर चढून येतील; तर तुमचा पालनकर्ता पांच हजार दूतांनीं तुमची मदत करील; व ते (सर्व प्रकारें) सज्ज होऊन हजर होतील. १२५. आणि ही मदत तर परमेश्वरानें केवळ तुम्हांला खुष करण्यास केली व या साठीं (केली) कीं तुमचीं अंतःकरणें त्यानें समाधान पावावींत. नाहीं तर, (अस्सल) मदत तर प्रबल व सत्यसंकल्प अशा परमेश्वराकडूनच होय. १२६. (आणि मदतही केली तर)

---

लढावें ह्मणजे आपणास घरांच्या आड राहून मोठा आश्रय मिळेल. अखेर बाहेर मैदानांत निघून लढण्याचें मत प्रबळ झालें. दांभिकहि हें आपल्या मताविरुद्ध असतांही बाहेर निघून आले खरे. पण वाटेंत मदिनेच्या अनसार लोकांचीं दोन घराणीं बहकवून त्यांनीं परत लाविलीं. त्यांच्या सरदारांनीं ऐकिलें तों त्यांना समजावून पटवून रोखून घेतलें. या लढाईंत प्रथम जय मुसलमानांच्या बाजूस दिसूं लागला होता पण लोकांनीं करारीपणा ठेवून पैगंबरांनीं सांगितलेल्या जागीं काईम न राहतां, लूट मिळविण्याच्या लोभानें आपल्या जागेवरून हटून पुढें मागें झाले; ह्मणून शत्रूंनीं ही संधी साधून त्यांना घेरलें व त्यांचा पराभव केला. कुराणांत दुसरे जागीं याचें वर्णन आलें आहे.

ह्या साठीं कीं त्यानें नास्तिकांचा कांहीं मोड करावा अगर त्यांना असें क्षुल्लक करून टाकावें कीं (ओशाळगत होऊन) त्यांनीं निष्काम परत चाललें जावें. १२७. (हे पैगंबरा!) तुझा तर कांहींच अखत्यार नाहीं; परमेश्वर पाहिजे तर त्यांच्यावर दया करील अगर ते फाजील आहेत म्हणून त्यांना शिक्षा करील. १२८. आणि जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें सर्व परमेश्वराचेंच होय. तो ज्याला इच्छील त्याला क्षमा करील व ज्याला इच्छील त्याला शिक्षा देईल. आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. १२९. अहो मुसलमानांनों! (चक्रवाढ) व्याजें खाऊं नका; (कीं तें

---

(१) उद्देश तर ओहदचे लढाईचा उल्लेख करण्याचा आहे. पण मध्यंतरीं बदरचे लढाईचें वर्णन आलें कीं त्या लढाईत मुसलमान शत्रूंच्या मुकाबल्यांत थोडे व युद्धसामग्रीरहीत असूनही परमेश्वरानें त्यांना शत्रूंवर धडधडीत विजय मिळवून दिला. तर या ओहदचे लढाईत, बदरचा वृत्तांत स्मरून मुसलमानांनीं खंबीर राहीलें पाहिजे होतें. परंतु कित्येकांनीं धैर्य खचून पळ काढण्याचा बेत केला; तेव्हां वडील मंडळीनें त्यांना समजावून परत आणिलें. अखेर लढाईचा रंग बिघडण्याचें कारण असें झालें कीं पैगंबर साहेबांनीं एका टोळीला एका टेंकाडावर तैनात करून त्यांना सांगितलें होतें कीं आपल्या जागेवरून हालूं नका. बाकी मुसलमानांनीं नास्तिकांवर तुटून पडून त्यांना पळविलें. टेंकडीवाल्यांनीं लूटीचे लालुचीनें मोर्चा सोडून दिला; व नास्तिकांनीं उलटून तो काबीज केला. मुसलमान पाडाव होऊन पळत सुटले; येथपर्यंत मजल गेली कीं हजरत पैगंबर साहेब थोड्याशा लोकांसह मुख्य सैन्यापासून वेगळे पडले व जखमी झाले. त्यांचा एक दांत गळून पडला व डोक्याला मार लागला. त्यावेळीं पैगंबर साहेब रागांत येऊन शाप उच्चारणार तोंच परमेश्वरानें त्यांना सहनशीलता व क्षमेचें शिक्षण दिलें.

(२) व्याज अजिबात निषिद्ध आहे. लोक व्याजाचें व्याज ह्मणजे चक्रवाढ व्याजें घेत होते व आतांही घेतात. हें मोठें पातक होय. ह्मणून त्याची मनाई येथेंही वेगळी केली.

मुद्दलांत मिळून मिसळून) दुप्पट चौपट (होत चाललें जाईल.) आणि परमेश्वराला भीत राहा, नवल नव्हे कीं (परलोकीं) तुह्मीं कृतार्थ व्हाल. १३०. आणि नरकाग्नी जो नास्तिकांसाठीं तयार करून ठेविला आहे त्या(च्या शिक्षे)चें भय बाळगा. १३१. आणि परमेश्वर व पैगंबर यांचा हुकूम माना; नवल नव्हे कीं तुह्मांवर दया केली जाईल. १३२. आणि आपल्या पालनकर्त्याचे क्षमेकडे सत्वर धांव मारा; व (तशीच) स्वर्गाकडेही कीं ज्याचा विस्तार (एवढा मोठा आहे कीं) जसा आकाश व पृथ्वी(चा विस्तार). तो (परमेश्वराला) भिऊन वागणारांसाठीं (आयता सजवून) तयार आहे. १३३. ह्मणजे जे लोक सुख व दुःख या(दोन्ही स्थितीं)त (परमेश्वराचे नांवें) खर्च करतात व राग (आला असतां) आवरून घेतात व लोकां(च्या अपराधां)ची क्षमा करतात; आणि (असल्याच) परोपकार करणारांस परमेश्वर चाहतो. १३४. आणि ते लोक असे (सुशील) होत कीं (मानवी मनोविकारामुळें) जेव्हां एखादें निर्लज्जपणाचें काम त्यांच्या हातून घडून येतें, अगर ते (आणखी एखादी गैरवाजवी गोष्ट करून) आपलें (ह्मणजे आपल्या धर्माचें कांहीं) नुकसान करून घेतात; तेव्हां ते परमेश्वराचें स्मरण करून आपल्या पातकांची क्षमा मागूं लागतात. आणि परमेश्वरावाचून (सेवकांचे) पातकांची क्षमा आणखी कोण करणार? आणि जी (गैरवाजवी) गोष्ट त्यांच्या हातून घडते, तर ते जाणून बुजून तिचाच आग्रह धरून बसत नाहींत. १३५. हेच लोक होत कीं ज्यांचा मोबदला त्यांच्या पालनकर्त्याकडून क्षमा होय; आणि (क्षमेव्यतिरिक्त स्वर्गाचे) बागहि; कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील (व) ते त्यांत निरंतर राहतील. आणि (चांगलें) काम करणारांचे-हि (कसे) चांगले मोबदले होत! १३६. (मुसलमानांनों!) तुमच्या पूर्वींही (बऱ्याच) गोष्टी होऊन गेल्या आहेत तर तुह्मीं मुलखांत हिंडा फिरा व पाहा कीं ज्या लोकांनीं (स्वकालीन पैगंबरांस) मिथ्यारोप केला त्यांचा कसा (वाईट) परिणाम झाला! १३७.

हें (जें कांहीं आम्हीं सांगितलें त्यानें सर्व) लोकांस स्पष्ट करून समजाविणें (हाच हेतु) होय. आणि ज्यांच्या मनांत (परमेश्वराचें) भय आहे त्यांच्याठायीं तर हें सन्मार्ग व बोधवचन होय. १३८. आणि तुम्ही धैर्य खचूं देऊं नका व (या नैमित्तिक पराभवानें) क्लेशयुक्त होऊं नका; आणि जर तुम्ही खरे मुसलमान आहां तर (अखेर) तुमचाच बोल बाला होय. १३९. तुम्हांस जर (या लढाईंत पराभवाचा) फटका लागेल, तर (धैर्य खचूं नका; कांकीं बदरचे लढाईंत विरुद्धपक्षीय) लोकांसही अशाच तऱ्हेचा फटका लागून चुकला आहे. आणि असले दिवस[1] आम्हीं वरचेवर (सर्वच) लोकांवर आणित असतों. आणि (तुम्हांवर जे अनिष्ट प्रसंग ओहदचे लढाईंत आले, तर त्या योगें) परमेश्वराला (खऱ्या) मुसलमानांस पाहणें मंजूर होतें व तुम्हांपैकीं कित्येकांस धर्मार्थ प्राणास मुकणाऱ्यांचें पद द्यावयाचें होतें. नाहीं तर परमेश्वराला (कोणाही तऱ्हेची) जालिमां(म्हणजे नास्तिकां)ची आवड नाहीं. १४०. आणि तसेंच हेंही मंजूर होतें कीं परमेश्वरानें मुसलमानांस (भ्रम व संशयाच्या विटाळापासून) शुद्ध करावें व नास्तिकांचा मोड करावा. १४१. तर कां तुम्हीं या विचारांत आहां कीं स्वर्गांत (जाऊन) दाखल व्हाल; आणि अजून तर परमेश्वरानें तुमच्यांतले जे लोक (धर्मयुद्धांत) झटतील त्यांना ताडून पाहिलें नाहीं व (तसेंच) जे लोक (युद्धांत) करारीपणानें वागतील त्यांनाही अजमावून पाहिलें नाहीं? १४२. आणि तुम्हीं तर मृत्युशीं प्रत्यक्ष गांठ पडण्यापूर्वींच (परमेश्वराचे मार्गांत) मरण्याची हांव घालीत होतां. पण आतां तर तुम्हीं त्याला प्रत्यक्ष डोळ्यांदेखत पाहून घेतलें; (मग लढण्यास कां कचरतां?) १४३. आणि मोहंमद याहूनही आणखी काय कीं एक पैगंबर होय, एवढेंच. याच्यापूर्वीं (आणखीही) पैगंबर होऊन गेले आहेत. मग जर (मोहंमद सुमरणानें) मरण पावेल किंवा मारला जाईल, तर कां तुम्हीं आपल्या उलट्या पायीं (नास्तिकपणाकडे) पुन्हां उलटून जाल?

---

(१) विजय व पराजय, ह्या दिवसाच्या चालत्याफिरत्या सावल्या आहेत; त्या कधीं कोणावर असतात तर कधीं कोणावरच.

आणि जो कोणी आपल्या उलट्या पायीं (नास्तिकपणाकडे) उलटून जाईल, तो परमेश्वराचें तर कांहींच बिघाडूं शकणार नाहीं. आणि जे लोक (इस्लामचे देणगीबद्दल) आभार प्रदर्शित करतात त्यांना परमेश्वर लवकरच (उत्तम) प्रतिफल देईल. १४४. आणि कोणाही मनुष्याला परमेश्वराचे हुकमावांचून मरतां येत नाहीं. (प्रत्येकाचे मरणाचा) वेळ मुक्रर नोंदलेला आहे. आणि जो कोणी ह्या जगांत (आपल्या कर्मांचें) प्रतिफल इच्छितो, त्याला आम्हीं त्याचें प्रतिफल (येथेंच) देऊन टाकितों; आणि जो पुढील जगांत प्रतिफल इच्छितो त्याला आम्हीं तें (तेथेंच) देऊं. आणि जे लोक (इस्लामचे देणगीबद्दल) आभार प्रदर्शित करतात, त्यांना आम्हीं लवकरच (उत्तम) मोबदला देऊं. १४५. आणि बहुतेक पैगंबर असे होऊन गेले आहेत कीं ज्यांच्याबरोबर राहून पुष्कळ ईश्वरभक्तांनीं (शत्रूंशीं) युद्ध केलें. पण जें जें संकट त्यांच्यावर परमेश्वराचे मार्गांत गुदरलें, त्याच्यामुळें त्यांनीं हिंमत खचविली नाहीं, व नेभळेपणा दाखविला नाहीं व (शत्रूपुढें) काकळुतीस येऊन शरणही गेले नाहींत. आणि परमेश्वर (संकट समयीं) सहनशील राहणा-रांस दोस्त ठेवितो. १४६. आणि ह्याच्या शिवाय त्यांच्या तोंडून एक चकार शब्दही तर निघाला नाहीं कीं ते प्रार्थना करूं लागले कीं हे आमच्या पालनकर्त्या! आह्मांला आमच्या पापांची व आमच्या कामांत (झालेल्या) आमच्या फाजिल-पणाची क्षमा कर, व (शत्रूंच्या मुकाबल्यांत) आमचे पाय दृढ जमवून ठेव व नास्तिक लोकांवर आह्मांस विजयी कर. १४७. तर परमेश्वरानें त्यांना ह्या जगांत मोबदला दिला; (तो दिलाच. पण) पुढील जगांतही चांगला मोबदला दिला. आणि परमेश्वर (प्रांजल-मनानें) सुकृत्य करणाऱ्यांस प्रिय ठेवितो. १४८. अहो मुसलमानांनों! जर तुह्मीं नास्तिकांच्या कह्यांत येऊन जाल तर ते तुह्मांस उलट्या पायीं (नास्तिकपणाकडे) उलटून नेतील; मग तुह्मींच उलट तोट्यांत येऊन जाल. १४९. (नास्तिक तुमचे हितचिंतक नव्हत;) किंबहुना तुमचा (खरा) हितचिंतक परमेश्वर होय. व तो सर्व

मददगारांत उत्तम (मददगार) होय. १५०. (घाबरूं नका,) आह्मीं लवकरच तुमची हैबत नास्तिकांचे मनांत बसवून सोडूं; कारण, त्यांनीं अशा वस्तूंस परमेश्वराचा सरकतदार बनविलें आहे कीं ज्यां(च्या सरकतदार होण्या)ची परमेश्वरानें कोणतीही सनदच पाठविली नाहीं. आणि (अखेर) त्या लोकांचें ठिकाण नरकाग्नी होय; आणि जुलमी लोकांचेंही (किती तरी) वाईट ठिकाण हें! १५१. आणि (मुसलमानांनों) ज्या वेळीं तुह्मीं परमेश्वराचे आज्ञेनें नास्तिकांचा संहार करीत सुटलां होतां, (त्या वेळीं) परमेश्वरानें तुह्मांस आपला (जयाचा) वायदा खरा करून दाखविला; येथपोवतों कीं त्यानें तुह्मांस हवी होती अशी (जीत) दाखवून दिली. त्यानंतर तुह्मीं (लूटीचा माल पाहून लढाईकडून) नामर्दी दाखविली व तुह्मीं (पैगंबराचे) हुकमा (ह्मणजे मोर्चावर जमून राहण्या)चे बाबतींत आपसांत झगडा केला व (पैगंबराचा) आज्ञाभंग केला. कित्येक तर तुमच्यांतून (मोर्चा सोडून) दुनिये (ह्मणजे लूटी)चे मागें पडून गेले व कित्येक (मोर्चावर कायम राहून) परलोकीं (पुण्य मिळविण्या)च्या फिकरींत लागले (व त्यांनीं धर्मासाठीं प्राण दिले). मग तर परमेश्वरानें तुह्मांस शत्रूंकडून फिरवून टाकिलें, (व तुह्मीं पळ काढला. ह्यानें) परमेश्वराला तुम(च्या विश्वासा)ची परिक्षा पाहावयाची होती. आणि (तरी देखिल परमेश्वरानें) तुम्हांस माफी दिली. आणि मुसलमानांवर परमेश्वर (फार) कृपावंत होय. १५२. (तो वेळ आठवा कीं) जेव्हां तुह्मीं (कावरेबावरे होऊन) तोंड वर करून पळत चाललां जात होतां, आणि पैगंबर तुमच्या पिछाडीस (उभा) तुह्मांस बोलावित होता, असें असतांही तुह्मीं मागें वळून कोणाकडेही पाहत नव्हतां. तर (ह्या विरोधामुळें तुह्मीं जें पैगंबरास दुखविलें त्या) दुःखाचे ऐवजीं परमेश्वरानें तुह्मांस (पराभवाचें) दुःख पोहोंचविलें; अशा साठीं कीं जेव्हां कधींही तुह्मीं एखाद्या गोष्टीस अंतराल अगर तुह्मांवर एखादें संकट येऊन पडेल, तेव्हां तुह्मीं (सहनशीलता राखून) त्याचा खेद करीत बसूं नये. आणि तुह्मीं

(१) खुलासा हा कीं ओहदचे लढाईत तुमचा एक पराभव झाला

जें कांहींही कराल त्याशीं परमेश्वर माहीतगार आहे. १५३. नंतर (तुमच्या ह्या पराभवाचे) दुःखा मागून परमेश्वरानें तुम्हांवर एक अशी शांतिदायक स्थिति आणिली, कीं तुमच्यांतल्या एका (टोळीच्या) टोळीला (म्हणजे खऱ्या मुसलमानांस) झोंपेनें येऊन घेरलें; आणि एक टोळी (जी दांभिक होती व) ज्यांना (त्यावेळीं) आपल्याच जिवाची चिंता पडली होती, ते परमेश्वरासंबंधीं अज्ञान-काळच्या कल्पना सारख्या, नाहीं त्याच कल्पना करीत होते. ते म्हणत कीं आमचा अखत्यारच काय! (हे पैगंबरा! तूं त्यांना) सांगून दे कीं सारीं कामें परमेश्वराचेच अखत्यारांत आहेत. (हे पैगंबरा! तोंडीं गाऱ्हाण्याशिवाय) ते तुला जाहीर करीत नाहींत अशा (आणखीही) गोष्टी ते आपल्या मनांत लपवून ठेवितात. ते (जिवांतल्या जिवांतच) म्हणतात कीं आमचा जर कांहीं जोरा चालता असता, तर आम्हीं येथें मारलेच न जातों. (हे पैगंबरा! तूं त्या लोकांस) सांगून दे कीं तुम्हीं आपल्या घरांतही असतां, तरी ज्यांच्या नशिबीं मारले जाणें लिहिलें होतें ते (घरांतून) निघून (खुद्द आप-) आपल्या पछाडणिच्या जागीं येऊन ठेपते. आणि (या लढाईच्या

---

ह्मणून काय झालें? मुसलमानांनीं कांहीं विजयाचा मक्ता घेतलेला आहे असें नाहीं, कीं नेहमी जिंकितच जातील. हार खाली ह्मणून त्याचा खेद करीत बसणें व्यर्थ! परंतु हें पाहिलें पाहिजे कीं आपण हारलों कां? तर परमेश्वरानें मुसलमानांस जताविलें कीं तुमची ही हार तुमचे सरदार ह्मणजे हजरत पैगंबर साहेब यांच्या आज्ञेचा भंग केल्यामुळें झाली. कारण, तुमची ही हालचाल लढाईच्या नियमांच्या अगदीं विरुद्ध होती. जी फौज आपल्या सरदाराची आज्ञा न पाळील व आपल्या मताप्रमाणें चालून कायदा मोडील, तिचा, ओहदचे लढाईंत मुसलमानांचे लष्करांचा जो परिणाम झाला तोच परिणाम व्हावयाचा.

(१) इस्लामाचा प्रसार होण्या पूर्वींच्या काळाला अज्ञानकाळ ह्मणतात कारण त्या काळीं अरबलोक धर्म व शास्त्र वगैरे कांहींच जाणीत नव्हते.

हार जाण्यांतही कित्येक सद्‌हेतु होते; त्यांतल्या त्यांतच हें कीं) परमेश्वराला तुमच्या हृदयस्थ भावना ताडून पाहावयाच्या होत्या व तुमच्या मनांतील विचार (भ्रांतिच्या विटाळापासून) शुद्ध करावयाचे होते. आणि परमेश्वर हृदयस्थ गोष्टींचा ज्ञाता होय. १५४. ज्या दिवशीं (ओहद मुक्कामीं मुसलमान व नास्तिक यांच्या) दोन्ही जमातीं (आपसांत) भिडून गेल्या (व) तुम्हां (मुसलमानां) तून (बहुतेक) लोक पळत सुटले, त्यावेळीं (त्यांचें पळणें नास्तिकपणा व स्वधर्मत्यागामुळें नव्हतें तर त्याचें) केवळ (हेंच कारण झालें कीं) त्यांच्या कित्येक स्वसंपादित पापा (म्हणजे पैगंबराचे आज्ञेचे विरोधा) मुळें सैतानानें त्यांचे पाय (जागेवरून) उखडून टाकिले. आणि निःसंशय परमेश्वरानें त्यां(च्या ह्या अपराधा)ची क्षमा केली. अर्थात् परमेश्वर क्षमाशील व दयार्द्र होय. १५५. अहो मुसलमानांनो! जे लोक (इस्लामाचा तोंडीं दावा करतात व त्याला मनांतून) नाकारितात त्यांच्यासारखे होऊन जाऊं नका; कीं ते, आपले भाऊबंद

---

(१) हजरत पैगंबर साहेबांनीं परमेश्वराज्ञेनें मुसलमानांस हें शुभवर्तमान सांगितलें होतें कीं परमेश्वर इस्लामचे प्रभावानें तुमचें जागिक राज्य कायम करील. त्या वेळेचे मुसलमानांस या वचनाचा फार अभिमान होता व ते असें समजून होते कीं दरेक जागीं आमचाच विजय होईल. आतां जी ओहदची लढाई बिघडली त्यामुळें दांभिकांची बनून आली; व ते ह्मणूं लागले कीं आमचें तर आधींच हें मत होतें कीं लढाल तर मदिनेच्या आंत आपल्या घराचा आश्रय धरून लढा व शहराबाहेर निघून लढण्याचा इरादा करूं नका. पण पैगंबरांनीं आमचें ऐकिलें नाहीं व लोकांस विनाकारण मारविलें. परमेश्वरानें या वरील महावाक्यांत त्यांच्या बकवादाचें उत्तर दिलें कीं जय व अपजय हीं परमेश्वराचे हातीं आहेत व मृत्युला कोणाच्यानेंही टाळतां येत नाहीं; पराभव जो झाला तो पैगंबरांचे गैर धोरणामुळें झाला नाहीं, तर मुसलमानांचे गैरधोरणामुळें व गळहात्यामुळेंच झाला; कीं त्यांनीं पैगंबराचे हुकमावर कायम न राहतां मोर्चा सोडून दिला.

परदेशांत निघाले असतील अथवा धर्मयुद्धास्तव गेले असतील (व तेथेंच धारातीर्थी पडतील) तेव्हां त्यांच्या संबंधीं म्हणूं लागतात कीं ते जर आम्हांपाशीं (थांबून राहिले) असते तर ते न मरते व न मारले जाते. परमेश्वरानें (त्या लोकांचे असले विचार) ह्यासाठीं करून टाकिले आहेत कीं (आयुष्यभर) त्यांचे मनांत हाच खेद राहावा. आणि (एरवींतर) परमेश्वरच जगवितो व मारतो. व जें कांहींही तुम्हीं करितां तें परमेश्वर निरिक्षून आहे. १५६. आणि परमेश्वराचे मार्गांत जर तुह्मीं मारले जाल अगर (त्याच्या मार्गांत आपल्या मरणानें) मरून जाल तर परमेश्वराची क्षमा व दया (जी तुह्मांवर परत्रीं होईल ती), लोक जी (धनदौलत कांहीं काळ जगून) गोळा करतात त्याहूनही उत्तम होय. १५७. आणि तुह्मीं (आपल्या मरणानें) मराल अगर मारले जाल तरी (अखेर) तुह्मीं परमेश्वराकडेच ओढून बोलाविले जाल. १५८. तर (हे पैगंबरा! हीहि) परमेश्वराची मोठीच कृपा झाली कीं तूं त्यांना (स्वभावानें) सौम्य असा (सरदार लाभला) आहेस. आणि जर करतां, तूं स्वभावाचा करडा (व) मनाचा कठोर असतास, तर हे लोक तुझ्यापासून (केव्हांचेच) फांकाफांक होऊन गेले असते. तर तूं (आपला जन्मसिद्ध स्वभाव कां म्हणून सोडावास! ओहदच्या ह्या युद्ध प्रकरणांत) त्यांचे अपराध क्षमा कर व (परमेश्वरापाशींही) त्यांच्या पापांबद्दल क्षमा भाक; आणि (समेट व युद्धाचे) प्रकरणीं (पूर्वींप्रमाणेंच) त्यांना सल्लामसलतींत सामील करीत जा; मग जेव्हां (सल्लामसलतीनंतर) तूं (ज्या गोष्टीचा) निर्धार करशील (ती गोष्ट बेलाशक करून सोड; पण) तेव्हां भरंवसा परमेश्वरावर ठेव. जे लोक परमेश्वरावर भरंवसा ठेवितात परमेश्वर त्यांना दोस्त ठेवितो. १५९. (मुसलमानांनों! ) जर परमेश्वर तुमच्या कुमकेवर आहे, तर मग कोणीही तुम्हांवर प्रबल होणार नाहीं. आणि जर तो तुम्हांस सोडून देईल तर त्याच्या (सोडल्या) नंतर (दुसरा) असा कोण आहे कीं जो तुमच्या मदतीस उभा राहील? आणि मुसलमानांस पाहिजे कीं (त्यांनीं) परमेश्वरावरच भरंवसा ठेवावा. १६०. आणि

पैगंबरा(चे पदा-)स शोभतच नाहीं कीं त्यानें (पैगंबर होऊन) लबाडी करावी. आणि जो कोणी लबाडी(चा गुन्हा) करील, तर ज्या (वस्तू)त त्यानें लबाडी केली असेल, पुनरुत्थानाचे दिवशीं (परमेश्वरापुढें बजिन्नस) तीच (वस्तु)[१] त्याला आणून हजर करावी लागेल. नंतर ज्यानें जसें केलें असेल, त्याचा त्याला पुरा पुरा बदला दिला जाईल. आणि कोणावर (कोणाही तऱ्हेचा जोर-)जुलुम केला जाणार नाहीं. १६१. बरें जो मनुष्य परमेश्वराचे मर्जीस अनुसरून चालेल त्याच्यानें, जो परमेश्वराचे कोपांत सांपडला असेल व (अखेर) त्याचें ठिकाण नरक होय—व तें (फारच) वाईट ठिकाण होय—त्याच्यासारखें[२] (काम कोठें) होऊं शकतें? १६२. परमेश्वरापाशीं लोकांचे (भिन्न भिन्न) दर्जे होत. आणि लोक जें कांहींही करतात तें परमेश्वर निरीक्षीत आहे. १६३. परमेश्वरानें मुसलमानांवर (मोठीच) कृपा केली कीं त्यानें त्यांच्यांत त्यांच्यांतूनच एक पैगंबर पाठविला, कीं तो त्यांना परमेश्वराचीं महा वाक्यें वाचून वाचून ऐकवितो व त्यांना (नास्तिक्य व मूर्तीपूजेचे विटाळापासून) शुचिर्भूत करितो, व (दिव्य) पुस्तक (म्हणजे कुर्आन) व शहाणपणा(च्या गोष्टीं)चें त्यांना शिक्षण देतो. नाहींतर (या पैगंबराचे आगमना)पूर्वीं तर हे लोक बोलून चालूनच चुकींत होते. १६४. आणि कां जेव्हां तुह्मां (मुसलमानां)वर (ओहदचे लढाईंत पराभवाचें)

---

(१) बदरचे लढाईंत जो लुटीचा माल मुसलमानांचे हातीं लागला होता तो या हेतुनें एके ठिकाणीं गोळा केला जात होता कीं सरशेवटीं फौजेंत वांटून दिला जाईल. त्यांतून पांघरावयाची एक रेशमी लुंगी वा चादर कोठें गमावून गेली होती. त्यावेळीं कोणा दुष्ट चांडाळानें हजरत पैगंबर साहेबांविषयीं अशी शंका धरली कीं त्यांनींच ती ठेविली असावी. त्या शंकेचें उत्तर परमेश्वरानें येथें स्पष्ट दिलें आहे कीं पैगंबरासंबंधानें ही शंकाच अनाठायीं होय.

(२) म्हणजे हें काम पैगंबराचें नव्हे तर कोणा शापग्रस्त नरकवाशाचें होय.

संकट येऊन पडलें (व वास्तविक पाहतां,) तुह्मीं (बदरचे लढाईंत) याहून दुप्पट संकट (आपल्या शत्रूंवर) आणून चुकलां आहां; (हें संकट त्याचें निम्में होय;) तेव्हांही तुह्मीं (बेदिल होत्साते) ह्मणूं लागला कीं ही (आफत) कोठून (आली? हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं ही (आफत आली ती) तुमच्या आपल्या (करणी)नेंच (आली.) निःसंशय परमेश्वर सर्वशक्तिमान् होय. १६५. आणि ज्या दिवशीं (ओहद मुक्कामीं मुसलमान व नास्तिक यांच्या) दोन्ही जमाती (आपसांत) भिडून गेल्या (त्या दिवशीं) तुह्मां(मुसलमानां)वर जें (पराभवाचें) संकट ओढवलें; तर तें परमेश्वराच्या हुकूमानेंच (झालें); आणि हाही उद्देश होता कीं परमेश्वरानें (खऱ्या) मुसलमानांस जाणून ठेवावें. १६६. आणि हें कीं दांभिकांसही ओळखून ठेवावें. आणि दांभिकांस सांगितलें गेलें कीं या हो, परमेश्वराचे मार्गांत लढा, अगर (त्याप्रित्यर्थ न लढाल, तर शत्रूंस आपल्याकडून) हटवून (तरी) टाका. तेव्हां ते ह्मणूं लागले कीं जर आह्मीं जाणतों (कीं आज) लढाई (होईल) तर आह्मीं जरूर तुमच्या मागोमागच आलों असतों. हे लोक त्या दिवशीं विश्वासाहून अविश्वासाशीं अधिक जवळ होते. ते आपल्या मनांत नाहींत अशा गोष्टी तोंडांनीं उच्चारितात. आणि (दुष्ट विचार) जे ते लपवितात ते परमेश्वराला खूप ठाऊक आहेत. १६७. (हेच लोक होत कीं) जे (आपण तर मजेनें) बसून राहून आपल्या (धारातीर्थीं पडलेल्या) भावां संबंधानें म्हणूं

(१) दांभिक लोकांच्या मताविरुद्ध बाहेर निघून लढण्याचें ठरलें, तेव्हां तेही संगतीं तर आले होते. परंतु वाटेंत त्यांनीं असें निमित्त काढलें कीं आज लढाई होईलशी दिसत नाहीं; व परत चालते झाले.

(२) हे केवळ निमित्त काढतात. नाहीं तर ते मनांतून खूप जाणतात कीं लढाई अवश्यच होईल. कारण कीं ते जाणत होते कीं गनीम इतक्या लांबच्या पल्ल्यावरून जयत लष्कर घेऊन बदरचे लढाईचा बदला घेण्याच्या उद्देशानें चढून येत आहे; तर लढाई अवश्यच होईल.

लागले कीं जर ते आमचा कह्या मानते तर ते मारले न जाते. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर तुह्मीं (आपल्या ह्या विधानांत) खरे आहां, तर तुह्मीं आपल्यावरून मृत्युला हटवून टाका. १६८. आणि (हे पैगंबरा!) जे लोक परमेश्वराचे मार्गांत मारले गेले आहेत त्यांना तूं मेलेले असें समजूं नकोस; (हे मेलेले नव्हेत) तर ते आपल्या पालनकर्त्यापाशीं जिते (जागते) असून त्यांना त्यांचा शेरही दिला जातो. १६९. (आणि) जें कांहीं परमेश्वरानें आपल्या कृपेनें त्यांना देऊन ठेविलें आहे त्यांतच ते मगन आहेत. आणि जे लोक त्यांच्या मागून (जिवंत राहिले आहेत व) अजून त्यांच्यांत येऊन सामील झाले नाहींत त्यांच्या-संबंधानें ते (अशा कल्पनेनें) हर्ष मानतात कीं (हेहि धर्मार्थ धारातीर्थीं पडतील तर आह्मांप्रमाणेंच) त्यांनाही (कोणा तऱ्हेचें) भय राहणार नाहीं व ते दुःखीहि होणार नाहींत. १७०. ते परमेश्वराचे देणग्यांची व त्याच्या कृपेची खुषी मानतात आणि (तशीच) ह्याची कीं परमेश्वर विश्वासणाऱ्यांचा मोबदला वायां जाऊं देत नसतो. १७१. जे लोक, (लढाईत) त्यांना जखम लागल्यानंतरही, परमेश्वर व पैगंबर यांच्या बोलाविण्यास ओ देऊन (निधून उभे) राहिले; अशा लोकांपैकीं ज्यांनीं सुकृत्यें केलीं व (परमेश्वराचें) भय बाळगिलें त्यांच्यासाठीं मोठा मोबदला होय. १७२. (हेच लोक होत कीं) ज्यांना लोकांनीं (येऊन) सांगितलें कीं (विरोधी) लोकांनीं तुम्हां(शीं लढण्या)साठीं मोठी जमवाजमव केली आहे, तर तुम्हीं (जरा) त्यांच्याशीं भिऊन असा. पण (ही बातमी ऐकून साशंक होण्याचे जागीं) ह्यानें त्यांचा विश्वास जास्त (मजबूत) होऊन गेला; व ते बोलूं लागले कीं आम्हांला परमेश्वर पुरा आहे व तो अत्युत्तम कैवारी होय. १७३. सारांश, (ते हिंमत बाळगून लढाईचे तयारीनें गेले, लढाई वगैरे कांहीं झाली नाहीं; पण) हे लोक परमेश्वराच्या देणग्या व (त्याच्या) औदार्यानें भरपूर (घरीं) परतले; त्यांना (कसलाच) अपाय पोहोंचला नाहीं, व ते परमेश्वराचे मर्जीप्रमाणें वागले (तें वेगळें;) आणि परमेश्वर महा कृपानिधान होय. १७४.

हा (बातमीदार) केवळ एक सैतानच होता कीं तो (तुह्मां मुसलमानांस) आपल्या मित्रांची भीति[1] घालीत होता. तर तुह्मीं त्यांना (मुद-लींच) भिऊं नका; आणि (खरे) मुसलमान आहां तर माझेंच भय ठेवा. १७५. आणि (हे पैगंबरा!) जे लोक नास्तिकपणा (चा प्रसार करण्यां)त दौडादौड करितात त्यांच्यामुळें तूं दुःखी होऊं नकोस. (कारण, ह्यानें) हे लोक परमेश्वराचें तर कांहींच बिघाडूं शकत नाहींत; (उलट पक्षीं) परमेश्वर इच्छितो कीं परलोकीं(च्या पुण्यां)त त्यांना कांहीं वांटा देऊं नये. आणि त्यांना मोठी शिक्षा (होणें) आहे. १७६. ज्या लोकांनीं विश्वास देऊन नास्तिकपणा विकत घेतला, ते परमेश्वराला तर कधींच कांहीं नुकसान पोहोंचवूं शकणार नाहींत; व (उलट) त्यांनाच दुःखदायक शिक्षा होईल. १७७. आणि जे लोक (इस्लामधर्मास) नाकारितात, त्यांनीं ही कल्पनाच करूं नये कीं आह्मीं जी त्यांना ढील देतों आहों ती त्यांच्याठायीं कांहीं हितावह आहे! आह्मीं तर त्यांना केवळ यासाठीं ढील देतों कीं त्यांनीं आणखीही पाप करावें; आणि (सरशेवटीं) त्यांना फजितीची शिक्षा (होणें) आहे. १७८. (हे दांभिकांनों!) परमेश्वर असा नव्हे

---

(१) ओहदची लढाई बिघडली, तेव्हां मुसलमान लोक एक तडाखा खाऊन पुन्हां सांवरले होते. तिकडे नास्तिक हें पाहून आपापल्या जागीं परत गेले. परंतु ते जातां जातां एक धमकी देऊन गेले कीं आह्मीं पुढल्या वर्षी बदरचे मुक्कामावर चढाई करून मुसलमानांची खबर घेऊं. तो प्रतिज्ञेचा वेळ जेव्हां जवळ आला, तेव्हां एका बातमीदाराचे तोंड-जबानीं त्यांनीं सांगून पाठविलें कीं मक्केकरांनीं युद्धाची प्रचंड तयारी केली आहे. त्यांत त्यांचा हेतु हा होता कीं मुसलमान ओहदमध्यें हार खाऊन चुकले होते; ह्मणून या तयारीची बातमी ऐकून ते लढाईस निघणारच नाहींत. पण या बातमीदार सैतानाद्वारें आलेल्या दरडावणीचा त्यांच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. मक्केकरांकडून कोणीच आला नाहीं व लढाई वगैरे कांहींच झाली नाहीं. परंतु मुसलमानांची फौज तीन दिवस बदर मुक्कामीं तळ देऊन देवघेव व क्रयविक्रय करीत राहिली; व सुखासमाधानानें कमाई करून भरपूर मदिनेस परत आली.

कीं ज्या स्थितींत तुह्मीं आहां, बऱ्या वाईटाची वेगळीक केल्यावांचून, त्याच स्थितींत मुसलमानांस (तुह्मांशीं मिळून जुळून) राहूं देईल. आणि परमेश्वर असाही नव्हे कीं तुम्हांला अदृष्ट–गैबी–गोष्ट कळवील. पण (होय,) परमेश्वर आपल्या पैगंबरांपैकीं ज्याला इच्छितो त्याला निवडून घेतो, (व योग्य तें अदृष्ट त्यांना कळवितोही;) तर तुम्हीं परमेश्वर व त्याचे पैगंबर यांजवर विश्वास ठेवा; (व अदृष्ट शोधण्याचे नादीं लागूं नका.) आणि जर तुम्हीं विश्वास धराल व (दांभिकपणाविषयीं) जपत राहाल, तर तुह्मांस मोठा मोबदला (प्राप्त) होईल. १७९. आणि ज्या लोकांस परमेश्वरानें आपल्या कृपे(व औदार्या)नें (सामर्थ्य) दिलें आहे व ते (परमेश्वराचे मार्गांत) त्याच्या (खर्च करण्यां)त लोभ करतात, त्यांनीं या लोभाला आपल्या ठायीं हितावह समजूं नये. (हितावह नव्हे) तर तो त्यांच्याठायीं फारच अहितकर होय. (कारण,) ज्या (द्रव्या)चा ते लोभ करतात, लवकरच पुनरुत्थानाचे दिवशीं त्याचा गळफांस बनवून त्यांच्या गळ्यांत घातला जाईल. आणि आकाश व पृथ्वी (अखेर या सर्वां)चा वारस परमेश्वरच होय. आणि जें कांहींही तुह्मीं (लोक) करितां, परमेश्वरास तें (सर्व) माहीत आहे. १८०. जे लोक असें प्रतिपादितात कीं

(१) दांभिक लोक ह्मणत होते कीं जर मोहंमद (परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो) खरे पैगंबर आहेत; तर त्यांनीं दांभिकांस ओळखून नांवनिशीं कळवावें कीं अमुक अमुक मनुष्य दांभिक आहे. परमेश्वरानें बजाविलें कीं उघड उघड नांव घेऊन तुह्मांस गैबी ह्मणजे अदृष्ट गोष्टी कळविणें हें अप्रशस्त होय. परंतु खूप जाणून असा कीं तुमचा अहवाल पैगंबर साहेबांस गुप्त नाहीं; व परमेश्वर तुह्मांस खऱ्या मुसलमानांपासून वेगळे करून सोडील. सारांश, पैगंबर साहेबांचे सांगण्यानें कित्येक दांभिकांचीं नांवें मुसलमानांस माहीत होतीं. आणि कित्येकांकडून अशा गोष्टी घडून येत होत्या कीं त्यांना मुसलमान ताडून घेत होते.

परमेश्वर गरीब आहे व आम्हीं श्रीमंत आहों, त्यांचें बकणें परमेश्वरानें ऐकिलें आहे. हे लोक जे (उगीच) हकनाक पैगंबरांना जिवें मारीत आले आहेत त्या बरोबर, आम्हीं त्यांच्या ह्या बकवादासही (त्यांच्या चित्रपटांत) नोंदून ठेवूं; आणि त्यां(च्या साऱ्या खोडसाळपणा)चा जबाब (पुनरुत्थानाचे दिवशीं) आह्मांकडून (केवळ) हाच होईल कीं तुह्मीं नरकाग्नीच्या शिक्षेची गोडी चाखीत राहा. १८१. जीं (जीं कर्मे) तुह्मीं अगोदरच आपल्या हातांनीं (पुढची सामग्री करून) पाठविलीं आहेत, त्यांच कर्मांचा हा मोबदला होय; नाहींपेक्षां परमेश्वर तर (आपल्या) सेवकांवर कोणाही तऱ्हेचा जुलूम करीत नसतो. १८२. (हेच लोक होत कीं) जे म्हणतात कीं परमेश्वरानें आह्मांस सांगून ठेविलें आहे कीं जोंपर्यंत कोणी पैगंबर आह्मांला आहुती (व नवस यांचा हा चमत्कार) न दाखवील कीं (त्यानें परमेश्वराला आहुती अर्पण करावी व) त्यास (आकाशांतून) अग्नीनें (येऊन) चट करावें, तोंपर्यंत आह्मीं त्याचा विश्वास धरूं नये. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझ्यापूर्वीं (पुष्कळशा) पैगंबरांनीं तुम्हांपाशीं खुल्या खुल्या निशाण्या आणिल्या आणि ज्या (निशाणी)ची तुह्मीं (आतां) मागणी करतां (ती ही आणिली; ) मग जर तुह्मीं (आपल्या दाव्यांत) खरे आहां, तर मग तुह्मीं त्यांना कां म्हणून जिवें मारिलें? १८३. (हे पैगंबरा!)

(१) बनी-इस्राएलांमधील कित्येक पैगंबरांसंबंधानें असेंही घडून आलें आहे कीं त्यांनीं परमेश्वरास आहुती व नवस अर्पण केले व आकाशांतून अग्नीनें येऊन ते जाळून टाकिले; ह्मणजे त्यांचे नवस मान्य झाले. यहुदी लोकांनीं पैगंबर साहेबांपुढेंही एक सबब काढली व त्यांचा हेतु एका खास चमत्काराची मागणी करण्याचा होता. तेव्हां परमेश्वरानें उत्तर दिलें कीं ह्या सर्व हारजितीच्या गोष्टी ह्मणजे हेकेखोरपणा आहे. तुमच्या वडिलांनीं पुष्कळ चमत्कार पाहिले व हा खास चमत्कारही पाहिला, तरीही त्यांनीं विश्वास धारिला नाहीं. तुह्मीं त्यांचीच संतति आहां व तुमचे स्वभावही त्यांच्यासारखेच हेकेखोर आहेत; तर तुह्मांकडून विश्वासाची काय आशा होऊं शकणार?

यावरही जर ते तुला पाखंडी ह्मणत चालले जातील, तर (तुला बेदिल होण्याचें कांहीं कारण नाहीं कीं) तुझ्यापूर्वी(ही पुष्कळसे) पैगंबर खुले चमत्कार घेऊन आले व शास्त्रलेख व तेजःपुंज पुस्तकेंही (घेऊन आले); तरीही (बहुतेक) लोकांनीं त्यांना पाखंडी ह्मटलें. १८४. प्रत्येक जण (एका ना एका दिवशीं) मृत्यु (चा स्वाद) चाखणार आहे; आणि (जीं कर्मे तुह्मीं करितां, त्यांचा) पुरा पुरा मोबदला तर तुह्मांस पुनरुत्थानाचेच दिवशीं दिला जाईल. तर (त्या दिवशीं) जो कोणी नरकाग्निपासून दूर हटविला गेला व (राहण्यासाठीं) स्वर्गात दाखल केला गेला; तो (आपल्या मनोरथांत) अर्थात् सफळ झाला. आणि इहलौकिक आयुष्य तर केवळ फसवणूकीचें साधन होय एवढेंच. १८५. (मुसलमानांनों!) तुमच्या द्रव्यां(च्या नुकसानां)त व तुमच्या प्राणा(च्या हानीं)त जरूर तुम(च्या विश्वासा)ची परिक्षा पाहिली जाईल. आणि ज्या लोकांस तुमच्या पूर्वी (दिव्य) पुस्तक दिलें जाऊन चुकलें आहे (म्हणजे यहुदी व खिस्ती) ह्यांजकडून व (मक्केच्या) मूर्तिपूजकांकडून तुम्हीं पुष्कळ उपद्रवाच्या गोष्टीही अवश्य ऐकाल. आणि जर तुम्हीं सहन कराल व (अपराधाविषयीं) जपाल तर निःसंशय हीं (मोठ्या) हिंमतीचीं कामें होत. १८६. आणि (हे पैगंबरा! ग्रंथधारी लोकांस तूं तो वेळ कां आठवून देत नाहींस कीं) जेव्हां परमेश्वरानें ग्रंथधारी लोकांपासून पक्कें वचन घेतलें कीं (तुम्हांला जें हें पुस्तक दिलें गेलें आहे) तुह्मीं त्याचा अर्थ लोकांस अवश्य स्पष्ट करून सांगा व त्या(च्या कोणत्याही गोष्टी)ला लपवूं नका. तथापि त्यांनीं (त्या वचनाची कांहींच पर्वा न बाळगितां,) त्यास आपल्या पाठीमागें झुगारून दिलें व त्याच्या ऐवजीं अत्यल्प दाम (ह्मणजे जगिक फायदे) पत्करले. पण हे लोक जो सौदा करितात तो (कितीतरी) वाईट होय! १८७. आणि जे लोक आपण केलेल्या (कृत्या)नें खुष होतात, व जें केलें (सवरलें तर कांहींच) नाहीं त्यावर चाहतात कीं त्यांची प्रशंसा केली जावी; (तर हे पैगंबरा!) असल्यांचा विचारच करूं नकोस; तथापि त्यांच्या संबंधीं कधींही अशीही कल्पना

करूं नकोस कीं ते शिक्षेंतून पार पडतील. किंबहुना त्यांच्यासाठीं दुःखदायक शिक्षा (तयार) आहे. १८८. आणि आकाशांचें व पृथ्वीचें राज्य (सर्व) परमेश्वराचेंच होय; व परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. १८९. निःसंशय आकाशांच्या व पृथ्वीच्या उत्पत्तींत व रात्रंदिवसाच्या अनुक्रमांत, बुद्धिमानां (च्या समजण्या)करितां (ईश्वर सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. १९०. (ह्मणजे) जे लोक उठतां, व बसतां व आपल्या कुशीवर (निजतां) परमेश्वराचें स्मरण करितात व आकाशांचे व पृथ्वीचे उत्पत्तीसंबंधीं मनन करतात (ते न कळत असे उद्गार काढितात कीं) हे आमच्या पालनकर्त्या! त्वां ह्या (सृष्टी)ला निरर्थक तर निर्मिलें नाहींस. तूं (अशा निरर्थक कृत्यांपासून) पवित्र आहेस. (आणि ह्या सृष्टिक्रमावरून स्पष्ट होत आहे कीं परलोकीं पुण्याचें फळ व पापाची शिक्षा होईलच; ) तर (हे आमच्या पालनकर्त्या!) आह्मांस नरकाग्नीचे शिक्षेपासून सुरक्षित ठेव. १९१. हे आमच्या पालनकर्त्या! ज्याला तूं नरकाग्नींत टाकिलेंस, तूं त्याला (फारच) लाजविलेंस. आणि (तेथें) अन्यायी लोकांचा कोणीच मदतगार नाहीं. १९२. हे आमच्या पालनकर्त्या! आह्मीं एका हाक मारणारा (ह्मणजे पैगंबरा)स ऐकिलें कीं तो विश्वास धरण्यास हाक मारीत होता (व लोकांस समजावीत होता) कीं तुह्मीं आपल्या पालनकर्त्याचा विश्वास धरा. तर आह्मीं विश्वास धरिला आहे. म्हणून हे आमच्या पालनकर्त्या! आह्मांस आमच्या अपराधांची क्षमा कर, व आह्मांपासून आमचीं दुर्व्यसनें घालीव, आणि पवित्राचरणी लोकांच्या समागमें आमचाही अंत(काल उत्तम) कर. १९३. हे आमच्या पालनकर्त्या! जसजशीं (देणग्यांचीं) अभिवचनें तूं आपल्या पैगंबरांद्वारा आह्मांस दिलीं आहेस तीं तूं आम्हांस (पुरीं पुरीं) दे; आणि पुनरुत्थानाचे दिवशीं आह्मांस फजित करूं नकोस. तूं (कधीं) वचनाच्या विरुद्ध तर करीतच नसतोस. १९४. तर मग त्यांच्या पालनकर्त्यानें त्यांची प्रार्थना मान्य केली (व म्हटलें) कीं मी तुम्हांपैकीं कोणाही (सु-)कृत्य करणाराचें कृत्य अकीत जाऊं देत नसतों; मग पुरुष असो वा स्त्री. (ह्यांत स्त्रिपुरुषांचा कांहीं

भेद नाहीं. कांकीं,) तुम्हीं (सर्व) एकमेकांची जाति आहां. तर ज्या लोकांनीं माझ्या मार्गाप्रित्यर्थ स्वदेश त्याग केला, व (माझ्याच कारणें) आपल्या घरादारांतून (हुसकावून) लाविले गेले व छळले गेले, आणि जे लढले व मारले गेले, मी त्यांचीं पातकें त्यांच्या(चित्र पटां)तून जरूर मिटवून टाकीन; आणि त्यांना अशा बागांत (नेऊन) दाखल करीन कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील. परमेश्वराकडून (हा त्यांच्या कृत्यांचा) मोबदला (होय;) आणि उत्तम मोबदला तर परमेश्वरापाशींच होय. १९५. (हे पैगंबरा!) शहरांत नास्तिकांच्या मिरवीत फिरण्यानें तुला (कोणा तऱ्हेच्या) फसवणूकींत[१] घालूं नये. १९६. (हीं) थोडींशीं (क्षणिक) साधनें होत. नंतर (सरते शेवटीं) या (नास्तिकां)चें ठिकाण नरकाग्नी होय; व तें (फारच) वाईट शयन होय. १९७. परंतु जे लोक आपल्या पालनकर्त्यास भीत राहिले, (परलोकीं) त्यांच्यासाठीं अशा बागा होत कीं ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व ते) तेथें सर्व काल राहतील. परमेश्वराकडून (हा त्यांचा) पाहुणचार (होईल). आणि जो (सरंजाम) परमेश्वराजवळ आहे तो (ह्या जगिक सरंजामापेक्षां) पवित्राचरणी लोकांचे ठायीं अत्युत्तम होय. १९८. आणि ग्रंथधारी लोकांत निःसंशय कांहीं लोक असेही

---

(१) ह्मणजे तुमच्या मनांत हा विचार येऊं नये कीं परमेश्वर तर नास्तिकपणाशीं राजी नाहीं; तर मग नास्तिक लोक जगांत कसे राहतात वसतात, चालतात फिरतात व कामकाज करितात; आणि त्यांचें आयुष्य खुशालींत जातें? तर खरें पाहतां, ही फसवणूकच फसवणूक आहे. मनुष्यानें तिला भुलूं नये. कारण ही मजा क्षणिक आहे व पुढें तिचा परिणाम 'जहन्नम' म्हणजे नरकाग्नी होय.

(२) अबिसीनीया (Ethiopia)चा बादशाहा, असहमाह नज्जाशी यांच्या निवर्तण्याची बातमी जेव्हां हजरत पैगंबर साहेबांस जिब्रील दूताद्वारें पोहोंचली, तेव्हां पैगंबरसाहेबांनीं लोकांस त्यांच्या प्राणसांत्वनार्थ परमेश्वरापाशीं प्रार्थना करण्यासाठीं मैदानांत जावयास सांगितलें. कित्येक लोक

आहेत कीं जे परमेश्वरावर विश्वास ठेवितात आणि जें (पुस्तक) तुम्हां (मुसलमानां)स प्रकट झालें आहे व जें (पुस्तक) त्यांना प्रकट झालें आहे त्या (सर्वां)वरही विश्वास ठेवितात, (व हरवक्त) परमेश्वरापुढें नमतात; (आणि) परमेश्वराच्या महावाक्यांच्या ऐवजीं (ऐहिक लोभाला भुलून) थोडेसे दाम घेत नाहींत; हेच ते लोक होत कीं ज्यांचे मोबदले परमेश्वरासमीप (सिद्ध) आहेत. (त्यांना फलप्राप्तीची वाट पाहण्याची तसदी घ्यावयास नको; कारण,) परमेश्वर फार जलद हिशेब करणारा होय. १९९. अहो मुसलमानांनों! (जीं संकटें परमेश्वराचे मार्गांत तुह्मांवर ओढवतील तीं) सहन करा, व एकमेकांस सहनशीलता शिकवा व आपसांत मिळून मिसळून बळकट राहा; आणि परमेश्वराला भ्या कीं (अखेर) तुम्हीं (आपल्या मनोरथांत) सफल व्हाल. २००.

---

ह्मणाले कीं आह्मीं हवशी खिस्त्याच्या शांतिप्रीत्यर्थ प्रार्थना करावी काय? त्यावरून नज्जाशीच्या सदाचरणी व खऱ्या मुसलमान होण्यासंबंधीं हें महावाक्य प्रकट झालें. (लुबाबु-न्नुकूल पहा.)

# अध्याय ४ था.

## सूरतु–न्निसा.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. ह्यांत १७७ महा-वाक्यें आहेत. स्त्रियांसंबंधीं सर्व प्रकारचे नियम, व बंधनें उदाहरणार्थ विवाहबंधन व विवाहविमोचन, स्त्रीधन व स्त्रीजातीस इतर कोणत्याही धर्मशास्त्रांत अद्यापि न मिळालेलें असें उच्च पद व हक्क वगैरे, बाकीच्या इतर अध्यायांपेक्षां ह्यांतच जास्त आहेत; ह्मणून सूरतु–न्निसा ह्मणजे स्त्रियांचें प्रकरण हें नांव होय.

**परम दयाळु आणि कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

**अहो लोकांनों? आपल्या पालनकर्त्यास भ्या, कीं ज्यानें तुह्मांस एका तनमना(ह्मणजे आदम)पासून निर्माण केलें; आणि (तें अशा प्रकारें कीं प्रथमारंभी,) त्यापासून त्याची पत्नि (हव्वा) इला पैदा केलें व त्या उभयतां(पति पत्नि)पासून पुष्कळ पुरुष व स्त्रिया (जगांत) फैलाविल्या. आणि ज्या परमेश्वराच्या नांवानें तुह्मीं एकमेकांकडून (आपलीं कित्येक) कामें काढून घेतां त्याच्या व गणगोत्रांच्या (मर्यादां)विषयीं जपून वागा; (कारण,) परमे-**

---

(१) ज्याच्या नांवाच्या वशिल्यानें तुम्हीं एकमेकापाशीं कांहीं मागून घेतां अथवा आपलीं कित्येक कामें काढून घेतां त्या परमेश्वरानें घालून दिलेल्या मर्यादेचे बाहेर जाण्याविषयीं भ्या आणि गणगोत्राच्या त्यानें ज्या मर्यादा कायम केल्या आहेत त्या राखण्यास जपा.

श्वराची तुह्मांवर (नित्य) नजर आहे. १. आणि अनाथ बालकांची मालमत्ता तुह्मीं त्यांच्या हवालीं करा; आणि चांगल्यां मालाचे बदलीं रद्दी माल घेऊं नका, व त्यांचे माल आपल्या मालांत मिसळून गिळंकृत करूं नका. (कारण,) हें (फारच) महा पातक होय. २. आणि जर तुह्मांस या गोष्टीची भीति असेल कीं तुह्मीं अनाथ बालेकियांचे बाबतींत इनसाफ कायम न ठेवूं शकाल, तर तुम्हांस भल्या वाटतील त्या दोन दोन व तीन तीन व चार चार स्त्रियांशीं लग्न लावून घ्या. पण जर तुह्मांस या गोष्टीचें भय असेल कीं (अनेक बायकांमध्यें) बरोबरी(चे नात्याचें वर्तन) न करूं शकाल, तर (अशा परिस्थितींत) एकच (बायको करणें;) अगर जी (दासी)[3] तुमच्या हस्तगत असेल (तिच्यावरच संतुष्ट राहणें.) तुमच्या

(१) लोक आपल्या रद्दी मालाशीं चांगला माल बदलून घेत होते. तर परमेश्वरानें असें करण्याची मनाई केली कारण कीं तुमचा माल जरी रद्दी आहे तरी तो तुमच्या ठायीं हक हलालाचा आहे; आणि अनाथांचा माल जरी चांगला आहे तरी तो तुह्मांस वर्ज्य व निषिद्ध आहे. ह्मणून वरवर पाहतां, जरी तुम्हीं वाईटाचे बदलीं चागलें घेतां, तरी पण खरें पाहूं जातां, गोष्टच तशी नाहीं.

(२) अनाथ बालकियांसंबंधीं न्याय न करण्याचा प्रकार असा कीं अनाथ बालकी कोणाचे आश्रयाखालीं आहे व तो तिच्या द्रव्याला किंवा रूपलावण्यास मोहून तिच्याशीं लग्न तर लावून घेतो; परंतु लग्नानंतर तिचे स्त्रीधन वगैरेचे हकांची फारशी पर्वा बाळगित नाहीं. कारण, त्या बापडीचे कोणी वाली वारस तर नव्हतेच कीं ते तिचे हक ठोकून बजावून घेतील. ह्मणून परमेश्वरानें बजाविलें कीं जर तुह्मीं न्याय न करूं शकाल तर तुह्मीं त्यांच्यांशीं लग्नच लावूं नये. दुसऱ्या कोणा स्त्रीशीं लग्न करा; बायकांचा कांहीं काळ पडलेला नाहीं.

(३) जे नास्तिक धर्मयुद्धांत पकडून आले असतील, तेच मात्र धर्मशास्त्रानुसार दासदासी होत. साऱ्या हिंदुस्थानाचे ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत कोणीच दासदासी नाहीं; आणि प्रस्तुत काळीं सरकारतर्फेही

हातून अन्याय न घडावा ह्मणून ही (युक्ति बुद्धीस) विशेष अनुसरती होय. ३. आणि स्त्रियांस त्यांचीं स्त्रीधनें खुशीनें देऊन टाका. मग जर त्या तुह्मांला त्यांतून कांहीं आपल्या राजीखुशीनें सोडून देतील, तर तें तुह्मीं रुचतें पचतें (समजून खुशाल) खा (प्या.) ४. आणि मालमत्ता जिला परमेश्वरानें तुह्मांसाठीं (एका प्रकारचा) आधार बनविला आहे, ती कमअक्कल (अनाथ) बालकांचे हवालीं करूं नका. पण त्यांतून त्यांच्या पोटापाण्यास द्या व त्यांचे कपडेलत्ते करा; आणि त्यांना (जें) बोलणें (तें) नरमाईनें बोलून समजावा. ५. आणि अनाथ बालकांस (संसार) व्यवहारांत लावून ठेवा; येथपर्यंत कीं तीं लग्ना(चे वया-)स पोहोंचतील. त्यावेळीं जर तुह्मीं त्यांच्यांत कांहीं योग्यता पाहाल, तर त्यांचा माल त्यांच्या हवालीं करून टाका. आणि असें करूं नका कीं (उद्याला) ते मोठे होतील ह्मणून उधळा उधळ करून व घाईघाईनें तो(त्यांचा माल) खाऊन (पिऊन) टाका. आणि जो (पालक) श्रीमंत असेल त्यानें (अनाथांचा माल आपल्यावर खर्च करण्याविषयीं) जपलें पाहिजे; आणि जो गरीब असेल त्यानें यथा रीति (निर्वाहा पुरतें) खावें; (त्यास हरकत नाहीं). आणि जेव्हां तुह्मी त्यांचा माल त्यांच्या स्वाधीन करूं लागाल, तेव्हां (लोकांस) त्यां(नीं आपला माल घेतल्या)चे साक्षी करून ठेवा. आणि (एरवीं) हिशेब घेण्यास तर परमेश्वर पूरा होय. ६. आईबाप व अगदीं जवळचे नातलग यांनीं जें कांहीं मागें सोडिलें असेल त्यांत थोडा असो वा बहुत, पुरुषांचा हिस्सा होय; आणि (तसाच) आईबाप व अगदीं जवळचे नातलग यांनीं जें

---

त्याची सक्त मनाई आहे. जे लोक दुष्काळांत मुलें घेऊन पाळतात ते अगर इतर चाकरनोकर हे आह्मांसर्वांप्रमाणें स्वतंत्र होत. त्यांच्याशीं दासदासींचें वर्तन करणें परमेश्वरापुढें पातक व सरकाराजवळ गुन्हा आहे.

(१) समजाविणें म्हणजे त्यांना सांगणें कीं ही तुमची वस्तु आहे, व आम्हीं तुम्हांसाठीं तिचें रक्षण करीत आहों. म्हणून तुम्हीं बिनघोर असा.

कांहीं मागें सोडिलें असेल त्यांत स्त्रियांचाही हिस्सा होय. (हा) हिस्सा (आह्मीं) ठरविलेला (होय.) ७. आणि जेव्हां (हिस्स्याचे) विभागणीचे वेळीं (दूरचे) नातलग व अनाथ मुलें व गोरगरीब हीं येऊन हजर होतील, तेव्हां त्यांतून त्यांनाही कांहीं देत जा; व (त्यांच्या मर्जीप्रमाणें त्यांना देतां येण्यासारखें नसेल तर) त्यांना नरमाईनें बोलून समजावून लावा. ८. आणि जे (हक्कदार वारस) होत त्यांना भ्यालें पाहिजे कीं जर ते (खुद्द) आपल्या (मरणा) पश्चात दुर्बल संतति सोडून जाते, तर त्यांच्या (स्थिती) संबंधानें त्यांना (कसला काय) घोर करावा लागता! ह्मणून (गोरगरीबांवर सक्ती करण्यांत) त्यांनीं परमेश्वराचें भय बाळगावें व (त्यांच्याशीं) नीट भाषण करावें. ९. जे लोक अन्यायानें अनाथ बालकांची मालमत्ता खाऊन चट करितात ते आपल्या पोटांत केवळ अंगारेच भरतात. आणि ते लवकरच (मेल्यावर) नरकाग्नींत पडतील. १०. (मुसलमानांनों!) तुमच्या संतती(च्या वांट्या) संबंधानें परमेश्वर तुह्मांस बजावून ठेवितो कीं मुलग्याला दोन मुलींच्या बरोबर हिस्सा (देत जा.) मग जर मुलीं (दोन वा) दोन्होंहून जास्ती असतील, तर (मरणारा) जें मागें सोडील त्यांत त्यांचा (हिस्सा) दोन तृतियांश होय. आणि जर ती एकटीच असेल, तर तिला निम्मेनिम. आणि मैताचे आईबापांस (म्हणजे) दोहोंतून प्रत्येकास, तो जें मागें सोडील त्यांतून, जर त्याला कांहीं संतान असेल तर एक षष्ठमांश होय. पण जर त्याला संतान नसेल व त्याचे वारस (फक्त) आईबाप असतील, तर त्याच्या आईचा (हिस्सा) एक तृतियांश; (बाकी बापाचा). परंतु जर (आईबापा खेरीज) मैताचीं (एकापेक्षां अधिक बहीण-)भावंडें असतील, तर आईचा (हिस्सा) एक षष्ठमांश. (पण हे हिस्से) मैयत इसम जो मृत्युलेख करील त्या(च्या बजावणी)नंतर व कर्जा(चे फेडी)नंतर (दिले जावेत). तुह्मीं आपले बाप(-दादे ह्मणजे मूळ) आणि आपले पुत्र(-पौत्रादि म्हणजे शाखा) यांस जाणूं शकत नाहीं कीं नफ्याचे मानानें त्यांजपैकीं कोणते तुह्मांशीं विशेष जवळ होत? (तर तुह्मीं आपलें मत चालवूं नका व पक्कें सम-

जा कीं ही) हिस्सेरशी परमेश्वराची ठरविलेली होय. परमेश्वर निःसंशय (सर्व कांहीं) जाणतो (व सर्व प्रयोजनांशीं) वाकब होय. ११. आणि जें कांहीं तुमच्या पत्न्या मागें सोडतील त्यांतून, जर त्यांना संतान नसेल तर, तुमचें अर्धें; आणि जर त्यांना संतान असेल तर त्या जें कांहीं मागें सोडतील त्यांतून तुमचें एक चतुर्थांश; (पण तेंही) त्या जो मृत्युलेख करतील त्या(च्या बजावणी) नंतर व कर्जा(चे फेडी) नंतर. आणि तुह्मीं जें कांहीं मागें सोडाल त्यांतून, जर तुह्मांला कांहीं संतती नसेल तर, (विधवा) स्त्रियांस एक चतुर्थांश. आणि जर तुह्मांला संतती असेल तर तुह्मीं जें कांहीं मागें सोडाल त्यांतून, (विधवा) स्त्रियांस एक अष्टमांश; (आणि तेंही) तुह्मीं जो मृत्युलेख कराल त्या(च्या बजावणी) नंतर व कर्जा(चे फेडी) नंतर (दिलें जावें.) आणि जर कोणा पुरुष वा स्त्रीचा (लांबचा) वारस असेल व त्यांचा पिता व पुत्र[१] (ह्मणजे मूळ व शाखा) नसेल व (दुसऱ्या बापापासून) त्यांचा कोणी भाऊ वा बहिण असेल; तर त्या दोहोंपैकीं प्रत्येकास एक षष्ठमांश. पण जर ते

---

(१) ज्या कोणा पुरुष वा स्त्रीला पिता व पुत्र (ह्मणजे मूळ व शाखा) नसेल त्यास किंवा तीस 'कलाला' ह्मणतात. त्याचें कुराणांत दोन जागीं 'वर्णन आलें आहे; एक येथें व दुसरें ह्याच अध्यायाचे शेवटीं. 'कलाला' च्या वारसांचे तीन प्रकार आहेत. एक हा कीं कलाला, 'ऐनी', भाऊबहीण ह्मणजे एकाच आईबापापासून सखे भाऊबहीण मागें सोडून मरण पावेल तो वा ती; दुसरा, 'अल्लाती' ह्मणजे सावत्र, एकाच बापाची अवलाद पण आई दोन असे; तिसरा, 'अखयाफी' म्हणजे सावत्र, ज्यांची आई एक पण बाप वेगळे असे. कुराणांत ह्या जागीं या तिसऱ्या प्रकाराचा उल्लेख आहे कीं त्यांपैकीं भाऊबहीण प्रत्येक, बरोबरीच्या साहाव्या भागाचे हक्कदार आहेत. 'मुलग्याला दोन मुलींच्या बरोबर हिस्सा' हा कायदा ह्यांच्यांत चालत नाहीं. आणि तीं बहीणभावंडें दोहोंहून जास्त असतील तर एक तृतियांशामध्यें ते सर्व बरोबरीचे समाईक होत. राहिला, पाहिला व दुसरा प्रकार त्यांचे नियम ह्या अध्यायाचे शेवटीं आहेत.

ह्याहून जास्त असतील तर एक तृतीयांशामध्यें ते (सर्व बरोबरीचे) पातीदार होत. (हे हिस्सेही मैयत इसमानें) केलेल्या मृत्यु-लेखा(च्या बजावणी) नंतर व कर्जा(चे फेडी) नंतर, (मैताकडून[1]) कोणालाही अपाय न होईल अशा अटीनें (दिले जावेत). (ही) परमेश्वराची ताकीद होय. आणि परमेश्वर (सर्व कांहीं) जाणतो (व लोकांची आज्ञाभंजकवृत्ति) सहन करितो. १२. ह्या, परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादा होत. आणि जो परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या हुकमाप्रमाणें चालेल, (परलोकीं) त्यांला परमेश्वर अशा बागांत (नेऊन) दाखल करील कीं ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व ते) त्यांत सदासर्वदा राहतील. आणि हें मोठें सार्थक होय. १३. आणि जो काणी, परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या हुकमांचा अनादर करील व परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादांचें उल्लंघन करील, त्याला परमेश्वर नरकाग्नींत (नेऊन) दाखल करील; (व) तो त्यांत निरंतर राहील; व त्याला फजितीची शिक्षा (प्राप्त) होईल. १४. आणि (मुसलमानांनों!) तुमच्या स्त्रियांपैकीं ज्या स्त्रिया बदकर्म करतील, तर त्यांच्या (बदफैली) वर आपल्या (लोकां)तून चौघांची साक्ष घ्या. मग जर साक्षी (त्यांच्या बदकर्मांची) साक्ष देतील, तर (शिक्षेपरी) त्या (स्त्रियां)स घरांत बंदिस्थ ठेवा; येथपर्यंत कीं मृत्यु त्यांचा अंत आणील अगर परमेश्वर

---

(१) मैताकडून वारसदारांस अशा प्रकारें अपाय होऊं शकतो, कीं मैतास एका तृतियांशापर्यंत मृत्युलेखदान करण्याची परवानगी आहे. मग जर कोणी वारसांचे हक्कांची पायमल्ली करण्याकरतां एका तृतियांशाहून अधिक मृत्युलेखदान करील व निवर्तेल; तर अधिकाचें प्रमाण अमलांत आणिलें जाणार नाहीं. अशाच रीतीनें मरणारा कोणाचेंही कर्ज मेहरबानीनें आपल्या अंगावर घेऊं शकतो व त्याचा समावेश मृत्युलेखांत होतो, परंतु मृत्युलेखदान असो किंवा त्यांत दर्शविलेलें कर्ज, असो, मरणारास हा अधिकार नाहीं कीं त्यानें वारसांचा हक्क बुडवावा.

त्यांच्यासाठीं (आणखी) कांहीं मार्ग[1] काढील. १५. आणि तुह्मां-(लोकां)पैकीं जे दोघे बदकर्म करतील त्यांना मारहाण[2] करा. मग जर ते उभयतां पश्चात्ताप पावतील व आपली स्थिति सुधारतील तर तुह्मीं त्यांच्या (आणखी जास्त) वाटेस जाऊं नका. कारण, परमेश्वर मोठा पश्चात्ताप मान्यकर्ता व दयाळू होय. १६. परमेश्वर पश्चात्ताप तर मान्य कारितोच; (पण) जे लोक अज्ञानामुळें एखादें दुष्कर्म करितील, मग लवकरच पश्चात्तापही पावतील त्यालोकांचाच मात्र. तर परमेश्वरही अशांचा पश्चात्ताप मान्य करून घेतो. आणि परमेश्वर (सर्वांची स्थिति) जाणतो (व सर्व-) युक्तिसंपन्न होय. १७. आणि जे लोक (आयुष्यभर) वाईट कामें करीत राहतील, येथपर्यंत कीं त्यांच्यांतून जेव्हां एखाद्यास मृत्यु येऊन ठेपेल, तेव्हां तो ह्मणूं लागेल कीं आतां मी अनुताप पावलों; अशा लोकांचा पश्चात्ताप (मान्य) नाहीं. आणि (तसाच) जे लोक नास्तिक असतांनाच मरण पावले त्यांचाहि (पश्चात्ताप मान्य) नाहीं. हेच होत कीं ज्यांच्यासाठीं आह्मीं दुःखदायक शिक्षा तयार करून ठेविली आहे. १८. अहो मुसलमानांनों! तुह्मांला याची मुभा नाहीं कीं स्त्रियांस

---

(१) ज्या मार्गाचें वचन या वाक्यांत आहे त्याचा उल्लेख अठराव्या भागाच्या सूरतु-न्नूर ह्मणजे २४ व्या अध्यायांत आणि अहादीस ह्मणजे पैगंबराचे वचनांत या प्रमाणें आहे कीं अविवाहित पुरुष किंवा अविवाहित स्त्रीच्या हातून जारकर्म घडून येईल तर प्रत्येकास शंभर फटके; आणि विवाहित असें काम करतील तर त्यांस धोंडमार.

(२) मागील वाक्यांत स्त्रीस फक्त हलकीशी शिक्षा ह्मणजे घरांत बंदिस्थ ठेवण्याचा मजकूर होता; व यांत स्त्रिपुरुष या दोघांस मार हाण करण्याचा हुकूम आहे. परंतु हे दोन्ही हुकूम प्राथमिक होते यानंतर अनुक्रमें शंभर फटके व धोंडमार करण्याचा शेवटचा हुकूम सादर झाला. मानवांत कामप्रवृत्ति अशी प्रबल असते कीं अशा सक्त कायद्यांवांचून त्यांचें वठणीस येणें अशक्य ह्मणून असल्या गुन्ह्यास आळा घालणेंहि अशक्य होय.

(मैताचा) वारसा समजून बळेंच त्यांच्यावर कबजा मिळवावा. आणि जें कांहीं तुह्मीं त्यांना (नवऱ्यांचे वारश्यांतून) दिलें असेल त्यांतून कांहीं हिरावून घेण्याच्या हेतुनें त्यांना (घरांत) अडकवून ठेवूं नका; (कीं त्यांना दुसऱ्या कोणाशीं लग्न करितां न यावें). परंतु त्या जर एखादें उघड बदकर्म करतील (तर त्यांना बंदिस्थ ठेवण्यास हरकत नाहीं). आणि तुह्मीं पत्न्यांशीं जनरिवाजाप्रमाणें नांदणूक करा. मग जर (कोणा कारणानें) तुह्मीं त्यांना नापसंत कराल तर नवल नव्हे कीं तुह्मांस एक वस्तु नापसंत असेल व परमेश्वर त्यांत पुष्कळ हित (व कल्याण) देईल. १९. आणि जर तुमचा बेत एका पत्नीच्या जागीं दुसरी पत्नि बदलून करण्याचा असेल तर त्यांतून (पहिल्या) एका पत्निला तुम्हीं ढीगभर द्रव्य देऊन टाकिलें असेल; तरीही त्यांतून कांहींच (परत) घेऊं नका. कां, (तुमच्या सभ्यपणास ही गोष्ट शोभते कीं) कोणा तऱ्हेचें कुभांड लावून व प्रत्यक्ष अनाठायीं गोष्ट करून (आपण दिलेलें तिच्यापासून परत) घ्यावें? २०. आणि तुम्हीं (दिलेलें परत) कसें घ्याल? व वास्तविक पाहतां, तुह्मीं एकमेकांच्या समागमांत येऊन चुकलां आहां व त्या तुह्मांपाशीं (लग्नाचे वेळीं स्त्रीधन व पालनपोषण वगैरे संबंधीचें) पक्कें वचन घेऊन चुकल्या आहेत. २१. आणि ज्या स्त्रियांशीं तुमच्या बापांनीं लग्न लाविलें असेल, तुम्हीं त्यांच्याशीं लग्न लावूं नका. परंतु जें पूर्वीं होऊन चुकलें (तें होऊन चुकलें). तथापि अर्थात् ही (मोठ्या) निर्लज्जपणाची व गहजबची गोष्ट होय! आणि तो (फारच) वाईट प्रघात होता. २२. (मुसलमानांनों!) तुमच्या आई व तुमच्या

(१) ह्मणजे कदाचित् तिच्यापासून पुष्कळ संतत होईल. मग जरी ती संतति रुपाळी नसेल तरी घरगुती कामासंबंधीं त्या मुलांच्या अंगीं चांगली योग्यता असेल अगर ते हुशार होतील व ते त्या पुरुषाची संपत्ति आपल्या कौशल्यानें वाढवितील.

(२) इस्लामाचे पूर्वीं स्त्रियांशीं अरब लोकांची वर्तणूक जाचजुलमाची होती; आणि कित्येक गोष्टींत जाचक होण्याशिवाय लज्जेच्या

मुली व तुमच्या बहिणी व तुमच्या चुलत्या व तुमच्या मावश्या व भावाच्या मुली (म्हणजे पुतण्या) व बहिणीच्या मुली (ह्मणजे भाच्या) व तुह्मांस ज्यांनीं दूध पाजिलें आहे त्या तुमच्या आया व तुमच्या दूधबहिणी आणि तुमच्या सास्वा (ह्या सर्व) तुह्मांस निषिद्ध होत. आणि ज्या स्त्रियांशीं तुह्मीं समागम करून चुकलां आहां त्यांच्या पाळलेल्या कन्या कीं ज्या (प्रायः) तुमच्या ओट्यांत (पालन) होतात त्या (तुह्मांस निषिद्ध होत.) पण जर तुह्मीं त्या(स्त्रियां)शीं समागम केला नसेल, तर (त्या पाळलेल्या मुलींशीं लग्न लावून घेतल्यास) तुह्मांवर कांहीं पाप नाहीं. आणि तुमच्या (खुद्द) पोटच्या मुलांच्या पत्न्या (ह्मणजे तुमच्या सुना; ह्या तुह्मांस निषिद्ध होत). आणि दोघां बहिणींशीं एकत्र लग्न करणें(ही निषिद्ध होय.) पण जें पूर्वीं होऊन चुकलें (तें होऊन चुकलें). निःसंशय परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. २३.

---

व शिष्टाईच्याहि विरुद्ध होती. उदाहरणार्थ, जेव्हां कोणी मरून जाई तेव्हां त्याचे वारस त्याच्या विधवा स्त्रीस मैताचा वारसा समजून तिचा कबजा मिळवित असत. पाहिजे तर स्त्रीधन ठरविल्याखेरीज तिच्याशीं आपणच लग्न लावून घेत व पाहिजे तर आणखी कोणाशीं लग्न लावून देत व तिचें स्त्रीधन स्वतः घेत. त्यांची मर्जी होई तर ते तिला बसवून ठेवीत. आणि वारसदाराखेरीज मैताचा कोणी मित्र त्याच्या विधवेवर कापड टाकून देई तर तोच तिचा हक्कदार समजला जाई. जर ती रुपाळी असे तर आपणच लग्न लावून घेई. आणि जर ती देखणी नसे तर तिला लग्नापासून अडथळा करी; येथपर्यंत कीं ती कांहीं खंड भरून सुटे अगर तेथेंच मरून जाई; व तो तिचा वारस होई. सारांश स्त्रियांवर येथपर्यंत आपले गैरवाजवी हक्क बजावीत कीं मुलगा आपल्या बापाचा वारस होई, तेव्हां तोहि आपल्या बापाच्या पत्नीशीं ह्मणजे सावत्र आईशीं लग्न लावी. परमेश्वरानें ह्या वाक्यांत या सर्व गोष्टी निषेधिल्या आहेत.

(१) हदीस ह्मणजे पैगंबरांचे पवित्र वचनाप्रमाणें मावशी व भाची आणि चुलती व पुतणी यांशींही एकत्र लग्न करणें निषिद्ध होय.

# पवित्र कुराण

## भाग ५ वा.

### सूरतु न्निसा (पुढें चालू).

आणि ज्या स्त्रिया (दुसऱ्यांच्या लग्न-)बंधनांत असतील त्याही (निषिद्ध होत); पण ज्या, (नास्तिकांचे लढाईंत बंदिवान होऊन) तुमच्या हस्तगत झाल्या असतील त्या मात्र (निषिद्ध नव्हेत.) (ही) परमेश्वराची लेखी आज्ञा होय (व तिचें पाळणें) तुह्मांस (आवश्यक होय). आणि (ज्या स्त्रिया तुह्मांस निषिद्ध होत) ह्या खेरीज (इतर स्त्रियांची) तुह्मांस मुभा आहे; या अटीवर कीं तुह्मीं कामतृप्तीसाठीं नव्हे तर (लग्न-)बंधनांत आणण्याकरितां द्रव्याचे (म्हणजे स्त्रीधनाचे) ऐवजीं (विवाह करूं) इच्छावें. मग ज्या स्त्रियांपासून तुह्मीं त्या (स्त्रीधनाचे) ऐवजीं सुखोपभोग घेतला असेल, त्यांच्याशीं जें स्त्रीधन ठरलें होतें तें त्यांच्या हवालीं करा. आणि (स्त्रीधन) ठरविल्यापश्चात (त्याच्या कमीजास्त करण्यास) तुह्मीं आपसांत राजी होऊन जाल, तर त्यांत तुह्मांकडे कांहीं पाप नाहीं. परमेश्वर (सर्वांच्या स्थितीशीं) वाकब (व सर्व) युक्तिसंपन्न होय. २४. आणि तुह्मांपैकीं ज्याला स्वतंत्र मुसलमान स्त्रियांशीं विवाह करण्याचें सामर्थ्य नसेल तर ज्या दासी (नास्तिकांचे लढाईंत) तुह्मां मुसलमानांचे हस्तगत होऊन जातील (व) त्या विश्वासूही असतील, त्यांच्याशीं (विवाह करा.) आणि परमेश्वर तुमच्या विश्वासास खूप जाणून आहे. (मानवी उत्पत्तीच्या दृष्टीनें) तुह्मीं एकमेकांचे सजातीय आहां; तर त्या (दास्यां)च्या मालकांचे परवानगीनें तुह्मीं त्यांच्याशीं (बिनधडक) विवाह करून घ्या: आणि शिष्टसांप्रदायाप्रमाणें त्यांचीं स्त्रीधनें त्यांच्या हवालीं करून टाका. (पण) शर्त अशी कीं त्या विवाह-बंधनांत आणिल्या जाव्यात (व) त्या बाहेरख्याली व चोरीछपी यार राखणाऱ्या अशा नसाव्यात. मग जेव्हां त्या लग्नबंधनांत येतील तेव्हां, जर ह्या निर्लज्जपणाचें एखादें काम

करतील तर जी शिक्षा स्वतंत्र स्त्रियांची तिच्या निम्मी दासींची. ही (दासीशीं विवाह करण्याची परवानगी) तुह्मांपैकीं ज्याला पातका(च्या घडण्या)चा अंदेशा असेल त्यालाच होय. आणि जर सहनशीलता राखाल तर तुमच्या ठायीं हें उत्तम होय. आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. २५. परमेश्वर इच्छितो कीं (पैगंबर व साधुसंत) जे तुमच्या पूर्वीं (होऊन गेले) आहेत त्यांचे (भक्ति-)मार्ग त्यानें तुह्मांस स्पष्ट करून सांगावेत व तुह्मांस त्यांच्याच सन्मार्गावर चालवावें आणि तुह्मांवर कृपा (नजर) ठेवावी. आणि परमेश्वर (सर्व कांहीं) जाणतो व (दरेक काम) युक्तिपुरस्सर करितो. २६. आणि परमेश्वर इच्छितो कीं तुह्मांवर कृपादृष्टि ठेवावी; आणि जे लोक कामवासनेच्या नादीं लागले आहेत त्यांचा बेत असा आहे कीं तुह्मीं (सन्मार्गाहून चकून कोठल्या कोठेंच) बहुत दूर झुकून पडावें. २७. परमेश्वर इच्छितो कीं तुह्मां-वरून (ओझें) हलकें करावें; कारण कीं, मनुष्य (स्वभावतः) दुर्बल निर्मिला गेला आहे; (व सक्त हुकमांचें ओझें त्याला दुःसह होय.) २८. अहो मुसलमानांनों! तुह्मीं एकमेकांची मालमत्ता (उगीच) हकनाक गिळं-कृत करूं नका; पण तुमच्या परस्पर सम्मतीनें एखादा व्यापार होत असेल (व त्यांत कांहीं प्राप्त होईल तर तें वर्ज्य नाहीं). आणि तुह्मीं (आपण) आपला घात करूं नका. (हें तुह्मांस यासाठीं

---

(१) स्त्रिया दोन प्रकारच्या असतात, स्वतंत्र स्त्रिया व दासी. तर स्वतंत्र स्त्रियांपैकीं ज्यांचे पति असतील व त्या बदकर्म करतील त्यांची शिक्षा धोंडमार होय; आणि ज्यांचे पति नसतील व त्या बदकर्म करतील, त्यांची शिक्षा शंभर फटके होत. कारण कीं विवाहित स्त्री बदफैली केल्यानें, मग तिचा पति जिवंत असो वा मयत, आपला व आपल्या पतीच्या अब्रूचा मातेरा करिते; आणि अविवाहित फक्त आपलीच अब्रू गमाविते. राहिली दासी, तिची अगोदर अब्रू ती काय? ह्मणून तिची शिक्षा सदरहू दोन्ही स्थितींत निम्मी ह्मणजे पन्नास कोरडे; कारण कीं धोंडमाराचें अर्धे तर होऊं शकतच नाहीं.

(२) याचा कित्येकांनीं अपघात असा अर्थ घेतला आहे. कित्येकांनीं दुसऱ्याच्या जिवाचा घात किंवा खून, ज्याची शिक्षा सूड आहे, तो घेतला आहे; त्या दुसऱ्याच्या घाताला आपला घात यासाठीं म्हटलें आहे कीं सर्व

सांगितलें जातें कीं) परमेश्वर तुह्मांवर मेहरबान होय. २९. आणि जो जोरजुलमानें असें (काम) करील (ह्मणजे परकीय माल खाऊन जाईल तर) आह्मीं त्याला (पुनरुत्थानाचे दिवशीं) नरकाग्नींत (नेऊन) झोंकून देऊं. आणि परमेश्वरापाशीं ही (एक) सोपी(शी गोष्ट) होय. ३०. ज्या (कामांचे करण्या)पासून तुह्मांला मनाई केली जाते त्यांतून महा पातकांविषयीं जर तुह्मीं जपून राहाल तर आह्मीं तुमचीं (लहान लहान) पातकें तुमच्या (चित्रपटां)तून मिटवून टाकूं व तुह्मांस सन्मानाच्या जागेंत (नेऊन) दाखल करूं. ३१. आणि परमेश्वरानें जी तुह्मांतून एकाला दुसऱ्यावर श्रेष्ठता देऊन ठेविली आहे तिची हांव घालीत बसूं नका. पुरुषांनीं जसजशीं कर्मे केलीं असतील त्यां(च्या पुण्या)चा वांटा त्यांना; आणि स्त्रियांनीं जसजशीं कर्मे केलीं असतील त्यां(च्या पुण्या)चा वांटा त्यांस. आणि परमेश्वरापासून (नित्य) त्याची कृपा भाकीत राहा. निःसंशय परमेश्वर सर्वज्ञानी होय. ३२. आणि जी (मालमत्ता) आईबाप व अगदीं जवळचे नातलग हीं मागें

---

मनुष्यजाति एकाच मुळाच्या शाखा होत. कित्येकांची अशी समजूत झाली आहे कीं फार कष्ट व परिश्रम व तपश्चर्या कीं ज्यांचा परिणाम बहुत करून प्राणांची हानी होय व जे रोमन कॅथोलिक धर्माचे मठवासी व आमच्याकडील जोगी व संन्यासी करीत राहतात व ह्याच स्थितींत आपला प्राणांत करून घेतात; त्यामुळें होणारा घात असा अर्थ होतो. कित्येकांनीं मागच्या व पुढच्या वाक्यसंबंधावरून, लोकांच्या हक्कांची पायमली असा अर्थ लिहिला आहे.

(१) परमेश्वरानें स्त्रियांचा स्वभावच असा नाजुक केला आहे कीं त्यांच्यानें दुनिया ती दुनिया पण धर्माच्या कामांतही पुरुषांची बरोबरी करवत नाहीं. निसर्गदत्त दौर्बल्यामुळें त्या धर्मयुद्धाच्या लायकीच्या नाहींत. त्यांना मुलें प्रसवण्याचीं आहेत; मुलांस स्तनपान व पालनपोषण करावयाचें आहे; आणि एका खास वेळेपर्यंत म्हणजे ऋतुमती असताना त्यांना उपोषण व प्रार्थना यांसही अंतरावें लागतें या गोष्टींचा विचार करून स्त्रियांस असें वाटत असेल कीं आम्हीं पुरुषच कां झालों नाहीं? परमेश्वरानें त्यांना समजाविलें कीं पुरुषांचें पुण्य पुरुषांना व स्त्रियांचें पुण्य स्त्रियांना.

सोडून जातील, त्यांत आह्मीं हरेक (मरणाराच्या वित्ता)चे हकदार नेमून दिले आहेत. आणि ज्या लोकांशीं तुमच्या उजव्या[1] हातांनीं (करार-)बंधन केलें असेल, तर त्यांनाही (आपल्यापरी) त्यांचा (कांहीं) हिस्सा देऊन टाका. निःसंशय परमेश्वर सर्वसाक्षी होय. ३३. पुरुष हे स्त्रियांवर सत्ताधारक होत. (त्यास) कारण (एक तर हें) कीं (मानवजातींत) परमेश्वरानें कित्येकां (ह्मणजे पुरुषां)ना कित्येकां (ह्मणजे स्त्रियां)वर (मानसिक व शारिरिक बलांत) श्रेष्ठत्व दिलें आहे; आणि (दुसरें कारण) हें कीं पुरुषांनीं (स्त्रियांसाठीं) आपलें द्रव्य[2] खर्ची घातलें आहे. तर ज्या सदाचरणी (स्त्रिया) होत त्या, (आपल्या भ्रतारांचा) कह्या मानतात (व) परमेश्वरानें (पति करवीं त्यांचा) जसा सांभाळ ठेविला आहे तसाच त्या (त्यांच्या) पाठीमागें (हरेक वस्तुचा) सांभाळ ठेवितात. आणि तुह्मांस ज्या स्त्रियांच्या शिरजोर होण्याचा अंदेशा असेल तर (पहिल्यानें) त्यांस समजावून सांगा, व (मग) त्यांचा शेज त्याग करा; आणि (यावरही त्या न समजल्या तर) त्यांना (हलकासा) चोप द्या. मग जर त्या तुमचा कह्या मानूं लागतील, तर तुह्मींही त्यांच्यावर (विनाकारण ठपका ठेवण्याचा) मार्ग शोधीत फिरूं नये. परमेश्वर (अति) महिमाशाली (व) बडा (जबरदस्त) होय. (तर त्याला भीत रहा) ३४.

---

(१) मौलाना शाह अब्दुल–कादिर साहेबांनीं लिहिलें आहे कीं बहुतेक लोक हजरत पैगंबर साहेबांबरोबर एकटेच मुसलमान झाले होते व त्यांचें गोत नास्तिक होतें; तेव्हां पैगंबर साहेबांनीं दोन दोन मुसलमानांस आपसांत भाऊ भाऊ बनविले. ते व एकमेकांचे वारसही होत होते. त्यांचा गोतवळा जेव्हां मुसलमान झाला तेव्हां हें वाक्य प्रकट झालें कीं वारसा नातलगासाठींच होय. ज्यांच्या हातावर हात मारून करारबंधन केलें असेल अगर तोंडानें भाऊ म्हटलें असेल त्यांच्याशीं जिवंत आहां तोंपर्यंत चांगलें परोपकारी वर्तन ठेवा व मरण समयीं त्यांच्यासाठीं कांहीं मृत्युलेखदान करा अशी आज्ञा होय.

(२) द्रव्य म्हणजे स्त्रीधन व पोटगी वगैरे.

आणि जर तुह्मांस उभयतां (पति–पत्नीं)त बिघाडाचा अंदेशा असेल, तर एक पंच त्या (पति)चे कुटुंबांतून मुकर करा व एक पंच त्या (पत्नी)चे कुटुंबांतून; जर पंचांचा (मनापासूनचा) इरादा (पतिपत्नींत) समेट (करविण्या)चा असेल तर परमेश्वर (त्यांच्या समजविण्या बुजविण्यानें) उभयतांत मिलाफ करून देईल. परमेश्वर (सर्वांच्या हृद्गतांशीं) वाकब (व) खबरदार होय. ३५. आणि तुह्मीं परमेश्वराचीच भक्ति करा व त्याचा कोणाही वस्तुस सरकतदार ठरवूं नका; आणि आईबापांशीं परोपकारानें वर्ता व (तसेंच) नातलग व अनाथ बालकें व गोरगरीब व नातेवाईक शेजारी व परकी शेजारी व बाजूला बाजू लावून बसणारा सोबती व वाटसरू आणि जे (दासी गुलाम) तुमच्या हस्तगत असतील ह्या (सर्वां)शींही (परोपकाराचें वर्तन करा). जे लोक अहंकारी व शेखी मिरविणारे होत त्यांना परमेश्वर चाहत नाहीं; ३६. कीं ते आपण कृपणपणा करतील (ते करतील; पण दुसऱ्या) लोकांनाही कृपणपणा करण्याची सल्ला देतील; आणि परमेश्वरानें आपल्या कृपेनें त्यांना जें कांहीं देऊन ठेविलें आहे तें ते लपवितील. आणि जे लोक (आमच्या देणग्याप्रत) कृतघ्नता दर्शवितील त्यांच्यासाठीं आह्मीं फजितीची शिक्षा तयार करून ठेविली आहे. ३७. आणि ते आपले माल खर्च करितील (तर) लोकांच्या दाखविण्यासाठीं व त्यांचा विश्वास (पाहावा तर) ना परमेश्वरावर व ना शेवटच्या दिवसावर. आणि सैतान ज्याचा साथी असेल तर तो (फारच) वाईट साथी होय! ३८. आणि जर (हे लोक) परमेश्वरावर व शेवटच्या दिवसावर विश्वास ठेविते व जें कांहीं परमेश्वरानें त्यांना देऊन ठेविलें होतें तें (प्रांजल मनानें परमेश्वराचे मार्गांत) खर्च करिते तर त्यांचें काय बिघडतें? आणि परमेश्वर तर त्यांच्या (स्थिती)शीं वाकबच होय. ३९.

---

(१) ह्मणजे मनुष्याकडून देखाव्याच्या व अविश्वासाच्या गोष्टी सैतानाचे बहकविण्यानें घडून येतात. तर मनुष्याला पाहिजे कीं त्यानें सैतानास आपला साथी व स्नेही बनवूं नये व त्याच्या बहकाविण्यांत येऊं नये.

परमेश्वर (कोणावर) अणुमात्रहि[1] जुलूम करीत नाहीं; आणि (कोणाचें अणुमात्रही) पुण्य असेल तर तो तें वाढवितो व आपल्याकडून मोठा मोबदला देतो. ४० बरें तर (त्या दिवशीं त्या लोकांची) कशी दशा होईल कीं जेव्हां (समस्त लोक गोळा होतील व) आम्हीं दरेक जनतेंतून (तिच्या) साक्षी (म्हणजे पैगंबरा)स आणूं (व तो त्यांचे संबंधीं साक्ष देईल;) आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुलाही ह्या लोकांवर साक्षी[2] ह्मणून आणूं! ४१. ज्या लोकांनीं (सद्धर्म अंगिकारण्याचें) नाकारिलें व पैगंबरा(चे हुकमा)चा अनादर केला, ते त्या दिवशीं अशी इच्छा करतील कीं त्यांना (मातींत गाडून) कोणी जमीनदोस्त करील तर बरें! आणि (त्या दिवशीं हे लोक) परमेश्वरापासून कोणचीही गोष्ट लपवूं शकणार नाहींत. ४२. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुम्हीं निशाधुंद[3] असाल तेव्हां नमाजीचे जवळही जाऊं नका; येथपर्यंत कीं (निशा उतरून जाईल व) जें काय तुम्हीं (तोंडानें) उच्चाराल तें समजूं लागाल; आणि (तसेंच) काम प्रकोपानें वीर्यपतनें[4] होऊन विटाळलां असतांनाहि, स्नान करून

---

(१) येथें 'ज़र्रा' म्हणजे पिपीलिका व 'मिस्काल' म्हणजे भार वा वजन; तर पिपीलिकेभारहि म्हणजे अणुमात्रहि असा मराठी भाषेस अनुसरून आम्हीं अर्थ केला आहे.

(२) अनुयायी व जनतेसंबंधीं पैगंबरांची साक्ष ह्मणजे हें कीं पैगंबरांनीं ईश्वरी संदेश पोहोंचविला, तर त्या लोकांनीं त्यांचा हुकूम कोठपर्यंत पाळला अगर न पाळला.

(३) हा हुकूम त्या वेळचा आहे कीं अजून मुसलमानांत दारू वा मद्य निषिद्ध झालें नव्हतें.

(४) येथें 'जुनुब' ह्मणजे कामप्रकोपानें वीर्यपतन होऊन विटाळलेला असा अर्थ आहे. मग तें वीर्यपतन कामबुद्धीनें स्त्रीसमागमामुळें झालेलें असो किंवा स्वप्नावस्थेमुळें अथवा अन्य कोणा कारणानें झालेलें असो; स्नान करणें अवश्यक आहे. लघवींत जें वीर्य जातें त्यांत कामप्रकोप नसल्यामुळें स्नान करणेंची जरूरी नाहीं.

टाकी पर्यंत (नमीजीचे जवळ जाऊं नका). पण (होय प्रवासांत) वाटेनें चालला जात असाल (व पाणी न मिळेल व धूलिशुद्धि उर्फ तयम्मम[1] करून नमाज पढाल तर असो.) आणि जर तुह्मीं आजारी असाल अगर प्रवासावर असाल, किंवा तुह्मां पैकीं कोणी शौचकुपाहून (जाऊन) येईल अगर तुह्मीं स्त्रीसमागम कराल; व तुह्मांस पाणी न मिळेल, तर स्वच्छ माती घेऊन तयम्मुम करा; ह्मणजे (तिणें) आपलीं तोंडें व आपले हात चोळा. परमेश्वर माफी कर्ता व क्षमाशील होय. ४३. (हे पैगंबरा!) ज्या लोकांस (दिव्य) पुस्तकांतून एक भाग दिला गेला होता, त्यांच्या (स्थिती)कडे तूं नजर केली नाहींस काय? ते (पुस्तक दिलें गेलें असूनही) चुकीचा मार्ग पत्करूं लागले व ते इच्छितात कीं तुह्मीं (मुसलमानांनीं) हि (सरळ) मार्ग सोडून बहकावें. ४४. आणि परमेश्वर तुमच्या शत्रूंस खूप जाणतो; आणि परमेश्वर पुरस्कर्ता बस्स होय व परमेश्वरच मदतगारही बस्स होय. ४५. (हे पैगंबरा!) यहुद्यांत[2] कांहीं (लोक असेही) होत कीं जे शब्दांस त्यांच्या जागे वरून (म्हणजे मूल अर्थावरून) फिरवितात व ते आपल्या जिव्हा वांकड्या करून व (इस्लाम-) धर्माची कुटाळी करीत, 'समेअना व असैना'

---

(१) तयम्मुम ह्मणजे मलीन झालेला भाग स्वच्छ मातीनें चोळून मग दोन्हीं हाताचे पंजे धुळीवर मारून ते तोंडावर फिरवावेत व पुन्हां दोन्ही पंजे धुळीवर मारून त्यांहीं दोन्ही हात कोंपरांपर्यंत चोळावेत ह्मणजे पाणी मिळेपर्यंत ही धुलिशुद्धि स्नानाची कायम मुकाम होते; पण पाणी मिळतांच मात्र स्नान करून टाकावें.

(२) यहुदी लोक हे नेहमीचे खोडसाळच; ह्मणून हजरत पैगंबर साहेबांसही त्यांच्या हातून पुष्कळच इजा व त्रास पोहोंचत होते. ते पैगंबर साहेबांपाशीं येऊन टवाळकी करीत व मोठ्यानें आवाज काढीत व असें व्यर्थक व पेंचदार शब्द उच्चारीत कीं त्यावरून जाहीरपणें त्यांची पकड न होऊं शके; पण त्यांत त्यांचा उद्देश अपमान व बेअदबी करण्याचा असे. येथें तीन गोष्टींचा उल्लेख आहे. एक, 'समेअना' व 'असैना'

आणि 'इस्मअ गैरमुस्मइन्' व 'राएना' (हे शब्द) बोलून (तुला) संबोधितात. आणि जर ते 'समेअना व अतअना' आणि (फक्त) 'इस्मअ' व 'उन्जुर्ना' बोलून संबोधिते, तर तें त्यांचेठायीं उत्तम होतें व तें नीटही होतें. परंतु त्यांना तर त्यांच्या नास्तिकपणामुळें परमेश्वरानें शापग्रस्त केलें आहे. तर त्यांच्यांतून (फारच) थोडे (लोक) विश्वास धरितात. ४६. अहो, ज्यांना पुस्तक दिलें गेलें आहे त्या (तुम्हीं) लोकांनों! (कुर्आन्) जें आम्हीं प्रकट केलें आहे (व जें) तुह्मांपाशीं जें (पुस्तक) आहे त्याचें सत्यत्वही दर्शवितें, त्याचा विश्वास धरा; (पण) ह्या गोष्टीच्या अगोदरच कीं (लोकांचीं) तोंडें विद्रूप करून आम्हीं फिरवून त्यांच्या पाठीस

---

ज्याचा अर्थ हा कीं आह्मीं तुमचें बोलणें ऐकिलें पण मान्य केलें नाहीं; 'मान्य केलें नाहीं' हे शब्द हळूच बोलत असतील अगर ते उद्धट तर होतेच, कदाचित् मोठ्यानेंही बोलत असतील. दुसरी गोष्ट 'इस्मअ गैर मुस्मइन्' ही होय. 'इस्मअ' याचा अर्थ असा कीं आह्मीं जें कांहीं बोलतों तेंही तर तूं ऐक; येथपावेतों तर कांहीं हरकत नाहीं, पण ह्याच्याबरोबरच ते 'गैर मुस्मइन्' हेंहि जास्त करीत—हा शब्द आशिर्वाद-व्यंजक असून शापवाचकही होऊं शकतो–त्याचा मूळ अर्थ, परमेश्वर तुह्मांस न ऐकवो; पण काय न ऐकवो–मित्र असेल तर त्याचा उद्देश हा कीं तुह्मांस कोणाचा अपशब्द ऐकण्याची पाळी न येवो.–व शत्रु असेल तर त्याचा हेतु हा कीं परमेश्वर करो आणि तुह्मीं बहिरे व्हा. तिसरा शब्द 'राएना' त्याचा व 'उन्जुर्ना'चा मजकूर पहिल्या अध्यायांत येऊन चुकला आहे (तेथें पाहा.) परमेश्वरानें बजाविलें कीं जर हे खोडसाळ लोक आपला खोडसाळपणा सोडते आणि 'असैना'चे जागीं 'अतअना'–ज्याचा अर्थ, आह्मीं मानिलें व मान्य केलें, असा आहे; आणि 'इस्मअ गैर मुस्मइन्' या जागीं फक्त 'इस्मअ' व 'राएना'चे जागीं उन्जुर्ना बोलते तर त्यांच्याठायीं उत्तम होतें.

(१) तोंड विद्रूप करून उलट पाठीस लाविलें ह्मणजे मनुष्याचा चेहरा भयानक दिसूं लागतो व लोकांत त्याची मोठी फजिती होते.

लावून देऊं, अगर जसें आम्हीं शब्बाथच्या[1] मंडळीस शापग्रस्त केलें होतें तसेंच त्यांनाही शापित करून टाकूं. आणि जें काम परमेश्वराला मंजूर होय तें तर होऊनच राहील. ४७. परमेश्वर तर हा (अपराध) क्षमा करणारच नाहीं कीं त्याचा (कोणालाही) शराकतदार बनविला जावा. आणि ह्याच्या शिवाय जो (अपराध) तो ज्याला तो इच्छील त्याला क्षमा करील. आणि ज्यानें परमेश्वराचा (कोणालाही) शराकतदार बनविला, तर त्यानें (परमेश्वरावर) खरोखरच कुभांड रचिलें; (व हें) महा पातक[2] (होय). ४८ (हे पैगंबरा!) जे लोक आपल्यास (सोंवळे व) पवित्र ठरवितात, तूं कां त्यां(च्या स्थिती)चें अवलोकन केलें नाहींस? (तर आपणच आपल्याला पवित्र ठरविल्यानें काय होतें?) किंबहुना परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला पवित्र बनवितो. आणि (परमेश्वरासमीप) जुलूम तर (कोणाहीवर) एक तंतुबरोबरहि केला जाणार नाहीं. ४९. (हे पैगंबरा! ) पाहा! (तर खरें,) हे लोक परमेश्वरावर कसकसें खोटे कुभांड रचितात! आणि उघड पातक (ठरण्यास) तर एवढेंच बस्स करितें. ५०. (हे पैगंबरा! ) ज्या लोकांस (दिव्य) पुस्तकांतून एक भाग दिला गेला, तूं कां त्यां(च्या स्थिती)चें अवलोकन केलें नाहींस? ते मूर्तींवर व सैतानावर विश्वास ठेवूं लागले व नास्तिकांसंबंधीं बोलूं लागले कीं मुसल-

---

पूर्वीं असा प्रघात होता कीं ज्या अपराध्याची दवंडी पिटविण्याची असे त्याचे तोंड काळें करून उलटा गाढवावर बसवीत व गांवांत फिरवीत असत.

(१) अध्याय २: ६५ वरील टीप १ पाहा.

(२) ह्मणजे एकच परमेश्वर असतां, त्याच्या तोडीचे अनेक स्वकपोलकल्पित देव अगर मूर्ती स्थापिल्या जाव्यात, यासारखें परमेश्वरा समीप दुसरें महा पातकच नव्हे. ह्मणून हा आपराध क्षमा होणार नाहीं व त्याचा जाब घेतला जाईल. कारण, हा ईश्वरद्रोहच होय; व तो राजद्रोहाप्रमाणेंच क्षमा करण्यासारख्या अपराधांपैकीं नव्हे.

मानांपेक्षां तर हेच लोक जास्त सन्मार्गी[1] होत. ५१. (हे पैगंबरा!) हेच लोक होत कीं ज्यांना परमेश्वरानें शापित केलें. आणि ज्याला परमेश्वर शापग्रस्त करील, त्याचा तुला कोणीहि मदतगार आढळेल हें अशक्यच. ५२. तर कां यांच्यापाशीं राज्याची कांहीं वांटणी आहे; व यामुळेंच लोकांस (त्यांतून) तिलप्रायही[2] देऊं इच्छित नाहींत? ५३. अगर परमेश्वरानें आपल्या कृपनें लोकांस जी (कुराआनाची) देणगी दिली आहे त्यामुळें त्यांचा ते हेवा करितात? पण (ही कांहीं नवीन गोष्ट नव्हे पूर्वींही) इब्राहीमांचे[3] घराण्यां-(तील लोकां)स आह्मीं पुस्तक दिलें व ज्ञान (दिलें) आणि

---

(१) हय्य बीन अखतब आणि कअब बीन अशरफ हे दोघे यहुदी सरदार मदिनेहून मक्केस गेले. त्यांचा उद्देश हा होता कीं मक्केकर नास्तिकांस हजरत पैगंबरांचे विरुद्ध उभारावें. त्यांनीं त्यांस विचारिलें कीं बरें सत्य कोणाकडे आहे? त्यांना पैगंबरांशीं द्वेष तर होताच; ते त्या लोकांच्या मनसमजवणीसाठीं ह्मणूं लागले कीं मुसलमानांपेक्षां तर तुह्मींच उत्तम आहां.

(२) खजुरेच्या आठळींतील लहानशा खांचेस अरबींत 'नकीर' ह्मणतात व त्याची उपमा, आमच्या येथें जशी रति, तिल, राई व अणु वगैरेची आहे तशी असते, कोणत्याही वस्तुची फारच कमतरता दाखविण्यांकडे याचा उपयोग होतो. त्याचा अर्थ आह्मीं येथें तिलप्राय हा घेतला आहे.

(३) भावार्थ हा कीं परमेश्वरानें इब्राहीमाचे घराण्यास पुष्कळ ऐहिक व पारलौकिक देणग्या दिल्या; तर त्या वेळेच्या लोकांपैकीं कांहीं-नीं तर विश्वास धरिला व कांहीं नास्तिक झाले. आतांही हजरत मोहंमद पैगंबर हे हजरत इब्राहीमाचे घराण्याचे आहेत व त्यांनाही परमेश्वरानें पैगंबरीचें पद व ज्ञान व कुराण हें दिव्यपुस्तक व बादशाही व राज्य या देणग्या दिल्या आहेत. सारांश, इब्राहीमाचे घराण्याचा, लोक नेहमीं हेवा करीत आले आहेत पण त्यांच्या मात्सर्यामुळें यांचें पूर्वीं कांहीं बिघडलें नव्हतें व आतांहि कांहीं बिघडणार नाहीं.

त्यांना मोठें राज्यहि दिलें. ५४. मग त्या (लोकां)पैकीं कोणी तर त्या (पुस्तका)वर विश्वास ठेविला आणि कोणी त्यापासून फटकून राहिला. आणि (जो फटकून राहिला त्याच्यासाठीं) नरकांत पेट घेणारा अग्नि (शिक्षेस) बस्स करितो. ५५. ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस नाकारिलें, त्यांना आम्हीं (पुनरुत्थानाचे दिवशीं) जळण्यास नरकाग्नींत (नेऊन) दाखल करूं. जों जों त्यांच्या चामड्या जळून गळून जातील, तों तों आम्हीं, त्यांनीं शिक्षेची गोडी (चांगल्या प्रकारें) चाखावी म्हणून (गळलेल्या) चामड्यांचे ऐवजीं त्यांच्या दुसऱ्या (नव्या) चामड्या निर्माण करूं. निःसंशय परमेश्वर (अति) समर्थ व युक्तिवान् होय. ५६. आणि ज्या लोकांनीं विश्वास धारिला व चांगलीं कामेंही केलीं, आम्हीं त्यांना लवकरच (स्वर्गांचे) अशा बागांत (नेऊन) दाखल करूं कीं ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील, (व ते) त्यांत निरंतर राहतील. त्या (बागां)त त्यांचीं (निर्मल व) चोखीं जोडपींही असतील. आणि आम्हीं त्यांना घनदाट सावलींत नेऊन ठेवूं. ५७. (मुसलमानांनों!) परमेश्वर तुम्हांस आज्ञा करितो कीं तुम्हीं ठेवीवाल्यांच्या ठेवी (ते मागतील तेव्हां) त्यांच्या हवालीं करीत जाव्या. आणि जेव्हां लोकांच्या परस्पर (झगड्यांचा) तुह्मीं निकाल देऊं लागाल, तेव्हां तुह्मीं न्यायास स्मरून निकाल करीत जावें. परमेश्वर तुह्मांस जो बोध करितो तो (तुमच्याठायीं) फारच उत्तम होय. यांत संशय नाहीं कीं परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) पाहतो. ५८. अहो मुसलमानांनों! तुम्हीं परमेश्वराचा हुकूम माना व पैगंबराचा हुकूम माना, आणि तुम्हांपैकीं जे सत्ताधिकारी होत (त्यांचाही).

---

(१) सत्ताधिकारी ह्मणजे सरकार किंवा त्यांच्या कडून नेमलेले अधिकारी यांचीहि आज्ञा पाळणें अवश्यक होय. परंतु तुमच्यांत व त्यांच्यांत कांही विरोध दिसल्यास तुह्मीं कुराण व हदीस ह्मणजे परमेश्वराचा हुकूम व पैगंबराचा हुकूम यांजकडे रुजू करा व त्यांत जी आज्ञा असेल त्या पुढें तुह्मीं कोणाचीच आज्ञा मान्य करूं नका; ह्मणजे अधिकारीही इस्लामधर्मशास्त्रा प्रमाणेंच मुसलमानांस हुकूम करतात.

**मग जर कोणाही गोष्टींत तुम्हीं (व सत्ताधिकारी) आपसांत झगडाल तर परमेश्वर व शेवटला दिवस यांजवर विश्वास ठेविण्याची अट ही होय कीं तुम्हीं ती गोष्ट परमेश्वर व पैगंबर यांच्या (हुकमा) कडे रुजू करा; कीं हें (तुमच्याठायीं) उत्तम होय व परिणामाच्या दृष्टीनेंही (हीच पद्धत) फार उत्कृष्ट होय. ५९. (हे पैगंबरा!) जे (ढोंगी मुसलमान, तोंडून तर असें) प्रतिपादितात कीं जें (कुर्‌आन्) तुला प्रकट झालें आहे त्यावर आणि जीं (दिव्य पुस्तकें) तुझ्यापूर्वीं प्रकट झालीं आहेत त्यांजवरही ते विश्वास ठेवितात, त्यां(च्या स्थिती)चें तूं अवलोकन केलें नाहींस काय? ते इच्छितात कीं त्यांनीं (आपला) मुकदमा,[१] एक खोडकर (माणूस ह्मणजे कअब बीन**

---

(१) एका यहुद्या व एका मुसलमानामध्यें लढा पडला. पैगंबर साहेबांचा प्रामाणिकपणा व सचाई हीं शत्रूंसही मान्य होतीं. यहुदी सत्यावर होता. त्यानें त्या दांभिक मुसलमानास सांगितलें कीं तुझ्या पैगंबर साहेबांकडेच हा न्याय नेणें मला मंजूर आहे. पण दांभिक असत्यावर होता; तो कअब बीन अशरफ यहुद्याकडे आपला न्याय न्यावयाची ओढ करीत होता. अखेर यहुद्यानें त्याला पैगंबराकडे ओढून ताणून आणिलें. मुकदमा ऐकून घेऊन पैगंबर साहेबांनीं यहुदीच्या तर्फे फैसला दिला. दांभिकानें पैगंबर साहेबांच्या निकालापासून संतुष्ट न होतां, त्या यहुद्यास या विचारानें हजरत उमर यांजपाशीं ओढून आणिलें कीं ते स्वभावाचे तीक्ष्ण आहेत व माझ्या जाहीर मुसलमान होण्याच्या थापेंत येऊन माझा पुरस्कार करतील. परंतु यहुद्यानें जातांच लावून दिलें कीं आह्मीं पैगंबर साहेबांपाशीं जाऊन आलों आहों व माझा प्रतिवादी त्यांच्या निकालाशीं संतुष्ट झाला नाहीं. हजरत उमरनें हें ऐकून त्या दांभिकाचें शिर उडविलें. त्याच्या वारसदारांनीं पैगंबरापुढें खुनाचा दावा केला, व सबबी काढून शपथा वाहूं लागले कीं आह्मीं हजरत उमरपाशीं तुमच्या हुकमावर अपील करण्यासाठीं नव्हे तर या आस्थेनें गेलों होतों कीं ते आपसांत समेट करवितील. या प्रसंगीं हीं महावाक्यें प्रकट झालीं. या प्रकरणावरूनच कीं हजरत उमर यांनीं सत्य व असत्य वेगळें करून दाखविलें

अशरफ यहुदी) याजकडे न्यावा; आणि खरें पाहतां त्यांना असा हुकूम दिला जाऊन चुकला आहे कीं त्यांनीं त्याची गोष्ट मानूं नये. आणि सैतान इच्छितो कीं त्यानें त्यांस बहकवून (सन्मार्गाहून) लांब आड रानांत नेऊन सोडावें. ६०. आणि जेव्हां त्यांना सांगितलें जातें कीं परमेश्वरानें जो (हुकूम) सादर केला आहे त्याकडे व पैगंबराकडे (वळू) या; तेव्हां तूं (त्या) दांभिकांस पाहतोस कीं, ते तुज (कडे येण्या)पासून बिचलतात (व अडखळतात). ६१. तर त्यांच्या हातांनीं पूर्वीं जीं कर्मैं केलीं असतील त्यामुळें जेव्हां त्यांच्यावर एखादें संकट ओढवेल (त्या वेळीं त्यांची) कशी (फजिती होईल)? मग ते तुजकडे शपथा वाहत येतील कीं परमेश्वरा शपथ, आमचा उद्देश तर भलाई व मिलाफ करण्याचा होता. ६२. हे असे (फिसादखोर) होत कीं त्यांच्या मनांत जो (फिसाद) आहे तो (केवळ) परमेश्वरालाच खूप माहीत आहे. तर (हे पैगंबरा!) तूं त्यांच्यामागें पडूं नकोस, आणि (दांभिकपणाच्या परिणामाविषयीं) त्यांना (चार) उपदेशाच्या गोष्टी सांग; व त्यांच्याशीं असें भाषण कर कीं (दांभिकपणाचा दुष्परिणाम) चांगल्या तऱ्हेनें त्यांच्या मर्मीं लागेल. ६३. आणि जो (जो ह्मणून) पैगंबर आह्मीं पाठविला (त्याच्या पाठविण्यांत आमचा) हेतु (नित्य) हाच राहिला आहे कीं परमेश्वराचे (ह्मणजे आमचे) हुकमानें त्याचा कह्या मानिला जावा. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां त्या लोकांनीं (तुझी आज्ञा मोडून) आपल्यावर आपणच जुलूम केला होता तेव्हां (जर हे लोक) तुजपाशीं येते व परमेश्वरापाशीं क्षमेची याचना करते आणि पैगंबर (ह्मणजे तूंहि) त्यांच्यासाठीं क्षमा मागता; तर अर्थातच (या लोकांस) आढळून आलें असतें कीं परमेश्वर फारच पश्चात्ताप मान्य करणारा व दयाळू होय. ६४. पण (हे पैगंबरा!) तुझ्याच पालनकर्त्याची (ह्मणजे आह्मांला आमचीच) शपथ आहे कीं जोंपर्यंत हे लोक आपल्या आपसांत उपस्थित (झालेल्या) झगड्यांत तुजकडूनच

---

त्यांचा किताब फारूक झाला. येथें 'तागूत' ह्मणजे कअब बीन अशरफ यहुदी जो फार खोडसाळ होता तो असा अर्थ आहे.

निकाल लावून (न) घेतील व (केवळ निकालच नव्हे तर) जो कांहीं निकाल तूं लावून देशील त्यामुळें ते आपल्या मनांत कसलाच संकोच न पावतील, आणि (मनापासून त्यास). मान्य करून (न) घेतील तों पर्यंत त्यांनीं विश्वास धारिला (असें ठरणार) नाहीं. ६५. आणि जर आह्मीं त्यांना हुकूम देतों कीं तुह्मीं आपल्याला ठार[1] करा अगर आपल्या घरदारांतून निघून (परदेशीं) जा; तर त्यांच्यापैकीं थोड्याशा लोकांशिवाय (बहुतेक आमचा हा हुकूम) अमलांत न आणिते. आणि जें कांहीं त्यांना समजाविलें जातें, जर त्यावर ते अमल करिते तर तें त्यांच्या ठायीं उत्तम झालें असतें व यांमुळें (धर्मावरही ते) फारच दृढपणें जमून राहते. ६६. आणि या स्थितींत आम्हीं त्यांना अर्थातच आपल्या कडून मोठा मोबदला देतों. ६७. आणि आह्मीं त्यांना अवश्य सरळ मार्गींही लावितों. ६८. आणि जो परमेश्वर व पैगंबर यांची आज्ञा पाळील, तर असलेच लोक (स्वर्गांत) अशा (आवडत्या सेवकां) समागमें असतील कीं ज्यांच्यावर परमेश्वरानें (मोठमोठाले) उपकार केले—ह्मणजे प्रेषितें[2], व सात्विक व धर्मार्थ प्राणार्पण

(१) म्हणजे प्राणांचा मालकहि परमेश्वरच होय तर त्याच्या आज्ञे पुढें प्राणाचेंहि कांहीं महत्व नाहीं, पण परमेश्वर जर असा हुकूम करता तर हे दांभिक लोक कधींहि त्याची बजावणी न करिते .

(२) हदीस ह्मणजे पैगंबर साहेबांच्या वचनसंग्रहांत आलें आहे कीं एकदां हजरत पैगंबर साहेब (परमेश्वर त्यांना शांति व धन्यवाद-देवो!) ओहद पर्वतावर बसले होते,आणि हजरत अबुबकर व हजरत उमर व हजरत उस्मान (परमेश्वर त्यांच्याशीं राजी होवो!) हेही बरोबर होते. इतक्यांत भूकंप झाला, तों पैगंबर साहेबांनीं ह्मटलें कीं हे ओहद! थांब, यावेळीं तुजवर पैगंबर वा प्रेषित (ह्मणजे मी) व सिद्दिक वा सात्विक (ह्मणजे अबुबकर) आणि शहीद या धर्मार्थ प्राणार्पण करणारे (ह्मणजे उमर व उस्मान) हे आहेत. सारांश, या वचनानें प्रेषित, सात्विक व धर्मार्थ प्राणार्पण करणारे यांचें स्पष्टीकरण झालें. हजरत अबुबकर यांनीं पहिल्यापासूनच, प्रमाण व चमत्कार यांची

करणारे आणि (इतर) पवित्राचरणी लोक. आणि हे लोक (किती तरी) चांगले सोबती होत! ६९. ही परमेश्वरची कृपा होय. आणि (या गोष्टीचा) ज्ञाता परमेश्वरच बस्स होय (कीं त्याच्या कृपेस कोण कोण किती पात्र होत!) ७०. अहो मुसलमानांनों! तुह्मीं आपली सावधगिरी (व हुशारी) ठेवा; आणि (शत्रूंच्या मुकाबल्यास निघाल तर) तुकड्या(च्या तुकड्या) बनून निघत जा अगर (सारेचे सारे) एक जूट होऊन निघून उभे राहत जा. ७१. आणि तुमच्यांत कोणी (कोणी) असा (दांभिकही) होय कीं (ज्यानें शपथ वाहिली आहे कीं धर्मयुद्धांत जाण्यापासून) तो अवश्य मागेंच हटून राहील. मग जर तुम्हांवर (एखादें) अरिष्ट येईल, तर तो ह्मणूं लागेल कीं परमेश्वरानें मजवर (मोठाच) उपकार केला कीं मीं या (मुसलमानां)सोबत हजर नव्हतों. ७२. आणि जर तुह्मांवर परमेश्वराची कृपा होईल तर (कट्टया वैऱ्याप्रमाणें कीं) जणो, तुमच्या व त्याच्या दरम्यान (कोणाही तऱ्हेची) दोस्ती (मोहबत) नव्हतीच, तो बोलूं लागेल कीं अहाहा! मीही त्यांच्यासोबत असतों तर मलाही मोठें यश प्राप्त झालें असतें! ७३. तर

---

वाट पाहिल्या वांचून पैगंबरावर विश्वास ठेविला. परमेश्वरानें त्यांस असें सात्विक मन दिलें होतें कीं पैगंबर साहेबांचें पैगंबर होणें त्यांच्या भाषणावरूनच त्यांच्या मनांत भिनलें होतें. हजरत उमर व हजरत उस्मान ह्यानीं स्वधर्मार्थ प्राणार्पण केलें ही गोष्ट जगमहशूरच आहे.

(१) मुसलमान जिहाद ह्मणजे धर्मयुद्धासाठीं गेले, आणि दांभिकांनीं त्यांची साथ दिली नाहीं. परमेश्वरानें मुसलमानांस यशही दिलें व लूटही त्यांच्या हातीं आली; व ते लूट घेऊन भरपूर व सुखरूप घरीं परत आले. तेव्हां दुरोखी दांभिकांनीं रीतीप्रमाणें बाह्यांगानें तरी हर्ष प्रदर्शित करावयाचा होता परंतु मत्सर व द्वेषभाव आवरून धरण्यास ते समर्थ नव्हते; आणि त्यांच्या तोंडून असे उद्गार निघाले कीं अहाहा! आह्मींहि त्यांच्या बरोबर असतों तर आह्मांसही मोठें यश आलें असतें. या गोष्टीवरून त्यांचें वैमनस्य व विषमभाव साफ प्रगट होतो कीं मुसलमान भावांच्या फायद्यांची त्यांस खुशी वाटली नाहीं.

जे लोक परलोकींच्या (अध्यात्मिक उन्नतीचे) ऐवजीं इहलौकिक जीवन (म्हणजे जीव सुद्धां) विकून टाकण्यास सिद्ध आहेत, त्यांना पाहिजे आहे कीं त्यांनीं परमेश्वराचे मार्गांत (शत्रूंशीं) लढावें. आणि जो परमेश्वराचे मार्गांत (शत्रूंशीं) लढेल, व मग तो मारला जाईल अगर प्राबल्य गाजवील, तर (या दोन्हीं स्थितींत पुनरुत्थानाचे दिवशीं) आम्हीं त्याला मोठा मोबदला देऊं. ७४. आणि (मुसलमानांनों!) तुह्मांला झालें तरी काय कीं तुह्मीं परमेश्वराचे मार्गांत व (तसेंच) दुर्बल पुरुष व स्त्रियां व मुलें यांच्याप्रीत्यर्थ शत्रूंशीं लढत नाहीं कीं तीं (अगदीं काकुळतीस येऊन परमेश्वरास) प्रार्थना करतात कीं हे आमच्या पालनकर्त्या! आम्हांला ह्या वस्तीं (म्हणजे मक्के)तून (कोठें) बाहेर ने, कीं येथील रहिवाशी (आह्मांवर) जाच जुलूम करीत आहेत. आणि तूंच (खुद्द) आपल्याकडून कोणालाही आमचा पुरस्कर्ता बनीव व (खुद्दच) आपल्याकडून कोणालाही आमचा मदतगार बनीव. ७५. जे विश्वास बाळगितात ते तर परमेश्वराचे मार्गांत लढतात; आणि जे (इस्लामधर्मास) नाकारितात, ते सैतानाचे मार्गांत लढतात. तर (मुसलमानांनों!) तुह्मीं सैतानाचे पक्षकारांशीं लढा (आणि त्यांच्या बहु संख्येची कांहीं पर्वा करूं नका; कां कीं, ) सैतानाचे (जितके) डावपेंच असतात (तितके सर्व) पोंचट. ७६. (हे पैगंबरा!) ज्या लोकांस असें फर्माविण्यांत आलें कीं तुह्मीं (अमळ) आपले हात आवरून घ्या व (ह्या वेळीं इस्लामासाठीं एवढेंच बस्स करितें कीं तुह्मीं) नमाज पढीत राहा व जकात देत जा, त्यांच्या (स्थिती)कडे तूं नजर केली नाहींस काय? मग जेव्हां त्या लोकांवर जिहाद कर्तव्य ठरलें, तेव्हां एक पक्ष तर त्यांच्यांतून (असा नेभळा निपजला कीं) जसें (कोणी) परमेश्वराचें भय बाळगितो तसेंच, किंबहुना (परमेश्वराचे भयाहूनही) जास्त भयभीत होऊन ते, लोकांस भिऊं लागले; आणि (घाबरून परमेश्वरास गाऱ्हाणें) सांगूं लागले कीं हे आमच्या पालनकर्त्या! तूं आह्मांवर जिहाद कां कर्तव्य ठरविलें असेल? आह्मांस थोड्या मुदतीपर्यंत आणखी कां अवकाश दिला नाहींस? (हे पैगंबरा! तूं या

लोकांस) सांग कीं ऐहिक फायदे अत्यल्प होत. आणि जो कोणी (परमेश्वराचें) भय राखील त्याच्यासाठीं परलोक (ऐहिक फायद्यांपेक्षांही) उत्तम होय. व (तेथें) तुह्मांलोकां (पैकीं कोणा)च्या हक्कांची पायमल्ली तंतुभरही होणार नाहीं. ७७. (लोकांनों !) तुह्मीं जेथें कोठेंही असाल तेथें, मृत्यु तर तुह्मांस येऊन गांठीलच ; व (मग पाहिजे तर) तुह्मीं पक्क्या घुमटांतच (कां) असाना ? आणि (हे पैगंबरा !) या लोकांस कांहीं फायदा पोहोंचून जातो, तर ते ह्मणूं लागतात कीं हा परमेश्वराकडून होय. आणि जर त्यांना कांहीं नुकसान पोहोंचून जातें, तर ते ह्मणूं लागतात कीं (हे पैगंबरा !) हें तुझ्याकडून (ह्मणजे तुझ्यापरत्वें) होय. (पण, हे पैगंबरा ! तूं त्यांना) सांगून दे कीं (नफानुकसान) सर्व परमेश्वराकडूनच होय. तर ह्या लोकांस काय झालें आहे कीं गोष्ट समजण्याचे जवळही फिरकत नाहींत ? ७८. (हे सेवका ! वस्तुस्थिति तर ही होय कीं) तुला जो कांहीं फायदा पोहोंचेल, तर (समज कीं) तो परमेश्वराकडून होय. आणि तुला जें कांहीं नुकसान पोहोंचेल तर (समज कीं) तें (खुद्द) तुझ्या जातीनेंच

---

(१) ह्याच्या मागील वाक्यांत आहे कीं (नफानुकसान) सर्व परमेश्वराकडूनच होय. व येथें सांगितलें गेलें आहे कीं फायदा परमेश्वराकडून व नुकसान सेवकांकडून. दिसण्यांत ह्या दोन्ही गोष्टी विसंगत वाटतात. परंतु ईश्वरवाणींत हें होऊं शकत नाहीं कीं एका दमांत कांहीं व दुसऱ्या दमांत कांहीं. सारांश, पुढें जातां हेंही ह्मटलें आहे कीं 'जर कुर्‌आन् परमेश्वराशिवाय अन्य कोणाकडून (आलें) असतें, तर (लोकांना) अर्थात्‌च त्यांत पुष्कळ फेरफार आढळला असता.' पण जे लोक मनुष्याला खुद्‌-मुखत्यार व स्वतंत्र कर्ता मानींत नाहींत व ह्मणतात कीं मनुष्य बरेंवाईट जें कांहीं करितो तें परमेश्वराच्या करविण्यानें करितो; ते लोक ह्या दोन विसंगत गोष्टींचा अशी संगत लावितात कीं जशी शिराजचे प्रख्यात हाफीज कवीनें लाविली आहे. 'हे हाफीजा ! पापावर जरी आमचा अखत्यार नव्हता तरी अदबीचा मार्ग पत्करण्यास

होय. आणि (हे पैगंबरा!) आह्मीं तुला लोकांकडे संदेश पोहोंचविणारा (करून) पाठविला आहे. आणि (तुझ्या पैगंबर होण्यासाठीं) परमेश्वराची साक्ष बस्स करिते. ७९. ज्यानें पैगंबराची आज्ञा पाळली त्यानें परमेश्वराचीच आज्ञा पाळली. आणि जो फिरून पडला, तर (हे पैगंबरा! त्याची तुझ्याशीं कांहीं वासपूस नाहीं. कांकीं,) आम्हीं तुला त्या लोकांवर रखवालदार (करून) पाठविला नाहीं. ८०. आणि (हे लोक तोंडून म्हणावयास तर) म्हणतात कीं (जें तूं बोलतोस तें) आम्हीं मान्य करितों. परंतु जेव्हां ते तुझ्यापासून (उठून) बाहेर जातात, तेव्हां त्यांच्यांतून कांहीं लोक रात्रीं (बसून बसून) आपण जें बोलतात त्याच्या उलट (भलभलत्या) मसलती करूं लागतात. आणि जसजशा मसलती रात्रीं (बसून बसून) ते करितात त्या परमेश्वर (आपल्या दूताद्वारें)

---

झट व सांग कीं पाप माझें होय.' ह्मणजे जेव्हां कोणा राजाचे हुकमानें एखादें बरेंवाईट कृत्य घडतें, तेव्हां बरें केलें तें राजानें व वाईट केलें तें आह्मीं प्रजेनें, असें ह्मणण्याचा प्रघात असतो. पण हा खुलासा सर्वांच्या मनांस पटणें शक्य नाहीं. तर आह्मीं मनुष्याला बरेंवाईटाचा जबाबदार गणितों व ह्या कायद्यावर जगप्रपंच व धर्म या दोहोंच्या व्यवस्थेची मदार समजतों. ह्या दोन परस्पर विरोधात्मक गोष्टींत संगत लावावयाची तर ती अशी कीं परमेश्वरानें जगाचे व्यवस्थेचा एक कायदा बांधून ठेविला आहे. हरेक वस्तु व हरेक गोष्टीचें एक कारण असतें व प्रत्येक कारणाचा एक परिणाम वा कार्य असतें. ह्मणूनच हें जग कार्यकारण न्यायास अनुसरून चालतें. उदाहरणार्थः—कोणा अधिकाऱ्यानें एक कायदा बनविला कीं चोरास एका वर्षाची कैद; 'अ'नें चोरी केली व बंदीखान्यांत पाठविला गेला. बोलण्यांत तर असें येतें कीं अधिकाऱ्यानें 'अ'ला कैद केलें. पण खरें पाहतां 'अ'नें आपणच आपल्याला कैद केलें. तो चोरी न करता, तर बंदीखान्यांत न जाता. तर अधिकाऱ्याचें 'अ'ला कैदेंत टाकणें व 'अ'चें खुद्द आपल्याला कैद करविणें या दोन्ही गोष्टी आपापल्या जागीं वाजवी आहेत.

नोंदीत जातो. तर त्यां(च्या मसलतीं)ची तूं कांहीं पर्वा करूं नकोस आणि परमेश्वरावर भरंवसा ठेव. आणि परमेश्वर हा कैवारी बस्स होय. ८१. तर कां हे लोक कुरआना(चे अर्था)चें मनन करीत नाहींत (कीं त्यांत केंसा एवढाही फरक नाहीं)? आणि जर (कुरआन्) परमेश्वराशिवाय अन्य कोणाकडून (आलें) असतें, तर (लोकांना) अर्थातच त्यांत पुष्कळ फेरफार आढळला असता. ८२. आणि जेव्हां त्यांच्यापाशीं अभयाची अगर भयाची कोणचीही बातमी येते, तेव्हां ते ती (सर्वांत) उडवून देतात. आणि जर ते लोक ती (बातमी) पैगंबराकडे व आपणापैकीं जे अधिकारारूढ होत त्यांजकडे नेते, तर (पैगंबर व अधिकारी) यांच्यांतून जे लोक त्या (गोष्टीच्या मूळ अर्था)चा उलगडा करतात, ते त्या(च्या वस्तुस्थिति)स अवश्य जाणून घेते. (व खोटी बातमी महशूर होण्याची पाळी आली नसती). आणि (मुसलमानांनों!) जर तुम्हांवर परमेश्वराची कृपा व त्याची दया (दृष्टी) नसती तर (कांहीं) थोडे खेरीज करून तुम्हीं (सारेचे सारेच) सैतानाचे नादास लागला असतां. ८३.

---

(१) शाह अबदुल कादिर साहेब यांनीं लिहिलें आहे कीं 'कोठूनही कांहीं बातमी येईल, तर प्रथम सरदार व त्याचे प्रतिनिधी यांजपर्यंत पोहोंचवावी. मग जेव्हां ते ती खबर खरी ठरवितील व ती आधारभूत होईल तेव्हां तिच्यावर अंमल करावा. हजरत पैगंबर साहेबांनीं एका मनुष्यास एका समाजाकडे जकात–धर्मकर–एक वर्षभर मालकींत असलेल्या मालाचा चाळीसावा हिस्सा ह्मणजे शेंकडा अडीच रुपये–वसूल करावयास पाठविलें. ते लोक त्याचे स्वागत करण्यासाठीं सामोरा जावयास निघाले. पण हा गृहस्थ असें समजला कीं ते त्याला मारावयास निघाले आहेत. म्हणून तो परत फिरला व त्यानें मदिनेंत येऊन सांगितलें कीं अमुक लोक स्वधर्माहून फिरून गेले. पैगंबरापर्यंत ही खबर पोहोंचली नाहीं तोंच शहरांत बोभाटा झाला. याप्रमाणें प्रत्येक बातमी चौकशी केल्याशिवाय व सरदारापर्यंत पोहोचविल्यावांचून उडवून देत असत. अखेर ती बातमी खोटी निघाली. आणि हें जें म्हटलें कीं जर त्याची कृपा व दया

तर (हे पैगंबरा!) तूं परमेश्वराचे मार्गांत (शत्रूशीं) लढ. तुजवर खास आपल्या जातीशिवाय कोणाचीही जिम्मेदारी नाहीं; आणि (होय,) तूं मुसलमानांसही (लढाईकरतां) प्रोत्साहन दे. नवल नाहीं कीं परमेश्वर नास्तिकांचा जोर हटवून टाकील. आणि परमेश्वराचा जोर (सर्वांत) जास्त खंबीर व त्याची शिक्षा (सर्वांत) जास्त कडक होय. ८४. जो कोणी चांगल्या गोष्टीची शिफारस करील, (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यां(चांगल्या कामाचें मोबदल्यां)तून त्यालाही वांटा मिळेल; आणि जो वाईट (गोष्टीची) शिफारस करील, त्या(च्या दुष्परिणामां)त तोहि वांटेकरी होईल. आणि परमेश्वर दरेक गोष्टीची चौकशी ठेवितो. ८५. आणि (मुसलमानांनो!) जेव्हां तुह्मांस कोणाही तऱ्हेनें सलाम केला जाईल, तेव्हां तुह्मीं (त्याचा जबाब देतांना) त्याहूनही उत्तम (तऱ्हेनें) सलाम करा; अगर (निदान) तसाच जबाब द्या. परमेश्वर हरेक गोष्टीचा हिशेब घेणार आहे. (तर जसें कराल तसें भराल.) ८६. परमेश्वर (असा परमपवित्र होय कीं) त्याचेखेरीज अन्य कोणी उपास्य नाहीं. यांत (किंचितही) संशय नाहीं कीं पुनरुत्थानाचे दिवशीं तो तुह्मां (सर्वां)स अवश्य (एके जागीं) गोळा करून सोडील. आणि परमेश्वरापेक्षां कोणाची गोष्ट जास्त खरी होऊं शकते? ८७.

---

तुह्मांवर नसती तर तुह्मीं कांहीं थोडे खेरीज करून सारेचे सारेच सैतानाचे ह्मणण्याप्रमाणें चालता; याचा अर्थ हा कीं नित्य हुकूम पोहोंचून तुह्मांस शिक्षण न मिळत राहील; तर फारच थोडे लोक सन्मार्गावर कायम राहतील.

(१) ह्मणजे सर्वांचें हद्दत त्याला माहीत आहे. ज्याला ज्या शिक्षेस अगर इनामास पात्र समजतो, त्याला ती शिक्षा अगर इनाम देण्यास समर्थही होय. आणि चांगल्या कामाची शिफारस ही होय कीं श्रीमंतास सांगून समजावून कोणा गरीबास आपण कांहीं देवविलें; व वाईट कामाची शिफारस ही कीं अधिकाऱ्यांपाशीं शिफारस करून अपराध्यांस शिक्षेंतून बचाविलें. पण याचा दुष्परिणाम त्या शिफारस कर्त्यास भोगावा लागेल.

पण (मुसलमानांनों!) तुमची काय स्थिति आहे कीं दांभिकांचे संबंधांत दोन पक्ष होऊन गेलां आहां; व खरें पाहूं जातां, परमेश्वरानें त्यांच्या कर्मांच्या शासनार्थ त्यां(च्या बुद्धी)स पालथें केलें आहे; (ह्मणूनच ते बहकून गेले आहेत.) का तुह्मीं हें इच्छितां कीं ज्याला परमेश्वरानें बहकविलें आहे त्याला तुह्मीं सन्मार्गीं लावावें? अणि ज्याला परमेश्वर बहकवील, त्याच्यासाठीं तुमच्यांतून कोणी मार्ग काढील हें अशक्यच. ८८. ह्या (दांभिकां)ची उत्कंठा ही होय कीं जसे ते स्वतः नास्तिक होऊन गेले आहेत तसेच तुह्मींहि नास्तिक होऊं लागावें; (आणि ते) व तुह्मीं (सर्व) सारखेच होऊन जावेत. तर जोंपर्यंत (हे लोक) परमेश्वराचे मार्गीं (ह्मणजे परमेश्वराप्रित्यर्थ) स्वदेश त्याग न करतील तोंपर्यंत त्यांच्यापैकीं (कोणालाहि आपला) दोस्त बनवूं नका. मग जर ते(स्वदेश त्यागाकडून) तोंड चुकवितील, तर त्यांना धरा व जेथें तुह्मीं त्यांना पावाल तेथें त्यांना ठार करा; आणि त्यांच्यांतून (कोणालाही आपला) दोस्त व मददगार बनवूं नका. ८९. परंतु जे लोक अशा मंडळीस जाऊन मिळाले असतील कीं तुमच्या व त्यांच्या दरम्यान (सलोख्याचें) करारबंधन असेल, अगर तुह्मांशीं लढावें किंवा आपल्या मंडळीशीं लढावें याबद्दल त्यांच्या उरांत संकोच वाटून ते तुह्मांकडे येतील (तर असल्या लोकांशीं मेळमिलाफ राखण्यांत अडचण नाहीं). आणि जर परमेश्वर इच्छिता, तर या लोकांस तुह्मांवर वर्चस्व देता. मग हे तुह्मांशीं लढतेच लढते. पण जर (असले लोक) तुह्मांपासून अलग राहतील व तुह्मांशीं न लढतील व तुह्मांकडे सलोख्याचें बोलणें टाकतील; तर अशा लोकांवर (हात टाकण्याचा) परमेश्वरानें तुह्मांस कोणचाही मार्ग ठेविला नाहीं. ९० आणखी कांहीं लोक तुह्मांस असेही सांपडतील कीं जे तुह्मांकडून अभयांत राहूं इच्छितात व आपल्या लोकांकडूनही अभयांत राहूं इच्छितात. (पण वस्तुस्थिति अशी कीं) जेव्हां कधीं त्यांना कोणी फंदफितुरा (ह्मणजे अधर्मा)कडे पालटून नेईल, तेव्हां ते त्यांत जाऊन पालथे पडण्यास तयार! पण, (असले लोक) जर

**तुह्मांपासून अलग न राहतील व तुह्मांकडे सलोख्याचें बोलणें न टाकतील आणि (लढाईपासून) आपले हात न आवरून घेतील, तर त्यांना धरा व जेथें तुह्मीं त्यांना पावाल तेथें त्यांना ठार करा. आणि हेच लोक होत कीं ज्यांच्यावर आह्मीं तुह्मांस उघड सत्ता देऊन ठेविली आहे. ९१. आणि कोणाहि मुसलमानास वाजवी नाहीं कीं त्यानें मुसलमानास (जिवें) मारून टाकावें; पण चुकीनें (मारून टाकिलें असेल तर**

---

( १ ) ह्यांतील ८८ ते ९१ पर्यंतचीं वाक्यें, जे ढोंगी मुसलमान, आपणास मदिनेचें हवापाणी सोसत नाहीं या निमित्तानें पैगंबर साहेबांची परवानगी घेऊन खेड्यापाड्यांत निघून गेले; व हळूहळू सरकत सरकत मूर्तिपूजकांपाशीं जाऊन आश्रय घेतला, त्यांच्या संबंधांत प्रकट झालीं आहेत. तेव्हां त्यांच्या संबंधानें मुसलमानांत मतभेद झाला. कोणी म्हणे कीं त्यांच्याशीं लढावें, व कोणी म्हणे कीं नाहीं. परमेश्वरानें त्यांच्याशीं लढण्या न लढण्याविषयीं तपशील केला आहे; कारण, या लोकांचे तीन पक्ष होते. कित्येक असे होते कीं त्यांनीं अशा लोकांचा जाऊन आश्रय घेतला कीं ज्यांच्याशीं मुसलमानांचा तह होता आणि ते आश्रय धरल्यावर गुपचीप राहिले. तर त्यांचें नांव काढतां कामा नये. दुसरे, ज्यांच्यानें मुकाट्यानें बसवलें नाहीं व ते होतेही लढवय्ये, त्यांना ही विवंचना पडली कीं खालीं बसल्या बसल्या जीव घाबरतो व लढावें तर कोणाशीं लढावें ? मुसलमानाशीं उघडपणें लढणें वाजवी नाहीं; व ज्यांच्या आश्रयांत आहेत त्यांशीं पूर्वीचें करारबंधन आहे; तेव्हां त्यांच्याशींही लढतां येईना. अखेर शरण येऊन मुसलमानांस म्हणूं लागले कीं आम्हांस पुन्हां आपल्यांत मिळवून घ्या. अशा लोकांविषयीं मुसलमानांस हुकूम आहे कीं त्यांच्याशीं साशंक होऊं नये व संशयावर आपल्या लोकांस समाजांतून काढून आपला जोर घटवून घेऊं नये. तिसरे, जे लोक संधि साधण्याचे बेतांत टपून आहेत, त्यांना जर फंदफितुर माजविण्याचें फावेल तर ते उघड रणें माजवितील; तर अशा लोकांविषयीं हा हुकूम आहे कीं मुसलमानांनीं त्यांस शत्रु समजून त्यांच्याशीं, जसें शत्रुशीं वर्तन करितात तसेंच वर्तन करावें.

गोष्ट वेगळी.) आणि जो मुसलमानाला चुकीनें (हि) मारून टाकील, तर एक मुसलमान गुलाम मुक्त करणें व द्रव्यदंड मैयताचे वारसदारांच्या स्वाधीन करणें होईल; (तें वेगळेंच.) पण हें कीं (मैयताचे वारस द्रव्यदंड,) माफ करतील (तर असो.) मग जर (मारला गेलेला इसम) तुह्मां मुसलमानांचे जे शत्रू होत अशा-लोकांपैकीं असेल व तो खुद्द मुसलमान असेल, तर (फक्त) एक मुसलमान गुलाम मुक्त करणें होईल. आणि जर तो अशा लोकांपैकीं असेल कीं तुमच्या व त्यांच्या दरम्यान (सलोख्याचें) करारबंधन आहे, तर (मारणारास पाहिजे कीं त्यानें) मैय-ताचे वारसदारांस द्रव्यदंड पोहोंचता करावा व (याशिवाय) एक मुसलमान गुलामही मुक्त करावा. आणि ज्याला (मुसल-मान गुलाम मुक्त करण्याचें) सामर्थ्य नसेल, तर लागोपाठ दोन महिन्यांचे उपास पाळणें; कीं प्रायश्चित्ताची ही पद्धति ईश्वरनियमित होय. आणि परमेश्वर (सर्वांचे स्थितीशीं) वाकब (असून) त्याचा बंदोबस्त (फार) पक्का (बंदोबस्त) होय. ९२. आणि जो मुसलमानास बुध्या (जिवें) मारून टाकील, तर त्याची शिक्षा जहन्नम (ह्मणजे नरकाग्नी) होय; कीं तो त्यांत नित्य राहील. आणि त्याच्यावर परमेश्वराचा गजब (सादर) होईल व त्याच्यावर परमे-श्वराचा शाप उतरेल, आणि परमेश्वरानें त्याच्यासाठीं मोठी (सक्त) शिक्षा तयार करून ठेविली आहे. ९३. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुह्मीं परमेश्वराचे मार्गांत (लढण्यासाठीं) बाहेर निघाल, तेव्हां (ज्या लोकांवर तुह्मीं चढून जाल त्यांच्या स्थितीची) चांगल्या प्रकारें चौकशी करीत जा. आणि जो कोणी (आपला इस्लामधर्म व्यक्त करण्यास) तुह्मांला सलाम करील त्याला तुह्मीं असें ह्मणूं नका कीं तूं मुसलमान नाहींस. (आणि असें ह्मणण्यांत) तुमचा उद्देश, इह-लौकिक आयुष्याचीं साधनें असतील (कीं त्याला शत्रु समजून लुटावें) तर (अशा लुटीवर काय तुटून पडतां!) परमेश्वरापाशीं (तुह्मांसाठीं) पुष्कळ (लखलाभ) लूटी (प्राप्त) आहेत. पूर्वीं तुह्मींही तर असेंच (उघडपणें इस्लाम व्यक्त करण्यास भीत) होतां; मग परमेश्वरानें

तुह्मांवर आपली कृपा केली (कीं तुह्मीं जगजाहीरपणें इस्लाम व्यक्त करूं लागला,) ह्मणून (दुसऱ्या नव्या मुसलमानांचें मनोदौर्बल्य पाहून लढालढी करण्यापूर्वीं) चांगल्याप्रकारें चवकशी करीत जा. जें कांहींही तुह्मीं करितां, त्याशीं परमेश्वर माहितगार होय. ९४. ज्या मुसलमानांस (कोणचीच) इजानुकसानी नाहीं व ते (धर्म युद्धावरून घरीं) बसून राहिले (व त्यांच्या सामील होण्याची फारशी जरूरीहि नव्हती) हे लोक (दर्ज्यांत), जे लोक आपलें तनमन व धन परमेश्वराचे मार्गात वाहून धर्मयुद्ध करीत आहेत, त्या लोकांचे बरोबर होऊं शकत नाहींत. आपलें तनमन व धन (परमेश्वरास) अर्पून धर्मयुद्ध करणारांस (घरीं) बसून राहणारांवर दर्जांचे मानानें परमेश्वरानें मोठें श्रेष्ठत्व दिलें आहे. आणि (एऱ्हवीं) परमेश्वरानें चांगल्या (मोबदल्या)चें अभिवचन तर सर्वांही (मुसलमानां)स दिलें

---

(१) नास्तिक लोक जाणूनबूजून आपल्या अज्ञानमूलक द्वेषाचे भरांत इस्लामधर्माची हेटाळणी व त्याच्या अनुयायांचा अतोनात छळ करूं लागले; तेव्हां त्यांच्याशीं युद्धाचा उपक्रम झाला; व पैगंबर साहेबांनीं कांहीं मुसलमानांस शत्रूंवर पाठविलें. तिकडील कांहीं जण गांवाबाहेर गुरें चरवीत होते. त्यांनीं इस्लाम व्यक्त करण्याचे हेतुनें मुसलमानांस पाहून इस्लामी कायद्यानुसार 'सलामुन् अलैकुम्–' तुह्मांस शांति वा सलाम असो–असें ह्मटलें. मुसलमान ह्यास धोका समजून त्यांशीं लढले व त्यांचीं गुरें हिरावून घेतलीं. या वाक्यांत अशा प्रकारच्या चवकशीवांचून केलेल्या उतावळ्या व अविचारीपणाच्या वर्तणुकीस दोषास्पद ठरविलें आहे.

(२) ही कैद आह्मीं यासाठीं लाविली कीं मुसलमानांस मदतीची जरूर असेल व सबबी वांचून कोणी युद्धांत सामील न होईल तर असलीं मनुष्यें इस्लामाबाहेर होत.

(३) तनमन अर्पून लढणें ह्मणजे शरीरबल खर्ची घालून शत्रूंशीं झुंज घालणें; व धन अर्पून युद्ध करणें ह्मणजे लढणारांस खर्चवेंच देऊन साह्य करणें.

**आहे. आणि परमेश्वरानें महा पुण्यफलाचे मानानें धर्मयोध्यांस (घरीं) बसून राहणारांवर मोठें श्रेष्ठत्व दिलें आहे. ९५. (हे लोकांचे) दर्जे होत (कीं जे) परमेश्वराकडून (ठरलेले आहेत) आणि त्याची क्षमा व दया ह्या होत. आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. ९६. जे लोक (मूर्तिपूजकांत पडून राहिल्यानें व धर्माच्या भ्रष्टाचारानें) आपणच आपल्यावर जुलूम करीत राहिले, त्यांना, दूत त्यांचे प्राण हरण केल्यावर विचारितात कीं तुह्मीं (दारुल्हर्ब[१] मध्यें पडल्या पडल्या) काय (करीत) राहिलां? तर ते जबाब देतात कीं आह्मीं तर त्या भूप्रदेशांत दुर्बल (व पराधीन) होतों. (यावर दूत त्यांना) ह्मणतात कीं परमेश्वराची (इतकी लांब रुंद) जमीन कां (तुमचा एवढा) समावेश करीत नव्हती कीं तुह्मीं तींत (कोणीकडेही) स्वदेशत्याग करून चालते झालां असतां? सारांश,**

---

(१) दारुल्हर्ब ह्मणजे ज्या देशांत परधर्मीय वा नास्तिकांची अंमलदारी असून तेथील अधिकारी धर्मद्वेष बाळगून मुसलमानांस नमाज, रोजा ह्मणजे उपास, हज्ज, व जकात ह्मणजे धर्मकर वगैरे धर्मकर्तव्यें बजाविण्यांत अडथळा करतील, तो देश. तर अशा मुलखांत मुसलमानांस राहणें योग्य नाहीं; किंबहुना स्वदेश त्याग करून त्यांनीं आणखी एखादा असा देश वसवावा कीं जेथें त्यांना धर्मसंबंधीं कसलाच प्रत्यवाय नसेल. अशा देशांत ज्यांना जिहाद ह्मणजे धर्मयुद्ध करण्याचें सामर्थ्य असेल व त्यांच्या शिरावर कोणी धर्माध्यक्ष अगर सरदार असेल तर त्यांना जिहाद करण्याची परवानगीहि आहे. परंतु आह्मांवर परमेश्वराचे मोठे उपकार आहेत कीं हिंदुस्थान हा एतावता खिस्त्यांची अंमलदारी असतांही दारुल्हर्ब नाहीं; कांकीं येथें धर्म कर्तव्यें बिनहरकत बजावितां येतात. प्लेग वगैरे स्पर्शजन्य सांथीमुळें हाजी लोकांस मज्जाव होतो तो कायमचा नसून तात्पुरताच होय. आरोग्यसंरक्षणार्थ व लोकांचे प्राण वांचविण्यासाठीं ज्या तजविजी काढल्या जातात त्यांस प्रत्यवाय असें ह्मणतां येत नाहीं; कारण कीं रोगराई नाहींशी होतांच हे कायदेही नाहींसे होतात.

हे ते लोक होत कीं ज्यांचें ठिकाण नरकाग्नि आहे; व ती (फारच) वाईट जागा होय.! ९७. पण (होय,) पुरुष व स्त्रियां व मुलें जीं इतकीं दुर्बल होत कीं त्यांच्यानें कोणतीही तोड काढवत नाहीं य त्यांना (बाहेर निघून जाण्याचा) एखादा मार्गही सुचत नाहीं; ९८. तर उमेद आहे कीं परमेश्वर अशा लोकांस माफ करील. आणि परमेश्वर माफीकर्ता व क्षमाशील होय. ९९. आणि जो कोणी परमेश्वराचे मार्गांत (ह्मणजे परमेश्वराप्रीत्यर्थ) स्वदेशत्याग करील, तर भूतळावर त्याला (राहण्या—वसण्यासाठीं) पुष्कळ ऐसपैस जागा व (हर तऱ्हेची) रेलचेल प्राप्त होईल. आणि जो कोणी आपल्या घरांतून परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजकडे स्वदेशत्याग करून निघेल, तदनंतर मृत्यु त्याला येऊन गांठील; तर त्याचा मोबदला परमेश्वराकडे सिद्ध होऊन चुकला. आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. १००. आणि (मुसलमानांनों!) जेव्हां तुह्मीं (धर्मयुद्धास्तव) पृथ्वीवर (कोठेंही) चालून जाल व तुह्मांस ही भीति असेल कीं (नमाज पढतांना कोठें) नास्तिक लोक तुह्मांशीं (लढाईची) कुरापत काढूं लागतील तर नमाजींतून (कांहीं) कमी करण्यांत तुह्मांवर कांहीं पाप

---

(१) कांहीं कमी करणें ह्मणजे नमाजींत चार रकअती पढण्याचे जागीं दोन रकअती पढाव्या—ह्मणजे एका वेळेच्या नमाजींत चारदां झुकावयाचें तेथें दोनदांच झुकावें. इतकीही संधि न मिळेल तर इमामासोबत एक रकअत नमाज करावी व दुसरी रकअत वेगळी आदा करावी. हेंही न होऊं शकल्यास क़ज़ा करावी ह्मणजे तो वेळ लोटून गेल्यास दुसऱ्या कोणत्याहीवेळीं पुरी करावी. यास प्रमाण हें कीं हजरत पैगंबर साहेबांनीं व हजरत उमर यांनीं खंदकाच्या लढाईंत त्यांच्या असरचे नमाजीचा वेळ चुकून गेला होता ह्मणून मगरीबचे नमाजीबरोबर ती गेलेली नमाज पुरी केली. हें वाक्य धर्मयोद्धयांच्या भयप्रसंगीं होणाऱ्या नमाजीसंबंधानें आहे. सामान्य प्रवासयास नमाजीच्या कमी करण्याविषयीं हुकूम हदीस ह्मणजे पैगंबरांच्या वचनांत आहेच.

नाहीं. निःसंशय नास्तिक तुमचे बोलून चालून शत्रु आहेत. (ते-तुह्मांस शांतपणें नमाज पढूं देणार नाहींत.) १०१. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां तूं मुसलमानां(च्या फौजे)सोबत असशील व (इमाम बनून) त्यांना नमाज पढवूं लागशील, तेव्हां मुसलमानांच्या एका समूहानें तुझ्या बरोबर (नमाजीस) उभें रहावें व आपलीं हत्यारें घेऊन असावें. मग जेव्हां ते (परमेश्वरापुढें) साष्टांग नमस्कार घालून चुकतील, तेव्हां त्यांनीं (मागें हटून) तुमच्या पाठीस राहावें. आणि दुसरा समूह जो (अद्यापि) नमाजींत सामील झाला नाहीं त्यानें येऊन तुजबरोबर नमाजींत सामील व्हावें; आणि त्यांनीं हुशारी (बाळगावी) व आपलीं हत्यारें घेऊन राहावें. नास्तिकांची तर ही उत्कंठा आहे कीं तुह्मीं (किंचित्‌हीं) आपलीं हत्यारें व (युद्ध-)सामुग्री यांकडून गाफील होऊन जावें कीं त्यांनीं एकाएकीं येऊन तुह्मांवर तुटून पडावें. आणि जर तुह्मां लोकांस पावसामुळें कांहीं इजा असेल अगर तुह्मीं अजारी असाल तर आपलीं हत्यारें उतरून ठेवण्यांतही तुह्मांवर कांहीं पाप नाहीं; आणि (होय,) आपली हुशारी ठेवा. परमेश्वरानें नास्तिकांसाठीं बेअब्रूची शिक्षा तयार करून ठेविली आहे. १०२. मग जेव्हां तुह्मीं (भयप्रसंगीं) नमाज पुरी करून चुकाल, तेव्हां (त्यानंतर) उठतां व बसतां व आपल्या कुशीवर (निजतां), परमेश्वराचें नाम-स्मरण करण्यांत लागून असा. मग जेव्हां तुह्मीं (शत्रूंकडून) बिनघोर होऊन जाल, तेव्हां तुह्मीं (नित्यनियमाप्रमाणें) नमाज पढा. कारण, वेळेचे वेळेस नमाज पढणें मुसलमानांचें कर्तव्यकर्म होय. १०३. आणि लोकां (ह्मणजे शत्रू)चा पिच्छा करण्यांत तुह्मी हिंमत खचूं नका. जर (लढाईत) तुह्मांस कष्ट पोहोंचतात तर, जसे तुह्मांला कष्ट पोहोंचतात तसेच त्यांनाही कष्ट पोहोंचतात. आणि (तुमची जीत ही

---

(१) भावार्थ हा कीं जर भयाची व जोखिमीची परिस्थिति आहे व नमाजीचा वेळ चालला जात आहे, तर जशी पढतां येईल तशी नमाज पढून घ्यावी व वेळ चुकूं देऊं नये.

होय कीं) परमेश्वराकडून तुह्मांस अशा अशा आशा आहेत कीं ज्या आशा त्यांना नाहींत. आणि परमेश्वर (सर्वांची स्थिति) जाणतो (व युद्धकौशल्य) खूप समजतो. १०४. (हे पैगंबरा!) आह्मीं (जें) सत्यपूर्ण पुस्तक तुला प्रकट केलें आहे (तें यासाठीं) कीं जसें परमेश्वरानें तुला दाखवून दिलें आहे त्याप्रमाणें तूं लोकांचा परस्पर न्याय निवडीत जावेंस. आणि दगलबाजांचा तरफदार बनूं नकोस. १०५. आणि परमेश्वरापाशीं (चूकभूली बद्दल) माफी माग; कीं परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. १०६. आणि जे लोक (इतरांशीं दगलबाजी करून वास्तविक दुष्परिणामाचे दृष्टीनें) खुद्द आपणाशींच दगलबाजी करतात, अशांची कड धरून (लोकांशीं,) वाटाघाट करूं नकोस. कारण, जो कोणी दगलबाज पापिष्ट होय त्याला परमेश्वर पसंत करीत नाहीं. १०७. (हे असे मूर्ख होत कीं) लोकांशीं तर पडदा[1] राखतात व परमेश्वराशीं पडदा राखीत नाहींत; व वास्तविक पाहतां, जेव्हां ते रात्रीं (बसून बसून) परमेश्वराला ज्या गोष्टी पसंत नाहींत अशा गोष्टींविषयीं सल्ला-मसलत करतात, तेव्हां परमेश्वर त्यांच्याबरोबर (हजर) असतो. आणि जें कांहीं (हे) करतात तें (सर्व) परमेश्वराचे आकलनशक्तींत होय. १०८. (मुसलमानांनो!) ऐका! तुह्मीं ह्या लोकींच्या आयुष्यांत त्यांची बाजू धरून वाटाघाट केली, (ती केली; पण बरें हें) तरी (सांगा कीं) पुनरुत्थानाचे दिवशीं त्यांच्याकडून परमेश्वरासमीप कोण वाटाघाट करील? अगर कोण त्यांचा वकील बनेल? १०९. आणि जो कोणी कांहीं वाईट काम करील, अगर (खोटी शपथ इत्यादि द्वारें) आपणच आपल्या जिवावर जुलूम करील, (व) तदनंतर परमेश्वरापाशीं (आपल्या अपराधांबद्दल) क्षमा मागील; तर त्याला आढळून येईल कीं परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ११०. आणि

---

(१) पडदा राखणें ह्मणजे लज्जे मुळें लपवून ठेवणें. तर कोणतेंहि काम करण्यांत लोकांची शरम पाळणें व परमेश्वर जो सर्वज्ञानी होय त्याची शरम न पाळणें हें खरोखरच मूर्खपण होय.

जो कोणी कांहीं पापार्जन करितो, तर त्याचें पापार्जन खुद्द त्याच्याच पुढें येतें. आणि परमेश्वर (तर सर्वांची स्थिति) जाणतो (व प्रत्येकाच्या स्थित्यनुसार) हुकूम फर्मावितो. १११. आणि जो कोणी कांहीं चूक वा पाप करील, व तदनंतर एखाद्या निरपराध्याचे डोक्यावर त्याचें खापर फोडील; तर त्यानें खचितच कुभांड व ढळढळीत पाप (यांचें ओझें आपल्या मानेवर) लादलें. ११२. आणि (हे पैगंबरा!) जर तुजवर परमेश्वराची कृपा व त्याची दया नसती, तर त्यांच्यांतल्या एका समूहानें तुला बहकविण्याचा बेत केलाच होता. आणि हे लोक काय ते आपणच आपल्याला बहकवित राहतात; आणि तुला (हे लोक) कांहींच नुकसान पोहोंचवूं शकत नाहींत. कारण, परमेश्वरानें तुला पुस्तक प्रकट केलें व विवेचक बुद्धि (दिली); आणि तुला अशा अशा गोष्टी शिकविल्या कीं ज्या, (पूर्वी) तुला माहीत नव्हत्या. आणि तुजवर परमेश्वराची मोठी कृपा होय. ११३. या लोकांच्या बहुतेक खलबतांत भलाई(चा तर गंधहि) नाहीं. पण (होय,) जो धर्मादाय अगर (आणखी एखादें) सुकृत्य किंवा लोकांचा परस्पर मेळ मिलाफ अशा(गोष्टीं)ची सल्ला देईल (तर ही अलबत भलाई होय); आणि जो कोणी परमेश्वराची मर्जी संपादण्यासाठीं अशीं कृत्यें करील तर आम्हीं (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्याला मोठा मोबदला देऊं. ११४. आणि जो कोणी सरळमार्ग स्पष्ट दिसून आल्यावर पैगंबराचे उलट जाईल व मुसलमानांच्या मार्गाशिवाय (अन्य मार्गी) लागेल तर

---

(१) मागील दोन रुकूअ म्हणजे सदरांतील वाक्यांच्या प्रकटीकरणासंबधानें एक गोष्ट आहे. ती अशी कीं हजरत पैगंबर साहेबांचे वेळीं एका अनसारी म्हणजे मदिनेकरानें आपलें बकतर पिठांत ठेविलें होतें तें चोरीस गेलें. पिठाचा शोध प्रथम तोअमा बीन उबैरक नामी मुसलमानाचे व नंतर एका यहुद्याचे घरापर्यंत लागला व बकतर यहुद्याचे घरीं सांपडलें. यहुदी म्हणाला कीं तें तोअमा हा ठेवून गेला आहे; पण तोअमा नाकबूल झाला व त्याचे ज्ञातीय बांधव त्याचा दोष उडविण्यास तयार झाले.

जो (मार्ग) त्यानें पत्करला आहे त्याच मार्गावर आम्हीं त्याला चालवित जाऊं व (अखेर) त्याला नरकाग्नींत (नेऊन) दाखल करूं. आणि ती (फारच) वाईट जागा होय.! ११५. परमेश्वर ह्या (अपराध) तर क्षमा करीत नाहीं कीं त्याचा (कोणालाही) शराकतदार बनविला जावा; आणि ह्याच्या खालोखाल जे (अपराध) ते तो ज्याला इच्छील त्याला क्षमा करील. आणि ज्यानें परमेश्वराचा शराकतदार ठरविला, तो (सरळ मार्गाहून फारच) दूर भटकून गेला. ११६. (हे मूर्तिपूजक लोक) परमेश्वरास सोडून फक्त स्त्रिया (ह्मणजे देवीं)चाच काय तो धांवा करतात; म्हणजे ते निवळ शिरजोर सैताना(चे कह्यांत येऊन त्या)स बोलवितात; ११७. कीं त्याला (पूर्वकालीं) परमेश्वरानें शापित केलें व तो म्हणूं लागला कीं मी तर तुझ्या सेवकांपासून (नवस व आहुतींचा) एक नियमित वांटा अवश्यच घेत जाईन. ११८. आणि मी त्यांना जरूर बहकवीन आणि त्यांना आशाहि अवश्य लावीत जाईन व त्यांना समजावीन कीं ते (माझ्या आज्ञेनुरूप मूर्तीच्या बळीदानाच्या) जनावरांचे कानही अवश्य चिरीत राहतील; आणि मी त्यांना समजावीन कीं ते (माझ्या आज्ञेनुसार) परमेश्वराच्या सृष्टीचें स्वरूपही अवश्य बदलून टाकतील. आणि जो कोणी परमेश्वरास सोडून सैतानास मित्र बनविल (व त्याचें अनुकरण करील) तर तो धडधडीत तोट्यांत येऊन पडलाच. ११९.

---

पैगंबर साहेबांस प्रकटीकरणाद्वारें यहुद्याची दोषमुक्तता व तोआमाचा अपराध शाबीत झाला. दोस्त व दुशमन यांचेमध्यें इतका इनसाफ व सत्याची इतकी तरफदारी पैगंबरावांचून दुसरा कोण करूं शकतो ?

(१) स्त्रिया म्हणजे देवींच्या मूर्ती. आपल्या कडील हिंदु लोक जसें देवींस मानतात तसेंच अरब लोकही पूर्वी 'लात, उज्जा इत्यादिकांस देवी व दूतांस परमेश्वराच्या मुली समजून त्यांची भक्ति उपासना करीत असत. ही किती तरी अविचारीपणाची गोष्ट होय कीं स्त्रिया ज्या पुरुषांपेक्षांहि दर्जात कमी प्रतीच्या होत त्यांस परमेश्वरासमान मानिलें जावें !

(२) डोक्यावर मानतेची शेंडी राखणें, गोंदणें व अशाच तऱ्हेच्या इतर गोष्टी करणें ह्मणजे सृष्टीचें स्वरूप बदलण्यादाखल होय.

(सैतान) त्यांना वायदे देतो व त्यांस आस्था लावितो; आणि सैतान त्यांच्याशीं जे (कांहींहि) वायदे करितो, त्या निवळ थापाच थापा होत. १२०. हेच लोक होत कीं त्यांचें (शेवटचें) ठिकाण नरकाग्नि होय; व त्यांना तेथून कोठेंच पळतां येणार नाहीं. १२१. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंही केलीं, त्यांना आह्मीं लवकरच (स्वर्गाचे) अशा बागांत (नेऊन) दाखल करूं कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व ते) त्यांत सदासर्वदा राहतील. (त्यांच्याशीं हा) परमेश्वराचा पक्का वायदा आहे; आणि परमेश्वरापेक्षांही बोलाचा खरा (आणखी) कोण (होणार)? १२२. (मुसलमानांनो! अंतिम साध्य) तुमच्या आस्थांवर (अवलंबून) नव्हे व ग्रंथधारी लोकांचेहि आस्थांवर नव्हे; (तर तें कर्मांवर अवलंबून होय.) तर जो कोणी वाईट काम करील त्याला त्याचें शासन दिलें जाईल; आणि परमेश्वराशिवाय त्याला कोणी पुरस्कर्ता मिळणार नाहीं व मदतगारहि नाहीं. १२३. आणि जो कोणी कांहीं सुकृत्य करील, मग तो पुरुष असो कीं स्त्री, व तो विश्वासही ठेवित असेल, तर असे (गुणवान्) लोक स्वर्गांत (जाऊन) दाखल होतील; व त्यांच्या हक्कांची तिळमात्रही पायमल्ली होणार नाहीं. १२४. आणि अशा मनुष्यापेक्षां कोणाचा धर्म उत्तम होऊं शकतो कीं ज्यानें परमेश्वरापुढें आपलें शिर नमविलें, व तो वस्तुतः परोपकारशीलहि आहे आणि इब्राहीमाचे धर्मावर चालतो कीं तो एका (परमेश्वरा)चाच होऊन राहिला होता. आणि परमेश्वरानें इब्राहीमाला (आपला) निस्सीम मित्रही ठरविला होता. १२५. आणि

---

(१) ह्मणजे प्रत्येक धर्माचा अनुयायी आपल्यापरी अंतिम साध्य वा अध्यात्मिक उन्नति यांचा आशावादी आहे. दरेक समाज जें कांहीं आपल्यापाशीं आहे त्यांतच मग्न आहे. परंतु जे लोक समजतात कीं आपण ज्या जातींत व समाजांत आहोंत त्यांतच असणें हें मोक्षास कारणीभूत आहे ही त्यांची चूक आहे. **पदः—जातपात पूछे न कोय ॥ हरको भजे सो हरका होय ॥१॥**

**जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वराचेंच होय. आणि दरेक वस्तु परमेश्वराच्याच आटोक्यांत होय. १२६. आणि (हे पैगंबरा! लोक) तुजपाशीं (अनाथ) स्त्रियां(शीं विवाह करण्या)विषयीं हुकूम मागतात. तर (तूं त्यांना) समजावून दे कीं परमेश्वर तुह्मांस त्यांच्या(शीं विवाह करण्या)विषयीं परवानगी देतो; (व पूर्वींही परवानगीच होती.) आणि कुर्आनांत जो (हुकूम पूर्वीं) तुम्हांस ऐकविला जाऊन चुकला आहे, तो (वस्तुतः) अशा अनाथ[1] स्त्रियांसंबंधींच होय कीं ज्यांना तुह्मीं (त्यांचा) हक्क**

---

(१) अरब लोकांचे स्वभाव करडे व सक्त तर होतेच. आणि मानवांत सर्वांत कमकुवत ह्मणजे स्त्रीजात व अनाथ बालकें हीं होत. तर ह्याच दोन्ही वर्गांवर लोकांकडून तऱ्हेतऱ्हेचे जाचजुलूम व निर्दयपणा होत होता. इस्लामधर्मानें त्यांस उच्च पायरी देऊन हे जुलूम अजीबात बंद केले. स्त्रियांविषयींच्या नियमांचा पूर्वीं उल्लेख होऊन चुकला आहे. अनाथ बालकांचे वित्ताचे संरक्षणास्तव आज्ञा केली गेली कीं तें गिळंकृत करूं नका. तेव्हां लोकांनीं भीतिमुळें त्यांचे खाणें पिणें वेगळें करून ठेविलें. सारांश, त्यांना पुन्हां समजाविणें भाग पडलें कीं असल्या अंतर ठेवण्यानें अनाथांस उलट आणखी नुकसान पोहोंचतें; ह्मणून त्यांचें खाणें पिणें संगतीं ठेवण्यास अडचण नाहीं. परंतु ह्याचा मात्र विचार पाहिजे कीं कोणाही तऱ्हेनें त्यांच्या हक्कांची पायमल्ली होऊं नये. अशाच तऱ्हेनें अनाथ बालकीयांसंबंधीं एक हुकूम दिला गेला आहे कीं जर तुमच्यानें त्यांच्या हक्कांचें संरक्षण न होऊं शकेल, तर त्यांशीं लग्न लावून घेऊं नये हेंच उत्तम. सल्ल्यापरी ही गोष्ट सांगितली गेली होती; पण लोक समजले कीं अनाथ बालकीशीं लग्न करणेंच निषिद्ध आहे. या गैरसमजुतीचे दुष्परिणाम असे घडून येऊं लागले कीं कांहीं विशिष्ट परिस्थितींत अनाथ बालकीचा पुरस्कर्ता तिच्याशीं लग्न करून जसा तिचा विचार व कळकळ ठेवी, तशी दुसऱ्या कोणा नवऱ्याच्यानें ठेववेना; हें त्यांस नुकसान कारक होतें; पण त्यांशीं लग्न करण्याची मनाई आहे असा लोकांचा खोटा ग्रह होता. या वाक्यांत ह्या गैरसमजुतीची सुधारणा केली गेली कीं अनाथ बलाकीयांशीं लग्नाची मनाई त्यांचें संरक्षण बरोबर न होण्याच्या भीतीमुळें

जो त्यांच्यासाठीं ठरविला गेला आहे तो देत नाहीं; व (असें असतांही) तुह्मीं त्यांच्याशीं विवाह करण्याची अभिलाषा बाळगितां! आणि तसाच (परमेश्वर) दुर्बल बालकांसंबंधींही (हुकूम देतो कीं त्यांच्या हक्काचें संरक्षण करा;) आणि (मुख्यत्वें करून) हें कीं अनाथ बालाकांचे ठायीं तुह्मीं न्याय कायम ठेवावा. आणि (अनाथांशीं) कोणाही तऱ्हेची भलाई कराल तर परमेश्वर तीस जाणून आहे. (ह्मणजे तो तुम्हांस तिचा मोबदला देईल.) १२७. आणि जर कोणा स्त्रीस आपल्या पतीकडून रुसवा वा बेपर्वाई यांचा अंदेशा असेल, तर (पतिपत्नि या) उभयतां(-तून कोणा)वरही कांहीं पाप नाहीं कीं त्यांनीं, तडजोडीचें बोलणें करून आपसांत समेट करून घ्यावा. आणि समेट (सर्वतोपरी) उत्तम होय. आणि (थोडाबहुत) लोभ तर सर्वांच्याही स्वभावांत असतोच. आणि जर तुह्मीं (एकमेकांशीं) परोपकार कराल व (सक्त वर्तणूकी विषयीं) जपाल, तर पमेश्वर तुमच्या (ह्या सु)कृत्यांशीं माहीतगार होय. (व तो तुह्मांस त्याचा बदला देईल.) १२८. आणि तुह्मीं (आपल्या परी) कितीहि आतुरतेनें इच्छाल तरीहि हें तुमच्यानें मुळींच होऊं शकणार नाहीं कीं तुह्मीं (अनेक) पत्न्यामध्यें (पुरीपुरी) बरोबरी करूं शकाल. तर तुह्मीं बिलकुल (एकीच्याचकडे) झुकून पडूं नका कीं (तेणें करून) दुसरीला तुह्मीं असें सोडून बसावें कीं जणों ती (अधरच) लोंबकळत राहिली आहे. आणि जर तुह्मीं (आपसांत) समेट करून घ्याल व (एकमेकांवर अतिरेक करण्याविषयीं) जपाल तर परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. १२९. आणि जर (पतिपत्नींत समेट न होऊं शकेल व एकमेकांपासून) ते वेगळे होऊन जातील, तर परमेश्वर आपल्या औदार्यानें प्रत्येकाचें

---

आहे पण पुरस्कर्त्यानें त्यांच्याशीं लग्न न केल्यानें जर त्यांचें नुकसान होत असेल तर मात्र त्यांशीं लग्नाची मनाई नाहीं.

(१) परमेश्वर असा औदार्यशाली होय कीं तो प्रत्येकास ज्याचा त्याला शेर देतो. तर स्त्रिपुरुषांपैकीं कोणीच असें समजूं नये कीं कोणातांचून कोणाचें कांहीं अडून राहील.

पुरें करील. आणि परमेश्वर (फारच) उदारधि व सत्यसंकल्प होय. १३०. आणि जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वराचेंच होय. आणि (मुसलमानांनों!) ज्या लोकांस, तुमच्यापूर्वी पुस्तक मिळालें होतें त्यांस व तुह्मांस आम्हीं हीच ताकीद देऊन ठेविली आहे कीं परमेश्वरा(चे खपा मर्जी)स भीत राहा. आणि जर तुह्मीं (त्याची आज्ञा) न मानाल तर (तो तुमची कांहीं पर्वा बाळगीत नाहीं; कारण,) जें कांहीं आकाशांत व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वराचेंच होय. आणि परमेश्वर निरपेक्ष (व सर्वतोपरी) सुस्तुत्य होय. १३१. आणि जें कांहीं आकाशांत व जें कांहीं पृथ्वींत आहे तें परमेश्वराचेंच होय. आणि परमेश्वरच कर्ताहर्ता बस्स होय. १३२. अहो लोकांनों! जर तो इच्छील तर तो तुह्मांस (इहलोकांतून) उचलून घेऊन इतरांस आणून वसवील आणि परमेश्वर असें करण्यास समर्थ होय. १३३. ज्याला (आपल्या कर्माचा) मोबदला या दुनियेंतच पाहिजे असेल तर परमेश्वरापाशीं इहलोक व परलोक या (दोहों)चा मोबदला (प्राप्त) होय. (तर मग त्याच्यापाशीं इहलौकिक व पारमार्थिक दोन्ही मोबदले कां न मागितले जावेत?) आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्वांची स्थिति) पाहतो. १३४. अहो मुसलमानांनों! तुह्मीं मजबुतीनें न्यायावर कायम राहा (व) परमेश्वरास स्मरून साक्ष द्या; व (मग) जरी (ही साक्ष) खुद्द तुमच्या अगर आईबापांच्या अगर अति जवळचे नातलगांच्या विरुद्धच (कां) असेना! जर (त्यांच्यांत) कोणी श्रीमंत अगर गरीब आहे तर परमेश्वर त्यांचा (सर्वांत) जास्त पुरस्कर्ता होय. ह्मणून तुह्मीं (त्यांच्या प्रीत्यर्थ आपल्या) वासनेच्या मागें लागूं नका कीं तुह्मीं सत्यापासून चळूं लागावें. आणि जर तुह्मीं ओढून ताणून साक्ष द्याल अगर (मुळांत साक्ष देण्यापासूनच) तोंड चुकवाल, तर (जसें कराल तसें भराल; कारण,) जें कांहीं तुह्मीं करितां, परमेश्वर त्याशीं माहितगार होय. १३५. अहो मुसलमानांनों! तुम्हीं, परमेश्वरावर विश्वास ठेवा, व त्याचा पैगंबर (मोहंमद) याजवर

आणि त्यानें जें (कुर्आन्) पुस्तक आपला पैगंबर (मोहंमद्) यास प्रकट केलें आहे त्यावर व (कुराणाचे) पूर्वीं जीं पुस्तकें (इतर पैगंबरांस) प्रकट केलीं त्यांजर (विश्वास ठेवा.) आणि जो कोणी परमेश्वरास नाकारील व त्याच्या दूतांस व त्याच्या पुस्तकांस व त्याच्या पैगंबरांस व शेवटल्या दिवसास; तर तो (सन्मार्गा-हून) फारच दूर भटकून गेला. १३६. ज्या लोकांनीं विश्वास धरिला, पुन्हां (विश्वासास) नाकारिलें; पुन्हां विश्वास धरिला; पुन्हां विश्वासास नाकारिलें, (व नाकारणी)नंतर ते नास्तिकपणांत वाढतच गेले; तर परमेश्वर त्यांना क्षमा करणार नाहीं व त्यांना (सरळ) मार्गहि दाखविणार नाहीं. १३७. (हे पैगंबरा!) दांभिकांस खुषखबर ऐकीव कीं त्यांना (परत्रीं) फार दुःखदायक शिक्षा (होणें) आहे; १३८. कीं हे लोक मुसलमानांस सोडून नास्तिकांस मित्र बनवीत फिरतात. कां नास्तिकांजवळ ते (आपली) अब्रू (वाढवूं) इच्छितात? पण अब्रू[1] तर सारी परमेश्वराचीच होय. १३९. आणि वास्तविक पाहतां, तुह्मां (मुसलमानां)स परमेश्वर (आपल्या) पुस्तकां (म्हणजे कुर्आनां)त हा (हुकूम) सादर करून चुकला आहे कीं जेव्हां तुह्मीं (आपल्या कानांनीं) ऐकून घ्याल कीं परमश्वराचे महावाक्यांस नाकारिलें जात आहे व त्यांची हंशी उडविली जात आहे, तेव्हां तुह्मीं अशा लोकांचे समागमें बसूं नका; येथपर्यंत कीं ते दुसऱ्या कोणा गोष्टींत लागून जातील. नाहींतर अशा स्थितींत तुह्मींहि त्यांच्यासारखेच (नास्तिक) होऊन जाल. परमेश्वर दांभिक व नास्तिक अशा सर्वांसहि नरकाग्नींत (एके जागीं) गोळा करून सोडील; १४०. कीं हे (दांभिक लोक अजून) तुम(च्या परिणा[2]मा)ची वाट पाहत आहेत (कीं पाहूं, नास्तिकांचे

(१) म्हणजे अब्रू परमेश्वराच्याच अखत्यारांत व त्याच्याच हातीं आहे. तो ज्याला इच्छितो त्याला मान अब्रू देतो व ज्याचा इच्छितो त्याचा अवमान करितो.

(२) मुसलमान व नास्तिक यांच्यांत लढाई होत असे, तेव्हां दांभिक लोक मुसलमानांसंगतीं असत; परंतु दिलसफाईनें नाहीं. ते अशा

मुकाबल्यांत ते जीततात कीं हारतात!) मग जर ईश्वरेच्छें करून तुह्मांस विजय (प्राप्त) होऊन गेला तर ते (तुह्मांस) म्हणूं लागतात; (कायहो!) कां आम्हीं तुह्मांबरोबर नव्हतों? आणि जर नास्तिकांस (विजयाचा) वांटा मिळाला, तर ते (आपला हितसंबंध व्यक्त करण्यास नास्तिकांस) ह्मणूं लागतात; कां आम्हीं तुह्मांवर प्रबल झालों नव्हतों व आम्हीं तुम्हांस मुसलमानांचे हातून वांचविलें नाहीं? तर (मुसलमानांनों!) परमेश्वर तुमच्यांत (व दांभिकांत) पुनरुत्थानाचे दिवशीं निकाल लावून देईल. आणि परमेश्वर नास्तिकांस मुसलमानांवर (दरेक प्रकारें वरचढ राहण्याचा) मार्ग केव्हांही ठेवणार नाहीं. १४१. दांभिक लोक (मुसलमानांस धोका दिल्यानें जणूं कीं) परमेश्वरास धोका देतात. आणि वास्तविक (त्यांच्या पारिपत्यास्तव) परमेश्वर

प्रकारचे जुगार खेळत होते कीं एकी व बेकी हे दोन्हो डाव त्यांचेच व्हावेत; ह्मणजे मुसलमानांची फत्ते होई तर लुटीचे मालांत आपला हिस्सा लावण्यासाठीं मुसलमानांस ह्मणत कीं आह्मींही तर तुह्मांबरोबरच होतों; आम्हांलाही आमचा वांटा द्या. आणि जर नास्तिकांची जीत होऊन जाई तर ते त्यांना चढवून देत व म्हणत कीं मुसलमान तर तुम्हांवर प्रबल होऊन चुकले होते. परंतु आम्हींच तुमच्याखातर बुध्या हयगय केली व तुम्हांस जितविलें. तर जें कांहीं मुसलमानांकडून तुमच्या हातीं लागलें आहे तें आणा, तुम्ही व आम्हीं आपसांत वांटून घेऊं.

(१) दरेक प्रकारें वरचढ राहणें म्हणजे यापासून दोन गोष्टी निष्पन्न होतात. एक ही कीं या जगांत नास्तिक लोकांची मुसलमानांवर धर्मविषयक शास्त्रार्थांत अगर वादविवादांत सरशी होऊं शकत नाहीं. अगर नास्तिकांचें इतकें प्राबल्य होणार नाहीं कीं जगांतून मुसलमान नामशेष होतील. दुसरी ही कीं परलोकीं मुसलमानांपुढें नास्तिक फजित व बेअब्रू होतील.

(२) परमेश्वर त्यांनाच धोका देतो आहे, ह्मणजे परमेश्वरानें त्यांची मति पालथली आहे; तर ते समजतात कांहींच व होतें कांहींच. कुराणांत जेथें जेथें धोका, कपट व डावपेंच वगैरे गोष्टी परमेश्वरासंबंधानें

त्यांनाच धोका देतो आहे. आणि (हे लोक) जेव्हां नमाजेसाठीं उभे राहतात, तेव्हां ते आळसावलेले होऊन उभे राहतात. ते (बाहेरून) लोकांस दाखवितात व (मनापासून) परमेश्वराचें स्मरण करीत नाहींत; पण कांहीं किंचितसेंच. १४२. (विश्वास व नास्तिकपणा) यांच्यामध्येंच ते गुटमळत पडले आहेत. (त्यांचा रोख) न (धड) ह्या (मुसलमानां)कडे आहे व न (धड) त्या (नास्तिकां)कडे. आणि ज्याला परमेश्वर भटकवील, तर शक्यच नाहीं कीं तुमच्यांतून कोणी त्याच्यासाठीं एखादा मार्ग काढील. १४३. अहो मुसलमानांनों! तुम्हीं मुसलमानांस सोडून नास्तिकांस मित्र पत्करूं नका. कां तुह्मीं हें इच्छितां कीं परमेश्वराचा धडधडीत पुरावा (म्हणजे दोषारोप) तुम्हीं आपल्यावर (ओढून) घ्यावा? १४४. कांहीं संशय नाहीं कीं दांभिक लोक नरकाग्नीच्या सर्वांत अगदीं खालच्या दर्जांत असतील. आणि (हे पैगंबरा! तेथें) तूं कोणालाही त्यांचा मदतगार न पावशील. १४५. परंतु (त्यांच्यापैकीं) ज्या लोकांनीं पश्चात्ताप केला व आपली स्थिति सुधारिली व परमेश्वरास दृढ चिटकून राहिले आणि प्रांजलमनानें आपला धर्म (सर्वस्वी) परमेश्वरासच वाहिला, तर असले लोक मुसलमानांबरोबर (स्वर्गांत) असतील; आणि परमेश्वर मुसलमानांस (परलोकीं) मोठा मोबदला देईल. १४६. जर तुह्मीं लोक (परमेश्वराचे) आभार मानाल व (त्याच्यावर) विश्वास ठेवाल, तर परमेश्वराला तुह्मांस शिक्षा देऊन काय करावयाचें आहे? किंबहुना परमेश्वर (तर कृतज्ञ लोकांचे) गुण जाणता (व त्यांच्या स्थितीशीं) वाकब होय. १४७.

---

बिवेदिल्या आहेत त्यांचा अर्थ लोकांच्या दुष्कर्मांचें पारिपत्य अगर त्यांचा दुष्परिणाम असा होतो. कारण परमेश्वर मनोविकाररहित असून सर्व प्रकारच्या दोषांपासून पवित्र आहे. तर आपल्या हातून जीं कांहीं वाईट कृत्यें होतात त्यांचेंच फळ आपल्या पुढें येतें; म्हणून दुसऱ्याला धोका देणें म्हणजे आपण आपल्यालाच फसविल्यासारखें होय.

# पवित्र कुराण

## भाग ६ वा.

### सूरतु-न्निसा (पुढें चालू).

परमेश्वरास हें पसंत नाहीं कीं कोणी (कोणाला चौघांत) तोंड सोडून वाईट बोलावें; पण ज्याच्यावर (कोणा तऱ्हेचा) जुलूम झाला असेल (व चौघांत तोंड सोडून जालिमास वाईट बोलत बसेल तर तें क्षम्य होय). आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. १४८. जर तुह्मीं (दुसऱ्यांशीं) जगजाहीरपणें भलाई कराल अगर ती गुप्तपणें कराल, अथवा (तुमच्याशीं कोणी वाईटपणा करील व तुह्मीं) वाईटपणाची माफी कराल, (कीं हीहि एका प्रकारची भलाईच होय); तर परमेश्वरहि (लोकांशीं भलाईच करितो कीं तो) परम समर्थ असतांहि माफी करितो. १४९. जे लोक परमेश्वर व त्याचे पैगंबर यांस (मानण्याचें) नाकारितात आणि परमेश्वर व त्याचे पैगंबर यांच्यांत जुदाई घालूं इच्छितात व म्हणतात कीं आम्हीं कांहीं (पैगंबरां)स मानितो व कांहींस मानीत नाहीं; आणि ते असें इच्छितात कीं (पैगंबरांत भिन्नभाव स्थापन करून विश्वास व नास्तिकपणा) यांच्या मधोमध (दुसरा एखादा) मार्ग पत्करावा. १५०. तर असले लोक खरोखरीच नास्तिक होत. आणि नास्तिकांसाठीं आह्मीं फजितीची शिक्षा तयार करून ठेविली आहे. १५१. आणि ज्या लोकांनीं परमेश्वर व त्याचे पैगंबर यांजवर विश्वास ठेविला व त्यांच्यापैकीं कोणा एका मध्येंही भिन्नभाव ठेविला नाहीं; तर हेच लोक होत कीं ज्यांना परमेश्वर (परलोकीं) त्यांचे मोबदले देईल. आणि परमेश्वर

---

(१) पैगंबरांपैकीं कोणाला पैगंबर न समजणें हेंच परमेश्वर व त्याच्या पैगंबरांत विषमभाव स्थापन करणें होय.

क्षमाकर्ता (व) दयाळू होय. १५२. (हे पैगंबरा!) ग्रंथधारी (ह्मणजे यहुदी) लोक तुजपाशीं (जी निरर्थक) मागणी करतात कीं तूं त्यांना एखादें (आयतें लिहिलेलें) पुस्तक आकाशांतून (आणून) सादर करावेंस, तर (तूं त्यांना बकवा करूं दे; त्यांची वितंडवाद करण्याची संवयच आहे. त्यांचे वडील) 'मूसा'पाशीं याहूनहि थोर (निरर्थक) मागणी करून चुकले आहेत. तथापि ते ह्मणूं लागले कीं आह्मांस तर तूं परमेश्वराचें साक्षात् दर्शन करीव. मग त्यांना त्यांच्या खोडसाळपणामुळें विजेनें येऊन गांठिलें; (व ते मरून गेले. आणि मूसाचे प्रार्थनेनें) पुन्हां (जिवंत झाले;) या (गोष्टी) नंतरहि, त्यांच्यापाशीं (परमेश्वराचे एकत्वाचीं प्रमाणें; व) चमत्कार येऊन चुकले होते त्या उपरांतहि ते (भक्तिप्रित्यर्थ) वासराला धरून बसले. मग आह्मीं (त्यांच्या) ह्या (अपराधा)चीही माफी केली (कीं त्यांचा अनुताप मान्य केला;) आणि 'मूसा'ला आह्मीं उघड उघड वर्चस्व दिलें. १५३. आणि त्या (लोकां)पांसून पक्कें वचन घेण्यासाठीं आह्मीं 'तूर' या (पर्वता)स त्यांच्या (शिरां)वरती आणून लोंबकळविलें, व (तसेंच) आह्मीं त्यांना फर्माविलें कीं (शहरच्या) दरवाज्यांत (उपकार स्तुत्यर्थ) साष्टांग नमस्कार घालीत दाखल व्हा; आणि आम्हीं त्यांना (हेंहि) आज्ञापिलें कीं सब्बाथ(चा दिवस) पाळण्यांत तुह्मीं (आमच्या हुकमांचें) उलंघन करूं नका. आणि आम्हीं त्यांच्यापासून पक्कें वचन घेऊन ठेविलें. १५४. मग त्यांनीं आपला वचनभंग केल्यामुळें व ईश्वरी हुकूम न मानिल्यामुळें आणि पैगंबरांना हकनाक कत्तल केल्यामुळें, (आम्हींही त्यांना शापित केलें;) व (तसेंच) त्यांच्या ह्या बोलण्यामुळें कीं आमचीं अंतःकरणें सुरक्षित आहेत (व कोणाच्याही उपदेशाचा आम्हांवर कांहीं परिणाम होत नाहीं; तर तीं सुरक्षित नव्हेत,) किंबहुना त्यांच्या नास्तिकपणामुळें परमेश्वरानें त्यांजवर मोहर लाविली आहे. म्हणून थोडे खेरीज करून (बहुतेक) विश्वास धरीत नाहींत. १५५. आणि (तसेंच) त्यांच्या नास्तिकपणामुळें व 'मरयम'चे संबंधांत त्यांनीं मोठें (सक्त) कुभांड बकल्यामुळें; १५६. आणि त्यांच्या ह्या बोलण्यामुळें कीं आम्हीं 'मरयम'चा

पुत्र, ईसा मसीह–ख्रिस्त–जो परमेश्वराचा प्रेषित (होण्याचा दावा करीत) होता त्यास कत्तल केलें. आणि (वस्तुस्थिति ही होय कीं) त्यास त्यांनीं कत्तलहि केलें नाहीं व त्याला सुळावरहि चढविलें नाहीं; (तर अर्थात ते कोणा दुसऱ्यालाच सुळीं देत होते); परंतु त्यांना असा आभास झाला (कीं आम्हीं ख्रिस्तास सुळीं देतों आहों). आणि जे लोक ह्या बाबतींत मतभेद करितात (व समजतात कीं ख्रिस्त सुळीं दिला गेला) तर या प्रकरणांत (हे लोक उगीच) संशयांत (पडले) आहेत. त्यांना याचें (खरें) ज्ञान तर नाहींच; पण ते केवळ कल्पनेमागेंच दौड घेत जात आहेत. आणि खात्रीनें, 'ईसा'ला लोकांनीं कत्तल[1] केलें नाहीं. १५७.

---

(१) कारण इस्लामधर्म प्रकट होण्यापूर्वींच ख्रिस्तीधर्मांतील बहुतेक पंथांचें मत असें होतें कीं येशू ख्रिस्त हा वधस्तंभावर चढविला गेला नाहीं व त्यास कोणी कत्तलही केलें नाहीं. त्यांत पूर्वकालीन बॅसिलिडीयन पंथाचे लोक ह्मणत कीं ख्रिस्ताचे ऐवजीं शिमोन वा सायमन हा वधस्तंभीं दिला गेला. (पाहा Irenæous I. 1, c. 23, &c.). त्यांच्यापूर्वीं सेरींथियन लोक व पुढें कारपोक्रेटियन लोकही असेंच मानीत होते. फोटीयस ह्मणतो कीं प्रेषितांचा प्रवास -The journeys of the apostles ज्यांत पिटर, जोहान, अंड्रू, थॉमस व पॉल यांची कृत्यें सांगितलीं आहेत त्या पुस्तकांत लिहिलेल्या अनेक गोष्टींपैकीं एक गोष्ट ही होय कीं 'ख्रिस्त वधस्तंभीं दिला गेला नाहीं; पण त्याचे ऐवजीं दुसराच कोणी वधस्तभीं दिला गेला. ह्मणून त्या वधस्तंभीं देणारांवर ख्रिस्त हंसत होता. (पाहा Photius Bibl. Cod. 114, Col. 291). या सर्व विधानांच्या समर्थनार्थ पाहा, Sale's Alkoran, page 38; notes; किंवा Gospel of Barnabas. ख्रिस्ती धर्माच्या प्रचलित ग्रंथावरूनसुद्धां बारकाईनें निरीक्षण केल्यास हें वधस्तंभप्रकरण खात्रीपूर्वक सिद्ध होत नाहीं. आणि कोणी ख्रिस्ती म्हणेल कीं जर ख्रिस्त वधस्तंभीं दिला गेला नाहीं तर मग पापाचें तारण त्यानें कसें केलें? पण ख्रिस्त्यांस पाहिजे आहे कीं त्यांनीं आपलें शुभवर्तमान मत्तय ९:२-६ आणि योहान्न ८:१-११ यांत पाहावें कीं वधस्तंभाचे प्रकरणापूर्वींच ख्रिस्तानें लोकांस पापांची क्षमा दिली आहे.

किंबहुना परमेश्वरानें त्याला आपल्याकडे उचलून घेतलें. आणि परमेश्वर सामर्थ्यवान (व) युक्तिवान होय. १५८. आणि (जेव्हां पुनरुत्थानाचे सुमारास ईसा-येशू पुन्हां इहलोकीं येईल तेव्हां,) ग्रंथधारी ह्मणून जेवढे होत तेवढे सारे अवश्य त्याच्या मरणापूर्वींच त्याजवर (मुसलमानांसारखाच) विश्वास ठेवितील; आणि पुरुनत्थानाचे दिवशीं ईसा हा त्या (नाकारणाऱ्यां) विरुद्ध साक्ष देईल. १५९. सारांश, यहुद्यांचे या खोडसाळपणामुळें, आह्मीं (बऱ्याच) चांगल्या चिजा ज्यांची त्यांना मुभा होती त्या त्यांना निषिद्ध करून टाकल्या (अशासाठीं कीं त्यांना पोटापाण्याची टंचाई भासावी); आणि (तसेंच) ह्यासाठींहि कीं ते परमेश्वराचे मार्गाहून पुष्कळांस अडथळा करीत होते. १६०. आणि (तसेंच) यामुळेंहि कीं त्यांना व्याजाची मनाई केली गेली होती तरी पण ते व्याज घेत होते. आणि (तसेंच) त्यामुळें कीं लोकांचे माल ते हकनाक गिळंकृत करीत होते. आणि त्यांजपैकीं जे लोक (परमेश्वराचा हुकूम) मानीत नाहींत त्यांच्यासाठीं आह्मीं दुःखप्रद शिक्षा तयार करून ठेविली आहे. १६१. परंतु (हे पैगंबरा!) त्यांच्यांतून जे लोक ज्ञानांत (फार) पारंगत

---

या शिवाय ख्रिस्तास पापांच्या क्षमेचा अधिकार होता यांतहि नवा करार लिहीणारांची अतिशयोक्तिच आहे. पापांच्या क्षमेचा, ज्याचें पाप केलें जातें त्या परमेश्वरालाच अधिकार आहे. तरीहि यांत तथ्य ह्मटलें ह्मणजे एवढेंच कीं पापी मनुष्यानें पश्चात्ताप करणें हेंच क्षमेचें मूलभूत कारण होय. या संबंधीं ज्यास्त माहिती मी लिहिलेल्या मोहंमद पैगंबराच्या चरित्रांत मिळेल तेंथे पाहा.

(१) सहीहदीस म्हणजे पैगंबर साहेबांचे ज्या वचनांत सत्यकथन-परंपरा कोठेंच सुटली नाहीं अशा वचनांत हें निवेदिलेलें आहे कीं पुनरुत्थानाचे आधीं हजरत ईसा–येशू (ईश्वर त्यांस शांति व धन्यवाद देवो!) हे इहलोकांत पुन्हां येतील आणि इस्लामी शास्त्रानुसार अंमल चालवितील व सर्व जगांत इस्लामी शास्त्राची स्थापना करतील. या वाक्यांत याच गोष्टीकडे इशारा आहे.

होत ते व मुसलमान (हे दोन्ही समाज तर) जें (पुस्तक) तुला प्रकट झालें आहे त्यावर व जीं (पुस्तकें) तुझ्यापूर्वीं (इतर पैगंबरांस) प्रकट झालीं आहेत त्यांजवर विश्वास ठेवितात; आणि ते नमाज पढतात व जकात देतात आणि परमेश्वर व शेवटला दिवस यांवर विश्वास ठेवितात. हेच लोक होत कीं ज्यांना आह्मीं लवकरच[1] मोठा मोबदला देऊं. १६२. (हे पैगंबरा!) आम्हीं (आपलें) प्रकटीकरण जसें 'नूह'यास व त्याचे मागून (झालेल्या इतर) पैगंबरांस पाठविलें होतें तसेंच आह्मीं तें तुलाही पाठविलें आहे; आणि (तसेंच) आम्हीं तें प्रकटीकरण, 'इब्राहीम' व 'इस्माईल' व 'इस्हाक' व 'याकूब' व 'याकूब'ची अवलाद व 'ईसा' व 'अय्युब' व 'यूनुस' व 'हारून' आणि 'सुलेमान' यांसही पाठविलें होतें. आणि आम्हीं 'दाऊद'ला जबूर (पुस्तक) दिलें होतें. १६३. आणि (तुझ्यासारखे आम्हीं) कित्येक पैगंबर (पाठवून चुकलों आहों कीं) ज्यांचा अहवाल आह्मीं (ह्याच्या) पूर्वीं तुला सांगून चुकलों आहों, आणि कित्येक पैगंबर (दुसरेही कीं) ज्यांचा अहवाल आम्हीं तुला (अद्यापि) सांगितला नाहीं. आणि परमेश्वरानें 'मूसा'शीं तर संभाषणही केलें. १६४. (हे सारे) पैगंबर (सदाचरणी लोकांस स्वर्गाचें) शुभवर्तमान देणारे आणि (दुराचरणी लोकांस ईश्वरी शिक्षेचें) भय दाखविणारे (होते); अशासाठीं कीं पैगंबरांच्या (आल्या)नंतर लोकांस परमेश्वरापुढें (कसलेंच) वादाचें कारण राहूं नये. आणि परमेश्वर प्रबल व बुद्धिमान् होय. १६५. (हे पैगंबरा! ग्रंथधारी लोक यदि नच मानतील;) परंतु जें कांहीं परमेश्वरानें तुला प्रकट केलें आहे त्याची परमेश्वर साक्ष देतो कीं (तुझ्या अंगीं त्याची पात्रता) जाणून तें (तुला) प्रकट केलें आहे; आणि (केवळ एक परमेश्वरच नव्हे तर)

---

(१) ह्मणजे पुनरुत्थानाचे दिवशीं कीं ज्याचें घडणें खात्रीपूर्वक व हें जगिक अस्तित्व क्षणिक होय; अगर त्याचा अर्थ कदाचित् इहलोकींच असा असेल, कीं ज्या यहुद्यांनीं विश्वास धरिला त्यांनींही इतर मुसलमानांप्रमाणें इस्लामाचे ऐहिक आशिर्वादांचा लाभ घेतला व घेत राहतील.

दूतही (त्याची) साक्ष देतात. आणि साक्षीस तर (एकला) परमेश्वरच बस्स होय. १६६. निःसंशय ज्या लोकांनीं (इस्लामधर्म मानण्याचें) नाकारिलें व परमेश्वराचे मार्गाहून (इतरांसही) अडथळा घातला, ते (सन्मार्गाहून) फारच दूर भटकून गेले. १६७. जे लोक नास्तिकपणा व (नास्तिकपणाबरोबर) जुलूमही[1] करीत राहिले, त्यांना परमेश्वर क्षमाहि करणार नाहीं व त्यांना (सरळ) मार्गहि दाखविणार नाहीं. १६८. किंबहुना, (त्यांना) जहन्नमचाच मार्ग (दाखवील कीं) ज्यांत ते सदोदित राहतील. आणि परमेश्वरापाशीं ही (एक) सोपीशी (गोष्ट) होय. १६९. अहो मनुष्यलोकहो! (हा) पैगंबर (मोहंमद) तुह्मांकडे तुमच्या पालनकर्त्याकडून सत्य(-धर्म) घेऊन आला आहे; तर, विश्वास धरा, हें तुमच्या ठायीं उत्तम होय. आणि जर तुह्मीं (विश्वासास) नाकाराल तर परमेश्वर (निरपेक्ष होय;) जें कांहीं आकाशांत व पृथ्वींत आहे तें (सर्व) त्याचेंच होय. आणि परमेश्वर (सर्वांच्या स्थितीशीं) वाकब होय, (जो जसें करील त्याला त्याचा मोबदला देईल; आणि) सत्यसंकल्प होय (कीं तो जें कांहीं करितो तें हेतुपुरस्सर करितो.) १७०. अहो ग्रंथधारी लोकांनों! तुह्मीं आपल्या धर्मांत (मर्यादेचें) अतिक्रमण (ह्मणजे अफरातफर) करूं नका; आणि परश्वेरासंबंधीं सत्याखेरीज तोंडांतून (ब्रही) काढूं नका. (खरी गोष्ट तर इतकीच होय कीं) 'मरयम'चा पुत्र ईसा–येशू–ख्रिस्त हा परमेश्वराचा (केवळ एक) पैगंबर होय व परमेश्वराचा (आज्ञार्थक) शब्द; कीं जो त्यानें मरयमकडे सांगून पाठविला होता (कीं पतिवांचून गर्भार होऊन जा व ती होऊन गेली), आणि (तो एक) आत्मा (होता कीं जो खास) परमेश्वराकडून (जगांत आला होता.) तर परमेश्वर व त्याचे पैगंबर यांजवर विश्वास

---

(१) येथें दोन अर्थ संभवित आहेत; एक तर हा कीं नास्तिकपणामुळें आपणच आपल्यावर जुलूम करीत राहिले म्हणून नास्तिकपणाचा दुष्परिणाम त्यांना भोगावा लागेल; व दुसरा हा कीं परमेश्वराशिवाय इतरांस परमेश्वराचा शराकतदार ठरवून परमेश्वराचा अन्याय करीत राहिले. कारण परमेश्वराचा शराकतदार ठरविणें हा मोठाच अन्याय व जुलूम होय.

**ठेवा आणि तीनें (परमेश्वर) ह्मणूं नका; (यापासून) पराङ्मुख राहा; हें तुमच्याठायीं उत्तम होय. केवळ परमेश्वरच एकटा उपास्य होय. तो यापासून पवित्र होय कीं त्याला कोणी पुत्र असावा. जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) त्याचेंच होय. आणि परमेश्वर (सर्वांचा) कर्ताहर्ता बस्स होय. १७१.**

---

(१) इ. स. ३२४ मध्ये अथॅनेशस नांवाच्या पाद्यानें कानस्टंटिन या राजास वश करून घेऊन नाईसच्या धर्मसभेंत तीन परमेश्वर किंवा परमेश्वराची त्रयी, हें मत तरवारीच्या जोरावर हजारों विद्वान लोकांची हत्या करून प्रस्थापित केलें. बायबलांत कोठेंच तीन अथवा त्रयी हा शब्द देखिल नसतां तें परम पूज्य प्रेषित येशू ख्रिस्ताचें धर्मशिक्षण आहे असें मानतात ही किती तरी महाअन्यायाची गोष्ट होय. यावरून हेंहि सिद्ध होतें कीं ख्रिस्ती धर्माचा आद्यप्रसार तरवारीचे जोरानें झाला आहे; आणि इस्लाम धर्मावर ख्रिस्ती जो दोषारोप करितात तो त्यांची चलाखी होय. मार्क अध्याय १२:२९ मध्यें, हे इस्राएला, ऐक, प्रभु आमचा देव, प्रभु एकच आहे, ही पहिली आज्ञा आहे व ती प्रत्येक ख्रिस्ती ह्मणविणाऱ्यांस मान्य असलीच पाहिजे. हें वाक्य त्यांची त्रयी रद्द करण्यास पुरेसें आहे. म्हणून परमेश्वरानें कुराणांत यास्थळीं 'तीन परमेश्वर ह्मणूं नका' असें आज्ञापिलें आहे. अशा रीतीनें ह्या लोकांचें आचरण बायबलाविरुद्ध असल्यामुळें त्यांस ख्रिस्ती ह्मणणें कितपत रास्त आहे त्याचा वाचकांनींच विचार करावा.

(२) हेतु तर ही गोष्ट समजाविण्याचा आहे कीं परमेश्वर पुत्र संततीचे बखेड्यापासून अलिप्त व निरपेक्ष आहे. ह्यास प्रमाण हें कीं संतति यासाठीं असते कीं बापाची मदतगार व्हावी, हा बाप होण्याचा फायदा झाला; आणि संतति बापाचे मालमत्तेची हक्कदार व वारस व्हावी हा संततिचा फायदा झाला. पण परमेश्वरास ह्या दोन्ही गोष्टींची अपेक्षा नाहीं, तो एकटाच कर्ताहर्ता बस्स आहे. त्याला मदतगारांची जरूर नाहीं तो एकटाच आकाश व पृथ्वी यांचा मालक आहे. त्याच्या मालकींत कोणीच समाईक व हक्कदार नाहीं.

(ख्रिस्त परमेश्वराचा सेवक होण्यापासून केव्हांहि नाक मोडणार नाहीं; व (तसेच परमेश्वराचे) सांनिध्य प्राप्त असलेले दूतहि नाहींत. आणि जो कोणी परमेश्वराचा सेवक होण्यापासून नाक मोडील व अहंकार करील; तर परमेश्वर लवकरच त्या सर्वांस आपल्यापाशीं खेंचून आणवील. १७२. मग (परमेश्वराचे हुजुरांत हजर झाल्यावर) जे लोक विश्वास ठेवित होते व चांगलीं कामें करीत होते, त्यांना परमेश्वर त्यां(च्या केल्या सवरल्या)चे मोबदले पुरे (पुरे) देईल; आणि तो आपल्या कृपेनें (आणखी कांहीं) विशेषहि देईल. आणि जे लोक (सेवक होण्यापासून) नाक मोडीत होते व शेखी मिरवीत होते, त्यांना परमेश्वर दुःखकारक यातनेची शिक्षा देईल. १७३. आणि परमेश्वराखेरीज त्यांना कोणी पुरस्कर्ता मिळणार नाहीं व मदतगारहि नाहीं. १७४. अहो लोकांनों! तुह्मांपाशीं तुमच्या पालनकर्त्याकडून प्रमाण येऊन चुकलें; आणि आम्हीं तुम्हांकडे चकचकीत प्रकाश (म्हणजे तेजःपुंज कुराण) पाठवून चुकलों. १७५. म्हणून ज्या लोकांनीं परमेश्वरावर विश्वास ठेविला व त्यालाच बळकट धरून राहिले, तर परमेश्वरहि त्यांना लवकरच आपली दया व कृपा यांच्या (आश्रया) खालीं घेईल; आणि त्यांना आपल्या (हुजुरा) पावेतों (पोंहोचण्या)चा सरळ मार्गही दाखवून देईल. १७६. (हे पैगंबरा! लोक) तुजपासून (कलाला संबंधींचा) हुकूम मागतात. (तूं या लोकांस) सांग कीं परमेश्वर 'कलाला' संबंधीं

---

(१) नजरानचे ख्रिस्ती लोकांनीं परमेश्वराचे पैगंबरास असा दोष दिला कीं तुह्मीं जें आमचा प्रभु ख्रिस्त यांस सेवक ह्मणतां; ह्यानें त्यांचा अपमान होतो. तेव्हां हीं महा वाक्यें प्रकट झालीं.

(२) प्रमाण ह्मणजे खुद्द मोहंमद पैगंबर अगर तुमच्या बुद्धीस पटतील असे हजरत मोहंमद पैगंबरानीं आणिलेले दृष्टांत; अथवा सुबोध कुराण. आणि कुराण मननपूर्वक वाचिल्यानें अंतःकरणास बोध होऊन त्यांत प्रकाश उपलब्ध होतो ह्मणून त्यास प्रकाश ह्मटलें आहे.

(३) कलालाचा अर्थ हारलेला व दुर्बल असा आहे. पण येथें ज्याचे वारसांत बाप व मुलगा नाहीं ते—कीं मूळ वारस हेच होत. तर

तुह्मांस हुकूम देतो; कीं जर कोणी असा पुरुष मरून जाईल कीं ज्याला संतति नसेल (व बापदादा नसतील–कीं ह्यालाच कलाला ह्मणतात,) आणि त्याची (फक्त एक) बहीण असेल; तर बहिणीस, त्यानें जें कांहीं मागें सोडलें असेल त्याचें अर्धें. आणि बहिणी(-ला मृत्यु येईल व ति-)ची संतति नसेल, तर ति(च्या समस्त माला)चा वारस तो हा (भाऊ). मग जर बहिणी दोन असतील (वा अधिक), तर त्यांस, त्यानें जें कांहीं मागें सोडलें असेल त्यांतून दोन तृतियांश होय. आणि जर बहीणभावंडें (सरमिसळ) असतील, (ह्मणजे कांहीं) पुरुष व (कांहीं) स्त्रिया,. तर दोन स्त्रियांच्या हिश्या एवढा एका पुरुषाचा (हिस्सा). आणि तुह्मीं लोक (सन्मार्गाहून) भटकूं नयेत ह्मणून परमेश्वर (आपले हुकूम) तुह्मांस स्पष्ट करून सांगतो. आणि परमेश्वर सर्वज्ञानी होय. १७७.

---

अशा वेळीं त्यांचीं सख्खीं बहीणभावंडें यांस मुलगा व मुलगीप्रमाणें लेखलें जातें. आणि जर सख्खीं नसतील तर सावत्रांचाही हाच हुकूम; एक बहीण असेल तर मरणारानें मागें सोडलेल्या मालांतून अर्धा व दोन बहिणी असतील तर दोन तृतियांश हिस्सा होय. जर भाऊही असतील व बहिणीही असतील तर पुरुषाला दुहेरी हिस्सा व स्त्रीला एकेरी. आणि जर निवळ भाऊच असतील, तर ते बहिणीचे मालाचे वारस होत, ह्मणजे त्यांचा हिस्सा मुक्रर नाहीं; ते 'असबा' ह्मणजे हिस्सेदारांपासून उरलेल्या मालाचा हक्क ज्यांना आहे ते होत. जर मुलगी असेल व बहीणी असतील तर मुलगीला हिस्सा मिळेल; व बहीण 'असबा' होय, उरलेलें तिला मिळेल. (पाहा, मोवज्जेहुल् कुर्आन्, मोलाना शाह अबदुल कादिर कृत.)

# अध्याय ५ वा.

## सूरतुल्–माईदः

हा अध्याय मदिना शहरीं हजरत मोहंमद पैगंबर यांस प्रकट झाला. ह्यांत १२० महा वाक्यें आहेत. ह्यांत हजरत ईसा उर्फ येशू पैगंबर यांचेसाठीं आकाशांतून जें ताट उतरत असे त्याचें वर्णन आहे ह्मणून याचें नांव 'सूरतुल्–माईदः ह्मणजे ताटाचें प्रकरण असें पडलें. यास आणखीही करारांचें प्रकरण असें नांव आहे.

**परम दयाळु आणि कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

**अहो मुसलमानांनों! तुह्मीं (आपले) करार पुरे करा. चतुष्पाद जनावरांची तुह्मांस मुभा दिली गेली आहे; पण तुह्मांस जीं (पुढें) वाचून ऐकविलीं जातील तेवढ्यांचीच मात्र. तथापि जेव्हां तुह्मीं एहराम (ह्मणजे हज्जचीं वस्त्रें) धारण कराल तेव्हां तुह्मीं शिकार हलाल (ह्मणजे शास्त्रविहित) समजूं नये. निःसंशय परमेश्वर जसा इच्छितो तसा हुकूम देतो. १. अहो मुसलमानांनों! परमेश्वराच्या (ठराविक धर्म-) मर्यादा विधींचा आनादर करूं नका,**

---

(१) जेव्हां कोणी मनुष्य इस्लामधर्माची दीक्षा घेतो, तेव्हां तो एकंदरींत परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा हुकूम मान्य करितो. आतां या ठिकाणीं खास खास हुकूम देऊन त्यास तपशीलवार करार पूर्ण करण्याची ताकीद दिली जाते.

व ना कोणा सन्माननीय महिन्यांचा[1] व ना (हजच्या) बळींचा; आणि ज्या (जनावरां)च्या (गळ्यांत तीं खास परमेश्वराला वाहिलेलीं आहेत अशा खुणे दाखल) माळा बांधलेल्या असतील ना त्या जनावरांचा व जे लोक पवित्र मंदिरा (ह्मणजे काबागृहाचे यात्रे)स जात असतील, (व त्यांतल्या त्यांत) आपल्या पालनकर्त्याची कृपा (ह्मणजे व्यापारसंबंधीं नफा) आणि (खरें पाहतां त्याची) सुप्रसन्नता शोधतील ना अशा लोकांचा. आणि जेव्हां तुह्मीं 'एहराम' सोडून टाकाल, तेव्हां (परवानगी आहे कीं पाहिजे तर दस्तुराप्रमाणें) शिकार करा. आणि (मुसलमानांनों!) कित्येक लोकांनीं तुह्मांस सन्माननीय मशीदी (ह्मणजे काबागृहांत जाण्या)पासून प्रतिबंध केला होता, हें त्यांचें वैमनस्य तुह्मांस (त्यांच्यावर कोणा तऱ्हेचा) अत्याचार करविण्यास प्रवर्तक होऊं नये. आणि पुण्य व ईश्वरभय यां(च्या कामां)त एकमेकांस मदतगार होत जा; व पाप आणि अत्याचारा(चे कामां)त एकमेकांचे मदतगार बनूं नका. आणि परमेश्वरा(चे क्रोधा)स भ्या; कारण कीं, परमेश्वराची शिक्षा (फारच) सक्त होय. २. मेलेलें (जनावर) व रक्त[2] व डुकरांचें मांस आणि जें (जनावर) परमेश्वराचे

---

(१) ह्मणजे जिल्काअद, जिल्हज्ज, मोहर्रम व रजब; कीं हे अभय व शांततेचे महिने आहेत. ह्यांत शत्रूंशीं लढण्याचीहि मनाई आहे.

(२) या सर्व वाक्यांचा भावार्थ इतकाच कीं हज्जचे यात्रेकरूंस जाण्यायेण्यांत कसलाच प्रतिबंध होऊं नये; व त्यांना कसलाच त्रास पोहोंचूं नये. ह्मणून मुसलमानांनीं या नियमांचा अवलंब अवश्यमेव करावा. नाहीं तर, त्यांना परमेश्वर सक्त शिक्षा देईल.

(३) येथें तर फक्त रक्त म्हटलें आहे. आणि आठव्या भागांत वाहतें रक्त आलें आहे. पैगंबर साहेबांचे वचनांत 'वाहतें' रक्त ही कैद लागल्यामुळें काळीज व प्लीहा हीं वर्ज्य ठरत नाहींत. याच प्रमाणें जुना करार अनुवाद, अध्याय १२ : १६ मध्यें 'रक्त मात्र खाऊं नका; पाण्यासारखें तें पृथ्वीवर ओता' असें आहे.

(४) यहुदी व ख्रिस्ती यांच्या येथेंहि डुकराचें मांस अशुद्ध व निषिद्ध आहे (पाहा, लेवीय, अध्याय ११:७–८, अनुवाद, अध्याय १४:८

शिवाय अन्य कोणास (जबे करतेवेळीं) नामनिर्दिष्ट केलें गेलें असेल तें व जें गुदमरून मेलें असेल तें व मार लागून मेलेलें व उंचीवरून पडून मेलेलें व (दुसऱ्या कोणा जनावराचें) शिंग भोसकून मेलेलें आणि (तसेंच) ज्या (जनावरा)स घातक श्वापदांनीं (फाडून) खाल्लें असेल तें (जनावर), हीं सर्व तुह्मांस शास्त्रनिषिद्ध होत. परंतु ज्या(च्या मरणापूर्वींच तुह्मीं त्या)ला हलाल करून टाकाल; (तर तें निषिद्ध नाहीं.) आणि (तसेंच) जें कोणा (मूर्तींच्या) स्थानांवर[1] (चढवून) कापलें गेलें असेल तें(हि निषिद्ध होय;) आणि हें(हि वर्ज्य होय) कीं (भागीच्या जनावराचें मांस जुगारेपरी) तीरांच्या[2] (फास्या)द्वारें तुह्मीं आपसांत वांटून घ्यावें; (कीं) हें पातक होय. (मुसलमानांनो!) आतां नास्तिक लोक तुमच्या धर्माकडून निराश झाले (कीं तुमच्यांत व त्यांच्यांत समेट होणें शक्य नाहीं, व ते तुह्मांशीं सक्त वैर मांडतील.) तर तुह्मीं त्यांना भिऊं नका व मलाच भ्या. आज मितीला मी तुमचा धर्म तुह्मांकरतां परिपूर्ण करून चुकलों, व मी तुह्मांवर आपला उपकार संपूर्ण केला; आणि मीं तुह्मांसाठीं (ह्याच) इस्लामधर्मास पसंत केलें. मग जो कोणी भुकेनें व्याकूळ होईल (व) पापाकडे त्याचा कल नसेल, (आणि तो निरुपायास्तव शास्त्रनिषिद्ध वस्तु खाईल) तर निःसंशय परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ३.

---

आणि यशाया अ. ६५:३–४ व अ. ६६:१७) शिवाय नव्या करारांत डुकरांचें अशुद्धतेविषयीं पाहा, मत्तय, ७:६ आणि २ पेत्र, अ. २:२२. यहुदी हे नियम पाळतात; पण खिस्त्यांची म्हण पुराणांतलीं वांगीं पुराणांत या सारखी आहे. हा अधर्म नव्हे असें कोण म्हणेल?

(१) स्थान म्हणजे ज्या जागांत लोक आशिर्वाददायक समजून परमेश्वराचेशिवाय अन्य कोणास आहुत्या व बळी चढवितात त्या जागा. उदाहरणार्थः—देवी देवतांचीं स्थानें अगर देव्हारे अथवा मातीचे ढीग अगर झाडें अथवा थडगीं अगर अशीच एखादी दुसरी जागा.

(२) आरबचे लोक फास्यांच्या जागीं कांहीं तीर बनवून ठेवीत होते व त्याद्वारें तऱ्हेतऱ्हेचे जुगार खेळत होते. उदाहरणार्थः—त्यांनीं

(हे पैगंबरा! लोक) तुला विचारितात कीं कोणकोणत्या वस्तूंची त्यांना मुभा दिली गेली आहे? (तर तूं त्यांना) समजावून दे कीं (खावयाच्या सर्व) चोख्या चिजांची तुह्मांस मुभा दिली गेली आहे. आणि शिकारी जनावरें ज्यांना तुह्मीं शिकारीसाठीं कुत्र्यांस वठवितां तसें वठवून तरबेज केलें असेल, (व शिकारीची रीत) जशी तुह्मांस परमेश्वरानें शिकवून ठेविली आहे तशीच तुह्मीं त्यांना शिकविली असेल, तर (हीं शिकारी जनावरें) जी (शिकार) तुह्मांसाठीं पकडून ठेवितील (व ती जबे करण्यापूर्वीच मरून जाईल,) तर ती तुह्मीं (बेलाशक) खा; पण (इतकी मात्र खबरदारी ठेवा कीं जसें जबे करते वेळीं परमेश्वराचें नांव घेत असतां, तसेंच शिकारी जनावरें सोडतांना) त्यावर परमेश्वराचें नांव घेत जा. आणि परमेश्वराला भीत रहा (कीं त्याच्या हुकमाविरुद्ध तुह्मीं कोणतहि शास्त्रनिषिद्ध वस्तु खाऊं नये;) कारण कीं, परमेश्वर फटक्या भरांत हिशेब घेईल. (तर तेथील जबाबदारीचा विचार ठेवा.) ४. आज (सर्व) चोख्या चिजांची तुह्मांस मुभा दिली गेली आहे. आणि ग्रंथधारी लोकांचें खाणें (तुमच्या येथेंहि तें शास्त्रविहित असेल तर) तुह्मांस हलाल होय; व तुमचें खाणें त्यांना हलाल होय. आणि मुसलमान स्त्रियांपैकीं स्वतंत्र स्त्रिया व तुह्मांपूर्वीं ज्या लोकांस पुस्तक दिलें जाऊन चुकलें आहे त्यांच्यापैकींही स्वतंत्र स्त्रिया ह्या (तुम्हांसाठीं) हलाल

---

उंट 'जबे' म्हणजे ईश्वरनामार्पण करून बळी दिला व त्याच तीरांनीं त्याचे मांस वांटून घेतलें; अगर परदेशीं जातांना त्याच तीरांनीं जोतिष्या प्रमाणें शकुन पाहिले जात. परमेश्वरानें जुगार कोणाही तऱ्हेचा असो व कोणाही कारणामुळें असो, अजीबात निषिद्ध ठरविला आहे. फासे टाकून फाल किंवा शकुन पाहणें हाहि एक प्रकारचा जुगारच होय. कुराणांतील शब्दांत या सर्व सदरांचा समावेश होतो. भाषांतरांत पूर्वापार संदर्भाकडे दृष्टि देऊन एकच खास गोष्ट म्हणजे मांस वांटणें इतकेंच घेण्यांत आलें आहे.

(१) ह्मणजे ज्या स्त्रिया स्वतंत्र असून लग्नाद्वारें लोकांशीं पतिपत्निसारखा संबंध उपलब्ध करूं इच्छित असतील त्या स्त्रिया.

होत; अशा अटीवर कीं तुम्हीं त्यांचीं स्त्रीधनें त्यांच्या हवालीं करावींत (व) तुमचा हेतु (त्यांस) विवाह बंधनांत आणण्याचा असावा; जगजाहीरपणें बदकर्म करण्याचा व चोरीछपी उपस्त्री राखण्याचा नसावा. आणि जो कोणी विश्वासा(च्या ह्या गोष्टी)स (मानण्याचें) नाकारील, तर त्याचें केलें (सवरलें सर्व) अक्रीतच. आणि परलोकींही तो हानि सोसणाऱ्यांपैकीं होईल. ५. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुह्मीं नमाजीस उभे राहण्यास तयार व्हाल, तेव्हां तुह्मीं आपलीं तोंडें धुत जा व कोंपरापर्यंत आपले दोन्हीं हातहि, व (पाण्याचा हात घेऊन) आपलीं डोकीं चोळीत जा, आणि घोट्यांपर्यंत आपले पायहि (धुत जा). आणि जर तुह्मीं (स्त्रीसमागमानें अगर कामप्रकोपामुळें वीर्यपतनानें) विटाळलां असाल, तर (स्नान करून) चांगल्या प्रकारें पाकसाफ होऊन जा. आणि जर तुह्मीं आजारी असाल अगर प्रवासांत असाल अगर तुम्हांपैकीं कोणी शौचकुपाहून (जाऊन) आला असेल अगर तुह्मीं स्त्रियांशीं समागम केला असेल, व तुम्हांस पाणी न मिळेल; तर स्वच्छ माती (घेऊन ति)नें तयंम्मुम[1] करा म्हणजे तिणें आपलीं तोंडें व हात चोळा. परमेश्वर तुम्हांस कसलीच अडचण करूं इच्छित नाहीं; किंबहुना तो तुम्हांस पाकसाफ ठेवूं इच्छितो; आणि (तसेंच) हेंहि (इच्छितो) कीं तुम्हांवर आपला उपकार पूर्ण करावा, कीं कदाचित् तुम्हीं (त्याचे) आभार मानाल. ६. आणि परमेश्वरानें तुम्हांवर जे उपकार केले आहेत त्यांचें स्मरण करा; आणि जें करारबंधन (पूर्ण करण्याचें आपल्या पैगंबरा द्वारें) त्यानें तुम्हांपासून पक्कें वचन घेतलें आहे तेंहि

(१) तयम्मुमची रीत अशी आहे कीं दोन्हीं तळहात व सर्व बोटें हीं उघडून पसरून स्वच्छ मातीवर अगर आणखी एखादी वस्तु जींतून धूळ उडणें शक्य असेल तिजवर मारावींत; आणि जसें तोंड धुतात तसें धुळीनें भरलेले हात एकवेळ तोंडावर फिरवावेत, व पुन्हां दुसऱ्यांदा तसेच मातीवर हात मारून ह्याचप्रमाणें कोंपरांसमवेत दोन्हीं हातांवर चोळावेत.

(आठवा कीं); जेव्हां (त्यानें तुम्हांस इस्लामधर्म स्वीकारण्यास सांगितलें तेव्हां) तुम्हीं म्हणाला कीं (हे आमच्या पालनकर्त्या!) आम्हीं तुझी आज्ञा) ऐकिली व मान्य केली. आणि परमेश्वरा(चे अवज्ञे)स भीत राहा; कारण कीं, परमेश्वर हृदयांतील (देखील) गोष्टी जाणतो. ७. अहो मुसलमानांनों! परमेश्वरासाठीं न्यायपुरस्सर साक्ष देण्यास खंबीर व तत्पर राहा, आणि लोकांची अदावत तुम्हांस ह्या (गुन्ह्याच्या करण्या)स प्रवर्तक होऊं नये कीं तुम्हीं (व्यवहारांत) न्याय न करावा. (तसें नव्हे, तर प्रत्येक स्थितींत) न्यायानें वागा; कीं (न्यायानें वागणें) हें (परमेश्वरास) भिऊन चालण्याच्या अगदीं जवळ जवळ होय. आणि परमेश्वरा(चे अवज्ञे)स भीत राहा. कारण, तुम्हीं जें कांहीं करितां, त्याशीं परमेश्वर माहीतगार होय. ८. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व सुकृत्येंहि केलीं, त्यांना परमेश्वरानें अभिवचन दिलें आहे कीं (परलोकीं) त्यांच्यासाठीं क्षमा व मोठा मोबदला होय. ९. आणि ज्या लोकांनीं (सद्धर्म स्वीकारण्याचें) नाकारिलें व आमच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें, ते नरकवासी होत. १०. अहो मुसलमानांनों! परमेश्वरानें तुम्हांवर जे उपकार केले आहेत त्यांचें स्मरण करा; कीं जेव्हां कांहीं लोकांनीं तुम्हांवर हात टाकण्याचा बेत केला तेव्हां परमेश्वरानें तुम्हांकडून त्यांचे हात आवरले. आणि परमेश्वराला भीत राहा. आणि मुसलमानांस पाहिजे कीं त्यांनीं परमेश्वरावरच भरंवसा ठेवावा. ११. आणि परमेश्वर (पूर्वींही) बनी-इस्राएलां-(पासून आज्ञापालना)चें वचन घेऊन चुकला आहे. आणि

(१) यहुद्यांनीं दोघां मुसलमानांस मूर्तिपूजक समजून मारून टाकिलें होतें. हजरत पैगंबर साहेब जेव्हां त्यांच्या रक्तपाताबद्दल खंडाची मागणी करावयास गेले तेव्हां यहुद्यांनीं त्या बद्दल द्रव्य दंड देणें कबूल केलें व त्यांना एका भिंतीखालीं बसवून सांगितलें कीं आम्हीं त्याची व्यवस्था करून येतों. त्यांनीं जाऊन आपसांत अशी मसलत केली कीं वरून जात्याचें पाट पाडून त्यांना कुचलून टाकावें. पैगंबर साहेबांस प्रकटीकरणायोगें त्यांच्या कटाची बातमी लागली व ते आपल्या लोकांसह पहिल्यानेंच निघून चालते झाले. या वाक्यांत ह्याच वृत्तांताकडे इषारा आहे.

आम्हीं (म्हणजे परमेश्वरानें) त्यांच्यांतलेच बारा सरदार (त्यांच्यावर) नेमिले. आणि परमेश्वरानें (बनी-इस्राएलांस हेंहि) सांगितलें कीं मी तुम्हां संगतीं आहें. जर तुम्हीं नमाज पढाल व जकात द्याल व माझ्या पैगंबरांवर विश्वास ठेवाल व त्यांना मदत कराल व (जेव्हां जेव्हां जरूर पडेल तेव्हां) खुषदिलीनें परमेश्वरास कर्ज देत राहाल; तर मी अवश्य तुमचीं पापें तुम्हांपासून दूर करीन, आणि जरूर तुम्हांस (स्वर्गाच्या) अशा बागांत नेऊन दाखल करीन कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील. ह्यानंतरहि तुम्हांपैकीं जो कोणी नाकारील तर (पक्कें समजून असा कीं) तो खरोखरींच सरळ मार्गाहून भटकून गेला. १२. मग त्याच लोकांनीं आपण आपलें वचन मोडल्यामुळें, आह्मीं त्यांना शापग्रस्त करून टाकिलें व त्यांचीं अंतःकरणें कठोर करून टाकिलीं; कीं ते (तौरातचे) शब्दांस त्यांच्या जागे (म्हणजे मूळ अर्था)वरून फिरवितात. आणि त्यांना जो उपदेश केला गेला होता त्यांतून एक (महत्वाचा) भाग (ह्मणजे कलियुगीन पैगंबर मोहंमद याजवर विश्वास ठेवणेंस) ते विसरले. आणि (हे पैगंबरा! आतां त्यांची ही अवस्था होऊन गेली आहे कीं) त्यांच्यापैकीं थोड्याशा लोकांखेरीज बाकी सर्वांच्या (कोणा ना कोणा) चोरीची[1] बातमी तुला लागतच राहत असते; तर तूं त्या लोकां(शीं भांडण उकरून काढूं नकोस, तर त्यां)चे अपराध माफ कर व (त्यांना) सोड जाऊं दे. कारण कीं परमेश्वर परोपकार करणाऱ्यांस प्रीय ठेवितो. १३. आणि जे लोक, आपण आपल्याला खिस्ती म्हणतात, त्यांच्यापासूनही आम्ही (अशाच तऱ्हेचें) पक्कें वचन घेतलें होतें. तर त्यांना जो उपदेश केला गेला होता त्यांतून एक (महत्वाचा) भाग (म्हणजे कलियुगीन

(१) चोरी म्हणजे कलियुगाच्या पैगंबराविषयींचें भविष्य व इतर ईश्वरी नियम याचें लपविणें, असा अर्थ आहे. अशी परिस्थिति असतांहि हजरत पैगंबर साहेबांनीं आपल्या सत्तेच्या काळींहि यहुदी व खिस्ती यांस छळिलें नाहीं. उलट पक्षीं ईश्वराज्ञेप्रमाणें त्यांचे अपराध माफ केले व त्यांची गय केली. ह्मणून इस्लाम हा खरी शांतता घडवून आणणारा धर्म होय.

पैगंबर याजवर विश्वास ठेवणेंस) तेंहि विसरले. तर (त्याच्या शासनार्थ) आम्हीं त्यांच्यांत पुनरुत्थानाचे दिवसापावेतों वैमनस्य व द्वेष (यांचा अग्नि) भडकवून दिला; आणि अखेर (पुनरुत्थानाचे दिवशीं) परमेश्वर त्यांना, ते जें जें कांहीं (जगांत) करीत होते तें विदित करील. १४. अहो ग्रंथधारी लोकांनों! तुह्मांपाशीं आमचा पैगंबर (मोहंमद) येऊन चुकला आहे, (व दिव्य) पुस्तकांतून जें कांहीं तुह्मीं लपवित राहिलां त्यांतून बहुतेक कांहीं तो तुह्मांस स्पष्ट करून सांगतो; आणि बहुतेक (गोष्टी अशाहि आहेत कीं तो त्यां)विषयीं तुमची (मनोवृती दुखवूं नये ह्मणून बुध्या) उपेक्षा करितो. (एवंच,) परमेश्वराकडून तुह्मांपाशीं (सन्मार्ग-)प्रकाश व सुबोधक कुर्आन् येऊन चुकलें आहे. १५. जे लोक परमेश्वराचे मर्जीचें अनुकरण करतात त्यांना परमेश्वर कुराणाद्वारें सुरक्षिततेचे मार्ग दाखवितो; व आपल्या मर्जीनें त्यांना (नास्तिकपणाचे) अंधःकारांतून काढून (विश्वासाचे) प्रकाशांत आणितो व त्यांना सरळ मार्ग दाखवितो. १६. जे लोक ह्मणतात कीं मरयमचा पुत्र ख्रिस्त हाच परमेश्वर होय, कांहीं संशय नाहीं कीं हे नास्तिक होऊन गेले. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग (कीं बरें, हें तरी दाखवा) कीं जर परमेश्वर, मरयमचा पुत्र ख्रिस्त व त्याची मातोश्री व जेवढे लोक भूतलावर होत त्या सर्वांचा संहार करूं इच्छील, तर असा कोण आहे कीं ज्याची परमेश्वरापुढे

(१) कुर्आनाच्या इतर पुष्कळ भविष्यवादांपैकीं हाहि एक अति ठळक व महान् भविष्यवाद होय, कीं तो आमच्या सांप्रत काळीं खरा ठरतांना आम्हीं पाहतों आहों. युरोपियन सर्व ख्रिस्ती असून त्यांच्यांत ४५० पंथ आहेत; व त्यांच्या आपसांत जबरदस्त वैमनस्य व द्वेष नित्य भडकतच राहतो. याशिवाय जगभर जरी त्यांचें वर्चस्व आहे तरी इंग्लंड, फ्रांस, रशिया, इटली, अमेरिका, ऑस्ट्रिया व जर्मनी ह्या सर्वांत नेहमीं मात्सर्य भडकलेलेंच असतें. म्हणून ते केव्हांहि एकदिल होऊं शकत नाहींत. आणि ऐतिहासिक माहितीच्या आधारें त्यांचे परस्पर छळही फारच अमानुष असतात असें दिसून येतें. (पाहा History of Inquisition.)

कांहींहि सत्ता चालत असेल? आणि आकाश व पृथ्वी व जें कांहीं त्या दोहोंच्या दरम्यान आहे त्या सर्वांवर परमेश्वराचेंच राज्य होय. तो जें इच्छितो तें निर्माण करितो. आणि परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. १७. आणि यहुदी व खिस्ती असें प्रतिपादन करितात कीं आह्मीं परमेश्वराचीं लेंकरें व त्याचे आवडते आहोंत. (हे पैगंबरा! तूं त्यांना) सांग (कीं जर तुह्मीं परमेश्वराचीं लेंकरें व आवडते आहां) तर मग तो तुमच्या पापांबद्दल तुह्मांस (वेळोवेळीं) शिक्षाच कां देत असतो? (अतएव तुह्मीं परमेश्वराचीं लेंकरें नव्हत व आवडतेहि नव्हत) किंबहुना परमेश्वरानें जीं (आणखीं मनुष्यें) निर्माण केलीं आहेत त्यांतलींच मनुष्यें तुह्मींहि आहां. परमेश्वर ज्याला इच्छील त्याला क्षमा करील व ज्याला इच्छील त्याला शिक्षा देईल. आणि आकाश व पृथ्वी व जें कांहीं यांच्या दरम्यान आहे तें सर्व परमेश्वराच्याच अखत्यारांत होय. आणि (सर्वांस) त्याच्या कडेच परत जाणें आहे. १८. अहो ग्रंथधारी लोकांनों! पैगंबरांचें येणें बहुतकाळपर्यंत तहकूब राहिल्यावर, आमचा (हा) पैगंबर (मोहंमद) तुह्मांपाशीं आला कीं जो (ईश्वरी हुकूम) तुम्हांस स्पष्ट करून करून सांगतो; (आणि आह्मीं हा पैगंबर यासाठीं पाठविला) कीं (कदाचित् उद्यांला कोठें) तुम्हीं असें बोलूं लागाल कीं आम्हांपाशीं तर कोणी (तारणाचें) शुभवर्तमान ऐकविणारा आला नाहीं व (ईश्वरी शिक्षेचें) कोणी भय सुचविणाराहि आला नाहीं. तर आतां (तुम्हांस या सबबीची जागाच उरली नाहीं; कारण) तुम्हांपाशीं शुभवर्तमान ऐकविणारा व भय सुचविणारा येऊन चुकला. आणि परमेश्वर सर्व शक्तिमान होय. १९. आणि (हे पैगंबरा! बनी-इस्राएलांस एक

---

(१) त्याच्या सर्व शक्तिचें एक अद्भूत हेंहि होय कीं त्यानें येशू खिस्ताला बापावांचून निर्माण केलें, याहूनहि मोठें अद्भूत हें कीं परमेश्वरानें आदमला आई व बाप या दोघां वांचून निर्मिलें. तर ह्या मुळें आदमला जसें परमेश्वर ह्मणत नाहींत तसेंच येशू खिताला परमेश्वर ह्मणणें हें नास्तिकपणाचें द्योतक होय.

(२) ह्मणूनच तो पैगंबर वा प्रेषित पाठविण्यासहि समर्थ होय.

गोष्ट हीहि आठवून दे कीं) जेव्हां मूसानें आपल्या लोकांस सांगितलें कीं हे बंधुजनहो! परमेश्वरानें जे तुम्हांवर उपकार केले आहेत त्यांचें स्मरण करा; कीं त्यानें तुमच्यांतच (बहुतेक) पैगंबर निर्मिले व तुह्मांला बादशाहाहि बनविले; आणि तुम्हांस अशा अशा देणग्या दिल्या कीं ज्या अलमदुनियेच्या लोकांपैकीं कोणासच दिल्या नाहींत. २०. हे माझ्या बांधवांनो! (सूरीयेची) पवित्र भूमि जी परमेश्वरानें तुमच्या प्रारब्धांत लिहून ठेविली आहे (कीं तुह्मीं तेथें राज्य कराल) तींत (जाऊन) दाखल व्हा; आणि (शत्रूचे सामन्यांत) पाठ फिरवूं नका; (कीं असें कराल) तर उलट तुह्मींच तोट्यांत येऊन जाल. २१. ते (लोक) म्हणूं लागले कीं हे मूसा! त्या (प्रांतां)त तर बडे जबरदस्त लोक (राहत) असतात. आणि जोंपर्यंत ते तेथून निघून न जातील तोंपर्यंत आह्मीं तर त्या(प्रांतां)त केव्हांच पायहि ठेवणार नाहीं. होय, (हे लोक) त्यांतून निघून जातील तर आह्मीं जरूर (जाऊन) दाखल होऊं. २२. (परमेश्वराचें) भय मानणाऱ्यांपैकीं दोन पुरुष (यूषा व कालिब हे) होते, कीं त्यांच्यावर परमेश्वरानें (आपली खास) मेहरबानी केली (व त्यांना हिंमत दिली,) ते बोलूं लागले (कीं शत्रूंच्या शरीरयष्टीचा विचार करूं नका, ते मनाचे फार नेभळे होत); त्यांच्यावर (चढाई करून पवित्र भूमीचे) दरवाज्यांत तर (एकदांचे) दाखल व्हा. मग जेव्हां तुह्मीं त्यांत शिरलांत कीं निःसंशय तुह्मींच विजयी आहांत. आणि जर तुह्मीं विश्वासू असाल, तर परमेश्वरावरच भरंवसा ठेवा. २३. ते बोलले, हे मूसा! जोंपर्यंत त्यांत ते (शत्रू) आहेत तोंपर्यंत आम्हीं तर केव्हांच त्यांत पायहि ठेवणार नाहीं. होय, तूं व तुझा पालनकर्ता (उभयतां) जा व (त्या लोकांशीं) लढा; आह्मीं तर येथेंच बसलों आहों. २४. (यावर मूसानें) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! स्वतः मी व माझा भाऊ (हारून) याशिवाय अन्य कोणावर माझा जोरा चालत नाहीं.

(१) सूरीया वा सीरीया या प्रांतास पवित्र भूमि यासाठीं ह्मटलें कीं तेथें पुष्कळ पैगंबर व प्रवक्ते होऊन गेले आहेत व ते तेथेंच समाधिस्थहि झाले आहेत.

तर (शिक्षा देतांना) आमच्यांत व या आज्ञाभंजक लोकांत तारतम्य ठेव; (कीं कोठें आह्मींहि त्यांच्या लपेटींत येऊन जाऊं नये). २५ (यावर परमेश्वरानें) फर्माविलें, बरें तर तो देश त्यांना चाळीस वर्षें वर्ज्य होईल; पृथ्वींत ते रानोमाळ भटकत फिरतील. तर तूं आज्ञाभंजक लोकां(चे स्थिती)बद्दल कांहींच खेद करूं नकोस. २६. आणि (हे पैगंबरा!) तूं या लोकांस आदमचे दोघे पुत्र (हाबील व काबील) यांचा खराखुरा अहवाल वाचून ऐकीव; कीं जेव्हां उभयतांनीं (परमेश्वराला) अर्पण देण्यास काढिलें व त्या दोहोंपैकीं एकाचें (म्हणजे हाबीलचें अर्पण) मान्य झालें आणि दुसऱ्या (म्हणजे काबील)चें मान्य झालें नाहीं; तेव्हां (काबील मत्सराचे आवेशांत भावास) म्हणूं लागला कीं मी जरूर तुला कत्तल करून टाकीन. त्यानें उत्तर दिलें कीं परमेश्वर तर केवळ (त्याला) भिऊन[1] चालणाऱ्यांचेंच (अर्पण) मान्य करितो. २७. जर मला मारून टाकण्याच्या हेतुनें तूं मजवर आपला हात चालविशील, तर मी तुला मारून टाकण्यासाठीं तुजवर आपला हात चालविणार नाहीं. कांकीं मी सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्याचें भय बाळगितों. २८. मी तर हें इच्छितों कीं (अगळीक होईल तर तुजकडूनच व्हावी व) तूं माझें पाप व आपल्या स्वताचें पाप (दोन्हींहि आपल्याच) शिरावर घ्यावेंस, व नरकवाश्यांत (जाऊन सामील) व्हावेंस. आणि जुलमी लोकांची हीच शिक्षा होय. २९. ह्यावरहि त्याच्या (म्हणजे काबीलच्या) जिवानें त्याला आपल्या भावास मारून टाकण्यास राजी (व प्रवृत्त) केलें. (सारांश,) अखेर त्यानें त्याला मारून टाकिलें; व (आपणच) तोट्यांत येऊन गेला. ३०. तदनंतर परमेश्वरानें एक कावळा पाठविला; तो जमीन पोखरूं

(१) ह्या उत्तरांत हाबीलचा उद्देश हें दाखविण्याचा मुळींच नव्हता कीं मी ईश्वराला भिऊन चालणारा आहे. किंबहुना त्याचा हेतु हें जाणविण्याचा होता कीं तुमचें अर्पण मान्य झालें नाहीं त्यांत माझा कांहींच दोष नाहीं. तर तुह्मींच ईश्वरास भिऊन चालण्याऐवजीं अशी एखादी गोष्ट केली असेल कीं ज्या कारणें परमेश्वरानें तुमचें अर्पण मान्य केलें नाहीं.

लागला; उद्देश हा कीं त्यानें त्याला (ह्मणजे काबीलला) हें दाखवावें कीं त्यानें आपल्या भावाचे लाजे (ह्मणजे त्याचे प्रेता)स कसें झांकावें. (सारांश, कावळ्याला जमीन पोखरतां पाहून) तो बोलूं लागला, हाय हाय! माझें दुर्दैव! मी ह्या कावळ्याएवढाहि (हुशार) असतों, तर मी आपल्या भावाचे फजिती (ह्मणजे प्रेता)स मातीच्या आड तरी केलें असतें! इतका कां मी असमर्थ ' झालों? एवंच, तो (आपल्या कृत्याबद्दल फारच) पश्चात्ताप पावता झाला. ३१. ह्याच (वृत्तांता)चे पायीं आह्मी बनी-इस्राएलांस लेखी हुकूम दिला कीं जो कोणी, एखाद्या जिवाचे ऐवजीं नव्हे अगर मुलखांत नासाडी माजविण्याच्या शिक्षेपरीहि नव्हे, (तर हकनाक) कोणालाहि मारून टाकील; तर (त्याच्यानिसबत असें समजलें जाईल कीं) जणुं त्यानें सर्व मनुष्यमात्रांस मारून टाकिलें. आणि ज्यानें मरत्याला वांचवून घेतलें, तर त्यानें जणो कीं सर्व मनुष्यमात्रांस वांचवून[२] घेतलें. आणि बनी-इस्राएलांपाशीं आमचे पैगंबर खुले खुले चमत्कार घेऊन येऊनहि चुकले आहेत. मग ह्या पश्चातहि त्यांच्यांतले बहुतेक (लोक) मुलखांत अनर्थ माजवीत फिरतात. ३२.

---

(१) हाबील व काबील हे दोघे हजरत आदम पैगंबराचे पुत्र होते. काबील शेतभात करी व हाबील शेळ्या पाळी. या उभयतांनीं परमेश्वरास अर्पण देण्यास काढिलें. काबीलनें रद्दी माल अर्पणांत ठेविला व हाबीलनें आपल्या कळपांत जी उत्तमांत उत्तम बकरी होती ती अर्पिली. काबीलचें अर्पण नामंजूर झालें व तें नामंजूर होण्याच्या लायकीचेंच होतें. आणि हाबीलचें अर्पण मान्य झालें, म्हणजे त्या काळच्या सांप्रदायाप्रमाणें आकाशांतून अग्नि येऊन त्यास जाळून गेला. काबीलनें रागाचे भरांत व मत्सरानें भावाला मारून टाकिलें व त्याचें प्रेत पाठीवर लादून लादून फिरूं लागला; कारण, जमिनीवर घडून आलेला असा तो पहिलाच मृत्यु होता. अखेर त्यानें कावळ्यापासून मातींत पुरणें शिकून घेतलें व त्याला आपल्या स्थितीबद्दल फार दु:ख झालें.

(२) कारण, बरें असो कीं वाईट, एकाच्या आरंभ केल्यानें दुसऱ्यांस उत्तेजन होतें.

जे लोक परमेश्वर व त्याचा पैगंबर यांशीं लढतात व फिसाद (माजविण्या)चे हेतुनें मुलखांत धुडगुस घालीत फिरतात, त्यांची सजा तर केवळ हीच होय कीं त्यांची (हुडकून हुडकून) कत्तल केली जावी अगर त्यांना सुळीं दिलें जावें, किंवा त्यांचे हात व त्यांचे पाय उलटे सुलटे कापून टाकले जावेत अगर त्यांना देशवटा दिला जावा. ही तर ह्या लोकीं त्यांची फजिती झाली आणि (ह्याशिवाय) परलोकीं त्यांच्याकरतां मोठी शिक्षा (तयार) होय. ३३ परंतु (मुसलमानांनों!) जे लोक, तुह्मीं त्यांच्यावर काबू पावाल त्याच्या आधींच, पश्चात्ताप करतील; तर (मात्र त्यांच्या वाटे जाऊं नका. आणि) जाणून असा कीं परमेश्वर (लोकांचे अपराध) क्षमाकर्ता व दयाळू होय ३४. अहो मुसलमानांनों! परमेश्वराला भ्या आणि (तसेंच) त्याच्यापर्यंत (पोंहोंचण्या)चें साधन[1] शोधीत राहा; व त्याच्या मार्गांत जिवापाड झटा कीं कदाचित् तुह्मी (आपल्या मनोरथांत) सफल व्हाल. ३५. ज्या लोकांनीं नास्तिकपणा पत्करला, त्यांच्यापाशीं जमिनींत जी (कांहींहि मालमत्ता) असेल ती सारीचीसारी आणि त्याबरोबर तितकीच आणखीहि जरी असली, कीं पुनरुत्थानाचे दिवसाचे शिक्षेबद्दल, त्यांना ती देऊन सुटतां येईल; (तरीहि हा मोबदला) त्यांच्याकडून मान्य केला जाणार नाहीं. आणि त्यांच्यासाठीं दुःखप्रद शिक्षा (तयार) होय. ३६ ते इच्छितील कीं नरकाग्नींतून निघून पळावें; पण त्यांना तेथून निघतां येणार नाहीं; आणि त्यांस कायमची शिक्षा होय. ३७. आणि (मुसलमानांनों!) पुरुष चोरी करील तर व स्त्री चोरी करील तर त्यांच्या (त्या) कृत्यांबद्दल (बिनतफावत) उभयतांचे (उजवे[2]) हात कापून टाका; हें शासन (त्यांच्याठायीं) परमेश्वराकडून (ठरलेलें) होय. आणि

(१) सर्वांत मोठें साधन हजरत पैगंबर साहेबांचें अक्षरशःअनुकरण होय. तसेंच जे सत्पुरुष पैगंबरांचे पदोपदीं चालतात त्यांचे अनुकरण करणें हेंहि महान पैगंबरांचेंच अनुकरण होय.

(२) 'उजव्या' हाताची जी कैद आम्हीं लाविली आहे ती हदीसांतून म्हणजे पैगंबर साहेबांच्या वचनसंग्रहांतून घेतली आहे.

परमेश्वर परम समर्थ व (व्यवहारशास्त्र-)ज्ञानी होय. ३८. तर जो आपल्या अपराधानंतर पश्चाताप करील व (आपलें आचरण) सुधारील, तर अर्थात परमेश्वर त्याचा पश्चात्ताप मान्य करितो. कारण, परमेश्वर (सेवकांच्या अपराधांचा) क्षमाकर्ता व दयाळू होय. ३९. (हे वाचक-श्रोत्या! चोराचा पश्चात्ताप मान्य होण्याचें आश्चर्य करूं नकोस.) कां तुला माहीत नाहीं कीं आकाश व पृथ्वी ह्यांत परमेश्वराचीच हुकमत होय. तो ज्याला इच्छील त्याला शिक्षा देईल व ज्याला इच्छील त्याला क्षमा करील. आणि परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. ४०. हे पैगंबरा! जे लोक नास्तिकपणाकडे त्वेरेनें धांव मारीत जातात त्यांच्यामुळें तूं दिलगीर होऊं नकोस; (हे दोन प्रकारचे लोक होत,) कित्येक तर असे (दांभिक) होत कीं ते आपल्या तोंडांनीं तर ह्मणतात कीं आम्हीं विश्वास धरिला व त्यांच्या अंतःकरणांनीं तर (मुळीं) विश्वासच धरिला नाहीं; आणि कित्येक यहुदी होत कीं ते (खोट्या) खोट्या गोष्टींचें कर्णसुख घेत फिरतात; (आणि) कर्णसुखहि घेत फिरतात (तर) जे लोक (अजून) तुजपाशींहि आले नाहींत अशा (दुसऱ्या) दुसऱ्या लोकांसाठींच. (तौरातचे हुकूम, उदाहरणार्थ, धोंडमाराच्या हुकमाचे) शब्दांस त्यांच्या जागे (म्हणजे अर्थबोध निश्चित झाल्यानंतर त्या)वरून ते फिरवाफिरव करितात. ते (लोकांस) सांगतात कीं जर (मोहंमदकडूनहि, आम्हीं जो सांगतों) हाच (हुकूम) तुम्हांस दिला जाईल, तर तो

(१) ह्मणजे पैगंबर साहेब व त्यांच्या धर्माविषयीं जे लोक कर्णोपकर्णीं कुजबुज करण्यांत हर्ष पावत होते, व ही खोटीनाटी कुजबुज आपल्यालाच बरी वाटावी ह्मणून नव्हे; तर ज्या लोकांस पैगंबर साहेबांशीं अजून कसलाच संबंध नव्हता त्यांस जाऊन ऐकवीत असत. हेतु हा कीं त्या लोकांच्या मनांत हजरत पैगंबरांविषयीं श्रद्धा उत्पन्न होऊं नये व त्यांच्या सहवासांत येण्यापूर्वीच इस्लामधर्माविषयीं त्यांची द्वेषबुद्धि तीव्र व्हावी. सद्यांहि अशाच प्रकारचें मिथ्या निवेदन करण्यास ख्रिस्ती पाद्रीहि मागें पुढें पाहत नाहींत. परमेश्वर अशा लोकांत न्यायबुद्धि जागृत करो व त्यांस सन्मार्ग दाखवो.

(मान्य करून) घ्या. आणि जर तुम्हांस (नेमका) तोच हुकूम न दिला जाईल तर (त्याविषयीं) जपून राहा. आणि (हे पैगंबरा!) ज्याला परमेश्वर (अधर्माचे) कसोटींत ताडून पाहूं इच्छितो, त्याच्यासाठीं परमेश्वरापुढें तुझा कांहींच जोरा चालूं शकत नाहीं. हे ते लोक होत कीं परमेश्वरहि त्यांच्या अंतःकरणास (पापगंधापासून) शुचिर्भूत करूं इच्छित नाहीं. या लोकांची इह-लोकींहि फजिती आहे व परलोकींहि त्यांच्यासाठीं मोठी (सक्त) शिक्षा होय. ४१. (हे लोक खोट्या) खोट्या गोष्टींचें कर्णसुख घेत फिरतात व हरामाचा माल खाऊन चट करीत जातात. तर (हे पैगंबरा!) जर (हे लोक आपल्या खटल्यांचे निवाडे करवि-ण्यास) तुजपाशीं येतील, तर (तुला अखत्यार आहे, पाहिजे तर,) तूं त्यांचा परस्पर फैसल्ला कर, अगर त्यांच्या (प्रकरणांत मध्यस्ती करण्या)पासून अलिप्त राहा. आणि जर तूं त्यांच्या (प्रकरणांत मध्यें पडण्या)पासून अलिप्त राहशील, तर ते तुला कोणाहि तऱ्हेचें नुकसान पोहोंचवूं शकणार नाहींत. आणि जर तूं फैसल्ला सांगशील तर त्यांच्यांत न्यायानें फैसल्ला कर. कारण कीं, परमेश्वर न्याय करणाऱ्यांवर प्रीति ठेवितो. ४२. आणि (हे लोक) कसे तुजपाशीं न्याय निवाडायास येतात? व वास्तविक पाहतां, खुद्द त्यांच्यापाशीं तौरात आहे कीं ज्यांत ईश्वराज्ञा आहे. मग ह्यानंतरहि ते (ईश्वराज्ञेकडून) तोंड चुकवितात, व ह्यांना (मुळापासून) विश्वास (ह्मणून) नाहींच. ४३. निःसं-शय आह्मींच तौरात (पुस्तक) प्रकट केलें; कीं त्यांत (हर-तऱ्हेचीं) बोधवचनें व (विश्वासाचा) प्रकाश होय. (परमेश्वराचे) आज्ञाधारक (सेवक) असे जे (बनी-इस्राएलांचे) प्रवक्ते तेहि त्यासच अनुसरून यहुद्यांस हुकूम देत आले आहेत; आणि (तसेच प्रवक्त्यां-शिवाय, यहुद्यांचे) गुरु (ह्मणजे साधुसंत) व विद्वान हेहि. कारण कीं, ते ईश्वरी पुस्तकाचे संरक्षक ठरविले गेले होते; व ते त्याचें प्रत्यक्ष संरक्षण करीतहि राहिले. तर (हे सांप्रतकाळच्या यहुद्यांनों!) लोकांस भिऊं नका, व माझेंच भय बाळगा; आणि माझीं महा वाक्यें (इहलौकिक)

क्षुल्लक किंमतीस विकूं नका. आणि जो कोणी परमेश्वरानें प्रकट केलें आहे त्या (पुस्तका)नुसार हुकूम न देईल तर हेच लोक नास्तिक होत. ४४. आणि आह्मीं तौरातमध्यें यहुद्यांस लेखी हुकूम दिला होता कीं जिवाबद्दल जीव व डोळ्याबद्दल डोळा व नाकाबद्दल नाक व कानाबद्दल कान व दांताबद्दल दांत आणि जखमांचा बदला (तसल्याच जखमा.) मग जो कोणी (आपल्यावर जुलूम झाल्यावर) बदला घेणें धर्मार्थ माफ करून टाकील, तर तें त्या(च्या पापां)चें प्रायश्चित होईल. आणि जो कोणी परमेश्वरानें प्रकट केलें आहे त्या (पुस्तका)प्रमाणें हुकूम न देईल, तर हेच लोक अन्यायी होत. ४५. आणि ह्यामागून ह्या (पैगंबरां)च्याच

(१) ४१ ते ४४ या वाक्यांच्या प्रकटीकरणाचें मूलभूत कारण असें आहे कीं मदिनेजवळील खैबर शहराच्या दोन अब्रूदार धनिक स्त्रिपुरुषांनीं जारकर्म केलें. त्यांच्या शास्त्रांत व्यभिचाराची शिक्षा धोंडमार होती. परंतु दोघांहि अपराध्यांच्या अब्रूमुळें त्यांस त्यांचा मोठा विचार येऊन पडला होता. हा तो वेळ होय कीं जेव्हां मदिनेंत पैगंबर साहेबांची सत्ता बसत चालली होती व परधर्मीय लोकही आपले बहुतेक झगडे निकालासाठीं त्यांच्यापुढें आणीत होते. ह्या गोष्टीची चर्चा लोकांतहि चाललीच होती. त्यांच्या पक्षकारांनीं हें प्रकरण पैगंबर साहेबांपुढें अशा आस्थेनें आणूं पाहिलें कीं हेहि अपराध्यांची कड उचलून धरतील. ते ह्या विचारांत होते कीं प्रथम पैगंबर साहेबांचें मत माहीत करून घ्यावें व समाधान झाल्यावर हें प्रकरण त्यांजपुढें मांडावें. अखेर हें प्रकरण त्यांच्यापाशीं गेलें व त्यांनीं तोच धोंडमाराचा हुकूम ऐकविला व तौरात पुस्तकाचा हवाला दिला. तौरात मागविण्यांत आलें तों, यहुदी तो हुकूम लपवूं लागले. पण शेवटीं त्यांची ही चोरी पकडण्यांत आली; आणि ह्या सर्व वाग्दंडाचें कारणहि हेंच होय.

(२) याच्या मागील वाक्यांच्या प्रकटीकरणाचें मूलभूत कारण, यहुद्यांत उघडकीस आलेलें व्यभिचाराचें प्रकरण होतें. त्यांतील अपराधी अब्रूदार होते ह्मणून धोंडमाराचा हुकूम अमलांत आणण्यास तौरातचे हुकमाविरुद्ध ते हेळसांड करीत होते. आणि या वाक्यांत सूड किंवा बदल्याचा हुकूम आहे; व हे नियम सर्वांस लागू आहेत. मग अपराधी कोण व

**पदोपदीं आह्मीं मरयमचा पुत्र ईसा यास चालविलें; कीं तो आपल्या (वेळीं) पूर्वींपासूनच जें तौरात होतें त्याचें सत्यत्व दर्शवीत होता. आणि आह्मीं त्याला इंजीलहि दिलें कीं त्यांत (हरतऱ्हेचा) बोध व (सन्मार्ग-)प्रकाश हीं होत. आणि तौरात जें त्याच्या (प्रकटीकरण काळाचे) पूर्वींपासूनच (अस्तित्वांत) होतें त्याचें (हें इंजील) सत्यत्व दर्शवितें व तें (स्वतांहि परमेश्वराला) भिऊन वागणाऱ्यांसाठीं सन्मार्ग व बोध असें होय. ४६. आणि इंजील वाल्यांस (ख्रिस्ती होण्याच्या नात्यानें) पाहिजे कीं परमेश्वरानें त्यांत जो (हुकूम) सादर केला आहे त्याला अनुसरूनच त्यांनीं हुकूम देत जावा. आणि जो कोणी परमेश्वरानें प्रकट केलेल्या (हुकमा) प्रमाणें हुकूम न देईल, तर हेच लोक आज्ञाभंजक होत. ४७. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुलाहि सत्यपूर्ण पुस्तक प्रकट केलें कीं तें त्याच्या (प्रकटीकरणाच्या वेळीं) पूर्वींपासून जीं पुस्तकें (अस्तित्वांत) आहेत त्यांची सत्यताहि पटवितें व त्यांचें संरक्षकहि होय.**

---

कोणत्या पदवीचा आहे याचा कसलाच विचार न बाळगितां त्याला शिक्षा दिली जावी. असाच धोंडमाराचा हुकूमहि सर्वांस सारखाच लागू होता. परंतु यहुदी दरेक कामांत ऐहिक लोभास मध्यें आणीत असत.

(१) या वाक्यांत यहुदी व ख्रिस्ती लोकांस ह्यासाठीं वाग्दंड केला गेला आहे कीं ते यहुदी व ख्रिस्ती होण्याचा दावा करतात पण आपलीं दिव्य पुस्तकें तौरात ह्मणजे जुना करार व इंजील ह्मणजे शुभवर्तमान यांतील गोष्टी कृतींत आणीत नाहींत. वस्तुतः त्यांना पाहिजे होतें कीं जर ते यहुदी व ख्रिस्ती होण्याचे दावेदार आहेत तर त्यांनीं ईश्वरी पुस्तकाचे नियम पाळले पाहिजेत. पण त्यांचा दावा हा तोंडींच दावा आहे; त्यास प्रमाण नाहीं. त्यांची कृति त्यांच्या दाव्याचें सत्यत्व पटवीत नाहीं.

(२) कुराणाला त्याच्या पूर्वींच्या पुस्तकांचें संरक्षक म्हटलें आहे; त्याचा अर्थ हा कीं तें त्या पुस्तकांत कोणा तऱ्हेचा फेरबदल केला जाणें वाजवी समजत नाहीं. म्हणूनच कुराणांत ग्रंथधारी लोकांस त्यांनीं आपल्या पुस्तकांत केलेले फेरबदल व ढवळाढवळी विषयीं वारंवार फार सक्तीनें दोष दिला गेला आहे.

तर जें कांहीं परमेश्वरानें (तुला) सादर केलें आहे, तूंहि त्या प्रमाणेंच त्या लोकांस हुकूम दे; आणि जी सत्य गोष्ट तुला (परमेश्वराकडून) पोहोंचली आहे तिला सोडून, तूं त्यांच्या मनोवासनेचें अनुकरण करूं नकोस. आम्हीं (वेळोवेळीं) तुमच्यांतून प्रत्येक (समाजा)साठीं एक शास्त्र व (खास) एक सांप्रदाय ठरविला. आणि जर परमेश्वर इच्छिता, तर तो तुह्मां सर्वांस एकच (धर्माचे) अनुयायी करता. परंतु (निरनिराळीं शास्त्रें पाठविण्याचा) हा उद्देश (राहिला) आहे कीं जे हुकूम (तुमच्या परिस्थितीनुरूप वेळोवेळीं) तुह्मांस दिले त्यांत तुह्मांस (वेळोवेळीं) कसून पाहावें. तर (मुसलमानांनों !) तुह्मीं (सांप्रतकाळच्या इस्लामी शास्त्राप्रमाणें) चांगल्या कामांकडे सरसावून जा. (कारण,) तुह्मां सर्वांस परमेश्वराकडेच परत जाणें आहे. तर ज्या ज्या गोष्टींत तुह्मीं लोक (जगांत) मतभेद करीत राहिलां आहां, तो तुह्मांस त्या (सर्वां)ची हकीकत विदित करील. ४८. (सारांश, हे पैगंबरा! तूं तर आपल्या धर्मशास्त्रावर कायम राहा;) आणि परमेश्वरानें जें (पुस्तक) (तुला) प्रकट केलें आहे त्याला अनुसरूनच त्या लोकांस हुकूम दे, व त्यांच्या मनोवासनेचें अनुकरण करूं नकोस व त्यां(च्या डावपेंचा)विषयीं जपत राहा; कीं जें (पुस्तक) परमेश्वरानें तुला प्रकट केलें आहे (असें न होवो कीं) त्याच्या कोणा हुकमापासून हे लोक तुला भटकवितील. मग जर (हे लोक तुझा कह्या) न मानतील, तर जाणून अस कीं परमेश्वरालाच असें मंजूर आहे कीं त्यांच्या कोणा पापांचे कारणें त्यानें त्यांच्यावर एखादें अरिष्ट आणावें. आणि निःसंशय बहुतेक लोक अलबत आज्ञाभंजक होत. ४९. तर कां ते (ह्यावेळीं) अज्ञानें काळाचा हुकूम इच्छितात? आणि जे लोक पक्का विश्वास ठेवितात त्यांच्या करतां परमेश्वरापेक्षां

(१) इस्लामचे पूर्वीचा वेळ मूर्तीपूजक अरब लोकांसाठीं अज्ञानकाळ ह्मणवितो. कारण सर्वांत पहिलें पुस्तक जें ह्या अरब लोकांस प्रकट झालें तें हेंच कुराण होय. ह्याच्या अगोदर तर त्यांना माहीतच नव्हतें कीं परमेश्वर वस्तुत: काय आहे व तो काय इच्छितो?

**उत्तम हुकूम देणारा (आणखी) कोण होऊं शकतो? ५०. अहो मुसलमानांनों! तुह्मीं यहुदी व खिस्ती यांस स्नेही बनवूं नका. (हे लोक तुमच्या विरोधांत) एकमेकांचे दोस्त होत. आणि तुह्मांपैकीं जो कोणी यांना दोस्त बनवील, तर निःसंशय तोहि त्यांच्यांतलाच (एक) होय. कारण कीं, परमेश्वर अशा जालिम लोकांस सन्मार्ग दाखवित नसतो. ५१. तर (हे पैगंबरा!) ज्या लोकांचे अंतःकरणांत (अविश्वासाचा) रोग आहे, तूं त्यांना पाहशील कीं ते ह्या (यहुदी व खिस्ती यांस दोस्त बनविण्यां)त (फार) त्वरा करतात; ते म्हणतात (काय) कीं आम्हांस या गोष्टीची भीति**

(१) हजरत पैगंबर साहेबांनीं लोकांस इस्लामधर्मशिक्षण देऊन मुसलमानांचा एक नवीन समाज स्थापिला. या धर्मांत मोठ्या कंठरवानें ईश्वरैक्यमताची ताकीद व समर्थन आहे; ह्मणून मुसलमानांचीं धर्म मतें, यहुदी, खिस्ती व मूर्तीपूजक अरब वगैरे यांच्याशीं मेळ खात नव्हतीं. जरी पैगंबर साहेबांनीं पुष्कळ प्रमाणें पटवून समजाविलें, तरी थोड्याशाच लोकांनीं विश्वास धरिला. व बाकीच्यांनीं देशभर वैर माजविण्यावर कमर बांधली. जोंवर मुसलमानांचा समाज कमजोर व अल्पसंख्य होता तोंवर प्रतिपक्षानें छळ करण्यांत कोणतीच कसर ठेविली नाहीं. यावरहि मुसलमान सहन व उपेक्षा करीत व त्यांना नरमाईनें समजावीत राहिले. परंतु "चांभाराच्या देवाला खेटरांचीपूजा" मिळालीच पाहिजे. तेव्हां मुसलमान आपलें बळ एकवटून जशास तसा जबाब देऊं लागले. सारांश, लढाई ठरली व यथासांप्रदाय तिची परंपरा वर्षों गणती चालू राहिली. ही गोष्ट जगजाहीर आहे कीं दोन्हीं पक्षांतहि लढाई होऊं लागते, व ती हमरातुमरी नव्हे तर, तीरतलवारीची लढाई ह्मणजे एक दुसऱ्याच्या जिवाचा घोट घेण्यास तयार असतो; अशा परिस्थितींत एकापक्षाचे लोकांस दुसऱ्या पक्षाचे लोकांशीं स्नेह ठेवणें हें आपल्या पक्षाच्या नाशास कारणीभूत होणें आहे. तर यहुदी व खिस्ती यांशीं दोस्ती ठेवण्याची मनाई तात्पुरती व विशिष्ट प्रकारचीच होती. हे लष्करी बंदोबस्त प्रत्येक देशास व प्रत्येक राज्यास करावे लागतात व त्यांचा संबंध जगाचे लढाई झगड्यांशींच होय. धर्मसंबंधीं विरोध ह्मणजे मतांतर ही दुसरी गोष्ट आहे. जास्त खुलाशासाठीं पाहा अध्याय ७२.

लागून राहिली आहे कीं कोठें (असें न व्हावें, कीं घर बसल्या) आम्हांवर एखादें कालचक्र येऊन जावें. पण (कांहीं दिवस जातां,) लवकरच, परमेश्वर (मुसलमानांचा) विजय अगर (आणखी) कांहीं गोष्ट आपल्याकडून (घडवून) आणील; तर (त्या वेळीं हे दांभिक, इस्लामचें वर्चस्व व त्याच्या सत्यत्वाविषयीं) आपल्या मनांत जे (कुतर्क) लपवून ठेवीत होते त्याबद्दल पश्चात्ताप पावतील. ५२. आणि (ह्यानें त्यांचा दांभिकपणा मुसलमानांचे निदर्शनास येईल; तेव्हां) मुसलमान (हे त्यांच्या स्थितीची कींव येऊन आपसांत) म्हणूं लागतील कीं हेच कां ते लोक कीं जे (वरवरून) मोठ्या जोरानें परमेश्वराच्या (कडाकड) शपथा वाहीत (व आम्हांस सांगीत) कीं आम्हीं तुमच्या संगतीं आहों? (व आंतल्या आंत यहुद्यांच्या कुमकेसाठीं झटत) तर त्यांचें सारें केलें (सवरलें) अक्रीत झालें व ते (सफाई) बुडाले. ५३. अहो मुसलमानांनों! तुमच्यांतून जो कोणी आपल्या (इस्लाम-)धर्मांहून फिरून जाईल तर परमेश्वर (त्याची लेशमात्रहि पर्वा करीत नाहीं; तो) अशा लोकांस आणून हजर करील कीं ज्यांच्यावर तो प्रीति ठेवीत असेल व जे त्याच्यावर प्रीति ठेवीत असतील. ते मुसलमानांशीं नम्र (व) नास्तिकांशीं उग्र असे (असून), परमेश्वराचे मार्गांत आपले प्राण लढवितील, व कोणाहि निंदा करणाऱ्याच्या निंदेचें (कांहींच) भय बाळगिणार नाहींत. हीहि परमेश्वराची (एक) कृपा होय. ती तो ज्याला इच्छील त्याला देईल. आणि परमेश्वर (दयेच्या मानानें) सर्व व्यापी (व सर्वांच्या स्थितीशीं) वाकब होय. ५४. (मुसलमानांनों!) तुमचे दोस्त (म्हटलें म्हणजे) काय ते हेचः–परमेश्वर व परमेश्वराचा पैगंबर व मुसलमान कीं जे नमाज पढतात व जकात देतात आणि जे (सर्वकाळ परमेश्वरापुढें) झुकून राहतात ते. ५५. आणि जो कोणी परमेश्वर व परमेश्वराचा पैगंबर व मुसलमान यांचा दोस्त होऊन राहील, तर (तो ईश्वरपक्षीय होय; आणि) परमेश्वराच्या पक्षाचाच बोल-बाला होय. ५६. अहो मुसलमानांनो! ज्यांनीं तुमच्या धर्माला हंशी व खेळ बनवून ठेविला आहे, म्हणजे (यहुदी व ख्रिस्ती) कीं ज्यांना तुमच्या पूर्वीं पुस्तक दिलें जाऊन चुकलें आहे त्यांना व नास्तिकांना

(आपले) मित्र बनवूं नका. आणि जर तुह्मीं (खरे) मुसलमान आहां तर परमेश्वराला भीत राहा. ५७. आणि जेव्हां तुह्मीं (नमाजीची बांग पुकारून लोकांस) नमाजीसाठीं बोलवितां, तेव्हां हे लोक नमाजीला हंशी व खेळ बनवितात. (आणि) हें (गैरशिस्त कार्य यांच्या हातून) ह्यासाठीं (घडून येतें) कीं हे असे (बेवकुब) लोक होत कीं (बिलकुल) समजत नाहींत. ५८. (हे पैगंबरा! यहुद्यांस) विचार कीं हे ग्रंथधारी लोकांनों! आम्हां (मुसलमानां)त तुह्मीं काय दोष काढतां? हाच ना कीं आम्हीं परमेश्वरावर व जें (कुर्आन्) त्यानें आह्मांस प्रकट केलें आहे त्यावर व जें (पुस्तक याच्या)पूर्वीं प्रकट होऊन चुकलें आहे त्यावर, विश्वास ठेविला आहे; आणि हें कीं तुमच्यांतले बहुतेक आज्ञाभंजक होत? ५९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं बरें, मी तुह्मांस (खरोखरी असे सदोष) दाखवूं कीं जे परमेश्वरा-समीप ह्या (तुमच्या कल्पित निंदार्ह लोकां)पेक्षांहि कोठें फारच वाईट मोबदल्यास पात्र ठरतात? (खरोखरी दूषणीय) ते (होत कीं) ज्यांना परमेश्वरानें शापग्रस्त केलें व तो त्यांच्यावर कोपायमान झाला; आणि कित्येकां(स विरूप करून त्यां-)ना त्यानें वानरें व डुकरें बनविलीं; व त्यांनीं (परमेश्वरास सोडून) सैताना(च्या बहकव-ण्यानें वासरा-)ची पूजा केली. तर हे लोक (ह्मणजे तुह्मीं) दर्जांत (आह्मांपेक्षांहि कोठें) वाईट आणि सरळ मार्गाहून फारच (दूर) भटकून गेलेले (असे ठरलां). ६०. आणि (मुसलसानांनों!) जेव्हां हे लोक तुह्मांपाशीं येतात, तेव्हां ते ह्मणतात कीं आह्मीं विश्वास धरिला, व वास्तविक पाहतां, ते नास्तिकपणांच संगती घेऊन आले होते

(१) मदिनेंत एक खिस्ती होता; तो बांग पुकारण्याच्या वेळीं ह्मणत असे कीं जळो तो लबाड बोलता. एके दिवशीं त्याच्या चाकरानें घरांत अग्नि आणिला व पेटविला; तों आग भडकली आणि खिस्ती आपल्या कुटुंबासह जळून घरांतच भस्म झाला. ही, परमेश्वराच्या नांवाला हंशी खेळ बनविण्याची शिक्षा त्या लबाडास त्याच्याच ह्मणण्याप्रमाणें मिळाली.

(२) भावार्थ हाच कीं तुमच्यांतले बहुतेक आज्ञाभंजक आहेत म्हणून आम्हीं तुमच्या डोळ्यांत सलतों हाहि आमचाच का दोष?

व ते नास्तिकपणाच संगती घेऊन चालतेहि झाले. आणि जो (द्वेषभाव ते मनांत) लपवून होते त्याला परमेश्वर खूप जाणतो. ६१. आणि (हे पैगंबरा!) तूं त्यांच्यांतून बहुतेकांस पाहशील कीं पापकर्म (म्हणजे लबाडी) व जाचजुलूम व हरामाचा माल खाणें यांजवर ते एकदम तुटून पडतात. अर्थात् हे लोक जीं (कामें) करतात तीं फारच वाईट होत! ६२. ह्यांना ह्यांचे रब्बी (म्हणजे साधुसंत) व पंडित हे, लबाड बोलणें व हरामाचा माल खाणें यांपासून कां ह्मणून मनाई करीत नाहींत? (त्यांचे साधुसंत व शास्त्री) जी (उपेक्षा व हेलसांड) करतात ती खरोखर (फारच) वाईट होय! ६३. आणि यहुदी ह्मणतात कीं परमेश्वराचा हात (आजकाल) तंग आहे. त्यांचेच हात तंग होऊन जावोत व त्यांच्या (ह्या) बोलण्याबद्दल त्यांना परमेश्वराचा) शाप लागो–(परमेश्वराचा हात तंग नाहीं); किंबहुना त्याचे दोन्ही हात सढळ आहेत. तो कसें इच्छितो तसें खर्च करितो. आणि (हे पैगंबरा! हे लोक तुझ्याशीं मत्सर व द्वेष बाळगितात ह्मणून हें कुर्आन्) जें तुझ्या पालनकर्त्याकडून तुला प्रकट झालें आहे तें अवश्य त्यांच्यांतून बऱ्याच लोकांची शिरजोरी व नास्तिकपणा वृद्धिंगत होण्यास कारणीभूत होईल. आणि (ह्याच मत्सराची सजा होय कीं) आम्हीं त्यांच्या आपसांतहि वैमनस्य व द्वेषभाव घालून टाकला आहे (कीं तो) पुनरुत्थानाचे दिवसा पावेतों (निघणार नाहीं.) जेव्हां जेव्हां ते लढाईचा वणवा पेटवितात, तेव्हां तेव्हां परमेश्वर तो विझवून टाकितो; आणि ते मुलखांत फिसाद माजवीत फिरतात. आणि परमेश्वर फिसादखोरांस प्रीय ठेवीत नसतो. ६४.

---

(१) पैगंबर साहेबांस धर्मयुद्ध वा जिहाद याच्या सरंजामासाठीं अगर स्वदेश त्याग करून आलेल्या मुसलमानांचे खर्चवेचा करतां अथवा मुसलमानांचे सार्वजनिक कामाकरितां फंड गोळा करण्याची जरूरी दिसून येई; तेव्हां यहुदी हे मुसलमानांस टोमणे मारीत कीं मुसलमानांचा परमेश्वर कंगाल होऊन गेला आहे. दुसरें असें कीं यहुदी जेव्हां पैगंबरास नाकारूं लागले तेव्हां परमेश्वरानें त्यांची निर्वाह–साधनांची त्याच्यावर ददात आणिली ह्मणून ते परमेश्वराला कंगाल ह्मणूं लागले. हाहि खोडसाळपणा होय.

आणि जर ग्रंथधारी लोक विश्वास धरिते व (परमेश्वराला) भीते तर आह्मीं यांच्यावरून यांचे अपराध अवश्य काढून टाकतों व यांना (स्वर्गांचे) परम सुखोद्यानांतही जरूर (नेऊन) दाखल करितों. ६५. आणि जर हे, तौरात व इंजील आणि जीं (पुस्तकें) यांच्या पालनकर्त्याकडून यांजला सादर झालीं आहेत तीं, कायम राखते, (व पाळते) तर जरूर (आह्मीं यांना अशी बरकत देतों कीं यांच्या) वरून (अन्नवृष्टी होते) आणि यांच्या पायांच्या खालून (रेलचेल निघते; व हे खुशाल) खाते. यांच्यांतून कांहीं लोक नेमस्तहि होत; आणि यांच्यांतले बहुतेक तर (दुराचरणी होत व) ते जें कांहीं करतात तें फारच वाईट होय. ६६. हे पैगंबरा! जे (हुकूम) तुला तुझ्या पालनकर्त्याकडून सादर झाले आहेत ते तूं (जशाचे तसेच लोकांना) पोहोंचवून दे. आणि जर त्वां (असें) न केलेंस तर (समजलें जाईल कीं) तूं परमेश्वराचा (कोणताच) संदेश (लोकांस) पोहोंचविला नाहींस. आणि परमेश्वर तुला लोकां(चे अपाया)पासून सुरक्षित[1] ठेवील. कारण कीं, परमेश्वर, जे लोक नास्तिकपणा करतात त्यांस (असा) मार्गच दाखविणार नाहीं (कीं ते तुझ्यावर हात टाकूं शकतील.) ६७. (हे पैगंबरा! यहुदी व ख्रिस्ती यांस) सांग कीं अहो ग्रंथधारी लोकांनों! जोंपर्यंत तुह्मीं तौरात व इंजील आणि जीं (पुस्तकें) तुमच्या पालनकर्त्याकडून तुह्मांस सादर झालीं आहेत तीं कायम न राखाल तोंपर्यंत (धर्म, ज्याचा तुह्मीं दावा सांगतां त्याशीं) तुह्मांस कोणचेंच कर्तव्य नाहीं. आणि (हे पैगंबरा! ज्या अर्थीं हे लोक तुझा द्वेष बाळगितात त्या अर्थीं हें कुरआन्) जें तुला तुझ्या पालनकर्त्याकडून प्रकट झालें आहे तें त्यांच्यांतल्या बहुतेकांची शिरजोरी व (तसाच त्यांचा) नास्तिकपणा वृद्धिंगत होण्यास अवश्य कारणीभूत होईल. तर जे नास्तिक होत त्या लोकां(च्या परिस्थिती)बद्दल तूं

(१) या महावाक्याच्या प्रकट होण्यापर्यंत हजरत पैगंबर साहेब आपल्या संगतीं रक्षक व पाहरेकरी ठेवीत होते; पण हें ईश्वरी आश्वासन प्रकट होतांच सर्वांस त्यांनीं रजा दिली. परमेश्वरावर इतकी त्यांची दृढ निष्ठा होती. हीहि एक गोष्ट कुराण हें ईश्वरप्रणीत आहे यास प्रत्यक्ष प्रमाण होय.

(मुळींच) खेद करूं नकोस. ६८. यांत शंका नाहीं कीं जे मुसलमान आहेत ते व जे यहुदी आहेत ते आणि साबी व ख्रिस्ती (यांजपैकीं) जो कोणी परमेश्वरावर व शेवटल्या दिवसावर विश्वास ठेवील व सुकृत्यहि करील, तर (पुनरुत्थानाचे दिवशीं) अशा लोकांस (कोणा तऱ्हेची) भीति राहणार नाहीं व ते (कोणा प्रकारें) दुःखीहि होणार नाहींत. ६९. (बनी–इस्राएल जर सत्य स्वीकारण्याचें नाकारितील तर ही कांहीं नवीन गोष्ट नव्हे पूर्वींहि) आह्मीं (या) बनी–इस्राएलां (म्हणजे यांच्या वडिलां)पासून पक्कें वचन घेऊन चुकलों आहों (कीं तौरात-वर कायम राहणें;) आणि आह्मीं यांच्याकडे (बरेच) पैगंबरहि पाठविले. (पण,) जेव्हां कधीं कोणी पैगंबर यांच्यापाशीं असे हुकूम घेऊन आला कीं यांच्या मनाला ते नकोसे वाटत होते; तेव्हां ते कित्येकांस पाखंडी ह्मणाले व कित्येकांची कत्तल उडवूं लागले. ७०. आणि ते समजले कीं (असें केल्यानें) कसलेंच अरिष्ट येणार नाहीं. आणि (ह्या त्यांच्या खोट्या कल्पनेमुळें) ते आंधळे य बहीरे होऊन गेले (कीं त्यांनीं ना सरळमार्गच पाहिला व ना सत्य गोष्टच ऐकिली). तदनंतर (हि एके काळीं त्यांनीं पश्चात्ताप केला आणि) परमेश्वरानें त्यांचा पश्चात्ताप मान्य केला. तथापि त्यांच्यांतून बहुतेक (पुन्हां) आंधळे व बहीरे बनले; आणि (या वेळचे यहुदीहि) जें कांहीं करीत राहिले आहेत तेंहि परमेश्वर पाहतच आहे. ७१. जे लोक म्हणतात कीं मरयमचा पुत्र ख्रिस्त हाच परमेश्वर होय, ते (या अशा बोलण्यानें) निःसंशय नास्तिक होऊन गेले. आणि ख्रिस्त (तर असें) प्रतिपादित होता कीं हे बनी–इस्राएलांनों! तुह्मीं परमेश्वराचीच उपासना करा; कीं तो माझाहि पालनकर्ता होय व तुमचाहि पालनकर्ता (होय. आणि) यांत संशय नाहीं कीं जो कोणी परमेश्वराचा (कोणालाहि) सरकतदार ठरवील तर परमेश्वराकडून त्याला स्वर्ग निषिद्ध होऊन चुकला, व त्याचें ठिकाण नरकाग्नी होय. आणि (अशा) जुलमी लोकांचा कोणीच

(१) पृष्ट २९. अध्याय २:६२ मध्यें हें महावाक्य बजिन्नस आलें आहे. जास्त खुलाशासाठीं त्यावरील टीपा १ व २ पाहा.

मदतगार नाहीं. ७२. जे लोक ह्मणतात कीं परमेश्वर (तर ह्याच) त्रयींतला (एक) तिसरा होय. तेही (अशा बोलण्यानें) निःसंशय नास्तिक होऊन गेले! व वास्तविक पाहतां, एकट्या परमेश्वराशिवाय अन्य कोणी उपास्य (ह्मणजे परमेश्वरच) नाहीं. आणि (परमेश्वरासंबंधीं जसजशा गोष्टी हे लोक उच्चारितात त्यांपासून जर ते पराङ्मुख न होतील, तर यांच्यापैकीं जे लोक नास्तिकपणा करीत राहतील, त्यांना दुःखप्रद शिक्षा पोहोंचेलच पोहोंचेल. ७३. तर कां (इतकें समजाविल्यावरहि) ते परमेश्वरापुढें पश्चात्ताप करीत व क्षमा भाकीत नाहींत? व वास्तविक पाहतां, परमेश्वर (तर फारच) क्षमाकर्ता व दयाळू होय. ७४. मरयमचा पुत्र ख्रिस्त हा तर केवळ एक पैगंबर होय एवढेंच. याच्या पूर्वींहि (अनेक) पैगंबर होऊन गेले आहेत. आणि याची मातोश्री (मरयमहि परमेश्वराची एक) सात्विक (सेविका) होती. (इतर मनुष्यांप्रमाणें हीं) उभयतां (मायलेकरें) अन्नें खात होतीं. (हे पैगंबरा!) पाहा, तर खरें, कीं आह्मीं (आपलीं) प्रमाणें या लोकांस कशीं स्पष्ट करून करून सांगतों! व नंतरहि पाहा कीं (सैतानाचे बहकविण्यानें) हे लोक कोठेंच उलटे भटकत चालले जात आहेत! ७५. (हे

---

(१) या जागीं ख्रिस्त्यांच्या अनेक पंथांपैकीं दोन पंथांचीं मतें दिलीं आहेत. एक पंथ ख्रिस्त येशूला परमेश्वर समजत होता; व दुसरा, अशा अजब तऱ्हेनें परमेश्वर मानीत होता कीं परमेश्वर व येशू व पवित्र आत्मा ह्या तिघांत परमेश्वरत्व आहे. ह्मणजे यांतील प्रत्येक परमेश्वर आहे. परमेश्वरानें यांचें खंडन करून ह्मटलें कीं हीं सर्व नास्तिक मतें होत, आणि परमेश्वर तर एकच होय. सत्रंथी ह्मणविणाऱ्या ख्रिस्त्यांच्या व्याख्येप्रमाणें परमेश्वर ह्मणजे सत्व, पुत्र ह्मणजे ज्ञान आणि पवित्र आत्मा ह्मणजे जीवन, असें जरी धरून चाललें तरी त्यांचीं अस्तित्वें भिन्नभिन्न असल्यामुळें ते एक होऊं शकत नाहींत. पहा मत्तय २७:४६ आणि योहान्न १६:७

(२) मतलब हा कीं उभयतांसहि भूक लागत होती व अन्नाची अपेक्षा राहात होती; आणि परमेश्वर तर निरपेक्ष असला पाहिजे.

पैगंबरा! तूं या लोकांस) सांग; कां तुह्मीं परमेश्वराशिवाय अशा वस्तूंची पूजाअर्चा करतां कीं ज्यांच्या अखत्यारांत तुमचें नफानुकसान (कांहींच) नाहीं? (अखत्यार तर एकिकडेच; त्यांना तुमच्या नफ्यानुकसानाची जाणीवहि नाहीं.) आणि परमेश्वरच असा होय कीं (तो सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो (व सर्व अखत्यारहि त्यालाच होय). ७६. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं हे ग्रंथधारी लोकांनों! तुह्मीं आपल्या धर्मांत नाहक (अनाठायीं) अतिशयोक्ति करूं नका; आणि जे लोक (तुमच्या)पूर्वीं बहकून चुकले आहेत व ज्यांनीं बहुतेकांस बहकावून सोडलें आहे व (अशा प्रकारें) सरळ मार्गाहून भटकून गेले आहेत त्या लोकांच्या (ह्मणजे आपल्या वडिलांच्या) मनेच्छेचें अनुकरण करूं नका. ७७ बनी-इस्त्राएलांपैकीं ज्या लोकांनीं नास्तिकपणा केला, त्यांच्यावर दाऊद[1] व मरयमचा पुत्र ईसा[2] यांच्या तोंडून (परमेश्वराचा) शाप झाला. हा (शाप त्यांच्यावर) ह्यासाठीं (झाला) कीं ते बेहुकमी करीत होते व मर्यादेबाहेर जात होते. ७८. जें वाईट काम ते (एकदां) करूं लागत होते त्यापासून ते पराङ्मुख होत नसत. अर्थात् हे लोक जीं कामें करीत होते तीं (फारच) वाईट होत. ७९. (हे पैगंबरा!) तूं या (यहुद्यां)पैकीं बहुतेकांस पाहशील कीं ते नास्तिकांशीं मैत्री ठेवितात. अलबत त्यांनीं आपल्या ठायीं जी प्रस्तावना केली ती (फारच) वाईट होय; कीं (तिचा परिणाम हा झाला कीं इहलोकींहि) परमेश्वर त्यांच्याशीं नाखुष झाला व (परलोकींहि) हे सर्वकाल शिक्षेंतच राहतील. ८०. आणि जर (हे लोक) परमेश्वरावर व (आपला) पैगंबर (मूसा)

---

(१) दाऊद किंवा दाविद यांच्या मुखानें आयला येथील लोकांवर शब्बाथचा अनादर केल्यामुळें शाप झाला.

(२) मरयमचा पुत्र ईसा वा येशूंच्या तोंडून, ज्या लोकांनीं त्यांच्यासाठीं आलेल्या ताटाच्या चमत्कारावर विश्वास ठेविला नाहीं त्यांच्यावर शाप आला. बायबलांत याला जें ( Table ) मेज ह्मटलें आहे ही मोठी चूक होय. कारण त्या काळीं मेजावर जेवण्याची चालच नव्हती.

यावर आणि जें (पुस्तक) त्या (पैगंबरा)ला प्रकट झालें त्यावर विश्वास ठेवित असते, तर ते नास्तिकांस मित्र न बनविते. परंतु यांच्यापैकीं बहुतेक आज्ञाभंजक होत. ८१. (हे पैगंबरा!) मुसलमानांशीं वैर भाव राखण्याच्या मानानें, यहुदी व मूर्तीपूजक यांस तूं सर्व लोकांत जास्तच सक्त पावशील, आणि मुसलमानांशीं दोस्ती ठेवण्याच्या मानानें सर्व लोकांत जे लोक ह्मणतात कीं आह्मीं ख्रिस्ती आहों त्यांस तूं जास्त जवळ पावशील. (मुसलमानांकडे ख्रिस्त्यांचा) हा (रोंख) या कारणामुळें होय कीं यांच्यांत कित्येक उपाध्ये मंडळी व (मठवासी) साधुसंत होत; आणि (तसेंच) हें कीं हे लोक अहंकार[1] करीत नाहींत. ८२.

---

(१) ह्मणजे यहुदीलोक जसा अहंकार करीत होते तसे ख्रिस्ती गर्विष्ठ नव्हते. तर ते नम्र स्वभावाचे असून विचार स्वातंत्र्य मिळाल्यास सत्य स्वीकारण्यास सिद्ध होत. परंतु पाद्र्यांच्या अनावर अंकुशामुळें त्यांना विचारस्वातंत्र्य मिळत नाहीं. ह्मणूनच ते अधर्माला धर्म समजून बसले आहेत. जगांतील संस्कृतीच्याकाळीं ही परिस्थिती काइम राहणें ह्मणजे सोंवळा गोंधळ अतएव अंधेरच होय असें समजलें पाहिजे. पाद्र्यांचें इतकें प्रस्थ माजलें आहे कीं तो करील ती पूर्वदिशा. त्यांच्या विरुद्ध कोणी खरें मतहि प्रतिपादन करील तर तो बिचारा धर्मबाह्य (Heretic) ह्मणवितो. पण पूर्वीं ख्रिस्ती उपाध्ये व साधुसंतांची गोष्ट बहुतेक अंशीं अशी नव्हती. ह्मणूनच बहुतेक ख्रिस्ती मुसलमान झाले; आणि अजूनहि होत आहेत.

# पवित्र कुराण

## भाग ७ वा.

### सूरतुल्-माईद: (पुढें चालू).

आणि जेव्हां (ते लोक कुर्आन्) जें (आमच्या या) पैगंबर (मोहंमद्) यास प्रकट झालें आहे तें ऐकतात, तेव्हां (हे वाचकश्रोत्या!) तूं त्यांच्या डोळ्यांस पाहतोस कीं ते आसवें ढाळीत आहेत; ह्यासाठीं

(१) हीं वाक्यें हबशी म्हणजे इथिओपियाचा ख्रिस्ती राजा नज्याशी व त्याचे दरबारी लोक जे ख्रिस्ती होते त्यांच्या संबंधानें प्रकट झालीं आहेत. गोष्ट ही कीं हजरत पैगंबर साहेबांनीं जेव्हां इस्लामाच्या उपदेशास सुरुवात केली तेव्हां पैगंबरांच्या घराण्यांतील कुरेशी लोक फार क्षुब्ध होऊन गेले. कारण कीं इस्लामधर्म उपदेशिल्यानें त्यांच्या पूर्वजांचे धर्मास अडथळा बसत होता. प्रथम प्रथम त्यांनीं धमकावून व दरडावून इच्छिलें कीं ही गोष्ट जेथल्या तेथेंच दबून जावी. परंतु पैगंबर साहेब एकसारखे उपदेश करीत राहिले व लोकहि एकएक दोनदोन करून इस्लामाची दीक्षा घेऊं लागले. तेव्हां कुरेशी लोकांनीं इतर घराण्यांस उचल देऊन व बहकावून सर्वांनीं मिळून मुसलमानांचा अनेक प्रकारें छळ सुरु केला. पैगंबर साहेब आपला चुलता अबुतालिब यांच्या रक्षणांत होते; व ते कुरेशीचे सरदारमंडळींपैकीं असल्यामुळें प्रतिपक्षाचे लोक, पैगंबरांचें कांहींच करूं शकले नाहींत. परंतु इतर मुसलमानांस फारच मुष्किल झाली व पैगंबर साहेबांसहि इतकी ताकद नव्हती कीं त्यांचें संरक्षण करिते. अखेर निरुपायास्तव त्यांनीं परवानगी दिली कीं इथिओपियाचा राजा नज्जाशी, जो सदाचरणी, न्यायी व प्रजावत्सल आहे, त्याच्या राज्यांत मुसलमानांनीं जाऊन राहावें. सारांश, प्रथम, ११ पुरुष व ४ स्त्रिया यांनीं तेथें आश्रय घेतला. ही पहिली हिजरत ह्मणजे स्वदेश त्याग ह्मणविते.

कीं त्यांना सत्य गोष्टीची ओळख पटली आहे. (कुर्आन् ऐकून) ते प्रार्थना करूं लागतात कीं हे आमच्या पालनकर्त्या! आह्मीं तर विश्वास धरिला. तर (सद्धर्माची) साक्ष पटविण्याऱ्यांबरोबर तूं आह्मांलाहि लेखून ठेव. ८३. आणि आह्मांला काय (वेड लागून गेलें) आहे कीं परमेश्वरावर व जी सत्य गोष्ट आह्मांपाशीं आली आहे तिच्यावर तर आह्मीं विश्वास न ठेवावा; आणि ही उमेद राखावी कीं आमचा पालनकर्ता आम्हांला सदाचरणी लोकांबरोबर (स्वर्गांत नेऊन) दाखल करील? ८४. तर यांच्या या म्हणण्याबद्दल परमेश्वरानें यांना (स्वर्गाच्या) अशा बागा दिल्या कीं ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहतात; (व हे) त्यांत सदासर्वदा राहतील. आणि (प्रांजलपणें) सुकृत्य करणारांचा हाच मोबदला होय. ८५. आणि ज्या लोकांनीं (सद्धर्म म्हणजे इस्लामास) नाकारिलें व आमच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें, हेच नरकवासी होत. ८६. अहो मुसलमानांनों! परमेश्वरानें जे चोखे पदार्थ तुह्मांसाठीं अनिषिद्ध ठरविले आहेत त्यांस तुह्मीं (आपल्यासाठीं) निषिद्ध करूं नका; आणि मर्यादे बाहेरहि जाऊं नका. कारण, परमेश्वर मर्यादेबाहेर जाणारांस पसंत करीत नाहीं. ८७. आणि परमेश्वरानें जी तुह्मांस हला-

---

या मंडळींत पैगंबर साहेबांच्या कन्या रुकिया व त्यांचे पति हजरत उस्मान बिन अफ्फान व पैगंबरांचे आतेभाऊ जुबैर बिन अव्वाम हेहि होते. दुसऱ्या खेपेस पैगंबरांचे चुलत भाऊ जाफर तय्यार बिन अबुतालिब हे इतर मुसलमान स्त्रीपुरुषांसह तेथें पोहोंचले. स्त्रिया व मुलें खेरीज करून ८२ माणसें गोळा झालीं. तेथेंहि कुरेशीलोकांनीं त्यांस चैन पडूं दिलें नाहीं; व नज्ज्याशीपाशीं जाऊन चहाड्या करूं लागले कीं हे अधर्मी असून तुमच्या देशांत फिसाद फैलाविण्यास आले आहेत. हे तुमच्या येशूख्रिस्तासहि मानीत नाहींत. यावरून नज्ज्याशीनें मुसलमानांस बोलावणें केलें. जाफर सर्वांच्या वतीनें वकील झाले व त्यांनीं कुराणाचे कांहीं अध्याय व विशेषें करून मरयमचा अध्याय ऐकवून आपलीं धर्ममतें नज्ज्याशीला जाहीर केलीं. तो व त्याचे दरबारी कुराण ऐकून त्यांस रडें कोसळलें व त्यांना इस्लामचे सत्यत्वाची ओळख पटली; आणि ते व नज्ज्याशी हे अखेर मुसलमान झाले.

लाची व चोखी रोजी दिली आहे तींतून तुह्मीं (बेधडक) खा आणि परमेश्वर ज्याच्यावर तुह्मीं विश्वास ठेवितां त्याचें भय बाळगून असा. ८८ तुमच्या आणाशपथांत ज्या निरर्थक होत त्यांबद्दल तर परमेश्वर तुह्मांस धरणार नाहीं. पण (होय,) पक्की शपथ वाहाल (व मग ती न पाळाल,) तर परमेश्वर त्याबद्दल तुह्मांस पकडील. तर ही (पक्की शपथ मोडण्या)चें प्रायश्चित, दहा गोरगरीबांस मध्यम प्रकारचें भोजन, जें तुम्हीं आपल्या कुटुंबास खाऊं घालतां, तें घालणें हें होय; अगर त्या(च दहा गोरगरीबां)स कपडेलत्ते करून देणें; अगर एक गुलाम मुक्त करणें. मग ज्याला हें (करणें) प्राप्त न होईल तर तीन दिवसांचे उपास पाळणें. जेव्हां तुम्हीं शपथ तर वाहाल (व तींत पुरे न उतराल) तेव्हां हें तुमच्या शपथांचें प्रायश्चित होय. आणि आपल्या शपथा (पुऱ्या करण्या)ची खबरदारी ठेवा. अशाच तऱ्हेनें परमेश्वर आपले हुकूम तुम्हांस स्पष्ट करून सांगतो कीं कदाचित् तुह्मीं (त्याचे) आभार मानाल; (कीं तो तुम्हांस शिस्त लावून देतो.) ८९. अहो मुसलमानांनों! दारू व जुगार आणि मूर्ती व (शकून पहावयाचे) बाण (ह्यांच्यातलें हरेक काम) तर केवळ नापाक सैतानी काम होय. ह्मणून त्याविषयीं जपत राहा कीं कदाचित् तुह्मीं (आपल्या मनोरथांत) सफल होऊन जाल. ९०. सैतान तर काय तें एवढेंच इच्छितो कीं दारू व जुगार यांच्यापायीं तुमच्या

---

(१) निरर्थक शपथ म्हणजे एखाद्या पूर्ववृत्तांतावरून जरी वस्तुतः तो खरा नव्हे तरी त्यास खरा समजून शपथ वाहणें, अथवा जिचा संकल्प व इरादा नसतां तोंडांतून निघून जाते ती शपथ.

(२) गुलाम, मुसलमान असो वा मूर्तीपूजक असो, त्याला मुक्त करणें हें शपथ मोडल्यास तिचें प्रायश्चित होय. मानवांस पूर्वींपासून चालत आलेल्या गुलामगिरींतून मुक्त करण्याच्या हेतुनें परमेश्वरानें कुराणांत इतर अनेक कामांच्या प्रायश्चिताबद्दल हे नियमच घालून दिले कीं तेणें करून गुलामगिरीस आळा बसून ती हळूहळू नष्ट व्हावी.

(३) प्राचीन काळीं अरब लोकांचा असा दस्तूर होता कीं ते फाशयांचे ऐवजीं बाण वापरीत होते. बाणांच्याचयोगें ते शकून पाहत

**आपसांत त्यानें वैमनस्य व द्वेष घालावा व तुह्मांस परमेश्वराच्या नामस्मरणापासून व नमाजेपासून अडथळा करावा. तर कां (सैतानाचे छकेपंजे कळून आल्यावर, आतांहि) तुह्मीं मागें घ्याल (कीं नाहीं)? ९१. आणि तुह्मीं परमेश्वराची आज्ञा माना व पैगंबराची आज्ञा माना; आणि (बेहुकमी करण्याविषयीं) जपत राहा. यावरहि जर तुह्मीं (ईश्वराज्ञेपासून) तोंड फिरवाल तर जाणून असा कीं आमच्या पैगंबराकडे तर (आमचे हुकूम) स्पष्ट-पणें पोहोंचते करणें होय एवढेंच. (तर न मानिल्यानें तुह्मीं आपलेंच नुकसान कराल.) ९२. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, तर जें कांहीं (मनाई हुकूम होण्यापूर्वीं) ते खाऊन-पिऊन चुकले त्यांत त्यांच्याकडे (कोणाहि तऱ्हेचा) दोष नाहीं. ज्या अर्थीं त्यांनीं (निषिद्ध पदार्थांविषयीं) जपलें व विश्वास धरिला व चांगलीं कामें केलीं; मग पुन्हां त्यांनीं (निषिद्ध पदार्थांविषयीं) जपलें व विश्वास धरिला; नंतरहि (निषिद्ध पदार्थांविषयीं) त्यांनीं जपलें व (जसा जपण्याचा हक्क होय तो) चांगल्या प्रकारें (पूर्ण) केला; (त्या अर्थीं परमेश्वर त्यांना त्यांचा बदला देईलच देईल.) आणि परमेश्वर (प्रांजलपणें) सुकृत्यें करणारांस प्रीय ठेवितो. ९३. अहो मुसलमानांनों!**

---

व खास करून त्यांहींच जुगार खेळत व त्यांजवर हारजीतीची मदार राखीत. आमच्या हिंदुस्थानांत बाणांच्या जागीं निव्वळ फासे आहेत. सोंगट्यांचे व रमलचे फासे टाकणें हें कांहीं झालें तरी एक प्रकारचा जुगारच होय. आणि जुगार कसलाहि कां असेना तो शास्त्रनिषिद्ध होय.

(१) गोष्ट अशी कीं दारू वा मद्यपान हें मुसलमानांत एकाच वेळीं निषिद्ध झालें नाहीं. पण त्याच्या गर्हणीय व निंद्य होण्याबद्दल वेळोवेळीं महा वाक्यें प्रकट होत होतीं. जे लोक त्या कालीं जास्त समंजस होते ते आरंभा-पासूनच मागेंपुढें पाहत होते. जेव्हां जेव्हां दारूचे निंदेविषयीं एखादें वाक्य प्रकट होई तेव्हां तेव्हां लोक त्याची खबरदारी ठेवूं लागत. या वारं-वारच्या निषेधानें कित्येकांस समजलें होतें कीं अखेर मद्यपान निषिद्ध ठरविलें जाईलच व झालेंहि असेंच. हजरत उमर सारख्या प्रतापशाली गृहस्था-सहि बराच वेळ याचा अंदेशा राहिला; व ते प्रार्थना करीत होते कीं

**एक अल्पस्वल्पशी गोष्ट ह्मणजे शिकार, जिच्यापर्यंत तुमचे हात व तुमचे भाले पोहोंचूं शकतील तिच्यायोगें परमेश्वर तुम(च्या आज्ञाधारकपणा)ची अवश्य कसोटी करून पाहील; अशासाठीं कीं परमेश्वरानें जाणून घ्यावें कीं कोण (असा आहे कीं) विनदेखतां त्याचें भय बाळगितो. मग ह्या (मनाई)नंतर जो कोणी अतिरेक करील, तर त्याच्याकरतां दुःखदायक शिक्षा (तयार) होय. ९४. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुह्मीं एहराम (ह्मणजे हज्जचीं वस्त्रें) धारण केलेलीं असतील, तेव्हां शिकार मारूं नका. आणि जो कोणी तुह्मांपैकीं जाणून बुजून शिकार मारील तर (त्याचा) मोबदला, जशा जनावराला त्यानें मारलें आहे, चतुष्पाद जनावरांपैकीं त्याच्यासारखेंच (जनावर) कीं जें तुमच्यांतील दोन मुनसफ ठरवितील तें (देणें भाग पडेल). (आणि हें) अर्पण काब्यास पोहोंचविलें जावें; अथवा प्रायश्चित (ह्मणजे त्याच्या किंमतींत जितक्या) गोरगरीबां(ची व्यवस्था होईल तितक्यां)ना भोजन घालणें अगर ह्या (गोरगरीबांच्या संख्ये)च्या**

---

हे परमेश्वरा! मद्यपानाविषयीं तूं आम्हांस स्पष्ठ हुकूम दे. तेव्हां हें वाक्य प्रकट झाल्यानें मद्यपान निषिद्ध ठरलें. यांत 'जपलें व विश्वास धरिला' हे शब्द पुन्हां पुन्हां आले आहेत यावरून असा अर्थबोध होतो कीं जसजसे दारूचे निदार्ह परिणाम वर्णण्यांत आले तसतसे लोक त्याविषयीं जपूं लागले; आणि जुगाराचेंहि जवळ जवळ असेंच उच्चाटन झालें. या वरून हेंहि प्रत्ययास आलें कीं दारू वगैरे दुर्व्यसनें एकदम कोणाच्यानें सोडवत नाहींत म्हणून परमेश्वरानें निःशक्त मानवस्वभावाकडे दृष्टि देऊन तीं हळू हळू निषिद्ध करून नाहींशीं केलीं.

(१) म्हणजे एखाद्या मनुष्याच्या हातीं शिकार लागली व तो हज्जच्या वस्त्रांचा मान ठेवून त्या शिकारीच्या प्राण्यास न मारील; तर तो आपल्या विश्वासाचे कसोटींत पुरा उतरला. कारण कीं शिकार त्याच्या हातांत असतां परमेश्वराचें भय म्हणजे त्याच्या आज्ञेची आदरबुद्धि जरी त्यानें परमेश्वरास पाहिलें नाहीं तरी त्याच्या मनांत येऊन शिकारीच्या संहारापासून त्यानें आपले हात आवरले. तर जसजशी ईश्वरी आज्ञा होईल तसतशी ती पाळणें हेंच इस्लामी कर्तव्य होय.

बरोबर उपास पारणें हें होय; अशासाठीं कीं त्यानें आपल्या कर्माच्या शिक्षेची गोडी चाखावी. पूर्वी जें झालें गेलें त्याची परमेश्वरानें माफी केली. आणि जो पुन्हां (असें काम) करील तर परमेश्वर त्याच्यापासून (आज्ञाभंगाचा) बदला घेईल. आणि परमेश्वर प्रबळ (व) बदला घेणाराहि होय. ९५. समुद्राची शिकार व समुद्रांतील भक्ष्य पदार्थ (जे शिकारीवांचून हातीं लागतील ते एहरामचे स्थितींतहि) यांची तुम्हांस मुभा दिली जाते कीं तेणें करून तुम्हांला फायदा पोहोंचावा व (इतर) मुशाफरासहि (फायदा पोहोंचावा.) आणि जंगलची शिकार जोंपर्यंत तुम्हीं हज्जचीं वस्त्रें धारण केलेलीं असतील तोंपर्यंत तुम्हांस निषिद्ध होय. आणि परमेश्वर ज्याच्याकडे तुम्हां (सर्वां)स एकत्र होऊन जाणें आहे त्याला भीत राहा. ९६. परमेश्वरानें काबा या पवित्रालयास लोकांचे (शांतते व समाधानाचे) कायम राखण्यास कारणीभूत ठरविलें आहे; आणि (तसेंच) पवित्र महिन्यास व (हज्जचे) बलीदाना(चे जनावरां)स आणि ज्या (जनावरां)स (ईश्वरार्पणासाठीं खास करून त्याच्या निशाणीदाखल त्यांच्या गळ्यांत) माला बांधून सोडतात त्या (जनावरां)सहि. हें ह्यासाठीं कीं तुह्मांस माहीत असावें कीं जें कांहीं आकाशांत व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वर जाणतो; आणि हें कीं परमेश्वर सर्वज्ञानी होय. ९७. तुह्मीं जाणून असा कीं परमेश्वर शिक्षेचाही (फार) कडक होय; आणि हेंहि कीं परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. ९८. पैगंबराकडे फक्त काय तें (ईश्वराज्ञेचें) पोहोंचतें करणें होय

---

(१) भावार्थ असा कीं काब्याला शांततेचें धाम ठरविणें व हाजी ह्मणजे यात्रेकरू लोकांच्या व बळीदानाचे जनावरांच्या संरक्षणाचा हुकूम देणें आणि जिल्काद, जिल्हज्ज, मोहर्रम व रजब या चातुर्मासास सार्वजनिक शांततेचे महिने ठरविणें ह्या सर्व पूर्व व्यवस्था परमेश्वराच्या सर्वज्ञानाचें प्रमाण पटवितात, कांकीं यांत हजारों गूजें व युक्त्या आहेत. त्यांतल्या त्यांत मक्केचें वसविणें व त्याची भरभराट व शोभा आणि आरबांसारख्या रानटी लोकांत अशा युक्तीनें शांतता कायम करणें हीं होत.

एवढेंच. आणि जें कांहीं तुह्मीं लोक जाहीरपणें करितां व जें लपवून करितां तें (सर्व कांहीं) परमेश्वर जाणतो. ९९. (हे पैगंबरा या लोकांस) सांग कीं मलीनें (ह्मणजे अशुद्ध) आणि स्वच्छ (ह्मणजे शुद्ध पदार्थ, दर्जांत) बरोबर होऊं शकत नाहींत; (व मग पाहिजे) तर मलीन पदार्थांची रेलचेल तुला मोहकच कां वाटेना! तर हे बुद्धिवंत हो! तुह्मीं परमेश्वरास भीत राहा कीं कदाचित् तुह्मीं (आपल्या मनोरथांत) सफल व्हाल. १००. अहो मुसलमानांनों! तुह्मीं (बहुतेक गोष्टी खोलून खोलून) विचारूं नका; कीं जर तुह्मांस त्या जाहीर केल्या जातील तर त्या तुह्मांस वाईट वाटूं लागतील. आणि कुर्आन् प्रकट होत आहे अशा वेळीं गोष्टींची (फारच) विचारपूस लावाल तर त्या तुह्मांस जाहीरहि केल्या जातील; (मग तुह्मीं वाईट मानाल. ह्मणून आतां,) परमेश्वरानें त्या (कृत्या)ची माफी दिली. आणि परमेश्वर क्षमाशील व सौम्य होय. १०१ तुमच्या पूर्वींहि लोकांनीं असल्याच गोष्टी (आपल्या पैगंबरांस) विचारल्या आहेत; मग (जेव्हां त्यांना त्या सांगण्यांत आल्या तेव्हां) ते त्या(प्रमाणें अमल, करण्या)स नाकारूं लागले. १०२.

---

(१) मलीन व स्वच्छ या शब्दांत नास्तिकपणा व विश्वास यांजकडे ही इशारत आहे. जरी जगांत लोक पुष्कळ नास्तिकपणा करतील तरी परमेश्वरापाशीं नास्तिक व अधर्मी हे तिरस्कारणीय व तुच्छ होत हें मात्र खास. मलीन व स्वच्छ हे शब्द पदार्थांविषयीं वापरल्यास त्यांचा अर्थ निषिद्ध व अनिषिद्ध असा होतो.

(२) या वाक्याच्या स्पष्टीकरणासंबंधानें शाह अबदुल कादिर साहेब लिहितात; ‘ म्हणजे तुम्हीं आपण होऊन पैगंबर साहेबांस विचारूं नका कीं ही वस्तु शास्त्रविहित आहे कीं नाहीं; हें काम करावें कीं नाहीं. तर त्यांनीं जें कांहीं फर्माविलें त्याची अमलबजावणी करा; आणि जें आज्ञापिलें नाहीं त्याची मुभा जाणा. ह्यानें धर्माचरण सोपें होईल. आणि जर प्रत्येक गोष्टीचें उत्तर येईल तर धर्माचरण कठीण होऊन जाईल. मग जसे पूर्वींचे लोक त्याप्रमाणें आचरूं शकले नाहींत तसेच तुह्मींहि आचरूं शकणार नाहींत. तदनंतर नास्तिकांच्या चालीरीति सांगितल्या

'बहीरा' व 'साइबा व 'वसीला' व 'हामी' (यांजपैकीं) कोणतेंच कांहीं परमेश्वरानें मुक्रर केलें नाहीं. किंबहुना, जे नास्तिक होत ते परमेश्वरावर खोटें (खोटें) थोतांड रचितात. आणि त्यांच्यांतले बहुतेक अक्कल ठेवीत नाहींत. १०३. आणि जेव्हां त्या(लोकां)स सांगितलें जातें कीं जें (कुर्आन्) परमेश्वरानें प्रकट केलें आहे त्याकडे व (परमेश्वराच्या) पैगंबराकडे चला; (व जो हुकूम ते देतील तो मान्य करा. यास उत्तर ह्मणून) ते ह्मणतात (काय) कीं ज्या (मार्गा)वर आह्मीं आपल्या वाडवडिलांस (चालतांना) पावलों आहों तोच (मार्ग) आह्मांस बस्स करतो. आणि कां त्यांचे वाडवडील जरी कांहींच जाणत नसतील व सरळ मार्गावरहि राहिले नसतील तरीहि (हे लोक त्यांचेंच अनुकरण करतील)? १०४ अहो मुसलमानांनों! तुह्मीं आपली खबरदारी ठेवा. ज्याअर्थीं तुह्मीं सरळमार्गावर आहां, त्याअर्थीं कोणीहि बहको; (त्याचें बहकणें) तुह्मांस (कांहीं) नुकसान पोहोंचवूं शकत नाहीं. तुह्मांसर्वांस परमेश्वराकडे परतून जाणें आहे; (तुह्मीं जेव्हां त्याच्यापाशीं जाल) तेव्हां तुह्मीं जें कांहीं (जगांत) करीत राहिलां आहां (त्याचें बरें वाईट) तो तुह्मांस विदित करील. १०५

कीं त्या विचारण्याची जरूरच राहूं नये. परमेश्वरानें जें कांहीं सांगितलें नाही तें निराधार होय. अशाच प्रकारें निरर्थक गोष्टी विचारणेंहि व्यर्थ होय. कोणी विचारिलें कीं माझा बाप कोण होता अगर माझी बायको घरीं काय करीत आहे? यांचा पैगंबर जबाब देतील; आणि जर खरोखर वाईट जबाब आलाच तर मग त्या मनुष्याला पस्तावा वाटेल.

(१) 'बहीरा' म्हणजे कान फाटलेली उंटणी कीं जी मूर्तींच्या नांवें कान चिरून सोडली जात होती; व मग तिला कोणी दुहीत नसे. 'साइबा' ही एक साधारण वळू असे कीं तिच्या कडून कसलीच सेवा घेतली जात नसे. 'वसीला' ती उंटणी जिची पहिली वीण खालवर दोन माद्या असतील; त्यांस शुभकर समजून सोडून देत असत. 'हामी' ह्मणजे नर उंट ज्याच्या पासून कित्येक बच्चे होऊन गेले असतील; व आयुष्याच्या शेवटीं त्यास सेवामुक्त करीत असत. ह्या व असल्याच कांहीं

अहो मुसलमानांनों! जेव्हां तुह्मांपैकीं कोणा एकाद्यास मृत्यु येऊन ठेपेल (व तो मृत्युपत्र करूं लागेल) तर मृत्युलेख करते वेळीं तुमच्यांत साक्षी(चा हा कायदा असला पाहिजे कीं) तुमच्यांतल्या दोन न्यायी (इसमां)ची (साक्ष) व्हावी; अथवा जर तुह्मीं कोठें पृथ्वींत प्रवास करीत असाल आणि (प्रवासांतच) मृत्युचें संकट तुह्मांवर ओढवेल, (व मुसलमान साक्षीदार सहजीं प्राप्त न होतील;) तर तुह्मां (मुसलमानां)खेरीज दोन (इतर साक्षीदारच सई.) (मग) जर तुह्मांस (त्यांच्या सत्यत्वांत कोणा तऱ्हेची) शंका येईल, तर तुह्मीं त्या उभयतांस (असरचे)[१] नमाजीनंतर रोखून ठेवावें; मग त्या उभयतांनीं परमेश्वराची शपथ वाहवी (व प्रतिज्ञापूर्वक सांगावें) कीं आम्हांस सत्य सांगण्याबद्दल कसलाच मोबदला घेणें नाहीं; मग (ज्याची आह्मीं साक्ष भरूं तो आमचा) आप्तच कां होईना! आणि आह्मीं परमेश्वरा लगती साक्ष लपवून ठेवणार नाहीं. असें करूं तर निःसंशय आह्मीं (परमेश्वराचे) गुन्हेगार होऊं. १०६. मग जर (साक्ष दिल्यानंतर) असें आढळून येईल कीं उभयतां (साक्षीदार खोटी साक्ष देण्याच्या) गुन्ह्यास पात्र ठरले तर (त्यांच्या खंडनार्थ) त्यांच्या जागीं दुसरे दोन (साक्षीदार) अशा लोकांतून (साक्ष देण्यास) उभे राहावेत कीं ज्यांचा हक्क (त्या उभयतां साक्षीदारांपैकीं प्रत्येकानें) पटकावूं पाहिला होता, (आणि हे नवीन साक्षीदार फर्यादीपक्षाचे) जवळचे आप्त[२] (असावेत); मग (ह्या नवीन साक्षीदारांनीं)

चालीरीति होत्या कीं त्यांस अरबलोकांनीं आपल्या धर्माचा एक अंश बनवून ठेविला होता. आमच्या हिंदुस्थानांतहि हिंदू लोक गाय बैल वगैरेचे वळू सोडतात. शिवाय येथील अडाणी मुसलमानांतहि ह्या चाली असल्यास नकळे. ह्मणून मुसलमानांनीं ह्या धर्मबाह्य चालीरीति अजीबात सोडून द्याव्या. कारण परमेश्वरानें अशा निरर्थक व अयुक्तिक गोष्टींची मनाई केली आहे.

(१) असरची नमाज तिसऱ्या प्रहरीं होते. पैगंबर साहेबांनीं अशाच एका खटल्यांत साक्षीदारापासून ह्या नमाजी नंतर शपथ घेवविली होती.

(२) ही अट ह्यासाठीं आहे कीं जवळचे आप्त मयताचे जवळिकीमुळें त्याची मालमत्ता खूप ओळखत असतील.

परमेश्वराची शपथ वाहावी कीं पहिल्या दोघां (साक्षीदारां)च्या साक्षीपेक्षां आमची साक्ष विशेष वास्तविक आहे व आह्मीं (साक्षदेण्यांत कसलाच) अतिरेक केला नाहीं. असें केलें असलें तर आह्मीं निःसंशय जुलमी आहों. १०७. अशा (प्रकारच्या शपथे)नें हें विशेष संभवित आहे कीं लोक (परलोकींच्या भीतीनें) यथास्थित साक्ष देतील; अगर (जनलज्जेस) भितील कीं (असें न व्हावें कीं आमच्या) शपथा प्रतिपक्षाचे शपथांनंतर रद्द केल्या जातील. आणि (मुसलमानांनों!) तुह्मीं परमेश्वरा(चे अवज्ञे)स भीत राहा व (त्याचा हुकूम चांगल्या प्रकारें) ऐका. आणि परमेश्वर आज्ञा[1]भंजक लोकांस सरळमार्ग दाखवीत नसतो. १०८. ज्या दिवशीं परमेश्वर पैगंबरांस गोळा करून विचारील कीं तुह्मांला (आपल्या अनुयायींकडून) काय जबाब मिळाला? तेव्हां ते ह्मणतील कीं (आह्मांस आपल्या हयातीपर्यंतचा अहवाल ठाऊक आहे व तोहि लो-

(१) मौलाना शाह अबदुल कादिर साहेब लिहितात कीं "हजरत पैगंबर साहेबांचे वेळीं एक मुसलमान व्यापारासाठीं गेला व वाटेंत मरावयास टेकला. त्या वेळीं त्यानें काफल्यांतील दोन खिस्ती गृहस्थांस आपली मालमत्ता सोंपविली व सांगितलें कीं ही माझ्या वारसांस द्या. ते जेव्हां त्यांस आणून देऊं लागले तेव्हां वारसांना त्यांत एक कटोरा दिसला नाहीं. तो सोन्याचा असून नकशीदार होता. त्याची त्यांनीं मागणी केली. तेव्हां त्या दोघांनीं शपथ वाहिली कीं त्यानें आह्मांस ह्याशिवाय आणखी कांहींच दिलें नव्हतें. नंतर वारसांना तो कटोरा सोनारापाशीं सांपडला. पुसल्यावर माहीत झालें कीं तो चांदीचा असून त्यावर सोन्याचा मुलामा चढविलेला होता व तो त्या खिस्ती इसमांनीं आणून विकला. त्यांच्यावर ही गोष्ट जेव्हां शाबीत झाली तेव्हां ते ह्मणूं लागले कीं मयतानें आपल्या हयातींत हा आह्मांस विकला आहे व तो किंमत घेऊन चुकला आहे. नंतर वारसांपैकीं जे दोघे फारच जवळचे आप्त होते त्यांनीं सर्वांचे तर्फें शपथ वाहिली कीं विकणें आह्मांस ठाऊक नाहीं; व मयताचे हातची यादीहि निघाली तींत त्या मालापैकीं तो कटोराहि होता. अखेर खिस्त्यांकडून तो परत करविण्यांत आला.

कांचा जाहीर अहवाल; ह्याचेशिवाय) आह्मांला कसलेंच ज्ञान नाहीं. निःसंशय, गैबी गोष्टी तर तूंच खूप जाणतोस. १०९. त्या दिवशीं (हें प्रकरणहि घडून येईल कीं) परमेश्वर फर्मावील कीं हे मरयमचे पुत्रा, ईसा! मी तुजवर व तुझ्या मातोश्रीवर जे जे उपकार केले आहेत त्यांचें तूं स्मरण कर; कीं जेव्हां मी पवित्र आत्मा (म्हणजे जिब्रील) याच्याद्वारें तुझी मदत केली, (हा एक; दुसरा हा कीं जेव्हां तूं अगदीं तान्हा होतास व) पाळण्यांत (झोलत होतास त्या वयांत) व मोठा होऊन (या दोन्हीं स्थितींत) तूं लोकांशीं (सारखें) संभाषण करीत होतास. आणि (तिसरा) जेव्हां मी तुला लिहिणें, व शहाणपणा(च्या गोष्टी) व तौरात व इंजील (हीं सर्व) शिकविलीं. आणि (चौथा) जेव्हां तूं माझ्या आज्ञेनें पांखराच्या आकाराचासा मातीचा पुतळा बनवीस व मग त्यांत फुंक मारून देईस तेव्हां तो माझ्या आज्ञेनें पक्षी होऊन जाई. आणि (पांचवा) जेव्हां जन्माचा आंधळा व कोडी यांस तूं माझ्या आज्ञेनें भलाचंगा करून टाकीस. आणि (सहावा) जेव्हां तूं माझ्या आज्ञेनें मर्डी (जिवंत करून थडग्यांतून) काढून उभीं करीस. आणि (सातवा) जेव्हां मी बनी-इस्राएलांस तुज(-वर हात उगारण्या)पासून अडकविलें कीं ज्या वेळीं तूं त्यांच्यापाशीं चमत्कार घेऊन आलास त्या वेळीं त्यांच्यापैकीं जे लोक (तुझ्या पैगंबरीस मानण्याचें) नाकारीत होते ते (चमत्कार पाहून) म्हणूं लागले कीं ही तर बोलूनचालून निवळ जादूच होय. ११०. आणि (आठवा,) जेव्हां मी 'हवारी' लोकांस इषारत केली कीं तुह्मी

(१) हे व इतर कांहीं चमत्कार येशू खिस्ताकडून लहानपणीं घडून आले आणि हल्लींचा नवा करार जो इतर १५० तसल्याच करारांपैकीं एक होय; तो फार मागाहूनचा व एकतरफी असल्यामुळें व खिस्ताच्या बाल्यावस्थेचें त्यांत कांहींच वर्णन नसल्यामुळें तो अपूर्ण असून त्याला खिस्ताचें पूर्ण जीवनचरित्रहि ह्मणतां येत नाहीं. ह्मणून ह्या गोष्टी त्यांत नाहींत हें वास्तविकच होय आणि हा दोष लपविण्यासाठीं इतर खऱ्या पुस्तकांसहि पाद्री बनावट ह्मणतात. हा कितीतरी हटवादीपणा आहे.

(२) पृष्ट १३३ अध्याय ३: ५२ वरील टीप नं. १ पहा.

मजवर व माझा पैगंबर (ईसा) याजवर विश्वास ठेवा, तेव्हां ते म्हणाले कीं आह्मीं विश्वास धरिला; आणि (हे परमेश्वरा!) तूं या गोष्टीचा साक्षी राहा कीं आह्मीं आज्ञाधारक (सेवक) आहोंत. १११. (हे पैगंबरा! तूं ही गोष्टहि लोकांस आठवून दे कीं) जेव्हां हवारी लोकांनीं दरखास्त केली कीं हे मरयमचे पुत्रा, ईसा! कां तुझ्या पालनकर्त्याच्यानें हें होऊं शकेल कीं तो आह्मांवर आकाशांतून (भोजनाचें) एक ताट उतरील? (ईसानें) ह्मटलें कीं जर तुह्मीं (ईश्वरसामर्थ्य व माझी पैगंबरी यांजवर) विश्वास ठेवितां, तर परमेश्वराला भ्या. (व अशी गैरशिस्त मागणी करूं नका, कीं त्यांत एका तऱ्हेच्या परिक्षेचा उद्देश दिसून येतो.) ११२. ते बोलले, (परिक्षा हा तर आमचा मुळींच उद्देश नाहीं, पण,) आह्मीं इच्छितों कीं (प्रसाद जाणून) त्या(ताटां)तून कांहीं खावें व (तुझ्या पैगंबरी संबंधानें) आमचीं अंतःकरणें (पूर्ण) समाधान पावावीं व आह्मीं (अनुभवांतीं) जाणावें कीं निःसंशय तूं आह्मांपुढें (पैगंबरीचा) खरा दावा केला होतास, आणि आह्मीं ह्या (तुझ्या ताटाचे चमत्कारा)चे साक्षी राहावें. ११३. (यावर) मरयमचा पुत्र, ईसा हा (प्रार्थना करीत) ह्मणाला कीं हे परमेश्वरा! हे आमच्या पालनकर्त्या! तूं आह्मांवर आकाशांतून (भोजनाचें) एक ताट उतर; कीं हें (ताटाचें उतरणें) आह्मांस ह्मणजे आमच्या पुढल्या व मागल्या (सर्व लोकां)साठीं एक सण ठरावा, आणि (ही) तुजकडून (आमच्याठायीं तुझ्या परम सामर्थ्याची एक) निशाणी व्हावीं आणि तूं आह्मांला (आपल्या औदार्याचे ताटांतून) अन्नदान दे; व तूं सर्व अन्नदात्यांत उत्तम (अन्नदाता) आहेस. ११४. परमेश्वरानें ह्मटलें, (फार उत्तम;) निःसंशय, मी तें (ताट) तुह्मां लोकांवर उतरवीन. तर तुह्मांपैकीं जो कोणी तदनंतरहि (माझ्या परम सामर्थ्यास) नाकारीत राहील तर मी त्याला (अशा) सक्त शिक्षेची सजा देईन कीं अलम दुनियेंत मी कोणालाहि तशी शिक्षा देणार नाहीं. ११५. आणि (पुनरुत्थानाचे दिवशीं हें प्रकरणहि पुढें येईल कीं) त्या दिवशीं परमेश्वर (ईसाला) विचारील कीं हे मरयमचे पुत्रा, ईसा! कां तूं लोकांस ही गोष्ट

सांगितली होतीस कीं परमेश्वराशिवाय मला व माझ्या मातोश्रीलाहि दोन परमेश्वर माना? (ईसा) अर्ज करील कीं (हे प्रभू!) तूं परम पवित्र आहेस. माझ्यानें हें कसें होऊं शकतें कीं जी गोष्ट बोलण्याचा मला कोणताच हक्क नाहीं, ती गोष्ट मी (तुझ्या संबंधानें) बोलेन? मी जर असेंच बोललों असेन तर माझें बोलणें तुला अवश्यच माहीत झालें असेल. कारण, तूं तर माझ्या अंतःकरणांतील (देखील) गोष्ट जाणतोस व मी तुझ्या अंतःकरणांतील गोष्ट जाणीत नाहीं. गैबी (अदृष्ट) गोष्टी तर तूंच खूप जाणतोस. ११६. तूं जो मला हुकूम दिला होतास, केवळ तोच मी या लोकांस सांगून दिला होता; कीं परमेश्वर जो माझा पालनकर्ता व तुमचा पालनकर्ता होय त्याचीच भक्ति करा. आणि जोंपावेतों मी त्यांच्यांत (हजर) राहिलों तोंपावेतों मी त्यांच्या (स्थिती)वर नजर ठेवीत होतों. मग जेव्हां तूं मला (या दुनियेंतून) उचलून घेतलेंस, तेव्हां तूंच त्यांचा निघावान होतास. व तूं सर्वसाक्षी आहेस. ११७. जर तूं त्यांना शिक्षा देशील तर (तूं मुखत्यार आहेस), हे तुझे सेवक होत. आणि जर तूं त्यांस क्षमा करशील तर (तुझा कोणी हात धरूं शकत नाहीं; कारण,) निःसंशय तूंच (सर्वांत) समर्थ व सत्यसंकल्प आहेस. ११८. (ईसा-येशू-ची ही विनवणी ऐकून) परमेश्वर बजावून सांगील कीं हाच (आजचा) दिवस होय कीं खऱ्या (सेवकां)स त्यांचें खरेंपण कामा येईल. त्यांच्यासाठीं अशा (स्वर्गीय) बागा असतील कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व ते) त्यांत सदासर्वदा राहतील. परमेश्वर त्यांच्याशीं खुष व ते परमेश्वराशीं खुष; हें होय मोठें सार्थक्य! ११९. आकाश व पृथ्वी आणि जें कांहीं यांच्या दरम्यान आहे त्या (सर्वां)वर परमेश्वराचीच हुकमत आहे. आणि तो सर्व-शक्तिमान् होय. १२०.

---

# अध्याय ६ वा.

## सूरतुल्-अन्आम्

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत १६६ आयात वा महा वाक्यें आहेत. ह्याचें नांव सूरतुल्-अन्आम् ह्मणजे गुरेंढोरें वा चतुष्पाद जनावरें यांचें प्रकरण, असें पडण्याचें कारण हें कीं यांत गुरांढोरांसंबंधीं व मक्केच्या मूर्तीपूजक लोकांच्या अज्ञानकाळच्या चाली रीतींसंबंधीं विधिनिषेधात्मक नियम आहेत. याशिवाय, मूर्तींशीं निकट संबंध जुळविण्यासाठीं जीं जनावरें त्यांस अर्पिलीं जात होतीं त्या पद्धतीचेंहि यांत खंडन आहे.

**परम दयाळु (आणि) कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

**सर्व स्तुति, परमेश्वर ज्यानें आकाश व (तशीच) पृथ्वी हीं निर्मिलीं, आणि (नानाविध) अंधःकार व (तसेंच) चांदणें बन-**

(१) अंधःकार कित्येक प्रकारचे होऊं शकतात. रात्रीचा साधारण अंधःकार, गाढ आभाळ आल्यामुळें झालेला अंधःकार, वादळामुळें केव्हां केव्हां होणारा अंधःकार, ग्रहण समयींचा अंधःकार, तळघरांतला अंधःकार, पडदे वगैरे सोडून बनविलेला कृत्रिम अंधःकार, समुद्राचे अगदीं मध्यांत असलेला अंधःकार आणि सर्वांत मोठा कुमार्गाचा अंधःकार कीं त्याच्या पुष्कळ तऱ्हा आहेत. म्हणूनच कदाचित् अंधःकार हा शब्द अनेक वचनीं आला असावा. आणि चांदणें किंवा प्रकाश ज्याचा अर्थ सद्बोध वा सन्मार्ग आहे तो एकच होय.

विलें, त्यालाच (योग्य) आहे. यावरहि नास्तिक (परमेश्वराशिवाय इतर वस्तूंस) आपल्या पालनकर्त्याचे बरोबरीचे लेखतात! १. तोच असा (परमसमर्थ) होय कीं ज्यानें तुह्मां (लोकां)स मातींतून निर्माण केलें; व तदनंतर (प्रत्येकासाठीं आयुष्याचा) एक काल नेमून दिला आणि एक काल (पुनरुत्थानाचा होय कीं त्याची वेळ कोणालाच माहीत नाहीं; पण तो) त्याच्यापाशीं निश्चित होय. तरीहि तुह्मीं (लोक त्याच्या परमेश्वर होण्यांत) शंका ठेवितां! २. आणि (काय) आकाशांत व (काय) पृथ्वींत तोच परमेश्वर (उपास्य) होय. तुमचें हळूच बोलणें व तुमचें मोठ्यानें बोलणें हें (सर्व) त्याला ठाऊक आहे; आणि जें कांहीं तुह्मीं करितां तेंहि (सर्व) त्याला माहीत आहे. ३. आणि यांच्या पालनकर्त्यांचे (एकत्वाचे) प्रमाणांतून कोणतेंहि प्रमाण या लोकांच्या समोर येत नाहीं कीं (लागलेंच) ते त्यापासून आपलीं तोंडें फिरवीत राहतात. ४. सारांश, जेव्हां सत्य(-पूर्वक कुर्आनहि) त्यांच्यापाशीं आलें, त्यालाहि त्यांनीं पाखंडच ह्मटलें. तर हे लोक ज्या गोष्टीची चेष्टा[1] उडवितात त्याची हकीकत त्यांना पुढें जातां माहीत होऊन जाईल. ५. कां या लोकांनीं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहीं कीं आह्मीं यांच्यापूर्वीं. अशा कित्येक पिढ्यांचा नाश करून टाकिला कीं ज्यांचा आह्मीं पृथ्वींत असा (मजबूत) पाया[2] बांधला होता कीं (हे नास्तिकांनो!) आह्मीं (आजूनहि) तुमचा तसा पाया बांधला नाहीं. आणि आह्मीं (पाण्याची इतकी वृष्टी केली कीं वरून तर) त्यांच्यावर मूसळधार

---

(१) कुराणांत इस्लामधर्माचा विजय व नास्तिकांचे निर्मूलन याविषयीं भविष्य वचन प्रकट होई तेव्हां नास्तिक लोक त्यांची हंशी उडवीत. परमेश्वरानें बजाविलें कीं थोड्याच काळांत त्यांना याची हकीकत माहीत होऊन जाईल.

(२) पाया मजबूत बांधणें याचा अर्थ असा कीं ते लोक मुलखांत सत्तावान होते. परमेश्वरानें त्यांना शेतभात व घरदार वगैरे हरतऱ्हेची मिळकत दिली होती व ते सुखसमाधानानें आयुष्यक्रमण करीत होते.

वर्षविली व त्यांच्याखालून (मोठाले) पाट वाहते केले. मग आह्मीं त्यांच्या पापांच्या शासनार्थ त्यांचा विध्वंस करून टाकिला; व त्यांच्या (नष्ट झाल्या)नंतर आह्मीं इतर पिढ्या निर्मून उभ्या केल्या. ६. आणि (हे पैगंबरा!) जरी आह्मीं कागदावर (आयतें लिहिलेलें) पुस्तकहि तुला सादर करतों, व हे लोक त्याला आपल्या हातांनीं स्पर्शहि करून पाहते, तरीहि जे लोक नास्तिक होत ते हेंच ह्मणाले असते कीं ही तर केवळ बोलून चालून जादूच होय. ७. आणि (नास्तिक) म्हणतात कीं या (पैगंबरा)वर कोणी दूत[1] कां नाहीं उतरला? आणि जर आम्हीं दूतास पाठवितों तर बखेडाच चुकता झाला असता, (कीं दूताच्या आल्यावरहि जर ते न मानते तर जरूर लागलीच शिक्षा होते;) व मग यांना (कोणा तऱ्हेचा) अवकाशच न मिळता. ८. आणि जर आह्मीं कोणा दूतास (पैगंबराचा मदतनीस) बनवितों, तर त्यालाहि आम्हीं मनुष्यच बनवितों; (कारण कीं ह्यांच्यांत देवदूतांचे पाहण्याची ताकदच नाहीं.) आणि जी भ्रांति (हे लोक आतां) करीत आहेत तीच भ्रांति आम्हीं (त्या वेळींहि) त्यांच्या (मनां)त भरवितों. ९. आणि (हे पैगंबरा!) तुझ्या पूर्वींहि पैगंबरांचा उपहास केला जाऊन चुकला आहे. तर ज्या लोकांनीं पैगंबरांचा उपहास केला, त्या लोकांस ज्या (शिक्षे)ची ते हंशी उडवीत होते (अखेर) त्याच शिक्षेनें येऊन गांठिलें. १०. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुह्मीं मुलखांत चाला फिरा; व मग पाहा कीं (पैगंबरांस) पाखंडी ह्मणणाऱ्यांचा परिणाम कसा काय झाला (तो)! ११. (हे पैगंबरा! या लोकांस) विचार कीं जें कांहीं आकाश व पृथ्वी यांमध्यें आहे तें (सारें) कोणाचें आहे? (मग त्यांच्या जबाबाची वाट पाहण्याची जरूरी नाहीं. तूं आपणच[2]) सांगून दे कीं

(१) नास्तिकांचा मतलब असा होता कीं कोणी देवदूत पैगंबरां-बरोबर येता व त्यांच्या पैगंबरीची साक्ष पटविता तेव्हां ते मानते.

(२) आपणच पुसणें व आपणच जबाब देणें याचा अर्थ हा कीं तुमच्या प्रश्नाचें आणखी कांहीं उत्तरच होऊं शकत नाहीं. नास्तिकांहि झालें तरी लाचार होऊन हेंच बोलणार.

(हें सारें कांहीं) परमेश्वराचें होय. त्यानें (आपण होऊन लोकांवर) दया करण्याचा आपल्याशीं नेम केला आहे. तो तुह्मांस पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत कीं त्या(च्या येण्यां)त कांहींहि संशय नाहीं, अवश्य गोळा करून सोडीलच. (परंतु कितीहि समजावा,) जे लोक आपणच आपलें नुकसान करीत आहेत, ते तर विश्वास धरणार नाहींत. १२. आणि जें कांहीं रात्री(चे अंधःकारां)त व दिवसा(चे प्रकाशां)त (या भूतलावर) वसतें तें सर्व त्या (परमेश्वरा)चेंच होय. आणि तो (सर्वांचें) ऐकितो व (सर्व कांहीं) जाणतो. १३. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) विचार कीं परमेश्वर जो आकाश व पृथ्वीचा उत्पादक होय, कां त्याचेशिवाय (अन्य कोणाला मी आपला) पुरस्कर्ता बनवूं? आणि तो (तर सर्वांस) खायाला घालतो व त्याला कोणी खायाला घालीत नाहीं; (कारण, तो पवित्र व निरपेक्ष होय. हे पैगंबरा! हे तर या सवालाचें काय उत्तर देतील; तूंच ह्यांना) सांगून दे कीं मला तर हा हुकूम मिळाला आहे कीं सर्वांत प्रथम मी (मात्र एका परमेश्वराचा) आज्ञाधारक (सेवक) बनावें; आणि (त्यानें मला फर्मा-विलें आहे कीं) खबरदार मूर्तीपूजकांत (सामील) होऊं नकोस. १४. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर मी आपल्या पालनकर्त्याच्या हुकमाचें उल्लंघन करीन, तर मला (पुनरुत्थानाचे) महा दिवसाच्या शिक्षेची (फारच) भीति लागते. १५. त्या दिवशीं ज्याच्या (शिरा) वरून शिक्षा टळून गेली, तर त्याच्यावर परमेश्वरानें (मोठीच) दया केली. आणि हेंच बोलूनचालून सार्थक्य होय. १६. आणि (हे मानवा!) जर परमेश्वर तुला (कोणा तऱ्हेचें)दुःख पोहोंचवील तर त्याच्याशिवाय कोणी त्या(दुःखा)चें निवारण करणारा नाहीं आणि जर तो तुला (कोणा प्रकारचा) फायदा पोहोंचवील, तर तो सर्वशक्तिमान् होय. १७. आणि तोच आपल्या सेवकांवर प्रबल सत्ताधारी होय. आणि तोच बुद्धिमान (व) खबरदार होय. १८

(१) प्रबल सत्ताधारी हा 'काहिर' या शब्दाचा आहे. कारण सर्व प्रजा सर्वस्वी त्याच्याच आटोक्यांत आहे व त्याच्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. सर्व लाचार आहेत.

(हे पैगंबरा ! या लोकांस) विचार कीं साक्षीचे दृष्टीनें मोठा (विश्वसनीय साक्षी) कोण? (हे तर उत्तरच काय देतील! तूं आपणच त्यांना) सांगून दे कीं माझ्या व तुमच्या दरम्यान (मोठा विश्वसनीय) साक्षी परमेश्वर होय. आणि हें कुर्आन् मजला यासाठीं प्रकट केलें गेलें आहे कीं त्या योगें मी तुह्मांस व ज्याला (याची बातमी) पोहोंचेल त्याला (ईश्वरीशिक्षेपासून) भिववावें. कां तुह्मीं खात्रीनें या गोष्टीची साक्ष देतां कीं परमेश्वरासमागमें इतर उपास्य (देवहि) आहेत? (हे पैगंबरा! तू यांना) सांग कीं (तुह्मी हवी तर तशी साक्ष देत जा.) मी तर (या गोष्टीची) साक्ष देत नाहीं. (तूं या लोकांस) सांग कीं तो तर केवळ एकटाच उपास्य होय (झालें.) आणि ज्या वस्तूंस तुह्मीं (परमेश्वराचा) सरकतदार ठरवितां, मी तर त्या(चे सरकतदार मानण्या)पासून निर्दोष आहे. १९. ज्या लोकांस आह्मीं पुस्तक दिलें आहे (ह्मणजे यहुदी व खिस्ती) ते तर जसें आपल्या मुलांस ओळखतात तसेंच (आमच्या) ह्या (मोहंमद पैगंबरा)सहि ओळखतात.[1] (परंतु) जे (आपल्या हातांनीं) आपलें नुकसान करीत आहेत, ते तर (कोणाहि प्रकारें) विश्वास धरणार नाहींत. २०. आणि जो कोणी परमेश्वरावर खोटें कुभांड रचील अगर त्याच्या निशाण्यास पाखंड म्हणील, त्याच्यापेक्षांहि जास्त जालीम (आणखी) कोण? (आणि) जालीम लोकांचें (कोणाहि प्रकारें) सार्थक होणें नाहीं. २१ आणि (एक दिवस असा होईल कीं) त्या दिवशीं आम्हीं त्या सर्वांस (आपल्या हुजुरांत) गोळा करूं; व मग जे लोक (इतर उपास्यांस आमचे) साथी ठरवीत होते त्या लोकांस आह्मीं विचारूं कीं ज्यांना तुह्मीं (परमेश्वराचे समाईक) समजत होतां ते तुमचे (ठरविलेले) सरकतदार कोठें आहेत? २२. तथापि,

(१) यासाठीं कीं पूर्वींच्या दिव्य पुस्तकांत या पैगंबराविषयींचें भविष्य वचन आहे. परंतु यहुदी व खिस्ती हे लोक अढी बाळगून वडिलांच्या सांप्रदायाची कड उचलून घेऊन त्या भविष्य वचनांचा कांहींचा कांहींच अर्थ लावतात. आणि गमत अशी कीं जो अर्थ ते लावतात तो बरोबर जुळतहि नाहीं.

ह्याशिवाय त्यांची (आणखी) काय लबाडी होणार कीं ते म्हणतील कीं आम्हांला आमचा पालनकर्ता जो परमेश्वर त्याची शपथ आहे कीं आम्हीं तर (कोणालाहि त्याचा) सरकतदार बनवीत नव्हतों. २३. (हे पैगंबरा!) पाहा तर खरें, (हे लोक) कसें आपल्या विरुद्ध आपणच खोटें बोलूं लागले? आणि ते जें जें थोतांड रचीत होते तें (सर्व) त्यांच्यापासून झालें गेलेंसें होऊन गेलें. २४. आणि (हे पैगंबरा!) यांच्यापैकीं कित्येक असेहि होत कीं ते तुझ्या (गोष्टीं)कडे कान लावितात; व त्यांच्या अंतःकरणांवर आह्मीं (दुराग्रह व गफलतीचे) पडदे घालून दिले आहेत आणि त्यांच्या कानांत बधिरत्व; कीं त्यांनीं तुझें बोलणें समजूं शकूं नये. आणि जरी हे (आलम दुनियेच्या) एकूणएक निशाण्या (ह्मणजे चमत्कार)हि पाहून घेतील तरीहि ते त्यांचा विश्वास धरणार नाहींत. (त्यांच्या दुराग्रहाची मजल) येथपर्यंत (गेली आहे) कीं जेव्हां ते तुजपाशीं तुझ्याशीं झगडत येतात, तेव्हां (हे) नास्तिक लोक (कुर्आन् ऐकून) बोलूं लागतात कीं (कुर्आनांत आणखी ठेवलेंच काय आहे?) ह्यांत तर केवळ प्राचीन लोकांच्या कथाच (कथा) होत. २५. आणि हे लोक कुर्आना(चे ऐकण्या)पासून इतरांस मनाई करतात व आपणहि त्यापासून दूरच राहतात. आणि ते (असल्या खोडसाळपणानें) केवळ आपलीच पायमल्ली करून घेतात; व (गहजब हा कीं ही गोष्ट) त्यांना कळत नाहीं. २६. आणि (हे पैगंबरा!) जर तूं (त्यांना) अशा स्थितींत पाहशील (तर फारच बरें;) कीं जेव्हां ते नरकाग्नीवर (आणून) उभे केले जातील व (त्याला पाहून) म्हणूं लागतील कीं परमेश्वर करो, आणि आह्मीं (पुन्हां जगांत) परत पाठवून दिले जावों! म्हणजे आह्मीं आपल्या पालनकर्त्यांचे निशाण्यांस पाखंड म्हणणार नाहीं व विश्वासू लोकांपैकीं होऊं. २७. (तरीहि त्यांचा हा पश्चात्ताप मनापासूनचा नव्हे; ) तर ज्या (बेइमानी)स ते पूर्वी लपवीत होते, (आतां) ती उघड त्यांच्यापुढें आली; (व तिला पाहून ते खेद प्रदर्शित करूं लागले.) आणि जर ते (जगांत) परत पाठवून दिले

जातील, तर ज्या गोष्टीची त्यांना मनाई केली गेली आहे, ती ते पुन्हां दुसऱ्यानें करतीलच करतील. आणि कांहीं संशय नाहीं कीं हे लबाड होत. २८. आणि (नास्तिक हेंहि) म्हणतात कीं हें जें आमचे जगिक आयुष्य होय त्याशिवाय आणखी कोणी आयुष्यच नाहीं; आणि हें हि (रास्त) नव्हें कीं आह्मीं (मेल्यावर) जिवंत उठविले जाऊं! २९. आणि (हे पैगंबरा!) जर तूं (त्यांना अशा वेळीं) पाहशील (तर फारच बरें,) कीं जेव्हां हे लोक आपल्या पालनकर्त्यांचे समक्ष (आणून) उभे केले जातील, (व तो त्यांना) विचारील, कां हें (तुमचें जिवंत उठणें आतांहि) खरें नव्हे? ते जबाब देतील कीं होय, आम्हांला आपल्या पालनकर्त्याची शपथ, (खरेंच तर आहे. यावर परमेश्वर) फर्मावील कीं तुह्मीं जें (जगांत ह्या आयुष्यास) नाकारीत राहिलां (आतां) त्याच्या शासनार्थ शिक्षेची गोडी चाखा. ३०. ज्या लोकांनीं (पुनरुत्थानाचे दिवशीं) परमेश्वराचे नजरानजर होण्यास पाखंड जाणिलें, निःसंशय ते लोक अगदींच सफाई बुडाले. (ह्यांची नाकारणी) तेथपर्यंतच (होय) कीं (पुनरुत्थान नाहीं आलें,) जेव्हां एकदम ती घटका त्यांच्या(शिरा)वर येऊन ठेपेल, तेव्हां ते असे उद्गार काढतील कीं हायहाय आमच्या कोताईवर कीं जी पुनरुत्थानाचे संबंधानें आमच्याकडून झाली! (हें ह्मणत जातील,) आणि आपलीं (पापाचीं) ओझीं आपल्या पाठीवर लादून असतील. पाहा! (किती तरी हें) वाईट ओझें कीं हे लोक लादून लादून फिरत असतील! ३१. आणि इहलौकिक आयुष्य तर निवळ खेळ व तमाशाच होय. आणि जे लोक (परमेश्वराला) भिऊन वागतात त्यांच्यासाठीं तर परलोकींचें धाम उत्तम होय. तर कां तुह्मां लोकांस (इतकीहि) अक्कल नाहीं? ३२. (हे पैगंबरा!) आह्मीं ही गोष्ट जाणून बसलों आहों कीं हे लोक जसजशा गोष्टी (तुझ्याशीं) करतात त्या खचित तुला कष्टी करतात. पण (तुला सहनशील असलें पाहिजे; कारण,) हे तुला मिथ्यारोप करीत नाहींत; किंबहुना, (हे) जालीम लोक (वस्तुतः) परमेश्वराचे निशाण्यास अव्हेरितात. (तर तो त्यांच्यापासून बदला घेईल). ३३. आणि तुझ्यापूर्वींहि पैगंबरांस पाखंडी म्हटलें जाऊन चुकलें आहे.

तर त्यांचेवर जे मिथ्यारोप केले गेले ते व त्यांना जी इजा दिली गेली ती त्यांनीं (मुकाट्यानें) सहन केली; येथपर्यंत कीं आमची मदत त्यांच्यापाशीं येऊन पोहोंचली. आणि कोणी (हेंकडांतला हेंकडहि) परमेश्वराचे शब्दांस बदलणारा नाहीं. आणि पैगंबरांचा अहवाल तर तुला पोहोंचूनच चुकला आहे. ३४. आणि जर या (नास्तिकां)ची शिरजोरी तुला जड जाते, आणि हें तुझ्यानें होऊं शकेल कीं जमिनीच्या आंतल्या आंतच एखादा सुरंग शोधून काढशील अगर आकाशांत एखादी शिडी (लावलेली पैदा करशील,) आणि (या युक्तींनीं) कोणी एखादा (फरमाशी) चमत्कार त्यांना आणून दाखवशील; (तर होतां होईल तेवढें करून पाहा; पण ह्यानें कांहींच होणें जाणें नाहीं.) आणि जर परमेश्वर इच्छिता, तर तो या(सर्वां)स सरळमार्गावर एकत्र गोळा करून टाकता. तर खबरदार! तूं अज्ञानी लोकांपैकीं होऊन जाऊं नकोस. (कीं तूं अवेळींच त्यांच्या शिक्षेची घाई मचवूं लागावेंस.) ३५. जे लोक (मनापासून तुझा उपदेश) ऐकितात तेच काय ते (तो) मान्यहि करतात. आणि (हे नास्तिक तर जणूं काय) मेलेले[3] (होत कीं) यांना परमेश्वर (पुनरुत्थानाचे दिवशीं जिवंत) उठवील; मग त्याच्या

(१) ह्मणजे परमेश्वर नेहमीं आपल्या पैगंबरांचा मदतगार राहिला आहे. ही परमेश्वराची संवय आहे व त्याची संवय बदलली जात नाहीं. तर तुह्मांस पूर्वकालीन पैगंबरांच्या अहवालापासून संतोष धरतां शिकलें पाहिजे कीं परमेश्वर तुमचीहि मदत करील व इस्लामधर्मास सरशी व वर्चस्व देईल.

(२) ह्मणजे चमत्कार घडवून आणणें हें तुमच्या अखत्यारांत नाहीं; तसाच त्या लोकांचा विश्वास हा कांहीं चमत्काराचा अवश्यक परिणाम नाहीं. तर हें संभवीत आहे कीं फरमाशी चमत्कार पाहूनहि ते संशयांतच राहतील.

(३) नास्तिकांस मेलेले यासाठीं ह्मटलें आहे कीं त्यांना धर्मासंबंधानें नेहमीं अनास्थाच असते.

कडेसच ते परतले जातील. (तेव्हां ते मानतील, पण त्या वेळेचें मानणें कांहीं उपयुक्त होणार नाहीं.) ३६. आणि (नास्तिक) म्हणतात कीं ह्या (दावेदार पैगंबरा)कडे त्याच्या पालनकर्त्याकडून एखादी निशाणी (म्हणजे चमत्कार जसा आह्मीं म्हणतों तसा) कां प्रकट होऊं नये? (हे पैगंबरा! तूं त्यांचें उत्तर म्हणून) सांग कीं परमेश्वर निशाणी (म्हणजे फरमाशी चमत्कार) प्रकट करण्यासहि समर्थ आहे. परंतु यांच्यांतले बहुतेक (परमेश्वराच्या मसलती) जाणत नाहींत. ३७. आणि जेवढे म्हणून प्राणी जमिनींत (चालत फिरत) आहेत व जितके म्हणून पक्षी आपल्या दोन्ही पंखावर उडत उडत फिरतात, तितके सर्वहि तुम्हांलोकांसारख्याच जनता होत. (जतन केलेल्या गुप्त) पुस्तकांत (सर्वांची नोंद आहे;) आह्मी कोणाहि वस्तु(चे लिहिण्यां)त मुळींच कोताई केली नाहीं. तथापि (पुनरुत्थानाचे दिवशीं सारेचे सारेच) आपल्या पालनकर्त्याचे हुजूर एकत्र[1] हजर केले जातील. ३८. आणि जे लोक आमच्या निशाण्यांस पाखंड म्हणतात (त्यांची उपमा म्हणजे जणों कीं) अंधाऱ्यांत बहिरे[2] व मुकेच (होत). परमेश्वर ज्याला इच्छील त्याला गैरमार्गीं[3] लावील व तो ज्याला इच्छील त्याला सरळमार्गीं लावून देईल. ३९. (हे पैगंबरा? यांना) विचार

(१) येथून असें निष्पन्न होतें कीं पुनरुत्थानाचे दिवशीं मनुष्यें व इतर प्राणी या सर्वांचें फिरोन उठणें होईल,

(२) बहिरे व मुके हे अंधाऱ्यांत असल्यास त्यांची वाटेवर येण्याची आशाच नको. कारण, बाहेरून जर कोणी वाट दाखवील तर तो बहिरा आहे, ऐकत नाहीं; आणि खुद्द त्याच्या मनांतच विचाराव याचें आलें तर तो मुका आहे; कोणालाहि मार्ग विचारूं शकत नाहीं. याशिवाय अंधाऱ्यांत असल्यामुळें त्याला डोळ्यांनींहि कांहीं सुचत नाहीं.

(३) हजरत पैगंबर साहेबांचें सांत्वन करण्याचा असा उद्देश दिसतो कीं लोकांस सरळ मार्गावर आणणें हें तुमच्या अखत्यारांत नाहीं. दुसरे जागीं ह्मटलें आहे कीं परमेश्वर इच्छिता, तर मनुष्यांचे ऐवजीं पृथ्वीवर

कीं बरें, पाहा तर खरें, कीं जर परमेश्वराकडची शिक्षा तुम्हां पुढें येऊन ठेपेल अगर (असें गृहित धरून चाला कीं ह्याच क्षणीं, पुनरुत्थानाची) घटका तुम्हां समक्ष येऊन उभी राहील; तर मग, जर तुह्मीं (आपल्या अनेकेश्वरवादाचे दाव्यांत) खरे असाल, तर कां (त्या वेळींहि) परमेश्वराखेरीज (अन्य उपास्यांचा) धांवा करूं लागाल? ४०. (अन्य उपास्यांचा नव्हे,) तर किंबहुना, त्या (एका परमेश्वरा)चाच धांवा कराल. तर ज्या (संकट-निवारणा) साठीं तुह्मीं त्याचा धांवा कराल, जर त्याच्या मर्जीस येईल तर तो त्याचें निवारण करून टाकील; आणि ज्या (देवां)स तुह्मीं (परमेश्वराचा) सरकतदार बनवितां, (त्या वेळीं त्या सर्वांस) तुह्मीं विसरून जाल. ४१. आणि (हे पैगंबरा!) तुझ्यापूर्वीं जे लोक होऊन गेले आहेत त्यांच्याकडेहि आम्हीं पैगंबर पाठवून चुकलों आहों. मग (जेव्हां त्यांनीं पैगंबरांचा कह्या न मानिला तेव्हां) आह्मीं त्यांना दारिद्र्यांत व दुःखांत पिडिलें; अशासाठीं कीं त्यांनीं (नम्र होऊन आह्मां समक्ष) गयावया करावें. ४२. तर जेव्हां त्यांच्यावर आमची शिक्षा आली होती, तेव्हां त्यांनीं (नम्र होऊन) कां म्हणून गयावया केलें नाहीं; (कीं आह्मीं शिक्षेला टाळून टाकतों.) परंतु (ते यामुळें नम्र झाले नाहीत कीं) त्यांचीं अंतःकरणें कठोर होऊन गेलीं होतीं. आणि ते जें (कुकर्म) करीत होते तें सैतानानें (त्यांच्या नजरेंत) सुशोभित करून दाखविलें होतें. ४३. मग ज्या (संकटा) द्वारें त्यांना तंबी केली गेली होती, त्याला जेव्हां ते

---

देवदूत आणून वसविता (कीं त्यांच्या स्वभावांत पापांची प्रेरणाच न होते). परंतु परमेश्वरानें आपल्या पवित्र इच्छेनें मानवास बरें वाईटाचें तारतम्य दिलें व या गोष्टीची सत्ताहि दिली कीं पाहिजे तर त्यानें चांगला मार्ग पत्करावा अगर वाईट मार्गी चालावें. गैर मार्गी लाविणें व सरळ मार्गी लावून देणें यांचा अर्थ हा होय.

(१) ह्मणजे ते वाईट करीत व त्याला बरें समजत असत. मनुष्याची ही स्थिति फारच जोखिमीची आहे. कारण, या स्थितीस पोहोंचल्यावर माणसाच्या सुधारण्याची आशा राहत नाहीं.

विसरून बसले तेव्हां आह्मींहि (त्यांना फसगतींत टाकण्यासाठीं) त्यांच्यावर हरतऱ्हेच्या (ऐहिक) सुखांचे दरवाजे खुले करून टाकले; येथपर्यंत कीं त्यांना जें सुख दिलें गेलें होतें तें उपभोगून जेव्हां ते आनंदी आनंद पावले, तेव्हां एकाएकीं आह्मीं त्यांना (शिक्षेंत) धरिलें. आणि शिक्षा आली तों लागलेच ते निराश होऊन गेले. ४४. आणि जालीम लोकांचा वंशच्छेद झाला; आणि सकल जगांचा पालनकर्ता जो परमेश्वर त्याचे (मोठेच) आभार! (कीं बखेडाच संपला) ४५. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं बरें पाहा तर खरें! जर परमेश्वर तुमचे कान व तुमचे डोळे हिरावून घेईल व तुमच्या अंतःकरणावर मोहर लावून टाकील, तर परमेश्वराशिवाय अन्य कोण उपास्य (देव) होय कीं तो तुह्मांस या देणग्या (पुन्हां) देईल? (हे पैगंबरा!) पाहा तर! आह्मीं कशीं (आपल्या सामर्थ्याचीं) प्रमाणें तऱ्हेतऱ्हेनें वर्णितों? यावरही हे लोक तोंड फिरवून चालते होतात. ४६. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं बरें पाहा तर खरें! जर ईश्वरी शिक्षा एकाएकीं अगर राजरोस तुह्मांवर येईल, तर कां आज्ञाभंजक लोकांशिवाय (आणखीहि कोणाचा) नाश केला जाईल? ४७. आणि पैगंबरांस आह्मीं फक्त यासाठीं पाठवितों कीं (त्यांनीं सदाचरणी लोकांस ईश्वरप्रसन्नतेचें) शुभवर्तमान ऐकवावें आणि (दुराचरण्यांस त्यांच्या शिक्षेचें) भय घालावें. तर मग ज्यानें विश्वास धरिला व (आपली स्थिति) सुधारिली, अशा लोकांस (पुनरुत्थानाचे दिवशीं) कोणा तऱ्हेचें भय राहणार नाहीं व ते दुःखीहि होणार नाहींत. ४८. आणि ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड ह्मटलें, त्यांच्या आज्ञाभंगाचे शासनार्थ (आमची) शिक्षा त्यांना सादर होईलच (होईल). ४९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मी तुह्मांस नाहीं म्हणत कीं माझ्यापाशीं परमेश्वरा(च्या राज्या)चे खजिने आहेत व मी अदृष्टहि जाणत नाहीं व मी तुह्मांस सांगत नाहीं कीं मीं (कोणी) देवदूत आहें. मी तर जो (हुकूम) मला प्रकट केला जातो केवळ त्या

प्रमाणेंच चालतों. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं बरें! आंधळा व डोळस (दोघे) बरोबर होऊं शकतात का? तर कां तुह्मीं (लोक इतकेंहि) मनन करीत नाहींत? ५०. आणि (हे पैगंबरा!) जे लोक या गोष्टीची भीति बाळगितात कीं (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांना आपल्या पालनकर्त्याच्या हुजूर आणून हजर केलें जाईल, (व त्यावेळीं) परमेश्वराशिवाय ना कोणी त्यांचें दोस्त होईल व ना कोणी मध्यस्थच; अशा लोकांस कुर्आनाद्वारें (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखीव. नवल नव्हे कीं हे लोक (तुझ्या भिवविण्यानें परमेश्वराला) भिऊन चालूं लागतील. ५१. आणि (हे पैगंबरा!) जे लोक आपल्या पालनकर्त्याच्या दर्शनाची आकांक्षा बाळगून सकाळ सांज त्याचाच धांवा करतात त्यांना (तूं आपल्यापासून) हांकून लावूं नकोस. त्यां(च्या कर्मां)ची जबाबदारी कोणा तऱ्हेनें तुझ्या जिम्मे नव्हे व तुझी जबाबदारी कोणा तऱ्हेनें त्यांच्या जिम्मे नव्हे कीं (जबाबदारीचे धास्तीनें) तूं त्यांना धक्के देऊं लागावेंस; (असें करशील) तर तूं जालिम लोकांपैकीं होऊन जाशील. ५२. आणि अशाच तऱ्हेनें (स्थित्यंतरायोगें) आम्हीं त्यांच्यांतल्या कित्येकांस (दुसऱ्या) कित्येकांशीं अजमावून पाहिलें; अशासाठीं कीं (मगदूरवाले, गरीबांस पाहून) ह्मणूं लागावेत कीं हेच कां ते (नीच) लोक कीं ज्यांच्यावर परमेश्वरानें आमच्यांतून (इस्लाम स्वीकारण्याची सुबुद्धि देऊन आपली) कृपा केली आहे? (ह्यालोकांस इतकें तरी समजलें पाहिजे होतें कीं) कां परमेश्वर कृतज्ञ लोकां(च्या स्थिती)शीं

(१) आंधळ्याचा अर्थ येथें नास्तिक जो परमेश्वराला मानीत नाहीं तो; आणखी डोळस ह्मणजे जो परमेश्वराला मानितो व त्याच्या आज्ञांकित आहे तो.

(२) सुरवातीस बहुतेक गरीब लोकांनीं इस्लामधर्म अंगिकारिला होता. आणि नियमही असाच असतो कीं सत्यगोष्ट गरीब लोकच त्वरेनें मान्य करतात; कारण जगिक ऐश्वर्य व स्वाभिमान हीं त्यांच्या मार्गांत अडथळा घालीत नाहींत. नास्तिकलोक ह्या बापड्यांची बाह्य स्थिती पाहून त्यांची अवहेलना करीत; व ते पैगंबर साहेबांस आग्रह करीत

पूर्णपणें वाकब नाहीं? ५३. आणि (हे पैगंबरा!) जे लोक आमच्या निशाण्यांवर विश्वास ठेवितात, ते जेव्हां तुजपाशीं येत जातील तेव्हां (तूं त्यांची मनधरणी कर व) सांग कीं (परमेश्वराकडून) तुह्मांस शांति(ची खुषखबर) असो! (आणि) तुमच्या पालनकर्त्यानें (सेवकांवर) दया करण्याचा आपल्या ठायीं नियम करून ठेविला आहे; कीं जो कोणी तुह्मांपैकीं अज्ञानपणानें एखादें पातक करून बसेल नंतर तें केल्यामागून पश्चात्ताप करील व (आपली स्थिति) सुधारील तर (परमेश्वर त्याला क्षमा करील; कारण,) तो क्षमाकर्ता व दयाळू होय. ५४. आणि अशाच तऱ्हेनें आह्मीं (आपल्या) निशाण्यांस तपशीलवार वर्णितों (कीं लोकांनीं त्या समजाव्या) आणि हें कीं पापी लोकांचा मार्ग (सर्वांस) जाहीर होऊन जावा. ५५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांगून दे कीं परमेश्वराशिवाय ज्या (देवां)स तुह्मीं (वेळ पडल्यास) बोलावितां त्यांची मी भक्ति करावी, या गोष्टीची मला मनाई केली गेली आहे. (या लोकांस) सांग कीं मी तुमच्या मनेच्छे-प्रमाणें तर चालत नाहीं. असें करीन तर मग मी बहकूनच चुकलों व सन्मार्गी लोकांपैकींहि न राहिलों. ५६. (या लोकांस) सांग कीं मी तर आपल्या पालनकर्त्या(च्या धर्मा)च्या राजमार्गावर आहें; आणि तुह्मीं त्याला पाखंड म्हणतां! ज्या (शिक्षे)ची तुह्मीं

---

कीं यांना आपल्यापाशीं न बसूं द्याल तर आम्हीं येऊं. काय हे व काय ह्यांचा धर्म! परमेश्वरानें त्यांच्या उत्तरादाखल, पैगंबर साहेबांस समजाविलें कीं हे लोक जसे बाहेरून आहेत तसेच आंतूनही परमेश्वराची मर्जी संपादूं इच्छितात. तुम्हीं त्यांच्या बाह्यांगावरून अंतरंगाचा अनुमान काढाल तर तुह्मीं कोणी अदृष्टज्ञानी तर नव्हेत. जर त्यांच्यांत कोणी खरोखरीच पोकळ विश्वासाचाहि असेल तर तो जाणो व त्याचें काम जाणो. आणि नास्तिक वा अविश्वासू यांचा आक्षेप अशा तऱ्हेनें उठविला कीं ऐहिक वैभव व थाटमाट हीं कुचकामाचीं होत. मोठी दौलत ह्मटली तर इस्लामची ईश्वरदत्त देणगीच होय व ती जे तिची किंमत जाणतात त्यांना दिली जाते; मग ते श्रीमंत असोत कीं गरीब असोत.

घाई मचवीत आहां ती माझ्यापाशीं (म्हणजे माझ्या अखत्यारांत) तर नाहींच. परमेश्वराशिवाय अन्य कोणाचाच अखत्यार नाहीं. तो सत्य (सत्य गोष्टी) निवेदितो. आणि तो सर्व फैसला करणारांत उत्तम (फैसलाकर्ता) होय. ५७. (या लोकांस) सांग कीं ज्या (शिक्षे)ची तुह्मीं घाई मचवीत आहां ती जर मजपाशीं (म्हणजे माझ्या अधिकारांत) असती, तर माझ्या व तुमच्या दरम्यान (जें) वादप्रकरण (आहे तें केव्हांचेंच) चुकतें झालें असतें. आणि परमेश्वर जालीम लोकां(च्या स्थिति)शीं खूप वाकब होय. ५८. आणि त्याच्याचपाशीं अदृष्टाच्या किल्ल्या होत कीं त्या त्याच्याशिवाय कोणीच जाणत नाहीं. आणि जें कांहीं खुष्कींत व जलांत आहे. तेंहि तोच जाणतो. आणि कोणी एक पान देखील (झाडावरून) गळून पडत नाहीं परंतु तें त्याला माहीत राहतें आणि धरित्रीच्या (नानाविध) अंधःकारां(च्या पडद्यां)त (जो) धान्याचा दाणा (असेल तो,) व (जगांतील) ओले व कोरडे (पदार्थ हे सर्वच तर) सुबोध पुस्तकां (म्हणजे जतन केलेल्या गुप्त पुस्तकां)त (नमूद केलेले) आहेत. ५९. आणि (लोकांनों!) तोच असा (परमसमर्थ) होय कीं जो रात्रीं (झोंपेंत एका अर्थीं) तुमचे प्राण[1] हरण करून नेतो; आणि जें कांहीं तुह्मीं दिवसाभरांत केलें होतें तेंहि तो जाणतो. मग दिवसांत तो तुह्मांस उठवून उभे करितो; अशासाठीं कीं (रात्रंदिवसाच्या अनुक्रमानें जीवन-)काल (जो त्याच्या ज्ञानांत) ठरलेला (आहे तो एके दिवशीं) पुरा व्हावा. मग (अखेर) त्याच्याचकडे तुह्मां(सर्वां)स परतून जाणें आहे. तेव्हां मग जें कांहीं तुह्मीं (जगांत) करीत राहिलां आहां (त्याचें बरेंवाईट) तो तुह्मांस विदित करील. ६०.

---

(१) निद्रावस्थेंत पंचेंद्रियें दिसण्यांत बेकार होऊन जातात. तरीहि जीवित्व बाकी राहतेंच; आणि आंतील इंद्रियें आपलीं कामें करतात; कीं जेणेंकरून मनुष्य स्वप्न पाहतो. झोंपेंत पंचेंद्रियांचें बेकार व निरुपयोगी होणें हें मरणें तर नव्हेच, परंतु त्यांत मृत्युच्या स्थितीशीं सादृश्य तर अवश्यच आहे. ह्मणूनच ह्मणतात कीं निजला व मेला बरोबर. ह्यासच अनुसरून आह्मीं हें भाषांतर केलें आहे.

**आणि तोच आपल्या सेवकांवर प्रबल सत्ताधारी होय; व तो तुह्मां लोकांवर पहारेकरी (दूत) सोडून ठेवितो; येथपर्यंत कीं जेव्हां तुमच्यांतून कोणाएकाला (खरोखरीच) मृत्यु येतो, तेव्हां आमचे दूत त्याचा प्राण (पूर्णपणें) हरण करतात. आणि ते (हुकूम बजाविण्यांत कसलीच) कोताई करीत नाहींत. ६१. नंतर (अशाच तऱ्हेनें सर्व लोक) परमेश्वर जो त्यांचा खरा पुरस्कर्ता त्याच्याकडेस (जगांतून) परत बोलावून घेतले जातात. ऐकून ठेवा कीं त्याचाच हुकूम (चालतो) आहे; आणि तो सर्वांत अधिक जलद हिशेब घेणारा होय. ६२. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं तुह्मांस भूमि व समुद्राच्या (निबिड) अंधःकारांतून कोण सुटका देतो कीं तुम्हीं (अशा समयीं) गहिंवरून (गहिंवरून) व मुकाट्या (मुकाट्या)नें त्याची प्रार्थना करितां? (आणि अशी प्रतिज्ञा करितां कीं) जर परमेश्वर आम्हांस या (संकटां)तून पार पाडील, तर आम्हीं जरूर (त्याचे) आभारप्रदर्शक (सेवक) होऊन राहूं. ६३. (हे पैगंबरा! हे तर**

---

(१) चोविसाव्या भागाच्या दुसऱ्या (रुकुअ) सदरांत असेंच एक वाक्य आहे. त्याचें भाषांतर येणेंप्रमाणें:—"लोकांच्या मरणसमयीं परमेश्वर त्यांचे प्राण (आपल्यापाशीं बोलावून घेतो, आणि जे लोक मेले नाहींत (त्यांचे प्राणहि) त्यांच्या निजते वेळीं (परमेश्वरापाशीं बोलाविले जातात); तर ज्यांच्यासंबंधीं (परमेश्वर) मृत्युचा हुकूम सादर करून चुकला आहे त्यांना (तर आपल्यापाशीं) रोखून ठेवितो, आणि बाकी (निजणाऱ्यां)ना एका नियमित काळापर्यंत पुन्हां जगांत पाठवून देतो." 'खरोखरीच मृत्यु' व 'पूर्णपणें प्राण हरण करणें' ही जी कैद आह्मीं भाषांतरांत लाविली आहे तिचा उद्देश सदरहू वाक्यावरून पूर्णपणें लक्ष्यांत येईल.

(२) अंधःकार ही एका प्रकारची शिक्षाच होय. त्याच्या होण्यानें जगाचीं कामें बंद पडतात; अंधःकारहि नानाविध असतात. रात्रीचा अंधःकार, तुफान, वादळ, व ग्रहण यामुळें होणारा अंधःकार जुलमाचा आणि अन्यायाचा अंधःकार व सर्वांत भयाण अंधःकार थडग्याचा अगर मरणोत्तर स्थितीचा.

त्याचा काय जबाब देतील? तूंच ह्यांना) सांग कीं या (अंधःकारां)तून व हरेक क्लेशांतून परमेश्वरच तुमची सुटका करितो. मग (यावरहि) तुम्हीं (परमेश्वराचे) सरकतदार ठरवितां! ६४. (हे पैगंबरा! यांना) सांग कीं तोच (परमेश्वर) या गोष्टीस समर्थ होय कीं तुमच्या वरच्या बाजूनें अगर तुमच्या पायांखालून एखादी शिक्षा तुम्हांसाठीं काढून उभी करील अथवा तुम्हांस (भिन्न भिन्न) पक्ष करून (एकमेकांशीं) झुंपवून सोडील व तुमच्यांतून कित्येकांस कित्येकांच्या लढाईची गोडी चाखवील. (हे पैगंबरा!) पाहा तर खरें! कीं आम्हीं (आपल्या) निशाण्यांस कसकशा तऱ्हेनें फिरवून फिरवून वर्णितों कीं लोकांनीं त्या समजाव्या. ६५. आणि कुर्आनास तुझ्या लोकांनीं पाखंड म्हटलें; व वास्तविक पाहतां, तें सत्य (पुस्तक) होय. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मी तुह्मांवर (कांहीं रक्षका सारखा तर) अधिकारी नाहींच; (कीं मी तुह्मांस नास्तिकपणा न करूं द्यावा). ६६. प्रत्येक भविष्यवचना(च्या सत्यते)चा एक वेळ (खास) मुक्रर आहे; आणि पुढें कांहीं कालानंतर (माझें सत्य) तुह्मांस माहीत[1] होऊन जाईल. ६७. आणि जेव्हां असे लोक (कोठें) तुझ्या दृष्टीस पडून जातील कीं जे आमच्या निशाण्यां(ची टवाळकी व थट्टा करण्यां)त लागून राहतात तेव्हां तूं त्यांच्यापासून एकीकडे होऊन जा; येथपर्यंत कीं ते आमच्या निशाण्यांशिवाय (दुसऱ्या) कांहीं गोष्टींत लागून जातील आणि जर सैतान तुला (आमचा हा आदेश एखादे वेळीं) भुलवून टाकील तर स्मरणानंतर (अशा) अन्यायी लोकांसंगतीं तूं कधींहि बसूं नकोस. ६८. आणि जे लोक (परमेश्वराला)

---

(१) ह्मणजे माझें काम तुह्मां लोकांस ईश्वरी हुकूम पोहोंचवून देणें आहे. मी तुमच्या विश्वासाचा जिम्मेदार नाहीं; आणि पुनरुत्थानाचे अहवाल व इहलोक व परलोक यांच्या शिक्षेसंबंधीं जें भविष्यवचन मी, परमेश्वराचे सांगण्यानें करितों तें आपल्या नियमित काळीं घडून येईलच येईल. वेळेपूर्वी तुमच्या घाई मचविल्यानें तें घडून येऊं शकत नाहीं. आणि घडण्याचे वेळीं तुह्मांस माहीत होऊन जाईल कीं जें जें मी तुह्मांस सांगित होतों तें सर्वस्वी खरें होतें.

भिऊन चालतात त्यांच्यावर अशा (अजागळ) लोकांच्या (कर्मांचे) हिशेबाची कसलीच जबाबदारी नाहीं. तरी पण (त्यांना) उपदेश करणें (तर अवश्य होय). कीं (चार गोष्टी सांगितल्यानें) तेहि कदाचित् (परमेश्वराला) भिऊन चालूं लागतील. ६९. आणि ज्यांनीं आपल्या धर्माला खेळ व तमाशा बनवून ठेविला आहे व इहलौकिक आयुष्यानें त्यांना फसवणुकींत घातलें आहे अशा लोकांस तूं (त्यांच्याच स्थितीवर) सोडून दे. आणि (संधि पाहून) कुर्आनाद्वारें (त्यांना) समजावीत रहा कीं कोठें (असें न होवो कीं) कोणी मनुष्य (पुनरुत्थानीं) आपल्या कर्मांचे मोबदला आपत्तींत पिडिला जावा; कीं (त्या वेळीं) परमेश्वराशिवाय त्याचा कोणी पुरस्कर्ता होणार नाहीं व शिफारस कर्ताहि नाहीं आणि (जितके) मोबदले (संभवनीय आहेत) जरी तो ते सर्वच देईल तरीहि (कोणचाहि मोबदला) त्याचेपासून घेतला जाणार नाहीं. हेच ते लोक होत कीं जे आपल्या कर्मांचेकारणें आपत्तींत पिडिले गेले. ह्यांना पिण्यास्तव उकळी आलेलें पाणी (मिळेल) आणि दुःखकारक शिक्षा होईल (ती वेगळी); कारणकीं हे नास्तिकपणा करीत होते. ७०. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस, कां (तुह्मीं हें इछितां कीं) आह्मीं (मुसलमानांनीं) परमेश्वराला सोडून अशा (खोट्या देवतां)स (आपल्या मदतीसाठीं) बोलवावें कीं जे आह्मांला नफाहि पोहोंचवूं शकत नाहींत व आह्मांला नुकसानहि पोहोंचवूं शकत नाहींत? आणि जेव्हां परमेश्वर आह्मांस सरळ मार्ग दाखवून चुकला, तेव्हां कां आह्मीं त्या उपरांतहि आपल्या मागल्या पायीं (नास्तिकपणाकडे) उलटून जावें? (आणि आमची अशी उपमा व्हावी कीं) जशी कोणा मनुष्यास भूतबाधा होऊन सैतान त्याला (चारहीकडे) जंगल अरण्यांत हैराण (करून सैरावैरां) भटकवीत फिरतो? त्याचे कांहीं साथी होत व ते त्याला सरळ मार्गाकडे बोलावितात कीं ये (इकडे) आह्मांजवळ. (हे पैगंबरा! हे तर त्याचें काय उत्तर देतील? तूंच यांना) सांग कीं परमेश्वर(-निर्दिष्ट) मार्ग तोच सरळ मार्ग होय. आणि आह्मां (मुसलमानां)स (तर हीच)आज्ञा

मिळाली आहे कीं आह्मीं सकल जगांचा पालनकर्ता अशा (परमेश्वरा)चेच आज्ञांकित होऊन राहावें. ७१. आणि (त्यानें आह्मांस आज्ञापिलें आहे कीं) नमाज पढा व परमेश्वराला भीत राहा. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्याच्या हुजुरांत (तुह्मीं सर्व लोक पुनरुत्थानाचे दिवशीं) आणून हजर केले जाल. ७२. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें (कोणा) सत्य संकल्पानेंच आकाश व पृथ्वी हीं निर्माण केलीं. आणि ज्या दिवशीं तो (पुनरुत्थानाचे संबंधानें) फर्मावील कीं हो; मग तें (तेव्हांच) होऊन जाईल. ७३. त्याचें फर्माविलेलें खरें होय. (ह्मणजे पुनरुत्थान घडून येईलच). आणि ज्या दिवशीं सूर (ह्मणजे करणा) फुंकला जाईल त्या दिवशीं त्याचीच हुकमत होईल.(तो) अदृष्ट व दृष्ट या (सर्वां)चा ज्ञाता होय. आणि तोच युक्तिवान् व (सर्व वस्तूंचा) माहीतगार होय. ७४. आणि (हे पैगंबरा! ती वेळ आठवण कर कीं) जेव्हां इब्राहिमानें आपला पिता 'आझर' यास म्हटलें, कां, तूं मूर्तींस उपास्य मानतोस? मी तर तुला व तुझ्या लोकांस धडधडीत चुकींत (पडलेले) पाहतों आहें. ७५. आणि (ज्याप्रमाणें आह्मीं इब्राहिमाचे मनांत ही प्रेरणा उत्पन्न केली) त्याच प्रमाणें आह्मीं इब्राहिमास आकाश व पृथ्वीची राज्य व्यवस्था दाखवूं लागलों; व हें यासाठीं कीं त्यानें (पूर्ण) विश्वास पटलेल्या लोकांपैकीं होऊन जावें. ७६. तर जेव्हां त्याच्यावर रात्र पसरून गेली, तेव्हां त्याला एक तारा दृष्टीस पडला, (व त्यास पाहून) तो म्हणूं लागला कीं हाच माझा पालनकर्ता होय. मग जेव्हां तो मावळून गेला. तेव्हां तो बोलला कीं मावळणाऱ्या (वस्तूंस) तर मी पसंत करीत नाहीं (कीं मी त्यांना परमेश्वर मानावें!) ७७. मग जेव्हां त्यानें चंद्राला चकचकीत प्रकाशतांना पाहिलें, तेव्हां तो म्हणूं लागला कीं हाच माझा पालनकर्ता होय. मग जेव्हां तोहि मावळून गेला, तेव्हां तो बोलला कीं जर मला माझा पालनकर्ता सरळ मार्ग न दाखवील तर निःसंशय मीहि आडमार्गी भटकणाऱ्या लोकांपैकीं होऊन जाईन. ७८. मग जेव्हां त्यानें सूर्याला चकचकीत प्रकाशतांना पाहिलें, तेव्हां

तो ह्मणूं लागला, हाच माझा पालनकर्ता; कीं हा (सर्वांत) मोठाहि होय. मग जेव्हां तोहि मावळून गेला, तेव्हां तो (आपल्या लोकांस संबोधून) बोलला कीं हे माझ्या लोकांनों! ज्या (वस्तूं)स तुह्मी (परमेश्वराचा) साथी मानतां, मी तर त्यांजपासून (अगदींच) अलिप्त आहें. ७९. मी तर एकाचाच होऊन, आपलें तोंड ज्यानें आकश व पृथ्वी हीं निर्माण केलीं त्याच (परम पवित्र परमेश्वरा)कडे फिरविलें आहे; आणि मी तर मूर्तीपूजकांपैकीं नाहींच. ८०. आणि त्याचे लोक त्याच्याशीं (या गोष्टीवर) वादविवाद करूं लागले. (तेव्हां इब्राहीमानें) म्हटलें, कां तुह्मी माझ्याशीं परमेश्वरा(चे एकत्वा)विषयीं वादविवाद करितां? आणि वास्तविक पाहतां, तो तर मला (आपल्या ऐक्याचा) सरळ मार्ग दाखवून चुकला आहे. आणि ज्या (मूर्तीं)स तुह्मीं त्याचा साथी मानतां मी तर त्यांच्याशीं कांहीं भीत (वित) नाहीं (कीं त्या मला कांहीं नुकसान पोहोंचवतील). होय, पण माझा पालनकर्ताच (मला) कांहीं (नुकसान पोहोंचवूं) इच्छिल (तर त्याची मर्जी). माझा पालनकर्ता तर ज्ञानाचे मानानें प्रत्येक वस्तूंस व्यापून आहे. तर कां तुह्मीं (या गोष्टींचें) मनन करीत नाहींत? ८१. आणि ज्या (वस्तूं)स तुम्हीं (परमेश्वराचा) सरकतदार बनवितां, मी त्यांशीं कसें भिऊं लागावें? आणि वास्तविक पाहतां, तुह्मीं तर या गोष्टीस (मुळींच) भीत नाहीं कीं तुह्मीं परमेश्वराचा अशा वस्तूंस सरकतदार बनविला कीं ज्यां(च्या उपास्य होण्या)चें कोणतेंच प्रमाण परमेश्वरानें तुह्मांकरतां पाठविलें नाहीं. तर (आह्मां) उभय पक्षांतून कोणता (पक्ष) शांति-(समाधानानें राहण्या)चा जास्त हक्कदार आहे? जर तुह्मीं जाणत असाल (तर आपणच समजून घ्या). ८२. ज्या लोकांनीं (परमेश्वरावर) विश्वास ठेविला व ज्यांनीं आपल्या

---

(१) हजरत इब्राहीम पैगंबर–ईश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो–यांचें, तारे, चंद्र व सूर्य यांस मावळतांना पाहून हें ह्मणणें कीं त्यांचें मावळून जाणें ईश्वरत्वास साजेसें नाहीं. याचा अर्थ असा कीं तारे, चंद्र व सूर्य हीं पराधीन व लाचार असून दुसऱ्याचे इच्छेस वश आहेत ह्मणून पराधीन व परवश अशी व्यक्ति परमेश्वर होऊं शकत नाहीं.

विश्वासांत बेइनसाफी (म्हणजे अनेकेश्वरमतवादा)चें मिश्रण घातलें नाहीं. हेच लोक होत कीं जे (चित्ताचे) शांति(-समाधाना)स पात्र होत व हेच लोक सन्मार्गीहि होत. ८३. आणि हें आमचें (सुचविलेलें) प्रमाण होतें कीं आह्मीं इब्राहिमाला तें आपल्या लोकांस पटविण्या-साठीं दिलें. आह्मीं ज्याचे इच्छितों त्याचे दर्जे वाढवितों. (हे पैगंबरा!) निःसंशय तुझा पालनकर्ता बुद्धिमान्‌ (असून सर्व कांहीं) जाणतो. ८४. आणि आह्मीं 'इब्राहीमा'ला इस्हाक (हा पुत्र) व याकूब (हा प्रपौत्र, असें संतान) अर्पिलें. या सर्वांस आम्हीं सरळमार्ग दाखविला. आणि (यांच्या) पूर्वीं 'नूह'लाहि आम्ही सन्मार्ग दाखविला. आणि त्याच्याच वंशांतून, 'दाऊद' व 'सुलेमान,' आणि 'अय्युब' व 'युसूफ' आणि 'मूसा,' व 'हारून' या (सर्वां)स (आम्हीं सन्मार्ग दाखविला). आणि (प्रांजलपणें) सुकृत्य करणारांस आम्हीं असेच मोबदले देत असतों. ८५. आणि (अशाच प्रकारें) 'जकरिय्या' व 'याहया' आणि 'ईसा' व 'इल्यास' यांसही; (कीं हे) सर्व (आमच्या) पवित्राचरणी सेवकापैकीं होत. ८६. आणि 'इस्माईल' व 'अल्यस्‌आ' आणि 'यूनुस' व 'लूत' या (सर्वां)स (हि आह्मीं सन्मार्ग दाखविला) आणि सर्वांसहि आलमदुनियेच्या लोकांवर श्रेष्ठत्व दिलें. ८७. आणि (यांनाच फक्त नव्हे तर) त्यांचे वडील व त्यांची संतती व त्यांचे भाऊबंद यांजपैकीं (आणखी बहुतेकांस); आणि यालोकांस आह्मीं (आपल्या सेवकां-तून) निवडून घेतलें व यांना (धर्माचा) सरळ मार्ग दाखविला. ८८.

---

(१) एका हदीसमध्यें आलें आहे कीं जेव्हां हें वाक्य प्रकट झालें तेव्हां कित्येक सहाबा म्हणजे तत्कालीन अनुयायांनीं हजरत पैगंबरांचे सेवेंत अर्ज केला कीं हे महा गुरु! आमच्यांत असा कोण आहे कीं जो थोडी वा बहुत बेइनसाफी व जुलूम आपल्यावर करीतच नाहीं. पैगंबर साहेब म्हणाले कीं तुह्मीं लुकमान पैगंबराचा उपदेश ऐकिला नाहीं काय? कीं त्यांत त्यांनीं आपल्या पुत्रास उद्देशून म्हटलें होतें; 'हे पुत्रा! परमेश्वराचा (कोणाला) सरकतदार बनवूं नकोस. कारण (त्याचा) सरकतदार स्थापिणें हा मोठाच अन्याय होय.' तर येथें जुलुमाचा अर्थ बेइनसाफी, अन्याय म्हणजे अनेकेश्वरमतवाद असा होतो.

हा होय परमेश्वराचा सरळ मार्ग; तो आपल्या सेवकांतून ज्याला इच्छील त्याला ह्या मार्गाची सुबुद्धि देईल. आणि जर हे (पैगंबर) (कोणाला परमेश्वराचा) सरकतदार ठरवितें, तर यांनीं जें कांहीं केलें (सवरलें) होतें तें (सर्व) यांच्यापासून नाहींसें होऊन जातें. ८९. (हे पैगंबर) असे लोक होत कीं ज्यांना आह्मीं पुस्तकहि दिलें व हुकमतहि (दिली) आणि पैगंबरी(हि दिली). तर हे (मक्केचे नास्तिक) जर या (देणग्यां)ची किंमतहि न जाणतील, तर (कांहीं फिकिरीची गोष्ट नाहीं); आह्मीं या (देणग्या यांच्याहून उत्तम) अशा लोकां (ह्मणजे मुसलमानां)स सोंपविल्या आहेत कीं ते (या नास्तिकांसारखे) या(देणग्यां)प्रत कृतघ्न नाहींत. ९०. हे (पूर्व कालीन पैगंबर) असे लोक होत कीं ज्यांना परमेश्वरानें सरळ मार्ग दाखविला. तर (हे पैगंबरा!) त्यांच्याच पद्धतीचें (तूंहि) अनुकरण कर. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मी कुरआना(चे ऐकविण्या)चें तुह्मांपासून कांहीं वेतन तर मागित नाहीं. हें कुरआन् तर आलम दुनियेच्या लोकांसाठीं केवळ एक बोध होय, एवढेंच. ९१. आणि (यहुद्यांनीं) जशी परमेश्वराची मान्यता ठेविली पाहिजे होती तशी त्याची मान्यता ठेविली नाहीं. कांकीं ते (मुसलमानांशीं अढी बाळगून) ह्मणूं लागले कीं परमेश्वरानें कोणाहि मनुष्याला (पुस्तकासारखें) कांहींच प्रकट केलें नाहीं. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं बरें, जें (तौरात) पुस्तक मूसा घेऊन आला तें (परमेश्वरानें प्रकट केलें नाहीं तर) कोणी प्रकट केलें? (आणि तें) लोकांसाठीं प्रकाश (होय कीं त्याचे उजेडांत त्यांनीं चालावें) व सद्बोध होय. (आणि) तुह्मीं त्याचीं (वेगळीं वेगळीं) पानें बनवून ठेविलीं आहेत. (त्यांतून जीं पानें तुमच्या मतलबाचीं होत) तीं तुह्मीं (लोकांत) जाहीर करितां व बहुतेक (पानें जीं तुमच्या मतलबास विरोधक होत तीं तुह्मीं लोकांपासून) लपवितां.

---

(१) कित्येक पैगंबरांस तर परमेश्वरानें पैगंबरीचे पदाबरोबर जगाचें राज्यहि दिलें होतें आणि ज्यांना दिलें नाहीं त्यांनाहि पैगंबरीचे नात्यानें अशी अत्युच्च प्रकारची हुकमत मिळाली होती कीं तिच्या पुढें जगाच्या राज्याची कांहीं हकीकतच नव्हती.

आणि (ह्याच पुस्तकाचे द्वारा) ज्या गोष्टी ना तुम्हीं जाणत होतां व ना तुमचे वाडवडीलच, त्या तुह्मांस शिकविल्या गेल्या. (हे पैगंबरा! हे तर ह्याचें काय उत्तर देतील? तूंच त्यांना) सांग कीं (तें पुस्तक) परमेश्वरानेंच (प्रकट केलें होतें). नंतर तूं त्यांना सोड, (या) आपल्या निरर्थक उहापोहांतच (धर्माच्या गोष्टींचा) त्यांना खेळ बनवूं दे. ९२. आणि (तौरातप्रमाणें) हें (कुर्आनहि) जें आह्मीं प्रकट केलें आहे तें (दिव्य) प्रासादिक पुस्तक होय. तें ह्याच्या (प्रकटीकरणाचे) पूर्वी जीं पुस्तकें (अस्तित्वांत) होत त्यांचें सत्यत्वहि पटवितें. आणि (हे पैगंबरा! हें आह्मीं यासाठीं प्रकट केलें आहे) कीं तूं मुख्य शहरा (ह्मणजे मक्केकरां)स व जे कोणी त्याच्या आसमंतांत् वसतात त्यांस (ईश्वरशिक्षेचें) भय घालावेंस. आणि जे लोक परलोकींचा (पूर्ण) विश्वास ठेवितात ते तर (बिनदिक्कत) याचा विश्वास धरतात; आणि ते आपल्या नमाजीचीहि कळकळ बाळगितात (कीं तिचा वेळ टळत नाहीं.) ९३. आणि अशा मनुष्याहूनहि जास्त जालीम (आणखी) कोण होणार कीं जो परमेश्वरावर खोटें कुभांड रचितो, अथवा असें प्रतिपादितो कीं मजकडे प्रकटीकरण आलें आहे, आणि वास्तविक पाहूं जातां, त्याजकडे कसलेंच कांहीं प्रकटिलें गेलें नाहीं? आणि (तसाच याच्यापेक्षांहि जास्त जालीम आणखी कोण होणार कीं) जो असें विधान

(१) उम्मुलकुरा याचा शब्दशः अर्थ गांवांची माता वा मूळ गांव असा आहे. मक्का शहराचें एक नांव उम्मुलकुरा असेंहि आहे. त्या काळीं अज्ञान, अनीति व अधर्म यांचें जगांत केंद्रस्थान म्हटल्यास हें मक्का शहरच होतें आणि याच्या आसमंतांत राहणाऱ्यांचीं गोष्ट सांगावयास नकोच. आणि एकदां कां जगांतील या मुख्य शहराचा उद्धार झाला म्हणजे जवळपासच्या सर्व राष्ट्रांचा व अखिल जगाचा उद्धार होणार हें परमेश्वराच्या ज्ञानांत ठरलेलेंच होतें म्हणून हजरत मोहंमद पैगंबरांसारख्या महान पुरुषास निर्माण करून परमेश्वरानें या अधोगतीस गेलेल्या शहरास पुन्हां ज्ञान, नीति व धर्म यांचें केंद्रस्थान बनविलें. तर हे कलियुगाचे पैगंबर अखिल जगाचे उद्धारासाठीं पाठविले गेले आहेत.

करितो कीं (कुर्‌आन्) जें (तुह्मीं म्हणतां कीं तें) परमेश्वरानें प्रकट केलें आहे, (म्हणालतर) तसलेंच मी आतां प्रकट करीन? आणि (हे पैगंबरा!) तूं जर (या) जालीम लोकांस अशा वेळीं पाहाशील (तर फारच बरें होईल) कीं ते मृत्युचे मुमूर्षेत (पडलेले) असतील व देवदूत (त्यांचे प्राण हरण करण्यासाठीं त्यांजकडे) आपले हात लांबवितील (व म्हणत जातील) कीं (चला!) काढा आपले प्राण. आज तुम्हांस पाणउतान्याचे शिक्षेची सजा दिली जाईल; यासाठीं कीं तुह्मीं परमेश्वराविषयीं हकनाक खोटें बोलत होतां व त्याच्या महा वाक्यां(-स ऐकून त्यां) पासून अहंकार करीत होतां. ९४. आणि (पुनरुत्थानाचे दिवशीं आम्हीं त्यांना उद्देशून म्हणूं कीं) पहिल्यांदा जसें आम्हीं तुम्हांस निर्मिलें होतें तसेच एकटे एकटे तुम्हीं आमच्या हुजूर (अखेर) आलांच आलां. आणि जो कांहीं (साज सरंजाम) आम्हीं तुम्हांस (जगांत) दिला होता तो (सर्व) तुम्हीं आपल्या पाठीमागें सोडून आलां. आणि तुमच्या शिफारसकर्त्यांस आम्हीं तुम्हांबरोबर (कोठें) पाहत नाहीं कीं त्यांना तुम्हीं समजत होतां कीं ते तुमच्यांत (म्हणजे तुमचें निर्माण करणें, अन्नपाणी देणें वगैरे गोष्टींत परमेश्वराचे) सरकतदार होत! आतां तुमचे परस्पर हितसंबंध (सर्व) पार तुटून गेले आणि जे दावे तुम्हीं करीत होतां ते (सर्व) तुम्हांपासून झाले गेलेसे होऊन गेले. ९५. (हा दाणा व आठळी जी जमिनींत फुटून तींतून वृक्ष उगवतो तर) परमेश्वरच (त्या) दाण्या व आठळीचा उकलविता होय. (तोच) सजिवास निर्जिवांतून काढतो (उदाहरणार्थ, जशी कवटांतून कोंबडी); आणि सजिवांतून निर्जिवाचा काढणाराहि (तोच; उदाहरणार्थ, जसें कोंबडीपासून कवट). (लोकांनों!) हाच तर (तुमचा) परमेश्वर होय; मग तुम्हीं कोठें भटकत चाललां जात आहां? ९६. त्याच्याच केल्यानें सकाळचा झुंझुरका फुटतो; आणि त्यानेंच विश्रांति साठीं रात्र व (वर्षमासाचे) कालमानासाठीं सूर्य व चंद्र हीं बनविलीं आहेत. ही (त्याच) परम समर्थ व ज्ञानी अशा (परमेश्वरा)ची मांडणी होय. ९७. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें तुह्मां लोकांसाठीं तारे

बनविले; अशासाठीं कीं तुह्मीं खुषकी व जलमार्गांचे अंधःकारांत त्यां(च्या खुणा)वर चालावें. जे लोक समंजस होत त्यांच्यासाठीं तर आह्मीं (आपल्या सामर्थ्याच्या) निशाण्या (खूप) सविस्तर वर्णिल्या आहेत. ९८. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें तुम्हां (सर्वां)स एका जिवा (म्हणजे आदम)पासून पैदा केलें. तर मग (प्रत्येक जणासाठीं) एक वेळ मुक्रर होय (कीं त्या वेळे पावेतों तो जगांत राहील) आणि (तशीच मेल्या पश्चात मातींत) सोंपविलें (म्हणजे पुरलें) जाण्याची जागाहि होय. जे लोक समजतात उमजतात त्यांच्यासाठीं तर आम्हीं (आपल्या सामर्थ्याच्या) निशाण्या तपशिलवार सांगून चुकलों आहों. ९९. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें आकाशांतून पाणी वर्षविलें. मग (पाण्याचे वृष्टीनंतर) आम्हींच त्यायोगें दरेक प्रकारचे वनस्पतींस कोंब फुटाविले; मग कोंबांतून आम्हीं हिरवीं (हिरवीं) ताटें काढून उभीं केलीं कीं त्यांतून आम्हीं हारोहार गुंफलेले दाणे निपजवितों. आणि (तसेच) खजुरीच्या गाभ्यांतून झुमके (चे झुमके) कीं जे (ओझ्यामुळें) झुकून पडतात, आणि द्राक्षाच्या बागी व जैतून-जीतफळ- आणि डाळींब (कीं हीं दिसण्यांत एकमेकाशीं) मिळतींजुळतीं होत व (रुचीच्या मानानें) मिळतींजुळतीं नव्हत. (यांतून प्रत्येक चीज) जेव्हां फळास येते तेव्हां तिचें फळ व फळाचें पिकणें हें (प्रेक्षणीय होय; तें फार बारकाईनें) पाहा. निःसंशय जे लोक (परमेश्वरावर) विश्वास ठेवितात त्यांच्याकरतां या (सर्व चिजां)त (ईश्वरसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या (उपलब्ध) होत. १००. आणि मूर्तीपूजकांनीं जिन्नातांस परमेश्वराचे सरकतदार बनवून उभे केले; व वास्तविक पाहतां, परमेश्वरानेंच जिन्नातास पैदा केलें

(१) सांगण्याचा अर्थ इतकाच कीं जैतून ( olive ) असो वा डाळींब असो. फळें दिसण्यांत सारखींच असतात आणि रुचींत अगदींच विजातीय असतात.

(२) जिन्नात किंवा जिन्न या अरबी शब्दांस मराठींत कोणी प्रतिशब्द आहे असें मला तरी माहीत नाहीं. कारण त्याचा

आणि या लोकांनीं अज्ञानानें परमेश्वरासाठीं मुलें व मुलीं हीं (आपल्या कडून) घडून ठेविलीं. (परमेश्वराकडे) ज्या ज्या गोष्टी हे लोक लावितात त्यांपासून तो पवित्र व थोर होय. १०१. (तोच या अद्भुत) आकाशांचा व पृथ्वीचा उत्पादक होय. ज्या अर्थी त्याची कधीं कोणी (जन्माची) सोबतीणच झाली नाहीं त्या अर्थीं त्याला संतति ती कोठून होणार? आणि त्यानेंच हरेक वस्तु निर्माण केली व तो हरेक वस्तु(चे स्थिती)शीं वाकब होय. १०२. (लोकांनों!) हाच परमेश्वर तुमचा पालन-कर्ता होय. त्याच्या वांचून अन्य कोणी उपास्य नाहीं. तोच प्रत्येक वस्तुचा निर्माण कर्ता होय. तर तुम्हीं त्याचीच भक्ति करा. आणि तोच हरेक वस्तुचा नियंता होय. १०३. (लोकांची) दृष्टि त्याला जाणूं शकत नाहीं व तो (लोकांचे) दृष्टीस (खूप) जाणतो. आणि तो सूक्ष्मदर्शी व बहुश्रुत होय. १०४. (लोकांनों!)

---

अर्थ, दैवगण व राक्षसगण यांच्या मधल्या कोटींतील अदृश्य सृष्टि असा होतो. जिन्नात कांहीं सदाचरणी असतात व कांहीं दुराच-रणीहि असतात. ह्मणूनच कांहीं भाष्यकार, त्यांस येथें देवदूत समजतात कीं मूर्तीपूजक अरब त्यांची पूजाअर्चा करीत असत. कित्येक, भूत पिशाच वा असुर असा अर्थ घेतात; कारण, त्यांच्या बहकविण्यानें ते मूर्तीपूजक बनून त्यांचे भक्त झाले होते. अथवा मार्जी ह्मणजे अग्निपूजक पारश्यांचे धर्म-सांप्रदायानुसार पाहिलें तर ते सैतानास एक प्रकारचा कर्ताहर्ता मानीत होते व असें प्रतिपादन करीत कीं वाईट तेवढें सैतान ह्मणजे अहरमन करतो व चांगलें तेवढें परमेश्वर ह्मणजे यझदान करतो. तथापि 'दैवत' या शब्दांत वरील अर्थांचा कांहीं बोध होत असल्यामुळें आह्मी ह्या 'जिन्न' शब्दाचा अर्थ दैवत घेतला आहे. (पाहा अध्याय ५५).

(१) सांगण्याचें इतकेंच कीं परमेश्वर डोळ्यांनीं पाहण्याची वस्तु नव्हे पण तो सर्वांचें डोळ्यांस पाहतो. ह्मणजे ज्याप्रमाणें मनुष्याचें कोणतेंच काम परमेश्वरापासून गुप्त नाहीं त्याचप्रमाणें मनुष्याचें पाहणेंहि त्याला माहीत आहे. परंतु जर परमेश्वर स्वतःच दर्शन देऊं इच्छील तर तो त्या सेवकांस त्याची पात्रताहि देईल.

तुमच्या पालनकर्त्याकडून स्पष्ट प्रमाणें तर तुम्हांपाशीं येऊन चुकलीं आहेत. तर मग (आतां) जो कोणी पाहील (व समजेल), तर (त्याचा लाभ) त्याला स्वतःलाच होय; आणि जो (जाणून-बुजून) आंधळा होऊन जाईल तर (त्याचा दुष्परिणाम) त्याच्याचपुढें येईल. आणि (हे पैगंबरा! या लोकांस सांग कीं) मी तुम्हां (लोकां)चा कांहीं रखवालदार तर नाहींच. १०५. आणि अशाच तऱ्हेनें आम्हीं (आपल्या) निशाण्या (तऱ्हेतऱ्हेनें) फिरवून फिरवून सांगतों (कीं नास्तिकांस ह्यांचें प्रमाण पटावें) व हें कीं त्यांना हें बोलणें भाग पडावें कीं तूं (आम्हांला कुर्आन्) वांचून ऐकविलेंस (व समजाविलेंस); आणि हें कीं जे लोक समज राखतात त्यांना आह्मीं (कुर्आन्) स्पष्ट करून समजावावें. १०६ (हे पैगंबरा! कुर्आन्) जें तुझ्या पालनकर्त्याकडून तुला प्रकट केलें गेलें आहे त्याच्याच (सद्बोधा)प्रमाणें चालत जा. परमेश्वरावांचून अन्य कोणी उपास्य नाहीं; आणि तूं मूर्तीपूजकांपासून फटकून राहा. १०७. आणि जर परमेश्वर इच्छिता तर हे (कोणाला परमेश्वराचा) साथी न ठरविते. आणि आह्मीं तुला त्यांच्यावर (कांहीं) रखवालदार तर नेमिला नाहीं; व तूं त्यांचा रक्षकहि नव्हेस (कीं तूं त्यांना बहकूं न द्यावेंस). १०८. आणि (मुसलमानांनों!) जे लोक परमेश्वराशिवाय (इतरांस उपास्य म्हणून, गरजा सारण्यास) बोलावितात (म्हणजे त्यांची पूजाअर्चा करतात) त्यांस अपशब्द बोलूं नका कीं हे लोकहि द्वेषाचे भरांत

(१) येथें परमेश्वरानें लोकांस एक फार महत्वाचा उपदेश केला आहे. तो हा कीं कोणीहि दुसऱ्या कोणाच्या उपास्य देवांस, मग पाहिजे तर त्या मूर्तीच कां असेनात, अपशब्द बोलूं नये. कारण असें केल्यानें त्या लोकांसहि अज्ञानाचे भरांत आवेश येऊन ते परमेश्वराला अपशब्द बोलतील. शिआ पंथांतील जे लोक सहाबा ह्मणजे पैगंबरांच्या कित्येक सोबत्यांस अपशब्द बोलतात त्यांस या ईश्वरी महावाक्यापासून बोध घेतला पाहिजे. कारण ज्या धर्मांत अपशब्द बोलणें हें पुण्यफलदायक आहे त्यांस मोमीन ह्मणजे विश्वासू ह्मणविणें कितीसें शोभतें याचा त्यांनींच विचार करावा; कारण अशा कृतिनें ते आपण होऊन आपल्या स्वकियांस विरुद्धपक्षाकडून शिव्या

नकळत परमेश्वरास (हकनाक) अपशब्द बोलूं लागतील. अशाच तऱ्हेनें आह्मीं प्रत्येक जनतेचीं कर्में त्यांना सुशोभित करून दाखविलीं आहेत. नंतर (सरशेवटीं) या सर्वांस आपल्या पालनकर्त्याकडे परत जाणें आहे; तर जसजशीं कर्में ते (जगांत) करीत होते (त्यांचें बरें वाईट परमेश्वर) त्यांना विदित करील. १०९. आणि (मक्केचे नास्तिक) परमेश्वराच्या (फार) कडकडीत शपथा वाहून(वाहून मुसलमानांस) म्हणतात कीं जर (त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें) एखादा चमत्कार त्यांच्यापुढें येईल तर ते जरूर त्याचा विश्वास धरतील. (हे पैगंबरा! तूं मुसलमानांस) समजावून सांग कीं चमत्कार तर परमेश्वराच्याच पाशीं होत (म्हणजे त्याच्याच अधिकारांत होत.) आणि (मुसलमानांनों!) तुम्हीं लोक काय जाणाल कीं हे लोक तर चमत्कार आला तरीहि विश्वास धरणार नाहींत. ११०. आणि जसा त्यांनीं कुरआनावर पहिल्यांदा विश्वास ठेविला नव्हता, तशींच आम्हीं त्यांचीं हृदयें व त्यांचे डोळे हीं पालटून टाकूं (कीं ते चमत्कार पाहूनहि विश्वास धरणार नाहींत); आणि आह्मीं त्यांना त्यांच्या शिरजोरी(चे स्थितीं)त राहूं देऊं कीं त्यांनीं भटकतच राहावें. १११.

---

देववितात व ह्याचें पातक प्रथम अपशब्द किंवा शिवी देणारांवरच राहतें.

(१) हजरत पैगंबर साहेबांनीं पुष्कळ चमत्कार दाखविले त्यांतल्या त्यांत कुरआन् हाहि एक महान चमत्कारच होता. परंतु येथें परमेश्वराचें ज्ञानांत हें ठरलेलेंच होतें कीं हे लोक चमत्कार पाहूनहि विश्वास धरणार नाहींत असाच प्रकार हजरत येशू खिस्ताच्याहि पुढें आला होता. (पाहा लूक अध्याय १६:३१) या वरून पैगंबर साहेब चमत्कार दाखविण्यास असमर्थ होते असें ठरविणें वेडेपणाचें होय.

(२) हृदय पालटलें तर सरळ गोष्टहि समजणार नाहीं व डोळे पालटले तर कांहीं सुचणारहि नाहीं. म्हणून फरमाशी चमत्कार होऊन न होऊन सारखाच.

# पवित्र कुराण

## भाग आठवा.

### सूरतुल्-अन्आम् (पुढें चालू).

आणि जरी आह्मीं (आकाशांतून) यांजकडे देवदूतहि पाठवितों व मेलेले (लोक)हि यांच्याशीं संभाषण करते आणि जेवढ्या वस्तु (यांच्या दृष्टीआड) होत (उदाहरणार्थ, नरक, स्वर्ग वगैरे) त्या सर्वच एका जुटीनें यांच्या समक्ष आणून हजर करितों, तरीहि पण, हे ईश्वरीसंकल्पावांचून[1] विश्वासच न धरिते. परंतु यांच्यांतले बहुतेक (ईश्वरी संकल्पच) जाणीत नाहींत. ११२. आणि (हे पैगंबरा! ज्याप्रमाणें हे मक्केचे नास्तिक तुझ्याशीं वैर बाळगितात) त्याचप्रमाणें आह्मीं, दांडगीं व द्वाड मनुष्यें व जिन्नात यांस (पैगंबरांची सहनशीलता अजमाविण्यासाठीं) प्रत्येक पैगंबराचा एकेक दुशमन बनविला होता; कीं भूलथाप देण्याचे हेतुनें ते एकमेकांचे कानांत तिखटमीठ लावलेल्या गोष्टी भरवीत असत. आणि (हे पैगंबरा!) जर तुझा पालनकर्ता इच्छिता तर हे लोक अशी गोष्ट न करते. तर तूं यांना व यांच्या खोट्या कुंभाडास (परमेश्वरावर) सोडून दे (ह्मणजे तो यांना समजून घेईल.) ११३. आणि (ह्या द्वाडांचें एकमेकांस बहकवणें) यासाठींहि (होतें) कीं जे लोक परलोकींचा विश्वास ठेवीत नाहींत त्यांचीं मनें यांच्या

---

(१) ईश्वरी संकल्प तर हा होय कीं परमेश्वरानें मनुष्यास बऱ्या-वाईटाची जाणीव पटविली; आणि फक्त जाणीवच नव्हे तर आखत्यार व अधिकारहि दिला कीं तो वाईट मार्ग पत्करो वा बऱ्यामार्गावर चालो. बऱ्यावाईटाची जाणीव व अधिकार यांच्यामुळेंच मनुष्य आपल्या कर्मांबद्दल जबाबदार ठरविला गेला आहे.

(गोष्टी)कडे वळावींत व हें कीं त्या लोकांनीं यांच्या गोष्टी पसंत कराव्यात; आणि जीं बद्कर्मैं हे (खुद्द) करतात तीं त्यांनींहि करावींत. ११४. (हे पैगंबरा! तूं या लोकांस पूस,) कां (तुह्मीं हें इच्छितां कीं) मी (आपल्या व तुमच्या दरम्यान) परमेश्वराशिवाय (अन्य) कोणी पंच शोधावा? आणि वास्तविक पाहतां, तोच असा (परम पवित्र) होय कीं ज्यानें तुम्हां लोकांकडे (हें) पुस्तक पाठविलें कीं त्यांत (हर तऱ्हेचा) तपशील आहे. आणि (हे पैगंबरा!) ज्या लोकांस आम्हीं (तुझ्या पूर्वीं) पुस्तक दिलें आहे ते या गोष्टीलाहि (खूप) जाणतात कीं कुर्आन् देखील खरोखरीच तुझ्या पालनकर्त्याकडून प्रकटिलेलें आहे. तर (हे पैगंबरा! खबरदार!) तूं कोठें शंका धरणाऱ्यांपैकीं होऊन जाऊं नयेस. ११५. आणि तुझ्या पालनकर्त्याचा बोल[1] (म्हणजे इस्लामाचे उत्कर्षाचा वायदा) सत्यानें व न्यायानें परिपूर्ण झाला. कोणीहि असा (हेंकड) नव्हे कीं त्याच्या कोणा हुकमास बदलून टाकील! आणि तोच (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ११६. आणि (हे पैगंबरा!) बहुतेक लोक तर पृथ्वींत असे होत कीं जर तूं त्यांच्या कह्याप्रमाणें चालशील तर ते तुला परमेश्वराचे मार्गाहून बहकवून सोडतील. हे तर केवळ (आपल्या) मानसिक तर्काप्रमाणेंच[2] चालतात; आणि निवळ तर्क वितर्कच (बसल्याबसल्या) लढवितात, (झालें.) ११७. जे लोक परमेश्वराचे मार्गाहून बहकलेले आहेत, निःसंशय तुझा पालनकर्ताच त्यांना खूप जाणतो; आणि जे सरळ मार्गावर आहेत त्यांनाहि तोच खूप जाणतो. ११८. मग जर तुह्मां लोकांस त्याच्या हुकमांवर विश्वास आहे, तर ज्या (जबे केलेल्या प्राण्या)वर परमेश्वराचें

---

(१) ह्मणजे, अनादिकालीं ईश्वरी संकल्प असा झाला होता कीं कलियुगामध्यें एका पैगंबराचा आरब देशांत जन्म व्हावा व त्यांस असें कुराण प्रकट व्हावें कीं तें सर्व जगाचे सन्मार्गदर्शनार्थ पुरें होय. हा परमेश्वराचा हेतु परिपूर्ण झाला.

(२) ह्मणजे हे लोक, आमच्या मूर्तीपूजक पूर्वजांचा जो धर्म तोच खराधर्म, वगैरे आपल्या मनाच्या कल्पना व तर्क लढवीत होते.

नांव घेतलें गेलें असेल त्यांतूनच तुम्हीं खा. (आणि मूर्तीपूजकांच्या बहकविण्यानें मुडदार खाण्याकडे नजर दौडवूं नका). ११९. आणि ज्या (जबे केलेल्या प्राण्या)वर परमेश्वराचें नांव घेतलें गेलें असेल त्यांतूनच तुम्हीं न खावें याचें कारण काय? आणि वास्तविक पाहतां, ज्या (चिजा) परमेश्वरानें तुम्हांस निषिद्ध केल्या आहेत त्यांचें त्यानें तुह्मांस सविस्तर वर्णन केलें आहे; (व त्यांत मुडदारहि दाखल होय.) परंतु जी (वस्तु निषिद्ध तर आहे पण भूक वगैरे यामुळें) तुम्हीं तिच्या (खाण्या)स्तव लाचार होऊन जाल (तर तीहि निषिद्ध नाहीं.) आणि बहुतेक लोक तर चौकशी केल्या-वांचून खामखा आपल्या मनेच्छेप्रमाणें (लोकांस) बहकवीत राहतात. (हे पैगंबरा!) जे लोक (धर्मशास्त्राचें) मर्यादेबाहेर निघून जातात, त्यांच्या (स्थितीं)शीं तुझा पालनकर्ताच खूप वाकब होय. १२०. आणि (लोकांनों!) तुम्हीं उघड[1] पाप व गुप्त पाप या(सर्वांहि)चा त्याग करा. जे लोक पापार्जन करितात त्यांना त्यांच्या पापार्जनाचा लवकरच मोबदला दिला जाईल. १२१. आणि ज्या (जबे केलेल्या प्राण्या)वर परमेश्वराचें नांव घेतलें गेलें नसेल त्यांतून तुह्मीं खाऊं नका. आणि (त्यांतून खाणें) हें अर्थात आज्ञाभंग करणें होय. आणि सैतान तर आपल्या गड्यांच्या मनांत हें ध्वनित करीतच असतात कीं त्यांनीं तुह्मांशीं वितंडे[2]वाद करावा.

---

(१) यांत याकडे इषारा आहे कीं निषिद्ध व मना केलेला पदार्थ चोरी छपींहि खाऊं नका.

(२) गोष्ट ही होय कीं मूर्तीपूजक व अनेकदेवमतवादी लोक तर मुडदार खातहि होते; व तसेच आतांहि आमच्या हिंदुस्थानदेशांत बहुतेक जातीचे लोक मुडदार ह्मणजे आपोआप मेलेलीं व ईश्वरार्पण न केलेलीं किंवा धर्मशास्त्रनिषिद्ध जनावरें खातात. आणि मुसलमानांस परमे-श्वरानें मुडदार जनावरें निषिद्ध केलीं आहेत. ह्मणून मूर्तीपूजक लोक मुसल-मानांशीं वितंडवाद करीत कीं मुडदार जें परमेश्वरानें मारलेलें त्याच्या खाण्याविषयीं तर तुह्मीं जपतां व आपण मारलेलें तें बिनधोक खाऊन टाकतां! कित्येक मुसलमानांस जबे केलेलें जनावर शास्त्रविहित व शुद्ध कां

आणि जर तुह्मीं त्यांचा कह्या मानिला तर (असें समजलें जाईल कीं) निःसंशय तुह्मींहि (परमेश्वराचे) सरकतदार मानणारेच आहां. १२२. आणि कां जो (मनुष्य पूर्वीं) मेलेला होता, मग आह्मीं त्याच्यांत जीव घातला व त्याला एक प्रकाश दिला कीं त्याच्या प्रभावानें तो लोकांत (खासा) चालतो फिरतो तो, ज्याची उपमा[१] अशी आहे कीं तो (नानाविध) अंधःकारांत (घेरून पडला) आहे कीं त्यांतून तो निघूं शकत नाहीं त्याच्यासारखा होऊं शकतो? (ज्या प्रमाणें हे लोक आहाराचे विधिनिषेधासंबंधीं वितंडवाद करतात) त्याच प्रमाणें (या) नास्तिकांस जें कांहींहि ते करितात तें बरेंच (बरें) दिसूं लागतें. १२३. आणि (ज्याप्रमाणें हे लोक सद्धर्माचे विरुद्ध खटपट करतात) त्याचप्रमाणें आह्मीं हरेक वस्तींत बडेबडे लोक पैदा केले कीं तेच त्या वस्तींतले पापीहि होते; अशासाठीं कीं त्यांनीं त्या वस्तींत फंदफितूर माजवावा. आणि जेवढे

---

व मुडदार जनावर निषिद्ध कां हें समजलेलें नसावें; तथापि वास्तविक पाहतां मुडदार जनावरांचें मांस वैद्यकशास्त्राच्या नियमांनुसार फारच अहितकारक होय. अशा वितंडवादामुळें कित्येक मुसलमानांस असें वाटूं लागलें कीं मुडदार खाल्लें गेल्यास काय अडचण? परमेश्वरानें त्याच्या विधिनिषेधाचें कारण दिलें नाहीं; कांकीं वैद्यकीचीं तत्वें समजणें हें प्रत्येकाचें काम नव्हे. परंतु सरळ रीतीनें एवढें मात्र सांगितलें कीं मुसलमानांस कारण शोधण्याची काय जरूर आहे? परमेश्वराची आज्ञा बस्स करते. मुसलमान जे जनावरांस जबे करतात त्यांत दोन गोष्टी होत. एक तर असें जबे करण्यांत वैद्यकशास्त्रानुसार मोठाच उपयोग व हित होय. दुसरें असें कीं परमेश्वराचें नांव घेऊन शास्त्रांत सांगितलेल्या नियमाप्रमाणें जबे केल्यानें हिंसा घडत नाहीं व ईश्वरार्पण केल्यानें, अनेक देवमतवाद व मूर्तीपूजा ह्या, बुद्धिश्रेष्ठ मानवांस न शोभणाऱ्या मतांचे खंडन होतें आणि जबे केलेलें जनावर ईश्वर नामार्पण होऊन त्याला पुढें सद्गती प्राप्त होते.

(१) परमेश्वरानें ही उपमा नास्तिकाची दिली कीं नास्तिक व श्रद्धावान मुसलमान हे उभयतां बरोबर होऊं शकत नाहींत.

फंदफितूर ते माजवितात तेवढे आपल्याचठायीं (ते माजवितात;) व (हें इंगित) त्यांना कळून येत नाहीं. १२४. आणि जेव्हां त्यांच्या-पाशीं (कुरआनाचें) कोणी महावाक्य येतें, तेव्हां ते ह्मणतात कीं जशी (पैगंबरीची पदवी) परमेश्वराच्या पैगंबरांना दिली गेली आहे तशीच जोंपर्यंत आह्मांलाहि न दिली जाईल तोंपर्यंत आह्मीं तर केव्हांहि विश्वास धरणारच नाहीं. (पण) परमेश्वर ज्या जागीं आपली पैगंबरी(ची ठेव सोंपवून) देतो, (त्या जागेचा सुर-क्षितपणा व विश्वसनीयताहि) तो खूप जाणतो. जे लोक (स्वच्छंदी पणाचे) अपराधी होत त्यांना लवकरच त्यांच्या प्रपंचा व फंदफितुराबद्दल परमेश्वरासमीप क्षुल्लकपणा व कडक शिक्षा पोहों-चणार आहे. १२५. तर ज्या कोणाला परमेश्वर इच्छितो कीं त्यानें त्याला सरळमार्ग दाखवावा तो त्याची छाती इस्लाम (अंगि-कारण्या)साठीं मोकळी करितो. आणि ज्या कोणाला तो इच्छितो कीं त्यानें त्यास बहकवावें, तो त्याची छाती अखुड व संकुचित करून टाकितो, जणूं कीं त्याला (बळेंच) आकाशांत चढावें लागतें. जे लोक विश्वास धरीत नाहींत त्यांच्यावर अशाच तऱ्हेनें परमेश्वर धिःकार पाडतो. १२६. आणि (हे पैगंबरा!) हा (इस्लामधर्मच) तुझ्या पालनकर्त्याचा सरळ मार्ग होय. जे लोक मनन (व विचार) करतात त्यांच्याकरितां तर आह्मीं (आपल्या) निशाण्या तपशीलवार वर्णून चुकलों आहों. १२७. त्यांच्या पालनकर्त्यासमीप त्यांच्यासाठीं शांति (व सुख-) धाम (ह्मणजे स्वर्ग तयार) होय. आणि (जगांत) जीं (चांगलीं) कामें ते करीत राहिले त्यांच्या मोबदल्यांत तोच त्यांचा (हरेक प्रकारें) पुरस्कर्ता होईल. १२८. आणि ज्या दिवशीं परमेश्वर (मनुष्यें व जिन्नात) या सर्वांस (आपल्या हुजुरांत) एकत्र गोळा करील (आणि सैतानांस उद्देशून ह्मणील कीं) हे जिन्नांतचे मंडलांनों! मानवांपैकीं तर तुह्मीं बराच बहुजन-

(१) येथें जिन्नात ह्मणजे सैतान किंवा मनुष्याच्या मनांत वाईट गोष्टीची प्रेरणा करणारी भूत सृष्टि असा अर्थ होय.

समाज आपलासा करून घेतला; आणि मानवांतून (जे लोक जगांत) सैतानांचे दोस्त (बनून गेले होते ते) ह्मणतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! (जगांत) आह्मीं एकमेकांपासून लाभ[1] घेत राहिलों, आणि (कर्मफल भोगण्याचा) जो काल तूं आह्मांकरितां नेमून दिला होतास, त्या आपल्या मुदतीस आमची मजल येऊन पोहोंचली. (आतां काय हुकूम होत आहे? त्यावेळीं परमेश्वर) हुकूम करील कीं तुमचें (सर्वां)चें ठिकाण नरकाग्नि होय; त्यांतच सर्व काल राहाल; मग पुढें परमेश्वराची (ह्मणजे आमची) मर्जी. (हे पैगंबरा!) निःसंशय तुझा पालनकर्ता बुद्धिमान् (व सर्वांच्या स्थितींशीं) वाकब होय. १२९. आणि अशाच तऱ्हेनें आम्हीं कित्येक जुलमी लोकांस इतर कित्येकांत सामील[2] करून टाकूं; ते (जगांत) जें करीत असत त्याच्या मोबदलाच (हें होय). १३०. (मग मी जिन्नात व मानव या उभयतांस संबोधून विचारीन कीं) अहो जिन्नात व मानव समूहांनों! कां तुह्मांकडे तुह्मांमधूनच पैगंबर आले नाहींत कीं ते तुह्मांला माझे नियम सांगीत आणि तुमच्या ह्या (पुनरुत्थानाचे) दिवसाचे नजरानजर होण्यापासून तुह्मांला भिववीत? ते ह्मणतील कीं आम्हीं आपणच आपल्या विरुद्ध साक्ष

(१) सैतानांनीं बहकवून ज्या मनुष्यांस आपलेसे केले होते तें सैतानांतर्फे असें उत्तर देतील कीं त्यांत ते आपला अपराध स्पष्टपणें कबूल करतील कीं आह्मीं एकमेकांपासून लाभ घेत राहिलों; ह्मणजे आह्मीं त्यांच्याबरोबर होतों ह्मणून त्यांचा समूह वाढला व ते आह्मांवर हुकूम चालवित राहिले; आणि आह्मीं हा लाभ घेतला कीं जगांत चैन मारीत राहिलों व सर्व प्रकारचीं पापें केलीं; येथपावेतों कीं हिशेब देण्याचा वेळ येऊन थडकला.

(२) ह्मणजे ज्या प्रमाणें आह्मीं पुनरुत्थानाचें दिवशीं मनुष्यांस व त्यांना बहकवणारे जे सैतान त्यांस नरकांत एकें जागीं, गोळा करूं; त्याच प्रमाणें इतर जुलमी लोकांसहि त्यांच्याचसारख्या लोकांबरोबर नरकांत एकत्र जमवूं. उदाहरणार्थ नास्तिक, मूर्तीपूजक व बडे लोक यांस, जे लोक त्यांच्या कह्यांत येऊन जातात त्यांच्या सोबत ठेवूं.

देतों (म्हणजे आपला गुन्हा कबूल करितों). आणि (खरोखरच) या जगाचे आयुष्यानें त्यांना फसनणूकींत घातलें. व (आतां) त्यांनीं आपणच आपल्याविरुद्ध साक्ष दिली (ह्मणजे कबूल केलें) कीं निःसंशय ते नास्तिक होते. १३१. (हे पैगंबरा! पैगंबरांस पाठवून प्रमाण सिद्ध करणें) हें यामुळें होय कीं तुझा पालनकर्ता गांवचेगांव जोर जुलमानें नष्ट करणारा नव्हे; (कीं इकडे त्यांचा नाश करून टाकावा) आणि (तिकडे) तेथील रहिवाशी (ईश्वरेच्छेकडून) बेफाम असावेत! १३२. आणि (लोकांनीं) जसजशीं कर्में केलीं आहेत त्या (कर्मा)नुसारच प्रत्येकांचे दर्जे होतील. आणि जें कांहीं (लोक जगांत) करीत आहेत त्यांशीं तुझा पालनकर्ता अजाण नाहीं. १३३. आणि (तसाच) तुझा पालनकर्ता निरपेक्ष व करुणामय होय. जर तो इच्छील तर तुह्मां (सर्वां) स (यालोकांतून उचलून) घेऊन जाईल आणि जसें तो दुसऱ्या लोकांचे वंशांतून (अखेर) तुह्मांस पैदा करूनच चुकला आहे तसेंच तुमच्यामागून तो ज्याला इच्छील त्याला तुमच्या जागीं आणील. १३४. ज्या (पुनरुत्थानाचे दिवसा)चा तुह्मां लोकांस वायदा केला जातो तो निःसंशयेंकरून अवश्य येईलच. आणि तुह्मीं (परमेश्वराला ही गोष्ट करण्यास) भाग पाडूं शकत नाहीं, (कीं त्यानें पुनरुत्थान होऊं न द्यावें.) १३५ (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं हे माझ्या लोकांनों! तुम्हीं आपल्या जागीं कर्म आचरा; मीहि (आपल्या जागीं) कर्म आचरीत आहें. मग पुढें तुह्मांस माहीत होईल कीं परलोकींचा (उत्तम) परिणाम कोणाला (प्राप्त) होतो? (पण) ह्यांत तर शंकाच नाहीं कीं जुलमी[1] लोक (कोणाहि प्रकारें) सफल व्हावयाचे नाहींत. १३६. आणि (हे नास्तिक लोक) परमेश्वरानें जीं शेतें व गुरेंढोरें उत्पन्न केलीं त्यांतून परमेश्वराचाहि एक हिस्सा ठरवितात. तर ते आपल्या कल्पनेप्रमाणें ह्मणतात (काय) कीं इतका तर परमेश्वराचा व इतका आमच्या

(१) जुलूम याचा मूळचा अर्थ हक्कांची पायमल्ली असा होतो. तर जुलमी ह्मणजे हक्कांची पायमल्ली करणारा; मग तो हक्क मानवांचा असो वा परमेश्वराचा असो.

सार्थींचा (म्हणजे ज्या इष्ट मूर्तींस आम्हीं परमेश्वराचा सरकतदार मानितों त्यांचा). मग (त्यांचें वर्तन हें असतें कीं) जो (हिस्सा) त्यांच्या (ठराविक) सरकदारांचा असतो तो तर परमेश्वराला पोहोंचत नाहीं; आणि जो (हिस्सा) परमेश्वराचा असतो तो त्यांच्या (ठराविक) सरकतदारांस पोहोंचून जातो. (हे लोक) जो (हिस्से रशीचा) हुकूम लावतात तो किती तरी वाईट होय! १३७. आणि अशाच तऱ्हेनें बहुतेक मूर्तीपूजकांस त्यांच्या (ठराविक) सरकतदारांनीं खुद्द त्यांचींच मुलें मारून टाकणें हें (त्यांच्या नजरेंत) उत्तम करून दाखविलें आहे; अशासाठीं कीं (अखेर) त्यांनीं त्यांस (सतत) पायमल्लींत घालावें व हें कीं त्यांचा धर्म त्यांना भ्रांतिमूलक करून टाकावा; (कीं त्यांना सरळ मार्गच सुचूं नये.) आणि परमेश्वर इच्छिता, तर हे लोक हें (निर्दयपणाचें कार्य) न करते. तर (हे पैगंबरा!) यांना व यांच्या फंदफितुरांस (परमेश्वरावर) सोडून दे. (तो त्यांशीं समजून घेईल). १३८. आणि (हे लोक हेंहि) आपल्या तर्कानें म्हणत असतात कीं हीं (अमुक) गुरें ढोरें व (अमुक) शेत पवित्र (व अस्पर्श्य) होत; कीं ज्याला आम्हीं इच्छूं त्याच्याशिवाय त्यांस अन्य कोणी चाखूं शकत नाहीं. आणि (कांहीं) गुरें (अशीं) होत कीं त्यांच्या पाठीं(वर स्वारी करणें व ओझीं लादणें यां)ची मनाई केली गेली आहे; आणि (कांहीं) गुरें (अशीं) होत कीं

---

(१) मूर्तीपूजक अरब जे नवस चढवीत असत त्यांत एक हिस्सा परमेश्वराचाहि ठेवीत असत व बाकी मूर्तींचा. मग पुढें त्यांना जर असें माहीत झालें कीं परमेश्वराला अर्पिलेलें जनावर मोठें ताजें आहे, तर तें बदलून मूर्तीकडे करून टाकीत. परंतु मूर्तींच्या हिशाचे उत्तम नवसाची परमेश्वराकडे बदली करीत नसत; कारण, त्यांना मूर्तींची प्रसन्नता हवीशी होती. ह्मणूनच ते त्यांचा जास्त विचार ठेवीत असत.

(२) मूर्तीपूजकांच्या धर्ममतांत हेंहि असे कीं जनावरास मूर्तीवर चढवीत तेव्हां तो एक खास प्रकारचा नवस होई व तो मूर्तीच्या पुजाऱ्याशिवाय कोणालाहि खातां येत नसे. या वाक्यांत याच गोष्टीकडे इशारा आहे.

त्यां(च्या जबे करते वेळीं त्यांच्या)वर ते परमेश्वराचें नांव घेत नाहींत. आणि (या भाकड कथांचा संबंध परमेश्वराशीं दाखवितात; तर) परमेश्वरावर (हें त्यांचें) कुभांड होय. तर जसजसें कुभांड हे लोक रचितात त्याची परमेश्वर त्यांना लवकरच सजा देईल. १३९. आणि ते (हेंहि) ह्मणत असतात कीं (आह्मीं जीं गुरेंढोरें मूर्तीस वाहून ठेविलीं आहेत) या गुरांढोरांच्या पोटीं जो (बच्चा येईल व त्यांत जीव) असेल तर तो निवळ आह्मा पुरुषां(चे खाण्या)करितां होय व आमच्या स्त्रियांस (त्याचें खाणें) निषिद्ध होय. आणि जर तो (बच्चा) मेलेला निपजेल तर स्त्रिपुरुषें (सर्वच) त्याच्या (खाण्यां)त पातीदार होत. (पण) परमेश्वर त्यांना त्यांच्या या बातांबद्दल लवकरच सजा देईल. निःसंशय तो सत्यसंकल्प व ज्ञानी होय. १४०. ज्या लोकांनीं मूर्ख समजुतीनें व अज्ञानानें आपलीं मुलें मारून टाकिलीं, ते खरोखरच (मोठ्या) तोट्यांत होत. आणि परमेश्वरानें त्यांना जें (पोटापाण्यास) पुरविलें होतें तें त्यांनीं परमेश्वरावर कुभांड रचून (आपल्याठायीं) निषिद्ध करून घेतलें. निःसंशय हे लोक (सन्मार्गाहून) बहकून गेले व ते सरळ मार्गावर येणारहि नव्हते. १४१. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें बागबगीचे पैदा केले, (त्यांत कांहीं तर मांडवावर) चढविलेले (जशा द्राक्षवेली) आणि (कांहीं) न चढविलेले; आणि खजुरीचीं झाडें व शेत कीं ज्यांचीं फळें भिन्नभिन्न (प्रकारचीं) असतात, आणि जैतफल व डाळिंब, (कीं हीं कांहीं तर रूप, आकृति व रुचि यांत) एकमेकाशीं मिळतींजुळतीं होत व (कांहीं) मिळतीं-जुळतीं नसतातहि. (लोकांनों!) हीं (झाडें) जेव्हां फळें देतील तेव्हां तुम्हीं त्यांच्या फळांतून (बेलाशक) खा. आणि (यांच्या उपकार स्तुत्यर्थ) त्यांच्या कापणी (व तोडणी)च्या दिवशीं परमेश्वराचा हक्क (ह्मणजे जकात त्यांतून) देऊन टाकीत जा व उधळाउधळ करूं नका; कां कीं उधळाउधळ करणारांस परमेश्वर पसंत करीत नसतो. १४२. आणि (त्याच परमेश्वरानें) गुरांढोरांत (कांहीं उंच काठींचीं,) ओझीं वाहणारीं (पैदा केलीं, कीं जसे उंट) आणि (कांहीं) जमिनीस

लागून असलेलीं (कीं जीं लादलीं जात नाहींत, जशा शेळ्या मेंढ्या. लोकांनों!) परमेश्वरानें तुह्मांस जें (खाण्यास) दिलें त्यांतून (बेलाशक) खा; आणि सैतानाच्या पदोपदीं चालूं नका. कारण कीं तो तुमचा बोलूनचालून शत्रु होय. १४३. (परमेश्वरानें हीं गुरेंढोरें नर व मादी अशीं) आठ प्रकार(चीं पैदा केलीं आहेत;) मेंढ्यांतून (नर मादी अशा) दोन आणि शेळ्यांतून (नर मादी अशा) दोन. (आतां हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं (परमेश्वरानें मेंढ्या व शेळयांच्या) दोघां नरांस निषिद्ध ठरविलें आहे कीं दोघीं माद्यांस? अगर (या) दोघीं माद्यांच्या गर्भकोशांनीं ज्या (बच्चां)चा समावेश करून घेतला आहे त्यांस? जर तुह्मीं (आपल्या विधानांत) खरे आहां तर मला (याचा) ज्ञानोक्त आधार दाखवा. १४४. आणि उंटांतून (नर व मादी असे) दोन व बैलां(चे जातीं)तून (नर व मादी असे) दोन. (आतां हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं (परमेश्वरानें उंट व बैल या) दोघां नरांस निषिद्ध केलें आहे कीं दोघीं माद्यांस? अगर (या) दोघीं माद्यांच्या गर्भकोशांनीं ज्या (बच्चां)चा समावेश करून घेतला आहे त्यांस? किंवा ज्या वेळीं परमेश्वरानें तुह्मांस या (वस्तु निषिद्ध करण्या)ची ताकीद दिली होती त्या वेळीं तुम्हीं खुद्द (तेथें) हजर होतां? तर जो मनुष्य लोकांस बहकवण्यासाठीं[1] समजल्या उमजल्यावांचून परमेश्वरावर खोटें कुभांड रचितो त्याच्यापेक्षां आणखी जास्त जुलमी कोण होणार? निःसंशय परमेश्वर आज्ञाभंजक लोकांस सन्मार्गाची बुद्धि देत नसतो. १४५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (ज्या वस्तूंस तुह्मीं निषिद्ध

---

(१) मूर्तीपूजक अरबांत उंट, बैल, मेंढी व शेळी हीं गुरांढोरांपैकीं चारच हलाल करण्याच्या व नवस व बळी चढविण्याच्या कामाचीं होतीं. आणि ह्यांतच ते लोक भ्रममूलक व खोट्या रीतिभाती सामील करून टाकीत. ह्मणून परमेश्वरानें या वस्तूंचा खुलासा करून दिला; आणि मूर्तीपूजकांच्या भ्रममूलक चाली रीतींचा वर उल्लेख होऊन चुकलाच आहे.

म्हणतां त्या वस्तूंतून) कोणी भक्षणारा कांहीं भक्ष्य करील, तर मजकडे जें दिव्य प्रकटीकरण आलें आहे त्यांत तर मी, त्याला कोणी वस्तु निषिद्ध अशी पावत नाहीं. परंतु हें कीं ती वस्तु मुडदार असेल अगर वाहतें रक्त वा डुकराचें मांस, तर निःसंशय या वस्तु अशुद्ध होत; अथवा तसेंच (जें जनावर) आज्ञा भंगास कारणीभूत होईल कीं परमेश्वराखेरीज दुसऱ्या कोणा करितां (वधलें व) नामनिर्दिष्ट केलें गेलें असेल(तें). यावरही जो कोणी (भुकेनें) निरुपाय होईल (व तो) आज्ञाभंगाचा इरादा ठेवीत नसेल व (अगत्याचे मर्यादेचें) उल्लंघनहि करणारा नसेल (तो या अशुद्ध वस्तूंतील कांहीं खाऊन जाईल); तर (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता निःसंशय क्षमाकर्ता व दयाळू होय. १४६. आणि यहुद्यांस आम्हीं सर्व नखवाले (प्राणी) निषिद्ध करून टाकले होते; आणि (तशीच) आम्ही बैल व बकरे यांजपैकीं दोहोंची चरबीहि त्यांस निषिद्ध करून टाकली होती. पण जी (चरबी) त्यांच्या पाठींवर लागून असेल अथवा आंतड्यांवर, किंवा हाडकांशीं मिळालेली असेल ती (निषिद्ध नव्हती. हा निर्बंध लावून दिल्यानें) ही, आम्हीं त्यांना त्यांच्या शिरजोरीची शिक्षा दिली होती; (कीं त्यांना उपजीविकेची टंचाई भासावी). आणि आम्हीं खचितच खरें सांगतों. १४७. (हे पैगंबरा!) यावरहि जर हे लोक तुला पाखंडी ह्मणतील तर (यांना) सांग कीं तुमचा पालनकर्ता (फारच) व्यापक दयानिधि होय, व (ह्मणूनच अजून तुह्मीं शिक्षेस पोहोंचलां नाहीं; पण हें कोठपर्यंत?) पापी लोकांपासून त्याची शिक्षा (सतत तर) टळणारच नाहीं. १४८. (परमेश्वराचे) सरकतदार मानणारे असेंहि प्रतिपादितील कीं जर परमेश्वर इच्छिता, तर ना आह्मीं (कोणाला त्याचा) सरकतदार मानतों व ना आमचे वाडवडीलच; आणि आह्मीं कोणा (शुद्ध) वस्तूस (आपणच आपल्यासाठीं) निषिद्ध न ठरवितों. अशाच तऱ्हेनें जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत ते (पैगंबरांना) पाखंडी म्हणत असत; येथपर्यंत कीं (अखेर) त्यांनीं आमच्या शिक्षेची गोडी चाखलीच (चाखली. हे पैगंबरा! या लोकांस) पूस, कां तुम्हांजवळ कांहीं ज्ञानोक्त आधारहि

आहे कीं तो आह्मां(स दाखविण्या)साठीं काढाल (व पुढें कराल)? (आधार तर तुह्मांपाशीं कांहीं नाहींच.) तुह्मीं निव्वळ वहिमावर चालतां, व निव्वळ अनुमानच अनुमान लढवीत असतां! १४९. (हे पैगंबरा! यांना) सांग कीं (तुह्मीं हारलां, व) परमेश्वराचें प्रमाण (तुमच्याठायीं) पुरतें सिद्ध झालें. मग जर तोच इच्छिता, तर तो तुह्मां सर्वांस (सद्धर्माचा) मार्ग दाखवून देता. १५०. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं ह्या (ज्या चिजा तुह्मीं निषिद्ध ह्मणतां त्या) परमेश्वरानें निषिद्ध केल्या आहेत अशी जे लोक साक्ष देतील त्या आपल्या साक्षीदारांस आणून हजर करा. मग जर (ते साक्षी आणितील व ते त्यांच्यासारखी) साक्षहि देतील, तर तूं त्यांच्याकडे होऊन त्यांच्यासारखे बोलूं नकोस आणि अशा लोकांचे मनेच्छे प्रमाणें चालूं नकोस कीं ज्यांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड ह्मटलें व जे शेवट(च्या दिवसा)चा विश्वास ठेवीत नाहींत व ते (इतर खोट्या उपास्यांना) आपल्या पालनकर्त्याचे बरोबर समजतात. १५१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग

---

(१) मक्केचे नास्तिक जेव्हां प्रमाणें देऊन सिद्धांत करण्यास अशक्त होत, तेव्हां ते ईश्वरी संकल्पाची गोष्ट पुढें करीत. परंतु ते मर्जी व संकल्प यांत फरक करीत नसत. परमेश्वरानें या जागीं मर्जी व संकल्प यांचा भेद उत्तम प्रकारें दाखविला आहे; कीं जी परमेश्वराची मर्जी होती ती पैगंबराद्वारें प्रकट केली गेली. आणि लोकांस अखत्यार दिला गेला कीं त्यांनीं चांगला मार्ग पत्करावा किंवा वाईट मार्गावर चालावें. वाईटांनीं पैगंबरांस पाखंडी ह्मटलें व जाणूनबुजून वाईट मार्ग पत्करला. ह्मणून ते अपराधी ठरले व त्यांच्याठायीं परमेश्वराचें प्रमाण पुरतें सिद्ध झालें. ईश्वरी संकल्पाशीं व ह्याशीं कांहीं संबंधच नाहीं. ईश्वरी संकल्प ही एक वेगळीच गोष्ट होय. यांत संशय नाहीं कीं परमेश्वर इच्छिता तर सर्वच सरळ मार्गावर चालते. पण त्यानें असें इच्छिलें कीं लोकांनीं आपल्या इराद्यानें सरळ मार्ग पत्करावा. तर लोकांचे कर्माशीं ईश्वरी संकल्प संबद्ध नाहीं. किंबहुना खुद त्यांचाच संकल्प लागून आहे; ह्मणजे ईश्वरी संकल्प असा होता कीं लोकांनीं आपल्या संकल्पानें बरेंवाईट हवें तें करावें.

कीं (इकडे) या, मी तुह्मांस तुमच्या पालनकर्त्यानें निषिद्ध केल्या आहेत त्या चिजा वाचून ऐकवितों; (त्या) अशा कीं तुह्मीं कोणत्याहि वस्तुस परमेश्वराचा सरकतदार ठरवूं नका व आईबापांशीं परोपकार करीत जा आणि गरिबाई (येण्याच्या धास्ती)नें आपल्या बालकांची हत्या करूं नका. (कारण,) आह्मींच तुह्मांलाहि (पोटास) देतों व त्यांनाहि; आणि निर्लज्जपणाच्या गोष्टी ज्या जाहीर असतील व ज्या गुप्त असतील त्यांपैकीं कोणाचे जवळहि फिरकूं नका. आणि जीव ज्या(च्या मारण्या)ला परमेश्वरानें निषिद्ध केलें आहे त्याची हत्या करूं नका; पण सत्य कारणांमुळेंच मात्र. परमेश्वरानें ज्यांचा तुह्मांस हुकूम दिला आहे त्या ह्या (गोष्टी होत;) कीं कदाचित् तुह्मीं (जगव्यवहाराची रीत) समजाल. १५२. आणि अनाथ बालकाच्या मालापाशींहि जाऊं नका; पण अशा रीतीनेंच मात्र कीं ती (त्यांच्याठायीं) उत्तम असेल; येथपर्यंत कीं तो आपल्या भरजवानीस पोहोंचेल. आणि न्यायपुरस्सर पुरें पुरें माप व (पुरा पुरा) तोल द्या. आम्हीं कोणाहि मनुष्यावर त्याच्या शक्ति पलिकडे बोजा टाकीत नाहीं. आणि (साक्ष देतांना व न्याय निवडतांना) जेव्हांहि तुम्हीं बोलाल तेव्हां (मुकदम्यांतील पक्षकार) जरी (आपले) आप्तहि असले तरी न्यायच करा; आणि परमेश्वराचा करार पुरा करा. परमेश्वरानें ज्या (गोष्टीं)ची तुह्मांस आज्ञा केली आहे त्या (गोष्टी) ह्या होत; कीं कदाचित् तुह्मीं बोध धराल. १५३. आणि (त्यानें) हेंहि (फर्मावलें आहे) कीं हाच माझा सरळ मार्ग होय. ह्मणून तुम्हीं त्याचेंच अनुकरण करा; आणि (इतर भलत्याच) मार्गांवर चालूं नका कीं हे परमेश्वराचे मार्गाहून (बहकवून) तुमची दाणादाण करून सोडतील. (सारांश,) परमेश्वरानें ज्या (गोष्टीं)चा तुह्मांस हुकूम दिला आहे (त्या साऱ्या गोष्टी) ह्या होत; कीं कदाचित् तुह्मीं परमेश्वराला भिऊन वागाल. १५४. नंतर (एक गोष्ट हीहि होय कीं) आह्मीं मूसाला (तौरात) पुस्तक दिलें कीं तेणें करून जो

(१) जसें मूड उगविणें वगैरे.

कोणी सुकृत्यें करितो त्याच्यावर आमची देणगी परिपूर्ण झाली; आणि त्यांत प्रत्येक गोष्टीचा तपशील, व (लोकांसाठीं) सद्बोध व दया हीं होत. (आणि हें पुस्तक मूसाला या हेतुनें दिलें गेलें होतें) कीं लोकांना (तें वाचून ऐकून शेवटीं) आपल्या पालनकर्त्याच्या भेटण्याचा (पक्का) विश्वास पटावा. १५५. आणि हें पुस्तक (म्हणजे कुर्‌आनूहि कीं) आह्मींच तें प्रकटिलें आहे; एक प्रासादिक (पुस्तक) होय. ह्मणून त्याचेच (हुकमा)प्रमाणें चाला व परमेश्वराला भीत राहा; नवल नाहीं कीं तुह्मांवर दया केली जाईल. १५६. (आणि हे अरब मूर्तीपूजकांनों! आह्मीं हें पुस्तक यासाठीं प्रकटिलें आहे) कीं (न जाणो, उद्यांला) कोठें तुह्मीं हें ह्मणूं लागाल कीं आह्मां पूर्वीं (यहुदी व खिस्ती) फक्त या दोनच लोकसमूहांकडे पुस्तक पाठविलें गेलें होतें; आणि आह्मीं तर त्याच्या पठनपाठनापासून बिलकुल अजाणच होतों. १५७. अथवा तुम्हीं हें (निमित्त) सांगूं लागाल कीं जर आह्मांस पुस्तक सादर केलें गेलें असतें, तर आम्हीं जरूर या (यहुद्या व खिस्त्यां)-पेक्षांहि जास्त सरळ मार्गावर असतों. तर आतां तुमच्या पालन-कर्त्याकडून तुह्मांपाशीं स्पष्ट प्रमाण व सद्बोध व दया (हीं सर्व तर) येऊन चुकलीं. तर मग अशा मनुष्याहून जास्त जुलमी आणखी कोण होईल कीं जो परमेश्वराच्या निशाण्यांस पाखंड ह्मणील व त्यांजपासून माघार घेईल? जे लोक आमच्या निशाण्यांपासून माघार घेतात, त्यांना आम्हीं त्यांच्या तोंड चुकविण्याबद्दल लवकरच वाईट माराची शिक्षा देऊं. १५८. (हे पैगंबरा!) कां हे लोक या गोष्टीचीच वाट पाहताहेतना कीं (त्यांचे प्राण काढण्यासाठीं) देवदूत त्यांच्यापाशीं येऊन हजर व्हावेत, अगर तुझ्या पालनकर्त्यानें (खुद्द) त्यांच्या पाशीं यावें, किंवा तुझ्या पालनकर्त्याची कांहीं चिन्हें (म्हणजे पुनरुत्थानाचीं महा चिन्हें) जाहिर व्हावींत?

(१) ह्मणजे परमेश्वरानें समजाविण्यांत कांहीं बाकी ठेविली नाहीं. पैगंबर पाठविले व पुस्तकें प्रकट केलीं; यावरहि लोक समजत नाहींत. तर असें वाटतें कीं हे लोक ज्या वेळीं विश्वासाचा कांहीं उपयोग

(पण,) ज्या दिवशीं तुझ्या पालनकर्त्याचीं कांहीं चिन्हें (म्हणजे पुनरुत्थानाचीं महा चिन्हें) जाहीर होतील, त्या दिवशीं ज्या मनुष्यानें याच्यापूर्वींच विश्वास धरिला नाहीं, अगर विश्वासा(चे स्थितीं)त ज्यानें कांहीं भलाई संपादिली नाहीं; आतां त्याचें विश्वास धरणें त्याला कांहींच फलप्रद होणार नाहीं. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (जर तुह्मीं या गोष्टीची वाट पाहतां तर बरें,) वाट पाहा; आह्मीं (मुसलमानहि) वाट पाहतच आहों. १५९. (हे पैगंबरा!) ज्या लोकांनीं आपल्या धर्मांत फूट टाकली व पंथें पंथ होऊन गेले; तुला त्यांच्या (भानगडी)शीं कांहीं कर्तव्य नाहीं. त्यांचे प्रकरण केवळ परमेश्वराचेच हवालीं होय, (कीं तो त्यांचा हिशेब घेईल.) नंतर जें कांहीं (जगांत) ते करीत असत (त्याचें बरेंवाईट) तो त्यांना विदित करील. १६०. जो मनुष्य (पुनरुत्थानाचे दिवशीं) पुण्य घेऊन येईल, तर त्याच्या दसपट त्याला (पुण्य प्राप्त) होईल. आणि जो पाप घेऊन येईल तर मात्र तेवढीच शिक्षा त्याला दिली जाईल; आणि लोकांवर (कोणा तऱ्हेचा) जुलूम केला जाणार नाहीं. १६१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मला तर माझ्या पालनकर्त्यानें सरळ मार्ग दाखवून दिला आहे;

---

होणार नाहीं त्या वेळीं विश्वास धरतील; ह्मणजे मरते वेळीं वा पुनरुत्थानाचे जवळ जवळ अथवा पुनरुत्थान झाल्यावर.

(१) ह्मणजे खऱ्याखोट्याचा फैसला जर पुनरुत्थानावरच ठेवितां व त्याचीच वाट पाहतां; तर आह्मींहि पुनरुत्थानाची वाटच पाहतों. परंतु आमच्या व तुमच्या वाट पाहण्यांत फरक एवढाच कीं तुह्मांस त्याच्या येण्याची खातरी नाहीं व आह्मांस त्याची पक्की खातरी आहे. तुह्मीं त्यास खेळ समजून बसलां आहां व आह्मीं त्यास भयंकर प्रसंग जाणितों.

(२) हें वाक्य यहुद्या व खिस्त्यांसाठीं प्रकट झालें आहे. पण फार दुःखाची गोष्ट ही कीं लहानलहान गोष्टींत आह्मी खुद्द मतभेद करितों; व कित्येक वेळां दुहीचा वाईट परिणामहि भोगितों. तरीहि त्यापासून माघार घेत नाहीं. मुसलमानांत शिआ व सुन्नी हे पंथ होण्याचें कारण धर्मविषयक नसून राजकीय होतें. त्यांस धर्माचें स्वरूप देणें चुकीचें आहे.

कीं तोच नीट धर्म होय, (ह्मणजे) इब्राहिमाचा मार्ग कीं तो एका (परमेश्वरा)चाच होऊन राहिला होता; आणि तो मूर्तीपूजकांपैकींहि नव्हता. १६२. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझी नमाज व माझी (अक्षय) भक्ति, आणि माझें जिणें व माझें मरणें (हीं सर्व) परमेश्वर जो सकल जगांचा पालनकर्ता त्याच्याच प्रीत्यर्थ होत. १६३. कोणीहि त्याचा सरकतदार नाहीं; आणि मला असाच हुकूम दिला गेला आहे; व मी (त्याच्या) आज्ञाधारकांपैकीं[1] पहिला (आज्ञाधारक) आहें. १६४. (हे पैगंबरा! यांना) पूस, कां (तुमची ही मर्जी आहे कीं) मी परमेश्वराशिवाय अन्य कोणी पालनकर्ता शोधावा? व वास्तविक पाहतां, तोच सर्व वस्तूंचा पालनकर्ता होय. आणि प्रत्येकजण (जें कांहीं पापपुण्य) संपादन करितो तें त्याच्याचपुढें येईल. आणि कोणीहि मनुष्य कोणा दुसऱ्या(चे पापां)चा बोजा (आपल्यावर) घेणार नाहीं. नंतर तुह्मां(सर्वां)स आपल्या पालनकर्त्याकडेच परत जाणें आहे. (जेव्हां तुह्मीं त्याच्या हुजुरांत हजर व्हाल,) तेव्हां (जगांत) ज्या(ज्या गोष्टीं)त तुह्मीं मतभेद करीत राहिलां त्या (सर्व) तो तुह्मांस विदित करील; (कीं कोण सत्यावर व कोण असत्यावर होता?) १६५. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें भूलोकांत तुह्मांस (आपले) प्रतिनिधि बनविले आहेत (कीं तुम्हीं जगाच्या वस्तूंवर आपली सत्ता चालवावी); आणि त्यानें तुमच्यांत (वैभव, सामर्थ्य व अधिकार यांच्या मानानें) कित्येकांचे कित्येकांवर दर्जे वाढविले; अशासाठीं कीं त्यानें ज्या (देणग्या) तुह्मांस दिल्या आहेत त्यांत तुमची (कृतज्ञता व आज्ञाधारकपणा यांची) परिक्षा पाहावी. (हे पैगंबरा!) निःसंशय तुझा पालनकर्ता जलद शिक्षा देणारा होय; व यांतहि शंका नाहीं कीं तो क्षमाकर्ता व दयाळूहि होय. १६६.

---

(१) मुसलमान हा पराशियन शद्ब होय; आणि मुस्लिम या अरबी शद्बावरून घेण्यांत आला आहे. त्याचा अर्थ आज्ञाधारक असा होतो.

# अध्याय ७ वा.

## सूरतुल्-आअराफ.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. ह्यांत २०६ महा वाक्यें उर्फ आयात आहेत. आअराफ ह्मणजे स्वर्ग व नरक यांच्या मधील जें तट वा अडकण तें. हा शब्द याच अध्यायांत ४६ व्या वाक्यांत आला आहे त्यावरून या प्रकरणाचें आअराफ हें नांव पडलें.

**परम दयाळु (आणि) कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

**अ. ल. म. स. (अलेफ–लाम–मीम-सॉद.) १. (हे पैगंबरा! हें) पुस्तक तुला यासाठीं सादर केलें गेलें आहे कीं तूं त्याच्याद्वारें (नास्तिकांस ईश्वरी शिक्षेचें) भय घालावेंस व विश्वासूंस बोध व्हावा; तर या (पुस्तका)मुळें तुझ्या मनांत (कोणाहि तऱ्हेचा) संकोच न झाला पाहिजे. २. (लोकांनों! हें कुर्आन्) जें तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हांस सादर झालें आहे, त्याच्याच (सद्बोधा)प्रमाणें तुह्मीं चालत जा; आणि परमेश्वराखेरीज (स्वकपोलकल्पित) पुरस्कर्त्यांचें (म्हणजे उपास्यांचें) अनुकरण करूं नका. (पण) तुह्मीं लोक फारच थोडें मनन करितां! ३. आणि कित्येक वस्त्या अशा होत कीं त्यांचा आह्मीं विध्वंस करून टाकिला, (कां तर लोकांनीं आमचा आज्ञाभंग केला); तर रात्रीच्या समयीं त्या (वस्त्यां)स आमच्या शिक्षेनें येऊन गांठिलें अगर (अशा वेळीं कीं) दुपारीं**

ते आराम घेत होते. ४. पण ज्या वेळीं आमची शिक्षा त्यांच्यावर येऊन थडकली, त्या वेळीं त्यांच्यानें ह्याशिवाय आणखी कांहींच बोलवलें नाहीं कीं ते ह्मणूं लागले कीं आम्हींच जुलमी होतों. ५. (आणि ज्या दिवशीं पुनरुत्थान घडून येईल) तेव्हां ज्या लोकांकडे पैगंबर पाठविले गेले होते त्यांना आह्मीं जरूर पुसूंच पुसूं आणि (खुद्द) पैगंबरांनाहि अवश्य पुसूंच पुसूं. ६. मग वस्तुस्थिति जी आह्मांस (खूप) माहीत आहे, तीहि आह्मीं त्यांना अवश्यच वर्णन करूं. आणि आह्मीं (त्यांचे हातून कर्म घडते वेळीं) कोठें गैरहजर तर (होऊन गेलोंच) नव्हतों. ७. आणि (कर्मांचें) वजन त्या दिवशीं (बिलकुल) नीट (रीतीनें) होईल. तर ज्यां(च्या) सुकृत्यां)चें वजन भारी होईल, तेच लोक (आपल्या मनोरथांत) सफल होतील. ८. आणि ज्यां(च्या सुकर्मां)चें वजन हलकें भरेल हेच ते लोक होत कीं ज्यांनीं यामुळें आपणच आपलें नुकसान केलें कीं ते आमच्या महा वाक्यांशीं अन्याय करीत होते. ९. आणि (हे मानवलोकहो!) आह्मीं तुह्मांस पृथ्वींत (राहण्याची व त्यांत सत्ता चालविण्याची) प्रशस्तता दिली व त्यांतच तुह्मांकरितां आह्मीं जिवित्वाचीं साधनेंहि ठेविलीं. (पण) तुह्मीं किंचितच आभार मानितां! १०. आणि आह्मींच तुम्हांस (म्हणजे तुमचा पिता 'आदम' यास) निर्मिलें व नंतर आह्मींच तुमचें (म्हणजे तुमचा पिता 'आदम' याचें) रूप घडिलें. तदनंतर आह्मीं देवदूतांस फर्माविलें कीं तुह्मीं 'आदम'चे पुढें नमन करा; तेव्हांच (सर्वांनीं) नमन केलें. पण इब्लीस, हा नमन करणारांत (सामील) झाला नाहीं. ११. (परमेश्वरानें इब्लीसला) विचारिलें कीं जेव्हां मी तुला हुकूम दिला तेव्हां ('आदम'चे पुढें) नमण्यापासून तुला कोणत्या वस्तुनें अटकाव

(१) कर्मांचा जाब तर प्रत्येक मनुष्यापासून घेतला जाईल. मग तो पैगंबर असो कीं आणखी कोणी. पैगंबरांस त्यांच्या संदेश पोहोंचविण्यासंबंधीं पुसलें जाईल कीं ईश्वरी निरोप पोहोंचविण्यांत त्यांनीं कोठवर प्रयत्न केले; आणि त्यांच्या अनुयायींस पुसलें जाईल कीं त्यांनीं पैगंबराच्या उपदेशाचा कोठपर्यंत अवलंब केला व त्याप्रमाणें चालले?

केला! तो बोलला, मी याच्यापेक्षां श्रेष्ठ आहें. (कांकीं,) मला तूं अग्नीपासून निर्मिलेंस व त्याला मातींतून पैदा केलेंस. १२. (यावर परमेश्वरानें) फर्माविलें (कीं तुला ही शेखी आहे,) तर स्वर्गांतून खाली उतर. कांतर, तुला हें शोभत नाहीं कीं तूं स्वर्गांत (राहून) शेखी मिरवावीस! तर (येथून) निघ, (बाहेर हो) कीं (हजारों) क्षुल्लकांतला (एक क्षुल्लक) तूंहि आहेस. १३. तो अर्ज करूं लागला कीं ज्या दिवशीं (सर्व) लोक (पुन्हां जिवंत) उठवून उभे केले जातील त्या दिवसापर्यंतचा तूं मला अवकाश दे. १४. (परमेश्वरानें) म्हटलें (जा, मंजूर,) तूं अवकाश दिलेल्यांपैकीं आहेस. १५. (यावर सैतान) बोलला कीं जशीं तूं माझी वाट मारली आहेस, मीहि तसाच तुझ्या सरळ मार्गावर मनुष्यजातीस टपून बसेन तरच सई. १६. मग मी आदरून त्यांच्या समोरून येईन व त्यांच्यामागून (येईन); आणि त्यांच्या उजवीकडून (येईन) व त्यांच्या डावीकडून (येईन; व कसेंहि करून त्यांना बहकवून सोडीन.) आणि तूं बहुतेक मनुष्यजातीस (आपले) आभारी पावणार नाहींस. १७. (परमेश्वरानें) फर्माविलें कीं स्वर्गांतून निघ, (बाहेर हो; आणि तूं) तुच्छ व (दरबारांतून) बहिष्कृत झालेला (आहेस). मनुष्यमात्रांतून जो कोणी तुझें अनुकरण करील, मी निःसंशय (तुझ्यानें व त्यांच्यांनीं ह्मणजे) तुह्मां सर्वांनीं जहन्नम भरून टाकीन. १८. आणि (मी 'आदमला' ह्मटलें कीं) हे 'आदमा'! तूं व तुझी पत्नि ('हव्वा') स्वर्गांत राहा; आणि जेथून तुह्मांस हवें असेल तेथून खा (प्या.) पण या (गव्हाचे) झाडाजवळहि फिरकूं नका. (असें कराल) तर तुह्मीं (आपणच आपलें) नुकसान करून घ्याल. १९. मग सैतानानें उभयतां (पतिपत्नीं)स बहकविलें अशासाठीं कीं त्यानें त्यांची काया जी त्यांच्या (दृष्टी)पासून झांकलेली होती ती त्यांना खुली करून दाखवावी. आणि तो (त्या उभयतांस) ह्मणूं लागला कीं तुमच्या पालनकर्त्यानें ह्या झाडा(चें फळ खाण्या)ची तुह्मांस जी मनाई करून टाकिली आहे, तर असो नसो, तिचें कारण हेंच आहे कीं कोठें (असें न व्हावें कीं) तुह्मीं उभयतां देवदूत बनून जाल अगर दोघेहि सतत (जिवंत) राहाल. २०. आणि तो त्यांच्याशीं

शपथा वाहून वाहून म्हणाला कीं निःसंशय मी तुह्मांस (चांगली) सल्लामसलत देणारांपैकीं आहें. २१. सारांश, भूलथाप देऊन त्यानें त्यांस (निषेधित झाडाचें फळ खाण्याकडे) वळविलें. तर त्यांनीं त्या झाडा(च्या फळा)ला चाखलें तों लागलेंच त्या उभयतांनाहि आपली काया उघडी दिसूं लागली; व ते स्वर्गा(च्या बागे)चीं पानें आपल्या (अंगा)वर चिटकावूं लागले. आणि त्यांच्या पालनकर्त्यानें त्यांना मोठ्यानें दटाविलें, कां मी तुह्मांस ह्या झाडा(चे खाण्या)पासून मनाई केली नव्हती? आणि कां तुह्मांस सांगून दिलें नव्हतें कीं सैतान तुमचा बोलून चालून दुशमन आहे? २२. ते उभयतां ह्मणूं लागले कीं हे आमच्या पालनकर्त्या! आह्मीं आपणच आपल्यावरतीं जुल्म[१] गुदरला; आणि जर तूं आह्मांस क्षमा न करशील व आह्मांवर दया न करशील, तर आह्मीं अजीबात हानिं भोगणारांपैकीं होऊन जाऊं. २३. (यावर परमेश्वरानें) फर्माविलें कीं (तुह्मीं पतिपत्नी व सैतान, तिघे स्वर्गांतून) खालीं उतरून जा. तुमच्यांत एकाचा एक शत्रु होय. आणि तुह्मां (मनुष्यजाती)स एका नियमित वेळे (ह्मणजे मरण-समया)पर्यंत पृथ्वीवर राहणें (होईल;) आणि (तुमचीं जीवन-) साधनेंहि (तेथेंच संग्रहीं होत.) २४. (परमेश्वरानें हेंहि) बजाविलें कीं तुह्मीं पृथ्वींतच आयुष्यक्रमण कराल व तींतच मराल आणि तींतूनच (पुनरुत्थानाचे दिवशीं पुन्हां) काढून उभे केले जाल. २५. हे आदमाचे मुलांनों! आह्मीं तुह्मांसाठीं (असा)

---

(१) या शब्दांनीं आदम व हव्वा यांनीं आपला गुन्हा कबूल केला व पश्चात्ताप पावून परमेश्वराची दया व क्षमा भाकिली. याच प्रमाणें बायबलांत उत्पत्ति अध्याय ३:९–१३ मध्यें या उभयतांनीं आपला गुन्हा पदरीं घेतला व पश्चात्ताप केला आहे. कारण, आदम यांनीं म्हटलें आहे कीं 'मी नग्न आहें असें समजून भ्यालों व लपलों;' (पाहा उत्पत्ति ३:१०). म्हणजे मी अपराधी आहें असें समजून मला भय वाटलें व लज्जा व खेद उत्पन्न होऊन मी लपलों. तर हा त्यांचा प्रश्चात्ताप झाला आणि पश्चात्तापानें पापाचें क्षालन होतें हें तत्व बायबलास व कुराणासहि मान्य आहे. तेव्हां आदमचें मूळचें पाप असें कांहींच राहिलें नाहीं. म्हणून मनुष्य हा मूळचा पापी आहे असें खिस्ती पाद्र्यांचें मानणें चुकीचें व निरधार आहे.

पोशाक पाठविला आहे कीं जो तुमची काया झांकील व भूषणहि (होईल). आणि (ईश्वर-)भयाचा पोशाक हा (सर्व पोशाकांत) अत्युत्तम होय. हें (ह्मणजे पोशाकाचें होणें) परमेश्वराच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं होय; कीं कदाचित् लोक (या गोष्टीचें) मनन करतील. २६. हे आदमाचे मुलांनों! सैतानानें जसें तुमचे आईबाप (आदम व हव्वा) यांस स्वर्गांतून काढविलें, व त्यांचा (स्वर्गीय) पोशाक त्यांच्या (अंगा)वरून उतरवूं लावला कीं तेणेंकरून त्यांची काया त्यांना (उघडी करून) दाखवावी; तसेंच (पाहा! कोठें) त्यानें तुह्मांस (ईश्वरी मार्गाहून) बहकवून न सोडावें! (एवंच, सैतानाचे बहकविण्याविषयीं जपून वागा; कांकीं,) तो व त्याचे साथी तुह्मांला, जेथून तुह्मीं त्यांना पाहत नाहींत तेथून पाहतात. आह्मीं सैतानांस, जे लोक विश्वास धरीत नाहींत अशांचेच दोस्त बनविले आहेत. २७. आणि (ते असे उद्धट होत कीं) जेव्हां ते एखादें निर्लज्जपणाचें कृत्य करून बसतात, तेव्हां ते ह्मणतात कीं आह्मीं आपल्या वडिलांस ह्याच (मार्गा)वर (चालतांना) पावलों; आणि परमेश्वरानें आह्मांस त्याची परवानगी दिली आहे. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं परमेश्वर तर निर्लज्जपणाच्या कृत्याची परवानगी देत नसतो. तर कां ज्या गोष्टींचें तुह्मांस ज्ञान नाहीं अशा (नसत्या कुभांडाच्या) गोष्टी तुह्मीं परमेश्वराविषयीं बोलतां? २८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझ्या पालनकर्त्यानें तर (नेहमीं) वाजवी (व रास्त कृत्यांचा) हुकूम दिला आहे. आणि (त्यानें असें आज्ञापिलें आहे कीं) प्रत्येक नमाजीचे वेळीं तुह्मीं (सर्व परमेश्वराकडे) आपलीं तोंडें नीट करा; आणि त्याच्याच आज्ञाधारणेकडे दृष्टि देऊन शुद्ध श्रद्धेनें त्यास बोलवा.

---

(१) बाहेरील पोशाक कांहीं अंशानें शरिराचीं व्यंगें व दोष लपवितो आणि परमेश्वराला भिऊन वागल्यानें अंतरंगांतील व्यंगें व दोष ह्मणजे अनीतिमत्ता हीं दूर होतात.

(२) ह्मणजे सैतान मनुष्याच्या मनांत तऱ्हेतऱ्हेचे भ्रम व शंका उपस्थित करीतो; पण मनुष्य हा सैतानांस पाहूं शकत नाहीं.

जसें त्यानें तुह्मांस प्रथम (पैदा) केलें होतें तसेंच तुम्हीं दुसऱ्यांदाहि (पैदा) व्हाल. २९. त्यानेंच एका लोकसमूहास सरळ मार्गाची बुद्धि दिली; आणि एक लोकसमूह असा आहे कीं ते आडमार्गीं भटकण्यासच पात्र होत. या लोकांनीं परमेश्वराला सोडून सैतानांस (आपले) मित्र बनविले, व (असें असतांहि) ते समजतात कीं ते सरळ मार्गावर आहेत. ३०. हे आदमाचे मुलांनों! प्रत्येक नमाजीच्या वेळीं भूषण(-पर व सभ्यतेचें वस्त्र) परिधान करीत जा; आणि तुह्मीं खा व प्या; आणि उधळपट्टी करीत जाऊं नका. कांकीं, परमेश्वर उधळपट्टी करणारांस प्रीय ठेवीत नाहीं. ३१. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं परमेश्वरानें भूषणा(च्या जिन्नसा) व खाण्यापिण्याचे निर्मळ पदार्थ जे आपल्या सेवकांसाठीं पैदा केले आहेत त्यांस कोणी निषिद्ध केलें आहे? (ते तर ह्याचें काय उत्तर देतील! तूंच त्यांना) समजावून दे कीं ज्या लोकांनीं ह्या जगिक आयुष्यामध्यें विश्वास धरिला आहे, पुनरुत्थानाचे दिवशीं ह्या (देणग्या) खासकरून त्यांनाच (दिल्या जातील.) अशाच तऱ्हेनें आह्मीं आपले हुकूम जे लोक जाणतात बुजतात त्यांच्याकरितां सविस्तर वर्णितों. ३२. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझ्या पालनकर्त्यानें तर केवळ निर्लज्जपणाचे कामांचा निषेध केला आहेः (मग) तीं (निर्लज्जपणाचीं कामें) जाहीर असोत कीं गुप्त असोत; आणि (तसाच) पापाचा व हकनाक (व विनाकारण) दांडगाईचा; आणि या गोष्टीचा कीं परमेश्वरानें ज्याचेसंबंधीं कोणतेंच प्रमाण पाठविलें नाहीं अशा कोणालाहि तुह्मीं परमेश्वराचा सरकतदार ठरवावा; आणि हें कीं

---

(१) भावार्थ असा कीं सृष्टि व जें कांहीं त्यांत आहे तें सर्व मानवलोकांसाठीं निर्माण केलें गेलें आहे; मग तो नास्तिक असो कीं आशांकित मुसलमान. शास्त्रोक्त भूषणाच्या जिन्नसा व खाण्यापिण्याचे शुद्ध पदार्थ यांचा कोणालाहि प्रत्यवाय नाहीं. पण पुनरुत्थानाचे दिवशीं नास्तिकांस ह्या देणग्या वर्ज्य होतील ह्मणजे ते ह्यांस अंतरतील. तर जो कोणी मुसलमान होऊन शास्त्रोक्त भूषणाच्या जिन्नसा व खाण्याचे शुद्ध पदार्थ आपण होऊन आपणास वर्ज्य करील, तर तो तें परमेश्वराचे मर्जीविरुद्ध करितो.

ज्या गोष्टींचें तुह्मांस ज्ञान नाहीं त्या गोष्टी तुह्मीं परमेश्वराविषयीं बोलाव्या. ३३. आणि प्रत्येक जनते(च्या मिटण्या)चा एक काळ (नियमित) होय. मग जेव्हां त्यांचा काळ येऊन पोहोंचतो तेव्हां (त्यापासून) ते एक घटकाभर ना मागें राहूं शकतात व ना (एक घटकाभर) पुढें जाऊं शकतात. ३४. हे आदमाचे मुलांनों! जेव्हां कधीं तुमच्यांतूनच (माझे) पैगंबर तुह्मांपाशीं येतील व माझे हुकूम तुह्मांस वाचून वाचून ऐकवितील, तेव्हां (त्यांचा कह्या मानीत जा, कांकीं) जो कोणी (त्यांच्या कह्याप्रमाणें परमेश्वराचें) भय बाळगील व (आपली स्थिति) सुधारील; तर (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांना (कसलेंच) भय राहणार नाहीं व ते (कोणा तऱ्हेनें) दुःखीहि होणार नाहींत. ३५. आणि जे लोक आमच्या निशाण्यांस पाखंड म्हणतील व त्यापासून अहंकार करतील, तेच नरकवासी होतील. ते निरंतर नरकांतच राहतील. ३६. तर जो कोणी परमेश्वरावर खोटें (खोटें) कुभांड रचील अगर त्याच्या निशाण्यांस पाखंड म्हणेल, त्याच्याहूनहि आणखी जास्त जुलमी कोण होणार? हेच लोक होत कीं ज्यांना (त्यांच्या प्रारब्ध-)लेखांतून त्यांचा (अन्नपाणी वगैरेचा) वाटा तर पोहोंचेल; येथपर्यंत कीं जेव्हां आमचे दूत त्यांचे प्राण हरण करण्यासाठीं त्यांच्यापुढें येऊन हजर होतील, तेव्हां ते (त्यांना) विचारितील कीं तुह्मीं ज्यांना परमेश्वराशिवाय (गरज सरण्यास) बोलावीत होतां, ते (आतां) कोठें आहेत? तर ते म्हणतील कीं ते तर आह्मांपासून (कोठेंसे) गडप होऊन गेले व आपणच आपल्या विरुद्ध साक्ष देतील (म्हणजे कबूल करतील) कीं निःसंशय ते नास्तिक होते. ३७. (यावर परमेश्वर त्यांना) बजावील कीं जिन्नात व मनुष्यकोटींतील इतर (नास्तिक) जनता, ज्या तुमच्यापूर्वीं होऊन गेल्या आहेत त्यांच्यांत (सामील होऊन) तुह्मींहि नरकाग्नींत जाऊन दाखल

(१) याच्या सुरुवातींत इतकें आणखी अवगत मानिलें पाहिजे:—(जेव्हां आह्मीं आदमला आज्ञाभंगाचे शिक्षेंत स्वर्गांतून काढिलें तेव्हां त्याच्या वंशाचे आत्म्यास गोळा करून हेंहि बजाविलें होतें कीं).

व्हा. (जरी हे लोक सर्वच नरकांत जातील, तरीही ते एकमेकांचे इतके शत्रु होतील कीं) जेव्हां कधींहि एक जनता (नरकांत) जाईल, तेव्हां ती आपले भगिनी (ह्मणजे दुसऱ्या जनते)ला शाप देईल; येथपर्यंत कीं जेव्हां सारेचे सारेच एकामागें एक नरकांत गोळा होतील, तेव्हां यांच्यांतून मागील जनता आपल्या पुढील जनतेसंबंधानें असे उद्गार काढील कीं हे आमचे पालनकर्त्या! ह्याच लोकांनीं आह्मांस बहकविलें, तर तूं त्यांना नरकाग्नीची दुप्पट शिक्षा दे. (यावर परमेश्वर) फर्मावील कीं (तुह्मांपैकीं) प्रत्येकींस दुप्पट (शिक्षा होय). परंतु तुह्मांस (याचें कारण) माहीत नाहीं. ३८. आणि (हें ऐकून) त्यांच्यांतले पहिले लोक आपल्या मागील लोकांस ह्मणतील कीं आतां तर तुह्मांस (शिक्षेचे कंवेशीबद्दल) आह्मांवर कोणातऱ्हेची सरशी राहिली नाहीं. तर (ज्याप्रमाणें आह्मीं आपल्या कर्मांच्या मोबदला दुप्पट शिक्षेची गोडी चाखत आहों त्याचप्रमाणें तुह्मींहि) आपल्या पापार्जनाबद्दल (दुप्पट) शिक्षेची गोडी चाखा. ३९. यांत संशय नाहीं कीं ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें व त्यांपासून अहंकार

---

(१) ह्मणजे जर तुमच्या पूर्वीच्या लोकांनीं कोणी एखादा वाईट कित्ता घालून दिला कीं त्यामुळें तुह्मीं बहकलां; तर तुह्मीं त्यांची परिस्थिति पाहून चांगला धडा कां घेतला नाहीं? वाईट कित्ता घालून देणें ही त्यांची चूक आणि त्यांची परिस्थिति पाहून चांगला धडा न घेणें हा तुमचा अपराध होय; दोघेहि बरोबरच. ते वाईट कित्ता घालून दिल्यानें दुप्पट शिक्षेस यासाठीं पात्र झाले कीं आपण वाईट केलें व दुसऱ्यालाहि वाईट करण्याचें उत्तेजन दिलें; आणि तुह्मांस दुप्पट शिक्षा याकरितां झाली कीं तुह्मीं वाईट केलें व मागें होऊन गेलेल्या लोकांची परिस्थिति पाहून जागृत झालां नाहींत. किंबहुना आंधळ्यां-प्रमाणें त्यांच्या मागें मागें चालूं लागलां; अगर हें कीं जसा तुह्मां पूर्वीच्या लोकांनीं तुह्मांकरितां वाईट कित्ता घालून दिला तसाच तुह्मींहि तुमच्या मागून येणाऱ्या लोकांसाठीं वाईट कित्ता घालून दिला.

केला, त्यांच्यासाठीं आकाशाचे दरवाजे उघडले[1] जाणार नाहींत व ते स्वर्गांतहि दाखल होणार नाहींत; येथपर्यंत कीं उंट सुईच्या[2] नाकामधून (न) जाईल. आणि अपराध्यांस आह्मीं अशीच शिक्षा देत असतों; ४०. कीं त्यांच्याकरितां नरकाग्नीचेंच अंथरूण होईल व त्यांच्या वरून (त्या अग्नीचेंच) पांघरूण (होईल). आणि शिरजोर लोकांस आह्मीं अशीच शिक्षा देत असतों. ४१. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (यथाशक्ति) चांगलीं कामेंहि केलीं—(आणि) आह्मीं तर कोणाहि मनुष्यावर त्याच्या शक्तिपलिकडे बोजा टाकीतच नाहीं—हेच लोक स्वर्गवासी होतील; कीं ते त्यांत निरंतर राहतील. ४२. आणि जी कांहीं त्यांच्या मनांत (एकमेकांकडून या लोकींची) चुरस असेल तीहि आह्मीं काढून टाकूं. त्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; व ते बोलूं लागतील कीं ज्यानें आह्मांस हा (स्वर्गाचा मार्ग) दाखविला त्या परमेश्वराचे (मोठेच) आभार! आणि जर परमेश्वर आह्मांस सरळमार्गाची बुद्धि न देता, तर आम्हीं (कोणाहि प्रकारें स्वर्गाचा) मार्ग (शोधूनहि) न पावलों असतों. आमच्या पालनकर्त्याचे पैगंबर सत्य (धर्म) घेऊन खचितच आले होते. आणि त्या लोकांस पुकारून सांगितलें जाईल कीं हाच तो स्वर्ग होय

---

(१) याचे दोन अर्थ होऊं शकतात. एकतर हा कीं त्यांचे आत्म्यांस आकाशावर जाऊं दिलें जाणार नाहीं; अथवा हा कीं त्यांचीं कर्में परमेश्वराजवळ अमान्य होतील व तशाच त्यांच्या प्रार्थनाहि. जरी परमेश्वर सर्वत्र आहे तरी त्याच्या परात्पर प्रभावाचे मानानें असेंच कल्पिलें व बोललें जातें कीं परमेश्वर आकाशांत विराजमान आहे.

(२) ह्मणजे उंट कधी सुईच्या नाकांमधून न निघाला आहे व न निघूं शकतो. त्याचप्रमाणें नास्तिक स्वर्गांत शिरूं शकणार नाहींत. पौर्वात्य लोकांत अरबी हिब्रू वगैरे भाषेंत ही एक म्हण आहे. कोणतेंहि अशक्य असें काम करणें म्हणजे सुईच्या नाकांतून जाणें असें म्हणण्याचा परिपाठ आहे. प्राचीन अरबी वाङमयांत व मत्तय यानें लिहिलेल्या शुभवर्तमानांतहि ही म्हण आहे. (पाहा मत्तय अध्याय १९:२४).

कीं तुह्मीं (जगांत) जीं कर्मे करीत होतां त्यांच्या प्रभावानें तुम्हीं त्याचे वारस[1] ठरविलां गेलां. ४३. आणि स्वर्गवासी लोक नरकवासी लोकांस हाक मारतील (व विचारितील) कीं आमच्या पालनकर्त्यानें आम्हांशीं जो वायदा केला होता आम्हीं तर तो खरा पावलों. तर कां (तुह्मांशीं) जो तुमच्या पालनकर्त्यानें वायदा केला होता तुह्मींहि तो खरा पावला (कीं नाहीं)? ते ह्मणतील, होय! इतक्यांत एक ललकारणारा (दूत) त्यांच्या मधोमध ललकारूं लागेल कीं जुलमी लोकांवर परमेश्वराचा शाप असो! ४४. कीं ते परमेश्वराचे मार्गाहून लोकांस अडथळा करीत व (लोकांचे मनांत भ्रम घालून) त्यांत वांकडेपणा आणूं इच्छीत; आणि ते शेवटल्या दिवसालाहि नाकारीत होते. ४५. आणि (स्वर्गवासी व नरकवासी) या उभयतांचे दरम्यान एक आड पडदा असेल (व त्याचें नांव 'आअराफ' होईल); आणि (त्या) 'आअराफ'वर कांहीं लोक असतील कीं ते (स्वर्गवासी व नरकवासी यांतून) प्रत्येकास (त्यांनीं जगांत पाहिलेल्या) त्यांच्या मुद्रेवरून ओळखून घेतील; आणि स्वर्गवाश्यांस हाक मारून तुह्मांस सलाम (ह्मणजे शांति) असो, असें ह्मणतील. ('आअराफ'वाले खुद्द अजून) स्वर्गांत गेले नाहींत; पण ते (स्वर्गांत जाण्याची) उमेद बाळगितात. ४६. आणि जेव्हां त्यांची नजर नरकवाश्यांकडे पालटली जाईल, तेव्हां (त्यांची खराब स्थिति पाहून परमेश्वरापाशीं) ते प्रार्थना करूं लागतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! (या) जालिम लोकांसंगतीं तूं आह्मांस (सामील) करूं नकोस. ४७. आणि 'आअराफ'वाले, कांहीं (नरकवासी) लोकांस कीं ते त्यांना (त्यांनीं जगांत पाहिलेल्या) त्यांच्या मुद्रेवरून ओळखत असतील मोठ्यानें हाक मारून म्हणतील कीं

---

(१) वारस यासाठीं ह्मटलें कीं परमेश्वाराकडून आह्मां सर्वांचे पिता आदम यांस स्वर्गाचें वतन दिलें गेलें होतें. त्यांच्या हातून एक अपराध घडला व स्वर्गातून त्यांचे उच्चाटन झालें. तर स्वर्ग हें आमचें वडिलोपार्जित वतन आहे. जर आमचेठायीं विश्वास व सदाचरण असेल तर तें आह्मांस मिळेल. ईश्वर आह्मांस सुबुद्धि देवो!

तुमची साठवासाठवहि कांहीं तुमच्या कामा आली नाहीं व तुह्मीं (जगांत) जी शेखी मिरवीत होतां तीहि (तुमच्या कामा आली नाहीं).४८. (आणि ते स्वर्गीयांस बोटानें दाखवून नरकवाश्यांस विचारतील कीं) हेच कां ते लोक कीं ज्यांच्या संबंधानें तुह्मीं शपथा वाहून वाहून म्हणत होतां कीं परमेश्वर त्यांच्यावर (आपली) दया करणारच नाहीं? (हे तर स्वर्गांत येऊन दाखल झाले; व त्यांना हुकूम मिळून गेला कीं) तुह्मीं स्वर्गांत चालले जा; (येथें) तुह्मांस (कोणा तऱ्हेचें) भय राहणार नाहीं व तुह्मीं (कोणा तऱ्हेनें) दुःखीहि होणार नाहींत. ४९. आणि नरकवासी हाका मारमारून स्वर्गवाश्यांस ह्मणतील कीं आह्मांवर थोडेंसें पाणीच ओतून द्या अगर तुह्मांस परमेश्वरानें जें (विपुल अन्न) दिलें आहे त्यांतून कांहीं आह्मांसहि देऊन टाका. ते ह्मणतील कीं परमेश्वरानें स्वर्गांचें अन्नपाणी नास्तिकांस निषिद्ध करून टाकिलें आहे; ५०. कीं या लोकांनीं आपल्या धर्मास हंशी व खेळ बनवून ठेविला होता, आणि या जगाचे आयुष्यानें त्यांना फसवणुकींत घातलें होतें. तर जसें हे लोक (जगांत असतांना) ह्या आपल्या दिवसाचे नजरानजर होण्यास विसरले व आमच्या निशाण्यांस नाकारीत राहिले तसेंच आज (पुनरुत्थानाचे दिवशीं) आह्मीं त्यांना (मुद्दाम) विसरून टाकूं. ५१. आणि आह्मीं तर या (मक्केकरां)स कुर्‌आन्‌हि पोचतें केलें आहे (व) त्यांत ज्ञानपुरस्सर (हरतऱ्हेचा) तपशीलहि केला; (आणि तें) विश्वासणाऱ्या लोकांसाठीं सद्बोध व दया होय. ५२. (जें काय अभिवचन वा ताकीद या पुस्तकांत आहे,) कां हे लोक त्याच्या स्पष्टीकरणाचीच वाट पाहताहेत? (पण,) ज्या दिवशीं त्याचें स्पष्टीकरण (प्रत्यक्ष घडून) येईल; त्या दिवशीं जे लोक त्याला पहिल्यानेंच विसरून बसले होते ते कबूल करतील कीं निःसंशय आमच्या पालनकर्त्यांचे पैगंबर–प्रेषित–सत्य गोष्ट घेऊन आले होते. तर (त्या वेळीं त्यांना या गोष्टीचीहि चौकशी होईल कीं) आमचे कां कोणी मध्यस्थहि आहेत कीं (आज) आमची मध्यस्थी करतील? अगर आह्मांस (जगांत) पुन्हां परतलें जाईल, कीं जशीं कर्में

आह्मी (पूर्वीं) करीत होतों त्यांशीं उलट (धार्मिकपणाचीं) कृत्यें करूं? निःसंशय या लोकांनीं आपणच आपलें नुकसान केलें, आणि जें जें थोतांड ते रचीत होते तें (सर्व) त्यांच्यापासून नाहींसें झालें ५३. (लोकांनों!) निःसंशय तुमचा पालनकर्ता हाच (असा) परमेश्वर होय कीं ज्यानें सहा दिवसांत आकाश व पृथ्वी हीं निर्माण केलीं; व मग तो ('अर्ष' उर्फ) महा सिंहासनारूढ झाला. तोच रात्रीला दिवसावर आच्छादितो; (जणुं कीं) रात्र दिवसाच्या मागें लागलीच चालली येत आहे. आणि त्यानेंच सूर्य व चंद्र व नक्षत्रें हीं निर्मिलीं कीं हीं (सर्व) त्याच्या आज्ञांकित होत. (लोकांनों!) पाहा! परमेश्वराचीच (अखिल) सृष्टि होय व (परमेश्वराचाच) हुकूम. परमेश्वर जो आलम दुनियेचा पालनकर्ता तोच (फार) आशिर्वाद दायक होय! ५४. (लोकांनों!) तुह्मीं आपल्या पालनकर्त्याचा काकळुतीस येऊन व चुपचाप धांवा करीत जा; (कांकीं) तो (भक्ति मर्यादेचें) उल्लंघन करणारांस प्रिय ठेवीत नसतो. ५५. आणि देशा(चे व्यवस्थे)ची दुरुस्ती झाल्यावर त्यांत फिसाद फैलावूं नका. आणि (शिक्षेचे) भयानें व (कृपेचे) आशेनें परमेश्वराची प्रार्थना करीत असा; (कारण कीं) परमेश्वराची दया (मनोभावें) सुकृत्य करणारांपासून (फारच) जवळ होय. ५६. आणि तोच असा (परमसमर्थ) होय कीं जो दये(चे वर्षावा)चे पुढें (पुढें) वारा पाठवितो कीं त्यानें (लोकांस पर्जन्याच्या येण्याची) खुष खबर पोहोंचवावी; येथपर्यंत कीं जेव्हां (वारा), भारी (बोजड) ढगांस उचलून नेतो, तेव्हां आह्मीं अशा एखाद्या वस्तीकडे कीं जी (पडित झाल्यामुळें जणों कीं)

(१) ह्मणजे सेवकांस सर्वकाळ आपला स्वामि जो परमेश्वर त्याच्या कृपेची व दयेची अपेक्षा असते. जर तो आपली गरज परमेश्वरापुढें जाहीर करण्यास संकोच करील तर त्यांत एका प्रकारची बेपर्वाई दिसून येते; आणि ती सेवकपणास विरोधक होय. भक्तिमर्यादेचा एक दर्जा–'रजा व तसलीम' म्हणजे निवृत्ति मार्ग हा होय. यांत मनुष्य ईश्वराज्ञेस पूर्णपणें अंकित होऊन व आपल्या मनोवासना आवरून परमेश्वरानें आंखून दिलेल्या मार्गावर चालतो. या निवृत्तिमार्गांतहि कर्म सुटत नाहीं.

मरून पडली होती, त्या (ढगां)स हांकलून लावितों. नंतर (तेथें) ढगांतून पाणी वर्षवितों व मग पाण्याद्वारें हरेक प्रकारची फळफळावळ (जमिनींतून) काढितों. अशाच तऱ्हेनें आह्मीं (पुनरुत्थानाचे दिवशीं) मेलेल्यांस (जमिनींतून) काढून उभे करूं; (आह्मीं आपल्या सामर्थ्याच्या निशाण्या यासाठीं वर्णितों) कीं तुह्मीं लोक कदाचित् (या गोष्टींचें) मनन कराल; (व पुनरुत्थानाचे दिवशीं मेलेल्यांच्या जिवंत होऊन उठण्याचा विश्वास धराल). ५७. आणि जी वस्ती (अशी आहे कीं तिची जमीन) उत्कृष्ट होय, तर तिच्या पालनकर्त्याचे हुकमानें तिचें पीकहि (उत्कृष्टच) निपजतें. आणि जी (वस्ती अशी आहे कीं तिची जमीन) निकृष्ट होय तर तिचें पीकहि निकृष्टच निघतें. अशाच [१]रीतीनें आह्मीं (आपल्या सामर्थ्याचीं) प्रमाणें ज्या लोकांच्या अंगीं कृतज्ञता बाणली आहे त्यांस तऱ्हेतऱ्हेनें सांगतों. ५८. निःसंशय आह्मींच 'नूह्'ला त्याच्या लोकांकडे (पैगंबर करून) पाठविलें. मग त्यानें (लोकांस समजावून) सांगितलें कीं अहो माझ्या लोकांनों! तुह्मीं परमेश्वराचीच भक्ति करा; (कारण,) त्याच्याशिवाय अन्य कोणी तुमचा उपास्य नाहीं. (आणि जर तुह्मीं माझा कह्या न मानाल तर) मला तुह्मांसंबंधानें (पुनरुत्थानाचे) महा (भयंकर) दिवसाचे शिक्षेचा (सक्त) अंदेशा आहे. ५९. (यावर) त्याच्या लोकांत जे बडे लोक होते ते ह्मणूं लागले कीं आमच्या दृष्टीनें तर तूं स्पष्ट भ्रमांत (पडला) आहेस. ६०. (यावर 'नूह'नें) ह्मटलें, हे माझ्या लोकांनों! माझ्यांत तर भ्रम (-मूलक कोणतीहि गोष्ट) नाहींच. किंबहुना मी तर सकल जगांच्या

(१) या वरील वाक्यांत पाणी व जमिनीचीं पिकें यांच्या दृष्टांतांचा उद्देश हा कीं कुरआनाचे प्रकटीकरणामुळें कित्येकांस बोध होतो व ते सन्मार्गी लागतात व कित्येक सन्मार्गाहून चकून जातात. ह्मणजे कुराण हें जणूं कीं स्वच्छ व निर्मळ पावसाचें पाणी होय. तें पाणी सर्वत्र पडतें व जमिनीच्या योग्यतेप्रमाणें तींत फळ येतें. त्याचप्रमाणें कुर्आन् हें बोधप्रद आहे; पण ज्यांच्या अंगी बोध ग्रहण करण्याची पात्रता आहे तेच मात्र त्यापासून बोध घेतात.

पालनकर्त्याकडून पाठविलेला (एक पैगंबर) आहें. ६१. तुम्हांस मी आपल्या पालनकर्त्याचे निरोप पोहोंचवितों व तुम्हांस नेकसल्ला देतों; आणि मी परमेश्वराकडून अशा (अशा) गोष्टी जाणतों कीं ज्या तुम्हीं जाणीत नाहींत. ६२. आणि कां तुम्हीं या गोष्टीचें आश्चर्य करितां कीं तुमच्यांतूनच एका पुरुषाच्या (म्हणजे माझ्या) मारफतीनें तुमच्या पालनकर्त्याचा बोध(-पर आदेश) तुम्हांस पोहोंचला; अशासाठीं कीं त्यानें तुह्मांस (ईश्वरी शिक्षेपासून) भिववावें, व (तसेंच) तुह्मीं (परमेश्वराचे कोपाविषयीं) जपावें, आणि हें कीं (सरशेवटीं) तुह्मांवर दया केली जावी? ६३. इतकें होतांहि, लोकांनीं त्यास पाखंडी म्हटलें. तेव्हां आह्मीं 'नूहा'ला व त्याचे संगतीं जे लोक नौकेंत होते त्यांना (तुफानांतून) तारिलें; आणि ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें होतें त्यांना आह्मीं बुडवून टाकिलें; (कारण,) ते लोक (नास्तिकपणामुळें) आंधळे (होऊन गेले) होते. ६४. आणि (आह्मींच) 'आद'(चे लोकां)कडे त्यांचा बंधु 'हूद' यास (पैगंबर करून पाठविलें). त्यानें (लोकांस समजावून) सांगितलें कीं हे माझ्या बांधवांनों! तुह्मीं परमेश्वराचीच भक्ति करा; (कां कीं,) त्याच्याशिवाय अन्य कोणी तुमचा उपास्य नाहीं. तर कां तुह्मीं (परमेश्वराचे कोपापासून) भीत नाहीं? ६५. (यावर) त्याच्या लोकांपैकीं जे नास्तिक होते ते बडे लोक ह्मणूं लागले कीं आम्हीं तर निःसंशय तुला मूर्खपणांत (गर्क) पाहतों; आणि (तसेंच) निःसंशय आम्हीं तुला लबाड समजतों. ६६. ('हूदा'नें) ह्मटलें, बांधवहो! माझ्यांत मूर्खपणा(ची तर कोणतीहि गोष्ट) नाहींच. किंबहुना, मी तर सकल जगांच्या पालनकर्त्याकडून पाठविलेला (एक पैगंबर) आहें. ६७. तुम्हांस मी आपल्या पालनकर्त्याचे हुकूम पोहोंचवितों व मी तुमचा (खरा) प्रामाणिक हितेच्छु आहें. ६८. आणि कां तुह्मीं या गोष्टीचें आश्चर्य करितां कीं तुमच्यांतूनच एका पुरुषाच्या (म्हणजे माझ्या) मार्फतीनें तुमच्या पालनकर्त्याचा बोध(-पर आदेश) तुम्हांस पोहोंचला; अशासाठीं कीं त्यानें तुम्हांस (ईश्वरी शिक्षेपासून) भिववावें? आणि

(परमेश्वराच्या त्या उपकाराचें) स्मरण करा कीं जेव्हां त्यानें तुह्मांस 'नूहा'चे लोकांमागून (त्यांचे) काईम मुकाम बनविले व शरीराचे तोसदानाची वाढहि तुम्हांस (इतरांपेक्षां) जास्त दिली. तर परमेश्वराचे देणग्यांचें स्मरण करा; कीं कदाचित् तुम्हीं (आपल्या मनोरथांत) सफल व्हाल. ६९. त्या लोकांनीं ('हूदा'ला) विचारिलें, कां तूं आम्हांपाशीं यासाठीं (पैगंबर होऊन) आला आहेस कीं आम्हीं एकट्या एकाच परमेश्वराची भक्ति करूं लागावी, व ज्या (उपास्यां)स आमचे वडील पूजत राहिले त्या (सर्वां)स आह्मीं सोडून बसावें? मग जर तूं खरा असशील, तर ज्या (शिक्षे)कडून तूं आम्हांस दरडावितोस ती तूं आह्मां समोर आण. ७०. ('हूदा'नें) जबाब दिला कीं (बस्स! जाणूनच राहा कीं कोणा क्षणांत) तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हांवर शिक्षा व कोप कोसळलाच (कोसळला). कां तुह्मीं माझ्याशीं (मूर्तींच्या कल्पित) नांवांविषयीं झगडतां, कीं तीं नांवेंहि (सार्थ तर नाहींतच व तीं) तुह्मीं व तुमच्या वडिलांनीं घडून ठेविलीं आहेत. (आणि) परमेश्वरानें त्यां-(च्या उपास्य होण्या) बद्दल कोणताच आधार सादर केला नाहीं. (बरें!) तर तुह्मीं (शिक्षेची) वाट पाहा; मींहि तुमच्या संगतीं वाट पाहतों आहें. ७१. सरशेवटीं आह्मीं आपल्या दयेनें 'हूदा'ला व त्याच्या संगतीं जे लोक होते त्यांना तारिलें. आणि जे लोक आमच्या निशाण्यांस पाखंड ह्मणत होते त्यांचा आम्हीं वंशच्छेद करून टाकिला; आणि ते विश्वास धरणारे नव्हतेच. ७२. आणि (आम्हींच) 'समूद'(चे लोकां)कडे त्यांचा बंधु 'सालेह' यास (पैगंबर करून पाठविलें). त्यानें (लोकांस जाऊन) समजाविलें कीं बांधवहो! तुम्हीं परमेश्वराचीच भक्ति करा; (कारण,) त्याचे शिवाय तुमचा अन्य कोणी उपास्य नाहीं. तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हांपाशीं एक स्पष्ट प्रमाण येऊन चुकलें आहे; कीं ही परमेश्वराची (पाठवि-लेली) सांढणी तुम्हांकरितां एक चमत्कार होय. तर हिला मोकळी फिरूं द्या कीं परमेश्वराचे जमिनींत (जेथें हवें तेथें) ती चरेल, आणि कोणा तऱ्हेचें नुकसान पोहोंचविण्याचे बुद्धीनें तिला

शिवूंहि नका; (जर तिला कोणा तऱ्हेचें नुकसान पोहोंचवाल) तर तुम्हांस दुःखकारक शिक्षा येऊन गांठील. ७३. आणि (परमेश्वराच्या त्या उपकाराचें) स्मरण करा कीं जेव्हां त्यानें तुह्मांस 'आद'चे (लोकां)मागून (त्यांचे) काईम मुक़ाम बनविले; आणि (तसेंच) तुम्हांस त्यानें भूतलावर अशा रीतीनें वसविलें कीं तुह्मीं तिच्या मैदानांत तर (टोलेजंग) हवेल्या उभ्या करितां व पर्वतांस कोरून (कोरून) घरें बनवितां. तर परमेश्वराच्या (ह्या) देणग्यांचें स्मरण करा; आणि देशांत फिसाद फैलावीत फिरूं नका. ७४. 'सालेह'च्या लोकांपैकीं गर्विष्ट होते असे जे बडे लोक ते, जे लोक गरीब समजले जात होते अशांना (ह्मणजे) त्यांच्यांतून ज्यांनीं विश्वास धरिला होता त्यांना, पुसूं लागले, कां तुह्मांस खात्रीनें माहीत आहे कीं 'सालेह' खरोखरच आपल्या पालनकर्त्याकडून पाठविलेला (पैगंबर) आहे? त्यांनीं उत्तर दिलें कीं जो हुकूम देऊन तो आह्मांकडे पाठविला गेला आहे आमचा तर त्यावर (पूर्ण) विश्वास आहे. ७५. (यावर) ज्यांना (आपल्या ऐहिक धनसंपत्तीचा) अभिमान होता ते म्हणूं लागले कीं ज्या गोष्टीवर तुह्मीं विश्वास ठेविला आहे, आह्मीं तर ती नाकारितों. ७६. सारांश, त्यांनीं सांढणीस (मांडीच्या शिरा तोडून) कापून टाकिलें व आपल्या पालनकर्त्याच्या हुकमास पाठ दिली व म्हणाले कीं हे 'सालेहा'! ज्या (शिक्षे)पासून तूं आम्हांस दरडावीत होतास ती (शिक्षा), जर तूं (खरोखरीच) पैगंबर असशील तर आम्हांसमोर आण. ७७. मग त्यांना भूकंपानें येऊन गांठिलें, आणि ते आपल्या घरांत (जसे बसले होते तसेच) बसले(चे बसलेच) राहून गेले. ७८. (जेव्हां 'समूद' यांस शिक्षा सादर होऊन चुकली) तेव्हां 'सालेह' त्यांच्यापासून निघून चालता झाला व (चालते वेळीं त्यांना उद्देशून) म्हणाला कीं हे माझ्या लोकांनों!

---

(१) एक अर्थ हाहि होऊं शकतो कीं मऊ मातींतून (गारा व विटा बनवून) हवेल्या उभ्या करितां.

(२) लोकांचा नाश होऊन गेल्यावर हजरत सालेह पैगंबरांचें त्यांना उद्देशून बोलणें ही एक मानवस्वभावाची प्रवृत्ती होय; कीं त्यांना

मी तर आपल्या पालनकर्त्यांचे हुकूम तुम्हांस पोहोंचवून दिले होते व तुम्हांस चांगला सल्लाहि दिला होता; परंतु (तुम्हांस कांहीं अशी अवदशा आठवली होती कीं) तुह्मीं हितचिंतकांसहि (आपले) दोस्त समजत नव्हतां. ७९. आणि (हे पैगंबरा!) 'लूता'(चे वृत्तांता)ची (आठवण कर कीं) जेव्हां त्यानें आपल्या लोकांस (जाऊन) सांगितलें, कां तुम्हीं लोक इतका निर्लज्जपणा करितां कीं आलमदुनियेंत तुमच्यापूर्वी कोणीहि असा निर्लज्जपणा केलाच नाहीं? ८०. कीं तुम्हीं स्त्रियांस सोडून कामतृप्तिप्रीत्यर्थ पुरुषांच्या जवळ जातां! (स्त्रिया आसतांना तुम्हांस याची जरूरी तर नाहींच;) पण तुम्हीं लोक कांहीं आहांच (मर्याद-शीलतेचें) उल्लंघन करणारे! ८१. आणि ('लूता'च्या) लोकांचा जबाब मात्र हाच होता कीं ते (आपापसांत) म्हणूं लागले कीं तुम्हीं या लोकांस आपल्या वस्तींतून काढून बाहेर लावा. (कां कीं,) हे असे लोक होत कीं जे (फार) पवित्र व सोंवळे बनूं पाहतात. ८२. मग आह्मीं 'लूता'ला व त्याच्या कुटुंबाला (शिक्षे-

---

जिवंत आहेत असें कल्पून त्यांनीं दोषारोप केला कीं जर ते माझें ऐकिते तर या दशेस कां पोहोंचते? ऐन अशाच प्रकारची एक गोष्ट आमच्या पैगंबर साहेबांपुढेंहि आली होती कीं बद्रच्े लढाईत जेव्हां मक्केच्या मूर्तीपूजकांचा पराभव झाला; बहुतेक मारले गेले व बहुतेक बंदीवान झाले; तेव्हां त्यांनीं मेलेल्यांच्या शवांस संबोधून ह्मटलें कीं तुमच्या पालनकर्त्यानें तुम्हांशीं जो वायदा केला होता तो तुह्मां खरा पावलांना?

(१) हजतर लूत हे हजरत इब्राहीम् पैगंबरांचे भाचे होते. हे इब्राहीम पैगंबर जेव्हां बाबेलहून सीरीयाप्रांताकडे निघाले तेव्हां त्यांनीं हजरत लूत यांस सदूमा शहरांत उतरलें. येथें ते लोकांस उपदेश करीत २९ वर्षे त्यांच्यांत राहिले. त्यांनीं चांगल्या कामांचा त्यांस उपदेश केला व वाईटापासून त्यांना मनाई करीत राहिले. त्या लोकांचें फारच निर्लज्जपणाचें काम ह्मटलें ह्मणजे ते पुंमैथुन करीत होते. ते त्या कामापासून पराङ्मुख झाले नाहींत; ह्मणून परमेश्वरानें त्यांच्यावर आकाशांतून दगड वर्षविले व त्यांचा नाश करून टाकिला.

तून) तारिलें. पण एक त्याची बायको कीं मागें राहून जाणारांत तीहि राहिली. ८३. आणि आम्हीं त्यांच्यावर (दगडांचा) वर्षाव वर्षविला. तर (हे पैगंबरा! जरा) पाहा, तर! अपराध्यांचा परिणाम कसा काय झाला? ८४. आणि (आह्मींच) 'मद्‌यन'(-करां) कडे त्यांचा बंधु 'शोऐब' यास (पैगंबर करून पाठविलें). त्यानें (लोकांस जाऊन) समजाविलें कीं हे बांधवांनों! तुम्हीं परमेश्वराचीच भक्ति करा; त्याच्याशिवाय तुमचा अन्य कोणी उपास्य नाहीं. तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हांपाशीं स्पष्ट प्रमाण तर येऊनच चुकलें आहे. तर तुम्हीं माप व तोल पुरा पुरा करीत जा: आणि लोकांस त्यांच्या जिन्नसा (ज्या ते खरीदतात त्या) कमी देत जाऊं नका. आणि देशाची (व्यवस्था) दुरुस्त झाल्यावर त्यांत नासधूस करूं नका. जर तुम्हीं विश्वासू आहां तर ही (सुव्यवहाराची पद्धति, जी मी तुम्हांस शिकवितों ती) तुमच्याठायीं (फार) उत्तम होय. ८५. आणि तुह्मीं (पुण्याईच्या) हरेक मार्गावर (बसून) जो कोणी परमेश्वरावर विश्वास ठेवितो त्याला धाक घालता व परमेश्वराचे मार्गा-(वर चालण्या)पासून (त्याला) अडथळा करिता आणि परमेश्वराचे मार्गांत वांकडेपणा आणूं इच्छिता, तर तुह्मीं आतां (असें) बसूं नका. आणि (परमेश्वराचे त्या उपकाराची) आठवण

---

(१) परमेश्वरानें इतर पैगंबरांपासून हेंच बोधवचन वदविलें आहे; व त्यांत त्यांच्या चमत्कारांचाहि मजकूर आहे. हे चमत्कार त्यांच्या पैगंबरीचें प्रमाण होते. परंतु हजरत **शोऐब** पैगंबराचा कोणताहि चमत्कार अवघ्या कुराणांत कोठेंहि दिलेला नाहीं. यावरून भाष्यकारांनीं कांहीं चमत्कार हजरत **शोऐब**कडे लाविले आहेत. उदाहरणार्थ, हजरत **मूसा** पैगंबराची काठी, कीं ती त्यांना त्यांचे सासरे हेच हजरत **शोऐब** यांनीं दिलेली होती. तर हजरत **शोऐब**चे विधानांत 'स्पष्ट प्रमाण' असा जो शब्द आहे त्याचा इशारा कदाचित् हजरत **मूसा**चे या काठीकडे असेल; अगर त्याचा अर्थ हजरत **शोऐब**चें शिक्षण असेल कीं 'माप व तोल पुरापुरा करणें, फिसाद व नासधूस न करणें, लोकांस परमेश्वराचे मार्गापासून अडथळा न करणें आणि परमेश्वराचे मार्गांत वांकडेपणा आणूं न इच्छिणें,' या सर्व गोष्टी

करा कीं जेव्हां तुह्मीं (संख्येंत) कमी होता, तेव्हां मग परमेश्वरानें (तुमचा वेलविस्तार करून) तुह्मांस बहुजन समाज बनविला. आणि या गोष्टीकडेहि नजर करा कीं फिसादखोरांचा परिणाम कसा काय झाला! ८६. आणि जें (धर्मशास्त्र) देऊन, मला तुह्मांकडे पाठविलें गेलें आहे, त्या(च्या सत्यत्वा)चा जर तुह्मां लोकांपैकीं एका पक्षाला विश्वास पटतो व दुसऱ्या पक्षाला विश्वास पटत नाहीं, तर (मुकाट्यानें) दम धरून बसा; येथपर्यंत कीं परमेश्वर आमच्या (तुमच्या) दर्म्यान निवाडा करून टाकील; आणि तो सर्व निवाडा करणाऱ्यांत उत्तम (निवाडा कर्ता) होय. ८७.

---

अशा आहेत कीं ज्यांस कोणीहि विचारी व न्यायबुद्धिसंपन्न मनुष्य प्रमाणावांचूनहि मान्य करील. प्रत्यक्षास प्रमाण कशास? तेजोमय सूर्यास प्रमाण सूर्यच होय.

# पवित्र कुराण

## भाग ९ वा.

### सूरतुल्-आअराफ (पुढें चालू).

(यावर) 'शोऐबा'च्या लोकांत जे बडे लोक (ऐहिक वैभवावर) गर्विष्ठ होते ते बोलले कीं हे 'शोऐबा'! आह्मीं तुला व ज्यांनीं तुजबरोबर विश्वास धरिला आहे त्यांना आपल्या वस्तींतून काढून लावूंच लावूं तर सई; अगर (हेंच होईल कीं) तुह्मीं लोक (परिणामीं) आमच्या धर्मांत परतून यालच. ('शोऐबा'नें) ह्मटलें, कां हो, जरी आह्मीं (तुमचा धर्म मनापासून) नापसंत करीत असूं (तरीहि बळेंच तुमच्या धर्मांत येऊन मिळूं)? ८८. ज्या अर्थीं परमेश्वरानें आह्मांस तुमच्या या (असत्) धर्मापासून सोडविलें त्या अर्थीं जर यानंतरहि आह्मीं तुमच्या धर्मांत परतून येऊं, तर निःसंशय (याचा हाच अर्थ होईल कीं) आह्मीं परमेश्वरावर खोटें कुभांड रचिलें. आणि आमच्यानें तर हें होऊं शकत नाहीं कीं आह्मीं तुमच्या धर्मांत परतून यावें; परंतु परमेश्वर जो आमचा पालनकर्ता त्याचीच इच्छा असेल तर (कांहीं आमचा जोरा नाहीं). आमचा पालनकर्ता ज्ञानाचे दृष्टीनें प्रत्येक वस्तूस व्यापून आहे. परमेश्वरावरच आमचा भरंवसा आहे. हे आमचे पालनकर्त्या! आह्मांत व आमच्या लोकांत (जो लढा येऊन पडला आहे तूंच त्यांचा) सत्य सत्य निवाडा कर; आणि तूं सर्व निवाडा करणाऱ्यांतं उत्तम (निवाडा कर्ता) आहेस. ८९. आणि 'शोऐबा'चे लोकांत जे बडे लोक (त्याच्या पैगंबरीस) नाकारीत होते ते (आपसांत) ह्मणाले कीं जर तुह्मीं 'शोऐबा'चे कह्याप्रमाणें चालाल तर यांत संशयच समजूं नका कीं मग तर तुह्मीं सफाई बुडालांच (बुडालां). ९०. सारांश, या

लोकांस भूकंपानें येऊन गांठिलें; आणि ते आपल्या घरांत (जसे बसले होते तसेच) बसले(चे बसलेच) राहून गेले. ९१. ज्या लोकांनीं 'शोऐबा'ला पाखंडी ह्मटलें, ते (असे मिटले) जणो कीं त्या वस्त्यांत कधीं वसलेच नव्हते. ज्या लोकांनीं 'शोऐबा'ला पाखंडी ह्मटलें, तेच हानि भोगणारे झाले. ९२ ('शोऐबा'चे लोक जेव्हां ईश्वरी शिक्षेनें हलाख होऊन चुकले) तेव्हां 'शोऐब' त्यांच्यापासून निघून चालता झाला आणि (चालतांना त्यांस संबोधून) बोलला कीं हे माझ्या बांधवांनों! मी तर तुह्मांस आपल्या पालनकर्त्याचे निरोप पोहोंचवूनच दिले होते व तुह्मांस नेक सल्लाहि देत राहिलों. (पण तुह्मीं मानिलें नाहीं तें नाहींच). तर ज्या लोकांनीं (माझा उपदेश) मानिला नाहीं, (आतां) त्यांच्या संबंधानें मी खेद तरी कसा प्रदर्शित करूं? ९३. आणि ज्या कोणा वस्तींत आह्मीं कोणी पैगंबर पाठविला (व वस्तीवाल्यांनीं त्याचा कह्या मानिला नाहीं तर) तेथल्या राहणाऱ्यांस आह्मीं दारिद्र्यांत व आपत्तींतहि पिडिलें; कीं हे लोक कदाचित् (आमच्यापुढें) गया वया करतील. ९४. नंतर आह्मीं (ह्यांस) दुःखाचे ठिकाणीं सुख बदलून दिलें; येथपर्यंत कीं ते खूप बढले चढले, व म्हणूं लागले कीं (असलीं) दुःखें व सुखें तर आमच्या वडिलांसहि पोहोंचून चुकलीं आहेत; (म्हणजे हे कालयोग होत). तर (या विपरित ग्रहाचे शासनार्थ) आह्मीं त्यांना अचानक (शिक्षेंत) पकडलें; व त्यांना (याचा) भासहि झाला नाहीं. ९५. आणि जर (या) वस्त्यांचे रहिवाशी (परमेश्वरावर) विश्वास ठेविते व (त्याला) भिऊन वागते, तर आम्हीं आकाश व

(१) भूकंपानें इतकाहि अवकाश दिला नाहीं कीं ते कोठें तरी पळून जाते.

(२) माणसाला जगांत पापाची शिक्षा होते व त्याला तिचा भास होतो; तेव्हां तो पश्चात्ताप करील अशी आशा असते. परंतु जेव्हां त्याला याचा भासहि होत नाहीं, तेव्हां या गोष्टीची भीति असते कीं तो अवश्यच नाश पावेल. उदाहरणार्थ, कोणी एखाद्यानें विष खालें व तें ओकून टाकिलें तर जगण्याची आशा असते; आणि जर तें पचलें तर त्याचें कामच संपलें.

पृथ्वीच्या आशिर्वादा(चे दरवाजा)स त्यांच्यासाठीं अवश्यच खुलें करून टाकितों. परंतु त्या लोकांनीं (आमच्या पैगंबरांस) पाखंडी ह्मटलें. तर जीं जीं कर्में ते करीत होते त्यांच्या शासनार्थ आह्मीं त्यांना (शिक्षेत) पकडलें. ९६. तर (हे पैगंबरा!) कां (तुझ्या या) वस्त्यांचे रहिवाशी या गोष्टीकडून निर्भय आहेत कीं त्यांना आमची शिक्षा रातोरात येऊन सादर होईल; व ते (निजलेचे) निजलेच राहतील? ९७. आणि कां (तुझ्या या) वस्त्यांचे रहिवाशी यांकडूनहि निश्चिंत आहेत कीं त्यांना आमची शिक्षा दिवसाढवळ्या येऊन सादर होईल; व ते खेळ करमणुकींत (गुंतलेले) असतील? ९८. तर कां ते परमेश्वराचे डावपेंचाकडून निर्भय होऊन गेले आहेत? पण ज्या लोकांचा (शेवटीं) नाश होणार आहे तेच लोक केवळ परमेश्वराचे डावपेंचाकडून निर्भय होऊन जातात. ९९. जे लोक पृथ्वीचे रहिवाशांचे(नाश पावल्या)नंतर पृथ्वीचे वारस होतात, त्यांना कां या गोष्टीनेंहि बोध झाला नाहीं, कीं जर आह्मीं इच्छूं तर (पूर्वींच्या राष्ट्रांप्रमाणें) यांच्या अपराधांबद्दल यांच्यावरहि संकट ओढून आणूं? (पण हे लोक धडा स्वीकारणारे नव्हतेच). आणि आह्मीं त्यांच्या अंतःकरणांवर मोहर लावून टाकितों; म्हणून हे लोक (उपदेशाची गोष्ट) ऐकितच नाहींत. १००. (हे पैगंबरा!) ह्याच त्या वस्त्या होत कीं ज्यांचा वृत्तांत आह्मीं तुला ऐकवितों (कीं कदाचित् तुझी प्रजा कर्तव्यास जागेल). आणि त्यांचे पैगंबर त्यांच्यापाशीं चमत्कारहि घेऊन आले; पण हे लोक (अशा स्वभावाचेच) नव्हते कीं ज्या गोष्टीस ते पूर्वीं पाखंड ह्मणून चुकले असतील त्याचा (चमत्कार पाहून) ते विश्वास धरतील. नास्तिकांच्या अंतःकरणांवर परमेश्वर अशाच तऱ्हेनें मोहर लावून टाकीत असतो. १०१. आणि आह्मीं तर यांच्यांतील बहुतेकांत करार[1](-पालनाचा बिलकुल विचारच) पावलों

(१) करार ह्मणजे नैसर्गिक करार; कीं प्रत्येक मनुष्य आपल्या निसर्गदत्त बुद्धीनेंच परमेश्वरास मानितो व मगही त्या करारावर काईम राहत नाहीं; आणि ईश्वरी आज्ञा पाळण्यांत हयगय करितो.

नाहीं. आणि आह्मीं तर यांच्यांतल्या बहुतेकांस आज्ञाभंजकच पावलों. १०२. नंतर (ज्या पैगंबरांचे अहवाल वर सांगितले गेले) त्यांच्यामागून आम्हीं 'मूसा'ला आपले चमत्कार देऊन फिरऔन व त्याच्या दरबारी मंडळाकडे पाठविलें; तेव्हां त्या लोकांनीं चमत्कारांप्रति (मोठा) उद्दटपणा दर्शविला. तर (हे पैगंबरा! जरा) पाहा कीं फिसादखोरांचा कसा काय परिणाम झाला? १०३. आणि 'मूसा'नें ('फिरऔना'ला संबोधून) म्हटलें कीं हे 'फिरऔना'! मी सकल जगांच्या पालनकर्त्याकडून पाठविलेला (आलों) आहें. १०४. माझें कर्तव्यकर्म हें आहे कीं सत्याशिवाय परमेश्वराकडे मी कसलीच गोष्ट लावूं नये. खचितच मी तुह्मां लोकांपाशीं तुमच्या पालनकर्त्या-कडून चमत्कार घेऊन आलों आहें. तर (हे 'फिरऔना'!) बनी-इस्राएलांस माझ्या संगतीं पाठीव. १०५. ('फिरऔन') बोलला, जर तूं (खरोखरींच) कोणी चमत्कार घेऊन आला आहेस, (आणि) जर तूं (आपल्या दाव्यांत) खरा आहेस, तर तो (चमत्कार) आणून दाखीव. १०६. यावर 'मूसा'नें आपली काठी टाकून दिली; तों काय पाहतात कीं तो एक धडधडीत अजगर आहे. १०७. आणि त्यानें आपला हात (बाहेर) काढला; तों काय पाहतात कीं तो प्रेक्षकांचे नजरेंत शुभ्र चकचकीत आहे. १०८. (यावर) फिरऔनाचे लोकांत जे (त्याचे) दरबारी होते ते (आपसांत) ह्मणूं लागले कीं हा तर मोठा वस्ताद जादुगीर आहे! १०९. तो इच्छितो कीं तुह्मां सर्वांस तुमच्या मुलकांतून काढून लावावें; तर (आतां तुह्मीं लोक) काय सल्ला देतां? ११०. (अखेर) सर्वांनीं मिळून ('फिरऔना'ला) सांगितलें कीं 'मूसा' व त्याचा भाऊ ('हारून') यां(च्या प्रकरणां)स (सध्यां) दिवसगतीवर लोटून दे आणि (चारहि दिशेस) शहरांत कांहीं हरकारे रवाना कर; १११. कीं प्रत्येक वस्ताद जादुगिरास (गोळा करून) ते तुझ्या हुजूरांत आणून हजर करतील. ११२. तात्पर्य हें कीं जादुगीर 'फिरऔना'पाशीं हजर झाले; (आणि) ह्मणूं लागले कीं जर आह्मीं ('मूसा'वर) विजयी झालों तर आह्मांस (सरकारांतून मोठें) बक्षीस तरी (मिळालेंच पाहिजे). ११३.

('फिरऔन') ह्मणाला, होहोय! आणि (निव्वळ बक्षीसच नव्हे तर) तुह्मीं जरूर (राजदरबारांत) जवळ केलेल्या (लोकां)पैकींहि लेखला जाल. ११४. (यावर) जादुगिरांनीं ('मूसा'ला) म्हटलें कीं हे 'मूसा'! का तर तूं (आपली काठी सर्वांचे समोर) आणून टाक (कीं ती अजगर बनून जाईल); आणि का तर (म्हणशील तर) आह्मींच (आपल्या काठ्या व दोऱ्या) टाकते होतों (कीं सारेचे सारे सर्प बनून जातील). ११५. (मूसानें) म्हटलें, (बरें, चला अगोदर) तुह्मींच टाकते व्हा. मग जेव्हां त्यांनीं (आपल्या काठ्या व दोऱ्या) टाकून दिल्या, तेव्हां जादूचे जोरानें त्यांनीं लोकांचे डोळे बांधून टाकिले (कीं चोहोंकडे सर्पच सर्प दृष्टीस पडूं लागले); आणि त्यांनीं त्या (सर्वां)स दहशत घालून टाकिली व (फारच) मोठी (भारी) जादू (घडवून) आणिली. ११६. आणि (त्या वेळीं) आह्मीं 'मूसा'कडे आदेश पाठविला कीं तूंहि आपली काठी (मैदानांत) टाकून दे. ('मूसा'नें काठी टाकून दिली) तोंच काय पाहतात कीं जादुगिरांनीं जें झुटमुट(च्या सर्पांचें सोंगढोंग) रचून उभें केलें होतें, त्या (सर्वां)स ती (काठी अजगर बनून) गिळत चालली जात आहे. ११७. तर सत्य (तें सर्वांस) शाबित होऊन गेलें आणि जें कांहीं जादुगिरांनीं केलें होतें तें (सर्व) नाहींसें होऊन गेलें. ११८. मग ('फिरऔन' व त्याचे लोक) त्या अखाड्यांत हारले व क्षुल्लक होऊन गेले. ११९. आणि जादुगीरांनीं साष्टांग नमस्कार घालीत मस्तक टेकून दिलें. १२०. (आणि) ते बोलत सुटले कीं आम्हीं सकल जगांच्या पालनकर्त्यांवर विश्वास ठेविला. १२१. (म्हणजे) 'मूसा' व 'हारून' यांच्या पालनकर्त्यावर. १२२. 'फिरऔन' बोलला, कां मी तुह्मांस परवानगी द्यावी याच्या अगोदरच तुह्मीं त्या ('मूसा'चे परमेश्वरा)वर विश्वास ठेविला? असो नसो, ही तुमची (व 'मूसा'ची) लबाडी होय कीं (आपसांत मतैक्य करून) तुह्मीं (या) शहरांत (येऊन) हे प्रपंच रचिले आहेत; अशासाठीं कीं तुह्मीं येथील रहिवाशांस (म्हणजे आम्हां सर्वांस) या शहरांतून काढून लावावें; (व आपली हुकमत जमवावी). तर (जरा दम धरा,) तुह्मांला

(आपल्या कर्मांचा परिणाम आतांच) थोड्या अवकाशांत
माहीत होऊन जाईल. १२३. तुमचे हात व तुमचे पाय
मी उलटे (सुलटे) कापवीन व तदनंतर तुह्मां सर्वांस सुळावर चढवीन
तरच सई. १२४. ते म्हणूं लागले (कीं आम्हीं तुझ्या या गुरकीला
भीत नाहीं; ) आम्हांस तर (मरून) आपल्या पालनकर्त्याकडे परत
जाणेंच आहे. १२५. आणि तूं आमच्यांत दोषच काय पाहिलास?
हाच ना कीं जेव्हां आमच्या पालनकर्त्याचे चमत्कार आम्हां समक्ष
(घडून) आले, तेव्हां आम्हीं त्यांचा विश्वास धरिला? (आणि आतां
आमची केवळ हीच प्रार्थना आहे कीं) हे आमच्या पालनकर्त्या! तूं
आह्मांवर सहनशीलतेचा वर्षाव कर आणि मुसलमान (म्हणजे
आपला आज्ञाधारक) ठेवूनच तूं आम्हांस (जगांतून) उचलून घे. १२६.
आणि 'फिरऔना'चे लोकांपैकीं सरदारांनीं ('फिरऔना'ला) म्हटलें कीं,
तूं कां 'मूसा' व त्याच्या लोकांस अशाच स्थितींत राहूं देशील कीं त्यांनीं
मुलखांत फिसाद फैलावावा आणि त्यानें तुला व तुझ्या (ठरीव) उपास्य
देवतांस सोडून द्यावें? ('फिरऔन') बोलला, (नाहीं, तर) आम्हीं आतांच
त्यांच्या मुलां (म्हणजे पुरुषसंतती)स (हुडकून हुडकून) ठार मारूं आणि
त्यांच्या स्त्रिजाती (म्हणजे मुलीं)स (आपल्या सेवेस्तव) जिवंत राखूं.
आणि आम्हीं त्यांच्यावर (हरतऱ्हेनें) सत्ताधीश आहों. १२७.

---

(१) ह्मणजे उदाहरणार्थ, उजवा हात व डावा पाय कापला तर सर्व देह निरोपयोगी होऊन जातो.

(२) फिरऔन उर्फ फेरो हा आपल्याला मोठा उपास्य देव समजत होता; आणि चोहोंकडील लोकांच्या पूजेसाठीं त्यानें लहान लहान मूर्ती बनवून दिल्या होत्या. कित्येक ह्मणतात कीं तो आपल्याच प्रतिमा पुजवीत होता.

(३) मुलांचें ठार मारणें व मुलींचें जिवंत ठेवणें हें एक तर हजरत मूसाचे जन्मसमयीं झालें होतें; मग फिरऔनानें मध्यंतरी हात आवरला होता. आतां जादुगिरांनीं विश्वास धरिला ह्मणून फिरऔनानें तोच आपला पूर्वीचा जुलूम पुन्हां सुरू केला. पहिला जुलूम हजरत मूसाच्या जन्मास प्रतिबंध करण्यासाठीं होता व हल्लींचा बनीइस्राएलांचा जोर मोडण्याच्या हेतुनें होय.

(हें ऐकून) 'मूसा'नें आपल्या लोकांशीं म्हटलें, परमेश्वरापाशीं मदत मागा व (मुकाट्यानें) सहन करा. मुलूख तर (अवघा) परमेश्वराचाच होय; तो आपल्या सेवकांपैकीं ज्याला इच्छितो त्याला त्याचा वारस बनवून टाकितो. आणि (उत्तमांत उत्तम) परिणाम तर (परमेश्वराला) भिऊन चालणाऱ्यांचाच होय. १२८. ते म्हणूं लागले कीं तुझ्या येण्याच्या पूर्वीं व तुझ्या आल्या मागून आम्हांस तर ('फिरऔना'च्या हातून) इजाच (इजा) पोहोंचविल्या गेल्या. 'मूसा' म्हणाला, आतां ती वेळ जवळ येऊन लागली आहे कीं तुमचा पालनकर्ता तुमच्या शत्रुचा नाश करील व तुम्हांस मुलखांत (त्याचा) काईम मुकाम बनवील व मग पाहील कीं तुह्मीं कसकशीं कृत्यें करितां? १२९. आणि आह्मीं तर 'फिरऔना'चे लोकांस सालोसालच्या दुष्काळांत व पिकाचे कमतरतेंतहि पिडिलें; कीं कदाचित् ते लोक बोध धरतील. १३०. तर जेव्हां त्यांना एखादा फायदा पोहोंचता, तेव्हां ते म्हणत कीं हा आमचा (हक्क) आहे (व आमच्याच कारणें होय.) आणि जर त्यांच्यावर एखादें संकट ओढवतें, तर ते (त्यास) मूसा व जे कोणी त्याच्या संगतीं होते त्यांचें अवलक्षण समजत. पहा हो! त्यांचें अव-लक्षण तर केवळ परमेश्वरापाशीं (त्यांच्या प्रारब्धांत लिहिलें जाऊन चुकलें) होतें; परंतु त्यांच्यांतील बहुतेकांस (ही हकीकत) माहीत नव्हती. १३१. आणि ('फिरऔना'चे लोकांनीं 'मूसा'ला) सांगितलें कीं तूं कोणती (हवी ती) निशाणीहि आम्हांपुढें आणशील कीं त्यायोगें तूं आम्हांवर आपली जादू चालवावीस, तर (खूप समजून अस कीं) आम्हीं तर तुझा (कोणाहि तऱ्हेनें) विश्वास धरणारच नाहीं. १३२. मग आह्मीं त्यांच्यावर तुफान पाठविलें; व (तसेंच) टोळ व उवा व बेडूक आणि रक्त; कीं हे सारे वेगवेगळाले चमत्कार होते. यावरहि

(१) कुराणाचे शब्दांत तर वर्तमानकाळ आहे. पण हा वृत्तांत प्राचीन काळचा आहे व तो हजरत पैगंबरांस उद्देशून सांगितलेला आहे. ह्मणून हा काळभेद दूर करण्यासाठीं भाषांतरांत आह्मीं भूतकाळ पत्करला आहे.

(२) शाह अबदुल कादिर साहेब लिहितात कीं, "हजरत मूसाचा फिरऔनाशीं चाळीस वर्षें सामना राहिला; आणि तोहि एवढ्याच गोष्टीवर

ते लोक ऐट्टून राहिले आणि ते अपराधी लोक झाले. १३३. आणि जेव्हां (जेव्हां) त्यांच्यावर शिक्षा येऊन पडे तेव्हां (तेव्हां) ते ह्मणत कीं हे 'मूसा'! तुझ्याशीं परमेश्वरानें (प्रार्थना मान्यकरण्याचा) जो वायदा करून ठेविला आहे त्याच्या आधारावर तूं आपल्या पालनकर्त्यापाशीं आह्मांसाठीं प्रार्थना कर. जर तूं आह्मांवरून (ही) शिक्षा टाळून दिलीस, तर आह्मीं जरूर तुझा विश्वास धरूं आणि बनी-इस्राएलांनाहि तुझ्या संगतीं अवश्यच पाठवून देऊं. १३४. मग जेव्हां आह्मीं, त्यांना जी वेळ पुरी करायाची होती त्या अमुक एका वेळेपर्यंत शिक्षेस त्यांच्यावरून हटवून टाकूं, तेव्हां ते तत्काळ वचनभंग करूं लागत. १३५. (सारांश,) सरशेवटीं आह्मीं त्यांच्यापासून (त्यांच्या खोडसाळपणाचा) बदला घेतलाच (घेतला); ह्मणजे या अपराधाचे शासनार्थ कीं ते आमच्या निशाण्यांस पाखंड ह्मणीत व त्यांजकडून बेपर्वाई करीत, आह्मीं त्यांना समुद्रांत गर्क करून टाकिलें. १३६. आणि (सूरीया

कीं बनी इस्राएलांस आपल्या स्वदेशीं जाऊं द्यावें. पण फिरऔनानें ही गोष्ट मान्य केली नाहीं. तेव्हां हजरत मूसाचे शापानें त्यांच्यावर हीं संकटें ओढवलीं: नाईल नदीस पूर आला, शेत, बागा व घरें नाश पावलीं, टोळ झाडपान खाऊन गेले; लोकांच्या अंगांत व कापडांत उवा पडून गेल्या; आणि असेंच प्रत्येक वस्तूंत बेडूक पसरून गेले व पाण्याचें रक्त बनून गेलें. पण शेवटीं फिरऔनानें मानिलें नाहीं तें नाहींच.

(१) शाह अबदुल कादिर साहेब लिहितात कीं हीं सर्व संकटें त्यांच्यावर आलीं; तीं एका एका आठवड्याच्या अंतरानें आलीं. प्रथम हजरत मूसा हे फिरऔनाला बजावून सांगीत कीं परमेश्वर तुह्मांवर हें अमुक अरिष्ट पाठवील; व तेंच अरिष्ट येई. मग ते काकुळतीस येऊन हजरत मूसाची खुशामत करीत; व त्यांच्या प्रार्थनेनें व उःशापानें त्या अरिष्टाचें निवारण होई. मग ते पुन्हां नास्तिक होऊन जात. सरशेवटीं त्यांच्यांत सांत आली, तों मध्यान्हरात्रीं साऱ्या शहरांत प्रत्येक मनुष्याचा पहिला पुत्र मरून गेला. ते आपल्या मेलेल्यांच्या शोकांत राहिले; आणि हजरत मूसा आपल्या लोकांना घेऊन शहरांतून निघून गेले. नंतर कित्येक दिवसांनीं

देशाचे) ज्या जमिनीला आह्मीं (बहु फलद्रूप होण्याचा) आशिर्वाद दिला होता, (अखेर) तिच्या पूर्वे व पश्चिमेचा आह्मीं अशा लोकांस वारस बनविला कीं जे ('फिरऔना'च्याजवळ) दुर्बल लेखले जात होते. आणि (हे पैगंबरा!) बनी-इस्राएलांनीं ('फिरऔना'चा जाच जुलूम मुकाट्यानें) सहन केला, ह्मणून तुझ्या पालनकर्त्याचें शुभ वचन[1] (जें त्यानें) बनी-इस्राएलां(स दिलें होतें तें त्यां)च्या ठायीं परिपूर्ण झालें. आणि जी (सक्तीची वर्तणूक) फिरऔन व त्याचे लोक (बनी-इस्राएलांशीं) करीत; आणि ज्या (मोठमोठ्या) उंच इमारती (त्यांच्याकडून बिगारीमध्यें) उभारीत होते; (हें सारें प्रकरण) आह्मीं हाणून पाडिलें. १३७. आणि आह्मीं बनी-इस्राएलांस समुद्रापार पोहोंचवून दिलें; तों त्यांचें अशा लोकांच्याजवळून जाणें झालें कीं जे आपल्या मूर्तींच्या (पूजेच्या) नादांत जमून बसले होते. (त्यांना पाहून बनी-इस्राएल हे, 'मूसा'ला) म्हणूं लागले कीं हे 'मूसा'! या लोकांचे जसे देव आहेत (असाच) एक देव तूं आह्मांलाहि बनवून दे. ('मूसा'नें) उत्तर दिलें कीं तुह्मीं (फारच) अज्ञानी लोक आहां. १३८. हे (मूर्तीपूजक) लोक ज्या (धर्मा)त आहेत त्याची धूळदशा होणार आहे; आणि जीं (जीं) कर्में हे लोक करीत आले आहेत तीं (सर्व) निरर्थक होत. १३९. (मूसा हेंहि) म्हणाला, कां (तुह्मीं असें इच्छितां कीं) परमेश्वराखेरीज अन्य कोणी उपास्य मी तुह्मांकरतां शोधून आणावा? आणि खरें पाहूं जातां, त्यानेंच तुह्मांस सकल जगांच्या लोकांवर श्रेष्ठत्व दिलें आहे. (तर हीच कां त्याच्या उपकाराची फेड?) १४०. आणि (हे बनी-इस्राएलांनो! तो वेळ आठवा कीं) जेव्हां आह्मीं तुह्मांला 'फिरऔना'च्या लोकांपासून तारिलें, कीं ते लोक तुह्मांस (म्हणजे तुमच्या वडिलांस) वाईट वाईट दुःख पोहोंचवीत

---

फिरऔनानें त्यांचा पिच्छा पुरविला व तांबड्या समुद्रावर जाऊन त्यांना गांठिलें. येथें हे लोक सुरक्षित पार पडले आणि फिरऔन आपल्या सैन्यासमवेत गर्क होऊन गेला.

(१) शुभवचन ह्मणजे सीरीया देशावर बनिइस्राएलांस वर्चस्व देणें हें होय.

होते; तुमच्या मुलांस (शोधून शोधून) कत्तल करीत, आणि तुमच्या स्त्रिया (म्हणजे मुलींच्या जाती)स (आपल्या सेवेसाठीं) जिवंत राखीत. आणि ह्यांत तुमच्या पालनकर्त्याकडून (तुमच्या सहनशीलतेची) मोठी (सक्त) परिक्षा होती. १४१. आणि आम्हीं 'मूसा'शीं तीस रात्रींचा वायदा केला; आणि आम्हीं दहा (रात्री त्यांत आणखी वाढवून त्यां)नीं तिसाला पुरे (चाळीस) करून टाकिले. आणि 'मूसा'चे पालनकर्त्याचा वायदा चाळीस रात्रींचा (असा) पुरा होऊन गेला. आणि 'मूसा' (तूर पर्वतावर जातांना) आपला भाऊ 'हारून' यास सांगून गेला कीं तूं माझ्या लोकांमध्यें माझें प्रतिनिधित्व करीत राहा व (त्यांच्यांत) संप (काईम) राख आणि फिसादखोरांच्या मार्गावर चालूं नकोस. १४२. आणि जेव्हां 'मूसा' आमच्या वायद्यानुसार (तूर पर्वतावर) हजर झाला व त्याच्या पालनकर्त्यानें त्याशीं संभाषण केलें, तेव्हां ('मूसा'नें) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! मला तूं (आपलें) दर्शन दे; कीं मीं तुला (एक नजर) पाहावें. (परमेश्वरानें) सांगितलें कीं तूं मला कधींच न पाहूं शकशील. पण होय, (अशीच हौस आहे तर समोरच्या ह्या) पर्वताकडे पाहा (कीं मी आपल्या अद्भुत सामर्थ्यानें त्यावर विराजमान होईन). मग जर (हा पर्वत) आपल्या जागीं स्थिर राहिला, तर (मात्र जाण कीं) मलाहि तूं पाहूं शकशील. मग जेव्हां त्याच्या पालनकर्त्यानें पर्वतावर (आपलें) जाज्वल्य स्वरूप प्रगट केलें, तेव्हां

(१) हजरत मूसा पैगंबराशीं परमेश्वरानें वायदा केला होता कीं तुह्मीं तूर पर्वतावर येऊन एक महिनाभर ईश्वरोपासना करा; म्हणजे आह्मीं तुह्मांस तौरात पुस्तक देऊं. ज्या प्रमाणें आमचे पैगंबर साहेब–परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो–पैगंबरीचें काम चालू करण्याचे पूर्वी हिरा नांवाचे गुहेंत एकांतीं बसून ध्यानस्थ असत तशाच प्रकारचा एकांतवास कदाचित् हाहि असेल. असो, मग परमेश्वरानें एका महिन्याच्या जागीं चाळीस दिवस केले कीं मूसा यांनीं पूर्णपणें आपली चित्तशुद्धि करून घ्यावी. सारांश, चाळीस दिवस पुरे झाल्यावर त्यांना तौरात पुस्तक मिळालें व ते तूर पर्वतावरून खालीं आले.

(भूकंप झाला व परमेश्वरानें) त्याला चकनाचूर केलें व 'मूसा' मूर्च्छित होऊन पडला. नंतर जेव्हां तो शुद्धीवर आला तेव्हां असें बोलूं लागला कीं (हे जगत्पालका!) तूं पवित्र आहेस; मी (दर्शनाची जी गैरशिस्त मागणी केली होती त्याबद्दल) तुझ्या हुजुरांत पश्चात्ताप करितों. आणि (तुजवर) विश्वास ठेवणाऱ्यांत पहिला (विश्वासू सेवक) मी आहें. १४३. (परमेश्वरानें) फर्माविलें कीं हे 'मूसा'! मी तुला आपल्या पैगंबरी व संभाषणाद्वारें (इतर) लोकांत निवडून घेतलें; तर जे (तौरातचे लेख) मी तुला दिले आहेत ते घे व आभार मानणारांपैकीं हो. १४४. आणि आह्मीं (तौरातचे) तक्तयांत 'मूसा'(चे आचरण्या)साठीं हरतऱ्हेचा बोध व प्रत्येक गोष्टीचा तपशील लिहून दिला होता; ह्मणून (आह्मीं 'मूसा'ला आज्ञा केली कीं तूं) या (तौरात पुस्तका)ला दृढपणें धरून राहा, (ह्मणजे त्याप्रमाणें आचरण कर); आणि आपल्या लोकांसहि सांग कीं या (पुस्तका)च्या अत्युत्तम[1] गोष्टी त्यांनीं पदराला गांठ बांधून ठेवाव्या; (व त्यांना हेंहि समजावून दे कीं) मी लवकरच तुह्मां लोकांस आज्ञाभंजकांचें[2] घरहि दाखवून देईन; (कीं तें कसें उजाड होतें!) १४५. जे लोक विनाकारण मुलखांत अकडत फिरतात, मी त्यांना आपल्या हुकमांकडून विमुख राहूं देईन; आणि (त्यांचीं अंतःकरणें

(१) ज्या कामांचा करण्याचा हुकूम आहे तीं सर्व चांगलीं कामें होत; आणि ज्यांची मनाई आहे तीं वाईट कामें होत.

(२) भाषांतरांत आह्मीं जो अर्थ पत्करला आहे त्याच्या दृष्टीनें आज्ञाभंजकांचें घर ह्मणजे इजिप्त देशीय लोकांचें घर, कीं त्यांच्या जाचजुलमामुळें बनी-इस्राएलांस इजिप्त देश सोडून देणें भाग पडलें व मग शेवटीं ते आपणहि उजाड झाले. अथवा आज्ञाभंजकांचें घर ह्मणजे सिरीया देश कीं ज्याचा वायदा बनी-इस्राएलांशीं होता; आणि तो हजरत मूसाचे हयातींत तर नाहीं; पण त्यांच्या मरणोत्तर बनीइस्राएलांच्या हातीं आला. पहिल्या अर्थांत एक प्रकारचा बोध आहे व दुसऱ्यांत खुषखबर आहे. पण खुषखबरेचा अर्थ घेतल्यास भाषांतर असें होईल:–आज्ञाभंजकांचें घरही दाखवून देईन (व तुह्मी त्यांत वास्तव्य कराल).

अशीं कठोर करून टाकीन कीं) जरी ते (सर्व जगांतील) ऐकू-णेक चमत्कारहि पाहतील तरीहि ते त्यांचा विश्वास धरणार नाहींत. आणि जरी सरळमार्ग त्यांना दिसून येईल, तरीहि ते त्यास (आपला) मार्ग ह्मणून पत्करणार नाहींत. आणि जर चुकीचा मार्ग त्यांना दिसून येईल तर ते त्यास मार्गा दाखल स्वीकारितील. ही (वक्रगति त्यांच्यांत) यासाठीं (उत्पन्न झाली) कीं त्यांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड ह्मटलें व त्यांज-कडून बेपर्वाई करीत राहिले. १४६. आणि ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस व शेवट(च्या दिवसा)चे नजरानजर होण्यास खोटें मानिलें त्यांचें केलें सवरलें सर्व अक्रीत झालें. ते जीं (जीं वाईट) कर्मं (जगांत) करीत होते त्यांच्याशिवाय (दुसरा कांहीं) मोबदला त्यांना दिला जाईल कां? १४७. आणि मूसाच्या (तूर पर्वतावर गेल्या) पश्चात त्याच्या लोकांनीं आपल्या डाग-दागिन्या(स ओतून त्यां)चें एक वासरूं बनविलें कीं तें एक (निर्जीव) शरीर असून त्यांतून हंबरण्याचा आवाज (येत) असे; (आणि ते त्याची पूजाअर्चा करूं लागले). (मूर्खांनीं) कां इतकी गोष्टहि पाहिली नाहीं कीं तें त्यांच्याशीं संभाषण देखील करूं शकत नाहीं व त्यांना (धर्माचा एखादा) मार्गहि दाखवूं शकत नाहीं? (कांहीं झालें तरी) हे लोक वासराला (भक्ति प्रीत्यर्थ) घेऊन बसले; आणि (असें केल्यानें ते आपणच आपल्यावर) जुलूम करीत राहिले. १४८. आणि जेव्हां त्यांचें केलें सवरलें त्यांच्या पुढें आलें, (व त्यांस अतोनात पश्चात्ताप झाला,) आणि त्यांनीं आपल्याला (सरळ मार्गाहून) भटकलेले पाहिलें; तेव्हां ते ह्मणूं लागले कीं जर आमचा पालनकर्ता आह्मांवर दया न करील व आमचे अपराध

(१) "सोकिता फी आयदी हिम" या अरबी वाक्याचा लाक्ष-णिक अर्थ 'त्यांस अतोनात पश्चात्ताप झाला' असा होतो; पण शब्दशः अर्थ 'त्यांच्या हातांत पाडिलें गेलें' ह्मणजे 'त्यांचें केलें सवरलें करतलामलकवत् त्यांच्यापुढें आलें' असा होतो. तर या वाक्याचें पूर्ण स्पष्टीकरण होऊन कसलाच भ्रम राहूं नये ह्मणून आह्मी दोन्ही अर्थ येथें दिले आहेत.

क्षमा न करील तर निःसंशय आह्मीं तोट्यांत येऊन जाऊं. १४९.
आणि जेव्हां 'मूसा' (तूर पर्वताहून) आपल्या लोकांकडे संताप व खेद यांनीं उद्विग्न होऊन परतला, तेव्हां (तो लोकांस संबोधून) बोलला कीं माझ्या (गेल्या) पश्चात माझ्या पाठीमागें तुह्मीं (वासराची भक्ति सुरु केली) ही (फारच) वाईट गोष्ट केली. कां तुह्मीं लोक आपल्या पालनकर्त्याचे हुकमापुढेंच घाई करून बसलां? आणि 'मूसा'नें (संतापाचे भरांत) तक्ते[1] फेंकून दिले; व आपला भाऊ ('हारून') याचे डोक्या(चे केंसा)ला धरून त्याला आपल्याकडे ओढूं ताणूं लागला. (यावर 'हारून') म्हणाला कीं हे माझ्या सहोदर (भावा!) लोकांनीं मला दुर्बल जाणिलें आणि ते बहुत करून मला जिवेंच मारून टाकते! तर (माझी बेहुरमती करून) तूं शत्रूंस मजवर हंसवूं नकोस; व मला (या) जालिम लोकांत सामील करूं नकोस. १५०. (यावर सावचित होऊन 'मूसा'नें परमेश्वरापाशीं) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! तूं माझा व माझ्या भावाचा अपराध क्षमा कर, व आम्हां (उभयतां)स आपल्या दये-(चे छाये)त घे; आणि तूं सर्व दया करणाऱ्यांत फारच दयाळू आहेस. १५१. (परमेश्वर म्हणाला कीं हे मूसा!) जे लोक वासराला (भक्तिप्रीत्यर्थ) घेऊन बसले, त्यांना लवकरच त्यांच्या पालनकर्त्याचा कोप येऊन घेरील आणि या लोकींच्या आयुष्यांत फजिती, (ती निराळीच). आणि खोटें कुभांड रचणारांस आम्हीं अशीच शिक्षा देत असतों. १५२. आणि ज्या लोकांनीं वाईट कर्मे केलीं व मग त्यांचे मागून पश्चात्ताप केला व विश्वास धरिला; तर निःसंशय तुझा पालनकर्ता त्या (पश्चात्तापा)नंतर अलबत क्षमाकर्ता व दयाळू होय. १५३. आणि जेव्हां 'मूसा'चा राग शांत झाला, तेव्हां त्यानें (तौरातचे) तक्ते (जमिनीवरून) उचलून घेतले. आणि तौरातचे

(१) हे तक्ते अगर पाट्या कशाच्या बनलेल्या होत्या यांत बराच मतभेद आहे. पण एवढें मात्र खचित कीं ह्यांत दहा ईश्वरी आज्ञा व जुना करार लिहिलेला होता. आणि प्रत्येक तक्ता दहा बारा हाताच्या लांबीचा होता.

लेखांत जे लोक आपल्या पालनकर्त्यास भितात त्यांच्यासाठीं (पूर्ण) सद्बोध व (विपुल) दया होय. १५४. आणि 'मूसा'नें आमच्या वायद्या(वर हजर करण्या)साठीं आपल्या लोकांतून सत्तर माणसें निवडून घेतलीं. मग जेव्हां त्यांना भूकंपानें येऊन गांठिलें, तेव्हां ('मूसा'नें) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! जर तूं इच्छितास तर माझ्यासहित या लोकांचा तूं पहिल्यानेंच नाश करून टाकतास. आमच्यांतून जे लोक मूर्ख होत, ते जी (एक खोडी) करून बसले त्याच्या शासनार्थ कां तूं आमचा नाश करून टाकतोस? ह्या सर्व केवळ तुझ्या कसोट्या (व लीला) होत त्या (कसोट्यां)च्या योगें ज्याला तूं इच्छिशील त्याला बहकवशील व ज्याला इच्छिशील त्याला सन्मार्गीं लावशील. तूंच आमचा पुरस्कर्ता आहेस; तर तूं आमचे अपराध क्षमा कर व आह्मांवर दया कर. आणि तूं सर्व क्षमा करणाऱ्यांत उत्तम (क्षमाकर्ता) आहेस. १५५. आणि इहलोक व परलोक यांत (या दोहोंचें) कल्याण तूं आमच्या नांवें लिहून टाक; अर्थात् आह्मीं तुझ्याच मार्गास लागलों आहों. (परमेश्वर) ह्मणाला कीं माझी जी शिक्षा आहे तीत ज्याला मी इच्छितों त्याला (पात्र समजून) पिडितों; आणि माझी जी दया आहे ती (पात्रापात्र अशा) सर्व वस्तूंस व्यापून आहे. तर जे लोक (मला)

---

(१) हजरत मूसा ह्यांनीं वासराच्यापूजेपासून पश्चात्ताप करविण्यास आपल्या लोकांकडून सत्तर माणसें निवडून घेतलीं व त्यांस तूर पर्वतावर घेऊन गेले. तेथें त्या लोकांनीं परमेश्वराचें संभाषण ऐकिलें, तों त्यांनीं हजरत मूसापाशीं अशी दरखास्त केली कीं जोंपर्यंत आह्मीं परमेश्वरास आपल्या डोळ्यांनीं पाहून घेणार नाहीं तोंपर्यंत आह्मीं तुझ्या बोलण्याचा भरंवसा करणारच नाहीं कीं परमेश्वरच तुझ्याशीं संभाषण करितो. या उद्धटपणाचे शासनार्थ त्यांच्यावर वीज पडून ते नाश पावले. हजरत मूसानीं प्रार्थना केली कीं हे परमेश्वरा! हे लोक निर्बुद्ध आहेत यांच्यावर दया कर. तेव्हां परमेश्वरानें त्यांना पुन्हां जिवंत केलें. हे लोक कां गेले होते यांत जरी मतभेद आहे तरी वाक्यसंबंधावरून इतकें माहीत होतें कीं ते वत्सपूजेपासून पश्चात्ताप करण्यासाठीं गेले होते.

भिऊन चालतील व जकात देतील आणि जे आमच्या निशाण्यांचा विश्वास धरतील अशा लोकांच्या नांवानें मी ती (खास करून) नोंदून ठेवीन. १५६. (ह्यानें माझा उद्देश असे तत्कालीन ग्रंथधारी लोक होत कीं) जे (माझा हा) प्रेषित निरक्षर भविष्यवादी ('मोहंमद') याचें अनुकरण करतात कीं त्या(च्या शुभवर्तमाना)स ते आपल्यापाशीं 'तौरात' व 'इंजील' यांजमध्यें लिहिलेलें पावतात. तो त्यांना चांगलें (तेंच करायास) सांगतो आणि वाईट कामाची त्यांना मनाई करितो; आणि शुद्ध वस्तु त्यांच्यासाठीं हलाल व अशुद्ध वस्तु त्यांच्याठायीं निषिद्ध करितो. आणि (कडक नियमांचें) ओझें जें त्या लोकां(चे शिरा)वर (लादलेलें) होतें तें व जोखडें जीं त्यांच्या (माने)वर (पडलेलीं) होतीं तीं सर्व तो त्यांच्यावरून उतरून ठेवितो. तर ज्या लोकांनीं या ('मोहंमद' पैगंबरा)वर विश्वास ठेविला व त्याला पुस्ती दिली व त्याची कुमक केली आणि (बोधरूपी)

(१) निरक्षर हा 'उम्मी' या शब्दाचा अर्थ आहे. निरक्षर होणें हें इतर सर्व लोकांसाठीं दूषण आहे; पण इस्लामचे प्रकाशक हजरत मोहंमद पैगंबरांसाठीं हे मोठें भूषण होतें. त्यांना न लिहितां येत होतें व न वाचतां येत होतें, पण दिव्य प्रकटीकरणाद्वारें मोठमोठे पढलेले व बहुश्रुत लोकांस ऐहिक व पारलौकिक ज्ञान व व्यवस्था शिकवून गेले.

(२) तौरात म्हणजे जुना करार अनुवाद अ. १८:१५, १९,२० आणि अ. ३३:२. इंजील म्हणजे नवा करार, योहान्न अ. १४:१५,१६ व २६, ३० आणि अ. १६:७ यांत हजरत मोहंमद पैगंबरांचें नांव कांहीं गुणवर्णनासह आलेलें आहे; तेथें पाहा.

(३) तौरात वाचल्यानें दिसून येतें कीं मूसाचे शास्त्राचे, नमाज, उपास, शुद्धीकरण व यज्ञयागादि, नियम फारच सक्त होते. सारांश, कापडावर गलिच्छ पदार्थ लागल्यास तें कातरून टाकावें व अंगावर लागल्यास तेवढें अंग सोलून टाकावें अशी आज्ञा होती. यहुद्यांचे यज्ञयागादि संस्कार इतके कठीण आहेत कीं विरळाच कोणी एखादा यहुदी आपल्या धर्मशास्त्रानुसार प्राणी हलाल करीत असेल!

जो प्रकाश (ह्मणजे कुर्आन्) त्याच्या संगें पाठविला गेला आहे त्याच्या मागें मागें चालले; हेच लोक (आपल्या मनोरथांत) सफल होत. १५७. (हे पैगंबरा! तूं लोकांस) सांग कीं अहो लोकांनों! मी तुम्हां सर्वांकडे त्या परमेश्वराचा पाठविलेला (आलों) आहें कीं आकाश व पृथ्वी यांचें (अखिल) राज्य त्याचेंच होय. त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य नाहीं; तोच जगवितो व मारतोहि तोच. तर (लोकांनों!) परमेश्वरावर विश्वास ठेवा आणि त्याचा प्रेषित निरक्षर भविष्यवादी ('मोहमद') याजवरहि; कीं (तो स्वतःहि) परमेश्वरावर व त्याच्या पुस्तकांवर विश्वास ठेवितो. आणि तुह्मीं त्याचेंच अनुकरण करा कीं कदाचित् तुह्मीं सरळ मार्गावर येऊन जाल. १५८. आणि 'मूसा'चे लोकांपैकीं कांहीं लोक (असेंहि) आहेत कीं जे सत्य गोष्टीचा मार्ग दाखवितात व सत्याला अनुसरूनच (लोकव्यवहारांत) न्यायहि करतात. १५९. आणि आह्मीं बनी-इस्राएलांचे भाग पाडून बारा कुलें, (म्हणजे अर्थात् इतकीं) राष्ट्रें बनविलीं. आणि जेव्हां 'मूसा'जवळ त्याच्या लोकांनीं (प्यावयास) पाणी मागितलें, तेव्हां आह्मीं 'मूसा'ला प्रकटीकरणाद्वारें इषारत दिली कीं तूं आपली काठी त्या (समोरचे) दगडावर मार. (काठी मारताक्षणीं) दगडांतून बारा झरे भळाभळ फुटून वाहूं लागले. प्रत्येक कुलसमूहानें आपापला पाणवटा जाणून घेतला. आणि आह्मीं बनी-इस्राएलांवर आभाळाची सावली केली आणि त्यांच्यावर मन्ना व सल्वा हीं उतरलीं; (व त्यांस परवानगी दिली) कीं हा शुद्ध आहार जो आह्मीं तुह्मांस दिला आहे त्यांतून तुह्मीं खा. आणि त्या लोकांनीं (जो आज्ञाभंग केला कीं परवानगी वांचून तो सांठवून ठेवूं लागले; तर त्या आज्ञाभंगानें) आमचें कांहीं नुकसान केलें नाहीं किंबहुना ते आपलेंच नुकसान करीत राहिले; (कीं शेवटीं मन्ना व सल्वा यांचें येणें बंद होऊन गेलें). १६०. आणि जेव्हां बनी-इस्राएलांस हुकूम दिला गेला कीं या (अरीहा) गांवांत जाऊन राहा व त्याच्या (उत्पन्नां)तून जेथून तुह्मांस हवें असेल तेथून खा; आणि तोंडानें 'हित्ततुन्–' क्षमाक्षमा ह्मणा व दरवाज्यांत साष्टांग नमस्कार

घालीत दाखल व्हा; (कीं असें कराल) तर आह्मीं तुमचे अपराध क्षमा करून टाकूं. (आणि) जे लोक (मनोभावानें आमचे हुकूम) उत्तम बजावितील आह्मीं त्यांस (आपल्याकडून कांहीं) जास्तहि देऊं. १६१. तर त्यांच्यांतून जे लोक खोडकर होते ते, जो (क्षमेचा) बोल[1] त्यांना शिकविला गेला होता तो बदलून आणखीच कांहीं बोलूं लागले; तेव्हां आम्हीं ते जो खोडकरपणा करीत होते त्याच्या शासनार्थ त्यांच्या ठायीं आकाशांतून शिक्षा सादर केली. १६२. आणि (हे पैगंबरा!) बनी-इस्राएलांस (आठवून देण्यासाठीं त्यांस) समुद्रकांठावर जें गांव वसलेलें होतें त्याचा (जरा) अहवाल तर पूस; कीं जेव्हां (त्यांचे वडील) शब्बाथमध्यें[2] मर्यादेचें उल्लंघन करूं लागले: जेव्हां त्यांच्या शब्बाथचे दिवशीं त्यांचे मासे धडधडीत (पाण्याच्या वरती) त्यांच्यासमोर येऊन गोळा होत; आणि ते शब्बाथ पाळीत नव्हते त्या दिवशीं मासे त्यांच्याजवळूनहि फिरकत नसत. हे लोक आज्ञाभंजक होते ह्मणून आम्हींहि अशाच तऱ्हेनें त्यांना ताडून पाहत असूं. १६३. आणि जेव्हां त्यांच्यापैकीं कांहीं लोकांनीं (जे इतर लोक शब्बाथचे दिवशीं शिकार करण्याची मनाई करीत होते त्यांस) म्हटलें कीं ज्या लोकांस परमेश्वर नष्ट करणार अगर त्यांना कडक शिक्षेंत पिडणार आहे अशा लोकांस तुम्हीं (वृथा) कां म्हणून उपदेश करितां बरें? त्यांनीं उत्तर दिलें कीं (आम्हीं तर) तुमच्या पालनकर्त्यापुढें (आपल्यास) दोषमुक्त करून घेण्याच्या निमित्तानें (उपदेश करितों); आणि (हाहि उद्देश होय) कीं कदाचित् हे लोक (परमेश्वराला)

---

(१) हा बोल हित्ततुन् म्हणजे क्षमा क्षमा असा होता पण त्याच्याजागीं ते लोक हिंत्ततुन म्हणजे गहूं हा शब्द बोलूं लागले. कारण त्यांच्या खोडकरपणामुळें त्यांस अध्यात्मिक गोष्टींची गोडी न वाटतां ते इहलौकिक क्षणभंगुर वस्तुकडे झुकले.

(२) शब्बाथ म्हणजे शनिवारचा दिवस ज्यास यहुदी लोक पवित्र म्हणून पाळतात; व त्या दिवशीं ते कोणतेंहि काम करीत नाहींत. पाहा पृष्ट ३१, टीप १.

भिऊन वागतील. १६४. तर जेव्हां (या आज्ञाभंजक लोकांनीं) त्यांना जे उपदेश केले गेले होते ते विसरून टाकिले; तेव्हां जे लोक वाईट कामापासून मनाई करीत होते त्यांस तर आम्हीं वांचवून घेतलें आणि जे लोक (दाटून) खोडकरपणा करीत राहिले त्यांस, त्यांनीं जो आज्ञाभंग केला त्याच्या शासनार्थ, आम्हीं सक्त शिक्षेंत पिडिलें. १६५. मग ज्या कामापासून त्यांना मनाई केली जात होती त्यांत जेव्हां ते मर्यादेचे बाहेर गेले तेव्हां आम्हीं त्यांस फर्माविलें कीं माणसांतून उठलेलीं अशीं (तुच्छ) वानरें बनून जा. (आणि ते वानर बनून गेले.) १६६. आणि (हे पैगंबरा! बनी-इस्राएलांस तो वेळहि आठवून दे कीं) जेव्हां तुझ्या पालनकर्त्यानें (त्यांस) बजावून दिलें होतें कीं तो त्यांच्यावर पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत अशा लोकांस (सत्ताधारी) नेमून पाठवील कीं जे त्यांस (वाईट) वाईट यातना पोहोंचवीत राहतील. (हे पैगंबरा!) निःसंशय तुझा पालनकर्ता अलबत शिक्षाहि फार जलद देतो; आणि निःसंशय तो क्षमाकर्ता (व) दयाळूहि होय. १६७. आणि आम्हीं बनी-इस्राएलांस समूह समूह करून मुलकांत (चोहोंकडे त्यांची) फांकाफांक करून टाकिली. (पण,) त्यांच्यापैकीं कित्येक तर सदाचरणी होते आणि त्यांतून कित्येक ह्याशिवाय होते. आणि आम्हीं त्यांना सुख व दुःख या (दोहों तऱ्हे)नीं अजमाविलें कीं कदाचित् ते (आम्हांकडे)वळतील. १६८. नंतर त्यांच्यामागून अशी (अजागळ) पिढी त्यांच्या जागीं आली कीं ते (वडिलांचे जागीं तौरात) पुस्तकाचे वारस तर बनले. (पण, त्यांची तऱ्हा अशी कीं ईश्वराज्ञेंत फेरबदल करण्याचे मोबदला त्यांना) ह्या कनिष्ठ जगाचा कोणचाहि जिन्नस (मिळाल्यास ते तो बिनधडक) स्वीकारतात. आणि (त्यांच्या नजरेंत या पातकाचें कांहीं महत्वच नाहीं ह्मणून) ते ह्मणतात कीं आह्मांस (या पातकाची) क्षमा तर

(१) यहुदी उर्फ बनी-इस्राएल हे परमेश्वराशीं आपला निकट संबंध आहे असें प्रतिपादीत व ह्मणत कीं 'आह्मीं परमेश्वराचीं लेंकरें व त्याचे आवडते आहोंत'; आणि 'कांहीं नेमक्या दिवसाशिवाय नरकाग्नि आह्मांला स्पर्शहि तर करणार नाहीं.' अशा त्यांच्या फाजील दाव्यामुळें

होऊनच जाईल. आणि जर अशाच तऱ्हेची एखादी जगिक वस्तु (पुन्हां) त्यांच्या पुढें येऊन जाईल तर तीहि ते घेऊनच सोडतील. त्या लोकांपासून कां (तौरात) पुस्तकांतला (लेखी) करार घेतला गेला नाहीं कीं त्यांनीं सत्य गोष्टीशिवाय दुसरें कांहींच परमेश्वरासंबंधानें व्यक्त करूं नये? आणि जें कांहीं त्या (पुस्तकां)त आहे तें त्यांनीं वाचून घेतलें. आणि जे लोक (परमेश्वराला) भिऊन चालतात त्यांच्या ठायीं परलोकींचें घर (या जगापेक्षांहि) उत्तम होय. (हे बनी-इस्राएलांनों!) तुम्हीं कां (इतकेंहि) समजत नाहीं? १६९. आणि (बनी-इस्राएलांपैकीं) जे लोक (तौरात) पुस्तकास दृढपणें धरून आहेत व नमाज पढतात, तर अशा सदाचरणी लोकांचा मोबदला आम्हीं वायां जाऊं देणार नाहीं. १७०. आणि (हे पैगंबरा! तूं आपल्या वेळेच्या यहुद्यांस तो काळहि आठवून दे कीं) जेव्हां आम्हीं त्यांच्या (वडिलां)वर पर्वतास अशा रीतीनें आणून लोंबकळविलें; जणूं कीं तें एक छत्रच होतें; आणि ते पक्कें समजले कीं हा (पर्वत) त्यांच्यावर आतां पडलाच (पडला. आणि आम्हीं हुकूम दिला कीं हें तौरात पुस्तक) जें आम्हीं तुम्हांस दिलें आहे त्याला दृढपणें धरून राहा आणि जें कांहीं त्यांत (लिहिलेलें) आहे तें स्मरणीं घ्या; (कीं असें केल्यानें) नवल नव्हे कीं तुम्हीं (ईश्वराला) भिऊन वागूं लागाल. १७१. आणि (हे पैगंबरा! या लोकांस ती वेळहि आठवून दे कीं) जेव्हां तुझ्या पालनकर्त्यानें 'आदमा'चे मुलांपासून म्हणजे त्यांच्या पाठींतून त्यांचा वंश (बाहेर काढून) घेतला व त्यांच्यावर खुद्द त्यांनाच साक्षी बनविले. (अशा तऱ्हेनें कीं त्यानें त्यांस पुसलें) कां मी तुमचा

---

त्यांना तौरात पुस्तकांत फेरबदल करण्याचें धारिष्ट झालें होतें. या वाक्याचा अर्थ असा कीं क्षमेच्या भरवंशावर आजवर त्यांनीं तौरातमध्यें जे फेरफार केले ते या अस्थानीं धारिष्ट्यानुळेंच होत. पुढेंहि हें पुस्तक त्यांच्या हातांत सुरक्षित राहणें कठीण. लांचलूच त्यांच्यासमोर आली कीं तोंडांत पाणी यावयाचेंच.

पालकर्ता नव्हें? ते सर्व बोलले, होय, आम्हीं (या गोष्टीचे) साक्षी आहोंत ; (आणि हें या हेतुनें केलें कीं असें न व्हावें कीं) कोठें पुनरुत्थानाचे दिवशीं तुम्हीं म्हणूं लागाल कीं आम्हीं तर या गोष्टीकडून गाफिलच राहिलों. (म्हणजे आम्हांला कोणी कांहीं सांगितलें नाहीं.) १७२. अगर तुम्हीं असें म्हणूं लागाल कीं पूर्वीपासून तर आमच्या वडिलांनींच (परमेश्वराचे) साथी मानिले आणि आम्हीं त्यांचे वंश होतों (कीं) त्यांच्यामागून (जगांत आलों. वडिलांस जसें करितांना पाहिलें तसेंच आम्हींहि करूं लागलों.) तर (हे परमेश्वरा! पहिल्यानें) चूक करणाऱ्यांनीं जी (चूक) केली तिच्या (अपराधा)बद्दल कां तूं आमचा नाश करून टाकतोस? १७३. आणि आम्हीं अशाच रीतीनें (आपल्या) निशाण्यांचें सविस्तर वर्णन करितों कीं कदाचित् हे लोक (आम्हांकडे) वळतील. १७४. आणि (हे पैगंबरा! तूं) या लोकांस, आम्हीं ज्या मनुष्याला आपले चम-

---

(१) परमेश्वर आम्हां मानवांस आपल्या प्रेषितांद्वारें वेळोवेळीं हा अनादिकाळाचा करार आठवून देतो. शिवाय त्यानें मनुष्याची मनोवृत्तीच अशी केली आहे कीं त्याला आपणच कळून येतें कीं परमेश्वर आहे व तो एकच आहे; ह्याला कसलेंच प्रमाण नको. मनुष्याचा अंतर्याम आपोआपच साक्ष देतो व हा विचार आपोआपच त्याच्या मनांत उत्पन्न होतो. सारांश मानव सृष्टीची घटनाच अशी झाली आहे कीं तो परमेश्वराचें अस्तित्व नाकारूं शकतच नाहीं. मोठमोठाले हेंकड लोकांस अनिवार संकटसमयीं परमेश्वराचें स्मरण झाल्याशिवाय राहात नाहीं.

(२) याचा अशा एका मनुष्याकडे इशारा आहे कीं जो एक ईश्वरभक्त होता. भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं त्याचें नांव 'बलअम बाऊर' असें होतें. दुर्दैवेंकरून त्याचे हातून पाप झालें. जे जे चमत्कार त्याला प्राप्त झाले होते ते सर्व हिरावून घेण्यांत आले; जणों कीं त्याला ईश्वरमान्यतेची जी खिलात मिळाली होती ती त्यानें उतरून टाकली व ज्या चमत्कारावर जगिक मान्यतेची भिस्त होती तीही नाहींशी झाली. परमेश्वराचें भय त्याच्या मनांतून गेलें ह्मणून तो सर्व बाजूंनीं क्षुल्लक झाला. जसा धोब्याचा कुत्रा घरचा ना घाटचा. हुबेहूब हीच स्थिति यहुद्यांची झाली कीं त्यांनीं ईश्वराज्ञेचा भंग

त्कार दिले होते व मग त्यानें ती कांत फेंकून दिली, तोंच सैतान त्याच्या पाठीस लागला (व त्यानें त्याला बहकवलें), तेव्हां तो बहकलेल्या (लोकां)त जाऊन सामील झाला, अशा त्या मनुष्याची हकीकत वाचून ऐकीव. १७५. आणि जर आह्मीं इच्छितों तर त्याच (चमत्कारांचे) प्रतापानें आम्हीं त्याला उच्चपद देतों; परंतु तो भूलोका(चे अधोगती)-कडेच झुकून राहिला व आपल्या मनोवासनेच्या नादीं लागून गेला. तर त्याची उपमा कुत्र्याचे उपमे सारखी होऊन गेली; कीं जर तूं त्याला खिदडशील, तर तो जीभ बाहेर काढील; अगर तूं त्याला (त्याच्याच स्थितिवर) सोडून देशील, तरीहि तो जीभ बाहेर काढील. ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें त्यालोकांची हीच गत होय. तर (हे पैगंबरा!) या गोष्टी (ह्या लोकांस) निवेदन कर कीं हे लोक कदाचित् विचार करतील. १७६. ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड ह्मटलें त्यांचीहि (किती तरी) वाईट गत होय! आणि (त्यांच्या ह्या पाखंड ह्मणण्यानें) ते आपणच आपलें नुकसान करित राहिले आहेत. १७७. परमेश्वर ज्याला सन्मार्गाची बुद्धि देईल तोच सन्मार्गास लागलेला; आणि ज्याला तो बहकवून टाकील, तर तेच लोक तोटा भोगणारे होत. १७८.

---

केल्यामुळें त्यांचे जगिक राज्य गेलें व पारलौकिक पायमल्ली याहूनहि जास्त झाली. कुत्र्याची जीभ बाहेर काढण्याचा जो मजकूर आहे त्यांत पूर्ण तुलनात्मक साम्य नाहीं. पण कुत्र्याचा हीनपणा व क्षुल्लकपणाचे स्थितीचें वर्णन आहे. जीभ बाहेर काढण्यानें कळून येतें कीं त्याच्यावर मोठें संकट पडलें आहे अगर त्याला मोठी तहान लागली आहे व हें संकट तो जीभ बाहेर काढून दर्शवीत आहे. म्हणजे तो मनुष्य कुत्र्यासारखा क्षुल्लक होऊन गेला; आणि तो एकटाच नव्हे तर यहुदी कीं ज्यांनीं परमेश्वराचे निशाण्यांस पाखंड म्हटलें ते सर्वच क्षुल्लक झाले.

(१) कुराणांत जेथें कोठेंहि अशा प्रकारचा मजकूर आला आहे–आणि अशीं स्थळें पुष्कळ आहेत कीं ज्यांत परमेश्वरानें सन्मार्ग व कुमार्ग यांचे दाखविणें आपल्याकडे लाविलें आहे–तेथें मूळ हेतु हा होय कीं पैगंबर साहेबांनीं नास्तिकांच्या नाकारानें दिलगीर होऊं नये व समजून राहावें

आणि आह्मीं बहुतेक जिन्नात व मनुष्यें 'जहन्नम' साठींच निर्माण केलीं आहेत. त्यांना अंतःकरणें तर आहेत, (पण) त्यांनीं ते समजण्याचें काम घेत नाहींत; आणि त्यांना डोळेहि आहेत (पण) त्यांनीं ते पाहण्याचें काम घेत नाहींत; आणि त्यांना कानहि आहेत, (पण,) त्यांनीं ते ऐकण्याचें काम घेत नाहींत. (सारांश,) हे लोक चतुष्पाद जनावरांसारखे आहेत, किंबहुना (त्यांच्याहूनहि) ते जास्तच बहकलेले होत. हेच ते लोक होत कीं जे (धर्माकडून बिलकूल) बेफाम आहेत. १७९. आणि परमेश्वराचीं (सर्वच) सुंदर नांवें होत. तर त्याचीं नांवें घेऊन त्याला (ज्या पाहिजे त्या नांवानें) बोलवा. आणि जे लोक त्याच्या नांवांत नास्तिकपणा करतात त्यांना (त्यांच्याच स्थितीवर) सोडून द्या; ते जें जें कांहीं करीत असत त्याचा मोबदला त्यांना लवकरच दिला जाईल. १८०. आणि आह्मीं जी (सृष्टि) निर्मिली आहे तींत असेहि कांहीं लोक होत कीं जे सत्याचाच मार्ग दाखवितात व त्यास अनुसरून (लोकांचे प्रकरणांत) न्यायहि करतात. १८१. आणि ज्या लोकांनीं आमच्या

---

कीं सन्मार्ग व कुमार्ग हे दोन्हीं परमेश्वराकडूनच होत; तोच ज्याला इच्छितो त्याला सरळमार्ग दाखवितो व ज्याला इच्छितो त्याला बहकवितो. तें असें कीं परमेश्वर इच्छिता तर मनुष्यांचे जागीं देवदूत निर्माण करता व त्यांच्या प्रकृति स्वभावांत नास्तिकपणा व पाप यांचीं प्रवृत्तीच नसती. परंतु त्यानें हेतु पुरःसर कीं ज्याचें प्रयोजन तोच खूप जाणतो, मनुष्यास सारासार विचार व सदसद्विवेकबुद्धि दिली व त्याला स्वतंत्र कर्ता भोक्ता केला; कीं पाहिजे तर त्यानें पुण्य व विश्वासाचा मार्ग पत्करावा आणि पाहिजे तर पाप, नास्तिकपणा व अविश्वासाचा मार्ग स्वीकारावा. पुण्यशील व विश्वासू अगर पापी व अविश्वासू बनणें मनुष्याचें काम आहे; आणि मनुष्याला तारतम्य व अधिकार देणें परमेश्वराचें काम आहे.

(१) नांवांत नास्तिकपणा करण्याचे अनेक प्रकार आहेत. त्यांत जीं विशेषणें परमेश्वरालाच योग्य आहेत तीं अन्य कोणाला लावणें; उदाहरणार्थ प्रभु, अन्नदाता सर्वशक्तिमान सर्वज्ञानी वगैरे, हेंहि नास्तिकपणाचें द्योतक होय.

निशाण्यांस पाखंड ह्मटलें, आह्मीं त्यांना, त्यांस जाणीवहि होणार नाहीं अशा तऱ्हेनें हळू हळू (नरकाग्नीकडे ओढून) घेऊन जाऊं. १८२. आणि मी त्यांस (जगांत) अवकाश देतों; माझा डाव निःसंशय फार पक्का (डाव) होय. १८३. आणि कां या लोकांनीं विचार केला नाहीं कीं यांचा सोबती (ह्मणजे आमचा हा 'मोहंमद' पैगंबर) यास कोणा तऱ्हेचें वेड तर नाहींच? तो तर राजरोसपणें (लोकांस ईश्वरी शिक्षेचें) भय दाखविणारा आहे एवढेंच. १८४. आणि कां या लोकांनीं आकाश व पृथ्वी यांची राज्य-व्यवस्था व परमेश्वरानें निर्माण केलेली एखादी वस्तु यांचेंहि अवलोकन केलें नाहीं? आणि या गोष्टीचेंहि कीं नवल नाहीं कीं त्यांचा (मरण) काल जवळ येऊन लागला असेल? तर आतां (एवढें समजाविल्या) नंतरहि आणखी अशी कोणती गोष्ट आहे कीं जिच्यावर ते विश्वास ठेवतील? १८५. ज्याला परमेश्वर बहकवील, तर मग त्याचा कोणीच सन्मार्गदर्शक नाहीं. आणि परमेश्वरच या (नास्तिकां)स (त्यांच्या-स्थितीवर) सोडून आहे कीं त्यांनीं आपल्या शिरजोरी व हेंकडाईतच भटक्या मारीत फिरावें. १८६. (हे पैगंबरा! लोक) तुला (पुनरुत्थानाचे) घटके संबंधीं प्रश्न करतात कीं कोठें तिचें ठावठिकाणहि आहे? तूं (त्यांना) जबाब दे कीं तिचें ज्ञान तर मात्र माझ्या पालनकर्त्यालाच होय. तोच केवळ तिला तिच्या (नियमित) वेळीं उघडकीस आणून दाखवील. (ती एक फार) भारी गोष्ट होय कीं आकाश व पृथ्वींत (घडून येईल. पुनरुत्थानाची) घटका तर केवळ एकाएकींच तुह्मां लोकांपुढें येऊन ठेपेल. (हे पैगंबरा!) हे लोक तुला (पुनरुत्थानाचा अहवाल अशा आग्रहानें) पुसतात, जणों कीं तूं तिच्या शोधांतच लागून आहेस (व तुला तिचा वेळ माहीत आहे)! (तूं त्यांना) सांग कीं पुनरुत्थानाचें ज्ञान तर फक्त परमेश्वरालाच आहे. परंतु बहुतेक लोक समजत नाहींत. १८७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझें स्वतःचें नफानुकसानहि माझ्या अखत्यारांत नाहीं. (मी बहुत कांहीं इच्छितों,) परंतु जें परमेश्वर इच्छील तेंच (होतें.) आणि जर मी अदृष्ट जाणत असतों तर मी

आपला बहुतसा फायदा करून घेतला असता; आणि मला (कोणा-तऱ्हेचा) अपकारहि न पोहोंचता. मी तर जे लोक विश्वास धरूं पाहतात, त्यांना (नरकाग्नीचें) भय दाखविणारा व (स्वर्गाची) सुवार्ता ऐकविणारा आहें, झालें. १८८. (लोकांनों!) तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें तुम्हांला एका तन मना (म्हणजे 'आदमा') पासून निर्माण केलें आणि त्याच्यांतूनच त्यानें त्याचा जोडा बन-विला कीं पुरुषानें स्त्रीशीं (प्रेमानें) नांदावें. मग जेव्हां तो तिला कवटाळितो, तेव्हां ती एक हलकासा गर्भ धारण करिते; व मग ती त्या (गर्भा)स घेऊन घेऊन फिरते. मग जेव्हां (गर्भामुळें ती जास्त) बोजड होऊन जाते, तेव्हां (पतिपत्नि) हीं उभयतां परमेश्वर जो त्यांचा पालनकर्ता त्याचा धांवा करतात कीं (हे परमेश्वरा!) जर तूं आम्हांस (जितें जागतें) पुरें मूल देशील, तर आम्हीं अर्थात् (तुझे) उपकार मानणारांपैकीं होऊन जाऊं. १८९. मग जेव्हां (परमेश्वर) त्यांना (जितें जागतें) पुरें मूल देतो; तेव्हां परमेश्वरानें त्यांना जी (संतति) दिली होती तींत (इतरांस) परमेश्वराचे साथी[१] बनवूं लागतात. पण ज्यांस ते (परमेश्वराचा) जोडीदार मानतात त्यांच्यापासून परमेश्वर (फार) थोर होय! १९०. कां ते अशा (कल्पित उपास्यांस म्हणजे देवां)स परमेश्वराचा जोडीदार बनवितात कीं जे कोणचीच वस्तु निर्माण करूं शकत नाहींत; व ते स्वतःहि (परमेश्वरानें) निर्माण केलेले होत? १९१. आणि या (जोडीदार मानणाऱ्यां)ची मदत करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं व ते आपणहि आपली मदत करूं शकत नाहींत. १९२. आणि जर तुम्हीं त्यांना सरळ मार्गाकडे बोलवाल, तर (ते निर्जीव असल्यामुळें) तुमच्या

(१) म्हणजे त्यांना संतान झालें कीं ते म्हणूं लागतात कीं अमुक देवाला किंवा पिराला नवस केला होता त्यानें हें संतान दिलें. कधींकधीं ते त्यांचीं नावेंहि पीरबक्ष, सालारबक्ष, कालीप्रसाद अशीं पिराचे वा देवाचे नांवावर ठेवतात. हदीसमध्यें पैगंबराचें असें वचन आहे कीं लोकांच्या नांवांत अबदुल्ला म्हणजे ईश्वरदास आणि अबदुर्रह्मान म्हणजे परम दयाळु परमेश्वराचा दास हीं दोन नांवें परमेश्वराला फार पसंत आहेत.

कह्या प्रमाणें चालूं शकणार नाहींत. (मग ते इतरांस मार्गच काय दाखवूं शकतील?) तुम्हीं त्यांना बोलवाल तर काय अगर गपचिप राहाल तर काय (या दोन्ही गोष्टी) तुमच्या ठायीं बरोबरच होत. १९३. (हे मूर्तीपूजकांनों!) तुह्मीं परमेश्वराशिवाय ज्या लोकांस (आपल्या मदतीसाठीं) बोलावितां, तेहि तुह्मां सारखेच सेवक होत. तर तुह्मीं त्यांना बोलावून पाहा; मग जर तुह्मीं (जोडीदार मानण्याचे दाव्यांत) खरे आहां तर त्यांनीं तुमची फिर्याद ऐकली पाहिजे. १९४ त्यांचे कां असे पाय आहेत कीं ज्यांनीं ते चालतात? अगर त्यांचे असे हात आहेत कीं ज्यांनीं ते (वस्तूंस) धरतात? किंवा त्यांचे असे डोळे आहेत कीं ज्यांनीं ते पाहतात? अगर त्यांचे असे कान आहेत कीं ज्यांनीं ते ऐकतात? (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुह्मीं आपल्या (ठराविक) साथीदारांस (आपल्या मदतीस्तव) बोलावून घ्या. तदनंतर (सर्व मिळून) मजवर आपला डाव चालवा; व मग मला (किंचितहि) अवकाश देऊं नका. १९५. परमेश्वर ज्यानें हें पुस्तक (ह्मणजे कुरआन्) प्रकट केलें आहे तोच माझा पुरस्कर्ता होय. आणि तोच (सर्व) सदाचरणी सेवकांचा (पुरस्कार व) कैवार घेतो. १९६. आणि त्याच्या शिवाय ज्या (उपास्यां)[1]स तुम्हीं (आपल्या मदतीसाठीं) बोलावितां त्यांच्यांत तुमची मदत करण्याचें सामर्थ्य नाहीं व ते आपणहि आपली मदत करूं शकत नाहींत. १९७. आणि जर तुह्मीं त्यांना सरळ मार्गाकडे बोलवाल, तर ते (तुमचें एकहि) ऐकणार नाहींत. आणि (हे वाचक–श्रोत्या! दिसण्यांत) ते तुला असे दिसून येतात, जणों कीं ते तुजकडे (टकटकां) पाहत आहेत; आणि खरें पाहूं जातां, ते पाहात (वाहात कांहींच) नाहींत. १९८. (हे पैगंबरा!) क्षमाशीलता पत्कर व (लोकांस) चांगलें (करावयास) सांग आणि अज्ञानी लोकांपासून एकिकडे राहा. १९९. आणि जर सैतानाकडून (सूड वगैरे घेण्याची) फूस तुझ्या (मनां)त ध्वनित होईल, तर

(१) येथें उपास्य ह्मणजे मूर्ती असा अर्थ आहे. मग त्या कशाच्याहि असोत; त्या संबंधीं कांहीं वाद नाहीं.

तूं परमेश्वराचा आश्रय घेत जा; (कारण,) तो (सर्वांचें) ऐकितो व (सर्व कांहीं) जाणतो. २००. जे लोक (परमेश्वराचें) भय बाळगितात त्यांना जेव्हां कधींहि सैतानाकडचा एखादा विचार स्पर्श करितो, तेव्हांच त्यांना (ईश्वराज्ञेचें) स्मरण होऊन जातें (ह्मणजे त्यांच्या डोळ्यावरून प्रमादपटल दूर होऊन जातें); तोंच ते (सन्मार्ग) पाहूं लागतात. २०१. आणि त्या (नास्तिकां)चे बांधव (ह्मणजे सैतान), त्यांना चुकीचे मार्गांत ओढून ताणून चालवितात व तदनंतर (त्यांचा नाश करण्यांत) कोताई करीत नाहींत. २०२. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां तूं या लोकांपाशीं एखादें (खास तऱ्हेचें कुराणाचें) महावाक्य आणीत नाहींस, तेव्हां ते (आपल्या खोट्या पूर्वग्रहांप्रमाणें) ह्मणतात कीं तूं हेंहि (आपल्याकडून) कां ह्मणून रचिलें नाहींस? तूं (त्यांना) सांग कीं मी तर (आपल्याकडून कांहींच रचीत नाहीं; किंबहुना) माझ्या पालनकर्त्याकडून जें कांहीं मला प्रकट केलें जातें त्याचप्रमाणें मीं चालतों. (लोकांनों!) हें (कुर्‌आन्) सुद्धीबुद्धीच्या गोष्टी होत (कीं ज्या) तुमच्या पालनकर्त्याकडून (आल्या आहेत,) आणि जे लोक (यावर) विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीं तें सद्बोध व दया होय. २०३. आणि (लोकांनों!) जेव्हां कुर्‌आन् वाचलें जात असेल (म्हणजे पैगंबर तुह्मांस वाचून ऐकवीत असेल) तेव्हां (गोंगाट माजवूं नका, तर) कान लावून ऐका व मुकाट्यानें बसा; नवल नव्हे कीं (त्याच्या प्रसादानें) तुह्मांवर दया केली जाईल. २०४. आणि (हे पैगंबरा!) तूं आपल्या मनच्यामनींच नम्रतापूर्वक व भिऊन (भिऊन) मोठ्या शब्दानें नव्हे (तर मंद स्वरानें) सकाळ सांज, आपल्या पालनकर्त्याचें स्मरण कर आणि (त्याच्या स्मरणाकडून) गाफिल होऊं नकोस. २०५. जे (देवदूत) तुझ्या पालनकर्त्यापाशीं आहेत तेहि त्याच्या भक्तिसेवेपासून अहंकार करीत नाहींत; ते त्याचीच पवित्रता वर्णितात व त्याच्याच पुढें साष्टांग नमस्कार घालतात. २०६.

---

(१) ज्याप्रमाणें लोक पैगंबर साहेबांपाशीं फर्माशी चमत्कार मागीत होते त्याचप्रमाणें कुराणाचीं फर्माशी महावाक्येंहि इच्छित होते. परमेश्वरानें पैगंबर साहेबांकडून जबाब दिला कीं पैगंबर साहेब आपल्याकडून कुराण रचित नाहींत, तर ते तुमची मागणी कशी पुरी करणार? ती पुरी करणें परमेश्वराचेंच काम होय.

# अध्याय ८ वा.

## सूरतुल्-अन्फाल्.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. ह्यांत ७५ आयात-महावाक्यें आहेत. याचें नांव सूरतुल्-अन्फाल् ह्मणजे लुटीचें प्रकरण असें पडण्याचें कारण हें कीं बद्रचे लढाईत प्राप्त झालेल्या लुटीच्या वांटणी संबंधानें मुसलमानांस एकमेकांवर एका तऱ्हेचें गुमान उत्पन्न झालें. दरेक इसम आपल्याला जास्त हिस्स्याचा हक्कदार समजत होता; यासाठीं कीं त्यानें आपल्या धारणेप्रमाणें लढाईत अधिक प्रयत्न केले होते. पण परमेश्वरानें त्यांला समजावून दिलें कीं तुह्मांस हा जो विजय प्राप्त झाला अगर लुटीचा माल जो हातीं आला तो तुमच्या प्रयत्नामुळें नव्हे तर निव्वळ परमेश्वराचे कृपेनेंच होय. लुटीचा साराचा सारा माल परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा होय. ज्याला जितकें दिलें जाईल तितकें त्यानें खुशीनें घ्यावें आणि त्यास परमेश्वर व पैगंबर यांजकडचें इनाम समजावें. अशा प्रकारें लुटीची वाट लाविली गेली व लढा मिटला.

**परम दयाळु (आणि) कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

**(हे पैगंबरा! मुसलमान शिपाई) तुला लुटीचे मालाविषयीं प्रश्न करतात. (तर तूं त्यांना) सांगून दे कीं लुटीचा माल तर परमेश्वर व पैगंबर यांचा होय. ह्मणून तुह्मीं लोक (लुटीचे मालाचे वांटणींत झगडा करूं नका आणि) परमेश्वरा(चे कोपा)स भ्या; आणि आपला परस्पर व्यवहार नीट ठेवा; आणि जर तुह्मीं (खरे) मुसलमान आहां तर परमेश्वर व त्याच्या पैगंबराचा हुकूम माना. १. (खरे) मुसलमान तर केवळ तेच होत कीं जेव्हां परमेश्वराचें नांव घेतलें जातें,**

तेव्हां त्यांचीं अंतःकरणें भयभीत होऊन जातात; आणि जेव्हां ईश्वरी महा वाक्यें त्यांना वाचून ऐकविलीं जातात, तेव्हां तीं त्यांचा विश्वास आणखीहि जास्त करितात; आणि (दरेक स्थितींत) ते आपल्या पालनकर्त्यावरच भरंवसा ठेवितात. २. आणि ते नमाज पढतात; आणि आह्मीं त्यांना जें कांहीं दिलें आहे त्यांतून (परमेश्वराचे मार्गांत) खर्च करतात. ३. हेच खरोखर विश्वासू होत. यांच्यासाठीं यांच्या पालनकर्त्यासमीप (मोठमोठे) दर्जे होत; आणि (पापांची) क्षमा व इजतअब्रूची रोजी होय. ४. (आणि हे पैगंबरा! या लोकांत) जसा ('बद्र'चे लढाईचे प्रसंगीं खळवाद उत्पन्न झाला होता तसाच या लुटीचे मालासंबंधानें झाला आहे;) कीं तुझ्या पालनकर्त्यानें (लढाईच्या दोन बाजूंपैकीं) खरी (बाजू) पत्करून तुला आपल्या घरांतून निघण्यास प्रवृत्त केलें. आणि वास्तविक पाहतां, मुसलमानांचा एक पक्ष (तुझ्या निघून उभे राहिल्यानें त्या वेळींहि) नाखुषच होता. ५. कारण ते लोक (सत्य गोष्ट) प्रकट झाल्या उपरांत तुझ्याशीं सत्य गोष्टींत झगडा करूं लागले (व भय-विव्हल होऊन मागें हटूं लागले,) जणूं कीं त्यांना (बळेंच) मृत्युकडे ढकलून दिलें जातें आणि ते (मृत्युला डोळ्यांदेखत) पाहतात. ६. आणि (मुसलमानांनो! हा तो वेळ होता कीं) जेव्हां परमेश्वर तुह्मां (मुसलमानां)स अभिवचन देत होता कीं (मक्केचे मूर्तीपूजकांचे या) उभय पक्षांतून (कोणताहि) एकच (पक्ष गांठून तुम्हीं लढाई द्याल तर तो) तुमच्या हातीं येऊन जाईल. आणि तुह्मीं इच्छित होतां कीं निःशस्त्र (आहेत ते) तुमच्या हातीं यावेत. आणि परमेश्वराची मर्जी अशी होती कीं आपल्या हुकमानें सत्यधर्म काईम करावा आणि नास्तिकांचा मूळच्छेद करून टाकावा; ७. अशासाठीं कीं त्यानें सत्याला सत्य व असत्याला असत्य करून दाखवावें व (मग हवें तर) नास्तिकांस वाईटच वाटो! ८. हा तो वेळ होता कीं तुह्मीं (मुसलमान) आपल्या पालनकर्त्यापुढें फिर्याद करीत होता; तर त्यानें तुमची दाद ऐकून घेतली (व म्हटलें) कीं मी लागोपाठ हजार देवदूतांनिशीं तुमची मदत करीन. ९. आणि ही (दुतांची

मदत) जी परमेश्वरानें केली ती केवळ (तुमच्या) खुष करण्यासाठीं (केली) आणि यासाठीं कीं तुमचीं अंतःकरणें त्यायोगें समाधान पावावींत. आणि (एरव्हीं तर) विजय म्हटला म्हणजे परमेश्वराकडूनच होय. निःसंशय परमेश्वर परमसमर्थ (व) सत्यसंकल्प होय. १०. हा तो वेळ होता कीं परमेश्वर आपल्याकडून (तुह्मां मुसलमानांचे) अभयास्तव तुह्मांवर झोंपेची गुंगी पसरत होता व आकाशांतून तुह्मांवर पाणी वर्षवीत होता कीं तेणें करून तुह्मांस त्यानें शुचिर्भूत करावें व सैतानाचा अमंगळपणा तुह्मांपासून दूर करून टाकावा; आणि या साठीं कीं त्यानें तुमच्या मनाचें धाडस बांधावें व त्या (पाण्या)च्याच योगें (समरांगणांत) तुमचे पाय जमवावेत. ११. (हे पैगंबरा!) हा तो वेळ होता कीं तुझा पालनकर्ता दूतांस फर्मावित होता कीं मी तुह्मांसोबत आहें; तर तुह्मीं मुसलमानांस जमवून ठेवा. मी लवकरच जे नास्तिक आहेत त्यांच्या अंतःकरणांत दहशत घालून टाकीन. (बरें,) तर लगावा (या नास्तिकांचे) मानांवर व लगावा यांच्या (बोटांचे) पेरांपेरांवर. १२. ही या गोष्टीची शिक्षा होय कीं त्यांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विरोध केला. आणि जो परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विरोध करील, तर (त्याला अशीच शिक्षा मिळेल; कारण) परमेश्वर शिक्षेंत फार सक्त होय. १३. (नास्तिकांनों! तुमची) हीच (शिक्षा) होय; तर ह्याची (जरा) गोडी चाखा; आणि (जाणून असा) कीं (अखेर) नास्तिकांस नरकाग्नीची शिक्षाहि (होणें) आहे. १४. अहो मुसलमानांनों! जेव्हां (लढाईचे बेतानें) एकजूट (होऊन आलेल्या) नास्तिकांशीं तुम(च्या लष्करां)ची भेटाभेट होऊन जाईल, तेव्हां तुह्मीं त्यांना पाठ दाखवूं नका. १५. आणि जो कोणी त्या दिवशीं (अशा प्रसंगी) नास्तिकांस आपली पाठ दाखवील, तर (समजा कीं) तो परमेश्वराचे कोपांत येऊन गेला आणि (सरशेवटीं) त्याचें ठिकाण 'जहन्नम' होईल व ती (फारच) वाईट जागा होय; पण तो लढाईसाठीं वळसा घेईल अगर (नास्तिकांसमोरून आपल्या)पक्षास जाऊन मिळेल (तर हरकत नाहीं.) १६. तर (मुसलमानांनों!) नास्तिकांस तुह्मीं मारून टाकिलें नाहीं; किंबहुना त्यांना परमेश्वरानें

**मारून टाकिलें. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां तूं वाळू फेंकलीस, तेव्हां ती तूं फेंकली नाहींस, पण परमेश्वरानें फेंकली; (अशा- साठीं कीं नास्तिकपणाचा पाया त्यानें डगमगून सोडावा) आणि हें कीं मुसलमानांस आपल्याकडून कसास लावून चांगलें बक्षीस (ह्मणजे यश) द्यावें. निःसंशय परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो व (सर्व कांहीं) जाणतो. १७. ही गोष्ट (चांगल्या रीतीनें ऐकून ठेव) आणि (जाणून घे कीं) परमेश्वरास नास्तिकांचे छक्केपंजे ढिलाविणें मंजूर**

(१) पांचव्या वाक्यापासून येथपर्यंत **बद्रचे** लढाईचे वृत्तांताचें दिग्दर्शन आहे. त्याचा संक्षिप्त अहवाल असा कीं हजरत **मोहंमद** पैगंबर साहेब–परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो–हे **मक्केच्या** नास्तिकांच्या छळानें लाचार होऊन **मदिनेस** येऊन राहिले होते; आणि मुसलमानां- पैकीं ज्याला ज्याला संधि सांपडत होती तो **मदिनेला** चालला येत होता. यावरहि नास्तिक लोक मुसलमानांस सुखानें बसूं देत नव्हते; आणि बिघाडाची स्थापना होऊन गेली होती. इतक्यांत पैगंबर साहेबांस माहीत झालें कीं मूर्तिपूजक **कुरेश्यांचा** तांडा **सिरीया** देशाहून व्यापारी माल घेऊन **मक्केस** जात आहे. पैगंबर साहेबांनीं विचार केला कीं पुढच्या बंदोबस्तासाठीं व नास्तिकांचा मोड व्हावा म्हणून मुसलमानांचें युद्धबल व हिंमत दाखवि- ण्याची ही उत्तम संधि आहे; ते त्या तांड्यावर चालून जाण्याचे बेतानें मुसलमानांस घेऊन निघाले. तिकडे **मक्केकरांस** आपल्या काफल्याची व मुसलमानांच्या इराद्याची बातमी लागली, तेव्हां **अबुजहल** हा प्रचंड सैन्य गोळा करून काफल्याचे कुमकेस निघाला. काफलेवाल्यांनीं समुद्रकांठाचा मार्ग घेतला व मुसलमानांच्या माऱ्यांतून बचावले. परंतु **अबुजहल** हा **बद्रचे** मुकामापर्यंत चाल करून आला. त्या वेळीं मुसलमानांत मतभेद उपस्थित झाला. कित्येक म्हणाले, आम्हीं काफल्यावर हमला करण्यासाठीं आलों होतों; तर त्याचाच पाठलाग केला पाहिजे. आणि पैगंबर साहेबांस हें मंजूर होतें कीं दुशमन छातीवर चढून चालला येत आहे त्याला अटकाव करणें आवश्यक आहे. अखेर पैगंबर साहेबांचे समजाविल्यानें **अबुजहला** बरोबर लढाई ठरली; आणि मुसलमान जरी अल्पसंख्याक व शस्त्रादि सामुग्रीरहीत होते, तरी परमेश्वरानें त्यांना नास्तिकांवर विजयहि दिला.

**आहे. १८. (अहो मक्केकरांनों!) तुह्मीं जो जय मागत होता, (कीं जो कोणी सत्यावर असेल त्याचा जय व्हावा,) तर (घ्या,) जयहि तुह्मांसमोर येऊन ठेपला; (कीं मुसलमान विजयी झाले. तर आतां इस्लाम स्वीकारण्यांत तुह्मांला अडचण कोणती?) आणि जर (यापुढें इस्लामाचे विरोधापासून) हात आवराल तर हें तुमच्या ठायीं उत्तम होय. आणि जर पुन्हां (इस्लामाचा विरोध) कराल, तर आह्मींहि पुन्हां (इस्लामवाल्यांची मदत) करूं. आणि तुमचा जथा कितीहि बहुत असेल तरीहि तो कांहींच तुमच्या कामा येणार**

---

हा बद्रचे लढाईचा वृत्तांत होय. आतां वरील वाक्यांत आलेल्या शब्दाविषयींहि कांहीं विवेचन करणें जरूर आहे. (प्रथम,) "सत्य गोष्टीचें प्रगट झाल्याउपरांत" याचा अर्थ हा कीं ज्याअर्थीं लोकांस हें माहीत झालें होतें कीं पैगंबर साहेब खरोखरच परमेश्वराचे पैगंबर आहेत व ते जसें म्हणतात तसें इस्लामाचें नास्तिकपणावर वर्चस्व होईल; त्याअर्थीं त्यांस अबुजहलचे सामन्याहून पैगंबराचे मर्जीविरुद्ध तोंड फिरविणें योग्य नव्हतें. (दुसरें) असें कीं देवदूतांचा उल्लेख, म्हणजे मुसलमानांचे सांत्वनासाठीं परमेश्वरानें दुतांची मदत दिली; प्रथम एक हजार, मग तीन हजार व मग पांच हजार दूतांचें येणें हें एक बाह्य कारण होतें, एरव्हीं परमेश्वराची आज्ञाच पुरवली असती. (तिसरें) झोंपेची गुंगी व पाऊस यांचा मजकूर आहे. तर मनाचें अस्वास्थ्य दूर करण्यासाठीं असें घडून आलें कीं मुसलमानांस थोडी झोंप येऊं लागली व कित्येकांस स्वप्नावस्था होऊन त्यांस स्नान करण्याची आवश्यकता भासली. पुढें रात्रीं पाऊस पडला. अरब देशांत याची जरूरी असते; व मुख्यत्वेंकरून अशा प्रसंगीं कीं अबुजहलनें बद्रचे तलावावर कबजा ठेविला होता; पाऊस न पडता तर मुसलमानास तहान सोसवली नसती. पण परमेश्वरानें पाऊस पाडला ह्मणून सर्व नाहून धुवून ताजे तवानें झाले; व पाण्याचीहि फिकिर राहिली नाहीं. त्यांनीं शत्रुशीं लढून त्यांचा पराभव केला; पैगंबरांनीं मूठभर वाळू फेंकली तों ती सर्व नास्तिकांचे डोळ्यांत पडून ते आंधळे झाले आणि ३१३ मनुष्यांनीं १००० मनुष्यांचा सप्पा उडविला. हा पैगंबर साहेबांचा चमत्कार होता. या लढाईंत नास्तिकांचा बराच मोड झाला; व मुसलमानांची हिंमत वाढली.

नाहीं. आणि हें(हि जाणून असा) कीं परमेश्वर विश्वासू-मुसलमानां-बरोबर होय. १९. अहो मुसलमानांनों ! परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा हुकूम माना व त्याच्या (हुकमा)कडून तोंड फिरवूं नका; आणि (आमचा आदेश तर) तुह्मीं ऐकूनच आहां. २०. आणि ज्या लोकांनीं (तोंडानें तर) सांगून दिलें कीं आह्मीं ऐकिलें व खरें पाहूं जातां, ते ऐकत (वैकत कांहींच) नाहींत, अशा लोकांसारखे तुह्मीं बनूं नका. २१. परमेश्वरापाशीं सर्व प्राण्यांत वाईट (प्राणी हे नास्तिक होत); बहिरे, मुके असे कीं जे (कांहीं) समजत नाहींत. २२. आणि जर परमेश्वर यांच्यांत (कांहींहि) बरेंपणा पाहता, तर तो त्यांना ऐकण्याची योग्यताहि देता. पण (एरव्हीं) जर तो त्यांना ऐकवून देईल तर हे लोक तोंड फिरवून उलटे पळतील. २३. अहो मुसलमानांनों ! जेव्हां (आमचा हा) पैगंबर ('मोहंमद') तुह्मांस अशा (धर्मा)कडे बोलावील कीं जो तुमच्यांत (नवीन) चैतन्य आणितो, तेव्हां तुह्मीं परमेश्वर व पैगंबर यांचा हुकूम (सावधान चित्तानें ऐका व) मान्य करा; आणि जाणून असा कीं परमेश्वर (असा परमसमर्थ आहे कीं तो) मनुष्याच्या व त्याच्या अंतःकरणाच्या (इराद्याचे) आड येऊन जातो. आणि हेंहि (जाणून असा) कीं (अखेर) तुह्मीं (सर्व) त्याच्याच हुजुरांत एकत्र हजर केले जाल. २४. आणि तुमच्यांतून ज्या लोकांनीं शिरजोरी केली आहे, त्यांसच खास करून जो फितुर लागू पडणार नाहीं, (तर जो सर्वांनाच लागू पडेल,) अशा फितुराविषयीं जपा. आणि जाणून असा कीं परमेश्वर शिक्षेंत फार कडक होय. २५. आणि (तो वेळ) स्मरण करा कीं जेव्हां तुह्मीं (मुसलमान, 'मक्के'च्या) प्रदेशांत थोडेसे होता (व) दुर्बल लेखले जात होता; (आणि) या गोष्टीला भीत होता कीं लोक तुह्मांस बळेंच धरून (कोठें) उचलून नेतील;

(१) पुनरुत्थानाची शिक्षा तर राहिली पुनरुत्थानाबरोबर; ते खुद्द आपल्या जागीं एक अनिवार्य संकट होय. पण जगांत हा फितुर काय कमी होता कीं मुसलमान लोक बद्रचे पहिल्या लढाईंत हार खाते तर नास्तिक लोक मुसलमानांस जिवंत न सोडते.

तेव्हां मग परमेश्वरानें (तुह्मांस 'मदिनें'त) थारा दिला व आपल्या साह्यानें तुह्मांस पुष्टी दिली आणि तुह्मांला चांगले चांगले पदार्थ खावयास दिले; (हे सर्व उपकार यासाठीं) कीं तुह्मीं कदाचित् आभार मानाल. २६. अहो मुसलमानांनों! परमेश्वर व पैगंबर यांच्याशीं दगलबाजी[1] करूं नका व आपल्याहि अमानतींत दगलबाजी करूं नका; आणि तुह्मीं तर (दगलबाजीचे दुष्परिणामाशीं) वाकब आहां. २७. आणि जाणून असा कीं तुमचें धन व तुमची संतति हीं केवळ (ऐहिक) मोहपाश होत. आणि तसेंच हें कीं परमेश्वर (असा परम पवित्र होय कीं) त्याचेपाशीं (सदाचरणी लोकांस) मोठें प्रतिफल (प्राप्त) होईल. २८. अहो मुसलमानांनों! जर तुह्मीं परमेश्वराला भीत राहाल तर तो तुह्मांसाठीं एक तारतम्य[2] पैदा करील व तुमचीं पापें तुह्मांवरून दूर करून टाकील आणि (अखेर) तुह्मांस क्षमाहि करील. आणि परमेश्वर महाकृपानिधी होय. २९. आणि (हे पैगंबरा! तो वेळ आठवण कर कीं) जेव्हां नास्तिक तुझ्यावर डाव चालवूं पाहत होते, कीं त्यांनीं तुला (बंदींत) अडकवून ठेवावें अगर तुला जिवें मारून टाकावें अथवा तुला हद्दपार करून टाकावें. आणि (परिस्थिति अशी होती कीं) नास्तिक (आपला) डाव चालवीत होते व परमेश्वर (आपला) डाव चालवीत होता. आणि परमेश्वर, सर्व डाव कर्त्यांत[3][1] उत्तम (डाव कर्ता)

(१) मुसलमान व नास्तिक यांच्यांत लढाई ठरली त्यावेळेपर्यंत मुसलमानांचें गणगोत मक्केंत होतें. मदिनेंत लढाईच्या मसलती होत होत्या व हें आवश्यक होतें कीं नास्तिकांस त्या मसलती जाहीर होऊं नयेत; व मुसलमानांतच त्या अनामत राहाव्या. धन व संततीचे विचारास आधीन होऊन येथील गुप्त मसलती प्रगट करणें हें परमेश्वर व पैगंबर यांच्याशीं दगलबाजी करणें होय असें ह्मटलें आहे.

(२) तारतम्य पैदाकरणें म्हणजे तुह्मीं पुण्य व धार्मिकपणांत इतर लोकांवर महत्व भोगाल अगर तुह्मीं शत्रूंवर वर्चस्वशाली व्हाल.

(३) या सबंध वाक्यांत, हजरत पैगंबराच्या जीवन चरित्राचा एक मोठा मशहूर वृत्तांत जो स्वदेशत्याग ऊर्फ हिजरत, त्याजकडे इशारा आहे. संक्षेपत: बोलावयाचें ह्मणजे हें कीं मक्केचे नास्तिक प्रथमारंभापासूनच इस्लामचे विरोधी होते; आणि शक्य तें करून इस्लामाचा प्रसार अडक-

**होय. ३०. आणि जेव्हां आमचीं वाक्यें या नास्तिकांस वाचून ऐकविलीं जातात, तेव्हां ते ह्मणतात कीं (हो होय) आह्मीं ऐकून घेतलें; जर आह्मीं इच्छूं तर आम्हींहि अशाच तऱ्हेचें (कुर्आन्) बोलून दाखवूं. ह्या तर केवळ प्राचीन लोकांच्या कथा होत! ३१. आणि (हे पैगंबरा! तो वेळ आठीव कीं) जेव्हां या नास्तिकांनीं प्रार्थना केली कीं हे परमेश्वरा! जर हा (इस्लाम धर्म) हाच सत्य (-धर्म) होय (व) तुजकडून (प्रकटिलेला आहे), तर तूं आम्हांवर आकाशांतून दगड वर्षाव अगर आम्हांवर (आणखी कांहीं) दुःखद**

---

वीत होते. पण जो दिवा परमेश्वर पेटवितो त्याला कोण विझवूं शकतो? जो कोणी फुंक मारील तो आपलेंच तोंड जाळून घेईल; नास्तिकांनीं भिवविलें, धमकाविलें व छळिलेंहि पण इस्लाम दिवसें दिवस वाढतच चालला होता. शेवटी सर्व निरुपाय होऊन 'दारुन्नदवा' नामक सभास्थानांत गोळा झाले. 'दारुन्नदवा' हा मक्केंत आमच्यायेथील मोठाल्या शहरांत जसा टाऊनहाल किंवा म्युनिसिपल कमिटी हाल असतो तशीच एक जागा होती. हरतऱ्हेची पंचाईत येथेंच होत असे. एवंच प्रत्येकानें आपापल्या तजविजा तेथें पुढें केल्या: कोणी ह्मणाला यांला हद्दपार करा, कोणी असें मत दिलें कीं कैद ठेवा ह्मणजे त्याच्यापाशीं कोणी येऊं शकणार नाहीं व तो कोणाला बहकविणारहि नाहीं; कोणी असा सल्ला दिला कीं त्याला जिवें मारून टाका. पुष्कळ वाटाघाट होऊन असें ठरलें कीं पुष्कळ जणांनीं मिळून दंगा करून त्याला एकदम मारून टाकावें; आणि रक्तपाताची किंमत मागणाऱ्यांस द्रव्यदंड देऊन राजी करावें. हजरत पैगंबर साहेबांस जेव्हां ही हकीकत कळली तेव्हां ते रात्रीचे वेळीं हजरत अली यांस आपल्या जागीं निजवून हजरत अबुबकर यांस बरोबर घेऊन थौर नांवाचे पर्वताचे गुहेंत जाऊन लपले. शत्रु सर्व रात्रभर पैगंबर साहेबांचे घरास गराडा घालून बसले होते. सकाळ झाली तों काय पाहतात कीं पैगंबर साहेबांचा पत्ता नाहीं. ज्यांना पैगंबर समजत होते ते हजरत अली निघाले. तेव्हां ते मधमाशांप्रमाणें चोहों दिशेस शोध लावण्यासाठीं रवाना झाले. ज्या गुहेंत हजरत पैगंबर साहेब होते तेथूनहि कित्येकांचें येणें जाणें झालें; परंतु परमेश्वरानें त्यांना आंधळे करून टाकले. हजरत पैगंबर साहेब तीन रात्र त्याच गुहेंत लपून राहिले आणि राहदारीचा रस्ता एकिकडे टाकून मदिनेस येऊन पोहोंचले.

शिक्षा आण. ३२. आणि (हे पैगंबरा!) परमेश्वर असा (बेलाग) नव्हे कीं तूं या लोकांत (हजर) आहेस, व (तुझ्या राहतां) तो त्यांना शिक्षा देईल! आणि परमेश्वर असा (दयाहीनहि) नव्हे कीं (कित्येक) लोक (परमेश्वरापाशीं पापांची) क्षमा[1] मागतात, असें असतां तो त्यां (सर्वां)स शिक्षा देईल! ३३. आणि आतां (तूं स्वदेशत्याग करून 'मदिने'स चालून आला आहेस, तर) या ('मक्के'चे नास्तिकां)स काय हक्क राहिला कीं ह्यांनीं तर 'मस्जिदे हराम' (म्हणजे 'काबा'गृहास जाण्या)पासून (मुसलमानांस) अडथळा करावा व परमेश्वरानें त्यांना शिक्षा देऊं नये? आणि वास्तविक पाहतां, हे (जरी त्याचे मुतवल्ली म्हणजे व्यवस्थापक होण्याचा हक्क सांगतात तरीपण न्यायानें) त्याचे हक्कदार नाहींत.[2] त्याचे हक्कदार तर केवळ(परमेश्वराला)भिऊन चालणारे लोकच होत. परंतु या (नास्तिकां)तून बहुतेक (ही गोष्ट) समजत नाहींत. ३४. आणि 'काबा'गृहापाशीं शिळा व टाळ्या[3] वाजविण्याखेरीज आणखी त्यांची नमाजच काय होती! तर (हे नास्तिकांनो!) तुह्मीं जो नास्तिकपणा करीत राहिलां आहां, त्याचे ऐवजीं आतां शिक्षेची गोडी चाखा. ३५. यांत संशय नाहीं कीं जे लोक नास्तिक होत ते आपलें धन (यासाठीं)

(१) हजरत पैगंबर साहेबांच्या औदार्यशील विद्यमानतेच्या प्रसादानें व मुसलमानांच्या क्षमायाचनेच्या प्रभावानें मक्केचे नास्तिकहि शिक्षेंतून बचावले;

(२) काबागृहाची स्थापना हजरत इब्राहीम पैगंबरानीं केली होती. आणि कुरेशी नास्तिक लोक त्यांच्याच वंशाचे होते. याच कारणामुळें ते आपल्याला काबागृहाचा मुतवल्ली वा सनदशीर व्यवस्थापक समजत असत. ज्याला पाहिजे त्याला आंत येऊं देत व ज्याला पाहिजे त्याला मज्जाव करीत. परमेश्वरानें यांच्या नास्तिकपणामुळें यांचें व्यवस्थापक होणें नामंजूर केलें; कारण कीं इब्राहीम जे काबागृहाचे संस्थापक होते ते पक्के एकेश्वरवादी होते. आणि हे मक्केकर कट्टे मूर्तिपूजक व अनेकेश्वरवादी होते. इतक्या धर्म विषयक मतभेदा उपरांतहि वंशपरंपरेचा उपयोग काय होणार?

(३) ज्याप्रमाणें आमच्या देशांतील हिंदुलोक पूजा अर्चा करतेवेळीं मंदिरांत नाचतात, गातात व वाजवितात, आणि ह्यांच्याच जवळजवळ ख्रिस्ती लोक देवळांत वर्तन करतात; त्याचप्रमाणें तत्कालीन मक्केकर नास्तिक शिळा व टाळ्या वाजवीत असावेत हें संभवनीय आहे.

खर्च करीत राहतात कीं त्यांनीं (लोकांस) परमेश्वराचे मार्गाहून प्रतिबंध करावा. पण, हे लोक तर द्रव्याचा (अशाच तऱ्हेनें) खर्चवेंच करीतच राहतील. तथापि (अखेर हेंच द्रव्य) त्यांच्याठायीं खेदास कारणीभूत होईल; (ते खर्चहि करतील व) मग जेरीहि होतील. आणि ज्यांनीं ज्यांनीं नास्तिकपणा केला असेल त्या (सर्वां)स (पुनरुत्थानाचे दिवशीं) 'जहन्नम'कडे एकत्र (हांकून) लाविलें जाईल; ३६. यासाठीं कीं परमेश्वरानें दुष्टांस चांगल्यापासून वेगळें करावें आणि दुष्टांस एकमेकांवर ठेवून त्या सर्वांचा (एक) ढीग करावा, मग तो (ढीगचाढीग) जहन्नममध्यें झोंकून द्यावा. हेच लोक होत कीं जे तोट्यांत राहिले. ३७. (हे पैगंबरा!) जे लोक नास्तिक होत त्यांस सांग कीं जर ते (आतांहि आपल्या खोडकरपणापासून) मागें सरतील, तर जें कांहीं झालें गेलें त्याची त्यांना क्षमा केली जाईल; आणि जर ते पुन्हां (खोडसरपणा) करतील; तर पूर्वींच्या लोकांची वाट (लाविलीच) जाऊन चुकली आहे; (तोच परिणाम यांचाहि होणें आहे). ३८. आणि (मुसलमानांनों!) नास्तिकांशीं लढत राहा; येथपर्यंत कीं फंदफितुर (नांवास देखील बाकी) राहणार नाहीं व धर्म सर्वस्वीं परमेश्वराचाच होईल. मग जर (हे लोक फिसादापासून) मागें सरून जातील, तर जें कांहीं हे लोक करतील परमेश्वर तें निरखून आहे; (व त्याला अनुसरूनच तो त्यांना मोबदला देईल). ३९. आणि जर ते बदलून पडतील तर (मुसलमानांनों!) तुह्मी समजून राहा कीं परमेश्वर तुमचा पुरस्कर्ता होय. तो (किती तरी) उत्तम पुरस्कर्ता व उत्तम मददगार होय! ४०.

---

(१) नास्तिक लोक मोठा खर्च करून लोकांस भोजन व पार्ट्या देऊन आपल्या बाजूला वळवून ठेवीत होते व अशा रीतीनें लोकांस सद्धर्म स्वीकारण्यापासून अडथळा करीत असत. परंतु त्यांनीं किती जरी खर्च केला तरी शेवटीं त्यांचा खर्च फुकट जाईल व त्यांना या कामांत यश येणार नाहीं व याबद्दल त्यांना फार खेद करावा लागेल; कुराणाच्या अनेक अद्भुत भविष्य वचनांपैकीं हेंहि एक आहे. कारण, पुढें थोडक्याच अवकाशांत मक्केवर मुसलमानांचा विजय झाला व ही उपरिनिर्दिष्ट गोष्ट हुबेहुब घडून आली.

# पवित्र कुराण

## भाग दहावा.

### सूरतुल्-अन्फाल् (पुढें चालू).

आणि तुह्मीं हें जाणून ठेवा कीं जी चीज तुह्मीं (लढाईंत) लुटून आणाल, तिचा पांचवा हिस्सा परमेश्वराचा व पैगंबराचा आणि (पैगंबराचे) नातलगांचा व अनाथ बालकांचा आणि गोरगरिबांचा व वाटसरूंचा होय; जर तुह्मीं परमेश्वरावर, व जी (गैबी मदत) आह्मीं आपला सेवक ('मोहंमद') याजला निर्णायक दिवशीं (म्हणजे 'बद्र'चे लढाईंत कीं) ज्या दिवशीं (मुसलमान व नास्तिक) यांच्या दोन्ही फौजा एकमेकांशीं भिडून गेल्या होत्या त्या दिवशीं सादर केली, त्या (गैबी मदती)वर विश्वास ठेवीत असाल तर (तुह्मांस या वांटणीवर अमल केला पाहिजे). आणि परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. (व मुसलमानांचा हा विजयहि त्याच्याच सामर्थ्यामुळें झाला.)४१
हा तो वेळ होता कीं तुह्मीं (मुसलमान रणांगणाचे) अलिकडील टोंकावर होतां व ते (नास्तिक) पलिकडील टोंकावर; आणि (काफल्याचे) स्वार (समुद्र कांठीं) तुमच्या पासून खालच्या बाजूस (हटून) होते. आणि जर तुह्मीं (उभय पक्षांनीं पहिल्यानेंच) आपसांत (लढाईचा) ठराव केला असता, तर तुमच्यां(-तून कोणा ना कोणा तरी पक्षा)कडून अवश्य करारभंग झालाच झाला असता. परंतु (परमेश्वरानें तुम्हांस एकमेकांशीं अचानक भिडविलें) यासाठीं कीं परमेश्वराला जें कांहीं करणें मंजूर होतें तें त्यानें पुरें करून दाखवावें. आणि हें कीं जो कोणी नाश पावेल त्यानें प्रमाण सिद्ध झाल्यावर नाश पावावें; आणि जो जगेल त्यानें प्रमाण सिद्ध झाल्यावर जगावें. आणि निःसंशय परमेश्वर जरूर (सर्वांचें) ऐकतो (व सर्व कांहीं) जाणतो. ४२.

---

(१) बद्रची लढाई आकस्मिक लढाई होती. उभय पक्षांतून कोणाचाहि लढण्याचा उद्देश नव्हता. इकडून मुसलमान लोक कुरेशी

(हे पैगंबरा! त्याच वेळेचा वृत्तांत हाहि होय कीं) जेव्हां परमेश्वरानें तुला स्वप्नांत नास्तिक थोडे करून दाखविले. आणि जर तो तुला त्या (नास्तिकां)स बहुत करून दाखविता, तर तुह्मीं (मुसलमानांनीं) अवश्य हिंमत खचली असतीं; आणि (लढाईचे) प्रकरणांतहि तुह्मीं जरूर आपसांत झगडूं लागता (कीं लढावें कीं न लढावें?) परंतु परमेश्वरानें (तुह्मांस नामर्दीच्या नामोशीपासून) वांचविलें. निःसंशय तो (लोकांच्या) मनांतर्गत गोष्टींशींहि वाकबगार होय. ४३. आणि (ह्याच लढाईंत) जेव्हां तुह्मीं (उभयपक्ष) एकमेकांशीं येऊन भिडलां तेव्हां (परमेश्वरानें) नास्तिकांस तुह्मां मुसलमानांच्या डोळ्यांत थोडे करून दाखविले, व नास्तिकांचे डोळ्यांत तुह्मां (मुसलमानां)स थोडे[1] करून दाखविले; यासाठीं कीं परमेश्वराला जें कांहीं करणें मंजूर होतें तें त्यानें पुरें करून दाखवावें. आणि (सरशेवटीं सर्व) कामांची मदार परमेश्वरावरच येऊन ठरते. ४४. अहो मुसलमानांनीं! जेव्हां तुह्मीं (नास्तिकांचे) कोणा सैन्यांशीं भिडून जात जाल, तेव्हां

---

काफल्यावर चालून गेले व तिकडून अबुजहल हा काफल्याचे बचावासाठीं निघाला. काफला मुख्य मार्ग एकिकडे टाकून निघून पार झाला. दैवयोगानें दोन्ही लष्करांची भेटाभेट होऊन गेली; आणि मुसलमानांचा विजय झाला. ही लढाई झाली नसती तर प्रत्येक पक्ष आपल्या जागीं फुशारकी मिरविता व आपल्यालाच प्रबल समजता. आतां लढाई झाली तों सर्वांनीं पाहून घेतलें कीं खरोखरीं प्रबल कोण व अप्रबल कोण? आणि परमेश्वर कोणाचे पल्ल्यावर आहे?

(१) पृष्ट १२१ वरील अध्याय ३:१३ व्या महावाक्यांत आलेल्या मजकुराशीं येथें दिसण्यांत या वाक्याचा विरोध दिसतो परंतु खरीगोष्ट तशी नव्हे. कारण बद्रची लढाई सुरु होण्याच्या अगोदर, नास्तिकांस लढाईस तोंड देण्याचें उत्तेजन यावें म्हणून मुसलमान सैन्य होतें त्यापेक्षांहि त्यांस कमी दिसत होतें; आणि लढाई सुरू झाली तोंच ते त्यांना दुप्पट दिसूं लागले व त्यांच्या मनांत आपल्या मुसलमान शत्रुंची दहशत बसली आणि पैगंबरांनीं आश्वासन दिल्या प्रमाणें मुसलमानांचा विजय झाला.

खंबीर उभे राहा व परमेश्वराचें अतोनात स्मरण करा; कीं (अखेर) तुह्मीं कदाचित् (आपल्या मनोरथांत) सफल व्हाल. ४५. आणि तुह्मीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा हुकूम माना व आपसांत भांडूं नका, कीं (आपसांत भांडण केल्यानें) तुमची हिंमत मोडून जाईल व तुमची वाफ चालली जाईल; आणि (ह्मणूनच लढाईचीं संकटें) सहन करा. निःसंशय परमेश्वर सहनशिलांसंगतीं आहे. ४६. आणि जे लोक फुशारकींत येऊन व लोकांस डौल दाखवून आपापल्या घरांतून निघून उभे राहिले; व (नांदणूक अशी कीं लोकांस) परमेश्वराचे मार्गाहून अडथळा करतात; अशा (नास्तिक) लोकांसारखे तुह्मीं बनूं नका आणि जें कांहींहि हे लोक करितात तें परमेश्वराच्या (ज्ञानाच्या) अटोक्यांत आहे. ४७. आणि जेव्हां सैतानानें त्या (नास्तिकां)चीं कर्में त्यांना (उमदीं) सुशोभित करून दाखविलीं व (त्यांना) सांगितलें कीं आजमितीस लोकांत कोणी असा (शूरवीर) नाहीं कीं जो तुम्हांवर विजयी होऊं शकेल; आणि मीही तुमच्या पाठीवर आहें. मग जेव्हां दोन्हीं फौजा एकमेकांचे दृष्टीचे टप्यांत आल्या, तेव्हां तो आपल्या उलट्या पायीं चालता झाला व ह्मणूं लागला कीं मीं तुम्हांपासून अलिप्त आहें. तुम्हांला जे (दूत) दिसत नाहींत ते मला खचित दिसतात. निःसंशय मी तर परमेश्वराला भितों. आणि परमेश्वर शिक्षेंत फार कडक होय. ४८. (हा तो वेळ होता कीं) जेव्हां दांभिक लोक व ज्या लोकांच्या अंतःकरणांत (नास्तिकपणाचा) रोग होता ते ह्मणत होते कीं या(मुसलमानां)स तर त्यांच्या धर्मानें फसगतींत ठेविलें आहे; (पण मुसलमान फसगतींत नव्हेत तर त्यांचा परमेश्वरावर भरंवसा आहे.) आणि जो कोणी परमेश्वरावर भरंवसा ठेवील तर (तो मनाचा सबल असणारच. कारण, त्याच्या कुमकेस) परमेश्वर हा परम समर्थ (व) सत्यसंकल्प होय. ४९. आणि (हे पैगंबरा!) तूं जर (अशा वेळीं नास्तिकांची स्थिति) पाहशील तर (फार बरें होईल कीं) जेव्हां दूत (या) नास्तिकांचे प्राण हरण करतात (व) त्यांच्या तोंडांवर व पाठींवर (लाथाबुक्यांचा) प्रहार करीत जातात व (म्हणत जातात

कीं ध्या,) भगभगीत नरकाग्नीची शिक्षा तर चाखा. ५०. (नास्तिकांनों! ही सक्ती जी तुम्हांवर केली जात आहे) हा तुमच्या त्या (पापकर्मां)चा मोबदला होय कीं तुमच्या हातांनीं तीं पाहिल्यानेंच पुढें पाठविलीं आहेत. आणि (तुम्हीं या शिक्षेस पात्र आहां; कां कीं) परमेश्वर तर (आपल्या) सेवकांवर कोणाहि तऱ्हेचा जुलूम करीत नसतो. ५१. (नास्तिकांनों!) 'फिरऔन'चे लोकांची व त्यांच्यापूर्वी जे लोक होऊन गेले आहेत त्यांची जशी गत (झाली तशीच गत तुमचीहि झाली;) कीं त्यांनीं परमेश्वराचे निशाण्यांस नाकारिलें; म्हणून परमेश्वरानें त्यांना त्यांच्या पापकर्मांबद्दल पकडलें. निःसंशय परमेश्वर फार बलवान् (असून) शिक्षेंत फार सक्त होय. ५२. ही (शिक्षा त्या लोकांस) यामुळें (दिली गेली) की जी देणगी परमेश्वरानें कोणाहि राष्ट्रास दिलेली असेल, जोंपर्यंत ते लोक आपणच आपल्या अंगीं असलेली योग्यता न बदलतील, तोंपर्यंत परमेश्वर (असा) नव्हे कीं (त्यांत कांहीं) फेरबदल करील; आणि (तशीच) यामुळें कीं परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. (आणि ते त्याच्या दृष्टींत शिक्षेस पात्र होते.) ५३. (नास्तिकांनों!) 'फिरऔन'चे लोकांची व त्यांच्यापूर्वी जे लोक होऊन गेले आहेत त्यांची जशी गत (झाली तशीच गत तुमचीहि झाली;) कीं त्यांनीं आपल्या पालनकर्त्याचे निशाण्यांस पाखंड ह्मटलें; म्हणून आम्हीं त्यांना त्यांच्या पापकर्मांबद्दल नष्ट करून टाकिलें आणि 'फिरऔन'चे लोकांस गर्क करून टाकिलें. आणि (हे) सारे(चे सारेच फार) खोडसर लोक होते. ५४. परमेश्वरासमीप सर्व प्राण्यांत वाईट

(१) या स्थळीं परमेश्वरास हें सांगावयाचें आहे कीं नास्तिकांस शिक्षा देण्याचीं दोन कारणें झालीं. एक हें कीं त्या लोकांनीं खुद्द परमेश्वराचे देणगीवर लाथ मारली; दुसरें हें कीं परमेश्वर सर्वांचें ऐकितो व सर्वांचे स्थितीशीं वाकब आहे. त्यांतल्या त्यांत तो नास्तिकांच्या गोष्टीहि ऐकत होता व त्यांच्या मनांतील दुष्ट हेतु जाणत होता; यामुळें त्यानें नास्तिकांस शिक्षेस पात्र समजून त्यांना शिक्षा दिली.

(२) या ठिकाणीं नास्तिकांस सर्व प्राण्यांत वाईट ह्मटलें आहे; आणि दुसऱ्या एके जागीं म्हटलें आहे कीं 'हे लोक चतुष्पाद जनावरां-

म्हणजे जे लोक नास्तिकपणा करतात ते होत; तर ते (कोणाहि प्रकारें) विश्वासच धरणार नाहींत. ५५. ज्या लोकांशीं तूं (सलोख्याचा) करारमदार केलास; मग ते आपल्या करारमदाराला हरदम मोडून टाकितात व ते (वचनभंगाच्या दुष्परिणामासही) भीत नाहींत; ५६. मग जर अशा लोकांस तूं लढाईंत (हजर) पावशील, तर तूं (त्यांच्यावर असा जोर टाक कीं) त्यांच्यांत भागड पाडून, जे लोक त्यांच्या पाठीवर असतील त्यांचीहि दाणादाण करून सोड; कीं कदाचित् हे लोक (पराभवास भिऊन) बोध धरतील. ५७. आणि जर तुला कोणाहि लोकांकडून दगलबाजीचा अंदेशा असेल, तर समसमान न्यायानें (त्यांचा करार उलट) त्यांच्याचकडे फेंकून दे. निःसंशय परमेश्वर विश्वासघातक्यांस दोस्त ठेवींत नसतो. ५८. आणि नास्तिकांनीं हें समजूं नये कीं ते (आमच्या तावडींतून) निघून गेले. ते कधींहि (आह्मांस) हरवूं शकत नाहींत. ५९. आणि (मुसलमानांनों! सैनिक) बलानें व घोडे बांधून ठेवण्यानें, जितकी तुमच्यानें होतां होईल तितकी नास्तिकांचे (सामन्या)साठीं तयारी ठेवा; कीं असें केल्यानें तुह्मीं परमेश्वराचे शत्रूंवर व खुद् आपल्या शत्रूंवर (आपली) धाक बसवून ठेवाल, आणि (तशीच) त्यांच्याशिवाय इतरांवरहि कीं ज्यांना तुह्मीं जाणत नाहींत; (पण) परमेश्वर त्यांच्या (स्थिती)शीं (खूप) वाकब होय. आणि तुह्मीं परमेश्वराचे मार्गांत जें कांहींहि खर्च कराल, तें तुह्मांला पुरें पुरें भरून दिलें जाईल; व (कोणाहि

---

सारखे होत किंबहुना त्यांच्याहूनहि जास्त बहकलेले.' जनावरांस विवेचक बुद्धि नाहीं म्हणून ते विचार करीत नाहीं. नास्तिकांस विवेचक बुद्धि आहे, पण तरीहि ते विचार करीत नाहींत; व ते विचार करीत नाहींत ह्मणूनच विश्वासहि धरीत नाहींत. बुद्धीनें काम घेतील तर ते अवश्य विश्वासहि धरतील.

(१) समसमान न्यायाचा अर्थ हा आहे कीं नास्तिक गैरसावध असतांना एकाएकीं त्यांच्याशीं असलेला तह न मोडला जावा; कांकीं ही दगलबाजी होय. तर त्यांना बजावून सांगा कीं आतां यापुढें तुमचा आमचा तह नाहीं ह्मणजे दोघांनाहि लढाईची तयारी करण्याचा अवकाश मिळावा.

तऱ्हेनेंच) तुमचा हक्क मारला जाणार नाहीं. ६०. आणि (हे पैगंबरा!) जर (नास्तिक) संधाकडे झुकतील तर तूंहि त्याकडे झुक व परमेश्वरावर भरंवसा ठेव. कारण, तोच (सर्वांचें) ऐकतो (व-सर्व कांहीं) जाणतो. ६१. आणि जरी त्यांचा उद्देश तुझ्याशीं दगा करण्याचाहि असेल तरीदेखिल (तूं मुळींच पर्वा करूं नकोस) परमेश्वर तुला पुरा होय. (हे पैगंबरा!) तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें आपल्या साह्यानें व मुसलमानांद्वारें तुला पाठबळ दिलें. ६२. आणि त्यानें मुसलमानांचे मनांत परस्पर प्रीति उत्पन्न केली. जरी तूं पृथ्वींतील अवघे (खजीनेहि) खर्च करून टाकतास, तरीहि तूं त्यांच्या मनांत प्रीति न पैदा करूं शकतास. परंतु परमेश्वरच (होता कीं) त्यानें त्यांच्यांत प्रीति उत्पन्न केली. निःसंशय तो फार सामर्थ्यवान्‌ (व) बुद्धिमान्‌ होय. ६३. हे पैगंबरा! परमेश्वर व मुसलमान लोक जे तुला अनुसरतात ते, तुला पुरे होत. ६४. हे पैगंबरा! तूं मुसलमानांस (नास्तिकांशीं) लढण्याचें प्रोत्साहन दे; कीं जर तुह्मां (मुसलमानां)पैकीं सहनशील (व करारी) असे वीसहि असतील, तर ते दोनशें (नास्तिकां)वर जय पावतील. आणि जर तुह्मां (मुसलमानां)पैकीं (असे) शंभर असतील तर ते हजार नास्तिकांवर जय पावतील; कारण, हे (नास्तिक) असे लोक होत कीं जे (पारलौकिक प्रतिफलास) समजतच नाहींत; (कीं जेणें करून त्याचे प्रीत्यर्थ प्राणास मुकण्यास ते कचरणार नाहींत.) ६५. (मुसलमानांनों!) आतां परमेश्वरानें तुह्मांवरून (आपल्या हुकमांचें ओझें) हलकें करून टाकलें; आणि त्यानें जाणिलें कीं तुमच्यांत (अजून) कमजोरी आहे. तर तुह्मांपैकीं सहनशील (असे) शंभर असतील तर ते दोनशें (नास्तिकां)वर जय मिळवितील. आणि जर तुम्हांतून (असले) एक हजार असतील, तर ते परमेश्वराचे हुकमानें दोन हजार (नास्तिकां)वर जय मिळवितील. आणि परमेश्वर (युद्धाचे संकटांत जे) सहनशील अशा(लोकां)चा साथी होय. ६६. पैगंबर जोंपर्यंत देशांत (नास्तिकांशीं) रणकंदन न करील, तोंपर्यंत त्याचेपाशीं कैदी (यांचा भरणा) राहणें हें त्यास योग्य नाहीं.

(मुसलमानांनों!) तुह्मीं तर इहलौकिक मालमत्तेची आकांक्षा बाळगिता, आणि परमेश्वर (तुह्मांस) परलोक (व तत्संबंधीं देणग्या देऊं) इच्छितो. आणि परमेश्वर सामर्थ्यवान (व) बुद्धिमान् होय. ६७. जर परमेश्वराकडून (तुमच्या या अपराधाचे माफीचा) लेखी हुकूम पहिल्यानेंच (सादर) न होऊन चुकला असता, तर जें कांहीं तुम्हीं ('बद्र'चे कैद्यांपासून त्यांना सोडून देण्याचे ऐवजीं) घेतलें आहे त्या (अपराधाचे शासनां)त जरूर तुह्मांस मोठ्या शिक्षेनें पिडिलें असतें. ६८. पण, (असो,) जें कांहीं तुह्मांस लुटींत मिळालें आहे तें हलालाचें व शुद्ध समजून खा; आणि परमेश्वरा(चे कोपा)स भीत राहा (व त्याचे क्षमेची आशा धरून असा; कारण,) परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ६९. हे पैगंबरा! ('बद्र'चे) कैदी जे (अद्यापि) तुमच्या (मुसलमानांच्या) हातीं आहेत, त्यांस तूं समजावून दे कीं जर परमेश्वर हें अनुभवील कीं तुमच्या अंतःकरणांत बरेपण आहे, तर जो (माल) तुम्हांपासून (हिरावून) घेतला गेला आहे त्याहूनहि उत्तम तो तुह्मांस देईल; व तुमचे अपराधहि क्षमा करील. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ७०. आणि (हे पैगंबरा!) जर हे लोक तुझ्याशीं दगलबाजी करूं इच्छितील तर पूर्वींही ते परमेश्वराशीं दगलबाजी करून चुकले आहेत; ह्मणून (तिच्या शासनार्थ) त्यानें त्यांस (तुझ्या तावडींत) धरून दिलें. आणि परमेश्वर (सर्वांच्या स्थितीशी) वाकब (व) युक्तिवान् होय. ७१.

---

(१) बद्रचे लढाईंत शत्रूंचीं सत्तर माणसें धरून आलीं होतीं; व हे लोक मुसलमानांचे गणगोत होते. मुसलमानांत अद्यापि राज्यपद्धतीची स्थापनाहि झाली नव्हती; कीं हें कैद्यांचें प्रकरण पुढें आलें. पैगंबर साहेबांनीं साथीदारांचा सल्ला घेतला कीं या कैद्यांचें करें काय करावें. कित्येकांनीं असें मत दिलें कीं खंड घेऊन त्यांना सोडून दिलें जावें; नवल नव्हे कीं हे लोक आस्ते आस्ते इस्लामच्या खुब्या समजून मुसलमान होऊन जातील. पैगंबर साहेबांचें मनहि पराकाष्टेचें दयार्द्र होतें ह्मणून त्यांचेहि या लोकांशीं मतैक्य झालें व खंड घेऊन बंदीवानांस सोडून दिलें. परंतु कित्येकांचा अभिप्राय असा होता कीं हे लोक

**ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (धर्मप्रीत्यर्थ) स्वदेश त्याग केला आणि परमेश्वराचे मार्गांत आपलें धन व आपलें तन मन (खर्चीं) घालून जिहाद्–धर्मयुद्ध–केलें; आणि ज्या लोकांनीं ('मुहाजिरीन' म्हणजे स्वदेशत्याग्यांस) थारा दिला व (त्यांची) मदत केली; हेच लोक एकमेकांचे वारस होत. आणि ज्या लोकांनीं विश्वास तर धरिला व (धर्मार्थ) स्वदेशत्याग केला नाहीं, तर तुह्मां (मुसलमानां)स त्यांच्या वारश्याशीं कोणतेंच कर्तव्य नाहीं; येथपर्यंत कीं स्वदेशत्याग करून तेहि (तुमच्यांत न) येतील. पण, जर धर्मा(चे बाबतीं)त ते तुमची मदत मागतील, तर तुह्मांस (त्यांची) मदत करणें आवश्यक होय; परंतु तुमच्या व ज्यांच्या दरम्यान (सलोख्याचें) करारबंधन असेल अशा लोकांचे विरुद्ध मात्र नव्हे. आणि जें कांहींहि तुह्मीं करितां तें परमेश्वर निरखून आहे. ७२. आणि जे नास्तिक आहेत ते एकमेकांचे वारस होत, (त्यांना एकमेकांचा वारसा**

---

मुसलमानांचे कट्टे दुशमन आहेत, एकदां सुटले कीं पुन्हां फिसाद माजवितील; आतां ते आमच्या सपाट्यांत आले आहेत, त्यांचा सप्पा उडविणें हेंच उचित आहे. परमेश्वरानें कालानुकूल्याप्रमाणें याच अभिप्रायास पसंती दर्शविली. परंतु जें कांहीं व्हावयाचें होतें तें होऊन चुकलें होतें. यानें इतकें मात्र झालें कीं मुसलमानांस आपली चूक कळून आली व ते जागृत झाले. बाहेरून दिसण्यांत हे हुकूम सक्त वाटतात; पण जोंपर्यंत कोणी मनुष्य स्वतः लढाईत हजर नसेल तोंपर्यंत तो शत्रुंच्या अदावतीचा अंदाज लावूं शकत नाहीं व वेळेचें प्रयोजनहि जाणूं शकत नाहीं. यांत शंका नाहीं कीं सत्तर माणसांचे जीव वांचविणें हें दिसण्यांत दयेचें काम आहे; पण हे सत्तर फिसादखोर कदाचित् सत्तर हजार मनुष्यांचा खून करून टाकतील. सारांश हे हुकूम, इंग्रजींत ज्याला मार्शल लॉ अगर फौजी कायदा ह्मणतात तशाच कोटींतले होत; आणि त्याच्या प्रयोजनास सैन्याचे अधिकारीच खूप समजतात. मग जेव्हां मुसलमानांस त्यांची चूक दाखविली गेली, तेव्हां ते भ्याले कीं सारी कारवाई फुकट व निरर्थक झाली. यासाठीं लुटीच्या मालाविषयीं जे कुत्सित विचार येऊन पडले होते परमेश्वरानें त्यांचेंहि निराकरण केलें.

घेऊं द्या;) जर तुह्मीं असें न कराल, तर मुलखांत फितुर होऊन जाईल व मोठा फिसाद (माजेल). ७३. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व स्वदेशत्याग केला आणि परमेश्वराचे मार्गांत जिहाद-धर्मयुद्ध-केलें; आणि ज्या लोकांनीं ('मुहाजिरीन' म्हणजे स्वदेशत्याग्यांस) थारा दिला व (त्यांची) मदत केली; हेच लोक पक्के मुसलमान होत. त्यांच्यासाठीं (पापांची) क्षमा व इज्जत-अब्रूचा शेर होय. ७४. आणि ज्या लोकांनीं मागून विश्वास धरिला व त्यांनीं स्वदेशत्याग केला; आणि तुह्मां (मुसलमानां) समागमें राहून जिहादही केलें; तर तेहि तुम्हांपैकीं होत. आणि गणगोतें परमेश्वराचे लेखी हुकमाअन्वयें (परकियांपेक्षां) एकमेकां(चे वारश्या)चे जास्त हक्कदार होत. निःसंशय परमेश्वर सर्वज्ञानी होय; (त्यांतल्या त्यांत वारश्याचे तजविजीशीं तो वाकब होय.) ७५.

---

(१) म्हणजे तुह्मीं मुसलमान जर नास्तिकांस एकमेकांचा वारसा न घेऊं द्याल आणि आत्प संबंधाचे सबबीवर दावे पुढें आणाल, तर आज-पर्यंत धर्मामुळें नास्तिकांशीं झगडा होत होता; यापुढें वारसपणामुळें अदावत येऊन ठरेल व झगडे वाढतील. परंतु जर 'विलायत' म्हणजे वारसा, याचा अर्थ मदत व 'अवलिया' म्हणजे वारसदार, याचा अर्थ मदतगार असा केला जाईल तर त्या स्थितींत भाष्य असें करतां येईल कीं:– जर तुह्मीं मुसलमान आपसांत एकमेकांची मदत न करीत राहाल, तर दुशमन लोक गरीब मुसलमानांस कीं जे नास्तिकांत घेरून राहिले आहेत त्यांचा कोणी मदतगार नाहीं असें समजून छळीत राहतील आणि धर्मामुळें जी लढाई पेटली आहे तिची परंपरा चालूच राहील.

(२) प्रथमारंभी जेव्हां मुसलमान स्वदेशत्याग करून मदिनेंत येऊन राहिले, तेव्हां पैगंबर साहेबांनीं मुहाजिरीन म्हणजे स्वदेशत्याग करणारे मक्केकर किंवा फिरस्ते आणि अनसार म्हणजे मदतगार मदिनेकर यांच्यांत बंधुत्व काईम केलें होतें व एकमेकांस एकमेकांचा वारसही ठरविला होता. या साठीं कीं मुहाजिरीन लोकांस द्रव्यासंबंधीं अडचण भासत होती. मग जेव्हां इस्लामचा विजय झाला व मुहाजिरीन लोकांस परमेश्वरानें श्रीमंत केलें तेव्हां फक्त गणगोतांत वारश्याचा कायदा चालू राहिला; आणि फिरस्ते व मदतगार यांचा परस्पर वारसपणाचा कायदा तहकूब झाला.

# अध्याय ९ वा.

## सूरतु-त्तौबा.

हा अध्याय मदिनेंत प्रकट झाला. ह्यांत १२९ आयात वा महावाक्यें आहेत. हजरत पैगंबर साहेबांस वेळोवेळीं ज्या वाक्यांचें प्रकटीकरण झालें त्यांत हा सर्वांत शेवटचा अध्याय होय. या अध्ययाचे आरंभीं 'बिस्मिल्ला' ह्मणजे—

**परम दयाळू आणि कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

हें दयामय मंगलाचरण आलें नाहीं, त्याचें कारण हें कीं अध्यायांची रचना पैगंबर साहेबांचे हातून झालेली आहे; आणि अध्याया अध्यायाच्या वेगळेपणाची ही एक निशाणी आहे. पैगंबर साहेबांचे साथीदारांस कुर्आनाच्या अध्यायांची मांडणी करते वेळीं याची चौकशी झालेली नव्हती कीं हा अध्याय स्वतंत्र अध्यायच आहे किंवा त्याचीं वाक्यें इतर अध्यायांचे अंश आहेत. परंतु त्या अध्यायाच्या वाक्यांचा अर्थ मागील 'सूरतुल–अन्फाल' या अध्यायाशीं मिळता जुळतासा होता ह्मणून त्याच्या अनुरोधानें हा अध्याय, 'अन्फाल'चे मागें ठेवण्यांत आला. पण जास्त खबरदारीचे दृष्टीनें याच्या आरंभीं 'बिस्मिल्ला' लिहिली नाहीं; कीं इतर अध्यायाप्रमाणें तो वेगळाच अध्याय समजला जाऊं नये. धन्य! धन्य! ह्या सात्विक लोकांनीं या ईश्वरवाणीचें कोठवर तरी संरक्षण केलें कीं अध्यायांचे वर्गीकरणांतहि त्यांनीं आपलें मत चालविलें नाहीं. तर त्यांतील वाक्यांत घालघुसड व ढवळाढवळ करण्याची गोष्टच कशाला? ह्याचें नांव 'सूरतु–त्तौबा' ह्मणजे पश्चात्तापाचें प्रकरण असें आहे.

ज्या मूर्तीपूजकांशीं तुह्मीं (मुसलमानांनीं सलोख्याचा) करार-मदार करून ठेविला होता, (आतां) परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजकडून त्यांना अभयदान होय. १. तर (हे मूर्तीपूजकहो! सार्व-जनिक शांततेचे) चार महिने मुलखांत तुह्मीं हिंडा फिरा; आणि हें जाणून असा कीं तुह्मीं परमेश्वराला (कोणाहि तऱ्हेनेंच) हरवूं न शकाल; आणि हें कीं (अखेर) परमेश्वर नास्तिकांस (मुसलमानांचे हस्तें जगांत) फजित करणारच. २. आणि बड्या यात्रेच्या दिवशीं, परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजकडून लोकांस (कळविण्यासाठीं सदर) जाहीरनामा पुकारला जातो कीं परमेश्वर मूर्तीपूजकांपासून अलिप्त आहे व (तसाच) त्याचा पैगंबरहि. मग (हे मूर्तीपूजकहो!) तुह्मीं जर पश्चात्ताप कराल तर हें तुमच्याठायीं बरें होय. आणि जर (आतांहि परमेश्वर व पैगंबर यांजकडून) तोंड फिरवूनच राहाल; तर जाणून घ्या कीं तुह्मीं परमेश्वराला (कोणाहि तऱ्हेनेंच) हरवूं शकणार नाहीं आणि (हे पैगंबरा!) नास्तिकांस दुःखदायक शिक्षेची खुषखबर ऐकवून दे. ३. पण ज्या मूर्तीपूजकांशीं तुह्मीं (मुसलमानांनीं सलोख्याचा) करारमदार करून ठेविला होता, नंतर त्यांनीं (तो पुरा करण्यांत) तुह्मांशीं कोणतीच कसर ठेविली नाहीं व त्यांनीं कोणा एखाद्याला तुमच्या विरुद्ध पाठबळहि दिलें नाहीं, ते अपवादात्मक होत. तर त्यांच्याबरोबर जो करार-मदार आहे तो, त्यांच्या(शीं जी मुद्दत ठरली होती त्या) मुदतीपर्यंत पुरा करा. कारण, जे लोक (वचनभंगाविषयीं) जपतात त्यांस परमेश्वर प्रीय ठेवितो. ४. मग जेव्हां (शांतता व) आदरसन्मानाचे महिने लोटून जातील तेव्हां मूर्तीपूजकांस जेथें कोठेंहि तुह्मीं पावाल तेथें त्यांचा सप्पा उडवा, व त्यांची धरपकड करा व त्यांना

(१) लोकांत असें महशूर आहे कीं शुक्रवारीं हज्ज-यात्रा होईल तर तो हज्जे-अकबर ह्मणजे बडी किंवा महा-यात्रा होय. परंतु शास्त्रांत यास आधार नाहीं. शास्त्रांत कोणत्याहि हज्जला 'हज्जे-अकबर' बोललें जातें; कां कीं एक प्रकारचा हज्ज 'उमरा'हि होय. पण तो तीर्थाप्रमाणें केव्हांहि होऊं शकतो. त्याच्या उलट महशूर हज्ज हाच हज्जे अकबर होय व त्यांत लोकांचा मोठा जमाव होत असतो.

वेढून टाका आणि प्रत्येक पाळतीचे जागीं त्यांना टपून बसा. मग जर ते लोक पश्चात्ताप करतील व नमाज पढतील व जकात देतील तर तुह्मीं त्यांची वाट मोकळी सोडा (ह्मणजे त्यांच्या वाटेस जाऊं नका). कारण, परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. ५. आणि (हे पैगंबरा!) मूर्तीपूजकांतून जर कोणी मनुष्य तुझा आश्रय मागील, तर तूं त्याला आश्रय दे; येथपर्यंत कीं तो (सुखासमाधानानें) ईश्वर-वाणी ऐकून (व समजून) घेईल. तदनंतर तूं त्याला त्याच्या अभयाचे जागीं (परत) पोंचता कर. ही (सवलत त्या लोकांचे ठायीं करणें) यासाठीं (अवश्यक) होय कीं हे लोक (इस्लामच्या हकीकतीशीं) वाकब नाहींत. ६. परमेश्वरापाशीं व त्याच्या पैगंबरापाशीं मूर्तीपूजकांचा (सलोख्याचा) करारमदार (विश्वसनीय) कसा होणार (कीं त्यांनीं वचनभंग करून आपणच आपला अभरंवसा करून घेतला)? परंतु ज्या लोकांशीं तुह्मीं (मुसलमानांनीं) 'मस्जिदेहराम' (म्हणजे 'काबा'गृहा) जवळ ('हुदेबियां'त सलोख्याचा) करारमदार[1] केला होता; (व त्यांनीं अद्यापि तो मोडला

---

(१) प्रथमत: इस्लाम कमजोर होता; येथपर्यंत कीं मुललमानांनीं आपापला देश सोडून हबश ह्मणजे अबिसीनिया येथें जाऊन आश्रय घेतला. आणि पैगंबरहि मक्केंत राहूं शकले नाहींत व निरुपाय होऊन मदिनेस जाऊन राहिले. मग येथें आल्यावर स्वधर्माचें स्वातंत्र्य काईम ठेवण्यासाठीं व स्वसंरक्षणास्तव लढायांस सुरवात झाली. हिजरी सनाचे सहावे वर्षी पैगंबर साहेबांनीं 'उमरा' ह्मणजे तीर्थ करण्यासाठीं मक्केस जाण्याचा बेत केला. कुरेशी मूर्तीपूजकांनीं त्यांस पुढें पाऊल टाकूं दिलें नाहीं व पैगंबर साहेबांनीं आपल्या साथीदारांसह हुदेबीया मुकामीं तळ दिला; आणि मक्केकरांबरोबर समेटाचें बोलणें होऊं लागलें. अखेर फार मुष्किलीनें समेट झाला व तोहि अपेश-दायक कीं पैगंबर साहेबांस 'उमरा' केल्यावांचून परतणें भाग पडलें. आणि असें ठरलें कीं मुसलमानांनीं येत्या वर्षी ही तीर्थ–यात्रा पुरी करावी; अशा अटीवर कीं त्यांनीं तलवारी म्यानांत घालून मक्केंत दाखल व्हावें, तीन दिवसापेक्षां जास्त राहूं नये, व लढाई दाहा वर्षें तहकूब राहावी.

**नाहीं) तर जोंपर्यंत ते लोक तुह्मांशीं सरळ राहतील तोंपर्यंत तुह्मींहि त्यांच्याशीं सरळ राहा. कां कीं जे लोक (वचन भंगाविषयीं) जपतात त्यांस परमेश्वर प्रीय राखतो. ७. (मूर्तीपूजकांचा कराररमदार) कसा**

---

मध्यंतरी मक्केकरांतून कोणी मुसलमानांस जाऊन सामील होईल तर तो परत केला जावा आणि कोणी मुसलमान स्वधर्मत्याग करून मक्केस चालला जाईल तर मुसलमानांनीं त्याची मागणी करूं नये. या समेटाची सूचनाहि पैगंबर साहेबांकडून झाली होती व त्याच्या अटी-वरून दिसत होतें कीं मुसलमानांनीं दबून समेट केला. या समेटांत एक गोष्ट हीहि होती कीं कोणाहि पक्षानें प्रतिपक्षाचे मिलाफ्यांशीं लढूं नये व त्याच्या शत्रूंची मदतहि करूं नये. मुसलमान तर हा समेट पसंत करीत नव्हते. ही तर पैगंबर साहेबांचीच सौम्यवृत्ती व दूरदृष्टी होती कीं संप घडून आला. परंतु कुरेशी लोकांच्या हाडीं माशीं द्वेष खिळलेला होता; ते उघड उघड नाहीं तर आंतल्याआंत मुसलमानांचे विरुद्ध खटपट करीत राहत. याच धांधलींत तीन वर्षें निघून गेलीं. ह्या अवधींत मुसलमानांचें सैन्य बळावलें होतें व त्यांनीं बहुतेक अरब घराणीं वश करून घेतलीं होतीं. पैगंबर साहेबांनीं अखिल अरबी द्विपकल्पाशीं मुसलमानांचा व्यवहार चोखा ठेवूं इच्छिलें. ह्मणून हिजरी सनाचे ९ व्या वर्षीं पैगंबरांनीं मक्का शहरांत हज्जचे दिवशीं हजरत अबुबकर व हजरत अली यांस पाठवून असा जाहीरनामा दिला कीं आजपासून पुढें मूर्तीपूजकांशीं आह्मां मुसलमानांस कांहीं संबंध नाहीं. ज्यांशीं संप आहे व ज्यांनीं संपाच्या अटी मोडल्या नाहींत, त्यांच्याशीं संपाचे मुदतीपर्यंत संप कायम राहील; त्यांच्याशिवाय ज्यांनीं संपाच्या अटी मोडून टाकिल्या अगर ज्यांशीं संपच नाहीं त्यांना चार महिन्यांचा अव-काश दिला जातो या अवधींत त्यांनीं मुसलमानांची ताबेदारी पत्करावी किंवा लढाईस तयार व्हावें. या अध्यायाचे वाक्यांवरून दिसण्यांत मुसल-मानांकडून एक प्रकारची सक्ती जाहीर होते. पण जो समाज वीस वर्षां पर्यंत इजा दुःख, बेहुरमती व जाचजुलूम सोशीत राहिला असेल व हल्लीं परमेश्वर त्याला स्वसंरक्षणाचें सामर्थ्य देईल; तर आह्मीं समजत नाहीं कीं तो शत्रूंशीं या हुकमाहून अधिक काय करूं शकतो?

(विश्वसनीय होऊं शकतो ? ) आणि (त्यांची परिस्थिती ही आहे कीं) जर (हे लोक) तुह्मां (मुसलमानां)वर वर्चस्व पावतील, तर ते तुमच्या संबंधानें आप्तपणाचा मान ठेवणार नाहींत व (तसाच) करारमदाराचाहि नाहीं, ते आपल्या तोंडीं (गोष्टींनीं) तर तुह्मांस खुष (खुष) करून टाकतात, पण त्यांचीं अंतःकरणें (त्या गोष्टी) नाकारितात. आणि त्यांच्यांत बहुतेक (असे होत कीं जे आपणच बोलतात व आपणच त्यांतून) निघून पळतात. ८. हे लोक (जगिक वैभवास भुलून) परमेश्वराचे निशाण्यांचे मोबदला थोडासा (ऐहिक) लाभ पत्करून परमेश्वराचे मार्गाहून (लोकांस) प्रतिबंध करूं लागले. हे लोक जीं कामें करितात तीं (कितीतरी) वाईट होत! ९. कोणाहि मुसलमानासंबंधानें ते आप्तपणाचा विचार ठेवीत नाहींत व ना करारमदाराचाच; आणि हेच लोक मर्यादेचें उल्लंघन करणारे होत. १०. मग (मुसलमानांनों!) जर हे लोक (नास्तिक्य व मूर्तीपूजेपासून) पश्चात्ताप पावतील व नमाज पढतील व जकात देतील, तर धर्मांत ते तुमचे बंधु होत. आणि जे लोक समंजस आहेत त्यांच्याकरतां आम्हीं (आपल्या) निशाण्या सविस्तर वर्णितों. ११. आणि जर हे लोक करार केल्यां मागून आपल्या शपथा मोडून टाकतील व तुमच्या धर्माची कुटाळी करतील, तर (या) नास्तिकपणाचे पुढाऱ्यांच्या शपथा कांहींच (विश्वासास पात्र) नाहींत; म्हणून त्यांच्यांशीं तुह्मीं (खूप) लढा; कीं हे लोक कदाचित् (आपल्या खोडसाळपणापासून) मागें घेतील. १२. (मुसलमानांनों!) तुह्मीं अशा लोकांशीं (सर्व सामर्थ्य खर्चून) कां

---

विघाड आहे पण दरेक गोष्टींत न्याय व सौम्यता दिसून येते. धोका नाहीं, दगा नाहीं, डावपेंच नाहीं.

(१) या प्रकारचा दोष बहुतांशीं यहुद्यांस दिला गेला आहे; कीं ते लोक तौरात पुस्तकांत फेरफार करण्यांत फार धीट होते. परंतु येथें पूर्वापर संदर्भावरून ते मूर्तीपूजक असावेत असें दिसतें. सारांश, मआलिमुत्–तन्जील नामक कुराण भाष्याचे कर्ते लिहितात कीं अबुसुफयान यानें आपली हिमाईत करणाऱ्या लोकांस भाकर देऊन व त्यांचे पोट पोसून पोसून इस्लामधर्म स्वीकारण्यापासून अडवून ठेविलें.

म्हणून लढूं नये कीं ज्यांनीं आपल्या शपथा मोडून टाकल्या व पैगंबरास काढून लावण्याचा बेत केला आणि तुह्मांशीं (कुरापतहि) प्रथम त्यांनींच सुरू केली? का तुह्मीं त्या लोकांशीं भितां? मग जर तुह्मीं विश्वासू आहां तर परमेश्वर (याहूनही) अधिक हक्क ठेवितो कीं तुह्मीं त्याला भ्यावें. १३. या लोकांशीं तुम्हीं (बेलाशक) लढा; परमेश्वर तुमच्या हातून यांना शिक्षा देईल व यांना फजित करील व यांवर तुह्मांस जय देईल आणि मुसलमान समाजाचें काळीज थंड करील. १४. आणि त्यांच्या मनांत (नास्तिकांकडून) जो राग (भरला) आहे त्या (चे बोचणी)चेंहि तो निरसन करून टाकील. आणि परमेश्वर ज्याचा पाहिजे असेल त्याचा पश्चात्ताप मान्य करील; आणि परमेश्वर (सर्वांचे स्थितीचा) ज्ञाता (व) सत्यसंकल्प होय. १५. (मुसलमानांनों!) कां तुह्मीं असें समजून ठेविलें आहे कीं तुह्मीं (एरवींच) सोडून दिलें जाल; आणि अजून परमेश्वरानें अशा लोकांस (संकटांतून चांगलें तावून सुलाखून) पाहिलें सुद्धां, नाहीं कीं तुमच्यांतून जे धर्मयुद्ध करतील आणि परमेश्वर व त्याचा पैगंबर व मुसलमान लोक यांस सोडून अन्य कोणाला जिवींचा मित्र न पत्करतील? आणि जें कांहींहि तुह्मीं लोक करीत आहां परमेश्वराला त्याची (सर्व) खबर होय. १६. मूर्तीपूजकांस कोणी हक्क नाहीं कीं त्यांनीं (आपल्यासारख्या नास्तिकांशीं) परमेश्वराच्या मशीदी आबाद राखण्यात आणि (आपल्या आचार-विचारांनीं) आपणच आपल्याविरुद्ध नास्तिकपणाची साक्षहि पटवीत जावी. हेच लोक होत कीं ज्यांचें केलें सवरलें (सर्व) अक्रीत झालें आणि हेच लोक निरंतर नरकाग्नींत राहणारे होत. १७. (वास्तविक पाहिलें तर) ज्यानें परमेश्वर व शेवटचे दिवसावर विश्वास ठेविला आणि नमाज पढत व जकात देत राहिला आणि ज्यानें परमेश्वराशिवाय कोणाचेंच भय बाळगिलें नाहीं, तोच मात्र परमेश्वराच्या मशीदी आंबाद राखतो. तर अशा लोकांसंबंधीं उमेद केली जाऊं शकते कीं ते (सरशेवटीं) अशा लोकांत (जाऊन सामील) होतील कीं जे सन्मार्गास लागून चुकले. १८. कां तुह्मीं लोकांनीं 'हाजी' लोकांस पाणी पाजणें व आदरस-

न्मानाची मशीद (म्हणजे 'काबा'गृह) आबाद राखणें या गोष्टींस, जो मनुष्य परमेश्वरावर व शेवटच्या दिवसावर विश्वास ठेवितो व परमेश्वराचे मार्गांत युद्ध करितो, त्याच्या (सेवे) सारखें समजून घेतलें? परमेश्वराजवळ तर हे (लोक एकमेकांच्या) बरोबर[1] नव्हेत. आणि परमेश्वर जालीम लोकांस सरळमार्ग दाखवीत नसतो. १९. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (धर्मप्रीत्यर्थ) स्वदेश त्याग केला आणि आपलें धन व आपलें तनमनें[2] खर्चीं घालून परमेश्वराच्या मार्गांत युद्ध केलें, (हे लोक) परमेश्वरासमीप दर्जांत सर्वांहून मोठे होत; आणि हेच (आपलें) सार्थक्यहि करून घेणारे होत. २०. यांचा पालनकर्ता यांना आपल्याकडून दया व सुप्रसन्नता यांची व अशा बागा (मध्यें राहण्या)ची खुष खबर देतो कीं ज्यांत त्यांना कायमचें सुख (प्राप्त) होईल. २१. (आणि हे लोक) त्या बागांत सदासर्वदा राहतील. निःसंशय परमेश्वरासमीप (पुण्याईचें) मोठें प्रतिफल होय. २२. अहो मुसलमानांनों! जर तुमचे बाप व तुमचे भाऊ हे विश्वासापुढें नास्तिकपणास प्रीय जाणतील, तर तुह्मीं त्यांना (आपले) स्नेही बनवूं नका. आणि जो कोणी तुह्मांपैकीं त्यांच्याशीं मित्राचार ठेवील; तर हेच लोक (परमेश्वरासमीप) आज्ञाभंजक होत. २३.

---

(१) हजरत अब्बास हे पैगंबर साहेबांचे चुलते होते; पण त्यांनीं मक्का शहर जिंकलें गेलें तेव्हां विश्वास धरिला. आणि हजरत अली हे पैगंबर साहेबांचे चुलत भाऊ व जामात होते; त्यांनीं सर्वांत प्रथम विश्वास धरिला, पैगंबर साहेबांबरोबर स्वदेश त्याग केला व धर्मार्थ युद्ध केलें. ह्मणून हजरत अलीची इस्लाम धर्माविषयींची सेवा अधिक होती आणि जवळचा आप्त संबंध हजरत अब्बासचा होता. याशिवाय हाजी लोकांस पाणी पाजणें व काबागृहाची सेवाचाकरी करणें या गोष्टींसहि ते आपली प्रतिष्ठा समजत होते. या वाक्यांत इस्लामचे सेवाचाकरीची श्रेष्ठता उल्लेखलेली आहे.

(२) तनमन खर्चीं घालणें ह्मणजे स्वतःआपण लढाईंत सामील होणें आणि धन खर्चीं घालून युद्ध करणें ह्मणजे धर्मयोध्यांच्या खर्चवेंचा बद्दलची जबाबदारी घेणें.

(हे पैगंबरा! तूं मुसलमानांस समजावून) सांग कीं जर तुमचे वडील व तुमचीं मुलेंलेंकरें व तुमचीं भावंडें व तुमच्या बायका व तुमचे कुटुंबी, आणि तुह्मीं जी कमाविली आहे ती धनदौलत व उदीमव्यापार ज्याच्या मंदीचा तुह्मांस [१]अंदेशा होतो तो आणि नांदतीं घरें ज्यां(त राहण्या)ची तुह्मांस आवड वाटते (हीं सर्व) परमेश्वर व त्याचा पैगंबर आणि परमेश्वराचे मार्गांत युद्ध करणें यांजपेक्षांहि तुह्मांस प्रीयतर असतील, तर (किंचित्) दम धरा येथपर्यंत कीं जें कांहीं परमेश्वराला करणें आहे तें (तुह्मांसमोर) आणून हजर करील. आणि परमेश्वर (आपला) आज्ञाभंग करणाऱ्या लोकांस सन्मार्गाची बुद्धि देत नसतो. २४. (मुसलमानांनों!) परमेश्वर अनेक स्थलीं तुमची मदत करून चुकला आहे, आणि (प्रामुख्यें करून) 'हुनैन[२]'(चे लढाई)च्या

(१) या वाक्यांत आरंभींचे मुसलमानांसाठीं मोठी सक्ती आहे असें वरवर पाहणारांस कदापि दिसेल; पण तसें मुळींच नव्हें. कारण ईश्वरप्रेम जें मनुष्यांचें अंतिम साध्य तें त्यानें नित्य डोळ्यापुढें ठेवून मग प्रपंचसंबंधी कामें पाहण्यास अडचण नाहीं; पण जो कोणी, परमेश्वर व त्याचा पैगंबर व ईश्वरधर्मसंरक्षण या गोष्टीपुढें जगिक वैभवास प्रीय जाणील तर तो आज्ञाभंजकांत लेखला जाईल. गोत्रसंबंधाची पर्वा न बाळगितां मुसलमान, ईश्वराज्ञेवर टिकून राहिले; ह्मणूनच त्यांचा समाज बळावला व नास्तिकांचे घोळचे घोळ मुसलमान होत गेले. अशा रीतीनें मुसलमानांस फार वेळ गोत्रसंबंध वर्जण्याचें कारण राहिलें नाहीं.

(२) हुनैन हें मक्का व ताएफ यांच्या दरम्यान एक स्थल आहे. मक्का जिंकिल्यावर पैगंबर साहेबांस अशी बातमी लागली कीं नास्तिक लोक हुनैन मुक्कामीं लढाईकरितां गोळा होत आहेत. तेव्हां पैगंबर साहेब स्वतः, मुहाजिरीन म्हणजे फिरस्ते व अन्सार उर्फ मददगार हे मिळून दहा हजार मुसलमान आणि दोन हजार मक्केंतील नवे मुसलमान असें सैन्य घेऊन त्यांच्यावर चालून गेले. सैन्यास एका पर्वताचे खिंडींतून जावयाचें होतें. रस्ता अरुंद असल्यामुळें थोडीं थोडीं माणसें खिंडींतून जाऊं शकत होतीं; आणि हवाजन जातीचे लोक खिंडीच्याजवळ मुसलमानांच्या पाळतींत लागून होते. संधि साधून ते त्यांच्यावर तुटून पडले व

दिवशीं कीं जेव्हां तुमच्या (संख्या)बाहुल्यानें तुह्मांस गर्विष्ट करून सोडलें होतें (कीं आह्मीं बहुत आहों); तर तें (वैपुल्य) तुमच्या कांहींच कामा आलें नाहीं. आणि जमीन (इतकी) ऐसपैस असतांहि ती तुह्मांस संकुचित होऊं लागली. तदनंतर तुह्मीं पाठ फिरवून पळ काढलांत. २५. मग परमेश्वरानें आपल्या पैगंबरावर व (तशीच) मुसलमानांवर आपल्याकडून शांति उतरली, आणि (तुमच्या कुमकेस दूतांचीं) अशीं सैन्यें पाठविलीं कीं जीं तुम्हांला दिसून येत नव्हतीं; आणि (अखेर) नास्तिकांस त्यानें शिक्षा दिली. आणि नास्तिकांचें हेंच प्रतिफळ होय. २६. मग या पश्चात परमेश्वर ज्याचा इच्छील त्याचा पश्चात्ताप मान्य करील. आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. २७. अहो मुसलमानांनों! मूर्तीपूजक हे तर (निवळ) गलिच्छ होत. तर ह्या वर्षापश्चात, त्यांनीं आदरसन्मानाच्या मशीदी (म्हणजे काबागृहा)-चे जवळहि फिरकूं नये. आणि जर (त्यांच्याशीं देवघेव व दळणवळण बंद झाल्यामुळें) तुह्मांस दारिद्र्याचा अंदेशा वाटेल तर (पक्का विश्वास ठेवा कीं) परमेश्वर इच्छील तर तो तुह्मांस आपल्या औदार्यानें श्रीमंत करील. निःसंशय परमेश्वर (सर्वांच्या मनोभावना) जाणता (व) सत्यसंकल्प होय. २८. पुस्तक दिलें गेलेल्या लोकांपैकीं,

---

मुसलमानांचे पाय उखडून गेले. मक्केहून निघतांना कित्येक मुसलमानांस असा गर्व होता कीं आतां आम्हीं इतके बहुत आहोंत नास्तिकांवर जरूर विजय पावूं. गर्व हा ईश्वरनिष्ठेस विघातक होता. ह्मणून पराजय होऊन मुसलमानांस त्याचें शासन मिळालें. हुनैनमध्यें जरी प्रथमतः पराभव झाला; येथपर्यंत कीं लोक पैगंबर साहेबांस सोडून पळाले तरी हजरत अब्बास पैगंबरांबरोबर होते, त्यांचा आवाज फार मोठा होता त्यांनीं ललकारतांच मुसलमान पुन्हां गोळा झाले व लढाई त्यांनीं जिंकिली.

(१) यहुदी व खिस्ती यांस तर पुस्तक दिलें गेलेल्या लोकांपैकीं गणिलेंच आहे; पण अबदुरहमान बीन औफ यांच्या हजरत उमरचे हुजुरांत निश्चयपूर्वक निवेदनाप्रमाणें, हजरत मोहंमद पैगंबरांनीं, बहरैनकडील हजर नामक गांवांतील पार्सी लोकांसीह (हजरत इब्राहीम पैगंबरास प्रकट झालेले दिव्य आज्ञालेख अगर तशाच कोणा पुस्तकांवर त्यांच्या धर्माची

**जे परमेश्वराला (जसें मानिले पाहिजे तसें) मानीत नाहींत व (तसेंच) शेवटल्या दिवसालाहि नाहीं; आणि परमेश्वर व त्याचा पैगंबर यांनीं ज्या (वस्तु) निषिद्ध केल्या आहेत' त्यांस ते निषिद्ध समजत नाहींत व सत्य धर्माचा अंगिकार करीत नाहींत, (मूर्तिपूजकांव्यतिरिक्त) अशा (लोकां)शींहि तुह्मी लढा; येथपर्यंत कीं क्षुल्लक होऊन ते (आपल्या) हातानें जिझिया देतील. २९. आणि यहुदी म्हणतात**

---

स्थापना होती ह्मणून) पुस्तक दिलें गेलेल्या लोकांत लेखिलें आहे. मुसलमानांस ज्या आचरणाची व विवाहसंबंध वगैरेची मुभा यहुदी व खिस्ती लोकांशीं आहे तीच त्यांना पार्सी लोकांशींहि असली पाहिजे. (पाहा तफसीरे बैजावी) हे सर्व ह्मणावयास तर एका परमेश्वराला व शेवटच्या दिवसालाहि मानतात; पण जसें मानिलें पाहिजे तसें मानीत नाहींत. कारण, खिस्ती हे तीन वा त्रिस्वरूपात्मक ईश्वर मानतात व येशूखिस्तास परमेश्वराचा पुत्र ह्मणतात. यहुदी ह्मणतात कीं अझरा किंवा ओझैर हे शंभर वर्षें मृत दशेंत राहून परमेश्वरानें त्यांना पुन्हां सजीवन केलें. तेव्हां बख्तनस्सर (Nebuchadnazzar) बादशहाचे अमदानींत, तौरात उर्फ पवित्र शास्त्र नष्ट वा विस्मृत झालें होतें. तें अझरांनीं आपल्या स्मरणावरून पुनरपि रचिलें. ह्मणून तत्कालीन यहुद्यांस आश्चर्य वाटून ते ओझैर यांस परमेश्वराचा पुत्र ह्मणू लागले. आतां राहिले पार्सी, ते ह्मणावयास तर ह्मणतात कीं परमेश्वर सर्व शक्तिमान आहे; या शिवाय यझदान हा सत्य व पुण्य यांचा निर्मिता व स्वतंत्र पुरस्कर्ता आणि अहरमन हा असत्य व पाप यांचा निर्मिता व स्वतंत्र पुरस्कर्ता आहे असेंहि ते मानतात. पण या परस्पर विरोधी अशा स्वतंत्र व्यक्तया सृष्टीच्या आरंभीं मानिल्या, तर सृष्टि ही त्या उभयपक्षांच्या बलश्रेष्ठतेच्या प्रमाणानें निर्माण झाली असती किंवा नसती. तर ज्याअर्थीं सृष्टि निर्माण झालीच आहे त्या अर्थीं सत्याचाच जय झाला व असत्य ह्मणजे अहरमनचें स्वातंत्र्य नष्ट झालें. तर सृष्टिकर्ता परमेश्वर एकच, सर्वशक्तिमान, स्वतंत्र व प्रतिस्पर्धी-विरहित असा होय. शिवाय दोन स्वतंत्र व्यक्तया मानणें हें ईश्वराचे सर्व शक्तिमान होण्यास विरोधक आहे. तर खरें पाहूं जातां या लोकांचें परमेश्वराला मानिलें पाहिजे तसें मानणें नव्हे; अतएव त्यांचें शेवटचे दिवसाचें मानणेंहि बरोबर नव्हे.

(१) प्राचीन काळापासून नेहमीं असें चालत आलें आहे कीं बादशाह किंवा राजा आपल्या रयतेपासून कर वा सारा वसूल करवितो. मग जो

**कीं 'ओझैर' परमेश्वराचा पुत्र आहे; आणि खिस्ती म्हणतात कीं 'खिस्त' परमेश्वराचा पुत्र आहे. हें त्यांचें आपल्या तोंडांचें बोलणें होय. ते (आपल्या) पूर्वीं जे नास्तिक (होऊन गेले) आहेत त्यांच्याच बोलण्याची धाटणी उचलूं लागले. परमेश्वर त्यांना गारत करो! (पाहा तर!) कोठल्याकोठेंच ते बहकले चालले जातात! ३०. या लोकांनीं परमेश्वराला सोडून आपल्या विद्वानांस व आपल्या संन्याशांस आणि 'मर्यम'चा पुत्र 'खिस्त' यास प्रभु मानिले. आणि वास्तविक पाहतां, (आम्हांकडून) त्यांना एवढाच हुकूम दिला गेला होता कीं त्यांनीं एकाच परमेश्वराची भक्ति करीत रहावें; त्याच्याशिवाय (अन्य) कोणी उपास्य नाहीं. तो त्यांच्या सरकतदार मानण्या-**

---

राजा पुण्यशील व प्रजावत्सल असतो तो रयतेचा फायदा व आराम ज्यांत आहे अशा कामीं त्याचा विनियोग करितो. उदाहरणार्थ, रस्ते, शाळा, इसस्पितळें वगैरे बनवितो. आणि जो विलासी व स्वार्थी असतो तो रयतेपासून घेऊन हपापाचा माल गपापा खर्च करितो ह्मणून त्याचें राज्य कमजोर व रयत असंतोषी होते. त्याच्यापाशीं ना फौजफांटा असतो व ना पोलीस; आणि अपक्षपाती व निस्पृह न्यायकोर्टेंहि नसतात. जझिया हाहि अशाच प्रकारचा कर होता कीं जो मुसलमान बादशाह परधर्मीय रयतेकडून रयतेंत शांतता स्थापिण्यास व देशाचें गनीमापासून संरक्षण करण्यास उपयोगी व्हावा म्हणून घेत होते. आणि मुसलमान स्वधर्मीय असतात ह्मणून आपले समजून त्यांस देशसंरक्षणाचें काम सोंपविलें जात होतें व त्यांच्यापासून चाकरी घेतली जात होती म्हणून त्यांस 'जझिया' वा कर यापासून मुक्त केलें होतें. अशा प्रकारचे करास जाचजुलूम समजणें समंजसपणाचें होणार नाहीं.

(१) यहुदी व खिस्ती ह्यांनीं आपल्या पुढाऱ्यांच्या आदरसन्मानाची पारावारच ठेविली नाहीं. हीच स्थिति जवळ जवळ हिंदु ह्मणविणारांचीहि झाली; त्यांचीं कामें व वचनें यांस ते ईश्वराचे ऐन हुकूम समजत असत. म्हणूनच त्यांनीं आपल्या विद्वानांस व संन्याश्यांस प्रभु मानिलें असें परमेश्वरानें दर्शविलें आहे. हल्लींचे कित्येक मुसलमानहि अशाच तऱ्हेनें पीरांची वा गुरुंची व थडग्यांची पूजाअर्चा करतात त्यांस या महावाक्यापासून धडा घेण्याजोगा आहे.

पासून पवित्र होय. ३१. ते इच्छितात कीं परमेश्वराच्या (इस्लामरूपी) प्रकाशाला तोंडांनीं (फुंक मारून) विझवून टाकावें; आणि परमेश्वराला हें मंजूर आहे कीं हरेक तऱ्हेनें त्यानें आपला प्रकाश परिपूर्ण करून सोडावा; व (मग पाहिजे तर) नास्तिकांस नाखुषच वाटो! ३२. तोच असा (परम पवित्र) होय कीं ज्यानें आपला पैगंबर ('मोहंमद') यास सद्बोध व सद्धर्म देऊन पाठविलें, कीं त्यानें दरोबस्त धर्मांवर त्याचें वर्चस्व[1] गाजवावें; व (मग पाहिजे तर) मूर्तिपूजकांस नाखुषच वाटो! ३३. अहो मुसलमानांनों! (ग्रंथधारी लोकांचे) बहुतेक विद्वान व संन्यासी हे लोकांचे माल अन्यायानें खाऊन चट करतात; व परमेश्वराचे मार्गाहून (लोकांस) अडथळा करतात. आणि जे लोक सोनें व चांदी गोळा करीत राहतात व त्यांस परमेश्वराचे मार्गांत खर्च करीत नाहींत; तर (हे पैगंबरा!) त्यांना (पुनरुत्थानाचे दिवसाचे) दुःखदायक शिक्षेची खुषखबर ऐकवून दे. ३४. त्या दिवशीं त्या (सोन्या व चांदी)ला 'जहन्नम'चे अग्नींत (ठेवून) तापविलें जाईल, मग त्यानें त्यांचीं कपाळें व त्यांच्या कुशी व त्यांच्या पाठी यांस डाग दिले जातील; आणि (त्यांस बजाविलें जाईल कीं) तुह्मीं आपल्यासाठीं (जगांत) जें गोळा करीत होता तें हेंच होय. तर (आज,) तुह्मीं जें गोळा केलें होतें त्याची गोडी चाखा. ३५. ज्या दिवशीं परमेश्वरानें आकाश व पृथ्वी पैदा केली आहे (तेव्हां-पासूनच) परमेश्वरासमीप महिन्यांची संख्या ह्मणजे परमेश्वराचे पुस्तकां (म्हणजे सुसंरक्षित अशा गुप्त पत्रिकें)त बारा महिने (लिहिलेले चालले येत) आहेत; त्यांतून चार[2] (महिने) सन्माननीय (व सार्वजनिक

---

(१) बहुत काळपर्यंत तर इस्लाम धर्माला इहलौकिक हुकमत व राज्याच्या मानानें मोठें वर्चस्व होतें. आतां जरी तसलें वर्चस्व नसलें, तरी इस्लाम धर्माचे सिद्धांत व प्रमाण सयुक्तिक व बुद्धीस पटणारें असेंच आहे ह्मणून त्याचें तसेंच वर्चस्व बाकी आहे; आणि परमेश्वरानें इच्छिलें तर तें पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत तसेंच राहील.

(२) चार महिने म्हणजे शव्वाल, जिल्काद, जिल्हज्ज, आणि मोहर्रम हे चार महिने होत.

**शांततेचे) होत. सरळ धर्म तर हा होय. तर (मुसलमानांनों! सन्मान व शांततेच्या) या (चार महिन्यां)त (लढाई व रक्तपात याद्वारें या महिन्यांची बेहुरमती करून) आपल्या जिवांवर जुलूम करूं नका. आणि जसे मूर्तिपूजक लोक तुह्मांशीं एकजुटीनें[1] लढतात, तसेच तुह्मींहि त्यांच्याशीं एकजुटीनें लढा; आणि जाणून असा कीं परमेश्वर (अत्याचाराविषयीं) जपणारांच्याच[2] संगतीं आहे. ३६. महिन्यांचें मागें पुढें सारून[3] टाकणें हीहि केवळ नास्तिकपणाची**

---

(१) अथवा दुसरा अर्थ असा कीं मुसलमान व मूर्तिपूजक यांच्यांत लढाई ठरली तर जसे मूर्तिपूजक मुसलमानांचा विचार ठेवीत नाहींत तसेंच कोणा मुसलमानानेंहि मूर्तिपूजक व नास्तिकांचा विचार ठेवूं नये.

(२) कुराणाचीं कित्येक वाक्यें दुसऱ्या कित्येक वाक्यांचें स्पष्टीकरण करतात, हा एक सर्वमान्य नियमच आहे. त्याचा अर्थ असा कीं एकच मजकूर कुराणांत अनेक जागीं आला आहे; पण कोठें एका तऱ्हेचे शब्दांनीं व कोठें दुसऱ्या तऱ्हेचे शब्दांनीं; तर सर्वांची संगत लाविल्यानें नीट अर्थ लक्ष्यांत येतो. येथें 'मुत्तकीन' शब्दाचे अनेक अर्थ होतात; पण सकृत्दर्शनीं जो अर्थ निष्पन्न होतो तो भिऊन चालणारे असा होय; आणि आम्हीं (अत्याचाराविषयीं) जपणारे असा अर्थ केला आहे. यास आधार अध्याय २:१९४ आयत "मग जो तुह्मांवर (कोणा तऱ्हेचा) अत्याचार करील, तर जसा अत्याचार त्यानें तुह्मांवर केला तसाच अत्याचार तुह्मींहि त्याच्यावर करा. आणि (अत्याचार करण्यांत) परमेश्वराला भीत राहा आणि जाणून असा कीं (त्याविषयीं) जपणाऱ्यांचाच परमेश्वर साथी होय."

(३) चांद्रमासांत ऋतुंचे अनुषंगानें कमबेशी होतच राहते. जे महिने कधीं कधीं हिवाळ्यांत येतात तेच महिने कालांतरानें उन्हाळ्यांत येतात. ह्मणून कधीं असें घडून येतें कीं आदराचे व शांततेचे चार महिने लढाईचे मोसमांत येतात. अशा प्रसंगीं मूर्तिपूजक यदृच्छेनें महिन्यांस मागें पुढें सारून टाकीत; याचा निषेध केला गेला आहे; कां कीं यांत लोकांची फसगत होत होती.

पराकाष्टाच होय; कीं त्यामुळें नास्तिक लोक (धर्माचे मार्गाहून) बहकत राहतात. एका वर्षी एका महिन्यांला ते, अनिषिद्ध समजतात व त्यालाच दुसरे वर्षी निषिद्ध मानतात; (ह्यानें त्यांचा उद्देश हा असतो) कीं परमेश्वरानें जे (चार महिने) निषिद्ध केले आहेत त्यांच्या गणनेचा (आपल्या गणनेशीं) मेळ घालून परमेश्वरानें जे (महिने) वर्ज्य केले आहेत त्यांस अवर्ज्य ठरवावें. त्यांचीं बदकर्में त्यांना भलीं करून दाखविलीं गेलीं आहेत. आणि जे लोक नास्तिकपणा करतात त्यांना परमेश्वर सन्मार्गाची मति देत नसतो. ३७. अहो मुसलमानांनों! तुह्मांला काय होऊन गेलें आहे कीं जेव्हां तुह्मांस सांगितलें जातें कीं परमेश्वराचे मार्गांत (लढण्यासाठीं) निघा; तेव्हां तुम्हीं भारावून धरणीं बसून जातां. कां तुह्मीं परलोकींच्याऐवजीं इहलौकिक आयुष्यावरच संतुष्ट होऊन बसलां? (जर हीच गोष्ट आहे) तर (हा तुमचा निव्वळ गैरसमज होय; कां कीं,) परलोकींच्या (फायद्या)पुढें ऐहिक आयुष्याचे फायदे अगदींच अत्यल्प होत. ३८. जर तुह्मीं (बोलविल्या गेल्या उपरहि परमेश्वराचे मार्गांत लढावयास) न निघाल, तर परमेश्वर तुह्मांस फार दुःखकारक शिक्षा देईल; आणि तुमच्या बदलीं दुसरे लोक (पैगंबराचे मदतीस) आणून हजर करील; व तुह्मीं त्याचें कांहींच बिघडवूं न शकाल; आणि परमेश्वर सर्वशक्तिमान होय. ३९. जर तुह्मीं पैगंबराची मदत नहि कराल, तर (कांहीं फिकिरीची गोष्ट नाहीं, परमेश्वर त्याचा मददगार होय;) त्यानेंच आपल्या पैगंबराची मदत त्या वेळींहि केली होती कीं जेव्हां नास्तिकांनीं त्याला (असा निराधार करून घरांतून) काढून बाहेर केलें होतें (कीं ते फक्त दोनच जण होते व) दोहोंत दुसरा (पैगंबर); त्या वेळीं हे दोघेहि ('थौर' पर्वताचे) गुहेंत होते (व) त्या वेळीं पैगंबर आपला साथी ('अबुबकर') यास समजावीत होता कीं तूं (कांहींच) खेद (चिंता) करूं नकोस;

(१) हा तबूकचे लढाईचा मजकूर आहे कीं त्याकडून दांभिक तोंड चुकवीत होते. पुढील टिकेंत पाहा.

**निःसंशय परमेश्वर आह्मांसोबत आहे. मग परमेश्वरानें आपल्या पैगंबरावर आपली शांति उतरली, आणि त्याला (दूतांच्या) अशा सैन्यांद्वारें पाठिंबा दिला कीं ज्यांला तुह्मीं लोक पाहूं शकला नाहीं; आणि त्यानें नास्तिकांचा बोल खालीं पाडला. आणि (सदासर्वदा) परमेश्वराचाच बोल बाला होय; आणि परमेश्वर सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् होय. ४०. (मुसलमानांनों!) तुह्मीं, हलके**

---

(१) हजरत पैगंबर साहेबांनीं पुरतीं दहा वर्षें मक्केंत राहून इस्लामधर्माचा जगजाहीरपणें डांगोरा ऐकविला व नास्तिकांकडून त्यांना तऱ्हे तऱ्हेच्या इजा व संकटें पोहोंचलीं. तीं त्यांनीं मुकाट्यानें सहन केलीं; येथपर्यंत कीं नास्तिकांनीं त्यांच्या जिवें मारून टाकण्याचाहि मनसुबा केला. जेव्हां त्यांना निश्चयपूर्वक माहीत झालें कीं आतां लोकांचे हातून जीव वाचविणें मुष्किलीचें आहे, तेव्हां पैगंबर साहेब रात्रीचे वेळीं हजरत अली यांस आपल्या बिछान्यावर निजवून हजरत अबुबकर यांस संगतीं घेऊन मक्केहून तीन मैलांचें अंतरावर सौर किंवा थौर नामक पर्वताचे गुहेंत जाऊन लपले. इकडे नास्तिकांस बातमी लागतांच त्यांनीं शोध सुरू केला. पैगंबर साहेब गुहेंत लपून बसून राहिले; त्या गुहेवरून नास्तिक लोक आले गेलेहि; पण परमेश्वरानें त्यांना आंधळे करून टाकिले व ते पैगंबरास पाहूं शकले नाहींत. हा त्याच वेळेचा उल्लेख होय कीं जेव्हां हजरत अबुबकर हे गुहेच्या तोंडावर नास्तिकांस चालतां फिरतां पाहून घाबरत होते व पैगंबर साहेब त्यांस दिलदिलासा देत होते. एवढ्यापर्यंत ईश्वरनिष्ठा व विश्वास पैगंबर साहेबांशिवाय कोणाच्यानेंहि होणें शक्यच नाहीं. सारांश, जेव्हां मक्केचे आसमंतात शोध करण्याची धामधूम नाहींशी झाली तेव्हां पैगंबर साहेब राहदारीचा मार्ग एकिकडे सोडून परभारा मदिनेस निघून गेले. यालाच हिजरत अशी संज्ञा आहे व याच वेळेपासून मुसलमानांचा हिजरी शक गणिला जातो. जोंपर्यंत ते गुहेंत राहिले तोंपर्यंत अबुबकरचे घराहून खाणेंपिणें व स्वारीचा बंदोबस्त होत राहिला. हजरत अबुबकरची ही महान सेवाभक्ति फार संस्मरणीय होय; तिचा कोणाहि मुसलमानास विसर पडूं शकणार नाहीं. या वाक्यांत दूतांच्या मदतीचा मजकूर आहे, तर कांहींच आश्चर्य

(म्हणजे निःशस्त्र असाल काय) व भारी (म्हणजे हत्यारबंद असाल काय, परमेश्वराचे मार्गांत लढण्यासाठीं पैगंबराचे पाचारणावर) निघून उभे राहत जा; आणि आपलें धन व आपलें तन मन खर्ची घालून परमेश्वराचे मार्गांत जिहाद करा. जर तुम्हीं (जिहाद म्हणजे धर्मार्थ झटणें वा युद्ध करणें याचें गूज) जाणत असाल तर हें तुमच्याठायीं (फार) उत्तम होय. ४१. (हे पैगंबरा!) जर तुर्तातूर्त फायदा असता व प्रवासहि मध्यम प्रतीचाच; (आणि तूं या दांभिकांस आपल्या सोबत जाण्यास बोलावतास) तर हे (लगेच) तुझ्यामागें येते. परंतु त्यांना पल्ला लांबचा वाटला. आणि (तूं त्यांना मागें राहण्याचें कारण विचारशील, तर हे) परमेश्वराच्या शपथा वाहून वाहून म्हणतील कीं जर आमच्यानें होऊं शकतें तर आम्हीं अवश्य तुम्हां लोकांबरोबर निघून उभे राहतों. हे लोक (खोट्या शपथा वाहून परलोकींच्या शिक्षेचे दृष्टीनें) आपणच आपला नाश करून घेतात. आणि परमेश्वराला माहीत आहे कीं हे लोक जरूर लबाड होत. ४२. (हे पैगंबरा!) परमेश्वर तुला क्षमा करो! तूं त्यांना (मागें राहून जाण्याची) परवानगीच कां दिली? त्या वेळेपर्यंत (वाट पाहिली असतीस) कीं तुला सच्चे ते (अलग) जाहीर होऊन जाते आणि लबाडांस (पृथक) जाणून घेतास. ४३. (हे पैगंबरा!) जे लोक परमेश्वरावर व शेवटचे दिवसावर विश्वास ठेवितात, ते तर तुझ्याशीं या गोष्टीची परवानगी मागीत नाहींत कीं आपलें धन व आपलें तन मन खर्चून जिहाद करावें (कीं नाहीं). आणि परमेश्वर (आपल्या) भिऊन वागणाऱ्यांस खूप जाणतो. ४४. (मागें राहून जाण्यासाठीं) तुझ्याशीं असलेच लोक मात्र परवानगी मागतात कीं जे परमेश्वरावर व शेवटचे दिवसावर विश्वास ठेवीत नाहींत व त्यांचीं अंतःकरणें साशंक झालीं आहेत. तर ते आपल्या

---

नाहीं कीं हिजरत करण्याचे वेळींहि दूत आले असतील व त्यांनीं नास्तिकांस आंधळे व बेकाबू करून सोडलें असेल. अगर कदापि बद्र, हुनैन व खंदकचे लढायांकडे इषारा असेल कीं त्यांत दूतांचें येणें व सहाह्य करणें हें स्पष्टपणें कुराणसिद्ध आहे.

शंकेंतच बुचकुळतात (कीं काय करावें व काय न करावें)! ४५. आणि जर हे लोक (मनांत घरांतून) निघण्याचा इरादा ठेवते, तर ते त्याच्यासाठीं कांहीं तयारी करतेच करते. परंतु परमेश्वराला त्यांचें जाग्यावरून हालणेंच नापसंत झालें; म्हणून त्यानें त्यांस आळशी बनवून टाकिलें. आणि (जणो कीं त्यांना) सांगून दिलें गेलें आहे कीं आणखी जे (थकून भागून) बसलेले आहेत, तुह्मींहि त्यांच्या संगतीं बसून राहा. ४६. जर हे लोक तुह्मां (मुसलमानां)त (सामील होऊन) निघतेहि, तर ते तुमच्यांत आणखी मात्र जास्त खराबी घालते; आणि तुमच्यांत फिसाद फैलावण्याचे उद्देशानें तुमच्या दरम्यान (इकडचे तिकडे व तिकडचे इकडे) दौडादौड करीत फिरते; (ती वेगळीच). आणि (गहजब हा होय कीं) तुमच्यांत असेहि होत कीं जे त्यांचें ऐकून घेतात. आणि परमेश्वर खोडसर लोकांस खूप जाणतो. ४७. (हे पैगंबरा!) त्यांनीं पूर्वींहि फिसाद उपस्थित करूं इच्छिलें व तुझ्या (बिघाडण्या)साठीं कामांची उलथापालथ करीतच राहिले; येथपर्यंत कीं (ईश्वरसाह्याचा) खरा वायदा येऊन पोहोंचला व परमेश्वराचा हुकूम वरचढ राहिला; आणि ते नाखुषच होत्साते राहिले. ४८. आणि या(च दांभिकां)त तो (अजागलहि) होय कीं जो (तुला) अशी दरखास्त करितो कीं मला (तूं मागें राहून जाण्याची) परवानगी दे, व मला (रोमन सौंदर्याचे) मोहपाशांत फसवूं नकोस. पाहा हो! हे लोक मोहपाशांत तर (येऊनच) पडले; (मग रोमन सौंदर्याचा मोहपाश नसला, तरीहि ईश्वराज्ञा-भंगाचा पाश तर खराच). आणि निःसंशय जहन्नम—नरकाग्नि (समस्त) नास्तिकांस घेरून

(१) हजरत पैगंबर साहेबांचे वेळीं जे लोक मुसलमान झाले होते, ते फार सक्त परिक्षेंत होते. त्या वेळीं इस्लाम प्रथमावस्थेंत होता; व ह्मणूनच कमजोर, अशक्त व परतंत्र असा होता. यासाठींच तत्कालीन मुसलमानांचे दर्जे अत्युच्च होत. पैगंबर साहेबांस बऱ्याच लढाया लढणें भाग पडलें; त्यांत सर्वांत शेवटली लढाई तबूकची होती. तबूक हें सूर्याप्रांताचें एक शहर असून त्यांत रोमन लोकांची अमलदारी होती; धर्मदृष्ट्या हे लोक खिस्ती होते. असें मशहूर झालें कीं अरबदेशांत

आहेच. ४९. (हे पैगंबरा!) जर तुला एखादी भलाई पोहोंचून जाते, तर ती या (दांभिकां)स वाईट लागते. आणि जर तुजवर एखादें संकट ओढवतें, तर ते म्हणूं लागतात कीं (ह्याच विचारामुळें) आह्मीं पहिल्यानेंच आपलें काम (ठीकठाक) करून घेतलें होतें; आणि (असें बोलून) ते खुष खुष होत्साते (तुझ्यापासून उठून) परत चालले जातात. ५०. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं जें कांहीं परमेश्वरानें आम्हांसाठीं लिहून ठेविलें आहे त्याच्याशिवाय (आणखी कांहीं) संकट तर आम्हांवर ओढवूं शकत नाहीं. तोच आमचा पुरस्कर्ता होय; आणि मुसलमानांस पाहिजे कीं त्याच्यावरच मात्र त्यांनीं भरंवसा ठेवावा. ५१. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं तुह्मीं आमच्याठायीं दोघी कल्याणास्पद गोष्टींपैकीं एकी (ना एकी)-

---

दुष्काळ आहे व पैगंबर साहेबांसंबंधानें शत्रूंनीं अशा गप्पा झोकल्या कीं त्यांचा देहांत झाला. हें ऐकून रोमन बादशहाला अरबदेश जिंकण्याची अभिलाषा उत्पन्न झाली व त्यानें कांहीं सैन्येंहि तिकडे पाठवून दिलीं. पैगंबर साहेबांस ही बातमी कळतांच, देश जिंकण्यासाठीं नव्हे, लढाई करण्यासाठीं नव्हे तर केवळ रोमन लोकांची मोडशी जिरविण्याच्या हेतुनें त्यांनीं ही चढाई केली. मोसम चांगला नव्हता; कडक गरमी पडत होती. इकडे खजुरीची फसल तयार होती कीं त्यावरच मदिनेकरांची उपजीविका होती; तशांत हत्यारें व इतर सामानसुमान नेण्याचीं साधनें पाहिजेत तशीं नव्हतीं. परंतु पैगंबर साहेबांची मनिषा ही होती कीं इकडून चाल करून जावें ह्मणजे रोमन लोक धमकींत येऊन जातील. सारांश, लढाई वगैरे कांहींच झाली नाहीं. परंतु कित्येक दुरोखी–दांभिक–मुसलमानांनीं पैगंबर साहेबांची साथ देण्यास संकोचवृत्ती दाखविली; व त्या कारणास्तव त्यांनीं तऱ्हतऱ्हेचे बाहाणे काढले. एवंच त्यांतून कोणी असाहि बहाणा केला होता कीं रोमन लोकांच्या सौंदर्याची फार अख्यायिका आहे, तर असें कोठें न व्हावें कीं मी रोमन सौंदर्याचे मोहपाशांत फसून जावें. कोणतीहि सबब सांगितली तरी नास्तिकांस नरकाग्नि घेरून आहे.

(१) ह्मणजे आमच्या तुमच्या लढाईचा परिणाम आमच्या ठिकाणीं दोन तऱ्हेचा होऊं शकतो कीं जर आह्मीं विजय पावलों तर गाजी मर्द आणि

ची तर (खामखा) वाट पाहतच आहांना? आणि आम्हीं तुमच्याठायीं या गोष्टीची वाट पाहतों आहों कीं परमेश्वर तुम्हांला आपल्याकडून एखाद्या शिक्षेंत पिडो अगर आमच्या हातून (तुह्मांस एखादी शिक्षा देववो)! तर (बरें,) तुह्मींहि वाट पाहा; आम्हींहि तुह्मांबरोबर वाट पाहतोंच. ५२. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुम्हीं खुशीनें खर्च करा अगर नाखुशीनें; तुमचा दानधर्म तर (परमेश्वरासमीप) कोणाहि तऱ्हेनें मान्य होणें नाहीं; कां कीं तुह्मी आज्ञाभंजक लोक आहां. ५३. आणि त्यांचा दानधर्म त्यांजकडून मान्य होण्यास त्यांना कोणताच प्रत्यवाय झाला नाहीं; परंतु हाच कीं त्यांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यां(ची आज्ञा पाळावया)स नाकारिलें, व ते नमाजीलाहि येतात ते केवळ आळसावलेले; आणि (परमार्थांत) खर्चवेंचहि करतात ते केवळ नाखुश होत्सातेच. ५४. तर (हे पैगंबरा!) तुला त्यांच्या द्रव्याचें नवल न वाटावें व ना त्यांच्या संततीचेंच, (कीं परमेश्वरानें त्यांच्या संसारांत बरकत कां ह्मणून देऊन ठेविली! ही बरकत नव्हे, तर) परमेश्वर असें इच्छितो कीं ऐहिक आयुष्यांत त्यांना या (द्रव्या व संतती)पर्त्वें शिक्षाग्रस्तच ठेवावें; आणि (हें कीं) त्यांचे प्राण निघून जावेत व (त्या वेळींहि) हे नास्तिकच राहावेत. ५५. आणि (मुसलमानांनों! हे दांभिक लोक तुम्हांसमक्ष) परमेश्वराच्या शपथा वाहतात कीं तेहि तुमच्यां-तूनच होत. व वास्तविक पाहतां, ते तुह्मांपैकीं नव्हेत; तथापि ते भ्याड लोक होत. ५६. जर कोठें त्यांना आश्रय सांपडेल अगर (लपून राहण्याजोग्या) गुहा किंवा आंत शिरून बसण्याची (आणखी कोणी) जागा; तर ते दोर तोडतोडून त्यांकडे धांव घेतील. ५७. आणि (हे पैगंबरा!) त्यांच्यांतून कांहीं लोक असेहि आहेत कीं जे खैरातीं(चा माल लोकांस वाटण्यां)त तुजवर (गैर इनसाफीचा) दोषारोप करतात. मग जर त्यांना त्यांतून (त्यांच्या मर्जीप्रमाणें) दिलें जाईल तर ते संतुष्ट होतात; आणि जर

मारले गेलों तर शहीद; ह्मणजे एकी व बेकी हे दोन्ही डाव मुसलमानांचेच होत.

त्यांना त्यांतून (त्यांच्या इच्छेनुरूप) न दिलें जाईल तर (झालें,) ते तेव्हांच रुसून बसतात. ५८. आणि जें कांहीं परमेश्वरानें व त्याच्या पैगंबरानें त्यांना दिलें होतें जर हे त्यांतच संतोष मानून राहते व म्हणते कीं आम्हांस परमेश्वर पुरा होय; (आणि आतां नाहीं दिलें म्हणून काय झालें?) पुढें आपल्या औदार्यानें परमेश्वर व त्याचा पैगंबर हे आम्हांस (बहुत कांहीं) देतील; आम्हीं तर परमेश्वराकडेच ध्यान लावून बसलों आहों. तर (हें त्यांच्याठायीं फार बरें होतें). ५९. खैरातीचा माल म्हटला म्हणजे केवळ गोरगरिबांचा हक्क होय आणि अन्नास मोताद अशा गरजूंचा व खैरातीच्या (वसुली) कारकुनांचा आणि ज्या लोकांची मनधरणी करणें मंजूर असेल त्यांचा; (अशा कामांत खैरात म्हणजे जकातीचा विनियोग केला जावा;) आणि (तसाच गुलामांच्या) माना (बंदमुक्त करण्यां)त, व कर्जदारां(चें कर्ज फेडण्यां)त आणि (तसाच) परमेश्वराच्या मार्गा(म्हणजे धर्मयोध्यांच्या युद्ध सरंजामां)त व वाटसरूं(च्या वाटखर्चा)त. (हे हक्क) परमेश्वराकडून ठरलेले (होत). आणि परमेश्वर ज्ञानी व बुद्धिमान होय (कीं योग्यस्थळीं खर्च करण्यास फर्मावितो). ६०. आणि या (दांभिकां)पैकीं (कित्येक) असेहि होत कीं जे पैगंबरास इजा देतात व म्हणतात कीं हा गृहस्थ कान(-पिसा) होय. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं कान(-पिसा वा कानाचा हलका होणें

(१) म्हणजे पैगंबर साहेब आपलें मत कांहींच ठेवीत नव्हते. जें कांहीं कोणी सांगितलें त्याचा विश्वास करीत. आणि हें जें म्हटलें कीं कान(-पिसा वा कानाचा हलका होणें हें) तुमच्या हितास (कारणीभूत) होय; याचा अर्थ हा कीं मुसलमानाचा विश्वास राखणें व त्याला खरा जाणणें, हा पैगंबराचा स्वभाविक गुण होय व तुमच्या हितास कारणीभूत होय. पण जर कोणी विश्वासाचा बाहणा करणाऱ्याच्या मनांतच खोट असेल तर हा त्याचा अपराध आहे; कीं त्यानें पैगंबरांस खोटी बातमी दिली आणि पैगंबरांनीं त्याच्या बाहेरून मुसलमान होण्यावर भरंवसा करून त्याचा विश्वास केला.

हें) तुमच्या हितास (कारणीभूत) होय. तो परमेश्वरावर विश्वास ठेवितो व मुसलमानां(च्या गोष्टीं)वरहि विश्वास राखतो; आणि तुमच्यापैकीं ज्या लोकांनीं विश्वास धरिला आहे त्यांच्यासाठीं तर
१ तो (सर्वोपरी) दया(च दया) होय. आणि जे लोक परमेश्वराचे पैगंबरास इजा देतात त्यांना (पुनरुत्थानाचे दिवशीं) दुःखकारक शिक्षा होणें आहे. ६१. (मुसलमानांनों! हे लोक) तुमच्या समक्ष परमेश्वराच्या शपथा वाहतात; अशासाठीं कीं त्यांनीं तुम्हांस राजी करून घ्यावें. आणि वास्तविक पाहतां, परमेश्वर व त्याचा पैगंबर हे अधिक हक्कदार होत कीं जर हे लोक खरे मुसलमान असतील, तर त्यांनीं (परमेश्वर व पैगंबर) या (प्रत्येका)स राजी करावें. ६२. कां त्यांनीं अद्यापि इतकी गोष्टहि जाणिली नाहीं कीं जो परमेश्वर व त्याचा पैगंबर यांशीं विरोध करितो, त्याच्यासाठीं तर 'जहन्नम'–नरका–ची आग (तयार) आहे कीं तींत तो सदासर्वदा राहील. (आणि) ही मोठीच फजिती(ची गोष्ट) होय. ६३. दांभिक लोक (या गोष्टीलाहि) भितात कीं (न जाणों! परमेश्वराकडून) मुसलमानांस (पैगंबराद्वारें) असा एखादा अध्याय प्रकटिला जाईल कीं जो त्यांच्या मनांत जें कांहीं आहे तें मुसलमानांस कळवून टाकील. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (बरें,) तुम्हीं थट्टा मस्करी करा; ज्या गोष्टीस तुम्हीं भीत आहां ती तर परमेश्वर उजेडास आणील(च आणील). ६४. आणि (हे पैगंबरा!) जर तूं या लोकांस पुसशील (कीं ही काय गोष्ट होती) तर ते अवश्य हाच जवाब देतील कीं आम्हीं तर एरवींच गप्पा मारीत व हंशी खेळ करीत होतों. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुम्हांस थट्टा मस्करी करावयाची होती तर कां परमेश्वराशींच

---

(१) दांभिकांत कित्येक तर अश्रद्धालु होते व कांणा विशिष्ट कारणामुळें आपण मुसलमान नसतांहि आपणास मुसलमान जाहीर करीत होते; व कित्येक साशंकवृत्तीचे व दुरोखा होते. या वाक्यांत ह्या शेवटचे प्रकारचे दांभिकांचा उल्लेख आहे. ते केव्हां केव्हां भीतहि होते; पण ईश्वरी धर्माचा उपहास व थट्टामस्करी करणें सोडून देत नव्हते.

व त्याच्याच निशाण्यांशीं व त्याच्याच पैगंबराशीं? ६५. तुम्हीं सबब म्हणून पुढें आणूं नका; खरें तर हें कीं तुह्मीं विश्वास धरल्या उपरहि नास्तिक होऊन गेलां. जरी आह्मीं तुह्मांपैकीं एका पक्षाचे अपराध क्षमाहि करून टाकूं, तरी देखिल दुसऱ्या पक्षाला आम्हीं शिक्षा देणारच; कीं तेच (मुळांत) अपराधी होते. ६६. दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया हीं एकमेकांचीं जिव्हाळीं होत; ते वाईट कामां(च्या करण्या)ची (लोकांस) सल्ला देतील व भलीं (कामें करण्या)ची मनाई करतील आणि (परमेश्वराचे मार्गांत खर्च करण्याची वेळ येईल तर) आपल्या मूठी आवळून आवळून धरतील. (वस्तु-स्थिति अशी होय कीं) ह्या लोकांनीं परमेश्वराला विसरून टाकिलें, म्हणून (त्याच्या ऐवजीं जणों कीं) परमेश्वरानेंहि त्यांना विसरून टाकिलें. कांहीं संशय नाहीं कीं दांभिक (हे फारच) शिरजोर होत. ६७. दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया व नास्तिक लोक यांच्याठायीं परमेश्वरानें जहन्नम-नरकाग्नी-चा वायदा करून ठेविला आहे कीं हे लोक निरंतर त्यांतच राहतील; तोच त्यांना पुरवतो. आणि परमेश्वरानें त्यांना शापित केलें आहे व त्यांच्या करितां कायमची शिक्षा होय. ६८. (दांभिकांनों!) तुमच्यापूर्वीं जे लोक होऊन गेले त्यांचा जसा प्रकार (झाला होता, तुमचाहि तोच प्रकार झाला) कीं ते तुमच्यापेक्षां फारच

---

(१) दांभिक लोक जे उपहास करीत होते त्यांत कित्येक तर असे असतील कीं जे करमणुकीखातर लोकांचे देखोदेखी हांजी हांजी करून माना डोलवूं लागतात. त्यांचा अपराध हलका आहे. आणि कित्येक खरोखरींच इस्लामाकडून खोटे ग्रह ठेवीत असतील; कीं हेच लोक मुळांत उपहासास व थट्टेस कारणीभूत होते. व तेच परमेश्वरासमीप शिक्षेस पात्र ठरले. येथें कोणाचाच उघडपणें उल्लेख केलेला नाहीं; यासाठीं सर्वांनीं आपआपल्या जागीं जागृत व सावध व्हावें.

(२) ह्मणजे ह्या सर्वांचें मत एकच आहे.

(३) परमेश्वरानें विसरून टाकिलें ह्मणजे परमेश्वर त्याची दाद घेणार नाहीं.

बलाढ्य होते, आणि धनदौलत व संततींतहि जास्त होते. तर ते आपल्या वांट्याचे (ऐहिक) फायदे उचलून गेले. पण जसे तुह्मां पूर्वींच्या लोकांनीं आपल्या वांटणीचे (ऐहिक) फायदे घेतले होते तसेच तुह्मींहि आपल्या वांटणीचे (ऐहिक) फायदे उचलले; आणि जशा गोष्टी ते लोक करीत होते तशाच गोष्टी तुह्मींहि करूं लागलां. हेच (ते) लोक (होत कीं) इहलोक व परलोक या (दोहों)त त्यांचें केलें-सवरलें (सर्व) अकीत झालें. आणि हेच तोट्यांतहि राहिले. (तर दांभिकांनों! तुमचाहि हाच परिणाम होणें आहे). ६९. कां या (दांभिकां)स त्यांच्या पूर्वीं जे लोक होऊन गेले आहेत त्यांची बातमी पोहोंचली नाहीं? (म्हणजे) 'नूह'चे लोक व 'आद' व 'समूद,' आणि 'इब्राहीम'चे लोक व 'मदयन'वासी आणि उलथून पाडलेल्या वस्त्या (म्हणजे 'लूत'चे लोकांचीं गांवें) यांचे रहिवाशी; कीं या (सर्वां)चे पैगंबर यांचेपाशीं उघड उघड चमत्कार घेऊन आले (व त्यांनीं मुळींच ऐकिलें नाहीं व ईश्वरशिक्षेच्या सपाट्यांत सांपडले); पण परमेश्वर तर यांच्यावर जुलूम करावयाचा नव्हताच; परंतु हे लोक (परमेश्वराची अवज्ञा करून) आपणच आपल्यावर जुलूम करीत होते. ७०. आणि मुसलमान पुरुष व मुसलमान स्त्रिया हीं एकमेकांचे मित्र होत; कीं ते (लोकांस) नेकी करावयास सांगतात व बदीची मनाई करतात आणि नमाज पढतात व जकात देतात आणि परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या हुकमावर चालतात; हेच लोक होत कीं परमेश्वर त्यांच्या (स्थिती)वर लवकरच दया करील. निःसंशय परमेश्वर सामर्थ्यवान् (व) बुद्धिवान् होय. ७१. विश्वासू पुरुष व विश्वासू स्त्रियांशीं परमेश्वरानें (स्वर्गीय) बागांचा वायदा केला आहे कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील (व तीं) त्यांत नित्य राहतील; आणि (तसाच परमेश्वरानें त्यांच्याशीं) चिरकालिक निवासस्थानाचे बागांत छानदार (छानदार) घरांचा (वायदा केला आहे). आणि परमेश्वराची सुप्रसन्नता (जी या गोष्टींनीं प्राप्त होईल ती या सर्व सुखापेक्षांहि) फारच थोर होय. हेंच मोठें सार्थक्य होय. ७२.

हे पैगंबरा! नास्तिकांशीं (हत्यारांनीं) व दांभिकांशीं (वाचेनें) जिहाद -धर्मयुद्ध कर आणि त्यांच्यावर सक्ती कर; (कीं हे या सक्तीस पात्र होत.) आणि (सरशेवटीं) त्यांचें ठिकाण जहन्नम-नरकाग्नि होय. व तीं (फारच) वाईट जागा होय! ७३. (हे दांभिक) परमेश्वराच्या शपथा वाहतात कीं आम्हीं तर ही (अस्थानीं) गोष्ट बोललोंच नाहीं. आणि वास्तविक पाहतां, ते नास्तिकपणाचा बोल अवश्य बोलले व इस्लाम स्वीकारल्यावर नास्तिक होऊन गेले; आणि (पैगंबराशीं दांडगाईचा-हि) त्यांनीं बेत केला पण तो त्यांना साधला नाहीं. आणि हे लोक चिडले कशावरून, एवढ्या वरूनच ना? कीं आपल्या मेहरबानीनें परमेश्वरानें व त्याच्या पैगंबरानें त्यांना श्रीमंत करून टाकिलें; पण हे लोक जर (आतांहि) पश्चात्ताप करतील तर यांच्याठायीं उत्तम होईल. आणि जर ते तोंड चुकवितील, तर परमेश्वर त्यांना इहलोक व परलोक यांत (फार) दुःखप्रद शिक्षा देईल; व भूलोकांत कोणी त्यांचा पुरस्कर्ता होणार नाहीं व ना मदतगारच. ७४. आणि या (दांभिकां-)तून कांहीं लोक असेहि होत कीं ज्यांनीं परमेश्वराशीं कौलकरार केला होता कीं जर तो आपल्या कृपेनें आम्हांला (धनदौलत) देईल तर आम्हीं अवश्य दानधर्म करीत जाऊं व जरूर (परमेश्वराचे) सदाचरणी (भक्त) होऊन राहूं. ७५. मग जेव्हां परमेश्वरानें त्यांना आपल्या कृपेनें (धन) दिलें, तेव्हां ते त्यांत कृपणपणा करूं लागले

(१) आम्हीं हत्यार व वाचेची कैद पैगंबर साहेबांच्या वर्तणुकीवरून लाविली आहे. कारण, त्यांनीं दांभिकांशीं नास्तिकांसारखें धर्मयुद्ध केलें नाहीं.

(२) दांभिक लोक, पैगंबर साहेब व मुसलमान यांच्याशीं आड-पडद्यांत अदावत तर ठेवितच होते; हमेषा अशा तजविजी करीत कीं ज्यांनीं त्यांस नुकसान पोहोंचावें. परंतु कोणतीच तजवीज सफल होत नव्हती. पाठीमागें ते पुष्कळ चडफडत व फार जळून गोष्टी करीत राहत होते. या वाक्याच्या भाष्यांत भाष्यकारांनीं दांभिकांचे अनेक खोडसरपणाचा उल्लेख केला आहे. त्यांतून एक तर आम्हीं भाषांतरांत पत्करला आहे; म्हणजे पैगंबराशीं दांडगाई करण्याचा व त्यांना मदिनेंतून काढून लावण्याचा.

आणि हेंकडपणा करून (आपल्या कौलकरारापासून) फिरून पडले. ७६. तर परिणाम हा झाला कीं ते परमेश्वराच्या नजरानजर होतील त्या दिवसापर्यंत (म्हणजे पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत) परमेश्वरानें त्यांच्या अंतःकरणांत दांभिकपणा उत्पन्न केला; यासाठीं कीं त्यांनीं परमेश्वराशीं जो वायदा केला होता त्यांत त्यांनीं त्याचा विरोध केला व (तसेंच) यासाठींहि कीं ते लबाड बोलत होते. ७७. कां त्यांनीं इतकेंहि जाणिलें नाहीं कीं परमेश्वर त्यांचे गुप्त भेद व त्यांची कुजबुज जाणतो आणि हें कीं परमेश्वर अदृष्ट गोष्टींचाहि ज्ञाता होय? ७८. हे (दांभिक)च तर होत कीं जे मुसलमानांपैकीं (ऐपतदार व) आपखुषीनें खैरात करणारे अशा लोकांवर (डौल मिरविण्याचा) दोष लाव-

(१) हजरत पैगंबर साहेब–परमेश्वर त्यांना धन्यावाद व शांति देवो–यांच्या वेळीं सअलबा नांवाचा एक दांभिक होता. त्यानें पैगंबरांपाशीं विनंति केली कीं माझी धनदौलत व संपत्ति वाढावी म्हणून तुम्हीं परमेश्वरापाशीं मजकरितां प्रार्थना करा. पैगंबर साहेबांनीं त्याला समजावून सांगितलें कीं संपत्तीची वाढ मनुष्यास गाफील व कर्तव्य-पराङ्मुख करिते; तर आहे त्यांतच संतोष मानून ऐस. त्यानें प्रतिज्ञापूर्वक कौलकरार केला कीं मला जास्त संपत्ति लाभेल तर मी गाफील नव्हे पण ईश्वराप्रत कृतज्ञ होऊन राहीन व त्याच्या मार्गांत खैरात–जकात देत जाईन. पैगंबर साहेबांचे प्रार्थनेमुळें परमेश्वरानें त्याच्या गुरांढोरांत व शेळ्यामेंढ्यांत इतकी बरकत दिली कीं त्याचे कळप मदिनेच्या जंगलांत मावेनातसे झाले; म्हणून तो मदिना सोडून बाहेर कोणा गांवीं जाऊन राहिला. त्याला आपल्या कामकाजांतून आतां एवढीहि फुरसत न मिळे कीं त्याला पैगंबर साहेबांच्या हुजूर हजर होतां आलें असतें अगर जुमा म्हणजे शुक्रवारची नमाज व जमात यांत सामील होता. मग जेव्हां त्याच्याकडे जकातीचा तगादा झाला, तेव्हां तो बडबडूं लागला व त्याची टाळाटाळ करूं लागला. पुढें तो एकदां पैगंबर साहेबांजवळ जकात–धर्मकर घेऊनहि आला. पण पैगंबरांनीं तो मान्य केला नाहीं; व त्यांच्या पश्चात झालेल्या त्यांच्या खलीफांनींहि तो कर स्वीकारिला नाहीं; येथपर्यंत कीं तो साअलबा हजरत उस्मान या खलीफाचे अमदानींत मरण पावला.

तात. आणि ज्या लोकांस स्वकष्टार्जनाशिवाय (जास्त) कांहीं मिळत नाहीं (व या उपरहि जें कांहीं मिळतें तें परमेश्वराचे मार्गांत खर्च करण्यास तत्पर असतात) त्यांच्यावरहि (उगींच शेखी मारण्याचा दोषारोप करतात). एवंच ते त्या (सर्वां)वर हंसतात; पण परमेश्वर या (दांभिकां)वर हंसतो; व त्यांच्यासाठीं दुःखप्रद शिक्षा (तयारच) होय. ७९. (हे पैगंबरा!) तूं यांच्याप्रीत्यर्थ क्षमेची प्रार्थना कर अगर यांच्याप्रीत्यर्थ क्षमेची प्रार्थना करूं नकोस; (यांच्याकरितां सर्व सारखेंच). जरी तूं सत्तर वेळांहि यांच्यासाठीं क्षमेची प्रार्थना करशील, तरी परमेश्वर कधींच त्यांना क्षमा करणार नाहीं. ही त्यांच्या या कर्मांची शिक्षा होय कीं त्यांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांस

---

(१) मुसलमान दोन प्रकारचे होते; कित्येक ऐपतदार व कित्येक बिन ऐपतदार. हे जेव्हां दानधर्म आणीत तेव्हां दांभिक लोक दोघांवरहि हंसत. ऐपतदारांस ते ह्मणत कीं तुह्मीं लोकांस डौल दाखवितां; व बिनऐपतदारांस टोमणे देत कीं तुह्मीं उगीच फुशारकी मिरवितां.

(२) 'सत्तर'चा अर्थ सत्तर ही संख्या नव्हे; किंबहुना त्याचा अर्थ पुष्कळ असा होय. आह्मीं मराठींत जसें शंभर हजार वगैरे शब्द पुष्कळ या अर्थी बोलतों तसाच बोलण्याचा हा संप्रदाय आहे. हजरत पैगंबर साहेबांच्या सहीह्–हदीस–आधारसिद्ध वचनसंग्रहांत आलें आहे कीं दांभिकांचा सरदार अबदुल्ला बिन उबै हा मेला; तेव्हां त्याच्या मुलानें पैगंबर साहेबांशीं दरखास्त केली कीं त्याला जनाजा ह्मणजे तिरडी किंवा प्रेतपालखी यांत घातल्यावर प्रेतविधि व नमाज आपण करावा. पैगंबर साहेब राजी झाले व नमाज करावयास उभे राहिले. अबदुल्ला हा कट्टा दांभिक व इस्लामधर्माचा कट्टा शत्रु असून त्याच्या हातून पैगंबर साहेब व मुसलमान यांस मोठमोठ्या इजा पोहोंचल्या होत्या. हजरत उमर यांनीं पैगंबर साहेबांस नमाज पढतां अडकविलें व ही आयत–महावाक्य आठवून दिलें. पैगंबर साहेब ह्मणाले, ईश्वरानें सत्तर वेळांसाठीं म्हटलें आहे कीं दांभिकांसाठीं मी एथपर्यंत तुझी प्रार्थना ऐकणार नाहीं. ह्मणून मी सत्तर वेळांपेक्षां जास्त प्रार्थना करीन कीं ती कदापि मान्य होईल; असें म्हणून त्यांनीं अबदुल्लाचे प्रेतावर नमाज पढविली; एवढेंच नव्हे तर त्यांनीं त्याचें प्रेतवस्त्र वा कफनासाठीं आपल्या अंगांतील पेहरणहि दिलें. नमाज पढविल्यावर, "(हे पैगंबरा!), जर यांच्यापैकीं कोणी

**नाकारिलें; आणि परमेश्वर (अशा) आज्ञाभंजक लोकांस सन्मार्गाची सुबुद्धि देत नसतो. ८०. ज्या (दांभिकां)स (खुद् त्यांच्या दुराग्रहा-मुळें) मागें राहूं दिलें गेलें, ते परमेश्वराच्या पैगंबराचे (मता)विरुद्ध आपल्या (घरीं) बसून राहण्यास फार खुष झाले; व परमेश्वराचे मार्गांत आपलें धन व आपलें तन मन अर्पून जिहाद् करणें त्यांना गोड वाटलें नाहीं. आणि ते (लोकांसहि) समजावूं लागले कीं (अशा) गरमींत (घरांतून) निघूं नका. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं गरमी तर नरकाग्नीची अतिशय सक्त होय. ते जर इतकें समजते तर (बरें होतें)! ८१. तर (एक दिवस असा होईल कीं) हे लोक हंसतील थोडें व रडतील फार; (आणि हा,) ते (जगांत) जीं कर्में करीत होते त्यांचा मोबदला (होय). ८२. तर (हे पैगंबरा!) जर परमेश्वर तुला (लढाईहून) या (दांभिकां)च्या कोणा पक्षाकडे (सुख-रूपपणें) परत नेईल व (मग कधीं हे लोक जिहादासाठीं) निघण्याची**

---

मरून जाईल, तर तूं कधींच त्याच्या (प्रेता)वर नमाज पढूं नकोस व त्याच्या कबरेवरहि (जाऊन) उभा राहूं नकोस." हें वाक्य सादर झालें. पैगंबर साहेबांचे वर्तनानें कोणी असें समजूं नये कीं त्यांना 'सत्तर' या शब्दाचा अर्थबोध झाला नव्हता. परंतु गोष्ट अशी आहे कीं पैगंबर साहेब हे नखशिखांत सर्वोपरी दयाच दया होते; त्यांच्यासंबंधानें "आणि आम्हीं तुला सकल जगांच्या लोकांसाठीं केवळ (मूर्त) दया करून पाठविलें आहे," अशी कुराणोक्ती आहे. उपेक्षा व क्षमा हा तर त्यांचा स्वभावच होता; आणि परमेश्वराची दया व करुणा यांचीहि त्यांना मोठी आशा होती. पैगंबर साहेबांनीं आपल्या स्वभावानें 'सत्तर' हा शब्द निमित्तास घेऊन सकल जगांसाठीं आपलें मूर्त दया होणें सिद्ध केलें. आणि अबदुल्लाचे कफनासाठीं जें आपलें पेहरण दिलें होतें, त्याची हकीकत अशी कीं तें वस्तुतः अबदुल्लाच्या एका उपकाराची फेड होती. ती अशी कीं पैगंबर साहेबांचे चुलते हजरत अब्बास हे जेव्हां मुसलमान झाले तेव्हां त्याच वेळीं त्यांचे कपडे बदलवावे लागले. ते उंच कांठीचे व हृष्टपुष्ट होते व अबदुल्लाचें पेहरणाशिवाय आणखी कोणा मुसलमानाचें पेहरण त्यांच्या अंगांत आलें नाहीं. धन्य! धन्य! त्यांची मर्यादशीलता! कीं त्यांच्यानें एका पेहरणेचा उपकारहि फेडल्या-वांचून राहववलें नाहीं. ह्याच गोष्टी, पैगंबर साहेबांविषयीं आमचा विश्वास व श्रद्धा वाढवितात. जगाच्या इतिहासांत असलीं उदाहरणें फारच दुर्मिळ आहेत.

तुजपाशीं परवानगी मागतील; तर तूं (त्यावेळीं त्यांना) सांगून दे कीं तुह्मीं तर माझ्या संगतीं (जिहादासाठीं) कधीं निघणार नाहीं व माझ्या सोबत राहून कधींहि कोणा शत्रुशीं लढणार नाहीं. खरोखरींच तुह्मीं पहिल्यांदा (घरांत) बसून राहण्यास राजी झाला, तर (आतांहि) मागें अडून बसणाऱ्यांबरोबर (घरांत) बसून राहा. ८३. आणि (हे पैगंबरा!) जर यांच्यापैकीं कोणी मरून जाईल, तर तूं कधींच त्याच्या (प्रेता)वर नमाज पढूं नकोस व त्याच्या कबरेवरहि (जाऊन) उभा राहूं नकोस; (कां कीं) त्यांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांस नाकारिलें; आणि हे आज्ञाभंजकच असतांना मरून गेले. ८४. आणि यांची संपत्ति व यांची संतति यांचा तुला आचंबा वाटूं नये, (कीं मग या ऐहिक संसाराची वृद्धि यांच्या येथें कां म्हणून? होय, तर ही ऐहिक संसार–वृद्धि यासाठीं होय कीं) केवळ परमेश्वरच इच्छितो कीं या (संपत्ति व संतती)मुळें त्यांना इहलोकींच शिक्षा भोगूं लावावें; आणि यांचे प्राण निघून जावेत व (त्या वेळींहि) हे नास्तिकच राहवेत. ८५. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां एखादा अध्याय प्रकट केला जातो (व त्यांत अशी आज्ञा असते) कीं परमेश्वरावर विश्वास ठेवा व त्याच्या पैगंबरा सोबत राहून 'जिहाद' करा; तेव्हां यांच्यांतून (जे) मगदूरवाले (होत तेच) तुझ्याशीं परवानगी मागूं लागतात व म्हणतात कीं आम्हांला (येथेंच) सोडून जा, कीं (इतर) बसून राहणाऱ्यांबरोबर आम्हींहि (घरांत बसून) राहूं. ८६. यांना, स्त्रिया ज्या मागें (घरांत बसून) राहतात त्यांच्याबरोबर (मागें बसून) राहणें पसंत आलें; आणि यांच्या अंतःकरणांवर मोहर लाविली गेली; म्हणून हे लोक ('जिहाद'च्या खुब्या कांहींच) समजत नाहींत. ८७. परंतु पैगंबर व ज्यांनीं त्याच्याबरोबर (परमेश्वरावर) विश्वास ठेविला आहे (या सर्वांनीं) आपलें धन व आपलें तनमन (परमेश्वराचे मार्गांत) अर्पून जिहाद–धर्मयुद्ध केलें; हेच लोक होत कीं ज्यांना (इहलोक व परलोक या सर्वांचें) श्रेय होय आणि हेच (अखेर आपल्या मनोरथांत) सफल होणारेहि होत. ८८. यांच्यासाठीं परमेश्वरानें (स्वर्गांचे)

(१) म्हणजे ते परवानगी मागतील तर त्यांना सांगा कीं तुम्हीं लबाड बोलतां व तुमचें मागचें वर्तन या गोष्टीची साक्ष पटविते.

बगीचे तयार करून ठेविले आहेत कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व हे) त्यांत निरंतर राहतील. (आणि) हेंच मोठें साफल्य होय. ८९. आणि (हे पैगंबरा! ) गांवढळांतूनहि (कांहीं) निमित्तखोर (तुजजवळ निमित्त घेऊन) आले कीं त्यांनाहि (मागें राहून जाण्याची) परवानगी दिली जावी. आणि जे लोक (इस्लामाचा खोटा दावा करून) परमेश्वराशीं व त्याच्या पैगंबराशीं लबाड बोलले होते, ते (घरींच) बसून राहिले (व आले देखिल नाहींत. पण हे पैगंबरा! ) त्यांच्यापैकीं ज्यांनीं नास्तिकपणा केला, त्यांना लवकरच दुःखकारक शिक्षा पोहोचेल. ९०. (हे पैगंबरा! ) दुर्बल व दुखणाईत पिडिलेले व ज्या लोकांस (लढाईस्तव) जो खर्चवेंच करावा तो मिळत नाहीं ते लोक, ज्याअर्थी (लढाईहून मागें बसून राहूनहि) परमेश्वर व त्याच्या पैगंबराचें हित चिंतीत राहतील त्याअर्थी त्यांच्यावर कांहीं गुन्हा नाहीं. (या) सुकृत्य करणाऱ्यांवर (दोष लावण्यास) कांहीं मार्ग नाहीं. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ९१. आणि अशा लोकांवरहि (दोष ठेवण्यास कांहीं मार्ग) नाहीं कीं जे लोक तुजपाशीं जेव्हां (दरखास्त घेऊन) आले कीं तूं त्यांच्यासाठीं स्वारी(ची व्यवस्था) करवावीस; तेव्हां तूं (त्यांना) जबाब दिलास कीं मला तर कोणी (स्वारी) मिळत नाहीं कीं मी त्यावर तुह्मांस स्वार करवीन; (हें ऐकून, ते लोक आपल्या जागीं) परत गेले आणि (लढाईसाठीं) जो खर्चवेंच करावा तो त्यांना मिळाला नाहीं म्हणून खेद होऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रु गळत होते. ९२. दोष तर (वस्तुतः) अशा लोकांवर होय कीं जे श्रीमंत असूनहि तुजपाशीं (मागें राहून जाण्याची) परवानगी मागतात. यांना, स्त्रिया ज्या (बहुधा) मागें (घरांत बसून) राहतात त्यांच्याबरोबर (मागें बसून) राहणें पसंत झालें; आणि परमेश्वरानें यांच्या अंतःकरणांवर मोहर लावून दिली आहे; ह्मणून हे (लोक जिहादच्या खुब्या) समजत नाहींत. ९३.

---

(१) तबूकचे लढाईस जाण्याचे वेळीं गांवढळ अरब म्हणजे बनी असद व बनी गतफान हीं घराणीं ह्मणूं लागलीं कीं आह्मांपाशीं माल थोडा व कुटुंब फार आहे; आणि आमिर बीन तुफैल ह्मणाला कीं आह्मीं लढाईस जाऊं तर बनी-तै आमच्या कुटुंबास व गुरांढोरांस लुटून जातील. हे निमित्तखोर अशा प्रकारचे होते.

# पवित्र कुराण

## भाग अकरावा.

### सूरतुल्-त्तौबा (पुढें चालू)

(मुसलमानांनों) जेव्हां तुम्हीं (जिहादहून परतून) दांभिकांकडे परत जाल, तेव्हां (हे लोक) तुह्मांसमोर (तऱ्हेतऱ्हेचें) निमित्त पुढें करतील. (तर हे पैगंबरा! यांस) सांगून दे कीं तुह्मीं निमित्त पुढें करूं नका; आह्मीं (मुसलमान) कोणाहि प्रकारें तुमचा विश्वास करणार नाहीं. परमेश्वर तुमची (सारी) हकीकत आह्मांला कळवून चुकला आहे. आणि अजून तर परमेश्वर व त्याचा पैगंबर पुढें तुमचीं कृत्यें पाहील; मग (अखेर) तुम्हीं अशा (परम समर्थ परमेश्वरा)कडे पालटले जाल कीं जो अदृष्ट व दृष्ट या (दोहों)चा ज्ञाता होय. मग जें कांहीं तुह्मीं (जगांत) करीत राहिलां असाल, (तें सर्व) तो तुम्हांस विदित करील. ९४. (मुसलमानांनों!) जेव्हां तुम्हीं (जिहादहून) परतून यांच्याकडे परत जाल, तेव्हां हे लोक जरूर तुह्मांपुढें परमेश्वराच्या शपथा व्हाहतील, यासाठीं कीं तुह्मीं त्यांच्या वाटेस जाऊं नये; तर तुह्मीं त्यांच्या तोंडीं लागूं नका; कारण, हे लोक मलीन होत. आणि (शेवटीं) त्यांचें ठिकाण 'जहन्नम' होय; (व हा,) तें (जगांत) जें करीत होते त्याचा मोबदला (होय). ९५. हे तुह्मांपुढें शपथा वाहतील कीं तुह्मीं त्यांच्याशीं राजी होऊन जावें. पण जर तुह्मीं त्यांच्याशीं राजीहि होऊन जाल, तर परमेश्वर (या) आज्ञाभंजक लोकांशीं राजी होणार नाहीं. ९६. गांवढळ लोक नास्तिकपणा व दांभिकपणा यांत फार सक्त होत; आणि, ते (जहालपणामुळें) याच लायकीचे होत कीं परमेश्वरानें आपल्या पैगंबरास जें (पुस्तक) प्रकटिलें आहे त्याचे हुकूम त्यांनीं (कांहीं) समजूं (उमजूं) नयेत. आणि परमेश्वर ज्ञानी (व) बुद्धिमान् होय. ९७.

आणि गांवढळ लोकांपैकीं कांहीं लोक (असेहि) होत कीं जे, (परमेश्वराचे मार्गांत) त्यांना जो खर्च करावा लागतो त्यास (विना-कारणाचा) भुरदंड समजतात; आणि ते तुह्मां (मुसलमानां)लागीं (काल-)चक्राची वाट पाहतात. तर त्यांच्यावरच (कालाचें) वाईट चक्र येवो! आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ९८. आणि गांवढळ लोकांतून कांहीं असेहि होत कीं जे परमेश्वर व शेवटचा दिवस यांवर विश्वास ठेवितात व जें कांहीं (परमार्थी) खर्च करतात त्यास परमेश्वराचे हुजूर सान्निध्य व पैगंब-राचा दुवा यांचें साधन समजतात. तर पाहा! खरोखरींच तें (खर्च करणें) त्यांच्या करितां सान्निध्य आहेहि; कीं (मरणोत्तर) परमेश्वर त्यांजला आपल्या दयेखालीं घेईल. निःसंशय परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ९९. आणि 'मुहाजिरिन' व 'अन्सार' यांजपैकीं जे लोक (इस्लाम स्वीकार-ण्यांत) पुढें सरसावले (व) अग्रगण्य झाले; व (तसेंच विश्वासांत) ज्यांनीं प्रांजलपणें त्यांचे अनुकरण केलें; त्यांच्याशीं परमेश्वर संतुष्ट झाला व ते परमेश्वराशीं संतुष्ट झाले. आणि परमेश्वरानें त्यांच्यासाठीं (स्वर्गाच्या अशा) बागा तयार करून ठेविल्या आहेत कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व हे) त्यांत सदासर्वदा राह-तील. हेंच मोठें साफल्य होय. १००. आणि (मुसलमानांनो!) तुमच्या आसपास जे गांवढळ लोक आहेत त्यांजपैकीं (कित्येक) दांभिक होत. आणि खुद्द 'मदिने'चे रहिवाशांपैकींहि (कित्येक), दांभिकपणावर अडून बसले आहेत. (हे पैगंबरा!) तूं त्यांना जाणीत नाहींस; आम्हीं त्यांना (खूप) जाणतों. तस्मात्

---

(१) पैगंबर साहेब नास्तिकांच्या इजांपासून लाचार होऊन मक्केहून मदिनेस चालले गेले. या स्वदेशत्यागास हिजरत अशी संज्ञा आहे. इतर मुसलमानहि पैगंबर साहेबांचे पुढें मागें मदिनेंत गोळा होत गेले; या विदेशीय मुसलमानांस मुहाजिरीन ह्मणतात. मदिनेचे मुसलमान ज्यांनीं परदेशीय मुसलमानांस आपल्या येथें थारा दिला व त्यांनीं अशा प्रसंगीं इस्लामची मदत केली त्यांस अन्सार ह्मणजे मदतगार ह्मणतात.

आतां तर आह्मीं (जगांत) त्यांना दुहेरी शिक्षा देऊं; मग (सरशेवटीं पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांना मोठ्या (सक्त) शिक्षेकडे पालटलें जाईल. १०१. आणि (कांहीं आणखी) दुसरे लोक होत कीं त्यांनीं आपले अपराध कबूल केले; (व त्यांनीं) सरमिसळ कर्में आचरिलीं; (कांहीं) भलीं व इतर (कांहीं) वाईट. तर नवल नाहीं कीं परमेश्वर त्यांचाहि पश्चात्ताप मान्य करील. कारण, परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. १०२. (हे पैगंबरा! हे लोक आपल्या मालाची जकात देतील तर) यांच्या मालाचीहि जकात घेत जा, कीं ही (जकात स्वीकारल्या)नें तूं त्यांची (पापांपासून अंतर्बाह्य) शुद्धि करितोस; आणि तूं त्यांना (चांगला) दुवा दे. कारण तुझा दुवा त्यांच्याठायीं (चित्त-)शांति(स कारणीभूत) होय. आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. १०३. कां या लोकांस ही गोष्ट माहीत नाहीं कीं परमेश्वरच आपल्या सेवकांचा पश्चात्ताप मान्य करितो व तोच खैराती(चा माल) घेतो; आणि हें कीं परमेश्वरच अति पश्चात्ताप मान्यकर्ता (व) दयाळू होय? १०४. आणि (हे पैगंबरा! यांना) समजावून दे कीं तुह्मीं (आपल्या जागीं) कर्मे आचरीत राहा; पण अजून तर परमेश्वर तुमचीं कर्में पाहील आणि त्याचा पैगंबर व मुसलमान (हेहि पाहतील). आणि (मरणा-नंतर) जरूर तुह्मीं अशा (परमसमर्थ परमेश्वरा)कडे पालटले जाल कीं जो अव्यक्त व व्यक्त या (दोहों)चा ज्ञाता होय. मग जें कांहीं तुह्मीं (जगांत) करीत राहिलां असाल, तें (सर्व) तो तुह्मांस विदित करील. १०५. आणि (कांहीं) इतर लोक होत कीं परमेश्वराचे हुकमाची वाट पाहण्यांत त्यांचें प्रकरण भिजत पडलें आहे; (त्याला अखत्यार होय) कीं तो त्यांना कां तर शिक्षा देईल व कां तर त्यांचा पश्चात्ताप स्वीकारील. आणि परमेश्वर ज्ञानी (व) बुद्धिमान होय. १०६. आणि (एका प्रकारचे दांभिक तेहि होत कीं) ज्यांनीं या हेतुनें एक

(१) दुहेरी शिक्षा याचा अर्थ हा कदाचित् होऊं शकेल कीं प्रथमतः मुसलमानांचे नजरेंत त्यांचा अभरवंसा झाला, आणि मग ते पडद्याआड नास्तिकांचे साथी झाले व त्यांच्या बरोबरच तेहि जेरीस आणिले गेले.

मशीद बनवून उभी केली की (मुसलमानांस) नुकसान पोहों-चवावें, व (परमेश्वर व पैगंबराशीं) नास्तिकपणा करावा व मुसल-मानांच्या दरम्यान फूट घालावी आणि जे लोक परमेश्वर व त्याचा पैगंबर यांशीं पूर्वी लढून चुकले आहेत त्यांना आश्रय द्यावा. आणि (त्यांस पुसलें जाईल तर) ते शपथा वाहूं लागतील कीं आमचा तर नेकीशिवाय दुसरा उद्देशच नव्हता; आणि परमेश्वर साक्ष देतो कीं अर्थात हे लबाड होत. १०७. (म्हणून हे पैगंबरा!) तूं त्या (मशीदीं)त कधीं (जाऊन) उभाहि

(१) १०७ ते ११० महावाक्यांपावेतों शाह अबदुल कादिर साहेबांनीं ज्या टीका केल्या आहेत त्यांत अवश्यक त्या ऐतिहासिक गोष्टी सर्व आल्या आहेत; ह्मणून त्या येथें आह्मी यथार्थ घेतों:—हजरत पैगंबर साहेब मक्कहून हिजरत—स्वदेशत्याग करून आले, तेव्हां ते मदिनेबाहेर बनी अम्र् बिन औफ यांची एक वस्ति होती, तींत उतरले. पुढें कांहीं दिवसांनीं मदिनाशहरीं आश्रय घेतला व मस्जिदे नबवी नांवाची मशीद बांधविली. प्रथम जेथें ते नमाज पढत होते त्या वस्तींत तेथील लोकांनीं एक मशीद बनवून ठेविली; व तेथें जमात कायम राहिली. इचें नांव मस्जिदे—कुबा मशहूर आहे. पैगंबर साहेब शनिवारीं बहुतकरून तेथें जात व नमाज पढत असत. याच स्थलीं कित्येक दांभिकांनीं असा बेत केला कीं उपरिनिर्दिष्ट लोकांच्या विरुद्ध आणखी एक मशीद बनवावी व आपली जमात वेगळीच कायम करावी; आणि अबुआमिर नांवाचा एक खिस्ती मठवासी जो इस्लामाचा विरोध करीत असल्यामुळें कोठें निघून गेला होता त्याला पुन्हा दांभिकपणानें बोलावून तेथें सरदार व इमाम—धर्माध्यक्ष करावा. या लोकांनीं पैगंबर साहेबांस विनंति केली कीं आपण एकदां येथें नमाज पढा, ह्मणजे आह्मी आपली जमात कायम करूं. पैगंबरास यांची दगाबाजी माहीत नव्हती. त्यांनीं अभिवचन दिलें कीं तबूकचे लढाईहून आह्मी परतूं, तेव्हां प्रथम तेथेंच नमाज पढूं. परमेश्वरानें त्यांना पाहिल्यानें व खबरदार केलें; आणि कुबाचे मशीदीचे लोकांची तारीफ केली. मनुष्यानें सावध असावें कीं बाहेरून दिसण्यांत भक्ति आहे पण त्यांत आंतून दुर्वासना व कुहेतु आहे त्या भक्तीची स्थिति हीच होय.

शाहूं नकोस. अर्थात एक मशीद जिची स्थापना पहिल्या दिवसापासूनच ईश्वरभयावर केली गेली आहे तिचा अधिक हक्क होय कीं तूं तिच्यांत उभें राहवेंस (व नमाज पढावीस). (कारण कीं) तींत असे लोक होत कीं जे खूप स्वच्छ व चोखे राहावयास पसंत करतात; आणि परमेश्वर खूप स्वच्छ व चोखे राहण्याऱ्यांस प्रिय राखतो. १०८. तरे कां जो कोणी परमेश्वराचे भयावर व (त्याच्या) सुप्रसन्नतेवर आपल्या इमारतीची स्थापना करील तो उत्तम कीं जो कोणी (पाण्याचे वेगानें) फुसफुशीत (होऊन) ढांसळेल अशा (नदीचे) बंधाऱ्याच्या कांठावर आपल्या इमारतीची स्थापना करील व मग ती (इमारत धाडदिशीं) त्याला घेऊन नरकाग्नींत ढांसळेल, तो? आणि परमेश्वर जालिम लोकांस सरळ मार्गाची बुद्धि देत नसतो. १०९. त्यांची (ही) इमारत जी त्यांनी बांधली आहे तीमुळें त्यांच्या मनांत नेहमीं धरसोड राहीलच; येथपर्यंत कीं (अखेर ही इमारत जमीन दोस्त झाल्यानें) त्यांच्या अंतःकरणाचे तुकडे तुकडे होऊन जातील. आणि परमेश्वर (सर्वांचे स्थितीशीं) वाकब (व) युक्तिवान् होय. ११०. परमेश्वरानें मुसलमानांपासून त्यांचे प्राण व त्यांची धनदौलत (या वायद्यानें) खरेदी घेतली आहे कीं त्यांच्या ऐवजीं त्यांना स्वर्ग(-प्राप्ति) होईल. (हे लोक तनमन व धन यांची पर्वा न बाळगितां) परमेश्वराचे मार्गांत लढतात, (आणि ते लढतात) तेव्हां (शत्रूंस) मारून टाकतात व (आपणहि वेळेस) मारले जातात. हा परमेश्वराचा पक्का वायदा होय व त्याचें पूर्ण करणें त्यानें आपल्या ठायीं अवश्यक केलें आहे. (आणि हा वायदा) 'तौरात' व 'इंजील' व 'कुर्आन्' या (सर्वां)त (लिहून ठेवलेलाच आहे). आणि परमेश्वराहून आपल्या वचनाचा अधिक पुरा आणखी कोण होऊं शकतो? तर (मुसलमानांनो!) आपला (हा) सौदा जो तुह्मीं परमेश्वराशीं केला आहे त्याची तुह्मीं खुशी माना; आणि हा (व्यवहार जो तुह्मीं परमेश्वराशीं केला आहे त्यांत तुमचें) मोठें सार्थक्य होय. १११. (ह्याच लोकांच्या अंगीं इतके गुण होत कीं ते) पश्चात्ताप करणारे, ईश्वरोपासना करणारे, (त्याची) स्तुति (व गुण) गाणारे, (परमे-

श्वराचे मार्गांत) प्रवास करणारे, ओणवून वंदन करणारे, साष्टांग नमस्कार घालणारे (ह्मणजे नमाज करणारे), इष्ट कामांचा (लोकांस) सल्ला देणारे, अनिष्ट कामापासून मनाई करणारे आणि परमेश्वरानें घालून दिलेल्या मर्यादांचें संरक्षण करणारे (असे होत.) आणि (हे पैगंबरा! अशा) मुसलमानांस, शुभवर्तमान ऐकीव. ११२. जेव्हां पैगंबर व मुसलमानांस, मूर्तिपूजक हे नरकवासी होत असें (ईश्वराज्ञेनें) माहीत होऊन गेलें, तेव्हां (आतां) त्यांना हें शोभत नाहीं कीं त्यांनीं अशा लोकांच्या क्षमेची प्रार्थना करावी; व मग (पाहिजे तर) ते (त्यांचे) आप्तच (कां) होईनात? ११३. आणि 'इब्राहिमा'नें आपल्या बापासाठीं क्षमेची (जी) प्रार्थना केली होती, (तर ती) केवळ, त्यानें आपल्या बापाला जें वचन देऊन ठेविलें होतें त्या वचनामुळें (केली होती). मग त्यालाहि जेव्हां हें माहीत होऊन गेलें कीं हा परमेश्वराचा दुशमन होय, तेव्हां तो बापापासून (अगदींच) अलिप्त होऊन गेला. निःसंशय 'इब्राहीम' अर्थात् कोमल अंतःकरणाचा व दयार्द्र असा होता. ११४. आणि परमेश्वर असा नव्हे कीं कोणा एका राष्ट्रास सरळ मार्गीं लावून दिल्यावर त्यांना कुमार्गी ठरवून देईल; येथपर्यंत कीं ज्या (गोष्टी) विषयीं

---

(१) जसे धर्मार्थ युद्ध करणारे, हाजी-यात्राळू-लोक व विद्यार्थी वगैरे.

(२) मर्यादांचें संरक्षण करणें ह्मणजे शास्त्र मर्यादांचें उलंघन न करणें व त्यांच्या बाहेर पाऊल न टाकणें.

(३) या वाक्याच्या संबंधानें भाष्यकारांचा मतभेद आहे. कित्येकांचें मत असें आहे कीं हें वाक्य मागील वाक्याची पुरवणी होय. तर याचा अर्थ असा होईल कीं मूर्तिपूजकांसाठीं जी क्षमेची प्रार्थना तुह्मीं मनाई होण्यापूर्वी करून चुकलां आहां तीबद्दल पकड नाहीं. आणि कित्येकांनीं यास स्वतंत्र व वेगळें वाक्य गणिलें आहे. तर ते ह्मणतात कीं कांहीं गांवढळ अरब मदिनेंत आले व त्यांनीं इस्लामाची दीक्षा घेतली व परत गेले. त्या वेळेपर्यंत सुरापान निषिद्ध झालें नव्हतें व काबागृहाकडे फिरल्याची दिशाहि पालटली नव्हती. तथापि बैतुल्–मकदिस

त्यांनीं जपत राहावें त्या (गोष्टी) त्यांना उघड करून न सांगील. निःसंशय परमेश्वर सर्वज्ञानी होय. ११५. निःसंशय आकाश व पृथ्वीची बादशाही परमेश्वराचीच होय. जगवितो(-हि तोच), व मारतो(-हिं तोच). आणि (मुसलमानांनों !) परमेश्वराखेरीज तुमचा कोणी पुरस्कर्ता नाहीं व कोणी मदतगारहि नाहीं. ११६. परमेश्वरानें अर्थात् पैगंबरावर मोठीच कृपा केली व (तशीच) 'मुहाजिरीन' व 'अन्सार' यांजवरहि कीं जे अडचणीचे समयीं, त्यांच्यांतील एका पक्षाचीं मनें डळमळीत व्हावयास आलीं होतीं त्या उपरहि, पैगंबराच्याच वळणावर गेले. नंतर त्यानेंच त्यांच्यावरहि कृपा केली (कीं त्यांना संभाळून घेतलें); यांत शंका नाहीं कीं परमेश्वर या (सर्वां)वर अतिशय करुणामय (व) दयाळू होय. ११७. आणि (तद्वत्) त्या तिघा (जणा)वरहि कीं जे (परमेश्वरच्या हुकमाची वाट पाहतां) मागें विलंबित टाकले गेले होते; येथपर्यंत कीं जेव्हां जमीन विस्तीर्ण असूनहि त्यांना तंग वाटूं लागली व ते आपल्या जिवानीशींहि तंग येऊन गेले व त्यांनीं समजून घेतलें कीं परमेश्वरा(च्या तावडीं)तून त्याच्याशिवाय आणखी कोणताच आश्रय नाहीं; तेव्हां मग परमेश्वरानें त्यांचा पश्चात्ताप स्वीकारिला, या साठीं कीं (पश्चात्ताप स्वीकारण्याच्या उपकार स्तुति दाखल त्यांनीं पुढेंहि) पश्चात्ताप करीत राहावें. निःसंशय परमेश्वर अति पश्चात्ताप मान्यकर्ता (व) दयाळू होय. ११८. अहो

---

ह्मणजे पॅलेस्टाईन येथील यरुशलेमचे पवित्र मशीदीकडे तोंड करून नमाज पढिली जात होती. हे लोक मद्यपान करीत व यरुशलेमकडे नमाज पढीत असत. नंतर पुष्कळ काळ लोटल्यावर त्यांचें मदिनेस येणें झालें; तेव्हां त्यांना माहीत झालें कीं दारू वा मद्यपान वर्ज्य ठरलें आहे व नमाजीची दिशाहि बदलली आहे. त्या वेळीं ते अनुतप्त होऊन पैगंबर साहेबांस ह्मणूं लागले कीं आह्मी मोठ्या चुकींत राहिलों. त्या लोकांचे सांत्वनासाठीं हें वाक्य प्रकट झालें कीं अज्ञानपणांत जें झालें तें माफ होय.

(१) तबूकची लढाई ही मोठ्या आणीबाणीची वेळ होती. एक तर उन्हाळा, दुसरा लांबचा पल्ला, युद्ध सामुग्रीची मारामार आणि खजुरीस

**मुसलमानांनों! परमेश्वरा(चे क्रोधा)स भ्या व सत्यवादी लोकांबरोबर राहा. ११९. 'मदिने'कर व त्यांच्या जवळपासचे गांवढळ अरब लोक यांस योग्य नव्हतें कीं त्यांनीं परमेश्वराचे पैगंबरा(चे संगतो)पासून मागें राहून जावें; व हेंहि (योग्य) नव्हतें कीं पैगंबराच्या जिवाची पर्वा न करितां त्यांनीं आपल्या जिवाचीच अभिलाषा बाळगावी. हें**

---

फळें आलेलीं कीं ह्यावरच मदिनेकरांच्या उपजिविकेची भिस्त होती. ह्मणून या लढाई संबंधानें पांच पक्ष होऊन गेले. प्रथम, पैगंबर साहेब मुहाजिरीन व अन्सार कीं यांनीं अडचणींची मुळींच पर्वा केली नाहीं व निःशंकपणें निघून उभे राहिले. दुसरा, पक्ष याच मुहाजिरीन व अन्सारमध्यें होता कीं ते निघावयास कचरत होते; पण अखेर निघून उभे राहिले. तिसरो पक्ष, फक्त तीन मनुष्यांचा होता, कअब बिन मालिक, हिलाल बिन उमय्या व मुरारा बीन रबीअ; हे लोक आळसा-मुळें मागें राहून गेले होते. पैगंबर साहेब मदिनेस परतले तेव्हां हे लोकहि त्यांच्या हुजरांत हजर झाले. जेव्हां त्यांना मागें राहण्याचे कारण विचारिलें गेलें तेव्हां जी गोष्ट खरी होती ती त्यांनीं सांगितली कीं आमच्याकडून अपराध झाला. ह्याच तीन मनुष्यासंबंधानें पैगंबर साहे-बांनीं हुकूम दिला होता कीं ईश्वरी प्रकटीकरणाची वाट पाहा. ईश्वराचा जसा हुकूम होईल तसें केलें जाईल. चवथा पक्ष, दांभिकांचा कीं या अवघ्या अध्यायांत त्यांची खरपूस खबर घेतली गेली आहे. या लोकांनीं निमित्त व बहाणे काढले म्हणून त्यांना दोषहि दिला आहे. पांचवा पक्ष म्हटला म्हणजे असे लोक होत कीं जे कोणा कारणांमुळें जाऊं शकले नाहींत. आतां या वाक्यांत जो परमेश्वराच्या कृपेचा मजकूर आहे, ती कृपा प्रत्येकांचे स्थितीस अनुसरून बेगवेगळाली होय. पैगंबर साहेब मुहाजिरीन व अन्सार यांजवर परमेश्वरानें ही कृपा केली कीं त्यांचे इरादे डळमळीत झाले नाहींत. आणि जे कचरत होते व मागें पुढें पाहत होते त्यांच्यावरहि कृपा झाली कीं अखेर त्यांनीं पैगंबर साहेबांची साथ दिली. आणि कअब व हिलाल व मुरारा यांजवरही कृपा झाली कीं त्यांनीं गुन्हा पदरीं घेतला व परमेश्वरानें त्यांना पश्चात्तापाची सुबुद्धि दिली व तो पश्चात्ताप मान्य झाला.

यासाठीं कीं या (धर्मयोध्यां)स परमेश्वराचे मार्गांत तहान व कष्ट व भूक यांची तोशीस लागते तर, व ज्या मुकामास त्यांचें पायाखालीं तुडवीत जाणें नास्तिकांस क्षुब्ध करितें त्यास ते पायाखालीं तुडवीत जातात तर आणि शत्रुपासून (कधीं) कांहीं प्राप्ति होते राहते तर (सारांश सुखदुःख या दोन्ही स्थितींत) प्रत्येक कामाच्या मोबदला (परमेश्वरासमीप) त्यांचें सुकृत्य लिहिलें जातें. निःसंशय परमेश्वर (इस्लामाची सेवा) प्रांजलपणें करणाऱ्यांचा मोबदला वायां जाऊं देत नसतो. १२०. आणि (अशाच तऱ्हेनें) थोडा वा बहुत जो कांहीं (परमेश्वराचे मार्गांत) ते खर्च करतात व जीं मैदानें त्यांना आक्रमावीं लागतात, तीं सर्व (त्यांच्या कर्म-पटांत) त्यांच्या नांवें लिहिलीं जातात; अशासाठीं कीं परमेश्वरानें त्यांना त्यांनीं केलेल्या कर्मांचा उत्तमांत उत्तम मोबदला द्यावा. १२१. आणि (हेंहि) योग्य नाहीं कीं मुसलमानांनीं सारेचे सारेच (लढाईसाठीं आपापल्या घरांतून) निघून उभें राहावें. तर त्यांनीं असें कां ह्मणून केलें नाहीं कीं त्यांच्या प्रत्येक मंडळींतून कांहीं लोक (आपल्या घरांतून) निघाले असते कीं त्यांनीं धर्माचें ज्ञान उपलब्ध करून घ्यावें; व जेव्हां ते (शिकून समजून) आपल्या लोकांकडे परत येते तेव्हां त्यांना (ईश्वराचे अवज्ञेपासून) भिववितें कीं ते लोकहि कदाचित् (वाईट कामाविषयीं) जपते. १२२. अहो मुसलमानांनों! तुह्मीं आपल्या आसपासचे नास्तिकांशीं लढा; आणि त्यांना तुमच्यांत उग्रता (व शौर्य) आढळून आलें पाहिजे; (आणि कोणावरहि अत्याचार करूं नका) व जाणून असा कीं जे लोक (अत्याचाराविषयीं) जपतात त्यांचा परमेश्वर साथी होय. १२३. आणि ज्या वेळीं कोणी एखादा अध्याय प्रकटिला जातो त्या वेळीं दांभिकांतून कित्येक लोक (एकमेकांस) पुसूं लागतात कीं बरें, या

---

(१) ह्मणजे तुमचे आप्त किंवा शेजारी; कारण तुमची कींव व कळकळ यांचे प्रथम हक्कदार हेच होत व प्रथम त्यांनाच सद्धर्माकडे आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. असें ह्मणतात कीं या वाक्यांत खास निर्दिष्ट लोक ह्मटले ह्मणजे कुरैझा व नझीर कुलांचे यहुदी लोक व खैबरचे यहुदी लोक अथवा सूर्या प्रांताचे रोमन लोक हे होत.

(अध्याया)नें तुमच्यांतून कोणाचा विश्वास वाढविला? पण जे (पहिल्यापासूनच) विश्वास ठेवितात त्यांचा तर या (अध्याया)नें विश्वास वाढविला व ते (आपल्या ठिकाणीं) आनंद प्रदर्शित करतात. १२४. आणि ज्या लोकांच्या मनांत (दांभिकपणाचा) रोग आहे, तर या (अध्याया)नें त्यांच्या (पूर्वींचे) मलिनतेंत आणखी एका मलिनतेची भर टाकली व हे लोक नास्तिकपणाच्या स्थितींतच मरून गेले. १२५. आणि कां (हे लोक इतकेंहि) अवलोकन करीत नाहींत कीं प्रतिवर्षीं एकदां किंवा दोनदां ते संकटांत तावून सुलाखून पाहिले जातात; यावरहि ते पश्चात्ताप करीत नाहींत व त्यांना अद्दलहि घडत नाहीं. १२६. आणि जेव्हां कोणी अध्याय प्रकटिला जातो, तेव्हां त्यांच्यांतून एकाकडे एक पाहूं लागतो. मग कोठें तुह्मांला कोणी पाहत तर नाहीं? (असें ह्मणून, उठून) ते चालते होतात. (हे लोक पैगंबराच्या बैठकींतून काय फिरले? तर) परमेश्वरानें त्यांच्या अंतःकरणांस (सद्धर्मांकडून) फिरवून टाकिलें; यासाठीं कीं हे असे लोक होत कीं यांना मुळींच समज नाहीं. १२७. (लोकांनों!) तुह्मांपाशीं तुमच्यांतूनच एक पैगंबर आला आहे; तुह्मीं जें दुःख कंठितां त्याबद्दल त्याला जड वाटतें (व) त्याला तुम(च्या कल्याणा)चा लाहो (व कळकळ) होय; (आणि तो) मुसलमानांप्रति अतिशय करुणामय (व) दयाळू होय. १२८. यावरहि जर हे लोक फिरून पडतील, तर (हे पैगंबरा! तूं यांना साफ) सांगून टाक कीं मला परमेश्वर पुरा आहे; त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य नाहीं. मी त्याच्यावरच भरंवसा ठेवितो आणि अर्श जो (सृष्टींत सर्वांत) मोठा होय त्याचाहि तोच मालक होय. १२९.

# अध्याय १० वा.

# सूरतो-यूनुस्.

ह्या अध्याय मक्काशहरीं प्रकट झाला. ह्यांत १०९ महावाक्यें आहेत. सांप्रत ज्या स्थळीं मोसल शहर आहे तेथेंच अगर त्याच्या आस्मंतात् निनिवा वा नैनवा नांवाची एक वस्ति होती. तेथील लोक मूर्तिपूजा करीत करीत अधर्मी होऊन खऱ्या ईश्वरी मार्गापासून फार दूर जाऊन पडले होते; तेव्हां त्यांना बोध करण्यासाठीं व त्यांचे आचार विचार सुधारण्यासाठीं, परमेश्वरानें हजरत यूनुस बिन मत्ती किंवा मत्तय यांस पैगंबर करून पाठविलें. परंतु त्यांनीं त्यांचें मुळींच कांहीं ऐकिलें नाहीं. उलट ते त्यांचा फार छळ करूं लागले; म्हणून यूनुस पैगंबरांना ती वस्ती सोडून जाणें भाग पडलें. हजरत यूनुस यांनीं चालतांना त्या लोकांस बजावून सांगितलें कीं तुमचा चाळीस दिवसांत नाश होईल. त्यांच्या सूचने बरहुकूम नियमित वेळीं भयानक चिन्हें दिसूं लागलीं. आकाश काळ्या काळ्या ढगांनीं भरून आलें; त्यांतून भराभर आगीची वृष्टी होऊं लागली व चोहोंकडे धूरच धूर दिसूं लागला. शिवाय ह्या सर्व दुश्चिन्हांचा रोखहि त्यांच्याच शहराकडे होता. तेव्हां त्या लोकांची पांचावर धारण बसून ते मुलेंबाळें व गुरांढोरांसह गांवांतून शेतांत निघून चालते झाले; व तेथें गोणताट पांघरून व नग्न होऊन, आपल्या हातून झालेल्या पापांबद्दल मनापासून अनुताप पावून परमेश्वरापुढें शिरसाष्टांग नमस्कार घालून क्षमेची याचना करूं लागले. त्यावेळीं दयार्द्र होऊन परमेश्वरानें त्यांना क्षमा केली; व त्यांच्यावर आलेलें अरिष्ट टळून गेलें. ह्याप्रमाणें ह्यांत हजरत यूनुस पैगंबराचें वर्णन आलें आहे; ह्मणून यास यूनुसचें प्रकरण असें नांव झालें. (पहा तफसीरे बैज़ावी.)

परम दयाळू आणि कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

अ. ल. र. (अलेफ-लाम-रा.) हीं अशा पुस्तकाचीं महा-वाक्यें आहेत कीं ज्यांत शहाणपणाच्या गोष्टी होत. १. कां लोकांस या गोष्टीचें आश्चर्य झालें कीं आह्मीं त्यांच्या मधूनच एका पुरुषाकडे असा आदेश पाठविला कीं तूं लोकांना (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखीव; आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला आहे त्यांना हें शुभवर्तमान ऐकीव कीं त्यांच्या पालनकर्त्यासमीप त्यांचा खरा बडेजाव होईल. नास्तिक (तर इतके आश्चर्यचकित झाले कीं ते) ह्मणूं लागले, असो नसो हा (मनुष्य) तर बोलूनचालून जादुगीर आहे! २. (लोकांनों!) तुमचा पालनकर्ता तोच परमेश्वर होय कीं ज्यानें सहा दिवसांत आकाशांस व पृथ्वीस निर्माण केलें. नंतर दिव्य सिंहासनावर तो विराजमान झाला, (कीं तो तेथूनच) प्रत्येक कामाची व्यवस्था लावीत राहतो. (त्याच्या दरबारांत) कोणीहि (कोणाचाच) शिफारसी (होऊं शकत) नाहीं; पण त्याची परवानगी झाल्यावरच मात्र. (लोकांनों!) हाच परमेश्वर तर तुमचा पालनकर्ता होय. तर तुह्मीं त्याचीच भक्ति करा. तर कां तुह्मीं (याचा) विचार करीत नाहीं? ३. त्याच्याचकडे तुह्मांसर्वांस परतून जाणें आहे. परमेश्वराचा (हा) वायदा खरा होय. तोच प्रथम सृष्टीस पैदा करितो; व मग (लय पावल्यावरहि तोच) तिला (पुनरुत्थानांत) पुन्हां (जिवंत) करील; अशासाठीं कीं ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि

(१) दिव्यसिंहासन हा 'अर्ष' या अरबी शब्दाचा अर्थ केला गेला आहे. तें परमेश्वरानें इतकें मोठें सजिलें आहे कीं यच्चयावत् सर्व सृष्टीस तें व्यापून आहे व त्यांवर सर्वव्यापी परमेश्वर आपली सत्ता व प्राबल्यानें विराजमान असतो, म्हणजे कोणतीहि वस्तु त्याच्या सत्तेच्या व अटोक्याच्या बाहेर नसते. यावरून सहजच असें ठरतें कीं परमेश्वर सर्वत्र आहे; व त्याचें कोणी खास मर्यादित स्थल आहे असें ह्मणणें दोषास्पद होय.

केलीं त्यांना (त्यांच्या कर्मांचा) मोबदला यथान्याय द्यावा. आणि जे लोक नास्तिक होत त्यांच्यासाठीं ते जो नास्तिकपणा करीत राहिले त्याच्या शासनार्थ त्यांना प्यावयास उकळी आलेलें पाणी (प्राप्त) होईल; आणि दुःखकारक शिक्षा, (ती वेगळीच). ४. तोच (असा परम समर्थ) होय कीं ज्यानें सूर्याला प्रकाशित बनविलें व चंद्राला तेजस्वी बनवून त्याच्या कला[1] नियमित केल्या; अशासाठीं कीं तुह्मां लोकांस वर्षाची गणती व हिशेब जाणता यावा. हें (सर्व कांहीं) परमेश्वरानें केवळ सत्य संकल्पानेंच बनविलें आहे. जे लोक समजतात त्यांच्यासाठीं परमेश्वर (आपल्या सामर्थ्याच्या) निशाण्या सविस्तर वर्णितो. ५. जे लोक (परमेश्वराचें) भय बाळगितात त्यांच्यासाठीं रात्रीच्या व दिवसाच्या अनुक्रमांत[2] आणि जें कांहीं परमेश्वरानें आकाशांत व पृथ्वींत निर्माण केलें आहे त्यांत (ईश्वरी सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या (उपलब्ध) आहेत. ६. ज्या लोकांस (मरणानंतर) आह्मांशीं भेटण्याची भीतिच नाहीं व ते इहलौकिक आयुष्यांतच खुष आहेत व (पुढचा धोका न बाळगितां) ह्या आयुष्यांतच समाधान मानतात; आणि जे लोक आमच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांकडून गाफिल आहेत; ७. हेच लोक होत कीं ते जीं कर्में करीत होते त्याच्या मोबदला त्यांचें (शेवटचें) ठिकाण नरकाग्नि होईल. ८. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्या विश्वासाचे प्रभावानें त्यांना त्यांचा पालनकर्ता (तारणाचा) मार्ग दाखवून देईल; कीं (ते मेल्या पश्चात) परम सुखाच्या बागांत (राहतील व) त्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील. ९. त्या (बागां)त (प्रवेश होतांच) त्यांचा जयघोष[3] 'सुबूहानकल्ला हुम्मा'

(१) चंद्र आपल्या दैनंदिन क्रमांत जो प्रदेश आक्रमितो त्यास मन्जिल ह्मणजे कला असें म्हणतात. ही विद्या ज्योतिष संबंधीं होय.

(२) अनुक्रमांत, रात्रंदिवसाचें एकामागून एक येणें व हिंवाळ्या व उन्हाळ्यांत त्यांचें कमी जास्त होणें या दोन्हीं गोष्टी आल्या.

(३) या वाक्यांत या गोष्टीचें विवेचन आहे कीं स्वर्गवाशी जेव्हां स्वर्गांत दाखल होतील तेव्हां स्वर्गाच्या खुब्या पाहून आपोआप 'सुब्-

(म्हणजे हे परमेश्वरा! तूं पवित्र आहेस;) व त्या (बागां)त त्यांचे (परस्पर) कुशलप्रश्न 'सलाम' (म्हणजे शांति!) असे होतील. आणि (जेव्हां ते स्वर्गांत सुखानें बसून जातील तेव्हां) त्यांची शेवटची प्रार्थना 'अल्हम्दो लिल्लाहे रब्बिल् आलमीन' (म्हणजे सर्व स्तुति सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच योग्य होय) ही होईल. १०. आणि ज्याप्रमाणें लोक फायद्या-साठीं घाई मचवीत राहतात, जर (त्याचप्रमाणें) परमेश्वरहि (त्यांच्या कुकर्मांच्या शासनार्थ) त्यांना नुकसान पोहोंचविण्याची घाई मचवीत राहता तर त्यांचा अंतकाळ (केव्हांचाच) येऊन चुकला असता. आणि ज्या लोकांस (मरणानंतर) आमच्याशीं नजरानजर होण्याची (किंचित्हि) भीति नाहीं, त्यांना आह्मीं सोडून देतों कीं ते आपल्या शिरजोरींतच भटकत फिरतात. ११. आणि जेव्हां मनुष्याला (कोणाहि प्रकारचें) दुःख पोहोंचतें, तेव्हां तो आपल्या कुशीवर (पडतां) वा बसतां वा उठतां, (कोणाहि स्थितींत असो) आमचा धांवा करीत जातो. मग जेव्हां आह्मीं त्याचें दुःख त्याच्या-पासून दूर करून टाकितों, तेव्हां तो असा (बेपर्वा होऊन) चालता होतो; जणों कीं त्याला जें दुःख पोहोंचत होतें त्याच्या निवारणार्थ त्यानें आम्हांला (कधीं) बोलाविलेंच नव्हतें. जे लोक (भक्ति-)मर्या-देचे बाहेर पाऊल टाकतात त्यांना, जीं जीं कर्में ते करितात तीं

---

हान कल्लाहुम्मा' असा जयघोष करूं लागतील. हे शब्द कोणा चांगल्या वस्तुची तारीफ वा आनंद प्रदर्शित करतेवेळीं उच्चारिले जातात. मग त्यांचे आपसांत कुशल प्रश्न होतील ह्मणजे एकमेकांस शांति इच्छितील. हें दिलसफाई व परस्पर प्रेम यांचें द्योतक होय. नंतर जेव्हां आपापल्या ठिकाणीं बसून जातील तेव्हां परमेश्वराची उपकारस्तुति करतील व ह्मणतील 'अल्हम्दो लिल्लाहे रब्बिल् आलमीन.' आणि हेंहि संभवनीय आहे कीं प्रत्येक स्वर्गीय देणगीबद्दल 'सुब्हानल्ला' ह्मणतील व तिचा सुखोपभोग घेतल्या-नंतर उपकार स्तुत्यर्थ 'अल्हम्दो लिल्ला हे रब्बिल् आलमीन' म्हणतील.

(१) भावार्थ हा कीं आह्मीं त्याचा केव्हांच नाश करून टाकिला असता.

अशाच रीतीनें भलीं करून दाखविलीं गेलीं आहेत. १२. आणि (लोकांनों!) तुमच्या पूर्वी कित्येक पिढ्या होऊन गेल्या आहेत कीं जेव्हा जेव्हां त्यांनीं अनर्थ रचिला तेव्हां तेव्हां आह्मीं त्यांचा नाश करून टाकिला. आणि त्यांचे पैगंबर त्यांच्यापाशीं उघड उघड चमत्कारहि घेऊन आले व (यावरहि) त्यांनीं विश्वास धरिला नाहीं तो नाहींच. अपराधी लोकांस आह्मीं अशाच तऱ्हेनें शासन देत असतों. १३. नंतर त्यांच्या (नष्ट झाल्या) मागून आम्हीं पृथ्वींत तुह्मां लोकांस (त्यांचे) प्रतिनिधी बनविलें; अशासाठीं कीं आह्मीं पाहावें कीं तुह्मीं कसकशीं कर्मे करितां? १४. आणि (हे पैगंबरा!)जेव्हां आमचे उघड उघड हुकूम या लोकांस वाचून ऐकविले जातात, तेव्हां ज्या लोकांस (मरणानंतर) आमच्याशीं नजरानजर होण्याची (किंचित्हि) भीति नाहीं ते (तुला) हुकूम फर्मावितात कीं ह्याच्याशिवाय (आणखी) एखादें कुराण आण अगर ह्यांतच फेरबदल करून टाक; तर (तूं त्यांना) सांग कीं माझा तर इतका मगदूर नाहीं कीं मीं आपल्या तर्फे ह्यांत (कोणाहि प्रकारचा) फेरबदल करीन. मजला जें कांहीं प्रकट केलें जातें, मी तर त्यावरच चालतों. जर मी आपल्या पालनकर्त्याची बेहुकमी करीन, तर मला (पुनरुत्थानाचे) मोठ्या (मुष्किलीचे) दिवसाच्या शिक्षेची (फारच) भीति वाटते. १५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर परमेश्वर इच्छिता तर मी हें (कुराण) तुह्मांस वाचून ऐकविलेंच नसतें व परमेश्वरहि त्याविषयीं तुह्मांस न जाणविता. याच्यापूर्वी मी वर्षोंगणती तुह्मांमध्यें राहून चुकलों आहे (आणि मी कधींच प्रकटीकरणाचा उच्चारहि केला नाहीं;) कां तुह्मीं (इतकेंहि) समजत नाहीं? १६. तर अशाहूनहि अधिक जुलमी आणखी कोण कीं जो परमेश्वरावर खोटें (खोटें) कुभांड रचील अगर त्याच्या निशाण्यांस पाखंड ह्मणील? कांहींच शंका नाहीं कीं

(१) म्हणजे त्यांचीं कर्मे वस्तुस्थितींत वाईट आहेत. पण परमेश्वरानें त्यांची अशी मति मारून टाकिली आहे कीं तीं कृत्यें त्यांच्या नजरेंत सुशोभित व भलीं दिसून येतात व ते समजतात कीं आह्मीं बरें करितों.

(असले) अपराधी (आपल्या मनोरथांत) सफल होणार नाहींत. १७. आणि (मूर्तिपूजक लोक) परमेश्वराशिवाय अशा वस्तूंची भक्तिपूजा करितात कीं ज्या त्यांना नुकसान पोहोचवूं शकत नाहींत व त्यांना फायदाहि पोहोचवूं शकत नाहींत; आणि ते म्हणतात कीं (आमचे) हे (उपास्य देव) परमेश्वरासमीप आमचे शिफारस कर्ते होत. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग, कां तुम्हीं परमेश्वराला अशा वस्तू(च्या अस्तित्वा)ची खबर देतां कीं जिला तो ना (तर कोठें) आकाशांतच पावतो व ना (कोठें) पृथ्वींतच. हे लोक ज्याला (त्याचा) शराकतदार ठरवितात त्यापासून तो पवित्र व थोर होय. १८. आणि (सुरुवातींत) लोक (धर्माचे) एकाच पंथावर होते, मदभेद तर त्यांच्यांत मागून (उत्पन्न) झाला. आणि (हे पैगंबरा!) जर तुझ्या पालनकर्त्यांकडून (पुनरुत्थानाचें) वचन पहिल्यानेंच न निघून चुकलें असतें, तर ज्या गोष्टींत हे लोक मतभेद करीत आहेत त्यांचा त्यांच्या दरम्यान(केव्हांचाच) फैसला करून दिला गेला असता. १९. आणि ते म्हणतात कीं ह्या (पैगंबर 'मोहंमद')ला त्याच्या पालनकर्त्यांकडून कोणी चमत्कार (जसा आम्हीं इच्छितों तसा) कां म्हणून नाहीं दिला गेला? तर (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं गैबी बातमी तर केवळ परमेश्वरालाच

(१) चमत्कारावरोबर–'जसा आम्हीं इच्छितो तसा'–हीं कैद आम्हीं यासाठीं लाविली आहे कीं कुराण हा ग्रंथ स्वतःच एक महान चमत्कार होय. सारांश, कुराणांतच एके स्थलीं असें म्हटलेलें आहे कीं "आणि (कित्येक लोक तुझ्यासंबंधीं) म्हणतात कीं या(मनुष्या)वर त्याच्या पालनकर्त्यांकडून चमत्कार कां उतरले नाहींत? (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं चमत्कार तर परमेश्वरापाशीं (म्हणजे त्याच्याच अखत्यारांत) आहेत. आणि मी तर स्पष्टपणें भय सांगणारा आहें इतकेंच. (हे पैगंबरा!) कां या लोकांसाठीं (हा चमत्कार) पुरेसा नाहीं कीं आम्हीं तुजला कुराण प्रकट केलें कीं तें त्यांना वाचून ऐकविलें जातें. जे लोक विश्वास पाळणारे होत त्यांच्यासाठीं तर ह्यांत (परमेश्वराची मोठी) मेहरबानी व (मेहरबानी खेरीज) बोध होय." (भाग २१ वा अध्याय २९:५०–५१).

होय; तर तुह्मींहि (परमेश्वराचे हुकमाची) वाट पाहा. मींहि तुह्मांबरोबर वाट पाहणाऱ्यांपैकींच आहें. २०. आणि लोकांस दुःख पोहोंचल्यानंतर जेव्हां आम्हीं (त्यांचें दुःख निवारण करून आपल्या) दयेची गोडी त्यांना चाखवून देतों, तेव्हां मात्र ते आमच्या निशाण्यां(च्या विरोधां)त आपले डावपेंच लढवितात. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (तुमच्या डावपेंचापेक्षां) परमेश्वराचे डाव पेंच अधिक चपळ आहेत. (तो ह्मणतो कीं) तुह्मीं जे जे डावपेंच लढवितां ते (सर्व) आमचे दूत लिहीत जातात. २१. तोच (परमेश्वर तर) होय कीं जो तुह्मां लोकांस खुष्कींत व समुद्रांत हिंडूं फिरूं देतो; येथपर्यंत कीं (कित्येक वेळां) जेव्हां तुह्मीं गलबतांत असतां, व तीं लोकांस अनुकूळ वाऱ्याचे प्रभावानें वाहून नेतात आणि लोक त्यां(च्या वाहण्या)नें खुष होतात; (एकाएकीं) गलबतांस वादळाचा झोका येऊन लागतो व लाटा दरेक बाजूनें त्यांच्यावर चालल्या येतात आणि ते (पक्कें) समजतात कीं (वाईट) घेरले गेलों; तेव्हां परमेश्वरालाच केवळ शुद्धभावानें मानून त्याच्यापाशीं प्रार्थना करूं लागतात; कीं (हे जगदीश्वरा!) जर (आपल्या कृपेनें) तूं आह्मांस ह्या (संकटां)तून तारशील तर आह्मीं अवश्य (तुझे मोठे) उपकार मानणारे होऊं. २२. मग जेव्हां तो त्यांना (त्या संकटांतून) तारून घेतो, तेव्हां खुष्कींत (येतांच) ते एकदम विनाकारण दांडगाई करूं लागतात. लोकांनों! तुमची शिरजोरी (म्हणजे तिचा दुष्परिणाम) तुमच्याच जिवावर (पडेल. हेहि) या जगिक (क्षणभंगुर) आयुष्याचे सुखोपभोग (होत; तर असो, हीहि चैन करून घ्या). अखेर तुह्मांस आम्हांकडेच परतून येणें आहे. तर (त्या वेळीं) जें कांहींहि तुह्मीं (जगांत) करीत राहिलां, आह्मीं तुह्मांस (त्याचें बरें वाईट) विदित करूं. २३. या जगिक आयुष्याची उपमा तर केवळ पाण्याच्या सारखीच होय, कीं आम्हीं तें आकाशांतून वर्षविलें मग जमिनीचीं पिकें कीं ज्यांस माणसें व चतुष्पाद जनावरें भक्ष करतात तीं त्या(पाण्या)शीं मिळून गेलीं (अशीं कीं पाणी शोषून प्रफुल्लित झालीं); येथपर्यंत कीं (फसल हंगाम होऊन) जेव्हां जमिनीनें

आपला शृंगार धारण केला व ती सुशोभित झाली; आणि शेतकरी समजले कीं (आतां) आपण त्यावर सत्तावान झालों. (पाहिजे तेव्हां कापून घेऊं. इतक्यांत) रात्रीं वा दिवसां आमचा (शिक्षारूपी) हुकूम त्यावर येऊन सादर झाला. मग आह्मीं त्यांची अशी (समूळ) कापणी करून टाकिली, जणूं कीं काल (शेतांत पीकच) नव्हतें. जे लोक (गोष्टींचें) मनन करतात त्यांच्या (सन्मार्ग) दर्श-णार्थ आम्हीं (आपल्या सामर्थ्याचीं) प्रमाणें अशाच प्रकारें सविस्तर करून सांगतों. २४. आणि परमेश्वर लोकांस शांतिधामा (ह्मणजे स्वर्गा)कडे बोलावितो व ज्याला इच्छितो त्याला सरळ मार्गाची सुबुद्धि देतो. २५. ज्या लोकांनीं (इह लोकीं) भलाई केली त्यांच्या करितां (पर लोकींहि तशीच) भलाई होय व कांहीं विशेषहि; आणि (पाप्यांप्रमाणें) त्यांच्या तोंडांवर कालिमाहि पसरलेला नसेल व ना नामोशीच. हेच लोक स्वर्गवासी होत कीं ते स्वर्गांत सदासर्वदा राहतील. २६. आणि ज्या लोकांनीं वाईट कामें केलीं, तर वाईटाचा मोबदला तसलाच (वाईट) व (ह्याशिवाय) त्यांच्या (तोंडां)वर नामोशी आच्छादिलेली असेल. परमेश्वरा(चे मारा)पासून कोणीहि त्यांचा वांचविणारा नाहीं, (त्यांचीं तोंडें अशीं काळीं कुट्ट होतील कीं) जणूं काळोख्या रात्री(च्या चादरे)च्या तुकड्यांनीं त्यांचीं तोंडें आच्छादिलीं गेलीं आहेत. हेच लोक नरकवासी होत कीं ते सर्वकाळ नरकाग्नींत राहतील. २७. आणि त्या (पुनरुत्थानाचे) दिवशीं आह्मीं या सर्वांस (आपल्या हुजुरांत) गोळा करूं, नंतर ज्या लोकांनीं (मूर्तींस आमचे) सरकतदार ठरविले होते त्यांस आह्मीं आज्ञा करूं कीं तुह्मीं व तुमचे (ठराविक) सरकतदार (उभयतां जरा) आपल्या जागीं थांबून राहा; मग आह्मीं त्यांच्या आपसांत फूट घालून टाकूं. आणि त्यांचे सरकतदार

(१) ह्मणजे त्यांच्या मूर्तींस वाचा फुटून त्या, मूर्तीपूजकांस ह्मणूं लागतील कीं वस्तुतः तुह्मीं आपल्या दुष्ट वासनांची पूजा करीत होतां व मूर्तीपूजेकडे तुह्मांस आह्मीं नव्हे पण तुमच्या धर्मभोळेपणाच्या कल्प-नांनीं मात्र वळविलें. ह्या प्रमाणें त्यांना आशा होती तशी त्यांची

(त्यांना) म्हणतील कीं (तुह्मीं लबाड आहां,) आमची भक्तिपूजा तर तुह्मीं कांहीं करीत (सवरीत)च नव्हता. २८. तर (आतां) आमच्या व तुमच्या दरम्यान केवळ परमेश्वरच साक्षी बस्स होय. आह्मीं तर तुमच्या भक्तिपूजेकडून बिलकुलच बेफाम होतों. २९. (सारांश) तेथें प्रत्येक मनुष्य, (पुढची सामुग्री म्हणून) त्यानें जीं कृत्यें पहिल्यानें पाठविलीं आहेत तीं अनुभवून घेईल. आणि सर्व लोक आपला खरा मालक जो परमेश्वर त्याच्याकडे परत आणिले जातील. आणि जीं जीं कुभांडें ते (जागांत) रचीत राहिले तीं सर्व त्यांच्यापासून नाहींशीं होऊन जातील. ३०. (हे पैगंबरा! या लोकांस इतकें तर) पूस कीं तुह्मांस आकाशांतून व पृथ्वींतून कोण रोजी पुरवितो? अगर (वस्तुतः तुमचे) कान व (तुमचे) डोळे यांजवर कोणाची सत्ता आहे? आणि कोण (असा आहे कीं जो) जिवंतांस मेलेल्यांतून काढतो आणि मेलेल्यांस जिवंतांतून काढतो? आणि (सृष्टींत) प्रत्येक कामाची व्यवस्था कोण लावितो? तर ते (तेव्हांच) बोलूं लागतील कीं परमेश्वर. तर मग तूं (त्यांना) सांग, कीं तुह्मीं या उपरांतहि त्याला भीत नाहीं? ३१. तथापि हाच परमेश्वर तर तुमचा खरा पालनकर्ता होय. तर सत्य (गोष्टीचें ज्ञान झाल्या)नंतर (त्याला न मानणें) ही चूक नव्हे तर आणखी काय आहे? तर तुह्मीं लोक कोणीकडे पालटले चालले जात आहां? ३२. (हे पैगंबरा!) ह्याप्रमाणें तुझ्या पालनकर्त्याचें वचन (या) आज्ञाभंजक

---

शिफारस करण्याचे ऐवजीं त्या त्यांच्यावरच ठपका ठेवतील. असेंहि ह्मणतात कीं मूर्तीपूजक अरब लोक बुतांची किंवा त्यांच्या कल्पित प्रतिमांची पूजाअर्चा करीत होते त्यांच्याकडे खास करून या जागीं इषारा आहे.

(१) जिवंतास मेलेल्यांतून काढण्याचें उदाहरण जसें कवटांतून सजीव पक्षाचें निघणें आणि मेलेल्यास जिवंतांतून काढणें ह्मणजे सजीव पक्षांतून कवट पैदा करणें.

(२) भावार्थ हा कीं परमेश्वर एक आहे असें ह्मणण्याचें व विश्वासण्याचें नाकारण्यास कोणतेंहि सयुक्तिक कारणच नाहीं. पण या उपरांतहि जे विश्वास धरीत नाहींत हें त्यांचें नशीब.)

लोकांसंबंधीं खरें होऊन चुकलें कीं हे कोणाहि तऱ्हेनें विश्वास धरणार नाहींत. ३३. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं तुमच्या (ठराविक) सरकतदारांत कोणी असाहि आहे कीं जो सृष्टीला प्रथम पैदा करील व मग तिला (लयास आणून) पुनरपि निर्माण करील? (हे तर त्याचा काय जबाब देतील? तूंच त्यांना) सांग कीं परमेश्वरच सृष्टीस प्रथम पैदा करितो, व मग (तोच) तिला (लयास आणून) पुन्हांहि निर्माण करील. तर आतां तुह्मीं कोठें उलटे चाललें जात आहां? ३४. (हे पैगंबरा! यांना) विचार कीं तुमच्या (ठराविक) सरकतदारांमध्यें कोणी असाहि आहे कीं जो (धर्माचा) सत्य मार्ग दाखवूं शकेल? (तूंच त्यांना) सांग कीं तो परमेश्वरच (धर्माचा) सत्य मार्ग दाखवितो. तर कां जो (धर्माचा) सत्य मार्ग दाखवितो तो या गोष्टीचा जास्त हक्क ठेवितो कीं त्या(च्या हुकमा)चें अनुकरण केलें जावें, कां जो असा (लाचार) होय कीं जोंपर्यंत दुसरा कोणी त्याला मार्ग न दाखवील तोंपर्यंत खुद्द त्यालाहि मार्ग सांपडूं शकत नाहीं तो? तर तुह्मां लोकांस काय होऊन गेलें आहे? तुह्मीं कसे फैसले करितां? ३५. आणि या लोकांतले बहुतेक तर केवळ अनुमानावरच चालतात. पण अनुमान सत्यापुढें कांहीं कामा येत नाहीं. जीं जीं (आज्ञानमूलक) कृत्यें हे लोक करितात त्यांशीं परमेश्वर खूप वाकब होय. ३६. आणि हें कुराण अशा प्रकारचें (पुस्तक) नव्हे कीं परमेश्वराखेरीज कोणी तें आपल्याकडून रचून आणील; किंबहुना जीं (पुस्तकें) याच्या (प्रकटीकरणा) पूर्वीं (उपलब्ध) होत, (हें कुराण) सकल जगांच्या पालनकर्त्याकडून त्यांच्या सत्यतेची साक्ष होय व (त्याच) पुस्तकां(च्या हुकमां)चा तपशील होय. आणि याच्या (दिव्य ईश्वरी पुस्तक होण्यां)त कांहींच शंका नाहीं. ३७. कां (हे लोक कुराणासंबंधीं असें) ह्मणतात कीं हें खुद्द पैगंबरानें रचिलें आहे? तर (हे पैगंबरा) तूं यांना) सांग कीं जर तुह्मीं (आपल्या दाव्यांत) खरे आहां (आणि जसें तुह्मीं ह्मणतां कीं मी तें बनविण्यास समर्थ आहें) तर (तुह्मींहि भाषाभिज्ञ व रसज्ञ आहां) असाच एक अध्याय तुह्मींहि

रचून आणा; आणि परमेश्वराशिवाय ज्याला (ज्याला) तुमच्यानें (बोलाविणें) शक्य आहे त्याला (आपल्या कुमकेस) बोलावून घ्या. ३८. पण (हे लोक विपर्यांतर करून) ज्या गोष्टींच्या ज्ञानाप्रत त्यांची पोहोंच झाली नाहीं आणि अजून त्यांचा खरा अर्थ त्यांच्या प्रत्ययास आला नाहीं, त्या गोष्टींस पाखंड म्हणूं लागले. अशाच तऱ्हेनें जे लोक यांच्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांनींहि मिथ्यारोप केला. तर (हे पैगंबरा!) पाहा! (त्या) जालिम लोकांचा कसा (वाईट) परिणाम झाला! ३९. आणि त्यांच्यांत कित्येक लोक असे होत कीं जे कुराणावर (पुढें जातां,) विश्वास ठेवितील आणि कित्येक असे होत कीं जे (पुढेंहि) त्यावर विश्वास ठेवणार नाहींत. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता फिसादखोरांस खूप जाणून आहे. ४०. आणि (हे पैगंबरा!) जर (इतकें समजाविल्यावरहि हे लोक) तुला पाखंडीच म्हणत जातील, तर (त्यांना) सांगून दे कीं माझें कर्म मला व तुमचें कर्म तुह्मांला; मी जें कर्म करितों त्यापासून तुह्मीं अलिप्त आहां आणि तुह्मीं जें कर्म करितां त्यापासून मी अलिप्त आहें. ४१. आणि (हे पैगंबरा!) त्यांच्यांत कांहीं लोक (असेहि) होत कीं जे तुझ्या (गोष्टी)कडे कान लावून ऐकतात. तर (कां ह्यानें तूं समजलास कीं हे लोक विश्वास धरतील; आणि) कां तूं (या) बहिऱ्यांस ऐकवूं शकशील? आणि जरी ते अक्कल ठेवीतहि नसतील तरीहि? ४२. आणि त्यांच्यांत कांहीं लोक (असेहि) होत कीं जे

(१) भावार्थ हा कीं ज्या गोष्टी त्यांच्या समजशक्ति पलिकडे होत्या, उदाहरणार्थ मरणानंतरची स्थिति अथवा सृष्ट्योत्पत्तीच्या आरंभाचा अहवाल, ह्यांची कैफियत जेव्हां त्यांना समजली नाहीं, तेव्हां आपली समज कमी हें कबूल करण्याच्या ऐवजीं ते या गोष्टींस पाखंड ह्मणूं लागले. 'आणि अजून त्यांचा खरा अर्थ त्यांच्या प्रत्ययास आला नाहीं' याचा अर्थ हा कीं उदाहरणार्थ, मरणानंतरचा अहवाल कीं मेल्यावर त्याची हकीकत प्रगट होईल; अगर उदाहरणार्थ, शासनाचीं कित्येक वचनें कीं जीं जगांतच आपल्या वेळीं पुरीं होतील आणि जीं अजून घडून आलीं नाहींत तीं. परंतु केवळ एवढ्याच गोष्टीनें ह्यांस पाखंड ह्मणण्याचा कोणास कोणताहि हक नाहीं.

तुजकडे टकत बसतात. तर कां (यांच्या टकत बसण्यानें तूं समजलास कीं हे विश्वास धरतील; आणि कां) तूं (या) आंधळ्यांस मार्ग दाखवून देशील? आणि जरी त्यांना (कांहींच) सुचत नसलें तरीहि? ४३. परमेश्वर तर लोकांवर किंचितहि जुलूम करीत नसतो; परंतु लोक (ईश्वराची अवज्ञा करून) आपणच आपल्यावर जुलूम करून घेतात. ४४. आणि ज्या दिवशीं (परमेश्वर) लोकांस (आपल्या हुजूर) गोळा करील, (त्या दिवशीं त्यांना असें भासूं लागेल) जणूं कीं ते (जगांत सारा दिवसहि नाहींत,) दिवसांतून (फार) राहिले असतील (तर) मात्र घटकाभरच; (आणि ते) आपसांत एकमेकांस ओळखतीलहि. ज्या लोकांनीं परमेश्वराचे नजरानजर होण्यास पाखंड ह्मटलें, ते मोठ्याच तोट्यांत येऊन गेले; आणि त्यांना (या तोट्यांतून बचावाचा) मार्गहि सुचला नाहीं. ४५. आणि (हे पैगंबरा!) जसजसे (शिक्षेचे) वायदे आह्मीं या लोकांशीं करितों, पाहिजे तर आह्मीं तुला त्यांतून कित्येक (वायदे प्रत्ययास आणून) दाखवूं अगर (ते प्रत्ययास येण्या-पूर्वींच) तुला (जगांतून) उचलून घेऊं; (कांहीं झालें तरी) त्यांना तर आह्मांकडे परतून येणें आहे. या उपरांत जें जें कांहीं हे करितात तें परमेश्वर निरखून आहे. ४६. आणि प्रत्येक जनतेचा एक पैगंबर-प्रेषित झाला आहे. तर जेव्हां (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांचा प्रेषित (आपल्या जनतेसह आमचे हुजूर) हजर होईल; तेव्हां जनता व प्रेषित यांच्यामध्यें इन्साफानें निवाडा चुकविला जाईल. आणि लोकांवर (मुळींच) जुलूम केला जाणार नाहीं. ४७. (मुसलमानांनों! हे लोक तुह्मांला) पुसतात कीं जर तुह्मीं खरे आहां तर हा (शिक्षेचा) वायदा केव्हां (पुरा) होईल? ४८. (हे पैगंबरा! तूं यांना) सांग कीं माझें स्वतःचें नफानुकसानहि माझ्या अख्त्यारांत नाहीं; पण जें परमेश्वर इच्छितो (तेंच होतें. त्याच्या अगाध ज्ञानांत) प्रत्येक जनते-(च्या जगांत राहण्या)चा एक वेळ मुकर आहे. जेव्हां त्यांचा (तो)

(१) कोणीहि प्रेषित वा पैगंबर असा होऊन गेला नाहीं कीं ज्याला त्याच्या वेळेचे प्रजेतून कांहीं लोकांनीं पाखंडी ह्मटलें नसेल. निवाडा ह्मणजे याच मतांतराचा निवाडा असा अर्थ होय.

वेळ येऊन पोहोंचतो तेव्हां (त्यापासून) एक घटकाभरहि ते मागें सरकूं शकत नाहींत व पुढेंहि जाऊं शकत नाहींत. ४९. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं बरें पाहा तर खरें! जर परमेश्वरी शिक्षा रात्रीं तुह्मांस पोहोंचली अगर दिसाढवळ्या, (कांहीं झालें तरी ती शिक्षाच असणार; तर) पापी लोक तिच्यासाठीं कशाची घाई मचवीत आहेत? ५०. तर कां मग जेव्हां ती (खरोखरींच) येऊन सादर होईल, तेव्हांच तिचा विश्वास कराल? (तर त्या वेळीं आह्मीं तुह्मांस म्हणूं कीं) कां आतां (येऊन पडल्यावर तुह्मांस विश्वास आला)? आणि तुह्मीं तर (तिच्या येण्याचीच शंका धरून) तिच्यासाठीं घाई मचवीत राहिला होता? ५१. नंतर (पुनरुत्थानाचे दिवशीं) आज्ञाभंजक लोकांस हुकूम दिला जाईल कीं आतां कायमच्या शिक्षेची गोडी चाखा. ही जी तुह्मांस शिक्षा दिली जात आहे ती केवळ तुमच्या स्वतःच्याच कर्मांचा मोबदला होय, (झालें). ५२. आणि (हे पैगंबरा! हे लोक) तुजपासून हें जाणूं इच्छितात कीं (जें कांहीं तूं त्यांना सांगतोस) तें खरोखरच होईल का? तूं (त्यांना) सांग, हो होय! माझ्या पालनकर्त्याची शपथ! तें खचित होइलच होईल. आणि तुह्मीं (परमेश्वरास) हारवूं शकणार नाहीं. ५३. आणि ज्या ज्या मनुष्यानें जगांत (आमचा) आज्ञा-भंग केला आहे, (पुनरुत्थानाचे दिवशीं) जमिनींतील सारे (खजिने) जर त्याच्या मालकींत[1] असतील तर तो अवश्य (आपल्या जिवाचें) बदल्यांत ते देऊन सुटेल. आणि जेव्हां लोक शिक्षेस (आपल्या नजरेनें) पाहून घेतील, तेव्हां ते पश्चात्ताप जाहीर[2] करतील. आणि

(१) आधीं तर साऱ्या जमिनीचे खजिने त्याला मिळणेंच अशक्य आणि जरी मिळालेहि तरी ते त्यांजकडून स्वीकारिले जाणार नाहींत.

(२) अरबी भाषेंत कित्येक शब्दांचे परस्पर उलट असे दोन अर्थ होतात; त्यापैकींच 'असर्रू' हा शब्द होय. 'इसरार' या धातुवरून याचा अर्थ लपविणें व जाहीर करणें असाहि होतो. आह्मीं भाषांतरांत त्याचा जाहीर करणें हा अर्थ घेतला आहे; ह्मणजे ते तोंडून ह्मणतील कीं आह्मीं फार पश्चात्ताप करितों. आणि लपविण्याचा अर्थ घ्यावा तर त्याचें भाषांतर असें होईल कीं मनांतल्या मनांतच पश्चात्ताप करतील ह्मणजे लज्जेनें तोंडांतून शब्दहि काढणार नाहींत परंतु मनांतच पश्चात्ताप पावतील.

लोकां(च्या मतभेदांच्या संबंधां)त न्याय पुरःसर निवाडा करून दिला जाईल; आणि त्यांच्यावर (मुळींच) जुलूम केला जाणार नाहीं. ५४. याद ठेवून राहा कीं जें कांहीं आकाशांत व पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वराचेंच होय. (आणि) याद ठेवा कीं परमेश्वराचें (पुनरुत्थानाचें) वचन सत्य होय. परंतु बहुतेक लोक निखालस जाणीत नाहींत. ५५. तोच जिवदान देतो व मारतो; आणि त्याच्याकडेच तुह्मां(सर्वां)स परतून जाणें होय. ५६. अहो लोकांनों! (प्रमाणापरीं) तुमच्या पालनकर्त्याकडून तुह्मापाशीं बोध येऊन चुकला, व (तसाच) तुमच्या उरांत ज्या (शंका) होत त्यांचा उपाय; आणि विश्वासू लोकांसाठीं सद्बोध व दया. ५७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (हें कुराण परमेश्वराची कृपा व त्याची दया होय, आणि लोकांस) पाहिजे आहे कीं परमेश्वराची कृपा व त्याची दया, म्हणजे हें (कुराण) पावून त्यांनीं खुष व्हावें. ज्या (जगिक फायद्यां)च्या गोळा करण्यामागें ते पडले आहेत त्यांजहून हें (फारच) श्रेयस्कर होय. ५८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं बरें पाहा तर खरें, परमेश्वरानें तुह्मांसाठीं अन्न उतरिलें. तर आतां तुह्मीं त्यांतून (कांहींस) निषिद्ध व (कांहींस) अनिषिद्ध ठरवूं लागला. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस, कां परमेश्वरानें तुह्मांस (याची) परवानगी दिली आहे? किंवा (आपल्याकडून) परमेश्वरावर थोतांड रचितां. ५९. आणि जे लोक परमेश्वरावर खोटें कुभांड रचितात ते पुनरुत्थानाचे दिवसाला काय समजून बसले आहेत? यांत संशय नाहीं कीं परमेश्वर लोकांवर (फारच) कृपावंत होय (कीं त्यांना तो तात्काळ शिक्षा देत नसतो); परंतु बहुतेक लोक (त्याचे) आभार मानीत नाहींत. ६०. आणि (हे पैगंबरा!) तूं कोणाहि स्थितींत (कां) असेनास आणि कुराणाचें कोणतेंहि महावाक्य (कां लोकांस) वाचून ऐकविनास, आणि (लोकांनों!) तुह्मीं कोणतेंहि कृत्यच (कां) करीत असानात; परंतु आह्मीं (सर्व काळ) जेव्हां तुम्हीं त्या कामांत गुंतून असतां तेव्हां तुह्मांस पाहत राहतों. आणि (हे पैगंबरा!) तुझ्या पालनकर्त्यापासून अणुरेणुभरहि कांहींच गुप्त राहूं शकत नाहीं; न पृथ्वींत व न आकाशांत. आणि ह्या

(अणुरेणु)पेक्षांहि अधिक लहान वा अधिक मोठी (वस्तु सर्व) सुव्यक्त पुस्तका (ह्मणजे 'लोहे–महफूज')मध्यें (नमूद केलेली) आहे. ६१. ध्यानांत ठेवा कीं परमेश्वराचे खास दोस्त (अशा चैनींत होत कीं पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांना (कोणा तऱ्हेचें) भय राहणार नाहीं व ते (कोणा तऱ्हेनें) दुःखीहि होणार नाहींत. ६२. (हे) असे (लोक होत कीं) ज्यांनीं विश्वास धरिला व (परमेश्वरास) भीत राहिले. ६३. यांच्यासाठीं इहलौकिक आयुष्यांतहि (समाधानाचें) शुभवर्तमान होय आणि परलोकींहि (मोक्षाचें). –परमेश्वराचे शब्दांत किंचितहि फरक येत नाहीं–हेंच मोठें साफल्य होय. ६४. आणि (हे पैगंबरा!) या (नास्तिकां)च्या (चेव आणणाऱ्या) गोष्टीनें तुला खेद उत्पन्न होऊं देऊं नकोस. कारण, सर्व सामर्थ्य परमेश्वरालाच होय. तो (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ६५. याद राखा कीं जे (देवदूत) आकाशांत आहेत व जे (लोक) जमिनींत आहेत (हे सर्व) परमेश्वराचेच (आज्ञेंत) आहेत. आणि जे लोक परमेश्वराखेरीज (आपल्या ठराविक) सरकतदारांस बोलवितात ते (कां माहीतहि आहे कीं) कोणत्या (मार्गा)वर चालतात? ते केवळ वहिमावर चालतात; आणि निवळ तर्क वितर्क लढवीत राहतात. ६६. (लोकांनों!) तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें तुह्मांसाठीं रात्र बनविली कीं तुह्मीं तींत विश्रांति घ्यावी; आणि दिवस (बनविला) कीं तुह्मीं (त्याच्या प्रकाशांत) पाहावें सवरावें. ह्यांत संशय नाहीं कीं या (रात्रंदिवसाच्या बनविण्यां)त जे

---

(१) मुसलमान जे परमेश्वरावर प्रेमयुक्त विश्वास ठेवून त्याला भिऊन आचरण करतात त्यांना आपण आपलें कर्तव्य केल्याचें समाधान वाटतें हें शुभवर्तमानच होय. शिवाय ह्याच कारणामुळें परलोकींहि त्याला मोक्ष मिळण्याचें शुभवर्तमान आहेच.

(२) यांत या गोष्टीकडे इषारा आहे कीं या वेळीं नास्तिक लोक मुसलमानांस वाईट स्थितींत पाहून त्यांना तुच्छ समजतात. पण परमेश्वराला सर्व सामर्थ्य आहे. तो जेव्हां त्यांना राज्य व इज्जत देईल तेव्हां हेच नास्तिक त्यांना मान देऊं लागतील, व त्यांच्या नजरेंत त्यांचें महत्व वाढेल.

लोक (सयुक्तिक गोष्टी कान लावून) ऐकतात त्यांच्यासाठीं (ईश्वरी सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. ६७. (कित्येक लोक) ह्मणतात कीं परमेश्वर पुत्र राखतो, (हें अगदींच असत्य होय); तो (सर्व उणीवा व दोषांपासून) पवित्र होय. तो (संततीकडून) निरपेक्ष होय. जें कांहीं आकाशांत व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) त्याचेंच होय. (लोकांनों!) तुह्मांपाशीं ह्याचें कांहीं प्रमाण तर नाहींच. तर कां तुह्मीं जाणत बुजत नाहींत अशा (खोट्या) तुह्मीं गोष्टी परमेश्वरासंबंधीं बोलतां? ६८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांगून दे कीं जे लोक परमेश्वरावर खोटें कुभांड रचितात, ते (आपल्या अंतिम साध्यांत) सफल होणार नाहींत. ६९. इहलोकींचे (अल्पकालिक) फायदे होत (तर कांहीं दिवस चैन करून घ्या.) नंतर (अखेर) त्यांना आह्मांकडेच परत येणें आहे; मग त्या वेळीं ते जो नास्तिकपणा करीत होते त्याच्या शासनार्थ आम्हीं त्यांना अति कडक शिक्षेची गोडी चाखवूं. ७०. आणि (हे पैगंबरा!) या लोकांस तूं 'नूह' (पैगंबरा)चा अहवाल वाचून ऐकीव; कीं जेव्हां तो आपल्या लोकांस ह्मणाला कीं हे बांधवांनों! जर माझें राहणें व परमेश्वराच्या महावाक्यांचा उल्लेख करून समजाविणें तुह्मांस जड जात आहे; तर मी परमेश्वरावरच भरवंसा ठेवितों. मग तुह्मीं व तुमचे सरकतदार (सर्व) मिळून आपली (एक) गोष्ट नक्की ठरवून घ्या. तथापि तुमची (ती) गोष्ट तुह्मां(पैकीं कोणा)पासूनहि गुप्त राहूं नये; (कीं सर्वांस त्या योजनेच्या पार पाडण्यास झटतां यावें). नंतर (जें कांहीं तुह्मांस करणें आहे तें) माझ्याबरोबर करून सोडा आणि मला अवकाश देऊं नका. ७१. मग जर तुम्हीं (माझ्या उपदेशाकडून) तोंड फिरवून बसलांत, तर मी तुह्मांपाशीं कांहीं वेतन तर मागितलें नव्हतें, (कीं तुह्मीं त्यास भुरदंड समजला!) माझें वेतन तर केवळ परमेश्वरावरच होय;

(१) सरकतदार ह्मणजे त्या लोकांचे कल्पित देव वा मूर्ति कीं ज्यांना ते परमेश्वराचे राज्यांत पातीदार समजत होते. पण सर्व शक्तिमान परमेश्वराला कोणी पातीदार आहे असें ह्मणणें ही ईश्वरनिंदा होय.

आणि (त्याच्याकडूनच) मला आज्ञा केली गेली आहे कीं मीं (त्याच्या) आज्ञाधारकांपैकीं होऊन राहावें. ७२. मग (इतकें समजाविल्यावरहि) लोकांनीं त्यास पाखंडी ह्मटलें; तेव्हां आम्हीं 'नूह'ला व जे लोक त्याच्याबरोबर गलबतांत होते त्यांजला (जलप्रलयांतून) तारिलें व त्यांना (त्यांच्या) मागें राहणारे बनविले. आणि ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस मिथ्यारोप केला त्यांस आम्हीं बुडवून टाकिलें. तर (हे पैगंबरा!) पाहा तर खरें, ज्या लोकांस (जलप्रलयाचें) भय दाखविलें जाऊन चुकलें होतें त्यांचा कसा (वाईट) परिणाम झाला! ७३. नंतर 'नूह'चे मागून आह्मीं (इतर) पैगंबरांना त्यांच्या (आपापल्या) लोकांकडे पाठविलें व हे पैगंबर त्यांच्यापाशीं चमत्कारहि घेऊन आले. यावरहि ज्या गोष्टीस हे लोक पहिल्यापासूनच पाखंड म्हणून चुकले होते, तिचा त्यांनीं विश्वास धरिला नाहीं (तो नाहींच). अशाच तऱ्हेनें जे लोक (भक्तिमर्यादे) बाहेर पाऊल टाकतात त्यांच्या अंतःकरणांवर आह्मीं मोहोर लावून टाकीत असतों. ७४. मग या (पैगंबरां)चेमागून आह्मीं 'मूसा' व 'हारून' यांस आपल्या निशाण्या (म्हणजे चमत्कार) देऊन 'फिरऔन' (फेरो) व त्याच्या दरबारी लोकांकडे पाठविलें. तेव्हां त्यांनीं अहंकार केला, आणि हे लोक कांहीं होतेहि आज्ञाभंजकच. ७५. मग जेव्हां त्यांच्यापाशीं आमच्याकडून सत्य पोहोंचलें (म्हणजे चमत्कार), तेव्हां ते म्हणूं लागले कीं ही तर अर्थात् बोलून चालून जादूच होय! ७६. 'मूसा'नें ह्मटलें कीं जेव्हां सत्य तुह्मांपाशीं आलें, तेव्हां कां तुह्मीं त्यासंबंधीं (असे निरर्थक बोल) बोलतां? कां ही जादू आहे? आणि जादूगिरां(ची तर ही परिस्थिति असते कीं त्यां)ना (कधींच) सफलता होत नाहीं. ७७. ते म्हणूं लागले, कां तूं या उद्देशानें आम्हांपाशीं आला आहेस कीं ज्या (धर्मा)वर आह्मीं आपल्या वडिलांस (चालतांना) पावलों त्या (धर्मा)कडून तूं आम्हांस फिरवून टाकावेंस? आणि देशांत तुह्मां दोघां (भावां)ची बढाई व्हावी? आणि आम्हीं तर तुम्हां उभयतांवर विश्वासच ठेवणार नाहीं. ७८. आणि 'फिरऔना'नें (आपल्या लोकांस) हुकूम दिला कीं दरेक वस्ताद जादुगिराला माझ्या

हुजुरांत आणून हजर करा. ७९. मग जेव्हां जादुगीर लोक (आखा-ड्यांत) येऊन हजर झाले तेव्हां 'मूसा' त्यांस (उद्देशून) म्हणाला कीं तुम्हांला जें कांहीं टाकावयाचें असेल तें (मैदानांत चला) टाका. ८०. तर जेव्हां त्यांनीं (आपल्या दोऱ्या व काठ्यांचे सर्प बनवून बनवून) टाकून दिले तेव्हां 'मूसा' म्हणाला कीं ही जी तुम्हीं (बनवून) आणिली आहे ती जादू होय. (पण) निःसंशय परमेश्वर ती एका पळांत नाहींशीं करून टाकील. कारण, परमेश्वर फिसादखोरांचें काम सुधरूं देत नसतो. ८१. आणि परमेश्वर आपल्या शब्दां(च्या प्रभावा)नें सत्यास सत्य करून दाखवील; व मग (पाहिजे तर) पापी लोकांस वाईटच वाटो! ८२. तथापि 'मूसा'वर केवळ त्याच्याच बांधवांच्या एका पिढीनें विश्वास ठेविला; तोहि 'फिरऔन' व त्याच्या सरदारांशीं भीत भीत, कीं कोठें ('फिरऔन') त्यांच्यावर कांहीं संकट न ओढून आणो. आणि (त्यांची भीतिहि सकारण होती, यासाठीं कीं) 'फिरऔन' हा, देशांत अर्थातच फार बढून चढून होता; आणि (तसेंच या करितांहि कीं) तो (लोकांवर) अनर्थ गुदरीत असे. ८३. आणि 'मूसा'नें (आपल्या लोकांस) समजाविलें कीं हे बांधवांनो! जर तुह्मीं (खरोखरीं) परमेश्वरावर विश्वास ठेवितां, तर तुह्मीं आज्ञाधारक आहां याची ही अट होय कीं तुह्मीं त्याच्याचवर भरंवसा ठेवा. ८४. यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं आह्मीं परमेश्वरावरच भरंवसा ठेवितों; (आणि लगेच प्रार्थना केली कीं) हे आमच्या पालनकर्त्या! आह्मांस (या) जालिम लोकां(च्या जुलमा)ची कसोटी बनवूं नकोस. ८५. आणि तूं आपल्या दयेनें आह्मांस (या) नास्तिक लोकां(च्या कचाटीं)तून सोडीव. ८६. आणि आह्मीं 'मूसा' व त्याचा बंधु ('हारून') यांजकडे आदेश पाठविला कीं तुह्मीं उभयतां 'मिसर'मध्यें आपल्या लोकांचीं (राहण्याचीं) घरें बनवून घ्या; आणि तुह्मीं (सर्व लोक) आपल्या (त्याच) घरांस मशीदी मुकर्र करा व (तेथेंच वेळस्वर) नमाज पढा; आणि (हे 'मूसा'!) विश्वासू लोकांस हें शुभ वर्तमानहि सांगून दे (कीं आतां तुमच्या उद्धाराचा वेळ जवळ येऊन लागला आहे). ८७. आणि 'मूसा'नें

(प्रार्थना करून) ह्मटलें कीं हे आमच्या पालनकर्त्या! तूं 'फिरऔन' व त्याच्या सरदार मंडळास या दुनियेच्या आयुष्यांत (मोठें) वैभव व धनदौलत देऊन ठेविली आहेस; (आणि) हे आमच्या पालनकर्त्या! (हीं साधनें तूं त्यांना) यासाठीं (देऊन ठेविलीं आहेत) कीं त्यांनीं (लोकांस) तुझ्या मार्गाहून बहेकवावें. तर हे आमच्या पालनकर्त्या! त्यांच्या धनदौलतीवर बोळा फिरीव, व त्यांचीं अंतःकरणें कठीण करून टाक कीं ह्या लोकांनीं दुःखद शिक्षा पाहिल्यावांचून विश्वासच धरूं नये. ८८. (परमेश्वरानें) फर्माविलें कीं तुम्हां दोघां (बंधूं)ची प्रार्थना मान्य झाली; तर तुम्हीं उभयतां बळकट जमून राहा आणि ज्या लोकांस (मुळीं कसलेंच) ज्ञान नाहीं अशा लोकांच्या मार्गावर चालूं नका. ८९. आणि आम्हीं 'बनी-इस्राएलां'स समुद्रापार उतरून दिलें; व मग 'फिरऔन' व त्याच्या लष्करांनीं शिरजोरींत व अदावतींत येऊन त्यांचा पिच्छा केला; येथपर्यंत कीं जेव्हां 'फिरऔन'(च्या शिरा)वर बुडतें (पाणी) येऊन पोहोंचलें, तेव्हां तो म्हणूं लागला कीं आतां मला (पक्का) विश्वास आला कीं ज्या (परमेश्वरा)वर 'बनी-इस्राएलां'नीं विश्वास ठेविला आहे त्याच्यावांचून अन्य कोणी उपास्य नाहीं; आणि (आतां) मीहि (त्याच्याच) अज्ञाधारकांपैकीं आहें. ९०. (तेव्हां परमेश्वरानें त्याला दोष लावून बजाविलें कीं) कां आतां (अशा वेळीं विश्वास)? आणि (तुझी स्थिति तर ही होती कीं ह्याच्या) पूर्वीं तूं बराबर अज्ञाभंग करीत राहिलास आणि तूं फिसादखोरांत (एकच फिसादखोर) होतास. ९१. तर आज (तुझ्या आत्म्याला तर नाहीं पण) तुझ्या शरिराला आम्हीं (पाण्याच्या बुडाशीं बसण्यापासून) बचावून घेऊं; (तेंहि यासाठीं) कीं जे लोक तुझ्यामागें (येणार) आहेत, तूं त्यांच्यासाठीं (बोधपर) नमुना व्हावास आणि अर्थात् बहुतेक लोक आमच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांकडून बेफाम आहेत. ९२. आणि

---

(१) ह्मणजे लोकांनीं त्यांच्या ऐहिक वैभवास व धनदौलतीस भुलून समजावें कीं परमेश्वर त्यांच्या नास्तिकपणाशीं राजी आहे; व हें कीं ह्या लोकीं त्यांचें सुखवस्तु होणें हा ईश्वरप्रसन्नतेचा पुरावाच होय.

आह्मीं बनी-इस्राएलांस (सीरीया प्रांतांत) एका खऱ्या ठिकाणीं नेऊन वसविलें व त्यांना चांगले चांगले पदार्थ (खावयासहि) दिले. तर बनी-इस्राएलांनीं जो (धर्मांत) मतभेद घातला तो ज्ञानें झाल्या पश्चात (घातला. हे पैगंबरा! जगांत) हे लोक ज्या ज्या गोष्टींत मतभेद करीत राहिले आहेत, तुझा पालनकर्ता पुनरुत्थानाचे दिवशीं यांच्या दरम्यान त्या मतांतरांचा फैसला करून टाकील. ९३. तर (हे पैगंबरा! हें कुराण) जें आह्मीं तुजकडे पाठविलें आहे, जर (मानवी प्रवृत्त्यनुसार) त्याच्या संबंधानें तूं कोणत्याहि प्रकारचे भ्रमांत अस-शील, तर तुझ्या अगोदरहि (पुस्तकें प्रकट झालीं आहेत) जे लोक (तीं) पुस्तकें वाचतात त्यांना विचारून पाहा. (ते याची साक्ष पटवितील कीं पूर्वींहि लोकांस प्रकटीकरण झालें आहे;) कांहीं

---

(१) बनी-इस्राएलांनीं फिरऔनचें बुडणें व आपलें त्यांच्या हातून बचावणें हें आपल्या डोळयांनीं पाहून घेतलें होतें. ह्मणून त्यांस पाहिजे होतें कीं पुढें ते मुळींच कांकूं न करते. कारण हजरत मूसाचें पैगंबर होणें ते खूप जाणून होते. असें असतांहि त्यांच्या खोडसाळपणाची परंपरा चालूच होती. ते जरा जराशा गोष्टींत हजरत मूसाशीं मतभेद करीत राहिले. हा अहवाल सूरतुल्-बकर: ह्मणजे पहिल्या अध्यायांत व इतर स्थळीं सविस्तर वर्णिला गेला आहे. मोठी जबाबदारी, ज्या कोणाला कोणा गोष्टीचें ज्ञान झाल्यावर जो लोकांत मतभेद घालतो त्याच्यावरच असते.

(२) पैगंबरीची अस्सल हकीकत समजणें ही गोष्ट आमच्या सामर्थ्या पलिकडची होय. परंतु कुराणांत विवेचन आलें आहे कीं 'मीहि तुह्मांच सारखा मनुष्य आहे, (माझ्यांत व तुमच्यांत फक्त एवढाच फरक आहे कीं) मजला 'वह्य' ह्मणजे प्रकटीकरण सादर होतें. मीहि तुह्मांच सारखा मनुष्य आहें, यावरून सिद्ध होतें कीं पैगंबर साहेबांत सर्व मानवी स्वभाविक गुण उपलब्ध असलेच पाहिजेत. त्यांतल्या त्यांत हें कीं त्यांच्याशीं निसर्गक्रमाविरुद्ध अध्यात्मिक संबंध उत्पन्न होण्यानें त्यांला मानवीस्वभावानुसार आश्चर्य वाटत होतें; आणि आश्चर्य हाहि एक प्रकारचा भ्रम होय. भ्रमाचेहि दर्जे होत. प्रथम वहीम होतो मग आश्चर्य व नंतर विवंचना; येथपर्यंत कीं त्याची मजल त्या गोष्टीस खोटें पाडण्यापर्यंत जाते. पण वहीम आणि आश्चर्य हीं पैगंबरीच्या पदांस असंभवित नाहींत.

संशय नाहीं कीं तुला तुझ्या पालनकर्त्याकडून सत्य (पुस्तक) आलेलें आहे; तर तूं कधींच शंका धरणाऱ्यांपैकीं होऊं नकोस. ९४. आणि ज्या लोकांनीं परमेश्वराच्या निशाण्यांस पाखंड ह्मटलें त्यांच्यांपैकींहि होऊं नकोस; (कीं असें करशील) तर (अखेर) तूंहि तोटा भोगणाऱ्यांपैकीं होऊन जाशील. ९५. (हे पैगंबरा!) जे लोक (आपल्या कुकर्मांमुळें) तुझ्या पालनकर्त्याच्या (शिक्षेच्या) हुकमास पात्र ठरून चुकले आहेत ते (कोणा तऱ्हेनेंहि) विश्वास धरणारच नाहींत; ९६. आणि जरी (जहान दुनियेचा) एकूणेक चमत्कार त्यांच्यासमोर येऊन गेला तरीहि, येथपर्यंत कीं ते दुःखदायक शिक्षाहि (आपल्या डोळ्यांनीं) पाहून घेतील. ९७. तर 'यूनुस'च्या लोकांच्या (वस्ती) शिवाय आणखी कोणी वस्ति अशी कां झाली नाहीं कीं (शिक्षा सादर होण्यापूर्वीं) तिणें विश्वास धरिला असता आणि तिचा विश्वास तिला फलद्रूप झाला असता! (कां कीं,) जेव्हां ('यूनुस'च्या लोकांनीं शिक्षा येत आहेशी पाहून झटदिशीं) विश्वास धरिला तेव्हां आम्हीं दुनियेच्या (या) आयुष्यांतच त्यांच्या वरून फजितीची शिक्षा हटविली; आणि त्यांना (अमुक) एक वेळपर्यंत सुखोपभोग करूं दिला. ९८. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता इच्छिता, तर अर्थात् जेवढीं (माणसें) या भूलोकांत होत त्या साऱ्याचे साऱ्यांनींच विश्वास धरिला असता. तर कां तूं लोकांवर बळजबरी करूं शकतोस, कीं त्या (साऱ्याचे साऱ्यां)नींच (खरे) विश्वासू बनून जावें? ९९. आणि परमेश्वराच्या आज्ञेवांचून, आपण विश्वास धरावा हें कोणाच्याच अखत्यारांत नाहीं. आणि जे लोक (ईश्वरैक्याच्या प्रमाणांत) बुद्धीनें काम घेत नाहींत त्यांच्यावरच (परमेश्वर मूर्तिपूजा व नास्तिकपणाची) घाण टाकतो. १००. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं हें जें कांहीं आकाश व पृथ्वींत आहे ज़रा त्याचें तर अवलोकन करा. (ह्मणजे परमेश्वराचें अस्तित्व व त्याचें ऐक्य तुह्मांस स्पष्ट दिसून येईल). आणि जे लोक विश्वासच धरीत नाहींत त्या लोकांस निशाण्या व ताकीद यांचा कांहींच उपयोग होत नाहीं. १०१. तर (हे लोकहि) त्यांच्या पूर्वीं जे लोक होऊन गेले आहेत

त्यांच्यावर जे (कालचक्राचे) दिवस लोटले केवळ तशाच दिवसांची वाट पाहतात का? (असेंच असल्यास, हे पैगंबरा! यांना) सांगून दे कीं बरें, तुम्हींहि वाट पाहा; मीहि तुम्हांबरोबर वाट पाहणाऱ्यांपैकींच आहें. १०२. नंतर (जेव्हां शिक्षा सादर होण्याची वेळ येऊन ठेपते तेव्हां) आम्हीं आपल्या पैगंबरांना (शिक्षेंतून) वांचवून घेतों, आणि (तसेंच) ज्या लोकांनीं (त्यांच्यावर) विश्वास ठेविला आहे त्यांसहि; आम्हीं आपल्यावर जिम्मा घेतला आहे कीं (अशा वेळीं) विश्वासू लोकांस वांचवून घेऊं. १०३. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं लोकांनों! जर तुम्हीं माझ्या धर्मासंबंधानें (कोणा तऱ्हेच्या) संशयांत असाल, (तर मी तुम्हांस साफ सांगून ठेवतों कीं) परमेश्वराशिवाय ज्या (मूर्तीं)ची तुम्हीं उपासना करितां, मी तर त्यांची उपासना करीत नाहीं. तथापि मी तर अशा परमेश्वराचीच उपासना करितों; कीं जो (असा परम समर्थ होय कीं) तुम्हां (सर्वांच्या प्राणां)स हरण करून (आपल्यापाशीं बोलावून) घेतो. आणि मला (त्याचेकडून) आज्ञा दिली गेली आहे कीं मी (सच्च्या) विश्वासू लोकांपैकीं होऊन राहावें. १०४. आणि (तसेंच परमेश्वरानें मला) हेंहि (फर्माविलें आहे) कीं तूं (याच) धर्माकडे आपलें तोंड नीट ठेवून सन्मार्गी होऊन चालला जा; आणि (मूर्ति वगैरेस परमेश्वराचा) सरकतदार मानणाऱ्यांपैकीं कधींच होऊं नकोस. १०५. आणि परमेश्वराशिवाय कोणाचाच धांवा करूं नकोस कीं तो तुला नफा पोहोंचवूं शकत नाहीं व तुला नुकसानहि पोहोंचवूं शकत नाहीं. आणि जर तूं (असें) केलेंस तर त्या वेळीं तूंहि जालिम लोकांत (लेखलेला) होशील. १०६. आणि जर परमेश्वर तुला एखादें दुःख पोहोंचवील, तर त्याच्याशिवाय कोणी त्या (दुःखा)चा निवारण कर्ता नाहीं; आणि जर तो तुला कोणा तऱ्हेचें हित पोहोंचवूं इच्छील तर कोणी त्याच्या औदार्यास आडवा येणारा नाहीं. तो आपल्या सेवकांतून ज्याला इच्छील त्याला फायदा पोहोंचवील. आणि तो क्षमाकर्ता (व) दयाळू होय. १०७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांगून दे कीं लोकांनों! (जी) सत्य गोष्ट (होती ती तर)

**तुमच्या पालनकर्त्याकडून तुह्मांपाशीं येऊन चुकली. मग ज्यानें सरळ-मार्ग पत्कारिला, तर तो आपल्याच (कल्याणा)साठीं तो पत्करितो; आणि जो बहकला, तर तो बहकून आपलीच हानि करितो. आणि मी तुमचा कांहीं रखवाल तर नाहींच. १०८. आणि (हे पैगंबरा!) तुजकडे जें प्रकटीकरण केलें जात आहे त्याप्रमाणेंच आचरीत जा आणि परमेश्वर (तुझ्या व नास्तिकांचे दरम्यान) फैसला करीपर्यंत (त्यांची इजा) सहन कर; आणि तोच (सर्व) न्याय निवडणारांत उत्तम (न्याय निवडणारा) होय. १०९.**

---

(१) भावार्थ हा कीं मी तुमच्या विश्वासाचा इजारा घेतलेला नाहीं; तसाच मी त्याबद्दल जबाबदारहि नाहीं. माझें काम ईश्वरी संदेश पोंहचतें करणें एवढेंच कायतें.

(२) ज्या फैसल्याचें अभिवचन दिलें गेलें होतें त्या फैसल्याचा ह्याप्रमाणें प्रादुर्भाव झाला कीं हजरत पैगंबर साहेब मक्केहून मदिनेस गेले आणि इस्लामचा विजय सुरू झाला. पुढें होतां होतां मुसलमानांचें राज्य काइम होऊन गेलें.

# अध्याय ११ वा.

## सूरतो-हूद.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. ह्यांत १२३ आयात वा महा वाक्यें आहेत. यांत हजरत हूद या पैगंबराचें वर्णन आलें आहे म्हणून हूदचें प्रकरण असें यास नांव देण्यांत आलें.

**परम दयालु (आणि) कृपालु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

अ. ल. र. (अलेफ-लाम-रा). (हे पैगंबरा! लोकांस सांग कीं हें कुराण असें) पुस्तक होय (कीं जें) बुद्धिमान् (व) ज्ञानी अशा (परमेश्वरा)कडून (प्रकट झालें आहे); याचीं महा वाक्यें (प्रमाणसिद्ध, सुबोध व भ्रष्ट होण्यापासून) भक्कम केलेलीं व ह्या उपरांत खूप सविस्तर वर्णिलेलीं अशीं होत. १. (त्यांचा खुलासा हा) कीं (लोकांनों!) परमेश्वराखेरीज कोणाचीहि उपासना करूं नका. मी त्याच्याचकडून तुम्हांस (त्याच्या शिक्षेचें) भय दाखवितों आणि (विश्वासूंस त्याच्या सुप्रसन्नतेचें) शुभवर्तमान ऐकवितों. २. आणि (तसेंच) हें कीं तुह्मीं आपल्या पालनकर्त्यापाशीं (मागें झालेल्या पापांबद्दल) क्षमा मागा, व मग (पुढें) पश्चात्ताप पावून त्याच्याकडे वळा; (असें कराल) तर तो तुह्मांस एका नियमित वेळे (म्हणजे मरणा-)पर्यंत (जगांत) उत्तम सुखोपभोग घेऊं देईल. आणि ज्यानें (कर्तव्यापेक्षां) जास्त केलें असेल त्याला त्याचें जास्त (फल) देईल. आणि जर तुह्मीं (त्याच्या आज्ञेकडून) तोंड फिरवाल, तर मला तुमच्या संबंधानें बड्या (सक्त) दिवसा (ह्मणजे पुनरुत्थाना)चे शिक्षेचा (मोठाच) अंदेशा वाटतो. ३. (कारण,)

**तुह्मां (सर्वां)स परमेश्वराकडेच परतून जाणें आहे व तो सर्व शक्तिमान् होय. ४. (हे पैगंबरा!) पाहा! हे (नास्तिक लोक वांकून वांकून) आपल्या उरांस दुमटे करून घेतात; अशासाठीं कीं त्यांनीं परमेश्वरापासून लपून राहावें. पाहा! (हे लोक निजतांना) जेव्हां आपले कपडे पांघरून घेतात, (त्या वेळींहि) परमेश्वरास (त्यांची सर्व कर्मे) जीं ते लपवून करतात व जीं ते उघड उघड करतात तीं (सर्व) माहीत राहतात. निःसंशय तो तर उरांतील गुप्त भेदांचाहि ज्ञाता होय. ५.** (पुढें चालू.)

(१) मनुष्याचा असा नियम असतो कीं जेव्हां तो कोणाची दृष्टि चुकवूं इच्छितो तेव्हां तो पडद्या आड होऊन जातो अगर दबकून जातो किंवा वांकून जातो. असेंच नास्तिक लोकहि करीत होते कीं उपदेश करतेवेळीं ते पैगंबर साहेबांच्या रूबरू असत; तेव्हां ते वांकून वांकून जात कीं असें न व्हावें कीं पैगंबर साहेब कोठें आह्मांला पाहून घेतील व आह्मांस उद्देशून कांहीं बोलतील.



# पवित्र कुराण

## भाग बारावा.

### सूरतो-हूद. (पुढें चालू).

आणि जितके (प्राणी) पृथ्वींत चालत फिरत आहेत त्या (सर्वां)चें अन्न[1] केवळ परमेश्वरावरच होय; आणि तोच त्यांचें (जित्या जिवाचें) ठिकाण आणि (तसेंच मेल्या पश्चात) त्यांचें (जमिनींत) सोंपविलें जाण्याचें स्थान जाणतो. सर्व कांहीं तेजःपूंज पुस्तका (म्हणजे 'लौहेमहफूज')मध्यें (नमूद केलेलें) आहे. ६. आणि तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें आकाशांस व पृथ्वीस सहा दिवसांत निर्माण केलें; आणि (त्या वेळीं) त्याचें सिंहासन पाण्यावर[2] होतें. (पण त्यानें जग ह्या हेतुनें बन-

---

(१) परमेश्वरानें सर्व प्राण्यांच्या अन्नपाण्याचा जो जिम्मा घेतला, तर त्या वचनास त्यानें ह्याप्रमाणें पूर्ण केलें; कीं पृथ्वीच्या तळावर जलांत व खुष्कींत, पर्वत, अरण्य व वस्तींत आणि पाण्यांत व हवेंत, सारांश, जो प्राणी जेथें-कोठेंहि आहे तेथें त्याचें अन्नपाणीहि तयार ठेविलें आहे. परंतु त्याचा शोध लावणें जरूर आहे; आणि प्रत्येक प्राण्याच्या परिस्थितिप्रमाणें शोध लावण्याचे प्रकारहि भिन्नभिन्न होत. कित्येक लोक ही बारकाई न समजून त्याच्या शोधांत कोताई करतात आणि यास ईश्वरनिष्ठा समजतात; आणि "मनुष्यानें प्रयत्न केल्यावांचून त्याला कांहीं (प्राप्त होणें) नाहीं" ही कुराणोक्ति ते विसरून जातात.

(२) त्याचें सिंहासन म्हणजे दयासन कीं जेथून प्रत्येक तऱ्हेचा प्रसाद होतो तें जीवसृष्टीस हितावह अशा पाण्यावर होतें व त्या

विलें) कीं त्यानें तुह्मां लोकांस पडताळून पाहावें कीं तुमच्यांत कोणाचीं कृत्यें उत्तम होत? आणि (हे पैगंबरा!) जर तूं (या लोकांस) सांगशील कीं मेल्या पश्चात तुह्मीं (सर्व पुन्हां जिवंत) उठवून उभे केले जाल, तर जे लोक नास्तिक होत ते (हें ऐकून) अवश्य ह्मणतील कीं हें (जें कांहीं तूं आह्मांस उपदेशितोस तीं) तर केवळ धडधडीत जादूच होय. ७. आणि जर आह्मीं या (लोकां)वरून शिक्षा (सादर करणें) मोजक्या काळापर्यंत पुढेंहि ढकलीत राहूं, तर हे लोक अवश्य ह्मणूं लागतील कीं कोणती वस्तु शिक्षेस आडवी येते? पाहा! ज्या दिवशीं यांना शिक्षा सादर होईल, (मग) ती यांच्यावरून कोणाच्या टाळल्यानें टळणार नाहीं; आणि ज्या (शिक्षे)ची हे लोक चेष्टा उडवीत होते, ती त्यांना चिटकून जाईल. ८. आणि जर आम्हीं मनुष्याला आपली मेहरबानी(ची गोडी) चाखवूं, व मग ती (देणगी) आह्मीं त्याच्यापासून हिरावून घेऊं तर (तो आमचें गाऱ्हाणें करूं लागतो; कारण,) तो (जराशा गोष्टींत) निराश होऊन जाणारा (व) अनुपकारी होय. ९. आणि जर त्याला एखादी आपत्ति पोहोंचली असेल व त्यानंतर आम्हीं त्याला खुशाली(ची मजा) चाखवूं तर तो म्हणूं लागतो कीं (आतां) मजवरून सर्व अरिष्टें टळलीं. कारण कीं, तो फारच (जलद) खुष होणारा व शेखीखोर होय. १०. परंतु जे लोक सहनशीलता पत्करतात व चांगलीं कृत्यें करतात, (त्यांची स्थिति अशी नाहीं). हेच तर होत कीं ज्यांच्यासाठीं (परमेश्वरासमीप) क्षमा व मोठें प्रतिफळ होय. ११. तर (हे

---

पाण्यावर हरतऱ्हेचें अन्न वगैरे पिकणें अवलंबून आहे; ह्मणजे त्यानें तुमची सर्वांशीं उत्तम व्यवस्था केली.

(१) ह्मणजे जसे जादुगीर खोटे व निराधार दावे व प्रतिज्ञा करतात, तसेच मेल्यावर पुन्हा जिवंत उठणें ह्यासहि ते त्याप्रमाणेंच समजले; ह्मणून ह्यास ते जादूच होय असें ह्मणूं लागले.

पैगंबरा!) नवल नाहीं कीं जें कांहीं तुला प्रकट केलें जातें, (लोकांस ऐकवितांना) तूं (त्यांतून) थोडेंसें सोडून देऊं पाहशील; आणि त्यामुळें तुझें हृदय संकोचित होईल कीं (न जाणो! हे लोक असें) म्हणूं लागतील कीं या मनुष्यावर एखादा खजिना कां नाहीं उतरला अगर (त्याच्या सचोटी करितां) त्याच्याबरोबर (परमेश्वराकडून) एखादा देवदूत कां नाहीं आला? (हे पैगंबरा!) तूं तर (या लोकांस ईश्वरी शिक्षेचें) भय सांगणारा आहेस एवढेंच. आणि प्रत्येक वस्तुचा परमेश्वरच नियंता होय. १२. (हे पैगंबरा!) कां (नास्तिक लोक) म्हणतात कीं या (मनुष्या)नें (म्हणजे त्वां) कुराण आपल्या मनानें रचिलें आहे? तर (या लोकांस) सांग कीं जर तुह्मीं (आपल्या दाव्यांत) खरे आहां (कीं मी हें कुराण आपल्या मनानें रचिलें आहे) तर तुह्मींहि (भाषाभिज्ञ आहां) अशाच तऱ्हेचे रचिलेले, (जास्त नव्हेत,) दहाच अध्याय घेऊन या; आणि परमेश्वराशिवाय ज्यांना (कुमकेसाठीं) तुमच्यानें बोलाविणें शक्य असेल त्यांस बोलावून घ्या. १३. मग जर (तुमचे हे मदतगार) तुमचा कह्या न करूं शकतील, तर जाणून असा कीं (कुराण) परमेश्वराचेच ज्ञानानें प्रकट झालें आहे; आणि हें कीं त्याच्या वांचून अन्य कोणी उपास्य नाहीं. तर कां (आतां हें प्रमाण पटल्यावरहि) तुह्मीं इस्लाम स्वीकारतां (कीं नाहीं)? १४. (सुकृत्य करण्यांत) ज्यांचा उद्देश इहलौकिक आयुष्य व ऐहिक भूषण असतो, आह्मीं त्यांच्या कर्मांचा मोबदला (येथेंच) जगांत त्यांना भरपूर देतों. आणि ते जगांत (कोणा तऱ्हेनें) तोट्यांत राहत नाहींत. १५. (पण) हे असे लोक होत कीं ज्यांच्यासाठीं परलोकीं नरकाग्नीशिवाय आणखी कांहींच नाहीं. आणि जीं (चांगलीं) कर्में त्या लोकांनीं जगांत केलीं तीं (परलोकीं

(१) म्हणजे सर्व वस्तु परमेश्वराच्याच अखत्यारांत आहेत. त्याचा पैगंबरांकडे कांहीं दोषच नाहीं.

(२) म्हणजे ते कांहीं ना कांहीं कमवितातच; तर जशीं त्यांचीं खोटीं कर्में, तसेच जगांतील कुचकामाचे व क्षणभंगुर फायदे त्यांना प्राप्त होतात.

सारीं) अक्रीत होऊन गेलीं व त्यांचें केलें सवरलें (सारेंच) निरर्थक. १६. तर कां जे लोक आपल्या पालनकर्त्याच्या राजमार्गावर असतील आणि त्यांच्या संगतीं (संगतींच) त्यांच्यांतलाच एक साक्षी असेल (ह्मणजे खुद्द त्यांचें अंतःकरण व विवेचक बुद्धि), आणि कुराणाच्या पूर्वीं (त्यांस मार्गदर्शक ह्मणून) मूसाचें पुस्तक असेल कीं तें (त्याची साक्ष पटविणारें व धर्म-)मार्ग दर्शक आणि (परमेश्वराची) दया होय; (तर कां असले लोक कुराणास नाकारणारे होऊं शकतात? अर्थातच नाहीं. किंबहुना) हे लोक (कांहीं झालें तरी) कुराणाचा विश्वास धरितात. आणि (इतर) मिलाफी मंडळापैकीं जो कोणी त्यास नाकारील त्याचें शेवटचें ठिकाण नरकाग्नि होय. तर (हे पैगंबरा!) तूंहि कुराणाकडून (कोणा तऱ्हेचे) शंकेत राहूं नकोस. कांहींच शंका नाहीं कीं तें सत्य आहे (व) तुझ्या पालनकर्त्याकडून (तुला प्रकट झालें आहे). परंतु बहुतेक लोक (यावर) विश्वास ठेवीत नाहींत. १७. आणि जो परमेश्वरावर खोटें खोटें कुभांड रचील त्याहूनहि अधिक जुलमी आणखी कोण? हेच लोक (पुनरुत्थानाचे दिवशीं) आपल्या पालनकर्त्यासमोर आणिले जातील

(१) या वाक्यांत बोलण्याचा रोंख बहुधा यहुद्यांकडे आहे; आणि जे यहुदी लोक मुसलमान होऊन गेले होते त्यांचे दृष्टांत देऊन त्यांस प्रमाण पटविलें जातें. प्रमाणपद्धति ही कीं यहुदी जे मुसलमान झाले होते त्यांस तीन गोष्टींमुळें इस्लाम स्वीकारणें भाग पडलें. एक तर ही कीं इस्लामचा बाळबोध, सोपा व सादा मार्ग कीं त्यांत कोणातऱ्हेचा गोंधळ नाहीं. दुसरी, बुद्धीस पटणारी साक्ष कीं इस्लाम बुद्धिविरुद्ध कसलेंच शिक्षण देत नाहीं. तिसरी गोष्ट म्हटली म्हणजे तौरात किंवा जुना करार ज्यास यहुदी मानीत होते व आहेत त्यांत हजरत मोहंमद पैगंबरांसंबंधानें भविष्य वचनें होतीं व अजूनहि आहेत; आणि कुराण व तौरात उभयतांचीं धर्मतत्वेंहि एकच होत. मतभेद जर कोठें आहे तर तो सांप्रदायिक व गौण प्रकारचा होय. जे यहुदी मुसलमान झालेले नाहींत तेहि जर ह्या तीन गोष्टींचा यथार्थ विचार करतील तर कांहीं झालें तरी त्यांना मुसलमान होणें भाग पडेल.

व साक्षी[1] साक्ष देतील कीं हेच होत कीं ज्यांनीं आपल्या पालनकर्त्यावर मिथ्यारोप केला होता. पाहा! (अशा) अनर्थ करणाऱ्यांवर परमेश्वराचाच शाप होय. १८. जे परमेश्वराचे मार्गाहून (लोकांस) अडवून ठेवितात व त्यांत वांकडेपणा (आणूं) इच्छितात; आणि हेच होत कीं जे परलोकासहि नाकारितात. १९. हे लोक पृथ्वींत (परमेश्वराला) हारवूं शकले नाहींत व परमेश्वराशिवाय त्यांचा कोणी हिमायतीहि (उभा) झाला नाहीं. (तर पुनरुत्थानांत) त्यांना दुहेरी शिक्षा होईल; कारण, (मत्सरामुळें) ते (खरी गोष्ट) ऐकूं शकत नव्हते व (खुद्द सरळ मार्गहि) त्यांना सुचून येत नव्हता. २०. हेच लोक होत कीं ज्यांनीं आपणच आपलें नुकसान करून घेतलें आणि ते (जगांत) ज्या ज्या बनावटी करीत असत त्या (सर्व परलोकीं) त्यांच्यापासून नाहींशा होऊन गेल्या. २१. झालें, जरूर हेच लोक परलोकीं सर्वांत अधिक तोट्यांत राहतील. २२. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (विश्वासाव्यतिरिक्त त्यांनीं) चांगलीं कांमेंहि केलीं आणि आपल्या पालनकर्त्यासमोर शिर नमवीत राहिले; हेच स्वर्गवासी लोक होत कीं हे स्वर्गांत निरंतर राहतील. २३. (नास्तिक व मुसलमान या) उभयपक्षांची उपमा, आंधळा व बहिरा आणि पाहता व ऐकता यांच्या सारखी होय. कां दोघांची स्थिति एकसारखीच होऊं शकते? तर कां तुह्मी लोक विचार करीत नाहीं? २४. आणि आम्हींच 'नूह'ला त्याच्या लोकांकडे (पैगंबर करून) पाठविलें; (आणि तो आपल्या लोकांशीं ह्मणाला) कीं मी तुम्हांस (ईश्वरी शिक्षेचें) साफसाफ भय सांगण्यास (आलों) आहें; २५. (आणि मी तुह्मांस समजावितों) कीं परमेश्वराशिवाय (अन्य कोणाची) उपासना करूं नका. (असें कराल तर,) मला तुमच्यासंबंधानें एका दुःखदायक दिवसाच्या शिक्षेची (फारच) भीति वाटते. २६. यावर त्याच्या लोकांतील

(१) साक्षी म्हणजे देवदूत कीं जे कर्में लिहीत जातात, अगर माणसाचे अवयव कीं जे पुनरुत्थानांत माणसाविरुद्ध साक्ष देतील अगर पैगंबर, हे होत.

सरदार जे (त्याला) मानीत नव्हते ते म्हणूं लागले कीं आह्मांस तर तूं केवळ आमच्याचसारखा मनुष्य दिसतोस; आणि आमच्या नजरेंत जे लोक आमच्यामध्यें अति नीच होत, तेच काय ते तुझे अनुयायी होऊन गेले आहेत; (व ते अनुयायी होऊनहि गेले आहेत तर अविचारानें व) वरवर दृष्टीनें. आणि आम्हीं तर तुम्हां लोकांत आपल्यावरती कांहीं श्रेष्ठता पाहत नाहीं; इतकेंच नव्हें तर आम्हीं तुम्हांस लबाड समजतों. २७. ('नूह') ह्मणाला, बांधवहो! बरें पाहा तर खरें, जर मी आपल्या पालनकर्त्याच्या राजमार्गावर आहें व त्यानें मला आपल्याकडून दया(-दान ह्मणजे पैगंबरी) दिली आहे, मग तो मार्ग तुम्हांस दिसेनासा होतो; तर कां आह्मीं तो (जबरदस्तीनें) तुमच्या गळयांत बांधीत आहों? आणि तुह्मीं (आहां कीं) तो नापसंतच करीत चालला जातां? २८. आणि हे बांधवांनों! मी या (उपदेशा)च्या मोबदला तुह्मांपाशीं कांहीं द्रव्य मागीत नाहीं; (कीं तुह्मीं त्याला भुरदंड समजावें!) माझें वेतन तर केवळ परमेश्वरावरच होय. आणि जे लोक विश्वास धरून चुकले आहेत त्यांस मी (आपल्यापासून) हांकूनहि लावून देऊं शकत नाहीं; कांकीं त्यांनाहि आपल्या पालनकर्त्याच्या नजरानजर जाणें आहे; (व न जाणो, ते परमेश्वरापाशीं गाऱ्हाणें करतील.) परंतु मी तुम्हांला पाहत आहें कीं तुह्मीं लोक (व्यर्थ) जहालपणा (अडाणीपणा) करितां. २९. आणि हे माझ्या लोकांनों! जर मी या(बापड्या विश्वासूं)स हांकूनहि देईन तर परमेश्वराविरुद्ध माझ्या कुमकेस कोण उभा राहील? कां तुह्मीं (इतकी गोष्टहि) समजत नाहीं? ३०. आणि मी तुह्मांस (प्रतिज्ञेनें) सांगत नाहीं कीं मजपाशीं ईश्वरी खजिने आहेत, व (मी हा दावा करित) नाहीं कीं मी अदृष्ट जाणतों व मी (आपल्या संबंधानें) म्हणत नाहीं कीं मी देवदूत आहें. आणि जे लोक तुमच्या डोळयांत तुच्छ दिसतात त्यांच्या संबंधानेंहि मी हें म्हणूं शकत नाहीं कीं परमेश्वर त्यांच्यावर (कधीं) कृपा करणारच नाहीं. त्यांच्या मनांतील गोष्ट परमेश्वरच खूप जाणतो. (जर मी फुशारकीनें अशा

बाता उडवीन तर) अशा स्थितींत जुलमी लोकांतला एक (जुलमी) मीच. ३१. ते बोलले, हे 'नूहा'! तूं आम्हांशीं झगडून चुकलास व झगडलासहि पुष्कळच; जर तूं खऱ्यांपैकीं आहेस तर ज्या (शिक्षे)-कडून तूं आह्मांस भिववितोस, ती आह्मांवर आणून सोड. ३२. ('नूह') म्हणाला कीं परमेश्वराची मर्जी होईल तर तोच शिक्षाहि तुह्मांस सादर करून सोडील आणि (मग) तुह्मीं (त्याला) हरवूंहि शकणार नाहीं. ३३. आणि मी तुमचें (कितीहि) हितचिंतन करूं इच्छीन, पण जर परमेश्वरालाच तुमचें (सरळ मार्गाहून) बहकविणें मंजूर आहे तर माझा उपदेश (कांहींच) तुमच्या कामा येऊं शकत नाहीं. तोच तुमचा पालनकर्ता होय; आणि त्याच्याकडेच तुह्मांस परतून जाणें आहे. ३४. (हे पैगंबरा! जसा 'नूह'च्या लोकांनीं 'नूह'वर मिथ्यारोप केला होता) कां (तसाच 'मक्के'चे नास्तिकहि तुजवर मिथ्यारोप करतात व आक्षेप काढतात आणि) म्हणतात कीं कुराण हें या(मनुष्या)नें (म्हणजे त्वां) खुद्द बनविलें आहे. तूं (यांना) उत्तर दे कीं जर कुराण मी खुद बनविलें असेल, तर माझें पातक मजवर; आणि तुह्मीं जें (वृथा मिथ्यारोपाचें) पातक करितां, मी त्यापासून निर्दोष आहें. ३५. आणि 'नूह'कडे प्रकटीकरण पाठविलें गेलें कीं तुझ्या लोकांत जे लोक विश्वास धरून चुकले आहेत त्यांच्याशिवाय आतां कधींहि कोणी विश्वास धरणार नाहीं. तर जसजशीं (बदकर्में) हे लोक करीत राहिले आहेत, तूं त्यांचें (कांहीं) वाईट वाटूं देऊं नकोस. ३६. आणि आमच्या नजरेखालीं व आमच्या प्रेरणेप्रमाणें तूं एक गलबत बनवूं लाग; आणि ज्या लोकांनीं अनर्थ केले आहेत त्यांच्यासंबंधीं तूं मला संबोधूं नकोस. कारण, हे लोक अवश्यच गर्क केले जातील. ३७. सारांश, 'नूह'नें गलबत बनविणें सुरु केलें; आणि जेव्हां जेव्हां त्याच्या बांधवांपैकीं बडे लोक त्याच्याजवळ होऊन जात, तेव्हां ते त्याचा उपहास करीत. 'नूह' (त्यांच्या उपाहासाचें) उत्तर देई कीं जर तुह्मीं (आज) आह्मांला हंसतां, तर जसें तुम्हीं (आम्हांला) हंसतां तसेंच आम्हीं (एक दिवस) तुह्मांला हंसूं. ३८.

मग थोड्याच अवधींत तुम्हांस माहीत होऊन जाईल कीं कोणाला अशी शिक्षा सादर होते कीं जी त्याला (जगांत) फजित करील; आणि (पुनरुत्थानांत) काइमची शिक्षा त्याच्या शिरीं पडेल; (ती वेगळीच). ३९. येथपर्यंत कीं जेव्हां आमचा (शिक्षेचा) हुकूम येऊन पोहोंचला व (ईश्वरी कोपाच्या) भट्टीला ऊत येऊन गेला; तेव्हां आम्हीं ('नूह'ला) आज्ञा केली कीं प्रत्येक वर्गां(च्या प्राण्यां)-तून (नर व मादी अशीं) दोन्हा-दोन्हाचीं जोडपीं, व ज्याच्या-संबंधानें (आमचा) पूर्वीं बोल होऊन चुकला आहे (कीं त्याचा नाश होईल) त्याला खेरीज करून, तूं आपलें (सर्व) कुटुंब, आणि (त्यांच्याशिवाय आणखी) जे लोक विश्वास धरून चुकले आहेत त्या(सर्वां)स गलबतांत बसून घे. आणि त्याच्या बरोबर विश्वासहि केवळ थोड्याशांनींच धरिला होता. ४०. आणि ('नूह'नें गलबतावर चढणाऱ्यांस) ह्मटलें, "बिस्मिल्लाहे मजरीहा व मुर्साहा" असें म्हणून तुह्मीं गलबतावर चढून जा. निःसंशय माझा पालनकर्ता अर्थात क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ४१. आणि गलबत पर्वतासारख्या (प्रचंड) लाटांत ('नूह' व) त्या(च्या साथीदारां)स घेऊन वाहत चाललें जात आहे. आणि 'नूह'चा मुलगा (त्याच्यापासून) अलग होता त्याला 'नूह'नें हाक मारली कीं हे माझ्या मुला! आह्मां संगतीं (गलबतावर) चढून बैस व नास्तिकांसंगतीं राहूं नकोस. ४२. तो बोलला, मी आतां (तुमच्या देखतां देखतां पोहून) एखाद्या

(१) आह्मां मुसलमानांत प्रत्येक प्रसंगीं 'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम' किंवा फक्त 'बिस्मिल्ला' ह्मणजे परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें किंवा फक्त परमेश्वराचे नांवानें असें ह्मणण्याचा प्रवात आहे. परंतु गलबतावर चढते वेळीं या वरील वाक्यांचे ऐवजीं 'बिस्मिल्लाहे मजरिहा व मुर्साहा' –याचा शब्दशः अर्थ हा आहे कीं या गलबताचें वाहत चालणें व उभें राहणें परमेश्वराचे नांवानें होय–हें वाक्य बोललें पाहिजे व नूहनेंहि असेंच उद्गार काढिले; याचा भावार्थ हा कीं सर्व कांहीं परमेश्वराचेच अखत्यारांत आहे. तो आपल्या नांवाचे प्रसादानें गलबतास समुद्रांतून सुखरूपपणें पार लावील.

पर्वताचे आश्रयास जाऊन लागतों कीं तो मला (प्रलयाचे पाण्यांतून) वांचवून घेईल. ('नूह'नें) म्हटलें कीं आजच्या दिवशीं परमेश्वराच्या हुकमा (म्हणजे कोपा)पासून कोणीच तारणारा नाहीं; पण परमेश्वरच ज्याच्यावर दया करील (तोच तरूं शकतो). आणि (बापलेक ह्या गोष्टी करीतच राहिले होते कीं) त्या उभयतांचे दरम्यान एक लाट येऊन कोसळली; तर इतरांबरोबर 'नूह'चा मुलगाहि बुडविला गेला. ४३. आणि हुकूम फर्माविला गेला कीं हे धरित्री! तूं आपलें पाणी शोषून घे; आणि हे आभाळा! तूं थांबून जा; आणि पाणी (चढलेलें) उतरून गेलें. व (लोकांचें) काम पुरें करून टाकिलें गेलें; आणि गलबत 'जूदी' (पर्वता)वर (जाऊन) टेंकलें. आणि (जगाच्या चारहि दिशेस) पुकारिलें गेलें कीं जालिम लोक (ईश्वरसान्निध्यापासून) दुरावले गेले. ४४. आणि ('नूह'चा मुलगा अद्यापि बुडालाहि नव्हता कीं) 'नूह'नें आपल्या पालनकर्त्यास हाक मारिली व (त्याच्या सेवेंत) अर्ज केला कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझा मुलगाहि माझ्या कुटुंबांत (दाखल) आहे; आणि तुझें (माझ्या कुटुंबास तारण्याविषयींचें) वचन सत्य होय व तूं सर्व अधिकाऱ्यांत फारच बडा अधिकारी आहेस. (म्हणून तूं माझ्या मुलाचेंही तारण कर). ४५. (परमेश्वरानें) फर्माविलें कीं हे 'नूहा'! तो (तुझा मुलगा) तुझ्या कुटुंबांत (दाखल) नाहीं; कारण, त्याचीं कृत्यें चांगलीं नव्हेत. तर ज्या गोष्टीची वस्तुस्थिति तुला माहीत नाहीं, त्या गोष्टीची तूं माझ्याशीं दरखास्त करूं नकोस. मी तुला समजावून सांगतों कीं तूं अडाण्यांपैकीं होऊन

(१) या जूदी पर्वतासंबंधीं अनेक भाष्यकारांनीं अनेक गोष्टींचा ऊहापोह केला आहे; त्यांत मजमऊल्-बिहार या ग्रंथाचे कर्ते लिहितात कीं दजला म्हणजे टायग्रीस व फुरात म्हणजे युफ्रेटीस या नद्यांच्या मध्य मार्गी एक बेट आहे त्यांत हा जूदी पर्वत आलेला आहे.

(२) जसें सर्व जगांतील बापांना आपल्या पुत्राचें प्रेम असतें व बाप आपल्या बालकांच्या अपराधांस प्रितीमुळें हलके समजत असतो अगर त्यांच्या अपराधांकडे काणाडोळा करितो; हीच स्थिति नूह पैगंबरांची आपल्या मुलासंबंधानें

जाऊं नकोस. ४६. 'नूह'नें विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! मी (असल्या धाष्टर्यापासून) तुझाच आश्रय धरितों कीं ज्या गोष्टीची वस्तुस्थिति मला माहीत नाहीं, त्याची मी तुझ्याशीं दरखास्त करावी. आणि जर तूं माझा अपराध क्षमा न करशील व मजवर दया न करशील तर मी (महा) हानि भोगणाऱ्यांपैकीं होऊन जाईन. ४७. (जेव्हां जल प्रलय निघून गेला तेव्हां 'नूह'ला) असें आज्ञापिलें गेलें कीं हे 'नूहा'! आह्मांकडून सुखशांति व आशिर्वाद यांसह तूं (गलबतांतून) उतर; (आणि हे आशिर्वाद) तुजवर व जे लोक तुजसंगतीं होत त्यांच्या पिढ्यांवर (नित्य) राहतील. आणि (तुम्हांलोकांत पुढें आणखी कांहीं असे) लोक(हि पैदा) होतील कीं ज्यांना आम्हीं (जगाचे क्षणिक) फायदे पोहोंचवीत राहूं, नंतर (त्यांच्या आज्ञाभंगामुळें परलोकीं) आह्मांकडून त्यांना दुःखकारक शिक्षा सादर होईल. ४८. (हे पैगंबरा!) ह्या कांहीं गैबी बातम्या होत कीं ज्या आम्हीं प्रकटीकरणाद्वारें तुला पोहोंचवितों. ह्या(कुराणाच्या प्रकटीकरणा) पूर्वीं तर तूं त्या जाणीत नव्हतास व नच तुझे लोक. तर तूं धीर धरून राहा, (व समजून अस कीं उत्तम) परिणाम (परमेश्वराला) भिऊन चालणाऱ्यांचाच होय. ४९. आणि 'आद' कडे (आम्हीं) त्यांचाच बंधु 'हूद' यास (पैगंबर करून पाठविलें). त्यानें (आपल्या लोकांस जाऊन) समजाविलें कीं हे माझ्या बांध-

---

होती; कीं शेवटपर्यंत त्याच्या तारणाप्रीत्यर्थ प्रार्थना करीत राहिले. परमेश्वरानें त्यांस जणाविलें कीं तुम्हीं त्याच्या कृत्यांचा इन्साफ करूं शकत नाहीं व तुम्हांला त्याच्या परिणामाची माहिती नाहीं कीं त्याला तारण दिलें गेलें तर तो कमकमे फिसाद उभे करील. जी गोष्ट सकृत्दर्शनीं तुम्हांस बरी लागते पण तिचा परिणाम वाईट होय.

(१) म्हणजे या गैबी बातम्याहि कुराण ईश्वरप्रणित आहे यास प्रमाण होत. तरीहि मक्केचे नास्तिक त्यास पाखंड म्हणतच जातात. तर तूं त्यांच्या इजा धीर धरून सहन करीत जा.

वांनों! परमेश्वराचीच उपासना करा; त्याच्यावांचून अन्य कोणी तुमचा उपास्य नाहीं. (आणि इतरांस परमेश्वराचे तुम्हीं जे सरकत दार ठरवितां, तर हें) तुह्मीं निवळच कुभांड रचितां. ५० हे माझ्या बांधवांनों! ह्या(उपदेशा)बद्दल मी तुम्हांपाशीं कांहीं वेतन तर मागीत नाहीं. माझें वेतन तर केवळ ज्यानें मला निर्मिलें त्याच्यावरच होय. तर कां तुह्मीं (इतकी गोष्टहि) समजत नाहीं? ५१. आणि हे माझ्या बांधवांनों! आपल्या पालनकर्त्यापाशीं (आपल्या-मागील अपराधाची) क्षमा मागा व मग (पुढच्याविषयीं) त्याच्या सेवेंत पश्चात्ताप करा कीं तो तुम्हांवर (त्याच्या मोबदला) रेलचेल वृष्टी करणारें आभाळ पाठवील व तुमच्या बळांत आणखी बळाची भर घालून तें वाढवील; आणि दंडेली करून तुह्मीं (त्याच्याकडून) तोंड फिरवूं नका. ५२. ते म्हणूं लागले, हे 'हूदा'! तूं आह्मांपाशीं एखादें प्रमाण घेऊन तर आला नाहींस; आणि तुझ्या सांगण्यानें आह्मीं आपल्या उपास्यांना सोडणार नाहीं; व आह्मीं तुझा विश्वासहि धरणार नाहीं. ५३. आह्मीं तर केवळ हेंच म्हणूं कीं तुला आमच्या उपास्य (देवतां)पैकीं कोणीतरी वाईट प्रकारें पछाडिलें आहे (कीं तूं अशा बहकल्या बहकल्या गोष्टी करतोस). 'हूद'नें उत्तर दिलें कीं मी परमेश्वराला साक्षी ठेवितों व तुह्मींहि साक्षी असा कीं परमेश्वरा-खेरीज जे तुह्मीं (त्याचे इतर) सरकतदार ठरवितां मी तर त्यांपासून (अगदीं) निर्दोष आहें. ५४. तर तुह्मीं सर्व मिळून माझ्याशीं डावपेंच लढवा व मग मला अवकाशहि देऊं नका. ५५. मी तर परमेश्वरा-वरच भरंवसा राखतों (कीं तो) माझाहि पालनकर्ता (होय) व तुमचाहि पालनकर्ता (होय). जितके प्राणी म्हणून आहेत त्या सर्वांची शेंडी तर त्याच्याच हातीं होय. निःसंशय माझा पालनकर्ता (न्यायाचे)

(१) म्हणजे धर्माच्या ज्या मार्गावर परमेश्वर लोकांस चालवूं इच्छितो तोच मार्ग सरळ होय. 'नासिया' म्हणजे कपाळावरचे केंस किंवा जुलुप असा अर्थ आहे. पण मराठी भाषेंत शेंडी या शब्दानें हा अर्थ फार स्पष्ट होतो. म्हणून कोणा एकाचाचे केंस किंवा शेंडी धरणें म्हणजे त्याला आपल्या कबज्यांत ठेवणें असें होतें.

सरळ मार्गावर होय. ५६. या उपरांतहि जर तुह्मीं लोक (त्याचे-कडून) फिरलेले राहाल, तर जो (हुकूम) देऊन मला तुह्मांकडे पाठविलें गेलें आहे तो तर मी तुह्मांस पोंचता करून चुकलों. आणि माझा पालनकर्ता तुमच्याशिवाय इतर लोकांस तुमच्या जागीं आणून ठेवील; आणि तुह्मीं त्याचें कांहींच बिघडवूं शकणार नाहीं. निःसंशय माझा पालनकर्ता दरेक वस्तूचा रक्षणकर्ता होय. ५७. आणि जेव्हां आमचा (शिक्षेचा) हुकूम येऊन पोहोंचला, तेव्हां आह्मीं आपल्या मेहरबानीनें 'हूद'ला व ज्या लोकांनीं त्याच्याबरोबर विश्वास धरिला होता त्यांजला सुटका दिली, व त्या (सर्वां)ना आम्हीं सक्त शिक्षेंतून वांचविलें. ५८. आणि (हे पैगंबरा!) हे (जे उजाड झालेले देश तूं पाहतोस तेच) 'आद' (जातीचे लोक) होत, कीं त्यांनीं आपल्या पालनकर्त्याच्या हुकमांस नाकारिलें व त्याच्या पैगंबरांचा आज्ञाभंग केला; आणि दरेक शिरजोर व दंडेल अशा (ईश्वररिपू)च्या हुकमा-वर चालत राहिले. ५९. आणि ह्या जगांतहि शाप त्यांच्या पाठीस लावून दिला गेला व (तसाच) पुनरुत्थानाचे दिवशींहि. पाहा! 'आद' (चे लोक) आपल्या पालनकर्त्यास अनुपकारी झाले; (त्याची त्यांना शिक्षा मिळाली). पाहा! 'आद' जे 'हूद'चे लोक होते ते (ईश्वर सान्निध्या-पासून) दुरावले गेले. ६०. आणि 'समूद'कडे (आम्हीं) त्यांचाच बंधु 'सालेह' यास (पैगंबर करून पाठविलें). तर तो (आपल्या लोकांस) बोलता झाला कीं हे माझ्या बांधवांनों! परमेश्वराचीच उपासना करा; त्याच्याशिवाय तुमचा अन्य कोणी उपास्य नाहीं. त्यानेंच तुम्हांस भूमी(च्या मातीं)तून बनवून उभें केलें व तुम्हांस तींत वसविलें. तर त्याच्याचपाशीं (मागील पापांची) क्षमा मागा व मग (पुढच्याविषयीं) त्याच्या सेवेंत पश्चात्ताप करा. निःसंशय माझा पालनकर्ता (प्रत्येकाचे) जवळ असून, (सर्वांचें) ऐकितो व प्रार्थना) मान्य करितो. ६१. ते म्हणूं लागले, हे 'सालेहा'! ह्याच्या अगोदर तर आह्मां लोकांत तुजकडून (मोठमोठाल्या) आशा

---

(१) म्हणजे तुझी अक्कलहुशारी व तुझे गुण पाहून आह्मीं तुला आपला राजा बनविण्याचा बेत केला होता. तुजकडून आह्मांस मोठ

केल्या जात होत्या (कीं तूं हरेक प्रकारें आमची साथ देशील). तर कां तूं आम्हांस, ज्या(देवतां)स आमचे वाडवडील पूजत आले आहेत त्यांची पूजाअर्चा करण्यापासून मनाई करितोस? आणि ज्या(धर्मा)कडे तूं आम्हांस बोलावितोस आह्मीं तर त्याच्या संबंधानें (मोठ्या) संशयांत (पडलों) आहों (व त्यानें आम्हांस फारच) गोंधळांत घातलें आहे. ६२. ('सालेह्'नें) जबाब दिला कीं हे माझ्या बांधवांनों! बरें, पाहा तर खरें! जर मी आपल्या पालनकर्त्याच्या राजमार्गावर आहें व त्यानें मजवर आपली दया केली आहे; व मग जर मी त्याचा आज्ञाभंग करूं लागेन, तर असा कोण होय कीं जो परमेश्वरापुढें माझ्या मदतीस उभा राहील? तर (अशा गैर समजुतीनें) तुह्मीं (उलटें) माझें आणखी नुकसानच करीत आहां. ६३. आणि हे माझ्या बांधवांनों! ही परमेश्वराची (धाडलेली) सांढणी तुह्मांकरितां (माझ्या पैगंबरीची) एक निशाणी होय; तर तिला (ह्याच स्थितींत) सुटी राहूं द्या, कीं परमेश्वराच्या जमिनींतून (हवें तेथें) चरत फिरेल. आणि तिला कोणा तऱ्हेची इजा पोहोंचवूं नका; नाहीं तर, तुम्हांस त्वरीतच शिक्षा येऊन गांठील. ६४. तर (इतकें बजाविल्याउपरांतहि) लोकांनीं ती (सांढणी) मारून टाकिली. तेव्हां 'सालेह' म्हणाला कीं (बरें) तीन दिवस आपल्या घरांत (आणखी) सुखचैन करून घ्या; (मग तर तुम्हांस शिक्षा मिळेलच;) हा (परमेश्वराचा) वायदा (कधींच) खोटा होणार नाहीं. ६५. मग जेव्हां आमचा (शिक्षेचा) हुकूम येऊन पोहोंचला तेव्हां आम्हीं 'सालेह'ला व ज्या लोकांनीं त्याच्यासंगतीं विश्वास धरिला होता त्यांना आपल्या मेहरबानीनें तारिलें व त्या दिवसाच्या फजितीपासून

---

मोठाल्या आशा होत्या त्या सर्व, धर्म संबंधांत तुझें वाडवडिलांच्या विरुद्ध मत झालेलें पाहून लयास गेल्या. ज्या लोकांस आपल्या कुलाचाराचा अभिमान वाटतो ते आपली चूक पाहूनहि त्याचा त्याग करण्यास मागें पुढें पाहातात ह्मणूनच सद्धर्माकडून ते भाग्यहीन राहतात. हीच स्थिति हजरत सालेह पैगंबराच्या लोकांची झाली.

(वांचवून घेतलें. हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता तोच निःसंशय बलवान् (व) सामर्थ्यवान् होय. ६६. आणि ज्या लोकांनीं अनर्थ केला होता त्यांना (मोठ्या जोराच्या) गर्जनेनें येऊन गांठिलें, तेव्हां ते आपल्या घरांत (बसल्या) बसल्याच गतप्राण झाले. ६७. (आणि असे नष्ट झाले कीं) जणूं ते त्यांत (कधीं) वसलेच नव्हते. पाहा! 'समूद'नीं आपल्या पालनकर्त्याचें मानिलें नाहीं (व ते आपल्या शिक्षेस पोहोंचले). पाहा! 'समूद' (ईश्वरसान्निध्यापासून) दुरावले गेले. ६८. आणि (जेव्हां) आमचे दूत 'इब्राहिमा'पाशीं शुभवर्तमान घेऊन आले (तेव्हां) त्यांनीं ('इब्राहिमा'स) सलाम केला. 'इब्राहिमा'नें परत सलाम केला. मग 'इब्राहिमा'नें (कांहींच) विलंब न लावतां, एक वासरूं (म्हणजे त्याचें) भाजलेलें (मांस त्यांच्यापुढें) आणून हजर केलें. ६९. मग जेव्हां त्यानें पाहिलें कीं त्यांचे हात भोजनाकडे उठतच नाहींत, तेव्हां तो त्यांना अपरिचित समजला व मनाच्या मनांतच त्यांच्याशीं भ्याला. ते बोलले (कीं तूं कोणा तऱ्हेची) भीति बाळगूं नकोस; आम्हीं तर (देवदूत आहों व) 'लूता'चे लोकांकडे पाठविले गेलों आहों; (कीं त्यांना त्यांच्या दुष्ट वासनांचें शासन द्यावें). ७०. आणि (ह्या संभाषणाचे वेळीं) 'इब्राहिमा'ची पत्नि ('सारा' ही)हि उभी होती, तिला (दुतांच्या सांत्वन करण्यामुळें) हांसूं आलें. तेव्हां आम्हीं तिला (ह्याच दूतांद्वारें प्रथम) 'इस्हाक' (हा पुत्र) आणि 'इस्हाका'नंतर 'याकूब' (हा प्रपौत्र) यां(च्या जन्मण्या)चें शुभवर्तमान दिलें. ७१. ती म्हणूं लागली, हाय हाय! माझें दुर्दैव! कां (या वयांत) मी पुत्र प्रसवेन? आणि मी तर वृद्ध

(१) ठगांचा दस्तुर असा ऐकिला जातो कीं ते ज्यांची मीठभाकर खातात त्यांच्याशीं दगा करीत नाहींत; आणि ज्यांच्याशीं त्यांना दगा करावयाचा असतो त्यांच्या घरीं घांसहि घेत नाहींत. हजरत इब्राहिमास यांच्या न खाण्यानें अशी शंका उत्पन्न झाली असावी. एतदर्थ दूतांनीं इब्राहिमाचें सांत्वन केलें व सांगितलें कीं आमच्या न खाण्याचें कारण हें आहे कीं आह्मीं ऊर्ध्वलोकीं राहतों व आह्मीं देवदूत आहों, आह्मीं कांहींच खात पीत नसतों. परमेश्वराची आज्ञा पालन करणें हेंच आमचें खाणें पिणें.

आहें; आणि माझा हा पतिहि वयातीत आहे. अशांत (आमच्या घरीं पुत्र येणें) ही (फारच) आश्चर्यकारक गोष्ट होय! ७२. देवदूत (तिला) म्हणाले, कां तुला परमेश्वराचे हुकमापासून (या गोष्टीचें कांहीं) आश्चर्य वाटतें? हे (पैगंबरी) घराण्याचे लोकांनों! तुम्हांवर परमेश्वराची दया व त्याचे आशिर्वाद (नांदत) असोत! निःसंशय परमेश्वर सुस्तुत्य (व आपल्या सेवकांवर) मोठाच (उपकारकर्ता) होय. ७३. मग जेव्हां 'इब्राहिमा'चे मनांतून भीति निघून गेली व त्याला (पुत्राचें) शुभवर्तमानहि मिळालें, तेव्हां तो 'लूता'चे लोकांसंबंधानें आम्हांशीं झगडूं लागला. ७४. निःसंशय, 'इब्राहीम' हा, (फारच) सौम्य, कनवाळू (व प्रत्येक गोष्टींत परमेश्वराकडे) वळणारा असा होता. ७५. (आम्हीं फर्मावलें कीं) हे 'इब्राहिमा'! तूं हा (विचार) सोडून दे; तुझ्या पालनकर्त्याचा (जो) हुकूम (होता तो) येऊन पोहोंचला. आणि त्या लोकांवर अशी शिक्षा येईल कीं जी (कांहीं झालें तरी) टळूं शकणार नाहीं. ७६. आणि जेव्हां आमचे दूत, 'लूता'पाशीं आले, तेव्हां त्यांचें (येणें) त्याला वाईट[1] वाटलें व त्यांच्या (येण्या)मुळें तो मनांत संकुचित झाला; आणि म्हणूं लागला कीं हा (आजचा दिवस) तर महा संकटाचा दिवस होय. ७७. आणि 'लूता'चे लोक (मुलांचें येणें ऐकून दुष्ट वासनेनें) धांवा घालीत घालीत 'लूता'जवळ आले. आणि हे लोक पहिल्यापासूनच वाईट कर्में तर करीतच होते. 'लूता'(-नें या लोकांस येतांना पाहिलें तेव्हां तो) म्हणूं लागला कीं हे माझ्या लोकांनों! ह्या माझ्या मुली (हजर) आहेत; (त्यांशीं तुम्हीं लग्न करून घ्या;) ह्या तुम्हांकरितां (विहित व) शुद्धतर होत. तथापि (या मुलांकडे ढुंकूनहि पाहूं नका, आणि) परमेश्वराला भ्या व माझ्या पाहुण्यांसंबंधानें मला फजित करूं नका. कां तुम्हांमध्यें कोणीहि भला माणूस नाहीं? ७८. त्यांनीं उत्तर दिलें कीं तुला तर ठाऊकच आहे कीं आम्हांस तुझ्या मुलींशीं कसलेंच कर्तव्य नाहीं. आणि आम्हीं जो इरादा राखतां तोहि तूं खूप

(१) लूताला वाईट वाटण्याचें कारण हें कीं हे दूत सुंदर सुंदर मुलांचें स्वरूप धारण करून आले होते व तेथील लोक स्त्रियांपेक्षां लहान लहान मुलांवरच अधिक तुटून पडत असत.

जाणून आहेस. ७९. 'लूत' म्हणाला कीं (आज) मला तुम(च्या सामन्या)ची ताकद असती अगर मी कोणा जबरदस्त आश्रय-स्तंभाचा आसरा धरला असता तर (बरें होतें)! ८०. (ते दूत) बोलले कीं हे 'लूता'! आम्हीं तुझ्या पालनकर्त्याचे पाठविलेले आहोंत; हे लोक कधींहि तुजपर्यंत पोहोंचू शकणार नाहींत, तर तूं आपल्या मुलांबाळांस घेऊन कांहीं रात्र राहतांच निघून जा; व (मग) तुम्हांपैकीं कोणी (इकडे मागें) वळूनहि पाहूं नये. परंतु तुझी बायको (कीं ती मागें पाहिल्या वांचून राहणार नाहीं; आणि) जी (शिक्षा) त्या लोकांवर ओढवेल ती तिच्यावरहि अवश्य ओढवेल. त्यां(च्या शिक्षे)ची नियमित वेळ सकाळ होय. तर कां सकाळ जवळ नव्हे? ८१. मग जेव्हां आमचा (शिक्षेचा हुकूम) येऊन पोहोंचला, तेव्हां (हे पैगंबरा!) आम्हीं (उलथून) त्या (वस्ती)च्या वरच्या भागाला तिचा खालचा भाग करून टाकिला आणि (वरून) तिच्यावर थरावर थर जमलेल्या कंकर-मातीच्या भाजीव दगडांचा वर्षाव केला. ८२. (त्या दगडांवर) तुझ्या पालनकर्त्यासमीप खूण केलेली होती (कीं हे या लोकांवर वर्षतील); आणि ही (जागा या) जालिमां (म्हणजे मक्केकर नास्तिकां)-पासून (अशी कांहीं) दूरहि नाहीं. (तर पाहिजे आहे कीं हिच्याच स्थित्यंतरापासून त्यांनीं धडा घ्यावा). ८३. आणि 'मद्यन'कडे (आम्हीं) त्यांचा बंधु 'शोऐब' यास (पैगंबर करून पाठविलें). त्यानें (त्यांना) सांगितलें कीं हे बांधवांनों! परमेश्वराचीच उपासना करा; त्याच्याशिवाय तुमचा अन्य कोणी उपास्य नाहीं. आणि तुम्हीं माप व तोल यांत कमी करूं नका. मी तुम्हांस सुखी स्थितींत पाहतों. (म्हणून मापातोलांत कमी करण्याची काय जरूरी आहे?) आणि (यावरहि या कृत्यांपासून माघार न घ्याल तर) मला तुमच्या-संबंधानें अशा एका दिवसाच्या शिक्षेचा अंदेशा वाटतो कीं जो (तुम्हां सर्वांस) येऊन घेरील. ८४. आणि हे बांधवांनों! माप व तोल यथान्याय भरपूर देत जा व लोकांस त्यांच्या वस्तु कमी देत जाऊं नका; आणि पृथ्वींत नासाडी माजवीत फिरूं नका. ८५. जर तुम्हीं विश्वासू आहां, तर परमेश्वराची (दिलेली) जी कांहीं (व्यापारांत)

शिल्लक राहील तीच तुह्मांसाठीं उत्तम होय. आणि मी तुमचा रखवालदार तर नव्हे! (कीं प्रत्येकाचें मापतोल मी पाहत फिरावें). ८६. ते म्हणूं लागले कीं हे 'शोऐबा'! कां तुझी नमाज तुला हें सांगते कीं ज्या (मूर्तीं)स आमचे वाडवडील पूजत आले आहेत त्या आह्मीं सोडून बसाव्या, अगर आपल्या मालांत ज्या तऱ्हे(ची उलाढाल करावया)स आह्मीं इच्छूं तशी न करावी? तर खचित तूंच मात्र (व्यवहारांत) सौम्य (व) भला माणूस (उरला) आहेस! ८७. ('शोऐब'नें) ह्मटलें कीं हे माझा लोकांनों! बरें पाहा तर खरें! जर मी आपल्या पालनकर्त्याच्या राजमार्गावर आहें व तो मला आपल्यातर्फे उत्तम(म्हणजे हक्कहलालाचा)शेर देतो (तर कां हा मार्ग सोडून मी तुह्मांप्रमाणें हरामाची कमाई खात बसूं?) आणि मी हें (मुळींच) इच्छित नाहीं कीं ज्या (कामाच्या करण्या)पासून मी तुह्मांस मनाई करितों, तें मी तुमच्या उलट आपणच करूं लागावें. मी तर माझ्यानें होतां होईल तों (लोकांत व्यवहार्य) सुधारणा इच्छितों, झालें. आणि (ह्या उद्देशांत) माझें सफल होणें तर केवळ परमेश्वराच्याच साह्यानें होऊं शकतें. मी तर त्याच्यावरच भरंवसा राखतों व मी (आपणाला) त्याच्याकडेच वळवितों. ८८. आणि हे बांधवांनों! माझ्याशीं अढी बाळगून तुमच्या हातून कोठें असा अपराध न घडून येवो कीं जसें संकट 'नूहा'चे लोक वा 'हूदा'चे लोक वा 'सालेह'चे लोक यांजवर ओढवून चुकलें आहे, तसलेंच संकट (त्या अपराधाबद्दल) तुह्मांवरहि ओढवावें! आणि 'लूता'चे लोक (ह्मणजे त्यांचीं खिंडारेंहि) तुह्मांपासून (अशी कांहीं) दूर नव्हत. (त्यांना पाहूनच तुह्मीं धडा घेऊं शकतां.) ८९.

(१) त्यांचा मतलब असा होता कीं तुमचा धार्मिकपणा कां ह्याची परवानगी देत नाहीं कीं तुह्मीं आम्हांस आपल्या स्थितीवरच राहूं द्यावें. आणि नमाज धार्मिकपणाचें द्योतक आहे म्हणूनच त्यांनीं नमाजीचा टोमणा दिला. आतांहि अशा प्रसंगीं लोक बोलतात कीं तूंच मोठा धार्मिक व पुण्यशील राहून गेला आहेस!

आणि आपल्या पालनकर्त्यापाशीं (आपल्या मागील पापांची) क्षमा मागा; मग (पुढच्याविषयीं) त्याच्याच सेवेंत पश्चात्ताप करा. निःसंशय माझा पालनकर्ता दयाळू (व) अति प्रेमळ होय. ९०. ते ह्मणूं लागले कीं हे 'शोऐब'! ज्या गोष्टी तूं बोलतोस त्यांतून बहुतेक तर आमच्या समजुतींत येत नाहींत; आणि (शिवाय) आम्हीं तुला आपल्या(लोकां)त (फारच) दुर्बल पाहतों. आणि जर तुझे भाऊबंद नसते तर आम्हीं तुला (केव्हांचाच) धोंडमार करून चुकलों असतों. आणि (भाऊबंदां-शिवाय) आह्मांवर (कोणाहि तऱ्हेचा) तुझा दाब तर नाहींच. ९१. ('शोऐब'ने) उत्तर दिलें कीं हे बांधवांनों! कां परमेश्वराहूनहि जास्त तुह्मांवर माझ्या भाऊबंदांचा दाब झाला? आणि तुम्हीं (आपल्या धारणेंत) परमेश्वराला आपल्या पाठीमागें टाकून दिलेंत! निःसंशय जें कांहीं तुम्हीं करीतां तें (सर्व) माझ्या पालनकर्त्याच्या (ज्ञान-)व्याप्तींत होय. ९२. आणि हे बांधवांनों! तुह्मीं आपल्या जागीं कर्म आचरा; मी (आपल्या जागीं) कर्म आचरितों. पुढें तुह्मांला ठाऊक होऊन जाईल कीं कोणाला अशी शिक्षा सादर होते कीं जी त्याला (सर्वांच्या नजरेंत) फजीत करून टाकील, आणि कोण लबाड होय. आणि (त्या वेळेची तुम्हींहि) वाट पाहत राहा; मीहि तुह्मांबरोबर वाट पाहतों. ९३. आणि जेव्हां आमचा (शिक्षेचा) हुकूम येऊन पोहोंचला, तेव्हां आह्मीं आपल्या मेहरबानीनें 'शोऐब'ला व ज्या लोकांनीं त्याच्या संगतीं विश्वास धरिला होता त्यांना वांचवून घेतलें. आणि जे लोक आज्ञाभंग करीत असत, त्यांना (भयंकर) गर्जनेनें येऊन गांठिलें; तर ते आपल्या घरांत (जसे बसले होते तसेच) बसलेचे बसलेच राहिले. ९४. (आणि असे नष्ट झाले कीं) जणूं त्यांत ते (कधीं) बसलेच नव्हते. (लोकांनों!) पाहा! जसे 'समूद' (ईश्वर-सान्निध्यापासून) दुरावले होते तसेच 'मदयन' (वासीहि) दुरावले गेले. ९५. आणि आह्मीं 'मूसा'ला 'फिरऔन' व त्याच्या दरबाऱ्यांकडे आपल्या निशाण्या व स्पष्ट प्रमाण यांसहित (पैगंबर करून) पाठविलें. तथापि लोक 'फिरऔना'चे हुकमावर

चालले; आणि 'फिरऔना'चा हुकूम कांहीं सन्मार्गाचा (हुकूम) तर नव्हताच. ९६–९७. पुनरुत्थानाचे दिवशीं, तो आपल्या लोकांच्या पुढें पुढें राहील व त्यांना नरकाग्नींत नेऊन दाखल करील. आणि (फारच) वाईट घाट होय कीं ज्यावर (हे लोक जाऊन) उतरले. ९८. ह्या (जगां)तहि त्यांच्या पाठीस शाप लावून दिला गेला व पुनरुत्थानाच्या दिवशींहि; (फारच) वाईट इनाम होय कीं जें (त्यांस) दिलें गेलें. ९९. (हे पैगंबरा!) हे (कित्येक) वस्त्यांचे वृत्तांत होत कीं ज्यांचें आह्मीं तुला निवेदन करितों. त्यांतून (कित्येक तर आजतागाईत) काइम होत आणि (कित्येक अगदीं) जमिनदोस्त (होऊन गेल्या). १००. आणि आम्हीं या लोकांवर (कोणाहि तऱ्हेचा) जुलूम केला नाहीं; परंतु त्यांनीं (आमचा आज्ञाभंग करून) आपणच आपणावर जुलूम केला. तर (हे पैगंबरा!) जेव्हां तुझ्या पालनकर्त्याचा (शिक्षेचा) हुकूम आला, तेव्हां परमेश्वराखेरीज ज्या उपास्य देवतांचा ते लोक (प्रसंग पडल्यास) धांवा करीत होते (आतां) ते त्यांच्या कांहींच कामा आले नाहींत. तर ते (उलट) आणखी त्यांच्या विध्वंसास कारणीभूत झाले, (कीं त्यांच्याच उपासनेमुळें त्यांना शिक्षा भोगावी लागली.) १०१. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां वस्त्यांचे लोक अनर्थ करूं लागतात व तुझा पालनकर्ता त्यांना (शिक्षेंत) पकडतो, तेव्हां त्याची पकड अशीच होत असते. निःसंशय त्याची पकड (बहु) दुःखद व सक्त होय. १०२. ह्या (वृत्तांतां)त जो कोणी परलोकींच्या शिक्षेचें भय बाळगितो, त्याच्यासाठीं एक धडा होय. हा (पुनरुत्थानाचा) असा एक दिवस होईल कीं ज्याच्यासाठीं (सर्व) लोक गोळा केले जातील; आणि हा असा दिवस होईल कीं जेव्हां (सर्व आमच्या हुजूरांत) हजर केले जातील. १०३. आणि आह्मीं केवळ एका नेमक्या काळापर्यंत त्यास (कोणा प्रयोजनामुळें) दिवसगतीवर टाकीत राहिलों आहों. १०४. जेव्हां तो दिवस येऊन पोहोंचेल, तेव्हां (भयामुळें) ईश्वराज्ञेवांचून कोणी मनुष्य चकार शब्दहि काढूं शकणार नाहीं. मग (त्यावेळीं लोक दोन प्रकारचे असतील) त्यांतून

कित्येक दुर्दैवी व कित्येक सुदैवी. १०५. तर जे दुर्दैवी होत ते नरकाग्नींत असतील (व) तेथें त्यांना ओरडाओरड व रडारड (लागलेली) असेल. १०६. (आणि) जोंपर्यंत आकाश व पृथ्वी काइम होत तोंपर्यंत ते सदासर्वदा त्यांतच राहतील; पण (हे पैगंबरा!) ज्याला तुझा पालनकर्ता (तारण देऊं) इच्छील (तो वांचेल). निःसंशय तुझा पालनकर्ता जें योजितो तें तो हटकून करितोच. १०७. आणि जे लोक सुदैवी होत ते स्वर्गांत असतील; आणि जोंपर्यंत आकाश व पृथ्वी काइम होत तोंपर्यंत बराबर त्यांतच राहतील. पण (हे पैगंबरा!) ज्याला तुझा पालनकर्ता इच्छील त्याला (तो शासन देऊन उशिरानें स्वर्गांत दाखल करील. हा स्वर्ग परमेश्वराची) एक देणगी होय कीं जी कधींच खुंटत नाहीं. १०८. तर (हे पैगंबरा!) हे (मूर्तिपूजक) ज्या (मूर्तीं)ची पूजाअर्चा करितात त्यांच्यासंबंधानें तूं कोणाहि तऱ्हेच्या संशयांत पडूं नकोस. जशी पूजाअर्चा (अविचारीपणानें यांच्या)पूर्वी यांचे वाडवडील करीत आले आहेत तशीच पूजाअर्चा केवळ (अविचारीपणानें) हे लोकहि कारि-

---

(१) 'जोंपर्यंत आकाश व पृथ्वी कायम होत' हें आह्मां लोकांच्या भाषासरणीस अनुसरून ह्मटलें आहे; व त्याचा अर्थ चिरकाल असा होतो. पण ब्रह्मज्ञान–शिरोमणी, हजरत शेख अरबी हे ह्मणतात कीं चिरकाल ह्मणजे लांबचा काल वा बहुत काल असा अर्थ होतो.

(२) ह्मणजे मनुष्यस्वभावानुसार, तुह्मांस असा संशय न यावा कीं इतकी बहुत मूर्तीपूजा होत आहे; तर असंख्य लोकांनीं एका असत्य गोष्टीवर मतैक्य कसें केलें असेल! पुढें परमेश्वरानें त्यांना समजावून दिलें कीं हे सर्व लोक मेंढरांच्या चालीप्रमाणें एक दुसऱ्याचें अंधश्रद्धेनें अनुकरण करीत चालले आहेत व त्यांना आतां एक प्रकारें संवय होऊन गेली आहे ह्मणून त्याचें वाईटपण त्यांच्या निदर्शनास येत नाहीं.

तात. आणि आह्मीं (पुनरुत्थानाचे दिवशीं शिक्षेंतून) त्यांचा हिस्सा त्यांना, कमी न करतां भरपूर देऊन टाकूं. १०९. आणि आम्हीं 'मूसा'ला (तौरात) पुस्तक दिलें होतें; पण, त्यांत (लोकांचा) मतभेद होऊं लागला. आणि (हे पैगंबरा! ) जर तुझ्या पालनकर्त्याकडून एक गोष्ट पहिल्यानेंच न निघून चुकली असती (कीं पुनरुत्थानांतच शेवटचा निकाल होईल), तर लोकांच्या दरम्यान (त्यांच्या मतभेदांचा केव्हांचाच) निकाल केला गेला असता. आणि हे लोक (म्हणजे 'मक्के'चे नास्तिकहि) कुराणाकडून अशा संशयांत (पडले) आहेत कीं ज्यानें (त्यांना) गोंधळून सोडलें आहे. ११०. आणि तुझा पालनकर्ता या (सर्वां)स यांच्या कर्मांचा मोबदला अवश्य भरपूर देऊन सोडील. कारण, जसजशीं कर्में हे लोक करितात तो त्यांशीं माहितगार होय. १११. तर (हे पैगंबरा!) जसा तुला हुकूम दिला गेला आहे तसा तूं आणि जे लोक (मूर्तीपूजा व नास्तिकत्व यांजपासून) अनुतप्त होऊन तुझ्या संगतीं (झाले) आहेत ते (सर्व इस्लाम धर्मावर) कायम राहा; आणि मर्यादेचें उल्लंघन करूं नका. निःसंशय तुह्मीं लोक जें कांहींहि करितां, तें परमेश्वर पाहत आहे. ११२. आणि (मुसलमानांनों!) ज्या लोकांनीं (आमचा) आज्ञाभंग केला त्यांच्याकडे झुकूं नका; नाहींतर, नरकाग्नि तुह्मांस येऊन लागेल. आणि परमेश्वराखेरीज तुमचा कोणी पुरस्कर्ता तर नाहींच; तर (आज्ञाभंजकांकडे झुकल्यानें त्याच्याकडूनहि) तुह्मांस मदत दिली जाणार नाहीं. ११३. आणि (हे पैगंबरा!) दिवसाच्या दोन्ही कडेच्या भागांत (ह्मणजे सकाळ सांज) व रात्रीच्या पूर्वार्धांत नमाज पढत जा. कारण, पुण्यकर्में हीं पापकर्मांचें निरसन करतात. जे लोक (परमेश्वरनाम) स्मरण करणारे होत त्यांच्याठायीं हा (आमचा आदेश एक तऱ्हेची) आठवणूक होय. ११४. आणि (हे पैगंबरा! भक्तिपरिश्रम राजीखुषीनें) सहन कर; कां कीं परमेश्वर सुकृत्यें करणारांचें फल वायां जाऊं देत नसतो. ११५. तर ज्या जनता तुह्मांलोकांपूर्वीं होऊन गेल्या आहेत त्यांच्यांत कां (सत्व-) गुणावशेषसंपन्न (असे सृष्टीचे हितेच्छुहि) झाले नाहींत कीं ते (लोकांस) मुलखांत नासधूस करण्याची मनाई करीत? (तर असले

लोक होते खरे) पण थोडे; (व हे तेच लोक होते कीं) ज्यांना आह्मीं (शिक्षेंतून) वांचवून घेतलें. आणि ज्या लोकांनीं आज्ञाभंग केला होता ते तर त्यांना जीं (ऐहिक साधनें) दिलीं गेलीं होतीं त्यांच्याच (क्षणिक गोडीच्या) मागें पडून राहिले; आणि हे लोक कांहीं होतेहि पापाचरणीच. ११६. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता असा (अन्यायी) नव्हे कीं जो (वस्त्यांच्या) वस्त्या जुलमानें नाश करून टाकील; व वास्तविक पाहतां,* तेथील लोक सदाचरणी असतील. ११७. आणि जर तुझा पालनकर्ता इच्छिता, तर तो लोकांस एकाच मताचे करून टाकता. पण लोक (आपसांत) नित्य मतभेद करीतच राहतील. ११८. परंतु ज्याच्यावर तुझा पालनकर्ता दया करील (त्याची गोष्ट वेगळी.) आणि ह्याच्याचकरितां तर त्यानें त्यांस निर्माण केलें आहे. आणि (ह्याच मत-भेदानें तर) तुझ्या पालनकर्त्याचें (तें) वचन पूर्ण होऊन राहील; कीं मी; जिन्नात (-दैवत काय), व मानवजात (काय), सर्वांनीं 'जहन्नम' भरून टाकीन. ११९. आणि (हे पैगंबरा! इतर) पैगंबरांचे जितके म्हणून वृत्तांत आम्हीं तुला निवेदन करितों, त्यांच्यायोगें आह्मीं तुझ्या मनाचें धाडस बांधवितों. आणि ह्या (वृत्तांतांच्या अंतरंगां)त (एक तर जी) सत्य गोष्ट (होती ती) तुला पोहोंचली; आणि (याशिवाय ह्यांत) मुसलमानांसाठीं बोध व स्मृतिहि होय. १२०. आणि (हे पैगंबरा!) जे लोक विश्वास धरीत नाहींत त्यांना तूं सांगून दे कीं तुह्मीं आपल्या जागीं कर्म करा; आह्मीं (मुसलमान अर्थात् आपल्या जागीं) कर्म करितों. १२१. आणि तुह्मींहि (परमेश्वराचे हुकमाची) वाट पाहत राहा; आह्मीं (मुसलमान)हि अर्थातच वाट पाहत आहों. १२२. आणि आकाश व पृथ्वी यांत जें अदृष्ट आहे त्याचें ज्ञान परमेश्वरा-लाच होय. आणि प्रत्येक कामाची मदार अखेर त्याच्यावरच जाऊन ठरते. तर (हे पैगंबरा!) त्याचीच उपासना कर व त्याच्यावरच भरंवसा ठेव. आणि जें कांहीं तुह्मीं लोक करीत आहां, त्यापासून (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता गैरसावध नाहीं. १२३.

# अध्याय १२ वा.

## सूरतो-यूसुफ.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. ह्यांत १११ आयात वा महावाक्यें आहेत. यांत हजरत यूसुफ पैगंबरांचा वृत्तांत आला आहे ह्मणून याचें नांव यूसुफाचें प्रकरण असें पडलें. हजरत मोहंमद पैगंबर साहेब निरक्षर होते व त्यांना पूर्वेतिहासाची कांहींच माहिती नव्हती; ह्मणून त्यांस निरुत्तर करण्यास्तव यहुदी लोकांच्या चिथावणी व सुचनेनें मक्केच्या बड्या बड्या कुरेषी लोकांनीं हजरत मोहंमद पैगंबरांपाशीं अशी मागणी केली कीं याकूब पैगंबराचें कुटुंब सीरीया देश सोडून मिसर (ईजिप्त) मध्यें कसें आलें व हजरत यूसुफाची सांगोपांग कची हकीकत काय आहे हें तुह्मीं आह्मांस सांगा. तेव्हां सर्वज्ञानी परमेश्वरानें हा अध्याय प्रकटिला व आपल्या पैगंबराची सत्यता सिद्ध करून दाखविली.

**परम दयाळू आणि कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

---

**अ. ल. र. (अलेफ-लाम-रा.) हा (अध्याय) सुबोध[१] पुस्तका-(म्हणजे कुराणा)चीं कांहीं महावाक्यें होत. १. आह्मीं या कुराणास अरबी भाषेंत यासाठीं प्रकटिलें आहे कीं तुह्मीं (अरब लोक तुमची ती जन्मभाषा असल्यामुळें बरोबर) समजूं शकाल; (आणि तुह्मांद्वारें इतर मनुष्य लोकहि समजतील). २. (हे पैगंबरा!) आह्मीं**

---

(१) म्हणजे कुराणास सुबोध म्हणण्याचें कारण हें कीं त्यांत दुर्बोध व दुर्ज्ञेय असें कांहींच नाहीं; बुद्धीस पटतील अशाच सर्व गोष्टी त्यांत आहेत.

तुजकडे प्रकटीकरणाद्वारें हा अध्याय पाठवून तुला एक उत्तमांत उत्तम गोष्ट ऐकवितों; आणि तूं या (अध्यायाच्या प्रकट होण्या)पूर्वी (या गोष्टींकडून) खचितच अजाण होतास. ३. एके काळीं 'यूसुफा' नें आपला पिता ('याकूब') यास सांगितलें कीं हे माझ्या पित्या! मी (स्वप्नांत) अकरा नक्षत्रें व सूर्य व चंद्र हीं पाहिलीं आहेत. मी काय पाहतों आहें कीं हीं सर्व मला साष्टांग नमस्कार घालीत आहेत. ४. ('याकूब'नें) म्हटलें कीं माझ्या मुला! कोठें, तूं आपलें स्वप्न आपल्या भावांस सांगून बसूं नकोस, कीं (ते ऐकून घेतील तर) तुला (कोणा ना कोणा तरी आपत्तींत) फसविण्याची खटपट करूं लागतील. यांत शंका नाहीं कीं सैतान माणसाचा धडधडीत शत्रु होय. (तो त्याला बहकविल्याशिवाय राहणार नाहीं.) ५. आणि (जसें तूं स्वप्नांत पाहिलें आहेस) तसेंच (होईल कीं) तुझा पालनकर्ता तुला (माझ्या वंशांतून) निवडून घेईल, व तुला (स्वप्नाच्या) गोष्टींचें भाकीत सांगावयास शिकवील; आणि ज्या-प्रमाणें परमेश्वरानें आपली देणगी पूर्वी तुझे उभयतां वाडवडील 'इब्राहीम' व 'इस्हाक' यांजवर पूर्ण केली होती त्याप्रमाणेंच ती तो तुजवर व 'याकूब'चे(ह्मणजे माझ्या) वंशावर पूर्ण करील. अर्थात् तुझा पालनकर्ता (सर्वांच्या स्थितीशीं) वाकब (व) बुद्धिमान् होय. ६. (हे पैगंबरा! यहुदी लोक) जे (तुझी परिक्षा पाह-ण्यास्तव बनी-इस्राएलांच्या 'ईजिप्त'मध्यें वसण्याचें कारण) विचारि-तात त्यांच्यासाठीं 'यूसुफ' व त्याच्या भावां(च्या अहवालां)त (ईश्वरी सामर्थ्याच्या) अलबत (बऱ्याच) निशाण्या होत. ७. जेव्हां 'यूसुफा'च्या (सावत्र) भावांनीं (आपसांत) म्हटलें कीं अर्थात् आम्हां (सख्या) भावांचा मोठा जथा आहे, असें असूनहि, 'यूसुफ' व त्याचा (सखा) भाऊ ('बिनयामीन') हे आमच्या पित्याला आम्हांपेक्षांहि फारच अधिक प्रीय होत. कांहींच संशय नाहीं कीं

(१) येथें कुराण हा शब्द असून त्याचा अर्थ अध्याय केला आहे; कारण कुराणाच्या कोणत्याहि भागालासुद्धां कुराण म्हणण्याचा प्रघात आहे; व हें संदर्भावरूनच कळतें.

आपला बाप अर्थात् धडधडीत चुकींत आहे. ८. (म्हणून एक तर) 'यूसुफा'ला मारून टाका अगर त्याला कोणा अशा भूप्रदेशांत (नेऊन) फेंकून या कीं आपल्या बापाचा रोख निव्वळ तुह्मांकडेच राहील व त्यानंतर तुह्मीं सदाचरणी लोक होऊन जाल. ९. त्यांच्यांतून एक बोलणारा बोलला कीं 'यूसुफा'ला तुह्मीं जिवें तर मारूं नका; आणि जर तुह्मांस (असेंच) करावयाचें असेल तर त्याला (नेऊन कोणा एखाद्या) खोल कोरड्या विहिरींत टाकून द्या कीं एकादा वाट चालता काफला त्याला काढून नेईल. १०. (तेव्हां सर्वांनीं मिळून 'याकूबा'ला) म्हटलें कीं हे आमच्या पित्या! याचें काय कारण कीं तूं 'यूसुफा'च्यासंबंधांत आमचा विश्वास करीत नाहींस; आणि आह्मीं तर त्याचे (मनापासून) हितचिंतक आहों. ११. (तर) तूं त्याला उद्यां आह्मांबरोबर पाठवून दे कीं तो (रानांतील फळफळादि) खाईल व (जरा) खेळेल रमेल; आणि आह्मीं त्याला सांभाळणारे आहोंच. १२. ('याकूबा'नें) म्हटलें कीं तुमचें याला घेऊन जाणें तर मला क्लेश उत्पन्न करितें व मी या गोष्टीलाहि भितों कीं (असें न व्हावें) कोठें तुह्मीं त्याकडून बेफाम होऊन जाल व त्याला लांडगा खाऊन जाईल. १३. ते म्हणूं लागले कीं जर याला लांडगा खाऊन जाईल व आह्मीं इतके सारे आहोंत; तर अशा स्थितींत आह्मीं (निवळ) नेभळेच ठरून गेलों! १४. अखेर जेव्हां हे लोक ('याकूबा'चे परवानगीनें) 'यूसुफा'ला (आपल्या-बरोबर) घेऊन गेले व सर्वांनीं असें संगनमत केलें कीं याला एखाद्या खोल कोरड्या विहिरींत टाकून द्यावें. (तर जसें ठरविलें होतें तसेंच त्यांनीं केलें.) आणि (त्याचवेळीं) आम्हीं 'यूसुफा'ला आदेश पाठविला कीं (मनांत संकोच बाळगूं नकोस; एक दिवस असा येईल कीं) तूं यांना यांचें हें प्रकरण जतवून सांगशील; व ते (तुला) ओळखणारदेखिल नाहींत. १५. तात्पर्य, हे लोक ('यूसुफा'ला विहिरींत पाडून) कांहीं रात्र पडतां, रडत रडत आपल्या

---

(१) हजरत यूसुफाचे भाऊ रानांत शेळ्यामेंढ्या चारावयास जात असत, तर ह्या निमित्तानें त्यांनीं यूसुफलाहि घेऊन जावयाची इच्छा दर्शविली.

बापापाशीं आले. १६. (आणि) ते ह्मणूं लागले कीं हे आमच्या पित्या! आम्हीं तर जाऊन एकमेकांसंगतीं दौड मारूं लागलों व 'यूसुफा'ला आम्हीं आपल्या सामानाजवळ सोडून दिलें; इतक्यांत लांडगा (येऊन) त्याला खाऊन गेला. आणि जरी आम्हीं खरेंहि बोलत असूं तरी तुला तर आम(च्या बोलण्या)चा विश्वास यावयाचा नाहींच. १७. आणि त्यांनीं 'यूसुफा'चे बंडीवर झूटमूटचें रक्तहि लावून आणिलें. 'याकूब'नें (त्यांचें बोलणें ऐकून व रक्तानें चिंब झालेली बंडी पाहून) ह्मटलें (कीं 'यूसुफा'ला लांडग्यानें तर नाहीं खालें,) किंबहुना, तुह्मीं आपल्या (सचोटी)करितां आपल्या मनानेंच एक गोष्ट रचिली आहे. असो, सबुरी चांगली आहे! आणि तुह्मीं जें निवेदन करितां (त्याचें खरें काय तें उघडकीस यावें) ह्मणून परमेश्वराचेंच साहाय्य मागितलें जातें. १८. आणि (कर्मधर्म संयोगानें) एक काफला (त्या जागीं) येऊन पोहोंचला व त्यांनीं आपल्या पाणक्यास (पाणी आणावयास) पाठविलें. मग त्यानें आपला डोल आंत सोडून दिला तोंच ('यूसुफ' त्यांत येऊन बसला; व बाहेर काढला तेव्हां) त्यानें असे उद्गार काढिले, अहाहा! हा तर मुलगा आहे! आणि काफलेवाल्यांनीं 'यूसुफा'ला व्यापारी जिन्नस ठरवून लपवून ठेविलें. आणि (या लोकांनीं तर जाणिलें कीं कोणालाच खबर नाहीं. परंतु 'यूसुफा'चा अहवाल लपविण्याच्या) ज्या (खटपटी हे लोक) करीत होते त्या परमेश्वर खूप जाणून होता. १९. (इतक्यांत तर भावांना यूसुफा'ची खबर लागली व त्यांनीं त्याला आपला गुलाम ह्मणून विकिलें) आणि काफलेवाल्यांनीं कमी किंमतींत (ह्मणजे) कांहीं मोजीव दिरमांच्या ऐवजीं त्याला विकत घेतलें; व ते 'यूसुफा'चे खरीदारींत (मनांतून) मागेंपुढेंहि करीत होते. २०. आणि

(१) या वाक्याच्या अर्थांत कांहीं मतभेद आहे. कित्येकांनीं असा अर्थ लाविला आहे कीं काफलेवाल्यांनीं यूसुफाला कमी किंमतींत खरेदी केलें; आणि देणेंघेणेंच्या वेळीं त्यांची यूसुफाचे भावांशीं तक्रार झाली होती ह्मणून ते या सौद्याशीं खुष नव्हते. हा अर्थ आह्मींहि

(अखेर) 'मिसर'(च्या लोकां)मधून ('अ॒ज़ीज़े मिसर') ज्यानें 'यूसुफा'ला (काफलेवाल्यांपासून) विकत घेतलें, त्यानें आपली बायको ('जुलेखा') इला सांगितलें कीं याला चांगल्या आदरानें ठेव; नवल नाहीं कीं तो (आपल्या सेवेनें) आम्हांस उपयुक्त होईल. अगर (कदाचित्) त्याला आह्मीं (आपला) पुत्रच करून घेऊं. आणि अशा रीतीनें आह्मीं 'यूसुफा'ची (मिसर) देशांत स्थापना[2] केली. आणि (मूळ) हेतु हा होता कीं आह्मीं त्याला (स्वप्नाच्या) गोष्टींचें भाकीतें[3] सांगावयास शिकवावें. आणि परमेश्वर आपल्या हेतु(च्या अमलांत आणण्या)स समर्थ होय. परंतु बहुतेक लोक (हें गूढ) जाणित नाहींत. २१. आणि जेव्हां 'यूसुफ' आपल्या भरजवानीस पोहोंचला, तेव्हां आम्हीं त्याला शहाणपण दिलें व (तसेंच) ज्ञानहि. आणि आम्हीं सुकृत्यें करणारांस अशाच तऱ्हेनें (त्यांच्या सुकर्मांचा) मोबदला देत असतों. २२. आणि ('जुलेखा') जिच्या घरांत 'यूसुफ' होता तिनें त्याच्यापाशीं मनोकामना (तृप्त) करूं इच्छिली व (घराचे) दरवाजे लावून घेतले; आणि ह्मणाली कीं तुला

---

घेतला आहे. कित्येकांनीं असें ह्मटलें आहे कीं भावांनीं यूसुफाला कमी किंमतींत विकून टाकिलें; कारण त्यांस यूसुफाचें राहून जाणें पसंत नव्हतें. व त्यांनीं त्याला जेमतेम टाळतें केलें अथवा विकलें तर खरें, परंतु त्यांना तें वाईट वाटत होतें; कां कीं अखेर ते भाऊच होते.

(१) अज़ीज़े मिसर म्हणजे हा मिसरदेशाचा जामदार किंवा हुजुरातीचा सरदार होता व त्याचा किताब अज़ीज़ होता. त्याचें नांव कितफीर किंवा इतफीर असें होतें. त्याची बायको जुलेखा-हें तिचें महशूर नांव आहे—इला राईल असेंहि म्हणत.

(२) ह्या अध्यायाचे आरंभीं जो मजकूर होता कीं यहुद्यांनीं हजरत पैगंबर साहेबांपाशीं बनी-इस्राएलांच्या मिसरदेशांत वसण्याचें कारण काय असा प्रश्न केला होता त्याचें हें उत्तर होय.

(३) म्हणजे यूसुफाचें पालनपोषण बादशाही दरबारांत व्हावें व प्रत्येक जातीचें व्यवहार-प्रकरण त्यांच्या नजरे समोर यावें; आणि अशा प्रकारें स्वप्नाचें भाकीत सांगण्याची शक्ति त्यांच्या अंगी प्राप्त व्हावी.

चल ये, (ह्मणत्येंना!) 'यूसुफा'नें ह्मटलें, आहि परमेश्वर! तो (तुझा पति) माझा मालक होय; त्यानें मला चांगल्याप्रकारें ठेविलें आहे. (मी त्याच्या विश्वासाचा घात करूं शकत नाहीं); कारण (असले) निमकहरामांस कधींहि साफल्य होणें नाहीं. २३. आणि ती (स्त्री) तर 'यूसुफा'-बरोबर (मनांत दुष्ट) संकल्प करूनच चुकली होती; आणि 'यूसुफा'ला आपल्या पालनकर्त्या(कड)चें प्रमाण, (कीं तो माझा मालक होय, वगैरे त्यावेळीं) सुचून गेलें नसतें, तर तोहि त्या(स्त्री)बरोबर (मनांत दुष्ट) संकल्प करून बसला असता! अशा तऱ्हेनें (आम्हीं 'यूसुफा'चा पाय डगमगूं दिला नाहीं;) अशासाठीं कीं बद्कर्म व निर्लज्जपणा(-चें काम) त्याच्यापासून दूर राखावें. कांहीं संशय नाहीं कीं तो आमच्या निवडक सेवकांपैकीं होता. २४. आणि उभयतांहि धांवा धांव करीत दरवाज्यावर पोहोंचले; व स्त्रीनें (पळत्याला धरूं इच्छिलें तों) मागून 'यूसुफा'ची बंडी फाडून टाकिली. आणि उभयतांहि स्त्रीच्या धन्याला दरवाज्याजवळ (उभा) पावले. (पहिल्यानेंच पतीचें धोरण बांधावें म्हणून) ती बोलली कीं जो मनुष्य तुझ्या कुटुंबाशीं बद्कर्माचा इरादा करील त्याचें तर केवळ हेंच शासन होय कीं (एक तर) त्याला कैद करून टाकिलें जावें; अगर (आणखी कोणी) दुःखदायक शिक्षा (दिली जावी). २५. 'यूसुफा'नें म्हटलें कीं तिणेंच खुद्द माझ्यापाशीं माझी मागणी केली होती; आणि तिच्याच कुटुंबांतून साक्षी-(परीं एका-)नें अशी साक्ष पटविली कीं 'यूसुफा'ची बंडी (पाहिली जावी); जर (ती) पुढून फाटलेली असेल तर ती (स्त्री) खरें सांगते आणि तो ('यूसुफ') लबाडांपैकीं होय. २६. आणि जर त्याची बंडी मागून फाटलेली असेल तर ती (स्त्री) लबाड बोलते आणि तो ('यूसुफ') खऱ्यापैकीं होय. २७. तर जेव्हां (स्त्रीच्या पतीनें) 'यूसुफा'ची बंडी मागून फाटलेली पाहिली, तेव्हां तो (तिला) ह्मणाला कीं हाहि तुह्मां स्त्रियांचा कावा होय!

---

(१) हजरत पैगंबर साहेबांच्या वचनसंग्रहांत असें सांगितलें कीं हा युक्ति दाखविणारा खुद्द जुलेखाचा मामेभाऊ होता. तो अगदीं तान्हें मूल असून ईश्वरचमत्कृतिनें बोलूं लागला.

निःसंशय तुह्मां स्त्रियांचा कावा मोठाच (एक गजब) असतो. २८. (आणि त्यानें 'यूसुफा'ला उद्देशून सांगितलें कीं) हे 'यूसुफा'! या(गोष्टी)ला जाऊं दे. आणि (अगे स्त्री!) तूं आपल्या अपराधांबद्दल क्षमा माग; कारण, तुझीच सरासरी (त्यांत) चूक होती. २९. आणि शहरांत स्त्रियांनीं चर्चा केली कीं 'अज़ीज़'ची बायको आपल्या गुलामाच्या छंदास लागली आहे; त्यानें तिचें मन प्रेमानें चकनाचूर करून टाकिलें आहे. आमच्या नजरेंत तर खचितच ती बोलून चालून चुकींत आहे. ३०. मग जेव्हां ('अज़ीज़'चे) स्त्रीनें त्या (स्त्रियां)ची चकरमकर ऐकिली तेव्हां तिनें त्यांस (आपल्या येथें) बोलावणें पाठविलें; आणि त्यांच्यासाठीं मेजवानीची तयारी केली व (फळफळादि कापून कापून खाण्याकरतां) एकेक सुरी त्यांच्यांतून प्रत्येकाच्या हवालीं केली. आणि (ऐन वेळेवर 'यूसुफा'ला) तिनें सांगितलें कीं यांच्या-समोर तूं बाहेर ये. मग जेव्हां स्त्रियांनीं 'यूसुफा'ला पाहिलें, तेव्हां त्यांच्यावर 'यूसुफा'(चे सौंदर्या)ची अशी धाक बसली कीं त्यांनीं (बेशुद्ध होऊन फळें कापतां कापतां) आपले हातच कापून घेतले; आणि त्या ह्मणूं लागल्या, हे परमेश्वरा! हा मनुष्य तर नव्हेच! असो नसो, हा कोणी सन्माननीय देवदूत[1] होय. ३१. ('अज़ीज़े मिसर'ची बायको) बोलली कीं बस्स, हाच तर होय कीं ज्याच्या संबंधांत तुह्मीं मला दोषारोप करीत होत्या. आणि खरेंच, मीं त्याच्यापाशीं त्याची मागणी केली; पण, तो (नित्य) बचूनच राहिला. आणि जें (काम करावयास) मी त्याला सांगत आहें, जर तें तो न करील, तर तो अवश्यच बंदीशाळेंत घातला जाईल; आणि जरूर क्षुल्लकहि होईल. ३२. (हें ऐकून) 'यूसुफा'नें (त्याच-वेळीं) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! ज्या(अयोग्य संबंधा)कडे (या स्त्रिया) मला बोलावीत आहेत त्यापेक्षां तर बंदी-शाळेंत राहणें मला जास्त पसंत आहे. आणि जर त्यांच्या कावे-बाजीला तूं मजपासून दूर न सारिलेंस, तर मी त्यांच्याकडे झुकेन व

(१) देवदूतांचें तेजोमय होणें तर माहीतच आहे; ह्मणूनच स्त्रियांनीं हजरत यूसुफ यांजला देवदूत ह्मटलें असावें.

अज्ञान्यांपैकीं (एक अज्ञानी) होऊन जाईन. ३३. तर 'यूसुफा'चे पालनकर्त्यानें त्याचें ऐकून घेतलें व त्याचेपासून स्त्रियांचे कावे दूर हटविले. कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वरच (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ३४. नंतर ('अज़ीज़' व त्याच्या) लोकांनीं ('यूसुफा'च्या निष्कलंकतेच्या) निशाण्या पाहून घेतल्या त्याउपरहि ('जुलेखा'ची मनधरणी करण्यास व 'यूसुफा'ला तिच्या नजरेपासून दूर ठेवण्यासाठीं) त्यांना हेंच (योग्य) दिसून आलें कीं अमुक एक वेळे-पर्यंत (मुद्दाम) त्याला बंदिशाळेंत राखावें. ३५. आणि (दैवानें असें घडून आलें कीं) 'यूसुफा'चे संगतीं दोन तरुण माणसें (आणखीहि) बंदिशाळेंत दाखल झालीं. (त्यांना स्वप्नें पडलीं व 'यूसुफा'ला सत्पुरुष जाणून स्वप्नाचें भाकीत पुसण्याच्या हेतूनें) त्या उभयतांपैकीं एकानें म्हटलें कीं मी आपल्याला (काय) पाहतों आहें कीं (जसें) दारू (बनविण्यासाठीं द्राक्षारस) मी पिळीत आहें. आणि दुसरा म्हणाला कीं मी आपल्याला (काय) पाहतों आहें कीं मी आपल्या डोक्यावर भाकरी उचलल्या आहेत व पाखरें तींतून खाखाऊन जातात. (हे 'यूसुफा'!) तूं आम्हांला (आमच्या) या (स्वप्ना)चें भाकीत सांग; कां कीं तूं आम्हांस परोपकारी माणूस दिसून येतोस. ३६.

(१) त्यांतून एक बादशाहाला प्याला पाजणारा व दुसरा स्वयंपाकी होता. हे दोघेहि बादशाहाला विष घालण्याच्या आरोपांत बंदीखान्यांत घातले गेले होते.

(२) नेहमींपासून लोकांची अशी श्रद्धा होऊन गेलेली आहे कीं स्वप्नाचा अर्थ सांगण्याची योग्यता ज्या मनुष्याच्या अंगीं असते तो अध्या-त्मिक अंतर्शुद्धि प्राप्त होऊन पवित्र व दिव्य लोकांशीं आपला संबंध जुळवून घेतो व ह्यामुळें त्या मनुष्याच्या मुद्रेवर तेजहि येऊन जातें; आणि त्याच्या हातून परोपकाराचीं सत्कार्येंहि घडून येतात. तर असा मनुष्य कोठें छपून राहत नाहीं. उदाहरणार्थ, अबदुल्ला बिन सलाम यांनीं हजरत मोहंमद पैगंबर साहेबांस पाहतांच सांगून दिलें होतें कीं अशा रंगारूपाचा मनुष्य खोटें बोलूं शकत नाहीं. अशाच तऱ्हेनें बंदिवानांचा यूसुफाच्यासंबंधानें

('यूसुफा'नें) जबाब दिला कीं जें जेवण तुह्मांस (आतां बंदिशाळेंत) मिळणार आहे (व त्याचा वेळहि जवळच आहे) तें तुह्मांपावेतों येऊन न पोहोंचेल कीं त्याच्या येण्याच्या आधीं (आधींच तुमच्या) स्वप्नाचें भाकीत मी तुह्मांस सांगेन. माझ्या पालनकर्त्यानें मला जें शिक्षण दिलें आहे त्या गोष्टींपैकींच (स्वप्नाचें भाकीत सांगणें) हेंहि होय. जे लोक परमेश्वरावर विश्वास ठेवीत नाहींत व परलोकासहि नाकारितात, अशा लोकांच्या धर्माचा मी (पहिल्यापासूनच) त्याग करून बसलों आहे. ३७. आणि मी आपले वाडवडील (ह्मणजे) 'इब्राहीम' व 'इस्हाक' व 'याकूब' यांच्या धर्मावर चालत राहिलों आहें. आह्मांस योग्य नव्हे कीं आम्हीं कोणाहि वस्तूस परमेश्वराचा सरकतदार बनवावा. हा (मतवाद[१]) आम्हांवर व लोकांवर परमेश्वराची एक कृपाच होय. परंतु बहुतेक लोक (त्याच्या देणगीचे) आभार मानीत नाहींत. ३८. हे बंदिशाळेच्या मित्रांनों! बरें, (पाहा तर खरें कीं) निरनिराळे उपास्य देव चांगले कीं एकच (व) जबरदस्त असा परमेश्वर? ३९. तुह्मीं लोक परमेश्वराला सोडून, तुह्मीं व तुमच्या वाडवडिलांनीं जीं नावें (आपल्या मनानेंच कल्पून) ठेविलीं आहेत, त्या नांवांचीच आराधना करीत आहां. परमेश्वरानें तर यां(च्या अराध्य होण्याबद्दल)चें कांहींच प्रमाण पाठविलें नाहीं. (सर्व सृष्टींत) हुकमत तर केवळ एका परमेश्वराचीच होय. त्यानें हुकूम दिला आहे कीं तुह्मीं त्याच्याशिवाय अन्य कोणाची

विचार होऊन गेला असेल कीं हा स्वप्नाचें भाकीत बरोबर सांगेल. एके हदिसींत असें आलें आहे कीं पैगंबरीच्या साठ भागांतून एक भाग स्वप्नाचें भाकीत सांगणें हें होय.

(१) हा मतवाद म्हणजे परमेश्वर एकच आहे, त्याचा कोणी प्रतिस्पर्धि व साथी नाहीं असें मत होणें ही पैगंबर लोकांच्याठायीं ईश्वर कृपाच होय हें उघड आहे; कारण, तें त्यांच्या उद्धारास आधार होय. आणि लोकांकारितां मुळीं पैगंबरांचें येणेंच ईश्वर कृपा होय. कां कीं, ते लोकांस ईश्वरैक्य मताचें शिक्षण देतात व मोक्षाच्या मार्गावर त्यांना घेऊन चालतात.

उपासना करूं नये. हाच सरळ धर्म होय; परंतु बहुतेक लोक (हें) जाणीत नाहींत. ४०. हे बंदिशाळेच्या मित्रांनों! तुम्हां उभयतांपैकीं एक (ज्यानें द्राक्षारसाचें पिळणें पाहिलें आहे तो) तर आपल्या धन्या(-चा पाजणारा पूर्ववत् बहाल राहील व त्या-)ला मद्य पाजील. आणि दुसरा (ज्यानें डोक्यावर भाकरी उचललेल्या पाहिल्या आहेत तो) सुळावर दिला जाईल व पांखरें त्याच्या शिरांतून (टोंचटोंचून) खातील. ज्या गोष्टींसंबंधीं तुम्हीं प्रश्न करीत होता ती (ही होय व परमेश्वराकडून) निवाडा होऊन चुकली आहे. ४१. आणि ज्या(इसमा)संबंधीं 'यूसुफा'नें तर्क केला होता कीं त्या उभयतांपैकीं याची सुटका होऊन जाईल, त्याशीं तो म्हणाला कीं तूं आपल्या धन्याहुजूर माझीहि आठवण कर (कीं मी विनाकारण कैदेंत आहें). पण सैतानानें त्याला आपल्या धन्याहुजूर (त्याची) आठवण करण्याचा विसर पाडला; म्हणून 'यूसुफ' कित्येक वर्षें बंदिशाळेंत राहिला. ४२. आणि (ह्याच अवधींत) बादशाहानेंहि (एक स्वप्न पाहिलें व आपल्या मंन्यांपाशींहि त्याचें) वर्णन केलें कीं मी पाहतों आहें (जशा) सात गायी (आहेत) लट्ठ (गुबगुबीत व) त्यांना सात (गायी) पातळ (रोडक्या त्याच) खात चालल्या जात आहेत; आणि (तशींच) सात कणसें हिरवीं (टवटवीत) व दुसरीं (सात आहेत) सुकलेलीं. हे दरबार–मंडळांनों! जर तुह्मांस स्वप्नाचें भाकीत सांगतां येत असेल तर माझ्या (या) स्वप्नाविषयीं माझ्याशीं तुह्मीं आपापलें मत जाहीर करा; (ह्मणजे स्वप्नार्थ सांगा). ४३. त्यांनीं अर्ज केला कीं हीं तर कांहीं गोंधळलेलींशीं स्वप्नें आहेत; आणि (असल्या) स्वप्नांचें भाकीत सांगणें तर आह्मीं जाणत नाहीं. ४४. आणि ('यूसुफा'च्या त्या) दोघां(सोबत्यां)पैकीं जो (चौकशी होऊन अखेर) मुक्त होऊन गेला होता आणि (आतां) त्याला एका मुदती नंतर ('यूसुफा'ची गोष्ट) आठवली, तो (बादशाहा व मंन्यांचें बोलणें ऐकून मध्येंच) बोलूं लागला कीं मला (बंदिशाळेपर्यंत) धाडून द्या, ह्मणजे मी ('यूसुफा'ला पुसून) त्याचें भाकीत तुह्मांस सांगेन. ४५. (एवंच त्याला परवानगी दिली गेली व त्यानें 'यूसुफा'ला जाऊन म्हटलें

कीं) हे 'यूसुफा'! हे (तूं स्वप्नाचें) सत्य (भाकीत) सांगणाऱ्या! बरें या(स्वप्ना)संबंधानें तर तूं आह्मांस आपलें मत सांग कीं सात लठ्ठ गुबगुबीत गायींस सात रोडक्या (गायी) खात चालल्या जात आहेत; आणि सात कणसें हिरवीं (टवटवीत) व दुसरीं (सात कणसें) सुकलेलीं. (ह्याचा जबाब दे) म्हणजे मी (ज्या लोकांकडून आलों आहें, पुन्हां त्याच) लोकांकडे परतून जाईन (आणि तूं सांगितलेला स्वप्नार्थ त्यांना कळवीन) कीं (अशा उल्लेखानें) कदाचित् (तुझा अहवाल) त्यांना माहीत होईल. ४६. ('यूसुफा'नें) सांगितलें, (स्वप्नाचें भाकीत हें होय कीं) तुह्मीं लोक यथासांप्रदाय सात वर्षे शेत पेरीत राहाल, तर जी (फसल) कापाल ती तिच्या कणसांतच राहूं द्या (कीं धान्य गळणार सडणार नाहीं). परंतु थोडेंसें जें तुह्मीं खाण्याच्या कामीं घ्याल (तेवढें तर कणसांतून काढावें लागणारच)४७. मग ह्याच्यानंतर फार सक्त (दुष्काळाचीं) सात (वर्षे) येतील कीं जें कांहीं तुह्मीं (माझ्या कह्याप्रमाणें) पहिल्यानेंच या(वर्षां)साठीं गोळा करून ठेविलें असेल त्या(सर्वां)स हीं खाऊन टाकतील; परंतु थोडेंसे जें तुह्मीं (बियाण्यास) राखून ठेवाल (तेवढेंच लोकांच्या खाण्यांतून वांचेल.) ४८. मग ह्याच्यानंतर एक वर्ष असें येईल कीं ज्यांत (खूप पर्जन्य होऊन) लोकांकरितां वृष्टिहि होईल; आणि (शेती खेरीज) त्या वर्षी (द्राक्षेंहि खूप लागतील व लोक दारूकरितां त्यांतून रसहि) पिळतील. ४९. (तात्पर्य, प्याला पाजणारानें हें सारें बादशहाला जाऊन सांगितलें;) आणि बादशहानें हुकूम दिला कीं 'यूसुफा'ला माझ्या हुजुरांत आणून हजर करा. तर जेव्हां (बादशाहाचा) हरकारा 'यूसुफा'जवळ (हा हुकूम घेऊन) पोहोंचला तेव्हां त्यानें म्हटलें कीं तूं आपल्या सरकारकडे परत जा व त्याला असें पूस कीं ज्या(स्त्रियां)नीं (मला पाहून) आपापले हात कापून घेतले होते त्या स्त्रियांची (खरी) हकीकत कोणती? (त्या माझ्या नादीं लागल्या होत्या कीं मी त्यांच्या नादीं लागलों होतों?) निःसंशय या स्त्रियांच्या काव्यास माझा पालनकर्ताच खूप जाणतो. ५०. (सारांश, बादशहानें त्या स्त्रियांस बोलावून) पुसलें कीं ज्या वेळीं तुह्मीं 'यूसुफा'पाशीं त्याची मागणी

केली होती त्या वेळीं तुमची काय गत (झाली) होती? त्या म्हणाल्या कीं परमेश्वर सुवंद्य असो! आम्हीं तर 'यूसुफा'मध्यें कांहींच वाईट जाणिलें नाहीं. (यावर) 'अज़ीज़'ची बायको बोलूं लागली कीं आतां तर (जी) सत्य गोष्ट (होती ती सर्वांस) जाहीर होऊनच गेली. (खरी हकीकत ही होय कीं) मीच 'यूसुफा'पाशीं त्याची मागणी केली होती; आणि 'यूसुफ'(नें जो आपला निर्दोषपणा जाहिर केला तर तो) अगदींच खऱ्यांपैकीं होय. ५१. (ही हकीकत हरकाऱ्यानें 'यूसुफा'ला जाऊन सांगितली, तेव्हां 'यूसुफ' म्हणाला कीं) ही (केव्हांची दाबून दडपून ठेवलेली गोष्ट मी) यासाठीं (उकरून काढली) कीं 'अज़ीज़ेमिसर'ला पक्कें माहीत होऊन जावें कीं मी त्याच्या पाठीमागें त्याचा विश्वासघात केला नाहीं; आणि (त्याला) हेंहि (माहीत व्हावें) कीं विश्वासघात करणारांचे प्रपंच परमेश्वर चालूं देत नसतो. ५२.

# पवित्र कुराण

## भाग तेरावा.

### सूरतो-यूसुफ (पुढें चालू).

आणि (एरवीं) मीहि (मनुष्यच आहें,) आपल्या जिवाला म्हणत
नाहीं कीं मी (देवदूतांप्रमाणें) निर्दोष आहें. कारण, (मानवी)
जीव तर (मनुष्यास) दुष्ट वासनांसाठीं (नित्य) प्रवृत्त करीतच राहतो.
परंतु हें कीं माझा पालनकर्ताच ज्याच्यावर दया करील, (त्याची
गोष्ट अलाहिदा). निःसंशय माझा पालनकर्ता क्षमाकर्ता (व) दयाळू
होय. ५३. आणि बादशाहानें फर्माविलें कीं 'यूसुफा'ला माझ्या-
समोर आणून हजर करा; कीं मी त्याला ('अज़ीज़'चे चाकरींतून)
मुक्त करून मुद्दाम आपल्या(कामा)साठीं ठेवून घेईन. मग जेव्हां
त्याचें 'यूसुफा'शीं बोलणें झालें, तेव्हां (बादशहाला 'यूसुफा'ची
योग्यता दिसून आली व तो त्याला) म्हणाला कीं आज(पासून) तूं
आमच्या दरबारीं बहुमान्य व विश्वसनीय आहेस. ५४. ('यूसुफा'नें)
अर्ज केला कीं (जर सरकारनें माझा एवढा बहुमान केला आहे तर)
मला मुलकी खजिन्यांवर नेमावें. कारण, मी (खजिन्यांचा) सांभाळहि
चांगला करूं शकतों; (आणि हिशेब वगैरेंतहि) फार प्रवीण आहें. ५५.

---

(१) हें वाक्य व ह्याच्या मागील वाक्य यांत भाष्यकारांचा मतभेद आहे. कित्येक ह्मणतात कीं हीं वाक्यें यूसुफाचीं असावींत व इतर कित्येक, जे दुष्टवासनांचा मनांत विचार येणेंहि यूसुफासारख्या पैगंबरास संभवीत नाहीं असें प्रतिपादितात ते ह्मणतात कीं हीं वाक्यें अज़ीज़ची स्त्री जुलेखा इचीं असावींत कीं तिणें सर्व दोष आपल्यावर घेतला व यूसुफाला निर्दोष ठरविलें.

(सारांश, 'यूसुफ' राष्ट्रीय खजिन्यांचा अधिकारी नेमिला गेला) आणि अशा प्रकारें आम्हीं 'यूसुफा'ला ('मिसर') देशांत स्थापिलें; कीं त्यानें त्यांत जेथें कोठें पाहिजे असेल तेथें राहावें. आम्हीं ज्याच्यावर इच्छितों त्याच्यावर आपली दया करितों, आणि सुकृत्यें करणाऱ्यांचा मोबदला आह्मीं (ह्या लोकींहि) वांयां जाऊं देत नसतों. ५६. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (परमेश्वराला) भीत राहिले त्यांच्यासाठीं परलोकींचा मोबदला (याहूनहि) उत्तम होय. ५७. आणि ('कनान'च्या सर्व जिल्हेनिहाय दुष्काळ पडला होता ह्मणून) 'यूसुफा'चे (सावत्र) भाऊ (धान्य खरेदीस 'मिसर'मध्यें) आले; आणि आंत 'यूसुफा'जवळ गेले व 'युसुफा'नें त्यांना (पाहतांच) ओळखिलें; आणि त्यांनीं त्याला ओळखिलें नाहीं. ५८. आणि जेव्हां 'यूसुफा'नें भावांचें (धान्य वगैरे) सामान (बांधवून) त्यांच्यासाठीं तयार करविलें तेव्हां तो (त्यांस) म्हणाला कीं (आतां याल तर) तुह्मीं आपल्या बापाकडून (झालेला) आपला भाऊ ('बिन्यामीन,' ज्याला तुम्हीं घरीं सोडून आला आहां) त्याला (बरोबर) घेऊन मजकडे या. कां तुह्मीं पाहत नाहीं कीं मी मापहि पुरें पुरें देतों व (शिवाय) मी सर्वांत उत्तम पाहुणचार करणाराहि आहें. ५९. पण जर तुम्हीं त्याला मजकडे घेऊन न आला, तर तुम्हांस माझ्या येथें कांहीं माप (मिळणार) नाहीं; आणि (तसें असेल तर) तुम्हीं मज जवळ येऊंहि नका. ६०.

---

(१) यूसुफांनीं बादशाहाच्या स्वप्नाचें जें भाकीत सांगितलें होतें, तसेंच घडून आलें; सर्व देशभर दुष्काळ पडला. मिसरमध्यें हजरत यूसुफ यांनीं ही व्यवस्था केली होती कीं दुष्काळासाठीं धान्यसामुग्री करून ठेविली होती. आणि बादशाहाचे वतीनें ते आपल्या इतमामाद्वारें तें विकीत होते. परंतु लोकांस गरजेपेक्षां जास्त धान्य देत नव्हते कीं त्यांनीं कोठें गोळा करून ठेवूं नये अगर व्यापार करूं लागूं नये. ही बातमी सर्वत्र मशहूर झाली. यूसुफाचे भाऊ कनान देशाहून धान्यखरेदीसाठीं मिसरला आले. अशा प्रकारें त्यांना यूसुफाजवळ येणें भाग पडलें. यूसुफानीं त्यांना किती धान्याची जरूरी आहे हें जाणण्यासाठीं

ते म्हणाले कीं आम्हीं (जातांच) त्याच्या बापाला त्याच्यासंबंधानें समजावूं आणि अर्थात आम्हीं (त्याला आणण्याची व्यवस्था) हटकूनच करूं. ६१. आणि 'यूसुफा'नें आपल्या चाकरांस फर्माविलें कीं या लोकांचा पैका (ज्याच्याऐवजीं त्यांनीं धान्य विकत घेतलें आहे तो) यांच्याच गोण्यांत ठेवून द्या कीं जेव्हां हे लोक आपल्या कुटुंबाकडे परतून जातील, तेव्हां ते आपला पैका ओळखतील; नवल नाहीं कीं (लोभांत येऊन) हे लोक पुन्हांहि (धान्य घ्यावयास) येतील. ६२. तर जेव्हां (हे लोक) आपल्या बापाकडे परत गेले तेव्हां ते (त्यास) सांगू लागले कीं हे आमच्या पित्या! (पुढें) आम्हांस माप घालण्याची मनाई केली गेली आहे; तर तूं आमचा भाऊ ('बिन्यामीन') यालाहि आम्हांबरोबर पाठवून दे कीं आह्मीं (पुन्हां धान्याचें) माप आणूं व आम्हीं अवश्य त्याचा सांभाळहि करूं. ६३. (बापानें) म्हटलें कीं मी पूर्वीं जसा याचा भाऊ ('यूसुफ') या संबंधानें तुमचा विश्वास केला होता, केवळ तसाच याच्यासंबंधानेंहि मी तुमचा विश्वास करावा ना? पण परमेश्वर सर्वांत उत्तम (याचा) संरक्षक होय व तो (सर्व) दया करणा-रांत अतिशय दयाळू होय. ६४. आणि जेव्हां या लोकांनीं आपलें सामान उघडलें तेव्हां (काय) पाहतात कीं यांचा पैकाहि यांना परत केला गेला आहे. (पैका पाहून बापास) म्हणूं लागले कीं हे आमच्या पित्या! (आणखी) आम्हांस काय पाहिजे? हा आमचा पैका सुद्धांहि तर आम्हांस परत केला गेला! (आतां आम्हांस परवानगी दे कीं 'बिन्यामीन' यास संगतीं घेऊन जाऊं) आणि आपल्या कुटुंबासाठीं धान्यसामुग्री आणूं. आणि आम्हीं आपला भाऊ ('बिन्यामीन') याचा सांभाळ करूं व (त्याच्या हिश्याचें) एक उंट भरून (धान्याचें)

---

त्यांच्या कुटुंबाचा अहवाल विचारला. त्यावरून असें माहीत झालें कीं त्यांचा आणखी एक बिन्यामीन नामक सावत्र भाऊहि आहे व त्याला ते घरीं सोडून आले आहेत. यूसुफ यांनीं मुद्दाम अजाण होऊन एक शंका काढिली कीं भावाचें नांव करून कोठें जास्त घेऊन जात नाहींना? अशा सबबीवर भावांस ताकीद केली कीं पुढल्या खेपेस घरीं ठेवून आलेल्या भावाला अवश्य घेऊन या.

माप आणखीहि आणूं: हें (धान्याचें) माप (जें आम्हीं या वेळीं आणिलें आहे तें) फारच थोडें आहे. ६५. (बापानें) सांगितलें, जोंपर्यंत तुह्मीं परमेश्वराची शपथ वाहून मला पक्कें वचन न द्याल कीं तुह्मीं त्याला अवश्य मजपाशीं (परत) आणून हजर कराल–पण हें कीं तुह्मीं आपणच घेरले जाल–(तर मात्र नाईलाज होय, अशा वचनावाचून तर) मी त्याला तुह्मांसंगतीं कधींच पाठविणार नाहीं. तर जेव्हां त्यांनीं बापाला आपलें पक्कें वचन देऊन टाकिलें, तेव्हां बाप म्हणाला कीं (हें) वचन जें आम्हीं (आपसांत) करीत आहों, परमेश्वर त्याचा साक्षी होय. ६६. आणि (बापानें त्यांना चालते वेळीं असेंहि) उपदेशिलें कीं हे माझ्या मुलांनों! (पाहा!) एकाच दरवाज्यानें दाखल होऊं नका (कीं कोठें तुह्मांस दृष्ट लागून जाईल) तर वेगवेगळाल्या दारांनीं दाखल व्हा. आणि मी (अशा युक्तीनें) परमेश्वराच्या हुकमाला तर तुम्हांवरून किंचितहि टाळूं शकत नाहीं. हुकूम तर केवळ परमेश्वराचाच (चालत) आहे. मी त्याच्यावरच भरंवसा राखिला आहे; आणि सर्व भरंवसा राखणाऱ्यांस पाहिजे आहे कीं त्यांनीं त्याच्यावरच भरंवसा राखावा. ६७. आणि जेव्हां हे लोक ज्या तऱ्हेनें त्यांच्या बापानें त्यांना आज्ञापिलें होतें त्याच तऱ्हेनें ('मिसर'मध्यें) दाखल झाले; तेव्हां ही (पूर्व सूचना) परमेश्वरापुढें त्यांच्या कांहींहि कामा येऊं शकत नव्हती. ती तर 'याकूबा'चे मनांत एक कांक्षा होती कीं ती त्यानें (आपल्यापरी अशा तऱ्हेनें) पूर्ण केली. आणि यांत संशय नाहीं कीं आह्मीं 'याकूबा'ला शिक्षण दिलें होतें ह्मणून, तो खरोखरींच एक ज्ञानी

(१) आत्मशुद्धीमुळें हजरत याकूबचे मनावर पुढील गोष्टींचें प्रतिबिंब पडलें होतें. व त्यांना अशी कांक्षा उत्पन्न झाली होती कीं ह्या प्रवासांतहि त्यांचे मुलगे सुखरूप परत येतील असें दिसत नाहीं. म्हणूनच त्यांनीं बिन्यामीनचें धाडण्यांत मागें पुढें पाहिलें होतें; आणि मुलांस सांगून ठेविलें होतें कीं सारेचे सारे एक संगतीं एका दरवाज्यांतून जाऊं नका. परंतु परमेश्वराचे हुकूमापुढें कोणाचीहि पूर्वसूचना कांहीं चालत नाहीं. तर जें व्हावयाचें होतें तें होऊन गेलें. त्याचें वर्णन पुढें येत आहे.

होता (व सर्वत्र तसे नसतात). परंतु बहुतेक लोक (हा भेद) जाणत नाहींत. ६८. आणि जेव्हां (ह्या लोकांचा पुन्हां) 'युसुफा'जवळ प्रवेश झाला, तेव्हां 'यूसुफा'नें आपला (सखा) भाऊ ('बिन्यामीन') यास आपणापाशीं बसवून घेतलें; (आणि हळूच त्यानें त्यास) सांगितलें कीं मी तुझा भाऊ ('यूसुफ') आहें ह्मणून जी (वाईट वागणूक हे लोक तुझ्यासंगतीं) करीत आले आहेत त्याचें तूं वाईट वाटूं देऊं नकोस. ६९. मग जेव्हां ('यूसुफा'नें) भावांसाठीं (धान्य वगैरे) त्यांचें सामान तयार करवलें, तेव्हां त्यानें आपला भाऊ ('बिन्यामीन') याचे गोणींत (आपला) पाणी प्यावयाचा पेला ठेववून दिला. नंतर (त्याच्याच इषारतीनें) एक ललकारणारा ललकारला कीं हे क़ाफलेवाल्यांनों! असो नसो, तुह्मींच चोर आहां. ७०. हे लोक ललकारणाऱ्याकडे वळून पुसूं लागले कीं (कांहो!) तुमचें काय गमावलें आहे? ७१. ते ह्मणाले, बादशाहाचा पेला आह्मांस (कोठें) सांपडत नाहीं. आणि जो कोणी तो आणून हजर करील त्याला एक उंटभर (धान्य इनाम;) आणि मी त्या (इनामा)चा जामीन आहें. ७२. (हें ऐकून ते लोक) ह्मणूं लागले कीं परमेश्वरा शपथ, तुह्मीं तर जाणतच आहां कीं आम्हीं (तुमच्या) मुलखांत फिसाद करण्याच्या हेतुनें आलों नाहीं; आणि आम्हीं (जातीचे) चोरहि नाहीं. ७३. (पेल्याचा शोध लावणारे) बोलले कीं (बरें) जर तुह्मीं लबाड निघाला तर चोराची काय शिक्षा? ७४. ते ह्मणूं लागले कीं चोराची शिक्षा ही कीं ज्याच्या गोणींत पेला सांपडेल, तो आपणच आपली शिक्षा; (म्हणजे तो पेल्याचे ऐवजीं बादशाहाचा गुलाम होईल). आम्हीं तर (आमच्या येथें) जालिमां(ह्मणजे चोरां)स अशाच तऱ्हेचें शासन देत असतों. ७५.

(१) हजरत यूसुफ ज्या पेल्यानें पाणी पीत असत त्यास धान्य घालण्याचें माप केलें होतें कीं दुष्काळ पिडीत लोकांस मोठ्या आदर सन्मानानें धान्य दिलें जावें. आणि यूसुफ पैगंबर धान्य वाटण्याची कामगिरी बादशाहाच्या वतीनें व त्याच्या नांवानें करीत होते ह्मणून तो पेला बादशाहाचा पेला ह्मणविला जात होता.

अखेर 'यूसुफा'नें आपला भाऊ ('बिन्यामीन') याच्या खुरजीच्या आधींच इतर भावांच्या खुरज्यांची (झडती घेवविण्यास) सुरुवात केली. नंतर (सर्वांचे मागून) आपला भाऊ ('बिन्यामीन') याच्या खुरजींतून पेला काढविला. अशा प्रकारें आम्हीं 'यूसुफा'ला युक्ति दाखविली. (नाहीं तर 'मिसर'च्या) बादशाहाच्या कायद्या अन्वयें तो आपल्या भावास अडकवून ठेवूं शकत नव्हता; पण हें कीं परमेश्वरास मंजूर असतें (तर दुसरी एखादी युक्ति निघते). आम्हीं ज्याचे इच्छितों त्याचे (चांगल्या युक्ति युक्तींत) दर्जे वाढवून देतों. आणि (जगांत) हरेक ज्ञान्यावर बढून चढून (दुसरा) ज्ञानी आहेच. ७६. (जेव्हां 'बिन्यामीन'च्या खुरजींतून पेला निघाला तेव्हां भाऊ) म्हणूं लागले कीं जर यानें चोरी केली असेल तर (नवल नव्हे; ह्याच्या) अगोदर याचा (सखा) भाऊ ('यूसुफ')हि चोरी करून चुकला आहे. त्यावर 'यूसुफ'नें (त्याचें उत्तर देऊं इच्छिलें पण) तें मनांतच गुप्त ठेविलें व त्यांना तें जाहीर होऊं दिलें नाहीं. (आणि बोलला तर एवढेंच) बोलला कीं तुम्हीं (याहूनहि) खराब अवस्थेंत आहां! आणि तुम्हीं जो (त्याच्या भावाच्या चोरीचा अहवाल) सांगतां तो परमेश्वरच खूप जाणत असेल. ७७. (यावर हे लोक)

(१) हजरत यूसुफ पैगंबरांचें त्यांच्या मावशीनें पालनपोषण केलें होतें. मोठे झाल्यावर त्यांना त्यांचे पिता हजरत याकूब यांनीं घेऊं इच्छिलें. मावशीनें आपला एक पटका त्यांच्या कमरेस बांधून त्यांच्यावर चोरीचा आरोप घातला; आणि अशा निमित्तानें तत्कालीन धर्मशास्त्रानुसार त्यांस आपल्या जवळून जाऊं दिलें नाहीं. भावांनीं याच चोरीकडे इशारा केला असेल तर नवल नाहीं. आणि हजरत यूसुफ यांनीं तुम्हीं याहूनहि खराब अवस्थेंत आहां, असें भावांस ह्मटलें त्याचा अर्थ असा दिसतो कीं आपण दोषमुक्त व्हावें ह्मणून आपल्या भावास फसविणें व आपत्तींत घालणें हें फारच बेमुरवतीचें व विश्वासघाताचें द्योतक होय. अशा गोष्टीनें देखिल या भावांची दोषमुक्तताहि पूर्णपणें होत नव्हती. हें संभवीत आहे कीं त्यांनीं आपणच पेला चोरून बिन्यामीनच्या खुरजींत बांधून दिला असेल. यांची एक चोरी पेल्याची येथें पकडली गेली आणि एका चोरीची हे आपणच बातमी

म्हणूं लागले कीं हे 'अज़ीज़ा'! या ('बिन्यामीन')चा बाप फारच वृद्ध (मनुष्य) आहे, (व त्याचें ह्याच्यावर अति प्रेम आहे) तर तूं (कृपा करून) ह्याच्या जागीं आम्हांपैकीं कोणा एकाला (आपल्या सेवेंत) ठेवून घे; आम्हांस तर तूं खरोखरच फार परोपकारी (सरदार) दिसून येतोस. ७८. ('यूसुफा'नें) म्हटलें कीं परमेश्वर (अशा कामापासून) वांचवो; कीं ज्याच्यापाशीं आम्हांस आपलें सामान सांपडलें आहे त्याला सोडून आम्हीं कोणा भलत्याच (मनुष्या)ला पकडून ठेवावें. असें करूं तर आम्हीं (मोठेच) जुलमी ठरलों. ७९. तर जेव्हां (हे लोक) 'यूसुफा'कडून निराश होऊन गेले, (कीं हा मानावयाचा नाहींच), तेव्हां ते (कुजबुज व) सल्लामसलत करण्यासाठीं अलग होऊन बसले. (अखेर) सर्वांत जो मोठा होता, तो म्हणाला कीं (बांधवहो!) कां तुह्मांला ठाऊक नाहीं कीं आपल्या पित्यानें ('बिन्यामीना' संबंधानें) परमेश्वराची शपथ घेऊन आपणाकडून पक्कें वचन घेतलें आहे; आणि (ह्याच्या)पूर्वीं 'यूसुफा'चे संबंधांत तुमच्याकडून एक तकशीर घडूनहि चुकली आहे. तर (बांधवहो!) जोंपर्यंत मला माझा पिता परवानगी (न) देईल अगर (जोंपर्यंत) परमेश्वर माझ्यासाठीं (आणखी कांहीं) हुकूम (न) करील; तोंपर्यंत मी या भूमिवरून कधींच टळणार नाहीं. आणि परमेश्वरच सर्वांत उत्तम हुकूमकर्ता होय. ८०. तर (बांधवहो!) तुम्हीं (सर्व) आपल्या पित्याकडे परत जा व (त्याला जाऊन) सांगा कीं हे आमच्या पित्या! तुझा पुत्र ('बिन्यामीन') यानें चोरी केली. आणि आम्हीं (प्रसंगीं) जें जाणिलें आहे तेवढ्याच गोष्टीची मात्र साक्ष देतों.

---

देतात. तर यावरून असें दिसून येतें कीं हे लोक जातीनें चोरच आहेत व आपणच आपल्या घराण्यास बदलाम करितात.

(१) अज़ीज़ हा मागें सांगितल्याप्रमाणें एक किताब होता. तो येथें आतां हजरत यूसुफाला दिला गेला आहे. कारण इतफिरानंतर या जागीं यांचीच नेमणूक झाली होती. म्हणून हजरत यूसुफाला येथें अज़ीज़ म्हटलें आहे.

आणि (आम्हीं जो 'बिन्यामीन'च्या सांभाळण्याचा विडा उचलला होता, तर त्यासंबंधानें) आम्हीं कांहीं गैबी बातमी तर बाळगीत नव्हतोंच (कीं हा चोरी करील)! ८१. आणि ज्या वस्तींत आम्हीं होतों, त्या वस्ती(म्हणजे 'मिसर'चे लोकां)शीं तूं दरयाफ्त कर; आणि (तसेंच) ज्या काफल्यांत आम्हीं आलों आहों त्यांशींहि (पूस). आणि आम्हीं बिलकुलच खरें सांगतों. ८२. (तर जेव्हां या भावांनीं 'याकूबा'ला ह्या प्रमाणें जाऊन सांगितलें तेव्हां तें ऐकून) तो बोलला (कीं 'बिन्यामीन'नें तर चोरी नाहींच केली,) पण तुम्हीं आपल्या मनानें एक गोष्ट बनवून आणिली आहे. तर (असो,) सबुरी उत्तम होय. (मला तर) आशा आहे कीं परमेश्वर (माझ्या) या सर्व मुलांस मजपाशीं आणून हजर करील. कां कीं, तो (सर्व हकीकत) जाणणारा (व) बुद्धिमान् होय. ८३. आणि 'याकूब' मुलांपासून (उठून) अलग जाऊन बसला व ('यूसुफा'चें स्मरण करून) म्हणूं लागला कीं हाय हाय! 'यूसुफा' करितां हें (केवढें तरी) दुःख! आणि (जरी तो मनाला आवरून घेई तरी पण) दुःखामुळें त्याचे दोन्ही डोळे पांढरे पडून गेले होते; व तो (जिवांतल्या जिवांतच) गम खात होता. ८४. (बापाची ही स्थिति पाहून मुलगे) म्हणूं लागले कीं परमेश्वराशपथ, तूं तर सदा 'यूसुफा'च्याच स्मरणांत लागून राहशील; येथपर्यंत कीं (झुरझुरून एक तर) सक्त आजारी होऊन जाशील किंवा अगदीं नाशच पावून जाशील. ८५. ('याकूबा'नें) उत्तर दिलें (कीं मी तुम्हांस तर कांहीं म्हणत नाहीं;) मी आपला दुःसह क्लेश व आपलें दुःख यांचें गाऱ्हाणें काय तें परमेश्वरापुढेंच करितों. आणि परमेश्वराकडून, ज्या गोष्टी तुम्हांस माहीत नाहींत त्या मला माहीत आहेत. ८६. हे माझ्या मुलांनों! (आणखी एकदां पुन्हां 'मिसर'ला) जा, आणि 'यूसुफ' व त्याच्या भावाचा पत्ता लावा. आणि परमेश्वराच्या दयेकडून निराश होऊं नका. कारण, जे लोक नास्तिक होत तेच मात्र परमेश्वराच्या दयेकडून निराश होतात. ८७. (तात्पर्य, ह्यांच्यांतून कित्येक पुन्हां 'मिसर'ला गेले.) तर जेव्हां (हे लोक तिसऱ्यांदा) 'यूसुफा'पर्यंत पोहोंचले तेव्हां

ते (जाऊन काकळुतीनें) म्हणूं लागले कीं हे 'अज़ीज़ा'! आह्मांला व आमच्या कुटुंबाला (दुष्काळामुळें मोठीच) तकलीफ पोहोंचत आहे; आणि आह्मीं कांहीं थोडीशी पुंजी घेऊन आलों आहों; तर तूं आह्मांस पुरें माप देववीव. आणि (तेंही किंमतीच्या प्रमाणांत नव्हे; तर) तूं आह्मांस धर्मदान कर; कारण, परमेश्वर धर्मदान करणाऱ्यांस (चांगला) मोबदला देतो. ८८. (आतां तर यूसुफा'च्या-नेंहि राहववलें नाहीं व) तो म्हणूं लागला कीं जेव्हां तुह्मीं 'अज्ञानपणावर उतरलां होतां, तेव्हां तुह्मीं 'यूसुफ' व त्याच्या भावाबरोबर जें जें केलें होतें त्याची तुम्हांस कांहीं जाणीवहि आहे काय? ८९. (ह्या बोलण्यानें भावांस जागृत केलें व) ते म्हणूं लागले, कां खरोखरच तूंच 'यूसुफ' आहेस? 'यूसुफ'नें म्हटलें, (होय!) मीच 'यूसुफ' आहें. आणि हा ('बिन्यामीन') माझाच भाऊ आहे. आह्मांवर परमेश्वरानें (मोठीच) कृपा केली. निःसंशय जो (परमेश्वराला) भितो व (संकट आल्यास मुकाट्यानें) सहन करीत राहतो तर परमेश्वर (अशा) सुकृत्य करणाऱ्यांचा मोबदला वांयां जाऊं देत नसतो. ९०. ते बोलले, परमेश्वराशपथ, कांहीं संशय नाहीं कीं तुला परमेश्वरानें आह्मांवर बढती दिली आहे; आणि अर्थात् आह्मींच तकशीरवार होतों. ९१. 'यूसुफ'नें ह्मटलें, आज दिवशीं तुह्मांवर कांहीं दोष नाहीं; (मी क्षमा केली व) परमेश्वरहि तुमचे अपराध क्षमा करील; आणि तो सर्व दयाकर्त्यांत अति दयाळू होय. ९२. (तुमच्या सांगण्यानें माहीत झालें कीं पिताजीचे डोळे निस्तेज झाले आहेत तर,) माझी ही बंडी घेऊन जा व ती माझ्या पित्याच्या तोंडावर टाकून द्या; ह्मणजे तो पाहता होऊन जाईल. आणि आपल्या समग्र कुटुंबास मजपाशीं घेऊन या. ९३. आणि काफला ('मिसर'हून) निघून चाललाच होता कीं त्यांचा पिता ('याकूब') यानें बोलणें सुरू केलें कीं जर मला तुह्मीं साठळलेला न ह्मणाल तर (मी एक गोष्ट सांगतों कीं) मला तर खचितच 'यूसुफ'चा सुवास आढळून येतो. ९४. (तर जे मुलगे 'याकूबा'पाशीं राहून गेले होते) ते ह्मणूं लागले कीं परमेश्वराशपथ, तूं तर (त्याच) आपल्या पुरातन भ्रमांत (पडलेला)

आहेस. ९५. मग जेव्हां ('यूसुफा'च्या सुरक्षितपणाचें) शुभवर्तमान देणारा ('याकूबा'जवळ) येऊन पोहोंचला, तेव्हां त्यानें (येतांच 'यूसुफा'ची) बंडी 'याकूबा'च्या तोंडावर टाकून दिली व तो तेव्हांच पुन्हां (पूर्ववत्) पाहता झाला. (आतां 'याकूब' मुलांस) ह्मणूं लागला कीं, कां मी तुह्मांला सांगत नव्हतों कीं तुह्मांला ज्या (गोष्टी) माहीत नाहींत त्या मला परमेश्वराकडून माहीत आहेत? ९६. ते बोलले, हे आमच्या पित्या! (परमेश्वरापाशीं) आह्मांसाठीं आमच्या अपराधांची क्षमा माग. निःसंशय, आम्हींच गुन्हेगार होतों. ९७. ('याकूब'नें) जबाब दिला कीं मी आपल्या पालनकर्त्यापाशीं (मुद्दाम) एकदां तुमच्या (अपराधांच्या) क्षमेकारितां प्रार्थना करीन. निःसंशय तोच क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ९८. मग जेव्हां (हे लोक सरते शेवटीं) 'यूसुफा'पाशीं गेले, तेव्हां 'यूसुफा'नें आपल्या मातापितरांस (ताजीम देऊन) आपल्या जवळ जागा दिली; आणि (सर्वांस उद्देशून) म्हणाला कीं 'मिसर' (शहरा)मध्यें येऊन दाखल व्हा; (आणि) परमेश्वरानें इच्छिलें तर तुह्मीं (सर्व) बिनधोक (चैनेनें) राहाल. ९९. आणि ('मिसर'च्या रीतिभातीप्रमाणें 'यूसुफ'नें) आपल्या मातापितरांस सिंहासनावर उंच बसविलें आणि सर्व (तत्कालीन पद्धत्यनुसार 'यूसुफा'च्या सन्मानार्थ) त्याच्या पुढें साष्टांग नमस्कार घालीत पालथे पडले. आणि 'यूसुफा'नें (आपलें स्वप्न आठवून आपल्या पित्याशीं) अर्ज केला कीं हे माझ्या पित्या! मी जें पूर्वी स्वप्न पाहिलें होतें त्या माझ्या स्वप्नाचें हें भाकीत होय. माझ्या पालनकर्त्यानें (आज) तें (स्वप्न) खरें करून दाखविलें. आणि (ह्याशिवाय) त्यानें मजवर (आणखीहि मोठमोठे) उपकार केले आहेत; कीं (कोणाच्याहि मध्यस्ती वांचून) त्यानें मला बंदिशाळेंतून काढिलें, आणि (जरी) सैतानानें माझ्यांत व माझ्या भावांत

---

(१) निरनिराळ्या भाष्यांत म्हणजे टीकांत लिहिलें आहे कीं हजरत यूसुफ यांनीं आपल्या बापभावांच्या येण्याची बातमी ऐकून शहराबाहेर येऊन त्यांचें आगतस्वागत केलें. त्या जागीं सर्वांच्या विश्रांतिसाठीं तंबू ठोकविले व तेथेंच सर्वांची भेट झाली. हें त्या प्रसंगाचेंच संभाषण होय.

वांकडें आणिलें होतें (तरी) त्याउपरांत बाहेरून (काळ्या कोसा वरून) त्यानें तुह्मांसर्वांस आणून भेटविलें. निःसंशय माझा पालनकर्ता जें कांहीं इच्छितो तें (फार) सुक्ष्म रीतीनें घडवून [1]आणितो. कारण कीं, तो (हरेक गोष्ट) जाणणारा (व) बुद्धिमान् होय. १००. (ह्या प्रकरणानंतर 'यूसुफा'चें मन विरक्त होऊन गेलें व परमेश्वराच्या भेटीची हौस प्रबळ झाली; तेव्हां त्यानें प्रार्थना केली कीं) हे माझ्या पालनकर्त्या! त्वां (आपल्या कृपेनें) मला राज्यांतूनहि हिस्सा दिलास आणि (योग्य-तेवढें) मला (स्वप्नाच्या) गोष्टीचें भाकीत सांगावयासहि शिकविलेंस. हे आकाशांच्या व पृथ्वीच्या उत्पादका! इहलोक व परलोक या(दोहीं)त तूंच माझा पुरस्कर्ता आहेस. (तर आतां) मला मुसलमान–आज्ञाधारक–ठेवूनच (जगांतून) उचलून घे व मला (आपल्या) सदाचरणी सेवकांत (नेऊन) सामील कर. १०१. (हे पैगंबरा!) ह्या कित्येक गैबी बातम्या होत कीं ज्या आम्हीं तुला प्रकटीकरणाद्वारें कळवितों; (व हें तुझ्या सत्यत्वाचें प्रमाण होय.) नाहीं तर ज्या वेळीं 'युसुफा'च्या भावांनीं आपलें संगनमत करून ठेविलें होतें (कीं 'यूसुफा'ला विहिरींत टाकून द्यावें) आणि ते (त्याचा घात कर-ण्याच्या) युक्त्या लढवीत होते; तेव्हां तूं तर त्यांच्यापाशीं हजर नव्हतास, (कीं ह्या गोष्टी तुला आपोआप माहीत होऊन जात्या!)१०२. असें असतांहि बहुतेक लोक, तूं कितीहि आतुरतेनें इच्छिलेंस तरी, विश्वास धरणारच नाहींत. १०३. आणि वास्तविक पाहतां, आदेश पोहोंच-विण्यासाठीं तूं त्यांच्यापाशीं कांहीं वेतनहि मागत नाहींस. (आणि) कुराण (जें तूं त्यांना वाचून ऐकवितोस तें) आलमदुनियेच्या लोकां-साठीं (सर्वस्वीं) बोधच (बोध) होय. (व तोहि बिनपैशाचा). १०४. आणि आकाश व पृथ्वींत (परमेश्वरी सामर्थ्याच्या अशा) कित्येक निशाण्या होत कीं ज्यांच्याजवळ होऊन लोक जातात येतात व ते त्यांची (कांहीं) पर्वा करीत नाहींत. १०५. आणि बहुतेक लोकांची

(१) हज़रत यूसुफाची ही प्रार्थना ह्या दर्ज्याची आहे कीं त्यांना आपल्या पैगंबरीच्या पुराव्याम पुरेशी आहे.

**स्थिति ही आहे कीं ते परमेश्वरालाहि मानतात, आणि (इतरांस त्याचे) सरकतदारहि बनवीत जातात. १०६. तर कां लोक यापासून निश्चित होऊन गेले आहेत कीं त्यांच्यावर परमेश्वरी शिक्षेची एखादी आपत्ति येऊन पडेल कीं ती (सर्वांस सारखी) घेरून टाकील; अगर एकाएकीं त्यांच्यावर (पुनरुत्थानाची) घटका येऊन जाईल; आणि (हें) त्यांना कळणार देखील नाहीं? १०७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग, माझा मार्ग तर हा होय कीं मी (सर्वांस) परमेश्वराकडे बोलावितों. आणि मी व जे लोक मला अनुसरतात ते (आह्मीं सर्व धर्मांच्या एका) स्पष्ट सिद्धांतावर आहों. आणि परमेश्वर परम पवित्र होय व मी (कोणाला त्याचा) सरकतदार मानणाऱ्यांपैकीं नव्हें. १०८.**

---

(१) 'शिर्क' ह्मणजे कोणालाहि परमेश्वराच्या कोणत्याहि कामांत सरकतदार मानणें अगर त्यास परमेश्वरसमागमें किंवा परमेश्वरतुल्य गणणें, हें फारच अनिष्ट होय. या गोष्टीपासून बहुतच थोडे लोक वांचलेले आहेत. मुसलमानांचें हें कर्तव्यकर्म आहे कीं आमचा इस्लामधर्म आह्मांस याविषयीं जपावयास सांगतो असा केवळ ज्ञानगर्व न वाहतां हमेष त्यांनीं या 'शिर्क'पासून दूर राहण्यास झटावें व एतदर्थ परमेश्वरापाशीं प्रार्थनाहि करीत राहावें; कां कीं एखाद्या चांगल्या गोष्टीचें ज्ञान जर कृतींत येईल तरच त्याचा खरा उपयोग. तर परमेश्वराशिवाय कोणालाहि—कोणालाहि या शब्दांत देवदूत, ऋषि, मुनि, पीर, पैगंबर, जिवंत व मैयत असे सत्पुरुष; आकाशमंडळ व त्यांतील चंद्र, सूर्य व नक्षत्रें; आणि महाभूतें, पाणी, पृथ्वी, वायू व अग्नि वगैरे सर्व सृष्टीचा कोणाहि अपवादावाचून समावेश होतो.—सारांश, परमेश्वराखेरीज कोणाहि वस्तूस व कोणाहि मनुष्यास कोणाहि स्थितींत सर्व सत्ताधारी व कोणाहि गोष्टीचें आदिकारण समजणें हें 'शिर्क' होय. आणि परमेश्वरानें ह्या जगाची रचना कार्यकारणन्यायावर केली आहे म्हणून मनुष्याची फसवणूक होऊन जाते; आणि मागें घडलेल्या गोष्टींस तो पुढें येणाऱ्या गोष्टींचें आदिकारण समजतो. या अर्थी किनिन ज्वरनाशक आहे असें समजणें म्हणजे किनिनमध्यें ताप दूर करण्याची शक्ति व सामर्थ्य आहे म्हणून तें ताप हरण करण्यास आदिकारण आहे असें समजणें हें 'शिर्क' होय. किनिनमध्यें हें सामर्थ्य

आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुझ्यापूर्वींहि वस्त्यांचेच रहिवासी (लोक म्हणजे) पुरुषच (पैगंबर करून) पाठविले होते कीं आम्हीं त्यांजकडे आदेश पाठवीत होतों. तर कां (हे लोक) मुलखांत (कोठें) हिंडले फिरले नाहींत; कीं ते (आपल्या डोळ्यांनीं) पाहून घेते कीं जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत (व ज्यांनीं पैगंबरांस पाखंडी म्हटलें होतें) त्यांचा परिणाम कसा झाला? आणि अर्थात जे लोक (परमेश्वराला) भिऊन चालतात त्यांच्यासाठीं परलोकींचें घर (इहलोकींच्या क्षणभंगुर बरापेक्षां फारच) उत्तम होय. तर (लोकांनो!) कां तुम्हीं (इतकी गोष्टहि) समजत नाहीं? १०९. (प्राचीनकाळचे लोकहि पैगंबरांना पाखंडी म्हणत असत,) येथपर्यंत कीं जेव्हां पैगंबर लोक निराश होऊन गेले व (मानवी प्रवृत्त्यनुरूप) त्यांना अशी कल्पना आली कीं (कोणाहि कारणामुळें कोठें) आपण लबाड तर ठरविले गेलों (नाहींना); तेव्हां (ऐन वेळीं) आमचें साह्य त्यांना येऊन पोहोंचलें; (आणि प्रतिज्ञापू-

---

नव्हे तर परमेश्वरानें त्यांत हा ज्वर नाशक गुण ठेविला आहे. तर मग ज्वर नाशक वस्तुत: परमेश्वराचा हुकूम आहे, क्विनिन नव्हे. परंतु हा फारच सूक्ष्म भेद आहे; व त्याकडे प्रत्येक मनुष्याचें लक्ष राहत नसतें. म्हणूनच हजारों, लाखों परमेश्वराचे सेवक 'शिर्क' करूं लागले आहेत. उदाहरणार्थ:–मूर्तीपूजक, अग्नीउपासक, गुरुपूजक, कबर वा स्मारकोपासक, ताबूतपूजक, सूर्योपासक वगैरे, वगैरे. अशा प्रकारचा 'शिर्क' शिर्केजली म्हणजे उघड शिर्क म्हणविला जातो. आणि यापासून अज्ञानी मुसलमान नसले तरी खास खास समंजस मुसलमान लोक दूर राहतात. परंतु 'शिर्क'चा दुसरा प्रकार म्हटला म्हणजे 'शिर्के खफी' होय. तर जो सर्वकाळ परमेश्वराचें ध्यान करितो व जो त्याच्यावरच भरंवसा राखतो, तोच यापासून दूर राहतो. असे लोक कमी–फारच कमी होत.' हजरत पैगंबर साहेब 'शिर्केखफी'चा एक दृष्टांत देत असत कीं जसें काळोख्या रात्रींत सपाट शिलेवर मुंगी चालते व तिचें चालणें दिसत नाहीं व ऐकूं येत नाहीं तसेंच हें शिर्क न कळतां मनुष्याच्या मनांत प्रवेश करितें.

वंक शिक्षाहि सादर झाली.) तर आम्हीं ज्याला इच्छिलें तो बचावला गेला. आणि गुन्हेगार लोकां(च्या शिरां)वरून तर आमची शिक्षा (कोणाहि प्रकारें) टळूंच शकत नाहीं. ११०. (यांत) शंका नाहीं कीं बुद्धिमानासाठीं या लोकांच्या वृत्तांतांत एक (मोठा) धडा होय. हें (कुराण) एखादी (नवीन) रचलेली गोष्ट तर नव्हेच; तर जीं (दिव्य पुस्तकें) याच्या(प्रकटीकरणा)पूर्वीं (उपलब्ध) होत त्यांचें तें सत्यत्व पटवितें. आणि यांत, जे लोक विश्वास धरितात त्यांच्यासाठीं प्रत्येक गोष्टीचा तपशील, व सद्बोध व दया हीं होत. १११.

---

(१) कुराणांत अशा तऱ्हेचा मजकूर पुष्कळ जागीं आहे, तर पूर्वींचीं पुस्तकें म्हणजे तौरात–जुना करार व इंजील–नवा करार वगैरे, वगैरेचें सत्यत्व म्हणजे त्यांचें एकंदरींत तात्विक दृष्ट्या सत्यत्व हा उद्देश होय. उदाहरणार्थ हजरत मूसा हे ईश्वरप्रेषित पैगंबर होते; आणि कुराण जशी ईश्वरवाणी आहे तशीच तौरात ही ईश्वरवाणी आहे. केवळ एवढ्याच गोष्टीनें हें अवश्यक होत नाहीं कीं आम्हीं मुसलमानांनीं, कुराणाच्या हुकमाअन्वयें पूर्वींच्या पुस्तकांस, आतां जशीं तीं उपलब्ध आहेत तशीं अथपासून इतिपर्यंत कांहीं कमी केल्यावांचून शुद्ध व सुरक्षित आहेत असें मानावें. कुराणांत जेथें जेथें जागजागीं प्राचीन पुस्तकांचें सत्यत्व पटविलें आहे तेथें तेथें जागजागीं या ग्रंथधारी लोकांस त्यांत फेरफार व ढवळाढवळ केल्याबद्दल दोषहि दिला गेला आहे. तथापि जसें संक्षिप्त रीतीनें त्यांचें सत्यत्व आहे तशीच संक्षिप्त रीतीनें मुसलमानांस त्यांबद्दल आदरबुद्धि राखणेंहि उचित होय.

# अध्याय १३ वा.

## सूरतु-रअद.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ४३ महावाक्यें आहेत. याचें नांव 'रअद्' म्हणजे मेघगर्जना असें पडण्याचें कारण हें कीं यांत मेघगर्जना व विद्युलता यांचें विवेचन आलें आहे. दुसरें असें कीं मेघगर्जना व विद्युलता, हीं जवळच येणाऱ्या पावसाचीं आशाजनक चिन्हें असून त्यांत दारूण निराशाहि होण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ कधीं पाऊस पडून पीकपाणी चांगलें येतें आणि कित्येकदां याच मेघगर्जनेनें पर्जन्य पडून अति वृष्टि होते व लोकांचें अनेक प्रकारें नुकसान होऊन दुष्काळाचीहि भीति असते तर या गोष्टी सर्वंकुष ईश्वरेच्छेवर अवलंबून असतात; ह्मणून मनुष्यानें कशालाच फार महत्व न देतां, परमेश्वरावरच विश्वास ठेवावा व त्या परम पवित्र व परम समर्थ अशा जगदीशाच्या आज्ञा व मर्जी यांच्या आधीन होऊन राहावें. यांतच मनुष्यजन्माचें सार्थक्य होय.

**परम दयाळु (आणि) कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

**अलेफ. लाम. मीम. रा. (अ. ल. म. र. हे पैगंबरा!) हीं, पुस्तका-(ह्मणजे कुराणा)चीं कांहीं महा वाक्यें होत. आणि तुझ्या पालनकर्त्या-कडून जें कांहीं तुला सादर झालें आहे तें (सर्वस्वी) सत्य होय. परंतु बहुतेक लोक विश्वास धरीत नाहींत. १. परमेश्वर असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें आकाशांला कोणाहि आधारावांचून उंच बनवून**

उभें केलें, कीं तें तुह्मीं (लोक) पाहतच आहां. नंतर तो महासिंहासनावर विराजमान झाला. आणि त्यानें सूर्य व चंद्र यांस नियंत्रित केलें कीं हरेक नियमित वेळेपावेतों (आपल्या गगनपंथांस लागून) चालला जात आहे. तोच (सर्व जग-)प्रकरणांची व्यवस्था लावितो; (आणि आपल्या सामर्थ्याच्या) निशाण्या तपशीलवार वर्णन करितो कीं (अशा प्रकारें) कदाचित् तुह्मां लोकांस आपल्या पालनकर्त्याशीं भेटण्याचा पक्का विश्वास पटेल. २. आणि तोच (असा परम समर्थ) होय कीं ज्यानें पृथ्वीचा विस्तारै केला व तींत (मोठमोठे) अचल (पर्वत) व नद्या बनवून टाकिल्या; आणि (तशाच) तींत हरतऱ्हेच्या फळफळादिच्या दोन दोन जाति निर्माण केल्या (उदाहरणार्थ गोड व आंबट; आणि तोच) रात्रीला दिवसाचें आवरण करितो. निःसंशय जे लोक मनन चिंतन करितात त्यांच्यासाठीं या गोष्टींत (ईश्वर सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. ३. आणि पृथ्वींत एकमेकांस लागून जवळ जवळ (अनेक) प्रदेश असतात, आणि द्राक्षांच्या बागा व शेत व खजुरीचीं झाडेंहि; (व त्यांत कित्येक मुळांमध्यें) अनेक शाखी असतात व (कित्येक) अनेक शाखी नसतात; वास्तविक पाहतां, या सर्वांस एकच पाणी दिलें जातें; आणि (तरीहि) आह्मीं कित्येकांस कित्येकांवर फळांत श्रेष्ठत्व देत असतों. निःसंशय, जे लोक बुद्धीनें काम घेतात त्यांच्यासाठीं या गोष्टींत (ईश्वर सामर्थ्याच्या

(१) म्हणजे पुनरुत्थान येणें व मेलेल्यांचें फिरून जिवंत केलें जाणें व कर्मांच्या हिशेबतपासणीनंतर इनाम व शासन दिलें जाणें असा भेटीचा अर्थ घ्यावयाचा आहे.

(२) बुद्धि व शास्त्रीय ज्ञान यांच्या प्रभावानें पृथ्वी गोल किंवा वर्तुळाकार आहे ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध होऊन गेली आहे, तीस पृथ्वीचें विस्तीर्ण होणें कांहीं विरोधक नाहीं. पृथ्वीचा विस्तार सर्वांस दिसत आहे. कुराणाच्या उद्देशासाठीं इतकें बस करितें. मूळ हेतु हा कीं लोकांनीं सृष्टीचें अवलोकन करून सृष्टीकर्त्याचें ज्ञान संपादन करावें व त्याला पूर्णपणें ओळखून आपल्या अंतर्यामीं त्याचें प्रेम बाळगावें.

बऱ्याच) निशाण्या होत. ४. आणि (हे पैगंबरा!) जर तुला (जगांत कोणा गोष्टीचें) आश्चर्य वाटेल, तर नास्तिकांचें (हें) बोलणेंहि आश्चर्यकारकच होय कीं जेव्हां आह्मीं (गळून सडून) माती होऊन जाऊं, तेव्हां कां आह्मांला (पुन्हां) नवीन जन्मांत[1] येणें आहे? हेच लोक होत कीं ज्यांनीं आपल्या पालनकर्त्या(च्या सामर्थ्या)स नाकारिलें; आणि हेच लोक होत कीं ज्यांच्या गळयांत (पुनरुत्थानाचे दिवशीं) मानखोडे (पडलेले) असतील. आणि हेच लोक नरकवासी होत; कीं ते नरकांत निरंतर राहतील. ५. आणि (हे पैगंबरा!) बऱ्याच्या अगोदरच हे लोक तुझ्याशीं वाईटाची घाई मचवीत आहेत. आणि वास्तविक ह्यांच्यापूर्वीं (अशा गोष्टीहि घडून आल्या आहेत कीं ज्यांच्या) म्हणी[2] चालल्या येत आहेत. आणि (हे पैगंबरा! यांत) शंका नाहीं कीं तुझा पालनकर्ता, लोकांस त्यांच्या खोडसाळपणा उपरांतहि क्षमाकर्ता होय; आणि (यांतहि) शंका नाहीं कीं तुझा पालनकर्ता शिक्षा देण्यांतहि फार कडक होय. ६. आणि जे लोक (परमेश्वर व पैगंबर यांस) नाकारितात ते (आक्षेपार्थ हेंहि) म्हणतात कीं (हा मनुष्य म्हणजे 'मोहंमद') याजवर त्याच्या पालन-

---

(१) नवीन जन्म ह्मणजे नवीन अवस्था किंवा पुनरुत्थानांत पुन्हा जिवंत होणें हें होय; त्याचा मजकूर कुराणांत जागजागीं पुष्कळ आला आहे. मानखोडे म्हणजे त्यांच्या चुका व दुराग्रह हे होत.

(२) भावार्थ हा कीं पैगंबर साहेबांच्या पैगंबरीचे दोन भाग होते. एक, विश्वासूंना इहपरलोकींच्या फलांची आशा देवविणें व दुसरें नास्तिकांस इहपरलोकींच्या शिक्षेकडून भिवविणें. तर नास्तिकांस पाहिजे होतें कीं विश्वास धरून इहपरलोकींच्या फायद्यांची उमेद राखते. पण त्यांची मति अशी मारली गेली होती कीं परमेश्वर व पैगंबर यांचा आज्ञाभंग करून आपल्यावर शिक्षा ओढवून घेत असत. आणि खरें पाहतां, त्यांनीं मागील लोकांचा नाश झालेला पाहून धडा घेतला पाहिजे होता; कीं शिक्षा येईल तर त्यांनाहि त्यांच्याचसारखें नष्टप्राय करील.

कर्त्याकडून एखादी निशाणी (जी आम्हीं मागतों ती) कां म्हणून उतरली नाहीं? तर (हे पैगंबरा!) तूं तर फक्त (ईश्वरी शिक्षेकडून लोकांस) भिवविणारा आहेस एवढेंच. आणि (तूं कांहीं नवखा पैगंबर नव्हेस;) प्रत्येक राष्ट्राचा एक ना एक सन्मार्गदर्शक (होऊन गेला) आहे (व आपल्या राष्ट्राचा सन्मार्ग दर्शक तूं आहेस.) ७. दरेक मादी जो गर्भ संभवून असते, तो परमेश्वरच जाणतो. आणि (तसेंच हरेक मादीच्या) गर्भाशयांचें घटणें व वाढणेंहि (त्यालाच माहीत असतें). आणि त्याच्यापाशीं दरेक गोष्टीचा अंदाज मुकर होय. ८. (तोच) अदृष्ट व दृष्ट या(दोहों)चा ज्ञाता (होय; सर्वांत) थोर (व) महिमाशाली. ९. तुह्मां लोकांपैकीं जो कोणी, एखादी गोष्ट हळू हळू सांगेल तो व जो कोणी ती मोठ्यानें सांगेल तो, (त्याच्या-समीप हे दोन्ही) सारखेच; आणि (अशाच तऱ्हेनें) जो कोणी तुह्मां-पैकीं रात्रीच्या वेळीं (अंधारांत कोठें) लपून छपून (बसला) असेल तो व जो कोणी दिवसा ढवळ्या (वाटेनें राजरोस) चालला जात असेल तो (त्याच्यासमीप हे सर्व सारखेच). १०. (मनुष्य कोणाहि स्थितींतच असो,) त्याच्या पुढून व त्याच्या मागून पाळीपाळीनें (परमेश्वराचे) दूत मागें लागलेलेच राहतात; व ते ईश्वराज्ञेनें त्याचें संरक्षण करतात. जी (देणगी) कोणा राष्ट्रास (परमेश्वरा

---

(१) म्हणजे चमत्कार तुमच्या अखत्यारांत नाहीं कीं तो जेव्हां पाहिजे तेव्हां व जसा पाहिजे तसा तुम्हीं त्यांना आणून दाखवावा. तर चमत्कारहि परमेश्वराच्या आज्ञेनें होतात. यांत (जी आम्हीं मागतों ती) अशी कैद आम्हीं यासाठीं वाढविली आहे, कीं एरवीं तर कुराण स्वतःच एक मोठा चमत्कार होता व आहे आणि ह्याच्या असतांना दुसरा चमत्कार शोधण्याची जरूरी नव्हती. पण ते लोक कुराणाला केव्हां मानीत होते? ह्याचा, एकविसाव्या भागाच्या आरंभींच्या महावाक्यांमध्यें विशेष खुलासा आहे.

(२) गर्भाशयाचें घटणें व वाढणें म्हणजे मुलांचें वेळीं अवेळीं, पुरें अधुरें व एक किंवा आवळे जावळे जन्मणें वगैरे.

कडून) प्राप्त झाली असेल, जोंपर्यंत तें (राष्ट्र) त्या बद्दलची आपली अंगीं असलेली योग्यता बदलत नाहीं, तोंपर्यंत परमेश्वर त्या(देणगी)त कोणाहि तऱ्हेचा फेरबदल करीत नसतो. आणि जेव्हां परमेश्वर कोणा राष्ट्रावर (त्यांच्या कुकर्मांच्या शासनार्थ) एखादें अनिष्ट आणूं इच्छितो, तेव्हां तें (कोणाच्या टाळल्यानें) टळूं शकत नाहीं; आणि परमेश्वरावांचून त्या लोकांचा कोणी वाली (व मदतगार)हि (उभा राहत) नाहीं. ११. तोच असा (परम समर्थ) होय कीं जो (वीज पडण्यापासून) भिवविण्यास व (तशीच पावसाची) आशा लावून देण्यास (विजेची) चकाकी तुह्मां लोकांस दाखवितो; आणि (पाण्यानें भरलेले) भारी भारी ढग उभारतो. १२. आणि (ढगांची) गर्जना त्याच्या स्तुतिबरोबर (त्याची) पवित्रता[१] गाते व (तसेच) देवदूत त्याच्या भीतीमुळें (त्याच्या स्तुतींतच लागलेले राहतात). (तोच आकाशांतून) विजा पाठवितो. व मग (भूलोकांपैकीं) ज्याच्यावर इच्छितो त्याच्यावर त्या (विजा) पाडून टाकितो. आणि हे (नास्तिक एरवींच परम समर्थ) परमेश्वरासंबंधानें झगडतात; आणि वास्तविक पाहतां त्याचे डाव (असे) सक्त होत (कीं ज्यांची तोड नाहीं). १३. (संकट प्रसंगीं) त्यालाच (बोलावणें) खरें बोलावणें होय. आणि जे लोक त्याच्याशिवाय अन्य कोणा(उपास्यां)स बोलावितात, त्यांचें ते कांहींच ऐकत नाहींत; परंतु (असेंच

---

(१) कुराणांत दुसऱ्या जागीं म्हटलें आहे कीं 'जगांतील एकूणेक वस्तु परमेश्वराच्या स्तुतीबरोबर त्याची पवित्रता गात राहते. म्हणजे प्रत्येक सृष्ट वस्तु आपल्या सृष्टीकर्त्याचें अस्तित्व व त्याचें परमसामर्थ्य यांस प्रत्यक्ष प्रमाण आहे. हीच त्याची स्तुति व पवित्रता होय, आणि सृष्ट पदार्थांत मेघ गर्जनाहि येते. ह्या विश्वाच्या सर्व गोष्टींचें यांत वर्णन आहे म्हणून कुराण हाच एक प्रचंड विश्वग्रंथ आहे. विश्वांत ज्या ज्या गोष्टी दृष्टोत्पत्तीस येतात त्यांचें कुराणांत उत्तम प्रकारें निरूपण केलें आहे. मग त्या गोष्टी सामाजिक, व्यवहारिक, बौद्धिक, नैतिक कोणत्याहि असोत. ही गोष्ट, कुराण विश्वग्रंथ असून ईश्वरप्रणित आहे यास प्रत्यक्ष प्रमाण आहे.

**निष्फळ ऐकणें कीं) जसें एक मनुष्य आपले दोन्ही हात पाण्याकडे पसरतो कीं पाणी (आपोआप) त्याच्या तोंडांत (उडून) यावें; आणि वास्तविक पाहतां, तें (कोणाहि तऱ्हेनें) त्याच्या(तोंडा)-पर्यंत (उडून) यावयाचेंच नाहीं. आणि नास्तिकांची प्रार्थना तर अशीच भटक्या भारीत फिरते (कीं कोणी तिचा ऐकणाराच नाहीं). १४. आणि जितकी ह्मणून सृष्टि आकाश व पृथ्वींत आहे ती (सर्व) अळें बळें परमेश्वरापुढें साष्टांग नमस्कार घालिते; आणि (अशाच तऱ्हेनें) सकाळीं व संध्याकाळीं तिच्या सावल्याहि. १५. (हे पैगंबरा! या लोकांस) पूस कीं आकाश व पृथ्वीचा पालनकर्ता कोण? (हे लोक तर त्याचें काय उत्तर देतील! तूंच त्यांना) सांग कीं (आकाश व पृथ्वीचा पालक) परमेश्वर. (पुन्हां त्यांना) सांग कां तुम्हीं त्याला सोडून (दुसरे दुसरे) पुरस्कर्ते बनवून ठेविले आहेत कीं ज्यांना आपल्या स्वतःच्या नफ्यानुकसानाचीहि सत्ता**

---

(१) भावार्थ हा कीं परमेश्वरानें जे सृष्टिक्रमाचे नियम बांधून दिले आहेत; ते कोणी मानो अगर न मानो याची त्याला कसलीहि पर्वा नाहीं. उदाहरणार्थ, सावल्या, कीं त्या कधीं इकडे व कधीं तिकडे, आपल्या सत्तेनें जमिनीवर पडत नाहींत आणि आपल्या अधिकारानें लांब रुंद व आंखुड होत नाहींत. तर जे लोक ईश्वरास मानीत नाहींत; ते जरी आपल्या तोंडानें नाकारितात तरी परमेश्वराचे आज्ञेबाहेर जाऊं शकत नाहींत. ते परमेश्वराच्या आज्ञेनें निर्माण झाले आहेत, त्याच्याच आज्ञेनें जगतात व मरतीलहि त्याच्याच आज्ञेनें. याच्या उलट हे लोक जगांत दुसरे कांहीं नवीन कायदेकानू व नियम चालवून दाखवितील तर मात्र त्यांचें परमेश्वराच्या आज्ञेस नाकारणें सकारण होईल. एरवीं कोणी कोणा एखाद्या राज्यअंमलाखालीं राहूनहि त्या राजास न मानील तर तें सकारण होणार नाहीं. कारण कीं शिक्का त्याचा चालतो, फौज त्याची, मुलखाचा वसूल तो घेतो, दिवाणी व फौजदारी त्याची व बंदिखानेंहि त्याचेच. अशाच तऱ्हेनें सृष्टींत राहून सृष्टिकर्त्या परमेश्वरास न मानणें म्हणजे एक प्रकारचा हट्ट व प्रत्यक्षास न मानणें असें होतें.

नाहीं? (यांना) सांग कीं बरें, कोठें आंधळा व पाहताहि बरोबर (होऊं शकतो) आहे? अगर कोठें अंधःकार व प्रकाश बरोबर (होऊं शकतो) आहे? अगर या लोकांनीं परमेश्वराचे असे सरकतदार ठरवून ठेविले आहेत कीं त्याच्या सारखीच सृष्टि, त्यांनींहि निर्माण करून ठेविली आहे; आणि आतां त्यांना सृष्टीसंबधानें आभास उत्पन्न होऊन गेला आहे (कीं ती कोणाची निर्मिलेली असावी? हे पैगंबरा! यांना) सांग कीं परमेश्वरच हरेक वस्तुचा निर्मिता होय; आणि तो एकटाच (व अद्वितीय असून) महा प्रबल होय. १६. (त्यानेंच) आकाशांतून पाणी वर्षविलें, मग आपापल्या अंदाजाप्रमाणें ओढे वाहूं लागले; व मग (ओढ्यांत जो पाण्याचा पूर आला त्या) पुरानें (पाण्या)वर जो फेण येऊन गेला होता त्याला उचलून (पुढें) घेतलें. आणि हे जे, (लोक) दागदागिने व इतर साजसरंजामा-(च्या बनाविण्या)च्या उद्देशानें अग्नींत (धातु) तापवितात त्यांतहि अशाच तऱ्हेचा फेण (म्हणजे हीणकस भाग मिळालेला) असतो (आणि तो तावून सुलाखून वेगळा निघून येतो). अशा तऱ्हेनें परमेश्वर सत्य व असत्य यांचे दृष्टांत सांगतो (कीं पाणी तें सत्य व फेण तें असत्य). तर फेण म्हटला म्हणजे फुकटावारीच जातो; आणि (पाणी) जें लोकांस उपयोगीं पडतें तें जमिनींत तुंबून राहतें. (सारांश,) परमेश्वर (लोकांच्या समजण्यासाठीं) अशा तऱ्हेनें दृष्टांत सांगतो. १७. ज्या लोकांनीं आपल्या पालनकर्त्याचा कह्या मानिला त्यांचें कल्याणच (कल्याण) होय. आणि ज्यांनीं त्याचा कह्या मानिला नाहीं (त्यांची पुनरुत्थानाचे दिवशीं अशी दशा होईल कीं) जें कांहीं भूतळावर आहे जर (तें सारेंचें) सारेंच त्यांच्या अखत्यारांत असेल व त्याजबरोबर तेवढेंच आणखीहि, तर हे लोक आपल्या ऐवजीं तें (खुशाल) देऊन टाकतील. हेच लोक होत कीं ज्यांचा वाईट

(१) अविश्वास व नास्तिकपणास अंधःकाराची व विश्वासास प्रकाशाची उपमा दिली गेली आहे; आणि नास्तिकास आंधळा व विश्वासूस पाहता ही उपमा आहे.

तऱ्हेनें (ह्मणजे चोपून) हिशेब घेतला जाईल. आणि त्यांचें (शेवटचें) ठिकाण 'जहन्नम' होय; व तीं (फारच) वाईट शय्या होय. १८. (हे पैगंबरा!) बरें, ज्या(मनुष्या)ला या गोष्टीची जाणीव आहे कीं (कुराण) जें तुझ्या पालनकर्त्याकडून तुला प्रकट झालें आहे तें सत्य होय, तर कां हा (मनुष्य), जो कोणी आंधळा आहे (व ज्याला इतकी स्पष्ट गोष्टहि कळत नाहीं) त्याच्या सारखाच (हतभाग्य राहूं शकतो) आहे? जे लोक अक्कलवान होत तेच काय ते (कुराणा-पासून) बोध घेतात. १९. (हे) असे लोक (होत) कीं जे परमेश्वराशीं (त्यांनीं भक्त होण्याचा) जो करार (केला आहे,) तो पूर्ण करतात व (आपलें) करारबंधन मोडीत नाहींत. २०. आणि (तसेंच हे) असे लोक (होत) कीं जे परमेश्वरानें (त्यांना) ज्या-(परस्पर संबंधा)च्या जोडून राखण्याची आज्ञा केली आहे तो जोडून राखतात, व आपल्या पालनकर्त्याचें भय बाळगितात आणि (पुनरुत्थानाचें दिवशीं) वाईट प्रकारें (ह्मणजे चोपून) हिशेब घेतला जाण्याचा अंदेशा राखतात. २१. आणि (तसेंच हे असे लोक होत कीं) ज्यांनीं आपल्या पालनकर्त्याची मर्जी संपादण्याकरितां[१] (जगाच्या संकटांस तोंड देऊन) सहनशीलता पत्करली व नमाज कायम ठेविली आणि आह्मीं जें कांहीं त्यांना दिलें होतें त्यांतून गपचीप (गपचीप) व जगजाहिरपणें (परमार्थांत) खर्च केला; आणि जे (लोकांचें) चांगलें करून वाईटाचें निरसन करतात; हेच लोक होत कीं ज्यांचा इहलोकींचा परिणाम (उत्तम) होय. २२. (ह्मणजे,) कायमच्या राहणाच्या बागा, कीं त्यांत ते (आपणहि) जातील आणि त्यांचे वाडवडील व त्यांच्या स्त्रिया व त्यांचीं मुलेंबाळें यांजपैकीं जे सदाचरणी असतील (ते सर्व त्यांजबरोबरच जातील). आणि (स्वर्गाच्या) हरेक दरवाज्यांतून देवदूत त्यांच्यापाशीं

(१) 'पालनकर्त्याची मर्जी संपादण्याकरितां' याच्या मूळवाक्याचा शब्दशः अर्थ हा आहे कीं 'आपल्या पालनकर्त्याचें तोंड शोधण्यासाठीं' ह्मणजे आपल्या पालनकर्त्यास तोषविण्यासाठीं.

प्रवेश करतील. २३. (व ते त्यांस म्हणतील कीं) तुह्मांस सलाम–शांति–असो! कां कीं, (जगांत) तुह्मीं (मुकाव्यानें) सहन करीत राहिला; हा त्याचाच मोबदला होय! तर (वाहवाह! वाह-वाह! तुमच्या) इहलोकींचाहि (कसा) उत्तम परिणाम झाला! २४. आणि जे लोक परमेश्वराशीं पक्कें करारबंधन केल्यावर त्याच्या वचनाचा भंग करतात व ज्या(परस्पर संबंधा)च्या जोडून राखण्याची परमेश्वरानें आज्ञा केली आहे तो तोडून टाकतात आणि मुलखांत नासधूळ माजवितात; हेच लोक होत कीं ज्यांच्यावर (ईश्वरी) शाप होय, आणि (शापाखेरीज) त्यांचा इहलोकींचा परिणामहि वाईटच होय. २५. परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला विपुल निर्वाहसाधन देतो; आणि (ज्याला इच्छितो त्याला) हात राखून देतो. आणि (नास्तिक लोक) इहलोकिक आयुष्यांत (फार) खुष आहेत. आणि वास्तविक पाहतां, इहलोकिक आयुष्य हें परलोकींच्यापुढें अगदींच भिकार चीज होय. २६. आणि (हे पैगंबरा!) जे लोक (तुझ्या पैगंबरीस) नाकारितात ते (हेंहि) ह्मणतात कीं या(गृहस्थावर म्हणजे तुज)वर याच्या पालनकर्त्याकडून (आमच्या मनाप्रमाणें) एखादा चमत्कार कां म्हणून उतरला नाहीं? (तूं यांना) सांग कीं (चमत्कारांनीं काय होतें?) परमेश्वरच ज्याला इच्छितो त्याला मार्गाहून चळवितो आणि जो कोणी (त्याच्याकडे) वळतो त्याला आपल्याकडे (पोहोंचण्याचा) मार्ग दाखवितो. २७. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व ज्यांच्या अंतःकरणांस ईश्वरस्मरणानें समाधान होतें,—(आणि) ऐकून ठेवा कीं ईश्वरस्मरणानें अंतः-करणांस समाधान होतच असतें— २८. तर ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्यासाठीं (पर-लोकीं) धन्यता व (स्वर्गाचें) उत्तम निवासस्थान होय. २९. (हे पैगंबरा! ज्याप्रमाणें आम्हीं इतर पैगंबर पाठविले होते) त्याच-प्रमाणें आह्मीं तुलाहि (एतद्कालीन) लोकांकडे (पैगंबर करून) पाठविलें आहे कीं ज्यांच्यापूर्वीं आणखीहि लोक होऊन गेले आहेत. (आणि तुझ्या पाठविण्यांत उद्देश हा) कीं आह्मीं जें (कुराण) तुजला

प्रकट केलें आहे तें तूं त्यांना वाचून ऐकवावेंस. आणि हे लोक (तुझ्या पैगंबरीलाच नाकारितात असें नाहीं, तर ते मुळांत) परम दयाळू (परमेश्वरा-)लाहि मानीत नाहींत. (तूं यांना) सांग कीं तोच माझा पालनकर्ता होय; त्याच्यावाचून अन्य कोणी उपास्य नाहीं. मी त्याच्यावरच भरंवसा ठेवितों आणि (दरेक गोष्टींत) त्याच्याचकडे माझें वळण असतें. ३०. आणि जरी एखादें कुराण (असेंहि प्रकट झालें) असतें कीं त्या(च्या प्रभावा)नें पर्वत चालूं लागते, अगर त्या(च्या प्रतापा)नें पृथ्वीपर्यटन (अनायासें) होऊं शकतें अगर त्या(च्या प्रभावा)नें मेलेल्यांशीं संभाषण होऊं शकतें तरीहि (हे लोक सरळ मार्ग न पत्करते). किंबहुना, (अस्सल गोष्ट ही होय कीं) सारा अखत्यार परमेश्वरालाच होय. तर कां (अजून) मुसलमानांची शहानिशा झाली नाहीं कीं जर परमेश्वर इच्छिता तर तो सर्व लोकांस सरळ मार्ग दाखविता? आणि जे ('मक्के'चे) लोक नास्तिक होत त्यांना त्यांच्या कर्मांच्या शासनार्थ (कोणीना कोणी तरी) आपत्ति नित्य पीडीतच राहील (कीं ती त्यांस मातींत मिळवीत राहील) अगर त्यां(स ती न पिडील तर त्यांच्या राहण्या)च्या वस्तीच्या जवळपास येऊन कोसळेल; येथपर्यंत कीं परमेश्वराचा वायदा (ह्मणजे 'मक्के'चा विजय अखेर) येऊन पुरा होईल. (यांत) संशय नाहीं कीं परमेश्वर वचनाच्या उलट करीत नसतो. ३१. आणि (हे पैगंबरा!) तुझ्यापूर्वींहि पैगंबरांचा उपहास केला जाऊन चुकला आहे. तर मी (कांहीं दिवस) नास्तिकांस अवकाश दिला;

---

(१) भावार्थ हा कीं नास्तिक आपल्या कुकर्मांच्या शासनामुळें सुखासमाधानानें बसून राहूं शकणार नाहींत. कां तर खुद्द त्यांच्यावरच चोहोंकडून नित्य संकटेंच कोसळत राहतील आणि कां तर त्यांच्या जवळपासच्या लोकांवरच; येथपर्यंत कीं एक दिवस असा येईल कीं इस्लामधर्मास पुरें पुरें प्राबल्य प्राप्त होईल कीं त्याचें परमेश्वरानें वचन दिलें आहे; आणि झालेंहि असेंच कीं मुसलमान विजय मिळवीत मिळवीत अखेर खुद्द मक्का शहरावर जाऊन आनायासें काबीज झाले.

व मग (सरशेवटीं) मी त्यांची धरपकड केली. तर (तूं पाहिलेंस कीं) माझी शिक्षा कशी (कडक) होती? ३२. तर कां जो (परमेश्वर) प्रत्येक मनुष्या(च्या शिरा)वर, तो जें कांहीं करितो त्याच्या(निरीक्षणा)-साठीं कायम उभा आहे, (तो त्याला शिक्षा दिल्यावाचून सोडील)? आणि हे लोक परमेश्वराचे (दुसरे दुसरे) सरकतदार ठरवितात (हे पैगंबरा! यांना) सांग कीं तुह्मीं या(सरकतदारां)चीं नांवें तर घ्या. अगर तुह्मीं परमेश्वराला अशा(सरकतदारांच्या होण्या)ची खबर देतां कीं ज्यांस तो जाणित देखिल नाहीं (कीं ते) जमिनींत (कोठें वसतात)? अगर (निव्वळ) वरकरणी (निराधार) बोलणें बोलतां? गोष्ट ही आहे कीं नास्तिकांस आपले कर्कपंजे भले दिसूं लागतात, आणि (म्हणूनच) ते (सरळ) मार्गाहून अडून राहतात. आणि ज्याला परमेश्वर बहकवील, तर कोणीहि त्याचा मार्गदर्शक नाहीं. ३३. या लोकांसाठीं इह लौकिक आयुष्यांतहि शिक्षा होय (व परलोकींहि); आणि परलोकींची शिक्षा (ऐहिक शिक्षेपेक्षां) अर्थात् फारच सक्त होय. आणि परमेश्वरा(च्या कोपा)पासून कोणीहि त्यांचा बचावणारा नाहीं. ३४. (परमेश्वराला) भिऊन चालणाऱ्यांस ज्या (स्वर्गीय) बागेचा वायदा केला जातो, तिचा (थोडक्यांत) नमुना हा होय कीं तिच्याखालून नद्या वाहत असतील; तिचीं फळें सदाबहार आणि (अशाच तऱ्हेची) तिची सावली. हा, जे लोक (जगांत परमेश्वराला) भीत राहिले त्यांचा परिणाम होय; आणि नास्तिकांचा परिणाम नरकाग्नि. ३५. आणि (हे पैगंबरा!) ज्या(मुसल्मानां)स आम्हीं (हें) पुस्तक दिलें आहे ते तर जे (जे हुकूम) तुला सादर केले गेले आहेत त्या(सर्वां)शीं खुष होतात; आणि इतर मिलाफी

(१). येथें पुस्तक दिलें गेलेल्या लोकांचा आह्मीं मुसलमान असा अर्थ घेतला आहे; पण बहुत करून यहुदी व खिस्ती यांजविषयींहि हा अर्थ घेतला जातो. येथें तोहि अर्थ घेतला जाईल तरी तो ठीकच जुळतो. अशा स्थितींत यहुदी व खिस्ती जे मुसलमान झाले होते त्यांजकडेहि इषारत संभवेल.

पक्षांत कित्येक असेहि होत कीं जे त्याच्या कित्येक गोष्टींची नाकारणी करतात. (तूं या नास्तिकांस) सांग कीं (तुह्मांला मानणें न मानणें याचा अखत्यार आहे;) मला तर हाच हुकूम मिळाला आहे कीं मी परमेश्वराचीच उपासना करावी व (कोणालाहि) त्याचा सरकतदार बनवूं नये. मीं (तुह्मां सर्वांस) त्याच्याचकडे बोलावितों व (हरेक गोष्टींत) त्याच्याचकडे वळतों. ३६. आणि अशाच कारणानें आह्मीं कुराणास अरबी (भाषेचा) हुकूम ह्मणून सादर केला आहे (कीं अरबलोकांस हें सहज समजेल). आणि (हे पैगंबरा!) तुला ज्ञान होऊन चुकलें आहे त्या उपरांतहि, जर तूं त्यांच्या मनोवासनांस अनुसरशील तर (मग) परमेश्वरापुढें कोणी तुझा पुरस्कर्ता होणार नाहीं व कोणी बचावणाराहि नाहीं. ३७. (आणि तुझ्यापूर्वींहि आह्मीं (बहुतेक) पैगंबर पाठविले व आह्मीं त्यांना बायकाहि दिल्या व संततिहि (दिली) आणि कोणाहि पैगंबराची ताकद नव्हती कीं ईश्वराज्ञेवाचून तो कोणी एखादा चमत्कार आणून दाखविता. प्रत्येक (नियमित) कालासाठीं (आह्मांसमीप एक प्रकारचा) लेख (राहत) असतो. ३८. (मग त्यांतून) परमेश्वर जें इच्छितो तें खोडून टाकतो आणि (जें इच्छितो तें) कायम ठेवितो. आणि त्याच्यापाशीं अस्सल पुस्तक (ह्मणजे 'लौहे महफूज' उपलब्ध) होय, (कीं त्यांत सर्व कांहीं नमूद केलेलें असतें). ३९. आणि (हे पैगंबरा! शिक्षा वगैरेंचे) जसजसे वायदे आह्मीं या('मक्के'च्या नास्तिकां)स करीत आहों,

---

(१) भावार्थ असा कीं जितक्या गोष्टी होतात—त्यांतल्यात्यांतच चमत्कारहि—सर्वांचा एक वेळ नियमित आहे. वाई केल्यानें कोणतेंहि काम वेळेपूर्वीं होऊं शकत नाहीं. घडून येणाऱ्या गोष्टींसाठीं एक प्रकारचा ठराव तर असा आहे कीं त्यांत परमेश्वराच्या मर्जीनें फेरबदल होत राहतो. आणि एक निश्चित हुकूम आहे कीं तो कधीं टळत नाहीं व बदलतहि नाहीं. पहिल्याला 'कज़ाए मुअल्लक़' ह्मणजे संकेतबोधक हुकूम व दुसऱ्याला 'कज़ाए मुब्रम्' म्हणजे निश्चयात्मक हुकूम असें ह्मणण्याचा प्रघात आहे.

त्यांतून पाहिजे तर कित्येक वायदे-आम्हीं (तुझ्या हयातीमध्यें) तुला (पुरे करून) दाखवूं आणि पाहिजे तर (त्या वायद्यांच्या घडून येण्या-पूर्वींच) आम्हीं तुला जगांतून उचलून घेऊं. कांहीं झालें तरी, (आमच्या आज्ञा) पोहोंचविणें हें तुझें काम होय व (त्यांच्यापासून) हिशेब घेणें हें आमचें. ४०. हे लोक कां हें पाहत नाहींत कीं आम्हीं (इस्लामच्या विजयांनीं) पृथ्वीला चारहि बाजूंनीं दाबीत चालले येत आहों? आणि परमेश्वर (इच्छितो तो) हुकूम देतो; कोणीहि (मागें पडून) त्याचा हुकूम टाळूं शकत नाहीं. आणि तो फार जलद हिशेब घेणारा होय. ४१. आणि जे लोक या('मक्के'च्या नास्तिकां)च्या पूर्वीं होऊन गेले आहेत त्यांनींहि (पैगंबरांच्या विरुद्ध आपले) डावपेंच लढविले; पण (यशस्वी) डावपेंच तर सर्व परमेश्वराचेच होत! प्रत्येक मनुष्य जें कांहीं करीत आहे तें (सर्व) परमेश्वराला माहीत आहे. आणि नास्तिकांस पुढें लवकरच माहीत होऊन जाईल कीं इहलोकींचा परिणाम कोणाचा (उत्तम) आहे? ४२. आणि (हे पैगंबरा!) नास्तिक ह्मणतात कीं तूं (परमेश्वराचा) प्रेषित नाहींस. तर (तूं यांना) सांग कीं माझ्या व तुमच्या दरम्यान परमेश्वर, आणि ज्यांच्यापाशीं (दिव्य) पुस्तकांचें ज्ञान आहे (कीं त्यांत माझ्यासंबंधानें भविष्यवचनें उपलब्ध होत) हे साक्षी पुरे आहेत. ४३.

# अध्याय १४ वा.

## सूरतु-इब्राहीम.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ५२ आयात वा महावाक्यें आहेत. ह्यांत हजरत इब्राहीम पैगंबरांचें वर्णन करण्यांत आलें आहे; ह्मणून इब्राहीमाचें प्रकरण हें नांव पडलें.

परम दयाळू आणि कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

---

अलेफ-लाम-रा. (अ. ल. र. हे पैगंबरा! हें कुराण एक अत्युच्च दर्ज्याचें) पुस्तक (होय;) हें आम्हीं तुला यासाठीं प्रकटिलें आहे कीं तूं लोकांस त्यांच्या पालनकर्त्याच्या आज्ञेनें (नास्तिकपणाच्या) अंधःकारांतून काढून (विश्वासाच्या) प्रकाशांत आणावेंस; (म्हणजे) अशा (परम पवित्रा)च्या मार्गाकडे (आणावेंस कीं) जो (सर्वांत) प्रबळ (व हरेक वेळीं व हरेक स्थितींत) स्तुत्य होय. १. (म्हणजे) परमेश्वर, कीं जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) त्याचेंच होय. आणि कडक शिक्षा (जी परलोकीं होणार आहे ति)च्या मानानें नास्तिकां(च्या स्थिति) बद्दल खेद होय; २. कीं हे लोक परलोकींच्यावर इहलोकिक आयुष्यास पसंत करतात व परमेश्वराच्या मार्गा-हून (लोकांस) अडथळा करतात व त्यांत वांकडेपणा आणूं इच्छितात. हेच लोक फार पराकाष्टेच्या चुकींत होत. ३ आणि जेव्हां कधीं आम्हीं

कोणी पैगंबर पाठविला तेव्हां (त्याला) त्याच्याच राष्ट्रीय भाषेंत (बोलता करून पाठविला); अशासाठीं कीं तो त्यांना (चांगल्या प्रकारें) समजावूं शकेल. यावरही परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला भटकवितो व ज्याला इच्छितो त्याला सन्मार्ग दाखवितो. आणि तो परम समर्थ (व) बुद्धिमान् होय. ४. आणि आह्मींच 'मूसा'लाहि आपल्या निशाण्या देऊन पाठविलें (व त्यास आज्ञापिलें) कीं तूं आपल्या लोकांस (नास्तिकपणाच्या) अंधःकारांतून काढून (विश्वासाच्या) प्रकाशांत आण. आणि त्यांना परमेश्वराचे घडामोडीची आठवण देवीव. कारण, या(वृत्तांतां)त हरेक सहनशील व कृतज्ञ मनुष्यासाठीं (ईश्वर सामर्थ्याच्या बोधपर) निशाण्या होत. ५ आणि त्याच काळाचा मजकूर हाहि होय कीं 'मूसा'नें आपल्या लोकांस ह्मटलें कीं (बंधुजनहो!) परमेश्वरानें तुह्मांवर जे उपकार केले आहेत त्यांचें स्मरण करा; कीं जेव्हां त्यानें तुह्मांस

(१) नास्तिकांच्या आक्षेपांत एक निराधार व विजोड आक्षेप हाहि होता कीं कुराण अरबी भाषेंत आहे; आणि अरबी भाषा आमची व या वादी पैगंबराची मातृभाषा आहे. असो नसो, हा गृहस्थ आपणच तें रचितो व परमेश्वराकडे लावून देतो कीं ही त्याची वाणी होय. आम्हीं इच्छूं तर आम्हींहि असें बनवूं. मग जर खरोखरच परमेश्वराला कोणी पैगंबर पाठवावयाचा होता, तर त्यानें अशा मनुष्याला पाठवावयाचें होतें कीं ज्याच्या भाषेंत आम्हांला बोलतां आलें नसतें. परमेश्वरानें याचें समर्पक उत्तर दिलें. या कुराणाचा बोधकटाक्ष विशेषतः अरब लोकांकडेच होय; कीं तेच आक्षेप काढीत होते. आणि परमेश्वराला असें मंजूर होतें कीं या लोकांची नैतिक स्थिति फारच बिघडलेली होती म्हणून, प्रथम यांच्यांतच सुधारणा केली जावी आणि ह्यांनीं अंबवणीचें काम द्यावें कीं त्यांच्यायोगें सर्व जगभर सुधारणा व्हावी.

(२) घडमोडी वा कालचक्र हा 'अय्यामिल्ला' म्हणजे परमेश्वराचे दिवस याचा लाक्षणिक अर्थ होय; म्हणजे मोठमोठ्या मशहूर व स्मरणीय गोष्टी वा वृत्तें असा अर्थ होतो. उदाहरणार्थः—नूहचा जलप्रलय, फिरऔनाचें बुडणें, कारूनचें घरादारासह जमिनींत घुसून गडप होऊन जाणें, वगैरे, वगैरे.

'फिरऔना'चे लोकां(च्या जुलमा)पासून वांचविलें: ते तुमचा वाईट (वाईट) तऱ्हेनें छल करीत होते, व तुमच्या मुलांस हुडकून हुडकून जबे करीत होते (कीं तुमचा कुलक्षय व्हावा), आणि तुमच्या स्त्रीजाती (ह्मणजे मुलीं)ला (सेवाचाकरीसाठीं) जिवंत राखीत असत. आणि ह्या (संकटां)त तुमच्या पालनकर्त्याकडून (तुमच्या सहनशीलतेची) मोठी परिक्षा होती. ६. आणि (त्या-वेळेचीहि आठवण आहे? कीं) जेव्हां तुमच्या पालकर्त्यानें बजावून दिलें होतें कीं जर (माझी) उपकारस्तुति कराल तर मीं तुह्मांस आणखीहि अधिकाधिकच (देणग्या) देईन. आणि जर तुह्मीं कृतघ्नता केली तर (समजा कीं) माझा मारहि (फारच) सक्त (मार) होय. ७. आणि 'मूसा'नें (आपल्या लोकांस हेंहि) सांगितलें कीं जर तुह्मीं व जेवढे ह्मणून लोक भूतलावर होत ते सारे(चे सारे मिळूनहि परमेश्वराप्रत) अनुपकारी व्हाल, तर परमेश्वर (त्याची यत्किंचितहि पर्वा बाळगीत नाहीं; कारण तो) निरपेक्ष (व सर्व-थैव) सुस्तुत्य होय. ८. कां, जे लोक तुह्मांपूर्वीं (होऊन गेले) आहेत त्यांचा अहवाल तुह्मांप्रत पोहोंचला नाहीं? ह्मणजे 'नूह'च्या लोकांचा व 'आद'च्या व 'समूद'च्या? आणि (इतर लोक) जे त्यांच्या मागून झाले त्यांची हकीकत काय ती परमेश्वरच जाणतो. त्यांचे पैगंबर स्पष्ट चमत्कार घेऊन त्यांच्यापाशीं आले; (आणि हात पुढें करून करून त्यांना समजावूं लागले) पण त्यांनीं (रागाच्या भरांत) त्यांचे हात[1] त्यांच्याच तोंडावर उलटून मारले व बोलूं

(१) या वाक्यांत "त्यांचे हात त्यांच्याच तोंडावर" असें जें आलें आहे त्यांतील सर्वनामांची भाष्यकारांनीं वेगवेगळाली उपपत्ति लाविली आहे. सर्वांचा भावार्थ हा आहे कीं नास्तिकांनीं पैगंबरांचें ऐकिलें नाहीं, त्यांना बोलूं दिलें नाहीं व त्यांच्या बोलण्यावर खूप खिदखिदून हंसले, येथपर्यंत कीं हंसें आवरण्यासाठीं आपलें तोंड बंद करून घेतलें; अगर पैगंबरांच्या गोष्टी ऐकून आश्चर्यानें आपल्या अंगुल्या दातांत घातल्या. आणि आम्हांला जी उपपत्ति योग्य दिसून आली ती आह्मीं भाषांतरांत दिलीच आहे.

लागले कीं जो हुकूम देऊन तुह्मीं (परमेश्वराकडून) पाठविले गेलां आहां, आम्हीं तर तो मानीत नाहीं; आणि ज्या (धर्मा)कडे तुह्मीं आम्हांस बोलावितां आम्हीं तर त्याच्यासंबंधानें अशा संशयांत (पडलों) आहों कीं त्यानें (आम्हांस) गोंधळून सोडलें आहे. ९. त्यांच्या पैगंबरांनीं (त्यांना) ह्मटलें, कां (तुह्मांला) परमेश्वरा(च्या अस्तित्वां)त शंका आहे कीं जो आकाश व पृथ्वीचा उत्पादक होय? (आणि) तो तुह्मांस यासाठीं (आपल्याकडे) बोलावितो कीं त्यानें तुह्मांला तुमचे अपराध क्षमा करावेत व एका नियमित काळापर्यंत तुह्मांस (जगांत चैनेनें) राहूं द्यावें. ते ह्मणूं लागले कीं तुह्मींहि तर केवळ आमच्याच सारखीं मनुष्यें आहां; तुमची ही इच्छा आहे कीं ज्या-(देवां)ची आमचे वाडवडील उपासना करीत आले आहेत त्यांच्या-(उपासने)पासून तुह्मीं आह्मांस प्रतिबंध करावा. (बरें तर, जर तुह्मीं आपल्या दाव्यांत खरे आहां) तर आह्मांस (आमच्या मागणी बरहुकूम) कोणताहि एक स्पष्ट चमत्कार आणून दाखवा. १० त्यांच्या पैगंबरांनीं त्यांना सांगितलें कीं निःसंशय आह्मीं तुमच्यासारखींच मनुष्यें आहों. परंतु परमेश्वर आपल्या सेवकांपैकीं ज्याच्यावर इच्छितो त्याच्यावर (मुद्दाम आपली) कृपा करितो; (व पैगंबरी पदावर त्याची नेमणूक करीतो). आणि ईश्वराज्ञेवांचून आमची बिशाद नाहीं कीं आह्मीं कोणचाहि चमत्कार तुह्मांस आणून दाखवूं. आणि परमेश्वरावरच (सर्व) विश्वासूंना भरंवसा ठेविला पाहिजे. ११. आणि आह्मांस काय (सबब होऊं शकते) कीं आह्मी परमेश्वरावर भरंवसा ठेवूं नये? आणि वास्तविक पाहतां आमचे (हे) मार्ग (ज्यांवर आम्हीं चालतों आहों ते) त्यानेंच आह्मांस दाखविले. आणि जसजशा इजा तुह्मीं आह्मांस पोहोंचवीत राहिलां आहां त्या (अद्यापपर्यंतहि आह्मी सहन केल्या व पुढेंहि) आह्मीं अवश्यच सहन करीत राहूं. आणि निष्ठा बाळगणाऱ्यांस पाहिजे कीं त्यांनी परमेश्वरावरच निष्ठा ठेवावी. १२. आणि नास्तिकांनीं आपल्या पैगंबरांना ह्मटलें कीं आह्मी तुह्मांस आपल्या देशांतून अवश्यच काढून बाहेर करूं; अगर (निर्वाणीस) तुह्मीं पुन्हां आमच्या धर्मांत परत येऊन जाल. यावर पैगंबरांच्या पालन-

कर्त्यानें त्यांच्याकडे आदेश पाठविला कीं आह्मीं (या) शिरजोर लोकांस अगदींच गारद करून टाकूं. १३. आणि त्यांच्या (गारद झाल्या) पश्चात् जरूर तुम्हांस याच भूप्रदेशांत वसवूं. हें प्रतिफल, जो कोणी माझ्यासमक्ष (कर्मांचा जाब देण्यासाठीं) उभा राहावयास भ्याला व (तसेंच) माझ्या शिक्षेसही भ्याला त्याच्यासाठीं होय. १४. आणि पैगंबरांनीं इच्छिलें कीं (त्यांच्या व नास्तिकांच्या झगड्याचा) उलगडा होऊन चुकावा. (तात्पर्य, त्यांची इच्छा परिपूर्ण झाली) आणि प्रत्येक हेंकेखोर दंडेलाचा हिरमोड झाला. १५. (हें तर इहलोकींचें शासन होतें व) याच्यापलिकडे (त्याच्यासाठीं) 'जहन्नम' होय; व (तेथें) त्याला पुंवाचें पाणी पाजलें जाईल. १६. तें तो बळेंच ओठांनीं घोट घोट पीईल आणि (तरीहि) तें त्याच्यानें गळ्याखालीं उतरवणार नाहीं. आणि मृत्युहि त्याला चोहोंकडून (येईसा दिसून) येईल व (तरीहि) तो मरणार नाहीं. आणि त्यापलिकडे (त्याला आणखी) सक्त शिक्षाहि आहेच. १७. जे लोक आपल्या पालनकर्त्याला मानीत नाहींत त्यांची उपमा अशी आहे कीं त्यांचीं (सत्)कृत्यें जणूं काय राखेचे ढीग होत; कीं वादळाच्या दिवशीं ज्यांला वाऱ्यानें झपाट्यासरशीं विसकटून टाकिलें. (अशींच) जीं (सुकृत्यें) हे लोक (जगांत) करून गेले आहेत तींतूनहि कांहींच त्यांच्या हातीं येणार नाहीं. फारच पराकाष्टेचें अपेश (ह्मटलें ह्मणजे) हेंच होय. १८. (हे मानवा!) कां तूं या गोष्टीवर नजर केली नाहींस कीं परमेश्वरानें आकाश व पृथ्वी हीं (अवश्य कोणातरी) सत्य संकल्पानें निर्माण केलीं आहेत? तो इच्छील तर तुह्मांसर्वांस मिटवून हटवून नवीन सृष्टि आणून वसवील. १९. आणि हें परमेश्वराला कांहीं दुरापास्त नव्हे. २०. आणि (पुनरुत्थानाचे दिवशीं) सर्व लोक परमेश्वराच्या रुबरू निघून उभे राहतील. तर (जे लोक जगांत) दुर्बल (होते ते त्यावेळीं,) जे लोक मोठेपणाचा ताठा बाळगीत होते त्यांस ह्मणतील कीं आह्मीं तर तुमच्या पावलोंपावलीं चालणारे होतों. तर कां (आज) तुह्मीं ईश्वरी शिक्षेंतून कांहीं (थोडीशीहि) आम्हांवरून हटवूं शकतां? ते म्हणतील कीं (भले

माणसा! आम्हीं तर आपणच शिक्षेंत फसलों आहों.) जर परमेश्वर आम्हांला (सुटकेचा) कोणी मार्ग दाखवून देता, तर (तो) मार्ग आम्हींहि तुम्हांस दाखवून देतों. (आतां तर) आम्हीं अधीरपणानें वागलों काय व सहनशीलपणानें वागलों काय, आमच्या(तुमच्या)ठायीं (दोन्हीहि स्थिति) बरोबरच होत. आह्मांला (शिक्षेपासून) कोणाहि तऱ्हेनें पळण्यास मार्ग नाहीं. २१. आणि जेव्हां (शेवटचा) फैसला होऊन चुकेल (व लोक सैतानास दोष देऊं लागतील) तेव्हां सैतान म्हणेल कीं परमेश्वरानें तुम्हांशीं खरा वायदा केला होता (तर त्यानें तो पुरा केला). आणि वायदा तुम्हांशीं मीहि केला होता; पण मी तुम्हांशीं (वायद्याच्या) उलट केलें. आणि तुमच्यावर माझें कांहीं बळ तर नव्हतेंच; पण इतकें खरें कीं मी तुह्मांस (आपल्याकडे) बोलाविलें व तुह्मीं माझा कह्या मान्य केला. तर आतां मला दोष देऊं नका; किंबहुना, आपणच आपल्याला दोष द्या. (आज) मी तुमच्या फिर्यादीस पोहोंचूं शकत नाहीं व तुह्मीं माझ्या फिर्यादीस पोहोंचूं शकत नाहींत. मला तर (मुळांत) हें मान्यच नाहीं कीं तुह्मीं मला (याच्या)पूर्वीं (जगांत परमेश्वराचा) सरकतदार बनवीत होतां. यांत संशय नाहीं कीं जे लोक आज्ञाभंजक होत त्यांना (पुनरुत्थानाचे दिवशीं) फार दुःखकारक शिक्षा होईल. २२. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं ते (स्वर्गाच्या) बागांत दाखल केले जातील कीं त्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील. (आणि ते) आपल्या पालनकर्त्याच्या हुकमानें त्यांत निरंतर राहतील; तेथें त्यां(च्या भेटीच्या वेळे)चें अभिवंदन शांति! (शांति!) असें होईल. २३.

---

(१) सांगावयाचा अर्थ हा कीं स्वर्गीय लोक जेव्हां एकमेकांशीं भेटतील तेव्हां ते हर्षयुक्त होऊन एकमेकांस सलाम करतील. त्याचा अर्थ हा कीं तुह्मांस शांति असो! हा स्वर्गीयांचा किंवा देवदूतांचा सलाम असेल कीं तेहि स्वर्गीयांस सलाम करतील. एके जागीं 'सूरतो

(हे पैगंबरा!) कां, तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वरानें उत्तम शब्द (ह्मणजे उदाहरणार्थ ईश्वरैक्यवाचक शब्द) याचा कसा (उत्तम) दृष्टांत दिला आहे कीं (उत्तम शब्द) जणूं एक उत्तम वृक्ष होय; कीं त्याचें मूळ (जमिनींत) भक्कम रोंवलेलें व त्याच्या फांद्या गगनांत (पोहोंचलेल्या अशा) होत. २४. तो आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेनें सर्व काळ आपलीं फळें देत असतो. आणि परमेश्वर लोकांस (यासाठीं) दृष्टांत सांगतो कीं कदाचित् ते मनन करतील. २५. आणि गलिच्छ शब्द (ह्मणजे उदाहरणार्थ, अनेकेश्वर वाचक शब्द) याचा दृष्टांत गलिच्छ वृक्षा सारखा होय; कीं (पाहिजे तेव्हां) तो जमिनीच्या वरवरूनच मुळांसह उपटून टाकला गेला; त्याला कांहीं भक्कमपणा तर नाहींच. २६. ज्या लोकांनीं विश्वास धरिला आहे, त्यांना पक्का भक्कम शब्द (ह्मणजे ईश्वरैक्यवाचक शब्द) याच्या प्रभावानें परमेश्वर इहलौकिक आयुष्यांतहि (विश्वासावर) ठाम व कायम राखितो व परलोकींहि (कायम राखील ह्मणजे प्रश्नोत्तराचे वेळीं त्यांची कोणाहि तऱ्हेनें तारांबळ उडणार नाहीं). आणि परमेश्वर आज्ञाभंजक लोकांस भटकत ठेवितो आणि परमेश्वर जें इच्छितो तें तो करून सोडतो. २७. (हे पैगंबरा!) तूं कां त्या लोकां(च्या स्थिती)चें अवलोकन केलें नाहींस कीं ज्यांनीं

---

यासीन' मध्यें असेंहि ह्मटलें आहे कीं परमेश्वरहि स्वर्गीयांस सलाम–शांति! शांति! असें ह्मणेल. परमेश्वराचें आपल्या आज्ञांकित सेवकांवर किती तरी हें प्रेम!

(१) या शब्दापासून आणखी एक अर्थनिष्पत्ति होते; ती ही कीं 'जमिनीच्या वरवरून जमून उभा राहिलेला' ह्मणजे अगदीं निर्बल.

(२) ह्मणजे जे लोक परमेश्वर एकच आहे असें पक्कें मनापासून मानतात त्यांचें बोलणें सयुक्तिक व मुस्तकीम होय; आणि जे लोक परमेश्वराला मुळींच मानीत नाहींत अगर त्याच्या समागमें इतर ईश्वरतुल्य असे देव स्थापित करतात त्यांचें प्रतिपादन फारच पोंचट व निराधार होय.

ईश्वरी देणगीचा बदला कृतघ्नतेनें केला व (अखेर) आपल्या लोकांस पूर्ण विध्वंसाच्या घरांत नेऊन उतरलें. २८. (ह्मणजे) 'जहन्नम' कीं ते (सर्व) त्यांत जळण्यास दाखल होतील; आणि तें फारच वाईट स्थल होय. २९. आणि या लोकांनीं परमेश्वरासमागमें इतर (परमेश्वरतुल्य) उपास्य स्थापित केले आहेत कीं (लोकांस) त्याच्या मार्गाहून बहकवावें. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (बरें, दोन दिवस, जगांत) सुख चैन करा; मग तर तुह्मांस नरकाग्नीकडे जावयाचेंच आहे. ३०. (हे पैगंबरा!) माझे सेवक ज्यांनीं विश्वास धरिला आहे त्यांना सांग कीं त्यांनीं नमाज पढीत असावें; आणि (पुनरुत्थानाचा) असा एक दिवस येऊन ठेपेल कीं ज्यांत (कर्मांचा) क्रय विक्रय होणार नाहीं व स्नेह(-मैत्रीहि चालणार) नाहीं त्यापूर्वींच, आम्हीं जें कांहीं त्यांना देऊन ठेविलें आहे त्यांतून त्यांनीं (परमार्थांत) गपचीप (गपचीप) व जगजाहीरपणें खर्च करीत राहावें. ३१. परमेश्वरच (असा परम समर्थ) होय कीं ज्यानें आकाश व पृथ्वी हीं निर्माण केलीं व आकाशांतून पाणी वर्षविलें; मग पाण्याच्यायोगें (वृक्षांस) फळें निपजविलीं कीं तीं तुह्मां लोकांचा आहार होय. आणि त्यानें गलबतें तुमच्या ताब्यांत करून दिलीं; अशासाठीं कीं तीं त्याच्या हुकमानें समुद्रांत

---

(१) या वाक्यांत कुरेशी नास्तिकांकडे इशारा आहे कीं परमेश्वरानें त्यांच्यांतूनच एक पैगंबर पाठवून त्यांचेवर मोठेच उपकार केले होते. त्यांनीं या उपकाराचे ऐवजीं कृतघ्नता केली; आणि पैगंबर साहेबांचा येथपर्यंत विरोध केला कीं निरुपाय होऊन त्यांना मक्काशहर सोडून जाणें भाग पडलें. अखेर मुसलमानांशीं त्यांच्या लढाया ठरल्या; त्यांत नास्तिक पराभूत झाले; कांहीं लढायांत मारले गेले, व कांहीं हद्दपार केले गेले. इहलोकीं तर ते याप्रमाणें विध्वस्त झाले आणि परलोकीं जहन्नम ह्मणजे नरकाग्नि त्यांचे नशीबीं आहेच.

(२) गलबतें, नद्या, सूर्य, चंद्र, रात्र आणि दिवस यांस मनुष्याच्या ताब्यांत करून देण्याचा अर्थ हा आहे कीं मनुष्य यांजपासून फायदे घेतो व

वाहत जावींत, आणि (तशाच) नद्याहि तुमच्या ताब्यांत करून दिल्या. ३२. आणि (अशाच तऱ्हेनें एका मानानें) सूर्य व चंद्र हेहि तुमच्या ताब्यांत करून दिले कीं देन्हींहि चक्कर खात राहतात; आणि (अशींच एका प्रकारें) रात्र व दिवस हींहि तुमच्या ताब्यांत करून दिलीं. ३३. आणि तुह्मीं जें जें कांहीं मागितलें त्या प्रत्येकांतून कांहीं (योग्य तें) तुम्हांस दिलें. आणि जर तुह्मीं परमेश्वराच्या देणग्या मोजूं पाहाल तर त्या तुह्मांला पुऱ्या पुऱ्या मोजतां येणार नाहींत. कांहीं संशय नाहीं कीं मनुष्य मोठाच अन्यायी (व) अनुपकारी होय. ३४. आणि (हे 'मक्के'च्या नास्तिकांनों! तो वेळ आठवण करा कीं) जेव्हां 'इब्राहीमा'नें (परमेश्वरापाशीं) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! या ('मक्का') शहरास (शांति व) अभयस्थान बनीव; आणि मला व माझ्या मुलांबाळांस या (कुमार्गा)पासून वांचीव कीं आह्मीं मूर्तींची उपासना करूं लागावी. ३५. हे माझ्या पालनकर्त्या! कांहीं संशय नाहीं कीं या मूर्तींनीं[१] पुष्कळ लोकांस

---

या वस्तु आपल्या कल्याणासाठीं व आपल्या उपयोगासाठीं निर्माण झालेल्या आहेत असे समजून आपल्या हितासाठीं अनेक शोध व युक्त्या काढतो. नाहींतर खरें पाहतां, सर्व गोष्टी परमेश्वराच्याच अखत्यारांत होत. परंतु या वस्तूंवर अधिकार चालविण्याचे प्रकार वेगवेगळाले आहेत. गलबतांवर हा अधिकार होय कीं आह्मीं त्यांस जिकडे पाहिजे तिकडे हाकारितों अगर नांगर टाकतों, अथवा भरधोसानें अगर हळुहळु चालवितों. नद्यांवर हा अधिकार होय कीं त्यांचा रोंख बदलून टाकतों व त्यांचें पात्र कापून पाणी एकीकडेस लावून देतों. सूर्य व चंद्र यांजवर हा अधिकार होय कीं त्यांच्या प्रकाशानें बहुत कामें काढून घेतों व त्यांच्या खुणेनें जंगलांत व समुद्रांत दिशा जाणतां येतात व भरती ओहटी माहीत होते; आणि महिन्यांचे व वर्षांचे हिशेब लावितों. याच्याचप्रमाणें रात्र व दिवस ह्यांनींहि बरींच कामें निघतात.

(१) मूर्तींनीं बहकवून सोडिलें ह्मणजे लोक मूर्तिपूजा करतात ह्मणून ते आपणच आपल्या चुकीनें बहकले व मूर्ति त्यांच्या बहकण्यास कारणीभूत झाल्या.

बहकवून सोडलें आहे. तर ज्यानें माझें अनुकरण केलें तो माझा होय; आणि ज्यानें माझा आज्ञाभंग केला, तर तूं अर्थात् क्षमाकर्ता (व) दयाळू आहेस. ३६. हे आमच्या पालनकर्त्या! मी तुझें सन्माननीय घर ('काबा') याच्यासमीप (या 'मक्के'च्या) रानांत (जेथें) शेतभात नाहीं (तेथें), आपली कांहीं संतति (आणून) वसविली आहे; अशासाठीं कीं, हे आमच्या पालनकर्त्या! या लोकांनीं नमाज कायम करावी. तर तूं असें कर कीं लोकांचीं मनें यांजकडे प्रेमानें वळतील; आणि (इतर देशांच्या) फळफळादींतून यांना खावयास दे कीं हे (तुझे) आभार मानतील. ३७. हे आमच्या पालनकर्त्या! जें कांहीं आम्हीं लपवितों व जें कांहीं आह्मीं प्रगट करितों तें (सर्व) तुला माहीत आहे. आणि परमेश्वरापासून कोणतीहि वस्तु गुप्त राहतच नाहीं; पृथ्वींतहि (नाहीं) व आकाशांतहि

---

(१) हजरत इब्राहीमानें प्रथम आपल्या व आपल्या मुलांबाळांसाठीं प्रार्थना केली. नंतर आपणास अनुसरणाऱ्या जनतेलाही प्रार्थनेंत सामील केलें. आणि हें मानवी स्वभावास अगदींच अनुसरून होय; कारण घरांत दिवा तर देवळांत दिवा.

(२) हज्ज-यात्रेसाठीं जाणें हेंच लोकांच्या मनांचें मक्केकऱ्यांकडे प्रेमानें वळणें होय. कारण, लोक हज्ज करावयास जातात तेव्हां ते तेथील लोकांशीं फार उदारतेनें वागतात; आणि परवींहि मक्केकरांना मुसलमानांकडून फायदे पोहोंचतच राहतात.

(३) हजरत इब्राहीम पैगंबरांच्या दोन बायका होत्या; एकीचें नांव 'सारा' व दुसरीचें नांव 'हाजरा' होतें. या दोघी सवतींचें आपसांत बनत नव्हतें. ह्मणून हजरत इब्राहीम हे 'हाजरा' इला आपला पुत्र इस्माईल यांसह, आतां जेथें मक्काशहर वसत आहे त्या ठिकाणीं घेऊन आले. तर दिसण्यांत, हजरत इब्राहीम यांच्या सीरीया देशाहून येण्याचें कारण दोघी बायकांचा बेबनाव हा होता. परंतु मोठा उद्देश हाहि होता कीं मक्केच्या डोंगराळ प्रदेशांत म्हणजे 'पारान' (पाहा उत्पत्ति अ. २१: २१) येथें एकाच अद्वितीय अशा परमेश्वराची उपासना कायम व्हावी. आणि

नाहीं. ३८. सर्व स्तुति परमेश्वरालाच होय कीं ज्यानें मला, वृद्धापकाळ असतांहि 'इस्माईल' व 'इस्हाक' (असे दोन दोन पुत्र) दिले. खरोखरच माझा पालनकर्ता प्रार्थना ऐकतो. ३९. हे माझ्या पालनकर्त्या! तूं मला अशी सुबुद्धि दे कीं मी नमाज पढत राहावें; आणि (केवळ मलाच नव्हे तर) माझ्या संततीलाहि. आणि हे आमच्या पालनकर्त्या! माझी प्रार्थना मान्य कर. ४०. हे आमच्या पालनकर्त्या! ज्या दिवशीं (कर्मांचा) हिशेब होऊं लागेल तेव्हां मला व माझ्या मातापितरांस व (सर्व) विश्वासणाऱ्यांस क्षमा कर. ४१. आणि (हे पैगंबरा!) असें समजूं नकोस कीं परमेश्वर, (या) जालिमां(ह्मणजे 'मक्के'च्या नास्तिकां)च्या कर्मांकडून गैरसावध आहे! आणि (ही जी तत्काळ त्यांना शिक्षा मिळत नाहीं त्याचें कारण) केवळ (हें होय कीं) परमेश्वर यांना अशा एका दिवसापर्यंतचा अवसर देतो आहे कीं जेव्हां (भयामुळें लोकांचे) डोळे उघडेचे उघडे राहून जातील. ४२. (त्यांची परिस्थिति अशी होईल कीं) आपलीं डोकीं वर करून ते धांव मारीत चालले जात आहेत, (टक लावून आहेत कीं जिकडे पाहत आहेत तिकडून) त्यांची दृष्टि पुन्हां त्यांच्याकडे उलटून येत नाहीं आणि त्यांचीं मनें (अगदीं) उडालेलींशीं (होत चाललीं) आहेत. ४३. आणि (हे पैगंबरा!) लोकांस अशा एका दिवसा(च्या येऊन ठेपण्या)ची भय सूचना कर कीं जेव्हां त्यांस शिक्षा सादर होईल. तर जे लोक आज्ञाभंग करीत राहिले आहेत ते (काकळुतीस येऊन) म्हणूं लागतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! तूं आह्मांस जवळच

---

वरील ३७ व्या वाक्यांत "हे आमच्या पालनकर्त्या! या लोकांनीं नमाज कायम करावी" या स्पष्टीकरणानें आमच्या म्हणण्याचें दृढीकरण होत आहे. दुसरा अर्थ हा कीं मनुष्य जेव्हां कोणा एका विचारांत निमग्न असतो व विशिष्ठ प्रकारें परमेश्वरापुढें विनवणी करतो, तेव्हां जसजसे विचार त्याला येत जातात तसेच तो प्रगट करीत जातो. आतां आतां हजरत इब्राहीम आपल्या मुलांबाळांसाठीं निर्वाहसाधनाची प्रार्थना करीत होते; इतक्यांत परमेश्वर गोचरागोचराचा ज्ञाता आहे हा विचार मनांत येतांच तोच विचार प्रगट करूं लागले.

थोड्याशा मुद्दतीपर्यंतचा आणखीहि अवकाश दे; म्हणजे आह्मीं (या खेपेस) तुझ्या बोलावण्यावर (सत्वर) उठून उभे राहूं आणि पैगंबरांच्या मागें मागें चालूं. (तेव्हां त्यांना उत्तर दिलें जाईल कीं) कां तुम्हीं (तेच लोक) आहां ना कीं जे (याच्या)पूर्वी शपथा वाहत होतां (व एकमेकांस सांगत होतां) कीं तुम्हांला कोणाहि तऱ्हेचा धोका नाहीं? ४४. आणि (कां तुह्मींच ते लोक आहां ना कीं) ज्या लोकांनीं (आमची अवज्ञा करून) आपणच आपणावर जुलूम केले होते, त्यांच्याच घरांत तुह्मींहि राहिलां; आणि तुह्मांस (हेंहि) जाहीर होऊन चुकलें होतें कीं आह्मीं त्यांच्याशीं कसें काय (वर्तन) केलें; आणि आम्हीं तुमच्या (समजाविण्या)साठीं (बरेच) दृष्टांतहि सांगितले होते. ४५. आणि ते लोकहि आपले छक्केपंजे लढवीत राहिले; आणि त्यांचे (सारे) छक्केपंजे परमेश्वराच्या नजरेंत होते. आणि जरी त्यांचे छक्केपंजे (इतके जबर) होते कीं त्यांनीं पर्वतहि जागेवरून सरकतील, तरी (पण ते साधले नाहींत.) ४६. तर (हे पैगंबरा!) अशी कल्पनाहि करूं नकोस कीं परमेश्वर, जो आपल्या पैगंबरांशीं वायदा करून चुकला आहे तो त्याच्या विरुद्ध करील! निःसंशय परमेश्वर परम समर्थ (व) बदला घेणारा होय. ४७. (परंतु हा बदला पुरा पुरा तर त्या दिवशीं घेतला जाईल कीं) जेव्हां (ही) पृथ्वी बदलून दुसऱ्या तऱ्हेची पृथ्वी केली जाईल आणि (अशाच प्रकारें) आकाशहि; आणि (सर्व) लोक एकाच (व) महा प्रबळ परमेश्वरासमोर (जाब देण्यासाठीं आपापल्या जागेवरून) निघून उभे राहतील. ४८. आणि (हे पैगंबरा!) तूं त्या दिवशीं गुन्हेगारांस पाहशील कीं ते साकळदंडानें जखडून गेलेले

---

(१) ह्मणजे तुह्मांस कोणत्याहि संकटदशेचें भय नाहीं अथवा तुम्हांला मृत्यु न येतां तुम्हीं नित्य ह्या जगांतच राहाल किंवा फिरून मेलेल्यांतून उठून तुह्मांस कर्मांचा जाब द्यावा लागणार नाहीं; व कोणताहि धोका राहणार नाहीं.

(२) म्हणजे आद आणि समूद कीं ज्यांच्या घरांत तुम्हीं जाऊन राहिलां होतां.

असतील. ४९. डांमराच्या[१] तर त्यांच्या बंड्या असतील व त्यांच्या तोंडांला आग लागलेली असेल. ५०. (ही सारी सक्ती) यासाठीं (केली जाईल) कीं परमेश्वर दरेक मनुष्याला त्याच्या केल्या सवरल्याचा मोबदला देईल. निःसंशय परमेश्वर हिशेबहि चटकनच घेतो. ५१. हें (कुराण) लोकांसाठीं एक पूर्ण संदेश होय; आणि (याच्या प्रकट करण्याचा) हेतु हा होय कीं याच्या द्वारें लोकांस (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखविलें जावें; आणि हें कीं (सर्व) लोकांनीं जाणून घ्यावें कीं परमेश्वरच एक उपास्य होय; आणि (तसेंच) हें कीं बुद्धिसंपन्न लोकांनीं (त्यापासून) बोध घ्यावा. ५२.

---

(१) कुराणांत मूळ अरबी शब्द 'कतेरान' आहे त्यांत जळजळ, तिखटपणा, अग्नि जवळ येतांच पेट घेणें, वासांत व रंगांत वाईट असे गुण असतात. आपल्या येथें जवळ जवळ असाच पदार्थ ह्मटला ह्मणजे डामर आहे. ह्मणून त्याचें आह्मीं डामर असें भाषांतर केलें आहे.

# अध्याय १५ वा.

## सूरतुल्-हिज्र.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ९९ महावाक्यें आहेत. 'अल्-हिज्र,' हा, हिजाज प्रांतांत मदिना व सीरीया यांचे मध्यवर्ती भागांत जेथें समूदचे लोक राहत होते तो भूप्रदेश होय. यांत तेथील लोकांचें विवेचन आहे ह्मणून हिज्रचें प्रकरण हें नांव पडलें.

**परम दयाळु (आणि) कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

अलेफ-लाम-रा. (अ. ल. र.) हीं (दिव्य) पुस्तकाचीं ह्मणजे सुबोध अशा कुराणाचीं (कांहीं) महावाक्यें होत. १.

# पवित्र कुराण

## भाग चौदावा.

### सूरतुल्-हिज्र (पुढें चालू).

(एक दिवस असा येईल कीं) नास्तिक फारच आस्थापूर्वक चिंति-
तील कीं (आपणहि) मुसलमान झालों असतों तर (बरें होतें)! २.
तर (हे पैगंबरा!) यांना (यांच्याच स्थितीवर) राहूं दे; कीं ते
खातील (पीतील) आणि (इहलोकींचा दोन दिवस) सुखोपभोग घेतील
व (त्यांच्या अनाठायीं) आस्था त्यांना गाफिल करून टाकतील; मग अखेर
(पुनरुत्थानांत) तर यांना माहीत होऊनच जाईल. ३. आणि आम्हीं
(कधीं) कोणाहि वस्तीला विध्वस्त केलें नाहीं; परंतु तिच्या(विध्वंसा)-
साठीं एक निश्चित काळ (पहिल्यानेंच) लिहिला जाऊन (चुकला)
होता. ४. कोणतीहि जनता आपल्या काळाच्या पुढें जाऊं शकत
नाहीं व मागेंहि राहूं शकत नाहीं. ५ आणि (हे पैगंबरा!
'मक्के'चे नास्तिक तुला ह्याप्रमाणें संबोधून) बोलतात कीं ज्या(च्या
डोक्यांत हें वेड शिरलें आहे कीं त्या)ला (परमेश्वराकडून) कुराण प्रकट
झालें आहे त्या हे मनुष्या! तूं तर वेडा आहेस. ६. जर तूं
(आपल्या प्रतिज्ञेंत) खरा आहेस तर तूं देवदूतांस आह्मांसमोर
कां आणून उभे करीत नाहींस? ७. पण आह्मीं देवदूतांस पाठवीत नसतों,
परंतु सत्यनिर्णयासाठींच आणि (देवदूत पाठविले गेले ह्मणजे) मग
त्यांना अवकाशहि दिला जाणार नाहीं. ८. निःसंशय आह्मींच

---

(१) भावार्थ हा कीं देवदूत अशा प्रसंगीं शिक्षाच घेऊन येतात.
आणि शिक्षा आली म्हणजे मग आवकाश कसला?

कुराण प्रकटिलें आहे आणि निर्विवाद आह्मींच त्याचें संरक्षकहि आहों. ९. आणि (हे पैगंबरा!) आह्मीं तुझ्या पूर्वींहि प्राचीन लोकांच्या (बहुतेक) पंथांत (पैगंबर) पाठविले होते. १०. आणि (त्या लोकांचाहि हाच संप्रदाय होता कीं) जेव्हां जेव्हां त्यांच्यापाशीं कोणी पैगंबर म्हणून येई, तेव्हां ते त्याची हंशी उडवीत. ११. (तर ज्याप्रमाणें पूर्वींचे लोक आपल्या पैगंबरांशीं खोडसाळपणा करीत आले) अशाच तऱ्हेनें आम्हीं (या पापिष्ट-) नास्तिकांच्या मनांतहि (तसलाच खोडसाळपणा) शिरवून टाकतों. १२. तर हे कुराणावर विश्वास ठेवणार नाहींत; आणि ही रीत (कांहीं नवखी नव्हे,) प्राचीन लोकांपासूनच होत आली आहे. १३. आणि जरी आह्मीं या लोकांवर आकाशाचें एक द्वारहि खुलें करून टाकूं व हे लोक दिवसाढवळ्या त्या द्वारांतून (आकाशांत) चढूनहि जातील; १४. तरीहि ते हेंच ह्मणतील कीं असोनसो, आमचे डोळेच निशाधुंद होऊन गेले आहेत. (अगर) हें नाहीं, तर आह्मां लोकांवर कोणीहि जादू केलेली आहे. १५. आणि आम्हींच आकाशांत राशी बनविल्या व प्रेक्षकांच्या निरी-

---

(१) हें कुराणासंबंधानें भविष्य होय; आणि तें, कशा उत्तम प्रकारें प्रत्ययास येत चाललें आहे, कीं परमेश्वरानें मुसलमानांस तें तोंडपाठ करणें सोपें केलें आहे व त्यांना त्याची आवडहि दिली आहे. जगांत, कुराण तोंडपाठ म्हणणारे असे इतके बहुत लोक नेहमीं उपलब्ध असतात कीं जर परमेश्वर न करो! असें गृहित धरून चाललें कीं छापील व हस्तलिखित कुराणें भूतळांवरून अगदीं नष्टप्राय होऊन जातील; तरीहि कुराणाचें एक वाक्य कीं एक शब्द कीं एक अक्षरसुद्धां लोपणार नाहीं किंवा बदलतांहि येणार नाहीं. कुराणावांचून अन्य कोणा धर्मपुस्तकास ही महती प्राप्त झाली नाहीं. तर कुराण हें ईश्वरप्रणित आहे यास कां हें पुरतें प्रमाण नाहीं? आहे, आणि अवश्यच आहे.

(२) चंद्र सूर्यादि नक्षत्रांच्या मार्गक्रमणाचे गणितासाठीं खगोलवेत्त्यांनीं असें गृहित धरिलें आहे कीं आकाशमंडळ सारख्या बारा भागांत विभक्त झालें आहे. प्रत्येक हिशाला राशी वा रास असें म्हणतात

पैगंबरा! यांना सांग कीं) होय! अवश्यच, (उठवून उभा करील; हें त्याचें) सत्य वचन होय (व त्याचें पुरें करणें) त्याच्यासाठीं (अनिवार्य होय). परंतु बहुतेक लोक (विश्वासपूर्वक हें) जाणित नाहींत. ३८. (मेलेल्यांचें जिवंत उठविणें) यासाठीं (आवश्यक होय) कीं ज्या गोष्टींत हे लोक (जगांत) मतभेद करीत राहिले आहेत (पुनरुत्थानाचे दिवशीं) परमेश्वर (खरी हकीकत) त्यांना जाहीर करून टाकील आणि हें कीं नास्तिकहि जाणून घेतील कीं ते आपणच लबाड होते. ३९. जेव्हां आह्मीं कोणा वस्तुचा इरादा करतों, तेव्हां आमचें म्हणणें तिच्या संबंधानें फक्त एवढेंच असतें कीं आह्मीं तिला फर्मावितों कीं हो, आणि ती होऊन जाते. (तर आम्हांस मेलेल्यांचें जिवंत करणें काय मुष्किलीचें आहे?) ४०. आणि ज्या(मुसलमानां)वर (नास्तिकांकडून) अनर्थ गुदरण्यांत आले व त्या उपरांतहि त्यांना परमेश्वराप्रीत्यर्थ स्वदेश-त्याग करणें भाग पडलें; त्यांना आम्हीं जरूर जरूर इहलोकींच चांगल्या ठिकाणीं बसवूं. आणि परलोकींचें प्रतिफल (जें त्यांना प्राप्त होणार आहे तें याहूनहि) अति मोठें होय; (हें) जर त्यांना माहीत झालें असतें तर (बरें होतें!) ४१. जे लोक (परमेश्वराचे मार्गांत मुकाट्यानें दुःख) सहन करतात व आपल्या पालनकर्त्यावर भरंवसा राखतात, ते (परलोकींच्या प्रतिफलाचा सविस्तर अहवाल जाणते, तर मनांत संकोचित झाले नसते). ४२. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुझ्यापूर्वींहि हेच (तुझ्याच सारखे) पुरुष (पैगंबर करून) पाठविले होते कीं त्यांना आम्हीं आदेश प्रकट करीत होतों. तर (या नास्तिकांस सांग कीं) जर (ही गोष्ट) स्वतः तुह्मांला माहीत नसली, तर (या पूर्वींची दिव्य पुस्तकें) पठन पाठन करणारांस विचारून पहा. ४३. (आणि आम्हीं पैगंबर पाठविले

(१) इस्लामाचे वर्चस्वाच्या भविष्य वचनांपैकीं हेंहि एक भविष्य होय. मक्का शहर सोडून मदिनेंत आल्यावर या लोकींच परमेश्वरानें मुसलमानांस चांगल्या ठिकाणीं बसविलें व पुढें त्यांची मोठीच उन्नति व भरभराट केली. या प्रमाणें हें भविष्य पूर्ण झालें.

होते तेहि) स्पष्ट प्रमाणें व पुस्तकें यांजसहित. आणि (अशाच तऱ्हेनें) आम्हीं तुलाहि हें कुराण प्रकटिलें आहे; अशासाठीं कीं जे (हुकूम) लोकां(च्या सन्मार्ग दर्शना)र्थ त्यांजकडे पाठविले गेले आहेत ते, तूं त्यांना स्पष्ट करून सांगावेस आणि हें कीं त्यांनींहि (या गोष्टींचें) मनन करावें. ४४. तर कां जे लोक वाईट वाईट कारस्थानें रचितात ते या गोष्टीकडून अगदींच निर्भय होऊन गेले आहेत कीं परमेश्वर त्यांना जमिनींत गडप करून मारील; अगर जेथून त्यांना कळणारहि नाहीं तेथून (ईश्वरी) शिक्षा त्याच्यापुढें येऊन ठेपेल? ४५. अगर त्यांच्या चालण्याफिरण्याच्या स्थितींतच परमेश्वर त्यांना येऊन पकडील; (व असें करूं लागेल) तर (कोणाहि युक्तीनें) ते (त्याला) हरवूंहि शकणार नाहींत. ४६. अगर त्यांना (परमेश्वराच्या पकडण्याचा अंदेशा असेल व) अंदेशा होत्सातांहि तो त्यांना पकडील. ह्मणून (लोकांनों!) यांत संशय नाहीं कीं तुमचा पालनकर्ता फारच करुणाशील (व) दयाळू होय. ४७. कां या लोकांनीं परमेश्वराचे सृष्टींपैकीं कोणाहि वस्तुचें अवलोकन केलें नाहीं कीं तिच्या सावल्या (कधीं) उजवीकडेस व (कधीं) डावीकडेस दोलायमान होतात; (जणूं कीं) त्या परमेश्वरापुढें साष्टांग नमस्कार घालीत आहेत व (आपला) विनय प्रदर्शित करीत आहेत. ४८. आणि जितक्या वस्तु आकाशांत व जेवढे चालते फिरते प्राणी पृथ्वींत होत ते (सर्व) परमेश्वराच्याच पुढें साष्टांग[1] नमस्कार घालतात; व (तसेंच) देवदूतहि; आणि ते (ईश्वराज्ञेपासून) अहंकार करीत नाहींत. ४९. आणि ते आपला पालनकर्ता, जो (अत्युच्च महा सिंहासनावर) त्यांच्यांवरतीं[2] होय

(१) वस्तूंच्या साष्टांग नमस्कार घालण्याचा अर्थ हा कीं ज्या वस्तूस ज्या प्रमाणें बनविलें आहे त्याच स्थितीवर ती काईम आहे; तींत केंसभरहि फरक येऊं शकत नाहीं.

(२) परमेश्वर त्याच्या महिम्याच्या मानानें वरती आकाशाकडे आहे असें मानिलें जातें. नाहींपेक्षां, तो प्रत्येक स्थळीं आहेच. पण

त्याला (सर्वकाल) भीत राहतात; आणि (त्याच्या हुजरांतून) जो हुकूम त्यांना दिला जातो तो ते बजावितात. ५०. आणि (लोकांनों!) परमेश्वरानें फर्माविलें आहे कीं दोन दोन उपास्य (देव) ठरवूं नका; केवळ तोच (परमेश्वर) एक उपास्य होय. तर केवळ माझेंच भय बाळगून असा. ५१. आणि जें कांहीं आकाशांत व पृथ्वींत आहे तें त्याचेंच होय; व त्याचेंच आज्ञापालन (नित्य) आवश्यक होय. तर कां तुह्मीं लोक परमेश्वराशिवाय (अन्य वस्तूंस) भितां? ५२. आणि जितक्या म्हणून देणग्या तुह्मांला (प्राप्त) आहेत त्या (सर्व) परमेश्वराकडूनच होत. नंतर जेव्हां तुह्मांला कांहीं क्लेश पोहोंचतो तेव्हां तुह्मीं त्याच्याच पुढें रडारड करतां. ५३. मग जेव्हां तो तुमच्या वरून (तो) क्लेश दूर करून टाकतो, तेव्हां तात्काळ तुह्मांपैकीं कांहीं लोक आपल्या पालनकर्त्यांचे सरकतदार स्थापित करूं लागतात; ५४. अशासाठीं कीं ज्या (देणग्या) आह्मीं त्यांना दिल्या होत्या त्यांजप्रत कृतघ्नता प्रदर्शित करावी. तर (असो, इहलोकींचा दोन दिवस) सुखोपभोग घ्या; मग अखेर (पुनरुत्थानांत) तर तुह्मांस माहीत होऊनच जाईल. ५५. आणि आम्हीं जें कांहीं यांना देऊन ठेविलें आहे त्यांत, हे लोक ज्या(मूर्तींच्या मूळ हकीकती-)लाहि जाणत नाहींत, त्या (मूर्तीं)चा वाटाहि लावतात. म्हणून परमेश्वराची (म्हणजे आम्हांला आमची) शपथ; कीं जसजसें कुभांड तुह्मीं लोक रचीत राहिलां आहां, त्याची (पुनरुत्थानाचे दिवशीं) तुह्मांपासून अवश्यच विचारणा होईल. ५६. आणि हे नास्तिक लोक (दुतांस) परमेश्वराच्या मुली ठरवितात. (वाहवाह!) परमेश्वर (जो) परम पवित्र (त्याच्या साठीं मुली) आणि खुद्द आपणासाठीं, जी कांहीं आकांक्षा ते बाळगितात ती (म्हणजे मुलगे)! ५७. आणि जेव्हां यांच्यांतून एखाद्याला मुलगी(च्या जन्मण्या)चें शुभवर्तमान दिलें जाईल, तेव्हां

---

तो कोणत्या तऱ्हेनें आहे व कसा आहे हें आमच्या बुद्धीला समजण्यासारखें नाहीं. 'अत्युच्च महा सिंहासनावर' हें जें ह्मटलें आहे त्याचा अर्थ तो आपल्या प्रतापानें सर्वव्यापी आहे; ह्मणून सर्वांत उच्चस्थानहि त्यालाच शोभतें. **कर्मणो गहना गतिः**

(दुःखामुळें) त्याचें तोंड काळें पडून जाईल, आणि तो (जिवाचा घोट घेऊन) गम खाऊन राहील. ५८. तो, ज्या (मुलीच्या जन्मण्या)चें शुभवर्तमान त्याला दिलें गेलें आहे तिचें वाईट मानून लोकांपासून (लज्जेमुळें) लपत लपत फिरेल. (आणि मनांत तर्क करील कीं या) अपमानावरहि मुलीला धरून राहावें कां तिला मातींत दडपून टाकावें? पाहा! तर (परमेश्वरासंबंधानें) या लोकांचा (कसा) वाईट अभिप्राय! ५९. वाईट (वाईट) उपमा तर जे लोक (नास्तिक असून) परलोकींचा विश्वास धरीत नाहींत त्यांसच लागू होत; आणि परमेश्वरा(च्या महिम्या)स (योग्य) तर (अत्युत्कृष्ट व) उंचांत उंच अशा उपमा होत. आणि तोच परम समर्थ (व) बुद्धिमान् होय. ६०. आणि जर परमेश्वर, लोकांस त्यांच्या आज्ञाभंगाच्या शासनांत पकडता, तर तो भूतळावर कोणाही एका चालत्या फिरत्या प्राण्यास (बाकी) न सोडता. परंतु तो एका नियमित काळा(म्हणजे मृत्यु)पर्यंत यांस अवकाश देतो आहे. मग जेव्हां त्यांचा (तो) काळ येऊन पोहोंचतो, तेव्हां ते (त्यापासून) एक घटका मागें राहूं शकत नाहींत व पुढेंहि जाऊं शकत नाहींत. ६१. आणि (हे लोक)

---

(१) हुकूम याचा अर्थ निवाडा; पण निवाडा हा एक अभिप्रायच असतो ह्मणून आह्मीं अभिप्राय असा अर्थ केला आहे. ह्मणजे मुलींचें जन्मणें त्यांस लज्जास्पद वाटत होतें; असें असूनही ते परमेश्वराच्या ठायीं मुलींची योजना करीत असत हा निवाडा फारच अयुक्तिक असा होय.

(२) परमेश्वराला मुळांत संततीची अपेक्षाच नाहीं; कारण ही अपेक्षा त्याच्या निरपेक्ष व अद्वितीय होण्यास बाधक आहे. तशांत मुली तर संततीच्या जमेस धरतां येत नाहींत; येथपर्यंत कीं लोकहि त्यांचें असणें लांछनास्पद समजतात. तर भावार्थ हा कीं अपमान तिरस्कार व अपेक्षा या जेवढ्या गोष्टी होत त्या नास्तिकांच्या स्थितीलाच योग्य व लागू आहेत. राहिला परमेश्वर, तो आपल्या महिम्यास व प्रतापास कमीपणा आणणाऱ्या गोष्टींपासून पवित्र व थोर होय.

ज्या वस्तूंस आपण स्वतः पसंत करीत नाहींत त्यांची परमेश्वराच्या ठायीं योजना करतात; आणि ते आपल्या जिव्हांनीं खोट्या प्रतिज्ञाहि करीत जातात कीं (परलोकींहि) आपलें कल्याणच होय. (कल्याण तर नाहींच;) अर्थात् त्यांच्यासाठीं नरकाग्नि होय; किंबहुना हे (नरकवाश्यांचे) पुढारी होत. ६२. (हे पैगंबरा!) परमेश्वराची (म्हणजे आम्हांला आपली) शपथ आहे कीं तुझ्यापूर्वींहि आह्मीं (भिन्न भिन्न) जनतांकडे पैगंबर पाठविले. सैतानानें (त्या लोकांची वाट मारली आणि) त्यांचीं (दुष्ट) कृत्यें त्यांना सुशोभित करून दाखविलीं. तर तोच (सैतान) आजचे काळीं या(नास्तिकां)चाही मित्र (बनला) आहे आणि (सरतेशेवटीं) यांना दुःखदायक शिक्षा (होणें) आहे. ६३. आणि (हे पैगंबरा!) आह्मीं तुला (हें) पुस्तक याच हेतुनें प्रकट केलें आहे कीं ज्या गोष्टींत (हे लोक आपसांत) मतभेद करीत आले आहेत, त्या तूं यांना स्पष्ट करून समजावव्यास. या शिवाय (हें कुराण) जे लोक विश्वास बाळगितात त्यांच्या ठायीं सद्बोध व दया(यांस कारणीभूत) होय. ६४. आणि परमेश्वरानेंच आकाशांतून पाणी पाडिलें; मग त्या(पाण्या)चे योगें जमिनीला तिच्या मेल्या (ह्मणजे पडीत झाल्या) पश्चात (नव्यानें) सजीव[3] करून टाकिलें. कांहीं संशय नाहीं कीं

---

(१) याचा अर्थ एक तर याच मुलीं ज्यांचा उल्लेख वरून चालला येत आहे त्या असाव्यात, अगर पातीदार मानणें हाहि अर्थ कदाचित असेल; कारण मनुष्य आपल्या अधिकारांत व आपल्या दौलतींत कोणाची पाती पसंत करीत नाहीं. असें असतांही तो परमेश्वराचे सेवक व त्याच्या सृष्ट वस्तु यांस परमेश्वराचा सरकतदार बनवितो वा त्यांजवर सचेतन धर्मारोप करितो व त्यांस ईश्वरतुल्य मानतो हें फारच निंद्य होय.

(२) याचा अर्थ नरकाग्नीवासाच्या अखेर दर्जास ते पोहोंचविले जातील म्हणजे त्यांना अतिशय कष्ट भोगावे लागतील असा आहे. या दृष्टीनें त्यांस पुढारी म्हटलें आहे.

(३) जमिनीवर जेव्हां पिकें टवटवीत होऊन हालूं लागतात व शेतकरी शेताकडे येरझाऱ्या घालूं लागतात त्या स्थितीलाच जमिनीचें सजीव होणें ह्मटलें आहे.

जे लोक (गोष्ट) ऐकतात (व समजतात) त्यांच्यासाठीं अर्थातच या(वृत्तांतां)त (ईश्वर-सामर्थ्याची एक मोठी) निशाणी होय. ६५. आणि (लोकांनों!) तुह्मांसाठीं चतुष्पाद जनावरांतहि एक बोधपर धडा होय; कीं त्यांच्या पोटांत जो (आलापाला भरलेला) आहे त्यांतून (ह्मणजे) शेण व रक्त यांजमधून, आह्मीं तुह्मांस चोखें दूध पाजतों कीं तें पिणाऱ्यांच्या गळ्याखालीं अनायासें (गटगट) उतरतें. ६६. आणि (अशाच प्रकारें) खजुरी व द्राक्षें यांच्या फळांतून (आह्मीं तुह्मांला त्यांचा शिरा पाजतों) कीं तुह्मीं त्यांतून मद्यार्क[1] बनवितां व (एरवींहि त्यांस) उत्तम आहार (समजून अनेक प्रकारें उपयोगांत आणतां). जे लोक अक्कल राखतात त्यांच्यासाठीं या(पदार्थां)तहि (ईश्वरसामर्थ्याची एक मोठी) निशाणी होय यांत शंका नाहीं. ६७. आणि (हे पैगंबरा!) तुझ्या पालनकर्त्यानें मधमाशी[2](च्या मनां)त अशी प्रेरणा केली कीं पर्वतांतून व झाडांतून

---

(१) मद्यार्क किंवा दारूचें पिणें निषिद्ध आहे. पण असें असतांहि त्यांत ईश्वरी सामर्थ्य दिसून येतें; कीं द्राक्षें शुद्ध व अनिषिद्ध होत व त्यांचे खाणें कोणताहि वाईट परिणाम उत्पन्न करीत नाहीं. परंतु त्यांच्या कुजल्या सडल्यानें त्यांत ईश्वर प्रतापानें एक कैफ पैदा होतो व त्यामुळें मनुष्याची अक्कल लय पावून जाते. ह्मणूनच कुराणांत दारूचा निषेध केलेला आहे.

(२) मधमाशांचा अहवाल कांहीं चमत्कारिकच आहे. त्यांच्या मोहोळांतील खोल्या भूमिति शास्त्रानुसार बनलेल्या दिसून येतात; अशा कीं लहानाहून लहान जागेंत अधिकांत अधिक मध सांठवितां येतो. मधपोळ्यांत जणुं एका राष्ट्राची व्यवस्था आढळून येते. या माशांची एक राणी असते व मोहोळांतील सर्व माशा तिच्या आज्ञेंत असतात. माशांतही निरनिराळ्या प्रकारच्या माशा असतात. कांहीं मध गोळा करणाऱ्या, कांहीं पाहरा देणाऱ्या, वगैरे. रानटी लोक आपल्या मुलींच्या हुंड्यांत मधपोळें देतात. जें पोळें द्यावयाचें असेल त्यांतील राणीला धरून हवालीं केलें ह्मणजे सर्व माशा तिच्या बरोबर जातात. मधमाशा वसंत ऋतूंत मध गोळा करतात

**व लोक जे उंच उंच तट उभारतात त्यांतून, तूं मोहोळें बनीव; ६८. नंतर हरेक तऱ्हेच्या फळांतून (त्यांचा अर्क) शोषीत फिर; मग तूं (मौजेनें) आपल्या पालनकर्त्याच्या (आंखून दिलेल्या) सुगम मार्गांवर नीट चालली जा. या(माशां)च्या पोटांतून एक पेय निघतें (म्हणजे मध); त्याचे रंग वेगवेगळाले असतात. (आणि) त्यांत लोकां(च्या बहुतेक रोगां)चा परिहार होय. निःसंशय, मनन करणाऱ्या-लोकांसाठीं यांतहि (ईश्वरी सामर्थ्याची एक मोठी) निशाणी होय. ६९. आणि (लोकांनों!) परमेश्वरानेंच तुह्मांस निर्मिलें; मग तोच तुमचे प्राण हरण करितो. आणि तुमच्यांतून कित्येक असेंहि होत कीं जे आयुष्याच्या (सर्वांत) खडतर(अवस्थे)कडे पालटले जातात; अशासाठीं कीं (बहुत कांहीं) जाणल्या(बुजल्या)नंतर (असे साठळलेले होऊन जावेत कीं) त्यांना कांहींच जाणतां येऊं नये.**

---

व शरदृतुसाठीं त्याचा संचय करून ठेवतात. त्यांना जेव्हां पोळें सोडावयाचें असतें तेव्हां त्या शिलक उरलेला मध सारा चाटून जातात. तात्पर्य, ह्या माशांत ईश्वरी सामर्थ्याचे बरेच चमत्कार होत. ज्या रीतीनें माशा मध गोळा करतात व त्याचें संरक्षण करतात, त्यामुळेंच त्यांच्यासंबंधानें ह्मटलें आहे कीं परमेश्वरानें त्यांच्या मनांत अशी अशी प्रेरणा केली आहे.

(१) मध हें एक उत्तम औषध असून कफनाशक आहे व बहुतेक औषधांचें हें अनुपानहि आहे. हजरत मोहंमद पैगंबरांचे वेळीं कोणा एका मनुष्याचा भाऊ पोटांतील भयंकर व्याधीनें पिडीत होता. त्यानें पैगंबरांला विचारिल्यावरून त्यांनीं सांगितलें कीं त्याला मध चाटीव. त्यानें तसें केलें. पण पोटाच्या वेदना कमी होईनात. पुन्हां विचारल्यावरून पैगंबर साहेबांनीं उत्तर दिलें कीं जा, त्याला आणखीहि मध दे; कारण कीं परमेश्वर सत्यवादी होय व तुझ्या भावाचें पोट लबाड आहे. त्या मनुष्याला पुन्हां जास्त मध देतांच तो ईश्वर-कृपेनें बरा झाला.

(२) या ठिकाणीं मनुष्याच्या शेवटच्या स्थितीचें वर्णन आहे कीं जेव्हां तो ह्मातारा होऊन साठळून जातो तेव्हां तो मुलांसारख्या गोष्टी करूं लागतो.

निःसंशय परमेश्वरच (सर्व कांहीं) जाणता (व) समर्थ होय. ७०. आणि परमेश्वरानेंच तुमच्यांतून कित्येकांस कित्येकांवर अन्न संपत्तींत श्रेष्ठत्व दिलें आहे. तर ज्यांना जास्त (संपत्ति) दिली गेली आहे, ते आपली संपत्ति उलटून, आपल्या उजव्या हातास ज्यांचें स्वामित्व प्राप्त आहे अशा (दास दासीं)स देत नसतात, कीं अन्न संपत्तींत या(सर्वां)चा हिस्सा बरोबर होईल. तर कां हे लोक परमेश्वराच्या देणग्यांस नाकारितात? ७१. आणि तुमच्यांतूनच परमेश्वरानें तुह्मांप्रीत्यर्थ बायका निर्माण केल्या; आणि (अशाच तऱ्हेनें) तुमच्या बायकांपासून तुह्मांसाठीं पुत्र व पौत्र हे निर्माण केले. व तुह्मांस चांगले (चांगले) पदार्थ खावयास दिले. तर कां (हे लोक अगदींच) मिथ्या(उपास्यांच्या अन्नदाते होण्या)चा विश्वास धरतात; आणि परमेश्वराच्या देणग्याप्रत कृतघ्नता दर्शवितात? (आणि वास्तविक पाहतां खरा दाता तोच होय.) ७२. आणि परमेश्वरा-

---

(१) भावार्थ असा दिसून येतो कीं इहलोकींची व्यवस्था परस्पर स्थित्यंतरावर अवलंबून आहे. जर सर्व मनुष्यें सर्व गोष्टींत सारखीं असतील, तर मग कोणी राजा कां व कोणी प्रजा कां, कोणी गरजवंत कां व कोणी गरज भागविणारा कां, कोणी बहु पुत्रवान कां व कोणी निःपुत्रिक कां, आणि कोणी घरधनी कां व कोणी भाडेकरी कां? परंतु ज्याप्रमाणें हें स्थित्यंतर परमेश्वराचे निर्माण केल्यानें होतें त्याचप्रमाणें या स्थित्यंतराचें जगांत कायम राखणें हेंहि परमेश्वराचे व्यवस्थेनेंच होतें. तात्पर्य, चोर, ठग, भामटे व लोकांचा हक्क बळकावून बसणारे, हे लोक हाच कायदा मोडूं पाहतात कीं जेणेंकरून सार्वजनिक शांततेचा भंग होतो. तर जगांत शांतता जी कायम होय ती, हें स्थित्यंतर जी आपल्या स्वतंत्र अधिकाराची गोष्ट नव्हे ती चालू राहते ह्मणूनच होय. एवंच ही एक ईश्वरानें दिलेली देणगी होय. ह्मणून अशा स्वतंत्र देणगी देणारास, तें तूं त्याला कां दिलेंस व मला कां दिलें नाहींस असा प्रश्न करणें चुकीचें होय; व तें निरीश्वर-वादाचें द्योतक होय. कारण माणसानें आपल्या अखत्यारानें हें स्थित्यंतर उत्पन्न केलें नाहीं व तो आपल्या अधिकारानें तें कायमहि राखूं शकत नाहीं. तर मग परमेश्वराची देणगी तर मान्य पण त्या देणगीचा दाता मान्य नाहीं हें कसें बरें होऊं शकतें?

**शिवाय ते अशा (देवां)ची उपासना करतात कीं जे आकाश व पृथ्वी यांतून यांना अन्न-संपत्ति देण्याची कांहींच सत्ता ठेवीत नाहींत; आणि (अशी सत्ता) त्यांना शक्यहि नाहीं. ७३. तर (इहलोकिक राजांच्या अनुमानावर) परमेश्वराप्रीत्यर्थ उपमा घडूं नका; (योग्य उपमा देणें हें) परमेश्वराला माहीत आहे व (तें) तुह्मांस माहीत नाहीं. ७४. परमेश्वर एक दृष्टांत सांगतो आहे कीं एक दास होय दुसऱ्याच्या मालकीचा, कीं तो कोणत्याहि गोष्टीवर सत्ता ठेवीत नाहीं; आणि एक (दुसरा) मनुष्य होय (स्वतंत्र), कीं त्याला आह्मीं आपल्याकडून चांगली (मुबलक) संपत्ति देऊन ठेविली आहे; तर तो तींतून**

---

(१) अनेकदेववादी व मूर्तीपूजक हे अनेक देव मानण्याचा असा अर्थ करीत होते व आतांहि करतात कीं जसे राजांपाशीं खुद्दमुखत्यार व स्वतंत्र वजीर व कामदार असतात तसेच परमेश्वराचे दरबारांत आमचे इतर उपास्य देवहि होत. परमेश्वरानें त्यांची ही उपमा खोटी पाडिली कीं तुह्मांस योग्य उपमा देतां येत नाहीं; तुमच्या उपमा अगदींच निराधार व बुद्धि रहीत असतात. ह्मणून परमेश्वरानें स्वत: दोन उपमा पुढें दिल्या आहेत व त्या फारच प्रमित व न्याय्य अशा होत. 'परमेश्वराला माहीत आहे व (तें) तुह्मांस माहीत नाहीं.' याचा हा अर्थहि होऊं शकतो कीं परमेश्वर लोकांच्या स्थितीशीं वाकब आहे व तुह्मीं मानव वाकब नाहींत. ही वाकबगारी नसल्या मुळेंच तुमच्यांत जे राजे असतात त्यांस साह्य घ्यावें लागतें आणि जे गरजवंत होत त्यांनाहि ह्याची आवश्यकता भासते कीं कोणी त्यांचा शिफारसकर्ता वा मध्यस्थी असावा व राजापावेतों त्याची बातमी पोहोंचवावी. परंतु याच्या उलट परमेश्वर स्वत: सर्वज्ञानी व दूरदर्शी होय. तो कसल्याहि साधनां-वाचून तुमचें ऐकतो व तुमची सर्व स्थिति जाणतो आहे.

(२) या दृष्टांतांत, मूर्ती व इतर खोटे कल्पित उपास्य देव यांस परतंत्र दास कीं जे आपल्या सत्तेनें कांहींच करूं शकत नाहींत ते, ठरविले आहेत. आणि परमेश्वरानें आपली उपमा अशा स्वतंत्र इस-माशीं दिली आहे कीं जो आपल्या मालमत्तेंत हवी तशी उलाढाल करूं शकतो व जो कोणच्याही अंकित नसतो.

गपचीप (गपचीप) व जगजाहीरपणें (जसा हवा तसा) खर्च करितो. (तर) कां (असलीं दोन मनुष्यें) सारखीं होऊं शकतात? (हा दृष्टांत ऐकून मूर्तीपूजक अवश्य बोलूं लागतील कीं ते लोक सारखे होऊं शकत नाहींत; तर हे पैगंबरा! तूं यांना सांग,) सर्व स्तुति परमेश्वरालाच (योग्य) होय (कीं तुह्मांस इतकी समज तर आहे)! परंतु (या लोकांची स्थिति ही होय कीं) यांच्यांत बहुतेक (इतकेंही) समजत नाहींत. ७५. आणि परमेश्वर (एक दुसरा) दृष्टांत[१] सांगतो आहे (कीं) दोन पुरुष (होत), त्यांच्यांतून एक (जन्माचा) मुका (व मुका असूनहि परतंत्र कीं स्वतः) कांहींच करावयास समर्थ नाहीं, आणि (मुका असल्यामुळें) तो आपल्या मालकाला भारच होय, कीं जेथें कोठें तो त्याला धाडील तेथें त्याला कांहींच श्रेय (प्राप्त) होत नाहीं. तर कां असा (परतंत्र दास) व जो मनुष्य (लोकांस) मध्यम मार्गावर कायम राहण्यास सांगतो व स्वतःहि (मध्यम ह्मणजे न्यायाच्या) सरळ मार्गावर (कायम) होय तो, हे दोन्हीं बरोबर होऊं शकतात? ७६. आणि आकाश व पृथ्वीच्या गुप्त गोष्टी परमेश्वरालाच (माहीत) होत. आणि (पुनरुत्थानाच्या) घटकेची घडामोड तर केवळ अशी होय कीं जसें डोळयांचें लवणें; किंबहुना ती (याहूनहि) शिघ्रतर होय. निःसंशय परमेश्वर सर्वशक्तिमान् होय. ७७. आणि (लोकांनों!) परमेश्वरानेंच तुह्मांला तुमच्या

---

(१) हा दुसरा दृष्टांतहि पहिल्याप्रमाणेंच मूर्तींचा होय कीं त्या केवळ परतंत्र व अधिकाररहित असे गुलाम होत; याशिवाय त्या मूर्ती जसे जन्माचे मुके असतात तशा मुक्या व बुद्धिशून्य होत. धनी अशा गुलामांस ज्या ज्या कामांस धाडून देतो त्यांच्यानें तीं कामें रेटत नाहींत व त्यांत त्यांना यशहि येत नाहीं. आणि दुसऱ्या बाजूस परमेश्वराची अशी उपमा आहे कीं त्यांत परमेश्वरानें आपणास असा एक मनुष्य प्रगट केला आहे कीं जो सरळ मार्ग दाखवितो व आपणहि सरळ मार्गावर होय. आणि सरळ मार्ग दाखविण्यासाठीं मोठें वक्तृत्व व बुद्धिकौशल्य पाहिजे असतें तें या मुक्या व बुद्धिशून्य मूर्तींत नसतें.

आईच्या पोटांतून काढिलें (व त्यावेळीं) तुह्मीं कांहींच जाणते नव्हतां; आणि त्यानें तुह्मांस कान दिले व डोळे (दिले) व हृदयें (दिलीं) कीं कदाचित तुह्मीं (त्याचे) आभार मानाल. ७८. कां लोकांनीं पक्ष्यां(च्या स्थिती)चें अवलोकन केलें नाहीं कीं ते खुल्या अंतरिक्षांत वश होऊन राहिलेले असतात (कीं त्यांतून बाहेर जाऊं शकत नाहींत); त्यांना (उडतांना) मात्र परमेश्वरच सावरून धरतो. जे लोक विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीं ह्यांत (ईश्वर-सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. ७९. आणि परमेश्वरानेंच तुह्मांप्रीत्यर्थ तुमच्या घरांस राहण्याचें ठिकाण बनविलें व गुरांढोरांच्या कातड्यांतून तुह्मांसाठीं (तंबू, वगैरे एका विशिष्ट प्रकारचीं) घरें बनविलीं; कीं त्यांस तुह्मीं आपल्या कूच करण्याचे दिवशीं व आपल्या मुक्काम करण्याचे दिवशीं हलकींफूल पावतां; आणि चतुष्पाद जनावरांची लोंकर व त्यांची लंव व त्यांचे केंस यांतून (तुमचें) बहुतेक सामानसुमान व उपयुक्त सटरफटर बनविलें (कीं तुह्मीं) अमुक एका वेळेपर्यंत (त्यांचा सुखोपभोग घ्यावा) ८०. आणि परमेश्वरानेंच तुह्मांसाठीं, आपण सृष्ट केलेल्या वस्तूंच्या सावल्या बनविल्या आणि पर्वतांतून तुमच्यासाठीं (गुहा गुफा वगैरे) एकांताचीं स्थानें बनविलीं; आणि त्यानें तुह्मांसाठीं वस्त्रप्रावरण बनविलें कीं तें तुमचें गरमी(-सरदी)पासून रक्षण करील व (कांहीं लोहमय) वस्त्रें (म्हणजे चिलखतें बनविलीं) कीं तीं तुह्मांस तुमच्या (परस्पर) प्रहारापासून वांचवितील. अशा प्रकारें (परमेश्वर) आपल्या देणग्या तुह्मां लोकांवर परिपूर्ण करितो, कीं कदाचित् तुह्मीं (उपकार मानून त्याच्या) आज्ञाधीन होऊन जाल. ८१. मग जर (लोक इतक्या समजाविल्यावरहि) तोंड चुकवितील, तर (हे पैगंबरा!) तुजकडे (परमेश्वराच्या आज्ञा) स्पष्टपणें पोहोंचविणें होय एवढेंच काय तें. ८२. (हे लोक) परमेश्वराच्या देणग्या ओळखतात व मग (जाणून बुजून)

---

(१) भावार्थ हा कीं तुह्मीं जन्मताच निव्वळ ज्ञानहीन व बुद्धिशून्य होतां. तर यावरून उघड दिसून येतें कीं तुह्मीं आपल्या इच्छेनें पैदा झालां नाहीं.

त्या नाकारितात; आणि यांच्यांतून बहुतेक अनुपकारी होत. ८३. आणि (लोकांनों! पुनरुत्थानाच्या दिवसाची आठवण करा कीं) त्या दिवशीं आह्मीं हरेक जनतेंतून (त्या जनतेच्या पैगंबरास) साक्षी (बनवून) उभा करूं; मग नास्तिकांस (ब्रहि काढण्याची) परवानगी दिली जाणार नाहीं व त्यांना माफीहि दिली जाणार नाहीं. ८४. आणि ज्या लोकांनीं (परमेश्वराच्या संबंधांत) दांडगाई केली आहे ते, जेव्हां (पुनरुत्थानाचे दिवशीं) शिक्षा पाहून घेतील तेव्हां (कांहीं केलें तरी) त्यांच्यावरून तर (शिक्षाच) हलकी केली जाणार नाहीं व त्यांना अवकाशहि दिला जाणार नाहीं. ८५. आणि जे लोक (जगांत परमेश्वराचे) सरकतदार स्थापित राहिले ते जेव्हां (पुनरुत्थानाचे दिवशीं) आपल्या (त्या) सरकतदारांना पाहतील, तेव्हां (त्यांना पाहतांच ) ते बोलूं लागतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! ज्यांना आह्मीं तुझ्याशिवाय (जगांत कर्ताहर्ता समजून) बोलावीत होतों ते आमचे सरकतदार हेच होत. मग ते सरकतदार (त्यांचें) बोलणें (उलटें) त्यांच्याचकडे फेंकून मारतील कीं अर्थात तुह्मीं (नखशिखांत) लबाड आहां. ८६. आणि ते लोक त्यादिवशीं परमेश्वरासमोर इस्लाम-आज्ञाधीनता पुढें करतील आणि (जगांत) ते जें जें कुभांड रचीत होते तें (सर्व) त्यांच्यापासून नाहींसें होऊन जाईल. ८७. जे लोक नास्तिकपणा करीत व (लोकांस) परमेश्वराचे मार्गाहून अडकवित राहिले ते, जो (हा) फिसाद करीत राहिले त्याच्या शासनार्थ आह्मीं त्यांच्याठायीं शिक्षेवर शिक्षाच वाढवीत जाऊं. ८८. आणि (लोकांनों! पुनरुत्थानाचे दिवसाची आठवण करा कीं) त्यादिवशीं आह्मीं हरेक जनतेंत त्यांच्यांतलाच एक साक्षी (ह्मणजे पैगंबर) त्यांच्यावर

(१) अपराध्यासाठीं हेंहि एक प्रकारचें शासन होय; कीं त्याच्यापासून जबाबहि घेतला जाऊं नये. या जगांत कोणी अधिकारी असें करील तर तो अन्याय होय. पण सर्वज्ञानी परमेश्वरास जाब घेण्याचीहि जरूरीच काय पडणार, तो तर जबाब घेतल्यावांचूनहि सर्व कांहीं जाणतोच आहे.

उभा करूं; आणि (हे पैगंबरा!) तुला (तुझ्या काळच्या) ह्या(नास्तिकां)वर साक्षी बनवून आणूं. आणि (हे पैगंबरा!) आह्मीं तुला (हें) पुस्तक प्रकट केलें आहे, (कीं ज्यांत) हरेक गोष्टीचें (समर्पक) विवेचन (होय), आणि मुसलमानांप्रीत्यर्थ सद्बोध व दया व शुभवर्तमान (हीं होत). ८९. (मुसलमानांनों!) परमेश्वर न्याय करण्याचा हुकूम देतो व (लोकांशीं) परोपकार करण्याचा आणि आप्त नातलगांस (द्रव्य संबंधीं साहाय्य) देण्याचा; आणि निर्लज्जपणा(चीं कामें) व असंभावित वर्तणूक आणि (एकमेकांवर) अत्याचार करणें यांपासून मनाई करतो. तो तुह्मांस (असे असे) बोध करितो कीं कदाचित् तुह्मीं (या गोष्टींचें) मनन कराल. ९०. आणि जेव्हां तुह्मीं लोक आपसांत कौलकरार करून टाकाल, तेव्हां परमेश्वराचा करार पुरा करा; आणि शपथा[२] पक्क्या केल्या पश्चात त्या मोडून टाकूं नका; आणि वास्तविक पाहतां तुह्मीं परमेश्वराला आपला जामिन ठरवून चुकलां आहां. कांहीं संशय नाहीं कीं जें कांहीं तुह्मीं करीत राहिलां आहां, तें परमेश्वर खूप जाणून आहे. ९१. आणि (शपथा मोडण्यांत) तुह्मीं त्या स्त्री सारखे होऊन जाऊं नका कीं जिणें आपलें कांतलेलें सूत मजबूत पीळ दिल्यानंतर तुकडे तुकडे करून तोडून टाकिलें; कीं तुह्मींहि आपल्या शपथांस (ह्या मुळें) आपसांतलि फिसादाचें कारण बनवूं लागावें कीं एक जनसमूह हा दुसऱ्या जनसमूहापेक्षां जबरदस्त होय. परमेश्वर (ज्यानें कित्येकांस जबरदस्त व कित्येकांस कमजोर बनवून ठेविलें आहे तो) केवळ या(स्थित्यंतरा)द्वारें तुह्मां लोकांस कसून

---

(१) या प्रकारचा मजकूर कुराणांत इतरत्रहि आला आहे. भावार्थ असा कीं ज्यावेळीं कर्मांचा हिशेब होऊं लागेल त्यावेळीं एका एका जनतेला त्यांच्या पैगंबरासह पुढें केलें जाईल; आणि पैगंबर साक्ष देतील कीं आह्मीं या लोकांस परमेश्वराचा हुकूम ऐकविला व समजाविला होता.

(२) लोकांत जो आपसांत कौलकरार होतो त्यांत बहुतकरून शपथाशपथ होत असते ह्मणून ह्मटलें कीं शपथा पक्क्या झाल्यावर त्या मोडूं नका ह्मणजे आपले कौलकरार पुरे करा.

पाहतो आहे (कीं तुह्मीं जबरदस्तांचा मान राखतां कीं कौलकराराचा व शपथांचा?) आणि ज्या गोष्टींत तुह्मीं मतभेद करीत आलां आहां, पुनरूत्थानाचे दिवशीं परमेश्वर तुह्मांस (त्यांची अस्सल हकीकत) अवश्य जाहीर करून टाकील ९२. आणि परमेश्वर इच्छिता तर तो तुह्मां(सर्वां)स एकच जनता करून टाकता. परंतु तो ज्याला इच्छितो त्याला मार्गाहून बहकवितो; व ज्याला इच्छितो त्याला सन्मार्गाची बुद्धि देतो. आणि (लोकांनों!) जें कांहीं तुह्मीं (जगांत) करीत राहिलां आहां त्याची तुह्मांपासून जरूर पृच्छा होईलच होईल. ९३. आणि आपल्या शपथांस आपसांतील फिसादाचें कारण बनवूं नका कीं (जेणेंकरून लोकांचा) पाय दृढ जमल्यानंतर (इसलामाहून) डगमगेल आणि (सरशेवटीं) परमेश्वराचे मार्गाहून (लोकांस) तुह्मीं प्रतिबंध केलांत ह्मणून तुह्मांस (ईश्वरी शिक्षेच्या) अनिष्टाची गोडी चाखावी लागेल व तुह्मांला मोठी (कडक) शिक्षा होईल. ९४. आणि परमेश्वराच्या आणा शपथांचे ऐवजीं (इहलोकींचे) अल्प स्वल्प फायदे पत्करूं नका. (करार पुरा करण्याचा मोबदला) जो परमेश्वरासमीप (प्राप्त) होय तोच तुमच्या ठायीं उत्तम होय; (पण,) अट ही आहे कीं तुह्मीं (ह्या गोष्टीला) समजावें. ९५. जी (ऐहिक मालमत्ता) तुह्मांपाशीं

(१) हजरत मोहंमद पैगंबरांच्या हातून इस्लामधर्माचा प्रसार होण्याच्यापूर्वी अरब लोकांची नीति-मत्ता फारच निकृष्ट व वाईट होती. त्यांत, त्यांच्यामध्यें एक मोठा ऐब ह्मटला ह्मणजे विश्वासघात व वचनभंग हा होता; आज एखाद्या लोकांशीं करार केला, उद्यां त्यांच्या विरुद्ध पक्षाचे लोक जबरदस्त दिसून आले कीं तो करार मोडून विरुद्ध पक्षाला जाऊन मिळाले. मुसलमानांस या महावाक्यांमध्यें वचनभंग करण्याविषयीं फार सक्तीनें मनाई केली गेली आहे; कीं ते वचनभंग करतील तर त्यांची उपमा त्या रैता बिन्ते सअद बिन्ते तैम या नांवाच्या मूर्ख स्त्रीसारखी होईल कीं फार श्रमानें तर तिणें सूत काढलें व मग सारें तोडून ताडून बरोबर करून टाकलें. विश्वासघात व वचनभंग याचा सर्वांत वाईट परिणाम हा होय कीं मनुष्य लोकांच्या नजरेंतून

**आहे ती (सर्व एका ना एका दिवशीं) खुंटून जाईल; आणि जो (मोबदला) परमेश्वरासमीप होय तो (सतत) बाकी राहील. आणि ज्या लोकांनीं (ह्या जगीं दुःख) सहन केलें त्यांना (पुनरुत्थानाचे दिवशीं) ते जें (हें) उत्तमोत्तम कर्म आचरीत राहिले त्याचा मोबदला आह्मीं अवश्य देऊंच देऊं. ९६. जो कोणी सुकृत्य करील, पुरुष असो वा स्त्री; आणि तो (खरा) विश्वासूहि असेल, तर आह्मीं (इहलोकींहि) त्याचें जिवित्व सुखाचें जीवित्व करूं; आणि त्यांना (परलोकीं) त्यांच्या (या) उत्तमोत्तम कर्मांचा मोबदला अवश्य देऊंच देऊं. ९७. तर (हे पैगंबरा!) जेव्हां तूं कुराण वाचूं लागशील, तेव्हां धोंडमार करून पिटाळलेल्या सैताना(च्या भुरळी)पासून तूं**

---

उतरून जातो, त्याच्या बोलण्याचा कोणालाही विश्वास पटत नाहीं. जर प्रथमारंभींचे मुसलमान वचनभंग करते तर त्यांचा आवश्यक परिणाम हा झाला असता कीं ज्या लोकांनीं इस्लामधर्माची दीक्षा घेतली तेहि त्यांचा वचनभंग पाहून त्यांच्या हातांतून निघून जाते व इतर लोक इस्लामधर्मांत येण्यास कचरते. व मग त्या मूर्ख स्त्रीची उपमा त्यांच्या ठायीं सार्थ झाली असती; कीं किती श्रमानें इस्लामाचा प्रसार केला व वचनभंग करून त्यांनीं सारी मेहनत निष्फळ करून टाकली. मुसलमानांची ही स्थिति असती तर लोकांस धर्माचा वीट येऊन गेला असता; कीं ज्यांच्या बोलाचा विश्वास नाहीं त्यांचा धर्मच काय! अरब लोक मुसलमान झाले तेव्हांपासून त्यांच्यांतला हा ऐब नाहींसा झाला. आणि मुसलमान लोक वचनाचे खरे असतात ही गोष्ट जगाच्या निदर्शनास आली. यावरहि जर कोणी विश्वासभंग करील तर इस्लामधर्मास त्याशीं कर्तव्य नाहीं.

(१) कारण संसारी माणूस श्रीमंत असो वा गरीब, कोणत्याही स्थितींत संतुष्ट राहूं शकत नाहीं; फक्त विश्वास वा धार्मिकपणाच एक अशी वस्तु होय कीं जी मनुष्याला इहलोकीं संतुष्ट राखूं शकते; कीं त्याला सुख प्राप्त आहे तर तो परमेश्वराप्रत कृतज्ञता व उपकार-स्तुति दर्शवितो आणि दुःख व संकट आलें तर तो सहनशीलता पत्करतो.

परमेश्वराचा आश्रय मागीत जा. ९८. जे लोक विश्वास धरतात व आपल्या पालनकर्त्यावर भरंवसा ठेवतात त्यांच्यावर सैतानाचा कांहीं जोरा (चालत) नाहीं, हें खचित. ९९. त्याचा जोरा तर जे लोक त्याच्याशीं स्नेहसंबंध ठेवतात व जे परमेश्वराचे सरकतदार स्थापितात त्यांच्यावरच काय तो (चालतो). १००. आणि (हे पैगंबरा!) जेव्हां आह्मीं एका महावाक्याला बदलून त्याच्याजागीं दुसरें महावाक्य प्रकट करितों ;-आणि परमेश्वर ज्या (आज्ञा) सादर करतो त्यां(च्या प्रयोजनां)स तोच खूप जाणतो,-तेव्हां (नास्तिक तुला) म्हणूं लागतात कीं बस्स तूं तर आपल्या मनानेंच घडितो आहेस. (त्यांचा हा ग्रह चुकीचा होय;) किंबहुना (गोष्ट ही होय कीं) यांच्यांतून बहुतेक (वेळेचें प्रयोजन) जाणत नाहींत. १०१. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं खरें तर हें होय कीं हें (कुराण) तुझ्या पालनकर्त्याकडून पवित्र आत्मा (म्हणजे 'जिब्रील') हा घेऊन आला आहे; अशा साठीं कीं जे लोक विश्वास धरून चुकले आहेत त्यांना परमेश्वर याच्यायोगें (विश्वासावर) शाबूद राखील, आणि तें (परमेश्वराचे) आज्ञाधारक सेवकांचे ठायीं सद्बोध व शुभवर्तमान होईल. १०२. आणि (हे पैगंबरा!) आह्मांस (हेंहि) खचित माहीत आहे कीं नास्तिक (कुराणासंबंधानें) हा (संदेह) व्यक्त करतात कीं असो नसो, या मनुष्याला (म्हणजे तुला अमुक अमुक) मनुष्य शिकवित असतो. पण ज्या मनुष्याकडे (हे लोक शिकविण्याचा) आरोप करतात, त्याची भाषा तर परकीय होय; आणि ही (जींत कुराण

(१) भावार्थ असा कीं कुराणाची वर्णनशैली फारच वक्तृत्वपूर्ण व त्यांतील मजकूर फारच सत्य व नीतिमत्तापूर्ण आहे; आणि आरंभापासून आजपर्यंत सर्व जगापुढें त्याच्या तोलाचें पुस्तक आणण्याचें खुद्द कुराणांतच कित्येक स्थळीं आव्हान आहे व तें रास्तहि आहे. शिवाय नास्तिकांस हेंहि ठाऊक होतें कीं हजरत मोहंमद पैगंबर हे निरक्षर होते. तेव्हां कुराण ईश्वरप्रणीत होय असें मानण्याचे ऐवजीं दुराग्रहानें त्यांनीं असे संदेह व्यक्त केले कीं पैगंबरांस अमुक अमुक मनुष्य शिकवीत असतो. पण नास्तिक लोक ज्याच्यावर असा आरोप करीत होते ते परकीय लोक असून त्यांची भाषाहि परकीय होती आणि

आहे ती) सुबोध अरबी भाषा होय. १०३. जे लोक (हट्टानें व दुराग्रहानें) परमेश्वराच्या महावाक्यांवर विश्वास ठेवीत नाहींत, परमेश्वरहि त्यांना सरळ मार्ग दाखवीत नसतो; आणि (परलोकीं) त्यांना दुःखकारक शिक्षा (होणें) आहे. १०४. ज्या लोकांस परमेश्वराच्या महावाक्यांवर विश्वास नाहीं तेच मात्र मनानें खोटें कुभांड रचितात; आणि (मुळांत) हेच लोक लबाड होत. १०५. जो मनुष्य (नास्तिकपणा करण्यास) बळेंच भाग पाडिला जाईल पण त्याचें अंतःकरण विश्वासानेंच संतुष्ट असेल (तर त्याला कांहीं शासनच नाहीं;) परंतु जो मनुष्य आपण विश्वास धरल्यानंतर परमेश्वराशीं नास्तिकपणा करील आणि नास्तिकपणाहि करील तर खूप मन मोकळें करून; तर अशा लोकांवर परमेश्वराचा कोप होय व त्यांच्यासाठीं मोठी (सक्त) शिक्षा होय. १०६. हें यामुळें कीं त्यांनीं इहलौकिक आयुष्यास परलोकींच्यापेक्षां प्रीयतर गणिलें. आणि (तसेंच) या मुळें कीं जे लोक नास्तिकपणा करतात त्यांस परमेश्वर सन्मार्गाची बुद्धि देत नसतो. १०७. हेच ते लोक होत कीं ज्यांच्या अंतःकरणांवर व ज्यांच्या कानांवर व ज्यांच्या डोळ्यांवर परमेश्वरानें मोहोर करून टाकली आहे; आणि हेच (पराकाष्टेचे) बेफाम होत. १०८. तथापि परलोकींहि अवश्य हेच लोक तोट्यांत राहतील. १०९. मग ज्या लोकांनीं संकट व छल यांस फशीं पडल्यानंतर घरेंदारें सोडिलीं व मग (परमेश्वराचे मार्गांत) युद्धें केलीं आणि (स्वदेशत्याग व धर्मयुद्धें यांत जीं संकटें ओढवलीं तीं मुकाट्यानें) सहन केलीं त्या लोकांप्रत, (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता, निःसंशयच तुझा पालनकर्ता या(सर्व परिक्षांच्या)नंतर (पुनरुत्थानाचे दिवशीं) अर्थात् क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ११०. त्या दिवशीं प्रत्येकजण आपल्या स्वताःहासाठीं वाद घालण्यास येऊन

---

कुराण हें खुद्द अरबी भाषेंत आहे. तर ज्यांची जन्मभाषा अरबी आहे त्यांच्यानें या आव्हानाचें उत्तर देववलें नाहीं. तर ज्यांची भाषा परकी ते काय पैगंबरांला शिकवूं शकतील? असें सांगून परमेश्वरानें त्यांस निरुत्तर केलें.

**हजर होईल; आणि प्रत्येकजणास त्यानें जें केलें सवरलें त्याचा भरपूर मोबदला दिला जाईल व लोकांवर (कोणाहि तऱ्हेचा) जुलूम केला जाणार नाहीं. १११. आणि परमेश्वर एका गांवाचा दृष्टांत सांगतो आहे कीं तें (गांव हरेक प्रकारें) निर्भय व शांततेचें होतें, चोहोंकडून त्याची संपत्ति रेलचेल त्याच्यापाशीं चालली येत होती; मग तें (गांव) परमेश्वराच्या देणग्यांप्रत अनुपकारी झालें, तर (तेथील) लोकांनीं जें जें कांहीं केलें त्याच्याबद्दल परमेश्वरानें त्यांस गोडीहि चाखविली कीं भूक आणि भय यांस (त्यांचें आंथरूण) पांघरूण करून टाकिलें. ११२. आणि त्यांच्यांतलाच एक पैगंबरहि त्यांच्यापाशीं आला, तर त्यांनीं त्याला पाखंडी म्हटलें; यावर (ईश्वरी) शिक्षेनें त्यांना येऊन गांठिलें. आणि तेच अन्यायकारी होते. ११३. तर (मुसलमानांनों!) परमेश्वरानें जो तुह्मांस शास्त्रविहित (व) शुद्ध आहार दिला आहे त्यांतून**

---

(१) परमेश्वरानें ज्या गांवाचा दृष्टांत सांगितला आहे त्याचें नांव स्पष्ट सांगितलें नाहीं. परंतु ज्या स्थितीचें वर्णन केलें आहे ती खुद्द **मक्का** शहरास लागू पडतेशी वाटते; कारण कीं अज्ञानकाळींहि **मक्के**चे लोक अभय व शांततेंत राहत होते. साऱ्या **अरबी** द्विपकल्पांत लुटालूट व यादवी माजलेलीच होती; पण **काबा**–भुवनाविषयींच्या पूज्यबुद्धि-मुळें कोणी त्या लोकांकडे डोळा उचलूनही पहात नव्हता. आणि **मक्के**चा प्रदेश डोंगराळ आहे व त्यांत शेतभात होण्यासारखें नाहीं, शिवाय तेथें पाण्याचीहि फारच टंचाई असते; असें असतांहि चोहोंकडून धान्यें, फळें, वगैरे रेलचेल **मक्के**ला येत असतात. तर हें अभय व शांतता व आहार संपत्तीची विपुलता **मक्के**च्या लोकांच्या ठिकाणीं परमेश्वराचा मोठा उपकारच होय ह्मणून तेथील लोकांस त्याची उपकारस्तुति करणें आवश्यक होतें. परंतु खरा अन्नदाता व उपकारकर्ता जो परमेश्वर त्याला विसरून ते मूर्तीपूजा करूं लागले. परमेश्वरानें पैगंबर साहेबांस त्यांच्या सन्मार्गदर्शनार्थ पाठविलें. त्यांची किंमत त्यांनीं जाणिली नाहीं; या अनुपकाराचे शासनार्थ सात वर्षे दुष्काळांत गांजिले गेले. मुसल-मांनाशीं त्यांचें युद्धही जुंपलें होतें ह्मणून त्यांना त्यांच्याकडून धास्ती लागून राहत होती.

(खुशाल) खा ; आणि जर तुह्मीं परमेश्वराच्याच भक्तिचा बाणा बाळगीत आहां तर त्याच्या देणगीबद्दल उपकारस्तुतिहि करा. ११४. त्यानें तर तुह्मांस फक्त आपोआप मेलेलें (जनावर) निषिद्ध केलें आहे आणि (तसेंच) रक्त व डुकराचें मांस आणि ज्या(जनावरा)स परमेश्वराशिवाय अन्य कोणा(च्या सन्मानार्थ व सांनिध्या)र्थ (वधिलें व) नामजाद केलें जाईल तें (जनावर)हि. मग जो कोणी (भुकेनें) व्याकूळ होईल, (आणि ईश्वराज्ञेचें) उल्लंघन न करतां व (आवश्यक मर्यादेच्या) बाहेर न जातां (निरुपायास्तव तो एखादी निषिद्ध वस्तु सेवन करील) तर परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ११५. आणि (नास्तिकांप्रमाणें) खोटें नाटें जें कांहीं तुमच्या जिव्हा उच्चारितील तें (समजल्या उमजल्यावांचून) बोलत जाऊं नका; कीं हें अनिषिद्ध आहे व हें निषिद्ध; कीं (अशा बडबडीनें) तुह्मीं परमेश्वरावर खोटें थोतांड रचूं लागाल. जे लोक परमेश्वरावर खोटें थोतांड रचितात ते (आपल्या मनोरथांत कधींहि) सफल होणार नाहींत. ११६. (हेंहि जगाचे दोन दिवसाचे) अल्प-स्वल्प उपभोग होत; आणि (परिणामीं) त्यांना दुःखदायक शिक्षा (होणें) आहे. ११७. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं ज्या वस्तु तुला पूर्वीं सांगून चुकलों आहों त्या आह्मीं यहुद्यांस निषिद्ध केल्या होत्या; आणि (त्या वस्तूंच्या निषेधांत) आम्हीं त्यांच्यावर जुलूम केला नाहीं, किंबहुना ते आपणच आपल्यावर जुलूम करीत असत. ११८. मग जे लोक अज्ञानानें पातक करीत राहिले, व मग त्यानंतर पश्चात्ताप पावले; आणि (पश्चात्तापानंतर ज्यांनीं आपलें आचरण) सुधारिलें त्या लोकांप्रत तर (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता, निःसंशयच तुझा पालनकर्ता (पश्चात्ताप व स्थितिसुधारणा) यांच्यानंतर अर्थात् क्षमा-कर्ता (व) दयाळू होय. ११९. निःसंशय, 'इब्राहीम' हा एक (सद्-

(१) या वाक्याचे स्पष्टीकरणास्तव कुराण भाग २, अध्याय २:१७३ या वरील टीप पहा.

(२) याचा उल्लेख कुराण, भाग ८, अध्याय ६:१४६-१५१ पर्यंत पहा.

मांचा) नमुना होऊन गेला आहे; तो परमेश्वराचा आज्ञाधारक सेवक असून एकनिष्ठ असा होता. आणि तो मूर्तीपूजकांपैकीं नव्हता. १२०. तो परमेश्वराच्या देणग्यांप्रत कृतज्ञ होता. परमेश्वरानें त्याला निवडून घेतलें होतें व त्याला (धर्माचा) सरळ मार्गहि दाखवून दिला होता. १२१. आणि आह्मीं त्याला इहलोकींहि (हरेक प्रकारचें) श्रेय दिलें होतें व परलोकींहि तो अवश्य (आमच्या) सदाचरणी (सेवकां) पैकीं होईल. १२२. मग (हे पैगंबरा!) आह्मीं तुजकडे (असा) आदेश पाठविला कीं तूं 'इब्राहिमा'च्या मार्गाचें अनुकरण कर, कीं तो एकनिष्ट होता आणि मूर्तीपूजकां पैकीं नव्हता. १२३. शनवार(च्या दिवसा)चा आदर सन्मान तर केवळ, ज्या लोकांनीं (अखेर) त्याच्या संबंधानें (तऱ्हेतऱ्हेचे) मतभेदहि केले त्यांनाच आवश्यक केला गेला होता. आणि (हे पैगंबरा!) ज्या ज्या गोष्टींत हे लोक आपसांत मतभेद करीत राहिले आहेत, पुनरुत्थानाचे दिवशीं तुझा पालनकर्ता यांच्यांत त्या गोष्टींचा (निर्णयात्मक) निवाडा करून टाकील. १२४. (हे पैगंबरा,

---

(१) यांत 'उम्मत' शब्द ज्याचा अर्थ गण, जनसमूह वा जनता असा होतो तो एकट्या इब्राहीम पैगंबरालाच लाविलेला अढळतो. ह्मणून याचा भावार्थ असा दिसतो कीं लोकांत जे जे श्रेष्ठ गुण होते ते सर्व समुच्चयेंकरून हजरत इब्राहीम पैगंबरांत आढळून येत होते. शिवाय त्यांना नमरूद बादशाहानें अग्नींत टाकून दिले त्यां पूर्वी सकळ जगांत, परमेश्वर एक आहे असा विश्वास धरणार आज्ञाधारक सेवक कोणीच नव्हता. तर इब्राहिम हा एकटाच गण होता. हें अधिक स्पष्टपणें सांगावयाचें ह्मणजे तो एक सद्धर्माचा नमुना होता; हाच अर्थ आह्मीं येथें स्वीकारिला आहे.

(२) मुसलमानांनीं ईश्वराज्ञेनें आठवड्याच्या वारांतून शुक्रवार पवित्र मानिला; तेव्हां यहुदी व खिस्ती हे यावर आक्षेप काढूं लागले. परमेश्वरानें त्याचें उत्तर दिलें कीं मुसलमान हे इब्राहीम पैगंबरांच्या धर्ममार्गाला अनुसरतात. शब्बाथ म्हणजे शनवारच्या आदर-सन्मानाचा हुकूम इब्राहिमानंतर झाला होता; म्हणून मुसलमानांस या हुकमाची अमल बजावणी आवश्यक नाहीं. मग ज्या लोकांस शनवारच्या आदर सन्मानाचा

तूं लोकांस) शहाणपणाच्या गोष्टी व उत्तम (उत्तम) उपदेशांद्वारें आपल्या पालनकर्त्याच्या मार्गाकडे आमंत्रण कर; आणि त्यांच्याशीं वाद-विवादहि कर, (तर) अशा रीतीनें कीं जी (लोकांस) फारच (पसंत व) शोभेलशी होईल. (हे पैगंबरा!) जो कोणी परमेश्वराच्या मार्गा-हून भटकला, त्या(च्या स्थिती)शीं तुझा पालनकर्ता खूप वाकब होय; आणि (तसाच) तो, जे लोक सरळ मार्गावर होत त्यांच्या(स्थिती)शींहि खूप वाकब होय. १२५. आणि (मुसलमानांनों! धर्माचे वादविवादांत विरुद्धपक्षी यांशीं) सक्तीहि कराल तर जशी सक्ती तुह्मांबरोबर केली गेली असेल तशीच सक्ती तुह्मींहि करा. आणि जर तुह्मीं (लोकांचे छल) सहन कराल, तर कांहीं झालें तरी, सहनशील लोकांच्याठायीं सहन करणेंच उत्तम होय. १२६. आणि (हे पैगंबरा! तूं विरुद्ध पक्षीयांचे छल) सहन कर; आणि तुझें सहन करणें हें परमेश्वराच्या(कृपे)वांचून होणेंहि (शक्य) नाहीं. आणि नास्ति-कांबद्दल तूं खेद करूं नकोस; आणि हे लोक (तुझ्याविरुद्ध) ज्या खटपटी करतात त्यांपासून तूं संकुचित होऊं नकोस. १२७. (कारण कीं) जे लोक (परमेश्वराला) भिऊन चालतात व (लोकां-बरोबर) जे परोपकारानें वागतात त्यांचा परमेश्वर साथी होय. १२८.

---

हुकूम दिला गेला होता त्यांनींहि याच्यासंबंधानें तऱ्हेतऱ्हेचे मतभेद केले. ख्रिस्त्यांनीं अदितवार पाळिला व यहुद्यांनीं शनवार पाळिला; त्यांनीं शनवारासंबंधींहि मोठमोठें निमित्त रचिलें. कारण, शनवारीं शिकार करण्याची मनाई होती. हे लोक आदल्यादिवशीं पाण्याचे बांध कापून टाकित होते व शनवारीं मासे आपोआप त्या खांचांत येऊन गोळा होत व दुसऱ्या दिवशीं ते त्यांस पकडून खात असत.

# पवित्र कुराण

## भाग पंधरावा.

### अध्याय १७ वा.

## सूरतु-बनी-इस्राईल.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकटिला गेला आहे. ह्यांत १११ आयात-महावाक्यें आहेत. 'बनी-इस्राईल' ह्मणजे यहुदी यांस त्यांच्या पूर्वस्थितीचें स्मरण देववून ती त्यांच्या विचारार्थ त्यांच्या डोळ्या पुढें धरून बजाविण्यांत आलें आहे कीं तुह्मीं आपले पूर्वग्रह व चुकीच्या समजुती सोडून, तौरात ह्मणजे जुना करार यांत अनुवाद, अध्याय १८:१५ मध्यें जें भविष्यवचन आहे तें हजरत मोहंमद पैगंबरांच्या वर्णनाशीं बरोबर सांगोपांग जुळतें; त्याचा विचार करा व त्या पैगंबराचें ऐका, कारण इब्राहीमाचे पुत्र इस्हाक यांची पुत्रपौत्र परंपरा मूसा वा मोश्या आणि येशू ख्रिस्त यांजकडे जाते; आणि इस्हाकचे भाऊ इस्माईल यांची वंशपरंपरा हजरत मोहंमद पैगंबराकडेस येऊन मिळते. तेव्हां हजरत मोहंमद हे मूसाच्या बांधवांपैकीं असून त्यांचें मूसाशीं बहुतेक सर्व गोष्टींत सादृश्य दिसून येतें. तसें येशू ख्रिस्ताचें नसून येशू हे मूसाच्या पुत्रपौत्रांत मोडतात, बांधवांत नाहींत. या शिवाय यूशा विन-नून किंवा जोशूआ ज्यांना यहुदी किंवा इस्राएल लोक या अनुवादांतील या भविष्यवचना प्रमाणें तो पैगंबर वा भविष्यवादी मानतात; तें बरोबर नव्हें. कारण, हजरत यूशा हे मूसाचे बांधव नसून त्यांचे शिष्य किंवा त्यांचे नोकर होते व त्यांचें मूशाशीं कांहींच सादृश्य नव्हतें. तर यहुद्यांनीं पूर्वी प्रेषित वा पैगंबरांचा जसा छळ केला होता, तसा न करतां हा सन्मार्ग ह्मणजे इस्लामधर्म स्वीकारावा वगैरे बनी-इस्राएलासंबंधीं विवेचन यांत झालें आहे

ह्मणून बनी-इस्राएलांचें प्रकरण हें नांव. याचें दुसरें नांव, 'सूरतुल्-अस्रा'-रात्र पर्यटनाचें प्रकरण-ज्यांत हजरत मोहंमद पैगंबरांस परमेश्वरानें मक्का-पुरीहून यरुशलेमपर्यंत रातोरात प्रवास करविला व तेथून पुढें त्यांचें दिव्यारोहण झालें त्याचें दिग्दर्शन आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचें नांवानें (मी आरंभ करितों).**

**तो (परमेश्वर दुर्बलता व अशक्तपणा या दोषांपासून) पवित्र होय कीं जो आपला सेवक ('मोहंमद') यास रातोरात पवित्र मशीदी (म्हणजे 'काबा' मंदिरा) पासून त्या लांबच्या पल्लयाच्या मशीदी (म्हणजे 'यरुशलेम') पावेतों घेऊन गेला; कीं जिच्या सभोंवताल(च्या प्रदेशास) आम्हीं (हरेक ऐहिक व पारमार्थिक प्रसादानें) आशिर्वादित केलें आहे. (आणि ह्या नेण्याचा उद्देश हा होता) कीं आम्हीं त्याला आपले (परम सामर्थ्याचे) अनेक चमत्कार निरीक्षण करवावेत (व त्याला कित्येक गुप्त भेद माहीत व्हावेत; नाहींतर, मुळांत) ऐकता व पाहता (म्हणजे अदृष्टज्ञानी) तोच परमेश्वर होय. १. आणि आम्हीं 'मूसा'ला**

---

(१) ऐहिक प्रसाद हे कीं तेथील जमीन उत्कृष्ठ असून तींत नद्या, पर्वत, वगैरे निसर्गाचे सुंदर सुंदर देखावे आहेत व उत्तमांत उत्तम पिकांची त्यांत नित्य रेलचेल असते. आणि पारमार्थिक प्रसाद ह्मटले ह्मणजे या पवित्रभूमींतील हें शहर व तेथील मंदिर यहुदी वगैरे सर्व ग्रंथधारी लोकांचें फार प्राचीन काळापासून पवित्र स्थळ आहे अशी प्रसिद्धि चालत आली आहे. शेकडों भविष्यवादी वा पैगंबर या भूप्रदेशांत जन्मले व तेथेंच समाधिस्थ झाले. ह्मणून या प्रदेशाला आशिर्वादित केलें असें ह्मटलें आहे.

(२) या वाक्याचा मागील वाक्याशीं संबंध विचार करण्याजोगा आहे. आमच्या लक्षांत तर हें येतें कीं अदृष्ट ह्मणजे गैबी गोष्टींचें ज्ञान विशेषेंकरून केवळ परमेश्वरालाच होय. पण त्याच्या मर्जीस येईल तर तो पाहिजे तितकें तें पैगंबरांनाहि प्रगट करतो. सारांश, एके जागीं ह्मटलें आहे कीं "तो (परमेश्वर) आपलें अदृष्ट कोणालाही प्रगट करीत नाहीं; पण पैगंबरांपैकीं ज्याच्यावर त्याची मर्जी होईल त्यालाच मात्र

**(तौरात) पुस्तक दिलें व तें 'बनी–इस्राएलां'साठीं सन्मार्गसूचक ठरविलें; (व त्यांना सांगून दिलें) कीं माझ्याशिवाय कोणालाच (आपला) पुरस्कर्ता बनवूं नका; २. (कीं) ज्यांना आम्हीं 'नूहा' बरोबर (गलबतांत) स्वार करून घेतलें होतें त्या लोकांचे (तुह्मी) वंश (आहां). (व) निःसंशय तो (आमचा) कृतज्ञ सेवक होता. ३. आणि आम्हीं 'बनी–इस्राएलां'स (त्याच तौरात) पुस्तकांत स्पष्ट बजावून ठेविलें होतें कीं तुह्मी अवश्य मुलकांत दोनदां नासाडी कराल व (दोन्ही वेळां लोकांवर) मोठे अत्याचारहि कराल. ४. मग जेव्हां त्या दोहोंतून पहिल्या (नासाडी)चा वेळ आला तेव्हां आम्हीं तुमच्या सामन्यास आपले असे सेवक उठवून उभे केले कीं जे फारच बलाढ्य होते आणि ते (तुमच्या) शहरांच्या अंतस्थ भागांत पसरून गेले. आणि (परमेश्वराचें) वचन पूर्ण व्हावयाचें तें झालें. ५. मग आम्हीं तुह्मांस शत्रूंवर फिरून वर्चस्व दिलें आणि द्रव्यें व संतति यांद्वारें**

---

( प्रगट करतो )." वर सांगितल्याप्रमाणें परमेश्वरानें हजरत मोहंमद पैगंबर यांस मक्केहून यरुशलेमपर्यंत रातोरात पोहोंचविलें, या विषयीं सर्वांची एकवाक्यता आहे. पुढील दिव्यारोहणाबद्दल भाष्यकारांनीं बरेच मतभेद केले आहेत. कोणी ह्मणतो तें आत्मिक स्थितींत ह्मणजे जसें स्वप्नांत झालें; कोणी ह्मणतो, शरीरासह; कोणी ह्मणतो केवळ एक वेळच; व कोणी ह्मणतो अनेक वेळ. कोणी ह्मणतो यरुशलेमपर्यंतच मात्र, आणि बहुतेक ह्मणतात कीं प्रथम यरुशलेमपर्यंत व मग आकाशादि द्युलोकापर्यंत. याविषयीं सर्वमान्य मत हेंच आहे कीं हजरत मोहंमद पैगंबर यांस शरीरासह हें दिव्यारोहण प्राप्त झालें. पुढें त्यांना परमेश्वराचें साक्षात दर्शन होऊन मानवी उद्धाराच्या नव्या नव्या गोष्टी प्रगट झाल्या; तर पैगंबर साहेबांस दिव्यरोहण झालें हें खास. आणि त्याचा अंतिम हेतु हा होता कीं पैगंबरास अदृष्टाचें कांहीं ज्ञान व्हावें. तथापि कांहीं झालें तरी त्यांचें हें ज्ञान मर्यादित होय; मुळांत अदृष्टाचा खरा ज्ञाता परमेश्वरच होय. त्याचें ज्ञान पूर्ण व अमर्याद होय. ऐकणें व पाहणें यांचें वैशिष्ट्य यामुळें आहे कीं नेहमींच्या व्यवहारांत मनुष्यास ज्ञानाचीं हींच दोन साधनें होत. लांबच्या पल्ल्याची किंवा दूरची मशीद यासाठीं ह्मटलें आहे कीं ती मक्केहून दूर आहे; दुसरें हें कीं सर्व सन्मान्य मशीदींत इची मान्यताहि अधिक आहे.

तुमची मदत केली व आम्हीं तुम्हांस बहुसंख्याक लोक केले. ६. जर (त्यावेळीं) तुह्मीं चांगलें केलें तर आपल्याच (हिता)साठीं चांगलें केलें; आणि जर वाईट केलें तर तेंहि आपल्याच साठीं. मग जेव्हां दुसऱ्या (नासाडी)चा वेळ आला, (तेव्हां मग आम्हीं आपले दुसरे सेवक उठवून उभे केले कीं त्यांनीं तुह्मांस इतकें मारावें) कीं तुमचीं तोंडें बिघडून टाकावींत (व तुमची शकल ओळखतां न यावी); आणि ज्याप्रमाणें ते पहिल्यांदां ('यरुशलेम'च्या) मशिदींत घुसले होते (व तेथें त्यांनीं लुटालूट चालविली होती) त्याचप्रमाणें (या प्रसंगींहि पुन्हां) तींत शिरावें आणि ज्या ज्या वस्तूंवर त्यांचा जोरा चालेल त्यांचा तोडून फोडून अगदीं विध्वंस करून टाकावा. ७. (आतांहि) नवल नाहीं कीं तुमचा पालनकर्ता तुम्हांवर दया करील, आणि जर तुह्मीं पुन्हां[२] (तोच पहिल्यासारखा खोडसाळपणा) कराल तर, आह्मींहि पुन्हां (पूर्वीं केलें होतें तेंच) करूं (म्हणजे शिक्षा देऊं). आणि आम्हीं नास्तिकांसाठीं 'जहन्नम'चा बंदीखाना (तयार) ठेवलाच आहे. ८.

(१) हें कौसांतील सारें वाक्य आह्मीं अध्याहृत घेतलें आहे; व या अध्याहारास आधारभूत असेंच एक वाक्य वर येऊन गेलें आहे. असें जर न केलें असतें तर अन्वयहि जुळला नसता व अर्थबोधहि झाला नसता.

(२) सकळ पृथ्वीवर यहुद्यांसारखें खोडसाळ कदाचित् दुसरें कोणी राष्ट्रच झालें नसेल; आणि त्यांच्या खोडसाळपणाच्या प्रमाणांत त्यांना पुन्हां पुन्हां शिक्षाहि होत होत्या. एक वेळ असा होता कीं त्यांचें मोठें राज्य होतें आणि आतां ही स्थिति आहे कीं त्यांचें कोठें बोटभर जमिनीवरहि राज्य नाहीं. यांनीं प्रथम आपल्या श्रीमंतीच्या व वर्चस्वाचे गर्वांत इरमिया–जिरेमिया–या पैगंबरास कत्तल केलें. तेव्हां परमेश्वरानें बाबेल शहराकडून बख्त–नस्सर ( Nebuchadnazzar ) यास पाठवून त्यांचा पराजय करविला व त्याच्या हातून लक्षावधि यहुदी कत्तल केले व यरुशलेमचें मंदिर जाळून फस्त केलें. पुढें परमेश्वरकृपेनें त्यांचे पुन्हां चांगले दिवस आले व ते ऐषआरामांत निमग्न झाले. नंतर ईश्वराज्ञेचा अनादर करून त्यांनीं जकरीया व यहया-योहान बाप्तिस्माकार–यांस मारून टाकिलें आणि येशू खिस्ताचाही घात

**निःसंशय, हें कुराण (धर्माचा) असा (मार्ग) दाखवितें कीं जो सर्वांत सरळ होय. आणि विश्वासू, जे चांगलीं कामें करतात त्यांस तें या गोष्टीचें शुभवर्तमान देतें कीं त्यांस महा पुण्यफल (प्राप्त) होईल. ९. आणि (तसेंच लोकांस) हेंहि (समजावितें) कीं जे लोक परलोकींचा विश्वास बाळगीत नाहींत, त्यांच्यासाठीं आम्हीं दुःखदायक शिक्षा तयार करून ठेविली आहे. १०. आणि मनुष्य (आपल्यासाठीं) ज्याप्रमाणें इष्ट वर मागतो त्याचप्रमाणें (बेदिल होऊन कधीं कधीं) अनिष्ट वरहि**

---

करण्याच्या बेतांत लागले; त्यांत ते सफल न होतां त्यांनीं भलत्याचाच घात केला. पुढें टायटस नांवाच्या रोमन राजानें त्यांच्यावर स्वारी केली व विजयी होऊन खूप लूटालूट चालविली व यरुशलेमच्या पवित्र देवळाचाहि मारून फन्ना उडवून टाकिला. याच सुमारास मूळचा खरा जुना करार नष्ट झाला व लोकांनीं आपल्या स्मरणशक्तीवरून तो जरी पुन्हां रचिला तरी त्यांत बरीच घालघुसड व ढवळाढवळ झाली हें खास. हीच गत अशो झरदोश्तच्या झंदावस्थेची (पहा झंदावस्था, Encyclopædia Britanica ) व पुरातन वेदांचीहि (पहा Mr. Tilak's Arctic home in the Vedas, page 457 ) झालेली आहे. ह्मणून परमेश्वर येथें यहुद्यांस व तद्वारें इतर राष्ट्रांस समजावींत आहे कीं या कलियुगाच्या पैगंबराबरोबर तशी वर्तणूक करूं नका; नाहींतर, तुह्मांवर तसलेंच संकट ओढवेल. सारांश यहुद्यांनीं तसलाच खोडसाळपणा केला व तसलीच शिक्षाहि पावले.

(१) आपल्याप्रीत्यर्थ अनिष्ट प्रार्थण्याचीं दोन अंगें होऊं शकतात; एक हें कीं माणसाला अदृष्टज्ञान तर दिलें गेलें नाहीं. ह्मणून पुष्कळ वेळां असें होतें कीं तो एका गोष्टीला गैर समजूतीनें आपल्या ठायीं उपयुक्त जाणून परमेश्वरापाशीं तिच्या प्राप्तीसाठीं प्रार्थना करूं लागतो; पण वस्तुतः ती गोष्ट त्याच्या ठायीं अहितकारक असते. उदाहरणार्थ, परमेश्वरापाशीं कोणी निपुत्रीक माणूस पुत्राची प्रार्थना करतो आणि तो मोठा होऊन असा नालायक सिध्द होईल कीं आपल्या घराण्याची दौलत व कीर्ती याचा समूळ नाश करून टाकील. दुसरें अंग असें कीं पैगंबरसाहेब नास्तिकांस ईश्वरशिक्षेचें भय दाखवीत होते व नास्तिक तें

मागूं लागतो. आणि मनुष्य हा फारच उतावळा होय. ११. आणि आम्हीं रात्रीला व दिवसाला (आपल्या सामर्थ्याच्या) दोन निशाण्या नेमिल्या. मग रात्रीच्या निशाणीला तर आम्हीं पुसट (व मंद) केलें आणि दिवसाच्या निशाणीला आम्हीं प्रकाशित बनविलें (कीं त्यांत सर्व कांहीं पाहतां यावें) कीं (तेणें करून) तुह्मीं (लोकांनीं) आपल्या पालनकर्त्याच्या औदार्याचा (म्हणजे निर्वाह साधनांचा) शोध करावा आणि वर्षांचें गणित व हिशेब जाणावा. आणि आह्मीं एकूणेक गोष्ट (कुराणांत) खूप तपशीलवार वर्णन केली आहे. (व त्यांतल्या त्यांत रात्र व दिवस हीं निर्मिण्याचें प्रयोजनहि होय.) १२. आणि आम्हीं हरेक माणसाचें (बरें वाईट) भाग्य त्याचें त्याच्या गळ्यांत घालून टाकलें आहे; (म्हणजे ज्याचें प्रारब्ध त्याच्याबरोबर होय); आणि पुनरुत्थानाचे दिवशीं आम्हीं (त्याचा कर्म-)लेख काढून त्याच्यापुढें ठेवून देऊं (व) तो त्याला आपल्या रूबरू उघडलेला पाहील. १३. (आणि आम्हीं त्याला म्हणूं कीं हा) आपला (कर्म-)लेख वाचून घे; (आणि) आज आपला हिशेब घ्यावयास तूं स्वतःच पुरा आहेस. १४. जो कोणी सरळ मार्गावर चालला तर तो आपल्याच (स्वतःहाच्या हिता)साठीं सरळमार्गावर चालतो; आणि जो भटकला तर त्याच्या भटकण्याचा दुष्परिणामही त्यालाच भोगावा लागेल. आणि कोणीहि ओझें वाहणारा (कोणा) दुसऱ्या(च्या पापा)चें ओझें वाहून नेणार नाहीं. आणि जोंपर्यंत आम्हीं पैगंबर पाठवून (पदरीं माप घालून) न देऊं, तोंपर्यंत (कोणालाहि त्याच्या पापाची) शिक्षा आम्हीं देत नसतों. १५. आणि जेव्हां आम्हीं कोणाहि वस्तीचा नाश करूं इच्छितों, तेव्हां आम्हीं तेथील सुखवस्तु लोकांस (कोणताहि एक) हुकूम देतों; मग

---

खोटें समजून तिच्यासाठीं घाई माजवित होते. अशा आशयाचीं वाक्यें हरेक पैगंबराच्या वर्णनांत आलेलीं आहेत; तेथें तेथें पहा.

(१) एक तर हाच भावार्थ होय कीं जो भाषांतरावरून प्रगट होतो, कीं परमेश्वर एक हुकूम सादर करतो व सर्वांत प्रथम अमीर उमराव व श्रीमंत लोक तो हुकूम मोडूं लागतात, ह्मणजे आज्ञेचा भंग

ते त्या(वस्ती)त हुकमाचा भंग करूं लागतात. मग ती वस्ती (शिक्षेच्या) हुकमास पात्र होऊन जाते (आणि) मग आम्हीं मारून त्या वस्तीची धूळधाणी करून टाकितों. १६. आणि 'नूहा'च्या मागून आम्हीं कित्येक पिढ्यांचा नाश करून टाकिला; आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता आपल्या सेवकांचीं पापें जाणण्यास व पाहावयास पुरा होय. १७. जो कोणी (या) क्षणभंगुर संसाराची अपेक्षा बाळगीत असेल, तर आम्हीं ज्याला इच्छितों (व) जितका इच्छितों तितका त्याला या(जगां)तच तूर्तातूर्त देऊन टाकितों. (पण,) मग (अखेर) आम्हीं त्याच्यासाठीं जहन्नम-नरकाग्नि ठरवून ठेविला आहे; त्यांत तो बुरे हाल होऊन (व ईश्वरकृपेपासून) दुरावला जाऊन जळावयास दाखल होईल. १८. आणि जो कोणी परलोकींची अपेक्षा बाळगीत असेल व परलोकींसाठीं जसे प्रयत्न केले पाहिजेत तसे त्यासाठीं प्रयत्नहि करील; आणि तो खरा विश्वासूही असेल; तर हेच लोक होत कीं ज्यांचे प्रयत्न (परमेश्वरासमीप) मान्य होतील. १९. (हे पैगंबरा!) ते (इहलोकाकांक्षी) व हे (परलोकाकांक्षी) या सर्वांनाहि आह्मीं तुझ्या पालनकर्त्याच्या (ह्मणजे आपल्या) दानांतून मदत देतों आणि तुझ्या पालनकर्त्याचें दान (सार्वजनिक होय; कोणालाहि) नाकारलें जात नाहीं. २०. (हे पैगंबरा!) पहा! (तर खरें, कीं) आह्मीं (जगांत) कित्येक लोकांस कित्येकांवर कसें श्रेष्ठत्व दिलें

---

सुखवस्तु लोकांपासून सुरु होतो व मग राव रंक सर्व त्या आज्ञाभंगाच्या दुष्परिणामांच्या लपेटींत येऊन जातात; आणि वास्तविक परिस्थितिहि अशीच पाहिली जाते कीं बहुतेक श्रीमंतच विशेषेंकरून आज्ञाभंगास व भ्रष्टाचारास बळी पडतात. अगर परमेश्वर सेवकांचा व त्यांच्या कृत्यांचा निर्माणकर्ता होय ह्मणजे सेवक बरें वाईट जें कांहीं करतात परमेश्वरच त्यांना तें करण्याचें सामर्थ्य देतो; ह्मणून सांगितलें असावें कीं आह्मीं श्रीमंतांस आज्ञा करितों व ते आज्ञाभंग करूं लागतात. तर मग "परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला बहकवितो व ज्याला इच्छितो त्याला सन्मार्गी लावितो" या तेऱ्हेचीच गोष्ट झाली.

आहे! आणि अर्थात् परलोकींचे दर्जे (याहूनहि) फारच थोर होत व (तसेंच त्या दिवसाचें) श्रेष्ठत्वहि फारच मोठें होय. २१. (हे पैगंबरा!) परमेश्वरासमागमें दुसरा कोणी उपास्य स्थापूं नकोस; नाहीं तर, तूं बद्लौकिक होऊन (परमेश्वर, देवदूत व विश्वासू हे सर्व तुझा अव्हेर करतील व तूं) परित्यक्त होऊन बसशील. २२. आणि (हे पैगंबरा!) तुझ्या पालनकर्त्यानें निर्णायक हुकूम देऊन ठेविला आहे कीं (लोकांनों!) तुह्मीं त्याच्याशिवाय कोणाचीच उपासना करूं नका; आणि आईबापांशीं उपकारशील वर्तणूक करा. (हे वाचक-श्रोत्या!) जर आईबापांतला एक अगर उभयतां तुझ्या समोर वृद्धावस्थेस पोहोंचतील, तर तूं त्यांच्यासमोर छिद् म्हणूनहि बोलूं नकोस व त्यांना झिडकावूंहि नकोस; आणि त्यांच्यांशीं (कांहीं) बोलणें (सवरणें असेल तर) सन्मानानें बोल (सवर). २३. आणि दयेनें त्यांच्यापुढें विनयाची बाजू नमीव व (त्यांच्याप्रीत्यर्थ) प्रार्थना करीत अस; कीं हे माझ्या पालनकर्त्या! ज्या तऱ्हेनें त्यांनीं मला लहानाला पाळिलें (व माझ्यावर दया करीत राहिले) त्याच तऱ्हेनें तूंहि त्यांच्यावर दया कर. २४. (लोकांनों!) तुमच्या मनांतली गोष्ट तुमचा पालनकर्ता खूप जाणतो. जर तुम्हीं (खरोखरींच) सदाचरणी असाल (व तुमच्या हातून आईबापांसंबंधानें चुकून कांहीं दोषहि घडला असेल) तर (तो तुम्हांस क्षमा करील); कांकीं तो पश्चात्ताप करणाऱ्यां(च्या पातकां)चा क्षमाकर्ता होय. २५. आणि गणगोत व गरीब गुरीब व वाटसरूं या (प्रत्येका)स त्याचा हक्क पोहोंचवीत राहा; आणि (द्रव्याची) उधळपट्टी करून अपव्यय करूं नकोस. २६. (कारण, द्रव्याची) उधळपट्टी करणारे सैतानांचे बंधु होत. आणि सैतान हा आपल्या पालनकर्त्याप्रत अनुपकारी होय. २७. आणि तूं

(१) ह्मणजे इहलौकिक कीर्ति व श्रेष्ठत्व, परलोकींच्या कीर्ति व श्रेष्ठत्वापुढें कुचकामाचें होय. आणि हा अर्थहि होऊं शकतो कीं जशी जगांत लोकांची स्थिति भिन्न आहे त्याहूनही अधिक भिन्न ती परलोकीं होईल.

(२) सैतान हा देवदूतांच्या समुदायांत गणिला जात होता; या देणगीची त्यानें किंमत जाणिली नाहीं व परमेश्वराचे आज्ञेचा भंग केला.

**आपल्या पालनकर्त्याच्या ज्या कृपेची आशा बाळगून असशील त्या कृपेची वाट पाहण्यांत जर तुला या(गरिबां)कडून तोंड फिरविणें भाग पडेल, तर तूं त्यांना (निदान) गोड (गोड) बोलानें समजावून दे. २८. आणि तूं आपला हात इतका (आटपता) धरूं नकोस कीं (जणुं) तो मानेशीं घट्ट बांधलेला आहे; आणि एकदम मोकळा करून तो सुटा ठेवूं नकोस; (नाहींतर) तूं (लोकांच्या) दोषास पात्र होऊन (व) भिकेस लागून बसशील. २९. (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता ज्याला इच्छितो त्याला विपूल अन्नसंपत्ति देतो व (ज्याला इच्छितो त्याला) कांटकसरीनें देतो. निःसंशय तो आपल्या सेवकां(च्या स्थिती)शीं वाकब (व त्यांच्या गरजांकडे) पाहतो आहे. ३०.**

---

अशाच तऱ्हेनें द्रव्य हीहि परमेश्वराची देणगी होय. आणि जो कोणी तिची उधळपट्टी करील तो तिची किंमत जाणीत नाहीं. ह्मणून या देणगीची किंमत न जाणिल्यानें तो सैतानाचा भाऊ झाला; आणि द्रव्याची उधळपट्टी होते ती बहुतेक सैतानी वा असुरी कामांत व शास्त्रनिषिद्ध गोष्टींत होतें. या दृष्टीनेंहि द्रव्याची उधळपट्टी करणार सैतानाचे बंधु ठरतात कीं ते त्याच्या कह्यांत चालतात.

(१) बहुतेक वेळां असें घडून येतें कीं वेळेवर माणसापाशीं पैसा नसतो व कोठून कांहीं यावयाचें असतें; पण अजून त्याच्या येण्यांत उशीर आहे. अशावेळीं लोक आपल्या गरजेपुढें वेळ अवेळ पाहत नाहींत व विनाकारण निकडीवर येतात. तर परमेश्वरानें ह्मटलें आहे कीं अशा स्थितींत लोकांचें मन दुखवूं नका व गोड बोलून समजावून लावा.

(२) यांत मध्यमपणाचा बोध होतो कीं मनुष्यानें दान धर्मात इतका कृपणपणा करूं नये कीं मुठी उघडणारच नाहीं. आणि इतका धर्मादायहि करूं नये कीं आपण दुःख सोसावें व लोकांनीं उलटा दोष द्यावा व त्याच्या दानधर्मास उधळपट्टी ठरवावी; आणि शेवटीं भिकेस लागून चित्तांत खात बसावें.

आणि (लोकांनों!) दारिद्याच्या भीतीनें आपल्या पोराबाळांचीं हत्या करूं नका; त्यांजला व तुह्मांला आह्मींच अन्नसंपत्ति देतों. निःसंशय बालहत्या करणें हें महा पातक होय. ३१. आणि तुह्मीं व्यभिचाराच्या जवळहि फिरकूं नका; कारण, तो निर्लज्जपणा असून (फारच) वाईट मार्ग होय. ३२. आणि ज्या कोणा जिवाला (मारून टाकणें) परमेश्वरानें निषिद्ध केलें आहे त्या(जिवा)ला हकनाक मारून टाकूं नका. आणि जो कोणी जुलूम केला जाऊन मारला जाईल, तर आह्मीं त्याच्या वाली(वारसा)स (खुन्या पासून सूड घेण्यांचा) अखत्यार दिला आहे; तर त्याला पाहिजे आहे कीं खुना(चा बदला घेण्यां)त त्यानें अतिरेक करूं नये. कारण, (वाजवी बदला घेण्यांतहि) त्याचीच जीत होय. ३३. आणि अनाथ बालक आपल्या भरतारुण्यास पोहोंचेपर्यंत त्याच्या मालमत्तेचे जवळहि जाऊं नका; पण अशा रीतीनें कीं जी (अनाथांचे ठायीं) उत्तम असेल (तर ती गोष्ट वेगळी). आणि (केलेला) करार पुरा करीत जा; कारण, (पुनरुत्थानामध्यें) कराराची वाजपूस होईल. ३४ आणि जेव्हां तुह्मीं मापून द्याल तेव्हां माप पुरें भरून देत जा; व (जोखून द्यावयाचें असेल तर) तराजू(ची दांडी) सरळ ठेवून जोखीत जा. (व्यवहाराची) ही उत्तम (रीत) होय व (तिचा) परिणामहि उत्तम होय. ३५. आणि (हे वाचक-

(१) भावार्थ हा आहे कीं उदाहरणार्थ 'अ'ने 'ब'ला जुलमानें मारून टाकिलें. तर अशा स्थितींत 'ब'ची बाजू दबलेली होती; नाहीं तर, 'ब' मारलाच कां जाता? आतां सूड घेण्याचा वेळ आला; तेव्हां 'ब'च्या पक्षाला परमेश्वरानें वर्चस्व दिलें व सूड घेण्याचा कायदा चालू करून त्याची मदत केली. तर 'ब'च्या वारसांस वाजवी रीतीनें बदला घेऊन संतुष्ट झालें पाहिजे. आणि वाजवी बदला ह्मणजे त्यांचा पुरा सूड झाला नाहीं, असें समजूं नये अगर त्याच्या पक्षाच्या दुसऱ्या कोणास किंवा मुख्य कुलपतीस मारून टाकूं नये. या कामांत वारसाला सरकारचें व भाविक जनांचें साह्य असतें ह्मणून जीतही त्याचीच होते.

श्रोत्या!) ज्या गोष्टीचें तुला (खात्रीपूर्वक) ज्ञान नाहीं, (केवळ अटकळीनें) त्या गोष्टीच्या नादीं लागूं नकोस. कारण कीं, कान व डोळा व हृदय या सर्वांपासून (पुनरुत्थानाचे दिवशीं) विचारपूस होणें आहे. ३६. आणि धरित्रीवर ऐट्टून चालूं नकोस; कारण, (धडाक्यानें चालून) तूं जमिनीस तर फाडूं शकणार नाहींस, व (ऐटीनें चालून) पर्वताच्या लांबीस पोहोंचू शकणार नाहींस. ३७. (हे पैगंबरा!) या सर्व गोष्टींत ज्या ज्या वाईट होत त्या सर्वच तुझ्या पालनकर्त्या समीप नापसंत होत. ३८. आणि (हे पैगंबरा!) तुझ्या पालनकर्त्यानें तुला ज्या शहाणपणाच्या गोष्टी प्रकट केल्या आहेत त्यांजपैकीं ह्याहि होत. आणि परमेश्वरासमागमें अन्य कोणी उपास्य स्थापूं नकोस. नाहींतर, तूं दोषास पात्र होऊन (व ईश्वरकृपेपासून) दुरावला जाऊन 'जहन्नम' मध्यें झोंकून दिला जाशील. ३९. (मूर्तीपूजकहो!) कां तुमच्या पालनकर्त्यानें तुम्हांसाठीं मुलगे पसंत केले व आपण मुली घेतल्या म्हणजे देवदूत? (हा तर) तुह्मीं अर्थातच मोठा बोल बोलतां! ४०. आणि आम्हीं या कुराणांत (लोकांस) नाना तऱ्हेनें समजाविलें कीं हे लोक (कोणाहि तऱ्हेनें) समजतील. पण यानें त्यांचा दुराग्रहच वाढत

(१) कान, डोळा व हृदय या अंतर्बाह्येंद्रियांच्या द्वारें ज्ञान प्राप्त होतें; तरी त्यास बुद्धि व ईश्वरी प्रकटीकरणाची आवश्यकता आहेच. यांच्या नियमनानें खरें व खात्रीपूर्वक ज्ञान होतें. पण ज्याला कांहीं धर्मच नाहीं तो तर्क लढवितो व मनोराज्य रचितो; ह्मणून त्याचें ज्ञान खात्रीपूर्वक होऊं शकत नाहीं. सारांश, मरणोत्तर होणाऱ्या स्थिती-संबंधानें मूर्तीपूजक व नास्तिक जे परलोकीं मेलेल्यांतून फिरून उठविलें जाऊं वगैरे अदृष्ट गोष्टी मानीत नाहींत ते, आपल्या ज्ञानाची छाननी, बुद्धि व ईश्वरी प्रकटीकरण यांच्याद्वारें न झाल्यामुळें नेहमीं असलेच तर्क वितर्क करतात. पण ते समजत नाहींत कीं मनुष्याचें ज्ञान मर्यादित आहे व मानवाचा विचार या गोष्टीप्रत पोहोंचूं शकत नाहीं. यांत या गोष्टीचा बोध आहे कीं मनुष्यानें आपल्या स्वभावसिद्ध मर्यादेचे अतिक्रमण करूं नये व तर्क वा अटकळीवर न चालतां ईश्वरप्रणीत शास्त्राधारावरच अवलंबून राहावें.

गेला. ४१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर परमेश्वरा-समागमें, जसे (हे लोक) म्हणतात तसे, आणखी उपास्यैहि असते, तर या स्थितींत त्या(उपास्य देवां)नीं (केव्हांचाच) महासिंहासनाधि-पति (म्हणजे परमेश्वरा)पर्यंत (पोहोंचण्याचा) मार्ग शोधून काढला असता. ४२. ज्या ज्या (निंद्य) गोष्टी हे लोक परमेश्वराविषयीं बोलून दाखवितात त्यांजपासून तो पवित्र व फार म्हणजे फारच थोर होय. ४३. सात आकाश व पृथ्वी, आणि यांत जे (देवदूत व मनुष्यें) होत ते (सर्व) त्याची पवित्रता गातात. आणि जितक्या म्हणून वस्तु होत त्या सर्व त्याच्या स्तुतिबरोबरच त्याची पवित्रता वर्णित राहतात. परंतु तुह्मां लोकांस त्यांचें पावित्र्यवर्णन समजत नाहीं. यांत शंका नाहीं कीं तो फारच दयार्द्र (व) क्षमाकर्ता होय. (कांकीं तो मनुष्यास त्याच्या आज्ञाभंगाची तात्काळ शिक्षा देत नसतो.) ४४. आणि (हे पैगंबरा!) तूं जेव्हां कुराण वाचीत असतोस, तेव्हां आम्हीं तुझ्या दरम्यान व जे लोक परलोकींचा विश्वास धरीत नाहींत त्यांच्या दरम्यान एक गुप्त (दाट) पडदा घालून टाकितों (कीं त्यांना सन्मार्ग दिसूं नये) ४५. आणि त्यांच्या अंतःकरणांवर आवरण घालून टाकितों कीं त्यांनीं कुराण समजूं शकूं नये. आणि

(१) सांगावयाचा अर्थ हा कीं ज्या प्रमाणें एका राज्यांत दोन स्वतंत्र राजे राहूं शकत नाहींत; त्याचप्रमाणें एका सृष्टींत दोन स्वतंत्र परमेश्वरहि होऊं शकत नाहींत. आपण पळभर अशी कल्पना करून चालूं कीं दोन अथवा अधिक परमेश्वर आहेत; तर त्या स्थितींत ते केव्हांचेच लढले भिडले असते. आणि खोट्या उपास्य देवांच्या अंगीं जर कांहीं सामर्थ्य असतें तर ते खऱ्या परमेश्वरावर चढाई करून गेले असते.

(२) जगांत सृष्टि ह्मणून जी कांहीं आहे ती आपल्या सृष्टि कर्त्याच्या अस्तित्वाची साक्ष पटविते. जगाचें सृष्ट होणें हें, बुद्धिलाही पटतें; कीं तें आपोआप अस्तित्वांत आलें नाहीं; किंबहुना कोणी तरी त्यास निर्माण केलें आहे आणि ज्यानें निर्माण केलें तोच एक खरा परमेश्वर होय.

त्यांच्या कानांत (एक प्रकारचा) भार (उत्पन्न करितों कीं त्यांना ऐकतां येऊं नये.) आणि जेव्हां तूं कुराणांत आपल्या पालनकर्त्याचें, (अद्वितीय अशा) एकट्याचेंच नामस्मरण करितोस, तेव्हां नास्तिक (एकट्याचे नांवानें) तिरस्कारयुक्त होऊन पाठ फिरवून फिरवून पळूं लागतात. ४६. जेव्हां हे लोक तुजकडे कान लावितात तेव्हां तें ज्या हेतुनें ऐकतात तो आम्हांस खूप ठाऊक आहे. आणि जेव्हां हे (आपसांत) कुजबुज चालवितात तेव्हां हे अन्यायकारी म्हणतात कीं तुम्हीं तर केवळ एका (खूळ्या) पुरुषाच्या नादीं लागलां आहां कीं ज्याला कोणी जादू केली आहे. (तर त्यांचें हें बोलणेंहि आम्हांस पक्कें माहीत आहे.) ४७. (हे पैगंबरा!) पहा! (तर खरें,) कीं हे तुझ्या संबंधानें कसकशा उपमा देतात! तर (याच गोष्टींमुळें) हे लोक बहकले; आणि (आतां) यांना (सत्याचा) मार्ग मिळणें शक्य नाहीं. ४८. आणि ते म्हणतात कीं, काय जेव्हां आम्हीं (मरूं व गळून सडून) हाडें व रजःकण होऊन जाऊं, तेव्हां (अशा स्थितींत) आम्हांला (पुनरुत्थानाचे दिवशीं) नव्यानें निर्माण करून उठवून उभें केलें जाईल? ४९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुम्हीं (मेल्यावर) धोंडे व्हा कीं लोखंड; ५०. अगर आणखी एखादी अशी सृष्ट वस्तु होऊन जा कीं जी तुमच्या विचारांत मोठी (अवजड) असेल (व जिचें जिवंत होणें तुमच्या मतें दुष्कर असेल; तरीहि तुम्हीं पुन्हां सजीव व्हालच व्हाल). यावर (हे लोक तुला) पुसतील कीं (बरें असें झाल्यास) आम्हांला पुन्हां कोण (जिवंत) करूं शकेल? (तूं यांना) सांग कीं ज्या(परमेश्वरा)नें तुह्मांस पहिल्या प्रथम स्रजिलें तोच. यावर हे लोक तुझ्यापुढें डोकीं डोलवूं लागतील व पुसतील कीं तें (पुनरुत्थान) केव्हां होईल बरें? (तूं यांना) सांग, अजब नाहीं कीं तें जवळच येऊन लागलें असेल. ५१. त्या दिवशीं जेव्हां परमेश्वर तुह्मांस

---

(१) डोकीं डोलविणें ह्मणजे माना हालविणें याचे कित्येक प्रकार असतात; कधीं रूकारार्थी व कधीं नकारार्थी; पण येथें नकारार्थी आहे.

बोलावील, तेव्हां तुह्मीं त्याचा हुकूम मानाल (म्हणजे) त्याचीं स्तोत्रें गात गात (थडग्यांतून निघून निघून वर चालले याल;) आणि अशी कल्पना कराल कीं (मेल्यापश्चात) तुह्मीं केवळ थोडेच[1] दिवस (मृत दशेंत) राहिलां. ५२. आणि (हे पैगंबरा!) माझे सेवकां(म्हणजे मुसलमानां)स समजावून दे कीं त्यांनीं (विरुद्धपक्षीयांस एकादी गोष्ट सांगितलीच तर) अशी सांगावी कीं जी (नैतिक दृष्टया) अत्युत्तम असेल. कारण, सैतान (कडक बोल बोलवून) लोकांच्या दरम्यान वांकडें आणितो. यांत संशय नाहीं कीं सैतान माणसाचा धडधडीत शत्रु होय. ५३. (लोकांनों!) तुमचा पालनकर्ता तुमच्या (स्थिती)शीं खूप वाकब होय. तो पाहिजे तर (दयेस पात्र समजून) तुह्मांवर दया करील; अगर तो पाहिजे तर (शिक्षेस पात्र जाणून) तुह्मांस शिक्षा देईल. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुला लोकांवर मक्तेदार[2] करून तर पाठविलें नाहीं. ५४. आणि (हे पैगंबरा! देवदूत, दैत्य व मनुष्यें वगैरे) जे कोणी आकाशांत व पृथ्वींत होत त्यांच्या(स्थिती)शीं तुझा पालनकर्ता खूप वाकब होय. आणि आम्हीं कित्येक पैगंबरांस कित्येकांवर श्रेष्टता दिली; आणि आम्हींच 'दाऊद'ला 'जबूर' (हें पुस्तक) दिलें. ५५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं परमेश्वराशिवाय ज्यांस तुह्मीं (देव) कल्पून ठेविलें आहे त्यांना (प्रसंगविशेषीं) बोलावून पाहा; मग (हे तुमचे उपास्य) तुमचें दुःखनिवारण करण्याची सत्ता ठेवणार नाहींत व तें फिरवून टाकण्याचें (सामर्थ्यहि राखणार) नाहींत. ५६.

---

(१) शिवाय हा अर्थहि होऊं शकतो कीं जगांत थोडेच दिवस राहिलां. भावार्थ हा कीं मनुष्य जिवंत जीव असतांना मृत्यु व परलोक यांजकडून गैर सावध असतो. जरी तो तोंडानें असें बोलत नाहीं तरी त्याचीं कृत्यें अशीं असतात कीं जणूं त्याला मरावयाचेंच नाहीं; व तो आयुष्याचा कौलनामा घेऊन आला आहे. परंतु मेल्यावर तो समजेल कीं आपण जगांत फारच थोडें राहिलों.

(२) ह्मणजे परमेश्वराचा निरोप पोहोंचविणें हेंच पैगंबरांचें काम होय. ते लोकांच्या विश्वास धरण्याचे जिम्मेदार नाहींत.

हे लोक ज्यांना, मूर्तीपूजक (कर्तेहर्ते समजून) बोलावितात, तेहि यांच्यांतून कोण (परमेश्वराच्या) अधिक सन्निध होतो, यासाठीं झटून आपल्या पालनकर्त्याचें (आणखीहि अधिकाधिक सान्निध्य प्राप्त करण्याचें) साधनें पाहात राहतात; आणि ते त्याच्या दयेची आशा बाळगितात व त्याच्या शिक्षेला भीत राहतात. खरोखरच तुझ्या पालनकर्त्याची शिक्षा भिर्जेची चीज आहेहि. ५७. आणि (आज्ञाभंजक लोकांची) कोणी एकहि वस्ती अशी नाहीं कीं आम्हीं तिचा पुनरुत्थानाचे दिवसाचे आधीं (आधींच आज्ञाभंगाच्या शासनार्थ कां तर) नाश (न) करून सोडूं अगर तिला (आणखी कोणी) सक्त शिक्षा (न) देऊं. (आणि) ही गोष्ट ('लौहे महफूज'या) पुस्तकांत लिहिली जाऊन चुकली आहे. ५८. आणि आम्हांस (विविक्षित) चमत्कार पाठविण्यापासून (आणखी कोण-

---

(१) यांत जे लोक, पैगंबर वा ऋषि अगर पीर अवलिया वा देवदूत अगर जिन्न-दैत्य वगैरेंस कोणाहि तऱ्हेनें परमेश्वराचे समाईक व पातीदार बनवीत होते, त्यांची चूक त्यांच्या पदरीं घालण्यासाठीं परमेश्वरानें बजाविलें आहे कीं ज्यांना तुम्हीं उपास्य देव ठरवितां हे तर स्वतःच परमेश्वराची मर्जी संपादण्याचीं साधनें शोधित राहतात आणि ईश्वरी शिक्षेला भीत राहतात—हाच सेवकाचा धर्म होय. तर ईश्वराशिवाय हे सारे सेवक होत व सेवक हे सेव्य व उपासनेस योग्य होऊं शकत नाहींत.

(२) हजरत पैगंबर साहेबांपाशीं लोक विविक्षित चमत्कारांची मागणी करीत होते. यांत त्यांचा हारजीत हाच हेतु होता. ह्मणून अशा मागण्या मंजूर झाल्या नाहींत व त्या मंजूर होण्यास योग्यहि नव्हत्या. असल्या चमत्कारासंबंधानें ह्मटलें आहे कीं पूर्वीच्या लोकांनीं त्यांस पाखंड ह्मटलें ह्मणून आम्हीं असले चमत्कार पाठविणें बंद केलें आहे. आणि उदाहरणहि अशा विविक्षित चमत्कृतीचेंच दिलें आहे कीं समूदचे लोकांनीं आपले पैगंबर सालेह यांजपाशीं अशी मागणी केली होती कीं पर्वतांतून सांढणी उत्पन्न व्हावी. हें झालें; तरीहि लोकांनीं मानिलें नाहीं. आमच्या पैगंबर साहेबांच्या वेळींहि अशाच प्रकारचे

**तेंच कारण) प्रतिबंधक झालें नाहीं; परंतु हेंच कीं पूर्वीच्या लोकांनीं त्यांस पाखंड म्हटलें. तात्पर्य, आम्हीं 'समूद'(चे लोकां)ला सांढणीचा देखत चमत्कार दिला होता. तरीहि लोकांनीं (तो न मानतां) तिला गांजिलें; (इतकें कीं तिला मारून टाकिलें). आणि (हे जे) आम्हीं चमत्कार (पाठवीत असतों ते) केवळ दरारा बसविण्याच्या हेतुनेंच पाठवीत असतों. ५९. आणि (हे पैगंबरा! तो वेळ आठीव कीं) जेव्हां आम्हीं तुला सांगितलें होतें कीं तुझ्या पालनकर्त्यानें (म्हणजे आम्हीं) लोकांस चोहोंकडून घेरून ठेविलें आहे (कीं त्यांना तुजवर हात टाकतां न यावा). आणि स्वप्न, जें आम्हीं तुला दाखविलें तें**

---

लोक होते कीं चमत्कार पाहूनहि मानीत नव्हते. नाहीं तर, दुसरे चमत्कार तर एकीकडेच, कुराण स्वतःच एक जागती ज्योत व महान् चमत्कृति होय.

(१) ह्मणजे पराक्रम वा चमत्कारांचा हेतु लोकांच्या मनांत धाक बसविण्याचा असतो. तेणें करून प्रेक्षक जनांत व त्यांच्यायोगें त्यांच्यामागून येणाऱ्या पिढ्यांस, पैगंबराची पैगंबरी अथवा प्रेषितत्वाची खात्री पटते. हजरत मोहंमद पैगंबरानींहि पुष्कळ चमत्कार दाखविले. परंतु चमत्कार एका विशिष्ट समयीं व विशिष्ट लोकांपुढेंच घडून येतात; त्यांतहि विरोधी लोक अनेक संशय काढतात. म्हणून चमत्कार हें एकटेंच कांहीं निश्चित प्रमाण नव्हे कीं त्यावर जोर देतां येईल. शिवाय सर्वच मनुष्यांचे स्वभाव सारखे नसतात ह्मणून त्यांस निरनिराळ्या प्रकारच्या प्रमाणांची अपेक्षा असते. चमत्कारास अरबी भाषेंत 'मोअजिज़ा' ह्मणजे ज्याच्या तोडीचें किंवा त्याहून उत्तम काम करणें लोकांस अशक्य व दुर्घट असतें तें अद्भुत असें ह्मणतात. कुराणहि याच कोटींतलें आहे. कौराणिक शिक्षणाचा सार हा आहे कीं आकाश, पृथ्वी, रात्र, दिवस, वायु, मेघ, पर्जन्य, विद्युलता, मरणें, जिणें, पिपीलिका--मुंगी व चिलट वगैरे सृष्टींतील वस्तु व त्यांच्या उत्क्रांत्या पाहून लोकांस परमेश्वर व त्याच्या परमसामर्थ्याचें उत्तम प्रमाण पटावें; व त्यांनीं त्याच्या आज्ञाधीन होऊन जीवन संसार करावा.

तर केवळ लोकांच्या (विश्वासाच्या) कसोटीस आम्हीं कारणीभूत ठरविलें; आणि (अशाच तऱ्हेनें कांटे निवडुंगाचें) झाड कीं जें कुराणांत शापित केलें गेलें आहे तेंहि. सारांश, या लोकांस आम्हीं (तऱ्हे-तऱ्हेनें) भिववितों; तथापि आमचें भिवविणें त्यांच्या जबरदस्त शिरंजोरींत आणखीहि भरच टाकीत जातें. ६०. आणि (एक वेळ

---

(१) ह्मणजे चमत्कार हे लोकांच्या मनांत भीती कौतुक व पूज्य-बुद्धि हीं उत्पन्न करण्यासाठीं पैगंबरांना दिले जातात. परंतु कित्येक लोकांच्या स्वभावांत अशी दंडेली व शिरजोरी असते कीं ते चमत्कृतीसहि भीत नाहींत. उदाहरणार्थ समूदचे लोक; आणि हीच परिस्थिति कुरेशी लोकांची होती कीं त्यांना भीति दाखविण्यांतहि कांहींच कमी केली गेली नव्हती. पण ज्यांच्या नशिबांत मानावयाचें नव्हतें त्यांनीं तर अखेर पावेतों मानिलेंच नाहीं. येथें दोन दराऱ्यांचा उल्लेख आहे. एक इहलौकिक ह्मणजे बद्रच्या युद्धप्रसंगाचा व दुसरा परलोकीं पाप्यांस होणाऱ्या शिक्षेचा. बद्रची लढाई झाली तिच्या अगोदरच पैगंबर साहेबांस एक खरें व उघड उघड स्वप्न आलें—आणि पैगंबरांचें स्वप्न नेहमीं ईश्वरी प्रकटीकरण असतें—या स्वप्नांत त्यांना येथपर्यंत साक्षात्कार झाला कीं अमुक अमुक मनुष्य अमुक अमुक जागीं मारलेला पडला आहे. एवंच पैगंबर साहेबांनीं आपलें स्वप्न लोकांस सांगितलें व ती जागाहि दाखविली; आणि पुढें असेंच घडूनहि आलें. तरीहि लोक भ्याले नाहींत; व शिरजोरी करून त्यांचीं चेष्टा उडवूं लागले. आतां परलोकींचा धाक ह्मणजे कांटे निवडुंग ज्याला अरबींत 'झकूम' ह्मणतात, त्याजविषयीं कुराणांत ह्मटलें आहे कीं तें नरकवासी लोकांस खावयास मिळेल व तें त्याच्या पोटांत उकळेल. हें ऐकून लोकांस भ्यावयास पाहिजे होतें. पण ते आक्षेप काढूं लागले कीं नरकाग्नींत हिरवें झाड हें कसें होऊं शकतें! परंतु त्यांना हें ठाऊक नाहीं कीं परमेश्वर सर्व शक्तिमान असून जीवनाशक अग्नींतहि सलामंदर (Salamander) नामक अग्निकीटक उत्पन्न करतो. तर मग हिरवें झाड नरकाग्नींत होईल यांत आश्चर्य कशाचें?

तोहि होता कीं) जेव्हां आम्हीं दूतांस हुकूम केला कीं तुह्मीं 'आदम'ला साष्टांग नमस्कार घाला, तेव्हां 'इबलीस' खेरीज करून सर्वांनींच वंदन केलें. तो म्हणूं लागला कीं ज्याला तूं मातींतून बनविलेंस त्याला कां मी साष्टांग नमस्कार घालूं? ६१. (आणि 'आदम'कडे तिरस्कार बुद्धिनें पाहून परमेश्वराशीं) म्हणूं लागला कीं बरें, पाहा तर खरें, तोच ना हा मनुष्य कीं ज्याला तूं माझ्यावर श्रेष्ठत्व दिलें आहेस? जर तूं मला पुनरुत्थानाचे दिवसापर्यंतचा अवकाश देशील तर मी, थोड्या थोडक्यांचें तर सांगवत नाहीं, बाकी, त्याच्या सकल वंशाचें मूलच्छेदन करून टाकीन तरच सई. ६२. (परमेश्वरानें) म्हटलें, चल निघ! (दूरहो!) जो कोण यांच्यांतून तुझें अनुकरण करील, तर तुम्हां(सर्वां)चें शासन 'जहन्नम'–नरक; (आणि) शासनहि पुरें पुरें. ६३. आणि यांच्यांतून ज्यांना तूं आपल्या (मोहक) स्वरानें (बहकवूं) शकशील त्यांना बहकीव; आणि यांच्यावर आपलें (असुरी[1] सैन्य) घोडेस्वार व पायदळ या(सर्वां[2])सह हल्ला चढीव; व यांचा धनसंपत्तींत व संततींत भागीदार होस आणि यांच्याशीं (खोटे खोटे)

---

(१) ह्मणजे सैतानाचें लष्कर किंवा त्याचे मदतगार; मग ते जिन्न वा दैत्य वर्गातले असोत किंवा मनुष्यकोटींतले असोत. भावार्थ हा कीं आपलें सर्व बळ खर्चून, होतां होईल ते प्रयत्न करून पाहा; कांहींच कसर ठेवूं नका.

(२) धनसंपत्तींत व संततींत भागीदार होण्याचा अर्थ हा कीं जगांत द्रव्य व संतति ह्या दोनच मोठ्या वस्तु होत. यांच्यामुळेंच मोठमोठालीं पातकें होतात, यांजमुळेंच मनुष्य परमेश्वराकडून गाफिल होतो; व यांमुळेंच जगांत अनेक बखेडे उद्भवतात. द्रव्य व संततीला शास्त्रविरुद्ध अतोनात प्रीय राखणें हें सैतानाचें बहकविणेंच होय; ह्मणूनच त्यास सैतानाची भागीदारी म्हटली आहे. द्रव्य व संततींत सैतानाचे भागीदारीचे अनेक प्रकार आहेत. त्यांतल्या त्यांत हें कीं द्रव्याचा यथाशास्त्र विनियोग न होतां तें उधळलें जातें; जसें परमेश्वराखेरीज अन्य कोणाला नैवेद्य दाखविणें किंवा मानता करणें अगर आणखी

वायदे करः आणि सैतान तर या लोकांशीं जेवढे म्हणून वायदे करितो त्या सर्व भूलथापाच असतात. ६४. माझे (जे खरे) सेवक (होत) त्यांच्यावर (तर) तुझा कोणत्याच प्रकारचा जोरा (चालणार) नाहीं. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता (आपल्या सेवकांचा) पुरस्कर्ता पुरा होय. ६५. (लोकांनों!) तुमचा पालनकर्ता असा (परम समर्थ) होय कीं जो तुह्मांसाठीं समुद्रांत गलबतें वाहवून नेतो कीं तुह्मीं (अनायासें) त्याचें औदार्य (म्हणजे आपलें निर्वाहसाधन) शोधावें. यांत संशय नाहीं कीं परमेश्वर तुह्मांवर (फारच) दयाळु होय. ६६. आणि जेव्हां समुद्रांत तुह्मांस (कोणा तऱ्हेचा) क्लेश पोहोंचतो, तेव्हां ज्या(उपास्यां)स तुम्हीं बोलावीत होतां, ते (सर्व) विस्मृत होऊन जातात; पण तोच (एक परमेश्वर आठवतो). मग जेव्हां (परमेश्वर) तुह्मांस (समुद्रांतून) खुष्कीकडे बचावून आणितो, तेव्हां (त्याच्याकडूनच) तुम्हीं फिरून पडतां! आणि मनुष्य हा फारच अनुपकारी होय! ६७. तर कां तुह्मीं या गोष्टीकडून निर्भय होऊन गेलां आहां कीं तो तुह्मांस खुष्कीकडेस (नेऊन जमिनींत) गडप करील? अगर तो तुह्मांवर (वावटळ चालवून) दगड वर्षवील? मग त्या वेळीं तुह्मीं (कोणालाहि) आपला कैवारी पावणार नाहीं. ६८. अगर तुम्हीं या गोष्टीकडून निश्चित होऊन गेलां आहां कीं परमेश्वर पुन्हां तुह्मांस पालटून दुसऱ्यांदां त्याच समुद्रांत नेईल; आणि (आंत नेल्यावर) तुह्मांवर एक वाऱ्याचा सोसाटा धाडील व तुम्हीं जो अनुपकारीपणा केला त्याच्या शासनांत तुम्हांस गर्क करून टाकील. तदूनंतर तुम्हीं कोणालाहि (असा हिमाईती) पावणार नाहीं कीं जो या गोष्टीबद्दल आमचा पिच्छा घेईल. ६९. आणि अलबत आह्मीं 'आदम'चे मुलांस (ह्मणजे मानवांस) इजत अब्रू

---

एखाद्या गैरवाजवी कामांत खर्चीं घालणें. अथवा आवश्यक खर्चांत कृपणपणा केला जातो. अशाच प्रकारें मुलांबाळांस वाईट रीतीनें वाढविलें जातें कीं त्यांना धर्माशीं कांहीं कर्तव्यच नसतें. अगर मुलांसाठीं असले टोणे तोडगे केले जातात कीं त्यांत अनेकेश्वरत्वाचा गंध आढळून येईल.

दिली आणि खुष्की व समुद्रांतून त्यांना (जनावरांवर व गलबतांवर) वाहवून नेलें; व चांगले (चांगले) पदार्थ त्यांस (खावयास) दिले; आणि जितकी ह्मणून सृष्टि आह्मीं निर्माण केली आहे तींतून बहुतेकांवर विशेष सत्ता देऊन आह्मीं त्यांस श्रेष्ठत्व दिलें. ७०. (आणि बडें श्रेष्ठत्व तर त्या दिवसाचें होय कीं) ज्या दिवशीं आह्मीं सर्व लोकांस त्यांच्या (त्यांच्या) पुढाऱ्यांसमवेत (आपल्या समोर) बोलावून हजर करूं. मग ज्यांचा (कर्म-)लेख त्यांच्या उजव्या हातांत दिला जाईल, ते (हर्षयुक्त होऊन) आपले (कर्म-)लेख (घाई घाईनें) वाचूं लागतील; आणि त्यांच्यावर एक तूसभरहि जुलूम केला जाणार नाहीं. ७१. आणि जो कोणी या(जगां)त (जाणून बुजून) आंधळा (बनून) राहिला, तो परलोकींहि आंधळा होईल; व (मोक्ष-)मार्गाहून फारच दूर भटकलेला. ७२. आणि (हे पैगंबरा! कुराण,) जें आह्मीं तुला प्रकट केलें आहे त्याजकडून लोक तर तुला चलबिचल करूं लागलेच होते कीं तेणेंकरून तूं या(कुराणा)शिवाय भलत्याच (खोट्या गोष्टी)घडून आह्मांकडे लावाव्यास. आणि (जर तूं एवढें धाडस करतास) तर हे लोक तुला (आपला जिवींचा) मित्र बनवून घेते. ७३. आणि आह्मीं तुला भक्कम ठेविलें, असें जर न घडतें तर तूंहि कांहीं थोडा (बहुत) त्यांच्याकडे अवश्य झुकूं लागलाच होतास. ७४. (तथापि,) असें होतें तर आम्हीं तुला जित्या व मेल्या दुहेरी दुहेरी (शिक्षेची) गोडीहि चाखवून देतों. व मग तुला आमच्या विरुद्ध कोणी मदतगारहि न मिळता. ७५. आणि ह्या लोकांनीं तर तुला ('मक्के'च्या) भूप्रदेशांतून पळोपळोसें करून सोडिलेंच होतें कीं तुला येथून काढून लावावें. आणि असें होतें तर तुझ्या(गेल्या)मागून ह्या लोकां-

---

(१) इहपरलोकीं आंधळें होणें म्हणजे डोळे फुटून जाणें हा अर्थ नव्हे, तर इहलोकीं आंधळें होणें हें कीं त्यानें सत्धर्माचा मार्ग पाहिला नाहीं किंवा तो त्याला सुचला नाहीं; आणि परलोकीं आंधळें होणें हें कीं त्याला स्वर्गांत जाण्याचा मार्ग सुचणार नाहीं.

सहि थोड्याच दिवसापेक्षां जास्त, (आपल्या जन्मभूमींत समाधानानें) राहतां आलें नसतें. ७६. तुझ्यापूर्वी जितके पैगंबर आम्हीं पाठविले आहेत त्यांचा हाच दस्तूर राहिला आहे; आणि आमचा (जो) दस्तूर (ठरविलेला) आहे त्यांत तुला (कधींहि) फेरफार होतां आढळणार नाहीं. ७७. (हे पैगंबरा!) सूर्याच्या ढळल्यापासून रात्रीच्या काळोखापर्यंत ('जोहर', 'असर', 'मगरिब' व 'इषा' या) नमाजी पढीत अस; आणि सकाळची नमाजहि. कारण, सकाळच्या नमाजाची वेळ (देवदूतांच्या) हाजिरीची वेळ होय. ७८. आणि तूं रात्रीच्या एका भागांत उठून 'तहज्जुद्'(ची नमाज)हि पढीत जा; (आणि इतर नमाजी तर अवश्य कर्तव्यें होत व ही) तुझी (नमाज) फाजिल (होय). नवल नाहीं कीं (इच्या प्रभावानें) तुझा पालनकर्ता (पुनरुत्थानाचे दिवशीं) तुला प्रतिष्ठित मुकामीं पोहोंचवील. ७९. आणि (ही)

---

(१) तो दस्तूर हा कीं जेव्हां कधीं कोणा लोकसमुदायानें आपल्या पैगंबरांना छळिलें अथवा त्यांस देशांतून घालवून लाविलें, तेव्हां हीं दुष्ट कर्में करणारे लोकहि शिक्षेंतून बचावले नाहींत. ही स्थिति मक्केकरांची होणें आहे. आणि खरोखर झालेंहि असेंच.

(२) 'मशूहूद' याचा शब्दशः अर्थ साक्ष दिलेला किंवा हजर झालेला असा होतो. पण भाष्यकारांनीं अनेक अर्थ केले आहेत. कित्येक ह्मणतात कीं जगव्यवस्थेसाठीं जे दूत येतात त्यांत दिवसाचे वेगळे व रात्रींचे वेगळे असतात त्यांची त्या वेळीं बदली होते; ह्मणून त्यांस हजर होऊन साक्ष पटवावी लागते. कित्येक ह्मणतात कीं सकाळचे नमाजींत नमाजी लोक पुष्कळ हजर होतात. कित्येक ह्मणतात कीं सकाळची वेळ मनुष्याच्या सावधान चित्ताची वेळ असते कीं त्या वेळीं नमाजींतहि मन चांगलें लागतें. पण आम्हां मूळ शब्दापासून जो अर्थ निष्पन्न होतो तोच येथें पत्करला आहे. 'कुर्आनुल्–फज्र्' म्हणजे सकाळचें कुराण; पण येथें त्याचा अर्थ सकाळची नमाज असा घ्यावयाचा आहे.

(३) प्रतिष्ठित मुकाम हा 'मुकामे मह्मूद' याचा शब्दशः अर्थ आहे. आणि 'सहीह् हदीस' ह्मणजे ज्याचें सत्वशील लोकांकडून

**प्रार्थना कर कीं हे माझ्या पालनकर्त्या! (अखेर तर मला 'मक्का' सोडून कोणाहि जागीं जाऊन राहणें आहे तर जेथें तूं मला नेशील तेथें) माझा प्रवेश सत्यमय (व यशस्वी) प्रवेश कर: आणि (जेव्हां मला नास्तिकांच्या गराड्यांतून काढशील तेव्हां) माझें निघणें सत्यमय (व यशस्वी) निघणें कर. आणि तूं आपल्याकडून मला (शत्रूंवर) साहाय्यपूर्वक वर्चस्व दे. ८०. आणि (हे पैगंबरा! लोकांस) सांगून दे कीं सत्य तें आलें आणि असत्य तें नाहींसें झालें.**

---

परंपरागत निवेदन होत आलें आहे असें पैगंबर साहेबांचें वचन; या वचनसंग्रहावरून असें सिद्ध होतें कीं ज्या पदाचें परमेश्वराकडून पैगंबर साहेबांस अभिवचन मिळालें आहे तें पद परमेश्वरासमीप पाप्यांची शिफारस करण्याचें होय; ह्मणजे पुनरुत्थान होईल तेव्हां लोक उद्विग्न होऊन व आपल्या हातून झालेल्या पापांचें कसें काय होईल याची त्यांना तळमळ वाटून, पूर्वींच्या सर्व पैगंबरांकडून शिफारस करवूं इच्छितील. पण पैगंबर म्हणजे सर्व मनुष्येंच होऊन गेलीं आहेत मग तें दाविद-दाऊद-असोत कीं येशू ख्रिस्त असोत; प्रत्येकाचे हातून मानवी प्रवृत्यनुसार कांहीं ना कांहीं दोष होऊन गेला आहे. म्हणून पूर्वींचे पैगंबर आपापले दोष आठवून शिफारस करण्याची हिंमत करूं शकणार नाहींत. सरते शेवटीं ही मोहीम आमचे कलियुगाचे पैगंबर हजरत मोहंमद साहेब (परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो!) हेच सर करतील. आणि परमेश्वराकडून त्यांना सकळ लोकांच्या शिफारशीची सदर परवानगी मिळेल आणि परमेश्वराच्या भूत दयेचा अशा प्रकारें प्रादुर्भाव होईल कीं आमचे पैगंबर सर्वांची शिफारस करतील व परमेश्वराच्या सेवेंत त्यांची शिफारस मान्य होईल.

(१) सत्य म्हणजे इस्लाम हा सद्धर्म आणि असत्य म्हणजे मूर्तीपूजा वगैरे मनःकल्पित उपासनेचे मार्ग. अर्थात ही मिथ्या उपासना विचाराअंतीं असत्यच सिद्ध होते व विचारशील लोकांस अशा बुद्धिशून्य व बलहीन देवांचा म्हणजे मूर्ती वगैरे ईश्वरेतर उपास्यांचा वीट येत

(आणि) अर्थात् असत्य तें नाहींसें व्हावयाचेंच होतें. ८१. आणि आह्मीं कुराणांत अशा अशा गोष्टी प्रकट करितों कीं ज्या विश्वासूंसाठीं (अध्यात्मिक) क्लेश-परिहारक व दयेस कारणीभूत होत. आणि आज्ञाभंजकांस तर ह्यानें आणखी (उलटें) नुकसानच होतें. ८२. आणि जेव्हां आह्मीं माणसाला एखादी देणगी देतों, तेव्हां तो (उलट आम्हांकडून) तोंड फिरवितो व आपलें अंग काढून घेतो. आणि जेव्हां त्याला एखादें अनिष्ट पोहोंचतें, तेव्हां तो (दयेची) आशा सोडून बसतो. ८३. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं प्रत्येक (जण) आपल्या परिपाठाप्रमाणें कार्य आचरतो. मग (तुमच्यांत) जो कोणी थेट सरळ मार्गावर आहे त्याला तुमचा पालनकर्ता खूप जाणतो. ८४. आणि (हे पैगंबरा! लोक) तुला आत्म्याच्यासंबंधानें प्रश्न करतात, तर (तूं यांना) सांगून दे कीं आत्मा हाहि माझ्या पालनकर्त्याचा एक हुकूम होय.[१] आणि तुम्हां लोकांस (परमेश्वराच्या गुप्त गोष्टींपैकीं) केवळ थोडेंसेंच ज्ञान दिलें गेलें आहे. ८५. आणि (हे पैगंबरा!) जर आम्हीं इच्छूं तर जें (कुराण) आम्हीं तुजला प्रकटिलें आहे तें (या भूतलावरून) आम्हीं उचलून घेऊन

---

असून ती दिवसें दिवस नाहींशी होत आहे. पैगंबर साहेबांचा मक्केच्या मंदिरांत यशस्वी प्रवेश झाला तेव्हां हें वाक्य उच्चारून हातांतल्या छडीनें स्पर्श करतांच तेथील मूर्ती धडाधड खालीं पडल्या म्हणतात.

(१) पैगंबर साहेबांची सचोटी पाहण्याकरतां यहुद्यांच्या चिथावणीनें कुरेशी लोकांनीं त्यांस तीन प्रश्न विचारले; एक गुहेतील लोकांविषयीं, दुसरा जुल्‌ कर्नैन संबंधीं व तिसरा मनुष्याच्या आत्म्यासंबंधानें व त्यांनीं हेंहि सुचविलें होतें कीं पहिल्या दोन ऐतिहासिक प्रश्नांचीं उत्तरें दिलीं व तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं तर समजा कीं तो खरा पैगंबर आहे व झालेंहि असेंच कीं त्यांनीं दोहोंचीं उत्तरें दिलीं व तिसऱ्या प्रश्नासंबंधीं तो परमेश्वराचा हुकूम 'कुन' म्हणजे हो, असा होय; म्हणजे परमेश्वराच्या इच्छाशक्ति–प्रेरित आज्ञेचा परिणाम हा आत्मा, अदेही व निराकार होय असें उत्तर दिलें.

जाऊं; मग तुला त्याच्यासाठीं आमच्या विरुद्ध कोणी कैवारीहि मिळणार नाहीं. ८६. पण (ही फक्त) तुझ्या पालनकर्त्याचीच दया (होय, कीं तो असें करीत नाहीं). निःसंशय तुजवर त्याची मोठीच कृपा होय. ८७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर मनुष्यें व 'जिन्न' (म्हणजे दैवत) हीं (मुद्दाम) या गोष्टीकरितां गोळा होतील कीं ह्या कुराणाच्या सारखें (आणखी कांहीं रचून) आणावें; तरीहि याच्या सारखें ते (कांहींहि रचून) आणूं शकत नाहींत. (मग पाहिजे) तर त्यांच्यांतून एकमेकांला एकमेकांचा पाठिंबाच (कां) असे (ना)! ८८. आणि आम्हीं ह्या कुराणांत लोकां(च्या समजण्या)साठीं सर्वच (प्रकारचे) दृष्टांत तऱ्हेतऱ्हेनें (फिरवून फिरवून) सांगितले आहेत; तरी देखिल बहुतेक लोक (त्यास) नाकारल्या वांचून राहिलेच नाहींत. ८९. आणि (हे पैगंबरा! 'मक्के'चे नास्तिक तुला) सांगतात कीं आम्हीं तर (कधींहि) तुझा विश्वासच धरणार नाहीं; येथपर्यंत कीं (एक तर) तूं आम्हांसाठीं जमिनींतून एखादा (पाण्याचा) झरा भळभळ (न) वाहवूं लावशील; ९०. अगर खजुरी व द्राक्षें यांची तुझी एखादी बाग (न) होईल व तिच्या मधोमध तूं (पुष्कळसे पाण्याचे) पाट झुळझुळ (न) वाहवून दाखविशील ; ९१. अगर जसें तूं बोलून दाखवीत होतास तसे आकाशाचे तुकडे आमच्यावर आणून (न) कोसळवशील; अगर परमेश्वर व देवदूत यांस (आम्हां)समोर प्रत्यक्ष आणून उभे (न) करशील; ९२. अगर (राहण्यास्तव) तुझें एखादें सुवर्णभुवन (न) होईल किंवा तूं चढून गगनांत (न) जाशील. आणि जोंपर्यंत तूं आम्हांस (परमेश्वराकडून) एखादें पुस्तक सादर (न) करवशील कीं तें आह्मीं स्वताहाच वाचूनहि घेऊं; तोंपर्यंत आह्मीं तुझ्या (गगनांत) चढण्याचाहि कधीं विश्वासच करणार नाहीं. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझा पालनकर्ता परम पवित्र होय! मी काय चीज आहें, हाच (परमेश्वरानें) पाठविलेला एक मनुष्यच ना? ९३. आणि जेव्हां लोकांपाशीं (परमेश्वराकडून) सन्मार्ग येऊन चुकला, तेव्हां त्यांना विश्वास धरण्यापासून याच्याशिवाय आणखी कोणत्याच गोष्टीनें प्रतिबंध केला नाहीं कीं ते म्हणूं लागले, काय

परमेश्वरानें मनुष्य पैगंबर (करून) पाठविला आहे? ९४. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) उत्तर दे कीं पृथ्वींत जर देवदूत (वसत) असते कीं ते (भूतळावर) सुखासमाधानें हिंडते फिरते; तर आम्हीं देवदूतालाच आकाशांतून पैगंबर (करून) त्यांच्याकडे पाठवितों. ९५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझ्या व तुमच्या दर्म्यान परमेश्वरच साक्षी पुरा आहे. निःसंशय तो आपल्या सेवकां(च्या स्थिती)शीं वाकब (असून त्यांचीं कृत्यें) पाहतो आहे. ९६. आणि ज्याला परमेश्वर सन्मार्गाची बुद्धि देईल तो सन्मार्गी होय; आणि ज्याला (तो) बहकवील तर मग (हे पैगंबरा!) अशा(बहकलेल्यां)स तूं परमेश्वराखेरीज कोणी (दुसरे) मदतगारहि पावणार नाहींस. आणि पुनरुत्थानाचे दिवशीं आम्हीं त्या लोकांस त्यांच्या तोंडांवाटे (सरपटत) उठवूं; (असे कीं) आंधळे व मुके व बहिरे, त्यांचें (शेवटचें) ठिकाण 'जहन्नम-' नरकाग्नि. जेव्हां जेव्हां तो विझावयास येईल, तेव्हां तेव्हां आम्हीं त्यांच्यासाठीं (तो) आणखी जास्तच पेटवून देऊं. ९७. हा (नरकाग्नि या साठीं) त्यांचें शासन होय कीं ते आमच्या निशाण्यांस नाकारीत आणि (पुनरुत्थानाचें होणें ऐकून) म्हणत असत कीं जेव्हां आम्हीं (मरूं व गळून सडून) हाडें व रजःकण होऊन जाऊं, तेव्हां कां आम्हीं नव्यानें निर्माण होऊन उठविले जाऊं? ९८. कां या लोकांनीं ह्या गोष्टींचें अवलोकन केलें नाहीं कीं परमेश्वर ज्यानें आकाश व पृथ्वी हीं निर्माण केलीं आहेत तो या गोष्टीसहि समर्थ होय कीं, त्यांच्यासारखीं (मनुष्यें पुन्हां) पैदा करील? आणि त्यानें त्यांच्या(पुन्हां पैदा होण्या)करितां एक वेळ मुक्रर करून ठेविला आहे कीं त्यांत कोणाहि तऱ्हेची शंकाच नाहीं.

---

(१) तोंडावाटे सरपटत ओढून नेणें ही आपल्यापरी एक प्रकारची शिक्षाच होय. मनुष्याच्या शरिरांत तोंड हें मुख्य अंग आहे व पाय हे अगदीं खालच्या प्रकारचें अंग आहे. म्हणून पायांचें काम तोंडानें घेतलें जाणें ही पराकाष्टेची बेअब्रू व मानहानि होय.

यावरहि (हे) दांडगे नकारणी केल्या वांचून राहिलेच नाहींत. ९९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर माझ्या पालनकर्त्याच्या दयेचीं भंडारें तुमच्या सत्तेचीं असतीं, तर खर्च होऊन जाण्याच्या धास्तीनें, तुम्हीं (तीं) बंद करून ठेविलीं असतीं. आणि मनुष्य हा फारच लोभिष्ट होय. १००. आणि कांहीं संशय नाहीं कीं आम्हीं 'मूसा'ला उघड उघड नऊ[२] चमत्कार दिले. तर (हे पैगंबरा!) 'बनी-इस्राएलां'सहि विचारून पाहा; कीं जेव्हां 'मूसा' 'बनी-इस्राएलां'पाशीं आला, तेव्हां 'फिरऔना'नें त्याला सांगितलें कीं हे 'मूसा'! मी तुजसंबंधानें (असा) तर्क करितों कीं कोणी तरी तुजवर जादू करून (तुला खूळ लावून) दिलें आहे. १०१. ('मूसा'नें) जबाब दिला कीं तूं (इतकी गोष्ट मनांत) अवश्य जाणून चुकला आहेस, कीं आकाश व पृथ्वीच्या पालनकर्त्यानेंच हे (चमत्कार) सादर केले आहेत; (आणि लोकांसाठीं हीं) स्पष्ट प्रमाणें (होत कीं हीं पाहून ते परमेश्वराला ओळखतील). आणि हे 'फिरऔना'! (तूं मजसंबंधानें जादूचा तर्क केलास) पण मी तुजसंबंधानें (असा)

---

(१) यहुदी व मुख्यत्वें करून मूर्तीपूजकहि या गोष्टीचा हेवा करीत होते कीं परमेश्वरानें पैगंबर साहेबांनाच पैगंबरीप्रीत्यर्थ कां म्हणून निवडून घेतलें व यांजलाच कुराण कां प्रकटिलें गेलें? तात्पर्य हाच मजकूर कुराणांत आणखी कित्येक जागीं आला आहे व येथेंहि याच गोष्टीकडे इषारत आहेशी दिसते.

(२) मआलिमुत्तंजील या भाष्याचे कर्त्यानें इबने अब्बास व दुह्हाक यांच्या कथनावरून नऊ चमत्कार या प्रमाणें गणिले आहेत; कीं हातांतल्या काठीचें सर्प बनणें एक, हाताचें शुभ्र प्रकाशमान होणें दोन, मूसाचें अड-खळत बोलणें आणि एरवीं तोतरें बोलत असूनहि, फिरऔनाशीं वादविवाद करतांना बोलण्यांत न अडखळतां अस्खलित भाषण करणें तीन, तुफान चार, टोळ पडणें पांच, उवा सहा, बेडूक सात, रक्त वर्षविणें आठ, काठीनें समुद्राला विभक्त करणें नऊ; याच चमत्कारांचे वर्णन अध्याय ७: १३३ या वरील टीप २ मध्यें आहे तें पाहा.

तर्क करितों कीं तुझा विनाशकाळ येऊन ठेपला आहे. १०२. मग ('फिरऔना'नें असें) योजिलें कीं 'बनी–इस्राएलां'स (कोणाहि तऱ्हेनें) देशांतून पळोपळोसें करावें (कीं त्यांनीं राहतां कामा नये.) तर आम्हीं त्याला व जे त्याच्या संगतीं होते त्यांस–सर्वांस बुडवून टाकिलें. १०३. आणि 'फिरऔना'च्या(बुडविल्या)नंतर आह्मीं 'बनी-इस्राएलां'ना सांगितलें कीं (आतां तुह्मींच ह्या) देशांत वसा; मग जेव्हां परलोकींचा वायदा येऊन ठेपेल, तेव्हां आह्मीं तुह्मां(सर्वां)स एकवटून (आपल्या हुजुरांत) आणून उभे करूं. १०४. आणि (हे पैगंबरा!) सत्यपूर्वकच आम्हीं कुराण पाठविलें आहे व सत्यपूर्वकच तें उतरलें आहे. आणि आम्हीं तुला तर केवळ (सज्जनांस ईश्वरप्रसन्नतेचें) शुभवर्तमान देणारा व (दुर्जनांस ईश्वर-शिक्षेचें) भय सुचविणारा (करून) पाठविला आहे. १०५. आणि कुराणास आम्हीं (थोडें थोडें प्रकटून यासाठीं त्याचे) भाग भाग केले कीं तूं तें (वेळोवेळीं) लोकांस सावकाश वाचून ऐकवावेंस; आणि (म्हणूनच) आम्हीं तें (प्रसंगानुरूप) अंशतः अंशतः प्रकट केलें आहे. १०६. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुम्हीं कुराणास माना अगर न माना; निःसंशय ज्या लोकांस कुराणाच्या पूर्वीं (दिव्य पुस्तकांचें) ज्ञान दिलें गेलें आहे (त्यांची तर ही स्थिति आहे कीं) जेव्हां तें त्यांच्यासमोर वाचिलें जातें, तेव्हां ते हनुवटीवाटे पालथे पडून साष्टांग नमस्कार घालतात. १०७. आणि ते

---

(१) म्हणजे कुराणांत जितक्या गोष्टी आहेत त्या सर्व खऱ्या व प्रमाणशुद्ध आहेत; आणि तें असें पुस्तक आहे कीं ज्यात कोणतीच गोष्ट विसंगत व पूर्वापरविरुद्ध अशी नाहीं. अशाच तऱ्हेचें कुराण परमेश्वरानें पाठविलें; आणि ज्या तऱ्हेचें पाठविलें त्याच तऱ्हेचें कांहींहि न्यूनाधिक्य न करतां जगांत प्रकट केलें; मध्यें कोणीहि त्यांत घालघुसड किंवा ढवळाढवळ केली नाहीं. कारण, परमेश्वरानें कुराणांत एके जागीं म्हटलें आहे कीं 'आम्हींच हें कुराण प्रकट केलें व आम्हींच त्याचे संरक्षकहि आहों.'

ह्मणूं लागतात कीं आमचा पालनकर्ता परमपवित्र होय. निःसंशय आमच्या पालनकर्त्याचें[1] वचन अर्थात् पुरें व्यावयाचेंच होतें. १०८. आणि ते हनुवटीवाट पालथे पडून (मस्तक रगडीत) रडत जातात, व कुराणामुळें त्यांच्या विनयांत (आणखीहि) जास्तच भर पडत जाते. १०९. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं तुह्मीं (परमेश्वराला) 'अल्लाह्' (म्हणून) बोलवा कीं 'रह्मान्' (म्हणून) बोलवा; ज्या कोणाहि (नांवा)[2]नें तुह्मीं बोलवाल, तर त्याचीं (सर्व) सुंदरच सुंदर नांवें होत. आणि (हे पैगंबरा!) तूं आपली नमाज मोठ्यानें ओरडून पढूं नकोस व ती अगदीं मंद स्वरानेंहि पढूं नकोस[3]; तर या (दोहोंच्या) दर्म्यान (एक मध्यम) मार्ग पत्कर. ११०. आणि बोल, कीं सर्व स्तुति अशा परमेश्वरालाच (योग्य) होय कीं जो कोणीहि पुत्र बाळगीत नाहीं व (इहपरलोकाच्या) राज्यांत ज्याचा कोणीहि पातीदार नाहीं आणि या कारणामुळें नव्हे कीं तो दुर्बल आहे, कोणीं त्याचा वाली–मददगारहि नाहीं; आणि (वेळोंवेळीं) तूं (त्याची) महती वर्णून त्याचा गौरव करीत अस. १११.

---

(१) ह्मणजे कुराणासंबंधाचें भविष्यवचन पूर्वीच्या दिव्य म्हणजे ईश्वरी पुस्तकांत उपलब्ध होतें; आणि ग्रंथधारी लोक कुराण व शेवटच्या–कलियुगाच्या–पैगंबराची वाट पाहत होते. तर त्यांच्यांत जे सत्यप्रिय व न्यायी होते ते कुराण ऐकतांच समजून गेले कीं ही त्याच वचनाची परिपूर्णता आहे व त्यांनीं त्याचा विश्वास धरिला.

(२) पैगंबर साहेब परमेश्वराला, अल्लाह् म्हणजे सर्वगुणसंपन्न असा परमेश्वर व रह्मान् म्हणजे परमदयाळु या दोन नांवांनीं बहुधा बोलावीत असत. तेव्हां अनेकेश्वरवादी व मूर्तीपूजकांस असा आभास झाला कीं पैगंबर दोन देवांचीं नांवें घेतात व दुसऱ्यांना याची मनाई करतात. म्हणून परमेश्वरानें सांगितलें कीं ज्या कोणाहि नांवानें तुम्हीं मला बोलवाल तीं सर्व एकत्र होत. व हीं सर्व मज एकाच व्यक्तिचीं नांवें होत.

(३) पैगंबर साहेब मक्केंत मोठ्यानें दिवसां नमाज पढीत व तींत ते कुराण वाचीत; तेव्हां अधर्मी लोक गोळा होऊन त्यांचें ध्यान लागू नये म्हणून शिळा व टाळ्या वाजवीत. म्हणून मोठ्यानें वाचण्याची व तसेंच इतकें हळूं वाचण्याची कीं मागच्या विश्वासू लोकांस ऐकूं येऊं नये, मनाई झाली.

# अध्याय १८ वा.

## सूरतुल्-कह्फ्.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला; यांत ११० आयात-महावाक्यें आहेत. 'सूरतुल्–कह्फ्,' म्हणजे गुहेचें प्रकरण या नांवाची उपपत्ति अशी आहे कीं फार प्राचीन काळीं दखयानुस नांवाचा एक मूर्तीपूजक राजा होता; तो लोकांकडून बळेंच मूर्तीपूजा करविण्याचा अंध श्रद्धेनें हट्ट घेऊन त्याच्या हुकमाचा जो अनादर करी त्यावर नाना तऱ्हेचे जाच जुलूम करून छळीत असे. पुढें त्यानें कित्येक सदाचरणी व निस्सीम ईश्वरभक्त अशा कुलीन लोकांवरहि बळजबरी करण्याचा बेत केला. परमेश्वरकृपेनें यांच्या अंगीं नैतिक धैर्य आलें व त्यांनीं मूर्तीपूजा करण्याचें नाकारिलें; आणि पळून जाऊन एका गुहेंत लपून बसले. तेथें त्यांना अशी एक गाढ झोंप लागली कीं ते त्या सुषुप्तीच्या स्थितींतच तीनशें नऊ वर्षें पडून राहिले. एवढ्या अवधींत येथें सारा खेळच बदलून गेला होता; तो राजाहि नव्हता, ते लोकहि नव्हते आणि मूर्तीपूजा तर नांवासहि राहिली नव्हती. आतां राजा व त्याची प्रजा यांचा धर्म ख्रिस्ती होता. परंतु त्या काळीं अस्सल ख्रिस्तीधर्म म्हणजे इस्लामच होता. सद्यां प्रचलित असलेला ख्रिस्तीधर्मच नव्हता. हीं गुहेंतील मनुष्यें जेव्हां जागृतावस्थेंत आलीं तेव्हां त्यांना भूक लागलीशी वाटली व त्यांनीं आपल्या एका सोबत्याला भोजन आणावयास वस्तींत पाठविलें. गुहेंत ३०९ वर्षें राहिल्यामुळें या मनुष्याचा कांहीं चेहराच बदलून गेला होता; आणि तो जो शिक्का घेऊन बाजारांत आला होता त्याचें चलन बंद होऊन गेलें होतें. म्हणून लोक त्याला विचारपूस करूं लागले व होतां होतां ही गोष्ट राजापर्यंत पोहोंचली. त्या मनुष्यानें आपला सारा अहवाल ऐकविला व सर्व खुणा सांगितल्या. हें ऐकून तत्कालीन ख्रिस्ती

लोकांस पुनरुत्थान म्हणजे मेलेल्यांचें फिरून जिवंत होऊन उठणें सत्य आहे असा पूर्ण विश्वास पटला कीं जो परमेश्वर मनुष्यांला तीनशें नऊ वर्षें सुषुप्तीच्या स्थितींत जिवंत राखूं शकतो, तो मनुष्यांला पुन्हां जिवंत करण्यास कां म्हणून समर्थ नसावा?

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों.)

सर्व स्तुति परमेश्वरालाच (योग्य) होय कीं ज्यानें आपला सेवक ('मोहंमद') याजला (कुराण हें) पुस्तक प्रकट केलें आणि त्यांत (कोणाहि तऱ्हेचें) वांकडेपण ठेविलें नाहीं; १. (तर) अगदीं सरळशी गोष्ट होय; कीं परमेश्वराकडून (जी) कडक शिक्षा (नास्तिकांस सादर व्हावयाची, लोकांस त्यानें) तिचें भय दाखवावें आणि जे भाविक जन चांगलीं कामें करतात त्यांना या गोष्टीचें शुभवर्तमान द्यावें कीं त्यांना (परमेश्वरासमीप फार) उत्तम मोबदला (प्राप्त) होईल. २. (म्हणजे स्वर्ग कीं) ज्यांत ते निरंतर राहतील. ३. आणि (तसेंच) जे लोक हें प्रतिपादितात कीं परमेश्वर पुत्र राखतो त्यांसहि (ईश्वरी शिक्षेकडून) भिववावें. ४. यांना या (गोष्टी)चें कांहीं ज्ञान नाहीं व यांच्या वडिलांसहि नव्हतें. बडा बोल होय कीं जो यांच्या तोंडांतून निघतो. हे निव्वळ खोटें बोलतात. ५. तर (हे पैगंबरा!) जर (हे लोक) या गोष्टीचा विश्वास न धरतील, तर कदाचित् तूं संतापाचे भरांत यांच्यामागें आपल्या जिवाचा घात करून घेशील. ६. जें (कांहीं) भूतळावर आहे त्याला आम्हीं पृथ्वीचा शृंगार बनविला आहे कीं जेणें करून आम्हीं लोकांस पडताळावें कीं यांच्यांत कोण (उत्तमांत) उत्तम कामें करितो ७. आणि (मग एक दिवस) आम्हीं पृथ्वी(तळा)वर ज्या आहेत त्या (सर्व) वस्तु (नष्ट करून पृथ्वीला) सपाट मैदान करून टाकूं. ८. (हे पैगंबरा!)कां

तूं अशी कल्पना करीतोस कीं गुहा व 'अर्रकीम'-शिलालेख-यांतील सोबती (ह्मणजे 'अस्हाबे कह्फ्') हे आमच्या (परम सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं एक अद्भुत होते? ९. कीं एके काळीं, कांहीं तरूण गड्यांनीं गुहेंत आश्रय घेतला; व प्रार्थिलें कीं हे आमच्या पालनकर्त्या! तूं आपल्याकडून आह्मांस दया(-दान) दे; आणि सन्मार्ग दृष्ट्या आमचा (हा) बेत आह्मां प्रीत्यर्थ सिद्धीस ने. १०. यानंतर वर्षेंगणती गुहेंत आम्हीं त्यांचे कान थोपटून दिले (ह्मणजे त्यांस निद्राग्रस्त केलें) ११. मग आम्हीं त्यांस (जागवून) उठविलें कीं तेणेंकरून आम्हीं जाणून घ्यावें कीं उभय पक्षांतून कोणता (पक्ष गुहेंत) विसंबून राहण्याची मुदत अगदीं तंतोतंत आठवतो? १२.

---

(१) अस्हाबे कह्फ् ह्मणजे गुहेतील सोबती यांची संक्षिप्त गोष्ट लोकांत प्रसिद्धच आहे; परंतु त्यांचें सविस्तर वर्णन कोठेंच उपलब्ध नाहीं. तथापि इतिहासावरून व कित्येक धर्मग्रंथांवरून त्यांचा कांहीं कांहीं शोध लागतो. कुराणांत त्यांना 'अस्हाबुल्-कह्फ् व रकीम' ह्मटलें आहे. 'कहफ' ह्मणजे गुहा व 'रकीम'चें भाषांतर आम्हीं शिलालेख असें केलें आहे: कीं गुहेंतील सोबत्यांचीं नांवें लोकांच्या स्मरणास्तव भिंतीवर कोरलेलीं होतीं अगर दगडाच्या शिलेवर कोरून ती गुहेच्या तोंडाशीं ठेवून दिलेली होती. गुहेच्या संबंधानें त्यांना 'अस्हाबुलकह्फ्' व शिलालेखावरून त्यांना 'अस्हाबु रकीम' ह्मणतात. मग परमेश्वरानें हेंहि सांगितलें कीं गुहेंतील सोबत्यांचा वृत्तांत आमच्या परम सामर्थ्याच्या निशाण्यांपैकीं तर आहे; पण त्यांत कांहींच चमत्कारिक असें समजूं नये. जगांतील नेहमीं घडणाऱ्या गोष्टी व सर्व सृष्टीचें अवलोकनानें परमेश्वराचें परम सामर्थ्य प्रगट होतें.

(२) गुहेंतील लोकांनीं सुषुप्तीतून जागृत होऊन या गोष्टींत मतभेद केला कीं निद्रावस्थेंत ते किती उशीर होते. यामुळें दोन पक्ष झाले होते. कुराणांत एका पक्षाचें मत तर पुढें दर्शविलें आहे कीं आह्मीं एक दिवस वा याहूनहि कमी राहिलों. दुसऱ्या पक्षानें ह्मटलें कीं याची खरी हकीकत परमेश्वरालाच माहीत आहे. आह्मांस ती सांगतां येत नाहीं.

(हे पैगंबरा! आतां) आम्हीं त्यांचा अहवाल तुला सत्यपूर्ण निवेदितों; कीं हे कित्येक तरूण गडी होते कीं त्यांनीं आपल्या पालनकर्त्यांचा विश्वास धरिला होता; आणि (दिवसें दिवस) आम्हीं त्यांस अधिकाधिक सन्मार्गाची बुद्धि देत गेलों. १३. आणि आम्हीं त्यांच्या मनांचें धाडस बांधविलें कीं जेव्हां (मूर्तीपूजेची बळजबरी करणाऱ्या राजापुढें) ते उभे राहिले; तेव्हां ते बोलूं लागले कीं आमचा पालनकर्ता (तर) आकाश व पृथ्वी यांचा (जो) पालनकर्ता (तोच होय.) आम्हीं तर त्याच्याशिवाय (प्रसंग पडल्यास) अन्य कोणा उपास्यास कधींहि बोलावणारच नाहीं. (आम्हीं जर असें करूं) तर आम्हीं फारच बेताल व फाजिल बोललों असें होईल. १४. (एक) हे आमचे लोक होत कीं ज्यांनीं परमेश्वराला सोडून (दुसरे दुसरे) उपास्य पत्करले आहेत. त्यां(च्या उपास्य होण्या)चें एकादें स्पष्ट प्रमाण ते कां पुढें करीत नाहींत? तर जो कोणी परमेश्वरावर खोटें कुभांड रचील त्याहूनहि अधिक जुलमी आणखी कोण? १५. आणि (मग ते ऐकमेकांशीं बोलूं लागले कीं) ज्या अर्थीं तुह्मीं (आपल्या) लोकांपासून व परमेश्वराशिवाय ज्या(देवां)ची हे लोक पूजाअर्चा करतात त्यांजपासून अंग काढून घेतलें आहे, त्याअर्थीं (चला, अमुक) गुहेंत जाऊन बसूं या, म्हणजे तुमचा पालनकर्ता आपली दया(रूपी छाया) तुह्मांवर पसरील; आणि तुमच्या (या) इराद्यांत तुम्हांस सुसाध्यता घडवून आणील. १६. (एवंच, मनांत असा निर्धार करून गुहेंत ते अशा जागीं जाऊन लपले कीं, हे वाचकश्रोत्या!) जेव्हां सूर्य उगवेल, तेव्हां तूं पाहशील कीं तो त्यांच्या गुहेपासून उजवीकडेस कललेला राहतो; आणि जेव्हां तो बुडूं लागतो, तेव्हां त्यांच्यापासून तो डावीकडेस कातरून निघून जातो; आणि (हें गुहेच्या तंगीमुळें नव्हे तर) ते गुहेंत मोठ्या प्रशस्त जागेंत (चैनीनें सावलींत पडून) आहेत. हीहि परमेश्वराच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं (एक निशाणी) होय. ज्याला परमे-

(१) पर्वतात गुहेचें होणें, ती प्रशस्त होणें व अशा तऱ्हेवर असणें कीं सूर्य उगवतांना तो तिच्या उजवीकडेस कललेला राहणें व ढळल्यावर तिच्या डावीकडेस कातरून निघून जाणें या सर्व गोष्टी परमेश्वराच्याच सामर्थ्यानें होत असत.

श्वर सन्मार्गीं नेईल तोच सन्मार्गावर होय; आणि ज्याला तो आडमार्गीं बहकवील, तर (हे पैगंबरा!) तुला त्याचा कोणी मार्गदर्शक असा पुरस्कर्ता आढळणारच नाहीं १७. आणि (हे वाचकश्रोत्या!) तूं त्यांना समजतोस कीं ते जागतात, आणि वास्तविक पाहतां, ते निद्रिस्त होत; व आह्मीं उजवीकडेस व डावीकडेस त्यांची कूस[१] बदलवीत राहतों; आणि त्यांचा (एक) कुत्राहि (होय कीं जो) गुहेच्या तोंडाशीं आपले पुढले पाय पसरून (बसला) आहे. (हे वाचकश्रोत्या!) जर तूं त्या लोकांस (या स्थितींत, वरून) डोकावून पाहशील, तर तूं अवश्य उलट्या पायीं पळत सुटशील व त्यांच्या(परिस्थिती) मुळें तुझ्या(मनां)त दहशत भरून जाईल. १८. आणि (ज्या प्रमाणें आम्हीं त्यांना आपल्या पराक्रमानें निद्रावश केलें होतें) त्याच-प्रमाणें आम्हीं त्यांना (स्वपराक्रमानें जागृत करूनहि) उठविलें, कीं त्यांनीं आपसांत एकमेकांला प्रश्न करावेत. (सारांश,) त्यांच्यांतून एक बोलणारा बोलला, बरें (कां, हो!) तुह्मीं (या गुहेंत) किती (मुद्दत) विसंबून राहिलां असाल? ते बोलले, आम्हीं (फारच) राहिलों (असलों तर) एक दिवस वा एका दिवसाहूनहि कमीच[२].

---

(१) त्यांचे डोळे उघडे होते व ते एकीकडून दुसरीकडेस आपली कड बदलीत होते ह्मणून लोक त्यांना जागे समजत होते. पण तसें कांहींच नव्हतें; निद्रावस्थेंतहि असें होतें. ते जर जमिनीवर इतका उशीर कड न बदलतां निजून राहते, तर त्यांची कुस राहून गेली असती व कदाचित् कुजूनहि गेली असती.

(२) म्हणजे ज्या वेळीं ते निजले तेव्हां सकाळ होती व जागृत झाले तेव्हां दोन प्रहर होती. म्हणून ते असें समजले कीं काल आम्हीं निजलों असलों तर एक दिवस निजलों; आणि आजच निजलों असलों तर एका दिवसाहूनहि कमीच निजलों. पुढें नख व डोक्याचे केंस वाढलेले पाहून सर्वच आश्चर्यचकित होऊन बोलले कीं खरें काय तें परमेश्वरच जाणें.

(शेवटीं दुसरे सर्व) बोलूं लागले कीं जितकी मुदत तुम्हीं लोक (गुहेंत) राहिलां, ती तुमचा पालनकर्ताच खूप जाणतो. तर (आतां) आपल्यांतून एकाला हा आपला रुपया देऊन शहराकडे रवाना करा कीं तो (जाऊन) पाहील कीं तेथें कोणापाशीं चांगलें चोखें भोजन (मिळणें शक्य) आहे व त्यांतून (पुरेसें) जेवण आपणांस घेऊन येईल; आणि त्यानें फार हुशारीनें वागावें व कोणालाहि तुमची खबर होऊं देऊं नये. १९. (कारण कीं), जर (तुमच्या जातीच्या) लोकांस तुमची खबर होऊन जाईल, तर ते (येऊन) तुह्मांस धोंडमार करूं लागतील अगर तुह्मांस उलट पुन्हां आपल्या धर्मांत नेतील; आणि असें झालें तर मग तुह्मांस कधींच (जीवन-)साफल्य होणें नाहीं. २०. आणि (ज्या तऱ्हेनें आम्हीं आपल्या प्रतापानें त्यांस निद्रिस्त केलें व उठविलें) त्याच तऱ्हेनें आम्हीं (त्यांच्या) लोकांस त्यांची ओळख पटवून दिली कीं लोकांस माहीत व्हावें कीं परमेश्वराचें वचन खरें होय आणि हें कीं (पुनरुत्थानाच्या) घटके संबंधीं कांहींच संशय नाहीं. आतां (ओळखिल्यावर) लोक त्यांच्या प्रकरणांत[1] आपसांत झगडूं लागले. तर कित्येकांनीं ह्मटलें कीं त्यांच्या(निजणेंच्या जागे)वर (स्मारकापरी) एक इमारत बांधून ठेवा. (आणि त्यांच्यासंबंधीं जास्त चौकशी करूं नका;) त्यां(च्या स्थिती)स त्यांचा पालनकर्ताच खूप जाणतो. यांच्या प्रकरणांत ज्यांचा अभिप्राय (इतरांवर) प्रबळ राहिला त्यांनीं ह्मटलें कीं आह्मीं तर यांच्या(निजणेंच्या जागे)वर एक मशीद बनवून घेऊं. २१. (कित्येक तर) ह्मणतात कीं (निजणारे) तीन (होते), त्यांच्यांतला चौथा त्यांचा कुत्रा. आणि (कित्येक) ह्मणतात, पांच (होते), त्यांच्यांतला सहावा त्यांचा कुत्रा. (हे सर्व) अदृष्ट गोष्टींत तर्क लढवितात. आणि (खरेंच, कित्येक) ह्मणतात, सात (होते) व त्यांच्यांतला आठवा त्यांचा कुत्रा. (हे पैगंबरा! या

---

(१) कित्येक म्हणूं लागले कीं शरीर व आत्मा यांचें पुनरुत्थान होईल, कोणी म्हणाले, फक्त आत्माच उठेल. पण परमेश्वरानें या निजणारांस उठवून आत्मा व शरीर याचें पुनरुत्थान सिद्ध करून दाखविलें.

लोकांस) सांग कीं यांची संख्या माझा पालनकर्ताच खूप जाणतो; यां(च्या अस्सल संख्ये)स मात्र फारच थोडे (लोक) जाणतात. तर (हे पैगंबरा!) यां('अस्हाबे कह्फ्')चे संबंधांत (लोकांशीं मुळींच) झगडूं नकोस; पण बाह्यस्वरूपाचा झगडा (असेल तर असो, चिंता नाहीं). आणि यांच्यासंबंधांत यांच्यांतून कोणालाच विचारपूसहि करूं नकोस. २२. आणि कोणत्याहि गोष्टी संबंधानें (हें) ह्मणूं नकोस कीं मी हें (काम) खचित उद्या करून टाकीन; २३. परंतु (असें ह्मणत जा कीं) परमेश्वर इच्छील तर (हें काम उद्यां करून टाकीन). आणि ('परमेश्वर इच्छील तर' असें ह्मणावयास) जर कधीं तूं विसरून जाशील तर (जेव्हां आठवेल तेव्हां 'परमेश्वर इच्छील तर' असें ह्मणून) आपल्या पालनकर्त्याचें स्मरण करीत जा. आणि तूं सांगून दे कीं आशा आहे कीं माझा पालनकर्ता सन्मार्ग दृष्ट्या याहूनहि जवळचा (व थेट) असा मार्ग मला दाखवील. २४. आणि (हे गुहेंतील लोक) आपल्या गुहेंत तीनशें वर्षें राहिले आणि नऊ (वर्षें त्याच्यावर) आणखीहि जास्त राहिले. २५. (हे पैगंबरा! यावरहि लोक या मुदतीस मान्य न करतील तर यांना) सांग कीं जेवढी मुदत (गुहास्थ लोक गुहेंत) राहिले ती परमेश्वर तुह्मांहून जास्तच जाणतो; आकाश व पृथ्वी यांच्या अदृष्टाचें ज्ञान त्यालाच होय. (अहाहा!) कितीतरी (उत्तम) पाहता! व कितीतरी (उत्तम) ऐकता! त्याच्यावांचून लोकांचा कोणी पुरस्कर्ता नाहीं व तो आपल्या हुकमांत कोणालाहि पातीदार करीत नाहीं. २६. आणि (हे पैगंबरा!)

---

(१) हजरत पैगंबर साहेबांनीं लोकांस जेव्हां इस्लामधर्माकडे पाचारण करण्याचा उपक्रम केला तेव्हां अरबी द्वीपकल्पांत, अनेकेश्वरवादी, मूर्तीपूजक, अग्निपूजक, नक्षत्रोपासक, ईश्वरनिंदक, नास्तिक, पुनरुत्थान न मानणारे, देवदूतांस परमेश्वराच्या मुली ह्मणणारे, खिस्ती, यहुदी वगैरे निरनिराळ्या मतांचे लोक वसत होते. आणि परमेश्वरानें पैगंबर साहेबांस यासाठीं पाठविलें होतें कीं ज्या ज्या धर्मानें सत्यास बाध येतो व प्रत्यक्ष

**तुझ्या पालनकर्त्याचें पुस्तक जें तुला प्रकट केलें गेलें आहे तें पठनपाठन करीत राहा; कोणीहि त्याच्या शब्दांस बदलूं शकत नाहीं; आणि त्याच्याशिवाय तुला (कोठेंच) आश्रयहि सांपडणार नाहीं. २७. आणि (हे पैगंबरा!) जे लोक सकाळसांज आपल्या पालनकर्त्याचा धांवा करतात (व) त्याची मर्जी संपादूं इच्छितात त्यांच्यासंगतीं (उठण्या बसण्या)ची आपल्या अंगीं चिकाटी आण; आणि तुझी दृष्टी त्यांच्यावरून हटूं देऊं नकोस कीं जेणें करून तूं ऐहिक आयुष्याच्या शृंगार(-वैभवा)ची आकांक्षा बाळगूं लागावीस. आणि तूं अशा मनुष्याचा कधींहि कह्या मानूं नकोस कीं ज्याच्या अंतःकरणाला आह्मीं आपल्या स्मरणाकडून गाफिल करून टाकिलें आहे व तो आपल्या मनोकामनेच्या छंदास लागला आहे आणि त्याचा प्रपंच अतोनात वाढून गेला आहे. २८.**

---

वा अप्रत्यक्ष रीतीनें एका व खऱ्या परमेश्वराशिवाय अनेक कल्पित देवांच्या उपासनेचा बोध होतो, अशा सर्व धर्मांची असत्यता पदरीं घालून लोकांस एकाच व अद्वितीय अशा खऱ्या ईश्वराकडे वळवावें. तर जेवढे म्हणून धर्म प्रचलित होते त्या सर्वांशींहि थोडा बहुत विरोध असणें साहाजिकच होतें. यामुळें दरोबस्त घरोघरीं पैगंबर साहेबांचे शत्रु होऊन राहिले होते. त्यांत अव्वल दर्जाचे यहुदी व मग अनेकेश्वरवादी मूर्तीपूजक वगैरे शत्रु होते. यालोकांनीं पैगंबर साहेब व इस्लामधर्माचें निर्मूलन करण्यांत कोणतीहि कसर ठेविली नाहीं. यहुदी लोकांच्या चेष्टेंत एक चेष्टा हीहि होती कीं ते नाईलाज होऊन पैंगंबर साहेबांस अशा गोष्टी विचारीत किंवा दुसऱ्यांकडून विचारवीत कीं पैगंबर निरक्षर असल्यामुळें त्यांना जबाब देतां येऊं नये व त्यांचें हंसें व्हावें. 'अस्हाबे कह्फ्' म्हणजे गुहास्थ लोकांचा अहवालहि परिक्षे-साठीं पुसण्यांत आला. पैगंबरांनीं या आशेनें कीं जिब्रील—पवित्र आत्मा-आदेश घेऊन येईल, वायदा केला कीं उद्यां जबाब देईन. परंतु वायदा करते वेळीं 'इन्शाअल्ला' म्हणजे परमेश्वर इच्छील तर, असें म्हणण्याचा त्यांना विसर पडला. पण मोठ्या लोकांची गोष्टहि मोठीच असते. एवढ्याशा विस्मरणावरहि परमेश्वरानें त्यांना पकडिलें. ह्मणून प्रकटीकरण झालें पण फार-

**आणि (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (हें) सत्य(-पूर्ण कुराण) तुमच्या पालनकर्त्याकडून (प्रकट झालें) आहे. तर ज्याची मर्जी असेल त्यानें (तें) मानावें; आणि ज्याची मर्जी असेल त्यानें (तें) न मानावें. अर्थात् नास्तिकांसाठीं तर आह्मीं असा अग्नि तयार करून ठेविला आहे कीं ज्याच्या कनाती (ह्मणजे लोळ) त्यांना चहूंकडून घेरून टाकतील. आणि जर ते पाणी मागतील तर (ज्या) पाण्यानें त्यांची तृषा परिहार केली जाईल (तें इतकें तापलेलें असेल कीं) जसें वितुळलेलें तांबें (व) तें तोंडें भाजून टाकील. (किती तरी) वाईट पेय हें! आणि ऐषआरामाचे दृष्टीनें (नरकाची किती तरी) वाईट शय्या ही! २९.**

---

उशिरानें झालें. या प्रकटीकरणाचे गोष्टी वरून पैगंबर साहेबांचे सत्यत्वाचें एक उत्तम प्रमाण प्रतितीस आलें कीं यहुदी लोकांनीं गुहेंतील लोकांचा अहवाल विचारला; तेव्हां त्यांना खात्रीपूर्वक माहीत होतें कीं यांचा अहवाल प्राचीन धर्मपुस्तकांत लिहिलेला आहे. तथापि ते हेंहि समजले होते कीं पैगंबर स्वतः निरक्षर असून त्यांचा कोणाशी असा स्नेह व हित-संबंधहि नाहीं कीं या गोष्टी त्यांना कोणी वाचून ऐकवील व त्यांना त्या कळतील. म्हणून त्या विचारल्या असतां त्यांना निरुत्तर होणें भागच पडेल. आणि जर यहुद्यांस हें माहीत असतें कीं नवल नाहीं, या गोष्टी पैगंबर साहेबांच्या कानापर्यंत पोहोंचल्या असतील अगर पोहोंचूं शकतील; तर यहुद्यांनीं या प्रश्नाचा इरादाच केला नसता. परंतु त्यांनीं विचारिलें व त्यांना सविस्तर व समर्पक उत्तरहि मिळालें. हें उत्तरच या गोष्टीचें प्रमाण आहे कीं पैगंबर साहेबांस प्रकटीकरण झालें. नाहींतर हा अहवाल जाणण्याचें आणखी कांहीं साधनच नव्हतें व ही गोष्ट खुद शत्रुहि मानीत होते.

(१) अरब लोक बहुत करून एके जागेहून दुसरे जागीं फिरणारे असून तंबू व राहुट्या मारून राहत होते. त्यांचे दरवाजे व भिंती तंबूच्या कनातीच होत्या. याच विचारानें नरकवासी लोकांसंबंधानें ह्मटलें आहे कीं त्यांच्या नरकीय तंबूंच्या कनाती आगीच्या होतील; ह्मणजे आगीचे लोळ इतके मोठे होतील कीं नरकाचे चारहि दरवाजे जणुं भिंतीच होत.

निःसंशय ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं; (परलोकीं त्यांची मोठी मजा होय; कारण,) जो कोणी सुकृत्य करील त्याचा मोबदला आह्मीं वांयां जाऊं देत नसतों. ३०. हेच लोक होत कीं ज्यांच्या राहण्यासाठीं (स्वर्गाच्या) कायमच्या बागा होत; या लोकांच्या (हवेल्या) खालून पाण्याचे पाट वाहत असतील; तेथें त्यांना आलंकारार्थ सोन्याचीं कंकणें घातलीं जातील. आणि ते तलम रेशमाचीं व किनखाबाचीं हिरवीं (हिरवीं) वस्त्रें ल्यालेले असतील; (व) तेथें सिंहासनावर टेंका लावून (खुशाल बसलेले) असतील. (किती तरी) उत्कृष्ट पुण्यफल हें! आणि ऐषआरामाचे दृष्टीनें (स्वर्गाची किती तरी) उत्तम शय्या ही! ३१. आणि (हे पैगंबरा!) या लोकांस दृष्टांतार्थ त्या दोन पुरुषांची गोष्ट सांग; कीं या उभयतांपैकीं एकाला आम्हीं द्राक्षांच्या दोन बागा देऊन ठेविल्या होत्या व त्या दोन्ही(बागां)च्या सभोंवतीं खजुरीचीं झाडें लावून दिलीं होतीं; आणि दोहों(बागां)च्या मधून मधून (धान्याचें) शेतहि पिकविलें होतें. ३२. दोन्ही बागांनीं आपलीं फळेंहि (मुबलक) दिलीं व फळ देण्यांत कांहींच कमी केलें नाहीं; आणि दोन्हीं(बागां)च्या दरम्यान आम्हीं एक नदीहि वाहून काढली होती. ३३. आणि (याप्रमाणें) बागांच्या मालकापाशीं (हरवक्त तऱ्हेतऱ्हेचें) पीक राहत असे. एके काळीं हा मनुष्य आपल्या (कोणा) मित्राशीं वाटाघाट करीत करीत बोलूं लागला कीं मी तुजहून धनसंपत्तींत अधिक आहें आणि (माझा) जथाहि फार जबरदस्त (जथा) आहे. ३४. आणि (तो असें बोलत बोलत) आपल्या बागेंत शिरला,—व वास्तविक तो (गर्वानें व ईश्वराप्रत

(१) सुवर्ण कंकणांचें परिधान करणें इजतअब्रू व श्रीमंतीचें द्योतक होय. आतांहि जगांतील राजे व अमीर उमराव सोन्याचे व रत्नाचे कडे हातांत घालतात अगर दुसऱ्या अनेक प्रकारांनीं सुवर्ण व रत्नें यांचा उपयोग करतात. पण इस्लामधर्मशास्त्रानुसार या लोकीं पुरुषांस यांचें लेणें निषिद्ध होय.

अनुपकारी होऊन हकनाक) आपणच आपल्या जिवावर जुलूम करीत होता;—तो ह्मणूं लागला कीं मी समजत नाहीं कीं ही (बाग) केव्हांहि लयास जाईल. ३५. आणि मी (हेंहि) समजत नाहीं कीं पुनरुत्थान काईम होईल. आणि यदा कदाचित्‌ (झालेंच तर) मी आपल्या पालनकर्त्याकडे परतलों जाईन (तर) अर्थात्‌ परिवर्तनाच्या मानानें (कांहीं झालें तरी) या (जगा)हून उत्तमच (जागा) मी पावेन. ३६. त्याचा मित्र ज्याच्याशीं तो बोलत होता, तो (बोलतां बोलतां मध्येंच) त्याला बोलूं लागला कीं, कां तूं अशा(पालनकर्त्या)स मानण्याचें नाकारितोस कीं ज्यानें (प्रथमतः) तुला मातींतून व मग वीर्यबिंदूतून निर्माण केलें; नंतर तुला त्यानें संपूर्ण मनुष्य बनविला? ३७. परंतु मी तर (हा भाव धरून आहें कीं) तोच परमेश्वर माझा पालनकर्ता होय; आणि मी आपल्या पालनकर्त्याचा कोणालाहि सरकतदार ठरवीत नाहीं. ३८. आणि जेव्हां तूं आपल्या बागेंत शिरलास, तेव्हां तूं (असें) कां म्हटलें नाहींस कीं हें जें (सर्व) परमेश्वरानें इच्छिलें (तें झालें; नाहींतर,) परमेश्वराचे(साहय्या)वांचून (माझ्या अंगीं तर) कसलीच ताकत नाहीं. जर धनसंपत्ति व संततीच्या मानानें, तूं मला आपल्यापेक्षां फारच कमी समजतोस; ३९. तर नवल नाहीं कीं माझा पालनकर्ता तुझ्या बागेहूनहि उत्तम (बाग) मला देईल, आणि या(तुझ्या बागे)वर (तुझ्या अनुपकारीपणाचें शासन म्हणून) आकाशांतून (अशी) एखादी विद्युत (-रूपी शिक्षा) पाठवील कीं ती खणखणीत सपाट मैदान होऊन जाईल; ४०. अगर तींतील पाणी फार खोल उतरून जाईल आणि तुला तें कोणा तऱ्हेनें काढतांहि येणार नाहीं. ४१. (सारांश, शिक्षा येऊन ठेपली;) आणि त्या(च्या बागे)चीं पिकें (शिक्षेच्या) फेऱ्यांत सांपडलीं. तर बागे(च्या मशागतीं)त त्यानें जें काय (धन) खर्चीं घातलें होतें त्याबद्दल तो (संतापानें) आपले दोन्ही हात चोळीत राहिला. आणि (बागेची-ही स्थिति होऊन गेली कीं) ती आपल्या मांडवांसह कोसळून

(१) राहत्या घरांत जसें छत असतें तसेच मळ्यांत व बागांत मांडव असतात; व त्यांजवर वेली चढवितात. ह्मणून 'अर्श' हा

पडली होती; आणि (बागेचा धनी) ह्मणत होता कीं अरेरे! मी आपल्या पालनकर्त्याचा कोणालाहि सरकतदार न ठरविला असता(तर बरें होतें)! ४२. आणि त्याचे कोणी पक्षकारहि असे नव्हते कीं परमेश्वरावांचून ते त्याची मदत करते आणि तो (स्वतःहि) बदला घेऊं शकला नाहीं. ४३. ह्या(गोष्टी)नेंच (सिद्ध झालें कीं) सर्व अधिकार खऱ्या परमेश्वरालाच होय. तोच (पुण्याचें) उत्तम फळ (देणारा) आणि (तोच शेवटीं) उत्तम मोबदला देणारा होय. ४४. आणि (हे पैगंबरा!) या लोकांस (एक दृष्टांत हाहि) सांग कीं इहलोकींच्या आयुष्याची उपमा पाण्यासारखी होय कीं आम्हीं तें आकाशांतून वर्षविलें; तों पृथ्वीची वनस्पति पाण्याशीं मिश्र होऊन गेली (अशा प्रकारें कीं पाणी शोषून ती प्रफुल्लित झाली); मग अखेर (तिचा) चुराडा होऊन गेला कीं वायु तिला (जिकडे तिकडे) उधळून टाकतात. आणि परमेश्वर सर्वशक्तिमान् होय. ४५. (हे पैगंबरा!) धनसंपत्ति व संतती हीं इहलोकिक आयुष्याची (क्षणभंगुर) शोभा होय; आणि चिरस्थायी[1] अशीं सुकृत्यें तुझ्या पालनकर्त्यासमीप पुण्यफलाचे मानानें उत्तम होत व (पुढील) आशेच्या दृष्टीनेंहि उत्तम होत. ४६. आणि (लोकांनों!) ज्या दिवशीं आम्हीं पर्वतांस (बुडापासून) चालवूं[2] लावूं (त्या दिवसाचे चिंतनाकडून

---

शब्द दोहोंसहि साधारण आहे. घराचा मजकूर असल्यास छत व बागेचा उल्लेख असल्यास मांडव असे अर्थ घ्यावयाचे असतात. मांडवासह कोसळणें ह्मणजे आधीं मांडव कोसळून मग बाग कोसळली. त्याचा प्रकार असा कीं स्तंभ कमजोर झाले ह्मणजे अगोदर छत किंवा मांडव कोसळून पडतो; तद्नंतर वरून स्तंभ किंवा भिंती पडतात.

(१) चिरस्थायी सुकृत्यें ह्मणजे ज्यांचें पुण्यफळ नेहमीं अप्रतिहत प्राप्त होतच राहतें तीं कामें; उदाहरणार्थ; पुत्रपौत्रादि सदाचरणी संतति, मशीद-उपासनालय, पुल, विहीरी, धर्मशाळा, इसपितळें वगैरे वगैरे बांधणें किंवा एखादें लोकोपयोगी पुस्तक लिहून ठेवणें वगैरे.

(२) पर्वतांस चालवूं लावणें ह्मणजे त्यांची अगदीं धुळधाणी करून त्यांना रजःकणाप्रमाणें जिकडे तिकडे उडूं लावणें.

बेफाम राहूं नका; ) आणि (हे पैगंबरा! ) तूं पृथ्वीला पाहशील (कीं पर्वत, घरेंदारें व बागबगिचे वगैरे जमिनदोस्त होऊन) खुला मैदान (पडला) आहे; व आह्मीं लोकांस एकत्र गोळा करूं व त्यांजपैकीं कोणालाहि सोडणार नाहीं. ४७. आणि (सारेचे सारे) रांगे रांगेनें तुझ्या पालनकर्त्यासमक्ष पुढें केले जातील. (आणि आह्मीं त्यांस बजावूं कीं) जसें आह्मीं तुह्मांस पहिल्यांदां निर्माण केलें, (अखेर) तसेंच तुह्मीं आमच्या हुजुरांत आलाच आला. तथापि, तुह्मीं अशी कल्पना करीत होता कीं आह्मीं तुमच्या(पुनरुत्थाना)साठीं कोणताहि वेळच (मुळीं) ठरविणार नाहीं. ४८. आणि (लोकांच्या कर्मांचें) रजिस्टर (पुढें) ठेविलें जाईल; तर (हे पैगंबरा!) तूं गुन्हेगारांना पाहशील कीं जें कांहीं रजिस्टरांत (नोंदलेलें) आहे (तें पाहून पाहून) त्या(चा जाब देण्या)पासून ते भीत आहेत व ह्मणत आहेत कीं हाय! आमचें दुर्दैव! ह्या रजिस्टराला ह्मणावें तरी काय कीं तें कलम बंद केल्यावांचून कोणा लहानशा(गुन्ह्या)लाहि सोडत नाहीं व न मोठ्यालाच! आणि जें कांहीं या लोकांनीं (जगांत) केलें सवरलें होतें (तें सर्व रजिस्टरां–कर्मपटां–त नोंदलेलें) प्रत्यक्ष पावतील. आणि तुझा पालनकर्ता कोणावरहि (अगदींच) अनर्थ करीत नाहीं. ४९. आणि (एक वेळ तोहि होता कीं) जेव्हां आह्मीं देवदूतांस आज्ञा केली कीं 'आदम'पुढें साष्टांग नमस्कार घाला; तेव्हां 'इब्लीस' खेरीज करून सर्वांनींच तर साष्टांग नमस्कार केला. (हा 'इब्लीस,') 'जिन्न'–दैवतदैत्य–कोटींतला होता, म्हणून तो आपल्या पालनकर्त्याचे आज्ञेतून निघून गेला. तर (लोकांनों!) कां, मला सोडून 'इब्लीस'ला व त्याच्या वंशजाला तुह्मीं (आपले) दोस्त बनवितां, आणि वास्तविक

---

(१) भावार्थ हा आहे कीं जसें तुह्मीं जगांत उघडे नागवे पाठविले गेलां होतां तसेंच उघडे नागवे सर्व कांहीं सोडून आह्मांपुढें हजर झालां ते झालांच.

पाहतां, ते तुमचे (पुरातन) शत्रु होत? अन्यायी लोकां-(नीं परमेश्वराचे ऐवजीं सैतानास पत्करलें त्यां)च्याठायीं ही अदलाबदल (फारच) वाईट झाली. ५०. मी आकाश व पृथ्वीच्या निर्माण करते वेळेस, किंबहुना, खुद्द सैतानांच्या निर्माण करते वेळेसहि सैतानांस (आपल्या कुमकेसाठीं बोलावून) हाजीरहि केलें नव्हतें. आणि मी (कांहीं असा दुर्बल) नव्हतों कीं बहकविणारांस (आपलें) बाहु(-बल) बनवितों! ५१. आणि (लोकांनों! तो दिवस आठवा कीं) ज्या दिवशीं परमेश्वर (मूर्तीपूजकांस) आज्ञा करील कीं ज्यांला तुह्मीं (आपल्या मतें) माझे सरकतदार समजत होतां त्यांजला (आतां) हाक मारा. तथापि हे त्यांना बोलावतीलहि; पण ते त्यांस जबाबहि देणार नाहींत. आणि आम्हीं या (उभयतां)च्या दर्म्यान एक (दुर्गम व) घातक[1] असा दरा घालून टाकूं. ५२. आणि गुन्हेगार लोक नरकाग्नीला पाहतील व ते समजून जातील कीं आपण त्यांत पडणार आहों; आणि त्यांना त्यापासून (कोठेंहि) गत्यंतरच सांपडणार नाहीं. ५३. आणि आम्हीं ह्या कुराणांत लोकांच्या(समजाविण्या)साठीं हरेक तऱ्हेचा दृष्टांत फिरवून फिरवून सांगितला आहे. पण मनुष्य हा सर्व सृष्टींत अतिशय कज्जेखोर होय. ५४. आणि जेव्हां लोकांपाशीं सन्मार्ग येऊन चुकला, तेव्हां (आतां) विश्वास धरण्यापासून व आपल्या पालनकर्त्यापाशीं क्षमा मागण्यापासून यांना या शिवाय आणखी कोणतें कारण प्रतिबंधक होऊं शकत होतें कीं पूर्वील लोकांचीशी गत यांच्याहि पुढें यावी अगर (आमची) शिक्षा यांच्यापुढें प्रत्यक्ष येऊन ठेपावी. ५५. आणि आह्मीं तर पैगंबरांस केवळ या करतांच पाठवितों कीं (त्यांनीं सज्जनांस तारणाचें) शुभवर्तमान ऐकवावें व (दुर्जनांस शिक्षेचें) भय दाखवावें. आणि जे लोक नास्तिक होत ते मिथ्या

---

(१) ह्मणजे उदाहरणार्थ मूर्तीपूजक व त्यांच्या मूर्ती यांच्या दर्म्यान एखादा खंदक आलेला असेल व त्यांत अग्नि भरलेला असेल; कीं जो कोणी तो ओलांडून पार जाऊं इच्छील तो जळून भस्म होऊन जाईल.

गोष्टींस आधारभूत घेऊन वाद घालीत असतात कीं तेणें करून सत्याला (निष्फळ व) डळमळीत करून सोडावें; आणि या लोकांनीं माझ्या निशाण्यांस व ज्या (शिक्षे)कडून ते दरडाविले जातात त्या(माझ्या शिक्षे)ल हंशी खेळ बनवून ठेविला आहे. ५६. आणि ज्या (मनुष्या)स आपल्या पालनकर्त्याच्या निशाण्यांचें स्मरण दिलें जाईल व तो त्यांजकडून तोंड चुकवील व त्याच्या दोन्ही हातांनीं[1] पूर्वीं जें केलें सवरलें आहे तें विसरून जाईल अशा (मनुष्या)पेक्षां अधिक अन्यायी आणखी कोण? (गोष्ट ही आहे कीं,) आम्हींच यांच्या अंतःकरणांवर पडदे पाडले आहेत कीं यांना सत्य उमजूं नये व यांच्या कानांत (एक प्रकारचें) जडत्व (आणिलें आहे कीं त्यांना सत्य ऐकतां येऊं नये). आणि (हे पैगंबरा!) जरी तूं या लोकांस सन्मार्गाकडे बोलाविशील तरी देखिल हे कधींहि सन्मार्गावर येणारच नाहींत. ५७. आणि (हे पैगंबरा! तुझा पालनकर्ता फारच क्षमाकर्ता (व) दयानिधान होय. यांनीं जें कांहीं संपादिलें आहे त्याच्या शासनांत जर तो यांना पकडता, तर तो केव्हांच यांना त्वरेनें शिक्षा ठोठावून टाकता. परंतु यांच्यासाठीं अशी एक वेळ (नियमित) होय कीं जिच्या अलिकडे[2] यांना (कोठेंच) आश्रय सांपडणार नाहीं. ५८.

---

(१) बहुतेक कर्में मनुष्य आपल्या हातांनींच करीत असतो ह्मणून हातांनीं असें ह्मटलें आहे. तात्पर्यार्थ हा आहे कीं परमेश्वराचें स्मरण दिलें जातांहि त्यांस पाखंड समजून त्याप्रमाणें आचरण न करावें व आपण जें कांहीं पूर्वी केलें तें परमेश्वरासमीप मान्य होईल कीं अमान्य याची किंचितहि पर्वा न बाळगावी यापेक्षां अधिक अन्याय तो कोणता?

(२) भावार्थ हा आहे कीं पुनरुत्थानाचा वेळ जवळ जवळ येतच चालला आहे ह्मणजे जो दिवस जातो तो कमी होत होत तो नियमित वेळ येऊन ठेपेलच ठेपेल. तर त्या वेळेच्या अलिकडे ह्मणजे पूर्वी कोठेंच आश्रय नाहीं कीं मनुष्य सुरक्षित जागीं बसून त्या पुनरुत्थानाचे वेळेपासून बचावून राहील.

**आणि ('आद' व 'समूद'च्या) ह्या वस्त्या (कीं ज्या तुम्हीं अरब लोक 'सिरीया' देशाच्या मार्गावर ओसाड पडलेल्या पाहतां त्या) जेव्हां त्यांनींहि शिरजोरी केली, तेव्हां आम्हीं त्यांचा संहार करून टाकला; आणि यांच्या संहाराचीहि आम्हीं एक वेळ मुक्रर केली होती. ५९. आणि (हे पैगंबरा! तो वृत्तांतहि आठवण कर कीं) जेव्हां 'मूसा' ('खिजर'चे भेटीस चालला तेव्हां तो) आपला गडी ('यूशा बिन नून') यास म्हणाला कीं दोन्हीं समुद्रांच्या संगमावर पोहोंचेपर्यंत मीं (आपल्या इराद्याहून) टळणार नाहीं; अगर (ह्याप्रमाणें) मीं वर्षोंवर्षे चालतच राहीन: ६०. मग जेव्हां हे उभयतां त्या दोन्ही समुद्रांच्या संगमावर पोहोंचले, तेव्हां**

---

(१) हदीस ह्मणजे पैगंबर साहेबांच्या प्रवचनांत असें सांगितलें आहे कीं हजरत मूसा हे लोकांस उपदेश करीत होते; तेव्हां त्यांचें ज्ञान, बुद्धिमत्ता व वक्तृत्व पाहून श्रोतृजनांपैकीं कोणी त्यांस असा प्रश्न केला कीं आपल्यापेक्षांहि आणखी जास्त विद्वत्ता कोणी बाळगितो काय? मूसा ह्मणाले कीं मी जाणत नाहीं. याचा अर्थ असा होता कीं ते आपणच मोठे ज्ञानी होत. हजरत मूसा हे निःसंशय महान व पराक्रमशाली पैगंबरांपैकीं होते; परंतु सेवाधर्मास हें योग्य होतें कीं त्यांनीं कांहीं झालें तरी नम्रता व विनय यांस अंतरलें न पाहिजे. पैगंबरांच्या अशा लहान लहान चुकाहि परमेश्वराजवळ धरल्या जातात. कारण, ते परमेश्वराची मान्यता पावलेले सेवक असतात; आणि जशी त्यांची मान्यता तशी त्यांची नीतिमत्ताहि उच्च प्रतीची असली पाहिजे. हजरत मूसाकडून एक अहंपणाची गोष्ट घडून आली; ह्मणून परमेश्वरानें त्यांना या चुकीबद्दल अशी तंबी केली कीं त्यांस खिजरपाशीं जावयास आज्ञा केली. परमेश्वरानें प्रकटीकरणाद्वारें हजरत मूसाला इषारा दिला होता कीं जेथें दोन समुद्रांचा संगम होतो तेथें तुझी खिजरशीं भेट होईल. आणि मूसाला हीहि खूण दिली गेली होती कीं खिजरची व तुझी ज्या स्थळीं भेट होईल त्या स्थळीं तुझ्या न्याहरीचा तळलेला मासा ईश्वरचमत्कृतीनें सजीव होऊन समुद्रांत चालला जाईल. बाकीची गोष्ट कुराणांत आलीच आहे.

ते आपला (न्याहरीसाठीं तळलेला) मासा (तेथेंच) विसरून गेले; तर माशानें समुद्रांत सुरंगासारखी आपली वाट घेतली. ६१. मग जेव्हां ते उभयतां (तेथून) पार होऊन गेले, तेव्हां 'मूसानें' आपल्या गड्यास म्हटलें कीं (चल), आमची न्याहरी तर आम्हांला दे; आमच्या ह्या (आजच्या) प्रवासानें तर खरोखरीं आम्हांस मोठीच ग्लानीशी वाटली.[१] ६२. (गड्यानें) म्हटलें, तूं हेंहि पाहिलेंस? कीं जेव्हां आम्हीं (समुद्रतिरीं) त्या खडकाजवळ विसावा घेतला, तेव्हां मी (त्याच जागीं) मासा विसरून गेलों; आणि सैतानानेंच केवळ मला त्याचा विसर पाडला कीं मी (तुझ्याशीं) त्याचा उल्लेख करितों; आणि माशानें चमत्कारिक रीतीनें समुद्रांत आपली वाट घेतली. ६३. 'मूसा'नें सांगितलें कीं हीच (ती जागा) कीं जिचा आह्मीं शोध करीत होतों. मग ते उभयतां आपल्या पदचिन्हांचा माग काढीत काढीत मागल्या पायीं फिरले. ६४. तर (दोन्ही समुद्राच्या संगमावर पोहोंचून) ते आमच्या सेवकांपैकीं एक सेवक (ह्मणजे 'खिजर्') यास पावले; कीं त्याला आह्मीं आपल्याकडून (खास) दया-दान दिलें होतें व आह्मीं (खास) आपल्यापासून त्याला एक (गूढ) विद्या शिकविली होती. ६५. 'मूसा'नें ('खिज्र') यास सांगितलें कीं मी तुझ्याबरोबर राहूं, (परवानगी आहे)? (पण) या अटीवर कीं (परमेश्वराकडून) जें सन्मार्गाचें[२] ज्ञान तुला शिकविलें गेलें आहे त्यांतून कांहीं तूं मलाहि

---

(१) हजरत मूसा हे आपल्या या प्रवासांत कोणाहि दिवशीं थकले नव्हते परंतु जेव्हां त्यांचा प्रवास संपावयास आला तेव्हां त्यांना फारच ग्लानि व श्रम लागल्यासारखें वाटलें ह्मणतात.

(२) कुराणांत 'रुष्द्' हा शब्द आहे. त्याचा अर्थ आह्मीं सन्मार्ग असा केला आहे. याचा मूळ अर्थ कोणाहि गोष्टीचें खरें मर्म जाणणें व त्याला व्यवहारज्ञान, विवेचकबुद्धि व सत्य अभिप्राय असेंहि ह्मणतां येईल. कित्येक भाष्यकारांनीं याचा अर्थ 'इल्मे लदुन्नी' ह्मणजे खास परमेश्वराकडून जें गुढार्थक ज्ञान प्राप्त होतें तें असा केला आहे. यास केवळज्ञानहि ह्मणतां येईल. या सर्वांचा उद्देश खरा सन्मार्ग प्राप्त होणें हाच असतो ह्मणून पर्यवसानीं सन्मार्ग हाच अर्थ शोभतो.

शिकवावेंस. ६६. ('खिज़र'नें) सांगितलें कीं तुझ्यानें माझ्या संगतीं मुळींच दम धरवणार नाहीं. ६७. आणि जी गोष्ट तुझ्या ज्ञानाच्या अटोक्यांत येत नाहीं त्या गोष्टीवर तुझ्यानें दम तरी कसा धरवणार? ६८. ('मूसा'नें) ह्मटलें कीं परमेश्वर इच्छील तर तूं मला सहनशील[1] पावशील; आणि मी तुझ्या कोणा हुकमाचा विरोध करणार नाहीं. ६९. ('खिजर'नें) सांगितलें कीं जर तुला माझ्यासंगतीं राहावयाचेंच असेल, तर मी (आपण होऊन) तुझ्याशीं कोणा गोष्टीचा उल्लेख करीपर्यंत तूं मला कोणत्याच बाबतींत कांहीं विचारूं नयेस. ७०. नंतर ('मूसा' व 'खिज़र' हे) उभयतां पुढें चालले; येथपर्यंत कीं (वाटेंत एक समुद्र आला व) उभयतांहि जेव्हां गलबतांत चढले, तेव्हां 'खिजर'नें (एक फळी तोडून) गलबत फोडून टाकलें. ('मूसा'नें) ह्मटलें, कां तूं गलबत यासाठीं फोडून टाकलेंस कीं गलबतांतील लोकांस तूं (समुद्रांत) बुडवून टाकावेंस? (हें तर) तूं (फारच) तऱ्हेवाईक काम केलेंस! ७१. ('खिज़र'नें) ह्मटलें कीं मी तुला कां सांगितलें नव्हतें कीं तुझ्यानें माझ्यासंगतीं मुळींच दम धरवणार नाहीं? ७२. ('मूसा') ह्मणाला कीं मी विसरलों, ह्मणून तूं माझी पकड धरूं नकोस; आणि माझ्या (ह्या) प्रकरणांत माझ्याशीं (इतकी) सक्तीहि करूं नकोस. ७३. (ही गोष्ट झाली गेली;) मग उभयतां (आणखी) पुढें चालले; येथपर्यंत कीं (वाटेंत) त्यांची एका मुलाशीं गांठ पडली तेव्हां (खिजर'नें) त्याला (धरून) मारून टाकिलें. 'मूसा' बोलला, कां, तूं एका निर्दोष जिवाला मारून टाकिलेंसना? (आणि तेंहि) दुसऱ्या कोणा जिवाच्या (खुनाच्या) बदल्यांत नव्हे. (ही तर) तूं फारच गैर गोष्ट केलीस! ७४.

(१) येथें सहनशील, कंटक ह्मणजे मला कोणा गोष्टीच्या पुसण्याची इच्छा होईल तो न पुसतां मी आपली इच्छा आवरूं शकेन असा मी आहें, हें तुला माहीत होईल.

## ( पूर्वार्ध समाप्त. )

# पवित्र कुराणाच्या उत्तरार्धाची अनुक्रमणिका.


| भाग | आरंभपृष्ठ. | अध्याय. | नांव. | | महा वाक्यांची संख्या. | आरंभपृष्ठ. |
|---|---|---|---|---|---|---|
| भाग १६ वा | ५९७ | १८ | सूरतुल्–कहफ | (समाप्त) | ११० | ५७८ |
| | | १९ | सूरतु–मर्यम | (संपूर्ण) | ९८ | ६०४ |
| | | २० | सूरतु–ताहा | ,, | १३५ | ६२० |
| भाग १७ वा | ६४२ | २१ | सूरतुल्–अंबिया | ,, | ११२ | ६४२ |
| | | २२ | सूरतुल्–हज्ज | ,, | ७८ | ६५९ |
| भाग १८ वा | ६७६ | २३ | सूरतुल्–मोमिनून | ,, | ११८ | ६७६ |
| | | २४ | सूरतु–न्नूर | ,, | ६४ | ६९० |
| | | २५ | सूरतुल–फुर्कान | (अपूर्ण) | ७७ | ७०८ |
| भाग १९ वा | ७१२ | ,, | ,, | ,, (समाप्त) | ... | ..... |
| | | २६ | सूरतु–श्शोअरा | (संपूर्ण) | २२७ | ७२१ |
| | | २७ | सूरतु–न्नमल् | (अपूर्ण) | ९३ | ७३८ |
| भाग २० वा | ७४८ | ,, | ,, | ,, (समाप्त) | ... | ..... |
| | | २८ | सूरतुल्–कसम् | (संपूर्ण) | ८८ | ७५६ |
| | | २९ | सूरतुल्–अन्कबूत | (अपूर्ण) | ६९ | ७७४ |
| भाग २१ वा | ७८१ | ,, | ,, | ,, (समाप्त) | ... | ..... |
| | | ३० | सूरतुर्रूम | (संपूर्ण) | ६० | ७८६ |
| | | ३१ | सूरतु–लुक्मान् | ,, | ३४ | ७९८ |
| | | ३२ | सूरतु–स्सिज्दा | ,, | ३० | ८०५ |
| | | ३३ | सूरतुल्–अहज़ाब | (अपूर्ण) | ७३ | ८१० |
| भाग २२ वा | ८१८ | ,, | ,, | ,, (समाप्त) | ... | ..... |
| | | ३४ | सूरतु–स्सबा | (संपूर्ण) | ५४ | ८३० |
| | | ३५ | सूरतु–फातिर | ,, | ४५ | ८४१ |
| | | ३६ | सूरतु–यासीन | (अपूर्ण) | ८३ | ८५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भाग २३ वा | ८५३ | ३६ सूरतु-यासीन | (समाप्त) | ... | ..... |
| | | ३७ सूरतु-स्साफ्फात | (संपूर्ण) | १८२ | ८६१ |
| | | ३८ सूरतु-सॉद | ,, | ८८ | ८७५ |
| | | ३९ सूरतु-ज्जुमर | (अपूर्ण) | ७५ | ८८६ |
| भाग २४ वा | ८९३ | ,, ,, ,, | (समाप्त) | ... | ..... |
| | | ४० सूरतुल्-मोमिन | (संपूर्ण) | ८५ | ९०० |
| | | ४१ सूरतु-हा-मीम(सिज्दः) | (अपूर्ण) | ५४ | ९१५ |
| भाग २५ वा | ९२४ | ,, ,, ,, | (समाप्त) | ... | ..... |
| | | ४२ सूरतु-श्शूरा | (संपूर्ण) | ५३ | ९२६ |
| | | ४३ सूरतु-ज्जुखरुफ | ,, | ८९ | ९३६ |
| | | ४४ सूरतु-दुखान | ,, | ५९ | ९४९ |
| | | ४५ सूरतुल्-जासियः | ,, | ३७ | ९५५ |
| भाग २६ वा | ९६१ | ४६ सूरतुल-अह्काफ | ,, | ३५ | ९६१ |
| | | ४७ सूरतु-मोहंमद | ,, | ३८ | ९६९ |
| | | ४८ सूरतुल्-फत्ह् | ,, | २९ | ९७६ |
| | | ४९ सूरतुल्-हुजरात | ,, | १८ | ९८७ |
| | | ५० सूरतु-क़ाफ | ,, | ४५ | ९९२ |
| | | ५१ सूरतु-ज्जारियात | (अपूर्ण) | ६० | ९९७ |
| भाग २७ वा | १००० | ,, ,, ,, | (समाप्त) | ... | ..... |
| | | ५२ सूरतु-त्तूर | (संपूर्ण) | ४९ | १००३ |
| | | ५३ सूरतु-न्नज्म | ,, | ६२ | १००८ |
| | | ५४ सूरतुल्-क़मर | ,, | ५५ | १०१३ |
| | | ५५ सूरतुर्-रह्मान् | ,, | ७८ | १०१९ |
| | | ५६ सूरतुल्-वाक़िअः | ,, | ९६ | १०२५ |
| | | ५७ सूरतुल्-हदीद | ,, | २९ | १०३० |
| भाग २८ वा | १०३७ | ५८ सूरतुल्-मुजादिलः | ,, | २२ | १०३७ |
| | | ५९ सूरतु -ह्शूर् | ,, | २४ | १०४३ |
| | | ६० सूरतुल्-मुम्तहनः | ,, | १३ | १०४९ |
| | | ६१ सूरतु-स्सफ् | ,, | १४ | १०५५ |
| | | ६२ सूरतुल्-जुमुअः | ,, | ११ | १०५९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ६३ | सूरतुल्-मुनाफिकून (संपूर्ण) | ११ | १०६१ |
| | | ६४ | सूरतु-त्तग़ाबुन् ,, | १८ | १०६३ |
| | | ६५ | सूरतु-त्तलाक़ ,, | १२ | १०६७ |
| | | ६६ | सूरतु-त्तहरीम ,, | १२ | १०७१ |
| भाग २९ वा | १०७५ | ६७ | सूरतुल्-मुल्क ,, | ३० | १०७५ |
| | | ६८ | सूरतुल्-क़लम ,, | ५२ | १०७९ |
| | | ६९ | सूरतुल्-हाक्क: ,, | ५२ | १०८५ |
| | | ७० | सूरतुल्-मआरिज ,, | ४४ | १०८९ |
| | | ७१ | सूरतु-नूह ,, | २८ | १०९२ |
| | | ७२ | सूरतुल्-जिन्न ,, | २८ | १०९५ |
| | | ७३ | सूरतुल्-मुज्जंम्मिल ,, | २० | १०९९ |
| | | ७४ | सूरतुल्-मुद्दस्सिर ,, | ५६ | ११०२ |
| | | ७५ | सूरतुल्-कियामत ,, | ४० | ११०७ |
| | | ७६ | सूरतु-द्दहर ,, | ३१ | १११० |
| | | ७७ | सूरतुल्-मुर्सलात ,, | ५० | १११४ |
| भाग ३० वा | १११७ | ७८ | सूरतु-न्नब्अ ,, | ४० | १११७ |
| | | ७९ | सूरतु-न्नाज़िआत ,, | ४६ | ११२० |
| | | ८० | सूरतु-अबस ,, | ४२ | ११२३ |
| | | ८१ | सूरतु--त्तकवीर ,, | २९ | ११२५ |
| | | ८२ | सूरतुल्-इन्फितार ,, | १९ | ११२८ |
| | | ८३ | सूरतु-त्तत्फीफ ,, | ३६ | ११३० |
| | | ८४ | सूरतुल्-इन्शिक़ाक़ ,, | २५ | ११३२ |
| | | ८५ | सूरतुल्-बुरूज ,, | २२ | ११३४ |
| | | ८६ | सूरतु-त्तारिक़ ,, | १७ | ११३६ |
| | | ८७ | सूरतुल्-आअला ,, | १९ | ११३८ |
| | | ८८ | सूरतुल्-ग़ाशिय: ,, | २६ | ११३९ |
| | | ८९ | सूरतुल्-फज्र् ,, | ३० | ११४१ |
| | | ९० | सूरतुल्-बलद ,, | २० | ११४५ |
| | | ९१ | सूरतु-श्शम्स ,, | १५ | ११४६ |
| | | ९२ | सूरतुल्-लैल् ,, | २१ | ११४८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भाग ३० वा (पुढें चालू) | ९३ | सूरतु-दुहा | ,, | ११ | ११४९ |
| | ९४ | सूरतुल-इन्शिराह | ,, | ८ | ११५० |
| | ९५ | सूरतु-त्तीन | ,, | ८ | ११५२ |
| | ९६ | सूरतुल्-अलक | ,, | १९ | ११५३ |
| | ९७ | सूरतुल्-कद्र | ,, | ५ | ११५५ |
| | ९८ | सूरतुल्-बय्यन: | ,, | ८ | ११५६ |
| | ९९ | सूरतु-ज्जिलजाल | ,, | ८ | ११५८ |
| | १०० | सूरतुल्-आदियात | ,, | ११ | ,, |
| | १०१ | सूरतुल्-कारिअः | ,, | ११ | ११६० |
| | १०२ | सूरतु-त्तकासुर | ,, | ८ | ११६१ |
| | १०३ | सूरतुल-असर | ,, | ३ | ११६२ |
| | १०४ | सूरतुल-हुमज: | ,, | ९ | ११६३ |
| | १०५ | सूरतुल्-फील | ,, | ५ | ११६४ |
| | १०६ | सूरतुल्-कुरैश | ,, | ४ | ११६५ |
| | १०७ | सूरतुल-माऊन | ,, | ७ | ११६६ |
| | १०८ | सूरतुल-कौसर | ,, | ३ | ११६७ |
| | १०९ | सूरतुल्-काफिरून | ,, | ६ | ११६८ |
| | ११० | सूरतु-न्नसर | ,, | ३ | ११६९ |
| | १११ | सूरतु-ल्लहब | ,, | ५ | ११७० |
| | ११२ | सूरतुल्-इखलास | ,, | ४ | ११७१ |
| | ११३ | सूरतुल्-फलक | ,, | ५ | ११७३ |
| | ११४ | सूरतु-न्नास | ,, | ६ | ११७४ |

# पवित्र कुराण.

## भाग १६ वा.

### सूरतुल्-कह्फ् (पुढें चालू).

('खिज़्र') ह्मणाला, मी कां तुला सांगितलें नव्हतें कीं तुझ्यानें माझ्या-संगतीं मुळींच दम धरवणार नाहीं? ७५. ('मूसानें') सांगितलें कीं या पश्चात जर मी तुला कोणतीहि बाबत विचारीन तर तूं मला (आपल्या)संगतीं राहूं देऊं नकोस; कीं तूं माझ्यातर्तीनें निमित्तास[1] पोहोंचून चुकलास. ७६. हें होऊन जाऊन, ते (आणखी) पुढें चालले; येथपर्यंत कीं ते जेव्हां एका गांवाच्या लोकांपाशीं पोहोंचले, तेव्हां त्यांनीं तेथिल लोकांपाशीं खावयास मागितलें. आणि त्यांनीं त्यांचा पाहुणचार करण्याचें नाकारिलें. इतक्यांत त्यांनीं गांवांत एक भिंत पाहली कीं ती कोसळण्याच्या बेतावर आली होती; ह्मणून ('खिजर'नें) ती (पुन्हां नव्यानें) उभी करून दिली. (यावर 'मूसा'नें) ह्मटलें कीं जर तूं इच्छितास तर अर्थात् (या लोकांपासून) तूं भिंत उभी करून देण्याबद्दल कांहीं वेतन घेतास. ७७. ('खिजर'नें) सांगितलें कीं बस, आतां माझ्या व तुझ्या दर्म्यान हीच तुटातूट! ज्या(गोष्टीं)वर तुझ्यानें दम धरवला नाहीं, त्यांची मी आतां तुला खरी हकीकत सांगून देतों. ७८. (ती अशी कीं) गलबत तर (खलाशी धंदा करणाऱ्या) गरीबांचें होतें कीं ते समुद्रांतच धंदा चालवीत असत. तर मी असें योजिलें कीं तें ऐबदार करून टाकावें. कारण, यांच्या समोरच (समुद्रा)पलिकडे एक (जुलमी) राजा होता कीं तो प्रत्येक

---

(१) भावार्थ हा कीं जेव्हां माझ्याकडून तिसऱ्यांदा अशी चूक होईल तेव्हां तुम्हांस मला वेगळा करण्याचा पूर्ण अधिकार आहे; तुह्मांस कांहीं तरी निमित्त पाहिजे होतें तें मिळालें. आतां यापुढें माझा तुम्हांशीं कांहीं गिला राहणार नाहीं

(धडधाकड) गलबत बळजबरीनें धरून ठेवीत असे. ७९. आणि मुलगा (जो होता) तर त्याचे आईबाप उभयतांहि विश्वासू होते. तर आम्हांस हा अंदेशा वाटला कीं (असें न व्हावें, मोठा होऊन) त्यानें शिरजोरी व नास्तिकपणा करून त्या उभयतांस इजा द्यावी. ८०. म्हणून आम्हीं हा इरादा[1] केला कीं (त्याला मारून टाकावें व) त्यांचा पालनकर्ता याच्यामोबदला त्यांना पवित्राचरणांत याहून उत्तम व गोत्रहितांत (याहून) जास्त निकट (कळकळीचा) असा (पुत्र) देवो. ८१. आणि राहिली, भिंत तर ती शहरांतील दोन अनाथ बालकांची होती; आणि भिंतीच्या खालीं त्या(मुलां)चाच खजिना (गाडलेला) होता; आणि या-(मुलां)चा बाप (एक) सदाचरणी (माणूस) होता. तर तुझ्या पालनकर्त्यानें असें इच्छिलें कीं उभयतां (मुलें) आपल्या भर तारुण्यास पोहोंचवींत व (भिंतीखालून) त्यांनीं आपला खजिना काढून घ्यावा. (आणि त्यांच्या स्थितीवर) तुझ्या पालनकर्त्याची ही एक मेहरबानी होती. आणि (या वृत्तांतांत) मी (जें कांहीं केलें) तें आपल्या अधिकारानें केलें नाहीं; (तर परमेश्वराचेच आज्ञेनें केलें.) ज्या गोष्टींवर तुझ्यानें दम धरवला नाहीं त्यांची खरी हकीकत ही होय. ८२. आणि (हे पैगंबरा!) लोक तुला (तुझी परिक्षा पाहण्यास) 'जुल्कर्नैन'[2]विषयीं प्रश्न करतात. तूं (यांना)

---

(१) हजरत खिजर यांनीं जेव्हां आपला इरादा परमेश्वराच्या इराद्याच्या बिलकुल आधीन केला होता, तेव्हां त्यांचें हें म्हणणें कीं आम्हीं इरादा केला, जणुं कीं हेंच म्हणणें होतें कीं परमेश्वरानेंच इच्छिलें. अथवा इरादा केला म्हणजे अशा इच्छेनें प्रार्थना केली, हाहि अर्थ होऊं शकतो. हा मुलगा मारला गेल्यावर परमेश्वरानें पुढें त्यांस एक मुलगी दिली व तिचा एका पैगंबराशींच विवाहसंबंध झाला. इच्या पोटीहि असा एक पैगंबर जन्मला कीं ज्यानें एक मोठे राष्ट्रच मुसलमान म्हणजे ईश्वराज्ञाधीन बनविलें.

(२) 'जुलकर्नैन' याचा शब्दशः अर्थ दोन शिंगें ज्याला आहेत तो. म्हणून पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत ज्याची राज्यसत्ता होय तो. याचें

सांग कीं मी तुम्हांस आतां त्याचा थोडासा उल्लेख वाचून ऐकवितों. ८३. (परमेश्वर म्हणतो कीं) आम्हीं त्याला पृथ्वीवर मोठें सामर्थ्य दिलें होतें; आणि आम्हीं त्याला हरतऱ्हेचें साहित्यहि देऊन ठेविलें होतें. ८४. सारांश, तो एका साधनाच्यामार्गें लागला (ह्मणजे पश्चिमेकडेस मार्ग आक्रमूं लागला). ८५. येथपर्यंत कीं जेव्हां तो (चालतां चालतां) सूर्यास्त होण्याच्या जागीं पोहोंचला, तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं सूर्य (जणुं) काळया काळया चिखलाच्या कुंडांत बुडतो आहे आणि त्याला असें आढळलें कीं त्या(कुंडा)च्या जवळ एक राष्ट्रहि (वसत) आहे. आम्हीं फर्माविलें कीं हे 'ज़ुल्क़र्नैना'! (तूं बादशाह आहेस आणि हे दोन्ही अधिकार बाळगितोस;) तूं पाहिजे तर (या लोकांस) शिक्षा दे; आणि पाहिजे तर यांच्या बाबतींत चांगुलपणा पत्कर. ८६. ('ज़ुल्क़र्नैन'नें) ह्मटलें कीं जो कोणी (यांच्यांतून) अनर्थ माजवील, त्याला तर आह्मीं शिक्षा देऊं. नंतर (पुनरुत्थानाचे दिवशीं) तो आपल्या पालनकर्त्याकडे परतून नेला जाईल; तर तो (आमच्या शिक्षेखेरीज) त्याला (आणखीहि) सक्त शिक्षा देईल. ८७. आणि जो कोणी विश्वास धरील व सुकर्म आचरील तर (तसेंच) मोबदल्यापरी त्याला (परमेश्वरा-समीप) कल्याण (प्राप्त) होईल; आणि आह्मींहि आपल्या कामांत त्याला सोपें तें करावयास सांगूं. ८८. नंतर तो (आणखी) एका साधनाच्या मार्गें लागला (ह्मणजे पूर्वेकडेस मार्ग आक्रमूं लागला). ८९. येथपर्यंत कीं जेव्हां तो (चालतां चालतां) सूर्यो-दयाच्या जागीं पोहोंचला, तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं

---

नांव सिकंदर–अलेक्ज़ांडर–असें होतें; पण तो अलेक्ज़ांडर धि ग्रेट, म्हणजे रोमन लोकांचा बादशाह नव्हे. तो फारच प्राचीन काळीं होऊन गेला असून इब्राहीम पैगंबराचा समकालीन होता ह्मणतात. तो खरा मुसलमान–ईश्वराज्ञाधीन–होता याविषयीं तर मतैक्य आहे; पण तो पैगंबर होता, ही गोष्ट वादग्रस्त आहे.

सूर्य अशा कांहीं लोकांवर उगवतो आहे कीं ज्यांच्या(निवारणा) करितां आह्मीं सूर्याच्याअलिकडे कांहींहि आडोसा[1] ठेविला नाहीं. ९०. (आणि वास्तविकहि) असेंच (होतें). आणि 'जुल्-कर्नैन'पाशीं जें काय होतें तें आह्मीं (आपल्या) व्यापक ज्ञानानें[2] जाणून होतों. ९१. नंतर तो (आणखी) एका (प्रवास-)साहि त्याच्या मागें लागला. ९२. येथपर्यंत कीं जेव्हां तो (चालतां-चालतां एका पर्वताच्या खिंडीच्या) दोन उभ्या कड्यांच्या मधोमध पोहोंचला, तेव्हां त्याला असें दिसून आलें कीं त्या दोन्हीं कड्यांच्या अलिकडे एक राष्ट्र (वसत) आहे (व ते लोक इतके रानटी आहेत) कीं बोललेलेंहि ते बहुतकरून समजत नाहींत. ९३. त्या लोकांनीं (आपल्या भाषेंत) अर्ज केला कीं हे 'जुल्कर्नैना'! (या घाटाचे पलिकडे) 'याजूज' व 'माजूज' (यांचें राष्ट्र आहे; व ते लोक आमच्या) देशांत (येऊन) नासाडी माजवितात. ह्मणून (तुझी मर्जी असेल तर) आह्मीं तुला खर्च (गोळा) करून देतों, (व तोहि) या अटीवर कीं तूं आमच्या व त्यांच्या दर्म्यान एक तट (बांधून) टाकावास. ९४. ('जुल्कर्नैन'नें) सांगितलें कीं ज्या(द्रव्यां)त माझ्या पालनकर्त्यानें मला (पूर्ण) सत्ता दिली आहे तेंच उत्तम (व पुरेसें) होय; ह्मणून (वर्गणीची तर जरूरी नाहीं, पण तुह्मांला मदतच करावयाची असेल तर आपल्या हातापायाचें) बळ खर्चून तुह्मीं माझी मदत करा; ह्मणजे मी तुह्मां (लोकां)च्या व त्या(लोकां)च्या दरम्यान एक खंबीर तट घालून देईन. ९५.

---

(१) ह्मणजे ते रानटी लोक होते. घरें बनवून राहावें कसें तें त्यांना माहीत नव्हतें. उन्हापासून निवारण करण्यास त्यांना कांहीं आश्रय नव्हता.

(२) 'जुल्कर्नैन'पाशीं जें कांहीं लष्कर व सूर्याचे तापापासून रक्षण करण्याचीं साधनें वगैरे होतीं त्यांची आह्मांस खडा ना खडा माहीती होती; कारण आमच्या व्यापक ज्ञानाबाहेर कोणतीहि गोष्ट राहूं शकत नाहीं.

(बरें तर कोठून) तुह्मीं मला लोखंडाच्या कांब्या आणून द्या; (सारांश, लोकांनीं कांब्या आणिल्या आणि इतर आवश्यक कामें होत राहिलीं;) येथपर्यंत कीं जेव्हां 'जुल्कर्नैन'नें दोन्हीं कड्यांच्या मधोमध (ची फट पुरून) बरोबर करून टाकली, तेव्हां त्यानें हुकूम दिला कीं (आतां तुह्मीं आपले भाते) फुंका; येथपर्यंत कीं जेव्हां त्यानें त्या तटास (लाल) अंगारा करून टाकिलें, तेव्हां तो ह्मणाला कीं आतां मला वितुळलेलें तांबें आणून द्या, ह्मणजे मी तें या(तटा)वर ओतून टाकीन. ९६. तात्पर्य, (या युक्तीनें अशी उंच व खंबीर तटबंदी तयार होऊन गेली कीं 'याजूज' व 'माजूज' हे) तिच्यावर चढून येऊं शकत नव्हते व तिला भोंकहि पाडूं शकत नव्हते. ९७. ('जुल्कर्नैन'नें ती लोखंडी तटबंदी पाहून) ह्मटलें कीं ही माझ्या पालनकर्त्याची मेहरबानी[1] होय. परंतु जेव्हां माझ्या पालनकर्त्याचा (पुनरुथानाचा) वायदा येऊन ठेपेल, तेव्हां तो या (तटा)स हाणून पाडून चुराचुरा करून टाकील. आणि माझ्या पालनकर्त्याचें वचन सत्य होय. ९८. आणि (हे पैगंबरा!) आह्मीं त्या दिवशीं (अशी स्थिति करून) सोडूं कीं (समुद्राच्या) लाटांप्रमाणें[2] यांच्यांतून कित्येक दुसऱ्या कित्येकांस चेपीत (अंधाधुंध) घुसून येतील; आणि शिंग[3] फुंकलें जाईल. मग आम्हीं सर्व लोकांस (पुनरुत्थानाचे मैदानांत) एकत्र गोळा करूं. ९९.

(१) जुल-कर्नैनच्याठायीं तर परमेश्वराची ही मेहरबानी झाली कीं त्यानें त्यास तट बांधण्याची सुबुद्धि दिली; आणि लोकांवर ही मेहरबानी होती कीं **याजूज** व **माजूज** यांच्या राक्षसी जुलमापासून त्यांची सुटका झाली.

(२) भावार्थ हा आहे कीं या वेळीं जुल-कर्नैनची तटबंदी, आह्मीं इकडचे राहणारे आणि **याजूज** व **माजूज** यांच्यामध्यें आलेली आहे. पुनरुत्थानाच्या जवळजवळ **याजूज** व **माजूज** या तटास हाणून पाडून इकडील राहणाऱ्यांवर तुटून पडतील व सर्वांचा संकर होऊन गोंधळ उडून जाईल.

(३) शिंग ह्मणजे करणा किंवा तुतारी वाजविली जाईल.

आणि त्याच दिवशीं आम्हीं जहन्नम-नरकाग्नी-लाहि नास्तिकांच्या समोर आणून हजर करूं. १००. (हे असे नास्तिक होत कीं) ज्यांचे डोळे माझ्या स्मरणा(म्हणजे कुराणा)कडून (गफलतीच्या) पडद्यांत होते आणि (सत्याकडून त्यांचे कान जड होऊन गेले होते कीं) तें त्यांच्यानें ऐकवत नव्हतें. १०१. तर कां (हे) नास्तिक अशी कल्पना करतात कीं मला सोडून त्यांनीं माझ्या सेवकांस (आपले) पुरस्कर्ते स्वीकारावें? (आणि त्यांची कांहींच विचारणा न व्हावी? असें मुळींच नव्हे.) आम्हीं नास्तिकांच्या पाहुणचारा-साठीं जहन्नम–नरकाग्नि–तयार करून ठेविला आहे. १०२. (हे पैगंबरा! या नास्तिकांस) बजावून दे कीं (ह्मणाल, तर) आह्मीं तुह्मांस असे लोक दाखवूं कीं जे कर्मांच्या मानानें अतिशय तोट्यांत होत. १०३. ज्यांचे इहलोकिक आयुष्यांतील प्रयत्न (सर्व) फसले आणि जे (गैरसमजुतीमुळें) असें समजतात कीं आपण चांगलीं कामें करीत आहों; १०४. हेच लोक होत कीं ज्यांनीं आपल्या पालनकर्त्यांच्या निशाण्यांस व (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्याच्या नजरानजर होण्यास मानण्याचें नाकारिलें; म्हणून यांचीं कर्में अक्रीत होऊन गेलीं. तर पुनरुत्थानाचे दिवशीं आम्हीं यां(च्या सुकर्मां)चें (रतीमात्र) वजनहि (हिशेबांत) काईम राखणार नाहीं. १०५. हा होय यांचा मोबदला ह्मणजे जहन्नम-नरकाग्नि; कांकीं यांनीं नास्तिकपणा केला आणि माझ्या निशाण्यांचा व माझ्या पैगंबरांचा उपहास मांडिला. १०६. अर्थातच ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्या पाहुणचारास्तव (अत्युच्च्य) आनंदलोकाच्या बागा असतील. १०७. ते त्यांत निरंतर राहतील (व

---

(१) अरबी भाषा-सरणीचे दृष्टीनें एक अर्थ हाहि होऊं शकतो कीं पुनरुत्थानाचे दिवशीं आह्मीं या लोकांस कसलेंच महत्व देणार नाहीं.

(२) फिरदोस या शब्दाचाच अपभ्रंश इंग्रजींत पॅराडाईज (Paradise) असा झालेला आहे; आणि त्याचा अर्थ आनंदलोक व सुखलोक असा होतो हा स्वर्गाचाच एक उंच दर्जा होय.

कधींच) तेथून स्थलांतर करूं इच्छिणार नाहींत. १०८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर माझ्या पालनकर्त्याच्या शब्दां(च्या लिहिण्या)साठीं समुद्र(-जल) शाई होईल, तर माझ्या पालनकर्त्याचे शब्द संपणार नाहींत त्याच्या आधींच, समुद्र खुंटून जाईल; व (मग) पाहिजे तर आम्हीं तसाच (समुद्र आणखीहि त्याच्या) मदतीसहि (कां) आणूं (ना). १०९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मी(हि तर) तुह्मांसारखाच एक मनुष्य आहें; (माझ्यांत व तुमच्यांत फक्त एवढाच फरक होय कीं) मला (परमेश्वराकडून) हें प्रकटिलें जातें कीं तुमचा उपास्य (तोच एकटा) एक उपास्य होय. तर जो कोणी आपल्या पालनकर्त्याच्या दर्शनाची आशा बाळगीत असेल, तर त्याला पाहिजे आहे कीं त्यानें सुकृत्य करावें व कोणालाहि आपल्या पालनकर्त्याच्या उपासनेंत सरकतदार बनवूं नये. ११०.

---

(१) शब्द ह्मणजे त्या परमेश्वराचीं स्तोत्रें, त्याचे पराक्रम, त्याची सत्ता व अधिकार आणि त्याचें जगच्चालन व व्यवस्था वगैरे असे अर्थ घ्यावयाचे असतात. परमेश्वर जसा अमर्यादित होय तसेच त्याचे शब्दहि अमर्यादित होत; आणि समुद्र कितीहि झाला तरी मर्यादितच असणार. ह्मणून जें मर्यादित तें अमर्यादिताच्या पासंगासहि पोंचणार नाहीं. शिवाय असेच इतर मर्यादित समुद्र त्याच्या भरीस घातले तरी देखिल ते अमर्यादित होऊं शकणार नाहींत.

(२) दर्शन ह्मणजे परमेश्वराचे गुण व पराक्रम व त्याचें परमात्मत्व यांचा प्रादुर्भाव होणें किंवा साक्षात्कार होणें, असाहि पुष्कळांनीं अर्थ केला आहे. पण दर्शन होईल हें तर खास. तर तें कोणा तऱ्हेनें होईल व कसें होईल या भानगडींत पडण्याचें आह्मांस कारण नाहीं. दर्शनाच्या मुख्य अटी, परमेश्वराचे आज्ञेनुसार ह्मणजे कुराणानुसार सुकृत्यें करणें व परमेश्वरासमागमें कोणालाहि उपास्य न मानणें या होत.

# अध्याय १९ वा.

## सूरतु-मर्यम.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ९८ आयात वा महावाक्यें आहेत. ह्यांत हजरत ईसा मसीह–येशू ख्रिस्त–या पैगंबरांच्या मातोश्री कुमारिकाशिरोमणी मर्यम बाई उर्फ मेरी यांच्या संबंधानें कित्येक गोष्टींचें विवेचन करण्यांत आलें आहे; ह्मणून 'सूरतु–मर्यम' म्हणजे मर्यमचें प्रकरण हें नांव पसंत करण्यांत आलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)

क. ह. य. अ. स. (काफ-हा-या-ऐन-साद). १. (हे पैगंबरा! हा) तुझ्या पालनकर्त्यानें आपला सेवक 'जकरिय्या' याजवर जी (कृपा) केली होती त्या कृपेचा उल्लेख होय; २ कीं जेव्हां त्यानें आपल्या पालनकर्त्याला नम्र स्वरानें हाक मारली; ३. (आणि) प्रार्थिलें कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझीं हाडें शिथिल होऊन गेलीं व डोकें ह्मातारपणा(च्या अग्नि)नें भडकून (पांढरें होऊन) गेलें आहे; आणि हे माझ्या पालनकर्त्या! तुझ्या सेवेंत प्रार्थना करून मी (कधींहि) अभागी झालों नाहीं. ४. आणि मला आपल्या पाठीमागें भावाबंदांची भीति वाटत आहे (कीं माझ्या मागें कोठें सद्धर्मांत ते कांहीं खराबी उत्पन्न करतील), आणि माझी पत्नि वांझ आहे; तर तूं आपल्यातर्फे मला एक औरस (पुत्र) दे: ५. कीं तो माझाहि वारस होईल व 'याकूब'चे वंशाचाहि वारस होईल (ह्मणजे सद्धर्माचें प्रतिपालन

करील). आणि हे माझ्या पालनकर्त्या! तूं त्याला (सर्वमान्य व) आवडता असा कर. ६. (परमेश्वरानें सांगितलें कीं) हे 'ज़क-रिय्या'! आह्मीं तुला एका पुत्रा(च्या जन्मण्या)चें शुभवर्तमान देतों; त्याचें नांव 'यह्या'-'योहान्न'-होईल (व या-)पूर्वी आह्मीं या नांवाचा कोणीहि (मनुष्य निर्माण) केला नाहीं. ७. ('ज़क-रिय्या'नें मानवी स्वभावानुरूप) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझ्या येथें पुत्र कसा होऊं शकतो? आणि वस्तुस्थिति अशी आहे आहे कीं माझी पत्नि तर वांझ आहे व मी वृद्धापकाळाच्या परमावधीस पोहोंचून गेलों आहे. ८. (दूतानें) सांगितलें, असेंच (होईल). तुझा पालनकर्ता सांगतो कीं (या वयांत पुत्ररत्न देणें) हें मला सोपें होय. आणि (याच्या) पूर्वी तुलाच (पाहा,) आह्मीं निर्माण केलें व वास्तविक पाहतां, तूं कांहींच नव्हतास. ९. ('ज़करिय्या'नें) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! (मला पुत्र होईल या गोष्टीची) मला एखादी निशाणी दे. (परमेश्वरानें) सांगितलें कीं तुझी निशाणी ही होय कीं तूं सारख्या तीन रात्रीं (व दिवशीं) लोकांशीं बोलूं शकणार

(१) परमेश्वर कृपेचें हें एक विशेष द्योतक होय कीं त्यानें निसर्ग नियमाविरुद्ध हजरत ज़करिय्याचे म्हातारपणीं त्यांची पत्नि वांझ असतांहि त्यांस पुत्ररत्न दिलें आणि सांगितलें कीं आह्मींच त्याच्यासाठीं एक नवें नांव योजिलें आहे. लोकांस याचीहि खुषी असते कीं आपल्या मुलाचें कांहीं तरी नवें व चांगलें नांव असावें. यह्या या नांवांत दोन्ही गोष्टी आहेत. एक तर हें नांव नवें आहे कीं यापूर्वी कोणा-चेंच नव्हतें व शिवाय यह्या-हाच योहान बाप्तिस्माकार-यांच्या अंगीं जे गुण व योग्यता होती ती यापूर्वी कोणाचेच अंगीं परमेश्वरानें दिली नव्हती; ह्मणूनहि हें नांव नवें होय. दुसरें हें चांगलें आहे यासाठीं कीं यांत एक आशिर्वाद निघतो; कारण याचा अर्थ जिताजागता असा होतो.

(२) आम्हीं 'सविय्या' या शब्दाचा अर्थ सारखा केला आहे. कित्येक भाष्यकारांनीं त्याचा अर्थ भलाचंगा व निरोगी असाहि केला आहे; ह्मणजे त्यांना अर्धांगवायु किंवा पक्षपात वगैरें कांहींच रोग

नाहींस. १०. मग ('जकरिय्या' नेहमींच्याप्रमाणें प्रवचन करण्यासतव) खोलींतून निघून आपल्या लोकांकडे आला; तों त्यानें त्यांस खुणांनीं सुचविलें कीं सकाळसांज तुह्मीं (परमेश्वराची) पवित्रता वर्णण्यांत लागून राहा. ११. (सारांश, 'यह्या'नें जन्म घेतला व आह्मीं त्याला आज्ञा केली कीं) हे 'यह्या'! तूं (तौरातें) पुस्तकाला बळकट धरून राहा. आणि अद्यापि तो बाळकच होता कीं आह्मीं त्याला (पैगंबरीचा) अधिकार दिला. १२. आणि आपल्याकडून कनवाळूपणा व पवित्राचरण हीं (आह्मीं त्यास दिलीं); व (याशिवाय) तो होताहि (परमेश्वराला) भिऊन वागणारा; १३. व आपल्या मातापितरांची सेवा करणारा; आणि तो शिरजोर व आज्ञाभंजक असा नव्हता. १४. आणि तो जन्मला त्या दिवशीं व मरण पावेल त्या दिवशीं व (पुन्हां) जिवंत उठविला जाईल त्या दिवशीं (हरेक स्थितींत) त्याला (परमेश्वराकडून) शांति (व अभय) होय. १५. आणि (हे पैगंबरा!) कुराणांत 'मर्यम'ची गोष्टहि (लोकांस) आठवून दे कीं जेव्हां ती आपल्या लोकांपासून एकिकडे होऊन पूर्वेकडेस एके जागीं जाऊन बसली. १६. आणि तिनें लोकांच्या पलिकडून गोषा करून घेतला;

---

नसतां तीन रात्रंदिवस हजरत जकरिय्या यांचें तोंड बंद राहिले व त्यांच्यानें कांहीं बोलवलें नाहीं. भावार्थ हा कीं तुह्मीं सारखे तीन दिवस लोकांशीं बोलूं नये ह्मणजे उपास पाळावा व परमेश्वराचें ध्यान करावें. त्या वेळच्या धर्मशास्त्रांत उपोषण केलें असतां अन्नपाणी वर्ज्य होतें तसेंच बोलणें चालणेंहि वर्ज्य होतें.

(१) तौरात ह्मणजे जुना करार याप्रमाणेंच तुह्मीं व तुमच्या प्रजेनें आचरण करणें अवश्यक जाणावें. कारण यह्या–योहान्न बाप्तिस्माकार यांस दुसरें पुस्तक नसून त्यांचें आचरण हजरत मूसा पैगंबराच्या पवित्र शास्त्राप्रमाणेंच होतें.

(२) मर्यमचे आईनें यरुशलेमच्या मंदिराच्या सेवेसाठीं मर्यमला जकरिय्या यांचे हवालीं केलें होतें. त्यांनीं यांजला मशीदींत एक जागा नेमून दिली होती तिचाच हा उल्लेख आहे.

तों आम्हीं आपला आत्मा (ह्मणजे 'जिब्रील') यास तिजकडे पाठविलें व तो संपूर्ण मनुष्याचें स्वरूप धारण करून तिजपुढें येऊन उभा राहिला. १७. ती (त्याला पाहून) ह्मणूं लागली कीं जर तूं (परमेश्वराला) भिऊन वागणारा असशील तर मी तुजपासून परम दयाळु (परमेश्वरा)चा आश्रय घेत्यें (कीं तूं माझ्यासमोरून निघून जा). १८. ('जिब्रीला'नें) ह्मटलें कीं मी तर केवळ तुझ्या पालनकर्त्याचा पाठविलेला (दूत) आहें (व) यासाठीं (आलों आहें) कीं मी तुला एक पवित्र पुत्र अर्पण करावा. १९. ती ह्मणाली, कीं मला पुत्र होणार तरी कसा? आणि वास्तविक पाहतां, (लग्नसंबंधाच्या नात्यानें) मला कोणाहि पुरुषानें स्पर्श केला नाहीं व मी (कधींच) जारकर्मीहि नव्हत्यें. २०. ('जिब्रील'नें) सांगितलें कीं (जसें मी म्हणतों) असेंच (होईल.) तुझा पालनकर्ता सांगतो कीं (तुझ्या घरीं बापावाचून पुत्र जन्म-विणें) हें मला सोपें होय. आणि (ह्याच्या निर्मिण्यांत) उद्देश हा होय कीं लोकांसाठीं आह्मीं त्याला (आपल्या परम सामर्थ्याची) एक निशाणी व (इहलोकीं आह्मीं त्याला) आपली दया ठरवावी. आणि ही गोष्ट (आमच्या येथून) फैसल होऊन चुकली आहे. २१. यावर 'मर्यम'ला (आपोआप पुत्राचा) गर्भ राहिला व ती तो (गर्भ) घेऊन कोठें अलग दूरचे जागीं जाऊन बसली. २२. नंतर प्रसव-वेदना तिला एका खजुरीच्या झाडाच्या बुडाशीं घेऊन गेल्या; (आणि बाळंत होते वेळीं तिला तीव्र यातना झाल्या तेव्हां तिनें)

---

(१) ह्मणजे तूं परमेश्वराला भिणारा धार्मिक मनुष्य असशील तर परमेश्वराचें नांव ऐकून तूं मजसमोरून दूर होशील; आणि जर तूं अधर्मी असशील तर तुजकडून मला परमेश्वर वांचवील ह्मणूनच मी परमेश्वराचा आश्रय धरून आहें.

(२) ह्मणजे आह्मीं ईसा-येशू-ला पैगंबर बनवूं व तो लोकांस सदाचरण शिकवील व त्या सदाचरणाचें बक्षीस ह्मणून आह्मीं लोकांवर दया करूं.

हे उद्गार[1] काढले कीं अरेरे! मी याच्या पूर्वींच मरून गेलें असत्यें (व भूतळावरून नाबूद होऊन केव्हांचीच) भुललें विसरलें गेलें असत्यें तर बरें होतें! २३. मग 'जिब्रील'नें 'मर्यम'चे खालून (ईश्वर प्रतापानें जो झरा वाहून निघाला होता तेथून) तिला हाक मारून सांगितलें कीं तूं खेद करूं नकोस, (हा पाहा!) तुझ्या पालनकर्त्यानें तुझ्या खालीं एक झरा (वाहूं) लावला आहे. २४. आणि तूं खजुरीच्या बुडक्याला धरून आपल्याकडेस हालीव; ह्मणजे तुजवर पक्के पक्के ताजे खजुर झडून पडतील. २५. मग तूं (खुशाल खजूर) खा व (झऱ्याचें पाणी) पी; आणि (पुत्राला पाहून आपले) डोळे गार कर. (आणि तूं आपला पुत्र घेऊन चल;) मग (वाटेंत) तुला कोणी मनुष्य दृष्टीस पडेल (व तो तुला विचारील) तर (तूं खुणांनीं) सांगून दे कीं मीं परम दयाळू(परमेश्वरा)प्रीत्यर्थ उपासाचें व्रत[2] घेतलें आहे; ह्मणून मी आज कोणाहि मनुष्याशीं संभाषण करूं शकणार नाहीं. २६. मग 'मर्यम' मुलाला (ओटींत) उचलून घेऊन आपल्या लोकांपाशीं आली. ते (हें पाहून) म्हणूं लागले कीं गे'मर्यम'! हें तर तूं फारच गैरलायक काम केलेंस. २७. हे 'हारून'च्या[3] बहिणी! तुझा बापहि वाईट माणूस नव्हता व

---

(१) कुमारिका मर्यम बाईच्या तोंडून हे उद्गार प्रसववेदनेच्या तीव्र यातनेमुळें अगर बदलौकिकाच्या धास्तानें निघाले असावेत.

(२) तत्कालीन धर्मशास्त्रांत उपास पाळणारास बोलणें निषिद्ध होतें. ह्मणूनच मर्यमला हें निमित्त शिकविलें होतें. जकरिय्याचे वृत्तांतांत वर आह्मीं जी टीप दिली आहे तिचेंहि हेंच मूळ होय.

(३) सहीह-मुस्लिम नामक हदीसच्या पुस्तकांत असें एक कथन आहे कीं मुगैरा बिन शाअबा या 'सहाबी' ह्मणजे पैगंबरकालीन मुसलमानास, पैगंबर साहेबांनीं नजरानच्या खिस्त्यांकडे पाठविलें होतें. ते लोक कुराण तर ऐकत राहतच होते. त्यांनीं मुगैराजवळ हा आक्षेप काढला कीं तुमच्या कुराणांत मर्यम कुमारीला हारूनची बहीण लिहिली आहे; पण खरोखरीं हारून हे मूसाचे भाऊ होते. आणि ईसापूर्वी

तुझी आईहि बदफैल नव्हती. (तर कुलसंप्रदायाविरुद्ध तूं हें काय करून बसलीस?) २८. तेव्हां 'मर्यम'नें त्या(तान्ह्या मुला) कडे बोट दाखविलें (कीं जें काय पुसावयाचें असेल तें याला पुसून घ्या). ते ह्मणूं लागले कीं पाळण्यांत जें बाळक होय त्याच्याशीं आम्हीं कसें बोलावें? २९. (यावर मुलाला) वाचा फुटली कीं मीं परमेश्वराचा सेवक आहें; त्यानें मला ('इंजील') पुस्तक दिलें आहे व मला पैगंबर-प्रवक्ता नेमिला आहे. ३०. आणि मीं जेथें कोठेंहि असेन तेथें त्यानें मला आशिर्वादित केलें आहे; आणि मी जिवंत राहीन तोंपर्यंत त्यानें मला नमाज(पढण्या)ची व जकात(देण्या)ची आज्ञा केली आहे. ३१. आणि (तसाच त्यानें) मला आपल्या आईचा सेवाधर्मतत्पर (बनविला) व मला शिरजोर व हतभागी बनविलें नाहीं. ३२. आणि मीं जन्मलों त्या दिवशीं व मरण पावेन त्या दिवशीं व (पुन्हां) जिवंत उठविलों जाईन त्या दिवशीं (दरेक स्थितींत) मला (परमेश्वराकडून) शांति (व अभय) होय. ३३. (हे पैगं-बरा!) हा होय 'मर्यम'चा पुत्र 'ईसा'(चा अहवाल); सत्य सत्य

---

त्यांस शेंकडों वर्षें होऊन गेलीं. तर मर्यम त्यांची बहीण कशी होऊं शकते? मुगैरानें हा आक्षेप हजरत पैगंबर साहेबांस येऊन सांगितला. तेव्हां पैगंबर साहेब ह्मणाले कीं हा हारून मूसाचा भाऊ तो नव्हे. किंबहुना लोक शुभ जाणून अभिष्टचिंतनार्थ पैगंबर, सत्पुरुष वगैरे वडिल लोकांचीं नांवें धारण करून नामविधान करीत असत. तर हे हारून, मूसाच्या भावाशिवाय दुसरेच होते. येथें ज्या हारूनाचा नामनिर्देश आहे ते इतके चांगले महा पुरुष होते कीं ते तर तेच; पण त्यांच्या घराण्यांतहि कोणी असें नालायक काम करूं शकत नव्हता, तर या लोकांचा उद्देश हा होता कीं तूं अशा पवित्र घराण्याची मुलगी आहेस कीं तुला हारून संताची बहीण ह्मटली पाहिजे; मग तूं हें नालायकीचें काम कसें केलेंस? याशिवाय आणखीहि याचीं उत्तरें आहेत. पाहा कुराण पृष्ठ १२८, टीप नं० १.

गोष्ट कीं जिच्याविषयीं लोक शंका धरतात. ३४. परमेश्वराला हें शोभत नाहीं कीं तो (कोणाला) पुत्र पत्करील. तो परम पवित्र होय. तो जेव्हां कोणाहि कामाचा संकल्प करितो तेव्हां तो त्याला केवळ एवढेंच फर्मावितो कीं हो, व तें होऊन जातें. ३५. आणि कांहीं शंका नाहीं कीं परमेश्वर माझाहि पालनकर्ता होय व तुमचाहि पालनकर्ता होय. तर (लोकांनों!) त्याचीच उपासना करा; हाच सरळ मार्ग होय. (हाच धर्म 'ईसा'-येशूनें आणिला होता). ३६. मग (यहुदी व खिस्ती यांचे) पंथ आपसांत मतभेद करूं लागले. तथापि, जे लोक, (पुनरुत्थानाच्या) मोठ्या (सक्त) दिवशीं (परमेश्वराच्या हुजूर) हजीर होणें आहे, ही गोष्ट नाकबूल करतात, त्यांच्यासाठीं फार दुःखाची गोष्ट होय. ३७. ज्या दिवशीं हे लोक आमच्या समक्ष हजर होतील त्या दिवशीं ते कसे कांहीं ऐकते व पाहते होतील! परंतु आजकाळीं तर हे अन्यायी लोक (आंधळे व बहिरे बनून) स्पष्ट भ्रमांत (पडले) आहेत. ३८. आणि (हे पैगंबरा!) या लोकांस (तो क्लेश व) खेदाचा दिवस कीं जेव्हां (शेवटचा) हुकूम सोडला जाईल त्या दिवसाचें भय दाखीव. आणि (या वेळीं तर) हे लोक फसगतींत होत व ते विश्वास धरीत नाहींत. ३९. (अखेर) आम्हींच पृथ्वीचे व जे लोक तिच्यावर होत त्यांचेहि वारस होऊं, व (सर्वच) आह्मांकडे परतून आणिले जातील. ४०. आणि (हे पैगंबरा!) कुराणांत तूं (लोकांशीं) 'इब्राहिमा'चा उल्लेखहि कर; कीं तो फारच सात्विक (सेवक व) पैगंबर होता. ४१. एके समयीं त्यानें आपल्या बापास ह्मटलें कीं हे पित्या! तूं कां ह्मणून अशा (मूर्तीं)ची पूजाअर्चा करतोस कीं ज्या (कांहीं) ऐकत नाहींत व (कांहीं) पाहत नाहींत व तुझ्या कांहीं कामाहि येऊं शकत

(१) या शंका किंवा झगडे खिस्ती व यहुदी लोकांच्या शंका व झगडे होत. खिस्ती हजरत ईसा-येशूला परमेश्वर व परमेश्वराचा पुत्र ह्मणतात आणि यहुदी मर्यम कुमारी (परमेश्वर तिला शांति देवो!) हिजवर खोटें खोटें कुभांड रचीत होते व तिला व्यर्थ दोष देत होते.

नाहींत. ४२. हे माझ्या पित्या! मला (परमेश्वराकडून) अशा गोष्टींचें ज्ञान (प्राप्त) झालें आहे कीं जें तुला (प्राप्त) झालें नाहीं. तर तूं माझें अनुकरण कर; ह्मणजे मी तुला (धर्माचा) सरळ मार्ग दाखवून देईन. ४३. हे माझ्या पित्या! 'सैताना'(च्या कह्यांत येऊन मूर्तीं)ची उपासना करूं नकोस. कारण, सैतान हा परम दयाळू(परमेश्वरा)प्रति बंडखोर होय. ४४. हे माझ्या पित्या! मला या गोष्टीची भीति वाटते कीं (कोठें असें न व्हावें कीं) परम दयाळू(परमेश्वरा)कडून तुला एखादी शिक्षा येऊन लागावी व तूं (अखेर नरकाग्नींत) सैतानाचा स्नेही होऊन राहावास. ४५. ('इब्राहिमा'चा बाप) ह्मणाला कीं हे 'इब्राहिमा'! कां तूं माझ्या उपास्य(देवतां)कडून फिरलेला आहेस? जर तूं (अशा गोष्टी पासून) पराङ्मुख न होशील, तर अवश्य मी तुला धोंडमार करून टाकीन; आणि (तूं जर आपलें बरें इच्छित असशील तर) बराच काळ तूं मजसमोरून दूर हो. ४६. ('इब्राहिमा'नें) सांगि-तलें (बरें तर, माझा) तुला सलाम आहे; (यावरहि) मी आपल्या पालनकर्त्यापाशीं तुझ्या क्षमेस्तव प्रार्थना करीन. कारण, तो मजवर अतोनात मेहरबान होय. ४७. आणि मी तुमचा (ह्मणजे मूर्तीपूजकांचा) व परमेश्वराला सोडून ज्या(मूर्तीं)चा तुह्मीं (प्रसंग विशेषीं) धांवा करितां त्या(तुमच्या मूर्तीं)चा त्याग करितों आहे; आणि मी आपल्या पालनकर्त्याचाच (प्रसंग पडल्यास) धांवा करीन. आशा आहे कीं मी आपल्या पालनकर्त्याची प्रार्थना करण्यांत हतभागी राहणार नाहीं. ४८. तर जेव्हां 'इब्राहिमा'नें त्या(मूर्तीपूजकां)पासून व परमेश्वराला सोडून ज्या(मूर्तीं)ची ते उपासना करीत होते त्या(मूर्तीं)पासून अंग काढून घेतलें, तेव्हां आह्मीं त्याला (पुत्र) 'इस्हाक' व (प्रपौत्र) 'याकूब' हे दिले; आणि प्रत्येकास आम्हीं पैगंबरहि बनविले. ४९. आणि [1]आह्मीं आपल्या दयेंतून त्यांस (मोठा वांटा) दिला व त्यांची कीर्ति

---

(१) याचा मूळचा शब्दशः अर्थ, 'आह्मीं त्यांच्यासाठीं सत्याची जिव्हा उंच केली' असा होतो.

(दिगंतरीं) दुमदुमूं लाविली. ५०. आणि (हे पैगंबरा!) कुराणांत तूं (लोकांशीं) 'मूसा'चा उल्लेखहि कर; कीं तो(हि आमचा) निःसीम (निवडक) सेवक होता व पैगंबर[1] (व) प्रवक्ता होता. ५१. आणि आह्मीं त्याला 'तूर'[2](पर्वता)च्या उजव्या बाजूनें हाक मारली व कानांत गुप्त गोष्ट सांगण्यास (जसें जवळ बोलावितात तसेंच) आह्मीं त्याला (आपल्या) जवळ बोलाविलें. ५२. आणि आह्मीं आपल्या मेहरबानीनें त्याचा भाऊ 'हारून' यास पैगंबर करून त्याला (एक मदतनीस) दिला. ५३. आणि (हे पैगंबरा!) कुराणांत तूं (लोकांशीं) 'इस्माईल'चा उल्लेखहि कर; कीं तो वचनाचा खरा होता व (आमचा) पाठविलेला पैगंबर होता. ५४. आणि तो आपल्या कुटुंबास नमाज व जकात यांची ताकीद करीत होता व आपल्या पालनकर्त्यासमीप मान्यता पावलेला होता. ५५. आणि कुराणांत तूं (लोकांशीं) 'इद्रीस'[3]चा उल्लेखहि

---

(१) 'रसूल' व 'नबी' हे शब्द एकाच अर्थाचे होत असे बोलले जातात. परंतु दोन्ही शब्द एके जागीं आले असतां त्यांत भेद राखणें अवश्यक आहे त्याप्रमाणें आह्मीं भाषांतर केलें आहे. पण कित्येक ह्मणतात कीं रसूल–पैगंबर--जो असतो त्याला धर्मशास्त्रलेख ह्मणजे पुस्तक दिलेलें असतें; व कित्येक ह्मणतात कीं नबी–प्रवक्ता–यालाहि पुस्तक दिलें जातें. तथापि पहिल्या विधानावर बहुतेकांची एकवाक्यता आहे.

(२) तूर पर्वत यालाच 'तूरे सीनीन' ह्मणजे सिनाई पर्वत ह्मणतात.

(३) हें भाषांतर, जे लोक मानितात कीं इद्रीस जित्या जिवीं स्वर्गांत गेले व अद्यापि स्वर्गांतच जिवंत आहेत त्यांच्या मतानुसार आहे. तथापि, 'आह्मीं त्याला उच्च पदास चढविलें,' कां कीं ते पैगंबर होते; हें भाषांतर सरळ असून त्यांत कांहीं भानगड नाहीं. भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं त्यांना तीस शास्त्रलेख सादर झाले होते व लिहिण्याची पद्धति प्रथम त्यांनींच चालू केली. ज्योतिष व गणितशास्त्र यांचेंहि श्रेय त्यांना दिलें जातें आणि कापड शिवणेंहि प्रथम

कर; कीं तोहि फारच सत्यशील (भक्त व) पैगंबर होता. ५६. आणि आह्मीं त्याला (पृथ्वींतून) उचलून अत्युच्च स्थानीं(-स्वर्गात.) नेलें. ५७. परमेश्वरानें पैगंबरांपैकीं ज्या लोकांवर कृपा केली ते हे लोक होत; ते 'आदम'चे वंश होत; आणि ज्या लोकांस आम्हीं (महाजलप्रलयाचे वेळीं गलबतांत) 'नूहा'बरोबर स्वार केलें होतें त्या लोकांचे वंश होत; आणि ते 'इब्राहीम' व 'याकूब' यांचे वंश आणि ज्यांना आम्हीं सन्मार्ग दाखविला व निवडून घेतलें त्या लोकांचे वंश होत. जेव्हां (जेव्हां) परम दयाळू (परमेश्वरा)चीं महा वाक्यें त्यांना वाचून ऐकविलीं जात होतीं, तेव्हां (तेव्हां) ते साष्टांग नमस्कार घालीत (पालथे) पडत होते व रडत जात होते. ५८. मग यांचे मागून अशी (निखट्टू) पिढी (उदयास) आली कीं ज्यांनीं (हयगयीनें) नेमाज गमविली व कामवासनेच्या नादीं लागले. ; तर ते लवकरच आपल्या बहकण्या(च्या दुष्परिणामा)ला पाहून घेतील. ५९. परंतु ज्यानें पश्चात्ताप केला व विश्वास धरिला आणि सुकृत्य केलें, तर असले लोक स्वर्गात दाखल होतील व त्यांचा किंचितहि हक मारला जाणार नाहीं. ६०. (आणि स्वर्ग ह्मणजे काय? त्या) कायमच्या राहण्याच्या बागा (होत) कीं ज्यांचें अभिवचन परम दयाळू(परमेश्वरा)नें आपल्या सेवकांस परभारेंच देऊन

---

त्यांनाच सुचलें. हे नूह पैगंबरांचे पितामह होते. यांचें मूळचें नांव उखनुख–Enoch– हें होय. "दूर्स". ह्मणजे शिकविणें या अरबी शब्दावरून त्यांचें इद्रीस–फार शिकविणारा–असें नांव पडलें. नूहची वंशावळी यांजप्रत खालीं दिल्याप्रमाणें पोहोंचते. ती अशी कीं:–नूह हा लमकचा पुत्र, लमक हा मुतवश्लखचा पुत्र व तो उखनुखचा.

(१) भावार्थ हा कीं जी गुणस्तुति प्रत्येकाच्या उल्लेखांत वेगवेगळाली आली आहे, त्याव्यतिरिक्त या पैगंबरांना पैगंबरांच्या पोटीं जन्मण्याचेंहि श्रेय होतें. याशिवाय मोठें श्रेय हें होतें कीं हे लोक खुद्द इस्लाम–सद्धर्मावर होते व परमेश्वराचे निवडक सेवक होते.

(२) ह्मणजे परमेश्वराच्या सेवकांनीं जरी स्वर्गाच्या बागा पाहिल्या नाहींत तरी परमेश्वराचें वचन पूर्ण होईलच होईल याची त्यांना खात्री

ठेविलें आहे; निःसंशय त्याचें अभिवचन खचित (घडून) येईलच येईल. ६१. स्वर्गांत कोणतीहि निरर्थक गोष्ट त्यांच्या कानांत पडणार नाहीं; पण शांतिच शांति(चा घोष चहूंकडून ऐकूं येईल). आणि तेथें त्यांचें भोजन सकाळे[1] सांज (जेव्हां इच्छितील तेव्हां) त्यांना (प्राप्त) होईल. ६२. हाच तो स्वर्ग होय कीं आमच्या सेवकांतून जो कोणी (आम्हांस) भिऊन वागणारा असेल त्याला आम्हीं त्याचा वारसें[2] बनवूं. ६३. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं (दूत), तुझ्या पालनकर्त्याच्या हुकमावांचून (जगांत) खालीं येऊं शकत नाहीं. जें कांहीं आम्हांपुढें (व्हावयाचें) आहे व जें कांहीं आमच्या मागें (होऊन गेलें) आहे आणि जें कांहीं या दोहोंच्या दर्म्यान आहे तें सर्व त्याच्या(च आज्ञे)नें होय. आणि तुझा पालनकर्ता (कोणत्याच गोष्टींत) विसराळू[3] नाहीं. ६४. (तोच)

---

आहे. तर हें वचन परभारां ह्मणजे पाहिल्या किंवा दाखविल्यावांचून दिलेलें असें झालें.

(१) येथें सकाळसांज हे दोनच वेळ बहुधा भोजनाचे असतात ह्मणून सकाळसांज ह्मटलें. नाहींपेक्षां त्याचा अर्थ दरेक वस्तूची रेलचेल असा होतो. कारण स्वर्गाचें खाणेंपिणें येथिल भोजनासारखें नाहींच; पण तें एक प्रकारचें इच्छा भोजन होय, असें ह्मणतां येईल.

(२) परमेश्वरानें आदमला निर्माण करून त्याला रहावयास स्वर्ग दिला होता या नात्यानें स्वर्गीय लोकांस स्वर्गाचे वारस म्हटलें आहे.

(३) वह्य ह्मणजे प्रकटीकरण येण्यांत उशिर होई तेव्हां पैगंबर साहेब मनांत संकुचित होत असत. एकदां पैगंबरानें जिब्रीलापाशीं गाऱ्हाणें केलें; तेव्हां प्रकटीकरण आणणाराकडून परमेश्वरानें हें उत्तर दिलें कीं आह्मीं ईश्वराज्ञेवांचून 'वह्य' आणूं शकत नाहीं व खालीं येऊं शकत नाहीं. परमेश्वरास सर्व कांहीं ज्ञात आहे त्याला कशाचेंच विस्मरण पडत नाहीं. कीं तो तुह्मांकडे प्रकटीकरण पाठविण्यास विसरला असावा. तर सेवकांच्या हिताहिताच्या दृष्टीनें जेव्हां योग्य वाटतें तेव्हां तो आपला आदेश प्रकट करितो.

आकाश व पृथ्वीचा आणि जें काय या दोहोंच्या दर्म्यान आहे त्याचा पालनकर्ता होय. म्हणून तूं त्याचीच उपासना करीत अस; व त्याच्या उपासनें(-त जें कांहीं विघ्न येईल त्या)स सहन कर. बरें, त्याशीं समान-नांवाचा (असाहि आणखी कोणी) तुझ्या जाणिवांत आहे? ६५. आणि (जो) माणूस (पुनरुत्थानास नाकारितो, तो आश्चर्यचकित होऊन) पुसत असतो कीं, कां (खरोखरींच) जेव्हां मीं मरून जाईन तेव्हां अवश्य (पुन्हां) जिवंत करून (जमिनींतून) मीं काढलों जाईन? ६६. आणि कां (या) माणसाला (हें) स्मरत नाहीं कीं आम्हीं त्याला पूर्वीं निर्माण केलें होतें; व (त्या वेळीं) वास्तविक तो कांहींच नव्हता? ६७. तर (हे पैगंबरा!) तुझ्याच पालनकर्त्याची (ह्मणजे आम्हांला आपलीच) शपथ आहे कीं आम्हीं (सर्व) मनुष्यांस व (त्यांच्या सोबत) सैतानांसहि (आपल्या हुजूर) गोळा करूं; नंतर आम्हीं या (सर्वां)स 'जहन्नम'—नरकाग्नी—च्याभोंवतीं आणून हजर करूं; (आणि हे भयाकुल होऊन) गुडघे टेकून बसलेले (असतील.) ६८. नंतर प्रत्येक समाजांतून आम्हीं त्यांजपैकीं जे कोणी परम दयाळू (परमेश्वरा) कडून फारच अकडून अकडून फिरत होते त्या लोकांस वेगळे (काढून उभे) करूं. ६९. तर जे लोक नरकाग्नींत जळावयास फारच योग्य होत, त्यांना अर्थात आम्हीं खूप जाणतों. ७०. आणि (हे मानवलोकहो!) तुमच्यांत कोणीहि (असा मनुष्य) नव्हे कीं जो नरकाग्निच्याजवळून न जाईल. (ह्या वचनाचें परिपालन) तुझ्या पालनकर्त्याप्रत आवश्यक (व) निश्चित असें होय. ७१. नंतर आह्मीं जे

(१) ह्मणजे परमेश्वराच्या नांवाची व गुण व विशेषणांची ज्याच्या अंगीं पात्रता आहे असाहि कोणी तुमच्या जाणिवांत आहे काय? ह्मणजे सर्वेश्वर, सर्व शक्तिमान्, निराकार, अजन्म, अनंत, अनादि, अनुपम, सर्वधारी, सर्वव्यापक, अजर, अमर, परम पवित्र, सृष्टिकर्ता व पालनकर्ता, मनोविकाररहित आणि कामहीन या सर्व गुणांनीं संपन्न असा कोणीच परमेश्वराशिवाय मिळणें शक्य नाहीं. ह्मणून त्याशीं समान नांवाचाहि कोणाला ह्मणतां येत नाहीं व होणेंहि अशक्य आहे.

लोक (आम्हांस) भिऊन चालतात त्यांस बचावून घेऊं; आणि आज्ञाभंजकांस त्यांतच गुडघ्यांवाटे (घसरत) सोडून देऊं. ७२. आणि जेव्हां आमचे हुकूम लोकांस खुले खुले वाचून ऐकविले जातात, तेव्हां नास्तिक (चेष्टेपरीं) मुसलमानांस विचारूं लागतात कीं (बरें तर, हे सांगा कीं आम्हां व तुह्मां) उभय पक्षांपैकीं राहणी कोणाची उत्तम व सभा (कोणाच्या) अति उत्कृष्ट होत? ७३. आणि वास्तविक पाहूं गेलें असतां, आम्हीं यांच्या पूर्वी बहुतेक पिढ्यांचा नाश करून चुकलों आहों कीं ते मालमत्तेंत व (बाह्य) देखाव्यांत (यांच्याहूनहि) फारच उत्तम होते. ७४. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जो कोणी चुकीच्या मार्गांत आहे, परम दयाळू (परमेश्वर) त्याला ढीलच ढील देत जातो; येथपर्यंत कीं त्यांना ज्या(गोष्टी) कडून भिवविलें जातें त्या जेव्हां ते (आपल्या डोळ्यांनीं) पाहून घेतील, ह्मणजे शिक्षा वा (पुनरुत्थानाची) घटका; तेव्हां यांना माहीत होऊन जाईल कीं आतां कोणाचें ठिकाण वाईट व (कोणाचा) समूह अधिक निर्बल होय? ७५. आणि जे लोक सन्मार्गावर होत, परमेश्वर त्यांना (दिवसेंदिवस) अधिकाधिक सन्मार्गाची बुद्धि देत जातो. आणि (हे पैगंबरा!) चिरस्थायी

---

(१) भावार्थ असा कीं जर नरकवासी लोक दुःख व यातना सहन न होऊन पळून जाऊं इच्छितील तर त्यांच्यानें पळूनहि जाववणार नाहीं.

(२) सुकृत्यें अनेक प्रकारचीं होत. त्यांपैकींच भुकेलेल्यास अन्न देणें व नागव्यास वस्त्रप्रावरण देणें हेंहि होय. पण यांचें चिरस्थायी ह्मणजे नित्य राहणारें असें फळ नव्हे. चिरस्थायी अशीं सुकृत्यें ह्मटलीं ह्मणजे पुल, मशीद-प्रार्थनालय, विहीर, धर्मशाळा, प्राथमिकशाळा व विद्यापीठ वगैरे बांधणें आणि परमार्थसाधनाचीं पुस्तकें वगैरे लिहून मनुष्यजातीची ज्ञानवृद्धि करणें हीं होत. आतां भावी परिणामाचा अर्थ कार्य आचरणाऱ्याचा परिणाम घ्याल, तरीहि होऊं शकतो; अगर खुद्द कार्याचा परिणाम घ्याल तरी त्याचा अर्थ, लोकांस जो फायदा उशिरापर्यंत पोहोंचत राहील तो असा होईल.

अशीं सुकृत्यें तुझ्या पालनकर्त्यासमीप पुण्यफलाच्या दृष्टीनेंहि उत्तम व (भावी) परिणामाचे मानानेंहि उत्तम होत. ७६. (हे पैगंबरा!) बरें त्या मनुष्या(च्या स्थिती)चेंहि तूं अवलोकन केलेंस कीं ज्यानें आमच्या निशाण्यास नाकारिलें व म्हणूं लागला कीं (पुनरुत्थान होईल तर तेथेंहि) मला अवश्य द्रव्य व संतति हींहि दिलीं जातील. ७७. कां त्याला अदृष्टाची बातमी लागली आहे; किंवा त्यानें परमदयाळू (परमेश्वरा)पाशीं एकादें वचन घेऊन ठेविलें आहे? ७८. (असें) मुळींच नव्हे. तो जें (जें कांहीं) बोलतो तें (सर्व) आम्हीं नोंदून घेतों; आणि आम्हीं त्याची शिक्षा वाढवीतच चालले जाऊं. ७९. आणि तो हें जें (द्रव्य व संततीविषयीं) बोलतो (अखेर) आम्हींच त्यांचे वारस होऊं व तो एकलाच आमच्या हुजुरांत हजर होईल. ८०. आणि मूर्तीपूजकांनीं परमेश्वराला सोडून (इतर) उपास्य (देव या उमेदीनें) स्थापित केले आहेत कीं

(१) हजरत खब्बाव–हे सहावी म्हणजे पैगंबरकालीन मुसलमान–लोहार होते. आस बिन वायल नांवाच्या नास्तिकानें त्यांच्यापाशीं तरवार बनविली व तिची किंमत दिली नाहीं. तेव्हां खब्बाबनें किंमत मागितली. आस बीन वायलनें म्हटलें कीं तूं जोंपर्यंत इस्लामधर्माकडून फिरणार नाहींस तोंपर्यंत मी तुला एक फुटकी कवडीहि देणार नाहीं. खब्बाबनें सांगितलें कीं माझ्यानें तर अशी नालायकी व्हावयाची नाहीं; आणि तूं मरूनहि उठशील तरींहि मी नास्तिकपणा करणार नाहीं. आस म्हणाला कीं मी मरून जिवंत होईन तर तुम्हां मुसलमानांच्या मताप्रमाणें तेथेंहि द्रव्य व संतति सर्व कांहीं मिळेल; त्यावेळीं मी तुझे दाम देऊन टाकीन. तर आसचे उत्तरा दाखल हें वाक्य प्रकट झालें कीं तूं मुसलमानांस हिणविण्यासाठीं त्यांचें मत म्हणून जें सांगितलेंस तें तसें मुळींच नाहीं; तर मरण येतांच सर्व द्रव्य व संतति जेथल्या तेथेंच जगांत राहील व अखेर त्याचा सर्वस्वी हक्क परमेश्वरालाच होईल; व मनुष्य जसा जगांत एकलाच व उघडानागडा आला होता तसाच परमेश्वरापुढें जाईल. तर पुनरुत्थानांत मनुष्याची कशावरच सत्ता राहणार नाहीं.

(पुनरुत्थानांत) ते त्यांचें पाठबळ (व मदतगार) होतील, ८१. (असें) मुळींच नव्हे. हे देव (ज्यांची हे उमेद बाळगून आहेत ते,) त्यांच्या उपासनेस नाकबूल जातील व (उलट) त्यांचे शत्रु होऊन जातील. ८२. (हे पैगंबरा!) कां तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं आम्हीं सैतानांस नास्तिकांच्यामागें सोडून ठेविलें आहे कीं ते त्यांना फूस देऊन भडकवीत राहतात. ८३. तर (हे पैगंबरा!) तूं या(नास्तिकां)वर (शिक्षा उतरण्याची) घाई करूं नकोस. आम्हीं त्यांच्यासाठीं (पुनरुत्थान येण्याचे) फक्त काय ते (दिवस) मोजीत आहों; ८४. कीं त्या दिवशीं आम्हीं पापभिरु(लोकां)स परम दयाळू (परमेश्वरा)च्या (म्हणजे आपल्या) हुजुरांत पाहुण्यापरी एकत्र गोळा करूं. ८५. आणि गुन्हेगारांना आम्हीं तान्हेले (उंटास पाण्यावर नेतात त्याप्रमाणें) जहन्नम-नरकाग्नी-कडे हाकून लावूं. ८६. (तेथें लोक कोणाचीहि) शिफारस(करण्या)ची सत्ता बाळगणार नाहींत; पण ज्यानें परम दयाळू (परमेश्वरा)पाशीं वचन[1] घेतलें आहे (तें वचन मात्र त्याला फलीभूत होईल.) ८७. आणि (कित्येक लोक) म्हणतात कीं परम दयाळू (परमेश्वर) पुत्र बाळगितो. ८८. (हे पैगंबरा! या लोकांस सांग कीं ही) तुम्हीं मोठीच गैर (म्हणजे ईश्वरनिंदास्पद) गोष्ट (घडून) आणिली आहे; ८९. कीं तिच्यामुळें (नवल नव्हे कीं) आकाश फाटून पडतील व जमीन दुभागून जाईल आणि पर्वत तुकडे तुकडे होऊन कोसळतील. ९०. (यासाठीं) कीं लोकांनीं परम दयाळू(परमेश्वरा)स पुत्र आहे असा आरोप केला. ९१. आणि खरें पाहतां, परम दयाळू (परमेश्वरा)ला हें शोभतच नाहीं कीं तो (कोणाला आपला) पुत्र करून घेईल. ९२. जेवढे म्हणून

---

(१) परमेश्वरापाशीं वचन घेण्याचा अर्थ हा आहे कीं जो कोणी इस्लाम म्हणजे परमेश्वराच्या आज्ञापालनाची दीक्षा घेऊन त्यावर विश्वास राखून सदाचरण पत्करील अशा मनुष्यास परमेश्वराचें वचन आहे कीं मी त्याला तारीन. तर याप्रमाणें वागल्यानें हें वचन त्याला फलीभूत होईल म्हणजे हें वचनच त्याची मध्यस्थी व रदबदली करील.

लोक आकाश व पृथ्वींत होत ते अवघे तर (पुनरुत्थानाचे दिवशीं) परम दयाळू(परमेश्वरा)पुढें (त्याचे) सेवक होऊन हजर होतील. ९३. परमेश्वरानें यांना (आपल्या सामर्थ्यानें) घेरून ठेविलें आहे आणि त्यानें या (सर्वां)स मोजूनहि ठेविलें आहे. ९४. आणि हे सर्व पुनरुत्थानाचे दिवशीं एकले (एकलेच) त्याच्या हुजुरांत हजर होतील. ९५. निःसंशय, ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, परम दयाळू (परमेश्वर) त्यांची प्रीति[१] लवकरच (लोकांच्या मनांत) उद्भवील. ९६. तर (हे पैगंबरा!) आह्मीं या (कुराणा)स तुझ्या (अरबी) भाषेंत यासाठीं सुलभ केलें आहे कीं तूं याच्यायोगें (परमेश्वराला) भिऊन वागणारे अशा (समस्त लोकां)स शुभवर्तमान ऐकवावेंस आणि (तसेंच) याच्यायोगें (मुख्यत्वें करून अरबच्या) भांडखोर[२] लोकांस (ईश्वरी शिक्षेचें) भय सुचवावेंस. ९७. आणि यांच्यापूर्वी आम्हीं कित्येक जनसमूहांचा संहार करून टाकला आहे. बरें तर, आतां तूं त्यांच्यापैकीं कोणालाच (कोठेंहि) पाहतोस अगर त्यांची कुजबुजहि ऐकतोस काय? ९८.

---

(१) ह्मणजे लोक आपोआपच धार्मिक लोकांचें पवित्राचरण पाहून त्यांच्याकडे वळतात व त्यांचें प्रेम व भक्ति त्यांजवर बसते. आणि असें पाहण्यांतहि येतें कीं सदाचरणी लोकांस व सत्पुरुषांस लोक मनापासून चाहतात. आणि ज्या अर्थी हे लोक कोणाला त्रास देत नाहींत त्या अर्थी ह्यांनाहि कोणी सतावीत नाहीं. 'तफसीरे कबीर' नामक भाष्याच्या कर्त्यानें एक अर्थ आणखीहि दिला आहे; आणि तोहि आपल्यापरी रास्तच होय. ह्मणजे 'परम दयाळू परमेश्वर (सर्व साज सरंजाम) त्यांच्या मनोकामनेप्रमाणें त्यांच्यासाठीं तयार करील'.

(२) येथें परमेश्वरानें पैगंबर साहेबांचें सांत्वन केलें आहे कीं जर अरबचे दंडेल व अडबंक लोक तुह्मांस छळतील तर तुह्मीं मुकाट्यानें सहन करा. यांच्या पूर्वी याहून फारच अडदांड होऊन गेले आहेत कीं आतां त्यांचें कोठें नांव निशाणहि नाहीं. ह्याच प्रमाणें हे लोकहि एके दिवशीं नाहींसे होऊन जातील; आणि जसा आह्मीं त्यांचा संहार केला तसाच आम्हीं या अडबंक लोकांचाहि संहार करूं.

# अध्याय २० वा.

## सूरतु-ताहा.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकटिला गेला. यांत १३५ आयात-महा वाक्यें आहेत. 'ताहा' या नांवासंबंधानें अनेक भाष्यकारांनीं अनेक उल्लेख केले आहेत. पण हें, हजरत मोहंमद पैगंबरांच्या यासीन, मुद्दस्सिर, मुज्जम्मिल वगैरे नांवापैकींच एक नांव आहे; याविषयीं बऱ्याच लोकांची एकवाक्यता आहे. पैगंबर साहेबांस पैगंबरीचें काम सोंपविलें गेल्यावर, ते जिवापाड परिश्रम करीत होते. अहोरात्र नमाजींत एका पायावर उभे राहत असत; येथपर्यंत कीं त्यांचे पाय सुजून केव्हां केव्हां त्यांतून रक्तस्राव होऊन चिंब होत होते. मग सारा दिवस लोकांस समजाविण्यांत व सन्मार्गाचा उपदेश करण्यांत निघून जाई. शिवाय नव्या मुसलमानांचें नास्तिकांच्या छळापासून संरक्षण करणें हेंहि आपल्या जागीं मोठेंच काम होतें. एवंच पैगंबरी पदाचीं कर्तव्येंहि कांहीं लहानसहान नव्हतीं; आणि पैगंबर साहेब हे स्वतः अक्षरशः धर्माचरण करून लोकांस खरा व व्यवहार्य असा कित्ता घालून देण्यांत व तत्संबंधी इतर कामें उरकण्यांत इतके परिश्रम घेत होते कीं त्यामुळें असा अंदेशा वाटत होता कीं कदाचित् त्यांच्या आरोग्यांत फरक पडेल. तर या अध्यायाद्वारें परमेश्वरानें त्यांना व त्यांच्याद्वारें त्यांच्या अनुयायांस, तपश्चर्या करून व मोठमोठे कष्ट भोगून बौद्ध व जैन वगैरे मठवासी लोकांप्रमाणें जीवित्वनाश करून घेण्यापासून मनाई केली आहे. कारण परमेश्वरानें या जगास कर्मक्षेत्र ठरविलें आहे; आणि आरोग्याच्या अभावीं आपलें इहलौकिक कर्मकांड पूर्ण करणें अशक्य आहे. तर मग जीवित सफलता कशी प्राप्त होणार? इस्लामधर्मात परमेश्वरानें जी नमाज निर्मिली आहे तींत तपस्या, ध्यान वगैरेंचीं रहस्यें समाविष्ट झालेलीं असून ती केल्यानें जिवाला कांहींच कष्ट न पडतां

चपलाई व तत्परता प्राप्त होते आणि दिवसांत पांचवेळां परमेश्वरापुढें उभें राहवयाचें असल्यामुळें पापांकडे प्रवृत्तिहि कमी होते. इतकें करून कुराणाच्या ईश्वरआज्ञापित 'नियमांप्रमाणें कर्मे आचरणें हेंच जन्माचें साफल्य होय.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)·**

**त. ह. (ता–हा.) १. (हे पैगंबरा!) आम्हीं तुला कुराण यासाठीं प्रकट केलें नाहीं कीं तूं (यामुळें इतके) कष्ट भोगावेस. २. पण (हें कुराण) केवळ एक बोधवचन होय; (व तेंहि) जो कोणी (परमेश्वराचें) भय बाळगितो त्याच्या करितांच होय. ३. (हें,) ज्या (परमेश्वरा)नें पृथ्वी व उंच (उंच) आकाश निर्माण केले त्याचेंच प्रकटिलेलें (होय) ४. (तोच) परम दयाळू महा सिंहासनावर विराजमान होय. ५. जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें व जें कांहीं (आकाश व पृथ्वी) या दोहोंच्या दर्म्यान आहे तें आणि जें कांहीं पाताळाखालीं आहे तें (सर्व) त्याचेंच होय. ६. आणि (हे वाचक–श्रोत्या!) जर तूं ओरडून बोलशील तर (त्याला तुझ्या ओरडून बोलण्याची जरुरी नाहीं; कारण) तो हळुहळु (बोललेली) व (तशीच याहून) अधिक गुप्त गोष्टहि जाणतो. ७. (तोच) परमेश्वर (होय कीं) त्याच्या वाचून (अन्य) कोणी उपास्य नाहीं; सुंदरें (सुंदर) नांवें**

---

(१) ह्मणजे अस्सल खुबी व सौंदर्य परमेश्वराच्या नांवाचें होय. याचा अर्थ या हिंदी श्लोकार्धावरून–**अल्लाहका नाम सच्चा सब झूटा है जतन**–अधिक स्पष्ट होतो. खरोखरीं पाहिलें असतां, परमेश्वराशिवाय सर्व वस्तु नाशिवंत होत; ह्मणून त्यांचीं नांवेंहि विनाशपात्र असून खरीं नव्हेत. कारण ज्यांनीं तीं नांवें ठेवलेलीं होतीं तेच मुळीं राहत नाहींत. अथवा ज्या परमेश्वरानें सकळ वस्तु निर्मिल्या व त्यांस सुंदर सुंदर नांवें दिलीं ह्मणून उत्पादक या नात्यानें सर्व सुंदर सुंदर नांवें त्याचींच असलीं पाहिजेत.

त्याचींच होत. ८. आणि (हे पैगंबरा!) बरें, 'मूसा'ची गोष्टहि तुला पोहोंचली आहे? ९. कीं जेव्हां त्याला (दुरून) आग दृष्टीस पडली, तेव्हां त्यानें आपल्या कुटुंबास सांगितलें (कीं जरा,) थांबा; मला (एका) अग्नीचासा भास झालेला आहे (मी तेथें जाईन तर); नवल नाहीं कीं मी त्या(अग्नीं)तून तुम्हांसाठीं एक अंगारा आणीन अगर अग्नी(च्या खुणे)वर मला सरळ मार्गाचा

(१) येथें हजरत मूसाची गोष्ट सांगावयाचा उद्देश हा आहे कीं त्यांच्या उदाहरणावरून, पैगंबरीचीं कर्तव्यें स्थिर मनानें बजावण्यास हजरत मोहंमद पैगंबरास उत्तेजन यावें; कांकीं त्यांनाहि परमेश्वराकडून अशाच मदतीचें आश्वासन मिळालेलें होतें.

(२) हजरत मूसा पैगंबरांनीं इजिप्तमध्यें एका काप्ती वा किब्ती जातीच्या मनुष्याला मारून टाकिलें होतें. तें असें कीं मूसाच्या जातीचा एक मनुष्य व हा किब्ती हे उभयतां लढत होते. तेव्हां मूसानें आपल्या जातभाईची कुमक केली व त्या किब्त्याला एक ठोसा लगावला. कर्मधर्मसंयोगानें तो मरून गेला. त्या वेळीं मूसा हे भिऊन व घाबरून मदयन–मिद्यान–कडे पळून गेले. तेथें त्यांना शोएब–ईथ्रो–यांनीं आपल्या शेरडांच्या चारणीवर ठेवून घेतलें व आपली मुलगी सफूरा–सिपोरा–इशीं त्यांचें लग्न झालें. हजरत मूसा दहा वर्षें सासऱ्याच्या घरीं राहिले. पुढें त्यांना आपल्या आई व बहीणींस भेटण्याची हौस प्रबल झाली; तेव्हां बायकोला बरोबर घेऊन 'मदयन'हून रवाना झाले. काळोखी रात्र, जिकडे तिकडे बर्फानें आच्छादिलेली जमीन, तशांत हजरत मूसा वाट चुकले व त्यांचीं गुरेंढोरेंहि दाणादाण झालीं; आणि तुवा नांवाच्या दऱ्यांत कीं जेथें सिनाई पर्वत आहे तेथें त्यांच्या पत्नीस प्रसववेदना होऊन त्या पुत्र प्रसवल्या. अशा वेळीं त्यांना तापावयासाठीं आगीची फारच आवश्यकता होती. इतक्यांत त्यांना झाडींत कोठेंसा अग्नि आहेसा भासला. आणि जेथें अग्नि असतो तेथें कोणी तरी वस्तीस असलें पाहिजे असा मनांत विचार करून त्याला वाट पुसण्यासाठीं ते तिकडे वळले. पण त्या हिरव्या कंज झाडींत धूर वगैरे कांहींच नसून एक प्रकाशसा दिसला. हा अग्नि नव्हे; तें ईश्वरी तेज होतें. ह्या गोष्टीचें या वाक्यांत विवरण केलेलें आहे.

पत्ता लागेल. १०. मग जेव्हां 'मूसा' तेथें आला, तेव्हां त्याला वाणी (ऐकूं) आली कीं हे 'मूसा'! ११. (हा तर) मी आहें तुझा पालनकर्ता; तर तूं आपलीं पायतणें काढून घे; कां तर (या वेळीं) तूं 'तुवा'(नांवा)च्या पवित्र दऱ्यांत (उभा) आहेस. १२ आणि मी तुला (पैगंबरीसाठीं) निवडून घेतलें आहे; तर जो कांहीं (तुला) आदेश दिला जातो तो तूं कान लावून ऐक; १३. कीं मींच परमेश्वर आहें; माझ्यावांचून (अन्य) कोणी उपास्य नाहीं. तर तूं माझीच उपासना करीत रहा आणि माझ्या संस्मरणार्थ नमाज कायम राख. १४. (कारण, पुनरुत्थानाची) घटका (अवश्य) येणार आहे (आणि) मीं तिचा वेळ (लोकां-पासून) साहजिकच गुप्त राखणार आहें; कीं जेणेंकरून प्रत्येक जणा(नें पुनरुत्थानाच्या भीतीमुळें सुकृत्य करावयास झटावें व त्या दिवशीं त्या-)ला त्याच्या प्रयत्नाचा मोबदला दिला जावा. १५. तर असें न व्हावें कीं जो मनुष्य पुनरुत्थानाचा विश्वास ठेवीत नाहीं व आपल्या कामवासनेच्या मागें पडला आहे, त्यानें (पुनरुत्थाना-विषयींच्या काळजीपासून) तुला प्रतिबंध करावा; कीं (असें करशील तर) तूं पार बुडून जाशील. १६. आणि हे 'मूसा'! तुझ्या उजव्या हातांत हें काय आहे? १७. तो बोलला, ही माझी काठी आहे; मी इच्यावर टेका लावितों व इच्याचयोगें आपल्या शेरडांवर (झाडांचीं) पानें झोडून पाडतों; आणि या(काठीं)त माझीं इतर (अनेक) कामें (निघत) आहेत. १८. (परमेश्वरानें) सांगितलें कीं हे 'मूसा'! या(काठी)ला तूं (जमिनीवर) टाकून दे. १९. सारांश 'मूसा'नें काठी टाकून दिली; तों काय पाहतो आहे कीं ती सर्प आहे (व इकडे तिकडे) धांव घेत आहे. २०. (परमेश्वरानें) सांगितलें कीं तूं तिला धरून ठेव व भिऊं नकोस. आम्हीं, आतां इतक्यांत, तिला पुन्हां तिच्या पूर्वस्थितीवर आणून सोडूं. २१. आणि तूं आपला हात आपल्या बगलेशीं दाबून ठेव (व मग काढून घे); ह्मणजे तो कोणाहि तऱ्हेच्या विकारावांचून पांढरा (शुभ्र) निघेल. (आणि हा) दुसरा चमत्कार (होय). २२.

(या दोन निशाण्या या वेळीं तुला यासाठीं दिल्या आहेत) कीं आम्हीं (पुढें जातां) तुला आपल्या (सामर्थ्यांच्या) मोठमोठ्या निशाण्या दाखवाव्या. २३. (बरें तर,) 'फिरऔना'कडे जा; खरोखरच त्यानें फार दंडेली माजविली आहे. २४. ('मूसा'नें) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझा हिय्या खुला कर. २५. व माझें काम मजवर सोपें कर. २६. आणि माझ्या जिभे(मध्यें जी तोतरेपणा)ची गांठ (पडलेली आहे तीहि)[1] उलगडून टाक; २७. कीं लोकांनीं माझें बोलणें (बरोबर) समजावें. २८. आणि माझ्या कुटुंबांतून मला (हातभार लावण्यास) एक वजीर नेमून दे; २९. ह्मणजे माझा बंधु 'हारून,' ३०. याच्यायोगें माझ्या कमरेस बळकटी आण; ३१. आणि माझ्या कामांत त्याला पातीदार बनीव; ३२. कीं आह्मीं (उभयतां एकचित्त होऊन) तुझी पवित्रता पुष्कळच वर्णावी; ३३. आणि तुझें अतोनात स्मरण करीत राहावें. ३४. (कारण,) तूं आह्मांवर (फार कृपा-)दृष्टि ठेवितो आहेस. ३५. (परमेश्वरानें) सांगितलें कीं हे 'मूसा'! तुझें (सारें) मागणें (मंजूर, जा;) दिलें गेलें. ३६. आणि आह्मीं तुजवर (हा) दुसऱ्यांदा उपकार करून चुकलों आहों. ३७. (पहिला उपकार तो) कीं जेव्हां आह्मीं तुझ्या मातोश्रीला ही इषारत दिली कीं जिचा अहवाल (तुला आतां) प्रकटीकरणाद्वारें कळविला जातो; ३८. कीं 'मूसा'ला तूं पेटींत घाल व मग ती (पेटी) नदींत टाकून दे; ह्मणजे नदी त्या(पेटी)ला कांठावर ढकलून देईल (व अखेर) 'मूसा'ला माझा शत्रु व (तसाच) 'मूसा'चा शत्रु (ह्मणजे 'फिरऔन') हा ठेवून घेईल. आणि (हे 'मूसा'!) मी तुजवर आपल्याकडून प्रेम(-प्रतिबिंब) टाकलें

---

(१) परमेश्वरानें हजरत मूसावर जे अनेक उपकार केले होते ते स्मरून मूसांनीं ह्मटलें कीं हे प्रभु! तुझी आम्हांवर फार मेहरनजर आहे आणि मी पक्कें जाणून आहे कीं मला कोणी तरी मदतगार पाहिजे आहे व हारून या कामास योग्य आहे. ह्मणून माझ्या इतर मागण्याबरोबर हेंहि मागणें मान्य कर.

(कीं तुला जो पाहील तो प्रेम करूं लागेल) आणि (ह्यांत) उद्देश हा होता कीं माझ्या नजरेखालीं तुझे पालनपोषण केलें जावें. ३९. (हा त्याच वेळेचा वृत्तांत होय कीं) जेव्हां तुझी बहीण (परकी बनून 'फिरऔना'च्या लोकांस) चालतां चालतां बोलत जात होती कीं (ह्मणाल तर) मी तुह्मांला अशी (एक दाई) दाखवून देईन कीं जी त्याची (चांगल्याप्रकारें) जोपासना करील. तर (या युक्तिनें) आह्मीं तुला पुन्हां तुझ्या आईकडे पोहोंचवून दिलें; कीं तिचे डोळे गार राहावेत व तिणें (तुझ्या वियोगाचा) क्लेश करूं नये. आणि (हे 'मूसा'!) तूं एका ('किब्ती') इसमाला मारून टाकिलें होतेंस (व आपल्या जिवाच्या भीतीनें तूं फारच क्लेशयुक्त व खिन्न झालास) तेव्हां आम्हीं तुझी (त्या) क्लेशापासूनहि सुटका केली; आणि तुला आम्हीं तऱ्हेतऱ्हेनें पडताळून पाहिलें.[2] मग तूं कित्येक

(१) ज्या काळीं फिरऔनानें बनी-इस्राएलांच्या मुलांस मारून सप्पा उडविण्याचा उद्योग चालविला होता; त्याच गडबडींत हजरत मूसा यांचाहि जन्म झाला. त्यांच्या मातोश्रींनीं त्यांना ईश्वरी प्रकटीकरणानुसार पेटींत घालून नाईल नदीमध्यें वाहवून दिलें. ह्या नदीचा एक पाट फिरऔनाचे बागेंत जात होता. ईश्वरप्रतापानें ती पेटी वाहत वाहत राजमहालापाशीं येऊन लागली. फिरऔन व त्याची पत्नि आसीया यांनीं या बालकाचें रूपलावण्य पाहून व त्यांच्या मनांत करुणा येऊन, मूसाला तींतून जिताजागता काढून घेतला. तर त्यांनीं त्यांस पाळण्याचा निर्धार करून त्यांला अंगावर पाजण्यासाठीं दाया बोलाविल्या; पण तें बाळक कोणाचेंहि स्तन घेईना. अखेर त्यांच्या बहिणीनें परकी बनून त्यांस दाई दाखवून देत्यें ह्मणून आपल्या आईला पुढें केलें आणि याप्रमाणें हजरत मूसा आपल्या आईकडे पोंचविले गेले.

(२) तऱ्हे तऱ्हेनें पडताळून पाहणें ह्मणजे अनेक विघ्नें व संकटें ओढवून त्यांचें धैर्य व ईश्वरनिष्ठा हीं कसून पाहणें हें होय. हजरत मूसाच्यासंबंधानें कुराणांत इतर स्थळीं असा मजकूर आहे कीं हजरत मूसा यांस लाचार होऊन एकटेच पळणें भाग पडलें. मार्गाचा परिचय नव्हता; शिधासामुग्री जवळ नव्हती. शेवटीं मदयन शहराबाहेर

वर्षें 'मद्‌यन'च्या लोकांत (जाऊन) राहिलास. नंतर हे 'मूसा'! (माझ्या) पूर्वसंकल्पाप्रमाणें तूं (अखेर पोक्त वयास पोहोंचून येथें माझ्या समक्ष) येऊन हजर झालास. ४०. आणि मी तुला आपल्या (पैगंबरीच्या कामा)साठीं निवडून तयार केलें आहे. ४१. तर तूं व तुझा भाऊ ('हारून' उभयतां) माझे चमत्कार घेऊन जा व माझ्या स्मरणांत हयगय करूं नका. ४२. तुम्हीं उभयतांहि 'फिरऔना'कडे जा; त्यानें फारच डोकें उचललें आहे. ४३. मग (त्याच्या पाशीं जाऊन) तुम्हीं त्याच्याशीं सौम्य बोल बोला; कीं तो कदाचित् (मनांत) समजून जाईल अगर (माझ्या कोपास) भिऊन जाईल. ४४. उभयतां(बंधू)नीं अर्ज केला कीं हे आमच्या पालनकर्त्या! आम्हीं या (गोष्टी)ला भितों कीं तो (कोठें) आम्हांवर अत्याचार करील अगर (आणखीहि जास्त) दंडेली माजवूं लागेल. ४५. (परमेश्वरानें) सांगितलें कीं भिऊं नका; मी तुह्मांसोबत आहें; (आणि सर्व कांहीं) ऐकतों व पाहतों. ४६. सारांश, त्याच्यापाशीं जा व (जाऊन) सांगा कीं आम्हीं उभयतां तुझ्या पालनकर्त्याचे पाठविलेले आहोंत; तर बनी-इस्राएलांना तूं आम्हांसोबत पाठीव; आणि त्यांना (कोणाहि प्रकारची) इजा देऊं नकोस. आम्हीं तुझ्या पालनकर्त्याकडून चमत्कार घेऊन आलों आहों. आणि जो कोणी सरळ मार्ग अनुसरील त्यालाच शांति होय. ४७. खरोखरांच आम्हांला (परमेश्वराकडून असें) प्रकट झालें आहे कीं जो कोणी (परमेश्वराच्या

जाऊन मुक्काम केला. तेथें जवळच विहिरीवर लोक पाणी भरीत होते; आणि हजरत शोएब ज्यांना बायबलांत इथ्रो म्हटलें आहे या वृद्ध पैगंबराच्या मुलींहि जनावरांस पाणी पाजण्यासाठी आल्या होत्या. तेव्हां मूसानें त्यांना विहीरींतून पाणी काढून दिलें. अशा प्रकारें हजरत मूसा हे हजरत शोएब पैगंबरापर्यंत पोंचले व त्यांच्या येथें शेरडें चारण्यासाठीं चाकरीस राहिले. पुढें यांच्याच एका सफूरा नामक मुलीशीं त्यांचें लग्न झालें.

(१) पोक्त वय म्हणजे चाळीस वर्षांचें वय कीं जेव्हां बहुतेक पैगंबरांना पैगंबरीचें काम सोंपविलें गेलें आहे.

निशाण्यांस) पाखंड म्हणेल व (त्याच्या आज्ञेकडून) तोंड फिरविल त्यालाच (ईश्वरी) शिक्षा (होईल). ४८. ('फिरऔन' मोठ्या अहंकारानें) बोलला, हे 'मूसा'! तुह्मां उभयतां(भावां)चा पालनकर्ता कोण होय? ४९. ('मूसानें') उत्तर दिलें कीं आमचा पालनकर्ता तोच होय कीं ज्यानें प्रत्येक (सृष्ट) वस्तूस तिची (विशिष्ट) संघटना अर्पण केली; नंतर त्यानें (ज्या ज्या कामांसाठीं त्या वस्तु निर्मिल्या होत्या तीं तीं कामें ईश्वरीतंत्राप्रमाणें बजाविण्यास तींस) मार्ग दाखविला. ५०. ('फिरऔन'नें) पुसलें कीं बरें! प्राचीन (काळाच्या) लोकांची काय स्थिति (होणें) आहे? ५१. ('मूसा'नें) सांगितलें कीं या(गोष्टी)चें ज्ञान माझ्या पालनकर्त्यापाशीं ('लौहे मह्‌फूज़'या) पुस्तकांत (नमूद केलेलें) आहे. माझा पालनकर्ता चुकत नाहीं व विसरतहि नाहीं. ५२. (आणि) त्यानेंच तर तुम्हां(लोकां)करतां पृथ्वीला बिछाईत बनविली व तुमच्या(चालण्या)साठीं पृथ्वींत मार्ग काढले व आकाशांतून पाणी वर्षविलें. मग आम्हींच पाण्याच्यायोगें तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पति (भूमींतून) निपजविल्या. ५३. (आणि सांगितलें) कीं तींतून तुम्हींहि खा व आपल्या गुरांढोरांसहि चारा. कांहीं संशय नाहीं कीं ह्या(वस्तूं)त बुद्धिवंतांसाठीं (परमेश्वरी सामर्थ्यांच्या

---

(१) भावार्थ हा आहे कीं सृष्ट पदार्थांच्या भिन्न भिन्न स्थिति असतात व त्या स्थितींच्या पूर्णतेस पोहोंचण्यास्तव दरेक पदार्थांत आरंभापासूनच तशी प्रवृत्ति उत्पन्न होते. माणसाचें मूल प्रथम दूध पितें, मग अन्न खाऊं लागतें व मग चालूं लागतें. पाखरांचीं पिलें हळू हळू उडावयास लागतात. माशाचीं पिलें पोहावयास शिकतात. याच अनुमानाप्रमाणें कांहीं लोक स्वर्गासाठीं होत ते चांगलीं कामें करतात; आणि कांहीं नरकाग्नीसाठीं होत ते नास्तिकपणा, मूर्तीपूजा व अनेकेश्वरावाद वगैरे करतात.

(२) या उत्तरांत हजरत मूसा पैगंबरांचा प्रायः हा हेतु होता कीं हे फिरऔना! तुला प्राचीन लोकांशीं काय कर्तव्य आहे, तूं आपली फिकीर कर. परमेश्वर कोणत्याच गोष्टींत चुकतहि नाहीं व विसरतहि नाहीं. त्याच्या रजिष्टरांत सर्व गोष्टी नमूद केलेल्या आहे.

बऱ्याच) निशाण्या होत. ५४. (लोकांनों!) याच भूमींतून आम्हीं तुम्हांस निर्मिलें व (मरणोत्तर) यांतच तुम्हांस परतून आणूं आणि यांतूनच (पुनरुत्थानाच्या दिवशीं) तुम्हांस दुसऱ्यांदा काढून उभे करूं. ५५. आणि आम्हीं 'फिरऔना'ला आपल्या अवघ्या निशाण्याहि दाखविल्या; तरी देखील तो (त्यांस) "पाखंड म्हणत व नाकारीतच राहिला. ५६. (शेवटीं) तो म्हणाला कीं, हे 'मूसा'! कां तूं आम्हांपाशीं याकरितां (पैगंबर बनून) आला आहेस कीं तूं आपल्या जादू(च्या जोरा)नें आह्मांस आमच्या मुलखांतून काढून लावावेंस? ५७. (बरें तर दम धर,) आम्हींहि असलीच जादू तुझ्यासमोर आणूं तरच सई. तर (आतां) तूं आमच्या व आपल्या दर्म्यान एक वेळ नेमून दे कीं आम्हींहि तिच्या उलट करूं नये व तूंहि (करूं नयेस); (तुझा व आमचा सामना) सपाट (व खुल्या) मैदानांत (होईल). ५८. ('मूसा'नें) सांगितलें कीं (माझा) तुमचा वायदा (सार्वजनिक) शृंगार(-सणा)चा दिवस

(१) मनुष्य जातीच्या उत्पत्तीची परंपरा 'आदम' या आदिपुरुषाच्या निर्मित होण्यापासून घ्याल, तर सकळ मनुष्यांस परमेश्वरानें मातींतून निर्मिलें असें ठरतें. कारण, आदमला मातींतून बनविलें व हे मूळपुरुष इतर मानवाप्रमाणें जारज कोटींतले नव्हेत. शिवाय मनुष्याचा जननक्रम सुरु झाला तेव्हांपासून मनुष्य वीर्यबिंदूंतून बनतो, व वीर्य अन्नांतून आणि अन्न मातींतून. आतां राहिलें मरणानंतर परतून भूमींत आणणें, तर जे लोक भूमींत दफन होतात त्यांचें परतून आणणें तर उघडच आहे. आणि जे लोक जाळले किंवा जलसमाधि दिले जातात; तेहि सरशेवटीं येऊन जाऊन मातींतच मिळून जातात. आतां राहिली शेवटची गोष्ट, पुनरुत्थानाचे दिवशीं मेलेल्यांचें मातींतून काढून उभें करणें; तर जो परमेश्वर जन्म देण्यास व मारण्यास समर्थ होय तो सर्व कांहीं करूं शकतो हें अगदीं उघड आहे.

(२) सार्वजनिक शृंगार सणाचा दिवस हा एखादा सण किंवा यात्रेचा दिवस असेल अथवा कदाचित् फिरऔनाच्या जन्मदिवसाचा उत्सव असेल कीं त्या दिवशीं लोक चांगलीं चांगलीं वस्त्रें व आलंकार

(होय) आणि हें कीं भर दिवसास लोकांस एकत्र गोळा केलें जावें. ५९. हें ऐकून 'फिरऔन' (आपल्या जागीं) परतला व मग त्यानें आपलें गौडबंगाल गोळा केलें व मग (नियमित वेळीं सामन्याकरतां तयार होऊन) येऊन ठेपला. ६०. 'मूसा'नें ('फिरऔना'चा जमाव पाहून) त्यांना सांगितलें कीं तुम्हांला दुःख असो! तुम्हीं परमेश्वरावर (तरी जादूचें) खोटें कुभांड रचूं नका. नाहीं तर, तो (तुम्हांवर एकादी) शिक्षा आणून तुमचा नाश करून टाकील. आणि ज्यानें (ज्यानें परमेश्वरावर) खोटें कुभांड रचिलें तो अर्थातच पार बुडून गेला. ६१. यावर, लोक आपल्या (या) प्रकरणासंबंधानें आपसांत वादविवाद व हळू हळू कुजबुज करूं लागले. ६२. (अखेर) सर्वांनीं (एक मत होऊन हें) म्हटलें कीं असो नसो, हे दोघे (भाऊ) खचित जादुगीर होत; (आणि हे एवढेंच) इच्छितात कीं आपल्या जादू(च्या प्रभावा)नें तुम्हांस तुमच्या मुलकांतून काढून लावावें आणि तुमच्या सर्वोत्कृष्ट धर्मपंथाचें चलनवलन दूर करून टाकावें. ६३. म्हणून तुम्हींहि आपले डावपेंच एकत्र गोळा करा व मग रांगेरांगेनें (यांचा) सामना करा. आणि जो कोणी वर्चस्वी झाला तोच अर्थात् आज सफल झाला. ६४. (सरशेवटीं जादुगीर) म्हणाले कीं हे 'मूसा'! कां तर हें होऊं दे कीं तूं (आपली काठी मैदानांत) टाक आणि कां तर हें कीं जे कोणी टाकणारे होत त्यांच्यांत पहिले आम्हींच होतों. ६५. ('मूसा'नें) म्हटलें, नाहीं तर, तुम्हींच टाका चला. (तात्पर्य त्यांनीं आपलें कर्तब दाखविलें;) तों 'मूसा'ला केवळ

---

धारण करून खुशी मानीत असतील व घरें व दुकानें सजवीत असतील व हा सर्वांच्या सुटीचा दिवस असेल.

(१) भर दिवसास म्हणजे भणभणीत उजाडल्यावर; हें यासाठीं कीं कित्येक लोक उशीरानें निजून उठतात व कित्येक आपल्या जरूरी कामांत गुंतलेले राहतात. सारांश भर दिवसास गोळा होतील तर कोणीहि गैरहजीर राहणार नाहीं; व सर्वांस खरें खोटें कळून येईल.

(२) परमेश्वरावर खोटें कुभांड रचणें ह्मणजे परमेश्वरानें जो मला काठीचा चमत्कार दिला आहे त्याला जादू म्हणूं नका.

त्यांच्या जादूमुळें असा आभास होऊन गेला कीं त्यांच्या दोऱ्या व त्यांच्या काठ्या (सर्प होत्सात्या जिकडे तिकडे) धांव घेताहेत. ६६. तेव्हां 'मूसा' आपल्या मनांतल्या मनांत भ्याला. ६७. आम्हीं फर्माविलें कीं (हे 'मूसा'!) भिऊं नकोस, निःसंशय तूंच वर्चस्वशाली होशील. ६८. आणि तुझ्या उजव्या हातांत जी (काठी) आहे ती तूं (मैदानांत) टाकून दे, म्हणजे (या जादुगीरांनीं) जें काय (थोतांड) रचून उभें केलें आहे तें (सर्व) ती (एकदम) गडप करून जाईल. (कारण,) जें (थोतांड) त्यांनीं रचून उभें केलें आहे तें (सारे) केवळ जादुगीराचें कर्तब होय. आणि जादुगीर कोठेंहि जावो, त्याला साफल्य होणें नाहीं. ६९. (सारांश 'मूसा'च्या काठीनें अजगर बनून जादुगीरांच्या सापसापोळ्या गिळून टाकल्या) तर (हें पाहून) जादुगीर साष्टांग नमस्कार घालीत (भराभर पालथे) पडले; (व) म्हणूं लागले कीं आम्हीं 'हारून' व 'मूसा' यांच्या पालनकर्त्याचा विश्वास धरिला. ७०. ('फिरऔन') म्हणाला कीं तुम्हांस मी परवानगी द्यावी याच्या आधींच कां तुम्हीं 'मूसा'चा विश्वास धरिला? असो नसो, हा तुमचा मोठा (गुरु) होय कीं ज्यानें तुम्हांस जादू शिकविली आहे. पण मी तुमचे हात व तुमचे पाय उलटे(सुलटे) कापून टाकीन आणि तुम्हांला खजुरीच्या कांड्यांवर फांशीं देईन तरच सई! आणि (आतां) तुम्हांस (चांगल्या रीतीनें) माहीत होऊन जाईल कीं आम्हां( उभयपक्षां) तून कोणाची शिक्षा अधिक सक्त व विशेष टिकाऊ होय? ७१. (जादुगीर) बोलले कीं स्पष्ट स्पष्ट चमत्कार जे आम्हांसमोर आले त्यांच्या पुढें आणि ज्या(परमेश्वरा)नें आम्हांस निर्माण केलें त्याच्यापुढें तर आम्हीं तुला कोणाहि तऱ्हेनें श्रेष्ठत्व देणारच नाहीं. तर तुला जो कांहीं हुकुम करावयाचा असेल तो करून सोड. तूं ह्या इहलौकिक आयुष्यावरच काय तो हुकूम चालवूं शकतोस (कीं तूं आम्हांस शिक्षा देशील आणि फार करशील तर जिवें मारवून टाकशील) एवढेंच. ७२.

---

(१) हा मजकूर नवव्या भागांत आला आहे. तेथें आम्हीं ही टीप दिली आहे कीं उलटे सुलटे हातपाय कापणें म्हणजे उजवा हात व डावा पाय कीं यानें सारें धड निकामी होऊन जातें.

आम्हीं आपल्या पालनकर्त्याचा विश्वास धरून चुकलों आहों कीं तो आम्हांला आमचे अपराध क्षमा करील व (मुख्यत्वेंकरून) जादू जी (करावया)स तूं आम्हांस भाग पाडिलेंस (तिचें पातक); आणि परमेश्वर (व त्याची देणगी तुझ्या देणगीपेक्षांहि) फारच उत्तम व विशेष चिरस्थायी होय. ७३. निःसंशय जो कोणी (नास्तिकपणाच्या-बद्दल) गुन्हेगार होऊन आपल्या पालनकर्त्याच्या समक्ष हजर होईल, त्याच्यासाठीं 'जहन्नम' होय; कीं तो त्यांत न मरेलच व न जगेलच (म्हणजे लहालहा सुसकारीत पडलेला असेल). ७४. आणि जो कोणी विश्वासू होऊन परमेश्वराच्या हुजूर हजर होईल (व) त्यानें सुकृत्येंहि केलेलीं असतील, तर हेच लोक होत कीं ज्यांचे बडेबडे दर्जे होतील. ७५. (म्हणजे) कायमच्या राहण्याच्या बागा, कीं ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील (व) ते त्यांत सदासर्वदा राहतील. आणि जो कोणी (पाप व नास्तिकपणा यांच्या दुर्गंधीपासून) शुचिर्भूत राहील त्याचा हाच मोबदला होय. ७६. आणि आम्हीं 'मूसा'कडे आदेश पाठविला कीं माझे सेवक (म्हणजे 'बनी-इस्राएल') यांस तूं रातोरात ('मिसर'मधून) काढून ने; व मग समुद्रांत (काठी मारून) त्यांच्याकरितां कोरडा मार्ग बनवून दे; (कीं त्यावरून तुम्हीं लोक समाधानानें पार होऊन जाल). मग तुला (कोणाच्याहि) पाठलागाची भीति राहणार नाहीं व तुला (बुडण्याचा) अंदेशाहि राहणार नाहीं. ७७. नंतर 'फिरऔना'नें आपल्या सैन्यां-सहित 'बनी–इस्राएलां'चा पाठलाग केला; व मग समुद्राचा जसा कांहीं (प्रवाह) त्यांच्यावर लोटला तो लोटला. ७८. आणि 'फिरऔना'नें' आपल्या लोकांस बहकविलें व सन्मार्गाहि दाखविला नाहीं. (त्याचा परिणाम हा झाला). ७९. हे 'बनी–इस्राएलांनों'! आम्हीं तुम्हांस तुमचा शत्रु ('फिरऔन')यापासून तारिलें, व तुम्हांशीं 'तूर'(पर्वता)च्या उजवीकडचा वायदा केला; आणि आम्हीं तुम्हांवर

(१) तूर म्हणजे सिनाई पर्वताच्या उजवी कडचा वायदा याचा अर्थ असा कीं परमेश्वरानें हजरत मूसा पैगंबरास हुकूम दिला होता कीं तुम्हीं आपल्या लोकांतून सत्तर माणसें निवडून घेऊन तूर पर्वताच्या उजवीकडेला त्यांस आणा म्हणजे आम्हीं तुम्हांस तौरात–जुनाकरार देऊं.

'मन्न' व 'सल्वा' हीं उतरविलीं. ८०. (आणि आम्हीं हुकूम दिला कीं हा) जो उत्तम आहार आम्हीं तुम्हांस दिला आहे त्यांतून खा, आणि या बाबतींत (माझ्या हुकूमाचें लवलेशहि) उल्लंघन करूं नका, (कीं तुम्हीं उद्यासाठीं सांठवूं लागावें; व असें कराल) तर तुम्हांवर माझा कोप ओढवेल आणि ज्याच्यावर माझा कोप ओढवेल; तर तो (समजा कीं नरकाग्नीच्या) खड्ड्यांत पडलाच पडला. ८१. आणि जो कोणी (पापापासून) अनुतप्त होईल व विश्वास धरील व सुकृत्यहि करील व मग सन्मार्गावर (कायमहि) राहील तर त्या (च्या पापां)चाहि मी मोठा क्षमाकर्ता आहें. ८२. आणि (जेव्हां 'मूसा' तौरात(पुस्तक) घेण्यास पुढें चालून आला तेव्हां आम्हीं विचारलें कीं) हे 'मूसा!' तूं त्वरा करून आपल्या लोकांस सोडून पुढें कसा आलास? ८३.('मूसा'नें) अर्ज केला कीं तेहि हे, माझ्या मागें, मागेंच (चालले येत आहेत); आणि हे माझ्या पालनकर्त्या! मी त्वरा करून तुजकडे यासाठीं (पुढें) आलों आहें कीं तूं (माझ्याशीं) खूष व्हावेंस ८४. (परमेश्वरानें) सांगितलें कीं तुझ्यामागून तुझ्या लोकांस आम्हीं (आणखी एका) कसाला लाविलें आहे, आणि (तो हा कीं) 'सामिरी'नें त्यांना बहकविलें. ८५. मग 'मूसा' रागाच्या व संतापाच्या स्थितींत आपल्या लोकांकडे परतला; (व तो येऊन) म्हणूं लागला कीं हे माझ्या बांधवांनों! कां तुमच्या पालनकर्त्यानें तुम्हांशीं (तौरात पुस्तक देण्याचा) उत्तम वायदा केला नव्हता? तर कां तुम्हांस (त्या वायद्याची) मुदत लांबलचक वाटली? अगर तुम्हींच (हें) इच्छिलें कीं तुम्हांवर तुमच्या पालनकर्त्याचा कोप ओढवावा व म्हणूनच तुम्हीं (एकाच परमेश्वराच्या उपासनेचा जो करार करून चुकलां होतां त्या) माझ्या कराराच्या उलट केलेंत? ८६. ते म्हणूं लागले कीं आम्हीं आपल्या अखत्यारानें तुझ्या कराराच्या उलट केलें नाहीं. किंबहुना (गोष्ट अशी झाली कीं 'किब्ती') लोकांच्या डागदागिन्यांचीं ओझीं कीं जीं ('मिसर'हून निघतेवेळीं)

(१) यासंबंधीं भाग पहिला अध्याय २. पृष्ठ २८ टीप १ मध्यें ऊहापोह झालेला आहे तेथें पाहा.

(२) बनी-इस्राएलांत सणाचा लाग आला होता; आणि या निमित्तानें

**आम्हांवर लादलीं गेलीं होतीं, तीं (आतां 'सामिरी'च्या सांगण्यानें) आम्हीं (अग्नींत आणून) टाकिलीं. आणि अशाच प्रकारें 'सामिरी'नेंहि (आपल्या जवळील दागिने आणून) टाकिले. ८७ मग ('सामिरी'नेंच लोकांसाठीं (त्यांतून एक) वासरूं (ओतून) काढिलें; (ह्मणजे वासराची) प्रतिमा कीं तिचा हंबरडाहि (वासरासारखाच) होता. यावर (कित्येक लोक) म्हणूं लागले कीं हाच तर तुमचा उपास्य (देव) होय; आणि 'मूसा'चा उपास्यहि (हाच होता). पण तो विसरून ('तूर' पर्वतावर अन्य कोणी देव पहावयास) गेला आहे. ८८. तर कां या लोकांस इतकेंहि सुचत नव्हतें कीं ती (वासराची प्रतिमा) यांच्या गोष्टीचा उलटून जबाब देऊं शकत नाहीं, आणि तिला यांच्या कोणाहि नुकसानाचा अधिकार नाहीं व नफ्याचाहि नाहीं. ८९. आणि 'हारून'नें (या वत्सपूजेच्या) पूर्वींच यांना सांगितलेंहि कीं हे**

---

ते सारेचे सारे शहर सोडून बाहेर निघून गेले होते. यांच्यापाशीं **किब्ती** ( Koptic ) लोकांचे कांहीं डागदागिनेहि होते. कित्येक म्हणतात कीं **किब्ती** लोकांनीं ते ठेवीदाखल ठेविले होते; आणि कित्येक म्हणतात कीं **बनी–इस्राएलांनीं** सणासाठीं मागून घेतले होते. कांहींहि असलें तरी यांच्यापाशीं **किब्ती** लोकांचे जडजवाहिर होतें हें खास. हे **किब्ती** लोक, **फिरऔन**च्या जातीचे होते. ते सर्व पुढें समुद्रांत बुडून गेले व त्यांचा कोणी वारस राहिला नव्हता. **सामिरी**नें हजरत **हारून** यांस सांगितलें कीं हा बिनवारसी माल जाळून टाकला पाहिजे. कां कीं कोणाचाच त्यावर हक्क नाहीं. याप्रमाणें **सामिरी**च्या बहकविण्यानें तें वितुळून त्यांतून वासराच्या स्वरूपाचा साचा बनवून प्रतिमा ओतून काढिली गेली; आणि ते लोक तिची पूजा अर्चा करूं लागले.

( १ ) हजरत **मूसा** प्रमाणेंच **फिरऔन**च्या भीतीनें **सामिरी**च्या आईनें **सामिरी**ला जन्मतांच समुद्रांत सोडून दिलें होतें. पण ईश्वराज्ञेनें **जिब्रील** दूत येऊन त्यांनीं त्याला पाण्यांतून काढून वांचविले व वाढविले. म्हणून तो या देवदुताला ओळखित होता. पुढें **फिरऔन** बुडाला त्या दिवशीं **जिब्रील**ास घोड्यावरून जातांना पाहून **सामिरी**नें घोड्याच्या पाया खालील मूठभर धूळ उचलून घेतली. ती त्यानें त्या ओतींव वासराच्या तोंडात घातली तों तें हंबरडा फोडूं लागलें.

माझ्या बांधवांनों! ही तर या(वासराच्या) द्वारें केवळ तुमची कसोटी पाहिली जाते, आणि (एरव्हीं) खरोखरींच तुमचा पालनकर्ता परम दयाळू (परमेश्वर)च होय. म्हणून माझें अनुकरण करा व माझा हुकूम माना. ९०. ते ह्मणूं लागले कीं 'मूसा' परतून आह्मांकडे येईपर्यंत आम्हीं तर बरोबर याच(वत्सपूजे)वर एकनिष्टपणें अडून बसावयास कधींहि चुकणारच नाहीं. ९१. ('मूसा'नें 'हारून' यास संबोधून) म्हटलें कीं हे 'हारूना! जेव्हां तूं यांना पाहिलें होतेंस कीं (हे लोक) बहकून गेले, तेव्हां तुला कोणी मनाई केली होती; ९२. कीं तूं माझें (बोधवचनाचें)अनुकरण न करावेंस? कां तूं माझ्या आज्ञेचें उल्लंघन केलेंस? ९३. (तो) बोलला कीं हे माझ्या सहोदर (भावा)! माझी दाढी व माझी डोकी (यांचे केंस) तर धरूं नकोस. मी या(गोष्टी)स भ्यालों कीं तूं (परत येऊन) कोठें असे (न) म्हणूं लागावेंस कीं त्वां 'बनी-इस्राएलां'मध्यें फूट घालून टाकलीस आणि माझ्या बोलाला मान दिला नाहींस. ९४. (आतां 'मूसा'नें 'सामिरी'ला) पुसलें कीं हे 'सामिरी'! तुझी काय गत आहे? ९५. त्यानें सांगितलें कीं इतरांना जें दिसून आलें नाहीं तें मला दिसून आलें; (मी 'जिब्रील'ला

---

(१) ह्याच गोष्टीचा उल्लेख कुराणांत अन्यत्र आलेला आहे कीं हजरत मूसा हे जातां जातां आपला भाऊ हारून यांस सांगून गेले होते कीं "माझ्या मागें तूं माझ्या लोकांत माझा प्रतिनिधि होस (व त्यांच्यांत) संप-सुधारणा-करीत अस (कीं त्यांनीं आपसांत झगडूं नये); आणि फिसादखोर लोकांचा मार्ग अनुसरूं नकोस." तर हजरत हारून यांनीं ती आज्ञा याप्रमाणें पाळली कीं बनी-इस्राएल ह्मणजे यहुद्यांस वत्सपूजेपासून मनाई केली व स्वत: त्यांजपासून दूर राहिले. पण त्या लोकांनीं जेव्हां यांचें ऐकिलें नाहीं तेव्हां हे गुपचुप बसून राहिले.यामुळें हजरत मूसांनीं हजरत हारूनाला ठपका दिला कीं तूं प्रतिनिधित्वाचें कर्तव्य कां ह्मणून बजाविलें नाहींस? तुला माझें अनुकरण करण्यापासून कोणी हरकत केली? या वाक्याचा अर्थ हा होय. हजरत मूसा पैगंबरांचा हेतु हा होता कीं सर्व प्रयत्न खर्चून बनी-इस्राएलांस एकाच परमेश्वराची उपासना करावयास बळेंच भाग पाडावयाचें होतें. हजरत हारून यांनीं आपसांत संप-सुधारणा करण्याची मूसानें दिलेली ताकीद आठवून देऊन क्षमा मागितली.

घोड्यावर स्वार होऊन जातांना पाहिलें,) तर मी ('जिब्रील') दूता (च्या घोड्या) च्या पावलांच्या चिन्हां(च्या धूळीं)तून एक मूठ भरून घेतली; व मग ती (ओतींव वासरांत) टाकून दिली; (तोंच तें हंबरडा फोडूं लागलें). आणि (त्यावेळीं) माझ्या मनानें मला असेंच सुचविलें. ९६. ('मूसा'नें) सांगितलें कीं चल (दूर हो)! (या) आयुष्यांत तर तुला हीच (शिक्षा) होय कीं तूं (जन्मभर) असेंच म्हणत फिरशील कीं (पाहा हो! मला कोणी) शिवूं नका. (नाहीं तर आम्हां दोघांनाहि ताप चढेल), आणि (याशिवाय) तुजकरतां (पुनरुत्थानाच्या शिक्षेचा) एक वायदा आणखीहि होय कीं तो तुला कोणाहि तऱ्हेनें टाळतां येणार नाहीं. आणि ज्या (मूर्ती)च्या (आराधने)वर तूं एकनिष्ठ होऊन अडून बसला होतास त्या आपल्या उपास्या (म्हणजे वासरा)कडेहि पाहा. याला आम्हीं जाळून(भस्म करून) टाकूं व मग ती (राख) समुद्रांत विसकळून (वाहवून) सोडूं ९७. (लोकांनों!) तुमचा(अस्सल)उपास्य केवळ परमेश्वरच होय कीं, ज्याच्यावांचून (अन्य) कोणी उपास्यच नाहीं. आणि त्याचें ज्ञान सर्व वस्तूंस व्यापून आहे. ९८. (हे पैगंबरा!) अशाच प्रकारें आह्मीं पूर्वीं जें (जें कांहीं) होऊन गेलें त्या गोष्टींचा अहवाल तुला ऐकवितों. आणि आम्हीं तुला आपल्याकडून कुराण[1] अर्पण केलें आहे. ९९. ज्या लोकांनीं याच्याकडून तोंड फिरविलें, ते पुनरुत्थानाचे दिवशीं (कुकर्मांचें) एक (भारी) ओझें (आपल्या डोईवर) लादलेले असतील १००. (आणि) याच स्थितींत (ते) निरंतर राहतील. आणि पुनरुत्थानाचे दिवशीं हें ओझें वाहणें त्यांस किती तरी वाईट होय! १०१. त्या दिवशीं 'सूर'–शिंग–फुंकलें जाईल व आम्हीं त्या दिवशीं गुन्हेगारांना(आपल्या हुजूर) एकत्र गोळा करूं; (आणि) त्यांचे डोळे (दहशतीमुळें हिरवे) निळे (निस्तेज होतील). १०२. ते आपसांत हळू हळू बोलत जातील कीं (जगांत) तुम्हीं लोक (फार) राहिलां

(१) पवित्र कुराणाच्या या महावाक्यांत 'ज़िक्र' हा शब्द आहे कीं ज्याचा अर्थ बोध–स्मरण असा आहे. आणि कुराणांत हे दोन्हीं गुण होत ह्मणून आह्मीं 'ज़िक्र' चें भाषांतर कुराण असें केलें आहे.

असाल (तर) केवळ दहाच दिवस. १०३. जसजशा गोष्टी (हे लोक त्या दिवशीं) करतील त्यांशीं आम्हीं खूप माहीतगार आहों; कीं यांच्यांत जो (सर्वांत) जास्त सन्मार्गोन्मुख असेल तो ह्मणेल कीं नाहीं हो ! तुह्मीं (जगांत फार) राहिलां असाल (तर) केवळ एकच दिवस. १०४. आणि (हे पैगंबरा ! लोक) तुला पर्वतांसंबंधानें प्रश्न करतात; (कीं पुनरुत्थानाचे दिवशीं यांची काय गत होणें आहे?) तर (तूं यांना) सांग कीं माझा पालनकर्ता यांस (धूळ बनवून चोहोंकडे) विसकळून टाकील; १०५. आणि पृथ्वीस सपाट मैदान करून सोडील; १०६. कीं त्यांत (हे वाचक-श्रोत्या !) तुला कोठें मोड दिसून येणार नाहीं व उच्च(नीचहि) नाहीं. १०७. त्या दिवशीं लोक पुकारणाऱ्या (म्हणजे करणा वाजविणाऱ्याच्या आवाजा) पासून वेडे वांकडे न जातां, (नीट) त्याच्या मागें मागेंच चालले जातील. आणि (धास्तीमुळें) परम दयाळू(परमेश्वरा)समक्ष (सर्वांचे) आवाज खोल बसून जातील. तर (हे वाचक-श्रोत्या ! पावलांच्या) मंद आवाजाशिवाय तूं आणखी कांहींच ऐकणार नाहींस. १०८. त्या दिवशीं परम दयाळू (परमेश्वर) ज्याला परवानगी देईल व ज्याचें बोलणें पसंत करील त्याच्याशिवाय (कोणाचीच) शिफारस कामा येणार नाहीं १०९. जें कांहीं लोकांपुढें चाललें आहे व जें कांहीं यांच्यामागें होऊन चुकलें आहे तें (सर्व कांहीं) तो जाणतो; आणि लोकांचें ज्ञान त्याला व्यापूं शकत नाहीं. ११०. आणि (पुनरुत्थानाचे दिवशीं सर्वांचीं) तोंडें, जिवंत (व) नित्यसिद्ध अशा (परमेश्वरा)पुढें नमलेलीं राहतील. आणि (त्या दिवशीं) जो मनुष्य (कोणाहि तऱ्हेच्या) अन्यायाचें ओझें (आपल्या मानेवर) लादून घेईल तो सफाई बुडालाच (बुडाला). १११. आणि जो कोणी

(१) भावार्थ हा आहे कीं त्याचा तर्क जगव्यवहारांत इतरांपेक्षां अधिक अनुमानसिद्ध असा होता; ह्मणजे त्यांच्यांत तो फारच शहाणा होता.

(२) कुराणांत इतरत्र सांगितलें आहे कीं सर्वांत मोठा अन्याय म्हटला ह्मणजे परमेश्वरसमागमें कोणालाहि परमेश्वर तुल्य गणिलें जावें हा होय. ह्याप्रकारच्या अन्यायापासून कसलेंच तारण नाहीं ह्मणून अशा पाप्याचा पूर्ण विध्वंस झालाच समजा.

(ह्या जगीं) सुकृत्यें करील आणि तो विश्वासूहि असेल, तर त्याला (कोणा तऱ्हेच्या) अन्यायाची भीति राहणार नाहीं व (कोणा तऱ्हेच्या) हक्कमाराचीहि नाहीं. ११२. आणि (जशी कुराणाची प्रस्तुत स्थिति होय;) असेंच आम्हीं तें अरबी भाषेचें कुराण प्रकटिलें आहे व यांत (तऱ्हे-तऱ्हेनें) फिरवून फिरवून आम्हीं दरडावणी केली आहे कीं कदाचित् लोक (परमेश्वराला) भिऊन वागतील अगर ह्यानें यांच्या(मनां)त नव्यानें कांहीं विचार (जागृत) होईल. ११३. तर परमेश्वर जो (इह परलोकाचा)खरा बादशाह त्याचा महिमा फारच थोर होय.आणि(हे पैगं-बरा!)कुराणाच्या प्रकटीकरणाची परिसमाप्ति होण्याच्या आधींच,तूं कुराणा(च्या पठण करण्यां)त घाई करीत जाऊं नकोस. आणि (असें) प्रार्थित जा कीं हे माझ्या पालनकर्त्या! मला (आणखी) अधिकाधिक ज्ञान दे. ११४. आणि आम्हीं पूर्वकाळीं 'आदमा'पासून (गोधूम न खाण्याबद्दल) प्रतिज्ञा घेतली होती. पण 'आदम' (ती) विसरून गेला, आणि आम्हीं त्याच्या (इराद्यांत) करारीपणा पावलों नाहीं. ११५. आणि-जेव्हां आम्हीं दूतांस सांगितलें कीं 'आदमा'पुढें साष्टांग नमस्कार

---

(१) जिब्रील दूत जेव्हां ईश्वरी प्रकटीकरण आणीत तेव्हां हजरत मोहंमद पैगंबर—परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो—हे या विचारानें कीं ईश्वरप्रणीत प्रकटीकरणांतून एकादा शब्द ध्यानांतून उतरून न जावा; ह्मणून कुराणोक्त शब्द मध्यें मध्येंच त्वरेनें पठन करूं लागत. यानें जिब्रील दूतांस प्रकटीकरणाचें परिपूर्णतेंत गोंधळ होऊन जाण्याचा अंदेशा होता. यासाठीं परमेश्वरानें पैगंबर साहेबांस कुराण वाचण्याचा व शिकण्याचा सभ्याचार शिकविला कीं प्रथम पूर्ण गोष्ट ऐकून घ्या व मग ती पुन्हां पाठ ह्मणून दाखवा. याच उल्लेखांत आदमच्या अंगीं स्वभावतः करारीपणाचा जो अभाव होता तोहि जाणावला. याचा भावार्थ हा कीं आदमजाद ह्मणजे मानव हे समुच्चयेंकरून उतावळ्या स्वभावाचे असतात; तथापि यांचेच कुलपुरुष, आदम हेहि स्थिर स्वभावाचे नव्हते; आणि स्वभावाची अस्थिरता हें उतावळेपणाचें द्योतक होय. कुराणांत दुसरे जागीं ह्मटलें आहे कीं "मनुष्य हा उतावळा निर्माण केला गेला आहे" आणि "मनुष्य हा उतावळा होय." सभ्याचार शिकविण्याचा काय उत्तम मार्ग आहे कीं त्यांत वाग्दंडहि आहे आणि दोषनिराकरणहि आहे.

घालां, तेव्हां सर्वांनींच साष्टांग नमस्कार घातला, पण 'इब्लीस' यानें नाकारिलें. ११६. तर आम्हीं ('आदमा'ला) सांगितलें कीं हे 'आदमा' ! हा ('इब्लीस') तुझा व तुझ्या पत्नीचा अर्थात शत्रु होय; तर असें न व्हावें कीं तुम्हां उभयतांस त्यानें स्वर्गांतून काढून बाहेर करावें व तूं कष्ट भोगावेस. ! ११७. आणि येथें (स्वर्गांत तर अशी मौज आहे कीं) तुला उपाशी राहावें लागत नाहीं व उघडेंबंबहि राहावें लागत नाहीं. ११८. आणि तसेंच हें कीं येथें तुला तहान सोसावी लागत नाहीं व उन्हातापांतहि रहावें लागत नाहीं. ११९. नंतर सैतानानें 'आदमा'ला फूसलावून टाकिलें (व त्याला) सांगितलें कीं हे 'आदमा' ! म्हणशील तर, मी तुला शाश्वतीचा वृक्ष (कीं ज्याला खाऊन अजरामर होशील तो) आणि असें राज्य कीं जें (कधींहि) पुरातन होणार नाहीं (म्हणजे ऱ्हास पावणार नाहीं तें) दाखवून देऊं का? १२० सारांश, उभयतां (पतिपत्नी) नीं त्या (निषिद्ध वृक्षां)तून (त्याचें फळ.) खालें तों त्यांना आपापली लाज उघड होऊन गेली आणि (स्वर्गांच्या) बागेचीं पानें ते आपल्या (नग्नांगा)वर टांचून घेऊं लागले. आणि 'आदम'नें आपल्या पालनकर्त्यांची आज्ञा मोडली व (सन्मार्गांहून) भटकून गेला. १२१. मग (अखेर) त्याच्या पालनकर्त्यानें त्याला स्वीकारिलें आणि त्याचा पश्चात्ताप मान्य केला व (त्याला आपल्या आज्ञापालनाचा) मार्ग दाखवून दिला. १२२. ('आदम'नें जेव्हां आज्ञाभंग केला तेव्हां परमेश्वरानें 'सैतान' व 'आदम' यांस) आज्ञा केली कीं, तुह्मीं दोघेहि स्वर्गांतून खालीं उतरून जा; तुह्मीं एकमेकांचे दुशमन (आहां. आणि पृथ्वींत तुमचा वेल-विस्तार होऊं द्या;) मग जर तुमच्या (म्हणजे तुमच्या वंशा)पाशीं मजकडून सन्मार्ग-बोध येईल, तर जो कोणी माझ्या सन्मार्गावर चालेल तो बहकणार नाहीं व (अखेर) त्याला कष्टहि भोगावे लागणार नाहींत १२३. आणि ज्या मनुष्यानें माझ्या स्मरणाकडून तोंड फिरविलें, त्याचें आयुष्य-क्रमण अडचणीचें होईल; आणि पुनरुत्थानाच्या दिवशींहि आम्हीं त्याला

(१) जे लोक परमेश्वराला स्मरून धर्माचरणांत आयुष्य घालवीत नाहींत ते खरोखरींच कोणत्याहि स्थितींत खुष राहूं शकत नाहींत. एक गरीब धार्मिक

**आंधळा ( करून ) उठवूं. १२४. तो म्हणेल कीं हे माझ्या पालनकर्त्या ! तूं मला आंधळा (करून) कां उठविलास; आणि मी तर (जगांत भलाचंगा) डोळस होतों ? १२५. ( परमेश्वर) जबाब देईल कीं असेंच (व्हावयास पाहिजे होतें; जगांत) तुजपाशीं आमच्या निशाण्या आल्या; पण तूं त्यांजला विसरून गेलास; आणि अशाच प्रकारें आज तुलाहि विसरलें जाईल. १२६. आणि ज्या मनुष्यानें (मर्यादेबाहेर) फाजिलपणा केला व आपल्या पालनकर्त्याच्या निशाण्यांचा विश्वास धरिला नाहीं, त्याला आम्हीं असाच मोबदला देत असतों. आणि परलोकींची शिक्षा (इहलोकींच्या शिक्षेहूनहि) फारच सक्त व फारच चिरस्थायी होय. १२७. तर कां लोकांस यानें बोध झाला नाहीं कीं यांच्यापूर्वी आम्हीं कित्येक पिढ्यांचा नायनाट करून टाकिला (आणि आतां) हे लोक त्यांच्याच राहण्या सवरण्याच्या जाग्यांत चालत ( फिरत ) आहेत ? बुद्धिसंपन्न लोकांसाठीं अर्थात् ह्याच (एका गोष्टीं)त ( ईश्वर-**

---

मनुष्य जर अडचणींत व संकटांत आहे तर तो तें सहन करितो; कांकीं त्याच्या मनाला एक प्रकारचें समाधान असतें कीं त्यांतून परमेश्वर त्याला पार पाडील. आणि जर तो सुखांत आहे तर तो या सुखाची किंमत जाणतो व परमेश्वराची उपकार स्तुति करतो. उलटपक्षीं, अधार्मिक मनुष्य जराशा आपत्तींत फारच तळमळून जातो; आणि सुखसंपत्तीचा असा दुरुपयोग करितो कीं अखेर तो महत्संकटांस बळी पडतो. केव्हां केव्हां दुष्टरोग त्याला येऊन घेरतात; व केव्हां केव्हां संपत्तीचा निष्काळजीपणानें अपव्यय करितो. आणि उत्कृष्ट खाणें व उत्तम कपडे यांनींहि त्याला कधीं सुख मिळत नाहीं व तो त्यांची किंमतहि जाणित नाहीं. नंतर धन संपादन करणें व त्याचें संभाळणें हीहि एक आपत्तिच होय. कोठें कोणाची खुशामत करावी लागते व कोठें खोटें बोलावें लागतें. ज्या कोणाशीं व्यवहार करतो त्याच्याशीं वैर कायम होतें. संसारमाया नाहीं तरीही दुःख; आणि आहे तेथें तिच्या माया शृंखलांत आपण जखडलेले आहों. म्हणून यापेक्षां विश्वव्यापक अशीं कोणतीच आपत्ति नाहीं; कीं आहे तरीही दुःख व नाहीं तरीहि दुःख. आयुष्यक्रमण अडचणींचें होण्याचा अर्थ ही वस्तुस्थिति पाहाल तर असाच आढळून येईल. कोणालाहि आपल्या मनानें खुष आहे असें धरून चाललें असतां, तो मनुष्य वस्तुतः खुष होऊं शकत नाहीं.

सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या (उपलब्ध) होत. १२८. आणि (हे पैगंबरा! लोकांचे आचार तर असे आहेत कीं) जर तुझ्या पालनकर्त्याकडून पूर्वीच एक हुकूम न सुटून चुकता व (शेवटच्या निर्णयाचा) एक नियमित वेळ (ठरला) नसता; तर (एव्हांच) शिक्षा सादर होणें आवश्यक होतें. १२९. तर (हे पैगंबरा!) जसजशा गोष्टी (हे नास्तिक) उच्चारितात त्या तूं (मुकाट्यानें) सहन कर आणि सूर्योदयापूर्वी व (तसेंच) सूर्यास्तापूर्वी आपल्या पालनकर्त्याच्या स्तुतिबरोबर (त्याच्या) पवित्रतेचेंहि वर्णन करीत अस; आणि (तसेंच) रात्रीच्या समयांत व दिवसाच्या उत्तरार्धांत (म्हणजे 'जोहर'च्या वेळींहि) पवित्रतेचें वर्णन करीत अस, कीं कदाचित तूं (या उपासनेचें प्रतिफल संपादून) खुष होऊन जाशील. १३० आणि (हे पैगंबरा!) आम्हीं भिन्नभिन्न लोकांस इहलौकिक आयुष्याची शोभा व बहार यांच्या सुखोपभोगाचीं जीं साधनें देऊन ठेविलीं आहेत कीं आम्हीं त्यांना त्यांच्या(स्थितीं)तच कसून पाहावें; त्यांजकडे तूं आपली नजर दौडूं नकोस. आणि तुझ्या पालनकर्त्याची (दिलेली) संपत्ति (म्हणजे पारलौकिक पुण्य याहूनहि) उत्तम व अधिक चिरस्थायी होय. १३१. आणि तूं आपल्या कुटुंबावर नमाजीची ताकीद राख व (स्वतःहि) ती चिकाटीनें करीत राहा. आम्हीं तुजपाशीं कांहीं अन्नसंपत्ति तर मागीत नाहीं; (किंबहुना,) आम्हींच तुला अन्न-संपत्ति देतों. आणि (उत्तम) परिणाम तर (परमेश्वराला) भिऊन वागण्याचाच होय. १३२.

(१) ह्मणजे नमाज पढत राहा असा अर्थ घ्यावयाचा आहे. यांत सूर्योदय व सूर्यास्ताच्या पूर्वी ह्मणजे सकाळची व तीन प्रहरची नमाज; रात्रीच्या समयांत म्हणजे संध्याकाळची व रात्रीची नमाज आणि दिवसाचा उत्तरार्ध म्हणजे दुपारी सूर्य ढळल्यावर जी नमाज पढतात तिला जोहरची नमाज म्हणतात.

(२) एक अर्थ आम्हीं भाषांतरांत पत्करला आहे तो हा होय कीं आम्हांला तुम्हांपासून आज्ञापालन व उपासना पाहिजे. जसें जगांतील राजे व बादशाह आपल्या प्रजेकडून आपणासाठीं कमाई करवितात व काबाडकष्ट करूं लावतात; तसें हें तर आम्हीं म्हणत नाहीं कीं कमाई करून आम्हांस खाऊं घाला. हीच गोष्ट कुराणांत दुसरे जागीं याप्रमाणें लिहिलेली आहे कीं "मी दैवत व

आणि (यहुदी व ख्रिस्ती हे) म्हणतात कीं (हा पैगंबर) आपल्या पालनकर्त्याकडून एकादी निशाणी आम्हांसाठीं कां म्हणून आणित नाहीं ? (पण) कां पूर्वींच्या पुस्तकांत जी (भविष्यवाणी) होय तिची ग्वाही यांना पोहोंचली नाहीं ? (कीं ती पैगंबरीची पूर्ण खूण होय). १३३. आणि जर आम्हीं कुराणा(च्या प्रकटीकरणा)पूर्वींच कोणाहि शिक्षेद्वारें यांचा नाश करून टाकतों तर ते म्हणतेच म्हणते कीं हे आमच्या पालनकर्त्या ! तूं आम्हांकडे कोणी पैगंबर कां पाठविला नाहींस कीं आम्हीं हीन दीन व फजित होण्यापूर्वींच तुझ्या हुकुमाप्रमाणें चालतों ! १३४. ( हे पैगंबरा ! यांना) सांग कीं (आपापल्या परीनें) सर्वच (शेवटील परिणामाची) वाट पाहताहेत तर तुम्हींहि वाट पहा. ह्मणजे पुढें जातां, तुम्हांस माहित होऊन जाईल कीं कोण सरळ मार्गाचे अनुयायी होत (व गैरमार्गी कोण) ? आणि कोण सन्मार्गास लागलेले होत (व बहकलेले कोण) ? १३५.

---

मनुष्य यांस दुसऱ्या कोणत्याहि हेतुनें निर्माण केलें नाहीं. पण यासाठीं कीं त्यानीं माझी उपासना करावी. मी त्यांच्यापाशीं अन्न संपत्ति इच्छित नाहीं व त्यांनीं मला खाऊं घालावें हेंही मी इच्छित नाहीं. निःसंशय परमेश्वरच भक्कम सामर्थ्यवान् असा अन्नदाता होय. " तर भावार्थ हा कीं जर आम्हीं तुम्हांस कमाई करण्यास सागतों तरीहि त्याचा आम्हांस हक्क होता. परंतु आम्हीं तुम्हांस फक्त उपासना करायास सागतों; आणि ती कमाई करून देण्यापेक्षां सोपी आहे. म्हणून नमाजीचा नियमितपणा राखण्यांत थोडेसे श्रम पडतील तर ते सहन करा आणि भक्तत्वाचें कर्तव्य बजावा. दुसरे अर्थ भाष्यकारांनीं असेहि लिहिले आहेत कीं " आम्हीं तुम्हांपाशीं ( तुमची ) अन्नसंपत्तिहि मागीत नाहीं ( कीं कमाई करा व खा; किंबहुना ) आम्हींच तुम्हास अन्नसंपत्ति देतों ( व देऊंहि; म्हणून खुशाल आनंदानें परमेश्वराच्या उपासनेवर जमून राहा )."

# पवित्र कुराण.

## भाग सतरावा.

### अध्याय २१ वा.

## सूरतुल्—अंबिया.

हा अध्याय मकेंत प्रकट झाला. यांत ११२ आयात वा महावाक्यें आहेत. यांत अनेक वेगवेगळाल्या पैगंबरां-प्रेषितां-चें निरुपण झालेलें आहे. म्हणून पैगंबरांचें प्रकरण असें यास नांव देण्यांत आलें आहे.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)

लोकांचा हिशोब (म्हणजे त्यांच्या कर्मांच्या हिशोबाचा समय) जवळ येऊन लागला, असें असतांहि ते गफलतींत (निमग्न होऊन) पलिकडे तोंड करून (चालले जात) आहेत. १. त्यांच्या पाशीं त्यांच्या पालनकर्त्याकडून जो नवीन हुकूम येतो, तो केवळ ते (इतके बेपर्वा होऊन) ऐकतात कीं, (त्याचा) खेळ मांडतात. २. (आणि) त्यांचीं मनें करमणुकींत गुंतलेलीं होत. आणि(हे) अन्यायकारी लोक (आपसांत) हळूहळू कुजबुज चालवितात; कीं हा (गृहस्थ म्हणजे 'मोहंमद') आहेच काय, तुम्हां सारखा एक मनुष्यच ना? तर कां तुम्हीं प्रत्यक्ष पाहून सवरून जादू(च्या गोष्टी ऐकावया)स येतां? ३. (पैगंबरानें यांची ही कुजबुज जाणून घेऊन) म्हटलें कीं (तुम्हीं काय कुजबुज करतां?) जितक्या म्हणून गोष्टी आकाश व पृथ्वींत होतात, त्या (सर्व) माझ्या पालनकर्त्यास माहित आहेत. आणि तो (सर्वांचें) ऐकतो (व सर्व कांहीं) जाणतो. ४. (अन्यायकारी लोकांनीं कुराणाला जादू म्हणण्यावरच पुरें केलें नाहीं;) तर ते म्हणूं लागले कीं, हा तर संभ्रांत स्वप्न-विचार-संग्रह होय; किंबहुना ह्यानें या (खोट्यानाट्या गोष्टी आपल्या

मनानें) रचिल्या आहेत; किंबहुना हा (गृहस्थ) कवि होय. (आणि जर खरोखरींच पैगंबर आहे ) तर ज्याप्रमाणें पूर्वींचे पैगंबर (चमत्कारासहित) पाठविले गेले होते, त्याच प्रमाणें त्यानेंहि (आम्हीं सांगूं तसा) एकादा चमत्कार आम्हांसमोर आणावा. ५. ज्या वस्त्यांचा आम्हीं यांच्यापूर्वीं नाश केला त्यांनीं तर (चमत्कार पाहूनहि) विश्वास धरिला नाहीं, तर कां हे विश्वास धरितील ? ६. आणि (हे पैगंबरा !) आम्हीं तुझ्या पूर्वींहि पुरुषच ( पैगंबर करून) पाठविले (कीं आम्हांस जें कांहीं सांगावयाचें होतें तें,) आम्हीं त्यांजला प्रकट करीत होतों. तर (लोकांनों !) जर तुम्हांस (ही गोष्ट) माहित नसेल तर (पूर्वील) ग्रंथधारी लोकांस विचारून पहा. ७. आणि आम्हीं त्यांचें शरीर असें बनविलें नव्हतें कीं ते अन्न खात नसत आणि ते लोक (जगांत) नेहमीं राहणारेहि नव्हते. ८. मग आम्हीं (शिक्षेचें) वचन त्यांना खरें करून दाखविलें. (म्हणजे नियमित वेळीं शिक्षा पाठविली). तर त्या( पैगंबरां)ना व ज्यांना (ज्यांना) आम्हीं इच्छिलें त्यांना (शिक्षेंतून) बचावून घेतलें आणि जे लोक (मर्यादे बाहेर) निघून गेले होते त्यांचा आम्हीं नाश केला. ९. (लोकांनों !) आम्हीं तुम्हांकडे (कुराण हें) असें पुस्तक पाठविलें आहे कीं ज्यांत तुमचा उल्लेख[2] आहे. तर कां तुम्हीं (इतकी गोष्टहि) समजत नाहीं ? १०. आणि बहुतेक वस्त्या कीं जेथील लोक (फारच) शिरजोर होते त्या आम्हीं तोडून फोडून बरोबर करून टाकल्या; आणि

---

( १ ) हा निर्बंध आह्मीं यासाठीं लाविला आहे कीं, त्या लोकांस फक्त चमत्कारच पाहिजे होता; तर कुराण हा स्वतः एक महान चमत्कार होय आणि तो पुनरुत्थानापर्यंत तसाच राहील.

( २ ) भावार्थ हा आहे कीं हें कुराण तुमच्या सुधारणेसाठीं पाठविण्यांत आलें आहे. तुमचे दोष, तुमच्या उणिवा व तुमची अनीति यांचा यांत उल्लेख केलेला आहे; कीं तुमच्या हातून कदाचित् यांची दुरुस्ती होईल. जर यांत केवळ दुसऱ्याच लोकांचा अहवाल उल्लेखिलेला असता, अगर फक्त पूर्वींच्या लोकांचा इतिहास असता, आणि तुह्मीं तो आपल्या प्रीत्यर्थ निरुपयोगी समजता तरीहि निमित्तास जागा होती. परंतु आतां तुह्मांस या पुस्तकाकडून बेपर्वाई करण्याचें कारणच उरलें नाहीं; इतकेंच नव्हे तर असें केल्यानें तुह्मांवर मोठा दोष येतो.

त्यांच्या मागून इतर लोक उठवून उभे केले. ११. तर जेव्हां त्या (नाश पावणाऱ्यां)स आमची शिक्षा (येत आहेशी) भासली, तेव्हां तर काय पाहतां! ते त्या( वस्त्यां )तून पळ काढूं लागले. १२. (आम्हीं सांगितलें कीं) पळूं नका; आणि ज्या(सुखसाधनां)त तुम्हीं आनंद चैन करीत होता त्यांकडेच परतून जा व (तसेंच ज्यांत तुम्हीं राहत होतां त्या) तुमच्या ठिकाणाकडे (परता;) कीं कदाचित् (तुमच्या विचाराप्रमाणें) तुमची कांहीं पृच्छा[१] केली जाईल. १३. ते म्हणूं लागले, हाय! आमचें दुर्दैव! निःसंशय आम्हींच तकशीरवार होतों. १४. मग ते लोक सारखा हाच आक्रोश करीत राहिले; येथपर्यंत कीं आम्हीं त्यांना (असें विध्वस्त) करून टाकिलें (कीं जर त्यांना उर्जितावस्थेमुळें शेत समजाल तर) कापलेलें (शेत होतें; आणि जर त्यांना खोडसाळपणामुळें आग समजाल तर ते) विझून गेलेले (अंगारे होते). १५. आणि आम्हीं आकाश व पृथ्वी आणि जें कांहीं या दोहोंच्या दरम्यान आहे त्यांस खेळासाठीं निर्माण केलें नाहीं. १६. जर आम्हीं[२] खेळ करून घेऊं इच्छितों तर आम्हीं आपल्यापरीनें (खेळासारखाच एकादा) खेळ करून घेतों. (पण) आम्हांला (असें) करावयाचेंच नव्हतें. १७. किंबहुना, (गोष्ट ही होय कीं) आम्हीं सत्य तें (धोंड्या परीं) असत्या(च्या शिरा)वर फेंकून मारतों, व तें असत्याचें मस्तक

( १ ) ह्मणजे ते लोक आपल्या ऐहिक सुखसाधनावर गर्विष्ठ होते. तर परमेश्वरानें त्यांस उपहासापरी सांगितलें कीं तुमच्यानें होईल तर तुह्मीं आपल्या त्याच स्थितींत रहा. ह्मणजे नवल नाहीं कीं शिक्षा उतरण्याचे वेळीं तुमची उर्जितावस्था व वैभव पाहून लोक सहानुभूतीनें तुमच्या अहवालाची पृच्छा करतील.

( २ ) सांगावयाचा अर्थ हा कीं, सृष्टि व जें कांहीं तींत आहे त्या सर्वांस जर आह्मांस खेळ व करमणूक करावयाची असती तर आह्मीं खेळासारखाच एकादा खेळ बनवितों. आणि कार्यकारणन्यायाची ज्यांत परंपराच लागून गेलेली व प्रत्येक गोष्टीचा एक विशिष्ट परिणाम व प्रत्येक अणुरेणूंत हजारों युक्त्या गुप्त होत, अशा बुद्धि व युक्ति व व्यवस्थेस अनुसरतें असें जग बनविलें नसतें. सारांश, जगाची रचना खेळापरी असती तर आणखीच कोणा तऱ्हेची असती; प्रचलित स्थितींची नसती.

ठेचून टाकतें; आणि असत्य तें तेव्हांच नाहींसें होऊन जातें. आणि (लोकांनों !) तुम्हांसाठीं (ही) दुःखाची गोष्ट होय कीं तुम्हीं (परमेश्वरा-संबंधानें) अशा गोष्टी उच्चारितां ! १८. आणि जे (दूत) आकाशांत व (जे लोक) पृथ्वींत होत ते त्याचेच (हुकूमबंदे) होत. आणि जे (दूत) त्याच्या समीप होत ते त्याच्या उपासनेपासून अहंकार करीत नाहींत व थकूनहि जात नाहींत. १९. ते रात्रंदिवस त्याच्याच पावित्र्य-वर्णनांत लागलेले होत (आणि) ते आळस करीत नाहींत. २०. कां या लोकांनीं असे उपास्य (देव) पत्करले आहेत कीं ज्यांना हे लोक खुद्द जमिनी(च्या वस्तू माती, दगड वगैरें)तून बनवून उभे करतात ? २१. जर या(पृथ्वी व आकाश)दोहोंत परमेश्वराशिवाय अन्य (कोणी) उपास्य (देव) असते, तर (पृथ्वी व आकाश) हीं दोन्हींहि (केव्हांच) नाश पावून गेलीं असतीं. तर जसजशा गोष्टी हे लोक उच्चारितात, परमेश्वर जो महासिंहासनाचा स्वामी तो तर या(दोष व न्यूनाधिक्या)पासून पवित्र होय. २२. तो जें कांहीं करितो त्याची पृच्छा त्यास केली जाऊं शकत नाहीं. पण लोकांस (त्यांच्या कर्मांची) विचारणा केली जाईल. २३. कां लोकांनीं परमेश्वराशिवाय (इतर) उपास्य बनवून ठेविले आहेत ? (हे पैगंबरा ! तूं या लोकांस) सांग कीं, तुम्हीं आपलें प्रमाण तरी पुढें आणा. जे लोक (माझ्याकाळीं) माझ्यासंगतीं होत त्यांचें पुस्तक (कुराण) आणि जे माझ्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांचीं पुस्तकें (तौरात, इंजील वगैरे) हीं (उपलब्ध) होत. (यांत अन्य कोणी उपास्य आहेत असा आधार दाखवा पाहूं ?) गोष्ट ही होय कीं, यांच्यांतून बहुतेक तर सत्य (गोष्ट) जाणतच नाहींत; म्हणून (जेव्हां सत्याची गोष्ट निघते तेव्हां) हे (लोक) तोंड फिरवून घेतात. २४.

(१) भावार्थ हा कीं, सृष्टि निर्माण करण्यांत अनेक प्रयोजनें होत. त्यांतल्या त्यांत सत्य व असत्य, बरें व वाईट, विश्वास व अविश्वास किंवा नास्तिकपणा, आणि खरें व खोटें हींहि जगांत होत; व यांच्याद्वारें माणसाची परीक्षा पहावयाची असते कीं तो या शत्रूंत कोणाच्या बाजूला होतो. दोघांसहि जरी परमेश्वरानें बनविलें आहे, तरी पण तो सत्याच्या पल्यावर असून सत्यास वर्चस्व देतो. सारांश जगदुत्पत्तींत मनुष्याची परीक्षा पाहणें हाच उद्देश होय.

आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुझ्या पूर्वीं (जेव्हांहि) कोणी पैगंबर पाठविला, तेव्हां त्याला आम्हीं हेंच प्रकट करीत राहिलों कीं, माझ्यावांचून अन्य (कोणी) उपास्य नाहीं; तर (लोकांनों!) माझीच उपासना करा. २५. आणि (कित्येक नास्तिक) म्हणतात कीं, परम दयाळू (परमेश्वर) संतान राखतो; (व देवदूत ह्या त्याच्या मुली होत). तो (या तोहमतीपासून) पवित्र होय. (देवदूत परमेश्वराच्या मुली नव्हेत;) किंबहुना, (ते त्याचे) सन्मान पावलेले सेवक होत. २६. ते त्याच्या पुढें पुढें बोलूं शकत नाहींत, आणि ते त्याचाच हुकूम बजावीत राहतात. २७. यांचा पुढचा व मागचा (सर्व) अहवाल त्याला माहीत आहे; आणि हे (दूत कोणाची) शिफारस (सुद्धां) करूं शकत नाहींत; पण ज्याच्यासाठीं परमेश्वर (त्यांची शिफारस) पसंत करील त्याचीच मात्र. आणि ते त्याच्या धाकापासून (नित्य) भीत राहतात. २८. आणि जो कोणी त्यांच्यांतून हें प्रतिपादन करील कीं परमेश्वर नव्हे किंबहुना मीच उपास्य आहें; तर (हा दूत शापग्रस्त होय कीं) त्याला आम्हीं नरकाग्नीची सजा देऊं आणि अनर्थ करणारांस आम्हीं अशीच सजा देत असतों २९. कां जे लोक नास्तिक होत त्यांनीं या गोष्टीचें अवलोकन केलें नाहीं कीं आकाश व पृथ्वी या दोहोंचा एक जड गोळासा होता; तर आम्हीं (तो तोडून) पृथ्वी व आकाश यांस वेगवेगळालें केलें. आणि पाण्यांतून आम्हीं प्रत्येक प्राणयुक्त वस्तु बनविली. तर कां यावरहि लोक (आमचा) विश्वास धरीत नाहींत? ३०. आणि आम्हींच पृथ्वींत भारी अचल (पर्वत योग्य त्या त्या ठिकाणीं) रोंविले कीं पृथ्वी लोकांसहित (कोणी एकीकडेस) कलून पडूं नये; आणि आम्हींच तींत रुंद रुंद मार्ग बनविले कीं कदाचित् लोक (आपल्या अंतिम साध्याच्या) मार्गास लागतील. ३१. आणि आम्हींच आकाशाचें (सर्व संकटांपासून) सुरक्षित असें छत बनविलें; आणि लोक आकाशाच्या निशाण्यांची मुळींच पर्वा करीत नाहींत. ३२. आणि तोच

(१) म्हणजे जे लोक विश्वासणारे असून सदाचरणांत लागून असतील व परमेश्वर त्यांच्यावर प्रसन्न होईल अशा लोकांची शिफारस देवदूत ईश्वराज्ञेनें करतील व ती मान्यहि होईल.

(परम समर्थ) होय कीं, ज्यानें रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्र हीं निर्माण केलीं; कीं (आकाशमंडलांतील) सर्व (ग्रह आपापल्या) कक्षेंत[1] तरंगत राहतात. ३३. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुझ्या पूर्वीपासून कोणाहि मानवासाठीं शाश्वती राखिली नाहीं, मग जर तूं मरून जाशील, तर कां हे लोक सतत राहणारे आहेत? ३४. प्रत्येक जीव (एक ना एक दिवशीं) मृत्यु-(ची गोडी) चाखणार आहे; आणि (लोकांनों!) आम्हीं तुम्हांस वाईट व बऱ्या स्थितींत (ठेवून) अजमावितों. आणि (अखेर) तुम्हां(सर्वां)स आम्हांकडेच परतून येणें आहे. ३५. आणि (हे पैगंबरा!) नास्तिक लोक जेव्हां तुला पाहतात तेव्हां तर ते केवळ (आपसांत) तुझें हंसें उडवूं लागतात; कीं, हाच का तो (इसम) कीं जो तुमच्या उपास्य(देवां)चा (वाईट प्रकारें) उल्लेख करितो. आणि (खुद्द या नास्तिकांची परिस्थिति ही होय कीं) ते स्वतः परम दयाळू (परमेश्वरा)चे नामस्मरणाचा अव्हेर करतात. (तर खरोखरींच यांच्या मूर्खपणावर हंसलें पाहिजे). ३६. मनुष्य (जणूं काय) उतावळीचा (पुतळा) निर्मिला गेला आहे. (लोकांनों! अमळ दम धरा.) मी लवकरच तुम्हांस आपल्या(परम सामर्थ्याच्या) निशाण्या दाखवून देईन. तर तुम्हीं माझ्याशीं घाई मांडूं नका. ३७. आणि (नास्तिक) म्हणतात कीं जर तुम्हीं (मुसलमान) खरे आहां, तर हें (पुनरुत्थानाचें) वचन केव्हां (पुरें) होईल? ३८. यदि (हे) नास्तिक त्यावेळे(च्या हकीकती)स जाणतील कीं जेव्हां (नरकाग्नि यांना घेऊन घेरील; आणि त्या) अग्नीला ते (समोरून) आपल्या तोंडावरून हटवूं शकणार नाहींत व (मागून) आपल्या पाठीवरूनहि नाहीं आणि त्यांना (कोठून) मदतहि दिली जाणार नाहीं; (तेव्हां मात्र हे घाई मचविणें सोडून देतील.) ३९. (पुनरुत्थानाची घटका येईल ती यांना सांगून थोडीच येईल?)

(१.) कक्षा हा "फलक" या शब्दाचा अर्थ होय. त्याचा अर्थ घेरा, वर्तुल असाहि होतो. आकाशालाहि 'फलक' यासाठींच म्हणतात कीं तो वर्तुलासारखा दिसून येतो. सूर्य व चंद्र यांची गतिहि एका काल्पनिक वर्तुलाकाराचीच आहे व त्यास कक्षा हें शास्त्रीय नांव आहे.

किंबहुना ती एकाएकीं यांच्यासमोर येऊन ठेपेल व यांना थक्क करून सोडील; मग त्यावेळीं हे तिला मागें सारूं शकणार नाहींत व यांना अवकाशहि मिळणार नाहीं. ४०. आणि (हे पैगंबरा!) तुझ्या पूर्वींहि (इतर) पैगंबरांचा उपहास केला जाऊन चुकला आहे तर जे लोक त्यांचा उपहास करीत होते, ते ज्या(शिक्षे)ची टर उडवीत होते, ती त्यांना सादर होऊनच राहिली. ४१. (हे पैगंबरा! या लोकांस) विचार कीं, परम दयाळू (परमेश्वराच्या शिक्षे) पासून रात्रीस व दिवसास तुमचा कोण संभाळ करूं शकतो? (तर यांनीं परमेश्वराला भ्यालें पाहिजे; तथापि भिणें तर एकिकडेच,) पण हे तर आपल्या पालनकर्त्याचें नांव घेण्यापासूनहि तोंड चुकवितात. ४२. का आमच्यावांचून यांचे अन्य (कोणी) उपास्य होत कीं ते यांना (आमच्या शिक्षेपासून) वांचवूं शकतात? (ते काय वांचवूं शकतील संकटप्रसंगीं) ते आपण आपली मदत तर करूं शकतच नाहींत; आणि आम्हांपुढें कोणी त्यांचा साथीहि होणार नाहीं. ४३. तर गोष्ट ही होय कीं आम्हीं या लोकांस व यांच्या वाडवडिलांस (या जगांत) सुखोपभोग करूं दिला; येथपर्यंत कीं (सुखांत) यांच्यावर मोठमोठालीं आयुष्यें लोटलीं. (व हे गर्विष्ट होऊन गेले.) तर का हे लोक या गोष्टीचें अवलोकन करीत नाहींत कीं; आम्हीं मुलुखास त्याच्या चोहोंकडून आकुंचित करीत (व जिंकीत) चालले येत आहों? तर (या परिस्थितींत) हे लोक प्रबळ होत (कीं मुसलमान)? ४४. (हे पैगंबरा! या

(१) नास्तिकांनीं इकडे शिक्षेची घाई मांडली होती व तिकडे पुनरुत्थानाची कीं जें कांहीं होणें असेल तें होऊन जावें.यास उत्तर ह्मणून परमेश्वरानें सांगितलें कीं, घाबरूं नका कीं शिक्षा जी येणार ती आपल्या वेळेवर येईल व पुनरुत्थानहि आपल्या वेळेवर होईल.

(२) इस्लाम धर्माच्या प्रारंभीं मुसलमानांचा समाज फारच दुर्बल होता; व त्यावेळीं त्यांना परमेश्वराकडून प्राबल्य व विजय यांचें शुभ वर्तमान दिलें जात होतें. ह्मणजे इतर प्रमाणांत इस्लामच्या सत्यत्वाचें एक प्रमाण हें भाकीतहि होतें कीं, मुसलमानांचें राज्य कायम होईल. तर नास्तिकांस पाहिजे होतें कीं, इस्लामाचा विजय पाहून त्याच्या सत्यत्वास मानते.

लोकांस) सांग कीं मी तर केवळ प्रकटीकरणानुसार तुम्हांस (ईश्वरीशिक्षेचें) भय सुचवितों. (पण हे लोक बहिरे होत;) आणि बहि[१]र्यांना भय सुचविलें जावें (म्हटलें) तर ते (मुळांत कोणाचेंहि) बोलणेंच ऐकत नाहींत. (तर भीतील काय धूळ!) ४५. आणि (हे पैगंबरा!) जर यांना तुझ्या पालनकर्त्याच्या शिक्षेची (जराशीहि) हवा लागून जाईल, तर ते लाचारीनें बोलूं लागतील कीं हाय! आमचें दुर्दैव! खरो-खरीं आम्हींच जुलमी होतों. ४६. आणि पुनरुत्थानाच्या दिवशीं (लोकांचीं कृत्यें तोलावयासाठीं) आम्हीं खऱ्या न्यायाचे कांटे लावून ठेवूं. तर कोणाहि मनुष्यावर कांहींच जुलूम केला जाणार नाहीं. आणि जर मोहरीच्या दाण्याच्या बरोबरहि (कोणाचें कर्म) असेल, तर आम्हीं तेंहि (तोलण्यासाठीं) आणून हजर करूं. आणि हिशोब घ्यावयास आम्हीं (एकटेच) पुरे आहों. ४७. आणि आम्हीं 'मूसा' व 'हारून' यांस (सत्यासत्यांत) भेददर्शक (पुस्तक म्हणजे तौरात) दिलें; व (सन्मार्गदर्शनार्थ) प्रकाश व (समजावून देण्यास एक) उपदेश-(पर लेख हेहि दिले; पण) अशाच पापभिरु लोकांकरतां; ४८. कीं जे बिन देखतां आपल्या पालनकर्त्याचा धाक बाळगितात आणि ते (पुनरुत्था-नाच्या) घटकेलाहि भितात. ४९. हें (कुराणहि) एक शुभबोध होय कीं आम्हींच तें प्रकटिलें आहे. तर कां तुम्हीं लोक त्यास नाकारितां? ५०. आणि 'इब्राहिमा'ला आम्हीं पहिल्यापासून सन्मार्गबुद्धि दिली होती; व आम्हीं त्याच्या(योग्यते)शीं (खुब) माहीतगार होतों. ५१. जेव्हां त्यानें आपल्या पित्यास व आपल्या ज्ञाती(च्या लोकां)स म्हटलें कीं ह्या मूर्ती कीं ज्यांच्या(आराधने)वर तुम्हीं एकनिष्ठतेनें जमून बसलां आहां त्या आहेत तरी काय? ५२. ते बोलले कीं, आम्हीं आपल्या वाडवडिलांस यांचीच उपासना करतांना पाहात आलों आहों. ५३. ('इब्राहिमा'नें) सांगितलें कीं, निःसंशय तुम्हीं व तुमचे वाडवडील

(१) म्हणजे ज्याप्रमाणें बहिरा मनुष्य आवाज ऐकत नाहीं, त्याचप्रमाणें नास्तिक लोक हेहि अंतःकरणाचे बहिरे होत; कीं ईश्वरीशिक्षेकडून त्यांना भिवविलें जातें. पण ते भीत नाहींत; कां कीं ते ऐकत नाहींत. जर ते ऐकते तर भ्यालेच भ्याले असते.

धडधडीत चुकींत पडून राहिलां. ५४. ते ह्मणाले कीं, तूं आम्हां-पाशीं सत्य गोष्ट घेऊन आला आहेस किंवा तूं थट्टेबाजी करणाऱ्यांपैकीं आहेस ? ५५. (इब्राहिमा'नें) सांगितलें (थट्टेची गोष्ट नव्हे;) किंबहुना आकाश व पृथ्वीचा पालनकर्ता कीं ज्यानें यांस सृष्ट केलें तोच तुमचाहि पालनकर्ता होय; आणि मी ह्याचा साक्षी आहें. ५६. आणि (हळूंच तो हेंहि ह्मणाला कीं) परमेश्वराशपथ ! तुम्हीं पाठ फिरवून निघून जाल त्यानंतर, मी तुमच्या मूर्तीशीं (एक) फंद लढवीन. ५७. सारांश, ('इब्राहिमा'नें) मूर्तीस (तोडून फोडून) तुकडे तुकडे करून टाकिले; परंतु त्यांच्या मोठ्या (मूर्ती)ला यासाठीं (राहूं दिलें) कीं, ते कदाचित् त्याच्याकडेच (दोषारोप करीत) वळतील. ५८. (लोकांस जेव्हां मूर्ति भंगिल्या गेल्याची हकीकत कळली तेव्हां) त्यांनीं ह्मटलें, (अरे !) आमच्या उपास्य देवांशीं हें (उद्धट वर्तन) कोणी केलें ? यांत संशय नाहीं कीं, त्यानें मोठाच जुलूम केला. ५९. (कित्येक) बोलले कीं, एक जवान गडी ज्याला 'इब्राहिम' ह्मणून बोलाविलें जातें त्याला आम्हीं या(मूर्तीं)चा (वाईटप्रकारें) उल्लेख करतांना ऐकिलें आहे. ६०. (लोकांनीं) म्हटलें, बरें तर त्याला (सर्व) लोकांच्या डोळ्यासमोर आणा; कीं (तो जें कांहीं उत्तर देईल) लोक (त्याचे) साक्षी होतील. ६१. (सारांश 'इब्राहिमा'स बोलाविलें गेलें व) लोकांनीं (त्यास)[1] विचारिलें कीं हे 'इब्राहिमा' ! कां आमच्या उपास्य देवाशीं हें (उद्धट वर्तन) तूं केलें आहेस ? ६२. ('इब्राहिमा'नें) म्हटलें, नाहीं ! किंबहुना, हा जो या(सर्वां)त मोठा (देव) होय त्यानें हें काम केलें (असेल) ! आणि जर ह्या (मूर्ति) बोलूं शकत असतील तर यांनाच तुम्हीं विचारून पाहा. ६३. यावर लोक आपल्या जिवाशीं विचार करूं लागले व (आपसांत) म्हणूं लागले कीं, निःसंशय तुम्हींच अन्यायी आहांत. ६४. नंतर (हट्टास पेटून) ते (त्याच अधर्मात) तोंडघशी पाडिले गेले (व 'इब्राहिमा'शीं बोलले

(१) साक्षी होण्याचा अर्थ हा कीं विचार करून व समजून उमजून मला जी गोष्ट खात्रीपूर्वक माहीत आहे ती मी तुम्हांस सांगतों व त्याची साक्षहि पटवून देतों.

**तर हें बोलले कीं) तुला तर माहीत आहेच कीं ह्या (मुर्ति) बोलत नसतात. ६५. ('इब्राहिमा'नें) म्हटलें कीं, तुम्हीं परमेश्वराशिवाय अशा ( वस्तूं )ची उपासना करितां कीं ज्या तुम्हांस कांहीं फायदा पोहोंचवीत नाहींत व तुम्हांस (कोणाहि तऱ्हेचें) नुकसानहि पोहोंचवीत नाहींत. ६६. धिक् होय तुम्हांस आणि ज्या(वस्तूं)ची तुम्हीं परमेश्वराशिवाय उपसना करतां त्यांस ! तर कां तुहीं (इतकेंहि) समजत नाहीं ? ६७. (ते आपसांत) म्हणूं लागले कीं जर तुम्हांला (कांहीं) करावयाचेंच आहे तर तुम्हीं ' इब्राहिमा'ला (अग्नींत)[1] जाळून टाका. आणि आपल्या**

---

(१) भाष्यकार लिहितात कीं, **न**मरूद वा **नि**मरोद या अधर्मी वा नास्तिक राजाच्या आज्ञेनें लोकांनीं एक महिनाभर लांकडें आणिलीं व साठ वार उंचीचा एक मोठा ढीग केला; आणि त्यांत पुष्कळसें तेल ओतलें व चोहोंकडून आग लावून दिली. हजरत **इ**ब्राहमीला हातपाय बांधून एका कावडींत घालून आगींत भिरकावून दिलें. हजरत **इ**ब्राहीम हे अग्नीपावेतों पोहोंचले नव्हते तोंच हजरत **जि**ब्रील दूत येऊन ह्मणाले कीं हे **इ**ब्राहीम! यावेळीं तुह्मांस कांहीं पाहिजे ? त्यांनीं उत्तर दिलें कीं, पाहिजे पण तुह्मांपासून नको. हजरत **जि**ब्रील ह्मणाले कीं ज्याच्यापासून पाहिजे त्यालाच सांगा. ते ह्मणाले कीं तो जाणतो आहे व पाहतो आहे, त्याला सांगावयास नकोच. हजरत **इ**ब्राहिमानें एका परमेश्वरावरच निष्ठा ठेवून कोणाशीं कांहीं गरज ठेविली नाहीं. तेव्हां परमेश्वरानें त्या अग्नीस त्यांच्या प्रीत्यर्थ थंडावा व संरक्षण बनविलें. त्यांचीं सर्व बंधनें जळून गेलीं; व त्या अग्नींत एक मनोहर उद्यान प्रगट झालें. आणि **इ**ब्राहीमांजवळ एक देवदूत येऊन ते त्याशीं बोलत चालत आनंदानें बसले . याप्रमाणें ते सात दिवस होते म्हणतात. **न**मरूदनें त्यांना आपल्या उंच हवेलीवरून पाहिलें तों हजरत **इ**ब्राहीम त्यांत खुशाल बसले आहेत; तेथें थंडगार पाण्याचा एक झराहि वाहतो आहे व एक स्वच्छ घरहि आहे आणि बागेंत चहोंकडे नाना तऱ्हेच्या सुवासिक फुलांचा परिमल हवेंत पसरला आहे. हें पाहून **न**मरूदनें ह्मटलें कीं तुह्मा परमेश्वर खरा सामर्थ्यवान् होय. मी त्याला हवि अर्पण करीन. **इ**ब्राहिमांनीं सांगितलें कीं जोंपर्यंत तूं अधर्मी आहेस तोंपर्यंत हें हवि अर्पून न अर्पून सारखेंच. तें मान्य होणार नाहीं. तरीहि **न**मरूदनें चार हजार प्राण्याचें हविर्दान दिलें. यावरून हेंहि सिद्ध होतें कीं प्राण्यांचें हविर्दान करण्याची वेदोक्त पद्धतिहि

उपास्य (देवां)ची मदत करा. ६८. (सारांश त्या लोकांनीं 'इब्राहिमा'स आगींत झोंकून दिलें.) आम्हीं (अग्नीला) आज्ञा केली कीं, हे अग्नि! 'इब्राहिमा'चे ठायीं तूं थंडावा व संरक्षण (यांस कारणीभूत) होस; (कीं त्याला कोणाहि प्रकारची इजा पोहोंचूं नये. आणि झालेंहि असेंच). ६९. आणि लोकांनीं 'इब्राहिमा'शीं कपट करण्याचा बेत केला होता; पण आम्हीं त्यांनाच (सर्वांत) मोठें नुकसान भोगणारे बनविलें. ७०. आणि आम्हीं 'इब्राहिमा'ला व (त्याच्या सोबत त्यांचा भाचा) 'लूत' याला (आज्ञाभंजक लोकांतून) सुरक्षित काढून ('सिरीया' प्रांताच्या) अशा प्रदेशांत घेऊन गेलों कीं, ज्यांत आम्हीं सकळ जगाच्या लोकांसाठीं (तऱ्हे तऱ्हेचे) आशीर्वाद देऊन ठेविले आहेत. ७१. आणि (ईश्वरोपासनेच्या मोबदला) 'इब्राहिमा'ला आम्हीं (एक पुत्र) दिला; 'इस्हाक'–(कीं ज्याचा त्यानें वर मागितला होता). आणि (पुत्राखेरीज प्रपौत्र) 'याकूब' हा (आपल्याकडून) विशेष. आणि सर्वांसहि आम्हीं सदाचरणी बनविलें. ७२. आणि आम्हीं त्यांना (लोकांचे) पुढारी बनविले कीं ते आमच्या आज्ञेनें (त्यांस) सन्मार्ग दाखवीत होते. आणि आम्हीं त्यांच्याकडे सुकृत्यें करणें व नमाज पढणें व जकात-धर्मकर-देणें या(गोष्टी करण्या)चा आदेश पाठविला; आणि ते (सर्व) आमच्याच उपासनेंत लागून राहिले होते. ७३. आणि 'लूता'लाहि आम्हीं (पैगंबरीचे) अधिकार दिले व ज्ञान(हि दिलें); आणि आम्हीं 'लूता'ला ज्या वस्तीचे लोक अपवित्र कामें करीत होते, त्या वस्तीपासून सोडविलें. यांत शंका नाहीं कीं ते फारच वाईट (व) दुराचरणी लोक होते. ७४. आणि 'लूता'ला आम्हीं आपल्या दये(च्या आश्रयां)त घेऊन ठेविलें; कारण, तो सदाचरणी लोकांपैकीं होता. ७५. आणि (हे पैगंबरा! लोकांस तूं) 'नूह' (चा वृत्तांतहि आठवून दे कीं) जेव्हां त्यानें (आम्हांला) हाक मारली, (व हा फारच) पूर्वीं(चा वृत्तांत होय); तेव्हां आम्हीं त्याचें ऐकिलें; आणि त्याला व त्याच्या (कुटुंबाच्या) लोकांस (महाप्रलयाच्या) मोठ्या

---

फार पुरातन काळची आहे. कारण नमरूद हाहि अग्नि, मूर्ती वगैरे वस्तूंस उपास्य जाणीत होता.

**(बिकट)संकटांतून तारिलें. ७६. आणि जे लोक आमच्या निशाण्यांस पाखंड म्हणत होते त्यांच्या विरुद्ध आम्हीं त्यांची मदत केली. निःसंशय हे(हि फारच) वाईट लोक होते; म्हणून आम्हीं सर्वांस गर्क करून टाकिलें. ७७. आणि (हे पैगंबरा!) 'दाऊद' व 'सुलैमान' (यांचा वृत्तांतहि लोकांस आठवून दे कीं) जेव्हां ते उभयतां, (लोकांचीं कांहीं, मेंढरें) रात्रींच्या समयीं सुटून एका शेतांवर जाऊन पडलीं होतीं त्यावेळीं, त्या शेतासंबंधानें निवाडा करूं लागले, आणि आम्हीं त्यांचा निवाडा प्रत्यक्ष पहात होतों. ७८. (तेव्हां) बापलेकांत मतभेद झाला; आणि आम्हीं (खरा) निवाडा 'सुलैमान' यास समजावून दिला. आणि (एरव्हीं तर) आम्हीं प्रत्येका-**

(१) गोष्ट ही होती कीं, कांहीं मनुष्यांच्या मेंढरांचा कळपचा कळप रात्रीच्या समयीं मेंढपाळाच्या गैरहजीरींत सुटून दुसऱ्या कोणा मनुष्याच्या शेतावर जाऊन पडला. त्यांनीं कांहीं खाल्लें, कांहीं तुडविलें; याप्रमाणें शेताची नासाडी करून टाकिली. शेताच्या मालकानें, ज्यांचीं मेंढरें होतीं त्या लोकांवर हजरत **दाऊद–दाविद्**–पैगंबराच्या कचेरींत फिर्याद मांडली. त्यांनीं चौकशी केली तों जेवढ्या किंमतीचीं मेंढरें होतीं तेवढ्याचेंच शेताचें नुकसान झालें होतें. सारांश, निकालांत त्यांनीं तीं मेंढरें शेतधन्यास देवविलीं. मुकदम्यांतील वादी व प्रतिवादी कचेरींतून जाऊं लागले, तोंच वाटेंत **दाऊद**चे पुत्र, हजरत **सुलैमान** पैगंबर हे त्यांना भेटले;व त्यांनीं त्यांस विचारिलें कीं, बाबानें काय निकाल दिला? तेव्हां त्या लोकांनीं त्याची सर्व हकीकत सांगितली. हजरत **सुलैमान** उभय पक्षांला घेऊन बापाजवळ आले व नम्रतेनें म्हणाले कीं, याशिवाय आणखी कांहीं हुकूम झाला असता तर बरें होतें. हजरत **दाऊद** म्हणाले, मुला! तुझा अभिप्राय काय आहे? ते म्हणाले, माझ्यामतें हा निकाल पाहिजे होता कीं, शेत पूर्वस्थितीवर येऊन प्रफुल्लित व टवटवीत होईपर्यंत मेंढरांच्या मालकानें शेताच्या धन्याची सेवाचाकरी करावी म्हणजे त्याच्या शेतांत राबावें; आणि त्यावेळेपावेतों मेंढरांचें दूध व लोंकर हीं शेतकऱ्यानें घ्यावीं. यानंतर मेंढरांच्या मालकास मेंढरें परत करावींत. बापाला हा निकाल पसंत पडला व तो त्यांनीं बहाल केला. ही गोष्ट या दृष्टीनें संस्मरणीय आहे कीं मुलानें बापाची चूकी काढिली व बापानें न्यायाला जागून ती कबूल केली. भावार्थ हा कीं, थोरानें चूक केली

लाहि निर्णयशक्ति व ज्ञान दिलें होतें; आणि पर्वतास आम्हीं 'दाऊदा'च्या आज्ञाधीन केलें होतें कीं त्याच्या संगतीं (संगतीं त्यांनीं ईश्वर-पावित्र्याचीं) स्तोत्रें गावींत; व (तसेंच) पक्षांसहि (त्याच्या अंकित केलें होतें). आणि आम्हीं (परमसमर्थ आहों; असले असले पराक्रम) करीतच राहतों. ७९. आणि 'दाऊदा'ला आम्हीं तुम्हां लोकांचा एक (लोखंडी) पोषाक (ह्मणजे चिलखत) बनविण्यासहि शिकविलें होतें कीं त्यानें तुमचें तुमच्या (परस्परांच्या) प्रहारापासून रक्षण करावें. तर (लोकांनों!) तुम्हीं (आमच्या या देणगीची) उपकारस्तुति कराल (कीं नाहीं)? ८०. आणि आम्हीं जोराचा वाराहि 'सुलैमाना'च्या आधीन केला होता, कीं तो त्याच्या हुकमानें–ज्या (सिरीया) प्रांतास आम्हीं (तऱ्हेतऱ्हेचे) आशिर्वाद देऊन ठेविले आहेत त्या प्रांताकडे–वाहत जाई. आणि आम्हीं सर्व वस्तूं(च्या स्थिती)शीं माहीतगार होतों. ८१. आणि असुरांतून कित्येक तर असे होते कीं जे 'सुलैमाना'साठीं (समुद्रांत) बुड्या मारीत व ह्याशिवाय दुसरें दुसरें कामहि करीत; आणि आम्हींच त्यांना सावरून होतों; (कीं ते मेहनतीला कंटाळून कोठें पळून जाऊं शकत नव्हते.) ८२. आणि (हे पैगंबरा!) 'अय्युब'(ची ती स्थितिहि आठवण कर कीं) जेव्हां

---

म्हणून लहानानें त्याचें अनुकरण करणें आवश्यक नाहीं; आणि थोरालाहि चुकीवर आग्रह धरून राहणें योग्य नाहीं. येथें ही गोष्ट सांगण्याचा उद्देश, अनेकेश्वरवादी, मूर्तीपूजक व नास्तिक यांस कित्ता घालून द्यावयाचा आहे कीं, त्यांनीं श्रद्धांध होऊन आपले वाडवडील अधर्म करीत होते म्हणून आपणहि अविचारानें अधर्म करूं नये. तर बुद्धीस त्याचें सत्यत्त्व पटल्याशिवाय कुलपरंपरा म्हणून त्याच्या नादीं लागूं नये.

(१) हजरत अय्युब पैगंबर हे फारच सुखवस्तु होते. परमेश्वरानें त्यांस द्रव्य, संतति व आरोग्य वगैरे सर्व प्रकारचें शुभ दिलें होतें. व ते या सुखवस्तुपणांत परमेश्वराची उपकारस्तुति करणाऱ्या सेवकांपैकीं होते. मग पुढें परमेश्वरानें त्यांना संकटद्वारें कसून पाहूं इच्छिलें. द्रव्य, संतति वगैरे साऱ्यांचा फन्ना होऊन गेला. त्यांना स्वतःला कुष्टरोग जडून गेला व असेंहि महशूर आहे कीं, त्यांच्या शरीरांत किडे बुचबुचूं लागले होते. परंतु या परिस्थितींतहि ते परमेश्वराचे आभार मानीत होते. याप्रमाणें ते परीक्षेंत पुरे उतरले म्हणून परमेश्वरानें पूर्ववत् त्यांना सुखवस्तु केलें; किंबहुना त्याहूनहि जास्त सुखी बनविलें.

त्यानें आपल्या पालनकर्त्यास हाक मारली कीं मला (या) रोगानें पिडिलें आहे; आणि तूं सर्व दयाळूंत अतिशय दयाळू आहेस. (तर माझ्या स्थितीवर कृपावलोकन कर.) ८३. तर आम्हीं त्याचें (गाऱ्हाणें ऐकिलें व त्याला जो रोग होता तो आम्हीं दूर केला. आणि त्याला आम्हीं त्याचें कुटुंब (मिळवून) दिलें; किंबहुना त्याच्याबरोबर तेवढेंच आणखीहि. (ही केवळ) आमच्याकडून मेहरबानी होती (कीं जी आम्हीं त्याजवर केली) आणि उपासकांसाठीं (हा वृत्तांत) संस्मरणीय (होय, कीं त्यानें त्यांना उपासनेची अधिकाधिक अभिरुचि होईल). ८४. आणि 'इस्माईल' व 'इद्रीस' व 'जुलकिफ्ल'[१] (यांचा अहवाल आठवण कर; हे) सर्व सहनशील सेवकांपैकीं होत. ८५. आणि आम्हीं या (सर्वां)स आपल्या दये(च्या छाये)त घेतलें. कांहीं शंका नाहीं कीं हे लोक सदाचरणी सेवकांपैकीं होते. ८६. आणि 'जुन्नून'[२] (म्हणजे 'यूनुस' याचें स्मरण कर कीं) जेव्हां तो संतापून निघून गेला व (रागेरागें जातांना मानवीस्वभावानुसार) त्यानें असा तर्क

(१) भाग २३ वा सूरते-सॉदमध्यें जुल्–किफ्ल यावरील टीप पाहा.

(२) जुन्नून याचा शब्दशः अर्थ मासेवाला असा आहे. या नांवानें हजरत यूनुस–योनास–या पैगंबराची प्रसिद्धि होण्याचें कारण हें कीं, यांच्या लोकांनीं यांशीं विरोध केला; येथपर्यंत कीं लोकांस शिक्षा सादर होण्याचा बेत आला; हजरत यूनुस यांनीं त्यांस अगोदरच ही बातमी सांगितली. तेव्हां लोकांनीं शिक्षा येण्यापूर्वींच परमेश्वरापुढें पश्चात्ताप केला व ते धायधाय रडले. म्हणून शिक्षा टळून गेली. तेव्हां त्यांना हा विचार आला कीं, लोक अगोदरच माझा कह्या मानीत नव्हते; आणि आतां तर माझ्याकडे ढुंकूनहि पाहणार नाहींत. म्हणून त्यांनीं इच्छिलें कीं, दुसरी कोणीकडे निघून जावें व या लोकांस तोंडहि दाखवूं नये. वाटेंत एक नदी पडत होती; ह्मणून हे नांवेत बसले. नांव चालतां चालतां एकेजागीं अडकली. नाखवा ह्मणाला, नांवेंत कोणी तरी असा गुलाम आहे कीं, जो धन्यापासून पळून आला आहे; तो उतरेल तर नांव चालेल. फासा टाकून पाहिला तों यूनुन यांचेंच नांव निघालें. त्यानें यांस धरून समुद्रांत फेकून दिलें व माशानें त्यांस गिळून टाकलें. त्यावेळीं यांनाहि आपली चुकी कळून आली व समजले कीं, तो पळालेला गुलाम मीच होय. त्यांनीं पश्चात्ताप केला व त्यांच्या अपराधाची माफी झाली. अंधारे ह्मणजे रात्र, नदी व माशाचें पोट वगैरे मिळून अनेक अंधःकार होते.

केला कीं, आम्हीं त्याच्यावर सत्ता चालवूं शकणार नाहीं. तर (अखेरीस लाचार होऊन) अंधारामध्यें तो मोठ्यानें ओरडूं लागला कीं (हे परमेश्वरा!) तुजवांचून अन्य (कोणी) उपास्य नाहीं; तूं परमपवित्र आहेस; मीच अन्यायकारांपैकीं होतों. ८७. मग आम्हीं त्याचें (गाऱ्हाणें) ऐकिलें व त्याला क्लेशांतून वांचविलें. आणि आम्हीं विश्वासूंस अशाच प्रकारें वांचवून घेत असतों. ८८. आणि 'ज़कारिय्या' (याचें स्मरण कर कीं) जेव्हां त्यानें (पुत्रसंतानाकडून हताश होऊन) आपल्या पालनकर्त्याला हाक मारली कीं, हे माझ्या पालनकर्त्या! मला एकला (म्हणजे निपुत्रिक) सोडूं नकोस; आणि (असा तर) तूं सर्व वारसांत उत्तम (वारस) आहेस. ८९. तर आम्हीं त्याचें (गाऱ्हाणें) ऐकिलें व त्याला 'यह्या' (हा पुत्र) दिला. आणि त्याच्या पत्नीला त्याच्यासाठीं बरी करून टाकिली. हे (वर सांगितलेले) लोक सुकृत्यांत त्वरित धांव घेत होते; आणि आम्हांस (आमच्या कृपेचे) अभिलाषेनें व (आमच्या शिक्षेचे) भीतीनें बोलावीत असत व आम्हांपुढें विनय (व नम्रभाव) प्रदर्शित करीत असत. ९०. आणि त्या ('मर्यम') बाईची (आठवण कर कीं) जिणें आपली लाज सांभाळली; तर आम्हीं तिच्यांत आपल्या आत्म्यांतून फुंकिलें (व तिला पतिवांचून गर्भ राहिला) आणि आम्हीं तिला व तिचा पुत्र ('ईसा') यास सकल सृष्टीसाठीं (आपल्या पूर्ण सामर्थ्याचें) चिन्ह ठरविलें. ९१. (मुसलमानांनो! धर्मदृष्ट्या) हे लोक तुमच्याच समूहाचे होत (व तुम्हां सर्वांचा) एकच समूह (होय); आणि मी तुमचा पालनकर्ता आहें; तर तुम्हीं माझीच उपासना करा. ९२. आणि लोकांनीं आपसांत (मतभेद करून) आपल्या (धर्म-)प्रकरणाचे तुकडे तुकडे करून टाकले. (परंतु अखेर) सर्व आम्हांकडेच परतून येणार आहेत (त्यावेळीं आम्हीं त्यांच्या मतभेदाचा फैसला करूं). ९३. तर जो मनुष्य सुकृत्यें करील व तो विश्वासूहि असेल, तर त्याच्या प्रयत्ना (च्या फलां) ची नकारणी होणार नाहीं. आणि आम्हीं अर्थातच त्याच्या

(१) ह्मणजे तिच्या अंगीं जो वांझपणाचा रोग होता, परमेश्वरानें आपल्या पराक्रमानें तो दूर करून त्या बाईला गर्भधारण करण्याची पात्रता दिली.

नांवानें (तीं) नोंदून ठेवित असतों. ९४. आणि ज्या वस्तीला आम्हीं (तेथील लोकांच्या शिरजोरीमुळें,) विध्वस्त करून टाकलें असेल, ते लोक (पुनरुत्थानाचे दिवशीं आमच्या हुजूर) परतून न येतील हें असंभवित आहे. ९५. पण इतका मात्र विलंब अवश्यच होईल कीं, 'याजूज' व 'माजूज' हे ('जुल्कर्नैन'चें तट बंदीतून) खुले केले जातील; व ते दरेक उंचीवरून भसाभस घसरत चालले येतील. ९६. आणि (पुनरुत्थानचें) सत्य वचन जवळ येऊन ठेपेल; तर एकाएकीं नास्तिकांचे डोळे उघडेचे उघडे राहून जातील. (आणि ते म्हणूं लागतील) अरेरे! आमचें दुर्भाग्य! आम्हीं तर त्या(दिवसा) कडून फसगतींतच राहिलों. तथापि (वास्तविक गोष्ट ही होय कीं) आम्हींच अन्यायकारी होतों. ९७. (त्या दिवशीं हुकूम दिला जाईल कीं आतां) तुम्हीं व ज्यांची तुम्हीं परमेश्वराखेरीस उपासना करीत होतां ते (सर्व) नरकाग्नीचें इंधन (व्हाल; आणि) तुम्हां(सर्वां)स नरकाग्नींत जावें लागेल. ९८. जर हे (तुमचे उपास्य, खरे) उपास्य असते तर ते नरकाग्नींत न जाते. आणि (आतां) तुम्हां सर्वांस त्यांतच निरंतर राहणें आहे. ९९. या लोकांस नरकाग्नींत हाहाकार लागलेला असेल, आणि ते (आपल्या हाहाकाराच्या गलब्यांत) तेथें (दुसऱ्या कोणाची गोष्टहि) न ऐकूं शकतील. १००.* निःसंशय ज्या लोकांकरतां आम्हांकडून (त्यांच्या नशीबीं) पहिल्यानेंच कल्याण (लिहिलें जाऊन चुकलें) आहे, ते-नरकाग्नीपासून दूरच दूर ठेविले जातील. १०१. त्याची झणझणाट देखिल तर त्यांच्या कानांत पडणार नाहीं; आणि ते, त्यांचे जीव इच्छितील त्या (त्या सुखां)त सर्वकाळ राहतील. १०२. आणि त्यांना (पुनरुत्थानाची) बडी भारी धास्तीहि (कोणा प्रकारें) क्लेशयुक्त करणार नाहीं; व दूत त्यांचें (अभिनंदन करीत) सामोरा येतील. (आणि म्हणतील कीं) ज्या दिवसाचें (जगांत) तुम्हांस अभिवचन दिलें जात होतें हाच तर तुमचा तो दिवस होय. १०३. (हा असा एक दिवस होईल कीं) ज्या दिवशीं आम्हीं आकाशांस पत्रांची पुस्ती गुंडाळल्याप्रमाणें गुंडाळून टाकूं. (आणि) ज्याप्रमाणें आम्हीं पहिल्या सृष्टीस प्रथम (निर्माण) केलें होतें त्याचप्रमाणें आम्हीं तिला पुन्हांहि (निर्माण) करूं. (हें एक) वचन (होय कीं ज्याचें पुरें करणें आम्हीं)

आपल्या ठायीं (आवश्यक ठरविलें आहे); अर्थात् आम्हीं (तें पुरें) करूनच सोडूं. १०४. आणि आम्हीं 'तौरात'च्या मागून 'ज़बूर'('दाविदा'चीं गितें) यांत ही गोष्ट लिहून चुकलों आहों कीं माझे सदाचरणी सेवक पृथ्वी(च्या राज्या)चे वारस होतील. १०५. जे लोक (परमेश्वराचे) उपासक होत, त्यांच्यासाठीं खरोखरींच ह्यांत(एक शुभवर्तमान)पोहोचतें करणें होय.१०६ आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तर तुला सकळ जगांच्या लोकांसाठीं केवळ (मूर्त) दया (बनवूनच) पाठविलें आहे. १०७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मजला तर हीच गोष्ट प्रगट केली जाते कीं केवळ एक परमेश्वरच तुमचा उपास्य होय. तर कां तुह्मीं (त्याचे) आज्ञाधारक (सेवक)होतां (कीं नाहीं)? १०८ मग जर (लोक) तोंड फिरवून घेतील तर (तूं त्यांना)सांगून दे कीं, मीं तुम्हां(सर्वां)स एकसारखी सूचना दिली आहे. आणि मीं हें जाणत नाहीं कीं ज्या(शिक्षे)चा तुम्हांशीं वायदा केला जातो (तिचा वेळ) जवळ येऊं लागला आहे कीं (अजून) दूरच आहे? १०९ तो (परमेश्वर) मोठ्यानें ओरडून बोललेली गोष्टहि जाणतो आणि तुम्हीं जें लपवितां तेंहि तो जाणतो. ११०. आणि मी जाणत नाहीं, कदाचित् परमेश्वराला या(अवकाशा)द्वारें तुमचें कसून पाहणें (मंजूर)असेल व (हाहि हेतु असेल कीं)एका (विशिष्ट)कालापर्यंत (या जगांत तुह्मांला) सुखोपभोग (घेऊं द्यावा). १११. (पैगंबरानें लोकांचा दुराग्रह पाहून, अखेर) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! (माझ्या व या नास्तिकांच्या विरोधांत) सत्य सत्य निवाडा करून टाक आणि आमचा (मुसलमानांचा) पालनकर्ता परमदयाळु (परमेश्वर) होय कीं जी (जी ईश्वरनिंदा व तोहमत) तुम्हीं लोक उच्चारितां, त्या विरुद्ध त्याचेंच साह्य मागितलें जातें. ११२.

---

(१) जबूर ह्मणजे दाऊद वा दाविद पैगंबराचीं गितें. पाहा (Psalms) गीत ३७ वर्स २९ यांत हें शुभवर्तमान दिलें गेलें आहे कीं जे लोक ईश्वरोपासना करतील व सदाचरण करतील त्यांनीं पक्कें समजावें कीं, ईश्वरोपासना व सदाचरण यांचें फल केवळ परलोकांवरच अवलंबून नव्हे तर या जगांतहि अशा लोकांस "पृथ्वीचें वतन मिळेल व त्यांत ते सर्वकाळ राहतील."

# अध्याय २२ वा.

## सूरतुल्–हज्ज.

हा अध्याय मक्कानगरींत प्रकट झाला. यांत ७८ आयात–महावाक्यें–आहेत. हज्ज, ह्मणजे मक्कापुरीच्या महायात्रेच्या समयीं जे जे विधि उपयोगांत आणिले जातात,त्यांचें विवेचन यांत आलें आहे. ह्मणून या अध्यायाला हज्जाचें प्रकरण असें नांव देण्यांत आलें.

परम दयाळु (आणि)कृपाळु परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों).

लोकांनों! आपल्या पालनकर्त्या(च्या शिक्षे)स भ्या; (कारण, शेवटच्या) घटकेचा (भू-)कंप ही एक मोठीच (भयंकर) गोष्ट होईल. १ ज्या दिवशीं ती (घटका) तुमच्या नजेरसमोर येऊन ठेपेल, त्या दिवशीं प्रत्येक स्तन पाजणारी (भयामुळें) ज्याला ती स्तनपान करिते त्या(मुला)कडून बेफाम होऊन जाईल व प्रत्येक गर्भवती आपला गर्भ गाळून टाकील; आणि (हे वाचक–श्रोत्या !)तूं लोकांस (गांगरून) निशाधुंद होत्साते पाहशील. आणि वास्तविक पाहतां, ते निशाधुंद झालेले नव्हेत; किंबहुना परमेश्वराची शिक्षा फारच कडक होय. (व तिनेंच त्यांचें देहभान हरपलें असेल.) २. आणि लोकांत कांहीं असेहि होत कीं जे जाणिल्या बुजल्यावांचून परमेश्वरासंबंधानें वाटाघाट करतात व दरेक शिरजोर दुंडेल(सैताना)च्या नादीं लागून जातात. ३. त्या(सैताना)च्या निसबत (परमेश्वराकडून) हा (हुकूम) लिहिला जाऊन चुकला आहे कीं, जो कोणी त्याच्याशीं स्नेह करील, तर हा त्याला बहकवील व त्याला नरकाग्नीचे शिक्षेस पाहोंचवून सोडील ४. लोकांनों! जर तुम्हीं (पुनरुत्थानाचे दिवशीं पुन्हां) जिवंत होऊन उठण्यासंबंधानें कोणाहि तऱ्हेच्या संशयांत असाल, तर आम्हीं तुम्हांस

(प्रथमतः) मातींतून व मग वीर्यबिंदूतून व मग किंचित जमून गेलेल्या रक्ताच्या गोळ्यांतून, नंतर पूर्ण बनलेल्या (सुढाळ) व अर्धवट बनलेल्या (बेडौल) अशा मांसांतून निर्माण केलें; कीं जेणेंकरून आम्हीं तुम्हांवर (आपलें परम सामर्थ्य) जाहीर करावें. (तर विचार करा कीं, तुम्हांस मेल्यावर पुन्हां जिवंत करून उठविणें काय मुश्किल आहे ?) आणि (स्त्रियांच्या) गर्भाशयांत आम्हीं ज्या(वीर्यबिंदू)स इच्छितों त्यास एका नियमित काळापर्यंत स्थिर राखून ठेवितों; तदनंतर तुम्हांस मूल बनवून बाहेर काढितों व मग (तुमचें पालनपोषण करितों) कीं तुम्हीं ( मोठे होऊन) आपल्या भरवयास पोहोंचावें. आणि तुम्हांपैकीं कोणी कोणी तर (पूर्ण वयास येण्यापूर्वींच) मरून जातो व कोणी कोणी सर्वांत अधिक खडतर वया( म्हणजे वृद्धावस्थे)कडे पालटून नेला जातो; कीं (सर्व कांहीं) जाणिल्यापश्चात तुम्हीं (सरशेवटीं साठवून) कांहींच (खाक) समजूं उमजूं नये. आणि (हे वाचक–श्रोत्या !) तूं भूमिला पाहतोस (कीं, ती) कोरडी शुष्क व पडित (पडलेली आहे;) मग जेव्हां आम्हीं तिच्यावर पाण्याचा वर्षाव करितों, तेव्हां ती तरारते व लसलसूं लागते; आणि हरेक प्रकारची छानदार वनस्पति उपजविते. ५. ह्या (सर्व उत्क्रांत्या) या गोष्टींचें प्रमाण होत कीं परमेश्वरच सत्य होय;

---

(१) मानव सृष्टीची ही परंपरा होय कीं मातींतून माणसाचें भक्ष्य उत्पन्न होतें, तें तो खातो व त्यांतून रक्त वगैरे चिजा बनतात;त्यांतल्या त्यांत वीर्य;मग पुरुषाचें वीर्य स्त्रीच्या गर्भाशयांत पडतें व त्यांत हळुहळु घट्टपणा येत जातो. प्रथम किंचित् जमून रक्ताचा गोळा बनतो व मग जास्त घट्ट होऊन मांसासारखा होऊन जातो. ह्या स्थितींत पोहोंचल्यावर निरनिराळीं रूपें व कच्च्या पक्क्या आकृत्यांचा भेद उत्पन्न होतो; कोणी पूर्ण कालावधींत जन्मतो व कोणी त्या मुदतीपूर्वींच जन्मास येतो. कोणाची शारीररचना पूर्ण व साधारण असते आणि कोणाची अपूर्ण व असाधारण असते.

(२) खडतर वयाकडे पालटून नेण्याचा अर्थ हा कीं, प्रथम जन्मतांच मनुष्याची शारीरिक व मानसिक शक्ति कमजोर असते. मग तो हळुहळु बळावत जातो. नंतर ढळत्या वयास पोहोंचून तेथें त्याची वाढ बंद होते व मग त्याची शक्ति कमीकमी होत जाते व त्याला उतरती कळा लागते.

आणि (तसेंच) हें कीं तो (पुनरुत्थानांत पुन्हां) मेलेल्यांस जिवंत करील व हें कीं तो सर्व शक्तिमान् होय. ६. आणि हें कीं, (पुनरुत्थानाची) घटका अवश्य येईलच; त्यांत कोणाहि तऱ्हेचा संशय नाहीं. आणि हें कीं, जे लोक थडग्यांत (गाडलेले पडले) आहेत, (पुनरुत्थानांत) परमेश्वर त्यांना (पुनरपि जिवंत करून) उठवील. ७. आणि लोकांत कोणी कोणी असाहि आहे कीं ज्याला (स्वतः) तर कोणाहि प्रकारचें ज्ञान नाहीं आणि (त्याचे पाशीं) कोणा तऱ्हेचा सद्‍बोध व कोणी असें पुस्तकहि नाहीं कीं जें (त्याला सन्मार्गाचा) प्रकाश दाखवील, असें असूनहि तो परमेश्वरासंबंधीं वाटाघाट करितो. ८ (व लोकांना) परमेश्वराचे मार्गाहून बहकवावें ह्मणून तो (गर्वानें) आपला खांदा फिरवून घेतो. असल्या(अजागळ माणसा)ची (शिक्षा) ह्या लोकींहि फजिती होय; आणि पुनरुत्थानाचे दिवशींहि आम्हीं त्याला जळल्या नरकाग्नीचे शिक्षेची गोडी चाखवूं. ९. (आणि त्याला बजावून सांगूं कीं) जीं (दुष्कर्मे) तुझ्या हातांनीं (पुढील सामुग्रीदाखल) पूर्वी (करून) पाठविलीं होतीं त्या(तुझ्या कर्मा)चा हा मोबदला होय एरवीं परमेश्वर तर (आपल्या) सेवकांवर किंचितहि जुलूम करीत नसतो. १०. आणि लोकांत कोणी कोणी असाहि आहे कीं जो परमेश्वराची भक्ति (तर) करतो, पण वरवरूनच; कीं जर त्याला कांहीं हित पोहोंचलें तर त्यानें तो समाधान पावला. आणि जर त्याच्यावर एखादें संकट ओढवलें तर तो (आलेल्या) तोंडानेंच परतून गेला. यानें इहलोकहि घालवला व परलोकहि. धडधडीत तोट्याची बाब (म्हटली म्हणजे) हीच. ११. परमेश्वराखेरीज तो अशा वस्तूंस (आपली गरज सारण्यास) बोलावितो कीं ज्या त्याला नुकसान पोहोंचवूं शकत नाहींत व नफाहि पोहोंचवूं शकत नाहींत. पराकाष्टेचें बहकणें (म्हटलें तर) तें हेंच. १२. तो अशा वस्तूंस (आपली गरज सारण्यास) बोलावितो कीं ज्यांच्या नफ्यापेक्षां त्यांचें नुकसानच अधिक जवळ होय. कांहीं संशय नाहीं कीं असला पुरस्कर्ताहि

(१) भावार्थ हा कीं खोट्यानाट्या उपास्यांच्या उपासनेपासून फायदा तर कधींच कांहीं होत नाहीं; कारण त्यांस फायदा पोहोंचविण्याची शक्ति नाहीं. राहिलें नुकसान, तें ह्या लोकीं झालें नाहीं तरी मरणाबरोबरच सारी हकीकत

**वाईट, आणि कांहीं शंका नाहीं कीं असला सोबतीहि वाईट! १३. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, कांहीं संशय नाहीं कीं त्यांना (परलोकीं) परमेश्वर (स्वर्गाच्या अशा) बागांत नेऊन दाखल करील कीं ज्यांच्या खालून नद्या वाहत असतील. निःसंशय परमेश्वर जें योजितो तें करून सोडतो. १४. जो कोणी (निराशावस्थेंत परमेश्वरासंबंधानें असें) वहीम धरीत असेल कीं परमेश्वर इहलोक व परलोक यांत त्याची मदत करणारच नाहीं, तर**

---

माहोत होऊन जाईल; आणि त्याची वेळहि कांहीं दूर नाहीं. मरण डोक्यावर उभेंच आहे. अथवा हा अर्थ होईल कीं ज्यांच्या फायद्याहून त्यांचें नुकसानच जास्त लक्षांत येण्यासारखें आहे.

(१) पूर्वींपासूनच मूर्तीपूजकांवर हा आक्षेप चालत येत आहे कीं हे लोक आपल्या गरजा सारण्यास मूर्तींचा धांवा करतात; व वास्तविक पाहतां त्या त्याला कांहींच नफा नुकसान पोहोंचवूं शकत नाहींत. परंतु कोणी एकादा वितंडवादी मनुष्य असलेंच वहीम परमेश्वरासंबंधानेंहि करूं शकतो; कारण कीं जगाचीं सर्व कामें मनुष्याच्या मर्जीप्रमाणें चालत नसतात. याचें उत्तर परमेश्वर असें देतो कीं, या गुमानी मनुष्याचा हेतु हा होय कीं त्यानें आमच्या इराद्याला आपल्या इराद्याच्या ताब्यांत ठेवावें कीं तो जें कांहीं सांगेल तें आम्हीं करीत जावें. पण आम्हीं असें करणारच नाहीं; मग पाहिजे तर आक्षेप आणणारा आपल्या जीवाचा घातच कां करून घेईना. जर आम्हीं आपल्या इराद्याला लोकांच्या इराद्याच्या आधीन करून टाकूं, तर त्याचा अर्थ हा होईल कीं लोकांस आम्हीं आपले पातीदार मानावेत. पण ही दरखास्त मान्य होणें अशक्य आहे. राहिल्या मूर्ती, त्या तर बरेंवाईट कांहींच करूं शकत नाहींत. आम्हीं (परमेश्वर) सर्व कांहीं करूं शकतों. परंतु कांहीं विशिष्ट कारणामुळें आपल्या सत्यसंकल्पानें व आपल्या मर्जीनें लोकांच्या मागण्याप्रमाणें आम्हीं कित्येक कामें करीत नसतों. तीं कामें मूर्तीहि करीत नाहींत; कां तर, त्या करूं शकत नाहींत. आम्हीं करीत नाहीं; कां कीं, आमची करण्याची इच्छा नाहीं. आणि कां करूं इच्छित नाहीं, ही आमची मर्जी; तुमचा आम्हांवर कांहीं जोरा नाहीं. आम्हीं मालक आहों, तुम्हीं सेवक आहां; तुमचें हित कशांत आहे तें आम्हीं पक्कें जाणतों.

त्याला पाहिजे कीं त्यानें आकाशाकडे एक दोर ताणावा (व आपल्या गळ्याला फांस लावावा आणि) मग पृथ्वीशीं आपला संबंध तोडून टाकावा (व लोंबकळून मरावें); नंतर पाहावें कीं त्याच्या (ह्या) युक्तीनें त्याला ज्याचा संताप आला होता तो दूर झाला कीं नाहीं? १५. आणि (जसें हें कुराण आहे) तसेंच आम्हीं तें प्रकटिलें आहे (कीं त्यांत) स्पष्ट स्पष्ट प्रमाणें (होत); आणि यासाठीं (प्रकटिलें आहे) कीं परमेश्वर ज्याला इच्छील त्याला (त्या द्वारें) सन्मार्ग दाखवील. १६. ज्या लोकांनीं विश्वास धरिला आहे (म्हणजे 'मुसलमान') आणि जे 'यहुदी' आहेत ते व साबी'-(नक्षत्रपूजक) व 'ख्रिस्ती' आणि 'मजूस' (म्हणजे अग्निपूजक) व जे लोक (इतरांस) परमेश्वरतुल्य मानतात ते या(सर्वां)च्या दर्म्यान पुनरुत्थानाचे दिवशीं परमेश्वर (त्यांच्या मतांतरांचा) फैसला करून टाकील. निःसंशय परमेश्वर (लोकांच्या) सर्व गोष्टी निरिक्षीत आहे १७. (हे वाचक-श्रोत्या!) कां तूं या गोष्टीकडे नजर केली नाहींस कीं जी (सृष्टि) पृथ्वींत आहे ती आणि सूर्य व चंद्र व नक्षत्रें आणि पर्वत व झाड व चतुष्पाद जनावरें (सर्वच तर) परमेश्वरापुढें साष्टांग नमस्कार घालतात; आणि पुष्कळशीं मनुष्येंहि. आणि (मनुष्यांत) पुष्कळ (असेहि) आहेत कीं त्यांच्यावर (आज्ञाभंगामुळें) शिक्षा (येणें) ठरलेलेंच आहे. आणि परमेश्वर ज्याला तुच्छ करील, तर (मग) कोणीच त्याला सन्मान देणारा नाहीं. परमेश्वरच जें इच्छितो तें करितो. १८. (या जगांत) हे दोन (पक्ष) होत एकमेकांच्या विरुद्ध, (आणि) ते आपसांत आपल्या पालनकर्त्यासंबंधानें झगडतात; (एक पक्ष परमेश्वराला मानतो व एक मानीत नाहीं;) तर जे लोक परमेश्वराला मानीत नाहींत त्यांच्यासाठीं अग्नीचे कपडे बेतविले गेले आहेत; (व ते त्यांना नरकाग्नींत नेसविले जातील; आणि) त्यांच्या शिरांवरून उकळतें पाणी ओतलें जाईल; १९. कीं त्या (च्या उष्णते)नें जें कांहीं त्यांच्या पोटांत आहे तें, (म्हणजे आंतडीं वगैरे) आणि चामडया (सर्व) गळून जातील २०. आणि त्यांच्या (मारण्या)करितां लोखंडाच्या गदा असतील, (कीं त्यांनीं त्यांस चोप दिला जाईल). २१. (आणि नरकाग्नींत) दुःखामुळें जेव्हां जेव्हां (ते कुंठित होतील व) तींतून निघावयास इच्छितील, तेव्हां तेव्हां

ते तींतच पुन्हां लोटून दिले जातील. आणि (त्यांना सांगितलें जाईल कीं आगींत) जळावयाच्या शिक्षेची मजा चाखीत राहा. २२. ज्या-लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांस परमेश्वर (स्वर्गाच्या अशा) बागांत (नेऊन) दाखल करील कीं, ज्यांच्याखालून पाण्याचे पाट वाहत असतील; (व) तेथें त्यांना सोन्याचीं कांकणें लेव-विलीं जातील आणि (हार वगैरेच्या आकारानें) मोतीं. आणि तेथें त्यांचा (नेहमींचा) पोषाकहि रेशमी असेल २३. आणि (हीं सर्व सुखें त्यांना यासाठीं प्राप्त होतील कीं इहलोकांत) त्यांना उत्तम गोष्ट(म्हणजे ईश्वरैक्याचा विश्वास) याची सुबुद्धि दिली गेली होती आणि त्यांना त्या(च परमेश्वरा)चा मार्ग दाखविला गेला होता कीं, जो स्तवण्यास योग्य होय २४ जे लोक नास्तिकपणा करतात व (लोकांस) परमे-श्वराच्या मार्गांत अडथळा करतात आणि सन्माननीय मशीदीं(त जाण्या)पासून (प्रतिबंध करतात) कीं तिला आम्हीं (कांहींच भेदभाव न ठेवतां सर्व) लोकांसाठीं—तेथील राहणारे असोत वा बाहेरील-एकसारखें प्रार्थनालय ठरविलें आहे; (या अडथळा करणाऱ्यांस) आणि तसेंच जे कोणी त्या मशीदींत खोडसाळपणानें नास्तिकपणा करूं इच्छितील त्यांस आम्हीं (परलोकीं) दुःखप्रद शिक्षेची गोडी चाखवूं. २५ आणि (हे पैगंबरा! त्या वेळेचें स्मरण कर कीं) जेव्हां आम्हीं 'इब्राहीमा' च्या (भक्ती) करितां ('काबा') गृहाच्या जागेची स्थापना केली (व आज्ञा-पिलें) कीं माझ्याबरोबर कोणाहि वस्तूला (ईश्वरत्वाचा) भागीदार मानूं नकोस. आणि माझ्या (या) घराला प्रदक्षिणा करणारे व उभे राहणारे व ओणवें होऊन नमन करणारे आणि सांष्टाग नमस्कार घालणारे (म्हणजे नमाज पढणारे) यांजकरितां पाक साफ ठेव. २६. आणि लोकांत 'हज्ज' (यात्रे)चा डांगोरा वाजीव कीं लोक तुजकडेस (पळ घेत) येतील. (त्यांजपैकीं कित्येक तर) पायींपायीं व कित्येक (हर तऱ्हेच्या रोडक्या) रोडक्या स्वाऱ्या ज्या दूरदूरच्या हरेक मार्गानें आलेल्या असतील, त्यांज-वर (स्वार असतील) २७. (या प्रवासांत त्यांचा उद्देश हा होईल) कीं आपल्या फायद्या(म्हणजे व्यापारा)साठीं(हि वेळेवर) येऊन हजर व्हावें आणि (तसेंच) परमेश्वरानें जीं चतुष्पाद जनावरें त्यांना दिलीं आहेत

(तीं बळी देतांना त्या) नियमित दिवसांत त्यांजवर त्यांनीं परमेश्वराचें नांव घ्यावें. तर (लोकांनों!) यज्ञा(च्या मांसां)तून तुम्हींहि खा आणि संकटपीडित (व) अन्नास मोताद अशासहि खाऊं घाला. २८. नंतर लोकांस पाहिजे आहे कीं (यज्ञानंतर) आपला मळ (जो 'एहराम'च्या दिवसांत अंगावर जमून गेला असेल तो) उतरून टाकावा व आपले नवस पूर्ण करावेत आणि पुरातन (उपासनालय म्हणजे 'काबा')गृहाला प्रदक्षिणाहि घालावी २९. (एक गोष्ट तर) ही (झाली); आणि (याव्य-तिरिक्त) जो कोणी ईश्वराज्ञापित (सर्व) सन्माननीय वस्तूंचा आदर व महिमा ठेवील, तर हें त्याच्या पालनकर्त्यासमीप त्याच्यासाठीं उत्तम होय. आणि (मुसलमानांनों! कुराणांतून) ज्या वस्तू तुम्हांस वाचून ऐकविल्या जातात (म्हणजे आपोआप मेलेले व डुकर वगैरे) या शिवाय (इतर) सर्व चतुष्पाद जनावरें तुम्हांसाठीं हलाल (म्हणजे विहित) होत. आणि (मूळधर्म तर हा होय कीं) मुर्तींच्या(उपासनेच्या)दुर्गंधीपासून जपून राहा व (तसेंच) खोटी गोष्ट बोलण्यापासूनहि जपा. ३०. (फक्त) एका परमेश्वराचेच होऊन राहा; त्याचा (कोणालाहि) सरकतदार मानूं नका आणि जो कोणी (एकाद्याला) परमेश्वराचा पातीदार बनवील तर (त्याची स्थिति अशी होय कीं) जणूं तो आकाशावरून खालीं पडला, मग (कां तर) त्याला (वाटेंतून शिकारी) पक्षी उचलून घेऊन जातील

(१) नियमित किंवा माहीत असलेले दिवस म्हणजे यज्ञाचे तीन दिवस होत. हज्ज-यात्रेची चाल इस्लामधर्माहूनहि फार प्राचीनची आहे. परंतु त्यांत पुष्कळ खराब व वेडगळ प्रकार दाखल झाले होते. इस्लामधर्मानें या पवित्र यात्रेस वाईट व वेडगळ चाली दूर करून भक्तीचें स्वरूप आणिलें; आणि यज्ञ व बलीदान हीहि एका प्रकारची भक्तिच होती. म्हणूनच यज्ञयागाला वेदांतहि अग्रस्थान दिलें आहे तें योग्यच होय. तर भावार्थ हा कीं, लोक भक्तीपरीं काबागृहाची यात्रा करतील; आणि या हंगामीं लोकांचा मोठा जमाव होत असतो म्हणून व्यापारउदीमाचाहि फायदा घेतील.

(२) यांत यज्ञ व प्रदक्षिणा याशिवाय हज्ज-यात्रेंत आणखी जीं मुख्य कामें आहेत तींहि करावींत या गोष्टीकडे इशारा आहे.

अगर त्याला वारा कोणा दूरच्या जागीं नेऊन टाकील. ३१. (एक गोष्ट) ही (झाली); आणि (याशिवाय) जो कोणी परमेश्वराच्या ठराविक वस्तूंचा (म्हणजे उदाहरणार्थ हज्जच्या यज्ञाचा) आदर व महिमा ठेवील; तर हें अंतःकरणांच्या (पूज्यबुद्धिजन्य) भयाचें (द्योतक) होय. ३२. या (चतुष्पाद जनावरां)त एका नियमित काळापर्यंत तुम्हां लोकांचे फायदे होत; नंतर (जेव्हां तुम्हीं त्यांना यज्ञासाठीं नामनिर्दिष्ठ करून टाकलें तेव्हां) पुरातन (उपासनालय म्हणजे 'काबा')गृहापाशीं (जाऊन) त्यांस हलाल (बळी) झालें पाहिजे. ३३. आणि प्रत्येक जनतेसाठीं आम्हीं बलिदान ठरविलें होतें; कीं जेणेंकरून परमेश्वरानें त्यांना जे चतुष्पाद पशु देऊन ठेविले आहेत त्यांजवर (बळी देतेवेळीं) त्यांनीं परमेश्वराचें नांव घ्यावें. तर (लोकांनों!) तुम्हां सर्वांचा परमेश्वर तोच एक परमेश्वर होय; म्हणून त्याच्याच आज्ञाधीन बनून राहा. आणि (हे पैगंबरा!) विनयशील सेवकांस (स्वर्गाचें) शुभ वर्तमान ऐकीव ३४. (म्हणजे जे लोक) असे (सुशील होत) कीं जेव्हां परमेश्वराचें नांव घेतलें जातें तेव्हां त्यांचीं अंतःकरणें (भयानें) थर कांपतात; आणि जें संकट त्यांच्यावर ओढवतें तें ते (मुकाट्यानें) सहन करतात व नमाज पढतात आणि आम्हीं जें त्यांना देऊन ठेविलें आहे त्यांतून (परमार्थांत) खर्च करतात. ३५. आणि (मुसलमानांनों!) आम्हीं तुम्हांसाठीं यज्ञाच्या उंटांसहि परमेश्वरासाठीं नामनिर्देश केलेल्या (सन्मान्य) वस्तूंपैकीं ठरविलें आहे; त्यांच्यांत तुमचे (अनेक) फायदे होत. तर (या फायद्यांच्या उपकारस्तुत्यर्थ परमेश्वराच्या नांवानें यज्ञ करतांना) त्यांना नीट उभे[3] ठेवून (जबे करा व जबे करते वेळीं)

(१) भावार्थ हा कीं, कोणाहि तऱ्हेनें कां होईना, ह्याचा परिणाम त्यांची जीवहानि होय.

(२) जनावरांचे व त्यांतल्यात्यांत उंटांचे फायदे सर्वांस माहीत आहेत; त्यांचें दूध पितात व दुधापासून तूप, लोणी व अनेक तऱ्हेच्या स्वादिष्ट वस्तु बनविल्या जातात. ते लादण्यास, स्वारीस व जमीन नांगरण्यास उपयोगी पडतात. त्यांचे केस, कातडीं व हाडें कोणतीच वस्तु व्यर्थ जात नाहीं.

(३) उंट उभा ठेवून मारला जातो. त्यांत मारणारास व उंटास दोघांनाहि श्रम पडत नाहींत; व हिंसेचें पातक घडत नाहीं.

त्यांजवर परमेश्वराचें नांव घ्या. मग जेव्हां ते कुशीवाटे खालीं पडतील (व थंडगार होऊन जातील) तेव्हां त्यांतून तुम्हींहि खा आणि संतुष्ट व भिक्षुक अशा(हर तऱ्हेच्या गोरगरिबां)स खावयास द्या. ह्याप्रमाणें आम्हीं हीं (जनावरें) तुम्हांस वश करून दिलीं आहेत कीं कदाचित् तुम्हीं (आमचे) आभार मानाल. ३६. परमेश्वरापावेतों यांचीं मांसें पोहोंचत नाहींत व यांचीं रक्तेंहि नाहींत; किंबहुना त्याजपावेतों तुमचें पापभिरुत्व (व आज्ञापालन) पोहोंचतें. परमेश्वरानें यांस अशा प्रकारें तुमच्या आधीन करून दिलें आहे कीं जेणेंकरून त्यानें जे (हज्जचे नियम शिकवून) तुम्हांस (धर्माचा) मार्ग दाखवून दिला आहे; तर (त्याच्या) या (उपकारा)बद्दल तुम्हीं त्याचा महिमा व गौरव करावा. आणि (हे पैगंबरा! प्रांजल मनानें) सुकृत्य करणाऱ्यांस (स्वर्गाची) सुवार्ता ऐकीव. ३७. परमेश्वर मुसलमानां(च्या शत्रूंस त्यांज)पासून हटवित राहतो. निःसंशय परमेश्वर कोणाहि विश्वासघातकी (व) कृतघ्न जनास पसंत करीत नसतो. ३८. ज्या (मुसलमानां)शीं (नास्तिक) लढतात, (आतां) त्यांनाहि (त्या नास्तिकांशीं लढण्याची) परवानगी आहे; यासाठीं कीं त्यांजवर जुलूम होत आहे. आणि कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर त्यांची मदत करण्यास समर्थ होय. ३९. (हे बापडे असे लोक होत कीं) जे केवळ एवढया गोष्टीच्या बोलण्यावर कीं आमचा पालनकर्ता परमेश्वर होय; (उगीच) हकनाक आपल्या घरांतून काढून लाविले गेले; आणि जर परमेश्वर लोकांस एकमेकांच्या हातून न हटवित राहता तर (खिस्त्यांचे) मठ व देवळें आणि (यहुद्यांचीं) भजनालयें व (मुसलमानांच्या) मशीदी कीं ज्यांत परमेश्वराचें अतोनात नामस्मरण केलें जातें, तीं केव्हांचींच मोडलीं जाऊन चुकलीं असतीं. आणि जो कोणी परमेश्वराची मदत करील, तर परमेश्वरहि अवश्य त्याची मदत करील.

(१) खिस्त्यांत जे लोक जोगी म्हणजे संसार त्याग करणारे होत ते पर्वतांत व अरण्यांत भक्तीप्रीत्यर्थ पडून राहतात; या लोकांच्या राहण्याच्या जागेस 'सौमेआ' म्हणजे मठ म्हणतात. भावार्थ हा कीं धर्मसंरक्षणार्थ लढण्याची परवानगी या साठीं दिली गेली आहे कीं अधर्मी लोकांस धर्माचीं चिन्हें मिटवून टाकतां न यावीं. परंतु तो ईश्वरनिर्मित धर्म असला पाहिजे.

कांहीं शंका नाहीं कीं परमेश्वर बलवंत (व) परम समर्थ होय. ४०. हे लोक (म्हणजे आरंभींचे मुसलमान गांजलेले तर होत; परंतु) जर (सत्ताधीश बनवून) आम्हीं जमीनींत यांचे पाय जमवून टाकूं,तर ते (चांगलींच चांगलीं कामें करतील म्हणजे) नमाज पढतील व जकात देतील; आणि (लोकांस) चांगलें काम करावयास सांगतील व वाईट कामापासून मना करतील. आणि सर्व गोष्टींचा परिणाम तर परमेश्वराच्याच अखत्यारांत होय.४१. आणि (हे पैगंबरा !) जर (हे नास्तिक) तुला पाखंडी ह्मणतील, तर यांच्यापूर्वी 'नूह'चे लोक आणि 'आद' व 'समूद' (हे सर्वच आपापल्या पैगंबरास) पाखंडी म्हणून चुकले आहेत; ४२. आणि 'इब्राहिमा'चे लोक व 'लूत'चे लोक; ४३. आणि 'मद्यन'चे रहिवासी (यांनींहि आपापल्या पैगंबरास पाखंडी ह्मटलें आहे). आणि (तसेंच) 'मूसा'लाहि पाखंडी ह्मटलें जाऊन चुकलें आहे. म्हणून मी (कांहीं काळ) नास्तिकांस अवकाश दिला; मग (अखेर) त्यांना (शिक्षेत) पकडलें. तर (तूं पाहिलेंस कीं) माझा कोप कसा काय झाला (तो) ? ४४. तात्पर्य, कित्येक वस्त्या होत कीं त्यांचा आह्मीं नाश करून टाकिला; आणि वास्तविक पाहतां, त्या अनर्थकारी होत्या. तर आतां त्या (अशा उजाड पडल्या आहेत कीं त्यांच्या भिंती) आपल्या छतांवर (कोसळून) पडल्या आहेत. आणि (कित्येक) विहिरी निकाम्या (पडल्या आहेत) व (कित्येक पक्क्या)पक्क्या हवेल्या (ओसाड पडलेल्या आहेत). ४५. तर कां हे लोक मुलखांत हिंडले फिरले नाहींत ? (हिंडते फिरते,) तर यांचीं अंतःकरणें अशीं असतीं कीं त्यांच्यायोगें ते (प्रत्येक गोष्टीचा परिणाम)समजते उमजते; आणि (यांचे)असे कान (असते)कीं त्यांच्याद्वारें (बोधपर गोष्ट) ऐकते. गोष्ट ही होय कीं डोळे कांहीं आंधळे होत नसतात. किंबहुना अंतःकरणें जीं उरांत असतात तीं आंधळीं होऊन

(१) ह्या शेवटच्या वाक्यावरून या गोष्टीकडे इशारा दिसतो कीं परमेश्वराला मुसलमानांचे पाय जमवावयाचे होते व तो आपला हा इरादा पूर्णतेस पोहोंचवून सोडील. सारांश असेंच झालें.

(२) वर सांगितलेली वस्त्यांची हकीकत लोक डोळे उघडे ठेवून पाहतात पण त्यांस जागृती प्राप्त होत नाहीं. याचें कारण हें कीं, त्यांच्या अंतःकरणांवर

जातात. ४६. आणि (हे पैगंबरा ! हे लोक) तुझ्याशीं शिक्षेची घाई मचविताहेत; आणि परमेश्वर तर कधींच आपल्या वचनाविरुद्ध करणार नाहीं. आणि कांहीं संशय नाहीं कीं तुझ्या पालनकर्त्यासमीप तुम्हां लोकांच्या गणिताप्रमाणें हजार वर्षांच्या बरोबर (शेवटल्या निर्णयाचा) एक दिवस (ठरलेला) आहे. (ह्मणजे पुनरुत्थानाचा दिवस; मग नास्तिकांस यालोकीं शिक्षा झाली नाहीं तर पुनरुत्थानांत तरी होईलच होईल.) ४७. आणि बहुतेक वस्त्या होत कीं ज्यांना मी (कांहींकाळ) अवकाश दिला; व वास्तविक पाहतां, त्या अन्यायकारी होत्या. नंतर (शेवटीं) मी त्यांस (शिक्षेंत) पकडलें. आणि (सर्वांनाच) मजकडे परतून येणें आहे. ४८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं हे लोकांनों ! मी तर तुम्हांस राजरोसपणें (ईश्वरीशिक्षेकडून) भिवविणारा आहे एवढेंच. ४९. मग ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं (याच्या मोबदला) त्यांच्यासाठीं क्षमा व इज्जत अब्रूचा रोर होय. ५० आणि जे लोक आमच्या निशाण्यांशीं हारजीत करावयास झटतात तेच नरकवासी होत. ५१. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुझ्यापूर्वीं कोणी असा पैगंबर पाठविला नाहीं व कोणी असा प्रेषितहि नाहीं कीं ही गोष्ट त्याच्या पुढें आली नसेल कीं जेव्हां त्यानें (आपल्याकडून कोणाहि गोष्टीची) आस्था[1] केली तेव्हां सैतानानें त्याच्या आस्थेंत (भ्रम) घातला; मग

---

ह्याचा कांहींच परिणाम घडत नाहीं. ह्मणून डोळे आंधळे नव्हेत तर अंतःकरणें आंधळीं होऊन जातात.

(१)इस्लामी मताप्रमाणें येथें एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे; ती ही कीं पैगंबर व ऋषि हीं मनुष्यें असतात आणि मानवी प्रवृत्त्यानुसार तेहि कित्येक आस्था बाळगून असतात. परंतु त्यांतून कांहीं आस्था पूर्ण होतात व कांहीं होत नाहींत. म्हणून कित्येक लोक त्यांच्या पैगंबरीच्या पदवींत शंका करूं लागतात. पण वास्तविक पाहतां, ही खुद्द लोकांचीच चुकी आहे कीं ते पैगंबरीचा अर्थ नीट समजले नाहींत. असले प्रसंग आमच्या पैगंबरावरहि आले आहेत. कारण परमेश्वर भविष्याच्या कित्येक गोष्टी प्रसंगानुसार व योग्य वाटतील त्या आपल्या पैगंबरांवर जाहीर करतो. परंतु पैगंबरांना व साधुसंतांना भविष्यज्ञान सर्वस्वींच असतें ही चुकीची समजूत आहे; म्हणूनच या ज्ञानाच्या अभावीं कित्येकांची

(शेवटीं) परमेश्वरानें सैतान जो (भ्रम) घालतो तो दूर केला आणि आपल्या निशाण्यांस मजबूत करून टाकिलें. आणि परमेश्वर (सर्वांच्या स्थितीचा) ज्ञाता (व) बुद्धिमान् होय. ५२. (अशा बाबतींत परमेश्वराला हें मंजूर असतें) कीं सैतान जो (भ्रम) घालतो त्या(भ्रमा)ला ज्या लोकांच्या मनांत (अश्रद्धेचा) रोग आहे आणि ज्यांचीं अंतःकरणें कठोर आहेत त्या लोकांची कसोटी (पाहण्याचें साधन) बनवावें. आणि कांहीं संशय नाहीं कीं (हे) जालिम (म्हणजे नास्तिक) तर पराकाष्ठेच्या विरोधांत (पडले) आहेत. ५३. आणि (हे पैगंबरा! तसेंच अशा प्रकरणांत परमेश्वराला) हें (मंजूर असतें) कीं ज्या लोकांस ज्ञान दिलें गेलें आहे, त्यांनीं जाणून घ्यावें कीं प्रकटीकरण सत्य (होय) व तें तुझ्या पालनकर्त्याकडून (झालें) आहे; तर (हें समजून) त्यांनीं त्याचा विश्वास धरावा आणि त्यांचीं अंतःकरणें (नम्र होऊन) परमेश्वरापुढें शरण जाऊं लागावींत. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला आहे कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर त्यांस सरळ मार्ग दाखवीत असतो. ५४. आणि जे लोक नास्तिक होत ते तर कुराणाकडून नेहमीं संशयांतच राहतील, येथपर्यंत कीं (पुनरुत्थानाची) घटका एकाएकीं त्यांच्या (शिरा)वर येऊन ठेपेल; अगर(असें म्हणा कीं एका मोठ्या)अभागी दिव-

---

पैगंबर व ऋषि यांजवरची श्रद्धा कमी होत जाते. उदाहरणार्थ, पैगंबर साहेबांस एक स्वप्न आलें कीं मी मक्का सोडून अशा वस्तींत जाऊन राहिलों आहे कीं जींत खजुरीचीं झाडें पुष्कळ आहेत. त्यांनीं विचार केला कीं ती वस्ती हजर अथवा यमामा असेल; पण ती मदिना निघाली. तर ही पैगंबर साहेबांची आस्था होती. तें ईश्वरी प्रकटीकरण नव्हतें कीं त्याच्या उलट कधीं होतच नाहीं. अशा प्रकारच्या आस्थेंत भ्रम होतो म्हणूनच ईश्वरानें प्रकट केलेल्या निशाण्यांची मजबुती झाली. कारण प्रकटीकरण ज्याला अरबींत 'वह्य' म्हणतात त्याच्या उलट कधीं झालें नाहीं व होऊंहि शकत नाहीं.

(१) 'अकीम'चा शब्दशः अर्थ वांझ होय म्हणजे ज्या स्त्रीला पुत्रसंतान होत नसते ती. आणि अरबी भाषेंत इच्छेविरुद्ध ज्यांत अपेश येतें त्या दिवसालाहि अभागी म्हणजे अपेशी दिवस बोलण्याचा परिपाठ आहे. हा दिवस बहुतकरून पुनरुत्थानाचा दिवस होईल; कदाचित् बद्रच्या लढाईचा दिवस

त्याची शिक्षा त्यांच्यापुढें येईल;५५. (कीं) हुकमत त्यादिवशीं परमेश्वराचीच होईल. तो लोकांत (त्यांच्या परस्पर विरोधांचा) फैसला करून टाकील. तर ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं ते ऐष-आरामाच्या बागांत असतील. ५६. आणि जे लोक नकारणी करीत व आमच्या निशाण्यांस पाखंड म्हणीत राहिले हेच तर (ते दुर्दैवी) होत कीं ज्यांना अपमानकारक शिक्षा होईल. ५७. आणि ज्या लोकांनीं परमेश्वराच्या मार्गांत देशत्याग केला व नंतर (धर्मार्थ) मारिले गेले अगर (आपल्या मरणीं) मेले, त्यांना परमेश्वर (परलोकीं) अवश्य उत्तम अन्न संपत्ति देईल. आणि कांहीं शंका नाहीं कीं परमेश्वरच (इतर) अन्नदात्यांहून उत्तम (अन्नदाता) होय. ५८. तो त्यांना (स्वर्गांत नेऊन) अशा जागीं दाखल करील कीं ज्यानें ते खुश होऊन जातील.आणि कांहीं शंका नाहीं कीं परमेश्वर(सर्वांच्यास्थितीचा)ज्ञाता(आणि) सहसा न रागावणारा असा होय. ५९. हें (तर आपल्या वेळेवर असेंच होऊन राहील) आणि ज्या मनुष्यानें जितका तो (शत्रूच्या हातून) सताविला गेला होता तितकेंच (शत्रूला) सताविलें; व नंतर (शत्रूकडून) त्यांच्यावर (पुन्हां) अत्याचार झाला तर या (गांजलेल्या)ची परमेश्वर अवश्य मदत करील. कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर करुणाशील (व) क्षमावंत होय. ६०. ही (मदत जी या गांजलेल्यास दिली जाईल ती) यामुळें होय कीं परमेश्वर (आपल्या मर्जीनें) रात्रीला दिवसांत दाखल करीत असतो आणि दिवसाला रात्रींत दाखल करीत असतो; आणि (तसेंच) यामुळें कीं परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) पाहतो. ६१.

---

अगर दुष्काळ यांकडेहि इषारा होऊं शकेल.कारण बद्रचे लढाईत मुसलमान फारच थोडे व तयारीवांचून होते; आणि मक्केचे नास्तिक मोठ्या तयारीनें चढून आले होते. तरीहि नास्तिकांचा पराभव झाला व त्यांचे मोठमोठे सरदार रणांत पडले. शिवाय हा तो दुष्काळ असावा कीं, पैगंबरसाहेबांच्या शापानें सारखीं सात वर्षें असा दुष्काळ पडला कीं, लोकांना मुडदार खाणें भाग पडलें.

(१) भावार्थ हा कीं, नास्तिकांनीं मुसलमानांस मोठमोठाल्या इजा दिल्या. पण मुसलमान होतांहोईतों मुकाट्यानें सहन करीत राहिले. आणि जेव्हां त्यांच्यांत जरा जीव आला तेव्हां कित्येक प्रसंगीं त्यांनीं सूडहि उगविला.

**(आणि तशीच) ही (मदत जी गांजलेल्यास दिली जाईल ती) या कारणें होय कीं परमेश्वरच सत्य (व सत्याचा पुरस्कर्ता) होय; आणि ज्या(देवां)स (हे नास्तिक) परमेश्वराला सोडून (आपली गरज पुरविण्यास्तव) बोलावितात, ते (सर्वोपरी) मिथ्या होत. आणि (तसेंच) या कारणें कीं परमेश्वरच महिमाशाली (व सर्वांत) मोठा होय. ६२. (हे वाचक–श्रोत्या!) कां तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वर आकाशांतून पाणी वर्षवितो; मग (पाणी वर्षविल्यावर) जमीन हिरवी गार होऊन जाते. निःसंशय परमेश्वर (सेवकांच्या स्थितींवर) मेहरबान (व त्यांच्या गरजांचा) जाणता होय. ६३. जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें त्याचेंच होय. आणि कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वरच (खरा) निरपेक्ष व स्तुत्य होय. ६४. (हे वाचक–श्रोत्या!) कां तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वरानें जमिनींत ज्या (वस्तु) आहेत त्या सर्व, तुम्हांलोकांच्या ताब्यांत करून दिल्या आणि (मुख्यत्वेंकरून) गलबत जें त्याच्या हुकमानें समुद्रांत वाहतें तेंहि. आणि (तोच) आकाशाला जमिनीवर पडण्यापासून सावरून आहे; पण (तो हुकूम देईल तर)**

---

नास्तिकांस पाहिजे होतें कीं, सुडाच्या मर्यादेपावेतों पुढें अत्याचार न करते; कारण सूडाचे मर्यादेपर्यंत तर बदला होता, परंतु त्यांनीं मुसलमानांस सुखानें बसूं दिलें नाहीं व त्यांजवर अत्याचार करूं लागले. तेव्हां मुसलमान गांजले गेले आणि परमेश्वरानेंच त्यांची मदत करण्याचा वायदा केला. यांत विजयाचें शुभवर्तमान आहे. आणि त्याचें कारण रात्र व दिवसाच्या दृष्टांतावरून सांगितलें कीं, जो परमेश्वर रात्र व दिवस यांस घटवितो व वाढवितो आणि आकाशमंडळांतील ग्रहांवर ज्याची हुकमत चालते त्याच्या सामर्थ्यापुढें नास्तिकांचें जेर होणें व मुसलमानांचें प्रबल होणें ही कांहींच गोष्ट नाहीं. रात्रीनें ज्या देशांवर नास्तिकपणाचा अंधःकार पसरला आहे ह्मणजे नास्तिकांचे कबज्यांत आहेत त्या देशाकडे इशारत आहे; आणि दिवसानें मुसलमानांच्या अमलदारीकडे इषारा होय.

(१) खगोलवेत्त्यांस शोधांतीं माहीत झालें आहे कीं चंद्र तर, असो, आमच्या पृथ्वीपेक्षांहि लहान आहे; परंतु इतर आकाशग्रह, येथपावेतों कीं लहान लहान तारे जे तकाकतात ते पृथ्वीपासून लाखों कोस दूर असून आपल्या

त्याच्या हुकमानें (तें एव्हांच धडदिशी पडून जाईल.) कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर मनुष्यांवर मोठी करुणा ठेवितो (व) मेहरबान होय. ६५. आणि (लोकांनों!) तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें (प्रथमारंभीं) तुमच्यांत जीव घातला. मग (तोच) तुम्हांस मारतो व नंतर (याचप्रमाणें पुनरुत्थानाचे दिवशीं) तुम्हांस जिवंतहि करील. कांहीं संशय नाहीं कीं माणूस फारच अनुपकारी होय. ६६. (हे पैगंबरा!) आम्हीं दरेक जनतेकरितां (भक्ती)चे मार्ग कायम केले कीं ते त्यांवर चालतात; तर (तुझ्या काळच्या) या लोकांस पाहिजे आहे कीं (इस्लामधर्माच्या) कोणाहि बाबतींत त्यांनीं तुझ्याशीं झगडा करूं नये. आणि तूं आपल्या पालनकर्त्याकडे (लोकांस) बोलावित चालला जा. कांहीं संशय नाहीं कीं तूं सरळ मार्गावर आहेस. ६७. आणि (यावरहि) जर (हे लोक) तुझ्याशीं झगडतील तर (यांना) सांगून दे कीं जें कांहीं तुम्हीं करितां परमेश्वर त्याशीं खूप वाकब आहे. ६८. (लोकांनों!) ज्या गोष्टींत तुम्हीं (जगांत) आपसांत मतभेद करीत राहिलां आहां पुनरुत्थानाचे दिवशीं परमेश्वर तुमच्यांत त्या झगडयांचा निवाडा करून टाकील६९. (हे पैगंबरा!) कां तूं जाणीत नाहींस कीं जें कांहीं आकाशांत व पृथ्वींत आहे त्याशीं परमेश्वर खूप वाकब होय. (ह्यांत कांहीं) संशय नाहीं कीं ह्या (सर्व गोष्टी 'लौहे महफूज़' या) पुस्तकांत (लिहून ठेवलेल्या) होत. (आणि यांतहि कांहीं) संशय नाहीं कीं हें (सर्व कांहीं) परमेश्वरास सोपें होय. ७०. आणि (नास्तिक) परमेश्वराला सोडून अशा वस्तूंची उपासना करतात कीं ज्यांच्यासाठीं परमेश्वरानेंच एकादें प्रमाण पाठविलें नाहीं व यांच्यापाशींहि याचा कोणी ज्ञानोक्त पुरावा नाहीं. आणि (पुनरुत्थानांत असलेल्या) अन्यायकाऱ्यांचा कोणीहि मदतगार

---

परीं वेगवेगळालीं जगें आहेत; आणि आमची पृथ्वी त्यांच्या पुढें एका मोठ्या रांजणांत राईच्या दाण्याप्रमाणें होय अथवा याहूनहि कमीच. हे सर्व ग्रह चक्कर खात राहतात व अशा व्यवस्थितपणें फिरतात कीं एकमेकांशीं टक्कर घेत नाहींत. जोतिषी कधीं कधीं बसल्या बसल्या अशी भीती दाखवितात कीं अमूक ग्रह पृथ्वीच्या जवळून पसार होईल आणि कदाचित् पृथ्वीशीं टक्कर खाईल. तसें अजून घडलें नाहीं. पण पुनरुत्थानाच्या जवळ जवळ असेंच घडून येईल.

होणार नाहीं. ७१. आणि (हे पैगंबरा !) जेव्हां यांना आमचीं स्पष्ट स्पष्ट महावाक्यें वाचून ऐकविलीं जातात तेव्हां तूं (या) नास्तिकांच्या तोंडावर नाखुशी(चीं चिन्हें) पाहतोस; (येथपावेतों कीं) जे लोक यांना आमची महावाक्यें वाचून ऐकवितात त्यांजवर हे लोक जवळ-जवळ हल्ला करूं लागतात. (हे पैगंबरा! तूं यांना) सांग कीं याहूनहि अधिक वाईट कां तुम्हांस (आणखी एक वस्तु) दाखवूं ? (तर घ्या, ऐका, तो) नरकाग्नि (होय). परमेश्वर नास्तिकांस त्याचा वायदा करतो आणि (तें फारच) वाईट ठिकाण होय. ७२. अहो लोकांनों ! एक दृष्टांत सांगितला जातो, तर तो कान लावून ऐका. परमेश्वराला सोडून ज्यांस तुम्हीं बोलावितां ते एक माशीहि पैदा करूं शकत नाहींत; आणि (मग पाहिजे तर) तिच्या(पैदा करण्या)साठीं (सारेचे सारे) एकत्रच (कां) होऊन जाईनात ! आणि जर माशी यांच्यापासून एकादी वस्तु हिरावून घेऊन जाईल तर ते ती तिजपासून सोडवूं शकत नाहींत. (किती तरी) निर्बल हे (देव)कीं जे (माशीच्या) मागें पडतात (व तिला पकडूं शकत नाहींत); आणि (किती तरी) ती निर्बल (बापडी माशी) कीं जिचा पिच्छा केला जातो (व मगाहि ती हातीं येत नाहीं) ! ७३. या लोकांनीं परमेश्वराची जशी किंमत जाणिली पाहिजे होती तशी जाणि-लीच नाहीं. (एरवीं)परमेश्वर महाबलवान (आणि सर्वांत)प्रबल होय.७४. परमेश्वर देवदुतांतून (कित्येकांस आपले हुकूम) पोहोंचविण्यासाठीं निवडून घेतो; आणि (ह्याच प्रमाणें कित्येकांस) मनुष्यांतूनहि; कारण कीं परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो(व सर्वांच्या स्थितीचें)निरीक्षण करितो ७५. तो यांच्या पुढील व यांच्या मागील (सर्व) अहवाल जाणतो. आणि सर्व कामांची मदार परमेश्वरावरच होय. ७६. मुसलमानांनों ! (परमेश्वराच्या सेवेंत) ओणवे होऊन नमन करा व साष्टांग नमस्कार घाला आणि आपल्या पालनकर्त्यांची भक्ति करा व सुकृत्य करीत रहा कीं तुम्हीं (सर

(१) आह्मीं पिच्छा करणारे व इच्छा दाखविणारे देव ह्मणजे मूर्ती आणि जिचा पिच्छा केला जातो व जिची इच्छा बाळगिली जाते ती माशी असा अर्थ घेतला आहे. दुसरा अर्थ हाहि होऊं शकतो कीं मूर्तीपूजक इच्छिणारे आणि मूर्ती इच्छित वस्तु. अर्थ दोहों प्रकारें नीट लावतां येतो.

शेवटीं आपल्या) मनोरथांत सफल व्हाल. ७७. आणि परमेश्वरा(च्या मार्गा)त जसा प्रयत्न करण्याचा हक्क आहे तसे प्रयत्न करा. त्यानेंच तुम्हांस (ह्या जगाच्या लोकांतून) निवडून घेतलें; आणि धर्मासंबंधानें तुम्हांवर कोणाहि तऱ्हेची सक्ति केली नाहीं. तुमचा बाप 'इब्राहीम' याचा (जो) धर्म (होता त्याचीच त्यानें तुम्हांकरतां योजना केली). त्या (परमेश्वरा)नेंच (पूर्वींच्या पुस्तकांत) पहिल्यानेंच तुमचें नांव मुसलमान (म्हणजे आज्ञाधारक सेवक) ठेविलें, आणि ह्या (कुराणां)तहि; अशासाठीं कीं 'रसूल'–महाप्रेषित–तुम्हांवर साक्ष व्हावा आणि तुम्हीं (इतर) लोकांवर साक्ष व्हावें. तर नमाज पढा आणि जकात द्या; आणि परमेश्वराचा आश्रय धरा; तोच तुमचा पुरस्कर्ता होय. तर (तो किती तरी) उत्तम पुरस्कर्ता व (किती तरी) उत्तम मदतगार होय! ७८.

---

(१) साक्ष होण्याचा हेतु प्रमाण पटवून पदरीं माप घालणें हा होय आणि प्रमाण पटविण्याचा उद्देश हा कीं, ज्याच्या पदरीं माप घातलें जातें त्याला निमित्त पुढें करण्यास जागा राहूं नये. तर परमेश्वरानें कलियुगाच्या पैगंबराला पाठवून आम्हां मुसलमानांवर आपलें प्रमाण पूर्ण केलें. कारण, ते पैगंबर ह्मणजे हजरत मोहंमद साहेब हे असा सोपा धर्म घेऊन आले कीं, तो साधा, सहज लक्षांत येणारा, बुद्धिस पटणारा व निसर्गनियमांस अनुसरता असा आहे. तो धर्म मान्य करण्यांत आह्मांला कोणतीच सबब सांगण्याचा वाव राहिला नाहीं. ज्याप्रमाणें पैगंबर पाठविण्यानें परमेश्वरानें आह्मां मुसलमानांवर आपलें प्रमाण सिद्ध केलें, त्याप्रमाणें आमचा इस्लाम धर्म न स्वीकारण्यानें इतर लोकांवर परमेश्वराचें प्रमाण पूर्ण झालें. कारण, आह्मी जशीं मनुष्यें आहोंत तशींच तींहि मनुष्यें आहेत. जसें आह्मांला देहभान आहे तसेंच त्यांनाहि आहे, आणि जशी आम्हांला बुद्धि दिली गेली आहे तशीच बुद्धि त्यांनाहि दिली गेली आहे; तर मग त्यांना कोणतीच सबब सांगण्यास उरली नाहीं कीं आह्मीं इस्लामधर्म स्वीकारावा व त्यांनीं तो स्वीकारूं नये.

# पवित्र कुराण

## भाग अठरावा.

## अध्याय २३ वा.

## सूरतुल्–मोमिनून.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ११८आयात–महावाक्यें आहेत. ह्यांत " मोमिनून " ह्मणजे विश्वासू वा श्रद्धावान् मुसलमानांचें निरूपण केलेलें आहे ह्मणून याला हें नांव दिलें गेलें आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों)**

विश्वासू (आपल्या) मनोरथांत सफल होऊन गेले १. (आणि हे)
असे (लोक होत कीं) जे आपल्या 'नमाजींत' नम्रता दाखवितात; २.
आणि जे निरर्थक गोष्टीकडून तोंड फिरवितात; ३. आणि जे जकात
देत असतात; ४. आणि जे आपली लाज सांभाळतात ५. पण
आपल्या पत्न्या अगर आपले उजवे हात ज्या(दासीं)चे मालक आहेत
त्यांजपासून नव्हे. कां कीं (यांच्यांत) त्यांच्यावर कांहीं दोष नाहीं. ६.
परंतु जे या पलीकडे इच्छा करतील तर तेच लोक (धर्मशास्त्राचे) मर्यादे
बाहेर निघालेले होत. ७. आणि जे आपल्या अमानती व आपलें
वचन पाळतात; ८. आणि जे आपल्या नमाजी(चे वेळ) सांभाळतात.९.
हेच लोक ('आदम'चे अस्सल) वारिसदार होत; १०. कीं जे

(१) परमेश्वरानें आदमला निर्माण करून त्यांस राहण्यासाठीं स्वर्गलोक दिला होता. नंतर आदमाचे हातून एक अपराध झाला कीं त्यांनीं मनाई

**'फिरदोस'-आनंदलोका-चें वतन पावतील व ते त्यांतच नित्य राहतील. ११ आणि आम्हीं माणसाला मातीच्या सत्त्वांतून बनविलें. १२. (व) मग आम्हींच त्याला सुरक्षित जागीं (म्हणजे स्त्रीच्या गर्भाशयांत) वीर्यबिंदु बनवून ठेविलें. १३. नंतर आम्हींच वीर्यबिंदूचें जमलेलें रक्त बनविलें; (व) मग आम्हींच जमलेल्या रक्ताचा मांसाचा गोळा बनविला; (आणि) मग आम्हींच मांसाच्या गोळ्याचीं हाडकें बनविलीं. व मग आम्हींच हाडकांवर मांस मढविलें; नंतर (सर शेवटीं) आम्हींच त्याला (जणूं अगदींच) दुसऱ्या सृष्टी(च्या रूपां)त बनवून उभें केलें. तर (वाहवाह!) परमेश्वर फारच शुभकारी होय (व तो सर्व) निर्माणकर्त्यांत उत्तम (निर्माण कर्ता) होय. १४. मग (लोकांनों!) ह्याच्यानंतर तुम्हां(सर्वां)स मरणें आहे. १५. मग**

---

केलेल्या झाडाचें फळ सेवन केलें. तेव्हां परमेश्वरानें त्यांना स्वर्गांतून काढून लाविलें; परंतु आदमाचें वतन जप्त केलें नव्हतें. किंबहुना आदमाच्या पश्चात्तापानंतर व आपला गुन्हा पदरीं घेतल्यावर परमेश्वरानें त्यांच्या संतानास वचन दिलें कीं जगांत चांगलीं कामें कराल तर तुम्हांस तुमच्या वडिलांचें वतन दिलें जाईल. वारसदार होण्याचा एक अर्थ तर हा होय. आणि दुसरी अर्थनिष्पत्ति हजरत अबुहुरेरा नामक पैगंबरांच्या एका सहाबी—तत्कालीन अनुयाया—च्या कथनावरून ही होते कीं प्रत्येक मनुष्यासाठीं परमेश्वरानें दोन धाम बनवून ठेविले आहेत. एक स्वर्गांत व एक नरकांत; तर नरकवाशीयांचे जे धाम स्वर्गांत होत स्वर्गवासी त्यांचे वारस ठरून त्यांच्यावरहि कबजा करतील.

(१) हा सामान्य मनुष्याच्या उत्पत्तीचा उल्लेख आहे; कीं त्याचा आरंभ वीर्यबिंदूपासून आहे; आणि वीर्यबिंदु हें अन्नाचें सत्व आणि अन्न हें मातीचें सत्व कीं ज्यांतून प्राणी व वनस्पति हे मनुष्याच्या खाण्याचे पदार्थ उत्पन्न होतात. मातीपासून जन्म घेईपर्यंत ज्या ज्या उत्क्रांत्या होतात त्यांस खरोखरीं मनुष्याशीं कोणताच संबंध दिसत नाहीं. वीर्यबिंदूच्या अवस्थेंत कोणालाही ह्मणतां येत नव्हतें कीं शेवटीं याचा मनुष्य बनून जाईल. दुसऱ्या सृष्टीच्या रूपांत बनवून उभे करण्याचा अर्थ हा होय.

(२) हे निर्माण कर्ते ह्मणजे मनुष्य आपल्या कल्पनेनें ज्यांस निर्माण कर्ते समजतो ते लोक; किंवा खोटेनाटे देव वगैरे.

पुनरुत्थानाच्या दिवशीं तुह्मीं (सर्व) उठवून उभे केले जाल. १६.
आणि आम्हींच तुह्मांवरतीं सात आकाश बनविले; आणि निर्माण
करण्या(च्या युक्तीं)त आम्हीं (कांहीं) अजाण नव्हतों. १७. आणि
आम्हींच एका प्रमाणानें आकाशांतून पाणी वर्षाविलें; मग तें जमिनींत
(जमा करून) तुंबून ठेविलें; आणि आह्मीं तें (पाणी उडवून) नेण्यासहि
समर्थ आहों. १८. मग त्या(पाण्या)च्या द्वारें आम्हीं तुम्हांसाठीं
खजुरी व द्राक्षाचे बाग बनवून उभे केले कीं त्यांत तुम्हांसाठीं बहुत
फळफळादि (उत्पन्न) होते आणि तींतून (कित्येक) तुम्हीं खातांहि. १९.
आणि (आम्हींच 'जीत' फळाचें) झाड (उत्पन्न केलें कीं) जे 'तूरेसीना'
(पर्वतां)त (पुष्कळ) पैदा होतें (आणि) खाणारांसाठीं (जणूं) तेल व
शाक घेऊन उगतें. २०. आणि (लोकांनों!) तुम्हांकरितां चतुष्पाद
जनावरांतहि बोध (घेण्याची जागा) आहे; कीं जो (आलापाला)
त्यांच्या पोटांत (भरलेला) आहे त्यांतूनच आम्हीं तुम्हांस (दूध) पाजतों
आणि (दुधाशिवाय) चतुष्पाद जनावरांत तुमचे (आणखींहि) बहुत
फायदे आहेत व त्यांतून (कित्येकांस) तुम्हीं खातहि असतां. २१.
आणि त्यांच्यावर व गलबतांवर तुह्मीं आरूढ होऊनहि फिरतां. २२.
आणि अर्थात आम्हीं 'नूहा'ला त्याच्या लोकांकडे (पैगंबर बनवून)
पाठविलें. तर तो (लोकांस) म्हणाला कीं हे बांधवांनों! परमेश्वराची
उपासना करा. त्याच्याशिवाय तुमचा (अन्य) कोणी उपास्य नाहीं. तर
कां तुम्हांला (त्याचें) भय वाटत नाहीं? २३. यावर, त्याच्या लोकांत

---

(१) कुराणांत अरबी शब्द 'तराएक' आहे; त्याचे भाषांतर आम्हीं आकाश केलें आहे आणि येथें त्याचा अर्थ आकाशच आहे; कांकीं याचा शब्दशः अर्थ मार्ग असा आहे, तर देवदूतांचे व आकाशमंडळांतील ग्रहांचे सात मार्ग म्हणजे सात आकाश. शिवाय अरबींत आकाशाला 'तराएक' यासाठीं म्हणतात कीं ते वर खालीं एकामागें एक पटाप्रमाणें आलेले आहेत.

(२) हा तूर पर्वत जो महशूर आहे त्याचें पूर्ण नांव 'तूरे सीना' असें आहे. त्यांत जीतवृक्ष (Olive tree) पुष्कळ होतो. जीत तेल किंवा जैतून हें तेलाचें व कोरड्यासाचें अशीं दोन्हीं कामें देतें. जर निव्वळ तेलांत भाकरी बुडवून खाली, तर भाकर व कोरड्यास यांची रुचि येईल.

जे सरदार नास्तिक होते ते (आपसांत म्हणूं लागले कीं) हाहि केवळ तुह्मां सारखाच मनुष्य होय, आणि तुह्मांवर (आपलें) श्रेष्ठत्व गाजवूं पाहतो आहे. आणि जर परमेश्वराला (पैगंबरच पाठविण्याची) इच्छा असती तर तो देवदुतांस उतारता. आम्हीं तर असली गोष्ट आपल्या प्राचीन बापजाद्यांत (होतांना) ऐकिली नाहीं. २४. असो नसो, हा केवळ एक (असा) पुरुष होय कीं ज्याला वेड (लागलेलें) आहे. तर (खास) एका वेळेपर्यंत त्या(च्या परिणामा)ची वाट पाहा २५. 'नूह'नें (परमेश्वरापाशीं) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! त्यांनीं मला पाखंडी म्हटलें आहे त्या अर्थीं तूंच माझी मदत कर. २६. यावर आम्हीं 'नूह'ला असा आदेश पाठविला कीं आमच्या नजरेखालीं व आमच्या इषारतीप्रमाणें तूं एक गलबत बनीव. मग जेव्हां आमचा (शिक्षेचा) हूकूम यावयास होईल आणि (जमिनींतील) भट्टी(चें पाणी) उतूं जाऊं लागेल, तेव्हां नावेंत हरेक (जनावरां)तून (नरमादी) दोहों दोहोंचा जोडा बसवून घे, आणि (त्यांबरोबर) आपलें कुटुंबहि; परंतु त्यांच्यांतून ज्यांच्यासंबंधीं पूर्वींच (गर्क होण्याचा) हुकूम होऊन चुकला आहे (ते मात्र नाहीं). आणि ज्या लोकांनीं आज्ञाभंग केला आहे त्यांच्यासंबंधानें, माझ्याशीं कांहींच संबोधून बोलूं नकोस; (कां कीं) हे (कांहीं झालें तरी) बुडावयाचेच आहेत. २७. मग जेव्हां तूं व जे कोणी तुझ्या संगतीं आहेत ते (सर्व सुखासमाधानानें) गलबतांत बसून जातील, तेव्हां तूं बोल कीं परमेश्वराचे उपकार होत कीं, त्यानें आमची (या) अन्यायकारी लोकांपासून सुटका केली. २८. आणि (परमेश्वराचे सेवेंत) प्रार्थना कर कीं हे माझ्या पालनकर्त्या! मला (जमिनीवर) आशिर्वादकारक [१]उतरणें उतर; आणि तूं सर्व उतारणाऱ्यांत उत्तम (उतारणारा)

(१) येथें उतारणें म्हणजे मेजवानी व पाहुणचार करणें असा अर्थ आहे. हजरत नूह—ईश्वर त्यांना शांति देवो—यांची मनीषा ही होती कीं हे परमेश्वरा! जमीन तुझी आहे आणि आम्हीं जे उतरूं ते तुझेच पाहुणे होऊं व तूं यजमान आहेस. तर आमचा उत्तम प्रकारें पाहुणचार कर म्हणजे खाण्यापिण्यास मुबलक दे. असे तर इतर लोकहि मेजवानी करतात, पण तूं त्या सर्वांहून यजमनीचा हक पूर्णपणें पाळतोस म्हणजे सर्वांस खाऊं घालतोस.

आहेस. २९. कांहीं संशय नाहीं कीं या(गोष्टीं)त (आमच्या परम-सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत; आणि आम्हांस (लोकांच्या विश्वासाची) परिक्षा पाहावयाची होती, (ती पाहिली). ३०. नंतर त्यांच्यामागून आम्हीं ('समूद' नांवाची) आणखी (एक) जनता निर्मून उभी केली. ३१. (आणि) मग त्यांच्यांतूनच ('सालेह' यास) पैगैबर (बनवून) त्यांच्यांत पाठविलें; (आणि त्यानें त्यांस समजाविलें) कीं, परमेश्वराची उपासना करा; त्याच्याशिवाय तुमचा (अन्य) कोणी उपास्य नाहीं. तर कां तुम्हांस (त्याचें) भय वाटत नाहीं? ३२. त्याच्या लोकांचे सरदार जे (त्याच्या पैगंबरीस) मानीत नव्हते व शेवटल्या दिवसाचे नजरानजर होण्यासहि खोटें म्हणीत होते,-आणि वास्तविक पाहतां, ह्या जगाच्या आयुष्यांत आम्हीं त्यांना सुखवस्तुहि केलें होतें-ते (आपसांत) म्हणूं लागले कीं, हा ('सालेह') केवळ तुम्हां-सारखाच मनुष्य आहे. जें अन्न तुम्हीं खातां त्याचप्रकारचें अन्न हाहि खातो आणि जें (पाणी) तुम्हीं पितां त्याचप्रकारचें (पाणी) हाहि पितो. ३३. आणि जर तुम्हीं आपल्यासारख्या मनुष्याचें अनुकरण केलें, तर या स्थितींत अवश्य तुमच्यांत (अक्कलेचा) तोटा होय. ३४. (हा गृहस्थ) कां तुम्हांस अभिवचन देतो कीं जेव्हां तुम्हीं मरून जाल आणि (मेल्यावर) तुमची माती व हाडें राहून जातील, तेव्हां तुम्हीं (पुन्हा जिवंत करून जमिनींतून) काढले जाल? ३५. (ही) गोष्ट जी तुम्हांस सांगितली जाते ती (बिलकुल शहाणपणापासून) दूर (व अनुमानास) दुरापास्त अशी आहे. ३६. (पुन्हां जन्मणें कसलें?) हेंच आमचें इह-लौकिक आयुष्य आहे, झालें; कीं आम्हीं मरतोंहि व जगतोंहि; आणि आम्हांस (पुन्हां जिवंत होऊन) उठावयाचें नाहीं. ३७. असो नसो, हा ('सालेह') असा एक (धीट,) पुरुष आहे कीं ज्यानें परमेश्वरावर खोटें कुभांड रचिलें आहे; आणि आम्हीं तर त्या(च्या बोलण्या)चा विश्वास धरीत नाहींच. ३८. (लोकांची ही नकारणी पाहून 'सालहा'नें) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या, जसें त्यांनीं मला पाखंडी म्हटलें आहे तशी तूं माझी मदत कर. ३९. (परमेश्वरानें) सांगितलें, (जरा धीर ठेव,) थोडक्याच काळांत हे लोक (आपल्या कृत्यापासून) अवश्य ओशाळे

गत होतील. ४० सारांश, (आमच्या) सत्य(वचना)नुसार त्यांना (भयंकर) आवाजा(चे शिक्षे)नें येऊन गांठिलें; आणि आम्हीं त्यांस केरकचऱ्याप्रमाणें (पायमाल) करून टाकिलें. तर जुलमी लोकांवर (परमेश्वराचा) शाप होय. ४१. नंतर त्यांच्यामागून आम्हीं इतर (बहुतेक) जनता पैदा केल्या. ४२. कोणतीहि जनता आपल्या (नियमित) वेळेपासून पुढेंहि जाऊं शकत नाहीं व (त्यापासून) मागेंहि राहूं शकत नाहीं. ४३. नंतर आम्हीं एकामागून एक आपले पैगंबर पाठवीत राहिलों. जेव्हां जेव्हां कोणाहि जनतेचा पैगंबर तिच्यापाशीं येई, तेव्हां तेव्हां ते त्याला पाखंडी म्हणत, म्हणून आम्हींहि एकामागून एकाला (उध्वस्त) करीत गेलों; आणि (त्यांचा नायनाट करून) आम्हीं त्यांच्या कथा बनवून टाकल्या. तर जे लोक विश्वास धरीत नाहींत त्यांजवर(परमेश्वराचा) शाप होय ! ४४. मग आम्हीं 'मूसा' व त्याचा भाऊ 'हारून' यांस आपल्या निशाण्या[1] व स्पष्ट प्रमाण देऊन 'फिरऔन' व त्याच्या सरदारमंडळाकडे (पैगंबर बनवून) पाठविलें ४५. पण ते (सर्व) शेखी मिरवूं लागले; आणि ते होतेहि शिरजोर लोकच. ४६. तर ते (आपसांत) म्हणूं लागले, कां आम्हीं या दोघा मनुष्यांवर कीं तेहि आम्हांसारखेच (मानव) होत, विश्वास ठेवावा ? आणि खरें पाहतां, त्यांचे (सारेच) लोक आमचे सेवक होत. ४७. सारांश, या लोकांनीं ('मूसा' व 'हारून' ) दोघांनाहि पांखंडी म्हटलें; तर (परिणाम हा झाला कीं) ते नाश पावणाऱ्यांपैकीं होऊन गेले. ४८. आणि आम्हीं 'मूसा'ला (तौरात) पुस्तक यासाठीं दिलें होतें कीं, लोक त्यायोगें सन्मार्ग पावतील. ४९. आणि आम्हीं 'मर्यम'चा पुत्र ('ईसा') व त्याची मातोश्री ('मर्यम') यांस (आपल्या सामर्थ्याची) निशाणी

---

(१) निशाण्या व स्पष्ट प्रमाण, यांत जें उभयान्वयी अव्यय आहे तें टीकारूप आहे कीं निशाण्या म्हणजे चमत्कार सर्व मिळून तेंच स्पष्ट प्रमाण होतें. अथवा मूसाच्या चमत्कृतींत काठीचा महान चमत्कार होता, तो इतर चमत्कारांपासून पृथक् करून त्यास स्पष्ट प्रमाण असें म्हटलें. अगर स्पष्ट प्रमाण म्हणजे मूसा पैंगबर हे फिरऔनाबरोबर वादविवाद करतांना जीं प्रमाणें सांगीत होते तीं प्रमाणें होत.

बनविली; आणि त्या उभयतांस राहण्याजोगी व पाणथळ अशा एका उंच जागीं (नेऊन) आश्रय दिला. ५०. (मी आपल्या सर्व पैगंबरांस हेंच आज्ञापीत आलों आहें कीं) हे पैगंबरांनों! शुद्ध पदार्थ खा व चांगलें काम करा. तुम्हीं जसजशीं कामें करितां, मी त्या(सर्वां)शीं खूप वाकब आहें. ५१. आणि हा तुमचा(ईश्वरी) पंथ आहे; (आणि मूळ-धर्माच्या मानानें) एकच पंथ (होय); आणि मीच तुम्हां सर्वांचा पालनकर्ता आहें; तर तुम्हीं मलाच भीत रहा. ५२. नंतर लोकांनीं आपसांत फूट करून आपापलें (धर्म-)प्रकरण वेगवेगळें करून टाकिलें. (आतां) जो (धर्म) प्रत्येक लोकसमुदायाजवळ आहे ते त्याशींच खुष आहेत. ५३. तर (हे पैगंबरा!) तूं एका(नियमित)वेळेपावेतों या लोकांस यांच्या फसगतींतच (पडून) राहूं दे. ५४. हे लोक कां अशी कल्पना करतात कीं, आम्हीं द्रव्य व संततीनें त्यांची मदत करीत जात आहों; (त्याचा अर्थ हा होय कीं), ५५. त्यांना फायदा पोहोंच-विण्यांत आम्हीं त्वरा करीत आहों? (नाहीं!) किंबहुना हे (लोक मूळअर्थ) समजत नाहींत (कीं हीहि एक परीक्षा होय). ५६. जे लोक आपल्या पालनकर्त्याच्या भीतीनें भयचकित राहतात; ५७. आणि जे आपल्या पालनकर्त्याच्या निशाण्यांचा विश्वास ठेवतात; ५८. आणि जे आपल्या पालनकर्त्यासमागमें (कोणालाहि) जोडीदार ठरवीत नाहींत; ५९ आणि जे लोक जितकें कांहीं त्यांच्यानें देववतें तें

---

(१) फिरऔन–फारो–शीं हजरत मूसाला जें प्रकरण घडलें होतें कीं त्यांच्या जन्माची खबर त्याला अगोदरच मिळून चुकली होती; तेंच प्रकरण हजरत ईसा–येशू–च्याहि पुढें आलें कीं त्यांच्या जन्मण्यापूर्वीच ज्योतिषांनीं हिरोडो-टस नामक तत्कालीन बादशाहाला सांगितलें होतें कीं इस्राएलांचा बादशाह जन्मणार आहे. तात्पर्य, हिरोडोटसच्या भयानें कुमारी मर्यमचा चुलत भाऊ योसेफ–यूसुफ–सुतार यानें मायलेंकरास मिसर प्रांताचें 'रम्ला' नामक गांव जें नाईल नदीवर वसलेलें होतें त्या गांवांत नेलें होतें. ईसा-येशू येथेंच मोठे झाले. हिरोडोटस मेल्यावर हे आपल्या गांवीं आले व तेथें आपली पैगंबरी वा प्रेषितत्व याची प्रसिद्धी केली. कदाचित् या प्रकरणाकडेच या महावाक्यांत इषारत असेल.

(परमार्थांत) देतात, आणि (यावरहि) त्यांचीं अंतःकरणें या गोष्टीला भीतच राहतात कीं, त्यांना आपल्या पालनकर्त्याकडे परतून जावयाचें आहे (पाहा! देणें देवविणें तेथें मान्य होतें कीं नाहीं)! ६०. हेच लोक चांगल्या कामांत त्वरा करितात आणि त्यासाठीं पुढें पुढें सरसावतात. ६१. आणि आह्मीं कोणाहि माणसाच्या शक्तीपलिकडे त्याच्यावर ओझें लादीत नसतों आणि आम्हांपाशीं (लोकांच्या कर्मांचें) नोंद पुस्तक आहे कीं जें (प्रत्येकाचा) सत्य(सत्य अहवाल) बोलून दाखवितें. आणि (लोकांनीं याचें समाधान ठेवावें कीं कोणाहि तऱ्हेनें) त्यांच्याशीं अन्याय केला जाणार नाहीं. ६२. परंतु (फारच वाईट गोष्ट तर ही होय कीं) या(लोकां)चीं अंतःकरणें या गोष्टीकडून गफलतींत आहेत; आणि ह्याशिवाय त्यांचीं (आणखीहि बरींच वाईट) कर्में होत कीं ते तीं करीतच राहतात,(व हे त्या कर्मांपासून पराङ्मुख होणारहि नाहींत;)६३. येथपर्यंत कीं जेव्हां आम्हीं यांच्यांतून सुखवस्तु लोकांस (आपल्या-शिक्षेंत) पकडूं, तेव्हां हे तत्काळ गयांवयां करूं लागतील. ६४. (त्यावेळीं आम्हीं त्यांस सांगूं कीं,)आज आतां गयांवयां करूं नका,तुम्हांला आम्हांकडून कोणाहि तऱ्हेची मदत मिळणार नाहीं. ६५. (कुराणांतून) आमचीं महावाक्यें तुम्हांस वाचून वाचून ऐकविलीं जात होतीं, तेव्हां

(१) भावार्थ हा कीं, नास्तिक, नास्तिकपणा करतो व इतरांस परमेश्वराचे जोडीदार मानतो, आणि जगांत त्याला यशहि मिळतें. व तो समजतो कीं हें यश त्याच्या नास्तिकपणाचा व अधर्माचा परिणाम आहे; म्हणून अधर्मच चांगला; आणि ह्या खोट्या समजुतीमुळें तो खुशी खुशीनें नास्तिकपणाच करीत चालला जातो. या खोट्या ग्रहासाठीं परमेश्वरानें त्याला तंबी केली कीं संसाराचें यश अपेश ही निराळी गोष्ट आहे. आणि त्यायोगें सेवकांची सहनशीलता व कृतज्ञता यांची परिक्षा पाहावयाची असते. तर नास्तिकपणा व अधर्म यांस चांगलें व जगसंसाराच्या यशाला त्याचा परिणाम समजणें हा अगदींच मूर्ख-पणा होय. परंतु जे लोक नास्तिकपणा करीत नाहींत ते अलबत चांगल्या कामाकडे सरसावून जातात. तशी गोष्ट नास्तिक व अधर्मी यांची नसते; कां कीं ते नास्तिकपणा करीत जातात व समजतात कीं आम्हीं सुकृत्यांकडे सरसावून जातों आणि आम्हांला जगांत याचाच मोबदला मिळत असतो.

तुम्हीं उलट्या पायीं माघार घेत होतां. ६६. (आणि तुमची स्थिति अशी होती कीं) तुह्मीं गर्वानें ऐटत (व कुराणासंबंधानें) रात्रीं गोष्टी करीत मूर्खपणाचा बकवाद करीत होतां. ६७. कां या लोकांनीं (मूळापासून आमचें हें) वचन (ह्मणजे कुराण) याचें मननच केलें नाहीं? अगर (यांच्या माघार घेण्याचें हें कारण झालें कीं) यांच्यापाशीं एक(नवीन) गोष्ट आली कीं जी यांच्या पूर्वील बापजाद्यांपाशीं आली नव्हती ? ६८. अथवा हे लोक आपल्या पैगंबरा(च्या सचोटी)शीं वाकब नव्हते; (आणि अज्ञानपणामुळें) हे त्या(च्या पैगंबरी)स नाकारितात ? ६९. अगर (आपल्या पैगंबरासंबंधानें अशी निरर्थक गोष्ट) बोलतात कीं त्याला वेड (लागलें) आहे ? (यांतून कोणतीच गोष्ट नाहीं;) किंबहुना पैगंबर यांच्यापाशीं सत्य (गोष्ट) घेऊन आला; पण यांच्यांतून बहुतेकांस सत्य गोड लागत नाहीं.७०. आणि जर सत्य यांच्या मनेच्छेप्रमाणें होत जातें, तर आकाश व पृथ्वी आणि जें कांहीं यांच्या दर्म्यान आहे (त्या सर्वांची व्यवस्था केव्हांचीच) बिघडून गेली असती. किंबहुना (वस्तुस्थिति तर ही आहे कीं) आम्हीं यांना यांचाच अहवाल आणून ऐकविला; (आतां) हे आपल्या अहवाला(च्या ऐकण्या)पासून तोंड फिरवितात ७१. अगर (हे पैगंबरा !) तूं यांजपाशीं (संदेश पोहोंचविण्याचें) कांहीं वेतन मागतोस ? तर तुझ्या पालनकर्त्याचें देणें (यांच्या वेतनांहून फारच)

---

(१) मनुष्याच्या इच्छेस कांहीं मर्यादा नसते, हें खरें आहे; आणि प्रत्येक मनुष्याची हीच स्थिति आहे व सर्वांस मिळून जुळून हो राहावयाचें आहे. मानवी इच्छेची जर कांहीं मर्यादा न ठरविली जाईल आणि लोकांस धर्मशास्त्राचा पायबंद न लाविला जाईल, तर एकाच दिवसांत सारेचे सारे आपसांत एकमेकांला कापून मरतील.

(२) ज्या काळीं हजरत मोहंमद पैगंबर या जगांत अवतरले, त्याकाळीं अरब लोकांच्या चालीरीति इतक्या वाईट होत्या कीं,त्यांस मनुष्य म्हणण्यासहि दिक्कत वाटते. पैगंबरसाहेबांनीं त्यांच्या उणिवा व दोष त्यांना जाहीर केले व त्यांची सुधारणा केली. कायदा आहे कीं मनुष्य आपले दोष ऐकून खुष होत नाहीं, आणि सत्य सर्वांसच कडू लागतें. तर जे लोक फारच खुदपसंत व गर्विष्ठ होते ते उलट हट्टास पेटले. या महावाक्यांत हाच दोष दिला गेला आहे.

उत्तम होय. आणि तो(सर्व) अन्नदात्यांत उत्तम (अन्नदाता) होय. ७२ आणि (हे पैगंबरा !) तूं यांना सरळ मार्गाकडे बोलावितोस. ७३. आणि जे लोक परलोकाचा विश्वास धरीत नाहींत, तेच (सरळ) मार्गाहून हटलेले होत. ७४. आणि जरी आम्हीं यां(च्या स्थिती)वर दया करूं; आणि जीं दुखें यांना (त्यांच्या नास्तिकपणामुळें) पोहोंचतात तीं दूरहि करून टाकूं; तरी (हे स्वभावाचे असे दुष्ट होत कीं) आपल्या शिरजोरीवरच हेका धरून राहतील (व सन्मार्गाहून) भटकत फिरतील. ७५. आणि आम्हीं यांना शिक्षेंतहि पकडलें. तरी देखिल हे लोक आपल्या पालनकर्त्यापुढें नमले नाहींत; आणि नम्रता दाखविणें तर यांचा बाणाच नाहीं; ७६. येथपर्यंत कीं जेव्हां आम्हीं यांजवर सक्त शिक्षेचें दार उघडलें तेव्हां ते तत्क्षणींच निराश होऊन बसले. ७७. आणि (लोकांनों !) तोच (परमदयाळू परमेश्वर) होय कीं ज्यानें तुम्हांसाठीं कान व डोळे व हृदयें हीं निर्माण केलीं. (परंतु) तुम्हीं फारच कमी आभार मानितां. ७८. आणि तोच होय कीं ज्यानें तुम्हांस पृथ्वींत (चाहोंकडे) फैलाविलें आहे. आणि (पुनरुत्थानाचें दिवशीं) तुम्हीं (सर्व) एकवटून त्याच्याच हुजुरांत आणिले जाल. ७९. आणि तोच होय कीं जो जगवितो व मारतो; आणि रात्रंदिवसाचा फेरबदलहि त्याचेंच (काम) होय तर कां तुम्हीं (लोक इतकी गोष्टहि) समजत नाहीं ? ८०. (यांजपाशीं कोणी सयुक्तिक उत्तर तर नाहींच;) किंबहुना जी (गोष्ट) पूर्वींचे लोक बोलत आले आहेत तसलीच (गोष्ट) हेहि बोलतात. ८१.

(१) उद्देश हा आहे कीं, त्यावेळेचे मक्केचे नास्तिक कांहीं झालें तरी परमेश्वराकडे वळत नव्हते. परमेश्वरानें त्यांस पैगंबरांची नकारणी केल्यामुळें दुःखें पोहोंचविलीं, मोठा भयंकर दुष्काळ पाडला; बद्रच्या लढाईत त्यांच्या जातीचे सरदार मारले गेले आणि पूर्ण पराजय झाला. म्हणून त्यांस पाहिजे होतें कीं शिक्षा आली होती तेव्हां परमेश्वरापुढें गयांवयां करते. पण हे या वळणाचेच नव्हते. हलकीशी शिक्षा झाली कीं आपल्या हट्टावर अडून बसले. शिक्षेंत सक्ती झाली म्हणजे त्यांचा अडेलपणा तर जाई, पण निराशावस्था त्यांच्यावर येई व त्यांचा आशाभोड होई. सारांश ते परमेश्वराकडे वळले नाहींत ते नाहींच; आणि नास्तिकच मेले.

(म्हणजे) ते म्हणतात कीं जेव्हां आम्हीं मरून जाऊं व (मेल्यावर) माती होऊन जाऊं व (फक्त) हाडें (बाकी राहून जातील) तेव्हां कां आम्हीं (पुन्हां जिवंत करून) उठवून उभे केले जाऊं ? ८२. आम्हांशीं व (आम्हां) पूर्वी आमच्या वाडवडिलांशीं याचा वायदा होत आला आहे. असो नसो, ह्या केवळ पूर्वीच्या लोकांच्या गप्पा होत. ८३. (हे पैगंबरा ! या लोकांस) विचार कीं जर तुम्हीं जाणत बुजत आहां, तर (बरें, एवढी गोष्ट तरी सांगा कीं) पृथ्वी व जें कांहीं तिच्यांत आहे (हें सर्व) कोणाचें आहे ? ८४. ते तेव्हांच (हेंच) उत्तर देतील कीं परमेश्वराचें. (यांना) सांग कीं मग तुम्हीं कां म्हणून विचार करीत नाहीं ? ८५. (हे पैगंबरा ! यांस ) विचार कीं सात आकाशांचा मालक कोण आहे ? आणि (तसाच)महान् ' अर्ष '-सिंहासना-चा मालक (कोण आहे) ?८६. ते तेव्हांच (हें)उत्तर देतील कीं (हें सर्व कांहीं) परमेश्वराचेंच होय. (आतां तूं यांना)सांग कीं मग कां तुम्हांस त्याचें भय वाटत नाहीं ? ८७. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं जर तुम्हीं जाणत बुजत आहां तर (बरें, एवढी गोष्ट तरी सांगा कीं) कोण (असा परमसमर्थ) आहे कीं, ज्याच्या हातांत प्रत्येक वस्तूची सत्ता आहे; आणि तो (ज्याला इच्छितो त्याला) आश्रय देतो व त्याच्या विरुद्ध कोणी कोणाला आश्रय देऊं शकत नाहीं ? ८८. ते तत्काळ (हेंच) उत्तर देतील कीं (हीं सर्व विशेषणें व गुण तर ) परमेश्वराचेच होत. (आतां तूं यांना) सांग कीं मग तुम्हांवर कोठून मोहजाल येऊन पडतें ? ८९. खरें हें आहे कीं आम्हीं यांना सत्य पोहोंचवून दिलें आहे आणि हे खरोखरींच लबाड होत. ९०. परमेश्वरानें कोणालाहि पुत्र बनविलें नाहीं आणि त्याच्या समागमें (अन्य) कोणी परमेश्वरहि नाहीं. नाहीं तर, प्रत्येक परमेश्वर आपली सृष्टि (वेगळीच) घेऊन फिरता; आणि (ते आपसांत लढते व अखेर) एकमेकांवर वर्चस्व गाजविते. जसजशा गोष्टी हे (लोक परमेश्वरा-संबंधानें ) उच्चारितात - त्यांपासून परमेश्वर पवित्र होय. ९१. (तो) अदृश्य आणि दृश्य (सर्व) जाणतो. आणि लोक ज्यांना त्याचा सरकतदार ठरवितात त्यांजपासून तो (निर्दोष व) थोर होय. ९२. (हे पैगंबरा ! तूं तर ही) प्रार्थना कर कीं हे माझ्या पालनकर्त्या ! ज्या (शिक्षे)चा

वायदा या (नास्तिकां)शीं केला जातो, जर (कदाचित् ती शिक्षा) तूं मला दाखविशील; ९३. तर हे माझ्या पालनकर्त्या ! (या) जुलमी लोकांत (कोठें) मला तूं सामील करूं नकोस. ९४. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं या गोष्टीसहि समर्थ आहों कीं ज्या(शिक्षे)चा वायदा या (नास्तिकां)शीं आम्हीं करीत आहों ती (तुझ्या हयातींतच त्यांना ठोठावून) तुला दाखवूं. ९५. (हे पैगंबरा ! जर कोणी तुझ्याशीं वाईट करील तर) वाईटाचें निरसन अशा वर्तनानें कर कीं तें (दिसण्यांत) फारच उत्तम असेल. (आणि) जें कांहीं हे (लोक तुझ्यासंबंधानें) व्यक्त करतात आम्हीं तें खूप जाणत आहों. ९६. आणि (हीहि) प्रार्थना कर कीं हे माझ्या पालनकर्त्या ! सैतानांनीं ध्वनित केलेल्या गोष्टींपासून मी तुझा आश्रय मागतों. ९७ आणि हे माझ्या पालनकर्त्या ! मी यापासूनहि तुझें शरण घितों कीं सैतानांनीं मजपाशीं यावें (व मला बहकवावें.)९८. (राहिले नास्तिक, हे तर मानणारच नाहींत,) येथपर्यंत कीं जेव्हां यांच्यांतून कोणाला मृत्यु येऊन ठेपेल, तेव्हां तो प्रार्थना करूं लागेल कीं, हे माझ्या पालनकर्त्या ! तूं मला (एकदां) पुन्हां परत पाठवून दे; ९९. म्हणजे ज्या(जगा)ला मी सोडून आलों आहे त्यांत (पुन्हां जाऊन) सुकृत्य करीन. (आम्हीं दूतांस संबोधून म्हणूं कीं) छेछे ! तो एक (अघटित) गोष्ट बोलतो आहे (तर त्याला बोलूं दे; असल्या मागण्या कोठें

(१) या वाक्यांत पैगंबरसाहेबांना नास्तिकांबरोबर सौम्यपणानें संभाषण करण्याचें शिक्षण आहे. जरी नास्तिक लोक पैगंबरसाहेबांना जादुगीर, कवि आणि पाखंडी सर्व कांहीं बोलत होते तरी, पण पैगंबरसाहेबांस हाच हुकूम होता कीं तुम्हीं शिवीच्या बदला शिवी देऊं नका. नाहीं तर सैतान लोकांस बहकवून त्यांच्यांत जास्त खराबी घालील.

(२) 'छे छे ! तो एक ( अघटित ) गोष्ट बोलतो आहे.' हा साराचा सारा नास्तिकांच्या प्रार्थनेचा जवाब होय, व त्याप्रमाणें भाषांतर केलें गेलें आहे. अथवा प्रार्थनेचें उत्तर छे छे ! या शब्दांवरच संपलें. "तो एक अघटित गोष्ट बोलतो आहे." हें वेगळें वाक्य आहे. भावार्थ हा आहे कीं परमेश्वर, नास्तिकांच्या स्थितीचें वर्तमान सांगीत आहे कीं तो चोहोंकडून निराश होऊनहि अघटित गोष्ट बोलेल.

मंजूर होऊं लागल्या आहेत?) आणि लोकांच्या (मरणा)पलीकडे एक (मध्यवर्ती जग) 'बरज़ख' होय (कीं तेथें) त्यांस जेव्हां (पुन्हा जिवंत करून) उठवून उभे केलें जाईल त्या दिवसापर्यंत (राहावें लागेल).१००. मग जेव्हां 'सूर'–करणा–फुंकला जाईल, तेव्हां त्या दिवशीं लोकांत गोत्र संबंधहि (बाकी) राहणार नाहीं व ते एकमेकाला विचारीनातसे होतील. १०१. मग ज्यां(च्या सुकृत्यां)चें पारडें भारी निघेल, हेच लोक (आपल्या मनोरथांत) सफल होतील. १०२. आणि ज्यां(च्या सुकर्मां)चें पारडें हलकें ठरेल, हेच लोक होत कीं, ज्यांनीं आपणच आपला नाश करून घेतला; कीं ते 'जहन्नम' नरकाग्नीमध्यें सर्वकाल राहतील. १०३. नरकाग्नी(चा डोंब) त्यांचीं तोंडें होरपळत असेल व ते तेथें तोंडें वांकडीं करीत असतील. १०४. (त्यांना विचारिलें जाईल,) कां (जगांत) माझ्या निशाण्या तुह्मांस वाचून वाचून ऐकविल्या जात नव्हत्या? (अवश्य ऐकविल्या जात होत्या;) पण तुम्हीं त्यांस (ऐकून–समजून) पाखंड म्हणीत होतां. १०५. ते म्हणतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! आह्मांवर आमचें दुर्दैव प्रबल झालें व आम्हीं बहकलेले लोक होतों. १०६ हे आमच्या पालनकर्त्या! आम्हांला (कसेंहि) या(नरकाग्नी)तून काढ; मग जर आह्मीं पुन्हां (असा अपराध) करूं तर आह्मीं खरोखरच गुन्हेगार.१०७. (परमेश्वर) ह्मणेल, (मजपासून) चला दूर व्हा व ह्याच(नरकाग्नी)मध्यें (रहा); आणि माझ्याशीं संभाषण करूं नका. १०८. माझ्या सेवकांत एक पक्ष असाहि होता कीं जे म्हणत होते कीं हे आमच्या पालनकर्त्या! आम्हीं विश्वास धरिला; तर तूं आम(च्या अपराधा)ची क्षमा कर व आम्हांवर दया कर; आणि तूं (सर्व) दयाकर्त्यांत उत्तम (दयाकर्ता) आहेस. १०९.

(२) मरणानंतर पुनरुत्थान होईपर्यंत आत्म्याचें ज्या अवस्थेंत वास्तव्य होईल तिचें नांव बर्ज़ख होय. मुळांत बर्ज़खचा अर्थ अडकण आहे, ह्मणूनच मरणापासून पुनरुत्थानापर्यंत जी स्थिति राहील तिला 'बर्ज़ख' म्हटलें आहे; जणूं कीं हें इहलौकिक आयुष्य व पुनरुत्थान यांच्यामध्यें ती वेगळेपणाची एक हद्द आहे.

(३) म्हणजे आप्त संबंध कांहीं कामा येणार नाहीं व कोणी कोणाची मदत करूं शकणार नाहीं; सर्वांस आपलें आपलें पडलेलें असेल.

तथापि तुम्हीं त्यांची टर उडविली; येथपावेतों कीं (जणूं) त्यांनीं तुम्हांस माझें स्मरणच भुलवून टाकिलें; आणि तुम्हीं त्यांच्याशीं हसें करीत राहिलां. ११०. आज आम्हीं त्यांना त्यांच्या (मुकाट्यानें) सहन करण्याचा बदला दिला; कीं तेच (मनस्वी) कृतार्थ झाले. १११. (मग परमेश्वर नरकवाइयांस) विचारील कीं (बरें) तुम्हीं पृथ्वींत गणतींचीं किती वर्षें राहिलां (असाल)? ११२. ते म्हणतील, (वर्षें कसलीं?) आम्हीं (फार) राहिलों (असलों, तर) एक दिवस अगर एका दिवसाहूनहि कमीच. (नीट वेळ आठवत नाहीं) तर जे (दिवस व महिने) मोजीत राहत असतील त्यांना विचारून पाहा. ११३. (यावर परमेश्वर) म्हणील कीं निःसंशय तुम्हीं (पृथ्वीच्या पाठीवर) थोडकाच वेळ राहिलां; (पण) जर तुम्हांला (या गोष्टीची जित्याजित्रींच) जाणीव झाली असती (तर बरें होतें)! ११४ (लोकांनों!) कां तुम्हीं अशी कल्पना करितां कीं आम्हीं तुम्हांस (असेंच) व्यर्थ निर्माण केलें आहे; आणि हें कीं आम्हांकडे तुम्हांला पुन्हां परतून यावयाचेंच नाहीं? ११५. तर परमेश्वर (जो) खरा बादशाह (होय तो व्यर्थ काम करण्यापासून निर्दोष व) थोर होय. त्याच्यावांचून (अन्य) कोणी उपास्य नाहीं; (तोच) सन्माननीय सिंहासनाचा मालक (होय). ११६. आणि जो कोणी परमेश्वराखेरीज (अन्य) कोणा उपास्यास (आपली गरज भागविण्यास्तव) बोलावितो; (आणि) त्याच्याजवळ या(अनेकेश्वरवादा)चें कोणतेंहि प्रमाण तर नाहींच; तर त्याचा हिशेब केवळ त्याच्या पालनकर्त्यापाशींच होणें आहे. (परंतु माहीत असूं द्या कीं) नास्तिकांस (तर कोणाहि तऱ्हेनें) साफल्य होणें नाहीं. ११७. आणि (हे पैगंबरा!) तूं प्रार्थना कर कीं हे माझ्या पालनकर्त्या! तूं (आमचे अपराध) क्षमा कर व (आमच्या स्थितीवर) दया कर. आणि तूं (सर्व) दयाकर्त्यांत उत्तम (दयाकर्ता) आहेस. ११८.

(१) म्हणजे त्यावेळीं त्यांना जगांत राहण्याची मुदत इतकी थोडी वाटेल कीं जसा जगांतला एक दिवस अथवा एका दिवसाहूनहि कमीच. परंतु जिवंत स्थितींत तर लोक मृत्यूकडून असे निश्चिंत असतात कीं जणूं त्यांस मरायाचेंच नाहीं.

# अध्याय २४ वा.

## सूरतुन्नूर.

हा अध्याय मदिनाशहरीं प्रकट झाला. ह्यांत ६४ आयात-महावाक्यें आहेत. ह्यांत 'नूर' म्हणजे प्रकाश आणि परमेश्वर यांची दृष्टांतरूपानें यांतील ३५ व्या महावाक्यांत तुलना करण्यांत आली आहे ह्मणून हें नांव पडलें.

परमदयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों).

(हा एक) अध्याय होय कीं जो आम्हीं प्रकटिला आणि ही (कानू) आम्हींच ठरविलेली आहे; आणि आम्हींच यांत स्पष्ट स्पष्ट हुकूम प्रकट केले आहेत कीं तुम्हीं (मुसलमान ते) कदाचित् स्मरणीं घ्याल (व त्याप्रमाणें वागाल). १. स्त्री व पुरुष हीं व्यभिचार करतील, तर त्या उभयतांतून प्रत्येकास शंभर कोरडे मारा; आणि जर तुम्हीं परमेश्वर व शेवटचा दिवस यांवर विश्वास ठेवीत आहां, तर परमेश्वराच्या हुकमाच्या अंमलबजावणींत तुम्हांला त्यां(च्या स्थिती)वर (कोणाहि तऱ्हेचा) कळवळा येतां कामा नये; आणि (तसेंच) त्यांना शिक्षा देतेवेळीं मुसलमानांचा एक लोकसमुदाय (त्यांच्या फजतीसाठीं) हजर राहवा. २. व्यभिचारी पुरुष (तर आपल्या इच्छेनें जेव्हां लग्न करील तेव्हां तो बहुधा) व्यभिचारिणी स्त्री वा मूर्तिपूजक स्त्रीशींच लग्न करील; आणि व्यभिचारिणी (बहुधा आपल्यासारख्यालाच शोधील व ति)लाहि व्यभिचारी वा मूर्तिपूजक पुरुषाशिवाय आणखी कोणी करणारच नाहीं. आणि (धर्मनिष्ठ) मुसलमानांस तर असले संबंध निषिद्ध होत. ३. आणि जे लोक

(१) व्यभिचारी वा मूर्तीपूजक पुरुष आणि व्यभिचारिणी वा मूर्तीपूजक स्त्री हीं जणूं एका माळेचे मणी होत. म्हणूनच त्यांच्यांत परस्पर स्नेहसंबंध जुळतो;

पतिव्रता स्त्रियांवर (व्यभिचाराचा) आळ घेतील व मग चार साक्षी न आणूं शकतील, तर त्यांना ऐशीं कोरडे मारा आणि (पुढें) कधींहि त्यांची साक्ष कबूल करूं नका. आणि हे लोक खुद्द दुराचारी होत. ४. परंतु ज्यांनीं असें केल्यानंतर पश्चात्ताप केला व आपली संवय सुधारली तर (त्यांजप्रत) परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ५. आणि जे लोक आपल्या पत्न्यांवर व्यभिचाराचा दोष लावतील व आपणा स्वतः-शिवाय त्यांचे कोणी साक्षी नसतील, तर असल्या (वाद्यां)पैकीं प्रत्येकाची शाबिदी हीच होय कीं त्यानें चार वेळां परमेश्वराची शपथ घेऊन असें प्रतिपादन करावें कीं निःसंशय मी (आपल्या दाव्यांत) खरा आहें. ६. आणि पांचव्यांदा असें (म्हणावें) कीं जर खोटें बोलत असेन, तर मजवर परमेश्वराचा धिक्कार असो. ७. आणि (पुरुषाच्या शपथेनंतर) स्त्रीच्या (शिरा)वरून अशा प्रकारें शिक्षा टळूं शकते कीं तिनें चारदां शपथ वाहून प्रतिपादन करावें कीं हा (गृहस्थ) अगदींच लबाडांपैकीं आहे. ८. आणि पांचव्यांदा असें (म्हणावें) कीं जर हा (गृहस्थ आपल्या विधानांत)

---

व तो वाढत वाढत कधीं कधीं उभयतांत विवाहसंबंधहि उत्पन्न होतो. असले स्त्री-पुरुष व्यभिचार व मूर्तीपूजा यांस वाईट समजतच नाहींत कीं, ते त्यांचा तिरस्कार करतील. जरी ही पराकाष्ठेची बेशरमी आहे तरी पण जग अशा लोकांपासून खाली नाहीं. पुरुष जो स्त्रीच्या व्यभिचाराकडून काणाडोळा करील तो भडवा म्हणवितो; आणि मुसलमान जो व्यभिचार व मूर्तीपूजा या दोहों-पासून स्वभावतःच तिरस्कार बाळगितो तो अशा नालायक स्त्रियांशीं संबंधच कां राखूं लागले कीं, त्याला लग्नांची पाळी येईल. 'धर्मनिष्ठ मुसलमानांस तर असले संबंध निषिद्ध होत' याचा हा अर्थ होय. परंतु स्त्री जर व्यभिचार व मूर्तीपूजा यांपासून पश्चात्ताप करील तर तिच्याशीं लग्न करण्याची मनाई नाहीं.

(१) कोणावरहि हकनाक आळ घेण्याचा अपराध निंद्य होय हें दर्शविण्या-साठीं ह्मटलें कीं, तेच खुद्द दुराचरणी होत. म्हणजे जसें व्यभिचार पाप आहे तसेंच आळ घेणेंहि पाप आहे. उगीच बालंट घेण्यानें मनुष्य सज्जनतेच्या मर्यादेंतून निघून जातो व बेअब्रू होऊन जातो; येथपर्यंत कीं, त्याची साक्षहि कबूल होत नाहीं.

खऱ्यांपैकीं असेल, तर मजवर परमेश्वराचा कोप (कोसळो) ! ९. आणि जर ही गोष्ट नसती कीं तुम्हां लोकांवर परमेश्वराची कृपा व त्याची दया होय (व तो आपल्या कृपेनें तुम्हांस हे कायदे शिकवितो) आणि (तसेंच) हें कीं परमेश्वर फारच पश्चात्ताप स्वीकार्ता (व घरगुती बाबींचा) जाणता होय; तर (घरगुती प्रकरणांत कसकसे बिघाड उपस्थित झाले असते). १०. (मुसलमानांनों !) ज्या लोकांनीं (विश्वासूंची मातोश्री 'आईशा' इजविषयीं) तुफान उठवून उभें केलें ते, तुम्हांमधलाच एक लोकसमुदाय होय. या(तुफाना)स आपल्याठायीं वाईट समजूं नका. किंबहुना, हें तुमच्या ठायीं उत्तम झालें (कीं खरे मुसलमान व दांभिक ओळखण्यांत आले). या(तुफान घेणाऱ्यां)तून दरेक मनुष्य (ज्यानें) जितकें पाप संपादिलें असेल (त्याची शिक्षा) त्याला (भोगावी लागेल). आणि ज्यानें त्यांच्यांतून बालंटाचा मोठा भाग घेतला त्याला (तशीच) मोठी शिक्षा होईल. ११. (मुसलमानांनों !) जेव्हां तुम्हीं अशी (नालायक) गोष्ट ऐकिली होती, तेव्हां विश्वासू पुरुषांनीं व विश्वासू स्त्रियांनीं आपल्या (मुसलमान बहीण भावंडां)संबंधानें चांगली कल्पना कां केली नाहीं ? आणि (ती ऐकल्याबरोबरच) कां बोलले नाहींत कीं हें धडधडीत कुभांड आहे ? १२. (ज्या लोकांनीं हें बालंट उठवून उभें केलें,) त्यांनीं आपल्या विधाना(च्या पुराव्या)साठीं चार साक्षी कां आणिले नाहींत ? मग जेव्हां ते साक्षी न आणूं शकले, तेव्हां परमेश्वरासमीप हेच (केवळ) लबाड होत. १३. आणि जर तुम्हां(मुसलमानां)वर ह्या लोकीं व परलोकीं परमेश्वराची कृपा व त्याची दया नसती, तर जशी तुम्हीं असल्या (नालायक) गोष्टीची चर्चा केली होती तशी यांत तुम्हांवर कोणी एकादी मोठी आपत्ति ओढवली असती; १४. कीं तुम्हीं आपल्या जिभांनीं तिची चर्चा करूं लागला व आपल्या तोंडांनीं अशा गोष्टी उच्चारूं लागला कीं ज्याचें तुम्हांस मुळींच ज्ञान नाहीं. आणि तुम्हीं तिला असली हलकीशी गोष्ट समजलां; व वास्तविक पाहतां ती परमेश्वरासमीप मोठीच (सक्त गोष्ट) होय. १५. आणि जेव्हां तुम्हीं असली (नालायक) गोष्ट ऐकिली होती, तेव्हां (ऐकतांच) तुम्हीं कां म्हणून बोलला नाहीं कीं आम्हांला असली (गोष्ट) तोंडांतून

काढणेंच योग्य नाहीं? परमेश्वर न करो! हें तर मोठें (भारी) कुभांड होय १६. (मुसलमानांनों!) परमेश्वर तुम्हांस बोध करितो कीं जर तुम्हीं विश्वास ठेवित आहां, तर पुन्हां कधींहि असें करूं नका. १७. आणि परमेश्वर (आपले) हुकूम तुम्हांस स्पष्ट करून सांगतो. आणि परमेश्वर (सर्वांच्या स्थितीचा) ज्ञाता (व) बुद्धिमान् होय. १८. जे लोक असें इच्छितात कीं मुसलमानांत लुच्च्या गोष्टींची चर्चा व्हावी, त्यांच्या साठीं ह्या लोकींहि दुःखदायक शिक्षा आहे व परलोकींहि. आणि (असल्या लोकांस) परमेश्वरच जाणतो व तुम्हीं जाणत नाहीं. १९. आणि (मुसलमानांनों) जर ही गोष्ट नसती कीं तुम्हांवर परमेश्वराची कृपा व त्याची दया होय आणि (तसेंच) हें कीं परमेश्वर फारच करुणाशील व दयाळू होय; तर (तुम्हांमध्यें मोठा बखेडा उपस्थित झाला असता). २०. मुसलमानांनों, सैतानाच्या पदोपदीं चालूं नका. आणि जो सैतानाच्या पदोपदीं चालेल तर सैतान (त्याला) निर्लज्जपणा व वाईटच काम (करायास) सांगील. आणि जर तुम्हांवर परमेश्वराची कृपा व त्याची दया नसती, तर तुमच्यांतून कोणी कधींहि (पापापासून) शुचिर्भूत झाला नसता; परंतु परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला शुचिर्भूत करितो. आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. २१. आणि तुमच्यांतून जे लोक संपत्तिवान् व मगदूरवाले होत, त्यांनीं, आप्तांस व गोरगरिबांस आणि परमेश्वराच्या मार्गांत देशत्याग करणाऱ्यांस (मदत खर्च) न देण्याची शपथ घेऊं नये; तर त्यांना पाहिजे आहे कीं (त्यांचे

(१) 'सुब्हानका' व 'सुब्हानल्ला' या दोन्हीं शब्दांचा अर्थ एकच आहे. 'सुब्हानल्ला' म्हणजे परमेश्वर पवित्र आहे; आणि 'सुब्हानका'चा अर्थ हा कीं (हे परमेश्वरा!) तूं पवित्र आहेस. 'सुब्हानल्ला' आश्चर्याच्या जागीं वापरला जातो. फरक इतकाच कीं आश्चर्य दोन प्रकारें होतें. एक चांगल्या जागीं व एक वाईट जागीं. अरब लोक दोन्ही स्थळीं 'सुब्हानल्ला' बोलतात. मराठींत चांगल्या जागीं 'वाहवा!' किंवा 'धन्य! धन्य!' आणि वाईट जागीं जेथें तिरस्कार व्यक्त करायाचा असतो तेथें शिवशिव,! देवादेवा,! व परमेश्वर न करो वगैरे असें बोलण्याचा प्रघात आहे.

अपराध त्यांनीं) क्षमा करावेत व सोडून द्यावेत. (मुसलमानांनों !) कां तुम्हीं चाहत नाहीं कीं परमेश्वरानें तुम(च्या अपराधा)ची क्षमा करावी ? आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. २२. जे लोक पतिव्रता स्त्रियांवर (व्यभिचाराचा) आळ घेतात कीं त्या (बापड्या असल्या गोष्टीकडून केवळ) बेफाम (होत व) विश्वासहि ठेवितात; (असले लोक) इहलोक व परलोक या (दोहों) मध्यें शापित होत. आणि (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांना मोठी (सक्त) शिक्षा होईल; २३. कीं ज्या दिवशीं यांच्याविरुद्ध यांच्या जिभा व यांचे हात व यांचे पाय, हे, यांच्या कर्मांची साक्ष देतील. २४. (आणि) त्या दिवशीं परमेश्वर यांना यांचा पुरा पुरा वाजवी मोबदला देईल; व हे जाणून घेतील कीं परमेश्वरच सत्य व (खऱ्याला खरें) करून दाखविणारा असा होय. २५. दुष्ट स्त्रिया दुष्ट पुरुषांसाठीं असतात. आणि दुष्ट पुरुष दुष्ट स्त्रियांसाठीं; आणि चांगल्या स्त्रिया चांगल्या पुरुषांसाठीं असतात आणि चांगले पुरुष चांगल्या स्त्रियांसाठीं. (तोहमत घेणारे) जो बकवा करीत फिरतात, त्यांच्या (तोहमती) पासून हे लोक (अगदींच) निर्दोष होत. यांच्याकरितां (पर-

(१) दहाव्या वाक्यापासून येथपर्यंत संपूर्ण दोन रुकु म्हणजे स्कंध वा सदर, हें अवर्णनीय प्रकरण जें परमेश्वराचे महाप्रेषित हजरत मोहंमद पैगंबरांस त्यांच्या सन्मान्य पत्नीसंबंधीं घडलें त्यास अनुलक्षून प्रकट झालें आहे. पैगंबरसाहेब जेव्हां जेव्हां प्रवासास जात असत तेव्हां तेव्हां ' उम्महातुल्-मोमिनीन ' ह्मणजे विश्वासूंच्या आई म्हणजे स्वकीय स्त्रियांसंबंधानें फासे टाकून पाहात होते; आणि जिच्या नांवावर फांसा पडे त्या बायकोला आपल्या संगतीं घेऊन जात असत. सारांश, हिजरी सनाच्या पांचव्या वर्षी बनी-मुस्तलिक नामक कुलावर स्वारी घेऊन जात असतांना, बीबी आईशा यांच्या नांवावर फासा निघाला व त्या पैगंबर साहेबांबरोबर गेल्या. परत येतांना मदिना अजून कांहीं दूरच होता कीं एके जागीं मुकाम झाला व कांहीं रात्र असतांच ते तेथून कूच करून निघाले. बीबी आईशा ह्या शौचाकरतां डेऱ्याबाहेर गेल्या होत्या; तेथें त्यांचा मण्यांचा हार जो त्यांनीं चालते वेळीं आपली बहीण अस्मा इजपासून मागून आणिला होता, तो कोठें तुटून पडला. डेऱ्यावर आल्यानंतर माहीत झालें; तेव्हां त्या हार शोधावयास परत गेल्या. तेथें शोधण्यांत वेळ झाला आणि पर-

**लोकीं) क्षमा व इजत अब्रूचा शेर होय. २६. मुसलमानांनों ! आपल्या घरांशिवाय (दुसऱ्या) घरांत त्यांच्यो राहणाऱ्यांस विचारल्याखेरीज व त्यांना सलाम केल्याखेरीज जात जाऊं नका. हें तुमच्याठायीं उत्तम**

---

तून येण्याच्या पूर्वींच लष्कर कूच करून गेलें. उंटाचा सारवान समजला कीं त्या आपल्या हौद्यांत आहेत. व त्यानें तो तसाच बंदचा बंद उंटावर लादला. कोणी ना कोणी तरी मला शोधायास येईल म्हणून ह्या आपल्या जागीं बसून राहिल्या. लष्करामागून एक इसम असतो कीं तो पडलें गेलें उचलून घेतो. कर्मधर्म संयोगानें तो इसम सफवान बिन मुअत्तल हा होता. तो आला तेव्हां त्यानें लांबूनच माणसाची छाया पाहून हाक मारली व त्याला माहीत झालें, कीं त्या बीबी आईशा आहेत. तो आपल्या उंटावरून उतरून या बाईस स्वार करवून व उंटाचो लगाम हातीं धरून पुढें पुढें चालला. गोष्ट तर एवढीच होती; परंतु दांभिकांस बोलण्या चालण्याची संधि सांपडली. सर्वांत जास्त अबदुल्ला बिन उबैय या दांभिकानें याची चर्चा केली व कित्येक मुसलमानहि या आपत्तींत सांपडले. पैगंबरसाहेबांस हें कळलें व ते बीबी आईशाकडून दूरदूर राहूं लागले. बाईहि अगोदरच आजारी होत्या त्यांत ह्या क्लेशामुळें आणखीहि गलितदेह झाल्या व आपल्या माहेरीं गेल्या. सरशेवटीं या पतिव्रता बाईची दोषमुक्तता मोठ्या कंठरवानें परमेश्वरानें प्रकट केली. हजरत अबुबकरचा एक मावस भाऊ मुस्ताह नांवाचा होता. तो गरीब असून स्वदेशत्याग करून मदिनेंत येऊन राहिला होता; व बद्रचे लढाईंतहि सामील झाला होता. हजरत अबुबकर हे त्याची खर्चेवेंच देऊन मदत करीत होते. तोहि दुर्दैवानें या तोहमतीच्या चर्चेत सांपडला. अबुबकर यांनीं आपली मदत बंद केली. परमेश्वरानें मुस्ताहची शिफारस केली व अबुबकर यांनीं पूर्ववत् आपली मदत चालू ठेविली. ही गोष्ट हजरत अबुबकरच्या ईश्वरनिष्ठेचा सर्वोत्तम पुरावा होय. आणि हजरत पैगंबरसाहेबांनीं तर आपल्याला इस्लाम धर्मासाठीं वाहून घेतलें होतें; इस्लामापुढें त्यांना जिवाची पर्वा नव्हती आणि द्रव्याची व इहलौकिक लौकिकाचीहि पर्वा नव्हती. त्यांचा स्नेह व मोहबतहि परमेश्वरासाठीं होती आणि वैर व अदावतहि परमेश्वरासाठीं होती. आपल्या अनुयायांवर इतकी मेहरबानी हा पैगंबरसाहेबांचा एक असा हक्क आहे कीं त्याची फेड आमच्यानें होणेंच शक्य नाहीं.

होय. (हा हुकूम तुम्हांस या हेतुनें दिला गेला आहे) कीं (जेव्हां असा प्रसंग होईल तेव्हां) तुम्हीं कदाचित (याचा) विचार ठेवाल २७. मग जर तुम्हांस आढळून येईल कीं घरांत कोणीच नाहीं, तर जोंपर्यंत तुम्हांस (खास) परवानगी न दिली जाईल तोंपर्यंत त्यांत जाऊं नका. आणि जर (घरांत कोणी असेल व) तुम्हांस सांगितलें जाईल कीं (यावेळीं संधि नाहीं,) परत जा; तर (बेलाशक) परत या. हें (परतणें) तुमच्याठायीं जास्त चोखेपणाची गोष्ट होय. आणि जें कांहींहि तुम्हीं करितां तें परमेश्वर जाणतो. २८. व निर्जन घरें ज्यांत तुमचें कांहीं सामान असेल त्यांत (परवानगीवांचून) चालले जाण्यांत तुम्हांकडे (कांहीं) दोष नाहीं. आणि जें कांहीं तुम्हीं जाहीरपणें करितां व जें कांहीं तुम्हीं गुप्तपणें करितां तें (सर्व) परमेश्वर जाणतो. २९. (हे पैगंबरा!) मुसलमानांस सांग कीं त्यांनीं आपली नजर खालीं राखावी आणि आपली लाज सांभाळावी. हें त्यांच्यासाठीं विशेष निर्मळ होय. (लोक) जें कांहींहि करीत असतात तें परमेश्वराला माहित आहे. ३०. आणि (हे पैगंबरा!) मुसलमान स्त्रियांस सांग कीं त्यांनींहि आपली नजर खालीं राखावी व आपली लाज सांभाळावी, आणि आपल्या शृंगारा(च्या अवयवां)स जाहीर होऊं देऊं नये, पण जो त्यांतून(निरुपायास्तव) खुला[1] राहतो (त्याच्या जाहीर होऊं देण्यास हरकत नाहीं); आणि त्यांनीं आपल्या अंगांवर[2] आपले पदर घ्यावेत व आपल्या शृंगारा(च्या अवयवां)स (कोणावरहि) जाहीर होऊं देऊं नये; पण आपल्या पतींवर

---

(१) "जो त्यांतून (निरुपायास्तव) खुला राहतो" याविषयीं भाष्यकारांनीं निरनिराळे उल्लेख केले आहेत. कोणी म्हणतो, कपडेलत्ते; कोणी ह्मणतो, डाग-डागिने जशा अंगठ्या, कडीं वगैरे किडुकमिडुक. आम्हीं शृंगारस्थळें घेतलीं आहेत. परंतु अस्सल गोष्ट ही कीं, प्रत्येक स्त्रीच्या शृंगाराचें प्रमाण वेगळें असतें. प्रत्येक स्त्रीनें जनाची लज्जा बाळगून संसार चालविण्यास कोणते अवयव (निरुपायास्तव) खुले ठेविले पाहिजेत याची त्यांनींच शास्त्रानुसार योजना करावी.

(२) येथें 'जुयूब' या शब्दाचा अर्थ मी अंग केला आहे. कारण अरबींत 'जुयूब'मध्यें डोकें, मान व ऊर या सार्‍या वरच्या धडाचा समावेश होतो.

किंवा आपल्या बापांवर अगर आपल्या नवऱ्यांच्या बापांवर किंवा आपल्या मुलांवर अगर आपल्या पतींच्या मुलांवर किंवा आपल्या भावांवर अगर आपल्या भावांच्या मुलांवर किंवा आपल्या बहिणींच्या मुलांवर अगर आपल्या (सहवासाच्या) स्त्रियांवर किंवा आपल्या हाताचे माल (म्हणजे दासदासी) यांजवर अगर (आपल्या) ताब्यांतील सेवक (कीं ते) पुरुष (तर) होत (पण स्त्रियाशीं कांहींच) गरज (व कर्तव्य) ठेवित नाहींत, (उदाहरणार्थ हिजडा वा अगदींच थेरडा म्हातारा) अशांवर किंवा लहान मुलें कीं ज्यांना स्त्रियांच्या पडद्या(च्या गोष्टी)ची समजच आलेली नाहीं त्यांजवर (जाहीर झाल्यास अडचण नाहीं). आणि त्यांनीं (चालण्यांत) आपले पाय (इतक्या जोरानें) मारूं नयेत कीं (लोकांस) त्या जो आपला शृंगार गुप्त ठेवितात तो माहीत होऊन जावा. आणि मुसलमानांनो ! तुम्हीं सर्व परमेश्वराच्या सेवेंत पश्चात्ताप करा; कीं कदाचित् तुम्हीं (शेवटीं) आपल्या मनोरथांत सफल व्हाल ३१. आणि तुमच्यांतून जे अविवाहित होत त्यांचें लग्न करून द्या; व आपले दास व आपल्या दासी यांजपैकीं जे सदाचरणी असतील त्यांचेंहि. जर हे लोक गरीब (द्रव्यहीन) असतील तर परमेश्वर आपल्या कृपेनें त्यांस श्रीमंत करून टाकील. आणि परमेश्वर उदार व (सर्वांच्या स्थिति) जाणणारा होय. ३२. आणि जे लोक लग्न करण्याचें सामर्थ्य ठेवीत नाहींत त्यांना पाहिजे आहे कीं त्यांनीं (जारकर्माविषयीं) आपल्याला जपावें; येथपर्यंत कीं परमेश्वर त्यांला आपल्या कृपेनें श्रीमंत करून टाकील. आणि तुमच्या हातांचे माल (म्हणजे दास व गुलाम) यांजपैकीं जे (अमुक रकम देऊन आपली सुटका करून घेण्याचे परवानगीबद्दल) लेख करूं पाहतील व तुम्हीं त्यांच्यांत बरेपणा(चीं चिन्हें) जाणित असाल तर तुम्हीं त्यांच्यापाशीं लेख करून द्या. आणि पर-

---

(१) 'अयामा' या शब्दांत विधवा वा विधुर आणि ज्या स्त्री वा पुरुषाचें मुळीं लग्नच झालें नाहीं ह्या सर्वांचा समावेश होतो; म्हणून आम्हीं अविवाहित हा शब्द सर्व साधारण अर्थात घेतला आहे. या महावाक्यांत विधवा विवाहाची किंवा पुनर्लग्नाची आज्ञा आहे.

**मेश्वरानें जो माल तुम्हांस देऊन ठेविला आहे त्या मालांतून त्यांनाहि द्या; आणि तुमच्या दासी, जर पातिव्रत्य पाळूं इच्छितात तर तुह्मीं इह-लौकिक आयुष्याचे किरकोळ फायदे प्राप्त करण्याच्या हेतूनें त्यांना जारकर्म करण्यास भाग पाडूं नका. आणि जो त्यांना भाग पाडील तर परमेश्वर,त्यांच्या भाग पाडिल्या गेल्यानंतर,क्षमाकर्ता (व) दयाळु होय.३३.**

---

(१) इस्लामाच्या शास्त्रीय परिभाषेंत "मुकातबत" म्हणजे दास व गुलाम यानें आपल्या मालकास सांगावें कीं, मी तुम्हांस मेहनत मजुरी करून अमुक इतके रुपये कमावून देईन; ती रकम घेऊन तुम्हीं मला मुक्त करावें; आणि धन्यानें या गोष्टीस राजी व्हावें. ज्या अर्थी दास्य व गुलामी एक मोठी शिक्षा आहे त्या अर्थी जर एकादा गुलाम व दास, त्यापासून सुटका मिळवूं पाहतो आहे तर मुसलमानांस आज्ञापिलें गेलें आहे कीं, त्याच्या मुक्त करण्यांत कंजुष-पणा व हरकत करूं नये. किंबहुना 'मुकातबत' ह्मणजे लेख ठरल्यावरहि स्वतःहि मदत करीत राहावें अथवा आपले रुपये देऊन त्याजकडून कमाई करवून घ्यावी; पण एवढें मात्र माहीत झालें पाहिजे कीं, त्याच्या अंगीं कमवि-ण्याची योग्यता आहे; आणि तो चटोरा, भटक्या वगैरे चालीचा नाहीं.

(२) या जागीं जराशी शंका येते कीं, दासी स्वतः पतिव्रता होऊन न राहूं इच्छील, तर तिला जारकर्म करण्यास भाग पाडिलें जाऊं शकतें. परंतु हा प्रकार कृतींतला नव्हे; कारण, जेव्हां दासी स्वतःच पातिव्रत्य न पाळूं इच्छील तेव्हां तिला व्यभिचारास भाग पाडण्याची जरूरीच कां होऊं लागणार? अस्सल मतलब दाशांच्या खर्चीची कमाई घेण्यापासून तिरस्कार उत्पन्न करणें व मनाई करणें हा होय.

(३) यांत 'इकराह' म्हणजे भाग पाडिलें जाणें किंवा जबरी करणें या क्रियापदाचे कर्तरी व कर्मणी असे दोन प्रयोग होतात. पहिला कर्तरी प्रयोग घेतला ह्मणजे त्याचा अर्थ मालकानें दासीला भाग पाडणें व दुसरा कर्मणी घेतला ह्मणजे मालकाकडून दासीचें भाग पाडिलें जाणें असा होतो. आम्हीं भाषांतरांत हा दुसरा कर्मणी प्रयोग घातला आहे. तर अर्थ हा झाला कीं धनी दासीला व्यभिचार करण्यास भाग पाडील तर दासीवर कांहीं पाप नाहीं. पहिल्या प्रकाराचा हा अर्थ होईल कीं धन्यानें दासीला जारकर्म करण्यास भाग पाडिलें असेल व मग तो पश्चात्ताप करील तर परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. उमेद आहे कीं, परमेश्वर त्याचें पाप क्षमा करील.

**(मुसलमानांनों !) आम्हीं (या कुराणांत) तुम्हांकडे स्पष्ट स्पष्ट हुकूम पाठविले आहेत; आणि जे लोक तुमच्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांचा अहवालहि; आणि (परमेश्वराला) भिऊन वागणारांसाठीं उपदेश(-पर गोष्टी). ३४. परमेश्वर(-तेजानेंच) आकाश व पृथ्वीचा प्रकाश होय. त्याच्या प्रकाशाची उपमा अशी आहे कीं जशी एक मेहराब आहे (व) मेहराबींत एक**

(१) यांत 'नूर' या शब्दाचा अर्थ मी प्रकाश केला आहे. परंतु अंधकाराच्या उलट जो प्रकाश तो प्रकाश समजावयाचा नाहीं. अशा ह्या प्रकाशाच्या विरुद्ध अर्थाचा कोणताहि शब्द नाहीं; म्हणून मानवबुद्धीस उमजण्यासाठीं नाइलाजास्तव त्याला ह्याच प्रकाशाची उपमा देणें उचित आहे. ह्या उपमेच्या अर्थासंबंधानें विद्वानांचीं भिन्नभिन्न मतें आहेत. त्यांतल्या त्यांत **इमाम फखुद्दीन राजी** या महान विद्वानांनीं जें स्पष्टीकरण केलें आहे, तें असेंः-**(अ)** प्रकाश म्हणजे विश्वास किंवा भाव; कारण परमपूज्य परमेश्वरानें विश्वासू मनुष्याच्या उरास मेहेराबीची व त्याच्या हृदयास कंदिलाची आणि कंदिलास चकाकत्या ताऱ्याची व ईश्वरैक्यवाचक शब्दांस शुभ व आशिर्वादित अशा झाडाची उपमा दिली आहे; ह्या झाडाला भयरूपी सूर्याचे उष्णतेपासून व आशारूपी सावलीपासून लाभ मिळत असतो. हे प्रसादरूपी शब्द विश्वासू किंवा भाविकाच्या तोंडांतून निघाल्यावांचूनहि जगास प्रकाशमय करीतील. आणि जर हे शब्द तोंडातून निघतील व अंतःकरण त्यांस खरें जाणील तर मग काय पाहतां प्रकाशावर प्रकाश प्रगट होईल. म्हणून ज्या घरांत दिव्याचा प्रकाश असतो त्या घरांत चोर येत नाहीं. असाच ज्या मनांत एकाच व सर्व शक्तिमान् परमेश्वराच्या विश्वासाचा प्रकाश असतो त्यांत सैतानाचा प्रवेश होत नाहीं. आणि घरांतील छिद्रांतून प्रकाश बाहेर पडून अंतर्बाह्य प्रकाशित होतें, तसेंच विश्वासाचा प्रकाश मनावर पडून त्याचें ज्ञानरूपी तेज ज्ञानेंद्रियांवर पडतें व त्यामुळें भक्तांचें तेज सर्व अवयवांत प्रदीप्त होऊन त्या विश्वासूची मुद्रा तेजस्वी दिसूं लागते. **(ब)** दुसरें एक स्पष्टीकरण असेंहि आहे कीं, तो प्रकाश म्हणजे कुराण, विश्वासूचें हृदय तें कांचेचें कंदील, व त्याची जीभ ती मेहाराब; आणि ज्या झाडाच्या तेलापासून कुराणरूपी प्रकाश उत्पन्न होतो तें झाड म्हणजे 'वह्य'-दिव्य प्रकटीकरण-कीं तें घडलेलें किंवा मनानें खोटेंनाटें रचिलेलें नव्हे. विश्वास धरल्यावर विश्वासूला त्याचीं प्रमाणें स्पष्ट व सुबोध होतील; पण जेव्हां तो तें वाचील तेव्हां प्रकाशावर प्रकाश प्रगट होईल.

दिवा (ठेवलेला आहे; आणि) दिवा एका कांचेच्या कंदिलांत आहे; आणि कंदील (इतका पारदर्शक चकचकीत आहे,) जणूं कीं तो मोत्याप्रमाणें चकाकता असा एक ताराच होय. (तो दिवा) 'जैतून'च्या एका आशिर्वादित झाडा(च्या तेला)नें जाळला जातो कीं तें पूर्वेकडेसहि नाहीं व पश्चिमेकडेसहि नाहीं; त्याचें तेल (इतकें स्वच्छ आहे कीं) जरी त्याला अग्नि स्पर्शहि न करील तरीहि असें वाटतें कीं तें (आपोआप) प्रकाशूं लागेल. (सारांश, एकच प्रकाश नव्हे; तर) प्रकाशावर प्रकाश होय. परमेश्वर आपल्या प्रकाशाकडे ज्याला इच्छितो त्याला मार्ग दाखवितो. आणि परमेश्वर लोकांच्या(समजण्या)साठीं दृष्टांत सांगतो; आणि परमेश्वर प्रत्येक वस्तू(च्या स्थिती)शीं माहितगार होय ३५. (आणि तो दिवा परमेश्वराच्या) अशा घरांत (म्हणजे उपासनालयांत पेटविला जातो) कीं ज्यांच्यासंबंधानें परमेश्वरानें परवानगी दिली आहे कीं तीं उंच उभारलीं जावींत व त्यांत परमेश्वराचें नांव घेतलें जावें. त्यां(उपासनालयां)त सकाळसांज असे लोक परमेश्वरा(च्या नांवा)ची पवित्रता गातात; ३६. कीं ज्यांना उदीमव्यापार व क्रयविक्रय हीं परमेश्वराचें स्मरण व नमाज पढणें व जकात देणें या गोष्टींपासून गाफिल करूं शकत नाहींत. (कां कीं, ते लोक) त्या दिवसाला भितात कीं जेव्हां (भयामुळें) हृदयें उलटून जातील व डोळे (फिरलेचे फिरलेच राहून जातील.) ३७. (आणि याच विचारानें हे लोक भक्तींत लागून राहिले आहेत,) कीं परमेश्वर त्यांना त्यांच्या कर्मांचा उत्तमोत्तम मोबदला देईल आणि त्यांना आपल्या कृपेनें कांहीं विशेषहि देईल. आणि परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला बेसुमार देतो. ३८. आणि जे लोक(इस्लामधर्मास)नाकारितात त्यांचीं कर्में (निव्वळभ्रमाचा भोपळा होत) जशी सपाट मैदानांत चकाकणारी रेती कीं तान्हेला तिला (दुरून) पाणी समजतो; येथ पावतों कीं जेव्हां तिच्याजवळ आला

(१) ही नास्तिकांच्या निराशावस्थेची उपमा आहे कीं, पुढील कल्याणाच्या आशेवर जगांत कर्में आचरीत राहिले; आणि जेव्हां कर्मांचें फळ भोगण्याचा वेळ आला, तेव्हां नास्तिकपणामुळें कर्मांस खोटें मोती व खोटा शिक्का पावले. उलट घेण्याचें देणें पडलें. ---

तेव्हां तिला कांहींच पावला नाहीं; (आणि तान्हेनें तडफडून तडफडून मरून गेला) व (पाहिलें तों) परमेश्वरास आपल्यापाशीं पावला. आणि त्यानें त्या(च्या कर्मा)चा हिशेब पुरा पुरा चुकवून दिला. आणि परमेश्वर फटक्या भरांत हिशेब करणारा होय. ३९. अगर (त्यांच्या कर्मांची उपमा) फार खोल समुद्राच्या आंतील अंधःकारासारखी (होय) कीं समुद्रास लाटेनें आच्छादून ठेविलें आहे. आणि (लाटहि एक नव्हे तर) लाटेवर लाट, तिच्यावर आभाळ; (एवंच) अंधःकार आहेत एकाचे वरती एक; कीं (समुद्राच्या बुडाशीं कोणी मनुष्य) आपला हात काढील तर आशा नाहीं कीं तो त्याला पाहूं शकेल. आणि ज्याला परमेश्वरच प्रकाश (म्हणजे सन्मार्ग) न देईल, तर त्याला (कोणाहि कडूनच) प्रकाश (–आधार) नाहीं. ४०. (हे वाचक–श्रोत्या !) कां तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं जेवढी (सृष्टि) आकाश व पृथ्वींत आहे ती (सर्व) परमेश्वराची पवित्रता गाते. आणि पक्षी (–हि जे) पंख पसरून (उडत फिरतात. ते) सर्वांस आपापली नमाज व आपापलें पावित्र्यवर्णन (यांची रीति) माहीत आहे. आणि जे कांहीं हे करितात परमेश्वर त्याशीं वाकब होय. ४१. आणि आकाश व पृथ्वीची हुकमत परमे-

(१) ज्याप्रमाणें जगाच्या प्रकाशांतून कोणताही प्रकाश या दर्जाचा होऊं शकत नाहीं कीं, त्याची परमेश्वराच्या प्रकाशांशीं तुलना केली जाईल; त्याचप्रमाणें जगाच्या अंधःकारांतून कोणताही अंधःकार असा होऊं शकत नाहीं कीं, त्याला नास्तिकपणाच्या अंधःकाराशीं तुलना दिला जाईल. तरी ही काळोखी रात्र आहे; समुद्राच्या तळांत एक माणूस आहे; व समुद्रांत तुफान झालें आहे कीं, लाटावरलाटा चालल्या येतात; वरती दाट आभाळ आहे. ह्या सर्व गोष्टींच्या एकत्र होण्यानें समुद्रतळांत जो अंधःकार होईल तो कांहीं अंशीं नास्तिकपणाच्या अंधःकाराशीं साम्यता राखूं शकेल.

(२) मतलब हा कीं, जगाचा अणुअणु परमेश्वराची साक्ष देतो. त्याचें अस्तित्व या गोष्टीचें प्रमाण आहे कीं, तो अणु आपोआप निर्माण झाला नाहीं किंवहुना कोणाच्या तरी बनविल्यानें बनला; आणि ज्यानें बनविलें तोच परमेश्वर होय. धर्महीन माणूस तोंडानें परमेश्वरास नाकारितो परंतु त्याचें रोम रोम परमेश्वराच्या परमेश्वरत्वाची साक्ष पटवितें.

श्वराचीच होय; आणि परमेश्वराकडेच (सर्वांस)परतून जाणें आहे. ४२. (हे वाचक–श्रोत्या !) कां तूं (या गोष्टींचें) अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वरच आभाळांस हांकलून नेतो. व मग आभाळा(च्या तुकड्यां)स आपसांत जोडतो; व मग त्यांस एकावर एक असे ढीग करून ठेवितो. मग (हे वाचक–श्रोत्या !) तूं आभाळांतून पाऊस निघतांना पाहतोस. आणि आकाशांत जे (गारांचे) पर्वत (म्हणजे थिजलेले ढग,) होत त्यांच्यांतून (तोच) गारा पाडतो. तर तो ज्याच्यावर इच्छितो त्याच्यावर गारा पाडतो आणि ज्याच्यापासून इच्छितो त्याच्यापासून त्यांस दूर राखतो. आभाळांच्या विजेची चमक जणूं डोळ्यां(च्या प्रकाशा)स उचकून घेऊन चालली जाते. ४३. परमेश्वर रात्र व दिवसाचा फेरबदल करीत राहतो. जे लोक दृष्टि बाळगितात त्यांच्यासाठीं यांत अवश्यच एक धडा होय. ४४. आणि परमेश्वरानेंच सर्व (चालत्या फिरत्या) प्राण्यांस पाण्यांपासून[1] निर्माण केलें आहे. तर त्यांत (कित्येक) असे होत कीं जे आपल्या पोटावर चालतात. आणि (कित्येक) त्यांतून असे होत कीं जे दोन पायांवर चालतात; आणि (कित्येक) त्यांतून असे होत कीं जे चार (अथवा अधिक पायां)वर चालतात. परमेश्वर जें इच्छितो तें निर्मितो. निःसंशय परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. ४५. आम्हींच (या) निशाण्या पाठविल्या(कीं लोकांस) त्या (आमच्या सामर्थ्याचें) सूचक होत. आणि परमेश्वरच ज्याला इच्छितो त्याला सरळ मार्गाकडे नेतो. ४६. आणि (दांभिक लोक) म्हणतात कीं आम्हीं परमेश्वराचा व (तसाच) पैगंबराचा

(१) कित्येक भाष्यकारांनीं पाण्याचा वीर्यबिंदु असा अर्थ घेतला आहे. तर चालत्या फिरत्या प्राण्यांत मनुष्य व चतुष्पाद वगैरे जनावरें यांचा समावेश होईल. नाहीं तर, बहुतेक प्राणी कीटक वगैरे मातींतून निपजतात; पण या प्राण्यांच्या बनावटींत मातीप्रमाणें पाण्याचाहि भाग असतोच. आणि सर्वोत्तम कारण मिमांसा ही होय कीं सृष्टीच्या आरंभीं पाणीच पाणी होतें. मग परमेश्वरानें पाण्यांत लहेर उत्पन्न केली व त्यानें फेंस पैदा झाला. फेंस जमून जाऊन जमीन बनली. तर या मानानें पाणी सर्व प्राण्यांचें मूळ ठरलें. ह्यांत तर कांहींच संशय नाहीं कीं प्राणीमात्रास पाणी हा जीवनोपाय होय. नवल नाहीं कीं यामुळेंच पाण्यांतून प्रत्येक वस्तूनें निर्माण करणें सांगितलें असावें.

**विश्वास धरिला आणि (त्यांची) आज्ञा पाळली; मग ह्यानंतर यांच्यांतला एक पक्ष (त्यांच्या हुकमाकडून) तोंड फिरवितो. आणि ते (मुळापासून) मुसलमानच नव्हत. ४७. आणि जेव्हां त्यांना परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजकडे बोलाविलें जातें कीं त्यानें त्यांच्यांत (त्यांच्यापरस्पर झगड्यांचा) न्याय चुकवावा; तेव्हांच त्यांच्यांतला एक पक्ष अंग काढून घेतो. ४८. आणि जर सत्य यांच्याबाजूला असेल तर ते (बेलाशक) माना वांकवून पैगंबराकडे (पळत) चालले येतात. ४९. कां यांच्या अंतःकरणांत (अधर्माचा) रोग आहे ? अगर हे संशयांत पडले आहेत अथवा ते (या गोष्टीस) भितात, कीं (कोठें) परमेश्वर व त्याचा पैगंबर त्यांचा हक्क मारून बसतील ? (परमेश्वर व पैगंबर तर कां म्हणून अन्याय करूं लागले ?) किंबहुना हे आपणच (सर्वांत मोठे) अन्यायी होत,५०. मुसलमानां(चें कर्तव्य तर हें होय कीं त्यां)स जेव्हां परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजकडे बोलाविलें जातें कीं त्यानें त्यांच्यांत (त्यांच्या परस्पर भांडणांचा) निकाल लावून टाकावा; तेव्हां त्यांनीं केवळ (इतकेंच) बोलावें कीं आम्हीं (बोलाविणें) ऐकिलें आणि (परमेश्वर व पैगंबराचा) हुकूम मानिला. आणि हेच लोक (परलोकीं आपल्या) मनोरथांत सफळ होतील. ५१. आणि जो कोणी परमेश्वराचा हुकूम मानील व परमेश्वराला भीत राहील आणि त्याच्या (गैरमर्जी) विषयीं जपत राहील तर असलेच लोक (सरशेवटीं आपल्या) मनोरथांत सफल होतील. ५२.**

---

(१) हीं महावाक्यें बिश्र नामक एका दांभिकासंबंधानें प्रकट झालीं आहेत; त्याच्या व एका यहुद्याच्या दर्म्यान भांडण होतें. यहुदी म्हणत होता कीं चल, तुझ्या पैगंबराकडे, ते जें सांगतील तें आपण दोघे मान्य करूं. त्या यहुद्याला पैगंबरसाहेबांच्या निकालावर भरवंसा होता व त्याची बाजूहि सत्य होती. बिश्र हा त्याला कअब बिन अश्रफ यहुद्याकडे घेऊन जाऊं पाहत होता; कां कीं शिफारस, भीड व लालुच यांचा लाभ त्याच्या येथें मिळूं शकेल. कांहीं झालें तरी प्रकटीकरणाचें कारण खास आहे. परंतु मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे कीं आतांहि आम्हीं मुसलमान या महावाक्यांत म्हटल्या सारखेच आहोंत. आम्हीं जर आपली भांडणें परमेश्वर व पैगंबराकडे रुजू करूं तर कोर्टांत जाऊन कां म्हणून कष्टी होऊं ? जसा विश्वास कमजोर आहे. तसेच परिणामहि भोगावे लागत आहेत.

आणि (हे पैगंबरा! दांभिक लोक) परमेश्वराच्या मोठ्या कडकडीत शपथा वाहून म्हणतात (कीं आम्हीं तर तुझे इतके आज्ञाधारक आहोंत) कीं जर तूं हुकूम देशील तर बिनहरकत (घरदार सर्व सोडून बाहेर) निघून उभे राहूं. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं शपथा वाहूं नका. (तुमची) आज्ञाधारणा[1] (म्हणजे तिची हकीकत) माहित आहे. आणि जें कांहीं तुम्हीं करितां त्याशीं परमेश्वर खूप माहीतगार होय. ५३. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं परमेश्वराचा हुकूम माना आणि पैगंबराचा हुकूम माना; मग जर तुम्हीं (त्यांच्या हुकमापासून) तोंड फिरवाल तर (पैगंबरीची) जी (जिम्मेदारी) पैगंबरावर लादलेली आहे तिचा जबाबदार तो होय; आणि (आज्ञापालनाची) जी (जिम्मेदारी) तुम्हांवर लादलेली आहे तिचे जबाबदार तुम्हीं आहां. आणि जर तुम्हीं पैगंबराच्या म्हणण्यावर चालाल तर मार्गाला लागून जाल. आणि पैगंबराकडे तर (ईश्वराज्ञेचें) स्पष्टपणें पोहोचतें करणें एवढेंच होय, झालें. ५४. तुमच्यांतून ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि करितात त्यांना परमेश्वरानें अभिवचन दिलें आहे कीं (एका ना एका दिवशीं) तो त्यांना, त्यांच्यापूर्वीं जे लोक होऊन गेले आहेत त्यांस जसा त्यानें राज्याधिकार दिला होता तसाच अवश्य पृथ्वींत राज्याधिकार देईल. आणि जो धर्म त्यानें त्यांच्यासाठीं पसंत केला आहे त्या (इस्लामधर्मा)ला तो त्यांच्या करितां भक्कम जमवून टाकील; आणि त्यांना (जें) भय (लागलेलें) आहे त्याच्या नंतर (लवकरच) तो त्यांस (त्याच्या) बदलीं अभय देईल; कीं (समाधानानें) ते माझी उपासना करीत राहतील; आणि कोणाहि वस्तूला माझा जोडीदार बनविणार

(१) एक अर्थ हाहि होऊं शकतो कीं शपथा वाहणें व बाता बनविण्याची काय जरूरी आहे ? दस्तुराप्रमाणें आज्ञाधारण तुह्मांपासून मागितलें जातें; व त्यावर रंग चढविणें, कीं ("आम्हीं तर तुझे इतके आज्ञा धारक आहोंत कीं) जर तूं हुकूम देशील तर बिनहरकत ( घरदार सोडून बाहेर ) निघून उभे राहूं." या निरर्थक आपमतलबी गोष्टी होत.

(२) ह्या व पुढील वाक्यांत स्पष्ट व भक्कम अशी भविष्यवाणी पैगंबरसाहेबांच्या पैगंबरीच्या बळकट प्रमाणांपैकीं होय आणि ती पूर्ण होतांना सर्व जगानें पाहिली आहे.

नाहींत. आणि जो कोणी ह्या (सर्व उपकारां)नंतर कृतघ्नता करील; तर असलेच लोक आज्ञाभंजक होत. ५५. आणि (मुसलमानांनों !) नमाज पढीत असा व जकात देत जा आणि पैगंबराच्या कह्याप्रमाणें चाला; कदाचित तुम्हांवर दया केली जाईल.५६. (हे पैगंबरा !) तूं अशी कल्पना करूं नकोस कीं नास्तिक, मुलखांत (कोठें तरी पळून आम्हांला) हारवून टाकतील. (तसें नव्हे, हे खुद्द हरून जातील.) आणि (अखेर) त्यांचे ठिकाण नरकाग्नि होय; आणि अर्थात् (तें फारच) वाईट ठिकाण होय. ५७ मुसलमानांनों ! तुमच्या हाताचे माल(म्हणजे दास दासी) आणि तुम्हांपैकीं जे पूर्ण वयास पोहोंचलेले नाहींत ते ह्यांनीं तीन वेळांत (तुम्हांजवळ येण्याची) तुम्हांपासून परवानगी घेत जावी. (एक तर) सकाळच्या नमाजीच्या अगोदर, व (दुसरी जेव्हां तुम्हीं दोन प्रहरीं (निजायासाठीं नित्याप्रमाणें) कपडे उतारून ठेवित असतां त्यावेळीं आणि (तिसरी) 'इशा' (म्हणजे रात्री)च्या नमाजीनंतर (हे) तीन (वेळ) तुमच्या पडद्याचे वेळ होत. ह्या(वेळां)उपरांत (विनपरवागीनें येऊं देण्यांत) तुम्हांकडे कांहीं दोष नाहीं; आणि (विन परवानगीनें चालले येण्यांत) त्यांच्या कडेहि (कांहीं दोष) नाहीं. (कारण, ते) बहुतेक तुम्हांपाशीं येत जात राहतात; (आणि) तुम्हांपैकीं कित्येकांस (म्हणजे दास दासीस) कित्येका(ह्मणजे तुमच्या)पाशीं (येण्याजाण्याची जरूरी लागलेलीच राहते तर वारंवार परवानगी मागण्यांत तुम्हां लोकांस मोठी अडचण पडेल). ह्याप्रमाणें परमेश्वर (आपले)हुकूम तुम्हांस स्पष्ट करून सांगतो आणि परमेश्वर ज्ञानी (व) बुद्धिमान होय. ५८. आणि (मुसलमानांनों !) जेव्हां तुमचे मुलगे पूर्ण वयास पोहोंचतील तेव्हां ज्याप्रमाणें यांच्यापूर्वील लोक (म्हणजे यांच्यापेक्षां मोठया वयाचे घरांत येण्याकरितां) परवानगी मागीत असतात, त्याच प्रमाणें यांनींहि परवानगी मागितली पाहिजे. अशा रीतीनें परमेश्वर आपले हुकूम तुम्हांस स्पष्ट करून सांगतो. आणि परमेश्वर ज्ञानी (व) बुद्धिमान् होय. ५९. आणि फारच वयातीत म्हाताऱ्या स्त्रिया ज्यांना लग्नाची आशाच (उरलेली) नाहीं, त्या जर आपले कपडे (चादर वगैरे) उतरून ठेवतील तर यांत त्यांच्यावर कांहीं पाप नाहीं. (पण) त्यांनीं (आपला) शृंगार मात्र दाखवितां कामा नये, आणि त्या (जर याविषयींहि) जपत राह-

तील तर त्यांच्याठायीं उत्तम होय. आणि परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ६०. (तर) आंधळ्या(मनुष्या)साठीं कांहीं हरकत नाहीं व लंगड्या (मनुष्या)साठींहि कांहीं हरकत नाहीं आणि आजाऱ्यासाठीं कांहीं हरकत नाहीं व (सामन्यतः) तुम्हां मुसलमानांसाठींहि यांत कांहीं हरकत नाहीं कीं आपल्या घरीं जेवावें किंवा आपल्या वडिलांच्या घरीं अगर आपल्या आईच्या घरीं किंवा आपल्या भावांच्या घरीं अगर आपल्या बहिणींच्या घरीं किंवा आपल्या चुलत्यांच्या घरीं अगर आपल्या आत्यांच्या घरीं किंवा आपल्या मामांच्या घरीं अगर आपल्या मावशांच्या घरीं किंवा ज्यांच्या किल्ल्या तुमच्या अधिकारांत आहेत त्या घरीं अगर आपल्या मित्रांच्या घरीं. (मग यांतहि) तुम्हांवर कांहीं दोष नाहीं कीं सगळे मिळून जेवा किंवा वेगळे वेगळे. तर जेव्हां घरांत शिरूं लागाल, तेव्हां आपल्या(लोकां)स सलाम करीत जा; (सलाम एक)

(१) लोकांत स्नेह व ऐक्य पैदा करण्याचें एक उत्तम साधन पंक्तिव्यवहार हा होय. या महावाक्याचा उद्देशहि हाच दिसून येतो कीं, मुसलमानांनीं याद्वारें परस्पर ऐक्य वाढवावें. आजहि लोकांची हीच स्थिती आहे कीं, होताहोईतों एकमेकांच्या येथें जेवत नाहींत कीं, लोक त्यांना लालची व वाईट दानतीचे समजूं लागतील; कित्येक लंगडे, पांगळे वगैरे लोक नाइलाजामुळें एकीकडे राहतात कीं कोणी त्यांस क्षुल्लक न समजावें. तुम्हीं माझ्यायेथें जेवलां व मी तुमच्यायेथें जेवलों ही रीत बहुतेक चालू झाली तर कांहीं संशय नाहीं कीं, मुसलमानांत एकदिली व ऐक्य स्थापन करण्याची ही उत्तम युक्ति आहे. "ज्यांच्या किल्ल्या तुमच्या अधिकारांत आहेत" याचा अर्थ हाहि होऊं शकतो कीं नातेवाईकांपैकीं कोणी कोठें पाहुणा जातो तेव्हां जवळच्या आप्तास ज्याच्यावर त्याचा विश्वास आहे, घरच्या किल्ल्या सोंपवून जातो. अर्थात् ही एकप्रकारची परवानगीच होय कीं, तुम्हांला ज्या वस्तूची गरज लागेल ती घरांतून घेत जा. परंतु हे किल्ल्या राखणारे आपण होऊन परकीयपणा दाखतात. नाहींपेक्षां घरधन्याच्या गैरहजरींत त्यांनीं एखादी जरूरीची वस्तु घेतली तर तो धनी येऊन खुषच होईल. पण जगांत सर्वांस आपलें आपलें पडलें आहे; कोणी कोणाबरोबरहि दानशूरता करूं इच्छित नाहीं आणि मोबदला फेडण्याच्या भितीनें कोणी अशा उदारपणापासूनहि फायदा करून घेत नाहीं. इस्लामधर्मांत बंधुत्व वाढविण्यास ही एक उत्तम युक्ति परमेश्वरानें दाखविली आहे. भाष्यकारांनीं हा अधिकारी ह्मणजे पोरक्या मुलाचा पुरस्कर्ता व व्यवस्थापक असाहि अर्थ घेतला आहे.

चांगला आशिर्वाद (होय कीं जो तुम्हां मुसलमानांस) परमेश्वराकडून (शिकविला गेला आहे); शुभकारक (व) उत्तम. अशा प्रकारें परमेश्वर (आपले) हुकूम तुम्हांस स्पष्ट करून करून सांगतो कीं कदाचित् तुम्हीं समजाल. ६१. (खरे) मुसलमान म्हटले म्हणजे ज्या लोकांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजवर विश्वास ठेविला आहे तेच होत. आणि जेव्हां अशा एखाद्या गोष्टी साठीं कीं ज्यांत लोकांची गोळा होण्याची जरूरी आहे, पैगंबरापाशीं ते असतात, तेव्हां जोंपर्यंत ते पैगंबरापासून परवानगी न घेतील, तोंपर्यंत ते (बैठकींहून उठून) जात नाहींत. (हे पैगंबरा!) जे लोक (अशा प्रसंगीं) तुजपासून परवानगी मागून घेतात, खरोखरीं तेच लोक होत कीं ज्यांनीं (खऱ्या मनानें) परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विश्वास धरिला आहे तर जेव्हां हे लोक आपल्या एखाद्या (आवश्यक) कामा साठीं तुजपासून (जावयाची) परवानगी मागतील, तेव्हां तूं यांच्या पैकीं ज्याला (योग्य समजून) इच्छिशील त्याला (जाण्याची) परवानगी देत जा; आणि परमेश्वराच्या सेवेंत त्यांच्यासाठीं क्षमेची प्रार्थनाहि कर. निःसंशय परमेश्वर क्षमा कर्ता (व) दयाळू होय. ६२. (मुसलमानांनों! जेव्हां) पैगंबर (तुमच्यांतून कोणालाहि बोलावील तेव्हां त्या)च्या बोलाविण्यास जसें तुम्हीं एकमेकांस बोलावित असतां तसें आपसांत (साधारण बोलाविणें) समजूं नका. जे लोक तुमच्यांतून लपूनछपून (पैगंबराच्या बैठकींतून विनपरवानगीनें) सटकून निघून जातात, अशा लोकांस परमेश्वर खूप जाणतो. तर जे लोक पैगंबराच्या हुकमाचा विरोध करतात त्यांना या(गोष्टी)स भ्यालें पाहिजे कीं (कोठें) त्यांच्यावर एखादी आपत्ति न ओढवो अगर त्यांच्यावर (आणखी कोणी) दुःखदायक शिक्षा न येवो. ६३. पाहा, हो! जें कांहीं आकाश व पृथ्वींत आहे तें सर्व परमेश्वराचेंच होय. तुम्हीं (लोक) ज्या(मार्गा)वर (चालत) आहां त्यास परमेश्वर खूप जाणतो. आणि ज्या दिवशीं (लोक पुनरुत्थानांत) परमेश्वराकडे परतून आणिले जातील त्या दिवशीं ते जशीं (कांहीं जगांत) कर्में करीत राहिले आहेत तसें (त्यांचें बरें वाईट) परमेश्वर त्यांस विदित करील. आणि परमेश्वर सर्व कांहीं जाणतो. ६४.

# अध्याय २५ वा.

## सूरतुल्-फुर्कान.

हा अध्याय मक्काशहरीं प्रकट झाला. ह्यांत ७७ महावाक्यें आहेत. याचें नांव 'फुर्कान' यासाठीं पडलें कीं, फुर्कान म्हणजे फरक करणारा किंवा सत्य व असत्य यांजमध्यें भेद दाखविणारा असा जो ग्रंथ तो. हें कुराणाचें दुसरें नांव होय. तसेंच तें पूर्वी हजरत मूसाच्या नियमशास्त्राचेंहि नांव होतें. कुराणांत या नियमशास्त्राचाहि समावेश झाला आहे म्हणून याला 'फुरर्कान' नांव देणेंहि वाजवी दिसतें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नावांनें (मी आरंभ करितों)**

**धन्य तो (परमेश्वर कीं) ज्यानें आपला सेवक (मोहंमद) याजला कुराण प्रकट केलें; अशासाठीं कीं त्यानें सकल जगा(च्या लोकां)साठीं भय सुचविणारा व्हावें. १. तोच तर होय कीं ज्याचें आकाश व पृथ्वीचें राज्य आहे; आणि तो कोणी पुत्रहि ठेवीत नाहीं; आणि राज्यांत (कधीं) कोणी त्याचा जोडीदारहि राहिला नाहीं. आणि त्यानेंच प्रत्येक वस्तु निर्माण केली व मग हरेक वस्तूसाठीं एक (योग्य) अंदाजा ठरवून दिला. २. आणि नास्तिकांनीं परमेश्वराशिवाय (दुसरे) असे उपास्य**

(१) उदाहरणार्थ मनुष्य अमुक एक वेळेपर्यंत आईच्या पोटांत राहतो व मग अमुक एक वेळेपावेतों दुधावर पोशिला जातो. मग त्याला दांत येतात व तो अन्न खाऊं लागतो. आणि एका मुदतीपर्यंत त्याचें शरीर व बुद्धि वृद्धिंगत होत जाते; नंतर उतार सुरू होतो व शेवटीं मरून जातो. अशाप्रकारें जगांतील प्रत्येक गोष्टी यांचा एक अंदाजा बांधिलेला असतो, कोणतीच गोष्ट या अंदाजाबाहेर जात नाहीं. चमत्कार झाले तरी त्यांचाहि अदाज्यांतच समावेश होतो. कारण परमेश्वराचा खरा अंदाजा कोणालाच माहीत होऊं शकत नाहीं.

पत्करून ठेविले आहेत, कीं जे कोणतीच वस्तु निर्माण करीत नाहींत, किंबहुना ते (खुद्द दुसऱ्याचे) निर्मिलेले (व पैदा केलेले) होत. आणि खुद्द त्यांचें आपलें नफा व नुकसानहि त्यांच्या सत्तेंत नाहीं; आणि (तसेंच) मरणें, व जिणें आणि (मेल्यावर जिवंत होऊन) उठणें हींहि त्यांच्या अखत्यारांत नाहींत. ३. आणि नास्तिक (कुराणासंबंधानें) म्हणतात कीं हें तर निव्वळ पाखंड होय कीं तें त्या (मनुष्या म्हणजे पैगंबरा)नें (आपल्या कल्पनेनें) रचिलें आहे आणि इतर लोकांनीं या(बनावटींत) त्याची मदत केली आहे. (अशी गोष्ट उच्चारण्यानें) ह्या लोकांनीं (फारच) अनर्थ व (सर्वतोपरी) लबाडी केली. ४. आणि ते (हेंहि) म्हणतात कीं (कुराण) पूर्वींच्या लोकांच्या गप्पा होत. त्या या (मनुष्या)नें कोणाहिपासून लिहिविल्या आहेत; व त्याच, सकाळसांज त्याला वाचून वाचून ऐकिविल्या (व पाठ करविल्या) जातात. ५ (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं (हें कुराण तर) जो (परमेश्वर) आकाश व पृथ्वींतलि सर्व गुप्त गोष्टी जाणतो, त्यानें प्रकटिलें आहे. निःसंशय तो फारच क्षमा कर्ता (व) दयाळू होय; (कीं तुम्हांला तुमच्या कुभांडाची तात्काळ शिक्षा देत नाहीं.) ६. आणि (नास्तिक हेंहि) म्हणतात कीं हा कसला पैगंबर आहे कीं तो अन्न खातो व बाजारांतून फिरतो ? याच्यापाशीं एकादा दूत कां नाहीं पाठविला गेला कीं याच्या संगतीं राहून (तोहि लोकांस ईश्वरीशिक्षेचें) भय दाखविता ? ७. अगर याच्यावर एकादा खजीना (ह्मणजे द्रव्य) याचा वर्षाव केला गेला असता ? अथवा (जास्त नाहीं तर) याच्यापाशीं एक बागच असती कीं तो तींतून खाता (पिता)? आणि (हे) अनर्थकारी, (मुसलमानांस) म्हणतात कीं तुम्हीं तर केवळ अशा मनुष्याच्या मागें लागला आहां कीं ज्याच्यावर कोणी तरी जादू केली आहे. ८. (हे पैगंबरा !) पाहा ! (तर खरें, हे लोक) तुझ्यासंबंधानें कसकसे दृष्टांत देतात; कीं जेणेंकरून (हे आपणच) बहकून गेले. आणि हे (कोणाहि तऱ्हेनें पुन्हां) मार्गावर येऊं शकत नाहींत ९ (परमेश्वरापाशीं कोणाहि वस्तुची कमी नाहीं;) तो असा शुभकारी होय, कीं तो इच्छील तर (एक बाग काय ?) याहूनहि उत्तम (पुष्कळ) बागा तुजसाठीं उपलब्ध करून देईल; कीं ज्यांच्याखालून नद्या वाहत असतील; आणि (बागाखेरीज) तुझ्या(राहण्या)साठीं महेल (तयार) करून

# अध्याय २५ वा.

# सूरतुल्-फुर्क़ान.

हा अध्याय मक्काशहरीं प्रकट झाला. ह्यांत ७७ महावाक्यें आहेत. याचें नांव 'फुर्क़ान' यासाठीं पडलें कीं, फुर्क़ान म्हणजे फरक करणारा किंवा सत्य व असत्य यांजमध्यें भेद दाखविणारा असा जो ग्रंथ तो. हें कुराणाचें दुसरें नांव होय. तसेंच तें पूर्वी हजरत मूसाच्या नियमशास्त्राचेंहि नांव होतें. कुराणांत या नियमशास्त्राचाहि समावेश झाला आहे म्हणून याला 'फुरक़ान' नांव देणेंहि वाजवी दिसतें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नावांनें (मी आरंभ करितों)**

**धन्य तो (परमेश्वर कीं) ज्यानें आपला सेवक (मोहंमद) याजला कुराण प्रकट केलें; अशासाठीं कीं त्यानें सकल जगा(च्या लोकां)साठीं भय सुचविणारा व्हावें. १. तोच तर होय कीं ज्याचें आकाश व पृथ्वीचें राज्य आहे; आणि तो कोणी पुत्रहि ठेवीत नाहीं; आणि राज्यांत (कधीं) कोणी त्याचा जोडीदारहि राहिला नाहीं. आणि त्यानेंच प्रत्येक वस्तु निर्माण केली व मग हरेक वस्तूसाठीं एक (योग्य) अंदाजा ठरवून दिला. २. आणि नास्तिकांनीं परमेश्वराशिवाय (दुसरे) असे उपास्य**

(१) उदाहरणार्थ मनुष्य अमुक एक वेळेपर्यंत आईच्या पोटांत राहतो व मग अमुक एक वेळेपावेतों दुधावर पोशिला जातो. मग त्याला दांत येतात व तो अन्न खाऊं लागतो. आणि एका मुदतीपर्यंत त्याचें शरीर व बुद्धि वृद्धिंगत होत जाते; नंतर उतार सुरू होतो व शेवटीं मरून जातो. अशाप्रकारें जगांतील प्रत्येक गोष्टी यांचा एक अंदाजा बांधिलेला असतो, कोणतीच गोष्ट या अंदाजाबाहेर जात नाहीं. चमत्कार झाले तरी त्यांचाहि अदाज्यांतच समावेश होतो. कारण परमेश्वराचा खरा अंदाजा कोणालाच माहीत होऊं शकत नाहीं.

सेवकांस तुह्मीं बहकविलें होतें ? अगर हे (आपल्या) आपणच मार्गां-
हून बहकले होते ? १७. (तेव्हां यांचे देव) म्हणतील कीं तूं पवित्र
आहेस; (आम्हीं तर खुद्द सेवक होतों,) आम्हांला ही गोष्ट कोणाहि
प्रकारें शोभतच नव्हती कीं तुझ्याशिवाय (आपल्या करितां दुसरे)
दुसरे पुरस्कर्ते पत्करतों. (तर आम्हीं यांचे पुरस्कर्ते होण्याचा कसा हक्क
सांगूं शकतों ?) परंतु गोष्ट ही झाली कीं तूं यांना व यांच्या वडिलांस
सुखोपभोग दिला; येथपर्यंत कीं ते तुझ्या स्मरणास विसरून बसले
आणि हे (आपणच) नाश पावणारे लोक होते. १८. (यावर आह्मीं
नास्तिकांस संबोधून म्हणूं कीं तुमच्या) या(उपास्य देवां) नीं तर
तुमच्या (साऱ्या) गोष्टींत तुह्मांस खोटें पाडिलें.तर (आतां) तुम्हीं (आम-
ची शिक्षा आपणावरून) टाळूं शकत नाहीं व (कोणापाशीं) मदतहि घेऊं
शकत नाहीं. आणि (लोकांनों ! अशाच प्रकारें) जो कोणी तुमच्यांतून
(परमेश्वराचा जोडीदार मानून) अनर्थ करील त्याला आम्हीं (परलोकीं)
मोठ्या (सक्त) शिक्षेची गोडी चाखवूं. १९. आणि (हे पैगंबरा !) आम्हीं
तुझ्या पूर्वी जितके पैगंबर पाठविले ते अन्नहि खात होते आणि बाजा-
रांतूनहि हिंडत फिरत होते. आणि आम्हीं तुम्हांमध्यें एकाला एकासाठीं
परीक्षेचें साधन ठरविलें आहे. तर (मुसलमानांनों !) तुम्हीं (आतांहि
नास्तिकांचे छळ) मुकाट्यानें सहन कराल (कीं नाहीं) ? आणि (हे
पैगंबरा !) तुझा पालनकर्ता (सर्वांची स्थिति) निरिक्षीत आहे. २०.

---

(१) भावार्थ ह्या कीं जगांत परमेश्वरानें जे पैगंबर पाठविले व लोकांच्या भिन्न भिन्न स्थिति ठेविल्या: कोणी विश्वास धरिला व कोणी नास्तिक वा अवि-श्वासू झाले; कोणी श्रीमंत आहेत; कोणी गरीब;ह्या सर्व परीक्षा होत. पैगंबरांची परीक्षा ही होय कीं त्यांनीं जनतेचा आज्ञाभंग सहन करून धर्म प्रसाराच्या कामांत लागून राहावें. जनतेची परीक्षा ही कीं पैगंबरांच्या समजाविण्याप्रमाणें वागावें आणि चालो रीति, कुलाचार व वाडवडिलांच्या अनुकरणाची पर्वा बाळगूं नये. श्रीमंताची परीक्षा ही कीं त्यांनीं गरीबांस तिरस्कारानें पाहूं नये व त्यांची मदत करावी. गरीबांची परीक्षा ही कीं जर श्रीमंत त्यांना तिरस्कार-युक्त दृष्टीनें पाहील तर त्यांनीं मनांत संकोचित होऊं नये. असो, हें जग परी-क्षेचें घर आहे. प्रत्येकाला त्याच्या विशिष्ट स्थितींत अजमाविलें जातें व परीक्षेचा परिणाम शेवटीं जाहीर होईल.

# पवित्र कुराण

## भाग एकोणिसावा.

### सुरतुल्-फुर्क़ान् ( पुढें चालू )

आणि जे लोक (परलोकीं) आमच्या दर्शनाची आशा ठेवीत नाहींत ते (ह्या प्रकारच्या गोष्टीहि) बोलत असतात कीं आम्हांवर देवदूत कां उतरले नाहींत ? अगर आम्हीं आपल्या पालनकर्त्यास पाहूं (तर विश्वास धरूं). या लोकांनीं आपल्या मनांत (आपलें) मोठें महत्त्व लावून ठेविलें आहे; आणि (मानवी)मर्यादेच्या अतिशय बाहेर निघून गेले आहेत. २१. ज्या दिवशीं लोक दूतांस पाहतील त्या दिवशीं गुन्हेगारांस कोणतीच खुषी (प्राप्त) होणार नाहीं; आणि (दूतांस पाहून) ते म्हणतील कीं (आमच्या पासून हे) दूर होवोत ! २२. आणि (जगांत) हे लोक जीं काय (सु)कृत्यें करून गेले आहेत, त्या(कृत्यां)कडे आम्हीं आतां वळूं आणि त्यांस (अशीं निरर्थक) करून टाकूं (कीं जशी) विसकटलेली धूळ. २३. त्या दिवशीं स्वर्गवाशां(ची ही स्थिति होईल कीं त्यां)चें ठिकाणहि उत्तमांत उत्तम व शय्याहि उत्कृष्टांत उत्कृष्ट २४. आणि ज्यादिवशीं आकाश एका ढगावरून फाटून जाईल (व तो ढग त्याच्यांतून दिसूं लागेल) आणि (त्याच ढगांतून) दूत घोळक्यांचे घोळके( जमिनीवर)

---

(१) यांत ' रजा ' हा शब्द आशेच्या अर्थात प्रसिद्ध आहे; पण मूळ व्युत्पत्तींत त्याचा अर्थ आशा व भय हे दोन्ही आहेत. अरबी भाषेंत परस्पर विरोधी अर्थाचे शब्द असतात त्यापैकींच हा होय. आम्हीं भाषांतरांत आशा हा जो अर्थ महशूर आहे तोच पत्करला आहे; परंतु भयाचा अर्थहि लावतां येतो. या स्थितींत भाषांतर हें होईल कीं " जे लोक ( परलोकीं ) आमच्या नजरानजर येण्यास भीत नाहींत."

(२) 'हिज़रं मह्जूरा' याचा शब्दशः अर्थ आड केली गेलेली म्हणजे आम्हांमध्यें व दूतांमध्यें अडकण घातली जावो कीं त्यांचे तोंड आह्मांस दिसूं नये. ( आमच्यापासून ) हे दूर होवोत ! त्यांचें तोंड आम्हांस नको असा याचा मराठी वाक्प्रचार आहे.

उतारिले जातील; २५. त्यादिवशीं खरें राज्य परमदयाळू (परमेश्वरा)चेंच होईल. आणि तो दिवस नास्तिकांस (फारच) सक्त होईल २६. आणि त्यादिवशीं आज्ञाभंजक (मनुष्य, संतापानें) आपले हात चावून घेईल (व) म्हणील कीं अरेरे! मींहि पैगंबराबरोबर (धर्माचा) सरळ मार्ग पत्करतों (तर बरें होतें)! २७. हाय! माझें दुर्दैव! मी अमुक (माणसा)ला मित्र बनविलें नसतें (तर बरें होतें)! २८. त्यानें तर मजकडे बोध आल्यावरहि मला त्यापासून बहकवून टाकिलें. आणि सैतान (प्रसंगविशेषीं) माणसाला सोडून वेगळा होऊन जातो. २९. आणि (त्यावेळीं) पैगंबर (म्हणजे 'मोहंमद,' परमेश्वरापाशीं) अर्ज करील कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझे लोक या कुराणास बकवाद समजले ३० आणि (हे पैगंबरा! जसे तुझ्या काळचे नास्तिक लोक तुझे शत्रु होत) तसेच गुन्हेगारांस आम्हीं प्रत्येक प्रवक्त्याचा शत्रु बनवित आलों आहों. आणि (लोकांस) सन्मार्ग दाखविण्यास व (पैगंबरांस) मदत करण्यास तुझा पालनकर्ता पुरा होय. ३१. आणि नास्तिक म्हणतात कीं या(पैगंबरा)ला कुराण सारेंचेंसारें एकदांच कां प्रकट केलें गेलें नाहीं? (आम्हीं म्हणतों कीं जसें तें वेळोवेळीं प्रकटिलें गेलें आहे) असेंच (प्रकट झालें पाहिजे होतें; आणि हे पैगंबरा! याचें इंगित हें होय) कीं आम्हीं (वेळोवेळीं) या द्वारें तुझ्या मनास सांत्वन देत राहावें; आणि (म्हणूनच) आम्हीं तें राहून राहून प्रकटिलें. ३२. आणि हे लोक (आक्षेपापरीं आपल्या मतें) कसलीहि (नवखी) गोष्ट तुजपाशीं (विचार करून) आणितील. पण आम्हीं खरें उत्तर व सर्वोत्तम स्पष्टीकरण तुला दाखवून देतों. ३३. जे लोक (पुनरुत्थानाचे दिवशीं) आपल्या तोंडावाटे (घरसत घसरत) 'जहन्नम'—नरकाग्नी—कडे हांकून लाविले जातील, हेच लोक वाईट जागेंत (म्हणजे नरकांत) असतील आणि (सर्वांत) अधिक वाट चुकलेले. ३४. आणि आम्हीं 'मूसा'ला (तौरात) पुस्तक दिलें व त्याचा भाऊ 'हारून' यास (त्याचा) मदतगार (बनवून) त्याच्या संगतीं दिला. ३५. मग आम्हीं हुकूम केला कीं तुम्हीं उभयतां (बंधू) जे लोक आमच्या (साम-

(१) वाट चुकलेले म्हणजे येथें त्यांना स्वर्गांत गेलें पाहिजे होतें. परंतु आपल्या दुराचारामुळें भटकून नरकांत येऊन पडले.

ध्यांच्या) निशाण्यांस पाखंड म्हणतात त्या लोकांकडे जा; (सारांश दोघांनींहि जाऊन समजाविलें; पण ते मानिनात); मग आम्हीं त्या लोकांचा पूर्ण विध्वंस करून टाकिला. ३६. आणि 'नूह'चे लोकांनींहि जेव्हां (आमच्या) प्रेषितांस[१] पाखंडी म्हटलें तेव्हां आम्हीं त्यांस गर्क करून टाकिलें व त्यांस लोकांसाठीं बोध(–पर चिन्ह) बनवून टाकिलें. आणि आम्हीं आज्ञाभंजक लोकांसाठीं दुःखदायक शिक्षा तयार करून ठेविली आहे. ३७. आणि (ह्याच प्रकारें) 'आद' व 'समूद' व 'खंदकवाले'[२] आणि त्यांच्या मधून मधून आणखीहि पुष्कळ जनता यांचाहि (आम्हीं नाश करून टाकिला). ३८. आणि सर्वांलाच आम्हीं (इतर लोकांचे) दृष्टांत देऊन देऊन समजाविलें होतें. (पण कोणीच समजला नाहीं.) आणि आम्हीं सर्वांचाच नायनाट करून टाकिला. ३९. आणि हे ('मक्के'चे नास्तिक) अवश्य ('लूत'चे लोकांचे) ज्या वस्तीवर दगडांचा वाईट वर्षाव केला गेला होता, त्या वस्तीजवळूनहि गेले आहेत. तर कां त्यांनीं ती पाहिली नसेल? परंतु (गोष्ट ही होय कीं) या लोकांस (मेल्यानंतर पुन्हां) जिवंत उठण्याची आशाच नाहीं. (तर ते विश्वास कसा धारणार ?) ४०. आणि (हे पैगंबरा! जेव्हां)

(१) सर्व प्रेषितांचीं मूळ धर्मतत्त्वें एकच होत. पण शास्त्रें वेगवेगळीं असतात. म्हणून एका पैगंबराला पाखंडी म्हटल्यानें सर्व पैगंबरांना पाखंडी म्हटल्यासारखें होतें. यापासून परमेश्वर आम्हांला वांचवो!

(२) 'रस्स' याच्या अर्थांत पुष्कळ मतभेद आहेत. कोणी म्हणतो, विहीर होती; कोणी म्हणतो, गांव; कोणी म्हणतो, वन होतें. ज्याअर्थी 'रस्स'च्या अर्थांत मतभेद आहे त्याअर्थी 'अस्हाबे रस्स'च्या अर्थांतही भेद आहे कीं, ते कोण लोक होते? कोणत्या प्रवक्त्याची प्रजा होते व ते कसे नाश पावले? कित्येक भाष्यकारांनीं याचा अर्थ 'खंदक'हि घेतला आहे. तोच आम्हीं येथें स्वीकारला आहे. अरबींत 'खंदका'ला 'उखदूद'हि म्हणतात. तिसाव्या भागांत सूरतुल्-बुरूजमध्यें हा शब्द आला आहे. हे लोक मूर्तीपूजक होते व एक खंदक खणून त्यांनीं त्यांत आग पेटवून ठेविली होती. ते लोकांकडून बळजबरीनें मूर्तीपूजा करवीत आणि जो कोणी नाकारी त्याला आगीच्या खंदकांत झोंकून देत. मौलवी जलालुद्दीन रूमी या सुफी विद्वानांनीं 'मस्नवी' नामक पुस्तकांत याचें मार्मिक वर्णन केलें आहे व तें हदीस ह्मणजे पैगंबराचे वचनांवरून घेतलेलें आहे.

जेव्हां हे लोक तुला पाहतात तेव्हां तेव्हां ते तुझी हंशीच उडवितात. (आणि छळण्यासाठीं म्हणतात) कीं ज्या (गृहस्था)ला परमेश्वरानें पैगंबर करून पाठविला आहे तो हाच कांहो? ४१. जर आम्हीं मूर्तीं(-पूजे)वर चिकाटीनें अडून न राहिलों असतों तर या (गृहस्था)नें आम्हांला आमच्या उपास्य देवांकडून फिरवूनच टाकिलें होतें. आणि कालांतरानें (पुनरुत्थानाचे दिवशीं) जेव्हां हे लोक शिक्षेस (आपल्या डोळ्यांनीं) पाहून घेतील तेव्हां ते जाणतील कीं (मुसलमान व नास्तिक या उभयपक्षांमध्यें) कोण अधिक वाट चुकलेला होता.? ४२. (हे पैगंबरा!) ज्या मनुष्यानें आपल्या मनेच्छेला आपला परमेश्वर बनवून ठेविला आहे त्या(च्या स्थिती)चें तूं अवलोकन केलेंस काय? तर कां तूं त्याचा राखणदार होऊं शकतोस (कीं त्याला बहकूं देऊं नयेस)? ४३. अगर तूं (अशी) कल्पना करितोस कीं या (नास्तिकां)तून बहुतेक, (गोष्ट) ऐकतात व समजतात? हे तर केवळ चतुष्पाद जनावरांसारखे होत किंबहुना हे (त्याहूनहि)जास्त मार्गभ्रष्ट होऊन गेलेले होत. ४४. (हे पैगंबरा!) कां तूं आपल्या पालनकर्त्यां(च्या या सामर्थ्या)चें अवलोकन केलें नाहींस कीं त्यानें छायेस कसें पसरून ठेविलें आहे? आणि जर तो इच्छिता तर तो तिला(एकाच स्थितींत) स्थिरावून ठेविता. (तथापि, आम्हीं ती पसरीत राहतों); तर आम्हीं सूर्यास त्याचें (बाह्य) कारण ठरवून दिलें आहे. ४५. नंतर आम्हीं तिला आपल्याकडे हळू हळु आखडून घेतों. ४६. आणि तोच

(१) भावार्थ हा कीं जेथें पृथ्वी, आकाश, चंद्र, सूर्य, नक्षत्रें आणखी काय काय परमेश्वराचें अस्तित्व व त्याचें परमसामर्थ्य यांची साक्ष पटवितात, तेथें सावली किंवा छाया हीहि परमेश्वराच्या या गुणांची साक्ष पटविते; कीं त्याचें बाह्य कारण सूर्याचें समोर येणें हें होय; हें खरें परंतु सर्व वस्तु व अखिल गोष्टींचें आदिकारण परमेश्वरच होय. तो जर इच्छिता तर सावलीस एक अशी वस्तु बनविता कीं तिचें सूर्याशीं कांहींच कर्तव्य नसतें. सूर्य उगवता, दोन प्रहरीं उमाळ्यावर येता व मग ढळूं लागता येथपर्यंत कीं तो मावळून जाता आणि हें सर्व होऊनहि सावली एकाच स्थितीवर राहती. तथापि परमेश्वरानें आतां सावलीला अशी वस्तु बनविली आहे कीं ती सूर्यामुळें घटते व वाढते; मग

(परमसमर्थ) होय कीं ज्यानें तुम्हां लोकांसाठीं रात्रीस पडदापोश आणि झोंपेस विश्रांति(चे कारण) बनविलें; आणि दिवसाला (या हेतूनें) बनविलें कीं लोकांस चालतां फिरतां यावें. ४७. आणि तोच (परमसमर्थ) होय कीं जो आपल्या दये (म्हणजे पावसा)च्या पुढें पुढें वाऱ्यांस (पावसाचें) शुभवर्तमान देण्यासाठीं पाठवितो; आणि आम्हींच आकाशांतून शुद्ध (व स्वच्छ) पाणी पाडितों; ४८. कीं तेणेंकरून आम्हीं एका शहराच्या मेलेल्या (म्हणजे पडित) जमिनींत जीव घालून टाकावा आणि आपली सृष्टि म्हणजे पुष्कळ चतुष्पाद जनावरें व मनुष्यें यांस (मनस्वी) पाणी पाजावें. ४९ आणि आम्हींच लोकांत (निरनिराळ्या प्रमाणांत)पाणी वाटलें कीं त्यांनीं (मनांत) मनन करावें. परंतु बहुतेक लोकांनीं उनुपकाराशिवाय (कांहींच उपकार) मानिले नाहींत. ५०. आणि जर आम्हीं इच्छितों, तर प्रत्येक वस्तींत एक एक भय सुचविणारा (म्हणजे पैगंबर) उठवून उभा करितों. ५१. तर (हे पैगंबरा!) तूं नास्तिकांचा कह्या मानूं नकोस (कीं जेणें करून तूं इस्लामाच्या आमंत्रणांत कोणाहि तऱ्हेची कोताई करूं लागूं नयेस); आणि कुराणा(च्या प्रमाणा)नें त्यांचा मोठ्या जोरानें झटून सामना कर. ५२. आणि तोच (परम समर्थ) होय कीं ज्यानें दोन समुद्रांस (आपसांत) भिडविलें; एक गोड स्वादिष्ट (पाण्याचा) आणि एक खारा (खारा) कडू. आणि दोहोंत एक अडकण व अटळ तट बनवून दिला. ५३. आणि

---

संध्याकाळीं सावली वाढत वाढत शेवटीं नाहींशी होते; व तिच्या जागेवर रात्रीचा काळोख येऊन जातो. सावली नष्ट होऊन जाण्यास म्हटलें कीं आह्मीं तिला आपल्याकडे आखडून घेतों; तसेंच एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं लोक जेव्हां निजतात तेव्हां आह्मीं सर्वांच्या आत्म्यांस आपल्याकडे बोलावितो.

(१) पुष्कळ वेळां पाहण्यांत येतें कीं पाऊस पडण्याच्या पूर्वीं वारा चालू लागतो; अशा साठीं कीं ढगांस त्यानें गोळा करावें, उभारावें व खालीं सोडावें. तर वाऱ्याचें वाहणें जणुं पावसाच्या येण्याचें शुभ वर्तमान होय.

(२) समुद्र, कोणी खारा, कोणी गोडा, असे दोन तऱ्हेचे असतात व त्यांच्यामध्यें जमिनीचा तट पडलेला असतो. कोठें असेंहि होतें कीं, गोडा व खारा समुद्र एकाच जागीं येऊन मिळतो व दोहोंचें पाणी असें वाहतें कीं,

तोच (परमसमर्थ) होय कीं ज्यानें पाणी (म्हणजे वीर्या)तून मनुष्य निर्माण केला; मग त्याला एक रक्त (म्हणजे कोणाचा मुलगा-मुलगी) व सोयरीक (म्हणजे कोणाची सून-जावई) असा संबंध लावून दिला. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता सर्व शक्तिमान् होय. ५४. आणि नास्तिक, परमेश्वराला सोडून अशा (खोटया नाटया देवां)ची उपासना करतात कीं जे त्यांना नफा पोहोंचवूं शकत नाहींत व त्यांना नुकसानहि पोहोंचवूं शकत नाहींत. आणि नास्तिक तर आपल्या पालनकर्त्या (च्या विरोधा)वर (नेहमीं) कंबर बांधून असतो. ५५. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुला केवळ यासाठीं पाठविलें आहे कीं (तूं सज्जनांस स्वर्गाचें) शुभवर्तमान ऐकवावेंस आणि (दुर्जनांस ईश्वरीशिक्षेचें) भय घालावेंस. ५६. तूं (या लोकांस) सांग कीं मी तुम्हांपाशीं या (संदेशा)-चें कांहीं वेतन तर मागीत नाहीं; तथापि (माझें वेतन तर केवळ हेंच होय कीं) ज्याची इच्छा होईल त्यानें आपल्या पालनकर्त्यापावेतों (पोहोंचण्या)चा मार्ग पत्करावा. ५७. आणि (हे पैगंबरा !) ज्याला मृत्यु नाहीं अशा जिवंत(परमेश्वरा)वर भरंवसा ठेव. आणि त्याच्या स्तवनाबरोबर (त्याच्या) पवित्रतेचें वर्णन करीत अस आणि त्या (परमे-

---

एकांत एक मिळून जात नाहीं. 'बहर' हा शब्द कधीं कधीं नदी या अर्थाहि वापरला जातो.

(१) या वाक्याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक आम्हीं भाषांतरांत पत्करला आहे त्याचा मतलब हा कीं माणसाला बाल्यावस्थेपर्यंत आपल्या आई-बापांशीं संबंध राहतो व तो ज्या घराण्याचा असेल त्या घराण्याचा मुलगा-मुलगी किंवा पौत्रपौत्री समजला जातो. मग त्याचें लग्न होतें व त्यांचा संबंध दुसऱ्या जागीं होऊं लागतो व तेथें तो व ती जावई वा सून म्हणवितें. ह्या अवस्था मनुष्यावर येतात. दुसरा अर्थ हा कीं, एक रक्त म्हणजे पुरुष व सोयरीक म्हणजे स्त्री; कां कीं, इस्लामधर्म शास्त्राप्रमाणें रक्ताचा संबंध पुरुषांशीं असतो. स्त्रीला त्याशीं कर्तव्य नाहीं. या अर्थानें नसब-एक रक्त-संबंध राखणार आणि सहर म्हणजे सोयरीक-म्हणजे संबंध राखीत नाहीं ती स्त्री. कांहीं असो, मनुष्याच्या प्रत्येक अवस्थेपासून परमेश्वराचें परमसामर्थ्य व्यक्त होतें कीं, एका वीर्यबिंदूंत त्यानें इतक्या उत्क्रांत्या केल्या.

श्वरा)चें आपल्या सेवकांच्या पापांशीं माहीतगार होणें पुरें करतें (व तो खुद्द त्यांस समजून घेईल); ५८. कीं त्यानें आकाश व पृथ्वी आणि जें काय त्यांच्या दर्म्यान आहे तें (सर्व) सहा दिवसांत निर्मिलें; व नंतर (महा)सिंहासनावर (जाऊन) विराजमान झाला. (तोच) परमदयाळू (परमेश्वर) होय; म्हणून त्याच्या (लीले) विषयीं तर कोणा माहीतगारासच पुस. (हे अजाण नास्तिक काय जाणतील?) ५९. आणि जेव्हां नास्तिकांस सांगितलें जातें कीं परमदयाळू(परमेश्वरा)पुढें साष्टांग नमस्कार घाला; तेव्हां ते म्हणतात, परमदयालु म्हणजे कोण? ज्याच्या पुढें तूं आम्हांस सांगशील त्याच्याचपुढें आम्हीं साष्टांग नमस्कार घालूं लागावा काय? आणि (परमदयाळूचें नांव ऐकून) त्यांचा दुराग्रह आणखीहि वाढतो. ६०. धन्य तो (परमेश्वर) कीं ज्यानें आकाशांत राशी बनविल्या आणि (याशिवाय) त्यांत (सूर्यरूपी चकचकीत) दिवा व प्रकाशमान् चंद्र बनविला. ६१. आणि तोच (परमसमर्थ) होय कीं ज्यानें रात्र व दिवस हीं बनविलीं (कीं) तीं एका मागून एक येत जात राहतात; (आणि हें सर्व कांहीं) जे लोक (सृष्टि व्यवस्थेचें) मनन करूं इच्छितात अगर (परमेश्वराचे उपकारांची) कृतज्ञता दर्शविण्याचा हेतु बाळगितात त्यांच्या (समजण्या)साठीं (बनविलें) ६२. आणि परमदयाळू (परमेश्वरा)चे खास सेवक तर असे लोक होत कीं जे जमिनीवर नम्रतेनें चालतात; आणि जेव्हां अज्ञानी लोक त्यांच्याशीं (अज्ञानाच्या) गोष्टी करूं लागतात तेव्हां ते (त्यांना) सलाम करतात (व अलग होऊन जातात); ६३. आणि जे रात्रीस आपल्या पालनकर्त्यापुढें साष्टांग नमस्कार घालतात व (हात जोडून) उभे राहतात (म्हणजे नमाज पढतात); ६४. आणि जे प्रार्थना करतात कीं हे आमच्या पालनकर्त्या! नरकाग्नीची शिक्षा तूं आम्हांपासून दूरदूरच ठेव. (कारण,) नरकाग्नीची शिक्षा (मोठी भारी) आपत्ति होय. ६५. आणि थोडा वेळ राहणें असेल तर व नेहमीं राहणें असेल तर (दोहीं स्थितींत) ती वाईट जागा होय! ६६. आणि जे खर्च

(१) हे लोक असे मूढ होते कीं, परमेश्वराला तर मानीत पण 'रहमान्' म्हणजे परमदयाळूच्या नांवानें त्यांना ताप चढे. जेव्हां कोणा लोकांचा विनाशकाळ येतो तेव्हां त्यांची स्थिति अशीच होते.

करूं लागतात तेव्हां उधळपट्टी करीत नाहींत व फार काटकसरहि करीत नाहींत; किंबहुना त्यांचा खर्च या (अफरातफरी) च्या दर्म्यान मध्यम प्रतीचा असतो; ६७. आणि जे परमेश्वरासमागमें अन्य कोणा उपास्यास बोलावीत नाहींत आणि ज्याला परमेश्वरानें निषिद्ध ठरवून ठेविलें आहे, अशा कोणाहि मनुष्यास (उगीच) नाहक जिवें मारीत नाहींत; आणि व्यभिचार करीत नाहींत. आणि जो कोणी हीं (सदरहु पापें) करील तो (आपल्या पापांचा) दुष्परिणाम भोगेल; ६८. कीं पुनरुत्थानाचे दिवशीं त्याला दुहेरी शिक्षा दिली जाईल, (मूर्तीपूजेची वेगळी व इतर पापांची वेगळी); आणि तो क्षुल्लक होऊन त्याच स्थितींत नेहमीं राहील. ६९. परंतु ज्यानें पश्चात्ताप केला व विश्वास धरिला आणि चांगलीं कृत्यें केलीं, अशा लोकांचीं पापें, परमेश्वर सुकृत्यांत बदलून टाकील. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ७०. आणि जो कोणी पश्चात्ताप करील व (त्यानंतर तो) सुकृत्यहि करील, तर तो खरोखरीं परमेश्वराकडे वळतो. ७१. (हा ज्यांचा उल्लेख झाला ते परमेश्वराचे खास सेवक होत) आणि (तसेच) जे खोटी साक्ष देत नाहींत व जे (दैवयोगानें) निरर्थक गोष्टींच्या जवळून जातात तेव्हां ते त्यांच्याजवळून शिष्टाचारानें (निघून) जातात. ७२. आणि (तसेच) ते लोक जेव्हां त्यांना त्यांच्या पालनकर्त्याचीं महावाक्यें ऐकवून ऐकवून बोध केला जातो, तेव्हां आंधळे व बहीरे होऊन त्यांजवर पडत[1] नाहींत; (तथापि, श्रद्धापूर्ण ऐकतात व बोध घेतात). ७३. आणि जे प्रार्थना करतात कीं हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हांला आमच्या बायकांकडून[2] व आमच्या संततीकडून डोळे गार होतील असें कर; आणि आम्हांस (तुला) भिणाऱ्या

(१) जेव्हां पैगंबरसाहेब कुराणाची तारीफ वाचून वाचून ऐकवीत असत तेव्हां नास्तिक व दांभिकहि तमाशापाहण्यासाठीं गर्दी करीत व एकमेकांवर तुटून पडत. परंतु हें त्यांचें पडणें नम्रतेनें व विनयपूर्ण होत नसे. कां कीं ते त्या वाक्यांस समजत नव्हते व समजण्याचे प्रयत्नहि करीत नव्हते. त्यांस पाहिजे होतें कीं त्या वाक्यांच्या अर्थाचा विचार करते व तीं श्रद्धापूर्ण ऐकते.

(२) म्हणजे घरगुती झगडे व बखेडे आम्हांस त्रास देऊं नयेत; कां तर मनुष्य या बखेड्यांत पडून धर्महि घालवून बसतो.

**लोकांचा पुढारी बनीव. ७४. हेच लोक होत कीं ज्यांना त्यांच्या सहनशीलतेबद्दल (स्वर्गांत राहवयास) उच्च प्रतीचे सज्जे दिले जातील आणि तेथें आशिर्वाद व सलाम (–शांति)नें त्यांचें आगतस्वागत केलें जाईल. (तें वेगळेंच). ७५. (आणि हे लोक) स्वर्गांत नेहमीं राहतील. थोडा वेळ राहावयाचें असेल तर आणि हमेष राहायाचें असेल तर (दोन्हीं स्थितींत स्वर्ग, हें) किती उत्तम स्थल होय ! ७६. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं जर तुम्हीं परमेश्वराला बोलावणार नाहीं तर माझा पालनकर्ताहि तुमची कांहीं पर्वा करीत नाहीं. तथापि तुम्हीं (त्याच्या निशाण्यांस) पाखंड तर म्हणून चुकलांच आहां तर आतां त्याचा दुष्परिणाम (तुम्हांवर) कायमचा[2] येऊन पडेल. ७७.**

---

(१) भावार्थ हा कीं आम्हांपासून जी संतती चालेल, तिनें आम्हांला पाहून धार्मिष्ठ व्हावें; आणि धार्मिष्ठपणांत आम्हीं त्यांचे पुढारी व नेते व्हावें, व त्यांनीं आमचे अनुयायी व्हावें. किंवा संततीचेंच विशेष प्रकारानें वर्णन कां करावें? मतलब हाहि असेल कीं आम्हांस इतके चांगले व सदाचरणी बनीव कीं, लोक आमचे चांगले नमुने पाहून धर्माचरण पत्करतील.

(२) मतलब हा होय कीं पैगंबरांच्या व प्रवक्त्यांच्या पाठविण्यांत आणि पुस्तकें प्रकट करण्यांत परमेश्वराचा स्वतःचा कांहीं एक हेतु नाहीं. तर सेवक लोक संकट पडल्यास त्याला बोलावितात; म्हणून तो त्यांच्यावर करुणा करितो व हें इच्छितो कीं त्यांनीं नरकाग्नींत पडूं नये. तर जे लोक परमेश्वराच्या निशाण्यांस पाखंड म्हणतात ते आपणच तर संकटसमयीं त्याला बोलावितात; आणि आपणच त्याच्याकडून फिरून पडतात. अतएव ते शिक्षेस पात्र ठरतात; आणि ती त्यांच्या शिरावरून कांहीं केल्यानें टळूं शकणार नाहीं.

# अध्याय २६ वा.

## सूरतु-श्शोअरा.

हा मक्केत प्रकट झाला. ह्यांत २२७ महावाक्यें आहेत. ह्यांत आलेल्या 'शोअरा' म्हणजे कविवृंद या शब्दावरून ह्याचें हें नांव झालें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नावानें (मी आरंभ करितों).

त. स. म (ता—सीन—मीम.) १. हींहि त्याच सुबोध पुस्तका-(म्हणजे कुराणा)चीं (कांहीं) महावाक्यें होत. २. (हे पैगंबरा ! तूं तर कांहीं असा हवालदिल होत चालला आहेस कीं) तूं हे लोक विश्वास धरीत नाहींत, म्हणून आपल्या जिवाचा कदाचित् घात करून बसशील. ३. आम्हीं इच्छूं तर या (लोकां)वर आकाशांतून एक (जबरदस्त) निशाणी उतरूं कीं यांच्या माना त्याच्यापुढें नम्रतापूर्वक झुकून राहतील. ४. आणि (लोकांचा दस्तुर आहे कीं जेव्हां कधीं) परमदयाळू (परमेश्वरा)-कडून त्यांच्यापाशीं एखादी बोधपर नवीन गोष्ट येते, तेव्हां ते त्यापासून तोंड फिरविल्यावांचून राहत नाहींत. ५. तर (असो,) त्यांनीं पाखंड तर म्हटलेंच आहे; परंतु हे ज्या शिक्षेची टर उडवीत होते तिची हकीकत यांना लवकरच येऊन पोहोंचेल. ६. या लोकांनीं भूमिकडे नजर केली नाहीं काय कीं आम्हीं दरेक प्रकारच्या उत्तम उत्तम चिजा कितीतरी तींत उगविल्या आहेत ? ७. निःसंशय त्यांतहि (ईश्वरसामर्थ्याची मोठी) निशाणी होय. पण (यावरहि) यांच्यांतून बहुतेक विश्वास धरणार नाहींत. ८. आणि (हे पैगंबरा !) कांहीं संशय नाहीं कीं तुझा पालनकर्ता हाच अलबत सामर्थ्यवान्[1] (व) दयानिधि होय. ९. आणि

(१) सामर्थ्यवान् आहे कीं इच्छील तर नास्तिकपणाची आतांच शिक्षा देईल आणि दयानिधि आहे कीं तो तात्काळ शिक्षा देत नाहीं.

(हे पैगंबरा !) एक वेळ (तोहि होता कीं) तुझ्या पालनकर्त्यानें 'मूसा'ला हटकलें कीं (या) जालिम लोकांपाशीं जा. १०. (म्हणजे) 'फिरऔना'च्या लोकांपाशीं; कां हे लोक (आमच्या शिक्षेस) भीत नाहींत ? ११. 'मूसा'नें उत्तर दिलें कीं हे माझ्या पालनकर्त्या ! ते मला पाखंडी म्हणतील म्हणून मी भीतों आहे. १२. आणि (बोलतांना) माझी छाती संकोचित होते व माझी जिव्हा (बरोबर) चालत नाहीं; तर तूं 'हारूना'ला सांगून पाठीव (कीं तो माझा साथी होईल.) १३ आणि माझ्यावर 'किब्त्यां'चा एक दंडहि आहे (कीं मी एका किब्त्याला मारून टाकिलें होतें); म्हणून मी भीतों कीं (त्याच्या ऐवजीं कोठें) ते मला मारून टाकतील. १४. (परमेश्वर) म्हणाला, (असें) कधींच (व्हावयाचें) नाहीं. (बरें), तर तुम्हीं (बंधुद्वय) आमच्या निशाण्या घेऊन जा; आम्हीं तुम्हां संगतीं आहों; (आणि जें संभाषण तुमच्या व त्यांच्या दर्म्यान होईल तें आम्हीं ) ऐकत राहूं. १५. सारांश, तुम्हीं दोघे 'फिरऔना'पाशीं जा आणि (त्यास) सांगा कीं आम्हीं सकल जगांच्या पालनकर्त्याकडून पाठविलेले (प्रेषित) आहोंत; १६. कीं तूं 'बनी-'इस्राएलां'स आम्हांसोबत पाठवून दे. १७. (एवंच, 'मूसा' व 'हारून' हे परमेश्वराचा हुकूम घेऊन 'फिरऔना'कडे गेले. तेव्हां 'फिरऔन') म्हणाला, (हे 'मूसा'!) कां आम्हीं तुला आपल्यायेथें (ठेवून घेऊन) मुलांसारखें पाळिलें नाहीं ? आणि (तुझें एवढें वय व्हावयास आलें) तूं आपल्या (या) वयांतून वर्षानवर्षं आमच्यायेथें राहिलास. १८. आणि तूं एक काम (आणखीहि) केलें होतेंस, तें तूंच केलें होतेंस (म्हणजे किब्त्याचा खून). आणि तूं (फारच) अनुपकाऱ्यांपैकीं आहेस. १९. ('मूसा'नें) उत्तर दिलें कीं, मी त्यावेळीं तें (काम)करून बसलों व मी चूक करणारांपैकीं होतों. २०. मग जेव्हां मला तुमचें भय वाटलें तेव्हां मी तुम्हांपासून पळून गेलों. नंतर (कांहीं कालावधीनें) माझ्या पालनकर्त्यानें मला (पैगंबरीचे) अधिकार दिले आणि पैगंबरांपैकीं मलाहि ( एक पैगंबर) बनविला २१. आणि तूं 'बनी-इस्राएलांस गुलाम बनवून ठेविलें होतेंस हा (हि कांहीं) उपकार आहे कीं तो तूं माझ्यावर ठेवि-

(१) फिरऔनानें हजरत मूसावर पालनपोषण करण्याचा उपकार ठेविला,

तोस ? २२. 'फिरऔना'नें विचारलें, (ज्याच्याकडून तूं आपलें येणें सांगतोस तो) सकल सृष्टीचा पालनकर्ता म्हणजे काय ? २३. ('मूसा')नें सांगतलें, आकाशाचा व पृथ्वीचा आणि जें काय यादोहोंच्या दर्म्यान आहे त्या (सर्वां)चा पालनकर्ता, तुम्हीं लोक जर विश्वास ठेवीत असाल तर, (तोच होय). २४. ('फिरऔना'नें आपले मानकरी)जे त्याच्या आसपास (बसले)होते त्यांस म्हटलें, कां तुम्हीं ('मूसा'च्या गोष्टी) ऐकत नाहींत ? २५. ('मूसा'नें) म्हटलें, तोच तुम्हां लोकांचा पालनकर्ता व तुमच्या प्राचीन बापजाद्यांचाहि पालनकर्ता (होय). २६. ('फिरऔना'नें पुन्हां आपल्या मानकऱ्यांस उद्देशून) म्हटलें कीं असो नसो, (हा) तुमचा प्रेषित-पैगंबर जो तुम्हांकडे पाठविला गेला आहे तो खचित वेडा होय. २७. ('मूसा'नें) म्हटलें, जर तुम्हीं कांहीं अक्कल

---

तेव्हां मूसानें त्याचें उत्तर दिलें कीं, जर निव्वळ उपकार असता तर मात्र उपकार होता खरा. परंतु माझ्या पालनपोषणाचें एक खास कारण होतें; कीं तूं बनी-इस्राएलांस कैद करून ठेविलें होतेंस. त्यांच्यांत जो मुलगा जन्मे त्याला तूं मारून टाकीस. त्याच हंगामास मी जन्मलों व माझ्या आईनें तुझ्या भीतीमुळें मला पेटींत घालून नाईल नदींत सोडून दिलें. पेटी वाहात वाहात तुझ्या महेलांत पोंचली. परमेश्वरानें तुझ्या बायकोच्या मनांत दयेचा द्रव उद्भवला व तिनें मला काढवून घेऊन पालनपोषण केलें. ह्या सर्व गोष्टी बनी-इस्राएल हे तुमच्या कचाटींत सांपडल्यामुळें घडून आल्या. बनी-इस्राएल कैद नसते तर मी तुझ्या मुलखांत न जन्मतों आणि माझी आई मला नदींत न टाकती व मी तुझ्या महेलापर्यंत पोहोंचलों नसतों; व माझें तुझ्यायेथें पालन-पोषणहि झालें नसतें. तर माझ्या पोषणाचें मूळकारण, तूं जो बनी-इस्राएलां-वर जुलूम करीत होतास तें होय. ज्याअर्थी जुलूमच मूळ कारण आहे त्याअर्थी अशा पालनपोषणाचा कांहीं उपकार नाहीं. आणि एक अर्थ हाहि होऊं शकतो कीं, हा (पोषणाचा) उपकार जो तूं माझ्यावर ठेवितोस, कां याच्याच बदलीं तूं बनी-इस्राएलांस गुलाम बनवून ठेविलें होतेंस ?

(१) फिरऔन हा मूसापाशीं परमेश्वराच्या अस्तित्वाचें साक्षात् प्रमाण मागीत होता. पण परमेश्वरासंबंधानें असें प्रमाण कधीं झालें नाहीं व होऊंहि शकत नाहीं. कारण, निसर्गतःच माणूस कमजोर; त्याला अशीं ज्ञानेंद्रियेंच दिलीं

बाळगित असाल तर, (तोच) पूर्व व पश्चिम व जें कांहीं या दोहोंच्या दर्म्यान आहे त्या(सर्वां)चा मालक होय. २८. (अखेरीस 'फिरऔन', 'मूसा'ला) म्हणाला, जर माझ्याखेरीज (आणखी कोणाला) तूं परमेश्वर मानिलेंस तर मी तुला बंदीवानांत (नेऊन दाखल) करीन. २९ ('मूसा'नें) म्हटलें कीं जरी मी एक स्पष्ट चमत्कारहि तुला आणून दाखवीन तरीहि काय ? ३०. ('फिरऔन') म्हणाला, जर तूं खऱ्यांपैकीं आहेस तर तो आण (पाहूं). ३१. यावर (मूसानें) आपली काठी टाकून दिली, तों काय पाहतात कीं तो एक धडधडीत अजगर आहे. ३२. आणि त्यानें आपला हात बाहेर काढिला तों (काढतांक्षणीं) तो प्रेक्षकांच्या नजरेंत शुभ्र चकचकीत झाला ३३. ('फिरऔना'नें आपले दरबारी) जे त्याच्या आसपास (बसले) होते त्यांस सांगितलें कीं यांत शंका नाहीं कीं हा कोणी मोठा वस्ताद जादुगिर आहे. ३४. (आणि) तो इच्छितो कीं आपल्या जादू (च्या प्रभावा)नें तुम्हांस तुमच्या देशांतून काढून बाहेर लावावें. तर (आतां) तुम्हीं लोक काय सल्ला देतां ? ३५. (दरबाऱ्यांनीं) विनंति केली, (महाराज !) 'मूसा' व त्याचा भाऊ यां(चे प्रकरणा)स (कांहीं दिवस) भिजत राहूं द्या आणि शहरांत (जादुगिरांच्या) गोळा करण्यास हरकारे पाठवून द्या; ३६. कीं ते सर्व दरेक

---

गेलीं नाहींत कीं जेणेंकरून परमेश्वर मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यांत पूर्णपणें येऊं शकेल. तर मूसा हे फिरऔन व त्याच्या दरबारमंडळांस बौद्धिकप्रमाणें देऊन समजावित होते; म्हणजे सृष्टीवरून सृष्टिकर्त्याचें प्रमाण पटवित होते आणि त्या बरोबरच हेंहि सांगत जात होते कीं 'तुम्हीं विश्वास ठेवीत असाल तर, तुम्हीं कांहीं अक्कल बाळगित असाल तर' म्हणजे जर तुम्हांला अक्कल आहे; व अक्कलेचा पुरावा तुमची खातरी करूं शकतो; तर हीच सृष्टि परमेश्वराच्या होण्याचा पुरावा आहे. जर तुह्मांत मुळींच बुद्धि नाहीं किंवा बुद्धिच्या साक्षीची खात्री नाहीं तर हा सर्व वितंडवाद होय.

(१) 'हाशिरीन' याचा शब्दशः अर्थ गोळा करणारे असा आहे. मतलब हा कीं, जे लोक शहरांत जातील व जादुगिरांना एकवटून आणितील ते लोक; याचें आम्हीं हलकारे असें भाषांतर केलें आहे; पण त्याबरोबरच 'जादुगिरांच्या गोळा करण्यास' हे शब्द आणखी वाढविले आहेत.

मोठमोठ्या वस्ताद जादुगिरास सरकारांत आणून हजर करतील. ३७. सारांश, (दिवस नियमित झाला व त्या) नियमित दिवसाच्या वायद्यावर जादुगीर गोळा केले गेले. ३८. आणि लोकांत दवंडी पिटवली गेली कीं (असो, आजवर तर तुम्हीं लोक अलग होऊन राहिलां; आतां अशा प्रसंगींहि) तुम्हीं लोक गोळा व्हाल कीं नाहीं? ३९. (अशासाठीं कीं) जर जादुगीर[१] (म्हणजे 'मूसा' व त्याचे साथी)च प्रबळ राहिले तर कदाचित् आम्हीं त्यांचाच मार्ग स्वीकारूं. ४०. तर जेव्हां जादुगीर (देशाच्या चोहोंकडून) येऊन हजर झाले, तेव्हां ते 'फिरऔना'ला म्हणाले, कीं बरें, आम्हींच प्रबल राहिलों तर आम्हांस (सरकारांतून) कांहीं इनामहि मिळेल? ४१. ('फिरऔना'नें) सांगितलें, होय (अवश्यच); आणि (इनामच काय? पण) प्रबळ राहाल तर तुम्हीं (दरबारांत) जवळ केलेल्यापैकींहि होऊन जाल. ४२. 'मूसा'नें (जादुगिरांस) म्हटलें, जें काय तुम्हांस टाकावयाचें असेल तें (मैदानांत) टाका चला. ४३. यावर जादुगिरांनीं आपल्या दोऱ्या व आपल्या काठ्या टाकून दिल्या व बोलूं लागले कीं 'फिरऔना'च्या प्रतापानें आम्हींच प्रबल राहूं. ४४. यावर 'मूसा'नें आपली काठी (मैदानांत) टाकिली तों काय पाहतात कीं जादुगिरांनीं जें बनवून आणिलें होतें त्या(गौडबंगाला)स ती एकदम गिळूं लागली. ४५. हें पाहून जादु-

(१) फिरऔनाला हजरत मूसाविषयीं मुळापासूनच ही खात्री होती कीं, ते जादुगीर आहेत आणि त्यांस मी आपल्या जादुगिरांकडून हारवून टाकीन. म्हणून त्यानें ही दवंडी विनोदानें पिटविली. त्याचा अस्सल हेतु लोकांस गोळा करण्याचा होता एवढाच. तर या स्थितींत जादुगीर ह्मणजे 'मूसा व हारून व त्यांचे साथी बनी-इस्राएल हे झाले; अगर जादुगीर ह्मणजे ज्या लोकांस फिरऔनानें गोळा केलें होतें तें होत. तर दवंडीचा उद्देश हा असेल कीं, जर आमचे जादुगीर विजयी झाले तर आम्हीं त्यांचाच धर्म पत्करूं. परंतु फिरऔनाचें हें म्हणणेंहि विनोदाचें होतें. कारण, त्याचे जादुगीर पैगंबरीचा दावा करीत नव्हते व आपल्या धर्माचें आमंत्रणहि करीत नव्हते. तथापि ते फिरऔनाच्या प्रजेंतील फारच क्षुल्लक प्रतीचे लोक समजले जात होते.

गीर (असे थक्क झाले कीं ते) साष्टांग नमस्कार घालीत (भूमीवर पालथे) पडले. ४६. (आणि) ते म्हणूं लागले कीं आम्हीं सकल जगांच्या पालनकर्त्याचा विश्वास धरिला; ४७. (म्हणजे),'मूसा' आणि 'हारून' यांच्या पालनकर्त्याचा. ४८. ('फिरऔन') म्हणाला, मी तुम्हांस परवानगी द्यावी त्याच्या आधींच कां तुम्हीं 'मूसा'वर विश्वास ठेविला? असो नसो, हा ('मूसा') ज्यानें तुम्हांस जादू शिकविली आहे तो तुमचा बडा (गुरु) होय. पण (असो) तुम्हांला (याचा परिणाम) माहित होऊन जाईल. मी तुमचे हात व तुमचे पाय उलटे (सुलटे) कापवीन आणि तुम्हांसर्वांस सुळावर चढवीन तरच सई. ४९. ते बोलले, कांहीं हरकतीची गोष्ट नाहीं; आम्हीं तर (कसेंहि-करून) आपल्या पालनकर्त्याकडे परत जाणार आहों ५०. आम्हीं उमेद बाळगितों कीं आमचा पालनकर्ता आमचे अपराध आम्हांला क्षमा करील; यासाठीं कीं आम्हीं सर्वांत पाहिल्या प्रथम विश्वासणारे झालों. ५१. आणि आम्हीं 'मूसा'कडे आदेश पाठविला कीं तूं माझ्या सेवका (म्हणजे बनी-इस्राएलां)स रातोरात घेऊन निघ; (कारण,) तुमचा पाठलाग केला जाणार आहे. ५२. यावर 'फिरऔना'नें (लोक समुदाय गोळा करण्यासाठीं) शहरांत हलकारे पाठवून दिले; ५३. कीं 'बनी-इस्राएल' हे थोडेसे लोक होत. ५४. व त्यांनीं आम्हांला सक्त नाराज केलें आहे. ५५. आणि (जरी) आम्हीं (इतके) बहुत आहों, (तरीहि) आम्हांस सावचित राहणें भाग आहे; (म्हणून आम्हीं तुम्हांस कुमकेस बोलावितों). ५६. तात्पर्यार्थे, आम्हीं 'फिरऔना'चे लोकांस बागांतून व झऱ्यांतून काढून बाहेर केलें; ५७. आणि (तसेंच) खजिन्यांतून व आदरसन्मानाच्या जागांतूनहि. ५८. असेंच (झालें व असेंच व्हावयासहि पाहिजे होतें). आणि (सरशेवटीं) 'बनी-इस्राएलां'स त्या वस्तूंचा आम्हीं वारस बनविला. ५९. (एवंच, 'मूसा' 'बनी-इस्रा.

---

(१) फिरऔन वा फारो हा गर्क झाल्यावर तत्काळ तर बनीइस्राएल मिसरवर काबीज झाले नाहींत. परंतु एका मोठ्या कालावधीनंतर अशा उत्क्रांत्या घडून आल्या कीं मिसरदेशहि बनीइस्राएलांच्या राज्यांत सामील होऊन गेला.

एलां'स रातोरात 'मिसर'हून घेऊन निघून गेला;) तेव्हां 'फिरऔना'च्या लोकांनीं दिवस उजाडतां उजाडतां त्यांचा पिच्छा केला. ६०. मग जेव्हां दोन्हीं समूह (इतके जवळ आले कीं ते) एकमेकांस पाहूं लागले, तेव्हां 'मूसा'चे लोक म्हणूं लागले कीं आतां तर (शत्रूनें) आम्हांस येऊन गांठिलें. ६१. ('मूसा'नें) म्हटलें, कधींच नाहीं; (कारण,) माझ्या संगतीं माझा पालनकर्ता आहे (आणि) तो लवकरच मला (बचावाचा) मार्ग दाखवील. ६२. मग आम्हीं 'मूसा'कडे आदेश पाठविला कीं तूं आपली काठी समुद्रावर मार. सारांश,('मूसा'नें काठी मारली; आणि) समुद्र फाटून (तुकडे तुकडे होऊन) गेला व हरेक तुकडा जणूं एक मोठा (उंच) पर्वत होता. ६३. आणि ह्याच स्थळीं आम्हीं दुसऱ्या लोकां(म्हणजे 'फिरऔन'वाल्यां)सहि जवळ घेऊन आलों. ६४. आणि आम्हीं 'मूसा' व जे लोक त्याच्या सोबत होते त्या सर्वांस वांचवून घेतलें. ६५. नंतर दुसऱ्यांस (म्हणजे 'फिरऔन' वाल्यांस) आम्हीं बुडवून टाकिलें. ६६. कांहीं संशय नाहीं कीं या(वृत्तांतां)त (एक मोठा)धडा होय. आणि 'फिरऔना'च्या लोकांपैकीं बहुतेक विश्वास धरणारेहि नव्हतेच. ६७. आणि (हे पैगंबरा!) कांहीं संशय नाहीं कीं तुझा पालनकर्ता तोच अलबत सामर्थ्यवान्[1] (व) दयानिधि होय. ६८. आणि (हे पैगंबरा!) या लोकांस 'इब्राहीमा'चा अहवाल वाचून ऐकीव; ६९. कीं जेव्हां त्यानें आपल्या बापाला व आपल्या लोकांना विचारिलें कीं(तुम्हीं लोक) कोणत्या वस्तुची उपासना करितां? ७०. तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं आम्हीं मूर्तींची उपासना करितों व दिवसभर नित्य आम्हीं त्यांचीच सेवा-चाकरी करीत राहतों. ७१. ('इब्राहीमा'नें) पुसलें कीं (बरें,) जेव्हां तुम्हीं (यांना) बोलावितां तेव्हां कां हे (देव) तुमचें (कांहीं) ऐकतात? ७२. अगर तुम्हांस नफा अथवा नुकसान पोहोंचवूं शकतात? ७३. ते

(१) सामर्थ्यवान आहे कीं फिरऔन व त्याच्या लोकांस त्यानें गर्क केलें; दयानिधी आहे कीं या वेळेच्या नास्तिकांस तत्काळ शिक्षा देत नाहीं. सारांश सामर्थ्य व क्षमा हे दोन्हीं गुण त्याच्यांत आहेत व योग्य वेळीं तो ते प्रगट करितो. अगर या युक्तीनें त्यानें बनी-इस्राएलांस फिरऔनच्या तावडींतून सुटका देवविली.

म्हणाले, (हें तर) नाहीं; पण आम्हीं आपल्या वडिलांस असेंच करितांना पावलों आहों. ७४. (यावर 'इब्राहीमा'नें) म्हटलें कीं ज्या (वस्तूं)ची तुम्हीं पूजाअर्चा करीत आलां आहां त्यांचा तुह्मीं (कांहीं) विचारहि करितां? ७५. (म्हणजे) तुम्हीं व तुमचे पूर्वींचे बापजादे? ७६. हे तर माझे शत्रु[1] होत; पण (माझा खरा मित्र तर) सकल जगांचा पालनकर्ता (होय) ७७. (म्हणजे) ज्यानें मला पैदा केलें; मग तोच (धर्म संसाराच्या विषांत) मला मार्ग दाखवितो; ७८ आणि जो मला खाऊं घालतो व जो मला (पाणी) पाजतो; ७९. आणि जेव्हां मी मी आजारी पडतों, तेव्हां तोच मला बरा करितो. ८० आणि जो मला मारील व (मारल्यावर) मग (तोच) मला जिववील. ८१ आणि जो (क्षमाकर्ता व दयाळू होय व त्याच्यापासून) मला तर आशा आहे कीं तो निर्णयाच्या दिवशीं मला माझे अपराध क्षमा करील. ८२ हे माझ्या पालनकर्त्या! मला (धर्माचें) शहाणपण दे व मला (आपल्या) सद्गुणी सेवकांत नेऊन मिळीव. ८३. आणि पुढल्या परंपरेंत माझें खेरें नांव निघेल असें कर. ८४. आणि आनंदलोकाच्या–स्वर्गाच्या वरिसदारांपैकीं मलाहि (एक वारस) बनीव. ८५. आणि माझ्या पित्यास क्षमा कर; कीं तो वाट चुकलेल्यांपैकीं होय. ८६. आणि लोक (पुनरपि जिवंत उठवून) उभे केले जातील त्यादिवशीं तूं मला फजित करूं नकोस; ८७. कीं त्यादिवशीं द्रव्य कामा येणार नाहीं व मुलगे (हि कामा येणार) नाहींत; ८८. पण जो निर्मल अंतःकरणानें परमेश्वराच्या सेवेंत हजर होईल (त्याचेंच तारण होईल) ८९. आणि स्वर्ग (परमेश्वराला) भिऊन वागणारांच्याजवळ आणिला जाईल; ९०. आणि नरकाग्नि काढून (कुमार्गी) भटकणाऱ्यांच्यासमोर केला जाईल. ९१. आणि त्यांना पुसलें जाईल कीं परमेश्वराखेरीज ज्या वस्तूंस तुम्हीं पूजत होतां, (आतां) त्या कोठें आहेत? ९२. कां त्या तुमची कांहीं मदत करूं शकतात अथवा (तुम्हांतर्फें कांहीं) सूड उगवूं शकतात? ९३. मग ते (उपास्य) व कुमार्गी लोक (जे त्यांची उपासना करीत होते ते) आणि सैतानाचीं सैन्यें सारींच्या सारींच तोंडघशीं नरकांत ढकलून दिलीं

(१) म्हणजे मी यांच्याशीं वैर बाळगितों.

जातील. ९४-९५. कुमार्गी व त्यांचे उपास्य तेथें (आपसांत) झगडूं लागतील (व झगडतांना) कुमार्गी लोक (आपल्या उपास्यांस) म्हणतील; ९६. कीं परमेश्वराशपथ आह्मी तर धडधडीत चुकींत होतों; ९७. कीं तुह्मांस आह्मीं सकल जगांच्या पालनकर्त्याबरोबर समजत होतों. ९८. आणि आम्हांला तर केवळ (या दुसऱ्या) पाप्यांनीं बहकविलें. ९९. तर (आतां) कोणी आमचे शिफारसकर्ते नाहींत. १००. व कोणी कळकळीचा मित्रहि नाहीं. १०१. पण जर आमचें (जगांत) पुन्हां परत जाणें होईल तर आम्हीं विश्वासूंत (सामील होऊन) राहूं. १०२. निःसंशय ('इब्राहिमा'च्या) या (वृत्तांतां)तहि (एक मोठा) बोध होय. आणि 'इब्राहिमा'च्या लोकांत बहुतेक विश्वासणारे नव्हतेहि. १०३. आणि (हे पैगंबरा!) कांहीं संशय नाहीं कीं तुझा पालनकर्ता तोच अलबत सामर्थ्यवान (व) दयानिधि होय. १०४. (अशाच प्रकारें) 'नूहा'च्या लोकांनीं पैगंबरांना पाखंडी म्हटलें; १०५. कीं त्यांस त्यांचा भाऊ 'नूह' यानें सांगितलें कीं, कां तुम्हीं (लोक परमेश्वराला) भीत नाहीं? १०६. मीं तुमचा प्रामाणिक पैगंबर आहें; १०७. तर परमेश्वराचें भय बाळगा व माझा कह्या माना. १०८. आणि मी या(समजाविण्या)वर तुम्हांपासून कांहीं वेतन तर मागीत नाहीं; माझें वेतन तर केवळ सकल जगांच्या पालनकर्त्यावरच होय. १०९. तर परमेश्वराचें भय बाळगा व माझा कह्या माना. ११०. ते म्हणूं लागले, कां आम्हीं तुझी गोष्ट कबूल करूं; आणि (आम्हीं पाहतों आहों कीं) कनिष्ट प्रतीचे लोक (मजूर वगैरे लालुची मुळें) तुझ्या मागें लागून गेले आहेत? १११. ('नूह'नें) म्हटलें

(१) पैगंबराला एके बाजूस परमेश्वराशीं संबंध असतो व दुसरे बाजूस प्रजा वा अनुयायांशीं संबंध राहतो; म्हणून त्याला कधीं तर परमेश्वराचा पैगंबर म्हणतात; कांकीं, परमेश्वरानें त्याला पाठविलें आहे; आणि केव्हां केव्हां जनतेचा पैगंबर म्हणतात, कांकीं तो जनतेकडे पाठविला गेला आहे. प्रामाणिक या शब्दाचीं हीं दोन अंगें होऊं शकतात. एक हें कीं परमेश्वरानें प्रकट केलेल्या संदेशावर पैगंबराचा भरवंसा केला कीं तो जशाचा तसा हुकूम लोकांपर्यंत पोंचता करील अथवा तो लोकांत विश्वसनीय होता कीं, खोटें बोलत नव्हता. याप्रमाणें जेथें जेथें प्रामाणिक पैगंबर असा उल्लेख आला असेल तेथें तेथें हाच अर्थ होय.

कीं जो (उद्योग) हे लोक करित राहिले असतील त्याच्या माहितीशीं मला काय (कर्तव्य)? ११२. (राहिली लालूच तर) त्यां(च्या कर्मा)चा हिशेब तर केवळ माझ्या पालनकर्त्याचें काम होय (कीं तोच त्यांच्या दानतेशीं वाकब आहे;) तुम्हीं जर (इतकें) समजतां (तर बरें होतें)! ११३. आणि मी मुसलमानांस (आपल्या येथून) धक्के देऊन काढणारा नव्हें. ११४. मी तर (लोकांस) स्पष्टपणें (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखविणारा आहें एवढेंच. ११५. ते बोलले, हे 'नूह'! जर तूं (आपल्या या गोष्टीपासून) पराङ्मुख न होशील तर तूं अवश्य धोंडमार केला जाशील. ११६. (अखेर 'नूहा'नें) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझ्या लोकांनीं मला पाखंडी म्हटलें; ११७. तर (आतां) माझ्यांत व या लोकांत एक निर्णायक फैसला करून टाक (म्हणजे यांजवर शिक्षा उतर) आणि मला व माझ्याबरोबर जे विश्वासू लोक आहेत त्यांस वांचवून घे. ११८. सारांश, आम्हीं 'नूह' व जे लोक (खचाखच) भरलेल्या गलबतांत त्याच्या संगतीं होते त्यांस (तुफानाच्या शिक्षेंतून) बचावून घेतलें. ११९. मग त्याच्यानंतर आम्हीं बाकीच्यांना बुडवून टाकिलें. १२०. निःसंशय या(वृत्तांतां)तहि अलबत एक धडा होय. आणि 'नूहा'च्या जनतेचे बहुतेक लोक विश्वासणारे नव्हतेहि. १२१. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता तोच अर्थात् सामर्थ्यवान् (व) दयानिधि होय. १२२. (ह्याच प्रमाणें) 'आद'(चे लोकां)नीं पैगंबरांस पाखंडी म्हटलें; १२३. कीं त्यांचा भाऊ 'हूद' यानें त्यांस सांगितलें कीं तुम्हीं (परमेश्वराला) भीत नाहीं? १२४. मी तुमचा प्रामाणिक पैगंबर आहें. १२५. तर परमेश्वराला भ्या आणि माझा कह्या माना. १२६. आणि मी या (समजाविण्या)वर तुम्हांपासून कांहीं वेतन तर मागीत नाहीं; माझें वेतन तर केवळ सकल जगांच्या पालनकर्त्यावरच होय. १२७. कां तुम्हीं प्रत्येक उंच स्थलीं (उगीच) आपल्या करमणुकीसाठीं स्मारकें बनवितां? १२८. आणि (भव्य कारागिरीचे) महाल उभारतां कीं (जणूं) तुम्हीं (ह्या जगांत) नेहमींच राहाल? १२९.

(१) 'आद'च्या लोकांस दगड कोरण्याच्या कामांत मोठा हातवळा असे. ते गरजेपेक्षांहि जास्त अशीं कामें करीत; पर्वतांत कोरून घरें बनवीत व तऱ्हे-

आणि जेव्हां (कोणावरहि) तुम्हीं हात टाकतां, तेव्हां (त्याला) मोठ्या सक्तीनें पकडतां. १३०. तर परमेश्वराला भ्या आणि माझा कह्या माना. १३१. आणि ज्यानें तुम्हांला (पक्क्या) माहित आहेत अशा वस्तूंद्वारें तुमची मदत केली, त्या(च्या कोपा)स भ्या. १३२. (म्हणजे) चतुष्पाद जनावरें व मुलगे आणि बागा व झरे यांद्वारें तुमची मदत केली. १३३–१३४. मला (तुमच्या दुराचरणामुळें) तुमच्यासंबंधानें एक मोठ्या (सक्त) दिवसाच्या शिक्षेचा अंदेशा वाटतो. १३५. ते बोलले, तूं आम्हांस उपदेश केलास काय व न केलास काय; आह्मांला (तर सर्व) सारखेंच आहे, १३६. ही (जी शिक्षेची भीति तूं आम्हांस दाखवितोस ती) केवळ पूर्वींच्या लोकांची (साधारण) संवय होय. १३७. आणि आम्हांवर कोणतीहि शिक्षा यावयाची नाहीं. १३८. तात्पर्य, 'आद'चे लोकांनीं 'हूद'ला पाखंडी म्हटलें. म्हणून आम्हीं त्यांस नष्ट करून टाकिलें. या (वृत्तां)तहि एक (मोठा) बोध होय. आणि 'हूद'चे लोकांत बहुतेक विश्वासणारे नव्हतेहि. १३९. आणि ( हे पैगंबरा ! ) तुझा पालनकर्ता तोच अर्थात् सामर्थ्यवान् (व) दयानिधान

---

तऱ्हेचीं स्मारकें उभीं करीत. तसेंच आतां आमच्या वेळींहि होत आहे कीं नामांकित लोकांचे सुबक पुतळे मोठमोठ्या शहरांत भर रस्त्यांत उभे केले जातात. त्यापासून हेतु इतकाच कीं त्या लोकांची आठवण कायम राहावी. विचारांतीं दिसून येईल कीं, शोभेसाठीं दगडांत पैसा घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं. असें केल्यानें "जो कोणी या (पृथ्वी)वर आहे त्या प्रत्येकाचा नाश होणारच" हा कुराणोक्त हुकूमनामा टळूं शकत नाहीं. आम्हीं पाहतों आहों कीं लाखों रुपये लावून घुमट, कबर, किल्ले आणखी काय काय तरी बनविलेले आहेत. पण तीं कोणी व केव्हां बनविलीं हें कोणालाहि ठाऊक नाहीं. याचा एक उत्तम दाखला इजिप्तचे पिरामिड—ह्मणजे ज्याच्या बाजू त्रिकोणाकृति असून वरचा भाग निमुळता होतो अशी भरीव आकृति—हे होय. सर्व पृथ्वीवर याच्या सारखी उत्तम व बळकट अशी इमारतच सांपडावयाची नाहीं. जरी त्यावर कांहीं लिहिलेलेंहि आहे तरी त्याचा मूळ कर्ता कोण हें माहीत होत नाहीं. सारांश परमेश्वराचेंच नांव सदा सर्वदा राहतें. आणि माणसाच्या निरर्थक हौसेचा कांहीं अंतच नाहीं.

होय. १४०. (ह्याच प्रकारें) 'समूद' (चे लोकां)नींहि पैगंबरांस पाखंडी म्हटलें; १४१. कीं त्यांचा भाऊ 'सालेह' यानें त्यांस सांगितलें, कां तुम्हीं (परमेश्वराला) भीत नाहीं? १४२. मी तुमचा प्रामाणिक पैगंबर आहें. १४३. तर परमेश्वराला भ्या व माझा कह्या माना. १४४. आणि मी या(समजाविण्या)वर तुम्हांपासून कांहीं वेतन तर मागीत नाहीं; माझें वेतन तर केवळ सकलजगांच्या पालनकर्त्यावर होय. १४५. कां, ज्या चिजा येथें (या जगांत) आहेत यांतच तुम्हीं बिनधडक (नेहमीं) सोडून दिले जाल? १४६. (म्हणजे) बागा व झरे, यांत? १४७. आणि शेत व खजुरी कीं ज्यांचे घोंस (बोजामुळें) तुटून पडत आहेत त्यांत? १४८. आणि (याच कल्पनेनें) तुम्हीं हर्षयुक्त (व उन्मत्त) होऊन होऊन पर्वतांतून कोरून कोरून घरें बनवितां? १४९. तर परमेश्वराला भ्या व माझा कह्या माना. १५०. आणि भक्तिमर्यादेचे बाहेर निघून जाणारांच्या कह्यांत येऊं नका; १५१. कीं ते मुलखांत नासाडी घालतात व (तिची) सुधारणा करीत नाहींत. १५२. ते बोलले, तुझ्यावर तर केवळ कोणी जादु करून टाकिली आहे. १५३. तूंहि आम्हांचसारखा मनुष्य आहेस, झालें. मग जर तूं खऱ्यांपैकीं आहेस तर एखादा चमत्कार आणून दाखीव. १५४. ('सालेहा'नें) सांगितलें, ही सांढणी (चमत्कार) होय; पाणी प्यावयाची (एका दिवसाची) पाळी इची. आणि एका नियमित दिवसाच्या पिण्याची पाळी तुमची. १५५. आणि इला कोणा प्रकारचा उपद्रव पोहोंचवूं नका; नाहींतर, एका मोठ्या (सक्त) दिवसाची शिक्षा तुम्हांला येऊन गांठेल. १५६. यावरहि लोकांनीं तिच्या घोंडशिरा कापल्या व मग फारच पश्चात्ताप पावले. १५७. (पण त्यावेळेचा पश्चात्ताप वृथा होता.) अखेर त्यांना शिक्षेनें येऊन गांठिलें. या(वृत्तांतां)तहि एक (मोठा) धडा होय. आणि 'सालेहा'च्या लोकांपैकीं बहुतेक विश्वासणारेहि नव्हते. १५८. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता तोच अर्थात् सामर्थ्यवान् (व) दयानिधान होय. १५९. (ह्याच रीतीनें) 'लूत' चे लोकांनींहि पैगंबरांस पाखंडी म्हटलें; १६०. कीं त्यांचा भाऊ 'लूत' यानें त्यांस सांगितलें, कीं तुम्हीं (परमेश्वराला) भीत नाहीं? १६१. मी तुमचा प्रामाणिक पैगंबर आहें. १६२. तर

परमेश्वराला भ्या व माझा कह्या माना. १६३. आणि मी या (समजाविण्या)वर तुम्हांपासून कांहीं वेतन तर मागीत नाहीं. माझें वेतन तर केवळ सकलजगांच्या पालकर्त्यावरच होय. १६४. कां तुम्हीं जगांतील लोकांपैकीं मुलांवर तुटून पडतां ? १६५. आणि तुमच्या पालनकर्त्यानें तुम्हांसाठीं ज्या पत्न्या निर्मिल्या आहेत त्यांचा त्याग करून टाकतां ? गोष्ट ही होय कीं तुह्मीं असे लोक आहांत कीं जे (सृष्टि)मर्यादेचे बाहेर निघून गेलां आहां. १६६. ते बोलले, हे 'लूता !' जर तूं (आपल्या या गोष्टीपासून) पराङ्मुख न होशील, तर बेलाशक तुला काढून बाहेर केलें जाईल. १६७. ('लूत'नें) म्हटलें कीं मी तर तुमच्या (या) कामास अति निंद्य मानितों. १६८. (आणि त्या बरोबरच परमेश्वराची प्रार्थनाहि केली कीं) हे माझ्या पालनकर्त्या ! मला व माझ्या कुटुंबास, हे लोक जीं (ओंगळ) कामें करिताहेत त्यांच्या (दुष्परिणामा)पासून सुटका दे. १६९. सारांश, आह्मीं 'लूत'ला व त्याचे कुटुंबाला सर्वांस सुटका दिली. १७० परंतु ('लूता'ची) म्हातारी बायको (कीं ती) मागें राहणारांत (मिळून शिक्षेंत सांपडली). १७१. मग आम्हीं बाकीच्या लोकांचा नायनाट करून टाकिला. १७२ आणि आम्हीं त्यांजवर दगडांचा वर्षाव केला; तर (आमच्या शिक्षेचें) भय दाखविलें गेलेल्या लोकांवर (किती तरी) वाईट वर्षाव झाला ! १७३ निःसंशय या (वृत्तांतां)तहि एक (मोठा) धडा होय. आणि 'लूता'चे लोकांपैकीं बहुतेक तर विश्वासणारेहि नव्हते. १७४ आणि (हे पैगंबरा !) तुझा पालनकर्ता तोच अर्थात् सामर्थ्यवान् (व) दयावान् होय. १७५. (ह्याच प्रमाणें) 'वना'च्या रहिवाशांनींहि पैगंबरांना

(१) परमेश्वरानें प्रजोत्पादनाचा जो नियम मनुष्यांस व जनावरांस लावून दिला आहे तो सृष्टिकर्मानुसार होय. ह्मणजे मनुष्य व पशु यांच्या उत्पत्तीकरितां पाहिजे आहे कीं त्या नियमाचें अनुसरण केलें जावें. या खेरीज जितक्या पद्धति आहेत त्या सर्व सृष्टिकर्माविरुद्ध होत. त्यांतल्या त्यांत लूताचे लोकांची कृतिहि निसर्गनियमाविरुद्ध होती.

(२) हे, शोएब पैगंबरांचे अनुयायी होते. कधीं कधीं त्यांस मदयनवालेहि म्हणतात. या साठीं कीं मदयन यांचें मोठें शहर होतें. आणि कधीं कधीं वनवाले; यासाठीं कीं या वस्त्यांच्या जवळ एक मोठें अरण्य होतें.

पाखंडी म्हटलें; १७६. कीं 'शोएब'नें त्यास सांगितलें, कां तुम्हीं (परमेश्वराला) भीत नाहीं ? १७७. मी तुमचा प्रामाणिक पैगंबर आहें. १७८. तर परमेश्वराला भ्या व माझा कह्या माना. १७९. आणि मी या (समजाविण्या) वर तुम्हांपासून कांहीं वेतन तर मागित नाहीं. माझें वेतन तर केवळ सकल जगांच्या पालनकर्त्यांवरच होय. १८०. (कोणतीहि वस्तु लोकांस मापानें मापून द्याल तर) माप पुरें भरून देतां जा; आणि (लोकांस) तोटा देणारांपैकीं होऊं नका.१८१. आणि (तोलून द्याल तर) तराजू (ची दांडी) सरळ ठेवून तोलीत जा१८२. आणि लोकांस त्यांच्या चिजा (ज्या ते खरीदतील त्या) कमी देत जाऊं नका आणि मुलखांत फिसाद फैलावित फिरूं नका. १८३. आणि ज्या (परमेश्वरा)नें तुम्हांस व पूर्वील सृष्टीस पैदा केलें त्याला भीत रहा. १८४. ते बोलले, तुझ्यावर तर केवळ कोणीहि जादु करून टाकिली आहे १८५. आणि तूं तर आमच्या सारखाच केवळ एक मनुष्य आहेस; आणि आम्हीं तर तुला लबाडच समजतों. १८६. आणि तूं जर खरा आहेस तर आम्हांवर आकाशांतून धोंडे पाड. १८७. ('शोएब'नें) म्हटलें,जें कांहीं तुम्हीं करीत आहां तें माझा पालनकर्ता खूप जाणतो. (व तो तुम्हांस अवश्य पाहून घेईल). १८८. सारांश, त्या लोकांनीं 'शोएबा'ला पाखंडी म्हटलें, तेंव्हां त्यांना छायामय[२] (आभाळाच्या) दिवसाच्या शिक्षेनें येऊन गांठिलें. यांत संशय नाहीं कीं छायात्मक प्रकरणहि मोठ्याच (सक्त) दिवसाची शिक्षा होती. १८९. निःसंशय ह्या(वृत्तांतां)तहि अर्थात् एक (मोठा) धडा होय. आणि 'शोएब'चे लोकांपैकीं बहुतेक विश्वास धरणारेहि नव्हते. १९०. आणि (हे पैगंबरा !) तुझा पालनकर्ता तोच अर्थात् सामर्थ्यवान् (व) दयानिधान होय. १९१. आणि (हे पैगंबरा!) कांहीं संशय नाहीं कीं हें कुराण (सर्व) सृष्टीच्या पालनकर्त्यांकडून प्रकटिलेलें होय. १९२. हें, प्रामाणिक[३] आत्मा (म्हणजे 'जिब्रील') यानें (आमच्या आज्ञेनें) तुझ्या अंतः-

(१) त्यांचा हेतु हा होता कीं दगडांचा वर्षाव करा.

(२) ह्मणजे आभाळ येऊन छायेसारखें पसरून गेलें, त्यांतून विजा पडल्या व सर्व नाश पावले.

(३) 'अमीन' ह्मणजे प्रामाणिक ही जिब्रील (Gabriel) या मुख्य

**करणांत भरविलें आहे; १९३. कीं इतर पैगंबरांप्रमाणें तूंहि (लोकांस ईश्वरी शिक्षेचें) भय घालावेंस १९४. (आणि) तेंहि सुबोध अरबी भाषेंत. १९५. आणि यांत शंका नाहीं कीं हें ( म्हणजे याचें भविष्य-वचन) पूर्वीच्या पैगंबरांच्या पुस्तकांत (उपलब्ध) आहे. १९६. कां लोकांसाठीं (या गोष्टीच्या सत्यत्वाचें) हें प्रमाण नाहीं कीं 'बनी–इस्त्राएलां'चे विद्वान या (भविष्य वचना)शीं वाकबगार होत? १९७ आणि जर आम्हीं हें(कुराण) कोणा परकीय (भाषेच्या) इसमास (त्याच्याच भाषेंत) प्रकट करितों; १९८. आणि तो, तें या (अरब लोकां)स वाचून ऐकविता; तर हे (लोक केंव्हांहि) त्यावर विश्वास न ठेविते. १९९. ह्याच प्रमाणें (दुराग्रह व अविश्वास) हीं आम्हीं पाप्यांच्या मनांत दृढ-करून ठेविलीं आहेत २००. ते जोंपर्यंत दुःखप्रद शिक्षा पाहून घेणार नाहींत तोंपर्यंत याचा विश्वास धरणार नाहींत. २०१. तर ती (शिक्षा,) अवचित त्यांच्या समोर येऊन ठेपेल व त्यांना (तिच्या येण्याची मुळींच) खबर होणार नाहीं. २०२. तेंव्हां ते ओरडून बोलतील कीं बरें**

प्रतीच्या देवदूताचें विशेषण होय. कां कीं, तो दूत, पैगंबर–प्रेषित अथवा प्रवक्ते यांजकडे ईश्वरी आदेश घेऊन येत व तो त्यांत कांहींच कंपेशी न करतां तो आदेश त्यांना पोंचता करीत असे.

(१) भावार्थ हा कीं कुराण अरबी भाषेंत प्रकट झालें कीं ती भाषा अरब लोक खूप समजतात; आणि कुराणाची भाषासरणी इतकी उत्कृष्ट आहे कीं कोणीहि मनुष्य कितीहि वक्तृत्वपूर्ण कां असेना अशी उत्कृष्ट भाषाशैली आणूं शकत नाहीं. याशिवाय बनी–इस्त्राएलाचे विद्वज्जन आपल्या धर्म पुस्तकांत या विषयींचें भविष्य पाहतात; असें असतांहि नास्तिकांनीं कुराणास मानिलें नाहीं. तर असें गृहित धरून चाला कीं जर कुराण आणखी कोणा भाषेंत प्रकट झालें असतें व तें यांना वाचून ऐकविलें जातें तर या स्थितींतहि हे लोक ही सबब सांगते कीं आह्मीं तर समजतच नाहीं. तर हे लोक किती तरी हट्टवादी होत कीं कुराण यांच्या भाषेंत आहे तरीहि ते मानीत नाहींत. आणि परकीय भाषेंत असतें तरीहि त्यांनीं मानिलें नसतें. तर असो नसो हे शिक्षेची वाट पाहतात कीं ती यांना जबरीनें मानवील. सारांश स्वभावच जर वांकडा आहे तर सत्य कोणाहि भाषेंत असो तो तें मान्य करीत नाहीं. लोक ह्मणतात तें खरें कीं लाथांचें भूत वातांस मानित नाहीं.

(आतांहि) आम्हांला कांहीं अवकाश मिळूं शकेल कां(नाहीं) ? २०३. तर कां हे लोक आमच्या शिक्षेसाठीं घाई माजावितात ? २०४. तर (हे पैगंबरा !) जरा पाहा ! तर खरें, कीं जर आह्मीं कांहीं वर्षे यांना (ऐहिक) सुखोपभोग घेऊंहि देऊं; २०५. व मग ज्या(शिक्षे)चें अभिवचन यांना दिलें जातें ती यांच्या समक्ष येऊन ठेपेल; २०६. तर त्यांना जो (ऐहिक) सुखोपभोग घेऊं दिला गेला तो (आतां या स्थितींत) यांच्या काय कामा येऊं शकतो ? २०७. आणि आम्हीं कोणाहि वस्तीचा याच्या शिवाय नाश केला नाहीं कीं सूचना करण्यास त्यांच्यापाशीं भय दाखविणारे (पैगंबर) आले; (व तेथील लोकांनीं मानिलें नाहीं) २०८. आणि आम्हीं जुलूम करणारे नव्हतों.२०९. आणि या(कुराणा)ला (जशी हे लोक कल्पना करितात तसे) सैतान घेऊन उतरले नाहींत. २१०. आणि हें काम त्यांच्या (करण्या) जोगें नाहीं व ते (हें) करूंहि शकत नाहींत. २११. (किंबहुना) ते तर (दिव्य प्रकटीकरणाच्या) ऐकण्यापासून(-हि दूरच) दूर ठेविले गेले आहेत. २१२. तर (हे पैगंबरा !) तूं परमेश्वरासमागमें अन्य कोणा उपास्याला बोलावूं नकोस; नाहीं तर, (इतर मूर्तीपूजकांप्रमाणें) तुलाहि शिक्षा दिली जाईल. २१३. आणि (मुख्यत्वेंकरून) तूं आपल्या अगदीं जवळच्या नातलगांस (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखीव. २१४. आणि जे मुसलमान तुला अनुसरले आहेत त्यांच्याशीं नम्रतेनें वाग. २१५. मग जर लोक तुझें आज्ञोल्लंघन करतील, तर (त्यांना साफ) सांगून टाक कीं मी, तुम्हीं जीं (जीं) कर्में करितां त्यांपासून निर्दोष आहें. २१६. आणि (हे पैगंबरा !) परमसमर्थ (व) दयाळू (परमेश्वरा) वर भरंवंसा ठेव; २१७. कीं तो, तूं (नमाजींत) उभा राहतोस त्यावेळीं तुला पाहतो. २१८. आणि साष्टांग नमस्कार घालणाऱ्या (ह्मणजे नमाज पढणाऱ्यांच्या समुदायां)त तुझ्या हालचालीहि (पाहतो) २१९. निःसंशय तोच (सर्वांचें) ऐकतो (व सर्व कांहीं) जाणतो. २२०. (हे पैगंबरा ! या लोकांस सांग कीं) मी तुम्हांस दाखवूं कीं, सैतान कोणावर उतरतात ? २२१. (होय तर,) ते दरेक लबाड (व) पापी (चांडाळा) वर उतरतात; २२२. कीं सैतान (कर्णोपकर्णीं) ऐकिलेल्या गोष्टी

(त्याच्यांत) भरवितात आणि त्यांच्यांत बहुतेक (तर निव्वळ) लबाडच असतात, २२३. आणि (नास्तिक जशी कल्पना करतात तसा पैगंबर हा कविहि नाहीं, कारण) कवि (स्वतः कुमार्गी असतात व कुमार्गाचें शिक्षण देतात; आणि ) त्यांचें अनुकरणहि कुमार्गीच करतात. २२४. (हे वाचक-श्रोत्या !) तूं कां या गोष्टीकडे नजर केली नाहींस कीं हे (कवि काल्पनिक गोष्टींच्या) हरेक दऱ्याखोऱ्यांत हैराण होऊन भटकतात. २२५. ते खुद्द ज्या (गोष्टी) करीत नाहींत त्या ते बोलून दाखवितात. २२६. परंतु ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चागलीं कामेंहि केलीं; व (आपल्या काव्यांत) परमेश्वराचें पुष्कळ स्मरण केलें, आणि (कोणाची निंदाहि केली तर प्रथम) त्यांच्यावर जुलूम केला गेला, त्या उपरांत त्यांनीं (वाजवी) बदला घेतला (तर अशा काव्यास हरकत नाहीं). आणि ज्यांनीं (लोकांवर) जुलूम केले आहेत (उदाहरणार्थ कोणाची निंदा केली आहे) त्यांना (मेल्यावर) लवकरच माहीत होऊन जाईल कीं कसल्या जागीं त्यांना परतून जायाचें आहे. २२७.

(१) मूर्तीपूजक लोक पैगंबरासंबंधानें हेंहि बोलत होते कीं हा मनुष्य प्रश्न पाहणारा म्हणजे ज्योतिषी आहे; सैतान वा असुर त्याच्या ताब्यांत आहेत व ते त्याला गैबी बातम्या पोहोंचवितात. यावर परमेश्वरानें त्यांच्या तोहमतींचा जबाब दिला कीं सैतान तर लबाड व पापी चांडाळांच्या जवळ येत असतात. त्यांनीं आकाशाकडून एखादी गोष्ट ऐकिली कीं त्यांत त्यांनीं आपल्याकडून झूट मिळवून त्यांच्या कानांत भरवून टाकिली. तात्पर्य, असले लोक लबाड व दुराचरणी असतात. याच्या उलट, पैगंबरांची कोणतीहि गोष्ट सत्याविरुद्ध नसते व ते दुराचरणापासून फटकून राहतात.

(२) या वाक्यांवरून सिद्ध होतें कीं एशिया खंडाच्या काव्याचा रंग पैगंबर-साहेबांच्या वेळींहि बिघडून गेला होता. आतां तर लबाडी, अतिशयोक्ति व निलज्जपणाच्या गोष्टी या शिवाय आणखी कांहींच पाहण्यांत येत नाहीं. तर पैगंबर व कुराणास या निरर्थक व रिकाम्या गोष्टींशीं काय संबंध ? यांत उपदेशाच्या व शहाणपणाच्या गोष्टी; नीति शिक्षण व ईश्वरोपासनेची ताकीद आहे. कोठें काव्यमय कल्पना व कोठें कुराण! जमीन अस्मानचें अंतर ! पूर्व पश्चिमचा तफावत !

# अध्याय २७ वा.

## सूरतु-न्नम्ल.

हा मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ९३ महावाक्यें आहेत. ह्यांत मुंगीचेसंबंधानें विवेचन करण्यांत आलें आहे. म्हणून सूरतु-न्नम्ल म्हणजे मुंगीचें प्रकरण असें नांव पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे 'नांवानें' (मी आरंभ करितों)

त. स. (ता–सीन.) हा (अध्याय) कुराणाचीं म्हणजे सुबोध अशा पुस्तकाचीं कांहीं महावाक्यें होत. १. (आणि सुबोध होण्याखेरीज) तें विश्वासूंसाठीं सन्मार्ग व शुभवर्तमानहि होय; २. कीं ते नमाज पढतात व जकात देतात आणि शेवटच्या दिवसाचीहि (पक्की) खात्री बाळगितात. ३. जे लोक शेवटच्या दिवसाचा विश्वास ठेवित नाहींत, त्यांचीं कर्में आम्हीं त्यांना सुशोभित करून दाखविलीं आहेत; तर हे लोक (सन्मार्गांहून) भटक्या मारीत फिरतात. ४. हेच लोक होत कीं ज्यांना वाईट तऱ्हेची शिक्षा होणें आहे; आणि हेच लोक होत कीं जे परलोकीं (सर्वांत) जास्त नुकसानांत राहतील. ५. आणि (हे पैगंबरा!) तुला तर कुराण हें, बुद्धिमान्, व ज्ञानी अशा (परमेश्वरा)चे विद्यमानें प्रेरित केलें जात आहे. ६. (तर लोकांस तूं ही गोष्ट आठवून दे कीं) जेव्हां 'मूसा'नें आपल्या कुटुंबास सांगितलें कीं मला अग्नीचा भासला झालेला आहे; जरा (थांबा म्हणजे) मी तेथून तुम्हांपाशीं (वाटेची) कांहीं खबर आणीन आणि (होऊं शकेल तर) एक जळतें कोलीत तुम्हांसाठीं घेऊन येईन; कीं तुम्हांस कदाचित् तापतां येईल. ७. मग जेव्हां 'मूसा' अग्नीपाशीं आला, तेव्हां त्याला हाक दिली गेली कीं धन्य तो कीं जो

(१) म्हणजे त्यांचा स्वभावच असा आहे कीं जें कांहींहि ते करतात तें त्यांना बरेंच बरें दिसून येतें.

(या प्रकाशमान्) अग्नीत (विराजमान) होय ! आणि धन्य ते कीं जे या (अग्नी)च्या सभोंवतीं होत ! आणि परमेश्वर (जो) सकल जगांचा पालनकर्ता (तो) पवित्र होय. ८. हे 'मूसा'! हा तर, मीं परमेश्वर आहें-सामर्थ्यवान् (व)बुद्धिमान्. ९. आणि तूं आपली काठी (खालीं) टाकून दे; तर जेव्हां ('मूसा'नें) पाहिलें कीं काठी (अशा तऱ्हेनें) वळवळत आहे कीं जणूं तो (जिता) सापच होय; तेव्हां त्यानें पाठ फिरवून पळ काढला व मागें (वळूनहि तर) पाहिलें नाहीं. (आम्हीं आज्ञापिलें, ) हे 'मूसा'! भिऊं नकोस. माझ्या हुजुरांत (येऊन) पैगंबर (समाधान पावतात व) भीत नाहींत. १०. पण ज्याच्याकडून एखादा अन्याय होऊन जाईल व मग (त्या) अन्यायापश्चात तो त्याच्याऐवजीं सुकृत्य करूं लागेल; तर मी क्षमाकर्ता (व) दयाळु आहें. ११. आणि तूं आपला हात आपल्या गळपटींत शिरीव (व मग काढ) म्हणजे तो (भलाचंगा) रोगरहित शुभ्र (चकचकीत) निघेल. (हे दोन चमत्कार त्या) नऊ चमत्कारांपैकीं(होत कीं त्यांच्यासह तुला)'फिरऔन' व त्याच्या लोकांकडे (पाठवावयाचें आहे; कारण,) ते आज्ञाभंजक लोक होत. १२. तर जेव्हां त्यांच्यापाशीं, (त्यांचे,) डोळे उघडतील असे आमचे चमत्कार आले, तेव्हां ते ह्मणूं लागले कीं,ही तर धडधडीत जादु होय. १३. आणि जरी त्यांचीं अंतःकरणें त्या(चमत्कारां)ची खात्री करून चुकलीं होतीं तरीहि त्यांनीं खोडसाळपणानें व दोखीनें त्यांस मानिलें नाहीं.

---

(२) जितके ह्मणून पैगंबर—प्रेषित वा प्रवक्ते होत ते सर्व पापरहित होत; म्हणजे त्यांच्या हातून कोणतेंहि महापातक बुध्या घडून येत नाहीं. परंतु मानवीप्रवृत्त्यनुसार लहान लहान चुका त्यांच्यकडून झाल्या आहेत व गैरसमजहि झाला आहे. खुद्द मूसा पैगंबरानें चुकून एक किप्ती मनुष्याला मारून टाकिलें म्हणजे त्यांनीं त्याला मुका मारला व तो मरून गेला. हजरत मूसाला या चुकून झालेल्या गोष्टीबद्दल फार वाईट वाटलें आणि त्यांनीं परमेश्वराच्या सेवेंत पश्चात्ताप व क्षमेची याचना केला. यावर परमेश्वरानें त्यांची चूक माफ केली. या वाक्यांत कदाचित् या गोष्टीकडेच इशारत असेल.

(१) शुभ्र चकचकीत हात व काठी या चमत्काराशिवाय आणखी सात चमत्कार नवव्या भागाच्या सहाव्या रुकु-स्कंधांत आलेले आहेत. पाहा पृष्ठ ३३० टीप २.

तर (हे पैगंबरा!) पाहा! फिसादखोरांचा कसा (वाईट) परिणाम झाला? १४. आणि आम्हीं 'दाऊद' व 'सुलेमान' यांस (धर्म व संसार यांचें) ज्ञान दिलें आणि ते उभयतां (खुष होऊन) ह्मणूं लागले कीं, ज्यानें आम्हांला आपल्या विश्वासू सेवकांपैकीं बहुतेकांवर श्रेष्टत्व दिलें आहे त्या परमेश्वरास उपकार-स्तुति होय. १५ आणि 'सुलेमान' हा 'दाऊद'चा वारस झाला आणि तो म्हणाला, लोकांनों! आह्मांला (परमेश्वराकडून) पक्षांचीसुद्धां बोली शिकविली गेली आहे व आम्हांस प्रत्येक वस्तु दिली गेली आहे. निःसंशय ही (परमेश्वराची) ठळठळीत कृपा होय. १६. आणि 'सुलेमाना'चीं (जितकीं) सैन्यें राक्षस (जिन्न) व मनुष्य आणि पक्षी यांचीं (होतीं तीं) त्याच्या (निरीक्षणा)-साठीं एकत्र गोळा केलीं गेलीं; तर ते वर्गावर्गानें त्याच्या समोर उभे केले जात होते. १७. (एवंच, या पद्धतीनें लष्कर एकीकडे रवाना झालें) येथपर्यंत कीं जेव्हां ते मुंग्यांच्या (एका) मैदानांत पोहोंचले तेव्हां एक मुंगी ह्मणाली, हे मुंग्यांनों! तुम्हीं आपापल्या बिळांत शिरून जा, असें न होवो कीं 'सुलेमान' व त्याचीं सैन्यें तुम्हांला पायांखालीं तुडवून टाकतील व त्यांना (याची) खबरहि होणार नाहीं. १८. मुंगीच्या (या) बोलण्यानें 'सुलेमान' प्रसन्न होऊन गालांतल्या गालांत हंसला व म्हणूं लागला कीं हे माझ्या पालनकर्त्या! तूं मला अशी सुबुद्धि दे कीं जे जे उपकार त्वां मजवर व माझ्या आईबापांवर केले आहेत त्या तुझ्या उपकारांचे मी आभार मानावेत; आणि मी जीं तूं पसंत करशील अशीं चांगलीं कामें (आजन्म) करीत राहावें. आणि (शेवटीं मेल्यावर) तूं मला आपल्या कृपेनें आपल्या सदाचरणी सेवकांत (नेऊन) दाखल कर. १९.

(१) हजरत सुलेमान वा सालोमन हे मुंगीचें बोलणें समजून गेले व तिच्या या लहानशा आकृतिवरहि त्यांनीं तिची हुशारी पाहिली; यामुळें ते फार प्रसन्न झाले; आणि तिची गोष्ट समजून दिल्याबद्दल त्यांनीं परमेश्वराचे आभार मानिले. कित्येक लोक चमत्कारांसंबंधीं शंका बाळगितात व आक्षेप घेतात. त्यांपैकीं या गोष्टीचाहि कीं, सुलेमान हे मुंगीची गोष्ट कशी समजले. परंतु कोणी एक विद्वान् डाक्टरानें मोठ्या परिश्रमानें मुंग्यांच्या इषाऱ्यांचा अर्थ शोधून काढून कोशासारखें एक पुस्तक लिहिलें आहे. लोक डाक्टरांच्या विश्वास

आणि 'सुलेमाना'नें पक्ष्यांची मोजदाद घेतली, तों त्यानें ह्मटलें कीं मला झालें तरी काय कीं मी टिटवीला पाहत नाहीं ? (कां पक्ष्यांच्या संख्याबाहुल्यामुळें ती मला दिसत नाहीं) अगर (खरोखरींच) ती गैरहाजीर आहे ? २०. (जर ती गैरहाजीर आहे तर) मी तिला अवश्यच सक्त शिक्षा देईन अथवा तिला हलालच करून टाकीन. किंवा तिणें माझ्या हुजूर (आपल्या गैरहजरीची अशी) एखादी सबब पुढें करावी (कीं जेणें करून हें) जाहीर (होईल कीं ती निर्दोष आहे) २१. मग थोड्याच अवकाशानंतर टिटवी येऊन हजर झाली व ती म्हणूं लागली कीं (हे राजा ! अद्यापि) तुला माहीत झाली नव्हती अशी एक गोष्ट मला माहीत झाली आहे; आणि मी तुझ्या हुजुरांत 'सबा' (नगरी)ची एक खात्रीपूर्वक खबर घेऊन हजर झालें आहे. २२. मी एका स्त्रीला पाहिलें कीं ती तेथिल लोकांची राणी आहे (व ती त्यांजवर राज्य करित्ये) आणि (राज्यसाधनांची) हरेक वस्तु तिला प्राप्त आहे व तिच्या येथें (एक फार) मोठें सिंहासनहि आहे. २३. मी राणीला व तिच्या लोकांना पाहिलें कीं ते परमेश्वराला सोडून सूर्यापुढें साष्टांग नमस्कार घालतात; आणि सैतानानें त्यांचीं कर्में त्यांना सुशोभित करून दाखविलीं आहेत व त्यांना (सरळ) मार्गाहून बहकविलें आहे. तर त्यांना (इतकी गोष्टहि) सुचत नाहीं; २४. कीं परमेश्वर जो आकाश व पृथ्वीच्या गुप्त वस्तु उघडकीस आणितो आणि जें काम तुम्हीं लोक गुप्तपणें करितां व प्रसिद्धपणें करितां तें (सर्व) तो जाणतो अशा परमेश्वराच्याचपुढें त्यांनीं (कां म्हणून) साष्टांग नमस्कार घालूं नये ? २५. परमेश्वर (असा परम पवित्र होय कीं) त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य नाहीं; (आणि) तोच महान 'अर्श'(च्या सिंहासना)चा

धरतात पण सुलेमानाचा विश्वास धरीत नाहींत हें त्यांचें दुर्दैव; म्हणूनच जी गोष्ट ध्यानांत येत नाहीं ती खोटी असें म्हणूं लागतात.

(१) पृथ्वीच्या गुप्त वस्तु म्हणजे वनस्पति व खनिज पदार्थ कीं ह्या वस्तु या जगांमध्यें जमिनींतून निघतात आणि पुनरुत्थानाचे दिवशीं मेलेल्यांस जमिनींतून जिवंत उठविलें जाईल. आणि आकाशाच्या गुप्त वस्तु पाऊस, वीज, गारा व तारे वगैरे हीं होत.

**मालकं होय. २६. ('सुलेमाना'नें) म्हटलें, (बरें)आम्हीं आतां पाहुन घेतों कीं तूं खरें बोलत्येंस किंवा लबाडांपैकीं आहेस. २७. हें माझें पत्र घेऊन जा व तें त्यांजकडेस टाकून दे; मग त्यांजपासून (एकीकडे) सरून जा व पाहात राहा कीं ते लोक काय जबाब देतात? २८. (सारांश, टिटवीनें 'सुलेमाना'चा संदेश राणीला पोंचता केला व ती तो पाहून) बोलली कीं हे दरबारमंडळांनों! (हें) एक सन्माननीय पत्र मजकडेस टाकिलें गेलें आहे. २९. हें 'सुलेमाना'कडून आहे आणि हें (म्हणजे त्याची वाक्यरचना याप्रमाणें आहे कीं सर्वांत प्रथम त्यांत) "परम दयाळू**

(१) वाक्यसंदर्भावरून हें निष्पन्न होतें कीं हें सर्व टिटवी–हुदहुद–चें बोलणें असावें. यांत आश्चर्य नाहीं कीं परमेश्वरानें प्राण्यांस किंबहुना खनिज पदार्थांसहि अशी उपजत बुद्धि दिली असावी कीं ते परमेश्वराला व त्याच्या कित्येक गुण विशेषणाला जाणत बुजत असतील. दुसऱ्या जागीं म्हटलें आहे " अशी एकहि वस्तु नाहीं कीं जी परमेश्वराच्या स्तुतिबरोबर त्याच्या पवित्रतेचेंहि वर्णन करीत नसेल. परंतु तुम्हीं त्यांचें पावित्र्य–वर्णन समजत नाहीं." या वरूनहि जगांतील सर्व सृष्ट पदार्थांतहि बुद्धि असावी असें उघड होतें. परंतु मनुष्याला प्राण्यांच्या व खनिज पदार्थांच्या या बुद्धिची जाणीव नाहीं; तथापि आमच्या न जाणिल्यानें हें जरूर नाहीं कीं, त्यांना ही बुद्धि नाहींच. हें निश्चित आहे कीं, मनुष्याला एक खास तऱ्हेची अक्कल दिली गेली आहे कीं, तिच्या बळावर माणसानें या जगांत आपला पगडा बसवून ठेविला आहे. पण असें असतांहि प्राण्यांत कित्येक निसर्गदत्त खुब्या आहेत कीं, त्या माणसांत नाहींत; आणि ह्या खुब्या बुद्धिविणा प्राप्त होणें शक्य नाहीं–बुद्धि देखिल कनिष्ठ प्रतीची नव्हे तर मानवी बुद्धिपेक्षां वरच्या प्रतीचीच. मधमाशी व मुंगी यांचा केवा काय? परंतु त्यांची व्यवस्था व त्यांचें मोहळ व बीळ यांची बनावट व कारागिरी पाहून हें सिद्ध होतें कीं, त्यांस खास एक अंगचें शहाणपण दिलेलें आहे. मनुष्य लहानशा चिमणीचें घरटें बांधूं शकत नाहीं. मुंग्यांच्या रांगेत अशी व्यवस्था पाहण्यांत येते कीं, ती कवाईत जाणणाऱ्या फौजेंतहि आढळून येत नाहीं. या प्रकारच्या हजारों गोष्टी आहेत कीं, त्यांनीं हें सिद्ध होतें कीं मनुष्यानें प्राण्यास जितकें बुद्धिशून्य समजलें आहे तितके ते बुद्धिहीन नाहींत. तथापि कित्येक गोष्टांत तर कित्येक प्राण्यांस मनुष्यावर श्रेष्ठत्व दिलें जातें.

(आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों,)" असें आहे. ३०. (आणि परमेश्वराच्या नांवानंतर) हें कीं माझ्यापुढें शिरजोरी करूं नका आणि आज्ञाधीन होऊन माझ्या हुजूर हजर व्हा. ३१. ('सबा'नगरीची राणी 'सुलेमाना'चा संदेश ऐकविल्यानंतर) बोलली कीं हे दरबार मंडळांनों ! माझ्या (या) प्रकरणांत तुम्हीं मला आपला अभिप्राय कळवा. (माझा नेहमीं हा परिपाठ राहिला आहे कीं) जोंपर्यंत तुम्हीं माझ्या हुजूर हजर नसतां, तोंपर्यंत मी कोणाहि प्रकरणांत निर्णायक हुकूम देत नसत्यें. ३२. (दरबारी) म्हणाले कीं आम्हीं (महा) बलाढ्य व सक्त लढवय्ये आहोंत; आणि (पुढें) सरकारला अखत्यार आहे; जी काय आपण आज्ञा कराल, ति(च्या बरें वाईटा)स (चांगल्या प्रकारें) पाहून घ्यावें. ३३. (ती) बोलली, बादशाह लोक जेव्हां कोणा शहरा(-स पराक्रमानें जिंकून त्यां)त दाखल होत असतात, तेव्हां (त्यांचा दस्तूर आहे कीं) ते त्याला खराब करून टाकतात आणि तेथील बड्या लोकांस नमवून सोडतात. आणि हेहि (वास्तविक) असेंच करितील. ३४. आणि मी (राजदूतांच्या हस्तें) त्यांजकडे भेट (नजराणें) पाठवून पाहत्यें कीं दूत काय जबाब घेऊन येतात ? ३५. मग जेव्हां (राजदूतांचा सरदार) 'सुलेमाना'चे सेवेंत (भेट नजराणें घेऊन) हजर झाला, तेव्हां 'सुलेमाना'नें सांगितलें, कां तुह्मीं लोक द्रव्यानें माझी मदत करूं पाहतां ? तर जें कांहीं परमेश्वरानें मला देऊन ठेविलें आहे तें, तुम्हांस जें देऊन ठेविलें आहे त्यांहून (फारच) उत्तम होय. तथापि तुम्हींच कांहीं आपल्या नजराण्यानें खुष होत असाल ! ३६. तर (हे राजदूतांच्या सरदारा ! ज्यांनीं तुला पाठविलें आहे) त्यांच्याचकडे (पुन्हां) परतून जा; आणि (आतां) आम्हीं अशा फौजा घेऊन त्यांच्यावर चढाई करूं कीं ज्यांचा त्यांच्यानें सामना करवणार नाहीं; आणि आम्हीं त्यांना तेथून पाण-उतारा करून बाहेर काढून लावूं; व ते क्षुल्लक होतील तरच सई. ३७. (इतक्यांत 'सुलेमाना'नें) म्हटलें कीं हे दरबारमंडळांनों ! कोणी तुमच्यांत असाहि आहे कीं हे लोक आज्ञांकित होऊन माझ्या हुजूर हजर

(१) हें वाक्य परमेश्वराचें असावें किंवा सबा नगरीच्या राणीचें असावें; हे दोन्हा अर्थ संभवतात.

होतील त्याच्या आधींच तो राणीचें सिंहासन मजपाशीं आणून हजर करील? ३८. (यावर), जिन्नांतून एक राक्षस बोलला कीं आपण आपल्या जागेवरून उठण्याच्या आधीं (आधींच) मी तें सिंहासन हुजुरांत आणून हजर करीन. आणि मी हि(मोहीम सर करण्या)ची ताकद्-हि बाळगितों (व) प्रामाणिकहि आहें.[1] ३९. (एक गृहस्थ) ज्याच्या-पाशीं पुस्तकाचें[2] ज्ञान होतें तो बोलला कीं तुझे डोळे लवण्याच्या आधीं (आधींच) मी तें सिंहासन तुझ्या हुजुरांत आणून हजर करीन. तर जेव्हां ('सुलेमाना'नें) सिंहासन आपल्यासमीप स्थिर ठेवलेलें पाहिलें तेव्हां तो बोलूं लागला कीं हीहि माझ्या पालनकर्याची कृपा होय; अशा-साठीं कीं त्यानें मला पडताळून पाहावें कीं मी (त्याचे) आभार मानतों का कृतघ्नता दर्शवितों?[3] आणि जो कोणी (परमेश्वराचे) अमार मानितो तो केवळ आपल्याच (कल्याणा)साठीं आभार मानितो; आणि जो कोणी कृतघ्नता दर्शवितो तर माझा पालनकर्ता (त्याच्या आभारापासून) निरपेक्ष व (फार) उदार होय. (कीं तो कृतघ्नांसहि देतो) ४०. ('सुलेमान'नें) हुकूम दिला कीं राणी(चें शहाणपण पाहण्या)साठीं तिच्या सिंहासनाचें रूप बदलून अनोळखेसें करून टाका. म्हणजे आम्हीं पाहूं कीं ती (अखेर

(१) सबा नगरीच्या राणीचें सिंहासन फार मौल्यवान होतें व तें रत्न जडित होतें म्हणून राक्षसानें आपला प्रामाणिकपणा जणाविला.

(२) कित्येक भाष्यकारांनीं पुस्तक म्हणजे दिव्य ईश्वरी पुस्तक किंवा लौहे महफूज़–सुरक्षित पत्रक असा अर्थ केला आहे. आणि तो गृहस्थ कोण होता यांतहि मतभेद आहे. कोणी म्हणतो कीं तो सुलेमान पैगंबराचा वज़ीर आसिफ़ बरखिया होता; आणि त्याला परमेश्वराच्या नांवांपैकीं महानामाचे मंत्र येत होते कीं त्याच्या प्रभावानें त्यानें ही करामत दाखविली.

(३) सुलेमानानें या गोष्टीचे आभार मानिले कीं परमेश्वरानें त्यांच्या ताब्यांत असे लोक करून दिले आहेत कीं ते सबा नगरीच्या राणीचें सिंहा-सन दरबार बरखास्त होण्याच्या आधीं आधींच उडवून आणूं शकत होते. शिवाय ते असे करामती व परमेश्वराचे मानिते होते कीं एका उन्मेषांत सिंहा-सन मागवूं शकत होते.

विश्वासाच्या सरळ) मार्गास लागते कां त्या लोकांपैकींच होऊन राहते कीं जे (कोणाहि तऱ्हेनें) मार्गावर येत नाहींत. ४१. मग जेव्हां ('बिल्कीस' राणी, 'सुलेमाना,'च्या हुजुरांत) येऊन हजर झाली, तेव्हां तिला पुसलें गेलें कीं तुझें सिंहासनहि कां असेंच आहे ? ती म्हणाली, हें तर जणूं (हुबेहूब) तेंच होय. आणि (मग 'सुलेमाना'ला उद्देशून ती बोलली कीं) आम्हांला तर या(गोष्टी)च्यापूर्वींच (तुझें ईश्वरनियुक्त होणें) माहीत होऊन गेलें होतें. आणि आम्हीं (तेव्हांच तुला)मानूं लागलों होतों. ४२. आणि (वस्तुतः) ती परमेश्वराखेरीज (सूर्याची) जी पूजा अर्चा करीत होती, तिनेंच (अद्याप पावेतों) तिला ('सुलेमाना' कडे येण्यापासून) अडथळाहि केला; कारण, ती नास्तिक लोकांपैकीं होती. ४३. (मग) तिला सांगितलें गेलें कीं तूं महालांत दाखल हो. तर जेव्हां तिणें महालां(त कांचेच्या फरसबंदी)स पाहिलें तेव्हां ती त्यास पाणी समजली व (तेथून पार जाण्यासाठीं अशा तऱ्हेनें पायजमा उचलून धरला कीं) तिनें आपल्या दोन्ही पिंडऱ्या खुल्या केल्या. ('सुलेमान'नें) सांगितलें कीं हा एक असा महाल आहे कीं त्याच्या (फरसबंदी)तहि कांचच जडविलेली आहे. (तेव्हां ती आपल्या चुकींतून देहभानावर आली आणि) अर्ज करूं लागली कीं हे माझ्या पालनकर्त्या! (मी जी इतके दिवस सूर्योपासना करीत राहिली यानें) मी आपलेंच नुकसान केलें आणि आतां मी 'सुलेमाना'बरोबर राहून सकलजगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्याचाच विश्वास धरिला. ४४. आणि आम्हींच 'समूद'(चे लोकां)कडे त्यांचा भाऊ 'सालेह' यास (पैगंबर बनवून) पाठविलें होतें; कीं (लोकांनों !) परमेश्वराची उपासना करा; तर 'सालेह'च्या येतांच ते लोक (विश्वासू व नास्तिक असे) दोन पक्ष होऊन गेले, (व) आपसांत झगडूं लागले. ४५. ('सालेह'नें) सांगितलें कीं हे बांधवांनों ! कल्याणाच्या आधींच अकल्याणांसाठीं घाई कां म्हणून मचवितां ? परमेश्वराच्या सेवेंत क्षमायाचना कां करीत नाहीं कीं कदाचित् तुम्हांवर दया केली जाईल ! ४६. ते बोलले, (हे 'सालेहा' !)

(१) म्हणजे जर ती ओळखून घेईल तर एवढें माहीत होईल कीं ती अक्कल ठेविते व यामुळें ती सन्मार्गी लागेल.

आम्हीं तर तुझा व तुझ्याबरोबर जे लोक होते त्यांचा अपशकुन घेतों. ('सालेह'नें) सांगितलें कीं तुमचा अपशकुन (सर्व) परमेश्वराकडून होय. (व याशीं आमचा कांहीं संबंध नाहीं;) किंबहुना (गोष्ट ही होय कीं) तुम्हीं (असे कांहीं डुळडुळीत मनाचे) लोक आहां (कीं सहज सैतानाच्या) बहकविण्यांत येऊन जातां. ४७. आणि शहरांत नऊ माणसें होतीं कीं तीं मुलखांत फिसाद फैलावित होतीं व ते (कोणाहि प्रकारें) सुधारणा करीत नव्हते ४८. ते (एकमेकांशीं) म्हणाले कीं (या हो!) आपसांत परमेश्वराच्या शपथा वाहूं कीं आम्हीं जरूर 'सालेहा'ला व त्याच्या कुटुंबाला रात्रीच्या समयीं जाऊन मारून टाकूं; मग (आम्हांला विचारण्याची पाळी येईल तर) आम्हीं त्याच्या वारसास सांगून देऊं कीं 'सालेह'चें कुटुंब मारलें जाण्याच्या वेळीं आम्हीं तर हजरच नव्हतों; आणि आम्हीं (अगदीं) खरें बोलतों. ४९. सारांश, ते एक डाव चालले व आम्हींहि एक डाव चाललों. आणि (आमच्या डावाची) त्यांना खबरहि झाली नाहीं. ५० तर (हे पैगंबरा!) पाहा! तर त्यांच्या डावपेंचाचा कसा (वाईट) परिणाम झाला; कीं आम्हीं त्यांना व त्यांच्या लोकांस सर्वांना तर नष्ट करून टाकिलें. ५१ आतां हीं त्यांचीं घरें होत कीं त्यांच्या आज्ञाभंगामुळें (त्यांच्यावर शिक्षा आली व तीं घरें) रिकामीं पडून (भयाण होऊन) गेलीं आहेत. ह्या (वृत्तांतां-)त जे लोक जाणतात बुजतात त्यांच्यासाठीं (एक मोठा) बोध होय. ५२. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (परमेश्वराला) भीत राहिले त्यांना आम्हीं बचावून घेतलें. ५३. आणि (हे पैगंबरा!) 'लूत' (चा अहवालहि लोकांस आठवून दे कीं) जेव्हां तो आपल्या लोकांस म्हणाला, कां तुम्हीं निर्लज्जपणा (चीं कामें) करीत आहां? आणि (गहजब हा कीं तुम्हीं लपवित देखील नाहीं तर एकमेकांस) पाहतहि जातां! ५४. कां तुम्हीं स्त्रियांस सोडून कामतृप्ती (च्या उद्देशा) नें मुलांजवळ जातां? गोष्ट ही होय कीं तुम्हीं (फारच) अज्ञानी लोक आहां. ५५. तर 'लूत'च्या लोकांचा याच्याशिवाय आणखी कांहीं जबाबच नव्हता कीं ते म्हणूं लागले कीं 'लूता'च्या घराण्यास आपल्या वस्तींतून काढून बाहेर करा. (कारण कीं) हे लोक फारच सोंवळे बनूं पाहतात. ५६. तर आम्हीं

'लूता'ला व त्याच्या घराण्याच्या लोकांस (शिक्षेंतून) वांचवून घेतलें; परंतु त्याची बायको मात्र कीं जिच्या प्रारब्धांत आम्हीं लिहून चुकलों होतों कीं तीहि मागें राहणारांपैकीं होईल. ५७ आणि ('लूता'च्या मागें जे लोक बाकी राहिले) त्यांच्यावर आम्हीं दगडांचा वर्षाव केला; तर ज्यांना (आमच्या शिक्षेचें) भय दाखविलें गेलें होतें; त्यांच्यावर (किती तरी) वाईट वर्षाव झाला! ५८. (हे पैगंबरा!) बोल कीं (आज्ञाभंजकांच्या नष्ट झाल्याबद्दल) परमेश्वरास उपकारस्तुति होय. आणि ज्यांस परमेश्वरानें निवडून घेतलें त्या त्याच्या सेवकांस सलाम–शांति–असो! बरें, (सामर्थ्य व गुणग्रहणाच्या मानानें) परमेश्वर उत्तम होय किंवा ज्या वस्तूंस हे लोक (ईश्वराचे) भागीदार ठरवितात त्या वस्तु? ५९.

---

(१) सालेह आणि लूत यांच्या अहवालानंतर हें वाक्य प्रकट करून फारच उत्कृष्ट रीतीनें यांत हजरत पैगंबरसाहेबांस शुभवर्तमान देण्याचा उद्देश दिसतो; कीं ज्याप्रमाणें सालेह व लूतचे लोक आपल्या पैगंबरांच्या विरोधामुळें नाश पावले; आणि पैगंबरांच्या छळासाठीं त्यांनीं जे जे मनसुबे बांधिले होते ते सर्व फसले. हेंच प्रकरण मक्केच्या नास्तिकांशीं होणें आहे. तर मतलब हा कीं, या लोकांस नष्ट झालेले समजा व परमेश्वराचे आभार माना कीं, ज्याप्रमाणें त्यानें सालेह व लूत यांस सोडविलें होतें त्याप्रमाणें त्यानें तुम्हांस त्यांच्या छळणुकींतून सोडविलें. आणि उपकारस्तुति व आभार यांबरोबर, परमेश्वराच्या निवडक सेवकांवर धन्यवाद व शांति हीं पाठवा. कारण, परमेश्वर आभार व उपकारस्तुतीस पात्र आहे; तर ईश्वराचे निवडक सेवक धन्यवाद व शांतीस पात्र होत.

# पवित्र कुराण

## भाग विसावा.

## अध्याय २७ वा.

### सूरतु-न्नम्ल् (पुढें चालू).

बरें, आकाश व पृथ्वीस कोणी निर्मिलें आणि आकाशांतून तुम्हां लोकांसाठीं (कोणी) पाणी वर्षविलें ? (आम्हींच तें वर्षविलें.) मग पाण्याच्या योगें आम्हींच आल्हाददायक बाग उगविले. (लोकांनों !) तुमच्या अधिकाराची तर गोष्ट नव्हती कीं तुम्हीं त्यांचीं झाडें उगवूं शकतां. कां परमेश्वरासमागमें (आणखी कोणी) उपास्यहि आहे? (नाहीं.) पण हेच (निर्बुद्ध) लोक होत कीं (हकनाक) मार्गाहून चळतात. ६० बरें, कोणी

(१) ह्या वाक्यांत व याच्या पुढील वाक्यांत मूर्तीपूजक व अनेकेश्वरवादी लोकांपुढें ही गोष्ट शाबीद करावयाची आहे कीं आम्हीं (परमेश्वर) परम पवित्र आहों, आमच्याशिवाय अन्य कोणी उपासनेस पात्र नाहीं. प्रमाण पटविण्याची रीत ही पत्करली आहे कीं परमेश्वर आपले कांहीं पराक्रम व सामर्थ्य आठवून देऊन पुसतो आहे कीं हीं मोठमोठीं कामें कोणी केलीं ? मनुष्यमात्राची व इतर वस्तूंची रचना अशा प्रकारची झालेली आहे कीं प्रत्येक मनुष्य निरुपाय होऊन मान्य करतोच कीं निःसंशय हीं कामें परमेश्वराचीं होत; व अन्य कोणाच्यानें होऊं शकत नाहींत. तात्पर्य हा मजकूर कित्येक जागीं स्पष्ट स्पष्ट शब्दांत आलेला आहे. तर प्रथम मानवी स्वभावापरत्वें ही गोष्ट मान्य करविली कीं आकाश व पृथ्वी निर्माण करणें वगैरे वगैरे हीं कामें परमेश्वराचीं होत व अन्य कोणाच्यानें होणें शक्य नाहींत. तर सिद्धांत हा कीं ज्यानें हीं कामें केलीं असतील तोच उपासनेस पात्र होय. ह्मणून परमेश्वराखेरीज अन्य कोणी उपास्य नाहीं. असें असतांहि लोक मूर्तीपूजा व अनेकेश्वरवाद घेऊन बसलेले आहेत व हकनाक मार्गाहून चळत आहेत.

पृथ्वीला (मनुष्यांच्या व प्राण्यांच्या) राहण्याची जागा बनविली व तिच्या मधूनमधून नद्या बनविल्या आणि तिच्या(एका विशिष्ट आकारावर राखण्या)साठीं अचल पर्वत बनविले व (गोड्या व खाऱ्या) दोन्हीं समुद्रांत बांध बनविला (कीं जेणें करून ते एकमेकांत मिश्र होऊं नयेत)? कां परमेश्वरा समागमें (आणखी कोणी) उपास्यहि आहे ? (नाहीं.) परंतु या लोकांस बहुतेक (इतकी ठळक गोष्टहि) जाणत नाहींत. ६१. बरें असा कोण आहे कीं जेव्हां कोणी मनुष्य (नाइलाज होऊन) त्याचा धांवा करील तेव्हां तो त्या व्याकुळाची दाद ऐकील व (त्याची) आपत्ति टाळील ? आणि (असा कोण आहे कीं जो) पृथ्वींत तुम्हां लोकांस (आपला) प्रतिनिधि बनवितो,(कीं तींत तुम्हीं आपली सत्ता चालवितां)? कां परमेश्वरासमागमें (आणखी कोणी) उपास्यहि आहे ? (नाहीं; परंतु) तुम्हीं लोक विचार (व मनन) फारच कमी करितां. ६२. बरें, असा कोण आहे कीं जो तुम्हां लोकांस खुष्की व जलाच्या अंधःकारांत मार्ग दाखवितो आणि कोण आहे कीं जो आपली दया (म्हणजे पाऊस) याच्या पुढें पुढें वाऱ्याला (पावसाचें) शुभवर्तमान देण्यासाठीं पाठवितो ? कां परमेश्वरासमागमें (आणखी कोणी) उपास्यहि आहे ? हे लोक ज्या(ज्या वस्तूं–) स त्याचा जोडीदार बनवितात त्यांजपासून परमेश्वर थोर होय ! ६३ बरें, असा कोण आहे कीं जो सृष्टीस प्रथम निर्माण करितो व मग त्याच प्रकारची सृष्टि पुन्हांपुन्हां बनवित राहतो ? आणि कोण आहे कीं जो तुम्हां लोकांस आकाश व पृथ्वींतून अन्नसंपत्ति देतो ? कां परमेश्वरासमागमें(आणखी

(१) मतलब हा कीं सृष्टीची परंपरा बंद नाहीं. दरवर्षी वसंतऋतु होतो व शरदृतु येतो; आणि जशी वनस्पतीच्या उत्पत्तीची परंपरा चालू आहे तशीच ती प्राणिमात्रांतहि आहे. मनुष्यें, प्राणी व वनस्पति हीं आम्हीं जन्मतांना पाहतों तरीहि आम्हीं सृष्टीच्या गुप्त भेदांशीं वाकब नाहीं. ह्याच प्रकारची उत्पत्ति पुनरुत्थानांतहि झाल्यास ती नाकारण्यास आह्मांला कांहीं सयुक्तिक कारण नाहीं. आणि एक अर्थ हाहि होऊं शकतो कीं ‘ कां लोकांनीं या गोष्टीवर नजर केली नाहीं कीं परमेश्वर प्रथम सृष्टीला कशी निर्मितो ’ येथें वाक्य संपलें आणि पुढें दुसरी गोष्ट सुरु होते कीं “ (ज्याप्रमाणें परमेश्वर प्रथम निर्मितो त्याप्रमाणें ) तोच ( पुनरुत्थानांत ) ती पुन्हांहि निर्मील.”

कोणी) उपास्यहि आहे ? (नाहीं. हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं जर तुम्हीं (अनेकेश्वरवादांत) खरे आहां तर आपलें प्रमाण पुढें करा. ६४. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं जितकी (सृष्टि) आकाशांत व पृथ्वींत आहे परमेश्वरावांचून त्यांजपैकीं कोणीहि अदृष्ट–गैबी गोष्ट–जाणत नाहीं. आणि लोकांस हेंहि माहीत नाहीं कीं केव्हां (पुनरुत्थान होईल व ते पुन्हां) उठवून उभे केले जातील ? ६५. गोष्ट ही होय कीं परलोका-संबंधानें (कां तर) या लोकांच्या ज्ञानाचा अंतच होऊन गेला आहे. (अगर असें) नव्हे, (तर) त्याच्यासंबंधानें हे संशयांत आहेत (किंवा हेंहि) नव्हे, (तर) हे लोक (जाणूनबुजून) त्याकडून आंधळे (बनून गेले) आहेत. ६६. आणि जे लोक नास्तिक आहेत ते (आश्चर्यानें) म्हणतात, कां जेव्हां आम्हीं व आमचे वाडवडील (गळून सडून) माती होऊन जाऊं, तेव्हां कां आम्हीं पुन्हां (जमिनींतून) काढले जाऊं ? ६७. पूर्वीं-पासूनच आमच्याशीं व आमच्या वाडवडिलांशीं असले वायदे होत आले आहेत. असो नसो, ह्या प्राचीन लोकांच्या केवळ भाकडकथा होत. ६८. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं मुलखांत हिंडा फिरा

(१) पुनरुत्थानासंबंधानें दोन गोष्टी आहेत- एक तर फक्त पुनरुत्थान होणें; दुसरी त्याची वेळ; तर वेळेसंबंधानें परमेश्वरानें सांगितलें आहे कीं, कोणाहि सेवकांस येथपर्यंत कीं पैगंबरांस व दूतांससुद्धां आम्हीं ती वेळ सांगितली नाहीं कीं, पुनरुत्थान केव्हां येईल ? म्हणजे पुनरुत्थानाची वेळ अदृष्ट किंवा गैबी गोष्टींपैकीं आहे कीं ती परमेश्वराशिवाय कोणीच जाणत नाहीं. आतां निव्वळ पुनरुत्थानाचें घडून येणें ही गोष्ट जरी निश्चित आहे आणि त्याचीं प्रमाणें कुराणांत ठिकठिकाणीं आलीं आहेत तरीहि ज्याअर्थी तें अद्यापि घडून आलें नाहीं व केव्हां येईल हेंहि माहीत नाहीं त्याअर्थी बहुतेक लोक त्यास नाकारूं लागतात; आणि अशा लोकांचे तीन प्रकार असतात. कित्येकांस पूर्ण विश्वास आहे कीं पुनरुत्थान होणारच नाहीं; पण त्यांचा हा विश्वास खोटा व निराधार आहे. दुसरा दर्जा संशयाचा आहे कीं, तें येईलहि किंवा नहि येईल. तिसरा प्रकार हा कीं पुनरुत्थानाची खात्री आहे; पण मनुष्य वाडवडिलांच्या अनुकरणामुळें व हट्टवादीपणामुळें त्याची नकारणी करीत जातो. ह्या तीन प्रकारांचें वर्णन या व पुढील दोन वाक्यांत आलें आहे.

**व मग पाहा कीं गुन्हेगारांचा[1] कसा परिणाम झाला ? ६९. आणि (हे पैगंबरा ! तूं) या(लोकांच्या स्थिती)बद्दल खेद करूं नकोस. आणि ज्या ज्या खटपटी (तुझ्याविरुद्ध) हे करीत आहेत त्यांजकडून तूं संकोचित होऊं नकोस. ७०. आणि (नास्तिक लोक मुसलमानांस) म्हणतात कीं जर तुम्हीं खरे आहां तर (बरें, इहलौकिक शिक्षेचें) हें वचन[2] केव्हां (पुरें) होईल ? ७१. (हे पैगंबरा ! लोकांस) सांग कीं नवल नाहीं, ज्या(शिक्षे)ची तुम्हीं घाई मचवित आहां तींतून कांहीं तर तुमच्या जवळच येऊन लागली असेल ! ७२. आणि (हे पैगंबरा!) यांत संशय नाहीं कीं तुझा पालनकर्ता लोकांवर (फारच) कृपावंत होय (कीं तो शिक्षा लवकर सादर करीत नसतो). परंतु बहुतेक लोक(त्याचे) आभार मानीत नाहींत. ७३. आणि यांतहि शंका नाहीं कीं ज्या(ज्या गोष्टी) लोकांच्या मनांत गुप्त होत व ज्या कांहीं हे जाहीरपणें करतात त्या (सर्व) तुझ्या पालनकर्त्यास माहीत आहेत. ७४. आणि आकाश व पृथ्वींत अशी कोणतीहि गुप्त गोष्ट नाहीं कीं जी सुबोध[3] पुस्तक (म्हणजे 'लौहे महफूज्') यांत**

(१) म्हणजे गुन्हेगार किंवा पापी लोक शिक्षेंत सांपडले किंवा शिक्षेंत न सांपडले तरीहि ते आपल्या मरणीं मेले. सारांश हें जग नेहमींची जागा नव्हे; आणि परमेश्वराला भिण्यास व सदाचरणी होण्यास एवढें पुरें आहे.

(२) पारलौकिक शिक्षेशिवाय पैगंबरसाहेब तत्कालीन नास्तिकांस इहलौकिक शिक्षेचेंहि भय घालीत होते; कीं तुम्हीं मुसलमानांपुढें पराजय पावाल व तुह्मांस दुष्काळ वगैरे आपत्ति येऊन घेरतील. 'हें वचन' यांत या गोष्टी होत व त्या आपापल्या वेळीं घडूनहि गेल्या.

(३) 'किताबुम्मुबीन' याचा अर्थ आह्मीं सुबोध पुस्तक असा केला आहे. तरीहि त्याचें भाषांतर जसें थोडक्यांत व स्पष्ट अर्थबोधक असें पाहिजे होतें तसें होऊं शकलें नाहीं. सुबोध म्हणजे ज्यांत लहान मोठ्या सर्व गोष्टी स्पष्टपणें लिहिलेल्या होत तें. या स्थलीं सुबोध हें 'लौहे महफूज'—सुसंरक्षित पत्रक वा पट—असें कीं त्यांत मुळींच फेरफार होऊं शकत नाहीं,याचें विशेषण आहे; आणि जो अर्थ वर लिहिला आहे तोच येथें उचित होय. इतर जागीं सुबोध हें कुराणाचें विशेषण आलें आहे; व तेथें आम्हीं त्याचा अर्थ हा केला आहे कीं ज्याचा अर्थ सर्वांस समजतो व स्पष्ट असतो तें कुराण.

(लिहिलेली)नसेल. ७५. निःसंशय हें कुराण 'बनी-इस्राएलां'च्या बहुतेक गोष्टी(ची वस्तुस्थिति) कीं ज्यांत ते मतभेद करतात (ती) त्यांना विदित करितें. ७६. आणि निःसंशय हें (कुराण) विश्वासूंच्या ठायीं (सर्वांशीं) बोध व दया होय. ७७. (हे पैगंबरा !) कांहीं शंका नाहीं कीं तुझा पालनकर्ता (कुराण प्रकट करून) आपल्या हुकमानें यांच्या आपसां(च्या झगड्यां)चा फैसला करितो. आणि तो सामर्थ्यवान् (व सर्व–)ज्ञानी होय. ७८. तर (हे पैगंबरा !) तूं परमेश्वरावरच भरंवसा ठेव. कांहीं संशय नाहीं कीं तूं ढळढळीत सत्यावर आहेस. ७९. निःसंशय तूं मेलेल्यांस[1] (आपल्या गोष्टी) ऐकवूं शकत नाहींस आणि बहिऱ्यांसहि (आपली) हाक ऐकवूं शकत नाहींस;(मुख्यत्वेंकरून) अशा स्थितींत कीं, जेव्हां ते पाठ फिरवून पळूं लागतात. ८०. आणि तूं आंधळ्यांस त्यांच्या गैरमार्गाहून (आवरून) सरळ मार्ग दाखवूं शकत नाहींस. तूं तर केवळ त्याच लोकांस (आपल्या गोष्टी) ऐकवूं शकतोस कीं जे आमच्या निशाण्यांवर विश्वास ठेवितात. म्हणून ते मानूनहि जातात. ८१. आणि जेव्हां (पुनरुत्थानाविषयींचें ईश्वरी) वचन या लोकांसंबंधानें सिद्ध (व्हावयास) होईल तेव्हां आम्हीं जमिनींतून यांच्याकरितां एक प्राणी[2] काढून उभा करूं कीं तो यांना सांगून देईल कीं (अमुक) मनुष्यें आमच्या निशाण्यांचा पूर्ण विश्वास ठेवित नव्हते. ८२.

(१) मेलेले, बहिरे व आंधळे म्हणजे नास्तिक लोक हे होत. ज्याप्रमाणें मेलेले व बहिरे कांहीं ऐकूं शकत नाहींत त्याचप्रमाणें हे नास्तिकहि सत्य गोष्ट ऐकत नाहींत. आणि जसें आंधळ्यास कांहीं दिसत नाहीं तसाच या नास्तिकांस सरळ मार्ग सुचत नाहीं. सारांश हे लोक सरळ मार्गावर येणार नाहींत.

(२) पुनरुत्थानाचे चिन्हांपैकीं एक हेंहि आहे कीं मक्केच्या सफा पर्वतावरून एक प्राणी निघेल व त्याच्याजवळ सुलेमान पैगंबराची मोहर व मूसा पैगंबराची काठी असेल; तो एका विशिष्ट निशाणीनें मुसलमानांस व नास्तिकांस वेगवेगळें करून टाकील कीं ते पृथक् पृथक् जाणतां येतील. ईश्वरी प्रकटी करणाद्वारें जी अनेक भविष्य वचनें घडून आलीं आहेत त्याचप्रमाणें ही गोष्टहि जरी अजून घडावयाची आहे तरी ती तशी मानण्यास योग्य आहे. कारण इतर गोष्टींप्रमाणें तीहि शेवटीं घडून येणारच येणार.

आणि (हे पैगंबरा ! या लोकांस त्या दिवसाच्या आपत्तीची आठवण दे कीं) ज्या दिवशीं आम्हीं हरेक जनतेंतून, (म्हणजे) जे लोक आमच्या निशाण्यांस पाखंड म्हणीत होते त्यांच्यांतून एक लोकसमुदाय गोळा करूं; व मग त्यांचे वर्ग वर्ग बनविले जातील; ८३. येथपर्यंत कीं जेव्हां ते (परमेश्वरासमोर) हजर होतील, तेव्हां (परमेश्वर त्यांस) विचारील कीं तुम्हीं माझ्या निशाण्या चांगल्या प्रकारें समजलांहि नव्हता, असें असूनहि, तुम्हीं त्यांस कां (समजल्याविणाच) पाखंड म्हटलें? अगर (हें नाहीं केलें, तर आणखी) काय करीत राहिलां? ८४. आणि हे लोक (या जगिक आयुष्यांत) शिरजोरी करीत राहिले म्हणून (त्याचा परिणाम हा झाला कीं शिक्षेचें) वचन त्यांच्या ठायीं पूर्ण झालें. आणि हे लोक ब्रहि काढूं शकणार नाहींत. ८५. कां या लोकांनीं या (गोष्टीवर) नजर केली नाहीं कीं आम्हीं रात्रीस (या साठीं काळोखी) बनविली आहे कीं तींत त्यांनीं विश्रांति घ्यावी ; आणि दिवसाला प्रकाशित, (कीं त्यांत त्यांनीं वस्तु पाहाव्या सवराव्या). कांहीं संशय नाहीं कीं (रात्रंदिवसाच्या) ह्या (स्थित्यंतरांत) जे लोक विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीं (ईश्वरी सामर्थ्याच्या बहुतेक) निशाण्या (उपलब्ध) होत. ८६. आणि ज्या दिवशीं सूर-करणा फुंकला जाईल त्यादिवशीं जे (दूत) आकाशांत आहेत व जे (लोक) पृथ्वींत आहेत ते सर्वच (त्याचा आवाज ऐकून) गांगरून जातील; पण ज्याला परमेश्वर इच्छील (तो समाधानानें राहील). आणि सारे (चे सारे) त्याच्या हुजुरांत दीनवाणे व नमून हजर होतील. ८७. आणि (हे वाचका-श्रोत्या)! तूं पर्वतांस पाहून विचार करितोस कीं ते (आपल्या जागीं) जमून गेले आहेत (व हालूं शकत नाहींत). पण (पुनरुत्थानाचे दिवशीं) हे (पर्वत) ढग चालतात तसे चालूं लागतील. (हीहि)

(१) या महावाक्याचा एक अर्थ आम्हीं जो भाषांतरांत पत्करला आहे तो होय. म्हणजे "तूं पर्वतांस पाहून विचार करितोस कीं, ते (आपल्या जागीं) जमून गेले आहेत." हें पर्वतांच्या या जगांतील स्थितीचें वर्णन होय. आणि "हे जसे ढग चालतात तसे चालूं लागतील." ही पर्वतांची पुनरुत्थानाच्या दिवशीं स्थिति होईल. इतर लोकांनीं ह्या दोन्ही स्थितीला पुनरुत्थानाच्या वेळची स्थिति घेतली आहे. तर त्यांस अनुसरून भाषांतर हें होईल. "आणि

परमेश्वराची कारागिरी (होय), कीं ज्यानें प्रत्येक वस्तु खूप भक्कम बनविली आहे. निःसंशय जें कांहींहि तुम्हीं (लोक) करितां त्याशीं तो खूप वाकब होय. ८८. जो मनुष्य सुकृत्य घेऊन हजर होईल तर त्याला त्याहून उत्तम (मोबदला) मिळेल. आणि असले लोक त्यादिवशीं भय (व धोक्या) पासूनहि निर्भय असतील. ८९. आणि जे कुकर्म घेऊन येतील, तर ते तोंडघशीं नरकाग्नींत झुगारून दिले जातील; (आणि त्यांस दोष देण्यासाठीं म्हटलें जाईल कीं ही तर) तुम्हीं जीं कर्मे जगांत करीत राहिलां, त्यांचीच केवळ तुम्हांस सजा दिली जात आहे ना? ९०. (हे पैगंबरा! या लोकांस सांग कीं) मला तर केवळ हाच हुकूम मिळाला आहे कीं मी या ('मक्का') शहराचा (खरा) मालक कीं ज्यानें ह्यास आदार सन्मान दिला आहे व सर्व कांहीं त्याचेंच आहे त्याची उपासना

---

(हे वाचकश्रोत्या!) तूं पर्वतांस (पुनरुत्थानाचे दिवशीं) पाहून विचार करशील कीं ते (आपल्या जागीं) जमून गेले आहेत; परंतु (वस्तुतः) ढगांच्याप्रमाणें उडत चालले जात आहेत." तर या स्थितींत या गोष्टीचें अर्थानुसंधान लावावें लागेल कीं पर्वत एकसमयावच्छेदेंकरून कसे उडत राहतील व जमलेलेहि दिसूं लागतील. ह्मणून लोकांनीं लिहिलें आहे कीं, मोठ्या लांबलचक व रुंद वस्तूंत गति उत्पन्न होईल तर तिच्या सर्वांगाच्या गतीचा भास होत नाहीं; उदाहरणार्थ, ढग जे साऱ्या आकाशावर पसरलेले आहेत ते चालतांना दिसत नाहींत. नंतर दुसरी गोष्ट ही पाहावयाची आहे कीं, 'प्रत्येक वस्तु खूप भक्कम बनविली' याचा "जसे ढग चालतात तसे चालूं लागतील" याशीं काय संबंध आहे? तथापि दिसण्यांत ह्या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी दिसतात. आम्ही समजतों कीं पुनरुत्थानांत पर्वतांचें उडत फिरणें हें त्यांच्या रचनेंत दोष आहे ह्मणून नव्हें, तर त्यांची रचना भक्कम आहे. परंतु ही परमेश्वराची कारागिरी होय कीं एक मजबूत व भक्कम वस्तु एक जराशी कळ दाबल्यानें ढगाप्रमाणें उडूं लागेल.

(१) आदरसन्मान देणें म्हणजे हें कीं त्या शहरांत रक्तपात व फिसाद करण्याची मनाई आहे. आणि जो कोणी तेथें आश्रय घेईल त्याची धरपकड होत नाहीं; येथपर्यंत कीं त्या पवित्र स्थाना—हरम—च्या आंत दर्भाची काडी तोडणेंही मना आहे; आणि जेव्हांपासून त्याची स्थापना झाली आहे तेव्हां-

**करावी. आणि (तसाच) मला हा हुकूम मिळाला आहे कीं मी (त्याच्या) आज्ञाधारकांत राहावें. ९१. आणि हें कीं मी लोकांस कुराण वाचून वाचून ऐकवावें. तर जो कोणी सरळ मार्गास लागला तो आपल्याच (कल्याणा)साठीं मार्गास लागतो; आणि जो मार्गांहून बहकला, तर तूं (त्याला) सांगून दे कीं (परमेश्वरानें जेथें आणखीहि भय सुचविणारे पैगंबर पाठविले आहेत तेथें) मींहि (त्या) भय सुचविणारांपैकीं (एक भय सुचविणारा) आहें एवढेंच. ९२. आणि तूं बोल कीं परमेश्वरास उपकार स्तुति होय. तो लवकरच तुम्हांला आपल्या निशाण्या दाखवील व (त्या-वेळीं) तुम्हीं त्यांस ओळखूनें[२] घ्याल. आणि जसजशीं (बरींवाईट) कामें तुम्हीं लोक करीत राहिलां आहां त्यांजकडून (हे पैगंबरा!) तुझा पालन-कर्ता अजाण नाहीं. (जो जसें करील तसा त्याला तो बदला देईल). ९३.**

---

पासून कोट्यावधि मनुष्यें त्याचा आदर सन्मान करतात व तेथील यात्रेस जातात.

(१) मतलब हा कीं जे लोक चुकीचा मार्ग पत्करतात ते आपलेंच नुकसान करतात. राहिले पैगंबर, त्यांचें काम लोकांस केवळ भय सुचविणें आहे. तें कोणाच्याही गैरमार्गी बहकण्याचे जबाबदार नाहींत.

(२) हजरत पैगंबर साहेब हे विरोधीलोकांस इहलौकिक शिक्षेचेंही भय दाखवित होते, कीं तुम्हीं लोक मुसलमानांपुढें पराभूत व्हाल; लढायांत मारले जाल व देशांत दुष्काळ पडतील. सारांश, या वाक्यांत याच गोष्टीकडे कटाक्ष आहे कीं तुम्हीं माझ्या बोलण्याचा विश्वास करीत नाहीं; पण जेव्हां एखादी शिक्षा उतरेल तेव्हां तुम्हीं ओळखून घ्याल कीं याच शिक्षेकडून मी तुम्हांस भिववित होतों.

# अध्याय २८ वा.

## सूरतुल्-क़सस्.

हा अध्याय मकाशहरीं प्रकट झाला यांत ८८ महावाक्यें आहेत. २६ व्या महावाक्यांत हजरत मूसा यांनीं आपल्या चमत्कारिक गोष्टी हजरत शोएब यांस सांगितल्या आहेत त्यांजवरून हें 'गोष्टींचें प्रकरण' असें नांव पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)

त. स. म. (ता-सीन-मीम.) १. हा (अध्यायहि) सुबोध पुस्तका (म्हणजे कुराणां)चीं कांहीं महावाक्यें होत. २. (हे पैगंबरा!) जे विश्वास ठेवितात त्या लोकां(च्या हिता)साठीं आम्हीं 'मूसा' व 'फिरऔन' यांचा खराखरा अहवाल तुला ऐकवितों; ३. कीं 'फिरऔन'('मिसर' देशांत (फारच) वरचढ होऊन राहिला होता. व त्यानें तेथील लोकांचे वेगवेगळाले पक्ष स्थापिले होते; त्यांजपैकीं एका पक्षा (म्हणजे 'बनी-इस्राएलां')स त्यानें (इतकें) कमजोर समजून ठेविलें होतें कीं तो त्यांच्या मुलांस जबे करवून टाकी आणि त्यांच्या स्त्रीजाती (म्हणजे मुलीं)स जिवंत राखी. यांत संशय नाहीं कीं तोहि फिसादखोरांपैकीं (एक फिसादीच) होता. ४. आणि आमचा इरादा हा होता कीं जे लोक (त्याच्या) मुलखांत कमजोर समजले गेले होते त्यांच्यावर आम्हीं उपकार करावेत व त्यांनाच सरदार बनवावें आणि त्यांनाच (राज्याचे) वारस ठरवावें; ५. आणि त्यांचीच मुलखांत स्थापना करावी व 'फिरऔन' व 'हामान' व त्यांचीं सैन्यें यांस ('बनी-इस्राएलां'कडून) ज्या गोष्टीचा अंदेशा होता, ती त्या ('बनी-इस्राएलीं')च्याच हातून त्यांच्यापुढें (आणून) दाखवावी. ६. आणि आम्हीं (त्याची ही युक्ति काढिली कीं 'मूसा' जन्मला व आम्हीं)

'मूसा' च्या आईकडे आदेश पाठविला कीं तूं त्याला दूध पाज. मग जेव्हां त्याच्या संबंधानें तुला (कोणातऱ्हेची) भीति वाटेल, तेव्हां त्याला तूं समुद्रांत टाकून दे; आणि (कांहीं) अंदेशा बाळगूं नकोस व क्लेशहि करूं नकोस. (कारण कीं) आम्हीं त्याला पुन्हां तुजपाशीं परत पोहोंचवूं आणि (शेवटीं) त्याला पैगंबरांपैकीं (एक पैगंबर) बनवूं ७ (तात्पर्य, 'मूसा'च्या मातोश्रीनें त्याला समुद्रांत टाकून दिलें.) तर 'फिरऔना'चे लोकांनीं त्या (वाहत्या)ला उचलून घेतलें; कीं (सरशेवटीं हाच 'मूसा') त्यांचा शत्रु व (त्यांच्या) क्लेशास कारणीभूत व्हावा. कांहीं संशय नाहीं कीं 'फिरऔन' व 'हामान' व त्यांच्या शिपायांनीं (आपल्या ठिकाणीं मोठी) चूक[2] केली. ८. आणि 'फिरऔना'ची बायको (आपल्या पतीशीं) बोलली कीं (हें मूल) माझ्या व तुझ्या (दोघांच्या) डोळ्यांची थंडक आहे. (तर तुम्हीं लोक) त्याला मारूं नका. नवल नाहीं कीं तो आम्हांला (कांहीं) फायदा पोंहोंचवील अगर आम्हीं त्याला (आपला) पुत्रच बनवून घेऊं; आणि त्या लोकांस (परिणामाची) जाणीव[3] नव्हती.९.

(१) अंदेशा हा होता कीं, फिरऔन वा फारोला जोतिष्यांनीं सांगितलें होतें कीं बनी-इस्राएलांमध्यें एक मनुष्य जन्मेल व तो बनी-इस्राएलांस तुझ्या हुकुमतींतून मुक्त करून तुझें राज्य उलटपालट करून टाकील. फिरऔननें त्याची तोड अशी केली कीं बनी-इस्राएलांमध्यें जो मुलगा जन्मे त्याला तो मारून टाकी. परंतु परमेश्वराच्या निरंकुश इराद्याच्या कोण आडवा येऊं शकतो. त्याच गडबडींत हजरत 'मूसा' यांचा जन्म झाला व अखेर मोठे होऊन त्यांनीं फिरऔनचें राज्य ह्लवून सोडलें.

(२) या महावाक्याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक तर आम्हीं भाषांतरांत पत्करला आहे तो; कीं परमेश्वरानें फिरऔनाच्या लोकांस आंधळें केलें व त्या मूर्खांनीं आपल्या हातांनीं आपल्या पायांवर कुऱ्हाड मारून घेतली आणि शत्रूला बगलेंत पाळिलें. दुसरा अर्थ हा होऊं शकतो कीं फिरऔन, हामान व त्यांचे शिपाई साह्यकार वगैरे आज्ञाभंजक व गुन्हेगार लोक होते. परमेश्वरानें त्यांचे विध्वंसाची तयारी त्यांच्याच हातून करविली.

(३) ह्मणजे ते ही गोष्ट जाणत नव्हते कीं ज्या मुलांकडून त्यांना फायद्याची आशा होती तोच मुलगा त्यांच्या नाशास कारणीभूत होईल.

आणि (तिकडे) 'मूसा'च्या आईचें अंतर्याम (भयानें) सद्गदित होऊन गेलें; (आणि) जर आम्हीं तिच्या मनाचें धाडस बांधविलें नसतें, तर हें संभवनीय होतें कीं ती 'मूसा'(च्या अहवाला)स (सर्वांवर) जाहिर करून टाकती. (परंतु आम्हीं तिचें धाडस बांधविलें) कीं तिणें (आमच्या वचनाचा) विश्वास धरून बसावें. १०. आणि (पेटीस समुद्रांत टाकतेवेळीं 'मूसा'चे आईनें) त्याच्या बहिणीस सांगितलें कीं तूं ह्याच्या मागून मागून चालली जा. तर ती त्याला (लांबूनच) लांबून पाहात राहिली; आणि 'फिरऔना'च्या लोकांस (हें) मुळींच कळून आलें नाहीं. ११ आणि (इकडे) आम्हीं 'मूसा'ला पहिल्यापासूनच (दाईचें) दूध वर्ज्य करून ठेविलें होतें (कीं तो कोणाचेंहि स्तन तोंडांतच घेत नव्हता). यावर 'मूसा'चे बहिणीनें 'फिरऔना'चे लोकांस) सांगितलें कीं ह्मणाल तर मी तुम्हांस एका घराण्याचा पत्ता दाखवितें कीं ते तुम्हांकरितां या (मुला)चें धारणपोषण करतील; आणि ते त्याची कळकळीनें जोपासनाहि करतील. १२. एवंच, आम्हीं 'मूसा'ला पुन्हां त्याच्या मातोश्रीजवळ पोचतें केलें कीं (मुलाला पाहून) तिचे डोळे गार व्हावेत व तिनें कोणाहि तऱ्हेचा क्लेश बाळगूं नये; आणि हेंहि तिला माहित व्हावें कीं परमेश्वराचें वचन खरें आहे. परंतु बहुतेक लोक (हें) जाणित नाहींत. १३. आणि जेव्हां 'मूसा' आपल्या भर जवानीस पोहोंचला व पूर्ण (तवाना) झाला तेव्हां आम्हीं त्याला बुद्धि व ज्ञान दिलें. आणि सुकृत्य करणारांस आम्हीं असाच मोबदला देत असतों. १४. आणि (दैवयोगें एके दिवशीं) 'मूसा' अशा वेळीं शहरांत आला कीं तेथिल लोक (दोनप्रहरीं घरांत) बेफाम (निजलेले पडले) होते. तेव्हां तेथें त्याला असें आढळून आलें कीं दोघे पुरुष आपसांत लढत आहेत; एक तर त्याच्या पक्षाचा (म्हणजे 'बनी-इस्राएलां'तला) होय; आणि एक त्याच्या शत्रूचा (म्हणजे 'फिरऔना'कडला). तर जो 'मूसा'च्या पक्षाचा होता त्यानें, त्याच्या शत्रूकडचा जो होता त्याच्या विरुद्ध 'मूसा'पाशीं कुमक मागितली. म्हणून 'मूसा'नें त्या(च्या शत्रू)स ठोसा मारला व (तेथेंच) त्याचें काम पुरें करून टाकिलें. (मग) तो म्हणूं लागला कीं हें तर (मजकडून) एक असुरी काम घडून आलें. कांहीं संशय नाहीं कीं सैतान (माणसाचा)

शत्रू व (त्याला) उघड उघड बहकविणारा होय. १५. (आणि 'मूसा'नें त्यावेळीं) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! (हा तर) मी आपल्यावर (मोठाच) जुलूम केला; तर तूं माझा अपराध क्षमा कर. सारांश, परमेश्वरानें त्याचा अपराध क्षमा केला. (आणि) तो (फारच) क्षमाकर्ता (व) दयाळू होय. १६. (मग 'मूसा'नें) म्हटलें कीं हे माझ्या पालककर्त्या ! जसा तूं मजवर (हा) उपकार केला आहेस तसा मींहि इतःपर कधींच खोडकर लोकांचा मदतगार बनणार नाहीं. १७. सारांश, (रात्र जशी तशी गेली; दुसऱ्या दिवशीं) सकाळीं तो भीतां भीतां शहरांत गेला कीं पाहावें (काय होतें तें ?) इतक्यांत काय पाहतो आहे कीं ज्यानें काल त्याच्यापाशीं मदत मागितली होती तोच (इसम आज पुन्हां) त्याला हाक मारीत आहे. (त्याची पुकार ऐकून) 'मूसा'नें त्याला म्हटलें कीं यांत संशय नाहीं कीं तूं तर धडधडीत गैरमार्गी (मनुष्य) आहेस (कीं नित्य लोकांशीं लढतच राहतोस). १८. मग जेव्हां 'मूसा'नें (आपला व त्या ओरडणाऱ्याचा) दोघांचा जो शत्रू होता त्या (किब्त्यां)ला धरूं इच्छिलें; तेव्हां ('इस्राएला'स असा आभास झाला कीं तो मला धरूं इच्छित आहे, म्हणून) तो ओरडून बोलला कीं हे 'मूसा' ! जसें काल त्वां एका मनुष्यास मारून टाकिलेंस (तसेंच आज) मलाहि कां मारून टाकूं पाहतोस ? (मला वाटतें कीं) तूं तर केवळ हेंच इच्छितोस कीं मुलखांत जोरजुलूम करीत राहावेंस आणि तूं भल्या माणसांपैकीं बनून राहूं इच्छित नाहींस. १९. आणि शहाराच्या फारच पलिकडील भागाहून एक माणूस धांव घेत आला; (व) त्यानें सांगितलें कीं हे 'मूसा' ! बडे बडे लोक तुझ्यासंबंधांत सल्ला मसलत करीत आहेत कीं तुला मारून टाकावें; तर तूं (शहरांतून) निघून जा. खरोखरींच मी तुझ्या बऱ्याचें सांगतों. २०. सारांश ('मूसा') शहरांतून निघून पळाला (व) भीत भीत जात होता कीं पाहावें (काय होतें तें; आणि 'मूसा'नें शहरांतून निघतांना) प्रार्थनाहि केली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! मला (या) जुलमी लोकांपासून तूं वांचीव. २१. आणि जेव्हां त्यानें (आपला)

(१) फिरऔनाच्या लोकांस किब्ती म्हणत होते. मिसर देशाचें असल नांव किब्त होतें व हे लोक तेथिल मूळ रहिवासी होत.

रोंख 'मदयन'कडे फिरविला (व तिकडील वाट त्याला माहींतहि नव्हती;) तेव्हां तो (आपल्या आपणच) म्हणाला कीं मला आपल्या पालनकर्त्याकडून आशा आहे कीं तो मला सरळ मार्ग दाखवील. २२. आणि जेव्हां तो (शहराबाहेर) 'मदयन' (नगरा)च्या पाण्या(च्या विहीरी)वर पोहोंचला तेव्हां त्याला आढळून आलें कीं पाण्यावर लोकांची एक गर्दी (लागली) आहे (व आपल्या जनावरांस) पाणी पाजीत आहेत. आणि त्यानें (हेंहि) पाहिलें कीं त्यांच्यापासून पलिकडेस दोन स्त्रिया (आपल्या शेळ्या मेंढ्यांस) थोपवून उभ्या आहेत. ('मूसा'नें त्यांस) विचारिलें कीं तुम्हां दोघींचा काय हेतु आहे? त्या म्हणाल्या, जोंपर्यंत (इतर) मेंढपाल (आपल्या जनावरांस पाणी पाजून) हटवून घेऊन न जातील तोंपर्यंत आम्हीं (आपल्या मेंढरांस पाणी) पाजूं शकत नाहीं. आणि आमचा पिता अतिवयस्के म्हातारा आहे. २३. हें ऐकून ('मूसा'नें) त्यांच्यासाठीं (पाणी ओढून त्यांच्या मेंढरांस) पाजून टाकिलें; नंतर (तेथून) सरून तो(एकेजागीं) सावलींत जाऊन बसला. आणि (भूक लागली होती म्हणून) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! तूं (या वेळीं) मला जें हितहि पोहोंचविशील त्याचा मी (अतिशय) गरेजवंत आहे. २४. इतक्यांत (काय पाहतो आहे कीं) त्या दोघींपैकीं एक त्याजकडेस लाजत लाजत चाललो येत आहे. तिणें (येऊन 'मूसा'ला) सांगितलें कीं माझा पिता तुला बोलावित आहे; अशासाठीं कीं तूं जें आम्हांकरितां (आमच्या मेंढरांस पाणी) पाजलें होतेंस त्याचें वेतन त्यानें तुला द्यावें. मग जेव्हां 'मूसा' त्या (वृद्धा)जवळ पोहोंचला व त्यानें त्याला आपला अहवाल सांगितला, तेव्हां तो म्हणाला कीं (आतां तूं कसलाच) अंदेशा बाळगूं नकोस. तूं जुलमी लोकांपासून पार बचावलास २५. त्या दोघींपैकीं

---

(१) यांचा हेतु हा होता कीं आमच्या घरांत कोणी पुरुष नाहीं म्हणून आम्हांला ह्या मेंढरांस पाणी पाजण्यासाठीं यावें लागतें. एक बाप आहे तोहि म्हातारा, चालण्याफिरण्यास अशक्त.

(२) लोकांच्या स्थितीवर करुणा करणें आणि स्वतःला गरज असतांहि त्यांजपासून मदत न मागणें ही या गोष्टीची साक्ष आहे कीं हजरत मूसाचा स्वभावच परमेश्वरानें पैगंबरी पदास योग्य असा निर्मिला होता.

एकीनें (आपल्या बापास) म्हटलें कीं हे पित्या ! याला चाकरीस ठेवून घे; कारण, उत्तमांत उत्तम माणूस ज्याला तूं चाकरीस ठेवूं इच्छिशील तो मजबूत (व) प्रामाणिक असला पाहिजे. (आणि या गृहस्थांत दोन्ही गुण दिसून येतात). २६. (यावर त्या वृद्ध मनुष्यानें 'मूसा'ला) म्हटलें कीं मी इच्छितों कीं आपल्या ह्या उभयतां मुलींपैकीं एकीस या (स्त्री-धना)ऐवजीं तुझ्याशीं लग्न करून द्यावें कीं तूं आठ वर्षें माझी नोकरी करावीस. आणि जर तूं दहा(वर्षें) पुरीं करशील तर तुझा उपकार होय. आणि मी तुजवर (जास्त) मेहनत टाकण्यास इच्छित नाहीं. (आणि) जर परमेश्वरानें इच्छिलें तर तूं मला (व्यवहारसुकर व) भला माणूस पावशील. २७. ('मूसा'नें) म्हटलें, (बरें तर) ही गोष्ट माझ्या व तुझ्या दरम्यान (पक्की) होऊन चुकली. (मला अखत्यार आहे) दोन्ही मुदतींपैकीं जी कोणतीहि (मी इच्छीन) ती पुरी करून देईन; मजवर कोणाहि प्रकारची जबरदस्ती नाहीं. आणि आम्हीं जें काय बोलतों आहों, परमेश्वर त्याचा साक्षी होय. २८. मग जेव्हां 'मूसा'नें (आपल्या नोकरीची) मुदत पुरी केली व तो आपल्या कुटुंबासह रवाना झाला तेव्हां 'तूर' (पर्वता)कडून याला एक आगशी दिसून आली. ('मूसा'नें) आपल्या कुटुंबास सांगितलें कीं तुम्हीं लोक (येथें) थांबा; मला एक आगशी दिसून आली आहे (व मी तेथें जातों) कीं कदाचित् तेथून तुह्मांपाशीं (वाटेची) कांहीं खबर (घेऊन येईन) अथवा (होईल तर) आगीचें एक कोलीत घेऊन येईन; कीं, कदाचित् तुम्हीं लोक तापाल. २९. मग जेव्हां 'मूसा' अग्निजवळ पोहोंचला तेव्हां (त्या) शुभकारक जागेंत मैदानाच्या उजव्या बाजूनें (एका) झाडांतून त्याला एक वाणी (ऐकूं) आली; कीं हे 'मूसा' ! (हा तर) मी सकल जगांचा पालनकर्ता परमेश्वर आहें. ३०. आणि (त्याबरोबरच) हीहि (वाणी आली) कीं तूं आपली काठी (खालीं) टाकून दे. तर जेव्हां ('मूसा'नें) काठी (टाकली व ती अशी) वळवळतांना पाहिली जणूं कीं तो (जिवंत) सर्पच होय; तेव्हां तो पाठ फिरवून पळाला व त्यानें मागें (वळूनहि) पाहिलें नाहीं. (आम्हीं आज्ञापिलें कीं) हे 'मूसा' ! पुढें ये; व (कोणाहि गोष्टीची) भीति बाळगूं

(१) पाहा अध्याय २०:१० वरील टीप. २. पृष्ठ ६२२.

नकोस. तूं (प्रत्येक रीतीनें) अभय पावलेल्या लोकांपैकीं आहेस; ३१. तुं आपला हात आपल्या गळेपट्टींत घाल (व मग काढ; म्हणजे तो) रोगरहित (भला चंगा) पांढरा (चकचकीत) निघेल; आणि भयनिरसनार्थ तूं आपली बाजू आपल्याकडे आंखडून[1] घे. सारांश, (काठी व शुभ्र हात) हे दोन (चमत्कार) तुझ्या पालनकर्त्याकडून दोन प्रमाणें होत (कीं तीं तुझ्या मार्फत) 'फिरऔन' व त्याच्या दरबारमंडळाकडे (पाठविलीं जातात). कारण कीं, ते (फारच) आज्ञाभंजक लोक होत. ३२. ('मूसा'नें) विनंति केली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! मी त्यांच्यांतून एका ('किप्ती') इसमांचा[2] खून केला आहे; म्हणून मला अंदेशा आहे कीं ते (कोठें) मला (त्याच्या ऐवजीं धरून) मारून टाकतील. ३३. आणि माझा भाऊ 'हारून' हा जिव्हेनें मजपेक्षां अधिक वक्ता आहे; तर त्याला (माझा) मदतगार बनवून मजबरोबर पाठीव कीं तो माझी सत्यता पटवील. कारण, मला अंदेशा आहे कीं, ('फिरऔना'चे लोक) मला पाखंडी म्हणतील. (तर त्यांना प्रमाण पटविण्यासाठीं वक्तृत्वाची आवश्यकता आहे). ३४. (परमेश्वर) म्हणाला (बरें), आम्हीं तुझी बाजू तुझ्या भावाद्वारें सबळ करूं आणि तुम्हां उभयतांस असें वर्चस्व देऊं कीं 'फिरऔना'चे लोक तुह्मांपावेतों पोहोंचूंहि शकणार नाहींत. (तर बेलाशक) आमचे चमत्कार घेऊन जा; (कीं) तुम्हीं उभयतां व जे तुम्हां उभयतांचें अनुकरण करतील ते तुम्हीं (सर्व) वर्चस्वी राहाल. ३५. तर जेव्हां 'मूसा' आमचे ठळक चमत्कार घेऊन त्यांजपाशीं आला, तेव्हां ते म्हणूं लागले कीं, हे (चमत्कार तर एक प्रकारची) जादु होत (व ते उगीच) हकनाक लबाडीनें (परमेश्वराकडे लाविले जातात). आणि आह्मीं तर आपल्या पूर्वींच्या वाडवडिलांत असल्या गोष्टी ऐकिल्या नाहींत. ३६. आणि 'मूसा'नें म्हटलें कीं जो मनुष्य परमेश्वराकडून

---

(१) हिंवाळ्याचा मोसम होता. शिवाय हजरत मूसाला भयहि होतें. एरवींहि मनुष्याला भयाचे वेळीं कंपन सुटतें आणि ऊब पैदा करण्यासाठीं हातपाय आंखडून बसतो. हीच स्थिती येथेंहि आहे.

(२) ज्या किप्त्याला हजरत मूसांनीं मारून टाकिलें होतें त्याचें नांव कालूम असें होतें.

सद्धर्म घेऊन आला आहे व अखेर ज्याचा परिणाम उत्तम होणें आहे त्याच्या स्थितीशीं माझा पालनकर्ता खूप वाकब होय. ही गोष्ट निश्चित आहे कीं अन्यायकारी लोकांस (कधींच) साफल्य होणें नाहीं. ३७. आणि 'फिरऔन' म्हणाला कीं हे दरबार मंडलांनों! मला तर आपल्या शिवाय तुमचा कोणी परमेश्वर माहीत नाहीं. (आणि 'मूसा' एका परमेश्वराचा पत्ता देतो, असें बोलून तो आपल्या वजीराला संबोधून म्हणाला कीं) हे 'हामाना'! बरें तर तूं मजकरितां माती(च्या विटां) स पेट लाव (म्हणजे त्यांची भट्टी शिजीव) व (त्यानें) मजकरितां एक (पक्का) महाल बनीव; कीं मी (त्यावर चढून) 'मूसा'च्या परमेश्वराला डोकावून पाहीन आणि मी (त्या दाव्यांत) 'मूसा'ला लबाडांपैकींच समजतों. ३८. आणि 'फिरऔन' व त्याच्या लष्करांनीं मुलखांत विना कारण फार डोकें उचललें व ते असें समजले कीं त्यांना (मेल्यावर) आम्हांकडे परतून आणिलें जाणार नाहीं. ३९. तर आम्हीं 'फिरऔन' व त्याच्या लष्करांस पकडलें व त्यांना समुद्रांत फेंकून दिलें. तर (हे पैगंबरा!) पाहा! (तर खरें), जुलमी लोकांचा कसा (वाईट) परिणाम झाला! ४०. आणि आम्हीं त्यांना सरदार तर केले होते; (पण असे वाईट सरदार) कीं (जोंपर्यंत ते जगांत राहिले तोंपर्यंत लोकांस) नरकाग्नीकडे बोलावित राहिले. आणि पुनरुत्थानाचे दिवशीं (सरदारी कसली?) यांना (कोणाहिकडून) मदत देखिल तर मिळणार नाहीं. ४१. आणि आम्हीं या लोकीं त्यांच्या मागें धुत्कार लाविला आहे व पुनरुत्थानाचे दिवशीं तर त्यांचे वाईट हाल होणेंच आहे. ४२. आणि पूर्वींच्या जनतांचा नाश केल्यानंतर आम्हीं 'मूसा'ला (असें उत्कृष्ट) पुस्तक (म्हणजे तौरात) दिलें कीं ज्यानें लोकांचे डोळे उघडत होते व (तें त्यांच्या ठिकाणीं) सन्मार्ग व दया होतें; (आणि) या हेतूनें (तें दिलें गेलें होतें) कीं लोक कदाचित् बोध धरतील. ४३. आणि (हे पैगंबरा!) ज्यावेळीं आम्हीं 'मूसा'ला (पैगंबरीचे) अधिकार दिले, त्यावेळीं तूं ('तूर'पर्वताच्या) पश्चिम बाजूला (जेथें 'मूसा'ला पैगंबरी मिळाली होती तेथें हजर) नव्हतास आणि तूं (तें प्रकरण) प्रत्यक्ष पाहणाऱ्यांपैकींहि नव्हतास. ४४. परंतु (गोष्ट ही होय कीं) आम्हीं बहुतशा जनता निर्मून

**उभ्या केल्या व त्यांचीं मोठमोठालीं वयें होऊन गेलीं;[1]आणि तूं 'मद्यन'-च्या लोकांतहि राहिला नाहींस कीं तूं त्यांना आमचीं महावाक्यें वाचून ऐकवीत असावींस (आणि तुला तत्कालीन हकीकत जाणण्याची या प्रकारें संधि मिळाली असावी)! किंबहुना आम्हांस (तुला पैगंबर बनवून) पाठवावयाचेंच[2] होतें. ४५. आणि आम्हीं जेव्हां ('मूसा'ला) बोलाविलें होतें तेव्हांहि तूं 'तूर'(पर्वता)च्या कोणाहि बाजूस हजर नव्हतास; (कीं त्वां या गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्या असाव्यात). किंबहुना (ही) तुझ्या पालनकर्त्याची (एक) मेहरबानी होय; अशासाठीं कीं तूं अशा लोकांस भिववावेंस कीं ज्यांच्यापाशीं तुझ्यापूर्वी कोणी भय सुचेविणारा आला नाहीं; कीं(तुझ्या भिवविण्यानें)कदाचित् हे लोक बोध**

---

(१) गोष्टीच्या अनुसंधानाकरितां कांहीं तरी अध्याहृत व अवगत मानणें भाग आहे. व ती गोष्ट मागच्या व पुढच्या वाक्यावरून समजतां येते; पुरी गोष्ट अशी कीं अहो पैगंबरा! तुम्हीं तर मूसाला पैगंबरी पावतांना पाहिलें नाहीं; व आम्हीं मूसाच्या मागून कित्येक जनता निर्माण केल्या व तशांत त्यांची मोठमोठालीं वयें होऊन गेलीं व ते आपले करार विसरले व त्यांना ज्ञान व प्रकटीकरणाची विस्मृति पडली, म्हणून लोक या गोष्टीची वाट पाहत होते कीं त्यांजकडे कोणी पैगंबर यावा व त्यानें त्यांस सन्मार्ग दाखवावा. सारांश, आम्हीं तुम्हांला पैगंबर बनविलें व ज्या गोष्टी तुम्हांस माहीत नव्हत्या त्या तुह्मांस प्रकटीकरणाद्वारें कळविल्या; आणि तुमच्या पैगंबर होण्याचें हें प्रत्यक्ष प्रमाण आहे कीं, तुह्मीं मूसाला पाहिलें नाहीं व त्यांचा अहवाल पुस्तकांत वाचिला नाहीं असें असतांहि तुह्मीं त्यांच्या वेळेच्या गोष्टी इतक्या विस्तारानें लोकांना ऐकवितां व शिकवितां.

(२) म्हणून आह्मीं तुम्हांस प्रकटीकरणाद्वारें मागील अहवाल कळविला.

(३) स्थलसंकोचामुळें आह्मीं भाषांतरांत अध्याहृत वाक्यें दिलीं नाहींत. नाहीं तर, अर्थबोधक भाषांतर असें झालें पाहिजे होतें, "कीं तूं तूर(पर्वता)च्या (कोणाहि) बाजूला हजर नव्हतास (कीं त्वां या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या असाव्यात); किंबहुना, (ह्या सर्व गोष्टी तुला प्रकटीकरणाद्वारें माहित झाल्या आहेत व ही तुजवर व सर्व लोकांवर) तुझ्या पालनकर्त्याचीं मेहरबानी होय, (कीं त्यानें तुला पैगंबर करून पाठविलें) अशासाठीं तूं या (अरबाच्या) लोकांस (ईश्वरीशिक्षेहून) भिववावेंस कीं, ज्यांच्यापाशीं तुझ्यापूर्वी कोणी भय सुचविणारा आला नाहीं.

धरतील. ४६. आणि(आम्हीं हें कुराण केवळ प्रामाण्य पुरें करण्यासाठींच प्रकटिलें आहे कीं) असें न होवो कीं खुद्द यांच्याच पूर्वकरणीबद्दल यांच्यावर एकादी आपत्ति येऊन कोसळेल, तर (त्यावेळीं) ते म्हणूं लागतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! तूं आम्हांकडेस कोणी पैगंबर कां पाठविला नाहींस? (तूं जर पैगंबर पाठवितास) तर आम्हीं तुझ्या हुकमाचें अनुकरण करितों व विश्वासूंपैकीं होऊन राहतों. ४७. मग जेव्हां आम्हांकडून सद्धर्म त्यांच्यापाशीं पोहोंचला, तेव्हां ते म्हणूं लागले कीं, जसे (चमत्कार) 'मूसा'ला दिले गेले होते तसेच या(पैगंबरा)ला कां नाहीं दिले गेले? आणि कां जे (चमत्कार)पूर्वीं 'मूसा'ला दिले गेले होते त्यांस लोकांनीं नाकारिलें नाहीं? नास्तिकांचें म्हणणें तर हें आहे कीं ('मूसा' व हा पैगंबर) दोघेहि जादु(-गीर होत,) एकमेकांचे मदतगार.(१) आणि (तसेंच ते कंठरवानें) म्हणतात कीं आम्हीं (या दोहोंतून) कोणासच मानीत नाहीं;(व त्यांच्या पुस्तकांसहि नाहीं). ४८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर (कुराण व तौरात दोन्हीं पुस्तकें खोटीं आहेत व ) तुम्हीं (आपल्या विधानांत) खरे आहां, तर परमेश्वरापासून (आणखी) कोणी पुस्तक आणा कीं तें या दोहोंपेक्षां विशेष सन्मार्गदर्शक असेल. मी त्याचें अनुकरण करायास (तयार) आहें. ४९. मग जर हे लोक तुझ्या कह्याप्रमाणें न करून दाखवितील, तर तूं जाणून घे कीं ते (सत्याचें नव्हे, तर) केवळ आपल्या मनेच्छेचें अनुकरण करतात. आणि अशापेक्षांहि विशेष कुमार्गी आणखी कोण, कीं जो परमेश्वराकडील सन्मार्गावांचून आपल्या मनेच्छेचें अनुकरण करितो? निःसंशय परमेश्वर हेंकड लोकांस सन्मार्ग दाखवित नसतो. ५०. (आणि तैरात व कुराण दोन्हीं पुस्तकें आम्हीं प्रकटलेलीं होत;) आणि आम्हीं बराबर लोकांस (आपले) हुकूम पाठवित राहिलों आहों कीं ते कदाचित् बोध धरतील. ५१. ज्या लोकांस कुराणापूर्वीं आम्हीं पुस्तक दिलें आहे (व जे समंजस व सत्यप्रीयहि(२) होत) ते तर या(कुराणा)वर विश्वास

(१) मदतगार या शब्दानें त्यांचा हेतु हा होता कीं दोहोंचें शिक्षण मिळतें जुळतें व उभयतांचें कर्तव्य एकाच तऱ्हेचें होय. तर जणूं ते एकमेकांस साह्य करतात.

(२) समंजस व सत्यप्रीय होण्याची जी अट आम्हीं लाविली आहे तर ती

ठेवितात. ५२. आणि जेव्हां त्यांना कुराण ऐकाविलें जातें तेव्हां ते म्हणूं लागतात कीं आम्हांला तर याचा विश्वास पटला. निःसंशय हें सत्य (होय व) आमच्या पालनकर्त्याकडून (प्रकटिलेलें आहे); वस्तुतः आम्हीं तर याच्या (प्रकट होण्या) पूर्वींहि (याला) मानीत होतों. ५३. हेच लोक होत कीं ज्यांना त्यांच्या सहनशीलतेबद्दल दुप्पट मोबदला दिला जाईल (कीं त्यांनीं तिकडे तैरातवर विश्वास ठेविला व इकडे कुराणावर). आणि (ते असे सोशिक होत कीं) पुण्यानें वाईटाचें निरसन करतात; आणि आम्हीं जें त्यांना दिलें आहे त्यांतून (परमार्थांत) खर्च करतात. ५४. आणि जेव्हां ते (कोणाकडूनहि) निरर्थक गोष्ट ऐकतात तेव्हां तिजपासून अंग काढून घेतात व (असल्या लोकांस) सांगून देतात कीं आमचीं कामें आम्हांला व तुमचीं कामें तुम्हांला. (आम्हीं तर) तुम्हांस (दुरूनच) सलाम (करितों); आम्हीं अज्ञानी (लोकांचा स्नेह) इच्छीत नाहीं. ५५. (हे पैगंबरा! आपल्या मर्जीप्रमाणें) तूं ज्याच्यावर प्रीति ठेवितोस त्याला तूं सन्मार्गी लावूं शकत नाहींस. किंबहुना, परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला सरळ मार्गास लावितो. आणि तोच सरळ मार्गावर येणा-रा(च्या स्थिती)शीं खूप वाकब होय. ५६. आणि (हे पैगंबरा! कित्येक 'मक्के'कर तुला) म्हणतात कीं जर आम्हीं तुझ्यासंगतीं सन्मार्गाचें अनुकरण करूं, तर आमच्या भूमींतून आमचें उच्चाटन केलें जाईल. (पण) कां आम्हीं त्यांना ('मक्के'च्या) पवित्र क्षेत्रांत जेथें (हरतन्हेचें) अभय (व शांति)

---

आम्हीं सहाव्या भागाच्या ४ थ्या अध्यायांतील महावाक्यावरून "तथापि त्यांच्यापैकीं जे लोक ज्ञानांत गहन होत ते व विश्वासणारे, तुला जें प्रकट झालें आहे त्यावर विश्वास ठेवितात." घेतली आहे. कुराणाचा कायदा आहे कीं त्यांत एकच मजकूर वारंवार भिन्न भिन्न स्थळीं भिन्न भिन्न रीतीनें सांगितला गेला आहे व ह्मणूनच ही गोष्ट ठरलेली आहे कीं कुराणाचे कित्येक भाग दुसऱ्या कित्येक भागांचें स्पष्टीकरण करतात.

(१) ह्मणजे जे लोक मुसलमानांचे विरोधी आहेत ते आह्मांला धरून कोणी-कडे घेऊन जातील. व तेथें नेल्यावर मारून टाकतील अथवा गुलाम बनवून ठेवितील अगर कोणाच्याहि हातीं विकून टाकतील तें परमेश्वर जाणें.

**आहे तेथें जागा दिली नाहीं ? कीं हरतऱ्हेची फळफळादि येथें आकर्षून चालली येत आहे: (घर बसल्या यांचा) आहार (यांना) आमच्या येथून (पोहोंचतो.) परंतु यांच्यांतून बहुतेक (या देणगीची किंमत) जाणित नाहींत. ५७. आणि आह्मीं कितीतरी वस्त्यांचा विध्वंस करून टाकिला कीं त्या आपल्या निर्वाह साधना(च्या वैपुल्याच्या स्थितीं)त (खाऊन पिऊन) फिरून गेल्या होत्या. तर (आतां) हीं त्याच लोकांचीं घरें होत कीं तीं त्यांच्या(विध्वस्त झाल्या)पश्चात वसलींहि नाहींत; पण क्वचितच. आणि (अखेरीस त्यांच्या मालमत्तेचे) आम्हींच वारस झालों. ५८. आणि (हे पैगंबरा !) जों पावेतों तुझा पालनकर्ता कोणाहि कसब्यांत पैगंबर न पाठवील व तो त्यांना आमचीं महावाक्यें वाचून न ऐकवील तों पावेतों त्या(च्या न्याया)स हें दुरापास्त होय कीं तो (गुन्हा पदरीं घातल्यावांचून) वस्त्यांचा नाश करून टाकील. आणि तेथिल लोक आज्ञा-**

---

(१) अरब लोक इस्लामाचे पूर्वींहि **काबा**गृहाची फारच अदब करीत होते; आणि **कुरेश**च्या घराण्याच्या लोकांस **काबा**चे सेवक समजून त्यांच्यावर कोणीहि कधीं चढून येत नसे आणि हे लोक कोठेंहि गेले तरी त्यांना कोणी मज्जाव करीत नसे. जर कोणी अपराधी वा आरोपी **मक्कें**त येऊन आश्रय घेई तर कोणीहि त्याच्या वाटेस जात नसे; हा अभयाचा अर्थ झाला. शिवाय खुद्द **मक्कें**त व त्याच्या आसमतांत पर्वत व वाळुकामय मैदान आहे. त्यांत धान्य वगैरे निपजविण्याची पात्रता नाहीं; असें असतांहि अगत्याचे जेवढे पदार्थ आहेत ते सर्व दूर देशावरून येतात व हरेक वेळीं **मक्कें**त ते मिळूं शकतात; ह्मणूनच ह्मटलें कीं हरतऱ्हेची फळाफळादि येथें आकर्षून चालली येत आहे.

(२) '**कसबा**' हा उम्मोहा—उम्मुलकुरा—म्हणजे गांवांची आई—या शब्दाचा अर्थ आहे. कारण कसबा हा गांवांपेक्षां लोकसंख्येंत अधिक असतो. पैगंबर कांहीं गांवोगांवीं येत नसतात; तर परमेश्वर कोणा मोठ्या वस्तींत पैगंबर पाठवून तेथील लोकांस शिक्षण देतो त्याचें शिक्षण हळूहळू लहान लहान गांवांत प्रसार पावतें. उदाहरणार्थ, अरबी द्वीपकल्पांत मुख्य शहर **मक्कें**त आमचे पैगंबरसाहेबांस परमेश्वरानें उत्पन्न केलें व मग तेथून इस्लामधर्म केवळ अरबस्थानांतच नव्हे तर सर्व जगांत पसरला. तर लहान लहान गांवांच्या मुख्य शहरास कसबा म्हणण्याचा प्रघात आहे.

भंग करूं लागल्याशिवाय, आम्हीं वस्त्यांचा नाश करीत नाहीं. ५९. आणि (लोकांनों!) जें कांहींहि तुम्हांस दिलें गेलें आहे तें इहलौकिक आयुष्याचें (सुख) साधन व येथीलच (शोभा व) भूषण होय. आणि जें (पुण्यफल) परमेश्वरासमीप आहे तें (याहूनहि) फारच उत्तम व चिरस्थायी होय. तर कां तुम्हीं लोक (एवढेंहि) समजत नाहीं? ६०. बरें, ज्या मनुष्याला आम्हीं (स्वर्गाचें) उत्कृष्ट अभिवचन[1] दिलें आहे व तें (परलोकीं) त्याला मिळणार आहे तो मनुष्य (ऐषआरामाचे मानानें) कां त्याच्या सारखा होऊं शकतो कीं ज्याला आम्हीं इहलौकिक आयुष्याचा सुखोपभोग घेऊं दिला व तदनंतर पुनरुत्थानाचे दिवशीं तो अशा लोकांपैकीं होईल कीं जे (जाब देण्यासाठीं परमेश्वरापुढें) हजर केले जातील? ६१. आणि ज्या दिवशीं परमेश्वर नास्तिकांस बोलावून विचारील कीं ज्या लोकांस तुम्हीं (माझे पातीदार) समजत होतां ते माझे पातीदार कोठें आहेत? ६२. (सारांश तेहि हजर केले जातील; तेव्हां हे सरकतदार) जे ईश्वरी हुकमास पात्र[2] ठरतील ते बोलूं लागतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! हे तेच लोक होत कीं ज्यांना आम्हीं बहकविलें. (पण) ज्याप्रमाणें आम्हीं स्वतः (राजीखुषीनें बळजबरीशिवाय) बहकलों होतों त्याच प्रमाणें आम्हीं यांनाहि (मुळींच सक्ती न करितां) बहकविलें. आम्हीं तुझ्या सेवेंत (यांच्या बहकावण्याच्या जबाबदारीपासून) निर्दोष आहों. हे लोक आमची उपासना करीतच नव्हते. ६३. आणि (मग मूर्तीपूजकांस) म्हटलें जाईल कीं (ज्यांना तुम्हीं ईश्वराचे सरकतदार समजत होतां) त्या आपल्या सरकतदारांस[3] (आपल्या कुमकेस्तव) बोलवा.

(१) भावार्थ हा कीं स्वर्ग, हें अभिवचन दिलेलें उसनें; आणि इहलौकिक साफल्य, हे रोख तूर्तातूर्त; पण स्वर्ग अनंत होय व हें जग नाशिवंत; म्हणून ही रोकड या उसनवारीस पोंहोंचत नाहीं.

(२) ईश्वरी हुकमास पात्र ठरणें याचा अर्थ हा कीं, परमेश्वरानें सांगितलें कीं, 'आम्हीं नरकाग्नीला गुहेगारांनीं भरून टाकूं,' तें वचन यांच्याठायीं पूर्ण होईल व हे शिक्षेच्या हुकमास पात्र ठरतील.

(३) सरकतदार वा पातीदार याचा अर्थ कोठें मूर्ती होतो व कोठें देवदूत व कोठें पैगंबर व ऋषि असा होतो; कोठें बडे पुढारी लोक व कोठें सैतान वा

तात्पर्य, हे लोक त्यांना बोलावितील; पण ते त्यांना जबाब सुद्धांहि देणार नाहींत व (मूर्तिपूजक आपल्या डोळ्यांनीं) शिक्षा पाहून घेतील. जर हे लोक (जगांत) सरळ मार्गावर असते तर (त्यांच्यावर हा वाईट प्रसंग आला नसता). ६४. आणि ज्या दिवशीं परमेश्वर नास्तिकांस बोलावून विचारील कीं पैगंबरां(नीं तुम्हांस समजाविलें, तर त्यां)ना तुम्हीं काय उत्तर दिलें ? ६५. तर त्यादिवशीं त्यांना कोणतीच गोष्ट सुचणार नाहीं व ते आपसांत विचारपूसहि करूं शकणार नाहींत. ६६. तर ज्यानें (जगांत)पश्चात्ताप केला व विश्वास धरिला व सुकृत्यहि केलें, तर आशा आहे कीं असा मनुष्य (परलोकीं आपल्या मनोरथांत)सफल होणारांपैकीं होईल. ६७. आणि (हे पैगंबरा!)तुझा पालनकर्ता जसे इच्छितो तसे लोक पैदा करतो व(त्यांच्यांतून ज्याला इच्छितो त्याला)निवडून घेतो. निवडणूक[1] लोकांच्या अखत्यारांत नाहीं. हे लोक जसजसे (परमेश्वराचे) जोडीदार

---

असुर असा अर्थ होतो. कारण ज्याच्यासंबंधानें अशी कल्पना केली कीं, त्याला ईश्वरत्वाचा कांहींहि अधिकार आहे तोच ईश्वराचा सरकतदार ठरला. याचप्रमाणें ज्यांचा बोल ईश्वराज्ञेवर वरचढ ठेविला गेला त्यांना ईश्वरी–सरकतदार म्हणतां येईल. येथें त्याचा अर्थ सैतान होतो. ही गोष्ट तेराव्या भागांतील ‘सूरते-इब्राहीम’ या अध्यायांत आलेल्या नरकवासी व सैतान यांच्या परलोकीं होणाऱ्या सवाल जबाबाशीं मिळतें. तात्पर्य सैतान स्पष्टपणें सांगून देतील कीं, हे आपणच आमच्या आधीन झाले व खरें पाहतां त्यांनीं आपल्या मनेच्छेचें अनुसरण केलें, आमचें नव्हे. आमच्या निव्वळ बहकविण्यानें ते आपल्या खुषीनें आमचे ताबेदार बनले. तर खरोखर त्यांनीं आपल्या मनेच्छेची उपासना केली आमची नव्हे. हे लोक आमची उपासना करीत नव्हते याचा एक अर्थ, हे लोक कांहीं आमचे गुलाम तर नव्हतेच, असाहि होऊं शकतो.

(१) मक्केचे नास्तिक पैगंबरसाहेबांवर एक आक्षेप हाहि काढीत होते कीं श्रीमंती व जथ्याच्या दृष्टीनें दुसरे लोक, पैगंबरीचे यांच्याहून जास्त हक्कदार आहेत. त्याचें हें उत्तर आहे कीं, परमेश्वरानें ही निवडणूक आपल्या हातांत ठेविली आहे व ती इहलौकिक वैभवावर अवलंबून नाहीं. किंबहुना अंतःकरणाच्या शुद्धीवर व पवित्रतेवर अवलंबून आहे. ह्या प्रकरणांमध्यें पडणें म्हणजे परमेश्वरासमागमें कोणी जोडीदार आहे असें मानणें होय.

ठरवितात त्यांजपासून परमेश्वर पवित्र व थोर होय. ६८. आणि (हे पैगंबरा!) जे (विचार) हे लोक आपल्या मनांत लपवितात व जे जाहीर करतात ते तुझा पालनकर्ता (खूप) जाणतो. ६९. आणि तोच परमेश्वर होय कीं त्याच्यावांचून अन्य कोणी उपास्य नाहीं. इहलोक व परलोक या (दोहों)त त्यालाच स्तुति होय; आणि त्याचीच हुकमत होय व त्याच्याचकडे तुम्हां लोकांस परतून जाणें आहे. ७०. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं बरें पहा तर खरें; कीं जर परमेश्वर पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत सर्वकाल तुम्हांवर रात्र करून ठेवील तर परमेश्वराखेरीज अन्य कोण परमेश्वर आहे कीं जो तुम्हांसाठीं (दिवसाचा) प्रकाश आणील? तर कां तुम्हीं (असली सयुक्तिक गोष्टहि) ऐकत नाहीं? ७१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं बरें पहा तर खरें, कीं जर परमेश्वर पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत सर्वकाल तुम्हांवर दिवस करून ठेवील तर परमेश्वराखेरीज अन्य कोण परमेश्वर आहे कीं जो तुह्मांसाठीं रात्र आणील कीं तुम्हीं तींत विश्रांति घ्यावी ? तर कां तुम्हीं लोक (परमेश्वराची अशी ठळक देणगीहि) पाहत नाहीं? ७२. आणि (त्यानेंच) आपल्या दयेनें तुम्हांकरतां रात्र व दिवस हीं बनविलीं आहेत कीं तुम्हीं रात्रींत विश्रांति घ्यावी आणि (दिवसास) त्याचे औदार्या (म्हणजे आपल्या आहारा)च्या शोधांत लागून राहावें. आणि हें कीं तुम्हीं (त्याचे) आभार मानावेत. ७३. आणि ज्यादिवशीं (परमेश्वर) मूर्तीपूजकांस बोलवून विचारील कीं ज्यांना तुम्हीं (माझे जोडीदार) समजत होता ते (आतां) माझे जोडीदार कोठें आहेत? ७४. (सारांश ते जोडीदार हजर केले-जातील;) आणि प्रत्येक जनतेंतून आम्हीं एक साक्षी (म्हणजे पैगंबर) अलग काढून घेऊं (व तो नास्तिकाविरुद्ध साक्ष देईल) मग आम्हीं (जन-समूहास) सांगू कीं आपला (निर्दोषितेचा) पुरावा पुढें करा; तेव्हां त्या लोकांस माहीत होऊन जाईल कीं सत्य परमेश्वराकडेच होय आणि हे (जगांत) जसजशा (नसत्या खोट्या) गोष्टी मनानें रचीत होते त्या (सर्व त्यादिवशीं) त्यांच्यापासून झाल्या गेल्या होऊन जातील. ७५. (कोणालाहि ईश्वरतुल्य मानणें हीहि एका प्रकारची कृतघ्नता होय; त्यास अनुरूप अशी एक गोष्ट ही होय कीं) 'कारून' 'मूसा'च्या ज्ञातीय

लोकां (म्हणजे 'बनी-इस्राएलां') पैकीं होता. मग तो त्यांच्यावर जुलूम करूं लागला; आणि आम्हीं त्याला इतके खजीने देऊन ठेविले होते कीं अनेक बलवान् माणसें त्याच्या किल्ल्या मुष्किलीनें उचलीत. एकदां त्याच्या (ज्ञातीय) लोकांनीं त्याला सांगितलें कीं तूं अत्यानंद पावूं नकोस; (कारण) परमेश्वर अत्यानंद पावणारांस पसंत करीत नसतो. ७६. आणि (हें) जें (संसारसाहित्य) तुला परमेश्वरानें देऊन ठेविलें आहे त्यांत (कांहीं) शेवटल्या (पारलौकिक) घराचीहि फिकीर करीत राहा; आणि इहलोकांतून जो तुझा हिस्सा[1] आहे तो विसरूं नकोस. आणि ज्याप्रमाणें परमेश्वरानें तुझ्याशीं परोपकार केला आहे त्याप्रमाणें तूंहि (इतरांशीं) परोपकार कर आणि मुलखांत फिसाद शोधीत फिरूं नकोस; (कारण,) परमेश्वर फिसादखोरांस पसंत करीत नसतो. ७७. ('कारून') बोलला हीं (धनदौलत) तर मला माझ्या ज्ञानयोग्यतेनें प्राप्त झाली आहे. कां ('कारूना'ला) हें माहीत नव्हतें कीं याच्यापूर्वीं परमेश्वर (मागील) पिढ्यांतून अशा अशा लोकांचा नाश करून चुकला आहे कीं जे (नोकर चाकरांचें) याच्याहून अधिक बल ठेवित होते आणि त्यांच्या पाशीं जमा (पुंजी)हि (याहून) फारच जास्त होती. आणि पाप्यांपासून त्यांच्या पापांसंबंधानें विचारणा[2] केली जात नसते. ७८. तात्पर्य, 'कारून'

(१) इहलौकिक हिस्सा विसरण्याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक हा कीं, ऐहिक साजसरंजाम सर्व सोडून जावयाचा आहे. यांतून द्रव्याच्या मालकाचा हिस्सा, तो जो पारलौकिक कार्यांत खर्च करून पुढील सामुग्री करून नेईल तोच होय. तर अर्थ हा होईल कीं, परलोकांसाठीं सामुग्री गोळा करीत राहा. दुसरा अर्थ हा होऊं शकतो कीं, परमेश्वरानें दिलें आहे तर निव्वळ त्या देणगीचे भक्त बनून राहूं नकोस; तर तूंहि खा व लोकांसहि खाऊं दे. कोणाच्याहि मालांत जर दुसऱ्याचा हक्क आहे तर खुद्द त्याचा हक्क कां म्हणून नसावा. त्याला आपल्या गरजेप्रमाणें सुखोपभोग मिळाला पाहिजे. परंतु कारूनसारख्या कंजूष व कवडीचुंबक माणसाच्याठायीं पहिलाच अर्थ जास्त लागू आहे.

(२) भावार्थ हा दिसतो कीं, कारून हा जगांत धनदौलतीचें श्रेय आपल्या ज्ञानयोग्यतेकडे लावित असे; म्हणूनच तो परमेश्वराचे उपकार मानीत नसे. आणि जो कोणी त्याला परमेश्वराच्या उपकारासंबंधानें चार गोष्टी सांगी; त्याशीं तो वितंडवाद करी. तर परमेश्वरानें जाणविलें कीं, माझ्यासमोर हा वितंडवाद चालत नाहीं व पाप्यांना अशी संधीहि दिली जाणार नाहीं कीं,

(एके दिवशीं) आपल्या थाटामाटानें लोकांच्या पुढून निघाला; तर जे लोक इहलौकिक आयुष्याचे अभिलाषी होते ते (त्याला पाहून) म्हणूं लागले कीं जसें कांहीं (संसारसाहित्य) 'कारूना'ला मिळालें आहे तसें आम्हांलाहि (प्राप्त) असतें तर बरें होतें! यांत संशय नाहीं कीं 'कारून' हा मोठा भाग्यवान् होय. ७९. आणि ज्या लोकांस (परमेश्वरा कडून) ज्ञानदानें दिलें गेलें होतें ते (या लोकांस) बोलले कीं तुमचा नाश जावो! ज्या मनुष्यानें विश्वास धरिला व त्यानें सुकृत्यहि केलें त्याच्या साठीं परमेश्वराचें पुण्यफल('कारूना'च्या धन दौलती पेक्षां) फारच उत्तम होय. पण सहनशील लोकां शिवाय तें (पुण्यफल प्रत्येकास) मिळत नसतें. ८०. मग आम्हीं 'कारून' व त्याचें घरदार यांसह जमीनीस ढांसळून टाकिलें; आणि परमेश्वराशिवाय कोणीहि जनसमुह त्याच्या मदतीस (उभाहि) राहिला नाहीं; आणि तो (आपणहि कोणा युक्तीनें) आपल्याला बचावूं शकला नाहीं. ८१. आणि जे लोक आदल्या दिवशीं त्याच्या जागीं (होण्या)ची हांव बाळगित होते ते सकाळींच म्हणूं लागले कीं हाय गहजब! ही तर, परमेश्वरच आपल्या सेवकांतून ज्याची इच्छितो त्याची अन्न(संपत्ति) वाढवितो आणि (ज्याला इच्छितो त्याला) काटकसरीनें देतो. परमेश्वर जर आह्मांवर (आपली) कृपा न करता, तर ('कारून'-च्यासारखें) आम्हांलाहि (जमीनींत) ढांसळविता. हाय गहजब! गोष्ट तर ही होय कीं कृतघ्नांस (कधींच) साफल्य होणें नाहीं. ८२. (जगिक देणग्या तर ज्याला त्याला प्राप्त होतातच; पण) हें पारलौकिक घर होय; कीं तें आह्मीं (मुद्दाम) अशा लोकांसाठीं राखून ठेविलें आहे कीं जे जगांत

---

ते वितंडवाद करतील. "पाप्यांपासून त्यांच्या पापांसंबंधानें विचारणा केली जात नसते." याचा अर्थ हाच होय.

(१) भाषांतरालंकारार्थ आह्मीं ज्ञानाबरोबर दान हा शब्द वाढविला आहे.

(२) अन्न संपत्तीची वाढ व घट माणसाच्या केल्यानें होत नाहीं. तर परमेश्वराच्या कृतीनें होतें. मनुष्य जर आपल्या अधिकारानें व युक्तीनें कारूनच्या म्हणण्याप्रमाणें आपला शेर वाढवून घेता, तर कारून कोणा युक्तीनें जमिनीला बळी पडण्यापासूनहि बचावला असता. हाय गजब हे शब्द मी समजलों होतों कांय व झालें काय याबद्दल सखेदाश्चर्य प्रगट करून त्या वाक्यावर जोर देण्यासाठीं, वापरले आहेत. कारूनच्या बाह्य सफलतेनें लोकांस धोक्यांत ठेविलें. पण जेंव्हां लोकांनीं त्याचा परिणाम पाहिला तेंव्हां त्यांना आपली चूक कळून आली व खेद झाला.

कोणाहि तऱ्हेची शेखी मिरवूं पाहत नाहींत व फिसादहि (इच्छीत) नाहींत. आणि (उत्तम) परिणाम (तर) (परमेश्वराला) भिऊन वागणाऱ्यांचाच होय. ८३. जो मनुष्य (पुनरुत्थानाचे दिवशीं) सुकृत्य घेऊन हजर होईल त्याला त्याहून उत्तम (मोबदला मिळेल) आणि जो वाईट कर्म घेऊन हजर होईल तर ज्या लोकांनीं वाईट कर्में केलीं आहेत त्यांना जसें ते (जगांत) करीत राहिले केवळ तसलाच मोबदला मिळेल. ८४. (हे पैगंबरा!) ज्या(परमेश्वरा)नें कुराणा(च्या हुकमाच्या अंमलबजावणी)स तुजवर आवश्यक ठरविलें आहे तो अर्थातच तुला (मूळ) ठिकाणास लावून देईल. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझ्या पालनकर्त्यास खूप माहीत आहे कीं कोण (त्याचेकडून) सद्धर्म घेऊन आला आहे आणि कोण धडधडीत चुकींत आहे? ८५. आणि (हे पैगंबरा!) तुला तर (मुळींच) आशा नव्हती कीं (परमेश्वराकडून) तुला पुस्तक प्रकटिलें जाईल; पण तुझ्या पालनकर्त्याची (तुजवर मोठीच) दया (झाली, कीं त्यानें कुराण प्रकटिलें); तर तूं (तें निस्पृहतेनें ऐकीव व) कधींच नास्तिकांची तरफदारी करूं नकोस. ८६. आणि असें न व्हावें कीं जेव्हां ईश्वरी हुकूम तुला प्रकट होऊन चुकतील तेव्हां त्यानंतर हे लोक तुला त्यांच्या (अमलबजावणी) पासून अडवितील (व तूं अडून जाशील; तर दीर्घोद्योगानें व चिकाटीनें आपलें पैगंबरी–कर्तव्य करीत राहा). आणि (लोकांस) आपल्या पालनकर्त्याकडे बोलावित चालला जा आणि (खबरदार!) मूर्तीपूजकांत (जाऊन सामील) होऊं नकोस. ८७. आणि परमेश्वरासमागमें कधींहि दुसऱ्या कोणा उपास्यास बोलावूं नकोस. (कारण), त्याच्यावांचून अन्य कोणी उपास्य नाहीं. त्याच्या व्यक्तिशिवाय सर्व वस्तु नाशिवंत होत. त्याचीच हुकमत होय. आणि त्याचेकडेच तुम्हां(सर्वां)स परतून जाणें आहे. ८८.

(१) 'मूळ ठिकाणां' याच्या अर्थात मतभेद आहे. कोणी म्हणतात, हें मक्केच्या जिंकिल्या जाण्याचें भविष्य आहे कीं आतां जरी तुह्मांस नास्तिकांचा छळ सोसून देशत्याग करावा लागला आहे तरी परमेश्वर एकेदिवशीं या शहराकडे तुम्हांस परत आणील. कोणी म्हणतात, मूळ ठिकाण ह्मणजे पारलौकिक उत्तम गति जिचें पैगंबरसाहेबांस अभिवचन दिलें गेलें आहे ती. हा मतभेद पाहून दोघांसहि अनुसरता असा अर्थ आम्हीं येथें पत्करला आहे.

# अध्याय २९ वा.

## सूरतुल्–अन्कबूत.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ६९ महावाक्यें आहेत. या अध्यायाचे मध्यभागीं कोळ्याचेसंबंधानें वर्णन आलें आहे त्यावरून 'सूरतुल्-अन्कबूत' म्हणजे कोळ्याचें प्रकरण असें यास नांव दिलें गेलें आहे.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों).

अ. ल. म. (अलेफ-लाम-मीम). १ कां लोकांनीं हें समजून ठेविलें आहे कां (तोंडानें) इतकें बोलण्यावर कीं आम्हीं विश्वास धरिला आहे ते सोडून दिले जातील; व त्यांना अजमाविलें जाणार नाहीं ? २. आणि आम्हीं तर यांच्यापूर्वीं जे लोक (होऊन गेले) आहेत त्यांनाहि अजमाविलें होतें. तर जे लोक (विश्वास व्यक्त करण्यांत) खरें बोलतात परमेश्वर त्यांनाहि अवश्य जाणून घेईल आणि तो लबाडांसहि अवश्य जाणून घेईल. ३. कां जे लोक दुष्टकर्में करितात त्यांनीं समजून ठेविलें आहे कीं ते आमच्या आवांक्याच्या बाहेर निघून जातील ? (असें समजत आहेत तर) हे लोक किती तरी वाईट निवाडा करतात ! ४. जो कोणी (परलोकीं) परमेश्वराला भेटण्याची आशा बाळगून असेल तर (त्याची त्यानें तयारी करावी; कारण,) परमेश्वराची (ठरीव) वेळ अवश्य येणार आहे. आणि तो (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो ५. आणि जो (परमेश्वराप्रीत्यर्थ) झटून उद्योग करितो, तो आपल्याच (कल्याणा)साठीं झटतो. (एरवीं) परमेश्वर तर सर्व सृष्टी(च्या लोकां)कडून

(१) परमेश्वराला कित्येक वस्तूसंबंधीं दोन्ही प्रकारचें ज्ञान आहे. ह्मणजे कोणतीहि गोष्ट होण्याच्या आधींचें व ती होण्याच्यानंतरचें; येथें दुसऱ्या प्रकारचें ज्ञान उद्दिष्ट आहे.

निरपेक्ष होय. ६. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, त्यांचीं पापें आम्हीं त्यांच्यावरून अवश्य दूर करूं आणि (जगांत हे लोक) जीं (चांगलीं) कामें करीत राहिले त्यांचा यांना उत्तमांत उत्तम मोबदला देऊं. ७. आणि आम्हीं माणसाला आपल्या आईबापाशीं चांगलें वर्तन करण्याची आज्ञा केली. आणि (हेंहि समजावून दिलें कीं) जर आईबाप तुझ्या मागें ह्यासाठीं झटतील कीं तूं अशा एखाद्याला माझा जोडीदार मानावास कीं ज्या(च्या ईश्वरी जोडीदार होण्या)चें तुजपाशीं कोणतेंहि ज्ञान (-युक्त प्रमाण)च नाहीं; तर (या गोष्टींत) तूं त्यांचा कद्या मानूं नकोस. तुह्मां(सर्वां)स मजकडे परतून येणें आहे; मग जें (कांहींहि) तुह्मीं (लोक जगांत) करीत राहिलां (त्याचें बरेंवाईट त्या वेळीं) मी तुह्मांस विदित करीन. ८. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांना आम्हीं (पुनरुत्थानांत) अवश्य सदाचरणी सेवकांत (नेऊन) दाखल करूं. ९. आणि कित्येक लोक असेहि होत कीं जे (तोंडून तर) म्हणतात कीं आम्हीं परमेश्वरावर विश्वास ठेविला. मग जेव्हां त्यांना परमेश्वरा(च्या मार्गा)त (कोणाहि तऱ्हेची) इजा पोहोंचते, तेव्हां लोकांच्या छळणूकीस ईश्वरीशिक्षेप्रमाणें (एक असह्य आपत्ति) बनवून घेतात. आणि (हे पैगंबरा !) जर तुझ्या पालनकर्त्यांची मदत येऊन पोहोंचेल (व मुसलमानांचा विजय होईल) तर हेच लोक (मुसलमानांस) म्हणूं लागतात कीं आह्मींहि तुमच्याच संगतीं होतों. बरें, जें कांहीं सकल जगांच्या (लोकांच्या) मनांत आहे त्यांशीं कां परमेश्वर खूप वाकब नाहीं ? १०. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला आहे, परमेश्वर त्यांना अवश्य जाणून घेईल; आणि तो दांभिकांसहि अवश्य जाणून घेईल. ११. आणि नास्तिक हे, मुसलमानांस सांगतात कीं, तुम्हीं आमच्या(धर्म-) पंथावर चाला; आणि (पुनरुत्थानीं) तुमचीं पापें आम्हीं उचलून घेऊं.

(१) जाणून घेण्याचा अर्थ मागील पानावरील टीकेंत पाहा.

(२) या बोलण्यांत नास्तिकांचा उद्देश हा होता कीं, आम्हीं तर तुम्हांस धर्माचा सरळ मार्ग दाखवितों. यावर जर तुम्हांला कांहीं अंदेशा असेल तर परमेश्वरापुढें जाऊन आम्हीं तुम्हांतर्फे जबाबदारी घेऊं; आणि परमेश्वर न करो ! जर कांहीं शिक्षा योजिली गेली तर ती आम्हीं भोगून घेऊं.

# अध्याय २९ वा.

## सूरतुल्–अन्कबूत.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ६९ महावाक्यें आहेत. या अध्यायाचे मध्यभागीं कोळ्याचेसंबंधानें वर्णन आलें आहे त्यावरून 'सूरतुल्-अन्कबूत' म्हणजे कोळ्याचें प्रकरण असें यास नांव दिलें गेलें आहे.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों).

अ. ल. म. (अलेफ–लाम–मीम). १ कां लोकांनीं हें समजून ठेविलें आहे कीं (तोंडानें) इतकें बोलण्यावर कीं आम्हीं विश्वास धरिला आहे ते सोडून दिले जातील; व त्यांना अजमाविलें जाणार नाहीं ? २. आणि आम्हीं तर यांच्यापूर्वीं जे लोक (होऊन गेले) आहेत त्यांनाहि अजमाविलें होतें. तर जे लोक (विश्वास व्यक्त करण्यांत) खरें बोलतात परमेश्वर त्यांनाहि अवश्य जाणून घेईल आणि तो लबाडांसहि अवश्य जाणून घेईल. ३. कां जे लोक दुष्टकर्में करितात त्यांनीं समजून ठेविलें आहे कीं ते आमच्या आवांक्याच्या बाहेर निघून जातील ? (असें समजत आहेत तर) हे लोक किती तरी वाईट निवाडा करतात ! ४. जो कोणी (परलोकीं) परमेश्वराला भेटण्याची आशा बाळगून असेल तर (त्याची त्यानें तयारी करावी; कारण,) परमेश्वराची (ठरीव) वेळ अवश्य येणार आहे. आणि तो (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो ५. आणि जो (परमेश्वराप्रीत्यर्थ) झटून उद्योग करितो, तो आपल्याच (कल्याणा)साठीं झटतो. (एरवीं) परमेश्वर तर सर्व सृष्टी(च्या लोकां)कडून

(१) परमेश्वराला कित्येक वस्तूसंबंधीं दोन्ही प्रकारचें ज्ञान आहे. ह्मणजे कोणतीहि गोष्ट होण्याच्या आधींचें व ती होण्याच्यानंतरचें; येथें दुसऱ्या प्रकारचें ज्ञान उद्दिष्ट आहे.

(आणि आम्हीं 'इब्राहिमा'स हेंहि आज्ञापिलें कीं या लोकांस) समजावून सांग कीं तुम्हीं मुलखांत हिंडा फिरा आणि पाहा कीं परमेश्वरानें (सृष्टीस) प्रथम कसें निर्माण केलें व मग (याच प्रमाणें, तोच) परमेश्वर (लोकांस पुनरुत्थानाचे दिवशीं) शेवटचें उठविणेंहि उठवील. निःसंशय परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. २०. तो ज्याला इच्छील त्याला शिक्षा देईल व ज्याच्यावर इच्छील त्याच्यावर दया करील. आणि तुम्हीं (सर्व) त्याच्याचकडे पालटून आणिले जाल. २१. आणि तुम्हीं तर जमिनींत (लपून परमेश्वराला) हारवूं शकत नाहीं व आकाशांत (उडूनहि) नाहीं. आणि परमेश्वरावांचून तर कोणी तुमचा पुरस्कर्ता नाहीं व कोणी मदतगारहि नाहीं. २२. आणि जे लोक परमेश्वराच्या निशाण्यांस व (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्याच्या हुजूर हजर होण्यास मानण्याचें नाकारितात; हेच लोक माझ्या दयेकडून निराश होऊन बसले आहेत; आणि हेच होत कीं त्यांना (परलोकीं) दुःखप्रद शिक्षा (होणें) आहे. २३. मग तर 'इब्राहिमा'चे लोकांपाशीं (त्याच्या गोष्टींचें) याशिवाय (आणखी कांहीं) उत्तरच नव्हतें कीं ते (आपसांत) म्हणूं लागले कीं, याला ठार करा अगर याला जाळून टाका. तात्पर्य (त्यांनीं त्याला अग्नींत फेंकून दिलें; पण,) परमेश्वरानें त्याला आगींतून बचाविलें. निःसंशय या(वृत्तांतां)-तहि जे लोक विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीं (ईश्वरीसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. २४. आणि ('इब्राहिमा'नें आपल्या लोकांस हेंहि) सांगितलें (होतें)कीं तुम्हीं परमेश्वराला सोडून जो मूर्तींचा अंगिकार करितां तो केवळ इहलौकिक आयुष्यांतील परस्पर स्नेह व प्रेम यामुळेंच (करितां). मग पुनरुत्थानाचे दिवशीं तर (तुमचें हें हाल होणें आहे कीं) तुमच्यांतला एक एकास नाकारील व एक एकास शाप देईल, आणि नरकाग्नि तुम्हां सर्वांचें (शेवटलें) ठिकाण होईल आणि (या मूर्तीं-

(१) भावार्थ हा आहे कीं तुम्हीं लोकांनीं आपल्या वाडवडिलांस चुकीच्या मार्गावर पाहिलें व त्यांच्या स्नेहामुळें व प्रेमामुळें तुम्हीं त्यांचें अनुकरण केलें; आणि असेंहि घडून येतें कीं मनुष्य चुकीच्या मार्गावर असतो व त्याला आपली चूक दिसूनहि येते; तरी देखिल तो स्नेह व गोत्रसंबंध यांच्याकडे नजर देऊन चुकीच्या मार्गावरच अडून बसतो आणि सन्मार्ग पत्करत नाहीं.

पैकीं) कोणीहि तुमचे मदतगार होणार नाहींत. २५. यावर (फक्त) 'लूत'नें 'इब्राहिमा'वर विश्वास ठेविला; आणि ('इब्राहिमा'नें) म्हटलें कीं मी तर देशत्याग करून आपल्या पालनकर्त्याकडे (जेथें कोठें त्याला मंजूर असेल येथें) निघून जाईन. निःसंशय तो सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् होय. २६. आणि आम्हीं 'इब्राहिमा'ला 'इस्हाक' (हा पुत्र) व 'याकूब' (हा प्रपौत्र) दिला; आणि त्याच्या वंशपरंपरेंत पैगंबरी व पुस्तक (–प्रकटीकरण) हीं (चालू )ठेविलीं आणि आम्हीं 'इब्राहिमा'स या लोकींहि त्याचें प्रतिफळ देऊन टाकिलें आणि (परलोकींहि) तो निःसंशयेंकरून (आमच्या) सदाचरणी सेवकांपैकीं होईल. २७. आणि (हे पैगंबरा ! या लोकांस) 'लूत'(चा अहवालहि ऐकीव कीं) जेव्हां त्यानें आपल्या लोकांस म्हटलें कीं तुम्हीं (अशीं) निलज्जपणाचीं कामें करितां कीं जीं तुम्हांपूर्वीं आलमदुनियेचे लोकांत कोणीहि केलीं नाहींत. २८. कां तुम्हीं (स्त्रियांस सोडून) पुरुषांजवळ जातां व (प्रवाश्यांची) वाट मारतां आणि आपल्या समाजांत गैरशिस्त कामें करितां ? तेव्हां 'लूत'चे लोकांपाशीं याच्याशिवाय (कांहीं) उत्तरच नव्हतें कीं ते म्हणूं लागले कीं जर तूं खऱ्यांपैकीं असशील तर तूं आम्हांवर ईश्वरी शिक्षा आण. २९. (यावर 'लूत'नें परमेश्वरापाशीं) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! (या)फिसादखोर लोकांविरुद्ध तूं माझी मदत कर. ३०.आणि जेव्हां आमचे दूत 'इब्राहिमा' पाशीं (वृद्धावस्थेंत पुत्र जन्मण्याचें) शुभवर्तमान घेऊन आले; तेव्हां त्यांनीं ('इब्राहिमा'स) सांगितलें कीं आम्हीं (लवकरच 'लूत'च्या) ह्या वस्तीच्या रहिवाश्यांचा नाश करणार आहों. (कारण कीं) या (वस्ती)चे लोक फारच खोडकर होत. ३१. (यावर 'इब्राहिमा'नें) म्हटलें कीं त्या

(१) कित्येक भाष्यकारांनीं वाट मारणें म्हणजे प्रजोत्पत्तीची वाट मारणें असा अर्थ घेतला आहे. तर या स्थितींत 'तुम्हीं पुरुषांच्या जवळ जातां" आणि 'प्रजोत्पत्तीची वाट मारता' यांचा अपराध एकच ठरतो. आम्हीं जो अर्थ वाट मारण्याचा घेतला आहे तो अपराध वेगळाच आहे. कित्येक तफसीर म्हणजे भाष्यांवरून सिद्ध होतें कीं ते लोक निर्लज्जपणा शिवाय दरवडेहि घालीत होते व लोकांस लुबाडीत होते.

(वस्ती)त तर 'लूत'हि आहे. ते बोलले कीं जे लोक त्या(वस्ती)त आहेत त्या(सर्वांच्या स्थिती)शीं आम्हीं चांगल्या रीतीनें वाकब आहों. 'लूत'ला व त्याच्या (सर्व) कुटुंबाला (वस्तींतून काढून नेऊन) आम्हीं अवश्य वांचवून घेऊं; परंतु (एक) 'लूत'ची बायको कीं ती (अलबत) मागें राहणाऱ्यांपैकीं होईल. ३२. आणि जेव्हां आमचे दूत 'लूत'च्याजवळ आले, तेव्हां 'लूत' त्यांच्या (येण्या) नें नाखुषसा झाला व त्यांच्या कारणें (आपल्या) मनांत फारच संकोचित झाला; आणि दूत म्हणाले कीं तूं (कोणाहि तऱ्हेची) भीति बाळगूं नकोस आणि खेदहि करूं नकोस. आम्हीं (शिक्षेचे दूत आहों पण) तुला आणि तुझ्या कुटुंबास वांचवून घेऊं. परंतु तुझी बायको कीं ती तर मागें राहणाऱ्यांपैकीं होईल. ३३. या वस्तीचे लोक जसजशीं कुकर्में करीत राहिले आहेत त्याच्या शासनार्थ आम्हीं यांच्यावर एक अस्मानी विपत्ति कोसळविणार आहों. ३४. (सारांश, दूतांनीं त्या वस्त्या उलटून टाकिल्या.) आणि जे लोक अक्कल ठेवितात त्यांच्यासाठीं त्या (उलटलेल्या वस्त्यां)स आम्हीं एक स्पष्ट धडा (बनवून) सोडला. ३५. आणि (आम्हीं) 'मदयन' (च्या राहणाऱ्यां)कडे त्यांचा बंधु 'शोएब' यास (पैगंबर बनवून पाठविलें) तर त्यानें (त्यांस जाऊन) सांगितलें कीं हे बांधवहो! परमेश्वराची उपासना करा आणि शेवटल्या दिवसाला भिऊन असा आणि मुलखांत फिसाद फैलावित फिरूं नका. ३६. तर त्यांनीं 'शोएबा'ला पाखंडी म्हटलें; व मग भूकंपानें त्यांना येऊन गांठिलें; आणि ते आपल्या घरांत बसल्या बसल्या[1] गतप्राण होऊन गेले. ३७. आणि (आम्हीं) 'आद' व 'समूद'(चे लोक) यांसहि (नष्ट करून टाकिलें) आणि (हे 'मक्के'कारांनो! 'सिरीया[2]' देशांत येतांजातां) तुम्हांला त्यांचीं (बेचिराख झालेलीं) घरेंहि स्पष्ट दिसून येतात. आणि

(१) असले शब्द-प्रबंध कुराणांत कित्येक जागीं आले आहेत. बसल्या बसल्या याचा अर्थ हा आहे कीं, ईश्वरीशिक्षेनें इतकी फुरसतहि दिली नाहीं कीं कोठें निघून पळते, अथवा त्या जागेवरून एकीकडे जाते. जो ज्या स्थितींत होता तींतच मरून तो पडला.

(२) हे लोक व्यापारी होते आणि व्यापारासाठीं शाम-सिरीया-देशाला त्यांचें जाणेंयेणें लागूनच राहिलें होतें.

सैतानानें त्यांना त्यांचीं कर्में सुशोभित (भलीं) करून दाखविलीं होतीं व (याच युक्तीनें) त्यांना (सरळ)मार्गा(च्या पत्करण्या)पासून अडथळाहि केला होता आणि (ते दुर्दैवानें सैतानाच्या बहकाविण्यांत येऊन गेले; एरवीं तर) ते (फारच) शहाणे सुरते लोक होते. ३८. आणि (आम्हीं) 'कारून' व 'फिरऔन' व ('फिरऔना'चा वजीर) 'हामान' यांसहि (नष्ट करून टाकिलें). आणि 'मूसा' त्यांच्यापाशीं खुले खुले चमत्कारहि घेऊन आला तरी देखील ते मुलखांत (अकडत) फिरले आणि (कोठेंहि आह्मांपासून) पळून जाऊं शकले नाहींत. ३९. मग आम्हीं सर्वांस त्यांच्या पापां(च्या शिक्षे)त पकडलें. तर त्यांच्यांतून कित्येक तर असे होते कीं ज्यांच्यावर आह्मीं दगड वर्षविले (जसे 'आद'चे लोक); आणि कित्येक त्यांच्यांतून असे होते कीं ज्यांना मोठ्या भयंकर गर्जनेनें येऊन गांठिलें (जसे 'समूद'चे लोक); आणि त्यांच्यांतून कित्येक असे होते कीं ज्यांना आम्हीं जमिनींत गारद केलें (जसा 'कारून'); आणि त्यांच्यांतून कित्येक असे होते कीं ज्यांना आम्हीं बुडवून टाकिलें (जसे 'फिरऔन' व 'हामान'); आणि परमेश्वर तर यांच्यावर जुलूम कां करावयास लागता? परंतु (हे लोक ईश्वराज्ञाभंग करून) आपणच आपल्यावर जुलूम करूं लागले होते. ४०. ज्या लोकांनीं परमेश्वराला सोडून दुसरे (दुसरे) पुरस्कर्ते बनवून ठेविले आहेत त्यांची उपमा कोष्ट्यासारखी होय; कीं त्यानेंहि (आपल्या कल्पनेनें) एक घर बनविलें; आणि कांहीं संशय नाहीं कीं घरांत अतिशय कमजोर कोष्ट्याचें घर होय. जर हे लोक (इतकी गोष्ट) समजते तर बरें होतें! ४१. परमेश्वरास सोडून हे लोक ज्या (ज्या) वस्तूंस बोलपवितात, कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर त्या(सर्वांच्या हकीकती)शीं वाकब होय; आणि तो सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् होय. ४२. आणि आम्हीं हे (कित्येक) दृष्टांत लोकां(च्या समजाविण्या)साठीं सांगतों; आणि केवळ समजदारच त्यांस समजतात. ४३. परमेश्वरानें आकाश व पृथ्वी हीं सत्यसंकल्पानें निर्मिलीं आहेत. विश्वासूंकरितां तर ह्यांतच (ईश्वरीसामर्थ्याची मोठीच) निशाणी (उपलब्ध) होय. ४४.

# पवित्र कुराण

## भाग एकविसावा.

### सूरतुल्-अन्कबूत (पुढें चालू)

(हे पैगंबरा ! हें) पुस्तक जें तुजला प्रकट केलें गेलें आहे त्याचें पठन करीत व नमाज पढीत रहा. निःसंशय नमाज ही निर्लज्जपणा(चीं कामें) व गैरशिस्त (गर्ह्य) वर्तन यांपासून अटकाव करीत (राहत) असते आणि ईश्वरस्मरण हें अर्थातच अति महान् (कर्तव्य) होय. आणि जें कांहींहि तुम्हीं लोक करितां तें परमेश्वर जाणतो. ४५. आणि (मुसलमानांनों !) ग्रंथधारी लोकांबरोबर वादविवाद करीत जाऊं नका; पण अशा रीतीनें कीं ती फारच उत्तम (व सभ्य) असेल. परंतु जे लोक त्यांच्यांतून अत्याचार करतील, (तर त्यांना उत्तरास प्रत्युत्तर देण्यांस हरकत नाहीं); आणि (या लोकांस) सांगा कीं जें (पुस्तक) आम्हांला प्रकट झालें व (जीं पुस्तकें) तुम्हांस प्रकट झालीं, आम्हीं तर त्या(सर्वां)सहि मानतों; आणि आमचा परमेश्वर व तुमचा परमेश्वर एकच होय; आणि आम्हीं त्याचेच आज्ञाधारक आहों. ४६. आणि (हे पैगंबरा ! ज्याप्रमाणें आम्हीं पूर्वींच्या पैगंबरांना पुस्तकें प्रकटिलीं होतीं) ह्याच प्रमाणें आम्हीं तुला (हें) पुस्तक प्रकटिलें आहे. तर ज्यांना आम्हीं (तुझ्यापूर्वीं) पुस्तक दिलें आहे (म्हणजे ग्रंथधारी, यांच्यांतून जे सत्यलोलुप आंहेत ते तर बिनदिक्कत) या (कुराणा)वर विश्वास ठेवितात. आणि ह्या(मूर्तिपूजक अरबां)तूनहि (कित्येक) असे (समंजस) आहेत कीं तेहि (समजून उमजून) यावर विश्वास ठेवितात. आणि (जे निव्वळ हट्टवादी) नास्तिक (होत) तेच आमच्या निशाण्यांस मानीत नाहींत. ४७. आणि (हे पैगंबरा !) कुराणाच्या पूर्वीं तूं कोणतेंहि पुस्तक पठन (पाठन) करीत नव्हतांस व तुला आपल्या हातानें तें लिहितांहि येत नव्हतें; कीं असें असतें तर हे खंडन

करणारे (अधर्मी) खामखा शंका काढते. ४८. किंबहुना ज्या लोकांस बुद्धि दिली गेली आहे त्यांच्या मनांत तर हें (कुराण, अशीं स्पष्ट) स्पष्ट वाक्यें होत (कीं कोणीहि न्यायी मनुष्य तीं नाकबूल करूं शकत नाहीं). आणि जे अन्यायी होत तेच आमच्या निशाण्यांस मानीत नाहींत. ४९. आणि (कित्येक लोक तुझ्यासंबंधानें) म्हणतात कीं या(गृहस्था)वर त्याच्या पालनकर्त्याकडून चमत्कार कां नाहीं उतरले? (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं चमत्कार तर परमेश्वराच्याच पाशीं (म्हणजे त्याच्या अखत्यारांत) होत. आणि मी तर स्पष्ट रीतीनें भय सुचविणारा आहें एवढेंच. ५०. (हे पैगंबरा!) कां या लोकांकरितां (हा चमत्कार) पुरा नाहीं कीं आम्हीं तुला कुराण प्रकटिलें कीं तें त्यांस वाचून ऐकाविलें जातें? जे लोक विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीं तर ह्यांत (परमेश्वराची मोठी) दया व (दयेशिवाय) उपदेश होय. ५१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझ्या व तुमच्या दर्म्यान परमेश्वर साक्षी पुरा आहे; (कीं) तो आकाश व पृथ्वींतील (सर्व) वस्तु जाणतो. आणि जे लोक खोट्या (उपास्यां)वर विश्वास ठेवितात आणि परमेश्वराकडून फिरलेले असतात; हेच तर (पुनरुत्थानाचे दिवशीं मोठ्या)तोट्यांत राहतील. ५२. आणि (हे पैगंबरा! हे लोक) तुझ्याशीं (परलोकींच्या) शिक्षेसाठीं घाई मचवितात. आणि जर (परमेश्वरासमीप शिक्षेचा) एक

(१) मतलब हा कीं हजरत मोहंमद पैगंबरसाहेब यांस लिहितां वाचतां तर कांहीं येतच नव्हतें. यांतहि परमेश्वरानें हें इंगित ठेविलें होतें कीं जर पैगंबरसाहेबांस लिहितां वाचतां येतें तर त्यांचे खंडन करणारे अधर्मी व नास्तिक लोक अवश्य शंका काढते कीं ह्या गोष्टी ज्या हा गृहस्थ समजावितो त्या त्याच्या पाहिल्या सवरलेल्या आहेत; व पूर्वींच्या पुस्तकांतून वेंचे घेऊन घेऊन त्यानें एक कुराण बनविलें आहे. परंतु पैगंबरसाहेब निरक्षर होते ह्मणून ही शंका तर होणें शक्यच नाहीं. यावरहि जे लोक नाकारीत होते तो त्यांचा निव्वळ हट्ट होय.

(२) अरबस्थानाचे मूर्तीपूजक पुनरुत्थानास तर साफ नाकरीत होते; आणि पैगंबरसाहेब जेव्हां त्यांना पुनरुत्थानाचें भय दाखवीत तेव्हां ते त्यांस म्हणत होते कीं, तुह्मीं खरे आहां तर पुनरुत्थान घडवून आणा; म्हणजे आह्मीं शिक्षेला आपल्या डोळ्यांनीं पाहून घेऊं. याप्रकारची घाई ते लोक मचवीत होते.

वेळ मुक्रर नसता तर यांच्यावर (केव्हांचीच) शिक्षा येऊन चुकली असती. आणि ती (एकाना एका दिवशीं) एकदम त्यांच्यापुढें येऊन ठेपेलच; आणि त्यांना कळूनहि येणार नाहीं. ५३. (हे पैगंबरा ! हे लोक) तुझ्याशीं (परलोकींच्या) शिक्षेसाठीं घाई मचवितात. आणि कांहीं संशय नाहीं कीं नरकाग्नि नास्तिकांस घेरून आहे, (कीं त्यापासून कोणी बचावणार नाहीं.) ५४. त्या दिवशीं शिक्षा यांच्या(शिरा)वरून व यांच्या पायांखालून यांना झांकून टाकील; आणि (परमेश्वर यांना) आज्ञापील कीं जसजशीं कृत्यें तुम्हीं (जगांत) करीत राहिलां आहां (आतां) त्यांची गोडी चाखा. ५५. ज्यांनीं विश्वास धरिला आहे त्या हे माझ्या सेवकांनों ! माझी जमीन विस्तीर्ण आहे; तर (तींत राहून तुमच्यानें होईल तेथें) माझीच उपासना करा. ५६. प्रत्येक जीव (एकाना एका दिवशीं) मृत्यू(ची गोडी) चाखणार आहे. नंतर (तुम्हीं सर्व लोक) आम्हांकडे पालटून आणिले जाल. ५७. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांना आम्हीं स्वर्गाच्या (अशा) उच्च भुवनांत जागा देऊं कीं ज्यांच्या खालून पाण्याचे पाट वाहत असतील (व ते) त्यांत सर्वकाल वास करीतील. (सत्कार्यें) करणारांचेंहि कितीतरी उत्तम प्रतिफल होय ! ५८. (म्हणजे) ज्यांनीं (जगांत) सहनशीलता पत्करली व आपल्या पालनकर्त्यावर भरंवसा ठेवित राहिले त्यांचें ! ५९. आणि कित्येक प्राणी होत कीं ते आपली अन्नसंपत्ति (आपल्यावर लादून) लादून फिरत नाहींत. परमेश्वरच त्यांनाहि अन्न पोहोंचितो व

(२) इस्लामाच्या आरंभीं अरबच्या मुसलमानांची स्थिति ही होती कीं, अद्यापि इस्लाम चांगल्याप्रकारें पसरला नव्हता आणि लोक जागजागीं नास्तिकांच्या कचाटींत होते व हे नास्तिक त्यांस एकाच परमेश्वराची उपासना करण्याची मनाई करीत होते. सारांश, पैगंबर व कांहीं मुसलमान तर हिजरत ह्मणजे स्वदेशत्याग करून मदिनेंत जाऊन राहिले; कित्येक मुसलमान नोकरीचाकरी वगैरे संबंधांमुळें तसेच नास्तिकांच्या कचाटींत राहिले. यांना परमेश्वरानें ही आज्ञा केली कीं, उदरनिर्वाहाचा काय लोभ करीतां ? परमेश्वर अन्नदाता होय. नास्तिकांच्या कचाटींतून निघून जा. परमेश्वराची जमीन विशाळ व प्रशस्त आहे; जिकडे वाव सांपडेल तिकडे निघून जा.

तुम्हां लोकांसहि. आणि तो (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ६०. आणि (हे पैगंबरा!) जर तूं या(लोकां)स विचारशील कीं (बरें) आकाश व पृथ्वी कोणी पैदा केली आहे आणि सूर्य व चंद्र यांस (आपल्या) वश[1] करून ठेविलें आहे ? तर ते अवश्य (हेंच) उत्तर देतील कीं परमेश्वरानें. मग (असें असतांहि हे लोक) कोठें बहकले चालले जात आहेत ? ६१. परमेश्वरच आपल्या सेवकांतून ज्याला इच्छितो त्याला अन्नसंपत्ति विपुल देतो आणि (ज्याला इच्छितो त्याला) काटकसरीनें देतो. निःसंशय परमेश्वरच हरेक वस्तू(च्या स्थिती)शीं वाकब होय. ६२. आणि (हे पैगंबरा!) जर तूं या(लोकां)स पुसशील कीं कोण आकाशांतून पाणी वर्षवितो व मग त्या पाण्याच्यायोगें जमिनीला तिच्या मृत (म्हणजे पडित) झाल्यानंतर सजीव-टवटवीत-करितो ? तर तें अवश्य (हेंच) उत्तर देतील कीं परमेश्वर. (हे पैगंबरा ! तूं ) बोल कीं सर्व स्तुति[2] परमेश्वरालाच (योग्य) होय. परंतु यांच्यांतून बहुतेक बुद्धीनें काम घेत नाहींत. ६३. आणि हें इहलौकिक आयुष्य तर केवळ (मनाची) करमणूक व खेळ होय. आणि परलोक हेंच (मूळ) जीवन होय. हे लोक (इतकी गोष्ट) जर समजते (तर फार बरें होतें)! ६४. मग जेव्हां (लोक) गलबतांवर स्वार होतात तेव्हां फार प्रांजलपणें परमेश्वराची भक्ति व्यक्त करून त्यालाच बोलावितात. मग जेव्हां (परमेश्वर) त्यांना (समुद्रांतून) सोडवून खुष्कीकडे पोहोंचवितो, तेव्हां सुटका होतांच ते (परमेश्वराचे) जोडीदार मानूं लागतात; ६५. अशा-साठीं कीं ज्या (देणग्या) आम्हीं त्यांस दिल्या आहेत त्यांजप्रत त्यांनीं

---

(१) कांहीं स्थलीं चंद्रसूर्यासंबंधीं हेंहि म्हटलें आहे कीं आम्हीं त्यांस मनुष्याच्या आज्ञांकित करून ठेविलें आहे. या दृष्टीनें मनुष्यांचीं कित्येक कामें चंद्र-सूर्यावर अवलंबून आहेत. उदाहरणार्थ; प्रकाश, ऋतु बदलणें, शेती, फळांचें पिकणें व व्यवहारांतील हिशेब वगैरे; येथेंहि हाच अर्थ असल्यास नवल नाहीं.

(२) म्हणजे परमेश्वराचे आभार कीं तुमचा निसर्गदत्त प्रकाश विझून गेला नाहीं पण मंदावला आहे; तो प्रदीप्त केला जाईल तर चमकेल. पण दिलगिरीची गोष्ट ही कीं बहुतेक लोक बुद्धीनें काम घेत नाहींत व तो प्रकाश प्रदीप्त करीत नाहींत.

कृतघ्नता प्रदर्शित करावी आणि हें कीं (कांहीं दिवस जगांत आणखी) सुखोपभोग घ्यावा. तर (असो,) पुढें जातां (पुनरुत्थानांत, आपल्या कृतघ्नतेचा परिणाम) त्यांस माहीत होऊन जाईल. ६६ कां ('मक्के'च्या नास्तिकांनीं या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहीं कीं आम्हीं ('मक्के'च्या) पवित्र क्षेत्रास शांततेची जागा बनवून ठेविली आहे आणि त्यांच्या भोंवतालून लोक लुबाडले जात आहेत? तर कां हे लोक खोट्या(उपास्यां)वर विश्वास ठेवितात आणि परमेश्वराच्या देणग्यांप्रत कृतघ्नता दर्शवितात? ६७. आणि त्याच्याहून अधिक जुलमी कोण, कीं जो परमेश्वरावर खोटें कुभांड रचील अगर जेव्हां सत्य त्याला पोहोंचेल तेव्हां तो त्यास पाखंड म्हणेल? कां (अशा) नास्तिकांचें (शेवटचें) ठिकाण 'जहन्नम'मध्यें नव्हे? ६८. आणि ज्या लोकांनीं आमच्या (धर्माच्या कामांत) प्रयत्न केले, आम्हींहि अवश्य त्यांना आपले मार्ग दाखवूं. आणि कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर अशा(लोकां)चा साथी होय कीं जे (प्रांजलपणानें) सुकृत्य करतात. ६९.

---

(१) काबागृह बांधला गेला तेव्हांपासून नेहमीं त्याची ताजीम होत आली आहे. इस्लामाचे पूर्वींहि लोक बिनधोक व बिनहरकत काब्याच्या जात्रेस येत होते. आणि सर्व अरबी द्विपकल्पावर अशांतता माजली होती; व लूटमार होत होती; तरी देखील काबागृहामुळें मक्कानगरीकडे कोणीहि डोळा उचलून पाहात नसे. मक्केबाहेर तर लोकांना घरांतहि शांतता नव्हती. ज्याला पाहिजे त्याला संधि पाहून लुबाडून नेलें व गुलाम करून ठेविलें किंवा विकलें अशी स्थिति होती.

(२) आपले मार्ग ह्मणजे आपली प्रसन्नता व मर्जी संपादण्याचे मार्ग. मतलब हा कीं आम्हीं (परमेश्वर) त्यांना सत्कार्यांची सुबुद्धि देऊं.

# अध्याय ३० वा.

## सूरतु-रूम.

हा अध्याय मकेंत प्रकट झाला. ह्यांत ६० महावाक्यें आहेत. रूम म्हणजे ग्रीक या देशांतील ख्रिस्ती लोकांशीं अग्निपूजक इराणी लोकांचें मोठें युद्ध झालें होतें. यांत प्रथम ग्रीकांचा पराभव झाला व इराणी विजयी झाले; पण पुढें थोड्याच वर्षांत ग्रीकांनीं त्यांवर मोठा विजय संपादिला. हें कुराणाचें ऐतिहासिक भविष्य इतर भविष्यांप्रमाणें तंतोतंत खरें होऊन गेलें. ह्मणून 'सूरतु-रूम' ह्मणजे ग्रीकांचें किंवा रोमन लोकांचें प्रकरण असें नांव पडलें.

परमदयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).

अ. ल. म. (अलेफ-लाम-मीम). १. जवळच्या देशा(ह्मणजे 'फारस')मध्यें 'रोमन' (जे ख्रिस्ती होते ते, 'इराणी' जे अग्निपूजक यांच्या हातून) पराभूत होऊन गेले आहेत. २. पण हे लोक आपल्या पराभूत झाल्यानंतर (पुन्हां इराण्यांवर) लवकरच विजयी होऊन जातील; ३. (ह्मणजे)थोड्याच वर्षांत. (याच्या)पूर्वींहि (विजय व पराजय यांचा) अधिकार परमेश्वरालाच होता आणि या (वृत्तांता)नंतरहि (त्यालाच अधिकार होय.) आणि त्या दिवशीं (कीं जेव्हां 'रोमन' विजयी होतील तेव्हां) मुसलमान परमेश्वराच्या साह्यानें खुष होऊन जातील. ४. तो ज्याला इच्छितो त्याला साहाय्य करितो. आणि तो सामर्थ्यवान् (व) दयाळू होय. ५. (हें) परमेश्वराचें वचन (आहे); आणि परमेश्वर आपल्या वचनाच्या उलट करीत नसतो. परंतु बहुतेक लोक समजेत

(१) पैगंबरसाहेबांच्या वेळीं रोमन राज्य ख्रिस्त्यांच्या कबजांत होतें; आणि फारस म्हणजे इराणावर अग्निपूजकांचा वर्चस्मा होता. या उभयतांत युद्ध

**नाहींत. ६. (हे लोक केवळ) इहलौकिक आयुष्याची बाह्य स्थिति जाणतात. आणि परलोकाकडून तर हे लोक अगदींच बेफाम होत. ७. कां या लोकांनीं आपल्या मनांत मनन केलें नाहीं कीं परमेश्वरानें आकाश व पृथ्वी यांस व या दोहोंच्या दर्म्यान ज्या वस्तु आहेत त्यांस कोणा सत्य संकल्पानेंच व एका नियमित काळासाठींच निर्माण केलें आहे ? आणि बहुतेक माणसें (तर पुनरुत्थानाचे दिवशीं) आपल्या**

---

झालें. जरी ही लढाई, इराके–अजम ह्मणजे मेसोपोटेमिया, जो अरबस्थाना-बाहेर व त्याच्या सरहद्दीवर आलेला आहे त्यांत झाली; आणि अरबांस या युद्धाशीं कांहीं संबंधहि नव्हता; तरीहि मुसलमानांची इच्छा होती कीं रोमन लोकांचा विजय व्हावा. कारण, ते ग्रंथधारी लोक होते. आणि अरबचे मूर्तीपूजक इराणवाल्यांचें बरें इच्छीत होते. कांकीं, तेहि एका प्रकारचे मूर्तीपूजकच होते. कर्मधर्मसंयोगेंकरून प्रथम इराणवाल्यांस जय मिळाला. तेव्हां मूर्तीपूजक फारच आनंद पावले व ते मुसलमानांवर ताण तोडूं लागले; कीं पाहा ! मूर्तींचा विजय झाला ना ? यावरील वाक्यांत परमेश्वरानें अगोदरच सांगून दिलें आहे कीं, यावेळीं जरी रोमन लोक पराभूत झाले आहेत तरी ते थोड्याच वर्षांनंतर इराण्यांवर विजय पावतील; सारांश, झालेंहि असेंच. अरबींत आलेल्या ‘बिदअ’ या शब्दाचा अर्थ मी ‘थोडाच’ असा केला आहे; पण मूळभाषेंत तीनपासून नऊ वर्षांपर्यं-तच्या अवधीस ‘बिदअ’ ह्मणतात. हें प्रकरण ऐतिहासिक भविष्याचा एक जबरदस्त चमत्कारच होय. दोन प्रबल राष्ट्रांसंबंधानें कित्येक वर्षांपूर्वींच एक निर्णायक फैसला कंठरवानें सांगणें हें कांहीं मनुष्याचें काम नव्हे. शिवाय पैगंबरसाहेबांस या दोन्ही राष्ट्रांचें सैनिक बल व व्यवस्था पाहण्याची कधींहि संधिच मिळाली नव्हती. ह्मणून यास पैगंबरांचा व्यवहार-अनुभव वा अभि-प्रायहि ह्मणतां येणार नाहीं. तर हें दिव्य प्रकटीकरणच होय. आणि हें जें ह्मटलें कीं ‘बहुतेक लोक समजत नाहींत,’ याचा भावार्थ हा आहे कीं, जग हें कार्यकारणन्यायास अनुसरून आहे बाह्यकारणांच्या धोक्यांत लोक मूळकारण ह्मणजे परमेश्वर याकडून फसगतींत राहतात. वास्तविक पाहतां, प्रत्येक लहान-मोठ्या प्रकरणाचें आदिकारण परमेश्वराचा इरादा असतो. लोक गैरसमजुतीनें तें दुसऱ्या दुसऱ्या कारणाकडे लावितात व त्यांवरच भरंवसा ठेवून बसतात.

पालनकर्त्याच्या नजरानजर होण्यास (मुळापासून) मानीतच नाहींत. ८ कां हे लोक मुलखांत हिंडले फिरले नाहींत ? (हिंडते फिरते) तर ते पाहाते कीं जे लोक त्यांच्या पूर्वीं होऊन गेले आहेत त्यांचा कसा (वाईट) परिणाम झाला ? ते लोक यांच्यापेक्षां बलांतहि फारच जबर होते आणि त्यांनीं जमिनीहि नांगरल्या व जमिनीस जितकें या लोकांनीं आबाद केलें आहे त्याहूनहि फारच जास्त त्या लोकांनीं आबाद केलें होतें; आणि त्यांचे पैगंबर त्यांच्यापाशींहि चमत्कार घेऊन आले होते. (पण त्यांनीं मानिलें नाहीं व आपल्या करणीची शिक्षा पावले.) तथापि परमेश्वर (तर असा अन्यायी) नव्हे कीं त्यांच्यावर जुलूम करील. परंतु ते लोक (नास्तिकपणा व मूर्तीपूजा करून) आपणच आपल्यावर जुलूम करीत होते. ९. मग ज्या लोकांनीं वाईट केलें त्यांचा परिणामहि वाईटच झाला. कारण, त्यांनीं परमेश्वराच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें व त्यांची टर उडवीत राहिले. १०. परमेश्वरच सृष्टीस प्रथम निर्माण करितो व नंतरहि तोच (याच तऱ्हेची) सृष्टि वारंवार निर्मित राहतो; नंतर तुम्हीं (सर्व लोक) त्याच्याच कडे पालटून नेले जाल. ११. आणि ज्या दिवशीं (पुनरुत्थानाची) घटका कायम होईल त्यादिवशीं पापी लोक निराश होऊन जातील. १२. आणि (ज्यांना हे लोक परमेश्वराचे सरकतदार बनवितात) त्यांच्या (त्या) सरकतदारांपैकीं कोणीहि त्यांचे मध्यस्थी होणार नाहींत आणि (त्यावेळीं हे लोकहि) आपल्या सरकतदारांवर उलटून[२] पडतील. १३. आणि ज्या दिवशीं (पुनरुत्थानाची) घटका काईम होईल त्या दिवशीं (विश्वासू व नास्तिक एकमेकांपासून) वेगळे होऊन जातील. १४. मग ज्यांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, ते तर (स्वर्गाच्या) बागेंत असतील व आनंदीआनंद पावत असतील. १५. आणि ज्या लोकांनीं नास्तिकपणा केला, व आमच्या निशाण्यांस व शेवटल्या दिव-

---

(१) अध्याय २७: ६४ मध्यें असलेंच महावाक्य आलें आहे. त्या वरील टीप पाहा.

(२) भावार्थ हा कीं खोटे उपास्य व त्यांचे उपासक हे पुनरुत्थानांत एकमेकांस खोटे पाडतील व एकमेकांस दोषारोप करतील.

साच्या नजरानजर होण्यास पाखंड म्हणत राहिले, हेच लोक शिक्षेत (पकडून) हजर केलेले असतील. १६. तर मग ज्यावेळीं तुम्हां लोकांस सांजावेल व ज्यावेळीं तुम्हांस सकाळ उजाडेल त्यावेळीं परमेश्वराचें पावित्र्य वर्णन करा. १७. आणि आकाश व पृथ्वींत तोच परमेश्वर स्तुतीस (योग्य) होय. आणि (तसेंच) तिसऱ्या प्रहरीं व ज्यावेळीं तुम्हां लोकांस दोन प्रहर होईल त्यावेळीं (परमेश्वराची पवित्रता वर्णन करा). १८. (तोच) जिवंतास मेलेल्यांतून काढतो व (तोच) मेलेल्यास जिवंतांतून काढतो, आणि (तोच) जमिनीस तिच्या मृत (म्हणजे पडित) झाल्या-नंतर सजीव (व टवटवीत) करितो. आणि अशाच तऱ्हेनें तुम्हीं (लोकहि मेल्यावर जमिनींतून) काढिले जाल. १९. आणि त्याच्याच (परम सामर्थ्याच्या) निशाण्यांतून (एक हीहि) होय कीं त्यानें तुम्हां(लोकां)स मातींतून निर्मिलें; मग आतां (पाहा!) तुम्हीं माणसें (भूतलावर चोहोंकडे) पसरलां आहां. २० आणि त्याच्याच (परम सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं (एक हीहि) होय कीं त्यानें तुम्हांसाठीं तुमच्याच जातीचीं जोडपीं निर्माण केलीं कीं तुम्हांस त्यांच्याकडे (वळून) विश्रांति मिळावी; आणि तुम्हां (पतिपत्नीं)मध्यें त्यानें प्रीति व करुणा (उत्पन्न) केली. जे लोक विचार व मनन करितात त्यांच्यासाठीं या(गोष्टीं)त (ईश्वरीसामर्थ्याच्या, बऱ्याच) निशाण्या होत. २१. आणि आकाश व पृथ्वीचें पैदा करणें आणि तुमच्या

(१) पावित्र्य वर्णन करणें म्हणजे निव्वळ ईश्वरस्मरण होय किंवा पांच नमाजी ह्या होत; कारण कीं नमाजींतहि परमेश्वराची पवित्रता गाईली जाते; आणि पांच वेळ जे मुद्दाम दाखविले आहेत त्यांनींहि याच अर्थाचें दृढीकरण होतें. कारण, 'सांजावेल' या शब्दांत मगरिब-संध्याकाळ व इशा-रात्र यांचा अंतर्भाव होतो, 'उजाडेल' यांत फज्र् म्हणजे सकाळ व 'तिसराप्रहर' म्हणजे 'असर'चा वेळ आणि दोन प्रहर म्हणजे जोहरचा वेळ. हे पांच वेळ झाले.

(२) मेलेल्यांतून जिवंत व जिवंतांतून मेलेल्यास काढण्याचीं पुष्कळ उदा-हरणें होऊं शकतात. उदाहरणार्थ-कवट कीं तें जिवंत कोंबडीपासून निघतें व तें खुद्द मेलेल्या-निर्जीवा-प्रमाणें असतें; व मग त्या निर्जिवांतून जिवंत प्राणी पैदा होतो.

भाषा व तुमचे रंग यांचें भिन्न भिन्न होणें (या गोष्टीहि) त्याच्या (परम सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकींच होत. कांहीं संशय नाहीं कीं (समंजस व) ज्ञानी लोकांसाठीं ह्या(गोष्टीं)त (ईश्वरसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. २२. आणि तुमचें रात्रीचें व दिवसाचें निजणें आणि त्याच्या औदार्या(म्हणजे आपल्या निर्वाहा)साठीं शोधाशोध करणें (हींहि) त्याच्या (परमसामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं होत. जे लोक (मनापासून) ऐकतात त्यांच्यासाठीं या(गोष्टीं)त (ईश्वरसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. २३. आणि त्याच्याच (परम सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं (एक हीहि)होय कीं तो तुमच्या भिण्यासाठीं व आशा करण्यासाठीं विजा दाखवितो व आकाशांतून पाणी पाडितो; व मग त्या (पाण्या)च्या योगें जमिनीस तिच्या मृत (म्हणजे पडित)झाल्या पश्चात सजीव (टवटवीत) करितो. जे लोक अक्कल बाळगितात त्यांच्यासाठीं या (गोष्टीं)त (ईश्वर सामर्थ्याच्या, बऱ्याच) निशाण्या होत. २४. आणि त्याच्याच (परम सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं (एक हीहि) होय कीं आकाश व पृथ्वी हीं त्याच्याच आज्ञेनें उभीं होत. (आणि तुम्हीं एका नियमित काळा पावेतों आयुष्य क्रमण करून जमिनींत पुरले जाल.) मग (पुनरुत्थानाचे दिवशीं) जेव्हां तो तुम्हांस एक हाक मारून भूमींतून बोलावील तेव्हां (हाकेसरशींच) तुम्हीं (सारेचे सारेच) बाहेर निघून पडाल. २५. आणि जे (दूत) आकाशांत (होत) व (जे लोक) पृथ्वींत होत ते (सर्व) त्याचेच होत. सर्व त्याच्याच (हुकमाच्या) आधीन होत. २६. आणि तोच (परम समर्थ) होय कीं जो सृष्टीस प्रथम निर्माण करितो व नंतर (पुनरुत्थानाचे दिवशीं) तोच तिला पुन्हा (निर्माण) करील. आणि हें त्याला फारच सोपें होय. आणि आकाश व पृथ्वींत त्यालाच थोरांत थोर उपमा होय; आणि तो सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् होय. २७. तो तुमच्या (समजण्या)साठीं तुमच्यांतीलच एक दृष्टांत सांगतो; कीं ज्या (गुलामां)चें तुमच्या उजव्या हातास स्वामित्व

(१) वीज भिण्याची वस्तुहि आहे; कारण जेथें ती पडते तेथें सर्व ज़ाळून भस्म करून टाकिते; आणि ती आशेची वस्तुहि आहे कीं, जसजशी चकाकेल तसतसा दयाप्रचुर वर्षाव होईल.

(२) तुम्हीं लोक जेव्हां आपल्या गुलामांस आपल्या बरोबरीस घेत नाहींत

आहे त्यांच्यांतून कोणींहि, आम्हीं जी तुम्हांस अन्न-संपत्ति देऊन ठेविली आहे तींत तुमचे सरकतदार आहेत कां? कीं तुम्हीं (व ते) त्या(अन्नसंपत्तीं)त बरोबरचा हक्क बाळगितां (आणि) जसे तुम्हीं आपल्या जिवाला भितां तसाच तुम्हीं त्यांचाही अंदेशा बाळगितां? जे लोक अक्कल ठेवितात त्यांच्या करितां आम्हीं (आपल्या) निशाण्या अशाच रीतीनें स्पष्ट करून करून सांगतों. २८. परंतु जे लोक (परमेश्वराचे सरकतदार मानून) अनर्थ करीत आहेत, ते तर जाणिल्या बुजल्यावांचून आपल्या मनेच्छेवर चालतात. तर ज्याला परमेश्वर कुमार्गी लावील त्याला कोण सरळ मार्गावर आणूं शकतो? आणि (परमेश्वरापुढें) अशा लोकांचे कोणीहि मदतगार नाहींत. २९. तर (हे पैगंबरा!) तूं तर एका (परमेश्वरा)चाच होऊन (त्याच्या) धर्माकडे आपला रोंख काईम राख. (हा) परमेश्वराचा (घातलेला) सृष्टिनियम होय कीं ज्याबरहुकूम परमेश्वरानें लोकांस सृष्ट केलें आहे. परमेश्वराच्या सृष्टींत फेरबदल होऊं शकत नाहीं. हाच धर्म(-मार्ग) सरळ होय. परंतु बहुतेक लोक समजत नाहींत. ३०. (लोकांनों!) त्या (एका परमेश्वरा)च्याकडेच वळून (इस्लामधर्मावर दृढ जमून) राहा आणि त्या (एका परमेश्वरा)चेंच भय बाळगा व नमाज पढीत राहा आणि (परमेश्वराचे) जोडीदार मानणाऱ्यांपैकीं बनून जाऊं नका; ३१. (म्हणजे) ज्यांनीं आपल्या (अस्सल नैसर्गिक) धर्मांत भेदभाव घातला आणि (परमेश्वराखेरीज इतर उपास्य बनवून) पंथ (पंथ) बनून गेले, त्यांच्यापैकीं (होऊं

---

व वास्तविक पाहतां ते तुमचे एवढ्याच गोष्टीनें मिंदे आहेत कीं तुम्हीं त्यांना विकत घेतलें आहे. यावरहि तुम्हीं त्यांना आपल्यासारखा आहार देत नाहीं व आपल्यासारखी त्यांची काळजी बाळगित नाहीं. तात्पर्य तुम्हीं त्यांना कोणाहि तऱ्हेनें आपल्याबरोबरीच्या दर्जात घेत नाहीं. तेव्हां परमेश्वर आपल्या सृष्टपदार्थांस आपला सरकतदार कां म्हणून पसंत करणार; आणि खरें पाहतां, ते त्याच्यासमोर गुलामांपेक्षांहि कनिष्ठतर होत.

(१) म्हणजे परमेश्वरानें मनुष्याच्या मनाची घटनाच अशी केली आहे कीं, त्याचें मन किंचितहि त्याकडे वेधलें कीं त्याला कसेंहि करून परमेश्वरासंबंधानें कबुली द्यावी लागते. पण प्रमाद व गाफिलपणा मनुष्यास विचार करूं व समजूं देत नाहीं.

नका.) प्रत्येक पक्ष जो (धर्म) त्यांच्यापाशीं आहे त्यांतच आनंदित होय. ३२. आणि जेव्हां लोकांस कांहीं दुःख पोहोंचतें तेव्हां ते आपल्या पालनकर्त्याकडे वळून त्यालाच बोलावूं लागतात. मग जेव्हां तो त्यांना आपल्या दयेची गोडी चाखवून देतो, तेव्हां त्यांच्यांतून कांहीं लोक (खोट्या उपास्यांस) आपल्या पालनकर्त्याचे जोडीदार बनवूं लागतात; ३३. अशासाठीं कीं ज्या (देणग्या) आम्हीं त्यांना दिल्या आहेत त्यांजप्रत त्यांनीं कृतघ्नता दर्शवावी. तर (लोकांनों ! कांहीं दिवस इहलौकिक) सुखोपभोग घ्या; पुढें जातां तर तुम्हीं (आपल्या कर्मांची हकीकत) जाणूनच घ्याल. ३४. कां आम्हीं या लोकांवर एखादें प्रमाण उतरलें आहे कीं तें हे लोक (परमेश्वराचे) जे जोडीदार ठरवितात (तें ठरविण्यास) सांगतें ? ३५. आणि जेव्हां लोकांस आम्हीं (आपल्या) दयेची गोडी चाखवून देतों तेव्हां ते त्यानें आनंद पावतात. आणि आपल्या हातांनीं ते पूर्वीं जें करून चुकले आहेत त्या (कुकर्मां)च्या ऐवजीं जर त्यांच्यावर (कोणाहि तऱ्हेचें) अरिष्ट ओढवेल, तर (झालेंच,) ते पार आशा तोडून बसतात. ३६. लोकांनीं कां या गोष्टीचें अवलोकन केलें नाहीं कीं परमेश्वरच ज्याची इच्छितो त्याची अन्नसंपत्ति वाढवितो व (ज्याला इच्छितो त्याला) काटकसरीनें देतो. जे लोक विश्वास बाळगितात त्यांच्यासाठीं यांतहि (ईश्वरी सामर्थ्यांच्या बऱ्याच) निशाण्या होत. ३७. तर (हे पैगंबरा !) नातलगास त्याचा हक्क देत राहा आणि गोरगरीब व मुशाफिर यांस (यांचा हक्क). जे लोक परमेश्वराची मर्जी संपादण्याचे अभिलाषी आहेत त्यांच्याठायीं हें उत्तम होय, आणि हेच लोक (परलोकीं) साफल्य पावणारे होत. ३८. आणि (हें) जें तुम्हीं लोक व्याज देतां कीं लोकांच्या मालांत वाढ व्हावी, तर तें (व्याज) परमेश्वरासमीप (फुलत) फळत नाहीं. (म्हणजे त्यांत बरकत होत नाहीं). आणि (ही) जी तुम्हीं केवळ परमेश्वराची मर्जी संपादण्याच्या उद्देशानें 'जकात' देतां तर जे लोक असें करतात तेच तें (आपलें दिलेलें दान परमेश्वरापाशीं) वाढवीत राहतात. ३९.

(१) परमेश्वरानें दिलेल्या देणग्यांस दुसऱ्यानें दिलेल्या समजणें हीहि एका प्रकारची कृतघ्नता होय आणि कृतघ्नताहि केवढी पराकाष्ठेची !

(२) या वाक्याच्या अर्थाचीं कित्येक अंगें होऊं शकतात. एक तर जें आम्हीं

(लोकांनो!) परमेश्वरच असा (परमसमर्थ) होय कीं ज्यानें तुम्हांस निर्मिलें व मग तुम्हांस अन्नसंपत्ति दिली; मग (तोच) तुम्हांस मारतो व मग (तोच) तुम्हांस जिवंवील. बरें तुमच्या (ठरीव) सरकतदारांत कोणी असाहि आहे कीं जो या(कामां)पैकीं कांहींहि करूं शकेल? हे लोक जसजसे (परमेश्वराचे) जोडीदार ठरवितात त्यांजपासून परमेश्वर पवित्र व थोर होय. ४०. खुद्द लोकांच्याच हातून जीं (जीं) कर्में झालीं त्यांच्यामुळें खुष्कींत (काय) व जलांत (काय,) म्हणजे (हरेक जागीं हरतऱ्हेची) खराबी जाहीर होऊन चुकली आहे; (आणि याचा आवश्यक परिणाम हा आहे) कीं लोक जसजशीं कर्में आचरितात त्यांतून कांहींची परमेश्वर त्यांना गोडी चाखवील; कीं ते कदाचित् (अशा कामा-पासून) माघार घेतील. ४१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं भूतलावर हिंडा फिरा, व पाहा कीं जे लोक (तुम्हां)पूर्वीं होऊन गेले आहेत त्यांचा कसा (वाईट) परिणाम झाला? त्यांच्यांतले बहुतेक मूर्तीपूजकच होते. ४२. तर (हे पैगंबरा!) परमेश्वराकडून (पुनरुत्थानाचा) दिवस येऊन ठेपेल कीं जो (कोण्याच्याहि टाळल्यानें) टळूं शकत नाहीं त्याच्या पूर्वींच सरळ धर्ममार्गाकडे (चिकाटीनें) आपला रोंख काईम राख; त्यादिवशीं (विश्वासू व नास्तिक हे एकमेकांपासून )वेगळे होऊन जातील. ४३. जो नास्तिकपणा करितो त्याच्यावरच त्याचा नास्तिकपणा(चा दुष्परिणाम) घडेल; आणि जो सुकृत्य करितो (ते लोक) आपल्याचसाठीं (परलोकींची) तयारी करीत आहेत; ४४. कीं तेणेंकरून ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, त्यांना (पुनरुत्थानाचे दिवशीं) परमेश्वर आप-ल्या कृपेनें (व औदार्यानें) त्यां(च्या कुकर्मां)चा मोबदला देईल. कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर नास्तिकांस पसंत करीत नाहीं. ४५.

---

भाषांतरांत पत्करलें आहे तें शब्दावरून तेव्हांच लक्षांत येतें. एक प्रकार भाष्यकारांनीं जो लिहिला आहे त्याचें तात्पर्य हें आहे कीं, जकात, म्हणजे दानधर्म वा तन्निमित्त ठराविक कर कीं जो खास परमेश्वरालाच अर्पून दिला जातो. त्या देण्याचें पुण्य आहे व त्याचें प्रतिफल परमेश्वरासमीप या जगांतच दशपट आहे. तें जणूं एक झाड आहे कीं तें फुलत व फळत राहतें. परंतु जेव्हां देण्यांत आपला कांहीं स्वार्थ असेल तर असल्या देण्याचें पुण्य नाहीं.

आणि त्याच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकीं (एक ही) होय कीं तो वाऱ्यास (यासाठीं) पाठवितो कीं त्यांनीं (लोकांस पावसाची) खुषखबर पोहोंचवावी; आणि हें कीं (वाऱ्याच्या चालण्यानें पर्जन्यवृष्टि व्हावी व) परमेश्वरानें तुह्मां लोकांस आपल्या दयेची गोडी चाखवावी; आणि हें कीं त्याच्या आज्ञेनें (समुद्रांत) गलबतें चालवींत व (समुद्रांतील व्यापाराद्वारें) तुम्हीं त्याचें औदार्य (म्हणजे आपलें अन्न) शोधावें; आणि हें कीं तुह्मीं (त्याचे) आभार मानावेत. ४६. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तुझ्यापूर्वीं (इतर) पैगंबरहि त्यांच्या लोकांकडे पाठविले. तर ते (पैगंबर) चमत्कार घेऊन घेऊन त्यांच्यापाशीं आले; (पण त्यांनीं त्यांस पाखंडी म्हटलें.) तर ज्या लोकांनीं (खोट्या दोषारोपाचा) अपराध केला त्यांच्यापासून आम्हीं (त्या दोषारोपाचा) बदलाहि घेतला. आणि विश्वासूंना सहाय्य करणें आम्हांस आवश्यक होतें. (व आह्मीं केलेंहि.)४७. परमेश्वरच असा (परमसमर्थ) होय कीं जो वाऱ्यांस पाठवितो; मग ते (वारे) ढगांस (त्यांच्या जागेवरून) उभारतात. मग (परमेश्वर) जसें जसें इच्छितो तसें ढगांस (कधीं साऱ्या) आकाशांत पसरतो व (कधीं) त्याचे तुकडे तुकडे करून टाकितो. तर (हे वाचक-श्रोत्या) तूं पाहतोस कीं [2]ढगांच्या मधून पाऊस निघून चालला येतो. मग जेव्हां परमेश्वर आप-

(१) हा एक ईश्वरी नियमच आहे कीं पावसाच्या आधीं वारा वाहूं लागतो आणि वाऱ्याचें वाहणें पाणी पडण्याची प्रस्तावना असते; म्हणूनच म्हटलें आहे कीं वारा लोकांस पावसाची खुषखबर देतो.

(२) ढगांचें मूळ हें आहे कीं ती एका तऱ्हेची वाफ होय ती सूर्याच्या उष्णतेमुळें प्रत्येक, ओली व भिजकट वस्तु व दंव व मुख्यत्वेंकरून समुद्र, नद्या वगैरे यांजपासून उत्पन्न होते. मग वारा ईश्वराज्ञेनें वाफेस वाहून वाहून नेतो आणि वरील ओलावा लागून ती वाफ पाणी होऊन वर्षते. जसें एखाद्या तपेलींत पाणी गरम करावें व वरून तपेलीस झांकण लावावें, म्हणजे उष्णता लागून पाण्याची वाफ होईल; आणि झांकणीस लागून वाफेचें झालेलें पाणी थेंबथेंब टपकेल; तसलाच प्रकार हुबेहूब याचाहि होय. परंतु अव्वलपासून अखेरपर्यंत ह्या सर्व उत्क्रांत्या परमेश्वराच्याच आज्ञेनें होतात. नाहीं तर, समुद्र, दंव, ऊन्ह व हवा, हीं सर्व कांहीं असूनहि पावसाळा व हिंवाळा

ल्या सेवकांतून ज्याच्यावर इच्छितो त्याच्यावर तो (पाऊस) वर्षवून टाकितो तेव्हां (काय पाहतां) ते लोक हर्ष मानूं लागतात. ४८. आणि वास्तविक पाहतां त्यांच्यावर पाऊस पडण्याच्या आधींच (पावसाकडून) हे लाक पहिल्यानेंच निराश होते. ४९. तर (हे वाचक-श्रोत्या!) परमेश्वराच्या दयेच्या चिन्हांकडे नजर कर कीं परमेश्वर जमिनीला तिच्या मृत[1] (म्हणजे पडित) झाल्या नंतर कशी संजीव (व टवटवीत) करितो. कांहीं संशय नाहीं कीं हाच (परमेश्वर तर पुनरुत्थानाचे दिवशीं) मेलेल्यांचाहि जिवंतकर्ता होय आणि तो सर्व शक्तिमान् होय. ५०. आणि जर आम्हीं(असा) वारा चालवूं (कीं तो ओलावा शोषून घेईल) व हे लोक शेत पिवळें (पडलेलें) पाहतील; तर शेताच्या पिवळया पडल्यानंतर अवश्य हे लोक (आमच्या पहिल्या देणग्यांबद्दल) अनुपकार[2] दर्शवूं लागतील. ५१. तर (हे पैगंबरा!) तूं मेलेल्यांस ऐकवूं शकत नाहींस आणि बहिऱ्यांसहि (आपली) हाक ऐकवूं शकत नाहींस; (मुख्यत्वेंकरून) अशावेळीं कीं जेव्हां बहिरे पाठ फिरवून (तुजपासून दूर) पळतील ५२. आणि आंधळयांस तूं गैरमार्गाहून सरळ मार्गावर आणूं शकत नाहींस. तूं तर जे लोक आमच्या निशाण्यांचा विश्वास ठेवितात त्यांसच

---

दोन्हीं ऋतु कोरडेच जातात. पाण्याचा थेंबहि पडत नाहीं. कां तर, परमेश्वर सेवकांस त्यांच्या आज्ञाभंगाची शिक्षा देतो व दयामय पाऊस रोखून ठेवितो.

(१) जमीन पडित होते तेव्हां तींत वनस्पतीच्या जातीची कोणतीहि वस्तु होत नाहीं. जमिनीच्या अशा स्थितीलाचा मृत म्हटलें आहे. मग जेव्हां जमिनीची मशागत झाली व तींत पीक होऊन तें वाऱ्यानें हालूं लागलें म्हणजे जमिनीच्या या स्थितीस तिचें सजीव होणें म्हटलें आहे. ह्या कशा उत्तम उपमा व रूपकालंकार होत!

(२) माणसाच्या या स्वाभाविक गुणाला दुसरे जागीं विशेष स्पष्ट करून सांगितलें आहे. तें असें:—“लोकांत कोणी असाहि आहे कीं जो परमेश्वराची उपासना तर करितो; (पण) वरवरूनच; कीं जर त्याला कांहीं हित पोहोंचलें तर त्यामुळें तो समाधान पावून गेला; आणि जर त्याच्यावर कांहीं आपत्ति ओढवली तर जेथून आला होता तिकडेच उलटून गेला. यानें इहलोकहि गमावला व परलोकहि. धडधडीत तोटा (म्हटला म्हणजे) हाच.”

केवळ ऐकवूं (समजावूं) शकतोस. तर हे लोक (तुझें म्हणणें) मान्यहि करून घेतात. ५३. परमेश्वरच असा (परम समर्थ) होय कीं, ज्यानें तुम्हांलोकांस कमजोर स्थिति(जी आईच्या उदरांत असते तीं)तून निर्मून उभें केलें. मग (बाल्य) कमजोरीच्या मागून (यौवनावस्थेची) कुवत दिली व मग कुवतीच्यामागून कमजोरी आणि वृद्धावस्था करून टाकिली. तो जें इच्छितो तें पैदा करितो आणि तोच (मनुष्याच्या स्थितीशीं) वाकब (व) सामर्थ्यवान् होय. ५४. आणि ज्या दिवशीं (पुनरुत्थानाची) घटका काईम होईल त्या दिवशीं अपराधी लोक शपथा वाहतील कीं ते (जगांत) एका घटकेशिवाय[२] जास्त राहिलेच नाहींत. अशाच तऱ्हेनें हे लोक (जगांतहि) बहकलेलेच राहिले. ५५. आणि ज्या लोकांस ज्ञान व विश्वास हीं दिलीं आहेत ते (त्यांस) उत्तर देतील कीं (नाहीं,) तुम्हीं तर (जसें) पुस्तकांत (आहे, तसें) पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत राहिलांत. आणि (आज) हा पुनरुत्थानाचाच दिवस होय. परंतु तुम्हांस (त्याची) जाणीवच नव्हती. ५६. तर त्या दिवशीं आज्ञाभंजकांस त्यांची क्षमायाचना (कांहीं) फायदा देणार नाहीं व त्यांना (परमेश्वरास) रा[३]जी करून घेण्याची संधिहि दिली

(१) सारांश हा कीं, नास्तिक हे जणूं मेलेले व बहिरे होत; म्हणून त्यांच्यांत ऐकण्या व समजण्याची पात्रताच नाहीं. आणि ते ऐकूं व समजूं इच्छितहि नाहींत.

(२) जगांत एका घटकेहून जास्त न राहण्याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक हा कीं, परलोकींच्या सतत अस्तित्त्वापुढें इहलौकिक आयुष्यास अत्यल्प समजतील. खरें पाहतां, त्यांस हा विचार जिवंत असतांना आलाच नाहीं; आणि ऐहिक आयुष्यावर ते गर्विष्ठ होऊन फसगतींत पडून राहिले. अथवा हें कीं जगांत एका घटकेशिवाय जास्त न राहण्याला सबब सांगण्याकरितां पुढें करतील; कीं आम्हांस अवकाशच कोठें मिळाला ! तर कांहीं कां असेना नरकवासी कोणाहि प्रकारें दोषमुक्त होऊं शकत नाहीं.

(३) भावार्थ हा कीं नास्तिक जसे जगांत निमित्त व बहाणे करीत होते तसें पुनरुत्थानांतहि ते खोटें नाटें निमित्त पुढें करतील कीं आम्हांला जगांत कर्मे आचरण्यास अवकाशच कोठें मिळाला ! आह्मीं जगांत फार राहिलों

**जाणार नाहीं. आणि आह्मीं लोकांच्या (समजण्या)साठीं ह्या कुराणांत हरतऱ्हेचे दृष्टांत सांगितले आहेत. आणि (हे पैगंबरा !) जरी तूं या (लोकां)स कोणचाहि चमत्कार आणून दाखविशील, तरी जे नास्तिक होत ते तर केवळ हेंच म्हणतील कीं तुम्हीं (मुसलमान) निव्वळ ठकबाज व लबाड आहां. ५८. जे लोक समज बाळगीत नाहींत त्यांच्या मनांवर परमेश्वर अशाच तऱ्हेनें मोहर लावून टाकित असतो. ५९. तर (हे पैगंबरा !) तूं (मुकाट्यानें) सहन करून बैस; निःसंशय परमेश्वराचें वचन सत्य होय आणि असें न व्हावें कीं जे लोक (तुझ्या बोलण्यावर) पूर्ण विश्वास ठेवीत नाहींत त्यांनीं तुला (खिजवून)[१] हलका करून टाकावा. ६०.**

---

असलों तर एक घटकाभरच; तर एका घटकेंत आम्हीं काय करूं शकणार ? विश्वासू लोक त्यांस सांगतील. कीं तुह्मीं हें खोटें बोलतां ईश्वरी पुस्तकाप्रमाणें तुम्हांला पुनरुत्थानाचे दिवसापर्यंतचा अवकाश मिळावयाचा होता तो मिळाला; आणि तो कर्म आचरण्यास पुरासा होता. तात्पर्य, ही गोष्ट दुसऱ्या जागीं स्पष्ट रीतीनें सांगितली आहे कीं " कां आम्हीं तुह्मांस इतकें आयुष्य दिलें नव्हतें कीं त्या अवकाशांत ज्याला विचार करावयाचा असता तो चांगल्या प्रकारें विचार करून घेता. आणि या उपरांत तुम्हांपाशीं भय सुचविणारे पैगंबरहि आले."

(१) नास्तिक लोक तुह्मांस खिजवून व चिथावून सरळ मार्गाहून चळवितील कीं जेणें करून तुह्मीं ईश्वरीशिक्षेसाठीं घाई मचवूं लागाल.

# अध्याय ३१ वा.

# सूरतु-लुक्मान्.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ३४ महावाक्यें आहेत. यांत लुकमान नांवाच्या विभूतीचें वर्णन आलेलें आहे त्यावरून हें नांव दिलें गेलें आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मीं आरंभ करितों).**

**अल. म. (अलेफ-लाम मीम.) १. हीं (त्याच) पुस्तका(म्हणजे कुराणा)चीं महावाक्यें होत कीं ज्यांत बुद्धि (व शहापणा)च्या गोष्टी आहेत. २. (तीं महावाक्यें) सुकृत्यें करणारांसाठीं सन्मार्ग व दया (यांस कारणीभूत) होत. ३. (म्हणजे) जे लोक नमाज पढतात व जकात देतात आणि जे परलोकींची खातरी बाळगितात त्यांच्या-साठीं. ४. हेच लोक आपल्या पालनकर्त्यांच्या सरळ मार्गावर होत आणि हेच (अखेर) आपल्या मनोरथांत सफल होतील. ५. आणि लोकांत कोणी (कोणी) असाहि (अजागळ) होय कीं जो निरर्थक भाकडकथा विकत घेतो कीं त्यानें (लोकांस त्या ऐकवून) समजल्या-**

(१) या महावाक्याच्या व्युत्पत्तींत भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं, मक्केच्या नास्तिकांतून एक मनुष्य नदर बिन हारिस बिन कल्दा नांवाचा होता. तो इराणच्या अहवाल व दंतकथा आणून लोकांस ऐकवी व म्हणे कीं, मोहंमद हा तुह्मांस आद व समूद यांच्या पुरातन गोष्टी ऐकवितो. मी त्यांहूनहि उत्तम रुस्तम व अस्फंदयार यांचे पराक्रम ऐकवितों. तेव्हां कित्येक लोक त्याच्या बातांत येऊन जात व त्याजपासून प्राचीन इराणच्या भाकडकथा ऐकीत. ह्या कथा फिर्दोसी नामक कवीनें 'शाहनामा' पुस्तकांत ग्रथित केल्या आहेत; ह्या पाहिल्या म्हणजे त्यांची कुराणाशीं तुलना करणें फोल ठरतें.

उमजल्यावांचून (त्यांना) सरळ मार्गांहून बहकवावें; आणि ईश्वरी-महावाक्यांची टर उडवावी. हेच होत कीं, ज्यांना (पुनरुत्था-नाच्या दिवशीं) अपमानकारक शिक्षा होणें आहे. ६. आणि जेव्हां (यांच्यापैकीं) एखाद्याला आमचीं महावाक्यें वाचून ऐकविलीं जातात तेव्हां तो ऐटून तोंड फिरवून चालता होतो; जणूं कीं त्यानें आमचीं महावाक्यें ऐकलींच नाहींत; जणूं कीं त्याच्या कानांत बधिरत्व आहे; तर (हे पैगंबरा!) अशा मनुष्याला दुःखप्रद शिक्षेची खुषखबर[1] ऐकवून दे. ७ निःसंशय ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्या(राहण्या)साठीं (मोठ्या) आनंदाच्या बागा (स्वर्गात तयार) आहेत; ८. कीं ते त्यांत निरंतर राहतील. (हें) परमेश्वराचें वचन पक्कें होय. आणि तो परम समर्थ व बुद्धिमान् होय; (तो आपलें वचन पुरें करून सोडील.) ९. त्यानेंच आकाशाला (जसें) तुम्हीं (लोक) पाहतां (तसें) स्तंभाविणा बनवून उभें केलें आहे आणि (त्यानेंच) पृथ्वींत (भारी अचल पर्वताचे) नांगर टाकले आहेत कीं ती (कोठें) तुम्हांसह (एकिकडे) कलून[2] पडूं नये. आणि तींत त्यानें हरेक जातीचे प्राणी पसरून टाकिले. आणि आम्हींच आकाशांतून पाणी वर्षविलें; व मग (त्या पाण्याद्वारें) जमिनींत आम्हीं हरेक जातीच्या उमदा चिजा उगविल्या. १०. (हे पैगंबरा! या लोकांस सांग कीं) ही तर परमेश्वराची (उत्पन्न केलेली) सृष्टि आहे तर आतां तुम्हीं लोक मला दाखवा कीं परमेश्वराशिवाय जे (उपास्य तुम्हीं लोकांनीं बनवून ठेविले) आहेत त्यांनीं काय काय उत्पन्न केलें आहे? गोष्ट (ही) होय कीं हे अनर्थकारी धडधडीत चुकींत (पडले) आहेत. ११. आणि आम्हीं 'लुकमान'यास शहाणपण दिलें (व सांगितलें) कीं परमेश्वराचे आभार मानीत रहा आणि जो

(१) शिक्षा व खुशखबर, यालाच दुःखावर डाग देणें किंवा फासण्या घालणें ह्मणतात.

(२) पृथ्वी गोलाकार आहे आणि तिच्या उत्तरध्रुवाकडील टोंक वरच्या बाजूस उठलेली आहे व त्याच प्रमाणानें दक्षिणेकडील टोंक झुकलेली. पृथ्वीचा हा आकार पर्वताच्या ओझ्यामुळें झालेला आहे. पर्वत नसते तर परमेश्वर जाणें. पृथ्वी कोठल्या कोठेंच कलून पडली असती व कांहींचें कांहींच झालें असतें.

आभार मानतो तो आपल्याच (कल्याणा) साठीं आभार मानतो आणि जो कृतघ्नता दर्शवितो तर परमेश्वर (सेवकांच्या आभारापासून) निरपेक्ष (आणि प्रत्येक स्थितींत) सुस्तुत्य होय. १२. आणि एके समयीं 'लुकमाना'[1]नें आपल्या मुलास उपदेश करीत असतांना त्याला सांगितलें कीं हे माझ्या मुला! (कोणालाहि) परमेश्वराचा जोडीदार ठरवूं नकोस. यांत संशय नाहीं कीं शिर्क[2]-परमेश्वराचा जोडीदार ठरविणें-ही मोठ्याच जुलमाची गोष्ट होय. १३. आणि आम्हीं माणसाला त्याच्या आईबापांच्या संबंधानें ताकीद केली (कीं प्रत्येक स्थितींत त्यांचा आदर सन्मान करीत जा;) कीं त्याच्या आईनें झटक्यावर झटके सोसून त्याला पोटांत वागविलें; आणि (पोटांत ठेवण्याच्या उपरांत) दोन वर्षांत (कोठें) त्याचें दूध सुटतें. (अतएव, मी माणसास हुकूम दिला) कीं तूं माझेहि उपकार मान व आपल्या आईबापांचेहि; (सरशेवटीं) मजकडेच (तुम्हांसर्वांस) परतून येणें आहे. (त्यावेळीं जसें कराल तसें भराल) १४. आणि (हे मानवा!) जर तुझे आईबाप तुझ्यामागें (या गोष्टीसाठीं) झटतील कीं तूं मजबरोबर अशा(कोणा)ला (ईश्वरत्वाचा) जोडीदार ठरवावास कीं ज्याचें

---

(१) लुकमान हा बाऊराचा पुत्र आणि हजरत अय्युब पैगंबरांचा मावस भाऊ होता. तो कित्येक शतकें हयात होता; म्हणजे हजरत दाऊदच्या राज्याच्या दहाव्या वर्षीं जन्मला आणि हजरत युनूसचे काळापर्यंत जिवंत होता. तो रंगानें काळा होता व त्याचे ओंठ जाड होतें ह्मणतात. म्हणूनच त्याला कित्येक सिद्दी (इथिओपियाचा) असें ह्मणतात. सद्दी, अकरमा व शअबी हे विद्वज्जन म्हणतात कीं लुकमान हा पैगंबर होता आणि त्याला शहाणपण ह्मणजे पैगंबरी दिली गेली होती. आणि कित्येक ह्मणतात कीं तो पैगंबर नव्हता; पण एक महाबुद्धिमान् तत्ववेत्ता वा नीतिशास्त्रज्ञ होता. सेलप्रभृति युरोपियन मंडळी याला ग्रीकाचा नीतिशास्त्रकर्ता इसफ असेंहि ह्मणतात. परंतु याला कांहींच आधार सांपडत नाहीं.

(२) 'शिर्क' या अरबी पारिभाषिक शब्दाचा अर्थ कोणालाहि परमेश्वराचा जोडीदार ठरविणें ह्मणजे अनेकेश्वर आहेत असें मानणें किंवा मूर्तीपूजा जी अनेकेश्वर मतवादास पोषक आहे ती करणें असा होतो. ह्मणूनच कोठें कोठें मुशरिक म्हणजे मूर्तीपूजक असा अर्थहि करण्यांत आला आहे.

तुझ्यापाशीं कोणतेंहि प्रमाणच नाहीं. तर (ह्यांत) त्यांचा कह्या मानूं नकोस; (पण) या लोकीं चांगल्या रीतीनें त्यांच्यासंगतीं राहा. आणि जे लोक (प्रत्येक गोष्टींत) मजकडे वळतात (व माझी आज्ञा पाळतात) त्यांच्या मार्गावर चाल. मग (अखेर) तुम्हांसर्वांचें मजकडेच परतून येणें होईल. तर जसजशीं कर्में तुम्हीं लोक करीत राहिलां (त्यांचें बरेंवाईट त्यावेळीं) मी तुम्हांस विदित करीन. १५. हे माझ्या मुला ! जर मोहरीच्या दाण्याच्या वजनाइतकेंहि एखादें कर्म असेल व मग (असें धरून चाल कीं) तें कोणा खडकाच्या आंत (ठेविलेलें आहे) अथवा आकाशांत (आहे) अगर जमिनींत आहे;तर तेंहि (पुनरुत्थानाचे दिवशीं कर्मांचा हिशेब घेतेवेळीं) परमेश्वर आणून हजर करील. कांहीं संशय नाहीं कीं परमेश्वर फार सूक्ष्मदर्शी (व) चतुर होय. १६. हे माझ्या मुला ! नमाज पढीत अस व (लोकांस) चांगल्या कामां(च्या करण्या)चा उपदेश करीत राहा आणि वाईट कामाची मनाई करीत जा. आणि तुजवर जें कांहीं बितेल तें सहन कर. निःसंशय हीं मोठ्या हिंमतीचीं कामें होत. १७. आणि लोकांकडून तोंड वांकडें करूं नकोस व धरित्रीवर ऐटून चालूं नकोस. (कारण), परमेश्वर कोणाहि ऐटबाज व शेखीखोरास पसंत करीत नसतो. १८. आणि आपल्या चालण्यांत मध्यमपणा राख व (कोणाशींहि बोलशील तर) नम्र स्वरानें हळुहळु बोल. कारण आवाजांत वाईटांत वाईट (व रूक्ष आवाज) गाढवांचा आवाज होय. १९. कां तुम्हीं लोकांनीं (या गोष्टींचें) अवलोकन केलें नाहीं कीं जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्वरानें (एका मानानें) तुमच्या आज्ञांकित करून

---

(१) गाढवांचा अवाज इतका मोठा असून तो कर्णकटु व रूक्ष असतो ह्मणून तो कोणालाहि आवडत नाहीं. तर मनुष्य होऊन त्यानें गाढवाप्रमाणें ओरडणें योग्य नाहीं.

(२) आकाश व पृथ्वींत पुष्कळ वस्तु आहेत कीं त्या मनुष्याच्या आज्ञांकित नाहींत. दिवस आपल्या वेळीं उगवतो व रात्र आपल्या वेळीं होते. चंद्र, सूर्य व तारे आपापल्या वेळीं निघतात व आपापल्या वेळीं मावळतात. धान्य आपल्या वेळेवर उगवतें व आपल्या वेळेवर पिकतें. यांतून कोणत्याहि गोष्टींवर माणसांची

ठेविलें आहे; आणि तुम्हांवर आपल्या जाहीर व गुप्त (सर्व तऱ्हेच्या) देणग्या पुऱ्या केल्या आहेत. आणि लोकांत कोणी असेहि आहेत कीं जे परमेश्वराचे संबंधांत वादविवाद करतात (आणि स्वतः त्यांच्यापाशीं) (कांहीं) ज्ञान नाहीं व (परमेश्वराकडून) सन्मार्गबोध नाहीं व (त्यांच्यापाशीं) कोणी पुस्तकहि नाहीं कीं (तें त्यांना सन्मार्गाचा) प्रकाश दाखवील. २०. आणि जेव्हां या लोकांस सांगितलें जातें कीं (कुराण) जें परमेश्वरानें प्रकटिलें आहे त्याप्रमाणें चाला; तेव्हां ते उत्तर देतात कीं नाहीं, आम्हीं तर ज्या (मार्गा)वर आमचे वाडवडिलांस (चालतांना) पावलों आहों त्याच (मार्गा)वर चालूं. बरें, जरी सैतान यांच्या वडिलांस नरकाग्नीच्या शिक्षेकडे बोलावित राहिला असेल तरीहि (ते त्यांचेंच अनुकरण करतील) का? २१. आणि जो कोणी परमेश्वरापुढें आपलें शिर[१] नमवील व तो सुकृत्य करणाराहि असेल, तर झालें, त्यानें मजबूत दोर धरला. आणि (अखेर सर्व) कामांचा परिणाम परमेश्वराकडेच होय. २२. आणि (हे पैगंबरा!) जो कोणी नास्तिकपणा करितो, त्याच्या नास्तिकपणामुळें तुला खेदयुक्त न झालें पाहिजे. या(सर्वांस आम्हांकडे) परतून येणें आहे; तर जें कांहीं (जगांत) हे करीत राहिले (त्या वेळीं त्यांचें बरेंवाईट) आम्हीं यांना विदित करूं. परमेश्वर तर (लोकांच्या) मनांतील विचार (सुद्धां) जाणतो. २३. आम्हीं यांना थोडे (दिवस जगिक) सुखोपभोग घेऊं देऊं, नंतर यांना सक्त शिक्षेकडे खेंचून बोलावूं. २४. आणि (हे पैगंबरा!) जर तूं या लोकांस पुसशील कीं आकाशास व पृथ्वीस कोणी निर्मिलें तर ते अवश्य हेंच उत्तर देतील कीं परमेश्वरानें. (यावर तूं यांना) सांग कीं परमेश्वराचे आभार! (तुम्हीं इतकी गोष्ट तर समजतां). तथापि यांच्यांतून बहुतेक तर (इतकेंहि) जाणित[२] नाहींत. २५. जें कांहीं आकाश व पृथ्वींत आहे तें (सर्व) परमेश्व-

कांहींच सत्ता चालत नाहीं. परंतु मनुष्य या सर्व गोष्टींपासून लाभ घेतो व आपलें काम काढतो; या मानानेंच यांस मनुष्यांच्या आज्ञांकित म्हटलें आहे.

(१) वाक्यांत 'शिर' शब्द आलेला आहे. पण त्या जागीं मूळ शब्द 'वज्ह' म्हणजे तोंड असा आहे. अरबी भाषेंत तोंड नमविणें वा वांकविणें असें म्हणण्याचा प्रचार आहे. पण मराठींत शिर नमविणें म्हणतात.

(२) म्हणजे या गोष्टींचा विचार करीत नाहींत. विचार करतील तर

राचेंच होय. निःसंशय परमेश्वर निरपेक्ष, व हरेक स्थितींत, स्तुत्य होय. २६. आणि पृथ्वींत जेवढे वृक्ष आहेत जर (त्या सर्वांच्या) लेखण्या होतील आणि समुद्र (त्याची शाई व तीहि अशी) कीं तिच्या (लिहून झाल्या) पश्चात (तसलेच आणखी) सात समुद्र त्याची मदत करतील; (सारांश, या सर्व लेखण्यांनीं व साऱ्या शाईनीं ईश्वराच्या गोष्टी लिहिल्या जातील) तरीहि परमेश्वराच्या गोष्टी संपणार नाहींत. निःसंशय परमेश्वर समर्थ (व) बुद्धिमान् होय. २७. (लोकांनो !) तुम्हांसर्वांचें पैदा करणें व (मेल्यावर) तुमचें उठवून उभें करणें, हें केवळ एका मनुष्या (चें पैदा करणें व जिवंत उठविणें या) सारखेंच होय. निःसंशय परमेश्वर (सर्वांचें) ऐकतो (व सर्व कांहीं) पाहतो. २८. (हे वाचक-श्रोत्या !) कां तूं या गोष्टीवर) नजर केली नाहींस कीं परमेश्वरच रात्री(च्या एका भागा)स दिवसांत दाखल करितो, (तेव्हां दिवस मोठा होतो व रात्र लहान); आणि तोच दिवसा(च्या एका भागा)ला रात्रींत दाखल करतो, (तेव्हां रात्र मोठी होते व दिवस लहान); आणि (त्यानेंच) सूर्य व चंद्र यांस (आपल्या किंवा एका मानानें तुम्हां लोकांच्या) वश करून ठेविलें आहे; कीं प्रत्येक (पुनरुत्थानाच्या) नियमित वेळेपर्यंत (अशाच तऱ्हेनें) चालत राहील. आणि (हे वाचक-श्रोत्या ! कां तूं) या गोष्टीवर (नजर केली नाहींस) कीं जें कांहीं (हि तुम्हीं लोक) करीत आहां परमेश्वराला त्याची (सर्व) खबर आहे. २९ ह्या (सर्व उत्क्रांत्या) या गोष्टींचें प्रमाण होत कीं परमेश्वर हाच खरा (समर्थ) होय आणि या गोष्टींचें कीं ज्या(उपास्यां)स (लोक) त्याला सोडून बोलावितात ते (सर्व) मिथ्या (निराधार) होत; आणि याचें कीं परमेश्वरच (सर्वांत) थोर (व) महिमाशाली होय. ३०. (हे वाचक-श्रोत्या !) कां तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वराच्याच कृपेनें गलबत समुद्रांत चालतें; (आणि त्यानें पाण्यांत व लांकडांत हे गुणधर्म यासाठीं ठेविले आहेत) कीं आपल्या

---

निरुपाय होऊन त्यांस मानावें लागेल कीं परमेश्वरानेंच आकाश व पृथ्वीस पैदा केलें आहे.

(२) परमेश्वराच्या गोष्टी म्हणजे त्याचें सामर्थ्य, त्याची महिमा, वैभव व पराक्रम आणि त्याची स्तुति व वाखाणणी.

(परम सामर्थ्यांच्या) कित्येक निशाण्या तुम्हां लोकांस दाखवाव्या निःसंशय ह्यांतहि प्रत्येक सहनशील व कृतज्ञ(सेवकां) साठीं (ईश्वरी सामर्थ्यांच्या बऱ्याच) निशाण्या होत. ३१. आणि जेव्हां (समुद्राच्या) लाटा (उंच उसळून गलबतांतील) लोकांवर छायेप्रमाणें आच्छादून जातात, तेव्हां ते प्रांजलमनानें परमेश्वराचीच भक्ति मानून त्यालाच बोलावूं लागतात. मग जेव्हां परमेश्वर त्यांना तारून खुष्कीकडे पोहोंचवितो, तेव्हां त्यांजपैकीं कित्येक तर मध्यम मर्यादेवर राहतात (म्हणजे परमेश्वराचें स्मरण करतात; आणि बहुतेक परमेश्वराला विसरून जातात). आणि आमच्या (सामर्थ्यांच्या) निशाण्यांस प्रत्येक विश्वासघातकी (व) कृतघ्न या शिवाय (अन्य) कोणी नाकारीतच नाहीं. ३२. लोकांनों! आपल्या पालनकर्त्याचें भय बाळगा; आणि ज्या दिवशीं कोणी बाप आपल्या मुलाच्या कामा येणार नाहीं व कोणी मूलहि आपल्या बापाच्या काहीं कामा येऊं शकणार नाहीं त्या दिवसाला भ्या. परमेश्वराचें (पुनरुत्थानाचें) वचन सत्य होय. तर लोकांनों! इहलौकिक आयुष्यानें तुम्हांस फसवूं नये. आणि परमेश्वराच्या संबंधांत (त्या) फसव्या(सैताना)नेंहि तुम्हांस (कोठें) फसवूं नये. ३३ निःसंशय परमेश्वरच (असा)होय कीं ज्याला (पुनरुत्थानाच्या) घटके(च्या येण्या)चें ज्ञान होय आणि तोच (एका नियमित वेळेवर जी त्याच्याशिवाय कोणालाच माहित नाहीं) पाऊस वर्षवितो; आणि (नर व मादी) जें कांहीं (आईच्या) पोटांत आहे तेंहि तोच जाणतो; आणि कोणाहि मनुष्याला माहीत नाहीं कीं (तो खुद्द) उद्यां काय करील. आणि कोणीहि मनुष्य जाणत नाहीं कीं तो कोणत्या भूप्रदेशांत मरेल. निःसंशय परमेश्वरच (सर्व गोष्टींचा) ज्ञाता (व) माहितगार होय. ३४.

(३) सहनशील म्हणजे गलबतांतील इजा सहन करणारे. कारण त्यांत वांती येतें, मळमळतें, तुफान येतें व केव्हां केव्हां गलबताचें यंत्र बिघडून जातें तर ते या इजा सहन करतात; आणि जेव्हां सुरक्षित व सुखरूपपणें आपल्या मुक्कामीं पोहोंचतात तेव्हां त्याबद्दल परमेश्वराप्रत कृतज्ञता व आभार प्रदर्शित करतात.

# अध्याय ३२ वा.

# सूरतु-स्सिज्दा.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला व ह्यांत ३० महावाक्यें आहेत. या अध्यायाचे मध्यभागीं मुसलमानांस 'सिज्दा' म्हणजे साष्टांग नमस्कार घालण्यासंबंधानें जी आज्ञा आली आहे तीवरून हें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों.)**

**अ. ल. म. (अलेफ-लाम-मीम.) १. (हे पैगंबरा!) यांत कांहींच संशय नाहीं कीं कुराण (जें तुला प्रकटिलें जातें तें) सकल जगांच्या पालनकर्त्याकडून प्रकट होतें. २. कां (हे लोक) म्हणतात कीं हें (पुस्तक) या (गृहस्था)नें (म्हणजे त्वां आपल्या मनानें) रचिलें आहे? (पण हे पैगंबरा! त्यांचें हें म्हणणें सर्वस्वीं खोटें आहे;) किंबहुना हें सत्य (पुस्तक होय व तें) तुझ्या पालनकर्त्याकडून (प्रकटिलेलें) आहे; अशासाठीं कीं तूं ज्या लोकांपाशीं तुझ्यापूर्वीं कोणी भय सुचविणारा आला नाहीं त्या लोकांस (ईश्वरी शिक्षेचें) भय सुचवावेंस. नवल नाहीं कीं हे लोक सन्मार्गावर येऊन जातील! ३. परमेश्वरच असा (परम समर्थ) होय कीं, ज्यानें सहा दिवसांत आकाश व पृथ्वी व जें काय त्या दोहोंच्या दर्म्यान आहे तें, हीं पैदा केलीं व नंतर**

(१) अरब लोक आपले कुलपुरुष हजरत इब्राहीम यांचे ज्येष्ठ पुत्र हजरत इस्माईल यांचे वंशज होत. येथें त्यांच्यानंतर कोणी पैगंबर आला नव्हता. सुरुवातींत हजरत पैगंबरसाहेबांच्या पैगंबरी अधिकाराची मर्यादा अरब लोकांपर्यंतच होती. मग हा अधिकार इतका विस्तृत केला गेला कीं तो सर्व जगांस व्यापक असा झाला. कारण, परमेश्वरानें सांगितलें कीं "आह्मीं तुला अवघ्या लोकांकडे पाठविलें आहे आणि आह्मीं तुला सकल जगांच्या लोकांसाठीं केवळ (मूर्त) दया (करून) पाठविलें आहे."

तो अर्श–महासिंहासना–वर (जाऊन) विराजमान झाला. त्याच्या-वांचून तुम्हांलोकांचा कोणी पुरस्कर्ता नाहीं; व कोणी मध्यस्थीहि नाहीं. तर कां तुम्हीं (लोक इतकेंहि) मनन करीत नाहीं ? ४. आकाशा-पासून (तों) पृथ्वीपर्यंत तोच (प्रत्येक) कामाची व्यवस्था लावितो; मग तुम्हां लोकांच्या (इहलौकिक) गणनेच्या (अनुरोधानें) हजार वर्षांच्या मुदतीचा एक दिवस होईल त्या दिवशीं सर्व व्यवस्था (म्हणजे तिचा परिणाम) त्याच्याच हुजुरांत गुदरेल. ५. हाच (तर परमेश्वर) अदृष्ट व दृष्ट या (सर्व) गोष्टींचा ज्ञाता, परमसमर्थ (व) दयाळू (असा होय);६ कीं त्यानें प्रत्येक वस्तु जी बनविली ती उत्कृष्टच बनविली; आणि माण-साची उत्पत्ति मातींतून सुरू केली. ७. मग (मातीच्या) निष्कर्षा (म्हणजे वीर्या)तून कीं तें एक क्षुल्लक पाणी होय,त्याचा वंश चालविला ८. व मग त्यानें त्या(च्या पुतळ्या)स दुरुस्त बनविलें व त्यांत आपल्या आत्म्यांतून फुंकिलें; आणि तुम्हां लोकांच्या(ऐकण्या)साठीं कान व (पहाण्यासाठीं) डोळे आणि (समजण्याकरितां) हृदयें हीं बनविलीं. (यावरहि तुम्हीं त्याचे) फारच थोडे उपकार मानतां ! ९. आणि (पुनरुत्थानाचे नाकारणारे) म्हणतात कीं, जेव्हां आम्हीं मातींत (मिसळून) नष्ट होऊन जाऊं तेव्हां कां आम्हीं (पुन्हां) नव्या जन्मांत येऊं ? (हे लोक पुन्हां जिवंत होण्यासच नव्हे;) किंबहुना (मुळांत) आपल्या पालनकर्त्याच्या हुजूराहुजूर हजर होण्यासहि मानीत नाहींत. १०.

---

(१) आम्हीं तर इहलौकिक गोष्टींपासून अनुमान काढून असें समजलों आहों कीं आकाशापासून तों पृथ्वीपर्यंत साऱ्या जगाची व्यवस्था परमेश्वरच करतो. नंतर पुनरुत्थानाचे दिवशीं हा सारा कारखाना उचलला जाईल. आणि जोंपर्यंत हा कारखाना काईम राहिला व जें जें कांहीं त्यांत घडून आलें त्या सर्वांचा शेवटला परिणाम परमेश्वराच्या रूबरू आणिला जाईल; त्यांतल्या-त्यांत लोकांचीं कर्मेंहि. यांत उदाहरणार्थ असें समजलें पाहिजे कीं, परमेश्वर न्यायाच्या खुर्चीवर उंच जागीं विराजमान होऊन इजलास करीत आहे आणि दैविक कारकून जगाच्या व्यवस्थेची सारी कैफियत त्याच्या हुजुरांत गुदरतात.

(२) मतलब हा आहे कीं पुनरुत्थानाची नकारणी एक तर यामुळें होऊं शकते कीं मेल्यावर जिवंत होऊन उठणें हें बुद्धीस पटत नाहीं आणि दुसरें हें कीं हिशेबाचा मोबदला व शिक्षा ह्या गोष्टी समजण्यास कठीण. म्हणून परमे-

(हे पैगंबरा ! तूं या लोकांस) सांग कीं मृत्यूचा दूत ज्याला तुम्हांवर नेमलेलें आहे तोच तुमचे प्राण हरण करितो व मग तुम्हीं (सर्व) आपल्या पालनकर्त्याकडे पालटून नेले जातां ११. आणि (हे पैगंबरा !) जर तूं गुन्हेगारांस पाहशील कीं (पुनरुत्थानांत कर्मांच्या हिशेबाचे वेळीं) ते आपल्या पालनकर्त्याच्या पुढें आपलीं डोकीं खालीं वांकवून उभे आहेत (व विनंति करीत आहेत) कीं हे आमच्या पालनकर्त्या ! (आतां) आम्हीं (प्रत्यक्ष) पाहिलें व ऐकिलें; तूं आम्हांला पुन्हां (एकदां जगांत) पाठीव; म्हणजे आम्हीं सुकृत्य करूं. (आणि आतां) आम्हांला (शेवटच्या दिवसाची पुरी पुरी) खात्री आहे; तर (तुला फारच कौतुक वाटेल) ! १२. आणि (परमेश्वर म्हणेल कीं) जर आम्हीं इच्छितों तर प्रत्येक मनुष्याला (जगांतच अशी) सुबुद्धि देतों (कीं ते सरळ मार्गावर येते);परंतु (जी गोष्ट अनादिकाळांत मी सांगून चुकलों होतों ती) गोष्ट सिद्ध होऊनच राहिली कीं 'जिन्न'–दैवत व मनुष्यें या सर्वांनींहि मी 'जहन्नम'–नरकाग्नि- भरून टाकीन. १३. तर (गुन्हेगारांनों) जसे तुम्हीं ह्या दिवसाच्या पुढें येण्यास विसरला होतां, तशी (आज त्याची) तुम्हीं गोडी चाखा; कीं आम्हींहि तुम्हांस (बुध्या) विसरून टाकिलें. आणि जसजशीं कर्में तुम्हीं आचरीत राहिलां त्याच्या मोबदला सर्वकालीन शिक्षेची गोडी चाखा. १४. आमच्या निशाण्यांचा तर केवळ तेच लोक विश्वास ठेवितात कीं ज्यांना त्या(निशाण्यां)चें जेव्हां स्मरण दिलें जातें तेव्हां ते साष्टांग नमस्कार घालीत (भराभर पालथे) पडतात व आपल्या पालनकर्त्याच्या स्तवनाबरोबर (त्याची) पवित्रताहि वर्णूं लागतात; आणि ते (कोणाहि प्रकारचा) अहंकार करीत नाहींत. १५. (रात्रीच्या समयीं) त्यांची पाठ बिछान्यास लागत नाहीं; (व शिक्षेच्या) भीतीनें आणि (दयेच्या) आशेनें आपल्या

---

श्वरानें म्हटलें आहे कीं पुनरुत्थानास नाकारणारे मुळांत कर्मांच्या जवाबदारीपासून भितात व या कारणामुळेंच पुनरुत्थानास मानीत नाहींत. जर कर्मांच्या जबाबदारीचें भय नसतें तर हे अशा जोरानें पुनरुथानास मानण्याचें न नाकारते.

(१) 'त्यांच्या कुशी आपल्या बिछान्यापासून उठलेल्या राहतात' याचें मराठींतून भाषांतर त्यांची पाठ बिछान्यास लागत नाहीं असें केलें आहे. म्हणजे ते झोपीं जात नाहींत व ईशस्मरणांत लागून राहातात.

पालनकर्त्याचा धांवा करतात; आणि जें कांहींहि आम्हीं त्यांना देऊन ठेविलें आहे त्यांतून (परमेश्वराच्या मार्गांत) खर्च करतात. १६. तर कोणींहि मनुष्य जाणत नाहीं कीं लोकांनीं जीं जीं (चांगलीं) कामें केलीं आहेत त्यांच्या मोबदला कसकसें नेत्रसुख त्यांच्यासाठीं गुप्त ठेविलेलें आहे! १७. तर जो विश्वासू आहे तो, जो कोणी आज्ञाभंजक आहे त्याच्या सारखाच होऊन जाईल काय? (उभयपक्ष कधींहि) बरोबर होऊं शकत नाहींत. १८. तर ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्या करितां राहावयास बागा असतील; (हा) पाहुणचार, ते (जगांत) जीं (चांगलीं) कर्में करीत राहिले त्यांचा मोबदला होय. १९. आणि जे लोक आज्ञाभंग करीत राहिले त्यांचें ठिकाण नरकाग्नि होईल. जेव्हां जेव्हां ते त्यांतून निघावयास इच्छितील तेव्हां तेव्हां ते त्यांतच पालटून दिले जातील; आणि त्यांना सांगितलें जाईल कीं ज्या नरकाग्नीच्या शिक्षेस तुम्हीं खोटी म्हणत राहिलां, आतां तिचीच गोडी चाखा. २०. आणि (पुनरुत्थानाच्या) महान् शिक्षेच्या आधींच आम्हीं या('मक्के'च्या नास्तिकां)स (अशा एका) शिक्षेची गोडीहि अवश्यच चाखवूं कीं जी (या जगांत त्यांना) लौकरच होईल; कीं कदाचित् हे लोक (आम्हांकडे) वळतील. २१. आणि त्याच्याहून अधिक जुलमी आणखी कोण कीं, ज्याला त्याच्या पालनकर्त्याच्या महावाक्यांच्याद्वारें उपदेश केला जाईल व तो त्यांपासून तोंड फिरवील? निःसंशय आम्हीं अपराध्यांपासून बदला घेऊनच सोडूं. २२. आणि 'मूसा'लाहि आम्हीं (तौरात

(१) लौकरच किंवा जवळच होणारी इहलौकिक शिक्षा म्हणजे कदाचित् पैगंबरसाहेबांच्या वेळीं पडलेला सात वर्षांचा दुष्काळ असेल कीं मक्केचे लोक भुकेनें व्याकूळ होऊन मुडदार खाऊं लागले होते. अगर बद्रची लढाइ कीं जींत मोठमोठे कुरेशी सरदार कामा आले ती असेल, आणि नवल नाहीं कीं जगांत नित्य येणाऱ्या आपत्ति ह्मणजेच ही शिक्षा असेल.

(२) हजरत मोहंमद पैगंबरसाहेब व हजरत मूसा (या उभयतांसहि शांति असो!) यांच्या बहुतेक अहवालांत फारच मेळ व सादृश्य दिसून येतें. ह्मणूनच कुराणांत वारंवार हजरत मूसाचा उल्लेख आहे. येथेंहि परमेश्वर पैगंबरसाहेबांस सांगतो आहे कीं जसें मूसाला तौरात–जुना करार–हें पुस्तक मिळालें तसेंच तुह्मांला कुराण प्राप्त झालें. जसा बनी–इस्राएलांस तौरातनें बोध झाला तसा तुमच्या जनतेस कुराणानें बोध होईल. ज्याप्रमाणें बनी–इस्राएलांत पुष्कळ

हें दिव्य) पुस्तक दिलें होतें; तर (हे पैगंबरा !) तूंहि (परमेश्वराकडून दिव्य) पुस्तका(म्हणजे कुराणा)च्या मिळण्याविषयीं संशयांत राहूं नकोस. आणि आह्मीं त्या(तौरात पुस्तका)ला 'बनी–इस्राएलां'साठीं सन्मार्ग(दर्शक) ठरविलें होतें. २३' आणि आह्मीं 'बनी–इस्राएलां'तून धर्माचे पुढारी नेमिले होते; कीं ते आमच्या आज्ञेनें (लोकांस) सन्मार्ग दाखवीत होते. (आणि हा नेतृत्वाचा अधिकार त्यांना त्यावेळीं प्राप्त झाला कीं) जेव्हां ते (नास्तिकांची छळणूक) सहन करून बसले व (याशिवाय) ते आमच्या निशाण्यांचा विश्वासहि ठेवीत होते. २४. (हे पैगंबरा !) कांहीं संशय नाहीं कीं 'बनी-इस्राएल'ज्या(ज्या बाबतीं)त, मतभेद करीत राहिले आहेत त्या (त्या बाबतीं)त तुझा पालनकर्ता पुनरुत्थानाचे दिवशीं त्यांच्यामध्यें फैसला करून टाकील. २५. (हे पैगंबरा!) कां(तुझ्या समकालिन) लोकांस यानें बोध झाला नाहीं कीं आम्हीं यांच्या पूर्वीं कित्येक पिढ्या नष्ट करून टाकिल्या (व) हे लोक त्यांच्याच घरांतून चालतात फिरतात. यांत संशय नाहीं कीं या कांतींत (लोकांकरितां मोठे) धडे होत. तर कां (हे लोक) ऐकत (समजत) नाहींत? २६. आणि कां यांनीं या (गोष्टी) वर नजर केली नाहीं कीं आम्हीं पडीत जमिनीकडे पाण्या (च्या ढगांस) हांकून लावितो व मग पाण्याच्या योगें शेत उपजवितो कीं त्यांतून त्यांचीं गुरें ढोरेंहि खातात व ते आपणहि. तर कां (हे लोक सृष्टीचा हा नमूना) पाहत नाहींत? २७. आणि (नास्तिक) म्हणतात कीं (हे मुसलमानांनों !) जर तुम्हीं खरे आहां तर (पुनरुत्थानाचा) हा (शेवटला) फैसला (कीं ज्यापासून तुम्हीं आम्हांस भिववितां तो) केव्हां होईल? (म्हणजे आम्हीं पाहून विश्वास धरूं.) २८. (हे पैगंबरा ! तूं यांना) जबाब दे कीं जे लोक (जगांत) नास्तिकपणा करीत राहिले, फैसल्याचे दिवशीं त्यांचें विश्वास धरणें त्यांच्या कांहींच कामा येणार नाहीं व त्यांना अवकाशहि मिळणार नाहीं. २९. तर (हे पैगंबरा!) यां(च्या गोष्टीं)ची पर्वा करूं नकोस व पाहा तर खरें (कीं काय होतें; अखेर) हे(हि तर) पाहातच आहेत. ३०.

---

प्रवक्ते झाले व ते मूसाच्या शास्त्रलेखाप्रमाणें लोकांस सन्मार्ग दाखवीत होते त्याचप्रमाणें तुमच्या जनतेंतील विद्वान् लोक या कुराणानुसार उपदेश करून लोकांस सन्मार्ग दाखवितील.

# अध्याय ३३ वा.

## सूरतुल्–अह्ज़ाब.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. ह्यांत ७३ महावाक्यें आहेत. नदीरकुलाच्या यहुद्यांच्या चिथावणीनें, कित्येक यहुदी कुलें आणि मक्का, नज्द व तिहामा येथील नास्तिक व दांभिक रहिवासी यांनीं एक मोठें मिलाफी सैन्य तयार करून वीस दिवसपर्यंत मदिना शहरास वेढा घातला होता; ह्मणून अह्ज़ाब् म्हणजे मिलाफी लोक यांचें प्रकरण असें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**हे पैगंबरा! परमेश्वरालाच भीत राहा, आणि नास्तिक व दांभिक यां(ना भिऊन त्यां)च्या कह्यांत येऊन जाऊं नकोस. निःसंशय परमेश्वर (सर्वांच्या स्थितीशीं) जाणता (व) बुद्धिमान् होय. १. आणि तुझ्या पालनकर्त्याकडून जें कांहीं तुला प्रकटिलें जातें त्याचेंच अनुकरण करीत जा. कांहीं संशय नाहीं कीं तुम्हीं लोक जसजशीं कामें करितां त्यांशीं परमेश्वर खूप माहितगार होय. २. आणि (हे पैगंबरा!) परमेश्वरावर भरवंसा ठेव; आणि परमेश्वर पुरस्कर्ता पुरा आहे. ३. परमेश्वरानें कोणाहि माणसाच्या उरांत दोन अंतःकरणें ठेविलीं नाहींत. आणि त्यानें तर तुम्हां लोकांच्या बायका कीं ज्यांना तुम्हीं मातेसमान गणून काडी मोडून देतां, त्यांना तुमच्या माता बनविल्या**

(१) इस्लामाच्यापूर्वी अरब लोकांत विवाहमोचनाची एक तऱ्हेवाईक चाल होती. तिला 'जिहार' म्हणतात; आणि तें विवाहमोचन अशा शब्दांच्या उच्चारण्यानें होऊन जात असे कीं, पुरुषानें स्त्रीस म्हटलें कीं, तुझी पाठ मला आपल्या आईच्या पाठीसमान आहे; याचा अर्थ हा होतो कीं तूं माझ्या माते-

**नाहींत व त्यानें तुमच्या दत्तक मुलांस तुमचे मुलगेहि बनविले नाहींत. हें तुमच्या तोडांनीं तुमचें बोलणें आहे. आणि परमेश्वर तर सत्य गोष्ट सांगतो व तोच (लोकांस सरळ) मार्ग दाखवितो. ४. दत्तकांस त्यांच्या (खऱ्या) बापांच्या नांवानें बोलावीत जा; हीच गोष्ट परमेश्वरासमीप विशेष न्याय्य होय. मग जर तुम्हांस त्यांचे बाप माहीत नसतील तर ते धर्मात तुमचे भाऊ व तुमचे मित्र होत. (म्हणून त्यांच्याच योग्यतेच्या शब्दांनीं त्यांना बोलवीत असा). आणि यांत तुमची भूलचूक होऊन जाईल तर त्यांत तुम्हांवर कांहीं पाप नाहीं. परंतु (असें करण्यांत) तुमच्या मनाचा खास इरादाच होईल (तर अलबत तें पाप होय). आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ५. पैगंबर, मुसलमानांवर खुद्द त्यांच्या जीवापेक्षांहि जास्त हक्क राखितो; (आणि तो मुसलमानांच्या बापाच्या जागीं आहे) व पैगंबराच्या पत्न्या (आदर-**

---

समान आहेस. एवढें म्हणण्यानेंच स्त्री-पुरुषांत वियोग व तुटाटूट होत होती. प्रस्तुतकाळींहि लोकांकडून अशा चुका होतात; पण इस्लामधर्म या चुकीला काडी मोडून देणें असें मानीत नाहीं. किंबहुना या शपथेचें एक प्रायश्चित ठरविलें गेलें आहे; त्याचा खुलासा भाग २८ वा अध्याय ५८ वा यांत केलेला आहे. दुसरी वाईट चाल दत्तक मुलासंबंधानें होती; आणि अजून दत्तकमुलांस सर्व गोष्टींत सख्या मुलाप्रमाणें समजलें जातें. परमेश्वरानें या दोन्ही चाली, हें सांगून, मिटविल्या कीं, कोणाहि माणसाच्या उरांत दोन अंत:करणें नसतात. याचा अर्थ हा कीं माणसाचा विशिष्टप्रकारचा स्वाभाविक कल दोहोंकडे होऊं शकत नाहीं. तर मनुष्याच्या मनाची जी ओढ आपल्या आईकडे असते त्याच प्रकारची ओढ त्याला आपल्या बायकोकडे कशी होणार? मग जर कोणी आपल्या बायकोस म्हणील कीं तूं माझ्या मातेसमान आहेस; तर यानें बायको मातेसमान होऊन जात नाहीं. आई ती आईच व बायको ती बायकोच. अशाचप्रकारें दुसऱ्याचे मुलास मूल बनवून घेण्यानें तो खरा व सखा मुलगा होऊन जात नाहीं. तर अशा गोष्टी परमेश्वरासमीप विश्वसनीय नाहींत. म्हणून परमेश्वरानें घालून दिलेल्या मर्यादेबाहेर जाणें हें पातक होय.

(१) भावार्थ हा कीं प्रत्येक जण आपल्या जिवाची काळजी बाळगितो; परंतु पैगंबराच्या हुकमाची याहूनहि जास्त काळजी ठेविली पाहिजे.

मानाच्या दृष्टीनें) त्यांच्या आई होत. आणि नातलग हे ईश्वरी पुस्तकानुरूप (सर्व) मुसलमान व मुहाजिरीन-धर्मार्थ स्वदेशत्याग करणारे-यांच्यापेक्षांहि जास्त एकमेकांचे हक्कदार होत; पण हें कीं तुम्हीं आपल्या मित्रांशीं परोपकार करूं पाहाल (तर ती गोष्ट दुसरी). हाच हुकूम ('लौहे महफूज' या) पुस्तकांत लिहिलेला आहे. ६. आणि (हे पैगंबरा ! त्या वेळेचें स्मरण कर कीं) जेव्हां आम्हीं (सर्व) पैगंबरांपासून (संदेश पोहोंचविण्याचें) वचन घेतलें; आणि (प्रामुख्येंकरून) तुजपासून व 'नूह' व 'इब्राहीम' व 'मूसा' आणि 'मर्यम'चा पुत्र 'ईसा' यांजपासून. आणि आम्हीं त्यांजपासून वचनहि घेतलें (तें) पक्कें; ७. कीं (सरशेवटीं पुनरुत्थानाच्या दिवशीं परमेश्वर) खऱ्यां-(म्हणजे पैगंबरां)पासून त्यांचें सत्य (म्हणजे संदेश पोहोंचविणें) याचा अहवाल दरयाफ्त करील आणि त्यानें (मानणारांसाठीं बक्षीस) व न मानणारांसाठीं दुःखप्रद शिक्षा तयार करून ठेविली आहे. ८. मुसलमानांनों ! तुम्हांवर परमेश्वरानें केलेल्या त्या उपकाराचें स्मरण करा; कीं जेव्हां तुम्हांवर (फौजाच्या) फौजा चढून आल्या, तेव्हां आम्हीं त्यांच्यावर वावटळ पाठविलें आणि (वावटळाशिवाय देवदुतांचीं) सैन्यें कीं जीं तुम्हांस दिसून येत नव्हतीं. आणि (त्या वेळीं युद्धाच्या) ज्या (युक्त्या) तुम्हीं लोक करीत होतां त्यांहि परमेश्वर पाहत होता. ९. ज्यावेळीं (शत्रु) तुम्हांवर तुमच्या वरच्या बाजूनेंहि उतरले व तुमच्या खालच्या बाजूनेंहि (तुटून पडले) आणि जेव्हां (भयामुळें तुमचे) डोळे (फिरलेचे) फिरलेच राहून गेले होते व काळिज

(१) जे लोक पैगंबरसाहेबांच्या पत्न्यांचा जसा पाहिजे तसा आदर व ताजीम करीत नाहींत त्यांच्यावर या वाक्यानुसार मोठी जबाबदारी होय.

(२) अध्याय ८ वा शेवटल्या वाक्यावरील टीका पाहा.

(३) म्हणजे नास्तिकांशीं लढण्यासाठीं ज्या युक्त्या तुह्मीं करीत होतां त्या; उदाहरणार्थ खंदक खणणें वगैरे.

(४) जरी शत्रूचें केवळ दोहोंकडून येणें सांगितलेलें आहे तरी अर्थ चोहोंकडून चढून येणें असा आहे. अगर कदाचित् वरच्या बाजूनें मदिनेच्या पूर्व दिशेनें कीं ती उंच आहे व खालच्या बाजूनें-पश्चिम तोंडानें-कीं ती खालीं आहे.

तोंडाली येऊन गेलें होतें; आणि परमेश्वराविषयीं तुम्हीं (लोक तऱ्हे-तऱ्हेच्या) कल्पना करूं लागलां होतां; १०. तेव्हां या प्रसंगीं मुसलमानां-(च्या चिकाटी)ची कसोटी केली गेली आणि फारच सक्त रीतीनें हडसले गेले. ११ आणि जेव्हां दांभिक व ज्या लोकांच्या अंतःकरणांत (संशयाचा) रोग होता ते (लाचार होऊन) बोलूं लागले कीं, परमेश्वर व त्याचा पैगंबर यांनीं आम्हांशीं जो वायदा केला होता ती नुसती (थापच) थाप होती. १२. आणि जेव्हां त्यांच्यांतून एक पक्ष म्हणूं लागला कीं, हे 'मदिने'च्या लोकांनों ! तुमच्यानें (या जागीं शत्रूच्या मुकाबल्यांत) उभें राहवणार नाहीं; तर (बेहत्तर आहे कीं) तुम्हीं परत चला. आणि त्यांच्यांतून कांहीं लोक पैगंबरापाशीं (घरीं परत जाण्याची) परवानगी मागूं लागले (व) म्हणूं लागले कीं, आमचीं घरें उघडीं आहेत; आणि वास्तविक पाहतां, तीं उघडीं[2] नाहींत. (किंबहुना) त्यांचा हेतु तर केवळ पळून जावयाचाच होय. १३. आणि जर (अशींच सैन्यें) 'मदिने'च्या जवळील भागांतून यांच्यावर (शहरांत) येऊन शिरतील व यांना फिसाद (उपस्थित) करण्यास विचारिलें जाईल; तर (बेलाशक) हे फिसाद (उपस्थित) करतील. आणि आपल्या घरांत असेंच कांहीं अमळसें थांबून राहतील (तर राहतील). १४. आणि वास्तविक पाहतां, (हेच लोक याच्या) पूर्वीं परमेश्वराशीं करार करून चुकले होते कीं (आम्हीं शत्रूंपुढें) पाठ फिरविणार नाहीं. आणि (या लोकांनीं) परमेश्वराच्या (बरोबर केलेल्या) कराराची तर (यांजकडून) पृच्छा होईलच होईल. १५.

(१) कुराणाच्या शब्दांचें भाषांतर तर हें आहे कीं, अंतःकरण गळ्यापर्यंत आलें होतें. आम्हीं भाषासरणीचा विचार करून शब्दांस चिटकून राहिलों नाहीं.

(२) तात्पर्य हें कीं, दांभिक, जे आपलीं घरें उघडीं व निःशस्त्र होण्याचें निमित्त सांगतात त्यांची मूळ मनीषा मुसलमानांस सोडून पळून जावयाची होय. नाहीं तर, मुळांत यांचीं घरें असुरक्षित नव्हती व त्यांच्या संरक्षणाची कांहीं अपेक्षाहि नव्हती. कारण कीं, जर शत्रु मदिनेंत शिरून येतील तर हे लोक दुसऱ्यांच्या लुटण्याची संधि साधतील व शहरांत फिसाद व फंद फितुर करीत फिरतील आणि आपल्या घरांजवळून फिरकणार देखिल नाहींत. म्हणून यांत त्यांचा हेतु वेगळाच होता.

(हे पैगंबरा ! तूं या लोकांस) सांग कीं, जर तुम्हीं मृत्यु किंवा मारले जाण्या(च्या भीती)नें पळून जातां, तर (हें) पळून जाणें तुह्मांस केव्हांच (कांहींहि) फायदा देणार नाहीं. आणि जर पळून बचावलांहि तर केवळ हेंच ना कीं (जगांत आणखी) थोडे दिवस सुखोपभोग घ्याल ? १६. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं जर परमेश्वर तुमचें वाईट करूं इच्छील तर कोण असा (शूरवीर) होय कीं, जो तुम्हांस त्याच्या (पकडी)-पासून वांचवूं शकेल अगर तुम्हांवर (आपली) दया करूं इच्छील (तर कोण त्याला आडवा येऊं शकतो) ? आणि परमेश्वरावांचून त्यांना (कोणी) आपला पुरस्कर्ता आढळणार नाहीं व (ते कोणाला आपला) मदतगारहि (पावणार) नाहींत. १७. (मुसलमानांनों !) परमेश्वर तुम्हांपैकीं अशा (दांभिकां)स खूप जाणतो कीं जे (दुसऱ्यांना लढाईंत सामील होण्यापासून) अडथळा करतात व आपल्या भावांबंदांस म्हणतात कीं, (युद्धांतून अलग होऊन) आम्हांपाशीं चालले या; आणि ते आपणहि लढाईंत हजर होत नाहींत; पण (दोष उडविण्यास) थोड्या वेळाकरितांच. १८. (कारण,) ते तुमच्याशीं कंजूषपणा ठेवितात. तर (हे पैगंबरा!) जेव्हां (कोणी) भय(प्रसंग)पुढें येईल तेव्हां तूं त्यांना पाहतोस कीं ते (निराश होऊन) तुजकडे पाहतात; त्यांचे डोळे, जशी कोणाला मृत्युची मूर्छा येते तसे (चोहोंकडे) गरगरा फिरत जातात.मग जेव्हां भीति दूर होऊन जाते (व मुसलमानांचा विजय होतो) तेव्हां ते (लुटीच्या) द्रव्यास लोभून तीव्र वाचेनें तुम्हांवर वाक्प्रहार करतात. ह्या लोकांनीं (पहिल्यापासून) विश्वास धरिलाच नाहीं. म्हणून परमेश्वरानें त्यांचीं कर्में (जीं काय त्यांनीं केलीं होतीं तीं) अक्रीत करून टाकिलीं आणि परमेश्वरापाशीं ही (एक) सोपीशी (गोष्ट) होय. १९. (वेढा घालणारीं सैन्यें वेढा उचलून चालतेहि झाले तरीदेखिल हे अजून हीच) कल्पना करीत

(१) भावार्थ हा कीं, जोंपर्यंत युद्ध राहिलें तोंपर्यंत दांभिकपणा व भीतरेपणा यामुळें त्यांना पळोपळोसें झालें होतें. मुसलमानांचा जय झाला तेव्हां लुटीच्या मालांतून भाग घेण्यासाठीं फारच तोंड सोडून निंदा व निर्भत्सना करूं लागले कीं, तुह्मीं आमच्यानें झालीं नाहीं अशी काय मोठी कामगिरी केली ? आम्हीं नसतों तर तुम्हांला विजयच तर मिळाला असता !

आहेत कीं (हीं) सैन्यें (अद्यापि) गेलींच नाहींत. आणि जर (शत्रूंचीं) मिलाफी सैन्यें (पुन्हां) येऊन थडकतील; तर हे लोक ह्याचीच हांव धरतील कीं जर ते खेडयापाडयांत (कोणीकडेस) निघून जातील (व दूर बसून) तुमचा अहवाल दर्याफ्त करतील (तर बरें होईल)! आणि जर (निरुपायास्तव) यांना तुमच्यांत राहावें लागेल, तर ते (शत्रूंशीं) लढणार नाहींत;पण (दोषनिराकरणार्थ)थोड्या वेळेसाठींच.२०. (मुसलमानांनों!) तुम्हांकरितां (म्हणजे) जे लोक परमेश्वराला व शेवटल्या दिवसा(च्या शिक्षे)ला भीत व परमेश्वराचें अतोनात स्मरण करीत होते त्यांच्याकरितां (अनुकरण करण्यास) परमेश्वराच्या पैगंबराचा[1] एक उमदा नमुना होता. २१. आणि जेव्हां खऱ्या मुसलमानांनीं (शत्रूंच्या) मिलाफी समुदायास पाहिलें, तेव्हां ते बोलूं लागले कीं, परमेश्वरानें व त्याच्या पैगंबरानें आम्हांस (पूर्वीं) जें सांगून ठेविलें होतें हा तोच (प्रसंग) होय; आणि परमेश्वर व त्याचा पैगंबर यांनीं खरें सांगितलें होतें. आणि या(प्रसंगाच्या येण्या)नें लोकांच्या विश्वासांत व आज्ञाधारकत्वांत आणखीहि भरच पडली. २२. (याच) मुसलमानांत कांहीं लोक तर असे होत कीं, त्यांनीं परमेश्वराशीं जो (प्राणार्पणाचा) करार केला होता, त्यांत ते खरे उतरले. पण (कित्येक तर) यांच्यांतून असे होते कीं जे आपला नवस पुरा करून गेले (म्हणजे

---

(१) ह्मणजे जेव्हां परमेश्वराचे पैगंबर स्वतः लढाईत सामील असून पुढें पुढें होते तेव्हां मुसलमानांस मागेंपुढें पाहणें योग्य नव्हतें. त्यांना पाहिजे होतें कीं, कांकूं केल्यावांचून 'रसूलुल्ला' ह्मणजे परमेश्वराच्या पैगंबराबरोबर राहून त्यांचें अनुकरण करतें.

(२) 'सूरतुल्-बकर' ह्मणजे २ ऱ्या अध्यायांत हें वाक्य येऊन चुकलें आहे व त्याचा खुलासा हा आहे कीं नास्तिक तुम्हांस वेढा घालतील व तुह्मांस नाइलाज होऊन त्यांच्याशीं लढावें लागेल; आणि लढाईचीं संकटें व आपत्ति भोगाव्या लागतील. पण सरशेवटीं परमेश्वर तुम्हांस जय देईल. तर मिलाफी सैन्यांच्या युद्धांत जो प्रकार पुढें आला तो पाहून खरे मुसलमान समजले कीं परमेश्वरानें ज्या प्रसंगासाठीं आह्मांस पहिल्यानेंच तयार राहण्यास सांगिलें होतें तोच हा प्रसंग असावा.

धर्मार्थ प्राणास अंतरले); आणि कित्येक यांच्यांतून असे होत कीं जे (प्राणार्पणाची) वाट पाहतात. आणि त्यांनीं (आपल्या गोष्टींत) किंचितहि तर फेरबदल केला नाहीं. २३. (सारांश ही लढाई यासाठीं पुढें आली) कीं, परमेश्वरानें खऱ्या मुसलमानांस त्यांच्या सत्याचा मोबदला द्यावा आणि दांभिकांस हवी तर शिक्षा द्यावी अगर (हवी तर) त्यां(ना पश्चात्तापाची सुबुद्धि द्यावी व त्यांनीं पश्चात्ताप करावा आणि परमेश्वरानें त्यां)चा पश्चात्ताप मान्य करावा. निःसंशय परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळ होय. २४. आणि परमेश्वरानें (आपल्या सामर्थ्यानें) नास्तिकांस ('मदिने'हून ) मागें हटवून टाकिलें; ( व ते) आपल्या रागांत (मागें हटून गेले व) त्यांना (या मोहिमेनें) कांहींच फायदा पोहोंचला नाहीं. आणि परमेश्वरानें (आपल्या कुमकेनें) मुसलमानांस लढण्याची पाळीच येऊं दिली नाहीं. आणि परमेश्वर बलवान्(व) परमसमर्थ होय. २५. आणि ग्रंथधारी लोकांतून जे लोक (म्हणजे यहुदी) मूर्तीपूजकांचे मदतगार झाले होते त्यांना परमेश्वरानें त्यांच्या गढ्यांतून खालीं उतरून आणिलें व त्यांच्या अंतःकरणांत (तुम्हां मुसलमानांचा असा) धाक बसवून टाकला कीं तुम्हीं (बेधडक) कित्येकांस कत्तल करूं लागला व कित्येकांस कैद करूं लागला. २६. आणि त्यांची जमीन व त्यांचीं घरें व त्यांचे माल व तशीच ('खैबर'ची) जमीन, जींत तुम्हीं अजून पाऊलहि ठेविलें नव्हतें या (सर्वां)चा (परमेश्वरानें) तुम्हांलाच वारसदार करून टाकिलें; आणि परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. २७. हे पैगंबरा! आपल्या स्त्रियांस

(१) या वरील वाक्यांत ज्या युद्धाचा मजकूर आहे त्या युद्धास 'खंदक'ची लढाई असेंहि ह्मणतात. कारण यांत मुसलमानांनीं मदिनेच्या चौफेर आपल्या संरक्षणास्तव खंदक खणले होते. हिजरी सनाच्या आरंभापासून खास मदिनेंत मुसलमानांची अमलदारी होऊन गेली होती. परंतु नदीर कुलाचे यहुदीहि मदिनेंत वसत होते व ते मुसलमानांस सुखानें राहूं देत नव्हते. अखेर शांतता व सुव्यवस्था राहावी ह्मणून पैगंबरसाहेबांनीं यहुद्यास मदिनेहून काढून लाविलें. त्यांनीं मदिनेच्या आसपास फंदफितुराचा वणवा पेटविला व बारा हजार माणसांसह येऊन मदिनेस वेढा दिला. त्यावेळीं येथें फक्त तीन हजार मुसलमान होते; त्यांतहि कित्येक निःशस्त्र व कित्येक दांभिक होते. सुमारें

**सांगून दे कीं जर तुम्हीं इहलौकिक आयुष्य व त्याच्या थाटामाटाच्या अभिलाषी आहां तर या, मीं तुम्हांस (कांहीं) देऊन सवरून तुम्हांला चांगुलपणानें निरोप देऊन टाकतों. २८. आणि जर तुम्हीं परमेश्वर व त्याचा पैगंबर व पारलौकिक धाम यांच्या अभिलाषी आहां तर तुमच्यांत ज्या सदाचरणी असतील त्यांच्या साठीं परमेश्वरानें मोठमोठे मोबदले तयार करून ठेविले आहेत. २९. अहो पैगंबराच्या पत्न्यांनों ! तुमच्यांतून जी कोणी एखादी उघड उघड गैरशिस्त वर्तणूक करील तिला दुहेरी शिक्षा दिली जाईल. आणि परमेश्वरासमीप ही (एक) सोपीशी (गोष्ट) होय. ३०.**

---

एक महिना शत्रु **मदिनेस** घेरून राहिले व दुरून दुरून कांहीं चकमकीहि होत राहिल्या. अखेर ईश्वरकृतीनें एक सोसाट्याचा वारा निघाला व जे लोक **मदिनेला** वेढा घालून पडले होते त्यांच्यांत खळबळ उडून गेली. तंबूच्या तनावा उखडून गेल्या व घोड्यांच्या आघाड्या पिछाड्या तुटून गेल्या. तेव्हां हे लोक वेढा उचलून आपलें तोंड घेऊन चालते झाले. हें प्रकरण **हिजरी** सनाच्या चौथ्या वर्षीं झालें. **मदिनेचे** बाहेर **बनी कुरैजा** नांवाचें यहुद्यांचें आणखी एक घराणें वसत होतें. जरी त्यांच्या व मुसलमानांच्या दर्म्यान तह होता, तरी ते लोकहि या गांवढळ लोकसमुहांत येऊन मिळाले. वेढा उठतांच मुसलमानांनीं **बनीं कुरैजांस** जाऊन घेरलें. सुमोरें तीन आठवडेपर्यंत ते घेरून राहिले. अखेर त्यांनीं घाबरून जाऊन असा संदेश पाठविला कीं **सअद बिन मआज** हे आमच्या करितां जी कांहीं योजना करतील ती आम्हांला मान्य आहे. तात्पर्य **सअद** यांनीं हा निकाल दिला कीं लढणारे लोक ठार केले जावेत व बाकीचे कैद. याच्या दोन वर्षांनंतर **मदिने** जवळील **खैबर** इलाख्यावर मुसलमान काबिज झाले; तेथें एक लढाईही झाली. पण तींत यहुदी न टिकून अभय मागूं लागले; व तह होऊन गेला. जमीन मुसलमानांच्या मालकीची ठरली. पण यहुदी पूर्णवत् घरांत राहात व जमिनी करीत. तरीहि यांनीं दुसऱ्यांसहि सुखानें बसूं दिलें नाहीं व आपणहि सुखानें बसले नाहींत. सरशेवटीं **हजरत उमर** या खलिफाच्या अमदानींत **कुरैजा** घराण्यास काढून बाहेर लाविलें व ते **शिरीया** देशांत जाऊन वसले.

# पवित्र कुराण.

## भाग बाविसावा.

### सूरतुल्-अहज़ाब (पुढें चालू)

आणि तुम्हां(स्त्रियां)पैकीं जी कोणी परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचें आज्ञा-
पालन करील व सुकृत्य करील, तिला आम्हीं तिचा मोबदलाहि दुप्पट
देऊं; आणि आम्हीं (परलोकीं) तिच्यासाठीं इज्जतअब्रूचा शेरहि तयार
करून ठेविला आहे. ३१. अहो पैगंबराच्या पत्न्यांनों! तुम्हीं कोणा
(सामान्य) स्त्रियांसारख्या तर नाहींतच. (मग) जर तुम्हीं (परमेश्वराला)
भीत असाल तर(कोणाशींहि) बोलतांना कोमल स्वर काढीत जाऊं नका,
(कीं असें कराल) तर ज्याच्या मनांत (कोणाही तऱ्हेचा) रोग आहे तो
(तुमच्यांशीं कोणत्या तऱ्हेची) लालूच बाळगील(नकळे); आणि(बोलालहि
तर) वाजवी रीतींचें बोलणें बोला. ३२ आणि आपल्या घरांत जमून
(बसलेल्या) राहा आणि पूर्वींच्या अज्ञानकालाचेसे शृंगार दाखवीत
फिरूं नका; आणि नमाज पढा व जकात द्या आणि परमेश्वर व त्याचा
पैगंबर यांची आज्ञा पाळा. हे (पैगंबराच्या) घरवाल्यांनों! परमेश्वराची
तर केवळ हीच मनिषा होय कीं त्यानें तुम्हांपासून (हरेक तऱ्हेचा)
अमंगळपणा दूर करावा आणि तुम्हांस (खूप) पाक साफ करून पवित्र
करावें. ३३. आणि तुमच्या घरांत जीं परमेश्वराचीं महावाक्यें व शहाण-
पणाच्या गोष्टी वाचून वाचून ऐकविल्या जातात त्या पाठ करा. (कारण,)
परमेश्वर (सर्वांचा) मर्मज्ञ (व सर्वांच्या स्थितीशीं) माहितगार होय. ३४.
निःसंशय, मुसलमान पुरुष व मुसलमान स्त्रिया आणि विश्वासू पुरुष व
विश्वासू स्त्रिया आणि आज्ञाधारक पुरुष व आज्ञाधारक स्त्रिया आणि सत्य-
वादी पुरुष व सत्यवादी स्त्रिया आणि सहनशील पुरुष व सहनशील स्त्रिया
आणि विनयशील पुरुष व विनयशील स्त्रिया आणि दानधर्मकर्ते पुरुष
व दानधर्मकर्त्या स्त्रिया आणि उपास पाळणारे पुरुष व उपास पाळणाऱ्या
स्त्रिया आणि आपली लाज सांभाळणारे पुरुष व (लाज) सांभाळणाऱ्या

स्त्रिया आणि परमेश्वराचें अतोनात स्मरण करणारे पुरुष व स्मरण करणाऱ्या स्त्रिया; या(सर्वां)करितां परमेश्वरानें (यांच्या कृत्यांचा मोबदला ह्मणजे) पापांची क्षमा तयार करून ठेविली आहे (व क्षमेखेरीज मोठें प्रतिफलहि. ३५. आणि कोणाहि मुसलमान पुरुषास व कोणाहि मुसलमान स्त्रीस हें योग्य नाहीं कीं जेव्हां परमेश्वर व त्याचा पैगंबर हे (त्यांच्यासंबंधीं) एखादी गोष्ट ठरवून टाकतील, तेव्हां (त्यांनीं आपलें मत चालवावें व) त्या गोष्टींत त्यांचा (आपला) अखत्यार (बाकी) राहावा. आणि जो कोणी परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा आज्ञाभंग करील, तर तो खचित धडधडीत चुकींत पडून बहकला. ३६. आणि (हे पैगंबरा! त्या गोष्टीचें स्मरण कर कीं) जेव्हां तूं, ज्या('जैद बिन हारिसा')वर परमेश्वरानें (आपला) उपकार केला (कीं त्याला इस्लामधर्माची सुबुद्धि दिली); आणि तूंहि ज्याच्यावर उपकार[1] करीत राहिलास; त्याला समजवीत होतास कीं तूं आपली बायको ('जैनब') इला आपल्या पत्नित्वांत राहूं दे व परमेश्वराला भी (व तिला सोडूं नकोस). आणि जी गोष्ट परमेश्वर (अखेर) उघडकीस[2] आणणार होता ती तूं आपल्या मनांत लपवित होतास; आणि (या गोष्टींत) तूं लोकांना भीत होतास. आणि परमेश्वर याचा जास्त हक्कदार आहे कीं तूं त्याला भ्यावेंस. मग जेव्हां 'जैद'नें तिजकडून (आपला)हितसंबंध सोडून दिला (म्हणजे तिला काडी मोडून दिली व 'इद्दत'ची मुदत पुरी होऊन गेली) तेव्हां आह्मीं तुझ्याशीं तिचा विवाह लावून दिला; कीं जेणेंकरून (सर्व) मुसलमानांचे दत्तक जेव्हां आपल्या स्त्रियांकडून हितसंबंध सोडून देतील तेव्हां मुसलमानांस त्यांच्या (सोडलेल्या) स्त्रियां(शीं लग्न करून करून घेण्यां)त (कोणाहि तऱ्हेची) अडचण राहूं नये. आणि परमेश्वराचा हुकूम तर पुरा होऊनच राहतो. ३७.

(१) म्हणजे पैगंबरानें त्याला पाळिलें पोसलें व गुलामपणांतून मुक्त केलें आणि आपली आतेबहीण जैनब इचें त्याच्याशीं लग्न करून दिलें.

(२) म्हणजे जैद हा जैनबला सोडून देईल तर मी तिच्याशीं लग्न करावें ही गोष्ट परमेश्वरानें पुढें स्पष्ट हुकूम पाठवून उघडकीस आणिली व पैगंबराशीं तिचें लग्न लावून दिलें.

**परमेश्वरानें पैगंबरासाठीं जी गोष्ट ठरवून दिली असेल ती (करण्यां)त पैगंबरास कांहीं हरकत नाहीं. जे पैगंबर पूर्वीं होऊन गेले आहेत त्यांच्यांतहि (हाच) ईश्वरी परिपाठ (राहिला) आहे (कीं त्यांच्यांत परमेश्वरानें लग्नासंबंधानें अडचण ठेविली नाहीं). आणि परमेश्वराचें (जितकें) काम (होय तें) पूर्वे संकल्पित (असून अनादि काळा पासून) ठरलेलें होय. ३८. (आणि) ते (पूर्वींचे पैगंबर अशा प्रकारचे होते कीं ते) परमेश्वराचे निरोप (लोकांस) पोहोंचवीत व परमेश्वराचें भय बाळगीत. व ते परमेश्वराशिवाय कोणालाच भीत नव्हते. (तर हे पैगंबरा! तूं कां भ्यावेंस?) आणि कर्मांच्या(हिशोबा)साठीं परमेश्वर बस्स होय. (तो सर्वांस पाहून घेईल.) ३९. (लोकांनों)'मोहंमद' तुमच्या पुरुषांतून कोणाचाहि बाप नाहीं; (मग 'जैद'चा कां म्हणून?) परंतु तो तर परमेश्वराचा**

(१) हजरत पैगंबरसाहेबांच्या जीवनचरित्रांत हें एक मोठें प्रकरण होय. त्याची हकीकत अशी कीं, जैनब बिन्ते जहश ह्या पैगंबरसाहेबांच्या आते बहीण होत्या. त्यांच्या आईचें नांव उमैमा होतें आणि पैगंबरसाहेबांचे पितामह अब्दुल्–मुत्तलिब यांच्या त्या पुत्री होत्या. हें तर जैनबसंबंधानें झालें. दुसऱ्या पक्षीं जैदबिन हारेसा हे कुलिन गृहस्थ होते. परंतु लहानपणीं लोक त्यांस धरून घेऊन गेले होते. त्याकाळीं मुलांना जबरीनें पकडून नेण्याची व गुलाम बनाविण्याची निंद्य चाल होती. अजून तरुणहि झाले नव्हते कीं जैद गुलामाच्या स्थितींत मक्कत येऊन विकले गेले. पैगंबरसाहेबांनीं त्यांस खरीद करून व दास्यांतून मुक्त करून आपल्या जवळ ठेविलें. प्रीति वाढतां वाढतां पैगंबरसाहेबांनीं त्यांस आपला दत्तक करून घेतला. त्या वेळेपर्यंत दत्तकांसंबंधानें परमेश्वराकडून कसलाच हुकूम सादर झाला नव्हता आणि दत्तक मुलांशीं सख्यामुलाप्रमाणें वर्तन केलें जात असे. अद्यापहि हिंदुस्थानाच्या मुसलमानांची जवळ जवळ अशीच स्थिति आहे. जैद, पैगंबरसाहेबांसहि इतके प्रिय होते कीं, त्यांनीं त्यांचें जैनबशीं लग्न लावून दिलें; व त्या वेळींहि जैनब, ह्या विवाहास नाखुष होत्या. कारण जैद जरी पैगंबरसाहेबांचे दत्तक ह्मणवीत होते तरी ते मुक्त केलेले गुलाम होते आणि याशिवाय रूपलावण्याच्या दृष्टीनेंहि ते कदाचित् जैनबच्या जोडीचे नव्हते. कसेंहि असलें तरी पतिपत्नींत मेळ मिलाफ नव्हता; येथपर्यंत कीं जैद हे जैनबला सोडून देण्यास तयार झाले: पैगंबर-

प्रेषित–पैगंबर–आहे; आणि (पत्रांच्या मोहोरेप्रमाणें सर्व) पैगंबरांच्या शेवटांत आहे. आणि परमेश्वर सर्व वस्तूं (च्या स्थिती)शीं वाकब होय. ४०. अहो मुसलमानांनों! परमेश्वराचें अतोनात स्मरण करीत जा. ४१. आणि सकाळ संध्याकाळ त्याची पवित्रता वर्णीत असा. ४२. तोच होय कीं, जो तुम्हांवर दया करितो व त्याचे दूतहि (रदबदली करतात) कीं परमेश्वर तुम्हांस (नास्तिकपणाच्या) अंधःकारांतून काढून (विश्वासाच्या) प्रकाशांत घेऊन जाईल; आणि परमेश्वर विश्वासूंवर फार दयाळू होय. ४३. ज्या दिवशीं हे लोक परमेश्वराशीं भेटतील तेव्हां (त्याचा)

---

साहेबांनीं त्यांना पुष्कळ समजाविलें. पण जेव्हां स्वभावांत साम्यता नसते, तेव्हां पतिपत्नीच्या संबंधांत कसलीच गोडी राहत नाहीं. शेवटीं जैदनें जैनबला काडी मोडून दिलीच दिली. आतां पैगंबरसाहेबांस अनेक अडचणी येऊन पडल्या. त्यांत पैगंबरसाहेबांनीं जैनबला जैदशीं लग्न करून दिलें होतें व तें जैनबला पसंत आलें नाहीं; आणि तशांत तो विवाहसंबंधहि तुटला; म्हणून प्रथमतः जैनबची मनधरणी करणें आवश्यक होतें. ह्याच्याच अनुषंगानें परमेश्वराला हेंहि मंजूर झालें कीं दत्तक घेण्याची पूर्वींची दुष्ट चालहि बंद केली जावी. ह्मणजे लोकांनीं दत्तक घेऊं नये असें नव्हे. तर दत्तकाला अगदीं सख्या मुलाप्रमाणें समजूं नये व सख्या मुलासारखे त्याचे हक्क मानिले जाऊं नयेत. जगांत जेव्हां कोणीहि सुधारणा करूं इच्छितो तेव्हां सुधारणेची सर्वांत उत्तम युक्ति ही होय कीं, त्यानें स्वतः त्याप्रमाणें आचरून इतरांस आपला नमूना दाखवावा. म्हणून परमेश्वराच्या आज्ञेनें दर सांगितल्याप्रमाणें पैगंबरसाहेबांनीं बीबी जैनब यांशीं स्वतः विवाह केला; आणि दत्तकाला सख्या पुत्राप्रमाणें समजण्याची जी रीत होती तिचा नायनाट केला. अशा प्रकारें जैनब यांची मनधरणी झाली व दत्तकाच्या प्राचीन चालीसंबंधानें सुधारणाहि होऊन गेली.

(१) सेवकांवर परमेश्वराच्या 'सलात' वा 'दरूद' पाठविण्याचा अर्थ हा कीं, तो त्यांच्यावर आपली दया करितो; आणि देवदुतांच्या 'दरूद' पाठविण्याचा अर्थ हा कीं, ते त्यांच्यासाठीं दुवा करतात व परमेश्वरापाशीं शिफारस व रदबदली करतात. निव्वळ 'दरूद' पाठविणें म्हणजे तारीफ, धन्यता व आनंदप्रदर्शन असा अर्थ होतो.

सलाम (म्हणजे शांति) यांची सलामी[1] होईल. आणि परमेश्वरानें यांच्या साठीं (आपल्या येथें मोठ्या) मानामानाचा मोबदला तयार करून ठेविला आहे. ४४. हे पैगंबरा! आम्हीं तुला साक्ष[2] देणारा व (सज्जनांस ईश्वरप्रसन्नतेची) सुवार्ता ऐकविणारा आणि(दुर्जनांस आमच्या कोपाकडून) भिवविणारा बनवून पाठविलें आहे; ४५. आणि (तसाच) परमेश्वराच्या आज्ञेनें त्याच्याकडे (लोकांस) बोलाविणारा आणि (सन्मार्गाचा) प्रकाशित दिवा (बनवून पाठविला आहे). ४६. आणि विश्वासूंना या (गोष्टी)चें शुभवर्तमान ऐकीव कीं त्यांच्यावर परमेश्वराची मोठी कृपा होय. ४७. आणि (हे पैगंबरा!) नास्तिकांचा व दांभिकांचा कह्या मानूं नकोस व त्यांच्या छळणुकीची (कांहीं) पर्वा करूं नकोस; आणि परमेश्वरावर भरंवसा राख आणि परमेश्वर कर्ताहर्ता बस होय. ४८. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुम्हीं मुसलमानस्त्रियांशीं विवाह कराल व मग त्यांस स्पर्श करण्याच्यापूर्वीं त्यांना काडी मोडून देऊन टाकाल; तेव्हां 'इद्दती'(त बसविण्या)चा तुम्हांला त्यांच्यावर (कोणताहि) हक्क नाहीं कीं तुम्हीं (त्यांस) 'इद्दती'ची गणती पुरी करवूं लावावी. तर (अशा स्थितींत) त्यांना कांहीं देऊन सवरून त्यांस चांगुलपणानें निरोप देऊन

---

(१) हें परमेश्वराचें सेवकवात्सल्य आहे कीं, विश्वासूंस याहून मोठी कोणती खुशखबर व देणगी होऊं शकते? सलामी अशी ताजीम व स्वागत आहे कीं, बादशाह व अंमलदार लोकांस मिळते. तर भावार्थ हा कीं, विश्वासूंसहि असली ताजीम दिली जाईल व परमेश्वर त्यांना सलाम ह्मणजे शांति-शांति म्हणील आणि हीच त्यांची सलामी होईल.

(२) पैगंबरसाहेबांना साक्ष देणारा ह्मटलें आहे. त्याचे पुष्कळ प्रकार होऊं शकतात. एक हा कीं, ते परमेश्वराचें अस्तित्व व त्याचें ऐक्य व त्याचें परम सामर्थ्य वगैरे यांची साक्ष देणारे होत. दुसरा स्वर्ग, नरक व मृत्युनंतरच्या गोष्टी यांचे साक्षी होत व परमेश्वराच्या दाखविण्यानें जणूं प्रत्यक्ष पाहिलेला अहवाल सांगतात. तिसरा हा कीं, पुनरुत्थानांत आपल्या जनतेची साक्ष देतील कीं अमुक अमुकानें मानिलें व विश्वास ठेविला व सुकृत्य केलें. आणि अमुक अमुकानें आज्ञेचा भंग केला.

**टीका. ४९. हे पैगंबरा ! आम्हीं तुला तुझ्या स्त्रियांची मुभा केली**

(१) मागील पानावरील (५०–५१) या महावाक्यांचा भावार्थ हा होय कीं, तुम्हांस बायकांसंबंधानें अधिकार दिल्यानें तुमच्या बायका समजून घेतील कीं, इतर लोकांच्या स्त्रियांप्रमाणें पैगंबरसाहेबांवर आमचे कांहींहि हक्क नाहींत. यावरहि पैगंबरसाहेब जितकें जिच्याकडे लक्ष देतील ती त्यांची स्वतःची मेहरनजर होय; आमचा कांहीं दावा नाहीं. आणि दावा नाहीं तेव्हां गाऱ्हाणें कां होणार? परमेश्वरानें पैगंबरसाहेबांस हे अधिकार दिले, त्याचें कारण असें झालें कीं, पैगंबरसाहेबांच्या बायका गरीबी व उपासमार यांवर संतुष्ट न राहतां त्यांना त्रास देऊं लागल्या होत्या. व तसेंच परमेश्वर पैगंबरसाहेबांचा न्यायी स्वभाव जाणत होता. परजातीचे लोक पैगंबरसाहेबांच्या घरगुती प्रकरणासंबधानें फारच तोंडसुख घेतात. परंतु न्यायानें पाहूं गेलें असतां, आक्षेपात्मक अशी कोणतीहि गोष्ट नाहीं. त्यांच्या घरच्या बाबतींत आक्षेपाजोगी एखादी गोष्ट असती तर त्यांच्या पैगंबरीस व्यत्यय आला असता. तथापि या गृहप्रकरणांसहितहि तत्कालीन लोक पैगंबरांस फार उच्च प्रतीचे, पवित्राचरणी महात्मा मानीत होते. याच एका गोष्टींत पैगंबरसाहेबांच्या घरप्रकरणासंबंधानें हटवादीपणानें व विरोधानें ज्या शंका काढल्या जातात त्या साऱ्या शंकांचें उत्तर आहे. अरब लोकांचे अहवाल इतिहासावरून व तत्कालीन काव्य वगैरे वरून प्रगट होतात त्यापासून हेंच माहित होतें कीं, ते शिपाई बाण्याचे व लाज अब्रूचे लोक होते. जर पैगंबरसाहेबांचा घरंदाजपणा आक्षेपार्ह असता तर हजरत अबुबकर व हजर उमर या सारखे लज्जेकज्जेचे लोक आपल्या मुली पैगंबरांशीं लग्न लावून देऊन त्यांच्या हवालीं न करते. पैगंबर साहेबांचे बहुतेक संसारसंबध अशावेळीं सुरू झाले कीं, जेव्हां त्यांचें वय पन्नासाच्या वर गेलें होतें. त्यांचा प्रथम संबंध बीबी खतीजा नांवाच्या एका प्रौढ विधवा व पैगंबरांहून पंधरा वर्षांनीं मोठ्या अशा स्त्रीशीं झाला. त्यांच्या मरणानंतर बीबी सौदा कीं त्याहि वयाचे मानानें त्यांच्या पेक्षांहि झाल्या गेल्या होत्या, त्यांशीं संबंध झाला. या विवाहसंबंधावरून सिद्ध होतें कीं, यांच्या मुळांशीं कोणती गुप्त कारणें होतीं. कित्येकांचे तर पैगंबरांवर हक्क होते व त्यांचा उत्तमोत्तम मोबदला याशिवाय आणखी कोणताच होऊं शकत नव्हता कीं पैगंबरसाहेबांनीं त्यांना आपल्या विवाहित कराव्या. कित्येकांसंब-

आहे; (म्हणजे) ज्यांचीं स्त्रीधनें तूं देऊन टाकिलीं आहेत (त्यांची); व तुझ्या हातचा माल (म्हणजे दासी) ज्या परमेश्वरानें तुला (शत्रूंच्या लढाईंत लुटीपरीं) देवविल्या आहेत (त्यांची); आणि तुझ्या चुलत्याच्या मुलीं व तुझ्या आतेच्या मुलीं आणि तुझ्या मामाच्या मुलीं व तुझ्या मावशीच्या मुलीं कीं, ज्या तुजसंगतीं स्वदेश त्याग करून आल्या आहेत (त्यांची); आणि कोणतीहि मुसलमान स्त्री जर ती आपल्या जिवाला पैगंबरास अर्पण करून टाकील (म्हणजे स्त्रीधनावांचून विवाहबंधनांत येऊं इच्छील; व तेंहि) या अटीवर कीं पैगंबरहि तिला आपल्या विवाहांत आणूं इच्छील तर (तिची). (ही गोष्ट) खास तुझ्यासाठींच होय. (सामान्यतः) इतर मुसलमानांसाठीं नव्हे. आम्हीं (सामान्य) मुसलमानांच्याठायीं त्यांच्या बायकां व त्यांच्या हातचे माल (म्हणजे दासी) यांचा जो (स्त्रीधनाचा) हक्क ठरवून दिला आहे तो आम्हांस माहीत आहे; (आणि तो त्यांना द्यावा लागेल. व तुझ्याबरोबर ही खास सवलत) यासाठीं (केली गेली आहे) कीं (बायकांसंबंधीं) तुला (कोणाहि तऱ्हेची) अडचण राहूं नये. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय.५०. (मग दुसरी सवलत ही होय कीं,)तूं आपल्या स्त्रियांतून जिला

धानें मुरवत पुढें येत होती व कित्येकांविषयीं इस्लाम धर्मसंबंधीं गरजा; उदाहरणार्थ त्यांची मनधरणी आणि कित्येक स्त्रिया पैगंबरसाहेबांस वर बनविण्यांत प्रतिष्ठा व मोक्षाचें कारण समजत होत्या. तात्पर्य, पृथक पृथक एक एका उम्मुल् मोमिनीन म्हणजे विश्वासूत्री आई यांच्या स्थितीचें अवलोकन केलें जाईल आणि खुद्द पैगंबरसाहेबांचें वय, त्यांचे रात्रभर जागणें, सक्त उपासना, ईश्वरी संदेश पोहोंचविण्याचीं कामें आणि जिहाद वगैरे गोष्टीचें अवलोकन केलें जाईल तर तेव्हांच निरुपाय होऊन मानावें लागतें कीं, पैगंबरसाहेबांचे विवाह संबंध विषयसुखाचे वासनेमुळें नव्हते. ह्याप्रमाणें पैगंबरसाहेबांचें कुटुंब इतर कुटुंबासारखें नव्हतें व होऊंहि शकत नव्हतें. यावरहि पैगंबरांस इतर लोकांप्रमाणें परमेश्वरानें आपल्या बायकांशीं बरोबरीचें वर्तन करण्यास भाग पाडिलें नव्हतें; तरीदेखील पैगंबरसाहेबांनीं आपण होऊन आपलें हें कर्तव्य ठरविलें होतें व तें त्यांनीं आजन्म अशा खुषीनें निभाविलें कीं दुसरा कोणी तसें करूंहि शकत नाहीं.

इच्छिशील (व जितके दिवस इच्छिशील तितके दिवस तिला आपल्यापासून) अलग राखावेंस आणि जिला इच्छिशील (व जोंपर्यंत इच्छिशील तोंपर्यंत तिला) तूं आपल्याजवळ राखावेंस; आणि ज्यांना तूं (एका नियमित वेळेपर्यंत) अलग करून टाकिलें होतेंस त्यांजपैकीं कोणतीलाहि पुन्हां (आपल्यापाशीं) बोलावून घ्यावेंस. तर (यांतहि) तुजवर कांहीं पाप नाहीं. हा (अखत्यार तुला) यासाठीं (दिला गेला आहे) कीं, बहुतकरून तुझ्या बायकांचे डोळे गार राहतील व त्या खेद मानणार नाहींत; आणि जें (कांहींहि) तूं त्यांना देऊन टाकशील तें घेऊन (साऱ्याच्या) साऱ्या राजी राहतील. आणि जें कांहीं तुम्हां लोकांच्या मनांत आहे तें परमेश्वर जाणतो. आणि परमेश्वर ज्ञानी (व) दयार्द्र होय. ५१. (हे पैगंबरा ! या वेळेच्या)नंतर (दुसऱ्या) स्त्रियांची तुला मुभा नाहीं; आणि हेंहि (उचित) नाहीं कीं तूं त्यांना बदलून दुसऱ्या पत्न्या करून घ्याव्यास; मग (हवें तर) त्यांचें सौंदर्य तुला (कितीहि) मोहक (कां) वाटेना ! पण तुझ्या हातचा माल (म्हणजे दासी यांची हरकत नाहीं). आणि परमेश्वराची प्रत्येक वस्तुवर नजर होय. ५२. अहो मुसलमानांनों ! पैगंबराच्या घरांत शिरत जाऊं नका; पण हें कीं तुम्हांस भोजनाकरितां (येण्याची) परवानगी दिली जाईल (तर अशा स्थितींत असा वेळ पाहून जा) कीं तुम्हांस त्याच्या पात्राची वाट पाहावी लागणार नाहीं. परंतु जेव्हां तुम्हांस बोलाविलें जाईल तेव्हां (ऐन वेळेवर) आंत जा; आणि जेव्हां तुम्हीं खाऊन चुकाल तेव्हां आपापले चालते व्हा; आणि गोष्टींत मन लावीत बसूं नका. यानें पैगंबराला इजा पोहोंचत होती व तो तुमची शरम ठेवीत होता. आणि परमेश्वर खऱ्या (गोष्टीच्या बोलण्यां)त (कोणाचीहि कांहीं) भीड ठेवीत नाहीं. आणि जेव्हां पैगंबराच्या स्त्रियांपासून तुह्मांला एखादी वस्तु मागायाची असेल, तेव्हां पडद्याचे बाहेर (उभें राहून) त्यांजपाशीं मागा. ह्यानें तुमचीं मनें (त्यांच्याकडून) फार चोखीं राहतील; व (ह्याच तऱ्हेनें) त्यांचीं मनेंहि. आणि तुम्हांस (कोणाहि तऱ्हेनें) हें शोभत नाहीं कीं तुम्हीं परमेश्वराच्या पैगंबरास इजा द्यावी; आणि हेंहि (शोभत) नाहीं कीं, त्याच्यामागून कधींहि तुम्हीं त्याच्या स्त्रियांशीं विवाह करावा. परमे-

श्वरासमीप ही मोठी (गैर) गोष्ट होय. ५३. तुम्हीं एखादी वस्तु जाहीर कराल किंवा ती लपवाल तर परमेश्वर (ज्याला दोन्ही गोष्टी बरोबर होत तो) सर्व वस्तूंशीं वाकबगार होय. ५४. पैगंबराच्या स्त्रियांवर आपल्या बापां (च्या समोर जाण्यां) त कांहीं पाप नाहीं व तसेंच आपलीं मुलें व आपले भाऊ व आपल्या भावांचीं मुलें व आपले भाचे व आपल्या (तऱ्हेच्या) स्त्रिया आणि हातचे माल (म्हणजे दासी) यांच्या (समोर होण्यां)त (त्यांच्यावर कांहीं पाप) नाहीं. आणि (हे पैगंबराच्या पत्न्यांनों! परक्या लोकांसमोर होण्यांत) परमेश्वराला भीत असा. निःसंशय परमेश्वर सर्वसाक्षी होय. ५५. परमेश्वर व त्याचे दूत पैगंबरास धन्यवाद देतात; (तर) अहो मुसलमानांनों! तुम्हींहि पैगंबरास धन्यवाद द्या व सलाम (शांति) पाठवीत असा. ५६. जे लोक परमेश्वर व त्याचा पैगंबर यांस (कोणाहि तऱ्हेची) इजा देतात त्यांच्यावर इहलोक व परलोक या(दोहों)त परमेश्वराचा शाप होय; आणि परमेश्वरानें त्यांच्यासाठीं अपमानकारक शिक्षा तयार करून ठेविली आहे. ५७. आणि जे लोक मुसलमान पुरुष व मुसलमान स्त्रिया यांस त्यांनीं कांहीं कसूर केल्यावांचून (उगीच तोहमत लावून) इजा देतात, तर तें (खोटें) तुफान व धडधडीत पाप यांचें ओझें (आपल्या मानेवर) लादून घेतात. ५८. हे पैगंबरा! तूं आपल्या बायका व आपल्या मुली व मुसलमानांच्या स्त्रिया यांना सांगून दे कीं त्यांनीं आपल्या चादरीचे घुंगट काढून घ्यावेत. ह्यानें बहुतकरून ह्या (वेगळ्या) ओळखल्या जातील (कीं त्या संभावित आहेत) व (कोणी) त्यांना छळणार नाहीं. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू

(१) हजरत पैगंबरसाहेबांच्या वेळीं जशी आपल्याकडे खेड्यांपाड्यांची स्थिति आहे तशीच मदिनेची स्थिति होती. घरांत शौचकूप नव्हता. कुलीन स्त्रिया झुंजुरक्याची वेळ पाहून शौचासाठीं वस्तीबाहेर चालल्या जात होत्या; आणि नीच लोक कोणाला जातां येतांना पाहून छळत असत. त्यांना त्याबद्दल दोष दिला जाई; तेव्हां ते उत्तर देत कीं, आम्हीं दासी समजलें होतों. या प्रकारच्या छळणुकी बंद करण्यासाठीं सुरुवातींत हा हुकूम दिला गेला होता कीं कुलीन व अब्रूदार स्त्रियांनीं घुंगट काढून निघावें. मग तर इस्लामाच्या प्रगती-

होय. ५९ दांभिक लोक व ज्यांच्या अंतःकरणांत रोग आहे ते आणि जे लोक 'मदिनें'त (खोट्या) अफवा पसरतात हे जर (आपल्या कृत्या-पासून) पराङ्मुख न होतील तर (हे पैगंबरा !) आम्हीं तुलाच (एका ना एका दिवशीं) त्यांच्यावर उठवूं; मग (हे लोक) 'मदिनें'त तर तुझ्या शेजारीं राहूं शकणार नाहींत; पण (असेंच) अमळसें. ६०. (मग) त्यांची ही दशा होईल कीं (चोहोंकडून) धुतकारलेले; जेथें मिळाले तेथें पकडलें व मारून त्यांचे तुकडे तुकडे उडवून दिले. ६१. जे लोक पूर्वीं होऊन गेले आहेत त्यांच्यांतहि परमेश्वराचा (हाच)परिपाठ राहिला आहे. आणि (हे पैगंबरा !) तुला परमेश्वराच्या परिपाठांत कधींहि (कोणातऱ्हेचा) फेरबदल आढळणार नाहीं. ६२. (हे पैगंबरा !) लोक तुला (पुनरुत्थानाचे) घटकेविषयीं प्रश्न करतात. तूं (यांना) सांग कीं, तिचें ज्ञान तर केवळ परमेश्वरापाशींच होय. आणि (हे पैगंबरा !) तूं काय जाणोस; कदाचित् ती घटका जवळ येऊन लागली असेल ! ६३. निःसंशय परमेश्वरानें नास्तिकांस शापित केलें आहे आणि त्यांच्याकरितां धगधगीत अग्नि तयार करून ठेविला आहे. ६४. ते त्यांत सदासर्वदा राहतील; (आणि) ते (कोणाला आपला) पुरस्कर्ताच पावणार नाहींत व मदतगारहि नाहीं ६५. (हा तो दिवस होईल कीं) ज्यादिवशीं यांचीं तोंडें (नरकाच्या) अग्नींत उलटींपालटीं केलीं जातील (आणि ते खेदानें) म्हणतील कीं, अरेरे! आम्हीं (जगांत) परमेश्वराचा कह्या मानिला असता आणि (तसाच)आम्हीं पैगंबराचा कह्या मानिला असता(तर बरें होतें)! ६६.

---

बरोबर मदिनाहि मोठें शहर होऊन गेलें. लोकांनीं घरांतच शौचकूप बनविले; आणि स्त्रियांस शौचास वस्तीबाहेर जाण्याची जरूरी राहिली नाहीं. एरवींहि संभावितपणा काईम राखण्यासाठीं स्त्रियांस घुंगट काढणें उचित होय.

(२) खोट्या खोट्या अफवा पसरण्यासंबंधानें भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं, जेव्हां मुसलमानांचें एखादें लष्कर किंवा फौजेचा दस्ता जिहाद-धर्मयुद्धा-साठीं जाई, तेव्हां कांहीं लोक मदिनेंत वाईट अवई उठवीत कीं मुसलमानांचा पराजय झाला व ते पळाले व मारले गेले. अशा अवईमुळें योध्यांच्या इष्ट मित्रांत व नातलगांत विवंचना व चिंता उत्पन्न होई. हें वाक्य अशा अफवा पसरणाऱ्यांसंबंधानें प्रकट झालें आहे.

आणि ते (हेंहि) म्हणतील कीं, हे आमच्या पालनकर्त्या! आम्हीं आपल्या सरदारांचा व आपल्या बड्या लोकांचा कह्या मानिला आणि त्यांनींच आम्हांला मार्गाहून बहकविलेंहि. ६७. तर हे आमच्या पालनकर्त्या! त्यांना दुप्पट शिक्षा दे आणि त्यांना(मोठ्यांत) मोठा शाप दे. ६८. अहो मुसलमानांनों! ज्या लोकांनीं 'मूसा'ला (उगाच दोषारोप करून) इजा दिली त्या लोकांसारखे बनूं नका. तर परमेश्वरानें त्यांच्या तोहमतींतून 'मूसा'ला निर्दोषी ठरविलें. आणि परमेश्वराजवळ('मूसा' हा मोठा) अब्रूदार (पैगंबर) होता. ६९. अहो मुसलमानांनों! परमेश्वराला भीत राहा आणि गोष्टहि बोलाल तर(ती मार्गाची व) सरळ (खरी). ७०. (असें कराल) तर (परमेश्वर) तुम्हांला चांगल्या कामांची बुद्धि देईल व तुम्हांस तुमचे अपराधहि क्षमा करील. आणि ज्यानें परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा कह्या मानिला तर त्यानें मोठें साफल्य साधलें. ७१. आम्हीं जिम्मेदारी (जी माणसावर आहे ती)

(१) भाष्यकारांनीं या वाक्यासंबंधानें भिन्नभिन्न गोष्टी लिहिल्या आहेत. त्यांतल्या त्यांत ही कीं कारूनाला हजरत मूसाशीं फारच कट्टें वैर होतें. त्यानें हजरत मूसाला उगाच बदलाम करण्यासाठीं एका वेश्या स्त्रीस लांच देऊन प्रवृत्त केलें कीं, तिनें हजरत मूसावर बालंट घ्यावें; जेव्हां लोक गोळा झाले तेव्हां तिच्यावर हजरत मूसाचा निर्दोषपणा व पवित्राचरण यांची अशी हैबत बसली कीं, तिनें मूसाला दोषारोप करण्याचे ऐवजीं कारूनचें सारें हितगुज उघडकीस आणिलें. या गोष्टीकडे याठिकाणीं या हेतूनें इषारत केली गेली आहे कीं लोक बीबी जैनबच्या विवाहासंबंधानें हजरत पैगंबराविषयीं बोलले चालले असतील; म्हणून मुसलमानांस यापासून अटकाव केला गेला.

(२) या वाक्यांत फारच उत्कृष्ट उपमारूपानें माणसाचें त्याच्या मानवी कर्तव्यकर्माकडे लक्ष्य ओढलें गेलें आहे. सृष्टींत माणसाची एक खास परिस्थिति आहे कीं, त्याला बुद्धि दिली गेली आहे व त्याच्या स्वभावांत अनेक प्रवृत्त्या व प्रेरणा आहेत. तो जगांत एकटा आयुष्यक्रमण करूं शकत नाहीं. म्हणून निरुपायास्तव त्याला आपल्या मनुष्य जातींत राहावें लागतें; आणि तेहि त्याच्या सारखेच स्वभाव बाळगितात; म्हणून लोकांच्या उद्देशांत खामखा ओढाताण घडून येते. जितके विपुल मनुष्याचे संबंध आहेत तितक्याच बहुत

**आकशाच्या व पृथ्वीच्या व पर्वतांच्यापुढें ठेविली (व हें ओझें त्यांच्यावर लादूं पाहिलें); तेव्हां त्यांनीं ती उचलण्याचें नाकारिलें व तिजपासून भिऊन गेले. आणि माणसानें (जणूं मुद्दाम अविचारीपणानें) ती उचलून घेतली. यांत संशय नाहीं कीं,तो (आपल्याठायीं) फारच अनर्थकारी (होता आणि अनर्थकारी होण्यापलिकडे) फारच अज्ञानीहि होता. ७२. (आणि ती उचलली तर तिचा आवश्यक परिणामहि हा व्हावयाचाच होता) कीं दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया आणि मूर्तीपूजक पुरुष व मूर्तिपूजक स्त्रिया यांस परमेश्वर (त्यांच्या कृत्यांची) शिक्षा देईल आणि मुसलमान पुरुष व मुसलमान स्त्रिया यांजवर (आपली) मेहेर-नजर करील. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळु होय. ७३.**

---

त्यांच्या जिम्मेदाऱ्याहि आहेत.त्याच्यावर परमेश्वराचे, आईबापांचे, नातलगांचे, पोरांबाळांचे, पतिपत्नींचे, शेजारच्या लोकांचे, तत्कालीन अधिकाऱ्यांचे आणि व्यवहारी लोकांचे इतके हक्क आहेत. या सर्व हक्कांकडे नजर केल्यास, मनुष्य खचितच मोठ्या सांपळ्यांत सांपडलेला आहे असें दिसून येईल. त्याला बुद्धि दिली गेली आहे व तो मनांत समजतो कीं त्याला प्रत्येक हक्कदाराशीं कशी वागणूक ठेविली पाहिजे आणि त्याला बरें वाईट दोन्ही करण्याचें सामर्थ्य आहे. यामुळें म्हटलें जातें कीं माणसानें ही स्थिति आपल्या आपखुशीनें पत्करली आहे. मनुष्याशिवाय जेवढे प्राणी आहेत त्यांची परिस्थितिच दुसरी आहे. त्यांच्या स्वभावांत भिन्न भिन्न प्रवृत्त्या नाहींत आणि त्यांना अनियंत्रित इच्छाहि नाहींत. ह्यामुळेंच त्यांच्यावर कांहीं जिम्मेदारी नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां मनुष्यापेक्षां इतर सृष्टि फार मौज व आरामांत आहे.

# अध्याय ३४ वा.

## सूरतु-स्सबा.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. ह्यांत ५४ महावाक्यें आहेत. यांतील १५ वाक्यांत सबानगरीच्या लोकांचें वर्णन आलें आहे ह्मणून सबाचें प्रकरण हें नांव झालें.

परम दयाळु (आणि) कृपाळु परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों)

**(इहलोकींहि) सर्व स्तुति त्या परमेश्वरालाच (योग्य) होय कीं, जें कांहीं आकाशांत आहे आणि जें कांही पृथ्वींत आहे तें (सर्व) त्याचेंच होय; आणि परलोकींहि त्याचीच स्तुति होय. आणि तोच बुद्धिमान् (व) बहुश्रुत होय. १. जें कांहीं जामिनींत दाखल होतें (ह्मणजे बी) व जें**

---

(१) आम्हीं जमिनींत व आकाशांत दाखल होणाऱ्या व त्यांतून निघणाऱ्या वस्तु भाषांतरांत उदाहरणापरीं उघड करून सांगितल्या आहेत. नाहीं तर, अशा बहुत वस्तु आहेत कीं, ज्या जमीन व आकाशांत दाखल होतात व त्यांतून निघतात. जमिनींत दाखल होणाऱ्या वस्तु म्हटल्या ह्मणजे मेलेल्यांचीं प्रेतेंहि होत; व तशाच जमिनींत गाडल्या जातात त्या सर्व वस्तुहि. आणि जमिनींतून निघणाऱ्या वस्तु वनस्पति खेरीज खनिज पदार्थहि होत कीं, ते जमिनींतून खणून काढिले जातात. मेलेल्यांचीं प्रेतेंहि पुनरुत्थानाचे दिवशीं थडग्यांतून निघतील. पाणीहि जमिनींतून निघतें. आकाशांतून उतरणाऱ्या वस्तु पाण्याखेरीज दूतंहि होत कीं, ते जमिनीवर ईश्वराज्ञेनें येत जात असतात. आणि आकाशांत चढणाऱ्या वस्तु वाफेशिवाय दूत व लोकांच्या प्रार्थना व त्यांचीं सुकृत्येंहि होत. याशिवाय विचार केल्यास आणखी पुष्कळ उदाहरणें सांपडू शकतात.

कांहीं तींतून निघतें, (म्हणजे वनस्पति) आणि जें कांहीं आकाशांतून उतरतें (म्हणजे पाणी) व जें कांहीं त्यांत चढून जातें (म्हणजे वाफ) तें (सर्व कांहीं) तो जाणतो. आणि तोच परम दयाळु (व) क्षमाशील होय. २. आणि नास्तिक म्हणतात कीं, आम्हांवर तर (पुनरुत्थानाची) घटका येणार नाहीं. (हे पैगंबरा ! तूं या लोकांस) सांग कीं, हो होय ! मला आपल्या (त्याच) पालनकर्त्याची शपथ आहे कीं जो अदृष्टाचा ज्ञाता होय; (आणि) अणुभर (वस्तुहि) आकाशांत व पृथ्वींत त्याजपासून लपलेली नाहीं; आणि ह्या(अणु)पेक्षांहि लहान व(अणुपेक्षांहि)मोठी जितकी वस्तु म्हणून आहे ती सर्व (त्याच्या येथें) सुबोध पुस्तका(म्हणजे 'लोहेमहफूज')मध्यें (स्पष्ट लिहिलेली) आहे; (सारांश मला आपल्या पालनकर्त्याची शपथ आहे कीं, पुनरुत्थानाची) घटका तर अवश्य तुम्हांपुढें येईलच येईल; ३. कीं जेणेंकरून ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांना परमेश्वर (त्यांच्या कर्मांचा) मोबदला देईल. हेच ते लोक होत कीं, ज्यांच्याकरितां (परलोकीं पापांची) क्षमा आणि (स्वर्गांत) आदरमानाची अन्नसंपत्ति होय. ४. आणि जे लोक आमच्या निशाण्यां(च्या निष्फल करण्यां)त विरोधात्मक प्रयत्न करतात; हेच होत कीं, ज्यांना (पुनरुत्थानांत) दुःखप्रद यातनेची शिक्षा (होणें) आहे. ५. आणि (हे पैगंबरा !) ज्या लोकांस (दिव्य पुस्तकाचें) ज्ञान दिलें गेलें आहे (व जे न्यायी स्वभावाचेहि आहेत) ते तर या(कुराणा)ला जें तुझ्या पालनकर्त्याकडून तुला प्रकट झालें आहे,(असेंच)समजतात कीं हें सत्य होय. आणि तें परम समर्थ व स्तुत्य अशा (परमेश्वरा)चा मार्ग दाखवितें. ६. आणि जे लोक नास्तिक होत, ते (एकमेकांशीं तुमची हंशी उडविण्यासाठीं) म्हणतात कीं म्हणाल, तर आम्हीं तुम्हांस असा पुरुष दाखवूं कीं, जो तुम्हांस (या विलक्षण गोष्टीची) खबर देईल कीं तुम्हीं (मेल्यावर) जेव्हां सर्वतोपरीं रजःकण होऊन जाल, तेव्हां (एकदां) अवश्य तुम्हांस नव्या जन्मांत यावें लागेल. ७. न जाणो, या (गृहस्था)नें परमेश्वरावर खोटें (कुभांड) रचिलें आहे अगर त्याला कोणा प्रकारचें वेड आहे ! (पण त्यानें कुभांड रचिलें नाहीं व त्याला वेडहि नाहीं;) किंबहुना जे लोक परलोकाचा विश्वास ठेवित नाहींत ते (दुर्दैवाची) आपत्ति व पराकाष्ठेच्या

भ्रमांत (पडलेले) आहेत. ८. तर कां या लोकांनीं आकाश व पृथ्वी कीं जों (यांना) यांच्या पुढून व यांच्या मागून (म्हणजे चारहि बाजूनें घेरून) आहेत त्यांजकडे नजर केली नाहीं? कीं आम्हीं इच्छूं तर यांना जमिनींत गडप करून टाकूं अगर यांजवर आकाशाचे तुकडे करून पाडूं. हरेक सेवक जो (परमेश्वराकडे) वळतो त्याच्याकरितां तर ह्यांत (मोठा) धडा होय. ९. आणि आम्हीं 'दाऊद'ला आपल्याकडून (अनेक प्रकारचें) श्रेष्ठत्व दिलें होतें. (तात्पर्य आम्हीं पर्वतांस आज्ञा केली कीं) हे पर्वतांनों! ईशस्तवनांत 'दाऊद'चे बरोबर त्याचा प्रतिध्वनि करा; आणि (अशीच आज्ञा आम्हीं) पक्ष्यांसहि (केली). आणि (यांशिवाय) 'दाऊद'च्या करितां आम्हीं लोखंडहि नरम करून टाकिलें होतें; १०. (व सांगितलें होतें) कीं, तूं (याचीं चांगलीं पुरीं) पुरीं चिलखतें बनीव आणि कड्या जोडण्यांत (बरोबर) अंदाजा ठेव; आणि (हे 'दाऊद'च्या घराण्याच्या लोकांनों! या देणग्यांच्या उपकारांत) तुम्हीं सुकृत्य करा. जें कांहींहि तुम्हीं करीत आहां तें मीं पाहात आहें. ११. आणि (अशाच प्रकारें) वाऱ्याला 'सुलेमाना'च्या आधीन करून ठेविलें होतें कीं, त्याची सकाळची चाल एका महिन्याची (वाट) होती व (तशीच) त्याची संध्याकाळची चाल एका महिन्याची (वाट होती). आणि आम्हीं त्याच्यासाठीं तांब्या(ला वितळून त्या)चा (एक) झरा वाहवून सोडला होता. आणि जिन्न(वा दैत्य यांस 'सुलेमाना'च्या आज्ञाधीन केलें होतें व त्यांच्यां)तून असेहि होते कीं, जे आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेनें त्याच्या हाताखालीं (तऱ्हे तऱ्हेचीं) कामें करीत होते. आणि (आम्हीं हेंहि आज्ञापिलें होतें कीं) यांच्यांतून जो कोणी आमच्या हुकमापासून वांकडें पाऊल टाकील, तर आम्हीं त्याला (परलोकीं) नरकाग्नीच्या शिक्षेची गोडी चाखवूं. १२. (तर) 'सुलेमाना'ला जें कांहीं (बनविण्याची) इच्छा होई तें (हे दैत्य वा जिन्न) त्याच्यासाठीं बनवीत. म्हणजे ('यरूशलेम'च्या मशिदीच्या उंच उंच)

---

(१) हजरत दाऊद पैगंबर हे फारच ताल शुद्ध व प्रसन्न स्वराचे होते आणि ते अशा हृदयद्रावक व मोहक स्वरानें ईशस्मरण करीत होते कीं पर्वतांतूनहि त्याचा प्रतिध्वनि होई; आणि पक्ष्यांत तर अत्यानंदाचा संचार होऊन तेहि तसेच ध्वनि काढीत.

मेहेरपी व (ओतींव) मूर्ती व हौदासारख्या (मोठमोठ्याल्या) पराती आणि (मोठे भारी भारी) हांडे (कीं ते एकाच जागीं) अचल (राहतात). (आणि आम्हीं 'दाऊद'च्या वंशास आज्ञा केली कीं) हे 'दाऊद'च्या वंशांनों! (या देणग्यांबद्दल माझे) उपकार मानीत राहा. आणि माझ्या सेवकांत उपकार मानणारे (फारच) थोडे होतात. १३. मग जेव्हां आम्हीं 'सुलेमाना'वर मृत्यूचा हुकूम सोडला, तेव्हां दैत्यांस (कोणत्याहि वस्तूनें) त्याच्या मृत्यूचा पत्ता लागूं दिला नाहीं; पण वाळवीनें कीं ती 'सुलेमाना'च्या काठीला खात होती' म्हणजे जेव्हां (काठी जिच्या आधारानें 'सुलेमान' मरणानंतर उभा होता ती खिळखिळी होऊन गेली; आणि 'सुलेमान') खालीं पडला, तेव्हां दैत्यांनीं स्पष्टपणें जाणून घेतलें कीं जर (आम्हांला) अदृष्टाची जाणीव झाली असती तर (या) अपमानकारक आपत्तींत राहिलों नसतों. १४. 'सबा'(च्या लोकां) करितां

---

(१) असें दिसून येतें कीं ते लोक पैगंबर, देवदूत व प्राणी यांच्या कल्पित व अस्सल मूर्ती बनवित होते व त्यांच्या धर्मशास्त्रांत त्यावेळीं त्यांची मुभा होती; पण ते त्या मूर्तींची पूजा अर्चा करीत नव्हते एवढें मात्र खास. इस्लाम धर्मशास्त्रांत मूर्ती पूजेचा समूळ नायनाट व्हावा ह्मणून तसबिरी व मूर्ती बनविणें याची अगदींच मनाई केली गेली आहे.

(२) बैतुल-मकदिस म्हणजे यरूशलेम येथील मंदिर वा मशीद; याचें बांधकाम तर हजरत दाऊदनें सुरू केलें होतें. पण अतेंच कांहीं थोडेंसें काम व्हावयास आलें होतें कीं, त्यांनीं देह टाकला; आणि ही सेवा परमेश्वराकडून हजरत सुलेमान यांस सोंपविली गेली. त्यांनीं तें असें भव्य वैभवशाली बनविलें कीं, भूपृष्ठावर तसली इमारत कधीं बनली नव्हती व कधीं बनणारहि नाहीं. लक्षावधि कारागीर त्यांत काम करीत होते व त्यांत जिन्नात वा दैत्यहि होते. इमारतीच्या पूर्णतेंत अजून कांहीं उणीव बाकीच होती कीं, हजरत सुलेमान यांचा आयुष्यकाल पूर्ण होऊन गेला; आणि हेंहि माहीत होतें कीं, हजरत सुलेमानाच्या मरणापरत्वें त्या पवित्र भुवनाच्या बांधकामांत खळ पडेल. ह्मणून ईश्वरीसंकल्पानुसार सुलेमान पैगंबर काठीच्या आधारानें उभ्या उभ्या निजधामास गेले. बहुत काळा पावेतों जिन्नात समजून होते कीं, सुलेमान जिवंत उभे आहेत; म्हणून सर्व कामें सुरळीत होत गेलीं; येथपर्यंत कीं ज्या

खुद्द त्यांच्याच घरांत (ईश्वरसामर्थ्याची) अर्थात् एक (मोठी) निशाणी (उपलब्ध) होती; (भूप्रदेश काय होता कीं मघून जाणाऱ्या साठीं) उजव्या हातानें व डाव्या हातीनें दोन बागा होत्या. (आम्हीं या लोकांस हुकूम दिला कीं) आपल्या पालनकर्त्याचें (दिलेलें) अन्न खा व त्याचे आभार माना; (जयांत राहावयास असें) उत्कृष्ट शहर आणि (परलोकीं पापांचा) क्षमाकर्ता असा पालनकर्ता.१५ यावरहि त्यांनीं (आमच्या हुकुमास) जुमानलें नाहीं; तर आम्हींहि (बांध तोडून) त्यांच्यावर मोठ्या जोराचा जलप्रलय पाठवून दिला(व त्यानें अवघ्या प्रांताचा मारून फन्ना करून टाकिला). आणि (जलप्रलय आल्यानंतर) आम्हीं त्यांच्या दोन बागांच्या ऐवजीं दोन बागा तर दिल्या; (पण) अशा कीं त्यांचीं फळें कडवीं(बेचव) होतीं व त्यांत (कांहीं) सुरू होता व थोडीशी बोर (होती). १६. हा आम्हीं त्यांना त्यांच्या अनुपकारीपणाचा बदला दिला आणि आम्हीं केवळ अकृतज्ञांसच (असले) बदले देत असतों. १७. आणि आम्हीं 'सबा'च्या लोकांच्या दर्म्यान व ('सिरीया,' देशांतील) ज्या(वस्त्यां)स आम्हीं आशिर्वाद देऊन ठेविला होता, त्या वस्त्यांच्या दर्म्यान (आणखी पुष्कळ) गांवें (आबाद करून) ठेविलीं होतीं कीं तीं (जवळ जवळ) दिसून येत होतीं;

---

काठीच्या आधारानें ते उभे होते ती बाळवीनें खात खात कमजोर होऊन गेली व मोडली. तेव्हां सुलेमानाचें प्रेत धडदिशीं खालीं पडलें. तेव्हां जिन्न म्हणूं लागले कीं, ही जी हीनदीन अवस्था आह्मांला भोगावी लागली ती आम्हांला अदृष्टाचें ज्ञान असतें तर भोगावी न लागती.

(१) सबा हें अरब देशांत यमन प्रांतांतील एक शहर होतें, फारच पाणथळ; तेथील लोकांनीं बांध घालून पावसाचें पाणी तुंबवून ठेविलें होतें. आमच्याकडे तेलंगणा देशांतहि असाच प्रघात आहे कीं ते पावसाचें पाणी व्यर्थ जाऊं देत नाहींत व तें तुंबवून पाटानें शेतास पाणी देण्याच्या कामीं घेतात. तर सबावाल्यांनींहि ह्याच पद्धतीचा अंगिकार केला होता. मग त्यांचें दैव ओढवलें व ते परमेश्वराला विसरून गेले. तर कोणा कारणामुळें बांध तुटून साऱ्या जमिनींत पाणी गरकलें व जमीन निकामी होऊन गेली.

(२) म्हणजे तीं गांवें जवळ जवळ होतीं म्हणून बाहेरून स्पष्ट दिसून येत होतीं. या शिवाय जागजागीं जसे टप्पे बनलेले असतात तसेहि तेथें होते.

आणि आम्हीं त्या(गांवां)त (मुशाफरांच्या) चालण्याची एक हद्द आंखून ठेविली होती; कीं यांत बेधडक रात्रीं व दिवसा चाला (फिरा). १८. तर ते म्हणूं लागले कीं, हे आमच्या पालनकर्त्या! (अशा जवळ जवळच्या गांवांत चालण्यानें प्रवासाची मजा येत नाहीं तर) तूं आमच्या सफरींत दूर दूरचा पल्ला ठेव. एवंच, या लोकांनीं (उपकाराची किंमत न जाणून) आपणच आपल्यावर अनर्थ केला. मग (तर) आम्हींहि (त्यांना असें मिटविलें कीं) त्यांच्या कहाण्या बनवून सोडल्या व आम्हीं त्यांच्या दरोबस्त धज्ज्या उडवून टाकिल्या. दरेक सहनशील (व) कृतज्ञ(सेवका)साठीं ('सबा'च्या) ह्या(प्रकरणां)त (मोठमोठे) धडे होत. १९. आणि सैतानानें (जी) या (लोकां) संबंधानें आपली कल्पना (लढविली होती कीं हे माझा संग देतील) खचितच (त्यांनें ती आपली कल्पना) खरी करून दाखविली; कीं हे लोक त्याचेंच अनुकरण करूं लागले; पण विश्वासूंचा एक जनसमूह (कीं तो त्याच्या बहकाविण्यांत आला नाहीं).२०. आणि सैतानाचा त्यांच्यावर कांहीं जोरा तर नव्हताच; परंतु(आम्हीं त्याचें एक निमित्त बनवून ठेविलें होतें; आणि अस्सल) उद्देश हा होता कीं, जो कोणी परलोकाचा विश्वास ठेवितो त्यास आम्हीं जो कोणी त्याच्याकडून संशयांत आहे त्याजपासून (वेगळा) जाणून घ्यावें: आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता हरेक वस्तूचा सांभाळकर्ता होय. २१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं परमेश्वराशिवाय ज्या(देवदूतां)स तुम्हीं (एका तऱ्हेनें ईश्वरत्वांत पातीदार) समजतां त्यांस बोलावा (व चौकशी करा म्हणजे तुम्हांस माहीत होऊन जाईल)कीं ते आकाशांत तिळमात्रहि सत्ता बाळगीत नाहींत व जमिनींत नाहीं; आणि आकाश व पृथ्वी (च्या बनविण्यां) तहि त्यांची कांहीं पाती नाहीं व यांच्यांतून कोणी परमेश्वराचा मदतगारहि नाहीं. २२. आणि परमेश्वरापाशीं (यांच्यांतून कोणाचीच) शिफारसहि (कोणाच्याच) कामा येत नाहीं; परंतु ज्याच्या संबंधानें (परमेश्वर शिफारशीची) परवानगी देईल त्याच्या मात्र (कामा येईल). (या दुतांची अशी स्थिति आहे कीं, जेव्हां एखादा हुकूम परमेश्वराकडून प्रकट होतो तेव्हां ते हैबतीमुळें घाबरून जातात;) येथपर्यंत कीं जेव्हां दहशत त्यांच्या मनांतून निघून जाते तेव्हां ते (एकमेकांस)

पुसतात कीं तुमच्या पालनकर्त्यानें काय हुकूम दिला? (यावर ज्यांना जास्त सान्निध्य प्राप्त आहे) ते म्हणतात कीं (जो हुकूम) वाजवी (तोच दिला); आणि तो महिमाशाली (व सर्वांत) थोर होय. २३. (हे पैगंबरा! या लोकांस) विचार कीं बरें तुह्मांस आकाशांतून व जमिनींतून कोण अन्नसंपत्ति देतो? (हे तर त्याचें काय उत्तर देतील! तूंच यांना) सांग कीं परमेश्वर. आणि आम्हीं (असों) वा तुम्हीं (असा एक ना एक पक्ष तर) अवश्य सरळ मार्गावर आहे अथवा धडधडीत चुकींत आहे. २४. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं आम्हीं जीं पापें केलीं त्यांचीं तुम्हांपासून वाजपूस होणें नाहीं. व तुह्मीं जीं कर्मे केलीं त्यांची आम्हांपासून वाजपूस होणें नाहीं. २५. (आणि यांस हेंहि) सांगून दे कीं आमचा पालनकर्ता (पुनरुत्थानाचे दिवशीं) आम्हां (उभयपक्षां)स एकत्र गोळा करील व नंतर आम्हां(तुह्मां)त तो न्यायपुरःसर निवाडा करून टाकील. आणि तो फारच (योग्य) निवाडा कर्ता (व सर्वांच्यास्थितीशीं) वाकबगार होय.··२६. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं ज्यांना तुम्हीं (परमेश्वराचे) जोडीदार बनवून परमेश्वराशीं भिडवितां त्यांना (जरा एक नजर)मला तरी दाखवा.नाहीं, (कोणीच त्याचा जोडीदार नाहीं.)किंबहुना तोच (एक) सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् परमेश्वर होय. २७. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं तर तुला अखंड (जगाच्या) लोकांकडे (पैगंबर करून) पाठविलें आहे; कीं (त्यांना विश्वास धरण्यावर आमच्या प्रसन्नतेची) खुशखबर ऐकीव आणि (नास्तिकपणा करण्यावर आमच्या शिक्षेचें) भय सुचीव. परंतु बहुतेक लोक समजत नाहींत. २८. आणि

(१) मतलब हा आहे कीं आम्हीं तर तुह्मांस एक सयुक्तिक व सरळ गोष्ट समजावितों; व तुह्मांला त्याचा कांहीं जबाब देतां येत नाहीं. मग आतां तुह्मींच समजून घ्या कीं आमच्या व तुमच्या मध्यें कोणता पक्ष सरळ मार्गावर आहे आणि कोणता गैरमार्गी आहे? कारण दोन्हींहि सन्मार्गावर असूं शकत नाहींत. पुष्कळ माणसांची अशी रीत असते कीं निरुत्तरहि होतात व गोष्ट टाळून टाकतात. तर हा स्वभाव चांगला नव्हे. मनुष्याला जेव्हां एखादी गोष्ट पटली व तो निरुत्तर झाला तेव्हां त्यास निर्णायक निवाडा केला पाहिजे आणि टाळाटाळी करण्यानें तर कोणतीहि गोष्ट तडीस जात नाहीं.

(जे नास्तिक होत ते मुसलमानांस) म्हणतात कीं बरें, जर तुम्हीं खरे आहां तर हा (पुनरुत्थानाचा) वायदा केव्हां (पुरा) होईल ? २९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुम्हांशीं ज्या दिवसाचा वायदा आहे त्यापासून तुम्हीं एक घटका मागें राहूं शकणार नाहींत व पुढेंहि जाऊं शकणार नाहींत. ३०. आणि ('मक्के'चे) नास्तिक म्हणतात कीं आम्हीं तर या कुराणास कधींच मानणार नाहीं व त्याच्या पूर्वीच्या (पुस्तकां)सहि नाहीं. आणि (हे पैगंबरा!) जर तूं पाहशील (तर बरें होईल!) कीं जेव्हां (पुनरुत्थानाचे दिवशीं हे) जुलमी लोक आपल्या पालकर्त्याच्या हुजुरांत (जाब देण्यासाठीं) उभे केले जातील (व) एकाची गोष्ट एक रद्द करीत असेल, तेव्हां कमजोर (म्हणजे खालच्या प्रतीचे लोक) बड्या लोकांस म्हणतील कीं जर तुम्हीं नसता तर आम्हीं अवश्यच विश्वासू झालों असतों. ३१. (यावर) बडे लोक दुर्बलांस म्हणतील कीं जेव्हां तुम्हांपाशीं (परमेश्वराकडून) सद्बोध आला तेव्हां कां त्याच्या आल्यानंतर आम्हीं तुम्हांला(बळेंच) त्या(वर अमल करण्या)पासून प्रतिबंध केला? (असें तर झालेंच नाहीं;) किंबहुना तुम्हीं (खुद्द) गुन्हेगार होता. ३२. आणि दुर्बळ लोक बड्या लोकांस म्हणतील (कीं बळेंच तर नव्हे)पण (तुमच्या) रात्रंदिवसाच्या डावपेचांनीं (प्रतिबंध केला) कीं बरोबर तुम्हीं आम्हांला परमेश्वराला न मानण्यास व त्याचे जोडीदार ठरविण्यास सांगत राहिलां. आणि जेव्हां हे लोक शिक्षेस (आपल्या डोळ्यांनीं) पाहून घेतील तेव्हां ते पश्चात्ताप जाहीर करतील. आणि जे लोक (जगांत) नास्तिकपणा करीत राहिले त्यांच्या मानेंत आम्हीं मानखोडे घालून टाकूं. जसजशीं कर्में हे लोक करीत राहिले केवळ त्यांचाच तर मोबदला यांना मिळत आहे. ३३. आणि आम्हीं कोणाहि वस्तींत कोणी (पैगंबर ईश्वरीशिक्षेचें) भय सुचविणारा पाठविलाच नाहीं; कीं तेथिल सुखवस्तु लोकांनीं (निरुत्तर होऊन पैगंबरास) सांगितलें नसेल कीं जे(हुकूम)देऊन

(१) दिसण्यांत तर ते लोक पुनरुत्थानाची वेळ पुसत होते; आणि त्यांचा हेतु हा होता कीं, पुनरुत्थान होणारच नाहीं. म्हणून उत्तरांत परमेश्वरानें वेळ तर सांगितली नाहीं पण त्यांचा मूळ हेतु म्हणजे नकारणी याचें याप्रमाणें खंडण केलें कीं, वेळ तर सांगावयाचीच नाहीं पण पुनरुत्थान आपल्या वेळेवर अवश्य होईलच.

तुम्हांस पाठविलें गेलें आहे त्यांस आम्हीं तर मानीत नाहीं. ३४. आणि (अशाच तऱ्हेनें हे 'मक्के'चे नास्तिकहि मुसलमानांस) म्हणतात कीं, आम्हीं द्रव्यांत व संततींत (तुम्हांपेक्षां) जास्त आहों; आणि (परलोकीं-हि) आम्हांस शिक्षा भोगावी लागणार नाहीं. ३५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं, माझा पालनकर्ता ज्याची इच्छितो त्याची अन्न-संपत्ति वाढवितो व (ज्याला इच्छितो त्याला) काटकसरीनें देतो. परंतु बहुतेक लोक (अन्नसंपत्तीच्या वांटणीचें प्रयोजन) जाणित नाहींत. ३६. आणि (लोकानों!) तुमचीं द्रव्यें व तुमची संतति (आम्हांजवळ कांहीं) अशी (महती बाळगित) नाहीं कीं तीं तुम्हांस आमचें सान्निध्य प्राप्त करून देतील. परंतु ज्यांनीं विश्वास धरिला व सुकृत्यहि केलें, (परलोकीं) अशा लोकांसाठीं त्यांच्या कर्मांचा दुप्पट मोबदला होय; आणि ते (स्वर्गाच्या) सज्ज्यांत निश्चितपणें (बसलेले) असतील. ३७. आणि जे लोक विरोधभावानें आमच्या निशाण्यां (च्या निष्फळ करण्यां)त झटतात, ते शिक्षेंत राखिले जातील. ३८. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं माझा पालनकर्ता आपल्या सेवकांतून ज्याची इच्छितो त्याची अन्नसंपत्ति वाढवितो आणि (ज्याला इच्छितो) त्याला काटकसरीनें देतो. आणि तुम्हीं लोक कांहींहि (परमेश्वराच्या मार्गांत) खर्च कराल, त्याचा ऐवज तो देईल. आणि तो सर्व अन्नदात्यांत उत्तम (अन्नदाता) होय. ३९. आणि (लोकांनों ! तो दिवस दृष्टीपुढें ठेवा कीं) जेव्हां परमेश्वर सर्व लोकांस गोळा करील व (गोळा केल्या) नंतर दूतांस विचारील कीं हीं (मनुष्यें) कां तुमचीच पूजा अर्चा करीत होते (व तुम्हीं यास राजी होता? ४०. ते म्हणतील कीं (हे प्रभो !) तूं पवित्र आहेस; तूं आमचा पुर-स्कर्ता आहेस; हे नव्हेत. (हे लोक वस्तुतः आमची नव्हे) किंबहुना सैतानांची[1] उपासना करीत होते (कीं ते त्याच्या बहकविण्यांत येऊन गेले; व) यां-च्यांत बहुतेक त्याचेच मानणारे होते. ४१. तर (यावर परमेश्वर म्हणील कीं) आज तुमच्यांतून तर कोणी कोणास नफाहि पोहोंचविण्याची सत्ता बाळगीत नाहीं व नुकसान पोहोंचविण्याचीहि नाहीं. आणि आम्हीं शिर-

(१) येथें 'जिन्न' शब्द आहे. परंतु सैतानहि त्याच कोटींतलें होत म्हणून मी सैतान असें भाषांतर केलें आहे.

जोर लोकांस सांगूं कीं, नरकाग्नीची शिक्षा जिला तुम्हीं पाखंड म्हणत होतां तिची (आतां) गोडी चाखा. ४२. आणि जेव्हां या(नास्तिकां)स आमचीं स्पष्ट स्पष्ट महावाक्यें वाचून ऐकविलीं जातात, तेव्हां ते (एक-मेकांस) म्हणतात कीं हा (गृहस्थ जो पैगंबरीचा दावा करतो तो) केवळ (आमच्याच सारखा) पुरुष होय. त्याचा उद्देश हा होय कीं, ज्या(उपा-स्यां)ची तुमचे वाडवडील पूजा अर्चा करीत होते त्यांच्या(उपासने)पासून तुह्मांस अडवून राखावें. आणि ते (कुराणासंबंधानें) म्हणतात कीं, हें तर नुसतें थोतांड होय (व तेंहि त्यानें आपणच) रचिलेलें. आणि जे लोक नास्तिक होत त्यांच्यापाशीं जेव्हां सत्य गोष्ट आली, तेव्हां ते त्याविषयीं म्हणूं लागले कीं, ही तर केवळ धडधडीत जादूच होय! ४३. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं यांना (दिव्य) पुस्तकें दिलीं नाहींत कीं ते त्यांचें पठन (पाठन) करते व तुझ्यापूर्वीं यांजकडे कोणी भय सुचविणाराहि पाठविला नाहीं. (यावरहि त्यांनीं कुराण व पैगंबराची योग्यता जाणिली नाहीं). ४४. आणि यांच्यापूर्वींच्या लोकांनींहि (पैगंबरांना) पाखंडी म्हटलें होतें. आणि जें कांहीं आम्हीं त्या लोकांस देऊन ठेविलें होतें त्याच्या दहाव्या हिश्यासहि तर हे लोक (अजून) पोहों-चले नाहींत. सारांश, पूर्वींच्या लोकांनीं माझ्या पैगंबरांना पाखंडी म्हटलें (व त्यांचा दोषारोप मला नाखुष वाटला); तर (हे पैगंबरा ! तूं अवलोकिलें असशीलच कीं) माझी नाखुशी (त्यांच्या ठायीं) कशी (वाईट) झाली ? ४५. (हे पैगंबरा ! तूं या लोकांस) सांग कीं मी उपदेशापरी तुम्हांस फक्त एक गोष्ट सांगतों; कीं परमेश्वराप्रीत्यर्थ दोन दोन (मिळून) व एकटे एकटे उभे होऊन जा व मग विचार करा; (म्हणजे तुम्हांस माहीत होऊन जाईल) कीं तुमच्या सोबत्याला (म्हणजे मला) कोणाहि तऱ्हेचें कांहीं वेड नाहीं. किंबहुना तो तुम्हांला, एका कडक शिक्षेच्या (सादर होण्या)पुढें पुढेंच (तिचें) भय सुचवितो एवढेंच काय ते. ४६.

---

(१) ह्मणजे तुम्हीं मनोविकार, खोटे ग्रह व मत्सर सोडून जणुं परमेश्वरा-पुढें उभे आहां असें स्मरून शांत व विमलमनानें माझ्याविषयीं व माझ्या दाव्याविषयीं विचार करूं लागाल, तर तुह्मांस माझ्या सांगण्याची सत्यता पटेल. दोन दोन मिळून व एकटे एकटे उभे राहण्यास सांगण्याचें कारण हें कीं मोठ्या समुदायांत कीं जेथें मनोविकार व प्रतिकूल मत व गोंगाट वगैरे चालू असतात तेथें मनुष्यास एकांतांत जें विचारस्वातंत्र्य असतें तें राहत नाहीं.

(हे पैगंबरा! यालोकांस) सांग कीं मी तुम्हांपासून (ईश्वरीसंदेश पोहोंचविण्याबद्दल) कांहीं वेतन मागितलें असेल तर तें तुम्हांलाच (लखलाभ होवो). माझें वेतन तर केवळ परमेश्वरावरच होय. आणि तो सर्वसाक्षी होय. ४७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं माझा पालनकर्ता (असत्याच्या निर्मूलनार्थ) सत्य (बाण) चालवितो; (व तो) अदृष्टाच्या (सर्व) गोष्टी खूप जाणतो. ४८. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं खरा (धर्म) येऊन पोहोंचला. आणि खोट्या (धर्मा)नें तर आतांहि[१] कांहीं (लाभ) होत नाहीं व पुढेंहि होणार नाहीं. ४९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर मी बहकलों आहें तर माझें बहकणें माझ्याचपुढें येईल; आणि जर मी सन्मार्गावर आहें तर (हें), माझा पालनकर्ता मजला जें (कुराण) प्रकटितो त्याच्या प्रतापानें होय. निःसंशय, तो (प्रत्येकाची फिर्याद) ऐकता (व प्रत्येक फिर्यादीच्या) जवळ होय ५०. आणि (हे पैगंबरा!) जर (ती स्थिति) तुझ्या दृष्टीपुढें राहील तर (बरें होईल); कीं जेव्हां हे लोक (पुनरुत्थानांत) घाबरे घाबरे फिरतील व (कोणीकडेसच) पळून जाऊं शकणार नाहींत व जवळचे जवळूनच धरिले जातील. ५१. आणि ते (आपणच) बोलूं लागतील कीं (आतां) आम्हीं पैगंबराचा विश्वास धरिला आणि एवढ्या लांबच्या पल्ल्याहून (विश्वास) कसा त्यांच्या हातीं[२] येऊं शकतो? ५२. आणि (त्यांची परस्थिति ही होय कीं) पूर्वी त्यानीं (विश्वासण्याचें) नाकारिलें व पाहिल्या सवरल्यावांचून लांबच्यालांबूनच (अटकळीचे) बाण चालवीत राहिले ५३. आणि (आतां) यांच्या व हे ज्या आकांक्षा बाळगितात त्यांच्या दर्म्यान एक अडकण घातलें जाईल; कीं असेंच (वर्तन) यांचे जे सजातीय होते (व) यांच्यापूर्वी (नास्तिकपणा करून चुकले होते) त्यालोकांशींहि केलें गेलें होतें तेहि (यांच्याचसारखे) गोंधळून सोडणाऱ्या संशयांत (पडले) होते. ५४.

(१) अरबी वाक्प्रचारांत या वाक्याचा जो अर्थ होतो तोच आम्हीं भाषांतरांत पत्करला आहे.

(२) भावार्थ हा आहे कीं, यांना जगांत असतांना विश्वास धरला पाहिजे होता. आतां परलोकांत विश्वास कोठें ठेविला आहे कीं ते तो धरतील? म्हणजे जग हेंच कर्मक्षेत्र आहे व विश्वास हें कर्माचें बीज होय तर त्याचें क्षेत्रांतच पेरणें फलदायी होऊं शकतें.

# अध्याय ३५ वा.

## सूरतु–फातिर.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ४५ महावाक्यें आहेत. यांत पहिल्याच वाक्यांत आलेल्या 'फातिर' म्हणजे स्रष्टा वा उत्पादक वा विधाता या शब्दावरून सूरतु–फातिर म्हणजे जगदुत्पादकाचें प्रकरण असें नांव पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)

सर्व स्तुति परमेश्वरालाच (योग्य) होय कीं, त्यानें (केवळ अभावांतून) आकाश व पृथ्वी हीं निर्मून काढिलीं (व) त्यानेंच देवदूतांस (आपले) हलकारे बनविले कीं ज्यांचे दोन दोन व तीन तीन व चार चार पंख आहेत. तो (आपल्या सृष्टीच्या) उत्पत्तींत जी इच्छितो ती (वस्तु) जास्त करितो. निःसंशय परमेश्वर सर्वशक्तिमान् होय. १. परमेश्वर (आपलें) दया(-सत्र) लोकांसाठीं उघडील तर (त्याचा) कोणी बंद करणारा नाहीं; आणि तो बंद करून टाकील तर त्याच्या (बंद केल्या) नंतर कोणी त्याचा चालू करणारा नाहीं. आणि तो परम समर्थ (व) बुद्धिमान् होय. २. अहो लोकांनों! परमेश्वराचे उपकार जे तुम्हांवर आहेत, त्यांची आठवण करा. बरें, परमेश्वराशिवाय कोणी (आणखीहि) निर्माणकर्ता आहे कीं तो आकाश व पृथ्वींतून तुम्हांस अन्नसंपत्ति देईल? तर त्याच्यावांचून कोणीच उपास्य नाहीं. मग तुम्हीं लोक कोठें बहकले चालले जात आहां? ३. आणि (हे पैगंबरा!) जर (हे लोक) तुला पाखंडी म्हणतील, तर तुझ्या पूर्वींहि पैगंबरांना पाखंडी म्हटलें जाऊन

(१) हजरत पैगंबरसाहेबांचें सांत्वन करणें हा येथें उद्देश होय; कीं या लोकांचें तुम्हांस पाखंडी म्हणणें ही कांहीं नवीन गोष्ट नाहीं. तुमच्या पूर्वींच्या

चुकलें आहे. आणि (अखेर) सर्व गोष्टी परमेश्वराच्यांच हुजुरांत रुजू केल्या जातील. ४. अहो लोकांनों! परमेश्वराचें (पुनरुत्थानाचें) वचन सत्य होय. तर असें न व्हावें कीं इहलौकिक आयुष्य तुम्हांस धोक्यांत टाकून ठेवील आणि असें न व्हावें कीं फसव्या (सैतान), परमेश्वरासंबंधानें तुम्हांस बहकवून टाकील. (कीं आज्ञाभंग करा व क्षमेची उमेद बाळगा.) ५. कांहीं संशय नाहीं कीं सैतान तुमचा (कट्टा) वैरी होय; तर तुम्हींहि त्याला (आपला) वैरीच समजून असा. तो तर आपल्या समूहास (आपल्याकडे) केवळ यासाठीं बोलावितो कीं या लोकांनीं (शेवटीं) नरकवाश्यांत (जाऊन सामील) व्हावें. ६. जे लोक नास्तिक होत त्यांना सक्त शिक्षा होणें आहे. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्यासाठीं (पापांची) क्षमा आणि (पुण्य कर्मांचा) मोठा मोबदला होय. ७. तर कां ज्या(मनुष्या)ला त्याचें वाईट कर्म (सैतानाच्या बहकाविण्यानें) सुशोभित करून दाखविलें गेलें व तो (आपल्या मनोविकारामुळें) त्यास चांगलें समजतो, तो (मनुष्य कोठें सदाचरणी विश्वासूंच्या बरोबर होऊं शकतो)? गोष्ट ही होय कीं, परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला कुमार्गी लावितो व ज्याला इच्छितो त्याला सरळमार्ग दाखवितो. तर (हे पैगंबरा!) या लोकां(च्या स्थिती)बद्दल खेद करून करून (कोठें) तुझा जीव न जावो! (तूं सहन करून बैस. कारण,) जसजशीं कर्में हे लोक करीत आहेत परमेश्वर त्या(सर्वां)शीं वाकब होय. (व वेळेवर त्यांस समजून येईल.) ८. आणि परमेश्वरच असा (परम समर्थ) होय कीं जो वारा चालवितो व वारा ढगांस उभारतो. मग ढगांस आम्हीं अशा शहराकडे हांकून लावितों कीं, जें (पाण्याच्या अभावामुळें) मृत (म्हणजे पडीत पडलेलें) आहे. मग आम्हीं पावसाद्वारें जमिनीस तिच्या मृत झाल्या

---

लोकांनींहि पैगंबरांना पाखंडी म्हटलें व त्यांनीं सहन केलें. तुह्मींहि सहन करा. याशिवाय अखेरीस प्रकरण परमेश्वराच्या हातीं आहे; तो पाखंडी म्हणणाऱ्यांस पाहून घेईल.

(१) कर्म सुशोभित करून दाखविणें ह्मणजे तें अगदींच वाईट आहे; पण सैतान तें मनुष्याच्या विकृत नजरेंत चांगलें दर्शवितो व तें त्याला चांगलें दिसतें.

पश्चात सजीव (व टवटवीत) करून टाकितों. अशाच प्रकारें (लोकांचेंहि पुनरुत्थानांत जिवंत) उठणें होईल. ९. जो कोणी इजत अब्रूचा अभिलाषि असेल तर (त्याला पाहिजे कीं त्यानें परमेश्वराचें आज्ञापालन करावें; कारण,) इजत अब्रू सर्व परमेश्वराची (देणगी) होय. (चांगल्या) चांगल्या गोष्टी त्याच्याच (सेवे)पर्यंत पोहोंचतात आणि (तोच) चांगलें काम (करणारांचे दर्जे) वाढवितो. आणि (हे पैगंबरा!) जे लोक (तुझ्या छळणुकीसाठीं) वाईट वाईट युक्त्या लढवीत राहतात त्यांना सक्त शिक्षा होणें आहे. आणि त्यांचे (सर्व) डावपेंच तेच (अखेर) निष्फळ होऊन जातील. १०. आणि (लोकांनों!) परमेश्वरानेंच (प्रथम) तुम्हांस मातींतून निर्मिलें, व मग वीर्यबिंदूतून; व मग (स्त्रीपुरुष बनवून) तुम्हांस जोडपीं जोडपीं बनविलीं. आणि कोणीहि स्त्री गर्भधारण करीत नाहीं व (ती मूलहि) प्रसवत नाहीं परंतु (हें सर्व) परमेश्वराच्याच ज्ञानानें (व परवानगीनें होतें.) आणि कोणा दीर्घायुष्य दिलेल्या मनुष्यास दीर्घायुष्य दिलें जात नाहीं व त्याच्या वयांतून कांहीं कमी केलें जात नाहीं; परंतु (हें सर्व 'लौहे महफुज' या) पुस्तकांत नोंदलेलें होय. कांहीं संशय नाहीं कीं ही(सर्व) परमेश्वरापाशीं (एक) सोपीशी (गोष्ट) होय. ११. आणि (समुद्र) दोन (प्रकारचे असतात व ते दोन्हीं) समुद्र एकसारखे नसतात. एक (असा आहे कीं) त्याचें पाणी गोडें, रुचकर (व गिळण्यास) सुखावह होय आणि एक (असा आहे कीं त्याचें पाणी खारें कडवें होय. आणि (असें असतांहि) तुम्हीं (लोक) दोन्हीं (प्रकारच्या समुद्रां)तून (मासे शिकार करून त्यांचें) ताजें ताजें मांस खातां आणि जडजवाहीर (म्हणजे मोत्यें) काढतां कीं तीं तुम्हीं लेत असतां. आणि (हे वाचक–श्रोत्या!) तूं पाहतोस कीं गलबतें

(१) यांत इस्लामधर्माच्या वर्चस्वाचें शुभवर्तमान व ढळढळीत भविष्य वचन आहे.

(२) गोडा व खारा समुद्र यांच्या उपमेंत इस्लाम व नास्तिकपणा यांजकडे इषारत आहे. म्हणजे इस्लाम मनुष्यस्वभावास अनुकूल असून अंतःकरण त्यास कबूल करितें. आणि नास्तिकपणापासून मन कंटाळतें व पळतें. मग जी दोन्हीं समुद्राची एकच स्थिति सांगितली आहे त्यानें मात्र परमेश्वराचें परमसामर्थ्य व्यक्त करण्याचा हेतु होय.

समुद्रांत (पाण्याला, गोडें असो किंवा खारें) फाडत चाललीं जातात; अशासाठीं कीं तुम्हीं लोकांनीं परमेश्वराचें औदार्य (म्हणजे व्यापार वगैरे लाभ) शोधावें आणि हें कीं तुम्हीं (त्याचे) आभार मानावेत. १२. तो रात्री(च्या एका भागा)स दिवसांत दाखल करितो व दिवसा(च्या एका भागा)स रात्रींत दाखल करितो; आणि त्यानेंच सूर्य व चंद्र यांस (आपल्या) आज्ञांकित करून ठेविलें आहे; कीं प्रत्येक (ह्याचप्रमाणें आपल्या) नियमित काळांत मार्ग आक्रमीत राहतो. (लोकांनों!) हाच परमेश्वर तर तुमचा पालनकर्ता होय; त्याचेंच राज्य होय आणि त्याच्याशिवाय ज्या (उपास्यां)स तुम्हीं बोलवितां ते किंचितेंहि तर अधिकार बाळगीत नाहींत. १३. तुम्हीं त्यांना (कितीहि) बोलवा (प्रथम) तर ते तुमचें बोलाविणें ऐकणारच नाहींत; आणि (कदापि) ते ऐकतीलहि तर ते तुमची दाद घेऊं शकणार नाहींत. आणि (तुम्हीं जे त्यांना ईश्वराचे पातीदार बनवितां) तर पुनरुत्थानाचे दिवशीं (हेच) तुमच्या पातीदार बनविण्यास नाकबूल जातील. आणि (हे वाचक–श्रोत्या ! परमेश्वर जो प्रत्येक गोष्टिच्या वस्तुस्थितीशीं) वाकबगार(होय, या पातीदारांची असत्यता त्याच्या) सारखा तर कोणी तुला सांगावयाचाच नाहीं. १४. अहो लोकांनों! तुम्हीं (प्रतिक्षणीं) परमेश्वराची अपेक्षा बाळगणारे आहां; आणि परमेश्वर (जो होय तर) तोच निरपेक्ष (व) सुस्तुत्य होय. १५. तो इच्छील तर तुम्हां (सर्वां)स (पृथ्वीच्या पाठीवरून उचलून) घेऊन जाईल आणि नवीन सृष्टि आणून वसवील. १६. आणि ही (गोष्ट) परमेश्वराला

(१) यांत "कित्मीर" या शब्दाचा अर्थ खजुरीच्या आठळींतील जो पडदा बहुधा तिच्या गीरांत मिसळून एक जात होतो तो आणि कित्येक खजुरींत आठळीच्या खांचेंत तो दिसूनहि येतो. पण तो इतका बारीक व सूक्ष्म असतो कीं अरबी वाक्प्रचारांत तो भिकार व बिन किंमतीच्या वस्तूसंबंधानें बोलतात. म्हणूनच आम्हीं त्याचें 'किंचितहि' असें भाषांतर केलें आहे.

(२) ही अरबी भाषेची एक म्हण आहे; व ती जेथें, माझ्यापेक्षां उत्तम आणखी कोण काय जाणील कीं मी त्याचा वाकबगार आहे, असें बोलावयाचें असतें तेथें बोलली जाते. येथें या जागीं परमेश्वरानें ती आपल्या संबंधानें म्हटली आहे.

(कांहींच) दुष्कर नाहीं. १७. आणि (पुनरुत्थानाच्या दिवशीं) कोणीहि दुसऱ्या कोणा(च्या पापा)चें ओझें आपल्यावर घेणार नाहीं. आणि जर कोणावर (पापांचें मोठें) भारी ओझें असेल व तो आपल्या ओझ्याला हात लावण्यासाठीं (कोणालाहि) बोलावील तर त्याचें किंचितहि ओझें वाहून दिलें जाणार नाहीं. व (मग ज्याला त्यानें बोलाविलें आहे त्याचा) तो नातलगच (कां) असेना! (हे पैगंबरा!) तूं तर केवळ अशा लोकांसच भिववूं शकतोस कीं, जे पाहिल्याविना आपल्या पालनकर्त्यास भितात व नमाज पढतात. आणि जो कोणी सुधारतो तो आपल्याच(कल्याणा)साठीं सुधारतो. आणि (सरशेवटीं सर्वांस) परमेश्वराकडेच परतून जाणें आहे. १८. आणि आंधळा व डोळस हे बरोबर (होऊं शकत) नाहींत; १९. आणि अंधःकार व प्रकाशहि नाहींत.२०. आणि सावली व उन्हहि नाहींत. २१. आणि जिवंत व मेलेले बरोबर होऊं शकत नाहींत. आणि परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला गोष्ट ऐकण्या (मानण्या)ची सुबुद्धि देतो. आणि (हे पैगंबरा!) जे लोक थडग्यांत (गाडलेले) आहेत त्यांना तूं (आपल्या गोष्टी) ऐकवूं शकत नाहींस;(व या नास्तिकांसहि मेलेलेच समज) २२. तूं तर (ईश्वरीशिक्षेकडून) भय सुचविणारा आहेस एवढेंच काय तें. (लोकांस अखत्यार आहे कीं ते ऐकोत अगर न ऐकोत). २३. वस्तुतः आम्हींच तुला (ईश्वरप्रसन्नतेची) खुशखबर ऐकविणारा व (ईश्वरीशिक्षेचें) भय सुचविणारा (बनवून) पाठविलें आहे. आणि कोणतीच जनता अशी (झाली) नाहीं कीं तींत कोणी भय सुचविणारा होऊन गेला नसेल. २४. आणि (हे नास्तिक) तुला पाखंडी म्हणतील तर जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत तेहि (आपल्यापैकीं आपल्या पैगंबरांस) पाखंडी म्हणून चुकले आहेत. त्यांचे पैगंबर त्यांच्यापाशीं चमत्कार व पोथ्या व अशीं पुस्तकें घेऊन आले कीं त्यांत (सन्मार्ग-) प्रकाश होता. (असें असूनहि ते पाखंडीच म्हणीत राहिले). २५. मग तर मीहि नास्तिकांस पकडलें तर (हे पैगंबरा! तूं पाहून घेतलेंच असेल कीं) माझी नाखूशी (त्यांच्याठायीं) कशी (वाईट) झाली? २६. (हे वाचक-श्रोत्या!) कां तूं या

(३) या सर्व उपमा मुसलमान व नास्तिक आणि इस्लाम व नास्तिकपणा यांच्या संबंधानें आहेत.

गोष्टीचे अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वरानेंच आकशांतून पाणी पाडिलें; मग त्या(पाण्या)च्या द्वारें आम्हीं भिन्न भिन्न रंगांचीं फळें काढिलीं; आणि (अशाच रीतीनें) पर्वतांत भिन्न भिन्न रंगांचे कांहीं प्रदेश होत. (कित्येक) पांढरे व (कित्येक) लाल; आणि (कित्येक) काळे ठिक्कर २७. आणि अशाच रीतीनें माणसें व जनावरें व चुतुष्पाद प्राणी यांचे रंगहि नानातऱ्हेचे होत. परमेश्वराला तर त्याच्या सेवकां-पैकीं जे (त्याच्या सामर्थ्यांचिन्हांचें) ज्ञान बाळगितात तेच काय ते भितात. निःसंशय परमेश्वर समर्थ (व) क्षमाशील होय. २८. जे लोक परमे-श्वराच्या पुस्तकांचें पठन करितात व नमाज पढतात आणि जें कांहीं आम्हीं त्यांस देऊन ठेविलें आहे त्यांतून गुप्तपणें व उघडपणें (परमार्थांत) खर्च करतात, निःसंशय ते अशा व्यापाराची आशा बाळगून बसले आहेत कीं ज्यांत कधीं तोटाच येऊं शकत नाहीं. २९. कारण कीं, परमेश्वर त्यांना त्यांचे मोबदले पुरे पुरे भरून देईल आणि आपल्या कृपेनें त्यांना जास्तहि देईल. (कारण,) तो (फारच) क्षमाकर्ता (व मोठा) गुणग्राहक होय. ३०. आणि (हे पैगंबरा! हें) पुस्तक जें आम्हीं प्रकटीकरणाद्वारें तुला पाठविलें आहे तें (बिलकुल) सत्य होय (आणि) जीं (पुस्तकें) याच्या पूर्वींचीं होत त्यांची (हें) सत्य-ताहि पटवितें. निःसंशय परमेश्वर आपल्या सेवकां (च्या स्थिती) शीं माहितगार (असून त्यांचीं कर्में) पाहतो आहे. ३१. मग आम्हीं आपल्या सेवकांतून ज्यांना (ह्या पुस्तकाचे सेवेसाठीं) निवडून काढिलें त्या लोकांस (त्या) पुस्तकाचा वारसदार ठरविला, (म्हणजे मुसलमानांना). मग त्यांजपैकीं (कित्येक तर त्याप्रमाणें न चालल्यामुळें) आपल्या जिवावर जुलूम करीत आहेत व (कित्येक) त्यांतून मध्यम पंथानें चालतात. आणि (कित्येक) त्यांतून (असेहि आहेत कीं जे) परमेश्वराचे आज्ञेनें पुण्याच्या कामांत (इतराहूनहि) पुढेंच सरसावून जातात. हीच तर (परमेश्वराची) मोठी कृपा होय. ३२. (आणि त्याचा मोबदला आहे) नेहमीं राहण्याच्या (स्वर्गाच्या) बागा कीं हे लोक (राहण्यासाठीं) त्यांत दाखल होतील; (व) तेथें त्यांना सोन्याचीं कंकणें व मोत्यें लेवविलीं जातील; व तेथें त्याचा (नित्याचा) पोशाकहि रेशमी होईल. ३३.

आणि (हे लोक देणग्या पावून) म्हणतील कीं परमेश्वराची उपकारस्तुति होय कीं त्यानें (हरेक तऱ्हेचें दुःख व) क्लेश आम्हांपासून दूर केले. निःसंशय आमचा पालनकर्ता फार क्षमाशील (व असा) मोठा गुणग्राहक होय; ३४. कीं त्यानें आम्हांस आपल्या कृपेनें राहण्याच्या (अशा) घरांत आणून उतरलें कीं येथें आम्हांला (कोणा तऱ्हेचे) श्रम पोंहचत नाहींत व येथें आम्हांस (कोणातऱ्हेचा) थकवा लागत नाहीं. ३५. आणि जे लोक नास्तिक होत त्यांच्यासाठीं नरकाग्नि (तयार) आहे; त्यांना मृत्यु येत नाहीं कीं ते मरून जातील आणि नरकाची शिक्षाहि त्यांच्यावरून हलकी केली जात नाहीं. आम्हीं प्रत्येक कृतघ्नास अशाच प्रकारें सजा देत असतों. ३६. आणि हे लोक नरकांत (पडल्या पडल्या) हाहाकार करतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! आम्हांला (येथून) काढून (पुन्हां जगांत) घेऊन चल; कीं आम्हीं जशीं कर्में आचरीत होतों तशीं नव्हेत; (किंबहुना) चांगलें कर्म करूं. (आम्हीं त्यांस उत्तर देऊं कीं) कां आम्हीं तुम्हांस इतकीं वर्यें दिलीं नव्हतीं कीं ज्याला विचार करावयाचा होता, तो इतक्या वयांत (खूप चांगल्या प्रकारें) विचार करून घेता? आणि (या शिवाय) तुम्हांपाशीं (आमच्या शिक्षेचें) भय सुचविणारा (पैगंबरहि) येऊन गेला. तर आतां (आपल्या कृत्यांची) मजा चाखा. कांकीं आज्ञाभंजक लोकांचा (येथें) कोणी मदतगार नाहीं. ३७. निःसंशय परमेश्वर आकाशाच्या व पृथ्वीच्या गुप्त गोष्टींचा ज्ञाता होय; निःसंशय तो (लोकांच्या) अंतस्थ विचाराशीं सुद्धां माहीतगार होय. ३८. तोच असा (परम समर्थ) होय कीं ज्यानें तुम्हांलोकांस पृथ्वींत (पूर्वींच्या लोकांचे) प्रतिनिधि बनविले. मग (यावरहि) जो कोणी नास्तिकपणा करितो त्याचा नास्तिकपणा त्याच्याचपुढें येईल; आणि जे लोक नास्तिकपणा करतात त्यांच्या नास्तिकपणामुळें परमेश्वरासमीप (त्यांच्याकडून) नाराजीच वाढत चालली जाते आणि नास्तिकपणामुळें नास्तिकांचा तोटाच जास्त होत जातो. ३९. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तुम्हीं परमेश्वराला सोडून ज्यांस बोलावित असतां त्या तुमच्या सरकतदारां(च्या स्थिती)ची तुम्हांला (कांहींहि) खबर आहे? (जरा एक नजर) मलाहि तर दाखवा कीं त्यांनीं कोणती पृथ्वी

बनविली आहे अगर आकाशां(च्या रचनें)त त्यांची (कांहीं) पाती आहे? अगर आम्हीं या (सरकतदार मानणारा)स कोणी एखादें पुस्तक दिलें आहे कीं हे त्याचा आधार बाळगितात? (यांतून कोणतीहि गोष्ट नाहीं.) किंबहुना, हे जुलमी लोक एकमेकांस जे वायदे करतात, त्या केवळ (नसत्या) भूलथापा होत. ४०. निःसंशय परमेश्वर आकाशांस व (तसेंच) पृथ्वीस आवरून आहे कीं तीं (कोठें आपल्या जागेवरून) ढळून (न) जावींत. आणि जर तीं (कदापि) ढळूनहि जातील तर मग त्याच्याशिवाय कोणीच (असा) नाहीं कीं जो त्यांस आवरूं शकेल. निःसंशय परमेश्वर सहसा न रागावणारा (व सेवकांच्या पापांचा) क्षमाकर्ता असा होय. ४१. आणि (हे नास्तिक तर) परमेश्वराच्या मोठ्या मोठ्या गंभीर शपथा वाहत होते कीं जर यांच्यापाशीं (परमेश्वराकडून) कोणी भय सुचविणारा येईल तर (कोणतीहि जनता असो) ते अवश्य हरेक जनतेपेक्षां अधिक सन्मार्गोन्मुख होतील. मग जेव्हां भय सुचविणारा यांच्यापाशीं येऊन पोहोचला तेव्हां (त्याच्या येण्यानें) यांच्या तिरस्कारांत मात्र (उलटी) भरच पडली; ४२. कीं ते मुलखांत उद्धटपणा व वाईट (वाईट) डावपेंच करूं लागले आणि वाईट डावपेंच (उलट) ते करणाऱ्यांच्याच गळ्यांत येतात. तर असो नसो, (हे लोक) पूर्वींच्या लोकांशीं जें वर्तन होत आलें आहे त्याच वर्तनाची वाट पाहतात. तर (हे पैगंबरा!) तूं परमेश्वराच्या कायद्याला कधींच बदलतांना पावणार नाहींस आणि परमेश्वराच्या कायद्याला कधींच टळतांनाहि पाहणार नाहींस. ४३. कां (हे लोक) मुलखांत हिंडले फिरले नाहींत व त्यांनीं पाहिलें नाहीं कीं जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत त्यांचा कसा (वाईट) परिणाम झाला? आणि वास्तविक पाहतां बळांत (ते लोक) यांच्याहून अधिक

(१) वायदे म्हणजे आस्था किंवा आशा ज्या मूर्तीपूजक लोक, तारण, शिफारस सान्निध्य व इहलौकिक यशप्राप्ती यांसंबंधानें एकमेकांस लावून ठेवितात त्या. पण वास्तविक पाहतां, ह्या सैतानी वा असुरी फसगती व भूलथापा होत; कारण ज्यांस परमेश्वराचे सरकतदार वा पातीदार ठरविलें जातें त्यांना कोणत्याच गोष्टीची सत्ता किंवा अधिकार नाहीं.

**होते. आणि परमेश्वर (कांहीं असा झाला गेला) नाहीं कीं आकाश व पृथ्वींत त्याला कोणतीहि वस्तु हारवूं शकेल. निःसंशय तो (सर्वांच्या-स्थितीचा) ज्ञाता (व मोठा) सामर्थ्यवान् होय. ४४. आणि जर परमेश्वर लोकांस त्यांच्या दुष्कर्मांच्या शिक्षेंत धरता, तर पृथ्वीच्या पाठी[२]वर कोणाहि प्राण्यास (बाकी) न सोडता. परंतु तो एका नियमित काला (म्हणजे पुनरुत्थाना) पर्यंत लोकांस अवकाश देतो. मग जेव्हां त्याचा (तो) काल येऊन पोहोंचेल तेव्हां परमेश्वर आपल्या सेवकां(च्या स्थिती)स निरिक्षीत आहे.(जसें ज्याचें कर्म असेल तसा त्याला मोबदला देईल). ४५.**

---

(१) अरबच्या मूर्तीपूजकांपाशीं कोणी पैगंबर तर आला नव्हता. म्हणून ते इतर लोकांचे आज्ञाभंग ऐकून म्हणत असत कीं, आह्मांपाशीं पैगंबर येईल तर आह्मीं ह्या सर्वांहून अधिक त्याचें आज्ञापालन करूं.परंतु जेव्हां खरोखरींच त्यांच्यापाशीं शेवटचे म्हणजे कलीयुगाचे पैगंबर आले तेव्हां जें इतर जनतांनीं केलें होतें तेंच त्यांनींहि केलें; म्हणजे शिरजोरी केली व पैंगंबरसाहेबांच्या इजा देण्यांत होईल तितका प्रयत्न केला; कांहींच बाकी ठेविली नाहीं.

(२) पृथ्वीच्या पाठीवर ह्मणजे भूतळावर.

# अध्याय ३६ वा.

## सूरतु—यासीन.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ८३ महावाक्यें आहेत. 'या—सीन' या त्रोटक अक्षरांच्या अर्थाबद्दल विद्वानांत मतभेद आहे. पण एवढें मात्र खरें आहे कीं याचा गुढार्थ परमेश्वर व त्याचा पैगंबर यांसच ठाऊक होय. कै. मौलाना शाह अबदुल कादिर साहेब दिल्लीनिवासी यांनीं लिहिलें आहे कीं 'यासीन' हें हजरत मोहंमद पैगंबरसाहेबांचे नांवांपैकीं एक नांव होय. ह्मणूनच 'आले—यासीन' ह्मणजे यासीन अथवा मोहंमद पैगंबरांचा वंश असा अर्थ घेतला जातो. शिवाय हेच भाष्यकार ह्मणतात कीं मक्केचें नास्तिक जे हजरत पैगंबरसाहेबांस ह्मणत होते कीं तूं परमेश्वराचा पाठविलेला नाहींस, म्हणून त्यांस उत्तरादाखल परमेश्वरानें यासीन ह्मणजे हे सरदार, या किताबाद्वारें पैगंबरांला संबोधून सांगितलें आहे कीं तूंहि इतर पैगंबरांपैकींच एक पैगंबर आहेस. या अध्यायास या त्रोटक अक्षरांवरून हें नांव देण्यांत आलें आहे. याला कुराणाचें हृदय वा अंतःकरण असेंहि नांव पैगंबरांनीं दिलें आहे. याच्या पारायणानें प्राणोत्क्रमणाच्या वेळेची यातना शमते; म्हणून त्यावेळीं हा वाचून ऐकविण्याचा सुयोग असतो.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**य. स. (या-सीन.) १. कुराण ज्यांत (सर्वस्वीं) शहाणपणाच्या गोष्टी होत त्याची शपथ, २. कीं (हे 'मोहंमद'!) कांहींच संशय नाहीं कीं (इतर) पैगंबरांपैकींच तूंहि (पैगंबर) आहेस; ३. (आणि धर्माच्या) सरळ मार्गावर आहेस. ४. (हें कुराण) सामर्थ्यवान् (व) दयाळू (परमेश्वरा) नें प्रकटिलें आहे; ५. कीं तेणें करून तूं अशा लोकांस (ईश्वरी**

शिक्षेचें) भय सुचवावेंस कीं ज्यांच्या वाडवडिलांस (तुझ्या पूर्वीं कोणाहि पैगंबराचे मार्फत ईश्वरी शिक्षेचें) भय सुचविलें गेलें नव्हतें; व (म्हणूनच) ते (धर्माकडून) गाफिल होत. ६. यांच्यांतून बहुतेकांवर तर(परमेश्वराचें) वचन सिद्ध होऊन चुकलें आहे. तर हे (कोणाहि तऱ्हेनें) मानणार नाहींत. ७. आम्हीं यांच्या गळ्यांत मानखोडे घालून टाकले आहेत व ते हनवट्यापर्यंत (येऊन फसलेले) आहेत; म्हणून त्यांचीं डोकीं (अशीं) ताठून वर गेलीं आहेत (कीं त्यांना मार्गच दिसून येत नाहीं.) ८. आणि आम्हीं एक आडभिंत तर यांच्या पुढें बनविली व एक आडभिंत यांच्या मागें; व मग वरून त्यांना टाकलें ढांपून; तर हे पोहूंच शकत नाहींत. ९. आणि (हे पैगंबरा!) तूं यांना (ईश्वरीशिक्षेचें) भय सुचविलेंस काय अगर न सुचविलेंस काय, हें यांच्याकरितां सारखेंच होय. हे तर विश्वास धरणार नाहींत. १०. जो कोणी बोधाप्रमाणें चालेल व बिन पाहिल्या परम दयाळू (परमेश्वरा)ला भीईल त्यालाच काय तें तूं भिववूं शकतोस. तर त्याला (पापांची) क्षमा व (पुण्यकर्मांच्याऐवजीं) सन्मानाचा मोबदला यांची खुशखबर ऐकवून दे ११. निःसंशय आम्हीं मेलेल्यांस जिवंत करूं; आणि जीं (कर्में पुढची सामुग्री म्हणून लोक आपल्यापुढें) पुढें पाठवितात व त्यांचीं (जीं) चिन्हें (मरणोत्तर जगांत बाकी राहतात तीं सर्व) आम्हीं लिहीत आहों. आणि आम्हीं तर ऐकूणेक वस्तु सुबोध पुस्तकीं(म्हणजे 'लैहेमहफूज')मध्यें कलमबंद करून ठेविली आहे. १२.

(१) मक्केचे नास्तिक हे हजरत इस्माईल वा इस्माएल या पैगंबराचे वंश होते; त्यांच्याकडे हजरत इस्माईल यांच्यानंतर हजरत मोहंमद पैगंबरापर्यंत कोणीच पैगंबर आला नव्हता.

(२) भावार्थ हा कीं, हे लोक ईश्वराच्या ज्ञानांत शिक्षापात्र ठरून चुकले होते.

(३) सरळ मार्ग न सुचण्याचे दोन दृष्टांत दिले आहेत. एक तर गळ्यांत मानखोडे फसून राहिलेले व त्यामुळें डोकीं ताठून वर गेलेलीं; तर मार्ग काय धूळ, सुचणार! दुसरा, पुढें आडभिंत व मागें आडभिंत आणि वरून पाटून टाकलेलें छत; तर काय सुचणार? तात्पर्य नास्तिक शेखी व विनाकारणाचा हट्ट वगैरे विचारांत गढून गेलेले आहेत; तर त्यांना विश्वासाचा मार्ग कसा फांवणार.

(४) येथें 'इमाम' या शब्दाचा अर्थ पुढारी व राजमार्ग असा आहे. 'लैहे-

आणि (हे पैगंबरा!) या (लोकां)स उदाहरणापरीं एका गांव-वाल्यांचा अहवाल सांग कीं जेव्हां त्यांच्यापाशीं पैगंबर आलेः १३. असे कीं (प्रथम तर) आम्हीं त्यांजकडे दोन (पैगंबर) पाठविले, तेव्हां त्यांनीं या उभयतांस पाखंडी म्हटलें. यावर आम्हीं तिसऱ्या(पैगंबरा)द्वारें (त्यांची आणखी) मदत केली. तर या तिघांनीं (मिळून) त्यांस सांगितलें कीं आम्हीं तुम्हांकडे (परमेश्वराचे) पाठविलेले (आलों) आहों. १४ ते म्हणूं लागले कीं तुम्हीं तर केवळ आमच्याच सारखीं मनुष्यें आहां आणि परम दयाळू(परमेश्वरा)नें कोणतीच वस्तु (पुस्तक वगैरे या प्रकारची कधींच) पाठविली नाहीं. तुम्हीं तर निखालस खोटें बोलतां. १५. (पैगंबरांनीं) म्हटलें कीं आमचा पालनकर्ता जाणून आहे कीं आम्हीं निःसंशय (त्याचेच) पाठविलेले तुम्हांकडे आलों आहों. १६. आणि आमचें काम तर (ईश्वराज्ञेचें साफ) साफ पोहोंचतें करणें होय एवढेंच. १७. ते म्हणूं लागले कीं आम्हीं तर तुम्हांला (फारच) अपशकुनी पावलों (कीं तुमच्या येतांच आम्हीं दुष्काळ वगैरेंत पिडून गेलों). जर तुम्हीं (आपल्या उपदेशापासून) पराङ्मुख न व्हाल, तर आम्हीं तुम्हांला अवश्य धोंडमार करून टाकूं आणि अवश्यच तुम्हांस आम्हांकडून सक्त शिक्षा पोहोंचेल. १८. (पैगंबरांनीं) सांगितलें कीं (हें तर) तुमच्याच कामाचें दुर्लक्षण (होय कीं कोठेंहि रहा तें) तुमच्या सोबतच आहे. कां तुम्हांस बोध दिला गेला म्हणून (तुम्हीं आम्हांवर उलटी तोहमत ठेवूं लागलां)? किंबहुना तुम्हीं (खुद्द या प्रकारचे) लोक आहां कीं भक्ति (मर्यादीचे) उल्लंघन करितां. १९. आणि शहराच्या पलिकडच्या टोंकाहून एक पुरुष धांव मारीत आला (व येऊन)म्हणूं लागला कीं हे बांधवांनों! या पैगंबरांच्या कह्याप्रमाणें चाला. २० (अवश्यच) अशा लोकांच्या कह्याप्रमाणें चाला कीं जे तुम्हांपासून (कांहींच) वेतन मागित नाहींत आणि ते स्वतःहि सरळ मार्गावरच होत. २१.

---

महफूज' यास या दोन्हीं गोष्टी लागू पडतात. कारण सर्व मागील व पुढील गोष्टी त्याच्याच अनुरोधानें घडून आल्या व पुढेंहि येतील. जणुं सर्व गोष्टी ठळक रीतीनें नोंदलेल्या आहेत; शिवाय याचा अर्थ ईश्वरी ज्ञान असाहि होऊं शकतो.

# पवित्र कुराण

## भाग तेविसावा.

### सूरतु-यासीन (पुढें चालू)

**आणि मला काय (वेड) आहे कीं ज्यानें मला निर्माण केलें आहे त्याचीच**

---

(१) वरील १३ ते ३२ वाक्यांपर्यंत एका गांवाचें वर्णन आहे. त्या गांवाच्या नांवाचा कुराणांत कोठें स्पष्ट उल्लेख नाहीं. तसाच त्यांच्याकडे तीन पैगंबर कोणते पाठविले होते व जो गृहस्थ शहराच्या पलिकडल्या टोंकाहून धांव घेत आला व ज्याला धोंडमार करून लोकांनीं मारून टाकिलें होतें तो कोण होता त्याचाहि मजकूर कोठें नाहीं. परंतु हें कसेंहि असो, या गोष्टीच्या सगण्यांत जो उद्देश आहे तो उत्तम प्रकारें साधतो. गांवाचीं व मनुष्यांचीं नांवें निश्चित करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण एक तर ह्या प्राचीन काळच्या इतिहासापूर्वीच्या गोष्टी व त्याहि संक्षिप्तरूपानें; तत्कालीन इतिहास व धर्मशास्त्रें ह्यांतहि बरीच ढवळाढवळ झालेली असल्यामुळें तींहि दोष मुक्त अशीं नाहींत. म्हणून कांहींच निश्चित सांगतां येणें कठीण. परंतु भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं तें गांव अंटियाक (Antioch) वा अंताकिया होतें. त्यांत पैगंबर वा प्रेषित म्हटलें म्हणजे हजरत ईसा वा येशू यांचे शिष्य होते; आणि जो मनुष्य शहराच्या पलिकडल्या टोंकाहून धांव घेत आला होता तो हबीब नांवाचा जातीनें सुतार होता व तो कुष्टरोगीहि होता. ईसा पैगंबराच्या शिष्यांनीं त्याला आपल्या पराक्रमानें बरें केलें. तो त्या शिष्यांस कुमक व त्यांची साक्ष देऊं लागला; ह्मणून अंताकियाच्या लोकांनीं त्याला धोंडमार करून ठार केलें. तेव्हां त्या गांवावर प्रथम दुष्काळ आला व मग वीजा पडल्या व गांव नाश पावून गेलें; वगैरे गोष्टी भाष्यावरून विशद होतात. पण खरें ज्ञान परमेश्वरालाच होय. आम्हीं या जागीं भाषांतर वाचणारांस ही गोष्ट समजावूं इच्छितों कीं कुराणाला ऐतिहासिक दृष्टीनें पाहण्याची जरूर नाहीं. ह्यानें मूळहेतु न साधतां आपला भक्तिभावहि डगमगीत होतो. कारण कुराणाचा इतिहास जरी खरा

उपासना मी न करावी ? आणि वास्तविक पाहतां, तुम्हीं (सर्व मेल्या-नंतर) त्याच्याचकडे पालटून नेले जाल. २२. कां त्याच्याशिवाय इत-रांस मी उपास्य मानूं ? जर परमदयाळू (परमेश्वर) मला एखादें दुःख पोहोंचवूं इच्छील, तर यांची शिफारस माझ्या कांहींच कामा येणार नाहीं, व हे मला (त्या आपत्तींतून) सोडवूं शकणार नाहींत. २३ (जर) असें करीन तर (मग) मी धडधडीत चुकींत जाऊन पडलों. २४. मी तर तुमच्या पालनकर्त्यावर विश्वास ठेविला आहे. तर माझें (बोधवचन) ऐका (व परदास गांठ बांधा). २५. (तथापि लोकांवर याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. किंबहुना त्यांनीं त्यास धोंडमार केला व तो मरण पावला. तेव्हां परमेश्वराकडून त्याला) आदेश केला गेला कीं तूं स्वर्गांत जाऊन दाखल हो. (आणि तो अद्यापिहि जनतेच्या हितचिंत-नांत होता; म्हणून तो) असे उद्गार काढूं लागला कीं, अरेरे ! माझ्या लोकांस (ही हकीकत) माहीत होईल (व तेहि माझ्याप्रमाणेंच विश्वास धरतील व परमेश्वराला भितील, तर बरें होईल;) २६. कीं माझ्या पालनकर्त्यानें मला क्षमा केली व आदरमान केलेल्या लोकांत मला (नेऊन सामील) केलें. २७. आणि आम्हीं त्याच्या(मरणा)पश्चात त्याच्या लोकांवर आकाशांतून (देवदूतांची) एखादी फौज उतरली नाहीं (कीं ते लोकांला विश्वास धरण्यास भाग पाडते) आणि आम्हांस (फौज) उतरण्याची जरूरीहि नव्हती. २८. ती तर केवळ एक (भयंकर) गर्जना होती (कीं केली गेली) व ते (अग्निप्रमाणें) तेव्हांच विझून (थंडगार होऊन) गेले. २९. सेवकां(च्या स्थिती)वरहि (मोठाच) खेद होय ! यांच्यापाशीं कधीं कोणी असा पैगंबर आला नाहीं कीं, ज्याची त्यांनीं टर उडविली नसेल. ३०. कां या लोकांनीं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहीं कीं यांच्यापूर्वी आम्हीं कित्येक पिढ्यांचा नाश करून टाकिला; असा कीं (ज्यांच्या नाश केला) ते यांच्याकडे (पुन्हां) परतून येत नाहींत. ३१. पण जेवढे आहेत तेवढे सर्व आमच्या हुजुरांत हजर

---

आहे तरी बायबल वगैरे पुस्तकांशीं त्याची तुलना करावयाची तीं पुस्तकेंच मुळीं भ्रष्ट झालीं आहेत. म्हणून धर्मभाव राखणाऱ्या लोकांनीं याविषयीं अवश्य जपावें.

ठेविले गेले आहेत. ३२. आणि या(लोकां)च्या (समजण्या)साठीं (आमच्या सामर्थ्याची) एक निशाणी, मृत (म्हणजे पडित) जमीन होय; कीं आम्हीं तिला (पर्जन्यवृष्टि करून) सजीव केलें व तींतून धान्य उपजविलें कीं त्यांतूनच (हे लोकहि आपल्या वांट्याचें) खातात. ३३. आणि जमिनींत आम्हीं खजुरीच्या व द्राक्षांच्या बागा लाविल्या व त्यांत (पाण्याचे) झरे वाहविले. ३४. अशासाठीं कीं बागांच्या फळफळादींतून (ह्या लोकांनीं आपल्या वांट्याचें) खावें. आणि (हें माहित आहे कीं) हीं फळें यांच्या हातांनीं बनविलेलीं नाहींत. तर कां (हे लोक या देणगीची) उपकारस्तुति करीत नाहींत? ३५. परम पवित्र होय तो (परमेश्वर) कीं ज्यानें जें कांहीं जमीन रुजविते त्या(वनस्पतीं)च्या जातींतून व (खुद्द)यांच्या आपल्या (म्हणजे मनुष्य–)जातींतून आणि ज्यांस हे जाणत नाहींत अशा (सृष्टीच्या)कोटींतून हरेक तऱ्हेच्या वस्तु निर्माण केल्या आहेत. ३६. आणि यांच्या(समजण्या)साठीं (आमच्या सामर्थ्याची) एक निशाणी रात्र होय कीं, आम्हीं तींतून दिवसाला खेंचून काढून नेतों, मग तेव्हांच हे लोक अंधाऱ्यांत राहून जातात. ३७. आणि सूर्य (होय कीं तो) आपल्या एका ठिकाणाकडे चालला जात आहे. ही जबरदस्त व सर्व ज्ञानी अशा (परमेश्वरा)ची मांडणी होय. ३८. आणि चन्द्र (होय कीं) त्याच्या आम्हीं कला ठरविल्या आहेत; येथपर्यंत कीं तो (महिन्या अखेरीस घटतां घटतां) पुन्हां (असा वक्र व पातळसा) राहून जातो; जणूं कीं (खजुरीची) जुनी फांदीच. ३९. तर सूर्याची (ही) योग्यता नाहीं कीं तो चंद्रास जाऊन गांठील व रात्रहि दिवसाच्या पुढें येऊं शकत नाहीं. आणि (सूर्य काय व चंद्र काय)सर्व (आपापल्या) कक्षेंत पोहत (पडले) आहेत. ४०. आणि या(लोकां)च्या (समजण्या)साठीं (आमच्या सामर्थ्याची) एक निशाणी ही होय कीं आम्हीं या(माणसां)च्या संततीस भरलेल्या गलबतांत वाहवून नेतों. ४१. आणि गलबताच्या प्रकाराच्याच आम्हीं यांच्याकरितां आणखी वस्तु (होड्यावगैरेहि) पैदा केल्या आहेत कीं (हे समुद्रांत) त्यांजवर स्वार होतात. ४२. आणि आम्हीं इच्छूं तर यांस बुडवून टाकूं; मग कोणी यांची दाद घेणारा नसेल व हे (कोणा रीतीनें बुडण्याच्या आपत्तींतून) सोडविलेहि जाऊं शकणार

नाहींत. ४३. परंतु (ही) आमची मेहरबानी(होय);आणि एका (नियमित) काळापर्यंत (यांना इहलोकिक) फायदे (पोहोंचवावयाचे) आहेत. ४४. आणि जेव्हां यांना सांगितलें जातें कीं ज्या (आपत्ति तुम्हांस) तुमच्या पुढून व तुमच्या मागून (घेरून) आहेत त्यांपासून भीत राहा कीं कदाचित तुम्हांवर दया केली जाईल; (तेव्हां ते याची मुळींच पर्वा करीत नाहींत). ४५. आणि यांच्या पालनकर्त्यांच्या निशाण्यांतून कोणचीहि निशाणी यांच्यापाशीं येईल तर हे त्या कडून तोंड फिरविल्या वांचून राहत नाहींत. ४६ आणि जेव्हां त्यांना सांगितलें जातें कीं परमेश्वराने जी तुम्हांस अन्नसंपत्ति देऊन ठेविली आहे तींतून (कांहीं त्याच्यामार्गांत गोरगरीबांवरहि) खर्च करीत असा; तेव्हां नास्तिक लोक मुसलमानांस म्हणतात, आम्हीं कां अशा लोकांस खाऊं घालावें कीं ज्यांना परमेश्वर इच्छील तर (तुम्हां मुसलमानांच्या मतान्वयें) तो आपणच बहुत कांहीं खायास देऊं शकतो ? (आतां तुम्हीं जी परमेश्वराच्या मर्जीविरुद्ध यांची शिफारस करितां तर) मग तुम्हीं धडधडींत भ्रमांत (पडलां) आहां. ४७. आणि नास्तिक मुसलमानांशीं बोलतात कीं जर तुम्हीं खरे आहां तर हें (पुनरुत्थानाचें) वचन केव्हां (पुरें) होईल ? ४८ हे तर केवळ या गोष्टीचीच वाट पाहतात कीं हे लोक आपसांत (एकमेकांशीं एरवींच) भांडत झगडत असावेत आणि (करण्याच्या) एका भयंकर आवाजानें यांस (एकदम) येऊन गांठावें. ४९. मग हे मृत्युलेख (करून मालमत्तेची व्यवस्था) करूं शकणार नाहींत व आपल्या पोरांबाळांतहि परतून जाऊं शकणार नाहींत. ५०. आणि (मग दुसऱ्यांदा) करणा फुंकला जाईल, तेव्हां एकदम (सारेचे-

---

(१) माणसाच्या आयुष्यांत हजारों तऱ्हेच्या आपत्ति असतात व पुष्कळ प्रकारचे रोग खुद्द याच्याच शरिरांतून पैदा होतात; आणि याच्यावर बाहेरून बहुत तऱ्हेच्या विपत्ति येऊं शकतात. म्हणून माणसास पाहिजे आहे कीं, त्यानें सर्वकाळ परमेश्वराच्या कोपास भीत राहावें व त्याचाच आश्रय मागींत राहावें. दुसरा अर्थ हा होऊं शकतो कीं, "ज्या (शिक्षा किंवा दुःखें) तुमच्या पूर्वी (इतर लोकांवर येऊन चुकलीं) आहेत आणि जीं तुमच्या मागून (पुढें यावयाचीं) आहेत त्यांजपासून भीत राहा."

सारेच) थडग्यांतून (निघून निघून) आपल्या पालनकर्त्याकडेच चालूं लागतील. ५१. (आणि ते हैराण होऊन एकमेकांस) पुसतील कीं, अरेरे! आमचें दुर्भाग्य! (आह्मीं तर निजलेले पडलों होतों); आम्हांला कोणी आमच्या शय्येवरून (जागवून) उठविलें? (देवदूत उत्तर देतील कीं) हेंच तर तें (पुनरुत्थान) होय कीं ज्याचें अभिवचन परमदयाळु (परमेश्वरा)नें देऊन ठेविलें होतें व पैगंबर लोक खरें सांगत होते. ५२. (सारांश,) पुनरुत्थान म्हणजे केवळ (करण्याची) एक भयंकर आवाज होईल; तेव्हां एकदम सर्व लोक आमच्या हुजुरांत आणून हजर केले जातील. ५३. मग त्यादिवशीं कोणाहि मनुष्यावर किंचितहि जुलूम होणार नाहीं; आणि तुम्हीं लोक (जगांत) जें करीत राहिलां केवळ त्याचाच मोबदला तुम्हांस दिला जाईल. ५४. निःसंशय स्वर्गांतील लोक त्यादिवशीं मौजेनें (आपलें) मनोरंजन करीत असतील. ५५. ते व त्यांच्या पत्न्या छायेंत तक्तांवर तक्ये लावून (बसलेल्या) असतील. ५६. स्वर्गांत त्यांच्यासाठीं (नानातऱ्हेचे) मेवे (उपलब्ध) होतील; आणि ते जें कांहीं मागतील तें त्यांच्यासाठीं (हजर होईल). ५७. परम कृपाळू पालनकर्ता आपल्याकडून सलाम सांगून पाठवील. ५८. आणि (गुन्हेगारांस हुकूम केला जाईल कीं) हे गुन्हेगारांनों! आज, (या स्वर्गाच्या लोकांपासून) तुम्हीं अलग व्हा. ५९. हे 'आदम'चे पुत्रांनों! कां मी तुम्हांस ताकीद केली नव्हती कीं सैतानाची उपासना करूं नका? कांकीं, तो तुमचा बोलून-चालून शत्रु होय. ६०. आणि हें कीं माझीच उपासना करा; कीं हाच-(धर्माचा) सरळ मार्ग होय. ६१. आणि (असें असतांहि) त्यानें तुम-च्यांतून बहुतेक लोकांस बहकवून सोडलें, तर कां तुम्हीं अक्कल ठेवित नव्हता? ६२. (तर आतां) ज्याचा तुम्हांस वायदा केला जात होता तोच हा नरकाग्नि होय. ६३. तुम्हीं जो नास्तिकपणा (व इनकार) करीत होता त्याच्याऐवजीं आज यांत दाखल व्हा. ६४. आज आम्हीं यांच्या तोंडांवर मोहोर लावून टाकूं (व हे बोलूंच शकणार नाहींत) आणि जशीं कामें हे लोक करीत राहिले होते तीं यांचे हात आम्हांस सांगून देतील व यांचे पायहि साक्ष देतील. ६५. आणि

आम्हीं इच्छूं तर यांच्या डोळ्यांवर बोळा[1] फिरवून टाकूं (व) मग हे मार्गाकडे दौड घेतील; पण यांना कोठून पाहतां येईल? ६६. आणि आम्हीं इच्छूं तर (हे जेथें आहेत तेथेंच) आपल्या जागच्याजागीं यांना विद्रूप करून (उदाहरणार्थ दगड वा पांगळे करून) टाकूं. मग तर यांच्यानें (पुढेंहि) जाववणार नाहीं व मागेंहि परतवणार नाहीं. ६७. आणि आम्हीं ज्याला दीर्घायुष्य देतों, (शरीर)रचनेंत[2] त्याला आम्हीं उलट घटवित जातों. तर कां हे लोक (इतकेंहि) समजत नाहींत? ६८. आणि आम्हीं या ('मोहंमद' पैगंबरा)स काव्य शिकविलें नाहीं व काव्य याच्या योग्यहि नाहीं. हें (कुराण) तर निरा बोध होय; व (तें) वाचनेंार्ह[3] (व) सुबोध होय. ६९. (आणि याच्या प्रकटीकरणाचा उद्देश हा होय) कीं जे चैतन्यशुद्ध असतील त्यांना ह्यानें (ईश्वरी शिक्षेचें) भय सुचवावें आणि नास्तिकांवर (ईश्वरी) प्रमाण सिद्ध व्हावें. ७०. कां या लोकांनीं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहीं कीं आम्हीं यांच्याकरितां चतुष्पाद[4] जनावरें पैदा केलीं कीं तींही आमच्याच हातांनीं बनविलेलीं होत; आणि (आतां) हे त्यांचे मालक(बनून बसले) आहेत? ७१. आणि आम्हीं या(चतुष्पादां)स यांच्या वश करून ठेविलें आहे;तर त्यांच्यापैकीं(कित्येक) यांच्या स्वाऱ्या

(१) बोळा फिरवून टाकणें ह्मणजे पुसून पार नाहींसें करणें.

(२) शरीररचनेंत घटविणें म्हणजे हें कीं, मनुष्य म्हातारा होतो; तेव्हां त्याच्या सर्वच गोष्टींत कमी येत जाते. मज्जातंतूंत व शारीरिक शक्तींत वगैरे; तात्पर्य बाल्यावस्थेंत जो कमकुवतपणा होता त्याकडेच तो उलटून जातोसा दिसतो.

(३) वाचनार्ह ह्मणजे वाचावयास योग्य होण्याचा अर्थ हा कीं, मनुष्य जर समजून त्याचें पठन करीत राहील तर हें असंभाव्य आहे कीं, त्याच्या मनावर त्याचा कांहीं परिणाम होणार नाहीं. कुराणांत ही एक मोठी खुबी आहे कीं, वारंवार तें वाचल्यानें मन कंटाळत नाहीं आणि प्रत्येक वेळीं अशी गोडी लागते कीं, जणूं पहिल्याच वेळीं वाचतो आहे ह्मणून कुराणास वाचनार्ह म्हटलें.

(४) ह्मणजे इतर सृष्टीप्रमाणेंच आम्हीं चतुष्पाद जनावरांनाहि केवळ आपल्या परमसामर्थ्यानें निर्मिलें. यांत कोणाचाच कांहीं हात नाहीं.

होत आणि यांच्यांतून (कित्येकांस) हे खातात. ७२. आणि त्या (चतुष्पादां)त यांच्याकरितां (आणखीही बहुत) फायदे आहेत आणि (मुख्यत्वें करून) पिण्याचे पदार्थ (म्हणजे दूध). तर कां (हे लोक या देणग्यांचे) आभार मानीत नाहींत ? ७३. आणि लोकांनीं परमेश्वराशिवाय (दुसरे दुसरे) उपास्यहि या आशेनें बनवून ठेविले आहेत; कीं यांना (त्यांजपासून) मदत मिळेल. ७४ पण ते त्यांची मदत (तर कांहींच) करूं शकत नाहींत. किंबहुना ह्या (मूर्ति उलट) मूर्तिपूजकांचे (पक्षपाती म्हणजे बंडखोर यांचें) सैन्य ठरून (पुनरुत्थानाचे दिवशीं ज़ाब देण्यासाठीं पकडून) हजर केले जातील. ७५. तर (हे पैगंबरा !) या लोकांच्या गोष्टी तुझ्या खेदास कारणीभूत होऊं नयेत. कारण, (हे लोक) जें कांहीं लपवून करतात व जें कांहीं जगजाहिरपणें करतात तें (सर्व कांहीं) आम्हीं जाणतों (व जो जसें करील तसें भरील). ७६. कां माणसाला हें माहीत नाहीं कीं आम्हीं त्याला वीर्यबिंदूतून पैदा केलें ? असें असतांहि तो (आमचा) उघडउघड (विरोधी बनून) झगडूं लागला. ७७. आणि आमच्या संबंधानें तो दृष्टांत सांगूं लागला व आपली (मूळ) उत्पत्ति विसरून गेला. तो म्हणतो (काय) कीं कोण (असें सामर्थ्य बाळगीत) आहे कीं (माणसाचीं) हाडें गळून (खाक होऊन) गेलीं असतांना तो त्यांस जिवंत करून उभें करील ? ७८. (हे पैगंबरा ! तूं या उद्धटाला) सांग कीं ज्यानें हाडांस प्रथमतः निर्माण केलें होतें तोच यांस (पुन्हांहि) जिवंत करील आणि तो सर्व (तऱ्हेचें) निर्माण करणें जाणतो. ७९ तोच तर (परमसमर्थ) होय कीं तो (कित्येक) हिरव्या झाडां(च्या परस्पर घर्षणा)नें तुह्मां लोकांसाठीं अग्नि पैदा

(१) कुराणाचे शब्द तर हे आहेत कीं हिरव्या झाडांतून अग्नि पैदा करितो. तर याचे अनेक प्रकार आहेत. एक आह्मीं जो भाषांतरांत पत्करला आहे तो दुसरा, कित्येक झाडें ज्यांना आरबींत 'मर्ख' 'अफार' वगैरे म्हणतात तीं हिरवीं असतांनाच एकमेकांवर रगडल्यानें अग्नि प्रदिप्त होतो; आणि अशीहि कांहीं आहेत कीं तीं हिरवींच जळतात. त्यांत एका प्रकारचें तेल असतें. तिसरा प्रकार हा कीं सामान्यतः सर्व हिरवीं झाडें सुकल्यावर जाळलीं जातात. परमेश्वराचे सामर्थ्याचें तर प्रत्येक गोष्टींत आविष्करण होतें; पण मनुष्य त्याचें

करितो; मग तुम्हीं त्यांतून (आणखी अग्नि) पेटवून घेतां. ८०. ज्यानें आकाश व पृथ्वी हीं पैदा केलीं तो (परमेश्वर) कां या गोष्टीस समर्थ नाहीं कीं (पुनरुत्थानांत) यांच्या सारख्या (मनुष्यां)स (पुन्हां) पैदा करील? होय! (तो अवश्य समर्थ आहे). आणि तो तर मोठा निर्मिता (व) निपुण होय. ८१. त्याचें काम तर असें आहे कीं जेव्हां तो कोणाहि वस्तूचा संकल्प करितो तेव्हां तो तिला केवळ (एवढेंच) सांगतो कीं हो, व ती होऊन जाते. ८२. तर परम पवित्र होय तो कीं ज्याच्या हातांत प्रत्येक वस्तूचा पूर्ण अधिकार आहे आणि (मेल्या-नंतर) तुम्हीं (सर्व) त्याच्याचकडे पालटून नेले जाल. ८३.

सामर्थ्य नेहमीच्या प्रचाराच्या गोष्टींत शोधतो. प्रत्येक मनुष्य त्यातें गूढ ओळखूं शकत नाहीं. नाहींपेक्षां, सर्वांस परिचित आहेत त्या सर्व गोष्टींत गुप्त-भेद आहेतच.



# अध्याय ३७ वा.

# सूरतु-स्साफ्फात.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. ह्यांत १८२ आयात वा महावाक्यें आहेत. 'सूरतु-स्साफ्फात' म्हणजे जे देवदूत किंवा जीं मनुष्यें सत्यधर्माप्रीत्यर्थ व्यूहरचनेंत रांगारांगांनीं उभे राहतात व शत्रूंवर चाल करण्यास आपले घोडे पुढें पुढें ढकलतात ते किंवा त्यांचे आत्मे यांचें प्रकरण; या शब्दावरून हें नांव झालें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)**

**(धर्मयोद्ध्यांच्या त्या) सेनांची शपथ कीं (शत्रूंशीं लढण्यासाठीं) ज्या रांगारांगांनीं उभ्या राहतात; १. व मग (आपल्या घोड्यांस जोरानें) दपटतात (व शत्रूंवर हल्ला चढवितात); २. नंतर (लढाईतून मोकळे होऊन परमेश्वर-)स्मरण (ह्मणजे कुराणाचें पठन) करितात. ३. (तात्पर्य, आम्हांला यांची शपथ आहे कीं), निःसंशयेंकरून तुम्हां सर्वांचा उपास्य एकच परमेश्वर होय. ४. (म्हणजे) आकाश व पृथ्वी आणि ज्या (वस्तु) या दोहोंच्या दरम्यान होत त्या (सर्वां)चा पालनकर्ता आणि (तसाच) जेथून जेथून (सूर्य) निरनिराळ्या वेळीं उगवतो त्या स्थलांचा**

(१) यांत 'मशारिक' हें 'मशरिक' या शब्दाचें अनेकवचन आहे व त्याचा अर्थ सूर्याचीं उदयस्थानें असा होतो. यावरून असें ठरतें कीं, एकाच पृथ्वीवर अनेक उदयस्थानें आहेत; ह्मणजे पृथ्वीहि गोलाकार असून तिच्या सभोंवतीं सूर्य फिरतो व खुद्द पृथ्वीहि आपल्या व्यासावर फिरत असते, म्हणूनच जेथून जेथून सूर्य फिरतो त्या त्या रेषेवर आरंभीं सूर्योदय होतो व असे सूर्योदय प्रत्येक रेषेवर वेगवेगळाले होतात. याप्रमाणें कुराणाचें, सायंन्स म्हणजे शास्त्रीय विचारपद्धतीशींहि तादात्म्य होऊं शकतें. हें जें कोणी सांगतात कीं कुराणांत पृथ्वीस सपाट ह्मटलें आहे ती भाषांतराची चूक आहे.

पालनकर्ता होय. ५. आम्हींच या जवळच्या खालच्या आकाशास (एक) अलंकार म्हणजे नक्षत्रें यांनीं सुशोभित केलें. ६. आणि हरेक शिरजोर सैतानापासून सुरक्षित ठेविलें आहे. ७. कीं ते परात्पर लोकां(च्या म्हणजे दुतांच्या गोष्टी)कडे कानहि लावूं शकत नाहींत; आणि हरेकबाजूनें (त्यांच्यावर तारे) फेंकले जातात. ८. (व हें) परत हांकून लावण्या-साठीं होय व त्यांजकरितां (ही) आवश्यक कायमची शिक्षा होय.(सारांश सैतानांस दुतांच्या गोष्टी ऐकतां येत नाहींत.) ९. पण (असेंच कोठें) जो कोणी (एखादी गोष्ट) झपाटून उचलून नेतो; तर धगधगीत उल्क्याची ज्वाळा त्याच्या पाठीस लागलेलीच असते. १०. तर (हे पैगंबरा !) या (पुनरुत्थानास नाकारण्याऱ्यां)स पूस कीं यांचें निर्मिणें जास्त कठीण आहे किंवा ज्यांना आम्हीं निर्माण केलें त्या(उपरिनिर्दिष्ट वस्तूं)चें? या(मानावां)-स तर आम्हीं (याच साधारण) चिकण मातींतून पैदा केलें आहे. ११. (हे पैगंबरा !) गोष्ट ही होय कीं, तूं तर (यांच्या पुनरुत्थानाच्या नका-रणीचें ) आश्चर्य करितोस; आणि हे (तुझ्या गोष्टींवर) हंसतात ! १२. आणि जेव्हां यांना बोध केला जातो, तेव्हां ते (व्यर्थ दुराग्रह कर-तात व) बोध घेत नाहींत. १३. आणि जेव्हां हे एखादी निशाणी (म्हणजे चमत्कार) पाहतात तेव्हां (तर हे त्याची)हंशी उडवितात. १४. आणि ते म्हणतात कीं, ही तर निव्वळ धडधडीत जादू होय. १५. कां

(१) जे लोक मेल्यावर फिरून उठण्यास मानीत नाहींत त्यांना प्रमाण पटवून त्यांची चूक त्यांच्या पदरीं घालावयाची आहे. त्यांना मोठें आश्चर्य या गोष्टीचें होतें कीं, मनुष्य हा प्राणीजननशास्त्राच्या नियमानुसार पैदा होतो; मेल्यावर नियमाविरुद्ध त्याचें सजीव होणें अनुमानगम्य नाहीं. यावर परमे-श्वरानें उत्तर दिलें कीं, प्रथमारंभीं मनुष्य मातींतून बनविला गेला. त्याचप्रमाणें पुनरुत्थानांत पुन्हा मातींतून काढून उभा केला जाईल. जसें तें निर्मिणें सोपें होतें तसेंच हें निर्मिणेंहि सोपें आहे. आणि मुळांत आक्षेपाकडेच पाहूं जाल तर आकाश व पृथ्वी व देवदूत वगैरे वगैरे यांचें निर्माण करणें हें दिसण्यांत फारच मुष्किलीचें आहे. तथापि या वस्तु परमेश्वरानें केवळ अभावांतून पैदा केल्या आहेत. तर उद्यां पुनरुत्थानांत माणसाचें पुन्हां जिवंत करणें त्याच्या-साठीं अशी कोणती मोठी मोहीम आहे ?

(खरोखरींच) जेव्हां आम्हीं मरून जाऊं व माती व हाडें होऊन जाऊं तेव्हां कां आम्हीं (पुनरुत्थानांत पुन्हां) उठवून उभे केले जाऊं ? १६. आणि कां आमचे पूर्वींचे वाडवडीलहि ? १७. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं होय ! (अवश्यच उठवून उभे केले जाल;) आणि तुम्हीं (त्यावेळीं बिलकुल बलहीन व) क्षुल्लक व्हाल. १८. पुनरुत्थान तर केवळ एक ललकार होय; इकडे ललकार झाली व तिकडे (सारेचे) सारे (जिवंत होऊन) टकटका पाहूं लागले. १९. आणि (जे पुनरुत्थानास नाकारितात ते त्यावेळीं) बोलत सुटतील कीं अरेरे! आमचें दुर्भाग्य ! हा तर (तोच शेवटच्या) निर्णयाचा दिवस (दिसतो) आहे. २०. (आम्हीं त्यांस बजावूं कीं, होय !) हाच तो निर्णयाचा दिवस होय कीं ज्याला तुम्हीं पाखंड म्हणीत होतां. २१. (आणि आम्हीं दूतांस आज्ञा करूं कीं ) जे लोक (जगांत) आज्ञाभंग करीत राहिले आहेत त्यांस व [१]त्यांच्या सोबत्यांस आणि परमेश्वराशिवाय ज्या(उपास्यां)स ते पूजत आले आहेत त्यांस ( या सर्वांस) एकदम गोळा करा. २२. (आणि) मग त्यांना नरकाच्या मार्गाकडे घेऊन चला. २३. आणि (होय, जरा)यांना थांबवा; यांना (कांहीं) पुसावयाचें आहे; २४. कीं (आतां) तुम्हांला काय होऊन गेलें कीं एकमेकांस तुम्हीं मदत करीत नाहींत ? २५. (हे कांहींच उत्तर देणार नाहींत;) किंबहुना हे तर त्या दिवशीं मान खालीं घालून (उभे) असतील. २६. आणि एकाकडे एक वळून (व एकमेकांस संबोधून) ते पृच्छा करूं लागतील.२७. एक पक्ष (दुसऱ्या पक्षांस) म्हणील कीं तुम्हीं आम्हांपाशीं बळें बळेंच येत होता (व बहकवीत होता). २८. ते म्हणतील (कीं नाहीं) किंबहुना, तुह्मीं स्वतःच विश्वासणारे नव्हता. २९. आणि तुम्हांवर आमचा कांहीं जोरा तर नव्हताच. पण तुम्हींच (खुद्द)शिरजोर लोक होता. ३०. तर मग

(१) कुराणांत 'अज़वाज' हा शब्द आहे व त्याचा सकृद्दर्शनीं लक्षांत येणारा अर्थ पत्न्या वा बायका असा होतो. शिवाय सजातीय असाहि होतो. शिवाय या सजातीयामध्यें साथी व सोबती हेहि येतात. मतलब हा कीं, त्यांचे जे भागीदार किंवा सोबती मार्गभ्रष्ट झालेले होते त्या सर्वांस एकत्र गोळा केलें जाईल.

आमच्या पालनकर्त्यांचें (शिक्षेचें) वचन आमच्या (सर्वांच्या) ठायीं सिद्ध झालेंच; तर आम्हां(सर्वां)स (शिक्षेची) मजा चाखावी लागेल. ३१ आम्हीं (खुद्द) बहकलेले होतों; ह्मणून आम्हीं तुम्हांलाहि बहकवून टाकिलें. (पण बळेंच नव्हे). ३२. सारांश, त्या दिवशीं हे (सर्व लोक) शिक्षेत भागीदार होतील. ३३. गुन्हेगारांशीं आम्हीं असेंच (वर्तन) करीत असतों. ३४ हे असे (शिरजोर) होते कीं यांना जेव्हां सांगितलें जात होतें की परमेश्वरावाचून अन्य कोणी उपास्य नाहीं; तेव्हां हे गर्वानें फुगून बसत होते. ३५. आणि (हे पैगंबरा! तुझ्या वेळेचे नास्तिक) म्हणतात कीं बरें, (कोठें) आम्हीं आपल्या उपास्यांस एका खुळ्या कवीसाठीं सोडून देणार कां? ३६. (पण पैगंबर खुळाहि नाहीं व कविहि नाहीं), तर तो (परमेश्वराकडून) सत्य(धर्म) घेऊन आला आहे; आणि (पूर्वींच्या) पैगंबरांची सत्यताहि दर्शवितो. ३७. तुम्हीं (याला न मानाल तर) अवश्य दुःखकारक शिक्षेची गोडी चाखाल. ३८. आणि जसजशीं कर्में तुम्हीं करीत राहिलां आहां केवळ त्यांचाच मोबदला पावाल. ३९. परंतु परमेश्वराचे खास निःसीम सेवक; ४०. हे असे (सुदैवी) असतील कीं, त्यांचा रतीब बांधलेला असेल. ४१. (आणि रतीबाहि असले तसले नाहींत, तर) मेवे; आणि त्यांचें आदरातिथ्य केलें जाईल. ४२. (ते) ऐषआरामाच्या बागांत (ठेविले जातील). ४३. (आणि ते) तक्तांवर समोरासमोर (बसलेले) असतील. ४४. यांच्यांत स्वच्छ मद्याचा पेला (चौफेर) फिरविला जात असेल. ४५. (तें मद्य) पांढरें शुभ्र (असून) पिणारांस (फार) रुचि देईल. ४६. त्यांत बुद्धिविभ्रम होणार नाहीं व त्यानें निशाधुंद होऊन ते बडबडणारहि नाहींत. ४७. आणि यांच्यापाशीं खालीं नजर राखणाऱ्या मोठमोठ्या डोळ्यांच्या (अप्सरा) असतील. ४८. (त्यांच्या गोऱ्यागोऱ्या रंगांत हलका हलका पिंवळेपणा असा झळकत

(१) डोळे खालीं लावून असणें हाहि सौंदर्याचा एक अदा आहे; अगर हा अर्थ आहे कीं, लाजशरम यामुळें त्या नजर खालीं राखून असतील; अथवा पातिव्रत्यामुळें आपल्या भ्रताराशिवाय दुसऱ्या कोणाकडे नजर उचलून पाहणार नाहींत.

असेल) कीं जणूं त्या, (शहामृगाचीं) अंडीं होत कीं तीं (संभाळून) पडद्यांत ठेविलेलीं होत. ४९. मग हे (स्वर्गवासी) एकमेकांकडे वळून (व संबोधून) आपसांत प्रश्न करतील. ५०. यांच्यांतून एक बोलणारा बोलेल कीं (जगांत) माझा एक जिवाचा सोबती होता. ५१. (तो मला आश्चर्यानें) विचारीत होता कीं जे लोक(पुनरुत्थानास) खरें म्हणून मानतात, कां तूंहि त्यांजपैकींच आहेस? ५२. कां (खरोखरींच) जेव्हां आम्हीं मरून जाऊं आणि माती व हाडें होऊन जाऊं, तेव्हां कां (खचितच आह्मीं पुन्हां उठवून उभे केले जाऊं व) आम्हांला (आपल्या कर्मांचा) बदला मिळेल ? ५३. (मग तो आपल्या इतर सोबत्यांस) म्हणेल (कीं मी तर त्या सोबत्याला पाहूं इच्छितों) कां तुम्हींहि (त्याला खालीं) डोकावून पाहूं इच्छितां ? ५४. असें म्हणून तो (वरून नरकांत) डोकावील तों, तो (आपल्या) त्या(सोबत्या)स पाहील (कीं) नरकाच्या मधोमध (पडलेला आहे). ५५. (तो त्याला त्या स्थितींत पाहून) असें उद्गार काढील कीं परमेश्वराची शपथ ! तूं तर माझा जवळजवळ घातच केला होतास. ५६. आणि जर माझ्या पालनकर्त्यांची कृपा (मजवर) नसती तर (आज) मीहि (शिक्षेंत) पकडून हजर केलेल्या लोकांपैकींच असतों. ५७. कां आम्हीं (स्वर्गवाश्यांची ही स्थिति) नाहीं कीं पहिल्यांदा मरावयाचें होतें (तें मरून चुकलों); आतां पुढें आम्हांला मरावयाचें[2]

(१) अरब लोक ज्या गैरवर्णांत लावण्य असेल ह्मणजे पांढरेपणांत हलकासा पिवळेपणा असेल तो वर्ण पसंत करतात; आणि शहामृगांचीं अंडींहि अशींच असतात.

(२) या वाक्याचा एक अर्थ तर आह्मीं भाषांतरांत दिलाच आहे. दुसरा अर्थ हाहि होऊं शकतो कीं, ज्याप्रमाणें नरकवासी जगांत ह्मणत होते कीं, बस एकदांच मरणें आहे; याच्यानंतर पुनरुत्थान नाहीं व एकत्र गोळा होणें आणि शिक्षाहि नाहीं व पुण्यफळ वगैरे कांहींच नाहीं. आतां स्वर्गवासी हा आपल्या नरकांतल्या सोबत्याची चूक त्याच्या पदरांत घालील; कीं पाहा तर खरें, तुझें बोलणें खोटें ठरलें कीं नाहीं ? कारण मेल्यानंतर एकप्रकारचें अस्तित्व प्राप्त झालें आणि शिक्षा व यातनाहि होत आहेत. अशा स्थितींत ही गोष्ट, स्वर्ग-वासी हा नरकवासी याशीं जें बोलणें चालणें चालवित होता

नाहीं व शिक्षेंतहि पीडित राहणार नाहीं. ५८–५९. निःसंशय हें मोठेंच साफल्य होय! ६०. (आणि) पाहिजे आहे कीं असल्याच (साफल्यप्राप्ती)साठीं कर्में करणारांनीं कर्में करावींत. ६१. बरें, (परमेश्वराकडून सेवकांचा) हा पाहुणचार उत्तम आहे किंवा 'जक्कूम' –निवडिंगा–चें झाड? ६२. कीं आम्हीं त्यास (या) जुलमी लोकां(च्या विश्वासा)ची कसोटी ठरविली आहे. ६३. तें एक झाड होय कीं नरकाच्या बुडांतून उगवतें. ६४. त्या(च्या फळां)चे घोंस (असे विद्रूप होत) कीं जशा सापांच्या फण्या. ६५. तर हे (नरकवासी) त्यांतूनच खातील व त्यानेंच पोट भरतील. ६६. व मग त्याच्यावरून यांना उकळी आलेल्या पाण्याचें (पूं वगैरेशीं) मिश्रण (करून पिण्यास) दिलें जाईल. ६७. नंतर (हें सर्व कांहीं खाऊन पिऊन) यांना नरकाकडे परतणें होईल. ६८. (हे पैगंबरा!) हे (म्हणजे 'मक्के'चे नास्तिक) आपल्या बापजाद्यांस बहकलेले पावले. ६९. मग हे थेट त्यांच्याच पावलांवर लगबग चालले जात आहेत. ७०. आणि यांच्या पूर्वी अगोदरच्या लोकांतूनहि बहुतेक बहकून चुकले आहेत. ७१. आणि त्यांच्यांतहि आम्हीं भय सुचविणारे (पैगंबर) पाठविले होते. ७२. तर (हे पैगंबरा!) पाहा! जे (पूर्वींच) भिवविले जाऊन चुकले होते (व त्यांनीं

---

त्याचीच समाप्ति होय. परंतु पाहिजे तर याला दुसरी गोष्ट समजून तें स्वर्गवासी यांस अनुलक्षून बोललेलें समजा. कसेंहि असलें तरी अस्सल अर्थात फारसा फरक होत नाहीं.

(१) विश्वासाची कसोटी ठरविणें ह्मणजे हें कीं नरकांत झाडें होणें ऐकून मुसलमानांनीं तर विश्वास धरिला कीं ईश्वर सामर्थ्यानें आगींत झाडें होणें कांहीं आश्चर्य नव्हे; आणि ह्या पृथ्वींतहि पाहिलें जातें कीं फारच उष्णांत उष्ण देशांतहि झाडें होतात, व बर्फाच्या प्रदेशांतहि वृक्ष होतात. तर बर्फस्थानांत राहणाऱ्यांस उष्ण देशाच्या झाडांवर आश्चर्य करण्याचा काय हक्क आहे? अशाच रीतीनें जर नरकांतहि कोणा विशिष्ट प्रकारचीं झाडें असतील तर यांत आश्चर्याची गोष्ट कोणती? पण नास्तिक लोक नरकाग्नि व झाड यांचें नांव ऐकून ईश्वर सामर्थ्यास मानण्याची आनाकानी करीत होते; व ह्यांतच त्यांच्या विश्वासाची कसोटी किंवा परिक्षा होती.

मानिलें नव्हतें) त्या लोकांचा कसा (वाईट) परिणाम झाला? ७३. परंतु (त्यांतून जे) परमेश्वराचे निःसीम भक्त (होते ते शिक्षेंतून बचावले). ७४. आणि 'नूह'नेंहि आम्हांस (मदतीसाठीं) हाक मारिली होती; तर (आम्हीं त्याची दाद् ऐकून घेतली; आणि) आम्हीं (किती तरी) चांगले दाद् ऐकणारे आहोंत! ७५. आणि 'नूह' व त्याच्या कुटुंबास आम्हीं मोठ्या आपत्तींतून वांचविलें. ७६. व त्याच्या वंशाला असें (आशिर्वादित) केलें कीं तेच (पुनरुत्थानापर्यंत) बाकी राहतील. ७७. आणि (त्याच्या) मागून येणाऱ्या जनतेंत त्याचें हें सुस्मरण मागें सोडिलें; ७८. कीं अलम दुनियेंत (चोहोंकडून हेंच घोषणा आहे कीं) 'नूहा'वर सलाम–शांति–असो! ७९. परोपकार करणारांस आम्हीं असाच मोबदला देत असतों. ८०. कांहीं संशय नाहीं कीं, 'नूह' आमच्या विश्वासू सेवकांपैकीं होय. ८१. नंतर बरकडांस आम्हीं बुडवून टाकिलें. ८२. आणि 'नूह'च्या पद्धतीवर चालणाऱ्यांपैकीं एक 'इब्राहीम'हि होता; ८३. कीं जेव्हां तो निर्मल मनानें (वळून) आपल्या पालनकर्त्याकडे आला; ८४. (व) जेव्हां त्यानें आपल्या बापास व आपल्या लोकांस म्हटलें

(१) हजरत नूह पैगंबरांस त्यांच्या लोकांकडून मोठमोठ्या इजा पोहोंचल्या होत्या व ही परंपरा पुष्कळ कालावधीपर्यंत चालूच होती. शेवटीं परमेश्वरानें जलप्रयलास त्यांच्या तारणाचें साधन ठरविलें. परमेश्वरानें नूहला पहिल्यानेंच कळविलें होतें व त्याच्याच आज्ञेनें त्यांनीं गलबत तयार केलें होतें. त्यांनीं आपल्या कुटुंबाच्या लोकांस व ज्यांनीं विश्वास धरिला होता त्यांस गलबतांत बसवून घेतलें आणि हरेक तऱ्हेच्या प्राण्यांचा एक एक जोडाहि त्यावर राखून ठेविला. शेवटीं नेमलेल्या वेळीं जलप्रलय झाला. जेवढे म्हणून प्राणी गलबतांत होते ते तर बचावले. बाकी अवघें जग जलमय झालें व बुडालें. बुडत्यांत नूहचा पुत्रहि होता. तो बापापासून फिरून गेला होता. बापानें पितृ–प्रेमाचा उमाळा येऊन त्याला बोलाविलें; पण तो आला नाहीं. परमेश्वरानें नूहला असें अभिवचन दिलें होतें कीं, आम्हीं तुमच्या कुटुंबास तुफानांतून तारूं. या वचनाबरहुकूम नुहनें आपल्या पुत्रासाठीं प्रार्थना केली. परमेश्वरानें फर्माविलें कीं तुमच्या मुलाचा नास्तिकपणा व आज्ञाभंग यामुळें तो तुमच्या कुटुंबांतून बहिष्कृत होऊन गेला.

कीं ह्या (मूर्ती) काय वस्तु आहेत कीं ज्यांची तुम्हीं उपासना करितां? ८५. कां (खऱ्या) परमेश्वराला सोडून खोट्या नाट्या उपास्यांची तुम्हीं योजना करितां? ८६. तर तुम्हीं सकल जगांच्या पालनकर्त्या(परमेश्वरा)ला काय कल्पून ठेविलें आहे? ८७. मग (ज्याप्रमाणें ज्योतिषि प्रश्न पाहतो त्याचप्रमाणें 'इब्राहिमा'नें) नक्षत्रां(च्या गतीं)त एक नजर टाकली; ८८. व हें (निमित्त) सांगितलें कीं, मी अजारी (व्हावयाचा) आहें. ८९. तर ते लोक याला पाठीमागें सोडून चालते झाले. ९०. ते जातांच, 'इब्राहीम' हळूंच त्यांच्या उपास्य देवां (मूर्तीं)त जाऊन शिरला व (त्यांना विनोदानें) म्हणाला कीं (इतके नैवेद्य तुह्मांसमोर ठेविले आहेत) कां तुम्हीं (ते) खात नाहींत? ९१ तुमची स्थिति तरी काय आहे कीं तुम्हीं बोलत सुद्धांहि नाहीं? ९२. मग तर 'इब्राहीम' मोठ्या जोरानें त्यांच्यावर मारण्यास तुटून पडला (व तोडून फोडून त्यांचे तुकडे उडवून दिले.) ९३. (लोकांस बातमी कळली;) तेव्हां ते 'इब्राहिमा'पाशीं लवकर

---

(१) हजरत इब्राहीम पैगंबरांच्या जातीच्या लोकांत कोणी एक सण व्हावयाचा होता. त्यांनीं इब्राहिमाला आपल्याबरोबर नेऊं इच्छिलें. हे एक निमित्त सांगून त्यांच्या संगतीं गेले नाहींत; आणि संधि साधून देवालयांत जाऊन शिरले. बाकीचा मजकूर कुराणांत आलाच आहे. नक्षत्रांत नजर टाकण्यासंबंधानें भाष्यकारांनीं अनेक अर्थ लाविले आहेत. एक हा कीं, इब्राहीमाच्या जातीचे लोक ज्योतिष्यांस फारच मानीत होते. इब्राहीमानें त्यांचा विश्वास बसण्यासाठीं वरवरच्या मनानें नक्षत्राच्या गतीचें अवलोकन केलें ह्मणजे प्रश्न पाहिला. दुसरा अर्थ हा कीं, इब्राहिमास ताप येत होता, त्यांनीं तापाचा वेळ पाहण्यासाठीं नक्षत्रें पाहिलीं व त्यांचा मतलब हा होता कीं, ताप चढण्याची वेळ जवळ आली आहे. अशाच रीतीनें लोकांच्या त्यांना सोडून चालते होण्याचाहि एक अर्थ लावितात कीं, लोक इब्राहिमाला यासाठीं सोडून गेले होते कीं, त्यांचा आजार कोठें दुसऱ्यांस न लागावा. अगर त्यांस त्यांची कींव आली असेल कीं, आजाऱ्याला कां ह्मणून परिश्रम द्यावेत. कसेंहि झालें तरी ह्या गोष्टी आनुषंगिक आहेत. अस्सल मतलब तर या गोष्टीनें हें सिद्ध करावयाचे आहे कीं, इब्राहिमास मूर्तींचा सक्त तिटकारा होता.

(लवकर) धांव घेत आले. ९४. ('इब्राहिमा'नें) म्हटलें, कां तुम्हीं अशा (भिकार) वस्तूंची पूजाअर्चा करितां कीं ज्या तुम्हीं (आपणच) कोरून काढितां ? ९५. आणि वास्तविक पाहतां, तुम्हांला व ज्या वस्तु तुम्हीं बनवितां त्या(सर्वां)ला परमेश्वरानेंच पैदा केलें आहे. ९६. (हें ऐकून ते लोक आपसांत) म्हणूं लागले कीं 'इब्राहिमा'करितां (भट्टांच्या तऱ्हेची) एक इमारत बनवा (व तींत अग्नि पेटवा)आणि त्याला धगधगीत आगींत टाकून द्या. ९७ सारांश, लोकांनीं 'इब्राहिमा' बरोबर एक डाव करण्याचें योजिलें; पण आम्हीं ('इब्राहिमा'पुढें) त्यांनाच जेरीस आणिलें. ९८. आणि (जेव्हां इब्राहिमा'ला मूर्तीपूजक बादशहाच्या खातर बापानें घरांतून काढून लाविलें तेव्हां 'इब्राहिम') म्हणाला कीं मी तर आपल्या पालनकर्त्याच्या(मार्गांत कोणीहि)कडेस चालला जातों; तो मला (कोणा चांगल्याच) ठिकाणीं लावून देईल.९९. ('इब्राहिमा'नें हीहि प्रार्थना केली कीं) हे माझ्या पालनकर्त्या ! मला सच्छील (आत्म्यां)पैकीं (एक सच्छील आत्मा पुत्रापरीं) अर्पण कर. १००. तर आम्हीं त्याला एक सौम्यवृत्तीचा पुत्र ('इस्माईल') या(च्या जन्मण्या)ची खुशखबर दिली. १०१. मग जेव्हां मुलगा (तरूण होऊन) 'इब्राहिमा'बरोबर चालूं फिरूं लागला तेव्हां 'इब्राहिमा'नें म्हटलें कीं हे माझ्या मुला ! मी स्वप्नांत (काय) पाहतों आहे कीं (जणूं) मी तुला बळी देत आहें. तर तूंहि (आपल्या जागीं) पाहा कीं तुझें काय मत आहे ? (मुलगा) म्हणाला कीं हे पिता ! तुला जो कांहीं हुकूम झाला आहे तो तूं (बेलाशक) बजाव. ईश्वर इच्छील तर तूं मलाहि सहनशीलच पावशील. १०२. मग जेव्हां उभयतां(बापलेक ईश्वराज्ञेच्या)[१] आधीन झाले व बापानें (बळी देण्यासाठीं) पुत्रास कपाळावाटे पछाडिलें, तेव्हां (आम्हांस त्यांची आज्ञाधीनता फारच पसंत आली) १०३. आणि आम्हीं 'इब्राहिमा'स हाक मारून सांगितलें कीं हे 'इब्राहिमा'! १०४. तूं (आपलें) स्वप्न खरें करून दाखविलेंस; (आतां आम्हीं तुला मोठमोठे दर्जे देऊं व) सुकृत्य करणारांस आम्हीं असाच मोबदला देत असतों. १०५. निःसंशय ही उघड उघड परीक्षा होती. १०६. आणि आम्हीं मोठा बळी खंड देऊन 'इस्माईला'स सोडविलें. १०७. आणि ('इब्राहिमा'च्या)

(१) भाष्यकारांनीं मोठा बळी म्हणजे लठ्ठ गुबगुबीत मेंढा कीं जो परमेश्व-

मागून येणाऱ्या जनतेंत त्याचें हें सुस्मरण मागें सोडिलें; १०८. कीं (अलमदुनियेंत हीच घोषणा होत आहे कीं) 'इब्राहिमा'वर सलाम-शांति असो. १०९. आम्हीं सुकृत्य करणारांस असाच मोबदला देत असतों ११०. यांत संशय नाहीं कीं 'इब्राहीम'हि आमच्या विश्वासू सेवकांपैकींच होय. १११. आणि आम्हीं 'इब्राहीमा'ला (एक दुसरा पुत्र) 'इस्हाक' (याच्या जन्मण्या)चीहि खुशखबर दिली होती (व सांगून दिलें होतें कीं हाहि) पैगंबर (व आमच्या) सदाचरणी सेवकांपैकीं (होईल.) ११२. आणि आम्हीं 'इब्राहिमा'वर व (तसेच) 'इस्हाका'वर (आपले) आशीर्वाद उतरले. आणि या उभयतांच्या वंशांत (कित्येक) सुकृत्यकर्ते आहेत व (कित्येक आज्ञाभंग करून) आपल्याच जिवावर धडधडीत जुलूम करीत आहेत. ११३ आणि आम्हीं 'मूसा' व 'हारून' यांजवरहि (बरेच) उपकार केले. ११४. आणि (सरशेवटीं) दोघां(बंधू)स व त्यांच्या लोकांस मोठी आपत्ति (म्हणजे 'फिरऔना'चे जाचजुलूम) यांपासून सुटका दिली. ११५. आणि ('फिरऔना'च्या विरुद्ध) आम्हीं त्यांची मदत केली; तर (अखेर) हेच लोक वरचड

रानें इस्माईलच्याऐवजीं बळी होण्यासाठीं स्वर्गातून पाठविला होता तो असा अर्थ केला आहे. विद्वानांत ही गोष्ट सर्वसंमत आहे कीं, हजरत इब्राहिमानें जो पुत्र बळी द्यावयास नेला होता तो इस्माईल होता. इस्हाक किंवा आयझाक नव्हे. कारण त्यावेळीं इब्राहिमाला इस्माईल हाच एकुलता एक मुलगा होता; आणि इस्हाकचा जन्म यानंतर झाला. म्हणून त्यांचा उल्लेखहि या मागूनच झाला आहे. याशिवाय हजरत पैगंबरसाहेबांनीं म्हटलें आहे कीं, मी दोघां बळींचा पुत्र आहें. एक त्यांचे पूर्वज म्हणजे हजरत इस्माईल हे व दुसरे त्यांचे पिता हजरत अबदुल्ला हे. कारण, हजरत पैगंबरांचे पितामह अब्दुल-मुत्तलिब यांनीं असा नवस केला होता कीं, जर परमेश्वर मला झमझमच्या विहीरीचा शोध लावून ती उघडून देईल आणि मला दहा मुलगे देईल तर मी त्यांतून एक बळी देईन. त्याप्रमाणें त्यांच्या ह्या दोन्ही आकांक्षा पूर्ण झाल्या. सर्व मुलांच्या नांवानीं त्यांनीं फांसे टाकले. पण तो अबदुल्ला यांच्याच नांवाचा निघाला. म्हणून अबदुल मुत्तलिब यांनीं शंभर उंट बळी देऊन त्यांचा जीव वांचविला.

राहिले. ११६. आणि दोघां(भावां)स आम्हीं ('तौरात') पुस्तक दिलें (कीं त्यांत हरतऱ्हेचे नियम) स्पष्ट (स्पष्ट लिहिलेले आहेत). ११७. आणि दोघांस (धर्माचा) सरळ मार्ग दाखविला. ११८. आणि (त्यांच्या) मागाहून येणाऱ्या जनतेंत त्यांचें हें सुस्मरण मागें सोडिलें; ११९. कीं (सर्व जगांत हीच घोषणा होत आहे कीं) 'मूसा' व 'हारून' यांजवर सलाम—शांति—असो. १२०. सुकृत्य करणारांस आम्हीं असाच मोबदला देत असतों. १२१. यांत संशय नाहीं कीं, ते उभयतां आमच्या विश्वासू सेवकांपैकीं होत. १२२. आणि खरोखरींच 'इल्यास'हि अर्थात् पैगंबरांपैकींच होय. १२३. जेव्हां त्यानें आपल्या लोकांस सांगितलें कीं, कां तुम्हीं (लोक परमेश्वराला) भीत नाहींत? १२४. कां तुम्हीं 'बअल्' या (मुर्ती)चा धांवा करितां आणि सर्वांत उत्तम निर्माणकर्ता असा जो परमेश्वर कीं तो तुमचाहि पालनकर्ता (होय) व तुमच्या पूर्वींच्या बापजाद्यांचाहि पालनकर्ता होय, त्याला सोडून बसतां? १२५-१२६. तर लोकांनीं 'इल्यास'ला पाखंडी म्हटलें. म्हणून हे लोक (पुनरुत्थानांत) अवश्य (शिक्षेंत पकडून) हजर केले जातील. १२७. परंतु परमेश्वराचे निःसीम भक्त (कीं ते पाखंडी म्हणाले नाहींत व त्यांना शिक्षाहि होणार नाहीं.) १२८ आणि ('इल्यास'च्या) मागून येणाऱ्या जनतेंत आम्हीं त्याचें हें सुस्मरण मागें सोडिलें; १२९. कीं (सर्व जगांत ही घोषणा होत आहे कीं) 'इल्यासीन' (म्हणजे 'इल्यास')वर सलाम–शांति असो १३०. निःसंशय आम्हीं परोपकार करणारांस असाच मोबदला देत असतों. १३१. यांत संशय नाहीं कीं 'इल्यास' हा आमच्या विश्वासू सेवकांपैकीं होय. १३२. आणि कांहीं संशय नाहीं कीं 'लूत' हा अर्थात् पैगंबरांपैकींच होय; १३३. कीं आम्हीं 'लूत'ला व त्याच्या (सर्व) कुटुंबाला (शिक्षेंतून) वांचवून घेतलें. १३४. पण (त्याची) म्हातारी (बायको कीं ती) मागें राहणाऱ्यांत (राहून गेली होती). १३५. मग (त्याच्या निघून गेल्यानंतर) आम्हीं दुसऱ्यांचा विध्वंस करून टाकिला. १३६. आणि (हे 'मक्के'करांनों!) तुम्हीं तर ('सिरीया'देशास व्यापारासाठीं येतां जातां कधीं) सकाळीं या लोकां(च्या वस्त्या)वरून जातच असतां; १३७. व (कधीं) रात्रींहि; तर कां तुम्हीं लोक बुद्धीनें

(एवढेंहि) काम घेत नाहीं (कीं त्यांना पाहून बोध घ्याल)? १३८. निःसंशय 'यूनुस'हि अर्थात् पैगंबरांपैकींच होय; १३९. जेव्हां तो पळून जाऊन भरलेल्या गलबतांपाशीं पोहोंचला. १४०. तेव्हां गलबतवाल्यांनीं आपसांत फांसे टाकिले (तों त्याचें नांव फांश्यांत निघालें); म्हणून तो (दोषी ठरून समुद्रांत) फेंकून दिला गेला. १४१. मग (समुद्रांत पडल्यावर) त्याला माशानें गिळलें व तो (त्यावेळीं आपल्याला फारच) दोष देत होता. १४२. पण जर 'यूनुस' (त्यावेळीं परमेश्वराचें) पावित्र्यवर्णन (व स्तवन) करणाऱ्यांपैकीं नसता, १४३. तर लोक उठवून उभे केले जातील त्या दिवसापर्यंत (म्हणजे पुनरुत्थानापर्यंत) तो माशाच्याच पोटांत राहता. १४४. (तथापि त्यानें पावित्र्यवर्णन व स्तवन केलें) तर आम्हीं त्याला (माशाच्या पोटांतून काढून) खुल्या मैदानांत टाकून दिलें. आणि तो (थोडा काळ माशाच्या पोटांत राहिल्यानें फारच) कासावीस (होऊन गेला) होता. १४५ आणि (मग) आम्हीं (भोपळ्याच्या) वेलीचें एक झाड त्याच्यावर उगवून दिलें. १४६. आणि आम्हीं त्याला (भला चंगा करून) एक लक्ष अगर (एका हिशेबानें लक्षाहूनहि) अधिकच होते इतक्या लोकांकडे (पैगंबर बनवून) पाठविलें १४७. तर त्या लोकांनीं (त्याच्यावर) विश्वास ठेविला; म्हणून आम्हीं त्यांजला एका (नियमित) वेळेपर्यंत (जगांत) सुखोपभोग घेऊं दिला. १४८. तर (हे पैगंबरा!) या ('मक्के'च्या नास्तिकां)ना पूस, कीं तुझ्या पालनकर्त्यास कां मुली व त्यांच्यासाठीं मुलगे होत? १४९. अगर आम्हीं (खरोखरींच) दूतांस स्त्रीजाती निर्मिली; आणि हे पाहत राहिले होते?१५०. पाहा हो! हे तर आपल्या (मनानें) थोतांड रचून रचून बोलतात: १५१. कीं परमेश्वराला पुत्र जन्मला आहे. आणि कांहीं संशय नाहीं कीं, हे लोक अवश्य लबाड

---

(१) भोपळ्याचा हा गुणधर्म आहे कीं, त्याच्या सावलींत माशी बसत नाहीं. कांहीं काळ यूनुस पैगंबर माशाच्या पोटांत राहिल्यामुळें शरीरत्वचा अगदीं कोमल होऊन गेली होती. माशा बसत्या तर जखम करून करून टाकत्या; म्हणून परमेश्वरानें त्यांजवर भोपळ्याची वेल उगविली.

(२) म्हणजे शहाणेसुरते घ्याल तर लाख होते आणि लहानांचीहि गणना कराल तर लाखाहूनहि अधिक होते.

होत. १५२. कां (परमेश्वरानें) मुलांवर (मुलींस बढती देऊन) मुलीं (आपल्यासाठीं) पसंत केल्या? १५३. तुम्हां लोकांस काय (होऊन गेलें) आहे? कसे (अजागळ) हुकूम लावतां? १५४. कां तुम्हीं मनन करीत नाहींत? १५५. अगर तुम्हांपाशीं एखादें स्पष्ट (पुस्तकी) प्रमाण आहे? १५६. जर तुम्हीं खरे आहां तर तुम्हीं आपलें पुस्तक आणा. १५७. आणि या लोकांनीं परमेश्वरामध्यें व 'जिन्नात'(दैवता)मध्यें नातें ठरविलें आहे. आणि खरें म्हटलें असतां, 'जिन्नात'ला पक्कें माहित आहे कीं तेहि (इतर सेवकांप्रमाणें आज्ञांकित होत व त्यांच्यांत जे दुराचरणी होत ते शिक्षेंत पकडून)अवश्य हजर केले जातील. १५८. (परमेश्वरा-संबंधानें) जसजशा (निरर्थक) गोष्टी (हे लोक) उच्चारितात त्यांपासून परमेश्वर पवित्र होय. १५९. पण परमेश्वराचे निःसीम भक्त (कीं ते परमेश्वरासंबंधीं खोटीं मतें बाळगित नाहींत व त्यांस शिक्षाहि होणार नाहीं.) १६०. पण (हे 'मक्के'च्या नास्तिकांनों!) तुम्हीं व ज्यांची तुम्हीं उपासना करितां ते (दैवत), १६१. (हे) तुम्हीं परमेश्वराशीं हट्ट बांधून (तर कोणालाहि) बहकवूं शकत नाहींत; १६२. परंतु जे (दैवयोजनेप्रमाणें) नरकांत जाणारे होत त्यांनाच मात्र. १६३. (ही तर जिन्नात-दैवतां-ची स्थिति होय) आणि (राहिले दूत, त्यांचें तर हें म्हणणें आहे कीं) आमच्यांतून प्रत्येकाचा एक नियमित दर्जा होय; १६४. आणि आम्हीं तर (हरवख्त परमेश्वराच्या सेवेंत) रांगारांगांनीं उभे आहोंत. १६५. आणि आम्हीं तर (सर्वकाल त्याच्या) पावित्र्यवर्णनांत (व स्तवनांत) लागूनच राहतों. १६६. आणि हे ('मक्के'चे नास्तिक, कुराणाच्या प्रकटीकरणापूर्वीं) म्हणतच होते, १६७. कीं पूर्वींच्या लोकांचें एखादें (दिव्य) पुस्तक आम्हांपाशीं असतें; १६८. तर आम्हींहि परमेश्वराचे निःसीम भक्त झालों असतों. १६९. पण (आतां हें ईश्वरी पुस्तक यांच्यापाशीं आलें व) त्यांनीं तें मानिलें नाहीं. तर (असो,) पुढें जातां, हे (आपल्या नकाराचा परिणाम) जाणून घेतील. १७०. आणि आपले (खास) सेवक (म्हणजे) पैगंबरांचे ठायीं आमचें पहिल्यानेंच वचन जाऊन चुकलेलें आहे; १७१. कीं (आमच्या येथून) निःसंशय त्यांचीच मदत होणें आहे. १७२. आणि निःसंशय आमचें (आज्ञाधारक) सैन्य हेंच

अवश्य प्रबल होऊन राहील. १७३. तर (हे पैगंबरा!) कांहीं काळ तूं या(नास्तिकां)पासून फटकून राहा; १७४. आणि यांना पाहात राहा; पुढें जातां (हे आपणच आपला परिणाम) पाहून घेतील. १७५. तर कां (हे लोक) आमच्या शिक्षेसाठीं घाई मचवितात? १७६. पण जेव्हां (ती शिक्षा) यांच्या(घरांच्या) आंगणांत येऊन थडकेल, तेव्हां ज्या लोकांस आधींच भिवविलें जाऊन चुकलें होतें (व त्यांनीं मानिलें नाहीं) त्यांची (ही) सकाळ (मोठीच) विपरित (सकाळ) झाली. १७७. आणि (हे पैगंबरा!) कांहीं काळ यांजपासून फटकून राहा. १७८. आणि पाहत राहा; पुढें जातां, हेहि (आपला परिणाम) पाहून घेतील. १७९. (हे पैगंबरा!) जसजशा गोष्टी (हे लोक परमेश्वरासंबंधानें) उच्चारितात त्यांजपासून तुझा पालनकर्ता (जो) प्रतिष्ठावान् (आहे तो) पवित्र होय. १८०. आणि पैगंबरांवर सलाम-शांति होय. १८१. आणि सर्व स्तुति सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच (योग्य) होय. १८२.

---

(१) उद्देश तर दिवस आहे कीं, ज्यांत शिक्षा उतरेल. आणि विशेषें करून सकालचें वर्णन यासाठीं आहे कीं, अरबलोकांत लूटमार करण्याचा वेळ तोच होता; आणि शिक्षाहि बहुधां सकाळ होतां होतांच उतरलेल्या आहेत. कारण तो गफलतीचा व गाढ निद्रेचा वेळ असतो.

# अध्याय ३८ वा.

## सूरतु—सॉद.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ८८ आयात वा महावाक्यें आहेत. ह्यांत 'सॉद' या त्रोटक अक्षराचा गुढार्थ परमेश्वराशिवाय कोणालाच माहित नाहीं. परंतु कोणी कोणी त्याचें सिद्क म्हणजे सत्य किंवा सदक म्हणजे मोहंमद पैगबरांनीं खरें सांगितलें वगैरे अर्थ घेतले आहेत. (पाहा तफसीरेहुसेनी). यावरून हें नांव पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)

स. (सॉद). उपदेशपर कुराणाची शपथ; (कीं हें कुराण आम्हीं प्रकटिलेलें आहे). १. परंतु जे लोक नास्तिक होत ते (उगाच) हेंकडपणा व विरोध यांत (पडलेले) आहेत २. आम्हीं यांच्यापूर्वीं कित्येक पिढ्यांचा नाश करून टाकिला; तर (शिक्षा सादर होण्याच्या वेळीं) ते हाकाटी करूं लागले आणि (त्यावेळीं हाकाटीनें काय होणार होतें?) सुटकेचा अवसरच (उरला)नव्हता. ३. आणि या लोकांनीं (या गोष्टीचेंहि) आश्चर्य केलें कीं यांच्यांतलाच (एक गृहस्थ ईश्वरीशिक्षेचें) भय सुचविणारा (परमेश्वराकडून) यांच्यापाशीं आला. आणि (हे)नास्तिक म्हणूं लागले कीं, हा जादुगीर (व) लबाड होय. ४. कां यानें (सर्व) उपास्यांचा (नायनाट करून) एकच उपास्य ठेविला? ही तर फारच चमत्कारिक गोष्ट होय. ५. आणि यांच्यांतून कित्येक बडी मंडळी असें बोलून (उपदेशगृहांतून) उठून चालती झाली कीं, चला हो (याचें ऐकूं नका). आणि आपल्या उपास्यांवर जमून राहा; ही गोष्ट (जी हा मनुष्य समाजावितो) निःसंशयेंकरून तींत (त्याचा) कांहीं स्वार्थ आहे. ६. आम्हीं तर ही (नवीनं) गोष्ट (आपल्या) मागील धर्मांत (कधींच) ऐकिली नाहीं. असो नसो, ही त्याची (स्वतःची) बनावट आहे. ७. कां

आमच्यांतून यालाच ईश्वरवाणी प्रकटिली गेली आहे? गोष्ट ही होय कीं, यांना (मुळांत) माझ्या बोधवचनांतच शंका आहे (कीं हें कुराण माझी वाणीहि आहे कीं नाहीं !) किंबहुना (अस्सल गोष्ट ही होय कीं) यांनीं अजून माझ्या शिक्षेची मजा चाखिली नाहीं. (नाहींतर, यांची अक्कल ठिकाणीं येऊन गेली असती.) ८. अगर (हे पैगंबरा !) तुझ्या परम समर्थ व उदार पालनकर्त्याच्या दयेचे खजीने यांच्याचपाशीं आहेत? ९. अगर आकाश व पृथ्वी व ज्या वस्तु या दोहोंच्या दर्म्यान होत त्या (सर्वां)चें अधिपत्य यांनाच आहे ? (जर आहे) तर यांना पाहिजे आहे कीं, त्यांनीं शिड्या लावून (आकाशावर) चढावें (व परमेश्वराशीं लढावें)! १०. (तर हे पैगंबरा ! लोकांचा हा) एक दळभार होय (कीं) येथें (तुझ्या विरोधास उठला आहे; जेथें आणखी परमेश्वराचे विरोधी) मिलाफी पक्षां-(स पराभूत होऊन पळ काढावा लागला आहे त्यां)तच यांनाहि पराभूत होऊन पळ काढावा लागेल. ११. यांच्यापूर्वी 'नूह'चे लोक व 'आद' व मेखांवाले[२] 'फिरऔन' हे, (पैगंबरांना) पाखंडी म्हणून चुकले आहेत. १२. आणि (तसेच) 'समूद' व 'लूत'चे लोक व वनाचे लोक (म्हणजे 'शोएब'चे लोक) हेहि.हेच ते मिलाफी पक्ष होत (कीं त्यांनीं परमेश्वरापुढें हार खाल्ली.) १३. (या) सर्वांनींच तर पैगंबरांना पाखंडी म्हटलें; म्हणून माझी शिक्षा न्यायपुरःसर सादर झाली. १४. आणि हे ('मक्के'चे

(१) परमेश्वरानें जेव्हां हजरत पैगंबरसाहेबांस पाठविलें, तेव्हां कुरेशच्या नास्तिकांच्या मनांत मत्सर उत्पन्न होऊन ते म्हणूं लागले कीं, आमच्यांत मोठमोठे लोक आहेत; पण ते पैगंबरीच्या लायकीचे नाहींत. परमेश्वर जर कोणाला पैगंबर बनविता तर तो यांना बनविता व जिब्रीलदूत त्यांजपाशीं येता. मोहंमद साहेबापाशीं कांहीं धनसंपत्तिहि नाहीं; मग त्यांची पैगंबरी कसली? परमेश्वरानें सांगितलें कीं पैगंबरी ही एक ईश्वरी दया व कृपा होय. ज्याच्या अंगीं त्याची योग्यता परमेश्वराला दिसून येते त्याला ती तो देतो. ही द्रव्यसंपत्ति व अखत्यार यावर अवलंबून नसते.

(२) फिरऔनाला मेखावाला यासाठीं म्हणतात कीं, तो लोकांस चार मेखा रोंवून त्यांत शिक्षा देत होता. अथवा हें कीं, त्याच्या सैन्यांत घोडेस्वार पुष्कळ होते.

नास्तिकहि) केवळ एका भयंकर आवाजा (म्हणजे पहिल्यांदा करणा फुंकण्या)ची वाट पाहत आहेत; कीं तो (सुरू झाल्यावर जोंपर्यंत सर्वांचा नाश न करील तोंपर्यंत) मध्यें श्वास घेणार नाहीं. १५. आणि ते (विनोदानें) म्हणतात कीं, हे आमच्या पालनकर्त्या ! (जें कांहीं) आमच्या वांट्याचें (लिहिलें आहे तें) हिशेबाच्या दिवसा (म्हणजे पुनरुत्थाना)च्या पूर्वींच आम्हांला (कोठें)लवकर देऊन टाक. १६. (हे पैगंबरा !)जसजसे बोल हे लोक उच्चारितात ते तूं मुकाट्यानें सहन कर; आणि आमचा सेवक 'दाऊद'याचें स्मरण कर कीं तो बलसंपन्न होता; (पण यावरहि) तो (सर्वकाळ अनुतप्त होऊन परमेश्वराकडे) वळत असे. १७. आम्हीं (एक प्रकारें) पर्वतांसहि (त्याच्या) आज्ञाधीन करून ठेविलें होतें कीं ते सकाळ संध्याकाळ त्याच्या संगतीं (संगतीं परमेश्वराचें) स्तवन करीत; १८. आणि (असेंच) पक्ष्यांसहि (त्याच्या आधीन करून ठेविलें होतें;) कीं (तेहि ईशस्तवन ऐकून त्याच्यापाशीं) एकत्र गोळा होत असत. (आणि) हे सर्व त्याला वारंवार सूर[1] देत असत. १९. आणि आम्हीं त्याचें राज्य फार सबळ केलें होतें व त्यास राज्यव्यवस्थेचें ज्ञान दिलें होतें आणि तसाच वादविवादांचा[2] फैसला (करण्याची हातोटी). २०. आणि (हे पैगंबरा !) बरें (त्या) वाद्यांचीहि बातमी तुजपावेतों पोहोंचली आहे ? कीं जेव्हां ते (प्रार्थनालयाच्या) खोलीच्या भिंतीवर चढले; २१. व एकाएकीं आंत 'दाऊदा'पाशीं आले; तेव्हां तो त्यांच्या(अवेळीं व वहिवाटीविरुद्ध येण्या)नें भिऊन गेला. ते म्हणाले कीं तूं भिऊं नकोस (आम्हीं)दोघे प्रतिपक्षी (आहों) कीं आमच्यांतून एकानें दुसऱ्यावर अत्याचार केला आहे. तर तूं आमच्यामध्यें खरा खरा निकाल सांग आणि न्यायाच्या बाहेर जाऊं नकोस व आम्हांला सरळ मार्गीं लावून दे. २२. (मुद्दा हा आहे कीं) हाहि माझा भाऊ आहे; (आणि) याच्या(येथें)

(१) सूर देणेंचा अर्थ हा कीं, ज्या शब्दांनीं हजरत दाऊद ईशस्मरण करीत होते त्या शब्दांचा प्रतिध्वनि पर्वतांतून येत असे व पक्षीहि तसलेच आवाज काढीत असत.

(२) वादविवाद म्हणजे दोन प्रतिपक्ष्यांत जी कोणाही प्रकरणासंबंधानें वाटाघाट होते ती; तींत एकमेकांस संबोधून बोलावें लागतें.

नव्याण्णव मेंढया आहेत व माझी (केवळ) एकच मेंढी आहे. आतां हा म्हणतो आहे कीं, तूं ती (आपली मेंढीहि) माझ्या हवालीं करून टाक; आणि बोलण्या चालण्यांत तो मला दबवून टाकतो. २३. ('दाऊदा'नें) सांगितलें कीं, हा जो आपल्या मेंढ्यांत (भर पडावी) म्हणून तुझी मेंढी मागतो, तर हा खचितच तुजवर जुलूम करितो आहे. आणि बहुतेक पातीदार एकमेकांवर अत्याचार करीतच राहतात; परंतु जे लोक विश्वास ठेवतात व चांगलीं कामेंहि करतात (ते मात्र अत्याचार करीत नसतात). आणि असले लोक फारच कमी होत. आणि (आतां) 'दाऊद'ला कल्पना आली कीं, आम्हीं त्याची केवळ परीक्षा पाहिली आहे म्हणून त्यानें आपल्या पालनकर्त्यापुढें क्षमा मागितली व साष्टांग नमस्कार घालीत (भुईवर) पडला व (अनुतप्त होऊन परमेश्वराकडे) वळला. २४. तर आम्हीं त्याचा हा (अपराध) क्षमा केला. आणि आम्हांपाशीं त्याचें सान्निध्य व (त्याचा स्वर्गांत) चांगला दर्जा होय. २५. (आम्हीं 'दाऊदा'ला हेंहि फर्माविलें कीं) हे 'दाऊदा'! आम्हीं तुला पृथ्वींत राजा बनविला आहे; तर लोकां(च्या प्रकरणां)त न्यायानें निवाडा करीत जा व (आपल्या) मनेच्छेवर चालूं नकोस. (असें करशील) तर (मनेच्छेचें अनुकरण) तुला परमेश्वराच्या मार्गाहून बहकवील. (आणि) निःसंशय जे लोक परमेश्वराच्या मार्गाहून बहकतात, त्यांना फार सक्त शिक्षा होणें आहे; यासाठीं कीं ते हिशेबाच्या दिवसा(म्हणजे पुनरुत्थाना)स विसरून गेले. २६. आणि आम्हीं आकाश व पृथ्वीस व ज्या वस्तु या दोहोंच्या दर्म्यान आहेत त्यांस मिथ्या निर्माण केलें नाहीं. जे नास्तिक होत त्या लोकांची ही कल्पना होय. तर नरका(च्या

---

(१) हजरत दाऊद पैगंबराच्या नव्याण्णव बायका होत्या. त्यांनीं त्यांची संख्या पुरी शंभर करूं इच्छिली. उरीया नांवाच्या एका शेजाऱ्याच्या बायकोला आपल्या स्त्रियांत सामील करण्याचा त्यांचा विचार झाला. तिचा नवरा दाऊदाच्या लष्करांत चाकरीस होता. त्याला कोणा लढाईवर पाठविणें भाग पडलें व कर्मधर्मसंयोगानें तो तेथें मारला गेला. या जागीं या प्रकरणाकडे इशारा आहे आणि मेंढ्यांच्या दृष्टांताचा रोंखहि या गोष्टीकडेच आहे कीं जेणेंकरून दाऊदची न्यायबुद्धि जागृत व्हावी.

दृष्टी)नें नास्तिकां(च्या स्थिती)बद्दल फारच खेद होय. २७. कां ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांस आम्हीं जे लोक मुलकांत फिसाद फैलावीत फिरतात त्यांच्या सारखेच करून ठेवूं? अगर आम्हीं (परमेश्वराला) भिऊन चालणारांस दुराचरणी लोकांसारखेच करून ठेवूं काय? २८. (हे पैगंबरा! हें कुराण फार) प्रासादिक पुस्तक होय कीं तें आम्हीं तुला प्रकटिलें आहे कीं जेणेंकरून लोकांनीं याच्या महावाक्याचें मनन करावें व हें कीं जे अक्कल बाळगितात त्यांनीं (याच्या अर्थावरूनच) बोध धरावा. २९. आणि आम्हीं 'दाऊद'ला 'सुलेमान,' (हा पुत्र) दिला; ('सुलेमान'हि किती तरी) चांगला सेवक होता, कीं तो (प्रत्येक गोष्टींत परमेश्वराकडे) वळत होता. ३०. एकदां संध्याकाळचे समयीं खासेंपागेचे असीलें घोडे त्याच्यापुढें रुजू केले गेले; ३१. (तेव्हां तो त्यांच्या पाहण्यांत इतका निमग्न झाला कीं 'असर'च्या नमाजीचा वेळ निघून गेला व मग त्याला विचार आला.) तर तो म्हणूं लागला कीं, मी आपल्या पालनकर्त्याचें स्मरण सोडून मालाच्या प्रीतिला पसंत केलें; येथपर्यंत कीं सूर्य (पश्चिमेच्या) पडद्यांत लपून गेला. ३२. (बरें तर,) या (घोड्यां)स मजपाशीं परत आणा; आणि आतां तो (रागाच्या भरांत तरवारीनें घोड्यांच्या पायांच्या) पोटऱ्या व माना यांचा मारून सफ्फा उडवूं लागला. ३३. आणि आम्हीं 'सुले-

(१) या वाक्याचा अर्थ हा आहे कीं, नरकाच्या आपत्तीवर नजर केली जाईल तर नास्तिकांची स्थिति फारच शोचनीय होय; मग ते त्यांत जाण्यापासून कां म्हणून भीत नाहींत. ?

(२) 'जियाद' याचा शब्दशः अर्थ उत्कृष्ट घोडे असा आहे. आणि बादशाही खास पागेचे घोडे उत्तम असतात म्हणून आम्हीं खासपागेचे घोडे असें भाषांतर केलें आहे.

(३) 'साफिनात' याचा मूळअर्थ, जे घोडे स्थानांवर बांधलेले असतांना तीन पायांवर उभे राहून चवथ्या पायावर बोजा टाकीत नाहींत ते, असा आहे; हे घोडे अस्सील-जातिवंत असतात; म्हणून असील असें भाषांतर केलें आहे.

(४) हें वाक्य शब्दाच्या व अर्थाच्या दृष्टीनें कुराणाच्या कठीण वाक्यांपैकीं आहे. टीकाकारांनीं याच्या अर्थांत पुष्कळ मतांतर केलें आहे. याशिवाय

**मान' यास(आणखी एका तऱ्हेनेंहि) अजमाविलें. व त्याच्या तक्तावर एक धड आणून टाकिलें; व मग ('सुलेमान' अनुतप्त होऊन परमेश्वराकडे) वळला; ३४. (आणि) त्यानें प्रार्थना केली कीं, हे माझ्या पालनकर्त्या ! माझा अपराध क्षमा कर आणि मला असें राज्य अर्पण कर कीं माझ्या मागून कोणालाहि तें योग्य नसावें. निःसंशय तूं मोठा दाता आहेस. ३५. तर आम्हीं वायूस त्याच्या आज्ञाधीन केलें कीं तो जेथें पोहोंचूं इच्छी तेथें त्याच्या आज्ञेप्रमाणें (त्याकडेसच) झुळझुळ वाही; ३६.**

भाषारचना व व्याकरण यांच्या दृष्टीनेंहि यांत बराच वाद आहे. आम्हीं भाषांतरांत जो अर्थ पत्करला आहे तो बहुतेक लोकांस मान्य असाच आहे. याशिवाय आणखी हाहि अर्थ होऊं शकेल कीं, हजरत सुलेमान पैगंबरापुढें घोडे रुजू केले गेले; तेव्हां ते म्हणाले कीं, मी ह्यांस आपल्या पालनकर्त्याच्या विचारानें प्रिय जाणतो; कारण हे धर्मयुद्धांत उपयोगी पडतील. मी सूर्यास्तापावेतों यांच्या परीक्षणांत निमग्न राहिलों. एकदां पुन्हां यांना मजपाशीं परत आणा. आणि मग पुन्हां त्यांनीं त्यांस गोंजारिलें व ममता केली आणि त्यांच्या पोटऱ्यांवर व मानांवर हात फिरविले व थपकलें. सुलेमान हे प्रत्येक गोष्टींत परमेश्वराकडे वळत होते यास प्रमाण या विवेचनांत आहे. त्यांना घोडे उत्तम होते म्हणून प्रीय नव्हते तर यामुळें प्रीय होते कीं, ते परमेश्वराच्या कार्यास उपयोगी पडतात. याचेंच नांव परमेश्वराकडे वळणें होय. भाषांतरास अनुसरून परमेश्वराकडे वळणें म्हटलें म्हणजे हें कीं, नमाजीचा वेळ निघून गेल्यामुळें हजरत सुलेमान यांस इतका संताप आला कीं, त्यांनीं आपल्या हौसेच्या वस्तू परमेश्वरास वाहून त्यांचा नाश करून टाकिला.

(४) भाष्यकारांनीं ही गोष्ट लिहिली आहे कीं, हजरत सुलेमान निःसंतान होते. त्यांना आपल्या सैन्याची फार मनधरणी करावी लागत असे. एकदां त्यांचें अनाठायीं लाड पाहून सुलेमान पैगंबर म्हणाले कीं, माझ्या सत्तर बायका आहेत. प्रत्येकीपाशीं जाईन तर सत्तर मुलगे होतील. पण 'इन्शाअल्ला' ह्मणजे ईश्वर इच्छील तर, बोलण्यास विसरले. पैगंबरांची एवढीशी हयगय पैगंबरीपदास बाधक असते. सारांश सत्तरच्या जागीं एकाच बायकोपासून पुत्र झाला. तोहि अधकच्चा अधुरा. लोकांनीं आणून त्यास तक्तावर ठेविलें कीं हा घ्या आपला राज्याचा वारस.

आणि (अशाच प्रकारें) जितके असुर शिल्पशास्त्रप्रवीण व पाणबुडे होते सर्वांस (त्याच्या आज्ञांकित केलें). ३७. आणि (यांच्याखेरीज) इतर (असुर) जे शृंखलांत जखडलेले होते त्यांसहि (त्याच्या आधीन केलें होतें). ३८. (आम्हीं 'सुलेमाना'स बजाविलें कीं) ही आमची बेसुमार देणगी होय; आतां तूं (पाहिजे तर लोकांस दे व त्यांजवर) उपकार कर अगर (सारा साजसरंजाम) आपल्यापाशींच राखून ठेव. ३९. आणि निःसंशय, 'सुलेमाना'स आम्हांपाशीं सान्निध्य होय व (त्याचा स्वर्गांत) चांगला दर्जा होय. ४०. आणि (हे पैगंबरा!) आमचा सेवक 'अय्युब'याची आठवण कर; कीं त्यानें एकेवेळीं आपल्या पालनकर्त्यास हाक मारून सांगितलें कीं, मला सैतानानें क्लेश व दुःख पोहोंचविलें आहे. ४१. (आह्मांस त्याची कींव आली व आज्ञा केली कीं) तूं आपल्या पायानें (जमिनीला) ठोकर मार; (सारांश ठोकर मारली तोंच एक झरा निघाला. तेव्हां आम्हीं 'अय्युबा'ला सांगितलें कीं तुझ्या) नाहण्या व पिण्यासाठीं हें थंड पाणी हजर आहे. ४२. आणि आम्हीं त्याला त्याचें कुटुंब व त्यांच्याबरोबर तेवढेंच आणखीहि दिलें. (ही आम्हीं त्याच्याबरोबर) आपल्याकडून मेहरबानी (केली); आणि (उद्देश हाहि होता कीं) जे बुद्धि बाळगितात त्यांच्याकरितां (ही गोष्ट) यादगिरी (राहावी). ४३. आणि (आम्हीं 'अय्युबा'ला सांगितलें कीं) मूठभर काडया आपल्या हातांत घे व (आपल्या बायकोस) त्यानें मार; आणि (आपली) शपथ मोडूं नकोस. निःसंशय आम्हीं 'अय्युबा'ला

(१) हजरत अय्युब हे मोठे सुखवस्तु पैगंबर होते. त्यांचा धीर पाहण्यासाठीं परमेश्वरानें त्यांच्यावर मोठमोठीं संकटें कोसळविलीं. मालमत्ता वगैरे सर्व कांहीं जाऊन एकटे राहून गेले. सारें शरीर फुटून निघालें होतें. फक्त बायको सेवा करीत होती. तिच्यावरहि कोणा गोष्टींत नाखुश होऊन शपथ वाहून बसले होते कीं, बरा होईन तर तुला शंभर वेत मारीन. मग हजरत अय्युब हे परमेश्वरापुढें धाय धाय रडले; तेव्हां ईश्वरसामर्थ्यानें एक झरा वाहून निघाला. त्यांत नाहून धुवून त्याचेंच ते पाणी प्याले व बरें झाले. बायकोला मारण्याची शपथ याप्रमाणें पुरी केली कीं शंभर काड्यांची एक मूठ भरून तिला एकदां स्पर्श केला.

(फारच) सहनशील पावलों. (तोहि किती) चांगला सेवक होता; कीं तो (प्रत्येक गोष्टींत परमेश्वराकडे) वळत होता. ४४. आणि (हे पैगंबरा !) आमचे सेवक, 'इब्राहीम' व 'इस्हाक' व 'याकूब' यांचीहि आठवण कर. (ते) हातांनीं व डोळ्यांनीं संपन्न (होते).४५. (आणि) आम्हीं त्यांस एक निर्मळ काम (म्हणजे) पारलौकिक स्मरणासाठीं निवडलें होतें. ४६. आणि निःसंशय ते (सर्व) आम्हांसमीप निवडलेले व पुण्यशील अशा (सेवकां)पैकीं होत. ४७ आणि 'इस्माईल' व 'अल्‌यसूअ' व 'जुलकिफ्ल' यांचीहि आठवण कर. आणि (हे) सर्वच पुण्यशीलांपैकीं होत. ४८. हा (सदरहू अहवाल आपल्यापरी लोकांसाठीं) ' एक बोध होय. आणि निःसंशय (परमेश्वराला) भिऊन चालणाऱ्यांसाठीं (परलोकीं) चांगलें ठिकाण होय. ४९. (म्हणजे) सर्वकाल राहण्याच्या (स्वर्गांच्या) बागा कीं ज्यांची दारें त्यांच्यासाठीं (पहिल्यानेंच) उघडलेलीं असतील; ५०. (आणि ते) त्यांत (जाऊन) तक्ये लावून लावून बसतील; तेथें (स्वर्गीय दूतां-कडून)पुष्कळ मेवे व पेयें मागवितील. (व मौजेनें खातील पीतील). ५१.

---

(१) हातांनीं संपन्न म्हणजे ते तोंडानें केवळ बोलतच नव्हते तर करूनहि दाखवित होते. आणि डोळ्यांनीं संपन्न म्हणजे जगांत राहून परलोकापर्यंतची स्थिति पाहत होते; आणि सृष्टीवरून सृष्टिकर्त्यास ओळखत होते.

(२) हजरत इस्माईलचा अहवाल तर माहीतच आहे कीं ते हजरत इब्राहीमाचे ज्येष्ठ पुत्र होते. त्यांस अबुल्–अरब म्हणजे सर्व अरबांचे पिता हा किताब आहे. कारण सर्व अरबलोक त्यांच्याच वंशांतले होत. 'अल्–यसअ' आणि जुल्–किफ्ल हीं दोन नावें 'नामूस'चीं म्हणजे तौरातचीं आहेत. अल्–यसअ, यसअ, व लयसअ हीं अनेक नावें होत; पण व्यक्ति एकच होय. यांच्या बापाचें नांव उखतूब आहे. अलयसअ हे हजरत इलयास पैगंबराचे प्रतिनिधि होते व पुढें पैगंबर झाले. आणि जुल्–किफ्ल तर समासात्मक नांव आहे, हें त्याच्या शब्द-रचनेवरूनच अरबी आहे असें दिसून येतें. याचा शब्दशःअर्थ जामीन असा आहे. हे हजरत यसअ किंवा बिशर बिन अय्युब यांचे चुलत भाऊ होते. यांच्या नांवाची उपपत्ति अशी लिहिली आहे कीं, बनी–इस्राएल हे आपल्या पैगंबरांना पुष्कळ कत्तल करीत होते तर त्यांनीं शंभर पैगंबराचा जीव वांचविला. अगर ते दररोज शंभर नमाजी लोकांइतकी नमाज पढीत होते.

आणि त्यांच्यापाशीं नजर खालीं[1] राखणाऱ्या (पत्न्या) असतील, (व त्यांत मौज ही कीं त्या, त्यांच्या) समवयाच्याहि (असतील). ५२. (मुसलमानांनों !) ह्या आहेत त्या (देणग्या) कीं ज्यांचें तुम्हांस हिशेबाच्या दिवसा (म्हणजे पुनरुत्थाना)साठीं अभिवचन दिलें जात आहे. ५३. निःसंशय ही आमची (दिलेली) अन्नसंपत्ति होय कीं ती कधींहि खुंटणारच नाहीं. ५४. (परमेश्वराला भिऊन वागणारांचा परिणाम) हा होय. आणि (राहिले शिरजोर तर) शिरजोरांचें वाईट ठिकाण होय; ५५. नरकाग्नि कीं त्यांत यांना जावें लागेल; आणि तें (किती तरी) वाईट स्थल होय ! ५६. ह्याची त्यांना गोडी चाखूं दे; (म्हणजे) उकळी आलेलें पाणी व पूं; ५७. आणि अशाच स्वरूपाचे इतर नानाविध पदार्थ (नरकवाश्यांच्या खाण्यापिण्यास हजर होत.) ५८ (मग जेव्हां नरकवाश्यांचे पुढारी नरकांत जाऊं लागतील तेव्हां त्यांना सांगितलें जाईल कीं तुमच्या अनुयायांची) ही एक फौज (आणखीहि आहे कीं तीहि) तुम्हांबरोबर (नरकांत) कोंदाटवयाची आहे. त्यांचेंहि तोंड[2] काळें ! हेहि नरकाग्नींतच जाणार. ५९. (हें ऐकून अनुयायी पुढाऱ्यांची पाठ घेतील व त्यांना संबोधून) म्हणतील कीं (आमचें नव्हे) तर तुमचेंच तोंड काळें ! (कारण) तुम्हींच तर हें (अरिष्ट) आमच्यापुढें आणिलें. तर (नरक हीहि किती) वाईट जागा होय (कीं त्यांत तुम्हीं आम्हांला आणून फांसलें.) ६० (हें बोलून अनुयायी) प्रार्थना करतील कीं हे आमच्या पालनकर्त्या ! ज्यानें हें (अरिष्ट) आमच्यापुढें आणिलें त्याला (आम्हांपेक्षांहि) जास्त नरकाग्नींत दुप्पट शिक्षा दे. ६१. आणि (नरकवासी

---

(१) नजर खालीं राखणें व कमी पाहणें हें पातिव्रत्याचें द्योतक व सौंदर्याची लाडी गोडी होय.

(२) 'लामहबा बिहिम' याचा अर्थ आम्हीं, 'त्यांचेंहि तोंड काळें !' असा केला आहे. कारण 'मर्हबा' हा आगतस्वागताच्या वेळीं बोलण्याचा शब्द आहे; ह्मणजे या, या, बरें आला. पण 'ला' हा नकारार्थी आहे म्हणून ज्याला आगतस्वागत द्यावयाचें नसतें त्याला म्हणतात चला निघा, दूर व्हा, आपलें तोंड काळें करा. तर हा एक वाक्प्रचार आहे; याचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाहीं.

आपसांत हेंहि) म्हणतील कीं ज्या लोकांची आम्हीं दुष्टांत गणना करीत होतों, आम्हांस काय झालें आहे कीं आम्हीं त्यांस (येथें नरकांत) पाहत नाहीं ? ६२. कां आम्हीं त्यांचा (उगाच) उपहास केला ? (व ते उपहासपात्र नव्हते. एवंच, ते नरकांत कोठेंच दिसत नाहींत.) अगर (ते नरकांत आहेत; व आमचीच) दृष्टि त्यांच्यावर पडत नाहीं ? ६३. नरकवासी यांचें आपसांत झगडणें हें (एक) सत्य होय (व तें बहुन येईलच येईल). ६४. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मी (तर तुम्हांस) केवळ (ईश्वरीशिक्षेचें) भय सुचविणारा आहे एवढेंच. आणि एका परमेश्वराशिवाय कीं (तो सर्वांवर) प्रबल होय, (अन्य) कोणी उपास्य नाहीं. ६५. (तोच) आकाश व पृथ्वी आणि जें काय या दोहोंच्या दरम्यान आहे या (सर्वां)चा मालक होय; (आणि तो) सामर्थ्यवान् (व) मोठा क्षमाकर्ता होय. ६६. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं (विश्ववृत्तांपैकीं) कुराण (प्रकट होणेंहि एक फारच) मोठें वृत्त होय! ६७. (पण) तुम्हीं लोक त्याची (कांहीं) पर्वा करीत नाहींत. ६८. परात्पराचे लोक (म्हणजे देवदूत) जेव्हां आपसांत वादविवाद करूं लागले तेव्हां मला त्यां(च्या वादविवादा)चें कांहींहि तर ज्ञान नव्हतें. ६९ (आणि ह्या गोष्टी मला प्रकटीकरणाद्वारें कळल्या आहेत; व) मला जें प्रकटीकरण होतें तें केवळ यासाठींच (होतें) कीं मी (तुम्हांस) धडधडीतपणें भय सुचवावें. ७०. (हे पैगंबरा ! दूतांचा तो परस्पर वादविवाद हा होता) कीं तुझ्या पालनकर्त्यानें दूतांस सांगितलें कीं मी मातींतून एक माणूस बनविणार आहें. ७१. तर जेव्हां मी त्यास पुरा बनवून चुकेन व आपला आत्मा[1] त्यांत फुंकून टाकीन; तेव्हां तुम्हीं त्याच्या पुढें साष्टांग नमस्कार घालीत, (भुईवर पालथे) पडा. ७२. तात्पर्य एकूणेक सर्वच दूतांनीं साष्टांग नमस्कार घातला. ७३. पण (एक) 'इब्लीस' (मात्र नमला नाहीं); कीं तो अभिमानांत येऊन गेला व नास्तिकांपैकीं होऊन बसला. ७४. परमेश्वरानें ('इब्लीस्'ला) पुसलें कीं हे 'इब्लीसा ! ज्या वस्तूला मी आपल्या हातांनीं बनविलें त्या (वस्तू)स साष्टांग नमस्कार घालण्या-

(१) आपला आत्मा म्हणजे आपला निर्मिलेला आत्मा; आणि मानवी आत्म्याच्या महत्त्वाच्या दृष्टीनें परमेश्वरानें त्यास आपल्याकडे लाविलें आहे.

पासून तुला कोणत्या वस्तुनें प्रतिबंध केला? काय तूं शेखींत येऊन गेलास अगर तूं (खरोखरींच) बड्या लोकांपैकीं आहेस? ७५. तो म्हणाला, (मीं त्याला कसा नमस्कार करूं?) मी त्याच्यापेक्षां फारच श्रेष्ठ आहें, मला तूं अग्नींतून बनविलेंस व त्याला तूं मातींतून बनविलेंस. ७६. (परमेश्वरानें) सांगितलें, तूं येथून निघ (बाहेर हो); कीं, तूं धोंडमार करून करून पिटाळला जाशील. ७७. आणि (शेवटच्या) निर्णयाच्या दिवसापर्यंत तुझ्यावर माझा शाप (पडत राहील). ७८. (तो) बोलला, हे माझ्या पालनकर्त्या! (सर्व लोक पुन्हां) उठवून उभे केले जातील त्या दिवसापर्यंत, मला तूं अवसर दे. ७९. (परमेश्वरानें) म्हटलें, (होय,) तुला त्या दिवसापावेतों अवसर आहे; ८०. कीं ज्याचा वेळ (मलाच) माहीत आहे. ८१. (तो) म्हणाला; तर (मलाहि) तुझ्याच प्रतापाची शपथ आहे कीं या(मानवां)त जे तुझे निःसीम भक्त होत त्यांना सोडून या समस्त लोकांस मी बहकवून सोडीन तरच सई. ८२-८३. (परमेश्वरानें) म्हटलें, तर (मींहि) सत्य (सांगून देतों); आणि मी सत्यच सांगीत असतों; ८४. कीं मींहि तुझ्यानें व जे लोक तुझें अनुकरण करतील त्या सर्वांनींच नरकाला भरून टाकीन. ८५. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं मी या (निरोप पोहोंचविण्या)बद्दल तुम्हांपाशीं कांहीं मोबदला तर मागीत नाहीं; आणि मी ओढून प्रतिष्ठा आणणाऱ्यांपैकींहि नव्हें. ८६. हें (कुराण जें मी तुम्हांला ऐकवितों तें) आलमदुनियेच्या लोकांसाठीं एक बोध होय एवढेंच काय तें. ८७. आणि कांहीं काळा नंतर तुम्हां(लोकां)स याची हकीकत माहित होऊन जाईल. ८८.

---

(१) प्रतापाची शपथ म्हणजे जसें आपण म्हणत असतों कीं, मला तुझ्या डोक्याची शपथ, तुझ्या गळ्याची शपथ त्यांशींच ही शपथहि मिळते जुळते.

# अध्याय ३९ वा.

## सूरतु-ज्जुमर.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ७५ महावाक्यें (आयात) आहेत. 'जुमर' म्हणजे टोळेचे टोळे किंवा दळभार; या अध्यायाच्या शेवटीं आलेल्या या वाक्यावरून हें नांव देण्यांत आलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)

(हा) लेखी फर्मान (अशा) परमेश्वराच्या हुजुरांतून सादर होतो (कीं जो) सामर्थ्यवान् (व) सत्य संकल्प (होय). १ (हे पैगंबरा! हें) पुस्तक आम्हींच तुला सत्यपुरस्सर प्रकट केलें. तर निव्वळ परमेश्वरासाठींच शुद्ध धर्म (-पालन) करून त्याचीच उपासना करीत जा. २. पाहा हो! निव्वळ धर्मपालन परमेश्वराप्रीत्यर्थच होय. आणि ज्या लोकांनीं परमेश्वराखेरीज (अन्य अन्य) पुरस्कर्ते बनवून ठेविले आहेत (व असें प्रतिपादितात कीं) आम्हीं तर यांची उपासना केवळ यासाठीं करितों कीं, ते परमेश्वराशीं आमचा निकट संबंध करून देतील. तर ज्या ज्या बाबींत हे लोक मतभेद करीत राहिले आहेत, परमेश्वर (पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांच्यांत त्या त्या (बाबीं)चा फैसला करून टाकील. निःसंशय जो मनुष्य लबाड (व) अनुपकारी असेल, त्याला परमेश्वर सुबुद्धि देत नसतो. ३. जर परमेश्वर (कोणालाहि) पुत्र करून घेऊं इच्छिता, तर तो आपल्या सृष्टींतून ज्याला पाहिजे त्याला पसंत करता. (परंतु) तो (बायकापोरांच्या बखेड्यापासून) पवित्र होय. तोच एकला जबरदस्त परमेश्वर होय. ४. त्यानेंच (कोणा) सत्य प्रयोजनानें आकाश व पृथ्वीस पैदा केलें; (तोच) रात्रीला दिवसावर लपेटतो आणि (तोच) दिवसाला रात्रीवर लपेटतो;[1]

(१) लपेटणें म्हणजे रात्र व दिवसाचे कमी होणें व वाढणें असा अर्थ होय.

आणि त्यानेंच सूर्य व चंद्र यांस आज्ञांकित करून ठेविलें आहे; (कीं हे) सर्व एका नेमलेल्या काळापर्यंत (अशाच प्रकारें) चालले जातील. पाहा हो! तोच (परमेश्वर) सामर्थ्यवान् (व मोठा) क्षमाकर्ता होय. ५. त्यानेंच तुम्हां लोकांस ('आदम'च्या) एका जिवांतून निर्माण केलें; मग त्याच्यांतून त्याचें जोडपें बनविलें आणि त्यानें तुम्हांसाठीं आठ[1] प्रकारचीं चतुष्पाद जनावरें (आपल्या सामर्थ्यानें) उतरलीं; तोच तुम्हांस तुमच्या आईच्या पोटांत (क्रमशः) एका घटनेनंतर दुसरी घटना[2], अशा तीन अंधारां[3](च्या पडद्यां)त बनवितो. हाच परमेश्वर तर तुमचा पालनकर्ता होय; त्याचीच हुकमत होय. त्याच्यावांचून (अन्य) कोणी उपास्य नाहीं. मग (यावरहि तुम्हीं लोक) कोणीकडे पालटले चालले जात आहां? ६. जर तुम्हीं (परमेश्वराप्रत) कृतघ्नता कराल तर परमेश्वर तुम्हांकडून (अगदींच) निरपेक्ष होय. आणि तो आपल्या सेवकांसाठीं कृतघ्नता पसंत करीत नाहीं. आणि जर तुम्हीं (त्याचे) आभार मानाल, तर तो तुमचें हें (करणें) पसंत करितो. आणि (पुनरुत्थानाच्या दिवशीं) कोणीहि ओझें वाहणारा दुसऱ्या कोणा(च्या पापां)चें ओझें (आपल्या मानेवर) उचलून घेणार नाहीं. मग तुम्हां(सर्वां)स आपल्या पालनकर्त्याकडे परतून जाणें आहे. तर जसजशीं कर्में तुम्हीं लोक (जगांत) करीत राहिलां आहां, तीं तो तुम्हांस (एक एक करून) विदित करील. तो तर (लोकांच्या) हृदयस्थ गोष्टींचा देखिल ज्ञाता होय. ७. आणि जेव्हां माणसाला एखादें दुःख पोहोंचतें, तेव्हां तो आपल्या पालनकर्त्याकडे वळून त्याला बोलावितो; मग जेव्हां (परमेश्वर) आपल्याकडून त्याला एखादी देणगी देऊन टाकितो,

(१) उंट, गाय, मेंढी व शेळी यांचे नरमादी मिळून आठ प्रकार होतात.

(२) एका घटनेनंतर दुसरी घटना म्हणजे प्रथम वीर्यबिंदु असतो. मग एक ओबड धोबड आकाराची वस्तु किंवा लादा होतो; त्यानंतर मांस व मग त्यांत हाडें, चामडीं व केंस पैदा होतात.

(३) तीन अंधारानें या गोष्टीकडे इषारा आहे कीं, एक उदर असतें व दुसरा उदराच्या आंत ज्यांत मूलांकुर असतो व ज्याला गर्भाशय म्हणतात तो; आणि तिसरा ज्या पातळ त्वचेंत गर्भपिंड आच्छादिलेला असतो व जी वारेबरोबर बाहेर निघून येते ती; हे तीन पडदे झाले.

तेव्हां त्यानें ज्या (उद्देशा)साठीं पूर्वीं (परमेश्वराला) बोलाविलें होतें त्यास तो विसरून जातो आणि (इतरांस) परमेश्वराचे जोडीदार बनवूं लागतो; कीं येणेंकरून (आपला वाईट किता घालून दुसऱ्यांसहि) त्यानें परमेश्वराच्या मार्गाहून बहकवावें. (हे पैगंबरा! अशा माणसास) सांगून दे कीं तूं थोडाकाळ आपल्या नास्तिकपणा(च्या स्थितीं)तच (जगाचा) सुखोपभोग घे; (अखेर तर) तूं नरकवाश्यांपैकीं होशीलच. ८. बरें, जो मनुष्य रात्रीच्या (एकांत) समयांत (परमेश्वराच्या) उपासनेंत लागून आहे; (कधीं त्याच्या सेवेंत) साष्टांग नमस्कार घालतो व (कधीं त्याच्यापुढें हात जोडून) उभा राहतो, परलोकाचें भय बाळगितो आणि आपल्या पालनकर्त्याच्या दयेचा उमेदवार आहे; (असा मनुष्य कोठें आज्ञाभंजक सेवकांच्या बरोबरीचा होऊं शकतो)? (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जाणणारे व न जाणणारेहि कोठें बरोबर झाले आहेत? (पण या गोष्टीपासून) जे लोक बुद्धिसंपन्न होत तेच मात्र बोध धरतात. ९. (हे पैगंबरा! माझ्यां कडून मुसलमानांस) समजावून दे कीं, जे विश्वास धरून चुकले आहेत हे त्या माझ्या सेवकांनो! आपल्या पालनकर्त्याला (म्हणजे मला) भीत राहा. जे लोक ह्या जगांत पुण्यकर्में करतात त्यांच्याकरितां (परलोकीं) पुण्य होय. आणि परमेश्वराची जमीन (फारच) विस्तीर्ण आहे. हे तर सहनशीलच होत कीं ज्यांना (पुनरुत्थानांत) त्यांचा मोबदला अगणित भरून दिला जाईल. १०. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मला (तर परमेश्वराकडून हीच) आज्ञा दिली गेली आहे कीं मी परमेश्वरासाठींच निव्वळ धर्मपालन करून त्याचीच उपासना करावी. ११. आणि (तशीच) मला ही आज्ञा केली गेली आहे कीं, मी सर्वांत पहिला मुसलमान व्हावें. १२. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जर मी आपल्या पालनकर्त्याची आज्ञा मोडीन, तर (अशा स्थितींत) मला मोठ्या (सक्त) दिवसा (म्हणजे पुनरुत्थानाच्या दिवसा)च्या शिक्षेची (फारच) भीति वाटते. १३. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं मी तर पर-

(१) म्हणजे मुसलमानांस धर्मासंबंधानें कोणाजागीं कांहीं सक्ती असेल तर तेथें राहावेंच कां म्हणून? परमेश्वराचा मुलूक इतका विस्तीर्ण आहे; जिकडे पाहिजे तिकडे निघून जावें.

मेश्वराप्रीत्यर्थच आपलें धर्मपालन शुद्ध करून त्याचीच उपासना करितों. १४. (राहिला तुम्हीं,) तर त्याच्याशिवाय ज्याची तुम्हांस इच्छा होईल त्याची पूजाअर्चा करा. (तुम्हांलाच त्याचा दुष्परिणाम भोगावा लागेल. हे पैगंबरा! या लोकांस) सांगून दे कीं, जे लोक पुनरुत्थानाच्या दिवशीं आपलें व आपल्या पोराबाळांचें नुकसान[1] करून घेतील तेच वस्तुतः तोटा भोगणारे होत. पाहाहो! हाच तर धडधडीत तोटा होय १५. त्यांच्यावरून अग्नीचेंच त्यांचें पांघरूण[2] होईल व त्यांच्याखालीं (अग्नीचेंच) अंथरूण. हीच (तर ती शिक्षा होय) कीं जिच्यापासून परमेश्वर आपल्या सेवकांस भिवविती. तर हे माझ्या सेवकांनों! तुम्हीं माझेंच भय बाळगा. १६. आणि जे लोक मूर्तीपूजेपासून जपून राहिले व परमेश्वराकडे वळले, त्यांच्यासाठीं (स्वर्गाचें) शुभवर्तमान होय. तर (हे पैगंबरा!) माझ्या अशा सेवकांस शुभवर्तमान ऐकवून दे; १७. कीं जे (माझे) बोल कान लावून ऐकितात व त्याच्या उत्तमोत्तम गोष्टींचें अनुकरण करतात; हेच तर ते लोक होत कीं, ज्यांना परमेश्वरानें सन्मार्ग दाखविला आहे आणि हेच तर (विवेक व) बुद्धिसंपन्नहि होत. १८. (हे पैगंबरा!) बरें, जो मनुष्य शिक्षेच्या वचनास पात्र ठरून गेला, तर कां (त्या) नरकवाश्यास तूं सोडवूं शकतील? १९. परंतु जे लोक आपल्या पालनकर्त्यास भीत राहिले, त्यांच्या (राहाण्या)साठीं (स्वर्गात) वरच्या खोल्या (व) वरच्या खोल्यांच्या वरती (आणखी) वरच्या खोल्या बांधून (तयार) होत; कीं, त्यांच्याखालून पाण्याचे पाट वाहत असतील. (हें त्यांच्याशीं) परमेश्वराचें वचन (होय; आणि) परमेश्वर वचनाच्या विरुद्ध करीत नसतो. २०. (हे वाचक-श्रोत्या!)

(१) मनुष्य गैरमार्गी झाल्यानें आपलें नुकसान करितो व याशिवाय आपल्या बायकापोरांचेंहि; कारण, ते लोक त्याचा वाईट नमुना पाहून त्याचें अनुकरण करूं लागतात.

(२) याचें शब्दशः भाषांतर म्हटलें ह्मणजे हें होतें; 'त्यांच्यावरून अग्नीचें सायवान असेल व त्यांच्या खालूनहि (अशाच तऱ्हेचें) सायवान.' परंतु कुराणांत दुसऱ्याजागीं ह्याच अर्थाचें वाक्य आलें आहे त्याच्या अनुरोधानें मराठी भाषासरणीस धरून आह्मीं वर भाषांतरांत दिलेला अर्थ पत्करला आहे.

कां तूं (या गोष्टींचें) अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वरानें आकाशांतून पाणी पाडिलें, व मग जमिनींत त्याचे झरे वाहविले; मग तोच त्या (पाण्या)द्वारें नानाविध रंगांचें शेत उगवितो: नंतर तें जोरावर येतें व मग (पिकल्यावर) तूं तें पाहतोस कीं (तें) पिवळें जरद पडून गेलें आहे. नंतर परमेश्वर त्याचा चुराचुरा करून टाकतो. निःसंशय (शेताच्या) या (आदि व अंतां)त बुद्धिवानांकरितां एक (मोठा) धडा होय. २१. कां ज्या मनुष्याचा ह्रिदया परमेश्वरानें इस्लमा(च्या स्वीकारा)साठीं उघडला आहे व तो आपल्या पालनकर्त्या(ची मार्गसूचक मशाल पुढें ठेवून ति)च्याच प्रकाशावर (चालतो) आहे, तो (जो नास्तिकपणाचें अंधःकारांत पडला आहे त्याच्यासारखा होऊं शकतो काय)? तर ज्या लोकांचीं अंतःकरणें परमेश्वराच्या स्मरणाकडून (गाफिल होऊन) कठोर होऊन गेलीं आहेत, त्यांस खेद होय! हेच लोक तर बोलून चालून चुकींत होत. २२. परमेश्वरानें फारच उत्तम गोष्ट (म्हणजे हें) पुस्तक[१] प्रकटिलें (कीं त्याच्या गोष्टी एकमेकांशीं) मिळत्याजुळत्या (होत; व एकच गोष्ट समजाविण्यासाठीं त्या) पुन्हां पुन्हां सांगितल्या गेल्या आहेत.(या पुस्तकाचा हा गुण आहे कीं,) जे लोक आपल्या पालनकर्त्यास भितात त्यांच्या (अंगांच्या) त्वचावर या(च्या ऐकण्या)नें शहारे उभे राहतात. मग त्यां(च्या अंगां)च्या त्वचा व त्यांचीं अंतःकरणें नरम होऊन[२] ईशस्मरणाकडे (लागून) राहतात. हें (कुराण) ईश्वरी सन्मार्ग होय. तो

(१) कुराण एकदांच एकदम प्रकट झालेलें नाहीं; तर थोडें थोडें करून पुष्कळ वर्षेंपावेतों प्रकट होत राहिलें आहे. हें जर कोणा मनुष्यानें रचिलेलें असतें तर, अशी तर कोणती गोष्ट आहे कीं, इतक्या लांब मुदतीपर्यंत सर्वकाळ त्याचे विचार सारखेच राहावेत. प्रत्येक जण समजूं शकतो कीं बाळपणापासून तों म्हाणारपणापर्यंत त्याच्या विचारांत मोठा फेरफार घडून येतो. ह्मणून कुराण जर कोणा माणसाची वाणी असती तर त्यांतहि भिन्न भिन्न विचार असतेच असते. परंतु हें पाहिलें जात आहे कीं, तें अव्वलपासून अखेरपर्यंत एकाच पद्धतीवर चाललें जातें आणि त्यांत जें शिक्षण देणें उद्दिष्ट आहे तें जागजागीं ठळकपणें दिसून येत आहे; आणि हें त्याच्या ईश्वरवाणी होण्याचें मोठें प्रमाण होय.

(२) अंगाचें वा त्वचेचें नरम होणें ह्मणजे ओणवे होऊन वंदन करणें,

ज्याला इच्छितो त्याला त्याच्यायोगें (धर्माचा सरळ) मार्ग दाखवून देतो. आणि ज्याला परमेश्वर आडमार्गी भटकवील, तर मग कोणीहि त्याला सन्मार्ग दाखविणारा तर नाहींच. २३. कां जो मनुष्य पुनरुत्थानाचे दिवशीं वाईटांत वाईट शिक्षेस (म्हणजे नरकाग्नीस) आपलें तोंड देऊन तिजपासून बचावूं पाहतो तो, (मौजेनें जो स्वर्गांत बसला आहे त्याच्यासारखा होऊं शकतो)? आणि आज्ञाभंजकांस सांगितलें जाईल कीं, (जगांत) जसें कांहीं तुम्हीं करीत राहिलां (त्याची आतां गोडी) चाखा. २४. जे लोक यांच्यापूर्वी होऊन गेले आहेत, त्यांनींहि (पैगंबरांस) पाखंडी म्हटलें; तर त्यांना शिक्षेनें अशा बाजूनें येऊन गांठिलें कीं, याची त्यांना खबरहि नव्हती. २५. मग त्यांना (याच) जगाच्या आयुष्यांत परमेश्वरानें (पाणउतारा व) फजितीची गोडी चाखवून दिली. आणि परलोकींची शिक्षा तर अर्थात् (याहूनहि) फारच मोठी होय. हे लोक (इतकें) जाणते (तर बरें होतें)! २६. आणि आम्हीं लोकांच्या (समजाविण्यां)साठीं ह्या कुराणांत सर्वच तऱ्हेचे दृष्टांत सांगितले आहेत; कीं हे लोक कदाचित् बोध धरतील. २७. (हें)कुराण (स्पष्ट व सुरस) अरबी (भाषेंत होय); यांत कोणाहि तऱ्हेचा वांकडेपणा नाहीं; कीं (प्रथम) ह्या (अरब) लोकांनीं (आपली मातृभाषा असल्यामुळें तें खूप समजून उमजून परमेश्वराला) भीत राहावें. २८. (आतां) पर-

---

साष्टांग नमस्कार घालणें वगैरे भक्तीचीं कामें-त्यायोगें फार अनायासानें आपोआप होऊं लागतात.

(१) तोंड मनुष्यास इतकें प्रिय असतें कीं तो इतर सर्व अवयवांस त्याची ढाल बनवितो. आणि जेव्हां तोंडानें तो ढालीचें काम घेऊं लागला तेव्हां ही कमाल दर्जाची शिक्षा होय. तोंडानें ढालीचें काम घेण्याचें हें कारण आहे कीं, नरकवाश्यांचे हात पाय तर जखडलेले असतील; तो बापडा तोंडाला ढाल न बनवील तर काय करील?

(२) ही कुराणाची अजब करामत आहे कीं, तें अरब लोकांत प्रकट झालें. हे लोक त्याच्या प्रकट होण्याच्या वेळीं सुसंस्कृति, नीतिमत्ता व ठरीव मतांच्या दृष्टीनें, फारच मागसलेल्या स्थितींत होतें हें निर्विवाद होय. नंतर कुराणाचे शिक्षणानें ते असे सुधरून गेले कीं, त्यांजपासून सर्व जगानें सुसंस्कृति, आत्मो-

मेश्वर एक दृष्टांत सांगतो कीं एक पुरुष (दास) आहे; त्याच्यांत कित्येक पातीदार आहेत कीं ते आपसांत फार चढाओढी ठेवितात; आणि एक पुरुष (तोहि दास आहे पण) समग्र एका पुरुषाचाच. कां हे दोवे (दास) दृष्टांतांत एकसारखे होऊं शकतात? (हे लोक हें ऐकून म्हणतील कीं नाहींच होऊं शकत. हे पैगंबरा! हें उत्तर ऐकून बोल;) सर्व स्तुति परमेश्वरास असो! परंतु यांच्यांतून बहुतेक (इतकी गोष्टहि) समजत नाहींत. २९. (हे पैगंबरा!) कांहीं संशय नाहीं कीं, तुलाहि मरणें होय; व कांहीं शंका नाहीं कीं यांनाहि मरणें आहे. ३०. मग पुनरुत्थानाच्या दिवशीं तुम्हीं (दोन्हीं पक्ष) आपल्या पालनकर्त्यांच्या रूबरू (आपापले) झगडे (पुढें) कराल; (तेव्हां सत्यासत्य उघडकीस येईल). ३१.

---

न्नति व प्रगती यांचा धडा घेतला. (पाहा Moors in Spain by Lane pool).

(१) हा दृष्टांत परमेश्वराला एकच मानणारा व अनेकेश्वर मानणारा अथवा मूर्तिपूजक यांचा आहे. कारण एकेश्वरमतवादी हा एका परमेश्वराचा सेवक आहे व तो त्याशींच आपला संबंध ठेवतो. आणि अनेकेश्वर मतवादी अनेक देवांचा सेवक आहे; म्हणजे तो आपल्याला अनेक मालकांचा गुलाम किंवा दास समजतो. शिवाय मालक असे आहेत कीं एकाचा स्वभाव एकाशीं मिळत नाहीं; आणि दास हा सर्वांस राजी राखूं पाहतो. तर मग हें कसें होऊं शकणार?

# पवित्र कुराण

## भाग चोवीसावा.

### सूरतु-ज्जुमर (पुढें चालू)

तर जो कोणी परमेश्वरासंबंधानें खोटें बोलेल आणि सत्य गोष्ट त्याला पोहोंचली म्हणजे तो तिला पाखंड म्हणेल त्याच्यापेक्षां अधिक जुलमी कोण? कां नास्तिकांचें ठिकाण 'जहन्नम'मध्यें नव्हें? ३२. आणि जो सत्य घेऊन आला व (तसेंच ज्यानें) त्यास सत्य जाणिलें, हेच लोक तर (परमेश्वराला) भिऊन वागणारे होत. ३३. ते जें इच्छितील तें त्यांच्या पालनकर्त्यापाशीं त्यांना (प्राप्त) होईल. सुकृत्य करणाऱ्यांचा हाच मोबदला होय; ३४. कीं परमेश्वर त्यांजपासून, त्यांनीं जीं वाईटांत वाईट कर्में केलीं आहेत तीं निरस्त करील आणि त्यांनीं जीं उत्तमांत उत्तम कर्में केलीं आहेत त्यांच्या ऐवजीं तो त्यांना त्यांचा मोबदला देईल. ३५. कां परमेश्वर आपल्या सेवका ('मोहंमदा'च्या संरक्षणा-)साठीं पुरेसा नाहीं? आणि (हे पैगंबरा! हे लोक) परमेश्वराशिवाय जे (खोटे उपास्य स्थापित करतात) त्यांचें तुला भय दाखवितात. आणि ज्याला परमेश्वर गैरमार्गीं लावील तर त्याला कोणीहि सन्मार्ग दाखविणारा नाहीं. ३६. आणि ज्याला परमेश्वर सन्मार्ग दाखवील तर कोणीहि त्याला बहकविणारा नाहीं. कां परमेश्वर सामर्थ्यवान् व सूड उगविणारा नव्हे. ? ३७. आणि (हे पैगंबरा !) जर तूं या (लोकां)स पुसशील कीं आकाश व पृथ्वी हीं कोणी निर्माण केलीं ? तर ते अवश्य (हेंच) म्हणतील कीं परमेश्वरानें. (आतां तूं या लोकांस)

---

(१) 'जो सत्य गोष्ट घेऊन आला' ते हजरत पैगंबरसाहेब होत. आणि सत्यगोष्ट म्हणजे कुराण व इस्लामधर्म; व 'ज्यानें त्यास सत्य जाणिलें, ते प्रथमं हजरत अबुलकर पैगंबरांचे दुय्यम खलीफा वा प्रतिनिधि हे होत व त्यानंतर इतर सर्व मुसलमान लोक.

सांग कीं बरें पाहा तर खरें, जर परमेश्वर मला एखादें दुःख पोहोंचवूं इच्छील तर परमेश्वराशिवाय ज्या (उपास्यां)स तुम्हीं बोलावितां, हे (उपास्य) कां त्याच्या (पाठविलेल्या) दुःखाचें निवारण करूं शकतात? अगर परमेश्वर माझ्यावर(आपली)दया करूं इच्छील,तर कां हे (उपास्य) त्याच्या दयेस अडवूं शकतात? (हे पैगंबरा! तूं) सांग कीं मला तर परमेश्वर बस्स करतो.(आणि)भरंवसा ठेवणारे त्याच्यावरच भरंवसा ठेवितात३८. (हे पैगंबरा!तूं या लोकांस)सांग कीं हे बांधवांनों! तुम्हीं आपल्या जागीं कर्म आचरीत राहा; मीहि(आपल्या जागीं)कर्म आचरीत राहतों. मग पुढें जातां तुम्हांस माहीत होऊन जाईल;३९. कीं कोणावर अशी आपत्ति येते कीं जी त्याला(जगांत)फजित करील; आणि(परलोकीं)त्याच्यावर कायमची शिक्षा उतरेल. (ती वेगळीच). ४०. (हे पैगंबरा!) निःसंशय, (हें) पुस्तक आम्हीं तुला लोकांच्या(फायद्या)साठीं प्रकट केलें आहे, व यांत सत्य (धर्माचें शिक्षण) होय. तर जो सन्मार्गोन्मुख झाला तो खास आपल्या (कल्याणा)साठींच (सन्मार्गोन्मुख झाला); आणि जो भटकला, तर त्याचें भटकणें केवळ त्याच्याच पुढें येईल. आणि तूं त्यांच्यावर कांहीं हवालदार[1] तर नाहींसच. ४१. लोकांच्या मरणसमयीं परमेश्वर त्यांच्या आत्म्यांस (आपल्यापाशीं) बोलावून घेतो; आणि जे लोक मेले नाहींत (त्यांच्या आत्म्यांनाहि) त्यांच्या निजतेवेळीं (परमेश्वरापाशीं बोलाविलें जातें); तर ज्यांच्यासंबंधानें (परमेश्वर) मृत्यूचा हुकूम सादर करून चुकला आहे, त्यांना तर (आपल्याएथें) अडकवून ठेवितो; आणि बाकीच्या(निजणाऱ्यां)स एका नियमित काळापर्यंत (पुन्हा जगांत) पाठवितो. जे लोक विचार व मनन करतात त्यांच्यासाठीं यांत (ईश्वरी सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या[2] होत, यांत संशय नाहीं. ४२. कां या लोकांनीं परमेश्वरा-

(१) हवालदार हाहि दारोग्या सारखाच एक हुद्दा आहे. त्यांत हवालदार हा आपल्या हाता खालच्या लोकांच्या कामांचा जबाबदार असतो व त्याला त्यांजवर अधिकारहि असतो. उद्देश हा कीं, तुम्हांस हा अधिकार देऊन पाठविलें गेलें नाहीं कीं, जबाबदारीच्या भीतीनें तुम्हीं लोकांस जबरदस्तीनें मुसलमान करावें. तुमचें कर्तव्य आमचे हुकूम पोहोंचते करणें आहे एवढेंच कायतें.

(२) निजणेंहि एक प्रकारचें मरणें होय. तर मरणें दोन प्रकारचें झालें. एक

शिवाय (दुसरे दुसरे) शिफारसी ठरवून ठेविले आहेत? (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं, जरी (तुमचे हे मध्यस्थ) कशाचीच सत्ता बाळगीत नसतील व कांहींच समजत नसतील, तरीहि कां (तुम्हीं त्यांस आपले शिफारसीच मानीत जाल)? ४३. (आणि या लोकांस) सांग कीं, शिफारस तर सारी परमेश्वराच्याच अख्त्यारांत होय. आकाश व पृथ्वीची हुकुमत त्याचीच होय. नंतर तुम्हीं (लोक) त्याच्याचकडे परतून आणिले जाल. ४४. आणि जेव्हां परमेश्वराचें एकल्याचेंच नांव घेतलें जातें, तेव्हां जे लोक परलोकींचा विश्वास बाळगित नाहींत त्यांचीं मनें चपापूं लागतात. आणि जेव्हां परमेश्वराशिवाय जे (इतर खोटे उपास्य) त्यांचें नांव घेतलें जातें, तेव्हां तर हे लोक खुष होऊन जातात. ४५. (हे पैगंबरा! तूं) बोल कीं, हे परमेश्वरा! आकाशांच्या व पृथ्वीच्या उत्पादका! अदृष्ट व दृष्टाच्या ज्ञात्या! ज्या बाबतींत (हे) तुझे सेवक आपसांत मतभेद करीत आहेत, त्या बाबतींत तूंच त्यांचें भांडण चुकवशील. ४६. आणि जर आज्ञाभंजकांपाशीं पृथ्वींतील सारा संसारहि असेल व त्याबरोबर तेवढाच आणखीहि असेल, तर पुनरुत्थानाच्या दिवशीं तो देऊन ते (सक्त) वाईट शिक्षेपासून (बेलाशक) सुटका करून घेतील. आणि (त्यावेळीं) या(लोकां)स परमेश्वराकडून अशा गोष्टी जाहीर होतील कीं ज्यांची त्यांना कल्पनाहि आली नव्हती. ४७. आणि जसजशीं कामें (हे लोक) करीत राहिले आहेत, त्यांचे दुष्परिणाम त्यांना जाहीर होऊन जातील; आणि ज्या(शिक्षे)चा ते उपहास करीत राहिले आहेत, ती त्यांना येऊन घेरील. ४८. तर माणसा(ची संवय आहे कीं त्या)ला जेव्हां एखादें दुःख पोहोंचतें तेव्हां तो आम्हांस बोलावितो. मग जेव्हां आम्हीं त्याला आपल्याकडून एखादी देणगी देतों, तेव्हां

---

खरोखरी मरणें व दुसरें निजणें; कीं या दोन्ही स्थितींत प्राणहरण केलें जातें म्हणून जो प्राण मृत्युमुळें हरण केला गेला आहे त्याला पुन्हां जगांत यावयास मिळत नाहीं; आणि जो प्राण निद्रमुळें हरण केला गेला आहे तो पुन्हां ईश्वराज्ञेनें जगांत परत येतो. तात्पर्य, बोध घेण्यासाठीं प्रत्येक निजण्यांत खऱ्या मृत्यूचें स्मरण केलें पाहिजे. निजलेला मेल्यासारखा अशी एक म्हणहि आहे.

तो म्हणूं लागतो कीं, ही तर मला फक्त (माझ्या) योग्यतेमुळें मिळाली आहे. (माणसाची ही समजूत चुकीची आहे.) किंबहुना ही (देणगी) परीक्षा[१] होय. परंतु बहुतेक लोक (या गोष्टीशीं) वाकब नाहींत. ४९. जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत तेहि अशाच बाता झोंकत होते. तर जें कांहीं ते करीत राहिले तें कांहींहि त्यांच्या कामा आलें नाहीं. ५०. तर त्यांनीं जीं (वाईट) कर्मे केलीं त्यांचे दुष्परिणाम त्यांना पोहोंचलेच (पोहोंचले). आणि या('मक्के'च्या नास्तिकां)पैकीं जे लोक आज्ञाभंग करतात त्यांनाहि त्यांच्या कर्मांचे वाईट परिणाम लवकरच पोहोंचतील. आणि (हे लोक परमेश्वराला तर) हारवूं शकत नाहींत. ५१. कां यांना (इतकीहि गोष्ट) माहीत नाहीं कीं, परमेश्वर ज्याची इच्छितो, त्याची चंदी वाढवितो आणि (ज्याला इच्छितो त्याला) काटकसरीनें देतो. निःसंशय, या(गोष्टीं)त जे लोक विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीं (तर ईश्वरीसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या (उपलब्ध) होत. ५२. (हे पैगंबरा! या लोकांस) सांगून दे कीं, ज्यांनीं (पापें करून) आपणच आपल्यावर अत्याचार केला आहे त्या हे माझ्या सेवकांनों! तुम्हीं परमेश्वराच्या दयेकडून निराश होऊं नका. कारण, परमेश्वर सर्व पापांची क्षमा करितो; तो निःसंशय (फारच) क्षमाकर्ता (व) दयाळु होय. ५३. आणि तुम्हीं आपल्या पालनकर्त्याकडे (अनुतप्त होऊन) वळा व त्याच्या आज्ञाधीन होऊन राहा; (पण) याच्यापूर्वींच कीं, शिक्षा तुम्हांस सादर होईल व त्यावेळीं तुम्हांस (कोणाहिकडून) मदतहि न पोहोंचूं शकेल. ५४. आणि तुमच्या पालनकर्त्याकडून ज्या चांगल्या चांगल्या (उपदेशपर) गोष्टी तुम्हांस प्रकट झाल्या आहेत, त्याप्रमाणें वागा; (पण) याच्यापूर्वींच कीं, तुह्मांस एकाएकीं शिक्षा सादर होईल व तुम्हांस (तिच्या येण्याची) बातमीहि नसेल. ५५. (कोठें असें न व्हावें) कीं (अखेर तुमच्यांतून) कोणी म्हणूं लागेल कीं, मी

(१) परीक्षा ह्मटली ह्मणजे या गोष्टीची परीक्षा कीं, माणसाला देणगी प्राप्त झाल्यावर तो परमेश्वराचे उपकार मानतो कीं, अनुपकारी होतो. पण जो मनुष्य देणगीस आपल्या शहाणपणाचा व योग्यतेचा मोबदला समजेल तो परमेश्वराचे उपकार कां मानील?

परमेश्वराच्या बाजू(च्या आपल्या कर्तव्यां)त कोताई केली याबद्दल खेद होय! आणि मी तर अर्थात् (या गोष्टींवर) हंसतच राहिलों. ५६. अगर तो ह्मणूं लागेल कीं, जर परमेश्वर मला सुबुद्धि देता, तर मीहि (परमेश्वराला) भिणाऱ्यांपैकीं झालों असतों. ५७. अथवा जेव्हां शिक्षा (समोर येऊन ठेपेल व ती) पाहून म्हणूं लागेल कीं अरेरे! जर माझें (जगांत) परतून जाणें होईल तर मीहि सुकृत्यें करणारांपैकीं होऊन जाईन. ५८. (त्यावेळीं परमेश्वर त्याला म्हणेल,) हो होय! माझे हुकूम तुला पोहोंचले व तूं त्यांस पाखंड म्हणालास व ऐटून बसलास आणि नास्तिकांपैकीं (एक नास्तिक तूंहि) होतास. (आतां तुजवर कांहीं मेहेरनजर होऊं शकत नाहीं.) ५९. आणि (हे पैगंबरा!) तूं पुनरुत्थानाच्या दिवशीं पाहशील कीं, जे लोक परमेश्वरासंबंधानें लबाड बोलले आहेत त्यांचीं तोंडें काळीं होतील. कां अहंकार करणाऱ्यांचें ठिकाण 'जहन्नम' मध्यें नव्हे? ६०. आणि जे (लोक (परमेश्वराला) भीत राहिले आहेत त्यांना परमेश्वर सफल करून तारील; कीं त्यांना (कोणा तऱ्हेचीहि ) इजा पोहोंचणार नाहीं व ते (कोणाहि तऱ्हेनें) दुःखी होणार नाहींत. ६१. परमेश्वरच प्रत्येक वस्तुचा निर्माणकर्ता होय व तोच हरेक वस्तुचा नियंता होय. ६२. आकाश व पृथ्वी(च्या खजिन्यां)च्या किल्ल्या[१] त्याच्याच होत; आणि जे लोक परमेश्वराचे निशाण्यास मानण्याचें नाकारितात तेच (अखेर) तोट्यांत राहतील. ६३. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं, हे अज्ञानी लोकांनों! कां तुम्हीं मला (हा) सल्ला देतां कीं, मी परमेश्वराशिवाय(अन्य कोणा)ची उपासना करावी? ६४. आणि (हे पैगंबरा! निःसंशय) तुजकडे व तुझ्यापूर्वीं जे (पैगंबर) होऊन गेले आहेत, त्या (प्रत्येका)कडे आदेश पाठविला जाऊन चुकला आहे कीं, जर तूं (कोणाला परमेश्वराचा) जोडीदार ठरविशील तर अवश्य तुझीं (सर्व) कर्में अकीत होऊन जातील आणि अवश्यच तूं हानि भोगणाऱ्यांपैकीं होऊन जाशील. (म्हणून नास्तिकांचा कह्या मानूं नकोस.) ६५. तर, परमेश्वराचीच उपासना कर व त्याच्या आभारशील

१ म्हणजे तोच त्या किल्ल्यांचा व खजिन्यांचा मालक होय व सर्व कांहीं त्याच्याच समर्थ हातांत आहे.

(सेवकां)पैकीं हो. ६६. आणि या लोकांनीं तर परमेश्वराचे जसे गुण जाणले पाहिजे होते तसे त्याचे (कांहींहि) गुण जाणिले नाहींत; व वास्तविक पाहतां, (तो असे पराक्रम व सामर्थ्य बाळगितो कीं) पुनरुत्थानाचे दिवशीं (ही) सारी पृथ्वी त्याच्या एका मुठींत असेल आणि आकाश (हे पत्रांप्रमाणें) गुंडाळलेले त्याच्या[१] उजव्या हातांत. लोक ज्या ज्या वस्तूंस (परमेश्वराचे) जोडीदार ठरवितात त्यांजपासून परमेश्वर पवित्र व थोर होय. ६७. आणि (पहिल्यांदा) 'सूर' (म्हणजे करणा) फुंकला जाईल, तर जी (सृष्टि) आकाशांत आहे व जी पृथ्वींत आहे त्या(सर्वां)स (मृत्युची) मूर्च्छा येऊन जाईल; परंतु ज्याला परमेश्वर इच्छील (त्याची गोष्ट वेगळी). मग दुसऱ्यांदा करणा फुंकला जाईल तर आतां सारेचे सारे एकदम (थडग्यांतून निघून) उभे राहून जातील (व चोहोंकडे) पाहूं लागतील. ६८. आणि पृथ्वी आपल्या पालनकर्त्याच्या प्रकाशानें चकाकूं लागेल व (लोकांचे कर्मांचें) पुस्तक (आणून समोर) ठेविलें जाईल; आणि पैगंबर व साक्षी हे हजर केले जातील; व लोकांच्या दरम्यान (त्यांच्या मतभेदांचा) न्यायपुरःसर निवाडा केला जाईल;आणि त्यांजवर (कोणाहि तऱ्हेचा) जुलूम केला जाणार नाहीं. ६९. आणि ज्यानें जशीं कर्मे केलीं आहेत प्रत्येकास तीं पुरीं पुरीं भरून दिलीं जातील. आणि लोक जें कांहींहि करितात परमेश्वर त्याशीं खूप वाकब होय.७०.आणि जे लोक नास्तिकपणा करीत राहिले आहेत ते 'जहन्नम'कडे टोळयाच्या टोळया बनवून हांकून लाविले जातील; येथपर्यंत कीं जेव्हां 'जहन्नम'च्याजवळ पोहोंचतील, तेव्हां (त्यांच्याकरितां) तिचे दरवाजे उघडले जातील; व तेथील रखवालदार त्यांना म्हणतील कीं,तुमच्यांतलेच पैगंबर तुम्हांपाशीं आले नाहींत काय, कीं ते तुमच्या पालनकर्त्याचीं महावाक्यें तुह्मांस वाचून वाचून ऐकवीत व तुमच्या ह्या(वाईट)दिवसाच्या पुढें येण्यापासून तुम्हांस भिववीत ? हे उत्तर देतील कीं होय. (पैगंबर आले व त्यांनीं भिवविलेंहि;) परंतु (आम्हीं त्यांचें एकहि ऐकिलें नाहीं व)

(१) परमेश्वरानें आह्मां लोकांस समजाविण्यासाठीं आमच्याच भाषासरणीस अनुसरून आपल्या महती व सामर्थ्यास मूठ व हात असें ह्मटलें आहे. नाहीं तर, परमेश्वर या अवयवांपासून निरपेक्ष होय.

शिक्षेचें वचन (आम्हां) नास्तिकांचेठायीं (पूर्णपणें) सिद्ध होऊन चुकलें. ७१. (मग यांना) सांगितलें जाईल कीं 'जहन्नम'च्या दरवाज्यांत दाखल व्हा (व नित्य) निरंतर या('जहन्नम')मध्यें, वास करा. सारांश, (परमेश्वराशीं) अहंकार करणाऱ्यांचेंहि (किती तरी) वाईट ठिकाण होय! ७२. आणि जे लोक (जगांत) आपल्या पालनकर्त्याला भीत राहिले त्यांनाहि टोळ्याचेटोळ्या बनवून स्वर्गाकडे नेलें जाईल; येथपर्यंत कीं, जेव्हां (हे लोक) स्वर्गाचे जवळ पोहोंचतील व त्याचे दरवाजे (तर त्यांच्यासाठीं पहिल्यानेंच) उघडलेले असतील, (कीं तेणेंकरून त्यांस उघडण्याची वाट पहावी लागणार नाहीं; तेव्हां यांचा मोठा बडेजाव होईल.) आणि स्वर्गाचे रखवालदार यांना सलामालकी करून म्हणतील कीं, तुम्हीं(फार) मजेंत राहिलां; तर आतां स्वर्गांत दाखल व्हा (व तेथें) निरंतर वास करा. ७३. आणि (हे लोक) म्हणतील, परमेश्वराचे आभार होत कीं, त्यानें आपलें वचन आम्हांस खरें करून दाखविलें व आम्हांस (स्वर्गाचे) भूमीचे वारस बनविले; कीं आम्हीं स्वर्गांत जेथें इच्छूं तेथें राहूं. तर (सुकृत्य) करणाऱ्यांचाहि (किती) चांगला मोबदला होय! ७४. आणि (हे पैगंबरा! त्या दिवशीं तूं) दूतांस पाहशील कीं, 'अर्श'–महासिंहासनाच्या सभोंवतीं चक्राकार फिरत (उभे आहेत, व) आपल्या पालनकर्त्याच्या स्तुतीबरोबर (त्याची) पवित्रता वर्णीत आहेत. आणि लोकांच्या दरम्यान न्यायानें निवाडा चुकविला जाईल; आणि (सर्व कांहीं होऊन जाऊन सरशेवटीं चोंहोंकडून हीच) घोषणा होईल कीं सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच सर्व स्तुति (योग्य) होय. ७५

# अध्याय ४० वा.

## सूरतुल्-मोमिन.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. ह्यांत ८५ आयात—महावाक्यें आहेत. फिरऔन किंवा फेरोचे लोकांपैकीं एक मनुष्य हिझकील नांवाचा होता. त्यानें हजरत मूसा पैगंबरावर, लोकांस न कळत, विश्वास ठेविलो होता. त्याचें ह्यांत वर्णन आलें आहे; म्हणून 'सुरतुल्-मोमिन' म्हणजे विश्वासूचें प्रकरण हें नांव प्रसिद्धीस आलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)

ह. म. (हा-मीम.) १. (हा) लेखी फर्मान (अशा) परमेश्वराच्या हुजुरांतून सादर होत आहे (कीं जो) परम समर्थ (व सर्व-)ज्ञानी (होय.) २. (तो) पापांचा क्षमाकर्ता व पश्चात्ताप स्वीकार्ता, (दुष्टांस) सक्त शिक्षा देणारा, (चांगल्यांच्या स्थितीवर) फारच कृपावंत (असा होय.) त्याच्या-शिवाय (अन्य)कोणी उपास्य नाहीं. त्याच्याचकडे (सर्वांस) परत जाणें आहे. ३. जे लोक नास्तिक होत तेच केवळ परमेश्वराच्या निशाण्यांत झगडे काढतात. तर (हे पैगंबरा!) या लोकांचे (व्यापार वगैरेसाठीं) शहरांत जिकडे तिकडे मिरवत फिरण्यानें तुला धोक्यांत घालूं नये (कीं यांना तर नास्तिकपणामुळें कांहींच नुकसान पोहोंचलें नाहीं). ४. यांच्यापूर्वी 'नूह'चे लोकांनीं व त्यांच्यामागून इतर लोकांनींहि (आपल्या पैगंबरांस) पाखंडी म्हटलें. आणि हरेक जनतेनें आपल्या पैगंबरास गिरफ्तार करण्याचा बेत केला आणि मिथ्या गोष्टीं(च्या आधारा)वर (पैगंबरांशीं) झगडले; अशासाठीं कीं, आपल्या वितंडवादानें सत्यास (जागेवरून) डगमगवावें. तर (अखेर) मी त्यांस पकडलें. तर (पाहिलेंसना) माझी शिक्षा कशी होती ती? ५.

आणि अशाच तऱ्हेनें (या) नास्तिकांवरहि तुझ्या पालनकर्त्याचें वचन सिद्ध होऊन चुकलें आहे कीं, हे नरकवासी होत. ६. जे (दूत) महा-सिंहासनास उचलून आहेत व जे त्याच्या सभोंवतीं (तैनातीं) होत, ते (नित्य) आपल्या पालनकर्त्याच्या स्तवनाबरोबर (त्याची) पवित्रताहि वर्णित राहतात; व त्यावर विश्वास ठेवितात; आणि जे लोक विश्वासू होत त्यांच्यासाठीं ते क्षमा मागीत असतात; कीं हे आमच्या पालनकर्त्या! तुझी दया व तुझें ज्ञान वस्तुमात्रास व्यापून आहे; तर जे लोक (तुझ्या सेवेंत) पश्चात्ताप करतात व तुझ्या मार्गावर चालतात त्यांना तूं क्षमा कर; आणि (तसेंच) त्यांना नरकाच्या शिक्षेंतून वांचीव. ७. आणि हे आमच्या पालनकर्त्या! त्यांना (स्वर्गाच्या) नेहमीं राहण्याच्या (अशा) बागांतहि नेऊन दाखल कर, कीं ज्याचें तूं त्यांस अभिवचन दिलें आहेस; आणि (तसेंच) त्यांचे वाडवडील व त्यांच्या पत्न्या व त्यांची संतति यांजपैकीं जे जे सदाचरणी असतील त्यांनाहि. निःसंशय, तूंच सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् आहेस. ८. आणि त्यांना (पुनरुत्थानाचे दिवशीं, हरतऱ्हेच्या) खराबींतून वांचीव. आणि ज्याला तूं त्या दिवशीं खराबींतून वांचविशील, तर त्याच्यावर तूं (आपली मोठीच) दया केलीस. आणि हीच तर मोठी सफलता होय. ९. जे लोक (सद्धर्मास) मानण्याचें नाकारितात त्यांना (पुनरुत्थानाचे दिवशीं) मोठ्यानें हाक मारून सांगितलें जाईल कीं जेव्हां तुम्हीं विश्वासाकडे बोलाविले जात होता व तुम्हीं नाकारीत होता, तेव्हां जसें तुम्हीं (आज) आपल्या जिवानिशीं बेजार आहां, परमेश्वर त्याहूनहि जास्त (तुम्हांशीं) बेजार होता. १०. (ते लोक प्रार्थना करून) म्हणतील कीं, हे आमच्या पालनकर्त्या! तूं आम्हांस दोनदां मेलेले व दोनदां जिवंत राखून चुकलास;

(१) जगांत निर्माण होण्याच्या पूर्वीं मनुष्य ज्या ज्या स्थितींत राहिला असेल तेंहि एक प्रकारचें मरणच होय. कारण कीं त्यास जीवित्व तर म्हणतां येत नाहीं. ज्यावेळीं शरीर व आत्मा यांचा संबंध घडून येतो त्या वेळेपासून आयुष्यक्रम सुरू होतो. शिवाय दुसरें मरण जें सर्वांस येतें तें तर माहीतच आहे. सारांश हीं दोन मरणें झालीं. आणि राहिलीं दोन आयुष्यें; त्यांत एक इहलौकिक आयुष्य व दुसरें पारलौकिक आयुष्य.

तर (आतां) आम्हीं आपलीं पापें कबूल करितों. तर (आतां येथून) निघण्याचाहि कांहीं मार्ग आहे ? ११. (परमेश्वर म्हणेल, नाहीं; व) हें यासाठीं कीं, (जगांत) जेव्हां एकल्या परमेश्वराला बोलाविलें जात होतें, तेव्हां तुम्हीं (त्याला) मानीत नव्हता. आणि जर त्याचे जोडीदार ठरविले जात होते, तर मात्र तुम्हीं विश्वास धरीत होता. तर (आज) परमेश्वराचीच हुकमत होय कीं जो महिमाशाली व (सर्वांत) मोठा होय. १२. (लोकांनों) तोच तर होय कीं जो तुह्मांस आपल्या (सामर्थ्याच्या) निशाण्या दाखवितो व आकाशांतून तुम्हांसाठीं अन्नसंपत्ति उतारतो. आणि जो कोणी (परमेश्वराकडे) वळतो तोच मात्र (अशा गोष्टींचें) मनन करितो. १३. तर (मुसलमानांनों!) खास परमेश्वराप्रीत्यर्थच शुद्ध धर्मपालन करून त्यालाच बोलावीत जा. व (मग) हवें तर नास्तिकांस (हें) आवडेनासेंच (कां) होईना ? १४. (परमेश्वर) दर्ज्यांत उच्च (व) महासिंहासनाचा मालक (होय). तो आपल्या सेवकांतून ज्याच्यावर इच्छितो त्याच्यावर आपल्या अधिकारानें (पवित्र) आत्मा[1] टाकतो; कीं त्या (पैगंबरा) नें (लोकांस) भेटीच्या[2] दिवसा (म्हणजे पुनरुत्थानाच्या आपत्ती) पासून भिववावें. १५. (ह्मणजे) तो दिवस कीं जेव्हां (सर्व) लोक (परमेश्वरा) पुढें निघून उभे राहतील; त्यांची कोणतीच गोष्ट परमेश्वरापासून गुप्त राहणार नाहीं. (परमेश्वराकडून वाणी होईल कीं) आज कोणाचें राज्य आहे ? (तेव्हां सर्व हैबतीनें स्तब्ध रातील व खुद्द ईश्वरी वाणी होईल कीं राज्य) एकट्या (व) जबरदस्त परमेश्वराचेंच होय. १६. आज प्रत्येक जणास त्याच्या कर्मांचा मोबदला दिला जाईल; आज (कोणावरहि) जुलूम (होणार) नाहीं. निःसंशय परमेश्वर फारच जलद हिशेब[3] करणारा होय. १७.

(१) पवित्र आत्मा टाकणें म्हणजे वाह्य-प्रकटीकरण पाठविणें असा अर्थ होतो.

(२) पुनरुत्थानाचीं जेथें 'यौमुल्-बअस' व 'यौमुत्तनाद' वगैरे आणखीहि नांवें आहेत तेथें त्याचें एक नांव 'यौमुत्तलाकी' हेंहि आहे. त्याचा अर्थ भेटीचा दिवस असा आहे. पुनरुत्थानाच्या दिवशीं भेट अनेक प्रकारची होईल:—आत्म्यांची शरीरांशीं, सेवकांची परमेश्वराशीं, स्वर्गीय व नरकवासी यांची आपापल्या कर्मांशीं, पृथ्वींत राहणारांची द्युलोक ह्मणजे देवदूतांशीं, आत्म्यांची आत्म्यांशीं, आणि ओळखीच्या लोकांची ओळखीच्या लोकांशीं वगैरे.

(३) या वाक्याचा मागील वाक्यांशीं संबंध असा आहे कीं कोणाहि प्रकर-

आणि (हे पैगंबरा!) या लोकांस जवळच (डोईवर) येऊन ठेपणाऱ्या (पुनरुत्थानाच्या आपत्तीच्या) दिवसाची भयसूचना कर; कीं जेव्हां (दुःखामुळें) ऊर दाटून दाटून (लोकांचीं) काळजें[1] तोंडास येऊन जातील; (त्या दिवशीं) आज्ञाभंजकांचा तर कोणी मित्र होणार नाहीं व कोणी असा शिफारसकर्ताहि नाहीं कीं ज्याची गोष्ट मान्य केली जाईल. १८. परमेश्वर नेत्रांच्या चोरीसें[2] जाणतो व (लोकांच्या) उरांत जे (भेद) गुप्त होत तेहि. १९. परमेश्वर तर (वाजवी) वाजवी हुकूम देतो; आणि त्याच्या-शिवाय ज्या(देवां)स हे लोक बोलावितात ते तर (वाजवी व गैरवाजवी) कोणाहि तऱ्हेचा हुकूम देऊं शकत नाहींत. निःसंशय परमेश्वरच ऐकता (व)पाहता होय. २०. आणि कां या लोकांनीं पृथ्वींत चालून फिरून पाहिलें नाहीं, कीं जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत, त्यांचा कसा परिणाम झाला? ते (लोक) बलशक्तिच्या मानानें (काय) व पृथ्वींत (त्यांनीं मागें सोडलेल्या) चिन्हांच्यामानानें, (काय) यांच्यापेक्षांहि फारच जबरदस्त होते. (पण नास्तिक व फिसादी होते म्हणून) तर परमेश्वरानें त्यांना त्यांच्या पापांच्या शिक्षेंत पकडलें आणि त्यांना परमेश्वरा(च्या कोपा)पासून कोणीहि वांचविणारा नव्हता. २१. हें या कारणें झालें कीं, त्यांचे पैगंबर चमत्कार घेऊन येऊन त्यांच्यापाशीं येत राहिले, यावरहि त्यांनीं मानिलें नाहीं; तर परमेश्वरानें त्यांना पकडलें. निःसंशय तो (फारच) बलाढ्य (व मोठी) सक्त शिक्षा देणारा होय. २२. आणि आम्हीं 'मूसा'ला आपल्या निशाण्या (म्हणजे चमत्कर) व स्पष्ट स्पष्ट प्रमाणें देऊन 'फिरऔन' व 'हामान' व 'कारून' यांजकडे पाठविलें; तर ते (लोक 'मूसा'च्यासंबंधानें) बोलूं लागले कीं (हा)

---

णास उशिरापावेतों लोंबकळत ठेवणें हाहि प्रतिपक्ष्यांवर एक प्रकारचा जुलूम होय. वाट पाहत बसणें मरणापेक्षांहि बिकट आहे ह्मणून परमेश्वराकडून लोकांवर एवढाहि जुलूम होणार नाहीं; कारण तो फारच जलद हिशेब करणारा होय.

(१) शब्दशः भाषांतर तर हें कीं, अंतःकरणें गळ्यापावेतों येतील व लोक गम खाऊन राहतील असल्या प्रसंगीं काळीज तोंडास येणें, किंवा नाकीं नव येणें असें बोलण्याचा परिपाठ आहे.

(२) नेत्राची चोरी म्हणजे वाईट नजर किंवा डोळ्याची इषारत ही होय.

जादुगीर (व) मोठा लबाड आहे.२३-२४.तात्पर्य, जेव्हां 'मूसा' आमच्याकडून सत्य (धर्म) घेऊन त्या लोकांपाशीं आला तेव्हां त्यांनीं (आपल्या हुकूमबंद्यांस) हुकूम दिला कीं, ज्या लोकांनीं 'मूसा'च्या संगतीं (परमेश्वराचा) विश्वास धरिला आहे त्यांच्या मुलांस तर कत्तल करून टाका; आणि त्यांच्यांतून (ज्या) स्त्रिया (असतील त्यांस) जिवंत राहूं द्या. आणि नास्तिकांच्या युक्त्या तर (अखेर सर्व) फसूनच जातात. २५. आणि 'फिरऔना'नें (आपल्या दरबाऱ्यांस) सांगितलें कीं, मला 'मूसा'ला ठार मारून टाकूं द्या; आणि त्यालाहि आपल्या पालनकर्त्यांस (कुमकेसाठीं) बोलावूं द्या. मला अंदेशा आहे कीं, (कोठें असें न व्हावें कीं) तो तुमचा धर्म उलटपालट करून टाकील अगर मुलखांत फिसाद काढून उभा करील. २६. आणि 'मूसा' म्हणाला कीं मी तर आपला पालनकर्ता व तुमचा पालनकर्ता (म्हणजे एकच परमेश्वर) याचा आश्रय घेऊन चुकलों आहे; (व तो मला) प्रत्येक गर्विष्ठ जो हिशेबाच्या दिवसा (म्हणजे पुनरुत्थाना)स मानीत नाहीं त्या(च्या अपाया)पासून (सुरक्षित ठेविल). २७. आणि 'फिरऔना'च्या कुटुंबांतून एक पुरुष विश्वासू होता (व) आपला विश्वास लपवित होता, तो (ही हकीकत ऐकून) बोलला, कां तुम्हीं (फक्त एवढ्याच गोष्टीवर) एका पुरुषास जिवें मारून टाकतां कीं, तो म्हणतो आहे कीं माझा पालनकर्ता परमेश्वरच होय? आणि वास्तविक पाहतां, तो तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हांपाशीं चमत्कार घेऊनहि आला आहे. आणि जर (असें गृहित धरलें कीं हा

(१) या तऱ्हेचा हुकुम तर फिरऔननें बनी–इस्राएलांसंबंधानें हजरत मूसा–(त्यांस शांति असो)–यांच्या जन्मास येण्यापूर्वींहि देऊन ठेविला होता. ज्योतिषांनीं फिरऔनाला असें भविष्य वर्तविलें होतें कीं, बनी-इस्राएलांत एक पुरुष जन्मेल व तो तुझें राज्य उलथेंपालथें करून टाकील. फिरऔनानें या धोक्यांतून सुरक्षित राहण्यासाठीं ही युक्ति काढली होती; पण ती सिद्धीस न जातां चुकूनच गेली. आतां पुन्हा दुसऱ्यांदा हुकूम दिला तर त्याचा हा हेतु होता कीं बनी–इस्राएलांच्या पुरुषांनें बाज मारलें जावें कीं,त्यांच्यांत पुरुष होणारहि नाहींत व ते फिरऔनाच्या लोकांचा सामनाहि करूं शकणार नाहींत. परंतु परमेश्वरापुढें कोणाचें चालूं शकतें? अखेर सर्व कारस्थान फशीं पडलें.

मनुष्य) लबाडच असेल, तर त्याच्या लबाडीचा दुष्परिणाम त्याच्यावरच (पडेल). आणि जर तो खरा झाला तर ज्या ज्या (शिक्षे)चा तो तुम्हांशीं वायदा करितो त्यांतून कोणी ना कोणी (तरी) तुम्हांस (अवश्यच) पोहोंचेल. निःसंशय, जो कोणी मर्यादेबाहेर निघून गेला (व) लबाड असेल त्याला परमेश्वर सुबुद्धि देत नसतो. २८. हे माझ्या बांधवांनों ! आज तर तुमचीच हुकमत होय (व) मुलखांत (तुम्हींच) वर्चस्व गाजवितां. परंतु जर (यदृच्छेनें) ईश्वरी शिक्षा आम्हांसमोर येऊन थडकली तर मग कोण आहे कीं जो तिजपासून वांचविण्यास आमच्या मदतीस उठून उभा राहील ? 'फिरऔन' म्हणाला कीं मी तर जें कांहीं (योग्य) समजतों तेंच तुम्हांस समजावितों; आणि मी तर केवळ सरळ मार्गच तुह्मांस दाखवितों. २९. आणि जो मनुष्य (गुप्तपणें) विश्वास धरून चुकला होता तो (लोकांशीं) म्हणूं लागला कीं हे माझ्या बांधवांनों ! मला तुमच्यासंबंधानें (इतर) जनतांच्या दिवसासारख्या (च वाईट दिवसा)चा अंदेशा आहे; ३०. (म्हणजे कोठें तुमचीही तशीच स्थिति न होवो, कीं) जशी 'नूह'चे लोक व "आद' व 'समूद' व जे लोक त्यांच्या मागून होऊन गेले त्यांची गत (झाली होती.) आणि परमेश्वर तर सेवकांवर कोणाहि तऱ्हेचा जुलूम करूं इच्छीत नाहीं. ३१. आणि हे माझ्या बांधवांनों ! मला तुमच्या संबंधानें (पुनरुत्थानाच्या) हांकाहांकीच्या दिवसाचा अंदेशा आहे ३२.

---

(१) याचा अर्थ दोन्हीकडे लागू होऊं शकतो कीं, जर मूसा मोठमोठ्या बाता झोंकतो व परमेश्वरावर खोटें खोटें कुभांड रचितो, तर त्याची कोणतीच युक्ति सफल होणार नाहीं. अथवा फिरऔनाकडे इषारा असेल कीं, तो भक्तिमर्यादेचे बाहेर निघून गेला होता व ईश्वरत्वाचे खोटे खोटे दावे करीत होता, तर त्याची कोणतीच युक्ति चालू शकणार नाहीं.

(२) पुनरुत्थानाच्या दिवसाचें एक नांव 'यौमुत्तनाद' आहे व तें येथें कुराणात आलें आहे. त्याचा शब्दशः अर्थ एकमेकांस हाक मारणें किंवा हाका हांकीचा दिवस; पुनरुत्थानाचें दिवशीं ही हांकाहांक अशा प्रकारची होईल कीं नरकवासी, नरकवाश्यांशीं व स्वर्गीयांशीं आणि आपल्या पुढाऱ्यांशीं बोलणें चालणें व सवालजवाब करतील व भांडतील; आणि तसेंच लोक जाब देण्यासाठीं नांवानांवांनीं पुकारले जातील.

(म्हणजे) ज्या दिवशीं तुह्मीं पाठ फिरवून पळत सुटाल, (त्या दिवशीं) तुम्हांस परमेश्वरा(च्या शिक्षे)पासून कोणीहि वांचविणारा नसेल. आणि ज्याला परमेश्वर कुमार्गी लावील, तर कोणीहि त्याचा सन्मार्ग दर्शक नाहीं. ३३. आणि (याच्या)पूर्वीं 'यूसुफ'[1] स्पष्ट स्पष्ट हुकूम घेऊन तुम्हांपाशीं येऊन चुकला आहे, तर जे (हुकूम) तो तुम्हांपाशीं घेऊन आला होता त्यांजकडून तुम्हीं नित्य संशयांतच राहिला; येथपर्यंत कीं जेव्हां तो निवर्तला, तेव्हां तुम्हीं (त्याच्या मरणोत्तर) म्हणूं लागला कीं (याचा बखेडा तर परमेश्वरानें चुकवून दिला. आणि आतां) याच्यानंतरहि परमेश्वर कधींच कोणी पैगंबर पाठविणार नाहीं. जे लोक (ईश्वरी मर्यादेचें) उल्लंघन करतात व संशयांत पडलेले असतात त्यांना परमेश्वर अशाच रीतीनें बहकवून देत असतो; ३४. कीं त्यांच्यापाशीं कोणतेंहि प्रमाण आलें नसतांहि, ते परमेश्वराच्या निशाण्यांत वादविवाद उपस्थित करतात. परमेश्वराजवळ व जे विश्वास धरतात त्यांच्याजवळ (त्यांचें) हें (कृत्य) फारच द्वेष्य व नापसंत होय. जेवढे म्हणून गर्विष्ठ(व) शिरजोर होत त्यांच्या अंतःकरणांवर परमेश्वर अशाच तऱ्हेनें मोहोर लावून देत असतो. ३५. आणि 'फिरऔन' (आपला वजीर 'हामान' यास) म्हणाला

(१) भावार्थ हा आहे कीं, नास्तिक लोक हजरत यूसुफ-अलैहिस्सलाम-त्यांस शांति असो-यांच्या पैगंबरीसंबंधानें त्यांच्या आयुष्यकाळापर्यंत नकाररणीच करीत राहिले. मग त्यांच्या निधनानंतर त्या लोकांनीं पुढचाहि हा निकाल लावून दिला कीं ज्याप्रमाणें परमेश्वरानें अद्यापपावेतों कोणताहि पैगंबर पाठविला नाहीं; त्याचप्रमाणें तो पुढेंहि पाठविणार नाहीं. एक अर्थ हाही होऊं शकतो कीं, हजरत यूसुफाच्या जिवांत जीव होता तोंपर्यंत तुह्मीं त्यांच्या पैगंबरीसंबंधीं शंकाच करीत राहिलां. पुढें जेव्हां त्यांना मरण आलें व मिसर-इजिप्त देशाच्या राज्यांत अव्यवस्था पसरली तेव्हां तुम्हांस यूसुफाची किंमत कळून आली व तुम्हीं समजला कीं ते खरोखरींच पैगंबर होते व भविष्यकाळीं यांच्या सारखा कोणी पैगंबर येणारहि नाहीं. सारांश कोणताहि अर्थ घ्या; त्या लोकांस त्यांच्या चुकी बद्दल तंबी करण्याचा उद्देश आहे, कीं, हजरत यूसुफाच्या पैगंबरींत संशय केला; तोहि गैरवाजवी होता व त्यानंतर त्यांनीं जो हुकूम लाविला तोहि गैर होता.

**कीं, हे 'हामाना'! तूं मजकरितां एक महाल बनीव कीं, मी (त्या) मार्गावर जाऊन पोहोंचेन, ३६. म्हणजे आकाशांचे मार्गावर; व मग मीं (तेथून) 'मूसा'च्या परमेश्वराकडे (सहज) डोकावून पाहीन. आणि वास्तविक पाहतां, मीं तर 'मूसा'ला (या विधानांत) लबाडच समजतों. आणि अशा रीतीनें 'फिरऔना'चीं कुकर्मे त्याला सुशोभित करून दाखविलीं गेलीं होतीं व त्याला (सरळ) मार्गाहून अडविलें गेलें होतें. आणि 'फिरऔन'च्या युक्त्यांची तर केवळ नासाडीच (व्हावयाची) होती. ३७. आणि ज्या मनुष्यानें (गुप्तपणें) विश्वास धरिला होता, तो म्हणूं लागला कीं, हे माझ्या लोकांनों! माझ्या कह्याप्रमाणें चाला; मी तुम्हांस (धर्माचा) सरळ मार्ग दाखवून देईन. ३८. हे माझ्या बांधवांनों! हें इहलौकिक आयुष्य तर केवळ (अल्पकालिक) सुखोपभोग होय; आणि परलोक (जो आहे तर) तेंच नेहमीं राहण्याचें घर होय. ३९. जो कोणी वाईट कर्म करितो तर त्याला तसलाच मोबदला मिळेल.आणि जो कोणी चांगलें कर्म करितो, पुरुष असो वा स्त्री, व तो विश्वासूहि आहे; तर हे लोक स्वर्गांत दाखल होतील (व) तेथें त्यांना बेसुमार संपत्ति दिली जाईल. ४०. आणि हे माझ्या बांधवांनों! माझीहि अजब गंमत आहे कीं, मी तुम्हांस मोक्षाकडे बोलावितों व तुम्हीं मला नरकाग्नीकडे बोलावितां. ४१, (म्हणजे) तुम्हीं मला याचकरितां बोलावितां कीं, मी परमेश्वराशीं नास्तिकपणा करावा व त्याचा अशा वस्तूंस जोडीदार ठरवावा कीं, ज्यां(च्या ईश्वरी जोडीदार होण्या)चें मजपाशीं कोणतेंहि प्रमाण नाहीं; आणि मी तुम्हांस अशा (परमेश्वरा)कडे बोलावितो कीं, जो सामर्थ्यवान् (व पापांचा) क्षमाकर्ता होय. ४२. (तस्मात्) कांहीं संशय नाहीं कीं, ज्या वस्तूकडे तुम्हीं मला बोलावितां, तिला इहलोकींहि बोलाविणें (योग्य) नाहीं व परलोकींहि नाहीं. आणि कांहीं**

(१) फिरऔन स्वतः तर परमेश्वराला मानीतच नव्हता; परंतु त्यानें हजरत मूसा—त्यांस शांति असो—यांजपासून ऐकिलें होतें कीं, परमेश्वर आहे व तो आकाशांत आहे; व तेथून त्याचे दूत पृथ्वीवर जात येत असतात .यावरून फिरऔनाचा विचार झाला कीं, मूसाच्या म्हणण्याप्रमाणें परमेश्वर आकाशांत आहे; तर मी उंच महाल बनवून आकाशापर्यंत पोहोंचूं शकतों.

संशय नाहीं कीं, आम्हां(सर्वां)स परमेश्वराकडे परतून जाणें आहे; व कांहीं शंका नाहीं कीं, जे लोक (भक्ति)मर्यादेच्या बाहेर निघून गेले आहेत तेच नरकवासी होत. ४३. म्हणून पुढें जातां, मी जें कांहीं तुम्हांस सांगतों त्याची तुम्हीं आठवण कराल. आणि मी तर आपलें प्रकरण परमेश्वरालाच सोंपवितों; निःसंशय, परमेश्वर (आपल्या) सेवकांस पाहतो आहे. ४४. एवंच, त्या(विश्वासू)ला परमेश्वरानें फिरऔनी लोकांच्या डावपेचांच्या अपायांतून वांचवून घेतलें. आणि 'फिरऔन'च्या लोकांसच (उलट) वाईट शिक्षेनें घेरिलें; ४५. (म्हणजे नरकाच्या) अग्नीनें कीं, सकाळीं व संध्याकाळीं त्यांना त्याच्यासमोर आणून उभे केलें जातें. आणि ज्या दिवशीं (पुनरुत्थानाची) घटका कायम होईल (त्या दिवशीं आम्हीं आज्ञा करूं कीं) 'फिरऔन'च्या लोकांस अतिशय कडक शिक्षेंत (नेऊन) दाखल करा. ४६. आणि एक वेळ (असा होईल कीं, नरकवासी) एकमेकांशीं नरकाग्नींत झगडतील; तर दुर्बल लोक बड्या लोकांस म्हणतील कीं आम्हीं तर तुमचे ताबेदार होतों. तर (आतां) तुम्हीं अग्नीचा एक अंशहि आम्हांवरून हटवूं शकतां काय? ४७. बडे लोक म्हणतील कीं (आतां तर) आम्हीं (तुम्हीं) सारेच या(अग्नीं)त (पडलों) आहों. परमेश्वर (आपल्या) सेवकांसंबंधानें (जो कांहीं) हुकूम (देणार होता तो) देऊन चुकला. ४८. आणि जे लोक नरकाग्नींत असतील, ते नरकाच्या रखवालदारांस विनंति करतील कीं तुम्हींच आपल्या पालनकर्त्यास विनंति करा कीं (बरें,) कोणा दिवशीं (तरी) तो आम्हांवरून शिक्षा हलकी करीत जाईल. ४९. ते उत्तर देतील कीं, तुमचे पैगंबर कां, तुम्हांपाशीं चमत्कार घेऊन येत नव्हते? ते म्हणतील होय, (येत तर होते; तेव्हां नरकाचे रखवालदार) म्हणतील कीं तर मग तुम्हीं (आपणच) प्रार्थना करा; आणि (त्या दिवशीं) नास्तिकांचें प्रार्थिणें केवळ व्यर्थच होईल. ५०.

(१) अधोलोक ज्याला अरबींत 'आलमे–बरझख' म्हणतात तेथील ही शिक्षा शेवटच्या शिक्षेची प्रस्तावना होय. परमेश्वर सर्व मुसलमानांस–आज्ञाधारकांस या दोन्ही शिक्षांपासून वांचवो व सर्वांच्या पायांच्या प्रतापानें भाषांतर कर्त्यासहि. आमीन.

आम्हीं इहलौकिक आयुष्यांतहि आपल्या पैगंबरांची व ज्यांनीं विश्वास धरिला आहे त्यांची मदत करितों; आणि ज्या दिवशीं साक्षी (म्हणजे पैगंबर व दूत, नास्तिकांविरुद्ध साक्ष देण्यास) उभे राहतील त्या दिवशींहि (त्यांची मदत करूं). ५१. त्या दिवशीं आज्ञाभंजकांस त्यांचें माफी मागणें (कांहींच) उपयोगीं पडणार नाहीं आणि त्यांना (परमेश्वरा)चा शाप होईल व त्यांस (फारच)वाईट घर (राहावयास) मिळेल. ५२. आणि आम्हींच 'मूसा'ला सद्बोध (म्हणजे तौरात ग्रंथ) दिला आणि 'बनी-इस्राए-लां'स (त्या) पुस्तकाचा वारस[1] बनविला; ५३. कीं (ज्यांत) बुद्धिमानांसाठीं सन्मार्ग व उपदेश होय. ५४. तर (हे पैगंबरा! नास्तिकांचा छळ) सहन कर. निःसंशय परमेश्वराचें वचन सत्य होय. आणि (परमेश्वरापाशीं) आपल्या अपराधाची[2] क्षमा मागीत राहा; आणि सकाळ संध्याकाळ आपल्या पालनकर्त्याच्या स्तुतिबरोबर(त्याची)पवित्रता वर्णीत अस. ५५. ज्या लोकांपाशीं (परमेश्वराकडून) कोणतेंही प्रमाण तर आलेंच नाहीं असें असतां, (उगीच) परमेश्वराच्या निशाण्यांत झगडे काढतात; त्यांच्या मनांत तर केवळ (असा अयोग्य) अभिमान[3] (भरलेला) आहे कीं ते

---

(१) बनी-इस्राएलांस पुस्तकाचा वारस बनविणेंचा अर्थ हा कीं, हजरत मूसा -अलैहिस्सलाम-च्या मरणानंतर तें तौरात पुस्तक बनी-इस्राएलांत राहिलें आणि त्यांचे विद्वान् व 'रिब्बी' म्हणजे ईश्वरभक्तिपरायण लोक हे त्याप्रमाणें लोकांस उपदेश करीत. हजरत मोहंमद पैगंबरसाहेबांनीं म्हटलें आहे कीं "विद्वान व ज्ञानी हे पैगंबरांचे वारस होत.' त्याच प्रकारचा वारसा हाहि होता.

(२) नास्तिकांच्या भीतीनें सद्धर्मप्रसारांत जी दिसण्यांत हयगय होत असे तिला कोणी कोणी अपराध गणतात; पण तो अपराध नसून त्याला दूर-दर्शीपणा म्हणतां येईल. येथें पैगंबरसाहेबांस आपल्या अपराधाची क्षमा मागणेंचें शिक्षण यासाठीं दिलें गेलें आहे कीं, लोकांनीं त्याप्रमाणें क्षमा मागीत राहावें व हा सांप्रदाय असाच चालू राहावा. कारण अपराध घडला नसला तरी नित्य क्षमा मागीत राहिल्यानें, ईश्वरप्रतापानें पुढें घडून येणारे अपराधहि टळतात; कां तर त्यानें मनुष्याला चित्ताची सावधानता प्राप्त होते.

(३) जे लोक ऐहिक वैभव व संपत्तीवर गर्विष्ठ होऊन व आपल्या जुन्या

(आपल्या) ह्या (मनोरथा)स (कधींहि) पोहोंचणारच नाहींत. तर (हे पैगंबरा! या लोकांच्या अपायापासून) परमेश्वराचा आश्रय मागीत राहा; निःसंशय तो (सर्वांचें) ऐकितो व (सर्व कांहीं) पाहतो. ५६. आकाशांस व पृथ्वीस निर्माण करणें हें माणसांच्या (पुनरपि) निर्माण करण्यापेक्षां अर्थात् मोठें (काम) होय; परंतु बहुतेक लोक (इतकी गोष्टहि) समजत नाहींत. ५७. आणि आंधळा व डोळस बरोबर (होऊं शकत) नाहींत; आणि (अशाच प्रकारें) ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं ते आणि दुराचरणी (बरोबर होऊं शकत नाहींत). (पण) तुम्हीं लोक विचार (फारच) कमी करितां. ५८. (पुनरुत्थानाची) घटका तर अवश्य येणारच आहे; तींत कोणा तऱ्हेची शंका नाहीं. परंतु बहुतेक लोक (तिचा) विश्वास धरीत नाहींत. ५९. आणि (लोकांनों!) तुमचा पालनकर्ता फर्मावितो कीं, तुम्हीं माझ्याशीं प्रार्थना करीत रहा, म्हणजे मी तुमची (प्रार्थना) स्वीकारीन. जे लोक (गर्वांत येऊन) माझ्या भक्तीपासून अहंकार करतात, ते लवकरच (मेल्या-नंतर) क्षुल्लक होऊन 'जहन्नम' मध्यें दाखल होतील. ६०. (लोकांनों!) परमेश्वर असा (परम समर्थ) होय कीं, ज्यानें तुम्हांसाठीं रात्र बनविली कीं तींत तुम्हीं विश्रांति घ्यावी आणि दिवस (बनविला) कीं, त्यानें (आपल्या प्रकाशांत तुम्हांस सर्व वस्तु) दाखवाव्या. निःसंशय परमेश्वर

---

पुराण्या व अर्थहीन सांप्रदायाचा अभिमान बाळगून इस्लाम जो खरा, शुद्ध व अमिश्रित धर्म त्यांत दाखल होण्यास आपली मानहानी समजत होते व पैगं-बरांवर आपला वर्चष्मा गाजवूं पाहत होते; ते लोक कधींहि आपल्या मनि-षेस पोहोचणार नाहींत.

(१) जे लोक पुनरुत्थान घडून येणेंस मानण्याचें नाकारितात, त्यांची खात्री होईल अशा रीतीनें समजाविणें हा या वाक्याचा उद्देश होय. कारण सकृ-द्दर्शनीं आकाश व पृथ्वी व त्यांतील सृष्टीचें निर्माण करणें हें अधिक मुष्कि-लीचें दिसून येतें. परंतु ह्या वस्तू तर परमेश्वरानें केव्हांच निर्माण करून ठेविल्या आहेत. म्हणून तोच परमेश्वर माणसांचें पुन्हां निर्माण करणें जी त्यापे-क्षांहि एक सोपीशी गोष्ट आहे ती करण्यास समर्थ कां म्हणून नसावा? तर अर्थात् तो सर्व शक्तिमान् असल्यामुळें सर्व कांहीं करण्यास समर्थच आहे.

तर लोकांवर (फारच) कृपावंत होय. परंतु बहुतेक लोक (त्याचे)आभार मानीत नाहींत. ६१. (लोकांनों!) हाच परमेश्वर तर तुमचा पालनकर्ता, प्रत्येक वस्तूचा निर्माणकर्ता होय. त्याच्याशिवाय (अन्य) कोणी उपास्य नाहीं. मग तुम्हीं कोठें बहकत चाललां जात आहां? ६२. जे लोक परमेश्वराच्या निशाण्यांची नकारणी करतात, ते अशाच तऱ्हेनें बहकत राहतात. ६३. परमेश्वर असा (परम समर्थ) होय कीं, ज्यानें तुम्हांसाठीं पृथ्वीस राहण्याची जागा व आकाशांस छत बनविलें; आणि त्यानेंच तुमच्या आकृति बनविल्या व आकृतिहि बनविल्या तर चांगल्या (सुरेख); आणि उत्तम उत्तम पदार्थ तुम्हांस (खावयास) दिले. हाच परमेश्वर तर तुमचा पालनकर्ता होय. म्हणून परमेश्वर धन्य! (कीं तो) सकल जगांचा पालनकर्ता (होय). ६४. तोच (नित्य) जिवंत होय; त्याच्या शिवाय (अन्य) कोणी उपास्य नाहीं. तर त्याच्याप्रीत्यर्थ शुद्ध धर्मपालन करून त्याचीच उपासना करा. सर्व स्तुति सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच (योग्य) होय. ६५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं ज्या अर्थीं मजपाशीं माझ्या पालनकर्त्याकडून स्पष्ट प्रमाणें येऊन चुकलीं आहेत त्याअर्थीं तुम्हीं परमेश्वराशिवाय ज्या(उपास्यां)चा धांवा करितां त्यांची उपासना करण्याची मला मनाई केली गेली आहे. आणि मला आज्ञा केली गेली आहे कीं, मी सकल जगांच्या पालनकर्त्या(परमेश्वरा)च्या आज्ञाधीन होऊन राहावें. ६६. (लोकांनों!) तो (परमेश्वरच तर) होय कीं, ज्यानें तुम्हांस (प्रथमतः) मातींतून निर्मिलें; मग वीर्यबिंदूंतून व मग मांसाच्या गोळ्यांतून; मग तुम्हांस मूलसें (बनवून आईच्या पोटांतून) काढतो; मग (तो तुम्हांस जगवितो) कीं तुम्हीं आपल्या भरतारुण्यास पोहोंचावें;व मग

(१) माणसाच्या प्रथमतः मातींतून निर्माण करण्यांत,कां तर हजरत आदमच्या उत्पत्तीकडे इषारा असेल; कीं ते आदिपुरुष असून प्रथमतः मातींतून निर्मिलेले होते. त्यांच्यानंतर आतां जी चालत आहे ती सृष्टिजननाची परंपरा चालू झाली; किंवा सर्व माणसें मातींतून निर्मिलीं गेलीं हा कदाचित् अर्थ असेल. कारण वीर्यबिंदू अन्नांतून बनतो आणि अन्न जें कांहींहि असेल तें मातींतून निपजतें.

(तुम्हांस आणखीहि जगवितो) कीं तुम्हीं वृद्ध होऊन जावेत. आणि तुम्हांपैकीं कोणी (कोणी तर या वेळांच्या) पूर्वींच मरून जातो; आणि (ज्यांना तारुण्य व वृद्धापकाळापर्यंत जगविलें जातें, तर तें) या उद्देशानें कीं तुम्हीं लोकांनीं (मृत्यूच्या) नियमित वेळेपर्यंत जाऊन पोहोंचावें. आणि (मूळ) उद्देश हा कीं तुम्हीं (या सृष्टिजन्य निशाण्यांस)समजावें.६७. तोच होय कीं जो जगवितो व मारतो.मग जेव्हां तो कोणा कामाचा संकल्प करितो तेव्हां तो त्याला केवळ इतकेंच म्हणतो कीं हो,व तें होऊन जातें.६८ (हे पैगंबरा!) जे लोक परमेश्वराच्या निशाण्यांत झगडे काढीत असतात त्यां(च्या स्थिती)चें तूं अवलोकन केलें नाहींस काय ? ते (सन्मार्गाहून) कोठें पालटून चालले जातात? ६९. (हे) असे लोक (होत कीं) जे (या) पुस्तका(म्हणजे कुराणा)स पाखंड म्हणतात आणि आम्हीं आपल्या (इतर) पैगंबरांच्यामार्फत जीं (पुस्तकें) पाठविलीं त्यांसहि (पाखंड म्हणतात). तर शेवटीं यांना (या पाखंड म्हणण्याचा परिणाम) माहीत होऊन जाईल; ७०. कीं जेव्हां मानखोडे यांच्या मानेंत असतील व (त्याशिवाय) शृंखला; (पाणी पाजण्यासाठीं) त्यांना फरफटीत नेलें जाईल. ७१. (म्हणजे) उकळी आलेल्या पाण्यांत; व मग त्यांस अग्नींत (जळावयास) झोंकून दिलें जाईल. ७२. मग त्यांना पुसलें जाईल कीं परमेश्वराशिवाय ज्या(देवां)स तुम्हीं (परमेश्वराचे) जोडीदार ठरवीत होतां, (आतां) ते कोठें आहेत ? ७३. ते म्हणतील (आतां तर ते) आम्हांपासून' नाहींसे झाले (कीं ते कोठें दिसत नाहींत). किंबहुना (अस्सल गोष्ट तर ही होय कीं) आम्हीं तर (याच्या)पूर्वीं (परमेश्वराशिवाय आणखी) कोणत्याहि वस्तूची पूजाच करीत नव्हतों. परमेश्वर नास्तिकांस अशाच रीतीनें गुंग करून टाकील (कीं त्यांना उत्तरहि सुचणार नाहीं.) ७४. (आणि त्यांना सांगितलें जाईल कीं) ही तुमच्या या गोष्टीची शिक्षा होय कीं, तुम्हीं पृथ्वींत (उगाच) मिथ्या(गोष्टीं)त आनंद मानीत होता व (तशीच) याची शिक्षा होय कीं, तुम्हीं ऐटीनें मिरवीत होतां. ७५. (तर आतां) 'जहन्नम'च्या दरवाज्यां(नीं नरकां)त जाऊन दाखल व्हा (व) सदासर्वदा त्यांतच वास्तव्य करा. सारांश, अहंकार करणाऱ्यांचेंहि

(कितीतरी) वाईट ठिकाण होय ! ७६. तर (हे पैगंबरा !) सहन करून ऐस; निःसंशय परमेश्वराचें वचन सत्य होय. तर (शिक्षेचे) जे जे वायदे आम्हीं या लोकांशीं करितों त्यांतून कित्येक तर तुला दाखवूं; अगर (ते वायदे घडून येण्याच्यापूर्वींच) तुला (जगांतून) उचलून घेऊं. (कांहींहि असो), यांना तर आम्हांकडे परतून येणेंच आहे. ७७. आणि आम्हीं तुझ्यापूर्वींहि (कित्येक) पैगंबर पाठविले; (तर) त्यांजपैकीं (कित्येक) असे होत कीं, ज्यांचा वृत्तांत आम्हीं तुला सांगितला आणि त्यांतून (कित्येक) असे होत कीं, ज्यांचा वृत्तांत आम्हीं तुला सांगितला नाहीं. आणि कोणाहि पैगंबराची ताकत नव्हती कीं, परमेश्वराच्या परवानगीवांचून एखादा चमत्कार आणून दाखविता. मग जेव्हां परमेश्वराचा हुकूम (म्हणजे शिक्षा) येऊन ठेपली तेव्हां (अनुयायी प्रजा व पैगंबरांच्या दरम्यान) न्यायानें फैसला चुकविला गेला. आणि जे लोक असत्यावर होते, तेच त्यावेळीं तोट्यांत राहिले. ७८. (लोकांनों !) परमेश्वर असा (परम समर्थ) होय कीं, ज्यानें तुम्हांसाठीं चतुष्पाद जनावरें (पैदा) केलीं; अशासाठीं कीं, त्यां(तून कित्येकां)पासून तुम्हीं स्वारीचें काम घ्यावें आणि (कित्येक) त्यांतून (असे होत कीं, तुम्हीं त्यांचें मांस) खातां. ७९. आणि तुम्हांकरितां चतुष्पाद जनावरांत (आणखीहि अनेक) फायदे आहेत; आणि (चतुष्पादांच्या पैदा करण्यांत एक) उद्देश हा(हि होय) कीं तुम्हीं त्यांजवर (आरूढ होऊन) आपल्या मनांत(योजिले)ल्या आकांक्षेस पोंहचावें; आणि चतुष्पादांवर व (तसेंच) गलबतांवर तुम्हीं (लोक चढून) चढून फिरतां. ८०. आणि (परमेश्वर) तुम्हांस आपल्या (सामर्थ्याच्या अगणित) निशाण्या दाखवितो; तर परमेश्वराच्या (सामर्थ्याच्या) कोण कोणत्या निशाण्यांस तुम्हीं नाकाराल ? ८१. कां हे लोक पृथ्वींत हिंडले फिरले नाहींत व त्यांनीं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहीं कीं जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत त्यांचा कसा परिणाम झाला ? ते यांच्यापेक्षां (संख्येंत) फारच जास्त होते; आणि बळाच्या मानानें (म्हणा) व (ते लोक) पृथ्वींत (जीं स्मारकें सोडून गेले आहेत त्या) स्मारकांच्या मानानें (म्हणा, यांच्यापेक्षां) फारच जबरदस्त होते. पण त्यांनीं जें जें (जगांत)

संपादिलें तें त्यांच्या कांहींच कामा आलें नाहीं. ८२. आणि जेव्हां त्यांचे पैगंबर त्यांच्यापाशीं स्पष्ट प्रमाणें घेऊन आले, तेव्हां हे लोक यांच्यापाशीं जें ज्ञान[१] (वैभव) होतें त्यांतच हर्ष मानीत होते. आणि ज्या (शिक्षे)चा ते उपहास करीत होते ती यांच्यावरच उलटून पडली.८३. मग जेव्हां त्यांनीं आमची शिक्षा (येतांना) पाहिली तेव्हां ते म्हणूं लागले कीं. (आतां) आम्हीं एकाच परमेश्वराचा विश्वास धरिला; आणि ज्या वस्तूंस आम्हीं (परमेश्वराचे) जोडीदार ठरवीत होतों (आतां) आम्हीं त्यांस मानीत नाहीं. ८४. पण जेव्हां त्यांनीं आमची शिक्षा (येतांना) पाहिली, तेव्हां त्यांचें विश्वास धरणें त्यांना कांहींच फलदायक झालें नाहीं. (हा) ईश्वरी सांप्रदाय होय कीं जो (नेहमींपासून) त्याच्या सेवकांत चालत आला आहे. आणि (जे लोक) नास्तिक (होते तेच) शिक्षा सादर होण्याच्या वेळीं तोटयांत राहिले. ८५.

(१) म्हणजे ते आपल्या ज्ञानाचा गर्व वाहात होते व समजत होते कीं,आम्हीं आपल्या बुद्धिवैभवानें पैगंबरांचें खंडन करूं व त्यांचें शिक्षण चालू देणार नाहीं. कारण आपल्या चुकीच्या मतांचें समर्थन करण्याच्या आवेशांत सत्याकडूनहि ते आंधळे होऊन गेले होते.



# अध्याय ४१ वा.

## सूरतु–हामीम (सिज्दः).

हा अध्याय मक्कानगरींत प्रकट झाला. ह्यांत ५४ आयात (महावाक्यें) आहेत. याचें नांव 'सूरतु–स्सिज्दः' म्हणजे साष्टांग नमस्काराचें प्रकरण असें या साठीं पडलें कीं, यांत अविश्वास्यांस मूर्तीची उपासना सोडून खऱ्या व एकाच परमेश्वराची उपासना करण्याचा हुकूम फर्माविण्यांत आला आहे; व सिज्दः–साष्टांग नमस्कार–हें या उपासनेचें मुख्य अंग आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)**

ह. म. (हा-मीम). १. (हा फर्मान) परम दयाळू (व) कृपाळू (परमेश्वरा)च्या हुजूरांतून सादर होतो. २. हें कुराण असें पुस्तक होय कीं, ज्याचीं महावाक्यें अरबी भाषेंत समंजस लोकांसाठीं विस्तारानें सांगितलीं गेलीं आहेत. ३. तें (विश्वासूंना ईश्वरप्रसन्नतेची) सुवार्ता ऐकवितें आणि (नास्तिकांस ईश्वरीशिक्षेची) भयसूचना देतें. यावरहि यांच्यांतून बहुतेक लोकांनीं तोंड फिरविलें व ते तें ऐकतच नाहींत. ४. आणि (हे पैगंबरा! हे लोक हेंहि) म्हणतात कीं ज्या गोष्टीकडे तूं आम्हांस बोलावितोस त्याकडून आमचीं अंतःकरणें तर पडद्यांत आहेत (कीं तुझी गोष्ट मनाला झोंबत नाहीं); आणि आमच्या कानांत एका प्रकारचें बधिरत्व आहे (कीं तूं जें म्हणतोस तें ऐकूं येत नाहीं); आणि आमच्या व तुझ्या दरम्यान (एका तऱ्हेचा) पडदा (पडलेला) आहे (कीं तूं आम्हांवर कोणाहि तऱ्हेचा परिणाम घडवूं शकत नाहींस). तर (यापेक्षां उत्तम हें होय कीं) तूं (आपल्यापरी) कर्म आचरीत राहा; आम्हीं (आपल्यापरी) कर्म आचरीत राहतों. ५. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं, मींहि तुम्हांसारखाच एक मनुष्य आहें; (पण)

मजकडे प्रकटीकरण येतें कीं तुमचा उपास्य केवळ (तोच) एक उपास्य होय; तर नीट त्याच्याच कडे (तोंड करून) चालले जा; आणि त्याजपाशीं (आपल्या पापांची) क्षमा मागा. आणि (परमेश्वराचे) जोडीदार मानणारांस दुःख होय; ६. कीं ते जकात देत नाहींत व परलोकासहि नाकारितात. ७. अलबत ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्यासाठीं (परत्रीं) मोठें प्रतिफल होय कीं, तें (कधींच) तहकूब होणार नाहीं. ८. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं तुम्हीं अशा (परम समर्थ परमेश्वराला) नाकारितां कीं ज्यानें दोन दिवसांत पृथ्वीस निर्माण केलें आणि तुम्हीं (इतरांस) त्याचे जोडीदार बनवितां? हाच (परमेश्वर तर) सकल जगांचा पालनकर्ता होय. ९. आणि त्यानेंच पृथ्वींत तिच्यावरून (भारी अचल) पर्वत रोंवून टाकिले आणि तींत (हरतऱ्हेची) बरकत दिली व तींतच तिच्या उत्पन्नाचा अंदाजहि ठरवून टाकिला, (आणि हें सर्व कांहीं) चार दिवसांत; (सर्व) मागणारांसाठीं बरोबर. १०. नंतर त्यानें आकाशा(च्या रचने)कडे लक्ष लाविलें व तें (त्यावेळेपर्यंत) धुकेंसें होतें. तेव्हां त्या (धुक्या)स व पृथ्वीस त्यानें आज्ञा केली कीं तुम्हीं उभयतां या, आपखुषीनें (याल तरी) अगर बळजबरीनें (याल तरी; आणि आम्हीं जो हुकूम देतों तो बजावा). उभयतांनींहि विनंति केली कीं आम्हीं आपखुषीनें (हुकुम बजावण्यास) हजर आहों. ११.

(१) यांत 'गैरो मम्नून' याचा अर्थ एक तर जो आम्हीं भाषांतरांत दिला आहे तो होय. एक अर्थ 'उपकार ठेविल्यावांचून' असाहि होतो; कारण उपकार ठेविल्यानें घेणारास थोडी बहुत इजा व दुःख होतें. सारांश परमेश्वरानें धर्मदानासंबंधानें म्हटलें आहे कीं, 'उपकार ठेवून व इजा देऊन आपलें धर्मदान निष्फळ करूं नका.' म्हणून भावार्थ हा कीं, स्वर्गवाश्यांस जें प्रतिफल दिलें जाईल त्याचा त्यांजवर उपकार ठेविला जाणार नाहीं; कीं जेणेंकरून ते लाजतील व ओशाळे होतील.

(२) मागणारे म्हणजे गरजू; दुसऱ्या एके जागीं म्हटलें आहे कीं "जें कांहीं तुम्हीं मागितलें ह्मणजे ज्या कशाची तुम्हांस गरज होती तें त्यानें तुम्हांस दिलें" तोंडून मागितलें नाहीं तरीहि प्राण्यांचा बालंबाल मागीत आहे.

त्यानंतर दोन दिवसांत त्यानें त्या(धुक्याच्या थरां)चीं सात आकाशें बनविलीं आणि प्रत्येक आकाशांत (जी व्यवस्था परमेश्वरास मंजूर होती ती) व्यवस्था त्यानें (दूतांस) सांगून दिली. आणि खालच्या आकाशास आम्हीं (ताऱ्यांचे) दिवे लावून सुशोभित केलें; आणि (सुशोभित करण्याशिवाय) संरक्षणासाठींहि. ही मांडणी सर्व समर्थ (व) सर्वज्ञानी अशा(परमेश्वरा)ची (केलेली) होय. १२. मग जर (इतकें समजाविल्यावरहि 'मक्के,चे नास्तिक) तोंड फिरवितील; तर (हे पैगंबरा ! तूं यांना) सांगून दे कीं

(१) प्रथमउत्पत्तीसंबंधानें मानवी ज्ञान निश्चयास पोहोंचलें नाहीं. दिव्य पुस्तकांत कांहीं किरकोळ मजकूर आहे. मूळ हेतु तर मनुष्याचें मन ईश्वर सामर्थ्याकडे वेधणें हा होय. तें जसें संक्षिप्त वर्णनानें होतें तसेंच विस्तारानेंहि होतें. प्रस्तुतकाळीं खगोल विद्येंत दुर्बीणीच्या द्वारें फारच प्रगति झाली आहे; आणि पुरातन गोष्टीहि फारच कसोशीनें पाहिल्या जातात. परंतु मनुष्य, "तुम्हांस फारच थोडें ज्ञान दिलें गेलें आहे" या ईश्वरोक्तीच्या मर्यादेबाहेर जाऊं शकत नाहीं. आतां लोकांचें हें मत आहे आणि सांप्रत उपलब्ध असलेल्या तौरात ह्मणजे जुन्या करारावरूनहि याचा पत्ता लागतो कीं आरंभांत पाणीच पाणी होतें, त्यांत परमेश्वरानें आपल्या सामर्थ्यानें उष्णता उत्पन्न केली; आणि पाण्यावर फेंस येऊन गेला व धुक्यासारखी कांहीं वाफ उडाली. धुक्याच्या थरांतून किंवा वाफेंतून आकाशें बनलीं व फेंस कठीण होऊन जमीन झाली. अशाच प्रकारें लोक आतां समजतात कीं आकाश मंडळांतील लहान लहान नक्षत्रेंहि आपल्या ठिकाणीं एक एक विश्व आहे. त्यांत पर्वत, वनस्पति, आभाळ, ऊन्ह वगैरे वस्तु दुर्बीणीनें पाहण्यांत आल्या आहेत व हें अनुमानगम्य आहे कीं नवल नाहीं कीं तेथेंहि कोणा प्रकारचे प्राणी वसत असतील. आम्हांस त्यांची जास्त हकीकत माहीत नाहीं तरीहि जें कांहीं आह्मांस जणाविलें गेलें आहे व जें कांहीं माहीत आहे तेवढें ईश्वरसामर्थ्याचें प्रमाण पटण्यास पुरें आहे. व हाच या सर्व विधानांचा हेतु आहे.

(२) संरक्षणानें कदाचित या आशयाकडे इशारत असेल कीं सैतान वा असुर आकाशाकडे तेथील गोष्टी चोरून मोरून ऐकण्याकरितां जातात; तर त्यांस तारे फेंकून मारून हांकून लाविलें जातें.

जशी (भयंकर) गर्जना 'आद्' व 'समूद' यांजवर झाली होती तशाच (भयंकर) गर्जनेपासून मी तुम्हांसहि भिववितों; १३. कीं त्यांच्यापाशींहि त्यांच्या पुढून व त्यांच्यामागून (म्हणजे पुष्कळसे) पैगंबर आले (व पैगंबरांनीं त्यांस समजाविलें) कीं परमेश्वरावांचून तुम्हीं अन्य कोणाचीहि उपासना करूं नका. ते म्हणूं लागले कीं जर आमचा पालनकर्ता (पैगंबर पाठवूं) इच्छिता, तर तो (आकाशांतून) दूत उतरविता. एवंच, जो धर्म देऊन तुम्हीं लोक पाठविले गेलां आहां, आम्हीं तर त्यास मानीत नाहीं. १४. पण (जे) 'आद्'(चे लोक होते ते उगाच) हकनाक मुलखांत अहंकार करूं लागले व बोलले कीं, शक्तीच्यामानानें आम्हांपेक्षां जबरदस्त आणखी कोण आहे? कां त्यांस इतकें सुचलें नाहीं कीं, ज्या परमेश्वरानें त्यांना पैदा केलें तो शक्तींत यांच्यापेक्षांहि फारच जबरदस्त होय? सारांश, ते लोक आमच्या निशाण्यांची नकारणीच करीत राहिले. १५. म्हणून आम्हींहि (त्यांच्या) दुर्भाग्याच्या दिवसांत त्यांच्यावर सोसाट्याचा वारा सोडला; अशासाठीं कीं, इहलौकिक आयुष्यांत आम्हीं त्यांना फजितीच्या शिक्षेची गोडी चाखवावी. आणि परलोकींची शिक्षा (त्यांना इहलौकिक शिक्षेपेक्षां) फारच जास्त फजित करणारी होईल; आणि (त्यावेळीं) त्यांना (कोठून) मदतहि मिळणार नाहीं. १६. आणि राहिले 'समूद,' तर आम्हीं त्यांना (सरळ) मार्ग दाखवून दिला होता; पण त्यांनीं सरळ मार्ग सोडून अंधमार्ग पसंत केला; परिणाम हा झाला कीं, त्यांनीं जीं (कुकर्मे) केलीं होतीं त्यांमुळें त्यांना अपमानकारक शिक्षेच्या गर्जनेनें येऊन गांठिलें. १७. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (जे आम्हांशीं) भीत होते त्यांना आम्हीं (या आपत्तींतून) वांचवून घेतलें. १८. आणि ज्या दिवशीं परमेश्वराचे शत्रू (म्हणजे नास्तिक) नरकाग्नीकडे हांकून एकवटले जातील, तेव्हां मग ते (इतर नरकवाश्यांच्या गोळा होण्याची वाट पाहात) थोपविले जातील; १९. येथपर्यंत कीं जेव्हां (सर्व) नरकावर येऊन गोळा होतील; तेव्हां त्यांचे कान व त्यांचे डोळे व त्यांच्या त्वचा त्यांच्याविरुद्ध ते जसजशीं कर्में करीत राहिले आहेत त्या(कर्मां)ची साक्ष देतील. २०. आणि हे लोक आपल्या त्वचांशीं पुसतील कीं (बरें,) तुम्हीं आमच्या

विरुद्ध कां म्हणून साक्ष दिली असेल ? ते उत्तर देतील कीं ज्या परमेश्वरानें प्रत्येक वस्तूंस[1] वाचा फुटविली त्यानेंच आम्हांलाहि (आपल्या सामर्थ्यानें) वाचा दिली; आणि त्यानेंच तुम्हांस प्रथमतः निर्माण केलें होतें आणि तुम्हीं लोक त्याचयाचकडे पालटून नेले जात आहां २१. आणि (पाप करतेवेळीं) तुम्हीं लपवितहि होतां (तर) तें या विचारानें नव्हे कीं (उद्यांला) तुमचे कान व तुमचे डोळे व तुमच्या त्वचा तुम्हां विरुद्ध साक्ष द्यावयास प्रवृत्त होतील; परंतु तुम्हांस तर हा विचार होता कीं तुम्हीं जीं कर्में करितां त्यांतून बहुतेकांशीं परमेश्वरहि वाकब नाहीं. २२. आणि हा कुतर्क जो तुम्हीं आपल्या पालनकर्त्यासंबंधानें केला, याच कुतर्कानें तर (आज) तुमचा नाश केला; आणि तुम्हीं हानि भोगणाऱ्यांपैकीं होऊन गेलां. २३. मग जरी हे लोक (शिक्षा मुकाट्यानें) सहन करून राहतील, तरीहि यांचें ठिकाण नरकाग्नि होय; आणि जर हे कृपादृष्टि मागतील तर यांच्यावर कृपादृष्टिहि केली जाणार नाहीं. २४. आणि आम्हीं या (नास्तिकां)बरोबर (दुष्ट) साथी[2] तैनात करून दिले होते; तर त्यांनीं यांच्या पुढील व यांच्या मागील सर्व अहवाल यांच्या नजरेंत (चांगला) सुशोभित करून दाखविला; आणि यांच्यापूर्वी जिन्न–दैवत व मनुष्यें

(१) 'प्रत्येक वस्तूस वाचा फुटविली' याचे दोन अर्थ संभवितातःएक हा कीं, जगांत ज्या वस्तु बोलण्याची योग्यता बाळगित होत्या त्यांना परमेश्वरानेंच वाचा फुटविली होती. तर त्याच परमेश्वरानें आपल्या सामर्थ्यानें आम्हांसही येथें वाचा दिली. दुसरा अर्थ हाहि होऊं शकतो कीं पुनरुत्थानाच्या दिवशीं तर सर्व वस्तूंस वाचा फुटेल; येथपावेतों कीं, भूमीसंबंधानें ह्मटलें आहे "त्यादिवशीं भूमि आपले वृत्तांत सांगील. कारण (हे पैगंबरा !) तुझा पालनकर्ता (ते) तिला प्रकट करील." म्हणून माणसांचीं अवयवें व इंद्रियें, इतर वस्तूंस वाचा फुटणें आधारभूत धरून, प्रतिपादितील कीं आह्मीं आपण बोललों नाहीं; तर परमेश्वरानें आम्हांस बोलविलें. ज्या प्रमाणें जगांत न बोलणें आमच्या अधिकाराची गोष्ट नव्हती त्याच प्रमाणें येथें बोलणें आमच्या इच्छेची गोष्ट नाहीं. सारांश, आमच्याशीं तक्रार करणें व्यर्थ होय.

(२) दुष्ट साथी म्हणजे सैतान व वाईट संगत.

यांच्या (आणखीहि) पुष्कळ (आज्ञाभंजक) जनता होऊन गेल्या होत्या त्यांच्याबरोबर (शिक्षेचें) वचन यांच्याठायींहि पूर्ण होऊन चुकलें. निःसंशय हे लोक (पहिल्यानेंच) आपल्या नुकसानाच्या पाठीस लागले होते. २५. आणि जे लोक नास्तिक होत ते (एकमेकांस) सांगतात कीं हें कुराण ऐकूंच नका; आणि (ते ऐकवूं लागतील तर) याच्यामधो-मधींच मोठ्यानें गलबल करून टाकीत जा; कीं (या युक्तीनें) कदाचित् तुह्मीं (मुसलमानांवर) सरशी घेऊन जाल. २६. तर जे लोक (इस्लाम धर्मास) मानण्याचें नाकारितात त्यांना आम्हीं अवश्य कडक शिक्षेची गोडी चाखवून सोडूं आणि ते वाईटांत वाईट जीं कर्में करीत होते त्यांच्या (या) कर्मांचा मोबदलाहि अवश्य देऊं. २७. हा नरकाग्निच परमेश्वराचे शत्रू (म्हणजे नास्तिकां)चा मोबदला होय; कीं आमच्या निशाण्यांची ते जी नकारणी करीत होते तिच्या शासनार्थ त्यांना नरकांत नेहमींचें घर मिळालें. २८. आणि जे लोक नास्तिक होत ते (पुनरुत्थानांत) म्हणतील कीं हे आमच्या पालनकर्त्या! सैतान व माणूस ज्यांनीं आम्हांस बहकाविलें होतें त्यां उभयतांस (एक नजर तरी) आम्हांलाहि दाखीव; कीं आम्हीं त्यांना आपल्या पायांखालीं (तुडवून) टाकूं कीं जेणेंकरून ते अतिशयच क्षुल्लक होतील. २९. निःसंशय, ज्या लोकांनीं बोलून दाखविलें कीं परमेश्वरच आमचा पालनकर्ता होय; मग (याच भावनेवर) दृढ राहिले, त्यांच्यावर (मरतेवेळीं) (दयेचे) दूत उतरतील (व त्यांस सांगतील) कीं (पुढच्यासाठीं कोणाहि तऱ्हेचा) तुम्हीं अंदेशा करूं नका आणि (मागच्याकरितां कोणाहि तऱ्हेचा) खेद करूं नका; आणि स्वर्ग ज्याचें तुम्हांस अभिवचन दिलें जात होतें, त्याचा आतां हर्ष माना ३०. इहलौकिक आयुष्यांतहि आम्हीं (ईश्वराज्ञेनें) तुमचे मदतगार होतों आणि परलोकींहि (होऊं). आणि जी वस्तु तुमचे जीव इच्छितील ती तुम्हांस स्वर्गांत (उपलब्ध) होईल; व तुम्हीं जी

(१) सैतान हा जिन्नांपैकीं होता. त्यानें प्रथम आज्ञाभंग केला आणि माणसांत आदमाचा मुलगा काबील यानें आपला भाऊ हाबील याचा खून केला; याप्रमाणें या उभयतांनीं प्रथम पापाचा पाया घातला व यांच्या उदाहरणानें आह्मांस बहकाविलें.

वस्तु मागाल ती तेथें तुम्हांकरितां (हजर) होईल. ३१. हा, क्षमाकर्ता (व) कृपाळू(परमेश्वरा)कडून (तुमचा) पाहुणचार होय. ३२. आणि जो (लोकांस) परमेश्वराकडे बोलावील व सुकृत्यहि करील आणि (लोकांस) सांगील कीं मींहि (परमेश्वराच्या) आज्ञाधारक सेवकांपैकींच आहें, त्याच्यापेक्षां उत्तम बोल कोणाचे होऊं शकतात? ३३. आणि (हे पैगंबरा !) पुण्य व पाप बरोबर होऊं शकत नाहींत. वाईटाचें निरसन अशा रीतीनें कर कीं ती (प्रेक्षकांच्या नजरेंत) फारच उत्तम असेल. (असें करशील) तर (तूं पाहशील कीं) तुझ्या व ज्या (कोणा मनुष्या)च्या दरम्यान वैर होतें तो आतां जणूं एकदम (तुझा) प्रेमळ मित्र होय. ३४. आणि सभ्याचाराची सुबुद्धि जे लोक सहनशीलता आचरतात त्यांनाच मात्र दिली जाते; आणि जे मोठे भागवान् होत त्यांनाच केवळ ती दिली जाते. ३५. आणि जर तुला कोणाहि तऱ्हेचा सैतानी वसवसा ध्वनित होईल, तर तूं परमेश्वराचा आश्रय मागीत जा; कांकीं, तोच (सर्वांचें) ऐकतो (व सर्व कांहीं) जाणतो. ३६. आणि (जेथें आणखी पुष्कळ निशाण्या आहेत तेथें) परमेश्वराच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांतून रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्र हींहि होत. (तर लोकांनों !) सूर्यालाहि साष्टांग नमस्कार घालूं नका व चंद्रालाहि (घालूं) नका; आणि जर तुम्हांला परमेश्वराचीच उपासना करावयाची आहे तर ज्यानें या वस्तु निर्माण केल्या त्या परमेश्वरालाच साष्टांग नमस्कार घाला. ३७. मग (हे पैगंबरा !) जर (हे लोक यावरहि) अहंकार करतील, तर (परमेश्वरासमीप उपासकांची कमी नाहीं;) जे (दूत) तुझ्या पालनकर्त्याच्या हुजुरांत आहेत ते रात्रंदिवस त्याच्या पावित्र्यवर्णनांत लागलेले असतात व ते (केव्हांहि) कंटाळत नाहींत. ३८. आणि (हे पैगंबरा!) त्याच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांतून एक हीहि होय कीं, तूं जमिनीस नम्र (व पडित) पडलेली पाहतोस; मग जेव्हां आम्हीं तिच्यावर पाणी वर्षावितों तेव्हां ती लसलसूं लागते व उमलून वर येते. ज्यानें या (भूमी)ला सजीव (व टवटवीत) केलें तोच (परमेश्वर पुनरुत्थानांत) मेलेल्यांचाहि सजीव कर्ता होय. कांहीं संशय नाहीं. कीं तो सर्व शक्तिमान् होय. ३९. जे लोक आमच्या महावाक्यांत वांकडेपणा[1] आणतात

(१) वांकडेपणा आणणें याचा अर्थ हा आहे कीं लोक ओढून ताणून आपल्या

**ते आम्हांपासून लपलेले नाहींत. बरें, जो (मनुष्य शेवटीं) नरकाग्नींत टाकिला जाईल तो उत्तम कीं, जो पुनरुत्थानाचे दिवशीं निर्भय (व शांत) होऊन येईल तो? (लोकांनों!) तुम्हीं जें हवें तें करा. जें कांहींहि तुम्हीं करितां अर्थात् परमेश्वर तें पाहत आहे. ४०. ज्या लोकां-पाशीं जेव्हां (कुराणासारखा) बोध आला तेव्हां त्यांनीं त्यास मानिलें नाहीं; (तेंहि आपला अंतिम परिणाम पाहून घेतील). आणि हें (कुराण) तर फार उच्च (दुर्भेद्य) पुस्तक होय; ४१. कीं असत्य हें याच्या पुढूनहि याच्याजवळ फिरकत नाहीं व याच्या मागूनहि (फिरकत) नाहीं. (कारण, हें) बुद्धिमान् (व) सुवंद्य अशा (परमेश्वरा)कडून प्रकट झालेलें आहे. ४२. (हे पैगंबरा!) जी गोष्ट तुझ्यापूर्वीं (इतर) पैगंबरांना सांगितली जाऊन चुकली आहे, तीच गोष्ट तुलाहि सांगितली जाते. निःसंशय तुझा पाल-**

---

इच्छेप्रमाणें कुराणांतून असे अर्थ काढूं इच्छितात कीं जे त्यापासून सत्कृदर्शनीं निष्पन्न होत नाहींत; व 'शारेअ' म्हणजे धर्मस्थापकाचेंहि ते उद्देश नसतात. हीहि एक प्रकारची ढवळाढवळच होय. अशा तऱ्हेच्या वांकडे अर्थ भरविण्यानें ग्रंथधारी म्हणजे यहुदी व खिस्ती यांनीं पैगंबरसाहेबांच्या भविष्य वचनांचा विपर्यास केला. पण त्यांचीहि परिस्थिति परमेश्वरापासून गुप्त नाहीं. तो त्यांचें अवश्य पारिपत्य करील.

(१) याचा अर्थ एक तर हा होतो कीं, नेहमीं एकच धर्म चालत आला आहे. इस्लाम हा कोणी नवीन धर्म नव्हे कीं, लोकांनीं यापासून गांगरून जावें व घाबरावें. मूळधर्म परमेश्वराला एक मानणें हा होय. सर्व पैगंबर वा प्रेषित किंवा ऋषि मुनि हे हेंच शिक्षण देत आले. लोकांच्या स्थित्यंतरामुळें शास्त्र बदलत गेलें म्हणून काय झालें? शास्त्र हें धर्माची केवळ एक शाखा होय. परमेश्वराला एक मानणें हा जो मूळधर्म यांत मात्र फरक पडूं नये व परमेश्वराखेरीज इतर कोणाची उपासना होऊं नये; याविषयीं जपणें प्रत्येक मानवाचें आद्य कर्तव्य आहे. अगर दुसरा हा अर्थ होतो कीं जसे इतर लोक आपापल्या पैगंबरांसंबंधानें बोलले; म्हणजे त्यांनीं त्यांस कवि, जादुगीर, लबाड व पाखंडी म्हटलें, तसेंच या लोकांतील नास्तिकहि तुम्हांसंबंधानें बोलतात. तर मागील पैगंबरांनीं ह्या गोष्टी मुकाट्यानें सहन करून घेतल्या; म्हणून तुम्हींहि सहन करून घ्या.

नकर्ता (पापांचा) क्षमाकर्ताहि होय व त्याची शिक्षाहि दुःखप्रद होय. ४३. आणि जर आम्हीं याला (अरबीशिवाय) परकीय भाषेचें कुराण बनवितों तर (हे 'मक्के'चे नास्तिक) अवश्य म्हणते कीं, याचीं महावाक्यें (आमच्याच भाषेंत आम्हांला) चांगलीं स्पष्ट करून कां म्हणून समजाविलीं गेलीं नाहींत? काय (विलक्षण गोष्ट आहे कीं कुराणाची भाषा) परकीय व (आमची) अरबी? (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं जे लोक विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीं तर हें (कुराण सर्वस्वीं) सद्बोध आणि (अध्यात्मिक रोगांचा) परिहार होय. आणि जे लोक विश्वास ठेवित नाहींत त्यांच्या कानांच्याठायीं तें बधिरत्व व त्यांच्या(डोळ्यांच्या)ठायीं अंधत्व होय. हे लोक (कुराणाकडून अशी बेपर्दाई जाहीर करतात कीं जणूं) ह्यांना लांबच्या पल्ल्यावरून हाक मारली जाते (कीं, यांना काहींच ऐकूं येत नाहीं). ४४. आणि आम्हींच 'मूसा'लाहि (तौरात) पुस्तक दिलें होतें; तर त्यांतहि (मोठमोठे) विरोध झाले. आणि (हे पैगंबरा!) जर तुझ्या पालनकर्त्याकडून (पुनरुत्थानांतच फैसला करण्याचें) वचन पहिल्यानेंच न निघून चुकलें असतें, तर यांच्यादरम्यान (यांच्या मतभेदांचा) फैसला (केव्हांचाच) केला गेला असता. आणि (असेच) हे लोक कुराणासंबंधानेंहि गोंधळून सोडणाऱ्या शंकेंत (पडलेले) आहेत. ४५. (हे पैगंबरा!) जो कोणी चांगलें करितो तो खास आपल्या(बऱ्या)साठींच (करितो). आणि जो वाईट करितो तर (त्याचा दुष्परिणाम) त्याच्यापुढेंच (येईल). आणि तुझा पालनकर्ता तर सेवकांवर मुळींच जुलूम करीत नसतो. ४६.

# पवित्र कुराण.

## भाग पंचवीसावा.

### सूरतु-स्सिज्दा:(पुढें चालू)

त्याच्याचकडे (पुनरुत्थानाच्या) घटकेचें ज्ञान लागू करितां येतें (म्हणजे, तोच जाणतो कीं ती केव्हां येईल). आणि फळेंहि आपल्या बोंडांतून निघत नाहींत व कोणतीहि मादी गर्भ धरीत नाहीं व ती प्रसवतहि नाहीं; पण (हें सर्व कांहीं) त्या(परमेश्वरा)च्याच ज्ञानानें (व संकल्पानें होत असतें). आणि (पुनरुत्थानाचे दिवशीं) जेव्हां परमेश्वर लोकांस हाक मारील (व विचारील)कीं(तुम्हीं ज्यांना माझे जोडीदार ठरवित होतां ते) माझे जोडीदार (आतां) कोठें आहेत ? ते जबाब देतील कीं आम्हीं तर तुला निश्चित सांगतों कीं आमच्यांतून कोणीहि (या जोडीदारांस) प्रत्यक्ष जाणीत नाहीं; ४७. आणि ज्या(देवां)स हे लोक पूर्वीं बोलावित होते ते आतां यांजपासून (असे) नष्ट होतील (कीं कोठें त्यांचा पत्ताच लागणार नाहीं). आणि हे लोक समजून जातील कीं (आतां) यांना (कोठेंच) गत्यंतर नाहीं. ४८. मनुष्य चांगला वर मागण्यापासून (कधींच) कंटाळत नाहीं आणि जर त्याला दुःख पोहोंचतें तर (तो) अगदींच हताश व निराश (होऊन जातो.) ४९. आणि जर त्याला एखादें दुःख पोहोंचतें व त्यानंतर आम्हीं त्याला आपल्या दयेची गोडी चाखवितों; तर तो म्हणूं लागतो कीं हें तर माझें (फळ) झालें. आणि मी समजत नाहीं कीं (पुनरुत्थानाची) घटका (कधींहि) कायम होईल; आणि जर मला आपल्या पालनकर्त्याकडे पालटून नेलेंहि गेलेंच तर त्याच्यायेथेंहि मजकरितां कल्याणच (कल्याण) होय. तर जे लोक (पुनरुत्थान) मानण्याचें नाकारितात त्यांस, आम्हीं जसजशीं कर्मे हे लोक करीत राहिले आहेत (त्यांचें बरें वाईट पुनरुत्थानाच्या दिवशीं) अवश्य कळवूं; आणि त्यांना सक्त शिक्षेची गोडी चाखवूं (ती वेगळीच). ५०. आणि जेव्हां आम्हीं माण-

सावर (आपली) कृपा करितों तेव्हां (तो आम्हांपासून) तोंड फिरवितो व आपलें अंग काढून घेतो. आणि जेव्हां त्याला दुःख पोहोंचतें, तेव्हां तो (लांब)रुंद प्रार्थना करूं लागतो. ५१. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं बरें पहा तर खरें, कीं जर (हें कुराण) परमेश्वराकडून (आलेलें) असेल व यावरहि तुम्हीं त्याचा अव्हेर कराल; तर जो कोणी (अशा) पराकाष्टेच्या विरोधांत (पडला) असेल त्याच्यापेक्षां जास्त बहकलेला (आणखी) कोण (होऊं शकतो)?५२. पण, आम्हीं लवकरच या लोकांस आपल्या (सामर्थ्याच्या) निशाण्या (जगाच्या) आस्मंतांतहि दाखवूं व खुद्द त्यांच्यांतहि;[१] येथपर्यंत कीं यांना जाहीर होऊन जाईल कीं हें (कुराण) सत्य होय; (कीं त्याचीं भविष्यें खरीं होत चाललीं आहेत. हे पैगंबरा!) कां (तुझ्या सांत्वनासाठीं) ही गोष्ट पुरी नाहीं कीं तुझा पालनकर्ता सर्वसाक्षी होय? ५३. पाहा हो! हे (लोक तर) आपल्या पालनकर्त्याच्या नजरानजर होण्यापासूनहि संशयांत (पडले) आहेत. पाहा हो!परमेश्वर(आपल्या ज्ञानानें व सामर्थ्यानें)प्रत्येक वस्तूस व्यापून आहे.५४.

---

(१) यांत आश्चर्य चकित करणाऱ्या इस्लामधर्माच्या विजयांकडे इषारा आहे कीं प्रथम दुसरे देश जिंकिले गेले व शेवटीं खुद्द नास्तिकांचें वतन मक्का हेंहि मुसलमानांच्या हस्तगत झालें.

# अध्याय ४२ वा.

# सूरतु-श्शूरा.

हा अध्याय मकेंत प्रकट झाला. यांत ५३ आयात-महावाक्यें आहेत. विश्वासूंस आपल्या कोणत्याहि कामांसंबंधीं विचार करण्याची व आपसांत सल्लामसलत करण्याची एका वाक्यांत शिफारस करण्यांत आली आहे त्यावरून सल्ला मसलतीचें प्रकरण हें नांव पडलें. यावरून ही गोष्ट ध्यानांत ठेवावयाची आहे कीं, इस्लामधर्म लोकसत्ताक राज्यपद्धतीचा अभिमान बाळगितो.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**ह. म. (हा-मीम)-१. अ. स. क. (ऐन-सीन-काफ). २.(हे पैगंबरा! ज्याप्रमाणें हा अध्याय तुला प्रकट केला जातो) याचप्रमाणें परमेश्वर जो सामर्थ्यवान (व) बुद्धिमान होय तो तुजकडे व जे (पैगंबर) तुझ्यापूर्वीं होऊन गेले आहेत त्यांजकडे आदेश पाठवीत राहिला आहे. ३. जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) त्याचेंच होय; आणि तोच (सर्वांत) थोर व महिमाशाली होय. ४. (कांहीं) दुरापास्त नाहीं कीं आकाशें (त्याच्या हैबतीमुळें) आपल्या वरच्या बाजूनें फाटून पडतील आणि दूत(होत कीं ते) आपल्या पालनकर्त्याच्या स्तवनाबरोबर (त्याच्या) पावित्र्यवर्णनांत लागलेले आहेत; आणि जे लोक पृथ्वींत (राहत) आहेत त्यां(च्या पापां)ची ते क्षमा मागीत राहतात. पाहा हो! परमेश्वरच (पापांचा) क्षमाकर्ता (व) कृपाळू होय. ५. आणि ज्या लोकांनीं परमेश्वराखेरीज (दुसरे दुसरे) पुरस्कर्ते ठरवून ठेविले आहेत त्यांच्यावर परमेश्वर नजर राखतो आहे; आणि (हे पैगंबरा!) तूं त्यांच्यावर कांहीं रखवालदार**

---

(१) म्हणजे आम्हीं तुम्हांस त्यांच्यावर तैनाती ठेविला नाहीं कीं, त्यांनीं नास्तिकपणा करूं नये. तुमचें काम तर फक्त संदेश पोहोंचविणें व तो समजून देणें हें आहे एवढेंच.

**तर नाहींस. ६. आणि अशाच तऱ्हेनें अरबी (भाषेचें) कुराण आम्हीं तुजकडे प्रकटीकरणाद्वारें पाठविलें आहे, कीं तूं मुख्य शहर[1] (म्हणजे 'मक्के'च्या राहणाऱ्यांस) व जे लोक त्याच्या आसपास (वसत) आहेत त्यांस (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखवावेंस; आणि (तसेंच) जमावाचा[2] दिवस (म्हणजे पुनरुत्थानाचा प्रसंग) कीं ज्या(च्या येण्यां)त किंचितूहि संशय नाहीं त्याचें तूं भय दाखवावेंस. (त्या दिवशीं) एक पक्ष स्वर्गांत असेल व एक पक्ष नरकांत. ७. आणि परमेश्वर इच्छिता तर (धर्मदृष्ट्या सर्व) लोकांचा एकच पंथ बनविता. परंतु तो ज्याला इच्छितो त्याला आपल्या दयेंत घेतो. आणि (राहिले) आज्ञाभंजक, (तर) त्यांचा (त्या दिवशीं) कोणी पुरस्कर्ता होणार नाहीं व कोणी मदतगारहि नाहीं. ८. कां या लोकांनीं परमेश्वराशिवाय (अन्य अन्य) पुरस्कर्ते बनवून ठेविले आहेत? तथापि परमेश्वरच पुरस्कर्ता होय; आणि तोच (पुनरुत्थानांत) मेलेल्यांस जिवंत करील; आणि तो सर्वशक्तिमान् होय. ९. आणि ज्या ज्या गोष्टींत तुम्हीं लोक आपसांत मतभेद करितां त्यांचा फैसला परमेश्वराच्याच हवालीं होय. (लोकांनों!) हाच परमेश्वर तर माझा**

---

(१) 'उम्मुल–कुरा' याचा अर्थ मीं मुख्य शहर केला आहे. त्याचा यथा-शब्द अर्थ गांवांची आई किंवा मूळ असा होतो. म्हणून मोठ्या कसब्यास किंवा मुख्य शहरास 'उम्मुलकुरा' ह्मणतात. त्याचें एक कारण तर हें असावें कीं जशीं मुलें आपल्या आईकडे जातात तद्वतच लोक बाजारहाट करण्यासाठीं नेहमीं तिकडेच वळतात. अगर दुसरें कारण असें असावें कीं जेव्हां मोठ्या कसब्यांत वस्ती जास्त होऊन जाते, तेव्हां तेथील लोक दुसऱ्या जागीं जाऊन वसतात; जणूं कीं हा मोठा कसबा किंवा शहर आई आहे व हीं लहान लहान तिचीं मुलेंबाळें आहेत; येथें मुख्य शहर म्हटलें म्हणजे मक्का होय कीं, तें त्या वेळींहि मोठें शहर होतें व आजहि मोठें शहर आहे; कीं लोक नेहमीं तिकडे जात येत राहतात.

(२) पुनरुत्थानाच्या दिवसाचीं पुष्कळ नांवें आहेत. जशीं 'यौमुलहश्र,' 'साअ:,' 'यौमुत्तनाद' वगैरे. त्यांतल्या त्यांत त्याचें एक नांव 'यौमुल–जम्अ' ह्मणजे जमावाचा दिवस हेंहि होय. कारण त्या दिवशीं कर्मांचा हिशेब देण्या-साठीं लोकांचा मोठा जमाव होईल.

पालनकर्ता होय. मी त्याच्यावरच भरंवसा ठेवितों आणि (प्रत्येक गोष्टींत) त्याच्याचकडे वळतों. १०. (तोच) आकाशांचा व पृथ्वीचा उत्पादक (होय); त्यानेंच तुम्हांसाठीं तुमच्या जातीचीं जोडपीं बनविलीं; (म्हणजे पत्न्या); आणि (तुमच्या जोडप्यांखेरीज) चतुष्पाद जनावरांचीं जोडपींहि. (अशा तऱ्हेनें) तो तुम्हांस भूतलावर फैलावित राहतो. त्याच्या समान कोणतीहि वस्तु नाहीं. आणि तो (सर्वांचें) ऐकतो, (व सर्व कांहीं) पाहतो. ११. आकाश व पृथ्वीच्या (खजिन्यांच्या) किल्ल्या त्याच्याच पाशीं आहेत. तो ज्याची इच्छितो त्याची अन्नसंपत्ति वाढवितो आणि (ज्याला इच्छितो त्याला) काटकसरीनें देतो. निःसंशय तो प्रत्येक वस्तु(च्या स्थिती)शीं वाकब होय. १२. (लोकांनों !) त्यानें तुम्हांसाठीं धर्माचा तोच संप्रदाय नेमून दिला आहे कीं, ज्या(प्रमाणें चालण्या)ची त्यानें 'नूह'ला आज्ञा केली होती; आणि (हे पैगंबरा !) तुलाहि आम्हीं तोच (मार्ग) प्रकट केला आहे; आणि त्याचीच आम्हीं 'इब्राहीम' व 'मूसा' व 'ईसा' यांसहि आज्ञा केली होती कीं, (याच) धर्मास कायम राखा आणि यांत भेदभाव उत्पन्न करूं नका. (हे पैगंबरा !) तूं ज्या(धर्मा)कडे मूर्तीपूजकांस पाचारितोस तो त्यांना (फारच) जड वाटतो. परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला निवडून आपल्याकडे घेतो. आणि जो (त्याजकडे) वळतो त्यालाच तो आपणाकडे (पोहोंचण्याचा)चा मार्ग दाखवून देतो. १३ आणि (ग्रंथधारी जे) वेगवेगळाले पंथ (झाले, तर ते) त्यांना जाणीव झाल्यामागून आपल्या परस्पर हेंकटपणानें झाले. आणि (हे पैगंबरा !) जर तुझ्या पालनकर्त्याकडून एका नियमित वेळेपर्यंतचें वचन पहिल्यानेंच न निघून चुकलें असतें (कीं, लोकांस पुनरुत्थानापर्यंतचा अवसर आहे); तर यांच्यांत (यांच्या मतभेदांचा) निर्णय (केव्हांचाच) केला गेला असता. आणि जे लोक पूर्वींच्या लोकांमागून (दिव्य) पुस्तकाचे वारस झाले (ह्मणजे तुझ्या वेळेचे यहुदी व ख्रिस्ती), ते मूळधर्माकडून साशंक करील अशा संशयांत (पडले) आहेत. १४.

---

(१) ह्या बाराव्या व तेराव्या महावाक्यांचा भावार्थ हा आहे कीं हजरत नूह पैगंबर कीं ज्यांच्या काळीं महाजलप्रलय झाला होता त्यांच्या प्रथम काळापासून शेवट म्हणजे कलियुगाचे महान् पैगंबर हजरत मोहंमद साहेब-

**म्हणून (हे पैगंबरा !) तूं तर (लोकांस) त्याच (अस्सल धर्मा)कडे बोलावित राहा; आणि (स्वतःहि) जशी तुला आज्ञा केली गेली आहे (त्यावरच) काईम राहा. आणि या (यहुदी व ख्रिस्त्यां)च्या मनेच्छांचें अनुकरण करूं नकोस; आणि (यांना स्पष्ट) सांग कीं पुस्तक म्हणून जें कांहीं परमेश्वरानें उतरलें आहे; मी तर त्या(सर्वां)वर विश्वास ठेवितों. आणि मला (परमेश्वराकडून) आज्ञा झाली आहे कीं मी तुमच्या दरम्यान (तुमच्या मतभेदांसंबंधानें) न्याय करावा. (तोच) परमेश्वर (तर) आमचा पालनकर्ता होय व (तोच) तुमचा पालनकर्ताहि (होय). आमचीं कर्मे आम्हांला व तुमचीं कर्मे तुम्हांला. आमच्यांत व तुमच्यांत कांहीं वाद नाहीं. परमेश्वरच (पुनरुत्थानाचे दिवशीं) आम्हांला (व तुम्हांला एकत्र) गोळा करील व त्याच्याचकडे (सर्वांस) परतून जाणें आहे. १५ आणि जेव्हां (पुष्कळ लोक इस्लाम स्वीकारून) परमेश्वरास मानून चुकले तेव्हां या पश्चात जे लोक परमेश्वरासंबधीं वादविवाद उपस्थित करतील; तर त्यांच्या**

---

सल्लाहो अलैहे व सल्लम—परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो—यांच्या काळापर्यंत जेवढे पैगंबर व ऋषि म्हणून आले ते हाच एक इस्लामधर्म—ईश्वराज्ञापालनाचा धर्म—घेऊन आले. त्यांना हेंच शिक्षण देण्याची आज्ञा होती व त्यांनीहि हेंच शिक्षण दिलें. कोणाहि पैगंबराचा मूळधर्म दुसऱ्या कोणाहि पैगंबराच्या मूळधर्मापासून भिन्न नाहीं व पैगंबरांमध्यें कोणाहि तऱ्हेचा भेद व विरोधहि नाहीं. सर्व एकाच परमेश्वराच्या उपासनेचा बोध करीत आले आहेत. तथापि पैगंबराच्या मूळधर्मांत कोणाहि तऱ्हेचा विरोध नाहीं असें असतांहि त्यांच्या अनुयायांनीं ईश्वरी दिव्य पुस्तक प्रकट झाल्यानंतर धर्मांत भेद उत्पन्न केला व यहुदी व ख्रिस्ती बनून बसले. हे लोक पैगंबरांच्या मागून दिव्य पुस्तकाचे वारस झाले होते. तर त्यांना पाहिजे होतें कीं अस्सल धर्मांत फूट न घालते. परंतु त्यांनीं अभिमान वा हेंकटपणा किंवा इहलौकिक लोभ यामुळें मूळधर्मांत शंका उत्पन्न केल्या. ईश्वराज्ञापालन हा जो मूळधर्म त्याच्याचकडे अरब नास्तिकं व मूर्तिपूजकांस पाचारिलें जातें; पण हे त्यापासून बिचकतात.

(१) अरबस्थानचे लोक पैगंबर साहेबांच्या वेळीं मूर्तिपूजक होते; शिवाय यहुदी व ख्रिस्ती हेहि अरबदेशांत वसत होते व ते ग्रंथधारी होते म्हणजे

पालनकर्त्यासमीप त्यांचा वाद पोंचट होय; आणि त्यांजवर (परमेश्वराचा) कोप होय; व त्यांना कडक शिक्षा होणें आहे. १६. परमेश्वरच तर होय कीं ज्यानें (पैगंबरांच्यामार्फत) पुस्तकें प्रकट केलीं; (व तीं सर्व) सत्य (–प्रचुर होत) व (तीं आपल्यापरीं) तराजू (होत कीं; त्यांनीं भारी व हलकें म्हणजे सत् व असत् तोललें जातें). आणि (हे पैगंबरा!) तूं काय जाणूं शकतोस कीं कदाचित् (पुनरुत्थानाची) घटका जवळ (येऊन लागली) असेल! १७. ज्यांना पुनरुत्थानाचा (पूर्ण) विश्वास नाहीं ते तर त्याच्यासाठीं घाई मचविताहेत; आणि ज्यांनीं विश्वास धरिला आहे ते त्यापासून भीत राहतात व जाणतात कीं (पुनरुत्थानाचें येणें) हें सत्य होय. पाहाहो! जे लोक (पुनरुत्थानाच्या) घटकेसंबंधानें झगडतात, ते निःसंशयेंकरून पराकाष्ठेच्या चुकींत होत १८. परमेश्वर आपल्या सेवकांच्या जरा जराशा स्थितीशीं वाकब होय; तो ज्याला (जितकें) इच्छितो (तितकें) त्याला देतो आणि तो फारच बलवान् व परम समर्थ होय. १९. जो कोणी परलोकींच्या शेतीचा अभिलाषी असेल त्याला आम्हीं त्याच्या शेतींत त्याच्याकरितां बरकत देऊं. आणि जो इहलोकींच्या शेतीचा आकांक्षी असेल तर आम्हीं (यथायोग्य प्रमाणांत) त्याला इहलोक देऊं. (पण) मग परलोकांत त्याचा कांहीं वांटा नाहीं. २०. कां या लोकां(नीं परमेश्वरा)चे पातीदार (बनवून ठेविले) आहेत; कीं त्यांनीं यांच्यासाठीं धर्माचा (असा) मार्ग नेमून दिला आहे कीं, ज्याची परमेश्वरानें परवानगी दिली नाहीं? आणि (परमेश्वराकडून पुनरुत्थानाचें) निर्णायक वचन होऊन गेलें नसतें तर यांच्यादरम्यान (यांच्या मतभेदांचा) निकाल (केव्हांचाच) लावून दिला गेला असता. आणि जे आज्ञाभंजक होत त्यांना (परलोकीं) अवश्य दुःखकारक शिक्षा होणें आहे. २१. (हे पैगंबरा! तूं त्या दिवशीं या) आज्ञाभंजकांस पाहशील कीं त्यांनीं

---

त्यांजपाशीं जुना करार व नवा करार हीं पुस्तकें होतीं. पैगंबरसाहेबांच्या उपदेशानें अरबचे लोक जेव्हां मुसलमान होत असत तेव्हां हे लोक त्यांच्या मनांत शंका घालीत व त्यांना बहकवीत. हें वाक्य या पुस्तकधारी लोकांस अनुलक्षून आहे.

जीं जीं कर्में केलीं आहेत त्यां(च्या दुष्परिणामा)पासून ते भीत असतील व तो त्यांजवर ओढवेलच (ओढवेल). आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, ते स्वर्गाच्या उद्यानांत असतील. जें कांहीं त्यांना पाहिजे असेल तें त्यांना त्यांच्या पालनकर्त्यासमीप (प्राप्त) होईल. हीच तर (परमेश्वराची) मोठी कृपा होय. २२. हीच (तर) ती (देणगी) होय कीं जिचें शुभवर्तमान परमेश्वर आपल्या अशा सेवकांस देतो कीं ज्यांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं मी तुम्हांपासून या(संदेश पोहोचविण्या)बद्दल कांहीं वेतन तर मागीत नाहीं. पण आप्तसंबंधाची प्रीति (तर कायम ठेवा). आणि जो कोणी पुण्य करील त्याच्यासाठीं आम्हीं त्या(च्या पुण्यां)त आणखी जास्त खुबी पैदा करूं. (कारण) परमेश्वर (पापांचा) क्षमाकर्ता (व) गुणग्राहक होय. २३. (हे पैगंबरा !) कां (हे लोक तुझ्या-संबंधानें) म्हणतात कीं या (गृहस्था)नें (कुराणासंबंधीं) परमेश्वरावर खोटें कुभांड रचिलें आहे. पण (अशा स्थितींत) परमेश्वर (तर या गोष्टीस समर्थ होय कीं तो) जर इच्छील तर तुझ्या अंतःकरणावर मोहर लावून टाकील; (आणि तुझ्या मुखांतून असली वाणी निघूंहि न शकेल). परंतु परमेश्वर आपल्या वाणीनें असत्य मिटवितो व सत्य स्थापितो. निःसंशय तो (लोकांच्या) मनांतील अंतस्थ विचारांशींदेखिल वाकब होय. २४. आणि तोच तर असा होय कीं जो आपल्या सेवकांकडून पश्चात्ताप मान्य करितो व (त्यांचीं) पापें क्षमा करितो आणि जसजशीं कृत्यें तुम्हीं लोक करितां त्यांशीं तो वाकब होय. २५. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व त्यांनीं चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्या (प्रार्थना) तो मान्य करितो आणि आपल्या कृपेनें त्यांना (योग्यतेहूनहि) अधिक (पुण्यफल) देतो. आणि जे लोक नास्तिक होत त्यांच्यासाठीं सक्त शिक्षा होय. २६ आणि जर परमेश्वर आपल्या सेवकांसाठीं (त्यांचीं) अन्नसंपत्ति वाढवील, तर ते अवश्य पृथ्वींत शिरजोरी करूं लागतील. परंतु तो योग्य प्रमाणांत जितकी (चंदी) इच्छितो तितकी उतरतो. (कारण,) तो आपल्या सेव-कां(च्या गरजां)शीं माहितगार (व त्यांची स्थिति) पाहणारा होय. २७. आणि तोच तर असा होय कीं जो लोकां(स पावसाकडून निराशा

होऊन जाते तेव्हां तो त्यां)च्या निराश झाल्यानंतर पर्जन्यवृष्टि करितो आणि आपली दया सर्वत्र पसरतो .. आणि तो(सर्वांचा)पुरस्कर्ता(व सर्व-) स्तुतिपात्र होय. २८. आणि त्याच्याच (सामर्थ्यांच्या) निशाण्यांतून आकाशांची व पृथ्वीची उत्पत्ति होय व (तशीच) त्यानें जे प्राणी आकाश व पृथ्वींत पसरून ठेविले आहेत त्या प्राण्यांचीहि. आणि तो जेव्हां इच्छील तेव्हां (म्हणजे पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांच्या एकत्र गोळा करण्यासहि समर्थ होय. २९. आणि (लोकांनों!) तुम्हांवर जें संकट ओढवतें तें तुमच्या आपल्याच हाताच्या कर्तृत्वानें; आणि परमेश्वर (तुमचे) बहुतेक (अपराधां)ची क्षमा करितो. ३०. नाहीं तर, तुम्हीं पृथ्वीवर (कोणीहि कडे पळून परमेश्वराला)जेर तर करूं शकतच नाहींत. आणि परमेश्वरावांचून तुमचा कोणी पुरस्कर्ताहि नाहीं व कोणी मदतगारहि नाहीं. ३१. आणि त्याच्याच (सामर्थ्यांच्या) निशाण्यांतून जहाजें होत कीं जीं समुद्रांतून पर्वतासारखीं(उंच उंच दिसून येत)आहेत. ३२. परमेश्वर इच्छील तर वायूला स्थिर करील व मग जहाजेंहि समुद्राच्या पाठीवर उभींचीं उभींच राहून जातील. जेवढे (म्हणून) सहनशील व उपकारशील (सेवक) होत त्यांच्या साठीं ह्या(जहाजांच्या इकडे तिकडे धांव घेत फिरण्यां)तहि (ईश्वरी सामर्थ्यांच्या बऱ्याच) निशाण्या होत. ३३. अथवा (तो इच्छील तर सोसाट्याचा वारा चालवील आणि) गलबतांवरील लोकांनीं जीं दुष्कर्में केलीं आहेत त्यांच्या ऐवजीं तो गलबतांचा (तुफानानें) नाश करून टाकील; (तर कित्येक बुडून जातील) आणि बहुतेकां(च्या पापां)ची क्षमा करील; (कीं ते नौकाभंग झाला असतांहि कसेंहि करून बचावतील.) ३४. आणि जे लोक आमच्या (सामर्थ्यांच्या) निशाण्यांत वितंडवाद(१) करतात त्यांनीं (नौकाभंगाचे वेळीं) जाणून घ्यावें कीं (आतां) त्यांना कोठेंच गत्यंतर नाहीं. ३५. तर (लोकांनों!) जें कांहींहि तुम्हांस दिलें गेलें आहे तें इहलौकिक आयुष्याचें (क्षणभंगुर)

---

(१) वितंडवाद करतात म्हणजे लोक प्रत्येक कामाचें श्रेय आपल्या युक्तीकडे लावतात. जहाज तवाईंत येईल व कोणतीच युक्ति चालू न शकेल तेव्हां ते समजतील कीं, सर्व कांहीं परमेश्वराचे हुकमानें होतें आणि माणसाचें कांहींच चालत नाहीं. माणूस अगदीं अशक्त असतो.

सुखसाधन होय. आणि जो (मोबदला) परमेश्वरापाशीं होय तो (याहूनहि फारच) व उत्तम चिरस्थायी होय; (पण) अशा लोकांसाठींच कीं ज्यांनीं विश्वास धरिला व (विश्वासाशिवाय) आपल्या पालनकर्त्यावरहि भरंवसा ठेवितात; ३६. आणि जे लोक महा पातकें व निर्लज्जपणाचीं कामें यांजपासून अलिप्त राहतात; आणि जेव्हां त्यांना राग येऊन जातो तेव्हां ते (लोकांच्या अपराधांची) क्षमा करतात; ३७. आणि जे आपल्या पालनकर्त्याची आज्ञा मान्य करतात व नमाज पढतात; आणि त्यांचीं (जितकीं) कामें (आहेत तीं) परस्पर सल्लामसलतीं(नें होत) असतात; आणि आम्हीं जें त्यांना देऊन ठेविलें आहे त्यांतून (परमार्थांत) खर्च करतात, ३८. आणि जे असे (दिलदार आहेत कीं जेव्हां त्यांच्यावर कोणाहिकडून) गैरशिस्त अत्याचार होतो तेव्हां ते (वाजवी) बदला घेऊन सोडतात. ३९. आणि दुष्टपणाचा मोबदला तसलाच दुष्टपणा होय. यावरहि जो कोणी माफी देऊन टाकील व संप करील तर त्याचें प्रतिफल परमेश्वराकडे होय. निःसंशय तो जुलूम करणाऱ्यांस पसंत करीत नसतो. ४०. आणि अर्थात् ज्या कोणावर जुलूम झाला असेल व त्यानंतर तो बदला घेईल तर हे लोक (क्षमापात्र होत) यांच्यावर (दोष ठेवण्यास) मार्ग नाहीं. ४१. अशा लोकांवरच काय तो (दोष ठेवण्यास) मार्ग होय कीं जे लोकांवर जुलूम करतात आणि मुलखांत हकनाक (उगीच) दांडगाई माजवितात. हेच लोक होत कीं ज्यांना दुखःकारक शिक्षा होणें आहे. ४२. आणि अलबत जो कोणी सहन करील व (दुसऱ्याचा अपराध) क्षमा करील तर निःसंशय हें मोठ्या हिंमतीचें काम होय. ४३. आणि ज्याला परमेश्वर आडमार्गीं भटकवील, तर मग त्याचा कोणी (वाली व) मदतगार नाहीं. आणि (हे पैगंबरा! पुनरुत्थानाचे दिवशीं तूं) जुलमी लोकांस पाहशील कीं जेव्हां ते शिक्षेला (आपल्या डोळ्यांनीं) पाहून घेतील तेव्हां ते (खेदयुक्त होऊन) म्हणतील कीं बरें, (जगांत) पुन्हां परतून जाण्याचीहि कांहीं वाट आहे? ४४. आणि तूं या लोकांस पाहशील कीं ते नरकाच्या समोरासमोर आणिले जातील (व परिस्थिति अशी असेल कीं) ते हीनत्वामुळें नमलेले असतील (व) हळूच एका बाजूनें पाहत

(जात) असतील. आणि (त्यावेळीं) विश्वासू म्हणतील कीं ज्या लोकांनीं (स्वतः गैरमार्गी होऊन आज) पुनरुत्थानाचे दिवशीं आपणच आपलेंहि नुकसान केलें व (आपला वाईट नमुना दाखवून व बहकवून) आपल्या कुटुंबाचेंहि (नुकसान केलें); खरोखरींच ते (मोठे) हानि भोगणारे होत. पाहाहो! जुलूम करणारे अवश्य कायमचे शिक्षेंत राहतील. ४५. आणि परमेश्वराखेरीज त्यांचे कोणी पुरस्कर्तेंहि नसतील कीं ते त्यांची मदत करतील. आणि ज्याला परमेश्वर कुमार्गीं लावील तर त्याच्यासाठीं (सुटकेचा) कोणताहि मार्गच नाहीं. ४६. (लोकांनो!) परमेश्वराकडून जो दिवस टळावयाचाच नाहीं त्या (पुनरुत्थानाच्या) दिवसाच्या येण्यापूर्वीच तुम्हीं आपल्या पालनकर्त्याचा कह्या माना; कीं त्या दिवशीं तर तुम्हांला कोठेंहि आश्रय (प्राप्त) होणार नाहीं व तुमच्यानें (पापांची) नाकारणीहि होऊं शकणार नाहीं. ४७. तर (हे पैगंबरा!) जर (इतके समजाविल्यावरहि हे लोक) तोंड फिरवित राहतील तर आम्हीं तुला यांजवर कांहीं रखवालदार तर करून पाठविला नाहीं. तुजकडे तर (ईश्वरी हुकमाचें) पोंचतें करणें आहे एवढेंच काय तें. आणि जेव्हां आम्हीं माणसाला आपल्या दयेची गोडी चाखवितों तेव्हां तो त्याशीं खुश होऊन जातो. आणि जर लोकांवर त्यानीं आपल्या हातांनीं पूर्वीं जें केलें सवरलें आहे त्याच्या ऐवजीं, एखादें अरिष्ट ओढवतें तर (ते परमेश्वराचा गिल्ला करूं लागतात, आणि) माणूस हा फारच कृतघ्न होय ४८. आकाशांचें व पृथ्वीचें राज्य परमेश्वराचेंच होय; तो जें इच्छितो तें निर्माण करितो. ज्याला तो इच्छितो त्याला (निव्वळ) मुलींच देतो आणि ज्याला तो इच्छितो त्याला (निव्वळ) मुलगेच देतो. ४९. अथवा मुलगे व मुलीं (मिळून) दोन्ही प्रकारची संतति तो त्यांस देतो. आणि ज्याला तो इच्छितो त्याला असा (नामशेष) करून टाकतो कीं त्याला संतानच होत नाहीं. निःसंशय तो (संतानाच्या प्रयोजनाशीं) वाकब (आणि स्त्रीपुरुष बनविण्यास) समर्थ होय ५०. आणि कोणाहि मनुष्याची ताकद नाहीं कीं परमेश्वर त्याच्याशीं (रूबरू होऊन) संभाषण करील; पण प्रकटीकरणाद्वारें अगर पडद्याच्यामागून; अथवा तो कोणा दूतास (त्यापाशीं) पाठवितो; व तो परमेश्वराचे हुकमानें जो त्याला मंजूर असतो तो (ईश्वरी) आदेश पोहोंचवितो. निःसंशय पर-

मेश्वर महिमाशाली (व) सत्यसंकल्प होय. ५१. आणि (हे पैगंबरा!) अशाच रीतीनें आम्हीं आपल्या हुकमानें (धर्माचा) आत्मा[१] (म्हणजे हा ग्रंथ) तुजकडे प्रकटीकरणाद्वारें पाठविला आहे. तूं जाणत नव्हतास कीं पुस्तक तें काय ? आणि (हेंहि) नाहीं (कीं) विश्वास (कोणाला म्हणतात.) ? परंतु आम्हीं कुराणाला एक प्रकाश बनविला आहे; कीं, आम्हीं आपल्या सेवकांतून ज्याला इच्छितों त्याला त्यायोगें (धर्माचा) मार्ग दाखवितों. आणि (हे पैगंबरा!) यांत संशय नाहीं कीं, तूं (तर लोकांस) सरळच मार्ग दाखवितोस; ५२. (म्हणजे) अशा परमेश्वराचा मार्ग कीं, जें कांहीं आकाशांत आहे,व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व) त्याचेंच होय. पाहाहो ! सर्व कामांची (अंतिम) मदार[२] परमेश्वरावरच होय. ५३.

(१) भाष्यकारांनीं 'रूह' ह्मणजे आत्मा याचे दोन अर्थ लिहिले आहेत. कित्येकांनीं रूहुल्-कुदुस म्हणजे पवित्र आत्मा-ज्याला जिब्रईल ह्मणतात, तो घेतला आहे; व त्यांनीं 'अवहयना'चा अर्थ पाठविलें असा केला आहे; कीं, आम्हीं आपल्या हुकमानें पवित्र आत्मा ह्मणजे जिब्रईल यास तुजकडे पाठविलें आहे; कित्येकांनीं 'रूह' याचा फलितार्थ कुराण घेतला आहे कीं, तें अंत:करणांस सजीव करितें अगर सार्वकालिक जीवन प्राप्त होण्याचें तें साधन आहे. आम्हीं हा अर्थ पत्करून 'धर्माचा आत्मा' असें भाषांतर केलें आहे. कारण, धर्म जो लोकांच्या मतभेदानें व ढवळाढवळीने जणूं मृत होऊन गेला होता, त्यांत कुराणानें पुन्हां चैतन्य आणिलें.

(२) ह्मणजे सेवकांचीं अवघीं बरीं वाईट कर्में त्याच्याच हुजुरांत गुदरतील. व तोच त्यांना त्याचा मोबदला वा शिक्षा देईल. अगर हें कीं, जेवढ्या गोष्टी जगांत घडून येतात त्या सर्वांचें अंतिम कारण परमेश्वरच होय. आणि कारणपरंपरेची अखेरीहि त्याकडेच जाऊन होते.

# अध्याय ४३ वा.

## सूरतु—ज्जुखरुफ.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ८९ आयात-महावाक्यें आहेत. यांत पुढें आलेल्या 'जुख्रुफ' म्हणजे सुवर्ण या शब्दावरून हें नांव पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों)

ह. म. (हा-मीम). १. (या) सुबोध पुस्तका(म्हणजे कुराणा)ची शपथ; २. कीं, आम्हीं याला (स्पष्ट व सुरस) अरबी (भाषेचें) कुराण बनविलें आहे कीं, तुम्हीं (अरब लोक कदाचित हें अनायासें) समजाल. (व तुम्हांद्वारें इतर लोकहि समजतील). ३. आणि हें (कुराण) आमच्यायेथें मूळ पुस्तका (म्हणजे 'लौहें—मजफूज')मध्यें (लिहिलेलें व) फारच भव्य व शहाणपणाचें (पुस्तक) होय. ४. तर कां तुम्हीं लोक (भक्ति-) मर्यादेचे बाहेर निघून गेलां आहां; म्हणून आम्हीं (तुमच्या सुधोरणे-कडून) संबंधरहित होऊन उपदेश करणें सोडून देऊं? ५. आणि पूर्वींच्या लोकांत आम्हीं कित्येक पैगंबर पाठविले; ६. आणि (त्यांचीहि हीच स्थिति होती कीं,) जो पैगंबर त्यांच्यापाशीं येई, त्याची ते केवळ हंशीच उडवीत. ७. मग (अखेर) आम्हीं या('मक्के'च्या नास्तिकां)-हूनहि बळांत फारच जबरदस्त अशांचा नाश करून टाकिला; आणि (जगांत त्या) पूर्वील लाकांची कथा चालू लागली. ८. आणि (हे पैगंबरा!) जर तूं या लोकांस पुसशील कीं (बरें,) आकाशांस व पृथ्वीस कोणी निर्माण केलें आहे? तर ते अवश्य म्हणतील कीं, अशा सर्वसमर्थ व सर्वज्ञानी(परमेश्वरा)नें त्यांस निर्माण केलें आहे; ९ कीं ज्यानें

(१) हा मजकूर कुराणांत अनेक जागीं आलेला आहे. कोठें आकाश व पृथ्वी निर्मिण्याचा, तर कोठें आकाश व पृथ्वीबरोबर चंद्र व सूर्याच्या निर्मि-

**पृथ्वीस तुम्हां लोकांसाठीं बिछाईत बनविली आहे व तुमच्या (चालण्या)साठीं तींत मार्ग काढले आहेत कीं तुम्हीं कदाचित् (आपल्या) सन्मार्गास लागाल; १०. आणि ज्यानें एका अंदाजानें आकाशांतून पाणी वर्षविलें, मग आम्हींच त्या(पाण्या)द्वारें मृत(म्हणजे पडित पडलेल्या) शहरास जिवंत (व टवटवीत) केलें.अशाच रीतीनें तुम्हीं लोकहि (पुनरुत्थानाचे दिवशीं थडग्यांतून) काढले जाल. ११. आणि ज्यानें हरेक तऱ्हेच्या वस्तु पैदा केल्या आहेत आणि तुम्हांसाठीं गलबतें व चतुष्पाद जनावरें कीं तुम्हीं ज्यांवर स्वार होत असतां, तीं बनविलीं आहेत; १२. कीं तुम्हीं त्यांच्या पाठींवर (सुखासमाधानानें) बरोबर बसून जावें; मग जेव्हां तुम्हीं त्यांजवर बरोबर बसून जाल तेव्हां तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या उपकारांचें स्मरण करावें व (आभारपूर्वक) ह्मणावें कीं, पवित्र होय तो (परमेश्वर) कीं ज्यानें ह्या वस्तु आह्मांस वश करून दिल्या आहेत ! आणि आम्हीं (तर असे बलवत्तर) नव्हतों कीं, त्यांस (आपल्या) सत्तेखालीं आणितों; १३. आणि निःसंशय आह्मीं तर आपल्या पालनकर्त्याकडे परतून जाणार आहोंत. १४. आणि लोकांनीं परमेश्वराचे सेवकांतून (दूतांस) त्याचा अंश (म्हणजे पुत्र) ठरविला आहे. कांहीं संशय नाहीं कीं, माणूस हा बोलूनचालून मोठाच अनुपकारी होय ! १५.**

---

ण्याच्या व कोठें आणखी आणखी गोष्टींचा कीं त्या मानवी सामर्थ्याच्या बाहेर होत. यांचा खुलासा हा आहे कीं, जरी मनुष्य एखाद्या वेळीं परमेश्वरास मानण्याचें नाकारितो तरी पण जर मानवी सामर्थ्याच्या बाहेर होत अशा गोष्टी त्याला आठवून दिल्या जातील तर त्यास निरुपायास्तव मानणें भाग पडेल कीं, ह्या उत्क्रांत्या परमेश्वराच्याच होत. सारांश, येथेंहि हाच अर्थ होय; कीं, आकाश व पृथ्वीच्या निर्मिण्याचा प्रश्न करून परमेश्वराचें अस्तित्व कबूल करवावें. बाकी गुणविशेषणांचा जो तपशीलवार उल्लेख केला गेला आहे तें नास्तिकांचें म्हणणें नव्हे; तर परमेश्वरानें आपल्या गुणविशेषणांचें आपणच वर्णन केलें आहे. फक्त व्यक्ति आहे असें कबूल करणें आणि व्यक्ति व विशेषण यांचा स्वीकार करणें या दोहोंचा परिणाम एकच.

(१) याच्या वरील महावाक्यांत परमेश्वरानें आपल्या सर्वसामान्य अशा कांहीं उपकारांचा उल्लेख केला आहे. तर त्या देणग्यांच्या उपकारस्तुतीस हें आव-

कां परमेश्वरानें आपल्या सृष्टींतून (आपण तर) मुलीं घेतल्या व तुम्हां (लोकां)साठीं मुलगे पसंत केले? १६. आणि (परिस्थिति ही होय कीं) जेव्हां या लोकांतून एखाद्यास अशा वस्तूच्या होण्याची खुषखबर दिली जाईल (म्हणजे मुलीची) कीं जिचा आरोप तो परम दयाळू (परमेश्वरा)-कडे लावितो आहे; तेव्हां (रागामुळें) आंतल्याआंतच ताव खाऊन त्याचें तोंड काळें पडून जाईल. १७. कां (मुलीची जात) जिचें शृंगारांत पालनपोषण केलें जातें आणि (एखादा कज्जा येऊन पडला तर) कज्जाचे वेळीं (चांगल्या प्रकारें) जी अर्थबोध करूं शकत नाहीं, (ती परमेश्वराचे ठायीं शोभते)? १८. आणि या लोकांनीं देवदूत जे स्वतःहि, (इतर सृष्टीप्रमाणें) परम दयाळू(परमेश्वरा)चे सेवक होत, त्यांस स्त्री-जाति ठरवून ठेविलें आहे. परमेश्वरानें दूतांस निर्माण केलें त्यावेळीं कां हे लोक हजर होते? (का एरवींच वायफळ बाता झोंकतात?) यांची (ही) जबानी नोंदून ठेविली जाईल आणि (पुनरुत्थानांत याची) यांजपासून विचारणा होईल. १९. आणि ते ह्मणतात कीं, परम दयाळू (परमेश्वर) इच्छिता तर आम्हीं त्यांची उपासना केली नसती. यांना ह्या (दैवी गोष्टीं)चें कांहीं ज्ञान तर नाहींच; हे निव्वळ खोटे तर्क लढवीत आहेत २०. अगर आम्हीं यांना याच्यापूर्वीं एखादें पुस्तक देऊन ठेविलें आहे कीं, हे त्याचा आधार धरतात? २१. (नाहीं.) किंबहुना

---

श्यक होतें कीं, परमेश्वराची पवित्रता वर्णिली जावी व त्याचा गौरव केला जावा. परंतु जे लोक परमेश्वराचेठायीं पुत्र आहे असें ठरवितात ते त्याच्या स्तवनाचे ठिकाणीं निंदा व दुर्भाषणें ह्मणजे उपकाराचे जागीं अनुपकार करतात.

(२) परमेश्वरानें स्त्रीजातीस मनाची अशी दुर्बल निर्माण केली आहे कीं, सार्वजनिक सभांमध्यें तिच्यानें भाषणसुद्धां करवत नाहीं. ही त्यांच्यांत नैसर्गिक उणीव आहे. एवंच, आतांहि आम्हीं पाहत असतों कीं, मोठमोठे इंग्रज लोक आपल्या पत्न्यांस दरबारांत घेऊन जातात; लोक खुशामतीनें त्यांचे आभार मानतात व त्यांच्या सेवांस देशसेवा गणितात. पण त्या स्त्रियांच्यानें कांहीं बोलवत नाहीं. त्यांचे पति त्यांजकडून उत्तर देतात व उलट आभारहि मानितात. आजकाल अभ्यासानें कांहीं स्त्रिया सभाधीट बनतात पण स्वभावतः त्या लाजाळूच असतात.

(हे तर असें) ह्मणतात कीं आम्हीं आपल्या वाडवडिलांस एका पंथावर पावलों आणि त्यांच्याच पदोपदीं आम्हींहि सरळ मार्गावर चालले जात आहोंत. २२. आणि (हे पैगंबरा !) अशाच तऱ्हेनें आम्हीं तुझ्यापूर्वीं जेव्हां कधीं कोणा गांवांत कोणी भय सुचविणारा (पैगंबर) पाठविला, तेव्हां तेथिल सुखवस्तु लोकांनीं हेंच म्हटलें कीं, आम्हीं आपल्या वाडवडिलांस एका पंथावर पावलों आहों, आणि त्यांच्याच पदोपदीं आम्हींहि (त्यांचें) अनुकरण करीत राहिलों आहों. २३. (यावर त्यांच्या पैगंबरानें त्यांस) म्हटलें कीं, ज्या (मार्गा)वर तुम्हीं आपल्या वाडवडिलांस पावलां त्याहूनहि फारच सरळ मार्ग (म्हणजे सद्धर्म) घेऊन जरी मी तुम्हांपाशीं आलों आहें, तरीहि (तुम्हीं त्याच धोरणावर चालले जाल काय)? ते बोलले, (कांहीं असो,) जो (धर्म) देऊन तुम्हीं पाठविले गेलां आहां, आम्हीं तर त्यास मानणारच नाहीं. २४. सरशेवटीं आम्हीं त्यांजपासून (त्यांच्या शिरजोरीचा) बदला घेतला. तर (हे पैगंबरा !) पाहा कीं (पैगंबरांना) पाखंडी म्हणणाऱ्यांचा कसा परिणाम झाला ? २५. आणि एक वेळ (तोहि होता कीं) 'इब्राहिमा'नें आपला पिता व आपले लोक यांस सांगितलें कीं, ज्या (मूर्तीं)ची तुम्हीं पूजा करितां, मला तर त्यांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. २६. परंतु ज्यानें मला निर्मिलें (त्या परमेश्वराशीं मला कर्तव्य आहे.) तर तोच मला सरळ मार्गहि दाखवील. २७. आणि त्यानें या (ईश्वरैक्याच्या मता)स (मृत्युलेखें वगैरेंनीं) असें (मुस्तकीम) केलें कीं, ती गोष्ट (वर्षांगणती) त्याच्या वंशांत बाकी राहिली; (यानें त्याचा) हेतु हा होता कीं, लोकांनीं (एकाच परमेश्वराकडे) वळून राहावें. २८. तथापि (अरब लोक हे त्याच्याच वंशांत असून) मी ह्यांना व यांच्या वाडवडिलांना (जगांत) सुखोपभोग घेऊं दिला; (तरी हे, 'इब्राहिमा'चे धर्माकडून बेफाम होऊन गेले व परमेश्वराचे जोडीदार मानूं

(१) कंसांत आह्मीं जें कांहीं वाढविलें आहे तें आम्हीं पहिल्या भागांतल्या शेवटीं आलेल्या या वाक्यावरून घेतलें आहे "आणि इब्राहीम व याकूब यांनीं आपल्या मुलांस मरणसमयीं अशी ताकीद केली कीं, हे माझ्या मुलांनों ! परमेश्वरानें तुह्मांसाठीं हा धर्म पसंत केला आहे तर तुह्मीं (मराल तेव्हां) मुसलमान-आज्ञाधारक-होऊनच मरा."

लागले); येथपर्यंत कीं आतां त्यांचेपाशीं सद्धर्म येऊन ठेपला आणि (तसाच हा) पैगंबर('मोहंमद')हि कीं जो (तेंच ईश्वरैक्य) स्पष्टपणें (त्यांस) समजावितो. २९. आणि जेव्हां यांच्यापाशीं सद्धर्म आला; तेव्हां ते ह्मणूं लागले कीं ही तर जादु होय व आम्हीं ह्यास मानीत नाहीं. ३०. आणि ते (हेंहि) म्हणतात कीं (या) दोन वस्त्या (म्हणजे 'मक्का' व 'ताईफ')[१] यांतून कोणा मोठ्या पुरुषाला हें कुराण कां म्हणून प्रकटिलें गेलें नाहीं? ३१. (हे पैगंबरा!) कां हे लोक तुझ्या पालनकर्त्याची दया (म्हणजे पैगंबरी) हिची वांटणी करीत आहेत? पण (या) इहलौकिक आयुष्यांत तर यांचें निर्वाहसाधन यांच्यामध्यें आम्हीं वाटून देतों आणि आम्हीं (जागिक) दर्ज्याचे मानानें यांच्यांत एकाला एकावर श्रेष्ठता दिली आहे; कीं यांच्यांतून एकानें एकाला (आपला) आज्ञांकित बनवून ठेवावा. आणि (हे पैगंबरा!) जी (मालमत्ता हे लोक) गोळा करीत फिरतात तिच्यापेक्षां तर तुझ्या पालनकर्त्याची दया (म्हणजे पैगंबरी) फारच उत्तम होय. (म्हणून,ती बहुतकरून आमच्याच हातांत राहिली पाहिजे).३२.आणि जर ही गोष्ट नसती कीं सर्व लोक एकाच पंथाचे होऊन जातील, तर (इहलौकिक साजसरंजाम आमच्या येथें इतका तुच्छ[२] आहे कीं) जे लोक

---

(१) हजरत पैगंबरसाहेबांच्या वेळीं मक्का व ताईफ हींच अरबस्थानांत मोठीं शहरें होतीं; आणि त्या शहरांचे रहिवासी फारच संभावित व उत्कृष्ट मानिले जात होते. आतांहि खेड्यापाड्यांचे लोक शहरच्या लोकांस ह्याच-प्रमाणें समजतात.

(२) या व पुढील वाक्यांत इहलौकिक साजसरंजाम ही एक भिकार व तुच्छ वस्तु आहे, हें अशा रीतीनें जाहीर केलें गेलें आहे कीं, परमेश्वर इच्छिता तर नास्तिकांस ह्मणजे आपल्या शत्रूंस चांदी व सोन्यांत मढवून टाकता आणि चांदीसोन्याला त्यांचें आंथरूण पांघरूण करून टाकता. परंतु इहलौकिक ऐश्वर्यांस लोकांनीं परमेश्वराच्या प्रसन्नतेचें कारण समजूं लागूं नये, फक्त एवढ्याच करितां त्यानें असें केलें नाहीं. नाहीं तर, परमेश्वराच्या नजरेंत या जगिक साधनांचें कांहींच महत्व नाहीं. याचें कांहीं महत्व असल्यास तें जे परमेश्वरास मानीत नाहींत व परलोकींची काळजी बाळगीत नाहींत अशा मूढ लोकांच्याच नजरेंत असेल.

परमदयाळू (परमेश्वरा)स नाकारितात, त्यांच्याकरितां त्यांच्या घरांचीं छतें आम्हीं चांदीचीं करवून देतों आणि (छतांखेरीज चांदीचे) जिनेहि कीं ते त्यांवर चढते (उतरते). ३३. आणि (चांदीचेच) त्यांच्या घरांचे दरवाजे (बनवून देतों); आणि (चांदीचेच) तक्त कीं ते त्यांवर(मौजेनें)तक्ये लावून लावून बसते. ३४. आणि (चांदीचेच नव्हे तर) सोन्याचेहि; आणि(मग देखिल) हा सर्व(साजसरंजाम या) इहलौकिक आयुष्याचा केवळ (क्षणिक) सुखोपभोग होय. आणि (हे पैगंबरा !) परलोक (ह्मणजे त्याचें उत्तम फल) तुझ्या पालनकर्त्यासमीप (त्याला) भिऊन चालणारांसाठींच होय. ३५. आणि जो कोणी परम दयाळू(परमेश्वरा)च्या स्मरणाकडून तोंड चुकवीत असतो त्याच्यावर आम्हीं एक सैतान तैनात करून ठेवितों; व तो त्याचा संगती (होऊन) राहतो. ३६. आणि सैतान हे पाप्यांस (परमेश्वराच्या) मार्गापासून अडथळा करीत राहतात तरीदेखिल पापी (आपल्या ठिकाणीं) अशी कल्पना करितात कीं ते सरळ मार्गावरच होत; ३७. येथपर्यंत कीं जेव्हां पापी (पुनरुत्थानाचे दिवशीं) आमच्या हुजुरांत हजर होईल, तेव्हां तो (आपला संगती सैतान याकडे पाहून) म्हणील कीं अरेरे ! तुझ्या व माझ्या दरम्यान पूर्वपश्चिमचा पल्ला असता तर बरें होतें ! तर (सैतान हाहि माणसाचा कितीतरी वाईट संगती होय ! ३८. आणि (पाप्यांनों !) ज्या अर्थी तुम्हीं (जगांत) आज्ञाभंग केला आहे त्याअर्थी आज ही गोष्टहि तुम्हांस कांहीं[1] फळणार नाहीं, कीं तुम्हीं (व सैतान) एकसंगतीं शिक्षेंत आहां. ३९. तर (हे पैगंबरा !) कां तूं बहिऱ्यांस ऐकवूं शकतोस ? अगर आंधळ्यांस व जे धडधडीत चुकींत आहेत त्यांस सन्मार्गावर आणूं शकतोस? ४०. मग जरी आम्हीं तुला (जगांतून) उचलूनहि घेऊं तरीहि आम्हीं या (नास्तिकां)पासून तर अवश्य बदला घेऊंच. ४१. अथवा (तुला जिवंत ठेवूं व) त्यांच्याशीं आम्हीं जो (शिक्षेचा) वायदा केला आहे (ती त्यांना सादर करून) तुला आम्हीं दाखवूं. तर (यांतहि कांहीं नवल

(१) माणसाचा हा स्वभाविक गुणधर्म आहे कीं तो कोणालाहि एखाद्या संकटांत वांटेकरी पाहून कांहीं अंशीं समाधान पावतो. पण नरकवासी यांस हें समाधान प्राप्त होणार नाहीं.कारण तेथें प्रत्येकाला आपापली चिंता पडलेली असेल.

नाहीं; कारण,) आम्हांला यांच्यावर (हरतऱ्हेची) सत्ता प्राप्त आहे. ४२. तर (हे पैगंबरा! कुराण) जें तुला प्रकट केलें गेलें आहे तें तूं बळकट धरून राहा. यांत संशय नाहीं कीं, तूं सरळ मार्गावर आहेस.४३. आणि यांतहि संशय नाहीं कीं हें (कुराण) अर्थात तुझ्यासाठीं व तुझ्या लोकांसाठीं एक बोध होय; आणि पुढें जातां, तुम्हां(सर्वां)पासून (याविषयीं) विचारपूस होणें आहे. ४४. आणि (हे पैगंबरा !) तुझ्यापूर्वीं आम्हीं जे आपले पैगंबर पाठविले त्यांस विचारून[२] पाहा; कां आम्हीं परमदयाळू (परमेश्वरा) शिवाय (दुसरे दुसरे) उपास्य ठरवून दिले होते कीं त्यांची उपासना केली जावी ? ४५. आणि आम्हींच 'मूसा'लाहि आपले चमत्कार देऊन 'फिरऔन व त्याच्या दरबारमंडळाकडे पाठविलें होतें; तर ('मूसानें' त्या लोकांस) सांगितलें कीं मी सकल जगांच्या पालनकर्त्याचा पाठविलेला आहें. ४६. मग जेव्हां ('मूसा') आमचे चमत्कार घेऊन त्यांच्यापाशीं आला, तेव्हां ते चमत्कारांची हंशी उडवूं लागले. ४७. आणि आम्हीं जो जो चमत्कार त्यांस दाखवीत होतों, तो त्या प्रकारच्या (इतर चमत्कारा)पेक्षां (कीं जे त्यांना दाखविले जाऊन चुकले होते) अतिशय मोठाच असे; आणि आम्हीं त्यांना शिक्षेंतहि धरिलें कीं (आतांहि) कदाचित हे लोक माघार घेतील. ४८. आणि ह्या लोकांनीं (शिक्षा सादर झाल्यावर 'मूसा'ला) म्हटलें कीं हे जादुगिरा ! तुझ्या पालनकर्त्यानें तुला (प्रार्थना मान्य करण्याचें) जें वचन देऊन ठेविलें आहे त्याच्या आधारावर तूं आम्हांकरितां त्याची प्रार्थना कर; (जर तुझ्या प्रार्थनेनें शिक्षा टळली तर) आम्हीं अवश्य सरळ मार्गावर येऊन जाऊं. ४९. मग जेव्हां आम्हीं त्या (लोकां) वरून शिक्षा दूर करून टाकिली; तेव्हां ते आपला करार मोडूं लागले.५०. आणि 'फिरऔना'नें आपल्या लोकांत या गोष्टीची दवंडी पिटविली कीं लोकांनों ! कां 'मिसर'देशाचें राज्य माझें नव्हें ? आणि (तुम्हीं पाहतां आहां कीं) ह्या नद्या माझ्या (राजवाड्याच्या)खालून वाहत आहेत. तर कां तुम्हांस (ह्या गोष्टी) सुचत नाहींत ? ५१. तर मी या ('मूसा')

(२) म्हणजे त्यांच्या पुस्तकांत ज्या गोष्टी त्यांच्या मतांच्या लिहिलेल्या आहेत त्या पाहा; त्या पाहणें म्हणजे जणुं कीं पैगंबरांना विचारणेंच होय.

पेक्षां कीं जो एक तुच्छ (मनुष्य) आहे व जो स्पष्टपणें बोलूंहि[1] शकत नाहीं, फारच श्रेष्ठ आहें. ५२. आणि (जर 'मूसा' माझ्याहून श्रेष्ठ असतां) तर त्याला सोन्याकडे[2] (परमेश्वराचे येथून) कां घातलें गेलें नाहीं ? अगर दूत गोळा होऊन त्याच्यासंगतीं संगतीं मिरवत आले असते ! ५३. तात्पर्य,(अशा गोष्टी करून करून) 'फिरऔना'नें आपल्या लोकांस फुसलाविलें व ते त्याच्या कह्यांत येऊन गेले; यांत संशय नाहीं कीं ते लोक होतेहि आज्ञाभंजकच. ५४. मग जेव्हां या लोकांनीं (आपल्या आज्ञाभंगानें) आम्हांस क्षुब्ध केलें, तेव्हां आम्हीं यांजकडून बदला घेतला आणि या सर्वांस बुडवून टाकिलें. ५५ आणि यांना आम्हीं झाले गेलेले करून टाकिलें आणि पुढें येणाऱ्या पिढ्यां-साठीं (त्यांची) ह्मण (बनविली). ५६. आणि (हे पैगंबरा !) जेव्हां 'मर्यम'चा पुत्र ( 'येशू')याचा दृष्टांत सांगितला गेला, तेव्हां तुझे ज्ञातीय लोक केवळ त्या(दृष्टाताच्या ऐकण्या)नें खिदखिदूं लागले. ५७. आणि ते म्हणूं लागले कीं (या बाबतींत) आमचे उपास्य (देव) बरे कीं 'इसा'[3] ? या लोकांनीं 'ईसा'चा दृष्टांत जो तुझ्यापुढें

(१) हजरत मूसाच्या जिभेंत तोतरेंपण होतें म्हणून त्यांच्यानें स्पष्ट बोल-वत नसे. यामुळेंच त्यांनीं हजरत हारून यांस आपल्या संगतीं घेतलें होतें. याचा उल्लेख दुसरें ठिकाणीं आला आहे. याच गोष्टीचें टोमणें फिरऔनानें यांस दिलें.

(२) फिरऔनाच्या आक्षेपाचा खुलासा हा होता कीं मूसाची सांसारिक स्थिति दुरुस्त कां नाहीं ? सोन्याचें कडे घालणें हें मातब्बर होण्याचें प्रमाण होय. आतांहि राजे व श्रीमंत लोक सुवर्ण व जडजवाहीर यांचा उपयोग करतात.

(३) कुराणांत एकेजागीं मूर्तीपूजकांस उद्देशून म्हटलें आहे कीं "तुम्हीं व परमेश्वराशिवाय ज्या वस्तूंची तुम्हीं पूजा करितां त्या सर्व नरकाग्नीचें इंधन होतील." यांवर एक मूर्तीपूजक बोलूं लागला कीं यानें तर देवदूत व पैगंबर ज्यांची लोक पूजा करतात त्यांचें आणि त्यांतल्या त्यांत ईसा–येशू ख्रिस्त ज्यांचे अनुयायी त्यांना परमेश्वराचा पुत्र वा प्रत्यक्ष परमेश्वर मानतात त्यांचें नरका-ग्नींत जाणें ओघानेंच आवश्यक ठरतें.तर ज्या अर्थीं मूर्ती,देवदूत व पैगंबर-ऋषि मुनि हे या अपराधाच्या शासनार्थ नरवासी झाले कीं लोकांनीं त्यांची पूजाअर्चा

**(मध्येंच) आणून टाकला तो केवळ वितंडवादापरीच (आणून टाकला). गोष्ट ही होय कीं हे लोक आहेतच भांडखोर. ५८. तर 'ईसा' हाहि केवळ (आमचा) एक सेवक होता कीं आम्हीं (त्याला पैगंबरी पद देऊन) त्याच्यावर उपकार केला होता आणि 'बनी-इस्रएलां'साठीं त्याला (आपल्या परम सामर्थ्याचा) एक नमुना बनविला होता. ५९. आणि आम्हीं इच्छितों तर तुम्हां(लोकां)तून देवदूत (पैदा) करितों कीं ते पृथ्वींत तुमच्याजागीं येऊन वसते. ६० आणि अर्थात् 'ईसा'हाहि (पुनरुत्थानाच्या) घटकेचें एक द्योतक होय; तर (हे पैगंबरा ! या लोकांस**

---

केली; त्या अर्थीं खरोखरींच मूर्ती बऱ्या राहिल्या. कारण दगडाला अग्नींत झोंकलें तर त्याला काय दुःख होणार ? परमेश्वरानें यास उत्तर दिलें कीं हा तुमचा वितंडवाद आहे; आणि वास्तविक पाहतां त्यांचें हें म्हणणें वितंडवादांत दाखल होतें. कां कीं देवदूत व पैगंबर या वाक्याखालीं येऊं शकत नाहींत. कारण अरबींतला 'मा' म्हणजे जी वस्तु हा शब्द प्राणीवाचक नामासंबंधानें बोलत नाहींत; म्हणजे या वाक्याचा कटाक्ष केवळ निर्जिव मूर्तीकडेच होता. राहिले **ईसा-येशूख्रिस्त** हे मूर्तीसारखे नव्हते आणि **पौल**मतवादी ख्रिस्ती लोक मानतात त्याप्रमाणें ते परमेश्वर किंवा परमेश्वराचे पुत्रहि नव्हते. किंबहुना तेहि परमेश्वराचे एक सेवक होते व इतर पैगंबरांप्रमाणें त्यांनाहि पैगंबरी पद मिळालें होतें. आतां सृष्टिजननशास्त्राचे पद्धतीनें दुतांचें व हजरत **ईसा-येशूं**चें न जन्मणें हें ईश्वरी सामर्थ्यापुढें कांहींच नाहीं. परमेश्वर इच्छील तर मनुष्यांतून देवदूत निर्माण होतील. **मत्तय** शुभवर्तमानकारानें अध्याय ३:९ मध्यें 'देव अब्राहामासाठीं या दगडांतून लेकरें उत्पन्न करण्यास समर्थ आहे.' असें लिहिलें आहे. तरीहि हजरत येशूसंबंधानें ईश्वरी सामर्थ्य मानण्यास **पौल** मतानुयायी ख्रिस्त्यांचें किती तरी हें बुद्धिमांद्य ?

(१) म्हणजे जो परमेश्वर हजरत **ईसा-येशूला** बापावांचून निर्माण करूं शकतो, तो पुनरुत्थानांत मेलेल्यांस पुन्हा जिवंत करून उठवील. अगर हा भावार्थ असावा कीं **ईसा-येशूचें** पुनरपि जगांत येणें हें पुनरुत्थान घडून येण्याचें द्योतक होय. या गोष्टीकडे हजरत पैगंबरसाहेबांच्या **अहादीस** म्हणजे त्यांच्या वचनसंग्रहांत इषारा आलेला आहे कीं हजरत **ईसा** हे **यरूशलेम**मध्यें इस्लामी शास्त्राप्रमाणें इस्लाम-धर्माध्यक्ष होऊन नमाज पढतील. क्रूसें मोडून टाकतील

सांग कीं) तुम्हीं लोक पुनरुत्थाना(चे येण्या)त शंका करूं नका; आणि माझ्या कत्याप्रमाणें चाला. हाच सरळ मार्ग होय. ६१. आणि असें न व्हावें कीं सैतानानें तुम्हांस (या मार्गापासून) अडथळा करावा; कारण, तो तुमचा बोलून चालून शत्रु होय. ६२. आणि जेव्हां 'ईसा' चमत्कार घेऊन आला, तेव्हां त्यानें (लोकांस) सांगितलें कीं मी तुम्हांपाशीं शहाणपणाच्या गोष्टी घेऊन आलों आहें; आणि (माझ्या येण्याचा एक) उद्देश हाहि आहे कीं कित्येक गोष्टी ज्यांत तुम्हीं मतभेद करीत राहिलां आहां, त्या तुम्हांस मी स्पष्ट करून समजावून द्याव्यात. तर (लोकांनों !) परमेश्वराला भ्या व माझा कह्या माना. ६३. निःसंशय परमेश्वरच माझाहि पालनकर्ता व तुमचाहि पालनकर्ता होय.म्हणून त्याचीच उपासना करा. हाच (धर्माचा) सरळ मार्ग होय. ६४ मग त्यांच्यांतूनच (पुष्कळ) लोक (त्याशीं) विरोध करूं लागले. तर जे लोक शिरजोरी करतात त्यांस (पुनरुत्थानाच्या) दिवसाच्या दुःखदायक शिक्षेच्या मानानें खेद होय. ६५. कां हे लोक केवळ (पुनरुत्थानाच्या) घटकेचीच वाट पाहत आहेत; कीं ती एकाएकीं यांच्या समोर येऊन थडकेल व यांना कळणार सुद्धां नाहीं ? ६६. जे लोक (आपसांत) स्नेह ठेवितात ते त्या दिवशीं एकमेकांचे शत्रु होऊन जातील; परंतु (परमेश्वराला) भिऊन वागणारे मात्र (तसे नव्हेत;) ६७. (त्यांना आह्मीं सांगूं कीं) हे माझ्या सेवकांनों ! आज तुम्हांला (कोणा तऱ्हेचें) भय नाहीं व तुम्हीं (कोणा प्रकारें) दुःखीहि होणार नाहींत. ६८. (हे ते लोक होत कीं) ज्यांनीं (जगांत) आमच्या निशाण्यांचा विश्वास धरिला व मुसलमान (म्हणजे आज्ञाधारक) होऊन राहिले. ६९. (आह्मीं त्यांस हुकूम फर्मावूं कीं) तुम्हीं व तुमच्या पत्न्या आनंदानें (व सन्मानपूर्वक)

---

व देवळें उजाड करतील; जे लोक इस्लाम स्वीकारतील त्यांना खेरीजकरून सर्व खिस्ती म्हणविणारांचा संहार करतील. कां कीं त्यांनीं त्यांच्या खऱ्या धर्माचा विपर्यास केला होता.

(१) ह्मणजे जगाचे स्नेही जगाबरोबर होते. ते तर आतां नाहींसे होऊन गेले. परंतु जे लोक परमेश्वराला भिऊन वागतात ते आपल्यासारख्या लोकांशीं परमेश्वराप्रित्यर्थ स्नेह ठेवितात. हे स्नेह परलोकींहि कायम राहतील.

स्वर्गांत दाखल व्हा. ७० त्यांच्यापुढें सोन्याचीं तबकें व पेले फिरविले जातील; आणि त्यांत (त्यांच्या) जिवाला ज्या वस्तूंची इच्छा होईल व (ज्यांत त्यांच्या) डोळ्यांस सुख वाटेल त्या (वस्तु त्यांना प्राप्त) होतील.आणि (त्यांना खुषखबर ऐकविली जाईल कीं) तुम्हीं सदासर्वदा येथेंच रहाल.७१ आणि हें स्वर्गाचें वतन[1] जें तुम्हांस मिळालें आहे तें तुम्हीं (जगांत) जीं (सुकृत्यें) करीत राहिलां आहां त्यांच्या मोबदला (मिळालें आहे.) ७२. येथें तुम्हांसाठीं पुष्कळ फळफळादि (उपलब्ध आहे) कीं तींतून तुम्हीं खात आहां. ७३. अर्थात् पापी निरंतर नरकाग्नीच्या शिक्षेंत राहतील; ७४. तिचा त्यांच्यावरून (केव्हांहि) खाडा केला जाणार नाहीं व ते त्या शिक्षेंतच निराश (व दिलगीर) राहतील. ७५. आणि आम्हीं त्यांजवर जुलूम[2] केला नाहीं, किंबहुना (आमच्या सेवेंत उन्मत्तपणा करून उलट) हेच जुलूम करीत राहिले. ७६. आणि (नरकवासी नरकाच्या दरोग्यास) हाक मारतील कीं हे मालिका[3] (तूंच कांहीं अशी युक्ति कर कीं कोठें)तुझा पालनकर्ता आमचा(नाश करून) अंत आणील.तो उत्तर देईल कीं तुम्हांला ह्याच स्थितींत रहावें लागणार. ७७. (हे 'मक्के' च्या नास्तिकांनो !) आम्हीं तुम्हांपाशीं सद्धर्म पाठविला आहे; परंतु तुमच्यांत बहुतेक (अशा प्रकारचे लोक होत कीं ते) सत्य गोष्टी पासून

(१) स्वर्गाला वतन यासाठीं ह्मटलें कीं, आम्हां सर्वांचे पिता हजरत आदम-'अलैहिस्लाम-त्यांस शांति असो-हे स्वर्गांत राहिले व तेंच त्यांचें अस्सल घर होतें. आम्हीं सर्व आदमाच्या मुलांच्या नात्यानें स्वर्गाचे वारीसदार आहोंत; पण त्यास एवढी मात्र अट आहे कीं, आदमाप्रमाणें आह्मीं सद्धर्माचा विश्वास ठेविला पाहिजे व चांगलीं कामें केलीं पाहिजेत.

(२) याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक हा कीं, परमेश्वरावर जुलूम करीत राहिले म्हणजे परमेश्वराचा जोडीदार मानणें हेंच परमेश्वरावर जुलूम करणें होय. दुसरा अर्थ हा कीं, आपल्या दुष्कर्मांनीं आपणच आपल्यावर जुलूम करीत व आपल्या हातांनींच आपल्या पायावर कुऱ्हाडी मारीत राहिले.

(३) मालिक हें एका दुताचें नांव असून तो 'जहन्नम' ह्मणजे नरकाग्निचा रखवाल किंवा दरोगा आहे.

चिडतात. ७८ या लोकांनीं कां (आणखी) एखादी गोष्ट निश्चित केली आहे ? तर (याद ठेवा कीं) आम्हींहि निश्चित करून ठेविली आहे. (७९) अगर (हे लोक अशी) कल्पना करतात कीं आम्हीं त्यांच्या गुप्त गोष्टी व त्यांची कुजबुज ऐकीत नाहीं? होय (अवश्य ऐकतों); आणि (ऐकण्याखेरीज) आमचे दूत यांच्यापाशीं (तैनातसि आहेत कीं ते यांच्या साऱ्या गोष्टी) नोंदीत राहतात. ८०. (हे पैगंबरा! लोकांस) सांग कीं जर परम दयाळू (परमेश्वरा)ला कोणी पुत्र असेल तर सर्वांत प्रथम (त्याची)उपासना करण्यास मी (हजर) आहें. ८१. ज्या ज्या गोष्टी (हे लोक परमेश्वरासंबंधानें) उच्चारितात त्यांपासून आकाशांचा व पृथ्वीचा स्वामी व महा सिंहासनाचा मालक पवित्र होय. ८२. तर (हे पैगंबरा!) या लोकांस बकवा करूं दे व खेळूं दे; येथपर्यंत कीं ज्या दिवसाचा यांच्याशीं वायदा केला जातो तो त्यांचा (पुनरुत्थानाचा) दिवस त्यांच्या नजरानजर येईल; (त्यावेळीं यांना सारी हकीकत जाहीर होईल). ८३. आणि तोच (खरा उपास्य) होय कीं जो आकाशांतहि भक्तीस पात्र आहे व पृथ्वींतहि भक्तीस योग्य आहे. आणि तो बुद्धिमान् (व सर्व वस्तूंचा) ज्ञाता होय. ८४. आणि धन्य तो (परमेश्वर कीं) ज्याचें आकाशांचें व पृथ्वीचें व जें काय या दोहोंच्या दर्म्यान आहे त्या (सर्वां)चें राज्य होय; आणि (पुनरुत्थानाच्या) घटकेची माहितीहि त्यालाच होय; आणि तुम्हीं (सर्व मेल्यावर) त्याच्या कडेसच परतून आणिले जाल. ८५. आणि परमेश्वराशिवाय ज्या (उपास्यां)स हे लोक बोलावितात, ते तर शिफारसीची देखिल सत्ता बाळगित नाहींत; पण जे लोक समजून उमजून सत्य (म्हणजे ईश्वरैक्या)ची साक्ष देतात; (अलबत त्यांची शिफारस दूत वगैरे करतील) ८६. आणि (हे पैगंबरा!) जर कदाचित् तूं या (मक्के'च्या नास्तिकां)स विचारशील कीं यांना (म्हणजे

(२) भावार्थ हा कीं त्यांच्या मनांत जर पैगंबराला कांहीं उपसर्ग पोहोंचवावयाचा त्यांचा निश्चय असेल; उदाहरणार्थः—हजरत पैगंबरावर हात टाकतील अगर त्यांना तडीपार करूं पाहतील; तर आम्हीं त्यांचे पारिपत्यहि निश्चित करून ठेविलें आहे. सारांश असेंच झालें कीं पैगंबर साहेब निर्वाणीस स्वदेश त्याग करून गेले व मग त्यांनाच परमेश्वरानें मक्केकरांवर विजय दिला.

तुम्हांस) कोणी निर्माण केलें आहे? तर ते अलबत हेंच उत्तर देतील कीं परमेश्वरानें. मग ते (इतकें समजल्यावर) कोठें बहकले जात आहेत? ८७. (आम्हांस) पैगंबराच्या, 'हे माझ्या पालनकर्त्या! [१] (हे माझ्या पालनकर्त्या!)' असें म्हणण्याची शपथ आहे, कीं हे निःसंशय असे (हट्टी) लोक होत कीं ते (केव्हांहि) विश्वास धरणार नाहींत. ८८. म्हणून (हे पैगंबरा! यावेळीं तर) तूं यांची उपेक्षा[२] कर व सांग (कीं माझा तर तुम्हांस) सलाम (आहे). मग पुढें जातां (पुनरुत्थानांत) त्यांना माहित होऊन जाईलच. ८९.

---

(१) म्हणजे पैगंबर साहेब 'हे माझ्या पालनकर्त्या!' हे माझ्या पालनकर्त्या! असें ह्मणून परमेश्वरापुढें धाय धाय रडत होते कीं मी आपल्याकडून बहुत कांहीं करितों, पण हे लोक कांहीं मानीत नाहींत परमेश्वराला पैगंबरांचे हें गाऱ्हाणें चांगलें वाटतें. म्हणून परमेश्वर त्याच गाऱ्हाण्याची शपथ वाहून ह्मणतो आहे कीं खरोखरच हे लोक विश्वास धरणार नाहींत.

(२) भावार्थ हा कीं शिष्टाचारानें यांजपासून अलग होऊन जा व त्यांच्या मागें लागूं नकोस.



# अध्याय ४४ वा.

## सूरतु-दुखान.

सूरतु-दुखान्, हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ५९ आयात-महावाक्यें आहेत. याचें नांव 'दुखान' ह्मणजे धूर याचें प्रकरण याच अध्यायांत पुढें आलेल्या 'दुखान' या शब्दावरून पडलें आहे. त्यासंबंधीं जास्त माहिती त्या स्थळीं येईल.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)

हे. म. (हा-मीम). १ (ह्या) सुव्यक्त व सुबोध पुस्तका (म्हणजे कुराणा)ची शपथ आहे, कीं २. आम्हीं एका शुभ रात्रीं हें (प्रथमतः) प्रकटलें; (कारण), आम्हांला (लोकांना आपल्या शिक्षेचें) भय दाखवावयाचें होतें. ३. (जगाच्या) साऱ्या व्यवस्था, ज्यांस युक्ति (व प्रयोजन हीं) आधारभूत होत त्या, त्याच रात्रीं निर्णय पावतात; (४) (त्यांतल्या त्यांत कुराणहि होतें कीं जें) आमच्या खास आज्ञेनें (प्रकट होऊं लागलें); कारण, आम्हांस

(१) शुभ रात्र म्हणजे शाबान महिन्याची पंधरावी रात्र कीं ज्या रात्रीं देवदूत पृथ्वीवर उतरतात, प्रार्थना स्वीकारल्या जातात व पृथ्वीवर देणग्यांचा वर्षाव होतो, हें तिचें शुभ. आणि सर्वसंमत गोष्ट ही दिसून येते कीं रमजान महिन्याच्या शेवटील विषम रात्रींपैकीं एक रात्र होय; फारकरून सत्ताविसवी रात्र. या रात्रीस अरबींत 'लय्लतुल् कद्र' ह्मणजे महत्वाची रात्र म्हणतात. भाष्यकारांनीं या जागीं दोन अर्थ लिहिले आहेत. एक हा कीं त्या रात्रीं पहिली वह्य ह्मणजे प्रकटीकरण झालें व मग कुराण वेळोवेळीं प्रकट होत राहिलें; अथवा दुसरा अर्थ हा कीं, त्या रात्रीं सारें कुराण खालील आकाशांत दुतांस प्रकट झालें. मग जितकें जितकें परमेश्वराला प्रकट करावयाचें होतें तितकें तितकें अंशतः अंशतः येत राहिलें.

(पैगंबराचें) पाठविणें मंजूर होतें. ५. (आणि हे पैगंबरा! ही) तुझ्या पालनकर्त्याची कृपा (होती कीं जी त्यानें आपल्या सेवकांवर केली; कारण,) तो (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. ६. आकाशांचा व पृथ्वीचा आणि जें कांहीं या दोहोंच्या दरम्यान आहे त्या (सर्वां)चा (तोच) मालक (होय); जर तुम्हां लोकांत (सत्य गोष्ट) निश्चयानें मानण्याची पात्रता आहे (तर ह्यालाहि तुम्हीं मान्य कराल). ७. त्याच्यावांचून (अन्य) कोणी उपास्य नाहीं; (तोच) जिववितो व (तोच) मारतो; (तोच) तुमचाहि पालनकर्ता होय; आणि (तोच) तुमच्या पूर्वींच्या वाडवडिलांचाहि पालनकर्ता होय. ८. परंतु हे लोक तर संशयांत पडले असून (या गोष्टीस) खेळ समजत आहेत. ९. तर (हे पैगंबरा!) त्या दिवसाची वाट पाहा कीं, ज्या दिवशीं (सर्वांच्या देखतां) आकाशांतून एक धूर प्रगट होईल; १०. (आणि तो) सर्व लोकांवर पसरून जाईल. ही होय दुःखदायक शिक्षा; ११. (कीं, जिला पाहून नास्तिकहि प्रार्थना करूं

(१) भावार्थ हा कीं लोकांचीं धर्मविषयक मतें बिलकुल भ्रष्ट होऊन गेलीं होतीं. ईश्वरकृपेस उमाळा आला व त्यानें केवळ आपल्या कृपेनें शेवटच्या युगाचे ह्मणजे कलियुगाचे पैगंबरास पाठविलें व त्यांस कुराण प्रकट केलें कीं जेणेंकरून जगांत विश्वासाचें तेज पसरलें.

(२) अरब लोक सर्वांस व्यापून टाकणाऱ्या आपत्तीस 'दुखान' ह्मणजे धूर ह्मणतात. ती पैगंबरांचा उपहास व थट्टा करणाऱ्यांवर येईल. 'ऐनुल्–मआनी' मध्यें ह्मटलें आहे कीं मक्केच्या विजयाच्या दिवशीं एक धुराळा उठला होता कीं त्यानें सर्व वातावरण व्यापिलें होतें तो होय. पैगंबरसाहेबांच्या वेळीं मक्केचे नास्तिक आपल्या नास्तिकपणामुळें सात वर्षे दुष्काळपीडित राहिले. अरबस्थानांत एरवींहि पीकपाणी फारच कमी होतें; तशांत एकावर एक अशा सात वर्षांचा दुष्काळ; लोक अगदीं विव्हल होऊन गेले. जेव्हां पाणी पडत नाहीं व कडक ऊन्ह पडतें तेव्हां असें वाटतें कीं आकाशांतून व पृथ्वींतून जणुं धूर उठत आहे; येथें धूर ह्मणजे तोच धूर होय. किंवा भुकेमुळें डोळ्यापुढें जो धूर दिसतो तो; कित्येक भाष्यकार ह्मणतात व 'हदीस' मध्येंहि आलें आहे कीं पुनरुत्थानाच्या जवळ जवळ 'अदन' येथें एक आग प्रगट होईल व तिचा धूर जगांत पसरून जाईल.

लागतील कीं) हे आमच्या पालनकर्त्या! अम्हांवरून या आपत्तीस टळीव कीं, (आतां) आम्हीं (तुझा) विश्वास धरिला आहे. १२. (परंतु या धुरापासून) यांना काय उपदेश होणार? आणि (यांची परिस्थिति तर ही आहे कीं) यांच्यापाशीं पैगंबर आला (व) त्यानें स्पष्ट करून (यांना) समजाविलें. १३. यावरहि हे लोक त्याच्याकडून तोंड फिरवित राहिले व हेंच म्हणत राहिले कीं (हा तर कोणी)-शिकविलेला (पढविलेला) खुळा आहे. १४. (लोकांनों! प्रमाण पदरीं घालण्यासाठीं) आम्हीं (तुम्हांवरून त्या) शिक्षेला कांहीं दिवसासाठीं टळवून टाकूं; पण तुम्हीं पुन्हां[1] (तोच नास्तिकपणा) कराल. १५ (आणि) आम्हीं (या लोकांपासून संपूर्ण बदला तर त्या दिवशीं घेऊं कीं) ज्या दिवशीं मोठी (सक्त) पकड[2] पकडूं; (कारण जेथें आम्हीं दया करितों तेथें) आम्हीं बदलाहि घेत असतों. १६. आणि यांच्यापूर्वीं आम्हीं 'फिरऔना'चे लोकांसहि कसून चुकलों आहों; आणि त्यांच्यापाशीं मोठ्या प्रतिष्ठेचा प्रेषित ('मूसा') हा आला; १७. (व त्यानें येऊन 'फिरऔन'चे लोकांस सांगितलें) कीं (ह्या) परमेश्वराच्या सेवकां(म्हणजे 'बनीइस्त्राएलां')स माझ्या हवालीं करा. मी (परमेश्वराचा) पाठविलेला तुम्हांपाशीं आलों आहें (व ईश्वरी प्रकटीकरण पोहोंचाविण्यांत) प्रामाणिक[3] (आहें.) १८.

---

(१) ह्मणजे हे लोक लबाड आहेत; शिक्षा टळतांच पुन्हां नास्तिकपणा करूं लागतील. अथवा हा अर्थ असेल कीं आतां यांचें जागृत होणें यांना काय उपयोगी होऊं शकणार? शिक्षा येऊन सादर झाल्यावर पश्चात्ताप कसा स्वीकारला जाईल?

(२) जर धुराचा अर्थ दुष्काळ आहे तर पकडचा अर्थ बद्रच्या युद्धाची पकड आहे, कारण यांत नास्तिकांचा असा पूर्ण पराभव झाला कीं ते पुन्हां पणपले नाहींत; आणि जर धुराचा अर्थ अदनच्या अग्नीचा धूर कीं जो पुनरुत्थानाच्या जवळ जवळ होईल तो आहे, तर ही पकड पुनरुत्थानाची पकड होय. परमेश्वर त्यापासून वांचवो!

(३) प्रकटीकरण पोहोंचविण्यांत प्रामाणिक होण्याचा अर्थ हा कीं मी आपल्याकडून त्यांत कांहीं कंपेश करीत नाहीं. जो हुकूम झाला आहे तो जसाचा तसाच पोहोंचवितों. 'अमीन'–प्रामाणिक या शब्दाचा एक अर्थ हाहि होऊं

आणि हेंहि (सांगितलें) कीं परमेश्वराशीं शिरजोरी करूं नका; मी (आपल्या पैगंबर होण्याचें) एक स्पष्ट प्रमाण तुम्हांपुढें आणितों. १९. आणि तुम्हीं मला धोंडमार कराल म्हणून मी माझा पालनकर्ता व तुमचा पालनकर्ता (ह्मणजे एकच परमेश्वर) याचा आश्रय धरितों. (तोच मला वांचवील.) २०. आणि जर तुम्हांस माझ्या गोष्टीचा विश्वास नसेल तर (निदान) तुम्हीं माझ्यावाटे जाऊं नका. २१. (पण यावरहि ते 'मूसा'चा छळ करीत राहिले)तेव्हां 'मूसा'नें आपल्या पालनकर्त्याची प्रार्थना केली कीं हे(फारच) पापिष्ट लोक होत, (मला यांजपासून वांचीव). २२. (तेव्हां आम्हीं 'मूसा'ला आज्ञा केली कीं) तूं माझ्या सेवकां(म्हणजे 'बनी इस्राएलां')स घेऊन रातोरात निघून जा. (आणि समजून अस कीं 'फिरऔना'कडून) तुम्हां लोकांचा पाठलाग केला जाईल; २३. आणि तूं समुद्रास (आपल्या जागीं) स्थिर व विभक्त सोडून (पार होऊन) जा. कीं (त्यांत) 'फिरऔनी'यांचें अवघें सैन्य बुडवून टाकिलें जाईल. २४. हे लोक किती तरी बागा व (किती तरी) झरे सोडून मेले; २५ आणि (तशींच किती तरी) शेतें व (किती तरी उत्तम) उत्तम घरें; २६. आणि (किती तरी) सुखसाधनें कीं ज्यांत ते चैन उडवीत होते; (हीं, हे आपल्यामागें सोडून गेले). २७. (खरोखरींच झालेंहि) असेंच. आणि आम्हीं दुसऱ्या लोकांस या (सर्व साजसरंजामा)चे वारस बनविले २८. तथापि या लोकांसाठीं आकाश व पृथ्वी (कोणीहि) तरी शोक केला नाहीं आणि त्यांनाहि (पश्चात्ताप करण्याचा) अवकाशच मिळाला नाहीं. २९. आणि आम्हीं 'बनी-इस्राएलां'स मानहानीच्या शिक्षेंतून वांचविलें; ३०. (म्हणजे) 'फिरऔना'(च्या कोपाच्या तावडी)पासून. यांत संशय नाहीं कीं, तो (फारच) शिरजोर (असून) भक्तिमर्यादेचे बाहेर होऊन गेला होता. ३१. आणि 'बनी-इस्राएलां'स आम्हीं जाणून उमजून सकल जगांच्या लोकांवर श्रेष्ठत्व दिलें; ३२. आणि आम्हीं त्यांना ('मन्न' व 'सल्वा' वगैरेंचे इतके बहुत) चमत्कार दिले कीं ज्यांत (त्यांच्या विश्वासाची) धडधडीत परीक्षा होती. ३३. हे ('मक्के'चे नास्तिक तर

शकतो कीं मी तुह्मांलोकांमध्यें एक विश्वसनीय मनुष्य समजला जातो तर मी परमेश्वरावर खोटें कुभांड कसें रचणार ?

मुसलमानांस) म्हणतातच, ३४. कीं हें आमचें केवळ पहिलेंच मरण होय,(पुढें कांहींच नव्हे); आणि आम्हीं (दुसऱ्यांदा) उठविले जाणार नाहींत. ३५. मग जर तुम्हीं (मुसलमान आपल्या पुनरुत्थानाच्या विधानांत) खरे आहां, तर आमच्या बापजाद्यांस (जिवंत करून आम्हांपुढें) आणून हजर करा. ३६. बरें, हे (लोक बळांत) श्रेष्ठ आहेत कीं, ('यमन'चा बादशहा) 'तुब्ब' याचे लोक व यांच्या पूर्वीं जे (इतर लोक) होऊन गेले ते ? आम्हीं या (सर्वां)चा संहार करून टाकिला: ( यासाठीं कीं,) ते आज्ञाभंजक होते. ३७. आणि आम्हीं आकाशांस व पृथ्वीस व जें कांहीं या दोहोंच्या दरम्यान आहे त्यास, खेळ करण्या साठीं उत्पन्न केलें नाहीं. ३८. आम्हीं तर या दोहोंला (कोणा) सत्य संकल्पानेंच निर्मिलें आहे; परंतु बहुतेक लोकांस (याची) जाणीव नाहीं. ३९. निःसंशय निर्णयाचा दिवस (म्हणजे पुनरुत्थानाचा दिवस) या(सर्वांच्या पुन्हां जिवंत होण्या)चा वेळ मुक़र्रर होय. ४०. त्यादिवशीं कोणी मित्र कोणा मित्राच्या कांहींच कामा येणार नाहीं व लोकांला (कोणिकडून) मदतहि पोहोंचणार नाहीं. ४१. पण ज्याच्यावर परमेश्वर दया करील तर (त्याचा बेडा पार होय); निःसंशय तो परम समर्थ (व) दयाळु होय. ४२. यांत संशय नाहीं कीं (परलोकीं) ' ज़क्कूम'–निवडिंगा–चें झाड, ४३.(महा)पापी (म्हणजे नास्तिक)यांचा आहार होईल; ४४. जसें वितळलेलें तांबें(व) तें पोटांत असें उकळेल, ४५. जसें कढ आलेलें पाणी

---

(१) मक्केचे मूर्तीपूजक मुळांत मेलेल्यांचें जिवंत होणें मानीत नव्हते व समजत होते कीं, मेल्या पश्चात माणसाचें जिवंत होणें अशक्य आहे. ह्मणूनच ते मुसलमानांस ह्मणत होते कीं, जर मेलेल्यांचें पुन्हां जिवंत होणें शक्य आहे तर पुनरुत्थानाच्या वचनाची कोण वाट पाहात बसला आहे ? आतांच एखाद्या प्रेतास जिवंत करून दाखवा. तर परमेश्वरानें यांना अगोदर यमन देशाचा बादशाह तुब्बा याच्या लोकांचा अहवाल ऐकवून भिवविलें; मग उत्तर दिलें कीं, आकाश व पृथ्वीचें निर्माण करणें कांहीं खेळ नव्हे. तर याच्या व्यवस्थेनेंच या गोष्टीची साक्ष पटते कीं, यांत कांहीं गुप्त भेद आहे आणि तो भेद म्हटला ह्मणजे कर्मांचा मोबदला व शिक्षा ही होय व त्याकारणें मेलेल्यांचें जिवंत होणें आवश्यक आहे.

उकळतें. ४६. (या शिवाय आम्हीं दुतांस आज्ञा करूं कीं) याला धरा आणि ओढीत ओढीत याला नरकाग्नीच्या मधोमधपर्यंत घेऊन जा. ४७. मग (याला ही) शिक्षा द्या कीं याच्या डोक्यावरून उकळी आलेलें पाणी ओता. ४८.(मग आम्हीं त्या नरकवाश्याच्या क्लेशाची वृद्धी करण्यासाठीं त्याला हिणवून म्हणूं कीं घे, या शिक्षेची गोडी) चाख; (कारण) तूंच तर तो सामर्थ्यवान् (व) अब्रूदार होतास. ४९. हाच तर तो (नरकाग्नि) होय कीं ज्याविषयीं तुम्हीं शंका करीत होतां. ५०. (राहिले परमेश्वराला) भिऊन वागणारे (तर ते) अभयाच्या स्थळीं, ५१. (म्हणजे) बागांत व झऱ्यांत असतील; ५२. ते तलम रेशमाचीं व साटीनचीं वस्त्रें परिधान करून (एकमेकाचे) समोरासमोर बसलेले असतील. ५३. (होईलहि) असेंच. आणि (या व्यतिरिक्त) मोठ्या मोठ्या व काळ्या डोळ्यांच्या अप्सरांशीं आम्हीं त्यांचे जोड लावून दिलेले असतील. ५४. ते तेथें निश्चिंत होऊन हर तऱ्हेचे मेवे मागवून (मागवून खात) असतील ५५. पहिला मृत्यु (जो ते यालोकीं चाखून चुकले) त्या शिवाय तेथें त्यांना मृत्यु (चा कटू स्वाद) चाखावाच लागणार नाहीं; आणि परमेश्वर त्यांना नरकाग्नीचे शिक्षेंतून वांचवून घेईल. ५६. आणि (हे पैगंबरा!) तुझ्या पालनकर्त्याची कृपा (त्यांच्यावर राहील; ह्या अनेक देणग्या त्यांस प्राप्त होतील,) हेंच मोठें साफल्य होय. ५७. तर (हे पैगंबरा! आम्हीं या (कुराणास) तुझ्या भाषेंत या साठीं सुलभ केलें आहे कीं हे (अरब लोक याचा आशय समजून) बोध धरतील. ५८. पण (तूर्त) तर (तूंहि परिणामाची) वाट पाहा: हेहि वाट पाहत आहेत. ५९.

# अध्याय ४५ वा.

## सूरतुल्-जासिय:

हा मक्केंत प्रकट झाला; यांत ३७ आयात-महावाक्यें आहेत. याचें नांव याच अध्यायांत आलेल्या 'जासिय:' म्हणजे गुडघे टेकणें या शब्दावरून पडलें आहे.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)

ह. म. (हा. मीम). १. हा लेखी फर्मान परम समर्थ (व) बुद्धिमान् अशा परमेश्वराच्या हुजुरांतून सादर होत आहे. २. निःसंशय विश्वासूंसाठीं आकाशांत व पृथ्वींत (ईश्वरीसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. ३. आणि (लोकांनों!) तुमच्या उत्पत्तींत आणि ज्या प्राण्यांस (तो भूतलावर) फैलावीत राहतो त्यांत (ईश्वरीसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत.(पण) जे पूर्ण विश्वासाची पात्रता बाळगितात अशा लोकांसाठींच. ४. आणि (तसेंच) रात्री व दिवसाच्या अनुक्रमांत आणि अन्नसंपत्ति(चें मूळ म्हणजे पाणी) जें परमेश्वर आकशांतून पाडितो व मग त्यायोगें जमिनीस तिच्या मृत (म्हणजे पडित) झाल्यापश्चात सजीव (व टवटवीत) करून टाकितो त्यांत,आणि वाऱ्यांच्या उलट फेरांत, जे लोक समंजस होत त्यांच्यासाठीं (ईश्वरीसामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. ५. (हे पैगंबरा!) खरोखरींच हीं परमेश्वराचीं (म्हणजे आमचीं) महावाक्यें होत कीं, जीं आम्हीं तुला वाचून वाचून ऐकवितों. तर (आतां) परमेश्वर व त्याच्या महावाक्यांनंतर आणखी कोणती गोष्ट असेल कीं (जिला ऐकून हे लोक) विश्वास धरतील? ६. लबाड (व) पापीचंडाळ अशा प्रत्येक (इसमा)साठीं दुःखाची गोष्ट होय; ७. कीं परमेश्वराचीं महावाक्यें त्याच्या रूबरू वाचिलीं जातात व तो तीं ऐकतोहि; तरीदेखिल गर्वाचे भरांत (नास्तिकपणावरच असा) हेका धरून राहतो (कीं) जणूं

त्यानें तीं ऐकलींच नाहींत. तर (हे पैगंबरा !) अशा(नालायका)स दुःखकारक शिक्षेची खुषखबर ऐकीव. ८. आणि (नास्तिकपणावर हेका धरून बसण्याशिवाय) जेव्हां त्याला आमच्या महावाक्यांचीं कांहींहि खबर होते, तेव्हां तो त्यांची हंशी उडवितो; असल्याच लोकां-साठीं फजितीची शिक्षा होय. ९. यांच्या(साठीं) पुढें (जातां) नरकाग्नि आहे; आणि( ह्यालोकीं) यांनीं जें कांहीं केलें सवरलें यांच्या कांहींच कामा येणार नाहीं व ज्या(मूर्तीं)स यांनीं परमेश्वराशिवाय (आपले) पुरस्कर्ते बनवून ठेविले होते त्याहि (कामा येणार) नाहींत. आणि यांना मोठी शिक्षा होणें आहे. १०. हें (कुराण साद्यंत) सद्बोध होय. आणि जे लोक आपल्या पालनकर्त्यांच्या निशाण्यांस नाकारितात त्यांना मोठ्या (सक्त) यातनेची दुःखकारक शिक्षा होणें आहे. ११. (लोकांनों !) परमे-श्वर असा (परम समर्थ) होय-कीं, ज्यानें समुद्रास तुमच्या आज्ञांकित करून दिलें आहे; अशासाठीं कीं ईश्वराज्ञेनें त्यांत गलबतें चालावींत; आणि हें कीं तुम्हीं लोकांनीं त्याच्या औदार्या (ह्मणजे आपल्या निर्वाहा)-चा शोध[1] करावा; आणि हें कीं तुम्हीं (त्याचे) आभार मानावेत. १२. आणि जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे त्या सर्वांस त्यानेंच आपल्या(कृपे)परत्वें तुमच्या कामांत लावून[2] ठेविलें आहे. निःसंशय या(गोष्टीं)त जे लोक मनन करतात त्यांच्यासाठीं (ईश्वरी सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत. १३. (हे पैगंबरा !) मुसलमानांस सांग कीं, जे लोक परमेश्वराच्या घडामो[3]-डींला भीत नाहींत त्यांस त्यांनीं क्षमा करावी (व परमेश्वरावर सोडून

(१) दर्यावरील व्यापार.

(२) पृथ्वींतील सृष्टि मनुष्याच्या कामा येते हें तर ठाऊकच आहे आणि आकाशांतील सृष्टि वायु, आभाळ, चंद्र व सूर्य यांजपासून मनुष्याची जीं जीं कामें निघतात तीं थोड्याशा विचारांतीं सहजगत्या लक्षांत येण्यासारखीं आहेत.

(३) येथें परमेश्वराचे दिवस ह्मणजे परमेश्वराच्या घडामोडी; जसा हजरत नूहच्या वेळेचा जलप्रलय, फिरऔनचें बुडून जाणें आणि आद, समूद व लूत वगैरे लोकांस जी शिक्षा सादर झाली ती शिक्षा कीं ज्या फारा दिवसा पावेतों विसरत नाहींत, असा अर्थ होतो.

द्यावें) कीं, परमेश्वर (या) लोकांस यांच्या कृत्यांचा मोबदला देईल. १४. जो कोणी सुकृत्य करितो तर (तें) खास आपल्या(कल्याणा)साठींच (करतो) आणि जो वाईट करितो तर (तें) त्याच्याचपुढें (येईल.) मग (सरेशेवटीं) तुम्हां(सर्वां)स आपल्या पालनकर्त्याकडे परतून जाणें आहे. १५. आणि अर्थात् आम्हीं 'बनी-इस्राएलां'स (तौरात)पुस्तक व अधिकार व पैगंबरी हीं दिलीं आणि ('मन्न' व 'सल्वा' यांसारखे) उत्तम उत्तम पदार्थ यांना खावयास दिले आणि सकल जगांच्या लोकांवर यांस श्रेष्ठत्व दिलें. १६. आणि धर्मप्रकरणासंबंधानें आम्हीं त्यांस स्पष्ट स्पष्ट नियम दिले. पण या लोकांनीं एकमेकांपासून जो मतभेद केला तो त्यांना ज्ञान झाल्यानंतर परस्परांच्या हट्टवादीपणानें (केला; हे पैगंबरा!) ज्या (गोष्टीं)त हे लोक मतभेद करीत आहेत पुनरुत्थानाचे दिवशीं तुझा पालनकर्ता यांच्यांत त्या(गोष्टीं)चा निकाल लावून टाकील. १७. मग (हे पैगंबरा!) आम्हीं तुला धर्मप्रकरणाच्या राजमार्गा (म्हणजे इस्लामा)स लावून दिलें आहे, तर तूं त्याच (धर्तीं)वर चालला जा; आणि ज्या लोकांस(या गोष्टींचें)ज्ञान नाहीं त्यांच्या मनेच्छेप्रमाणें चालूं नकोस १८. परमेश्वरापुढें हे लोक तुझ्या कांहींच कामा येऊं शकणार नाहींत, आणि आज्ञाभंजक लोक हे एकाचे एक साथी होत. व (परमेश्वराला) भिऊन वागणारांचा साथी परमेश्वर होय. १९. हें (कुराण) लोकांसाठीं शहाणपणाच्या गोष्टींचा संग्रह होय; आणि जे लोक (याचा)निश्चय बाळगितात त्यांच्यासाठीं (नखशिकांत) सद्बोध व दया होय. २०. जे लोक दुष्कर्मे करीत राहतात त्यांनीं कां ही कल्पना करून ठेविली आहे कीं, आम्हीं त्यांना, ज्या लोकांनीं विश्वास धरिला व (विश्वासाव्यतिरिक्त) चांगलीं कामेंहि केलीं त्या लोकांसारखेच करून टाकूं, कीं या(सर्वां)चें जिणें व या(सर्वां)चें मरणें सारखेंच होईल? हे (लोक कितीतरी) वाईट निर्णय करतात! २१. आणि परमेश्वरानें आकाश व पृथ्वीला (कोणा) सत्यसंकल्पानेंच उत्पन्न केलें आहे; आणि उद्देश हा होय कीं, प्रत्येकजणास त्याच्या कृत्याचा मोब-

---

(२) भावार्थ हा आहे कीं ह्या इहलौकिक संसारांत मनुष्य हा सर्व सृष्टींत श्रेष्ठ आहे; आणि असें वाटतें कीं अवघें जग व त्यांतील साजसंरजाम याच्याच

दला दिला जावा. (सारांश, पुनरुत्थानांत असेंच होईल,) आणि लोकांवर (कोणाहि तऱ्हेचा) जुलूम केला जाणार नाहीं. २२. (हे पैगंबरा!) बरें, त्वां त्या मनुष्या(च्या स्थिती)चेंहि अवलोकन केलेंस कीं ज्यानें आपल्या मनःकामनेला आपली उपास्य (देवता) बनवून ठेविली आहे, व परमेश्वरानें जाणून त्याला आडमार्गीं भटकविलें आहे आणि त्यानें त्याच्या श्रवणेंद्रियांवर व मनावर मोहोर लावून टाकली आहे व त्याच्या दृष्टीवर पडदा घातला आहे? तर परमेश्वराचे(बहकविल्या) नंतर त्याला कोण सन्मार्ग दाखवूं शकतो? कां तुम्हीं लोक विचार करीत नाहीं? २३. आणि ते म्हणतात, आमचें तर केवळ हेंच इहलौकिक जीवन होय, झालें; कीं (येथेंच) मरतों व (येथेंच) जगतों; आणि काळच (एका नियमित वेळेपर्यंत जिवंत ठेवून) आमचा संहार करितो. आणि यांना याचें कांहीं (चौकस) ज्ञान तर नाहींच. हे तर निव्वळ अनुमानच लढवीत असतात. २४. आणि जेव्हां यांना आमचीं स्पष्ट स्पष्ट महावाक्यें वाचून ऐकविलीं जातात, तेव्हां यांची तक्रार केवळ

---

करितां उत्पन्न केला गेला आहे. तो एका नियमित वेळेपर्यंत जगांत वावरतो, जगाच्या पदार्थांचा सुखोपभोग घेतो आणि त्यांत घडामोड करतो. याच सुखोपभोग व घडामोडीमुळें तो स्वतंत्र कर्ता आहे; आणि ह्मणून परमेश्वरापाशीं तो आपल्या कर्मांचा जबाबदार आहे. तर अशा स्थितींत बरें वाईट सारखेंच होऊं शकत नाहीं; कीं सर्व एका साधारण नियमाप्रमाणें एकाच प्रकारें पैदा झाले व एकाच प्रकारें मरण पावले; आणि याच्यानंतर कांहींच नव्हे. पण तसें नव्हे; तर ह्या लोकानंतर आणखी एक अस्तित्व आहे व माणसानें जें कांहीं येथें केलें सवरलें असेल त्याचा परिणाम तेथें त्याला भोगावा लागेल. चांगले लोक स्वर्गांत असतील व वाईट नरकांत.

(१) म्हणजे परमेश्वरानें हें जाणून कीं हा मनुष्य सन्मार्गोन्मुख होणार नाहीं व याच्यांत सन्मार्गावर येण्याची पात्रताही नाहीं त्याला आडमार्गी भटकविलें. किंवा तो मनुष्य जाणतो बुजतो पण त्याच्या अक्कलेवर धोंडे पडलेले आहेत; कीं तो नाकारीत जातो. खरें ह्मटलेलें आहे कीं 'ज्ञान हीहि एक प्रचंड आड काठी होय.' परमेश्वराकडून सद्बुद्धि नसेल तर ज्ञान व बुद्धि कांहीं उपयोगी पडत नाहींत.

हींच असते कीं ते (मुसलमानांस) म्हणतात कीं जर तुम्हीं (आपल्या पुनरुत्थानाच्या दाव्यांत) खरे आहां तर आमच्या बापजाद्यांस (जिवंत उठवून आम्हांपुढें) आणून हजर करा. २५. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं परमेश्वरच तुम्हांस जिवंत ठेवितो व मग (तोच) तुम्हांस मारतोहि; तदनंतर पुनरुत्थानाचा दिवस कीं ज्या(च्या येण्यां)त कांहींच संशय नाहीं त्या दिवशीं तो तुम्हांस (पुन्हां जिवंत करून हिशेबासाठीं एकत्र) गोळाहि करील. परंतु बहुतेक लोक समजत नाहींत. २६. आणि आकाशांचें व पृथ्वीचें राज्य परमेश्वराचेंच होय. आणि ज्या दिवशीं (पुनरुत्थानाची) घटका कायम होईल त्या दिवशीं (पुनरुत्थानाचें) खंडन करणारे मोठ्याच गोत्यांत येऊन जातील. (कारण त्यांनीं पुनरुत्थानासाठीं कांहींच तयारी केली नाहीं). २७. आणि (हे पैगंबरा!) तूं पाहशील कीं प्रत्येक जनता (निर्णयाची वाट पहात, अदबीनें) गुडघे टेंकून बसलेली असेल; प्रत्येक जनता आपल्या कर्मपटा(च्या पाहण्या)साठीं बोलाविली जाईल; (आणि त्यांस बजाविलें जाईल कीं जगांत) तुम्हीं लोक जसजशीं कर्में करीत राहिलां आहां, आज तुम्हांस त्यांचा मोबदला दिला जाईल. २८. हें आमचें पुस्तक (ज्यांत तुमचीं कर्में लिहिलेलीं आहेत तें) तुमच्या विरुद्ध खरें खरें बोलत आहे; (व) जीं जीं कर्में तुम्हीं करीत होतां तीं आम्हीं लिहिववीत जात होतों. २९. तर ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांना त्यांचा पालनकर्ता आपल्या दयेखालीं घेईल. हेंच ढळढळीत साफल्य होय. ३० आणि जे लोक नास्तिकपणा करीत राहिले, (त्यांना मी बजावीन कीं) कां तुम्हांस माझीं महावाक्यें वाचून वाचून ऐकविलीं जात नव्हतीं ?

(१) ह्याच प्रकारचें एक वाक्य 'सूरतु-दुखान' मध्यें नुकतेंच येऊन गेलें. पुनरुत्थानास नाकारणाऱ्यांचा जो आक्षेप तेथें होता तो येथेंहि आहे. परंतु तेथें परमेश्वरानें आकाश व पृथ्वी हीं कोणा सत्य संकल्पानें निर्मिलीं आहेत असें उत्तर दिलें होतें; आणि येथें हें उत्तर दिलें आहे कीं तोच पहिल्यांदा जगांत जिववितो व मारतो म्हणून तो पुन्हांहि जिवंत करून उठवील; म्हणजे जो जगांत जिवविण्यास व मारण्यास समर्थ आहे तोच पुन्हाहि जिवंत करून उठविण्यास समर्थ होय. म्हणून नाकारण्याचें कांहीं कारण नाहीं.

(अवश्य ऐकविलीं जात होतीं.) पण तुम्हीं अहंकार केला आणि
तुम्हीं लोक होतांहि अन्याभंजकच. ३१. आणि जेव्हां (तुम्हांस)
सांगितलें जात होतें कीं परमेश्वराचें वचन सत्य होय आणि
(पुनरुत्थानाच्या) घटके(च्या येण्यां)त कांहींच संशय नाहीं; तेव्हां
तुम्हीं म्हणत होतां कीं आम्हीं जाणित नाहीं कीं (पुनरुत्थानाची)
घटका म्हणजे काय? पण असेच कांहीं तर्क आम्हांलाहि येतात.
तथापि (ज्याला) खातरी (म्हणावी तीं तर) आम्हांला नाहींच. ३२.
आणि जीं जीं कर्मं हे लोक करीत राहिले आहेत (आतां) त्यांचे दुष्प-
रिणाम यांना जाहीर होऊन जातील;आणि ज्या (शिक्षेची) हे हंशी उडवीत
राहिले आहेत ती (आतां) यांना घेरून टाकील. ३३. आणि (यांना)
सांगितलें जाईल कीं ज्या प्रमाणें तुम्हीं आपल्या ह्या दिवसाच्या येण्यास
विसरलां होतां, आम्हींहि त्याप्रमाणें आज तुम्हांस (बुध्या) विसरून जाऊं.
आणि तुमचें ठिकाण नरकाग्नि होय व कोणीहि तुमचा मदतगार नाहीं.३४.
ही त्याची शिक्षा होय कीं तुम्हीं परमेश्वराच्या माहावाक्यांची हंशी उड-
विली आणि इहलौकिक आयुष्यानें तुम्हांस फसगतींत घालून ठेविलें.
एवंच, आज हे लोक नरकांतून काढिले जाणार नाहींत आणि यांना
याची संधिहि दिली जाणार नाहीं कीं (पश्चात्ताप करून ते परमेश्वराला)
प्रसन्न करून घेतील. ३५. तर परमेश्वरालाच सर्व स्तुति होय (कीं
जो) आकाशांचा मालक (होय). ३६. व पृथ्वीचा मालक (होय;
व) सकलजगांचा मालक (होय). आणि आकाशांत व पृथ्वींत त्याचाच
गौरव होय; आणि तोच परम समर्थ व बुद्धिमान् होय. ३७.

(१) लोकांस परमेश्वराच्या विसरून जाण्याचा अर्थ हा आहे कीं तो नरकवा-
सीयांचा कांहींच समाचार घेणार नाहीं कीं त्यांच्यावर काय बितते ?

# पवित्र कुराण

## भाग सविसावा.

## अध्याय ४६ वा.

## सूरतुल्–अह्क़ाफ्.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ३५ महावाक्यें–आयात आहेत्. 'अह्काफ्' हें 'हिक़्फ्' या शब्दाचें अनेक वचन आहे वं तें हद्रमौत इलाख्यांतील एका वांकड्या व नागमोडी प्रदेशाचें नांव आहे. ह्यांतच 'आद' नामक लोकांच्या वसाहती होत्या. म्हणून 'अह्काफ'चें प्रकरण हें नांव पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

ह. म. (हा-मीम). १. हा लेखी फर्मान परम समर्थ (व) बुद्धिमान अशा परमेश्वराच्या हुजुरांतून सादर होत आहे. २ आम्हीं आकाशांस व पृथ्वीस व जें काय या दोहोंच्या दरम्यान आहे त्यास केवळ (कोणा) सत्यसंकल्पानेंच व एका नियमित काळासाठींच निर्माण केलें आहे. आणि जे लोक नास्तिक आहेत त्यांस ज्या (गोष्टी म्हणजे पुनरुत्थान वगैरे) पासून भिवविलें जातें, ते तर त्याची पर्वाहि करीत नाहींत. ३. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं, बरें पाहा तर खरें, कीं, परमेश्वरा-शिवाय ज्या(उपास्यां)स तुम्हीं बोलावितां (एक नजर) मला तरी दाखवा कीं, त्यांनीं कोणती भूमि निर्मिली आहे? अथवा आकाशा(च्या रचनें)त त्यांचा कांहीं भाग आहे? जर तुम्हीं (आपल्या दाव्यांत) खरे आहां तर ह्याच्या पूर्वीचें एखादें पुस्तक किंवा ज्ञानोक्त कथन माझ्यापुढें आणा. ४. आणि अशा (मनुष्या)पेक्षांहिं जास्त बहकलेला (आणखी) कोण? कीं, जो परमेश्वराला सोडून अशा(उपास्यां)स बोलावील कीं, जे

पुनरुत्थानाचे दिवसापर्यंत त्याला जबाब (देखिल) देऊं शकणार नाहींत; आणि (जबाब तर एकीकडेच) त्यांना तर यांच्या बोलाविण्याचीहि खबर नाहीं. ५. आणि जेव्हां (पुनरुत्थानाचे दिवशीं)लोक(जाब देण्यासाठीं) एकत्र गोळा केले जातील तेव्हां हे (उपास्य, उलट) त्यांचे शत्रु होऊन जातील व यांच्या उपासनेची नकारणी करतील. (ती वेगळीच).६. आणि जेव्हां आमचीं स्पष्ट स्पष्ट महावाक्यें या (लोकां)स वाचून ऐकविलीं जातात, तेव्हां जे लोक नास्तिक होत ते, सत्य (-पूर्ण कुराण) त्यांच्यापाशीं आलें त्यावेळीं, त्यासंबंधानें म्हणतात कीं, ही तर धडधडीत जादू होय ७. (हे पैगंबरा!) कां (हे लोक कुराणासंबंधानें) म्हणतात कीं हें या (मनुष्या)नें (म्हणजे त्वां) आपल्या मनानें रचिलें आहे.(तूं यांना) सांग कीं जर मी हें आपल्या मनानें रचिलें असेल तर तुम्हीं परमेश्वरापुढें माझ्या कांहींच कामा[2] येऊं शकत नाहींत. ज्या ज्या बाता तुम्हीं लोक कुराणासंबंधानें उडवितां, त्यांस तोच खूप जाणतो. (व तोच) माझ्या व तुमच्या दर्म्यान साक्षी बस्स आहे; आणि तोच क्षमाकर्ता (व)दयाळू होय ८. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं मी पैगंबरांत कोणी नवल परीचा (पैगंबर) तर नव्हेंच; आणि मी जाणत नाहीं कीं (पुढें) माझ्याबरोबर काय केलें जाईल व हेंहि नाहीं (जाणत कीं) तुमच्याबरोबर (काय केलें जाईल) ! मला जो आदेश प्रकट होतो मी तर केवळ त्याचेंच अनुकरण करितों; आणि मी (ईश्वरी शिक्षेचें) स्पष्टपणें भय सुचविणारा आहें एवढेंच काय तें. ९. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं बरें पाहा तर

---

(१) नास्तिकांच्या मताप्रमाणें जादुचा अर्थ हा कीं, ज्याप्रमाणें एखाद्या मनुष्यावर मंत्र पढून घातलें जातें; त्याच प्रमाणें कुराण ऐकून लोक त्याच्या पाशांत येऊन जातात.

(२) म्हणजे जर मी हें आपल्या मनानें रचिलें आहें तर त्याचा दुष्परिणामहि मीच भोगीन. तुम्हीं त्यापासून मला वांचवूं शकणार नाहींत. जर हें परमेश्वराकडून प्रकट झालें आहे व आहेहि असेंच, तर तुम्हींच आपली काळजी वाहत राहा.

(३) म्हणजे मी स्वतंत्रपणें अदृष्ट जाणत नाहीं कीं, जगांत काय कोणाच्या पुढें येणार आहे; अथवा ईश्वरभयाच्या दृष्टीनें ह्मटलें कीं मी कोणाचाच परिणाम जाणत नाहीं; आपलाहि नाहीं व तुमचाहि नाहीं

खरें, जर हें (कुराण) परमेश्वराकडून आहे व तुम्हीं त्याला नाकारून बसलां; आणि 'बनीइस्राएलां'तून एका साक्षीदारानें असल्या एका (पुस्तकाच्या प्रकट होण्या)ची साक्षहि दिली व त्यानें विश्वासहि धरिला आणि तुम्हीं अहंकारांतच राहिलां; (तर अशा स्थितींत तुमचा काय परिणाम होणार?) निःसंशय परमेश्वर आज्ञाभंजक लोकांस सन्मार्गाची बुद्धि देत नसतो. १० आणि जे नास्तिक होत ते मुसलमानांसंबंधानें म्हणतात कीं जर (इस्लामधर्म) उत्तम असता, तर हे (साधारण लोक) आमच्याआधींच त्याकडे सरसावून गेले नसते.आणि जेव्हां कुराणाद्वारें यांना सन्मार्गबोध झाला नाहीं, तेव्हां आतां हे (याच्या शिवाय आणखी काय) म्हणतील कीं हें (तर एक) पुरातन थोतांड होय. ११. आणि वास्तविक पाहतां, कुराणाच्यापूर्वी 'मूसा'चें पुस्तक (म्हणजे तौरात प्रकट होऊन चुकलें) आहे (व तें आपल्या ठिकाणीं खुद्द धर्माचा)नेता व (परमेश्वराची) दया होय. आणि हें (कुराणहि त्याच तऱ्हेचें दिव्य) पुस्तक होय; (तें तौरातचें) सत्यत्व दर्शवितें (व) अरबी भाषेंत (आहे); अशा साठीं कीं जे लोक (फारच) शिरजोर होत, त्यांना त्यानें (ईश्वरीशिक्षेचें) भय दाखवावें; आणि जे सुकृत्य करणारे होत त्यांना (ईश्वरप्रसन्नतेचें) शुभवर्तमान (द्यावें). १२. निःसंशय जे लोक म्हणाले कीं, आमचा पालनकर्ता परमेश्वर होय; मग (शेवटपर्यंत याच भावनेवर) दृढ राहिले; तर (परलोकीं) त्यांना (कोणाहि तऱ्हेचें) भय राहणार नाहीं व ते कोणाप्रकारें दुःखीहि होणार नाहींत. १३. हेच तर स्वर्गवासी होत कीं त्यांत ते सदासर्वदा राहतील. हा, ते (जगांत) जीं कर्में करीत राहिले त्यांचा मोबदला होय. १४. आणि आम्हीं मान-

(१) तो साक्षीदार ह्मणजे अबदुल्ला बिन सलाम जे पूर्वी यहुदी होते ते आहेत, ह्मणतात. तथापि कोणीहि असोत; भावार्थ इतकाच कीं, यहुद्यांच्या विद्वानांत जे न्यायीस्वभावाचे होते ते शेवटच्या–कलियुगाचे पैगंबरा विषयींचीं भविष्यवचनें तौरातमध्यें पाहून त्यांची वाट पाहत होते कीं, त्यांच्या गोष्टी ऐकून विश्वास धरावा.

(२) म्हणजे ज्याप्रमाणें पूर्वीपासून खोट्यानाट्या गोष्टी बनत चालल्या आहेत तेंहि त्याच प्रकारचें थोतांड असेल.

वाला आपल्या आईबापाशीं चांगलें (वर्तन) करण्याची ताकीद केली आहे; कीं त्याच्या आईनें कष्टानें त्याला पोटांत वागविलें व कष्टानेंच त्याला जन्म दिला. आणि त्याचें पोटांत वागविणें व त्याचें दूध सोडविणें (कमींत कमी कोठें) तीस महिने (जाऊन पुरें) होतें; येथपर्यंत कीं जेव्हां (मनुष्य)आपल्या प्रौढ वयास पोहोंचतो म्हणजे चाळीस वर्षां(च्या वया)स पोहोंचतो, तेव्हां (परमेश्वरास) प्रार्थना करितो कीं हे माझ्या पालनकर्त्या ! मला या(गोष्टी)ची सुबुद्धि दे कीं तूं माझ्यावर व माझ्या आईबापांवर जे उपकार केले आहेत त्या तुझ्या उपकारांचे मी आभार मानीत राहावेत; आणि या (गोष्टी)चीहि (सुबुद्धि दे) कीं मी असें सुकृत्य करावें कीं ज्यानें तूं राजी होशील; आणि माझ्या संततींत सदाचरण पैदा कर (कीं) माझ्यासाठीं (तें सुखास कारणीभूत होईल). मी (आपल्या सर्व कामांत) तुजकडे वळतों व मी मुसलमानां-(म्हणजे तुझ्या आज्ञाधारक सेवकां)पैकीं आहें. १५. हेच लोक होत कीं (इतर) स्वर्गवासी यां(च्या बरोबरीं)त आम्हीं यांच्या पासून यांनीं जीं चांगलीं कर्मे केलीं आहेत तीं स्वीकारूं आणि यांच्या पापांची गय करूं. खरा वायदा जो (जगांत) यांच्याशीं केला जात होता (ही त्याची अमलबजावणी होय) १६. आणि ज्यानें आपल्या आईबापांस म्हटलें कीं तुम्हांस छी: आहे, का तुम्हीं मला धुगारपट्टी देतां कीं (मेल्यापश्चात), मी (पुन्हां जिवंत करून थडग्यांतून) बाहेर काढिलों जाईन ? आणि वास्तविक पाहतां, माझ्यापूर्वीं कित्येक पिढ्या होऊन गेल्यां आहेत (पण कोणालाहि मरून जिवंत होतांना पाहिलें नाहीं). आणि (आईबापांची परिस्थिति ही आहे कीं) ते (काकळुतीनें) परमेश्वरापाशीं साह्य मागतात (व मुलाला म्हणतात) कीं तुझा सत्या-नास जावो! तूं विश्वास धर; निःसंशय परमेश्वराचें (पुनरुत्थानाचें) वचन केवळ सत्य होय. तेव्हां (हा त्यांना) उत्तर देतो कीं ह्या तर पूर्वींच्या लोकांच्या केवळ भाकडकथा होत. १७. हेच ते लोक होत कीं 'जिन्न'–दैवत व मनुष्यें यांच्या दुसऱ्या जनता, ज्या यांच्यापूर्वीं

(१) कमींत कमी तीस महिने असे होतात कीं गर्भाची प्रथम अवधि सहा महिने व मग दोन वर्षे दूध पाजण्याचे मिळून तीस महिने झाले.

होऊन गेल्या आहेत त्यांच्याबरोबर हेहि (शिक्षेच्या) वचनास पात्र ठरले. निःसंशय हे लोक (आपल्या कुकर्मांमुळें) नाश पावणारेच होते (ते पावले). १८. आणि (परलोकीं) आपल्या कर्मांनुसार सर्वांचे (चांगले अथवा वाईट) दर्जे होतील. आणि (हें) यासाठीं कीं परमेश्वरानें त्या लोकांस त्यांच्या कर्मांचा भरपूर मोबदला द्यावा; आणि त्यांजवर (कोणाहि तऱ्हेचा) जुलूम केला जाऊं नये. १९. आणि त्या (पुनरुत्थानाचे) दिवशीं जेव्हां नास्तिक नरकाग्नीसमोर आणिले जातील (तेव्हां त्यांस बजाविलें जाईल कीं) तुम्हीं आपल्या ऐहिक आयुष्यांत आपले (वाट्याचे) चांगले (चांगले) पदार्थ घेऊन चुकलां व त्यांपासून (मनस्वी) सुखोपभोगहि घेऊन चुकलां. तर आज तुम्हांस फजितीची शिक्षा दिली जाईल; (हा) याचा मोबदला (होय) कीं तुम्हीं (उगाच) हकनाक पृथ्वींत अहंकार करीत होतां; आणि (हा) याचा मोबदला (होय) कीं तुह्मीं आज्ञेचें उल्लंघन करीत होतां. २०. आणि (हे पैगंबरा! या लोकांस) 'आद'(चे लोकां)चा भाऊ 'हूद'(पैगंबरा)ची आठवण करून दे कीं त्यानें आपल्या लोकांस 'आहकाफ'(चे भूप्रदेशा)मध्यें (ईश्वरी शिक्षेचें) भय दाखविलें; आणि (परिस्थिति ही होती कीं) त्यांच्या पुढून व त्यांच्या मागून (म्हणजे पुष्कळसे इतर) भय सुचविणारेहि येऊन चुकले होते; (आणि 'हूद'नें आपल्या लोकांस सांगितलें) कीं तुम्हीं परमेश्वराशिवाय कोणाचीच उपासना करूं नका. मला तुह्मांसंबंधानें (एका) मोठ्या (सक्त) दिवसाच्या शिक्षेचा अंदेशा वाटतो. २१. ते म्हणूं लागले कीं तूं यासाठीं कां आम्हांकडे (पैगंबर बनून) आला आहेस कीं तूं आम्हांला आमच्या उपास्य(देवां)कडून फिरवून टाकावेंस? मग जर तूं (आपल्या दाव्यांत) खरा आहेस तर ज्या (शिक्षे)चा वायदा तूं आम्हां(लोकां)स देत होतास ती (शिक्षा) तूं आम्हांवर आण (पाहूं). २२. ('हूद'नें) म्हटलें (याचें) ज्ञान तर परमेश्वरालाच होय. आणि मला जो (संदेश) देऊन पाठविलें गेलें आहे तो मी तुम्हांस पोहोंचवून देत आहें. परंतु मी तुम्हांस पाहतों आहें कीं तुम्हीं अज्ञानी लोक आहां. २३. मग (त्या लोकांनीं) जेव्हां त्या(शिक्षे)स पाहिलें कीं एक ढग आहे कीं

तो त्यांच्या दऱ्याखोऱ्यांकडे गरारत चालला येत आहे, तेव्हां ते म्हणूं लागले कीं हा तर एक ढग आहे (व तो) आम्हांवर वर्षाव करितो आहेसा (दिसतो. नाहीं, नाहीं! ढग नव्हे,) किंबहुना ज्या(शिक्षे)साठीं तुम्हीं घाई मचवित होतां तोच हा (ईश्वरी क्षोभ) होय. (म्हणजे मोठा सोसाट्याचा) वारा, कीं ज्यांत दुःखप्रद शिक्षा होय; २४ कीं हा आपल्या पालनकर्त्याच्या हुकमानें प्रत्येक वस्तूचा फन्ना उडवून टाकील. सारांश (खरोखरींच) हे लोक असे (नष्ट) होऊन गेले कीं यांच्या घरांशिवाय आणखी कांहींच दृष्टीस पडत नव्हतें. आज्ञाभंजक लोकांस आम्हीं अशाच रीतीनें सजा देत असतों. २५, आणि आम्हीं त्यांना अशा अशा कामाचें सामर्थ्य दिलें होतें कीं तुम्हां('मक्के'करां)स (त्याचें दशपटहि) सामर्थ्य दिलें नाहीं. आणि आम्हीं त्यांना कान व डोळे व हृदयें हीं (सर्व कांहीं) दिलीं होतीं. परंतु ज्या अर्थी ते लोक परमेश्वराच्या महावाक्यांचा अव्हेर बाळगित होते, त्या अर्थी त्यांचे कान त्यांच्या कांहींच कामा आले नाहींत; व त्यांचे डोळे व त्यांचीं हृदयें हींहि (कामा आलीं) नाहींत; आणि ज्या(शिक्षे)चीं ते हंशी उडवित होते ती (अखेर) त्यांच्याचवर उलटून पडली. २६. आणि (मक्के'करांनों!) आम्हीं तुमच्या आसपासच्या (कित्येक) वस्त्यांचा नाश करून टाकिला; व आम्हीं बदलून बदलून (आपल्या सामर्थ्याच्या) निशाण्या (बहुत कांहीं) दाखविल्या कीं, (कसेंहि करून) ते (असल्या कामापासून) माघार घेतील.(परंतु त्यांनीं एक देखील ऐकिलें नाहीं व अखेर शिक्षाग्रस्त झाले) २७. तर परमेश्वराशिवाय ज्या वस्तूंस त्यांनीं (परमेश्वर)सान्निध्य प्राप्त करण्यासाठीं आपले उपास्य बनवून ठेविले होते (त्यांना जर सामर्थ्य होतें तर) त्यांनीं (शिक्षा उतरण्याचे वेळीं) त्यांची कां म्हणून मदत केली नाहीं? (मदत करणें तर एकीकडेच,) किंबहुना (प्रसंगीं, उलट) यांच्या(दृष्टि)पासून नाहींसे झाले. आणि यांचे खोटे ग्रह व हे जें कुभांड रचित होते त्यांची ही हकीकत होती; (कीं जी आतां उघडकीस आली.) २८. आणि (हे पैगंबरा! या लोकांस ती गोष्टहि आठवून दे कीं) जेव्हां आम्हीं कित्येक 'जिन्न'-दैवत यांस (घेरून) तुजकडे आणिलें कीं त्यांनीं कुराण ऐकावें; मग जेव्हां ते या(प्रसंगा)वर येऊन हजर झाले तेव्हां ते (एकमेकांस)

बोलूं लागले कीं गप (बसून ऐकत) राहा. मग जेव्हां (कुराणाचें वाचन) पूर्ण झालें, तेव्हां ते आपल्या लोकांकडे परतले कीं (त्यांस) त्यांनीं (ईश्वर-शिक्षेचें) भय सुचवावें. २९. ते (त्यांना जाऊन) म्हणूं लागले कीं हे आमच्या बांधवांनों ! आम्हीं एक पुस्तक ऐकून आलों आहों कीं जें 'मूसा'चे नंतर प्रकट झालें आहे, पूर्वींचीं (पुस्तकें) जीं याच्यावेळीं उपलब्ध आहेत तें त्यांची सत्यता दर्शवितें, सत्याकडे नेतें व सरळ मार्ग दाखवितें. ३०. हे बांधव हो ! (हा पैगंबर 'मोहंमद') जो परमेश्वरातर्फें (विश्वासाकडे) पाचारितो, त्याचें ऐका व परमेश्वरावर विश्वास ठेवा; कीं परमेश्वर तुम्हांस तुमच्या पापांची क्षमा करील आणि (परलोकींच्या) दुःखप्रद शिक्षेपासून तुम्हांला (आपल्या) आश्रयांत घेईल. ३१. आणि (हा पैगंबर) जो परमेश्वरातर्फें (विश्वासाकडे) पाचारितो त्याचें जो कोणी न ऐकील, तो भूपृष्ठावर (कोठेंच पळून परमेश्वराला तर) हारवूं शकत नाहीं; आणि परमेश्वराखेरीज (कोणी) याचे पुरस्कर्तेहि नाहींत. हे लोक धडधडीत [1]भ्रमांत (पडले) आहेत. ३२. (जे लोक पुनरुत्थानास नाकारितात) त्यांनीं कां (या गोष्टीवर) नजर केली नाहीं कीं ज्या परमेश्वरानें आकाशांस व पृथ्वीस उत्पन्न केलें व त्यांच्या निर्माण करण्यांत त्याला (किंचितहि) थकवा वाटला नाहीं, तो मेलेल्यांस जिवंत करण्यासहि समर्थ आहे ? (आणि) कां

(१) मौलवी शाह अबदुल्कादिर साहेब लिहितात कीं, हजरत पैगंबरसाहेब हज्जचे दिवसांत मक्का शहराबाहेर निघून आले होते व तेथें ते आपल्या मित्रांसह सकाळची नमाज पढूं लागले. त्यावेळीं कित्येक 'जिन्न' लोक कुराण ऐकून गेले व मुसलमान झाले. नंतर त्यांनीं आपल्या लोकांस जाऊन समजाविलें. पण या खेपेस ते हजरत पैगंबरांला भेटले नव्हते. मग पुन्हां पुष्कळ लोक मुसलमान होऊन एके रात्रीं मक्केच्या बाहेर आले; हजरत पैगंबरसाहेबहि एकटेच बाहेर निघाले होते. त्यावेळीं सर्वांनीं कुराण ऐकिलें व शिकून घेतलें, आणि त्यांनीं इस्लाम धर्माचा अंगिकार केला. 'सुरतुल्-जिन्न' यामध्यें त्यांच्या गोष्टी सविस्तर आहेत. जेव्हांपासून पैगंबर साहेबांस वह्य म्हणजे प्रकटीकरण होऊं लागलें, तेव्हांपासून 'जिन्न' लोकांस आकाशाच्या बातम्या कळणें बंद झालें होतें. त्यांना याचें कारण माहीत नव्हतें. कुराण जेव्हां ऐकिलें तेव्हां त्यांनीं जाणिलें कीं याचें प्रकटीकरण होत होतें ह्मणून बातमी बंद केली आहे.

नसावा ? तो तर सर्व शक्तिमान् होय. ३३. आणि ज्या दिवशीं नास्तिक नरकाग्नीसमोर आणिले जातील; (तेव्हां त्यांस विचारिलें जाईल कीं) हा (नरकाग्नि आतांहि) कां सत्य नव्हे ? ते म्हणतील, आह्मांला आमच्या पालनकर्त्याची शपथ होय; अवश्य (सत्य) आहे. तर (परमेश्वर त्यांस) आज्ञा करील कीं (बरें तर,) तुम्हीं जो नास्तिकपणा करीत राहिलां त्याच्याबद्लीं (याच्याच) शिक्षेची गोडी चाखा. ३४. तर (हे पैगंबरा !) ज्याप्रमाणें (इतर) हिम्मतवाल्या पैगंबरांनीं (नास्तिकांचे छळ मुकाटयानें) सहन केले त्याचप्रमाणें तूंहि सहन कर; आणि यांच्यासाठीं (शिक्षेची)घाई मचवूं नकोस.ज्या दिवशीं(पुनरुत्थान)ज्याचा यांना वायदा केला जातो तें हे पाहून घेतील तेव्हां (यांना असें वाटेल कीं)जणूं(जगांत) फार राहिले असतील तर (साऱ्या) दिवसांतून एक घटकाभर. (लोकांस ईश्वराज्ञा पोहोंचवावयाची होती ती) पोहोंचविली. तर (आतां ह्यानंतर) जे लोक आज्ञाभंजक असतील तेच मात्र नाश केले जातील. ३५.

# अध्याय ४७ वा.

## सूरतु–मोहंमद.

हा मदिना शहरीं प्रकट झाला. यांत ३८ महावाक्यें आहेत. त्याचें नांव 'सूरतु–मोहंमद' ह्मणजे हजरत मोहंमद–परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांति देवो–यांचें प्रकरण असें पडण्याचें कारण हें कीं यांत या महान् व शेवटच्या पैगंबरांचें प्रामुख्य व महत्त्वें प्रदर्शित केलें आहे; व यांच्या पुर्वींच्या पैगंबरांविषयीं पुज्यबुद्धि बाळगून यांच्या शिक्षणाप्रमाणें म्हणजे कुराणाप्रमाणें आचरण्यास सांगितलें आहे. शिवाय यांत सद्धर्मसंरक्षणार्थ युद्ध करण्याची पाळी आल्यास तें करण्याचीहि परवानगी आहे; म्हणून याला 'सूरतुल्–कित़ाल'–युद्ध प्रकरण–असेंहि म्हणतात.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

ज्या लोकांनीं (सद्धर्मास) नाकारिलें व परमेश्वराच्या मार्गापासून (लोकांस) अडकविलें, परमेश्वरानें त्यांचीं कर्में निष्फळ करून टाकिलीं. १. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं; आणि (कुराण) जें 'मोहंमद'ला प्रकट झालें आहे त्यावरहि विश्वास ठेविला कीं तें सत्य होय (व) त्यांच्या पालनकर्त्याकडूनच (प्रकट झालें) आहे; परमेश्वरानें त्यांचीं पातकें त्यांजपासून निरस्त केलीं व त्यांची (ऐहिक व पारमार्थिक) स्थितिहि सुधारिली. २. हें (स्थित्यंतर) या करितां होय कीं, ज्या लोकांनीं (सद्धर्मास) नाकारिलें त्यांनीं असत्याचें अनुकरण केलें आणि ज्यांनीं विश्वास धरिला ते आपल्या पालनकर्त्याच्या सत्य (मार्गा)वर चालले. अशा रीतीनें परमेश्वर लोकांच्या (समजण्या)-साठीं त्यांचेच दृष्टांत सांगतो. ३. तर (मुसलमानांनों ! लढाईत) जेव्हां नास्तिकांशीं तुमची भेटाभेट होईल, तेव्हां (बेलाशक त्यांच्या) माना

उडवून टाका; येथपर्यंत कीं जेव्हां तुम्हीं खूप त्यांचा जोर मोडून टाकाल, तेव्हां तुम्हीं त्यांच्या मुस्क्या बांधून टाका (म्हणजे कैद करा). मग(कैद केल्या)नंतर एक तर परोपकार करून, (सोडून देणें) किंवा खंड घेऊन; येथपर्यंत कीं (शत्रु) लढाईचीं हत्यारें ठेवून देतील. हा (आमचा हुकूम आहे व याची बजावणी झाली पाहिजे). आणि परमेश्वर इच्छिता तर (लढण्याची पाळीच न येती; व एरव्हींच) तो त्यांच्यापासून बदला घेता. परंतु (त्याला तर हें) मंजूर होतें कीं, एकाला एकाशीं (लढवून तुह्मां सर्वांस) कसून पाहावें. आणि जे लोक परमेश्वराच्या मार्गांत मारले गेले त्यांचीं कर्में परमेश्वर कधींच वाया जाऊं देणार नाहीं. ४. (किंबहुना) तो त्यांना (उद्दिष्ट) मार्गास लावून देईल व त्यांची अंतर्दशा सुधारील; ५. आणि त्यांना स्वर्गांत नेऊन दाखल करील कीं, ज्याचा अहवाल त्यानें त्यांस (पूर्वींच) सांगून ठेविला आहे. ६. अहो मुसलमानांनों! जर तुम्हीं परमेश्वरा(च्या धर्मा)ची मदत कराल तर तो तुमची मदत करील आणि (शत्रूच्या विरुद्ध) तुमचे पाय दृढ जमवून ठेवील. ७. आणि जे लोक (सद्धर्मास) नाकारितात, त्यांचे पाय उखडूनें जातील; आणि त्यांचें सारें केलें सवरलें परमेश्वर अकीत करून टाकील. ८. हें यासाठीं होय कीं, परमेश्वरानें जो (धर्म) उतरला तो त्यांनीं पसंत केला नाहीं; परिणाम हा झाला कीं, परमेश्वरानें त्यांचीं कर्में अक्रीत करून टाकिलीं. ९. कां हे लोक मुलखांत चालले फिरेल नाहींत? (चालते फिरते) तर ते पाहाते कीं, जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत त्यांचा कसा परिणाम झाला? परमेश्वरानें त्यांचा विध्वंस करून टाकिला; आणि असलेच कांहीं (दुष्परिणाम या) नास्तिकांसहि

(१) शब्दशः अर्थ तर हा होता कीं 'लढाई आपलीं हत्यारें ठेवून देईल. ही अरबी भाषासरणी होय. मराठींत असें बोलत नाहींत. म्हणूनच आम्हीं हा अर्थ पत्करला आहे. भावार्थ हा कीं शत्रूंत लढण्याची ताकद राहणार नाहीं व लढाई बंद होईल.

(१) शब्दकोशांत 'तअस्' याचे अनेक अर्थ लिहिलेले आहेत. त्यांतून दोन अर्थ येथें उचित आहेत. एक अर्थ आम्हीं जो भाषांतरांत पत्करला आहे तो व दुसरा हा कीं, ते नाश पावतील किंवा त्यांचा सत्यनाश होईल.

(घडणार) आहेत. १०. हें यामुळें कीं होय ज्यांनीं विश्वास धरिला आहे त्यांचा पुरस्कर्ता (व मदतगार) तर परमेश्वर होय; आणि यामुळें कीं नास्तिकांचा कोणीच पुरस्कर्ता (व मदतगार) नाहीं. ११. ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं, निःसंशय परमेश्वर त्यांना (स्वर्गाच्या अशा) बागांत नेऊन दाखल करील कीं, ज्यांच्या खालून नद्या वाहत असतील; आणि जे नास्तिक होत ते (जगांत निश्चिंत) सुखोपभोग घेतात, व ज्याप्रमाणें चतुष्पाद जनावरें खात (पीत) असतात त्याप्रमाणें हेहि (वाटेल तें) खातात (पितात); आणि यांचें (शेवटचें) ठिकाण नरकाग्नि होय. १२. आणि (हे पैगंबरा !) तुझी (ही) वस्ति ('मक्का') जेथील लोकांनीं तुला (घरांतून) काढून लाविलें याहूनहि कित्येक वस्त्या फारच बलवत्तर होत्या, कीं आम्हीं त्यांचा नाश करून टाकिला व कोणीहि त्यांच्या मदतीस उभा राहिला नाहीं. १३. तर कां जे लोक आपल्या पालनकर्त्याच्या (सरळ व) खुल्या मार्गावर होत ते, ज्यांचीं कुकर्मे त्यांना सुशोभित करून दाखविलीं गेलीं आहेत व जे आपल्या मनेच्छेप्रमाणें वागतात, त्यांजसारखेच (झाले गेलेले) आहेत? १४. ज्या स्वर्गाचें अभिवचन (परमेश्वराला) भिऊन वागणाऱ्यांस दिलें जातें त्याची तऱ्हा अशी होय कीं, त्यांत (अशा) पाण्याच्या नद्या होत कीं ज्यांत (नांवासहि) वास नाहीं, व (अशा) दुधाच्या नद्या होत कीं, ज्यांची रुचि (मुळींच) बदलली नाहीं, आणि (अशा) मद्याच्या नद्या होत कीं जें सेवन करणाऱ्यांस फारच रुचिकर लागेल; व (तशाच) स्वच्छ (व निर्मल) मधाच्या नद्याहि होत; आणि त्यांना तेथें हरतऱ्हेची फळफळावळ (प्राप्त) होईल व त्यांच्या पालनकर्त्याकडून (पापांची) क्षमा (ती वेगळीच). (कां अशा स्वर्गाचे रहिवाशी,) जे लोक नित्य अग्नींत (पडून जळत) असतील आणि (तहान लागेल तर) त्यांना कढ आलेलें पाणी पाजलें जाईल व तें (मारून) त्यांच्या आंतड्यांचे तुकडे तुकडे करून टाकील, त्यांच्या सारखेच होऊं शकतात? १५. आणि (हे पैगंबरा !) यांच्यांतून कोणी असेहि होत कीं, जे (कुराण ऐकण्यासाठीं दिसण्यांत) तुजकडे कान तर लावतात; परंतु जेव्हां तुझ्या पासून (उठून) बाहेर जातात, तेव्हां ज्या लोकांस (धर्मविषयक) ज्ञान

दिलें गेलें आहे त्यांस ते विचारितात, (काय हो!) या (गृहस्थानें) नुक्तेंच आतां काय सांगितलें? हेच लोक होत कीं, ज्यांच्या अंतःकरणांवर परमेश्वरानें मोहोर लावून टाकिली आहे व ते आपल्या मनेच्छेप्रमाणें वागतात. १६. आणि जे लोक सन्मार्गोन्मुख होत (ते जेव्हां जेव्हां कुराण ऐकतात तेव्हां तेव्हां) त्यांना परमेश्वर (या कुराणाच्या प्रभावानें आणखी) अधिकाधिक सन्मार्ग दाखवितो; आणि (तशीच) त्यांना (परमेश्वराला) भिऊन आचरणें(ची सुबुद्धि) देतो. १७. तर कां हे लोक फक्त (पुनरुत्थानाच्या) घटकेची वाट पाहतात कीं, ती एकदम यांच्यापुढें यावी? तथापि तिच्या निशाण्या[1] तर येऊनच चुकल्या आहेत. मग जेव्हां ती (घटका) यांच्यासमोर येऊन ठेपेल तेव्हां यांचें समजणें यांना काय (उपयोगी) होणार? १८. तर (हे पैगंबरा! पक्कें) जाणून ठेव कीं, परमेश्वराशिवाय अन्य कोणी उपास्य (देव) नाहीं; आणि तूं (मजपाशीं) आपल्या[2] पापांची क्षमा मागीत रहा व (तशीच) विश्वासू पुरुष व विश्वासू स्त्रियांसाठींहि (क्षमा मागीत राहा) आणि (कामकाजासाठीं) तुम्हां लोकांचें चालणें फिरणें व (विश्रांतिकरितां घरांत येऊन) राहणें हें(सर्व) परमेश्वराला माहीत आहे. १९. आणि ज्यांनीं (खरा) विश्वास धरिला

---

(१) पुनरुत्थानाच्या जवळ येण्याच्या निशाण्यांत सर्वांत मोठी निशाणी, आमच्या या शेवटच्या म्हणजे कलियुगाच्या पैगंबरांचें प्रगट होणें व पाठविलें जाणें हें होय; तर तें होऊन चुकलें. याशिवाय हजरत पैगंबरसाहेबांच्या वचन-संग्रहांत पुनरुत्थानाचीं पुष्कळ चिन्हें उपलब्ध आहेत; त्यांतल्यात्यांत पाप व बदफैलीचें पसरणें आणि धर्मज्ञानाचें उच्चाटन होणें वगैरे वगैरे.

(२) पैगंबरांस उद्देशून परमेश्वर जें कांहीं आज्ञापितो तें त्यांच्या अनुयायांस शिक्षण असतें. म्हणूनच पैगंबरसाहेब दिवसांत शंभरदां परमेश्वराची क्षमा भाकीत असत व लोकांस कित्ता घालून देत असत कीं, त्यांनीं आपल्या पापांबद्दल व इतर विश्वासू लोकांच्या पापांबद्दल स्वार्थबुद्धि न बाळगतां क्षमा मागीत राहावें. यावरून पैगंबरावर पापारोप करणें हा निव्वळ मूर्खवाद होय. तर हजरत मोहंमद पैगंबरसाहेब इतर पैगंबरांप्रमाणें निष्पाप होते; कारण त्यांनीं पाप—ईश्वराज्ञोल्लंघन-कधींहि केलें नाहीं. ईश्वरप्रणीत कुराणास अनुसरून त्यांचें नित्य वर्तन असे.

आहे ते ही उत्कंठा जाहीर करतात कीं जर ('जिहाद'–धर्मयुद्धां-संबंधीं) एखादा अध्याय प्रकट होईल तर बरें होईल (कीं सर्व त्या हुकमाची अमल बजावणी करतील). मग जेव्हां एखादा स्पष्ट व असंदिग्ध अध्याय प्रकट होईल व त्यांत लढाईचा उल्लेखहि असेल; तेव्हां(हे पैगंबरा !) ज्या लोकांच्या अंतःकरणांत (दांभिकपणाचा) रोग होय त्यांना तूं पहाशील कीं ते तुजकडे असे (भयभीत होऊन) पाहात आहेत कीं जशी एखाद्याला मृत्यूची मूर्च्छा येते (व त्याचे डोळे फाटलेलेच राहून जातात). तर त्यांना उचित होतें, २०. (पैगंबराचें) आज्ञापालन (करणें) व (कांहीं विचारल्यास) यथायोग्य (निस्पृहपणें) उत्तर देणें; आणि जेव्हां (लढाईचा-) हुकूम निश्चित होईल तेव्हां हे लोक परमेश्वराला सत्य जाणित असतील, तर हेंच त्यांच्याठायीं उत्तम होय. २१. तर (दांभिकांनों !) कां तुम्हांला हें कांहीं दुरापास्त आहे, कीं जर (जिहाद–धर्मयुद्ध करण्यापासून) तुम्हीं फिरून पडाल तर (अशा स्थितींतहि) मुलखांत तुम्हीं नासाडी माजवूं लागाल व आपले आप्तसंबंध तोडूं[1] लागाल ? २२. हेच लोक होत कीं ज्यांना परमेश्वरानें शापग्रस्त केलें व यांना (सत्यगोष्टी कडून) बहिरे केलें आणि (सरळ मार्गाकडून) यांचे डोळे आंधळे करून टाकिले. २३. कां हे लोक कुराणा(च्या अर्था)चें मनन करीत नाहींत ? अगर (यांच्या) अंतःकरणावर कुलपें (लागलेलीं) आहेत ? २४. निःसंशय ज्या लोकांस (धर्माचा) सरळमार्ग स्पष्टपणें दिसून आला (व) त्या उपरांतहि ते आपल्या मागल्या पायींच फिरून गेले; त्यांना सैतानानें झुगारपट्टी दिली आहे व त्यांच्या (आशेच्या) दोऱ्या लांबविल्या[2]

(१) भावार्थ हा कीं; जिहाद–धर्मयुद्ध–जें केलें जातें तें मुलखांत शांतता नांदावी म्हणून. आणि दांभिक लोक जे त्यापासून जीव चोरतात व धर्मयुद्धास फंदफितुर समजतात तर हें त्यांचें निमित्त आहे. युद्ध न केलें जाईल तरीहि हे लोक यादवी व लूटमार करीत राहतात व आप्तसंबंध वगैरे कोणत्याच गोष्टीचा विचार ठेवित नाहींत; आणि पुढेंहि असले बखेडे करायास चुकणार नाहींत.

(२) मूळ अर्थ 'त्यांना अवकाश देऊन ठेविला आहे' असा आहे. आम्हीं बरोबर अर्थबोध व्हावा म्हणून (आशारूपी) दोऱ्या लांबविल्या' असें लिहिलें

आहेत. २५. हें (या लोकांचें फिरून जाणें) या कारणामुळें होय कीं जे लोक (कुराण) जें परमेश्वरानें प्रकट केलें आहे, त्यास नापसंत करतात (उदाहरणार्थ यहुदी), त्यांस हे (दांभिक) सांगत राहतात कीं कित्येक प्रकरणांत आम्हीं तुमच्याच सल्ल्याप्रमाणें चालूं; आणि परमेश्वर त्यांच्या चोरट्या कुजबुजीस (खूप) जाणतो. २६. मग जेव्हां दूत यांचे प्राण हरण करितील (व) यांच्या तोंडावर व यांच्या ढुंगणावर मारीत जातील तेव्हां त्यांची कशी (गत) होईल? २७. ही (त्यांची गत) यासाठीं (होईल) कीं, जी गोष्ट परमेश्वराची खप्पा मर्जी करिते तिचेंच ह्यांनीं अनुकरण केलें व त्याची प्रसन्नता पसंत केली नाहीं; म्हणून परमेश्वरानेंहि त्यांचीं कर्में अक्रीत करून टाकिलीं. २८. कां ज्या लोकांच्या मनांत (दांभिकपणाचा)रोग आहे ते या विचारांत आहेत कीं परमेश्वर त्यांचे हृदयस्थ द्वेष कधींच उघडकीस आणणार नाहीं? २९. आणि (हे पैगंबरा!) आम्हीं इच्छितों तर तुला हे लोक (अशा चांगल्या तऱ्हेनें) दाखवून देतों कीं तूं त्यांना त्यांच्या चेहऱ्यानेंच ओळखून घेतास; आणि (एरवींहि) तूं त्यांना (त्यांच्या) बोलण्याच्या छटेंतच अवश्य ओळखून घेशील. आणि परमेश्वर तुम्हां सर्वांच्या कृत्यांस (खूप) जाणतो. ३०. आणि (मुसलमानांनों!) तुम्हां (सर्वां)स आम्हीं अवश्य पडताळून पाहूं; येथपर्यंत कीं तुमच्यांत जे धर्मयोद्धे व (लढाईचीं संकटें) सहन करणारे होत त्यांस आम्हीं (चांगल्याप्रकारें) जाणून घेऊं आणि तुमचा अहवालहि ताडून पाहूं. ३१. निःसंशय ज्या लोकांवर (धर्माचा) सरळमार्ग स्पष्ट जाहीर होऊन गेला, (व) त्यानंतर त्यांनीं (त्यास) नाकारिलें व परमेश्वराच्या मार्गापासून (लोकांस) प्रतिबंध केला आणि पैगंबराचा विरोध केला, हे लोक परमे-

---

आहे. मतलब हा कीं सैतानानें त्यांना समजावून ठेविलें आहे कीं, जिहाद न कराल तर बहुतकाळ जगाल.

(१) दांभिक लोक जगजाहिरपणें मुसलमानांशीं विरोध करीत नव्हते. परंतु आंतल्या आंत यहुद्यांशीं मिळालेले होते. अध्याय ५९ सुरतुल–हश्र्च्या ११ व्या महावाक्यांत, दांभिकांचे जे बोल दिले आहेत त्याच प्रकारची ही कुजबुज व चोरटे संभाषण असावें.

श्वराला तर कोणाहि तऱ्हेचें नुकसान पोहोंचवूं शकणार नाहींत; किंबहुना तो त्यांचींच कर्में अक्रीत करून टाकील. ३२. अहो मुसलमानांनों! परमेश्वराची आज्ञा पाळा व पैगंबराची आज्ञा पाळा; आणि (पैगंबराचा विरोध करून) आपलीं कर्में निष्फळ करूं नका. ३३. निःसंशय ज्या लोकांनीं नास्तिकपणा केला व (लोकांस) परमेश्वराच्या मार्गापासून अडविलें आणि नास्तिक असतांनाच मरून गेले; त्यांस परमेश्वर कधींहि क्षमा करणार नाहीं. ३४. तर (मुसलमानांनों!) नेभळे बनूं नका आणि (स्वतः निरोप पाठवून शत्रूंस) समेटाकडे बोलावूं नका; व (जाणून असा कीं अखेर) तुम्हींच वरचढ राहाल. आणि परमेश्वर तुमच्या संगतीं आहे व तुमच्या कर्मां(च्या पुण्यफळां)त कधींहि कोणाहि प्रकारची कमी करणार नाहीं. ३५. हें इहलौकिक आयुष्य (ह्मटलें म्हणजे) केवळ खेळ व तमाशा होय. आणि जर तुम्हीं (परमेश्वरावर) विश्वास ठेवाल व (त्याला) भीत राहाल, तर तो तुम्हांस तुमचीं प्रतिफलें देईल आणि तो (आपल्यासाठीं) तुमचे माल तुम्हांपासून मागणार नाहीं. ३६. (आणि असें समजा,) जर तो तुम्हांपासून (आपल्यासाठीं) तुमचे माल मागील व तुम्हांस अगदींच निकड लावील, तर तुम्हीं (अवश्य) कृपणपणा कराल व त्यानें तुमचे हृदयस्थ द्वेष[1] उघडकीस येतील. ३७. तुम्हीं लोक ऐकून घ्या कीं, (परमेश्वराला तर तुम्हीं काय द्याल?) तुम्हीं तर असे (मनाचे कृपण) आहां कीं तुम्हांला परमेश्वराचे मार्गांत (आपल्या सार्वजनिक कल्याणासाठीं) खर्च करावयास बोलाविलें जातें, यावरहि तुमच्यांत असे (बहुतेक) आहेत कीं जे कृपणपणा करतात; आणि जो कृपणपणा करितो तो खरोखरींच खुद्द आपल्याचठायीं कृपणपणा करितो. नाहींपेक्षां, परमेश्वर तर निरपेक्ष होय व तुम्हीं (त्याचे) गरजवंत आहां. आणि जर तुम्हीं (ईश्वरी आज्ञेकडून) तोंड फिरवाल, तर (परमेश्वर) तुमच्या शिवाय दुसऱ्या लोकांस (तुमच्या ऐवजीं) आणून बसवील; व मग ते तुम्हांसारखे (संकोचित मनाचे) होणार नाहींत. ३८.

(१) द्वेष म्हणजे प्रत्येक कृपणास याचकांशीं सामान्यतः असतो तो; अथवा पूर्वींपासूनच मुसलमानांशीं त्या लोकांच्या मनांत जो द्वेष होता तो असावा.

# अध्याय ४८ वा.

## सूरतुल्–फत्ह्.

'सूरतुल्-फत्ह्' हा अध्याय मदिनेंत प्रकट झाला. व यांत २९ आयात–महावाक्यें आहेत. याचें 'सूरतुल्-फत्ह' ह्मणजे विजयाचें प्रकरण असें नांव पडण्याचें कारण हें कीं, यांत होदेबिया येथें हजरत पैगंबरसाहेबांचा नास्तिकांशीं झालेला तह कीं, ज्याचें पर्यवसान तहाच्या दोन वर्षांनंतर मुख्य क्षेत्र मक्केच्या विजयांत झालें त्याचें व 'खैबर' येथें पुढें लवकरच झालेल्या विजयाचें वर्णन आहे. आणि फारस म्हणजे इराण व रोम ह्मणजे ग्रीस इकडील मोठमोठे विजय कीं जे खलिफा म्हणजे हजरत पैगंबर साहेबांनंतरचे लोकनियुक्त धर्माध्यक्ष व राजे यांच्या व प्रमुखत्वानें हजरत उमर बिन खत्ताब यांच्या अमदानींत घडून आले त्यांचें भविष्यरूपानें दिग्दर्शन झालें आहे; म्हणून हें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)**

**(हे पैगंबरा! हा 'हुदेबिया'चा तह म्हटला म्हणजे) खरोखरींच आम्हीं तुला एक प्रत्यक्ष विजय (मिळवून) दिला आहे; १. अशासाठीं कीं,**

---

(१) हिजरी सनाच्या सहावें वर्षी हजरत पैगंबर साहेबांनीं स्वप्नांत पाहिलें कीं, मुसलमान मक्केच्या सन्माननीय मशीदींत गेले आहेत व तेथें 'एहराम' म्हणजे हज्जचीं वस्त्रें उतरण्यासाठीं कोणी बसून डोसकें मुंडवीत आहेत व कोणी केंस कातरवीत आहेत. सारांश पैगंबरांचें स्वप्न खोटें होत नसतें. पैगंबरांनीं 'उमरा'–तीर्थ–करायाचा बेत करून ते मक्केच्या जवळ जवळ पोहोंचले; तेव्हां तेथील कुरेशी नास्तिक वगैरे हें ऐकून लढाई देण्यासाठीं सज्ज होऊन बाहेर आले. त्यांची तयारी पाहून पैगंबर साहेबांनीं हुदेबिया येथें तळ दिला; व उभयपक्षांत तहाचें बोलणें चाललें. अखेर मोठ्या परिश्रमानें तह ठरला. तो असा:–दहा. वर्षांपर्यंत मुसलमानांमध्यें व कुरेशीयांमध्यें लढाई

**(तूं या विजयाच्या आभारप्रदर्शनार्थ सद्धर्माच्या प्रगतीकरितां अधिकाधिक झटावेंस; आणि) परमेश्वरानें (त्याच्या ऐवजीं) तुझें मागचें व पुढचें पाप क्षमा करावें व तुजवर आपले उपकार पूर्ण करावेत आणि तुला (धर्माच्या) सरळ मार्गावर चालवावें (कीं कोणीहि तुझ्या आड येऊं नये); २. आणि हें कीं, परमेश्वरानें तुला जबरदस्त साहाय्य करावें. ३.**

---

बंद राहावी, व हजरत पैगंबर साहेबांनीं या वेळीं 'उमरा'–तीर्थ केल्यावांचून परतावें व पुढील सालीं 'उमरा' करावा; पण त्यावेळींहि कोणा मुसलमानानें म्यानेंतून तलवार काढूं नये व तीन दिवसापेक्षां अधिक **मक्केंत** राहूं नये. तहाच्या मध्यंतरीं कोणी मुसलमान कुरेशीयांस जाऊन मिळेल तर त्यास कुरेशीयांनीं परत देऊं नये; पण त्यांचा कोणी मनुष्य मुसलमानांकडे आल्यास त्यांनीं त्यांस परत द्यावें. हा तहनामा पैगंबर साहेबांनीं दबून केला म्हणून मुसलमानांस फारच वाईट वाटलें. त्यावेळीं कित्येक मुसलमानांच्या मनांत हा विचार आला कीं, पैगंबरांनीं हें कसलें स्वप्न पाहिलें होतें ? कित्येक दांभिक तर अशी शंका काढूं लागले होते कीं, जर परमेश्वर इस्लामाचा पुरस्कर्ता असता तर हा तह दबून कां केला जाता ? कांहीं लोक पहिल्यानेंच मागें राहून गेले होते त्यांना खात्री होती कीं मुसलमानांस **मक्केकर** आंत शिरूं देणार नाहींत;व झालेंहि असेंच. हा तह दिसण्यास दबून केला गेला; परंतु त्यांत खरोखरींच मुसलमानांची जीत होती. कारण प्रथमावस्थेंत नित्य लढाई होत असल्यामुळें ती त्यांना पणपूं देत नसे. त्यांना हेंहि माहीत होतें कीं, कुरेशीयांकडून अवश्यच तह होईल व झालाहि. तो असा कीं, **बनी–खुजाअ:** व **बनी–बक्र्** हीं दोन घराणीं होतीं. **बनी–खुजअ:**हे मुसलमानांचे तरफदार होते व **बनी–बक्र्** हे कुरेशीयांचे तरफदार होते; तर तहाप्रमाणें या दोन्ही घराण्यास तहाच्या अटी पाळणें आवश्यक होतें ; परंतु हे उभयतां लढले; व कुरेशीयांनीं गुप्त रीतीनें **बनी–बक्र्**ला कुमक दिली, अशा रीतीनें हुदेबियाचा तह मोडून गेला. मुसलमानांस वादाचें कारण मिळालें व त्यांनीं **मक्केवर** स्वारी केली. परमेश्वराची करणी अशी झाली कीं **मक्का** लढल्या भिडल्यावाचून जिंकिला गेला.

(२) मागचें पाप म्हणजे कुराण प्रकट होण्याच्या अगोदर जीं अपुरीं धर्मशास्त्रें होतीं व ज्यांस कुराणानें खोडून टाकिलें आहे त्या प्रमाणें पैगंबर होण्या

तो (परमेश्वर)च तर होता कीं, ज्यानें मुसलमानांच्या अंतःकरणांत शांति उतरली; कीं, त्यांच्या (पूर्वींच्या) विश्वासाबरोबर आणखीहि त्यांचा विश्वास वाढावा. आणि आकाश व पृथ्वी (च्या सृष्टीं)चीं सैन्यें (सारीं) परमेश्वराचींच होत; आणि परमेश्वर (हरेक वेळेचें प्रयोजन) जाणता (व) बुद्धिमान् होय. ४. (आणि मुसलमानांच्या मनांत शांति भरविण्याचा एक उद्देश हाहि होता) कीं (त्यांनीं इस्लामावर दृढ राहावें व अखेर) परमेश्वरानें विश्वासू पुरुष व विश्वासू स्त्रीयांस (स्वर्गाच्या) अशा बागांत नेऊन दाखल करावें कीं, ज्यांच्याखालून नद्या वाहत असतील (व ते) नित्यनिरंतर त्या (बागां)तच राहतील; आणि (तसेंच हें कीं,) त्यांच्यापासून त्यांच्या पापांचें निरसन करावें. आणि परमेश्वरासमीप हें मोठें साफल्य होय. ५ आणि(तसेंच हें कीं)दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया आणि मूर्तीपूजक पुरुष व मूर्तीपूजक स्त्रिया कीं जी परमेश्वरासंबंधानें(तऱ्हेतऱ्हेचे) वाईट ग्रह बाळगितात त्यांस त्यानें शिक्षा द्यावी.आतां यांच्यावरच अरिष्टाचें परचक्र आलें. आणि परमेश्वर यांच्यावर कोपायमान झाला; आणि त्यानें यांस शापग्रस्त केलें. आणि (याशिवाय) त्यानें यांच्याकरितां 'जहन्नम'–नरकाग्नि तयार करून ठेविला आहे. आणि तें फारच वाईट ठिकाण होय. ६. आणि आकाशां(च्या) व पृथ्वीं (च्या सृष्टीं)चीं सैन्यें (सर्व) परमेश्वराचींच होत आणि परमेश्वर परम समर्थ व बुद्धिमान होय. ७. (हे पैगंबरा !) आम्हीं तुला (आपल्या व्यक्ति व विशेषणांचा) साक्षी आणि (विश्वासूंना) शुभवर्तमान व (नास्तिकांस)भय ऐकविणारा (करून) पाठविला आहे.८. आणि (मुसलमानांनो ! आम्हीं याला यासाठीं पैगंबर बनवून पाठविलें आहे) कीं तुम्हीं लोकांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विश्वास धरावा व (परमेश्वराच्या धर्माची मदत करून) परमेश्वरास मदत करावी व त्याचा आदर बाळगावा; आणि सकाळसंध्याकाळ त्याच्या पवित्र्यवर्णनांत लागून राहावें. ९. (हे पैगंबरा !) जे लोक ('हुदेबिया'चे

पूर्वींचें तुझें आचरण; पुढचें पाप जे पैगंबरी पद मिळाल्यानंतर व या विजया पूर्वीं शत्रूंच्या भीतीनें धर्मप्रसारांत जी हयगय व कोताई होत होती ती. हा पैगंबराच्या अनुयायांसही लागू करता येते. कारण पैगंबराच्या आदेशांत अनुयायांसहि शिक्षण असतें.

**तहाचेवेळीं) तुझ्या हातावर हात देऊन (लढण्यामरण्याची) प्रतिज्ञा[1] करीत आहेत, ते (केवळ तुझ्याशीं नव्हे तर) परमेश्वराशीं प्रतिज्ञा करीत आहेत; (कारण तुझा नव्हे तर) परमेश्वराचा हात[2] त्यांच्या हातावर होय. म्हणून जो (असें पक्के वचन दिल्यावर तें) वचन मोडून टाकील; तर तो जें वचन मोडील त्याचा दुष्परिणाम खुद्द त्याच्याच पुढें येईल. आणि जो कोणी, परमेश्वराशीं त्यानें जो करार केला आहे तो पुरा करील, त्याला परमेश्वर लवकरच मोठें प्रतिफल देईल. १०. (हे पैगंबरा!) गांवढळ लोक जे मागें राहून गेले (व या 'हुदेबिया'चे**

(१) अरबींत 'बैअत' या शब्दाचा अर्थ हातावर हात देऊन आपल्या राजास किंवा अध्यक्षास तुह्मीं सांगितलेल्या गोष्टी आम्हांला मान्य आहेत व त्याप्रमाणें आह्मीं वर्तू असें प्रतिज्ञेवर कबूल करणें किंवा थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे स्वराजनिष्ठा जाहीर करणें असा होतो. वास्तविक पाहतां, ही, प्रजेनें किंवा सैन्यानें घ्यावयाची एक शपथ असते.

(२) परमेश्वर निरवयव व निराकार ह्मणून हात या शब्दाचा अक्षरशः अर्थ न घेतां, आश्रय, सहाय्य, सामर्थ्य किंवा असाच कोणी एखादा अर्थ घेतला पाहिजे. परमेश्वरानें कुराण हें आम्हां मानवांच्या भाषासरणीस अनुसरून प्रकट केलें आहे. ह्मणून परमेश्वराचे हात, पाय व तोंड वगैरे कल्पून त्याला सावयव व साकार मानणें बरोबर नव्हे. अशाच कल्पना मूर्तीपूजेच्या बुडाशीं असाव्यात हें संभवित आहे. परमेश्वराचा हात त्यांच्या हातावर आहे ह्मणजे परमेश्वर वरून निरीक्षित आहे व पैगंबरास ते शपथेवर जें अभिवचन देतात त्याचा तो साक्षी असून त्याचें प्रतिफल तो त्यांना देईल. अगर लोकांनीं ही जी शपथ वाहिली आहे ती परमेश्वराची मर्जी संपादण्यासाठींच होय; तर परमेश्वरानें हजरत पैगंबरसाहेबांचें आपल्याशीं असलेलें सान्निध्य प्रदर्शित करण्यासाठीं म्हटलें कीं, पैगंबरांचे हातावर शपथ वाहणें हें जणुं काय परमेश्वराचे हातावर शपथ वाहण्यासारखें आहे. पैगंबरांच्या ईश्वरसान्निध्यासंबंधानेंहि कुराणांत अशीं अनेक महावाक्यें असूनहि आह्मीं मुसलमान लोक, ज्याप्रमाणें खिस्ती लोक बायबलांतील मती ,योहान्न वगैरे मनुष्यांनीं लिहिलेल्या शुभवर्तमानांच्या शब्दांमुळें भ्रमिष्ट होऊन हजरत येशूस परमेश्वर मानतात त्याप्रमाणें न मानतां पैगंबरास पैगंबरच मानितों.

सफरींत सामील झाले नाहींत) ते आतां तुझ्यासमक्ष (खोटेंनाटें निमित्त) सांगतील कीं आम्हीं आपल्या मालमत्तेच्या व बायकापोरांच्या सांभाळण्यांत गुंतून राहिलों; म्हणून तूं आमचा (हा) अपराध परमेश्वरापासून) क्षमा करीव. (हे लोक) आपल्या जिव्हांनीं अशा गोष्टी बोलतात कीं ज्या यांच्या मनांत नाहींत.(हे पैगंबरा! तूं यांना)सांग कीं जर परमेश्वर तुम्हांस नुकसान पोहोंचवूं इच्छील अथवा तुम्हांस फायदा पोहोंचवूं इच्छील, तर कोण असा आहे कीं जो परमेश्वरापुढें(यांपैकीं)तुमचें कांहींहि करण्याची सत्ता बाळगितो ? (मालमत्ता व बायकापोरांचें तर निमित्तच निमित्त होय.) किंबहुना (गोष्ट ही होय कीं) जें कांहींहि तुम्हीं लोक करितां त्याशीं परमेश्वर वाकब होय. ११. (आणि तो जाणतो कीं तुम्हीं मालमत्ता व बायकांपोरांमुळें मागें राहिलां नाहींत;) किंबहुना (भीतीमुळें मागें राहिलां व) तुम्हीं असें समजलां कीं पैगंबर व मुसलमान हे आपल्या पोरांबाळांकडे कधींहि परतून येणारच नाहींत. आणि ही (गोष्ट) तुमच्या मनांत सुशोभित केली गेली होती; आणि तुम्हीं (तऱ्हेतऱ्हेच्या) वाईट कल्पना करूं लागलां होतां. आणि (असल्या विचारांनीं) तुम्हीं लोक आपणच हानि भोगणारे झालांत. १२. आणि जो कोणी परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजवर विश्वास न ठेवील, तर आम्हीं (असल्या) नास्तिकांसाठीं (नरकाचा) धगधगीत अग्नि तयार करून ठेविला आहे. १३. आणि आकाशाचें व पृथ्वीचें राज्य परमेश्वराचेंच होय. तो ज्याला इच्छील त्याला क्षमा करील व ज्याला इच्छील त्याला शिक्षा देईल. आणि परमेश्वर मोठा क्षमा कर्ता (व) दयाळू होय. १४. (मुसलमानांनों !) आतां जेव्हां तुम्हीं ('खैबर'ची) लूट घेण्यासाठीं जाऊं लागाल तेव्हां

(१) हुदेबिया येथील तह करून मोकळे झाल्यावर हजरत पैगंबर साहेब मदिने पासून कांहीं अंतरावर आलेल्या खैबर शहराकडे वळले; कारण तेथील यहुदी मुसलमानांस नेहमीं त्रास देत असत व त्यांच्या शांततेचा भंग करीत असत. खैबर येथें मोठमोठे अभेद्य किलेकोट असतांहि त्यावर मुसलमान काबिज झाले व पुष्कळ लुटीचा माल त्यांच्या हातीं लागला. खैबरच्या लुटी संबंधानें परमेश्वराची अशी आज्ञा होती कीं जे लोक हुदेबियाच्या प्रवासांत संगतीं होते त्याच लोकांस इचा हक्क आहे. दांभिक लोक जे हुदेबियांत मागें

जे लोक ('हुदेबिया'चे सफरींत) मागें राहून गेले होते ते (तुम्हांस) ह्मणूं लागतील कीं आम्हांलाहि तुम्हीं आपल्या संगतीं येऊं द्या; (यांत) त्यांचा उद्देश हा होय कीं परमेश्वराच्या वाणीस बदलून टाकावें; (म्हणजे ती पुरी होऊं देऊं नये. हे पैगंबरा ! तूं या लोकांस) सांग कीं तुम्हांस कधींहि आम्हां संगतीं येतां येणार नाहीं; परमेश्वरानें अगोदरच असें सांगितलें आहे. हें ऐकून (हे लोक) म्हणतील (कीं परमेश्वरानें तर काय सांगितलें असेल) पण (गोष्ट ही होय कीं) तुम्हीं आह्मांशीं मत्सर[1] बाळगितां. (मत्सर नव्हे;) पण हे लोक (मुळ हेतु) फारच कमी समजतात; (कीं हीं,'हुदेबिया'चे सफरींत मागें राहून जाण्याची शिक्षा होय.) १५. (हे पैगंबरा !) गांवढळ लोक जे ('हुदेबिया'चे सफरींत) मागें राहून गेले त्यांस सांगून ठेव कीं, तुम्हीं लवकरच ('इराण'च्या व 'रोम'म्हणजे 'ग्रीक'च्या) मोठ्या लढवय्या राष्ट्रां(चा सामना करण्या)साठीं[2] बोलाविले जाल; कीं तुम्हीं त्यांच्याशीं (एक तर)लढत राहल किंवा ते मुसलमानच होऊन जातील. म्हणून (त्या प्रसंगीं) जर तुम्हीं (परमेश्वराचा) हुकूम मानाल तर परमेश्वर तुम्हांस उत्तम मोबदला देईल; आणि जसें तुम्हीं पूर्वी ('हुदेबिया'चे सफरींत) तोंड चुकविलें होतें तसेंच जर तुम्हीं तोंड चुकवाल, तर तो तुम्हांला दुःखदायक शिक्षा करील. १६. (कोणा) आंधळ्यावर सक्ती नाहीं (कीं त्यानें खामखा युद्धांत सामील व्हावेंच), व (कोणा) लंगड्यावर सक्ती नाहीं आणि (कोणा) आजाऱ्यावरहि सक्ती नाहीं आणि जो परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा हुकूम मानील त्याला (परमेश्वर स्वर्गाच्या अशा) बागांत नेऊन दाखल करील कीं, ज्यांच्या खा-

---

राहून गेले होते त्यांनीं खैबरच्या स्वारींत मुसलमानांबरोबर जाऊं इच्छिलें व त्यांचा उद्देश हा होता कीं खैबरच्या लुटींत भाग घ्यावा. परंतु पैगंबर साहेबांनीं त्यांस परवानगी दिली नाहीं.

(१) तुम्हीं मत्सरामुळें आम्हांस बरोबर घेत नाहींत कीं, खैबरचे लुटींतून कोठें आम्हीं वांटा घेऊं नये.

(२) रोम ह्मणजे ग्रीक व इराण येथील लढाया हजरत उमरच्या कारकीर्दींत झाल्या आहेत ह्मणून हें महावाक्य हजरत उमरच्या भव्य खिलाफतीचे—ह्मणजे हजरत पैगंबरांच्या प्रतिनिधित्वाचें-शुभवर्तमान होय.

लून नद्या वाहत असतील; आणि जो तोंड चुकवील त्याला तो दुःख-कारक शिक्षा करील. १७. (हे पैगंबरा!) मुसलमान जेव्हां (एका बाभळीच्या) झाडाखालीं तुझ्या हातावर हात देऊन (लढण्या मरण्याची) प्रतिज्ञा¹ करीत होते, तेव्हां परमेश्वर (ही स्थिति पाहून अर्थात) त्या मुसलमानांशीं खुष झाला; व त्यानें त्यांच्या मनांतला सद्भाव जाणिला व त्यांस (चित्त–) समाधान दिलें आणि (त्याच्या) मोबदला, त्यानें त्यांस तूर्तातूर्त ('खैबर'चा) विजय दिला; १८. आणि (या व्यतिरिक्त) विपुल लूटहि कीं जी त्यांनीं काबिज केली; आणि परमेश्वर परम समर्थ व बुद्धिमान् होय. १९. (मुसलमानांनों!) परमेश्वर तुम्हांस विपुल लुटींचा वायदा करून चुकला आहे कीं, तुम्हीं त्यांजवर काबिज व्हाल; तथापि ही ('खैबर'ची लूट) त्यानें तुम्हांस तूर्त देवविली, आणि ('हुदेबिया'चे तहापरत्वें नास्तिक लोकांचे हात तुमच्या(अत्याचारा)कडून आवरून धरले (तें वेगळेंच). आणि (एक) उद्देश हाहि होता कीं, (ह्या गोष्टी तुम्हां–) मुसलमानांसाठीं (पैगंबराच्या सत्यत्वाचें एक) प्रमाण व्हावें व (तसेंच) हें कीं, परमेश्वरानें तुम्हांस (इस्लामधर्माच्या) सरळ मार्गावर चालवावें. (व कोणीहि तुमच्या आड येऊं नये.) २०.

---

(१) हुदेबियाच्या तहासंबंधानें उल्लेख करण्यासारख्या कांहीं गोष्टी आहेत; त्यांत 'बैअतु-रिद्वान्' ह्मणजे राजी असल्याबद्दल प्रतिज्ञा ही एक होय. ती अशी कीं, हजरत उस्मान हे मुसलमानांकडून मक्केकरांकडे तहाचें बोलणें घेऊन गेले होते; त्यांच्या परत येण्यांत वेळ लागला व येथें असा गवगवा झाला कीं, मक्केकरांनीं हजरत उस्मान यांस मारून टाकिलें. ह्मणून आतां निर्वाणीस लढण्याचें ठरलें. त्यावेळीं हजरत पैगंबरसाहेबांनीं लोकांपासून हातावर हात देऊन लढण्या मरण्याची प्रतिज्ञा घेतली, ती बैअतुर्रिद्वान् या नांवानें महशूर आहे. ती एका बाभळीच्या झाडाखालीं झाली होती अखेर त्या झाडाचा आदरहि फारच होऊं लागला म्हणजे जवळजवळ पूजाच होऊं लागली होती. ह्मणून पुढें हजरत उमर यांनीं त्या झाडाला मुळापासून उखडवून टाकलें. कारण इस्लामधर्मामध्यें एकाच व सर्वशक्तिमान् परमेश्वराशिवाय कोणाहि मनुष्याची किंवा वस्तूंची उपासना करणें निषिद्ध होय. दुसरी गोष्ट तहाच्या लेखासंबंधानें होय. ती पुढें याच अध्यायांत येईल.

आणि (याशिवाय एक विजय) आणखीहि (होणें आहे) कीं त्यावर (अजूनहि) तुम्हांला काबू मिळाला नाहीं; (पण) तो परमेश्वरानें (तुम्हां-साठीं) साधून ठेविला आहे. आणि परमेश्वर सर्व शक्तिमान् होय. २१. आणि जर नास्तिक (या वेळीं) तुम्हां(मुसलमानां)शीं लढते तर ते अवश्य पाठ फिरवून पळते; व मग त्यांना कोणी पुरस्कर्ता मिळाला नसता व कोणी मदतगारहि नसता. २२. (हा) जो परमेश्वराचा दस्तूर (होय) तो पूर्वींपासून चालतच आला आहे. आणि (हे पैगंबरा!) तुला परमेश्वराच्या दस्तुरांत कधींच फेरफार (होतांना) आढळणार नाहीं. २३. आणि (मुसलमानांनो!) तोच (परमेश्वर तर) होता कीं, ज्यानें ऐन 'मक्के'त तुम्हांस नास्तिकांवर विजय[2] दिल्यानंतर, त्यांचे हात तुम्हांपासून आवरून[3] धरले व तुमचे हात त्यांच्यापासून; आणि (त्यावेळीं) जें कांहींहि तुम्हीं (लोक) करीत होतां तें (सर्व) परमेश्वर पाहत होता. २४. (हे 'मक्के'कर) तेच तर होत कीं ज्यांनीं नास्तिकपणा केला व तुम्हांस सन्माननीय मशीदीं(-त जाण्या)पासून अडकविलें व यज्ञपशूंसहि (येऊं दिलें नाहीं) कीं (ते जेथल्या तेथेंच) अडकून राहिले (व) त्यांस आपल्या यज्ञवेदीजवळहि पोहोंचतां आलें नाहीं. आणि जर ('मक्का' शहरांत) कित्येक मुसलमान पुरुष व कित्येक मुसलमान स्त्रिया अशा

---

(१) ही मक्केच्या विजयाकडे इषारत आहे.

(२) या महावाक्यांत मजकूर तर आहे हुदेबियाच्या तहाचा; त्याच विवे-चनांत मुसलमानांचा विजय झाला असें सुचविलें आहे, ही गोष्ट दिसण्यांत परस्पर विरोधक दिसते. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, हुदेबियाच्या तहाचें बोलणें चाललेंच होतें कीं, कुरेशी नास्तिकांचीं सत्तर ऐशीं माणसें, मुसल-मानांवर छापा घालण्याच्या उद्देशानें 'जबले-तनूईम' या पर्वतावरून उतरून आलीं. मुसलमान अगदीं तयार व सावध होतेच. त्यांनीं त्यांस गिरफदार केलें. हाहि एका प्रकारचा विजय होय. परंतु पैगंबरसाहेबांनीं त्यांस सोडून दिलें; आणि जर त्यांस न सोडते तर खामखा खुद्द मक्काशहरांत तलवार चालती व तह व्हावयाचा तो न होता.

(३) हात आवरून धरणें म्हणजे एकमेकांवर अत्याचार करूं न देणें.

नसत्या कीं ज्यां(च्या स्थिती)शीं तुम्हीं वाकब नव्हता (व लढाईच्या स्थितींत) तुम्हीं त्यांना पादाक्रांत करून टाकतां; आणि त्यांच्याकडून तुम्हांस नकळत नुकसान[1] पोहोंचून जातें; (तर एव्हांच एकतर्फी प्रकरण होऊन जातें. परंतु परमेश्वरानें 'हुदेबिया'चे तहाचे वेळीं यासाठीं लढाई होऊं दिली नाहीं) कीं, परमेश्वरानें (या अवधींत) ज्याला (ज्याला) तो इच्छील त्याला आपल्या दयेंत (म्हणजे इस्लामधर्मांत) दाखल करावें. जर ('मक्का'वासी मुसलमान 'मक्के'हून कोठें) एकी-कडे निघून गेले असते, तर ('मक्के'करांपैकीं) ज्यांनीं ज्यांनीं नास्तिकपणा केला त्या (सर्वां)सच आम्हीं दुःखदायक शिक्षा देतों. २५. (हा त्या वेळेचा वृत्तांत होय कीं,) जेव्हां नास्तिकांनीं आपल्या मनांत आढ्यता[2] धरिली, (व आढ्यताहि) अज्ञानकाळाच्या आढ्यतेसारखी; तेव्हां परमेश्वरानें आपला पैगंबर व मुसलमान यांस आपल्याकडून (सहनशी-

---

(१) भावार्थ हा कीं, मक्केंत पुष्कळ लोक नास्तिकांच्या भीतीनें लपूनछपून मुसलमान झाले होते. खुद्द मुसलमानांसहि त्यांची हकीगत माहीत नव्हती. ह्मणून जर लढाई झाली असती तर नास्तिकांबरोबर या बापड्या मुसलमानांचाहि घात झाला असता. हे मुसलमानांचे शत्रु नव्हते ह्मणून त्यांना द्रव्यदंड देणें भाग पडतें. या द्रव्यदंडालाच नुकसान असें म्हटलें आहे.

(२) ही आढयता म्हणजे हुदेबियाचा तहनामा लिहिववितांना नास्तिकांनीं जी ओढाताण केली ती होय. हजरत अली यांनीं 'बिस्मिल्ला हिर्रहमानिररहीम' म्हणजे 'परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें' असें लिहिलें, तेव्हां नास्तिकांपैकीं सुहेल यानें म्हटलें कीं, आम्हीं हें जाणित नाहीं. 'हे परमेश्वरा! तुझ्या नांवानें' असें लिहा. 'मोहंमद परमेश्वराचा पैगंबर यांजकडून लिहिलें जातें' या प्रमाणें हजरत अली यांनीं लिहिलें. त्यावरहि त्यांनीं इतका हट्ट केला कीं, अखेर हजरत पैगंबरांनीं हें वाक्य आपल्या हातानें खोडून टाकिलें व विरोधीपक्षाच्या सांगण्याप्रमाणें 'मोहंमद बिन अबदुल्ला' यांजकडून असें लिहावयास सांगितलें. मुसलमान फारच संतापले व तह मोडावयाची पाळी आलीच असती; पण परमेश्वरानें मुसलमांनास सहनशीलता व चित्तसमाधान दिलें व सारें वादग्रस्त प्रकरण मिटलें.

लता व) चित्तसमाधान दिलें व (आपल्याला ) भिऊन वागण्याच्या वचना-वर त्यांस दृढ जमविलें. आणि ते त्याच्या योग्यतेचे व त्यास पात्रहि होते. आणि परमेश्वर तर दरेक वस्तूशीं वाकब होय. २६. निःसंशय परमेश्वरानें आपल्या पैगंबरास वस्तुतः खरेंच स्वप्न दाखविलें होतें कीं, परमेश्वरानें इच्छिलें,तर तुम्हीं (मुसलमान) सन्मानीय मशीदींत निर्भयपणें (व पूर्ण) समाधानानें दाखल व्हाल; (तेथें जाऊन) तुम्हीं (कांहीं तर) आपलीं डोकीं मुंडकाल आणि (कांहीं फक्त) केंसच कातरवाल. सारांश, जी गोष्ट तुम्हांला माहीतहि नव्हती ती परमेश्वराला (अगोदरच) माहीत होती; मग (त्या स्वप्नाचें भाकीत हें झालें कीं), या('मक्के'च्या विजया) पूर्वींच परमेश्वरानें एक तूर्तातूर्त विजय करवून दिला. २७. तो (परमेश्वर)च तर होय कीं, ज्यानें आला पैगंबर ('मोहंमद') यास सद्बोध व सद्धर्म देऊन यासाठीं पाठविलें कीं, त्यानें सर्व धर्मांवर त्याचें वर्चस्व गाजवावें; आणि (इस्लामधर्माच्या सत्यत्वाबद्दल) परमेश्वर साक्षी बस करितो. २८. 'मोहंमद' परमेश्वराचा पाठविलेला (पैगंबर) होय आणि जे लोक त्याच्या संगतीं होत ते नास्तिकांच्या ठायीं (तर त्यांच्या छळाचा प्रतिकार करण्यास) फार सक्त (होत;पण) आपसांत करुणाशील.(हे वाचक–श्रोत्या!) तूं त्यांना पाहशील कीं (कधीं ते) रुकूअ (म्हणजे ओणवे होऊन नमन)

---

(१) परमेश्वराला भिऊन वागणें म्हणजे जास्त बखेडा न वाढवितां समेट करणें. जर मुसलमान सहनशीलतेनें न वागते व नास्तिकांसारखी आढ्यता बाळगिते तर केव्हांच शांततेचा भंग झाला असता. मुसलमान परमेश्वराला भिऊन वागले म्हणूनच हा संप घडून आला.

(२) डोकें मुंडविणें व केंस कातरविणें हाहि स्वप्नाचाच एक भाग होता कीं, हजरत पैगंबरांनीं मुसलमानांस तसें करितांना पाहिलें; आणि हज्जच्या विधींपैकीं हा शेवटला विधी आहे. तर भावार्थ हा कीं 'निर्भयपणें व समाधान-पूर्ण हा विधि संपेल'.

(३) म्हणजे हुदेबियाचा तह हाहि एक प्रकारचा विजय होता. अथवा खैबरचा विजय तोहि हुदेबियाच्या तहाच्या थोडया दिवसांनीं म्हणजे मक्केच्या विजयापूर्वींच घडून आला होता.

करिताहेत (आणि कधीं) साष्टांग नमस्कार घालिताहेत; ते परमेश्वराची कृपा व सुप्रसन्नता संपादण्यांत लागून आहेत. त्यांची खूण ही होय कीं, त्यांच्या कपाळांवर नमस्काराचे घटे होत. हेंच वर्णन त्यांचें तौरात-नियमशास्त्रामध्येंहि (लिहिलेलें) आहे आणि (हेंच) वर्णन त्यांचें इंजील-शुभवर्तमानामध्येंहि आहे; जसें शेत कीं त्यानें (प्रथमतः भूमींतून) आपला अंकुर काढिला व मग त्यानें (वायु व मातींतून पौष्टिक द्रव्यें शोषून आपल्या) त्या अंकुरास पुष्ट केलें; सारांश, तो (हळुहळू) मोठा झाला; (येथपावेतों कीं) अखेर (शेत) आपल्या कांडयांवर सरळ उभें राहिलें; व तें आपल्या टवटवीनें) शेतकऱ्यांस मोहित करूं लागलें; (अशाच तऱ्हेनें (मुसलमान दिवसेंदिवस उन्नति करीत जातील. परमेश्वरानें यांना ही उन्नति) यासाठीं (दिली) कीं यांच्या(उन्नती)मुळें नास्तिक्रांस (संतापवून) जाळावें. यांच्यांतून ज्यांनीं (खऱ्या मनापासून) विश्वास धरिला व त्यांनीं चांगलीं कामेंहि केलीं त्यांना परमेश्वरानें क्षमा व मोठा मोबदला यांचें अभिवचन दिलें आहे. २९.



# अध्याय ४९ वा.

## सूरतुल्-हुजरात

हा अध्याय मदिनेंत प्रकट झाला. यांत १८ आयात-महावाक्यें आहेत. यांत आलेल्या हुजरात म्हणजे खोल्या या शब्दावरून हें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**अहो मुसलमानांनों ! तुम्हीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या समक्ष पुढें पुढें होऊन बोलूं नका; आणि (सर्वकाळ) परमेश्वराला भीत राहा; (कारण) परमेश्वर (सर्वांचें) ऐकितो (व सर्व कांहीं) जाणतो. १. अहो मुसलमानांनों ! तुम्हीं आपले आवाजाला पैगंबराच्या आवाजापेक्षां उंच होऊं देऊं नका; आणि जसे तुम्हीं एकमेकांशीं (आपसांत) मोठ्यामोठ्यानें बोलत असतां, तसें तुम्हीं त्याच्याशीं मोठ्यानें बोलूं नका; (कोठें असें न होवो) कीं तुमचें केलें सवरलें (सर्व) अक्रीत होऊन जाईल व तुम्हांस कळणार सुद्धां नाहीं. २. जे लोक परमेश्वराच्या पैगंबरासमक्ष आपले आवाज मंद करून घेतात; हेच होत कीं ज्यांच्या अंतःकरणांस परमेश्वरानें (आपल्या) भैयासाठीं (चांगल्या प्रकारें) पडताळून पाहिलें आहे. यांच्या करितां (परलोकीं पापांची) क्षमा व मोठें प्रतिफल होय. ३ (हे पैगंबरा !) जे लोक तुला (तुझ्या राहत्या) खोल्यांच्या बाहेरून हाका[१]**

(१) बनी-तमीम या घराण्याचे कांहीं लोक हजरत पैगंबर साहेबांशीं भेटावयास आले होते. पैगंबरसाहेब त्यांना मशीदींत दृष्टीं पडले नाहींत ह्मणून ते मोठ्यामोठ्यानें नांव घेऊन हाका मारूं लागले. परमेश्वरानें हजरत पैगंबरसाहेबांची अदब व मर्यादा कशी ठेवावी हें शिकविलें कीं, मोठ्यानें हाक मारणें तर कशाला, हजरत पैगंबर साहेबांसमोर जोरानेंहि बोलणें बेअदबी आहे.

**मारतात त्यांच्यांतून बहुतेक (तर असे होत कीं ज्यां)ना (मुळींच)समज नाहीं. ४. आणि जर (हे लोक) इतका दम धरते कीं, तूं, (स्वतःच खोल्यांतून) बाहेर निघून याजपाशीं येतास, तर यांच्याठायीं फारच उत्तम होतें. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. ५. अहो मुसलमानांनों ! जर कोणी दुष्ट (मनुष्य) तुम्हांपाशीं एखादी बातमी आणील, तर (त्याची) चांगल्या प्रकारें चवकशी करीत जा; (असें न व्हावें) कीं अज्ञानामुळें तुम्हीं एखाद्या राष्ट्रावर चढून जावें व मग आपण जें कांहीं केलें त्याबद्दल पश्चात्ताप करूं लागावें. ६.**

---

(२) वलीद बिन अकबा बिन अबी मुकीत हा मुसलमान होता; पण दांभिक होता. हजरत पैगंबर साहेब दांभिकांस जाणून होते. परंतु कांहीं हित-दृष्टीनेंच त्यांच्याशीं असें वर्तन करीत कीं, त्यांना कोणा तऱ्हेची शंका येत नसे. दुसरी गोष्ट ही आहे कीं, हजरत पैगंबरसाहेबांच्या वेळेपासून तों हजरत उस्मानच्या खिलाफतीच्या कांहीं दिवसापावेतों जकात म्हणजे धर्मकर किंवा सारा जो ‘बैतुल्माल’ म्हणजे हुजूरखजिन्यांत दाखल केला जात होता व हजरत पैगंबरांनीं तहाहयात व त्यांचे मागून त्यांच्या खलीफांनीं ज्याचा विनियोग मुसलमान शिपायांच्या साजसरंजामांत व गोरगरिबांच्या मदतींत केला होता; तो कर, हजरत उस्मानचे वेळीं मुसलमांनीं राष्ट्राचा फारच विस्तार झाला होता व राज्याचा वसूलहि फार वाढला होता; ह्मणून हुजूर खजिन्यांत घेणें बंद केलें व लोकांस परवानगी दिली कीं, त्यांनीं आपल्यापरीं जकातीचा योग्य विनियोग करावा. हजरत पैगंबर साहेबांच्या वेळीं हा कर पैगंबर साहेबांनीं ह्या वलीदला वसूल करण्यासाठीं बनी-मुस्तलीक या घराण्याचे लोकांकडे पाठविलें. वलीदच्या व मुस्तलीकच्या घराण्यांत अगोदरचीच अदावत होती. बनी–मुस्तलीकचे लोक त्याला पैगंबर साहेबांचा दूत समजून त्यास सामोरा आले; तेव्हां वलीदला पुर्वींच्या अदावतीमुळें शंका आली व तो परत मदिनेस आला. त्यानें येऊन प्रसिद्ध केलें कीं, बनी–मुस्तलीक बदलून पडले व जकात देण्यास नाकारतात. हजरत पैगंबरसाहेब खालीद बिन वलीद या सरदारास पाठवीत होते. इतक्यांत त्या मुस्तलीक घराण्याचे कांहीं लोक आले व त्यांनीं खरीखुरी हकीकत सांगितली. यावरून कोणतेंहि काम चौकशी केल्यावांचून करूं नये अशी आज्ञा झाली.

आणि तुम्हीं जाणून असा कीं, तुम्हांमध्यें परमेश्वराचा पैगंबर (हजर) आहे; आणि बहुतेक गोष्टी (अशा प्रकारच्या) असतात कीं, जर तो त्यांत तुमचा कह्या मानीत जाईल तर (उलट) तुम्हींच कष्टी होऊन जाल. परंतु (बरें होय, कीं) परमेश्वरानें तुम्हांस विश्वासाचें प्रेम देऊन ठेविलें आहे व तो त्यानें तुमच्या अंतःकरणांत (उत्तम) सुशोभित करून दाखविला आहे; आणि नास्तिकपणा व अनीति व आज्ञाभंग यांजपासून तुम्हांस तिरस्कार आणिला आहे. हेच लोक सन्मार्गोन्मुख होत; ७. (ही) परमेश्वराची कृपा व देणगी होय. आणि परमेश्वर सर्वज्ञानी (व) बुद्धिमान् होय. ८. आणि जर (तुम्हां) मुसलमानांचे दोन पक्ष आपसांत लढतील, तर त्यांच्या दर्म्यान समेट करवा; मग जर त्यांच्यातला एक (पक्ष) दुसऱ्यावर अत्याचार करील, तर जो अत्याचार करितो त्याशीं (तुम्हींहि) लढा; येथपर्यंत कीं तो परमेश्वराच्या हुकमाकडे वळेल.मग जेव्हां तो (त्याकडे) वळेल तेव्हां त्या दोहोंत बरोबरीनें समेट करवा व न्यायानें वर्ता. निःसंशय परमेश्वर न्यायानें वर्तणारांस प्रिय ठेवितो.९ मुसलमान (म्हटले म्हणजे आपसांत भाऊ)भाऊ होत;म्हणून तुम्हीं आपल्या दोघां भावांत समेट करवीत असा; आणि परमेश्वरा(चे कोपा)स भीत राहा कीं, कदाचित् (परमेश्वराकडून) तुम्हांवर दया केली जाईल. १०. अहो मुसलमानांनों ! पुरुषांनीं पुरुषांस हसूं नये; नवल नव्हे कीं (ज्यांना ते हंसतात) ते,(परमेश्वरासमीप) त्यांच्यापेक्षां उत्तम असतील; आणि स्त्रियांनीं स्त्रियांस (हसूं) नये; नवल नव्हे कीं,(ज्यांना त्या हंसतात) त्या, यांच्यापेक्षांहि उत्तम असतील. आणि तुम्हीं आपसांत एकमेकांला टोमणें देऊं नका व एकमेकांस नांवेंहि ठेवूं नका. विश्वास धरिल्यापश्चात असभ्याचाराचें नांवच वाईट होय. आणि जे (या गोष्टीपासून) पराङ्मुख होणार नाहींत तेच तर (परमेश्वरासमीप) अन्यायी (व जुलमी)होत. ११. अहो मुसलमानांनों ! (लोकांसंबंधानें) तुम्हीं बहुत तर्क करण्याविषयीं जपत राहा; कारण कांहीं कांहीं तर्क पातक होय; आणि एकमेकांच्या चौकशींत राहूं नका व तुमच्यांतून कोणी कोणाच्या पाठीमागें निंदा

---

१ या महावाक्यांत पाठीमागें निंदा करणेंस आपल्या मेलेल्या भावाचें मांस खाण्याची उपमा दिलेली आहे. ती अशी कीं, ज्याप्रमाणें मेलेल्यास कोणी

**करूं नये. कां तुम्हांपैकीं कोणाला(ही गोष्ट) आवडेल कीं, आपण आपल्या मेलेल्या भावाचें मांस खावें ? हें तर (खरोखरींच) तुम्हांस आवडणार नाहीं; (तर मग निंदा कशी आवडेल कीं हेंहि एक प्रकारचें मुडदार खाणेंच होय). आणि परमेश्वरा(चे कोपा)स भीत असा. निःसंशय परमेश्वर मोठा पश्चात्ताप स्वीकार्ता (व) दयाळु होय. १२. अहो लोकांनों ! आम्हीं तुम्हां(सर्वां)स एक पुरुष ('आदम') व एक स्त्री ('हव्वा') यांपासून निर्माण केलें व (मग) तुमच्या जाति व घराणीं हीं ठरविलीं कीं, तुम्हीं एकमेकांस ओळखूं शकावें. (नाहीं तर,) परमेश्वरा-समीप तुमच्यांत मोठा अब्रूदार, जो तुमच्यांत (परमेश्वराला) फारच भिऊन वागतो तोच होय. निःसंशय परमेश्वर सर्वज्ञानी (व) बहुश्रुत होय. १३. अरबचे गांवढळ लोक म्हणतात कीं, आम्हीं विश्वास धरिला आहे. (हे पैगंबरा ! तूं यांना) सांग कीं, तुम्हीं विश्वास धरिला नाहीं; परंतु (असें) म्हणा कीं आम्हीं मुसलमान झालों आहों; आणि विश्वासाचा**

---

आपलें मांस टोंचटोंचून खाल्याची खबर होत नाहीं त्याचप्रमाणें ज्या मनुष्याची पाठीमागून निंदा केली जाते त्याला त्या निंदेची खबर होत नाहीं. दुसरें असें कीं, मांस खाणारानें जसें प्रेताच्या मांसाचे तुकडे तुकडे उडविले तसेंच निंदा करणारानें आपल्या भावाच्या अब्रूचे तुकडे उडविले अगर असें ह्मणा कीं, त्यानें त्याच्या अब्रूचा खून केला.

(१) विश्वास, ज्याला अरबी प्रति-शब्द 'ईमान' हा आहे; त्याचा मनुष्याच्या अंतःकरणाशीं संबंध असतो; आणि परमेश्वरावांचून इतरांस त्याची खबर होत नाहीं. इस्लाम म्हणजे ईश्वराज्ञाधीन होणें याचा संबंध त्याच्या बाह्य कृत्यांशीं असतो. एक मनुष्य जो मुसलमानांप्रमाणें राहतो व त्यांच्या संगतीं खातो पितो व आपणाला मुसलमान ह्मणवितो तो, 'शरअ' म्हणजे धर्म-शास्त्र ज्याचा अम्मल बाह्य स्थितीवर असतो त्याच्या दृष्टीनें मुसलमान समजला जाईल; परंतु त्याच्या मनांत विश्वास नसेल हेंहि संभवित आहे. या महावाक्यांत 'ईमान' व 'इस्लाम' यांतील फरक दर्शविण्याचा उद्देश आहे. फारच दुःखाची ही गोष्ट होय कीं, आजकाल आह्मीं मुसलमानांत आणि प्रामुख्येंकरून महाराष्ट्रांत जराजराशा गोष्टींत मुसलमान मुसलमानास काफिर, अविश्वासू व नास्तिक म्हणतात; आणि नवीन झालेले मुसलमान जे हजरत

तर अजून तुमच्या मनांत शिरकावहि झालेला नाहीं. आणि जर तुम्हीं लोक परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या हुकमाप्रमाणें वागाल, तर परमेश्वर तुमच्या कर्मां(च्या प्रतिफलां)तून कांहींच छाटाछाट करणार नाहीं. निःसंशय परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. १४. (खरे) मुसलमान (म्हटले म्हणजे) ते होत कीं, ज्यांनीं परमेश्वराचा व त्याच्या पैगंबराचा विश्वास धरिला व मग (कोणाहि प्रकारचा) संशय ठेविला नाहीं आणि परमेश्वराच्या मार्गांत आपल्या जिवानिशीं व आपल्या द्रव्यानिशीं प्रयत्न केले. (खरोखरीं) हेच खरे (मुसलमान) होत. १५. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं, तुम्हीं कां परमेश्वराला आपला धार्मिकपणा जाणवितां? व वास्तविक पाहतां, जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें (सर्व कांहीं) परमेश्वर जाणतो. आणि परमेश्वर सर्वज्ञानी होय. १६. (हे पैगंबरा! हे लोक) तुझ्यावर आपल्या इस्लाम(स्वीकारण्या)चा उपकार ठेवितात. (तर तूं यांना) सांग कीं, तुम्हीं माझ्यावर आपल्या इस्लाम(स्वीकारण्या)चा उपकार ठेऊं नका. किंबहुना परमेश्वर तुम्हांवर उपकार ठेवितो कीं त्यानें तुम्हांस विश्वासाचा मार्ग दाखविला, या अटीवर कीं तुम्हीं (इस्लामाच्या दाव्यांत) खरे आहां. १७. निःसंशय परमेश्वर आकाशांच्या व पृथ्वीच्या अदृष्ट (गैबी) गोष्टींस जाणतो. आणि तुम्हीं लोक जसजशीं कर्में करीत आहां तीं परमेश्वर पाहतो आहे. १८.

---

पैगंबराचे वचनाप्रमाणें अगदींच निष्पाप ठरतात, त्यांस पंक्तीस घेत नाहींत व त्यांच्याशीं दुजाभाव ठेवितात. हजरत पैगंबरसाहेब तर ह्मणतात कीं 'सर्व पैगंबरांत मी असा पैगंबर आहे कीं, माझी अनुयायी प्रजा इतर सर्व पैगंबरांच्या प्रजेपेक्षां परलोकीं फारच जास्त होईल, याच्या उलट आह्मीं मुसलमान आपल्या लोकांस आपल्यांतून बाहेर घालविण्याचे प्रयत्न करीत असतों; ही फार दुःखाची गोष्ट आहे, एवढेंच नव्हे; तर हें अक्षम्य पाप होय.

# अध्याय ५० वा.

## सूरतु-क़ाफ.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ४५ आयात ह्मणजे महावाक्यें आहेत. याचें नांव 'सुरतु-क़ाफ' असें पडण्याचें कारण हें कीं 'क़ाफ' ह्या नांवाचा सर्व पृथ्वीच्या सभोंवतीं एक पर्वत आहे व त्यांत पत्रे उद्भवतात; अगर 'कदलअमूर' ह्मणजे 'हुकूम सुटला व नास्तिकांच्या शिक्षेचें काम पूर्ण झालें' या वाक्यांचें प्रथम अक्षर 'क़ाफ' होय. हा पर्वत कोठें असावा हें खगोल वेत्त्यांस माहीत असणें अवश्य नाहीं; कारण अजून खगोलविद्येचाहि अंत आलेला नाहीं; आणि पुढें कोणे काळीं येईल किंवा नाहीं याचीहि वानवाच आहे. म्हणून परमेश्वरांच्या अगाध ज्ञानांत हा पर्वत कोठें तरी असलाच पाहिजे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)**

**क. (काफ). (हे पैगंबरा!) महनीय कुराणाची शपथ, (कीं तूं आमचा पाठविलेला पैगंबर आहेस); १. परंतु या नास्तिकांस (ह्याचें) आश्चर्य झालें कीं, यांच्यांतूनच एक भय सुचविणारा यांच्यापाशीं (पैगंबर बनून) आला. तर (हे) नास्तिक म्हणूं लागले कीं ही तर एक विलक्षण गोष्ट होय. २. कीं जेव्हां आम्हीं मरून जाऊं व (गळून कुजून) माती होऊन जाऊं तेव्हां (आम्हांस पुनरुत्थानांत दुसऱ्यांदा जिवंत करून उठविलें जाईल)? हें पुनरपि (जिवंत) होणें तर बिलकुलच दुरापास्त होय. ३. मेलेल्यांच्या ज्या ज्या भागास माती (खाते व) कमी करिते, ते आम्हांला तर माहीतच आहेत; (मग जेव्हां आह्मीं इच्छूं तेव्हां ते गोळा करून घेऊं). आणि आम्हांपाशीं जतन केलेलें (लौहे-महफूज़) पुस्तकहि आहे; (व त्यांत एकूणेक गोष्ट लिहिलेली आहे). ४.**

परंतु या लोकांस एक सत्य गोष्ट पोहोंचली तोंच (हट्टानें व विचार केल्यावांचून) ते तिला पाखंड म्हणूं लागले. तर ते अशा गोष्टींत (गोंधळून पडले) आहेत कीं जिला स्थैर्य नाहीं. ५. कां या लोकांनीं आपल्यावरती आकाशाकडे (नजर भरून) पाहिलें नाहीं कीं आम्हीं त्यास कसें बनविलें व त्यास (नक्षत्रांनीं) सुशोभित केलें; आणि त्यांत कोठेंच तडा नाहीं. ६. आणि आम्हीं जमिनीचा विस्तार केला व तींत भारी अचळ पर्वत रोंविले; आणि सर्व प्रकारच्या सुंदर वस्तु तींत उगविल्या; ७. अशासाठीं कीं (आम्हांकडे) वळणारे जितके म्हणून (आमचे) सेवक होत (त्यांनीं आमच्या सामर्थ्याची लीला) पाहावी व बोध धरावा. ८. आणि आम्हीं आकाशांतून आशिर्वादरूप पाणी पाठविलें; व त्या (पाण्या)-च्या योगें बागा उगविल्या व कापणी केलेल्या शेतांचें धान्य; ९. व उंच उंच खजुरी कीं ज्यांचे झुबके एकावर एक लोंबकळत असतात; १०. हें सर्व (आमच्या) सेवकांच्या आहारासाठीं होय आणि (तसेंच) आम्हीं पावसद्वारें मृत (म्हणजे पडित) झालेल्या वस्तीस जिवंत (म्हणजे टवटवीत) केलें. अशाच तऱ्हेनें (पुनरुत्थानाचे दिवशीं लोकांचें थडग्यांतून) निघणें होईल. ११. या (लोकां)च्या पूर्वीं 'नूह'चे लोकांनीं (पैगंबरांस)पाखंडी म्हटलें, आणि खंदकवाल्यांनीं व 'समूद'नें. १२. आणि 'आद'नें

१ ह्मणजे नास्तिक लोक हजरत पैगंबर साहेबांस कधीं कवि म्हणत व कधीं जादुगार; आणि कधीं खुळा व वेडा व कधीं कांहीं व कधीं कांहीं; आणि कधीं म्हणत कीं पुनरुत्थानाचें घडून येणें अनुमानगम्य नाहीं व दुरापास्त आहे. एवंच त्यांच्या बोलण्यांत बोलणें नव्हतें व त्यांच्या बोलण्यास स्थैर्य नव्हतें.

२ खंदकवाल्यांचा उल्लेख शेवटच्या भागाच्या ' सूरतूल–बुरूज'मध्यें आहे. वनाचे रहिवासी हे हजरत शोएब पैगंबराचे लोक होत; हें वन मदयनजवळ होतें. तुब्बा हा यमन देशाचा बादशाह होता. पैगंबरांना पाखंडी ह्मणण्याचा एक अर्थ आह्मीं जो भाषांतरांत पत्करला आहे तो होय; आणि दुसरा हा कीं पहिल्यापासून शेवटपर्यंत सर्व पैगंबरांचा धर्म एकच राहिला आहे. धर्मशास्त्रें लोकांच्या हिताहिताच्या मानानें बदलत राहिलीं आहेत; ह्मणून एका पैगंबरास पाखंडी ह्मटल्यानें साऱ्या पैगंबरांना अवश्य पाखंडी म्हटल्यासारखें होतें. परमेश्वर आम्हांला यापासून वांचवो.

व 'फिरऔना'नें व 'लूतच्या' बांधवांनीं; १३. आणि वनाच्या रहिवाश्यांनीं व 'तुब्बा'चे लोकांनीं, (या) सर्वांनींच तर (आपापल्या) पैगंबरांना पाखंडी म्हटलें; म्हणून माझें (शिक्षेचें) वचन (त्यांच्याठायीं) सिद्ध झालें. १४. तर का आम्हीं पहिल्या (प्रथम) निर्माण करण्यांत थकून गेलों (कीं पुनरुत्थानांत पुन्हा निर्माण करूं शकणार नाहीं)? किंबहुना (गोष्ट ही होय कीं) हे लोक (निसर्गक्रमाविरुद्ध) नवीन निर्माण करण्याकडून संशयांत (पडले) आहेत. १५. आणि निःसंशय आम्हींच माणसाला उत्पन्न केलें व त्याचें मन जें कांहीं ध्वनित करतें तें आम्हीं जाणून आहों; आणि आम्हीं (त्याच्या) मुख्य धमनीपेक्षांहि त्याच्याशीं अधिक जवळ आहों. (पण त्याच्या डोळयांवर गफलतीचा पडदा पडला आहे); १६. कीं दोन नोंदणारे (म्हणजे 'किरामन्‌कातिबीन' दूत त्याच्या गोष्टी) नोंदीत जातात; (एक) उजव्या बाजूला बसलेला आहे व (एक) डाव्या बाजूला. १७. तो कोणतीहि गोष्ट (तोंडून) उच्चारीत नाहीं कीं एक पहारेकरी त्याचे पाशीं (ती नोंदण्यास) तयार (राहतो). १८. आणि मृत्यूची मूर्च्छा तर खरोखर येईलच येईल.(आणि आम्हीं त्यावेळीं माणसास बजावूं कीं,) ज्या (स्थिती) पासून तूं पळत होतास ती हीच होय. १९. आणि (पुनरुत्थानाचे दिवशीं) करणा फुंकला जाईल. ज्या(दिवसा)पासून (लोकांस) भिवविलें जातें तो दिवस हाच होईल. २०. आणि प्रत्येकजण (कर्मांचा जाब देण्यासाठीं) हजर होईल; (एक देवदूत तर) त्याच्या संगतीं हांकणारा असेल व (एक दूत त्याचें कर्मपत्रक घेऊन त्याच्या कर्मांचा) साक्षी. २१. (आणि आम्हीं त्याला बजावून सांगूं कीं) तूं ह्या(दिवसा) कडून फसगतींत राहिलास. तर (जो पडदा तुझ्या डोळयावर पडलेला होता) आम्हीं तुझा (तो) पडदा तुजवरून हटविला; म्हणून आज तुझी नजर फार तीक्ष्ण (दिसत) आहे. २२. आणि त्याचा साथी (जो साक्ष द्यावयास आला आहे तो) म्हणील कीं, (त्याचें कर्मपत्रक) जें मजपाशीं (नोंदलेलें) आहे तें तर हें (हजर) होय. २३. (यावर आम्हीं आपल्या दोघा चोबदारांस म्हणजे दूतांस आज्ञा करूं कीं) प्रत्येक शिरजोर नास्तिकांस 'जहन्नम'–नरकाग्नींत झोंकून द्या; २४.

(तसेंच) सत्कार्यास मनाई करणारा, (भक्ति) मर्यादेचें उल्लंघन करणारा, (सद्धर्मांत) शंका उत्पन्न करणारा अशालाहि; २५. कीं तो परमेश्वरासमागमें दुसरे (दुसरे) उपास्य (देव) ठरावित होता; त्याला आतां कडक शिक्षेत (नेऊन) टाका. २६. (मग) त्याचा सोबती (सैतान) ह्मणील कीं हे आमच्या पालनकर्त्या ! मी तर याला शिरजोर बनविलें नाहीं. किंबहुना हा (आपणच) पराकाष्ठेच्या भ्रमांत (पडलेला) होता. २७. (यावर परमेश्वर) फर्मावील कीं, माझ्या हुजूर असा वाद घालीत बसूं नका; आणि वास्तविक पाहतां, मी तर तुम्हांस पहिल्यानेंच (आपल्या शिक्षेचें) भय ऐकवून चुकलों होतों. २८. मजपाशीं (जी एक) गोष्ट (ठरून चुकली आहे ती) बदलत नसते; आणि मी तर सेवकांवर तिलप्रायहि जुलूम करीत नसतों. २९. त्या दिवशीं आम्हीं नरकाग्नीला विचारूं कीं तूं (नरकवासीयांनीं) भरून चुकलास (कीं नाहीं) ? आणि तो (नरकाग्नि) ह्मणेल कीं कांहीं आणखीहि जास्त आहे ? ३०. आणि स्वर्ग (परमेश्वराला) भिऊन वागणारांच्या (इतका) जवळ आणिला जाईल (कीं कांहींहि) अंतर राहणार नाहीं. ३१. हाच तर तो (स्वर्ग) होय कीं ज्याचा तुम्हांतून प्रत्येक (परमेश्वराकडे) वळणारा (व हक्काचें) संरक्षण करणारा अशास वायदा केला जातो. ३२. जो कोणी बिनदेखतां परमदयाळू (परमेश्वरा)स भीत राहिला आणि अनुतप्त अंतःकरण घेऊन हजर झाला, ३३. (अशा लोकांस आम्हीं आज्ञा करूं) कीं शांतिसमाधानानें या (स्वर्गांत) जाऊन दाखल व्हा; कीं हाच तर सतत राहण्याचा दिवस होय. (जो जेथें राहिला तो राहिला). ३४. स्वर्गांत या लोकांस ते जें इच्छितील तें (प्राप्त) होईल, आणि आमच्या येथें तर (याहून कोठें) जास्तच (उपलब्ध) होय. ३५. आणि या('मक्केच्या नास्तिका) पूर्वीं आम्हीं कित्येक पिढ्यांचा नाश करून टाकिला कीं ते यांच्यापेक्षांहि बळांत फारच जबरदस्त होते. तर (जेव्हां त्यांस शिक्षा सादर झाली तेव्हां) त्यांनीं सारीं शहरें धुंडाळून टाकलीं; कीं कोठेंहि गत्यंतर आहे? ३६. ज्याला (समजण्यास) अंतःकरण आहे अगर जो कान लावून सावधान चित्तानें ऐकितो त्याच्याकरितां तर या गोष्टींत (पूर्ण) बोध होय. ३७. आणि आम्हीं आकाशांस व पृथ्वीस व ज्या वस्तु या दोहोंच्या दरम्यान

आहेत त्या(सर्वां)स सहा दिवसांत निर्माण केलें; आणि थकव्यानें आम्हांस स्पर्शहि तर केला नाहीं. ३८. तर (हे पैगंबरा !) जसजशा गोष्टी (हे नास्तिक) बोलतात त्या तूं सहन कर; आणि सूर्योदयाच्या पूर्वी व (त्याच्या) अस्तमान होण्याच्यापूर्वी तूं आपल्या पालनकर्त्याच्या स्तवनाबरोबर त्याची पवित्रता वर्णन कर. ३९. आणि रात्रींतूनहि (थोडा वेळ) त्याचें पावित्र्यवर्णन कर आणि नमाजींच्या मागूनहि. ४०. आणि (हे पैगंबरा ! ही गोष्टहि मनोभावानें) ऐकून ठेव कीं, ज्या दिवशीं (मेलेल्यांचा) पुकारणारा (दूत 'इस्राफील') जवळच्या जवळून (सर्वांस) हाक मारील (कीं उठा); ४१. ज्या दिवशीं (या दूताचे) आरोळीस (सर्व लोक) सत्यपूर्ण ऐकून घेतील; तो (लोकांच्या थडग्यांतून)निघण्याचा दिवस असेल. ४२ निःसंशय आह्मींच जिवंवितों व आह्मींच मारतों आणि आह्मांकडेच (हिरून) फिरून (लोकांस) येणें आहे. ४३. ज्या दिवशीं (माती) मेलेल्यांच्या प्रेतांवरून (सरून) जमीन फाटून जाईल (व हे जिवंत होऊन हिशेबास्तव) पटकन पुढें येतील. हें एकत्र गोळा करणें आम्हांस (एक) सोपीशी (गोष्ट) होय. ४४. (हे पैगंबरा !) हे लोक ज्या(ज्या गोष्टी तुजसंबंधानें)व्यक्त करून दाखवितात त्या आम्हीं खूप जाणून आहों. आणि तूं यांजवर जबरदस्ती करणारा (अधिकारी) तर नाहींच, (कीं मारूनकुटून यांस मुसलमान करावेंस; तुझें काम) तर (हें होय कीं,) जो कोणी माझ्या शिक्षेस भितो त्याला कुराण ऐकवून ऐकवून समजावीत जा. ४५.

# अध्याय ५१ वा.

## सूरतु–ज्ज़ारियात.

हा मक्केंत प्रकट झाला. यांत ६० आयात म्हणजे महावाक्यें आहेत. याचें नांव 'जारियात' ह्मणजे धूळ उडविणार वायु असें पडण्याचें कारण हें कीं, या अध्यायाच्या आरंभीं परमेश्वरानें वायूंची शपथ वाहून पुनरुत्थानास नाकारणाऱ्याचें खंडन केलें आहे; यांत मोठे भेद आहेत. त्यांत लहानसा भेद म्हटला म्हणजे हा कीं, वायु किंवा हवा यावर जगाचें अस्तित्व अवलंबून आहे व तोच वेगांत आला ह्मणजे जगाचा नाशहि करून टाकितो. हें सर्व परमेश्वराच्याच सामर्थ्यानें होतें; ह्मणून वायूची शपथ वाहणें म्हणजे खुद्द परमेश्वर आपलीच शपथ वाहतो, किंवा आपल्या परमसामर्थ्याची साक्ष पटवून देतो, असें होतें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**(वायु) जे (ढगांस) फांकून फांकून वाहून नेतात, १. मग (पावसाचें) ओझें उचलतात, २. व मग हळुहळू वाहतात, ३. मग एक (मोठ्या आवश्यक) वस्तु (म्हणजे पावसा)ला (भूपृष्ठावर) वांटून टाकतात; (आह्मांला) या(च वायूं)ची शपथ आहे; ४. कीं तुम्हां लोकांस जो (पुनरुत्थानाचा) वायदा केला जातो तो बिलकुल खरा होय. ५. आणि (कर्मांचा) निर्णय अवश्यच होणें आहे. ६. आकाश, ज्यांत (नक्षत्रांच्या कक्षांचे) मार्ग पडलेले आहेत त्याची शपथ आहे; ७. कीं तुह्मीं लोक (अशा एका) भिन्न[1] गोष्टींत (पडलां) आहां; ८. कीं**

---

(१) भावार्थ हा कीं, कुराणासंबंधानें तुह्मीं लोक भिन्न व विपरीत गोष्टी करितां. कधीं ह्मणतां, ही एक प्रकारची जादु आहे; कधीं म्हणतां, पैगंबरानें हें आपल्या मनानें रचिलें आहे. कधीं म्हणतां, कोणी दुसरा मनुष्य त्याला तें रचून देतो. तर तुमच्या या गोष्टींनीं जो कोणी (दैवानेंच) बहकला असेल तोच बहकला जातो.

जिच्यामुळें जो कोणी(दैवाचाच)बहकलेला असेल तोच बहकला जातो.९. मरोत (हे) खोटे तर्क लढविणारे ! १०. कीं ते गफलतींत भुललेले आहेत; ११. ते विचारतात कीं, निर्णयाचा दिवस केव्हां होईल ? १२. (यांना सांगितलें पाहिजे कीं) त्या दिवशीं (होईल) कीं जेव्हां हे लोक अग्नीवर होरपळले जातील. १३. (व यांना सांगितलें जाईल कीं, आतां) आपल्या (या) जळण्याची गोडी चाखा. जिच्या साठीं तुम्हीं घाई मचवीत होतां हीच तर ती (शिक्षा) होय. १४ निःसंशय (परमेश्वराला) भिऊन वागणारे (स्वर्गाच्या) बागांत व झऱ्यांत असतील; १५. जें कांहीं त्यांना त्यांचा पालनकर्ता देत असेल तें ते घेत असतील. हे लोक ह्याच्यापूर्वीं परोपकार करणारे होते. १६. (भक्तींत निमग्न होऊन राहिल्यामुळें) हे रात्रीस फारच कमी निजत होते; १७. आणि प्रातःसमयास (आपल्या पापांची) क्षमा भाकीत होते; १८. आणि त्यांच्या धनदौलतींत (तोंड पसरून) मागणारा व (लज्जेमुळें) मागावयास आनाकानी करणारा अशांचा हक्क होता. १९. आणि(लोकांनों !) पूर्ण विश्वास बाळगणाऱ्यांसाठीं पृथ्वींत (ईश्वरी सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत; २०. आणि खुद्द तुमच्या(पिंडा) तहि. तर कां तुह्मांला सुचत नाहीं ? २१. आणि तुमची चंदी व जें कांहीं तुह्मांस वचन दिलें जातें (तें सर्व) आकाशांत आहे. २२. तर आकाश व पृथ्वीच्या पालनकर्त्यांची शपथ कीं हें (कुराण) जशी तुह्मीं वाणी करितां तशीच

(१) शेर किंवा चंदी यांचें आकाशांत होणें अशा प्रकारें आहे कीं अन्नसंपत्तीचे कारण म्हणजे पाणी आकाशांतून बर्षतें आणि वचन म्हणजे स्वर्गाचें वचन; व तोहि आकाशांत होय. अगर हा अर्थ असेल कीं, तुमची अन्नसंपत्ति व जें कांही तुम्हांला वचन दिलें जातें तें म्हणजे पाप व पुण्यफल वगैरे सर्व ज्या परमेश्वराचे अखत्यारांत आहे तो आकाशांत आहे.

(२) म्हणजे ज्याप्रमाणें तुह्मीं आपल्या वाणीस आपली वाणी समजतां याचप्रमाणें कुराणालाहि निःसंशयें करून ईश्वरवाणी समजा. पण ईश्वरवाणीची हकीकत माहीत नाहीं कीं तो बोलतो कसें व आमच्या सारखे शब्द त्याच्या वाणीनें कसे प्रगट होतात ? परंतु परमेश्वराला सर्वशक्तिमान समजल्यावर ही शंकाहि राहात नाहीं.

सत्य (प्रचुर ईश्वरवाणी) होय. २३. (हे पैगंबरा !) 'इब्राहिमा'चे सन्मान्य पाहुणे (म्हणजे देवदूत) यांची गोष्टहि तुजपर्यंत पोहोंचली आहे? २४ कीं जेव्हां (हे लोक) त्याच्यापाशीं आंत आले; तेव्हां (येतांच) त्यांनीं सलाम केला. ('इब्राहिमा'नें) सलामाचा जबाब दिला (व मनांत म्हणाला कीं, हे) लोक (तर कांहीं) अनोळखीसे (दिसत) आहेत ! २५. मग तो जलद आपल्या कुटुंबीं गेला व त्यानें एक मोठें लठ्ठ वासरूं (म्हणजे त्याचें मांस भाजून पाहुण्याकरितां) आणिलें. २६. आणि तें त्यांच्यापुढें ठेविलें. तेव्हां (त्यांनीं हात आवरलेले पाहून 'इब्राहिमा'नें) विचारिलें, तुम्हीं खात कां नाहीं ? २७. (यावरहि त्यांनीं खावयास नाकारिलें तेव्हां) तर 'इब्राहीम' त्यांच्याकडून मनांत भिऊं लागला. ते (त्याची ही स्थिति पाहून) म्हणाले, तूं (कोणा तऱ्हेचा) अंदेशा करूं नकोस; आणि त्यांनीं त्याला एक शहाणा सुरता पुत्र(म्हणजे 'इस्हाक') या (च्या जन्मा)चें शुभवर्तमानहि दिलें २८. हें ऐकून 'इब्राहिमा'ची बायको ('सारा') ही मोठ्यानें बोलत बोलत पुढें आली व तिनें आपलें तोंड बडवून घेतलें व म्हणूं लागली, (आधीं तर) म्हातारी, (दुसरी) वांझोटी (मला पुत्र होऊन चुकलें) ! २९. (देवदूत) बोलले, तुझ्या पालनकर्त्यानें असेंच फर्माविलें आहे, (व) कांहीं संशय नाहीं कीं तो सत्यसंकल्प (व) सर्वज्ञानी होय. ३०

( पुढें चालू. )



# पवित्र कुराण

## भाग सत्ताविसावा.

### सूरतु-ज्ज़ारियात (पुढें चालू)

(ह्यानंतर 'इब्राहीमा'नें दुतांस) विचारिलें कीं हे (ईश्वरी-) दूतांनो ! मग (येथें येण्यांत) तुमचा काय हेतु आहे ? ३१. ते बोलले कीं आम्हांला अपराधी (ह्मणजे 'लूत'चे) लोकांकडे पाठविलें गेलें आहे; ३२. कीं आम्हीं त्यांच्यावर चिकणमातीच्या खड्यांचा वर्षाव करावा. ३३. हे (खडे) तुझ्या पालनकर्त्यापाशीं अशा लोकांसाठीं नामनिर्दिष्ट होऊन चुकले आहेत कीं जे (सृष्टिक्रमा[1]च्या) बाहेर निघून गेले आहेत. ३४. एवंच, (परिणाम हा झाला कीं) त्या वस्तींत जितके म्हणून विश्वासू होते त्यांना तर आह्मीं (मुकाट्यानें) बाहेर लावून दिलें. ३५. आणि आम्हीं त्या वस्तींत मुसलमा[2]नाच्या एका घराशिवाय (कीं तें 'लूत'च्या कुटुंबाचे लोक होत, मुसलमानांचें आणखी कोणी घर) पावलोंहि नाहीं. ३६. आणि (खड्यांचा वर्षाव केल्यावर) आह्मीं त्या(वस्तीं)त जे लोक दुःखप्रद शिक्षेस भितात त्यांच्याकरितां (बोधपर) निशाणी बाकी राखिली (म्हणजे त्यांचीं खिंडारें). ३७ आणि 'मूसा'(च्या वृत्तांतां)तहि (ईश्वरसामर्थ्याच्या बऱ्याच निशाण्या होत कीं) जेव्हां आम्हीं त्याला स्पष्ट चमत्कार देऊन 'फिरऔना'कडे पाठविलें; ३८. तेव्हां तो आपल्या सेने(च्या-

---

(१) परमेश्वरानें स्त्रीपुरुषांत अशी एक वस्तु ठेवून दिली आहे कीं तिच्यामुळें तीं एकामेकांवर आसक्त होतात; व ही आसक्ती निसर्गदत्त होय. याशिवाय जितक्या म्हणून पद्धति कामतृप्तीच्या होत त्या सर्व सृष्टिक्रमाविरुद्ध होत. त्यांजपैकीं एका विशिष्ट प्रकारचे गुन्हेगार लूतचे जातीचे लोक होते आणि त्यांना शिक्षा सादर होण्याचें कारणहि हेंच झालें.

(२) येथें कोणी ह्मणेल कीं मुसल्मान मागाहून झाले. मग इब्राहिम व लूत चे वेळीं मुसलमान कोठून आले ? तर मुसलमान म्हणजे आज्ञाधारक ही प्रत्येक पैगंबराच्या अनुयायांची संज्ञा आहे. (पहा प्रस्तावना पृष्ठ ३. प्यारा ३.)

बळा)मुळें (गर्विष्ट होऊन) फिरून पडला; आणि ('मूसा'चें संबंधानें) म्हणाला कीं (हा तर) जादुगीर अथवा वेडा होय. ३९. तर आम्हीं त्याला व त्याच्या सैन्यांला (शिक्षेंत) धरिलें व त्यांना समुद्रांत नेऊन फेंकिलें; आणि त्यानें कामच असें केलें होतें कीं जो ऐकी तो थुथुकरी. ४०. आणि 'आद'(च्या लोकांच्या संहारा)मध्येंहि (ईश्वरसामर्थ्यांच्या बऱ्याच निशाण्या होत कीं) जेव्हां आम्हीं त्यांजवर एक हानिकारक वावटळ चालविली; ४१. तेव्हां ज्या ज्या वस्तूवरून ती जाई तिला कुजलेल्या हाडांप्रमाणें (चुराडा) केल्याशिवाय ती सोडीत नसे. ४२. आणि 'समूद'(च्या लोकांच्या पायमल्ली)मध्येंहि (ईश्वरसामर्थ्यांच्या बऱ्याच निशाण्या होत कीं) जेव्हां त्यांना सांगितलें गेलें होतें कीं (अमुक) एकावेळेपर्यंत (जगांत) सुखोपभोग घ्या. ४३. परंतु त्यांनीं आपल्या पालनकर्त्यांच्या हुकमापासून तोंड फिरविलें; तर त्यांना त्यांच्या देखतां देखतां एक भयंकर गर्जनेनें येऊन गांठिलें. ४४. तथापि त्यांच्यानें (शिक्षेपुढें) उभे राहववलें नाहीं, (किंबहुना ते मरूनच गेले); आणि (आम्हांपासून) बदलाहि घेऊं शकले नाहींत. ४५. आणि (त्यांच्या) पूर्वीं (आम्हीं) 'नूह'चे लोकांस (नष्ट करून चुकलों होतों); यांत संशय नाहीं कीं तेहि (फारच) आज्ञाभंजक लोक होते. ४६. आणि आम्हीं आकाशाला आपल्या बाहुबलानें रचिलें, आणि आम्हीं (फारच) व्यापक सामर्थ्य बाळगितों. ४७. आणि आम्हींच जमीनीस अंथरलें, तर (आम्हीं कसे) चांगले अंथरणारे आहोंत! ४८. आणि आम्हीं दरेक वस्तु दोन प्रकारची बनविली, कीं कदाचित् तुम्हीं (लोक

---

(१) 'अकीम' याचा अर्थ स्त्री असल्यास वांझ, वांझोटी असा होतो आणि पुरुष असल्यास निःसंतान व निपुत्री असा होतो. या जागीं त्याचा अर्थ अशी एक वावटळ आहे कीं, जींत नाश व पायमल्ली यां शिवाय दुसरे कांहींच नव्हतें. म्हणून आम्हीं त्याचा अर्थ हानिकारक असा केला आहे.

(२) प्राण्यांत तर बहुधा नर व मादी असे दोन प्रकार असतात; व निर्जीव वस्तूंत उच्च, नीच वा उत्कृष्ट, निकृष्ट, अथवा स्थित्यंतराच्या दृष्टीनें आणखी कोणा तऱ्हेचे दोन प्रकार निघूं शकतात. उदाहरणार्थ काळी, गोरी; लहान, मोठी; हलकी, भारी; हितकारक, अहितकारक; वगैरे

जगव्यवस्थेचें) मनन कराल. ४९. तर (हे पैगंबरा! या लोकांस सांग कीं) परमेश्वराकडेच पळा (म्हणजे त्याचाच आश्रय घ्या). मी तुम्हांस त्याच्याकडून (त्याच्या शिक्षेचें) स्पष्टपणें भय सुचवितों. ५०. आणि परमेश्वरासमागमें अन्य (कोणी) उपास्य ठरवूं नका. मी तुम्हांस त्याच्याकडून (त्याच्या शिक्षेचें) स्पष्टपणें भय सुचवितों. ५१. अशाच रीतीनें जे लोक यांच्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांच्यापाशीं जो जो कोणी पैगंबर आला (त्याला) त्यांनीं जादुगीर अगर वेडाच ह्मटलें. ५२. कां लोक एकमेकांस या गोष्टीची ताकीद करीत आले आहेत? किंबहुना (अस्सल गोष्ट ही होय कीं) हे (स्वतःच) शिरजोर लोक होत. ५३. म्हणून (हे पैगंबरा!) तूं यांची (मुळींच) पर्वा बाळगूं नकोस; कारण (यांच्या नास्तिकपणाबद्दल) तुजकडे कांहीं दोष नाहीं. ५४. पण (होय,) समजावीत राहा; कांकीं समजावित राहणें विश्वासूंना उपयोगी होतें. ५५. आणि मी 'जिन्न'—दैवत—व मनुष्यें यांस या हेतूनेंच निर्माण केलें आहे कीं त्यांनीं माझी उपासना करावी. ५६. मी त्यांजपासून कांहीं अन्नसंपत्तीची अपेक्षा बाळगीत नाहीं आणि याचीहि मला अपेक्षा नाहीं कीं ते मला खाऊं (पिऊं) घालतील. ५७. परमेश्वरच खुद्द मोठा अन्नदाता, बलवंत (व) जबरदस्त होय. ५८. तर ज्याप्रमाणें या (लोकां)च्या सोबत्यां (म्हणजे पूर्वींच्या जनतां)ची पाळी[१] (मुक्रर) होती त्याचप्रमाणें (या) जुलमी लोकांचीहि पाळी (मुक्रर) होय. (व पाळी यावयास वेळ आहे); म्हणून त्यांनीं माझ्याशीं (शिक्षेची) घाई करूं नये. ५९. सारांश, नास्तिकां(च्या स्थिती)वर, ज्या दिवसाचें त्यांना वचन दिलें जातें त्या (दुष्ट दिवसा)च्या मानानें फारच खेद होय. ६०.

(१) भावार्थ हा होय कीं, ज्याप्रमाणें अमुक एक मर्यादेपर्यंत पाणी जाऊन पोहोंचल्यानें नावेच्या बुडण्याची पाळी येते; तशीच पाप अथवा वेळेच्या दृष्टीनें या लोकांचीहि एक पाळी यावयाची असते ती आली कीं त्यांना शिक्षा ठोठावण्यांत येते.

# अध्याय ५२ वा.

## सूरतु–त्तूर.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ४९ आयात–महावाक्यें आहेत. 'तूर' म्हणजे पर्वत. येथें हा शब्द 'तूरे सीनीना' म्हणजे सिनाई पर्वत या अर्थी अध्यायाच्या आरंभीं योजिला आहे. म्हणून हें नांव.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**(हे पैगंबरा ! आम्हांला) 'तूर' (पर्वता)ची शपथ, १. आणि (तशीच) पसरट पटावर लिहिलेल्या ('लौहे महफूज') पुस्तकांची, २–३. व (तशीच देवलोकींचा 'काबा') 'बैतुल—मामूर'ची, ४. आणि (तशीच आकाशाच्या) उंच छताची, ५. व (तशीच) ऊत आलेल्या समुद्राची; ६. कीं तुझ्या पालनकर्त्याची शिक्षा (नास्तिकांवर) अवश्यच येऊन उतरेल. ७. कोणाची ताकद नाहीं कीं तिला टाळूं शकेल. ८. ज्या दिवशीं आकाश (समुद्राच्या पाण्याप्रमाणें) लाटा मारूं लागेल, ९. आणि पर्वत उडत उडत फिरतील. १०. त्या दिवशीं (पैगंबरांना) पाखंडी म्हणणारे, जे बकवादेंत पडून खेळ करीत राहिले आहेत त्यांस फारच दुःख होय. ११—१२. ज्या दिवशीं या लोकांस 'जहन्नम'च्या अग्नीकडे बलजबरीनें धक्के देऊन देऊन नेलें जाईल; १३. (तेव्हां यांना बजाविलें जाईल कीं) ज्याला तुम्हीं पाखंड म्हणीत होतां तो नरकाग्नी हाच होय. १४.**

(१) पुस्तकाची एक उपपत्ति जी आम्हीं भाषांतरांत पत्करली आहे ती होय. आतां पसरट पटावर लिहिलेलें असणें हें त्याच्या व्याप्तीच्या दृष्टीनें होय. कीं त्यांतून कोणतीच गोष्ट वगळली गेली नाहीं. कित्येक भाष्यकार पुस्तक म्हणजे लोकांचे कर्मपट समजले. आणि कदाचित सामान्य पुस्तक जें रुंद कागदांवर लिहिलें जातें तें असेल.

**तर कां हीहि नजरबंदी आहे ? अथवा तुम्हांस (आतांहि) सुचत नाहीं? १५. तुम्हीं यांत शिरा; मग तुम्हीं सहन करा अगर न सहन करा; तुमच्याठायीं (दोन्हीं गोष्टी) बरोबरच (होत); जशीं कर्मे तुम्हीं (जगांत) करीत राहिलां केवल त्यांचाच मोबदला तुम्हांस दिला जाईल. १६. (राहिले, परमेश्वराला) भिऊन वागणारे (ते तर) निःसंशय (स्वर्गाच्या बागांत) व सुखचैनींत; १७. त्यांच्या पालनकर्त्यानें जें कांहीं (सुखसाधन) त्यांना दिलें आहे त्यांतच ते आनंद करीत राहतील. आणि त्यांचा पालनकर्ता त्यांना नरकाचे शिक्षेपासूनहि (बालंबाल) बचावून ठेवील. १८. (आणि त्यांना परवानगी दिली जाईल कीं, जगांत) तुम्हीं जें (चांगलें) कर्म करीत राहिलां त्याच्या मोबदला (खुशाल) खा प्या; (व तें तुम्हांस) रुचो पचो ! १९. (व मौजेनें) बरोबर रांगेनें हांतरलेल्या तक्तांवर टेंकून टेंकून (बसा). आणि (याशिवाय) आम्हीं मोठमोठाल्या डोळ्यावाल्या अप्सरांशीं त्यांचा विवाह लावून देऊं. २०. आणि ज्या लोकांनीं विश्वास धरिला व त्यांची संतति विश्वासासहित (सुकृत्यांत) त्यांचें अनुकरण करीत राहिली, (मग जरी कर्मे आचरण्यांत त्यांच्याकडून किंचित् कसूरहि झाली असेल तरीदेखिल स्वर्गवासीयांच्या खातर) आम्हीं त्यांच्या संततीलाहि (स्वर्गांत) त्यांच्याबरोबर नेऊन सामील करूं; आणि स्वर्गवासी यांच्या कर्मा(च्या मोबदल्यां)तून आम्हीं कांहींच कमी करणार नाहीं. (आणि) प्रत्येक मनुष्य आपल्या कर्मांच्या मोबदला गहाण होय. २१. आणि**

---

(१) ही गोष्ट त्यांना पदरीं माप घालण्यासाठीं ह्मणजे त्यांची खात्री करण्यासाठीं सांगितली जाईल, कीं नरकाग्नीस त्यांच्या समक्ष आणून हजर केलें व त्यांस विचारिलें, काय हो ही नजरबंदी आहे ? आणि कां मुळांत नव्हती ती गोष्ट आणून दाखविली आहे ? परंतु त्यांना यातना होतील, ह्मणून ते नजरबंदी म्हणूं शकणार नाहींत. दुसरें हें कीं, जगांत तर त्यांना नरक दिसत नव्हता व ते त्यास नाकारीत होते. आतां त्यांच्या डोळ्यांसच नव्हे तर रोमांरोमांस कळून येईल. आणि त्यांना तंबीसाठीं विचारलें जाईल कीं, आतांहि नरकाग्नि दिसून येतो किंवा नाहीं? पण त्यांच्या जवळ ओशाळपणा व पश्चात्ताप याशिवाय उत्तरच मिळणार नाहीं.

(२) कर्मांच्या मोबदला गहाण असण्याचा अर्थ हा कीं, मोक्ष चांगल्या कर्मांवर अवलंबून आहे. चांगलीं कर्मे कराल तर मोक्षप्राप्ति होईल.

ज्या फळफळादिची व मांसाची स्वर्गवासीयांस इच्छा होईल त्यांची आम्हीं त्यांच्यासाठीं रेलचेल करून टाकूं. २२. ते तेथें परस्परांस (मद्याचे) पेले हेका करून करून देऊं करतील; त्या(च्या निशें)त (त्यांना) बरळ (लागणार)नाहीं व (त्यांचेकडून) कसलेंच पापाचरण (होणार) नाहीं. २३. आणि (अशीं स्वरूपवान्) मुलें (त्यांच्या सेवेसाठीं) त्यांच्यापाशीं येरझारा घालतील; कीं जणूं तीं जतनेनें ठेविलेलीं मोत्येंच होत. २४. आणि ते एकमेकांकडे वळून आपसांत कुशल प्रश्न करतील. २५. (कित्येक) म्हणतील कीं (गड्या!) आम्हीं (या)पूर्वी आपल्या घरीं (अंतिम परिणामाला फारच) भीत असूं. २६. तर परमेश्वरानें आम्हांवर (मोठीच) कृपा केली व आम्हांला (नरकाग्नीचे) झळीच्या शिक्षेंतून वांचवून घेतलें. २७. (याच्या)पूर्वी आम्हीं त्याचा धांवा करीत होतों. निःसंशय तो (फारच) परोपकारी (व) दयाळू होय. २८. तर (हे पैगंबरा! तूं या लोकांस) उपदेश करीत राहा. तथापि तूं आपल्या पालनकर्त्याच्या कृपेनें भविष्य सांगणारा (जोशी)हि नाहींस व वेडाहि नाहींस. २९. कां (हे लोक तुझ्यासंबंधीं) म्हणतात कीं, (हा) कवि आहे, (व) आम्हीं त्याच्यासंबंधानें कालचक्राची वाट पाहात आहों? ३०. (तूं यांना) सांग कीं, (फार उत्तम;) तुम्हींहि वाट पाहत राहा; मीहि तुम्हांबरोबर वाट पाहात राहतों. ३१. कां यांची बुद्धि यांना ह्या (गोष्टी) शिकवित्ये अगर हे लोक (जात्याच) शिरजोर होत? ३२. अथवा ते म्हणतात कीं, या(गृहस्था)नें कुराण आपल्या आपणच रचिलें आहे? (हें तर त्यांच्या आपल्याच तोंडाचें बोलणें होय;) किंबहुना (अस्सल गोष्ट ही कीं) हे (मुदलांत) विश्वासच धरूं इच्छित नाहींत. ३३. म्हणून जर हे (आपल्या दाव्यांत) खरे आहेत तर असल्याच तऱ्हेची एक गोष्ट (यांनींहि बनवून) आणावी! ३४. कां कोणाच्या निर्माण केल्यावांचून (हे आपणच) निर्माण होऊन गेले आहेत अगर हेच (सृष्टीस) निर्माण करतात? ३५. अथवा यांनीं आकाश व पृथ्वीस निर्माण केलें आहे? (यांचा तर काय भगदूर होता?) पण (असें म्हणा कीं, हे लोक परमेश्वरावर) विश्वासच ठेवूं पाहत नाहींत. ३६. (हे पैगंबरा!) कां तुझ्या पालनकर्त्याचे (दयारूपी) खजिने यांच्याच कबज्यांत आहेत?

अगर हे (कोठले) अधिकारी आहेत ? ३७. अथवा यांच्यापाशीं एखादी शिडी आहे कीं, तीवर (चढून आकाशांतील गोष्टी) हे ऐकूण येत असतात ? म्हणून जर यांच्यापैकीं कोणी (आकाशांतील गोष्टी) ऐकून येत असेल तर त्यानें एखादें स्पष्ट प्रमाण पुढें करावें. ३८. कां परमेश्वरासाठीं मुलीं व तुम्हां लोकांसाठीं मुलगे ? ३९. अगर (हे पैगंबरा !) तूं यांजपासून( संदेश पोहोंचविण्याबद्दल) कांहीं वेतन मागतोस, कीं हे (त्या) दंडामुळें भारावून बसतात ? ४०. अथवा यांच्यापाशीं अदृष्टाचें ज्ञान आहे (कीं यांना सांगितलें जाईल) तर हे (तें तंतोतंत) लिहून देतील ?४१. अगर यांचा उद्देश कांहीं धोका देण्याचा आहे ? तर (हे) नास्तिक आपणच धोक्यांत होत. ४२. अथवा परमेश्वरावांचून यांचा (अन्य) कोणी उपास्य (देव) आहे ? तर (हे लोक) ज्यांना (परमेश्वराचे) जोडीदार मानतात त्यांजपासून परमेश्वर पवित्र होय. ४३. आणि जरी एखादा आकाशाचा तुकडा खालीं पडतांना हे पाहतील तरीहि (ईश्वरीशिक्षेस भिणार नाहींत. किंबहुना) म्हणूं लागतील, (काय झालें, हाहि एक प्रकारचा) ढग होय कीं, जमून कठीण होऊन गेला आहे. ४४. तर (हे पैगंबरा !) यांना (यांच्याच स्थितीवर) राहूं दे; येथपर्यंत कीं ज्या दिवशीं (यातनामुळें) यांना मूर्च्छा येऊन जाईल असा यांचा दिवस यांच्या दृष्टीसमोर येईल. ४५. (आणि) त्या दिवशीं यांचे डावपेंच यांच्या कांहींच कामा येणार नाहींत व यांना (कोठून) मदतहि मिळणार नाहीं. ४६. आणि (या) जुलमी लोकांस ह्या(पुनरुत्थानाचे शिक्षे)शिवाय (जगांत आणखीहि) शिक्षा (होणें) आहे. परंतु यांच्यापैकीं बहुतेकांस माहीत

(१) जेव्हां कोणाहि मनुष्याला एखाद्या गोष्टीची पक्की खात्री असते तेव्हां तो ती लिहून द्यावयासहि तयार होऊन जातो. याचें उदाहरण असें कीं, रोम ह्मणजे ग्रीस व इराणच्या लढाईसंबंधानें हजरत पैगंबरसाहेबांस प्रकटीकरणाद्वारें माहीत झालें होतें कीं, जरी रोमन लोक यावेळीं पराभूत होऊन गेले आहेत तरी ते कांहीं वर्षानंतर पुन्हां विजयी होतील; आणि हजरत पैगंबरसाहेबांस वह्य ह्मणजे दिव्य प्रकटीकरणावर पूर्ण विश्वास होता म्हणून त्यांनीं तें जशाचें तसेंच कुराणांत लिहिवविलें व जगांत चोहोंकडे तिचा पुकारा करविला. पण ज्यांना अशी खात्री नाहीं ते कसे लिहिववूं शकणार ?

**नाहीं. ४७. आणि (हे पैगंबरा !) तूं आपल्या पालनकर्त्याच्या हुकमाची वाट पाहत मुकाट्यानें बैस; कीं तूं आमच्या डोळ्यांपुढें (संरक्षणांत) आहेस; आणि ज्यावेळीं तूं (निजून) उठशील त्यावेळीं आपल्या पालनकर्त्याच्या स्तवनाबरोबर (त्याचें) पावित्र्यवर्णनहि करीत जा; ४८. आणि रात्रीच्या एका भागांतहि त्याची पवित्रता वर्णीत जा व नक्षत्रांच्या(मावळल्या)नंतरहि. ४९.**

---

(१) या महावाक्यांत रात्रीच्या नमाजीचा मजकूर आहे. रात्रीचा वेळ झोंपेचा व विश्रांतीचा असतो व जिकडेतिकडे सर्व स्वस्थ व सामसूम असतें; व ही गोष्ट चित्ताच्या एकाग्रतेसाठीं आवश्यक आहे; ह्मणून रात्रीच्या उपासनेस दिवसाच्या उपासनेवर श्रेष्ठत्व आहे. रात्रीं निजून उठल्यावर तहज्जुद्ची नमाज आहे. रात्रीच्या एका भागांत मगरिब व ईशा या नमाजी आहेत; व नक्षत्रांच्या अस्त पावल्यानंतर सकाळची नमाज आहे.



# अध्याय ५३ वा.

## सूरतु–न्नज्म.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ६२ आयात-महावाक्यें आहेत. ह्या अध्यायाच्या आरंभीं 'नज्म' ह्मणजे नक्षत्र हा शब्द आला आहे यावरून हें नांव पडलें. कित्येकांनीं याचा अर्थ 'सुरैया' ह्मणजे कृत्तिका नक्षत्र असा घेतला आहे. कोणी ह्मणतात कीं, तें उल्का नक्षत्र होय.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों).

(लोकांनों !आम्हांस) नक्षत्राची शपथ, कीं जेव्हां तें (आकाशांतून) तुटून पडतें; १. कीं तुमचा सोबती ('मोहंमद' सरळमार्गाहून) चळलाहि नाहीं व बहकलाहि नाहीं. २. आणि तो (आपल्या) मनेच्छेनें बोलत नाहीं. ३. (किंबहुना) हें (कुराण जें तो वाचून ऐकवितो तें दिव्य) प्रकटीकरण होय कीं तें त्याला प्रकट केलें जातें. ४. (आणि) त्याला ('जिब्रील'दूत) ज्याच्या (आत्मिक) शक्ति (फारच) अबाढव्य अशा आहेत तो शिक्षण देतो; ५. (आणि) त्याची (शारीरिक) शक्तिहि (फार) जबरदस्त होय; कीं तो (आपल्या मूळच्या स्वरूपांत) साराचासारा (पैगंबरासमक्ष) येऊन उभा झाला; ६. व तो त्यावेळीं अत्युच्च क्षितिजावर (म्हणजे आकाशाच्या एके बाजूस चांगल्या उंच जागीं) होता. ७. नंतर तो त्याच्या जवळ आला व (इतका त्याच्याकडे) झुकला; ८. कीं (उभयतांमध्यें) दोन कमानी इतका अंतर राहून गेला; किंबहुना (याहूनहि) कमीच. ९. त्यावेळीं परमेश्वरानें आपला सेवक ('मोहंमद')यास ('जिब्रील'द्वारें) जें कांहीं प्रकट करावयाचें होतें तें प्रकट केलें. १०. (पैगंबरानें) जें कांहीं पाहिलें होतें त्यांत (त्याच्या) मनानें कांहीं खोटें (मिसळून) दाखविलें नाहीं. ११. पैगंबर जो

('जिब्रील'ला) पाहतो आहे त्यावर कां तुम्हीं लोक त्याच्याशीं झगडतां? १२.
आणि वास्तविक पाहतां (झगडण्याची कांहीं गोष्टच नाहीं; कारण,)
त्यानें तर ('मेराज' म्हणजे आकाशारोहणावेळीं) 'जिब्रीला'ला आण-
खीहि एकदां (मूळ स्वरूपांत आपल्यापाशीं आलेला) पाहिलें होतें, १३.
(व ही गोष्ट) 'सिद्रतुल्-मुन्तहा'जवळ (घडून आली होती); १४. कीं
जेथें (पवित्राचरणी सेवकांच्या) राहण्याची जागा, स्वर्ग आहे. १५.
त्यासमयीं (त्या) 'सिद्रा'वर जें कांहीं अच्छादून राहिलें होतें तें
अच्छादिलें होतें; (म्हणजे दिव्य तेज) १६. (त्यावेळींहि पैगंबराची) दृष्टी
(कोणीकडेहि) चकली नाहीं व (जागेवरून) चळलीहि नाहीं. १७.
कांहीं संशय नाहीं कीं पैगंबरानें (या प्रसंगीं) आपल्या पालनकर्त्या(च्या
सामर्थ्या)चे मोठमोठे चमत्कार पाहिले. १८ (हे मूर्तीपूजकांनों!)
बरें, तुम्हीं 'लात' व 'उज्जा' या (मूर्तींच्या स्थिती)चें अवलोकन केलें? १९.
आणि (तशीच) आणखीहि (एक) तिसरी (देवी) जी 'मनात' होय
तिचेंहि; (कीं यांच्यांत कांहीं तरी सामर्थ्य आहे)? २०. (काय हो!)
तुम्हां लोकांसाठीं कां मुलगे व परमेश्वरासाठीं मुली? २१. असें जर
असेल, तर ही मोठी अन्यायाची वांटणी होय. २२. ह्या (मूर्ती) तर
निव्वळ नांवेंच (नांवें) होत कीं जीं नांवें तुम्हीं व तुमच्या वाडवडिलांनीं

(१) 'सिद्रा' अरबींत बोरीच्या झाडाला म्हणतात; आणि 'सिद्रतुल-मुन्तहा' म्हणजे सातव्या आकाशावर जें बोरीचें झाड आहे तें होय. त्याच्यापलिकडे 'जिब्रील'सारख्या प्रमुख दुतांसहि रीघ नाहीं व ते येथपर्यंतच पोहोंचूं शकतात. ह्या जगांत कित्येक गोष्टी अशा असतात कीं, ज्यांची आम्हीं खरी कल्पनादेखील करूं शकत नाहीं. तर मग मनुष्याचें ज्ञान दिव्य गोष्टींचें आकलन कसें करणार? यावरून हें समजतां कामा नये कीं, ह्या गोष्टी कल्पनातीत आहेत म्हणून खऱ्या नव्हेत. कारण, कांहीं वर्षांपूर्वी झेपेलीन, पाणबुडी वगैरे पुष्कळ गोष्टींची कल्पनाहि आली नव्हती; पण कालांतरानें आतां तीं प्रत्यक्ष पाहतां येतात. ह्याचप्रमाणें मानवांतील गुप्त शक्तिनें विकास पावून पुढें त्यांस दिव्यदृष्टी प्राप्त होऊन या गोष्टींचें सत्यत्व पटेल हें संभाव्य आहे. म्हणून आतांच त्याविषयीं वाटाघाट करणें व्यर्थ; व ह्या गोष्टी विश्वासास बाधक नाहींत.

(२) 'लात,' 'उज्जा' व 'मनात,' हीं अरबलोकांच्या मूर्तींचीं नांवें होत; कीं ते त्यांस इस्लामधर्माच्या प्रसारापूर्वी देवता व देवी समजून त्यांची पूजाअर्चा करीत होते.

(आपल्याकडून) ठेवून दिलीं आहेत. परमेश्वरानें तर यां(च्या उपास्य होण्या)चें कोणतेंच प्रमाण उतरलें नाहीं. हे लोक तर केवळ अटकळीवर व (आपल्या) जिवांस जी वांच्छा होते त्याप्रमाणेंच चालतात. आणि (चमत्कार हा कीं) यांच्या पालनकर्त्याकडून यांच्यापाशीं सन्मार्गहि येऊन चुकला आहे. (यावरहि ते मानीत नाहींत.) २३. कां (कोठें) माणसाला मनस्वी[1] इच्छाहि (प्राप्त झाली) आहे ? २४. तर परलोक व इहलोक (सर्व कांहीं) परमेश्वराच्याच अखत्यारांत होत. २५. आणि कित्येक देवदूत आकाशांत (पडून) आहेत कीं त्यांची शिफारस कांहींहि कामा येत नाहीं; पण जेव्हां परमेश्वर ज्या कोणाहि संबंधानें (शिफारस करवूं) इच्छील; (त्याच्या शिफारशीची देवदुतांस) परवानगी देईल आणि (त्यांच्या शिफारशीस) पसंत करील तेव्हांच मात्र. २६. जे लोक परलोकींचा विश्वास बळगीत नाहींत तेच तर दुतांस स्त्रियांचीं नांवें देतात (कीं त्या परमेश्वराच्या मुलीं होत). २७. आणि वास्तविक पाहतां, त्यांना याचें कांहीं ज्ञानाहि नाहीं. ते तर केवळ अटकळीवर चालतात; आणि अटकळीचा तर निश्चित गोष्टीपुढें कांहींच उपयोग होत नसतो. २८. तर (हे पैगंबरा !) जो कोणी आमच्या स्मरणाकडून तोंड फिरवील व इहलौकिक आयुष्याशिवाय त्याला (आणखी कोणा गोष्टीची) आकांक्षाच नसेल तर अशा(इसमा)चा तूं किंचितहि पर्वा करूं नकोस. २९. त्यांच्या ज्ञानाची पोहंच इतकीच आहे. निःसंशय, तुझा पालनकर्ता, जे लोक त्याच्या मार्गापासून चळले आहेत त्यांना खूप जाणतो. आणि जे लोक सन्मार्गी लागले आहेत त्यांनाहि तो खूप जाणतो. ३०. आणि जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत

(१) ह्मणजे माणसाच्या मनांत जी लहर येते तीप्रमाणें कधींहि कार्य होत नाहीं. तर मग त्यानें परमेश्वरावर हुकूम कां गाजवावा व आपल्याला वाटेल त्याला आपला शिफारसी वा आपला पैगंबर कसा नेमावा ? आणि आपल्या मनानेंच एक धर्म निर्माण करून इहपरलोकीं इनाम मिळविण्याच्या अटी त्यावर कां लावाव्यात ? भावार्थ हा कीं, मूर्तीपूजाहि करीत जावी व परमेश्वरापाशीं इहपरलोकींच्या साफल्याचीहि आशा बाळगावी हा वेडगळपणा होय. इहपरलोकींचें सर्व कल्याण परमेश्वराच्याच हातीं आहे ह्मणून मनुष्याला त्याचीच उपासना केली पाहिजे.

आहे तें (सर्व) परमेश्वराचेंच होय. (म्हणजे त्यानेंच त्यांस बनविलें व निर्माण केलें; त्यांतल्यात्यांत माणसालाहि;) कीं (अखेर) ज्या लोकांनीं वाईट कर्मे केलीं आहेत त्यांना त्यांनीं जें जें केलें त्याचा मोबदला द्यावा आणि ज्यांनीं चांगलीं कर्मे केलीं आहेत त्यांना (तसाच)चांगला मोबदला द्यावा. ३१. (चांगलीं कर्मे करणारे म्हणजे) जे लोक महापातकें व निर्लज्जपणाचीं कामें याविषयीं जपत राहतात ते; पण लहान सहान पातकें मात्र (कीं त्यांपासून विरलाच मनुष्य बचावूं शकतो. हे पैगंबरा!) निःसंशय, तुझ्या पालनकर्त्याची क्षमा (फार) व्यापक होय. (आणि) तो (त्या वेळेपासून) तुम्हां लोकांस खूप जाणतो कीं जेव्हां त्यानें (पहिल्या-प्रथम) तुम्हां(मानवां)स मातींतून बनवून उभें केलें व जेव्हां तुह्मीं आपल्या आईच्या पोटांत मूलांकुर (बच्चे) होतां. तर आपला (फार) सोंवळेपणा (व्यक्त) करूं नका. जो कोणी (परमेश्वराला) भिऊन वागतो त्याला तोच खूप जाणतो. ३२. (हे पैगंबरा !) बरें, तूं त्या मनुष्या(च्या स्थिती)कडेहि नजर केलीस कीं ज्यानें (तुझ्या बोधाकडून) तोंड फिरविलें; ३३. आणि थोडेसें (परमार्थात) देऊन[1] (मग दगडासारखा) कठोर होऊन गेला ? ३४. कां त्याच्यापाशीं अदृष्टाचें ज्ञान आहे कीं, त्याला (आपला परिणाम) दिसून येऊं लागला आहे ? ३५. कां त्याला "मूसा'च्या लेखांत ज्या (गोष्टी लिहिलेल्या) आहेत त्यांची बातमी पोहोंचली नाहीं ? ३६. आणि (तशीच) 'इब्राहिम' ज्यानें (आपल्या आयुष्यांत ईश्वरोपसनेचा हक्क) पुरा केला त्याच्या(लेखां)तहि ? ३७. (त्या लेखांत हें लिहिलें आहे) कीं कोणीहि ओझें वाहणारा दुसऱ्यां(च्या पापां)चें ओझें (आपल्यामानेवर) घेणार नाहीं. ३८. आणि हें कीं माणूस जितके प्रयत्न करील केवळ तितकेंच त्याला (प्राप्त) होईल; ३९. आणि हें कीं त्याचे प्रयत्न पुढें जातां (पुनरुत्थानाचे दिवशीं) निरीक्षिले जातील; ४०. नंतर, त्याला त्याचा अगदीं भरपूर मोबदला दिला जाईल; ४१. आणि हें कीं (अखेर सर्वांचा) अंत तुझ्या पालनकर्त्या-कडे होईल. ४२. आणि हें कीं तोच हंसवितो व रडवितो. ४३. व हें कीं तोच मारतो व जिववितो. ४४. आणि हें कीं जेव्हां वीर्य

(१) म्हणजे तो जें देऊन चुकला आहे तें आपल्या मुक्तीसाठीं पुरेंसें समजतो व थोडेंसें देण्यावरच अभिमान बाळगितो.

(मादीच्या गर्भाशयांत) पाडिलें जातें तेव्हां तोच (परमेश्वर) त्यापासून नर व मादी असे दोन प्रकार(चे प्राणी) उत्पन्न करितो. ४५–४६. आणि हें कीं दुसऱ्यांदा (जिववून) उठाविणें त्याच्याचकडे होय. ४७. आणि हें कीं तोच (लोकांस) श्रीमंत व मातब्बर करितो. ४८. आणि हें कीं तोच लुब्धक[1](ताऱ्या)चा मालक होय. ४९. आणि हें कीं त्यानेंच 'आद[2]'(च्या) पहिल्या(लोकां)चा नाश केला होता. ५०. आणि (ह्याप्रमाणेंच) 'समूद'चा कीं (त्यांच्यांतून कोणालाहि) बाकी सोडिलें नाहीं ५१. आणि (यांच्या) पूर्वीं 'नूह'च्या लोकांचा; यांत संशय नाहीं कीं हेच स्वतः फार जुलमी व फार शिरजोर होते ५२. आणि ('लूत'च्या लोकांच्या) पालथलेल्या वस्त्याहि त्यानेंच पालथ्या पाडिल्या होत्या. ५३. तर त्या (वस्त्या)वर जी तवाई पसरली ती पसरली. ५४. तर (हे मानवा!) तूं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांत शंका[3] काढीत जाशील? ५५ पूर्वील भय सुचविणाऱ्यां(पैगंबरां)पैकीं एक भय सुचविणारा हा(कलियुगी पैगंबर)हि होय. ५६. (पुनरुत्थान) जें येणारें तें जवळ येऊन पोहोंचलें. ५७. परमेश्वराशिवाय कोणाहि (मनुष्या) चा मखदूर नाहीं कीं या(आपत्ती) स टाळूं शकेल ५८. तर कां तुम्हीं (लोक) ह्या गोष्टीचें आश्चर्य करितां? ५९ आणि (पुनरुत्थानाचा उल्लेख ऐकून) हंसतां व तुम्हांस रडें येत नाहीं? ६०. आणि वास्तविक पाहतां, तुम्हीं (इतके) गाफिल आहां! ६१. तर परमेश्वरापुढें साष्टांग नमस्कार घाला व(त्याचीच) उपासना करा. ६२.

---

(१) अरबांचीं कित्येक घराणीं 'शेअरा'-ह्मणजे लुब्धक ताऱ्याचीहि पूजा करीत होते म्हणून त्याचा मुख्यत्वेंकरून उल्लेख केला गेला आहे.

(२) हे 'आदेऊला' म्हणजे पहिले आद हजरत हूदचे लोक होते व ते वावटळानें नाश पावले; आणि 'आदेसानियः' ह्मणजे दुसरे आद हे आदे इरम ह्मणवितात व त्यांचा मजकूर शेवटील तिसाव्या भागाच्या 'सूरतु-फज्र'मध्यें आहे.

(३) हजरत मूसा व हजरत इब्राहीम यांच्या लेखांच्या वा पुस्तकांच्या मजकुराचा खुलासा वर दिलेलाच आहे. त्यांत देणग्यांचा व शिक्षा-दंडाचाहि उल्लेख आहे. देणग्या तर देणग्याच आहेत पण शिक्षाहि एका मानानें देणग्याच होत. कारण परमेश्वरानें विश्वासूंस सुरक्षित राखिलें व त्यांच्या शत्रूंना ह्मणजे नास्तिकांना विध्वस्त करून पृथ्वीवर पुण्याई व शांतता काईम केली. या शिवाय त्या लेखांचें उतरणें हीहि आपल्या ठिकाणीं एक देणगीच होय.

# अध्याय ५४ वा.

## सूरतुल्-कमर.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ५५ आयात–महावाक्यें आहेत. मौलवी शाह अबदुल कादिर साहेब यांनीं या स्थळीं लिहिलें आहे कीं, हज्जच्या मोसमांत मध्यान्ह रात्रीं नास्तिक लोक जमा होते व हजरत पैगंबरसाहेब–परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो–हे त्यांना उपदेश करून समजावीत होते. तेव्हां त्या लोकांनीं चमत्कार व चिन्ह मागितलें; हजरत पैगंबरसाहेब म्हणाले, पाहा आकाशाकडे; तों चंद्र दोन तुकडे होऊन गेला. त्यांतला एक तुकडा पूर्वेकडे आला व एक पश्चिमेकडे; येथ-पर्यंत कीं, त्यांनीं चांगल्या प्रकारें निरखून निरखून पाहिलें. मग ते तुकडे आप-सांत मिळून गेले. हें चिन्ह होतें पुनरुत्थानाचें कीं, पुढें सर्व कांहीं असेंच फाटेल व दुभागेल. मौलवी शाह अबदुल कादिर साहेबांनीं जें कांहीं लिहिलें आहे त्यावर सर्व भाष्यकारांचें मतैक्य आहे. याशिवाय हजरत पैगंबरसाहेबांच्या हदीसे सहीद् म्हणजे शोधाअंतीं सत्य ठरलेल्या वचनसंग्रहावरूनहि या चमत्काराचें घडून येणें सिद्ध होतें. सदरहू मौलवी साहेबांनीं हेंहि नमूद केलें आहे कीं, अबू–जहल् वगैरे नास्तिकांनीं प्रवासाहून आलेल्या लोकांस विचारिलें कीं अमुक अमुक रात्रीं तुम्हीं आकाशावर कांहीं चमत्कार पाहिला होता काय? त्यांनीं उत्तर दिलें कीं त्या रात्रीं आम्हीं सर्वांनीं पाहिलें कीं चंद्र दुभागला व पुन्हां मिळून गेला होता. कित्येक तत्वज्ञानी लोकांचा समज असा आहे कीं, चंद्राचें दुभागणें पुनरुत्थानांत घडून येईल. म्हणून ते असें भाषांतर करतील कीं '(पुनरुत्थानाची) घटका जवळ येऊन लागली व (असें समजा कीं) चंद्र फाटून गेला.' यांत संशय नाहीं कीं ही एक विलक्षण गोष्ट आहे व ती लक्षांत येत नाहीं; व ह्मणूनच तो 'मोजेज़ा' म्हणजे चमत्कार होय. परंतु पुनरुत्थान हें याहू-नहि विलक्षणच आहे; आणि आश्चर्य हें कीं तत्वज्ञानी मुसलमानांस पुनरुत्थान जें अधिक आश्चर्यकारक होय तें होणें मान्य आहे; पण हा चंद्राचा चमत्कार

त्यांस मान्य नाहीं ! हें त्यांचें किती तरी बुद्धिमांद्य आहे ! या वर्णनावरून या अध्यायास चंद्राचें प्रकरण असें ह्मणतात.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)**

(पुनरुत्थानाची) घटका जवळ येऊन लागली आणि (पैगंबराच्या पराक्रमानें) चंद्र फाटून गेला. (कीं, पुनरुत्थानाच्या जवळ येण्याचें हेंहि एक चिन्ह होय.) १. आणि (हे लोक) जरी कोणी एखादा चमत्कारहि पाहतील तरी हे (सत्याकडून) तोंड फिरवतील व म्हणतील कीं, (हीहि एक प्रकारची) जादु आहे कीं, जी नित्य होत आली आहे. २. आणि या लोकांनीं (पैगंबरांस) पाखंडी म्हटलें व आपल्या मनेच्छेचें अनुकरण केलें; आणि प्रत्येक गोष्टीचा एक काल मुक्रर ठरलेला आहे; (त्यांतल्या त्यांत शिक्षेचाहि). ३, आणि यांना तर (पूर्वीच्या जनतांचे) इतके अहवाल पोहोंचून चुकले कीं, ज्यांत (पूर्ण) तंबी होती ४. (व तंबी-खेरीज) संपूर्ण शहाणपणा (च्या गोष्टी होत्या.) पण (या लोकांस) भिव-विणेंहि कांहीं उपयोगी होत नाहीं. ५ तर (हे पैगंबरा !) तूं या लोकां-पासून एकीकडे हो. ज्या दिवशीं बोलाविणारा (ह्मणजे 'इस्राफील' दूत यांना) अशा (एका) गोष्टीकडे बोलावील कीं, जिचा (यांच्या चित्तासहि) परिचय नसेल; ६.(आणि ओशाळपणामुळें)यांचे डोळे नमलेले असतील; (तर त्या दिवशीं) ते थडग्यांतून(असे) निघून पडतील कीं, जणूं हे टोळ होत (कीं ते चहूंकडे) पसरलेले (आहेत). ७. (व ते) बोलविणाराकडे धांव घेत चालले जात असतील (आणि) नास्तिक म्हणत(जात)असतील कीं, हा (तर फारच) कठीण दिवस होय ! ८. या लोकांच्या पूर्वी 'नूह'चे लोकांनींहि ( पैगंबरीला सपशेल नाकारून सर्व पैगंबरांना) पाखंडी ह्मटलें (व त्यांतल्यात्यांत) आमचा सेवक ('नूह') यालाहि पाखंडी म्हटलें. आणि ते (त्याच्यासंबंधीं) म्हणाले कीं, (हा) खुळा आहे; व त्याला झिडकारलें गेलें (तें वेगळेंच). ९. म्हणून त्यानें आपल्या पालन-कर्त्याचा धांवा केला कीं, मी (त्यांच्या हातून) जेरीस आलों आहें; तर

(१) म्हणजे कर्मांचा हिशेब अगर पुनरुत्थानाचे इतर दारुण व भयानक वृत्तांत.

आतां तूंच (यांजकडून माझा) बदला घे. १०. तथापि आम्हीं मुसळधार पाण्यानें आकाशाचीं द्वारें उघडून टाकिलीं. ११. आणि आम्हीं जमिनींतून झरे फोडून वाहविले. तर मग नेमलेल्या अंदाजावर (जमीन व आकाशाचें) पाणी मिळून (एक होऊन) गेलें. १२. आणि 'नूह'ला आम्हीं (लांकडाचे) तक्ते व खिळे यांनीं बनलेल्या(गलबता)वर स्वार करवून घेतलें; १३.(व तें) आमच्या डोळ्यांपुढें तरंगत राहिलें.(हा)ज्या ('नूह')चा कृतघ्नतेनें नकार केला गेला होता त्याचा बदला (होता).१४. आणि आम्हीं या(वृत्तांता)ला एक (बोधपर) नमुना करून सोडला. तर कोणी आहे कीं, (यापासून) बोध घेईल ? १५. तर माझी शिक्षा व माझें भिवविणें (पाहिलेंस, त्याचें फळ) कसें झालें तें ? १६. आणि अर्थात् आम्हीं कुराणाला (लोकांच्या) बोध घेण्यासाठीं सुलभ केलें आहे; तर कोणी आहे कीं, बोध घेईल ? १७. 'आद'(च्या लोकां)नींहि (पैगंबरांस) पाखंडी म्हटलें; तर माझी शिक्षा व माझें भिवविणें (पाहिलेंस त्याचें फळ) कसें झालें तें ? १८. कीं आम्हीं एका दुर्दैवी दिवशीं कीं, ज्याचें दुर्दैव (कोणा तऱ्हेनें टाळल्यानेंहि) टळत नव्हतें, त्यांच्यावर एक सोसाट्याची वावटळ चालविली; १९. (व) ती लोकांना (जागेवरून असें) उखडून फेंकीत होती कीं, जणूं ते मुळांसह उपटलेल्या खजुरीचे ओंडे होत. २०. तर माझी शिक्षा व माझें भिवविणें (पाहिलेंस, त्याचें फळ) कसें झालें तें ? २१. आणि अर्थात् आम्हीं कुराणाला (लोकांच्या) बोध घेण्यासाठीं सुलभ केलें आहे; तर कोणी आहे कीं, बोध घेईल ? २२.'समूद'(च्या लोकां)नींहि भय सुचविणाऱ्यां (पैगंबरां)स पाखंडी म्हटलें (व त्यांतल्यात्यांतच आपला पैगंबर 'साल्हे' यालाहि).२३. आणि ते (त्याच्यासंबंधीं) म्हणाले कीं, आम्हीं कां अशाचें अनुकरण करावें कीं तोहि आम्हांपैकींच एक मनुष्य होय ? असें करूं तर आम्हीं चुकींत (पडूं) व नरकाग्नींत (जाऊं).२४. कां आमच्यामधून याच्यावरच प्रकटीकरण टाकलें गेलें ? असोनसो, हा(इसम)लबाड(व) बढाईखोर आहे. २५. (तेव्हां आम्हीं 'साल्हे'ला सांगितलें कीं) लवकरच यांना उद्यां (परवांच) माहीत होऊन जाईल कीं, कोण लबाड (व) बढाईखोर

(१) शिक्षेचा वायदा जवळ येऊन लागला होता म्हणून उद्या असें म्हटलें

आहे ? २६. आम्हीं यांच्या अजमात्रिण्यासाठीं एक सांढणी पाठविणार आहों; तर तूं यांना पाहत राहा (कीं हे तिचें कसें स्वागत करतात), आणि सहन करून बैस; २७. आणि यांना सूचना दे कीं, यांच्यांत (व सांढणींत) -पाण्याची वांटणी (झाली) आहे; तर हरेक (पक्षानें आपापल्या) पाळीवर (पाणी पिण्यासाठीं) हजर (व्हावें). २८. मग त्यांनीं आपला सोबती ('कुदार') यास बोलाविलें, तर त्यानें (सांढणीवर) हात टाकला व (तिच्या) धोंडे शिरा कापल्या. २९. तर माझी शिक्षा व माझें भिवविणें (पाहिलेंस त्याचें फळ) कसें झालें तें ? ३०. कीं आम्हीं त्यांच्यावर एक (भयंकर) गर्जना (शिक्षेदाखल) पाठविली; तों, कुंपण घालणाराच्या तुडविलेल्या कुंपणासारखे ते (पायमाल) होऊन गेले. ३१. आणि अर्थात् आम्हीं कुराणाला (लोकांच्या) बोध घेण्यासाठीं सुलभ केलें आहे; तर कोणी आहे कीं बोध घेईल ? ३२. 'लूत'च्या लोकांनींहि भय सुचविणाऱ्यां(म्हणजे पैगंबरां)स पाखंडी म्हटलें. ३३. तर आम्हीं त्यांच्यावर दगडांचा वर्षाव केला; परंतु 'लूत'-च्या घराण्याचे लोक कीं त्यांना आम्हीं सकाळ होतां होतां (शिक्षेच्या जागेंतून) बचावून घेऊन गेऊों. ३४. (ही) आमच्याकडून कृपा (होय);

---

आहे. कारण हजरत साल्हे पैगंबराबरोबर सदरहू वाटाघाट झाल्यावर तिसऱ्याच दिवशीं त्यांना ईश्वरी शिक्षेनें येऊन गांठलें.

(१) धोंडशिरा म्हणजे मांडीच्या शिरा कापणें. अरबांत अशी चाल होती कीं उंट किंवा सांढणी कापावयाची असल्यास तिच्या मांडीच्या शिरा कापीत कीं तिला पळून जातां येऊं नये आणि एरवींहि मांडीच्या शिरा कापल्या म्हणजे जनावर पडल्या पडल्या मरून जातें. भावार्थ हा कीं, कुदारनें सांडणीला मारून टाकिलें.

(२) शेताच्या सभोंवतीं त्याच्या संरक्षणासाठीं कांटे, पाला व बारीक सारीक लांकडांचें एक कुंपण घालण्याची चाल असते; मग सुकून त्याचा चुराचुरा होऊन जातो. सांगावयाचा अर्थ इतकाच कीं, जसें हें कुंपण शेवटीं पायाखालीं तुडविलें जातें, तसेच हे लोकहि नाश पावतील. अरबस्थानांत शेतें कमी होतात. तर ते जनावरांच्या कोंडवाड्यास किंवा गोठ्यास अशाच प्रकारें सुरक्षित करतात व येथेंहि कोठें कोठें असें करतात.

(आणि) जो कोणी (आमचे) आभार मानितो त्याला आम्हीं असाच मोबदला देत असतों. ३५. आणि 'लूत'नें त्या लोकांस आमच्या पकडीकडून भिवविलेंहि होतें; पण ते(त्याच्या) भिवविण्यांत वितंडवाद (उपस्थित) करूं लागले. ३६. आणि त्यांनीं त्याच्या पाहुण्या (म्हणजे दुतां-)सहि त्याच्यापासून उडवून नेण्याचा बेत केला. तथापि आम्हीं त्यांच्या डोळ्यांवर बोळा फिरवून टाकिला (व म्हणालों कीं घ्या,) आतां माझी शिक्षा व माझ्या भिवविण्याची गोडी चाखा. ३७. आणि खरो-खरीं फारच सकाळीं त्यांना कायमच्या अशा शिक्षेनें येऊन गांठि-लेंच. ३८. (आणि मी फर्माविलें कीं) घ्या, आतां माझी शिक्षा व माझ्या भिवविण्याची मजा चाखा. ३९. आणि अर्थात् आम्हीं कुराणाला (लोकांच्या) बोध घेण्यासाठीं सुलभ केलें आहे; तर कोणी आहे कीं बोध घेईल ? ४०. आणि खरोखरींच 'फिरऔन'चे लोकांपाशींहि (पुष्कळच) भयसूचना आल्या; ४१. (पण) त्यांनीं आमच्या सर्व निशा-ण्यांस पाखंड म्हटलें; म्हणून आम्हीं त्यांना, जसा एखादा जबरदस्त सामर्थ्यवान् पकडतो तसें (सक्त) पकडलें. ४२. (हे 'मक्के'करांनों!) तुमच्यांत जे नास्तिक होत ते कां या लोकांपेक्षांहि श्रेष्ठ आहेत ? अगर (तुम्हांपाशीं लेख आहेत व त्या) लेखांत तुमची माफी (लिहिलेली) आहे ? ४३. अथवा हे लोक म्हणतात कीं आम्हीं एक मोठा बलवान् जथा आहों ? ४४. प०. लवकरच (यांचा) जथा हार खाईल व (मुसलमानांपुढें) ते (पाठ) फिरवून फिरवून पळूं लाग-तील. ४५. किंबहुना (मूळ) वायदा तर यांच्याशीं (पुनरुत्थानाचे) घटकेचा होय; व ती घटका फारच आपत्तिकारक व कटू होय. ४६. निःसंशय पापी (लोक) भ्रमांत (पडले) आहेत व (अखेर) नरकाग्नींत (जातील). ४७. त्या दिवशीं त्यांना त्यांच्या तोंडा-वाटें (नरकाच्या) अग्नींत फरपटत नेलें जाईल, (व त्यांना बजाविलें

(१) हजरत लूत पैगंबरांचा वृत्तांत कुराणांत अनेक जागीं सविस्तर आला आहे. तेथें शिक्षेच्या दूतांचें स्वरूपवान व सुंदर मुलांचें रूप धारण करून येणें व लूतच्या घरीं पाहुणे होणें सांगितलें आहे. येथें संक्षिप्तरूपानें दुतांच्या पाहुणे होण्याचा उल्लेख आहे. बाकी मजकुराकडून मौन आहे.

जाईल कीं आतां) अंगाला नरकाग्नि लागण्याची मजा चाखा. ४८. आम्हीं सर्व वस्तूंस एका अंदाजाप्रमाणें पैदा केलें आहे: (व त्यांतल्या-त्यांत पुनरुत्थानाचाहि एक वेळ मुक्रर आहे). ४९. आणि आमचें काम तर केवळ एक गोष्ट असते कीं जसें डोळयाचें लवविणें.[1] ५०. आणि (हे 'मक्के'च्या नास्तिकांनों!) आम्हीं तुमच्या (कित्येक)सोबत्यांचा नाश करून चुकलों आहों; तर कोणी आहे कीं बोध घेईल? ५१. आणि हे लोक जें कांहीं ऐकूणेक करून चुकले आहेत तें (त्यांच्या) कर्मपटांत (नोंदलेलें) आहे; ५२. आणि (कोणतेंहि काम असो) लहान व मोठें सर्व लिहि-लेलें आहे. ५३. जे लोक (परमेश्वराला) भिऊन वागतात ते (स्वर्गीय) बागांत व नद्यांत, ५४. खऱ्या (सन्मानाच्या) जागीं परम-समर्थ (अशा सर्व जगांच्या) बादशाहाच्या सन्निध असतील. ५५.

(१). भावार्थ हा कीं, मनुष्य जसा अनायासें व त्वरेनें डोळा लववितो तसें परमेश्वराचें कामहि होत राहतें. त्याला साधन नसतें व विचार करण्याचीहि जरूरी नाहीं. इकडे आज्ञा केली तिकडे काम झालें. नवल नाहीं यांत पुनरुत्थानाकडेहि इषारत असेल कीं ती घटका एका उन्मेषांत काइम होईल.

# अध्याय ५५ वा.

# सूरतुर्-रह्मान्.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ७८ आयात-महावाक्यें आहेत. ह्याचें नांव 'रह्मान्' पडण्याचें कारण असें कीं हजरत मोहंमद पैगंबरसाहेब परमेश्वर-त्यांस धन्यवाद व शांति देवो-नास्तिकां-पुढें जेव्हां जेव्हां रह्मान् ह्मणजे परम दयाळू (परमेश्वर) असें नांव घेत, तेव्हां तेव्हां नास्तिक म्हणत कीं आह्मी रह्मान्ला जाणित नाहीं कीं तो कोण आहे. ह्मणून हा अध्याय प्रकटिला गेला. कित्येक लोक रहमान् हें कोणा मनुष्याचें नांव आहे असें समजून म्हणत असत कीं, हा मनुष्य मोहंमदला कुराण शिकवित असतो. पण रहमान् हें परमेश्वराच्या नांवांपैकीं एक नांव आहे ह्मणून हें नामाभिधान होय.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**परम दयाळू (परमेश्वराचे दैवत व मनुष्यें यांजवर जेथें आणखीहि अगणित उपकार होत. त्यांतल्या त्यांत हें कीं, त्या) नें, १. कुराण शिकविलें; २. त्यानेंच मानवास निर्माण केलें. ३. (मग) त्यानें त्याला स्पष्ट बोलावयास शिकविलें. ४. सूर्य आणि चंद्र एका हिशेबानें (आपल्या कक्षेंत फिरत) आहेत. ५. आणि वनस्पति व झाडें हीं (परमेश्वरा पुढें) नमून असतात. ६. आणि त्यानेंच आकाशास उभारिलें व तराजू स्थापिली; ७. अशा साठीं कीं, तुम्हीं लोकांनीं तोलण्यांत (मर्यादेचें) उल्लंघन करूं नये. ८. आणि न्यायानें नीट तोल तोला व कमी तोलूं**

---

(१) माप व तोल ह्या फार आवश्यक गोष्टी आहेत. कोणाहि मनुष्यमात्रास याची गरज नाहीं, असें नाहीं. तो मापून तोलून देतो अथवा घेतो हें तर खास. धर्मशास्त्रांत याला फार महत्त्व दिलें जातें कीं मापातोलांत चलाखी व ठगबाजी असतां कामा नये. ह्मणूनच याजागीं एकाच गोष्टीला अनेक प्रकारांनीं सांगितलें आहे. परंतु दुःखाचीं गोष्ट ही कीं, मापतोल लोकांत पाहिजे तसा अद्यापिहि बरोबर नाहीं.

नका. ९. आणि त्यानेंच जीवसृष्टी (च्या हिता) साठीं जमिनीची स्थापना केली; १०. कीं, तींत (नानाविध) फळफळावळ व कळ्यांनीं वलयांकित अशीं खजुरीचीं झाडें होत; ११. आणि (तऱ्हेतऱ्हेचीं) धान्यें जीं तुसांत असतात तीं व सुवासिक फुलें हीं होत. १२. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुह्मीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? १३. त्यानेंच माणसा(चा पूर्वज 'आदम'या)ला खणखण वाजणाऱ्या चिकण मातींतून उत्पन्न केलें. १४. आणि 'जिन्न'–दैवत–यांस अग्नीच्या (शुद्ध) ज्वाळेंतून निर्मिलें. १५. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? १६. (तोच हिंवाळ्या व उन्हाळ्यांत) सुर्योदयाच्या दोन (भिन्न) स्थलांचा मालक होय! व (तसाच तो) अस्तामानाच्या दोन (भिन्न) स्थानांचा स्वामि होय. १७. तर (हे दैवत व मनुष्यैहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? १८. त्यानेंच (अशा तऱ्हेचे खारे व गोडे) दोन समुद्र सोडले कीं, ते आपसांत मिळतात; १९. (आणि मगहि) दोहोंत एक अडकण असतें कीं (त्याच्यापलिकडे) ते दोन्हीं (एकमेकांकडे) जाऊं शकत नाहींत. २० तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुह्मीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? २१. दोन्हीहि (प्रकारच्या समुद्रां)तून मोत्येंहि निघतात व प्रवाळहि. २२. तर (हे दैवत व मनुष्य हो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? २३. आणि जहाजें जीं समुद्रांत पर्वतांसारखीं उंच उभारलेलीं (दिसत) आहेत तींहि त्याचींच होत. २४. तर (हे दैवत व मनुष्य हो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? २५. (हे पैगंबरा!) जितकी म्हणून (सृष्टि) भूतळावर आहे ती सर्व नाशिवंत होय; २६. आणि तुझ्या पालनकर्त्याची प्रतापशाली व महनीय(अशी एक) व्यक्ति मात्र (सतत) बाकी राहील. २७. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? २८. जे जे कोणी आकाशांत व पृथ्वींत आहेत ते (सर्व त्यांना जें पाहिजे तें)त्याच्या

चपाशीं मागतात. आणि तो (रिकामा नाहीं, तर) दररोज (एका ना एका) कामांत (राहत) असतो. २९. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ३०. हे दैवत व मनुष्यहो! आम्हीं लवकरच (पुनरुत्थानाचे दिवशीं कर्मांचे हिशोबासाठीं) सर्वथैव तुम्हांकडे लक्ष देऊं. ३१. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ३२. हे दैवत व मनुष्यांच्या समुदायांनों! जर तुमच्यानें होऊं शकेल कीं तुम्हीं आकाशांच्या व पृथ्वीच्या हद्दींतून (कोठें) निघून पळाल; तर निघून पाहा. पण असाच कांहीं जोर असेल तर मात्र निघाल.(व तो तुमच्यांत नाहीं व असणारहि नाहीं. ३३. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ३४. (जर तुम्हीं आकाश व पृथ्वींतून कोठें निघून जाऊं पाहाल तर) तुम्हांवर अग्नीचा कच्चा[२] पक्का लोळ सोडला जाईल कीं तुम्हांस (त्या पासून) बचावतां येणार नाहीं. ३५. तर (हे दैवत व मनुष्य हो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ३६, मग जेव्हां (पुनरुत्थानाचे दिवशीं) आकाश फाटेल व तेलासारखा (त्याचा रंग) लाल होऊन जाईल; (तो शेवटच्या निकालाचा दिवस असेल). ३७. तर (हे दैवत व मनुष्य हो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ३८. तर त्या दिवशीं मनुष्यास त्याच्या पापाकडून विचारलें जाणार नाहीं व दैवतासहि नाहीं. (कारण, परमेश्वरास सर्व सांगितल्याशिवाय माहित आहे). ३९. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ४०.

---

(१) मनीषा ही आहे कीं ज्याप्रमाणें कित्येक लोकांचें मत आहे कीं परमेश्वर सृष्टि निर्माण करून रिकामा बसला आहे, ती त्यांची चूक आहे. तो हरेक वेळीं सृष्टीच्या कामांत घडामोड करीत असतो. तो जगाच्या व्यवस्थेकडून क्षणभरहि अंग काढून घेईल तर जगाचें काम कसें चालेल?

(२) कच्चा ह्मणजे धूर; हें 'नोहास'चें भाषांतर आहे, आणि पक्का हें 'शोवाज'चें भाषांतर आहे व त्याचा अर्थ ज्वाळा असा आहे.

(त्यादिवशीं) पाप्यांस त्यांच्या मुद्रेवरून ओळखलें जाईल; मग (त्यांच्या) टाळवा व पाय धरले जातील. (व ह्या प्रकारें त्यांना फरपटत फरपटत नरकाग्नींत नेलें जाईल.) ४१. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ४२. ज्या (नरका)ला पापी लोक पाखंड म्हणतात तो नरक हा होय. ४३. (पुनरुत्थानाच्या दिवशीं) त्यांत व उकळी आलेल्या पाण्यांत ते (व्याकूळ होऊन) फिरतील. ४४. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ४५. आणि जो कोणी (कर्मांच्या जाबासाठीं) आपल्या पालनकर्त्यासमोर उभा राहण्यास भीत राहिला त्याला (स्वर्गाच्या) दोन बागा (प्राप्त) होतील. ४६. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ४७. त्या दोन्हीं (बागा पुष्कळ) फांद्यांनीं युक्त (म्हणजे हिरव्या टवटवीत असतील). ४८. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ४९. दोहोंत दोन झरे वाहत असतील. ५०. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ५१. दोहोंत प्रत्येक फळाच्या दोन जाति[१] असतील. ५२. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ५३. (स्वर्गवासी त्यांत अशा उमदा) बिछायतीवर टेके लावून (बसलेले) असतील कीं ताफत्याचीं त्यांचीं असतरें असतील आणि दोन्ही बागांचीं फळें (इतकीं) जवळ (लोंबलेलीं) असतील (कीं हवीं तेव्हां झाडाच्या झाडावरच ताजीं ताजीं खातां येतील.) ५४. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ५५. त्यांत (प्रतिव्रता अप्सरा) असतील कीं त्या (परक्याकडे) नजर उचलूनहि[२] पाहणार नाहींत आणि स्वर्गवासी-

(१) फळांच्या दोन जाति अनेक दृष्टीनें होऊं शकतात. उदाहरणार्थः—रंग, रुचि, वास वगैरे आणि ह्या जाति स्वर्गवासीयांस फारच हितकर होत. कारण मनुष्याला प्रति दिवशीं नवीन नवीन पदार्थ आवडतात व एकच पदार्थ खातां खातां त्याला वीट येतो.

(२) 'कासिरातुत्तर्फ' याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक जो भाषांतरांत

यांच्यापूर्वीं कोणाहि मनुष्यानें त्यांच्यावर हात घातला नाहीं व कोणा दैवतानेंहि नाहीं. ५६. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल? ५७. (त्यांचे रंग असे तांबूस गुलाबी असतील कीं)जणूं त्या माणीक व प्रवाल (यांच्या बनलेल्या) होत. ५८. तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ५९. (बरें) पुण्याशिवाय पुण्याचा मोबदला आणखीहि कांहीं होऊं शकतो कां ? ६०. तर(हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ६१. आणि ह्या दोन (बागां)खेरीज (स्वर्गवासीयांसाठीं) दोन बागा (आणखीहि) असतील. ६२. तर (हे दैवत मनुष्यहो !) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ६३. (त्या) दोन्ही (बागा खूप) हिरव्यागार (असतील) ६४.तर (हे दैवत व मनुष्य हो!)तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ६५. त्या दोन्हीं(बागां)त दोन झरे जोरानें उचंबळत असतील ६६. तर (हे दैवत व मनुष्यहो !) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ६७. त्या दोन्हीं(बागां)त मेवे (असतील) व खजुरी(असतील) व डाळिंब (असतील). ६८. तर (हे दैवत व मनुष्यहो !) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ६९. त्यांत (शीलानें) चांगल्या व (वर्णानें) सुंदर (स्त्रिया) असतील. ७०. तर (हे दैवत व मनुष्यहो !) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ७१. (त्या स्त्रिया) काळ्या कुळकुळीत व मोठ्या नेत्रांच्या (अप्सरा असतील कीं त्या आपल्या राहात्या) तंबूंत बंद (होऊन बसलेल्या) होत, (कीं, त्या कोणाच्या दृष्टीस पडत नाहींत) ७२.तर (हे दैवत व मनुष्यहो!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्यांच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ७३. स्वर्गवासीयांपूर्वीं कोणाहि मनुष्यानें त्यांच्यावर हात घातला नाहीं व कोणा दैव-

पत्करला आहे तो; व दुसरा हा कीं खालीं नमलेले डोळेहि सौंदर्यांत भर घालतात. मराठींत त्यांस 'राजीवनयना' म्हणतां येईल.

**तानेंहि नाहीं. ७४. तर (हे दैवत व मनुष्यहो !) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ७५. (स्वर्गवासी तेथें) हिरव्या लोडांवर व सुंदर बिछायतीवर टेके लावून (बसलेले) असतील. ७६. तर (हे दैवत व मनुष्यहो !) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांस नाकबूल जाल ? ७७. (हे पैगंबरा !) प्रतापशाली व परोपकारशील अशा तुझ्या पालनकर्त्याचें नांव (फार) शुभकारक होय. ७८.**

---

(१) ह्या अध्यायांत परमेश्वरानें वारंवार जिन्न–दैवत व मनुष्यें यांस आपल्या देणग्या जाणविल्या आहेत. तथापि कोठें तर वास्तविक देणग्या मोजून दाखविल्या आहेत; व कोठें कोठें शिक्षा व दंड यांचा मजकूर आहे, असें असतांहि त्यांचा देणग्यांत समावेश केला आहे. पण खरोखरींच लक्षपूर्वक पाहिलें जाईल तर नरकाग्नीच्या आपत्ति सेवकांस व भक्तांस बजावून सांगणें हीहि आपल्या ठिकाणीं एक देणगी होय; कीं जेणेंकरून भक्तांनीं भिऊन सदाचार पत्करावा. ज्याअर्थीं परमेश्वराच्या देणग्या बेसुमार आहेत त्याअर्थीं वारंवार सांगण्याची मनीषा ही आहे कीं, त्याचे आभारहि वारंवार प्रदर्शित केले जावेत; म्हणजे जेवढ्या देणग्या तेवढे आभार होतील.



# अध्याय ५६ वा.

## सूरतुल्–वाकेअः

हा अध्याय मक्काशहरीं प्रकट झाला. ह्यांत ९६ आयात-महावाक्यें आहेत. याचें नांव 'वाकेअः' यासाठीं झालें कीं, यांत न टाळतां येण्यासारखें आकस्मिक संकट, ज्याला पुनरुत्थान अथवा 'कियामत' म्हणतात त्याचें विवेचन करण्यांत आलें आहे. 'वाकेअः' म्हणजे अनिवार्य अशी अवश्य घडणारी गोष्ट.

परमदयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)

जेव्हां (पुनरुत्थान जें अवश्य) घडणारें (तें) घडून येईल; १. (व) त्याच्या घडून येण्याला कोणीहि खोटें पाडूं शकणार नाहीं.२ . (त्यावेळीं लोकांचें स्थित्यंतर जाहीर होईल; कित्येकांस) तें नमवील (व कित्येकांस) उच्चपद देईल. ३. (हें त्यावेळीं घडून येईल कीं) जेव्हां जमीन मोठ्या जोरानें हालूं लागेल, ४. आणि पर्वत (आदळून असे) तुकडे तुकडे होऊन जातील; ५. कीं (जशी) धूळच उधळून पडलेली आहे. ६. आणि (त्यावेळीं) तुम्हां लोकांचेहि तीन वर्ग होतील. ७. (एक) तर उजव्या हातावाले, तर उजव्या हातावाल्यांचें काय (सांगणें)! ८. आणि (एक) डाव्या हातावाले; तर डाव्या हातावाल्यांची काय (तरी दुर्गत)!९. आणि (तिसरा,) जे (सर्वांत) पुढेंच होत ते पुढेंच (बसविण्यास योग्य) होत;१०. (कीं) हे (परमेश्वराचे हुजुरांत) जवळ केलेले होत. ११. (यांना स्वर्गाच्या) ऐषआरामाच्या बागांत (जागा दिली जाईल). १२. (या समुहांत) बहुतेक तर पूर्वील लोकांपैकीं (असतील); १३. आणि थोडे मागील लोकांपैकींहि. १४ सुवर्णाच्या रत्नजडित तक्तांवर, १५. ते एकमेकांच्या समोरासमोर टेकून (बसलेले) असतील. १६. त्यांच्या-पाशीं (स्वर्गीय) तरुण मुलें जीं नित्य (मुलेंच बनून) राहतील तीं (शर-

बत वगैरे पाजण्यासाठीं) आपखरे व तोटीदार तांबे घेऊन येत जात असतील; आणि (अशा) स्वच्छ मद्याचे पेलेहि, १७-१८. कीं ज्या(च्या पिण्या)नें त्यांचे डोकें दुखणार नाहीं व ते बरळणारहि नाहींत. १९. आणि (तसेच) ज्या तऱ्हेचे मेवे ते पसंत करतील (ते मेवे); २०. व ज्या प्रकारच्या पक्ष्यांचें मांसास त्यांची वांच्छा होईल (तेंच मांस), २१. आणि (या देणग्या खेरीज) काळया कुळकुळीत मोठ्या डोळयांच्या अप्सरा (असतील); २२. कीं त्या जणूं (जतनेनें कित्येक) घड्यांत ठेवलेल्या मोत्यांसारख्या (सुंदर) होत. २३. (हा, जगांत) ते जीं (चांगलीं) कामें करीत राहिले त्यांचा मोबदला (होय). २४. तेथें त्यांस कोणतीहि निरर्थक गोष्ट ऐकूं येणार नाहीं व (तशीच) कोणा पातकाची गोष्टहि नाहीं २५. परंतु (चोहोंकडून) शांतिच शांतीचे आवाज (चालले येतील). २६. आणि उजव्या हातावाले; तर (या) उजव्या हातावाल्यांचें काय (सांगणें)! २७. कीं बिनकांटयाच्या बोरींत, २८. व (फळांनीं) लादलेल्या केळयांत. २९. व लांब पसरट सावलींत. ३०. व वाहत्या पाण्यांत, ३१. व पुष्कळ (रेलचेल) मेव्यांत ३२. कीं जे (बारा महिने) खळ पडल्यावांचून व बिन रोकटोक (त्यांस) मिळतील, ३३. आणि उंच उंच बिछायतीं(च्या सुखां)त (मजे उडवीत) असतील. ३४. (आणि यांनाहि अप्सरा मिळतील व) या (अप्सरा) आम्हीं (यांच्यासाठीं एकदम) बनवून उभ्या केल्या. ३५. आणि यांना (अशा) बनविल्या (कीं या) कुमाऱ्या (होत); ३६. (आपल्या पतींस) प्रीय(व त्यांच्याशीं)समान वयाच्या (अशा होत). ३७. (ह्या) उजव्या हातावाल्यां(च्या सुखा)साठीं (होत.) ३८. (या समूहांत) बहुतेक पूर्वील लोक (असतील); ३९. आणि बहुतेकच मागील लोकहि. ४०. आणि डाव्या हातावाले; (तर या) डाव्या हातावाल्यांची काय (तरी दुर्गत)! ४१. कीं, (ते नरकाग्नीच्या) तापांत व उकळी आलेल्या पाण्यांत असतील. ४२. आणि (अशा) काळयाकुट्ट धुराच्या छायेंत (असतील). ४३. (कीं, जी) थंडगारहि नसेल व सन्मानाची

(१) पातकाची गोष्ट म्हणजे जिच्या उच्चारण्यानें ऐकणारास राग येईल व तो पापास प्रवृत्त होईल.

(जागा)हि नसेल. ४४. हे लोक ह्यापूर्वी (जगांत) फार सुखवस्तु होते; ४५. आणि (मातबरीच्या गर्वात) मोठ्या (घोर) पातका (म्हणजे मूर्तीपूजे) वर आग्रह करीत राहत होते. ४६. आणि (पुनरुत्थाना संबंधानें) ते म्हणत असत कीं, जेव्हां आम्हीं मरून जाऊं व (मेल्यावर) माती होऊन जाऊं व (आमचीं केवळ) हाडकेंच (राहून जातील); तेव्हां कां आम्हीं (पुनरपि) उठवून उभे केले जाऊं? ४७. आणि कां आमचे (सर्व) पूर्वींचे बापदादेहि? ४८. (हे पैगंबरा! तूं या पुनरुत्थानास नाकारणाऱ्यांस) सांग कीं निःसंशय पूर्वील व मागील (सर्व), ४९. नियमित दिवसाच्या (नेमक्या) वेळेवर अवश्य एकत्र गोळा केले जातील. ५०. नंतर हे आडमार्गीं भटकणाऱ्यांनों! (व पुनरुत्थानास) पाखंड म्हणणाऱ्यांनों! ५१. तुम्हांस (नरकांत) नागफणीचें झाड खावें लागेल; ५२. आणि त्यानेंच पोटें भरावीं लागतील. ५३. मग त्यावरती उकळी आलेलें पाणी प्यावें लागेल; ५४. आणि प्यावेंहि लागेल (तर घटाघट) तान्हेल्या उंटांच्या पिण्यासारखेंच. ५५. (शेवटच्या) निर्णयाच्या दिवशीं हा त्यांचा पाहुणचार होईल. ५६ (लोकांनों आतांहि) आम्हींच तुम्हांस पैदा केलें आहे; तर तुम्हीं (पुनरुत्थानांत आमच्या पुनरपि पैदा करण्यास) कां म्हणून खरें समजत नाहींत? ५७. बरें पाहा तर (खरें हें) वीर्य जें तुम्हीं (स्त्रियांच्या गर्भाशयांत) पोंहोंचवितां ५८. त्या(वीर्या)चा मनुष्य तुम्हीं बनवितां कीं आम्हीं बनवितों? ५९. आम्हींच तुम्हां लोकांत मृत्युची योजना करून ठेविली आहे; आणि आम्हीं (या गोष्टीस) असमर्थ नाहीं; ६०. कीं तुमच्या सारख्या(शरीरा)स बदलून टाकूं व तुम्हीं जाणीत नाहींत अशा(कोणा आकृतीं)त तुम्हांस निर्मून उभें करूं. ६१. आणि तुम्हीं तर (आमच्या) पहिल्या निर्माण करण्यास जाणूनच चुकलां आहां तर (आतां) तुम्हीं कां म्हणून विचार करीत नाहींत (कीं ह्याप्रमाणेंच पुनरुत्थानांत निर्मिले जाऊं शकतां)? ६२. बरें, पाहा तर (खरें, हीं) जीं तुम्हीं शेतें करतां; ६३. तीं कां तुम्हीं उगवितां कीं आम्हीं उगवितों? ६४. आम्हीं इच्छूं तर (एखादी आपत्ति पाठवून पिकण्याच्यापूर्वींच) त्यांचा चुराचुरा करून टाकूं; आणि तुम्हीं (कौतुकानें) बाता बनवित राहाल; ६५. कीं आम्हीं तर

भुदंडांत पडलों. ६६. किंबहुना आमचें तर नशीब फुटून गेलें. ६७ बरें पाहा तर (खरें, हें) पाणी जें तुम्हीं पितां; ६८. कां ढगांतून तुम्हीं वर्षविलें आहे कीं आम्हीं वर्षवितों? ६९. आम्हीं इच्छूं तर त्याला आम्हीं (असें) खारें करून टाकूं (कीं तें जिभेवरहि ठेववणार नाहीं). तर तुम्हीं आभार कां मानीत नाहींत?७०. बरे पाहा तर(खरें,हा)अग्नि जो तुम्हीं पेटावितां; ७१. त्याचें झाड[1] (म्हणजे ज्याची लांकडें त्यांत जाळलीं जातात तें) तुम्हीं पैदा केलें आहे कीं आम्हीं पैदा करितों? ७२. आम्हीं अग्नीला (नरकाग्नीची) आठवण देण्यास आणि प्रवाशांच्या फायद्यासाठीं बनविलें आहे. ७३. तर (हे पैगंबरा!) तूं आपल्या महिमाशाली पालनकर्त्याच्या नांवाची पवित्रता वर्णीत अस. ७४. तथापि मी (उल्का) नक्षत्रांच्या[3] तुटण्याची शपथ वाहतों. ७५. आणि तुम्हीं समजाल तर खरोखरच ही (फारच) मोठी शपथ[4] होय. ७६.

(१) अग्नीचें झाड म्हणजे एक तर सामान्यतः सर्व झाडें कीं त्यांचीं लांकडें जाळलीं जातात तीं; हा अर्थ आह्मीं भाषांतरांत दिला आहे. अथवा कदाचित जीं झाडें हिरवींच जळतात तीं असतील. उदाहरणार्थः—चिवा किंवा बांबूचे जंगलांत तर बांबूच्या परस्पर घर्षणानें आग उत्पन्न होते व सारें जंगल भडकून जातें. तात्पर्य, प्रत्येक स्थितींत ईश्वरी सामर्थ्य प्रगट होतें.

(२) अग्नीपासून सर्वांनाच फायदा आहे मुख्यत्वेंकरून मुशाफरांस, कीं त्यांना त्याची गरज अधिक लागते व म्हणूनच अग्नि त्यांस प्रिय असतो.

(३) 'नुजूम' चा अर्थ आम्हीं उल्कानक्षत्र व 'मवाकिआ' चा अर्थ तुटणें असा केला आहे. पण कित्येक भाष्यकारांनीं नुजूम म्हणजे सामान्यतः नक्षत्रें व 'मवाकिआ' म्हणजे त्यांचीं स्थलें किंवा मार्ग अथवा त्यांच्या उगवण्याच्या व मावळण्याच्या जागा असेंहि लिहिलें आहे.

(४) परमेश्वर जेव्हां आपल्या सृष्टींतून कोणाची शपथ वाहतो, तेव्हां तो जणुं आपल्या परमसामर्थ्याची व पराक्रमाची शपथ वाहतो; व त्याचें सामर्थ्य हें त्याचें एक विशेषण होय. त्याचीं विशेषणें त्याच्या व्यक्तीपासून वेगळीं नाहींत म्हणून तो आपल्या व्यक्तीची शपथ वाहतो. परमेश्वराची शपथ सर्व शपथांत फारच मोठी आहे हेंहि उघडच आहे. अथवा हा अर्थ होऊं शकतो कीं, परमेश्वराचें शपथ वाहणें हीच एक मोठी महत्त्वाची गोष्ट आहे.

कीं निःसंशय हें (कुरआन्) मोठ्या आदर सन्मानाचें कुरआन् होय. ७७. (व हें आमच्या येथें) जतन करून ठेवलेल्या गुप्त पुस्तका (म्हणजे 'लौहे महफूज')मध्यें (लिहिलेलें)आहे. ७८. सोंवळ्या व पवित्र (दुतां)शिवाय अन्य कोणाच्यानें त्यास स्पर्श करवत नाहीं. ७९. (आणि त्याचीच नक्कल हें कुरआन् होय कीं तें) सकल जगांच्या पालनकर्त्याकडून (कलियुगाचे पैगंबरास) प्रकट झालें आहे. ८०. तर कां तुम्हीं(लोक) ह्या (कुराणाच्या) गोष्टीस नाकारितां ? ८१. आणि तुम्हीं आपला रतीब बांधून घेतला आहे कीं तुह्मीं (त्याला) पाखंड म्हणीतच राहाल ? ८२. तर कां जेव्हां (प्राण शरीरांतून निघून) गळ्यांत येऊन पोहोंचेल; ८३. व तुम्हीं त्यावेळीं (टकटकां) पाहात राहाल (व मरणाराची कांहींहि मदत न करूं शकाल); ८४. आणि आम्हीं तुम्हां (सुश्रूषा करणाऱ्यां)पेक्षां त्या (मरणोन्मुख मनुष्या)च्या अधिक जवळ आहों; परंतु (हें) तुम्हांला सुचून येत नाहीं. ८५. तेव्हां जर तुम्हीं (कर्मांच्या जाबासाठीं कोणाचे) दबलेले नाहींत; ८६. (व स्वतंत्रपणाचे दाव्यांत) खरे आहां; तर प्राणा(च्या गळ्यांत आल्यावर त्या)ला तुम्हीं (शरीरांत) परतून कां आणीत नाहींत ? ८७. मग जर (मरणारा ईश्वरी दरबारांत) जवळ केलेल्या पैकीं आहे. ८८. तर (त्याच्याकरितां) ऐषआराम होय व (रेलचेल) अन्नसंपत्ति; व सुखाचा स्वर्ग होय. ८९. आणि जर (तो) उजव्या हातावाल्यांपैकीं आहे. ९०. तर (त्याला सांगितलें जाईल कीं, हे मनुष्या !) जो उजव्या हातावर आहेस त्या तुला सलाम–शांति (असो). ९१. आणि जर पाखंडी म्हणणाऱ्यांपैकीं (व) आडमार्गी भटकणाऱ्यांपैकीं आहे. ९२. तर उकळी आलेल्या पाण्याचा पाहुणचार होय; ९३. आणि (अखेर) नरकाग्नींत ढकलून देणें. ९४. निःसंशय (परलोकींचें) हें (जें वर्णन केलें गेलें तें) बिलकुल खरें व निश्चित होय. ९५. तर (हे पैगंबरा !) तूं आपल्या महिमाशाली पालनकर्त्याच्या नांवाची पवित्रता वर्णीत अस. ९६.

(१) म्हणजे हे नास्तिकांनों ! तुमच्या कल्पनेप्रमाणें जर पुनरुत्थान घडून येणार नाहीं, व तुह्मांस आपल्या कर्मांचा जाबहि द्यावा लागणार नाहीं आणि या संबंधानें तुह्मांस पूर्ण स्वतंत्रता आहे; तर शेवटला न्याय टाळण्यापेक्षां मरणाऱ्या मनुष्याच्या गळ्याला आलेला प्राण परत त्याच्या शरीरांत फिरविणें, हें अधिक सोपें आहे. ह्मणून तुम्हीं आपल्या दाव्यांत खरे आहां तर त्या मरणाऱ्याच्या प्राणाला परतून त्याच्या शरीरांत आणा पाहूं ! हें जर तुमच्यानें झालें नाहीं तर तुम्हांवर परमेश्वराचा अधिकार आहे व तो तुमच्या कर्मांचा जाब घेण्यासाठीं पुनरुत्थान अवश्य घडवून आणील हें निश्चित आहे. तर तुमचें नाकारणें तुमच्याच नाशास कारणीभूत होईल.

# अध्याय ५७ वा.

# सूरतुल्-हदीद्.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. ह्यांत २९ आयात–महावाक्यें आहेत. ह्याचें नांव या अध्यायांतील २५ व्या वाक्यांत आलेल्या 'हदीद्' ह्मणजे लोखंड या शब्दावरून 'सुरतुल–हदीद्' ह्मणजे लोखंडाचें प्रकरण असें पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

जी (सृष्टि) आकाशांत व पृथ्वींत आहे ती (सर्वच) तर परमेश्वराची पवित्रता वर्णिते. आणि तो सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् होय. १. आकाशांचें व पृथ्वीचें राज्य त्याचेंच होय. (तोच) जिववितो व मारतो. आणि तो सर्व शक्तिमान् होय. २. तोच पहिल्यापासून आहे व तोच शेवटपर्यंत राहील; आणि तो (आपल्या सामर्थ्यानें) व्यक्त व (व्यक्ति व गुणानें) गुप्त होय. आणि तो सर्वज्ञानी होय. ३. तोच (परम समर्थ) होय कीं, ज्यानें सहा दिवसांत आकाशांस व पृथ्वीस पैदा केलें; व नंतर (अत्युच्च) सिंहासनावर (जाऊन) विराजमान झाला. जी वस्तु जमिनींत दाखल होते (जसें पाणी, बीं व मढीं

---

(१) 'तोच आदि व तोच अंत होय, आणि तोच व्यक्त व तोच अव्यक्त होय' या वाक्यांचें हें भाषांतर आहे. पण सामान्य लोकांसहि समजावें म्हणून आम्हीं तें जास्त स्पष्ट केलें आहे.

(२) परमेश्वराच्या व्यक्तीचें गुप्त असणें तर उघडच आहे. राहिले गुण व विशेषणें, तर उदाहरणार्थ आह्मीं म्हणतों कीं परमेश्वर ऐकतो. फक्त ऐकणें तर माहीतच आहे पण तो कसें ऐकितो तें माहीत नाहीं. ह्याचप्रमाणें त्याचीं इतर विशेषणेंहि समजावींत.

वगैरे) व जी वस्तु जमिनींतून बाहेर येते (जसें झाड वगैरे) आणि जी वस्तु आकाशांतून उतरते (जसा पाऊस वगैरे) व जी वस्तु आकाशांत चढते (जशी वाफ व सुकृत्यें वगैरे) (ह्या सर्व कांहीं) तो जाणतो. आणि तुम्हीं लोक जेथें कोठेंहि असाल तेथें तो तुमच्या संगतीं आहे. आणि जें कांहीं तुम्हीं करीत असतां तें परमेश्वर पाहतो आहे. ४. आकाशांचे व पृथ्वीचें राज्य त्याचेंच होय. आणि परमेश्वरावरच (सर्व) कामांची मदार होय. ५. तोच (उन्हाळ्यांत) रात्रीस (घटवून) दिवसांत दाखल करितो आणि (तोच हिंवाळ्यांत) दिवसाला (घटवून) रात्रींत दाखल करितो. आणि तो (लोकांच्या) हृदयांतील गोष्टींशींहि वाकब होय. ६. (लोकांनों !) परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विश्वास धरा आणि ज्या (माला)चे त्यानें तुम्हांस (पूर्वींच्या लोकांचे) कायम मुकाम (बनवून मालिक) केले आहेत त्यांतुन (परमार्थांत) खर्च करा. तर तुमच्यांतून ज्या लोकांनीं विश्वास धरिला व त्यांनीं (परमार्थांत) खर्चहि केला त्यांना (परलोकीं) मोठें प्रतिफल (प्राप्त) होईल. ७. आणि तुह्मांला काय झालें आहे कीं, तुह्मीं परमेश्वराचा विश्वास धरीत नाहींत व वास्तविक पाहतां, पैगंबर तुम्हांस तुमच्याच पालनकर्त्यावर विश्वास ठेवण्यासाठीं बोलावित आहे. आणि जर तुम्हांस विश्वास येईल तर परमेश्वर (खुद्द) तुम्हांपासून (विश्वासाचें) वचन[१] घेऊन चुकला आहे. ८. तोच (कृपावंत परमेश्वर तर) होय कीं जो आपला सेवक ('मोहंमद') यास (कुराणाचीं) स्पष्ट स्पष्ट मह्रावाक्यें प्रकट करितो; अशासाठीं कीं, त्यानें तुम्हांस (नास्तिकपणाच्या) अंधकारांतून काढून (विश्वासाच्या) प्रकाशांत आणावें. आणि निःसंशय परमेश्वर तुह्मां (लोकांच्या स्थिती)वर अति करुणामय (व) दयाळू होय. ९. आणि तुम्हांस काय होऊन गेलें आहे कीं तुम्हीं (आपला माल) परमेश्वराच्या मार्गांत खर्च करीत नाहींत; व वास्तविक पाहतां, आकाश व पृथ्वी (सर्वां)चें वतन परमेश्वराचेंच होय. तुम्हां

(१) हा इषारा 'अलस्तो बे रब्बेकुम' म्हणजे मी तुमचा पालनकर्ता नव्हे काय ? अनादिकाळाच्या या वचनाकडे असावा; कीं परमेश्वरानें माणसाच्या अंतःकरणास असेंच बनविलें आहे कीं, स्वभावतःच परमेश्वराला मानण्याकडे त्याचा कल असतो.

(मुसलमानां)पैकीं ज्या लोकांनीं ('मक्के'च्या) विजयापूर्वीं (परमेश्वरार्थीं माल) खर्च केले व (शत्रूंशीं) लढले ते (इतर मुसलमानांच्या) बरोबर होऊं शकत नाहींत. हे लोक दर्जांत,[1] ज्यांनीं ('मक्के'च्या विजया) मागून (माल) खर्च केले व लढले त्या(मुसलमानां)पेक्षांहि फारच थोर होत. आणि (एरवीं) कल्याणाचें वचन तर परमेश्वरानें सर्वांनाच देऊन ठेविलें आहे. आणि जसजशीं कर्में तुम्हीं लोक करितां त्या(सर्वां)शीं परमेश्वर माहितगार होय. १०. कोण असा आहे कीं जो परमेश्वरास दिलखुशीनें कर्ज देईल ? व तो त्याच्या दुप्पट त्याला अदा करील; आणि त्याला फार सन्मानाचा मोबदला (देईल तो आणखी वेगळाच). ११. (हे पैगंबरा !) तूं त्या दिवशीं मुसलमान पुरुषांस व मुसलमान स्त्रियांस पाहशील कीं, त्यांचा (विश्वास) प्रकाश (—दीप बनून) त्यांच्यापुढें पुढें व त्यांच्या उजव्या हाताकडे धांवत जात असेल; (आणि देवदूत त्यांस म्हणत जातील कीं) आज तुह्मां लोकांसाठीं आनंदीआनंद होय; (कीं स्वर्गीय) बागा होत कीं ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत आहेत; (व तुम्हीं) त्यांत सदासर्वदा रहाल. मोठें सार्थक (म्हणावयाचें) तें हेंच होय. १२. त्या दिवशीं दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया, मुसलमानांस म्हणतील कीं, (जरा तरी) आह्मांसाठीं थांबा कीं तुमच्या (या) प्रकाशां(च्या ज्योतीं)तून आम्हींहि कांहीं (फायदा उचलून) घेऊं; (तेव्हां त्यांस) सांगितलें जाईल कीं, (नाहीं), तुम्हीं आपले पाठीमागें परतून जा आणि (आणखी कोणी) प्रकाश शोधा. तदनंतर, या(उभय पक्षां)च्या दर्म्यान[2] एक भिंत उभी केली जाईल (व) तींत एक दरवाजा

(१) हजरत पैगंबरसाहेब हे पैगंबरीची पदवी परमेश्वराकडून अर्पण झाल्यावर तेरा वर्षें मक्केंत लोकांस उपदेश करीत राहिले. नंतर विरोधी पक्षाच्या विरोधामुळें व अतिशय छळामुळें त्रासून निरुपायास्तव मदिनेस निघून गेलें. या मदिनेस जाण्याचें नांव हिजरत झालें. हिजरतच्या नवव्यावर्षी मक्का शहर जिंकिलें गेलें. या मक्केच्या विजयापूर्वीचा काळ, इस्लामच्या कमजोरीचा काळ होता व पुढचा, वर्चस्वाचा. यावरूनच त्या वेळच्या मुसलमानांच्या दर्जांत झालेला फरक दृष्टोत्पत्तीस येतो.

(२) अध्याय २ रा पृष्ट ९८ टीप ३ पाहा.

असेल; (मग जो) दरवाज्याचा आंतील भाग (होय कीं जेथें मुसलमान होत) त्यांत (तर परमेश्वराची) दया असेल; आणि त्याचा (जो) बाहेरील भाग (होय कीं जेथें दांभिक होत) त्याच्यासमोर कांहीं अंतरावर (ईश्वरी) शिक्षा असेल. १३. (हे दांभिक लोक) मुसलमानांस हांक मारून मारून ह्मणतील, कां (जगांत) आम्हीं तुम्हांसंगतीं नव्हतों ? ते म्हणतील, होय, (होतां तर खरें;) परंतु तुम्हीं आपणच आपल्याला फसविलें: आणि (या गोष्टीची) वाट पाहत राहिलां (कीं मुसलमानांवर कालचक्र यावें) व (इस्लामधर्माकडून) संशयांत पडून राहिलां; आणि (ह्याच अघटित) आशांनीं तुम्हांस फसविलें; येथपर्यंत कीं ईश्वरी आज्ञा (म्हणजे मृत्यु) येऊन पोहोंचला आणि फसव्या (सैतान) परमेश्वरासंबंधानें तुम्हांस भूल थाप देत राहिला. १४. तर आज तुम्हांपासूनहि कांहीं खंड घेतला जाणार नाहीं आणि जे लोक नास्तिकपणा करीत राहिले त्यांच्यापासूनहि नाहीं. तुम्हां सर्वांचें ठिकाण नरकाग्नि होय. तोच तुमचा योग्य साथी होय; आणि तें (कितीतरी) वाईट ठिकाण होय ! १५. कां मुसलमानांसाठीं अजूनहि याचा वेळ आला नाहीं कीं, त्यांचीं अंतःकरणें परमेश्वराच्या स्मरणापुढें व सत्य (म्हणजे कुराण)जें प्रकट झालें आहे त्याच्यापुढें विनम्रभावानें नमावींत ? आणि ज्या लोकांस (यांच्या) पूर्वीं पुस्तक दिलें गेलें होतें (म्हणजे यहुदी व खिस्ती) त्यांच्यासारखे यांनीं (पढतमूर्ख) होऊन जाऊं नये; कीं (ह्याप्रमाणें) त्यांच्यावर एक लांबलचक मुदत लोटली व (हळुहळु) त्यांचीं अंतःकरणें कठीण होऊन गेलीं. आणि (आतां त्यांची स्थिति अशी आहे कीं) त्यांच्यांतून बहुतेक आज्ञाभंजक होत. १६. (लोकांनों !) जाणून असा कीं, परमेश्वर जमिनीला तिच्या मृत (ह्मणजे पडित) झाल्या पश्चात (पाणी वर्षवून) सजीवन करितो. आम्हीं आपल्या

(१) म्हणजे अरबस्थान देश नास्तिकपणा व मूर्तीपूजा या दुर्दैवी कर्मांमुळें फारच अधोगतीस गेला आहे. आतां परमेश्वर यांत इस्लामाचे प्रभावामुळें पुन्हा नवीन चैतन्य आणील. तात्पर्य, झालेंहि असेंच कीं, इस्लामामुळें अरबांची काया पालटली व ते असे सजीव झाले कीं, त्यांनीं अखिल जगांत नवीन जोम उत्पन्न केला.

(सामर्थ्याच्या) निशाण्या तुम्हांस स्पष्ट करून करून सांगितल्या आहेत कीं कदाचित् तुम्हीं समजाल. १७. निःसंशय धर्मदान करणारे पुरुष व धर्मदान करणाऱ्या स्त्रिया, आणि (जे लोक) परमेश्वराला दिलखुशीनें कर्ज देतात, त्यांना (पुनरुत्थानाचे दिवशीं त्यांच्या कर्जाचे) दुप्पट अदा केलें जाईल; आणि त्यांना (मोठ्या) सन्मानाचा मोबदला (प्राप्त) होईल. (तो वेगळाच). १८. आणि ज्या लोकांनीं परमेश्वर व त्याचे पैगंबर यांजवर (खऱ्या मनानें) विश्वास ठेविला, हेच लोक आपल्या पालनकर्त्यासमीप सात्त्विक व धर्मार्थ प्राणास मुकणारे (यांच्या पदास पात्र) होतील. यांना त्यांच्याच सारखें प्रतिफळ (मिळेल) व त्यांच्याच- सारखा (विश्वासाचा) प्रकाश (यांच्या संगतीं असेल). आणि जे लोक आमच्या निशाण्यांस नाकारीत व (त्यांस) पाखंड म्हणीत आहेत हेच लोक नरकवासी होत. १९. (लोकांनों!) जाणून असा कीं, इहलौकिक आयुष्य, (म्हणजे)केवळ खेळ व तमाशा आणि बाह्य थाटमाट व आपसांत एकमेकांवर शेखी मिरविणें आणि धनसंपत्तींत व संततींत एकमेकांवर वरचढपणा शोधणें (हेंच सर्व) होय. (इहलौकिक आयुष्याची उपमा) पाव- साचे उपमेसारखी होय कीं (जमिनीवर पाऊस पडतो आणि त्यानें शेत टवटवूं लागतें व) त्याचें उगणें शेतकऱ्यांस मोह पाडितें (व खुष करितें); नंतर तें (पिकून)वाळून जातें. तर (हे वाचकश्रोत्या! त्यावेळीं)तूं त्यास पाहतोस कीं तें पिवळें पडून गेलें आहे; व मग ( शेवटीं) धसकट होऊन जातें. (सारांश, इहलौकिक आयुष्य दोन दिवसांची शोभा आहे) आणि परलोकीं (ऐहिक आयुष्याचे दोन परिणाम होतः कित्येकांस) सक्त शिक्षा व (कित्येकांस) परमेश्वराकडून (पापांची) क्षमा व सुप्रसन्नता (हीं होत).आणि इहलौकिक आयुष्य तर निव्वळ फसवणुकीचें साधन होय.२०. (लोकांनों!) तुम्हीं आपल्या पालनकर्त्याच्या क्षमेकडे धांव मारा व (तशीच) स्वर्गाकडे (धांव मारा) कीं ज्याचा विस्तार आकाश व पृथ्वी- च्या विस्तारा एवढा होय. (आणि तो) जे लोक परमेश्वर व त्याच्या पैगंबरांवर विश्वास ठेवितात त्यांच्याकरितां तयार केला गेला आहे. ही

(१) ह्याच प्रकारचा मजकुर भाग ५ वा सूरतु-न्निसामध्यें येऊन चुकला आहे. तेथील टीप पाहा.

परमेश्वराची कृपा होय; तो ज्याला इच्छील त्याला ती देईल, आणि परमेश्वर महा कृपानिधान होय. २१. (लोकांनों !) जितकीं म्हणून संकटें पृथ्वींत घडून येतात व जीं (खुद्द) तुम्हांवर ओढवतात (तीं सर्व), आम्हीं तीं निर्माण केलीं याच्यापूर्वींच, ('लौहेमहफूज')पुस्तका मध्यें (लिहिलेलीं) होत. (आणि) निःसंशय ही परमेश्वरास (एक) सोपीशी (गोष्ट) होय. २२. (हें आम्हीं तुम्हांस) या साठीं (बजाविलें आहे) कीं कोणतीहि वस्तू तुमच्या हातून निघून जाईल तर तुम्हीं तिचा खेद करीत बसूं नये. आणि परमेश्वर तुम्हांस (एखादी देणगी) देईल तर तुम्हीं तिच्यावर आनंदानें नाचूं नये. आणि परमेश्वर कोणाहि गर्विष्ट (व) शेखी मिरविणारास पसंत करीत नसतो; २३. कीं हे (एक तर आपण) कृपणपणा करतात व (इतर) लोकांसहि कृपणपणा करावयास सांगतात. आणि जो कोणी (या बोधापासून) तोंड फिरवील तर कांहीं संशय नाहीं कीं, परमेश्वर निरपेक्ष (व प्रत्येक स्थितींत) सुस्तुत्य होय. २४. खरोखर आम्हीं आपल्या पैगंबरांना खुले खुले चमत्कार देऊन पाठविलें व त्यांच्यामार्फत पुस्तकें प्रकटिलीं व(तशीच आम्हीं) तराजू(रूढींत आणिली) कीं जेणें करून लोक (धर्म व संसार या दोहोंत) न्यायावर काईम राहवेत. आणि आम्हीं लोखंड पैदा केलें कीं (हत्यारांच्या कामीं आणिलें जावें; तर) त्यांत फार सक्त धाक होय; व (त्यांत) लोकांचे (नानाविध) फायदेहि होत; आणि (ह्या धाक उत्पन्न करणाऱ्या लोखंडाचे पैदा करण्यांत) एक उद्देश हाहि होय कीं, परमेश्वरानें (तुम्हांपैकीं) अशा लोकांस जाणून घ्यावें कीं, ज्यांनीं (परमेश्वराला) पाहिलें नाहीं तरीहि (ते) परमेश्वर व त्याचे पैगंबर यांच्या कुमकेस उभे राहतात. निःसंशय परमेश्वर बलवान् व परम समर्थ होय. २५. आणि खरोखरं आम्हींच 'नूह' व 'इब्राहीम' यांस (पैगंबर करून) पाठविलें; आणि त्यांच्या वंशांत पैगंबरी व पुस्तक (म्हणजे दिव्य

(१) म्हणजे जर एखाद्या वस्तूस तुम्हीं अंतराल अगर ती तुमच्या हातून निघून जाईल तर हीहि एक दैवाची गोष्ट होय; आणि जर एखादी देणगी प्राप्त होईल तर ती पूर्वींचा कांहींच हक्क नसतां केवळ ईश्वर कृपेनें प्राप्त झाली आहे व तो कोणाच्याहि प्रयत्नांचा परिणाम नाहीं.तर मग आनंदानें व गर्वानें नाचण्यांत व उड्या मारण्यांत काय हंशील ?

प्रकटीकरण) हीं (चालू) ठेविलीं. तथापि (कित्येक तर) त्यांच्यांतून सन्मार्गोन्मुख होत आणि बहुतेक त्यांच्यांतून आज्ञाभंजक होत. २६. तदनंतर (त्यांच्या) मागून त्यांच्याच पदोपदीं आम्हीं आपले (इतर) पैगंबरहि पाठविले; आणि (त्यांच्या) मागून 'मर्यम'चा पुत्र 'ईसा' यास पाठविलें व त्याला 'इंजील'--शुभवर्तमान दिलें; आणि ज्या लोकांनीं त्याचें अनुकरण केलें त्यांच्या अंतःकरणांत आम्हीं करुणा व दया घातली आणि संन्यास जो त्यांनीं नवीनच काढला होता तो (संप्रदाय) आम्हीं त्यांस कर्तव्य म्हणून नेमून दिला नव्हता; परंतु (त्यांनीं तो) परमेश्वराची मर्जी संपादण्यासाठीं (काढिला होता). तथापि जसा तो पाळिला पाहिजे होता तसा त्यांनीं तो पाळिला नाहीं. तर यांच्यांतून ज्या लोकांनीं विश्वास धरिला त्यांस आम्हीं त्यांचा मोबदला दिला; आणि यांच्यांतून बहुतेक तर आज्ञाभंजक होत. २७. अहो मुसलमानांनो! तुम्हीं परमेश्वराला भीत रहा आणि (मनोभावानें) त्याचा पैगंबर ('मोहंमद') याचा विश्वास धरा; कीं परमेश्वर आपल्या दयेंतून तुह्मांस दुहिरी हिस्सा देईल व तुह्मांस असा प्रकाश देईल कीं, ज्या(च्या उजेडां)त तुम्हीं चालाल आणि तुम(च्या पापां)ची क्षमा करील. आणि परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. २८. (आणि हें तुम्हांस यासाठीं सांगितलें जातें) कीं ग्रंथधारी लोकांनीं हें समजूं नये कीं मुसलमानांस परमेश्वराचे कृपेवर कांहींहि सत्ता नाहीं; आणि (तसेंच) ह्यासाठीं (सांगितलें जातें) कीं कृपा परमेश्वराच्या हातीं होय. तो ज्याला इच्छील त्याला ती देईल. आणि परमेश्वर महा-कृपानिधान होय. २९.

# पवित्र कुराण.
## भाग अठ्ठाविसावा.
## अध्याय ५८ वा.
## सूरतुल्–मुजादिलः

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. यांत २२ आयात-महावाक्यें आहेत. याचें नांव 'मुजादिलः' म्हणजे वाद घालणारी असें पड-ण्याचें कारण हें कीं, एकदां खौला बिनते सालबा, जी औस बिन सामितची बायको होती तिला तिच्या नवऱ्यानें अज्ञान काळच्या काडी मोडून देण्याच्या रूढीप्रमाणें म्हणजे 'तूं मला माझ्या आईच्या पाठी-सारखी आहेस' असें ह्मणून सोडून दिलें. तेव्हां ती हजरत मोहंमद पैगंबर-साहेबापाशीं अशा शब्दांनीं विवाहमोचन होतें किंवा नाहीं, हें विचाराव-यास आली. त्यांनीं तिला सांगितलें कीं, तुला तुझ्या नवऱ्याबरोबर आतां राहणें बेकायदेशीर आहे. तिणें उत्तर दिलें कीं, मला माझ्या नवऱ्यानें टाकिलें नाहीं. हजरत पैगंबरांनीं तोच निकाल पुन्हां सांगितला कीं, अशा ह्मणण्यानें कायमची सुटका होतें ही सर्वमान्य गोष्ट आहे. यावरून ती बाई फारच चिंता-तुर झाली; कारण तिला लहान लहान मुलें होतीं व तिच्यांत व नवऱ्यांत ताटातूट होत होती. तेव्हां ती घरीं गेली व परमेश्वरापुढें प्रार्थना करूं लागली. त्यावर परमेश्वरानें हजरत पैगंबरसाहेबांस इकडे हीं महावाक्यें प्रकटिलीं कीं त्या अन्वयें असले शब्द उच्चारल्यानें विवाह मोडत नाहीं आणि नवऱ्यानें प्राय-श्चित्तादाखल कांहीं दानधर्म केल्यास तो आपल्या त्या बायकोचा पुनरपि अंगिकार करूं शकतो. बाई खौलानें जो वाद घातला तो हा होता.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

(हे पैगंबरा! 'सालबा'ची मुलगी 'खौला')जी आपला भ्रतार('सामित'चा

पुत्र 'औस') याच्या संबंधीं तुझ्याशीं वाद घालीत होती व परमेश्वरापुढें गाऱ्हाणें करीत होती, तिचें बोलणें परमेश्वरानें ऐकून घेतलें. आणि परमेश्वर तुम्हां उभयतांचें संभाषण ऐकित होता. निःसंशय परमेश्वर ऐकता (व) पाहता होय. १. (मुसलमानांनो!) जे लोक तुमच्यांतून आपल्या स्त्रियांस(आई म्हणून) टाकून बसतील, त्या (कांहीं) त्यांच्या आई नव्हत. त्यांच्या आई तर केवळ ज्यांनीं त्यांस जन्म दिला त्याच होत. आणि (बायकोला आई म्हणून) त्यांनीं एक निरर्थक व खोटी गोष्ट उच्चारिली. आणि निःसंशय परमेश्वर माफी करणारा (व) क्षमाशील होय. २. आणि जे लोक आपल्या स्त्रियांस (आई म्हणून) टाकून बसतात तदनंतर ते जें बोलून चुकले आहेत (कीं अमुक काम करणार नाहींत) तेंच (काम) परतून ते करूं पाहतात; तर त्यांनीं एकमेकांस हात लावण्यापूर्वींच (पुरुषाला एका बंदिवानाची) मान मुक्त करणें (भाग आहे. मुसलमानांनो!) तुम्हांस हा उपदेश केला जातो (कीं तुम्हीं त्याचप्रमाणें आचरावें); आणि जें कांहीं तुम्हीं करितां परमेश्वर त्याशीं माहीतगार होय. ३. मग ज्याला (बंदीवान) न मिळेल तर त्यांनीं एकमेकांला हात लावण्यापूर्वीं (पुरुषानें)लागोपाठ दोन महिन्यांचे उपास पाळणें; आणि ज्याच्यानें हें न होऊं शकेल त्यानें साठ (अन्नास मोताद अशा) गरीबांस भोजन घालणें. हा (हुकूम) यासाठीं (दिला जातो) कीं तुम्हीं लोकांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजवर (पूर्ण) विश्वास[2] ठेवावा. आणि ह्या

(१) इस्लामधर्मापूर्वी अरब लोकांत स्त्रियांची फारच दुर्गत होती. ह्मणूनच कुराणांत अनेक जागीं स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणाचे नियम आलेले आहेत. त्या पैकींच हा 'ज़िहार'चा प्रश्नहि होय. हेंहि अज्ञानकाळीं एक प्रकारचें विवाहमोचन होतें. त्याचें वर्णन ह्या अध्यायाच्या आरंभीं केलेलेंच आहे. याला शास्त्रीय परिभाषेंत 'ज़िहार' यासाठीं ह्मणतात कीं 'ज़िहार' हा ज़हर ह्मणजे पाठ यापासून निघालेला आहे. इस्लामानें या शब्दांनीं सोडचिठी होणें मान्य केलें नाहीं परंतु असल्या निरर्थक गोष्टी बोलण्यासाठीं प्रायश्चित्त मात्र ठरविलें आहे.

(२) विश्वास तर मुळांत श्रद्धेचें नांव आहे; व त्याची परिपूर्णता कर्मानें होते. जर कोणी मनुष्य परमेश्वर व पैगंबर यांजवर विश्वास ठेवितो व त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणें आचरीत नाहीं; तर त्याला पुरा मुसलमान म्हणतां येत नाहीं.

परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादा होत. आणि जे लोक (ह्यांस) नाकारितात त्यांना दुःखदायक शिक्षा (होणें) आहे. ४. जे लोक परमेश्वर व त्याचा पैगंबर यां(च्या हुकमां)चा विरोध करितात ते (अखेर) जसे यांच्यापूर्वींचे (आज्ञाभंजक लोक) क्षुल्लक झाले होते तसेच क्षुल्लक होतील; आणि आम्हीं तर(आपले)खुले खुले हुकूम सादर करूनच चुकलों आहों. आणि नाकारणाऱ्यांस फजितीची शिक्षा (होणें) आहे. ५. (आणि ही शिक्षा त्या दिवशीं होईल कीं) ज्या दिवशीं परमेश्वर त्या सर्वांस (जिवंत करून) उठवील. मग जसजशीं कर्मे हे लोक करीत राहिले तीं तो त्यांना विदित करील. परमेश्वर तर त्यांचीं कर्मे मोजीत गेला आणि हे (स्वतः करून) तीं विसरून गेले. आणि परमेश्वर सर्वसाक्षी होय. ६. (हे पैगंबरा !) कां तूं (या गोष्टीवर) नजर केली नाहींस कीं, जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे त्या (सर्वांच्या स्थिती)शीं परमेश्वर वाकब होय. कोणाहि तीन (माणसां)ची (गुप्त) सल्लामसलत होते, तेव्हां अवश्य त्यांचा चवथा तो असतो; आणि पांचांची (सल्लामसलत) होते तेव्हां अवश्यच त्यांचा सहावा तो असतो. आणि ह्यापेक्षां कमी असोत अगर अधिक(व) ते कोठेंहि असोत तो अवश्यच त्यांच्याबरोबर असतो. मग जसजशीं कर्मे हे (जगांत) करीत राहिले आहेत तीं पुनरुत्थानाच्या दिवशीं तो त्यांना कळवील. (कारण) परमेश्वर अर्थात सर्वज्ञानी होय. ७. (हे पैगंबरा !) कां तूं त्या लोकां (च्या स्थिती) चें अवलोकन केलें नाहींस कीं, ज्यांना कुजबुज करण्यापासून मनाई केली गेली होती ? मग ज्या पासून त्यांस मनाई केली गेली होती तीच (गोष्ट) ते पुन्हां करतात. आणि कुजबुजहि करतात (तर) पातकाची व (लोकांवर अनाठायीं) अत्याचार करण्याची आणि पैगंबराच्या आज्ञाभंगाची;आणि ते जेव्हां तुजपाशीं येतात तेव्हां ज्या(शब्दां)नीं परमेश्वरानें तुला सलाम पाठविला नाहीं अशा(शब्दां) नीं तुला सलाम करतात; आणि आपल्या मनांत म्हणतात कीं,[1] (जर हा खरा पैगंबर आहे तर) आम्हीं (हें) जें बोलतों त्यावर

(१) यहुदी लोक हजरत पैगंबरसाहेबांस 'अस्सलामो अलैक'च्या जागीं 'अस्सामों अलैक' म्हणत होते. 'सलाम' ह्मणजे शांति व सलामती असा अर्थ आहे; आणि 'साम' ह्मणजे मृत्यु या वाक्यांत याच गोष्टीकडे इषारत आहे.

परमेश्वर आम्हांला शिक्षा कां देत नाहीं? यांना 'जहन्नम'(ची शिक्षा) पुरी होय; हे त्यांत जळावयास दाखल होतील. तर (या लोकांचेंहि कितीतरी) वाईट ठिकाण होय! ८. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुम्हीं एकमेकांच्या कानांत बोलाल, तेव्हां पातकाची व (लोकांवर विनाकारण) अत्याचार करण्याची आणि पैगंबराच्या आज्ञाभंगाची गोष्ट एकमेकांच्या कानांत बोलत जाऊं नका. आणि (बोलाल तर) पुण्याची व (ईश्वर) भयाची गोष्ट एकमेकांच्या कानांत बोला; (त्यास हरकत नाहीं). आणि परमेश्वर ज्याच्या हुजुरांत (तुम्हीं सर्व पुनरुत्थानाच्या दिवशीं हिशेबासाठीं) एकत्र केले जाल त्याला भीत राहा. ९. कुजबुज[१] करणें तर केवळ सैतानी काम होय, कीं जेणेंकरून ज्यांनीं विश्वास धरिला आहे ते दुःखी व्हावेत. आणि खरें पाहतां, परमेश्वराच्या परवानगीवांचून (कोणाचीहि कुजबुज) त्यांना कांहींच नुकसान पोहोंचवूं शकत नाहीं. आणि मुसलमानांस पाहिजे आहे कीं, त्यांनीं परमेश्वरावरच भरंवसा ठेवावा. १०. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुम्हांस सांगितलें जाईल कीं, सभेंत खुलून खुलून बसा तेव्हां तुम्हीं खुलून बसत जा; म्हणजे परमेश्वर तुम्हांस (स्वर्गांत) ऐसपैस (खुली) जागा देईल.आणि जेव्हां (तुम्हांस) सांगितलें जाईल कीं, (आपल्या जागेवरून) उठून उभे राहा (व दुसरे जागीं जाऊन बसा) तेव्हां तुम्हीं उठून उभे राहत जा; कीं तुम्हां लोकांपैकीं ज्यांनीं (पूर्ण) विश्वास धरिला आहे व ज्यांना (समाजशास्त्राचें) ज्ञान दिलें गेलें आहे (व जे समाजनीतिप्रमाणें वागतातहि); परमेश्वर त्यांचे दर्जे वाढवील. आणि जें कांहीं तुम्हीं करितां तें परमेश्वरास माहीत आहे. ११. अहो मुसलमानांनों! जेव्हां तुम्हांस पैगंबराच्या कानांत एकादी (गुप्त) गोष्ट सांगावयाची असेल तेव्हां तुम्हीं कानांत सांगण्याच्या

---

(१) कानांत बोलणें वा कुजबुज करणें याची मनाई या महावाक्यांत केली गेली आहे; तर हजरत पैगंबरांच्या मजालसींत दांभिक लोक आपसांत जी कुजबुज करीत होते ती होय. ते मुसलमानांच्या भयानें स्पष्टपणें तर कांहीं बोलत नव्हते; पण कुजबुज व खुणा करून आपलें काम काढीत होते. याच कुजबुजीची निंदा व निषेध पांचव्या भागांतहि आहे.

आधीं कांहीं दानधर्म करीत असा. हें तुमच्याठायीं उत्तम आणि (चित्तास) विशेष शुद्धिकारक होय. मग जर तुम्हांस (दानधर्माचा) मगदूर नसेल तर परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय. १२. (मुसलमानांनों!) कां तुम्हीं (हा हुकूम ऐकून) भिऊन गेला कीं, (पैगंबराच्या) कानांत बोलण्याच्या आधीं कांहीं दानधर्म करीत असा? तर ज्या अर्थीं तुह्मीं (ह्या हुकमाची) बजावणी न करूं शकला व परमेश्वरानें तुम्हांला माफीहि देऊन टाकली त्याअर्थीं (आतां इस्लामाच्या आवश्यक नियमांच्या बजाविण्यांत कोताई होऊं नये म्हणजे) नमाज पढा व जकात द्या; आणि परमेश्वराचा व त्याच्या पैगंबराचा हुकूम माना. आणि जे कांहींहि तुम्हीं करितां परमेश्वर त्याशीं माहीतगार होय. १३. (हे पैगंबरा!) कां तूं त्या(दांभिकांच्या स्थिती)चें अवलोकन केलें नाहींस कीं ज्यांनीं अशा लोकांशीं (जाऊन) दोस्ती लाविली कीं, ज्यांवर परमेश्वराचा कोप झालेला आहे. (तर आतां) हे लोक तुमच्यांतहि नाहींत व त्यांच्यांतहि नाहींत; आणि ते जाणत (बुजत) आहेत तरी देखिल खोट्या (खोट्या)गोष्टींवर शपथ वाहतात. १४. यांच्यासाठीं परमेश्वरानें सक्त शिक्षा तयार करून ठेविली आहे. यांत शंका नाहीं कीं हे लोक (फारच) वाईट करितात. १५. यांनीं आपल्या शपथांस ढाल बनवून ठेविली आहे आणि ते (लोकांस) परमेश्वराच्या मार्गा-

---

(१) हजरत पैगंबरसाहेबांपाशीं लोक विनाकारण कामावांचूनहि एकांतीं जाऊन बोलूं लागत असत; आणि पैगंबरीचा आदर व मर्यादा कायम राखण्यास्तव होतां होईतों त्यास प्रतिबंध करणें आवश्यक होतें. म्हणून हा हुकूम झाला कीं, हजरत पैगंबरांशीं गुप्तपणें एकांतीं कांहीं बोलावयाचें असल्यास अगोदर कांहीं धर्मदान करीत असा. एक तर या दानांत लोकांचें कल्याण होतें व दुसरें, द्रव्य खर्च होत होतें. ह्मणून त्यांच्यापाशीं विनाकारण जाऊन त्रास देणारांस अडथळाहि होत असे. ह्या युक्तीनें लोकांच्या विनाकारण येण्याजाण्यासहि आळा बसला. हा हुकूम तात्पुरता असून फक्त थोडावेळच अमलांत होता; पुढें तो रद्द झाला.

(२) भावार्थ हा कीं, गुप्तरीतीनें ते इस्लामाचें निर्मूलन करण्यांत लागून राहतात आणि मुसलमानापुढें खोट्या खोट्या शपथा वाहतात कीं, ते पकडले जाऊं नयेत.

हून अडथळा करीत राहतात. म्हणून यांना अपमानकारक शिक्षा (होणें) आहे. १६. परमेश्वरापुढें तर यांची धनदौलतहि यांच्या कांहीं कामा येणार नाहीं व यांची संततिहि (यांच्या कांहीं उपयोगी पडणार नाहीं). हे नरकवासी लोक होत. ते सदासर्वदा नरकांतच राहतील. १७. ज्या दिवशीं परमेश्वर या सर्वांस (सजीव) उठवील तेव्हां हे जशा तुम्हां (मुसलमानां)पुढें शपथा वाहतात तशाच त्याच्यापुढेंहि शपथा वाहतील; आणि ते समजतात कीं, तेहि कांहीं आहेत. पाहाहो! हे लोक (मोठेच) लबाड होत. १८. सैतान यांच्यावर प्रबल होऊन गेला आहे व त्यानें यांना परमेश्वराचें स्मरण विसरविलें आहे. हा (एक) असुरी समुदाय होय. पाहा हो! असुरी समुदायच (अखेर) नाश पावेल. १९. जे लोक परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विरोध करितात तेच (अखेर) सर्वांत क्षुल्लक लोकांपैकीं होतील. २०. परमेश्वर तर लिहून चुकला आहे कीं, मी (नास्तिकांवर) अवश्य प्राबल्य गाजवीन व माझे पैगंबरहि. निःसंशय परमेश्वर बलवान् (व) परम समर्थ होय २१ (हे पैगंबरा!) जे लोक परमेश्वर व शेवटचा दिवस यांचा विश्वास बाळगितात ते, जे लोक परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विरोध करतात त्यांच्याशीं प्रीति ठेवितील असें तुला आढळून येणार नाहीं;(मग पाहिजे) तर ते त्यांचे बाप किंवा त्यांचे मुलगे अथवा त्यांचे भाऊ किंवा त्यांचे कुटुंबांचि (कां) असेनात! हेच (ते पक्के मुसलमान) होत कीं, ज्यांच्या अंतःकरणांमध्यें परमेश्वरानें विश्वास जमविला आहे; आणि आपल्या आत्म्याद्वारें त्यांस सबल केलें आहे. आणि तो त्यांना (स्वर्गाच्या अशा) बागांत नेऊन दाखल करील कीं ज्यांच्या खालून पाण्याचे पाट वाहत असतील; (व ते) त्यांतच निरंतर राहतील. परमेश्वर त्यांच्याशीं खुष व ते परमेश्वराशीं खुष. हा ईश्वरी समूह होय. पाहाहो! ईश्वरी समूहच (सरेशवटीं) सफल होईल. २२.

(२) म्हणजे ते फार चाणाक्ष आहेत आणि समजतात कीं शपथ वाहणें हें त्यांस उपयुक्त होईल अथवा ते जें कांहीं करतात ते चांगलेंच करतात.

# अध्याय ५९ वा.

# सूरतुल–हश्र्.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. यांत २४ आयात–महावाक्यें आहेत. याचें नांव सूरतुल्-हश्र् होण्याचें कारण असें कीं मदिनेहून चार पांच कोसांच्या अंतरावर यहुद्यांची एक जात वसत होती. ते बनी–नदीर म्हणवीत असत. त्यांचा मुसलमानांशीं तह होता; परंतु त्या लोकांचा चोरीछपी मक्केच्या नास्तिकांशीं कट होता; आणि एकदां त्यांनीं हजरत पैगंबरसाहेबांस मारून टाकण्याचाहि बेत केला होता. ते एका भिंतीखालीं बसून कांहीं गोष्टी करीत होते हें त्या लोकांनीं पाहून वरून एक जात्याची तळी पाडूं इच्छिली. येथपर्यंत मजल आली; तेव्हां अर्थातच बनी–नदीरच्या बेइमानीची पराकाष्टाच झाली. म्हणून हजरत पैगंबरसाहेबांनीं त्या दुष्टांस घेरा घातला व ते अतानोत घाबरले. शेवटीं असें ठरलें कीं ह्या लोकांनीं स्वदेश सोडून सीरीया देशांत जाऊन राहावें. सारांश मालमत्ता वगैरे जें कांहीं त्यांना नेतां आलें तें ते घेऊन गेले. तर 'हश्र्' म्हणजे स्वदेशत्याग हा त्या राजद्रोही लोकांसाठीं जणूं काळ्यापाण्याची शिक्षाच होय. असल्या शासनाशिवाय ते लोक वठणीस आले नसते व सद्धर्म व साम्राज्य संरक्षणहि झालें नसतें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें ( मी आरंभ करितों).**

**जितकी म्हणून (सृष्टि) आकाशांत आहे व जितकी म्हणून (सृष्टि) पृथ्वींत आहे (सर्वच तर) परमेश्वराच्या पावित्र्यवर्णनांत लागून आहे; आणि तो सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् होय. १. तो (परमेश्वर)च तर होता कीं ज्यानें ग्रंथधारी नास्तिकांस त्यांच्या घरादारांतून काढून बाहेर लाविलें; (आणि हा त्यांच्या नशीबीं) पहिला स्वदेशत्याग (होता) कीं**

(१) म्हणजे वरील टीपेंत सांगितलेला त्याग हा त्या यहुद्यांच्या नशीबीं

ज्याच्यासाठीं ते काढिले गेले. (मुसलमानांनों!) तुम्हांस तर याची कल्पनाहि नव्हती कीं (हे आपल्या घरांतून) निघतील. आणि ते या विचारांत (उन्मत्त) होते कीं त्यांचे किल्ले त्यांना परमेश्वरा(च्या पकडी)पासून बचावून घेतील. तर जेथून त्यांना गुमानहि नव्हतें तेथून परमेश्वरा(च्या सैन्या)नें त्यांना येऊन गांठिलें व त्यांच्या अंतःकरणांत (मुसलमानांचा) धाक घालून दिला; कीं ते आपलीं घरें(खुद्द) आपल्या हातांनीं व मुसलमानांच्या हातांनीं उजाड करूं लागले.तर ज्यांना डोळे आहेत अशा हे लोकांनों! तुम्हीं (या वृत्तांतापासून) धडा घ्या. २. आणि जर परमेश्वरानें हद्दपार होणें यांच्या नशीबीं लिहिलें नसतें, तर परमेश्वर यांस (अन्य तऱ्हेनें) या जगांत शिक्षा देता. आणि परलोकीं तर यांना नरकाग्नीची शिक्षा (होणेंच) आहे. ३. (आणि)हें या कारणामुळें कीं यांनीं परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा विरोध केला; आणि जो कोणी परमेश्वराचा विरोध करील, तर (त्याला) शिक्षा देण्यांत परमेश्वर फार कडक होय. ४. (मुसलमानांनों! यांचीं) खजुरींचीं झाडें जीं तुम्हीं कापून टाकिलीं अगर त्यांस (हात देखील न लावतां तशींच) त्यांच्या मुळ्यांसहित उभीं राहूं दिलीं तर (हें सर्व कांहीं) परमेश्वराचेच हुकमानें झालें; आणि परमेश्वरास मंजूर होतें कीं, अज्ञाभंजकांस फजित करावें. ५. आणि जी (मालमत्ता) परमेश्वरानें आपल्या पैगंबरास बिन लढल्या फुकटांवारी[१] त्यांच्यापासून देवविली; तर (मुसलमानांनों!) तुम्हीं तिच्यासाठीं कांहीं धांवधूप तर केली नाहीं, घोड्याद्वारेंहि नाहीं व उंटाद्वारेंहि नाहीं. परंतु परमेश्वर आपल्या पैगंबरांस ज्याच्यावर इच्छील त्याच्यावर वर्चस्व देईल. आणि

---

आलेला पहिला स्वदेशत्याग होय. यावरून त्यांचा दुसऱ्यांदाहि स्वदेशत्याग होईल असें भविष्य निघतें; तात्पर्य झालेंहि असेंच कीं हजरत उमर या दुय्यम खलिफांनीं आपल्या अमदानींत सर्व यहुद्यांस त्यांच्या फिसादखोरपणामुळें अरबी द्वीपकल्पांतून हद्दपार करून टाकिलें.

(१) लुटीचे दोन प्रकार आहेत. एक जी नास्तिकांशीं लढून हातीं लागते तिला 'गनीमत' ह्मणतात; आणि दुसरी जी बिनलढल्या हातीं लागते कीं जशी बनी–नदीर यहुद्यांपासून प्राप्त झाली होती, तिला शास्त्रीय परिभाषेंत 'फै' ह्मणतात; व त्याचें भाषांतर आम्हीं फुकटावारी असें केलें आहे.

# अध्याय ६३ वा.

## सूरतुल्–मुनाफिकून.

हा अध्याय मदिनेंत प्रकट झाला. यांत ११ महावाक्यें आहेत. यांत 'मुनाफिकून' म्हणजे दांभिक लोक, यांचें कांहीं विवेचन करण्यांत आलें आहे म्हणून हें नांव पडलें. त्या दांभिकांचा मुख्य सरदार अबदुल्ला बिन उबै बिन सलूल हा होता. त्याचा खोडसाळपणाहि यांत निदर्शनास आणिला गेला आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**(हे पैगंबरा!) दांभिक लोक जेव्हां तुजपाशीं येतात तेव्हां ते (तुला खुष करण्यासाठीं) म्हणूं लागतात कीं, आम्हीं तर प्रत्यक्ष म्हणतों कीं, तूं निःसंशय परमेश्वराचा पैगंबर आहेस. आणि परमेश्वर तर जाणितच आहे कीं, तूं निःसंशय त्याचा पैगंबर आहेस. आणि परमेश्वर (हेंहि तुला) बजावून सांगित आहे कीं, (हे) दांभिक लोक लबाड होत. (कारण, ते खऱ्या अंतःकरणानें असें बोलत नाहींत.) १. या लोकांनीं आपल्या शपथांस ढाल बनवून ठेविली आहे; तर (तिच्या आड पडद्यांत लोकांस) ते परमेश्वराच्या मार्गाहून अडथळा करितात. हे लोक जीं कामें करीत आहेत तीं (किती तरी) वाईट होत! २. हें (कां? तर) यासाठीं कीं ह्या लोकांनीं (प्रथम मुसलमानांस दाखविण्यासाठीं) विश्वास धरिला व मग (नास्तिकांत मिळून इस्लामास) नाकारूं लागले; येथपर्यंत कीं यांच्या अंतःकरणावर मोहोर लाविली गेली, तर**

(१) भावार्थ हा कीं, खोट्या शपथांनीं मुसलमानांस दांभिकांनीं धोका दिला आणि पाहावयास तर ते त्यांच्याशीं मिळून राहिले; व या शपथांच्या आड पडद्यांत लोकांस बहकवीत व इस्लामाचा मूलच्छेद करूं पाहीत.

(आतां) ह्यांस (सत्य) समजतच नाहीं. ३. आणि (हे पैगंबरा !) तूं जेव्हां यां(च्या बाह्यस्थिती)स पाहशील तेव्हां त्यांचीं शरीरें तुला मोह घालतील; आणि जर ते बोलूं लागतील तर तूं त्यांची गोष्ट (कान लावून) ऐकशील. (तुझ्यासमोर हे असे टेंकून टेंकून बसतात कीं) जणूं ते लांकडांचे ओंढे होत कीं जे (भिंतीस) लावून ठेविलेले आहेत. प्रत्येक आरोळीस ते समजातात कीं आपल्यालाच ललकारलें. (हे पैगंबरा !) हेच लोक तुझे (कट्टे) शत्रू होत. तर यांजपासून जपत राहा. त्यांना परमेश्वराची मार! कोठल्या कोठेंच ते बहकले जात आहेत ! ४. आणि जेव्हां त्यांना सांगितलें जातें कीं या हो, परमेश्वराचा पैगंबर (त्याच्या सत्रेंत गेलें म्हणजे) तुम्हांसाठीं क्षमेची प्रार्थना करील; तेव्हां (ते हें ऐकतांच) डोकीं फिरवून घेतात. आणि (हे पैगंबरा !) तूं (त्यावेळीं) त्यांना पाहशील, तर ते गर्विष्ठ होत्साते (तुजकडे) रोंखहि करीत नाहींत. ५. या लोकांसाठीं तूं क्षमेची प्रार्थना कर वा न कर, यांच्याठायीं (दोन्हीं) सारखेंच होय; परमेश्वर तर यांना क्षमा करणारच नाहीं. निःसंशय परमेश्वर आज्ञाभंजक लोकांस सन्मार्गाची बुद्धि देत नसतो. ६. हेच तर होत कीं, जे (लोकांस बहकवून) सांगतात कीं, जे लोक परमेश्वराच्या पैगंबरापाशीं (येऊन गोळा झाले) आहेत त्यांजवर (आपला पैसा) खर्च करूं नका; कीं ते (निरुपाय होऊन) अखेरीस (आपणच) फांकाफांक होऊन जातील. आणि वास्तविक पाहतां आकाशांत व पृथ्वींत जितके खजिने आहेत ते (सर्व) परमेश्वराचेच होत; परंतु दांभिक लोकांस (इतकी) समज नाहीं. ७. (हे दांभिक) म्हणतात कीं, जर आम्हीं 'मदिने'स परतून गेलों, तर प्रतिष्ठित तेथून हलक्यास

(१) मतलब हा होय कीं, त्यांना खूप बाता बनवितां येतात; कीं ऐकणाराचें चित्त खामखा त्यांच्याकडे वेधलें जातें.

(२) हा गजवए–बनी–मुस्तलिक या लढाईचा मजकूर आहे; कीं कित्येक मक्केकर मुसलमानांची कित्येक मदिनेकरांशीं पाण्यासंबंधानें विहीरीवर मारामारी झाली; तेव्हां त्या मदिनेकरांनी, दांभिकांचा सरदार अबदुल्ला बिन उबै बिन सलूल याजपाशीं गाऱ्हाणें सांगितलें. तो ह्मणूं लागला कीं, यांस आम्हीं आश्रय दिला म्हणून हा दिवस आला ना ? तरी जर आह्मीं मदिनेस परत गेलों, तर तेथून प्रतिष्ठित हलक्यास बाहेर काढून लावील तरच सई. मग हे राहणारहि नाहींत व बखेडा होणारहि नाहीं.

बाहेर काढून लावील तरच सई. आणि खरें पाहतां, (अस्सल) प्रतिष्ठा परमेश्वराची व त्याच्या पैगंबराची व मुसलमानांची होय. परंतु दांभिकांस (या गोष्टीची) जाणीव नाहीं. ८. अहो मुसलमानांनों! तुम्हांस तुमच्या धनदौलतीनें व तुमच्या संततीनें ईश्वरस्मरणाकडून गफलतींत ठेवतां कामा नये. आणि जो कोणी असें करील तर तेच लोक (शेवटीं) हानि पावणारे होतील. ९. आणि आम्हीं तुम्हांस जें कांहीं देऊन ठेविलें आहे त्यांतून (परमेश्वराच्या मार्गांतहि कांहीं) खर्च करीत राहा; (पण) याच्या पूर्वींच (खर्च करा व याची पाळी येऊं देऊं नका) कीं, तुम्हांपैकीं कोणाला मृत्यु येऊन ठेपेल व तो (त्यावेळीं) म्हणूं लागेल कीं हे माझ्या पालनकर्त्या! जर तूं मला थोडया काळापर्यंत आणखी अवकाश देतास; तर मी दानधर्म करितों व (इतर) सदाचरणी सेवकांपैकीं (एक सदाचरणी सेवक) मीहि होतों. १०. आणि जेव्हां कोणाचा मृत्यु येऊन ठेपतो, तेव्हां परमेश्वर कधींहि त्याला अवकाश देत नसतो. आणि जें कांहींहि तुम्हीं (लोक) करितां परमेश्वर त्याशीं वाकबगार होय. ११.

## अध्याय ६४ वा.

# सूरतु–त्तग़ाबुन्.

हा अध्याय मदिनेंत प्रकट झाला. यांत १८ आयात–महावाक्यें आहेत. यास 'तग़ाबुन्' नांव देण्याचें कारण हें कीं, नास्तिक लोक ह्या जगांत मुसलमानांशीं विश्वासासंबंधीं जी दगलबाजी करीत होते व त्यांस छळत होते तिचा खरा परिणाम पुनरुत्थानांत जाहीर होईल व नास्तिकांस आपल्या दगलबाजीची शिक्षा मिळेल; म्हणजे त्यांनीं विश्वास धरिला असता तर जो स्वर्ग त्यांना मिळता, तो आतां मुसलमानांस मिळेल व नास्तिकांस नरकवास प्राप्त होईल. त्या दिवशीं खरी हारजीत निदर्शनास येईल.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें ( मी आरंभ करितों).

जी (सृष्टि) आकाशांत आहे व जी (सृष्टि) पृथ्वींत आहे ती (सर्वच तर) परमेश्वराची पवित्रता वर्णण्यांत लागून आहे. त्याचेंच राज्य आहे व त्यालाच स्तुति होय; आणि तो सर्वशक्तिमान् होय. १. (लोकांनों!) तोच तर होय कीं ज्यानें तुम्हांस निर्मिलें; यावरहि तुमच्यांत कित्येक नास्तिक होत व कित्येक विश्वासू. आणि जें कांहींहि तुम्हीं करितां तें परमेश्वर पाहतो आहे. २. त्यानेंच कोणा सत्यसंकल्पानें आकाशांस व पृथ्वीस उत्पन्न केलें आहे; व त्यानेंच तुमच्या आकृति बनविल्या आणि तुमच्या आकृतिहि (बनविल्या त्या) सुंदर बनविल्या. आणि त्याच्याचकडे (सर्वांस) परत जाणें आहे. ३ जें कांहीं आकाशांत व पृथ्वींत आहे तें (सर्व) तो जाणतो; आणि जें कांहीं तुम्हीं लपवून करितां व जें कांहीं तुम्हीं उघडपणें करितां तेंहि तो जाणतो. आणि परमेश्वर (तर लोकांच्या) मनांतील गोष्टींशीं (देखिल) वाकब होय. ४. ज्या लोकांनीं (तुमच्या)पूर्वीं नास्तिकपणा केला व मग (जगांतच) आपल्या कर्मांच्या दुष्परिणामाची गोडीहि चाखली आणि (परत्रीं) त्यांना दुःखद शिक्षा होणें आहे, (ती वेगळीच); त्यांची हकीकत तुम्हांपर्यंत आली नाहीं काय? ५. हें यासाठीं कीं त्यांचे पैगंबर खुलेखुले चमत्कार घेऊन येत राहिले, आणि हे (लोक हेंच) म्हणत राहिले कीं, कां (आम्हांसारखीं) माणसें आम्हांस सन्मार्ग दाखविणार? सारांश त्यांनीं (पैगंबरांस) नाकारिलें व (त्यांजकडून) तोंड फिरविलें; आणि परमेश्वरानेंहि (त्यांची कांहींच) पर्वा केली नाहीं. आणि परमेश्वर निरपेक्ष (व प्रत्येक अवस्थेंत) सुस्तुत्य होय. ६. जे नास्तिक आहेत

(१) माणसाची इतर प्राणिमात्राशीं तुलना करून पाहिलें असतां, माणसाची आकृति, रूप व रचना हीं सामान्येंकरून सुंदर आहेत. इतर प्राणी कोणी तर भूमीस सरपटत जातात, कोणी सरळ उभे राहूं शकत नाहींत आणि बहुतेकांस भूमीस तोंड लावून खावें प्यावें लागतें. तात्पर्य, एकंदरींत माणसास कोणताहि प्राणी पोहोंचू शकत नाहीं. त्याची सरळ काठी या गोष्टीची द्योतक होय कीं, तो सर्वांवर सत्ता चालविण्यास पैदा केला गेला आहे.

ते (असें) प्रतिपादितात कीं त्यांना कधींच (पुन्हा जिवंत करून) उठविलें जाणार नाहीं. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं, हो होय, मला आपल्या पालनकर्त्याचीच शपथ आहे कीं तुम्हीं अवश्यच उठविले जाल; तदनंतर, जें कांहींहि तुम्हीं (जगांत) केलें आहे (त्याचें बरें वाईट) अवश्य तुम्हांस कळविलें जाईल. आणि ही परमेश्वरासमीप (एक) सोपीशी (गोष्ट) होय. ७. तर (लोकांनों!) परमेश्वर व त्याचा पैगंबर यांजवर विश्वास ठेवा; आणि (तसेंच) जें तेज (म्हणजे कुराण) आम्हीं प्रकट केलें आहे त्यावरहि. आणि जें कांहींहि तुम्हीं करितां त्याशीं परमेश्वर (खूप) माहीतगार होय. ८. (आणि त्याचा परिणाम तुम्हांस त्याविषयीं माहित होईल कीं,) जेव्हां (मोठ्या) जमावाचे दिवशीं तो तुम्हां(सर्वां)स एकत्र गोळा करील; हाच हारजितीचा दिवस होईल. आणि जो कोणी (इहलोकीं) परमेश्वरावर विश्वास ठेवितो व सुकृत्य करितो, (पुनरुत्थानांत) परमेश्वर त्याचीं पापें त्याच्यावरून दूर करील; व त्याला (स्वर्गाच्या) अशा बागांत (नेऊन) दाखल करील कीं, ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व ते) त्या(बागां)तच नित्य निरंतर राहतील. मोठें सार्थक (म्हटलें तर) हेंच होय. ९. आणि ज्या लोकांनीं नास्तिकपणा केला व आमच्या निशाण्यांस पाखंड म्हणीत राहिले, हेच लोक नरकवासी होतील; कीं, ते निरंतर नरकाग्नींत राहतील. आणि ती फारच वाईट जागा होय. १०. परमेश्वराच्या आज्ञेवांचून कोणतीहि आपत्ति ओढवत नसते. आणि जो कोणी परमेश्वरावर विश्वास ठेवील, (संकटप्रसंगीं) परमेश्वर त्याच्या अंतःकरणास मार्ग सुचवील. आणि परमेश्वर सर्वज्ञानी होय. ११. आणि (लोकांनों!) परमेश्वराची आज्ञा पाळा व पैगंबराची आज्ञा पाळा; मग जर तुम्हीं तोंड फिरवाल, तर आमच्या पैगंबराकडे स्पष्टपणें (आमच्या आज्ञांचें) पोहोंचविणें मात्र आहे, एवढेंच. १२. परमेश्वरच (होय कीं,) त्याच्याशिवाय (अन्य) कोणी उपास्य नाहीं.आणि विश्वासूंस पाहिजे कीं, त्यांनीं परमेश्वरावरच भरंवसा ठेवावा. १३. अहो मुसलमानांनों! तुमच्या पत्न्या व तुमची संतति यांजपैकीं (कित्येक) तुम(च्या धर्मा)चे शत्रु होत; तर यांजपासून जपत राहा. आणि जर तुम्हीं (यांच्या अपरा-

धांची) माफी कराल व गय कराल व क्षमा कराल, तर परमेश्वरहि क्षमाकर्ता (व) दयालु होय. १४. तुमची धनदौलत व तुमची संतति (हा) निव्वळ मायेचा पसाराच होय. आणि परमेश्वरासमीप (या पसाऱ्यांत धर्मावर दृढ राहणारासाठीं) मोठा मोबदला होय. १५. म्हणून (मुसलमानांनों !) तुमच्यानें होईल तितकें परमेश्वराला भीत राहा; व (त्याची आज्ञा) ऐका व माना; आणि (त्याच्या मार्गांत) खर्च करीत राहा; कीं (हें) खुद्द तुमच्याचकरितां उत्तम होय. आणि जो कोणी आपल्या स्वभाविक कृपणपणापासून सुरक्षित राखिला जाईल; तर असलेच लोक (परलोकीं) कृतार्थ होतील. १६. (मुसलमानांनों !) जर तुम्हीं परमेश्वरास दिलखुशीनें कर्ज द्याल, तर (परत्रीं) तो तुम्हांस त्याच्या दुप्पट देईल व तुम्हांस क्षमा करील; (ती वेगळीच). आणि परमेश्वर (मोठा) गुणग्राहक (व) दयार्द्र होय. १७. (तो) अदृष्ट व दृष्ट (सर्व) जाणणारा, सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् (होय) १८.

(१) कृपणपणाला स्वाभाविक यासाठीं म्हटलें कीं, थोडा बहुत कृपणपणा तर प्रत्येकाच्या स्वभावांत असतोच. अशाच प्रकारचें एक वाक्य दुसरीकडेहि आलें आहे.



# अध्याय ६५ वा.

## सूरतु–त्तलाक़.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. यांत १२ महावाक्यें आहेत. अबदुल्ला बिन उमर यांनीं आपल्या बायकोस, ती ऋतुमति असतांना सूटपत्र दिलें व पैगंबर साहेबांनीं यांत आलेल्या ईश्वराज्ञेप्रमाणें अबदुल्लास आपल्या स्त्रीचा पुन्हा अंगिकार करण्यास सांगितलें. यांत सूटपत्राचें विवेचन आलें आहे ह्मणून सूरतु-त्तलाक़ ह्मणजे विवाहमोचनाचें प्रकरण हें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**हे पैगंबरा !(मुसलमानांस सांग कीं)जेव्हां तुम्हीं (आपल्या) स्त्रियांस सूटपत्र देऊं पहाल तेव्हां त्यांना त्यांच्या इतद्दी(च्या सुरवातीं)त सूटपत्र द्या आणि (विवाहमोचनाच्यानंतर) 'इद्दत' मोजूं लागा; आणि परमेश्वर जो तुमचा पालनकर्ता त्याला भीत राहा. (इद्दतींत) त्यांना त्यांच्या**

(१) तलाक़ ह्मणजे काडी मोडून देणें ही इस्लामी धर्मशास्त्रांत फारच नापसंतीची गोष्ट आहे. परंतु पुरुषाला जर याचा बिलकुलच अधिकार न दिला जाता, तर कित्येक विशिष्ट स्थितींत मोठमोठाले बखेडे उत्पन्न होण्याचा संभव आहे. हिंदु, ख्रिस्ती वगैरे ज्यांच्या धर्मांत स्त्रीला काडी मोडून देण्याचा कायदा नाहीं,त्यांच्यांत कसकशा भानगडी होतात व त्यांना आमरणांत दुःखांत आयुष्य कंठावें लागतें; यांचीं उदाहरणें दररोज मुबलक पाहण्यांत येतात. म्हणून त्यांना शेवटीं निरुपायास्तव ह्या इस्लामी कायद्याचा आसरा घ्यावा लागतो. इस्लामधर्मांत सूटपत्राची मोकळीक आहे; पण होतां होईतों याची पाळीच येऊं नये, ह्मणून फारच खबरदारी घेण्याचा हुकूम आहे. मग जर सूटपत्र दिल्याशिवाय गत्यंतरच नसलें, तर पतिपत्नीपैकीं कोणाच्याहि हक्कांची पायमल्ली होतां कामा नये. आधीं तर विटाळाच्या दिवसांत काडी मोडून देण्याची मनाई आहे.याचें प्रयोजन हें कीं,त्या दिवसांत पतिपत्नि हीं एकमेकांपासून अलग राहतात; म्हणून हें संभवतें कीं, हा त्यांचा वेगळेपणा विवाहमोचनास कारण,

घरांतून काढूं नका व त्यांनीं (आपणहि) निघूं नये; पण हें कीं त्या, जगजाहीरपणें (एकादें) निर्लज्जपणा (चें काम) करून बसतील, (तर त्यांना बाहेर काढण्यास हरकत नाहीं). आणि ह्या परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादा होत. आणि ज्यानें परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादांचें उल्लंघन केलें तर त्यानें (आपणच) आपल्यावर जुलूम केला. (हे मनुष्या ! जो बायकोस काडी मोडून देतोस त्या) तूं जाणित नाहींस कीं कदाचित परमेश्वर ह्या (सूटपत्रा)नंतर (मिलाफाचें एखादें) नवें प्रकरण पैदा करील. १. मग जेव्हां त्या (स्त्रिया) आपल्या (इद्दतीचा) काळ पूर्ण करायास येतील, तेव्हां (एक तर पुन्हां अंगिकार करून) नीट रीतीनें त्यांना (आपल्या पत्नित्वांत) ठेवून घ्या अथवा नीट रीतीनें त्यांस वेगळें करा; आणि (जें कांहींहि कराल त्यांत) आपल्या (लोकां)पैकीं दोन न्यायी(व मातब्बर माणसां)स साक्षी ठेवीत जा. आणि (साक्षीदारांनों ! साक्षीची जरूर पडल्यास) परमेश्वराला स्मरून तुम्हीं नीट नीट साक्ष द्या. ह्या बोधपर गोष्टी ज्या लोकांस परमेश्वर व शेवटचा दिवस यांचा (पूर्ण) विश्वास

---

भूत झाला असेल. तर ज्याला सूटपत्र द्यावयाचें असेल त्यानें स्त्री विटाळांतून-नाहून धुवून चोखी झाल्यावर द्यावें; कीं जेणेंकरून सूटपत्र सकारण आहे हें उघड होईल. फारखत झाल्यावर 'इद्दत' पाळावी लागते. त्याचें कारण एक तर हें कीं त्यांत वंश निर्मळ राखिला जातो. 'इद्दती'च्या मुदतींत स्त्रीस लागोपाठ तीनदां विटाळ येऊन जाईल, तर पक्कें समाधान होईल कीं ती गर्भवती नाहीं. स्त्री गर्भार असेल तर तिची इद्दत प्रसूतीपर्यंत असते. याशिवाय ह्या मुदतींत एका विशिष्ट प्रकारच्या विवाहमोचनांत पतिपत्नि यांस समेट व मिलाफ करण्याचीहि संधि सांपडते, हाहि एक लाभ होय. सूटपत्रांत याचाहि विचार ठेविला जातो कीं स्त्रीचा वेळ इद्दतींत व्यर्थ व विनाकारण वायां जाऊं नये व तिला तो काळ लवकर पुरा करण्याची संधि दिली जावी. ह्मणून या अध्यायाच्या आरंभीं इद्दतीच्या सुरवातींतच काडी मोडून दिली जाण्याची आज्ञा आहे ह्मणजे ती नाहून धुवून चोखी झाल्यावर तिला सूटपत्र दिलें जावें. स्त्री गर्भवती असल्यास मूल प्रसवण्यानंतर त्याच्या स्तनपानासंबंधानेंहि इस्लामधर्मांत पूर्ण व्यवस्था केलेली आहे. यासंबंधीं सर्व गोष्टी यांत आल्या आहेत.

(१) ह्मणजे परमेश्वरानें जे कायदे ठरविले आहेत ते सेवकांच्या हितासाठीं ठरविले आहेत; आणि जेव्हां कोणी कायद्याचा भंग करितो तेव्हां तें हित नाहींसें होतें. जो मनुष्य तो कायदा मोडतो त्याचें नुकसान मागेंपुढें त्याच्याच पुढें येतें व परमेश्वराजवळ तो पापी ठरतो तें वेगळेंच. आपल्यावर जुलूम करणें ह्मणजे हेंच.

आहे त्या लोकांस समजाविल्या जातात. आणि जो कोणी परमेश्वराला भीत राहील त्याच्यासाठीं परमेश्वर (परस्परच्या बखेड्यांतून) सुटकेचा मार्ग काढील. २. आणि त्याला जेथून (वहीम व) गुमानहि नव्हतें; तेथून तो त्याला अन्न पोहोंचवील. आणि जो कोणी परमेश्वरावर भरंवसा ठेवील तर परमेश्वर त्या(च्या संकटनिवारणा)स पुरा होय. निःसंशय परमेश्वर आपला उद्देश पुरा करूनच सोडतो. (आणि) परमेश्वरानें तर प्रत्येक वस्तूचा एक अंदाजा ठरवूनच ठेविला आहे. ३. आणि (मुसलमानांनों !) तुमच्या (सोडचिठी दिलेल्या) स्त्रियांतून ज्यांना (वयातीतपणामुळें) विटाळाकडून निराशा होऊन राहिली आहे, (व त्याविषयीं) तुम्हांस संशय असेल तर त्यांची 'इद्दत' (विटाळापासून नव्हे, तर दिनमानाप्रमाणें) तीन महिने; आणि (ह्याचप्रमाणें) ज्या स्त्रियांस विटाळ आलाच नाहीं (त्यांची इद्दतहि तीन महिने). आणि (राहिल्या) गर्भिणी स्त्रिया, तर त्यांची मुदत, त्यांच्या मूल प्रसवण्यापर्यंत होय. आणि जो कोणी परमेश्वराला भीत राहील, त्याचें काम परमेश्वर सोपें करील. ४. (मुसलमानांनों !) हा ( उपरिनिर्दिष्ट हुकूम) परमेश्वराची आज्ञा होय; कीं ती त्यानें तुम्हांस सादर केली आहे. आणि जो कोणी परमेश्वराला भीत राहील, (परत्रीं) परमेश्वर त्याचीं पापें त्याच्यावरून दूर करील; आणि त्याला मोठें प्रतिफल देईल. (तें वेगळेंच). ५ या (सोडचिठी दिलेल्या स्त्रियां)स (इद्दतीकरितां) आपल्या सामर्थ्यानुसार जेथें तुम्हीं स्वतः रहाल तेथेंच राहूं द्या; आणि त्यांच्यावर सक्ती करण्यासाठीं त्यांना इजा देऊं नका. आणि जर त्या गर्भवती असतील, तर मूल प्रसवण्यापर्यंत त्यांचा खर्च उचलीत रहा. मग (मूल प्रसवण्यानंतर) जर त्या, तुम्हांसाठीं (मुलाला) दूध पाजतील, तर त्यांना त्यांचीं (स्तनपानाचीं) वेतनें द्या;

(१) यांत या गोष्टीकडे इशारा दिसतो कीं, पुरुषानें असें समजूं नये कीं मी या स्त्रीस सोडून देईन तर तिला कोठें अन्नवस्त्र मिळणार नाहीं.

(२) त्यापैकींच इद्दतचा अंदाजाहि होय. यांतहि पुष्कळ युक्त्या आहेत.

(३) संशय हा कीं, इद्दतींचा हिशेब विटाळापासून होतो व तिला विटाळच येत नसेल तर तिच्यासंबंधानें कसें करावें ? यास उत्तर म्हणून सांगितलें कीं, अशा स्त्रियांचा हिशेब दिनमानावरून करीत जावा.

आणि परस्पर सल्लामसलतीनें दस्तुराप्रमाणें (वेतन वगैरेंचा) ठराव करून घ्या. आणि जर तुम्हीं आपसांत ओढाताण कराल तर (पुरुषाला कोणी) दुसरी (स्त्री मिळेल व ती) त्याच्यासाठीं (मुलाला) दूध पाजील. ६. ज्याला ऐपत असेल त्याला पाहिजे कीं, त्यानें आपल्या ऐपतीप्रमाणें खर्च करावा. आणि ज्याला अन्नसंपत्तीची तंगी असेल, त्यानें जितकें त्याला परमेश्वरानें दिलें आहे त्यांतूनच खर्च करावा. परमेश्वरानें ज्याला जितकें देऊन ठेविलें आहे त्याहून अधिकाची तो कोणालाहि तकलीफ देत नाहीं. (घाबरण्याची गोष्ट नाहीं;) परमेश्वर तंगीच्या मागून लवकरच सुबत्ताहि देईल. ७. आणि बहुतेक वस्त्या अशा होऊन गेल्या आहेत कीं, ज्यां(च्या रहिवाश्यां)नीं आपला पालनकर्ता व त्याचे पैगंबर यांच्या आज्ञेकडून तोंड फिरविलें; म्हणून आम्हीं मोठ्या सक्तीनें त्यां(च्या कर्मां)चा हिशेब घेतला व त्यांना (मोठी) वाईट शिक्षा दिली. ८. तर त्यांनीं आपल्या कर्मांच्या दुष्परिणामाची गोडी चाखिली; आणि त्यांच्या कामाचा परिणाम तोटाच (तोटा) झाला. ९. या लोकांसाठीं परमेश्वरानें (आणखीहि पुनरुत्थानाची) सक्त शिक्षा तयार करून ठेविली आहे. तर जे विश्वास धरून चुकले आहेत त्या हे बुद्धिमानांनों! परमेश्वरा(च्या कोपा)स भीत राहा. परमेश्वरानें तुम्हांकडे बोध पाठविला आहे; १०. (म्हणजे) पैगंबर (मोहंमद); कीं तो तुम्हांस परमेश्वराचीं स्पष्ट (स्पष्ट) महावाक्यें वाचून वाचून ऐकवितो, कीं जेणेंकरून, जे लोक विश्वास धरितील व चांगलीं कामें करितील त्यांना त्यानें (नास्तिकपणाच्या) अंधःकारांतून काढून (विश्वासाच्या) प्रकाशांत आणावें. आणि जो कोणी परमेश्वरावर विश्वास ठेवील व सुकृत्य करील त्याला परमेश्वर (स्वर्गाच्या अशा) बागांत (नेऊन) दाखल करील; कीं ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील; (व ते) त्यांत सदासर्वदा राहतील. परमेश्वरानें (ही) त्याला खूपच उत्कृष्ट अन्नसंपत्ति दिली. ११. परमेश्वरच तर होय कीं, ज्यानें (एकावर एक अशीं) सात आकाशें निर्माण केलीं व त्यांच्याच सारखी पृथ्वीहि. आकाश व पृथ्वींत (व्यवस्थेचे) हुकूम (वेळोवेळीं) सादर होत राहतात; कीं तुम्हांलोकांस माहीत व्हावें कीं परमेश्वर सर्व शक्तिमान् होय; आणि (तसेंच) हें कीं परमेश्वराचें ज्ञान सर्व वस्तूंस व्यापून आहे. १२.

# अध्याय ६६ वा

# सूरतु--त्तह्रीम्.

हा अध्याय मदिना शहरीं प्रकट झाला. यांत १२ महावाक्यें आहेत याचें नांव ' सुरतु–त्तह्रीम् ' ह्मणजे मनाईचें प्रकरण असें पड-ण्याचें कारण या अध्यायांतील १ ल्या वाक्याच्या टीपेंत दिलें आहे तें पहा.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**हे पैगंबरा ! ज्या (वस्तु) परमेश्वरानें तुझ्यासाठीं मुभा केल्या आहेत त्या, तूं आपल्या पत्न्यांची मर्जी संपादण्याकरितां (आपल्याला) कां**

(१) हजरत पैगंबरसाहेबांच्या वयाच्या ५० व्या वर्षापर्यंत त्यांची एकच पत्नि होती. तिच्या निधनानंतर भिन्न भिन्न विशिष्ट परिस्थितीमुळें त्यांस अनेक विवाह करावे लागले होते. प्रत्येकाचे कांहीं कांहीं हक्क पैगंबरावर होते आणि विवाह केल्यावांचून ते हक्क फेडणें शक्य नव्हतें. ह्यामुळें त्यांस अनेक अडचणी नडत होत्या. त्यांस आपल्या स्त्रियांशीं दुहेरी संबंध असत. एकतर पतिपत्नीत्वाचा प्रेममयसंबंध व दुसरा धर्माचा संबंध कीं पैगंबरसाहेब पैगंबर होते व पत्न्या त्यांच्या अनुयायी होत्या. याशिवाय त्यांस अनेक पत्न्यांचें संभाळणें व त्यांच्याशीं एकसारखें व बरोबरीचें वर्तन राखणें आणि पत्नित्वा-पलीकडे त्यांच्याकडून पैगंबरींची मर्यादा कायम ठेवविणें वगैरे अनेक अडचणी होत्या. अशा स्थितींत कसें आयुष्यक्रमण करावें, हें पैगंबर साहेबांचेंच काम होतें. त्यांत मुभा असलेल्या वस्तूला निषिद्ध करण्याचें जें विवेचन आलें आहे तें नवल नव्हे कीं, नामांकित घराण्याच्या पत्न्यांच्या खातर हजरत पैगंबर-साहेबांनीं दुर्लक्ष करूं इच्छिलें असेल; आणि ही गोष्ट न्याय्य नव्हती. दुसरें असें कीं, पैगंबरसाहेबांनीं कोणा पत्नीस हळूच एक गुप्त गोष्ट सांगितली व तिनें दुसरीला सांगितली. कुराणाच्या शब्दप्रबंधावरून ती कोणी महत्वाची

म्हणून निषिद्ध करितोस ? आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळु होय. १. तुम्हां(मुसलमानां)साठीं परमेश्वरानें तुमच्या शपथा मोडण्याचाहि नियम[1] ठरविला आहे. आणि परमेश्वरच तुमचा पुरस्कर्ता होय; व तो (सर्वांच्या स्थितीशीं) वाकबगार (व) युक्तिवान् होय. २. आणि जेव्हां पैगंबरानें आपल्या पत्न्यांपैकीं कोणी एकीला एक गोष्ट हळुच सांगितली; (तेव्हां दैवयोगानें रजाचा गज होऊन गेला, कीं त्या पत्नीनें ती गोष्ट दुसरीस सांगितली; आणि) मग जेव्हां तिनें ती (गोष्ट) फोडिली आणि परमेश्वरानें पैगंबरावर ती जाहीर करून टाकिली; तेव्हां पैगंबरानें कांहीं (तर त्या पत्नीस) जाणविलें आणि कांहीं टाळून दिलें. मग जेव्हां पैगंबरानें (जाणवावयाचें होतें) तें त्या(पत्नी)ला कळविलें; तेव्हां तिनें (चकित होऊन पैगंबरास) विचारिलें कीं तुला हें (सारें) कोणी कळविलें ? पैगंबरानें सांगितलें कीं मला, जो (सर्व कांहीं) जाणतो (व हरतऱ्हेची) खबर ठेवितो त्या(परमेश्वरा)नें कळविलें. ३. पण (हे पैगंबराच्या पत्निद्वयांनो ! ह्या कामापासून) जर तुम्हीं परमेश्वराच्या सेवेंत पश्चात्ताप कराल तर (हें तुमच्याठायीं उत्तम होय; कारण) तुह्मां उभयतांचीं अंतःकरणें ढळून गेलीं आहेत. आणि जर तुम्हीं पैगंबराच्या विरुद्ध कट कराल तर त्याचा (हिमायती व) मदतगार परमेश्वर होय, आणि 'जिब्रील' (दूत) व भले (चांगले) मुसलमानहि; आणि ह्याच्या उपरांत (इतर) दूतहि पैगंबराचे पाठराखे (व मदतगार) होत. ४. जर पैगंबर तुह्मां(स्त्रियां)स काडी मोडून देईल तर नवल नव्हे कीं, त्याचा पालनकर्ता त्याला तुम्हांपेक्षां उत्तम पत्न्या तुमच्या बदलीं देईल; (म्हणजे) ईश्वराज्ञाधीन, विश्वासू, भक्तिपरायण, (परमेश्वराच्या सेवेंत)

---

गोष्ट असावी असें दिसतें आणि तिच्या जाहीर झाल्यानें इस्लामी राज्य व्यवस्थेंत खो पडण्याचा अंदेशा होता. ह्मणूनच ह्यावर परमेश्वराची इतराजी झाली होती. यावरून एक बोध घेण्यासारखी गोष्ट ही कीं, कुराण हें ईश्वरी पुस्तक आहे व त्याच्या रचनेशीं हजरत पैगंबरसाहेबांचा मुळींच कांहीं संबंध नव्हता.

(१) नियम ह्मणजे प्रायश्चित त्याचा ७ व्या भागाच्या आरंभीं उल्लेख आला आहे तो पहा.

पश्चात्ताप करणाऱ्या, उपासिका, उपोषण करणाऱ्या, विधवा आणि कुमारिका (अशा); ५. अहो मुसलमानांनों ! तुम्हीं आपल्याला व आपल्या कुटुंबाला (अशा) नरकाग्नीपासून वांचवा; कीं, ज्याचें इंधन मनुष्यें व दगड हीं होतील; त्यावर जबरदस्त व कडक स्वभावाचे असे दूत (तैनातीस) होत; परमेश्वरानें त्यांना जो कांहीं हुकूम दिला तो ते मोडीत नाहींत आणि त्यांना जो कांहीं हुकूम दिला जातो तो ते (अक्षरशः) बजावितात ६. (पुनरुत्थानाचे दिवशीं जेव्हां नरकाग्नि सर्वांच्यासमोर आणून हजर केला जाईल तेव्हां आम्हीं नास्तिकांस बजावूं कीं ) हे नास्तिकांनों ! आज तुम्हीं (आपल्या निरर्थक) सबबी पुढें करूं नका. जसजशीं कर्में तुह्मीं (जगांत) करीत राहिलां आहां, (आज) तुह्मांस केवळ त्यांचाच मोबदला दिला जाईल. ७. अहो मुसलमानांनों ! परमश्वराचे सेवेंत निर्मल (मनानें) पश्चात्ताप करा. नवल नव्हे कीं, तुमचा पालनकर्ता (परलोकीं) तुमचीं पापें तुम्हांपासून दूर करून टाकील व तुम्हांस (स्वर्गाच्या अशा) बागांत (नेऊन) दाखल करील कीं, ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील. त्या दिवशीं परमेश्वर पैगंबरास व ज्या लोकांनीं त्याच्यासंगतीं विश्वास धरिला आहे त्यांस फजित करणार नाहीं. त्यां(च्या विश्वासा)चा प्रकाश त्यांच्या पुढें पुढें व त्यांच्या उजवीकडेस (त्यांच्या संगतीं संगतीं) धांवत राहील; (आणि हे) प्रार्थना करीत जातील कीं, हे आमच्या पालनकर्त्या ! आमच्या (ह्या) प्रकाशास आम्हांसाठीं शेवटपर्यंत काईम ठेव व आम्हांस क्षमा कर. निःसंशय तूंच सर्वशक्तिमान् आहेस. ८. हे पैगंबरा! नास्तिकांशीं (हातांनीं) व दांभिकांशीं (वाचेनें)

---

(१) ५७ अध्यायांत हें विवेचन येऊन गेलें आहे कीं, मुसलमानांच्या पुढें पुढें व त्यांच्या उजवीकडेस त्यांच्या विश्वासाचा प्रकाश चालत राहील; आणि दांभिक त्याचा लाभ घेऊं पाहतील तर त्यांच्यांत व मुसलमानांच्या प्रकाशांत आड केली जाईल व दांभिक अंधारांत राहून जातील. त्यांची ही स्थिति पाहून मुसलमान प्रार्थना करतील कीं हे परमेश्वरा ! हा प्रकाश आह्मांसाठीं शेवटपर्यंत राहूं दे.

(२) कौंसांत आह्मीं 'हातांनीं' व 'वाचेनें' हे शब्द भाषांतरांत वाढविले आहेत. कारण हजरत पैगंबरसाहेब दांभिकांस जाणत ओळखत होते; तरी

धर्मयुद्ध करीत राहा; आणि त्यांच्यावर सक्ती राख. आणि त्यांचें ठिकाण नरकाग्नि होय. व ती (फारच) वाईट जागा होय! ९. नास्तिकां(च्या बोध घेण्या)साठीं परमेश्वर, 'नूह'ची बायको व 'लूत'ची बायको यांचा दृष्टांत सांगतो; कीं या (दोघी स्त्रिया) आमच्या सेवकांपैकीं दोन पवित्राचरणी सेवकांच्या विवाहांत होत्या. मग या दोघींनीं त्यांस दगा दिला (कीं आपल्या पतींच्या विरुद्ध नास्तिकांशीं मिळून राहिल्या); तर दोघींचे पति (पैगंबर असूनहि) परमेश्वरापुढें त्यांच्या कांहींहि कामा आले नाहींत; आणि (या दोघी स्त्रियांस) हुकूम दिला गेला कीं(जेथें)आणखीहि लोक('जहन्नमीं'त) दाखल झाले आहेत (तेथें) त्यांच्या बरोबरच तुम्हींहि नरकाग्नींत (जाऊन) दाखल व्हा. १०. आणि (खऱ्या) मुसलमानां(च्या सांत्वना) साठीं परमेश्वर (एक तर) 'फिरऔन'ची बायको ('आसिया') इचा दृष्टांत देतो कीं त्या बाईनें प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझ्या करितां स्वर्गांत आपल्यापाशीं एक घर बनीव; आणि मला 'फिरऔन' व त्याच्या (दुष्ट) कर्मांपासून सुटका दे व (तशीच) मला (या) जालीम लोकांपासून सुटका दे. ११. आणि (दुसरा दृष्टांत) 'इमरान'ची मुलगी 'मरयम' इचा; कीं, जिनें आपली लाज सांभाळली. तर आम्हीं तिच्या(पोटां)त आपल्या आत्म्यां(म्हणजे सामर्थ्यां)नें फुंक मारली; व ती आपल्या पालनकर्त्यांच्या शब्दांचें व त्याच्या पुस्तकांचें सत्यत्व पटवीत राहिली; आणि ती (आमच्या) आज्ञाधारक (सेविकां)पैकीं होती. १२.

---

देखिल त्यांनीं व त्यांच्या प्रतिनिधींनीं म्हणजे खलीफांनीं प्रचारांत असलेलें धर्मयुद्ध–जिहाद केलें नव्हतें.

(१) आपल्या आत्म्यांतून ह्मणजे आह्मीं जो आत्मा निर्माण केला होता तो जिब्रीलदूत आमच्या आज्ञेनें हजरत मर्यमच्या उदरांत फुंकून आले आणि आह्मीं ज्या गोष्टी ह्या दुताद्वारें मर्यमला सांगितल्या होत्या त्या व तौरात पुस्तक हीं त्यांनीं सत्य जाणिलीं. किंवा दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे परमेश्वरानें आपल्या परम सामर्थ्यानें व सत्य संकल्पानें हजरत मर्यम यांच्या उदरीं येशू ख्रिस्ताला निर्मिलें.

# पवित्र कुराण.

## भाग एकुणतिसावा.

## अध्याय ६७ वा.

## सूरतुल्-मुल्क.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ३० आयात म्हणजे महावाक्यें आहेत. यास 'सूरतुल्-मुल्क' म्हणजे राज्य किंवा बादशाही याचें प्रकरण असें नांव देण्याचें कारण हें कीं, यांत परमेश्वरानें आपल्या परम सामर्थ्याचें व सर्व शक्तिचें वर्णन करून दाखविलें आहे कीं, खरें राज्य त्याचेंच होय. यास 'रक्षक' व 'तारक' असें दुसरें नांवहि होय; कारण हजरत पैगंबर साहेबांच्या वचनान्वयें जो कोणी हा अध्याय मननपूर्वक वाचील; परमेश्वर त्याला कबरेच्या यातनेंतून तारील.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों)

(फारच) धन्य तो (परमेश्वर कीं) ज्याच्या हातांत (आलमदुनियेचें) राज्य होय. आणि तो सर्व शक्तिमान् होय; १. कीं त्यानेंच मृत्यु व व जीवन हीं निर्मिलीं; अशा साठीं कीं त्यानें तुम्हांलोकांस पडताळून पाहावें कीं तुमच्यांत कोण उत्तम कर्में करितो? आणि तो परम समर्थ (व) क्षमाशील होय. २. (आणि) त्यानेंच एकावर एक अशीं सात आकाशें बनविलीं. (हे प्रेक्षका!) बरें, तुला परम दयाळू (परमेश्वरा)च्या (या) सृष्टींत कांहीं तफावत दिसून येते? (आणि एकदां पाहिल्यानें न दिसेल) तर पुन्हां नजर कर (व पाहा), कीं तुला (कोठें) कांहीं तडा

(१) मृत्यु व जीवन याद्वारें पडताळून पाहण्याचा अर्थ हा आहे कीं जर जीवित्व नाहीं तर कर्में कशीं आचरलीं जातील; आणि मृत्यु नसेल तर मनुष्य परमेश्वराला भिऊंच कां लागला?

(दोष) दिसून येतो? ३. तदनंतर पुन्हां दोन दोनदां नजर कर; (परिणाम हाच होईल कीं) तुझी दृष्टि लाजिरवाणी होत्साती थकून भागून तुझ्याकडेच पालटून येईल. (आणि तुला आकाशांत कसलाच उणेपणा दिसून येणार नाहीं). ४. आणि आम्हीं अलिकडील आकाशास (नक्षत्रांच्या) दिव्यांनीं सजवून ठेविलें आहे; व आम्हीं या(दिव्यां)स सैतानां (असुरां) साठीं (एका प्रकारचा) धोंडेमार बनविला आहे आणि (परलोकीं) आम्हीं त्यांच्यासाठीं धगधगीत नरकाग्नीची शिक्षा तयार करून ठेविली आहे; (ती वेगळीच). ५. आणि जे लोक आपल्या पालनकर्त्यास मानीत नाहींत त्यांच्यासाठींहि नरकाग्निची शिक्षा होय. आणि (ती फारच) वाईट जागा होय. ६. जेव्हां (हे लोक) त्यांत टाकिले जातील, तेव्हां (दुरूनच) त्याची मोठ्या जोराची सणसण ऐकूं येईल व तो (असा) भडकत राहील; ७ कीं (जणूं) अवेशानें (एव्हांच) फाटून पडेल. जेव्हां जेव्हां त्यांत (नास्तिकांची) एखादी टोळी टाकिली जाईल तेव्हां जे (दूत) त्यावर तैनातीस होत ते त्यांस विचारितील, कां तुम्हांपाशीं (ईश्वरी शिक्षेचें) भय सुचविणारा (कोणी पैगंबर) आला नाहीं? ८. ते म्हणतील, होय, भय सुचविणारा तर आम्हांपाशीं आला होता; पण आम्हीं त्याला पाखंडी म्हटलें व सांगितलें कीं परमेश्वरानें तर (पुस्तक वैगेरे) कोणतीच वस्तु उतरली नाहीं. निःसंशय, तुम्हीं (व तुमचे अनुयायी सारेच) मोठ्या भ्रमांत (पडलां) आहां. ९. आणि (हे लोक नरकाग्नीच्या दुतांस हेंहि) सांगतील कीं जर आम्हीं (पैगंबरांचें बोलणें) ऐकिलें व समजून घेतलें असतें, तर (आज) आम्हीं नरकवाश्यांत नसतों १०. सारांश, (त्यावेळीं नरकवासी) आपलीं पातकें कबूल करतील. तर नरकवाश्यांचें काळें तोंड होवो! ११. जे

(१) धोंडमार म्हणजे सैतान—असुर हे दिव्य बातम्यांचा शोध लावण्यासाठीं वरती जातात व दूत त्यांच्यावर तारे फेंकून त्यांस हटवितात. या गोष्टीचें गूढ साधारण मनुष्यांच्या लक्ष्यांत येणें दुर्घट आहे.

(२) शब्दशः अर्थ हा होता कीं नरकवासी दूर होवोत, परंतु आम्हीं मराठी भाषेच्या दृष्टीनें तोंड काळें होणें असें भाषांतर केलें आहे. कारण याचाहि तोच अर्थ होतो.

लोक बिनपाहिल्या आपल्या पालनकर्त्यास भितात त्यांच्यासाठीं (परलोकीं) क्षमा व (क्षमेशिवाय) मोठमोठे मोबदले होत. १२. आणि (लोकांनों!) तुम्हीं आपलें बोलणें हळुंच बोला अथवा तें मोठ्यानें बोला; परमेश्वर तर (तुमच्या) हृदयस्थ गोष्टींशीं (सुद्धां) वाकब होय. १३. बरें (असें होऊं शकतें कीं परमेश्वर) जो निर्माण करितो तोच (आपल्या सृष्टीशीं) गैरमाहीतगार असेल? आणि वास्तविक पाहतां, तो (फारच) सूक्ष्मदर्शी (व) बहुश्रुत होय. १४. (लोकांनों!) तो(परमेश्वर)च तर होय कीं ज्यानें भूमीला तुम्हांसाठीं नरम (व सारखी) केली आहे; तर तिच्या भूप्रदेशांत (जिकडें हवें तिकडें) हिंडा फिरा; आणि (तसेंच)परमेश्वराच्या (दिलेल्या) रोझांतून (कीं जो भूमींतून पैदा होतो खूप) खा(प्या). आणि (अखेर पुनरुत्थानाच्या दिवशीं पुनः जगून) उठून त्याच्याचकडे जाणें होय. १५.(परमेश्वर) जो आकाशांत आहे, कां तुम्हीं त्या(च्या कोपा)स भीत नाहीं कीं (कोठें) तो तुम्हांस जमिनींत गडप करून टाकील आणि ती झोके खात राहील? १६. अगर (परमेश्वर) जो आकाशांत होय तुम्हीं त्या(च्या कोपा)स भीत नाहीं कीं (कोठें) तो तुम्हांवर दगडांचा वर्षाव करील? (बरें) तर (जरा दम धरा) लवकरच तुम्हांस माहीत होऊन जाईल कीं माझें भिवविणें (तुमच्याठायीं) कसें (वाईट) झालें? १७. आणि जे लोक यांच्यापूर्वीं होऊन गेले आहेत त्यांनींहि (माझ्या पैगंबरांस) पाखंडी म्हटलें होतें; तर (हे पैगंबरा! तूं पाहिलेंस कीं) माझी नाखुशी कशी (त्यांच्या नाशास कारणीभूत) झाली (कीं सारेच नाश पावून गेले)? १८. कां या लोकांनीं पक्ष्यांवर नजर केली नाहीं कीं ते यांच्या (शिरां)वरती पंख (फडफडवितात व कधीं आपले पंख) पसरून ठेवतात व (कधीं) आंखडून घेतात; (दोन्हीं स्थितींत) परम दयाळू(परमेश्वर)च त्यांस (हवेवर) थांबवून राखतो. कांहीं संशय नाहीं कीं तोच प्रत्येक वस्तूवर नजर राखतो. १९. (लोकांनों!) बरें, परम दयाळू (परमेश्वरा)शिवाय कोण असा आहे कीं जो तुमचें (लाव) लष्कर बनून तुमची मदत करील? (खचितच) नास्तिक तर निव्वळ फसगतींत होत. २०. (आणि) जर परमेश्वर आपलें अन्नपाणी रोकून घेईल तर बरें असा कोण आहे कीं जो तुम्हांस अन्नोदक पोहोंचवील?

परंतु (नास्तिक) तर शिरजोरी व (सत्यापासून) पळण्यावर अडून बसले आहेत. २१. तर कां जो कोणी आपलें तोंड पालथें घालून चालतो तो अधिक सन्मार्गोन्मुख (होऊं शकतो) आहे कीं जो कोणी नीट (उभा) सरळ मार्गावर चालला जात आहे तो? २२. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तो (परमेश्वर)च तर होय कीं ज्यानें तुह्मांस निर्माण केलें आणि तुह्मांसाठीं (ऐकण्यास) कान व (पाहण्यास) डोळे आणि (समजण्यास) हृदयें हीं बनविलीं. (परंतु) तुम्हीं लोक (त्याचे) फारच थोडे आभार मानतां. २३. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं तो(परमेश्वर)च तर होय कीं, ज्यानें तुम्हांस भूपृष्ठांत (चोहों-कडे) फैलावून ठेविलें आहे आणि (पुनरुत्थानाच्या दिवशीं) त्याच्याच हुजुरांत तुम्हीं (सर्व) गोळा केले जाल. २४. आणि (नास्तिक, मुसल-मानांस) म्हणतात कीं, जर तुम्हीं (आपल्या दाव्यांत) खरे आहां तर (पुनरुत्थानाचा) हा वायदा केव्हां (पुरा) होईल? २५. (हे पैगंबरा! या लोकांस) जबाब दे कीं; (त्याचें) ज्ञान तर परमेश्वरालाच होय; आणि मी तर (लोकांस) उघडपणें (पारलौकिक शिक्षेचें) भय सुचविणारा मात्र आहें, एवढेंच. २६. मग जेव्हां ते त्या(पुनरुत्थानाच्या दिवसा)ला जवळ येऊन ठेपलेला पाहतील तेव्हां (दुःख व दहशतीमुळें) नास्तिकांचीं तोंडें वाईट वाईट होऊन जातील; आणि (त्यांना) सांगितलें जाईल कीं, हीच ती (शिक्षा) होय कीं, जिची तुम्हीं निकड लावून मागणी करीत होता. २७. (हे पैगंबरा! या लोकांस) सांग कीं,बरें पाहा तर (खरें) कीं, जर परमेश्वर मला व जे लोक माझ्या बरोबर होत त्यांना विध्वंस्त करून

(१) तोंड पालथें करून चालणें आणि नीट उभा चालणें हे दोन्ही दाखले नास्तिक आणि विश्वासू यांचे होत. कारण, दोघेहि आयुष्याची मजल आक्र-मीत आहेत. परंतु नास्तिक तोंड पालथें करून चालतो; म्हणून त्याला मार्ग सुचत नाहीं; आणि विश्वासू मुसलमान नीट डोकें उचलून चालतो म्हणून त्याला मार्ग दिसूं लागतो.

(२) भावार्थ हा कीं, आम्हां मुसलमानांच्या बऱ्यावाईटांस तुम्हां नास्ति-कांच्या परिणामाशीं कांहीं संबंधच होऊं शकत नाहीं. आम्हीं वाईट आहों तर आपणांसाठीं आणि चांगले आहों तर आपणांसाठीं; तुम्हांला आपल्या मुक्तीची व सुटकेची चिंता वाहिली पाहिजे.

टाकील अगर आमच्या (स्थिती)वर दया करील; तर कोणी आहे कीं, जो नास्तिकांस (परलोकींच्या) दुःखकारक शिक्षेपासून आश्रय देऊं शकेल? २८. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं, तोच परमदयाळु (परमेश्वर) होय; आम्हीं त्याचाच विश्वास धरिला आहे आणि त्याच्यावरच आम्हीं भरंवसा ठेवितों; तथापि लवकरच तुम्हांस माहित होऊन जाईल कीं, (आम्हां उभयपक्षांत) कोण बोलूनचालून चुकींत होता? २९. (हे पैगंबरा ! या लोकांस) सांग कीं, बरें पाहा तर (खरें कीं, हें) तुमचें पाणी (जें तुम्हीं पितां तें) जर (जमिनीच्या) तळास बसून सुकून जाईल तर कोण तुम्हांसाठीं (स्वच्छ) पाण्याचे झरे आणून वाहवील? ३०

(१) 'तफसीरे ज़ाहिदी'मध्यें लिहिलें आहे कीं एक मुल्ला–पंतोजी आपल्या शिष्यांस हें महावाक्य पाठ करवीत होता; कीं एक नास्तिक हें ऐकून 'बिल्-मअवले वल मोईन' म्हणजे हत्यारांनीं व मदतगाराद्वारें पाणी भरून भरून आणूं असें बोलत निघून चालता झाला. रात्रीं आंधळा झाला व त्यानें एक आकाशवाणी ऐकिली कीं, हें तुझ्या नेत्राचें पाणी म्हणजे तेज नष्ट झालें तें तूं पुन्हां आण पाहूं? सकाळीं उठून पाहतो आहे, तों आंधळा आहे; तेव्हां तो आपलें तोंड बडवून घेऊं लागला. पण सगळें व्यर्थ ! म्हणून मनुष्यानें नित्य परमेश्वरास भीत राहावें हेंच उचित आहे.

# अध्याय ६८ वा.

## सूरतुल्-कलम्.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ५२ आयात–महावाक्यें आहेत. याचें नांव 'सूरतुल्–कलम' म्हणजे लेखणीचें प्रकरण असें पडण्याचें कारण पुढील पहिल्या वाक्याच्या टीपेंत पाहा.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)

न. (नून. हे पैगंबरा !) लेखणीची[1] शपथ, आणि लोकांच्या लिहिण्याची शपथ; १. कीं, तूं आपल्या पालनकर्त्याच्या कृपेनें (नास्तिक म्हणतात तसा केव्हांहि) वेडा नाहींस. २. आणि निःसंशय (पैगंबरी-संदेश पोहोंचविण्याच्या मोबदल्यांत) तुला (असा) मोबदला (मिळणार) आहे (कीं, ज्याची परंपरा कधींहि) तुटणारच नाहीं. ३. आणि निःसंशय तुझी नीतिमत्ता अर्थात् मोठ्या (उच्च)पायरीची होय. ४. तर लवकरच (तूंहि) पाहून घेशील आणि (हे नास्तिकहि) पाहून घेतील, ५. कीं, तुम्हांपैकीं कोणाला वेड आहे ? ६. (हे पैगंबरा !) जे लोक परमेश्वराच्या मार्गाहून भटकून गेले आहेत त्यांना निःसंशय तुझा पालनकर्ताच खूप जाणतो; आणि जे सन्मार्गावर आहेत त्यांनाहि तोच खूप जाणतो. ७. तर (हे पैगंबरा ! तूं कोठें) पाखंडी म्हणणारांच्या कह्यांत येऊं नकोस. ८. हे तर हेंच इच्छितात कीं, तूं नरम[2] पडशील तर हेहि नरम पडतील. ९. आणि तूं कोणा अशा(अजागळा)च्या कह्यांतहि येऊं नकोस कीं, जो भारी शपथा वाहतो (व) मानहानि झालेला आहे; १०. (लोकांची) अब्रू घेतो, (इकडून तिकडे व तिकडून इकडे) चहाड्या लावीत फिरतो; ११. चांगल्या कामापासून (लोकांस)

---

(१)मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, तो नेहमींच्या व्यावहारिक गोष्टींचें मुळीच मनन करीत नाहीं. नाहींतर, लेखणी आणि लिहिणें ही अशी एक चमत्कारिक व उपयुक्त युक्ति होय कीं, आज तागाईत अशी उत्तम युक्ति कोठेंच व कोणींहि काढलेली नाहीं; आणि ज्याला परमेश्वरानें लिहिणेंची पद्धति प्रथम सुचविली असेल, खरोखरींच् त्याच्यापासून परमेश्वरानें असें काम घेतलें कीं, ज्यावर सर्व जगिक व पारमार्थिक व्यवहारांची मदार येऊन ठरते. ह्मणून लेखणी व लिहिणें ह्या दोन्हींहि फार भारदस्त व महत्वाच्या वस्तु होत, अतएव परमेश्वरानें त्यांची शपथ वाहिली आहे.

(२) म्हणजे नास्तिक इच्छितात कीं, तुह्मी मूर्तीपूजेस वाईट ह्मणूं नका; ह्मणजे तेहि तुमच्या धर्माचा इतका विरोध करणार नाहींत.

रोखीत राहतो, (भक्ति–) मर्यादेचें उल्लंघन करितो, दुष्ट आहे, १२. निष्ठुर आहे; (आणि) या (दोषां) उपरांत, जो कम अस्सलहि आहे; १३. तो धनसंपन्न व (पुष्कळ) पुत्रसंतान आहे म्हणून, १४. जेव्हां आमचीं महावाक्यें त्याला वाचून ऐकविलीं जातात तेव्हां तो म्हणूं लागतो कीं, (ह्या) पूर्वीच्या लोकांच्या भाकडकथा होत. १५. (त्याला जरा दम धरूं द्या;) आम्हीं लवकरच (त्याच्या) नाकाडावर² डाग लावून टाकूं. १६. (हे पैगंबरा!) ज्याप्रमाणें आम्हीं (एका) बागेवाल्यांस अजमाविलें होतें त्याचप्रमाणें आम्हीं या(नास्तिकां)सहि अजमाविलें³ आहे; कीं, त्या बागेवाल्यांनीं शपथ वाहून वाहून म्हटलें कीं, सकाळ होतांच आम्हीं याचीं फळें अवश्य तोडून घेऊं. १७. आणि (त्यांना इतकी खात्री होती

(१) एक अर्थ हा जो आह्मीं भाषांतरांत घेतला आहे तो; आणि दुसरा अर्थ हाहि होऊं शकतो कीं, 'खैर' म्हणजे द्रव्य आणि 'मन्नाअ' ह्मणजे रोखणारा; तर द्रव्याचा रोखणारा म्हणजे कंजूष जो परमार्थांत देत नाहीं तो.

(२) हीं महावाक्यें एक नास्तिक वलीद बिन मुगीरह याच्या संबंधानें प्रकट झालीं आहेत, कीं तो फारच दुष्ट व उपद्व्यापी असा होता. ज्या बाबतींत परमेश्वरानें त्याला दोष दिला आहे त्यापासून मनुष्याला पाहिजे कीं त्यानें जपून राहावें. यांत आलेल्या 'खर्तूम' या शब्दाचा अर्थ सोंड असा आहे. येथें हा शब्द तिरस्कारदर्शक अर्थात माणसांसाठीं वापरण्यांत आला आहे; ह्मणून त्याचा अर्थ 'नाकाड' किंवा नाकोटा हाच उचित आहे. खरें पाहूं जातां, बद्रचे लढाईंत वलीदच्या नाकावर जखमहि झाली होती व तिचा डाग होता. यास्तव त्याच्या संबंधानें हें भविष्य पुरें होऊन चुकलें.

(३) हजरत अबदुल्ला बिन अब्बास यांनीं असें निरुपण केलें आहे कीं, यमन प्रांतांत सन्आ शहरापासून तीन कोसांच्या अंतरावर वाटेवरच एक बाग होता. त्याला 'दखान' असें म्हणत असत. या बागेचा दानशूर व वृद्ध धनी फळें तोडण्याचे वेळीं उत्तमांत उत्तम फळें गोरगरीब व भिक्षुकांस देई व दहावा हिस्सा परमेश्वराप्रीत्यर्थ काढून गरीबांस वाटी. त्यांच्यानंतर त्याचे मुलगे त्या बागेचे वारसदार बनले. त्यांनीं दारिद्र्याच्या भीतीनें कृपण होऊन सर्व दानधर्म बंद केला; आणि सकाळींच जाऊन भिक्षुकांच्या येण्याच्या आधींच फळें तोडून आणावीं असा बेत केला; तों बागेवर रातोरात अस्मानी आपत्ति येऊन पडली व सारा बाग उजाड झाला.

कीं,) 'परमेश्वर इच्छील तर' हा अपवादहि त्यांनीं लाविला नाहीं. १८. तर हे निजलेचे निजलेच राहिले कीं, तुझ्या पालनकर्त्याकडून एक (आकस्मिक) विपत्ति (ओढवली व या टोंकापासून त्या टोंकापर्यंत) बागेवर फिरून गेली; १९. आणि सकाळ होतां होतां, तो बाग असा (खालीं) होऊन गेला कीं, जणूं कोणी सारींच फळें तोडून घेऊन गेला. २०. (आणि इकडे) या लोकांनीं सकाळ होतां होतां एकमेकांस आवाज दिला, २१. कीं जर तुम्हांस फळें तोडावयाचीं असतील, तर अगदीं सकाळींच आपल्या बागेंत[1] जाऊन पोहोंचा. २२. सारांश, (ते सर्व लोक) रवाना झाले आणि आपसांत हळूहळू बोलत जात होते; २३. कीं, (पाहा हो!) आज कोणी गोरगरीब तुम्हांपर्यंत बागेच्या आंत शिरतां कामा नये; (नाहीं तर त्याला कांहीं द्यावें लागेल). २४. (तात्पर्य आपल्या मनांत) हें समजून कीं, बस्स जातांच फळें तोडून घेऊं; मोठ्या तयारीनें[2] अगदीं सकाळींच जाऊन पोहोंचले. २५. मग जेव्हां त्यांनीं बागेला पाहिलें तेव्हां (तो असा उजाड पडला होता कीं त्यांनीं ओळखिलेंहि नाहीं व) म्हणूं लागले कीं, असो नसो, आम्हीं (वाट) भुलून गेलों. २६. (मग विचार करून बोलले, नाहीं वाट भुललों नाहीं;) किंबहुना आमचें नशीब फुटून गेलें. २७. त्यांच्यांत जो उत्तम (मनुष्य) होता तो म्हणूं लागला, कां मी तुम्हांस सांगित नव्हतों कीं तुम्हीं (परमेश्वराची स्तुति व) पवित्रता कां म्हणून करीत नाहीं? २८. (तथापि ते आतां) बोलूं लागले कीं आमचा पालनकर्ता परम पवित्र होय; निःसंशय आम्हींच तकशीरवार होतों. २९. (आणि) ते आतां एकमेकांकडे वळून परस्पर दोष देऊं लागले. ३०. (अखेर सर्व) बोलले; अरेरे! आमचें दुर्दैव! निःसंशय आम्हींच (भक्ति-) मर्यादेचें उल्लंघन केलें होतें. ३१. नवल नव्हे कीं आमचा पालनकर्ता या(बागे)च्या बदलीं आम्हांला याहून उत्तम (बागा) देईल. (आतां) आम्हीं आपल्या पालन-

(१) कुराणांत 'हर्स' आहे; त्याचा अर्थ शेत होतो. तर येथें एक तर बागेला शेत म्हटलें असावें; कीं त्या लोकांचीं शेतें हे बागच होते. अथवा बागेच्या आंतच्या आंत शेतेंहि असतील.

(२) अथवा दुसरा अर्थ, 'गोरगरीबांस प्रतिबंध करण्यावर कंबर बांधून अगदीं सकाळींच जाऊन पोहोंचले' असाहि होऊं शकतो.

कर्त्याकडे आस्थापूर्वक वळलों आहों. ३२. (हे पैगंबरा ! जे लोक अनुपकारी होतात त्यांना ह्या लोकीं) अशीच शिक्षा होत असते. आणि परलोकींची शिक्षा तर (याहूनहि) फारच थोर होय; जर (सांप्रत कालचे नास्तिक) समजत असते (तर बरें होतें)! ३३. नि:संशय, (परमेश्वराला) भिऊन वागणारांसाठीं त्यांच्या पालनकर्त्यापाशीं (स्वर्गाचे) ऐषआरामाचे बाग होत. ३४. कां आम्हीं (आपल्या) आज्ञाधारकांस पाप्यांसारखें बनवून टाकूं? ३५. तुम्हां लोकांस काय (होऊन गेलें) आहे, कसे (वेडगळ) हुकूम लावीत असतां? ३६. कां तुम्हांपाशीं एखादें (दिव्य) पुस्तक आहे कीं त्यांत वाचीत असतां? ३७. कीं जें तुम्हीं पसंत कराल तेंच तुम्हांला परलोकीं[1] (प्राप्त) होईल? ३८. अगर कां तुम्हीं आम्हांपासून पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत चालल्या जातील अशा शपथा घेऊन ठेविल्या आहेत कीं तुम्हीं ज्या वस्तूंची फर-मास कराल तीच तुम्हांसाठीं (परत्रीं हजर केली जाईल)? ३९. (हे पैगंबरा !) या लोकांस पूस कीं, यांच्यांतून कोण ह्याचा जिम्मेदार आहे? ४०. किंवा यांनीं (परमेश्वराचे) सरकतदार ठरवून ठेविले आहेत (व ते जिम्मेदार बनतात)? मग जर हे (आपल्या दाव्यांत) खरे आहेत तर त्यांनीं आपल्या सरकतदारांस आणून हजर करावें. ४१. ज्या दिवशीं पडदा[2] उचलला जाईल आणि लोक साष्टांग नमस्कारासाठीं

(१) येथें 'फीहे' यांतील 'हे' हें सर्वनाम परलोकाकडे लाविलें तर वरील ३४ वाक्यांतल्या 'त्यांच्या पालनकर्त्यापाशीं' या शब्दांच्या अनुरोधानें लावितां येतो. आणि आम्हीं जो अर्थ केला आहे तोच अर्थ होतो. पण जर हें सर्वनाम 'पुस्तका'कडे लावलें तर हा अर्थ होईल कीं, त्यांत वाचीत असतां (व) त्यांत (लिहिलें) आहे कीं जें तुम्हीं पसंत कराल (तेंच) तुम्हांला (परलोकीं) मिळेल.

(२) या महावाक्याचा शब्दश: अर्थ म्हटला म्हणजे 'ज्या दिवशीं पायाची पोटरी उघडी केली जाईल' असा होय. हा अरबांच्या बोलण्याचा एक संप्र-दाय आहे; आणि पोटरी उघडणें ह्मणजे अडचण किंवा संकट ओढवणें असा अर्थ होतो. कारण एखादें मोठें काम करावयाचें असलें ह्मणजे मनुष्य आपली तुमान चढवितो व तें काम करण्यास प्रवृत्त होतो. अगर नदी उतरावयाची असली म्हणजे कपडे वर उचलून घेतो. कित्येक भाष्यकार ह्मणतात कीं, मूळ गोष्ट उघडकीस येणें असा अर्थ होतो. म्हणून आम्हीं 'पडदा उचलला जाईल.' असें भाषांतर केलें. हें जें म्हटलें कीं साष्टांग नमस्कार करूं शकणार नाहींत, त्यासंबंधानें हजरत पैगंबरसाहेबांचें एक वचन आहे कीं, नास्तिकांची पाठ तक्ता होऊन जाईल व त्यांच्यानें नमवलें जाणार नाहीं.

बोलाविले जातील, तेव्हां ते (साष्टांग नमस्कार) करूं शकणार नाहींत. ४२. (लज्जेमुळें) त्यांचे डोळे नमलेले असतील (आणि) हीनता त्यांच्या(चेहऱ्या)वर पसरलेली असेल. आणि (जगांत) त्यांना साष्टांग नमस्काराकडे बोलाविलें जात होतें व त्यावेळीं हे लोक भले-चंगेहि होते; (परंतु ते खोडसाळपणामुळें नमस्कार करीत नव्हते.) ४३. तर (हे पैगंबरा !) मला व जे लोक (माझ्या) या वाणीस पाखंड म्हणतात त्यांस (आपापल्या स्थितीवर)सोडून दे; (मी त्यांना पाहून घेईन.) आम्हीं, त्यांस जाणीवहि होणार नाहीं अशा रीतीनें हळु हळु त्यांना (नरकाग्नीकडे) ओढीत जाऊं. ४४. आणि मी त्यांना ढील देत चाललों जात आहें; निःसंशय माझा डाव (मोठा) पक्का (डाव) होय; (कीं त्याची तोडहि होऊं शकत नाहीं.) ४५. (हे पैगंबरा !) कां तूं यांजपाशीं (संदेश पोंचविण्याबद्दल) कांहीं वेतन मागतोस, कीं हे त्या(च्या भूदंडाचे ओझ्या)नें दबूत जात आहेत ? ४६. अथवा यांच्यापाशीं गैबी बातम्या (येत) आहेत व हे (त्या) लिहून घेत जातात ? ४७. तर (हे पैगंबरा!) तूं आपल्या पालनकर्त्याच्या हुकुमाची वाट पाहत मुकाट्यानें बैस; आणि 'जुन्नुन' (म्हणजे 'यूनुस')सारखा (मनोदुर्बल) होऊं नकोस; कीं त्यानें संतप्त होत्साता (परमेश्वराला) हाक मारिली.४८. जर त्याच्या पालनकर्त्याची कृपा त्याची मदत न करते, तर त्याचे बुरे हाल होऊन तो उघड्या मैदानांत फेंकून दिला गेला असता. ४९. परंतु त्याच्या पालनकर्त्यानें त्याला निवडून घेतलें व त्याला (आपल्या) पवित्राचरणी सेवकांत (पुन्हां सामिल) केलें. ५०. आणि (हे पैगंबरा !) नास्तिक जेव्हां कुरआन् ऐकितात तेव्हां असें दिसून येतें कीं ते तुला गुरकावून पाहून पाहून (परमेश्वराच्या मार्गाहून) भटकवून टाकतील; आणि ते म्हणतात कीं हा (गृहस्थ) तर अर्थात (एक) वेडा होय ५१. आणि वास्तविक पाहतां, हें (कुराण जें तूं त्यांस ऐकवितोस तें) आलमदुनियेच्या (लोकां)साठीं एक बोध होय एवढेंच. ५२.

(१) 'साहबुल्–हूत' व 'जून्नून' या दोहोंचा अर्थ मासेवाला असा होतो. परंतु त्याचा अर्थ मासे विकणाराहि होतो. आणि वास्तविक पाहतां 'जुन्नून' हें हजरत यूनुस पैगंबराचें नांव पडून गेलें आहे. कां कीं त्यांस माशानें गिळून टाकलें होतें.

(२) गुरकावून पाहणें ह्मणजे संताप व्यक्त करणें किंवा नजरेनें भारणें.

# अध्याय ६९ वा.

## सूरतुल्--हाक्क:

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ५२ आयात म्हणजे महावाक्यें आहेत. मूळशब्द 'अल्–हाक्कतो,' हें पुनरुत्थानाच्या अनेक नावांपैकीं एक नांव होय. या शब्दाचा धात्वार्थ अवश्य घडून येणें एवढा नसून, खरें करून दाखविणें असाहि होतो. म्हणून मेलेल्यांचें फिरून उठणें, त्यांच्यापासून त्यांच्या कर्मांचा जाब पुसला जाणें आणि त्याप्रमाणें त्यांस इनाम मिळणें किंवा शिक्षा होणें वगैरेविषयीं इहलोकीं मनुष्यांस ज्या शंका येतात त्यांचें सत्यत्व पटविलें जाईल तो दिवस, असेंहि कित्येकांचें मत आहे. म्हणून सुरतुल्–हाक्क:म्हणजे अपरिहार्य किंवा खचित घडून येणाऱ्या दिवसाचें प्रकरण हें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**खचित घडून येणारें; १. (आणि) खचित घडून येणारें आहे काय?२. आणि (हे पैगंबरा!) तूं काय समजलास कीं, खचित घडून येणारें आहे काय? (तें एक आकस्मिक संकट होय कीं, सर्वांस हळहळवून सोडील; म्हणजे पुनरुत्थान). ३. 'समूद' आणि 'आद'या(दोघां)नीं (त्या) हळहळविणाऱ्या(संकटा)स खोटें म्हटलें; ४. तथापि 'समूद' तर (एका भयंकर) गर्जने(च्या कडाक्या)नें नष्ट केले गेले. ५. आणि (राहिले) 'आद;' तथापि तेहि एका झपाट्याच्या जोरदार वावटळानें उध्वस्त केले गेले; ६. कीं बरोबर सात रात्री व आठ दिवस ती (वावटळ) परमेश्वरानें त्यांच्यावर चालू ठेविली. तर (हे वाचक-श्रोत्या!) तूं (त्या) लोकांस त्या (वावटळीं)त असे पछाडलेले पाहतास कीं, जशा पोकळ पुळपुळीत खजुरीच्या मुळ्या. ७. मग आतां तुला त्यांच्यांतून कोणीहि बाकी राहिलेला दिसून येतो काय? ८. आणि 'फिरऔन' व ज्या (जनता)**

त्याच्यापूर्वीं होऊन गेल्या आहेत त्या व उलटलेल्या वस्त्यांचे रहिवासी (ह्मणजे 'लूत'चे लोक,ह्या सर्वांनीं मोठमोठीं) पापें केलीं. ९. मग(त्यांच्या-कडे पैगंबर पाठविले गेले व) त्यांनीं आपल्या पालनकर्त्याच्या पैगंबराचा (ह्मणजे जो त्यांजकडे पाठविला गेला होता त्याचा) आज्ञाभंग केला म्हणून त्यानेंहि त्यांस फार सक्तीनें पकडलें.१०. (लोकांनों ! 'नूह'च्या काळीं)जेव्हां पाण्याचें तुफान उसळलें, तेव्हां आम्हींच तुम्हांला (म्हणजे तुमच्या वडि-लांना) गलबतांत स्वार करून घेतलें होतें; ११. कीं या(वृत्तांता)स आह्मीं तुम्हांसाठीं एक यादगिरी बनवून ठेवावी आणि ज्यां (च्या) कानास (परमेश्वरानें याद) ठेवण्याची पात्रता दिली आहे त्यांनीं तो याद ठेवावा;१२. मग जेव्हां (हे पैगंबरा !) तुतारींत (पहिली) एक फुंक मारली जाईल; १३. आणि जमीन व पर्वत या दोहोंस उचलून (व आदळून) एका फटक्या सरशीं त्यांचे तुकडे तुकडे केले जातील; १४. तेव्हां (पुनरुत्थान)जें खचित घडून येणारें तें त्या दिवशीं घडून येईल. १५. आणि आकाश फाटून जाईल व तें त्या दिवशीं फारच पोंचट (फुसफुशीत) होऊन जाईल. १६. आणि त्याच्या किनाऱ्यांवर दूत असतील; आणि त्यादिवशीं तुझ्या पालन-कर्त्याच्या सिंहासनास आठ[1] (दूत) आपल्यावरती उचलून धरतील. १७. (लोकांनों !) त्या दिवशीं तुम्हीं (परमेश्वरापुढें) रुजू केले जाल (व, तुमचें कोणतेंच गूढ (परमेश्वरापासून) गुप्त राहणार नाहीं. १८. तर ज्याला त्याचें (कर्म)पत्रक त्याच्या उजव्या हातांत दिलें जाईल, तो (खुशीखुशीनें लोकांस) म्हणील कीं घ्याहो ! (हें) माझें (कर्म)पत्रक तर वाचा. १९. मला तर (इहलौकिक आयुष्यांत) खात्री होती कीं (एके दिवशीं) माझा हिशेब (म्हणजे कर्मपट)मला मिळेल;(तो मिळाला.)२०. तर तो (गृहस्थ मनस्वी) सुखावह आयुष्यांत असेल; २१. (म्हणजे) परात्पर सुखोद्यानांत, २२. कीं ज्याचीं फळें (अशीं) लोंबकलेलीं असतील (कीं पाहिजे तर आपल्या जागीं बसल्या बसल्या तोडावींत. व त्यांना परवानगी असेल,)२३.कीं गुदस्त दिवसांत(म्हणजे जगांत)तुह्मीं जीं (कर्में करून पुढील सामग्रीदाखल)पाठविलीं होतीं त्यांच्या मोबदला खा व प्या

(१) आठची संख्या ईश्वरनियमित आहे. आपल्या प्रयोजनांस तोच खूब जाणतो. त्यांत आम्हांस डोकेफोड करण्याचें कारण नाहीं.

व (तें तुमच्या) अंगीं लागो. २४. आणि ज्याचें (कर्म)पत्रक त्याच्या डाव्या हातांत दिलें जाईल; तो म्हणेल, मला जर माझें (कर्म)पत्रक मिळालें नसतें तर बरें होतें ! २५. आणि (तसाच) मला आपला (हा) हिशेबहि न कळता कीं काय आहे (व काय नाहीं) ! २६. मरणानें (माझ्या अस्तित्वाचा) अंत होऊन गेला असता तर बरें होतें ! २७. माझें द्रव्य माझ्या (कांहींहि) कामा आलें नाहीं. २८. मजपासून माझी सत्ता नष्ट झाली. २९. (मग आम्हीं त्याच्या संबंधानें हुकूम देऊं कीं) याला धरा व याच्या गळ्यांत मानखोडा घाला. ३०. तदनंतर (ओढीत ओढीत नेऊन)याला 'जहन्नम'मध्यें ढकलून द्या; ३१. मग जिची लांबी गजांनीं सत्तर[1] गज होईल अशा सांकळींत त्याला खूप जखडून टाका. ३२. (कारण) ह्यानें महान परमेश्वराचा विश्वास धरिला नव्हता. ३३. आणि (आपण खाऊं घालणें तर एकिकडेच, इतरांसहि) गोरगरिबांस खाऊं घालण्याचें उत्तेजन देत नव्हता. ३४. तर आज येथें याचा कोणीहि दोस्तदार नाहीं; ३५. आणि पूंवा(च्या पाण्या)शिवाय याला (आणखी कांहीं) खावयासहि नाहीं. ३६. (आणि) हें खाणें केवळ पापीच खातील. ३७. तर (लोकांनों !) जी वस्तु तुम्हांस दिसते व जी वस्तु तुम्हांस दिसत नाहीं (उदाहरणार्थः— जिन्न–दैवत, दूत वगैरे) मी तर सर्वांचीच शपथ वाहतों आहे (ना[2]). ३८—३९. कीं हें (कुराण) निःसंशय एका सन्माननीय दूता[3]ची (आणलेली ईश्वर) वाणी होय. ४०. आणि ही कोणा कवीची (रचिलेली) गोष्ट नव्हे. परंतु तुम्हीं लोक फारच कमी विश्वास धरितां. ४१.

(१) येथें एक तर, सत्तरच्या संख्येचें गूढ आम्हांस जाहीर केलें गेलें नाहीं याचें कांहीं तरी खास कारण असावें; किंवा फक्त लांबीच उद्दिष्ट असावी. कारण अरबी भाषेत केवळ संख्याबाहुल्य दाखविण्यासाठींहि सत्तर हा शब्द वापरला जातो.

(२) (ना) हा शब्द एखाद्या गोष्टीला जोर देण्यासाठींहि बोलतात. उदाहरणार्थ बसाना यांत बसण्याच्या अर्थाचें दृढीकरण होतें.

(३) 'रसूले–करीम' म्हणजे सन्माननीय दूत म्हणजे जिब्रील किंवा पवित्र आत्मा या अर्थीच येथें व इतरत्रहि आलेला आहे.

आणि (तसेंच) हें कोणा भविष्य करणाऱ्या(मांत्रिका)चें बोलणें नव्हे; परंतु तुम्हीं लोक फारच कमी मनन करितां. ४२. (ही) सकल जगांच्या पालनकर्त्याकडून प्रकटलेली (वाणी) होय. ४३. आणि जर (पैगंबरानें बळेंच) एखादी गोष्ट आमच्या संबंधानें वडली असती; ४४. तर अर्थात् आम्हीं त्याचा उजवा हात धरून, ४५. त्याची मान उडवून टाकिली असती. ४६. आणि तुम्हांपैकीं कोणीहि (आम्हांस) त्यापासून प्रतिबंध न करूं शकता. ४७. आणि कांहीं संशय नाहीं कीं हें (कुराण परमेश्वराला) भिऊन वागणारांसाठीं एक बोध होय. ४८. आणि आम्हांस पक्कें माहित आहे कीं, तुम्हांपैकीं (कित्येक यास) पाखंड म्हणणारेहि होत. ४९. आणि यांत कांहीं संशय नाहीं कीं हें नास्तिकांसाठीं खेदें-(प्रद) होय. ५०. आणि यांतहि संशय नाहीं कीं हें निश्चयानें सत्य होय. ५१. तर (हे पैगंबरा!) तूं आपल्या महान् पालनकर्त्याच्या नांवाचें पावित्र्य गाण्यांत लागून अस. ५२.

---

(१) 'वतीन' ही एक शीर आहे; ती मानेंतून होऊन जाते. तिचा रुधिराच्या मुख्य धमन्यांशीं संबंध असतो. ती कापली गेली कीं प्राण निघून जातो. या वाक्याचा शब्दशः अर्थ तर असा होतो कीं, 'आम्हीं त्याच्या रुधिराची शीर कापली असती. भाषेस अनुसरून आम्हीं परिणामवाचक अर्थ घेतला आहे.

(२) खेदप्रद ह्मणजे परत्रीं नास्तिकांस मोठा खेद होईल कीं आपण कुराणावर कां विश्वास ठेविला नाहीं ?

# अध्याय ७० वा.

# सूरतुल्–मआरिज.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ४४ महावाक्यें आहेत. याला 'सूरतुल्–मआरिज' म्हणजे पायऱ्यांचे किंवा वर चढणाऱ्या जिन्यांचें प्रकरण असें नांव देण्याचें कारण हें कीं, परमेश्वर अत्युच्च असून त्यापावेतों पोंचण्याच्या पायऱ्या व जिने अनेक आहेत; अथवा दुसऱ्या शब्दांनीं म्हणावयाचें म्हणजे परमेश्वरा-संबंधाचें ज्ञान पायपायरीनें प्राप्त होतें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)

कोणा एका (अदूरदर्शी) दरखास्त करणारानें येणाऱ्या शिक्षेविषयीं दरखास्त केली; १. (कीं ती) नातिकांवर (यावी), अशी कीं तिला कोणी टाळणारहि नाहीं; २. (ती अशा) पायऱ्यावाल्या परमेश्वरा(च्या हुकमा)नें (घडून येईल); ३. कीं ज्या (पायऱ्यां)च्या (वाटां)द्वारें देव-दूत व आत्मा (म्हणजे 'जिब्रील') त्याच्याकडेस चढून जातात; (पुनरुत्था-नाच्या) अशा एका दिवशीं (ती घडून येईल) कीं ज्याचा अंदाज पन्नास हजार वर्षांचा होईल. ४. तर (हे पैगंबरा!) तूं (या लोकांच्या छळ-णुकीस) चांगल्या प्रकारें सहन करून (मुकाट्यानें) बैस. ५. हे लोक तर पुनरुत्थानाच्या दिवसास दुरापास्त समजतात. ६. आणि आम्हीं त्याला (केवळ संभवनीयच नाहीं) तर जवळ पाहतों आहों. ७. त्या दिवशीं आकाश (तर असें लाल) होऊन जाईल कीं, जसें वितुळलेलें तांबें; ८. आणि पर्वत (असे उडत) असतील कीं, जशी रंगीबेरंगी लोंकर. ९. आणि कोणी आप्त (दुसऱ्या) कोणा आप्तास विचारणार (देखील) नाहीं; १०. (व जरी) ते एकमेकांस दाखविले जातील (तरी देखील). पापी असें इच्छील कीं, त्या दिवसाचे शिक्षेबद्दल आपले मुलगे (खंडादाखल) देऊन सुटतां येईल (तर बरें होईल). ११. आणि (तशीच)

आपली (जन्माची) सोबतीण व आपले भाऊ; १२. आणि आपलें कुटुंब जें त्याला (प्रसंगापोत) आश्रय देत होतें तें; १३. आणि भूतलावर जे कोणी होत ते सर्व (द्यावें;) व नंतर ह्या(मोबदल्या)नें त्याला वांचवून घ्यावें! १४. पण (हें तर) कधींहि (होणारच) नाहीं. कारण, नरकाग्नि (असा भयंकर) डोंब होय, १५. कीं तो माथ्याची कातडी उडवून टाकील; १६. (आणि) जे (जगांत सत्यापासून) पाठ फिरवीत व तोंड चुकवीत राहिले, त्यांस तो (आपल्याकडे खेंचून) बोलावील; १७. आणि (आयुष्यभर) ज्यांनीं द्रव्य गोळा केलें व (तें परमार्थांत खर्च न करितां) सांठवून सांठवून ठेवीत राहिले त्यांसहि (बोलावील). १८. निःसंशय, मनुष्य मनाचा फारच दुर्बल निर्माण केला गेला आहे;१९. कीं जेव्हां त्याला (कोणा तऱ्हेचें) नुकसान पोहोंचतें, तेव्हां तो फारच घाबरूं लागतो. २०. आणि जेव्हां त्याला (कोणा तऱ्हेचा) लाभ पोहोंचतो तेव्हां तो लोभ करूं लागतो. २१. परंतु जे नमाज पढतात (त्यांची स्थिति मुळींच अशी नाहीं). २२. (म्हणजे) जे लोक आपल्या नमाजीवर नित्य कायम असतात ते; २३ आणि ज्यांच्या धनदौलतींत, (तोंड पसरून)मागणारा व (लज्जेमुळें)न मागणारा या (दोहों)चा एक नियमित हक्क (मुक़र) होय ते; २४–२५. आणि जे (शेवटच्या) निर्णयाच्या दिवसाला सत्य जाणतात ते; २६. आणि जे आपल्या पालनकर्त्याच्या शिक्षेस भीत राहतात ते. २७. खचितच त्यांच्या पालनकर्त्यांची शिक्षा बिनघोर होण्याची गोष्ट नव्हे. २८. आणि जे लोक आपली लाज संभाळून राहतात; २९. पण आपल्या पत्न्यांपासून व आपल्या उजव्या हांताचे माला-(ह्मणजे दासी)पासून मात्र (विषयोपभोग घेतल्यास त्यांत) त्यांना कांहीं दोष लाविला जाणार नाहीं. ३०. पण जो कोणी ह्याखेरीज (आणखी) शोधील तर (समजा कीं,) ते (सृष्टि–) मर्यादेबाहेर निघून गेले आहेत. ३१. आणि जे आपल्या(-ला सोंपविलेल्या) ठेवींचा व आपल्या कराराचा विचार बाळगितात. ३२. व जे आपल्या साक्षीवर शाबिद राहतात; ३३. आणि जे आपल्या नमाजाची कळकळ बाळगितात; ३४. हे लोक (होत कीं,) ज्यांचा (स्वर्गाच्या) बागांत आदर सन्मान केला जाईल. ३५. तर

(१) 'आणखी' या शब्दांत अट लावलेल्या पत्न्यांच्या गणतीशिवाय कामतृप्तीच्या इतर सर्व गैरशिस्त पद्धति दाखल आहेत.

**(हे पैगंबरा ! या) नास्तिकांस काय (होऊन गेलें) आहे कीं, टोळयाच्या-टोळया बनून उजवीकडून व डावीकडून तुजकडे धांवत चालले येत आहेत ?**[१] **३६—३७. कां यांच्यांतून प्रत्येक मनुष्य (या गोष्टीची) उमेद बाळगितो कीं, तो आनंदाच्या स्वर्गांत दाखल केला जाईल ? ३८. पण (हें तर) कधींच (होणार) नाहीं, आम्हीं त्यांना त्याच(घाणेरड्या)वस्तूंतून**[२] **निर्माण केलें आहे कीं,जी त्यांना ठाऊक आहे.३९ तर मला सूर्योदयांच्या**[३] **व सूर्यास्तांच्या मालकाची(म्हणजे आपली)शपथ आहे कीं आम्हीं या गोष्टीसहि समर्थ आहों; ४०. कीं, (जगांत) यांच्याहून उत्तम (सृष्टि) यांच्याऐवजीं आणून वसवूं;आणि(असें करूं इच्छूं तर) कोणी आमच्या हुकमाबाहेर होऊं शकत नाहीं. ४१. तर (हे पैगंबरा !) यांना निरर्थक बाता झोकूं दे व खेळ करूं दे; येथपर्यंत कीं, (अखेर) ज्या दिवसाचा यांना वायदा केला जात आहे तो दिवस यांच्या नजरानजर येऊन ठेपेल. ४२ (म्हणजे तो दिवस कीं,) जेव्हां हे आपल्या थडग्यांतून निघून पडतील (व गोळा होण्याच्या मैदानाकडे) असे धांवत असतील कीं जणूं कोणा निशाणाकडे**[४] **धांवत चाललें जात आहेत. ४३. (खेद व पश्चात्तापामुळें) यांच्या नजरा खालीं नमलेल्या असतील; हीनत्व यांच्या(चेहऱ्यां)वर पसरलेलें असेल. ज्या दिवसाचा यांना वायदा केला जात होता तो हाच दिवस होय ४४.**

---

(२) नास्तिकांचे मोठमोठे लोकसमूह हजरत पैगंबर साहेबांपाशीं येत होते; परंतु सद्भावनेनें व श्रद्धेनें नव्हे तर त्यांचा धर्माची हंशी उडविणें हा उद्देश असे. ते तेथें येत तेव्हां गरीब मुसलमानांस धिक्कारानें पाहत व आपसांत म्हणत कीं जर असले क्षुल्लक व नीच स्वर्गांत जातील तर आम्हीं यांजपेक्षांहि अगोदर जाऊन दाखल होऊं. परमेश्वरानें त्यांची ही कल्पना खोडून काढिली कीं तुम्हांस या मुसलमानांवर श्रेष्ठत्व तें कोणतें ? तुम्हांला खुद्द ठाऊक आहे कीं कसल्या घाणेरड्या व क्षुल्लक वस्तूपासून तुमचा जन्म झाला आहे ! जी वस्तु माणसाच्या श्रेष्ठत्वास कारणीभूत आहे व ज्या वस्तूमुळें तो स्वर्गांत जाण्याची उमेद बाळगूं शकतो तो कुलीन जन्म नव्हे तर विश्वासाची कुलीनता होय; ती विश्वासूंना प्राप्त आहे आणि तुम्हीं नास्तिक त्यापासून नामोहरम आहां.

(३) ऋतु बदलतांच सूर्य, चंद्र व नक्षत्रें यांच्या उदय व अस्त होण्याच्या जागाहि बदलत राहतात;म्हणून सूर्योदय व सूर्यास्त हीं बहुवचनीं आलीं आहेत.

(४) निशाण म्हणजे धांवण्याची हद्द बांधलेली जागा कीं, जिच्याकडे मुलें खेळांत धांव मारीत जातात.

# अध्याय ७१ वा.

## सूरतु–नूह.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत २८ आयात–महावाक्यें आहेत. याचें नांव नूहचें प्रकरण असें पडण्याचें कारण हें कीं, यांत हजरत नूह पैगबरांच्या प्रेषितत्वाच्या कामगिरीचें वर्णन आलें आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

आम्हीं 'नूह'ला त्याच्या लोकांकडे (पैगंबर करून) पाठविलें कीं तुझ्या लोकांवर दुःखप्रद शिक्षा येऊन पडेल त्याच्या आधींच त्यांना (तिचें) भय घाल. १. (सारांश त्यानें त्यांस) सांगितलें कीं हे माझ्या लोकांनों! मी तुम्हांस राजरोसपणें भय सुचविण्यास आलों आहें; (व तुम्हांस समजावितों,) २. कीं तुम्हीं परमेश्वराची उपासना करा व त्या(च्या कोपा)स भीत राहा; आणि माझा कह्या माना ३. (असें कराल) तर तो तुम्हांस तुमचीं पापें क्षमा करील व (मृत्यूच्या) नियमित काळापर्यंत् तुम्हांस (जगांत सुखासमाधानानें राहण्यास) अवसर देईल. जेव्हां परमेश्वराचा (तो ठरीव) काळ येऊन ठेपतो, तेव्हां तो (कोणाच्या टाळल्यानें किंचित्‌हि) पुढें ढकलला जात नाहीं. तुम्हीं जर (इतकी गोष्ट) समजत असतां (तर बरें होतें)! ४. ('नूह' जेव्हां ईश्वरी संदेश पोहोंचविण्याचें कर्तव्य पुरें करून चुकला व लोक त्याला बरोबर पाखंडीच म्हणत राहिले, तेव्हां त्यानें परमेश्वराला) अर्ज केला कीं हे माझ्या पालनकर्त्या! मी आपल्या लोकांस रात्रींहि बोलाविलें व दिवसांहि (बोलाविलें). ५. पण माझ्या बोलाविण्याचा त्यांच्यावर हाच परिणाम झाला कीं, (जितकें जास्त मी बोलाविलें तितकेंच) जास्त ते पळाले. ६. आणि जेव्हां जेव्हां मी त्यांस बोलाविलें कीं (त्यांनीं तुजकडे वळावें व) तूं त्यांचें पाप क्षमा

स्वतः आपणच आपला पुरावा होय. १४. व (मग पाहिजे तर) तो (आपल्याला निर्दोष ठरविण्यासाठीं कितीहि) निमित्त (कां) पुढें आणीना! १५. (हे पैगंबरा!) प्रकटीकरणा(च्या तोंडपाठ करण्या)साठीं, तें तुला लवकर पाठ होऊन जावें म्हणून आपली जीभ हालवीत जाऊं नकोस १६. (तुला) कुराण तोंडपाठ करून देणें व त्याचें वाचविणें हें आमचें काम आहे. १७. तर जेव्हां आम्हीं ('जिब्रील' दुताद्वारें) कुराण वाचून चुकूं, तेव्हां (त्यानंतर तूंहि) त्या (दुता)च्या वाचनाचें अनुकरण करीत जा. १८. तदनंतर, त्याचें समजावून सांगणेंहि आमचेंच काम होय. १९. (सारांश तुला घाई न केली पाहिजे). परंतु तुम्हीं (मानवलोक कांहीं आहांच उतावळे; व म्हणूनच) इहलोक जो तूर्त (प्राप्त) आहे त्याला प्रीय ठेवितां; २० व परलोकाला सोडून बसतां. २१. त्या दिवशीं बहुतेक (लोकांचीं) तोंडें ताजीं टवटवीत (असून), २२. आपल्या पालनकर्त्याकडे (टकटकां) पहात असतील. २३. आणि त्या दिवशीं बहुतेक तोंडें फिकीं पडलेलीं असतील. २४. (कारण, ते) समजून असतील कीं त्यांच्यावर अशी सक्ती केली जाईल कीं जी (त्यांची) कंबर मोडून टाकील. २५. पाहा हो! जेव्हां (प्राण देहांतून खेचून) गळ्यापर्यंत येऊन पोहोंचेल; २६. आणि (मरणोन्मुख मनुष्याची शुश्रूषा करणारे) ओरडूं लागतील कीं (अरे) कोणी मंत्र घालणारा आहे (कीं त्याला येऊन मंत्र घालील)? २७. आणि त्या (रोग्या)ला खात्री होऊन जाईल कीं (आतां) हा (जगांतून) वियोग (होण्याचा वेळ) आहे. २८. आणि (प्राणांतिक यातनेमुळें एका पायाची) पिंडरी (दुसऱ्या पायाच्या)

---

(१) भावार्थ हा कीं परमेश्वरानें मनुष्याचें मन असें बनविलें कीं तें बरें वाईटाचें तारतम्य करूं शकतें. तो जर वाईट कामास प्रवृत्त होतो तर ही त्याच्या इराद्याची कमजोरी होय; ह्मणून तो दोषमुक्त होऊं शकत नाहीं. 'आपणच आपला पुरावा' होण्याचा अर्थ हा आहे. अथवा हा कीं त्याचीं अवयवें त्याच्या विरुद्ध साक्ष देतील; मग पाहिजे तर तो कितीहि निमित्त कां काढीना!

(२) म्हणजे ज्याप्रमाणें जिब्रील दूतानें तुम्हांस वाचून ऐकविलें आहे, त्याप्रमाणेंच तुह्मीं तें पुन्हां म्हणत जा.

पिंडरीशीं चिटकून (चिटकून) जाईल. २९. (हे मनुष्या ! ही स्थिति जेव्हां येईल) त्या दिवशीं (तुझें) आपल्या पालनकर्त्याकडे प्रयाण होईल. ३० तर (प्रमादयुक्त माणसानें जित्याजिवीं ईश्वरवाणीस) खरें जाणिलें नाहीं व त्यानें नमाजहि पढिली नाहीं. ३१. किंबहुना, त्यानें (त्याला उलट) पाखंड म्हटलें व (त्यापासून) तोंड फिरविलें. ३२. तदनंतर (उपदेशालयांतून उठून) ऐटत ऐटत आपल्या कुटुंबाकडे चालता झाला. ३३. (तर पुनरुत्थानाचे दिवशीं त्याला सांगितलें जाईल कीं हे मनुष्या !) तुला छीः होय ! व मगहि (छीवर) छीः होय. ! ३४. पुन्हां (हे मनुष्या !) तुला छीः होय ! व मगहि (छीवर) छीः होय ! ३५. कां मनुष्य (अशी) कल्पना करितो कीं त्याला (विचारपूस केल्याशिवाय) एरव्हींच सोडून दिलें जाईल ? ३६. कां (प्रथमतः) तो वीर्याचा एक थेंब नव्हता कीं जो (स्त्रीच्या गर्भाशयांत) टाकिला गेला होता ? ३७. तदनंतर तो रक्ताचा एक गोळा झाला; मग (परमेश्वरानें त्याला दुसऱ्याच आकृतीचा) बनविला व मग त्याचे जोडबंद बरोबर केले. ३८ (येथपर्यंत कीं) अखेर त्याचे दोन वर्ग केले, (म्हणजे) पुरुष व स्त्री. ३९. कां हा (परमेश्वर ज्यानें सर्व कांहीं केलें तो पुनरुत्थानांत) मेलेल्यांस जिवंत करण्यास समर्थ नव्हे ? ४०.

---

(१) ही गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे कीं, जो परमेश्वर पाण्याच्या एका थेंबांतून मनुष्यासारखे सावयव व साकार प्राणी पैदा करितो त्याला कां एवढें सामर्थ्य नाहीं कीं, मेलेल्यांस पुनरुत्थानाचे दिवशीं जाब घेण्यासाठीं पुन्हां जिवंत करून उठवील? हा अध्याय वाचून 'सुब्हान रब्बियल् आला' ह्मणजे माझा परात्पर पालनकर्ता परम पवित्र होय, असें ह्मणण्याचा प्रघात आहे.

# अध्याय ७६ वा.

# सूरतु-द्दह्र्.

हा अध्याय मकेंत प्रकट झाला. यांत ३१ आयात-महावाक्यें आहेत. याला 'सूरतु-द्दह्र्' म्हणतात; कारण यांत द्दह्र् म्हणजे काळ याचें विवेचन आलें आहे. याला दुसरें नांव 'सुरतुल्-इन्सान' आहे; कारण यांत सामान्यतः 'इन्सान' म्हणजे माणसाचा उल्लेख आला आहे. सारांश, कालांतरानें माणसाचें स्थित्यंतर कसें होतें हें यांत सांगितलें आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**निःसंशय मनुष्यजातीवर (इतक्या मोठ्या प्रशस्त) काळांत एक असा वेळहि येऊन चुकला आहे कीं, तो वर्णनीय अशी कांहीं वस्तुच नव्हता. १. आम्हीं माणसाला मिश्र वीर्यबिंदूंतून पैदा केलें; (व उद्देश हा होता) कीं त्या(च्या बऱ्या वाईटास) आम्हीं पडताळून पाहावें. म्हणूनच आम्हीं त्याला ऐकता व पाहता (प्राणी) बनविला. २. (मग) आम्हीं त्याला (धर्माचा) मार्गहि दाखविला. (तर आतां दोन प्रकारचीं माणसें होत;) एक तर कृतज्ञ होत (म्हणजे मुसलमान) अथवा अनुपकारी (म्हणजे नास्तिक). ३. आम्हीं नास्तिकांसाठीं शृंखला व मानखोडे व (नरकाचा) धगधगीत अग्नि (ह्या वस्तु) तयार करून ठेविल्या आहेत. ४. निःसंशय (जे लोक) सदाचरणी (होत ते परलोकीं अशा**

(१) वीर्यबिंदूला मिश्र यासाठीं म्हटलें कीं, तो स्त्रीपुरुष दोहोंच्या वीर्याच्या मिश्रणानें पैदा होतो. अगर वीर्यबिंदु हा सर्व शरीराच्या अवयवांचा अर्क असतो या मानानेंहि तो मिश्र होय; कारण वीर्यबिंदु जरी एक वस्तु आहे तरी खरोखरी ती प्रत्येक अवयवांच्या अर्कानें मिश्र झालेली असते.

(२) म्हणजे त्याच्या सन्मार्गदर्शनार्थ परमेश्वरानें जे कायदे घालून दिले आहेत ते ग्रहण करणें व त्याप्रमाणें आचरणें, याची पात्रता ऐकण्यानें व पाहण्यानें प्राप्त होते म्हणून 'ऐकता व पाहता' म्हटलें.

मदाचे) पेले पितील कीं, ज्यांत कापुरा(च्या पाण्या)चें मिश्रण असेल. ५. (आणि कापुराच्या पाण्याचा एक) झरा (होईल कीं,) त्याचें पाणी परमेश्वराचे (निवडक) सेवक पीतील (व जेथें पाहिजे तेथें) त्या(झऱ्या)ला वाहून नेतील. ६. (हे असे लोक होत कीं, जे आपले) नवस पुरे करतात आणि (पुनरुत्थानाच्या) त्या दिवसाला भितात कीं ज्याचा अपकार (सर्वत्र) पसरलेला असेल. ७. आणि परमेश्वराच्या प्रीतीसाठीं ते मोताद गोरगरीब व अनाथ बालक व बंदिवान् यांस अन्न खाऊं घालितात. ८. (आणि त्यांना बजावूनहि देतात कीं,) आम्हीं तर तुम्हांला केवळ परमेश्वरासाठींच खाऊं घालितों; आम्हीं तुम्हांपासून (कांहीं) मोबदला इच्छीत नाहीं व (कांहीं) उपकारहि नाहीं. ९. आम्हांला आपल्या पालनकर्त्याकडून त्या दिवसाची भीति वाटत आहे कीं जेव्हां लोक (दुःखामुळें) कपाळास आठ्या घालतील व तोंड वाईट करून घेतील. १० तर परमेश्वरानेंहि त्या दिवसाच्या अपकारांपासून त्यांना वांचवून घेतलें; आणि त्यांची (चेहऱ्याचा) तजेला व आनंद यांशीं गांठ घालून दिली. ११. आणि त्यांनीं (जगांत) जी सहनशीलता पत्करली होती तिचा मोबदला म्हणून त्यानें त्यांस (राहावयास) स्वर्ग आणि (नेसण्यास) रेशमी पोशाक दिला. १२. स्वर्गांत ते तक्कांवर टेंकून (बसलेले) असतील; (ऋतु असा बेताचा असेल कीं,) तेथें त्यांना (सूर्याची)उष्णता दिसून येणार नाहीं व (हिंवाळ्याचा) गारठाहि नाहीं. १३. आणि झाडांच्या सावल्या त्यांच्यावर झुकून पडतील; आणि त्यांचीं फळें(इतकीं)खालीं लोंबकळत आलेलीं असतील (कीं, ते जसें व जेव्हां पाहिजे तेव्हां तोडतील व खातील). १४. आणि त्यांच्यापुढून चांदीचीं पात्रें व आपखरे यांचा दौर चाललेला असेल; (आणि) ते (असे स्वच्छ व पारदर्शक) असतील कीं, (जणूं) त्या बाटल्या होत; १५. (आणि) बाटल्याहि (कांचेच्या नव्हेत तर) चांदीच्या, कीं, (देवदूतांनीं स्वर्गीयांच्या जरूरीच्या) प्रमाणांत त्या बेतानें बनविलेल्या असतील; १६. आणि (याशिवाय) तेथें त्यांना

(३) आम्हीं ‘हुब्बेहि’ यांतील सर्वनाम परमेश्वराकडे लाविलें आहे. कित्येक भाष्यकार अन्नाकडे लावितात; तेव्हां त्यांच्या मताप्रमाणें भाषांतर असें होईल:- कीं, खुद्द त्यांना अन्नाची अपेक्षा असतांहि ते मोताद गोरगरीब व अनाथ बालक व बंदीवान् यांस अन्न खाऊं घालितात.

(अशा मद्याचे) पेलेहि पाजले जातील कीं, ज्यांत सुंठी(च्या पाण्या)चें मिश्रण असेल. १७. (आणि) स्वर्गांत (सुंठीच्या पाण्याचा एक) झरा असेल कीं, त्याचें नांव 'सल्सबील' होईल. १८. स्वर्गवाश्यांपाशीं (सेवेसाठीं) मुलें येत जात असतील कीं, तीं नेहमीं (मुलेंच) राहतील;(आणि तीं अशीं सुंदर असतील कीं, हे वाचक-श्रोत्या!) तूं त्यांना (चालतां फिरतां) पाहशील, तर तूं (अशी) कल्पना करशील कीं, (जणूं) तीं पसरलेलीं मोत्येंच(होत). १९. आणि तूं जेव्हां स्वर्गा(च्या एकंदर स्थिती)ला पाहशील तेव्हां (तेथें) तुला हर तऱ्हेचें सुख व मोठी बादशाही(ची तयारी) दिसून येईल; २०. स्वर्गवाश्यांच्या अंगावर हिरव्या तलम रेशिमाचीं व किनखाबचीं वस्त्रें असतील; व त्यांना चांदीचीं कडीं लेवविलीं जातील; आणि त्यांचा पालनकर्ता त्यांना पवित्र (शुद्धिकारक)मद्य पाजवील. २१. (स्वर्गवाश्यांनों!) हा होय तुमचा मोबदला; आणि तुमचे (इहलौकिक) प्रयत्न (आज) मान्य झाले. २२. (हे पैगंबरा!) निःसंशय आम्हींच तुला (वेळोवेळीं) क्रमाक्रमानें कुराण प्रकट केलें आहे. २३. तर तूं आपल्या पालनकर्त्याच्या हुकमाची वाट पाहत दम धरून बैस; आणि लोकांतून कोणा पापी व कृतघ्न अशाच्या कह्यांत येऊं नकोस. २४. आणि सकाळीं व संध्याकाळीं आपल्या पालनकर्त्याचें नांव घेत जा. २५. आणि रात्रीच्या कांहीं भागांत परमेश्वरापुढें साष्टांग नमस्कार घालीत जा; आणि मोठ्या रात्रीं त्याची पवित्रता वर्णीत जा. २६. हे (अधर्मी लोक) तर तूर्त (प्राप्त आहे) अशी केवळ (दुनियाच) इच्छितात; आणि (पुनरुत्थानाच्या) भारी (बिकट) दिवसाला ते आपल्या पाठीमागें टाकून देत आहेत, (कीं, त्याच्यासाठीं कांहींच तयारी करीत नाहींत). २७. आम्हींच यांना पैदा केलें व आम्हींच यांचे जोडबंद मजबूत केले. आणि आम्हीं जेव्हां इच्छूं तेव्हां यांच्याबदलीं यांच्याच सारखीं (माणसें आणखी) आणून वसवूं. २८. ह्या गोष्टी उपदेश(पर) होत, तर जो इच्छील तो आपल्या पालनकर्त्याकडे (पोहोंचण्या)चा मार्ग पत्करील. २९. आणि परमेश्वराच्या संकल्पावांचून तुम्हीं लोक (कोणतीहि गोष्ट) इच्छूं शकत नाहीं. निःसंशय परमेश्वर परम ज्ञानी व सत्यसंकल्प होय. ३०. तो ज्याला इच्छितो त्याला आपल्या दयेंत घेतो. आणि शिरजोर लोकांसाठीं त्यानें दुःखकारक शिक्षा तयार करून ठेविली आहे. ३१.

# अध्याय ७७ वा.

# सूरतुल्-मुर्सलात.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ५० अयात–महावाक्यें आहेत. याचें नांव 'मुर्सलात' म्हणजे पाठविलेले किंवा चालविलेले (वायु) असें पडण्याचें कारण हें कीं, यांत सकृद्दर्शनीं चांगल्या दिसणाऱ्या गोष्टीचें पर्यवसान ती गोष्ट मर्यादेबाहेर गेल्यावर वाईटांत होतें यास प्रमाण आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**त्या (वाऱ्यां)ची शपथ कीं जे (प्रथमतः) साधारण वेगानें चालविले जातात; १. मग जोर धरून मोठ्या आवेशानें वाहतात, २. आणि (ढगांस उभारून चोहोंकडे) फैलावून देतात, ३. मग (त्यांस फाडून एकमेकांपासून) वेगळे करून टाकतात; ४. मग (सर्वांत विशेष हें कीं, लोकांच्या मनांत परमेश्वराचें) स्मरण घालतात; ५. कीं (येणेंकरून मुसलमानांस तारणाचें) निमित्त व्हावें व (नास्तिकांस) भिवविलें जावें. ६. (सारांश, आम्हांस वाऱ्यांची शपथ आहे) कीं, तुम्हां (लोकां)स जो (पुनरुत्थानाचा) वायदा केला जातो तो अवश्य घडून येईलच येईल. ७. म्हणजे जेव्हां तारे निस्तेज होतील, ८. आणि जेव्हां**

(१) वायु किंवा हवा जीवनास अगत्याची आहे व ती पाऊसहि वर्षविते. अर्थात् ही परमेश्वराची एक कृपाच होय. परंतु ती जेव्हां मर्यादेहून जास्त वाहाते तेव्हां ती महा संकटासहि कारणीभूत होते. ह्याच हवेनें आदकुलाच्या लोकांस नष्ट करून टाकिलें होतें; आणि एरव्हींहि वादळानें बहुत नुकसान होत राहतें. तात्पर्य हें कीं, हवेंत दोन्ही गोष्टी होत. ती कधीं दयारूपी होते कीं परमेश्वर तिच्यायोगें आपल्या सेवकांच्या तारणाचें निमित्त घडवून आणितो आणि कधीं ती शिक्षा व दुःखरूपी असते कीं परमेश्वर तिच्याद्वारें आपल्या सेवकांस भिववित असतो.

आकाश फाटून जाईल, ९. आणि जेव्हां पर्वत पाखडले जातील, १०. आणि जेव्हां पैगंबर (आपापल्या जनतेच्या हिशेबासाठीं) नियमित वेळेवर हजर केले जातील; (तेव्हां समजा, कीं पुनरुत्थान घडून आलें). ११. (परंतु ह्या गोष्टी) कोणत्या दिवसासाठीं कालांतरावर टाकिल्या जातात? १२. (तर त्या भिजत पडल्या आहेत) फैसल्याच्या दिवसासाठीं. १३. आणि (हे पैगंबरा!) तुला काय समजलें कीं फैसल्याचा दिवस तो काय? १४. त्यादिवशीं (पुनरुत्थानास) पाखंड ह्मणणाऱ्यांस दुःख होय! १५. कां आम्हीं पूर्वींच्या (आज्ञाभंजक) लोकांचा नाश केला नाहीं? १६. मग (ह्याचप्रमाणें) आम्हीं या मागील (आज्ञाभंजक) लोकांसहि त्यांच्याच मागें मागें लावून देऊं. १७. अपराध्यांबरोबर आम्हीं असेंच करीत असतों. १८. (राहिलें पुनरुत्थान, तर) त्या दिवशीं पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय! १९. (लोकांनों!) कां आम्हीं तुम्हांस तुच्छ पाण्यां(म्हणजे वीर्या)तून पैदा केलें नाहीं? (कीं मुळांत तुम्हीं वीर्यबिंदु होतां); २०. मग आम्हीं त्याला एका नियमित काळपर्यंत एका सुरक्षित जागीं (म्हणजे स्त्रीच्या गर्भाशयांत) ठेविलें. २१–२२. मग आम्हीं (त्याचा एक) अंदाजा[1] ठरविला. तर (आह्मीं कसे) चांगले अंदाजा ठरविणारे आहोंत! २३. तर त्या दिवशीं (पुनरुत्थानास) पाखंड ह्मणणाऱ्यांस दुःख होय! २४. कां आम्हीं जमिनीला जित्यांस व मेलेल्यांस पुरी पडणारी बनविली नाहीं? (बनविली). २५–२६. आणि (याशिवाय) तींत उंच उंच अचल पर्वत रोंविले आणि तुम्हां लोकांस गोडें पाणी पाजिलें. २७. तर त्या दिवशीं (पुनरुत्थानास) पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय! २८. (नास्तिकांस त्यादिवशीं हुकूम दिला जाईल कीं) ज्या(नरकाग्नी)स तुह्मीं पाखंड म्हणीत होता, (आतां) त्याच्याकडे चला. २९. (म्हणजे धुराच्या) सावलीकडे चला कीं जिचे तीन[2] भाग आहेत; ३०. (पण) त्या(च्या

(१) अंदाजा या शब्दांत जोडबंद, रूप, आकृति, आयुष्य, पापपुण्य, चरितार्थ वगैरे सर्व गोष्टी येऊन गेल्या.

(२) भाषांतरांत आम्हीं सावलीला धुराची सावली म्हटली आहे. ही गोष्ट आम्हीं कुराणाच्या २७व्या भागांतील 'सूरतुल्–वाकेअः' यांतून घेतली आहे. पाहा अध्याय ५६:४३–४४. सावलीच्या तीन शाखा किंवा फांका होण्याचा

सावलीं)त थंडक नाहीं आणि ती (अग्निच्या) ज्वालेपासून (बचावाच्या) कामाचीहि नाहीं. ३१. त्या सावलींतून मोठमोठ्या घरांसारखे अंगारे निघून पडतात. ३२. ते (अंगारे लांबून असे दिसून येतात कीं) जसे पिंवळ्या रंगाचे उंटच होत. ३२. (सारांश,) त्या दिवशीं (पुनरुत्थानास) पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय! ३३. हाच तो दिवस होईल कीं, (गुन्हेगार, हैबतीमुळें,) बोलूं शकणार नाहींत. ३४. आणि त्यांना परवानगीहि दिली जाणार नाहीं कीं, ते (कोणा तऱ्हेची) सबब पुढें करतील. ३५. तर त्या दिवशीं (पुनरुत्थानास) पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय! ३६. (त्यादिवशीं आम्हीं त्यांस बजावून सांगूं कीं) हाच फैसल्ल्याचा दिवस होय; (कीं) आम्हीं तुम्हांला व पूर्वींच्या लोकांना (कर्मांच्या जाबासाठीं) एकत्र गोळा केलें आहे. ३७. तर, तुम्हांला जर कोणी डाव येत असेल तर, मजवर (आपला) डाव चालवून पाहा. ३८. (तात्पर्य,) त्या दिवशीं (पुनरुत्थानास) पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय! ३९. निःसंशय, (परमेश्वराला) भिऊन वागणारे (स्वर्गीय बागांच्या) सावल्या व झरे यांत, ४०. आणि त्यांना ज्यांची इच्छा होईल त्या प्रकारच्या मेव्यांत (चैन करीत) असतील. ४१. (आणि आम्हीं त्यांना परवानगी देऊं) कीं, (जगांत) तुम्हीं जसजशीं (चांगलीं) कर्में करून राहिलां आहां त्यांच्या मोबदला (आतां खूप) खा व प्या. (व तें तुमच्या) अंगीं लागो! ४२. सुकृत्य करणाऱ्यांस आम्हीं असाच मोबदला देत असतों. ४३. (पण) त्यादिवशीं पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय! ४४. (सद्धर्मास नाकारणाऱ्यांनों! तुम्हींहि जगांत) थोडे दिवस खाऊन (पीऊन) घ्या व (ऐहिक) सुख उपभोगा. (पण) तुम्हीं खरोखरच गुन्हेगार (व पाखंड म्हणणारे) आहां. ४५. (आणि) त्या दिवशीं(पुनरुत्थानास) पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय!४७. आणि जेव्हां या लोकांस सांगितलें जातें कीं,(नमाजींत परमेश्वरापुढें)झुका; तर ते झुकत नाहींत. ४८. म्हणून त्या दिवशीं पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय! ४९. आतां ह्या (इतक्या बोधा व उपदेशा) नंतर (अशी आणखी) कोणती गोष्ट होय कीं, जिच्या योगें हे लोक विश्वास धरितील? ५०.

---

अर्थ हा कीं, सावली जेव्हां लांबवर सारखी मिळालेली नसते तेव्हां तींतून उन्ह किंवा ताप बाहेर येत असतो.

# पवित्र कुराण.

## भाग तिसावा.

## अध्याय ७८ वा.

## सूरतु–न्नबअ.

हा अध्याय हजरत श्रीमन्मोहंमद–परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो-ह्यांस मक्काशहरीं प्रकट झाला. ह्यांत ४० आयात म्हणजे महावाक्यें आहेत. हजरत पैगंबरसाहेब हे लोकांना कुराणांतून उपदेश करीत असतांना जेव्हां 'कियामत' म्हणजे पुनरुत्थानासंबंधानें उल्लेख करूं लागले तेव्हां नास्तिक लोक मेल्यावर फिरून उठणें हें, काय हो ! खरें आहे ? असे एकमेकांस प्रश्न करूं लागले. त्यांच्या प्रश्नास उत्तर म्हणून परमेश्वरानें त्या 'नबअ' म्हणजे वृत्तांताचें यांत वर्णन केलें आहे. यावरून हें नांव झालें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों).

हे लोक एकमेकांस कशाविषयीं प्रश्न करतात ? १. (कां पुनरुत्थानाच्या) त्या महान् वृत्तांताविषयीं; २. कीं ज्याच्या संबंधानें हे भिन्न भिन्न (मतें बाळगीत) आहेत ? ३. (तर) असो, लवकरच यांना (त्याची हकीकत) माहीत होऊन जाईल; ४. नंतर (आम्हीं पुन्हांहि सांगतों कीं,) हो होय, लवकरच यांना (त्याची हकीकत) माहीत होऊन जाईल. ५. (लोकांनो !) कां आम्हीं जमिनीला (तुमची) बिछाईत बनविली नाहीं ? ६ आणि पर्वतांस (जमिनीच्या) मेखा (बनविल्या नाहींत) ? ७. आणि (याशिवाय) आम्हींच तुम्हांला जोडपीं जोडपीं (म्हणजे स्त्रीपुरुष) पैदा केलें; ८. आणि आम्हींच तुमची निद्रा विश्रांती

(१) 'कल्ला' या शब्दाचा अर्थ आह्मीं 'असो व 'हो होय' असा केला आहे, हा शब्द येथें धमकीसाठीं वापरलेला आहे.

(-स'कारणीभूत)बनविली;९ आणि आम्हींच रात्रीला आवरण(म्हणजे पडदा) बनविला; १०. आणि आम्हींच दिवसाला उपजीविका (म्हणजे तिच्या उद्योगाची वेळ) बनविली; ११. व आम्हींच तुमच्यावरतीं सात मजबूत (आकाशें) बनवून उभीं केलीं. १२. आणि आम्हींच (सूर्यरूपी) अति प्रकाशमान् दिवा बनविला; १३. व आम्हींच चेपून वर्षाव करणाऱ्या (ढगां)तून जोराचें पाणी पाडिलें; १४. कीं जेणेंकरून आम्हीं धान्य व (हर तऱ्हेची ) वनस्पति (जमिनींतून) उपजवावी; १५. व तशाच दाट दाट (झाडांच्या) बागाहि. १६. निःसंशय फैसल्याचा दिवस एक नियमित वेळ होय; १७. कीं, त्या दिवशीं करणा फुंकिला जाईल, व तुम्हीं लोक घोळकेचे घोळके येऊन हजर व्हाल. १८. आणि आकाश फाटून (त्यांत) दरवाजेच दरवाजे होऊन जातील. १९. आणि पर्वत (आपल्या जागेवरून)चालविले जातील व धूळेच[2] धूळ होऊन राहतील.२०. निःसंशय 'जहन्नम'–नरकाग्नि पाळतींतच लागून आहे; २१. (व तोच) शिरजोरांचें ठिकाण (होय); २२. कीं ते त्यांतच युगानुयुग (पडून) राहतील. २३. तेथें ते (कोणत्याहि तऱ्हेची) थंडाई चाखणार नाहींत आणि उकळी आलेलें गरम पाणी व पूं यांशिवाय त्यांना कांहीं पिण्यासहि मिळणार नाहीं.२४-२५.(हा त्यांच्या कर्मांचा),पुरापुरा मोबदला(होय.)२६. (कारण), हे लोक (परलोकींच्या)हिशेबास (मुळींच) भीत नव्हते; २७. आणि आमच्या महावाक्यांस मोठ्या धिटाईनें पाखंड म्हणीत होते. २८. आणि आम्हीं प्रत्येक वस्तु ('लौहे–महफूज') पुस्तकांत नोंदून ठेविली आहे (व त्यांतल्या त्यांतच यांचीं कर्मेंहि). २९. तर (आम्हीं या लोकांस फर्मावूं कीं आतां आपल्या कर्मांची) गोडी चाखा; आणि आम्हीं तर (दिवसें दिवस) तुम्हांसाठीं शिक्षाच वाढवीत जाऊं. ३०. निःसंशय जे लोक (परमेश्वराला) भिऊन वागतात त्यांस (परलोकीं मोठेंच) साफल्य (प्राप्त) होईल; ३१. (म्हणजे राहावयास) बागा व (खावयास) द्राक्षें, ३२. आणि (करमणुकीस) समानवयाच्या युवति, ३३. व

(१) 'सूर' याचा अर्थ कोशांत 'शिंग' लिहिलेला आहे. हें तोंडानें फुंकून वाजविलें जातें. आतां शिंगाच्या जागीं करणा, तुतारी व बिगल उपयोगांत आणतात. मुसलमानांत याची 'सूर' या शब्दानें प्रसिद्धि आहे.

(२) म्हणजे पर्वतांची अशी स्थिति होईल कीं, ते टक्कर खाऊन व आपल्या स्थानावरून हालून धूळच धूळ होऊन उडत फिरतील.

(प्यावयास पवित्र मद्याचे) ओतप्रोत भरलेले पेले; ३४. तेथें हे लोक (कोणाच्या तोंडून कोणांहि तऱ्हेची) निरर्थक गोष्ट ऐकणार नाहींत व खोटी तक्रारहि नाहीं. ३५. (हे पैगंबरा! हें त्यांच्या कर्मांचें) पुरेसें इनाम (होय कीं तें त्यांच्या कर्मांच्या) ऐवजीं तुझ्या पालनकर्त्याकडून (त्यांना मिळेल); ३६. कीं (तो) आकाशांचा व पृथ्वीचा व जितकी सृष्टि या दोहोंच्या दर्म्यान आहे त्या (सर्वां)चा परमदयाळू मालक होय; कीं (पुनरुत्थानाचे दिवशीं लोक दहशतीमुळें) त्याला संबोधून बोलण्या-चीहि सत्ता बाळगूं शकणार नाहींत. ३७. त्या दिवशीं 'जिब्रील' व (इतर) दूत (त्याच्या हुजुरांत) रांगे रांगेनें उभे राहतील. ज्याला परम दयाळू (परमेश्वर) परवानगी देईल व तो बोलेलहि[1] वाजवीच त्याच्या-शिवाय कोणाच्याच तोंडांतून शब्दहि निघणार नाहीं. ३८. हा, (तो) दिवस (होय कीं ज्याचें होणें)सत्य होय. तर ज्याची इच्छा असेल, त्यानें आपल्या पालनकर्त्यापाशीं (आपलें) ठिकाण[2] बनून ठेवावें. ३९. (लोकांनों!) आम्हीं तुम्हांस जवळच येणाऱ्या (पुनरुत्थानाच्या) शिक्षेचें भय दाखविलें आहे; कीं त्या दिवशीं माणसानें आपल्या हातांनीं जीं (कर्में पुढची सामुग्री म्हणून) पुढें पाठविलीं आहेत तीं तो प्रत्यक्ष पाहील आणि (त्या दिवशीं) नास्तिक असे उद्गार काढील कीं अरेरे! मी मातीं[3] असतों तर बरें होतें! ४०

---

(१) अरब मूर्तीपूजकांची अशी श्रद्धा बसलेली होती कीं, देवदूत ह्या परमेश्वराच्या मुली आहेत व पुनरुत्थानाच्या दिवशीं ते त्यांची शिफारस कर-तील. येथें त्यांचें खंडण आहे कीं, ते परमेश्वराच्या हुकमावांचून कोणाच्याहि शिफारसीसाठीं चकार शब्दहि काढणार नाहींत; आणि परवानगी झाल्या-वरहि वाजवीच गोष्ट बोलतील; म्हणजे ते जो कोणी परमेश्वर एकच आहे असें मानील व शिफारसीस पात्र होईल त्याचीच शिफारस करतील.

(२) म्हणजे त्यानें अशीं कर्में करावींत कीं, ज्यामुळें त्याला परमेश्वरासमीप अभय व शांति प्राप्त होईल; व उत्तम ठिकाण मिळेल.

(३) म्हणजे मातीप्रमाणें निर्जीव असतों व वाईट कर्में करण्याची मला शक्तिच नसती; कीं, त्यांचा दुष्परिणाम मला आज भोगावा लागत आहे. अथवा हें कीं मी माती असतों तर पुन्हां जिवंत करून उठविला गेलों नसतों व मला कोणा तऱ्हेची विचारपूसहि झाली नसती.

# अध्याय ७९ वा.

## सूरतु--न्नाजेआत.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ४६ महावाक्यें आहेत. ह्याचें नांव त्यांत आलेल्या नाजेआत या शब्दावरून पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)

(नास्तिकांच्या देहांत कोन्या कोन्यांत शिरून) (त्यांचे प्राण सक्तीनें) खेंचून काढणाऱ्या (दूतां)ची शपथ; १. व जे (दूत विश्वासूंचे प्राण असे हळूंच काढतात कीं जणूं बंद) उघडून टाकतात त्या(दूतां)ची शपथ;२. आणि (आकाश व पृथ्वीच्या अंतरंगांत) पोहोंत पोहोंत फिरणाऱ्या (दूतां)ची शपथ; ३. मग (जो कांहीं वरून हुकूम होतो तो ऐकण्यास) सरसावून जातात; त्यांची, ४. व मग जसा हुकूम होतो (त्या प्रमाणें जगाची) व्यवस्था करितात त्यांची;(सारांश, आम्हांला या दूतांची शपथ, कीं पुनरुत्थानाचा दिवस अवश्य येईलच येईल); ५. कीं त्या दिवशीं जमीन थरथरा कांपेल;६, आणि एका भूकंपानंतर(दुसरा)भूकंप येईल;७. त्या दिवशीं (बहुतेक लोकांचीं) अंतःकरणें धडधडूं लागतील ८. (आणि दुःख व दहशतीमुळें) त्यांचे डोळे खालीं नमलेले असतील. ९. (पुनरुत्थानास नाकारणारे) म्हणतात कीं आम्हीं कां (मेल्या नंतर पुन्हां) उलट्या पायीं (जीवित्वाकडे) पालटले जाऊं ? १०. (आणि) कां (तेंहि अशा स्थितींत कीं) जेव्हां (कुजून गळून) आम्हीं पोकळ हाडें होऊन जाऊं? ११. ते ह्मणतात (काय) कीं असें झालें तर हें परतणें (फार) नुकसानकारक

(१) नुकसान हें कीं, पुन्हां जिवंत केलें जाणें कर्मांचा जाब देण्यासाठीं होईल व त्याच्या करितां आम्हीं कांहीं तयारी केली नाहीं. त्याचें हें बोलणें विनोदानें व नाकारणीमुळें आहे.

होय. १२. पण तें(पुनरुत्थान या लोकांस दुष्कर असेल! आम्हांपाशीं तर त्याची हकीकत) केवळ एवढीच होय(कीं)एक धमकी (दाखविली); १३. आणि एकदम (सर्व) लोक (पुनरुत्थानाच्या) मैदानांत येऊन हजर झालेच. १४. (हे पैगंबरा!)'मूसा'चा वृत्तांतहि तुला पोहोंचला आहे? १५. कीं जेव्हां त्याला 'तुवा'च्या पवित्र दऱ्यांत (ज्यांत 'तूर' पर्वत आलेला आहे त्यांत) त्याच्या पालनकर्त्यानें हाक मारून सांगितलें कीं, १६. (हे 'मूसा'!) 'फिरऔना'कडे जा; कीं, त्यानें फार डोकें उचललें आहे. १७. आणि (त्याला जाऊन) सांग कीं बरें, तुला याचीहि कांहीं काळजी आहे कीं तूं (नास्तिकपणाच्या गंधापासून) शुचिर्भूत व्हावेंस; १८. आणि मी तुला तुझ्या पालनकर्त्याकडचा मार्ग दाखवावा व तूं (त्याला) भ्यावेंस? १९. सारांश, 'मूसा'नें (जाऊन) त्याला (काठीचा) मोठा चमत्कार दाखविला २०. तेंव्हां त्यानें (त्यास) पाखंडी म्हटलें व आज्ञाभंग केला. २१. नंतर तो (आपल्या जागीं) माघारा गेला व ('मूसा'च्या विरुद्ध) खटपट करूं लागला. २२. म्हणजे त्यानें (लोकांस) गोळा केलें व (त्यांच्यांत अशी) दवंडी पिटविली; २३. व (मोठ्यानें) म्हणाला कीं मी तुमचा (सर्वांत) वरिष्ठ पालनकर्ता आहें. २४. तर परमेश्वरानें त्याला इहलोक व परलोक या (दोहों)च्या शिक्षेंत पकडलें. २५. निःसंशय जो कोणी (परमेश्वराला) भितो त्याच्या साठीं ह्या(वृतांतां)त (मोठा) धडा होय. २६. (लोकांनों!) बरें, तुमचें (पुनरुत्थानांत पुन्हां) निर्मिणें कठीण आहे किंवा आकाशाचें (बनविणें)? कीं, तें परमेश्वरानें बनविलें. २७. त्याची उंची खूप उभारली व मग त्याला सारखें केलें. २८. आणि त्याची रात्र काळोखी बनविली व त्याचें ऊन्ह[१] काढलें; २९. आणि ह्याच्या उपरांत जमिनीला फैलाविलें. ३०. तींतूनच तिचें पाणी व तिचा चारा काढला; ३१. आणि पर्वतांस (तींत) रोंवून टाकिलें. ३२. (हें सर्व) तुमच्या व तुमच्या गुरांढोरांच्या सुखोपभोगासाठींच. ३३.

(१) रात्र व ऊन्ह हीं आकाशाकडे यासाठीं लाविलीं आहेत; कीं, दोन्हींहि सूर्यापासून उत्पन्न होतात. व सूर्य आकाशांत होय; व मूळहेतु, रात्र व दिवस होय.

तर जेव्हां (पुनरुत्थानाचा) महान् प्रसंग येऊन थडकेल; ३४. त्यादिवशीं माणसानें (जगांत) जें कांहीं केलें आहे तें त्याला आठवेल; ३५. आणि सर्व पाहणाऱ्यांच्या समोर नरकाग्नि बाहेर काढून ठेविला जाईल. ३६. तर (जगांत) ज्यानें शिरजोर केली; ३७. व इहलौकिक आयुष्यास (परलोकावर) पसंती दर्शविली; ३८. तर (त्याचें) ठिकाण केवळ नरकाग्निच होय. ३९. आणि जो कोणी आपल्या पालनकर्त्याच्या हुजूर (जाब देण्यास) उभे राहण्यापासून भ्याला व (आपल्या) मनोकामनेपासून आत्मसंयमन करीत राहिला; ४०. तर त्याचें ठिकाण केवळ स्वर्गच. ४१. (हे पैगंबरा! हे लोक) तुला (पुनरुत्थानाच्या) घटकेसंबंधानें विचारितात कीं तिचें कोठें ठावठिकाणाहि आहे? ४२. (तर हे पैगंबरा!) तूं तिची वेळ सांगण्याच्या[1] कसल्या भानगडींत पडला आहेस? ४३. (तिची निश्चित वेळ) अखेर तुझ्या पालनकर्त्याकडेच[2] जाऊन ठरते. ४४. (राहिलास तूं, तर) जो कोणी पुनरुत्थानास भिईल त्याला तूं भय सुचविणारा आहेस एवढेंच. ४५. लोक ज्या दिवशीं पुनरुत्थानास पाहतील तेव्हां (त्यांना असें वाटेल कीं) जणूं ते (जगांत) एक सांज अथवा एक सकाळ मात्र राहिले. ४६.

(१) पैगंबर साहेबांस पुनरुत्थानाविषयीं लोक वारंवार विचारीत होते; म्हणून मानवस्वभावानुसार त्यांना एका प्रकारची तळमळ होत असेल कीं, मला माहित होईल तर मी त्यांना सांगेन. परमेश्वरानें जणाविलें कीं, ह्याचा तुह्मीं कधींच उलगडा करूं शकणार नाहींत ह्मणून तुह्मीं या भानगडींत पडूं नका.

(२) ह्मणजे ज्याला विचाराल तो 'परमेश्वर जाणें' असें म्हणून स्तब्ध राहील.

# अध्याय ८०

# सूरतु--अबस.

हा अध्याय मक्का शहरांत प्रकट झाला. ह्यांत ४२ महावाक्यें आहेत. एके दिवशीं हजरत मोहंमद पैगंबर साहेब—सल्लल्लाहो अलैहे व सल्लम—हे कुरेश कुलांतील श्रीमंत व कुलीन लोकांस इस्लाम-धर्मासंबंधानें निरुपण करण्यांत निमग्न होते; इतक्यांत अबदुल्ला बिन उम्मे—मकतूम—परमेश्वर त्यांशीं राजी होवो—हे येऊन त्या बैठकींत बसले. परंतु त्यांस दिसत नव्हतें म्हणून त्यांनीं कालपरिस्थितीचा विचार केला नाहीं व मध्यंतरींच धर्माविषयीं कांहीं प्रश्न पुसूं लागले. त्यांचें मध्येंच बोलत सुटणें हजरत पैगंबर साहेबांस न आवडून त्यांनीं त्यांच्याकडून तोंड फिरविलें. तेव्हां अबदुल्ला ह्यांस फार विषाद वाटून ते तेथून उठले; तोंच जिब्रीलदूत हा अध्याय घेऊन आले. ह्या पश्चात जेव्हां जेव्हां हे अंध—अबदुल्ला पैगंबर साहेबांकडे येत तेव्हां तेव्हां ते त्यांचें फार स्वागत करीत व त्यांस बसण्यासाठीं आपली चादर देत असत. यांना दोनदां मदिनेचा गवरनरहि नेमिलें होतें. या वृत्तांतावरून हेंहि सिद्ध होतें कीं कुराण हें ईश्वरप्रणीत आहे व पैगंबर साहेब त्याचें अनुकरण दरेक स्थितींत तंतोतंत करीत होते. यांत आलेल्या 'अबस' या पहिल्या शब्दावरून हें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों).**

**(पैगंबरानें) एवढ्यावरूनच कपाळास आठ्या घातल्या व तोंड फिरवून घेतलें, १, कीं (एक) आंधळा त्याच्यापाशीं आला. २. आणि (हे पैगंबरा!) तूं काय जाणोस, नवल नव्हे (कीं तुझ्या उपदेशानें) तो (नास्तिक्य सोडून) शुचिर्भूत होईल; ३. अगर बोध घेईल व बोध त्याला उपयुक्त होईल. ४. पण जो कोणी (धर्माकडून) बेपर्वाई करितो, ५. त्याच्याकडे तूं फार लक्ष पुरवितोस. ६. आणि वास्तविक पाहतां; तो न सुधारला तर तुजवर कांहीं (दोषहि) नाहीं. ७. आणि**

जो कोणी तुजकडे धांव घेत येतो, ८. व तो (परमेश्वरालाहि) भितो; ९. तर तूं त्याजकडून दुर्लक्ष करितोस. १०. पाहाहो! कुराण तर (सर्वसर्वां) बोध होय. ११. तर ज्याची इच्छा असेल त्यानें त्याचें मनन करावें. १२. (तें आमच्या येथें 'लौहेमहफूज'च्या) सन्मान्य पानांत (लिहिलेलें) होय. १३. (व तीं) उंच स्थळीं ठेवलेलीं (असून) पवित्र (होत). १४. (व तीं अशा) लिहिणाऱ्या(म्हणजे दुतां)च्या हातांत (असतात) १५. कीं जे सन्माननीय (व) सदाचारी होत. १६. माणसाला (परमेश्वराचा) मार (होय)! तो किती तरी अनुपकारी आहे! १७. (परमेश्वरानें) त्याला कोणत्या वस्तूंतून निर्मिलें? १८. (तर निर्मिलें) वीर्यबिंदूंतून,(कीं प्रथम) त्याला निर्मिलें व मग त्या(च्या प्रत्येक वस्तू)चा एक अंदाजा बांधिला. १९. तदनंतर (बऱ्यावाईटाचा) मार्ग त्याला सुलभ करून दिला. २०. नंतर (एका नियमित वेळे पर्यंत जिवंत ठेवून) त्याला मारून टाकिलें व मग त्याला (नेऊन) थडग्यांत दाखल केलें; २१. नंतर जेव्हां तो इच्छील तेव्हां त्याला (पुन्हां) उठवून उभा करील. २२. खरी गोष्ट तर ही होय कीं परमेश्वरानें माणसाला जो कांहीं हुकूम दिला तो त्यानें बजाविलाच नाहीं. २३. तर माणसाला पाहिजे कीं (आणखी नाहींतर) त्यानें आपल्या अन्नाकडेच पाहावें; २४. कीं आम्हींच वरून पाण्याचा वर्षाव केला; २५. नंतर आम्हींच (बियाला अशी शक्ति दिली कीं त्यानें) जमिनीला फाडिलें. २६. व मग आम्हींच (एकाच) जमिनींत (सर्व कांहीं) उगविलें; (म्हणजे) धान्य, २७. व द्राक्षें व शाकभाजी, २८. आणि जैतून व खजूर. २९. आणि दाटदाट बागा. ३०. आणि फळफळा-

(१) उंच स्थळीं ठेवलेलें असणें याचा अर्थ हा कीं, कोणाचेहि हात तेथपर्यंत पोहोंचणार नाहींत व तो ढवळाढवळहि करूं शकणार नाहीं. शिवाय आदर सन्मानामुळें त्याला उंच जागीं ठेविलें गेलें आहे,

(२) शब्दश: भाषांतर तर हें आहे कीं 'आम्हींच जमिनीला फाडिलें.' पण जमिनीच्या फाडण्याचे दोन प्रकार आहेत; एक तर जमीन नांगरणें व दुसरें बियाचें फुटणें. परंतु ज्याअर्थी दोन्हीं कामें परमेश्वराचे हुकमानें होतात त्याअर्थी परमेश्वरानें म्हटलें कीं आम्हींच फाडिलें.

वळ व चारा; ३१. (हीं सर्व) यासाठीं कीं, तुम्हांस व तुमच्या गुरा-ढोरांस फायदा पोहोंचावा; ३२. तर जेव्हां कानठळ्या बसून जातील असा (पुनरुत्थानाचा) मोठा नाद (सुरू) होईल; ३३. ज्या दिवशीं (आपापली अशी चिंता पडेल कीं,) मनुष्य, आपला भाऊ व आपली आई व आपला बाप व आपली (जन्माची) सोबतीण (म्हणजे बायको) व आपलीं मुलें यांजपासून सुद्धां पळेल ३४-३५-३६ त्या दिवशीं या (नातलगां)तून प्रत्येक मनुष्यास (आपापल्या सुटकेची) फिकीर लागली असेल कीं ती त्याला पुरेपुरेशी होईल. ३७. कित्येक (लोकांचीं) तोंडें त्या दिवशीं चमकतीं; ३८. (व) हसतीं (व) आनंदित असतील ३९. आणि कित्येक (लोकांचीं) तोंडें त्या दिवशीं (अशीं)असतील कीं त्यांजवर धूळ (पडलेली) असेल; ४०. (आणखी) कालिमाहि त्यांजवर पसरलेला असेल. ४१. हेच (ते लोक) होत (कीं जे जगांत) नास्तिक व दुराचारी (होते). ४२.

## अध्याय ८१ वा.

## सूरतु-त्तकवीर.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत २९ आयात वा महावाक्यें आहेत. पहिल्याच महावाक्यांत आलेल्या 'कुव्वेरत' या शब्दाच्या क्रियापदाच्या रूपावरून हे नांव पडलें

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों).

ज्या वेळीं सूर्या(च्या प्रकाशपटला)स गुंडाळलें जाईल. १. व जेव्हां तारे झडून पडतील, २. आणि ज्या वेळां पर्वत (आपल्या जागेवरून)

चालविलें जातील; ३. व जेव्हां दहा महिन्यांच्या गर्भिणी[1] सांढण्या मोकळ्या मोकळ्या फिरतील; (व कोणीहि त्यांचा राखणदार नसेल;) ४. आणि ज्या वेळीं रानटी जनावरें (भयानें वस्त्यांत) येऊन भरतील; ५. व जेव्हां समुद्रांस ऊत येऊन ते एक होऊन जातील, ६ आणि ज्या वेळीं आत्मे (आपापल्या शरीराशीं) जोडिले जातील; ७ व जेव्हां जिवंत पुरून टाकलेल्या मुलीस विचारिलें जाईल, ८. कीं तिला कोणत्या अपराधाबद्दल ठार केलें गेलें ? ९ आणि ज्या वेळीं (लोकांचे) कर्मपट उघडले जातील; १०. व जेव्हां आकाशाचें कातडें काढिलें जाईल ११. आणि ज्या वेळीं नरकाग्नि धगधगविला जाईल; १२. आणि जेव्हां स्वर्ग जवळ आणिला जाईल; १३. (त्यावेळीं) प्रत्येक जीवाला, त्यानें जें कांहीं (पुढच्या सामुग्रीदाखल ) आणून हजर केलें आहे तें (प्रत्यक्ष) कळून येईल. १४. तर मला अशा(नक्षत्रां)ची शपथ कीं, जीं (एका दिशेस) चालतां चालतां उलटून मागें हटूं लागतात; १५. व जीं नीट

---

(१) अरब लोक दहा महिन्यांच्या गार्भिणी सांढण्यास फार प्रीय राखतात. कारण त्यांच्या व्याण्याची वेळ जवळ आलेली असते; तर त्यांस बच्चा होईल व आपणास दूध मिळेल अशी त्यांना लालुच असते.

(२) रानटी जनावरें जेव्हां भयभीत होतात तेव्हां ते वस्त्यांत येऊन आश्रय घेतात. अशीच स्थिति पुनरुत्थानाच्या दिवशींहि होईल.

(३) ह्मणजे ज्यावेळीं पुनरुत्थानाचा धरणीकंप होईल त्यावेळीं पर्वत तुकडे तुकडे होऊन पडून जातील व समुद्राच्या पाण्यास ऊत येऊन तें कोणीहिकडे वाहून जाईल व जमिनींत कोठें उच्चनीच नसल्यामुळें सारखो होऊन जाईल व पाणीहि एक होऊन जाईल.

(४) अरब लोक मुलींची हत्या करीत होते. जगांतील मुकदम्याच्या धोरणा प्रमाणें या मुकदम्यासहि आरंभ होईलें; कीं प्रथम खून झालेली मुलगो जी वादीण आहे तिची जबानी घेतली जाईल. येथें इतकेंच विवेचन आहे.

(५) आकाशाचें कातडें काढणें म्हणजे आकाश जें हल्लीं नीळसर दिसतें त्यांत पुनरुत्थानाचे दिवशीं भगदाड पडून जशी कातडें काढलेली बकरी लाल लाल दिसते तसाच त्याच्या आंतून लाल लाल रंग दिसून येईल.

जातां जातां (डोळ्यापुढून) लपून[1] जातात; १६. आणि रात्रीची शपथ
कीं, जेव्हां ती काळोखी होत जाते; १७. आणि सकाळची शपथ कीं,
जेव्हां ती फटफटीत होते. (सारांश,मला या सर्व वस्तूंची शपथ आहे);१८.
कीं, हें (कुराण) सन्माननीय दूता(म्हणजे 'जिब्रील')नें पोहोंचविलेला
निरोप होय; १९. (व तो प्रकटीकरणाचें भारी ओझें उचलण्याची)
ताकद बाळगितो, (आणि) महासिंहासनाधीश(परमेश्वरा)समीप त्याचा
मोठा दर्जा होय; २०. (व) तेथें तो (दूतांचा) सरदार (व) प्रामाणिक
होय. २१. आणि (हे 'मक्के'च्या लोकांनों!) तुमचा सोबती ('मोहं-
मद,' कांहीं) वेडा नव्हे. २२. आणि निःसंशय त्यानें 'जिब्रील'ला
(आकाशाच्या) निरभ्र क्षितिजावर पाहिलेंहि आहे. २३. आणि तो गैबी
गोष्टींवर लोभ[2] करणाराहि नव्हे. २४. व हें (कुराण) बहिष्कृत केलेल्या
सैतानांच्या[3] (रचिलेल्या) गोष्टीहि नव्हेत. २५. मग तुम्हीं (लोक) कोठें
(बहकले) जात आहां? २६. हें कुराण तर सकल जगांच्या लोकांसाठीं
उपदेशच (उपदेश) होय; २७. (पण) तुमच्यांतून जो कोणी सरळ राहूं
इच्छील त्यालाच (उपयोगी होय). २८. आणि परमेश्वर जो सकल जगांचा
पालनकर्ता त्यानें इच्छिल्याशिवाय[4] तुम्हीं कांहींच इच्छूं शकत नाहींत.२९.

(१) हा वृत्तांत खगोलशास्त्रासंबंधानें आहे कीं, शनि, बृहस्पति, मंगळ, शुक्र व बुध हीं पांच नक्षत्रें अशीं आहेत कीं, चालतां चालतां उलटून मागें हटूं लागतात व देखतां देखतां लपून जातात. मागें हटणें व लपून जाणें या फार विलक्षण गोष्टी होत.

(२) हजरत पैगंबरसाहेबांस प्रकटीकरणद्वारें जें कांहीं कळविलें जात होतें तें ते जशाचें तसेंच सर्वांस पोहोंचवीत असतात.

(३) येथें पैगंबरीस न मानणाऱ्यांच्या कल्पनेचें खंडन करण्याचा हेतु दिसतो. कारण ते लोक ह्मणत होते कीं, पैगंबर हे ज्योतिषि किंवा मांत्रिक आहेत व त्यांनीं जिन्न–दैवतांस वश करून घेतलें आहे व ते गैबी बातम्या यांना येऊन सांगतात.

(४) मनुष्य जें योजितो तें नेहमींच होत नसतें. कारण, सर्व इच्छा परम समर्थ परमेश्वराच्या सर्वांकुश इच्छेच्या अंकित आहेत. शिवाय कधीं कधीं जें कांहीं होतें तें त्याच्याच इच्छेनुरूप होत असतें. त्याची इच्छा व संकल्पावांचून कांहींच शक्य नाहीं.

# अध्याय ८२ वा.

## सूरतुल्-इन्फितार.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत १९ महावाक्यें आहेत. पहिल्या महावाक्यांत आलेल्या 'इन्फितार' या क्रियापदाच्या रूपावरून हें नांव झालें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों)**

**जेव्हां आकाश फाटून जाईल; १. व जेव्हां तारे झडून पडतील. २. व जेव्हां समुद्रास (त्याच्या मूळजागेवरून उचलून दुसरीकडेस)**

---

(१) पुनरुत्थानाचें येणें कुराणांत अनेक चिन्हांनीं प्रदर्शित केलें गेलें आहे. उदाहरणार्थः—प्रचंड भूकंप, पर्वतांचें उडत उडत फिरणें व टक्कर खाऊन चकनाचूर होणें, समुद्रांचें व नद्यांचें ऊतु जाऊन आपल्या मर्यादेबाहेर वाहूं लागणें, तारे झडून पडणें, चंद्र व सूर्यांचें निस्तेज व मंद पडणें वगैरे; वगैरे. आधुनिक काळीं ज्योतिर्विद्येनें फारच प्रगति केली आहे व मोठमोठया लांबच्या पल्ल्याच्या दुर्बिणी निघाल्या आहेत कीं, जेणें करून हजारों कोसांच्या अंतरावरील वस्तु जणूं जवळच ठेवलेल्या आहेत अशा दिसून येतात. तर आधुनिक शोधाचा परिणाम हा होय कीं, आकाशमंडळांतील सर्व ग्रह मोठमोठे गोळे आहेत आणि घागरीपुढें मोहरीचा दाणा तशी त्यांतील एका ग्रहापुढें पृथ्वी आहे. शिवाय अशीहि कल्पना आहे कीं पृथ्वीच्या प्रमाणें तेथेंहि वस्ती आहे. परमेश्वरानें सर्व ग्रहांत आकर्षण शक्ति ठेविली आहे; म्हणून ते सर्व आपआपल्या कक्षेत फिरत राहतात. या गोष्टी जेव्हां पुनरुत्थानाच्या चिन्हांशीं मिळवून पाहिल्या जातात तेव्हां असें दिसून येतें कीं, परमेश्वर ही आकर्षण शक्ति हरण करून किंवा दुसऱ्या कोणा रीतीनें ही सर्व व्यवस्था उलट पालट करून टाकील व हे सर्व एकमेकांशीं टक्कर खातील व अशी प्रचंड आपत्ति उद्भवेल कीं, कोणाहि मनुष्यास तिची कल्पनाहि येणार नाहीं. या वृत्तांतापुढें आगगाडीची कांहींच हकीकत नाहीं. परंतु जेव्हां तिची टक्कर होते तेव्हां सांगतां येत नाहीं अशी आपत्ति कोसळते. पुनरुत्थानाचे वृत्तांतांत एक वृत्तांत हाहि होय कीं, नद्या व समुद्र आपले पाट सोडून देतील; कां तर त्यांत पर्वतांचे तुकडे येऊन

वाहविलें जाईल; ३. आणि जेव्हां थडगीं उखडून टाकिलीं जातील; ४. (तेव्हां) प्रत्येक जीवाला त्यानें जें कांहीं (पारलौकिक सामुग्रीदाखल) पुढें पाठविलें आहे व जें कांहीं (जगांत) मागें सोडिलें[2] आहे तें (प्रत्यक्ष) कळून येईल. ५ हे मानवा! तुला कोणत्या वस्तूनें आपल्या उदार पालनकर्त्याचे सेवेंत उद्धट केलें? ६. कीं, त्यानें तुला बनविलें व (बनविलेंहि तर) फार परिपूर्ण बनविलें आणि तुझीं अवयवें बेताचीं ठेविलीं. ७. (मग) ज्या कोणा आकृतींत इच्छिलें तींत तुझी (म्हणजे तुझ्या अवयवांची) जोडणी केली. ८. तथापि, गोष्ट ही होय कीं, तुम्हीं (मानव लोक) निर्णया(च्या दिवसा)स पाखंड म्हणतां. ९. व खरें पाहतां, तुम्हांवर (आमचे) चौकीदार (तैनातीस) होत; १०. म्हणजे 'किरामनूकातिबीन'[3] हे दूत. ११. जें कांहींहि तुम्हीं करितां तें त्यांस माहीत होत राहतें. १२. निःसंशय, सदाचरणी (लोक) अवश्य सुखलोकांत असतील; १३. व निःसंशय, दुराचरणी (लोक) अर्थात् नरकाग्नींत असतील. १४. (आणि) निर्णयाचे दिवशीं (म्हणजे पुनरुत्थानांत) त्या(नरकाग्नी)त दाखल होतील. १५. व ते त्यापासून गैरहाजीर होऊं शकणार नाहींत. १६. आणि (हे पैगंबरा!) तूं काय समजलास कीं, निर्णयाचा दिवस तो काय? १७. नंतरहि (मी तुला पुन्हां विचारितों कीं,) तूं काय समजलास कीं निर्णयाचा दिवस तो काय? १८. (हा तो दिवस असेल कीं,) ज्या दिवशीं कोणीहि मनुष्य कोणा मनुष्यासाठीं कसलीच सत्ता बाळगिणार नाहीं; आणि अधिकार त्या दिवशीं परमेश्वराचाच असेल. १९.

---

भरतील अथवा टक्करीमुळें पाणी उसळून चोहोंकडे वाहूं लागेल. सारांश, मोठीच आपत्ति होईल. याचा तपशील परमेश्वरालाच माहीत आहे.

(१) थडग्यांच्या उखडून जाण्याचा अर्थ हा कीं, त्यांतील मडीं त्यांतून निघून उभीं राहतील.

(२) एक अर्थ हाहि होऊं शकतो कीं, परमेश्वरानें सांगितलेलें काम करणें किंवा त्यांत टाळाटाळ करणें.

(३) 'किरामन् कातिबीन' याचा मूळ अर्थ सन्माननीय लिहिणारे; म्हणजे माणसांच्या बऱ्यावाईट कर्मांच्या नोंदून ठेवण्यासाठीं जे दोन दूत तैनातीस आहेत ते. हें त्यांचें विशेषण होतें पण आतां त्यांचें नांव पडलें आहे. म्हणून 'किरामन् कातिबीन' शब्द तसाच ठेवून ह्या शब्दाचें आह्मीं येथें भाषांतर दिलें आहे.

# अध्याय ८३ वा.

## सूरतु–त्तत्फीफ.

हा अध्याय हजरत पैगंबर साहेब यांस मक्का सोडून मदिनेकडे जात असतांना वाटेंत प्रकट झाला. कारण कीं, मदिनेकर त्या काळीं मापातोलांत लबाडी करीत असत. यांत ३६ महावाक्यें आहेत. 'मुतफ्फेफीन' म्हणजे मापातोलांत कमी करणारे, याच्या क्रियापदाच्या रूपावरून 'सूरतु–त्तत्फीफ' हें नांव दिलें गेलें आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें ( मी आरंभ करितों).**

**(मापातोलांत) कमी देणारांस (फारच) दुःख होय; १. कीं, लोकांपासून जेव्हां ते मापून घेतात तेव्हां ते पुरें पुरें घेतात; २. आणि जेव्हां ते त्यांना मापून किंवा तोलून देतात, तेव्हां ते कमी देतात. ३. कां यांना या गोष्टीची कल्पना नाहीं कीं, (पुनरुत्थानाचे) महा दिवशीं हे उठवून उभे केले जातील ? ४–५. (व) त्या दिवशीं लोक सकल जगांच्या पालनकर्त्यासमक्ष (कर्मांच्या जाबासाठीं) उभे राहतील ? ६. पाहाहो ! दुराचारी लोकांचे कर्मलेख कैद्यांच्या रजिष्टरांत (नोंदलेले) होत. ७. आणि (हे पैगंबरा !) तूं काय समजलास कीं, कैद्यांचें रजिष्टर तें काय ? ८. (तें एक) पुस्तक होय कीं (वरचेवर) लिहिलें जात असतें. ९, त्या दिवशीं पाखंड म्हणणाऱ्यांस दुःख होय; १०. कीं ते निर्णयाच्या दिवसाला पाखंड जाणतात. ११. आणि (भक्ति-)मर्यादेचे उल्लंघन करणारा (व) पापिष्ट अशा(इसमा)शिवाय (दुसरा) कोणीच त्यास पाखंड जाणीत नाहीं; १२. कीं जेव्हां त्याला आमचीं महावाक्यें वाचून ऐकविलीं जातात तेव्हां तो म्हणतो कीं, (ह्या) पूर्वीच्या लोकांच्या**

(१) रजिष्टर इंग्रजी शब्द आहे. परंतु या देशांत ज्यांना ज्यांना ह्मणून कचेऱ्यांशीं कांहीं संबंध आहे, ते सर्व त्यास जाणतात व समजतात ह्मणून आम्हीं भाषांतरांत रजिष्टर शब्द वापरला आहे.

भाकडकथा होत. १३. (भाकडकथा) नव्हेत; किंबहुना (गोष्ट ही होय कीं) यांच्या अतःकरणांवर यांनीं जीं (वाईट) कर्में केलीं आहेत त्यांचाच जंग बसून गेला आहे. १४. पाहाहो ! हेच (लोक होत कीं, जे) त्या दिवशीं आपल्या पालनकर्त्यापासून आवरणांत ठेविले जातील;१५. मग हे लोक अवश्य नरकांत दाखल होतील. १६. नंतर (त्यांना) बजाविलें जाईल कीं, हीच तर ती (वस्तु) होय कीं जिला तुम्हीं (जगांत) पाखंड समजत होतां. १७. पाहाहो ! सदाचरणी लोकांचे कर्मलेख उच्चपदाच्या लोकांच्या रजिष्टरांत (नोंदलेले) होत. १८.आणि(हे पैगंबरा !) तूं काय समजलास कीं, उच्च पदाच्या लोकांचें रजिष्टर तें काय? १९. (तें एक) पुस्तक होय कीं, (वरचेवर) लिहिलें जात असतें. २०. (आणि) जवळ केलेले (दूत) त्यावर तैनातीस असतात. २१. निःसंशय सदाचरणी (लोक पुनरुत्थानाचे दिवशीं मोठ्या) सुखांत असतील. २२. ते तक्तांवर (बसून स्वर्गाची मौज) पाहत असतील. २३. (हे वाचक-श्रोत्या !) तूं (त्यांना पाहशील तर) आनंदाची टवटवी त्यांच्या चेहऱ्यावरून (साफ) ओळखून घेशील. २४. त्यांना मोहोरबंद शुद्ध मद्य पाजलें जाईल. २५. कीं ज्या(च्या बाटली)ची मोहोर कस्तुरीची असेल. आणि ईर्षा बाळगणारांस पाहिजे कीं, त्यांनीं ह्याचीच ईर्षा बाळगावी. २६. आणि त्या (मद्यां)त 'तस्नीम'(च्या पाण्या)चें मिश्रण असेल. २७. ('तस्नीम,' स्वर्गाचा एक) झरा (होय कीं) ज्यांतून (मुख्यत्वें करून ईश्वरी) सान्निध्य प्राप्त झालेले (लोक) पीतील. २८. निःसंशय पापी लोक (जगांत) विश्वासूंस हंसत होते. २९. आणि जेव्हां ते त्यांच्या जवळून जात येत तेव्हां ते त्यांना डोळे मिचकावीत. ३०. आणि जेव्हां (मुसलमानांपासून) निघून आपल्या घरांदारांकडे जात, तेव्हां परतून(यांच्या संबंधानेंच)ते अभद्र गोष्टी करीत. ३१. आणि जेव्हां ते यांना पाहात असत तेव्हां ते (बिनधडक) बोलत सुटत कीं, अर्थात् हेच ते बहकलेले (लोक) होत.३२. व वास्तविक पाहतां,यांना मुसलमानांवर रक्षक म्हणून पाठविलें गेलें नाहीं. ३३. तर आज (परलोकीं) मुसलमान नास्तिकांवर हंसतील; ३४. (आणि) तक्तांवर (बसून स्वर्गाची मौज) पाहत असतील. ३५. (आतां तर) नास्तिक जीं कृत्यें करीत होते त्यांचा मोबदला त्यांना मिळाला ना? ३६.

# अध्याय ८४ वा.

## सूरतुल्–इन्शिक़ाक्.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत २५ आयात–महावाक्यें आहेत. पहिल्या वाक्यांत आलेल्या 'इन्शिक़्त' शब्दाच्या 'इन्‌शिक़ाक' या क्रियापदाच्या रूपावरून हें नांव पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

जेव्हां आकाश (ईश्वराज्ञेनें) फाटून जाईल; १. आणि आपल्या पालनकर्त्याची (ही) आज्ञा बजावील; व (कां बजावूं नये ? कीं हें) त्याचें कर्तव्य होय. २. आणि जेव्हां (ईश्वराज्ञेनें) जमीन (त्यावरील उच्चनीच प्रदेश सारखे करून बिछायतीप्रमाणें) ताणिली जाईल; ३. आणि (खजीने व मढीं ) जीं (कांहींहि) तींत असतील तीं (सर्व) ती बाहेर टाकून देईल व रिती होऊन जाईल; ४. आणि आपल्या पालनकर्त्याच्या (ह्या) आज्ञा बजावील व (कां बजावूं नये ? कीं हें) तिचें कर्तव्य होय. (ह्या गोष्टी जेव्हां घडून येतील तेव्हां पक्कें जाण कीं पुनरुत्थान आलें). ५. हे मानवा ! तूं काबाडकष्ट करीत (असेंच) राबत राबत आपल्या पालनकर्त्याकडे चालला जात आहेस; मग (एका ना एका दिवशीं) तूं त्याला जाऊन भेटशील. ६. तर (त्या दिवशीं) ज्याला त्याचा (कर्म–) लेख त्याच्या उजव्या हातांत दिला जाईल; ७. त्याचा सोपासा हिशोब घेतला जाईल; ८. व तो (हिशेबांतून मुक्त होऊन) हर्षभरित आपल्या कुटुंबाकडे परत येईल. ९. आणि ज्याला त्याचा (कर्म–) लेख त्याच्या पाठीमागून दिला जाईल; १०. तो मृत्यूची प्रार्थना करील. ११. व नरकाग्नींत जाऊन दाखल होईल. १२. हा (तो मनुष्य होय कीं जो) आपल्या बायकां(पोरांबरोबर जगां)त मग्न

(राहात) होता; १३. तो ही कल्पना करीत होता कीं त्याच्या (प्रस्तुत) स्थितींत कोणाहि प्रकारचें स्थित्यंतर होणार नाहीं. १४. (पण स्थित्यंतर तर) व्हावयाचें होतें; (व तें झालें). त्याचा पालनकर्ता त्याला (दुष्कर्में करितांना) पाहात होता. १५. तर मला संधिप्रकाशाची[1] शपथ; १६. व रात्रीची व ज्यांवर ती आच्छादिते त्यांची; १७. आणि चंद्राची कीं जेव्हां तो परिपूर्ण होतो; १८. कीं तुम्हीं लोक (अशाच प्रकारें) एका दर्जावरून दुसऱ्या दर्जावर[2] चढत जाल. १९. तर या(नास्तिकां)स काय(झालें)आहे कीं ते विश्वास धरीत नाहींत? २०. आणि जेव्हां यांच्यासमक्ष कुराण वाचिलें जातें तेव्हां ते (परमेश्वरापुढें) साष्टांग नमस्कार घालीत नाहींत? २१. किंबहुना, (हे) नास्तिक लोक (उलट त्यास) पाखंड ह्मणतात. २२. आणि जसजसे विचार (हे लोक आपल्या) मनांत बाळगितात ते परमेश्वरास पक्के माहीत आहेत. २३. तर (हे पैगंबरा!) यांना दुःखकारक शिक्षेचें शुभवर्तमान ऐकवून टाक. २४. पण (होय), ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्यासाठीं अपरंपार मोबदला होय. २५.

(१) सूर्यास्तानंतर आकाशावर जी लाली दिसून येते तिला अरबी भाषेंत 'शफक्' म्हणजे संधिप्रकाश असें ह्मणतात.

(२) ह्मणजे मनुष्याच्या अनेक पायऱ्या व दर्जे असतात.एकेकाळीं तो माती होता व मग तो वनस्पतीच्या रूपांत आला व मनुष्याचा आहार झाला. नंतर वीर्यबिंदु होऊन आईच्या पोटांत राहिला. मग मानवरूपांत निर्माण झाला; मुलापासून तरूण झाला, वृद्ध झाला व मरून गेला. एकेकाळापर्यंत 'बरज़ख' ह्मणजे अधोलोकांत राहिला. नंतर पुनरुत्थानांत त्याच्या आयुष्याचा शेवटचा निकाल होऊन जाईल, कीं स्वर्गवासी आहे किंवा नरकवासी. सारांश प्रथम निर्माण होण्यापासून मृत्यूपर्यंत व मृत्यूपासून शेवटच्या निर्णयापर्यंत माणसाला अनेक पायऱ्या व दर्जे पार करावे लागतात.

# अध्याय ८५ वा.

## सूरतुल्-बुरूज.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत २२ आयात—महावाक्यें आहेत. पहिल्याच वाक्यांतील 'बुरूज' शब्दावरून हें नांव पडलें. 'बुरूज' हें 'बुर्ज' शब्दाचें अनेकवचन आहे; म्हणून ज्यांत सर्व राशी मोडतात तें राशीमंडळ किंवा राशीचक्र असा अर्थ घ्यावयाचा आहे. परंतु येथें बुर्ज म्हणजे घुमट हा अर्थ उद्दिष्ट दिसतो.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**आकाश ज्यांत घुमट आहेत त्याची शपथ; १. (व) ज्याचें अभिवचन आहे त्या (पुनरुत्थानाच्या) दिवसाची (शपथ); २. आणि साक्षीदारांची (शपथ) व ज्याची साक्ष दिली जाते त्याची (शपथ); ३. कीं, (ते) खंदकवाले ठार केले गेले. (तसेच सरशेवटीं हे नास्तिकहि ठार होतील). ४. (ते खंदक) अग्नी(चे होते) कीं, ज्यांत (तत्कालीन मुसलमानांस जाळण्यासाठीं त्यांनीं पुष्कळसें) इंधन (झोंकून ठेविलें) होतें. ५. त्या समयीं ते खंदकांवर बसलेले होते; ६. आणि जो (जुलूम) ते मुस-**

(१) भाष्यकारांनीं 'शाहिद' व 'मशहूद्' या शब्दांच्या अर्थांत पुष्कळ मतभेद केला आहे. कित्येकांनीं 'जुमा'—शुक्रवारच्या दिवसाला 'शाहिद' व 'अर्फा'—हज्जच्या आदला दिवस ह्मणजे 'मश्हूद' असें ह्मटलें आहे. कित्येकांनीं दोहोंला मश्हूद व लोकांना शाहिद म्हटलें आहे. कित्येक लोक माणसाच्या अवयवांस 'शाहिद समजले; कांकीं ते लोकांच्या कर्मांची साक्ष देतील व लोकांना 'मशहूद' म्हटलें आहे. कित्येक म्हणतात कीं, 'शाहिद' म्हणजे पैगंबर कीं जे आपल्या जनतेची साक्ष देतील व 'मश्हूद' ह्मणजे त्यांची जनता कीं जिची साक्ष दिली जाईल.

लमानांवर करीत होते (त्याचा तमाशा) ते प्रत्यक्ष पाहत होते. ७.आणि ते मुसलमानांशीं एवढ्याच गोष्टीवर चिडले कीं, त्यांनीं परमसमर्थ (व) सुस्तुत्य अशा परमेश्वराचा विश्वास धरिला; ८. (कीं, जो असा (परमसमर्थ) होय कीं, आकाशांचे व पृथ्वीचें राज्य त्याचेंच होय. आणि (या शिवाय तो) परमेश्वर सर्वसाक्षीहि होय. ९. निःसंशय ज्या लोकांनीं मुसलमान पुरुष व मुसलमान स्त्रियांचा छळ केला व मग पश्चात्ताप केला नाहीं; त्यांना 'जहन्नम'–नरकाच्या (तऱ्हे तऱ्हेच्या) शिक्षा होतील. आणि (या शिवाय) त्यांना (मुख्यत्वेंकरून)जळण्याची शिक्षाहि होईल. १०. अर्थात् ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं त्यांच्या-साठीं (स्वर्गाच्या) अशा बागा होत कीं, ज्यांच्याखालून (पाण्याचे) पाट वाहत असतील. हें होय मोठें साफल्य. ११. (हे पैगंबरा !) निःसंशय तुझ्या पालनकर्त्याची पकड फारच सक्त (पकड) होय. १२. तोच पहिल्यांदा (पैदा) करितो व (तोच पुनरुत्थानांत) पुन्हांहि करील. १३ आणि तो क्षमाकर्ता (व) ममताळू, १४. (आणि) महासिंहासनाधीश (व) प्रतापशाली होय. १५. तो जें योजितो तें हटकून करितो. १६. (हे पैगंबरा !) बरें, (ईश्वराच्या शत्रूंच्या) सैन्यांचा अहवालहि तुजपावेतों पोहोंचला आहे ना ? १७. (म्हणजे) 'फिरऔन' व 'समूद' यांचा ? १८. (होय ! तूं लोकांस तो ऐकवितोसहि). परंतु नास्तिक हे (कुराणास) पाखंड म्हणण्यांत (लागून) आहेत. १९. आणि परमेश्वर त्यांना सर्व बाजूंनीं घेरून आहे.२० (यांच्या पाखंड म्हणण्यानें होतें काय ? तें भलतें सलतें पुस्तक नव्हे;) तर हें महनीय कुराण होय. २१. (व तें आमच्या येथें) सुरक्षित पत्रक ('लौहे–महफूज')मध्यें (हुबेहूब लिहिलेलें)आहे. २२.

(२) एक मूर्तीपूजक राजा आपल्या प्रजेस मूर्तीपूजा करण्यास बळेंच भाग पाडीत होता; येथपर्यंत कीं, त्यानें एक खंदक खणवून त्यांत अग्नि पेटविला व लोकांस गोळा करून त्यांस आज्ञा केली कीं, मूर्तीपुढें नमस्कार घाला. ज्यानें ज्यानें नाकारलें त्याला धरून अग्नींत झोंकून दिलें; तो हा जुलूम करीतच होता कीं, स्वतः त्याला व त्याच्या अमीरउमरावांस अग्नि येऊन लागला व सारेचे सारे जळून भस्म झाले.

# अध्याय ८६ वा.

# सूरतु--त्तारिक्.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत १७ आयात—महावाक्यें आहेत. यांतील पहिल्या वाक्यांत आलेल्या 'तारिक' शब्दावरून हें नांव पडलें. एके रात्रीं हजरत मोहंमद पैगंबर—सल्लल्लाहो अलैहे व सल्लम—परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो-हे आपले चुलते अबु—तालिब यांजजवळ बसलेले होते;कीं एकाएकीं एक तारा चकाकला व त्यांतून एक मोठी ज्वाला प्रदिप्त झाली. अबु-तालिब भिवून विचारूं लागले कीं, हें काय आहे ? हजरत पैगंबरसाहेब ह्मणाले कीं, हा एक तारा आहे कीं जो आकाशांतून असुरांस हांकून लावितो; याशिवाय परमेश्वरी सामर्थ्याची ही एक मोठी निशाणी आहे. इतक्यांत हजरत जिब्रील दूत हा अध्याय घेऊन आले.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचें नांवानें (मी आरंभ करितों.)**

**आकाशाची शपथ व रात्रीं येणाराची (शपथ); १. आणि (हे पैगंबरा !) तूं काय समजलास कीं रात्रीं येणारा (म्हणजे) काय ? २. (तो) चकाकणारा तारा (होय). ३. (सारांश, मला आकाशाची व ताऱ्याची शपथ;) कीं, कोणीहि मनुष्य असा नाहीं कीं, ज्याच्यावर (आम्हांकडून) चौकीदार (म्हणजे 'किरामन् कातिबीन' दूत तैनातीस)**

---

(१) भाष्यकारांनीं चकाकणारा तारा म्हणजे साधारण तारा असा अर्थ घेतला आहे. कित्येकांनीं खासखास ताऱ्यांचीं नांवें दिलीं आहेत; व कित्येक त्याला कृत्तिका नक्षत्र म्हणतात.

(२) चौकीदार म्हणजे जे दूत मनुष्याच्या संरक्षणासाठीं परमेश्वराकडून त्याच्या संगतीं तैनातीस असतात ते; व त्यांना 'किरामन् कातिबीन'हि म्हणतात.

नसतील. ४. तर मनुष्यास पाहिजे कीं, (फार नाहीं, त्यानें एवढें तरी) पाहावें कीं, त्याला कोणत्या वस्तूंतून निर्माण केलें गेलें आहे ? ५. त्याला निर्माण केलें गेलें आहे पाण्यांतून (म्हणजे वीर्यबिंदूंतून) कीं, जें उचंबळून, ६. पाठींतून व उराच्या हाडांमधून निघतें. ७. निःसंशय परमेश्वर (माणसाच्या मरणोत्तर) त्याला परतविण्या(म्हणजे पुनरपि निर्मिण्या)सहि समर्थ होय. ८. ज्या दिवशीं (लोकांच्या मनांतील) गुप्त भेद पडताळून पाहिले जातील; ९. (त्या दिवशीं) माणसाचा कांहीं जोर (चालणार) नाहीं व (त्याचा) कोणी मदतगारहि होणार नाहीं. १०. पाणी वर्षविणाऱ्या आकाशाची शपथ. ११. आणि जमीन जी (अंकूर फुटतांना) भेगलून जाते तिची शपथ; १२. कीं, निःसंशय, (कुराण) हें एक निर्णायक वचन होय; १३. ती कांहीं मस्करी (ची पोंचट गोष्ट) नव्हे. १४. निःसंशय, हे (नास्तिक तर आपले) डावपेंच लढवीत आहेत; १५. आणि मी (आपले) डावपेंच करीत आहे, १६. तर (हे पैगंबरा ! या) नास्तिकांस अवसर दे; (आणि फार नव्हे तर) यांना थोडासाच अवकाश दे. १७.

---

(१) हिपोक्रेटीस जो मोठा ग्रीक तत्ववेत्ता व वैद्यविद्याशिरोमणी होऊन गेला आहे, त्याचें मत असें आहे कीं, वीर्य, पुरुषाचें असो किंवा स्त्रीचें, मेंदूतून पैदा होतें व मग कानांमागील दोन शिरामधून पाठीच्या कण्यांत येतें; मग यकृतांतून दोन शिरा निघतात त्यांत येतें व तेथून मूत्राशयांत; व अखेर परंपरेनें स्त्रीपुरुष्यांच्या गुह्यभागांत. सारांश, वीर्याचा सारा मार्ग पाठींतून व उराच्या हाडांमधून असतो. जास्त तपशिलास्तव वैद्यकीचे ग्रंथ पाहा.

(२) म्हणजे लोकांच्या बऱ्यावाईट उद्देशांत व बुद्धींत असलेला फरक पाहिला जाईल.

(३) अरबींत 'रजअ' म्हणजे पर्जन्य किंवा पाणी वर्षविणें असाहि अर्थ होतो; कारण, पर्जन्य आपल्या ऋतूच्या वेळीं पुन्हां पुन्हां होत असतो. कांहीं भाष्यकारांनीं 'रजअ' म्हणजे पर्यटन असा अर्थ घेतला आहे.

(४) तें इस्लामाच्या विरोधासाठीं खटपट करतात व आह्मीं त्यास फशीं पाडितों व साधूं देत नाहीं.

(५) म्हणजे त्यांच्या शिक्षेची घाई करूं नका.

# अध्याय ८७ वा.

## सूरतुल्–आअ़ला.

हा अध्याय मक्का शहरीं प्रगट झाला यांत १९ महावाक्यें आहेत. या अध्यायांत आलेल्या 'आअला' म्हणजे अति महिमाशाली, या शब्दावरून हें नांव झालें.

**परम दयाळू(आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).**

**(हे पैगंबरा !) तूं आपल्या अति महिमाशाली पालनकर्त्याच्या नांवाची पवित्रता वर्णन कर; १. कीं ज्यानें (सर्व सृष्टीला) निर्मिलें व (फारच) परिपूर्ण बनविलें; २. आणि ज्यानें (प्रत्येक वस्तूचा उद्देश व मर्यादा यांचा) अंदाज ठरविला व (त्याला त्या) मार्गास लावून दिलें. ३. आणि ज्यानें (हिरवा हिरवा) चारा (जमिनींतून) काढिला. ४. मग (शेवटीं) त्याचा काळाकाळा चुरा करून टाकिला ५. (हे पैगंबरा !) आम्हीं तुला (अशा उत्तम प्रकारें कुराण) पढवूं कीं, तूं (तें) विसरणार नाहींस. ६. परंतु (एखाद्या महावाक्याला) परमेश्वरच**

---

(१) म्हणजे परमेश्वरानें प्रत्येक मनुष्यांत एकएका विशिष्ट प्रकारची योग्यता देऊन ठेविली आहे. त्या प्रमाणें त्याला प्रत्येक कामाची बुद्धि निसर्गतःच उत्पन्न होते व त्याच्या मनाचा कलहि तिकडेच असतो व त्याप्रमाणें तो आचरण करितो.

(२) हा मजकूर दुसरे जागींहि आलेला आहे कीं जिब्रील दूत जेव्हां वह्य म्हणजे प्रकटीकरण आणीत तेव्हां हजरत पैगंबर साहेब हौसेनें व चुकूं नये म्हणून जिब्रीलच्या संगतीं संगतीं वाचूं लागत असत; ह्यानें प्रकटीकरणांत घोंटाळा होण्याचा संभव होता. ह्मणून परमेश्वरानें हजरत पैगंबर साहेबांस आज्ञा केली कीं तुह्मीं मन लावून ऐकत जा. प्रकटीकरणाचें याद राखणें तुमचें काम नाहीं. आह्मीं तें तुमच्या मनांत असें ठसवून देऊं कीं तुह्मीं तें कधींच विसरणार नाहीं.

(भुलवूं) इच्छील (तर ती गोष्ट निराळी). खरोखरच परमेश्वर मोठ्यानें ओरडून वाचण्यालाहि जाणतो व हळुहळु वाचण्यालाहि (जाणतो). ७. आणि सोप्या (इस्लामधर्मा)वर (दृढ राहणेंहि) आम्हीं तुला सुलभ करूं. ८. तथापि जर उपदेश करणें फलद्रुप होईल तर (लोकांस) तूं उपदेश करीत राहा. ९. जो कोणी (परमेश्वराला) भितो तो तर लवकर समजून जाईल. १०. आणि अति दुर्भागी (मनुष्य) तर त्याकडून अंग काढीतच राहील. ११. कीं तो (शेवटीं) मोठया (सक्त) अग्नी (म्हणजे नरकां)त पडेल. १२. मग तेथें त्याला मरणहि येणार नाहीं व तो (सुखानें) जिवंतहि राहणार नाहीं. १३. खरोखर जो कोणी (नास्तिकपणा व मूर्तिपूजेच्या दुर्गंधापासून) शुचिर्भूत राहिला; आणि आपल्या पालनकर्त्याचें नामस्मरण करीत व नमाज पढीत राहिला तो (आपल्या मनोरथांत मनस्वी) सफल होऊन गेला. १४–१५. परंतु तुम्हीं लोक इहलौकिक आयुष्यास पसंत करितां, १६. व वास्तविक पाहतां परलोक (इहलोकापेक्षां) फारच उत्तम व चिरस्थायी होय. १७. हीच गोष्ट तर प्राचीन पुस्तकांत, १८. (म्हणजे) 'इब्राहीम' व 'मूसा' यांच्या पुस्तकांतहि होय. १९.

## अध्याय ८८ वा.

# सूरतुल–ग़ाशियः

हा अध्याय मक्केंत प्रगट झाला. यांत २६ आयात–महावाक्यें आहेत याचें नांव 'ग़ाशियः' म्हणजे सर्वत्र आच्छादणारी अशी जी पुनरुत्थानाचा आपत्ति तीवरून पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों)

(हे पैगंबरा!) तुला त्या(आपत्ति म्हणजे पुनरुत्थाना)ची गोष्टहि पोहोंचली आहे कीं जी (साऱ्या जगावर) आच्छादील? १ कित्येक (लोकांचीं) तोंडें त्यादिवशीं उतरलेलीं असतील. २. (आणि ते लोक तऱ्हेतऱ्हेचे) परिश्रम करीत असतील (व श्रमानें) थकून (चूर होऊन) राहतील; ३. (हे लोक नरकाच्या) धगधगीत अग्नींत दाखल होतील. ४. (व) यांना एका उकळत्या झऱ्याचें पाणी पाजलें जाईल. ५. कांट्या-शिवाय आणखी कांहीं आहार यांना (मिळणार) नाहीं; ६. कीं ज्या (ऱ्या खाण्या)नें शरीरहि पुष्ट होणार नाहीं व भूकहि भागणार नाहीं. ७. कित्येक (लोकांचीं) तोंडें त्यादिवशीं प्रफुल्लित असतील. ८. (ते जगांत जे पुण्यप्रयत्न करून आले आहेत त्या) आपल्या प्रयत्ना(च्या परिणा-मा)शीं (फार) संतुष्ट असून, ९. अत्युच्च स्वर्गांत असतील; १०. कीं तेथें कोणतीहि निरर्थक गोष्ट त्यांच्या कानांत पडणार नाहीं. ११. त्यांत झरे वाहत असतील. १२. त्यांत उंच उंच तक्त (हांतरलेले), १३. आणि (पाण्याचे) जांब ठेवलेले, १४. व लोडगाद्या एका रांगेनें लावलेल्या असतील. १५. आणि उत्कृष्ट जाजमें अंथरलेलीं असतील १६. तर कां लोक उंटांकडे पाहत नाहींत कीं कसे (विलक्षण) पैदा केले गेले

---

(१) आम्हीं 'दरीअ' या शब्दाचा अर्थ कांटे केला आहे. हें एक प्रकारचें झुडुप आहे व तें पाण्याच्या कांठी पैदा होतें. हिरवें असतें तोंपर्यंत त्याला 'शबरक' म्हणतात. त्याचा मराठी अपभ्रंश सुबक–कांटे सुबक असा आहे. उंट तें चरतातहि. तें जेव्हां शुष्क होतें तेव्हां कांटेच कांटे राहून जातात व ते विषारीहि होऊन जातें. कोणताहि प्राणी त्याला तोंड लावीत नाहीं व त्यावेळीं त्याचें नांव 'दरीअ' असें होतें. ही या जगांतील 'दरीअ'ची स्थिति आहे. मग नरकाच्या 'दरीअ' पासून तर परमेश्वरच वांचवो!

(२) उंट, आकाश, पर्वत वगैरे यांच्या अवलोकनानें खचितच ईश्वरी सामर्थ्य प्रगट होतें. त्याच्याच परम सामर्थ्यापैकीं एक पुनरुत्थानहि होय; व तें घडून येणें कर्मांच्या हिशेबासाठीं आवश्यक आहे. हिशेबाचा परिणाम हा कीं, एक पक्ष स्वर्गांत व एक पक्ष नरकांत जाईल. या दोहोंचा अहवाल या अध्यायाच्या आरंभीं आलेलाच आहे.

आहेत? १७. आणि आकाशाकडे कीं तें कसें उंच उभारलें गेलें आहे? १८. आणि पर्वतांकडे कीं ते कसे उभे केले गेले आहेत? १९. आणि भूमीकडे कीं ती कशी पसरली गेली आहे? २०. तर (हे पैगंबरा! तूं लोकांस) उपदेश कर. (व) तूं तर (फक्त) उपदेश करणारा आहेस एवढेंच. २१. तूं त्यांच्यावर कांहीं दरोगा नव्हेस. २२. पण जो कोणी तोंड फिरविल व नाकारील; २३. तर परमेश्वर त्याला (परलोकीं) मोठी शिक्षा देईल. २४. निःसंशय, या (सर्वां)स आम्हांकडेच परतून येणें आहे. २५. तदनंतर यांचे हिशेब घेणेंहि आमचेंच काम होय. २६.

# अध्याय ८९ वा.

## सूरतुल्–फज्र्.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ३० महावाक्यें आहेत. यांत आलेल्या पहिल्याच 'फज्र्' या शब्दावरून हें नांव दिलेलें आहे.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों).

सकाळची शपथ, १. व दहा रात्रींची (शपथ), २. आणि बेकी व एकीची (शपथ), ३. आणि रात्रीची (शपथ), कीं जेव्हां ती लोटत जाते; ४. बुद्धिमानांजवळ तर ह्या(गोष्टीं)त भारी (महत्वाच्या)

(१) दहा रात्रींचा अर्थ 'बकर-ईद'च्या दहा रात्री असा आहे; अथवा मोहरमच्या पहिल्या दहा रात्री किंवा रमजान महिन्याच्या शेवटच्या दहा रात्री कीं ज्यांत 'शबेकद्र' म्हणजे महारात्र किंवा महत्वाची रात्र होते.

**शपथा होत. (कांहीं झालें तरी, मला सकाळ वगैरेंची शपथ होय कीं कर्मांचा हिशेब अवश्य होणार आहे). ५. (हे पैगंबरा !) कां तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं तुझ्या पालनकर्त्यानें 'आद'(च्या लोकां)शीं कसें (काय वर्तन) केलें ? ६. (म्हणजे) 'इरमे'(चे वंश कीं जे**

---

(१) परमेश्वरानें कुराणांत अनेक जागीं अनेक वस्तूंच्या शपथा वाहिल्या आहेत; व त्या सर्वच आपापल्यापरीनें भारी (महत्वाच्या) शपथा होत. कारण, या शपथांनीं, परमेश्वराचें अस्तित्व, त्याचे एकत्व, त्याचें सामर्थ्य त्याच्या वचनांची परिपूर्णता, पुनरुत्थानाचें घडून येणें व अशाच प्रकारच्या इतर गोष्टींसंबंधानें सिद्धांत करितां येतो. पण कित्येक जागीं ह्या भारी शपथा आहेत असें सांगितलें व कित्येक जागीं कांहींच सांगितलें नाहीं. तरीहि ह्या शपथा भारी आहेत हें मात्र खरें. कारण, सकाळचा वेळ जगांत एक मोठा उत्क्रांतिकारक वेळ असतो. त्याला पुनरुत्थानाचा नमुना म्हणतां येईल. कां कीं, रात्रीच्या समयीं सर्व जग जणूं मरून पडलें होतें; व सकाळीं सर्वांत एकदम जीव पडला व ते चालूं फिरूं लागले. ह्याचप्रमाणें 'बकर-ईद'च्या दहा रात्रींत 'अरफात'च्या मैदानांत हज्ज–यात्रा करण्यासाठीं लक्षावधि लोकांचें एकत्र गोळा होणें हाहि पुनरुत्थानाचा नमुना होय. मोहरमच्या पहिल्या दशकांत बनी-इस्राएलांची फिरऔनापासून सुटका झाली; बनी-इस्राएलांसाठीं तेंहि एक पुनरुत्थान किंवा पुनरुज्जीवन होतें. एकीबेकी यांतहि पुनरुत्थानाकडे इषारत आहे कीं, त्या दिवशीं प्रत्येक आत्मा आपल्या शरीराशीं जोडला जाईल 'रात्र कीं जेव्हां ती लोटत जाते' ह्मणजे उत्तररात्र, ती सकाळची प्रस्तावना असते; व मोठा शुभ व प्रासादिक वेळ असतो. तात्पर्य, विचार केल्यानें अशा पुष्कळ गोष्टी निष्पन्न होतात कीं, ज्यांनीं हें शाबिद होतें कीं, ह्या खरोखरींच भारी शपथा होत.

(२) आद, हें हजरत नूहच्या पांचव्या पिढीच्या नातूचें नांव होय. तें असें:–नूहचा पुत्र साम, सामचा पुत्र इरम, इरमचा पुत्र औस, आणि औसचा पुत्र आद, मग आदचा वंश आद म्हणवूं लागला. यांच्याकडे हजरत हूद हे पैगंबर आले होते. त्यांनीं हूदचा आज्ञाभंग केला व ते वावटळीनें नाश पावले; व ज्यांनीं हूदचा विश्वास धरिला होता ते सुरक्षित राहिले. पुढें त्यांची वंशपरंपरा चालली. परंतु जे लोक शिक्षेस बळी पडले ते आदे-ऊला-

स्तंभवत् अशा) उंच बांध्याचे होते; ७. कीं (शारिरीक शक्तीच्या मानानें या जगांतलि) शहरांत कोणीहि (प्राणी) त्यांच्या सारखा पैदा झाला नाहीं. ८. आणि (तसेंच) 'समूद'(च्या लोकां)शीं कीं ज्यांनीं (आपल्या राहण्याची जागा) 'वादिल-कुरा'मध्यें (घरें बनविण्यासाठीं) पर्वतांस (आंतल्या आंतच) कोरून टाकिलें होतें; (त्यांशीं परमेश्वरानें कसें वर्तन केलें) ? ९. आणि (तसेंच) 'फिरऔन' जो मेखां[१] वाळगीत होता त्याशीं (परमेश्वरानें काय केलें) ? १०. हे लोक होत कीं ज्यांनीं शहरांत फार डोकें उचललें होतें; ११. व त्यांत पुष्कळ नासाडी माजवून ठेविली होती. १२. तर (हे पैगंबरा !) तुझ्या पालनकर्त्यानें या(सर्वां)स शिक्षेचा कोरडा फटकारला. १३. निःसंशय तुझा पालनकर्ता (आज्ञाभंजकांच्या) पाळतींत (लागून) आहे. १४. पण मनुष्य (असा होय कीं) जेव्हां त्याचा पालनकर्ता (अशा तऱ्हेनें) त्या(च्या विश्वासा)स कसून पाहतो कीं तो त्याला मानपान व सुख देतो; तेव्हां (तो खुष होऊन) म्हणतो कीं, माझा पालनकर्ता मला मान देतो. १५. आणि जेव्हां तो त्या(च्या विश्वासा)स (अशा प्रकारें) ताडून पाहतो कीं, तो त्याला अन्नसंपत्तीची टंचाई भासवितो; तेव्हां तो (दिलगीर होत्साता) बडबडत (फिरत) असतो कीं माझा पालनकर्ता मला तुच्छ समजतो. १६. परंतु तुमची ही कल्पना चुकीची आहे. किंबहुना

---

पूर्वीचे आद, व जे शिक्षेनंतर झाले ते आदे-सानिया म्हणजे मागाहूनचे आद म्हणवूं लागले. आदे-ऊलाचें एक नांव इरमहि होतें; कारण इरम त्यांचा आजा होता. याशिवाय इरम हें एका शहराचें नांवहि होतें कीं, तें त्यांनीं आपल्या आजाच्या नांवावर वसविलें होतें. राहिला 'जातुल-इमाद' हा शब्द. तर हें आदच्या लोकांचें विशेषणहि होऊं शकतें व इरम शहराचेंहि विशेषण होऊं शकतें. ते लोक मोठे उंच बांध्याचे होते म्हणून त्यांना जातुल-इमाद म्हटलें. अगर त्या शहराच्या इमारतींत स्तंभ पुष्कळ होते म्हणून शहराला स्तंभयुक्त शहर म्हटलें.

(१) म्हणजे त्याच्यापाशीं घोडे बांधण्यासाठीं सोन्याचांदीच्या मेखा होत्या अगर तो लोकांस चार मेखा ठोकून त्यांत शिक्षा देत असे म्हणून त्याला मेखावाला म्हटलें.

तुम्हीं(स्वतः असे कृपण आहां कीं) अनाथांचा आदर करीत नाहींत; १७. आणि गोरगरिबांस भोजन घालण्यासाठीं तुम्हीं एकमेकांस उत्तेजन देत नाहीं. १८. आणि (द्रव्याचे असे लोभिष्ट आहां कीं) तुम्हीं (मेलेल्यांचा) वारसासुद्धां साराचा साराच खाऊन चट करितां. (तरीदेखिल तुम्हांला अद्दल घडत नाहीं)! १९. आणि तुम्हीं द्रव्यास फारच प्रिय ठेवितां. २०. पण (ऐका हो!) ज्या दिवशीं पृथ्वी धक्क्यामुळें चकनाचूर होऊन जाईल; २१. आणि (हे पैगंबरा!) तुझा पालनकर्ता येऊन विराजमान होईल व दूत रांगारांगांनीं (त्याच्यापुढें उभे राहतील); २२. आणि त्या दिवशीं 'जहन्नम'–नरकाग्नि (सर्वांच्या समक्ष) आणून हजर केला जाईल; त्या दिवशीं मनुष्य बोध घेईल. पण (त्या वेळीं) त्याच्या बोध घेण्याचा उपयोग काय? २३. (म्हणजे मनुष्य) म्हणेल कीं, अरेरे! मी आपल्या (या परलोकींच्या) जीवनासाठीं पहिल्यानें (सुकृत्यांची सामुग्री करून) कांहीं पाठविलें असतें तर बरें होतें! २४. तर त्या दिवशीं (परमेश्वर गुन्हेगारांस अशी शिक्षा देईल कीं) त्या सारखी कोणीच शिक्षा दिली नसेल. २५. व (त्यांना असे जखडील कीं) त्यासारखें कोणीच जखडलें नसेल. २६. (आणि ज्या आत्म्याला परमेश्वराकडून शांति होय त्यास सांगितलें जाईल कीं,) हे शांति पावणाऱ्या आत्म्या! २७. आपल्या पालनकर्त्याकडे परत चल; तूं त्याशीं संतुष्ट (व) तो तुझ्याशीं संतुष्ट. २८. मग (परमेश्वर त्याला आज्ञा करील कीं) माझ्या (खास) सेवकांत जाऊन मिळ; २९. व माझ्या स्वर्गांत जाऊन दाखल हो. ३०.

---

(१) मतलब हा कीं, तुमचे स्वभाव लोभिष्ट व लालची आहेत, म्हणून तुम्हीं अन्नसंपत्तीची विपुलता व टंचाईवर मानापमानाची भिस्त ठेवितां; आणि तुम्हीं इतके कृपण आहां कीं, अनाथ व गोरगरीबांची सुद्धां पर्वा बाळगित नाहींत.

(२) अरबी 'दक्क' या शब्दाचा अपभ्रंश मराठींत व हिंदींत धक्का असा झालेला असल्यास नवल नव्हे. आतां पुनरुत्थानांत जमिनीस धक्के कसे पोहोंचतील तें पाहूं. तर हे धक्के पर्वतांच्या आपसांत टक्कर व आदळाआदळी होण्यानें होतील किंवा पृथ्वी ही आकाशमंडळांतील इतर ग्रहांशीं आदळेल. याविषयीं आम्हीं मागें कोठेसें लिहिलें आहे.

# अध्याय ९० वा.

# सुरतुल्-बलद.

हा अध्याय मकेंत प्रकटिलेला असून यांत २० महावाक्यें—आयात आहेत. 'बलद' म्हणजे शहर किंवा नगर यावरून हें नांव पडलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)**

**(हे पैगंबरा!) मी ह्या('मक्का') शहराची शपथ वाहतों; १. आणि (या शहराला हें श्रेय यासाठीं प्राप्त होय कीं,) तूं या शहरांत वसलेला आहेस. २. आणि (तशीच) बाप व त्याची संतति (म्हणजे 'आदम' व त्याची संतति) यांची (शपथ वाहतों कीं,) ३. आम्हीं माणसाला (अशा सृष्टींत) बनविलें आहे (कीं, तो जन्मभर) कष्टांत (राहील). (तर त्यानें गर्व कां म्हणून करावा?) ४. कां तो अशी कल्पना करितो कीं, त्याच्यावर कोणाचाच जोरा चालणार नाहीं? ५. तो (शेखींत येऊन) म्हणतो कीं, मी ढिगांनीं द्रव्य उधळून टाकिलें. ६. कां तो हें समजतो कीं, (उधळपट्टी करितांना) त्याला कोणी पाहिलें नाहीं? ७. कां आम्हीं त्याला(एक सोडून दोन) दोन डोळे, व जीभ व दोन ओंठ दिले नाहींत? (खचितच दिले.) ८–९. आणि त्याला (पाप व पुण्याचे) दोन्हीं मार्गहि दाखवून दिले. १०. तरीहि (त्यानें या देणग्यांच्या उपकारस्तुत्यर्थ)**

(१) मक्का शहरांत एरवींहि पवित्रालय असल्यामुळें तें शुभ होतेंच. तथापि हजरत पैगंबरसाहेबांच्या जन्मामुळें व तेथें त्यांनीं वास्तव्य केल्यामुळें तें आणखीहि जास्तच शुभ झालें. म्हणून परमेश्वरानें हजरत पैगंबर साहेबांची जन्मभूमि व निवासस्थान म्हणजे मक्का शहर याची शपथ वाहिली आहे.

(२) जिभेबरोबर ओंठांचा उल्लेख बहुधा यामुळें आहे कीं, जर ओंठ नसतील तर जीभ आपलें काम करूं शकणार नाहीं.

कड्यांत प्रवेश केला नाहीं. ११. आणि (हे पैगंबरा!) तूं काय समजलास कीं, कडा म्हणजे काय? १२. (कडा म्हणजे एखाद्याची) मान (गुलामगिरींच्या किंवा कर्जाच्या बंदांतून) सोडविणें. १३. अगर भुकेच्या दिवशीं जेवूं घालणें;१४. (मुख्यत्वेंकरून)आप्ताच्या पोरक्या मुलाला, १५. अथवा धुळीवर पडलेल्या एखाद्या गोरगरीबाला. १६. (तर जो उगाच शेखी मिरवितो त्याला पाहिजे होतें कीं,) याशिवाय, ज्यांनीं विश्वास धरिला व एकमेकांस सहनशीलतेची ताकीद करीत राहिले व (तशीच) एकमेकांस (लोकांवर) दया करण्याची ताकीद करीत राहिले त्यांच्यापैकीं झाला असता. १७. हेच लोक (परलोकीं) उजव्या हाताचे सोबती (म्हणजे सुदैवी) असतील; १८. आणि ज्यांनीं आमच्या महावाक्यांस नाकारिलें तेच डाव्या हाताचे सोबती (म्हणजे दुर्दैवी) असतील; १९. कीं, त्यांना नरकाग्नींत टाकून (चोहोंकडून) कडीकोट केला जाईल. २०.

(१) कडा म्हणजे पर्वतांत जी विकट व दुष्कर वाट असते ती होय. ज्या अर्थी एकाद्याची मान सोडविणें अगर पोरक्या मुलास व गोरगरीबांस जेवूं घालणें ह्या गोष्टी धर्मदृष्ट्या बिकट व कठिण आहेत त्या अर्थी या कर्मांस कडा असें म्हटलें आहे.

# अध्याय ९१ वा.

## सूरतु--श्शम्स.

या चें प्रकटीकरण मक्का शहरांत झालें आहे. यांत १५ आयात—महावाक्यें आहेत. यांत पहिल्याच वाक्यांत आलेल्या 'शम्स' म्हणजे सूर्य या शब्दावरून हें नांव झालें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

सूर्याची व त्याच्या चढत्या उन्हाची शपथ, १. आणि सूर्याच्या (मावळल्या) पश्चात जेव्हां चंद्र निघतो त्याची (शपथ), २. आणि दिवसाची (शपथ) कीं, जेव्हां तो सूर्यास प्रगट करितो; ३. आणि

रात्रीची (शपथ) कीं, जेव्हां ती सूर्यास लपवून टाकिते;४. आणि आकाशाची व ज्यानें तें बनविलें त्याची (शपथ); ५. आणि जमिनीची व ज्यानें तिला पसरलें त्याची (शपथ), ६. आणि माणसाची व ज्यानें त्याला नीटनेटकें बनविलें त्याची (शपथ); ७. मग त्यानें त्याचें दुराचरण व त्याचें पवित्राचरण (दोन्हीं गोष्टी) त्याला समजावून दिल्या. ८. (सारांश, आम्हांला यांची शपथ;) कीं, ज्यानें आपल्या आत्म्याला (नास्तिकपणा व अनीतीच्या दुर्गंधापासून) शुचिर्भूत केलें तो अवश्य (आपल्या) मनोरथांत सफळ झाला. ९. आणि ज्यानें त्याला दाबून टाकिलें तो अर्थात् तोट्यांत राहिला. १०. 'समूद'(च्या लोकां)नीं आपल्या शिरजोरीमुळें (आपला पैगंबर 'सालेह' यास) पाखंडी म्हटलें; ११ कीं, जेव्हां त्यांच्यांतून जो अधिकच दुर्दैवी (चंडाळ) होता तो (सांढणीला मारून टाकण्यास) प्रवृत्त होऊन उठला. १२. यावर परमेश्वराचा पैगंबर ('सालेह') यानें त्यांस बजाविलें कीं, (पाहा हो !) परमेश्वराच्या सांढणीला (हात लावूं नका:) आणि तिचें पाणीहि (बंद करूं नका) १३. यावरहि त्या लोकांनीं 'सालेहा'ला पाखंडी म्हटलें व सांढणीला मारून टाकिलें. तेव्हां त्यांच्या पालनकर्त्यानें त्यांच्या पापाबद्दल त्यांचा नाश केला; व सर्वांस (मारून) सारखें (तळपट) केलें. १४. आणि त्यानें यांच्या (ह्या) परिणामाची (किंचितहि) पर्वा केली नाहीं. १५.

---

(१) म्हणजे मनुष्य हेंकडाईनें न मानील तर न मानो; एरवीं परमेश्वरानें त्याचें मनच असें न्यायी बनविलें आहे कीं, तो स्वभावतःच बऱ्यावाईटांत फरक करितो.

(२) दाबून टाकणें म्हणजे त्याच्या दोषांची सुधारणा केली नाहीं; तर उलटपक्षीं, नास्तिकपणा, मूर्तीपूजा व अनीति यांच्या दुर्गंधावर धूळ घातली व तीं लपविलीं कीं, जेणेंकरून त्याची फजिती जाहीर होऊं नये.

(३) परमेश्वरानें चमत्कारापरीं पर्वतांतून एक सांढणी काढिली होती व लोकांस सालेह पैगंबराद्वारें समजावून दिलें होतें कीं, तिची अदब ताजीम करा; व तिला कोणा तऱ्हेची इजा देऊं नका व तिच्या चरण्या व पाणी पिण्याच्या कोणीहि आड येऊं नये. परंतु त्यांच्यांतूनच कुदार बिन सालिफ नांवाच्या एका पापी चंडाळानें त्या सांढणीच्या घोंडशिरा कापून तिला मारून टाकिलें. त्याच्या अविचारीपणामुळें एका सांढणीच्याऐवजीं तुरीबरोबर बरड चिरडला जातो त्याप्रमाणें साऱ्या लोकांस शिक्षा भोगावी लागली.

# अध्याय ९२ वा.

## सूरतुल्-लैल्.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत २१ आयात–महावाक्यें आहेत. ह्यांतील 'लैल' ह्मणजे रात्र या पहिल्या शब्दावरून हें नांव देण्यांत आलें.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों)**

**रात्रीची शपथ कीं जेव्हां ती (सर्व वस्तूंवर) आच्छादिते, १. आणि दिवसाची (शपथ) कीं, जेव्हां तो फटफटीत उजाडतो, २. आणि ज्यानें नर व मादी निर्माण केली त्याची (शपथ), ३. कीं निःसंशय, तुम्हां लोकांचे प्रयत्न अर्थात् भिन्न भिन्न (तऱ्हेचे) होत. ४. तर ज्यानें (परमार्थांत) दिलें व पवित्राचरणाचा बाणा पत्करला, ५. आणि सर्वोत्तम गोष्टीला (म्हणजे इस्लाम धर्माला) सत्य जाणिलें, ६. तर त्याच्यासाठीं आम्हीं सौख्याची जागा (म्हणजे स्वर्गांत पोहोंचण्याचा मार्ग)सुलभ करून टाकूं. ७. आणि ज्यानें (परमार्थांत) देण्यांत लोभ केला व (परलोकींची)पर्वा केली नाहीं.८. आणि सर्वोत्तम गोष्टीला(म्हणजे इस्लाम धर्माला)पाखंड जाणिलें; ९. तर त्याच्यासाठीं आम्हीं कष्टाची जागा(म्हणजे नरकांत पोहोंचण्याचा मार्ग) सुलभ करून देऊं; १०. आणि**

---

(१) भावार्थ हा आहे कीं, बरे व वाईट हे दोघेहि आपापल्यापरीनें कर्म आचरीत राहतात. बऱ्याचा परिणाम स्वर्ग आहे व वाईटाचा परिणाम नरक. ज्याच्या नशीबीं स्वर्ग आहे तो सहजगत्या चांगलें कर्म करीत राहतो; आणि ज्याच्या दैवीं नरक आहे तो सहजरीतीनें वाईट कर्म करीत राहतो. पाहण्यांतहि असेंच येतें कीं, चांगल्या लोकांस वाईट कर्में करणें म्हणजे मोठें संकट वाटतें, व ते चांगलीं कामें खुशी खुशीनें करतात. याच्या उलट वाईट लोकांची स्थिति असते. सारांश, स्वर्गीय व नरकवासी यांचीं उघड उघड चिन्हें बरीं व वाईट कर्में होत.

जेव्हां तो नरकांत जाऊन पडेल, तेव्हां त्याचें द्रव्य त्याच्या कांहींच कामा येणार नाहीं. ११. आमचेकडे तर सन्मार्ग दाखवून देणें होय; १२. आणि परलोक व इहलोक (दोन्हीं) अर्थात् आमच्याच अखत्यारांत होत. १३. म्हणून (लोकांनों !) मी तुम्हांस (नरकाच्या) धगधगीत अग्नीपासून भिवविलें आहे. १४. त्यांत तोच दुर्दैवी (चंडाळ) दाखल होईल, १५. कीं, जो (जगांत सद्धर्मास) पाखंड म्हणीत व (त्याकडून) तोंड फिरवीत राहिला. १६. आणि जो मोठा पवित्राचरणी होय तो त्या (अग्नी)पासून दूरच दूर ठेविला जाईल; १७. तो असा (मनाचा उदार) होय कीं, आपलें द्रव्य (परमार्थांत) देतो कीं, जेणेंकरून (त्याचा जीव लोभाच्या दोषापासून) शुचिर्भूत होईल १८. आणि कोणाचा त्याच्यावर कांहीं उपकार नाहीं कीं (या देण्यानें त्याला) त्याची फेड करावयाची असेल; १९. पण त्याला तर आपल्या परात्पर पालनकर्त्याची मर्जी संपादन करावयाची आहे एवढेंच. २०. आणि (परमेश्वर त्याला) अवश्य प्रसन्नहि होईल. २१.

(१) जो मनुष्य इहलोक इच्छील त्याला इहलोक देऊं; आणि जो परलोक इच्छील त्याला परलोक देऊं. जो दोहोंचा अभिलाषी असेल त्याला दोन्हीं देऊं.

# अध्याय ९३ वा.

## सूरतु-द्दुहा.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ११ आयात-महावाक्यें आहेत. हजरत मोहंमद पैगंबर साहेब-सल्लल्लाहो अलैहे व सल्लम-परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांति देवो-यांस कित्येक दिवस कुराणाचें प्रकटीकरण झालें नव्हतें म्हणून नास्तिकांनीं त्यांची चेष्टा व अवहेलना सुरू केली कीं, मोहंमदला त्याच्या पालनकर्त्यानें सोडून दिलें व तो त्यांशीं बेजार झाला. त्या चेष्टेच्या उत्तरादाखल हा अध्याय प्रकट झाला. याचें नांव 'दुहा' ह्मणजे चढता दिवस म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण. यांत प्रथमच्च आलेल्या 'दुहा' या शब्दावरून पडलें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों.)

(हे पैगंबरा ! मला) चढत्या दिवसाची शपथ, १. आणि रात्रीची (शपथ) कीं जेव्हां ती (वस्तुमात्रावर) आच्छादित्ये; २. कीं तुझ्या पालनकर्त्यानें तुला सोडिलें नाहीं व तो (तुझ्याशीं कांहीं) नाखुषहि नाहीं. ३. आणि अर्थात् परलोक तुझ्यासाठीं (या) इहलोकापेक्षांहि उत्तम होय. ४. आणि तुझा पालनकर्ता पुढें तुला इतकें देईल कीं, तूंहि खुष होऊन जाशील. ५. कां तो तुला एक अनाथ बालक पावला नाहीं ? (म्हणजे पावला.)मग त्यानें थारा[1] दिला. ६. आणि त्यानें तुला पाहिलें कीं, (सन्मार्गाचे शोधांत भटकत) भटकत (फिरत) आहेस; म्हणून त्यानें तुला (इस्लामधर्माचा) सरळ मार्ग दाखविला. ७. आणि तो तुला गरीब पावला; म्हणून त्यानें श्रीमंत[2] करून टाकिलें. ८. तर (या देणग्यांच्या उपकारस्तुत्यर्थ) अनाथावर (कोणाहि तऱ्हेचा) जुलूम करूं नकोस. ९. आणि याचकास झिडकी देऊं नकोस. १०. आणि (लोकांत) आपल्या पालनकर्त्याच्या उपकाराचा उल्लेख करीत राहा. (कीं हीहि उपकारस्तुतीची एक रीत होय). ११.

(१) म्हणजे प्रथमत: हजरत पैगंबरांचे पितामह अबदुल्-मुत्तलिब यांच्या येथें व मग चुलते अबुतालिब यांच्या येथें थारा दिला. तें असें कीं,हजरत पैगंबर साहेब अजून आईच्या पोटांतच होते कीं, त्यांचे पिता अबदुल्ला हे निवर्तले; तेव्हां त्यांचें त्यांच्या आजानें पालनपोषण केलें; व मग आजाच्या मरणानंतर त्यांच्या चुलत्यानें त्यांना पाळिलें.

(२) हजरत पैगंबर साहेबांची श्रीमंती जिचा उपकार परमेश्वरानें त्यांस आठवून दिला ती याप्रमाणें झाली; कीं बीबी खदीजतुल्-कुब्रा म्हणून एक कुलीन व श्रीमंत बाई होत्या. त्या विधवा होत्या व त्यांचा सिरीया देशाशीं व्यापारउदीम होत असे. त्यांनीं हजरत पैगंबरसाहेबांचें सत्यत्व व प्रामाणिकपणा यांची प्रसिद्धी ऐकिली होती; म्हणून त्यांनीं त्यांस काफल्याचा सरदार बनवून सिरीया देशाकडे पाठविलें. परमेश्वरानें त्यांच्या त्या व्यापारांत बरकत व भरभराट दिली. शिवाय बीबी खदीजतुल्-कुब्रा यांनीं हजरत पैगंबर साहेबांशीं विवाह लावून घेतला. ह्याप्रमाणें पैगंबर साहेबांची गरीबी व दैन्यावस्था दूर झाली. हीच त्यांची श्रीमंती होती.

# अध्याय ९४ वा.

## सूरतुल्--इन्शिराह्.

हा अध्याय मक्का शहरीं प्रकट झाला. यांत ८ आयात-महावाक्यें आहेत. याचें नांव 'इन्शिराह' म्हणजे उघडणें किंवा चिरणें असें आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों.)**

**(हे पैगंबरा !) कां आम्हीं तुझा हिय्या उघडला नाहीं ? (म्हणजे उघडला.) १. आणि (याशिवाय) आम्हीं तुझ्यावरून तुझें ओझें**

(१) हिय्या उघडण्याचा अर्थ हा आहे कीं, ईश्वरी संदेश पोहोंचविणें हें कांहीं सोपें काम नव्हतें. हजरत पैगंबर साहेबांनीं आपलें काम अशा लोकांत सुरू केलें कीं, जे त्याकाळीं अज्ञानी, अल्लड, क्रूरस्वभावाचे, भांडखोर आणि संस्कृती व सभ्याचाराचे दृष्टीनें फारच खालावलेल्या स्थितींत होते. अशा लोकांस सन्मार्गावर आणणें ह्मणजे फार मुष्किलीचें होतें. ज्यानें इस्लामधर्माचा प्राथमिक इतिहास वाचला असेल तोच हजरत पैगंबर साहेबांवर इस्लामचा प्रचार करण्यांत जीं जीं संकटें आलीं त्यांचा कांहीं अंदाज करूं शकतो. त्यांना एकीकडे धमक्या दिल्या जात होत्या व एकीकडे लालूच दाखविली जात होती; जिवें मारून टाकण्याच्या खटपटीहि केल्या जात होत्या त्या वेगळ्याच. हा हजरत पैगंबरसाहेबांचाच हिय्या होता कीं, आपल्या इरादावर दृढ जमून राहिले व आपल्या आयुष्यांतच सर्व अरबी द्वीपकल्पास मुसलमान म्हणजे ईश्वराज्ञाधीन बनविलें. येथें ऊर या शब्दाचा अर्थ आम्हीं हिय्या केला आहे. तर फारच लहानपणीं अथवा 'मेराज' म्हणजे आकाशारोहणाच्या वेळीं हजरत मोहंमद पैगंबरांचें अंत:करण जिब्रील दूतानें चिरलें होतें व त्यांतून काळ्या रक्ताचा थेंब अथवा पापाचें बीज धुवून काढून साफ केलें होतें; व त्यांत दिव्य ज्ञान व विश्वास भरला होता. परंतु कित्येक लोक बाल्यावस्थेच्या ह्या पहिल्या वृत्तांताकडे इषारत आहे असें समजतात. यावरून हेंहि सिद्ध होतें कीं, हजरत पैगंबर साहेब निष्पाप होते. याशिवाय पाप म्हणजे ईश्वराज्ञोल्लंघन हें त्यांनीं कधींहि केलें नाहीं; म्हणूनहि ते निष्पाप होते यांत शंका नाहीं.

उतरून टाकिलें; २. कीं त्यानें तुझी कंबर मोडून टाकिली होती. ३. आणि आम्हीं तुजसाठीं तुझा नांवलौकिक वाढविला. ४. तर निःसंशय संकटाबरोबर सौख्य¹ होय. ५. निःसंशय संकटाबरोबर सौख्य होय. ६ तर आतां ज्या अर्थीं तूं (या भानगडींतून) मोकळा झाला आहेस, त्या अर्थीं तूं (ईश्वरोपासनेसाठीं) कष्ट घे; ७. आणि आपल्या पालनकर्त्याकडे एकाग्रचित्त होऊन वळ. ८.

(१) येथें 'संकटाबरोबर सौख्य होय' हें वाक्य दोनदां आलें आहे. तर पहिल्या वाक्याचा सिद्धांत इहलौकिक व्यवहारासंबंधीं आहे व दुसऱ्या वाक्याचा अर्थ इहलौकिक संकट व अडचणी सहन केल्यानें पारलौकिक सौख्य सहजच प्राप्त होतें असा आहे.

## अध्याय ९५ वा.

# सूरतु-त्तीन.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ८ आयात–महावाक्यें आहेत. याचें नांव 'सूरतु-त्तीन' म्हणजे अंजीरचें प्रकरण असें आहे.

**परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मीं आरंभ करितों).**

अंजीरा(च्या फळा)ची व 'जैतून'(जीतवृक्षा)ची शपथ, १. आणि 'तूरे सीनीन' (पर्वता)ची २. आणि हें ('मक्का') शहर कीं, ज्यांत (हरतऱ्हेची) शांतता होय त्याची शपथ; ३. कीं आम्हीं माणसाला उत्तमांत उत्तम घटनेंत निर्माण केलें. ४. मग आम्हीं त्याला (वृद्ध करून) खडतरांत अति खडतर अवस्थेंत पालटून नेलें. ५. परंतु ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केलीं; (त्यांनीं खडतर अवस्थेकडून दिलगीर होऊं नये; कारण,) त्यांच्यासाठीं (परलोकीं)

**अपरंपार मोबदला होय. ६. तर (हे पैगंबरा ! आतां) कोण (असा) आहे कीं जो या(सर्व गोष्टी जाणिल्या)नंतर निर्णया(च्या दिवसा) संबंधानें तुला पाखंडी समजेल ? ७. कां परमेश्वर सर्व अधिकाऱ्यांत मोठा अधिकारी (व समर्थ) नव्हे ? (तर पुनरुत्थानास नाकारणारे त्याला कां भीत नाहींत ?) ८.**

(१) भावार्थ हा कीं, माणसाची घटना किंवा रचना इतर सर्व सृष्टीच्या घटनेपेक्षां उत्कृष्ट व सुंदर आहे. परंतु वृद्ध झाल्यावर त्याची सारी खुबी नाहींशी होते. तर हें स्थित्यंतर जें माणसांत होतें तें परमेश्वराच्या आज्ञेनेंच होतें ह्मणून जो परमेश्वर हें करण्यास समर्थ आहे तो माणसाला पुनरुत्थानांत पुन्हां सजीव करून त्याच्या कर्मांचा मोबदला अवश्यच देईल. एवंच माणसाला याची नाकारणी करण्यास जागाच नाहीं. कमजोरी व ह्मातारपणाची अवस्था ही बरे वाईट सर्वांनाच येते; तरीहि चांगल्यासाठीं त्यांत एक प्रकारचें समाधान असतें कीं परलोकीं त्याला चांगल्या कर्मांचा चांगला मोबदला मिळेल. पण नास्तिकाला हें समाधानहि प्राप्त होत नाहीं. त्यानें इहलोक व परलोक दोन्हीं घालवले. हदीस म्हणजे पैगंबर साहेबांच्या वचनसंग्रहांत आलें आहे कीं, जो कोणी हा अध्याय वाचील त्यानें शेवटीं हेंहि वाचावें, 'बला व अना अला जालिका मिनश्शाहिदीन' म्हणजे, निःसंशय तो अवश्य सर्वाधिकारी आहे व मी या गोष्टीचा साक्षी आहें.

## अध्याय ९६ वा.

## सूरतुल्-अलक्.

हा अध्याय मक्का शहरांत हजरत मोहंमद पैगंबर साहेब हिरा नांवाच्या गुहेंत पैगंबरी अधिकार प्राप्त होण्याच्या पूर्वी एकांतवासांत ईश्वरोपासना करीत होते त्यावेळीं त्यांस प्रकट झाला. ह्यांतील पहिलीं पांच महावाक्यें सर्वांत प्रथम प्रकट झालीं. याचें नांव 'अलक्' ह्मणजे मांसाचा गोळा असें यांत आलेल्या 'अलक' शब्दावरून पडलें. यांत १९ आयात-महावाक्यें आहेत.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

(हे पैगंबरा! कुराण जें वेळोवेळीं तुला प्रकट होईल तें) तूं आपला पालनकर्ता कीं ज्यानें (सर्व सृष्टि) निर्माण केली त्याचें नांव घेऊन वाचीत जा; १. (त्यानें) माणसाला मांसाच्या गोळ्यांतून बनविलें. २. (कुराण) वाचीत जा; आणि (परमेश्वरावर भरंवसा ठेव कीं) तुझा पालनकर्ता फार उदार होय; ३. कीं ज्यानें (माणसाला) लेखणीद्वारें विद्या शिकविली. ४. (त्यानें प्रकटीकरणाद्वारेंहि) माणसाला ज्या माहीत नव्हत्या अशा गोष्टी शिकविल्या. ५. तथापि माणूस (असा होय कीं, तो) आपणाला निरपेक्ष समजून (आभाराच्या ऐवजीं परमेश्वराशीं उलट) शिरजोरी करितो. ६-७. (हे पैगंबरा!) निःसंशय, (या सर्वांस) तुझ्या पालनकर्त्याकडे परतून जाणें आहे. ८. (हे पैगंबरा!) तूं त्या (मनुष्याच्या स्थिती)चेंहि अवलोकन केलेंस कीं, जो (आमचा एक) सेवक जेव्हां नमाज पढावयास उभा राहतो तेव्हां त्याला मनाई करितो? ९-१०. बरें

---

(१) हीं पहिलीं पांच महावाक्यें हजरत पैगंबर साहेबांस प्रथम प्रकट झालीं. ह्यांतील शेवटच्या महावाक्यांत परात्पर परमेश्वरानें शिक्षणाची दोन साधनें सांगितलीं आहेत; एक पुस्तकी शिक्षण कीं जें लेखणीद्वारें होतें, दुसरें 'लदुन्नी' म्हणजे प्रणवरूपानें होणारें शिक्षण; याला वह्य म्हणजे प्रकटीकरणहि म्हणतात. तें प्रथम पैगंबरास लाभतें. व मग पैगंबराद्वारें इतर लोकांस माहीत होतें. सारांश हा कीं, कुराणाचें हजरत पैगंबरांस प्रकट होणें हें पुस्तकी शिक्षण नव्हे तर तें 'लदुन्नी' म्हणजे दिव्य प्रणवरूपाचें शिक्षण होय.

(२) मतलब हा कीं, 'वह्य'—प्रकटीकरणाद्वारें परमेश्वर आपली मर्जी मानवास प्रगट करितो. कारण, जरी तें फक्त पैगंबरासच प्रकट होतें तरी सर्व मानवासाठींहि ती सामान्य देणगी होय. म्हणून सर्वांनीं परमेश्वराचे आभार मानिले पाहिजेत. परंतु आभाराऐवजीं पुष्कळ लोक आज्ञोल्लंघन करतात. या महावाक्यांत तेच लोक उद्दिष्ट होत.

(३) येथून शेवटपर्यंत अबूजहल जो हजरत पैगंबराचा कट्टा शत्रु होता त्याच्याकडे इशारा आहे. तो पैगंबराचा आप्त होता; परंतु तो त्यांना नमाज पढण्यास मनाई करीत होता व धमकया देत होता कीं, जर तुम्ही या

पाहा तर, (खरें) जर (हा मनुष्य खुद्द) सन्मार्गावर आहे; ११. अगर तो (जसें समजतो तसें लोकांस) पवित्राचरण शिकवितो. १२. बरें पाहा तर (खरें) जर हा (मनुष्य ईश्वरवाणीस) पाखंड म्हणतो व (सद्धर्मांकडून) तोंड फिरवितो. १३. तर (कांहीं झालें तरी) का त्याला (इतकीहि गोष्ट) माहीत नाहीं कीं (दोन्हीं स्थितींत) परमेश्वर त्याला पाहतो आहे. १४. पाहाहो! जर तो (आपल्या कृत्यांपासून) पराङ्मुख न होईल तर आम्हीं त्याचें झुलूप धरून फरफटत ओढूं; १५. (म्हणजे) त्या लबाड पापी (चंडाळा)चें झुलूप. १६. तर त्याला पाहिजे कीं, त्यानें आपले सल्लागार (ज्यांच्यावर तो उड्या मारितो त्यांना आपल्या कुमकेसाठीं) बोलावून घ्यावें. १७. (तसेंच) आम्हींहि (आपल्या) जलाद दूतांस(त्याच्या पारिपत्यासाठीं) बोलावून घेऊं. १८. पाहा! तूं त्याचा कह्या (मुळींच) मानूं नकोस व (बिनधोक परमेश्वरापुढें) साष्टांग नमस्कार घाल (म्हणजे नमाज पढ) व (त्याचें) सान्निध्य प्राप्त कर. १९.

---

नव्या पद्धतीनें उपासना कराल तर मी आपल्या सोबत्यांस आणून तुमच्या मानेवर चढवीन. एकदां हजरत पैगंबर साहेब नमाज पढीत आहेत असें पाहून त्यानें हा दुष्ट विचार मनांत आणिला; तोंच तो घाबरून पळूं लागला. लोकांनीं विचारल्यावरून म्हणाला कीं, मी आपल्या व मोहंमदच्या दर्म्यान एक मोठा अग्नीचा खाडा पाहिला व त्याच्या संरक्षणास्तव एक प्रचंड सैन्यहि पाहिलें. परिणाम हा झाला कीं, तो बद्रच्या लढाईंत मारला गेला. व त्याला फरफटत ओढीत इतर मड्यां बरोबर एका खाड्यांत टाकून दिलें गेलें; आणि त्याच्यासंबंधानें कुराणांतील भविष्य पूर्ण झालें.

# अध्याय ९७ वा.

## सूरतुल्-कद्र.

हा अध्याय मक्केंत प्रकट झाला. यांत ५ आयात-महावाक्यें आहेत. याचें 'अल्-कद्र' म्हणजे महत्व, प्रतिष्ठा, अंदाज व ईश्वरी हुकूम वगैरे, असें नांव झालें.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचे नांवानें (मी आरंभ करितों).

आम्हीं कुराणा(च्या प्रथम प्रकटीकरणा)ला 'कद्र'च्या रात्रींत उतारिलें. १. आणि (हे पैगंबरा !) तूं काय समजलास कीं, 'कद्र'ची[2] रात्र म्हणजे काय? २. 'कद्र'ची रात्र (पुण्यप्रसादांत) हजार महिन्यापेक्षांहि उत्तम होय. ३. त्या रात्रीं (पुढील सालाच्या) प्रत्येक व्यवस्थेसाठीं देवदूत व 'जिब्रील' हे आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेनें (पृथ्वीवर) उतरतात. ४. ती (रात्र अभय व) शांति(ची रात्र) होय; (व) ती (म्हणजे तिचें पुण्य व समृद्धि) अरुणोदयापर्यंत[2] (राहत) असते. ५.

(१) याचे दोन अर्थ होऊं शकतात; एक तर जो आम्हीं भाषांतरांत पत्करला तो. दुसरा हा कीं, त्या रात्रीं कुराण एकदांच 'लौहिमहफूज' मधून खालील आकाशांत उतरलें व मग तेथून अंशतः अंशतः प्रकट होत राहिलें.

(२) 'कद्र'च्या रात्रीसंबंधानें २५ व्या भागांत 'सूरतु–दुखान' मध्यें आम्हीं जी टीप दिली आहे ती पहावी.

# अध्याय ९८ वा.

## सूरतुल्–बय्यनः

हा अध्याय मदिनेंत प्रकट झाला. यांत ८ आयात–महावाक्यें आहेत. याचें नांव 'बय्यनः' म्हणजे स्पष्ट प्रमाण हें होय.

परम दयाळू (आणि) कृपाळू परमेश्वराचें नांवानें (मी आरंभ करितों.)

ग्रंथधारी लोकांपैकीं व मूर्तिपूजकांपैकीं जे लोक (सद्धर्मास म्हणजे इस्लामास) मानीत नाहींत ते आपल्यापाशीं एखादें स्पष्ट प्रमाण येऊन पोहोंचेपर्यंत (आपल्या पूर्वधर्मापासून) डळमळणार नव्हते. १.

# पवित्र कुराणाची अदब मर्यादा राखण्याविषयींचे नियम.

१ **जुनुब** म्हणजे शरीअत–शास्त्रा–प्रमाणें ज्याला स्नान करणें आवश्यक आहे तो किंवा ती, **हाइझ** म्हणजे जी स्त्री ऋतुस्त्रावांत आहे ती, **नफसा** म्हणजे ज्या स्त्रीला मुल झालें आहे व ती अद्याप ऋतुमति आहे अशांसाठीं जाणून बुजून पवित्र कुराण वाचणें हराम म्हणजे निषिद्ध आहे.

**अपवाद (अ)** ज्या आयात–महावाक्यांत दुआ–प्रार्थना असेल त्यांना प्रार्थनादाखल वाचण्यास हरकत नाहीं.

**( आ )** तसेंच खुशालीचा समाचार ऐकून परमेश्वराचे आभार मानून 'अल्हम्दो लिल्लाहे रब्बिल आलमीन' म्हणणें, किंवा दुःख व शोक यांचा समाचार ऐकून 'इन्ना-लिल्लाहे व इन्ना इलैहे राजेऊन' म्हणणें यांची पण परवानगी आहे.

**( इ )** कुराण वाचणारी स्त्री ऋतुमति असतांना एक एक शब्द वेगळा वेगळा करून म्हणजे हिज्जे करून कुराण शरीफ वाचूं शकतये.

( २ ) **जुनुब, हाइझ** आणि **नफसा** यांसाठीं कुराण वाचण्याची अथवा त्याला स्पर्श करण्याची मनाई आहे. मग पाहिजे तर तें अरबी शिवाय इतर भाषेंत लिहिलेलें कां असेना.

( ३ ) कुराण शरीफ जर वेगळें गिलाफांत-जुजदानांत असेल तर ह्या लोकांनीं तें उचलल्यास हरकत नाहीं.

**नोटः**– ( १ ) कुराणास लावलेल्या पुठ्ठ्यास जुजदान–गिलाफ म्हणतां येणार नाहीं. म्हणून बांधलेल्या कुराणास वेगळ्या गिलाफा वांचून हात लावणें दुरुस्त नाहीं.

( २ ) कुराणाचा तो भाग कीं जेथें अक्षरें लिहिलेलीं नाहींत (म्हणजे ओळींच्या मधली जागा अथवा बार्डर ) त्याचाही कुराणांतच समावेश होतो.

( ४ ) कुराणाला वजू केल्यावांचून उचलणें किंवा हात लावणें हराम-निषिद्ध आहे.

**अपवाद** ( अ ) कुराण शरीफ जर जुजदानांत अथवा पाकिटांत असेल तर तें उचलण्याची मुभा आहे.

( आ ) कुराणास हात लावल्यावांचून वजू केल्याशिवाय तोंडी वाचण्यास हरकत नाहीं.

( इ ) बेवजू मनुष्य कोणा वस्तुद्वारें कुराणाचीं पानें फिरवील तर कांहीं हरकत नाहीं.

( ५ ) जर जुनुब ( ज्याला स्नान करणें अगत्याचें आहे तो ) तोंडांत पाणी घेऊन तोंड साफ करील व कुराण तोंडी वाचूं पाहील तर तें दुरुस्त नाहीं.

( ६ ) जुनुब अथवा वजू न केलेला मनुष्य मात्र हात धुवून कुराणास स्पर्श करण्यास किंवा उचलण्यास इच्छील तर तें पण दुरुस्त नाहीं.

( ७ ) डोळ्यावर जनाबत—नापाकीचा परिणाम होत नाहीं म्हणून तशा स्थितींत डोळ्यांनीं पाहूनच मात्र कुराण वाचण्यास हरकत नाहीं.

( ८ ) अस्तनीद्वारें बेवजू माणसानें कुराणास हात लावणें ( सही रिवायतप्रमाणें ) मकरूह् म्हणजे नापसंत काम आहे.

( ९ ) अंगावर नेसलेल्या कापडाद्वारें बेवजू माणसानें कुराणास हात लावणें मकरूह् आहे.

( १० ) गिलाफ म्हणजे जी वस्तु कुराणापासून वेगळी असेल व शरीरावर नेसलेली नसेल ती; उदाहरणार्थ जुजदान, थैली, पेटी, बॅग वगैरे.

( ११ ) मुलें वजूवांचून कुराणास हात लावतील तर हरकत नाहीं.

( १२ ) वजूवांचून मुलांना कुराण देणें किंवा त्यांच्यापासून घेणें यांत कांहीं दोष नाहीं.

( १३ ) वजूवांचूनच्या माणसानें कुराण लिहिणें त्यावेळीं मकरूह आहे, कीं जेव्हां ज्या कागदावर कुराण लिहिलें जात आहे त्या कागदाला त्याचा हात स्पर्श करीत असेल.

(१४) ज्या कागदावर कुराण लिहिलें असेल त्या कागदाला लिहिणाऱ्यांचा हात स्पर्श करीत नसेल तर मात्र अशा स्थितींत कुराण लिहिण्यास हरकत नाहीं.

(१५) कुराणशरीफची तफसीर–टीका व भाषांतर मूळ कुराणासह लिहिलेलें असेल तर तें वजूवांचून शिवणें मकरूह आहे.

(१६) कुराणशरीफची तफसीर अथवा त्याचें भाषांतर मूळ कुराणासह लिहिलेलें नसेल तर त्याला वजूवांचून हात लावण्यास हरकत नाहीं.

(१७) काफिर–नास्तिकास मूळ कुराणास शिवण्याची मनाई केली पाहिजे. परंतु त्याला तोंडीं शिक्षण देण्यास हरकत नाहीं.

(१८) कुराणास कारणावांचून डोक्याखालीं ठेवणें मकरूह आहे. परंतु त्याचें रक्षण करण्यासाठीं ठेवल्यास अडचण नाहीं.

(१९) ज्या ताईतांत कुराणाचीं महावाक्यें लिहिलीं आहेत तें जाजरु म्हणजे शौचकूपांत जवळ ठेवणें अथवा बरोबर घेऊन जाणें दुरुस्त नाहीं.

(२०) ताईत जर वेगळ्या गिलाफांत असेल व त्याला तें चिकटलेलें नसेल तर तें जवळ ठेवतां येईल.

(२१) अशा ताईतास ज्याच्यावर गिलाफ असेल, जुनुब अथवा बेवजू मनुष्य हात लावील अथवा उचलील तर तें मकरूह नाहीं.

(२२) कुराणाच्या वरतीं इतर पुस्तकें ठेवणें बेअदबी आहे.

(२३) सर्वांत वरतीं कुराणशरीफ त्यानंतर तफसीर अथवा भाषांतर ठेवलें पाहिजे; याच्या उलट करणें बेअदबी आहे.

(२४) कुराणशरीफ जुनें झालें असेल अथवा वाचण्यासारखें राहिलें नसेल तेव्हां तें कोणा पाक व स्वच्छ कापडांत गुंडाळून मुसलमानाच्या प्रेतासारखें कोणा पाक व सुरक्षित जागीं लहद-खाडा खोदून त्यांत गाडून टाकलें पाहिजे.

( २५ ) तफसीर अथवा भाषांतरही जुनें होईल तेव्हां वर लिहिल्या प्रमाणें गाडून टाकणें आवश्यक होय.

( २६ ) तफसीर व भाषांतर जुनें होऊन गेल्यावर वाहत्या पाण्यांत अथवा नदींत टाकून दिलें तर कांहीं हरकत नाहीं.

( २७ ) तफसीर अथवा भाषांतर मूळासह त्यांतील परमेश्वराचीं नांवें तशींच पैगंबरांचीं व देवदूत–फिरस्त्यांचीं नांवें मिटवून बाकीचा भाग जाळून टाकण्यांत आल्यास हरकत नाहीं.

**सूचना:**–आकाश आणि पृथ्वी व त्यांत जितक्या वस्तु आहेत त्या सर्वांपेक्षां परमेश्वराला पवित्र कुराण जास्त प्रिय आहे; त्याचें वाचन करणें परमेश्वराबरोबर संभाषण केल्यासारखें आहे; म्हणून तें वाचतांना हाच विचार ठेविला पाहिजे कीं, मी ईश्वरी दरबारांत हजर असून अल्लाह बरोबर बोलत आहें. यास्तव त्याला पाहिजे आहे कीं त्यानें स्वच्छ होऊन स्वच्छ जागीं वाचावें; आणि त्या वेळीं स्वच्छ कपडे घालून **किब्ला** याकडे तोंड फिरवून वाचणें फारच उत्तम व आशिर्वाददायक व बरकतीचें काम आहे.

कुराणशरीफ नमाजींत उभे राहून वाचणें जास्त श्रेयस्कर आहे. परंतु बसून अथवा तसें न होऊं शकल्यास निजून वाचणें दुरुस्त आहे; आणि नमाजीच्या बाहेर वाचावयाचें असल्यास उत्तम हें आहे कीं स्वच्छ होऊन किब्ल्याकडे तोंड करून बसावें आणि कुराणशरीफ उंच जागीं ठेवून वाचावें.

( सही )–**मौलवी मोहमद रहिमुद्दीन**
**नायबे मुफ्ती**— सदारते आलीया
सरकारे आली निजाम हैदराबाद.

" श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस, " ३६४ ठाकुरद्वार मुंबई नं० २.

# पवित्र कुराणाची अदब मर्यादा राखण्याविषयींचे नियम.

१ जुनुब म्हणजे शरीअत–शास्त्रा–प्रमाणें ज्याला स्नान करणें आवश्यक आहे तो किंवा ती, हाइझ म्हणजे जी स्त्री ऋतुस्रावांत आहे ती, नफसा म्हणजे ज्या स्त्रीला मुल झालें आहे व ती अद्याप ऋतुमति आहे अशांसाठीं जाणून बुजून पवित्र कुराण वाचणें हराम म्हणजे निषिद्ध आहे.

**अपवाद (अ)** ज्या आयात–महावाक्यांत दुआ–प्रार्थना असेल त्यांना प्रार्थनादाखल वाचण्यास हरकत नाहीं.

(आ) तसेंच खुशालीचा समाचार ऐकून परमेश्वराचे आभार मानून 'अल्हम्दो लिल्लाहे रब्बिल आलमीन' म्हणणें, किंवा दुःख व शोक यांचा समाचार ऐकून 'इन्ना-लिल्लाहे व इन्ना इलैहे राजेऊन' म्हणणें यांची पण परवानगी आहे.

(इ) कुराण वाचणारी स्त्री ऋतुमति असतांना एक एक शब्द वेगळा वेगळा करून म्हणजे हिज्जे करून कुराण शरीफ वाचूं शकत्ये.

(२) जुनुब, हाइझ आणि नफसा यांसाठीं कुराण वाचण्याची अथवा त्याला स्पर्श करण्याची मनाई आहे. मग पाहिजे तर तें अरबी शिवाय इतर भाषेंत लिहिलेलें कां असेना.

(३) कुराण शरीफ जर वेगळें गिलाफांत-जुजदानांत असेल तर ह्या लोकांनीं तें उचलल्यास हरकत नाहीं.

**नोट:–** (१) कुराणास लावलेल्या पुठ्यास जुजदान–गिलाफ म्हणतां येणार नाहीं. म्हणून बांधलेल्या कुराणास वेगळ्या गिलाफा वांचून हात लावणें दुरुस्त नाहीं.

(२) कुराणाचा तो भाग कीं जेथें अक्षरें लिहिलेलीं नाहींत (म्हणजे ओळींच्या मधली जागा अथवा बार्डर) त्याचाही कुराणांतच समावेश होतो.